
॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥ 784

श्रीज्ञानेश्वरी-गूढार्थदीपिका



गीताप्रेस, गोरखपुर



अर्जुनको उपदेश



कृपासिन्धु भगवान् श्रीकृष्ण

॥ श्रीहरि: ॥

प्रकाशकीय निवेदन

वेद अपौरुषेय आहेत, परमात्म्याच्या नि:श्वासरूप आहेत. ते ज्ञानाचे अक्षय आणि अगाध भांडार आहेत. वेदवेद्य परमात्मा आणि वेद दोन्ही ब्रह्मस्वरूपच आहेत. म्हणून वेद हे ब्रह्माहून भिन्न नाहीत. म्हणून वेदार्थ ही अपौरुषेय असून पूर्णरूपाने भगवत्कृपा साध्य आहे. परमात्म्याच्या परम अनुग्रहानेच वेदार्थाचा बोध होत असतो. त्याचप्रकारे भगवान् श्रीकृष्णाच्या पावन वार्णातून नि:सृत गीता ही वेदार्थ असल्याने अपौरुषेय आहे. गीता आणि परमात्मा दोन्ही अभिन्न आहेत. गीतेच्या कृपेनें परमात्म्याचा आणि परमात्म्याच्या कृपेने गीतार्थाचा बोध होतो. गीता स्वत: भगवंताची वाङ्मयीन मूर्ती आहे, प्रासदिक आहे आणि भक्तवांछाकल्पतरु आहे स्वत: भगवंतांनीच अर्जुनाला निमित्त बनवून लोककल्याणाच्या हेतूनें तिचे प्रकाशन केले आहे. गीतेच्या अर्थाचा विस्तारही भगवान् स्वत:च करीत असतात—**'तस्यात्मानुग्रहाभावेऽपि भूतानुग्रहप्रयोजनं ज्ञानधर्मोपदेशेन कल्पप्रलयमहाप्रलयेषु संसारिण: उद्धरिष्यामीति'**। (योगभाष्य) भगवंताच्या अनुग्रहाने अनादिकालापासून भूतानुग्रह होत राहीला आहे. अर्थात् सृष्टिच्या आदिकालापासून भगवान् अनेक रूपानें अनुग्रह करीत आले आहेत. अशा प्रकारें अनुग्रह करणें ही पण भगवंताची विवशता अगतिकता आहे कारण अनुग्रह केल्यावाचून ते राहूच शकत नाहीत.

पतित मनुष्य आणि मानवतेचा उद्धार करण्यासाठीं संत आणि भगवंत दोघांचे अवतार होत असतात. संत म्हणजे भगवंताचा प्रेममय विग्रहच असतात. अर्थात् भगवान् स्वत:च भक्त बनून प्रेमाचे आस्वादन करीत आणि करवीत असतात. तेच अर्जुन आणि श्रीकृष्ण दोन्ही रूपांत अभिव्यक्त झाले. म्हणून गीतेचा वक्ता, श्रोता आणि गीता तीन्ही भगवानच आहेत. म्हणून गीता ही विश्व-संस्कृतिचा खजिना आहे आध्यात्मिक जीवनाचा दिव्य संदेश आहे, संपूर्ण मानव जातिचा धर्मग्रंथ आहे, उपनिषद् आहे ज्ञानाचा उज्ज्वल प्रदीप आहे, ब्रह्मविद्या आहे, योगशास्त्र आहे, नर-नारायण याचां संवाद आहे तसेच भगवत् साक्षात्काराचे द्वार आहे.

भगवानच गीतार्थ प्रकट करण्यासाठीं अनेकानेक संत, महापुरुषांच्या रूपांत प्रकट होऊन भाष्य, प्रवचनांच्या द्वारा गीतेची खरीखुरी व्याख्या आणि विस्तार करण्यासाठीं येत असतात. संत ज्ञानेश्वरमहाराजही **'ज्ञानेशो भगवान् विष्णु:'** या सदयुक्तिला अनुसरून गीतार्थ प्रकट करण्यासाठीच अवतरित झाले होते. कारण संत आणि भगवंत या दोहोत अभेद आहे. एवढेच नव्हे तर संतांची भोरवी भगवंतापेक्षांही अधिक आहे. देवर्षि नारदांनी म्हटले आहे—**'महत्संगस्तु दुर्लभोऽगम्योऽमोघश्च'** महापुरुषांचा संग दुर्लभ, अगम्य आणि अमोघ आहे, अर्थात् खऱ्या सत्पुरुषाची भेट झाली तर त्यांचा संग कधीं निष्फळ ठरत नाही, तात्काळ कल्याण करतो. संत ज्ञानेश्वर महाराज आणि ज्ञानेश्वरी यांचा परिचय केवळ महाराष्ट्रालाच आहे असे नाहीं तर संपूर्ण विश्वासच त्यांचा परिचय आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथाची साक्षात् भगवंताचा विग्रह या रूपानें पूजा केली जाते. आजपर्यंत कोटयावधि लोकांनी ज्ञानेश्वरीतील दिव्य प्रकाशाच्या सहाय्यानें आपल्या कर्तव्याचा मार्ग निश्चित करून आत्मकल्याण साधले आहे. आजही अनेक लोक व्यक्तिश: आणि सामुदायिक रीत्या ज्ञानेश्वरीचा प्रचार आणि प्रसार यांत गढून गेले आहेत. अनेक संस्थानी, मुद्रकांनी, प्रकाशकांनी विविध रूपांनी या ग्रंथाचे प्रकाशन केले आहे आणि त्यांच्या या प्रयत्नांचा फायदा घेऊन श्रद्धाळु जनता आपले आत्मकल्याण साधून घेत आहे.

गीताप्रेसचा मुख्य उद्देश्य घराघरांतुन गीता आणि गीतार्थाचा प्रचार आणि प्रस्तार कर्मांत कमी मूल्य ठेवून जन-सामान्यांसाठीं सुलभ करणे हेच आहे. काही महानुभावांनी गीताप्रेसच्या संचालकांना ज्ञानेश्वरीच्या प्रकाशनासाठीं अनेक वेळा आग्रह केला. या आग्रह करणारांच्या मनांत अशी धारण झालेली आहे की अन्य प्रकाशकांच्या तुलनेत गीताप्रेस आपल्या पुस्तकांचे मूल्य खूपच कमी ठेवत असते. भगवंताच्या विशेष अनुकंपेमुळे गीताप्रेसचे लक्ष्य या महानुभावांच्या आग्रहाकडे वेधले गेले आणि गीताप्रेसच्या संचालकांनी मूळ ज्ञानेश्वरी दैनंदिन पाठासाठीं उपयुक्त अशा गुटक्याच्या स्वरूपांत प्रकाशित केली. धार्मिक लोकांनी पूर्ण श्रद्धेन या उपक्रमास स्वीकारून या ग्रंथाचे चांगले स्वागत केले. यानंतरही हा ग्रंथ सटीक मोठ्या ग्रंथाच्या आकारांत प्रकाशित व्हावा असा आग्रह होतच राहिला.

ज्ञानेश्वर महाराजांच्या कृपेनें त्यांचे अभिन्न भक्त श्रीगुलाबराव महाराज प्रणीत ज्ञानेश्वरी (गुढार्थ दीपिका) चे प्रकाशन करण्याचा आग्रह झाला. संत गुलाबराव महाराज वैकुंठवासी झाल्यानंतर या ग्रंथाच्या काही आवृत्ति छापल्या गेल्या होत्या. त्या ग्रंथासंबंधी महाराष्ट्रीय लोकांत भागवतासारखी श्रद्धा व आदराची भावना आहे. श्रीगुलाबराव महारज स्वत:ला ज्ञानेश्वरांची कन्या म्हणवीत असत आणि पिता भावनेनें ज्ञानेश्वरांची उपासना करीत असत। जन्मजात प्रज्ञाचक्षु (अंध) असूनही ज्ञानेश्वर महाराजांची असीम कृपा त्यांच्यावर असल्याने ज्ञानेश्वरी ग्रंथावर त्यांनी मोठ्या सुलभ आणि काव्यमय भाषेत गूढार्थ प्रकट करणारी टीका केली आहे. कुणी विद्याभिमानी व्यक्ति गीतार्थाचे प्रतिपादन करणें तर दूरच राहिले गीतार्थ समजू ही शकत नाही. सर्व साधारण लोकांची अशी धारणा आहे कीं ज्ञानेश्वर महाराजांच्या कृपेनेंच श्रीगुलाबराव महाराजांना गीतार्थ अवगत झाला. जरी श्रीगुलाबराव महाराजांची ग्रंथ संपदा विपुल आहे तथापि या गुढार्थ दीपिकेंत त्यांचे जवळजवळ सर्व भाव समाविष्ट झाले आहेत.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या भावांना अधिकाधिक श्रद्धाळु लोकसमुदायापर्यंत पोहोंचविण्याच्या उद्देशानें या ग्रंथाच्या प्रकाशनाचा निर्णय घेतला गेला. हे भगवंताचे कार्य आहे. त्यांच्या अनुग्रहानेंच हे कठीण कार्य संभवनीय झाले. आम्हांला निमित्त बनविण्यांतही त्यांचा अनुग्रहच कारण आहे. आमची सर्व मुद्रक आणि प्रकाशकांनाही विनंति आहे कीं त्यांनीही आपल्या शक्तिनुसार ज्ञानेश्वरी ग्रंथाचें प्रकाशन हिंदी तसेच अन्य भाषांतही करण्याचा सत्प्रयास करावा. शेवटीं भगवंतानी आपल्या प्रेमी भक्तांपर्यत व श्रद्धाळु भाविक जनतेपर्यंत हा ग्रंथ पोहोंचविण्यांचे भाग्य आम्हांस दिले याबद्दल जनताजनार्दन चरणीं आम्ही अत्यंत कृतज्ञ आहोत.

—प्रकाशक

हरिः ॐ तत् सत्

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ ॐ अस्य श्रीमद्भगवद्गीतामालामन्त्रस्य भगवान् वेदव्यास ऋषिः। अनुष्टुप् छन्दः॥ श्रीकृष्णः परमात्मा देवता॥ अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे, इति बीजम्॥ सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज, इति शक्तिः॥ अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः, इति कीलकम्॥ अथ करन्यासः। नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः, इत्यङ्गुष्ठाभ्यां नमः॥ न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः, इति तर्जनीभ्यां नमः॥ अच्छेद्योऽयमदाह्योऽय-मक्लेद्योऽशोष्य एव च, इति मध्यमाभ्यां नमः॥ नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः, इत्यनामिकाभ्यां नमः॥ पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्त्रशः, इति कनिष्ठिकाभ्यां नमः॥ नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च, इति करतलकरपृष्ठाभ्यां नमः॥ इति करन्यासः॥ अथ हृदयादिन्यासः॥ नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः, इति हृदयाय नमः॥ न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः, इति शिरसे स्वाहा॥ अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च, इति शिखायै वषट्॥ नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः, इति कवचाय हुम्॥ पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्त्रशः, इति नेत्रत्रयाय वौषट्॥ नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च, इति अस्त्राय फट्॥ श्रीकृष्णप्रीत्यर्थे पाठे विनियोगः॥ ॐ॥ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम्। अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीमम्ब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम्॥ १॥ नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र। येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः॥ २॥ प्रपन्नपारिजाताय तोत्त्रवेत्रैकपाणये। ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः॥ ३॥ सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः। पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत्॥ ४॥ वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम्। देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम्॥ ५॥ भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गान्धारनीलोत्पला शल्यग्राहवती कृपेण वहनी कर्णेन वेलाकुला। अश्वत्थामविकर्ण-घोरमकरा दुर्योधनावर्तिनी सोत्तीर्णा खलु पाण्डवै रणनदी कैवर्तकः केशवः॥ ६॥ पाराशर्यवचः सरोजममलं गीतार्थगन्धोत्कटं नानाख्यानककेसरं हरिकथा-संबोधनाबोधितम्। लोके सज्जनषट्पदैरहरहः पेपीयमानं मुदा भूयाद् भारतपङ्कजं कलिमलप्रध्वंसि नः श्रेयसे॥ ७॥ मूकं करोति वाचालं पङ्गुं लङ्घयते गिरिम्। यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम्॥ ८॥ यं ब्रह्मावरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवैर्वेदैः साङ्गपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः। ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः॥ ९॥ इति श्रीमद्भगवद्गीतान्यासध्यानादि॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

श्रीज्ञानेश्वरी गूढार्थ दीपिका

अध्याय पहिला

॥ श्रीगणेशायनमः ॥

ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा॥

अर्थ—भगवंता! ज्या तुझे ॐ हे मंगलकारक नाम आहे, जो तू सर्व कार्यरूप सृष्टीच्या पूर्वी कारणरूपाने असतोस, वेदांनी ज्या तुझे एकाचेच अनेक रूपांनी वर्णन केले आहे, जो तू स्वसंवेद्य म्हणजे आपणच आपल्याला जाणणारा असून, दुसऱ्या कशानेही जाणला जाऊ शकत नाहीस, ज्या तुझा स्वसंवेद्य (सच्चिदानंद) रूपाने सर्वत्र जयजयकार असून जो तू सर्व जीवांचे ठिकाणी आत्मरूपानेही आहेस, त्या तुला नमस्कार करतो. ॥ १ ॥

गूढार्थदीपिका:—मंगलाचरण ग्रंथारंभी भगवंताचे मंगलाचरण करावे असा शिष्टसंप्रदाय आहे. वेदादि वैदिक वाङ्मय प्रमाण मानणाऱ्या लोकांना शिष्ट म्हणतात. अशा शिष्टसंप्रदायाला अनुसरून या ग्रंथाचे आरंभी श्रीज्ञानेश्वर माऊलीने भगवंताचे मंगलाचरण केले आहे. मंगलाचरण तीन प्रकारचे असते. पहिले वस्तुनिर्देशरूप मंगलाचरण, दुसरे नमस्काररूप मंगलाचरण व तिसरे आशीर्वादरूप मंगलाचरण. श्रीज्ञानेश्वर माऊलीने येथे तिन्ही प्रकारचे मंगलाचरण केले आहे.

परमेश्वरवस्तू अत्यंत मंगलरूप असल्यामुळे कोणी ग्रंथकार आपल्या ग्रंथारंभी केवळ परमेश्वर वस्तूचा निर्देशच करतात. असा निर्देश वस्तुनिर्देशरूप मंगलाचरण होय. हे मंगलाचरण सगुणवस्तुनिर्देशरूप व निर्गुणवस्तुनिर्देशरूप असे दोन प्रकारचे आहे. जेव्हा रूपरहित ब्रह्मवस्तूचा निर्देश ग्रंथारंभी केला जातो किंवा जेव्हा नामरूप या वाच्यांशाच्या द्वारा नामरूपरहित अशी ब्रह्मवस्तू लक्षिली जाते, तेव्हा ते निर्गुणवस्तुनिर्देशरूप मंगलाचरण होते. या ओवीत माऊलींनी 'स्वसंवेद्या' व 'आत्मरूपा' या शब्दांनी निर्गुणवस्तुनिर्देशरूप मंगलाचरण केले असून 'आद्या' व 'वेदप्रतिपाद्या' या शब्दांनी सगुणवस्तुनिर्देशरूप मंगलाचरण केले आहे.

ॐकार:—नामरूपरहित निर्गुण ब्रह्मवस्तू अत्यंत सूक्ष व बुद्ध्यादिकांच्या पलीकडे असल्यामुळे, ती बुद्ध्यादिक वृत्तीने ग्रहण केली जात नाही. म्हणून ज्याप्रमाणे अत्यंत सूक्ष्म असा अरुंधतीचा तारा दाखविण्याकरिता प्रथम अरुंधतीच्या जवळ असलेला असा वसिष्ठांचा तारा दाखविला जातो, त्याप्रमाणे नामरूपरहित निर्गुण ब्रह्मवस्तू अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे तिच्या साक्षात्काराकरिता शास्त्राने स्थूल अशा ॐकाराला त्या ब्रह्मवस्तूचे वाचक (नाव) ठरविले आहे. व त्या ॐकाराचे ठिकाणी ब्रह्मभावना दृढ करून पुढे ॐकार अनुच्चारित झाला असता जीव ब्रह्मस्वरूप होतो.

ॐ कारश्चाथशब्दश्च द्वावेतौ ब्रह्मणः पुरा। कंठं भित्वा विनिर्यातौ तस्मान्मांगलिकावुभौ॥

'ॐकार' व 'अथ' हे दोन शब्द ब्रह्मदेवाच्या कंठातून प्रथमच बाहेर पडले, त्यामुळे हे दोन्ही शब्द स्वभावत: मंगलकारक आहेत या अर्थाची वरील स्मृती आहे. याप्रमाणे ॐकार हा शब्द परमेश्वराचा वाचक व मंगलकारक असल्यामुळे माऊलींनी ॐकारद्वारा सगुण व निर्गुण परब्रह्माचे एकत्र मंगलाचरण केले आहे.

पण येथे या ओवीत ॐकाराचे ठिकाणी परमेश्वर भावना करून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ॐकाराचे मंगलाचरण केले आहे, असे कित्येक म्हणतात. पण ते योग्य नाही. कारण वर सांगितल्याप्रमाणे ॐकार हा परमेश्वराचे मंगलकारक नाव असल्यामुळे ज्या मंगलकारक ॐकाराच्या नुसत्या उच्चाराने परमेश्वराचे मंगल होऊ शकते त्या

मंगलाकारक शब्दाचेच मंगलाचरण कसे केले जाणार? येथे ॐकाराचे मंगलाचरण केले आहे हे दाखविण्याकरिता ॐकाराचे ठिकाणी परमेश्वराची भावना करून ॐकाराचे मंगलचरण केले आहे, असे विधान अभूतपूर्व आहे. परमात्मभावाने ॐकाराचे मंगलाचरण आजतागायत कोण्याही ग्रंथकाराने केलेले नाही. कारण तसे करण्याची आवश्यकताच नाही.

ॐकाराचे वाच्य व आकाशापेक्षाही सूक्ष्म असे जे परब्रह्म त्या परब्रह्माच्या अपरोक्ष साक्षात्काराकरिता स्थूलारुंधतीन्यायाने त्या परब्रह्मापेक्षा स्थूल असलेल्या त्याच्या ॐ या वाचक नामाचे ठिकाणी परब्रह्म भावना करण्याला श्रुतीने सांगितले आहे. मंगलाचरण करण्यासाठी ॐकाराचे ठिकाणी परब्रह्माची भावना करावयास सांगितली नाही. मंगलाचरण हे परमेश्वराचेच होऊ शकते व परमेश्वराचे मंगलाचरण करण्याकरिता ॐकाराचे ठिकाणी परब्रह्माची भावना करण्याची आवश्यकताही नाही. कारण परमेश्वराचा अपरोक्ष साक्षात्कार नसला तरी परमेश्वर आहे इतके परोक्ष ज्ञान असले की ॐकाराचे ठिकाणी ब्रह्मभावना न करता साक्षात् परब्रह्माचे मंगलाचरण अज्ञान्याला देखील करता येते. तेथे ज्ञानियांचे राजे म्हणविले जाणारे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना ॐकाराचे ठिकाणी परमेश्वर भावना करून ॐकाराचे मंगलाचरण करण्याचे कारणच काय? श्रुतिशास्त्रात जी काही परमेश्वरभावनेने ॐकारादिकांची उपासना सांगितली आहे, ती दृढ अपरोक्ष साक्षात्कार नसलेल्या अदृढ ज्ञान्याकरिता सांगितली आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजासारख्या दृढ ज्ञान्यांकरिता मुळीच नाही. कारण दृढ ज्ञान होण्यापूर्वी केली जाणारी उपासना, ज्ञान दृढ झाल्यानंतर सुटून जाते. म्हणून येथे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी परमेश्वर भावनेने ॐकाराचे मंगल केलेले नसून या पहिल्या ओवीने साक्षात् परमेश्वराचेच 'सगुणनिर्गुणवस्तुनिर्देशरूप मंगलाचरण' केले आहे.

आद्या:—आता 'आद्या' शब्दाने श्रीमहाराज काय विशद करतात ते पाहू. प्रत्येक कार्याला उपादान व निमित्त अशी दोन कारणे असतात. कार्यरूप होणारे जे कारण ते उपादान कारण होय. उदाहरण—मातीचा घडा होतो, म्हणून माती हे घड्याचे उपादान कारण आहे. कार्य निर्माण करणाऱ्याला निमित्त कारण म्हणतात. कुंभार हा घडा निर्माण करतो म्हणून तो निमित्तकारण होय. जगातील प्रत्येक कार्याला उपादान व निमित्त अशी दोन कारणे दिसून येत असली तरी जगद्रूप कार्याच्या पूर्वी एक चेतन परमात्माच असतो. म्हणून जगद्रूप कार्याला अशी दोन भिन्न कारणे नसून, उपादान व निमित्त असे दोन्ही प्रकारचे कारण एक चेतन परमात्माच आहे. म्हणजे चेतन परमात्माच जगद्रूप झाला आहे व त्यानेच आपल्याला तसे जगद्रूप करून घेतले आहे. असा हा वेदान्तसिद्धान्त माऊलींनी 'आद्या' या शब्दाने सुचविला आहे.

वेदप्रतिपाद्या:—म्हणजे वेदाने ज्याचे वर्णन केले आहे असा परमात्मा वेदादि वाङ्मयात कर्म, कर्मकर्ता जीव, स्वर्गादिक भोगस्थाने, भोग इत्यादिकांचे वर्णन आले असले, तरी त्या सर्व नामरूपांनी केवळ एका परमेश्वराचेच वर्णन केले गेले आहे. हाच वेदान्ताचा अद्वैतसिद्धान्त माऊलींनी 'वेदप्रतिपाद्या' या शब्दाने मांडून, वेदप्रतिपाद्य अशा सगुण-भगवंताचा निर्देश करून सगुणवस्तुनिर्देशरूप मंगलाचरण केले आहे.

वेदस्ततीतील श्रीधराचार्य टीकेत

''**सगुणमेव॰गुणैरनभिभूतं सर्वशक्तिं सर्वेश्वरं सर्वनियन्तारं सर्वोपास्यं सर्वकर्मफलदातारं समस्तकल्याणगुणनिलयं सच्चिदानंदं, भगवन्तं श्रुतय: प्रतिपादयन्ति**''

त्रिगुणातीत, पण आपल्या स्वरूपभूत षड्गुणैश्वर्याने व सच्चिदानंद गुणाने सगुण झालेल्या परमेश्वराचेच श्रुतीने वर्णन केले आहे. तसेच.

''**अपरिमेयभगोऽपरिमितैश्वर्य: न हि अन्येषामिव देशकालादिपरिच्छिन्नं, तवाष्टगुणितमैश्वर्यमपि तु परिपूर्णस्वरूपानु-बंधित्वादपरिमितमित्यर्थ:**''

परमेश्वराचे षड्गुणैश्वर्य इतरांप्रमाणे मर्यादित नाही. ते सच्चिनंदस्वरूपाला धरून असल्यामुळे अमर्याद सच्चिदानंदस्वरूपाप्रमाणे अमर्यादच आहे. या दुसऱ्याही वचनावरून वेदप्रतिपाद्य अशा सगुण भगवंताचे सगुणत्व

मायोपाधिक नाही हे वेदान्तानेच सिद्ध आहे. कारण जेवढे मायोपाधिक असते तेवढे मर्यादित असते व जेवढे आत्मस्वरूपाप्रमाणे अमर्याद असते तेवढे सर्व मायोपाधिवर्जित असते असा वेदान्ताचा सिद्धान्त आहे.

स्वसंवेद्याः—म्हणजे आपणच आपल्याला जाणणारा आत्मा ज्ञानरूप असून तो ज्ञानरूप वृत्तीनेच जाणला जातो, अज्ञानादिकाने जाणला जात नाही. हाच वेदान्ताचा सिद्धान्त असून तोच श्रीज्ञानेश्वर महाराजांनी अनुभवामृतात प्रतिपादिला आहे व येथे 'स्वसंवेद्य' शब्दाने मांडला आहे.

आत्मरूपाः—या प्रमाणे ॐकाराचा वाच्य, सृष्टीच्या पूर्वी असणारा, सृष्टीचे कारण, वेदाने प्रतिपादिलेला व आपणच आपल्याला जाणणारा 'स्वसंवेद्य' असा हा परमेश्वर कोणता तर याचे उत्तर माऊलींनी 'आत्मरूपा' या शब्दाने दिले आहे. म्हणजे प्रत्येकाचा आत्मा तोच परमात्मा आहे. आत्म्याहून परमात्मा भिन्न नाही असा भाव.

आत्मा वा इदमेक एवाग्र आशीत्। ऐत. २—१

पूर्वी हे जगत् आत्मस्वरूप होते म्हणजे जगताच्या पूर्वी आत्मा होता. तोच नामरूपात्मक जगद्रूप झाला. याही श्रुतिवचनावरून सर्व जगाला अधिष्ठानभूत असलेले चेतन म्हणजे परमात्मा, तो प्रत्येक देहाचे ठिकाणी अधिष्ठानभूत असलेले चेतन जो आत्मा, त्याहून भिन्न नाही, एकच आहे असा अर्थ निघतो.

नमोः—या पदाने नमस्काररूप मंगलाचरण केले आहे. कार्यरूप जगताचे कारण स्वसंवेद्य असा हा एक आत्माच आहे व त्याचेच वेदांनी प्रतिपादन केले आहे. जसे हरिपाठाच्या अभंगात.

चहू वेदीं जाण। षट्शास्त्रीं कारण। अठराहि पुराणें। हरीसीं गाती॥

असे म्हणून माऊली सर्व वेदशास्त्रात हरीची कीर्ती गायिली आहे असे सांगतात, तसेच येथेही 'आद्या', 'वेद प्रतिपाद्या', 'स्वसंवेद्या' आणि 'आत्मरूपा' या पदांनी ज्ञानीयांचे राजे केवलाद्वैत ब्रह्मसिद्धान्तच प्रतिपादन करीत आहेत. वरील विशेषणे ॐकाराला लागू शकत नाहीत म्हणून ॐकाराचे परमेश्वर भावनेने मंगलाचरण केले आहे असे म्हणणे वेदान्ताला धरून होणार नाही.

देवा तूंचि गणेशु। सकलार्थमतिप्रकाशु। म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी॥ २॥

अर्थ—श्रीनिवृत्तिनाथांचे दास श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, हे आत्मरूपा परमेश्वरा! माझ्या बोलण्याकडे लक्ष दे. वैदिक वाङ्मयातील संपूर्ण अर्थाच्या ज्ञानाचा प्रकाश किंवा स्फुरणस्वरूप असा जो गणेश तो तूच आहेस.॥ २॥

गूढार्थदीपिका—अवधारिजो जी—वैदिक वाङ्मयात ज्ञानदात्री देवता गणेश समजली जाते. सर्व देवतांचे ठिकाणी जो काही शक्तीचा उद्‌बोध दिसून येतो, तो सर्व माझ्याच शक्तीचा उद्‌बोध आहे असे भगवंतांनीच गीतेत 'गामाविश्य च भूतानि' इत्यादि श्लोकांनी सांगीतले आहे. याला धरूनच या ओवीत बुद्धीत होणाऱ्या अर्थज्ञानाच्या स्फुरणाला गणेश देवता हे नाव दिले आहे.

आता ग्रंथारंभी त्या देवतेला नमस्कार करण्याकरिता तिच्या शरीराचे वर्णन करतात. ज्याप्रमाणे राजाचे ठिकाणी प्रजेचे नियमन करण्याची असलेली शक्ती निरनिराळ्या अधिकारी वर्गाचे रूपाने प्रगट होते, त्याप्रमाचे परमेश्वराचे ठिकाणी सृष्टीचे नियमन करण्याची असलेली शक्ती, गणेशादि अधिकारी देवतांच्या रूपाने सृष्टिकाली प्रगट होते. म्हणून ज्याप्रमाणे प्रजेचे नियमन करणाऱ्या अधिकारी वर्गाचे ठिकाणी राजबुद्धीच केली जाते, त्याप्रमाणे मतिप्रकाश करणाऱ्या गणेश देवतेच्या ठिकाणी मतिप्रकाश करण्याची जी शक्ती आहे ती मूळची परमेश्वराचीच जीवानुग्राहकशक्ती असून ती गणेश या नामरूपाने प्रगट झाली असल्यामुळे परमेश्वरच गणेश होय, असा आपला अनुभवजन्य निर्धार श्रीज्ञानेश्वर महाराज "अवधारिजो जी" या शब्दाने व्यक्त करतात. हे परमेश्वरा! सर्वांच्या मतीत यथार्थ ज्ञानाने स्फुरणारा गणेश तूच आहेस असे म्हणून माऊलींनी सर्व श्रोतृवर्गाला यथार्थज्ञान होण्याकरिता गणेशरूप परमेश्वराच्या आशीर्वादाची याचना सूचित केली आहे. हेच तिसऱ्या प्रकारचे आशीर्वादरूप मंगलाचरण होय.

हे शब्दब्रह्म अशेष। तेचि मूर्ति सुवेष। तेथ वर्णवपु निर्दोष। मिरवत असे॥ ३॥

अर्थ—जेवढे काही वैदिक म्हणजे वेद व वेदानुकूल असलेले स्मृतिपुराणे वगैरे वाङ्मय आहे तेच या

गणेशरूपी परमेश्वराची उत्तम रेखीव वेष केलेली मूर्ती असून त्या वाङ्मयातील शब्द हे गणेशाचे निर्दोष म्हणजे अव्यंग असे शरीर शोभत आहे॥ ३॥

गूढार्थदीपिका—वर्णवपुनिर्दोष—येथे सर्व शब्दांवर म्हणजे श्रुति स्मृती, पुराणे इत्यादि वैदिक वाङ्मयावर गणेशाचे मूर्तीची कल्पना करून त्या सर्वांची एकवाक्यता श्रीज्ञानेश्वर महाराजांनी स्वीकारिली आहे. या वाङ्मयांतील शब्दरचना निर्दोष म्हणजे पूर्ण भ्रमप्रमादादि दोषरहित आहे. १—भ्रम म्हणजे विपरीत ज्ञान होणे; २-प्रमाद म्हणजे चुकणे; ३-करणापाटव म्हणजे इंद्रियांचे असामर्थ्य; ४-विप्रलिप्सा म्हणजे खोटे बोलून फसविण्याची बुद्धी. हे दोष जीवाच्या ग्रंथात असू शकतात, नि:स्वार्थी परमेश्वराच्या वाङ्मयात राहत नाहीत, हा 'निर्दोष' या शब्दाचा आशय आहे.

स्मृती तेचि अवयव। देखा अंगीकभाव। तेथ लावण्याची ठेव। अर्थशोभा॥ ४॥

अर्थ—निरनिळ्या स्मृति ह्या गणेशाच्या शब्दरूपी शरीराचे स्वाभाविक अंगभूत अवयव आहेत. त्या सर्व स्मृतिरूप अवयवांचे ठिकाणी त्या स्मृतीतील निरनिराळे सिद्धान्तरूप अर्थसौंदर्य हेच गणेशाच्या शरीराचे एकवटलेले सौंदर्य होय.

गूढार्थदीपिका—अवयव अंगीकभाव—श्रुती म्हणजे ज्याला आत्मविस्मृती कधीच झाली नाही अशा पुरुषाचे शब्द होत. असा एक परमात्माच आहे. म्हणून श्रुतीला म्हणजे वेदाला परमेश्वरप्रणीत म्हणतात. या श्रुती म्हणजे वेद, ब्राह्मण, उपनिषदे होत.

ज्यांना आत्मविस्मृती झाली त्यांना जीव म्हणतात. परमेश्वरप्रणीत श्रुतीवरून ज्यांना पुढे आत्मज्ञान झाले व नंतर त्यांनी जे ग्रंथ केले. त्या ग्रंथांना स्मृती म्हणतात. मन्वादिस्मृती व षड्दर्शने इत्यादि स्मृतीग्रंथ होत.

या सर्व श्रुति—स्मृति—पुराणे वगैरेतींल सर्व सिद्धान्तांची एकवाक्यता आहे. ज्याप्रमाणे शरीराचे निरनिराळे अवयव शरीर पोषणाचे निरनिराळे कार्य करून एका संपूर्ण शरीराला पुष्टी देतात, त्याप्रमाणे स्मृती श्रुतीचेच आंगीक म्हणजे अंगभूत अवयव आहेत. म्हणजे श्रुतीतीलच अर्थ किंवा सिद्धान्त त्यांनी व्यक्त केलेले आहेत म्हणून श्रुतीला पोषक आहेत. त्यात श्रुत्यर्थाला सोडून स्मृतिकाराने आपल्या बुद्धीतले काहीही सिद्धान्त ओतलेले नाहीत असे 'अवयव' व 'आंगीकभाव' या पदांनी सुचविले आहे.

अष्टादश पुराणें। तींचि मणिभूषणें। पदपद्धती खेवणें। प्रमेयरत्नांची॥ ५॥

अर्थ—अठरा पुराणे ही गणेशाच्या वर्णरूपी शरीरावरील रत्नालंकार आहेत व त्यातील शब्दरचना ही त्यात असलेल्या अनेक वेदान्तसिद्धान्तरूपी रत्नांची कोंदणे आहेत.

गूढार्थदीपिका—तींचि मणिभूषणें—येथे अठरा पुराणांना गणेशाच्या शब्दब्रह्म शरीरावरील रत्नालंकार म्हटले आहे. याचा आशय असा आहे की ज्याप्रमाणे अलंकाराने मनुष्याचे शरीर सुंदर दिसते, त्याप्रमाणे पुराणांनी वेदातील अर्थरूपी सिद्धान्त सुशोभित करून दाखविले आहेत व पुराणातील शब्दरचनेने ते सिद्धान्तरूपी अर्थ खुलवून ठसठशीत दिसतील असे मांडले आहेत. वेद हे अस्पष्टार्थबोधक असल्यामुळे त्यातील सिद्धान्त वेदशब्दावरूनच स्पष्टपणे कळत नाहीत. परंतु तेच सिद्धान्त स्पष्टपणे कळतील अशा शब्दांत पुराणातून मांडले आहेत. म्हणूनच,

इतिहासपुराणाभ्यां वेदं समुबृंहयेत्। बिभेत्यल्पश्रुताद्वेदो मामयं प्रहरिष्यति॥

इतिहास पुराणानुसार वेदाचा अर्थ करावा असे भारत, अविस्मृत्यादि ग्रंथातून सांगितले आहे व ऋग्वेदाच्या भूमिकेत विद्यारण्यांनी असेच म्हटले आहे. इतिहास पुराणे सोडून आपल्या बुद्धीने वेदांचा अर्थ करू पाहणारा माझा अर्थघात करील अशी वेदाला भीती वाटते. वेद श्रेष्ठ व इतिहास पुराणे गौण असे मानल्यास गौण अशा इतिहास पुराणानुसार श्रेष्ठ अशा वेदाचा अर्थ करावा असे म्हणणे सयुक्तिक नाही. म्हणून वरील वाक्यावरून वेद व इतिहास पुराणे यांचे तुल्य प्रामाण्य आहे असा अर्थ होतो.

वेद, स्मृति, पुराणे, इतिहास इत्यादि ग्रंथ निरनिराळ्या काळी झाले असल्यामुळे त्यांची एकवाक्यता कशी करावयाची अशी कित्येक शंका घेतात, पण ती अज्ञानमूलक अतएव निरर्थक आहे. अज्ञानी जीवांना यथार्थ

आत्मज्ञान व्हावे म्हणून नित्यज्ञानी परमेश्वराने निर्माण केलेल्या वेदग्रन्थानंतर निरनिराळ्या काळी इतिहास पुराणादि ग्रंथ निर्माण झाले असले तरी ते भगवंतांनीच आपल्या ज्ञानसंपन्न अशा निरनिराळ्या अधिकारी पुरुषांकडून प्रगट करविले आहेत. आणि परमेश्वरापासून पूर्ण साक्षात्कारी होणाऱ्या जीवापर्यंत जेवढे काही आत्मज्ञान प्रगट झालेले असते ते सर्वांचे एकरूपच असते. कारण ज्या परब्रह्माचा साक्षात्कार किंवा ज्ञान व्हावयाचे ते परब्रह्म एकजिनसी, पूर्ण, निरंश असे असल्यामुळे ते ज्ञान प्रत्येक साक्षात्कारी पुरुषांचे भिन्न-भिन्न राहू शकत नाही. ज्याप्रमाणे टीकाकार मूळ ग्रंथकाराचा आशय स्पष्ट करतो, त्याप्रमाणे पुराण, इतिहास, किंबहुना संतवाङ्मय यातून मूळ वैदिक सिद्धान्तच स्पष्ट केलेले असतात. म्हणून वेद, इतिहास, पुराण, संतवाङ्मय यांची एकवाक्यता करून यथार्थ सिद्धान्त कळू शकतो, असे सर्व साक्षात्कारी पुरुषांचे म्हणणे आहे व तशाच रीतीने त्यांनी वेदान्तसिद्धान्त ग्रहण केले आहेत.

पदबंध नागर। तेंचि रंगाथिलें अंबर। जेथ साहित्य वाणें सपूर। उजाळाचें॥ ६ ॥

अर्थ—त्यातील शब्दांची बांधणी ही गणेशाचे अंगावरील रंगविलेले वस्त्र असून त्यातील भरपूर उपमादि अलंकारसाहित्य हेच त्या वस्त्राला उठावदार व बहुमोलाचे दाखविणारे तेज किंवा चकचकितपणा होय. ॥ ६ ॥

देखा काव्यनाटका। जें निर्धारितां सकौतुका। त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका। अर्थध्वनि॥ ७॥

अर्थ—जसा जसा विचार करावा तसतशी जी काव्यनाटके कौतुकास्पद व चित्ताकर्षक वाटतात, तीच गणेशाच्या पायातील घागऱ्या असून त्यातील ध्वन्यर्थ हाच त्या घागऱ्यांचा रुणझुण नाद होय. ॥ ७ ॥

गूढार्थदीपिका—अर्थध्वनि—येथे घागऱ्यांच्या ध्वनीप्रमाणे काव्य व नाटके ही वेदार्थाला गोड ध्वन्यर्थाने प्रगट करतात असे माऊली सूचित करीत आहे. म्हणून वेदार्थानुकूल वेदार्थाचा ध्वनी काढणारी काव्यनाटके येथे स्वीकारली पाहिजेत हे उघड आहे. धर्माविरुद्ध विषयवासना वाढवून इंद्रियांचे चाळे पुरविण्याची प्रवृत्ती उत्पन्न करणारी काव्यनाटके येथे घेता येत नाहीत.

नाना प्रमेयांची परी। निपुणपणें पाहतां कुसरी। दिसती उचित पदें माझारीं। रत्नें भलीं॥ ८ ॥

अर्थ—अर्थव्युत्पत्तीत निष्णात होऊन पाहणाऱ्याला या काव्यनाटकातून जे वैदिक सिद्धान्त कौशल्याने मांडले आहेत ते सिद्धान्त व्यक्त करणारी योग्य पदे हीच त्यातील रत्ने होत. ॥ ८ ॥

जेथ व्यासादिकांची मती। तेचि मेखळा मिरवती। चोखाळपणें झळकती। पल्लवसडका॥ ९ ॥

अर्थ—या वैदिक वाङ्मयातील व्यासादिक दर्शनकारांच्या विचारप्रान्ताची मर्यादा हाच गणेशाच्या कंबरेला बांधलेला शेला असून, त्यातील स्पष्टपणे झळकणारे विचार हेच शेल्याचे मोकळे सडक पदर होत. ॥ ९ ॥

गूढार्थदीपिका—व्यासादिकांची मती—शेल्याचे झळकणारे पदर अनेक असले तरी ते जसे एकाच शेल्याला शोभा आणतात, त्याप्रमाणे दर्शनकारांचे विचार भिन्न दिसले तरी ते एकाच अद्वैतवेदान्तमतालाच पोषक असतात असे येथे माऊलींनी पुन: दर्शविले आहे.

देखा षड्दर्शनें म्हणिपती। तेचि भुजांची आकृती। म्हणऊनि विसंवादे धरिती। आयुधें हातीं॥ १० ॥

अर्थ—वैदिक षड्दर्शने जी म्हटली जातात तीच निरनिराळ्या भुजांची आकृती होय. म्हणूनच निरनिराळी आयुधे हाती धरिली आहेत. ॥ १० ॥

गूढार्थदीपिका—गणेशपुराणात कृतयुगातील गणेशाचे षड्भुजात्मक वर्णन केले आहे. तेच येथे षड्दर्शनाच्या उपमेकरिता माऊलींनी घेतले आहे. षड्दर्शने ही बाहू आहेत व त्यातील प्रतिपाद्य विषय ही आयुधे होत. एक एक वैदिक दर्शन एका-एका भुजेच्या निरनिराळेपणासारखे निरनिराळे दिसते व भुजांचे निरनिराळेपणामुळे जसे निरनिराळ्या हातात निरनिराळी आयुधे धरिता येतात, त्याप्रमाणे निरनिराळ्या दर्शनांचा प्रतिपाद्य विषयही निरनिराळा दिसतो. एका शरीराच्या निरनिराळ्या हातात जरी निरनिराळी आयुधे असली तरी ती सर्व शरीरसंरक्षणार्थच उपयोगिली जातात त्याप्रमाणे सर्व वैदिक दर्शने निरनिराळा विषय प्रतिपादित असली, तरी ती वैदिक अद्वैतसिद्धान्ताचेच शेवटी पोषण करतात, किंवा तोच अर्थ सिद्ध करतात असे दिसून येते.

चहूं वेदीं जाण षड्शास्त्रीं कारण। अठराहि पुराणें हरीसी गाती॥ हरिपाठ.

चार वेद, सहा शास्त्रे व अठरा पुराणे एका अद्वैत ब्रह्मवस्तूचेच प्रतिपादन करितात असे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी हरिपाठाचे अभंगात म्हटले आहे. महिम्नस्तोत्राच्या टीकेत,

सर्वेषां प्रस्थानकर्तृणां साक्षात्परंपरया वा अद्वैते ब्रह्मण्येव तात्पर्यम्।

न हि ते मनुयोभ्रान्ताः सर्वज्ञत्वात् तेषाम्॥ मधुसूदन.

सर्व स्मृतिकार व दर्शनकार यांच्या स्मृतीचे व दर्शनांचे तात्पर्य साक्षात् किंवा परंपरेने अद्वैतब्रह्म प्रतिपादन करण्यातच आहे. कारण ते सर्व परमेश्वरकृपेने सर्वज्ञ होते, भ्रान्त नव्हते, असे मधुसूदन सरस्वतीही म्हणतात. सर्व दर्शनकारांचे अद्वैतप्रतिपादनात तात्पर्य कसे आहे हे विद्यारण्यांनी सूतसंहितेवरील.

अन्यागमाश्च विदुषामनुभूतिस्तथैव च। अस्मिन्नर्थे स्वसंवेद्ये पर्यवस्यंति नान्यथा॥

या श्लोकाच्या टीकेत स्पष्ट दाखविले आहे भारतातही शान्तिपर्वात अध्याय ३४७ मधील श्लोकात याच अर्थाचे प्रतिपादन आले आहे. सर्व वैदिक वाङ्मयाचे प्रतिपाद्य सरते शेवटी एक अद्वैत ब्रह्मवस्तूच आहे व हेच श्रीज्ञानेश्वर महाराज यांनी या ओवीत सांगितले आहे.

तरी तर्कु तोचि फरशु। नीतिभेदु अंकुशु। वेदान्तु तो महारसु। मोदकु मिरवे॥ ११॥

अर्थ—सत्तर्क हा हातातील फरशू आहे, नीतिभेद हा अंकुश होय आणि वेदान्तदर्शनातील प्रतिपाद्य विषय जो परमानंद तो गणेशाचे हातातील मधुर मोदक होय॥ ११॥

तर्कु तोचि फरशु

गूढार्थदीपिका—१-न्याय—येथे श्रीमहाराजांनी षड्दर्शनांना बाहू म्हणून, प्रतिपाद्य विषयांना आयुधे म्हटले आहे, न्याय—वैशेषिक, उत्तरमीमांसा—पूर्व मीमांसा, सांख्य—योग अशी वैदिक षड्दर्शने आहेत. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी प्रथम न्यायदर्शनाला गणेशाच्या हाताची उपमा देऊन त्यातील प्रतिपाद्य विषय जो सत्तर्क त्याला गणेशाच्या हातातील फरशुची उपमा दिली आहे, ही उपमा फार समर्पक आहे. वाटेमध्ये आड येणाऱ्या पदार्थाचा छेद करण्याकरिता जसा फरशुचा उपयोग केला जातो, त्याप्रमाणे अद्वैत ब्रह्मज्ञान संपादन करताना जे संशय उत्पन्न होतात किंवा आक्षेप घेतले जातात. त्यांचा उच्छेद करून शुद्ध ब्रह्मविचार अंतःकरणात ठसविण्याकरिता वेदान्तात सत्तर्काची आवश्यकता मानली आहे. "**जन्माद्यस्य यतः**" (ब्र० सू० १।१।२) या सूत्रावरील भाष्यात "**श्रोतव्यो मंतव्यः**" (बृह० २।४।५) ही श्रुती प्रमाण देऊन आचार्य म्हणतात.

श्रुत्यैव च सहायत्वेन तर्कस्याभ्युपेतत्वात्।

श्रुतीत सांगितलेला सिद्धान्त दृढ बिंबविण्याकरिता सहायार्थ वेदान्तात श्रुत्यनुकूल तर्काचा अंगीकार केला आहे. श्रुतिविरोधी तर्कांचा मात्र वेदान्तात स्वीकार नाही. अशा रीतीने न्यायशास्त्र सत्तर्काचे स्वरूप दाखवून वेदान्ताला पोषक होते.

नीतिभेदु अंकुशु

२—वैशेषिकदर्शनः—नीतिभेद म्हणजे वैशेषिक दर्शन होय. या वैशेषिक दर्शनाला नीतिभेद म्हणण्याचे कारण असे की नीती म्हणजे धर्म. पूर्वमीमांसादर्शन व वैशेषिकदर्शन या दोघांनीही धर्माची व्याख्या केली आहे. पूर्वमीमांसा दर्शनाने,

चोदनालक्षणोऽर्थो धर्मः।

'अमुक कर' अशी आज्ञा हे वचनावरून धर्माचे लक्षण ठरविले व वैशेषिक दर्शनाने थोड्या भिन्न रीतीने,

यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः।

ज्याच्या पासून विषयसुख व मोक्षसुख मिळते तो धर्म अशी फलावरून धर्माची व्याख्या केली आहे. म्हणून वैशेषिक दर्शन नीतिभेद म्हणजे धर्मभेद किंवा भिन्न रीतीने धर्माची व्याख्या करणारे शास्त्र होय. या शास्त्राला

श्रीज्ञानेश्वर महाराजांनी गणेशाचे हातातील अंकुशाची उपमा दिली आहे. याचे कारण असे की वैशेषिक दर्शनाने जी धर्माची व्याख्या केली आहे तीत ज्या धर्माच्या योगाने अभ्युदय सिद्धि व नि:श्रेयस सिद्धी होते तो धर्म अशी अट आहे. ज्या धर्माचरणाने नि:श्रेयस अंतरेल व नुसता अभ्युदय साधेल, असे आचरण धर्मरूप नव्हे. येथे अभ्युदय साधताना नि:श्रेयस अंतरणार नाही इकडे लक्ष दिले पाहिजे. असा हा धर्मभेद आहे व तो अंकुशाप्रमाणे कार्य करतो अंकुशाच्या योगाने जसा माहुत हत्तीला वळवितो, तसा हा धर्मभेदही नि:श्रेयसाला घातक अशा स्वैरवृत्तीपासून वळविणारा होतो.

वेदान्तु तो महारसु

३—उत्तरमीमांसादर्शनः—वेदान्त दर्शनाने परमानंदाची प्राप्ती होते, म्हणून त्या दर्शनाला गणेशाच्या हातातील मधुर अशा मोदकाची उपमा दिली आहे.

एके हातीं दन्तु। जो स्वभावता खंडितु। तो बौद्धमतसंकेतु। वार्तिकांचा॥ १२॥

अर्थ—गणेशाच्या एका हातात जो दात आहे तो बौद्धमताचे आपोआप [सहजलीलेने] खंडन करणारा वार्तिकांचा संकेत होय.॥ १२॥

खंडित बौद्धमत

गूढार्थदीपिका—४-पूर्वमीमांसादर्शन—भगवती ज्ञानेश्वरीच्या अनेक भाषान्तरकारांनी या ओवीत बौद्धदर्शनाचा उल्लेख केला आहे. पण गणेशाच्या शरीराच्या ठिकाणी वेद, पुराण, इतिहासादि वैदिक वाङ्मयाचीच उपमा दिली आहे. तेव्हा गणेशाच्या सहा हाताच्या ठिकाणी सहा वैदिक दर्शनांचीच उपमा घेतली पाहिजे. पाच वैदिक दर्शने व एक बौद्ध जे अवैदिक दर्शन आहे व ज्याचे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपले अमृतानुभव ग्रंथात,

शून्यसिद्धान्त बोधु। कवणें सत्ता होय सिद्धु॥ (अमृ० प्र० ४ ओ० २७)

या ओवीने खंडन केले आहे, ते येथे घेणे सयुक्तिक होत नाही.वैदिक दर्शने सहा आहेत हे मागे सांगितलेच आहे. या दर्शनांचा जोडी जोडीनेच ग्रंथात उल्लेख केलेला दिसतो व श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी तसाच उल्लेख करून बाहूंना उपमा दिली आहे. न्याय—वैशेषिक या जोडीचा निर्देश केल्यानंतर पुढे वेदान्त दर्शनाचा उल्लेख आला आहे. तेव्हा त्याच्या जोडीचे जे पूर्वमीमांसा दर्शन तेच येथे घ्यावयास पाहिजे. म्हणून या ओवीत बौद्धदर्शनाचा उल्लेख नसून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी पूर्वमीमांसेचा निर्देश करून उपमा दिली आहे.

बौद्धमत संकेतु। वार्तिकांचा॥

कुमारिल भट्ट यानी पूर्वमीमांसेवर तंत्रवार्तिक व श्लोकवार्तिक अशी दोन वार्तिके लिहिली आहेत. या वार्तिकात आत्मा कर्ताभोक्ता आहे असे प्रतिपादन केले आहे. त्यामुळे बौद्धांच्या क्षणिकविज्ञान आत्मवादाचे व आत्मशून्यवादाचे आपोआप खंडन झाले आहे. कारण आत्मा कर्ता व भोक्ता असे जे वार्तिककाराने मानले आहे, त्याचा अर्थ असा होतो की कर्मकर्त्यालाच त्याच्यां कर्माचे फळ मिळणे न्यायप्राप्त आहे व कर्माचे फळ भोगण्याकरिता कर्मकर्ता स्थिर असावयास पाहिजे व तसाच तो स्थिर आहे. या विधानाने बौद्धांच्या क्षणिकविज्ञान आत्मवादाचे व शून्यात्मवादाचे अनायासेच खंडन होत आहे.

येथे बौद्धदर्शन जर घेतले तर षड्दर्शनांपैकी एक वैदिकदर्शन (पूर्वमीमांसा किंवा योगदर्शन) उपमा दिल्यावाचून सुटून जाते. यास्तव या ठिकाणी वैदिक पूर्वमीमांसादर्शनच घेणे योग्य आहे.

''वार्तिकांचा'' या अनेकवचनी पदाने तंत्रवार्तिक व श्लोकवार्तिक या दोन वार्तिकांचा येथे निर्देश आहे.[१]

मग सहजें सत्कारवादु। तो पद्मकर वरदु। धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु। अभयहस्तु॥ १३॥

अर्थ—मग गणेशाचा पांचवा हात हा सहज असणारा सत्कार्यवादरूपी सांख्य दर्शन असून तेथे भक्तांना इच्छित

१. **टीप—**याच विषयाचे विस्तृत विवेचन ''ज्ञानेश्वरीतील षड्दर्शने'' या माऊली मासिकातील लेखात केलेले आहे. तो लेख परिशिष्टात घेतला आहे, तो पहावा.

वर देणारे करकमल आहे. आणि सहावा हात हा धर्म म्हणजे सच्चिदानंद धर्म त्याची प्रतिष्ठा करून देणारे योगदर्शन असून त्यायोगे अभय प्राप्त होते, म्हणून त्या दर्शनाला माऊली अभय असे म्हणते. ॥ १३ ॥

गूढार्थदीपिका—५-सांख्य दर्शन—"सत्कारवाद" म्हणजे सत्कार्यवाद. जगद्रूपी कार्य सत् म्हणजे खरे आहे, असा वाद. हा वाद सांख्यदर्शनाचा आहे. तो वाद "सहज' आहे. म्हणजे न सांगता सर्व आबालवृद्ध अज्ञानी जीव जगत् खरे आहे असे स्वभावतः च मानतात. सांख्यदर्शनात प्रकृती व पुरुष यांच्या विवेकाने म्हणजे प्रकृती व पुरुष हे दोन निराळे पदार्थ आहेत असे समजल्याने पुरुष, प्रकृती व तिच्या कार्यापासून आपल्याला अत्यंत अलग पाहतो व दुःखापासून सुटतो. म्हणून माउलीने सांख्यदर्शनाला वरदहस्त म्हटले आहे.

पुरुषाने आपल्याला प्रकृती व तीचि चोवीस कार्ये यांपासून अलग करून घेणे हेच सांख्यज्ञानाचे ध्येय आहे, व हे ध्येय वेदान्तात पहिली पायरी म्हणून स्वीकारले आहे. प्रकृती व तीचि कार्ये यांपासून अलग करून घेणे हा व्यतिरेक होय. या व्यतिरेकाने पुरुष त्रिविध दुःखांपासून मुक्त होतो, परंतु त्याला परमानंदाची प्राप्ती होत नाही. त्याकरिता वेदान्तदर्शनाची आवश्यकता आहे. कारण वेदान्तदर्शनात नामरूपासह सर्व ब्रह्म आहे असा अन्वयविचार हाच वेदान्तातील मुख्य विषय आहे. या अन्वयाने पुरुषाला परमानंदाची प्राप्ती होते. अशा रीतीने सांख्यदर्शन प्रथम व्यतिरेक करवून पुरुषाला वेदान्तदर्शनाची भूमिका तयार करून देते. म्हणून ते दर्शन (सांख्य) वेदान्तदर्शनाची पहिली पायरी समजली जाते.

६-योगदर्शन—धर्मप्रतिष्ठा—योगशास्त्राने जीवाचे ठिकाणचे जीवधर्म जाऊन परमेश्वराचे सच्चिदानंदधर्म स्थापित होतात व तो अभयाला प्राप्त होतो, म्हणून योगदर्शनाला अभयहस्त असे म्हटले आहे.

देखा विवेक तव सुविमळु। तोचि शुंडादंडु सरळु। जेथ परमानंदु केवळु। महासुखाचा॥ १४॥

अर्थ—शुद्ध आत्मानात्मविवेक हाच गणेशाची सरळ शुंडा होय आणि तेथेच परमानंद व महासुखाची प्राप्ती होते. विवेकाने प्राप्त होणारा साम्यभाव हा परमानंददायक आहे असा अर्थ. ॥ १४ ॥

गूढार्थदीपिका—सांख्यशास्त्र विचाराने पुरुषप्रकृतीचा विवेक म्हणजे निराळेपणा झाला तरी त्या शास्त्रात प्रकृती ही स्वतंत्र निराळी वस्तू मानल्यामुळे द्वैत कायम राहते. तेथे प्रकृतीहून निराळा झालेला पुरुष उदासीन राहतो, म्हणून तो दुःखातून सुटतो, असे जरी सांख्यशास्त्र म्हणत असले तरी,

अनुकूलवेदनीयं सुखम्। प्रतिकूलवेदनीयं दुःखम्।

म्हणजे जे अनुकूल असते ते सुख व प्रतिकूल असते ते दुःख अशा सुखदुःखाच्या व्याख्या शास्त्रकार मानतात. उदासीनता ही काही सात्त्विक वृत्ती असली तरी प्रियवृत्ती नव्हे. थोडी प्रतिकूल वृत्तिच आहे.

उदासीनोऽरिवद्वर्ज्यः। (भाग० १०। २४। ५)

असे भागवतात म्हटले आहे. उदासीन म्हणजे मित्र नव्हे. म्हणून प्रकृतिविषयी सांख्यविचाराने उदासीन झालेला पुरुष निःशेष दुःखरहित होत नाही. वेदान्तातील आत्मनात्मरूपी शुद्ध विवेकाच्या योगाने प्रकृती व तिचे कार्य संपूर्ण मिथ्या ठरवून म्हणजे त्याला स्वतंत्र अस्तित्व व वस्तुत्व मुळीच नाही असे कळून आल्यावर, मग "सरळ" म्हणजे समरस असा एक आत्माच उरतो. तेथे प्रतिकूल मानण्याजोगे किंवा उदासीन असण्याजोगे असे कांहीच उरत नाही. उरलेला असा एक समरस आत्मा अत्यंत प्रिय अतएव अनुकूल असल्यामुळे त्याचे ठिकाणी जसजसे चित्त स्थिर होईल तसतसा महासुखाचा किंवा परमानंदाचा अखंड लाभ होतो.

तरी संवादु तोचि दशनु। जो समता शुभ्रवर्णु। देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु। विघ्नराजु॥ १५॥

अर्थ—सर्व दर्शनांची एकवाक्यता हाच गणेशाच्या मुखातील पांढरा शुभ्र एकसारखा समान असलेला दात होय. हा सर्व विघ्नांचा शास्ता असा गणेश, उन्मेष म्हणजे अद्वैतज्ञानरूपी सूक्ष्म दृष्टी असलेला देव होय॥ १५॥

गूढार्थदीपिका—येथे संवाद हा शब्द विसंवादीच्या विरोधी अर्थाने आला आहे. वैदिक षड्दर्शने वरवर विसंवादी म्हणजे भिन्न भिन्न मतांचे प्रतिपादन करणारी दिसत असली तरी ब्रह्मदृष्टीने त्यांची एकवाक्यता आहे असा

अर्थ. रजस्तमोगुणी दर्शनांचा आग्रह सोडल्यास शुद्धसत्वगुणात्मक समबुद्धीने त्यांची एकवाक्यता होते, हा 'जो समता शुभ्रवर्ण' या पदसमुच्चयाचा भाव आहे. प्रपंचाला जाणणारी स्थूल दृष्टी जीवाचे ठिकाणी असते. अत्यंत सूक्ष्म अशा परब्रह्माला जाणणारी दृष्टी सूक्ष्म किंवा चरम म्हटली जाते. परमेश्वराचे ठिकाणी एक तीच सूक्ष्म दृष्टी असते, स्थूल दृष्टी मुळीच नसते म्हणजे जीवाला जसे जगाचे भान आहे तसे ते परमेश्वराला मुळीच नाही असा भाव. ज्ञानेश्वरीत श्री माउली म्हणते.

तो सृजी पाळी संहारी। ऐसें बोलती जें चराचरीं। तें अज्ञान गा अवधारीं। पंडुकुमरा॥ (ज्ञाने० ५-८२)

जगचि हें होय जाये। तो शुद्धीही नेणे॥ (ज्ञाने० ५-७९)

'विघ्नराज' या शब्दाने आपल्या भक्ताची परमार्थ मार्गातील विघ्ने नाहीशी करण्याचे सामर्थ्य परमेश्वराचे ठिकाणी आहे, हे दाखविले आहे.

मज अवगमलिया दोनी। मीमांसा श्रवणस्थानीं। बोधमदामृत मुनी-। अली सेविती॥ १६॥

अर्थ—पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा या दोन मीमांसा गणेशाचे दोन श्रवण म्हणजे कान होत असे मला वाटते व त्यातील ज्ञान मादक अमृत असून, मुनिरूपी भ्रमर त्याचे सेवन करतात. ॥ १६ ॥

गूढार्थदीपिका—पूर्वमीमांसा दर्शन व उत्तरमीमांसा दर्शन यांची उपमा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी वर दिली असून पुन: येथे त्यांची कानाचे ठिकाणी उपमा देत आहेत. याचे कारण हे आहे की, षड्दर्शनांपैकी पूर्वदर्शन व उत्तरदर्शन ही दोन दर्शने अशी आहेत की ज्यांचे दर्शन व मीमांसा असे दोन स्वतंत्र भाग पडतात. उपनिषदे हे उत्तरदर्शन असून कर्ममार्ग सांगणारे श्रौतस्मार्त ग्रंथ हे पूर्वदर्शन होय. या दोन्ही दर्शनातील नाना प्रकारचे जे वचनविरोध आहेत, त्यांचा परिहार करून त्यांची एकवाक्यता करणे व व्यवस्था लावणे, हा मीमांसेचा भाग होय. कर्मदर्शनात कर्मदेवता वगैरे प्रतिपादक जी वचने आहेत, त्यांचा विरोधपरिहार पूर्वमीमांसेत केला आहे आणि आत्मविषयक, ज्ञानविषयक, उपासनाविषयक वगैरे जी उपनिषदातील वचने आहेत त्यांचा विरोधपरिहार उत्तरमीमांसेत केला आहे. ही दोन दर्शने सोडून बाकीच्या न्यायादि दर्शनात विरोधपरिहाराचा संबंधच नसल्यामुळे त्या दर्शनांचे मीमांसाग्रंथ स्वतंत्र नाहीत. म्हणून षड्दर्शनांची उपमा देताना, निरनिराळ्या यज्ञयागादि कर्माचे नुसते निरूपण करणाऱ्या ग्रंथाचा पूर्वदर्शन या शब्दाने उल्लेख करून, उपनिषदांचा उत्तरदर्शन म्हणून उल्लेख केला गेला आहे व विरोध-परिहार करणारे पूर्वमीमांसा सूत्रग्रंथ व उत्तरमीमांसा सूत्रग्रंथ यांना मीमांसा म्हणून तेथे संबोधिले आहे.

सूत्रग्रंथांना देखील दर्शन म्हणून (पूर्वमीमांसा दर्शन व उत्तरमीमांसा दर्शन) संबोधण्यात येते. याचे कारण हे आहे की या सूत्रग्रंथात देखील मूळ दर्शनग्रंथातील सिद्धान्त देऊन त्यांची मीमांसा केली आहे. दर्शन ग्रंथांचे सिद्धान्त त्यात असल्यामुळे त्यांना दर्शन म्हणतात व मीमांसा केली आहे म्हणून मीमांसा म्हणतात. अर्थातच त्यांची गणेशाच्या कानाला योग्य अशी स्वतंत्र उपमा दिली गेली आहे. मीमांसा ऐकल्याखेरीज बरोबर कर्मज्ञान किंवा ब्रह्मज्ञान होणार नाही. निरनिराळ्या कर्माने प्राप्त होणाऱ्या स्वर्गादिकातील विषयसुखाच्या आसक्तीने मदांध झालेले मुनी कर्मज्ञानाची मीमांसा करणारी पूर्वमीमांसा ऐकतात व ब्रह्मज्ञानाने प्राप्त होणाऱ्या आत्मसुखाच्या आसक्तीने मदांध झालेले विरक्त मुनी शुद्ध ब्रह्मज्ञान करून देणारी उत्तरमीमांसा ऐकतात.

प्रमेय प्रवाल सुप्रभ। द्वैताद्वैत तेचि निकुंभ। सरिसेपणे एकवटती इभ। मस्तकावरी॥ १७॥

अर्थ—तेजस्वी प्रवाळाप्रमाणे असलेले द्वैत व अद्वैत ही दोन प्रमेये हीच त्या गणेशाची गंडस्थळे होत आणि तीच गणपतीच्या हत्तीच्या मस्तकावर सारखीच बरोबरीने राहिली आहेत. ॥ १७ ॥

गूढार्थदीपिका—द्वैताद्वैत.......एकवटती:—द्वैत व अद्वैत ही प्रमेये परस्परांचा विरोध न येता गणेशाचे मस्तकावर गंडस्थळाप्रमाणे राहिली आहेत. या म्हणण्याचा भावार्थ असा की वस्तू व वस्तूची शक्ती मिळून एक वस्तू होत असते. वस्तू व वस्तूची शक्ती या दोन निराळ्या वस्तू नसतात. म्हणून त्यांना यत्किंचित् अलग करता येत नाही.

ब्रह्मवस्तू ही तशीच शक्तिसहित एकरूप आहे. ब्रह्मवस्तू व तिची शक्ती अलग करता येत नाही. म्हणूनच त्यांचा निराळेपणा नाही. पाण्यावर लहरी स्फुरल्याबरोबर मुळच्या पाण्याचा एकपणाच दोनपणाने भासू लागतो, पण पाण्याहून लहरी किंवा लहरीहून पाणी निराळे करता येत नाही. कारण त्यांचे एकवस्तुत्व कायमच राहते. म्हणून त्यांचे ऐक्य किंवा अभेद खरे (कधीही नष्ट न होणारे) असल्यामुळे त्यांचे दोनपण भासमात्र ठरते. त्याप्रमाणे ब्रह्मवस्तू शक्तिस्वरूपाने किंवा वृत्तिस्वरूपाने स्फुरण पावली असता ब्रह्म व स्फुरण असे दोनपणाने दिसत असले तरी, त्यांचे ऐक्य किंवा एकवस्तुत्व नाहीसे होत नाही व त्यांना परस्परातून अलग निराळे करता येत नाही. म्हणून ब्रह्म व त्याची शक्ती यांचे दोनपण भासमात्र असते. ज्याप्रमाणे एक पाणीच लहरीच्या रूपाने दोनपणाला येते. म्हणून त्या दोनपणाचा पाण्याच्या एकपणाशी विरोध नसतो किंवा पाण्याच्या एकपणाचा लहरीमुळे होणाऱ्या दोनपणाशी विरोध नसतो; त्याप्रमाणे अद्वैत परब्रह्मच शक्तीच्या स्फुरणाने दोनपणाला येत असल्यामुळे अद्वैतब्रह्माचा शक्तीच्या स्फुरणामुळे भासणाऱ्या दोनपणाशी किंवा शक्तीच्या स्फुरणामुळे भासणारा दोनपणा ब्रह्माच्या अद्वैतपणाशी विरोधी नाही. कारण पाणी लहरीरूपाने दोनपणाला आले तरी पाणी व लहरी यात जसे पाणीच असते, त्याप्रमाणे ब्रह्महो शक्तीस्फुरणाने दोनपणाला आले तरी ब्रह्म व स्फुरण या दोहोतही एक सच्चिदानंद परब्रह्मच अनुभवाला येते. पाण्याच्या लहरीच्या स्फुरणाने पाण्याचे ज्ञान जसे झाकले जात नाही, त्याप्रमाणे ब्रह्माच्या शक्तिस्फुरणाने ब्रह्माचे सच्चिदानंद ज्ञान झाकले जात नाही.

अद्वैत परमार्थोहि द्वैतं तत्कार्यमुच्यते।

या मांडुक्यकारिकेवरील आपल्या भाष्यात आचार्यांनी हाच आशय दाखविला आहे. आचार्यांनी किंवा श्रीज्ञानेश्वर महाराजादि संतांनी जे द्वैताचे खंडन केले आहे, ते ज्या द्वैताच्या प्रत्ययाने अद्वैतप्रत्यय झाकला जातो व अद्वैतब्रह्माच्या सच्चिदानंद धर्माहून निराळ्या अशा जड विनाशी व दु:खरूप धर्माचा प्रत्यय येतो अशा द्वैत प्रत्ययाचे त्यांनी खंडन केले आहे. द्वैताला अद्वैतासारखेच त्रिकालाबाधित मानणारे जे लोक आहेत, ते आचार्यांप्रमाणे द्वैताला अद्वैताचे कार्य मानीत नाही. कारण साखरेपासून बनलेल्या पदार्थात जशी साखर स्पष्ट असते तशाप्रमाणे सच्चिदानंद परब्रह्मापासून झालेल्या द्वैतरूप जगाचाही सच्चिदानंद धर्माने अनुभव त्यांना आला असता. पण ते ब्रह्मापासून झालेल्या द्वैतरूप जगाला जड, विनाशी, दु:खरूप मानतात म्हणून त्यांचा द्वैतप्रत्यय अद्वैतप्रत्ययाला झाकणारा होतो. तेथे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी द्वैताद्वैत ही अविरोधी गंडस्थळाप्रमाणेच आहेत असे जे म्हटले आहे ते द्वैती लोकांच्या म्हणण्याप्रमाणे नाही. हाच विषय त्यांनी अनुभवामृतात स्पष्ट केला आहे. सारांश अद्वैत त्रिकालाबाधित किंवा अखंड अबाधित असून द्वैत भासमात्र आहे असाच श्रीज्ञानेश्वर महाराजांचा येथे आशय आहे.

कोणी म्हणतात की या ओवीत 'निकुंभ' शब्दाचे ऐवजी 'कुंभ' शब्द योग्य आहे; कारण 'निकुंभ' हा शब्द गंडस्थलवाचक नसून 'कुंभ' हा शब्द गंडस्थलवाचक आहे. परंतु येथे 'निकुंभ' हाच शब्द योग्य आहे. कारण 'कुंभ' हा शब्द गंडस्थलवाचक असला तरी त्या शब्दाने एकाच गंडस्थलाचा बोध होईल परंतु गणेशाच्या मस्तकावर दोन गंडस्थले आहेत त्या दोघांचा बोध व्हावा म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी गटवाचक 'नि' हा उपसर्ग 'कुंभ' या शब्दाला लावून 'निकुंभ' या शब्दाने दोन गंडस्थलांच्या गटाचा बोध करून दिला आहे.

उपरि वेदोपनिषदें। जियें उदारें ज्ञानमकरंदें। तियें कुसुमें मुगुटीं सुगंधें। शोभती भलीं॥ १८॥

अर्थ—ज्यात उदारज्ञानरूपी मकरंद म्हणजे मध भरलेला आहे व जी वेदांचा अंतिम भाग म्हटली जातात ती उपनिषदे गणेशाच्या मस्तकाच्या मुकुटाचे ठिकाणी अत्यंत शोभणारी सुगंधी फुले आहेत.॥ १८॥

गूढार्थदीपिका:—वेदातील मंत्र व ब्राह्मण यातील कर्मकांडाच्या भागात, यज्ञयागादिक क्रिया, देवता इत्यादिक भिन्न-भिन्न पदार्थाला धरून व अनेक निषेधाने युक्त असे संकुचित ज्ञान आहे. पण उपनिषदातून जे ज्ञान सांगितले गेले आहे, ते सर्व भेद नाहीसे करून, मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत अखिल चराचर पदार्थांचे ठिकाणी एक पूर्ण ब्रह्मदृष्टीच उत्पन्न करून देते. म्हणून उपनिषदातील ज्ञानाला अत्यंत 'उदार' म्हणजे पदार्थमात्राला एक सारखे समदृष्टीने पाहणारे ज्ञान असे म्हटले आहे व ज्ञानाने सर्व दु:ख नाहीसे होऊन पुढे परमसुखाची प्राप्ती

होते. म्हणून त्या ज्ञानाला सुगंधित फुलातील गोड मधाची उपमा दिली आहे.

कोणी, आचार्यानी दशोपनिषदावर भाष्य केले म्हणून दशोपनिषदेच प्रमाण मानून, येथे 'दशोपनिषदाचा' पाठ घेतात. पण आचार्यानी नृसिंहतापनीय, श्वेताश्वतर, या उपनिषदांवरही भाष्य केले असून ब्रह्मसूत्रभाष्यात 'जाबालोपनिषद्' 'मैत्रेयोपनिषद्' 'नारायणोपनिषद्' इत्यादि उपनिषदातील वचने प्रमाण घेतली आहेत. म्हणून 'उपनिषद्' या शब्दाचा दशोपनिषदापुरताच मर्यादित (संकुचित) अर्थ करणे योग्य नव्हे. दश ही संख्या सर्व उपनिषदांचे उपलक्षण आहे.

अकार चरणयुगुल। उकार उदर विशाल। मकार महामंडल। मस्तकाकारें॥ १९॥

अर्थ—अकार म्हणजे सर्व स्थूल नामरूपे ही गणपतीचे दोन चरण होत. उकार म्हणजे सर्व सूक्ष्म नामरूपे ही गणपतीच्या पोटाचे ठिकाणी आहेत आणि मकार म्हणजे नामरूपांची अव्यक्तदशा ही गणपतीच्या विशाल मंडलाकार मस्तकाचे ठिकाणी होय. ॥ १९ ॥

हे तिन्ही एकवटले। तेथ शब्दब्रह्म कवळलें। तें मियां श्रीगुरुकृपा नमिलें। आदिबीज॥ २०॥

अर्थ—अकार उकार मकार ह्या तिन्ही मात्रा ज्या ॐकारात एकरूप आहेत, त्या ॐकारात सर्व वैदिकशब्दब्रह्म साठविले आहे. तो ॐकारच सर्व जगाचे 'आदिबीज' म्हणजे कारण असल्यामुळे श्रीगुरूकृपेने ते जाणून मी त्याला नमस्कार केला. ॥ २० ॥

गूढार्थदीपिका:—

तरी अनादि परब्रह्म। जें जगदादि विश्रामधाम। तयाचें एक नाम। त्रिधा पैं असे॥ (ज्ञाने० १७-३२८)

मनोवाग्गोचर असे परब्रह्म जाणण्याकरिता वेदाने परब्रह्माचे ॐ हे नाव ठेविले, ते अ, उ, म असे तीन मात्रात्मक आहे जगदुत्पत्तीपूर्वी परब्रह्माचे ठिकाणी ॐकाराचे स्फुरण होऊन, परमात्मा ॐकारवाच्य होतो. नंतर ॐकाराच्या अ, उ, म, अशा तीन मात्रा प्रगट होऊन त्यातून सर्व नामरूपे प्रगट होतात व त्या प्रगट झालेल्या नामरूपाचे योगाने परमात्मा जगद्रूपाला येतो. ज्याप्रमाणे पोळपाट, लाटणे, खुर्ची, मेज वगैरे कार्य एका लाकूड या पदार्थाचे केवळ नामरूपांचा बदल होऊनच निर्माण होतात, त्याप्रमाणे परब्रह्म हे प्रकट झालेल्या विविध नामरूपांमुळे अज्ञानी लोकांना जगद्रूप भासते. या सर्व नामरूपांचा विस्तार ॐकारात प्रथम साठविलेला असतो. म्हणून ॐकार जगाचे 'आदिबीज' म्हणजे मूळ कारण होय.

याचा अर्थ ॐकार हा जगताचे उपादान कारण आहे व ॐकार जगद्रूप झाला आहे असा नसून, ॐकारापासून सर्व वैदिक शब्द व त्या वैदिकशब्दपूर्वक सर्व सृष्टी निर्माण झाली आहे, असा त्याचा अर्थ आहे. हाच आशय आचार्यांनी.

शब्द इति चेन्नातः प्रभवात्प्रत्यक्षानुमानाभ्याम्। (ब्र० सू० १-३-२८)

या सूत्रावरील भाष्यात स्पष्ट केला आहे. प्रथम ओवीत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सगुणनिर्गुणरूप परमेश्वराला नमस्कार करून या ओवीत शब्दब्रह्मरूप ॐकाराला नमस्कार केला आहे.

आतां अभिनव वाग्विलासिनी। जे चातुर्यार्थकलाकामिनी।
ते शारदा विश्वमोहिनी। नमस्कारिली मियां॥ २१॥

अर्थ:—अपूर्व शब्दविलासाची जी परमेश्वरशक्ती, चातुर्यपूर्वक अर्थाची कला दाखविणारी, सर्व चौसष्ट कलेची स्त्रीमूर्ती व तशाच शब्दविलासामुळे जगाला मोह पाडणारी अशी जी शारदा, तिला मी नमस्कार केला. ॥ २१ ॥

गूढार्थदीपिका:—शब्दाधिष्ठात्री जी शारदा देवता तिने जग आहे. विधिनिषेध आहे, बंधमोक्ष आहे इत्यादि शब्दांनीच भ्रान्ती उत्पन्न केली आहे. जो जो शब्द जीव ऐकतो, त्या त्या शब्दाला परब्रह्माहून निरनिराळ्या अर्थाची तो कल्पना करतो असा अर्थ.

विधिनिषेधाचिया वाटा। दाविता हाचि दिवटा। बंधमोक्ष कळिकाटा। शिष्टु हाचि॥ ५॥

हा अविद्येचिया आंगा पडे। तैं नाथिले ऐसे रूढे। न लाहिजे तीन कवडे। साचा वस्तु॥ ६ ॥ (अमृ० प्र० ६)

इत्यादि ओव्यांनी हा अर्थ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अमृतानुभवाात स्पष्ट केला आहे.

वास्तविक पाहता श्रुती म्हणते विश्व हे केवळ वाचारंभण म्हणजे शब्दमात्र आहे. म्हणजे नुसते शब्दच आहेत. शब्दांप्रमाणे अर्थ नाहीत. सर्व शब्दांचा अर्थ एक परमात्माच आहे. पण विचार न करणाऱ्या जीवाला या शब्दाने भ्रम उत्पन्न केला व निरनिराळ्या शब्दांचे अनेक अर्थ आहेत असे तो मानू लागला. म्हणून शब्दाधिष्ठात्री शारदेला 'विश्वमोहिनी' म्हटले आहे.

मज हृदयीं सद्‌गुरु। जेणें तारिलों हा संसारपूरु। म्हणऊनि विशेषें अत्यादरु। विवेकावरी॥ २२ ॥

अर्थः—ज्यांनी आत्मानात्मविवेक सांगून या मायेच्या संसाररूपी पुरातून मला वाचविले, तो सदगुरु अखंड माझ्या हृदयात आहे. म्हणूनच माझा विवेकावर अत्यंत आदर किंवा प्रेम आहे. ॥ २२ ॥

गूढार्थदीपिका—संसारातून सुटण्याच्या तळमळीने ज्यांच्या अंतःकरणात संसारसमुद्रापासून तारणाऱ्या ज्ञानभक्तिसंपन्न श्रीगुरूंचे सारखे ध्यान असते अशा मुमुक्षू शिष्याला सद्‌गुरूनी आत्मानात्मविवेक सांगितल्याबरोबर तो विवेक त्याच्या अंतःकरणात अत्यंत दृढ ठसतो व त्या विवेकाच्या अत्यंत आस्थापूर्वक चिंतनाने, तात्काळ संसारमिथ्या ठरवून, शिष्याची संसारासक्ति नाहीशी होते. हे शिष्याचे श्रीगुरुवचनावर अत्यंत प्रेमामुळे असलेल्या विश्वासाचे फळ होय.

जैसें डोळयां अंजन भेटे। ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे। मग वास पाहिजे तेथ प्रगटे। महानिधी॥ २३ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे पायाळू मनुष्याच्या डोळ्याला अंजन लाविले असता त्याच्या दृष्टीचे तेज वाढून त्या दृष्टीला भूमिगत धन दिसू लागते. ॥ २३ ॥

कां चिंतामणि आलीया हातीं। सदा विजयवृत्ति मनोरथीं।
तैसा मी पूर्णकाम श्रीनिवृत्ती। ज्ञानदेवो म्हणे॥ २४ ॥

अर्थ—चिंतामणी हाती लागल्यास ज्याप्रमाणे मनुष्याचे सदा सर्वदा केलेले मनोरथ पूर्ण होतात, त्याप्रमाणे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात श्रीनिवृत्तिनाथांमुळे मीही पूर्णकाम झालो. म्हणजे माझी कोणतीच इच्छा निष्फळ होत नाही. ॥ २४ ॥

गूढार्थदीपिकाः—प्रेमळ शिष्याच्या प्रेमपूर्वक सेवेने तो दुःखरूप संसारसमुद्रातून पार व्हावा म्हणून श्रीगुरूच्या अंतःकरणांत जो त्याच्याविषयी अत्यंत कळवळा उत्पन्न होतो, त्या कळवळ्याने श्रीगुरू शिष्याचे सर्वस्वी स्वाधीन होतात आणि चिंतामणी हातात सापडला असता, जसे सर्व मनोरथ पूर्ण होतात, तसा सर्व समर्थ श्रीगुरु शिष्याच्या स्वाधीन झाल्यावर शिष्याचेही मनोरथ पूर्ण होतात. मुमुक्षू शिष्य, विषयसुखांची निःशेष वासना सोडून परमसुखरूप अशा परमेश्वराशी ऐक्य पावण्याकरिताच श्रीगुरुला शरण जात असल्यामुळे, निरनिराळ्या विषयसुख-प्राप्तीचे मनोरथ कधीच करीत नसतो, म्हणून येथे "मनोरथ या शब्दाचा अर्थ परमार्थ साधक अशा मनोरथाची पूर्ती" असाच घेतला पाहिजे.

म्हणोनि जाणतेनें गुरु भजिजे। तेणें कृतकार्य होईजे।
जैसे मूळसिंचनें सहजें। शाखा पल्लव संतोषती॥ २५ ॥

कां तीर्थे जियें त्रिभुवनीं। तियें घडती समुद्रावगाहनीं। ना तरी अमृतरसास्वादनीं। रस सकळ॥ २६ ॥

तैसा पुढतपुढती तोचि। मियां अभिवंदिला श्रीगुरुचि। जो अभिलषित मनोरुचि। पुरविता तो॥ २७ ॥

अर्थ—श्रीगुरुचे महिमान जाणणाऱ्या व परमेश्वर प्राप्तीचा मार्ग आक्रमू पाहणाऱ्या शहाण्या पुरुषाने श्रीगुरुचेच भजन करावे व त्या श्रीगुरुच्या भजनाने कृतकृत्य व्हावे. ज्याप्रमाणे झाडाच्या मुळाशी पाणी घातले असता, झाडाचे सर्व शाखादि अवयव संतुष्ट होतात म्हणजे टवटवीत होतात॥ २५ ॥ किंवा सृष्टीत जेवढी तीर्थे आहेत त्या सर्व तीर्थात स्नान केल्याचे पुण्य एका समुद्रात स्नान केल्याने मिळते किंवा अमृताच्या रसाचा स्वाद घेतला असता सर्व सहाहि

रसांचा स्वाद मिळतो॥ २६॥ त्याप्रमाणे सर्व कामना पुरविणारा एक श्रीगुरु आहे असे जाणून त्यालाच मी वारंवार वंदन केले.॥ २७॥

गूढार्थदीपिका—जाणतेने गुरु भजिजे—सच्छिष्याला श्रीगुरुच्याच ठिकाणी पूर्ण परब्रह्म परमात्म्याचा अनुभव येतो व तोच एक सर्व भावाने सेव्य ठरतो. वेदान्त निरूपणात अध्यारोपाने किंवा भ्रमाने जगताचा भास कसा होतो हे सांगताना शिष्याला श्रीगुरुचे ठिकाणी ब्रह्मदेवाचा अनुभव येतो. अपवादाने म्हणजे ब्रह्मविचाराने संसारभ्रमाची निवृत्ती करून दाखविताना श्रीगुरुचे ठिकाणी त्याला शंकराचा अनुभव येतो व ब्रह्मबोध करीत असताना परमार्थ मार्गात येणारे अडथळे दूर करून शिष्याला त्याची मूळची अविनाशी सच्चिदानंदरूप स्थिती प्राप्त करून देऊन मायामय संसारातून त्याचा श्रीगुरु उद्धार करतात, तेव्हा त्याला ते विष्णुरूप दिसतात व एक माझे सद्‌गुरुनाथच पूर्ण ब्रह्म होत असा अनुभव येतो. हाच आपला अनुभव श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अमृतानुभवाच्या दुसऱ्या प्रकरणात निवेदन केला आहे. श्रीगुरुहून ब्रह्म निराळे नाही. श्रीगुरुच पूर्ण होय. म्हणून एका श्रीगुरुचीच सेवा करावी म्हणजे जीव कृतकृत्य होतो असे माउली स्वानुभवाने सांगत आहे. श्रीगुरुला मनुष्य समजणाऱ्याचा परमार्थ कधीच साधत नाही असे नाथांनी ठिकठिकाणी म्हटले आहे.

आम्हा सद्‌गुरु तेचि परब्रह्म। ऐसा नित्य निजभाव सप्रेम।
हेचि गुरुसेवा उत्तमोत्तम। शिष्य परब्रह्म स्वयें होय॥ (ना० भा० अ० २ ओ० ५०२)
गुरुच्या ठायीं नीचपण। शिष्ये देखिलिया असे जाण।
अणुमात्र केलिया हेळण। ब्रह्मज्ञान कदां नुपजे त्या॥ (चतु० भा० ओ० ५७)

नीचपण म्हणजे जीवभाव असा अर्थ.

आतां अवधारा कथा गहन। जे सकळ कथां जन्मस्थान। कीं अभिनव उद्यान। विवेकतरुचें॥ २८॥
ना तरी सर्व सुखांची आदि। जे प्रमेयमहानिधि। नाना नवरससुधाब्धि। परिपूर्ण हे॥ २९॥
कीं परमधाम प्रकट। सर्व विद्यांचें मूळपीठ। शास्त्रजातां वसौट। अशेषांचें॥ ३०॥
ना तरी सकळ धर्मांचें माहेर। सज्जनांचें जिव्हार। लावण्यरत्नभांडार। शारदेचें॥ ३१॥
नाना कथारूपें भारती। प्रकटली असे त्रिजगतीं। आविष्करोनि। महामतीं। व्यासाचिये॥ ३२॥
म्हणोनि हा काव्यां रावो। ग्रंथ गुरुवतीचा ठावो। एथूनि रसां झाला आवो। रसाळपणाचा॥ ३३॥

अर्थ—सृष्टीतील सर्व ऐतिहासिक कथांचे, जी भारत कथा उगमस्थान आहे किंवा जी कथा अध्यात्म विवेकरूपी अपूर्व वृक्षांची बाग आहे॥ २८॥ किंवा सर्व सुखाचे जी मूळ आहे. जी नाना प्रकारच्या जाणण्यायोग्य अशा प्रमेयांचा किंवा सिद्धान्ताचा थोर साठा आहे किंवा नवरसांचा पूर्ण भरलेला सुखसागरच आहे॥ २९॥ किंवा जी कथा उघड परमगती होय. सर्व विद्यांचे जी जन्मस्थान होय. जी सर्व शास्त्रांचे वसतिस्थान आहे॥ ३०॥ किंवा जी सर्व धर्माचे माहेर होय. जी सत्पुरुषांचा जिव्हाळा आहे. जी सरस्वतीचे सौंदर्याचे कोठार आहे॥ ३१॥ किंवा जी कथा म्हणजे भगवान् व्यांसांच्या महान् विशाल बुद्धीचा आश्रय करून तिन्ही लोकात कथारूपाने प्रगट झालेली प्रत्यक्ष सरस्वती होय॥ ३२॥ म्हणून महाभारत ग्रंथ म्हणजे सर्व काव्यांचा राजा होय. इतर सर्व ग्रंथांच्या श्रेष्ठपणाचे एकमेव राहते ठिकाण होय. या ग्रंथापासूनच सर्व रसांना रसाळपणाची प्राप्ती झाली.॥ ३३॥

गूढार्थदीपिका—भगवान् व्यासांनी प्रथम एक लक्ष श्लोकात महाभारत ग्रंथाची रचना केल्यावर त्यांनी आणखी एकूण साठ लक्ष श्लोक रचले व दुसरी एकंदर साठ लक्ष श्लोकांची एक भारत संहिता तयार केली. ह्या संहितेपैकी तीस लक्ष संहिता देवलोकी प्रसिद्ध आहे, पंधरा लक्ष संहिता पितृलोकी प्रसिद्ध आहे; चौदा लक्ष संहिता गंधर्वलोकी प्रसिद्ध आहे आणि एक लक्ष संहिता मृत्यलोकी प्रसिद्ध आहे असे आदि पर्वात सांगितले आहे. (श्रीमन्महाभारत अनुक्रमणिका पर्व-अध्याय १). महाभारतात जे आहे तेच सर्व त्रिभुवनात आहे महाभारतात नाही ते कोठेच नाही.

तेवींचि आइका आणीक एक। एथूनि शब्दश्री सच्छास्त्रिक। आणि महाबोधीं कोंवळीक। दुणावली॥ ३४॥
एथ चातुर्य शहाणें झालें। प्रमेय रुचीस आलें। आणि सौभाग्य पोखलें। सुखाचें एथ॥ ३५॥
माधुर्यीं मधुरता। शृंगारीं सुरेखता। रूढपण उचितां। दिसले भलें॥ ३६॥
एथ कळाविदपण कळा। पुण्यासि प्रतापु आगळा। म्हणऊनि जनमेजयाचे अवलीळा। दोष हरले॥ ३७॥
आणि पाहतां नावेक। रंगीं सुरंगतेची आगळीक। गुणां सगुणपणाचें बिक। बहुवस एथ॥ ३८॥
भानुचेनि तेजें धवळलें। जैसें त्रैलोक्य दिसे उजळलें। तैसें व्यासमति कवळलें। मिरवे विश्व॥ ३९॥
कां सुक्षेत्रीं बीज घातलें। तें आपुलियापरी विस्तारलें। तैसें भारतीं सुरवाडलें। अर्थजात॥ ४०॥
ना तरी नगरांतरीं वसिजे। तरी नागरचि होईजे। तैसें व्यासोक्तितेजें। धवळित सकळ॥ ४१॥
कीं प्रथमवयसाकाळीं। लावण्याची नव्हाळी। प्रकटे जैसी आगळी। अंगनाअंगीं॥ ४२॥
ना तरी उद्यानीं माधवी घडे। तेथ वनशोभेची खाणी उघडे। आदिलापासोनि अपाडें। जियापरी॥ ४३॥
नाना घनीभूत सुवर्ण। जैसें न्याहाळितां साधारण। मग अळंकारीं बरवेपण। निवाडु दावी॥ ४४॥
तैसें व्यासोक्ती अळंकारिलें। आवडे तें बरवेपण पातलें। तें जाणोनि काय आश्रयिलें। इतिहासीं॥ ४५॥
ना ना पुरतिये प्रतिष्ठेलागीं। सानीव धरूनि अंगीं। पुराणें आख्यानरूपें जगीं। भारता आलीं॥ ४६॥
म्हणऊनि महाभारतीं जें नाहीं। तें नोहेचि लोकीं तिहीं। येणें कारणें म्हाणिपे पाहीं। व्यासोच्छिष्ट जगत्रय॥ ४७॥

अर्थ—त्याचप्रमाणे आणिक एक गोष्ट सांगतो, ऐका. या महाभारत ग्रंथापासूनच शब्दाच्या सौंदर्याला शास्त्रीयपणाची बैठक मिळाली. ब्रह्मबोधाची रुक्षता जाऊन त्याचा मृदुपणा पुष्ट झाला॥ ३४॥ चातुर्याला चतुरता येथून प्राप्त झाली. नीरस ब्रह्मसिद्धान्ताला रुची आली. सुखाचे वैधव्य म्हणजे विषयसुखाचा नाशिवंतपणा जाऊन त्याचे सौभाग्य वाढले म्हणजे त्या सुखाला अखंडता प्राप्त झाली ''कैवल्याहि चढावा। करीत विषयसेवा (अमृता० प्र० ९)''॥ ३५॥ गोडीचा गोडपणा, शृंगार रसाचा सुरेखपणा, योग्यपणाला योग्य म्हणून जी प्रसिद्धी आली ती यामुळेच॥ ३६॥ कलांना कळानैपुण्य याचेपासूनच आले, पुण्याचे दोष जाळण्याचे सामर्थ्य येथूनच विलक्षण वाढले. म्हणूनच महाभारत श्रवणाने जनमेजयाचे दोष सहज नाहीसे झाले॥ ३७॥ घटकाभर विचार केला तर असे दिसून येते की बहारीचा बहारपणा विलक्षण वाढला आणि गुणाला सद्गुणपणाची खूप वाढ झाली.॥ ३८॥ सूर्याचे तेजस्वी प्रकाशाने त्रैलोक्य जसे प्रकाशित झालेले दिसते तसे भगवान् व्यासांच्या बुद्धीने आकलन झालेले असे संपूर्ण विश्व शोभत आहे.॥ ३९॥ किंवा ज्याप्रमाणे चांगल्या मशागत केलेल्या जमिनीत पेरलेले बी जितके विस्तार पावू शकेल तितके विस्तार पावते; त्याप्रमाणे या महाभारत ग्रंथात सर्व पुरुषार्थ किंवा सर्व प्रकारचे ज्ञान पूर्ण विस्तारपूर्वक निरूपिले आहे.॥ ४०॥ किंवा ज्याप्रमाणे शहरात राहणारा मनुष्य सुविद्य, चतुर, शहाणा होतो, त्याप्रमाणे भगवान् व्यासांच्या वचनरूपी तेजाचाच सर्वत्र प्रकाश पडला आहे.॥ ४१॥ किंवा ज्याप्रमाणे स्त्रियांच्या ठिकाणी तारुण्यदशेत त्यांचे अपूर्व सौंदर्य अधिकच प्रगट होते.॥ ४२॥ किंवा बगीच्यात वसंतऋतूने प्रवेश केला असता तेथे पहिल्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक वनश्रीची खाण उघडली जाते किंवा वनसौंदर्य वाढते.॥ ४३॥ किंवा सोन्याची लगड पाहिली असता साधारण वाटते. ती मन हरण करीत नाही. पण तीच अलंकाराचे रूपात आली असता मन मोहून आपले विशेषपण दाखविते.॥ ४४॥ त्याप्रमाणे भगवान व्यासांचे शब्दालंकाराने सुशोभित केलेले आणि ज्या ज्या तऱ्हेने आवडेल त्या त्या तऱ्हेने आवडू लागलेले, असे हे महाभारत आहे, असे पाहून इतिहासांनी त्या महाभारताचा आश्रय केला.॥ ४५॥ किंवा आपली पूर्ण प्रतिष्ठा वाढावी या उद्देशाने पुराणांनी नम्रपणा धारण करून आख्यानाच्या रूपाने महाभारतग्रंथात प्रवेश केला.॥ ४६॥ म्हणूनच महाभारताची अशी प्रसिद्धी झाली की महाभारतात जे नाही ते त्रैलोक्यातही नाही. म्हणूनच तिन्ही लोकात जे आहे ते सर्व भगवान व्यासांचे उच्छिष्टच आहे.॥ ४७॥

गूढार्थदीपिका—सर्वज्ञ अशा भगवान व्यासांनी आपले विविध ज्ञाननैपुण्य महाभारतात ओतले व महाभारतावरूनच जे ज्ञान निरनिराळ्या शास्त्रकारांनी आपल्या शास्त्रातून सांगितले, असा हा महाभारत ग्रंथ सर्व शास्त्रसमन्वित आहे असा भाव.

ऐसी जगीं सुरस कथा। जे जन्मभूमि परमार्थां। मुनि सांगे नृपनाथा। जनमेजया॥ ४८॥
जें अद्वितीय उत्तम। पवित्रैक निरुपम। परम मंगलधाम। अवधारिजो॥ ४९॥

अर्थ—वर वाखाणलेली अशी ही गोड व परमार्थाला किंवा परमपुरुषार्थाला प्राप्त करून देणारी महाभारत-रूपी कथा वैशंपायनाने राजा जनमेजयाला सांगितली. ॥ ४८ ॥ ही कथा अद्वितीय आहे म्हणजे हिच्या बरोबरीची पावन करणारी दुसरी कथा नाही. अशी ही केवळ पवित्रतेची मूर्ती आहे व ही अत्यंत कल्याणाचे माहेरघर आहे ऐका. ॥ ४९ ॥

आतां भारतकमळपरागु। गीताख्यु प्रसंगु। जो संवादला श्रीरंगु। अर्जुनेसी॥ ५०॥

अर्थ—आता जो श्रीकृष्ण व अर्जुन या दोघांचा संवादरूप प्रसंग झाला, ज्याला गीता म्हणतात व जो भारतरूपी कमळांतील सूक्ष्म सुगंधित रेणूच आहे. ॥ ५० ॥

गूढार्थदीपिका:—भारत कमळपराग:—चौदा विद्या, चौसष्ट कला, सर्व शास्त्रे व पुराणे इत्यादी ज्ञान-भांडाराचे माहेरधर असलेल्या भारतग्रंथात कमलाच्या परागाप्रमाणे सर्व ज्ञानांचा, गीतोपदेश हा सारभूत आहे. म्हणजे तो अत्यंत ग्राह्य आहे.

ना तरी शब्दब्रह्माब्धि। मथिलेया व्यासबुद्धि। निवडिलें निरवधि। नवनीत हें॥ ५१॥

अर्थ—किंवा ज्याला भगवान व्यासांनी सर्व श्रुतिस्मृतिरूप शब्दब्रह्माचे मंथन करून काढलेले लोणीच म्हणता येईल. ॥ ५१ ॥

मग ज्ञानाग्निसंपर्के। कडसिलें विवेकें। पद आलें परिपाकें। आमोदासी॥ ५२॥

अर्थ:—मग ज्ञानरूप अग्नीने तापवून विवेकाने कढल्यावर ज्याला सुंदर सुवास प्राप्त झाला. ॥ ५२ ॥

गूढार्थदीपिका:—ज्याप्रमाणे मंथन करून काढलेल्या लोण्याचा अग्निसंपर्काने लोण्यातील घृताव्यतिरिक्त भाग जळून जाऊन, उर्वरित सुगंधयुक्त तूप राहते त्याप्रमाणे गीतोपदेशरूप नवनीतातील ब्रह्मज्ञान विचाररूप अग्नीच्या योगाने आत्मानात्मविवेकाने मायोपाधिरूप ब्रह्मव्यतिरिक्त असलेला भाग जळून जाऊन सुगंधित तूपाप्रमाणे परमप्रेमरूप सगुणभक्ती राहते. परमप्रेमरूप भक्ती व त्या भक्तीचा विषय सगुण परमात्मा हे दोन्ही शुद्ध म्हणजे मायोपाधिरहित आहेत असा भाव.

जें अपेक्षिजे विरक्तीं। सदा अनुभविजे संतीं। सोहंभावें पारंगतीं। रमिजे जेथ॥ ५३॥
जें आकर्णिजे भक्तीं। जें आदिवंद्य त्रिजगतीं। ते भीष्मपर्वीं संगती। सांगिजैल॥ ५४॥
जें भगवद् गीता म्हणिजे। जें ब्रह्मेशांनीं प्रशंसिजे। जें सनकादिकीं सेविजे। आदरेसी॥ ५५॥

अर्थ—विरक्त पुरुष, विरक्तीची उदासीनता नाहीशी करण्याकरिता, ज्याची इच्छा करतात, सोहंभावाने ज्ञानात पारंगत झालेले देखील सगुण भगवंताच्या सुगंधित तुपाप्रमाणे असलेल्या परमप्रेमभक्तीमध्ये रममाण होतात, भक्तलोक ज्याचे नेहमी श्रवण करतात, ज्याला तिन्ही लोकात सर्वश्रेष्ठ म्हणून नमस्काराचा पहिला मान मिळतो तो भीष्मपर्वातील कृष्णार्जुन संवादाचा कथाभाग मी सुसंगत सांगतो ॥ ५३-५४ ॥ या संवादाला भगवद् गीता म्हणतात. याची ब्रह्मादी देवांनी फार प्रशंसा केली आहे. सनकादिकासारखे विरक्त पुरुष देखील अत्यंत पूज्यभावाने याचे सेवन करतात. ॥ ५५ ॥

गूढार्थदीपिका:—योगज्ञानादिकांच्या योगाने ब्रह्मात्मैक्यतेच्या जाणीवेचा येणारा प्रत्यय शांत होऊन शेवटी एक सगुण भगवंताची ज्ञानोत्तर भक्तीच उरते. तीच अंतिम प्राप्य असून भगवद्गीतेचा मुख्य सारभूत विषय आहे. म्हणून ती त्रैलोक्यात ब्रह्मदेव, शंकर व सनकादिक मुनी यांच्या सारख्या पूर्ण ज्ञान्यांना देखील सेव्य झाली आहे असा भाव.

कोणी एक अकृत्रिम। भक्तीचें हें वर्म। योगज्ञानादि विश्राम। भूमिका हे॥ (अमृ० प्रक० ९ ओ० ५९)

या ओवीत श्रीज्ञानेश्वर महाराजांनी हाच आशय व्यक्त केला आहे.

आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथा अप्युरुक्रमे। कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरि॥

(भाग० स्कं० १, अ० ७ श्लो० १०)

प्रेमभक्तीचे सुख किती मधुर आहे व ज्ञानी लोक त्यात कसे लंपट होतात हे या भागवताचे श्लोकांतही सांगितले आहे.

जैसें शारदीयेचे चंद्रकळे। माजीं अमृतकण कोंवळे। ते वेंचिती मनें मवाळें। चकोरतलगें॥ ५६ ॥
तियापरी श्रोतां। अनुभवावी हे कथा। अतिहळुवारपण चित्ता। आणुनियां॥ ५७॥
हे शब्देविण संवादिजे। इंद्रियां नेणतां भोगिजे। बोलाआदि झोंबिजे। प्रमेयासी॥ ५८॥
जैसे भ्रमर परागु नेती। परी कमळदळें नेणती। तैसी परी आहे सेविती। ग्रंथीं इये॥ ५९॥
कां आपुला ठावो न सांडितां। आलिंगिजे चंद्रु प्रगटतां। हा अनुरागु भोगितां। कुमुदिनी जाणे॥ ६०॥
ऐसेनि गंभीरपणें। स्थिरावलेनि अंतःकरणें। आथिला तोचि जाणे। मानूं इये॥ ६१॥

अर्थ—ज्याप्रमाणे शरद ऋतूतील पूर्ण चंद्राच्या किरणातील सूक्ष्म अमृतमय कण चकोर व त्यांची पिलेच अत्यंत कोमल मनाने वेचू शकतात. ॥ ५६ ॥ त्याप्रमाणे श्रोत्यांना गीतेतील प्रेमभक्तितत्त्वाचा अनुभव अत्यंत कोमल चित्ताने श्रवण करूनच घेता येणे शक्य आहे (येथील "कोंवळे", "हळुवार" इत्यादि पदे अत्यंत प्रेमाने श्रवण करावे याचे द्योतक आहेत). ॥ ५७ ॥ शब्दावाचून म्हणजे शब्दावरच लक्ष न ठेवता अर्थाकारवृत्ती करीत जाऊन या गीतेतील ज्ञान व भक्तिप्रेमाचे श्रवण व निरूपण केले पाहिजे. "इंद्रियां नेणतां भोगिजे" म्हणजे इंद्रिये आपले विषय विषयाला आपल्याहून निराळे ठेवून जसे विषयीविषयभावाने किंवा भोक्तृभोग्य भावाने भोगतात, तशा रीतीने गीतेतील सिद्धान्ताचा अनुभव आपल्याला निराळे ठेवून न घेता आपण अर्थाशी तद्रूप होत गेले पाहिजे आणि निरूपण ऐकतेवेळी वक्त्याचे तोंडून शब्द निघताच आपले चित्त अर्थाकार होईल इतकी चित्ताची एकाग्रता पाहिजे. ॥ ५८ ॥ ज्याप्रमाणे कमळातील रेणू वेचताना भ्रमर कमलदळावरच बसलेला असतो तरी त्याचे कमलदळावर लक्ष नसते. कमलदळावर बसलेलो आहो हे त्याला स्मरत नाही इतका तो त्यात गढून जातो. त्याप्रमाणे एकनिष्ठ आवडीने या ग्रंथाचे सेवन करावयास पाहिजे, तरच ग्रंथार्थ समजू शकतो. ॥ ५९ ॥ ज्या पाण्याचे ठिकाणी चंद्रविकासिनी कमलिनी असते ते पाण्याचे ठिकाण न सोडताच ती तेथूनच ज्या प्रेमाने चंद्राला आलिंगन देऊन चंद्राचे आलिंगनसुख भोगते, ते प्रेमसुख कमलिनीलाच माहीत. ॥ ६० ॥ अशा स्थिर एकचित्ताने जो श्रवण करील तोच या गीतोपदेशाचा अधिकारी होय व तोच गीतेचा अर्थ जाणण्यास समर्थ होतो. ॥ ६१ ॥

गूढार्थदीपिकाः—शब्देविण संवादिजेः—अनेक विषयव्यापृत चित्ताला व केवळ शब्दांकडे लक्ष देणाऱ्याला गीतेचा यथार्थ अर्थ समजू शकत नाही. कारण अद्वैताचे निरूपण करताना शब्दाने द्वैत निर्माण करूनच अद्वैत सांगितले जाते व शब्दांवर लक्ष देणारा अद्वैत ग्रहण न करता द्वैतच ग्रहण करतो. म्हणून शब्द ऐकल्याबरोबर शब्दावर म्हणजे शब्दाने निर्माण केलेल्या द्वैतावर लक्ष न देता गीतेतील जो अद्वैत अर्थ, त्या अर्थाच्या आकाराचे मन करावे, असा भाव.

अहो अर्जुनाचिये पांती। परिसणया योग्य होती। तिहीं कृपा करूनि संतीं। अवधान द्यावें॥ ६२॥
हें सलगी म्यां म्हणितलें। चरणां लागोनि विनविलें। प्रभु सखोल हृदय आपुलें। म्हणऊनियां॥ ६३॥
जैसा स्वभावो मायबापांचा। अपत्य बोले जरी बोबडी वाचा। तरी अधिकचि तयाचा। संतोष आथी॥ ६४॥
तैसा तुम्हीं मी अंगिकारिला। सज्जनीं आपुला म्हणितला। तरी उणें सहजें उपसाहला। प्रार्थूं कायी॥ ६५॥

अर्थ—श्रवण करताना अर्जुनाचे पंक्तीस बसून म्हणजे अर्जुनासारखे अत्यंत एकनिष्ठ आवडीने ज्यांना श्रवण करण्याची योग्यता आहे अशा संतमंडळींनीच कृपा करून श्रवण करावे॥ ६२ ॥ ही माझी आज्ञा नव्हे तर आपण थोर अंतःकरणाचे आहात हे जाणून आपल्या चरणापाशी लडिवाळपणाने मी विनंती करीत आहे. ॥ ६३ ॥ लहान मुलगा बोबडे जरी बोलत असला तरी त्याचे बोलण्याचे मायबापाला मोठे कौतुक वाटते. जितके जितके लहान मुलगा बोबडे बोलतो तितका तितका त्यांना अधिक संतोष होतो. हा मायबापांचा स्वभावच असतो. ॥ ६४ ॥ त्याप्रमाणे तुम्ही सज्जनांनी मला आपला म्हणून माझा अंगीकार केल्यामुळे माझ्या उण्यापुऱ्या बोलाबद्दल सहजच क्षमा कराल. क्षमा करा म्हणून प्रार्थना करण्याची गरजच नाही॥ ६५ ॥

गूढार्थदीपिका:—यात निरूपण करतेवेळी वक्त्यांनी श्रोत्यांना आपले आई-बापाप्रमाणे लेखावे व आपण थोरपणाचा व विद्वत्तेचा अभिमान न धरता अत्यंत मुलासारखे निरहंकार असावे हे दाखविले आहे. ह्या इतक्या निरहंकार स्थितीत जीवभाव जाऊन परमात्मा किंवा श्रीगुरुच अंत:करणात उरत असल्यामुळे त्यांचेकडून जे निरूपण होते ते परमात्म्यांनी किंवा श्रीगुरुनीच केलेले असते.

परी अपराधु तो आणीक आहे। जें मी गीतार्थु कवळुं पाहें।
तें अवधारा विनवूं लाहे। म्हणऊनियां॥ ६६ ॥
हें अनावर न विचारितां। वायांचि धिंवसा उपनला चित्ता।
येऱ्हवीं भानुतेजीं काय खद्योता। शोभा आथी॥ ६७ ॥
कीं टिटिभू चांचूवरी। माप सूये सागरीं। मी नेणतु त्यापरी। प्रवर्ते एथ॥ ६८ ॥
आयका आकाश गिंवसावें। तरी आणीक त्याहूनि थोर होआवें।
म्हणऊनि अपाडु हें आघवें। निर्धारितां॥ ६९ ॥

अर्थ:—पण येथे माझा एक प्रमाद होत आहे. तो असा की मी गीतेतील संपूर्ण अर्थ बुद्धीने आकलन करून स्पष्ट करू पाहतो, म्हणून तुमची प्रार्थना करीत आहे, पहा. ॥ ६६ ॥ कारण गीतार्थाचा विचार करू गेल्यास तो सर्वथा अनाकलनीय आहे, पण याचा विचार न करताच मनात गीतार्थाचे विवरण करण्याचे मी धैर्य धरीत आहे. एरव्ही पाहता सूर्यप्रकाशापुढे काजव्याच्या प्रकाशाला काय किंमत आहे ? ॥ ६७ ॥ किंवा गीतार्थाचे अनाकलनीयत्व न जाणता माझे विवरण करण्याचे धैर्य म्हणजे टिटवीने आपले सामर्थ्य न जाणता समुद्रात चोच घालून आपल्या चोचीने समुद्राच्या पाण्याचा अंत पाहण्यासारखे आहे. ॥ ६८ ॥ हे पहा, आकाशाला कवटाळू म्हटले तर त्याहून थोर व्हायला पाहिजे (पण ते शक्य नसते) तसेच ज्याच्या बरोबरीचे दुसरे काहीच नाही असे गीतातत्त्व अमर्याद आहे—म्हणजे 'असे आहे, तसे आहे', असा निश्चय करता येत नाही. ॥ ६९ ॥

गूढार्थदीपिका:—अपाड हें आघवें—निर्धारितां—परब्रह्म हे सर्व वृत्तीचे साक्षी असल्यामुळे ते सर्व वृत्तीच्या पलीकडे राहते; म्हणून कोणत्याही निश्चयादी वृत्तींचा ते विषय होऊ शकत नाही. निश्चय, अनुभव इत्यादि वृत्ती जाणीवस्वरूप असल्यामुळे जोपर्यंत जाणीव उरली आहे तोपर्यंत जीव हा निर्विकल्प ब्रह्मस्वरूप होत नाही असा भाव.

या गीतार्थाची थोरी। स्वयें शंभू विवरी। जेथ भवानी प्रश्नु करी। चमत्कारोनी॥ ७० ॥
तेथ हरु म्हणे नेणिजे। देवी जैसें कां स्वरूप तुझें। तैसें हें नित्य नूतन देखिजे। गीतातत्त्व॥ ७१ ॥

अर्थ—असे हे अतिगंभीर व सूक्ष्म निर्विकल्प ब्रह्म गीतेचा अर्थ आहे. त्या गीतार्थाची थोरवी भगवान शंकर कथन करीत असताना देवी पार्वतीला आश्चर्य वाटून, त्याविषयी तिने शंकराला प्रश्न केला॥ ७० ॥ शंकर म्हणतात की देवी, गीतार्थाला मीही पूर्ण जाणत नाही. तुझे स्वरूप जसे नित्य नवीन आहे तसे गीतातत्त्वही नित्य नूतन आहे॥ ७१ ॥

गूढार्थदीपिका—नित्यनूतन देखिजे—गीतातत्त्व—नित्यनूतन म्हणजे प्रथम क्षणी जसे असते तसेच शेवटपर्यंत कायम राहणे. नव्या वस्तूचे प्रथमक्षणी प्रेम वाटते. पण ती वस्तू जशी जशी जुनी होते किंवा भोगली जाते तसे तसे तिचे प्रेम क्षीण होत जाते. म्हणून विषयाचे प्रेम असे क्षीण होत असल्यामुळे त्या विषयप्रेमाला नित्यनूतन प्रेम म्हणता यावयाचे नाही. आणि विषयही नित्यनूतन म्हटला जात नाही. सारखेच टिकून राहणारे जे प्रेम त्यालाच परमप्रेम म्हणतात किंवा परमप्रेमस्वरूप वस्तूच नित्यनूतन असते. देवी पार्वतीचे स्वरूप नित्यनूतन म्हणजे परमप्रेम स्वरूप आहे. परमप्रेमालाच भक्ती म्हणतात. असे प्रेम, भगवान अविनाशी असल्यामुळे त्याचे विषयीच राहू शकते. भगवंताविषयीचे नित्यनूतन म्हणजे परमप्रेम तेच गीतेचे तत्त्व होय. भगवंताची परमप्रेमभक्तीच मुख्यत: गीतेत प्रतिपादिली आहे.

गीतेतील प्रत्येक अध्याय कोणत्या ना कोणत्या प्रक्रियेच्या द्वारा परमप्रेमरूप अशा सच्चिदानंद ब्रह्माचेच प्रतिपादन करीत असल्यामुळे कोणत्याही अध्यायात साक्षात् किंवा परंपरेने परब्रह्माची प्राप्ती होते असा भाव.

हा वेदार्थसागरु। जया निद्रिताचा घोरु। तो स्वयें सर्वेश्वरु। प्रत्यक्ष अनुवादला॥ ७२ ॥

अर्थ—हा वेदार्थरूपीसागर ज्या परब्रह्म परमात्म्याचे घोरणे होय, तो परब्रह्म परमात्मा साक्षात् जागृतिदशेतील मनुष्याच्या बोलण्याप्रमाणे अर्जुनाशी बोलला॥ ७२॥

गूढार्थदीपिका—जागृती असो किंवा निद्रा असो ह्या अवस्था अविद्याजन्य आहेत व अविद्यायुक्त जीवाचे ठिकाणीच असतात. पण परमेश्वर अविद्यारहित आहे. तो कधीच अविद्येच्या स्वाधीन होत नाही; म्हणून त्याचे ठिकाणी निद्रा किंवा जागृति नाही. तेव्हा निद्रेत बेसावध राहून घोरणे व जागृतीत सावधपणे बोलणे हे भगवंताचे ठिकाणी संभवत नाही. त्याचप्रमाणे परमात्मा सर्वज्ञ, पूर्ण सच्चिदानन्दस्वरूप व सर्वशक्तिमान राहूनच अवतार घेत असल्यामुळे भगवंताचा अवतारविग्रहही अविद्यारहितच असतो व त्याचे ठिकाणीही जागृती किंवा सुषुप्ती ह्या अवस्था नसून जागृतीतला सावधपणा किंवा सुषुप्तीतला बेसावधपणा हे धर्म त्याचे ठिकाणी नसतात. म्हणून या ओवीचा अर्थ असा आहे की, ज्याप्रमाणे स्वप्नात मनुष्य घोरत असला तरी तो घोरण्याचा प्रयत्न करून घोरत नसतो तर सहज घोरतो, त्याप्रमाणें भगवंतापासून घोरण्याप्रमाणे म्हणजे अप्रयत्नपूर्वक (सहज) वेद निर्माण झाले आहेत. आणि त्यातील ज्ञान, भ्रमादिदोषरहित असल्यामुळे जर प्रमाण आहेत तर मग, त्याच परमात्म्याने अवतार घेऊन जागृतीत असलेल्या माणसाप्रमाणे प्रत्यक्ष सांगितलेले गीतेतील ते ज्ञान भ्रमरहित व प्रमाण आहे हे काय सांगायचे? जीवाने आपल्या कल्याणाकरिता भ्रमरहित ज्ञान व्हावे म्हणून गीतेनुसारच वेदाचे ज्ञान करून घेतले पाहिजे, एवढी गीतेची योग्यता आहे. भगवंतापासून प्रकट झालेल्या वेद व गीता या दोघात, वेद अस्पष्टार्थबोधक व गीता स्पष्टार्थबोधक आहे. म्हणून गीतेला धरून वेदादी भागाचा अर्थ करावा असा भाव.

ऐसें जें अगाध। जेथ वेडावती वेद। तेथ अल्प मी मतिमंद। काय होय॥ ७३॥

अर्थ—असा गीतेतील अर्थ अगाध आहे. ज्या गीतार्थाचे आकलन वेदालाही झाले नाही, तेथे माझ्यासारख्या मंदमतीचा पाड काय? (त्या गीतार्थाचे आकलन माझ्यासारख्याला कसे होणार?)॥ ७३॥

गूढार्थदीपिका—ऐसें जे अगाध—जेथ वेडावती वेद—गीतार्थाचे आकलन वेदालाही झाले नाही या म्हणण्याचा आशय हा आहे की वेदाने जाणीव ठेवून जेवढे सविशेष किंवा सविकल्प निरूपण करता आले तेवढे केले. पण ज्याप्रमाणे आंबा, द्राक्षे, साखर इत्यादि निरनिराळे मधुर पदार्थ खाल्ले तरी त्यांच्या रुचीतला फरक शब्दाने सांगता येत नाही, तो मनानेच कळतो, त्याप्रमाणे गीतेतील जाणीवरहित परमप्रेमरूप भक्तितत्त्वही अनिर्वचनीय म्हणून शब्दाचे पलीकडचे असे स्वसंवेद्य किंवा अनुभवरूप असल्यामुळे वेदाला शब्दाने सांगता आले नाही असा भाव.

हे अपार कैसेनि कवळावें। महातेज कवणें धवळावें। गगन मुठीं सुवावें। मशकें केवीं॥ ७४॥

अर्थ—असा हा अमर्याद व जाणीवेला आकलन न होण्याजोगा गीतार्थ बुद्धीत कसा आणावा? अत्यन्त थोर प्रकाशाला कशाने प्रकाशित करणार? एवढ्याशा चिलटाने आपल्या मुठीत आकाशाला कसे साठवायचे?॥ ७४॥

परि एथ असे एक आधारु। तेणेंचि बोलें मी सधरु। जे सानुकूळ श्रीगुरु। ज्ञानदेवो म्हणे॥ ७५॥
येऱ्हवीं तरी मी मुर्खु। जरी जाहला अविवेकु। तरी संतकृपादीपकु। सोज्वळु असे॥ ७६॥
लोहाचें कनक होये। हें सामर्थ्य परिसींच आहे। कीं मृतही जीवित लाहे। अमृतसिद्धि॥ ७७॥
जरी प्रकटे सिद्धसरस्वती। तरी मुकया आथी भारती। एथ वस्तुसामर्थ्यशक्ती। नवल कायी॥ ७८॥
कां जयातें कामधेनु माये। तयासी अप्राप्य कांहीं आहे। म्हणऊनि मी प्रवर्तों लाहें। ग्रंथीं इये॥ ७९॥

अर्थ—श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात अशा रीतीने गीतार्थ आपल्या स्वतंत्र बुद्धीने आकलन होणे जरी सर्वस्वी अशक्य आहे, तरी एका आधाराने ते शक्य आहे. व त्या आधाराच्या बळावरच मी धैर्याने गीतार्थ सांगू इच्छितो. तो आधार म्हणजे श्रीगुरुची कृपा होय.॥ ७५॥ एऱ्हवी पाहता मी अत्यंत अज्ञानी असून अति गंभीर असा गीतार्थ सांगण्याचा अविचार करीत आहे. पण माझ्या दृष्टीसमोर संतकृपेचा मोठा लखलखीत दिवा लागला असल्यामुळे, मी मूर्ख आहे तरी त्या दिव्याचे योगाने मला सर्व चक्क दिसते.॥ ७६॥ ज्याप्रमाणे परिसातच लोखंडाचे सोने करण्याचे सामर्थ्य आहे किंवा अमृताच्या योगाने मेलेला पुरुषही जीवंत होतो॥ ७७॥ मुक्याच्या मुखात जर सरस्वती

बसली तर मुकाही पंडित होईल. हे त्या त्या वस्तूचे सामर्थ्य आहे यात नवल नाही. ॥ ७८ ॥ किंवा ज्याला कामधेनू हीच माता प्राप्त झाली त्याला न प्राप्त होण्यासारखे काय आहे? त्याप्रमाणे सर्व समर्थ अशी श्रीगुरुची कृपा मला लाभल्यामुळे मी गीतार्थ सांगण्यास धजत आहे. ॥ ७९ ॥

गूढार्थदीपिका—बोलें मी सधरु। जैं सानुकूळ श्रीगुरु

परमप्रेमभक्तिरूप जो गीतेचा अर्थ तो, 'तत्तु मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद्वा।'

(नारदभक्तिसूत्र ३८)

या नारदभक्तिसूत्राप्रमाणे संतरूपी श्रीगुरु किंवा भगवान यांच्या कृपेनेच प्राप्त होणारा आहे. तो संतकृपेवाचून स्वत:च्या बुद्धीने आकलन होऊ शकत नाही असे सर्व संतांचे म्हणणे आहे.

तरी न्यून तें पुरतें। अधिक तें सरतें। करूनि घेयावें हें तुमतें। विनवितु असें॥ ८० ॥
आतां देइजो अवधान। तुम्हीं बोलविल्या मी बोलेन। जैसें चेष्टे सूत्राधीन। दारुयंत्र॥ ८१ ॥
तैसा मी अनुग्रहीतु। साधूंचा निरूपितु। ते आपुला अलंकारितु। भलतयापरी॥ ८२ ॥
तंव श्रीगुरु म्हणती राहीं। हें तुज बोलावें नलगे कांहीं। आतां ग्रंथा चित्त देईं। झडकरी वेगा॥ ८३ ॥
या बोला निवृत्तिदासु। पावूनि परम उल्हासु। म्हणे परियेसा मना अवकाशु। देऊनियां॥ ८४॥

अर्थ—तरी उणे काही वाटल्यास आपण पुरे करून घ्यावे व अधिक शब्द तोंडातून निघाल्यास आपण गोड करून घ्यावे ही माझी तुम्हाला प्रार्थना आहे. ॥ ८० ॥ आता निरूपणाकडे लक्ष द्यावे. तुम्ही जसे बोलवाल तसे मी निरूपण करीन. ज्याप्रमाणे लाकडाची कळसूत्री बाहुली जशी नाचविणाऱ्याच्या स्वाधीन असते, तसा मीही तुम्हा गुरुजनांचा कृपापात्र असून आज्ञेप्रमाणे वागणारा आहे. आता ते साधुजन आवडेल तसा आपल्या लेकराला अलंकृत करतील. ॥ ८१-८२ ॥ श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात "अशी प्रार्थना केल्याबरोबर श्रीगुरु निवृत्तिनाथांनी आश्वासन देऊन सांगितले, तुला प्रार्थना करण्याची गरजच नाही. ग्रंथ सांगण्याकडे लवकर चित्त दे म्हणजे झाले" ॥ ८३ ॥ हे आश्वासन ऐकून निवृत्तिदास श्रीज्ञानेश्वर महाराजांना परम आनंद झाला. परम उल्हास पावलेले श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रोत्यांना मनाला अवकाश देऊन ऐकण्याची विनंती करतात. ॥ ८४ ॥

गूढार्थदीपिका—परिसा मना अवकाशु। देऊंनियां

येथे मनाला अवकाश देऊन असे जे म्हटले आहे, त्याचा अर्थ, दुसरे काही न ऐकू देता मनाला गीतार्थच ऐकण्याला सवड द्या म्हणजे अत्यंत एकाग्र चित्ताने ऐका, असा आहे.

धृतराष्ट्र उवाच

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः। मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत सञ्जय॥ १ ॥

अर्थ—राजा धृष्टराष्ट्र म्हणतो, संजया! धर्मक्षेत्र असे जे कुरुक्षेत्र, जेथे माझे मुलगे व पांडूचे मुलगे आपसात युद्ध करण्याकरिता एकत्र मिळालेले आहेत, तेव्हा ते काय करते झाले. ॥ १ ॥

तरी पुत्रस्नेहें मोहितु। धृतराष्ट्र असे पुसतु। म्हणे संजया सांगें मातु। कुरुक्षेत्रींची॥ ८५ ॥
जें धर्मालय म्हणिजे। तेथ पांडव आणि माझे। गेले असती व्याजें। झुंजाचेनि॥ ८६ ॥
तरी तिहीं येतुला अवसरीं। काय किजत असे येरयेरीं। तें झडकरी कथन करीं। मजप्रती॥ ८७॥

अर्थ—पुत्रप्रेमाने वेडा झालेला धृतराष्ट्र संजयाला विचारतो की, संजया! कुरुक्षेत्राकडील हकीगत सांग. ॥ ८५ ॥ ज्या कुरुक्षेत्राला धर्माचे ठिकाण (म्हणजे जेथे गेले असता दुर्बुद्धी नाहीशी होऊन सुबुद्धीच सुचायची असे ठिकाण) म्हणतात त्या कुरुक्षेत्राचे ठिकाणी पांडव व माझे पुत्र कौरव युद्धाकरिता गेले आहेत. ॥ ८६ ॥ ते इतका वेळ परस्परात काय करीत आहेत हे लवकर मला सांग ॥ ८७ ॥

गूढार्थदीपिका—धर्मालय—

सर्व सृष्टी त्रिगुणात्मक आहे; म्हणून देशही त्रिगुणात्मक आहेत. त्या त्या गुणाचे देशाचे ठिकाणी गेले असता

त्यांच्या त्यांच्या गुणानुसार मनुष्याची मती होत असते. कुरुक्षेत्र हा देश धर्मक्षेत्र म्हणजे पुण्यक्षेत्र. त्या ठिकाणी गेलेल्या मनुष्याची वृत्ती सात्त्विक होऊन त्याचे मतीत सद्विचार उत्पन्न होतात. युद्धाकरिता कौरव अशा पुण्यभूमीवर गेल्यावर युद्ध करणे योग्य नाही, तर पांडवांचे न्याय्य राज्य त्यांना परत करावे असा त्यांच्या मतीमध्ये पालट झाला किंवा काय, अशी धृतराष्ट्राला शंका आली, असे "धर्मक्षेत्र" या पदाने सुचविले आहे.

सञ्जय उवाच

दृष्ट्वा तु पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा। आचार्यमुपसङ्गम्य राजा वचनमब्रवीत्॥ २॥
पश्यैतां पाण्डुपुत्राणामाचार्य महतीं चमूम्। व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता॥ ३॥

अर्थ—राजा धृतराष्ट्राचा प्रश्न ऐकून संजय म्हणतो "राजा धृतराष्ट्रा! व्यूहरचित पांडवांचे सैन्य पाहून राजा दुर्योधन द्रोणाचार्यापाशी आला व त्यांना म्हणाला. ॥ २ ॥ अहो आचार्य! तुमच्या बुद्धिमान शिष्याने व द्रुपद राजाच्या पुत्राने पांडवांच्या या अफाट सैन्याची कशी व्यूहरचना केली आहे, पहा." ॥ ३ ॥

तिये वेळीं तो संजय बोले। म्हणे पांडवसैन्य उचललें। जैसें महाप्रळयीं पसरलें। कृतांतमुख॥ ८८॥
तैसें तें घनदाट। उठावलें एकवट। जैसें उसळलें कालकूट। धरी कवण॥ ८९॥
नातरी वडवानलु सांदुकला। प्रलयवातें पोखला। सागर शोषूनि उधवला। अंबरासी॥ ९०॥
तैसें दळ दुर्धर। नानाव्यूहीं परिकर। अवगमले भयासुर। तिये काळीं॥ ९१॥
तें देखोनि दुर्योधनें। अव्हेरिलें कवणे मानें। जैसें न गणिजे पंचाननें। गजघटांतें॥ ९२॥
मग द्रोणापासीं आला। तयातें म्हणे हा देखिला। कैसा दळभारु उचलला। पांडवांचा॥ ९३॥
गिरिदुर्ग जैसे चालते। तैसे विविध व्यूह भंवते। हे रचिले आथि बुद्धिमंतें। द्रुपदकुमरें॥ ९४॥
जो कां तुम्हीं शिष्य आपुला। विद्या देऊनि कुरुठा केला। तेणें हा सैन्यसिंधु पाखरिला। देख देख॥ ९५॥

अर्थ—त्यावेळी तो संजय म्हणाला, युद्धाकरिता खवळलेले पांडवाचे सैन्य प्रलयकाळी तोंड फाडून सृष्टीचा संहार करू पाहणाऱ्या काळाच्या मुखाप्रमाणे भासले. ॥ ८८ ॥ ज्याप्रमाणे समुद्रमंथनातून निघालेले काळकूट विष देवदैत्यांना अनावर दिसू लागले त्याप्रमाणे घनदाट पसरलेले पांडवसैन्य कौरवांवर चाल करून जाण्यास सिद्ध झाले तेव्हा अनावर झाले॥ ८९ ॥ किंवा समुद्रातील वडवानळ पेटून त्याला प्रलयकाळच्या वायूचे साह्य मिळाले असता तो जसा संपूर्ण सागराला शोषून आकाशाला जाऊन भिडतो. ॥ ९० ॥ त्याप्रमाणे पांडवांचे अफाट व अनेकप्रकारच्या सैन्यरचनेने सज्ज झालेले सैन्य त्यावेळी भयानक दिसत होते. ॥ ९१ ॥ ते सैन्य पाहून ज्याप्रमाणे सिंहाने हत्तीच्या कळपाला काही जुमानू नये, तसे दुर्योधनाने मात्र त्याला तुच्छच लेखिले. ॥ ९२ ॥ मग दुर्योधन द्रोणाचार्यापाशी येऊन त्यांना म्हणू लागला, आचार्य! हे पाहिले का पांडवांचे सैन्य कसे सज्ज झाले आहे ते. ॥ ९३ ॥ तुमचा बुद्धिमान शिष्य द्रुपदराजाचा मुलगा, जो धृष्टद्युम्न, त्यांनी नानाप्रकारची सैन्याची रचना केली असून ते सैन्य जणू चालत्या डोंगरी किल्ल्याप्रमाणे दिसत आहे. ॥ ९४ ॥ अहो, पहा! पहा! ज्या ज्या शिष्याला तुम्ही धनुर्विद्या देऊन त्यात पूर्ण निष्णात केले, त्याने ही समुद्राप्रमाणे पसरलेल्या सैन्याची रचना केली आहे. ॥ ९५ ॥

गूढार्थदीपिका—सैन्यसिंधु—पराक्रम या गुणाला उद्देशून सिंहाची उपमा दिली जाते. पण येथे दुर्योधनाला पांडवसैन्याचा पराक्रम तुच्छ वाटत होता हे.

ते देखोनि दुर्योधनें। अव्हेरिले कवणे माने। जैसे न गणिजे पंचाननें। गजघटांतें॥

या ओवीवरून स्पष्ट आहे; म्हणून येथे सिंहाची उपमा योग्य नाही. पांडवांचे सैन्य कसे अफाट पसरले आहे हे दुर्योधनाला सांगावयाचे होते व त्याला अनुलक्षून पांडवांच्या सैन्याच्या अफाटपणाला सिंधूची उपमा दिली; म्हणून या ठिकाणी "सिंधु" हाच शब्द योग्य वाटतो.

अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि। युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः॥ ४॥
धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान्। पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुङ्गवः॥ ५॥

युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान् । सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥ ६ ॥

अर्थ—या सैन्यात भीम, अर्जुन यांच्या तुल्य महान पराक्रमी व थोर धनुर्धारी असे युयुधान, विराट, महारथी द्रुपद, धृष्टकेतू, चेकितान, पराक्रमी काशीराज, पुरुजित्, कुन्तिभोज, नरश्रेष्ठ शैब्यराजा, युधामन्यु, विक्रान्त, पराक्रमी उत्तमौजा, अभिमन्यू, द्रुपदराजाचे पुत्र इत्यादी महारथी आहेत. ॥ ४-५-६ ॥

आणीकही असाधारण। जे शस्त्रास्त्रीं प्रवीण। जे क्षात्रधर्मीं निपुण। वीर आहाती॥ ९६ ॥
जे बळें प्रौढी पौरुषें। भीमार्जुनांसारिखे। ते सांगेन कौतुकें। प्रसंगेंची॥ ९७ ॥
एथ युयुधानु सुभटु। आला असे विराटु। महारथी श्रेष्ठु। द्रुपद वीरु॥ ९८ ॥
चेकितान धृष्टकेतु। काशीश्वरु विक्रांतु। उत्तमौजा नृपनाथु। शैब्य देख॥ ९९ ॥
हा कुंतिभोजु पाहें। एथ युधामन्यु आला आहे। आणि पुरुजितादि राय हे। सकळ देखें॥ १०० ॥
हा सुभद्राहृदयनंदनु। जो अपरु नवा अर्जुनु। तो अभिमन्यु म्हणे दुर्योधनु। देखें द्रोणा॥ १०१ ॥
आणीकही द्रौपदीकुमर। हे सकळही महारथी वीर। मिती नेणिजे परि अपार। मीनले असती॥ १०२ ॥

अर्थ—आणिकही पांडवसैन्यात शस्त्र व अस्त्र यात विशेष प्रवीण व क्षात्रधर्मात विशेष निपुण असे वीर आहेत. ॥ ९६ ॥ जे बळात, थोरवीत व पराक्रमात भीमार्जुनासारखे आहेत, असे पुष्कळ वीर पांडवसैन्यात आहेत. त्याचीं नावे या प्रसंगी सांगतो. ॥ ९७ ॥ महान योद्धे युयुधान व विराट येथे आले आहेत व महारथी द्रुपदराजाही येथे आहे. ॥ ९८ ॥ धृष्टकेतू, चेकितान, पराक्रमी काशीराज, उत्तमौजा, नृपति, शैब्य. ॥ ९९ ॥ हा पहा, कुंतिभोज, हा युधामन्यू पहा, हे पुरुजितादी राजे, पहां ॥ १०० ॥ दुर्योधन म्हणाला द्रोणाचार्य! हा सुभद्रेचा मुलगा जो प्रत्यक्ष दुसरा अर्जुनच म्हटला जातो व जो सुभद्रेच्या चित्ताची साक्षात् करमणूक आहे, तो अभिमन्यू पहा. ॥ १०१ ॥ आणखी हे द्रौपदीचे मुलगे पहा. हे सर्व महारथी असून, असे जे पुष्कळ वीर येथे आले आहेत त्यांची संख्या करवत नाही ॥ १०२ ॥

अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम । नायका मम सैन्यस्य सञ्ज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥ ७ ॥
भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिञ्जयः । अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥ ८ ॥
अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः । नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥

अर्थ—आचार्य, आता आपल्या सैन्यात कोण कोण थोर योद्धे आहेत, हे आपल्या माहितीकरता सांगतो, ऐका. ॥ ७ ॥ आपण स्वतः, भीष्माचार्य, कर्ण, कृपाचार्य, समितिंजय, अश्वत्थामा, विकर्ण, तसाच राजा सौमदत्ती हे आहेत. ॥ ८ ॥ आणखी महान पराक्रमी, माझ्याकरिता आपल्या जीविताची आशा सोडणारे, नाना प्रकारच्या शस्त्रांचा युद्धात उपयोग करणारे, असे पुष्कळ वीर आहेत व ते सर्व युद्धशास्त्रात निपुण आहेत. ॥ ९ ॥

आतां आमुच्या दळीं नायक। जे रूढ वीर सैनिक। ते प्रसंगें आइक। सांगिजती॥ १०३ ॥
उद्देशें एक दोनी। जायिजती बोलोनी। तुम्ही आदिकरूनी। मुख्य जे जे॥ १०४ ॥
हा भीष्म गंगानंदनु। जो प्रतापतेजस्वी भानु। रिपुगजपंचाननु। कर्ण वीरु॥ १०५ ॥
या एकेकाचेनि मनोव्यापारें। हें विश्व होय संहरे। हा कृपाचार्य न पुरे। एकलाचि॥ १०६ ॥
एथ विकर्ण वीरु आहे। हा अश्वत्थामा पैल पाहें। याचा अडदरु सदा वाहे। कृतांतु मनीं॥ १०७ ॥
समितिंजयो सौमदत्ति। ऐसे आणीकही बहुत आहाती। जयांचिया बळा मिती। धाताही नेणे॥ १०८ ॥
जे शस्त्रविद्यापारंगत। मंत्रावतार मूर्त। हो कां जें अस्त्रजात। एथूनि रूढ॥ १०९ ॥
हे अप्रतिमल्ल जगीं। पुरता प्रतापु अंगीं। परी सर्व प्राणें मजचिलागीं। आराइले असती॥ ११० ॥
पतिव्रतेचें हृदय जैसें। पतीवांचूनि न स्पर्शे। मी सर्वस्व या तैसें। सुभटांसी॥ १११ ॥
आमुचिया काजाचेनि पाडें। देखती आपुलें जीवित थोकडें। ऐसे निरवधि चोखडे। स्वामिभक्त॥ ११२ ॥
झुंजती कुळकणी जाणती। कळे कीर्तीसी जिती। हे बहु असो क्षात्रनीती। एथोनियां॥ ११३ ॥
ऐसें सर्वांपरी पुरते। वीर दळीं आमुतें। आतां काय गणूं यांतें। अपार हे॥ ११४ ॥

अर्थ—आता आमच्या सैन्यात जे प्रसिद्ध सेनानी आहेत तेही या प्रसंगाने सांगतो, ऐका. ॥ १०३ ॥ तुमच्या माहितीकरिता एक दोन जे तुम्ही आदिकरून मुख्य मुख्य वीर आहेत ते सांगतो. ॥ १०४ ॥ हा गंगापुत्र भीष्माचार्य, पराक्रमरूपी अती दैदीप्यमान सूर्यच आहे. शत्रुरूपी हत्तींना सिंहासारखा वाटणारा हा कर्णवीर पहा. ॥ १०५ ॥ या एकेकाने नुसते मनात आणल्यास सर्व सृष्टीचा संहार होईल. कृपाचार्य हा एकटाच सर्व शत्रुसैन्याला पुरून उरणारा आहे. ॥ १०६ ॥ एथ हा विकर्ण वीर आहे. हा त्याच्या पलीकडेंच असलेला अश्वत्थामा पहा. याचे काळाला देखील सदा भय वाटत असते. ॥ १०७ ॥ समितिंजय सौमदत्ती यांचेसारखे आणिकही असे पुष्कळ वीर आहेत की ज्यांचे सामर्थ्य ब्रह्मदेवही जाणत नाही. ॥ १०८ ॥ हे शस्त्रविद्येत पूर्ण निष्णात असून अस्त्रविद्येचे तर मूर्तिमंत मंत्रच आहेत. असे वाटते की सर्व अस्त्रविद्याच यांच्यापासून प्रगट झाली. ॥ १०९ ॥ यांच्या तोडीचा जगात कोणी दुसरा मल्ल नाहीं. यांच्या अंगी पराक्रम पूर्णपणे वास करतो. असे असून माझ्याकरिता ज्यांनी जीवितावर पाणी सोडले आहे. ॥ ११० ॥ पतिव्रतेचे मन जसे पतीवाचून दुसरे कशालाही शिवत नाही त्याप्रमाणे या योद्ध्यांचे सर्व काही मी आहे. ॥ १११ ॥ आमच्या कार्यापुढे त्यांना त्यांचे जीवितही तुच्छ वाटते. असे हे पराकाष्ठेचे स्वामिभक्त आहेत. ॥ ११२ ॥ आपल्या पूर्वजांचा लौकिक जाणून युद्ध करतात. आपल्या युद्धकौशल्याने कीर्ती मिळवितात. बहुत काय सर्व क्षात्रधर्मच येथून प्रगट झाला असेच मी म्हणतो. ॥ ११३ ॥ सर्व दृष्टीने निष्णात असे हे वीर आमच्या सैन्यात आहेत व त्यांची संख्याही करवत नाही. ॥ ११४ ॥

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् । पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥ १० ॥

अर्थ—म्हणून भीष्माचार्यांनी रक्षण केलेले आमचे सैन्य अमर्याद असून भीमाने रक्षण केलेले पांडवांचे सैन्य मर्यादित आहे. ॥ १० ॥

वरी क्षत्रियांमाजी श्रेष्ठु। जो जगजेठी जगीं सुभटु। तया दळवैपणाचा पाटु। भीष्मासि पैं॥ ११५ ॥
आतां याचेनि बळें गवसलें। हें दुर्ग जैसें पन्नासिलें। येणें पाडें थेंकुलें। लोकत्रय॥ ११६ ॥
आधींच समुद्र पाहीं। तेथ दुवाडपण कवणा नाहीं। मग वडवानळु तैसे याही। विरजा जैसा॥ ११७ ॥
ना तरी प्रलयवन्हि महावातु। या दोघां जैसा सांघातु। तैसा हा गंगासुतु। सेनापति॥ ११८ ॥
आतां येणेंसि कवण भिडे। हें पांडवसैन्य कीर थोकडे। वरचिलेनि पाडें। दिसत असे॥ ११९ ॥
वरी भीमसेन बेथु। तो जाहला असे सेनानाथु। ऐसें बोलोनि हे मातु। सांडिली तेणें॥ १२० ॥

अर्थ—आणखी त्यात सर्व क्षत्रियात श्रेष्ठ, सर्व जगात नावाजलेले थोर योद्धे अशा भीष्माचार्यांना सर्व सैन्याच्या सेनापतिपणाचा अधिकार दिला आहे. ॥ ११५ ॥ आता यांच्या सामर्थ्याने आवरलेले हे सैन्य बांधलेल्या किल्ल्याप्रमाणे पसरले आहे. यांच्या तुलनेने पांडवसैन्यच काय पण त्रैलोक्यही अल्प आहे. ॥ ११६ ॥ आधीच समुद्र विशाल, तो पाहून कोणाला भय वाटत नाही? त्यातच जसे वडवानलाचे आणखी साह्य व्हावे. ॥ ११७ ॥ किंवा प्रलयकालचा अग्नी व प्रलयकालचा वायू दोघांचा ज्याप्रमाणे मेळ व्हावा त्याप्रमाणे हा गंगासुत सेनापती आहे. ॥ ११८ ॥ आता अशा या आमच्या सैन्याशी कोण युद्ध करणार? हे पांडवांचे सैन्य तर अगदीच अपुरे आहे. ॥ ११९ ॥ आणखी युद्धचातुर्यहीन आडदांड असा हा भीमसेन त्या पांडवसेनेचा सेनापती आहे. असे बोलून त्याने ही गोष्ट तेथेच सोडून दिली. ॥ १२० ॥

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः । भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्तः सर्व एव हि॥ ११ ॥

अर्थ—आपआपल्या माऱ्याच्या ठिकाणी स्थित राहून व आपल्या अधिकाराखाली असलेल्या सैन्यानिशी आपण सर्वांनी भीष्माचार्यांचे संरक्षण केले पाहिजे. ॥ ११ ॥

मग पुनरपि काय बोले। सकळ सैनिकांतें म्हणितलें। आतां दळभार आपुलाले। सरसे करा॥ १२१ ॥
जया जिया अक्षौहिणी। तेणें तिया आरणी। वरगण कवणकवणी। महारथिया॥ १२२ ॥
तेणें तिया आवरिजे। भीष्मातळीं राहिजे। द्रोणातें म्हणे पाहिजे। तुम्ही सकळ॥ १२३ ॥
हाचि एकु रक्षावा। मी तैसा हा देखावा। येणें दळभारु आघवा। साचु आमुचा॥ १२४ ॥

अर्थ—मग पुन: दुर्योधन सर्व सेनापतींना उद्देशून बोलू लागला की आता सर्वांनी आपापले सैन्यभार सज्ज करावे॥ १२१॥ ज्यांच्या ज्यांच्या स्वाधीन ज्या ज्या अक्षौहिणी असतील त्या त्या रणभूमीवर त्यांनी महारथ्यांच्या हुकमतीखाली वाटून द्याव्या॥ १२२॥ त्या त्या महारथ्यांनी त्या आपल्या स्वाधीन ठेवाव्या आणि सर्वांनी मिळून भीष्माचार्यांच्या आज्ञेत राहावे. द्रोणाचार्यांना मग म्हणाला॥ १२३॥ आपण सर्वांनी, भीष्माचार्यांना 'मी' समजून त्यांचे रक्षण केले पाहिजे. यांच्या योगानेच आपले सैन्य समर्थ ठरणार आहे॥ १२४॥

तस्य सञ्जनयन् हर्षं कुरुवृद्धः पितामहः। सिंहनादं विनद्योच्चैः शङ्खं दध्मौ प्रतापवान्॥ १२॥
ततः शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः। सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत्॥ १३॥

अर्थ—राजा दुर्योधनाचे भाषण ऐकून नंतर कौरवांच्या कुलात सर्वात वडिल असलेले पितामह जे भीष्माचार्य त्यांनी अत्यंत आवेशाने सिंहासारखी गर्जना करून व शंखनाद करून दुर्योधनाच्या चित्तात अत्यन्त हर्ष उत्पन्न केला॥ १२॥ भीष्माचार्यांच्या शंखनादाबरोबर जिकडे तिकडे शंख, भेरी, पणवानक, गोमुख वगैरे यांचे ध्वनी उठले व तो सर्व मिळून एकच भयंकर ध्वनी झाला॥ १३॥

या राजयाचिया बोला। सेनापति संतोषला। मग तेणें केला। सिंहनादु॥ १२५॥
तो गाजत असे अद्भुतु। दोन्हीं सैन्यांआंतु। प्रतिध्वनि न समातु। उपजत असे॥ १२६॥
तयाचि तुलगासवें। वीरवृत्तीचेनि थावें। दिव्य शंख भीष्मदेवें। आस्फुरिला॥ १२७॥
ते दोन्ही नाद मिनले। तेथ त्रैलोक्य बधिरीभूत जाहलें। जैसें आकाश का पडिलें। तुटोनियां॥ १२८॥
घडघडीत अंबर। उचंबळत सागर। क्षोभलें चराचर। कांपत असे॥ १२९॥
तेणें महाघोष गजरें। दुमदुमिताती गिरिकंदरें। तंव दळामाजि रणतुरें। आस्फुरिलीं॥ १३०॥
उदंड सैंघ वाजतें। भयानकें खाखातें। महाप्रळयो जेथें। धोकडांसी॥ १३१॥
भेरी निशाण मांदळ। शंख काहळा भोंगळ। आणि भयासुर रणकोल्हाळ। सुभटांचे॥ १३२॥
आवेशें भुजा त्राहाटिती। विसणैले हांका देती। जेथ महामद भद्रजाती। आवरती ना॥ १३३॥
तेथ भेडांची कवण मातु। कांचया केर फिटतु। जेणें दचकला कृतांतु। अंग नेघे॥ १३४॥
एकां उभयांचि प्राण गेले। चांगांचे दांत बैसले। बिरुदांचे दादुले। हिंवताती॥ १३५॥
ऐसा अद्भुत तूरबंबाळु। ऐकोनि ब्रह्मा व्याकुळु। देव म्हणती प्रळयकाळु। वोढवला आजी॥ १३६॥

अर्थ—या दुर्योधनाच्या बोलण्याने भीष्माचार्यांना फार संतोष होऊन त्यांनी भयंकर सिंहनाद केला॥ १२५॥ तो सिंहनाद जिकडे तिकडे दोन्ही सैन्यात घुमत होता व त्याचा प्रतिध्वनी इतका उमटत होता की तो कोठे मावेना॥ १२६॥ तो प्रतिध्वनी उमटत असताच भीष्माचार्यांनी वीरवृत्तीच्या आवेशाने दिव्य शंख फुंकला॥ १२७॥ ते दोन्ही नाद मिळाले तेव्हा आकाश तुटून पडावे त्याप्रमाणे भयंकर आवाज होऊन त्रैलोकांच्या कानठाळ्या बसल्या॥ १२८॥ आकाशात घडघड आवाज होऊ लागला. समुद्र उचंबळू लागला. सर्व चराचर भयभीत होऊन कांपू लागले॥ १२९॥ त्या भयंकर नादाने पर्वताच्या गुहा दुमदुमून गेल्या, तितक्यातच सैन्यात जिकडे तिकडे रणवाद्येही वाजू लागली॥ १३०॥ तेथेच भयंकर व कर्कश अशी अनेक प्रकारची वाजंत्रे वाजू लागली, तेव्हा मोठमोठ्या धैर्यवानांनाही महाप्रलय होतो असे वाटले॥ १३१॥ नौबत, डंके, ढोल, शंख, झांजा, तुतारी आणि जिकडे तिकडे योद्ध्यांचे युद्धासंबंधीचे ओरडणे या सर्वाचा एकच कल्लोळ झाला॥ १३२॥ योद्धे जिकडे तिकडे वीरश्रीने दंड थोपटू लागले. कित्येक युद्धाच्या आवेशाने शत्रूंना हाका देवू लागले. त्या ठिकाणी मदोन्मत्त हत्ती आवरेनासे झाले॥ १३३॥ भेकड असे कच्चे वीर तर पांचोळ्यासारखे उडाले. प्रत्यक्ष मृत्युदेखील भयभीत होऊन तेथे पाय ठेऊ इच्छित नव्हता॥ १३४॥ कित्येकानी उभ्या उभ्या प्राण सोडले. मी मी म्हणणाऱ्यांची दांतखिळी बसली, जे अजिंक्यपणाचे बंड वागविणारे होते तेही थरथर कांपू लागले॥ १३५॥ असा हा भयंकर ध्वनी ऐकून ब्रह्मदेवालाही काही सुचेनासे झाले. देव तर आता प्रलय होतो असेच म्हणू लागले॥ १३६॥

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ। माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शङ्खौ प्रदध्मतुः॥ १४॥
पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनञ्जयः। पौण्ड्रं दध्मौ महाशङ्खं भीमकर्मा वृकोदरः॥ १५॥
अनन्तविजयं राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः। नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ॥ १६॥
काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः। धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः॥ १७॥
द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते। सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान्दध्मुः पृथक् पृथक्॥ १८॥
स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्। नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन्॥ १९॥

अर्थ—नंतर ज्याला पांढरे शुभ्र घोडे जोडलेले आहेत अशा थोर रथात असलेल्या भगवान् श्रीकृष्ण व अर्जुन या दोघांनी आपल्या दिव्य शंखांचा नाद केला॥ १४॥ भगवान् श्रीकृष्णाने आपला पांचजन्य शंख फुंकला व अर्जुनाने आपला देवदत्त शंख वाजविला. अचाट कर्म करणाऱ्या बलशाली भीमाने आपला पौण्ड्र नावाच्या शंखाचा नाद केला॥ १५॥ कुन्तिपुत्र युधिष्ठिराने आपला अनंतविजय नावाचा शंख वाजविला आणि नकुल सहदेव यांनी आपले सुघोष, मणिपुष्पक या नावाचे शंख फुंकले॥ १६॥ हे राजा! महाधनुर्धारी काशीराज, महारथी शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट आणि कोणाहीकडून जिंकला न जाणारा असा सात्यकी, द्रुपद व द्रुपदराजाचे पुत्र या सर्वांनी व सुभद्रापुत्र अभिमन्यूने हे राजा! आपले निरनिराळे शंख फुंकले॥ १७-१८॥ या सर्व शंखांच्या एकवटलेल्या नादाने धृतराष्ट्रांच्या मुलांची अंतःकरणे विदीर्ण झाली व तो भयंकर नाद पृथ्वी व अंतरिक्षातही दुमदुमु लागला॥ १९॥

ऐसी स्वर्गी मातु। देखोनि तो आकांतु। तंव पांडवदळाआंतु। वर्तलें कायी॥ १३७॥
हो कां निजसार विजयाचें। कीं तें भांडार महातेजाचें। जेथ गरुडाचिये जावळियेचे। कांतले चाऱ्ही॥ १३८॥
कीं पाखांचा मेरु जैसा। रहंवरु मिरवतसे तैसा। तेजें कोंदाटलिया दिशा। जयाचेनि॥ १३९॥
जेथ अश्ववाहकु आपण। वैकुंठींचा राणा जाण। तया रथाचे गुण। काय वर्णूं॥ १४०॥
ध्वजस्तंभावरी वानरु। तो मूर्तिमंत शंकरु। सारथी शारंगधरु। अर्जुनेंसीं॥ १४१॥
देखा नवल तया प्रभूचें। अद्भुत प्रेम भक्तांचें। जें सारथ्य पार्थाचें। करितु असें॥ १४२॥
पाइकु पाठीसीं घातला। आपण पुढां राहिला। तेणें पांचजन्यु आस्फुरिला। अवलीळाचि॥ १४३॥
परी तो महाघोषु थोरु। गर्जतु असे गंहिरु। जैसा उदैला लोपी दिनकरु। नक्षत्रांतें॥ १४४॥
तैसे तूरबंबाळु भंवते। कौरवदळीं गाजत होते। ते हारपोनि नेणों केउते। गेले तेथ॥ १४५॥
तैसाचि देखें येरें। निनादें अति गहिरें। देवदत्त धनुर्धरें। आस्फुरिला॥ १४६॥
ते दोनी शब्द अचाट। मिनले एकवट। तेथ ब्रह्मकटाह शतकूट। हों पाहत असे॥ १४७॥
तंव भीमसेनु विसणैला। जैसा महाकाळु खवळला। तेणें पौण्ड्र आस्फुरिला। महाशंखु॥ १४८॥
तो महाप्रलयजलधरु। जैसा घडघडिला गंहिरु। तंव अनंतविजयो युधिष्ठिरु। आस्फुरित असे॥ १४९॥
नकुळें सुघोषु। सहदेवें मणिपुष्पकु। जेणें नादें अंतकु। गजबजला ठाके॥ १५०॥
तेथ भूपती होते अनेक। द्रुपद द्रौपदेयादिक। हा काशीपति देख। महाबाहू॥ १५१॥
तेथ अर्जुनाचा सुतु। सात्यकि अपराजितु। धृष्टद्युम्नु नृपनाथु। शिखंडी हन॥ १५२॥
विराटादि नृपवर। जे सैनिक मुख्य वीर। तिहीं नाना शंख निरंतर। आस्फुरिले॥ १५३॥
तेणें महाघोषनिर्घातें। शेष कूर्म अवचितें। गजबजोनि भूभारातें। सांडूं पाहती॥ १५४॥
तेथ तिन्ही लोक डंडळित। मेरु मांदार आंदोळित। समुद्रजळ उसळत। कैलासवेरी॥ १५५॥
पृथ्वीतळ उलथों पहात। आकाश असे आसुडत। तेथ सडा होत। नक्षत्रांचा॥ १५६॥
सृष्टि गेली रे गेली। देवां मोकळवादी जाहली। ऐसी एक टाळी पिटिली। सत्यलोकीं॥ १५७॥
दिहाचि दिन थोकला। जैसा प्रळयकाळ मांडला। तैसा हाहाकारु उठिला। तिहीं लोकीं॥ १५८॥
तें देखोनि आदिपुरुष विस्मितु। म्हणे झणें होय पां अंतु। मग लोपिला अद्भुतु। संभ्रमु तो॥ १५९॥

म्हणोनि विश्व सांवरलें। एऱ्हवीं युगांत होतें वोडवलें। जैं महाशंख आस्फुरिले। कृष्णादिकीं॥ १६०॥
तो घोष तरी उपसंहरला। परी पडिसाद होता राहिला। तेणें दळभार विध्वंसिला। कौरवांचा॥ १६१॥
जैसा गजघटाआंतु। सिंह लीला विदारितु। तैसा हृदयातें भेदितु। कौरवांचिया॥ १६२॥
तो गाजत जंव आइकती। तंव उभेचि हिये घालिती। एकमेकांतें म्हणती। सावध रे सावध॥ १६३॥

अर्थ—कौरव सैन्यात होत असलेला भयंकर ध्वनी ऐकून देव स्वर्गात अशा रीतीने गोष्टी करीत असताना, इकडे पांडवसैन्यात काय वर्तमान चालले होते॥ १३७॥ जणू विजयाचे सर्व सार असलेला (म्हणजे ज्याच्यावर बसून युद्ध केले असता विजय येणारच असा) किंवा जो थोर तेजाचे कोठराप्रमाणे अति दैदीप्यमान आहे, ज्याला गरुडासारखे वेगवान असलेले चार घोडे जुंपले होते. ॥ १३८॥ किंवा जो पंख असलेल्या मेरुपर्वताप्रमाणे दिसत होता, ज्याच्या तेजाने सर्व दिशा भरून गेल्या होत्या, असा तो अर्जुनाचा रथ तेथे शोभत होता॥ १३९॥ ज्या अर्जुनाचे रथावर साक्षात् वैकुंठीचा राजा स्वत: घोडे हाकणारा होता, त्या रथाचे गुण काय वर्णन करू?॥ १४०॥ रथाच्या ध्वजस्तंभावर मूर्तिमंत शंकर असलेले मारुतिराय असून अर्जुन योद्धा व सारथी भगवान् श्रीकृष्ण होते॥ १४१॥ पहा, भगवंताचे आपल्या भक्तावर कसे आश्चर्यकारक प्रेम असते. आपण स्वत: भगवान् अर्जुनाचे सारथ्य करू लागले॥ १४२॥ भगवंतांनी आपला दास पाठीशी घालून आपण शत्रूच्या समोर झाले. त्या भगवंताने सहज लीलेने पाञ्चजन्य शंख फुंकला. ॥ १४३॥ पण त्याचा ध्वनी इतका मोठा झाला की सूर्य उगवला असता ज्याप्रमाणे नक्षत्रे लोपून जातात॥ १४४॥ त्याप्रमाणे त्या नादानेही कौरवसैन्यात जे नाद घुमत होते ते सर्व कोठे लोपले गेले, कोण जाणे॥ १४५॥ तसेच ज्याचा आवाज फार घुमणारा व गंभीर गर्जना करणारा आहे असा आपला देवदत्त शंख अर्जुनाने वाजविला॥ १४६॥ देवाचा पाञ्चजन्य व अर्जुनाचा देवदत्त या दोन्ही शंखांचे भयंकर शब्द एकत्र मिळाले, तेव्हा या ब्रह्मांडाचे आता तुकडे तुकडे होणार असे वाटले॥ १४७॥ तितक्यात भीमसेन महाकाळासारखा खडबडून जागा झाला व त्याने आपला पौंड्र नावाचा शंख फुंकला॥ १४८॥ प्रलयकाळच्या मेघाप्रमाणे त्याचा गडगडाट झाला. तितक्यात युधिष्ठिराने आपला अनंतविजय नावाचा शंख वाजविला॥ १४९॥ नकुलाने सुघोष व सहदेवाने मणिपुष्पक नावाचे आपापले शंख वाजविले; त्या सर्वांच्या एकत्र झालेल्या नादाने यमही घाबरून गेला॥ १५०॥ त्या सैन्यात आणखी जे द्रुपद, द्रौपदीचे मुलगे, विशालबाहूचा काशीपती॥ १५१॥ अर्जुनाचा मुलगा अभिमन्यू, सात्यकी, अपराजित धृष्टद्युम्न राजा, शिखंडी, विराटादी राजे जे सेनाधिपती होते तेही आपापले शंख सारखे वाजवू लागले॥ १५२-१५३॥ ते सर्व निनाद एक होऊन, होत असलेल्या त्या भयंकर गडगडाटाने शेष, कूर्म हे अकस्मात् भयभीत होऊन आपल्या डोक्यावरील भूमीचा भार टाकून देण्यास पाहू लागले. ॥ १५४॥ त्यामुळे तिन्ही लोक डळमळू लागले. मेरु, मंदार पर्वत हेही झोके घेऊ लागले. समुद्राचे पाणी कैलासापर्यंत उसळू लागले. ॥ १५५॥ पृथ्वी उलटी होण्याच्या बेतात आली. आकाश तुटून पडण्याच्या बेतात आले. नक्षत्रांचा पृथ्वीवर सडा पडला. ॥ १५६॥ अरे! सृष्टि बुडाली, देवांचा त्राता कोणी नाही असे सत्यलोकामध्ये सर्व एकदम ओरडू लागले॥ १५७॥ प्रलयकाल होतो त्याप्रमाणे दिवसाच दिवस संपला, तसेच त्रैलोक्यात जिकडे तिकडे हाहाकार माजून गेला. ॥ १५८॥ हे पाहून आदिनारायणाला प्रलय होतो की काय असे वाटले, पण तो मग तेवढाही गडगडाट थांबला॥ १५९॥ म्हणूनच सर्व विश्वरचना कायम राहिली, नाही तर जेंव्हा श्रीकृष्णार्जुनादिकानी शंखनाद केलेत, तेव्हा प्रलयकालच प्राप्त झाला होता॥ १६०॥ तो भयंकर नाद तर लोपला, पण त्याचा प्रतिध्वनी जो राहिला होता त्याच्या योगानेच कौरवाचे काही सैन्य नाश पावले. ॥ १६१॥ ज्याप्रमाणे हत्तीच्या समुदायांचा सिंह लीलेनें नाश करतो त्याप्रमाणे तो प्रतिध्वनी कौरवांच्या हृदयाला फाडू लागला. ॥ १६२॥ तो गाजत असलेला नाद ऐकत असता उभे असलेल्याचे धैर्य सुटू लागले व परस्परांस 'सांभाळा रे, सांभाळा' असे म्हणू लागले. ॥ १६३॥

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वजः। प्रवृत्ते शस्त्रसम्पाते धनुरुद्यम्य पाण्डवः॥ २०॥

अर्जुन उवाच

हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते। सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत॥ २१॥

यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धु कामानवस्थितान्। कैर्मया सह योद्धव्यमस्मिन्रणसमुद्यमे॥ २२॥
योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः। धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः॥ २३॥

अर्थ— नंतर धृतराष्ट्राची सर्व मुले सावध झाली आहेत व परस्पर शस्त्रवर्षावाला सुरुवात झाली आहे असे पाहून, ज्याच्या रथावर स्वत: मारुति हा ध्वज आहे. अशा अर्जुनाने धनुष्यबाण उचलून हाती घेतले व तो श्रीकृष्णाला असे वचन बोलला. अर्जुन म्हणाला देवा! या रणसंग्रामामध्ये युद्ध करण्याच्या इच्छेने सज्ज होऊन आलेल्या दुर्योधनाकडील योद्ध्यांपैकी मी कोणाशी युद्ध करावे याचे निरीक्षण करीत आहे, तोपर्यंत दोन्ही सैन्यांच्या मध्ये आपण रथ स्थिर करा॥ २०-२१-२२॥ या युद्धात दुर्मति अशा दुर्योधनाचे हितसाधू असे, येथे युद्धाकरिता जमलेल्या सर्व योद्ध्यांना मी पाहू इच्छितो॥ २३॥

तेथ बळें प्रौढीपुरते। जे महारथी वीर होते। तिहीं पुनरपि दळातें। आवरिलें॥ १६४॥
मग सरिसेपणें उठावले। दुणवटोनि उचलले। तया दंडी क्षोभलें। लोकत्रय॥ १६५॥
तेथ बाणवरी धनुर्धर। वर्षताती निरंतर। जैसे प्रळयांत जलधर। अनिवार कां॥ १६६॥
ते देखलिया अर्जुनें। संतोष घेऊनि मनें। मग संभ्रमें दिठी सेने। घालितसे॥ १६७॥
तंव संग्रामीं सज्ज जाहले। सकळ कौरव देखिले। मग लीला धनुष्य उचलिलें। पंडुकुमरें॥ १६८॥
ते वेळीं अर्जुन म्हणतसे देवा। आतां झडकरी रथु पेलावा। नेऊनि मध्यें घालावा। दोहीं दळां॥ १६९॥
जंव मी नावेक। हे सकळ वीर सैनिक। न्याहाळीन अशेख। झुंजते जे॥ १७०॥
एथ आले असती आघवे। परी कवणेसीं म्यां झुंजावें। हें रणीं लागे पहावें। म्हणऊनियां॥ १७१॥
बहुतकरूनि कौरव। हे आतुर दुःस्वभाव। वांटिवावीण हांव। बांधिती झुंजीं॥ १७२॥
झुंजाची आवडी धरिती। परी संग्रामीं धीर नव्हती। हें सांगोनि रायाप्रती। काय संजयो म्हणे॥ १७३॥

अर्थ— त्या सैन्यात पराक्रमाने व नावाने थोर गाजलेले जे महारथी वीर होते त्यांनी आपआपले सैन्य आवरले॥ १६४॥ मग दोन्हीकडील सैन्यांनी सारखी उठावणी केली. त्यांच्यात लढण्याचा दुप्पट हुरूप आला. याप्रमाणे दोन्हीकडील सैन्ये एकमेकांशी भिडली असता ते पाहून तिन्ही लोक भयभीत झाले.॥ १६५॥ त्या ठिकाणी प्रलयात जसा एकसारखा मुसळधार पाऊस पडतो, त्याप्रमाणे धनुर्धरांनी एकमेकांवर एकसारखा बाणांचा वर्षाव सुरू केला॥ १६६॥ ते पाहून अर्जुनाला संतोष वाटला व त्याने लागबगीने तात्काळ सर्व सेनेकडे दृष्टी दिली.॥ १६७॥ पाहतो तो त्या युद्धात सर्व कौरव सज्ज झालेले दिसले. तेव्हा अर्जुनाने हळूच आपले धनुष्य उचलले.॥ १६८॥ तेव्हा अर्जुन देवाला म्हणू लागला की, देवा! आता लवकर रथ हाकावा व दोन्ही सैन्यामध्ये नेऊन उभा करावा॥ १६९॥ कारण या युद्धात जे वीर लढण्याकरिता आले आहेत त्या सर्वांना घटकाभर पाहून घेऊ म्हणतो.॥ १७०॥ कारण या ठिकाणी सर्वजणच आले आहेत तरी मी कोणाशी युद्धात लढावे हे पाहिले पाहिजे.॥ १७१॥ बहुधा हे कौरव फार दुष्ट व उतावळ्या स्वभावाचे आहेत. पराक्रमावाचून युद्धाची हौस बाळगतात.॥ १७२॥ आवड तर धरतात, पण युद्धात धैर्य धरून लढत नाहीत, असे धृतराष्ट्राला सांगून पुढे संजय म्हणतो.॥ १७३॥

सञ्जय उवाच

एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत। सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम्॥ २४॥
भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम्। उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति॥ २५॥
तत्रापश्यत्स्थितान् पार्थः पितृनथ पितामहान्। आचार्यान्मातुलान्भ्रातृन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा॥ २६॥
श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि। तान्समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान्बन्धूनवस्थितान्॥ २७॥
कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत्।

अर्थ— संजय म्हणतो राजा! याप्रमाणे ज्याने निद्रा जिंकली आहे. अशा अर्जुनाने भगवान् श्रीकृष्णाने दोन्ही दळांमध्ये आपला उत्तम रथ उभा करून भीष्मद्रोणादिक व मोठमोठे राजे पाहत असता भगवान् अर्जुनाला म्हणाले—

हे सर्व जमलेले कौरव पहा. त्याठिकाणी जमलेल्या दोन्ही सैन्यांमध्ये अर्जुनाने पितृतुल्य वडिल, आजे, गुरु, मामे, बंधू, मुलगे, नातू, सखे, सोयरे, आपले निरपेक्ष हितकर्ते असे मित्र पाहिले. त्या सर्व उपस्थित युद्धाला सज्ज झालेल्या बांधवांना पाहून अर्जुनाच्या अंत:करणात त्यांच्याविषयी अत्यंत मोह उत्पन्न झाला व खिन्न होत्साता असे बोलू लागला. ॥ २४-२७ ॥

आइका अर्जुन इतुकें बोलिला। तंव श्रीकृष्णें रथु पेलिला। दोहीं सैन्यांमाजीं केला। उभा तेणें॥ १७४॥
जेथ भीष्मद्रोणादिक। जवळिकेचि सन्मुख। पृथिवीपति आणिक। बहुत आहाती॥ १७५॥
तेथ स्थिर करूनिया रथु। अर्जुन असे पाहातु। तो दळभार समस्तु। संभ्रमेंसीं॥ १७६॥
मग देवा म्हणे देख देख। हे गोत्रगुरु अशेख। तंव कृष्णा मनीं नावेक। विस्मो जाहला॥ १७७॥
तो आपणयां आपण म्हणे। एथ कायी कवण जाणे। हें मनीं धरिलें येणें। परि कांहीं आश्चर्य असे॥ १७८॥
ऐसी पुढील से घेतु। तो सहजें जाणे हृदयस्थु। परि उगा असे निवांतु। तिये वेळीं॥ १७९॥
तंव तेथ पार्थु सकळ। पितृ पितामह केवळ। गुरु बंधु मातुळ। देखता जाहला॥ १८०॥
इष्ट मित्र आपुले। कुमरजन देखिले। हे सकळ असती आले। तयांमाजीं॥ १८१॥
सुहृज्जन सासरे। आणीकही सखे सोइरे। कुमर पौत्र धनुर्धरें। देखिले तेथ॥ १८२॥
जयां उपकार होते केले। कां आपदीं जे रक्षिले। हें असो वडिल धाकुले। आदिकरूनी॥ १८३॥
ऐसें गोत्रचि दोहीं दळीं। उदित जालें असे कळीं। हें अर्जुनें तिये वेळीं। अवलोकिलें॥ १८४॥
तेथ मनीं गजबज जाहाली। आणि आपैसी कृपा उपजली। तेणें अपमानें निघाली। वीरवृत्ति॥ १८५॥
जिया उत्तम कुळींचिया होती। आणि गुणलावण्य आथी। तिया आणिकीतें न साहती। सुतेजपणें॥ १८६॥
नविये आवडीचेनि भरें। कामुक निजवनिता विसरे। मग पाडेंवीण अनुसरे। भ्रमला जैसा॥ १८७॥
कीं तपोबळें ऋद्धी। पातलिया भ्रंशे बुद्धी। मग तया विरक्तता सिद्धी। आठवेना॥ १८८॥
तैसें अर्जुना तेथ जाहलें। असतें पुरुषत्व गेलें। जें अंत:करण दिधलें। कारुण्यासी॥ १८९॥
देखा मंत्रज्ञु बरळु जाय। मग तेथ कां जैसा संचारु होय। तैसा तो धनुर्धर महामोहें। आकळिला॥ १९०॥
म्हणऊनि असता धीरु गेला। हृदया द्रवो आला। जैसा चंद्रकळीं शिवतला। सोमकांतु॥ १९१॥
तयापरी पार्थु। अतिस्नेहें मोहितु। मग सखेद असे बोलतु। श्रीअच्युतेंसीं॥ १९२॥

अर्थ—संजय धृतराष्ट्राला म्हणतो, अर्जुन असे बोलला असता श्रीकृष्णाने रथ चटकन् हाकला व दोन्ही सैन्याचे मध्ये उभा केला. ॥ १७४॥ जेथे समोरच भीष्मद्रोणादिक असे जवळचे आप्तसंबंधी व आणिक पुष्कळ दुसरे राजे होते तेथे रथ उभा केला. अर्जुन सर्व दळभार मोठ्या उल्हासाने पाहू लागला॥ १७५-१७६ ॥ मग तो श्रीकृष्णाला म्हणू लागला, देवा! पहा, पहा हे सर्व गोत्र व गुरुजन. हे ऐकताच क्षणभर श्रीकृष्णांच्या मनात आश्चर्य वाटले. ॥ १७७ ॥ तो श्रीकृष्ण आपल्याशीच म्हणू लागला हे अर्जुनाने काय मनात धरले कोणाला ठाऊक! पण काही तरी आश्चर्य आहे!॥ १७८ ॥ असा थोडा पुढला विचार श्रीकृष्ण करू लागले. तो परमात्मा सर्वांच्या अंतर्यामी असल्यामुळे त्याला कळलेच. पण काही न बोलता गुपचूप राहिले. ॥ १७९ ॥ इतक्यात अर्जुन आपले सर्व चुलते, आजे, गुरुजन, भाऊ, मामे पाहू लागला. ॥ १८० ॥ आपले प्रेमाचे मित्र मुले असे सर्व येथे युद्धात आले आहेत असे पाहू लागला॥ १८१ ॥ आपले निष्काम हितकर्ते, सासरे, आणखी इतर सखे सोयरे, मुलगे, नातू इत्यादी अर्जुन पाहू लागला॥ १८२ ॥ ज्यांच्यावर संकटात उपकार केले किंवा आपत्काळी ज्यांचे रक्षण केले असे वडिल धाकटे सर्वच आलेले पाहिले॥ १८३ ॥ अशा रीतीने सैन्यात आपले गोत्रजच युद्ध करावयाला उभे ठाकले आहेत. असे त्यांनी त्यावेळी पाहिले. ॥ १८४ ॥ त्याबरोबर अर्जुनाचे मन व्याकुळ झाले व त्यामुळे अनायासे दया उत्पन्न झाली. ती उत्पन्न झालेली दयावृत्ती पाहून अर्जुनाच्या मनातील वीरवृत्तीला आपला अपमान झाला असे वाटून ती वीरवृत्ती निघून गेली. ॥ १८५ ॥ खरेच आहे, उत्तम कुलातीत गुणलावण्यांनी संपन्न ज्या स्त्रिया असतात त्या दुसऱ्या स्त्रियांचा वरचष्मा सहन करीत

नाहीत. ॥ १८६ ॥ ज्याप्रमाणे नूतन स्त्रीच्या प्रेमाच्या भरात कामी पुरुष आपल्या पहिल्या स्त्रीला विसरतो व आपल्या योग्यतेची आहे की नाही याचा विचार न करता भ्रमिष्टाप्रमाणे तिच्या नादी लागतो. ॥ १८७ ॥ किंवा तपश्चर्येमुळे ऋद्धी प्राप्त झाली असता बुद्धीला भ्रम होतो व मग पहिल्या विरक्त स्थितीची त्याला आठवणही राहत नाही. ॥ १८८ ॥ त्याप्रमाणेच अर्जुनाला त्या ठिकाणी झाले. अंत:करणात आप्ताविषयी करुणवृत्ती उत्पन्न झाल्यामुळे अंगचा पराक्रम नाहीसा झाला ॥ १८९ ॥ मांत्रिकाकडून मंत्रोच्चार करताना जर मंत्र बरोबर म्हणता आला नाही, काही चूक झाली तर तोच जसा भूताने पछाडला जातो, त्याप्रमाणे अर्जुन स्वजनांच्या मोहाने पछाडला गेला. ॥ १९० ॥ म्हणूनच त्याचे ठिकाणचे धैर्य नाहीसे झाले व ज्याप्रमाणे चंद्राच्या कलेचा सोमकान्त मण्याला स्पर्श झाल्याबरोबर तो मणी पाझरू लागतो, त्याप्रमाणे अर्जुनाचे चित्त द्रवले. ॥ १९१ ॥ अर्जुन असा स्वजनांच्या प्रेमाने अति व्याकूळ झाला असता खिन्न अंत:करणाने भगवंताला बोलू लागला. ॥ १९२ ॥

अर्जुन उवाच

दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम्॥ २८ ॥

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति। वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते॥ २९ ॥

गाण्डीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते। न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मन:॥ ३० ॥

अर्थ—अर्जुन म्हणाला, हे कृष्णा! युद्धाला सज्ज झालेल्या या स्वजनांना पाहून माझे सर्व अवयव शिथिल झाले असून तोंडाला कोरड उत्पन्न झाली. माझे शरीराला कंप उत्पन्न होऊन सर्व शरीरांवर रोमांच उभे राहिले आहेत. ॥ २८-२९ ॥ हातातील गांडीव धनुष्य सुटले असून सर्व शरीराचा संताप झाला आहे. माझे मन भ्रमीष्ट झाल्यासारखे होत असून या युद्धात मी आता उभा राहू शकत नाही. ॥ ३० ॥

तो म्हणे अवधारीं देवा। म्यां पाहिला हा मेळावा। तंव गोत्रवर्गु आघवा। देखिला एथ॥ १९३ ॥
हे संग्रामीं अति उद्यत। जहाले असती कीर समस्त। पण आपणपेयां उचित। केवीं होय॥ १९४ ॥
येणें नांवेंचि नेणों कायी। मज आपणपें सर्वथा नाहीं। मन बुद्धी ठायीं। स्थिर नोहे॥ १९५ ॥
देखें देह कांपत। तोंड असे कोरडें होत। विकळता उपजत। गात्रांसी॥ १९६ ॥
सर्वांगा कांटाळा आला। अति संतापु उपनला। तेथ बेंबळ हातु गेला। गांडिवाचा॥ १९७ ॥
तें न धरतचि निष्टलें। परि नेणेंचि हातोनि पडिलें। ऐसें हृदय असे व्यापिलें। मोहें येणें॥ १९८ ॥
जें वज्रापासोनि कठिण। दुर्धर अतिदारुण। तयाहून असाधारण। हें स्नेह नवल॥ १९९ ॥
जेणें संग्रामीं हरु जिंतिला। निवातकवचांचा ठावो फेडिला। तो अर्जुन मोहें कवळिला। क्षणामाजीं॥ २०० ॥
जैसा भ्रमर भेदी कोडें। भलतैसें काष्ठ कोरडें। परि कळिकेमाजीं सांपडे। कोंवळिये॥ २०१ ॥
तेथ उत्तीर्ण होईल प्राणें। परी तें कमळदळ चिरूं नेणे। तैसें कठिण कोंवळेंपणें। स्नेह देखा॥ २०२ ॥
हे आदिपुरुषाची माया। ब्रह्मेयाही नयेचि आया। म्हणवूनि भुलविला ऐके राया। संजयो म्हणे॥ २०३ ॥
अवधारीं मग तो अर्जुनु। देखोनि सकळ स्वजनु। विसरला अभिमानु। संग्रामींचा॥ २०४ ॥
कैसी नेणों सदयता। उपनली तेथें चित्ता। मग म्हणे कृष्णा आतां। नसिजे एथ॥ २०५ ॥
माझें मन अतिशय व्याकुळ। होतसे वाचा बरळ। जे वधावे हे सकळ। येणें नांवें॥ २०६ ॥

अर्थ—अर्जुन म्हणतो देवा! पहा, मी युद्धास जमलेल्या सर्व लोकांना पाहिले परंतु हे सर्व आप्तजन आहेत असेच दिसून राहिले ॥ १९३ ॥ हे सर्वजण युद्धाला सज्ज झाले आहेत खरे, पण हे युद्ध करणे आपल्याला योग्य कसे होईल. ॥ १९४ ॥ आप्तांशी युद्ध हे शब्दच मनात आल्याबरोबर माझे मला भान राहत नाही व माझे मन व बुद्धि ही ठिकाणावर राहत नाहीत. ॥ १९५ ॥ देह थरथर कांपून राहिला, तोंडाला कोरड पडली, सर्व अवयव शिथिल झाले. ॥ १९६ ॥ सर्व शरीरावर काटा उभा राहिला, मला माझाच संताप येत आहे. गांडीव धनुष्य धरलेला हात ढिला पडला. ॥ १९७ ॥ म्हणून ते धरता येत नाही व हातातून निसटून खाली पडले. अशा रीतीने माझे मन स्वजनांच्या

प्रेमाने घेरले आहे. ॥ १९८ ॥ जे काही वज्रापेक्षाही फुटण्याला भयंकर कठीण असेल त्यापेक्षाही हा स्वजनांचा मोह निवृत्त होण्याला अत्यंत कठीण आहे हे आश्चर्य आहे ॥ १९९ ॥ ज्याने युद्धात शंकराला जिंकले, निवातकवच नावाच्या राक्षसांचा फडशा पाडला, त्या अशा पराक्रमी अर्जुनालाही क्षणामध्ये मोहाने ग्रासले. ॥ २०० ॥ ज्याप्रमाणे भुंगा कशाही प्रकारचे लाकूड सहज लीलेने कोरतो पण कमळाची कोवळी कळी मात्र तो कोरू शकत नाही व त्यात अडकून पडतो. ॥ २०१ ॥ त्या कळीचे प्रेमाने तो तिच्यावरून प्राणही ओवाळून टाकील, पण कळी चिरून बाहेर पडत नाही. असे हे प्रेम अत्यंत मृदू असल्यामुळे तोडण्यास कठीण आहे. ॥ २०२ ॥ संजय म्हणतो, राजा धृतराष्ट्रा! हे प्रेमच परमेश्वराची माया आहे. ही ब्रह्मदेवालाही आटोपत नाही. म्हणूनच अर्जुनालाही त्या प्रेमरूप मायेने घेरले. ॥ २०३ ॥ राजा धृतराष्ट्रा! मग तो अर्जुन आपल्या आप्तेष्टानां पाहून मी कौरवांसी युद्ध करीन असा जो अभिमान धरून आला होता तो अभिमानच विसरला. ॥ २०४ ॥ अर्जुनाचे मनात स्वजनाविषयी असे कसे प्रेम उत्पन्न झाले, समजत नाही. मग तो श्रीकृष्णाला म्हणाला, देवा! आता आपण येथे राहू नये असे वाटते. ॥ २०५ ॥ हे सर्व स्वजन मारावे असे मनात आले की माझे मन अत्यंत व्याकुळ होते व तोंडातून शब्दही फुटत नाही. ॥ २०६ ॥

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव। न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे॥ ३१ ॥

अर्थ—येथे विपरीत लक्षणे दिसून येत असून युद्धात सज्जनांचा वध करण्याने हे केशवा! माझे परम कल्याण होईल, असे मला वाटत नाही. ॥ ३१ ॥

या कौरवां जरी वधावें। तरी युधिष्ठिरादिक कां न वधावे। हे येरयेर आघवे। गोत्रज आमुचे॥ २०७ ॥
म्हणोनि जळो हें झुंज। प्रत्यया न ये मज। येणे काय काज। महापापें॥ २०८ ॥
देवा बहुतां परी पाहतां। एथ वोखटें होईल झुंजतां। वर कांही चुकवितां। लाभु आथी॥ २०९ ॥

अर्थ—या कौरवांना जर मारावे तर युधिष्ठिरादिकांना मारण्यास काय हरकत आहे? कारण दोघेही आमचे आप्तच आहेत. ॥ २०७ ॥ म्हणून आग लागो त्या युद्धाला! माझ्या मनाला ते पटत नाही. या महापापाने काय लाभ होणार! ॥ २०८ ॥ देवा! मी पुष्कळ विचार केला, मला वाटते युद्ध करण्यात आपले हित नाही. त्यापेक्षा युद्ध टाळण्यातच लाभ आहे. ॥ २०९ ॥

न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च। किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा॥ ३२ ॥
येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च। त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च॥ ३३ ॥

अर्थ—मला जयाची इच्छा नाही, तशीच राज्य व राज्यसुखाची इच्छा नाही. हे गोविंदा! राज्य मिळवून काय करायचे किंवा भोग मिळवून काय करायचे? अथवा जगायचे तरी कशाला? कारण ज्याच्याकरिता आम्ही राज्य व सुखभोग मिळवू इच्छितो तेच प्राणावर व संपत्तीवर पाणी सोडून येथे युद्धाकरिता सज्ज झाले आहेत. ॥ ३२-३३ ॥

तया विजयवृत्ती कांहीं। मज सर्वथा काज नाहीं। एथ राज्य तरी कायी। पावोनियां॥ २१० ॥
यां सकळांतें वधावें। मग जे भोग भोगावे। ते जळोत आघवे। पार्थु म्हणे॥ २११ ॥
तेणें सुखेंविण होईल। तें भलतेंही साहिजेल। वरी जीवितही वेंचिजेल। याचिलागी॥ २१२ ॥
परी यांसी घातु कीजे। मग आपण राज्य भोगिजे। हें स्वप्नींही मन माझें। करूं न शके॥ २१३ ॥
तरी आम्हीं कां जन्मावें। कवणालागीं जियावें। जें वडिलां यां चिंतावें। विरुद्ध मनें॥ २१४ ॥
पुत्रातें इप्सी कुळ। तयाचें कायि हेंचि फळ। जे निर्दाळिजे केवळ। गोत्र आपुलें॥ २१५ ॥
हें मनींचि केविं धरिजे। आपण वज्राचेयां होईजे। वरी घडे तरी कीजे। भलें इयां॥ २१६ ॥
आम्हीं जें जें जोडावें। तें समस्तीं इहीं भोगावें। हें जीवितही उपकारावें। काजीं यांचा॥ २१७ ॥
आम्ही दिगंतींचे भूपाळ। विभांडूनि सकळ। मग संतोषविजे कुळ। आपुलें जें॥ २१८ ॥
तेचि हे समस्त। परी कैसें कर्म विपरीत। जे जाहले असती उद्यत। झुंजावया॥ २१९ ॥
अंतौरियां कुमरें। सांडोनियां भांडारें। शस्त्राग्रीं जिव्हारें। आरोपुनी॥ २२० ॥

ऐसियांतें कैसेनि मारूं। कवणावरी शस्त्र धरूं। निज हृदया करूं। घातु केवीं॥ २२१॥

अर्थ—मी विजय मिळवला अशी वृत्ती मिरविण्याशी मला कर्तव्य नाही. अशा रीतीने राज्य मिळाले तरी काय उपयोग?॥ २१०॥ अर्जुन म्हणतो, या सर्व स्वजनांना मारून जे राज्यभोग भोगायचे त्या राज्यभोगाला आग लागो!॥ २११॥ अशा प्रकारच्या सुखापेक्षा दुसरे कसेही सुख मिळाले किंवा न मिळाले तरी ते सहन करता येईल, येवढेच नाही तर यांच्याकरिता मी मरायला देखील तयार आहे. ॥ २१२॥ पण यांना मारून आपण राज्यसुख भोगावे हे स्वप्नातही माझे मनांत येणार नाही. ॥ २१३॥ आपल्या वाडवडिलांना मारण्याचे जर आम्ही मनात आणायचे तर आम्ही जन्मावे तरी कशाला? व जिवंत राहावे तरी कोणाकरिता?॥ २१४॥ कुळातील पुरुष, पुत्र व्हावा अशी इच्छा करतात, पुत्र झाल्यावर त्याने सर्व आपल्या गोत्रकुळाचा फडशा पाडावा हेच त्या इच्छेचे फळ काय?॥ २१५॥ हे मनातच कसे आणता येईल? व मन तरी वज्रासारखे कसे कठोर करता येईल? यापेक्षा आपल्याकडून होईल तितके त्यांचे कल्याण करावे हे बरे॥ २१६॥ आम्ही जे जे पराक्रम करून मिळवावे ते ते स्वजनांनी भोगायचे असते. एवढेच नाही तर यांच्या भल्याकरिता आपला जीव खर्ची पडला तरी हरकत नाही. ॥ २१७॥ आम्ही देशोदेशींचे राजांना जिंकून त्यांची संपत्ती लुटून आणावी व आपल्या कुळाला सुख द्यावे हे आमचे कर्तव्य होय. ॥ २१८॥ (ज्या कुळाला अशा रीतीने सुख द्यावयाचे) तेच हे सर्वजण होत; पण कसे हे विपरीत कर्म होत आहे की हे सर्व युद्ध करण्याला उद्युक्त झाले आहेत. ॥ २१९॥ बायका, मुले, राज्य, संपत्ती हे सर्व टाकून देऊन व आपले प्राण शस्त्रांवर ठेवून युद्धाला सज्ज आहेत. ॥ २२०॥ अशांना कसे मारायचे व यांच्यावर शस्त्र तरी उचलता येईल का? आपण आपल्या हृदयावरच प्रहार कसा करायचा?॥ २२१॥

आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः। मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः सम्बन्धिनस्तथा॥ ३४॥
एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन। अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते॥ ३५॥

अर्थ—गुरुजन, वडिल, पुत्र, त्याचप्रमाणे आजे, मामे, सासरे, नातू, मेव्हणे, तसेच सोयरे वगैरे येथे आले आहेत. पृथ्वीचेच राज्य काय पण त्रैलोक्याचे राज्य मिळाले व त्यांनी मला मारले तरी, हे मधुसूदना! मी त्यांना मारू इच्छित नाही. ॥ ३४-३५॥

हे नेणसी तूं कवण। परी पैल भीष्म द्रोण। जयांचे उपकार असाधारण। आम्हां बहुत॥ २२२॥
एथ शालक सासरे मातुळ। आणि बंधु कीं हे सकळ। पुत्र नातू केवळ। इष्टही असती॥ २२३॥
अवधारीं अति जवळिकेचे। हे सकळही सोयरे आमुचे। म्हणोनि दोष आथि वाचे। बोलतांचि॥ २२४॥
हे वरी भलतें करितु। आतांचि एथें मारितु। परि आपण मनें घातु। न चिंतावा॥ २२५॥
त्रैलोक्यींचें अनकळित। जरी राज्य होईल प्राप्त। तरी हें अनुचित। नाचरें मी॥ २२६॥
जरी आजि एथ ऐसें कीजे। तरी कवणाच्या मनीं उरिजे। सांगें मुख केवीं पाहिजे। तुझें कृष्णा॥ २२७॥

अर्थ—देवा युद्धाला सज्ज झालेले कोण आहेत इकडे तू लक्ष देत नाहीस, पण ज्यांचे आमच्यावर अत्यंत उपकार आहेत ते भीष्माचार्य व द्रोणाचार्य हे पलीकडे आहेत, पहा. ॥ २२२॥ या ठिकाणी शालक, सासरे, मामे, बंधू, पुत्र, नातू व इतर आप्त इष्ट हे सर्व आले आहेत. ॥ २२३॥ हे सर्व आमचे अत्यंत जवळचे नातलग आहेत, हे लक्षात घे. म्हणून यांना मारावे असे नुसते बोललो तरी दोष लागतो. ॥ २२४॥ हे कांहीही करोत, आताच येथे मला मारतील तरी हरकत नाही, पण आपण मात्र यांना मारण्याचा विचार मनात आणू नये. ॥ २२५॥ त्रैलोक्याचे अफाट राज्य जरी मिळत असले तरी मी हे अयोग्य कर्म करणार नाही. ॥ २२६॥ जर मी आज येथे असे करू लागलो तर आम्हां विषयी कोणाच्या मनात आदर राहील? व तुझे मुख तरी आम्हांला पाहायला मिळेल का?॥ २२७॥

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन। पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः॥ ३६॥

अर्थ—हे जनार्दना! या कौरवांना मारून आम्हांला काय सुख होणार? उलट आततायी कौरवांना मारले तर आम्हांला त्यापासून पापच लागेल. ॥ ३६॥

जरी वधु करूनि गोत्रजांचा। तरी वसौटा होऊनि दोषांचा। मज जोडिलासि तूं हातींचा। दूरी होसी॥ २२८॥
कुळहरणीं पातकें। तियें आंगीं जडती अशेखें। तये वेळीं तूं कवणें कें। देखावासी॥ २२९॥
जैसा उद्यानामाजीं अनळु। संचरला देखोनि प्रबळु। मग क्षणभरी कोकिळु। स्थिर नोहे॥ २३०॥
कां सकर्दम सरोवरु। अवलोकूनि चकोरु। न सेवितु अव्हेरु। करूनि निघे॥ २३१॥
तयापरी तूं देवा। मज झकों न येसी मावा। जरी पुण्याचा वोलावा। नाशिजैल॥ २३२॥

अर्थ—जर या गोत्रजांचा वध करीन तर सर्व दोषांचे वसतिस्थान मी होईन व माझ्या स्वाधीन झालेला तू अंतरशील. ॥ २२८ ॥ कुळाच्या नाशामुळे संपूर्ण पातके जडतात मग तुला कोण कोठे पाहू शकेल? ॥ २२९ ॥ ज्याप्रमाणे बगीच्याला भयंकर आग लागलेली पाहून कोकिळ क्षणभर देखील तेथे थांबत नाही. ॥ २३० ॥ किंवा सरोवरात सर्व चिखल झाला असे पाहून चकोरपक्षी ते सोडून निघून जातो. ॥ २३१ ॥ त्याप्रमाणे (मी पापांचा आश्रय बनून) माझ्या ठिकाणी पुण्याचा ओलावा काहीच राहिला नाही म्हणजे मग तूही मला मायेने फसवून दूर होशील. ॥ २३२ ॥

गूढार्थदीपिका—साधारणपणे कोणतेही शास्त्रविरुद्ध आचरण म्हणजे पाप होय. हे शास्त्रविरुद्ध आचरण परमेश्वरप्राप्तीला प्रतिबंधक होते असे शास्त्र आहे, तो शास्त्रसिद्धान्तच येथे अर्जुन देवापुढे मांडत आहे.

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान्स्वबान्धवान्। स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव॥ ३७॥

अर्थ—म्हणून आपल्या स्वजन असलेल्या कौरवांना आम्ही मारणेयोग्य नाही, स्वजनांना मारून हे माधवा! आम्ही सुखी कसे होणार? ॥ ३७ ॥

म्हणोनि मी हें न करीं। इये संग्रामीं शस्त्र न धरीं। हें किडाळ बहुतीं परी। दिसतसे॥ २३३॥
तुजसीं अंतराय होईल। मग सांगें आमचें काय उरेल। तेणें दुःखें हियें फुटेल। तुजवीण कृष्णा॥ २३४॥
म्हणऊनि कौरव हे वधिजती। मग आम्हीं भोग भोगिजती। हे असो मात अघडती। अर्जुन म्हणे॥ २३५॥

अर्थ—म्हणून ते मी करणार नाही. या युद्धात मी शस्त्र हातात धरणार नाही. कारण युद्ध करणे पुष्कळ दृष्टीने अनर्थावह आहे. ॥ २३३ ॥ तुझ्या प्राप्तीला प्रतिबंध झाला तर आम्ही सर्वस्व नागविलो. तुझ्या वियोगदुःखाने आमचे हृदय शतचूर्ण होईल. ॥ २३४ ॥ म्हणून कौरवांना मारावे व मग राज्यभोग भोगावे ही गोष्ट शक्य नाही, असे अर्जुनाने सांगितले. ॥ २३५ ॥

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः। कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम्॥ ३८॥
कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम्। कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन॥ ३९॥

अर्थ—जरी राज्यलोभामुळे ज्यांचे चित्तात विवेक राहिला नाही अशा ह्या कौरवांना, हे स्वजनांमध्ये होणारे युद्ध, सर्व कुलांचा क्षय करणारे पापरूप आहे व यात मित्रद्रोहाचेही पातक आहे, असे कळत नसले, तरी हे युद्ध सर्व कुलांचा क्षय करणारे व पाप घडविणारे आहे असे प्रत्यक्ष जाणत असलेले आम्ही, त्या पापापासून दूर राहिले पाहिजे असे कसे जाणू नये? ॥ ३८-३९ ॥

हें अभिमानमदें भुलले। जऱ्हीं पां संग्रामा आले। तऱ्ही आम्हां हित आपुलें। जाणावें लागे॥ २३६॥
हें ऐसें कैसें करावें। जे आपुले आपण मारावे। जाणतजाणतांचि सेवावें। काळकूट॥ २३७॥
हां जी मार्गीं चालतां। पुढां सिंह जाहला अवचितां। तो तंव चुकवितां। लाभु आथी॥ २३८॥
असता प्रकाशु सांडावा। मग अंधकूप आश्रावा। तरी तेथ कवणु देवा। लाभु सांगें॥ २३९॥
कां समोर अग्नि देखोनी। जरी न वचिजे वोसंडोनी। तरी क्षणा एका कवळूनी। जाळूं सके॥ २४०॥
तैसे दोष हे मूर्त। अंगीं वाजों असती पहात। हें जाणतांही केवीं एथ। प्रवर्तावें॥ २४१॥
ऐसें पार्थ तिये अवसरीं। म्हणे देवा अवधारीं। या कल्मषाची थोरी। सांगेन तुज॥ २४२॥

अर्थ—हे कौरव जरी पराक्रमाचा अभिमान धारण केल्यामुळे अविचारी होऊन युद्धास सज्ज झाले असले तरी आपण आपले हित कशात आहे हे जाणले पाहिजे. ॥ २३६ ॥ हे कौरव सर्व आपलेच आहेत तेव्हा आपण आपल्याच

आप्तांना मारायचे हे कसे करावे? काळकूट आहे असे समजल्यावरही ते खावे काय?॥ २३७ ॥ अहो देवा! मार्गाने चालत असता समोरून अकस्मात सिंह आला तर त्याला चुकवून जाण्यातच आपले हित असते. ॥ २३८ ॥ चांगला प्रकाश असताना त्याचा उपभोग न करता त्याला टाकून गडद अंध:कार असलेल्या विहिरीचा आश्रय करण्यात काय लाभ होणार?॥ २३९ ॥ समोर अग्नी लागला आहे असे दिसत असता त्याला टाकून जर आपण निघून गेलो नाही तर तो एका क्षणामध्ये आपल्याला जाळील॥ २४० ॥ त्याप्रमाणे युद्धात स्वजनांना मारण्यापासून होणारे पाप आपल्या अंगी जडणार हे प्रत्यक्ष दिसत असताना युद्धाला कसे प्रवृत्त व्हावे?॥ २४१ ॥ त्या प्रसंगी याप्रमाणे अर्जुन पुन: देवाला म्हणाला की देवा! या युद्धामुळे स्वजनांचा वध होणाऱ्या पापांचे कसे भयंकर परिणाम होतील, हे पहा. ॥ २४२ ॥

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः। धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत॥ ४० ॥

अर्थ—कुलाचा नाश झाला असता अनादिकालापासून कुळात चालत आलेले कुलधर्म नाश पावतात. एकदा हा सनातन धर्म अशा रीतीने नष्ट झाला की सर्व कुळात अधर्मच माजतो. ॥ ४० ॥

जैसें काष्ठें काष्ठ मथिजे। तेथ वन्हि एक उपजे। तेणें काष्ठजात जाळिजे। प्रज्वळलेनि॥ २४३ ॥
तैसा गोत्रींची परस्परें। जरी वधु घडे मत्सरें। तरी तेणें महादोषें घोरें। कुळचि नाशे॥ ४४४ ॥
म्हणवूनि येणें पापें। वंशजधर्मु लोपे। मग अधर्मुचि आरोपे। कुळामाजी॥ २४५ ॥

अर्थ—अरण्यात एका लाकडाशी दुसऱ्या लाकडाचे घर्षण झाले असता अग्नी उत्पन्न होतो व तो भडकला म्हणजे सर्व जंगलातील लाकडे जाळतो. ॥ २४३ ॥ त्याप्रमाणे स्वजनात परस्पर युद्ध होऊन मत्सराने परस्परांचा वध केला तर त्या घोर पापाने सर्व कुळाचाच नाश होतो. ॥ २४४ ॥ म्हणून पुढे अशा पापाने वंशात कोणीच जिवंत न राहिल्यामुळे कुळधर्माचा लोप होतो व कुळात अधर्मच प्रवृत्त होतो. ॥ २४५ ॥

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः। स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसङ्करः॥ ४१ ॥

अर्थ—कुळांत अधर्म माजला की कुलस्त्रिया दूषित होतात आणि कुलस्त्रिया दूषित झाल्या म्हणजे हे अर्जुना! वर्णसंकर होतो. ॥ ४१ ॥

एथ सारासार विचारावें। कवणें काय आचरावें। आणि विधिनिषेध आघवे। पारुषती॥ २४६ ॥
असता दीपु दवडिजे। मग अंधकारीं राहाटिजे। तरी उजूचि कां अडखुळिजे। जयापरी॥ २४७ ॥
तैसा कुळीं कुळक्षयो होय। तये वेळीं तो आद्यधर्मु जाय। मग आन कांहीं आहे। पापावांचुनी॥ २४८ ॥
जैं यमनियम ठाकती। तेथ इंद्रियें सैरा विचरती। म्हणऊनि व्यभिचार घडती। कुळस्त्रियांसी॥ २४९ ॥
उत्तम अधर्मी संचरती। ऐसे वर्णावर्ण मिसळती। तेथ समूळ उपडती। जातिधर्म॥ २५० ॥
जैसी चोहटाचिये बळी। पाविजे सैरा काउळीं। तैसीं महापापें कुळीं। संचरती॥ २५१ ॥

अर्थ—अशा स्थितीत बऱ्या वाईटाचा आपला धर्म काय याचा मग कोण विचार करतो? अशा रीतीने सर्व विधिनिषेध बंद पडतात. ॥ २४६ ॥ असलेला दिवा विझविला असता ज्याप्रमाणे अंधारात राहाट करावी लागते व सरळ जागेवरहि मनुष्य अडखळतो. ॥ २४७ ॥ त्याप्रमाणे कुळातील कुळक्षयामुळे मूळचा धर्म लोप पावतो. मग पापावाचून दुसरे काय असणार?॥ २४८ ॥ जेव्हा यमनियमरूप धर्माचे आचरण बंद पडते तेव्हा इन्द्रियांचे स्वैर वर्तन सुरू होते, म्हणून कुलीनस्त्रियात व्यभिचार सुरू होतो. ॥ २४९ ॥ उत्तम अधमात मिसळतात. मग वर्णावर्णाची भेसळ होते व जातिधर्माचा समूळ उच्छेद होतो. ॥ २५० ॥ ज्याप्रमाणे चौरस्त्यावर ठेवलेल्या बळीवर चोहोकडून कावळे धावतात त्याप्रमाणे जातिधर्म लोपले असता कुलामध्येही चोहोकडून पापे शिरतात. ॥ २५१ ॥

सङ्करो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च। पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिण्डोदकक्रियाः॥ ४२ ॥

अर्थ—अशा वर्णसंकराने कुलाला व कुलांचा नाश करणाऱ्यांना नरकप्राप्ती होते व कुलातील पूर्वपुरुषांना पिंड व तिलोदक देण्यास कोणी न उरल्यामुळे पुढे ते पतन पावतात. ॥ ४२ ॥

मग कुळा तया अशेखा। आणि कुळघातकां। येरयेरां नरका। जाणें आथी॥ २५२ ॥

देखें वंशवृद्धि समस्त। यापरी होय पतित। मग वोवांडिती स्वर्गस्थ। पूर्वपुरुष॥ २५३॥
जेथ नित्यादि क्रिया ठाके। आणि नैमित्तिक क्रिया पारुखे। तेथ कवणा तिळोदकें। कवण अर्पी॥ २५४॥
तरी पितर काय करिती। कैसेनि स्वर्गीं वसती। म्हणोनी तेही येती। कुळापासीं॥ २५५॥
जैसा नखाग्रीं व्याळु लागे। तो शिखांत व्यापी वेगें। तेवीं आब्रह्म कुळ अवघें। आप्लविजे॥ २५६॥

अर्थ—मग संपूर्ण कुळ व कुळांचा नाश करणारा या दोघांना नरकातच पडावे लागते. ॥ २५२ ॥ पहा, याप्रमाणे सर्व वंशच पतीत होतो व मग पूर्वज स्वर्गात असले तरी तेही स्वर्गातून च्युत होऊन नरकात वंशापाशी येतात. ॥ २५३ ॥ कारण नित्यनैमित्तिक क्रिया बंद पडल्यावर श्राद्धादी कर्मे कशी होणार ? ॥ २५४ ॥ श्राद्धादी कर्माचे द्वारा मिळणारे अन्नपाणी पितरांना मिळाले नाही म्हणजे पितर स्वर्गात काय खातील? व कसे राहतील? म्हणून तेही वंशजापाशी नरकात येतात. ॥ २५५ ॥ ज्याप्रमाणे पायाच्या बोटाच्या टोकाला जरी सर्प चावला तरी क्षणात त्याचे विष मस्तकापर्यन्त चढते त्याप्रमाणे कुळधर्माच्या लोपाचे पाप ब्रह्मलोकापर्यंत गेलेल्या पूर्वजांनाही बाधते ॥ २५६ ॥

दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसङ्करकारकैः । उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ॥ ४३ ॥
उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन। नरकेऽनियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम॥ ४४॥
अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् । यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥

अर्थ—कुलांचा नाश करणाऱ्यांच्या सर्व वर्णांचा संकर करणाऱ्या पापामुळे सनातन असे जातिधर्म व कुलधर्म नष्ट होतात. ॥ ४३ ॥ हे जनार्दना! ज्या मनुष्यांच्या कुळातील कुलधर्म व जातिधर्म वगैरे नष्ट झाले आहेत, अशा पुरुषांना निश्चित नरकात पडून राहावे लागते असे आम्ही पूर्वजांच्या तोंडून ऐकले आहे. ॥ ४४ ॥ अहो! आम्ही राज्यसुख प्राप्त व्हावे या लोभाने स्वजनांचा वध करणाऱ्या युद्धरूपी महत् पापकर्म करण्याला कसे प्रवृत्त झालो आहो, पहा! ॥ ४५ ॥

देवा अवधारीं आणिक एक। एथ घडे महापातक। जे संगदोषें हा लौकिक। भ्रंशु पावे॥ २५७॥
जैसा घरीं आपुलां। वानिवसें वन्ही लागला। तो आणिकांहीं प्रज्वळिला। जाळूनि घाली॥ २५८॥
तैसिया तया कुळसंगती। जे जे लोक वर्तती। तेही बाधूं पावती। निमित्तें येणें॥ २५९॥
तैसें नाना दोषें सकळ। अर्जुन म्हणे तें कुळ। मग महाघोर केवळ। निरय भोगी॥ २६०॥
पडिलिया तिये ठायीं। मग कल्पांतींही उकलु नाहीं। येसणें पतन कुळक्षयीं। अर्जुन म्हणे॥ २६१॥
देवा हें विविध कानीं ऐकिजे। परी अझुनिवरी त्रासु नुपजे। हृदय वज्राचें हें काय कीजे। अवधारीं पां॥ २६२॥
अपेक्षिजे राज्यसुख। जयालागीं तें तंव क्षणिक। ऐसें जाणतांही दोख। अव्हेरूं ना॥ २६३॥
जे हे वडिल सकळ आपुले। वधावया दिठी सूदले। सांग पां काय थेकुलें। घडलें आम्हां॥ २६४॥

अर्थ—देवा! आणखी एक गोष्ट लक्षात घ्या. येथे महापाप आणखी असे होत असते की संसर्गामुळे इतर लोकांचेही जातिधर्म सुटू लागतात. ॥ २५७ ॥ ज्याप्रमाणे न कळत आपल्या घराला अग्नी लागला आणि तो जर भडकला तर शेजाऱ्याचेही घर जाळतो. ॥ २५८ ॥ त्याप्रमाणे ज्या कुळातील धर्माचरण बंद पडले त्या कुळाशी संबंध असलेले व त्याप्रमाणे वागू पाहणारे कुळही तसेच होते. ॥ २५९ ॥ त्याप्रमाणे नाना प्रकारचे पापांनी युक्त झालेले ते कुळ, अर्जुन म्हणतो देवा! घोर नरकात पडते. ॥ २६० ॥ त्या घोर नरकात पडल्यानंतर त्यातून कल्पान्तापर्यंत त्याची सुटका होत नाही कुलक्षय झाला असता सर्व कुळांचा एवढा अधःपात होतो, पहा. ॥ २६१ ॥ देवा! आम्ही हे असे शास्त्राचे म्हणणे पुष्कळ प्रकाराने ऐकतो पण अजूनही त्या तशा वागण्याचा वीट येत नाही, पण काय करावे! माझे हृदय वज्रासारखे अत्यंत कठोर आहे, पहा. ॥ २६२ ॥ ज्या देहाकरिता या राज्यसुखाची इच्छा करायची तो देह क्षणिक आहे हे जाणूनही आम्ही या युद्धरूपी पापाचा त्याग करीत नाही. ॥ २६३ ॥ हे सर्व भीष्म द्रोणादिक जे आमचे वडील पूज्य सोयरे आहेत, त्यांचा वध करण्याकरिता त्यांना आपल्या दृष्टीसमोर केलेले आहेत, हे काय थोडे पातक आहे ? ॥ २६४ ॥

यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः । धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत्॥ ४६ ॥

अर्थ—शस्त्र धारण करणाऱ्या दुर्योधनादिक धृतराष्ट्राच्या पुत्रांनी जर निःशस्त्र म्हणून प्रतिकार न करणाऱ्या माझ्यावर शस्त्रवर्षाव केला तरी ते मला सुखकर होईल. ॥ ४६ ॥

आतां यावरी जें जियावें। तयापासूनि हें बरवें। जे शस्त्रें सांडूनि साहावे। बाण यांचे ॥ २६५ ॥
तयावरी होय जितुकें। तें मरणही वरी निकें। परी येणें कल्मषें। चाड नाहीं ॥ २६६ ॥
ऐसें देखून सकळ। अर्जुनें आपुलें कुळ। मग म्हणे राज्य तें केवळ। निरयभोगु ॥ २६७ ॥

अर्थ—असे पाप करून आम्ही जे जिवंत राहायचे त्यापेक्षा आपण आपली शस्त्रे खाली ठेऊन यांचे बाणांचा मारा सहन करावा हे उत्तम. ॥ २६५ ॥ असे केल्याने जितके काही होईल त्यात मरण आले तरी चांगलेच आहे, पण गोत्रजवधाचे पातक करण्याची माझी इच्छा नाही. ॥ २६६ ॥ अशाप्रकारे युद्धास सज्ज झालेले सर्व कुल पाहून अर्जुन म्हणाला राज्यसुख म्हणजे केवळ नरकाचा भोग होय. ॥ २६७ ॥

सञ्जय उवाच

एवमुक्त्वार्जुनः सङ्ख्ये रथोपस्थ उपाविशत्। विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥ ४७ ॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादेऽर्जुनविषादयोगो नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

अर्थ—संजय म्हणतो—याप्रमाणे समरांगणात अर्जुन बोलून, हातातील धनुष्यबाण टाकून देऊन अत्यंत शोकाकुल झाला व रथातून खाली उतरून रथाजवळ बसला. ॥ ४७ ॥

ऐसें तिये अवसरीं। अर्जुन बोलिला समरीं। संजयो म्हणे अवधारीं। धृतराष्ट्रातें ॥ २६८ ॥
मग अत्यंत उद्वेगला। न धरत गहिंवरु आला। तेथ उडी घातली खालां। रथौनियां ॥ २६९ ॥
जैसा राजकुमरु पदच्युतु। सर्वथा होय उपहतु। कां रवि राहुग्रस्तु। प्रभाहीनु ॥ २७० ॥
नातरी महासिद्धिसंभ्रमें। जिंतला तापसु भ्रमें। मग आकळूनि कामें। दीनु कीजे ॥ २७१ ॥
तैसा तो धनुर्धरु। अत्यंत दुःखें जर्जरु। दिसे जेथ रहंवरु। त्यजिला तेणें ॥ २७२ ॥
मग धनुष्यबाण सांडिले। न धरत अश्रुपात आले। ऐसें ऐकें राया वर्तलें। संजयो म्हणे ॥ २७३ ॥
आतां यावरी तो वैकुंठनाथु। देखोनि सखेद पार्थु। कवणेपरी परमार्थु। निरूपील ॥ २७४ ॥
ते सविस्तर पुढारी कथा। अति सकौतुक ऐकतां। ज्ञानदेव म्हणे आतां। निवृत्तिदासु ॥ २७५ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

अर्थ—संजय म्हणतो—राजा धृतराष्ट्रा! याप्रमाणे त्या युद्धाचे ठिकाणी अर्जुन, भगवान् श्रीकृष्णाला म्हणाला, पहा. ॥ २६८ ॥ मग अत्यंत खिन्न झाला, धरू शकेना असा त्याचा कंठ दाटून आला. तेव्हा त्याने लगेच रथाखाली उडी घेतली. ॥ २६९ ॥ ज्याप्रमाणे राजपुत्र राज्यपदावरून काढला गेला असता सर्वस्वी निस्तेज दिसतो किंवा सूर्याला राहूने ग्रासले असता तो कळाहीन दिसतो. ॥ २७० ॥ किंवा एखाद्या तपस्व्याला महासिद्धी प्राप्त होऊन तो जसा तिच्या मोहात सापडून विवेकहीन बनतो व कामवासनेच्या तडाक्यात सापडून कामाधीन होतो. ॥ २७१ ॥ त्याप्रमाणे तो अर्जुन अत्यंत दुःखाने त्रस्त झाला व आपला रथ टाकून दिलेला दिसला. ॥ २७२ ॥ मग धनुष्यबाण टाकून दिले. धरवेना असे डोळ्यातून सारखे अश्रू सुरू झाले. संजय म्हणतो, राजा धृतराष्ट्रा! असा तेथे वृत्तांत झाला. ॥ २७३ ॥ आता पुढे भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला अशा अत्यंत खिन्न स्थितीत पाहून कशा रीतीने परमार्थाचा विवेक सांगणार. ॥ २७४ ॥ ती सविस्तर पुढील कथा, श्रीनिवृत्तिदासज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ऐकिली असता भगवंताच्या भक्तवात्सल्याचे मोठे कौतुक वाटणार आहे. ॥ २७५ ॥

श्रीसद्गुरुमाउलीच्या कृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायाचा अनुवाद गूढार्थदीपिकेसह पूर्ण झाला तो सद्गुरु चरणी समर्पण असो!

समारोप

सुईच्या अग्राइतकी भूमी पांडवांना द्यावयाची नाही असा दुर्योधनाने हट्ट धरल्यामुळे पांडवांना युद्ध करून राज्य मिळविल्यावाचून गत्यंतर नव्हते. पांडवांनी कौरवांशी युद्ध करण्याचे ठरविले व कौरव, पांडव या दोघांचीही सैन्ये कुरुक्षेत्रात युद्ध करण्याकरिता सज्ज झाली. अर्जुनाने दोन्ही सैन्ये न्याहाळून पाहिली व त्यात पूज्य गुरुजन, पुत्र, मामे, सखे, सोयरे हेच सर्व मिळाले असून, या युद्धात या सर्व स्वजनांचा वध होणार असे त्याला दिसून आले. तेव्हा यात स्वजनांचा वध होऊन कुळाचाच नाश होणार व त्या कुळाच्या नाशाने सर्व धर्माचाही नाश होणार धर्मनाशाने सर्व कुळ व कुळातील पूर्वज हे सर्व नरकात जातील असे हे युद्ध आम्हा क्षत्रियाना धर्मरूप असले तरी घोर पापरूप आहे व याने परमेश्वरप्राप्तिरूप परमकल्याण साधणार नाही. पापानेच परमेश्वर प्राप्तीला प्रतिबंध होतो. तेव्हा हे घोर पापरूपी युद्ध न करणे बरे; असे अर्जुनाला वाटून, त्या घोर पापरूपी युद्धापासून परावृत्त होण्याचे त्याने ठरविले व 'मी युद्ध करीत नाही' असे भगवान श्रीकृष्णाला सांगितले.

अर्जुनाच्या अशा या भूमिकेत सर्व अज्ञानी लोकांच्या मनोभूमिकेचेच चित्र रेखाटले आहे. अज्ञानी मनुष्याची बुद्धी धर्माधर्म जाणण्याकरिता जशी विरक्त व ज्ञानसंपन्न पाहिजे तशी मूळची नसते. देहादि विषय सत्य आहेत, असे दृढ समजून ती बुद्धी त्या विषयाच्या मोहाने अत्यंत अविवेकी बनते व ती ज्ञानाने संपन्न होऊन पूर्ण शुद्धब्रह्मस्वरूप व्हावी एवढ्याकरिता परमेश्वराने जे धर्माधर्म मनुष्याकरिता सांगून ठेविले आहेत, ते धर्माधर्म, त्या अविवेकी बुद्धीच्या मनुष्याला पटत नाहीत. तो धर्मालाच अधर्म समजू लागतो. अविवेकी पुरुषाला आपला स्वधर्म परमकल्याणाचा वाटत नाही. केव्हा केव्हा स्वधर्मापेक्षा सुटसुटित असा परधर्म बरा वाटतो. कर्मत्यागरूप संन्यास हा, अत्यन्त विरक्त व ज्यांचे शमदमादी हे स्वभावधर्म आहेत व सत्वगुणांच्या वृद्धीमुळे ज्यांच्या प्रकृतीतील कर्मप्रवृत्ती क्षीण झाली आहे, अशा ब्राह्मणाकरिताच सांगितला आहे. ज्यांची कर्मप्रवृत्ति क्षीण झाली नाही अशा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इत्यादिकांना कर्मत्यागरूपी संन्यास सांगितला नाही. म्हणून अशा लोकांनी कर्मसंन्यास करणे म्हणजे परधर्म स्वीकारणे होय. अर्जुन कर्मप्रवृत्ति क्षीण नसलेल्या क्षत्रिय जातीतला असून अत्यंत विरक्त ब्राह्मणाचा कर्मत्यागरूपी संन्यासधर्म स्वजनांच्या मोहाने स्वीकारू पाहात होता. म्हणून भगवंतांनी त्याला स्वधर्माचा त्याग न करताही प्रत्येक मनुष्याला आपल्या स्वधर्माप्रमाणे वागून आपले आत्यंतिक कल्याण म्हणजे भगवत्प्राप्ती कशी करून घेता येते या मुद्याचा पुढे सविस्तार उपदेश केला.

श्रीमद्सद्गुरू श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु!

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय दुसरा

सञ्जय उवाच

तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् । विषीदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः॥ १॥

अर्थ—*संजय म्हणतो*—आतापर्यंत सांगितल्याप्रमाणे स्वजनांच्या मोहाने अत्यंत व्याकुळ होऊन ज्याच्या डोळ्यातून अश्रू वाहत आहेत व जो अत्यंत विषण्ण झाला आहे, अशा अर्जुनाला पाहून भगवान् बोलू लागले.॥ १॥

मग संजयो म्हणे रायातें। आइकें तो पार्थु तेथें। शोकाकुळ रुदनातें। करीत असे॥ १॥
तें कुळ देखोनि समस्त। स्नेह उपनलें अद्भुत। तेणें द्रवलें असे चित्त। कवणे परि॥ २॥
जैसें लवण जळें झळंबलें। ना तरी अभ्र वातें हाले। तैसें सधीर परी विरमलें। हृदय तयाचें॥ ३॥
म्हणोनी कृपा आकळिला। दिसतसे अति कोमाइला। जैसा कर्दमीं रुपला। राजहंस॥ ४॥
तयापरी तो पंडुकुमरु। महामोहें अति जर्जरु। देखोनी श्री शार्ङ्गधरु। काय बोले॥ ५॥

अर्थ—मग संजय धृतराष्ट्राला म्हणाला, राजा! तो अर्जुन युद्धात अत्यंत शोकाकुल होऊन रडू लागला, पहा.॥ १॥ युद्धात सज्ज झालेले आपले कुळ पाहून अर्जुनाने मनात जे स्वजनांचे प्रेम उत्पन्न झाले व त्याचे चित्ताला पाझर फुटला तो कशा रीतीने, पहा.॥ २॥ ज्याप्रमाणे मिठावर पाण्याचा लोट यावा किंवा वायूने अभ्र हालावे, त्याप्रमाणे अर्जुनाचे चित्त अढळ, पण त्यावेळी विरघळले.॥ ३॥ म्हणून स्वजनांचे प्रेमाने त्याचे चित्त घेरले गेले. तो अती सुकून गेला व ज्याप्रमाणे चिखलात सापडलेला राजहंस अती दीन होतो. तसा तो दीन झाला.॥ ४॥ याप्रमाणे तो पांडुकुमर अर्जुन मोहाने अती व्याकुळ झालेला पाहून भगवान काय म्हणाले ते ऐक.॥ ५॥

श्रीभगवानुवाच

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम्। अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २॥

अर्थ—*भगवान् म्हणतात*—अर्जुना! युद्धाला सज्ज झाल्यावर अनार्याचे ठिकाणी असणारे, स्वर्गाचे द्वार बंद करणारे व अपकीर्ती करणारे असे हे युद्धापासून पराङ्मुख होण्याचे निंद्य पापरूप विचार कोठून सुचलेत?॥ २॥

म्हणे अर्जुना आदि पाहीं। हें उचित काय इये ठायीं। तूं कवण हें कायी। करीत आहासी॥ ६॥
तुज सांगें काय जाहलें। कवण उणें आलें। करितां काय ठेलें। खेदु कायिसा॥ ७॥
तूं अनुचिता चित्त नेदिसी। धीरु कंहींच न संडिसी। तुझेनि नामें अपयशीं। दिशा लंघिजे॥ ८॥
तूं शूरवृत्तीचा ठावो। क्षत्रियांमाजीं रावो। तुझिया लाठेपणाचा आवो। तिहीं लोकीं॥ ९॥
तुवां संग्रामीं हरु जिंतिला। निवातकवचांचा ठावो फेडिला। पवाडा तुवां केला। गंधर्वांसी॥ १०॥
पाहतां तुझेनि पाडें। दिसे त्रैलोक्यही थोकडें। ऐसें पुरुषत्व चोखडें। पार्था तुझें॥ ११॥
तो तूं कीं आजि येथें। सांडूनियां वीरवृत्तीतें। अधोमुख रुदनातें। करितु आहासी॥ १२॥
विचारीं तूं अर्जुनु। कीं कारुण्यें कीजसी दीनु। सांग पां अंधकारें भानु। ग्रासिला आथी॥ १३॥
ना तरी पवनु मेघासी बिहे। कीं अमृतासी मरण आहे। पाहें पां इंधनचि गिळोनि जाये। पावकातें॥ १४॥
कीं लवणेंचि जळ विरे। संसर्गें काळकूट मरे। सांग पा महाफणी दर्दुरें। गिळिजे कायी॥ १५॥
सिंहासी झोंबे कोल्हा। ऐसा अपाडु आथि कें जाहला। परी तो त्वां साच केला। आजि एथ॥ १६॥
म्हणोनि अझुनी अर्जुना। झणें चित्त देसी या हीना। वेगीं धीर करूनियां मना। सावधु होईं॥ १७॥
सांडीं हें मूर्खपण। उठीं घे धनुष्यबाण। संग्रामीं हें कवण। कारुण्य तुझें॥ १८॥

हां गा तूं जाणता। तरी न विचारिसी कां आतां। सांगें झुंजावेळे सदयता। उचित कायी॥ १९॥
हे असतिये कीर्तीसी नाशु। आणि पारत्रिकासि अपभ्रंशु। म्हणे जगन्निवासु। अर्जुनातें॥ २०॥

अर्थ— *भगवान् म्हणतात*—अर्जुना! युद्धभूमीवर हे तुझे विचार योग्य आहेत काय? तू कोण व काय करीत आहेस याचा अगोदर विचार कर. ॥ ६ ॥ तुला झाले तरी काय? तुझ्या ठिकाणी कोणता उणेपणा आहे? काय करायचे राहिले? कशाचा तुला खेद होत आहे? सांग बरे॥ ७॥ तू कधी अयोग्य गोष्टीकडे लक्ष देत नाहीस, धैर्य कधी सोडत नाहीस, तुझे नाव घेतले की अपयश दशदिशेच्या पलीकडे जाते म्हणजे कोठे दिसतच नाही. ॥ ८॥ तू शौर्याचे वसतिस्थान आहेस, सर्व क्षत्रियांमध्ये श्रेष्ठ आहेस. तिन्ही लोकात तुझ्या शौर्याचा डंका वाजतो. ॥ ९ ॥ युद्धात तू प्रत्यक्ष शंकराला जिंकलेस, निवातकवच राक्षसाचे कोठे नाव निशाण ठेवले नाहीस. गंधर्वांना देखील पराक्रम करून जिंकलेस॥ १० ॥ तुझ्याशी तुलना करून पाहता त्रैलोक्यही कमीच वाटते. अशा प्रकारचा अर्जुना! तुझा उत्तम पराक्रम आहे. ॥ ११ ॥ आणि तो तू आज या युद्धात शौर्य गाजविण्याचे सोडून खाली मान घालून रडत बसला आहेस!॥ १२ ॥ अर्जुना तू विचार कर, तुझ्या सारख्या शूराला दयावृत्तीने दीन करून सोडावे काय? अंध:काराने सूर्य झाकला जाईल काय? सांग बरें!॥ १३॥ की वायूला मेघाची भीती वाटेल? की अमृताला मरण येईल? लाकडेच अग्नीला गिळतील?॥ १४॥ मीठच पाण्याला विरवून टाकील काय? की दुसऱ्याचा संसर्ग झाल्याबरोबर काळकूटाचा नाश होईल? बेडकी मोठ्या सर्पाला गिळील काय?॥ १५॥ सिंहाबरोबर कोल्हा झोंबी घेईल असे कधी तरी घडेल का? पण आज तू मात्र ह्या गोष्टी खऱ्या करून दाखविल्या॥ १६॥ म्हणून अजूनही अर्जुना, ह्या अयोग्य गोष्टीकडे तू लक्ष देशील काय? अरे! लवकर धैर्य धर व सावध हो. ॥ १७॥ हे मूर्खाचे विचार सोड; धनुष्य बाण हाती घे. अरे! युद्धाचे वेळी अशी दयावृत्ती काय कामाची?॥ १८॥ तू आपल्याला शहाणा म्हणवितोस मग विचार कां करीत नाहीस? लढाईच्या वेळी अशी दया दाखविणे योग्य आहे काय, हे तूच सांग. ॥ १९॥ युद्धाचे वेळी अशी दया दाखविणे आजपर्यंत मिळविलेल्या कीर्तीला धुळीला मिळविणारे आहे व मेल्यावर परलोकप्राप्तीला बाधक आहे, असे श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले. ॥ २० ॥

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते। क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परन्तप॥ ३॥

अर्थ—असा नपुंसकपणा धरू नकोस. ते तुला शोभत नाही. हे अर्जुना! चित्ताचा दुबळेपणा टाकून देऊन युद्धाला सज्ज हो. ॥ ३ ॥

म्हणोनि शोकु न करीं। तूं पुरता धीरु धरीं। हे शोच्यता अव्हेरीं। पंडुकुमरा॥ २१॥
तुज नव्हे हें उचित। येणें नासेल जोडलें बहुत। तूं अझुनि तरी हित। विचारीं पां॥ २२॥
येणें संग्रामाचेनि अवसरें। एथ कृपाळुपण नुपकरे। हे आतांचि काय सोयरे। जाहले तुज॥ २३॥
तूं आधींचि काय नेणसी। कीं हे गोत्र नोळखसी। वायांचि काय करिसी। अतिशयो आतां॥ २४॥
आजिचें हें झुंज। काय जन्मा नवल तुज। हें परस्परें तुम्हां व्याज। सदाचि आथी॥ २५॥
तरी आतां काय जाहलें। कायि स्नेह उपनलें। हें नेणिजे परी कुडें केलें। अर्जुना तुवां॥ २६॥
मोह धरिलिया ऐसें होईल। जे असती प्रतिष्ठा जाईल। आणि परलोकही अंतरेल। ऐहिकेंसी॥ २७॥
हृदयाचें ढिलेपण। एथ निकयासि नव्हे कारण। हें संग्रामीं पतन जाण। क्षत्रियांसी॥ २८॥
ऐसेनि तो कृपावंतु। नानापरी असे शिकवतु। हें ऐकोनि पंडुसुतु। काय बोले॥ २९॥

अर्थ—म्हणून अर्जुना! तू शोक करू नकोस. पूर्ण धैर्य धर. असे हे शोक करणे टाकून दे. ॥ २१ ॥ तुला असा शोक करणे योग्य नाही. आजपर्यंत मिळविलेल्या कीर्तीला ते नाहीसे करणारे आहे. अजून तरी तू आपले हित कशात आहे याचा विचार कर. ॥ २२ ॥ या युद्धाचे वेळी शत्रूची दया करणे हे काही हितकर नाही. अरे! हे कौरव आताच तुझे सोयरे झाले आहेत काय?॥ २३॥ तुला हे आपले स्वजन आहेत हे युद्धाचे पूर्वी माहित नव्हते काय? मग आताच काय सोयरेपणाचा बडेजाव करून राहिलास?॥ २४॥ जन्मामध्ये हे आजचे युद्ध नवलाचे वाटावे असे

पहिलेच आहे काय? अरे! तुम्हा परस्परांत युद्धाचे निमित्त नेहमीच उत्पन्न होत आले आहे. ॥ २५ ॥ मग आताच काय त्याचा मोठा बाऊ करीत बसलास? आताच कसा काय तुला त्यांच्याविषयी प्रेमाचा उमाळा आला हे मला समजत नाही. पण अर्जुना! हा जो तू शोक मांडला आहेस हे फार वाईट आहे. ॥ २६ ॥ अशी शत्रुवर दया दाखविली तर असे होईल की तुझी असलेली प्रतिष्ठा नाहीशी होईल व इहलोक व परलोक हे दोन्ही अंतरतील. ॥ २७ ॥ क्षत्रियाने युद्धाचे वेळी शत्रूविषयी कोवळे मन असू देणे हितकर नाही. उलट ते त्याचे पतन करणारे आहे. ॥ २८ ॥ संजय म्हणतो धृतराष्ट्रा! तो कृपाळू भगवान् श्रीकृष्ण नाना प्रकाराने उपदेश करीत असता अर्जुन देवाला म्हणाला. ॥ २९ ॥

अर्जुन उवाच

कथं भीष्ममहं सङ्ख्ये द्रोणं च मधुसूदन। इषुभिः प्रति योत्स्यामि पूजार्हावरिसूदन॥ ४॥

अर्थ—अर्जुन म्हणतो—शत्रूचा निःपात करणाऱ्या कृष्णा, या युद्धामध्ये पूज्य अशा भीष्मद्रोणांवर बाणांचा वर्षाव कसा करू?॥ ४॥

देवा हें येतुलेवरी। बोलावें नलगे अवधारीं। आधीं तूंचि चित्तीं विचारीं। संग्रामु हा॥ ३०॥
हें झुंज नव्हे प्रमादु। एथ प्रवर्तलिया दिसतसे बाधु। हा उघडा लिंगभेदु। वोढवला आम्हां॥ ३१॥
देखें मातापितरें अर्चिजती। सर्वस्वें तोष पावविजती। तियें पाठीं केवीं वधिजती। आपुलियां हातीं॥ ३२॥
देवा संतवृंद नमस्कारिजे। कां घडे तरी पूजिजे। हें वांचूनि केवीं निंदिजे। स्वयें वाचा॥ ३३॥
तैसे गोत्रगुरु आमुचे। हे पूजनीय आम्हां नेमाचें। मज बहुत भीष्मद्रोणांचें। वर्ततसे॥ ३४॥
जयांलागीं मनें विरू। आम्ही स्वप्नींही न शकों धरूं। तयां प्रत्यक्ष केवीं करूं। घातु देवा॥ ३५॥
वरि जळो हें जियालें। एथ आघवेयांसि हेंचि काय जाहलें। जे यांचां वधीं अभ्यासिलें। मिरविजे आम्हीं॥ ३६॥
मी पार्थु द्रोणाचा केला। येणें धनुर्वेदु मज दिधला। तेणें उपकारें काय आभारैला। वधीं तयातें॥ ३७॥
जेथोंचिया कृपा लाभिजे वरु। तेथेंचि मनें व्यभिचारु। तरी काय मी भस्मासुरु। अर्जुन म्हणे॥ ३८॥

अर्थ—देवा! हे इतके तुम्हाला म्हणावेच लागत नाही. तुम्हीच पहा आधी तूच या युद्धाचा विचार कर. ॥ ३० ॥ हे मला युद्धच वाटत नाही. ही केवळ जाणूनबुजून आपण चूक करीत आहो. म्हणून या युद्धाला प्रवृत्त होण्यात फार अहित आहे असे मला दिसून येते. या उघड उघड पूज्यांचा अपमान आम्ही आपल्यावर ओढवून घेत आहो. ॥ ३१ ॥ देवा! पहा, आईबापांचे अर्चन करावे व सर्व तऱ्हेने त्यांना संतुष्ट करावे ते सोडून आपल्या हाताने त्यांचा वध कसा करावा?॥ ३२ ॥ त्याप्रमाणे देवा! संतजनांना नमस्कार करावा किंवा आपल्याकडून होत असल्यास त्यांचे पूजन करावे. पण हे सोडून देऊन आपल्या वाणीने त्यांची निंदा कशी करावी?॥ ३३ ॥ त्याप्रमाणे भीष्माचार्य हे आमचे कुलातील श्रेष्ठ पुरुष व द्रोणाचार्य हे आमचे विद्यागुरु आहेत. हे दोघेही आम्हाला नित्य आदरणीय आहेत. या दोघांचाही माझ्या चित्तात तर अत्यंत आदर आहे. ॥ ३४ ॥ ज्याच्याविषयी स्वप्नात देखील मनात वैर उत्पन्न होणे शक्य नाही. त्यांना प्रत्यक्ष जागृतीत मी कसे मारू?॥ ३५ ॥ यापेक्षा आग लागो या माझ्या अशा जगण्याला! येथे सर्वांनाच काय झाले समजत नाही. आम्ही जेवढी विद्या अभ्यासाने संपादन केली त्या विद्येने यांचा वध करूनच आम्ही आपली बहादुरी मिरवायची की काय?॥ ३६ ॥ द्रोणाचार्यांनी मला धनुर्विद्या शिकवून एवढ्या कीर्तीस चढविले, त्यांच्या त्या उपकाराचे अत्यंत ऋण झाले, म्हणून त्यांचा वध करून ते ऋण फेडायचे की काय?॥ ३७ ॥ (शंकरानी भस्मासुराला ज्याच्या डोक्यावर हात ठेवशील तो तात्काळ भस्म होईल असा वर दिला व तो भस्मासुर शंकराच्या डोक्यावरच हात ठेवू पाहत होता) त्याप्रमाणे ज्या द्रोणाचार्यांनी कृपाळू होऊन संपूर्ण धनुर्विद्या शिकविली, त्या धनुर्विद्येचा प्रयोग त्यांच्यावरच करायला, देवा! मी काय भस्मासुर आहे? असे अर्जुन म्हणाला. ॥ ३८ ॥

गुरूनहत्वा हि महानुभावान् श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके।
हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव भुञ्जीय भोगान् रुधिरप्रदिग्धान्॥ ५॥

अर्थ—या महापराक्रमी व पूजनीय गुरुजनांना न मारता भिक्षान्न खाऊन जगणे श्रेयस्कर आहे. कारण

गुरुजनांना मारून त्यांच्या रक्ताने माखलेले अर्थ आणि काम मला भोगावे लागणार॥ ५॥

देवा समुद्र गंभीर आइकिजे। वर तोहि आहाच देखिजे। परी क्षोभु मनीं नेणिजे। द्रोणाचियें॥ ३९॥
हें अपार जें गगन। वर तयाही होईल मान। परि अगाध भलें गहन। हृदय याचें॥ ४०॥
वरी अमृतही विटे। कीं काळवशें वज्र फुटे। परी मनोधर्मु न लोटे। विकरविला हा॥ ४१॥
स्नेहालागीं माये। म्हणिपे तें कीरु होये। परी कृपा ते मूर्त आहे। द्रोणीं इये॥ ४२॥
हा कारुण्याची आदि। सकळ गुणांचा निधि। विद्यासिंधु निरवधि। अर्जुन म्हणे॥ ४३॥
हा येणें मानें महंतु। वरी आम्हांलागीं कृपावंतु। आतां सांग पां येथ घातु। चिंतूं येईल॥ ४४॥
ऐसे हे रणीं वधावे। मग आपण राज्यसुख भोगावें। तें मना नये आघवें। जीवितेंसीं॥ ४५॥
हें येणें मानें दुर्भर। जे याहीहुनि भोग सधर। ते असतु येथवर। भिक्षा मागतां भली॥ ४६॥
ना तरी देशत्यागें जाइजे। कां गिरिकंदर सेविजे। परी शस्त्र आतां न धरिजे। इयांवरी॥ ४७॥
देवा नवनिशतीं शरीं। वावरोनी यांचा जिव्हारीं। भोग गिंवसावे रुधिरीं। बुडाले जे॥ ४८॥
ते काढूनि काय कीजती। लिप्त केवीं सेविजती। मज नये हे उपपत्ति। याचिलागीं॥ ४९॥
ऐसें अर्जुन तिये अवसरीं। म्हणे श्रीकृष्णा अवधारीं। परि तें मना नयेचि मुरारी। आइकोनियां॥ ५०॥
हें जाणोनि पार्थु बिहाला। मग पुनरपि बोलों लागला। म्हणे देवो कां चित्त या बोला। देतीचि ना॥ ५१॥

अर्थ—देवा! समुद्र फार गंभीर असतो असे आपण ऐकतो. त्याचे ते गांभीर्य नावाचेच म्हणता येईल. पण या द्रोणाचार्यांचे चित्त कधी क्षुब्ध होतच नाही. ॥ ३९ ॥ या आकाशाला अफाट म्हणतात पण तेही मर्यादित होईल, पण द्रोणाचार्यांचे हृदय खरोखरच अगाध आहे. ॥ ४० ॥ अमृतही विटेल, काळाने वज्रही फुटेल, पण क्षुब्ध व्हावे म्हणून प्रयत्न केला तरी द्रोणाचार्यांचे चित्तात खळबळ होणार नाही. ॥ ४१ ॥ प्रेम खरे आईचे असे म्हणतात, ते खरे आहे, पण द्रोणाचार्य म्हणजे प्रेमाची साक्षात् मूर्ती आहेत. ॥ ४२ ॥ अर्जुन म्हणतो, द्रोणाचार्य म्हणजे करुणेचे उगमस्थान होय हे सर्व सद्‌गुणांचा साठा होत हे सर्व विद्यांचे अमर्याद समुद्र आहेत. ॥ ४३ ॥ ते, याप्रमाणे अत्यंत थोर पुरुष असून आमच्यावर त्यांचे अत्यंत प्रेम आहे आता देवा! तुम्हीच सांगा, अशा द्रोणाचार्यांचा घात करावा हे मनात तरी येणे शक्य आहे का? ॥ ४४ ॥ अशा सत्पुरुषांना युद्धात मारून मग आपण आनंदाने राज्याचा उपभोग घ्यावा, असे हे जीवित जगणे मला मुळीच बरे वाटत नाही. ॥ ४५ ॥ याप्रमाणे असे राज्यभोग भोगणे मला फार कठीण आहे. एवढेच नाहीतर या राज्यभोगाहून श्रेष्ठ भोग अशा रीतीने जर प्राप्त होतील तर तेही मला नकोत, त्यापेक्षा भिक्षा मागून जगणे मला अधिक बरे वाटते. ॥ ४६ ॥ किंवा हा देश सोडून दुसऱ्या देशात जाणे बरे, किंवा एखाद्या पर्वताचे गुहेत जाऊन राहणे बरे. पण त्यांच्यावर शस्त्रवर्षाव करणे बरे नव्हे. ॥ ४७ ॥ आमच्या तीक्ष्ण परजलेल्या शरांनी यांच्या मर्माचे ठिकाणी राहावे आणि त्या मर्मातून निघणाऱ्या रक्तात बुडालेले हे भोग भोगण्याकरिता बाहेर काढावे. ॥ ४८ ॥ असे रुधिरात बुडालेले भोग काढून काय करायचे? रक्ताने माखलेले ते भोग कसे भोगावे? म्हणूनच देवा! आपले विचार मला पटत नाहीत. ॥ ४९ ॥ संजय म्हणतो, राजा धृतराष्ट्रा! तेव्हा तो अर्जुन याप्रमाणे श्रीकृष्णाला म्हणाला, कृष्णा! माझे बोलण्याकडे लक्ष दे, पण ते श्रीकृष्णाने ऐकिले तरी श्रीकृष्णाला ते मुळीच पटले नाही. ॥ ५० ॥ आपले बोलणे देवाला पटले नाही व देव आपले बोलण्याकडे लक्ष न देता उगे राहिले. ही देवाची उदासीनता पाहून अर्जुनाला भीती वाटली व देवा! माझ्या बोलण्याकडे आपण लक्ष कां देत नाही, असे तो देवाला म्हणू लागला. ॥ ५१ ॥

गूढार्थदीपिका—हें जाणोनि पार्थ बिहाला।

आपले हितकर्ते जे असतात ते प्रेमाने सांगोत किंवा रागावून सांगोत, ते त्यांचे सांगणे हिताकडे दृष्टी देऊनच असते. पण हितकर्ता उदासीन राहतो तेव्हा त्याला 'आपल्याला काय करावयाचे' असे वाटत असते. म्हणजे तो हिताकडे दुर्लक्ष करतो. म्हणून हितकर्त्याचा एकदाचा राग बरा, पण उदासीनता कल्याणाची नसते. म्हणून देवाच्या उदासीनवृत्तीची अर्जुनाला भीती वाटली.

न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः।
यानेव हत्वा न जिजीविषाम स्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः॥ ६॥

अर्थ—देवा युद्ध करणे बरे की न करणे बरे, आम्हाला जय येईल किंवा येणार नाही, हे काही आम्हांला समजत नाही परंतु ज्यांना मारून आम्ही जिवंत राहणे शक्य नाही ते कौरव मात्र युद्धाला समोर उभे आहेत.॥ ६॥

येऱ्हवीं माझा चित्तीं जें होतें। तें मी विचारूनि बोलिलो येथें। परी निकें काय यापरौतें। तें तुम्ही जाणा॥ ५२॥
पैं विरु जयांसी ऐकिजे। आणि या बोलींचि प्राणु सांडिजे। ते एथ संग्रामव्याजें। उभे आहाती॥ ५३॥
आतां ऐसेयांतें वधावें। कीं अव्हेरूनिया निघावें। या दोहोंमाजीं काय करावें। तें नेणों आम्ही॥ ५४॥

अर्थ—एरव्ही मला जे वाटत होते ते मी आपल्या समोर स्पष्टपणे मांडले आहे. परंतु यात हिताचे काय ते तुम्हाला माहित!॥ ५२॥ पण 'वैर आहे' असे शब्द ज्यांच्याविषयी म्हटल्याबरोबर आपण प्राण सोडला पाहिजे, तेच मात्र येथे युद्धाकरिता सज्ज आहेत.॥ ५३॥ आता युद्धात अशांचा वध करावा की युद्ध टाकून चालते व्हावे? या दोहोत योग्य काय हे काही मला समजत नाही.॥ ५४॥

कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसम्मूढचेताः।
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्॥ ७॥

अर्थ—देवा! स्वजनांच्या मोहाने मी दीन झाल्यामुळे माझा क्षात्रस्वभाव नाहीसा झाला व मला धर्माधर्म कळेनासे झाले आहेत. म्हणून मी तुला विचारतो की यात माझे कल्याणाचे काय हे निश्चित मला सांग मी तुझा शिष्य आहे व मी तुला शरण आलो आहे.॥ ७॥

आम्हां काय उचित। तें पाहतां न स्फुरे येथ। जे मोंहें येणें चित्त। व्याकुळ माझें॥ ५५॥
तिमिराविरुद्ध जैसें। दृष्टीचें तेज भ्रंशे। मग पासींच असतां न दिसे। वस्तुजात॥ ५६॥
देवा तैसें मज जाहलें। जे मन हें भ्रांती ग्रासिलें। आतां काय हित आपुलें। तेंही नेणें॥ ५७॥
तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें। निकें तें आम्हां सांगावें। जे सखा सर्वस्व आघवें। आम्हांसि तूं॥ ५८॥
तूं गुरु बंधु पिता। तूं आमची इष्ट देवता। तूंचि सदा रक्षिता। आपदीं आमुतें॥ ५९॥
जैसा शिष्यांतें गुरु। सर्वथा नेणे अव्हेरू। कीं सरितांते सागरू। त्यजी केवीं॥ ६०॥
नातरी अपत्यातें माये। सांडूनि जरी जाये। तरी तें कैसेनि जिये। ऐकें कृष्णा॥ ६१॥
तैसा सर्वांपरी आम्हांसी। देवा तूंचि एक आहासि। आणि बोलिलें जरी न मानिसी। मागील माझें॥ ६२॥
तरी उचित काय आम्हां। जें व्यभिचरेना धर्मा। तें झडकरी पुरुषोत्तमा। सांगें आतां॥ ६३॥

अर्थ—आम्ही काय करणे योग्य आहे हे मला काही सुचत नाही. कारण स्वजनांच्या प्रेमाने माझे चित्त व्याकुळ झाले आहे.॥ ५५॥ तिमिरदोषाने जसे डोळे असून आंधळे होतात व मग जवळची वस्तू देखील दिसत नाही.॥ ५६॥ देवा! त्याप्रमाणे मला झाले, माझे मन भ्रांतिष्ठ झाल्यामुळे आपले हित कशात आहे हे काही मला समजत नाही.॥ ५७॥ तरी श्रीकृष्णा! ही माझी मनःस्थिती जाणून योग्य ते काय हे तू सांग. कारण आम्हाला अगदी आमचे हिताचे सांगणारा तूच एक खरा मित्र आहेस.॥ ५८॥ तूच आमचा गुरु होय तूच आमचा बंधू, पिता आहेस. तूच इष्ट देवता होय. संकटकाळी तूच आमचे संरक्षण करणारा आहेस.॥ ५९॥ ज्याप्रमाणे प्रिय शिष्याला गुरु कधी सोडू इच्छित नाही किंवा समुद्र नदीची कशी उपेक्षा करील?॥ ६०॥ श्रीकृष्णा! ऐक, आई जर आपल्या बाळाची उपेक्षा करील तर ते कसे जिवंत राहील, सांग बरे.॥ ६१॥ त्याप्रमाणे सर्वतोपरी आम्हाला तूच एक आहेस, आणि मागील माझ्या बोलण्याकडे जर लक्ष न देशील॥ ६२॥ तर देवा! 'धर्माला सोडून नाही व आमच्या कल्याणाचे आहे' असे काय आहे ते लवकर सांग॥ ६३॥

न हि प्रपश्यामि ममापनुद्याद् यच्छोकमुच्छोषणमिन्द्रियाणाम् ।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाधिपत्यम्॥ ८॥

अर्थ—या लोकातील शत्रुरहित पृथ्वीचे राज्य किंवा स्वर्गाचे राज्य मला मिळाले तरी त्याने माझ्या इंद्रियांचा शोष करणारा हा स्वजनविषयक शोक तुझ्यावाचून नाहीसा होणार नाही. ॥ ८ ॥

हें सकळ कुळ देखोनि। जो शोकु उपजलासे मनीं। तो तुझिया वाक्यावांचुनि। न जाय आणिकें ॥ ६४ ॥
एथ पृथ्वीतळ आपु होईल। हें महेंद्रपदही पाविजेल। परि मोह हा न फिटेल। मानसींचा ॥ ६५ ॥
जैसीं बीजें सर्वथा आहाळलीं। तीं सुक्षेत्रीं जर्‍ही पेरिलीं। तरी न विरूढती सिंचलीं। आवडे तैसीं ॥ ६६ ॥
ना तरी आयुष्य पुरलें आहे। तरी औषधें कांहीं नोहे। एथ एकचि उपेगा जाये। परमामृत ॥ ६७ ॥
तैसें राज्यभोगसमृद्धि। उज्जीवन नोहे जीवबुद्धि। एथ जिव्हाळा कृपानिधि। कारुण्य तुझें ॥ ६८ ॥
ऐसें अर्जुन तेथ बोलिला। जंव क्षणएक भ्रांती सांडिला। मग पुनरपि व्यापिला। उर्मी तेणें ॥ ६९ ॥
कीं मज पाहतां उर्मी नोहे। हे अनारिसें गमत आहे। तो ग्रासिला महामोहें। काळसर्पें ॥ ७० ॥
सवर्म हृदयकल्हारीं। तेथ कारुण्यवेळेच्या भरीं। लागला म्हणोनि लहरी। भांजेचि ना ॥ ७१ ॥

अर्थ—अर्जुन म्हणतो देवा! हे युद्धास तयार झालेले आपलेच कुळातील सर्व स्वजन पाहून मला जो शोक होत आहे तो तुझ्या उपदेशावाचून नाहीसा होणे शक्य नाही. ॥ ६४ ॥ सर्व पृथ्वीचे राज्य प्राप्त झाले किंवा इंद्राचे राज्य जरी मिळाले तरी मनात वाटणारा स्वजनांविषयीचा मोह नाहीसा होणार नाही. ॥ ६५ ॥ ज्याप्रमाणे भाजलेले बीज चांगल्या तयार केलेल्या जमिनीत पेरले व पुरेसे पाणी दिले, तरी उगवणे शक्य नाही. ॥ ६६ ॥ किंवा आयुष्यच संपले असले तर औषधाने मनुष्य वाचू शकत नाही. अशावेळी एका अमृताचाच उपयोग होतो. ॥ ६७ ॥ त्याप्रमाणे केवढ्याही राज्यभोगाची प्राप्ती झाली तरी त्याच्या योगाने बुद्धीला विवेक उत्पन्न होईल अशी आशा नाही. येथे तुला जर करुणा येईल आणि कृपा करून जिव्हाळ्याने उपदेश करशील तरच हे शक्य आहे. ॥ ६८ ॥ अशा रीतीने अर्जुन तेथे थोडा वेळ विवेकपूर्वक जरी बोलला तरी पुन: लागलीच त्याला शोकाची उर्मी आली ॥ ६९ ॥ मला तर असे दिसते की ती शोकाची उर्मी नव्हती. ते काही तरी निराळेच होते ते निराळे म्हणजे त्या अर्जुनाला स्वजनांच्या महामोहरूपी काळसर्पाने दंश केला होता. ॥ ७० ॥ आणि मर्मयुक्त अशा अति नाजूक हृदयकमळाचे ठिकाणी ममतारूपी संध्यासमयी त्या मोहसर्पाने दंश केल्यामुळे त्याच्या विषबाधेचे वेग थांबत नव्हते. ॥ ७१ ॥

गूढार्थदीपिका—सवर्म हृदयकल्हारीं। कारुण्यवेळेच्या भरी।

इतर स्थानांपेक्षा मर्मस्थानी झालेल्या रोगाची पीडा अधिक असते व कोणत्याही रोगाचा दिवसापेक्षा रात्री जास्त वेग असतो, हा लोकांत अनुभवाने असलेल्या समजुतीचा उल्लेख येथे माउलीने केला आहे.

हें जाणोनि ऐसी प्रौढी। जो दृष्टिसवें विष फेडी। तो धावया श्रीहरी गारुडी। पातला कीं ॥ ७२ ॥
तैसिया पंडुकुमरा व्याकुळा। मिरवतसे श्रीकृष्ण जवळा। तो कृपावशें अवलीळा। रक्षील आतां ॥ ७३ ॥
म्हणोनि तो पार्थु। मोहफणिग्रस्तु। म्यां म्हणितला हा हेतु। जाणोनियां ॥ ७४ ॥
मग देखा तेथ फाल्गुनु। घेतला असे भ्रांती कवळूनु। जैसा घनपडळीं भानु। आच्छादिजे ॥ ७५ ॥
तयापरी तो धनुर्धरु। जाहलासे दु:खें जर्जरु। जैसा ग्रीष्मकाळीं गिरिवरु। वणवला कां ॥ ७६ ॥
म्हणोनि सहजें सुनीळु। कृपामृतें सजळु। तो वोळलासे श्रीगोपाळु। महामेघु ॥ ७७ ॥
तेथ सुदर्शनांची द्युति। तेचि विद्युल्लता झळकती। गंभीर वाचा ते आयती। गर्जनेची ॥ ७८ ॥
आतां तो उदार कैसा वर्षेल। तेणें अर्जुनाचळु निवेल। मग नवी विरूढी फुटेल। उन्मेषाची ॥ ७९ ॥
ते कथा आइका। मनाचिया आराणुका। ज्ञानदेवो म्हणे देखा। निवृत्तिदासु ॥ ८० ॥

अर्थ—असा विशेषप्रसंग पाहून जो दृष्टीमात्रे करून विषाची बाधा नाहीशी करतो तो हाकेसरसा धावून येणारा मांत्रिक श्रीकृष्ण धावून आला. ॥ ७२ ॥ असो, असा तो अर्जुन स्वजनांच्या ममतेने व्याकुळ झाला असता श्रीकृष्ण जवळ होताच. तो आता आपल्या कृपेने अर्जुनाचा शोक सहज घालवील. ॥ ७३ ॥ म्हणूनच हा भावार्थ लक्षात घेऊन मी अर्जुनाला मोहरूपी सर्पराजाने दंश केला होता असे म्हटले. ॥ ७४ ॥ मग तेथे अर्जुन अशा रीतीने अविचाररूप

भ्रांतीने पछाडला असता मेघपटलाने आच्छादिलेल्या सूर्यासारखाच दिसत होता. ॥ ७५ ॥ तसा तो धनुर्धर अर्जुन उन्हाळ्यात पेटलेल्या पर्वताप्रमाणे दु:खाने होरपळून गेला. ॥ ७६ ॥ म्हणून स्वाभाविकच सुंदर नीलवर्ण असलेल्या कृपारूपी अमृतजलाने भरलेला थोर मेघ, भगवान् श्रीकृष्ण, तेथे वळून आला. ॥ ७७ ॥ भगवान् श्रीकृष्णाच्या हिऱ्यासारख्या दंतपंक्तीचे तेज हेच येथे चमकणाऱ्या विजा होत. भगवंताच्या मुखातून आपोआप निघणारी गंभीर वाणीच मेघांचा गडगडाट होय. ॥ ७८ ॥ मेघापेक्षाही कृपावर्षाव करण्यात अत्यंत उदार असलेला भगवान् श्रीकृष्ण आता कसा मुक्त कृपावर्षाव करील, त्या वर्षावाने पेटलेला अर्जुनरूपी पर्वत कसा शांत होईल आणि त्या अर्जुनरूपी पर्वतावर पुन: कसे विवेकज्ञानरूपी नवे अंकुर फुटतील. ॥ ७९ ॥ ही सर्व कथा, श्रीनिवृत्तिदास श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मनाचे पूर्ण समाधान होईपर्यंत श्रवण करा. ॥ ८० ॥

गूढार्थदीपिका—शिष्यस्तेऽहं शाधि मां

श्लोक ६-७— व त्यावरील श्रीज्ञानेश्वरमहाराजांची भावार्थदीपिका पाहता असे दिसते की अर्जुन आपला शहाणपणा मिरवीत होता तोपर्यंत भगवान् श्रीकृष्णाचे म्हणणे त्याला पटले नाही. शेवटी भगवान् श्रीकृष्णांनी त्याचे विचार ऐकून 'परी ते मना, न येची मुरारी' त्या विचाराकडे मुळीच लक्ष दिले नाही. हे पाहून अर्जुनाला वाटले की आपण योग्य विचार मांडत असतानाही भगवंताला ते विचार योग्य वाटत नाहीत, तेव्हा आपण चुकत आहो. अर्जुनाने आपल्या शहाणपणाचा अभिमान सोडला व अत्यंत दीन होऊन भगवंताला म्हणाला की, 'देवा! मी अत्यंत मूर्ख आहे. मला माझे आत्यंतिक कल्याण कशात आहे हे समजत नाही. मोहाने माझे मन विवेक करण्यास समर्थ राहिले नाही. मी तुझा दास आहे. आता तूच माझे कल्याण कशात आहे सांग.'

या आत्यंतिक कल्याणाची मीमांसा करण्याकरिताच वेदान्तशास्त्र प्रवृत्त झाले आहे. वेदान्तशास्त्राने केलेली आत्यंतिक कल्याणाची मीमांसा व त्यातील विचार हेच खरोखर बुद्धीचे खरे शहाणपण होय. कारण पूर्वीच्या महानुभावांनी ईश्वराच्या कृपेने प्राप्त झालेल्या अत्यंत शुद्धबुद्धीने व श्रुती, युक्ती, अनुभव या तीन मुख्य प्रमाणांच्या साह्याने ती मीमांसा केली असल्यामुळे, अत्यंत प्रमाण आहे. पण हे खरे ज्ञान ज्यांना नाही असे अज्ञानी लोक आपल्या विपरीत बुद्धीने मानलेले ज्ञानच किंवा शहाणपणच बरोबर आहे असे समजतात. आपल्या अशा विपरीत शहाणपणाचा अभिमान जोपर्यंत असतो तोपर्यंत त्यांना खऱ्या विवेकज्ञानाचा कितीही उपदेश केला तरी शहाणपणाच्या अभिमानाने त्यांच्या बुद्धीचा दरवाजा बंद झालेला असल्यामुळे ते ज्ञान त्याना पटत नाही; म्हणून तोपर्यंत खरे सत्पुरुष त्यांना उपदेश करीत नाहीत. आपल्याला काही समजत नाही असे वाटू लागले व आपल्या जाणीवेचा अभिमान सोडून ते दीन झाले म्हणजे ज्ञानी पुरुष त्यांना उपदेश करतात. भगवान् श्रीकृष्णाने तसेच केले. अर्जुनाने आपण कोण व हे स्वजन कोण, यांचा संबंध काय याचा कधी. विचारच केला नव्हता. त्यामुळे स्वजनांचा, पुढे युद्धांत नाश होणार या कल्पनेने त्याला अत्यंत दु:ख होत होते. खरा विचार झाल्यावर हे दु:खच होणे शक्य राहत नाही. अर्जुनाने आपल्या खोट्या समजुतीचे विचार देवासमोर मांडले. देवांनी त्याला मान दिला नाही. तेव्हा तो भ्याला व देवाला शरण गेला. देवांनी पुढे त्याला आत्मानात्मविवेकाचा उपदेश केला.

सञ्जय उवाच

एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेश: परन्तप। न योत्स्य इति गोविन्दमुक्त्वा तूष्णीं बभूव ह॥ ९॥

अर्थ—संजय म्हणतो—हे धृतराष्ट्रा याप्रमाणे अर्जुन भगवंताशी बोलून मी युद्ध करीत नाही असे त्याने श्रीकृष्णाला सांगितले व मौन धरून तो स्वस्थ राहिला. ॥ ९ ॥

ऐसें संजयो सांगतु। म्हणे राया तो पार्थु। पुनरपि शोकाकुलितु। काय बोले॥ ८१॥
आइकें सखेदु बोले श्रीकृष्णातें। आतां नाळवावें तुम्हीं मातें। मी सर्वथा न झुंजे येथें। भरंवसेनि॥ ८२॥
ऐसें येकिहेळां बोलिला। मग मौन धरूनि ठेला। तेथ श्रीकृष्ण विस्मयो पावला। देखोनि तयातें॥ ८३॥

अर्थ—संजय धृतराष्ट्राला सांगतो की राजा! पुन: अर्जुन शोकग्रस्त होऊन श्रीकृष्णाला काय म्हणाला ते

ऐक. ॥ ८१ ॥ अत्यंत खिन्न होऊन अर्जुन श्रीकृष्णाला म्हणतो, कृष्णा! माझी आता प्रशंसा करून मनधरणीही करू नकोस. मी खात्रीने येथे युद्ध करणार नाही. ॥ ८२ ॥ इतके एकदा बोलला व अर्जुनाने मौन धरिले त्याला तसे मौन धरलेले पाहून श्रीकृष्णाला आश्चर्य वाटले. ॥ ८३ ॥

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत । सेनयोरुभयोर्मध्ये विषीदन्तमिदं वचः ॥ १० ॥

अर्थ—दोन्ही सैन्यांच्या मध्ये अत्यन्त व्याकुळ व खिन्न होऊन बसलेल्या अर्जुनाला पाहून व हासल्यासारखे करून त्याला पुढे भगवान असे वचन बोलले. ॥ १० ॥

मग आपुलां चित्तीं म्हणे। एथ हें कायी आदरिलें येणें। अर्जुन सर्वथा कांहीं नेणे। काय कीजे ॥ ८४ ॥
हा उमजे आतां कवणेपरी। कैसेनि धीरू स्वीकारी। जैसा ग्रहातें पंचाक्षरी। अनुमानी कां ॥ ८५ ॥
ना तरी असाध्य देखोनि व्याधि। अमृतासम दिव्य ओषधी। वैद्य सूचि निरवधि। निदानींची ॥ ८६ ॥
तैसें विवरीतु असे श्रीअनंतु। तया दोहीं सैन्याआंतु। जयापरी पार्थु। भ्रांति सांडी ॥ ८७ ॥
तें कारण मनीं धरिलें। मग सरोष बोलों आदरिलें। जैसें मातेच्या कोपीं थोकलें। स्नेह आथी ॥ ८८ ॥
कीं औषधाचिया कडुवटपणीं। जैसी अमृताची पुरवणी। ते आहाच न दिसे परी गुणीं। प्रकट होय ॥ ८९ ॥
तैसीं वरिवरि पाहतां उदासें। आंत तरी अतिसुरसें। तियें वाक्यें हृषीकेशें। बोलों आदरिलीं ॥ ९० ॥

अर्थ—तेव्हा भगवान श्रीकृष्ण आपल्या मनात म्हणाले, येथे हे अर्जुनाने काय मांडले आहे समजत नाही. अर्जुनाला काहीच मुळी समजत नाही, काय करावे! ॥ ८४ ॥ जसा मांत्रिक भूतबाधा कशी नाहीशी होईल याचा विचार करतो, त्याप्रमाणे भगवान श्रीकृष्णही आता अर्जुनाला कसा विवेक उत्पन्न होईल व तो पुन: धैर्य धरून युद्धाला कसा उभा राहील याचा विचार करू लागले. ॥ ८५ ॥ किंवा व्याधी असाध्य आहे असे पाहून वैद्य जसा हटकून गुणकारी शेवटली मात्रा म्हणून अमृतासारख्या दिव्य ओषधाची योजना करितो. ॥ ८६ ॥ त्याप्रमाणे श्रीभगवान तेथे दोन्ही सैन्यांमध्ये असताना युद्ध करून स्वजनाना मारणे हे पातक आहे अशी जी अर्जुनाला भ्रांती झाली होती, ती त्याची भ्रांती कशी नाहिशी होईल याचा विचार करू लागले. ॥ ८७ ॥ मलाही धर्माधर्म समजतात, हा जो अर्जुनाला आपल्या शहाणपणाचा अभिमान होता, तो अर्जुनाला आपले म्हणणे न पटण्याचे कारण होय असे मनात आणून, जशी आई वरवर राग दाखवून, पण अंत:करणात पुत्रप्रेम ठेऊन, आपल्या मुलाला उपदेश करिते, त्याप्रमाणे श्रीकृष्ण भगवंतानेही वरवर राग दाखवून बोलण्याला सुरवात केली. ॥ ८८ ॥ किंवा औषध जितके कडू असते तितका त्यात अमृतासारखा गुण असतो; तो प्रथम दिसत नाही पण रोग निवृत्ती झाल्यावर दिसून येतो. ॥ ८९ ॥ त्याप्रमाणे श्रीकृष्णाने वरवर पाहता उदासीना प्रमाणे, पण आत अर्जुनाविषयीचे प्रेम भरले असल्यामुळे, अर्थाचे दृष्टीने गोड, अशी वाक्ये बोलण्यास सुरुवात केली. ॥ ९० ॥

श्रीभगवानुवाच

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे। गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिताः ॥ ११ ॥

अर्थ—भगवान म्हणतात, ज्यांचा शोक करू नये त्यांचा तू शोक करतोस व तूच शहाणपणाचा आव आणून गोष्टी सांगतोस. पण खरे शहाणे आहेत ते मात्र मेलेल्यांचा व आता जीवन्त असलेल्यांचा म्हणजेच पुढे. मरणाऱ्यांचा व दोघांबद्दलही शोक करीत नाहीत. ॥ ११ ॥

मग अर्जुनातें म्हणितलें। आम्हीं आजि हें नवल देखिलें। जें तुवां एथ आदरिलें। माझारींचि ॥ ९१ ॥
तूं जाणता तरी म्हणविसी। परी नेणिवेतें न संडिसी। आणि शिकवूं म्हणों तरी बोलसी। बहुसाल नीति ॥ ९२ ॥
जात्यंधा लागे पिसें। मग तें सैरा धांवे जैसें। तुझें शहाणपण तैसें। दिसतसे ॥ ९३ ॥
तूं आपणपें तरी नेणसी। परी या कौरवांतें शोचूं पाहासी। हा बहु विस्मय आम्हांसी। पुढतपुढती ॥ ९४ ॥
तरी सांग पां मज अर्जुना। तुजपासूनि स्थिति या त्रिभुवना। हे अनादि विश्वरचना। तें लटकें कायी ॥ ९५ ॥
एथ समर्थु एक आथी। तयापासूनि भूतें होती। तरी हें वायांचि काय बोलती। जगामाजीं ॥ ९६ ॥

हो कां सांप्रत ऐसें जाहलें। जे हे जन्ममृत्यु तुवां सृजिले। आणि नाशु पावे नाशिलें। तुझेनि कायी॥ ९७ ॥
तूं भ्रमलेपणें अहंकृती। यांसि घातु न धरिसी चित्तीं। तरी सांगें कायि हे होती। चिरंतन॥ ९८ ॥
कीं तूं एक वधिता। आणि सकळ लोकु हा मरता। ऐसी भ्रांति झणें चित्ता। येवों देसी॥ ९९ ॥
अनादिसिद्ध हें आघवें। होत जात स्वभावें। तरी तुवां कां शोचावें। सांगें मज॥ १००॥
परी मूर्खपणें नेणसी। न चिंतावें तें चिंतिसी। आणि तूंचि नीति सांगसी। आम्हांप्रति॥ १०१॥
देखें विवेकी जे होती। ते दोहींतेंही न शोचिती। जे होय जाय हे भ्रांती। म्हणऊनियां॥ १०२॥

अर्थ—मग अर्जुनाला श्रीकृष्ण म्हणाले, अर्जुना! आज युद्धाचे वेळी मध्येच जे तू शोक करणे आरंभिले आहेस ते एक आम्ही आश्चर्य पाहात आहो. ॥ ९१ ॥ अरे! तू आपल्याला मोठा जाणता समजतोस, पण अज्ञान मात्र तू सोडले नाहीस. बरे, तुला ज्ञान सांगावे तर, तूच धर्माच्या बाता मारतोस॥ ९२॥ जन्मांधाला वेड लागले असता तो जसा सैरावैरा धावतो, त्याप्रमाणे आम्हाला तुझे शहाणपण दिसत आहे. ॥ ९३ ॥ तू कोण हेच तुला नीट कळत नाही आणि या कौरवाबद्दल शोक करतोस, याचेच मला वारंवार आश्चर्य वाटते. ॥ ९४॥ पण अर्जुना, सांग बरे! हे सर्व त्रैलोक्य तुझ्यापासून उत्पन्न झाले आहे काय? ही जगाची उभारणी अनादी आहे हे खोटे मानायचे काय?॥ ९५ ॥ सर्व समर्थ एक परमात्मा आहे व त्याचे पासूनच सर्व ब्रह्मांडातील जीवाची उत्पत्ती होते असे जे सर्व लोक समजतात त्यात काही अर्थ नाही असे म्हणायचे काय?॥ ९६ ॥ असे असेल तर मग तूच हे जगामध्ये जन्ममृत्यू उत्पन्न केलेस आणि तू ज्याचा नाश करशील त्याचाच नाश होईल असे म्हणायचे काय?॥ ९७॥ कौरवांचा वध करणारा मी, असा व्यर्थ अभिमान धारण करून कौरवांना मारू इच्छित नाहीस, पण तू त्याना मारले नाहीस म्हणून ते कधी मरणार नाहीत काय?॥ ९८ ॥ किंवा तू एक मारणारा बाकीचे सर्व कौरव मरणारे असे तू आपले मनात भ्रांतीने समजशील. ॥ ९९ ॥ पण हे जन्ममृत्यु अनादी आहेत. जन्मला तो मरणार व मेलेला जन्मणार हे स्वभावसिद्ध आहे. मग याचे व्यर्थ कां दु:ख मानावे हे मला सांग बरे!॥ १०० ॥ पण मूर्खपणाने तू हे जाणत नाहीस आणि ज्याबद्दल चिंता करू नये त्याबद्दल चिंता करतोस आणि पुन: आम्हांलाच धर्म सांगतोस. ॥ १०१ ॥ अर्जुना! लक्षात ठेव. जे विवेकी पुरुष असतात, ते उत्पत्ती किंवा जन्म आणि नाश किंवा मरण हे दोन्ही भ्रांतीने भासतात म्हणून वस्तुत: उत्पत्तिनाश नाहीच, असे जाणून शोक करीत नाहीत. ॥ १०२ ॥

गूढार्थदीपिका—

मनुष्याला मी कोण हे पूर्णपणे कळून आल्याखेरीज जगाचे खरे स्वरूप काय हे कळत नाही. तोपर्यंत जगत सत्य आहे, आपण जे करू ते-होईल, असे वाटत असते. एक सर्वज्ञ सर्वशक्तिमान परमात्मा जगाचा नियंता असून तो जीवाच्या कर्माप्रमाणे यशापयश, सुख-दु:खे, जन्म-मृत्यू जीवाकडून भोगवितो, हे सर्व सात्विकबुद्धीला पटणारे व संत-महंतांच्या अनुभवाचे विचार त्याच्या बुद्धीला पटत नाहीत. आणि आपल्या रजोगुणी तमोगुणी बुद्धीचे विपरीत विचार प्रगट करतो व त्याचीच सुविचार किंवा योग्यविचार अथवा बौद्धिक विचार म्हणून घमेंड मारतो. हेच भगवंतानी अर्जुनाचे विचार ऐकून सांगितले आहे.

न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपा:। न चैव न भविष्याम: सर्वे वयमत: परम्॥ १२॥

अर्थ—मी, तू व हे सर्व लोक व राजे हे सर्व पूर्वी नव्हते असे नाही. आता पुढे राहणार नाहीत असेही नाही हे सर्व आत्मस्वरूप दृष्टीने तीन्ही काली नित्यच आहेत. ॥ १२ ॥

अर्जुना सांगेन आइक। एथ आम्ही तुम्ही देख। आणि हे भूपति अशेख। आदिकरुनी॥ १०३॥
नित्यता ऐसेचि असोनी। ना तरी निश्चित क्षया जाउनी। हे भ्रांति वेगळी करूनी। दोन्ही नाहीं॥ १०४॥
हें उपजे आणि नाशे। तें मायावशें दिसे। येऱ्हवीं तत्त्वता वस्तु जे असे। ते अविनाशचि॥ १०५॥
जैसें पवनें तोय हालविलें। आणि तरंगाकार जाहलें। तरी कवण कें जन्मलें। म्हणो ये तेथ॥ १०६॥
तेंचि वायूचें स्फुरण ठेलें। आणि उदक सहज सपाट जाहालें। तरी आतां काय निमालें। विचारीं पां॥ १०७॥

अर्थ—अर्जुना! मी सांगतो ते ऐक. येथे आम्ही व तुम्ही, तसेच हे जमलेले सर्व राजे वगैरे. ॥ १०३ ॥ नित्य असेच असू असे नाही किंवा निश्चित क्षय पावू असेही नाही. असणे व जाणे ह्या दोन्ही भ्रांती आहेत. असणे, नसणे हे दोन्ही आपले ठिकाणी नाहीत. ॥ १०४ ॥ उत्पत्ति, नाश हे दोन्ही भ्रांतीने भासतात. वस्तुत: पाहिले असता जी मूळ वस्तू ती अविनाशी म्हणजे उत्पत्तिविनाशरहित आहे. ॥ १०५(ज्याप्रमाणे वाऱ्याने पाणी हालले असता ते पाणी तरंगाकार होते. तेव्हा येथे कोण जन्माला आले म्हणता येईल? ॥ १०६ ॥ आणि वारा वाहणे बंद झाले असता पाणी पुन: पूर्ववत सपाट होऊन जाते, तेव्हा कशाचा नाश म्हणता येईल याचा विचार कर. ॥ १०७ ॥

गूढार्थदीपिका—हें उपजे आणि नाशे। ते मायावशे दिसे।

ज्याप्रमाणे पाणी हीच एक वस्तू आहे व तरंग हा त्या पाणीवस्तूचे स्फुरण आहे, म्हणून तरंग ही पाणीच आहे. पाणी या वस्तूहून तरंग ही वस्तू निराळी नव्हे तरंग उठण्यापूर्वी पाणीच वस्तू आहे. तरंग उठल्यावरही तरंगात पाणी हीच वस्तू असते. तरंग नाहीसा झाल्यानंतर उर्वरित पाणीच वस्तू राहते. म्हणून तिन्हीकाळी असणाऱ्या पाणीवस्तूचे ठिकाणी उत्पत्तिनाश नाही. आणि तरंग ही पाण्याहून निराळी वस्तू सिद्ध होत नसल्यामुळे तरंगाचे ठिकाणी उत्पत्तिनाश मानता येत नाही सारांश, उत्पत्तिनाशाचे ज्ञान भ्रांती ठरते. त्याप्रमाणे देहाचे आत मुक्त असलेली चैतन्यात्मक वस्तू, ती देहादिक उपाधिहून अत्यंत निराळी आहे. म्हणून देहादिकांचे ठिकाणी दिसून येणारे उत्पत्तिनाश त्या आत्मवस्तूचे ठिकाणी मुळीच नाहीत. पण जीव हा आपले देहाहून निराळे असलेले चैतन्यात्मस्वरूप विसरून देहालाच मी म्हणतो व देहादिकांचे उत्पत्तिनाश माझे ठिकाणीच आहेत असे समजतो. वास्तविक चैतन्यात्मा सर्वकाळी असणारा आहे, म्हणून तो उत्पन्न होत नाही व नाशही पावत नाही. आणि तो अद्वैतस्वरूप असल्यामुळे—म्हणजे त्याच्यावाचून दुसरी कोणती खरी किंवा खोटी वस्तूच नसल्यामुळे—देहादी वस्तूची व त्यांच्या उत्पत्तिनाशाची जाणीव ही भ्रांतीच ठरते.

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा। तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति॥ १३ ॥

अर्थ—जीवात्म्याचे ठिकाणी दिसणारा हा देह जसा बाल्य, तारुण्य व वार्धक्य या अवस्थेतून जातो, त्याप्रमाणे जीवात्माही एका देहातून दुसऱ्या देहात जातो, देहाबरोवर, नाश पावत नाही, हे जाणून देह पडल्याचे दु:ख करीत नाहीत. ॥ १३ ॥

आइकें शरीर तरी एक। परी वयसा भेदे अनेक। हें प्रत्यक्षचि देख। प्रमाण तूं॥ १०८ ॥
एथ कौमारत्व दिसे। मग तारुण्यीं तें भ्रंशे। परी देहचि न नाशे। एकेकासवें॥ १०९ ॥
तैसीं चैतन्याचां ठायीं। इयें शरीरांतरें होती जाती पाहीं। ऐसें जाणे तया नाहीं। व्यामोहदु:ख॥ ११० ॥

अर्थ—पहा, अर्जुना! आपले शरीर एकच असते पण वयाच्या भेदाने तेही निरनिराळे वाटते. हे प्रत्यक्षच आपण पाहतो. ॥ १०८ ॥ पहिले बाळपण असते. ते बाळपण तारुण्य दशेत नाहीसे होते. पण या एका एका दशेबरोबर देह काही नाहीसा होत नाही. ॥ १०९ ॥ त्याप्रमाणे चैतन्याचे सत्तेवर हे नानाप्रकारचे देह होतात व जातात, असे ज्याला ज्ञान झाले त्याला असा संसाराचा मोह होत नाही व त्यामुळे त्या मायामोहामुळे होणारे दु:खही होत नाही. ॥ ११० ॥

गूढार्थदीपिका—चैतन्याच्या ठायीं। इये शरीरांतरे होती जाती।

याठिकाणी माऊलीनी शंकराचार्यांप्रमाणे विवर्तवादच मानला आहे. ब्रह्मसत्तेवर नामरूपांचा भास हेच जग होय असा अर्थ. म्हणजे परब्रह्माची अद्वितीय व्यापक सत्ता विसरून परब्रह्मावर भासणाऱ्या नामरूपाला ब्रह्माहून निराळी सत्ता मानली की, परब्रह्मावर नामरूपांचा पसाराच जगद्रूप भासू लागतो. किंवा नामरूपाने व्यक्त किंवा इंद्रियगोचर होणाऱ्या परब्रह्मालाच, परब्रह्म विसरून जीव जग म्हणतो.

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदु:खदा:। आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत॥ १४ ॥

अर्थ—इंद्रियांचे विषयाशी जे संयोग होतात ते शीतोष्णद्वारा सुखदु:खादी देणारे असून, प्राप्त होणारे व नाहीसे होणारे आहेत; म्हणून अर्जुना हे सहन केलेच पाहिजे. ॥ १४ ॥

एथ नेणावया हेंचि कारण। जें इंद्रियां आधीनपण। तिंहीं आकळिजे अंत:करण। म्हणऊनि भ्रमे॥ १११ ॥

इंद्रियें विषय सेविती। तेथ हर्ष शोकु उपजती। ते अंतर आप्लविति। संगें येणें॥ ११२॥
जयां विषयांच्या ठायीं। एकनिष्ठता कहीं नाहीं। तेथ दु:ख आणि कांहीं। सुखही दिसे॥ ११३॥
देखें हे शब्दाची व्याप्ति। निंदा आणि स्तुति। तेथ द्वेषाद्वेष उपजती। श्रवणद्वारें॥ ११४॥
मृदु आणि कठीण। हे स्पर्शाचे दोन्ही गुण। जे वपूचेनि संगें कारण। संतोषखेदां॥ ११५॥
भ्यासुर आणि सुरेख। हें रूपाचें स्वरूप देख। जें उपजवी सुखदु:ख। नेत्रद्वारें॥ ११६॥
सुगंधु आणि दुर्गंधु। हा परिमळाचा भेदु। जो घ्राणसंगें विषादु। तोषु देता॥ ११७॥
तैसाचि द्विविध रसु। उपजवी प्रीतित्रासु। म्हणूनि हा अपभ्रंशु। विषयसंगु॥ ११८॥
देखें इंद्रियांआधीन होईजे। तैं शीतोष्णांतें पाविजे। आणि सुखदु:खीं आकळिजे। आपणपें॥ ११९॥
या विषयांवांचूनि कांहीं। आणीक सर्वथा रम्य नाहीं। ऐसा स्वभावोचि पाहीं। इंद्रियांचा॥ १२०॥
हे विषय तरी कैसे। रोहिणीचें जळ जैसें। कां स्वप्नींचा आभासे। भद्रजाति॥ १२१॥
देखें अनित्य तियापरी। म्हणउनि तूं अव्हेरीं। हा सर्वथा संगु न धरीं। धनुर्धरा॥ १२२॥

अर्थ—हे तत्व न जाणले जाण्याचे कारण हे आहे की, आपले अंत:करण सर्वस्वी इंद्रियांचे स्वाधीन होऊन गेले आहे म्हणून हा भ्रम होतो. ॥ १११ ॥ इंद्रिये आपापले विषय सेवन करतात तेव्हां इंद्रियांना कोठे सुख होते, त कोठे दु:ख होते आणि अंत:करण इंद्रियाधीन असल्यामुळे इंद्रियांच्या संगाने अंत:करणही सुखदु:खाने ग्रासिले जाते. ॥ ११२ ॥ या विषयांचे ठिकाणी एक सुखच मिळेल किंवा दु:खच मिळेल अशी एकनिष्ठ स्थिती नाही. केव्ह सुख होते तर केव्हा दु:ख होते. ॥ ११३ ॥ शब्दविषयाचे दोन भेद. शब्द निंदात्मक राहील किंवा स्तुतिबोधक त राहील. तो शब्द ऐकल्याबरोबर द्वेष किंवा प्रेम उत्पन्न होते. ॥ ११४ ॥ स्पर्शविषयाचे मृदुत्व व कठिणत्व हे दोन गु आहेत. ते शरीराचे द्वारा अंत:करणात संतोष किंवा खेद उत्पन्न करतात. ॥ ११५ ॥ भयंकर आणि सुरेख असा दो प्रकारचा रूपविषय आहे. तो नेत्रेंद्रियाचे द्वारा सुखदु:ख भोगवितो. ॥ ११६ ॥ सुगंध व दुर्गंध असा दोन प्रकारच परिमळ (गंध) आहे. तो घ्राणेंद्रियाचे द्वारा संतोष व विषाद उत्पन्न करतो. ॥ ११७ ॥ त्याचप्रमाणे गोड व कडू अस दोन प्रकारचा रसविषय, प्रीती व कंटाळा उत्पन्न करतो. म्हणून विषयाचा संग आपल्याला आपल्या स्वरूपाचा विस पाडणारा आहे. ॥ ११८ ॥ अर्जुना! पहा, अशा रीतीने जेव्हा आपण इंद्रियांच्या स्वाधीन होतो तेव्हा शीत व उष्ण इत्यादी द्वंद्वांचा अनुभव घेतो आणि त्यामुळे आपण सुखदु:ख भोगतो. ॥ ११९ ॥ या विषयासारखे आपल्याला सुख देणारे या जगात काहीच नाही असे भासविणे हा या इंद्रियांचा स्वभावच आहे. ॥ १२० ॥ पण हे विषय तरी क आहेत पहा, या विषयांना मृगजळापेक्षा अधिक सत्यता नाही. किंवा स्वप्नातला हत्ती जितका सत्य आहे तितकेच हे विषय सत्य आहेत. ॥ १२१ ॥ अशा रीतीने हे विषय क्षणभर टिकणारे आहेत म्हणून त्यांचा त्याग कर व पुन: संग धरू नकोस. ॥। १२२ ॥

गूढार्थदीपिका—

विषय म्हणजे जग, हे अनित्य आहे म्हणजे काल्पनिक आहे असा अर्थ. म्हणून ब्रह्मज्ञान होऊन जग मिथ्य आहे, हे ज्ञान दृढ होईपर्यंत प्रारब्धानुसार होणाऱ्या विषयसंगापासून होणारे सुखदु:ख सहन केले पाहिजे, यालाच तितिक्षा म्हणतात.

यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ। समदु:खसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते॥ १५॥

अर्थ—हे नरश्रेष्ठा अर्जुना! हा विषयाचा संयोग ज्याच्या चित्ताला दु:ख देत नसेल व जो पुरुष सात्विक धैर्या सुखदु:ख सारखेच मानून राहतो, तो अविनाशी ब्रह्माला प्राप्त होतो. ॥ १५ ॥

हे विषय जयातें नाकळिती। तया सुखदु:खें दोनी न पवती। आणि गर्भवास संगती। नाहीं तया॥ १२३॥
तो नित्यरूपु पार्था। वोळखावा सर्वथा। जो या इंद्रियार्थां। नागवेचि॥ १२४॥

अर्थ—ज्याला विषयसुखात गोडी वाटत नाही त्याला विषयसंगापासून सुखदु:ख होत नाहीत आणि त्याच

जन्ममरणपरंपराही संपते. ॥ १२३ ॥ जो पुरुष या विषयाला भाळत नाही, तो नित्य अविनाशी स्वरूप होतो म्हणजे ब्रह्मस्वरूप होतो असे समज. ॥ १२४ ॥

गूढार्थदीपिका—

या विषयसुखाच्या वासनेनेच मनुष्याला जन्म घ्यावा लागतो व ब्रह्मज्ञान स्थिर होत नाही. ज्याचे चित्त निर्वासन झाले, त्यालाच मुक्त म्हणतात. ब्रह्मज्ञान होणे सोपे आहे, पण विषयवासना नाहीशी होणेच कठिण आहे, म्हणून मुक्ती दुर्लभ झाली आहे.

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः। उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १६ ॥

अर्थ—असत् म्हणजे खोट्या वस्तूचे मुळीच अस्तित्व नसते व सत्य वस्तूचे अस्तित्व नाहीसे होत नाही. असा खऱ्या खोट्या या दोन वस्तूविषयी ज्ञानी पुरुषांनी निष्कर्ष काढला आहे. ॥ १६ ॥

आतां अर्जुना आणिक कांहीं एक। सांगेन मी आइक। जें विचारें पर लोक। वोळखिती ॥ १२५ ॥
या उपाधिमाजीं गुप्त। चैतन्य असे सर्वगत। तें तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती ॥ १२६ ॥
सलिलीं पय जैसें। एक होऊनि मीनलें असे। परी निवडूनि राजहंसें। वेगळें कीजे ॥ १२७ ॥
कीं अग्निमुखें किडाळ। तोडोनियां चोखाळ। निवडिती केवळ। बुद्धिमंत ॥ १२८ ॥
ना तरी जाणिवेचिया आयणी। करितां दधिकडसणी। मग नवनीत निर्वाणीं। दिसे जैसें ॥ १२९ ॥
कीं भूस बीज एकवट। उपणितां राहे घनवट। तेथ उडे तें फलकट। जाणों आलें ॥ १३० ॥
तैसें विचारितां निरसलें। तें प्रपंचु सहजें सांडवलें। मग तत्त्वता तत्त्व उरलें। ज्ञानियांसी ॥ १३१ ॥
म्हणोनि अनित्याच्या ठायीं। तयां आस्तिक्यबुद्धि नाहीं। निष्कर्षु दोहींही। देखिला असे ॥ १३२ ॥

अर्थ—अर्जुना आणखी एक गोष्ट सांगतो ती लक्षात ठेव. ही गोष्ट विचारी लोक जे आहेत त्यांनाच माहित असते. ॥ १२५ ॥ या नामरूपात्मक जगामध्ये एक चैतन्यवस्तू व्यापून आहे. पण ती गुप्त आहे. म्हणजे नामरूपाने झाकली गेल्यामुळे दिसत नाही. तत्त्वज्ञ पुरुष जे आहेत ते अखंड त्याकडेच दृष्टी देतात. ॥ १२६ ॥ पाण्यात दूध मिसळले असता जसे ते पाण्याशी मिळून राहते. पण हंसाला मात्र ते पाण्यातील दूध, पाणी टाकून देऊन निराळे वेचून घेता येते. ॥ १२७ ॥ किंवा बुद्धिमान लोक, अग्नीत तापवून तापवून सोन्यातील हीणकस नाहीसे करून शुद्ध सोने अलग करून घेतात. ॥ १२८ ॥ किंवा बुद्धीच्या साह्याने, दह्याचे घुसळण केले असता ज्याप्रमाणे लोणी बाहेर पडते. ॥ १२९ ॥ अथवा कोंडा व धान्य एकवटलेले असते पण तेच पाखडले असता, खाली साचते ते धान्य व उडून गेले तो भुसा, असे आपल्याला कळून येते. ॥ १३० ॥ त्याप्रमाणे विचार केला असता, प्रपंच म्हणून कोण्या वस्तूचे अस्तित्व सिद्ध होत नाही व त्याचे ज्ञानच होत नाही. मग प्रपंचाचा निरास होऊन शेष चैतन्यवस्तू हीच शिल्लक राहते व ज्ञानी पुरुष तीच घेतात. ॥ १३१ ॥ म्हणून अनित्य भासणारी वस्तू अस्तित्वात आहे असे त्यांना कधीच वाटत नाही, असा ज्ञानी पुरुषांनी नित्य आणि अनित्य वस्तूचा निर्णय केला आहे. ॥ १३२ ॥

गूढार्थदीपिका—उपाधि माजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत।

या ठिकाणी माऊलीने नामरूपाला उपाधी म्हटले आहे. मूळच्या वस्तूला झाकून भलतीच वस्तू भासविणाऱ्या पदार्थाला उपाधी म्हणतात. नामरूपाला नामरूपाचे खाली गुप्त असलेल्या चैतन्याहून स्वतंत्र निराळे अस्तित्व दिले असता, नामरूपाने चैतन्यवस्तू झाकली जाऊन, नामरूप हीच प्रपंचरूप स्वतंत्र निराळी वस्तू मानली जाते व तेव्हा नामरूपे चैतन्याच्या उपाधी होतात. सर्व अज्ञानी पुरुष नामरूपाला स्वतंत्र अस्तित्व व वस्तुत्व मानतात. म्हणून अशा अज्ञानी लोकांना ब्रह्माचा बोध करून देण्याकरिता नामरूपांना दूर करून चैतन्य ओळखण्यास वेदान्तात प्रथम सांगितले जाते, तसेच भगवंतांनी अर्जुनाला येथे सांगितले आहे.

नित्य वस्तू म्हणजे जिचा कधी नाश होत नाही किंवा नाश मानता येत नाही, ती होय. ही नित्य वस्तू एक व अमर्यादच राहू शकते. दोन नित्य वस्तू राहणे अशक्य आहे. दोन नित्य वस्तू मानायच्या तर त्यांचे परस्पर स्वतंत्र

निरनिराळे अस्तित्व मानले पाहिजे आणि असे अस्तित्व मानण्यात त्या दोन्ही वस्तूचे अस्तित्व मर्यादित होते व त्या अंतवान किंवा नाशिवंत ठरतात. नाशिवंत ठरल्यावर वस्तूला नित्य कसे, म्हणावयाचे? म्हणून नित्यवस्तू एक व अमर्यादच असली पाहिजे. विचाराने चैतन्य हीच एक वस्तू नित्य ठरते व अमर्यादही ठरते.

अशा नित्य व अमर्याद चैतन्यवस्तूची मर्यादा संपतच नसल्यामुळे तिच्याबरोबर भासणारी अनित्यवस्तू स्वतंत्र अस्तित्वाची मानता येत नाही. त्या अनित्यवस्तूचा भास नित्यवस्तूच्या अस्तित्वावरच स्वीकारावा लागतो. म्हणजे त्याचा अर्थ असा होतो की नित्यवस्तूचीच आपण अनित्यवस्तुरूपाने कल्पना करतो. एरवी अनित्यवस्तू म्हणून काहीही वस्तू मुळीच अस्तित्वात नाही. म्हणूनच वेदान्तविचाराने अनित्य ठरणारा हा प्रपंच मुळीच अस्तित्वात नसून, आहे अशी त्याविषयी आपण कल्पना करतो व कल्पनेनुसार तो भासतो. चैतन्यरूप आत्म्याचा विचार करीत नाही तोपर्यंत अस्तित्वाविषयीची आपली कल्पना नाहीशी होत नाही, म्हणून तोपर्यंत प्रपंचाचा भासही नाहीसा होत नाही. अनित्यवस्तू म्हणजे कल्पित वस्तू. कल्पित वस्तूच अनित्य राहू शकते. किंवा जो जो पदार्थ अनित्य आहे, तो तो पदार्थ कल्पित आहे असे समीकरण मांडता येते. कल्पित व नित्य अशा दोनच सत्ता राहू शकतात. चैतन्यरूप आत्म्याची सत्ता नित्य असल्यामुळे तद्व्यतिरिक्त जगाची सत्ता अनित्य किंवा कल्पित ठरते. म्हणजे अज्ञान्याला जग सत्य आहे असे वाटत असले तरी, जग मुळीच नाही असा सिद्धान्त निघतो.

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम्। विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति॥ १७॥

अर्थ—चैतन्यरूप आत्मतत्व सर्व जगात भरले असून ते सर्वांचे अविनाशी आत्मस्वरूप असल्यामुळे त्याचा नाश कोणी करू शकत नाही. ॥ १७ ॥

देखें सारासार विचारितां। भ्रांति ते पाहीं असारता। तरी सार तें स्वभावता। नित्य जाणें॥ १३३॥
हा लोकत्रयाकारु। तो जयाचा विस्तारु। तेथ नाम वर्ण आकारु। चिन्ह नाहीं॥ १३४॥
जो सर्वदा सर्वगतु। जन्मक्षयातीतु। तया केलियाहि घातु। कदा नोहे॥ १३५॥

अर्थ—अर्जुना पहा, सार काय व असार काय याचा विचार केला असता, अविचाराने किंवा कल्पनेमुळे जे भासते ते असार असते व जे कल्पनेपूर्वीच असते म्हणून नित्य असते ते सार म्हटले जाते. ॥ १३३ ॥ हे सर्व त्रैलोक्य त्या नित्य वस्तूचा खरोखर विस्तार होय. त्या वस्तूचे ठिकाणी नाम, वर्ण, आकार यापैकी काही एक त्याला जाणता येईल असे चिन्ह नाही. ॥ १३४ ॥ जो आत्मा सर्वदा राहणारा आहे, सर्व व्यापक आहे, ज्याला उत्पत्तिनाश नाहीत, म्हणून त्याचा नाश कधीच होऊ शकत नाही. ॥ १३५ ॥

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः। अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत॥ १८॥
य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम्। उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते॥ १९॥

अर्थ—अविनाशी अशा जीवात्म्याचे हे देह नाशिवंत आहेत व तो (आत्मा) प्रमाणाने न कळणारा व अविनाशी आहे, म्हणून तू युद्ध कर. ॥ १८ ॥ जो पुरुष या चैतन्यरूप आत्म्याला मारणारा किंवा मरणारा समजतो ते दोघेही त्याच्या खऱ्या स्वरूपाला जाणत नाहीत कारण तो मारत नाही किंवा मरतही नाही. ॥ १९ ॥

आणि शरीरजात आघवें। हें नाशवंत स्वभावें। म्हणोनि तुवां झुंजावें। पंडुकुमरा॥ १३६॥
तूं धरूनि देहाभिमानातें। दिठी सूनि या शरीरातें। मी मारिता हे मरते। म्हणत आहासी॥ १३७॥
तरी अर्जुना तूं हें नेणसी। जरी तत्त्वता विचारिसी। तरी वधिता तूं नव्हेसी। हे वध्य नव्हती॥ १३८॥

अर्थ—आणि सर्व प्रकारची जीवशरीरे स्वभावतः नाशिवंत आहेत. म्हणूनच अर्जुना! युद्ध करणे हा स्वधर्म सोडू नको, युद्ध कर. ॥ १३६ ॥ शरीराचा तू अभिमान धरून किंवा मी म्हणजे शरीर असे समजून मी मारणारा व हे मरणारे असे तू म्हणत आहेस. ॥ १३७ ॥ पण अर्जुना! मी म्हणजे कोण याचा तात्त्विक विचार करून पाहता तू मारणारा ठरत नाहीस व ते मरणारे ठरत नाहीत हे मात्र तू जाणत नाहीस. ॥ १३८ ॥

गूढार्थदीपिका—हे नाशवंत स्वभावे

मरणे किंवा मारणे ही क्रिया आहे. एक मारणारा व त्याचेहून दुसरा मरणारा असे दोन निरनिराळे पदार्थ जेथे असतात, तेथेच ही मरण्याची—मारण्याची किंवा कोणतीही क्रिया संभवते. आत्मस्वरूपाचा विचार केला असता तो नित्य व अमर्याद असल्यामुळे त्याच्या ठिकाणी त्यावाचून दुसरा पदार्थ संभवत नाही. म्हणूनच मागे नामरूपात्मक जगत् असत् म्हणजे मुळीच अस्तित्वात नाही असे भगवंतानी सांगून एक चैतन्यरूप आत्माच सत्य असून, तद्व्यतिरिक्त सर्व मिथ्या आहे असे सांगितले आहे. अशा अद्वैत अमर्याद आत्मस्वरूपाच्या ठिकाणी दुसरा कोणीच नसल्यामुळे कोणतीच क्रिया संभवत नाही. चैतन्यरूप आत्मा सर्व कर्म व कर्तृत्वाहून निराळा आहे असा भाव.

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे॥ २०॥
वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम्। कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम्॥ २१॥
वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही॥ २२॥

अर्थ—चैतन्यरूप आत्मा उत्पन्न होत नाही व कधीही मरत नाही; कारण तो अस्तित्वात येऊन पुनः नाहीसा होतो व पुनः जन्मतो असे नाही. जो जन्मरहित, अविनाशी, शाश्वत, सनातन असल्यामुळे शरीराचा नाश झाला म्हणून त्याचा नाश होत नाही. ॥ २०॥ जो पुरुष चैतन्यरूप आत्म्याला अविनाशी, नित्य, जन्मरहित, कधीही न परिणाम न पावणारा असे जाणतो तो पुरुष (आत्मस्वरूपच होत असल्यामुळे) कोणास कसा मारील? ॥ २१॥ देहाचा अहंकार धरणारा जीवात्मा, ज्याप्रमाणे जुनी वस्त्रे टाकून देहावर नवी वस्त्रे धारण करतो, त्याप्रमाणे तोच जीवात्मा जुनी शरीरे टाकून नवीन शरीरे धारण करतो. ॥ २२॥

जैसें स्वप्नामाजीं देखिजे। तें स्वप्नींचि साच आपजे। मग चेऊनियां पाहिजे। तवं कांहीं नाहीं॥ १३९॥
तैसी हे जाण माया। तूं भ्रमत आहासी वायां। शस्त्रें हाणितलिया छाया। जैसी आंगीं न रुपे॥ १४०॥
कां पूर्ण कुंभ उलंडला। तेथ बिंबाकारु दिसे भ्रंशला। परी भानु नाहीं नासला। तयासवें॥ १४१॥
ना तरी मठीं आकाश जैसें। मठाकृती अवतरलें असे। तो भंगलिया आपैसें। स्वरूपचि॥ १४२॥
तैसें शरीराचां लोपीं। सर्वथा नाशु नाहीं स्वरूपीं। म्हणऊनि तूं हें नारोपीं। भ्रांति बापा॥ १४३॥
जैसें जीर्ण वस्त्र सांडिजे। मग नूतन वेढिजे। तैसें देहांतरातें स्वीकारिजे। चैतन्यनाथें॥ १४४॥

अर्थ—ज्याप्रमाणे स्वप्नात दिसणारा देखावा, स्वप्न आहे तोपर्यंत खरा वाटतो मग जाग आल्यावर ते काही एक खरे वाटत नाही. ॥ १३९॥ त्याप्रमाणे जागृतीतला हा जगत्पसारा तसाच, अर्जुना! खोटा आहे असे समज. तू व्यर्थच भ्रमाने त्याला खरे समजतोस. ज्याप्रमाणे शस्त्राने छायेवर वार केल्यास त्या छायेस काही तो प्रहार लागत नाही किंवा तो शस्त्राचा घाव आपल्या अंगाला लागत नाही. ॥ १४०॥ ज्याप्रमाणे पाण्याने भरलेला घडा पालथा झाला असता त्यात पडलेले सूर्याचे प्रतिबिंब नाहीसे होते तरी, प्रतिबिंबाबरोबर बिंबरूप सूर्य नाहीसा होत नाही. ॥ १४१॥ किंवा घड्यात भरून असलेली पोकळी घड्याच्या आकाराची दिसते, पण घडा फुटला तरी ती पोकळी व बाहेरचे आकाश एकच राहते. ॥ १४२॥ त्याप्रमाणे शरीर नाहीसे झाले तरी देहातील चैतन्य नाहीसे होत नाही. म्हणून अर्जुना! उत्पत्तिनाशाची किंवा जन्म-मृत्यूची खोटी भ्रान्त कल्पना चैतन्याचे ठिकाणी मानू नकोस. ॥ १४३॥ ज्याप्रमाणे फाटकी जीर्ण झालेली वस्त्रे टाकून, आपण नवीन वस्त्रे धारण करतो, त्याप्रमाणे जीव हा एक देह टाकून दुसरा देह धारण करीत असतो. ॥ १४४॥

गूढार्थदीपिका—शरीराच्या लोपीं। सर्वथा नाश नाही स्वरूपी

आत्मा चेतनस्वरूप असून, तो अविनाशी आहे व नित्यआत्म्याहून जेवढे काही निराळे विनाशी भासते ते सर्व जीवात्म्याच्या कल्पनेने भासते. पण आपण नित्य आत्म्याचे व अनित्य अशा देहादिकांचे ऐक्य करतो; म्हणून अनित्याचे नाशाबरोबर आपलाच नाश होतो असे समजून, त्या नाशाबद्दल शोक करतो. या ठिकाणी कौरवादिक

बांधवाच्या युद्धात होणाऱ्या नाशाबद्दल जो शोक झाला होता, तो नाहीसा करण्याकरिता भगवान अर्जुनाला आत्मानात्मविवेकच सांगत आहेत. या आत्मानात्मविवेकाने चेतन नित्य असा आत्मा व जडनाशिवंत देहादी पदार्थाचे अविचाराने मानलेले ऐक्य नाहीसे होऊन, अनात्म अशा जड देहादिकांच्या नाशाच्या भीतीने होणारे दुःख नाहीसे होते. या आत्मानात्मविवेक ज्ञानावाचून शोकदुःख नाहीसे करणारे दुसरे साधन नाही. आत्मा व अनात्मा यांना एक समजणे हेच सर्व दुःखाचे कारण असून त्यांचे भिन्नत्व जाणणे हे सर्व दुःखाचे परिमार्जन करणारे आहे. या आत्मानात्मविवेकाला व्यतिरेक विचारही म्हणतात.

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः । न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च । नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ २४ ॥
अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते । तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २५ ॥

अर्थ—कोणतेही शस्त्र चैतन्यरूप आत्म्याला तोडू शकत नाही, अग्नी त्याला जाळू शकत नाही, पाणी त्याला भिजवू शकत नाही व वायू त्याला सुकवू शकत नाही. ॥ २३ ॥ असा हा आत्मा तुटला जात नाही, जाळला जात नाही, भिजला जात नाही व सुकला जात नाही. तो नित्य, सर्वव्यापक, स्थाणुप्रमाणे अचल असून सनातन आहे. ॥ २४ ॥ हा अव्यक्त म्हणजे इंद्रियातीत, अचिन्त्य म्हणजे मनाने आकलन न होणारा व परिणाम पावून विकाररूप न होणारा किंवा न बदलणारा आहे, असे त्याविषयी म्हटले आहे म्हणून अशाप्रकारचा तो आहे असे जाणून अर्जुना! तू शोक करू नकोस. ॥ २५ ॥

हा अनादि नित्यसिद्धु। निरुपाधि विशुद्धु। म्हणऊनि शस्त्रादिकीं छेदु। न घडे यया॥ १४५ ॥
हा प्रळयोदकें नाप्लवे। अग्निदाहो न संभवे। एथ महाशोषु न प्रभवे। मारुताचा॥ १४६ ॥
अर्जुना हा नित्यु। अचळु हा शाश्वतु। सर्वत्र सदोदितु। परिपूर्णु हा॥ १४७ ॥
हा तर्काचिये दिठी। गोचर नोहे किरीटी। ध्यान याचिये भेटी। उत्कंठा वाहे॥ १४८ ॥
हा सदा दुर्लभु मना। आपु नोहे साधना। निःसीमु हा अर्जुना। पुरुषोत्तमु॥ १४९ ॥
हा गुणत्रयारहितु। व्यक्तीसी अतीतु। अनादि अविकृतु। सर्वरूप॥ १५० ॥
अर्जुना ऐसा जाणावा। हा सकळात्मकु देखावा। मग सहजें शोकु आघवा। हरेल तुझा॥ १५१ ॥

अर्थ—अर्जुना! ज्याच्याविषयी तू शोक करतोस तो जीवात्मा अनादी म्हणजे उत्पत्तिरहित आहे. नित्य राहणारा आहे. त्याच्याशिवाय दुसरी वस्तूच नाही, म्हणून तो उपाधिरहितही आहे. त्रिगुणरहित शुद्ध आहे म्हणून शस्त्रादिकांनी तो तुटला जात नाही. ॥ १४५ ॥ या जीवात्म्याला प्रलयातले सर्व एक झालेले पाणी देखील बुडवू शकत नाही. अग्नीची उष्णता त्याला जाळू शकत नाही व वायुही त्याला शोषू शकत नाही. ॥ १४६ ॥ असा हा अर्जुना! नित्य अखंड एक चेतनरूपच असून कधीही परिणाम न पावणारा आहे. तो सर्वत्र अणुरेणूपासून भरलेला असून परिपूर्ण आहे, म्हणजे अपूर्ण कधी होतच नाही. ॥ १४७ ॥ अर्जुना! तर्काने याचे ग्रहण होत नाही किंवा कितीही तर्क केले तरी याचे स्वरूपाचे ज्ञान होणे शक्य नाही. याच्या प्राप्तीकरिता ध्यान करावे तर ध्यानाला लागलेली याच्या प्राप्तीची उत्कंठा कधी थांबतच नाही. ॥ १४८ ॥ हा आत्मा मनाला तर अत्यंत दुर्लभच आहे. तसाच कोणत्या साधनानेही त्याची प्राप्ती होत नाही; असा हा, अर्जुना! अमर्याद पुरुषोत्तम आहे. ॥ १४९ ॥ हा त्रिगुणरहित आहे व अनादी म्हणजे उत्पत्तिरहित व कधी बदलणारा नव्हे किंवा कार्यदशेला न येणारा अथवा ज्याच्यापासून काही कार्य उत्पन्न होत नाही. त्याचप्रमाणे कोण्या एका व्यक्तीतच आहे असे नसून सर्व तोच झाला आहे. ॥ १५० ॥ अर्जुना! असे हे आत्म्याचे स्वरूप ओळखिले पाहिजे. सर्व नामरूपाने तोच नटला आहे, असे जाणले पाहिजे; तरच आत्म्याचे खरे स्वरूप कळले असे म्हणता येते. हे आत्म्याचे स्वरूप कळून आल्यानंतर तुझ्या ठिकाणी शोकच राहणार नाही. ॥ १५१ ॥

गूढार्थदीपिका—

आत्म्याचे स्वरूप विसरणे व भलत्याच वस्तूला आत्मा मानणे यालाच वेदान्तात अनुक्रमे आवरण व

विक्षेप म्हणतात. सर्व जीव असे आपले खरे आत्मस्वरूप विसरले आहेत व भलत्याच देहादिक पदार्थाला मी म्हणून म्हणतात. मूळची वस्तू विसरल्यावाचून दुसऱ्या निराळ्या वस्तूचा भास व तीच मी आहे असे समजणे शक्य नाही. येथपर्यंत भगवंतांनी अर्जुनाला ज्ञान्याच्या तात्त्विक दृष्टीनुसार बोध करून, आत्मा सर्व कर्मकर्तृत्वरहित आहे हेच पुन: सांगितले.

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम्। तथापि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि॥ २६॥

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च। तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि॥ २७॥

अर्थ—किंवा हा आत्मा नित्य जन्मतो व नित्य मरतो असे समजत असशील तरी हे, महाबाहो! तुला शोक करण्याचे कारण नाही.॥ २६॥ कारण जन्मलेला प्राणी मरणारच व मेलेला प्राणी पुन: उत्पन्न होणारच. असे हे जन्ममृत्यु कोणालाही चुकत नसल्यामुळे त्याबद्दल शोक करणे तुला उचित नाही.॥ २७॥

अथवा ऐसा नेणसी। तूं अंतवंतचि हें मानिसी। तऱ्ही शोचूं न पवसी। पंडुकुमरा॥ १५२॥
जे आदि स्थिति अंतु। हा निरंतर असे नित्यु। जैसा प्रवाहो अनुस्यूतु। गंगाजळाचा॥ १५३॥
तें आदि नाहीं खंडलें। समुद्रीं तरी असे मिनलें। आणि जातचि मध्यें उरलें। दिसे जैसें॥ १५४॥
इयें तिन्ही तयापरी। सरसींच सदा अवधारीं। भूतांसि कवणीं अवसरीं। ठाकती ना॥ १५५॥
म्हणोनि हें आघवें। एथ तुज नलगे शोचावें। जे स्थितीचि हें स्वभावें। अनादि ऐसी॥ १५६॥
ना तरी हें अर्जुना। नयेचि तुझिया मना। जे देखोनि लोकु अधीना। जन्मक्षया॥ १५७॥
तरी येथ कांहीं। तुज शोकासि कारण नाहीं। जे जन्ममृत्यु हे पाहीं। अपरिहर॥ १५८॥
उपजे तें नाशे। नाशलें पुनरपि दिसे। हें घटिकायंत्र तैसें। परिभ्रमे गा॥ १५९॥
ना तरी उदो अस्तु आपैसें। अखंडित होत जात जैसें। हें जन्ममरण तैसें। अनिवार जगीं॥ १६०॥
महाप्रळयअवसरें। हें त्रैलोक्यही संहरे। म्हणोनि हा न परिहरे। आदि अंतु॥ १६१॥
तूं जरी हें ऐसें मानसी। तरी खेदु कां करिसी। काय जाणतचि नेणसी। धनुर्धरा॥ १६२॥
एथ आणीकही एक पार्था। तुज बहुतीं परी पाहातां। दु:ख करावया सर्वथा। विषो नाहीं॥ १६३॥

अर्थ—अथवा हा आत्मानात्मविवेक तुला कळत नसेल व तू सर्व नाशिवंत मानीत असशील तरी अर्जुना! तुला शोक करण्याला कारण नाही.॥ १५२॥ कारण उत्पत्ती, स्थिती व नाश हे तिन्ही धर्म वाहत्या गंगोदकाप्रमाणे सर्व पदार्थाचे ठिकाणी सारखे नित्य दिसूनच येतात.॥ १५३॥ गंगोदकाकडे पाहिले तर उगमाचे ठिकाणी ते आहेच व शेवटी समुद्रात मिळते आणि वाहत असताना मध्ये ओघात दिसतेच.॥ १५४॥ त्याप्रमाणे आदी, मध्य व अंत या तिघांचा प्रवाह प्रत्येक भूताचे ठिकाणी अव्याहत चालू आहे.॥ १५५॥ असे जर प्रत्येक पदार्थात आदी, मध्य, अंत दिसतात, तर प्रत्येक पदार्थाची ही अनादी स्वाभाविक स्थितीच असल्यामुळे त्याबद्दल शोक करण्याचे तुला कारणच नाही.॥ १५६॥ आणि अर्जुना! सर्व लोक उत्पत्ती व मरण यांचे अधीन आहेत असे पाहून जर माझे हे म्हणणे पटत नसेल.॥ १५७॥ तरी तुला शोक करण्याचे कारण नाही; कारण प्रत्येक भूताचे मागे लागलेल्या जन्ममृत्यूपासून त्याची सुटका होणे शक्य नाही, मग त्यांच्या उत्पत्तिनाशाबद्दल शोक कसा करता येईल?॥ १५८॥ उत्पन्न झालेली वस्तू नाश पावणारच आणि नाश पावली तरी ती पुन: उत्पन्न होणारच, असे हे राहाटगाडगे सारखे फिरत असते.॥ १५९॥ किंवा सूर्याचे उगवणे व मावळणे जसे सारखे चालूच असते, त्याप्रमाणे जन्ममृत्यू हेही जगात सारखे होत असतात. ते जगातून नाहीसे होणे शक्य नाही किंवा कोणाला टाळता येणे शक्य नाही.॥ १६०॥ जेव्हा महाप्रलय होतो तेव्हा सर्व त्रैलोक्याचा संहार होतो, म्हणून हे उत्पत्तिनाश कोणालाच सुटत नाहीत.॥ १६१॥ तुला हे जर माहित आहे तर शोक कां करतोस? अर्जुना! जाणून मूर्खाप्रमाणे शोक करतोस की काय?॥ १६२॥ आणखी पुष्कळ प्रकाराने येथे शोक करण्याला कारण नाही हे अर्जुना! मी सांगतो पहा.॥ १६३॥

गूढार्थदीपिका—दु:ख करावया सर्वथा। विषो नाही.

आता येथून अज्ञान्याच्या व्यावहारिक दृष्टीने भगवंतांनी अर्जुनास बोध करण्यास सुरुवात केली आहे. भगवान म्हणतात, अर्जुना! आत्मानात्मविवेकरूप तात्विक दृष्टी सोडली व व्यावहारिक दृष्टीने विचार केला तरी कोणत्याही वस्तूच्या नाशाविषयी दु:ख करण्याचे कारण दिसत नाही. एखाद्या गृहस्थाने आपल्यापाशी अनामत रक्कम ठेविली, ती तो वाटेल तेव्हा मागणारच. तो रक्कम मागावयास आला असता आपण काय म्हणून दु:ख करावे? येथे दु:ख करण्यात रक्कम दडपण्याची इच्छा दिसून पडते. पण अनामत रकमेचा आपल्यापासून परत जाण्याचा स्वभावच असतो. वस्तूच्या स्वभावाविरुद्ध इच्छा धरून काय उपयोग? त्याप्रमाणे प्रत्येक वस्तू उत्पन्न होते व नाश पावते. हा तिचा स्वभाव आहे. येथे त्या वस्तूच्या स्वभावाविरुद्ध ही उत्पन्न होऊ नये व नाश पावू नये अशी इच्छा धरून त्या वस्तूच्या होणाऱ्या नाशाबद्दल दु:ख करू लागलो तर ते शोभेल काय? ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणी तात्विक आत्मानात्मविवेक बाणतो, म्हणून ते आत्मानात्मविवेकाच्या बळावर जगातल्या कोणत्याही घडामोडीविषयी दु:ख करीत नाहीत आणि आत्मज्ञान नसूनही व्यावहारिक धीर पुरुष देखील, वर भगवंतांनी सांगितलेल्या उपदेशानुसार विचार करतात व कोणताही दु:खद प्रसंग ओढवला तरी मोठ्या धैर्याने त्या प्रसंगाला तोंड देतात. दु:ख करीत बसत नाहीत असा अर्थ.

ज्ञानी स्थितप्रज्ञ असतो व ज्ञानरहित व्यावहारिक धीर पुरुष स्थितप्रज्ञासारखा अचल चित्तवृत्तीचा दिसला तरी त्याला स्थितप्रज्ञ म्हणता येत नाही. कारण ज्ञानी स्थितप्रज्ञाची चित्तवृत्ती अविचल नित्य अशा परमेश्वराच्या ठिकाणी किंवा आत्म्याच्या ठिकाणी स्थित असते, पर व्यावहारिक धीर पुरुषाची चित्तवृत्ती नाशीवंत जगाचे ठिकाणी स्थित असते म्हणून ज्ञानी स्थितप्रज्ञाला मुक्ती मिळते व व्यावहारिक स्थिरचित्त पुरुषाला संसारच मिळतो. म्हणून केवळ धैर्यावरून ज्ञानी पुरुषाची ओळख होऊ शकत नाही.

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत। अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना॥ २८॥

अर्थ—अर्जुना! सर्व भूतसृष्टी प्रथम अव्यक्त म्हणजे लीनदशेत असते, नंतर मध्ये ती व्यक्त होते, शेवटी पुन: अव्यक्त म्हणजे लीन होते, असा शिष्टस्वभाव असल्यामुळे येथे शोक करण्याचे कारण काय?॥ २८॥

जें समस्तें इयें भूतें। जन्माआदि अमूर्तें। मग पातलीं व्यक्तीतें। जन्मलेया॥ १६४॥
तियें क्षयासि जेथ जाती। तेथ निभ्रांत आनें नव्हती। देखें पूर्व स्थितीच येती। आपुलिये॥ १६५॥
येर मध्यें जें प्रतिभासे। तें निद्रिता स्वप्न जैसें। तैसा आकारु हा मायावशें। सत्स्वरूपीं॥ १६६॥
नातरी पवनें स्पर्शिलें नीर। पढियासे तरंगाकार। कां परापेक्षा अळंकार-। व्यक्ती कनकीं॥ १६७॥
तैसें सकळ हें मूर्त। जाण पां मायाकारित। जैसें आकाशीं बिंबत। अभ्रपटळ॥ १६८॥
तैसें आदीचि जें नाहीं। तयालागीं तूं रुदसी कायी। तूं अवीट तें पाहीं। चैतन्य एक॥ १६९॥
जयाची आर्तीचि भोगित। विषयीं त्यजिले संत। जयालागीं विरक्त। वनवासिये॥ १७०॥
दिठी सूनि जयातें। ब्रह्मचर्यादि व्रतें। मुनीश्वर तपातें। आचरताती॥ १७१॥

अर्थ—अर्जुना! ही जी सर्व प्राणिसृष्टी दिसते ती उत्पत्तीपूर्वी आकाररहित होती आणि मग उत्पत्ती झाली तेव्हा आकाराला आली.॥ १६४॥ पुढे या सृष्टीतील प्राण्यांचा जेव्हा नाश होईल तेव्हा त्यांची दुसरी कोणती स्थिती होत नाही. ते आपल्या पूर्व निराकार स्थितीलाच येतात हे निश्चित समज.॥ १६५॥ बाकी उत्पत्ती व नाश यांच्यामध्ये जो वस्तूचा मर्यादित भास होतो तो निजलेल्या माणसाला जसे भ्रमाने स्वप्न दिसते, त्याप्रमाणे सद्रूप आत्मस्वरूपाचे ठिकाणी भ्रमानेच प्राणिमात्रांचे आकार भासतात.॥ १६६॥ नाही तरी वाऱ्याचा पाण्याला स्पर्श झाल्याबरोबर ते पाणी तरंगाकार दिसायला लागते. किंवा सोन्याहून निराळा जो पुरुष त्यालाच सोने अलंकाररूप व्यक्तित्वाला आले असे दिसते.॥ १६७॥ त्याप्रमाणे ही सर्व साकार सृष्टी, आकाशात अभ्रे दिसावी, त्या प्रमाणे मायाभ्रमाने भासते.॥ १६८॥ अर्जुना! जे मुळी अस्तित्वातच नाही त्यासाठी तू शोक करीत आहेस. वास्तविक एक अत्यंत आत्मस्वरुप चैतन्यच आहे, दुसरे काही नाही.॥ १६९॥ ज्या आत्मस्वरुपाच्या प्राप्तीची उत्कंठा व आशा वाहत, संत विषयसुखाचा त्याग

करतात आणि विरक्त पुरुष अत्यंत वैराग्य धारण करून वनात राहतात. ॥ १७० ॥ तसेच मोठमोठे मुनी ज्याचे प्राप्तीच्या इच्छेने आजन्म ब्रह्मचर्यादी व्रते व नानाप्रकारची उग्रतपे यांचे अनुष्ठान करतात. ॥ १७१ ॥

गूढार्थदीपिका—आकार हा मायावशे। सत्स्वरूपी

या भासत असलेल्या सर्व भूतसृष्टीला एक अविनाशी आत्मस्वरूपच आधार असून, त्या आत्मस्वरूपावर भ्रांतीने भूतसृष्टी भासते. म्हणून तुला शोक करण्याचे कारण नाही. मुळात आत्मस्वरूप निराकार आहे. हे निराकार आत्मस्वरूप जेव्हा आत्मप्रेमानेच स्फुरण पावते, तेव्हा ते बहूरूप होते. बहूरूप झाले तरी आत्मस्वरूपाची एकात्मता मोडत नाही. कारण आत्मस्वरूपाच्या बाहेर आत्मसत्ता सोडून काही ते बहूरूप होत नाही. ज्याप्रमाणे पाण्यावर उठणारी लाट पाण्याचा पृष्ठभाग सोडून जमिनीवर काही जात नाही व तिचा पाण्याचा संबंध सुटत नाही, त्याप्रमाणे बहुरूपताही आत्मसत्तेवरच स्फुरते. या अनुभवात जरी आकार भासतात, तरी ते निरनिराळ्या वस्तूंच्या मर्यादा म्हणून जोपर्यंत वाटत नाहीं, तोपर्यंत त्या सर्व निरनिराळ्या आकारात एक मूळची आत्मवस्तूच प्रत्ययाला येते; म्हणून आत्मवस्तूच्या अद्वैताला बाध येत नाही. म्हणून या बहुपणाच्या प्रत्ययाला भ्रम म्हणता येत नाही. बहुरूपातील आत्मवस्तूची एकात्मता विसरून जेव्हा बहुरूपता बहुवस्तुरूपाने प्रत्ययाला येते तेव्हा तो भ्रम म्हटला जातो. अशा भूतसृष्टीची अव्यक्तदशा ही व्यक्तदशा मानली जाते.

अर्जुनाला भूतसृष्टीरूप बहुभावनाचा प्रत्यय अनेक वस्तुरूप वाटत होता व त्या बहुभावनात आपण निराळे आहो व कौरवादी दोन्ही सैन्यातील योद्धे वगैरे निरनिराळे स्वतंत्र सत्ता असलेले पदार्थ आहेत असे तो मानत होता. म्हणूनच तो त्यांच्या होणाऱ्या नाशाबद्दल दु:ख करीत होता. भगवान् म्हणतात, अर्जुना! एका आत्मसत्तेवरच हा सर्व बहुत्वाचा देखावा आहे, बहु निरनिराळे पदार्थ नाहीत आणि आत्मा अविनाशी असल्यामुळे येथे दुसरे आत्म्यावाचून काही उत्पन्न होत नाही व नाशही पावत नाही. किंबहुना द्वैतातच संभवणारी मारणे—मरणे, तोडणे-बुडणे अशी क्रिया अद्वैतवस्तूत संभवणेच शक्य नाही; म्हणून तुझा शोक व्यर्थ आहे. सर्वत्र एक आत्मवस्तूच असताना ती विसरून तू अनेक निरनिराळ्या वस्तूंचे स्वतंत्र अस्तित्व मानतोस. हा तुझा भ्रमच तुझ्या दु:खाला कारणीभूत आहे.

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्य:।
आश्चर्यवच्चैनमन्य: शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्॥ २९॥

अर्थ—कोणी आश्चर्याने थक्क व्हावे त्याप्रमाणे आत्मस्वरूपाला पाहतात व त्यात निमग्न होतात. कोणी आत्मस्वरूपाचे गुणानुवाद गाता गाता आश्चर्याने थक्क झाल्याप्रमाणे आत्मस्वरूपात तल्लीन होऊन जातात. कोणी आत्मस्वरूपाचे श्रवण करता करता आश्चर्याने चकित झाल्याप्रमाणे त्यात रंगून जातात. कोणी आत्मस्वरूपाचे श्रवण करून जाणीव न ठेवता निर्विकल्प स्थितीला प्राप्त होतात. ॥ २९ ॥

एक अंतरीं निश्चळ। जें निहाळितां केवळ। विसरले सकळ। संसारजात॥ १७२॥
एकां गुणानुवादु करितां। उपरति होऊनि चित्ता। निरवधि तल्लीनता। निरंतर॥ १७३॥
एक ऐकतांचि निवाले। ते देहभावीं सांडिले। एक अनुभवें पातले। तद्रूपता॥ १७४॥
जैसे सरिता ओघ समस्त। समुद्रामाजि मिळत। परी माघौते न समात। परतले नाहीं॥ १७५॥
तैसिया योगीश्वरांचिया मती। मिळणींसवें एकवटती। परी जे विचारूनि पुनरावृत्ति। भजतीचिना॥ १७६॥

अर्थ—या आत्मस्वरूपाला पाहून तेथेच अंत:करण स्थिर झाल्यामुळे कित्येकजण संसाराचे भानच विसरतात. ॥ १७२ ॥ कित्येकजण या आत्मस्वरूपाचे वर्णन करता करता चित्त संसारापासून पूर्ण विरक्त झाल्यामुळे अखंड आत्मस्वरूपाचे ठिकाणी तल्लीन होऊन राहतात. ॥ १७३ ॥ कित्येक लोक आत्मस्वरूपाची स्वरूपस्थिती गुरुमुखाने ऐकून अत्यंत समाधान पावले व त्यांचा देहभावच नाहीसा झाला. कित्येक आत्मस्वरूपाचा अनुभव घेऊन तद्रूप होऊन राहिले. ॥ १७४ ॥ ज्याप्रमाणे सर्व नद्या वाहत वाहत शेवटी समुद्राला मिळतात व समुद्रातच सामावून राहतात. मग पुन: परत फिरून येत नाहीत. ॥ १७५ ॥ त्याप्रमाणे परमेश्वराला जाणणारे योगीदेखील परमेश्वराला जाणून परमेश्वराशी एकरूप होतात व पुन: परमेश्वरापासून अलग होऊन जन्ममरणपरंपरा भोगीत नाहीत. ॥ १७६ ॥

गूढार्थदीपिका—विचारूनि पुनरावृत्ती। भजतीचिना

जीवाला भासणारे जडविनाशी धर्माचे जगत् भ्रांतीने भासते असे कां म्हणावयाचे, याचा उलगडा माऊलींनी येथे केला आहे. सत्य म्हणजे सदासर्वदा असणारे व भ्रांती म्हणजे "**आदावंते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तया**" अगोदरही ज्यांचे अस्तित्व सिद्ध होत नाही व नंतरही ज्यांचे अस्तित्व राहत नाही, पण मध्येच भासते, असा पदार्थ भ्रांतीने भासला म्हणावा लागतो. एक तर पदार्थ सत्य म्हणजे सदासर्वदा राहणारा असे सिद्ध झाले पाहिजे. तसा सिद्ध न होता भासत असेल तर भ्रांतीने भासतो असे म्हणावे लागेल सत्य अस्तित्व किंवा भ्रांतिजन्य खोटे, क्षणभराचे अस्तित्व या दोन अस्तित्वावाचून तिसऱ्या प्रकारच्या अस्तित्वाची कल्पनाच करता येत नाही. आत्मा अविनाशी म्हणजे सदासर्वदा सत्य आहे. तसे जडविनाशी जगही सदासर्वदा राहणारे सत्य असते तर, ते आत्म्याच्या अनुभवाबरोबर अनुभवाला आले असते. पण कोणत्याही रीतीने आत्मानुभव घेणाऱ्या पुरुषाला आत्म्याबरोबर जडविनाशी जगाचा अनुभव येत नाही.

कोणी अशी शंका घेतील की एका वस्तूकडे लक्ष लागले असता दुसरी वस्तू असून दिसत नाही. या नियमाप्रमाणे आत्म्याकडे लक्ष लावणाऱ्या पुरुषांना जग असून दिसत नाही. पण हे म्हणणे चूक आहे. दोन भिन्न स्वतंत्र अस्तित्व असलेल्या पदार्थांच्या ज्ञानाविषयीच हा आक्षेप लागू होतो. जडविनाशी जगाचे व आत्म्याचे भिन्न निरनिराळे अस्तित्व घेतल्यास दोघांची स्वतंत्र निरनिराळी अस्तित्वमर्यादा मानावी लागते व अस्तित्व मर्यादा मानली की जगाबरोबर आत्माही विनाशी मानावा लागतो. असे मानणे त्याच्या अविनाशी धर्माशी विरुद्ध होते आत्म्याचे अस्तित्व मर्यादित केले नाही. तर, जडविनाशी जगाचा भास आत्मसत्तेवरच मानावा लागतो. अमर्याद सच्चिदानंदरूप आत्मसत्तेवर जगाचाही सच्चिदानंदरूपाने भास झाला असता तर ते जगत सत्य झाले असते; पण जीवाला जगाचा तसा प्रत्यय नाही. त्याला जगाचा जडविनाशी प्रत्यय आहे; म्हणून अशा विनाशी जड प्रत्ययाचे जगत जीवाला भ्रांतीने भासते. असे विचारी पुरुषांनी निश्चित केले आहे.

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत । तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि॥ ३०॥

अर्थ—अर्जुना! सर्व प्राण्यांच्या देहामध्ये देहाचा अहंकार धारण करणारा जो जीवात्मा आहे, त्याचा कधीच नाश होत नाही. म्हणून कोण्याही प्राण्याविषयी तुला शोक करणे उचित नाही. ॥ ३० ॥

जें सर्वत्र सर्वही देहीं। जया करितांही घातु नाहीं। तें विश्वात्मक तूं पाहीं। चैतन्य एक॥ १७७॥
इयाचेनि स्वभावें। हें होत जात आघवें। तरी सांग काय शोचावें। एथ तुवां॥ १७८॥
एऱ्हवीं तरी पार्था। तुज कां नेणों न मने चित्ता। परी किडाळ हें शोचितां। बहुतीं परी॥ १७९॥

अर्थ—अर्जुना, जे सर्वत्र व्यापून सर्व देहामध्ये आहे व ज्याचा घात केला असतानाही घात होऊ शकत नाही, ते एक चैतन्यच सर्व नामरूपाने प्रकट झाले आहे. ॥ १७७ ॥ या चैतन्याच्या स्वभावानेच हे विश्व उत्पन्न होते व नाश पावते. मग तू शोक कशाचा करतोस सांग ?॥ १७८ ॥ एऱ्हवी अर्जुना, हे तुझ्या मनाला कसे पटत नाही हे मला समजत नाही. पण पुष्कळ दृष्टिनें पाहिले तरी, तुला शोक करणे योग्य दिसत नाही. ॥ १७९ ॥

गूढार्थदीपिका—इयाचेनि स्वभावें। हें होत जात आघवें

या ओव्यात श्रीज्ञानेश्वर माऊलींनी संसारचित्र कसे भासते याचा उलगडा केला आहे. "इयाचेनि स्वभावे" म्हणजे चैतन्याचे स्वभावाने "हें होत जात आघवें" सम्पूर्ण जगत होते व जाते असे माऊली म्हणते. पण याचा अर्थ असा नव्हे की 'जगत उत्पन्न करणे व त्याचा नाश करणे हा चैतन्याचा स्वभावच आहे. किंवा चैतन्य स्वभावत: जडविनाशी जगत उत्पन्न करिते. जडविनाशी जगताच्या उत्पत्तिकरिता माया मानण्याचे कारण नाही' असा अर्थ केल्यास जगत सत्य ठरते व त्याचे उत्पत्तिनाश हे धर्मही स्वाभाविक ठरतात व "**हे उपजे आणि नाशे। ते मायावशें दिसें**" (ज्ञाने० अ० २ ओ० १०५)

त्या त्यांच्याच वचनाशी विरोध येतो. म्हणून या ओवीचा अर्थ असा आहे की, स्फुरणे हा चैतन्याचा स्वभाव

आहे. ते 'मी' या वृत्तिरूपाने स्फुरत असते. या चैतन्यसमुद्रावर "मी" या वृत्तिरूपाने अनंत स्फुरणे होतात. त्या स्फुरणांकडे लक्ष देऊन मूळची चैतन्यवस्तू विसरली गेली की, 'मी' वृत्तीचे अनंत स्फुरणच निरनिराळ्या भूतांच्या रूपाने प्रत्ययाला येते व त्या स्फुरणाचे ठिकाणी उत्पत्तिनाश दिसू लागतात. यालाच जीव, जगत म्हणतो. याप्रमाणे चैतन्याचे स्वाभाविक स्फुरणाचे ठिकाणी जीव भ्रमाने जगाची कल्पना करतो, असा या ओवीचा अर्थ करावा लागतो.

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि । धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते॥ ३१ ॥

अर्थ—युद्ध हे घोर कर्म असले तरी ते (युद्ध) स्वधर्म असल्यामुळे युद्ध करताना त्यापासून पराङ्मुख होऊ नये. कारण धार्मिक युद्धावाचून क्षत्रियांना दुसरा मार्ग नाही. ॥ ३१ ॥

तूं अझुनि कां न विचारिसी। काय हें चिंतितु आहासी। स्वधर्मु तो विसरलासी। तरावें जेणें॥ १८० ॥
या कौरवां भलतें जाहलें। अथवा तुजचि कांहीं पातलें। कीं युगचि हें बुडालें। जऱ्ही एथ॥ १८१ ॥
तरी स्वधर्मु एक आहे। तो सर्वथा त्याज्य नोहे। मग तरिजेल काय पाहें। कृपाळूपणें॥ १८२ ॥
अर्जुना तुझें चित्त। जऱ्ही जाहलें द्रवीभूत। तऱ्ही हें अनुचित। संग्रामसमयीं॥ १८३ ॥
अगा गोक्षीर जरी जाहलें। तरी पथ्यासि नाहीं म्हणितलें। ऐसेनिहि विष होय सुदलें। नवज्वरीं देतां॥ १८४ ॥
तैसें आनीं आन करितां। नाशु होईल स्वहिता। म्हणऊनि तूं आतां। सावध होईं॥ १८५ ॥
वायांचि व्याकुळ कायी। आपुला निजधर्म पाहीं। जो आचरितां बाधु नाहीं। कवणे काळीं॥ १८६ ॥
जैसें मार्गेचि चालतां। अपावो न पवे सर्वथा। कां दीपाधारें वर्ततां। नाडळिजे॥ १८७ ॥
तयापरी पार्था। स्वधर्में राहाटतां। सकळ कामपूर्णता। सहजें होय॥ १८८ ॥
म्हणोनि यालागीं पाहीं। तुम्हां क्षत्रियां आणीक कांहीं। संग्रामावांचूनि नाहीं। उचित जाणें॥ १८९ ॥
निष्कपटा होआवें। उसिणा घाई जुंझावें। हें असो काय सांगावें। प्रत्यक्षावरी॥ १९० ॥

अर्थ—अर्जुना! या युद्धाचे समयी मी काय शोक करीत बसलो, युद्ध न करण्याचे भलतेच विचार मनात काय मी आणीत आहे असे अजूनही तुला वाटत नाही. अरे! युद्ध करणे हा क्षत्रियाचा स्वधर्म आहे. तो स्वधर्म तारणारा आहे, बुडविणारा नाही. ॥ १८० ॥ या कौरवांचे काही जरी झाले किंवा तुझाच घात होणाचा संभव असला अथवा सर्व सृष्टीचा प्रलय होण्याचा प्रसंग आला. ॥ १८१ ॥ तरी हा स्वधर्म जो आहे तो केव्हाही व कसल्याही प्रसंगी सोडता येत नाही. युद्ध करणे हा धर्म सोडून आपण शत्रूवर दया दाखविली व दया दाखविणे हा धर्म स्वीकारला तर या धर्माने तू तरणार काय? ॥ १८२ ॥ अर्जुना! या युद्धात स्वजनांचा नाश होतो हे पाहून तुझे चित्ताला प्रेमाचा पाझर फुटला तरी युद्धरूपी स्वधर्माचे अनुष्ठान करीत असताना ते काय उपयोगाचे? ॥ १८३ ॥ गायीचे दूध झाले म्हणून काही ज्वरात देणे पथ्यकर नसते. इतकेही करून दिलेच तर ते नवज्वरात विषाप्रमाणे मारक होते. ॥ १८४ ॥ त्याप्रमाणे आपला स्वधर्म सोडून परधर्माचे अनुष्ठान करणे आपल्या कल्याणाचे होत नाही. म्हणून तू सावध हो. अविचार करू नकोस. ॥ १८५ ॥ विनाकारण तू स्वजनांचे नाशामुळे व्याकुळ होऊन दु:ख करतोस. आपल्या स्वधर्माकडे लक्ष दे. या स्वधर्माचे अनुष्ठान केले असता केव्हाही अहित होत नाही. ॥ १८६ ॥ ज्याप्रमाणे सरळ मार्गाने चालणाऱ्याला कधीही अपाय होत नाही किंवा दिव्याच्या उजेडाने व्यवहार करीत असता मनुष्य कधी अडखळत नाही. ॥ १८७ ॥ त्याप्रमाणे अर्जुना! आपल्या स्वधर्माप्रमाणे वागणाऱ्याचे सर्व मनोरथ अनायासे पूर्ण होतात. ॥ १८८ ॥ म्हणून तुम्हा क्षत्रियांना युद्धावाचून दुसरा धर्म उचित सांगितलेला नाही. ॥ १८९ ॥ शत्रूने आपल्यावर मारा केल्यास निष्कपट अंत:करणाने उलट शत्रूवर मारा करीत लढावे. प्रत्यक्ष समोर युद्धाचा प्रसंग आहे, तेव्हा हे सांगण्याची जरूरी नाही. ॥ १९० ॥

गूढार्थदीपिका—तैसें आनीं आन करितां। नाशु होईल स्वहिता.

येथे श्रीकृष्ण भगवंतांनी अर्जुनाला व श्रीज्ञानेश्वर माऊलींनी जगाला जो उपदेश केला आहे तो अत्यंत लक्षात ठेवण्याजोगा आहे. धर्म हा जो प्रवृत्त झाला आहे, तो जीवाच्या आध्यात्मिक कल्याणाकरिताच प्रवृत्त झाला आहे.

त्या धर्माने आपले आत्यंतिक कल्याण होणार नाही असे वाटणे ही सर्वस्वी विपरीत समजूत आहे. त्याचप्रमाणे स्वजनांचा नाश होणार म्हणून अर्जुन 'युद्ध करणे' या स्वधर्मापासून परावृत होऊ पाहत होता; पण भगवान म्हणतात अर्जुना! "**स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि**" स्वधर्माचे अनुष्ठान करताना चलितचित्त होऊ नये. याचे स्पष्टीकरण करताना माउली म्हणते की.

"**या कौरवा भलते जाहले। अथवां तुजचि कांहीं पातलें। कीं युगचि हें बुडालें। जऱ्ही येथ॥**"

"**तरी स्वधर्म जो आहे। तो सर्वथा त्याज्य नोहे॥**"

काही झाले तरी स्वधर्म सोडता येत नाही. याचा अर्थ असा की जीवाच्या मरणानंतर होणाऱ्या त्याच्या गतीशी व आत्यंतिक कल्याणाशीही धर्माचा संबंध असल्यामुळे समाजाकरिता धर्म नसून धर्माकरिता समाज आहे. धर्माकरिता समाज सोडता येतो, पण समाजाकरिता धर्म सोडता येत नाही. कारण तो समाजाचे कल्याणाचा मार्ग म्हणूनच भगवंतांनी प्रकट केला आहे. भगवंताने जो धर्म प्रकट केला आहे तो समाजाचे धारण करणाराच आहे. म्हणूनच त्याला भगवंतांनी धर्म हे नाव दिले. त्या धर्मावाचून दुसरा कोणता धर्म समाजाचे धारण करणारा होऊ शकत नाही.

"**धारणाद्धर्म इत्याहुः**"

ज्याचे योगाने समाजाचे धारण होईल तो धर्म असा अर्थ कित्येक करतात. पण असा अर्थ केल्यास, ज्याला ज्या प्रकाराने वागले असता माझे हित आहे असे वाटेल तसे वागणे हा त्याचा धर्म होईल व धर्माची सामान्य पणे रूपरेषा काहीच करता येणार नाही. अर्जुनाला युद्ध न करणे हे हिताचे वाटत होते. पण त्याच्या उलट युद्ध करणे हा तुम्हा क्षत्रियांचा धर्म होय असे भगवंतांनी सांगितले. म्हणजे धर्माधर्माची ओळख भगवंतानी शास्त्रावरून ठरविली. स्वतः मनुष्याच्या बुद्धीवर अवलंबून ठरविली नाही. कारण भगवान व ज्ञानी भक्त ह्या दोन अत्यंत शुद्धबुद्धीच्या व्यक्तीवाचून इतर विषयात सुख मानणाऱ्या मनुष्याला, तो केवढाही व्यावहारिक दृष्ट्या थोर व बुद्धिमान असला तरी, निर्हेतुक असा निर्विकार चित्ताने विचार करताच येत नाही, म्हणून धर्माधर्माचा निर्णय करता येत नाही. प्राकृत मनुष्याची बुद्धी त्याच्या त्रिगुणात्मक प्रकृतीच्या कार्यात किंवा जगाच्या घडामोडीत गुंतलेली असते, म्हणून ती प्रकृतीच्या किंवा स्वभावाच्या स्वाधीन असते व ज्ञानी भक्ताची बुद्धी प्रकृतीच्या स्वाधीन नसते. ती परमेश्वराचे ठिकाणी स्थित असते. म्हणून शास्त्राने सांगितलेल्या स्वधर्मानुसार वागण्यात जीवाचे कल्याणच आहे, व तसे न वागण्यात जीवाचे अकल्याणच आहे.

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् । सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम्॥ ३२॥

अर्थ—अर्जुना! अनायासे प्राप्त झालेले व स्वर्गाचे द्वारच खुले झाले, असे हे प्रस्तुतसारखे युद्ध पुण्यशील व भाग्यवान क्षत्रियांनाच प्राप्त होते.॥ ३२॥

अर्जुना झुंज देखें आतांचें। हें हो कां दैव तुमचें। कीं निधान सकळ धर्मांचें। प्रगटलें असे॥ १९१॥
हा संग्रामु काय म्हणिपे। कीं स्वर्गुचि येणें रूपें। मूर्त कां प्रतापें। उदय केला॥ १९२॥
ना तरी गुणाचेनि पतिकरें। आर्तीचेनि पडिभरें। हें कीर्तीचि स्वयंवरें। आली तुज॥ १९३॥
क्षत्रियें बहुत पुण्य कीजे। तैं झुंज ऐसें हे लाहिजे। जैसें मार्गें जातां आडळिजे। चिंतामणीसी॥ १९४॥
ना तरी जांभया पसरे मुख। तेथ अवचटें पडे पीयूख। तैसा संग्रामु हा देख। पातला असे॥ १९५॥

अर्थ—अर्जुना! प्रस्तुत प्राप्त झालेला युद्धाचा प्रसंग तुमचे सुदैवच होय. किंवा सर्व क्षात्रधर्माचा ठेवाच तुझ्यापुढे प्रकट झाला असे समज.॥ १९१॥ किंवा हे युद्ध म्हणजे या रूपाने प्रत्यक्ष स्वर्गच मूर्तरूप धारण करून तुझ्यापुढे उभा आहे. अथवा तुझ्या पराक्रमाने मूर्तरूप धारण केले आहे.॥ १९२॥ किंवा तुझे क्षात्रगुण पाहून अत्यंत आवडीने तुला स्वयंवरात वरण्याकरिता ही कीर्ती अत्यंत आतुर झाली आहे असे समज.॥ १९३॥ खरोखर क्षत्रियाने पुष्कळ पुण्य करावे तेव्हाच असा युद्धाचा प्रसंग त्याला येतो. हे युद्ध म्हणजे वाटेने जात असता अनायसे चिंतामणी सापडावा असे आहे.॥ १९४॥ किंवा जांभई देण्याकरिता पसरलेल्या मुखात अकस्मात अमृत पडावे तसा हा युद्धप्रसंग आला आहे.॥ १९५॥

गूढार्थदीपिका—तैसा संग्रामु हा देख। पातला असे

युद्धाची इच्छा नसताना आपल्या हक्काची न्याय मागणी प्राप्त करून घेण्याकरिता, जर क्षत्रियाला युद्ध करण्याचा प्रसंग आला तर त्या युद्धात होणाऱ्या प्राणहानीचा दोष त्याला लागत नाही. तो प्रसंग भगवत्इच्छेनेच आला आहे असे समजावे.

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं सङ्ग्रामं न करिष्यसि। ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि॥ ३३॥

अर्थ—जर कदाचित् धर्माने प्राप्त झालेले युद्ध तू करणार नाहीस तर स्वधर्माचा व कीर्तीचा नाश होऊन तुला त्यायोगे पाप लागेल.॥ ३३॥

आतां हा ऐसा अव्हेरिजे। मग नाथिलें शोचूं बैसिजे। तरी आपण आहाणा होईजे। आपणपेयां॥ १९६॥
पूर्वजांचें जोडलें। आपणचि होय धाडिलें। जरी आजि शस्त्र सांडिलें। रणीं इये॥ १९७॥
तरी असती कीर्ति जाईल। जगचि अभिशापु देईल। आणि गिंवसित पावतील। महादोष॥ १९८॥
जैसी भतरिहीन वनिता। उपहति पावे सर्वथा। मग तैसी दशा जीविता। स्वधर्मेंवीण॥ १९९॥
ना तरी रणीं शव सांडिजे। तें चौमेरीं गिधीं विदारिजे। तैसें स्वधर्महीना अभिभाविजे। महादोषीं॥ २००॥

अर्थ—आता हे स्वधर्मरूप युद्ध सोडून खोट्या अशा स्वजनांबद्दल शोक करीत बसायचे! या अशा करण्यात अर्जुना! आपणच आपले अकल्याण करून घेतो.॥ १९६॥ जर युद्ध केले नाही व मागे फिरलो तर मोठे पराक्रम करून पूर्वजांनी आपल्या कुळाची जी कीर्ती वाढविली ती आपण धुळीस मिळवू॥ १९७॥ मिळविलेली कीर्ती जाईल व जग तुला शाप देईल. त्या बरोबरच स्वधर्माचा त्याग केल्यामुळे होणारे पुष्कळसे पाप तुला लागेल.॥ १९८॥ पतिहीन विधवा स्त्रीचा जसा पदोपदी पाणउतारा होतो, त्याप्रमाणे स्वधर्मरूप युद्धापासून परावृत होणाऱ्या क्षत्रियाची गती होते.॥ १९९॥ किंवा रणामध्ये पडलेल्या प्रेताला ज्याप्रमाणे चोहोकडून आलेली गिधाडे फाडून खातात, त्याप्रमाणे स्वधर्माचा त्याग करणाऱ्या पुरुषाला मोठमोठे दोष घेरतात.॥ २००॥

गूढार्थदीपिका—स्वधर्महीना अभिभाविजे। महादोषीं

जन्मलेल्या प्राण्याला मरेपर्यंत आत्मकल्याण साधण्याचा जो मार्ग भगवंतांनी मोठमोठ्या आधिकारिक ऋषींच्या द्वारा आखून दिला त्याला धर्म म्हणतात. त्या धर्ममार्गानेच प्रत्येकाला जायचे असते. त्या धर्माचा त्याग केला व त्याला जसे वागायला सांगितले नाही तसे वागायला लागला की त्याचे ते सर्व वागणे पापरूपच असते.

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम्। सम्भावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते॥ ३४॥

अर्थ—सर्व मनुष्यप्राणी अखंड तुझी अपकीर्ती गातील. सज्जनांना अपकीर्ती ही मरणाच्या दुःखापेक्षाही अधिक दुःख देणारी होते.॥ ३४॥

म्हणोनि स्वधर्म हा सांडसील। तरी पापा वरपडा होसील। आणि अपेश तें न वचेल। कल्पांतवरी॥ २०१॥
जाणतेनि तंवचि जियावें। जंव अपकीर्ति अंगा न पवे। आणि सांग पां केवीं निगावें। एथोनियां॥ २०२॥
तूं निर्मत्सरु सदयता। येथूनि निघसी कीर माघौता। परी ते गति समस्तां। न मनेल ययां॥ २०३॥
हे चहूंकडूनि वेढितील। बाणवरी घेतील। तेथ पार्था न सुटिजेल। कृपाळुपणें॥ २०४॥
ऐसेनिहि प्राणसंकटें। जरी विपायें पां निघणें घटे। तरी तें जियालेंही वोखटें। मरणाहुनी॥ २०५॥

अर्थ—अर्जुना! हा युद्धरूपी स्वधर्म जो आहे तो टाकून देशील तर पापालाच बळी पडशील व कल्पपर्यंत तुझ्या अपयशाचा कलंक दूर होणार नाही.॥ २०१॥ शहाण्याने जोपर्यंत अपकीर्ती होत नाही तोपर्यंतच जिवंत राहावे. मग सांग तुला या युद्धातून पाय मागे घेणे कसे योग्य होईल?॥ २०२॥ तू जरी या युद्धातून कौरवांविषयी मत्सर टाकून व त्यांची दया येऊन माघारा निघालास तरी या सर्वांना तू त्यांच्यावर दया करून युद्धातून परत फिरत आहेस असे वाटणार नाही.॥ २०३॥ युद्धांतून परत फिरलास की हे सर्वजण लगेच तुला घेरतील व बाणांचा तुझ्यावर वर्षाव करतील. दयाळुपणा दाखविलास म्हणून काही त्यातून तू सुटणार नाहीस.॥ २०४॥ अशाही प्राणसंकटातून कदाचित जरी वाचलास तरी तशा प्रकारचे वाचणे हे मरणाहूनही वाईट होय.॥ २०५॥

गूढार्थदीपिका—

येथून काही श्लोकांपर्यंत भगवंतांनी लोकरीत्या अर्जुनाला उपदेश करून स्वधर्माचरणाचीच मनुष्याने कास धरावी असे सांगितले आहे.

भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः । येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ ३५ ॥
अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यन्ति तवाहिताः । निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३६ ॥

अर्थ—मोठमोठे महारथी, तू भीतीने रणातून पाय काढलास, असेच समजतील. आज ज्यांच्या मनात तुझ्याविषयी आदर आहे त्यांच्या मनात तू युद्ध सोडून निघाल्यास तुझ्याविषयी अत्यंत अनादर उत्पन्न होईल. ॥ ३५ ॥ तुझे शत्रू तुझ्या सामर्थ्याची निंदा करून बोलू नये ते किंवा वाटेल तसे बोलतील मग त्यापेक्षा अधिक दुःख कोणते? ॥ ३६ ॥

तूं आणिकही एक न विचारिसी। एथ संभ्रमें झुंजों आलासी। आणि सकणवपणें निघालासी। मागुता जरी॥ २०६ ॥
तरी तुझें तें अर्जुना। या वैरियां दुर्जनां। कां प्रत्यया येईल मना। सांगें मज॥ २०७॥
हे म्हणतील गेला रे गेला। अर्जुन आम्हां बिहाला। हा सांगें बोलु उरला। निका कायी॥ २०८॥
लोक सायासें करुनि बहुतें। कां वेंचिती आपुलीं जीवितें। परी वाढविती कीर्तीतें। धनुर्धरा॥ २०९॥
ते तुज अनायासें। अनकळित जोडिली असे। हें अद्वितीय जैसें। गगन आहे॥ २१०॥
तैसी कीर्ति निःसीम। तुझां ठायीं निरुपम। तुझे गुण उत्तम। तिहीं लोकीं॥ २११॥
दिगंतींचे भूपति। भाट होऊनि वाखाणिती। जे ऐकिलिया दचकती। कृतांतादिक॥ २१२॥
ऐसा महिमा घनवट। गंगा तैसी चोखट। जया देखी जगीं सुभट। वांठ जाहाली॥ २१३॥
तें पौरुष तुझें अद्भुत। आइकोनियां हे समस्त। जाहले आथि विरक्त। जीवितेंसीं॥ २१४॥
जैसा सिंहाचिया हांका। युगांतु होय मदमुखा। तैसा कौरवां अशेखां। धाकु तुझा॥ २१५॥
जैसे पर्वत वज्रातें। ना तरी सर्प गरुडातें। तैसे अर्जुना हे तूंतें। मानिती सदा॥ २१६॥
तें अगाधपण जाईल। मग हिणावो अंगा येईल। जरी मागुता निघसील। न झुंजतचि॥ २१७॥
आणि हे पळतां पळों नेदिती। धरूनि अवकळा करिती। न गणित कुटी बोलती। आइकतां तुज॥ २१८॥
मग ते वेळीं हियें फुटावें। आतां लाठेपणें कां न झुंजावें। हें जिंतलें तरी भोगावें। महीतळ॥ २१९॥

अर्थ—अर्जुना! आणखी एक गोष्ट आहे. तू तिचा विचार करीत नाहीस. येथे मोठ्या उत्साहाने तू युद्ध करायला आलास. आता जर का येथून तू कौरवांवर दया करून माघारा गेलास. ॥ २०६ ॥ तर या दुर्जन अशा कौरवांना खरे वाटेल काय? आमची दया येऊनच अर्जुनाने युद्धातून पाय मागे घेतला असा त्यांना तुझ्या मनातील भावाचा अनुभव येईल काय, हे मला सांग. ॥ २०७ ॥ ते म्हणतील अरे! हा अर्जुन आम्हाला पाहून भ्याला व त्याने पळ काढला, हाच सर्वांचा बोल राहील. असा बोल उरलेला बरा काय? ॥ २०८ ॥ चांगले लोक, होईल ते प्रयास करून व प्रसंग पडल्यास आपले प्राण खर्ची घालून, अर्जुना! कीर्ती संपादन करतात. ॥ २०९ ॥ ती कीर्ती तुला न कळत अनायासे प्राप्त व्हावी तशी प्राप्त झाली आहे. जसे या आकाशाच्या बरोबरीचे दुसरे काही नाही, त्याप्रमाणे तुझ्या कीर्तीच्या तोडीची दुसऱ्या कोणाची कीर्ती नाही. ॥ २१० ॥ याप्रमाणे तुझी कीर्ती अपार व अनुपम आहे. तुझे गुणही त्रैलोक्यात वाखाणण्याजोगे आहेत. ॥ २११ ॥ देशोदेशींचे राजे भाट होऊन तुझे गुणांचे वर्णन करतात व ते गुण ऐकून यमासारख्यांनाही तुझा धाक वाटतो. ॥ २१२ ॥ अर्जुना! गंगा जशी अती पवित्र तशी तुझी कीर्तीही शुद्ध व दाट पसरलेली आहे; म्हणूनच अशी तुझी निष्कलंक कीर्ती पाहून उत्तम योद्धे भाटाप्रमाणे तुझी स्तुती करतात. ॥ २१३ ॥ तुझे विलक्षण शौर्य पाहून व ऐकून हे सर्व कौरवादिक आपल्याला अशा थोर अर्जुनाशी युद्ध करण्याचे भाग्य लाभणार आहे असे वाटून जीवावर उदार झाले आहेत. ॥ २१४ ॥ ज्याप्रमाणे सिंहाची गर्जना ऐकून मदोन्मत्त हत्तीला देखील प्रलयाप्रमाणे भीती उत्पन्न होते, त्याप्रमाणे या सर्व कौरवांना तुझा धाक वाटतो. ॥ २१५ ॥ ज्याप्रमाणे पर्वतांना वज्राची

भीती वाटते किंवा गरुडाला सर्प भितात, तसे अर्जुना! हे तुला भितात. ॥ २१६ ॥ तू हे युद्ध न करताच जर माघारा फिरलास तर हे तुझे थोरपण सर्व लयाला जाईल. ॥ २१७ ॥ आणि तू पळालास तरी हे तुला पळू देणार नाहीत. तुला धरून तुझी विटंबना करतील. तुझ्या तोंडावर ऐकवणार नाही अशी तुझी निंदा करतील. ॥ २१८ ॥ त्यावेळी ती निंदा ऐकून तुझे हृदय फुटेल म्हणजे अत्यंत दु:ख होईल. त्यापेक्षा आताच शूराप्रमाणे कां लढू नये? या युद्धात जय मिळविला तर आनंदाने पृथ्वीचे राज्य कां भोगू नये?॥ २१९ ॥

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्। तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः॥ ३७॥

अर्थ—युद्धात तुला मरण आल्यास तुला स्वर्गप्राप्ती होईल व तुला जय प्राप्त झाला तर या पृथ्वीचे राज्य तुला भोगता येईल; म्हणून अर्जुना! युद्ध करण्याचा निश्चय करून युद्धाला सज्ज हो. ॥ ३७ ॥

ना तरी रणीं एथ। झुंजतां वेंचलें जीवित। तरी स्वर्गसुख अनकळित। पावसील॥ २२० ॥
म्हणोनि ये गोठी। विचारु न करीं किरीटी। आतां धनुष्य घेऊनि उठीं। झुंजे वेगीं॥ २२१ ॥
देखें स्वधर्मु हा आचरतां। दोषु नाशे असता। तुज भ्रांति हे कवण चित्ता। एथ काची॥ २२२ ॥
सांगें प्लवेंचि काय बुडिजे। कां मार्गीं जातां आडळिजे। परी विपायें चालों नेणिजे। तरी तेंही घडे॥ २२३ ॥
अमृतें तरीचि मरिजे। जरी विखेंसीं सेविजे। तैसा स्वधर्में दोषु पाविजे। हेतुकपणें॥ २२४ ॥
म्हणोनि तुज पार्था। हेतु सांडोनि सर्वथा। क्षात्रवृत्ति झुंजतां। पाप नाहीं॥ २२५ ॥

अर्थ—किंवा अर्जुना! युद्ध करता करता जर मरण आले तर तेवढ्यानेच अनायासे स्वर्गसुखाची प्राप्ती होईल. ॥ २२० ॥ म्हणूनच जयापजयाची चिंता करू नकोस. धनुष्य घेऊन युद्धाला उभा राहा. ॥ २२१ ॥ युद्ध हा क्षत्रियांचा स्वधर्म आहे. तो स्वधर्म आचरित असताना असलेले पाप नाहीसे होते. तेथे स्वधर्माच्या आचरणाने पाप लागेल अशी शंका तुला कशी येते?॥ २२२ ॥ सांग बरे, पाण्यातून तारणारी नाव ही कधी बुडविते का? किंवा मार्गानेच चालू लागलेला अडखळून पडतो का? पण कदाचित सरळ मार्गाने चालता येणार नाही तर मात्र तेही होईल. ॥ २२३ ॥ विष मिळवून अमृत प्याले असता अमृतानेही मनुष्य मरेल, त्याप्रमाणे विषयसुखाच्या प्राप्तीचा हेतू मनात धरून कर्म केल्यास मात्र पापही होईल. ॥ २२४ ॥ म्हणून अर्जुना! विषयसुखाच्या प्राप्तीकरिता स्वधर्म पाळायचा अशी कामना मनात न धरता क्षत्रियाचा धर्म समजून तू युद्ध केलेस तर तुला पाप लागणार नाही. ॥ २२५ ॥

गूढार्थदीपिका—स्वधर्में दोषु पाविजे। हेतुकपणें

याचा भावार्थ असा की "**धर्मस्य ह्यापवर्ग्यस्य**" या भागवत वचनाप्रमाणे मुख्यत: हा प्रवृत्तिधर्मही परमेश्वराच्या प्राप्तीकरिताच निर्माण झाला आहे. परमेश्वरप्राप्तीकरिता जी चित्ताची शुद्धी पाहिजे ती या धर्माचरणाने होते. पण धर्माचरण करीत असताना त्या धर्माने विषयसुख प्राप्त व्हावे अशी कामना धरली तर किंवा संकल्प केला तर मात्र त्या कामनेनुसारच विषयसुखाची प्राप्ती हेच फळ मिळते व परमेश्वर अंतरतो. ज्याने ज्याने परमेश्वर अंतरेल ते ते पापच समजले पाहिजे. असे सकाम धर्माचे अनुष्ठान.—

"धर्मोऽपि मुमुक्षूणां पापमेवोच्यते"

परमेश्वरप्राप्तीची इच्छा करणाऱ्याला पापरूप आहे, असे आचार्यही म्हणतात.

ज्ञानेश्वर माऊलींनी पुढे नवव्या अध्यायात या अर्थाचे विधान केले आहे. कामनारहित धर्मानुष्ठानाने होणारी चित्तशुद्धी ही काही अदृष्टफल म्हणजे मेल्यानंतर मिळणारे फळ नव्हे, हे दृष्टफळ आहे. म्हणजे येथेच धर्मानुष्ठान [illegible] करता ते फळ मिळते व अनुभविता येते. विषयसुखाच्या प्राप्तीची कामना सोडून स्वधर्म हा परमेश्वराची [illegible] आहे, ती पाळायची म्हणून केलेल्या स्वधर्माचरणाने विषयवैराग्य आंगी बाणते व भगवंताकडे चित्ताचा [illegible] लागून चित्त अध्यात्माचा विचार करू लागते. विषयवैराग्य उत्पन्न होणे व अध्यात्मप्रवण मन होणे यालाच [illegible] चित्तशुद्धी असे नाव दिले आहे. विषयाविषयी उत्पन्न होणारे रागद्वेष ही चित्तातील अशुद्धी आहे. ते गेले [illegible] चित्त शुद्ध झाले व केवळ परमेश्वराची आज्ञा समजून सात्त्विक धर्माचरण केले असता रागद्वेष चित्तातून

जातात, नाही तर जात नाहीत; उलट चित्त अधिक रागद्वेषयुक्त होते व असे विषयासक्त चित्तच संसारदु:खाचे मूळ आहे. म्हणून येथे भगवंतांनी हेतुरहित म्हणजे विषयसुखाची कामना न धरता केवळ भगवदाज्ञा समजून स्वधर्माचे अनुष्ठान करण्यास सांगितले आहे.

सुखदु:खे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ। ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि॥ ३८॥

अर्थ—सुखदु:ख, लाभालाभ, जयापजय हे सारखे समजून म्हणजे सुख, जय, लाभ हे प्राप्त व्हावेत असा राग किंवा आसक्ती व दु:ख, पराजय व हानी प्राप्त होऊ नये असा द्वेष चित्तात न ठेवता युद्ध कर म्हणजे तुला युद्धाचे पाप लागणार नाही.॥ ३८॥

सुखीं संतोषा न यावें। दु:खीं विषादा न भजावें। आणि लाभालाभ न धरावे। मनामाजीं॥ २२६॥
एथ विजयपण होईल। कां सर्वथा देह जाईल। हें आधींचि कांहीं पुढील। चिंतावेना॥ २२७॥
आपणयां उचिता। स्वधर्मातेंचि रहाटतां। जें पावे तें निवांता। साहोनि जावें॥ २२८॥
ऐसेया मनें होआवें। तरी दोषु न घडे स्वभावें। म्हणोनि आतां झुंजावें। निभ्रांत तुवां॥ २२९॥

अर्थ—अर्जुना आपल्या मनाप्रमाणे झाले असता नेहमी सुख होते, पण असे मनाप्रमाणे झाले तरी त्याचा आपण संतोष मानू नये. किंवा मनाच्या विरुद्ध झाले तरी त्याचे दु:ख मानू नये. तसेच लाभ झाला पाहिजे, हानी होऊ नये हेही काही मनात धरू नये.॥ २२६॥ युद्धात माझा जय होईल किंवा माझा देह धारातीर्थी पडेल याची आधीपासूनच चिंता करीत बसू नये.॥ २२७॥ आपल्याला उचित म्हणून सांगितलेला स्वधर्मच आचरत असता जे सुखदु:ख येईल ते निवांत अंत:करणाने सहन करावे.॥ २२८॥ असे आपले मन ठेवून धर्माचे आचरण केले असता काही दोष लागत नाही, म्हणून अशा मनाने आता नि:संशय युद्ध कर॥ २२९॥

गूढार्थदीपिका—सुखदु:खे समे कृत्वा

या श्लोकात भगवंतांनी व श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी मोठा एक गूढार्थ सांगितला आहे. ज्याप्रमाणे पाण्यावर ज्या लहरी उठतात, त्यांचे ठिकाणी मूळ पाण्याहून, काही स्फुरणरूप विशेषभाव आपण समजतो. सर्व लहरींच्या स्फुरणरूप विशेषभावांचे अपेक्षेने त्या लहरींना आधार असणारे जे पाणी त्याचे ठिकाणी सामान्य भाव असतो. त्याप्रमाणेच आपल्या आत्मचैतन्यावर उठणाऱ्या मनोवृत्तिरूप लहरी नेहमी विशेषरूपाने प्रत्ययाला येतात. सुखदु:ख, लाभालाभ, जयापजय वगैरे सर्व त्या मनोवृत्तिरूप विशेषभावाचेच प्रकार आहेत. या मनोवृत्तिरूप विशेषभावाशी जीव आपले नेहमी ऐक्य करीत व मी सुखी, मी दु:खी, माझा लाभ, माझी हानी, माझा जय, माझा पराजय असे म्हणत 'मी मी' म्हणून स्फुरत असतो. किंवा अशा विशेषभावाने आपली कांही कल्पना करीत 'मी' म्हणून स्फुरणे हेच जीवदशेचे स्वरूप आहे. पण पाण्याच्या लहरीचे खाली जसे आधारभूत सामान्य पाणी असते व लहरीचा विशेषभाव सुटला की ती सामान्यरूप पाण्याशी मिळून तीही सामान्यरूप पाणीच होऊन जाते, त्याप्रमाणेच जीवाने सुखदु:ख, लाभालाभ इत्यादी विशेषभावांशी ऐक्य करणे सोडून दिले की त्याची विशेषभावरूप जीवदशा नाहीशी होऊन, तो जीव आपल्या सामान्य आत्मदशेशी किंवा ब्रह्मरूपाशी ऐक्य पावतो व मग त्याला कर्माचा स्पर्श होत नाही. येथे भगवंतांनी सांगितलेली सुखदु:खसमता, लाभालाभसमता दिसते तितकी सोपी नाही. ती विषयवैराग्य, आत्मज्ञान, भक्ती इत्यादी साधनानेच साधणारी आहे. येथे पाप केव्हा लागत नाही हे सांगण्यापुरताच त्या समतेचा भगवंतांनी उल्लेख केला आहे व सर्व प्रसंगी सम म्हणजे ब्रह्म, या ठिकाणी चित्त ठेवून तेथे स्थिर करीत गेल्यासच ही समता साधते असे ध्वनित केले आहे.

मनाला जे अनुकूल वाटते त्यापासून मनाला सुख होते व जे मनाला प्रतिकूल वाटते त्यापासून दु:ख होते. सुखदु:ख याप्रमाणे मनाच्या अनुकूल व प्रतिकूल वाटण्यावर अवलंबून असते. विषयाच्या या अशा सुखदु:खकाली मन विषम होते, म्हणून जेव्हा मनात सुखदु:ख हे विषमभाव उत्पन्न होत नाहीत किंवा मनावर येत नाहीत, तेव्हाच मन सम होते. आत्मज्ञान होऊन सुखदु:ख मिथ्या आहे किंवा मन:कल्पित आहे असे वाटल्यावाचून सुखदु:खाचे

प्रसंगी मन सम राहू शकत नाही. म्हणून आत्मविचाराने सर्व खोटे समजून घेऊन व सर्वांची उपेक्षा करून, साक्षी होऊन राहिल्यासच सुखदु:ख सम होते, असा या श्लोकाचा भावार्थ आहे.

आत्मज्ञान नसून अत्यंत धैर्याने एखादा पुरुष दु:ख सहन करतो हे आपण पाहतो खरे, पण तेथेही मनाला दु:ख प्रतिकूल वाटतच असते; पण तो ते धैर्याने सहन करतो व प्रतिकूल वाटत असते म्हणून दु:खभोगही होतो. नाहीतर सुखभोगाचे वेळी जसे मनाला धैर्य धरावे लागत नाही, तसे दु:खभोगाचे वेळीही धैर्य धरण्याची आवश्यकता पडू नये. धैर्यामुळे दु:खाची उपेक्षा होते. कर्तव्याच्या प्रेमाने दु:ख सहन करता येते, पण त्याचा अर्थ वरप्रमाणेच आहे. म्हणजे दु:ख सहन करता येते या म्हणण्यातच दु:खाविषयी मनाची प्रतिकूलता कायम राहते.

सारांश, सम अशा ब्रह्मवस्तूचे ठिकाणी मन स्थिर करून व तद्व्यतिरिक्त मिथ्या मानूनच सुखदु:ख सम पाहता येते हेच येथे भगवंतांनी सांगितले आहे.

एषा तेऽभिहिता साङ्ख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु। बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबन्धं प्रहास्यसि॥ ३९॥

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते। स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्॥ ४०॥

अर्थ—अर्जुना! ज्ञानयोगात केवळ ज्ञानरूप निर्गुण अशा सम ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी बुद्धी स्थिर कशी ठेवायची हे तुला सांगितले, आता सगुण भगवत्स्वरूपाचे ठिकाणी बुद्धी स्थिर कशी करायची हे तुला सांगतो ऐक. या बुद्धीने युक्त झाले असता कर्माचा बंध लागत नाही. ॥ ३९ ॥ या कर्मयोगबुद्धीने आरंभिलेल्या कर्माचा नाश होत नाही व त्यात दोषही उत्पन्न होत नाहीत. आणि कर्मयोगाचे अल्पदेखील आचरण जन्ममरणरूपी महाभयापासून मनुष्याला मुक्त करते. ॥ ४० ॥

हे सांख्यस्थिति मुकुलित। सांगितली तुज एथ। आतां बुद्धियोगु निश्चित। अवधारीं पां॥ २३०॥
जया बुद्धियुक्ता। जाहालिया पार्था। कर्मबंधु सर्वथा। बाधूं न पवे॥ २३१॥
जैसें वज्रकवच लेइजे। मग शस्त्रांचा वर्षावो साहिजे। परी जैतेंसीं उरिजे। अचुंबिता॥ २३२॥
तैसें ऐहिक तरी न नशे। आणि मोक्षु तो उरला असे। जेथ पुर्वानुक्रमु दिसे। चोखाळत॥ २३३॥
कर्माधारें राहाटिजे। परी कर्मफळ न निरीक्षिजे। जैसा मंत्रज्ञु न बधिजे। भूतबाधा॥ २३४॥
तियापरी जे सुबुद्धि। आपु जालिया निरवधि। हा असतांचि उपाधि। आकळूं न सके॥ २३५॥
जेथ न संचरे पुण्यपाप। जें सुक्ष्म अति निष्कंप। गुणत्रयादि लेप। न लगती जेथ॥ २३६॥
अर्जुना ते पुण्यवशें। जरी अल्पचि हृदयीं बुद्धि प्रकाशे। तरी अशेषही नाशे। संसारभय॥ २३७॥

अर्थ—अर्जुना! मी तुला हा ज्ञानमार्ग संक्षिप्तरूपाने सांगितला आहे. आता बुद्धियोग म्हणजे कर्मयोग सांगतो, इकडे लक्ष दे. ॥ २३० ॥ ज्या बुद्धियोगाने युक्त होऊन कर्म केले असता अर्जुना! कर्म मुळीच बंधनकारक होत नाही. ॥ २३१ ॥ ज्याप्रमाणे अभेद्य कवच अंगावर घालून युद्धामध्ये होणारा शस्त्रांचा वर्षाव सहन करता येतो व हटकून जय प्राप्त होतो. ॥ २३२ ॥ त्याप्रमाणे ऐहिक राज्यादी सुखाची हानी न होता व शेवटी मोक्ष किंवा भगवत्प्राप्तीही होते. कारण या बुद्धियोगात ज्ञानयोगाने प्राप्त होणारी स्थितीही कायम राहते. ॥ २३३ ॥ स्वधर्माप्रमाणे आचरण करावे, पण धर्माप्रमाणे वागले असता जे फळ प्राप्त होते म्हणून सांगितले असेल, त्या फळाची प्राप्ती व्हावी अशी इच्छा मात्र धरू नये. ज्याप्रमाणे मांत्रिकाला भूताची बाधा होत नाही. ॥ २३४ ॥ त्याप्रमाणे बुद्धियोगरूपी सद्‌बुद्धी पूर्ण प्राप्त झाली असता ही असलेली कर्मबंधरूपी उपाधी बाधू शकत नाही. ॥ २३५ ॥ या सद्‌बुद्धीचे ठिकाणी पुण्यपापाचा प्रवेश होत नाही. ही सद्‌बुद्धी सूक्ष्म असून अत्यंत निश्चल असते, म्हणजे कधी ढळत नाही. सत्वादी त्रिगुणांचा तेथे स्पर्श होत नाही. ॥ २३६ ॥ अर्जुना! पूर्वपुण्याने ती थोडीशी जरी हृदयात प्रगट झाली तरी नि:शेष संसाराची म्हणजे जन्ममृत्यूची भीती नाहीशी होते. ॥ २३७ ॥

गूढार्थदीपिका—सांख्ययोग व बुद्धीयोग

ज्ञानयोगातील बुद्धीच्या समस्थितीलाच साक्षी म्हणतात. साक्षी हा उदासीन व अकर्ता असल्यामुळे निर्गुणनिष्ठ

राहून किंवा साक्षी होऊन व सुखदु:ख सम मानून कर्म करणे शक्य नसते; म्हणून निर्गुण स्वरूपाची प्राप्ती करून घेणाऱ्या अतीविरक्त व ज्याची कर्मप्रवृत्ती अती क्षीण आहे अशा ब्राह्मणाकरिता सांख्ययोग सांगितला आहे.

ज्यांच्या ठिकाणी कर्मप्रवृत्ती प्रबळ आहे अशा ब्राह्मणादिक जातीकरिता कर्मयोग सांगतात. या बुद्धियोगाने (कर्मयोगाने) कर्म केले असता कर्माचा बंध उत्पन्न होत नाही, पाप उत्पन्न होत नाही, व कर्म उणेपुरे कसेही झाले तरी व्यर्थ जात नाही. कारण बुद्धियोगाने केलेले कर्म ईश्वराप्रीत्यर्थच होत असते.

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन। बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम्॥ ४१॥

अर्थ—हे कुरुपुत्रा अर्जुना! ज्या बुद्धीने सत्याचा निश्चय होतो ती बुद्धी एकच आहे, पण बदलणाऱ्या व खोट्या वस्तूंचा निश्चय करणाऱ्यांची बुद्धी मात्र पुष्कळ प्रकारची असते.॥ ४१॥

जैसी दीपकळिका धाकुटी। परी बहु तेजातें प्रगटी। तैसी सद्‌बुद्धि हे थेकुटी। म्हणों नये॥ २३८॥
पार्था बहुतीं परी। हे अपेक्षिजे विचारशूरीं। जे दुर्लभ चराचरीं। सद्वासना॥ २३९॥
आणिकासारिखा बहुवसु। जैसा न जोडे परिसु। कां अमृताचा लेशु। दैवगुणें॥ २४०॥
तैसी दुर्लभ जे सद्‌बुद्धि। जिये परमात्माचि अवधि। जैसा गंगेसी उदधि। निरंतर॥ २४१॥
तैसा ईश्वरावांचूनि कांहीं। जिये आणीक लाहाणें नाहीं। ते एकचि बुद्धि पाहीं। अर्जुना जगीं॥ २४२॥
येरी ते दुर्मति। जे बहुधा असे विकरती। तेथ निरंतर रमती। अविवेकिये॥ २४३॥
म्हणोनि तयां पार्था। स्वर्ग संसार नरकावस्था। आत्मसुख सर्वथा। दृष्ट नाहीं॥ २४४॥

अर्थ—ज्याप्रमाणे दिव्याची ज्योती लहान असली तरी बराच प्रकाश देते. त्याप्रमाणेच ही सद्‌बुद्धी आत्मप्रकाश देणारी असल्यामुळे अल्प म्हणता येत नाही.॥ २३८॥ अर्जुना! श्रेष्ठ विचारी पुरुषांनी हिची प्राप्ती करून घेण्याची आवश्यकता आहे, असे अनेक कारणास्तव म्हणता येईल; कारण ही सद्‌बुद्धी जगात दुर्लभ आहे.॥ २३९॥ ज्याप्रमाणे इतर दगडाप्रमाणे कोठेही परीस सांपडणे शक्य नाही किंवा अमृताचा एक थेंब प्राप्त होणे देखील दैवाधीनच असते.॥ २४०॥ त्याप्रमाणे ही सद्‌बुद्धी दुर्लभ आहे. या सद्‌बुद्धीचा प्रवाह परमात्म्याकडे असून तो परमात्म्यातच मिळतो. ज्याप्रमाणे गंगा समुद्राकडे वाहते व समुद्रातच मिळते.॥ २४१॥ त्याप्रमाणे या सद्‌बुद्धीला परमेश्वरावाचून दुसरे काहीही आवडत नाही. ही सद्‌बुद्धि ज्यांना प्राप्त होते त्या सर्वांचे ठिकाणी अर्जुना! अशी ती एक प्रकारचीच असते.॥ २४२॥ बाकीच्या ज्या दुर्मती किंवा परमेश्वराचा लाहो न करता विषयसुखाचा लाहो किंवा सोस वाहणाऱ्या अनेक प्रकारांनी विकारवश झालेल्या वाईट बुद्ध्या आहेत, त्यांचे ठिकाणी अविचारी लोकच रमतात.॥ २४३॥ म्हणून अर्जुना! त्या विषयासक्त बुद्धिमुळे त्या अविचारी लोकांना स्वर्ग, संसार किंवा नरक या तीन गतीच मिळतात. मोक्षसुख त्यांना भोगण्यास कधी मिळत नाही.॥ २४४॥

गूढार्थदीपिका—व्यवसायात्मिका व अव्यवसायात्मिका बुद्धि

बुद्धिही सत्पक्षपाती आहे, असे शास्त्रात म्हटले आहे. सत्पक्षपाती म्हणजे सत्याचा पक्ष धरणारी, आणि सत्य म्हणजे त्रिकालाबाधित किंवा ज्याचा कधी नाशच होत नाही ते. असे सत्य एक ब्रह्मच आहे. म्हणूनच त्या परब्रह्माला सत्य म्हणतात. सत्य एकच असू शकते. अनेक सत्य असू शकत नाहीत. म्हणून परब्रह्मावाचून दुसरे कांहीही सत्य राहू शकत नाही. व्यवसाय म्हणजे खरा निश्चय किंवा कधी न बदलणारा निश्चय होय. असा निश्चय अद्वितीय परब्रह्माचाच होऊ शकतो, म्हणून एक परब्रह्मच सत्य आहे व दुसरे सर्व खोटे, असा निश्चय करणाऱ्या बुद्धीलाच व्यवसायात्मिका बुद्धि म्हणतात. ती परमेश्वराचे ठिकाणीच स्थिर असते. अर्थात् जिचा निश्चय क्षणोक्षणी बदलतो ती बुद्धि अव्यवसायात्मिका म्हटली जाते. ब्रह्मविषयक व्यवसायात्मिका बुद्धि एका प्रकारचीच असते, म्हणजे ती ज्यांना ज्यांना प्राप्त होते त्यांचा अनुभव एकच असतो.

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः। वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः॥ ४२॥
कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम्। क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति॥ ४३॥

भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् । व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते॥ ४४॥

अर्थ—वेदाचा अर्थ करण्यात पटू असणारे जे लोक वेदात सांगितलेल्या कर्माच्या विषयसुखरूप गोड दिसणाऱ्या फळावर लक्ष ठेऊन हेच कर्माचे फळ होय, दूसरे कोणते नाही असे म्हणतात, ते लोक अविवेकी मूर्ख होत. ॥ ४२॥ ते लोक अखंड विषयसुखाची वासना करीत, स्वर्गादिक सुखाच्या प्राप्तीची इच्छा करीत राहतात व पुन: पुन: जन्मकर्म हेच फळ देणाऱ्या अशा नानाप्रकारची क्रिया-कर्मे, भोग व ऐश्वर्य गती प्राप्त होण्याकरिता करीत असतात. ॥ ४३॥ भोग व ऐश्वर्य यांच्यात ज्यांचे चित्त आसक्त झाले आहे व त्यामुळे विवेक नाहीसा होऊन जे अविवेकी झाले आहेत, त्यांची निश्चयात्मिका बुद्धी परमेश्वराचे ठिकाणी स्थिर होत नाही. ॥ ४४॥

वेदाधारें बोलती। केवळ कर्म प्रतिष्ठिती। परी कर्मफळीं आसक्ती। धरूनियां॥ २४५॥
म्हणती संसारीं जन्मिजे। यज्ञादि कर्म कीजे। मग स्वर्गसुख भोगिजे। मनोहर॥ २४६॥
एथ हें वांचूनि कांहीं। आणिक सर्वथा सुखचि नाहीं। ऐसें अर्जुना बोलती पाहीं। दुर्बुद्धि ते॥ २४७॥
देखें कामना अभिभूत। होऊनि कर्मे आचरत। ते केवळ भोगीं चित्त। देऊनियां॥ २४८॥
क्रियाविशेषें बहुतें। न लोपितीं विधीतें। निपुण होऊनि धर्मातें। अनुष्ठिती॥ २४९॥
परी एकचि कुडें करिती। जे स्वर्गकामु मनीं धरिती। यज्ञपुरुषा चुकती। भोक्ता जो॥ २५०॥
जैसा कर्पूराचा राशि कीजे। मग अग्नि लाऊनि दीजे। कां मिष्टान्नीं संचरविजे। काळकूट॥ २५१॥
दैवें अमृतकुंभ जोडला। तो पायें हाणोनि उलंडिला। तैसा नासिती धर्मु निपजला। हेतुकपणें॥ २५२॥
सायासें पुण्य अर्जिजे। मग संसारु कां अपेक्षिजे। परी नेणती ते काय कीजे। अप्राप्त देखें॥ २५३॥
जैसी रांधवणी रससोय निकी। करूनियां मोलें विकी। तैसा भोगासाठीं अविवेकी। धाडिती धर्मु॥ २५४॥
म्हणोनि हे पार्था। दुर्बुद्धि देख सर्वथा। तयां वेदवादरतां। मनीं वसे॥ २५५॥

अर्थ—हे लोक वेदाचा आधार घेऊन बोलतात व केवळ कर्माचे प्रतिपादन करतात. म्हणजे वेदाने कर्मच करायला सांगितले आहे असे प्रतिपादतात. पण हे सर्व त्यांचे प्रतिपादन कर्माच्या फळाशी आसक्ती मनात धरून असते. ॥ २४५॥ संसारी जन्मावे व यज्ञादिक कर्मे करून स्वर्गातील सुंदर सुख भोगावे असे त्यांचे म्हणणे असते. ॥ २४६॥ अर्जुना! यावाचून दुसरे सुखच नाही असे हे दुर्बुद्धी लोक म्हणत असतात. ॥ २४७॥ याप्रमाणे विषयसुखभोगाच्या तावडीत गेलेले हे लोक केवळ विषयसुख भोगण्याच्या इच्छेनेच कर्मे करतात. ॥ २४८॥ ते स्वर्गसुख मिळावे म्हणून यत्किंचित विधीचा लोप न होऊ देता निष्णात होऊन नानाप्रकारची कर्मे करतात. ॥ २४९॥ पण सर्व कर्मांचा फळ भोक्ता जो यज्ञपुरुष त्याच्या प्राप्तीची इच्छा न धरता स्वर्गसुखाची इच्छा मनात धरतात हेच एक वाईट करतात. ॥ २५०॥ ज्याप्रमाणे कापुराचा ढीग करून त्याला अग्नी लावावा अथवा मिष्टान्नात विष कालवावे. ॥ २५१॥ किंवा दैवाने अमृताचा घडा सापडला असता तो पायाने उलंडून द्यावा. त्याप्रमाणे क्षुल्लक विषयसुखाची कामना मनात धरून धर्माचरण करतात. ॥ २५२॥ श्रम करून पुण्य जोडावे, मग त्यापासून संसाराची इच्छा कां करावी? पण काय करावे? या अज्ञानी लोकांना विचारच नसतो. ॥ २५३॥ जसे चांगले उत्तम प्रकारचे अन्न शिजवावयाचे व शेवटी ते द्रव्य घेऊन विकायचे, तसे अविचारी लोक केवळ विषयसुख मिळविण्याकरिताच धर्मानुष्ठानाचा उपयोग करतात. ॥ २५४॥ म्हणून अर्जुना! वेदाचा कर्मपर अर्थ लावणारे जे पुरुष असतात त्यांच्या ठिकाणी अशी दुर्बुद्धी असते, पहा. ॥ २५५॥

गूढार्थदीपिका—भोगासाठीं अविवेकी। धाडिती धर्मु

भगवंताची वेदाज्ञा निष्काम चित्ताने पाळून व फळासह ते कर्म भगवंतालाच अर्पण करून, भगवंताला संतुष्ट करावे, हा धर्माचा मुख्य हेतू आहे. निष्काम आज्ञा पालन करणे हेच प्रथम प्रेमाचे लक्षण होय. भगवंताची धर्माज्ञा निष्काम चित्ताने पाळण्यातही असेच भगवंताचे प्रेम जोडले जाते. तेव्हा ज्या निष्काम धर्माचरणाने अविनाशी सुखस्वरूप परमात्म्याची प्राप्ती होते, तो सोडून क्षणिक विषयसुखाच्या प्राप्तीची इच्छा करणे करंटेपणच

म्हटले पाहिजे. पण असा सद्विचार करणारी ही व्यवसायात्मिका म्हणजे सद्बुद्धि, कर्मासक्त व विषयासक्त पुरुषांचे ठिकाणी कर्मासक्ती व विषयासक्तीमुळे अत्यंत झाकली गेलेली असते व क्षणोक्षणी जिचा निश्चय बदलते अशी अव्यवसायात्मिका बुद्धिच त्यांचे ठिकाणी राहते; म्हणून त्यांची व्यवसायात्मिका बुद्धि प्रकट होऊन परमेश्वराचे ठिकाणी स्थिर होऊ शकत नाही.

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन। निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्॥ ४५ ॥

अर्थ—अर्जुना! वेद हे तीन गुणांच्या विषयांचे वर्णन करणारे आहेत. तू तीन गुण रहित हो व सुखदु:खादि द्वंद्वरहित नित्यसत्वस्थ, अप्राप्त वस्तूची प्राप्ती व प्राप्त वस्तूंचे रक्षण यांची चिंता सोडून आत्मवस्तूचे ठिकाणी चित्त स्थिर ठेवून राहा. ॥ ४५ ॥

तिहीं गुणीं आवृत। हे वेद जाणे निभ्रांत। म्हणोनि उपनिषदादि समस्त। सात्त्विक ते॥ २५६ ॥
येर रजतमात्मक। जेथ निरूपिजे कर्मादिक। जे केवळ स्वर्गसूचक। धनुर्धरा॥ २५७ ॥
म्हणोनि तूं जाण। हे सुखदु:खांसीच कारण। एथ झणें अंत:करण। रिगों देसी॥ २५८ ॥
तूं गुणत्रयातें अव्हेरीं। मी माझें हें न करीं। एक आत्मसुख अंतरीं। विसंब झणीं॥ २५९ ॥

अर्थ—सर्व वेद त्रिगुणात्मक आहेत असे नि:संशय समज. त्यात उपनिषदादी भाग हा सात्विक आहे. ॥ २५६ ॥ आणि बाकीचा वेदभाग, अर्जुना! रजतमात्मक आहे. कारण त्यात कर्मादिकांचे निरूपण असून, त्या कर्माने स्वर्गादी विषयसुख मिळते हे सांगितले आहे. ॥ २५७ ॥ म्हणून कर्मप्रतिपादक वेदाचा रजतमात्मक जो भाग आहे तो सुखदु:ख प्राप्त करून देणाराच आहे. तेथे आपले अंत:करण जाऊ देऊ नकोस. ॥ २५८ ॥ तू तिन्ही गुणाचा अव्हेर कर व हा मी व हे माझे असे चित्तात ठेऊ नकोस व अंतरात एक आत्मसुख ठेव ते मात्र सोडू नको. ॥ २५९ ॥

यावानर्थ उदपाने सर्वत: सम्प्लुतोदके। तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानत:॥ ४६ ॥

अर्थ—सर्वत्र जलमय झाले असताही पाणी पिणे वगैरेकरिता जितके पाणी लागते तितक्याच पाण्याचा ज्याप्रमाणे आपण उपयोग करून घेतो, त्याप्रमाणे जाणत्या ब्राह्मणाला सर्व वेदांमध्ये त्याच्या उपयोगाचा मार्गच काढून घेणे योग्य असते. ॥ ४६ ॥

जरी वेदें बहुत बोलिलें। विविध भेद सूचिले। तऱ्ही आपण हित आपुलें। तेंचि घेपें॥ २६० ॥
जैसा प्रगटलिया गभस्ती। अशेषही मार्ग दिसती। तरी तेतुलेही काय चालिजती। सांगें मज॥ २६१ ॥
कां उदकमय सकळ। जऱ्ही जाहलें असे महीतळ। तरी आपण घेपें केवळ। आर्तीचजोगें॥ २६२ ॥
तैसे ज्ञानिये जे होती। ते वेदार्थातें विवरिती। मग अपेक्षित तें स्वीकारिती। शाश्वत जें॥ २६३ ॥

अर्थ—वेदाने पुष्कळ बोलणे करून विविध मार्ग सुचविले असले तरी आपण आपल्याला जे हितकर असेल तेच त्यातून घेतले पाहिजे. ॥ २६० ॥ ज्याप्रमाणे सूर्योदय झाला म्हणजे जेवढे मार्ग असतील तेवढेही प्रकाशित होतात, पण प्रकाशित झालेल्या सर्वच मार्गाने आपण जातो काय? सांग बरे, अर्जुना!॥ २६१ ॥ किंवा सर्व पृथ्वी जलमय झाली असली तरी आपण आपल्या गरजे पुरतेच पाणी घेतो, नाही काय?॥ २६२ ॥ त्याप्रमाणे ज्ञानी जे असतात ते वेदाच्या उपदेशाचा विचार करतात आणि आपल्याला जे शाश्वत आहे, ते अपेक्षित आहे असे जाणून तेच शाश्वत किंवा अविनाशी तत्त्व स्वीकारतात. ॥ २६३ ॥

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि॥ ४७ ॥

अर्थ—तू कर्माचाच अधिकारी आहेस. फलाच्या ठिकाणी कधी अधिकार बाळगू नकोस. तू कर्मफलाचे निमित्त कधी होऊ नयेस आणि अकर्माचे ठिकाणी तुझी आसक्ती नसावी. ॥ ४७ ॥

म्हणोनि आइकें पार्था। याचिपरी पाहातां। तुज उचित होय आतां। स्वकर्म हें॥ २६४ ॥
आम्हीं समस्तही विचारिलें। तंव ऐसेंचि हें मना आलें। जे न संडिजे तुवां आपुलें। विहित कर्म॥ २६५ ॥
परी कर्मफळीं आस न करावी। आणि कुकर्मीं संगति न व्हावी। हे सत्क्रियाचि आचरावी। हेतूविण॥ २६६ ॥

अर्थ—म्हणून अर्जुना! मी काय सांगतो ते ऐक. याप्रमाणे विचार केल्यास तुला स्वधर्मरूपी युद्ध करणेच योग्य आहे. ॥ २६४ ॥ आम्ही सर्व तऱ्हेने विचार केला असता असेच आमच्या मनाला वाटते की तू आपले विहित कर्म सोडू नयेस. ॥ २६५ ॥ परंतु कर्म करीत असताना कर्मापासून मला इच्छित फळ प्राप्त झाले पाहिजे असे मात्र मनात धरू नये आणि कर्माचा त्यागही करू नये. फळाविषयीची इच्छा मनात न ठेवता ही स्वधर्मरूपी सत्क्रियाच आचरणे योग्य होय. ॥ २६६ ॥

गूढार्थदीपिका—तुज उचित होय.........स्वकर्म हें

प्रबल कर्मप्रवृत्ती असलेल्या ब्राह्मणाला देखील संन्यासाधिकार नाही. अर्जुन हा प्रबल कर्मप्रवृत्ती असलेल्या क्षत्रियजातीतला होता आणि त्याला संन्यासाधिकार नव्हता, हे शास्त्रात स्पष्ट आहे.

नहि क्षत्रियवैश्ययोः पारिव्राज्यप्रतिपत्तिरस्ति। वृह० शां० भा० (४।५।९५)

क्षत्रिय वैश्यांना कर्मसंन्यासाचा अधिकार नाही, म्हणून भगवान् येथे "**कर्मण्येवाधिकारस्ते**" कर्माचाच तू अधिकारी आहेस असे निक्षून सांगतात.

योगस्थः कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनञ्जय। सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते॥ ४८॥

अर्थ—अर्जुना! कर्म सिद्धीला जावो वा न जावो, या दोन्ही ठिकाणी चित्त सम ठेवणे किंवा हे दोन्ही सम लेखणे याला योग म्हणतात. असे सम चित्त ठेवून व कर्मफलाची आसक्ती सोडून कर्मे कर. ॥ ४८ ॥

तूं योगयुक्त होउनी। फळाचा संग सांडुनी। मग अर्जुना चित्त देऊनी। करीं कर्में॥ २६७॥
परी आदरिलें कर्म दैवें। जरी समाप्तीतें पावे। तरी विशेषें तेथ तोषावें। हेंहि नको॥ २६८॥
कां निमित्तें कोणें एकें। तें सिद्धी न वचतांचि ठाके। तरी तेथिंचेनि अपरितोखें। क्षोभावें ना॥ २६९॥
आचरतां सिद्धी गेलें। तरी काजाचि कीर आलें। परी ठेलियाही सगुण जाहालें। ऐसेंचि मानीं॥ २७०॥
देखें जेतुलालें कर्म निपजे। तेतुलें आदिपुरुषीं जरी अर्पिजे। तरी परिपूर्ण सहजें। जाहालें जाणें॥ २७१॥
देखें सतासत् कर्मीं। हें जें सरिसेपण मनोधर्मीं। तेचि योगस्थिति उत्तमीं। प्रशंसिजे॥ २७२॥

अर्थ—अर्जुना! तू योगयुक्त हो व फळाची आसक्ती सोडून कर्माकडे चित्त देऊन कर्मे कर. ॥ २६७ ॥ परन्तु करायचे कर्म जर सुदैवाने पूर्ण झाले तर त्यायोगे आनंद मानण्याची गरज नाही. ॥ २६८ ॥ किंवा काही कारणामुळे ते कर्म सिद्धीस न जाता अपूर्ण राहिले तर त्यामुळे असंतोष मानण्याचे किंवा मन:क्षोभ होऊ देण्याचे कारण नाही. ॥ २६९ ॥ कर्म केले व सिद्धी झाली तर बरेच झाले किंवा कर्म सिद्धीस गेले नाही तरी ते सफल झाले असेच मानावे. ॥ २७० ॥ अर्जुना! पहा, जेवढे काही आपल्याकडून कर्म होते तेवढेही परमेश्वराला समर्पण करावे. कर्म परमेश्वराला समर्पण केले की परिपूर्ण होतेच. ॥ २७१ ॥ पहा, अशा रीतीने होणाऱ्या बरे वाईट कर्माचे ठिकाणी जी चित्ताची समता याचीच सज्जन लोक योगस्थिती म्हणून प्रशंसा करतात. ॥ २७२ ॥

गूढार्थदीपिका—योगयुक्त होउनी......करीं कर्में

येथे भगवंतानी अर्जुनाला योगस्थ राहून कर्म करण्याचा उपदेश केला आहे. "योग" या शब्दाचा ऐक्य असा अर्थ आहे. बुद्धीचे परमेश्वराशी ऐक्य करून कर्मे कर असे भगवान येथे सांगत आहेत जीवदशेत बुद्धीचे देहादिकांशी ऐक्य झालेले असते. त्या देहादिकांकरिता कर्म केले तर ते बंधनकारक होते. पण परमेश्वराशी बुद्धीचे ऐक्य ठेवून किंवा परमेश्वराच्या आसक्तीने कर्म केल्यास ते बंधनकारक होत नाही.

'योग' या शब्दाचा अनासक्ती असा कित्येक अर्थ करतात. पण असा अर्थ केला तरी जी वस्तू बुद्धीला सत्य वाटते तेथेच ती आसक्त होते, असा बुद्धीचा स्वभाव आहे. बुद्धीचा स्वभाव निश्चय करणे असला तरी तिला जी वस्तू खरी वाटते तिचाच ती निश्चय करते व ती ज्या वस्तूचा निश्चय करते ती वस्तू खरी वाटल्यावाचून बुद्धी निश्चयच करीत नाही.

विषय व परमात्मा किंवा आत्मा व अनात्मा असे दोनच पदार्थ आहेत. त्यांपैकी योग्य विचार न करता देहादी

अनात्म पदार्थांच्या सत्यत्वाचा निश्चय करून बुद्धी तेथे आसक्त झाली व त्यांच्या ठिकाणी स्थित होऊन कर्मे झाल्यास ती कर्मे बंधनकारक होतात हे भगवंतांनी सांगीतले आहे. अर्थात् येथे देहादिकांची आसक्ती न ठेविता, कर्मे करायला भगवान सांगतात असे म्हटले तरी देहादिकांचे ठिकाणी अनासक्त असलेली बुद्धी परमेश्वराच्या सत्यत्वाचा व देहादिकांच्या मिथ्यत्वाचा निश्चय करून, ती बुद्धी देहादिकांची आसक्ती सोडू शकते व देहादिकांची आसक्ती सोडणारी बुद्धी परमेश्वराचे ठिकाणी स्थिर होते. एवंच कोणत्याही रीतीने पाहिले तरी ''योग'' या शब्दाचा अर्थ 'परमेश्वराचे ठिकाणी बुद्धीची स्थिती' असाच होतो.

कर्मयोगाचे अनुष्ठानात ''योगस्थः कुरु कर्माणि'' असे म्हटले आहे. ''योग'' या शब्दाचा अर्थ कर्माचरण करणे एवढाच जर घेतला तर ''योगस्थः कुरु कर्माणि'' या पदाचा अर्थ कर्माचे ठिकाणी स्थिर राहून कर्म कर, असा होतो. पण कर्मस्थ राहून कर्म कर या म्हणण्यात नुसती पुनरुक्ती होते व ''दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगात् धनंजय'' ह्या पुढील श्लोकात कर्मयोगापेक्षा नुसते कर्म करणे अत्यंत कनिष्ठ आहे, म्हणजे तसे कर्माचरण कर्मयोगाचे आचरण नव्हे. असे स्पष्ट सांगितले आहे. परमेश्वराचे ठिकाणी बुद्धी स्थिर न करता नुसते कर्म करणारा कर्मयोगी होऊ शकत नाही. कारण कर्मयोगाचेही मोक्ष हेच फळ आहे व ते मोक्षफळ केवळ कर्माने मिळत नाही. उलट तसे कर्माचरण बंधनकारक म्हणजे संसार देणारे होते, असे भगवंतांनीच स्पष्ट केले आहे.

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनञ्जय। बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः॥ ४९॥
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते। तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्॥ ५०॥

अर्थ—बुद्धियुक्त होऊन केलेल्या कर्मापेक्षा बुद्धियोगावाचून केलेले कर्म फार कनिष्ठ आहे. कर्मफलाचे निमित्त होणारे पुरुष दरिद्री होत. म्हणून अर्जुना! तू बुद्धियुक्त होऊन कर्म कर.॥ ४९॥ बुद्धियुक्त झालेला पुरुष पापपुण्याने लिप्त होत नाही. म्हणून समचित्त होऊन राहा, किंवा परमेश्वराचे ठिकाणी चित्त ठेवून रहा. बरे किंवा वाईट कोणतेही कर्म होत असताना समचित्त असणे हेच कर्म बंधनकारक होऊ न देण्यातील कौशल्य आहे.॥ ५०॥

अर्जुना समत्व चित्ताचें। तेंचि सार जाण योगाचें। जेथ मना आणि बुद्धीचें। ऐक्य आथी॥ २७३॥
तो बुद्धियोग विवरितां। बहुतें पाडें पार्था। दिसे हा अरुता। कर्मयोगु॥ २७४॥
परी तेंचि कर्म आचरिजे। तरीच हा योगु पाविजे। जें कर्मशेष सहजें। योगस्थिति॥ २७५॥
म्हणोनि बुद्धियोगु सधरु। तेथ अर्जुना होईं स्थिरु। मनें करीं अव्हेरु। फळहेतूचा॥ २७६॥
जे बुद्धियोगा योजिले। तेचि पारंगत जाहले। इहीं उभय संबंधीं सांडिले। पापपुण्यीं॥ २७७॥

अर्थ—अर्जुना! पापपुण्य, सुखदुःख इत्यादि द्वंद्वात न सापडता चित्त त्याविरहित राहणे याला चित्ताचे समत्व म्हणतात व हे चित्ताचे समत्वच योगबुद्धीचे मर्म आहे. कारण या योगाने मन व बुद्धीचे ऐक्य होते.॥ २७३॥ या बुद्धियोगाचा विचार जर केला तर अर्जुना! नुसते कर्म करणे हे त्याच्याशी तुलनेत फार कमी दर्जाचे आहे असे दिसून येते.॥ २७४॥ पण बुद्धियोग कर्माचरणानेच प्राप्त होतो कारण योग हा कर्माचेच अंग आहे.॥ २७५॥ म्हणून नुसते कर्म करण्यापेक्षा बुद्धियोगस्थ राहून कर्म करणे श्रेष्ठ असल्यामुळे तेथे स्थिर राहून व कर्मफळाची इच्छा सोडून कर्मे कर.॥ २७६॥ बुद्धियोगाचे ठिकाणी जे स्थिर झाले तेच संसारसमुद्राच्या पार झाले, असे समज. कारण इहलोक व परलोक या दोहोंची प्राप्ती करून देणारे जे पापपुण्य त्याचा संबंधच या बुद्धियोगाने सुटतो.॥ २७७॥

गूढार्थदीपिका—सार जाण योगाचें

सुखदुःख, लाभालाभ यांना सोडून चित्त राहिले म्हणजे ते सम होते. पण हे समत्वच ब्रह्म असल्यामुळे, चित्ताचे समत्व म्हणजे चित्ताने ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर होणेच होय. हे वर सांगितलेच आहे. आणि पुढे ५ व्या अध्यायामध्ये ''**निर्दोषं हि समं ब्रह्म**'' (अ० ५ श्लो० १९) सम म्हणजे ब्रह्म असा भगवंतांनीच स्पष्टार्थ केला आहे. असे चित्त ब्रह्माचे ठिकाणी स्थिर झाले असता त्यालाच समाधी म्हणतात. या समाधिस्थितीत जीवाची वृत्तिरूपता सुटून जाते व वृत्तिरूपता सुटली की पापपुण्याची जाणीव व त्याचे कर्तृत्वही राहत नाही, असा

जीव अनायासे मुक्त होतो. बुद्धियोगात सगुण भगवंताचे ठिकाणी कर्मसमर्पणद्वारा भगवंताचे ध्यान घडून बुद्धी स्थिर होत जाते. निर्गुण स्वरूपाप्रमाणे भगवंताचे सगुण स्वरूपही सम व व्यापकच असल्यामुळे, समत्वरूपी योग सगुणाचे ठिकाणीही साधतो.

"**योगः कर्मसु कौशलम्**" ही योगाची व्याख्या नसून योगात कर्माचे बंधकत्व नाहीसे करण्याचे कौशल्य आहे एवढेच दाखविले आहे.

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः। जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम्॥ ५१॥
यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति। तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च॥ ५२॥
श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला। समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि॥ ५३॥

अर्थ—बुद्धियुक्त झालेले ज्ञानी पुरुष कर्मापासून उत्पन्न होणारे फल टाकून देऊन जन्ममरणापासून सुटतात व अखंड दुःखरहित अशा परमपदाला प्राप्त होतात. ॥ ५१ ॥ अर्जुना! मोहाने व्याप्त झालेली तुझी बुद्धी मोहरहित किंवा अविवेकरहित होईल तेव्हा आतापर्यंत ऐकलेले व ऐकण्याचे राहिलेले या सर्वांचाच तुला वीट येईल. ॥ ५२ ॥ श्रुतीतील अनेक साधने व त्यांची फळे यांची वर्णने ऐकून गांगरलेली तुझी बुद्धी जेव्हा समाधीचे ठिकाणी स्थिर होईल तेव्हाच तुला योगाची प्राप्ती होईल. ॥ ५३ ॥

ते कर्मी तरी वर्तती। परी कर्मफळा नातळती। आणि यातायाती लोपती। अर्जुना तयां॥ २७८॥
मग निरामयभरित। पावती पद अच्युत। ते बुद्धियोगयुक्त। धनुर्धरा॥ २७९॥
तूं ऐसा तैं होसी। जैं मोहातें यया सांडिसी। आणि वैराग्य मानसीं। संचरेल॥ २८०॥
मग निष्कळंक गहन। उपजेल आत्मज्ञान। तेणें निचाडें होईल मन। अपैसें तुझें॥ २८१॥
तेथ आणिक कांहीं जाणावें। कां मागिलातें स्मरावें। हें अर्जुना आघवें। पारुषेल॥ २८२॥
इंद्रियांचिया संगती। जियें पसरु होतसे मती। ते स्थिर होईल मागुती। आत्मस्वरूपीं॥ २८३॥
समाधिसुखीं केवळ। जैं बुद्धि होईल निश्चळ। तैं पावसी तूं सकळ। योगस्थिति॥ २८४॥

अर्थ—जे पुरुष योगयुक्त असतात ते कर्म करतात, पण कर्माचे फळाची इच्छा मात्र करीत नाहीत, म्हणून त्यांचे संसारात येणे जाणे नाहीसे होते. ॥ २७८ ॥ आणि ते अर्जुना! अत्यंत दुःखरहित व पतनरहित अशा परमपदाला प्राप्त होतात. ॥ २७९ ॥ जेव्हा तू या शोकापासून मुक्त होशील तेव्हा तूही तसा योगयुक्त होशील, मग तुझे मन विषयवैराग्याने संपन्न होईल. ॥ २८० ॥ मग त्या वैराग्याने अत्यंत शुद्ध व तर्कातीत असे आत्मज्ञान प्राप्त होईल व त्या आत्मज्ञानाने विषयसुखाची इच्छा निःशेष नाहीशी होईल. ॥ २८१ ॥ त्याचप्रमाणे अर्जुना! मग काही जाणण्याची इच्छा किंवा काही स्मरण्याची इच्छाही नाहीशी होईल. ॥ २८२ ॥ इंद्रियांचे संगतीमुळे जी आपली मती नाना विषयांकडे बहुरूप होऊन धावते ती आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर होईल. ॥ २८३ ॥ अशा रीतीने केवळ समाधीतच जेव्हा बुद्धी स्थिर होईल तेव्हा तुला पूर्ण योगस्थिती प्राप्त होईल. ॥ २८४ ॥

गूढार्थदीपिका—पावसी तूं सकळ। योगस्थिति

मागे "योगस्थः कुरु कर्माणि" योगस्थ राहून कर्म कर व

सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते।

सिद्धी व असिद्धी यांचे ठिकाणी सम होऊन म्हणजे आपला जयच झाला पाहिजे किंवा पराजय होऊ नये अशी कोणतीही इच्छा न धरता जय पराजय हे दोन्ही सारखेच मानून कर्म करणे या समबुद्धीला योग म्हणतात असे भगवंतांनी सांगितले. आता अशी समबुद्धी कोणत्या दशेत राहते हे आम्ही वर भगवंताचे वचन संगतीने स्पष्ट केले आहे. भगवानही पुनः येथे स्पष्ट करतात. समाधी म्हणजे सम अशा आत्मस्वरूपाचे ठिकाणी बुद्धी निश्चल झाली की योग म्हणजे आत्मैक्य प्राप्त होते व अखंड निश्चल अशा आत्मतत्वाचे ठिकाणी बुद्धी स्थिर करून कर्म केले असता बुद्धीही सम होते आणि सिद्धी असिद्धी यांचेकडे ती लक्षच देत नाही. सम अशा आत्मस्वरूपाचे ठिकाणी बुद्धी निश्चल झाल्याखेरीज सुखदुःख, लाभालाभ सम होत नाहीत.

अर्जुन उवाच

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव। स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम्॥ ५४॥

अर्थ—अर्जुन म्हणाला, ज्याचे चित्त परमेश्वराचे ठिकाणीच राहते अशा स्थिरचित्त किंवा समाधिस्थ पुरुषाची भाषा कोणती असते? असा स्थिरचित्त पुरुष काय बोलतो? कसा बसतो? व कसा चालतो?॥ ५४॥

तेथ अर्जुन म्हणे देवा। हाचि अभिप्रावो आघवा। मी पुसेन आतां सांगावा। कृपानिधी॥ २८५॥
मग अच्युत म्हणे सुखें। जें किरीटी तुज निकें। तें पूस पां उन्मेखें। मनाचेनि॥ २८६॥
या बोला पार्थें। म्हणितलें सांग पां श्रीकृष्णातें। काय म्हणिपे स्थितप्रज्ञातें। वोळखों केवीं॥ २८७॥
आणि स्थिरबुद्धि जो म्हणिजे। तो कैसिया चिन्हीं जाणिजे। जो समाधिसुख भुंजे। अखंडित २८८॥
तो कवणें स्थिती असे। कैसेनि रूपीं विलसे। देवा सांगावें हें ऐसें। लक्ष्मीपती॥ २८९॥
तंव परब्रह्म अवतरणु। जो षड्गुणाधिकरणु। तो काय तेथ नारायणु। बोलतु असे॥ २९०॥

अर्थ—तेव्हा अर्जुन देवाला म्हणाला हे कृपानिधे देवा! आता आपल्या म्हणण्याचा जो अभिप्रेत अर्थ असेल तो स्पष्ट होण्याकरिता जे काही मी विचारणार आहे ते आपण स्पष्ट करून सांगावे.॥ २८५॥ भगवान श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना! जे काय तुला विचारावेसे वाटेल ते खुशाल आनंदाने विचार.॥ २८६॥ भगवान् श्रीकृष्णाचे हे बोलणे ऐकून अर्जुन म्हणतो, देवा! स्थितप्रज्ञ पुरुष जो आपण म्हणता तो कसा ओळखावा हे सांगा॥ २८७॥ आणि ज्याची बुद्धी स्थिर झाली व जो अखंड समाधिसुख भोगतो तो कोणत्या चिन्हावरून तसा ओळखता येतो?॥ २८८॥ तो कोणत्या स्थितीत असतो, त्याचे रूप कसे असते? हे सर्व भगवंता! स्पष्ट सांगावे.॥ २८९॥ हे अर्जुनाचे म्हणणे ऐकून षड्गुणैश्वर्यसम्पन्न व साकार परब्रह्म भगवान् श्रीकृष्ण काय बोलता झाला ते ऐक.॥ २९०॥

गूढार्थदीपिका—परब्रह्म अवतरणु""""षड्गुणाधिकरणु

''परब्रह्म अवतरण व षड्गुणाधिकरण'' या दोन पदांनी श्रीज्ञानेश्वर महाराजांनी श्रीकृष्ण अवतार म्हणजे पूर्ण ब्रह्माचा यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य या सहा प्रकारच्या पूर्ण ऐश्वर्याला आधार होऊन झालेला पूर्ण अवतार होय असे स्पष्ट केले आहे. श्रीज्ञानेश्वर महाराज श्रीकृष्णस्वरूपाला कसे मानतात हे यावरून दिसून येण्याजोगे आहे.

श्रीभगवानुवाच

प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान्। आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते॥ ५५॥

अर्थ—जेव्हा पुरुष आपल्या अंतःकरणातील संपूर्ण विषयसुखाची वासना सोडून देतो व आपल्या आत्मस्वरूपाचे ठिकाणी चित्त स्थिर करण्यात आनंद मानतो तेव्हा त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात.॥ ५५॥

म्हणे अर्जुना परियेसीं। जो हा अभिलाषु प्रौढ मानसीं। तो अंतराय स्वसुखेंसी। करीत असे॥ २९१॥
जो सर्वदा नित्यतृप्तु। अंतःकरण भरितु। परी विषयामाजीं पतितु। जेणें संगें कीजे॥ २९२॥
तो कामु सर्वथा जाये। जयाचें आत्मतोषीं मन राहे। तोचि स्थितप्रज्ञु होये। पुरुष जाणें॥ २९३॥

अर्थ—भगवान् म्हणतात—अर्जुना! ऐक. आपल्या अंतःकरणात विषयाचे सुख भोगण्याची जी दृढ इच्छा असते, तीच आपल्या आत्मसुख भोगण्याच्या आड येते.॥ २९१॥ वास्तविक पाहता जीवात्मा नित्य सुखस्वरूप असल्यामुळे तो नित्यतृप्तच आहे, कारण ते आत्मसुख त्याच्या अंतःकरणातही भरून आहे. पण या विषयसुखाचे वासनेमुळे विषयात आसक्त होतो.॥ २९२॥ ही विषयसुखाची वासना निःशेष नाहीशी होऊन ज्या पुरुषाचे मन आत्मसुखातच तल्लीन राहते, तो पुरुष स्थितप्रज्ञ होय, असे जाण.॥ २९३॥

गूढार्थदीपिका—तोचि स्थितप्रज्ञु होय। पुरुष जाणें

या श्लोकात स्थितप्रज्ञ किंवा ज्ञानी पुरुषाचे एक लक्षण सांगितले आहे. ते लक्षण म्हणजे ज्याचे चित्तातून विषयसुखाची वासना निःशेष नाहीशी झाली, तो स्थितप्रज्ञ होय. 'वासना' शब्द क्षणिक विषयसुखाचे इच्छेसच बहुधा लावला जातो. क्षणिक सुखाची वासना नाहीशी झाली की आत्मसुख प्रगट होते व स्थितप्रज्ञ पुरुष आत्मसुखानेच

सदा संतुष्ट असतो. अज्ञानी लोकांचे दृष्टीने स्थितप्रज्ञ पुरुष प्रारब्धानुसार विषय भोगताना दिसले तरी अज्ञानी पुरुषाचे चित्त जसे विषयभोगाचे वेळी विषयाकार होते, तसे स्थितप्रज्ञपुरुषांचे चित्त विषयभोगतानाही विषयाकार होत नाही. त्यांचे चित्त भगवदाकारच राहते व ते भगवत्सुखच भोगतात. कारण कर्मयोगाने अखंड भगवंताचे ठिकाणीच त्याचे चित्त जडत जाते व म्हणूनच ते क्रमाक्रमाने स्थितप्रज्ञ होतात.

तुकाराम महाराज म्हणतात.

"विषय तो त्यांचा झाला नारायण"

त्यांच्या सर्व इंद्रियांचा व मनाचा विषय नारायणच झालेला असतो, श्रीएकनाथ महाराज म्हणतात.

"मुक्तींमाजी विशेषु कायी। वृत्ति निर्विषय असे पाही। भक्तांसी सर्व कर्माचे ठायीं। स्फुरण नाही विषयांचे॥ ६६२॥
भक्तांचे विषयीं नाहीं चित्त। त्यांचा विषय मी भगवंत। ते सदा मजमाजीं लोलुप्त। नित्यमुक्त या लागीं"॥ ६६३॥

(ए० भा० अ० ११)

सारांश ज्ञानी भगवद्भक्ताला अखंड सगुण भगवंताचीच स्फूर्ती असते. म्हणून त्याचे मन विषयाकार होतच नाही व विषयसुखाची वासनाही होत नाही. ते अखंड आत्मसुखातच तल्लीन असतात.

दु:खेष्वनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह: । वीतरागभयक्रोध: स्थितधीर्मुनिरुच्यते॥ ५६॥

अर्थ—दु:ख प्राप्त झाले असता ज्यांचे चित्त खिन्न होत नाही, ज्यांना सुख प्राप्त व्हावे अशी इच्छा नसते व ज्यांच्या चित्तातून विषयसुखाची इच्छा, भय, क्रोध हे विकार नाहीसे झाले असून, ज्यांचे चित्त परमेश्वराचे ठिकाणी स्थिर झाले आहे त्यांना मुनी म्हणतात.॥ ५६॥

नाना दु:खीं प्राप्तीं। जयासी उद्वेगु नाहीं चित्तीं। आणि सुखाचिया आर्ती। अडपैजेना॥ २९४॥
अर्जुना तयाच्या ठायीं। कामक्रोधु सहजें नाहीं। आणि भयातें नेणें कंहीं। परिपूर्णु तो॥ २९५॥
ऐसा जो निरवधि। तो जाण पां स्थिरबुद्धि। जो निरसूनि उपाधि। भेदरहितु॥ २९६॥

अर्थ—अर्जुना! नाना प्रकारची दु:खे प्राप्त झाली असता ज्याच्या मनात खिन्नता उत्पन्न होत नाही आणि जो सुख प्राप्त व्हावे अशा आशेत अडकून पडत नाही.॥ २९४॥ अर्जुना! त्या स्थितप्रज्ञ पुरुषाचे ठिकाणी स्वाभाविकच काम क्रोध म्हणजे विषयाची इच्छा नसते व विषयाची इच्छा विफल झाली तरी त्याला क्रोधही येत नाही, असा तो स्थितप्रज्ञ पुरुष भयरहित परिपूर्ण आत्मस्वरूप होऊन राहतो.॥ २९५॥ अशी ही ज्याची स्थिती अविनाशी असते व जो उपाधिरहित झाल्यामुळे ज्याला भेद मुळीच दिसत नाही, तो स्थितप्रज्ञ होय असे जाण.॥ २९६॥

य: सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम्। नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥ ५७॥
यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वश:। इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥ ५८॥

अर्थ—ज्याचे कोठेही प्रेम नसते आणि प्रारब्धबलाने जे जे सुखदु:ख प्राप्त होईल त्याचा आनंद किंवा द्वेषही करीत नाही, अशा पुरुषाची प्रज्ञा म्हणजे बुद्धी स्थिर झाली असे समज.॥ ५७॥ ज्याप्रमाणे कासव आपले हातापायादि अंगे सहजच आवरून घेतो, त्याप्रमाणे ज्या पुरुषाची इंद्रिये आपआपल्या विषयापासून सहज परावृत्त होतात. त्याचे चित्त स्थिर झाले असे समज.॥ ५८॥

जो सर्वत्र सदा सरिसा। परिपूर्ण चंद्रु कां जैसा। अधमोत्तम प्रकाशा-। माजीं न म्हणे॥ २९७॥
ऐसी अनवच्छिन्न समता। भूतमात्रीं सदयता। आणि पालटु नाहीं चित्ता। कवणे वेळे॥ २९८॥
गोमटें कांहीं पावे। तरी संतोषें तेणें नाभिभवे। जो ओखटेनि नागवे। विषादासी॥ २९९॥
ऐसा हरिखशोकरहितु। जो आत्मबोधभरितु। तो जाण पां प्रज्ञायुक्तु। धनुर्धरा॥ ३००॥
कां कूर्म जियापरी। उवाइला अवेव पसरी। ना इच्छावशें आवरी। आपुले आपण॥ ३०१॥
तैसीं इंद्रियें आपैतीं होती। जयाचें म्हणितलें करिती। तयाची प्रज्ञा जाण स्थिती। पातली असे॥ ३०२॥

अर्थ—पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राचा प्रकाश जसा प्राणिमात्राला मिळतो. तो आपला प्रकाश देताना अधम किंवा

उत्तम असा प्राण्यात भेद करीत नाही, त्याप्रमाणे सर्व भूतमात्रांशी जो सारखा वागतो. ॥ २९७ ॥ ज्याची समदृष्टी काही जीवापुरतीच मर्यादित नसून अमर्याद आहे. यच्चयावत् प्राणिमात्रांचे ठिकाणी जो दयार्द्र असतो व अशा प्रकारचे असलेले ज्यांचे चित्त कधीच विषम होत नाही. ॥ २९८ ॥ मनाजोगे झाले नाही अथवा मनाच्या विरुद्ध झाले म्हणून ज्याचे चित्तात खेद होत नाही. ॥ २९९ ॥ पूर्ण ब्रह्मबोध झाल्यामुळे जो असा हर्ष शोक रहित असतो, तो स्थितप्रज्ञ होय असे अर्जुना! तू जाण ॥ ३०० ॥ कासव ज्याप्रमाणे वाटेल तेव्हा आपले लपविलेले अवयव बाहेर पसरतो व पुनः इच्छेने पोटात लपवितो. ॥ ३०१ ॥ त्याप्रमाणे ज्याची इंद्रिये स्वाधीन असून त्याच्या इच्छेप्रमाणे वागतात, त्याची बुद्धी स्थिर झाली, असे समज. ॥ ३०२ ॥

गूढार्थदीपिका—

"**यः सर्वत्रानभिस्नेहः**" स्थितप्रज्ञपुरुषाचे कोठेही प्रेम नसते या वचनाने भगवंताने संपूर्ण विषयप्रेमाचाच निषेध केला आहे. आत्मप्रेमाचा निषेध केला नाही. विषय कितीही श्रेष्ठ असला तरी खोटा व तुच्छ असल्यामुळे ज्ञान्याला त्याचे प्रेम वाटत नाही. पण आत्मा परमप्रेमरूप असल्यामुळे आत्मप्रेम जसे नाहीसे होत नाही, तसेच सगुण भगवंताचे प्रेमही सगुण भगवान आत्मरूपच असल्यामुळे त्याचे प्रेम ज्ञान्याला असतेच. ज्याला सगुण परमात्म्याचे प्रेम राहणार नाही तो पूर्ण ज्ञानीच नव्हे.

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः। रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते॥ ५९॥

अर्थ—अन्नादि आहार न घेणाऱ्या पुरुषांची इंद्रिये विषयापासून परावृत्त होतात, पण विषयवासना निवृत्त होत नाही. ही विषयवासना ब्रह्मसाक्षात्कारानंतर निवृत्त होते. ॥ ५९ ॥

आतां अर्जुना आणिकही एक। सांगेन ऐकें कवतिक। या विषयांते साधक। त्यजिती नियमें॥ ३०३॥
श्रोत्रादि इंद्रियें आवरिती। परि रसने नियमु न करिती। ते सहस्रधा कवळिजती। विषयीं इंहीं॥ ३०४॥
जैसी वरिवरि पालवी खुडिजे। आणि मुळीं उदक घालिजे। तरी कैसेनि नाशु निपजे। तया वृक्षा॥ ३०५॥
तो उदकाचेनि बळें अधिकें। जैसा आडवेनि अंगें फांके। तैसा मानसीं विषो पोखे। रसनाद्वारें॥ ३०६॥
येरां इंद्रियां विषय तुटे। तैसा नियमूं न ये रस हटें। जें जीवन हें न घटे। येणेंविण॥ ३०७॥
मग अर्जुना स्वभावें। ऐसियाही नियमातें पावे। जैं परब्रह्म अनुभवें। होऊनि जाइजे॥ ३०८॥
तैं शरीरभाव नासती। इंद्रियें विषय विसरती। जैं सोहंभाव प्रतीति। प्रगट होय॥ ३०९॥

अर्थ—अर्जुना! आणखी एक गंमत सांगतो ऐक. जे साधकपुरुष इंद्रिये आवरून विषयांचा त्याग करतात. ॥ ३०३ ॥ श्रोत्रादी इंद्रिये आवरतात व त्यांना विषयाकडे धावू देत नाहीत. पण रसनेन्द्रिय जी जिह्वा तिचे मात्र नियमन करीत नाहीत, ते हजारो प्रकारांनी इंद्रियांच्या व विषयांच्या तडाक्यात जातात. त्यांच्याने विषय जिंकवले जात नाहीत. ॥ ३०४ ॥ ज्याप्रमाणे झाडाची वरवर छाटणी करून त्यांच्या मुळाशी पाणी घातले असता ते कसे नाश पावेल बरे? ॥ ३०५ ॥ त्याला जसजसे पाणी मिळते तसतसे ते आणखी चौफेर पाने फुटून वाढते. त्याप्रमाणे रसनेंद्रियाचे द्वारा मनाला पुष्टी मिळून मनात सतत विषयाचे ध्यान बळावते. ॥ ३०६ ॥ असे असले तरी इतर इंद्रियांचे विषयसेवन जसे तोडता येते, तसे रसनेंद्रियाचा विषय सर्वथा तोडू नये. कारण त्यावाचून जिवंतच राहता येणार नाही. (जिवंत राहिल्यासच ज्ञानप्राप्ती होऊ शकते असा भाव) ॥ ३०७ ॥ अर्जुना! जेव्हा साधक अनुभवाने परब्रह्मस्वरूप होऊन जातो तेव्हा रसनेंद्रियाच्या विषयाचेही नियमन होत असते. ॥ ३०८ ॥ जेव्हा मी ब्रह्म आहे अशी प्रतीती मनात ठसते, तेव्हा मग शरीरभाव किंवा मी म्हणजे देह, हा बुद्धीचा शरीरभाव नाहीसा होतो व ही देहबुद्धी नाहीशी झाली की इंद्रियांना विषयांचा विसरच पडतो. ॥ ३०९ ॥

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः। इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः॥ ६०॥

अर्थ—हे अर्जुना! इंद्रिये फार बलवान आहेत; कारण मन आवरण्याचा प्रयत्न करणाऱ्या ज्ञानी पुरुषाचे मन देखील ही इंद्रिये बलात्काराने आपल्या स्वाधीन करतात. ॥ ६० ॥

येऱ्हवीं तरी अर्जुना। हें आया नये साधना। जे जे राहाटताती जतना। निरंतर॥ ३१०॥
जयातें अभ्यासाची घरटी। यमनियमांची ताटी। जे मनातें सदा मुठी। धरूनि आहाती॥ ३११॥
तेही किजती कासाविसी। या इंद्रियांची प्रौढी ऐसी। जैसी मंत्रज्ञातें विवसी। भुलवी कां॥ ३१२॥
देखें विषय हे तैसे। पावती ऋद्धिसिद्धीचेनि मिषें। मग आकळिती स्पर्शें। इंद्रियांचेनी॥ ३१३॥
तिये संधीं मन जाये। मग अभ्यासीं ठोठावलें ठाये। ऐसें बळकटपण आहे। इंद्रियांचें॥ ३१४॥

अर्थ—अर्जुना! आपण पाहू गेलो तर हा इंद्रियांचा निग्रह कोणत्याही साधनाने साधत नाही. जे साधक इंद्रियांच्या निग्रहाचे जतन करण्याकरिता सारखा अहर्निश प्रयत्न करतात.॥ ३१०॥ ज्यांच्या ठिकाणी इंद्रियांच्या निग्रहाचा अभ्यास सारखा गस्त घालीत असतो, ज्यांनी आपल्या सभोवार यमनियमांचे कुंपण घातले आहे आणि अशा रीतीने मनाला आपल्या मुठीत धरून ठेवण्याचा जे प्रयत्न करतात, असे पुरुष देखील, ज्याप्रमाणे धनावर असलेले पिशाच्च मांत्रिकालाही भ्रम उत्पन्न करिते, त्याप्रमाणे इंद्रियांकडून व्याकुळ केले जातात. अशी ही इंद्रिये बलवान आहेत॥ ३११-३१२॥ पहा! ऋद्धिसिद्धीच्या योगाने विषय प्राप्त होतात व अशा रीतीने प्राप्त झालेल्या त्या विषयांचा व इंद्रियांचा संबंध झाला की, मन त्या विषयाकरिता व्याकुळ होते.॥ ३१३॥ अशा रीतीने इंद्रिये व विषय यांच्या संधीत मन सापडते व मग त्या मनाकडून अभ्यास होत नाही, ते अडून बसते. असा हा मनावर इंद्रियांचा जबरदस्त पगडा आहे.॥ ३१४॥

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः। वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥ ६१॥

अर्थ—जो सर्व इंद्रियांना विषयांपासून आवरून माझे ठिकाणी मन एकाग्र करतो व मीच पूर्ण परमात्मा आहे असे जाणून हृदयात माझे ध्यान करतो, अशा रीतीने ज्यांनी आपली इंद्रिये आपल्या स्वाधीन करून ठेविली त्यांची बुद्धी स्थिर झाली असे जाणावे.॥ ६१॥

म्हणोनि आइकें पार्था। यांतें निर्दळी जो सर्वथा। सर्व विषयीं आस्था। सांडूनियां॥ ३१५॥
तोचि तूं जाण। योगनिष्ठेसि कारण। जयाचें विषयसुखें अंतःकरण। झकवेना॥ ३१६॥
जो आत्मबोधयुक्तु। होऊनि असे सततु। जो मातें हृदयाआंतु। विसंबेना॥ ३१७॥
एऱ्हवीं बाह्य विषय तरी नाहीं। परी मानसीं होईल जरी कांहीं। तरी साद्यंतुचि हा पाहीं। संसारु असे॥ ३१८॥
जैसा कां विषाचा लेशु। घेतलियां होय बहुवसु। मग निभ्रांत करी नाशु। जीवितासि॥ ३१९॥
तैसी या विषयांची शंका। मनीं वसती देखा। घातु करी अशेखा। विवेकजाता॥ ३२०॥

अर्थ—म्हणून अर्जुना! ऐक, सर्व विषयांच्या सुखाची इच्छा सोडून देऊन किंवा विषयात सुख आहे ही खोटी बुद्धी सोडून देऊन, जो कोणी या इंद्रियांच्या विषयप्रवृत्तीचा नाश करून इंद्रियांचाच नाश करतो.॥ ३१५॥ अर्जुना! ज्याचे चित्त विषयसुखाने मोह पावत नाही, असा पुरुष योगनिष्ठेला योग्य असतो, असे तू जाण.॥ ३१६॥ जो पुरुष योगयुक्त असतो, तो अखंड आत्मबोधयुक्त असतो आणि आपल्या हृदयामध्ये मी जो परमेश्वर, त्या मला कधी विसरत नाही.॥ ३१७॥ एऱ्हवी बाहेर विषयांचा संबंध सुटला असला, पण अंतःकरणात जर का थोडी तरी विषयसुखाची इच्छा असली, तर मात्र संपूर्ण संसारच त्याच्या ठिकाणी आहे, असे समज. (काही एक त्याचे सुटले नाही असा भाव)॥ ३१८॥ ज्याप्रमाणे विषाचा एक थेंब जरी पोटात गेला तरी तो सर्व शरीरभर पसरतो व निश्चित मृत्यू येतो.॥ ३१९॥ त्याप्रमाणेच विषयात सुख असावे अशी शंका जरी मनात राहिली तरी देखील संपूर्ण विवेक नाहीसा होतो.॥ ३२०॥

गूढार्थदीपिका—

या सर्व श्लोकातून व ओव्यांतून भगवंतांनी व श्रीज्ञानेश्वर माऊलींनी ज्यांची विषयसुखाची वासना निःशेष सुटली व ज्याची इंद्रिये सर्वस्वी स्वाधीन झाली किंवा जो इंद्रियांच्या कधीच स्वाधीन होऊन वागत नाही, तोच पुरुष स्थितप्रज्ञ होय हेच सांगितले आहे. पुढे थोडी देखील विषयसुखाची वासना राहिल्यास पुरुष परमार्थप्राप्तीस कसा दुरावतो हे सांगितले आहे.

ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते। सङ्गात्सञ्जायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते॥ ६२॥

क्रोधाद्भवति सम्मोहः सम्मोहात्स्मृतिविभ्रमः। स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति॥ ६३॥

अर्थ—विषयात सुख आहे असे मनाला जोपर्यंत वाटते तोपर्यंत विषयाचे ध्यान असते. विषयाचे ध्यानाने विषयाशी संबंध येतो. विषयसंगाने विषयभोगाची वासना उत्पन्न होते. त्या वासनेपासून क्रोध उत्पन्न होतो. ॥ ६२॥ क्रोधाने मनाचा विवेक नाहीसा होतो. विवेक नाहीसा झाला की माझी स्मृती राहत नाही किंवा परमेश्वराचा विसर पडतो, परमेश्वराचा विसर पडला की बुद्धीचाच नाश होतो व बुद्धिनाशापासून मरण येते. ॥ ६३॥

जरी हृदयीं विषय स्मरती। तरी निसंगाही आपजे संगती। संगें प्रगटे मूर्ति। अभिलाषाची॥ ३२१॥
जेथ कामु उपजला। तेथ क्रोधु आधींचि आला। क्रोधीं असे ठेविला। संमोह जाणें॥ ३२२॥
संमोहा जालिया व्यक्ति। तरी नाशु पावे स्मृति। चंडवातें ज्योति। आहत जैसी॥ ३२३॥
कां अस्तमानीं निशी। जैसी सूर्यतेजातें ग्रासी। तैसी दशा स्मृतिभ्रंशीं। प्राणियांसी॥ ३२४॥
मग अज्ञानांध केवळ। तेणें आप्लविजे सकळ। तेथ बुद्धि होय व्याकुळ। हृदयामाजीं॥ ३२५॥
जैसें जात्यंधा पळणी पावे। मग ते काकुळती सैरा धांवे। तैसें बुद्धींसि होती भंवे। धनुर्धरा॥ ३२६॥
ऐसा स्मृतिभ्रंशु घडे। मग सर्वथा बुद्धि अवघडे। तेथ समूळ हें उपडे। ज्ञानजात॥ ३२७॥
चैतन्याच्या भ्रंशीं। शरीरा दशा जैशी। तैशी पुरुषा बुद्धिनाशीं। होय देखें॥ ३२८॥
म्हणोनि आइकें अर्जुना। जैसा विस्फुलिंग लागे इंधना। मग तो प्रौढ जालिया त्रिभुवना। पुरों शके॥ ३२९॥
तैसें विषयांचें ध्यान। जरी विपायें वाहे मन। तरी येसणें हें पतन। गिंवसीत पावे॥ ३३०॥

अर्थ—अर्जुना! विषयाचे स्मरण मनात जरी राहिले तरी देखील निःसंग झालेल्या पुरुषालाही विषयाचा संग होतो आणि विषयाचा संग झाला की तो विषय भोगण्याची इच्छा उत्पन्न होतेच. ॥ ३२१॥ ज्याठिकाणी विषयाची वासना उत्पन्न झाली तेथे क्रोधही असतोच आणि क्रोधामुळे बुद्धी अविवेकसंपन्न होते. ॥ ३२२॥ बुद्धी अविवेकी झाली की ज्याप्रमाणे सोसाट्याच्या वाऱ्यात दिवा राहत नाही, त्याप्रमाणे आत्मस्मृती राहत नाही. ॥ ३२३॥ ज्याप्रमाणे सूर्यास्त होऊन अंधकार झाला असता सूर्याचे तेज लोपले जाते त्याप्रमाणे विवेक—स्मृती नाहीशी झालेल्या प्राण्याची केवळ अविवेकसंपन्न स्थिती होते. ॥ ३२४॥ मग केवळ गडद अंधःकारच असतो. त्यामुळे प्राण्याला काहीच कळत नाही. त्याचे सर्व ज्ञान नष्ट होते व आत हृदयामध्ये बुद्धि ही व्याकुळ म्हणजे सारासार विचाररहित होऊन भ्रमिष्ट व विषय सुखाकरिता कासावीस होते. ॥ ३२५॥ ज्याप्रमाणे जन्मांधाला प्राण घेऊन पळण्याचा प्रसंग आला असता तो दीन होऊन सैरावैरा धावतो त्याप्रमाणे अर्जुना! बुद्धिही भ्रमिष्ट होऊन सैरावैरा धावते. ॥ ३२६॥ याप्रमाणे बुद्धिभ्रंश झाला असता बुद्धीला काहीच सुचत नाही व सर्व ज्ञान नष्ट होते. ॥ ३२७॥ जीवचैतन्य, शरीराला सोडून गेल्यावर जशी देहाची स्थिती होते, तशीच दशा, पुरुषाच्या बुद्धीचा नाश झाला असता होते. ॥ ३२८॥ म्हणून अर्जुना! ऐक. जशी विस्तवाची ठिणगी लाकडाला लागली व तो अग्नी जर धडाडून पेटला, तर त्रिभुवनालाही व्यापतो॥ ३२९॥ तसेच मनात विषयाचे क्वचित सूक्ष्म ध्यान जरी असले तरी पुरुषाचे एवढे पतन होते. ॥ ३३०॥

गूढार्थदीपिका—

या श्लोकांनी व ओव्यांनी श्रीकृष्ण भगवंतांनी व श्रीज्ञानेश्वर माऊलींनी जे सांगितले त्याचे सार हे आहे की मनात विषयसुखाची गोडी यत्किंचित् जरी असली तरी मनुष्याचा आत्मविवेक टिकत नाही विषयसुखाची गोडी हे जोपर्यंत, विषय खरे वाटतात तो पर्यंत नाहीशी होणे शक्य नाही व पतनही चुकत नाही. म्हणून आत्मविवेकाने विषयांचे अस्तित्व खरे नसून काल्पनिक आहे, हेच अंतःकरणात बाणले पाहिजे. तेव्हाच पुरुष स्थितप्रज्ञ होऊ शकतो.

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन्। आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति॥ ६४॥

अर्थ—जो मनुष्य रागद्वेषरहित व स्वाधीन असलेल्या इंद्रियांनी विषय भोगतो व ज्याचे अंतःकरण त्याचे इच्छेप्रमाणेच वागते तो सदा सुखी असतो. ॥ ६४॥

म्हणोनि विषय हे आघवे। सर्वथा मनौनि सांडावे। मग रागद्वेष स्वभावें। नाशतील॥ ३३१ ॥
पार्था आणिकही एक। जरी नाशले रागद्वेष। तरी इंद्रियां विषयीं बाधक। रमतां नाहीं॥ ३३२ ॥
जैसा सूर्य आकाशगतु। रश्मिकरीं जगातें स्पर्शतु। तरी संगदोषें काय लिंपतु। तेथिंचेनि॥ ३३३ ॥
तैसा इंद्रियार्थी उदासीन। आत्मरसेंचि निर्भिन्न। जो कामक्रोधविहीन। होऊनि असे॥ ३३४ ॥
तरी विषयांतुही कांहीं। आपणपेंवांचुनि नाहीं। मग विषय कवण कायी। बाधितील कवणा॥ ३३५ ॥
जरी उदकें उदकीं बुडिजे। कां अग्नि आगी पोळिजे। तरी विषयसंगें आप्लविजे। परिपूर्णु तो॥ ३३६ ॥
ऐसा आपणचि केवळ। होऊनि असे निखळ। तयाची प्रज्ञा अचल। निभ्रांत मानीं॥ ३३७ ॥

अर्थ—म्हणून अर्जुना! आपल्या मनातून विषयांचे अस्तित्व नि:शेष नाहीसे झाले पाहिजे. विषयाचे मनाने मानलेले काल्पनिक अस्तित्व चित्तातून नाहीसे झाले की विषयाविषयीची आवडनावड किंवा रागद्वेष स्वभावत:च नाहीसे होतात. ॥ ३३१ ॥ अर्जुना! येथे आणिक एक गोष्ट सांगण्याजोगी आहे. हे रागद्वेष जर नाहीसे झाले तर विषयामध्ये राहून विषयाशी केलेली क्रीडा, पुरुषाला बाधक होत नाही. ॥ ३३२ ॥ ज्याप्रमाणे आकाशात सूर्य असतो व आपल्या किरणरूपी हाताने सर्व जगातील पदार्थमात्रास स्पर्श करतो तरी त्याला पदार्थाचा संग होतो काय? ॥ ३३३ ॥ त्याप्रमाणे आत्मसुखाशी एकरूप होऊन इद्रियांच्या विषयाचे ठिकाणी जो उदासीन असतो व कामक्रोधविरहित होऊन असतो. ॥ ३३४ ॥ त्याला विषयातही आपल्यावाचून काही दुसरी वस्तु दिसत नसते. विषयातही तो आपल्यालाच पाहतो मग तेथे विषय कुठले आले व ते बाधतील तरी कोणाला? ॥ ३३५ ॥ जर पाण्यातच पाणी बुडेल किंवा अग्नीने अग्नी पोळेल तरच सर्वत्र आत्मस्वरूप पाहणारा पूर्णज्ञानीपुरुष विषयांच्या संगाने बुडविला जाईल. ॥ ३३६ ॥ याप्रमाणे जो सर्वत्र आपणच होऊन राहतो किंवा आपल्यालाच पाहतो त्याची बुद्धी स्थिर झाली हे पक्के समज. ॥ ३३७ ॥

प्रसादे सर्वदु:खानां हानिरस्योपजायते। प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते॥ ६५ ॥

अर्थ—चित्त सदा प्रसन्न असले म्हणजे सर्व दु:खांचा नाश होतो. ज्याचे चित्त सदा प्रसन्न आहे, त्याची बुद्धी एका आत्मस्वरूपाचे ठिकाणीच तात्काळ स्थिर होते. ॥ ६५ ॥

देखें अखंडित प्रसन्नता। आथी जेथ चित्ता। तेथ रिगणें नाहीं समस्तां। संसारदु:खां॥ ३३८ ॥
जैसा अमृताचा निर्झरु। प्रसवे जयाचा जठरु। तया क्षुधेतृषेचा अडदरु। कहींचि नाहीं॥ ३३९ ॥
तैसें हृदय प्रसन्न होये। तरी दु:ख कैचें कें आहे। तेथ आपैसी बुद्धि राहे। परमात्मरूपीं॥ ३४० ॥
जैसा निर्वातीचा दीपु। सर्वथा नेणे कंपु। तैसा स्थिरबुद्धि स्वस्वरूपु। योगयुक्तु॥ ३४१ ॥

अर्थ—आत्मसुखातच अखंड चित्त राहिल्यामुळे नेहमी चित्ताला सुखाचाच अनुभव आल्यास तेथे दु:खाचा प्रवेशच होणे शक्य नाही, म्हणून अशा पुरुषाला कोणतेही संसारदु:ख भासत नाही. ॥ ३३८ ॥ ज्याच्या पोटात अमृताचा झरा आहे किंवा ज्याच्या पोटात अमृत स्रवते त्याला जसे भूक तहान यांचे दु:ख कधीच होणे शक्य नाही. ॥ ३३९ ॥ त्याप्रमाणे ज्याचे चित्त आत्मसुखात तल्लीन आहे अशाला दु:ख कोठे व कसे भासणार? त्याची बुद्धी आपोआपच आत्मस्वरूपाचे ठिकाणीच असते. ॥ ३४० ॥ ज्याप्रमाणे निवाऱ्यात ठेवलेल्या दिव्याची ज्योत हालत नाही, एकसारखी तेवत राहते, त्याप्रमाणे जो योगयुक्त असतो, त्याची बुद्धी आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर असते. ॥ ३४१ ॥

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना। न चाभावयतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम्॥ ६६ ॥

अर्थ—ज्याचे मन व इंद्रिये स्वाधीन नाहीत, त्याची बुद्धी आत्माकार होत नाही व मी पूर्णब्रह्म आहे अशीही त्याची भावना होत नाही मी पूर्ण आहे अशी भावना झाल्याखेरीज चित्ताला शांती मिळत नाही. अशा अशान्त चित्ताला कसे सुख मिळणार? ॥ ६६ ॥

ये युक्तीची कडसणी। नाहीं जयाच्या अंत:करणीं। तो आकळिला जाण गुणीं। विषयादिकीं॥ ३४२ ॥
तया स्थिरबुद्धि पार्था। कहीं नाहीं सर्वथा। आणि स्थैर्याची आस्था। तेही नुपजे॥ ३४३ ॥

निश्चळत्वाची भावना। जरी नव्हेचि देखें मना। तरी शांति केवीं अर्जुना। आपु होय॥ ३४४॥
आणि जेथ शांतीचा जिव्हाळा नाहीं। तेथ सुख विसरोनी न रिगे कहीं। जैसा पापियाचां ठायीं। मोक्षु न वसे॥ ३४५ ॥
देखें अग्निमाजीं घापती। तियें बीजें जरी विरूढती। तरी अशांता सुखप्राप्ती। घडों शके॥ ३४६॥
म्हणोनि अयुक्तपण मनाचें। तेंचि सर्वस्व दु:खाचें। या कारणें इंद्रियांचें। दमन निकें॥ ३४७॥

अर्थ—परमेश्वरस्वरूपाचे ठिकाणी बुद्धी स्थिर करणे हा जो योग किंवा युक्ती आहे, त्या युक्तीचा अभ्यास ज्याच्या चित्ताला नाही तोच विषयसुखाच्या पाशात सापडतो. ॥ ३४२ ॥ अशा पुरुषाचे चित्त कधी स्थिर होत नाही आणि पुढे कधी स्थिर होईल याचीही आशा नसते. ॥ ३४३ ॥ चित्त स्थिर झाले नाही तर शांती तरी कशी प्राप्त होणार ? ॥ ३४४ ॥ ज्याप्रमाणे पापी पुरुषाला मोक्ष कधी मिळत नाही, त्याप्रमाणे ज्याठिकाणी शांतीचा जिव्हाळा नाही तेथे सुखही विसरून देखील राहत नाही. ॥ ३४५ ॥ अर्जुना! अग्नीत टाकलेले बी जर उगवेल तर अशान्त चित्ताला सुख प्राप्त होईल असे समज. ॥ ३४६ ॥ म्हणून सुखस्वरूप आत्म्याचे ठिकाणी चित्त स्थिर न होणे यातच सर्व दु:खाचे बीज आहे. याकरिताच इंद्रियांना विषयापासून आवरून आपल्या स्वाधीन केले पाहिजे. ॥ ३४७ ॥

इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते । तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि॥ ६७॥

अर्थ—पाण्यावर असलेल्या नावेला जसा वायू ओढून नेतो, त्याप्रमाणे विषयाकडे धावणाऱ्या इंद्रियाबरोबर धावणारे मनही बुद्धीला आपल्याबरोबर ओढून नेते. ॥ ६७ ॥

इंद्रियें जें जें म्हणती। तें तेंचि जे पुरुष करिती। ते तरलेचि न तरती। विषयसिंधु॥ ३४८॥
जैसी नाव थडिये ठाकितां। जरी वरपडी होय दुर्वाता। तरी चुकलाही मागौता। अपावो पावे॥ ३४९॥
तैसीं प्राप्तेंही पुरुषें। इंद्रियें लाळिलीं जरी कौतुकें। तरी आक्रमिला जाण दु:खें। सांसारिकें॥ ३५०॥

अर्थ—इंद्रियांना जे जे बरे वाटते तसे तसेच जे पुरुष करतात ते ज्ञानाने आम्ही संसारसमुद्रातून पार झालो असे त्यांना वाटले तरी ते खरोखर संसारसमुद्राचे पार होत नाहीत. ॥ ३४८ ॥ ज्याप्रमाणे तीराला लागू पाहणारी नाव जर वादळात सापडली, तर बुडण्यापासून वांचलेलीही ती पुन: बुडू पाहते. ॥ ३४९ ॥ त्याप्रमाणे प्राप्तपुरुषाने जर आपली इंद्रिये लाडविली व तो त्यांच्याप्रमाणे वागू लागला तर पुन: संसारदु:खांनी दु:खी होतो. ॥ ३५० ॥

तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः । इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥ ६८॥

अर्थ—म्हणून हे महाबाहो अर्जुना! ज्यांनी आपली इंद्रिये विषयापासून पूर्णपणे आवरून आपल्या स्वाधीन केली, त्यांची बुद्धी स्थिर झाली असे समज. ॥ ६८ ॥

म्हणोनि आपुलीं आपणपेयां। जरी ये इंद्रियें येती आया। तरी अधिक कांहीं धनंजया। सार्थक असे॥ ३५१॥
देखें कूर्म जियापरी। उवाइला अवयव पसरी। ना तरी इच्छावशें आवरी। आपणपेंचि॥ ३५२॥
तैसीं इंद्रियें आपैतीं होती। जयाचें म्हणितलें करिती। तयाची प्रज्ञा जाण स्थिती। पातली असे॥ ३५३॥
आतां आणिक एक गहन। पूर्णाचें चिन्ह। अर्जुना तुज सांगेन। परिस पां॥ ३५४॥

अर्थ—म्हणून अर्जुना! आपली इंद्रिये जर आपल्या स्वाधीन झाली तर इंद्रिये स्वाधीन होणे यापेक्षा दुसरे सार्थक काय ? ॥ ३५१ ॥ हे पहा, अर्जुना! ज्याप्रमाणे कासव लपविलेले अवयव इच्छेस वाटेल तेव्हा पसरतो आणि वाटेल तेव्हा लपवितो. ॥ ३५२ ॥ त्याप्रमाणे ज्याची इंद्रिये इतकी स्वाधीन झाली की त्याच्या सर्वस्वी हुकूमात आहेत व त्याला जे वाटेल तेच ती करतात, अशा पुरुषाची बुद्धी स्थिर झाली असे समज. ॥ ३५३ ॥ अर्जुना! आणखी एक पूर्ण झालेल्या पुरुषाचे मुख्य व सर्वात श्रेष्ठ चिन्ह सांगतो ते ऐक. ॥ ३५४ ॥

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी। यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः॥ ६९॥

अर्थ—जी स्थिती सर्व प्राण्यांना रात्रीप्रमाणे आहे म्हणजे जी स्थिती सर्व प्राणी विसरले आहेत, त्या स्थितीचे ठिकाणी मन व इंद्रियांचे निग्रह करणारा पुरुष जागा असतो आणि ज्या स्थितीचे ठिकाणी सर्व प्राणी जागे असतात, ती स्थिती मन व इंद्रिये यांचा निग्रह करणाऱ्या पुरुषाची रात्र असते. म्हणजे तो ती स्थिती नि:शेष विसरतो॥ ६९ ॥

देखें भूतजात निदेलें। तेथेंचि जया पाहलें। आणि जीव जेथ चेइले। तेथ निद्रितु जो॥ ३५५॥
तोचि तो निरुपाधि। अर्जुना तो स्थिरबुद्धि। तोचि जाणें निरवधि। मुनीश्वर॥ ३५६॥

अर्थ—जेथे सर्व जीव निजलेले आहेत तेथे तो जागा असतो आणि जेथे सर्व जीव जागे आहेत तेथे तो निजलेला असतो. ॥ ३५५ ॥ असा पुरुष सर्व उपाधिरहित झाला, त्याचीच बुद्धी परमात्मस्वरूपी स्थिर झाली आणि तोच एक अविनाशीस्वरूप मुनीश्वर होय. ॥ ३५६ ॥

गूढार्थदीपिका—या निशा सर्व भूतानाम्

सर्व जीव जगाला जाणतात. ते जगाचे ठिकाणी जागे आहेत, पण सर्व जगाला अधिष्ठानभूत जे परब्रह्म ते त्यांना दिसत नाही. वास्तविक पाहता मुळात एक सच्चिदानंद परब्रह्मच आहे. दुसरे यत्किंचित् काही नाही. असे असताना सच्चिदानंद परब्रह्माच्या शक्तिस्फुरणाला कर्म किंवा व्यापार आणि शक्तीच्या नामरूपात्मक आविष्काराला जग असे समजून सर्व जीव सच्चिदानंद परब्रह्माला विसरले आहेत आणि नामरूप जगताला परब्रह्माहून निराळी सत्य वस्तू समजून त्याचेच अहोरात्र स्मरण ठेवतात. पण ज्यांनी आपली इंद्रिये व मन स्वाधीन करून, बुद्धीने परब्रह्म जाणले, त्या पुरुषाला परब्रह्माची शक्ती व तिचा नामरूपकर्म या रूपाने झालेला आविष्कार हे सर्व पूर्ण ब्रह्मस्वरूपच आहे असा अनुभव येतो. व त्याचे चित्त येथे स्थिर होऊन पूर्वी नामरूपकर्म ही जगद्वस्तू आहे असे जे वाटत होते त्याचा पूर्ण विसर पडतो. परमेश्वरस्वरूपी ज्याची बुद्धी स्थिर झाली, त्याला सच्चिदानंद परमेश्वरावाचून दुसरी जड विनाशी दु:खरूप अशी वस्तुच दिसत नाही व ज्याला हे परमेश्वर स्वरूपाचे ज्ञान नाही तोच असलेल्या सच्चिदानंद परमेश्वराला विसरून जड, विनाशी, दु:खरूप अशी निराळी जगवस्तू पाहतो असा भाव.

शंका—कोणी या श्लोकाचा असा अर्थ करितात की अज्ञानी लोकांना जे नकोसे वाटते म्हणजे त्यांना जो अंध:कार, ते ज्ञान्याला हवे असते व अज्ञानी लोक ज्यात गुंतलेले असतात-त्यांना जेथे उजेड-तेथे ज्ञान्याला अंध:कार म्हणजे ते ज्ञान्याला नको असते. उदाहरणार्थ-ज्ञानी पुरुष काम्य कर्मे तुच्छ मानतो, तर त्यातच सामान्य लोक राबत असतात आणि ज्ञानी पुरुषाला जे निष्काम कर्म पाहिजे ते इतरास नको असते.

उत्तर—पण आचार्यादिकांनी केलेला अर्थ प्रथम मान्य केल्याशिवाय असा अर्थ करता येत नाही. कारण बुद्धीला जी वस्तू सत्य वाटते तेथे ती जागी राहते किंवा स्थिर होते व तिच्याप्रीत्यर्थच बुद्धी, मन, इंद्रियें वगैरेंचे व्यापार होतात. बुद्धीला जे खोटे वाटते तेथे ती बुद्धी आसक्त न होता तो पदार्थ विसरते. अर्थातच तिच्याप्रीत्यर्थ बुद्धी, मन, इंद्रिये व्यापार करू शकत नाहीत.

मुळात एक अद्वैत परब्रह्मच आहे. अशा परब्रह्माला विसरल्यावाचून व विषय व विषयातील सुख खरे आहे असे समजल्यावाचून विषयसुखाच्या प्राप्तीकरिता कराव्या लागणाऱ्या काम्य कर्मांचे आचरण होणे शक्य नाही. म्हणजे सामान्य अज्ञानी पुरुष प्रथम आत्मस्वरूपाचे ठिकाणी निजलेले म्हणजे आत्मस्वरूपाला विसरलेले व जगाचे ठिकाणी जागे असतात म्हणजे जगाला सत्य समजत असतात, असाच त्याचा अर्थ होतो.

परब्रह्मच सत्य आहे व जगत् खोटे आहे असा ज्याच्या बुद्धीचा निश्चय झाला त्याची बुद्धी परमेश्वराचे ठिकाणी स्थिर होते, किंवा जागी असते व ती जगताचे अस्तित्व ग्रहण करीत नाही. असा पुरुष प्रारब्धानुसार होणारी आपली कर्मे निष्काम चित्ताने परमेश्वरप्रीत्यर्थ करू शकतो. अर्थात निष्कामकर्माचरण करणारे पुरुष प्रथम परब्रह्माचे ठिकाणी जागे असतात व जगाचे ठिकाणी निजलेले असतात, म्हणूनच ते निष्काम कर्माचरण करू शकतात. एऱ्हवी जगताचे अस्तित्व ग्रहण करणाऱ्या बुद्धीकडून निष्काम कर्माचरण घडणे शक्य नाही हे बुद्धीच्या वर दिलेल्या स्वभावावरून सर्वांना अनुभूत आहे.

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत्।
तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे स शान्तिमाप्नोति न कामकामी॥ ७०॥

अर्थ—ज्याप्रमाणे पृथ्वीवरील पाण्यांचे समस्त ओघ समुद्रालाच मिळतात, त्याप्रमाणे ज्या पुरुषांच्या

निरनिराळ्या सुखाच्या वासना त्यांच्या आत्मस्वरूपाच्या ठिकाणी मिळाल्या, त्याला परमशांती प्राप्त होते. निरनिराळ्या विषयसुखाची वासना करणाऱ्याला परमशांती प्राप्त होत नाही. ॥ ७० ॥

पार्था आणीकही परी। तो जाणों येईल अवधारीं। जैसी अक्षोभता सागरीं। अखंडित॥ ३५७॥
जरी सरिताओघ समस्त। परिपूर्ण होऊनि मिळत। तरी अधिक नोहे ईषत्। मर्यादा न संडी॥ ३५८॥
ना तरी ग्रीष्मकाळीं सरिता। शोषूनि जाती समस्ता। परी न्यून नव्हे पार्था। समुद्रु जैसा॥ ३५९॥
तैसा प्राप्तीं ऋद्धिसिद्धी। तयासि क्षोभु नाहीं बुद्धि। आणि न पवतां न बाधी। अधृति तयातें॥ ३६०॥
सांगें सूर्याच्या घरीं। प्रकाशु काय वातीवेरी। कीं न लविजे तरी अंधारीं। कोंडेल तो॥ ३६१॥
देखे ऋद्धिसिद्धि तयापरी। आली गेली से न करी। तो विगुंतला असे अंतरीं। महासुखीं॥ ३६२॥
जो आपुलेंनि नागरपणें। इंद्रभुवनातें पाबळें म्हणे। तो केवीं रंजे पालिवणें। भिल्लांचेनि॥ ३६३॥
जो अमृतासि ठी ठेवी। तो जैसा कांजी न सेवी। तैसा स्वसुखानुभवी। न भोगी ऋद्धि॥ ३६४॥
पार्था नवल हें पाहीं। जेथ स्वर्गसुख लेखनीय नाहीं। तेथ ऋद्धिसिद्धि कायी। प्राकृता होती॥ ३६५॥

अर्थ—अर्जुना! आणखी एका चिन्हावरून स्थितप्रज्ञ पुरुषाला ओळखता येईल पहा. जसा समुद्र नेहमी अक्षुब्ध म्हणजे शांतच असतो, तसा स्थितप्रज्ञ पुरुषही शान्त असतो. ॥ ३५७ ॥ संपूर्ण नद्यांचे पाणी मोठ्या पुराने वाहत जाऊन समुद्रात मिळाले तरी समुद्र यत्किंचित् मर्यादा सोडत नाही व मोठा होत नाही. ॥ ३५८ ॥ किंवा अर्जुना! उन्हाळ्यात नद्यांचे पाणी आटते व पावसाळ्याप्रमाणे समुद्राला नद्यांचे पाणी मिळत नाही तरी त्याची मर्यादा कमी होत नाही. तो सदासर्वदा सारखाच दिसतो. ॥ ३५९ ॥ त्याप्रमाणे ऋद्धिसिद्धी प्राप्त झाल्या असताही ज्याच्या बुद्धीत काही फरक पडत नाही आणि ऋद्धिसिद्धी प्राप्त झाल्या नाहीत म्हणून त्याचे धैर्यही खचत नाही. ॥ ३६० ॥ अर्जुना! सूर्याचे घरी काय वाती लावून प्रकाश करावा लागतो? आणि वाती लावून प्रकाश केला नाही तर तो अंधारात राहील काय? सांग बरे? ॥ ३६१ ॥ पहा, अशाच रीतीने जो स्थितप्रज्ञ पुरुषही ऋद्धिसिद्धी प्राप्त झाल्या किंवा नाहीशा झाल्या इकडे लक्षच देत नाही, तो आत्म्याच्या महासुखात तल्लीन असतो. ॥ ३६२ ॥ जो आपल्या आत्मसंपन्न स्थितीपुढे इंद्राचे स्वर्गसुखही तुच्छ समजतो, त्याला भिल्लाची पर्णकुटी कशी श्रेष्ठ वाटणार? ॥ ३६३ ॥ जो पुरुष अमृत पिण्याकडे दृष्टी ठेवतो, तो ज्याप्रमाणे कांजी पिण्याची इच्छा करीत नाही, त्याप्रमाणे ज्याला आत्मसुखाचा अनुभव आला तो ऋद्धिसिद्धी भोगण्याची कधी इच्छा करीत नाही. ॥ ३६४ ॥ अर्जुना! स्थितप्रज्ञ पुरुषाचे ठिकाणी हे एक नवल असते की, तो आत्मसुखापुढे स्वर्गसुख काही समजत नाही तेथे ऋद्धिसिद्धीला काय किंमत राहणार? ॥ ३६५ ॥

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः। निर्ममो निरहङ्कारः स शान्तिमधिगच्छति॥ ७१॥

अर्थ—जो पुरुष सर्व विषयकामना निःशेष सोडून देऊन विषयसुखाची कधी इच्छाच करीत नाही व ममता व अहंता यानी रहित होऊन राहतो त्याला परमशांती प्राप्त होते. ॥ ७१ ॥

ऐसा आत्मबोधें तोषला। जो परमानंदें पोखला। तोचि स्थिरप्रज्ञु भला। वोळख तूं॥ ३६६॥
तो अहंकारातें दंडुनी। सकळ कामु सांडोनी। विचरे विश्व होऊनि। विश्वाचिमाजीं॥ ३६७॥

अर्थ—याप्रमाणे आत्मज्ञानाने समाधान पावलेला व आत्मसुखाने जो पुष्ट झाला आहे. असा पुरुष स्थितप्रज्ञ होय, हे जाण. ॥ ३६६ ॥ या स्थितप्रज्ञ पुरुषाने अहंकार निःशेष नाहीसा केलेला असतो, त्याची विषयसुखाची इच्छा निःशेष नाहीशी झालेली असते व तो सर्व जगच आपण होऊन जगातच असतो. ॥ ३६७ ॥

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति। स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति॥ ७२॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे साङ्ख्ययोगो नाम द्वितीयोऽध्यायः॥ २॥

अर्थ—अर्जुना! या स्थितीला ब्रह्मस्थिती म्हणतात. ती प्राप्त झाली असता कधीही मोह उत्पन्न होत नाही. या ब्रह्मस्थितीत राहिलेला पुरुष मरणाच्या भयंकर दुःखकाली देखील ब्रह्मस्वरूपच राहतो. ॥ ७२ ॥

हे ब्रह्मस्थिति निःसीम। जे अनुभवितां निष्काम। पातले परब्रह्म। अनायासे॥ ३६८॥
जे चिद्रूपीं मिळतां। देहांतीची व्याकुळता। आड ठाकों न शके चित्ता। प्राज्ञा जया॥ ३६९॥
तेचि हे स्थिति। स्वमुखें श्रीपती। सांगत अर्जुनाप्रती। संजयो म्हणे॥ ३७०॥
ऐसें कृष्णवाक्य ऐकिले। तेथ अर्जुनें मनीं म्हणितलें। आतां आमुचियाचि काजा आलें। उपपत्ती इया॥ ३७१॥
जें कर्मजात आघवें। एथ निराकरिलें देवें। तरी पारुषलें म्यां झुंजावें। म्हणूनियां॥ ३७२॥
ऐसा श्रीअच्युताचिया बोला। चित्तीं धनुर्धरु उवायिला। आतां प्रश्नु करील भला। आशंकोनियां॥ ३७३॥
तो प्रसंगु असे नागरु। जो सकळ धर्मासि आगरु। कीं विवेकामृतसागरु। प्रांतहीनु॥ ३७४॥
जो आपण सर्वज्ञनाथु। निरूपिता होईल श्रीअनंतु। ते ज्ञानदेवो सांगेल मातु। निवृत्तिदासु॥ ३७५॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां द्वितीयोऽध्यायः॥ २॥

अर्थ—या निःसीम ब्रह्मस्थितीचा पूर्ण विषयवासनारहित होऊन ज्यांनी अनुभव घेतला ते अनायासे ब्रह्मस्वरूप होऊन राहतात.॥ ३६८॥ ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेऊन सच्चिदानंदरूप ब्रह्माशी ऐक्य पावताना, देह सोडतेवेळी चित्ताची जी व्याकुळता होते ती चित्ताची व्याकुळता ज्यांना काही एक आड येत नाही. (मरणसमयी स्थितप्रज्ञ पुरुषाचे चित्त व्याकुळ होत नाही व त्याचा ब्रह्मभाव अंतरत नाही असा भाव).॥ ३६९॥ ही ब्रह्मस्थिती भगवान् श्रीकृष्ण आपल्या मुखाने अर्जुनाला सांगत आहेत असे संजय धृतराष्ट्राला म्हणाला.॥ ३७०॥ हे भगवान श्रीकृष्णाचे वाक्य ऐकल्याबरोबर अर्जुन आपल्या मनात म्हणतो. हे सर्व देवाने केलेले ब्रह्मस्थितीचे निरूपण माझ्या पथ्यावर पडले.॥ ३७१॥ कारण या ब्रह्मस्थितीचे निरूपण करताना ब्रह्मस्थितीचे ठिकाणी कर्म मुळीच नाही किंवा ती कर्मकर्ता-विरहित आहे, असे प्रतिपादून देवाने कर्मांचेच खंडन केले आहे, अर्थात् ब्रह्मस्थिती प्राप्त होण्याकरिता युद्धादि कर्म करणे योग्य नाही किंवा युद्ध करू नये असेच सिद्ध होते.॥ ३७२॥ याप्रमाणे श्रीकृष्णाचे बोलणे ऐकून अर्जुनाला संतोष झाला आता पुढे त्याला उत्पन्न झालेल्या शंकेला धरून तो प्रश्न करील.॥ ३७३॥ तो प्रसंग फार बहारीचा आहे व त्यात सर्व धर्मांचे कोठार भरलेले आहे; किंवा तो विवेकरूपी अमृताचा अमर्याद सागरच आहे असे म्हटले तरी चालेल.॥ ३७४॥ हा जो प्रसंग सर्वज्ञांचा स्वामी जो भगवान श्रीकृष्ण सांगणार आहेत तो श्रीनिवृत्तिदास श्रीज्ञानेश्वर महाराज पुढे सांगतील.॥ ३७५॥

गूढार्थदीपिका—सर्वज्ञनाथ

'तत्र हि निरतिशयं सार्वज्ञं बीजम्' या योगसूत्रात व वेदान्तसूत्रातील **'जगद्व्यापारवर्जाधिकरणात'** (सूघ० ४-४-१७) सांगितल्याप्रमाणे परमेश्वर व परमेश्वराचे अवतार यांचे ठिकाणी सर्वज्ञत्वादिक गुण जसे अमर्याद असतात, तसे योगीपुरुष अमर्याद सर्वज्ञ होत नाहीत. त्यांची सर्वज्ञता मर्यादित असते; म्हणून येथे भगवान श्रीकृष्णाला 'सर्वज्ञनाथ' हे विशेषण दिले आहे.

श्रीसद्गुरुमाऊलीच्या कृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या दुसऱ्या अध्यायाचा अनुवाद गूढार्थदीपिकेसह पूर्ण झाला तो सद्गुरुचरणी समर्पण असो.

समारोप

युद्ध झाल्यास त्यात पुढे स्वजनांचा नाश होणार, या दु:खाने व्याकुळ झालेल्या अर्जुनाला श्रीभगवंतांनी या अध्यायापासून तात्विक उपदेश करण्याला सुरुवात केली आहे. स्वकुळात परंपरागत चालत आलेल्या सर्व धर्मांचा स्वजनांच्या वधाने उच्छेद होऊन सर्व कुळाला नरकप्राप्ती होईल व भगवंताची प्राप्तीही अंतरेल, हा युक्तिवाद पुढे मांडून, युद्धापासून परावृत्त होण्यातच लाभ आहे, असे मानणाऱ्या अर्जुनाला भगवान उपदेश करतात. 'अर्जुना! युद्धाला सज्ज हो. तुझ्यासारख्या शूर पुरुषाने युद्धापासून परावृत्त होण्याचा असा भ्याड विचार करणे योग्य नाही युद्धाचे वेळी शत्रूंची दया काय कामाची ?' अशा व्यावहारिक दृष्टीने भगवंताने अर्जुनाला समजावून पाहिले. पण ज्या गुरुजनांपासून आपण विद्या संपादन केली व जे आपल्या कुळातील अत्यंत पूज्य पुरुष समजले गेले, अशा भीष्मद्रोणादिकांवरच शस्त्रांचा वर्षाव करण्याचा हा प्रसंग आहे. व्यावहारिक दृष्टीने हे योग्य होणार नाही, असे अर्जुनाने जेव्हा भगवंताला म्हटले, तेव्हा 'हे तुझे सर्व बोलणे मूर्खपणाचे आहे' असे तिरस्काराने अर्जुनाला बोलून भगवान गप्प बसले.

भगवतांचे हे मौन पाहून अर्जुन भ्याला व दीनपणाने भगवंताला म्हणू लागला की 'भगवंता! मी सर्वस्वी मूढ व त्यातच स्वजनांच्या मोहाने माझे चित्त गांगरून गेले आहे. माझे हित कशात आहे हे समजेनासे झाले आहे. मी तुला शरण आलो आहे. मी तुझा शिष्य आहे. तूच आता माझ्या कल्याणाचे काय आहे ते सांग.' श्रीभगवान् म्हणतात, 'अर्जुना! ज्या गोष्टीचा तू शोक करू नये त्याबद्दल तू शोक करतोस आणि तूच शहाणपणाच्या गोष्टी सांगतोस. शहाणे पुरुष जन्म व मरण किंवा उत्पत्ती व नाश हे दोन्ही भ्रांतीने भासतात असे समजून त्याचा शोक करीत नाहीत ज्याप्रमाणे बाल्य, तारुण्य व जरा ह्या अवस्था शरीराला होतात, पण प्रत्येक अवस्थेतून जाताना शरीराचा नाश होत नाही, त्याप्रमाणे चैतन्याच्या सत्तेवर नानाप्रकारचे देह होतात, जातात असे जाणणाऱ्यास संसाराचा मोह होत नाही. इंद्रियांचे विषयाशी जे संयोग होतात तेच सुखदु:ख देणारे आहेत. विषय हे क्षणभर टिकणारे आहेत, म्हणून त्यांचा त्याग कर व पुन: संग धरू नकोस हा विषयांचा संयोग ज्याच्या चित्ताला दु:ख देत नाही तो अविनाशी ब्रह्माला प्राप्त होतो.'

खऱ्या खोट्याचा निर्णय

खरी वस्तू कोणती व खोटी वस्तू कोणती याचा निर्णय तत्त्व जाणणाऱ्यांनी केला आहे. सत् म्हणजे खरी वस्तू ही अविनाशी असते, म्हणून तिचा अभाव कधी सिद्ध होत नाही. असत् म्हणजे खोटी वस्तू ही विनाशी असते म्हणजे तिचा भाव किंवा अस्तित्व कधी सिद्ध होत नाही. या लक्षणाप्रमाणे सतासताचा विचार केला असता आत्मा व देहादिक जड पदार्थ या दोहोंमध्ये चेतनरूप जीवात्म्याचा अभाव सिद्ध होत नाही, म्हणून तो सत्य आहे व जड देहादिक पदार्थांचा अभाव अनुभवाला येतो, म्हणून ते असत् आहेत. अर्थात् आत्मा व देहादिक जड पदार्थ या दोहोंमध्ये देहादिकांचे जे अस्तित्व भासते किंवा ते आहेत असे जे वाटते ते भ्रातीने किंवा अविचाराने वाटते. अर्थात् जीवात्मा व देहादिक पदार्थ यांचा कांही संबंध नाही. पण जीवात्मा आपले अविनाशी स्वरूप विसरून देहाशी ऐक्य करतो व देहाचे उत्पत्ती-नाश आपले ठिकाणी मानून दु:खी होतो.

व्यावहारिक दृष्टीने विचार

भगवान म्हणतात, अर्जुना! हा ज्ञानदृष्टीचा विचार तुला पटत नसेल तर राहू दे. व्यावहारिक दृष्टीने विचार केला असताही तुला शोक करण्याचे कारण नाही. कारण सर्व सृष्टीतील पदार्थांचे ठिकाणीं उत्पत्ती-नाश यांचा प्रवाह सारखा चालू आहे. उत्पन्न झालेला पदार्थ नाश पावणारच व नाश पावलेला पदार्थ पुन: उत्पन्न होणारच. हे उत्पत्तिनाश कोणालाच चुकत नाहीत. असा जर पदार्थाचा स्वभावच दिसून पडतो, तर त्याबद्दल शोक करणे योग्य होईल काय?

समाजापेक्षा धर्म श्रेष्ठ

बरे, धर्माचे दृष्टीने विचार केला तरी तुला शोक करण्याचे कारण नाही अन्यायाचा प्रतिकार करण्याकरिता किंवा प्रजेला सुखी करण्याकरिता व दुष्ट राजांचा नाश करण्याकरिता युद्ध करणे हा क्षत्रियांचा धर्मच आहे आणि नि:श्रेयस साधण्याकरिताच धर्माची योजना आहे. मग त्या युद्धरूपी धर्माने माझे नि:श्रेयस अंतरेल अशी भीती तुला कां वाटावी?

धर्म हा समाजापेक्षा श्रेष्ठ असल्यामुळे सर्व जगाचा नाश होत असला तरी स्वधर्म सोडता येत नाही; कारण

समाजाचा संबंध इहलोकापुरताच असतो, पण धर्माचा संबंध इहलोक, परलोक व पुनर्जन्म या तिघांशी असून भगवत्प्राप्तीशीही त्याचा संबंध आहे. पुन: विहित धर्म हा समाजाचे धारण करणारा आहे, समाजाचा नाश करणारा नाही.

धर्माचरण नि:श्रेयसाला साधक केव्हा होते?

आपल्या देहाच्या सुखाकरिता ज्या धर्माचे आपण आचरण करितो, त्या धर्माचरणापासून पापपुण्य उत्पन्न होते. व ते भोगण्याकरिता जन्माला यावे लागते. अशाप्रकारे धर्माचरण बंधनकारक होते. पण हे धर्माचरण देहसुखाकरिता न करता केवळ परमेश्वरप्रीत्यर्थ झाले असता त्यापासून पापपुण्य उत्पन्न होत नाहीत व ते भोगण्याकरिता जन्माला यावे लागत नाही.

सांख्यबुद्धी व योगबुद्धी

भगवंतानी अर्जुनाला सांख्यबुद्धी व योगबुद्धी असे बुद्धीचे दोन प्रकार सांगितले आहेत.

१—सांख्यबुद्धी म्हणजे आत्मज्ञान. विचाराने परमेश्वराच्या निर्गुण स्वरूपाचे ठिकाणी बुद्धी स्थिर करणे होय या बुद्धीत मनुष्य सुखदु:खादी कोणत्याही वृत्तीवर आरूढ न होता किंवा त्यांच्याशी ऐक्य न पावता साक्षी होऊन राहतो; म्हणून त्याच्या ठिकाणी प्रारब्धानुसार होणाऱ्या कोणत्याही कर्माचा लेप लागत नाही.

२—योगबुद्धी म्हणजे सगुण परमेश्वराचे ठिकाणी बुद्धी स्थिर करणे होय. सगुण परमात्माही कर्म व कर्तृत्व या विरहित असल्यामुळे त्याचे ठिकाणी स्थिर झालेली बुद्धी ही कर्म व कर्तृत्व यांचा आपल्याशी संबंध वागवीत नाही, म्हणून कर्माचा लेप लागत नाही.

बुद्धियोगाचा अधिकारी

सत्वगुणाचे उत्कर्षाने ज्यांचीं कर्मप्रवृत्ती क्षीण झाली आहे व ज्यांची इंद्रिये वैराग्यामुळे कर्माकडे प्रवृत्त होत नाहीत व जो कर्म व कर्तृत्व यांच्याहून मी निराळा आहे असे आपल्याला जाणतो, अशा ब्राह्मणालाच निर्गुणस्वरूपाच्या प्राप्तीकरिता कर्मसंन्यासनिष्ठा सांगितली आहे.

अर्जुन हा क्षत्रिय होता व क्षत्रियांचे ठिकाणी कर्मप्रवृत्ति अधिक राहते. ज्यांचे ठिकाणी कर्मप्रवृत्ती अधिक आहे, अशा सर्व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्रादिकांकरिता भगवंतांनी अर्जुनाला निमित्त करून कर्मयोगाचा मार्ग गीतेत सांगितला आहे.

व्यवसायात्मिका व अव्यवसायात्मिका बुद्धि

व्यवसायात्मिका बुद्धि म्हणजे सत्य वस्तूचा निश्चय करणारी बुद्धि होय. एक परमेश्वरच सत्य आहे, म्हणून परमेश्वराचा निश्चय करून तेथे स्थिर होणारी व परमेश्वरप्रीत्यर्थच मन, इंद्रियांदिकांचे व्यापार, करणारी बुद्धिच व्यवसायात्मिका म्हटली जाते.

परमेश्वराला विसरून देहादी असत् वस्तूंचा सत्य म्हणून निश्चय करणारी व तिच्या प्रित्यर्थ इंद्रियादिकांचा व्यापार करणारी बुद्धी अव्यवसायात्मिका. व्यवसायात्मिका बुद्धीच परमेश्वरप्राप्तीला कारणीभूत होते. या व्यवसायात्मिका बुद्धीने कर्म करणे यालाच कर्मयोग म्हणतात. ज्यांची व्यवसायात्मिका-बुद्धी परमेश्वरस्वरूपाचे ठिकाणी अढळ झाली त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात.

स्थितप्रज्ञाचे लक्षण

भगवंतांनी अर्जुनाला जी स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगितली त्यांचे संकलन लक्षण असे करतां येईल की नारळ. सुकला असता त्याच्या कवटीवर घातलेले घाव आतील नारळाला जसे लागत नाहीत तसेच व्यवसायात्मिकाबुद्धीने देहाहून निराळा होऊन परमेश्वराचे ठिकाणी स्थिर झालेल्या स्थितप्रज्ञाच्या बुद्धीच्या ठिकाणीही सुखदु:खादी कोणत्याही विकाराचा परिणाम होत नाही व तो परमेश्वरापासून ढळत नाही. ज्ञानी व अज्ञानी यांच्यांत इतकाच भेद आहे की ज्ञानी जगाला विसरतो पण परमेश्वराला कधी विसरत नाही व अज्ञानी परमेश्वराला विसरतो व जगाला कधी विसरत नाही. ही स्थितप्रज्ञस्थिती प्राप्त झाली असता मरणकाली देखील बुद्धी मोह न पावता ब्रह्माशीच ऐक्य पावते.

श्रीमद्‌सद्‌गुरू श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु।

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय तिसरा

अर्जुन उवाच

ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन। तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव॥ १॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, भगवंता! नुसते कर्म करण्यापेक्षा जर बुद्धियोग श्रेष्ठ आहे असे तुझे मत आहे तर मल युद्धरूपी घोर कर्म करण्याला कां प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करतोस?

मग आइका अर्जुनें म्हणितलें। देवा तुम्हीं जें वाक्य बोलिलें। तें निकें म्यां परिसलें। कमळापती॥ १॥
तेथ कर्म आणि कर्ता। उरेचिना पाहतां। ऐसें मत तुझें अनंता। निश्चित जरी॥ २॥
तरी मातें केवीं श्रीहरी। म्हणसी पार्था संग्रामु करीं। इये लाजसीना महाघोरीं। कर्मी सुतां॥ ३॥
हां गा कर्म तूंचि अशेष। निराकारिसी निःशेष। तरी मजकरवीं हें हिंसक। कां करविसी तूं॥ ४॥
तरी हेंचि विचारीं श्रीहृषीकेशा। तूं मानु न देसी कर्मलेशा। आणि येसणी हे हिंसा। करवीत आहासी॥ ५॥

अर्थ—श्रोतृजन ऐका, मग देवाला अर्जुन म्हणाला, हे कृपानिधी देवा! तुम्ही जे बोलला ते मी नीट ऐकले॥ १॥ ब्रह्मस्थितीत कर्म आणि कर्ता हे काही उरतच नाही असे जर तुमचे निश्चित मत आहे.॥ २॥ तर मग देवा! 'अर्जुना युद्ध कर' असे मलां कां म्हणता? हे युद्धरूपी भयंकर कर्म मजकडून करविताना तुम्हाला कसा संकोच वाटत नाही.॥ ३॥ तुम्हींच ब्रह्मस्थितीचे ठिकाणी कर्माचा निःशेष निरास आहे असे जर म्हणता तर हे हिंसात्मक कर्म मजकडून कां करविता?॥ ४॥ भगवंता! तेव्हा याचाच विचार कर, तू आत्म्याचे ठिकाणी कर्माचा लेशही नाही म्हणतोस आणि अशा प्रकारची हिंसा मजकडून करविण्याचा प्रयत्न करतोस.॥ ५॥

गूढार्थदीपिका—

अर्जुनाचे प्रश्नाचा हेतु असा आहे की समबुद्धी किंवा समाधी यांत बुद्धी स्थिर करून कर्म केले असता कर्माचा बंध उत्पन्न होत नाही असे भगवंताने म्हटल्यावर अर्जुनाला शंका आली की, समबुद्धी किंवा समाधिस्थ बुद्धी झाल्यावर कर्म, कर्त्ता, क्रिया हा विषम प्रकारच राहत नाही. समत्व ही कर्मरहित स्थिती आहे व हीच कर्मरहित स्थिती जर जीवाला प्राप्त करून घ्यावयाची आहे, तर मी युद्ध सोडून आताच कर्मरहित होण्याचा प्रयत्न करीत असताना देव मला युद्धरूपी भयंकर कर्माला कां प्रवृत्त करीत आहेत? असे मनात येऊन अर्जुनाने देवाला प्रश्न केला.

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे। तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम्॥ २॥

अर्थ—भगवंता! जे भाषण ऐकून एक निश्चय होत नाही अशा तुमच्या दुटप्पी भाषणाने मला आपण अधिकच मोह उत्पन्न करीत आहा या दोहोतून ज्याने माझे निश्चित कल्याण होईल असे एक सांगावे.॥ २॥

देवा तुवांचि ऐसें बोलावे। तरी आम्हीं नेणतीं काय करावें। आतां संपलें म्हण पां आघवें। विवेकाचें॥ ६॥
हां गा उपदेश जरी ऐसा। तरी अपभ्रंशु तो कैसा। आतां पुरला आम्हां धिंवसा। आत्मबोधाचा॥ ७॥
वैद्यु पथ्य वारूनि जाये। मग जरी आपणचि विष सुये। तरी रोगिया कैसेनि जिये। सांगें मज॥ ८॥
जैसें आंधळें सुईजे आव्हांटा। कां माजवण दीजे मर्कटा। तैसा उपदेशु हा गोमटा। वोढवला आम्हां॥ ९॥
मी आधींचि कांहीं नेणे। वरी कवळिलों मोहें येणें। कृष्णा विवेकु या कारणें। पुसिला तुज॥ १०॥
तंव तुझी एकेकी नवाई। एथ उपदेशामाजिं गोवाई। तरी अनुसरलिया काई। ऐसें कीजे॥ ११॥
आम्हीं तनुमनुजीवें। तुझिया बोला वोटंगावें। आणि तुवांचि ऐसें करावें। तरी सरलें म्हणें॥ १२॥

आतां ऐसियापरी बोधिसी। तरी निकें आम्हां करिसी। एथ ज्ञानाची आस कायसी। अर्जुन म्हणे॥ १३॥
तरी ये जाणिवेचें कीर सरलें। परी आणीक एक असे जाहलें। जे थितें हें डहुळलें। मानस माझें॥ १४॥
तेवींचि श्रीकृष्णा हें तुझें। चरित्र कांहीं नेणिजे। जरी चित्त पाहसी माझें। येणे मिषें॥ १५॥
ना तरी झकवीतु आहासी मातें। कीं तत्त्वचि कथिसी ध्वनितें। हें अवगमितां निरुतें। जाणवेना॥ १६॥
म्हणोनि आइकें देवा। हा भावार्थु आतां न बोलावा। मज विवेकु सांगावा। मऱ्हाटा जी॥ १७॥
मी अत्यंत जड असें। परी ऐसाही निकें परियसें। श्रीकृष्णा बोलावें तुवां तैसें। एकनिष्ठ॥ १८॥
देखें रोगातें जिणावें। औषध तरी देयावें। परी तें अतिरुच्य व्हावें। मधुर जैसें॥ १९॥
तैसें सकळार्थभरित। तत्त्व तरी सांगावें उचित। परी बोधे माझें चित्त। जयापरी॥ २०॥
देवा तुजऐसा निजगुरु। आजि आर्तीधणी कां न करूं। एथ भीड कवणाची धरूं। तूं माय आमुची॥ २१॥
हां गा कामधेनूचें दुभतें। दैवें जाहलें जरी आपैतें। तरी कामनेची कां तेथें। वानी कीजे॥ २२॥
जरी चिंतामणी हातां चढे। तरी वांछेचें कवण सांकडें। कां आपुलेनि सुरवाडें। इच्छावें ना॥ २३॥
देखा अमृतसिंधूतें ठाकावें। मग ताहाना जरी फुटावें। तरी सायासु कां करावे। मागील ते॥ २४॥
तैसा जन्मांतरी बहुतीं। उपासितां श्रीलक्ष्मीपती। तूं दैवें आजि हातीं। जाहलासि जरी॥ २५॥
तरी आपुलिया सवेसा। कां न मागावासि परेशा। देवा सुकाळु हा मानसा। पाहला असे॥ २६॥
देखें सकळार्तींचें जियालें। आजि पुण्य यशासि आलें। हे मनोरथ जहाले। विजयी माझे॥ २७॥
जी जी परममंगळधामा। सकळ देवदेवोत्तमा। तूं स्वाधीन आजि आम्हां। म्हणऊनियां॥ २८॥
जैसें मातेच्या ठायीं। अपत्या अनवसरू नाहीं। स्तन्यालागूनि पाहीं। जियापरी॥ २९॥
तैसें देवा तूतें। पुसिजतसे आवडे तें। आपुलेनि आर्तें। कृपानिधि॥ ३०॥
तरी पारत्रिकीं हित। आणि आचरितां तरी उचित। तें सांगें एक निश्चित। पार्थु म्हणे॥ ३१॥

अर्थ—तुझ्यासारख्यानेच जर देवा, असे संदिग्ध बोलावे तर आम्ही अज्ञान्यांनी काय करावे? असे वाटते की, आता माझ्या ठिकाणी विवेक उत्पन्न होण्याची आशाच नाही. ॥ ६॥ अशा संदिग्ध बोलण्याला जर उपदेश हे नाव द्यावे तर भ्रम उत्पन्न करणारे दुसरे बोलणे कोणते राहू शकेल? अशा उपदेशाने आत्मबोध होईल असा भरवसा कधीच बाळगता येणार नाही. ॥ ७॥ वैद्य पथ्य सांगून जाऊन पुन: आपणच जर विष देईल तर रोगी कसा जीवंत राहणार हे मला सांग॥ ८॥ ज्याप्रमाणे आंधळ्याने आडमार्गाने जावें किंवा वानराला दारू पाजावी त्याप्रमाणे या तुझ्या उपदेशाने माझ्या ठिकाणी विपरीत झाले आहे. ॥ ९॥ पहिलेच मी अत्यंत अज्ञानी आहे. त्यात पुन: स्वजनांच्या मोहाने ग्रस्त झालो, म्हणून तू मला योग्य विचार सांगशील असे वाटून तुला मी या प्रसंगी योग्य काय होईल हे विचारले. ॥ १०॥ पण तुझे एकेक आश्चर्यच, तुझ्या उपदेशामध्ये गुंतागुंतच (गोंवाई) दिसून येते. तूं (अनुसरलिया) सांगशील तसे करावे असे ठरविणाऱ्या आमच्याशी तू असे करावे काय?॥ ११॥ आम्ही कायावाचा मनाने तुझे वचन प्रमाण मानावे आणि तूच असे करावे म्हणजे सर्व कारभार आटोपला॥ १२॥ अर्जुन म्हणतो देवा! आता अशाच अनिश्चितपणे बोध करून आम्हाला कल्याणाचा मार्ग दाखववयाचा असेल तर येथे विवेक ज्ञानाची काय आशा राहील?॥ १३॥ अशा उपदेशात निश्चित मार्ग कळण्याची आशा तर राहिलीच नाही. उलट तुमच्या उपदेशाने माझे मनाचा आणखी जास्त गोंधळ उडाला हे एक अधिक झाले. ॥ १४॥ त्याचप्रमाणे देवा! तुझी लीलाही मला काही समजत नाही. तू या निमित्ताने माझे चित्त पाहतोस की काय?॥ १५॥ किंवा थापा मारून टाळाटाळी करतोस अथवा गुप्तरीतीने तात्विक विचारच मला सांगतोस हे खरोखर काही मला कळत नाही. ॥ १६॥ म्हणून देवा, ऐक. असे गुप्त भावार्थाचे बोलणे पुरे करा आणि मला समजेल अशा प्राकृत भाषेत योग्य विचार सांगा॥ १७॥ देवा! मी अत्यंत मूढमती आहे. पण अशाही मंदमती मला समजू शकेल अशा रीतीने निश्चित एक विचार सांगा. ॥ १८॥ रोग जिंकला जाईल असे औषध द्यायचे असले तरी ते गोड लागेल व अतिरुचकर राहील असे असावे. ॥ १९॥ ज्यायोगे माझ्या

चित्ताला बोध होईल व समाधान पावेल असा सर्व अर्थाने पूर्ण भरलेला योग्य विचार मला सांगा. ॥ २० ॥ देवा! तुझ्या सारखा सर्वज्ञ श्रीगुरु मला प्राप्त असताना मी आपली इच्छा पूर्ण कां करून घेऊ नये? तू आमची प्रेमळ आई आहेस मग येथे संकोच करण्याचे कारण काय?॥ २१ ॥ सुदैवाने आपल्या घरी कामधेनूचे सर्व इच्छा पुरविणारे दुभते जर प्राप्त झाले तर इच्छा करण्यास कां संकोच करावा?॥ २२ ॥ जर कदाचित आपल्या हाती चिंतामणी लागला तर मनोरथ पूर्ण होण्याला काय अडचण पडेल? मग आपले इच्छेप्रमाणे कां मागू नये?॥ २३ ॥ हे पहा देवा! आपण प्रयत्न करून अमृताच्या समुद्रावर गेलो आणि तेथेही जर यथेच्छ अमृत प्राशन करून तहान भागविली नाही व तहानेचे दु:ख भोगीत राहिलो तर अमृताच्या सागरावर येण्याचे कष्ट कशाला केले?॥ २४ ॥ त्याप्रमाणे हे श्रीकृष्णा. मागील अनेक जन्मात केलेल्या तुझ्या उपासनेने तू आज आमच्या सुदैवाने आम्हाला जर प्राप्त झाला आहेस. ॥ २५ तर मग आपल्या इच्छेप्रमाणे तुझ्यापाशीं कां मागू नये? देवा! तुझी प्राप्ती म्हणजे माझ्या मनाला अत्यंत सुकाळ वाटतो. ॥ २६ ॥ तुझ्या प्राप्तीमुळे माझ्या सर्व इच्छांना चेतना लाभली, माझे अनेक जन्मांचे पुण्य सफल झाले आणि माझे सर्व मनोरथ पूर्ण यशस्वी झाले. ॥ २७ ॥ या सर्वाचे कारण एकच आहे. सर्व मंगलाचे माहेरघर, सर्व देवांचा देव असा जो तुझा महिमा आहे, तो तू आमच्या स्वाधीन आहेस. ॥ २८ ॥ ज्याप्रमाणे स्तनपान करणाऱ्या मुलाला स्तनपान करण्याकरिता काळवेळाचे बंधन आई ठेवीत नाही. ॥ २९ ॥ त्याप्रमाणे, देवा! तू कृपानिधी आहेस म्हणून माझ्या मनाला जे जे पुसावेसे वाटेल ते ते मी इच्छेप्रमाणे तुला विचारतो. ॥ ३० ॥ तरी मेल्यावर सदगती देणारे व इहलोकातही आचरण्याला योग्य जे असेल ते एक निश्चित सांग असे अर्जुन म्हणाला. ॥ ३१ ॥

श्रीभगवानुवाच

लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ । ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥ ३ ॥

अर्थ—भगवान म्हणतात हे निष्पाप अर्जुना! पूर्वी सर्गाचे आरंभीच या लोकामध्ये दोन प्रकारच्या निष्ठा मी सांगून ठेविल्या आहेत. चोवीस तत्वाहून आपल्याला निराळे पहावे अशी ज्ञानयोगनिष्ठा विचारवंताकरिता सांगितली असून क्रियावानांकरिता कर्मयोगनिष्ठा सांगतली आहे. ॥ ३ ॥

या बोला श्रीअच्युतु। म्हणतसे विस्मितु। अर्जुना हा ध्वनितु। अभिप्रावो ॥ ३२ ॥
जे बुद्धियोगु सांगतां। सांख्यमतसंस्था। प्रगटिली स्वभावता। प्रसंगें आम्हीं ॥ ३३ ॥
तो उद्देशु तूं नेणसीचि। म्हणोनि क्षोभलासि वायांचि। तरी आतां जाण म्यांचि। उक्त दोन्हीं ॥ ३४ ॥
अवधारीं वीरश्रेष्ठा। ये लोकीं या दोन्ही निष्ठा। मजचिपासूनि प्रगटा। अनादिसिद्ध ॥ ३५ ॥
एकु ज्ञानयोगु म्हणिजे। जो सांख्यीं अनुष्ठिजे। जेथ ओळखीसवें पाविजे। तद्रूपता ॥ ३६ ॥
एकु कर्मयोगु जाण। जेथ साधकजन निपुण। होवूनिया निर्वाण। पावती वेळे ॥ ३७ ॥
हे मार्गु तरी दोनी। परि एकवटती निदानीं। जैसी सिद्धसाध्यभोजनीं। तृप्ती एकी ॥ ३८ ॥
कां पूर्वापर सरिता। भिन्न दिसती पाहतां। मग सिंधुमिळणीं ऐक्यता। पावती शेखीं ॥ ३९ ॥
तैसीं दोनी ही मतें। सूचिती एका कारणातें। परी उपास्ति ते योग्यते। आधीन असे ॥ ४० ॥
देखें उत्प्लवनासरिसा। पक्षी फळासि झोंबे जैसा। सांगें नरु केवीं तैसा। पावे वेगां ॥ ४१ ॥
तो हळूहळू ढाळेंढाळें। केतुलेनि एके वेळे। तया मार्गाचेनि बळें। निश्चित ठाकी ॥ ४२ ॥
तैसें देख पां विहंगममतें। अधिष्ठूनि ज्ञानातें। सांख्य सद्य मोक्षातें। आकळिती ॥ ४३ ॥
येर योगिये कर्माधारें। विहितेंचि निजाचारें। पूर्णता अवसरें। पावते होती ॥ ४४ ॥

अर्थ—असे अर्जुनाचे भाषण ऐकून भगवान श्रीकृष्ण आश्चर्ययुक्त हसून म्हणाले, अर्जुना! माझ्या बोलण्यात हे इंगित होते किंवा हा गुप्त अभिप्राय होता. ॥ ३२ ॥ तुला मी बुद्धियोगच सांगत होतो; पण त्या प्रसंगाने स्वभावत:च सांख्यमत-निष्ठाही सांगण्यात आली. ॥ ३३ ॥ हा माझा उद्देश तू न जाणल्यामुळे तुझ्या मनात गोंधळ उत्पन्न होवून व्यर्थच तुला त्रास झाला. पण हे दोन्ही मार्ग मीच सांगितले आहेत एवढे आता लक्षात असू दे. ॥ ३४ ॥ हे वीरांमध्ये

श्रेष्ठ असलेल्या अर्जुना! या लोकांमध्ये ज्ञाननिष्ठा व कर्मयोगनिष्ठा अशा ज्या दोन निष्ठा दिसतात त्या अनादिकाळापासून चालत आलेल्या आहेत हे पक्के ध्यानांत ठेव॥ ३५॥ एक ज्ञानयोग जो आहे तो सांख्य म्हणजे आत्मानात्मविचार करणारे जे आहेत त्यांनी आचरावयाचा असून या ज्ञानमार्गाने आत्मस्वरूपाची ओळख होते व पुरुष आत्मरूप होतो. ॥ ३६ ॥ आणि दुसरा एक जो कर्मयोग आहे त्या मार्गाने जाणारे साधक पुरुष त्या मार्गात निष्णात होऊन काही काळाने पूर्णावस्थेला पोहचतात॥ ३७॥ ज्याप्रमाणें आयता स्वयंपाक तयार झाला असता जेवण केले किंवा स्वत: स्वयंपाक करून जेवण केले तरी दोहोनीही होणारी तृप्ती एकच असते; त्याप्रमाणे ज्ञानयोग व कर्मयोग हे दोन मार्ग असले तरी शेवटी एकाच ठिकाणी मिळतात॥ ३८॥ किंवा पूर्ववाहिनी व पश्चिम वाहिनी अशा दोन नद्या वाहताना भिन्न दिसल्या तरी समुद्रास मिळाल्यावर एकरूपच होतात. ॥ ३९ ॥ त्याप्रमाणे कर्मयोग व ज्ञानयोग ही दोन्ही मतें, सर्वांचे कारण जे परब्रह्म त्या कारणालाच शेवटी सूचित करितात. पण त्यांचे आचरण मात्र योग्यतेवर अवलंबून आहे. ॥ ४० ॥ अर्जुना! असे पहा की पक्षी हा उडून एकदम फळाला झोंबतो तसे त्या वेगाने एकदम मनुष्याला फळ हस्तगत करता येईल का?॥ ४१ ॥ तो हळूहळू एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर अशा क्रमाक्रमाने जात जातच, पण निश्चित फळाला प्राप्त होतो. ॥ ४२ ॥ त्याप्रमाणे पक्षाच्या मार्गाप्रमाणे ज्ञानयोगी ज्ञानमार्गाचे अनुष्ठान करून तात्काळ मोक्षाला गाठतात. ॥ ४३ ॥ आणि बाकीचे साधक कर्ममार्गानुसार आपला जो विहित आचार असेल त्याचे आचरण करून काही काळाने पूर्णतेला म्हणजे परब्रह्मस्वरूपाला पावतात. ॥ ४४ ॥

गूढार्थदीपिका—परी उपास्ति ते योग्यते। आधीन असे.

ज्ञानयोगनिष्ठा व कर्मयोगनिष्ठा ह्या दोन्ही निष्ठा मीच सांगितल्या असून ज्ञानयोगनिष्ठा विचारप्रधान पुरुषाकरिता व कर्मयोगनिष्ठा कर्मप्रवृत्ती प्रबल असलेल्या पुरुषाकरिता सांगितली आहे असे भगवान म्हणतात. यावरून या पृथक दोन निष्ठांचे पृथक अधिकारी आहेत हे सिद्ध आहे. सर्व पुरुषांकरिता एक कर्मयोग निष्ठाच काही भगवंतांनी सांगितली नाही; किंवा प्रत्येक पुरुषासमोर ह्या दोन निष्ठा ठेविल्या नाहीत. अधिकारानुसारच भगवंतांनी मार्ग प्रवृत्त केले आहेत.

एखादे वेळी कर्मयोगनिष्ठेचा अधिकारी असलेला पुरुष अविवेकाने कर्मसंन्यास करू पाहतो. अर्जुनाचा प्रकार तसाच होता तो जातीचा क्षत्रिय होता व क्षत्रियाची प्रकृती कर्मप्रधान असल्यामुळे तो कर्मयोगनिष्ठेचाच अधिकारी होता पण स्वजनांच्या मोहाने कर्मसंन्यास करू पाहत होता. वास्तविक कर्मसंन्यास हा त्याचा धर्म नव्हता. म्हणूनच 'अर्जुना! तू कर्मयोगनिष्ठेचा अधिकारी आहेस. तुझ्या प्रकृतीनुसार पाहता तू कर्मसंन्यासाचा अधिकारी नाहीस' हे सांगण्याकरिता भगवंतांनी कर्मनिष्ठेचा अधिकारी व कर्मसंन्यासनिष्ठेचा अधिकारी एक नाही, भिन्न आहेत हे येथे सांगितले आहे. नाहीतर भिन्न मार्ग किंवा भिन्न निष्ठा सांगण्याचे काही कारणच नव्हते. ज्ञानयोगाचा अधिकारी कर्मयोगाचे अनुष्ठान करू शकत नसला पाहिजे व कर्मयोगाचा अधिकारी ज्ञाननिष्ठा सांभाळू शकत नसला पाहिजे तरच या दोन निष्ठांची उपयुक्तता सिद्ध होऊ शकते व तसे आहेही.

ज्याप्रमाणे लहान मुले असलेल्या व नवरा सरकारी नोकर असलेल्या एकट्या बाईला मुले सांभाळणे व स्वयंपाकादी कामे करून वेळेवर नवऱ्याला जेऊ घालून कामावर पाठविणे अशक्य होते, त्याप्रमाणे ज्यांच्या ठिकाणी प्रकृतिधर्मानुसार कर्मप्रवृत्ति विशेष आहे अशा क्षत्रियादि जातीतील पुरुषांना साक्षीत्व सांभाळण्याकरिता 'मी अकर्ता असंग आहे' अशी बुद्धी सारखी वागवावी लागते. पण कर्मप्रवृत्तीत कर्तृत्व उत्पन्न होते, म्हणून परस्परविरुद्ध अशी कर्मप्रवृत्ती व साक्षित्व एके ठिकाणी राहू शकत नाहीत. आपले साक्षित्व जाणल्या बरोबरच साक्षीत्व बाणते असा अर्थ नाही. ते बाणण्याकरिता सारखा अभ्यासच करावा लागतो. एकदा साक्षीत्व आंगी बाणल्यावर मग साक्षीत्व व कर्म प्रवृत्ती यांचा विरोध राहत नाही हे खरे, पण कर्मप्रवृत्ती प्रबल असताना, साक्षीत्व बाणण्याचा अभ्यास करताना मात्र अंतर कर्मप्रवृत्ती व साक्षीत्वाचा अभ्यास यांचा विरोध येतो. ज्याप्रमाणे परीक्षेकरिता अभ्यास करण्यात गुंतलेल्या विद्यार्थ्याला घरची कामे करणे जमत नाही, त्याप्रमाणेच साक्षीत्वाचा अभ्यास व कर्मप्रवृत्ती यांचा मेळ बसत नाही.

ज्यांच्या प्रकृतीत सत्वगुणाच्या उत्कर्षामुळे कर्म करण्याची प्रवृत्ती अत्यंत क्षीण आहे अशा लोकांनाच, संन्यासपूर्वक साक्षीत्वाचा अभ्यास करता येतो व अशा लोकांकरिताच संन्यासाचे विधान आहे.

न कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते। न च सन्न्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति॥ ४॥

अर्थ—नुसता उचित कर्माचा त्याग केला की मनुष्य सिद्धाप्रमाणे कर्मरहित होऊ शकत नाही आणि नुसता कर्मसंन्यास केला तर तो ब्रह्मस्वरूप होतो असे नाही.॥ ४॥

वांचोनि कर्मारंभ उचित। न करितांचि कां सिद्धवत। कर्महीना निश्चित। होईजेना॥ ४५॥
कां प्राप्तकर्म सांडिजे। येतुलेनि नैष्कर्म्या होईजे। हें अर्जुना वायां बोलिजे। मूर्खपणें॥ ४६॥
सांगे पैलतीरा जावें। ऐसें व्यसन कां जेथ पावे। तेथ नावेतें त्यजावें। घडे केवीं॥ ४७॥
ना तरी तृप्ति इच्छिजे। तरी कैसेनि पाकु न कीजे। कीं सिद्धुही न सेविजे। केवीं सांगें॥ ४८॥
जंव निरार्तता नाहीं। तंव व्यापारु असे पाहीं। मग संतुष्टीच्या ठायीं। कुंठे सहजें॥ ४९॥
म्हणोनि आइकें पार्था। जया नैष्कर्म्यपदीं आस्था। तया उचित कर्म सर्वथा। त्याज्य नोहे॥ ५०॥
आणि आपुलालिये चाडे। आपादिलें हें मांडे। कीं त्यजिलें कर्म सांडे। ऐसें आहे॥ ५१॥
हें वायांचि सैरा बोलिजे। उकलु तरी देखोनि पाहिजे। परी त्यजितां कर्म न त्यजे। निभ्रांत मानीं॥ ५२॥

अर्थ—सिद्ध म्हणजे स्थितप्रज्ञ पुरुष जसा कर्मरहित ब्रह्मस्वरूप होऊन राहतो तसा उचित कर्माचा आरंभ न करणारा असा कर्महीन पुरुष उचित कर्माचे अनुष्ठान केल्यावाचून सिद्ध म्हणजे स्थितप्रज्ञ पुरुषाप्रमाणे कर्मरहित ब्रह्मस्वरूप होऊ शकत नाही.॥ ४५॥ किंवा विहित कर्म सोडल्यानेच केवळ पुरुष कर्मरहित होतो असे म्हणणे, अर्जुना मूर्खपणाचे आहे म्हणून व्यर्थ आहे.॥ ४६॥ अर्जुना! सांग बरे, नदीच्या परतीराला जायचे आहे असे जर संकट प्राप्त झाले तर नावेचा त्याग करिता येईल का?॥ ४७॥ किंवा क्षुधाशांती व्हावी अशी इच्छा असल्यास स्वयंपाक न करता कसे भागेल किंवा आयते शिजविलेले अन्नही घेतले नाही तर क्षुधाशांती होईल का?॥ ४८॥ जोपर्यंत विषयसुखाची वासना नाहीशी होत नाही तोपर्यंत प्रयत्न लागतोच. विषयावाचून मन सदा संतुष्ट राहू लागले की प्रयत्न आपोआप थांबतो.॥ ४९॥ म्हणून अर्जुना! ऐक, ज्याला कर्मरहित अशा आपल्या आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर राहावयाचे असेल त्याचे आपले विहित कर्माचरण सोडू नये.॥ ५०॥ आणि आपल्या इच्छेप्रमाणे जे कर्म करू तेच होते व जे कर्म टाकू किंवा करणार नाही ते होंतच नाही असे आहे काय?॥ ५१॥ हे व्यर्थच काहीतरी बडबडणे आहे. विचार करून जर आपण पाहू लागलो तर असे दिसते की केवळ विहित कर्म टाकल्यानेच कर्म टाकले जाते किंवा आपण कर्मरहित होतो असे नाही, हे पक्के समज.॥ ५२॥

गूढार्थदीपिका—त्यजिता कर्म न त्यजे

'**न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते**' या श्लोकाने भगवंतानीच विहित कर्म करता करताच नैष्कर्म्य स्थिती किंवा कर्मरहित स्थिती प्राप्त होते असे स्वत:च सांगून, कर्मयोग हा नैष्कर्म्याचे साधन आहे, असे दाखविले आहे. नैष्कर्म्य म्हणजे आपण मूळचे कर्मरहित केवळ सच्चिदानंदस्वरूप आहो असे जाणणे होय कर्मयोगाचे अनुष्ठानाने असा आपल्या स्वरूपाचा अनुभव येतो. मनुष्याने सर्वकर्माहून आपल्याला निराळे किंवा कर्मरहित पाहणे यालाच सर्वकर्मसंन्यास म्हणतात.

असा हा कर्मसंन्यास कर्म टाकल्याने प्राप्त होऊ शकत नाही, कारण कर्माचा त्याग करण्यात 'मी कर्माचा त्याग केला' असे त्यागरूप कर्म व त्याचे कर्तृत्व मनात उठत राहते.

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्। कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः॥ ५॥

अर्थ—कोणीही पुरुष क्षणभर देखील कर्मरहित राहू शकत नाही आपल्या प्रकृतीमध्ये जे गुण असतील किंवा ज्या गुणांचा प्रकृतिस्वभाव बनला असतो त्या प्रकृतिगुणानुसार प्रत्येक मनुष्य प्रकृतीच्या स्वाधीन असल्यामुळे कर्म करीतच असतो किंवा त्याच्याकडून गुणानुसार कर्म घडतच असते.॥ ५॥

जंव प्रकृतीचें अधिष्ठान। तंव सांडी मांडी हें अज्ञान। जे चेष्टा ते गुणाधीन। आपैसी असे॥ ५३॥
देखें विहित कर्म जेतुलें। तें सळे जरी वोसंडिलें। तरी स्वभाव काय निमाले। इंद्रियांचे॥ ५४॥
सांगें श्रवणीं ऐकावें ठेलें। कीं नेत्रींचे तेज गेलें। हें नासारंध्र बुझालें। परिमळु नेघे॥ ५५॥
ना तरी प्राणापानगति। कीं निर्विकल्प जाहली मति। कीं क्षुधातृषादि आर्ति। खुंटलिया॥ ५६॥
हे स्वप्नावबोधु ठेले। कीं चरण चालों विसरले। हें असो काय निमाले। जन्ममृत्य॥ ५७॥
हें न ठकेचि जरी कांहीं। तरी सांडिलें तें कायी। म्हणोनि कर्मत्यागु नाहीं। प्रकृतिमंतां॥ ५८॥
कर्म पराधीनपणें। निपजतसे प्रकृतिगुणें। येरी धरीं मोकलीं अंतःकरणें। वाहिजे वायां॥ ५९॥
देखें रथीं आरूढिजे। मग जरी निश्चळा बैसिजे। तरी चळा होऊनि हिंडिजे। परतंत्रा॥ ६०॥
कां उचलिलें वायुवशें। चळे शुष्क पत्र जैसें। निचेष्ट आकाशें। परिभ्रमे॥ ६१॥
तैसें प्रकृतिआधारें। कर्मेंद्रियविकारें। निष्कर्म्युही व्यापारे। निरंतर॥ ६२॥
म्हणऊनि संगु जंव प्रकृतीचा। तंव त्यागु न घडे कर्माचा। ऐसियाहि करूं म्हणती तयांचा। आग्रहोचि उरे॥ ६३॥

अर्थ—जीवाचा जोपर्यंत प्रकृतीशी संबंध आहे तोपर्यंत मी कर्मत्याग करतो किंवा कर्म करतो असे म्हणणे हे अज्ञानच म्हटले पाहिजे. कारण आत्मा कर्ता नसून कर्म करण्याचा किंवा न करण्याचा व्यापार सर्व आपोआप गुणानुसार होत जातो. ॥ ५३ ॥ हे पहा, अर्जुना! जेवढे काही विहित कर्म असेल ते सर्व जरी केले नाही, टाकून दिले तरी इंद्रियांचे स्वभावभूत व्यापार काय नाहीसे होतात?॥ ५४॥ अर्जुना सांग बरे! कानाचा ऐकण्याचा व्यापार बंद पडला काय? किंवा डोळ्याचे तेज जाऊन त्याचे पाहण्याचे कर्म होत नसते की नाक बुजून गेले आणि वास घेण्याचे काम ते करीत नाही?॥ ५५॥ किंवा प्राणाची-अपानाची वर व खाली वाहण्याची गती बंद पडली की आपले मन निर्विकल्प होऊन ते संकल्प विकल्प करेनासे झाले? तहान भूक हे व्यापार तरी बंद पडतात का?॥ ५६॥ त्याचप्रमाणे निजणे व जागणे हे व्यापार तरी थांबलेत का? का पायांचा चालण्याचा व्यापार तरी बंद पडला? हे राहो, पण जन्ममृत्यु तरी नाहीसे झाले का?॥ ५७॥ हे सर्व व्यापार होतातच व यांपैकी काही एक कर्म जर बंद पडत नाही तर कोणते कर्म आपण सोडले असे म्हणता येते? म्हणून प्रकृतीच्या स्वाधीन असणाऱ्याला कर्म सुटत नाही हे पक्के समज. ॥ ५८॥ आपण प्रकृतीच्या स्वाधीन झाल्यामुळे प्रकृतीच्या गुणानुसार कर्म होतच असते, पण 'धरी' म्हणजे मी कर्म केले व माझे हे कर्म, तसेच 'मोकळी' म्हणजे मी हे कर्म सोडतो किंवा करीत नाही असे व्यर्थच आपण आपल्या अंतःकरणात कर्माचा संबंध वागवीत असतो. ॥ ५९॥ हे पहा अर्जुना! आपण रथावर बसलो व निश्चळ जरी राहिलो तरी रथाच्या परतंत्र झाल्यामुळे आपण चालतो व हिंडतोच. ॥ ६०॥ झाडाचे वाळलेले पान ज्याप्रमाणे वायूने उडविले असता ते जसे निःचेष्ट म्हणजे स्वतः काही चेष्टा न करता आकाशात परिभ्रमण करिते. ॥ ६१॥ जोपर्यंत आत्मा प्रकृतीला आधार आहे तोपर्यंत कार्यरूप कर्मेन्द्रियांचे, निष्कर्म म्हणजे कर्मरहित अशा आत्म्याचे ठिकाणीही, सदा कर्म होतच राहते. ॥ ६२॥ म्हणून जोपर्यंत प्रकृतीचा संबंध वागविला जातो तोपर्यंत कर्माचा त्याग होऊ शकत नाही. असे असूनही जर कोणी कर्मत्याग करतो असे म्हणू लागला तर तो त्याचा दुराग्रहच म्हणावा लागेल. ॥ ६३॥

गूढार्थदीपिका विवरण—येथे श्रीज्ञानेश्वर माऊली असें सांगत आहे की कर्म तेवढें तें प्रकृतीचें कार्य किंवा स्वरूप होय. कर्म म्हणजेच प्रकृति होय. असें पुढे तेराव्या अध्यायांत ''प्रकृतीतें समस्तां। क्रियां नाम''॥ ९६६॥ या ओवीने सांगितलेही आहे कर्म हें प्रकृतीचें असतांना तें कर्म माझें, मी तें केलें असे जो अंतःकरणांत समजतो, त्याने प्रकृतीचा आश्रय केला असें समजावें, येथे अज्ञानी असो कीं ज्ञानी असो प्रत्येक पुरुष कर्म करीतच असतो. तो क्षणभरही कर्मरहित राहूं शकत नाहीं असें सांगितलें नसून प्रकृतीच्या स्वाधीन असलेला म्हणजे मी प्रकृतीहून निराळा आहे असें आपल्याला न जाणणारा असा अज्ञानी पुरुषच क्षणभर देखील कर्मरहित राहूं शकत नाही असें सांगितलें आहे. ज्ञानी पुरुष आपल्याला जड प्रकृतीहून व कर्माहून निराळें पाहातो, म्हणून तो (ज्ञानी पुरुष)

आपल्याला मी ज्ञानस्वरूप असून जड अशा प्रकृतीहून व कर्माहून निराळा आहे असे साक्षात् जाणत असल्यामुळे त्याच्या ठिकाणी प्रकृतीनुसार कर्म होत असलें तरी तो त्या कर्माशीं व त्या कर्माच्या कर्तृत्वाशीं मुळीच संबंध वागवत नाही. म्हणून दुसरा पुरुष त्याचें ठिकाणी कर्म पाहत असला व तो कर्म करितो असें म्हणत असला तरी ज्ञानी पुरुषाचे ठिकाणी कर्म आहे किंवा मी तें केलें अशी कर्मबुद्धि व कर्तृत्वबुद्धि कधीच उत्पन्न होत नाही. म्हणून तो कर्म करणे किंवा त्यागणे या दोन्हीहि कर्माच्या विरहित असतो. ॥ ५ ॥

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् । इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ ६ ॥

अर्थ—कर्मेंद्रियांना विषयांपासून आवरून जो मनाने विषयाचें चिंतन करतो, तो मूर्ख जाणावा व तो दंभाचार समजावा. ॥ ६ ॥

जे उचित कर्म सांडिती। मग नैष्कर्म्य होऊं पाहती। परी कर्मेन्द्रियप्रवृत्ती। निरोधुनी ॥ ६४ ॥
तयां कर्मत्यागु न घडे। जे कर्तव्य मनीं सांपडे। वरी नटती तें फुडें। दरिद्र जाण ॥ ६५ ॥
ऐसे ते पार्था। विषयासक्त सर्वथा। ओळखावे तत्त्वता। येथ भ्रांति नाहीं ॥ ६६ ॥
आतां देईं अवधान। प्रसंगें तुज सांगेन। या नैराश्याचें चिन्ह। धनुर्धरा ॥ ६७ ॥

अर्थ—जे पुरुष कर्मेंद्रियांचा निरोध करून म्हणजे कर्मेंद्रियांची आपआपल्या विषयांकडे जाण्याची जी प्रवृत्ति तिचा निरोध करून आपलें विहित कर्म सोडून देतात व नैष्कर्म्य होऊ पाहतात. ॥ ६४ ॥ त्यांना कर्मत्याग घडत नाही. कारण त्यांच्या ठिकाणीं अंत:करणांत प्रवृत्तीचा निरोध करण्याचें कर्म व त्यांचें कर्तृत्व उत्पन्न होतेच, असें असूनहि जे कर्मेंद्रियप्रवृत्तीचा निरोध करतात त्यांचें तें करणें म्हणजे दारिद्र्य भोगणेंच होय, कारण अशा करण्याने विषयसुखहि मिळत नाही व आत्मसुखहि मिळत नाही. ॥ ६५ ॥ अशा पुरुषांच्या अंत:करणांत विषयासक्ति राहते हें नि:संशय लक्षांत घे. ॥ ६६ ॥ अर्जुना! आतां लक्ष दे. या प्रसंगानेच मी तुला नैराश्याचें म्हणजें विषयसुखाची आशा ज्याचे ठिकाणी मुळीच नाही अशा पुरुषाचे लक्षण सांगतों. ॥ ६७ ॥

गूढार्थदीपिका विवरण—श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या गीतेंतील १४ व्या. अध्यायाच्या "नाइकणें ते कानचि वाळी। न पाहणें तें दिठीचि गाळी। अवाच्य तें टाळी। जिभचि गा. ॥ २०९ ॥" या ओवीतील स्वानुभूतिप्रमाणे सत्वगुणाच्या उत्कर्षामुळे तीव्र वैराग्य उत्पन्न होऊन ज्यांची इंद्रिये आपआपले विषयाकडे आपण होऊनच प्रवृत्त होत नाही. अशा पुरुषाच्या कर्मराहित्याला येथे मिथ्याचार म्हटलें नसून, मनांत व इंद्रियांच्या ठिकाणी विषयासक्तीमुळे कर्म करण्याची प्रवृत्ति कायम असून जे कोणी जबरदस्तीने इंद्रियांना आपआपले व्यवहार करूं देत नाहीत व अशा रीतीने कर्मरहित होऊं पाहतात, त्यांच्या त्या अकर्म स्थितीला येथे मिथ्याचार म्हटलें आहे असे "**कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्**" या वचनावरून स्पष्ट आहे. अर्थात् ज्यांची कर्मप्रवृत्तिरूप प्रकृति क्षीण झाली त्यांचा येथे निषेध नसून ज्यांची कर्मप्रवृत्ति क्षीण झाली नाही व बळेच इंद्रियांचा रोध करून कर्माचा त्याग करूं पाहतात अशांची येथे निंदा केली आहे.

यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन । कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥

अर्थ—मनांतून विषयसुखाची इच्छा सोडून जो पुरुष आपल्या मनाने कर्मेंद्रियाचें नियमन करतो व निष्काम चित्त होऊन किंवा विषयसुखाची इच्छा न करता कर्मयोगाचें अनुष्ठान करितो तो श्रेष्ठ समजावा. ॥ ७ ॥

जो अंतरीं दृढु। परमात्मरूपीं गूढु। बाह्य तरी रूढु। लौकिकु जैसा ॥ ६८ ॥
तो इंद्रियां आज्ञा न करी। विषयांचें भय न धरी। प्राप्त कर्म न अव्हेरी। उचित जें जें ॥ ६९ ॥
तो कर्मेन्द्रियें कर्मीं। राहटतां तरी न नियमी। परी तेथिचेनि उर्मीं। झांकोळेना ॥ ७० ॥
तो कामनामात्रें न घेपे। मोहमळें न लिंपे। जैसें जळीं जळें न शिंपे। पद्मपत्र ॥ ७१ ॥
तैसा संसर्गामाजि असे। सकळांसारिखा दिसे। जैसें तोयसंगें आभासे। भानुबिंब ॥ ७२ ॥
तैसा सामान्यत्वें पाहिजे। तरी साधारणुचि देखिजे। येरवीं निर्धारितां नेणिजे। सोय जयाची ॥ ७३ ॥

ऐशा चिन्हीं चिन्हितु। देखसी तोचि मुक्तु। आशापाशरहितु। वोळख पां॥ ७४॥
अर्जुना तोचि योगी। विशेषिजे जो जगीं। म्हणोनि ऐसा होय यालागीं। म्हणिपें तूतें॥ ७५॥
तूं मानसा नियमु करीं। निश्चळु होयें अंतरीं। मग कर्मेन्द्रियें हीं व्यापारी। वर्ततु सुखें॥ ७६॥

अर्थ—जो पुरुष अंत:करणांत गुप्त असलेल्या परमेश्वर स्वरूपाचे ठिकाणीं अचल स्थिर झाला व बाहेर लोकांत इतर सामान्य लोकांप्रमाणे कार्य करीत राहतो. ॥ ६८ ॥ जो पुरुष इंद्रियांना आज्ञा करीत नाही, जो विषयाची भीति बाळगीत नाही म्हणजे विषय मिथ्या वाटल्यामुळे ज्या मला हे विषय गोंवतील अशी भीति वाटत नाही आणि जें जें वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या उचित कर्माचा जो त्याग करीत नाही. ॥ ६९ ॥ त्यांची कर्मेंद्रियें कर्मांमध्ये वावरीत असतांना त्यांना आवरत नाही, पण त्या कर्मेंद्रियांच्या व्यापाराने अपल्या कर्मरहित स्थितीला विसरत नाही. ॥ ७० ॥ तो कोणत्याहि प्रकारची विषयवासना करीत नाही, त्याला अविवेकरूपी मळाचा कधी स्पर्श होत नाही, ज्याप्रमाणे पाण्यांतील कमळाचें पानाला पाणी लागत नाही त्याप्रमाणे तो कर्मांत अलिप्त असतो. ॥ ७१ ॥ सर्व लोकांच्या व सर्व कर्मांच्या संसर्गांत किंवा समागमांत तो वावरतो व सर्वसामान्य माणसाप्रमाणेच दिसतो; पण ज्याप्रमाणे पाण्यांत सूर्याचें प्रतिबिंब पडलें तरी सूर्य पाण्याहून अत्यंत निराळा असतो, त्याप्रमाणे तो सर्व संसर्गाहून निराळा असतो. ॥ ७२ ॥ त्याप्रमाणे सामान्य दृष्टीने त्याच्याकडे पाहिलें असतां तो साधारण माणसाप्रमाणे भासतो, पण खरोखर त्यांच्या स्थितीचा निश्चय करूं असे म्हणून पाहूं लागलों तर त्याच्या स्थितीची कल्पनाच करिता येत नाही. ॥ ७३ ॥ अशा लक्षणाने युक्त असलेला पुरुष तो मुक्तच असतो आणि त्याला कांही मिळविण्याची आशा नसते व तो कोणत्या मोहपाशांत गुंतलेलाहि नसतो. ॥ ७४ ॥ अर्जुना! अशा विशेषणांनी विशिष्ट जो पुरुष आहे तोच कर्मयोगी होय असें जाण. म्हणूनच मी तुला असा योगी हो असें म्हणत असतो. ॥ ७५ ॥ तूं आपल्या मनाला आवर व अंत:करण परमेश्वरस्वरूपाचें ठिकाणी निश्चळ कर. असें झालें असतां हीं तुझीं कर्मेंद्रियें आपआपली कर्मे खुशाल करोत. ॥ ७६ ॥

गूढार्थदीपिका विवरण—या ओव्यांचा भावार्थ असा आहे की मनुष्याचें अंत:करण परमेश्वराचे ठिकाणी निश्चल झालें असतां जेवढें कांही कर्म होतें तेवढें सर्व कर्म प्रकृतिमुळे होतें व माझ्या आत्मस्वरूपाचा येथे कांही संबंध नाही असें तो जाणतो, म्हणून त्याचा सर्व कर्माशीं संबंध सुटतो. जसें जसें कर्म अशा रीतीने होत जाते तसें तसें अंत:करण परमेश्वराचे ठिकाणीं दृढ होत जातें व अंत:करणांतून विषयसुखाची वासना नाहीशी होत जाऊन जीव हा पूर्ण निष्काम होतो व ईश्वराशीं ऐक्य पावतो. कोणत्याहि कर्माचा लेप त्याला मग लागत नाही. असा पुरुष वरवर पाहतां सामान्य पुरुषाप्रमाणे कर्म करतो असें दिसत असलें तरी तो पूर्ण कर्मरहित ब्रह्मस्वरूप असतो. कर्माचा त्याग करून मी कर्माचा त्याग केला अशी कर्म व कर्तृत्वाची बुद्धि वागविणारा कर्मरहित न होतां कर्म करणाराच होतों आणि कर्मफळाची इच्छा सोडून भगवंतांनी निर्माण केलेल्या धर्मानुसार वागण्याचा इंद्रियांना अभ्यास लावतो, त्यांचें चित्त परमेश्वराचे ठिकाणीं स्थिर होऊन मी कर्म व कर्तृत्व यांच्याहून अत्यंत निराळा, केवळ सच्चिदानंद आत्मस्वरूप आहे, असां अनुभव येत असल्यामुळे तो पहिल्यापेक्षा श्रेष्ठ असून तोच खरा ज्ञानीपुरुष होय. कारण त्याचेच ठिकाणीं प्रवृत्तिनिवृत्तिरहित खरी साक्षीदशा किंवा समता बाणली असते.

येथे मनाचें नियमन कर असें जें सांगितलें आहे. त्याचा अर्थ असा आहे की मनाची वाटेल तसें वागण्याची प्रवृत्ति सोडून भगवंतांनी निर्माण केलेल्या केवळ धर्माप्रमाणेच वागण्याची मनाला संवय लावावी.

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः। शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः॥ ८॥

अर्थ—अर्जुना! तू आपलें विहित कर्म कर. कर्म न करण्यापेक्षा कर्म करणें चांगले आहे. कर्मच केलें नाही, तर कर्म न करण्याने शरीर ही जिवंत राहणार नाही. ॥ ८ ॥

म्हणशी नैष्कर्म्य होआवें। तरी एथ तें न संभवें। आणि निषिद्ध केवीं राहाटावें। विचारीं पां॥ ७७॥
म्हणोनि जें जें उचित। आणि अवसरेंकरूनि प्राप्त। तें कर्म हेतुरहित। आचरे तूं॥ ७८॥
पार्था आणीकही एक। नेणसी तूं हें कवतिक। जे ऐसें कर्म मोचक। आपैसें असे॥ ७९॥

देखें अनुक्रमाधारें। स्वधर्मु जो आचरे। तो मोक्षु तेणें व्यापारें। निश्चित पावे॥ ८०॥

अर्थ—म्हणून नैष्कर्म्य म्हणजे कर्मरहित असें आत्मरूप व्हायचें असल्यास कर्मत्याग करून तें साधणें शक्य नाही बरें, वेदाने जें करूं नये म्हणून सांगितलें आहे असें निषिद्ध कर्म करण्याला कसें प्रवृत्त होणें योग्य आहे याचा, अर्जुना! विचार कर॥ ७७॥ म्हणून आपल्याला विहित असेल तें उचित कर्म व प्रसंगोपात्त जें नैमित्तिक कर्म, अशीं दोन नित्य व नैमित्तिक कर्में विषयासुखाच्या प्राप्तीचा उद्देश सोडून केवळ भगवंताने लावून दिलेलें आपलें कर्तव्य आहे असें समजून कर.॥ ७८॥ अर्जुना! अशा रीतीने निष्काम कर्म करण्यांत एक जी मौज आहे ती तुला माहित नाही. अशा रीतीने केलेलें कर्म अनायासें कर्मबंधनापासून सोडविणारें होते.॥ ७९॥ अर्जुना! हें एक लक्षांत ठेव की नित्यकर्म दररोज करायचें असतें व नैमित्तिक कर्म त्यांचें निमित्त प्राप्त झाले असतां करायचें असतें. हा जो नित्यनैमित्तिक कर्म करण्याचा क्रम आहे त्या कर्माला अनुसरून जो आपल्या नित्यनैमित्तिक कर्मरूपी स्वधर्माचें आचरण करितो तो त्या निष्काम करण्याने निश्चित मोक्षाला प्राप्त होतो.॥ ८०॥

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः। तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्गः समाचर॥ ९॥

अर्थ—अर्जुना! हा मृत्युलोक (कर्माने बांधला आहे म्हणजे) कर्माने प्राप्त होतो, यज्ञाप्रीत्यर्थ म्हणजे केवळ भगवत्प्रीत्यर्थ कर्म न करता किंवा भगवंताची निष्काम आज्ञा पाळणें माझें कर्तव्य आहे असे समजून स्वधर्माचें अनुष्ठान न करतां विषयसुखाचे प्राप्तीकरिता जें कर्म केलें जातें त्या कर्माने हा लोक बांधला गेला आहे; म्हणून फळाची इच्छा सोडून केवळ स्वधर्म म्हणून निष्काम चित्ताने भगवत्प्रीत्यर्थ कर्म कर.॥ ९॥

स्वधर्मु जो बापा। तोचि नित्ययज्ञु जाण पां। म्हणोनि वर्ततां तेथ पापा। संचारु नाहीं॥ ८१॥
हा निजधर्मु जैं सांडे। आणि कुकर्मीं रति घडे। तैंचि बंधु पडे। संसारिकु॥ ८२॥
म्हणोनि स्वधर्मानुष्ठान। तें अखंड यज्ञयाजन। जो करी तया बंधन। कहींच न घडे॥ ८३॥
हा लोकु कर्में बांधिला। जो परतंत्रा भूलला। तो नित्ययज्ञातें चुकला। म्हणोनियां॥ ८४॥

अर्थ—अर्जुना! मनुष्याला जो स्वधर्म म्हणून सांगितला तोच नित्ययज्ञ होय हें जाण. म्हणूनच स्वधर्माचें अनुष्ठान करण्यांत पाप होत नाही.॥ ८१॥ हा स्वधर्म जेव्हा टाकला जातो तेव्हा शास्त्रविरुद्ध कर्म करण्यांतच मनाची आवडी होते व तेव्हाच संसाराचें बंधन उत्पन्न होतें.॥ ८२॥ म्हणून स्वधर्माचें अनुष्ठान करणें हेंच अखंड यज्ञाचें अनुष्ठान होय हें स्वधर्मरूप अखंड यज्ञाचें अनुष्ठान जो करतो त्याला कधीच कर्माचें बंधन होत नाही.॥ ८३॥ नित्य यज्ञरूप परमेश्वराला सोडून विषयांत गोडी मानणाऱ्या इंद्रियांचे स्वाधीन होऊन कर्म करतो म्हणून तो मनुष्य कर्माने बांधला जाते.॥ ८४॥

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः। अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक्॥ १०॥

अर्थ—पूर्वी स्वधर्मरूप यज्ञासह ब्रह्मदेवाने सर्व सृष्टि निर्माण केली तेव्हा ब्रह्मदेव सर्व निर्माण केलेल्या प्रजेला म्हणाले की, या स्वधर्मरूप यज्ञाने तुम्ही आपली वृद्धि करून घ्या व हा धर्मरूप यज्ञच तुमच्या सर्व इच्छित कामना पुरविणारा होवो!॥ १०॥

आतां येचिविशीं पार्था। तुज सांगेन एकी मी कथा। जैं सृष्ट्यादि संस्था। ब्रह्मेने केली॥ ८५॥
तैं नित्ययागसहितें। सृजिलीं भूतें समस्तें। परी नेणतीचि तियें यज्ञातें। सूक्ष्म म्हणउनी॥ ८६॥
ते वेळीं प्रजीं विनविला ब्रह्मा। देवा काय आश्रयो एथ आम्हां। तंव म्हणे तो कमळजन्मा। भूतांप्रति॥ ८७॥
तुम्हां वर्णविशेषवशें। आम्हीं हा स्वधर्मुचि विहिला असे। यातें उपासा मग आपैसे। पुरतीकाम॥ ८८॥
तुम्हीं व्रतें नियमु न करावे। शरीरातें न पीडावें। दुरी केंही न वचावें। तीर्थासी गा॥ ८९॥
योगादिकें साधनें। साकांक्ष आराधनें। मंत्रयंत्रविधानें। झणीं करा॥ ९०॥
देवतांतरा न भजावें। हें सर्वथा कांहीं न करावें। तुम्ही स्वधर्मयज्ञीं यजावें। अनायासें॥ ९१॥

अहेतुकें चित्तें। अनुष्ठा पां ययातें। पतिव्रता पतीतें। जियापरी॥ ९२॥
तैसा स्वधर्मरूप मखु। हाचि सेव्यु तुम्हां एकु। ऐसें सत्यलोकनायकु। बोलता जाहला॥ ९३॥
देखा स्वधर्मातें भजाल। तरी कामधेनु हा होईल। मग प्रजा हो न संडील। तुमतें कदा॥ ९४॥

अर्थ—नित्य यज्ञरूप परमेश्वराला सोडून विषयांत गोडी मानणाऱ्या इंद्रियांचे स्वाधीन होऊन कर्म करतो म्हणून तो मनुष्य कर्माने बांधला जातो. ॥ ८४ ॥ आता याचविषयी अर्जुना! तुला एक मी कथा सांगतों, ऐक. जेव्हा ब्रह्मदेवाने सृष्टि निर्माण केली. ॥ ८५ ॥ तेव्हा सर्व प्रजारूप सृष्टि निर्माण केली व त्याबरोबरच स्वधर्मरूप यज्ञहि उत्पन्न केले. पण हे धर्मरूप यज्ञ अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे त्या यज्ञांना प्रजा जाणू शकली नाही. ॥ ८६ ॥ तेव्हा सर्व प्रजेने ब्रह्मदेवाची प्रार्थना केली की देवा! येथे उत्पन्न झाल्यानंतर आम्हा सर्व प्रजेला जीवंत राहण्याचें साधन काय? तेव्हा ब्रह्मदेव सर्व प्रजेला म्हणालें. ॥ ८७ ॥ आपआपल्या वर्णाप्रमाणे तुम्हाला हा धर्म सांगितला आहे. तुम्ही त्याचेंच अनुष्ठान करा म्हणजे अनायासें तुमच्या सर्व इच्छा पूर्ण होतील. ॥ ८८ ॥ तुमच्या मनोकामना पूर्ण होण्याकरिता तुम्हाला व्रतादि नियम करण्याची आवश्यकता नाही, तपादिकाने शरीराला दु:ख देण्याचें कारण नाही, दूरदूरच्या तीर्थयात्रेला जाणेहि आवश्यक नाही. ॥ ८९ ॥ योगादिकांसारखी साधनें किंवा निरनिराळ्या देवतांची कामनिक आराधना अथवा मंत्र तंत्रादि विधानें करायला कदाचित् तुम्ही प्रवृत्त व्हाल. ॥ ९० ॥ पण एका स्वधर्मरूप परमेश्वराला सोडून दुसऱ्या देवतेची उपासना वगैरे कांही करू नका. सायासरहित आपल्या स्वधर्मरूप यज्ञाने परमेश्वराचें यजन करा म्हणजे झालें. ॥ ९१ ॥ ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री आपल्या पतीची निष्काम चित्ताने सेवा करिते त्याप्रमाणे तुम्हीहि तशाच निष्काम चित्ताने या स्वधर्मरूप यज्ञाचें अनुष्ठान करा. ॥ ९२ ॥ तसेंच हा स्वधर्मरूप यज्ञ तुम्हाला सर्वस्वीं सेव्य आहे असें सत्यलोकाधिपति ब्रह्मदेव बोललें. ॥ ९३ ॥ हें पहा, या स्वधर्माचें जर अनुष्ठान कराल तर हा कामधेनूप्रमाणे तुमची मनोकामना पूर्ण करील. प्रजाजनहो, तो स्वधर्म तुमची कधीहि उपेक्षा करणार नाही. ॥ ९४ ॥

गूढार्थदीपिका विवरण—''मानव समाज केव्हा प्रथम रानटी अवस्थेंत म्हणजे धर्मनिर्बंधरहित अवस्थेंत असतो व पुढे तसे धर्मबंधनरहित राहणें हिताचें नाही असें समजून मानव समाजच धर्ममर्यादा निर्माण करतो.'' हें मत गीतेला मान्य नाही असें ''सहयज्ञा: प्रजा: सृष्ट्वा'' या श्लोकावरून स्पष्ट दिसतें.

पूर्वी कांही एक तिचें अस्तित्व नसतां प्रथमच केव्हा तरी सृष्टि उत्पन्न झाली व त्यावेळीं मानव समाज रानटी अवस्थेंत होता असें कोणत्याही प्राचीन आर्षग्रंथांत मानलें नाही. सर्व गोष्टीचा तात्त्विक विचार करण्याऱ्या वेदान्तशास्त्राने जगत् हें अनादि मानलें आहे व प्रत्येक सृष्टीच्या आरंभी असणारे जे कृतयुग ते युग सात्विक असल्यामुळे त्या युगांतील मानवसमाज कोणत्याहि नियंत्रणावांचून स्वभावत: धर्मपरायण असतो व ही धर्मपरायणता पुढे युगपरत्वें जशी जशी क्षीण होत जाते तसे तसे परमेश्वराचे ठिकाणीं लीन किंवा अव्यक्त असलेले निर्बंध परमेश्वरच, परमेश्वरास प्राप्त झालेल्या आपल्या आधिकारिक महात्म्यांच्या द्वारा प्रकट करतो, असें ''**युगान्तेऽन्तर्हितान्वेदान्सेतिहासान्महर्षय:। लेभिरे तपसा पूर्वमनुज्ञाता: स्वयंभुवा**'' या श्लोकांत सांगितलें असून ''**स्थितामेव वाचमनुविन्नां दर्शयति**'' (ब्र०सू०शां०भा० १-३-२९) या वाक्यात सांगितल्याप्रमाणे पूर्वी लीन असलेलेच वेदादिग्रंथ व धर्मनिर्बंध प्रगट होत असतात. असे सर्व वेदाला प्रमाण मानणारे शिष्ट समजत आले आहेत व गीतेलाहि तेच मान्य आहे.

देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु व:। परस्परं भावयन्त: श्रेय: परमवाप्स्यथ॥ ११॥

अर्थ—या धर्मानुष्ठानाने तुम्ही देवांना संतुष्ट केलें असतां उलट देवहि तुम्हाला संतुष्ट करतील. अशा रीतीने परस्परांनी परस्परांना संतुष्ट केलें असतां सहजच तुमचें परम कल्याण होईल. ॥ ११ ॥

जें येणेंकरूनि समस्तां। परितोषु होईल देवतां। मग ते तुम्हां ईप्सिता। अर्थातें देती॥ ९५॥
या स्वधर्मपूजा पूजितां। देवतागणां समस्तां। योगक्षेमु निश्चिता। करिती तुमचा॥ ९६॥
तुम्हीं देवतांतें भजाल। देव तुम्हां तुष्टतील। ऐसी परस्परें घडेल। प्रीति जेथ॥ ९७॥

तेथ तुम्ही जें करूं म्हणाल। तें आपैसें सिद्धी जाईल। वांछितही पुरेल। मानसींचें॥ ९८ ॥
वाचासिद्धि पावाल। आज्ञापक होआल। म्हणियें तुमतें मागतील। महात्रऋद्धि॥ ९९ ॥
जैसें ऋतुपतीचें द्वार। वनश्री निरंतर। वोळगे फळभार। लावण्येंसीं॥ १००॥

अर्थ—जेव्हा या स्वधर्मरूप यज्ञाच्या अनुष्ठानाने सर्व देवतांना संतोष होईल तेव्हा ते तुम्हाला, तुमच्या इच्छेप्रमाणे भोग देतील. ॥ ९५ ॥ या स्वधर्मयज्ञाने सर्व देवतांचें तुम्ही पूजन केलें असतां ते देव तुमचा योगक्षेम खात्रीने चालवितील. ॥ ९६ ॥ तुम्ही अशा रीतीने देवांचें भजन कराल तर देवहि तुम्हांला संतुष्ट करतील. अशा रीतीने देवांचें व तुमचें परस्पर प्रेम जुळेल. ॥ ९७ ॥ असें तुमचें प्रेम जुळल्यास तुम्ही जें करूं म्हणाल तें अवश्य सिद्धीस जाईल आणि मनांत ज्या कांही इच्छा उत्पन्न होतील त्यांहि पूर्ण होतील. ॥ ९८ ॥ देवांच्या प्रसादाने तुम्हाला वाचासिद्धी (म्हणजे-बोललें तसें सत्य होणें) प्राप्त होईल. तुम्ही आज्ञा करणारे व्हाल म्हणजे तुमचें म्हणणें कोणी मोडणार नाही व मोठमोठ्या सिद्धि तुम्हाला "आज्ञा करा" असें मागणें मागतील. ॥ ९९ ॥ ज्याप्रमाणे वसंत ऋतु लागल्याबरोबर वनांतील झाडांना फळाफुलांचा बहर येऊन एकंदर वनाचें सौंदर्य नेहमी प्रगट होते. ॥ १०० ॥

गूढार्थदीपिका विवरण—मनुष्यांनी ऐहिक किंवा पारमार्थिक सुखाकरिता जो प्रयत्न करावयाचा तो म्हणजे आपल्या स्वधर्माचरणाने परमेश्वराने सृष्टिकार्यार्थ नेमलेल्या आधिकारिक देवतादिकांचे यजनद्वारा परमेश्वराचें यजन करणें हे होय; असा या श्लोकाचा भाव आहे. दुसऱ्या अध्यायांत भगवंतांनी कर्मयोगाचा तूं अधिकारी आहेस असा प्रस्ताव मांडून या तिसऱ्या अध्यायांत कर्मयोगाचें स्वरूप सांगितलें आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला ज्या कर्मयोगाचा उपदेश केला, त्या कर्मयोगाचें स्वरूप काय, याचें महाभारतांतील शांतिपर्वांतर्गत नारदनारायण संवादात्मक नारायणीय धर्मांत पूर्ण स्पष्टीकरण आलें असल्यामुळे, नारायणीय धर्माचा विचार केला पाहिजे. '**मुक्तानां तूं गतिर्ब्रह्मन क्षेत्रज्ञ इति कल्पिता। सहि सर्व गुणश्चैवनिर्गुणश्चैव कथ्यते॥**' (म० भा० शां० प० अ० ३३५ श्लो० ४१) शुद्ध क्षेत्रज्ञ आत्मा कर्मकर्तृत्वरहित केवळ सच्चिदानंदस्वरूप आहे. आपल्याला कर्मकर्ता व कर्मफलभोक्ता समजणाऱ्या जीवात्म्याने कर्मकर्तृत्वरहित होऊन शुद्ध क्षेत्रज्ञाशीं आपलें ऐक्य पाहणें याला मुक्ति म्हणतात. अशा रीतीने जीवात्मा मुक्त होऊन ज्या क्षेत्रज्ञाशीं ऐक्य पावतो तो क्षेत्रज्ञ परमात्मा सगुण निर्गुण अशा दोन प्रकारचा आहे. सर्व गुण वेगळे करून क्षेत्रज्ञाला पाहिलें असतां तो निर्गुण भासतो व सर्वगुणसहित पाहिलें असतां तो सगुण भासतो निर्गुण क्षेत्रज्ञ असंग असल्यामुळे त्याला उद्देशून कर्मयोगाचें अनुष्ठान होऊ शकत नाही. म्हणजे त्याचे ठिकाणी कर्म समर्पण करतां येत नाही; म्हणून निष्काम कर्म समर्पणरूप कर्मयोगांचें अनुष्ठान सगुणाला धरून करतां येते. परमेश्वराचें हें सगुण स्वरूपहि दोन प्रकारचें आहे. मायागुणाच्या स्वाधीन न होतां मायागुणाला आपल्या स्वाधीन ठेवून सृष्टिकार्यार्थ मायागुणाला आश्रय झालेलें हें एक स्वरूप असून, भक्तांना भक्तिप्रेम देऊन त्या प्रेमाची वृद्धि करण्याकरिता सच्चिदानंदधर्माने व षड्गुणैश्वर्याने सगुण झालेंले रामकृष्णादि सगुण स्वरूप हें दुसरें स्वरूप होय. याच दोन्ही सगुण स्वरूपांचे प्रीत्यर्थ निष्काम कर्मयोगाचें अनुष्ठान करतां येतें. भगवंताचीं स्वरूपें दोन असल्यामुळे त्यांचे प्रीत्यर्थ केला जाणारा निष्काम कर्मयोगहि दोन प्रकारचा सांगितला आहे. "**तेनैषा प्रथिता ब्रह्मन् मर्यादा लोकभाविनी, दैवं पित्र्यं च कर्तव्यमिति तस्यानुशासनम्॥ ३४॥**" दैवकर्माने म्हणजे इंद्रादिक देवतांच्या प्रीत्यर्थ कराव्या लागणाऱ्या यज्ञादिकर्माने व पैत्रकर्माने म्हणजे पितराप्रीत्यर्थ कराव्या लागणाऱ्या श्राद्धादि कर्माने माझें यजन करावें, अशी सृष्टीचें उत्पत्त्यादि कार्य करण्याकरिता मायेचा आश्रय करुन सगुण झालेल्या क्षेत्रज्ञ परमेश्वराने लोक कल्याणकारक मर्यादा घालून दिली आहे. हा पहिल्या प्रकारचा कर्मयोग आहे. या कर्मयोगांत नित्य, नैमित्तिक, काम्य व निषिद्ध या चार कर्मांपैकी केवळ नित्य व नैमित्तिक अशीं दोनच कर्में परमेश्वराप्रीत्यर्थ केलीं जातात. काम्य म्हणजे विषयसुखाच्या आशेने होणारें कर्म व निषिद्ध म्हणजे शास्त्राने करूं नये म्हणून सांगितलेलें कर्म, ही दोन्ही कर्में सोडावीं लागतात, म्हणून हा पहिल्या प्रकारचा कर्मयोग नित्यनैमित्तिक कर्माच्या अनुष्ठानापुरताच मर्यादित आहे व तो या तिसऱ्या अध्यायांत ९, १० व ११ व्या श्लोकांत सांगितला आहे.

सच्चिदानंदस्वरूप षड्गुणैश्वर्यसंपन्न अशा लीलाविग्रही रामकृष्णादि सगुण स्वरूपाचे ठिकाणीं होणारा व ज्याला नारायणीयधर्मात एकान्त धर्म किंवा भक्तियोग म्हटलें आहे व ज्यां त्या सगुणस्वरूपाचें अखंड ध्यान ठेवून साक्षात् त्याच्याच प्रीत्यर्थं सर्व कर्मे केलीं जातात असा हा दुसरा कर्मयोग आहे त्याचे भगवंतांनी पुढे नवव्या अध्यायात सविस्तर निरूपण केलें आहे व तोच दुसरा कर्मयोग भगवंतांनी अर्जुनाला मुख्यत: उपदेशिला आहे.

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविता:। तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव स:॥ १२॥

अर्थ—यज्ञामध्ये देवांना हविर्भाग देऊन तुष्ट केलें असतां ते मनुष्याला त्याच्या इच्छेप्रमाणे भोग देतात. देवांनी दिलेले भोग पुन: देवांना न देतां जो मनुष्य त्यांचा आपणच उपभोग घेतो तो चोर होतो. ॥ १२ ॥

तैसें सर्व सुखेंसहित। दैवचि मूर्तिमंत। येईल देखा काढत। तुम्हांपाठीं॥ १०१॥
ऐसें समस्त भोगभरित। होआल तुम्ही अनार्त। जरी स्वधर्मैकनिरत। वर्ताल बापा॥ १०२॥
कां जालिया सकल संपदा। जो अनुसरेल इंद्रियमदा। लुब्ध होऊनियां स्वादा। विषयांचिया॥ १०३॥
तिहीं यज्ञभाविकीं सुरीं। जे हे संपत्ति दिधली पुरी। तयां स्वधर्मी सर्वेश्वरीं। न भजेल जो॥ १०४॥
अग्निमुखीं हवन। न करील देवतापूजन। प्राप्तवेळे भोजन। ब्राह्मणाचें॥ १०५॥
विमुखु होईल गुरुभक्ती। आदरु न करील अतिथी। संतोषु नेदील ज्ञाती। आपुलिये॥ १०६॥
ऐसा स्वधर्मुक्रियारहितु। आथिलेपणें प्रमत्तु। केवळ भोगासक्तु। होईल जो॥ १०७॥
तया मग अपावो थोरु आहे। जेणें तें हातींचें सकळ जाये। देखा प्राप्तही न लाहे। भोग भोगूं॥ १०८॥
जैसें गतायुषीं शरीरीं। चैतन्य वासु न करी। कां निदैवाचां घरीं। न राहे लक्ष्मी॥ १०९॥
तैसा स्वधर्मु जरी लोपला। तरी सर्व सुखांचा थारा मोडला। जैसा दीपासवें हरपला। प्रकाशु जाय॥ ११०॥
तैसी निजवृत्ति जेथ सांडे। तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे। आइका प्रजाहो हें फुडें। विरंचि म्हणे॥ १११॥
म्हणऊनि स्वधर्मु जो सांडील। तयातें काळु दंडील। चोरु म्हणूनि हरील। सर्वस्व तयाचें॥ ११२॥
मग सकळ दोष भंवते। गिंवसोनि घेती तयातें। रात्रिसमयीं स्मशानातें। भूतें जैशीं॥ ११३॥
तैशीं त्रिभुवनींचीं दु:खें। आणि नानाविधें पातकें। दैन्यजात तितुकें। तेथेंचि वसे॥ ११४॥
ऐसें होय तया उन्मत्ता। मग न सुटे बापा रुदतां। कल्पांतींही सर्वथा। प्राणिगण हो॥ ११५॥
म्हणऊनि निजवृत्ति हे न संडावी। इंद्रियें बरळों नेदावीं। ऐसें प्रजांतें शिकवी। चतुराननु॥ ११६॥
जैसें जळचरा जळ सांडे। आणि तत्क्षणीं मरण मांडे। हा स्वधर्मु तेणें पाडे। विसंबों नये॥ ११७॥
म्हणोनि तुम्ही समस्तीं। आपुलालिया कर्मीं उचितीं। निरत व्हावें पुढतपुढती। म्हणिपत असें॥ ११८॥

अर्थ—त्याप्रमाणे देवांना हविर्भागाने संतुष्ट केलें असतां तुमचा शोध करीत, सर्व सुखाने भरलेलें तुमचें सुदैवच, तुमच्या पाठीमागे येईल. ॥ १०१ ॥ अशा रीतीने जर तुम्ही धर्मपरायण झाला तर तुम्ही सर्व भोगसंपन्न व्हाल. तुम्ही दु:खरहितहि व्हाल. ॥ १०२ ॥ याच्या उलट सर्व संपत्ति प्राप्त होऊन जो कोणी विषयाच्या सुखाला भुलून इंद्रियांना जसें वाटेल तसें वागण्याचा प्रयत्न करील. ॥ १०३ ॥ स्वधर्मरूप यज्ञांत ज्या देवतांना संतुष्ट केलें व त्या देवतांनी प्रसन्न होऊन मनुष्याला जीं इच्छित भोगसंपत्ति दिली, त्या भोगसंपत्तीने जो कोणी पुरुष त्या देवतांचे द्वारा सृष्टिचालक परमेश्वराचें यजन करणार नाही. ॥ १०४ ॥ अग्नीच्या मुखांत हवन करणार नाही, देवतांचें पूजन करणार नाही, प्रसंगाने ब्राह्मणाचें भोजन करणार नाही. ॥ १०५ ॥ आपल्या गुरूची भक्ति करणार नाही, अतिथीचा आदर करणार नाही, आपल्या जातिबांधवांचें कार्य करून त्यांना संतोष देणार नाही. ॥ १०६ ॥ अशा रीतीने स्वधर्मक्रिया न करणारा होऊन संपत्तीमुळे माजून जाईल व स्वत:च केवळ नानाप्रकारचे भोग भोगीत जाईल. ॥ १०७ ॥ अशा पुरुषाला पुढे फार दु:ख होतें. त्याला प्राप्त झालेली संपत्ति सर्व नाहिशी होते, आणि प्राप्त भोग भोगण्याकरिताहि तो समर्थ राहत नाही. ॥ १०८ ॥ ज्याप्रमाणे ज्या पुरुषाचें आयुष्य सरलें त्याच्या देहांत चैतन्य राहत नाही, किंवा ज्याचें दैव फिरलें त्याचें घरीं लक्ष्मी राहत नाही. ॥ १०९ ॥ त्याप्रमाणे जसा दिवा मालवला की प्रकाश तात्काळ नाहिसा

होतो तसा स्वधर्माचा लोप झाला असतां सर्व सुखांचा थारा मोडतो, कोणतेंच सुख भोगण्यास मिळत नाही. ॥ ११० ॥ त्याचप्रमाणे निजवृत्ति म्हणजे आपल्या सुखाने जगण्याचें साधन जो स्वधर्म तो टाकला गेला की जीवाचें स्वातंत्र्य नाहिसें होतें. तो इंद्रियांच्या परतंत्र होतो, असें ब्रह्मदेव प्रजेला सांगू लागला. ॥ १११ ॥ म्हणून स्वधर्माचें आचरण जो करणार नाही, त्याला अवश्य दंड भोगावा लागेल, आणि तो चोर गणला जाऊन त्याचे प्राप्त झालेले भोग पुढे त्याच्यापासून हिरावून घेतले जातील. ॥ ११२ ॥ असें झाल्यावर मग ज्याप्रमाणे रात्रीं स्मशानांत भूतेंच राहतात, त्याप्रमाणे स्वधर्माचें अनुष्ठान न करणाऱ्या पुरुषाचे ठिकाणी सर्व पापें येतात. ॥ ११३ ॥ त्रिभुवनांत जेवढें कांही दु:ख असेल व जेवढें कांही पाप असेल आणि जेवढें कांही दारिद्र्य असेल तें सर्व स्वधर्म सोडणाऱ्या पुरुषाचे ठिकाणीं प्राप्त होतें. ॥ ११४ ॥ ब्रह्मदेव म्हणतात, हे प्रजाजनांनो! संपत्तीमुळे उन्मत्त होऊन व इंद्रियांच्या स्वाधीन होऊन धर्म सोडून वागणाऱ्या उन्मत्त पुरुषाला अशी स्थिति प्राप्त होते. मग कितीहि तो रडला व दु:ख केलें तरी कोणी त्याला त्यांतून कल्पांतींहि सोडवूं शकत नाही. ॥ ११५ ॥ म्हणून निजवृत्ति म्हणजे शरीरयात्रा चालण्याचें साधन जो धर्म तो कोणी सोडू नये, इंद्रियांना वाटेल तसे स्वैर वागूं देऊं नये, असें ब्रह्मदेव प्रजाजनांना सांगूं लागले. ॥ ११६ ॥ ज्याप्रमाणे मासे इत्यादि जलांत जगणाऱ्या प्राण्यांना जलावांचून तात्काळ मरण येतें, त्याप्रमाणे स्वधर्म हा तसाच असल्यामुळे कधी सोडूं नये ॥ ११७ ॥ म्हणून तुम्ही सर्व लोकांनी आपआपल्या विहित कर्माचे ठिकाणींच तत्पर राहावें हें मी पुन: पुन: सांगत आहे. ॥ ११८ ॥

यज्ञशिष्टाशिन: सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषै: । भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ॥ १३ ॥

अर्थ—देवतांचे हविर्भाग दिल्यावर जें कांही यज्ञांतून अवशिष्ट अन्न उरेल ते खाणारे जे पुरुष असतात ते सर्व पापांपासून मुक्त होतात. परंतु केवळ आपल्या भोगाकरिता पाकसिद्धि करणारे पुरुष मात्र पापी होतात व पापच खातात. ॥ १३ ॥

देखा विहित क्रियाविधि। निर्हेतुका बुद्धी। जो असतिये समृद्धी। विनियोगु करी ॥ ११९ ॥
गुरु गोत्र अग्नि पूजी। अवसरीं भजे द्विजीं। निमित्तादिकीं यजी। पितरोद्देशें ॥ १२० ॥
या यज्ञक्रिया उचिता। यज्ञेशीं हवन करितां। हुतशेष स्वभावता। उरे जें जें ॥ १२१ ॥
तें सुखें आपुले घरीं। कुटुंबेंसीं भोजन करी। कीं भोग्यचि तें निवारी। कल्मषातें ॥ १२२ ॥
तें यज्ञावशिष्ट भोगी। म्हणोनि सांडिजे तो अघीं। जयापरी महारोगीं। अमृतसिद्धि ॥ १२३ ॥
कीं तत्त्वनिष्ठु जैसा। नागवे भ्रांतिलेशा। तो शेषभोगी तैसा। नाकळे दोषा ॥ १२४ ॥
म्हणोनि स्वधर्मे जें अर्जे। तें स्वधर्मेंचि विनियोगिजे। मग उरे तें भोगिजे। संतोषेंसीं ॥ १२५ ॥
हें वांचूनि पार्था। राहाटों नये अन्यथा। ऐसी आद्य हे कथा। श्री मुरारी सांगे ॥ १२६ ॥
जे देहचि आपणपें मानिती। आणि विषयांतें भोग्य म्हणती। यापरतें न स्मरती। आणिक कांहीं ॥ १२७ ॥
हें यज्ञोपकरण सकळ। नेणतसांते बरळ। अहंबुद्धि केवळ। भोगूं पाहती ॥ १२८ ॥
इंद्रियरुचीसारखे। करविती पाक निके। ते पापिये पातकें। सेविती जाण ॥ १२९ ॥
हे संपत्तिजात आघवें। हें हवनद्रव्य मानावें। मग स्वधर्मयज्ञें अर्पावें। आदिपुरुषीं ॥ १३० ॥
हें सांडोनियां मूर्ख। आपणपेयालागीं देख। निपजविती पाक। नानाविध ॥ १३१ ॥
जिहीं यज्ञु सिद्धी जाये। परेशा तोषु होये। तें हें सामान्य अन्न न होये। म्हणोनियां ॥ १३२ ॥
हें न म्हणावें साधारण। अन्न ब्रह्मरूप जाण। जे जीवनहेतु कारण। विश्वा यया ॥ १३३ ॥

अर्थ—अर्जुना! हे पहा, जो कोणी विहित कर्म करण्यांत निष्काम बुद्धीने आपल्याला प्राप्त झालेल्या संपत्तीचा उपयोग करितो. ॥ ११९ ॥ गुरु, स्वजाति, अग्नि यांचे पूजन करतो, प्रसंगी ब्राह्मणाचीहि सेवा करितो, पितरांच्या निमित्ताने प्राप्त झालेल्या श्राद्धादि प्रसंगी पितरांचेंही यजन करितो. ॥ १२० ॥ या सर्व विहित क्रिया आहेत. त्या स्वधर्माप्रमाणे करून हवन केल्यावर जें जें मग उरेल. ॥ १२१ ॥ तें तें मग खुशाल आपल्या कुटुंबातील माणसासह

खावें. हा भोग घेणें असलें तरी तशा भोग घेण्याने पापाचा लेप लागत नाही. ॥ १२२ ॥ ज्याप्रमाणे अमृताच्या सेवनाने महारोगहि नाहिसा होतो त्याप्रमाणे स्वधर्मरूप यज्ञाचरण करून जें शेष राहील तें खाणारे ते लोक असतात म्हणून पातकें त्यांना सोडून देतात. ॥ १२३ ॥ किंवा ज्या प्रमाणे आत्मतत्त्व अनुभवणारा पुरुष पुन: भ्रांतीने कवळिला जात नाही त्याप्रमाणे यज्ञशेष भक्षण करणारा पुरुषहि पापाने लिप्त होत नाही. ॥ १२४ ॥ म्हणून स्वधर्माने जें जें आपण मिळविले ते तें स्वधर्मांत खर्च करावें आणि उरेल तें आनंदाने भोगावें. ॥ १२५ ॥ अर्जुना! स्वधर्माला सोडून भलत्याच रीतीने वागू नये, असा हा सृष्टीच्या आरंभी घडलेला वृत्तान्त भगवानांनी सांगितला. ॥ १२६ ॥ जे पुरुष देहालाच मी समजतात व विषयाला भोग्य समजतात, यावांचून दुसरें कांही जाणत नाहीत ॥ १२७ ॥ वास्तविक पाहतां ही सर्व विषयसंपत्ति, स्वधर्मरूप यज्ञाची यज्ञसामग्री आहे. हें न जाणतां मी भोक्ता व हे विषय भोग्य असा अभिमान धरून जे विषय भोगतात. ॥ १२८ ॥ आपल्या इंद्रियांना जसे जसे रुचेल तसे तसे पदार्थ करवून जे खातात ते अन्न खात नाहीत तर पापच खातात. ॥ १२९ ॥ अर्जुना! ही सर्व संपत्ति यज्ञसामग्री आहे असें समजावें आणि स्वधर्मयज्ञाच्या द्वारा सृष्टीचा जनिता जो परमात्मा त्याला समर्पण करावी. ॥ १३० ॥ असें करणें सोडून देऊन मूर्खलोक आपल्याकरिता नानाप्रकारचे भोग्य पदार्थ निर्माण करितात. ॥ १३१ ॥ म्हणूनच ज्याच्या योगाने यज्ञ पूर्ण होतो व परमात्माहि संतुष्ट होतो असें हें अन्न सामान्य म्हणतां येत नाही. ॥ १३२ ॥ या अन्नाला सामान्य वस्तूप्रमाणे लेखू नये. सर्व जग त्या अन्नावर जगतें म्हणून तें परब्रह्मरूप आहे. ॥ १३३ ॥

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः । यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥
कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् । तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥

अर्थ—अन्नापासून भूतांची उत्पत्ति आहे. पावसामुळे अन्न पिकतें. तो पाऊस यज्ञामुळे पडतो व यज्ञ स्वधर्मरूप कर्मापासून निपजतो. स्वधर्मरूप कर्म हें वेदापासून प्रगट झालें आहे आणि वेद हे अक्षर म्हणजे अविनाशी ब्रह्मापासून उत्पन्न झाले आहेत. म्हणून सर्वत्र व्यापक असणारी ब्रह्मवस्तु स्वधर्मरूप यज्ञाचे ठिकाणीं स्थित आहे. ॥ १४-१५ ॥

अन्नास्तव भूतें। प्ररोह पावती समस्तें। मग वरिषु या अन्नातें। सर्वत्र प्रसवे ॥ १३४ ॥
तया पर्जन्या यज्ञीं जन्म। यज्ञातें प्रगटी कर्म। कर्मासि आदि ब्रह्म। वेदरूप ॥ १३५ ॥
मग वेदांतें परापर। प्रसवतसे अक्षर। म्हणऊनि हें चराचर। ब्रह्मबद्ध ॥ १३६ ॥
परी कर्माचिये मूर्ति। यज्ञीं अधिवासु श्रुति। ऐकें सुभद्रापति। अखंड गा ॥ १३७ ॥

अर्थ—अन्नामुळे जीव उत्पन्न होतात आणि पर्जन्य हा सर्वत्र अन्नाला पिकविणारा आहे. ॥ १३४ ॥ त्या पावसाचा जन्म यज्ञापासून असून यज्ञ हा कर्मापासून उत्पन्न होतो व कर्माचें कारण वेद आहेत. ॥ १३५ ॥ या वेदाची उत्पत्ति सर्वांच्या पलीकडे असलेल्या अविनाशी ब्रह्मापासून आहे. म्हणून ही सर्व सृष्टि ब्रह्माने व्याप्त आहे. ॥ १३६ ॥ हें, अर्जुना! अखंड ध्यानांत ठेव की कर्म मूर्तिमंत प्रगट होण्याकरिता यज्ञाचे ठिकाणीं श्रुतीचें राहणें आहे. म्हणजे यज्ञादि कर्में कशीं करायचीं हें श्रुतींत सांगितले आहे किंवा श्रुतींत सांगितल्याप्रमाणे यज्ञादि कर्में होतात. ॥ १३७ ॥

गूढार्थदीपिका विवरण—''यज्ञाद्भवति पर्जन्यो:'' या वाक्याचा अर्थ असा की खूप धान्य पिकेल असा योग्य पाऊस पाडणे इत्यादि सृष्टींतील कार्ये भगवंतांनी इंद्रादि देवतांकडे सोंपविलीं असल्यामुळे यज्ञाने संतुष्ट झालेल्या इंद्रादि देवता योग्य पाऊस पाडणें इत्यादि कार्ये करीत असतात. ''कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि'' या पंक्तीतील ''ब्रह्म'' शब्दाचा चौदावे अध्यायांतील ''महत् ब्रह्म'' या शब्दाच्या आधारें ''प्रकृति'' असा कोणी अर्थ करतात. पण त्यांतील ''ब्रह्म'' शब्दाचे मागे ''महत्'' हा शब्द लावल्यामुळे तेथे महत् ब्रह्माचा प्रकृति असा अर्थ केला आहे. नुसत्या ब्रह्म शब्दाचा प्रकृति असा अर्थ कोठे केलेला आढळत नाही.

सर्व कर्म प्रकृतीपासून उत्पन्न होतें, म्हणून कर्म या शब्दाचा अर्थ सामान्यत: यच्चयावत् कर्म असा होऊं शकला, तरी येथील 'कर्म' शब्दाचा यच्चयावत कर्म असा सामान्य अर्थ विवक्षित आहे असें ''अन्नाद्भवंति भूतानि'' इत्यादि मागील संदर्भ पाहतां दिसत नाही. येथे मनुष्याच्या जीवनधारणाशीं ज्या विशेष कर्माचा प्रत्यक्ष संबंध

आहे. तेवढ्याच विशेष कर्माचाच उल्लेख केलेला आहे असें स्पष्ट दिसतें आणि तें विशेष कर्म म्हणजे ''देवान्भावयतानेन'' या श्लोकांत यज्ञादि कर्म होय, हें भगवंतांनी सांगितले आहे. ते यज्ञादि कर्म वेदापासून प्रगट होत असल्यामुळे ''कर्म ब्रह्मोद्भवें विद्धि'' या पंक्तींतील ''ब्रह्म'' शब्दाचा अर्थ 'प्रकृति' असा न करता 'वेद' असाच अर्थ करावा लागतो.

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः। अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति॥ १६॥

अर्थ—असें अनादिकालापासून प्रवृत्त झालेलें चक्र जो कोणी चालूं ठेवणार नाही व इंद्रियासक्त होईल त्याचें जीवन व्यर्थ आहे, त्याचें आयुष्य सर्व पापरूप आहे. ॥ १६ ॥

ऐशी हे आदि परंपरा। संक्षेपें तुज धनुर्धरा। सांगितली या अध्वरा। लागौनियां॥ १३८॥
म्हणूनि समूळ हा उचितु। स्वधर्मरूप क्रतु। नानुष्ठी जो मत्तु। लोकीं इये॥ १३९॥
तो पातकांची राशी। जाण भार भूमीसी। जो कुकर्मे इंद्रियांसी। उपेगा गेला॥ १४०॥
तें जन्म कर्म सकळ। अर्जुना अति निष्फळ। जैसें कां अभ्रपटळ। अकाळींचे॥ १४१॥
कां गळां स्तन अजेचे। तैसें जियालें देखें तयाचें। जया अनुष्ठान स्वधर्माचें। घडेचिना॥ १४२॥
म्हणोनि ऐकें पांडवा। हा स्वधर्मु कवणें न संडावा। सर्वभावें भजावा। हाचि एकु॥ १४३॥
हां गा शरीर जरी जाहलें। तरी कर्तव्यवोघें आलें। मग उचित कां आपुलें। वोसंडावें॥ १४४॥
परिस पां सव्यसाची। मूर्ती लाहोनि देहाची। खंती करिति कर्माची। तें गांवढे गा॥ १४५॥

अर्थ—अशी ही अनादि परंपरा, अर्जुना! तुला या स्वधर्मरूप यज्ञाचें अनुष्ठानाकरिता सांगितली॥ १३८ ॥ म्हणून हा स्वधर्मरूप यज्ञ विहित आहे व आचरणाला योग्य आहे. पण या लोकांत जो कोणी इंद्रियांच्या परतंत्र होऊन उन्मत्त होईल व स्वधर्माचे अनुष्ठान करणार नाही. ॥ १३९ ॥ जो शास्त्राने विहित केलेला धर्म सोडून आपल्या मनाला व इंद्रियाला वाटेल तसें वागून त्यांच्या स्वाधीन झाला तो केवळ पापाचा पर्वत होय असें समज. तो भूमीला भारभूत होतो व त्याच्या योगें भूमि त्रस्त होते. ॥ १४० ॥ अकाळींचे अभ्र जसें निरर्थक असतें, तसें धर्म सोडून वागणाऱ्याचें जन्म व कर्म दोन्ही निष्फळ असतात. ॥ १४१ ॥ किंवा शेळीच्या गळ्याला असलेले स्तन जसें निरर्थक असतात त्याप्रमाणे स्वधर्माचे अनुष्ठान न करणाऱ्याचें जीवंत राहणें निरर्थक आहे. ॥ १४२ ॥ म्हणून, अर्जुना! आपला विहित धर्म कोणीहि सोडू नये; एवढेच नाही तर सर्वतोपरी त्याचेंच आचरण करावें. ॥ १४३ ॥ अर्जुना! जोपर्यंत या शरीराचा संबंध आहे. तोपर्यंत त्या शरीराबरोबर कर्म होणारच; मग आपलें विहित कर्म कां बरें सोडावें?॥ १४४॥ अर्जुना! ऐक, हें शरीर प्राप्त होऊन ज्यांना कर्म करण्याचा कंटाळा वाटतो ते अत्यंत मूर्ख होत. ॥ १४५ ॥

गूढार्थदीपिका विवरण—''सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा'' या श्लोकापासून तर ''एवं प्रवर्तितं चक्रम्'' या श्लोकापर्यंत जेवढे श्लोक आहेत व त्यांवर श्रीज्ञानेश्वर माऊलीच्या ज्या ओव्या आहेत, त्यांचे तात्पर्य असें आहे की या जगांत सुखभोग मिळविण्याकरिता व दुःख प्राप्त होऊं नये म्हणून मनुष्याला जो प्रयत्न किंवा कर्म करावें लागतें तें कर्म किंवा तो प्रयत्न कोणता, याचा मनुष्याने विचार केला पाहिजे.

भगवंतानी सर्व जीवसृष्टि निर्माण केली. त्यांत देव, मनुष्य, पशु, पक्षी, कृमि, कीटक, वृक्ष पाषाणादिक सर्वजीवांचा समावेश होतो. त्यांत मनुष्यप्राण्याकरिताच धर्म सांगितला आहे व बाकीच्या जीवयोनी केवळ भोगयोनी आहेत. म्हणजे त्या योनींत प्राणी पूर्वकर्मानुसार सुखदुःखफळें भोगतात. पूर्वकर्मानुसार मिळणाऱ्या सुखदुःखांत प्रयत्नाने कांही बदल घडवून आणणें हें मनुष्ययोनींतच शक्य आहे; दुसऱ्या योनींत नाही. हा मनुष्ययोनींत होणारा प्रयत्न म्हणजे स्वधर्म होय. जेव्हा सृष्टि निर्माण झाली तेव्हाच सृष्टिबरोबर धर्महि निर्माण झाला. सृष्टि व धर्म दोन्ही परमेश्वराने एकदमच निर्माण केले. विहित धर्माला धर्म हें जें नांव दिलें गेलें तें, तो धर्म जगाचे धारण करितो म्हणून दिलें गेलें. शास्त्राने सांगितलेल्या धर्मावांचून जगाचें धारण करणारा दुसरा धर्म नाही व दुसरा धर्म होऊं शकत नाही भगवंताची आज्ञा तो धर्म होय. व भगवंताची आज्ञा नाही तो अधर्म होय. धर्माने वागल्यास सर्व सुखभोग मिळतात

व अधर्माने वागल्यास दु:ख प्राप्त होतें म्हणून भगवंताची आज्ञा सोडून, आपल्याला बरें वाटतें तसें वागण्यांत मनुष्य मन व इंद्रियें यांच्या परतंत्र होतो व तेंच वागणें त्याच्या सर्व इहलोकांतील व परलोकांतील दु:खाला सर्वस्वी कारणीभूत होतें. म्हणून मनुष्याने आपला विहित धर्म सोडून मनाला वाटेल तसें वागू नये. या ठिकाणी हें स्पष्ट दिसून येते की धर्म जीवाने निर्माण केला व जीव आपल्या बुद्धीने धर्माधर्माचा निर्णय करूं शकतो, हें मत गीतेला मान्य नाही. त्याचप्रमाणे सुख प्राप्त करून घेण्याकरिता व दु:ख प्राप्त होऊ नये म्हणून जो कांही प्रयत्न करायचा तो धर्मानुष्ठानावांचून दुसरा कोणताच नाही. व्यक्तिव्यक्तीचा किंवा समाजासमाजाचा संघर्ष उत्पन्न होणार नाही किंवा कोणाचें कोणावर आक्रमण होणार नाही व समाजाचें ऐहिक पारलौकिक कल्याण होईल अशा रीतीने धर्माची रचना भगवंतांनी केली असल्यामुळे, मनुष्याला आपल्या स्वधर्माचें आचरण करणें एवढाच प्रयत्न केला की पुरें, असें भगवंतांनीच निक्षून सांगितलें आहे.

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः। आत्मन्येव च सन्तुष्टस्तस्य कार्यं न विद्यते॥ १७॥
नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन। न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः॥ १८॥

अर्थ—जो कोणी पुरुष आपल्या आत्मस्वरूपाचे ठिकाणी रममाण होणारा असेल व आत्मप्राप्तीने तृप्त म्हणजे विषयवासनारहित झाला असेल आणि विषयावांचून ज्याचें चित्त आपल्या आत्मस्वरूपाचे ठिकाणीं प्रसन्न राहत असेल त्याला मग धर्माचरणाची जरूरी नसते. ॥ १७॥ स्वधर्माचें आचरण करून त्याला कांही प्रयोजन साधायचें नसतें किंवा न केल्याने त्याची कांहीं हानि होत नाही सर्व भूतांचे ठिकाणींहि त्याला कांही अर्थ साधायचा नसतो. ॥ १८॥

देखें असतेनि देहधर्में। एथ तोचि एकु न लिंपे कर्में। जो अखंडित रमे। आपणपांचि॥ १४६॥
जे तो आत्मबोधें तोषला। तरी कृतकार्यु देखें जाहला। म्हणोनि सहजें सांडवला। कर्मसंगु॥ १४७॥
तृप्ति जालिया जैसीं। साधनें सरती आपैसीं। देखें आत्मतुष्टीं तैसीं। कर्में नाहीं॥ १४८॥
जंववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना। तंवचि यया साधना। भजावें लागे॥ १४९॥

अर्थ—जो अखंड आत्मस्वरूपाचे ठिकाणींच रममाण होतो, त्याला असलेल्या देहाच्या धर्माचा किंवा कोणत्याहि कर्मांचा लेप होत नाही. ॥ १४६॥ कारण तो आत्मबोधाने म्हणजे मीच एक आहे, माझ्या शिवाय दुसरें कांही नाही या ज्ञानाने आपल्या ठिकाणीं संतुष्ट असल्यामुळे सर्व कर्मांच्या संगापासून तो सुटतो. ॥ १४७॥ तृप्ति झाल्यावर ज्याप्रमाणे स्वयंपाकादि साधनांचा उपयोग नसतो, त्याप्रमाणे आत्मसुखानेच तृप्त झाल्यावर कर्तव्य उरत नाही. ॥ १४८॥ अर्जुना! जोपर्यंत आपल्याला आत्मज्ञान होत नाही तोपर्यंतच या साधनरूप कर्मयोगाचें अनुष्ठान करायचें असतें. ॥ १४९॥

गूढार्थदीपिका विवरण—आत्मस्वरूपाचे ठिकाणीं कर्म मुळीच नाही. तो केवळ कर्मरहित सच्चिदानंदस्वरूप आहे असें भगवंतांनी पुढे तेरावे अध्यायांत आत्मस्वरूप निरूपण करतांना सांगितले आहे. म्हणून ज्या ज्ञानी पुरुषाचे ठिकाणीं कर्मप्रवृत्ति अत्यंत क्षीण झाली आहे, अशा ज्ञानी पुरुषाचे ठिकाणी देह धारण होण्यापुरताच प्रारब्धबलाने व्यापार किंवा कर्म दिसू शकतें. आत्मा कर्मरहित असल्यामुळे व देहधारण व्यापारावांचून इतर व्यापार करणारी प्रकृति क्षीण झाल्यामुळे आत्मरूप झालेला ज्ञानी पुरुष प्रारब्धबलाने देहधारणार्थ होणाऱ्या व्यापारावांचून दुसरा व्यापार करूं शकत नाही असा अर्थ. असा अर्थ केला नाही तर शुद्ध आत्माच कर्म करणारा आहे असें मानण्याचा प्रसंग येतो व त्याचें तर भगवंतांनी खंडन केले आहे.

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर। असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः॥ १९॥
कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः। लोकसङ्ग्रहमेवापि सम्पश्यन्कर्तुमर्हसि॥ २०॥
यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः। स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते॥ २१॥

अर्थ—म्हणून कर्माचे फळाचे ठिकाणीं आसक्ति न ठेवतां विहित कर्माचें अनुष्ठान कर. आसक्ति सोडून कर्म

केलें असतां त्याला परमेश्वराची प्राप्ति होते. ॥ १९ ॥ जनकादिक राजर्षि कर्म करूनच परमेश्वराची प्राप्ति करून घेते झाले. लोकसंग्रहाकडे लक्ष देऊनहि तुला कर्म केलें पाहिजे. ॥ २० ॥ श्रेष्ठ पुरुष जसें आचरण करितात तसें पाहून इतर लोकहि वागतात, हा सामान्य नियम आहे आणि श्रेष्ठ लोकांनी जें आचरण प्रमाण मानलें त्याचप्रमाणे इतर लोक वागतात. ॥ २१ ॥

म्हणऊनि तूं नियतु। सकळ कामरहितु। होऊनियां उचितु। स्वधर्मे रहाटें॥ १५० ॥
जे स्वधर्में निष्कामता। अनुसरले पार्था। ते कैवल्यपद तत्त्वता। पावले जगीं॥ १५१ ॥
देख पां जनकादिक। कर्मजात अशेख। न सांडितां मोक्षसुख। पावते जाहले॥ १५२ ॥
याकारणें पार्था। होआवी कर्मी आस्था। हे आणिकाहि एका अर्था। उपकारेल॥ १५३ ॥
जे आचरतां आपणपेयां। देखी लागेल लोका यया। तरी चुकेल हा अपाया। प्रसंगेंचि॥ १५४॥
देखें प्राप्तार्थ जाहले। जे निष्कामता पावले। तयांही कर्तव्य असे उरलें। लोकांलागीं॥ १५५ ॥
मार्गी अंधासरिसा। पुढें देखणाही चाले जैसा। अज्ञाना प्रकटावा धर्मु तैसा। आचरोनि॥ १५६ ॥
हां गा ऐसें जरी न कीजे। तरी अज्ञानां काय उमजे। तिहीं कवणेंपरी जाणिजे। मार्गातें या॥ १५७ ॥
एथ वडील जें जें करिती। तया नाम धर्मु ठेविती। तेंचि येर अनुष्ठिती। सामान्य सकळ॥ १५८ ॥
हें ऐसें असे स्वभावें। म्हणोनि कर्म न संडावें। विशेषें आचरावें। लागे संतीं॥ १५९ ॥

अर्थ—म्हणून अर्जुना! तू आपल्या मनाला व इंद्रियांना शास्त्रानुसार वागण्याचा अभ्यास लावून व कर्मानें विषयसुख मिळालें पाहिजे ही वासना सोडून देऊन आपल्या योग्य विहित धर्माचें आचरण कर. ॥ १५० ॥ जे लोक स्वधर्माचें आचरण करतांना निष्काम झाले ते या जगात-मोक्षाला गेले आहेत. ॥ १५१ ॥ अर्जुना पहा, जनकादिक राजर्षि संपूर्ण कर्म करूनच मोक्षसुखाला प्राप्त झाले. ॥ १५२ ॥ याचसाठी अर्जुना! कर्माचें आचरण करण्याकडे मनुष्याची आस्थापूर्वक प्रवृत्ति असावी. अशा प्रवृत्तीचा आणखी एक उपयोग होतो. ॥ १५३ ॥ आपण कर्माचें आचरण केलें असतां बाकीच्या लोकांनाहि वागण्याकरिता तें मार्गदर्शक होतें व अनायासें तसें लोक वागूं लागले की त्यांचा अध:पात चुकतो; म्हणजे तेहि जन्ममृत्युरूप संसारांतून सुटतात. ॥ १५४॥ अर्जुना! ज्यांना परमेश्वरप्राप्ति झाली व म्हणून ज्यांची विषयसुखाची वासना नाहिशी झाली अशा पुरुषांनाहि लोकांना सन्मार्ग दाखविण्याचें कर्तव्य करायचें असतें. ॥ १५५ ॥ डोळस मनुष्य ज्याप्रमाणे आंधळ्याला बरोबर मार्ग दाखवित असतो त्याप्रमाणे शहाण्यांनी स्वत:च्या आचरणाने अज्ञानी लोकांना धर्मरूप भगवत्प्राप्तीचा धर्मरूप मार्ग दाखवावा. ॥ १५६ ॥ अर्जुना! असे जर प्राप्तपुरुषाने केलें नाही तर अज्ञान्यांना आत्यंतिक कल्याणरूप परमेश्वराच्या प्राप्तीचा मार्ग कसा समजणार? त्यांनी हा मार्ग कसा जाणावा? ॥ १५७ ॥ या लोकांत श्रेष्ठ पुरुष जसे आचरण करितात तें आचरण म्हणजे धर्म होय, असें अज्ञानी लोकांना वाटते व ते सामान्य लोक तसेंच आचरण करूं पाहतात. ॥ १५८ ॥ अशी ही माणसाची स्वाभाविक अनुकरणशीलता आहे, म्हणून शहाण्यांनी कर्म सांडू नये. एवढेच नाही तर लोकांना मार्गास लावण्याकरितां प्राप्त पुरुषांनीच विशेषत: धर्माचें आचरण केलें पाहिजे. ॥ १५९ ॥

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किञ्चन। नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि॥ २२॥
यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः। मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः॥ २३॥
उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम्। सङ्करस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः॥ २४॥

अर्थ—अर्जुना! या तिन्ही लोकांमध्ये मला कांही प्राप्त करून घ्यावयाचें आहे व त्याकरिता मला कांही कर्तव्य केलें पाहिजे असें नाही; पण तो मी कर्माचें आचरण करितोच. ॥ २२ ॥ अर्जुना! सर्व लोक माझ्या मागे येणारे आहेत. मी जर अत्यंत दक्ष राहून कर्म केलें नाही तर सर्व लोक माझेंच अनुकरण करतील. ॥ २३ ॥ मग कल्याणाच्या मार्गांचा उच्छेद होऊन सर्व लोकस्थिति नाश पावेल. मी संकटाला कारण होईन व माझ्याकडूनच सर्व प्रजेचा घात होईल. ॥ २४ ॥

आतां आणिकाचिया गोठी। तुज सांगों काई किरीटी। देखें मीचि इये राहाटी। वर्तत असें॥ १६०॥
काय सांकडें कांहीं मातें। कीं कवणें एकें आर्तें। आचरें मी धर्मातें। म्हणसी जरी॥ १६१॥
तरी पुरतेपणालागीं। आणिकु दुसरा नाहीं जगीं। ऐसी सामुग्री माझां अंगीं। जाणसी तूं॥ १६२॥
मृत गुरुपुत्र आणिला। तो तुवां पवाडा देखिला। तोही मी उगला। कर्मी वर्ते॥ १६३॥
परी स्वधर्मी वर्ते कैसा। साकांक्षु कां होय जैसा। तयाचि एका उद्देशा-। लागोनियां॥ १६४॥
जे भूतजात सकळ। असे आम्हांचि आधीन केवळ। तरी न व्हावें बरळ। म्हणोनियां॥ १६५॥
आम्ही पूर्णकाम होउनी। जरी आत्मस्थिती राहुनी। तरी प्रजा हे कैसेनि। निस्तरेल॥ १६६॥
इहीं आमुची वास पाहावी। मग वर्तती परी जाणावी। ते लौकिक स्थिति आघवी। नासिली होईल॥ १६७॥
म्हणोनि समर्थु जो एथें। आथिला सर्वज्ञते। तेणें सविशेषें कर्मातें। त्यजावें ना॥ १६८॥

अर्थ—अर्जुना! इतर जनकादिकांचे पुरावे कशाला देत बसूं स्वतः मीच या मार्गाने वागत आहे. ॥ १६०॥ मला कांही कमी आहे किंवा इच्छा पूर्ण करून घेण्याकरिता धर्मांप्रमाणे आचरण करीत आहे असें जर कदाचित् समजशील. ॥ १६१॥ तर मी षड्गुणैश्वर्य संपन्न असल्यामुळे पूर्णतेच्या दृष्टीने पाहतां माझ्यासारख्या पूर्ण आप्तकाम कोणी दुसरा या जगात नाही, हें तूं जाणतोस. ॥ १६२॥ गुरूचा मेलेला मुलगा. परत आणून गुरूला समर्पण केला तो माझा पराक्रम तूं पाहिला आहेसच. असा मी समर्थ असूनहि निरिच्छपणे कर्म करीत राहतो. ॥ १६३॥ या धर्माचें आचरण मी, एखादा कामनिक पुरुष कामना पूर्ण व्हावी म्हणून जितक्या दक्षतेने वागतो, तितक्या दक्षतेने करितो. पण हें सर्व या एका उद्देशानेच असते. ॥ १६४॥ की सर्व लोकस्थिति आपल्या स्वाधीन आहे व आपण धर्म सोडून वागूं लागलों तर लोकहि स्वैर वर्तन करतील, तसें होऊ नये. ॥ १६५॥ आम्ही निर्वासन होऊन जर आत्मस्थितींत गढून राहिलो तर ही सर्व लोकप्रजा या संसारांतून कशी तरून जायची? ॥ १६६॥ आम्ही कसें वागतो इकडे दृष्टि ठेवून, लोक कसें वागायचें हें जाणत असतात. आम्हीच जर धर्म सोडून वागू लागलो तर समाजव्यस्थाच सर्व नाहिशी होईल. ॥ १६७॥ म्हणून जो थोर पुरुष आहे व सर्वज्ञ आहे, त्याने तर मुख्यतः स्वधर्म सोडून वागू नये. ॥ १६८॥

गूढार्थदीपिका विवरण—शुद्ध आत्मस्वरूप स्वतः कर्ता नाही किंवा करविता नाही आणि कर्म हें प्रकृति आहे, असा वेदान्तशास्त्राचा अनुभूत सिद्धान्त आहे. म्हणून ज्यांचे ठिकाणी अत्यंत वैराग्यामुळे कर्मप्रवृत्ति अत्यंत क्षीण झाली आहे अशा साधक पुरुषाकरिताच आत्मविचाराने ब्रह्मप्राप्ति करून घेण्याकरिता संन्यासनिष्ठा मी प्रगट केली असें भगवंतांनी स्वमुखानें सांगितलें असल्यामुळे वरील श्लोकांतील कर्मयोगनिष्ठेचा भगवंतांनी केलेला उपदेश, ज्यांचे ठिकाणीं कर्मरूप प्रकृति अत्यंत वैराग्याने क्षीण झाली नाही अशा साधक पुरुषाकरिता व सिद्धपुरुषाकरिता आहें असें म्हणणें भाग आहे.

भगवान श्रीकृष्णाचा अवतार, कर्मप्रवृत्तिरूप प्रकृति ज्या क्षत्रियकुलांत असते, त्या क्षत्रियकुलांतच झाला असल्यामुळे भगवान श्रीकृष्णांनी कर्मप्रवृत्ति प्रबल असलेल्या क्षत्रियांतील सर्व जातींतील साधकांना संन्यासनिष्ठा दुर्घट असून ब्रह्मप्राप्तीकरिता कर्मयोगनिष्ठाच हितकर आहे असें सोदाहरणाने दाखविलें आहें. सर्व मनुष्यप्राण्याकरिताच कर्मयोगनिष्ठा हितकर आहे. कर्मसंन्यासनिष्ठेने कोणीच वागू नये असा भगवंताच्या सांगण्याचा आशय नाही. कारण कर्मप्रवृत्ति प्रधान असलेल्या क्षत्रियजातीत रामकृष्णादि अवतार घेऊन जसें भगवंतांनी कर्मयोगाचें अनुष्ठान केलें, तसेंच हंसादि अवतार घेऊन संन्यासनिष्ठेचेंहि मंडन केलें, असें पुराणादिकांतून वर्णन आहे. अत्यंत वैराग्याने ज्याची कर्मप्रवृत्ति क्षीण झाली आहे व जो शमादि लक्षणसंपन्न असून निर्गुण ब्रह्मप्राप्तीकडेच ज्याच्या चित्ताचा ओढा आहे. अशा ब्राह्मणालाच केवळ संन्यासनिष्ठेचा अधिकार सांगितला आहे. असा अधिकारी विरळाच असणार; म्हणून ज्यांची कर्मप्रवृत्ति क्षीण नाही असा सर्व ब्राह्मणादिवर्णांना कर्मयोगनिष्ठाच हितावह आहे असा भगवंताच्या उपदेशाचा भाव आहे. ह्या दोन्ही निष्ठा भगवंतांनी स्वेच्छेनी निर्माण केल्या नसून जीवांच्या ठिकाणीं असलेल्या प्रकृतिस्वभावानुसार निर्माण केल्या आहेत.

भगवंतांनी मला कांही प्राप्त करून घ्यावयाचें नाही तरी मी कर्माचें आचरण करितों असें जें स्वत:विषयी म्हटले आहे, तेंहि जीवाचे ठिकाणी खरेच कर्मकर्तृत्व आहे असें जें कर्मासक्त अज्ञानी जनांना वाटत असतें त्या अज्ञानी जनांच्या दृष्टीनेच म्हटले आहे. वास्तविक नाही. कारण अज्ञानी जन प्रकृतीचें कर्म व कर्तृत्व आपल्यावर ओढून घेतात असें पुढे या अध्यायांतच भगवंतांनी स्वमुखाने सांगितले आहे. जीवदशेंत जें कर्म व कर्तृत्व खरें वाटतें तेंच आत्मज्ञान झाल्यावर खरें वाटत नाही. म्हणजे कर्मकर्तृत्व याचें अस्तित्वच अनुभवाला येत नाही ''तिन्ही अवस्थांचेनि द्वारें। उपाध्युपहिताकारें। भावाभावरूप स्फुरे। दृश्य जें हें॥ तें हें आघवेचि मी दृष्टा। ऐसिया बोधाचा माजिवटा। अनुभवाचा सुभटा। धेंडा तो नाचे॥'' (ज्ञा० अ० १८ ओ० ११८६-८७) जेवढें कांही दृश्य आहे म्हणजे जाणले जातें तें सर्व केवळ चैतन्याचें स्फुरण आहे, असा ज्ञानदशेंतला स्वानुभव श्रीज्ञानेश्वर महाराजांनी सांगितला आहे. म्हणून अज्ञान्याला जसें कर्म व कर्तृत्वाचें ज्ञान होतें. तसें ज्ञान्याला होत नाही. त्यांना जर सर्व एक चैतन्याचा अनुभव येतो, तर नित्यज्ञानी भगवान् श्रीकृष्णाला कर्म व कर्तृत्वाचें ज्ञान असणें व कर्म करणें कसें शक्य आहे? चैतन्याच्या या स्फूर्तीला अज्ञानी जीव भ्रांतीने कर्मकर्तृत्वादिक दृश्य म्हणत असतो. म्हणून भगवंताचा हा उपदेश अज्ञानी जीवांच्या दृष्टीनेच आहे असें म्हणावें लागतें.

सक्ता: कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत। कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसङ्ग्रहम्॥ २५॥

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिनाम्। जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्त: समाचरन्॥ २६॥

अर्थ—कर्मफळाची इच्छा करणारे अज्ञानी पुरुष ज्या आस्थेने कर्म करितात, तशाच आस्थेने ज्या ज्ञानी पुरुषाला लोकसंग्रह करायचा आहे, त्यानी धर्माचें आचरण फळाशा सोडून केलें पाहिजे.॥ २५॥ अज्ञानी व कर्मफळाची इच्छा करणारे अशा पुरुषांच्या बुद्धीचा भेद करूं नये. ज्ञानी पुरुषांनी परमेश्वराचे ठिकाणीं स्थिर चित्त ठेवून स्वत: धर्माचें आचरण करावें व लोकांकडून त्याचें अनुकरण करवावें.॥ २६॥

देखें फळाचिया आशा। आचरे कामुक जैसा। कर्मीं भरू होआवा तैसा। निराशाही॥ १६९॥
जे पुढतपुढती पार्था। हे सकळ लोकसंस्था। रक्षणीय सर्वथा। म्हणऊनियां॥ १७०॥
मार्गाधारें वर्तावें। विश्व हें मोहरे लावावें। अलौकिक नोहावें। लोकांप्रति॥ १७१॥
जें सायासें स्तन्य सेवी। तें पक्वान्नें केवीं जेवी। म्हणोनि बाळका जैशीं नेदावीं। धनुर्धरा॥ १७२॥
तैसी कर्मी जया अयोग्यता। तयाप्रति नैष्कर्म्यता। न प्रगटावी खेळतां। आदिकरुनी॥ १७३॥
तेथें सत्क्रियाचि लावावी। तेचि एकी प्रशंसावी। नैष्कर्मीही दावावी। आचरोनी॥ १७४॥
तया लोकसंग्रहालागीं। वर्ततां कर्मसंगीं। तो कर्मबंधु आंगीं। वाजेलना॥ १७५॥
जैसी बहुरूपियांची रावो राणी। स्त्रीपुरुषभावो नाहीं मनीं। परी लोकसंपादणी। तैशीच करिती॥ १७६॥

अर्थ—अर्जुना! हे पहा, फळाची आशा धरून कामनिक पुरुष जसें कर्म करितो तसें निरिच्छ ज्ञानीपुरुषाने आस्थेने कर्माचरण केलें पाहिजे.॥ १६९॥ या लोक संस्थेचें रक्षण झालें पाहिजे, म्हणून ज्ञानी पुरुषानीहि धर्माचरण सोडूं नये असें वारंवार सांगावें लागत आहे.॥ १७०॥ धर्ममार्गाने चालावें व सर्व लोकांनाहि त्या मार्गाने वागायला लावावें. लोकांना मार्गाने लावावयाचे असल्यास आपण अलौकिक म्हणजे सामान्य माणसांपेक्षा कांही विशेष आहो असें दाखवूं नये.॥ १७१॥ ज्या नुकत्याच जन्मलेल्या मुलाला आईचें स्तनपानहि करतां येत नाही तें पक्वान्न खावूं शकेल काय? म्हणून अर्जुना! अशा लहान मुलाला तीं देऊं नयेत.॥ १७२॥ त्याचप्रमाणे परमेश्वर प्राप्तीकरिता कशा रीतीने कर्म करायला पाहिजे हेंच ज्यांना समजत नाही त्यांना कर्मरहित होण्याचा उपदेश थट्टेने सुद्धां करूं नये.॥ १७३॥ त्यांना निष्काम कर्मानुष्ठानालाच लावावें त्याप्रमाणे कर्म करण्याचीच प्रशंसा करावी आणि जे कोणी ज्ञानाने कर्मरहित झाले असतील त्यांनीं स्वत: आचरण करून दाखवावें.॥ १७४॥ अशा लोकसंग्रहाकरिता धर्माचें आचरण करण्यांत कर्म बंधनकारक होत नाही.॥ १७५॥ बहुरूपी राजाराणीचें सोंग घेतात; पण त्यांच्या मनांत तसा स्त्रीपुरुषभाव उत्पन्न होत नाही. एवढेंच की लोकांत राजाराणी जसे असतात तसे नुसतें सोंग घेऊन लौकिक क्रीडा करून दाखवितात.॥ १७६॥

गूढार्थदीपिका—हाहि भगवंताचा उपदेश शुद्ध आत्मा कर्ता करविता नाही, म्हणून ज्या शुद्ध आत्मस्वरूप झालेल्या ज्ञान्याचे ठिकाणीं कर्मप्रवृत्तिरूप ज्ञानानंतरहि प्रारब्धानुसार शिल्लक राहते, अशा ज्ञानी पुरुषांनाच केलेला आहे व करणें शक्य आहे हें मागे आम्ही सांगितलें आहे. श्लोकांत "**अज्ञानां कर्मसंगीनाम्**" हीं जीं पदें आहेत त्यावरून असें स्पष्ट दिसतें की "अज्ञानाम्" म्हणजे मी कर्म व कर्तृत्व यांहून निराळा केवळ ज्ञानस्वरूप आहे असें विवेकाने ज्यांनी आपल्याला जाणलें नाही, म्हणून प्रकृतीचें कार्य जें कर्म व कर्तृत्व हे आपल्यावर ओढून घेऊन, कर्म करण्याची आसक्ति धरतात व प्रकृतीनुसार झालेंलें कर्म मी केलें, असें कर्तृत्व वागवितात, अशा अज्ञानी पुरुषांना निष्कर्मतेचा बरोबर अर्थ समजत नसल्यामुळे, कर्म सोडून देणे यालाच ते निष्कर्मता म्हणतात. वास्तविक मी कर्म व कर्तृत्व यांहून अत्यंत निराळा, केवळ सच्चिदानंदस्वरूप आहे असें जाणणें, याला सर्वकर्मसंन्यास किंवा निष्कर्मता म्हणतात. कर्मासक्त अज्ञानी लोकांचा कर्म टाकणें म्हणजे निष्कर्मता असा गैरसमाज होऊं नये म्हणून ज्ञानानंतर कर्मप्रवृत्तिरूप प्रकृति ज्यांचीं क्षीण झाली नाही, अशा आत्मज्ञानी पुरुषांनी देखील लोकांना सन्मार्ग दाखविण्याकरिता शास्त्रानुसार कर्मानुष्ठान करावें असें भगवान् म्हणतात.

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः। अहङ्कारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते॥ २७॥
तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः। गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते॥ २८॥
प्रकृतेर्गुणसम्मूढाः सज्जन्ते गुणकर्मसु। तानकृत्स्नविदो मन्दान्कृत्स्नविन्न विचालयेत्॥ २९॥

अर्थ—सर्व जेवढें कांही कर्म होते तेवढेंहि प्रकृतीच्या त्रिगुणांकडून होत असते पण अहंकाराने विचारशून्य झालेला पुरुष त्या कर्माचा आपल्याला कर्ता समजतो.॥ २७॥ पण ज्ञानी पुरुष गुण व कर्म हा दोन्ही प्रकारचा विभाग माझ्याहून भिन्न आहे व एका गुणाची दुसऱ्या गुणाचे ठिकाणी क्रीडा आहे असें तो जाणत असतो म्हणून तो आपल्याकडे कर्माचें कर्तृत्व घेत नाही.॥ २८॥ प्रकृतीच्या शरीरेंद्रियादि गुणाने विचारशून्य झालेले पुरुष गुणांचा व कर्मांचा अहंकार धरितात, म्हणून त्यांत आसक्त होतात. अशा अल्पज्ञांना सर्व जाणणाऱ्या ज्ञानी पुरुषांनी बिघडवूं नये.॥ २९॥

देखें पुढिलाचें वोझें। जरी आपुला माथां घेईजे। तरी सांगें कां न दाटिजे। धनुर्धरा॥ १७७॥
तैसीं शुभाशुभें कर्में। जियें निफजती प्रकृतिधर्में। तियें मूर्ख मतिभ्रमें। मी कर्ता म्हणे॥ १७८॥
ऐसा अहंकाराधि रूढ। एकदेशी मूढ। तया हा परमार्थ गूढ। प्रगटावा ना॥ १७९॥
हें असो प्रस्तुत। सांगिजेल तुज हित। तें अर्जुना देऊनि चित्त। अवधारीं पां॥ १८०॥
जे तत्त्वज्ञानियांचां ठायीं। तो प्रकृतिभावो नाहीं। जेथ कर्मजात पाहीं। निपजत असे॥ १८१॥
ते देहाभिमानु सांडुनी। गुणकर्मे वोलांडुनी। साक्षीभूत होऊनी। वर्तती देहीं॥ १८२॥
म्हणूनि शरीरीं जरी होती। तरी कर्मबंधा नातळती। जैसा कां भूतचेष्टा गभस्ती। घेपवेना॥ १८३॥
एथ कर्मीं तोचि लिंपे। जो गुणसंभ्रमें घेपे। प्रकृतीचेनि आटोपें। वर्ततु असे॥ १८४॥
इन्द्रियें गुणाधारें। राहाटती निजव्यापारें। तें परकर्म बलात्कारें। आपादी जो॥ १८५॥

अर्थ—हें पहा, अर्जुना! आपण जर दुसऱ्यांचें ओझें आपल्या डोक्यावर घेतलें तर आपल्याला भार होणार नाही काय?॥ १७७॥ त्याप्रमाणे जीं कांही पापपुण्यें होतात, तीं प्रकृतीकडून होत असतात. पण मूर्ख लोक अविचाराने मी तीं केलीं म्हणतात.॥ १७८॥ याप्रमाणे अहंकारावर आरूढ होऊन म्हणजे अहंकार धरून तो मूर्ख पुरुष (सर्व व्यापक ब्रह्मस्वरूप असून) देहापुरता एकदेशी होतो. अशा अज्ञानी पुरुषाला गुह्य परमार्थज्ञान सांगूं नये.॥ १७९॥ हें असो, सध्या तुला मी तुझ्या हिताचें काय तें सांगतों. तें नीट चित्त देऊन ऐक.॥ १८०॥ ज्ञानी पुरुष कर्माचें कर्तृत्व आपल्याकडे घेत नाहीत, कारण ज्या प्रकृतीच्या ठिकाणी संपूर्ण कर्माची उत्पत्ति होते त्या प्रकृतीचा भाव (प्रकृतीचें ऐक्य) ज्ञानी पुरुषांचे ठिकाणीं नसतो.॥ १८१॥ ज्ञानी पुरुष देहाचा अभिमान धरीत नाहीत म्हणजे मी देह आहे असें म्हणत नाहीत. गुणकर्मांना आपल्याहून निराळे पाहतात व त्या सर्वांचे साक्षी होऊन देहाचे ठिकाणीं

राहतात. ॥ १८२ ॥ ज्याप्रमाणे सूर्याच्या प्रकाशाच्या साह्याने सर्व प्राण्यांचे व्यापार होतात, पण त्यांचा लेप सूर्याला लागत नाही, त्याप्रमाणे शरीराचे ठिकाणीं ज्ञानी पुरुष राहतो तरी शरीरादिकांच्या कर्मांचा त्यांचाशीं कांही एक संबंध होत नाही. ॥ १८३ ॥ प्रकृतीच्या स्वाधीन होऊन जो वागतो व अविचाराने गुणच मी आहे असें समजतो तोच पुरुष कर्मांने बद्ध होतो. ॥ १८४ ॥ गुणानुसार इंद्रियांचे व्यापार होतात. ते आपल्याहून निराळे असलेल्या इंद्रियांचें कर्म मुद्दाम आपल्यावर ओढवून घेतो म्हणजे मीं तें कर्म केलें म्हणतो, त्याला कर्म बाधतें. ॥ १८५ ॥

गूढार्थदीपिका—अज्ञानी जीवात्मा अहंकाराने प्रकृतीशीं ऐक्य पावून प्रकृतीचें कर्म व कर्तृत्व आपल्यावर ओढून घेतो हें भगवंतांनी सांगितलें असल्यामुळे, अहंकाराने प्रकृतीशीं ऐक्य पावणें व तिचें कर्मकर्तृत्व आपल्या ठिकाणीं घेणें हा जो अविवेकरूपी जीवभाव, तो शुद्ध आत्म्याच्या ज्ञानाने टाकून देऊन, जीवात्मा, शुद्ध आत्मस्वरूप झाल्यावर तो सर्व कर्म व कर्तृत्वरहित होतो. म्हणून असें शुद्ध आत्मस्वरूप झालेले जे ज्ञानी असतात ते त्यांचे ठिकाणीं ज्ञानानंतर जोपर्यंत कर्मप्रवृत्ति क्षीण होत नाही तोपर्यंतच प्रकृतीनुसार कर्मयोगानुष्ठान करून लोकसंग्रह करूं शकतात व ज्यांचे ठिकाणीं कर्मप्रवृत्ति क्षीण झाली, अशांना कर्मानुष्ठान करून त्यांनी लोकसंग्रह करावा असा निर्बंध घालतां येत नाही.

मयि सर्वाणि कर्माणि सन्न्यस्याध्यात्मचेतसा । निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥ ३० ॥

अर्थ—आत्मस्वरूपाचे ठिकाणीं दृढ चित्तवृत्ति ठेवून माझे सगुण स्वरूपाचे ठिकाणीं कर्तृत्वासह सर्व कर्मे समर्पण कर व विषयाविषयींचा असलेला ममता अहंकार सोडून विषयसुखाची वासना निःशेष सोडून शोक न करतां युद्ध कर. ॥ ३० ॥

तरी उचितें कर्मे आघवीं। तुवां आचरोनि मज अर्पावीं। परी चित्तवृत्ति न्यासावी। आत्मरूपीं॥ १८६ ॥
हें कर्म मी कर्ता। कां आचरेन या अर्था। ऐसा अभिमानु झणें चित्ता। रिगों देसी॥ १८७॥
तुवां शरीरपरा नोहावें। कामनाजात सांडावें। मग अवसरोचित भोगावे। भोग सकळ॥ १८८॥
आतां कोदंड घेऊनि हातीं। आरूढ पां इये रथीं। देईं आलिंगन वीरवृत्ती। समाधानें॥ १८९॥
जगीं कीर्ति रूढवीं। स्वधर्माचा मानु वाढवीं। यया भारापासोनि सोडवीं। मेदिनी हे॥ १९०॥
आतां पार्था निःशंकु होईं। या संग्रामा चित्त देईं। एथ हेंवांचूनि कांहीं। बोलों नये॥ १९१॥

अर्थ—तेव्हा जीं कांही विहित कर्मे असतील तीं सर्व करून मला अर्पण कर. पण आपली चित्तवृत्ति मात्र आत्मस्वरूपाचे ठिकाणीं दृढ ठेव. ॥ १८६ ॥ हें कर्म आहे व मी त्याचा कर्ता आहे किंवा मी तें करीन अशी अभिमानाची वृत्ति कदाचित् वागविशील. ॥ १८७ ॥ जें कांही करायचें तें देहाचे सुखाकरिता, असा केवळ देहपरायण होऊं नको. सर्व कामना चित्तांतून काढून टाक. मग जे जे प्रसंगोपात्त भोग प्राप्त होतील ते खुशाल भोग. ॥ १८८ ॥ आता धनुष्य घेऊन रथावर आरूढ हो व आनंदाने आपल्या वीरवृत्तीचा स्वीकार कर. ॥ १८९ ॥ जगांत आपली कीर्ति गाजूं दे. स्वधर्माचा आदर वाढव आणि या पृथ्वीची दुर्जनांच्या भारापासून सुटका कर. ॥ १९० ॥ अर्जुना! आता निःशंक हो, या युद्धाकडे लक्ष दे, कारण युद्धाचे वेळीं युद्धावांचून दुसरें कांही बोलूं नये. ॥ १९१ ॥

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवाः । श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः ॥ ३१ ॥
ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम् । सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥

अर्थ—या माझ्या मताचें जे कोणी पुरुष अत्यंत श्रद्धेने व निर्मत्सरचित्ताने आचरण करतील तेहि कर्मबंधापासून मुक्त होतील. ॥ ३१ ॥ जे कोणी पुरुष या माझ्या उपदेशाकडे दोष दृष्टीने पाहतील व त्याप्रमाणे वागणार नाहीत, ते अत्यंत विचारशून्य मूर्ख आहेत व आपला घात करून घेणारे होत असें पक्के समज. ॥ ३२ ॥

हें अनुपरोध मत माझें। जिहीं परमादरें स्वीकारिजे। श्रद्धापूर्वक अनुष्ठिजे। धनुर्धरा॥ १९२॥
तेही सकळ कर्मीं वर्ततु। जाण पां कर्मरहितु। म्हणोनि हें निश्चितु। करणीय गा॥ १९३॥
नातरी प्रकृतिमंतु होउनी। इंद्रिया लळा देउनी। जे हें माझें मत अव्हेरुनी। ओसंडिती॥ १९४॥

जे सामान्यत्वें लेखिती। अवज्ञा करूनि देखिती। कां हा अर्थवादु म्हणती। वाचाळपणें॥ १९५॥
ते मोहमदिरा भ्रमले। विषयविखें घारले। अज्ञानपंकीं बुडाले। निभ्रांत मानीं॥ १९६॥
देखें शवाचां हातीं दिधलें। जैसें कां रत्न वायां गेलें। नातरी जात्यंधा पाहलें। प्रमाण नोहे॥ १९७॥
कां चंद्राचा उदयो जैसा। उपयोगा न वचे वायसा। मूर्खा विवेकु हा तैसा। रुचेल ना॥ १९८॥
तैसे ते पार्था। जे विमुख या परमार्था। तयांसी संभाषण सर्वथा। करावें ना॥ १९९॥
म्हणोनि ते न मानिती। आणि निंदाही करूं लागती। सांगें पतंगु काय साहती। प्रकाशातें॥ २००॥
पतंगा दीपीं आलिंगन। तेथ त्यासी अचुक मरण। तेवीं विषयाचरण। आत्मघाता॥ २०१॥

अर्थ—अर्जुना माझें हें निश्चित मत जे कोणी पुरुष अत्यंत आदराने प्रमाण मानून, त्याप्रमाणे अत्यंत श्रद्धेने वागतील. ॥ १९२॥ ते सर्व कर्म करीत असले तरी ते सर्व कर्मरहित आहेत असें समज. म्हणून मी सांगितल्याप्रमाणे निश्चित कर्म केलें पाहिजे. ॥ १९३॥ नाहीतर प्रकृतीच्या स्वाधीन होऊन व इंद्रियांचे लाड पुरवित माझ्या मताला धि:कारून जें कोणी वागतील. ॥ १९४॥ जे कोणी मला पूर्ण ब्रह्म न समजतां सामान्य पुरुषांप्रमाणे लेखतील, माझ्या म्हणण्याचा अनादर करतील, वाचाळपणाने आपलेंच शहाणपण मिरवून माझ्या या मताला अर्थवाद म्हणजे केवळ स्तुतिमात्र म्हणतील॥ १९५॥ ते अविवेकरूपी मद्य पिऊन विचारशून्य झाले, त्यांना विषयसुखरूपी विषाची बाधा झाली, ते अज्ञानरूपी चिखलांत फसले हें निसंशय जाण. ॥ १९६॥ ज्याप्रमाणे प्रेताचे हातांत दिलेलें रत्नहि फेंकून द्यावें लागतें किंवा जन्मांध असलेल्या पुरुषाला दिवसाच्या प्रकाशाचा उपयोग नसतो. ॥ १९७॥ किंवा चंद्राचा प्रकाश कावळ्याच्या कामीं पडत नाही त्याप्रमाणे अज्ञानी मूर्खांना माझा उपदेश हितकर वाटणार नाही किंवा रुचणार नाही. ॥ ११८॥ असे हे परमार्थाला विन्मुख असणारे जे पुरुष आहेत त्यांच्याशीं भाषणच करूं नये. ॥ १९९॥ हे मूर्ख लोक माझें म्हणणे मानत नाहीत व आणखी माझ्या मताची निंदा करूं पाहतात. खरेच आहे, अर्जुना! पतंगाला दिव्याचा प्रकाश पाहून बरें वाटतें का?॥ २००॥ ज्याप्रमाणे पतंगाने दिव्याला आलिंगन दिलें की निश्चित त्याचा नाश होतो, त्याचप्रमाणे स्वैर विषयसुख भोगणें हेंहि निश्चित आत्मघाताला कारण होते. ॥ २०१॥

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि। प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति॥ ३३॥

अर्थ—सर्व प्राणी आपल्या प्रकृतीच्या स्वाधीन होऊन वागतात, एवढेच नाही तर ज्ञानी पुरुष देखील आपल्या प्रकृतीप्रमाणेच वागतात, मग तेथे दुसरा कोणी (म्हणजे मी देखील) शास्त्रानुसार इंद्रियांचें नियमन करूं शकत नाही (म्हणजे आपल्या इंद्रियांचे आपणच नियमन केलें पाहिजे, असा अर्थ). ॥ ३३॥

म्हणोनि इंद्रियें एकें। जाणतेनि पुरुखें। लाळावीं ना कौतुकें। आदिकरुनी॥ २०२॥
हां गा सर्पेसी खेळों येईल। कीं व्याघ्रसंसर्ग सिद्धी जाईल। सांगें हाळाहाळ जिरेल। सेविलिया काई॥ २०३॥
देखें खेळतां अग्नि लागला। मग तो न सांवरे जैसा उधवला। तैसा इंद्रियां लळा दिधला। भला नोहे॥ २०४॥
एऱ्हवीं तरी अर्जुना। या शरीरा पराधीना। कां नाना भोगरचना। मेळवावी॥ २०५॥
आपण सायासेंकरूनि बहुतें। सकळहि समृद्धिजातें। उदोअस्तु या देहातें। प्रतिपाळावें कां॥ २०६॥
सर्वस्वें शिणोनि एथें। अर्जवावीं संपत्तिजातें। तेणें स्वधर्मु सांडूनि देहातें। पोखावें काई॥ २०७॥
मग हें तंव पांचमेळावा। शेखीं अनुसरेल पंचत्वा। ते वेळीं केला कें गिंवसावा। शीणु आपुला॥ २०८॥
म्हणूनि केवळ देहभरण। तें जाणें उघडी नागवण। यालागीं एथ अंतःकरण। देयावेंना॥ २०९॥

अर्थ—म्हणून जाणत्या शहाण्या पुरुषाने आपल्या इंद्रियांचे लाड, कौतुक म्हणून देखील पुरवूं नये. ॥ २०२॥ सर्पाशीं कधी खेळतां येईल काय? किंवा वाघाचा संबंध ठेवणें शक्य आहे काय? अथवा हालाहल विषय प्यालें तर तें पोटांत पचेल काय?॥ २०३॥ अर्जुना! पहा, खेळतां खेळतां जरी अग्नि लागला व पेटला तर तो सांवरला जात नाही. तसेंच इंद्रियांचे लाड पुरविणें आपल्या कल्याणाचें होत नाही. ॥ २०४॥ नाही तरी हें आपलें शरीर काळाच्या स्वाधीन आहे. या पराधीन देहाच्या सुखाकरिता, अर्जुना! कां आपण नानाप्रकारचे कष्ट सोसून नानाप्रकारचे

भोग मिळविण्याचा प्रयत्न करावा ? ॥ २०५ ॥ नानाप्रकारचे कष्ट करून व नाना प्रकारची भोगसंपत्ति मिळवून आणि रात्रंदिवस या देहाची काळजी वाहून त्याचे पोषण कां करावें बरें ? ॥ २०६ ॥ सर्वथा कष्ट करून संपत्ति मिळवावी आणि स्वधर्माला सोडून या शरीरांचें पोषण करावें काय ? ॥ २०७ ॥ पुढे पंचभूतांचे समुदायाने बनलेलें हें शरीर जेव्हा पंचभूतांत शेवटीं मिळून जाईल तेव्हा या शरीराचें पोषण करण्याकरिता जे आपण कष्ट केले ते कांही दिसत नाहीत, सर्व व्यर्थच जातात. ॥ २०८ ॥ म्हणून स्वधर्माचरणात, मिळविलेल्या शक्तीचा व्यय न करतां केवळ देह पोसण्यांतच तिचा विनियोग करणें ही सर्वस्वीं नागवण आहे. म्हणून केवळ विषयसुख भोगण्याकडेच लक्ष देऊं नये. ॥ २०९ ॥

इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ । तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥ ३४ ॥

अर्थ—इंद्रियांचे ठिकाणीं आपल्या विषयाविषयीं स्वाभाविकच रागद्वेष आहेत. पण मात्र मनुष्याने त्यांच्या तावडींत जाऊं नये. कारण रागद्वेष हे परमार्थ मार्गांतील लुटारू आहेत. ॥ ३४ ॥

एऱ्हवीं इंद्रियांचिया अर्था-। सारखा विषयो पोखितां। संतोषु कीर चित्ता। आपजेल ॥ २१० ॥
परी तो संवचोराचा सांगातु। जैसा नावेक स्वस्थु। जंव नगराचा प्रांतु। सांडिजेना ॥ २११ ॥
बापा विषाची मधुरता। झणें आवडी उपजे चित्ता। परी तो परिणाम विचारितां। प्राणु हरी ॥ २१२ ॥
देखें इंद्रियीं कामु असे। तो लावी सुखदुराशे। जैसा गळीं मीनु अमिषें। भुलविजे गा ॥ २१३ ॥
परी तयामाजी गळु आहे। जो प्राणातें घेऊनि जाये। तो जैसा ठाउवा नोहे। झांकलेपणें ॥ २१४ ॥
तैसें अभिलाषें येणें कीजेल। जरी विषयांची आशा धरिजेल। तरी वरपडा होईजेल। क्रोधानळा ॥ २१५ ॥
जैसा कवळोनियां पारधी। घातेचिये संधी। आणी मृगातें बुद्धी। साधावया ॥ २१६ ॥
एथ तैसीचि परी आहे। म्हणूनि संगु हा तुज नोहे। पार्था दोन्ही कामक्रोध हे। घातुक जाणें ॥ २१७ ॥
म्हणऊनि हा आश्रयोचि न करावा। मनींही आठवो न धरावा। एकु निजवृत्तीचा वोलावा। नासों नेदीं ॥ २१८ ॥

अर्थ—एरव्हीं इंद्रियांची ओढ ज्या विषयाकडे आहे तोच विषय इंद्रियाला भोगूं दिल्यास मनाला संतोष होईल हें खरें. ॥ २१० ॥ पण ज्याप्रमाणे सोबती करणारे चोर गांवाची शींव सुटेंपर्यंत कांही करीत नाहीत; स्वस्थ राहतात, पण पुढे गांवाची शींव सुटली की लुटतात, त्याप्रमाणेच इंद्रियांचे रागद्वेष हे सोबतीचे चोर आहेत. ॥ २११ ॥ बापा अर्जुना! या विषयसुखाचे ठिकाणीं जर का चित्ताला गोडी लागली की, त्याच्या परिणामाचा विचार करतां आपला नाशच दिसून येतो. ॥ २१२ ॥ अर्जुना! पहा, इंद्रियांचे ठिकाणीं सुखाची इच्छा असते व ती इच्छा मग कधी आवरली जाणार नाही अशी दुर्धर वाढते. ज्याप्रमाणे गळाला लागलेल्या मांसाच्या तुकड्याला मत्स्य भुलतो त्याप्रमाणे मनुष्य विषयसुखांत भुलतो. ॥ २१३ ॥ पण गळाला लागलेल्या मांसाच्या तुकड्याने गळ झांकला गेल्यामुळे प्राण घेणारा गळ त्या मत्स्याला दिसत नाही. ॥ २१४ ॥ त्याप्रमाणे या कामाने लोभ उत्पन्न होऊन विषयसुखाची आशा धरली जाईल आणि त्यामुळे क्रोधरूपी अग्नीच्या तावडींत मनुष्य सांपडेल. ॥ २१५ ॥ ज्याप्रमाणे पारधी किंवा शिकारी मृगाला पकडण्याकरिता किंवा मारण्याकरिता मृग मारला जाईल अशा अडचणींत मृगाला आपल्या बुद्धीने घेरतो. ॥ २१६ ॥ अर्जुना! तशीच स्थिति येथेहि आहे. म्हणून त्यांचा संगच तुझ्या उपयोगाचा नाही, अर्जुना! काम क्रोध हे दोन्ही परमार्थात घातक आहेत. ॥ २१७ ॥ म्हणून यांचा आश्रय करूं नको. एवढेंच नाही तर मनाने देखील त्यांचें कधी स्मरण करूं नये आणि मी आपल्या सर्वांहून निराळा साक्षिस्वरूप आहे या वृत्तीचा जो जिव्हाळा तो एक कधी नाहीसा होऊं देऊं नकोस. ॥ २१८ ॥

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्। स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥

अर्थ—दुसऱ्याला विहित असलेला धर्म आचरण्यास सोपा असला व आपला धर्म आचरण्यास कठीण वाटत असला, तरी दुसऱ्याला विहित असलेल्या धर्माचें आचरण करण्यापेक्षा आपल्याला विहित असलेला धर्मच श्रेयस्कर असतो. आचरण्यास कठीण म्हणून आपल्याला मरण आलें तरी त्यांत कल्याणच असतें; पण परक्याचा धर्म मात्र आपल्याला अनर्थकारक असतो. ॥ ३५ ॥

अगा स्वधर्मु हा आपुला। जरी कां कठिणु जाहला। तरी हाचि अनुष्ठिला। भला देखें॥ २१९॥
येरु आचारु जो परावा। तो देखतां कीर बरवा। परी आचरतेनि आचरावा। आपुलाचि॥ २२०॥
सांगें शूद्रघरीं आघवीं। पक्वान्नें आहाति बरवीं। तीं द्विजें केवीं सेवावीं। दुर्बळु जरी जाहला॥ २२१॥
हें अनुचित कैसेनि कीजे। अग्राह्य केवीं इच्छिजे। अथवा इच्छिलेंही पाविजे। विचारीं पां॥ २२२॥
तरी लोकांचीं धवळारें। देखोनियां मनोहरें। असतीं आपुलीं तणारें। मोडावीं केवीं॥ २२३॥
हें असो वनिता आपुली। कुरूप जरी जाहली। तरी भोगितां तेचि भली। जियापरी॥ २२४॥
तेवीं आवडे तैसा सांकडु। आचरतां जरी दुवाडु। तरी स्वधर्मुचि सुरवाडु। परत्रींचा॥ २२५॥
हां गा साकर आणि दूध। हें गौल्य कीर प्रसिध्द। परी कृमिदोषीं विरुद्ध। घेपे केवीं॥ २२६॥
ऐसेंनिही जरी सेविजेल। तरी ते आळुकीचि उरेल। जे तें परिणामीं पथ्य नव्हेल। धनुर्धरा॥ २२७॥
म्हणोनि आणिकांसी जें विहित। आणि आपणपेयां अनुचित। तें नाचरावें जरी हित। विचारिजे॥ २२८॥
या स्वधर्मातें अनुष्ठितां। वेंचु होईल जीविता। तोहि निका वर उभयतां। दिसत असे॥ २२९॥
ऐसें समस्त सुरशिरोमणी। बोलिले जेथ श्रीशार्ङ्गपाणी। तेथ अर्जुन म्हणे विनवणी। असे देवा॥ २३०॥
हें जें तुम्हीं सांगितलें। तें सकळ कीर म्यां परिसलें। परी आतां पुसेन कांहीं आपलें। अपेक्षित॥ २३१॥

अर्थ—अर्जुना! आपला विहित धर्म कठीण जरी वाटत असला तरी त्याचेंच आचरण करणें आपल्या कल्याणाचें असतें. ॥ २१९ ॥ एरवीं दुसऱ्याला विहित असलेला धर्म जरी बरा दिसत असला तरी आचरण करायचें तें स्वधर्माचेंच केलें पाहिजे. ॥ २२० ॥ अर्जुना! सांग, शूद्रजातीचें घरीं उत्तम उत्तम पक्वान्नें केलीं असलीं तरीं अत्यंत दरिद्री आहे म्हणून ब्राह्मणाने तीं कशी खावीं बरें ?॥ २२१ ॥ असें विहित नसलेलें कर्म कसें करायचें किंवा जें शूद्रान्न आपल्याला निषिद्ध म्हणून शास्त्राने सांगितले त्यांची इच्छा तरी कशी करावी ? अथवा इच्छिलें तरी कसें प्राप्त करून घ्यावें याचा विचार कर. ॥ २२२ ॥ तसेंच दुसऱ्या लोकांची सात मजलीं सुंदर घरें पाहून आपल्या गवताच्या झोपड्या कशा मोडाव्या ?॥ २२३ ॥ असो, आपली बायको जरी कुरूप असली तरी भोग घ्यावयाचा तर तिचाच घेणें हिताचें असतें. ॥ २२४ ॥ त्याप्रमाणे आपला स्वधर्म वाटेल तितका कठीण असला व आचरतांना दुःखदायक असला तरी स्वधर्माचें आचरणच मेल्यानंतर सुखकारक असतें. ॥ २२५ ॥ बा अर्जुना! साखर आणि दूध हे दोन्ही गोड म्हणून प्रसिद्ध आहेत पण कृमीच्या आजारांत देणे विरुद्ध आहे, तेव्हा तें कसें घ्यावें ?॥ २२६ ॥ इतक्यावरहि अर्जुना! कृमिदोषवानाने त्यांचें सेवन केलेंच तर ती इच्छेची पूर्तीच होईल, पण परिणामी हितकर होणार नाही. ॥ २२७ ॥ म्हणून परलोकाचा विचार केला तर दुसऱ्याला जो धर्म विहित आहे व आपल्याला विहित नाही अशा धर्माचें आचरण करूं नये. ॥ २२८ ॥ आपल्या विहित धर्माचें अनुष्ठान करतां करतां प्राण जरी खर्ची पडलें तरी तें उत्तम असतें; कारण इहपरलोकांत तसें होणें श्रेष्ठ गणलें गेलें आहे. ॥ २२९ ॥ याप्रमाणे जेथे सर्व देवांच्या देवाचें असें बोलणें चाललें आहे तेथे अर्जुन म्हणतो, शार्ङ्गधरा! आपले चरणीं माझी एक प्रार्थना आहे. ॥ २३० ॥ तुम्ही जें सर्व आतापर्यंत सांगितलें तें मी सर्व बरोबर ऐकिलें आहे; पण आता माझी कांही विचारावयाची इच्छा आहे तें मी विचारतो. ॥ २३१ ॥

गूढार्थदीपिका—मनुष्याला ब्राह्मणादि वर्णानुसार जो निरनिराळा धर्म भगवंतांनी सांगून ठेविला आहे तो त्याच्या समोर धर्म असतो व तोच त्याच्या इहपरकल्याणाचा आहे. पण केव्हा केव्हा मनुष्याला आपल्या स्वधर्मापेक्षा दुसऱ्याला विहित असलेल्या धर्मातील वर वर दिसणारा सुटसुटितपणा किंवा सोपेपणा अथवा फायदा पाहून आपला धर्म सोडून दुसऱ्याच्या धर्माने वागण्याचा मोह होतो. अर्जुनाला असाच मोह होऊन क्षत्रियांच्या युद्धरूपी घोर कर्मापेक्षा ब्राह्मणांचा क्षमाशांतिरूप संन्यासधर्मच आपलें व सर्व समाजाचें किंवा अपल्या ज्ञातीचें कल्याण करणारा आहे व इहपरलोक किंवा आत्मकल्याण साधणारा आहे असें वाटूं लागलें. पण इहलोकांतील भौतिक विषयसुख व अध्यात्मसुख या दोघांचीहि प्राप्ति होण्याकरिता भगवंतांनी प्रत्येकाचा धर्म सांगून ठेविला असल्यामुळे व तो भगवानच

सांगून ठेविलेल्या धर्माप्रमाणे अनुष्ठान करणाऱ्याचें दोन्ही प्रकारचें हित साधून देणारा असल्यामुळे, भगवंताने आपल्याला विहित केलेला धर्म जरी आपल्या बुद्धीने अकल्याणाचा व दुसऱ्याला विहित असलेला धर्म कल्याणाचा आहे असें वाटत असलें तरी, स्वधर्म सोडून परधर्माचें आचरण करण्याचा मनुष्याने आपल्या बुद्धीने केलेला विचार हितकर होत नाही, हेंच भगवंतांनी या श्लोकाने सांगितलें आहे.

अर्जुन उवाच

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पुरुषः। अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः॥ ३६॥

अर्थ—अर्जुन म्हणतो हे वृष्णिकुळांत उत्पन्न झालेल्या भगवंता! हा पुरुष इच्छा नसतांनाहि बळजबरीने-दुसऱ्याने प्रवृत्त करावें तसें कोणी प्रवृत्त केल्यामुळे पापाचरण करतो किंवा शास्त्र सोडून वागतो. ॥ ३६॥

तरी देवा हें ऐसें कैसें। जे ज्ञानियांचीही स्थिति भ्रंशे। मार्गु सांडुनि अनारिसे। चालत देखों॥ २३२॥
सर्वज्ञुही जे होती। हे उपायही जाणती। तेही परधर्में व्यभिचरति। कवणें गुणें॥ २३३॥
बीजा आणि भुसा। अंधु निवाडु नेणे जैसा। नावेक देखणाही तैसा। बरळे कां पां॥ २३४॥
जे असता संगु सांडिती। तेचि संसर्गु करितां न धाती। वनवासीही सेविती। जनपदातें॥ २३५॥
आपण तरी लपती। सर्वस्वें पाप चुकविती। परी बलात्कारें सुइजती। तयाचि माजीं॥ २३६॥
जयाची जीवें घेती विवसी। तेंचि जडोनि ठाके जीवेंसी। चुकवितां तें गिंवसी। तयांतेंचि॥ २३७॥
ऐसा बलात्कारु एकु दिसे। तो कवणाचा एथ आग्रहो असे। हें बोलावें हृषीकेशें। पार्थु म्हणे॥ २३८॥

अर्थ—तरी, देवा! हें आश्चर्यच आहे की ज्ञानी जे म्हणवितात ते देखील विहित मार्ग सोडून भलत्या मार्गाने चाललेले व विहित मार्गापासून भ्रष्ट झालेले दिसतात. ॥ २३२॥ जे सर्वज्ञ आहेत व जे आपल्या कल्याणाचा मार्ग जाणतात तेहि स्वधर्म सोडून परधर्माने वागतांना जे दिसतात ते कशामुळे ?॥ २३३॥ बी आणि कोंडा यांचा निवाडा आंधळ्याला करतां येणार नाही; पण केव्हा केव्हा क्षणभर डोळस पुरुषहि चुकतो तें कां ?॥ २३४॥ जे पुरुष, असलेला आप्तेष्टांचा संग सोडून दुसऱ्याचा संसर्ग लावून घेतांना पुरे म्हणत नाहीत, लोकसंसर्ग सोडून जंगलात राहायला गेलेले पुरुषहि पुनः लोकांतच राहू इच्छितात. ॥ २३५॥ पाप होऊं नये म्हणून पाप प्रसंगाला चुकविण्याचा प्रयत्न करितात व पापापासून आपण लपून राहतात. पापकर्मीच्या दृष्टीस आपण पडत नाहीत. असे जे पुरुष तेहि पण बळजबरीने पापाचरणांत लोटले जातात. ॥ २३६॥ ज्या वस्तूचा मनापासून त्रास वाटतो, त्याच वस्तूचा मनांत ध्यास लागतो आणि जी वस्तु आपण चुकवू पाहतों ती गळयात येऊन पडते. ॥ २३७॥ असा एक बलात्कार दिसून पडतो तो कोणाचा आग्रह किंवा बलात्कार आहे! हे, देवा! मला नीट सांगा. ॥ २३८॥

श्रीभगवानुवाच

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः। महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम्॥ ३७॥

अर्थ—भगवान म्हणतात—अर्जुना! रजोगुणापासून उत्पन्न झालेला हा काम आहे व हाच पुढे क्रोधहि होतो. हा मोठा खादाड आहे. म्हणजे याची कधी तृप्तीच होत नाही. तसाच हा मोठा पापी आहे. (कारण हाच पापाला प्रवृत्त करितो) म्हणून या जगाचा हा वैरी आहे असें समज. ॥ ३७॥

तंव हृदयकमळआरामु। जो योगियांचा निष्काम कामु। तो म्हणतसे पुरुषोत्तमु। सांगेन आइक॥ २३९॥
तरी हे काम क्रोधु पाहीं। जयांतें कृपेची सांठवण नाहीं। हे कृतांताचां ठायीं। मानिजती॥ २४०॥
हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचे वाघ। भजनमार्गीचे मांग। मारक जे॥ २४१॥
हे देहदुर्गींचे धोंड। इंद्रियग्रामींचे कोंड। यांचें व्यामोहादिक बंड। जगावरी॥ २४२॥
हे रजोगुण मानसीचे। समूळ आसुरियेचे। धालेपण ययांचें। अविद्या केलें॥ २४३॥
हे रजाचे कीर जाहले। परी तमासी पढियंते भले। तेणें निजपद यां दिधलें। प्रमादमोहो॥ २४४॥
हे मृत्यूचां नगरीं। मानिजती निकियापरी। जे जीविताचे वैरी। म्हणऊनियां॥ २४५॥

जयांसि भुकेलियां आमिषा। हें विश्व न पुरेचि घांसा। कुळवाडी यांची आशा। चाळीत असे॥ २४६॥
कौतुकें कवळितां मुठी। जिये चवदा भुवनें थेंकुटी। ते भ्रांति तिये धाकुटी। वाल्हीदुल्ही॥ २४७॥
जे लोकत्रयाचें भातुकें। खेळतांचि खाय कवतिकें। तिच्या दासीपणाचेनि बिकें। तृष्णा जिये॥ २४८॥
हें असो मोहें मानिजे। यांतें अहंकारें घेपे दीजे। जेणें जग आपुलेनि भोजें। नाचवीत असे॥ २४९॥
जेणें सत्याचा भोकसा काढिला। मग असत्य तृणकुटा भरिला। तो दंभु रूढविला। जगीं इहीं॥ २५०॥
साध्वी शांति नागविली। मग माया मांगी शृंगारिली। तियेकरवीं विटाळविलीं। साधुवृंदें॥ २५१॥
इहीं विवेकाची त्राय फेडिली। वैराग्याची खाली काढिली। जितया मान मोडिली। उपशमाची॥ २५२॥
इहीं संतोषवन खांडिलें। धैर्यदुर्ग पाडिले। आनंदरोप सांडिले। उपडूनियां॥ २५३॥
इहीं बोधाचीं रोपें लुंचिलीं। सुखाची लिपी पुसिली। जिव्हारीं आगी सूदली। तापत्रयाची॥ २५४॥
हे आंगा तंव घडले। जीवींचि आथी जडले। परी नातुडती गिंवसिले। ब्रह्मादिकां॥ २५५॥
हे चैतन्याचे शेजारीं। वसती ज्ञानाचां एका हारीं। म्हणोनि प्रवर्तले महामारी। सांवरती ना॥ २५६॥
हे जळेंवीण बुडविती। आगीविण जाळिती। न बोलतां कवळिती। प्राणियांतें॥ २५७॥
हे शस्त्रेंवीण साधिती। दोरेंवीण बांधिती। ज्ञानियासी तरी वधिती। पैज घेउनी॥ २५८॥
हे चिखलेंवीण रोंविती। पाशिकेंवीण गोंविती। हे कवणाजोगे न होती। आंतौटेपणें॥ २५९॥

अर्थ—यावर, हृदयरूपी कमळ हें ज्याचें क्रीडास्थान आहे, योगीजनाचा जो कामनारहित काम आहे म्हणजे योगी विषयसुखाची इच्छा सोडून ज्याच्या प्राप्तीची इच्छा करितात, तो परमात्मा श्रीकृष्ण म्हणतो, अर्जुना! सांगतों ऐक.॥ २३९॥ तू विचारलेस तर, हे कामक्रोध जे आहेत त्यांचे ठिकाणी दयावृत्तीचा मुळीच सांठा नाहीं. हे साक्षात् मृत्युच आहेत असें समज.॥ २४०॥ हे आत्मज्ञानरूपी ठेव्यावर बसलेले सर्प आहेत, हे विषयरूप गुहेंत दडून बसलेले वाघ आहेत, हे परमेश्वराच्या भजनमार्गानें जाणारे जे लोक आहेत त्यांना मारणारे मारेकरी मांग आहेत.॥ २४१॥ हे देहरूप किल्ल्याचे मजबूत दगडी चिरे आहेत (म्हणजे मजबूत दगडांनी जसा किल्ला मजबूत राहतो, त्याप्रमाणे काम क्रोध हे देहबुद्धि दृढ करणारे आहेत). हे इंद्रियरूपी गांवीचे गांवकुस आहेत (म्हणजे गांवाच्या भोंवतीं जी भिंत असते तिच्या योगाने गांवाचें संरक्षण होतें त्याप्रमाणे कामक्रोधाचे योगाने इंद्रियांचें संरक्षण होतें किंवा इंद्रियांच्या विषयासक्तीचें संरक्षण होते). या कामक्रोधांनी विचारशून्यता इत्यादिकांच्या साह्याने सर्व जगावर उठाव केला आहे.॥ २४२॥ कामक्रोध हे मनाचा रजोगुणच होय. हे कामक्रोध नि:शेष आसुरी संपत्तीच होय आणि अविद्येने म्हणजे विपरीत भ्रांतीने यांना दाईप्रमाणे दूध पाजून वाढविलें.॥ २४३॥ हे रजोगुणापासून जन्मले हें अगदी खरें, पण हे तमोगुणाचेहि मोठे आवडते आहेत. त्या तमोगुणाने या कामक्रोधांना प्रमाद, विचारशून्यता किंवा अविवेक हें आपलें पद दिलें.॥ २४४। मृत्यूच्या नगरांत यांना अगदीं सच्च्या मित्राप्रमाणे मानिलें जातें; कारण हें जीविताचे वैरी आहेत.॥ २४५॥ या कामक्रोधाच्या भुकेची शांति करण्याकरिता मांस द्यावयाचें तर संपूर्ण विश्वाचें मांस त्यांना एका घांसाला देखील पुरत नाही. जगरूप शेतीचा सर्व उदीम यांच्या ठिकाणीं असणाऱ्या आशेनेच होत असतो.॥ २४६॥ या कामक्रोधांनी सृष्टीच्या चवदाहि लोकांना कौतुकाने मुठींत धरतो म्हटलें तर ती चवदा भुवनेंहि कमी पडतात आणि या कामक्रोधांची भ्रांति ही आवडती धाकटी बहीण आहे.॥ २४७॥ त्रैलोक्य हें मुलांचे भातुक्याप्रमाणे कामक्रोधांकडून सहज खाल्ले जातें. विषयसुखाची वासना ही या कामक्रोधांच्या दासीपणाचें बळावर जगते.॥ २४८॥ हे असो. अर्जुना! अविवेक या कामक्रोधांना मोठा मान देतो. अहंकार याच्याशीं घेण्यादेण्याचा व्यापार करितो. म्हणून तो अहंकार वाटेल तसें सर्व जग हौसेने नाचवित आहे.॥ २४९॥ या अहंकाराने सत्यपणाचा जो गाभा तोच नाहिसा केला व त्यांत असत्यपणाचें कुटार भरून दिलें. तोच जगांत दंभ प्रसिद्ध झाला.॥ २५०॥ सती शांतीला लुटून टाकिलें. कपटरूपी मांगिणीला सजविलें व तिच्या हाताने साधुसमुदाय बाटविला.॥ २५१॥ यांनी विवेकाची प्रतिष्ठाच नाहिशी केली. वैराग्याची साल सोलून काढली व जिवंत उपशमाची मानच मोडली.॥ २५२॥

यांनी संतोषरूपी वन उध्वस्त केलें. धैर्यरूपी मजबूत किल्ला जमीनदोस्त केला आणि मनाच्या समाधानाचें रोपटें उपटून टाकिलें. ॥ २५३ ॥ यांनी ज्ञानाचीं रोपटें तोडून टाकलीं, सुख हा शब्दच पुसून टाकिला व हृदयांत आध्यात्मिकादि तीन दु:खरूपी अग्नीची शेगडी घातली. ॥ २५४ ॥ हे अंगात उत्पन्न झाले आहेत. चित्तांत दृढ खिळून बसले आहेत, पण ब्रह्मादिकांनी शोध केला तरी त्यांच्या हातीं लागत नाहीत. ॥ २५५ ॥ हे चैतन्याचे अगदी जवळ असतात, ज्ञानाच्या एका सत्तारूप पंक्तींत राहतात, म्हणूनच ते आटोपले जाऊं शकत नाहीत व सर्व नाश करण्यास प्रवृत्त होतात. ॥ २५६ ॥ हे पाण्यावांचून बुडवितात, अग्निवांचून जाळतात. न बोलतांच मनुष्याला घेरतात. ॥ २५७ ॥ हे शस्त्रावांचून मारतात, दोरीवांचून बांधतात आणि ज्ञानी पुरुषाला प्रतिज्ञा करून मारतात, म्हणजे त्यांचे ठिकाणीं देहबुद्धि उत्पन्न करितात. ॥ २५८ ॥ हे चिखलावांचून गाडतात, जाळ्यावांचून गुंतवितात आणि आपल्या चिवटपणाने कोणाच्या स्वाधीन होत नाहीत. ॥ २५९ ॥

धूमेनाऽऽव्रियते वह्निर्यथादर्शो मलेन च। यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम्॥ ३८ ॥
आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा। कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च॥ ३९ ॥

अर्थ—जसा धूमाने अग्नि, धुळीने आरसा व वारेने गर्भ आच्छदिलेला असतो, तसें हें आत्मज्ञान कामक्रोधाने झांकलेलें आहे. ॥ ३८ ॥ अर्जुना जो काम, ज्याची कधी तृप्तिच होत नाही असा अग्निच आहे व जो ज्ञान्याचा सदा वैरी आहे, त्या कामाने आत्मज्ञान झांकून टाकिलें आहे. ॥ ३९ ॥

जैसी चंदनाची मुळी। गिंवसोनि घेपें व्याळीं। नातरी उल्बाची खोळी। गर्भस्थासी॥ २६० ॥
कां प्रभावीण भानु। धूमेंवीण हुताशनु। जैसा दर्पण मळहीनु। कंहींच नसे॥ २६१ ॥
तैसें इहींवीण एकलें। आम्हीं ज्ञान नाहीं देखिलें। जैसें कोंडेनि पां गुंतलें। बीज निपजे॥ २६२ ॥
तैसें ज्ञान तरी शुद्ध। परी इहीं असे प्ररुद्ध। म्हणोनि तें अगाध। होऊनि ठेलें॥ २६३ ॥
आधीं यांतें जिणावें। मग तें ज्ञान पावावें। तंव पराभवो न संभवे। रागद्वेषां॥ २६४ ॥
यांतें साधावयालागीं। जें बळ आणिजे आंगीं। तें इंधन जैसे आगी। सावावो होय॥ २६५ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे चंदनाच्या मुळाला सर्प वेढून असतात किंवा गर्भातील जीवाला वारेची खोळ असते. ॥ २६० ॥ का प्रकाशांवाचून सूर्य राहत नाही, धूरावांचून अग्नि नसतो किंवा आरसा मळणार नाही, असे होत नाही. ॥ २६१ ॥ ज्याप्रमाणे कोंड्यावांचून बीं नसते त्याप्रमाणे या कामक्रोधांनी युक्त नाही असें निर्भेळ ज्ञान आम्ही पाहिलें नाही. ॥ २६२ ॥ तसें पाहिलें तर ज्ञान हें निर्भेळच आहे, पण या कामक्रोधांनी त्या ज्ञानाला रोधून धरिलें आहे, म्हणून अत्यंत कठीण होऊन बसलें आहे. ॥ २६३ ॥ अगोदर या कामक्रोधाला जिंकावे तरच तें ज्ञान प्राप्त होतें कामक्रोध जिंकले जात नाहीत तोपर्यंत रागद्वेषहि जिंकले जात नाहीत. ॥ २६४ ॥ या कामक्रोधांना जिंकण्याकरिता जें सामर्थ आपण आपल्या आंगीं आणावें तें अग्नीला सरपण जसें साह्यभूतच होतें तसें कामक्रोधाला साह्यभूतच होतें. (कारण रागद्वेषपूर्वकच सामर्थ्याने प्रयत्न केला जातो व रागद्वेषाने पुन: कामक्रोध वाढतात). ॥ २६५ ॥

गूढार्थदीपिका—काम म्हणजे विषयाचें प्रेम; ज्ञान म्हणजे जाणणें; विरोधी पदार्थच विरोधी पदार्थाचा नाश करूं शकतो. पण कामक्रोधादिक जाणले जातात म्हणून जाणीवेचा कामाशीं विरोध नाही व म्हणूनच ज्ञानाने कामाचा नाश न होतां ज्ञानाबरोबर तो राहूं शकतो. एका विषयाच्या प्रेमाने दुसऱ्या विषयाचें प्रेम नाहिसें होतें; हें आपण पाहतों. म्हणून परमेश्वराच्या प्रेमाने कामरूपी विषयांचें प्रेम नाहीसें होऊं शकतें.

इन्द्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते। एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम्॥ ४० ॥
तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ। पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम्॥ ४१ ॥
इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्य: परं मन:। मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धे: परतस्तु स:॥ ४२ ॥
एवं बुद्धे: परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना। जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम्॥ ४३ ॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगो नाम तृतीयोऽध्याय:॥ ३ ॥

अर्थ—इंद्रिये, मन, बुद्धि हीं या कामक्रोधांचीं वसतिस्थानें आहेत. त्यांच्या आश्रयाने हा काम ज्ञानाला वेढून घेऊन झांकून टाकतो व पुरुषाला भुरळ पाडतो. ॥ ४० ॥ म्हणून अर्जुना! अगोदर इंद्रियांचें दमन कर किंवा विषयांपासून आवर. ज्ञान विज्ञान यांचा नाश करणाऱ्या या पाप्याला ठार कर. ॥ ४१ ॥ बाह्य स्थूल विषय जे आहेत त्यांच्या पलीकडे इंद्रियें आहेत. इंद्रियांच्या पलीकडे मन आहे. मनाच्या पलीकडे बुद्धि आहे व बुद्धीच्या पलीकडे तो आत्मा आहे. ॥ ४२ ॥ याप्रमाणे बुद्धीच्या पलीकडे असणाऱ्या आत्म्याला जाणून बुद्धीने त्याला दृढ धरून ठेवून कधीहि हातीं न लागणाऱ्या या कामरूपी शत्रूला ठार कर. ॥ ४३ ॥

तैसे उपाय कीजती जे जे। ते यांसीचि होती विरजे। म्हणोनि हटियांतें जिणिजे। इहींचि जगीं॥ २६६ ॥
ऐसियांही सांकडां बोला। एक उपायो आहे भला। तो करितां जरी आंगवला। तरी सांगेन तुज॥ २६७ ॥
यांचा पहिला कुरुठा इंद्रियें। एथूनि प्रवृत्ति कर्मातें विये। आधीं निर्दळूनि घालीं तियें। सर्वथैव॥ २६८ ॥
मग मनाची धांव पारुषेल। आणि बुद्धीची सोडवण होईल। इतुकेनि थारा मोडेल। या पापियांचा॥ २६९ ॥
हे अंतरींहूनि जरी फिटले। तरी निभ्रांत जाण निवटले। जैसें रश्मीविण उरलें। मृगजळ नाहीं॥ २७० ॥
तैसे रागद्वेष जरी निमाले। तरी ब्रह्मींचें स्वराज्य आलें। मग तो भोगी सुख आपुलें। आपणचि॥ २७१ ॥
जे गुरुशिष्याची गोठी। पदपिंडाची गांठी। तेथ स्थिर राहोनि नुठीं। कवणे काळीं॥ २७२ ॥
ऐसें सकळ सिद्धांचा रावो। देवी लक्ष्मीयेचा नाहो। राया ऐक देवदेवो। बोलता जाहला॥ २७३ ॥
आतां पुनरपि तो अनंतु। आद्य एकी मातु। सांगेल तेथ पंडुसुतु। प्रश्नु करील॥ २७४ ॥
तया बोलाचा हन पाडु। कां रसवृत्तीचा निवाडु। येणें श्रोतयां होईल सुरवाडु। श्रवणसुखाचा॥ २७५ ॥
ज्ञानदेवो म्हणे निवृत्तीचा। चांग उठावा करूनि उन्मेषाचा। मग संवादु श्रीहरिपार्थाचा। भोगावा बापा॥ २७६ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां तृतीयोऽध्याय:॥ ३ ॥

अर्थ—त्याचप्रमाणे कामाला जिंकण्याला जे जे उपाय करावे ते ते त्यालाच साह्य होतात. म्हणूनच कामाला जिंकायाचेंच असा हट्ट धरून जे प्रयत्न करितात त्यांना हाच जिंकतो. ॥ २६६ ॥ अशाहि अडचणींत सांगण्यासारखा एक उपाय आहे. तो जर तुझ्या अंगीं बाणूं शकेल तर सांगतों. ॥ २६७ ॥ यांचे मूळस्थान इंद्रियें आहेत. या इंद्रियांपासून प्रथम प्रवृत्ति होऊन कर्म घडतें. म्हणून इंद्रियांचेंच अगोदर निर्दालन कर. ॥ २६८ ॥ (इंद्रियांचें स्वाधीन मन असल्यामुळे) इंद्रियें जिंकलीं की मनाचीहि विषयांकडील धाव नाहिशी होते आणि (बुद्धि मनाच्या स्वाधीन असल्यामुळे मन स्थिर झालें की) बुद्धिहि मनाहून स्वतंत्र होते. अशा रीतीने कामाचा आश्रयच नाहिसा झाल्यामुळे या कामक्रोधरूपी पाप्यांचें नांवहि राहत नाही. ॥ २६९ ॥ अर्जुना! ज्याप्रमाणे सूर्याचीं किरणें नाहिशीं झालीं की मृगजळ कोठेच दृष्टीस पडत नाही त्याप्रमाणे हे कामक्रोध अंत:करणांतून नाहिसे झाले की कोठेच दृष्टीस पडायचे नांहीत. ॥ २७० ॥ तसेंच कामक्रोधाच्या नाशामुळे रागद्वेषाचांहि नाश झाला की परब्रह्मप्राप्तिरूप स्वराज्य स्वाधीन झालेंच. मग असा पुरुष आपण आपलेंच सुख भोगतो. ॥ २७१ ॥ ही ब्रह्मस्वराज्याची प्राप्तीहि गुरुशिष्याच्या एकांतांतील गुप्त गोष्ट आहे. तींत जीवाशीवांचें ऐक्य होतें. तें ऐक्य प्राप्त करून घेऊन तेथे स्थिर हो. तेथून केव्हाहि ढळूं नको. ॥ २७२ ॥ संजय म्हणतो, राया धृतराष्ट्रा! सर्व सिद्धांचा राजा, लक्ष्मी देवीचा नाथ, सर्व देवांचाहि देव, भगवान श्रीकृष्ण, याप्रमाणे अर्जुनाला म्हणाला. ॥ २७३ ॥ आता पुन: तो अनंत भगवान् श्रीकृष्ण सृष्टीच्या आरंभीची एक गोष्ट सांगेल व त्यावर अर्जुन प्रश्न करील. ॥ २७४ ॥ त्या दोघांच्या बोलण्याची योग्यता तसेंच त्या भाषणांतील रसाळपणाचा परिपोष यांचे योगाने श्रोत्यांना श्रवणाच्या सुखाचा अत्यंत सुकाळ होईल. ॥ २७५ ॥ श्रीनिवृत्तिनाथांचे श्रीज्ञानेश्वर महाराज श्रोत्यांना म्हणतात, ज्ञानश्रवणाची अत्यंत उत्कंठा वाढवून तुम्ही श्रीकृष्ण भगवान व अर्जुन यांचा संवाद श्रवण करा. ॥ २७६ ॥

श्रीसद्‌गुरुमाऊलीच्या कृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायाचा अनुवाद गूढार्थदीपिकेसह पूर्ण झाला तो सद्‌गुरुचरणीं समर्पण असो.

समारोप

अर्जुन म्हणतो, हे केशवा! जीव कर्मकर्तृत्वरहित आहे असें सांगता व युद्धरूपी घोर कर्मालाहि मला प्रवृत्त करता, तर यांत माझ्या कल्याणाचा निश्चित असा एक मार्ग कोणता हें मला सांगा.

श्रीभगवान म्हणतात, अर्जुना! मी दोन प्रकारच्या निष्ठा पूर्वीच सांगून ठेविल्या आहे. एक ज्ञानयोगनिष्ठा व दुसरी कर्मयोगनिष्ठा. कर्मयोगाचें आचरण केल्याशिवाय ज्ञानयोगनिष्ठेचा अधिकारी होऊं शकत नाही. प्रत्येक मनुष्य एक क्षण देखील कर्माशिवाय राहू शकत नाही. कारण तो प्रकृतीच्या आधीन असल्यामुळे त्याच्याकडून न कळत कर्म घडतच असतें. कर्मेंद्रियांचा निरोध करून मनांत विषयांचें चिंतन करितो तो ढोंगी होय. परंतु जो मनाचा निग्रह करून कर्मफळामध्ये आसक्त न होतां, कर्माचें आचरण करतो तो श्रेष्ठ समजावा. म्हणून, अर्जुना! तूं असा योगी हो. तुला तुझ्या धर्माप्रमाणे जो विहित आचार सांगितला आहे, त्याचें पालन कर. जो विषयसुखाचे स्वाधीन झाला, तो कर्माने बांधला जातो. याकरिता सर्व प्रकारची कामना सोडून परमेश्वरप्रीत्यर्थ आपल्या विहित धर्माचें आचरण कर. यासंबंधी पूर्वी एक इतिहास घडला तो सांगतों, ऐक.

ब्रह्मदेवाने यज्ञासहित सर्व सृष्टि निर्माण केली; पण यज्ञाची गति सूक्ष्म असल्यामुळे त्या यज्ञाचें कसें आचरण करावें हें प्रजेला समजले नाही. म्हणून प्रजेने ब्रह्मदेवाला विनंती केली की हे ब्रह्मदेवा! आम्हाला तुम्ही उत्पन्न केलें, पण आम्ही कशाचा आश्रय करावा? तेव्हा ब्रह्मदेव म्हणाले की तुम्ही तुमचा जो जो वर्ण असेल, त्या वर्णधर्माचे आचरण करा व देवांना संतुष्ट करा. हाच तुमचा यज्ञ होय. देवानां तुम्ही संतुष्ट केलें म्हणजे देव तुमच्यावर संतुष्ट होतील व त्यामुळे सर्व भोग तुम्हाला प्राप्त होतील. असे भोग प्राप्त झाले असता त्या भोगाने पुन: देवतांचे आराधन करा. अशा रीतीने भोग प्राप्त झाले असतां जो ते भोग देवतादिकांना न देतां आपणच त्याचा उपभोग घेईल तो चोर समजावा.

अन्नापासून सर्व सृष्टि उत्पन्न होते, पर्जन्यापासून अन्न उत्पन्न होतें. यज्ञापासून पर्जन्य पडतो. यज्ञापासून कर्म प्रकट झाले व यज्ञाला आधार वेद हें परमेश्वरापासून उत्पन्न झाले; म्हणून सर्व सृष्टि परमेश्वरव्याप्त आहे. अशी ही परंपरा ब्रह्मदेवाने सांगितली. म्हणून या स्वधर्मरूप यज्ञाचें जो पालन करणार नाही त्याचें जीवित व्यर्थ आहे.

जो या देहांतच राहून आत्मस्वरूपांत रंगला, तो कृतकृत्य झाला. त्याला कधीच कर्माचा लेप लागत नाही. त्याला या जगांत कांही करावयाचें उरलेलें नाही. पण जोपर्यंत ज्ञान होत नाही तोपर्यंत विहित धर्मानुसार कर्माचरण करणें आवश्यक आहे. म्हणून अर्जुना? तूं सर्व विषयसुखाची इच्छा सोडून धर्माचरण कर. या योगाने तूं मोक्षपदाला जाशील. असेच कर्म करून जनकादिक राजर्षि मोक्षसुखाला पावले.

श्रेष्ठ लोकांचें धर्माचरण अज्ञानी लोकांना मार्ग दाखविणारे होतें. माझेंच उदाहरण पहा. मी पूर्णकाम आहे. मला कांहीहि कर्तव्य म्हणून त्रैलोक्यांत उरलेलें नाही. पण मी कर्म करीतच असतो. उद्देश एवढाच की हे सर्व लोक माझ्या आधीन असल्यामुळे ते कुमार्गाला लागूं नयेत व लोकसंस्थेचें रक्षण व्हावें. ज्ञानी पुरुषांनी, अज्ञानी पुरुष जसा कर्माच्या फळाच्या इच्छेने आस्थेने कर्म करतो, तसें धर्माचें आचरण करावें. कर्म व त्याचें फळ यांत आसक्ति ठेवणाऱ्या अज्ञानी लोकांना निष्कर्मतेचा उपदेश करूं नये. त्यांना कर्म करण्यासच प्रवृत्त करावें. देहालाच मी म्हणणारे विवेकहीन जे पुरुष असतात ते मीच कर्माचा कर्ता आहे असें मानितात. वास्तविक प्रकृतीच्या गुणामुळे बरीं वाईट कर्मे देहाकडून होतात. ज्ञानी लोक गुणाच्या ठिकाणीं गुणाची क्रीडा आहे असें समजून त्यांत आसक्त होत नाहीत. ज्याने प्रकृतीचे धर्म आपले अंगावर ओढून घेतले तो या कर्माने बांधला जातो.

म्हणून अर्जुना! सर्व कर्मे मला अर्पण कर व तूं आसक्तिरहित होऊन शोकरहित होवून या युद्धाकडे लक्ष दे.

माझ्या ह्या मताचा जे कोणी आदर करून श्रद्धापूर्वक अनुष्ठान करतात ते कर्मापासून मुक्त होतात व जे माझी निंदा करून या मताचा तिरस्कार करितात ते नतदृष्ट होत.

ज्ञानी जरी असला तरी आपआपल्या स्वत:च्या प्रकृतीच्या आधारानेच प्रत्येक मनुष्याचीं कर्मे होत असतात. तेव्हा तेथे कोणाचाहि निग्रह काय करणार? इंद्रियें व त्यांचे विषय यांच्या संगामुळेच रागद्वेष उद्भवतात. तेव्हा तूं त्यांच्या स्वाधीन होऊं नकोस. दुसऱ्याच्या धर्मापेक्षा आपलाच धर्म श्रेष्ठ आहे. म्हणून स्वधर्माचरणांत मरण आलेलें बरें; पण परधर्माचें आचरण नरकादि भय प्राप्त करून देणारें आहे.

अर्जुन म्हणतो भगवंता! हें असें कसें हो, की ज्ञानी जरी झाला तरी तो पाप करण्याची इच्छा नसतांहि बलात्काराने आपल्या मार्गापासून भ्रष्ट झालेला दिसतो. भगवान म्हणतात अर्जुना! रजोगुणापासून झालेले काम व क्रोध हे विवेकाचे वैरी होत. ते ज्ञानाला झांकून टाकतात व आत्म्याची शुद्ध स्थिती प्रकट होऊं देत नाहीत. यांना जिंकले की ज्ञान प्राप्त होतेच. यांचे राहण्याचें ठिकाण म्हणजे इंद्रिये, मन व बुद्धि हीं होत. म्हणून अर्जुना! या इंद्रियांचाच प्रथम मुळांत घाव घालून निरोध कर. कारण इंद्रियांकडूनच सर्व कर्मे प्रवृत्त होतात. शरीराचे पलीकडे इंद्रियें आहेत. इंद्रियाचे पलीकडे मन आहे व मनाच्या पलिकडे बुद्धि आहे. आत्मा हा बुद्धीचेहि पलीकडे आहे. त्या आत्म्याचे ठिकाणीं बुद्धीला स्थिर करून कामक्रोधरूपी शत्रूचा नाश कर.

श्रीमद्सद्‌गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु।



॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय चवथा

आजि श्रवणेंद्रिया पिकलें। जे येणें गीतानिधान देखिलें। आतां स्वप्नचि हें तुकलें। साचासरिसें॥ १॥

अर्थ—आता या श्रवणेंद्रियाने आज गीतेसारखा अमोल ठेवा पाहिला, म्हणून परमसुखाची सकाळ झाली व स्वप्नासारखे असलेले जगत् सत्य वाटूं लागलें. ॥ १ ॥

गूढार्थदीपिका—कानाने जें खरोखर ऐकायला पाहिजे तें ऐकिलें. समर्थ म्हणतात, "**आता असो हें बोलणें जयासि स्वहित करणें। तेणें सदा विचरणें। अद्वैतग्रंथीं॥ २६॥ जेणें परमार्थ वाढे। आंगीं अनुताप चढे। भक्तिसाधन आवडे। त्या नांव ग्रंथ॥ ३०॥ जेणें होये उपरति। अवगुण पालटती। जेणें चुके अधोगती। त्या नांव ग्रंथ॥ ३२। जेणें नुपजे विरक्ति भक्ति। तो ग्रंथचि नव्हे.॥ ३५॥**" (दास० द० ७ स० ९). कानाला अद्वैत परमात्मवस्तूचें निरूपण ऐकायला मिळालें तरच कानाचें सार्थक झालें म्हणायचें. अद्वैतवस्तूच्या श्रवणाने कर्णेंद्रियाला खऱ्या वस्तूचा प्रकाश होतो किंवा ज्ञान होते. श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात आज अद्वैत ग्रंथ जी गीता, त्यातील अद्वैत आत्मवस्तूचा उपदेश ऐकून माझें कर्णेंद्रिय खऱ्या ज्ञानाने प्रकाशित झालें म्हणून आत्म्याहून निराळा अनेक वस्तूरूप जड, विनाशी असा जो जगाचा प्रत्यय पूर्वी येत होता, तो स्वप्नासारखा अत्यंत खोटा होता आता आत्मविचाराने पाहूं गेलें असतां जगहि सच्चिदानंद आत्मस्वरूपच आहे असा अनुभव आला, असा अर्थ.

आधींचि विवेकाची गोठी। वरी प्रतिपादी श्रीकृष्ण जगजेठी। आणि भक्तराजु किरीटी। परिसत असे॥ २॥
जैसा पंचमालापु सुगंधु। कीं परिमळु आणि सुस्वादु। तैसा भला जाहला विनोदु। कथेचा इये॥ ३॥

अर्थ—आधीच आत्मानात्मविवेकासारख्या विषयाचें प्रतिपादन व त्यांतहि जो विवेक, जगन्नियंता साक्षात् परमात्मा श्रीकृष्ण सांगत आहे आणि भक्तश्रेष्ठ अर्जुन ऐकत आहे (असा महद्भाग्याचा संवाद ऐकायला मिळणें दुर्लभ)॥ २॥ ज्याप्रमाणे सुगंधित परिमळाने व अत्यंत मधुर रुचीने युक्त अशा अत्यंत कोमल पंचमालापाचा लाभ होणे महदानंद होय, त्याप्रमाणेच श्रीकृष्णार्जुन संवादरूप कथेचा आनंद आहे (ज्याचें बोल अत्यंत कोवळे व मनमोहक असें मधुर आहेत व जो अत्यंत हळुवार किंवा कोमल चित्ताने ऐकत आहे अशा श्रीकृष्णार्जुनांच्या संवादाचा लाभ होणें श्रोत्याचें महद्भाग्यच होय.)॥ ३॥

कैसी आगळिक दैवाची। जे गंगा वोळली अमृताची। हो कां जपतपें श्रोतयांची। फळा आलीं॥ ४॥

अर्थ—असा श्रीकृष्णार्जुनाचा संवाद श्रोत्यांना ऐकायला मिळाला, श्रोत्यांचें केवढें थोर भाग्य की त्यांना अमृताची गंगाच प्राप्त झाली किंवा त्यांची अनेक जन्मांचीं जपतपादि पुण्यकर्में या रीतीनें फलद्रूप झालीं.॥ ४॥

गूढार्थदीपिका—अनंत जन्मातील पुण्याचा सांठा पदरीं असल्याखेरीज अद्वैत श्रवणाकडे चित्ताचा ओढा लागत नाही "**बहुता सुकृताची जोडी। म्हणूनि विठ्ठलीं आवडी**" **अद्वैत ग्रंथ श्रवण करण्याची आवडी असणें व त्यांचें श्रवण घडणें हें महत्पुण्याचेंच फळ असतें "यावन्नानुग्रहःसाक्षात् जायते परमेश्वरात्। तावन्न सद्गुरुः कश्चित्सच्छास्त्रं वापि नो लभेत्॥"** जोपर्यंत निष्काम कर्मानुष्ठानाचें पुण्याने साक्षात् परमेश्वराची कृपा होत नाही तोपर्यंत अद्वैतग्रंथ श्रवण करण्याची आवडी उत्पन्न होत नाही व त्या ग्रंथाचें यथार्थ ज्ञान करून देण्यास पुरुषहि मिळत नाहीत असें वचनहि आहे.

आतां इंद्रियजात आघवें। तिहीं श्रवणाचें घर रिघावें। मग संवादसुख भोगावें। गीताख्य हें॥ ५॥

अर्थ—आता सर्व इंद्रियांनी श्रवणेंद्रियाचे ठिकाणी यावें व मग गीतारूपी संवादाचें खरें सुख भोगावें.॥ ५

गूढार्थदीपिका—अत्यंत एकाग्र चित्तानें श्रवण करणाऱ्याच्या अंत:करणांतच बोध उत्पन्न होतो व तशाच बोधापासून उपदेशाचें फळ मिळतें असा अर्थ.

हा अतिसो अतिप्रसंगें। सांडूनि कथाचि ते सांगें। जे कृष्णार्जुनु दोघे। बोलत होते॥ ६॥

ते वेळीं संजयो रायातें म्हणे। अर्जुनु अधिष्ठिला दैवगुणें। जे अतिप्रीति नारायणें। बोलिजतु असे॥ ७॥

अर्थ—असें विशेष विषयांतर न करतां आता श्रीकृष्ण व अर्जुन हे दोघेजण काय बोलत होते ती कथाच मी सांगतों.॥ ६॥ त्यावेळीं राजा धृतराष्ट्राला, संजय म्हणायला लागला की राजा! अर्जुन हा सर्व दैवगुणाला अधिष्ठानरूप होता, म्हणूनच भगवान् श्रीकृष्ण त्याच्याशीं अत्यंत प्रेमाने बोलूं लागले.॥ ७॥ (असें म्हणण्याचें कारण की)—

जें न सांगेचि पितया वसुदेवासी। जें न सांगेचि माते देवकीसी। जें न सांगेचि बंधु बळिभद्रासी। तें गुह्य अर्जुनेंशीं बोलत॥ ८॥

अर्थ—जे अत्यंत गुह्य असल्यामुळे भगवंतांनी आपल्या पित्या वसुदेवालाहि सांगितलें नाही किंवा माता देवकीलाहि सांगितलें नाही. अथवा भाऊ बळीराम यालाहि सांगितलें नाही; तें अंत:करणांतील निजगुज भगवान अर्जुनाला सांगूं लागले.॥ ८॥

गूढार्थदीपिका—"**ब्रूयुः स्निग्धस्य शिष्यस्य गुरवो गुह्यमप्युत**" (भाग, द० स्कं अ० १३ श्लो० ४) स्वानुभवी पुरुषाने आपला अत्यंत प्रिय स्वानुभव प्रेमळ शिष्यांनाच द्यावा असा ईश्वरासह सर्व अनुभवी संतांचा दंडकच आहे. ते ब्रह्मानुभवरूप गुह्य कधीही उघड सर्वांना सांगत नसतात. आपण जितक्या प्रेमाने त्या गुह्याचें संगोपन केलें, तितक्या प्रेमाने त्याचें संगोपन करणाऱ्या प्रेमळ शिष्यापाशीच ते प्रगट करितात.

देवी लक्ष्मीये एवढी जवळिक। तेही न देखे या प्रेमाचें सुख। आजि श्रीकृष्णस्नेहाचें बिक। यातेंचि आथी॥ ९॥

सनकादिकांचिया आशा। वाढीनल्या होतिया कीर बहुवसा। परी त्याही येणें मानें यशा। येतीचिना॥ १०॥

या श्रीजगदीश्वराचें प्रेम। एथ दिसतसे निरुपम। कैसें पार्थे येणें सर्वोत्तम। पुण्य केलें॥ ११॥

अर्थ—देवीं लक्ष्मी नेहमी भगवंतापाशीच राहणारी पण तिलाहि हें प्रेमसुख मिळालें नाही. श्रीकृष्ण प्रेमाचें संपूर्ण पीक या अर्जुनाला मिळालें.॥ ९॥ सनकादिक हें श्रीकृष्णाचे प्रेमसुख मिळावें म्हणून पुष्कळ दिवसांपासून सारखी आशा करीत राहिले, पण त्यांच्या आशा अर्जुनासारख्या सफळ झाल्या नाहीत.॥ १०॥ या अर्जुनाचे केवढें थोर पुण्य आहे पहा! या श्रीकृष्णाचें अर्जुनावर जें प्रेम आहे त्याला उपमाच देतां येत नाही.॥ ११॥

हो कां जयाचिया प्रीति। अमूर्त हा आला व्यक्ती। मज एकवंकी याची स्थिति। आवडतु असे॥ १२॥

अर्थ—ज्या अर्जुनाच्या प्रेमांकरिता अमूर्त म्हणजे निर्गुण निराकार परमात्मा सगुण साकार झाला, त्या अर्जुनाची एकनिष्ठ प्रेमस्थितीच मला आवडते.॥ १२॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे सत्वादिगुणांचा आश्रय करून परब्रह्म परमात्मा सृष्टीच्या उत्पत्त्यादि कार्याकरिता विष्णू आदि रूपाने सगुण साकार होतो, त्याप्रमाणें तो सत्वादिगुणांचा आश्रय न करतां मुख्यत: प्रेमळ भक्तांच्या परमप्रेमरूप वृत्तीचा विषय होऊन, रामकृष्णादि रूपानें साकार होत असतो, असा भाव.

एऱ्हवीं हा योगियां नाडळे। वेदार्थासी नाकळे। जेथ ध्यानाचेही डोळे। पावतीना॥ १३॥

तें हा निजस्वरूप। अनादि निष्कंप। परी कवणें मानें सकृप। जाहला आहे॥ १४॥

हा त्रैलोक्यपटाची घडी। आकाराची पैलथडी। कैसा याचिये आवडी। आवरला असे॥ १५॥

अर्थ—एरव्ही पाहतां एका प्रेमावांचून हा श्रीकृष्ण परमात्मा योग्यांनाहि प्राप्त होत नाही वेदाचा जो अर्थ त्यांतहि तो सांपडत नाही. ध्यानाच्या डोळ्यांनाहि दिसत नाही.॥ १३॥ तो हा आपल्या सच्चिदानन्द स्वरूपाने अखंड स्थित असलेला, अनादि, अचल आहे, पण या अर्जुनाला कसा कृपाळू झाला आहे, पहा.॥ १४॥ हा श्रीकृष्ण परमात्मा त्रैलोक्यरूपी उकललेल्या वस्त्राची घडी आहे म्हणजे जगद्व्यापक आहे. आकाराचें परतीर (म्हणजे मर्यादित असे भौतिक आकार ज्या सगुण परमेश्वराच्या आकाराच्या आधींच संपतात किंवा ज्याचा आकार भौतिक नाही असा)

आहे. पण तोच आपलें व्यापकत्व व निराकारत्व न सोडतां या अर्जुनाच्या प्रेमामुळे तेवढाहि व्यापक श्रीकृष्ण परमात्मा कसा एकदेशी सगुण साकार झाला आहे पहा. ॥ १५ ॥

श्रीभगवानुवाच

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्। विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्॥ १॥
एवं परम्पराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः। स कालेनेह महता योगो नष्टः परन्तप॥ २॥
स एवाऽयं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः। भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम्॥ ३॥

अर्थ—भगवान म्हणतात अर्जुना! (पूर्वी) मी हा योग विवस्वानाला सांगितला होता. विवस्वनांनी (पुढे) मनूला सांगितला व मनूंनी इक्ष्वाकु राजाला सांगितला. ॥ १ ॥ याप्रमाणे परंपरेने प्राप्त झालेल्या या योगाला राजर्षि जाणते झाले. हा योग पुष्कळ काळ लोटल्यामुळे, हे शत्रूला ताप देणाऱ्या अर्जुना (सांप्रत) नष्ट झाला आहे. ॥ २ ॥ तोच पुरातन काळचा योग व उत्तम रहस्य तू माझा प्रेमळ भक्त व मित्र असल्यामुळे आज मी तुला सांगितला आहे. ॥ ३ ॥

मग देव म्हणे अगा पंडुसुता। हाचि योगु आम्हीं विवस्वता। कथिला परी ते वार्ता। बहुतां दिवसांची॥ १६॥
मग तेणें विवस्वतें रवी। हे योगस्थिति आघवी। निरूपिली बरवी। मनूप्रती॥ १७॥
मनूनें आपण अनुष्ठिली। मग इक्ष्वाकुवा उपदेशिली। ऐसी परंपरा विस्तारिली। आद्य हे गा॥ १८॥
मग आणिकहि या योगातें। राजर्षि जाहले जाणते। परि तेथोनि आतां सांप्रतें। नेणिजे कोणी॥ १९॥
जे प्राणिया कामीं भरु। देहाचिवरी आदरु। म्हणोनि पडिला विसरु। आत्मबोधाचा॥ २०॥
अव्हांटलिया आस्थाबुद्धि। विषयसुखचि परमावधि। जीवु तैसा उपाधि। आवडे लोकां॥ २१॥
एऱ्हवीं तरी खवणेयांच्या गांवीं। पाटाउवें काय करावीं। सांगें जात्यंधा रवी। काय आथी॥ २२॥
कां बहिरयांचा आस्थानीं। कवण गीतातें मानी। कीं कोल्हेया चांदणीं। आवडी उपजे॥ २३॥
पैं चंद्रोदया आरौतें। जयांचे डोळे फुटती असते। ते काउळे केवीं चंद्रातें। वोळखती॥ २४॥
तैसे वैराग्याची शिंव न देखती। जे विवेकाची भाष नेणती। ते मूर्ख केवीं पावती। मज ईश्वरातें॥ २५॥
कैसा नेणों मोहो वाढीनला। तेणें बहुतेक काळु व्यर्थ गेला। म्हणोनि योगु हा लोपला। लोकीं इये॥ २६॥
तोचि हा आजि आतां। तुजप्रती कुंतीसुता। सांगितला आम्हीं तत्त्वता। भ्रांति न करीं॥ २७॥
हें जीवींचें निज गुज। परी केवीं राखों तुज। जे पढियेसी तूं मज। म्हणऊनियां॥ २८॥
तूं प्रेमाचा पुतळा। भक्तीचा जिव्हाळा। मैत्रियेची चित्कळा। धनुर्धरा॥ २९॥
तूं अनुसंगाचा ठावो। आतां तुज काय वंचूं जावों। जरी संग्रामारूढ आहों। जाहलों आम्ही॥ ३०॥
तरी नावेक हें सहावें। गाजाबज्यही न धरावें। परी तुझें अज्ञानत्व हरावें। लागे आधीं॥ ३१॥

अर्थ—मग देव म्हणाले, पंडुसुता! हाच योग मी विवस्वानाला सांगितला होता, पण ती फार दिवसांची गोष्ट आहे. ॥ १६ ॥ मग त्या विवस्वान् रवीने ती संपूर्ण योगस्थिति मनूला सांगितली. ॥ १७ ॥ मनूने त्याचें स्वतः अनुष्ठान करून इक्ष्वाकु राजाला सांगितली. अशी ही या आद्य योगधर्माची परंपरा आहे. ॥ १८ ॥ पुढे मग कांही कांही राजर्षींनी याला जाणून त्याचें अनुष्ठान केलें, पण सांप्रत हा योग कोणी जाणत नाहीत. ॥ १९ ॥ याचें कारण हें आहे की मनुष्यप्राणी देहाचेच अत्यंत प्रेम धरून विषयसुखांतच अत्यंत आसक्त झाल्यामुळे त्याला आत्मज्ञानाचा अगदीच विसर पडला. ॥ २० ॥ परमेश्वराला सोडून आस्था व बुद्धि या दोन्ही भलत्या देहादिक आडमार्गाने जाऊ लागल्यामुळे, विषयसुख हें परम ध्येय वाटूं लागून लोकांना आपल्या जीवात्म्याइतकेच देहादिक उपाधीचें प्रेम वाटूं लागलें. ॥ २१ ॥ नाही तरी दिगंबर लोकांच्या गांवीं वस्त्रांचा काय उपयोग आहे? जन्मांध जो आहे त्याला सूर्याचा काय उपयोग होणार? ॥ २२ ॥ किंवा बहिऱ्यांच्या सभेत कोण गाण्याला मान देतो? किंवा कोल्ह्याला चंद्रप्रकाश आवडेल का? ॥ २३ ॥ चंद्राचा उदय होण्यापूर्वीच ज्याचे डोळे फुटतात म्हणजे डोळ्याला दिसत नाही, त्या कावळ्यांना चंद्राची

ओळख कशी होईल?॥ २४॥ त्याप्रमाणे ज्यांनी वैराग्याची हद्दच पाहिली नाही व ज्यांनी आत्मानात्मविवेक हा शब्दच ऐकला नाही असे मूर्ख लोक मला ईश्वराला कसें प्राप्त होतील?॥ २५ ॥ हा अविवेक व देहादिकांची आसक्ति कशी वाढत गेली, हें समजत नाही, पण अशा स्थितींतच फार काळ लोटल्यामुळे, हा योग या लोकांतून नष्ट झाला. ॥ २६ ॥ तोच योग आज आता, अर्जुना! तुला आम्ही सांगितला आहे, यांत मुळींच संशय नाही. ॥ २७॥ ही आमच्या अंत:करणांतील अत्यंत गुप्त गोष्ट आहे; पण तूं मला अत्यंत प्रिय असल्यामुळे, तुझ्यापासून ती मी गुप्त कसा ठेवूं शकेन?॥ २८॥ अर्जुना! तूं प्रेमाची मूर्ति आहेस; भक्तीचा ओलावा आहेस व सख्य भक्तीचें केवळ चैतन्य आहेस. ॥ २९ ॥ तू पूर्ण विश्वासू सांगाती असा, विश्वास ठेवण्यास पात्र आहेस, मग तुझ्यापासून काय लपवून ठेवितां येईल? जरी आपण या वेळी युद्धाला सज्ज झालों आहो॥ ३० ॥ तरी घटकाभर तें बाजूला ठेवून या युद्धाच्या गडबडीचा मनावर परिणाम होऊं न देतां अगोदर तुझी गैरसमजूत नाहिशी केली पाहिजे. ॥ ३१ ॥

गूढार्थदीपिका—हा कर्मयोगमार्ग अर्वाचीन नसून सनातन मार्ग आहे. किंबहुना सृष्टीच्या आरंभीं हाच आद्य धर्म म्हणून सांगितला गेला, हें दाखविण्याकरिता भगवंतांनी चवथ्या अध्यायाच्या आरंभी कर्मयोगाची अनादि परंपरा सांगितली आहे. हीच परंपरा भारताच्या शांतिपर्वात सांगितलेल्या नारायणीय धर्मातहि सांगितली आहे. भारताच्या शांतिपर्वातील धर्माला नारायणीय धर्म म्हणण्याचें कारण असें आहे की "एष धर्मो जगन्नाथात्साक्षान्नारायणान्नृप" (शां० प०अ० ३४६ श्लो० १०) तो धर्म साक्षात् नारायणानेच स्वमुखाने सांगितला व "धार्यते स्वयमीशेन राजन्नारायणेन च" (शां० प० अ० ३४८ श्लो० १०). भगवान अवतारकालीं त्या धर्माचें स्वत: अनुष्ठान करून दाखवितात. या धर्मालाच श्रीमद्भागवत ग्रंथांत भागवतधर्म किंवा भक्तियोग हें नांव दिलें आहे. श्रीमद्भागवतांतील दशमस्कंधांतर्गत वेदस्तुतींतहि याच धर्माचें विवेचन आलें आहे. एकादश स्कंधांत या कर्मयोगाला भागवतधर्म असें नांव देऊन "ये वै भगवता प्रोक्ता उपाया ह्यात्मलब्धये। अज: पुंसामविदुषां विद्धिभागवतान्हि तान्" या श्लोकांत भागवतधर्म हा भोळ्या भाविकांना देखील सहज व निर्विघ्न भगवत्प्राप्ति करून देणारा आहे असे म्हटलें आहे.

या कर्मयोगाचें अनुष्ठान करीत असतांनाच पुढे भगवन्नामाची व भगवत्कथेची गोडी लागून, अखंड सगुण भगवंताचें ध्यान होऊं लागलें की या कर्मयोगालाच एकांत धर्म किंवा एकान्तभक्तिही संज्ञा प्राप्त होते. म्हणून या भागवतधर्मात भगवत्प्रीत्यर्थ म्हणजे भगवंताच्या प्रेमाने कर्म करणे, भगवंताच्या कथा ऐकणें, भगवंताचें नाम स्मरणें, भगवंताचें ध्यान करणें या सर्वांचा समावेश होतो. या धर्माचे सविस्तर विवेचन पुढे नवव्या अध्यायांत भगवंताने केलें आहे.

अर्जुन उवाच

अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वत:। कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति॥ ४॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, देवा! विवस्वान हा किती तरी वर्षापूर्वी होऊन गेला आणि तुझा जन्म तर आता झाला. मग तूं विवस्वानाला हा योग सांगितलास हें आम्ही कसें समजावें?॥ ४॥

तंव अर्जुन म्हणे श्रीहरी। माय आपुलेयाचा स्नेहो करी। एथ विस्मयो काय अवधारीं। कृपानिधी॥ ३२ ॥
तूं संसारश्रांतांची साउली। अनाथा जीवांची माउली। आमुतें कीर प्रसवली। तुझीच कृपा॥ ३३ ॥
देवा पांगुळ एकादें विइजे। तरी जन्मौनि जोजारु साहिजे। हें बोलों काय तुझें। तुजचि पुढां॥ ३४॥
आतां पुसेन जें मी कांहीं। तेथ निकें चित्त देईं। तेवींचि देवें कोपावें ना कांहीं। बोला एका॥ ३५॥
तरी मागील जे वार्ता। तुवां सांगितली होती अनंता। ते नावेक मज चित्ता। मानेचिना॥ ३६॥
जे तो विवस्वतु म्हणजे कायी। ऐसें हें वडिलां ठाउवें नाहीं। तरी तुवांचि केवीं पाहीं। उपदेशिला॥ ३७॥
तो तरी आइकिजे बहुतां काळांचा। आणि तूं तंव कृष्ण सांपेचा। म्हणोनि गा इये मातुचा। विसंवादु॥ ३८॥
तेवींचि देवा चरित्र तुझें। आपण कांहीं काय जाणिजे। हें लटिकें केवीं म्हणिजे। एकिहेळां॥ ३९॥
परी हेचि मातु आघवी। मी परियेसें तैशी सांगावी। जे तुवांचि तया रवी केवीं। उपदेशु केला॥ ४०॥

अर्थ—तेव्हा अर्जुन म्हणाला, हें पहा, परम कृपाळु देवा! आई आपल्या बाळाचें स्वाभाविक प्रेम करिते यांत आश्चर्य करण्यासारखें काय आहे?॥ ३२ ॥ त्याप्रमाणेच देवा! या संसारांत अत्यंत पोळलेल्यांना तूं सावलींत बसण्याचें ठिकाण आहेस, जे अनाथ असतील त्यांची तूं आई आहेस. आम्ही तर सर्वस्वी तुझ्या कृपेचेंच फळ आहोंत. ॥ ३३ ॥ देवा! एखादें मूल पांगळें जन्मलें असता जन्मापासून शेवटपर्यंत आईलाच त्याची काळजी वाहावी लागते, (अशीच आमची सर्व काळजी तुलाच करावी लागते). हें तुझें (प्रेम) तुझ्यासमोरच काय सांगायचें?॥ ३४॥ आतां हें असो. मी जें विचारणार आहे त्याकडे नीट लक्ष द्या व देवा! माझ्या एका बोलण्याचा रागहि येऊं देऊं नका. ॥ ३५ ॥ हे अनंता! मी हा योग विवस्वानाला सांगितला होता असा जो तूं आपला पूर्वीचा वृत्तांत सांगतोस, तो जरा मला पटत नाही. ॥ ३६ ॥ करण तो विवस्वान् किती पूर्वी होऊन गेला हें आमच्या वडिल माणसांनाहि माहीत नाही तेव्हा तूंच कसा व केव्हा त्याला उपदेश केलास?॥ ३७ ॥ तो विवस्वान फार दिवसांपूर्वी होऊन गेला आणि तूं आता जन्मलास. म्हणून तूं विवस्वानाला उपदेश केला ही गोष्ट विसंगत वाटते. ॥ ३८ ॥ त्याचप्रमाणे देवा! तुझी लीला अगाध आहे. आम्ही पामर ती काय जाणणार? म्हणून तुझें म्हणणें एकदम खोटें तरी कसें म्हणायचें?॥ ३९ ॥ पण विवस्वानाला तूं उपदेश करूं शकलास ही गोष्ट मला बरोबर समजेल अशा रीतीने सांग. ॥ ४० ॥

श्रीभगवानुवाच

बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन। तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप॥ ५ ॥
अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्। प्रकृतिं स्वामधिष्ठाय सम्भवाम्यात्ममायया॥ ६ ॥

अर्थ—भगवान म्हणतात, अर्जुना! माझे व तुझे पुष्कळ जन्म होऊन गेलेत. पण मी आपल्या सर्व जन्मांना जाणतों. तूं मात्र आपल्या जन्मांना जाणत नाहीस. ॥ ५ ॥ मी अजन्मा, अविनाशी व सर्व जीवांचा शास्ता राहूनच आपल्या प्रकृतीला आपल्या स्वाधीन ठेवून, त्या आपल्या मायेने जन्म घेतों. ॥ ६ ॥

तवं कृष्ण म्हणे पंडुसुता। तो विवस्वतु जैं होता। तैं आम्हीं नसों ऐसी चित्ता। भ्रांति जरी तुज॥ ४१ ॥
तरी तूं गा हें नेणसी। पैं जन्में आम्हां तुम्हांसी। बहुतें गेलीं परी तियें न स्मरसी। आपुलीं तूं॥ ४२ ॥
मी जेणें जेणें अवसरें। जें जें होऊनि अवतरें। तें समस्तही स्मरें। धनुर्धरा॥ ४३ ॥
म्हणोनि आघवें। मागील मज आठवे। मी अजुही परि संभवें। प्रकृतियोगें॥ ४४ ॥
माझें अव्ययत्व तरी न नसे। परी होणें जाणें एक दिसे। तें प्रतिबिंबे मायावशे। माझ्याचि ठायीं॥ ४५ ॥
माझी स्वतंत्रता तरी न मोडे। परी कर्माधीनु ऐसा आवडे। तेही भ्रांतिबुद्धि तरी घडे। एऱ्हवीं नाहीं॥ ४६ ॥
कीं एकचि दिसे दुसरें। तें दर्पणाचेनि आधारें। एऱ्हवीं काय वस्तुविचारें। दुजें आहे॥ ४७ ॥
तैसा अमूर्तचि मी किरीटी। परी प्रकृति जैं अधिष्ठीं। तैं साकारपणें नटें नटीं। कार्यालागीं॥ ४८ ॥

अर्थ—तेव्हा भगवान म्हणतात! पंडुसुता (तुला अशी शंका घेण्याचें कारण हें आहे की) जेव्हा तो विवस्वान् होता तेव्हा आम्ही नव्हतों असें तुला वाटतें. पण ही तुझी भ्रांति आहे. ॥ ४१ ॥ अर्जुना! माझे व तुझे असे पुष्कळ जन्म होऊन गेले आहेत, पण तुला त्यांचें स्मरण नाही. ॥ ४२ ॥ मी मात्र ज्या ज्या वेळीं ज्या ज्या रूपाने अवतीर्ण होतो तें तें सर्व मला आठवतें. ॥ ४३ ॥

गूढार्थदीपिका—परमेश्वराप्रमाणेच अवतारांचे ठिकाणीहि विस्मृति म्हणजे अविद्या हा धर्म कधीच नसतो. ते सदा सर्वदा सर्वज्ञ व सर्वशक्तिमानच असतात. हाच सिद्धांत, भगवंतांनी मला माझे अवतार आठवतात असें सांगून येथे मांडला आहे. हे अर्जुना! तुझें जन्म तूं विसरलास असें म्हणून जीवाला अविद्यारूप विस्मृति असते म्हणून तो अल्पज्ञ असतो, हें तत्व भगवंतांनी येथे सांगितलें आहे.

अर्थ—म्हणूनच मला मागे विवस्वानाला उपदेश केल्याची माझी जाणीव जशीच्या तशीच कायम आहे. मी जन्मरहित असूनहि प्रकृतीमुळे जन्मल्यासारखा भासतों. ॥ ४४ ॥ माझी अविनाश स्थिति नाहिशी होत नाही; पण माझे ठिकाणीं जन्मणें व अंतर्धान पावणें हें जें दिसतें तें प्रतिबिंबाप्रमाणें मायाभ्रांतीने दिसतें. ॥ ४५ ॥ मी स्वतंत्र आहे म्हणजे

माया माझ्या स्वाधीन असून मी तिचा नियंता आहे. मी कधी मायापरतंत्र होत नाहीं. परंतु मायेमुळे कर्माच्या परतंत्र वागतों असें मायाभ्रांतीमुळे दिसतें. एरव्ही माझे ठिकाणीं कर्म नाही व मी कधी कर्मपरतंत्रहि होत नाही. ॥ ४६ ॥ एकच वस्तु आरशांत तिचें प्रतिबिंब पडलें असतां दोनपणाला येते पण वस्तुदृष्टीने विचार केला असतां दोन वस्तु असतात काय? ॥ ४७ ॥ त्याप्रमाणे, अर्जुन! मी निराकारच असतो व निराकार राहूनच देवांचें कार्य साधण्याकरिता प्रकृतीचा आश्रय होऊन साकार भासतों. ॥ ४८ ॥

गूढार्थदीपिका—''अजोऽपि सन्नव्ययात्मा..................''

या श्लोकावरील आपल्या भाष्यांत आचार्यांनी ''प्रकृतिं स्वाम्'' या चरणाचा ''मायां त्रिगुणात्मिकाम्'' म्हणजे त्रिगुणात्मक माया असा अर्थ केला आहे. आणि ''अधिष्ठाय'' या पदाचा ''वशीकृत्य'' म्हणजे त्रिगुणात्मक मायेला आपल्या स्वाधीन ठेवून असा अर्थ केला आहे. पण प्रकाशरूप सूर्याचे ठिकाणीं जसा अंध:कार राहत नाही व राहाणें शक्य नाही त्याप्रमाणे सच्चिदानंदरूप परमेश्वराचें ठिकाणीं त्रिगुणात्मक माया ही राहात नाही व राहू शकत नाही, असा सर्व आचार्यादि संतांनी आपला परम अनुभव सांगितला आहे. तेव्हा ''प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवामि'' म्हणजे ''त्रिगुणात्मक मायेचा आश्रय करून मी अवतार घेतों'' या चरणांतील अर्थाचा उलगडा होणें अवश्य आहे व तो उलगडा अशा रीतीनेच होऊं शकतो की मी अज्ञानी आहे, मी दु:खी आहे, मी सुखी आहे, मी अल्पज्ञ आहे अशी जी आपल्या ठिकाणीं जीवाने भ्रांतिरूप माया मानिली आहे, तीच त्रिगुणात्मक माया होय आणि ती परमेश्वराच्या आश्रयाने राहणारी परमेश्वराची शक्ति होय, असें तो समजतो. याच जीवाच्या गैरसमजूतीचा अनुवाद करून भगवंताने त्रिगुणात्मक मायेला आपले स्वाधींन ठेवून मी जन्म घेतों असें म्हटलें आहे.

परमेश्वर नित्य आहे, पण ही माया तो जन्मला असें भासविते व एवढेच तिचें कार्य आहे ती परमेश्वराचा देह निर्माण करीत नाही. कारण मायेपासून झालेला देह पांचभौतिकच राहणार आणि माया म्हणजे आत्मविस्मृती, आत्मविस्मृतीमुळे कर्म व कर्मामुळे पांचभौतिक देहाची प्राप्ति, अशा क्रमाने पांचभौतिक देह प्राप्त होतो. पण अवताराचे ठिकाणीं आत्मविस्मृति व कर्म मुळीच नसते, हा सर्व वेदान्तांनी मान्य केलेला सिद्धान्त आहे.

म्हणून परमेश्वराला पांचभौतिक देहाने अवतार घेता येत नाही.

किंवा

वरील श्लोकांत भगवंतांनी आपला अवतार कसा होतो हें सांगतांना ''प्रकृतिं स्वामधिष्ठाय'' व ''आत्ममायया'' अशी पदें घेतलीं आहेत. हीं दोन्ही पदें एकार्थी आहेत असें म्हणतां येत नाही. कारण तेथे पुनरुक्तीचा दोष येतो. तेव्हा वेदान्तशास्त्रांत अविद्या व विद्या असे मायेचे दोन भेद सांगितले आहेत. त्या उपाधी घेऊन या पदांचा अर्थ करणें योग्य होईल.

''प्रकृतिं स्वाम्'' या पदांचा माझी त्रिगुणात्मक प्रकृति (म्हणजे अविद्या) असा आचार्यांनी अर्थ केलाच आहे आणि ''आत्ममाया'' या शब्दाचा अर्थ ''विद्या'' असा केला असतां ''प्रकृति'' व ''आत्ममाया'' हीं दोन्ही पदें सार्थ होतात व अवतारदेहाची नीट उपपत्ति लागते.

अविद्या ही विपरीत ज्ञानरूप असून, विद्या ही यथार्थ ज्ञानरूप आहे, असें अविद्येचें व विद्येचें लक्षण श्रीज्ञानेश्वर माऊलींनी अमृतानुभवांत ''जिती अविद्या ऐसी। अन्यथा बोधाते गिवसी। तेचि यथाबोधेसी। निमाली उठी॥'' (प्र० ३-१०) या ओवीने केलें आहे. वरील श्लोकांतील दुसऱ्या चरणाचा ''प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवामि'' व ''आत्ममायया संभवामि'' असा ''संभवामि'' या पदाचा दोन्हीकडे संबंध लावून अर्थ केला असतां मी यथार्थ ज्ञानरूप विद्येने सच्चिदानंदरूप लीलाविग्रह असा देह धारण करतों; पण भ्रांतीरूप त्रिगुणात्मक अविद्येमुळे किंवा भ्रांतीमुळे मी जीवांना जन्मल्यासारखा भासतों, असा वेदान्ताला धरून सुसंगत अर्थ होतो.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥ ७॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे॥ ८॥

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः। त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन॥ ९॥

अर्थ—जेव्हा जेव्हा धर्माचा ऱ्हास होतो व अधर्माची वाढ होते तेव्हा तेव्हा, अर्जुना! अधर्माचा नाश करून धर्माचा पुनः उद्धार करण्याकरिता मी प्रगट होतों. ॥ ७ ॥ साधुपुरुषाचें संरक्षण करण्याकरिता व दुष्टांचा नाश करण्याकरिता आणि धर्माचें पुनः संस्थापन करण्याकरिता मी युगायुगाचे ठिकाणीं देह धारण करितो. ॥ ८ ॥ अशा माझे जन्म व कर्म हे दोन्ही दिव्य म्हणजे प्रकृतिजन्य नाहीत असें जो ज्ञानदृष्टीने ओळखतो तो देहपात झाल्यावर अर्जुना! पुनः जन्माला येत नाही व मला येऊन मिळतो. ॥ ९ ॥

जें धर्मजात आघवें। युगायुगीं म्यां रक्षावें। ऐसा ओघु हा स्वभावें। आद्य असे॥ ४९॥
म्हणोनि अजत्व परतें ठेवीं। मी अव्यक्तपणही नाठवीं। जे वेळीं धर्मातें अभिभवी। अधर्मु हा॥ ५०॥
ते वेळीं आपुल्याचेनि कैवारें। मी साकारु होऊनि अवतरें। मग अज्ञानाचें आंधारें। गिळूनि घालीं॥ ५१॥
अधर्माची अवधी तोडीं। दोषांची लिहिलीं फाडीं। सज्जनांकरवीं गुढी। सुखाची उभवीं॥ ५२॥
दैत्यांचीं कुळें नाशीं। साधूंचा मानु गिंवशीं। धर्मासीं नीतीशीं। शेंज भरीं॥ ५३॥
मी अविवेकाची काजळी। फेडूनि विवेकदीप उजळीं। तैं योगियां पाहे दिवाळी। निरंतर॥ ५४॥
स्वसुखें विश्व कोंदें। धर्मचि जगीं नांदे। भक्तां निघती दोंदें। सात्त्विकाचीं॥ ५५॥
तैं पापाचा अचळु फिटे। पुण्याची पहाट फुटे। जैं मूर्ति माझी प्रगटे। पंडुकुमरा॥ ५६॥
ऐसेया काजालागीं। अवतरें मी युगींयुगीं। परी हेंचि वोळखे जो जगीं। तो विवेकिया॥ ५७॥
माझें अजत्वें जन्मणें। अक्रियताचि कर्म करणें। हें अविकार जो जाणे। तो परममुक्त॥ ५८॥
तो चालिला संगें न चळे। देहींचा देहा नाकळे। मग पंचत्वीं तंव मिळे। माझ्याचि रूपीं॥ ५९॥

अर्थ—जेवढा कांही धर्म आहे त्याचें युगायुगाचें ठिकाणीं अवतार धारण करून रक्षण करावें असा सृष्टीच्या आरंभापासून प्रवाह चालत आला आहे. ॥ ४९ ॥ म्हणून मी, अर्जुना! जेव्हा अधर्माने धर्म दिसेनासा होतो तेव्हा आपलें न जन्मणें बाजूला ठेवितों, किंवा अव्यक्तपणहि लक्षांत घेत नाही. ॥ ५० ॥

गूढार्थदीपिका—याचा अर्थ हे दोन्ही धर्म नाहिसे होतात असा नाही. कारण असा अर्थ केल्यास "माझें अजत्वें जन्मणें" इत्यादि माउलीच्या ओव्यांना विरोध येतो. म्हणून अज राहूनच जन्मल्यासारखा भासतो, अव्यक्त राहूनच व्यक्त होतों असे अर्थ करावे लागतात.

अर्थ—त्यावेळीं मी आपल्या भक्तांचा कैवार घेऊन सगुण साकार होऊन अवतरतों आणि मग संपूर्ण अज्ञान अंधकार नाहिसा करितों. ॥ ५१ ॥ अधर्माचा शेवट करितों, पापांचा जमाखर्च फाडून टाकितों आणि साधुपुरुषांच्या कडून भक्तीचा प्रसार करवून जिकडे तिकडे सुखाच्या गुढ्या उभारतों. ॥ ५२ ॥ दैत्यकुळांचा नाश करितों, साधूंचा लोकांत आदर वाढवितों आणि धर्म व नीति यांचे ऐक्य करवितों. ॥ ५३ ॥ अविचाराचें जमलेलें काजळ झाडून टाकून विवेकाचा दिवा पाजळतों. त्यावेळीं भगवद्भक्ताला जिकडे तिकडे अखंड सुखाची दिवाळी उजाडते. ॥ ५४ ॥ सर्व विश्व आत्मानंदाने भरून जाते व जगांत एक धर्मच राहतो आणि भक्तांना सत्वगुणांची पेटी फुटते. ॥ ५५ ॥ हे अर्जुना! जेव्हा भगवंताचा अवतार होतो तेव्हा पापांचे पर्वत नाहिसे होतात व पुण्याचा उदय होतो अशी सर्व सुखाची स्थिति जगांत नांदते. ॥ ५६ ॥ जगांत अशी ही सुखाची स्थिति उत्पन्न करण्याकरिता मी युगायुगाचे ठिकाणीं अवतरतों, पण हें माझें अवताराचें मर्म जो जाणतो तोच खरा विवेकी पुरुष होय. ॥ ५७ ॥ मी जन्मरहित राहूनच जन्मतों, निष्क्रिय राहूनच कर्म करितों, ही माझी अविकारी स्थिति जो जाणतो तो पूर्ण मुक्त झाला. ॥ ५८ ॥ तो पुरुष क्रियेच्या संगतीने क्रियावान होत नाही. देहांत राहूनहि देहाचा संबंध वागवीत नाही. शेवटीं मरणाचे वेळी माझ्या स्वरूपांतच तो मिळतो. ॥ ५९ ॥

गूढार्थदीपिका—या ठिकाणीं अवतार कसा ओळखतां येतो हें दाखविलें आहे. अवतार धर्मस्थापनेकरिताच होतो, म्हणून भगवद्भक्तिरूप धर्माचें संरक्षण व स्थापना करणाराच अवतार असतो. हें अवताराचें पहिलें लक्षण आहे.

अवतारकाळीं सर्व लोक विवेकसंपन्न, पुण्यशील, धर्मपरायण व सुखी होतात, हें दुसरे लक्षण होय.

अवताराचे जन्म व कर्म हेहि सामान्य माणसाच्या जन्मकर्माप्रमाणे पांचभौतिक नसतात; म्हणजे प्रकृतिजन्य पांचभौतिक नसतात. तेहि प्रकृतीच्या पलीकडे आहेत. अजन्मापरमेश्वराचें जन्मणें हें अविकार आहे, असें श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात. याचा अर्थ असा आहे की भगवंताचें जन्मकर्म मायेच्या पलीकडील आहेत. त्याचा मायेमध्ये अंतर्भाव होत नाही. म्हणजे मूळच्या पूर्ण ब्रह्मस्थितीत यत्किंचितहि बदल न होतां अधिकारी राहूनच परमेश्वर जीवाच्या ठिकाणीं असलेल्या मायेच्या योगाने जीवाला जन्मल्यासारखा भासतो. पण त्यांचे ठिकाणीं प्रकृतिजन्य जन्म संभवत नाही.

कोणी अज्ञ लोक अवतार म्हणजे पूर्ण ब्रह्मस्थितींतून खाली येणें असा अर्थ करितात, पण पूर्ण ब्रह्मस्थिति नित्य, अक्षय, तशीच पूर्ण राहणारी असल्यामुळे ती अपूर्ण कधी होत नाही, म्हणून 'अवतार' शब्दाचा अर्थ तसा करतां येत नाही. भगवंताच्या अवताराचें व अंतर्धानाचें लक्षण स्वानुभवी एकनाथ महाराजांनी चतु:श्लोकी भागवतांत केलें आहे तें असे "**श्रीनारायण साकारला। तंव तो इंद्रियां विषय केला। तोचि इंद्रियातीत जाहला। या नांव पावला अंतर्धांना॥ ७६३॥**" परब्रह्माची मूळ शक्ति नामरूपात्मक व सच्चिदानंदस्वरूप आहे; म्हणून ती परब्रह्माशीं एकरूप असते. तीच परब्रह्माचे ठिकाणीं स्फुरण पावली असतां परब्रह्माला नामरूपासहित व्यक्त करिते हें श्रीज्ञानेश्वर महाराजांनी अमृतानुभवाच्या पहिल्या प्रकरणांत सांगितलें आहे. अशा नामरूपाने व्यक्त झालेल्या परमेश्वराला अवतार म्हणतात व ती नामरूपात्मक चैतन्यशक्ति परब्रह्माशीं अत्यंत एकरूप झाली किंवा स्फुरणरहित झाली म्हणजे त्याला अवताराचें अंतर्धान पावणें म्हणतात.

परमेश्वराशीं एकरूप असलेल्या याच नामरूपात्मक चैतन्यशक्तीचे ठिकाणीं अज्ञानी जीवाला त्रिगुणात्मक मायेचा भ्रम झाला आहे व तो त्या मायाभ्रमाने मोहित होऊन परमेश्वराच्या सच्चिदानंदरूप अवतार देहाला मायाजन्य पांचभौतिक देह समजतो. वास्तविक परमेश्वराचा अवतारदेह पांचभौतिक आहे असें वेदान्ताने सिद्ध होत नाही. म्हणूनच भगवंताचें जन्मकर्म प्रकृतिजन्य नाहीत हें ज्याला समजलें, तो पुरुषहि प्रकृतीच्या पलीकडे जातो व मुक्त होतो.

सामान्य माणसाचें जन्मकर्म पांचभौतिक असल्यामुळे तें जाणून कोणीहि मुक्त होत नाही. म्हणून ज्याचें जन्म व कर्म प्रकृतीच्या पलीकडे आहे त्याला अवतार म्हणतात व हें अवताराचे तिसरें लक्षण होय.

"**धर्मासीं नीतीशी। शेंज भरी**"—

धर्म व नीतीचें ऐक्य होतें. नीतीचें स्वरूप सांगतांना श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात की "पैं सारासार निर्धारितयां। धर्मज्ञानाचा पक्षु धरितयां। सकळशास्त्रांमाजी ययां। नीतिशास्त्र तें मी" (ज्ञा० अ० १० ओ० २९७), आपत्प्रसंगीं धर्म व ज्ञान यांचा पक्ष धरून हिताचें काय व अहिताचें कोणतें याचा निश्चय करून देणारें शास्त्र नीतिशास्त्र होय. वस्तुत: धर्म व नीति हे एकच आहेत; पण स्वधर्माप्रमाणे जेव्हा पूर्णपणे वागतां येत नाही, तथा आपत्प्रसंगीं धर्म व नीति यांच्या स्वरूपांत थोडा फरक होतो.

शास्त्राची आज्ञा तो धर्म होय. या धर्माला सर्वस्वीं न सोडतां ज्ञानाच्या बळावर त्या आपत्प्रसंगीं धर्माला थोडी मुरड घालून जें वागणें त्याला नीति म्हणतात. या नीतीचा आश्रय आपत्प्रसंगीच घेतात.

भगवंतांनी अवतार घेऊन धर्माचा उद्धार केला व आपत्प्रसंग नाहिसा झाला की धर्म व नीति एक होऊन जातात म्हणजे नीति नाहिशी होऊन धर्मच एक राहतो.

(१) साधूंचें संरक्षण (२) दुर्जनांचा नाश व (३) धर्म स्थापना; अशी ही भगवंताला अवतार घेण्याची तीन प्रयोजनें सांगितलीं आहेत. पण भगवान सर्व कर्मांचीं फळें देणारा असल्यामुळे, साधूचें संरक्षण त्यांच्या सत्कर्मामुळेच करीत असतो व दुष्टांचा नाशहि त्यांच्या अधर्मामुळेच भगवान करीत असतो. म्हणून हीं दोन प्रयोजनें आनुषंगिक आहेत. हीं अवतारांची मुख्य प्रयोजनें म्हणतां येत नाहीत. परंतु लोकांची अधर्म प्रवृत्ति नाहिशी होऊन लोकांत जिकडे तिकडे धर्मादिकांची प्रवृत्ति निर्माण करण्याचें काम अवतारावांचून कोणी करूं शकत नाही. म्हणून धर्मसंस्थापन हेंच मुख्य अवतारांचें प्रयोजन म्हणावें लागतें. येथे "धर्म" या शब्दाने केवळ श्रुतिस्मृतियुक्त असा अर्थ घेतां येत

नाही. कारण तो युगपरत्वें बदलत असतो असे भारतादि ग्रंथांतून सांगितलें आहे, म्हणून येथील 'धर्म' शब्दाचा अर्थ भागवत धर्म, भक्तिधर्म किंवा एकांत धर्म अथवा कर्मयोग असा करावा लागतो आणि योगधर्म हाच आद्य धर्म असून तो जेव्हा जेव्हा बुडाला तेव्हा तेव्हा विवस्वान, मनु इत्यादिकांना त्याचा उपदेश करून त्याची स्थापना केली असा इतिहास आहे आणि आताहि तो नष्ट झाल्यामुळे तुला तो सांगत आहे असें भगवंतांनीच अर्जुनाला सांगितलें आहे.

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः। बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः॥ १०॥

अर्थ—एक माझाच आश्रय करून माझ्या प्रेमाने माझ्याशीं तन्मय झाल्यामुळे विषयवासना, भय, क्रोध, यांचा ज्यांनी निःशेष नाश केला असें ऐक्यरूप ज्ञानतपाने संपन्न झालेले पुष्कळ पुरुष अत्यंत उपाधिरहित होऊन, माझ्या सायुज्यास प्राप्त झाले आहेत. ॥ १० ॥

एऱ्हवीं परापर न शोचिती। जे कामनाशून्य होती। वाटा कें वेळीं न वचती। क्रोधाचिया॥ ६०॥
जे सदा मियांचि आथिले। माझिया सेवा जियाले। कां आत्मबोधें तोषले। वीतराग जे॥ ६१॥
जे तपोतेजाचिया राशी। कां एकायतन ज्ञानासी। जे पवित्रता तीर्थांसी। तीर्थरूप॥ ६२॥
ते मद्भावा सहजें आले। मी तेचि ते होऊनि ठेले। जे मज तयां उरले। पदर नाहीं॥ ६३॥
सांगें पितळेची गंधिकाळिक। जैं फिटली होय निःशेख। तैं सुवर्ण काई आणिक। जोडूं जाईजे॥ ६४॥
तैसे यमनियमीं कडसले। जे तपोज्ञानीं चोखाळले। मी तेचि ते जाहले। एथ संशयो कायसा॥ ६५॥

अर्थ—जे आपपरभावाने दुःखी होत नाहीत, ते सर्व वासनारहित होतात. क्रोधाच्या तावडींत कधी सांपडत नाहीत. ॥ ६० ॥ जे सदा सर्वदा माझ्या प्रेमांत निमग्न असतात, माझ्या सेवेच्या प्रेमामुळे जीवंत राहतात, किंवा आत्मज्ञानामुळे रागद्वेषरहित शांत चित्त असतात. ॥ ६१ ॥ ज्यांनी अखंड भगवत्‌चिंतनाने तपाच्या राशी जोडल्या व सामर्थ्याचें तेजाने संपन्न झाले अथवा आत्मज्ञानाचा एकमेव आश्रय झाले व तीर्थांचेंहि पाप धुवून त्यांना पवित्र करणारें महान तीर्थ बनलें. ॥ ६२ ॥ असे जे पुरुष ते सहजच मला प्राप्त होतात किंवा सहजच मत्स्वरूप होतात. मी म्हणजे तेच होत. माझ्यांत व त्यांच्यांत यत्किंचित्‌हि अंतर नसतें. ॥ ६३ ॥ अर्जुना! सांग पाहूं, पितळेच्या धातूचे काळे पडणें व कळकणें हे दोन दोष निःशेष नाहिसे झाल्यास सोनें त्याहून निराळें राहतें काय? ॥ ६४ ॥ त्याप्रमाणे ज्यांचीं इंद्रियें व मन अनुक्रमें नियम व यम यांनी दृढ आवळलीं गेलीं, जे तप व ज्ञान यांच्या योगाने उपाधिरहित शुद्ध झाले, ते मीच झाले यांत संशयच नाही. ॥ ६५ ॥

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्। मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः॥ ११॥
काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः। क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा॥ १२॥

अर्थ—अर्जुना! जे ज्या भावाने माझें भजन करितात, त्याच भावाने मीहि त्यांचें भजन करितों. सर्व मनुष्य प्राणी स्वभावतःच माझे ठायीं भजनशील आहेत. ॥ ११ ॥ कर्माचें जे फळ सांगितलें आहे त्या फळाची इच्छा करणारे या लोकामध्ये नाना देवतांचे यजन करितात. कारण या मनुष्य लोकामध्ये कर्मानें देवतांचें यजन केल्याने त्या कर्माचें फळ लवकर प्राप्त होतें. ॥ १२ ॥

एऱ्हवीं तरी पाहीं। जे जैसे माझ्या ठायीं। भजती तयां मीही। तैसाचि भजें॥ ६६॥
देखें मनुष्यजात सकळ। हें स्वभावता भजनशीळ। जाहलें असे केवळ। माझ्याचि ठायीं॥ ६७॥
परी ज्ञानेवीण नाशिले। जे बुद्धिभेदासी आले। तेणेंचि या कल्पिलें। अनेकत्व॥ ६८॥
म्हणऊनि अभेदीं भेदु देखती। यया अनाम्या नामें ठेविती। देवी देवो म्हणती। अचर्चातें॥ ६९॥
जें सर्वत्र सदा सम। तेथ विभाग अधमोत्तम। मतिवशें संभ्रम। विवंचिती॥ ७०॥
मग नानाहेतुप्रकारें। यथोचितें उपचारें। मानिलीं देवतांतरें। उपासिती॥ ७१॥
तेथ जें जें अपेक्षित। तें तैसेंचि पावती समस्त। परी तें कर्मफळ निश्चित। वोळख तूं॥ ७२॥
वांचूनि देतें घेतें आणिक। निभ्रांत नाहीं सम्यक। एथ कर्मचि फळसूचक। मनुष्यलोकीं॥ ७३॥

जैसें क्षेत्रीं जें पेरिजे। तेंवांचूनि आन न निपजे। कां पाहिजे तेंचि देखिजे। दर्पणाधारें॥ ७४॥
नातरी कडेयातळवटीं। जैसा आपुलाचि बोलु किरीटी। पडिसादु होऊनि उठी। निमित्तयोगें॥ ७५॥
तैसा समस्तां यां भजनां। मी साक्षिभूतु पैं अर्जुना। एथ प्रतिफळे भावना। आपुलाली॥ ७६॥

अर्थ—एरव्ही तरी, अर्जुना! जे पुरुष ज्या रीतीने माझें भजन करितात, तसेंच मीहि त्यांचें भजन करितो. ॥६६॥ पहा, माझ्यावांचून दुसरी वस्तुच नसल्यामुळे सर्व हा मनुष्यप्राणी स्वभावतः माझ्या ठिकाणींच भजनशील आहे. ॥ ६७॥ पण माझ्या व्यापक स्वरूपाचें ज्ञान नसल्यामुळे मनुष्य आपल्या बुद्धीने निरनिराळ्या देवतांतराची कल्पना करून माझींच अनेक रूपाने कल्पना करितात. ॥ ६८॥ म्हणून एका अद्वैत वस्तूचे ठिकाणी द्वैत पाहतात. या नामरहित वस्तूला नामाचा संबंध लावितात आणि जी शब्दाचें वाच्य होऊं शकत नाही तिला ते देवदेवी असें म्हणतात. ॥ ६९॥ जी वस्तु सर्वत्र सम आहे, त्या वस्तूचे ठिकाणीं उत्तम अधम अशी विषमतेची भ्रान्त कल्पना करितात. ॥ ७०॥ मग नाना प्रकाराने व नाना प्रकारच्या वासनेने मानलेल्या देवतांचे त्यांना प्रिय असलेल्या उपचार सामग्रीने त्यांची उपासना करितात. ॥ ७१॥ या उपासनेंत उपासक जी जी कामना करितो ती ती पूर्ण होते; पण ते सर्व कर्माचें फळ होय, असें तूं जाण. ॥ ७२॥ येथे मनुष्यलोकांत जेवढे फळ किंवा सुख मिळतें तें कर्मावांचून स्वतंत्र फळ देणारा दुसरा कोणी नाही. कर्मच फळ देतें. ॥ ७३॥ ज्याप्रमाणे शेतांत जें पेरावें तेंच उगवतें किंवा आरशांत पहावें तेंच दिसतें. ॥ ७४॥ किंवा पर्वताचे दरींतून पोकळीमुळे आपला शब्दच प्रतिध्वनिरूपाने जसा उमटतो. ॥ ७५॥ त्याप्रमाणे सर्व प्राणीमात्रांच्या भजनाला मी केवळ साक्षीभूत राहतों आणि त्यांची भावनाच त्यांना इच्छेंप्रमाणे फळ देते. ॥ ७६॥

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः। तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम्॥ १३॥
न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा। इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते॥ १४॥
एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः। कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम्॥ १५॥

अर्थ—गुण कर्माच्या विभागानुसार मी चातुर्वर्णाची उत्पत्ति केली. मी त्यांचा कर्ता भासतों, तरी मी अविनाशी, अकर्ता आहे असें जाण. ॥ १३॥ कर्माचा लेप मला लागत नाही व मला कर्मफळाची इच्छाहि नाही, असें मला जो जाणतो तोहि कर्माने बद्ध होत नाही. ॥ १४॥ असें मला जाणूनच पूर्वी मुमुक्षु जनांनी कर्म केलें आहे, म्हणून पूर्वीच्या लोकांनी आपलें पूर्वीपासूनच चालत आलेलें जसें कर्म केलें, तसें, अर्जुना! तूंहि कर. ॥ १५॥

आतां याचिपरी जाण। चाऱ्ही आहेती हे वर्ण। सृजिले म्यां गुण। कर्मभागें॥ ७७॥
जे प्रकृतीचेनि आधारें। गुणाचेनि व्यभिचारें। कर्मे तदनुसारें। विवंचिलीं॥ ७८॥
एथ एकचि हे धनुष्यपाणी। परी जाहले गा चहूं वर्णी। ऐसी गुणकर्मी कडसणी। केली सहजें॥ ७९॥
म्हणोनि आइकें पार्था। हे वर्णभेदसंस्था। मी कर्ता नव्हे सर्वथा। याचिलागीं॥ ८०॥
हें मजचिस्तव जाहलें। परी म्यां नाहीं केलें। ऐसें जेणें जाणितलें। तो सुटला गा॥ ८१॥
मागील मुमुक्षु जे होते। तिहीं ऐशियाचि जाणोनि मातें। कर्मे केली समस्तें। धनुर्धरा॥ ८२॥
परि तें बीजें जैसीं दग्धलीं। नुगवतीचि पेरिलीं। तैशीं कर्मेचि परि तयां जाहलीं। मोक्षहेतु॥ ८३॥

अर्थ—त्याप्रमाणेच, अर्जुना! हेंहि जाण की, ब्राह्मणादि चार वर्ण गुणकर्माच्या विभागानुसार मी उत्पन्न केले. ॥ ७७॥ ब्राह्मणादि वर्णाच्या प्रकृतीला अनुसरून व त्यांच्या त्रिगुणाच्या मिश्रस्थितीचा विचार करून त्यांना तशीं कर्मे लावून दिलीं. ॥ ७८॥ धनुर्धारी अर्जुना! मनुष्यमात्र येथे एकच आहे. तरी तो मनुष्य चार वर्णात विभागला गेला. अशा रीतीने स्वभावतः गुणकर्मानुसार वर्ण मर्यादा केली गेली. ॥ ७९॥ म्हणून अर्जुना! ऐक, ही चार निराळ्या वर्णाची व्यवस्था मी केली नाही. ॥ ८०॥ हा वर्णभेद माझ्यामुळे झाला खरा, पण मी मात्र केला नाही, हें ज्याने जाणलें तो या कर्मबंधांतून सुटला. ॥ ८१॥ अर्जुना! मागे जे मुमुक्षु होऊन गेले. त्यांनी मी कर्म करून अकर्ता कसा आहे, हें जाणून सर्व कर्मे केलीं. ॥ ८२॥ जळलेलें धान्य पेरलें असतां जसें उगवत नाही, त्याप्रमाणे आपलें अकर्तृत्व जाणून निष्काम चित्ताने त्यांनी केलेलीं कर्मेच त्यांच्या मोक्षाला साधक झालीं. ॥ ८३॥

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः। तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्॥ १६॥
कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः। अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः॥ १७॥

अर्थ—कर्म कशाला म्हणायचें, अकर्म कशाला म्हणायचें याचा निर्णय करतांना सुज्ञ पूरुषांनाहि भ्रम झाला आहे; म्हणून जें कर्म जाणलें असतां तूं संसारांतून मुक्त होशील तें कर्म मी तुला सांगतों. ॥ १६ ॥ कर्माची गती म्हणजे व्याप्ति फार दुर्ज्ञेय आहे. म्हणून कर्माचें स्वरूप, विकर्माचें स्वरूप आणि अकर्माचें स्वरूप जाणणें आवश्यक आहे. ॥ १७ ॥

एथ आणिकही एक अर्जुना। हे कर्माकर्मविवंचना। आपुलिये चाडें सज्ञाना। योग्य नोहे॥ ८४॥
कर्म म्हणिजे तें कवण। अथवा अकर्मा काय लक्षण। ऐसें विचारितां विचक्षण। गुंफोनि ठेले॥ ८५॥
जैसें कां कुडें नाणें। खऱ्याचेनि सारखेपणें। डोळयाचेंहि देखणें। संशयीं घालीं॥ ८६॥
तैसें नैष्कर्म्यतेचेनि भ्रमें। गिंवसिजत आहातीं कर्में। जे दुजी सृष्टि मनोधर्में। करूं सकती॥ ८७॥
वांचूनि मूर्खाची गोठी कायसी। एथ मोहले गा क्रांतदर्शी। म्हणोनि आतां तेचि परियेसीं। सांगेन तुज॥ ८८॥
तरी कर्म म्हणजे स्वभावें। जेणें विश्वाकारु संभवे। तें सम्यक आधीं जाणावें। लागे एथ॥ ८९॥
मग वर्णाश्रमासी उचित। जें विशेष कर्म विहित। तेंही वोळखावें निश्चित। उपयोगेंसीं॥ ९०॥
पाठीं जें निषिद्ध म्हणिपे। तेंही बुझावें स्वरूपें। येतुलेनि येथ कांहीं न गुंफे। आपैसेंचि॥ ९१॥
एऱ्हवीं जग हें कर्माधीन। ऐसी याची व्याप्ती गहन। परी तें असो आइकें चिन्ह। प्राप्ताचें गा॥ ९२॥

अर्थ—अर्जुना! येथे आणखी एक गोष्ट सांगायची आहे की मोठा शहाणा किंवा शास्त्रज्ञ झाला तरी त्याला आपल्या बुद्धीनुसार कर्माकर्माची मर्यादा ठरवितां येण्याजोगी नाही. ॥ ८४ ॥ कारण कर्म म्हणजे काय व अकर्माचें लक्षण काय याचा विचार करतांना अत्यंत सूक्ष्म विचार करणाऱ्या पुरुषांना देखील भ्रम झाला आहे. ॥ ८५ ॥ ज्याप्रमाणे खोटे नाणें खऱ्याप्रमाणेच हुबेहुब दिसायला लागलें तर डोळ्यानेच आपण प्रत्यक्ष पाहतों तरी खरें खोटें निवडतांना भ्रम होतो. ॥ ८६ ॥ त्याप्रमाणे मनाने प्रतिसृष्टि निर्माण करण्याचें ज्याचें ठिकाणीं सामर्थ्य आहे असे पुरुष देखील निष्कर्मतेच्या भ्रमांत कर्म करीत असतात. ॥ ८७ ॥ येथे मोठमोठ्याला समजत नाही तेथे मूर्खांबद्दल काय बोलायचें, म्हणून मी तुला कर्माकर्माचा उलगडा सांगतों. ॥ ८८ ॥ ज्याच्या योगाने स्वाभाविक ही सृष्टीची उत्पत्ति होते, त्याला कर्म म्हणतात, हें आधीं नीट जाणलें पाहिजे. ॥ ८९ ॥ मग निरनिराळ्या वर्णाला व आश्रमाला योग्य असें जें शास्त्राने कर्म नियत करून ठेविलें आहे, तें विशेष कर्म विकर्म होय. तें कर्म व त्याचा उपयोग काय हेंही नीट जाणले पाहिजे. ॥ ९० ॥ त्यानंतर ज्याला निषिद्ध म्हणतात किंवा शास्त्राने करूं नये म्हणून म्हटलें आहे, त्याचेहि स्वरूप कळणें जरूर आहे. इतकें कळलें की मग पुरुष कर्म होत असतांहि सहजच कर्मबंधांत पडत नाही. ॥ ९१ ॥ एरव्ही सर्व जग कर्माचे आधीन आहे, या विधानाची किंवा या विचाराची व्याप्ति दुर्बोध आहे, परंतु तें असूं दे. आता तुला प्राप्त पुरुषाचे चिन्ह सांगतों, ऐक. ॥ ९२ ॥

गूढार्थदीपिका—कर्म म्हणजे व्यापार. हा व्यापार दोन निरनिराळ्या वस्तू असल्याखेरीज किंवा एक वस्तु असली तरी ती विभागली जाण्याजोगी असल्याशिवाय होवू शकत नाही. परब्रह्म अद्वितीय आहे. तेथे त्यासारखी किंवा त्याहून निराळी अशी कोणती दुसरी वस्तु नाही आणि ती कधी विभागलीहि जात नाही. असें तें ब्रह्म अतूट, एकरूप आहे; म्हणून तेथे व्यापाररूप कर्म संभवतच नाही. तें सर्वदा अखंड कर्मरहित आहे असें हें ब्रह्म नामरूपाने स्फुरण पावतें. असें नामरूपाने स्फुरण पावणें हा परब्रह्माचा स्वभावच आहे. जसा अग्नि क्रियेमुळे उष्ण होत नाही, उष्णता त्याचा स्वभाव आहे, त्याप्रमाणे नामरूपात्मक होणें हाहि परब्रह्माचा स्वभाव असल्यामुळे नामरूपात्मक स्फुरण होण्यांत परब्रह्माकडून कोणतीहि क्रिया होत नाही. तें नामरूपाने स्फुरण पावलें तरी कर्मरहितच असतें. पण अज्ञानी जीवाला परब्रह्माच्या या कर्मरहित स्वरूपाचा अनुभव नसल्यामुळे, परब्रह्माचें नामरूपाने स्फुरणें हा परब्रह्माचा स्वभाव न वाटतां, परब्रह्माने केलेलें कर्म वाटतें. आणि नामरूपांचें नानात्व हें त्याला जगत् वाटतें. ज्याप्रमाणे दोरीच्या एक

भागावर सर्पाचा भ्रम झाल्याबरोबर सर्वच दोरी सर्परूप दिसते, त्याप्रमाणे नामरूपाने ब्रह्माचें स्फुरण कर्मरूप वाटूं लागलें की सर्व ब्रह्मच त्याला कर्मरूप वाटतें म्हणजे नामरूपात्मक ब्रह्माण्डच कर्मबद्ध वाटून तोहि आपल्याला कर्मबद्ध समजतो.

अशा रीतीने कर्माची व्याप्ति अमर्याद होते व त्याच्या सर्व दु:खाला कारणीभूत होते. म्हणून कर्माचें स्वरूप जाणणें आवश्यक असतें.

व्यापाररूप कर्म म्हणून मुळीच नाही, तें सच्चिदानंद परब्रह्माचें स्फुरण आहे असें कर्माचें खरें स्वरूप कळून आलें असतां कर्माच्या वस्तुत्वाचा भ्रम नाहिसा होतो आणि दु:खाचें कारण नाहिसें होतें. हा कर्माचें स्वरूप जाणण्याचा उपयोग आहे.

कर्माचें स्वरूप जाणून कर्माच्या वस्तुत्वाविषयींचा भ्रम नहिसा झाला व आपण मुळांत अकर्मरूप ब्रह्म-स्वरूप आहों असें कळलें, म्हणजे दु:खाचें कारणच नाहिसें झाल्यामुळे सर्व दु:ख नाहिसें होतें हें खरें, पण हें कार्य कर्माचें स्वरूप कळल्याबरोबरच होतें असा अर्थ नाही. कर्म आहे अशी दृढ झालेली बुद्धि जोपर्यंत अखंड अकर्मरूप व सच्चिदानंदस्वरूप अशा परब्रह्माचें ठिकाणीं स्थिर होत नाही, तोपर्यंत हें कर्म झालें व मी तें केलें अशी कर्मकर्तृत्वाची बुद्धि स्फुरत राहते. म्हणून आपल्याकडून होणाऱ्या कर्माचा व मी त्या कर्माचा कर्ता आहे, या बुद्धीने जो संबंध होतो, तो संबंध नाहिसा झाला पाहिजे.

कर्मत्यागाने कर्मकर्तृत्व संबंध नाहिसा होत नाही. कारण तेथेहि 'हें कर्म मी सोडलें' अशी कर्मकर्तृत्व बुद्धि उत्पन्न होतेच. म्हणून होणारें कर्म व त्यांचे कर्तृत्व हीं दोन्ही भगवंताला समर्पण करणें हाच एक मार्ग कर्माशीं संबंध नाहिसा करण्याकरिता उरतो. जी कर्में आपणाकडून होतात व ज्यांचा ''मी केलें'' या कर्तृत्वबुद्धीने आपण संबंध वागवितों तीं कर्में दोन प्रकारचीं आहेत. सामान्य व विशेष.

सामान्य म्हणजे कर्तृत्वबुद्धिपूर्वक होणारा किंवा कर्तृत्वबुद्धिरहित होणारा असा यच्चयावत् सर्व व्यापार होय या व्यापाराची व्याप्ति गहन असल्यामुळे तो सर्व व्यापार परमेश्वराला समर्पण करणें कठीण आहे. बुद्धीला परमेश्वराचें दृढ ज्ञान झालें असतां आपोआप यच्चयावत् कर्में परमेश्वराला समर्पण होतात व आपला कर्माशीं संबंध राहत नाही. म्हणून बुद्धींत परमेश्वराचें ध्यान दृढ होण्याकरीता शास्त्रांनी विशेष कर्में जीवाला सांगितलीं आहेत. तीं विशेष कर्में लक्ष ठेवून व कर्तृत्वबुद्धीने केलीं जातात.

अशीं विशेष कर्में दोन प्रकारचीं आहेत. एक विहित-व दुसरें निषिद्ध. ''अमुक कर्में करावीं'' असें ज्या कर्मा विषयी शास्त्रांनी विधान केलें असेल त्या कर्माला विहित कर्म म्हणतात आणि जीवाने ''करू नये'' असें ज्या कर्माविषयी शास्त्राने विधान केलें असेल त्याला निषिद्ध कर्म म्हणतात.

विहित कर्में हीं फलाशेने केलीं असतां परमेश्वराचें ध्यान घडत नाही व कर्मबद्धताच विशेष दृढ होतें. म्हणून कर्में फलाशा सोडून केवळ भगवत्प्रीत्यर्थ केलीं असतां भगवंताचें ध्यान घडत जाऊन भगवंताचे ठिकाणीं बुद्धि स्थिर होत जाते व आपल्या अकर्मरूप ब्रह्मस्वरूपाचा अनुभव दृढ होत जातो हाच त्या विहित कर्माचा उपयोग आहे. आणि निषिद्धकर्माने पाप उत्पन्न होतें व तें परमेश्वराच्या ध्यानाला व परमेश्वराचें ठिकाणी बुद्धि स्थिर होण्याला प्रतिबंधक असतें. निषिद्धकर्म करूं नये अशी परमेश्वराची आज्ञा आहे, हें सारखे लक्षांत ठेऊन निषिद्धकर्म न होऊं देण्याची खबरदारी घेत राहिलें असतां, परमेश्वराचें ध्यान घडून, परमेश्वराचें ठिकाणीं बुद्धि स्थिर होत जाते आणि निषिद्धकर्म न घडल्यामुळे परमेश्वराच्या प्राप्तीला प्रतिबंधक होणारें पापकर्महि राहत नाही. हा त्या निषिद्धकर्माचें स्वरूप जाणण्याचा उपयोग आहे.

अशा रीतीने कर्म, विहितकर्म व निषिद्धकर्म हीं तिन्ही कर्में जीवाला त्याच्या मूळ अकर्मरूप सच्चिदानंद ब्रह्मस्थितीचा अनुभव आणून देण्याला कारणीभूत होतात व या अनुभवाने त्याने मानिलेलें कर्महि ब्रह्मस्वरूप दिसू लागतें.

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः। स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत्॥ १८॥

अर्थ—कर्माचे ठिकाणीं अकर्म जो पाहतो व अकर्माचे ठिकाणी कर्म जो पाहतो, तोच सर्व पुरुषांत बुद्धिमान् होय. तोच योगी होय व त्यांनीच सर्व कर्म केलें असें जाण. ॥ १८॥

जो सकळकर्मीं वर्ततां। देखें आपुली नैष्कर्म्यता। कर्मसंगें निराशता। फळाचिया॥ ९३ ॥
आणि कर्तव्यतेलागीं। जया दुसरें नाहीं जगीं। ऐसिया नैष्कर्म्यता तरी चांगी। बोधला असे॥ ९४ ॥
परी क्रियाकलापु आघवा। आचरतु दिसे बरवा। तरी तो इहीं चिन्हीं जाणावा। ज्ञानिया गा॥ ९५ ॥
जैसा कां जळापाशीं उभा ठाके। तो जरी आपणपें जळामाजि देखे। तरी तो निभ्रांत वोळखे। म्हणे मी वेगळा आहें॥ ९६ ॥
अथवा नावे हन जो रिगे। तो थडियेचे रुख जातां देखे वेगें। तेचि साचोकारें जों पाहों लागे। तंव रुख म्हणे अचळ॥ ९७ ॥
तैसें सर्व कर्मी असणें। तें फुडें मानूनि वायाणें। मग आपणपें जो जाणे। नैष्कर्म्यु ऐसा॥ ९८ ॥
आणि उदोअस्ताचेनि प्रमाणें। जैसें न चालतां सूर्याचें चालणें। तैसें नैष्कर्म्यत्व जाणे। कर्मीचि असतां॥ ९९ ॥
तो मनुष्यासारिखा तरी आवडे। परी मनुष्यत्व तया न घडे। जैसें जळीं जळामाजीं न बुडे। भानुबिंब॥ १००॥
तेणें न पाहता विश्व देखिलें। न करितां सर्व केलें। न भोगितां भोगिलें। भोग्यजात॥ १०१॥
एकेचि ठायीं बैसला। परि सर्वत्र तोचि गेला। हें असो विश्व जाहला। आंगेंचि तो॥ १०२॥

अर्थ—सर्व कर्म होत असतांना जो मी कर्मरहित आहे असें जाणतो व कर्माची आसक्ति धरीत नाही व फळाची इच्छा करीत नाही. ॥ ९३॥ आणि मला कर्म केलें पाहिजे असें कर्तव्य वागविण्याकरिता, ज्याला आपल्याहून दुसरें कांही दिसतच नाही, असा स्वत:च्या स्वरूपाविषयी ज्याला उत्तम निष्कर्मतेचा बोध असतो. ॥ ९४॥ असें असूनहि तो सर्व कर्मे करतांना दिसतो. अशा चिन्हांनी युक्त असलेला पुरुष ज्ञानी होय असे जाण. ॥ ९५॥ ज्याप्रमाणे एखादा पुरुष जलाशयाच्या कांठीं उभा राहून जरी आपलें प्रतिबिंब पाण्यांत पाहतो, तरी मी पाण्याहून निराळा आहे असें नि:संशय जाणतो. ॥ ९६॥ किंवा नावेंत बसून जात असलेला पुरुष नदीकांठचे वृक्ष वेगाने जातांना पाहतो, पण विचार करून पाहतो तेव्हा तो म्हणतो मी जात आहे व वृक्ष स्थिर आहेत. ॥ ९७॥ त्याप्रमाणे सर्व कर्मे मी करतों हें अनुभवाने स्पष्ट खोटें मानून मी वस्तुत: निष्कर्म आहे, (सर्वाचा साक्षी आहे) असें जाणतो. ॥ ९८॥ आणि ज्याप्रमाणे सूर्य चालत नाही तरी उदय व अस्त यांच्यामुळे सूर्य चालतो असें वाटतें, त्याप्रमाणे कर्मे होत असतांच जो आपली कर्मरहित स्थिति जाणतो. ॥ ९९॥ ज्याप्रमाणे पाण्यांत सूर्याचें प्रतिबिंब जरी पडलेले दिसलें तरी पाण्यांत सूर्यबिंब नसतें, त्याप्रमाणे तो पुरुष सामान्य माणसासारखाच दिसला तरी सामान्य माणसासारखी त्याची स्थिति नसते. ॥ १००॥ त्या पुरुषाने जग न पाहतां पाहिलें. कांही न करतांच सर्व केलें व न भोगताच सर्व भोग भोगले. ॥ १०१॥ एका ठिकाणी बसूनच तो सर्वत्र गेला. आता असो हें वर्णन. अर्जुना! तो स्वत: सर्व विश्वच होतो. ॥ १०२॥

यस्य सर्वे समारम्भाः कामसङ्कल्पवर्जिताः। ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पण्डितं बुधाः॥ १९॥
त्यक्त्वा कर्मफलासङ्गं नित्यतृप्तो निराश्रयः। कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किञ्चित्करोति सः॥ २०॥

अर्थ—ज्याचीं सर्व कर्मे काम व संकल्परहित म्हणजे विषयसुखाची इच्छा हा काम व हें कर्म आहे व तें मी करितों हा संकल्प, या दोहोंवांचून केवळ व्यापार मात्र असतात आणि आत्मज्ञानाने ज्याचीं सर्व कर्मे नाहिशी झाली, त्याला पंडित म्हणतात. ॥ १९॥ कर्मासक्ति म्हणजे मला कर्म केलें पाहिजे व तें सिद्धीस नेलें पाहिजे ही इच्छा व फळासक्ति म्हणजे कर्माचें फळ मला मिळालें पाहिजे ही इच्छा, या दोन्ही इच्छा सोडून आत्मसुखानेच जो तृप्त असतो व कशाचा आश्रय करीत नाही, असा पुरुष कर्म करितांना दिसला तरी (आत्मज्ञानाने, कर्म व कर्तृत्व यांचे अस्तित्व नाही असा अनुभव येत असल्यामुळे) तो कांहीं एक करीत नसतो. ॥ २०॥

जया पुरुषाचां ठायीं। कर्माचा तरी खेदु नाहीं। परी फळापेक्षा कंहीं। संचरेना॥ १०३॥
आणि हें कर्म मी करीन। अथवा आदरिलें सिद्धी नेईन। येणें संकल्पेंही जयाचें मन। विटाळेना॥ १०४॥

ज्ञानाग्नीचेनि मुखें। जेणें जाळिलीं कर्मे अशेखें। तो ब्रह्मचि मनुष्यवेखें। वोळख तूं॥ १०५॥
जो शरीरीं उदासु। फळभोगीं निरासु। नित्यता उल्हासु। होऊनि असे॥ १०६॥
जो संतोषाचां गाभारां। आत्मबोधाचिया वोगरां। पुरे न म्हणेचि धनुर्धरा। आरोगितां॥ १०७॥

अर्थ—ज्या पुरुषाला कर्म करण्याचें वाईट वाटत नाही, आणि त्या कर्माच्या फळाचीहि इच्छा करीत नाही॥ १०३॥ आणि हें कर्म आहे व मी तें करीन किंवा आरंभलेलें कर्म बरोबर शेवटास नेईन असा संकल्प ज्याच्या मनाला शिवत नाही.॥ १०४॥ आत्मज्ञानरूपी अग्नीच्या मुखांत ज्यांनी आपलीं सर्व कर्मे जाळलीं, अर्जुना! असा पुरुष म्हणजे मनुष्यवेषाने पूर्ण ब्रह्मच होय असें समज.॥ १०५॥ जो शरीराचें ठिकाणीं उदास आहे, कर्माचें फळ भोगण्याची ज्याची इच्छा नाहीं, नित्य प्रसन्नचित्त असतो.॥ १०६॥ जो संतोषाचें माजघरांत बसून आत्मानुभवाचें जेवण जेवीत असतों व ते जेवण कितीहि वाढलें गेलें तरी त्याची तृप्ति होतच नाही.॥ १०७॥

गूढार्थदीपिका—ज्ञानी पुरुष साक्षी होऊन राहतो त्याला देह, कर्म, कर्मफल यांपैकी कांहीच सत्य वाटत नसल्यामुळे तो उदासीन असतो व त्याचे ठिकाणीं त्याच्या प्रकृतीनुसार कर्मे होत राहतात. त्यांचा त्याच्याशीं संबंध नसतो; म्हणून कर्म झाले असतां त्याला खेद होत नाही व न झाले असतां त्याला संतोषहि होत नाही.

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः। शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्॥ २१॥
यदृच्छालाभसन्तुष्टो द्वन्द्वातीतो विमत्सरः। समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते॥ २२॥

अर्थ—विषयकामना सोडून ज्यांनी अंतःकरणाचा निग्रह केला व सर्व संसाराची मनांतून आसक्ति सोडली, अशा पुरुषाला ज्याच्या केवळ शरीराकडून होणाऱ्या कर्माचा लेप लागत नाही.॥ २१॥ प्रारब्धाने जे मिळेंल त्यांतच जो पुरुष संतुष्ट असतो, सुखदुःखादि द्वंद्वापासून जो मुक्त झाला, अद्वैत अनुभवाने आपल्याहून दूसरा भासत नसल्यामुळे जो मत्सररहित झाला, सिद्धि व असिद्धि दोन्ही जो सम पाहतो असा पुरुष कर्म करूनहि बद्ध होत नाही.॥ २२॥

कैसी अधिकाधिक आवडी। घेत महासुखाची गोडी। सांडोनियां आशा कुरोंडी। अहंभावेंसीं॥ १०८॥
म्हणोनि अवसरें जें जें पावें। कीं तेणेंचि तो सुखावे। जया आपुलें आणि परावें। दोन्ही नाहीं॥ १०९॥
तो दिठीं जें पाहे। तें आपणचि होऊनि जाये। आइके तें आहे। तोचि जाहाला॥ ११०॥
चरणीं हन चाले। मुखें जें जें बोले। ऐसें चेष्टाजात तेतुलें। आपणचि जो॥ १११॥
हें असो विश्व पाहीं। जयासि आपणपेंवांचूनि नाहीं। आतां कवण तें कर्म कायी। बाधी तयातें॥ ११२॥
हा मत्सरु जेथ उपजे। तेतुलें नुरेचि जया दुजें। तो निर्मत्सरु काइ म्हणिजे। बोलवरी॥ ११३॥
म्हणोनि सर्वांपरी मुक्तु। तो सकर्मुचि कर्मरहितु। सगुण परि गुणातीतु। एथ भ्रांति नाहीं॥ ११४॥

अर्थ—ज्याची आत्मसुखाची आवडी उत्तरोत्तर वाढत जाऊन जो अहंभावासह आशेला त्या आत्मसुखावरून ओवाळून टाकतो व आत्म्याचें महासुख भोगतो.॥ १०८॥ ज्याचे ठिकाणीं आपपरभाव नसल्यामुळे, ज्या वेळीं जें प्राप्त होईल तेवढ्यानेच तो संतुष्ट असतो.॥ १०९॥ तो आपल्या दृष्टीने जें जें पाहतो तें तें तोच होतो, जें जें ऐकतो ते ते तोच होतो.॥ ११०॥ पायाने जेवढी चालण्याची क्रिया होते किंवा मुखाने बोलण्याची जी क्रिया होते तितकी सर्व क्रिया तो आत्मस्वरूपच पाहतो.॥ १११॥ हें असो. संपूर्ण जगच त्याला आत्मस्वरूप दिसते. अशा स्थितींत त्याला बंधनकारक होईल असें त्याच्याहून निराळे कोणते कर्म राहिले?॥ ११२॥ आपल्याला हें बंधनकारक आहे असें वाटून ज्याच्या विषयी मत्सर उत्पन्न होईल, असें त्याच्याहून दुसरें कांहीच नसते, मग त्याला निर्मत्सर हा शब्द तरी कशाला लावायचा?॥ ११३॥ म्हणून असा पुरुष पूर्ण मुक्त असतो. तो कर्म करीत असतो तरी कर्मरहितच असतो. सगुण असला तरी गुणरहित असतो, यांत मुळींच शंका नाही.॥ ११४॥

गतसङ्गस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः। यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते॥ २३॥
ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्। ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना॥ २४॥

अर्थ—ज्याचे चित्त आत्मज्ञानांत गढून गेले व ज्याची कर्म व कर्मफल यांच्या ठिकाणची आसक्ति नाहिशी झाली, म्हणून ज्याचे कर्मानुष्ठान केवळ परमेश्वराची आज्ञा आहे असें समजूनच होते, अशा मुक्त पुरुषाचे सर्व कर्म त्याचे ठिकाणींच लीन होते. म्हणजे कर्म फलस्वरूपाने उदयास येत नाही. ॥ २३ ॥ ज्ञानी पुरुषाला अर्पणक्रिया ब्रह्मस्वरूपच भासते, हविर्द्रव्यहि ब्रह्मच दिसते, अग्नि त्याला ब्रह्मस्वरूपच असतो, हवनकर्ता देखील ब्रह्मस्वरूपच दिसतो, कर्माने प्राप्त होणारें फलहि तो ब्रह्मस्वरूपच पाहतो, म्हणून कर्म व ब्रह्म एकरूप पाहणारा ज्ञानी, कर्म हें ब्रह्मच आहे अशा अढळ समदृष्टीमुळे तो ब्रह्मालाच प्राप्त होतो. ॥ २४ ॥

तो देहसंगें तरी असे। परि चैतन्यासारिखा दिसे। पाहतां परब्रह्माचेनि कसें। चोखाळु भला॥ ११५॥
ऐसाही परी कौतुकें। जरी कर्मे करी यज्ञादिकें। तरी तियें लया जाती अशेखें। तयाचांचि ठायीं॥ ११६॥
अकाळींचीं अभ्रें जैशीं। उर्मीवीण आकाशीं। हारपती आपैशीं। उदयलीं सांतीं॥ ११७॥
तैशीं विधीविधानविहितें। जरी आचरे तो समस्तें। तरी तियें ऐक्यभावें ऐक्यातें। पावतीचि गा॥ ११८॥
जें हें हवन मी होता। कां इये यज्ञीं हा भोक्ता। ऐसिया बुद्धीसी नाहीं भिन्नता। म्हणऊनियां॥ ११९॥
जे इष्टयज्ञ यजावे। ते हविर्मंत्रादि आघवें। तो देखतसे अविनाशभावें। आत्मबुद्धि॥ १२०॥
म्हणऊनि ब्रह्म तेंचि कर्म। ऐसें बोधा आलें जया सम। तया कर्तव्य तें नैष्कर्म्य। धनुर्धरा॥ १२१॥

अर्थ—तो ज्ञानी पुरुष देहाचा संबंध वागवितो असें दिसतें, पण तो चैतन्यरूप असतो. परब्रह्माची कसोटी लावून पाहतां तोहि शुद्ध परब्रह्मच ठरतो. ॥ ११५ ॥ असें असूनहि जर त्यांनी यज्ञादिक कर्मे केंलीं तरी, तीं संपूर्ण त्याचे ठिकाणीं लय पावतात. ॥ ११६ ॥ ज्याप्रमाणे अकाळीं आलेली अभ्रें पाऊस न पडतां तेथल्या तेथे आकाशांत निःशेष नाहिशीं होतात. ॥ ११७ ॥ त्याप्रमाणे सर्व विहित कर्माचें आचरण जरी ज्ञानी पुरुष करीत असला तरी तीं सर्व त्यांशीं आत्मरूप होऊन ऐक्य पावतात. ॥ ११८ ॥ हें हवनकर्म, मी हवन करणारा किंवा या यज्ञांत हा भोक्ता अशी भिन्न भिन्न बुद्धि त्याचें ठिकाणीं नसतें; म्हणजे त्याला सर्वत्र एक अद्वैत ब्रह्मच भासतें. ॥ ११९ ॥ ज्या इष्ट यज्ञाचें यजन करायचें तें हविर्द्रव्य मंत्र वगैरे तो अविनाशी आत्मस्वरूपच पाहतो. ॥ १२० ॥ म्हणून जें ब्रह्म तेंच कर्म होय, असें जो आत्मज्ञानाने दोन्ही एकरूप पाहतो अशा ज्ञान्याचें कर्म करणेंच, हे अर्जुना! नैष्कर्म असतें. ॥ १२१ ॥

गूढार्थदीपिका—श्लोक १८ पासून २४ पर्यंत भगवंतांनी अर्जुनाला प्राप्त पुरुषाचीं चिन्हे सांगितलीं आहेत व प्राप्त पुरुष कर्मे करूनहि ब्रह्मैक्यज्ञानामुळे कसें कर्मरहित राहतात हें दाखविलें आहे.

अद्वैत सच्चिदानंद परमेश्वरस्वरूपाचें ठिकाणीं किंवा आत्मस्वरूपाचे ठिकाणीं बुद्धि स्थिर करणें यालाच भगवान योग म्हणतात हें दुसऱ्या अध्यायांत स्पष्ट केलेंच आहे. ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर नसलेली बुद्धी, निरनिराळ्या पदार्थाच्या अस्तित्वाची जोपर्यंत कल्पना करते तोपर्यंत सच्चिदानंद अद्वैत अशा परमेश्वरस्वरूपाचें ठिकाणीं ती स्थिर होत नाही आणि एकदा ती तेथे स्थिर झाली की तिला एका परमेश्वरावांचून दुसऱ्या कोणत्याच पदार्थाचें ज्ञान होत नाही. म्हणून ब्रम्हस्वरूपाचे ठिकाणी स्थिर झालेले पुरुष, इतर लोकांना कर्म करतांना दिसले तरी कर्मरहित असतात असें भगवंताचें म्हणणें आहे.

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते। ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति॥ २५॥

अर्थ—कित्येक योगी दैव यज्ञाचीच उपासना करितात व कोणी ब्रह्मारूप अग्नीत यज्ञाचें हवन करितात. ॥ २५ ॥

आतां अविवेककुमारत्वा मुकले। जयां विरक्तीचें पाणिग्रहण जाहलें। मग उपासन जिहीं आणिलें। योगाग्नीचें॥ १२२॥
जे यजनशील अहर्निशीं। जिहीं अविद्या हविली मनेंसीं। गुरुवाक्यहुताशीं। हवन केलें॥ १२३॥
तिहीं योगाग्निकीं यजिजे। तो दैवयज्ञु म्हणिजे। जेणें आत्मसुख कामिजे। पंडुकुमरा॥ १२४॥
दैवास्तव देहाचें पाळण। ऐसा निश्चयो परिपूर्ण। जो चिंती ना देहभरण। तो महायोगी जाण दैवयोगें॥ १२५॥
आतां अवधारीं सांगेन आणिक। जे ब्रह्माग्नी साग्निक। तयांतें यज्ञेंचि यज्ञु देख। उपासिजे॥ १२६॥

अर्थ—आतां अविवेकरूपी बालदशा सुटून ज्यांचें विरक्तीशीं लग्न लागलें व म्हणून मग ज्यांनी योगाग्नीची

उपासना सुरू केली. ॥ १२२ ॥ जे असे अद्वैत ब्रह्मबुद्धीने अखंड यजन करितात व ज्यांनी गुरुवचनरूपी अग्नींत मनासह अविद्येचें हवन केलें. ॥ १२३ ॥ ते अशा रीतीने जीवब्रह्मैक्यरूप योगाग्नीचें यजन करितात, म्हणून त्या यज्ञाला दैवयज्ञ म्हटलें जातें. असे यज्ञ करून ते त्या यज्ञापासून आत्मसुखाच्या प्राप्तीची इच्छा करितात. ॥ १२४ ॥ जो कोणी देहाचें पालन पोषण सर्वस्वीं, दैवाने होतें असें समजून, दैवावर टाकतो व देहाच्या पोषणाची चिंता करीत नाही, तो त्या दैवयोगाने महायोगी समजला जातो. ॥ १२५ ॥ आता, अर्जुना! आणखी एक सांगतों ऐक. जे ब्रह्मरूप अग्नि ठेवून अग्निहोत्री झाले ते यज्ञानेच यज्ञाची उपासना करितात. ॥ १२६ ॥

श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति । शब्दादीन्विषयानन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति ॥ २६ ॥

अर्थ—कित्येक संयमरूपी अग्नींत श्रवणेंद्रियादि इंद्रियांची आहुति देतात. कित्येक दुसरे इंद्रियरूपीं अग्नींत शब्दादि विषयांची आहुति देतात. ॥ २६ ॥

एक संयमाग्निहोत्री। ते युक्तित्रयाच्या मंत्रीं। यजन करिती पवित्रीं। इंद्रियद्रव्यीं ॥ १२७ ॥
एकां वैराग्य रवि विवळे। तंव संयती विहार केले। तेथ अपावृत जाहले। इंद्रियानळ ॥ १२८ ॥
तिहीं विरक्तीची ज्वाळा घेतली। तंव विकारांचीं इंधनें पळिपलीं। तेथ आशाधूमें सांडिलीं। पांचही कुंडें ॥ १२९ ॥
मग वाक्यविधींचिया निरवडी। विषयआहुती उदंडीं। हवन केलें कुंडीं। इंद्रियाग्नीच्या ॥ १३० ॥

अर्थ—("त्रयमेकत्र सयम:") या योगसूत्राप्रमाणे, धारणा, ध्यान, समाधि हे तिन्ही एका वस्तूचे ठिकाणीं करणें याला संयम म्हणतात. कित्येक आसक्तिरहित असल्यामुळे पवित्र झालेल्या इंद्रियरूपी द्रव्याचें, या युक्तित्रयरूप मंत्राने संयमरूपी अग्निहोत्राचे ठिकाणीं यजन करितात. (युक्तित्रय म्हणजे शरीरांत धातुसाम्य राहील अशा रीतीने आहारविहार व निद्रा यांचें शास्त्रानुसार नियमन करणें होय). (विषय वैराग्याने विषयासक्ति सुटली की इंद्रियरूपी द्रव्य शुद्ध होतें). ॥ १२७ ॥ कोणाचे ठिकाणीं वैराग्यरूपी सूर्य प्रकाशू लागतो व त्यांचे आहार विहार सर्व संयमाने होतात, तेव्हा त्यांचे ठिकाणीं इंद्रियरूपीं अग्नि, धूमरहित होऊन तेजस्वी होतो. ॥ १२८ ॥ तो अग्नि मग विरक्तीची ज्वाळा घेतो. त्या ज्वाळेंत मनोविकारांचीं लाकडें पेटूं लागतात. त्या इंद्रियरूपी पांच कुंडांत यत्किंचित्हि आशेचा धूर राहत नाही. ॥ १२९ ॥ मग त्या प्रज्वलित इंद्रियाग्निकुंडांत सद्गुरूंचे वाक्य हेंच विधिवाक्य जाणून त्या विधिवाक्याचे विश्वासावर सर्व विषयांचें हवन केलें जातें. ॥ १३० ॥

सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे। आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥ २७ ॥

अर्थ—कित्येकजण आत्म्याचे ठिकाणीं धारणा, ध्यान समाधिरूप संयम करून ज्ञानाने प्रज्वलित झालेल्या त्या संयमरूप अग्नीमध्ये इंद्रियांच्या व प्राणांच्या सर्व कर्मांचें हवन करितात. ॥ २७ ॥

एकीं ययापरी पार्था। दोषु क्षाळिले सर्वथा। आणिकीं हृदयारणीं मंथा। विवेकु केला ॥ १३१ ॥
तो उपशमें निहटिला। धैर्यें वरी दाटिला। गुरुवाक्यें काढिला। बळकटपणें ॥ १३२ ॥
ऐसें समरसें मंथन केलें। तेथ झडकरी काजा आलें। जें उज्जीवन जाहालें। ज्ञानाग्नीचें ॥ १३३ ॥
पहिला ऋद्धिसिद्धीचा संभ्रमु। निवर्तोनि गेला धूमु। मग प्रगटला सूक्ष्मु। विस्फुलिंगु ॥ १३४ ॥
तया मनाचें मोकळें। तेंचि पेटवण घातलें। जें यमदमीं हळुवारलें। आइतें होतें ॥ १३५ ॥
तेणें सादुकपणें ज्वाळा समृद्धा। मग वासनांतराचिया समिधा। स्नेहेंसी नानाविधा। जाळिलिया ॥ १३६ ॥
तेथ सोहंमंत्रें दीक्षितीं। इंद्रियकर्मांचिया आहुती। तिये ज्ञानानळीं प्रदीप्तीं। दिधलिया ॥ १३७ ॥
पाठीं प्राणकर्मांचिये स्रुवेनिशीं। पूर्णाहुती पडली हुताशीं। तेथ अवभृथ समरसीं। सहजें जाहलें ॥ १३८ ॥
मग आत्मबोधींचें सुख। जें संयमाग्नीचें हुतशेष। तोचि पुरोडाशु देख। घेतला तिहीं ॥ १३९ ॥
एक ऐशिया इहीं यजनीं। मुक्त ते जाहले त्रिभुवनीं। या यज्ञक्रिया तरी आनानी। परि प्राप्य तें एक ॥ १४० ॥

अर्थ—याप्रमाणे कित्येक योगीपुरुष आपलें पाप नाहिसें करितात. कित्येक जण आपल्या हृदयाची अरणि (म्हणजे मंथनाचे खालचे काष्ठ) करून विवेकाची रवी करितात. ॥ १३१ ॥ मनाच्या उपशमाने रवी घट्ट धरून

अतिशय धैर्याने व गुरुवाक्यावरील दृढ विश्वासांने जोरदार मंथन करितात व ज्ञानाग्नि काढतात. ॥ १३२ ॥ असें समदृष्टीने मंथन केलें असतां तत्क्षणीं कार्य झालें समजावें, कारण त्या मंथनाने ज्ञानाग्नि प्रगट होतो. ॥ १३३ ॥ प्रथम ऋद्धिसिद्धि यांचा मोह हा धूर निघून जातो व मग अग्नीची ठिणगी प्रगट होते. ॥ १३४ ॥ त्या ठिणगींत यमनियमांच्या अभ्यासाने आयतें वाळून शुष्क झालेलें व विषयरहित झालेलें मनाचें पेटवण घातलें. ॥ १३५ ॥ त्या पेटवणाने ज्ञानाग्नि प्रज्वलित होऊन तो ज्वाळांनी युक्त होतो व त्या ज्वाळेमध्ये विषयाचें विविध स्नेह हेंच तूप, त्या तूपासह नाना वासनांच्या समिधा जाळल्या जातात. ॥ १३६ ॥ तेथे त्या प्रदीप्त ज्ञानाग्नींत यज्ञकर्त्याने सोहं मंत्राने (मी तो आहे या मंत्राने) सर्व इंद्रियें व त्यांचीं कर्मे यांच्या आहुत्या दिल्या असतां. ॥ १३७ ॥ नंतर प्राणाचें कर्म हाच स्रुवा, (म्हणजे ज्या पात्राने आहुति टाकतात तें पात्र) त्या स्रुवेने अग्नीत पूर्णाहुति दिल्यावर समदृष्टिरूप अवभृत स्नान होतें. ॥ १३८ ॥ मग आत्मज्ञानाचें हें जें संयमाग्निहोत्राचें शेष तो पुरोडाश ते सेवन करितात. ॥ १३९ ॥ कित्येकजण अशाप्रकारे यजन करून या संसारातून मुक्त होतात. या सर्व यज्ञक्रिया भिन्न असल्या तरी त्यांचे योगाने प्राप्त होणारें फळ मात्र एकच असतें. ॥ १४० ॥

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे । स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥ २८ ॥

अर्थ—द्रव्ययज्ञ म्हणजे तीर्थांत द्रव्य दान देणें, तपयज्ञ म्हणजे तप करणें, योगयज्ञ म्हणजे प्राणायामादि योगानुष्ठान करणें, स्वाध्याययज्ञ म्हणजे भगवन्नास्मरण किंवा वेदाध्ययन करणें, ज्ञानयज्ञ म्हणजे शास्त्रार्थ जाणणें ब्रह्म जाणणें इत्यादि यज्ञांचे कित्येक अनुष्ठान करितात आणि कित्येक प्रयत्न करणारे अति तीव्र व्रतें करणारे असतात. ॥ २८ ॥

एक द्रव्ययज्ञु म्हणिपती। एक तपसामग्रीया निपजती। एक योगयागुही आहाती। जे सांगितले॥ १४१ ॥
एकीं शब्दीं शब्दु यजिजे। तो वाग्यज्ञु म्हणिजे। ज्ञानें ज्ञेय गमिजे। तो ज्ञानयज्ञु॥ १४२ ॥
हें अर्जुना सकळ कुवाडें। जे अनुष्ठितां अतिसांकडें। परी जितेंद्रियासीचि घडे। योग्यतावशें॥ १४३ ॥
ते प्रवीण तेथ भले। आणि योगसमृद्धी आथिले। म्हणोनि आपणपां तिहीं केलें। आत्महवन॥ १४४ ॥

अर्थ—एक द्रव्ययज्ञ म्हटला जातो, कोणी तपाच्या सामग्रीलाच निर्माण करितात, शास्त्रांत सांगितलेला अष्टांगयोगरूप यज्ञहि एक आहे. ॥ १४१ ॥ शब्दाने शब्दाचें यजन म्हणजे आपल्या मुखांतून वेद शब्दाचें अध्ययन करणें हा वाग्यज्ञ होय, ज्ञानाने ज्ञेय असें परब्रह्म जाणणें तो ज्ञानयज्ञ होय. ॥ १४२ ॥ अर्जुना! हे यज्ञ सर्व कठीण आहेत, कारण यांचें अनुष्ठानांत कष्ट पडतात. असें असूनहि जितेंद्रिय पुरुषासच ते योग्यतेनुसार साधूं शकतात. ॥ १४३ ॥ अशा रीतीने इंद्रियांना जिंकण्यात चांगले प्रवीण व योगाभ्याससंपन्न होतात, म्हणून आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाचें ठिकाणीं आपल्या जीवदशेचें हवन करितात. म्हणजे जीवदशेचा नाश करितात. ॥ १४४ ॥

गूढार्थदीपिका—शुद्ध आत्मस्वरूपाचे ठिकाणीं जीवदशेचा नाश करणें याला आत्महवन म्हणतात.

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे । प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥ २९ ॥
अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति । सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ३० ॥
यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् । नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम॥ ३१ ॥
एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे । कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे॥ ३२ ॥

अर्थ—कोणी अपानांत प्राणाचा होम करितात म्हणजे नुसता रेचकच करितात. दुसरे प्राणाच्या ठिकाणीं अपानाचा होम करितात म्हणजे केवल पूरकच करितात. कोणी प्राण व अपान यांच्या गतीचा रोध करून प्राणायाम करितात म्हणजे आंतहि वायु जाऊं देत नाहीत व बाहेरहि येऊं देत नाहीत. म्हणजे केवल कुंभक करितात. हे सर्व प्राणायाम करणारे होत. ॥ २९ ॥ कित्येकजण आहाराचें नियमन करून प्राणाचें प्राणाच्या ठिकाणीच हवन करितात. हे सर्व यज्ञाला जाणणारेच होत व यज्ञाने आपलें सर्व पाप दग्ध करणारे होत. ॥ ३० ॥ यज्ञावशिष्ट खाणारे सनातन ब्रम्हाला प्राप्त होतात. यज्ञ न करणाऱ्याला हा लोकच मिळत नाही, तर परलोक कोठला

मिळणार ? ॥ ३१ ॥ त्याप्रमाणे वेदद्वारा पुष्कळ प्रकारच्या यज्ञाचा विस्तार झाला. पण हे सर्व यज्ञ कर्मजन्य आहेत. हें जाणलें असतां तूं मुक्त होशील. ॥ ३२ ॥

मग अपानाग्नीचे मुखीं। प्राणद्रव्यें देखीं। हवन केलें एकीं। अभ्यासयोगें॥ १४५॥
एक अपानु प्राणीं अर्पिती। एक दोहींतेंही निरुंधिती। ते प्राणायामी म्हणिपती। पंडुकुमरा॥ १४६॥
एक वज्रयोगक्रमें। सर्वाहारसंयमें। प्राणीं प्राणु संभ्रमें। हवन करिती॥ १४७॥
ऐसे मोक्षकाम सकळ। समस्त हे यजनशीळ। जिहीं यज्ञद्वारा मनोमळ। क्षाळण केले॥ १४८॥
जया अविद्याजात, जाळितां। जें उरलें निजस्वभावता। जेथ अग्नि आणि होता। उरेचिना॥ १४९॥
जेथ यजितयाचा कामु पुरे। यज्ञींचें विधान सरे। मागुतें जेथूनि वोसरे। क्रियाजात॥ १५०॥
विचार जेथ न रिगे। हेतु जेथ न निगे। जें द्वैतदोषसंगें। लिंपेचिना॥ १५१॥
ऐसें अनादिसिद्ध चोखट। जें ज्ञान यज्ञावशिष्ट। तें सेविती ब्रह्मनिष्ठ। ब्रह्माहंमंत्रें॥ १५२॥
ऐसे शेषामृतें धाले। कीं अमर्त्यभावा आले। म्हणोनि ब्रह्म ते जहाले। अनायासें॥ १५३॥
येरां विरक्ति माळ न घालीचि। जयां संयमाग्नीची सेवा न घडेचि। जे योगुयागु न करितीचि। जन्मले सांते॥ १५४॥
जयां ऐहिक धड नाहीं। तयांचें परत्र पुससी काई। म्हणोनि असो हे गोष्टी पाहीं। पंडुकुमरा॥ १५५॥
ऐसें बहुतीं परी अनेग। जे सांगितले तुज कां याग। ते विस्तारूनि वेदेंचि चांग। म्हणितले आहाती॥ १५६॥
परि तेणें विस्तारें काय करावें। हेंचि कर्मसिद्ध जाणावें। येतुलेनि कर्मबंधु स्वभावें। पावेल ना॥ १५७॥

अर्थ—कोणी अभ्यासाच्या साह्याने अपानरूपी अग्नींचें मुखांत प्राणरूपी द्रव्याचें हवन करितात म्हणजे नुसता रेचक प्राणायाम करितात. ॥ १४५ ॥ कोणी प्राणाचे ठिकाणीं अपानाचें हवन करतात म्हणजे केवळ पूरकच करितात ? कोणी प्राण व अपान या दोघांचाहि रोध करितात म्हणजे केवळ कुंभक करितात. हे सर्व प्राणायामी म्हटले जातात. ॥ १४६ ॥ (सहाव्या अध्यायांत सांगितल्याप्रमाणे) लययोगांतील वज्रासनसाधनादि क्रमाने व सर्व आहाराचें नियमन करून प्राणाचें प्राणाच्या ठिकाणींच उल्हासाने हवन करितात. ॥ १४७ ॥ हे सर्व यज्ञ मोक्षाकरिताच आहेत व मोक्षाची इच्छा करणारेच हे यज्ञ करीत असतात. ते अशा यज्ञाचे द्वारा मनाचे दोष नाहिसे करितात. ॥ १४८ ॥ अशा रीतीने त्यांनी आपली सर्व प्रकारची अविद्या नाहिशी केली असतां उर्वरित जी मूळ ब्रम्हरूप स्थिति राहते तेथे अग्नि आणि हवन करणारा हे कांहीच राहत नाही. ॥ १४९ ॥ तेथे यज्ञ करणाऱ्याची यज्ञ करण्याची इच्छाहि नाहिशी होते किंवा मोक्षेच्छा पूर्ण होते. त्याच्याकरिता यज्ञाचें विधानहि राहत नाही. किंबहुना जेथून संपूर्ण क्रिया मागे फिरतात, म्हणजे कोणती क्रियाच जेथे राहत नाही. ॥ १५० ॥ जेथे विचाराचाहि प्रवेश होत नाही, तर्कानें जे घेतलें जाऊं शकत नाही, जें द्वैतभावाने लिप्त होत नाही. ॥ १५१ ॥ जें यज्ञाचे शेष म्हणून उरलेलें अनादि, स्वयंभू व शुद्ध असें ब्रह्म ते अहंब्रह्मा म्हणून सेवन करितात. ॥ १५२ ॥ असें ज्ञानयज्ञाच्या शेषरूप "अहंब्रह्मास्मि" या बोधरूप अमृताने तृप्त होतात. एवढेंच नाही तर, अविनाशभावालाच प्राप्त होतात. म्हणून ते अनायासे ब्रह्मस्वरूप होतात. ॥ १५३ ॥ या यज्ञ करणाऱ्यावांचून दुसरे जे आहेत, ज्यांना जन्मास आल्यापासून संयमाग्नीची सेवा घडलीं नाही, जे योग याग कधी करीतच नाहीत, अशांना विषयवैराग्य कधी बाणत नाही. ॥ १५४ ॥ अशांना ऐहिक सुख धड मिळत नाही तेथे त्यांच्या पारलौकिक सुखाचें काय विचारायचें ? म्हणून, अर्जुना ! ह्यांची गोष्टच नको. ॥ १५५ ॥ याप्रमाणे पुष्कळ प्रकारें घडणारे जे अनेक याग, अर्जुना ! तुला सांगितले, ते सर्व वेदाने विस्तारपूर्वक सांगितले आहेत. ॥ १५६ ॥ पण त्या विस्ताराशीं आपल्याला कांही कर्तव्य नाही. हे सर्व यज्ञ कर्मजन्य आहेत इतकें जाण. इतकें जाणलें असतां कर्माचे बंधन होणार नाही. ॥ १५७ ॥

गूढार्थदीपिका—योग साधल्यावांचून म्हणजे परमेश्वराचे ठिकाणीं बुद्धि स्थिर झाल्यावांचून वैराग्य बाणणें किंवा निष्काम चित्त होणें शक्य नाही व निष्काम कर्मयोगाचें अनुष्ठानहि होऊं शकत नाही; म्हणून निष्काम कर्मयोगाचें अनुष्ठान करण्याकरिता कर्माचरणाबरोबर परमेश्वराचे ठिकाणीं बुद्धि स्थिर करण्याचा व विषयवासना क्षीण

होण्याचा अभ्यास व्हायला पाहिजे. पण जोपर्यंत मन विषयसुखाकरिता चंचल होतें, तोपर्यंत परमेश्वराचे ठिकाणीं बुद्धि स्थिर होत नाही आणि वैराग्यहि बाणत नाही. म्हणून श्लोक २५ ते ३० पर्यंतच्या श्लोकांत भगवंताने नानाप्रकारच्या योगानुष्ठानांचें वर्णन केलें आहे. हे सर्व योगाभ्यासाचे प्रकार जरी कर्मरूप असले तरी, शेवटीं परमेश्वराचे ठिकाणीं बुद्धि स्थिर करून व जीवाशिवाचें ऐक्यज्ञान करून देऊन परमेश्वर प्राप्ति करून देणारे आहेत.

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परन्तप। सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते॥ ३३॥

अर्थ—हे शत्रूला ताप देणाऱ्या अर्जुना! द्रव्यमय यज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ हा श्रेयस्कर आहे. कारण सर्व कर्म शेवटी या ज्ञानयज्ञांत समाप्त होतें.॥ ३३॥

अर्जुना वेदु जयांचे मूळ। जे क्रियाविशेषें स्थूळ। जयां नव्हाळियेचें फळ। स्वर्गसुख॥ १५८॥
ते द्रव्यादियागु कीर होती। परी ज्ञानयज्ञाची सरी न पवती। जैशी तारातेजसंपत्ती। दिनकरापाशीं॥ १५९॥
देखें परमात्मसुखनिधान। साधावया योगीजन। जें न विसंबिती अंजन। उन्मेषनेत्रीं॥ १६०॥
जें धांवतया कर्माची लाणी। नैष्कर्म्यबोधाची खाणी। जें भुकेलिया धणी। साधनाची॥ १६१॥
जेथ प्रवृत्ति पांगुळ जाहली। तर्काची दिठी गेली। जेणें इंद्रियें विसरलीं। विषयसंगु॥ १६२॥
मनाचें मनपण गेलें। जेथ बोलाचें बोलपण ठेलें। जयामाजि सांपडलें। ज्ञेय दिसे॥ १६३॥
जेथ वैराग्याचा पांगु फिटे। विवेकाचाही सोसु तुटे। जेथ न पाहतां सहज भेटे। आपणपें॥ १६४॥

अर्थ—अर्जुना! ज्यांना वेदच मूळ आहे, जे स्थूल क्रियाविशेष आहेत व ज्यांचें अपूर्व फल म्हणजे स्वर्गसुख होय.॥ १५८॥ ते द्रव्यादियज्ञहि यज्ञच आहेत, पण ज्याप्रमाणे सर्व नक्षत्रांचें तेज सूर्याच्या तेजाची बरोबरी करूं शकत नाही, तसें ते ज्ञानयज्ञाची बरोबरी करूं शकत नाहीत.॥ १५९॥ अर्जुना! पहा, परमात्मसुखाचा ठेवा प्राप्त करून घेण्याकरीता योगीलोक जें ज्ञानरूपी (उन्मेष) अंजन डोळ्यांत घालण्याचे कधी विसरत नाहीत.॥ १६०॥ जें ज्ञान, प्रवृत्त झालेल्या कर्मांच्या वेगाचा शेंवट आहे. मी कर्मरहित आहे अशा बोधाची खाणी आहे व मोक्षसुखाच्या साधनांची तृप्ति आहे.॥ १६१॥ ज्या ज्ञानाचे ठिकाणीं प्रवृत्ति पांगळी होते, जें ज्ञान पाहण्याकरिता तर्काची दृष्टिच नाहिशी होते व ज्या ज्ञानाने इंद्रियें विषयांचा संबंधच विसरतात.॥ १६२॥ ज्या ज्ञानाने मनपण राहत नाही. जेथे वाणीचा शब्द प्रवृत्त होत नाही, ज्या ज्ञानांत ज्ञेय जी ब्रम्हवस्तु सांपडते.॥ १६३॥ जेथें वैराग्याचाहि संबंध नाहिसा होतो, विवेकाची हांवहि नाहिशी होते आणि ज्या ज्ञानाचे ठिकाणीं आपलें स्वरूप न पाहतांच सहज आपण आपल्याला प्राप्त होतो.॥ १६४॥

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः॥ ३४॥
यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव। येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि॥ ३५॥
अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः। सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि॥ ३६॥
यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन। ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा॥ ३७॥

अर्थ—आत्मतत्वाला जाणणारे ज्ञानी पुरुष आहेत तेच तुला ज्ञान सांगू शकतात, पण त्या ज्ञानी पुरुषांची सेवा करून, अत्यंत नम्रभावाने त्यांचे पायावर डोकें ठेऊन व त्यांच्याशीं प्रश्नोत्तररूप चर्चा करून तें ज्ञान जाणून घे.॥ ३४॥ जें ज्ञान जाणलें असतां, अर्जुना! पुनः तुला असा मोह होणार नाही व ज्या ज्ञानाने ही संपूर्ण भूतसृष्टि आपल्या आत्मस्वरूपाचे ठिकाणीं म्हणजेच माझ्या ठिकाणीं भासत आहे असें तुला कळून येईल.॥ ३५॥ तूं जरी सर्व पाप्यांमध्ये अत्यंत पापी असलास तरी या ज्ञानरूपी नावेने त्या सर्व पापांपासून मुक्त होशील.॥ ३६॥ हे अर्जुना! ज्याप्रमाणे पेटलेला अग्नि, लांकडें जाळून भस्म करितो, त्याप्रमाणेच हा ज्ञानाग्नि देखील सर्व पापें जाळून भस्म करितो.॥ ३७॥

तें ज्ञान पैं गा बरवें। जरी मनीं आथि आणावें। तरी संतां या भजावें। सर्वस्वेंशीं॥ १६५॥
जे ज्ञानाचा कुरुठा। तेथ सेवा हा दारवंटा। तो स्वाधीन करीं सुभटा। वोळगोनी॥ १६६॥

तरी तनुमनुजीवें। चरणासीं लागावें। आणि अगर्वता करावें। दास्य सकळ॥ १६७॥
मग अपेक्षित जें आपुलें। तेंही सांगती पुसिलें। जेणें अंत:करण बोधलें। संकल्पा न ये॥ १६८॥
जयाचेनि वाक्यउजिवडें। जाहलें चित्त निधडें। ब्रह्माचेनि पाडें। नि:शंकु होय॥ १६९॥
ते वेळीं आपणपेयांसहितें। इयें अशेषेंही भूतें। माझां स्वरूपीं अखंडितें। देखसी तूं॥ १७०॥
ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल। तैं मोहांधकारु जाईल। जैं श्रीगुरुकृपा होईल। पार्था गा॥ १७१॥
जरी कल्मषांचा आगरु। तूं भ्रांतीचा सागरु। व्यामोहाचा डोंगरु। होउनी अससी॥ १७२॥
तऱ्ही ज्ञानशक्तिचेनि पाडें। हें आघवेंचि गा थोकडें। ऐसें सामर्थ्य असे चोखडें। ज्ञानीं इये॥ १७३॥
देखें विश्वभ्रमाऐसा। जो अमूर्ताचा कडवसा। तो जयाचिया प्रकाशा। पुरेचिना॥ १७४॥
तया कायसे हे मनोमळ। हें बोलतांचि अति किडाळ। नाहीं येणें पाडें ढिसाळ। दुजें जगीं॥ १७५॥
सांगें भुवनत्रयाची काजळी। जे गगनामाजि उधवली। तियें प्रळयींचे वाहटुळी। काय अभ्र पुरे॥ १७६॥
कीं पवनाचेनि कोपें। पाणियेंचि जो पळिपे। तो प्रळयानळु दडपे। तृणें काष्ठें काइ॥ १७७॥

अर्थ—हें उत्तम आत्मज्ञान आपल्याला प्राप्त व्हावें असें जर वाटत असेल तर ज्ञान प्राप्त झालेल्या सत्पुरुषांची सर्व भावाने उपासना करावी. ॥ १६५ ॥ हे सत्पुरुष म्हणजे ज्ञानाचें कोठार होत. त्यांची सेवा हा त्या कोठाराचा दारवंठा होय. त्या सेवारूपी दारवंठ्याचा अवलंब करून तूं तो आपल्या स्वाधीन करून घे. ॥ १६६ ॥ हा सेवारूपी दारवंठा स्वाधीन करून घेण्याकरिता शरीर, मन व जीवभाव हे संतांना अर्पण करून त्यांचे पाय धरावे व अत्यंत नम्र व निरहंकार होऊन त्यांची सेवा करावी. ॥ १६७ ॥ अशा प्रेमाने केलेल्या सेवेने ते प्रसन्न होऊन आपलें इच्छित जें आत्मज्ञान त्याच्याविषयी प्रश्न केला असतां त्याचा बोध करून देतात. हें ज्ञान प्राप्त झालें असतां अंत:करण संकल्प करणेंच विसरतें म्हणजे आत्मपदार्थावांचून इतर पदार्थाची कल्पनाच करीत नाही. ॥ १६८ ॥ आत्मज्ञान करून देणाऱ्या त्या संतवचनाने चित्त निर्भय होतें व जीव परब्रम्हासारखाच नि:संशय होतो. ॥ १६९ ॥ त्यावेळी आपल्यासह सर्व भूतें भगवंताचे ठिकाणीं, अर्जुना! तू एकरूप पाहूं लागशील. ॥ १७० ॥ अर्जुना! अशी श्रीगुरुकृपा होऊन जेव्हा या ज्ञानप्रकाशाचा उदय होईल तेव्हा हा तुझा मोहांध:कार संपूर्ण नाहिसा होईल. ॥ १७१ ॥ अर्जुना! जरी तूं सर्व पापांचें घर असलास किंवा भ्रांतीचा समुद्र असलास अथवा मोंहाचा डोंगर असलास. ॥ १७२ ॥ तरी आत्मज्ञानाच्या शक्तीच्या मानाने हे सर्व क:पदार्थ आहेत. एवढें आत्मज्ञान समर्थ आहे. ॥ १७३ ॥ अर्जुना! हें पहा, हा जो जगदाभास निराकार ब्रम्हाचा अंधुक प्रकाशरूप किरण आहे, तो देखील त्या ज्ञानप्रकाशापुढे कांहीच नाही. ॥ १७४ ॥ मग त्या ज्ञानापुढे मनाचे दोष काय आहेत? खरोखर अशी तुलना करणें देखील योग्य नाही. या ज्ञानासारखा दुसरा थोर पदार्थच नाही. ॥ १७५ ॥ अर्जुना! सांग बरें, त्रैलोक्यरूप ब्रम्हांडाची प्रलयाग्नीने झालेली राखरांगोळी आकाशांत उडवणाऱ्या प्रलयकाळाच्या वाऱ्यापुढे, अभ्र टिकू शकेल काय? ॥ १७६ ॥ वायूचाहि कोप होऊन त्याच्या साहायाने धडाडलेला व सर्व पाणी शोषून घेणारा प्रलयकाळचा अग्नि गवत लांकडें यांनी दडपला जाईल का? ॥ १७७ ॥

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते । तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति॥ ३८॥

अर्थ—या लोकांत आत्मज्ञानासारखी पवित्र वस्तु दुसरी कोणतीच नाही. हें ब्रम्हज्ञान कर्मयोगाने अत्यंत शुद्धचित्त झालेल्या पुरुषाला कालान्तराने आपल्याच ठिकाणीं होतें (म्हणजे परमेश्वर कृपेने ज्ञानसंपन्न अशा श्रीगुरुची प्राप्ति होऊन त्या श्रीगुरूच्या द्वारा मी ब्रम्ह आहे असा अनुभव येतो.) ॥ ३८ ॥

म्हणोनि असो हें न घडे। तें विचारितांचि असंगडें। पुढती ज्ञानाचेनि पाडें। पवित्र न दिसे॥ १७८॥
एथ ज्ञान हें उत्तम होये। आणिकही एक तैसें कें आहे। जैसें चैतन्य कां नोहे। दुसरें गा॥ १७९॥
या महातेजाचेनि कसें। जरी चोखाळु प्रतिबिंब दिसे। कां गिंवसिलें गिंवसे। आकाश हें॥ १८०॥
नातरी पृथ्वीचेनि पाडें। कांटाळें जरी जोडे। तरी उपमा ज्ञानीं घडे। पंडुकुमरा॥ १८१॥
म्हणूनि बहुतीं परीं पाहतां। पुढतपुढती निर्धारितां। हे ज्ञानाची पवित्रता। ज्ञानींचि आथि॥ १८२॥

जैसी अमृताची चवी निवडिजे। तरी अमृताचिसारिखी म्हणिजे। तैसें ज्ञान हें उपमिजे। ज्ञानेंसींचि॥ १८३॥
आतां यावरी जें बोलणें। तें वायांचि वेळु फेडणें। तंव सांचचि जी हें पार्थु म्हणे। जें बोलत असां॥ १८४॥
परि तेंचि ज्ञान केवीं जाणावें। ऐसें अर्जुनें जंव पुसावें। तंव तें मनोगत देवें। जाणितलें॥ १८५॥
मग म्हणतसे किरीटी। आतां चित्त देईं इये गोठी। सांगेन ज्ञानाचिये भेटी। उपाय तुज॥ १८६॥

अर्थ—म्हणून आत्मज्ञानाने पाप जळत नाही हें म्हणणें विचाराने विसंगत दिसतें; कारण आत्मज्ञानाच्या बरोबरीचें दुसरें कांही पवित्र दिसत नाही. ॥ १७८ ॥ एक आत्मज्ञान उत्तम ठरल्यावर तसेंच उत्तम दुसरें कोणतें राहूं शकेल? ज्याप्रमाणे चैतन्य एकच, दुसरें नाही, त्याप्रमाणे आत्मज्ञान हें एकच सर्वांत श्रेष्ठ आहे. ॥ १७९ ॥ जर एखादे वेळी या सूर्याच्या तेजाची कसोटी त्या सूर्याच्या प्रतिबिंबाच्या तेजाला लावून पाहतां प्रतिबिंबाचें तेज सूर्याच्या तेजाच्या बरोबरीचें ठरेल किंवा आकाश कवटाळण्याचा प्रयत्न करणाऱ्याकडून तें कवटाळलें जाईल. ॥ १८० ॥ किंवा तोलांत पृथ्वीच्या बरोबरीचें दुसरें कांही सापडेल तरच आत्मज्ञानाला उपमा देतां येईल. ॥ १८१ ॥ म्हणून पुष्कळ रीतीने पाहून व विचार करून निर्णय केला असतां असेंच दिसतें की या आत्मज्ञानाची पवित्रता आत्मज्ञानाच्याच ठिकाणीं आहे. ॥ १८२ ॥ ज्याप्रमाणे अमृताची रुचि अमृतासारखीच म्हणावी लागते, त्याप्रमाणे आत्मज्ञानाला आत्मज्ञानाचीच उपमा देतां येते. ॥ १८३ ॥ आता या पलीकडे बोलणें म्हणजे व्यर्थ वेळ घालविणें आहे. हें ऐकून अर्जुन म्हणतो, देवा! तुम्ही म्हणतां तेंच खरें आहे. ॥ १८४ ॥ पण तें आत्मज्ञान कसें जाणायचें हें देवाला अर्जुन विचारतो तोच देवानेच अर्जुनाच्या मनांतील इच्छा जाणली. ॥ १८५ ॥ ती जाणून मग देव म्हणतात, अर्जुना! या ज्ञानाचा अनुभव घेण्याचा उपाय मी तुला आता सांगतो तो चित्त देऊन ऐक. ॥ १८६ ॥

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः। ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति॥ ३९॥

अर्थ—आत्मज्ञानप्राप्तीच्या मागे लागून गुरुसेवादिक साधनें करणाऱ्या व इंद्रियें स्वाधीन ठेवणाऱ्या श्रद्धावान पुरुषाला ज्ञानप्राप्ति होते. हें ज्ञान प्राप्त झालें असतां तात्काळ परमशांति प्राप्त होते (चित्तातील विषयसुखाची धडपड नि:शेष नाहिशी होते असा भाव). ॥ ३९ ॥

तरी आत्मसुखाचिया गोडिया। विटे जो कां सकळ विषयां। जयाचां ठायीं इंद्रियां। मानु नाहीं॥ १८७॥
जो मनासी चाड न सांगे। जो प्रकृतीचें केलें नेघे। जो श्रद्धेचेनि संभोगें। सुखिया जाहला॥ १८८॥
तयातेंचि गिंवसित। तें ज्ञान पावे निश्चित। जयामाजी अचुंबित। शांति असे॥ १८९॥
तें ज्ञान हृदयीं प्रतिष्ठे। आणि शांतीचा अंकुर फुटे। मग विस्तार बहु प्रगटे। आत्मबोधाचा॥ १९०॥
मग जेउती वास पाहिजे। तेउती शांतीचि देखिजे। तेथ अपारा पारु नेणिजे। निर्धारितां॥ १९१॥
ऐसा हा उत्तरोत्तरु। ज्ञानबीजाचा विस्तारु। सांगतां असे अपारु। परि असो आतां॥ १९२॥

अर्थ—आत्मसुखाच्या गोडीने जो सर्व विषयसुखाला विटला, जो इंद्रियांच्या इच्छेला मुळीच मान देत नाही. ॥ १८७ ॥ जो आपली आत्मसुख भोगण्याची इच्छा मनाला कधी सांगत नाही, जो प्रकृतीचें कर्म आपलें ठिकाणीं मानीत नाही आणि शास्त्र व गुरु यांच्या वचनावर दृढ विश्वास ठेवून निश्चिंत झाला. ॥ १८८ ॥ ब्रह्मज्ञान आपोआप त्याचा शोध करीत त्याच्याकडे येतें व त्या ज्ञानांत स्वाभाविक शांति असते. ॥ १८९ ॥ आत्मज्ञानाची हृदयांत दृढ प्रतिष्ठा झाली की तेथे शांतीचा अंकुर फुटतो. मग तें आत्मज्ञान बहु विस्तारलें जातें म्हणजे व्यापक होतें किंवा सर्व पदार्थांशी ऐक्य करतें ("ज्ञान जिया तिया परी। जगीं आत्मैक्य करी" अमृ० प्र० ४ ओ० ३) ॥ १९० ॥ मग जेथे जेथे दृष्टि पडेल तेथें तेथे शांत अशा आत्म्याचाच प्रत्यय येतो व तेथे विचार करून पाहतांहि आपपर असा भेद सांपडत नाही. ॥ १९१ ॥ असा हा आत्मज्ञानाचा वाढता विस्तार अमर्याद होतो, म्हणून पुरे. अर्जुना! येथेच आपण थांबूं. ॥ १९२ ॥

गूढार्थदीपिका—३४ व्या श्लोकांत संताला शरण जाऊन ज्ञान प्राप्त करून घ्यावें असें सांगून "श्रद्धावाँल्लभते ज्ञानं" या ३९ व्या श्लोकांत श्रद्धावान्, तत्पर व संयतेंद्रिय पुरुषांना ज्ञान प्राप्त होतें असें भगवंतांनी सांगितले. येथे

हे ज्ञानप्राप्तीचे निरनिराळे मार्ग आहेत असें कोणी म्हणतात. पण हे निरनिराळे मार्ग नाहीत. ज्याप्रमाणे आधी झाडावर फळ पाहून मग आपण तें तोडतों, त्याप्रमाणे ३४ वें श्लोकांत अनुभवी संतांच्या मुखाने परब्रह्माचें स्वरूप जाणून घेऊन, मग तें आपल्या ठिकाणीं दृढ बाणवून घेण्याचे उपाय ३९ वे श्लोकांत सांगितले आहेत. अनुभवी संताच्या मुखाने परब्रह्माचें स्वरूप समजून घेणें याला वेदान्तांत परोक्ष ज्ञान म्हणतात आणि जाणलेली स्थिति दृढ अभ्यासाने आपल्या ठिकाणीं अनुभविणें याला अपरोक्ष ज्ञान म्हणतात.

याप्रमाणे आत्मज्ञानाचे परोक्ष व अपरोक्ष असे दोन भाग आचार्यांनी व सर्व संतांनी मानिले आहेत. "**आत्मावाऽरे दृष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः**" अशी श्रुति असून या श्रुतीचाच अर्थ श्रीमुकुंदरायांनी "**आधीं आत्मयातें जाणावे। मग तयातें साधावें**" या ओवीने सांगितला आहे. म्हणून परमेश्वरप्राप्तीकरिता संतरूपी सदगुरूची आवश्यकता असून श्रीगुरूच्या वचनांवर दृढ श्रद्धा, सांगितल्याप्रमाणे वागणें व तसें वागण्याकरिता आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेवणें हें सर्व आवश्यक आहे.

जीव कितीहि बुद्धीमान असला तरी अनुभवी संतांच्या मुखाने जसा आत्मस्वरूपाचा संशयरहित परिचय होतो तसा तो स्वतःच्या बुद्धीने होऊंच शकत नाही. "**तद्विज्ञानार्थं। स गुरुमेवाभिगच्छेत्**" ब्रह्मस्वरूप जाणण्याकरिता संतालाच शरण गेलें पाहिजे असें मुंडकश्रुतीने सांगितलें असून "शास्त्रज्ञोऽपि स्वातंत्र्येण ब्रह्मज्ञानान्वेषण न कुर्यात्" सर्व शास्त्रांचें अध्ययन झालें त्या पुरुषाने देखील केवळ आपल्या स्वतःच्या बुद्धीच्या साह्याने ब्रह्मस्वरूप जाणण्याचा प्रयत्न करूं नये असें आचार्यांनीहि वरील श्रुतीवरील भाष्यांत म्हटलें आहे.

"**मागां झाले थोर थोर। संत महंत मुनीश्वर। तयांसहि ज्ञानविज्ञानविचार। सदगुरूचेनि॥ ४१ ॥ श्रीरामकृष्णादिकरूनी। अतितत्पर गुरुभजनीं। सिद्ध आणि सज्जनीं। गुरुदास्य केलें॥ ४२॥ असो जयास मोक्ष व्हावा। तेणें सद्गुरू करावा। सद्गुरूविणे मोक्ष पावावा। हे कल्पांतीं न घडे.॥ ४३॥**" (दासबोध दशक ५ समास १) असें समर्थांचेंहि वचन आहे.

प्रथम एकदां झाडावर फळ पाहिलें की तें मग कोणी झाडावर चढून हस्तगत करितो, कोणी दगड मारून हस्तगत करील व कोणी काठीने त्या फळाला पाडून हस्तगत करील. त्याप्रमाणे गुरुमुखाने निश्चित झालेल्या आत्मस्थितीचा आपलें ठिकाणीं प्रत्यक्ष अनुभव कोणी ध्यानाने घेतो. कोणी विचाराने घेतो, कोणी कर्मयोगाने घेतो. याप्रमाणें आत्मस्थितीचा पूर्ण निर्णय समजून घेण्याचा, गुरुमुखाने श्रवण करणें, हाच एक उपाय असून, त्याचा साक्षात् अनुभव घेण्याचें अधिकारानुसार निरनिराळे मार्ग असतात. यालाच वेदान्तशास्त्रांत प्रक्रिया म्हणतात.

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति । नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥ ४० ॥

अर्थ—अज्ञानी, मूर्ख, श्रद्धाहीन, संशयी अशा। पुरुषाला ज्ञान कधी होत नाही. तो संसारपरंपराच भोगतो, अशा पुरुषाला हा लोकहि सुखाचा व परलोकहि सुखाचा होत नाही. संशयी पुरुषाला सुखच मिळत नाही. ॥ ४० ॥

ऐकें जया प्राणियाचां ठायीं। इया ज्ञानाची आवडी नाहीं। तयाचें जियालें म्हणों काई। वरी मरण चांग॥ १९३ ॥
शून्य जैसें गृह। कां चैतन्येंवीण देह। तैसें जीवित तें संमोह। ज्ञानहीना॥ १९४॥
अथवा ज्ञान कीर आपु नोहे। परि ते चाड एकी जरी वाहे। तरी तेथ जिव्हाळा कांहीं आहे। प्राप्तीचा पैं॥ १९५ ॥
वांचूनि ज्ञानाची गोठी कायसी। परि ते आस्थाही न धरी मानसीं। तरी तो संशयरूप हुताशीं। पडिला जाण॥ १९६ ॥
जे अमृतही परि नावडे। ऐसें सावियाचि अरोचकु जैं पडे। तैं मरण आलें असे फुडें। जाणों ये कीं॥ १९७॥
तैसा विषयसुखें रंजे। जो ज्ञानेंसींचि माजे। तो संशयें अंगीकारिजे। एथ भ्रांति नाहीं॥ १९८॥
मग संशयीं जरी पडला। तरी निभ्रांत जाणें नासला। तो ऐहिकपरत्रा मुकला। सुखासि गा॥ १९९॥
जया काळज्वरु आंगीं बाणें। तो शीतोष्णें जैशीं नेणें। आगी आणि चांदिणें। सरिसेंचि मानी॥ २००॥
तैसें साच आणि लटिकें। विरुद्ध आणि निकें। संशयीं तो नोळखे। हिताहित॥ २०१॥
हा रात्रिदिवसु पाहीं। जैसा जात्यंधा ठाउवा नाहीं। तैसें संशयीं असतां कांहीं। मना नये॥ २०२॥

म्हणऊनि संशयाहूनि थोर। आणिक नाहीं पाप घोर। हा विनाशाची वागुर। प्राणियासी॥ २०३॥
येणें कारणें तुवां त्यजावा। आधीं हाचि एकु जिणावा। जो ज्ञानाचिया अभावा-। माजि असे॥ २०४॥
जैं अज्ञानाचें गडद पडे। तैं हा बहुवस मनीं वाढे। म्हणोनि सर्वथा मागु मोडे। विश्वासाचा॥ २०५॥
हृदयीं हाचि न समाये। बुद्धीतें गिंवसूनि ठाये। तेथ संशयात्मक होये। लोकत्रय॥ २०६॥

अर्थ—अर्जुना! ऐक, ज्या पुरुषाचे ठिकाणीं या आत्मज्ञानाची आवड नाही, त्याचें जिणें व्यर्थ आहे. त्यापेक्षा तो मेलेला बरा. ॥ १९३ ॥ जसें ओसाड घर किंवा चैतन्यावांचून देह असावा, त्याप्रमाणे त्याचें जीवन भ्रमरूप ज्ञानरहित असतें. ॥ १९४ ॥ अथवा निश्चित ज्ञान प्राप्त झालें नाही तरी आत्मज्ञानाची थोडी इच्छा जर असली तर कांही तरी प्राप्तीची आशा असते. ॥ १९५ ॥ आत्मज्ञानाच्या प्राप्तीची गोष्ट असो, पण त्याच्या प्राप्तीची इच्छाहि जो मनांत ठेवित नाही, तो सर्वस्वीं संशयरूप अग्नींत पडला आहे असें समजावें. ॥ १९६ ॥ जेव्हा अमृतासारखी वस्तूहि घ्यावीशी वाटत नाही अशात अरुचि उत्पन्न झाली. तेव्हा तो रोगी निश्चित मरणार असें समजावें. ॥ १९७ ॥ त्याप्रमाणे जो विषयसुखांतच आनंद मानितो व आत्मज्ञानाला माजरेपणाने तुच्छ लेखतो तो संशयाने ग्रस्त झाला यांत संशय नाही. ॥ १९८ ॥ मनुष्य संशयांत पडला की नि:संशय नाश पावतो व तो ऐहिक व पारत्रिक अशा दोन्ही सुखाला मुकतो. ॥ १९९ ॥ ज्याला भयंकर सन्निपातज्वर उत्पन्न झाला त्याला शीत-उष्णाचें ज्ञान होत नाही, तो उष्णता व चांदणें सारखेंच समजतो. ॥ २०० ॥ त्याप्रमाणे संशयाने ग्रस्त झालेला मनुष्यहि खरें खोटे, हिताचें व अहिताचें कांहीच जाणत नसतो. ॥ २०१ ॥ ज्याप्रमाणे जन्मांध पुरुष रात्र व दिवस ओळखत नाही त्याप्रमाणे संशयात पडलेल्या मनुष्याच्या बुद्धीला दुसऱ्याचें सांगणें मुळीच पटत नाही. ॥ २०२ ॥ म्हणून संशयाहून दुसरें अत्यंत घोर पातक नाही. संशय हा प्राण्याचा सर्वस्वीं नाश करणारें जाळें आहे. ॥ २०३ ॥ म्हणून अर्जुना! तूं त्याचा त्याग कर. प्रथम संशयालाच जिंक, हा संशय जेथे यथार्थ ज्ञान नाही तेथेच असतो. ॥ २०४ ॥ जेव्हा अज्ञानाचा गाढ अंध:कार असतो, तेव्हाच याची फार वाढ होते; म्हणूनच तो विश्वासाचा मार्ग मोडतो. संशय श्रद्धाच बसूं देत नाही. ॥ २०५ ॥ हा संशय वाढला की मनांतच सामावत नाही. तो बुद्धीलाहि मग व्यापतो. असें झालें की त्रैलोक्यांत त्याला जेथे तेथे संशयच दिसतो. ॥ २०६ ॥

योगसन्न्यस्तकर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम्। आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय॥ ४१॥
तस्मादज्ञानसम्भूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः। छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत॥ ४२॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
ज्ञानकर्मसन्यासयोगो नाम चतुर्थोऽध्याय:॥ ४॥

अर्थ—ब्रह्मैक्य ज्ञानाने (अपरोक्ष ज्ञानाने) सर्व कर्माहून मी निराळा आहे असें जाणून व परोक्ष ज्ञानाने आत्मस्वरूपाविषयी सर्व संशयरहित होऊन, जो आत्मस्वरूप झाला त्याला कोणत्याहि कर्माचा लेप लागत नाही. ॥ ४१ ॥ अर्जुना! परोक्ष ज्ञानरूप खड्गाने आपल्या हृदयांतील अज्ञानजन्य, संशय नाहिसा करून जीवब्रह्मैक्यरूप अपरोक्ष अनुभवाकरिता (परमेश्वराचे ठिकाणीं बुद्धि स्थिर करणाऱ्या) कर्मयोगाचें अनुष्ठान कर व युद्धाकरिता सज्ज हो. ॥ ४२ ॥

ऐसा जरी थोरावे। तरी उपायें एकें आंगवे। जरी हातीं होय बरवें। ज्ञानखड्ग॥ २०७॥
तरी तेणें ज्ञानशस्त्रें तिखटें। निखळु हा निवटे। मग नि:शेष खता फिटे। मानसींचा॥ २०८॥
याकारणें पार्था। उठीं वेगीं वरौता। नाशु करोनि हृदयस्था। संशयासी॥ २०९॥
ऐसें सर्वज्ञाचा बापु। जो श्रीकृष्णु ज्ञानदीपु। तो म्हणतसे सकृपु। ऐकें राया॥ २१०॥
तंव या पूर्वापर बोलाचा। विचार करूनि कुमरु पंडूचा। कैसा प्रश्नु हन अवसरींचा। करिता होईल॥ २११॥
ते कथेचि संगति। भावाची संपत्ति। रसाची उन्नति। म्हणिपेल पुढां॥ २१२॥
जयाचिया बरवेपणीं। कीजे आठां रसांची ओवाळणी। जो सज्जनाचिये आयणी। विसांवा जगीं॥ २१३॥
तो शांतुचि अभिनवेल। ते परियसा मऱ्हाटे बोल। जे समुद्राहूनि खोल। अर्थभरित॥ २१४॥
जैसें बिंब तरी बचकें एवढें। परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडें। शब्दाची व्याप्ति तेणें पाडें। अनुभवावी॥ २१५॥

नातरी कामितयाचिया इच्छा। फळे कल्पवृक्षु जैसा। बोलु व्यापकु होय तैसा। तरी अवधान द्यावें॥ २१६॥
हें असो काय म्हणावें। सर्वज्ञु जाणती स्वभावें। तरी निकें चित्त द्यावें। हे विनंति माझी॥ २१७॥
जेथ साहित्य आणि शांति। हे रेखा दिसे बोलती। जैसी लावण्यगुणकुळवती। आणि पतिव्रता॥ २१८॥
आधींचि साखर आवडे। आणि तेचि जरी ओखदीं जोडे। तरी सेवावी ना कां कोडें। नावानावा॥ २१९॥
सहजें मलयानिलु मंदु सुगंधु। तया अमृताचा होय स्वादु। आणि तेथेंचि जोडे नादु। जरी दैवगत्या॥ २२०॥
तरी स्पर्शें सर्वांग निववी। स्वादें जिव्हेतें नाचवी। तेवींची कानाकरवीं म्हणवी। बापु माझा॥ २२१॥
तैसें कथेचें इये ऐकणें। एक श्रवणासी होय पारणें। आणि संसारदुःख मूळवणें। विकृतीविणें॥ २२२॥
जरी मंत्रेंचि वैरी मरे। तरी वायांचि कां बांधावी कटारें। रोग जाय दुधें साखरें। तरी निंब कां पियावा॥ २२३॥
तैसा मनाचा मारु न करितां। आणि इंद्रियां दुःख न देतां। एथ मोक्षु असे आयता। श्रवणाचिमाजी॥ २२४॥
म्हणोनि आथिलिया आराणुका। गीतार्थु हा निका। ज्ञानदेवो म्हणे आइका। निवृत्तिदासु॥ २२५॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां चतुर्थोऽध्यायः॥ ४॥

अर्थ—अर्जुना! असा संशय वाढला तरी एका उपायाने म्हणजे आपल्या हातांत ज्ञानरूपी तीक्ष्ण खड्ग-जर असलें तर तो संशय आपल्या आटोक्यांत येतो.॥ २०७॥ त्या तीक्ष्ण ज्ञानखड्गाने हा संशय संपूर्ण नाहिसा होतो व मनाला होणाऱ्या सर्व दुःखांचा नाश होतो.॥ २०८॥ म्हणून, अर्जुना अंतःकरणांतील संशयाचा नाश करून सत्वर युद्धाला तयार हो.॥ २०९॥ राजा धृतराष्ट्रा! सर्व सर्वज्ञांचा पिता व ज्ञानाचा दिवा जो श्रीकृष्ण तो अत्यंत प्रेमाने असें म्हणाला.॥ २१०॥ आता भगवंताच्या मागल्या पुढल्या बोलण्याचा विचार करून पांडुकुमार अर्जुन कसा प्रसंगाला धरून प्रश्न करील.॥ २११॥ तो कथेचा संदर्भ व बोधाची संपत्ति व रसाचा उत्कर्ष हे सर्व पुढे सांगण्यांत येईल.॥ २१२॥ ज्याच्या उत्तमपणावरून आठहि रसांची ओवाळणी करावी आणि जो संतांच्या चित्ताला अत्यंत आवडणारा व जगालाहि विसावा देणारा आहे.॥ २१३॥ असा जो शांतरस तो प्रगट होईल, असें माझें समुद्राहूनहि सखोल अर्थाने भरलेले मराठी बोल श्रवण करा.॥ २१४॥ ज्याप्रमाणे सूर्यबिंब दिसायला टिचभर दिसतें, पण त्याच्या प्रकाशाला त्रिभुवनहि कमी पडते, त्याप्रमाणे माझ्या शब्दांची बोध करून देण्याची शक्तिहि सूर्यप्रकाशाच्या बरोबरीची अनुभवाला येईल.॥ २१५॥ किंवा ज्याप्रमाणे कामिक लोकांची जी जो कामना असेल ती ती कामना कल्पवृक्ष पुरवितो, त्याप्रमाणेच माझा बोल देखील तशाच व्यापक अर्थाने वाचकांना फलद्रूप होईल; म्हणून एकाग्र चित्ताने ऐका.॥ २१६॥ असो, मी काय जास्त प्रशंसा करूं! पण सर्वज्ञ पुरुष जाणतात, म्हणून चांगलें एकाग्र चित्ताने ऐका, अशी माझी विनंति आहे.॥ २१७॥ एखाद्या स्त्रीचे ठिकाणीं सौंदर्य, सद्गुण व पातीव्रत्य यांच्या अलग अलग जशा मर्यादा दिसतात, त्याप्रमाणे येथेहि अलंकाराची व शांतरसाची अलग अलग स्पष्ट मर्यादा दिसेल.॥ २१८॥ अगोदरच साखर हा आवडणारा पदार्थ आणि तीच जर औषधांत असली तर आनंदाने वारंवार औषध घ्यावेंसें वाटेल.॥ २१९॥ मलयपर्वतावरून आलेला वारा स्वभावतःच मंद व सुगंधयुक्त असतो आणि तेथेच सुदैवाने जर अमृताचा स्वाद असून मधुर नादहि असला॥ २२०॥ तर त्याच्या स्पर्शानें सर्वांग शीतल होईल, स्वादाने जीभ नाचूं लागेल व कानहि वाहवा वाहवा म्हणतील.॥ २२१॥ त्याचप्रमाणे या श्रीकृष्णार्जुनांचा संवाद ऐकण्याचें फळ आहे. श्रवणेंद्रियाच्या उपासाचें पारणें सुटेल आणि संपूर्ण संसारदुःखाला अनायासे आनंदाने घालविलें जाईल.॥ २२२॥ वैरी जर मंत्रानेच मरूं शकेल तर शस्त्र बाळगण्याचें काय काम आहें.? दुधसाखरेने रोग गेला तर कडुनिंब पिण्याचें कारण काय?॥ २२३॥ त्याप्रमाणे मनाला न मारतां व इंद्रियांनाहि दुःख न देता या श्रीकृष्णार्जुनांचा सवांद श्रवण करण्यांतच मोक्ष होतो.॥ २२४॥ म्हणून अत्यंत प्रसन्न चित्ताने हा गीतासंवाद ऐका असें श्रीनिवृत्तिदास श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.॥ २२५॥

याप्रमाणे श्रीज्ञानेश्वरीच्या चवथ्या अध्यायाचा अनुवाद गूढार्थदीपिकेसह श्रीगुरुकृपेने पूर्ण झाला तो श्रीगुरुचरणीं समर्पण असो.

समारोप

श्रीभगवान म्हणतात, अर्जुना! मागील अध्यायांत मी जो कर्मयोग सांगितला तो मागे मी विवस्वानाला सांगितला होता. विवस्वानाने मनूला व मनूने इक्ष्वाकु राजाला सांगितला. पुढे परंपरेने त्याला राजर्षि लोक जाणते झाले. नंतर तो योग लुप्त झाला. तोच पुरातन योग मी आता तुला सांगतों. हा योग म्हणजे माझें एक परम गुह्य आहे. तूं माझा प्रेमळ सखा म्हणून तें गुह्य तुजजवळ प्रगट करीत आहे.

अर्जुन म्हणतो, देवा! आपला जन्म तर आजचा व विवस्वान तर इतके पूर्वी होऊन गेले की ज्यांच्याविषयी आमच्या वडिलांनाहि माहिती नाही. तेव्हा आपण त्यांना हा योग सांगितला ही गोष्ट जरा विसंगत वाटते, पण मी ती गोष्ट खोटी आहे असेंहि म्हणूं शकत नाही. आपण त्याचा जरा उलगडा करून सांगा।

श्रीभगवान म्हणतात, अर्जुना! तुझे व माझे पुष्कळ जन्म झाले, पण तुझे जन्म तुला आठवत नाहीत. माझे मात्र सर्व जन्म मला आठवतात. तूं प्रकृतीच्या आधीन असल्यामुळे तुझ्या ठिकाणीं विस्मृति वगैरे जीवाचे धर्म आहेत. मी जन्मरहित, अविनाशी, सर्व प्रकृतीचा नियंता आहे. पण मायेने मी जन्मलों असें भासतें. हें माझें अप्राकृत जन्मकर्म जो जाणतो तो मला प्राप्त होतो व मत्स्वरूप होतो. माझे खरें स्वरूप अज्ञानाने न ओळखतां जो इतर देवतांची उपासना करितो त्याला त्याच्या भावनेप्रमाणे ती उपासना फलद्रूप होते. मी तेथे साक्षीभूत असतो. जीवांच्या स्वाभाविक गुणकर्मानुसार हे चार वर्ण मी उत्पन्न केले, पण मी त्याचा कर्ता नाही. कारण माझे ठिकाणीं कोणत्याहि कर्माचा लेप नाही व कोणत्या कर्माच्या फळाची अपेक्षाहि नाही.

अशाप्रकारे मला जाणून पूर्वी मुमुक्षु जनांनी आपआपली कर्मे केलीं. तसेंच तूहि आपलें विहित कर्म कर. कर्माची व्याप्ति अति गहन आहे, याकरिता कर्माचें, विकर्माचें व अकर्माचें तात्विकस्वरूप जाणलें पाहिजे. कर्म करीत असतांना तें कर्म मी करतों असा अभिमान जो धारण करीत नाही व त्या कर्माच्या फळाचीहि इच्छा सोडतो तो खरा योगी होय. त्याचे ठिकणीं कर्तव्य म्हणून जगांत कांहीच उरलेलें नसतें. तो कर्म करीत असतांना दिसला तरी त्याची नैष्कर्म्य स्थिती भंग पावत नाही. त्याचीं सर्व कर्मे काम व संकल्परहित असतात. तो आत्मसुखाने तृप्त असतो. त्याने आपल्या अंत:करणाचा निग्रह केलेला असतो व संसाराची मनांतून आसक्ति सोडलेली असते. प्रारब्धाने जें मिळेल त्यांत तो संतुष्ट असतो. अद्वैतभावाने तो मत्सररहित झालेला असतो. तो सर्व कर्मे परब्रम्हस्वरूप पाहतो. असा हा पूर्ण परब्रम्हस्वरूपच असतो.

ही ब्रम्हस्थिति बाणण्याकरिता लोक नानाप्रकारच्या यज्ञांची उपासना करतात. ह्या सर्व यज्ञाक्रिया भिन्न असल्या तरी साक्षात् वा परंपरेने त्या सर्वांचें फळ एकच असतें. कोणी द्रव्य यज्ञ करतात, कोणी तपयज्ञ करतात, कोणी अष्टांगयोगरूप यज्ञ करतात, कोणी वाग्यज्ञ करतात व कोणी ज्ञानयज्ञ करतात. सर्व यज्ञात ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे. या ज्ञानयज्ञाने आत्मस्वरूपाचें ज्ञान झालें असता परमसुखाची प्राप्ति होते.

पण हें आत्मज्ञान श्रीगुरूची सेवा करून व श्रीगुरूशीं प्रश्न करूनच घ्यावें लागतें. श्रीगुरूच्या मुखाने असें परोक्षज्ञान झाल्यावर श्रद्धा इंद्रियनिग्रह इत्यादि उपायाने तें दृढ करून, त्याचा अपरोक्ष अनुभव घेतला जातो.

ज्यांनी असें आत्मज्ञान प्राप्त करून घेतलें नाही, तो विषयसुखांतच आनंद मानतो व आपलें हित कशांत आहे याची त्याला ओळख नसते. तो संशयाने ग्रस्त झालेला असतो. म्हणून, अर्जुना! खड्ग हातांत घेऊन त्या संशयाचा नाश कर व निष्काम कर्मयोगाचे आचरण करून युद्धाला सज्ज हो.

॥ श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय पांचवा

अर्जुन उवाच

सन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि। यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम्॥ १॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, देवा! तुम्ही कर्मसंन्यासाची प्रशंसा करता व कर्मानुष्ठानाचीहि प्रशंसा करता. या दोहोंपैकी माझ्या कल्याणाचा मार्ग कोणता हें निश्चित करून मला सांगा॥ १॥

मग पार्थु श्रीकृष्णातें म्हणे। हां हो हें कैसें तुमचें बोलणें। एक होय तरी अंत:करणें। विचारूं ये॥ १॥
मागां सकळ कर्मांचा संन्यासु। तुम्हींचि निरोपिला होता बहुवसु। तरी कर्मयोगीं केवीं अतिरसु। पोखीतसां पुढती॥ २॥
ऐसे द्व्यर्थ हें बोलतां। आम्हां नेणतयांच्या चित्ता। आपुलिये चाडे अनंता। उमजु नोहे॥ ३॥
ऐकें एकसारातें बोधिजे। तरी एकनिष्ठचि बोलिजे। हें आणिकीं काय सांगिजे। तुम्हांप्रति॥ ४॥
तरी याचिलागीं तुमतें। म्यां राउळासि विनविलें होतें। जे हा परमार्थु ध्वनितें। न बोलावा॥ ५॥
परी मागील असो देवा। आतां प्रस्तुतीं उकलु देखावा। सांगें दोहींमाजि बरवा। मार्गु कवण॥ ६॥
जों परिणामींचा निर्वाळा। अचुंबितु ये फळा। आणि अनुष्ठितां प्रांजळा। सावियाचि॥ ७॥
जैसें निद्रेचें सुख न मोडे। आणि मार्गु तरी बहुसाल सांडे। तैसें सुखासना सांगडें। सोहपें होय॥ ८॥
येणें अर्जुनाचेनि बोलें। देवो मनीं रिझले। मग होईल ऐकें म्हणितलें। संतोषोनियां॥ ९॥
देखा कामधेनुऐसी माये। सदैवा जया होये। तो चंद्रुही परी लाहे। खेळावया॥ १०॥
पाहें पां शंभूची प्रसन्नता। तया उपमन्यूचिया आर्ता। काय क्षीराब्धि दूधभाता। देइजेचिना॥ ११॥
तैसा औदार्याचा कुरुठा। श्रीकृष्ण आपु जाहलिया सुभटा। कां सर्व सुखांचा वसौटा। तोचि नोहावा॥ १२॥
एथ चमत्कारु कायसा। गोसावी श्रीलक्ष्मीकांताऐसा। आतां आपुलिया सवेसा। मागावा कीं॥ १३॥
म्हणोनी अर्जुनें म्हणितलें। तें हांसोनी येरें दिधलें। तेंचि सांगेन बोलिलें। काय कृष्णें॥ १४॥

अर्थ—मग अर्जुन श्रीकृष्णाला म्हणतो, देवा! हें तुमचें बोलणें कसें आहे हो! एक निश्चित कांही सांगितलें तर, त्याचा अंत:करणाने विचार करतां येतो. ॥ १ ॥ आत्मस्वरूपाचे ठिकाणीं सर्व कर्माचा संन्यास म्हणजे तेथे कर्मकर्तृत्वच नाही हें तुम्हीच मागे सांगितलें; मग आता कर्मयोगाचें अनुष्ठान करावें, या गोष्टीवर कां भर देत आहा?॥२॥ असें हे दुटप्पी बोलणें आहे, पण आमच्यासारख्या मूढांना आपल्या कल्याणाचें काय हें त्यांतून निवडतां येत नाही. ॥ ३ ॥ ऐका, देवा! मला त्यापैकी एक कोणता तरी सारभूत मार्ग सांगायचा असेल तर, आपण त्यालाच धरून बोलिलें पाहिजे, हें काय दुसऱ्यांनी तुम्हाला सांगितलें पाहिजे?॥ ४॥ मागे एकदां आपणाला मी घरीं अशी प्रार्थना केली होती की, भगवंता! आम्हांला आपल्या बुद्धीने तुमच्या बोलण्यांतील गूढ अर्थ समजून घ्यावा लागेल, अशा गूढभाषेने मला परमार्थ सांगू नये. ॥ ५॥ परंतु मागील गोष्ट जाऊं द्या. आता तरी देवा, स्पष्ट करून सांगा की या दोन्ही मार्गांपैकी मला हितावह कोणता मार्ग आहे. ॥ ६ ॥ ज्याचा खात्रीने शेवट चांगला होईल व ज्याचें अचूक फळ मिळेल आणि खरोखरच ज्याचें अनुष्ठान करणें सरळ सोपें असेल. ॥ ७॥ ज्याप्रमाणे पालखीसारख्या सुखकर वाहनांतून प्रवास करितांना निद्रेचें सुख अंतरत नाही व मार्गहि लवकर तोडला जातो, त्याप्रमाणे तुम्ही सांगणार तो मार्ग अनुष्ठान करण्यास सोपा असावा. ॥ ८ ॥ हें अर्जुनाचें बोलणें ऐकून भगवंताला फार संतोष झाला व अर्जुनाला म्हणाले, हो बरें, अर्जुना! तुझ्या इच्छेप्रमाणेच होईल. ॥ ९ ॥ पहा, जर एखाद्या भाग्यवानाला कामधेनुसारखी आई

मिळाली, तर त्याला खेळायला चंद्र देखील मिळूं शकेल. ॥ १० ॥ तसेंच, पहा बरें उपमन्यूची दूधभात खाण्याची इच्छा होती. ती इच्छा भगवान शंकर प्रसन्न झाल्याने क्षीराब्धि (दुधाचा सागर) प्राप्त होऊन पूर्ण झाली नाही काय? ॥ ११ ॥ त्याचप्रमाणे औदार्याचें केवळ कोठारच असा श्रीकृष्ण भगवान ज्या योद्ध्या अर्जुनाचे स्वाधीन झाला तो अर्जुन सर्व सुखांचें वसतिस्थान कां होणार नाही? ॥ १२ ॥ येथे आश्चर्य करण्याचें कारणच नाही. ज्या अर्जुनाचा, लक्ष्मीपति भगवान धनी आहे, त्या श्रीकृष्णापाशी इच्छेप्रमाणे मागितलेंच पाहिजे. ॥ १३ ॥ म्हणून अर्जुनाने जे म्हटलें त्यावर श्रीकृष्णाने हासून जें उत्तर दिलें, तेंच मी सांगतों. ॥ १४ ॥

श्रीभगवानुवाच

सन्न्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ । तयोस्तु कर्मसन्न्यासात्कर्मयोगो विशिष्यते॥ २॥
ज्ञेयः स नित्यसन्न्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति । निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बन्धात्प्रमुच्यते॥ ३॥

अर्थ—श्रीभगवान म्हणतात, संन्यास व कर्मयोग हे दोन्ही मार्ग आत्मकल्याण करणारेच आहेत खरे, पण त्या दोहोंमध्ये कर्मसंन्यासापेक्षा कर्मयोग हा विशेष बरा आहे. ॥ २ ॥ हे महाबाहो, अर्जुना! जो कशाचा द्वेष करीत नाही व कशाची इच्छाहि करीत नाही, तोच खरा अखंड संन्यासी होय. तो सुखदुःखादि द्वंद्वापासून व संसारबंधापासून मुक्त होतो. ॥ ३ ॥

तो म्हणें गा कुंतीसुता। हे संन्यास योग विचारितां। मोक्षकर तत्त्वता। दोनीही होती॥ १५॥
तरी जाणां नेणां सकळां। हा कर्मयोगु कीर प्रांजळा। जैसी नाव स्त्रियां बाळां। तोयतरणीं॥ १६॥
तैसें सारासार पाहिजे। तरी सोहपा हाचि देखिजे। येणें संन्यासफळ लाहिजे। अनायासें॥ १७॥
आतां याचिलागीं सांगेन। तुज संन्यासियाचें चिन्ह। मग सहजें हें अभिन्न। जाणसी तूं॥ १८॥
तरी गेलियाची से न करी। न पवतां चाड न धरी। जो सुनिश्चळु अंतरीं। मेरु जैसा॥ १९॥
आणि मी माझें ऐसी आठवण। विसरलें जयाचें अंतःकरण। पार्था तो संन्यासी जाण। निरंतर॥ २०॥
जो मनें ऐसा जाहला। संगीं तोचि सांडिला। म्हणोनि सुखें सुख पावला। अखंडित॥ २१॥
आतां गृहादिक आघवें। तें कांही न लगे त्यजावें। जें घेतें जाहलें स्वभावें। निःसंगु म्हणऊनि॥ २२॥
देखें अग्नि विझोनि जाये। मग जे राखोंडी केवळु होये। तैं ते कापुसें गिंवसूं ये। जियापरी॥ २३॥
तैसा असतेनि उपाधी। नाकळिजे तो कर्मबंधी। जयाचिये बुद्धी। संकल्पु नाहीं॥ २४॥
म्हणोनि कल्पना जैं सांडे। तैंचि गा संन्यासु घडे। या कारणें दोनी सांगडे। संन्यासयोगु॥ २५॥

अर्थ—भगवान् म्हणतात, कुंतीसुता अर्जुना! संन्यास व कर्मयोग या दोघांचा विचार करून पाहतां दोन्ही मार्ग मोक्षसाधकच आहेत. ॥ १५ ॥ तरीपण, ज्याप्रमाणे नावेंत बसून स्त्रियाना व मुलाबाळांना देखील नदी तरून जातां येते, त्याप्रमाणे कर्मयोग हा जाणत्या व नेणत्या सर्वांना अनुष्ठान करण्यास सरळ व सोपा आहे. ॥ १६ ॥ योग्यायोग्याचा विचार केल्यास कर्मयोगच सोपा आहे आणि याच अनुष्ठानाने अनायासे संन्यासमार्गाचेहि फळ मिळते. ॥ १७ ॥ या करिताच तुला हें समजावें म्हणून खऱ्या संन्याशांचें लक्षण सांगतों पहा, म्हणजे संन्यास व कर्मयोग हे दोन्ही साध्याचे दृष्टीने किंवा फळप्राप्तीचे दृष्टीने कसे सारखे आहेत हें तुला कळून येईल. ॥ १८ ॥ जो पुरुष गेल्या गोष्टीची कधी आठवण करीत नाही व प्राप्त नसलेल्या वस्तूची कधी इच्छाहि करीत नाही व अंतःकरणांत मेरुपर्वताप्रमाणे निश्चळ राहतो. ॥ १९ ॥ आणि मी अमुक देहधारी आहे व माझें अमुक हे आहे असें ज्याचे अंतःकरणात स्मरण देखील होत नाही, अर्जुना! असा पुरुष खरोखर अखंड संन्यासी होय. ॥ २० ॥ अंतःकरणांतून जो देहादिक विसरला आणि म्हणूनच जो सर्व संग सोडून निःसंग झाला, तो पुरुष निश्चिंत अनायासे अखंड सुख भोगतो. ॥ २१ ॥ अशी स्थिति प्राप्त झाली असतां कशाचाहि, घरादाराचा त्याग करावा लागत नाही, कारण स्वतः तो मनाने सर्व संग सोडून निःसंगच झालेला असतो. ॥ २२ ॥ अर्जुना, पहा. ज्याप्रमाणे अग्नि विझून गेला असतां जी नुसती राख राहते, ती कापसाने देखील घेतां येते. ॥ २३ ॥ त्याप्रमाणे तो उपाधीत असूनच कर्मादिकांनी बांधला जात नाही व बुद्धीने एकहि

संकल्प करीत नाही. ॥ २४ ॥ म्हणून आपले संकल्पविकल्प नाहिसे झाले की अनायासें संन्यास होतो व या दृष्टीने संन्यास व कर्मयोग दोन्ही सारखेच आहेत. ॥ २५ ॥

साङ्ख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः । एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ॥ ४ ॥
यत्साङ्ख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते । एकं साङ्ख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥ ५ ॥
सन्न्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः । योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ॥ ६ ॥
योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेन्द्रियः । सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ७ ॥

अर्थ—संन्यास व कर्मयोग हे दोन मार्ग निराळे आहेत, असें मूर्खांनां वाटतें, शहाण्यांना वाटत नाही. कारण यांपैकी कोण्याहि एका मार्गाचें योग्य अनुष्ठान केलें असतां, दोन्ही मार्गांचे एकच फळ मिळते. ॥ ४ ॥ संन्यासमार्गाने जें फळ मिळतें तेंच कर्मयोगानेहि मिळतें, म्हणून सांख्य व योग हे दोन्ही एके ठिकाणीं जाणारेच मार्ग आहेत. असा त्यांचा एकपणा जो जाणतो तोच सांख्ययोगाचें खरें तत्व जाणतो. ॥ ५ ॥ कर्मयोगाचें अनुष्ठान केल्यावांचून संन्यासस्थिति प्राप्त होणें कठिण आहे. योगयुक्त झालेल्या मुनीला शीघ्र ब्रह्मप्राप्ति होते. ॥ ६ ॥ जो योगयुक्त झालेला आहे व म्हणून त्या योगामुळे ज्याचें अंतःकरण अत्यंत शुद्ध झालें व तें ज्याच्या स्वाधीन झालें, इंद्रियेंहि ज्यांनी जिंकलीं आणि जो पुरुष सर्व प्राणिमात्रांचा अंतर्यामी आत्मा झाला, तो पुरुष कर्म करूनहि कर्माने लिप्त होत नाही. ॥ ७ ॥

एऱ्हवीं तरी पार्था। जे मूर्ख होती सर्वथा। ते सांख्यकर्मसंस्था। जाणती केवीं ॥ २६ ॥
सहजें ते अज्ञान। म्हणोनि म्हणती हे भिन्न। एऱ्हवी दीपाप्रति काई आनान। प्रकाशु आहाती ॥ २७ ॥
पैं सम्यक् एकें अनुभवें। जिहीं देखिलें तत्त्व आघवें। दोन्हींतेंही ऐक्यभावें। मानिती गा ॥ २८ ॥
आणि सांख्यीं जें पाविजे। तेंचि योगीं गमिजे। म्हणोनि ऐक्यता दोहींतें सहजें। इयापरी ॥ २९ ॥
देखें आकाशा आणि अवकाशा। भेदु नाहीं जैसा। तैसें ऐक्य योग-संन्यासा। वोळखे जो ॥ ३० ॥
तयासींचि जगीं पाहलें। आपणपें तेणेंचि देखिलें। जया सांख्य-योग जाणवले। भेदेंविण ॥ ३१ ॥
जो युक्तिपंथें पार्था। चढे मोक्षपर्वता। तो महासुखाचा निमथा। वहिला पावे ॥ ३२ ॥
येरा योगस्थिति जया सांडे। तो वायांचि गा हव्यासीं पडे। परि प्राप्ति कंहीं न घडे। संन्यासाची ॥ ३३ ॥
जेणें भ्रांतीपासूनि हिरतलें। गुरुवाक्यें मन धुतलें। मग आत्मस्वरूपीं घातलें। हारौनियां ॥ ३४ ॥
जैसें समुद्रीं लवण न पडे। तंव वेगळें अल्प आवडे। मग होय सिंधूचि एवढें। मिळे तेव्हां ॥ ३५ ॥
तैसें संकल्पोनि काढिलें। जयाचें मनचि चैतन्य जाहलें। तेणें एकदेशियें परी व्यापिलें। लोकत्रय ॥ ३६ ॥
आतां कर्ता कर्म करावें। हें खुंटलें तया स्वभावें। आणि करी जऱ्हीं आघवें। तऱ्हीं अकर्ता तो ॥ ३७ ॥

अर्थ—अर्जुना! एरव्ही जे मूर्ख असतात ते सांख्यमार्ग किंवा योगमार्ग कसें जाणतील? ॥ २६ ॥ कारण ते अज्ञानी असल्यामुळे, संन्यासमार्ग व योगमार्ग भिन्न आहेत असें समजतात; परंतु वास्तविक पाहतां एकाच दिव्याला निरनिराळे प्रकाश असतात का? ॥ २७ ॥ कोणत्याहि एका मार्गाने जाऊन ज्यांनी आत्मवस्तूचा बरोबर पूर्ण अनुभव घेतला, ते पुरुष मात्र दोन्ही मार्गांना एकरूपच पाहतात. ॥ २८ ॥ आणि संन्यास मार्गाने जी आत्मप्राप्ति व्हावयाची तीच आत्मवस्तु योगमार्गानेहि प्राप्त होते, म्हणून दोन्ही मार्गांचें या रीतीने सहजच ऐक्य आहे. ॥ २९ ॥ अर्जुना! आकाश व पोकळी या दोहोंमध्ये जसा फरक नाही, त्याप्रमाणेच योगमार्ग व संन्यासमार्ग यांचें ऐक्य जो ओळखतो. ॥ ३० ॥ ज्याला सांख्ययोगाचें ऐक्य पटले, जगांत त्याचेंच ठिकाणीं खऱ्या ज्ञानाचा प्रकाश झाला, त्यानेच आपल्या खऱ्या स्वरूपाला ओळखलें. ॥ ३१ ॥ अर्जुना! जो या कर्मयोगरूपी युक्तीच्या मार्गाने जातो, तो ब्रह्मसुखाच्या माथ्यावर निश्चित प्राप्त होतो. ॥ ३२ ॥ इतर ज्याला योगमार्गाने टाकून दिलें तो व्यर्थ संन्यासमार्ग साधण्याच्या खटपटींत पडतो. पण तो मार्ग त्याला साधत नाही व खरा संन्यास त्याला कधी प्राप्त होत नाही. ॥ ३३ ॥ ज्यांनी आपलें मन श्रीगुरूच्या उपदेशानुसार संसारभ्रांति नाहिशी करून शुद्ध केले व आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर केले. ॥ ३४ ॥ ज्याप्रमाणे मिठाचा

खडा समुद्रांत जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत तो मर्यादित वाटतो, समुद्रांत मिळाला की समुद्रच होऊन जातो. ॥ ३५ ॥ त्याप्रमाणे संकल्पविकल्पापासून ज्याचें मन निराळे झाले व त्यामुळे ते मन चैतन्यस्वरूपच होऊन राहिलें, तो देहदृष्टीनें मर्यादित दिसत असला तरी सर्व ब्रह्मांड व्यापून राहतो. ॥ ३६ ॥ मग मी कर्ता, हें कर्म, तें केलें पाहिजे, अशी जाणीव त्याचे ठिकाणी मुळीच राहत नाही. अशा स्थितींत, त्याचे ठिकाणीं जें कर्म होतांना दिसतें, त्याचा तो कर्ता होत नाही, तो अकर्ता असतो. ॥ ३७ ॥

गूढार्थदीपिका—मी सर्व सुखदु:खांपासून मुक्त असून, केवळसच्चिदानंद आत्मस्वरूप आहे व माझें ठिकाणीं कर्म व कर्तृत्व नाही, ते सर्व प्रकृतीचेच धर्म आहेत, असें आपल्याला ओळखणें व प्रकृति स्वभावानुसार जीं कर्मे होणारीं असतील, त्या कर्मांना प्रवृत्त न करतां किंवा निवृत्त न करतां केवळ साक्षी होऊन राहणे, हा खरा कर्मसंन्यास आहे. हा संन्यास प्राप्त होण्याकरीता, विषयवैराग्य व सत्वगुणाचा उत्कर्ष होणें आवश्यक असतें. निष्काम कर्मयोगाच्या अनुष्ठानाने मन व इंद्रिये यांच्या स्वैर वर्तनाला आळा पडून क्रमाक्रमाने विषयसुखाची इच्छा नि:शेष नाहिशी होते व सत्वगुणाचा उत्कर्ष होतो. सत्वगुणाच्या उत्कर्षाने मी कर्मकर्तृत्वरहित केवलसच्चिदानंदस्वरूप आहे असें ज्ञान होण्यास जी मनाची शुद्धभूमिका आवश्यक असते तीहि तयार होते. हें कार्य कर्मयोगाचें अनुष्ठानावांचून दुसऱ्या रीतीने होत नाही, म्हणून खरा कर्मसंन्यास प्राप्त होण्याकरिता, त्यापूर्वी निष्काम कर्मयोगाचें आचरण करावेंच लागतें.

नैव किञ्चित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् । पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपञ्श्वसन् ॥ ८ ॥
प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि । इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ॥ ९ ॥
ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः । लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ॥ १० ॥

अर्थ—जो योगयुक्त पुरुष तत्वज्ञानी होतो, त्याचे ठिकाणीं मी कर्म करितों अशी कर्तृत्वबुद्धि कधीच उठत नसते तो आपल्याला कर्मरहित केवळ चैतन्यस्वरूप पाहतो. लोकांना तो पाहतो, ऐकतो, स्पर्श करितो, वास घेतो, खातो, जातो, निजतो श्वासोश्वास करितो. ॥ ८ ॥ बोलतो, मलमूत्र विसर्ग करितो, डोळ्यांची उघडझांप करितो, असें दिसतें पण तो मात्र इंद्रियें आपआपल्या विषयाचा व्यापार करीत आहेत, त्यांच्याशीं माझा (आत्मस्वरूपाचा) कांही एक संबंध नाही असें अंत:करणांत धारण करितो व मी त्याच्याहून निराळा आहे असें समजतो. ॥ ९ ॥ सर्व कर्मे परब्रह्मसत्तेवर भासतात असें जाणून जो कर्माची आसक्ति व कर्तृत्व सोडून कर्मे करितो, तो कमळाच्या पानाला जसें पाणी चिटकत नाही, तसा पापरूपी कर्माने लिप्त होत नाही. ॥ १० ॥

जे पार्था तया देहीं। मी ऐसा आठऊ नाहीं। तरी कर्तृत्व कैंचें काई। उरे सांगें॥ ३८ ॥
ऐसें तनुत्यागेंवीण। अमूर्ताचे गुण। दिसती संपूर्ण। योगयुक्ता॥ ३९ ॥
एऱ्हवीं आणिकांचिये परी। तोही एक शरीरी। अशेषींही व्यापारीं। वर्ततु दिसे॥ ४० ॥
तोही नेत्रीं पाहे। श्रवणीं ऐकतु आहे। परि तेथींचा सर्वथा नोहे। नवल देखें॥ ४१ ॥
स्पर्शासि तरी जाणे। परिमळु सेवी घ्राणें। अवसरोचित बोलणें। तयाहि आथी॥ ४२ ॥
आहारातें स्वीकारी। त्यजावें तें परिहरी। निद्रेचिया अवसरीं। निदिजे सुखें॥ ४३ ॥
आपुलेनि इच्छावशें। तोही गा चालतु दिसे। पैं सकळ कर्म ऐसें। राहाटे कीर॥ ४४ ॥
हें सांगों काई एकैक। देखें श्वासोच्छ्वासादिक। आणि निमिषोन्निमिष। आदिकरूनि॥ ४५ ॥
पार्था तयाचे ठायीं। हें आघवेंचि आथि पाहीं। परी तो कर्ता नव्हे कांहीं। प्रतीतिबळें॥ ४६ ॥
जैं भ्रांतिसेजे सुतला। तै स्वप्नसुखें भुलला। मग तो ज्ञानोदयीं चेइला। म्हणोनियां॥ ४७ ॥
आतां अधिष्ठानसंगती। अशेषाही इंद्रियवृत्ती। आपुलालिया अर्थी। वर्तत आहाती॥ ४८ ॥
दीपाचेनि प्रकाशें। गृहींचे व्यापार जैसे। देहीं कर्मजात तैसें। योगयुक्ता॥ ४९ ॥
तो कर्मे करी सकळें। परी कर्मबंधा नाकळे। जैसें न सिंपे जळीं जळें। पद्मपत्र॥ ५० ॥

अर्थ—अर्जुना! जर ज्ञानी पुरुषाला, मी देह, अशी बुद्धीच स्फुरत नाही, तर त्याचे ठिकाणी कर्तृत्व तरी कसें

राहणार बरें ? ॥ ३८ ॥ याप्रमाणे योगयुक्त (म्हणजे ईश्वराप्रीत्यर्थ कर्म करतां करतां ज्याचें चित्त ईश्वराचे ठिकाणीं स्थिर झालें) पुरुषाचे ठिकाणीं देह पडण्यापूर्वीच निर्गुण निराकार परमेश्वराचे धर्म दिसू लागतात. ॥ ३९ ॥ साधारणत: इतराप्रमाणे तोंहि शरीरधारीच असतो, तरी सर्व कर्मे करतांना दिसतो. ॥ ४० ॥ तोहि डोळ्याने पाहतो, कानाने ऐकतो, पण आश्चर्य हें की तो कर्माने लिप्त होत नाही (म्हणजे त्या कर्माचें कर्तृत्व घेत नाही). ॥ ४१ ॥ स्पर्श जाणतो, नाकाने सुगंध घेतो, प्रसंगोपात्त तो बोलतोहि. ॥ ४२ ॥ आहार घेतो, जें घेऊं नये तें टाकून देतो, झोंप आली असतां झोंपतोहि. ॥ ४३ ॥ मनाची इच्छा होईल तेव्हा चालतो, याप्रमाणे सर्व कर्मे करींत असलेला दिसतो. ॥ ४४ ॥ अर्जुना! एक एक कर्म काय सांगूं, श्वासोच्छ्वासादिक व डोळे उघडणें व डोळे झांकणें इत्यादि कर्मे देखील. ॥ ४५ ॥ हे अर्जुना! त्या पुरुषाचे ठिकाणीं हीं सर्व कर्म होतात, पण आत्मस्वरूप झालेला पुरुष, माझे ठिकाणीं कर्म नाही व कर्तृत्व नाही अशा ज्ञानानुभवामुळे, त्या कर्माचा आपल्याला कर्ता मानित नाही. ॥ ४६ ॥ जोपर्यंत कर्म आहे व मी त्याचा कर्ता आहे अशा भ्रांतीच्या बिछान्यावर निजला होता, तोपर्यंत तो आपल्याला भुलला होता व आपलें ठिकाणीं कर्म व त्याचे कर्तृत्व पाहत होता, पण आता स्वस्वरूपाचे ज्ञानाने जागा झाल्यामुळे तो आपले ठिकाणीं कर्म व कर्तृत्व पाहत नाही. ॥ ४७ ॥ आता अधिष्ठानरूप आत्म्याच्या सत्तेचा संबंध घेऊन संपूर्ण इंद्रियवृत्ति आपआपल्या विषयाचे ठिकाणीं प्रवृत्त होतात, असें तो जाणतो. ॥ ४८ ॥ ज्याप्रमाणे दिव्याचे प्रकाशाच्या साह्याने आपण घरांत सर्व व्यवहार करितो, त्याप्रमाणे भगवंताचे ठिकाणीं चित्तवृत्ति स्थिर केलेल्या योगयुक्ताचीं कर्मे होत असतात. ॥ ४९ ॥ योगयुक्त पुरुष सर्व कर्मे करतांना दिसतो, पण ज्याप्रमाणे कमळाचे पानाला पाणी चिकटत नाही, त्याप्रमाणे योगयुक्त पुरुषाला, कर्म व कर्तृत्वच भासत नसल्यामुळे कर्माचा लेप होत नाही. ॥ ५० ॥

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि । योगिनः कर्म कुर्वन्ति सङ्गं त्यक्त्वात्मशुद्धये ॥ ११ ॥

अर्थ—कर्मयोगी जे असतात ते आत्मशुद्ध्यर्थ म्हणजे देहादिकांचे ठिकाणीं असलेली बुद्धीची आसक्ति नाहिशी करून, बुद्धि सगुण भगवंताचे ठिकाणी स्थिर करण्याकरिता, देहाच्या सुखाकरिता कर्म करण्याची इच्छा सोडून देवून व मी कर्म करितो हा कर्तृत्वाचा अहंकार सोडून, केवळ शरीराने, केवळ मनाने, केवळ बुद्धीने व केवळ इंद्रियाने कर्म करीत असतात. ॥ ११ ॥

देखें बुद्धीची भाष नेणिजे। मनाचा अंकुर नुदैजे। ऐसा व्यापारु तो बोलिजे। शारीरु गा ॥ ५१ ॥
हेंच मराठें परियेसी। तरी बाळकाची चेष्टा जैशी। योगिये कर्मे करिती तैशीं। केवळा तनु ॥ ५२ ॥
मग पांचभौतिक संचलें। जेव्हां शरीर असे निदेलें। तेथ मनचि राहाटे एकलें। स्वप्नीं जेवीं ॥ ५३ ॥
नवल ऐकें धनुर्धरा। कैसा वासनेचा संसारा। देहा होऊं नेदी उजगरा। परी सुखदुःखें भोगी ॥ ५४ ॥
इंद्रियांचां गांवीं नेणिजे। ऐसा व्यापारु जो निपजे। तो केवळ गा म्हणिजे। मानसाचा ॥ ५५ ॥
योगिये तोही करिती। परी कर्मे तेणें न बंधिजती। जे सांडिली आहे संगती। अहंभावाची ॥ ५६ ॥
आतां जाहालिया भ्रमहत। जैसें पिशाचाचें चित्त। मग इंद्रियांचें चेष्टित। विकळु दिसे ॥ ५७ ॥
स्वरूप तरी देखे। आळविलें आइके। शब्दु बोले मुखें। परी ज्ञान नाहीं ॥ ५८ ॥
हें असो काजेंविण। जें जें कांही कारण। तें केवळ कर्म जाण। इंद्रियांचें ॥ ५९ ॥
मग सर्वत्र जें जाणतें। तें बुद्धीचें कर्म निरुतें। वोळख अर्जुनातें। म्हणे श्रीहरी ॥ ६० ॥
ते बुद्धि धुरे करुनी। कर्म करिती चित्त देउनी। परि ते कर्मापासुनी। मुक्त दिसती ॥ ६१ ॥
जे बुद्धीचिये ठावूनि देहीं। तयां अहंकाराची सेचि नाहीं। म्हणोनि कर्मेचि करितां पाहीं। चोखाळले ॥ ६२ ॥
अगा करितेनवीण कर्म। तेंचि तें निष्कर्म। हें जाणती सवर्म। गुरुगम्य जें ॥ ६३ ॥
आतां शांतरसाचें भरितें। सांडीत आहे पात्रातें। जें बोलणें बोलापरौतें। बोलवलें ॥ ६४ ॥
एथ इंद्रियांचा पांगु। जया फिटला आहे चांगु। तयासीचि आथि लागु। परिसावया ॥ ६५ ॥
हा असो अतिप्रसंगु। न संडीं पां कथालागु। होईल श्लोकसंगतिभंगु। म्हणोनियां ॥ ६६ ॥

जें मना आकळितां कुवाडें। घाघुसितां बुद्धी नातुडे। तें दैवाचेनि सुरवाडें। सांगवलें तुज॥ ६७॥
जें शब्दातीत स्वभावें। तें बोलींचि जरी फावे। तरी आणिकें काय करावें। सांगे कथा॥ ६८॥
हा आर्तिविशेषु श्रोतयांचा। जाणोनि दास निवृत्तीचा। म्हणे संवादु तया दोघांचा। परिसोनि परिसा॥ ६९॥
मग श्रीकृष्ण म्हणे पार्थातें। आतां प्राप्ताचें चिन्ह पुरतें। सांगेन तुज निरुतें। चित्त देईं॥ ७०॥

अर्थ—बुद्धीची भाषा न जाणतां म्हणजे बुद्धीने कर्माचा निश्चय न होतां, मनाचें स्फुरण न होतां म्हणजे मनाने कर्माविषयी बरा-वाईट संकल्प न करतां जो व्यापार होतो त्याला केवळ शरीराचा व्यापार म्हणतात. ॥ ५१ ॥ हेंच मराठी भाषेत सांगतों ऐक. ज्याप्रमाणे अत्यंत लहान मुलांचा व्यापार होतो, त्याप्रमाणे योग्याचें केवळ शरीराने होणारें कर्म असतें. ॥ ५२ ॥ मग हें पंचभूतांपासून बनलेलें शरीर जेव्हा निद्रेंत विसरलें जातें, तेव्हा स्वप्नांतु नुसता जसा मनाचाच व्यापार असतो. ॥ ५३ ॥ अर्जुना! कसें आश्चर्य आहे पहा, स्वप्नांत कसा नुसता वासना संस्काराचाच संसार मांडला जातो व आंथरूणावर पडलेल्या देहाला जागे न करतां, सुखदुःख भोगतो. ॥ ५४ ॥ इंद्रियें देखील स्वप्नांतलें कांही जाणत नाहीत. याप्रमाणे जो व्यापार होतो तो केवळ मनानें होणारा व्यापार होय. ॥ ५५ ॥ योगी पुरुष असा केवळ मनाचा व्यापार करितात. पण देहावर त्यांचा अहंभाव किंवा मीपणाच नसल्यामुळे, तीं कर्में त्यांना बंधनकारक होत नाहीत. मी तीं कर्में करितों असें कर्तृत्व त्यांचे ठिकाणीं स्फुरत नाही. ॥ ५६ ॥ पिशाचाचें चित्त जसें भ्रमिष्ट झालें असतां इंद्रियांचे व्यापार नीट होत नाहीत. ॥ ५७ ॥ समोर असलेलें माणूस दिसतें, त्याने हांक मारली असतां ऐकूं येते व तो त्याला उत्तरहि देतो, पण त्या कशाचेंहि त्याला ज्ञान नसतें. ॥ ५८ ॥ असो, याप्रकारें कांहीं एक उद्देश मनांत न धरतां जें जे कांही केलें जातें तें तें कर्म, केवळ इंद्रियाने केलेलें होय असें समज. ॥ ५९ ॥ भगवान म्हणतात, अर्जुना! मग जेवढें कांही जाणणें आहे, तें बुद्धीचे कर्म होय, हें जाण. ॥ ६० ॥ त्या बुद्धीला पुढे करून व चित्त देऊन तें कर्म करितात, पण कर्मांपासून ते मुक्त असतात. ॥ ६१ ॥ कारण त्यांचा मीपणा आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर असल्यामुळे तो मीपणा बुद्धी पासून देहापर्यंत जीं तत्वें आहेत, त्यांपैकी कोणाचेहि ठिकाणीं नसतो. या तत्वांना अहंकाराची आठवणच नसते. अशा रीतीने हा कर्मयोगी कर्म करीत असतांना निष्काम असतो. ॥ ६२ ॥ बापा अर्जुना! मी कर्माचा कर्ता असें कर्तृत्व उत्पन्न न होतां जें कर्म होतें, त्याला नैष्कर्म म्हणतात, हें नैष्कर्म्याचें अनुभविक वर्म गुरूच्या मुखानेच कळत असतें. हें मर्मज्ञ गुरुपुत्रच जाणतात. ॥ ६३ ॥

गूढार्थदीपिका—कर्म हें कर्त्यावांचून उत्पन्नच होत नाही, म्हणून कर्त्यावांचून कर्म राहूं शकत नाही. तेव्हा या ओवीचा अर्थ असा आहे की आत्मस्वरूपाचे ठिकाणीं जे कर्म दिसतें, त्याचा कोणीच कर्ता दिसत नाही. आत्मा कधी कर्ता दिसत नाही. आत्मा कधी कर्ता होत नाही व करवितहि नाही, कारण कर्म करणाऱ्याला कर्ता म्हणतात व त्याच्या व्यापाराला कर्म म्हणतात. कर्ता हा चेतनच असला पाहिजे व जेव्हा देशकालवस्तु या तीन मर्यादेने तो मर्यादित असतो तेव्हाच तो कर्म करू शकतो. पण चैतन्यवस्तु ही अद्वैत, अमर्याद व घनदाट भरली आहे. तिच्या ठिकाणीं पोकळीच नाही; म्हणून ती क्रिया करूं शकत नाही व करवूं शकत नाही. जीवात्मा आपल्याला देशकालवस्तु या मर्यादेने मर्यादित मानित असला तरी खरोखर तोहि कर्म करीत नाही, पण व्यर्थच प्रकृतीच्या कर्माचें कर्तृत्व आपल्याकडे मानतो, असें भगवंतांनींच "**प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः। अहंकार विमूढात्मा कर्ताहमिति मन्यते**" (गी० अ० ३) या श्लोकाने सांगितले आहे; म्हणून जीवही कर्माचा कर्ता नाही.

प्रकृति जड असल्यामुळे कर्म करूं शकत नाही. जडाचे ठिकाणींहि कर्म करण्याची किंवा करविण्याची शक्ति नाही, कर्मरूप होण्याची शक्ति आहे, म्हणून तीहि कर्म करूं शकत नाही किंवा करवू शकत नाही. म्हणून कर्माचें अस्तित्व अज्ञानी पुरुष भ्रांतीने मानतो. ज्ञानदृष्टिने सच्चिदानंदब्रह्माहून भिन्न अशी कर्म नांवाची व्यापाररूप वस्तु नाही. सर्व कर्म नैष्कर्म ब्रह्मरूपच असून कर्म आहे, कर्म होतें व कर्म झालें ही केवळ भ्रांति होय असा अर्थ.

अर्थ—श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात जी स्थिति शब्दाने सांगता येत नाही, ती गुरुकृपेने माझ्याकडून शब्दानेच सांगितली गेली म्हणून माझ्या चित्तरूपी पात्रांत शांतरसाचे भरतें येऊन तें बाहेर ओसंडू लागले. (चित्ताची कर्ता

क्रिया कर्म या त्रिपुटीरहित निर्वासन स्थिति होणे याला शांतरस म्हणतात). ॥ ६४ ॥ ज्यांचा इंद्रियांचा नि:शेष संबंध सुटला, अशा पुरुषांनाच हें निरूपण ऐकण्याचा अधिकार आहे. त्यांनाच हें समजू शकेल. ॥ ६५ ॥ श्लोक संगति सुटली जाईल; हें विषयांतर राहूं देऊं व मूळ संवादाकडेच वळूं. ॥ ६६ ॥ अर्जुना जें मनाला आकलन होऊं शकत नाही, बुद्धीने विचारांची कितीहि घासघीस केली तरी जें तिला सांपडत नाही, तें आज तुझ्या थोर सुदैवाने माझ्याकडून सांगितलें गेलें. ॥ ६७ ॥ जें स्वभावत:च शब्दाचें पलीकडे आहे, तें जर शब्दाने सांगतां आलें, तर इतर निरर्थक कथा काय करायच्या ? ॥ ६८ ॥ श्रोत्यांची ही विशेष इच्छा जाणून श्रीनिवृत्तिदास श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, श्रीकृष्ण व अर्जुन या दोघांचा संवाद आतापर्यंत ऐकला. आता तसाच पुढेहि ऐका. ॥ ६९ ॥ मग भगवान श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना! तुला आता प्राप्त पुरुषांचें चिन्ह सांगतों, तें नीट चित्त देऊन ऐक. ॥ ७० ॥

युक्त: कर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम्। अयुक्त: कामकारेण फले सक्तो निबद्ध्यते॥ १२॥
सर्वकर्माणि मनसा सन्न्यस्यास्ते सुखं वशी। नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन्॥ १३॥
न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभु:। न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते॥ १४॥
नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभु:। अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तव:॥ १५॥
ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मन:। तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम्॥ १६॥

अर्थ—कर्मफळाची इच्छा सोडून ज्याचे चित्त सगुण भगवंताचे ठिकाणीं स्थिर झालें असा योगयुक्त पुरुष अढळ शांतीला प्राप्त होतो व ज्याचें चित्त परमेश्वराचे ठिकाणीं स्थिर झालें नाही, तो विषयसुखाच्या वासनेमुळे कर्मफळाची इच्छा करितो व संसारांत पडतो. ॥ १२ ॥ सर्व कर्माचा मनाने संन्यास करून व इंद्रियें आपल्या स्वाधीन ठेवून विषयसुखाची इच्छा न करतां, मी कर्म करितों किंवा करवितों, असें न समजणारा संयमी पुरुष या नवद्वाराच्या देहामध्ये आनंदाने राहतो. ॥ १३ ॥ सृष्टिकर्त्या परमेश्वराने लोकांचीं कर्में लोकांचें कर्तृत्व किंवा कर्मफळ यांचा संबंध यांपैकी कांही उत्पन्न केलें नाही. कर्म, कर्तृत्व व कर्मफळसंयोग या सर्वरूपाने प्रकृतीच परिणाम पावते. ॥ १४ ॥ परमेश्वर कोणाचें पाप घेत नाही व पुण्यहि घेत नाही. प्राण्यांना आत्मस्वरूपाचें जें अज्ञान असतें, त्या अज्ञानाच्या भ्रांतीमुळे हें कर्म, हा मी कर्ता, त्याचें फळ व तें मी भोगतों अशा व्यर्थ भ्रांत कल्पना प्राणी करितात. ॥ १५ ॥ आत्मस्वरूपाच्या ज्ञानाने ज्यांचें अज्ञान नाहिसें झालें. त्यांचे ठिकाणी सूर्यासारखें प्रखर प्रगट झालेलें तें आत्मज्ञान त्यांना सर्व जग आत्मस्वरूप आहे असेंच दाखवितें. ॥ १६ ॥

तरी आत्मयोगें आथिला। जो कर्मफळाशीं विटला। तो घर रिघोनि वरिला। शांती जगीं॥ ७१॥
येरु कर्मबंधें किरीटी। अभिलाषाचिया गांठी। कळासला खुंटीं। फळभोगाच्या॥ ७२॥
जैसा फळाचिये हावें। ऐसें कर्म करी आघवें। मग न कीजेचि येणें भावें। उपेक्षी जो॥ ७३॥
तो जयाकडे वास पाहे। तेउती सुखाची सृष्टि होये। तो म्हणे तेथ राहे। महाबोधु॥ ७४॥
नवद्वारें देहीं। तो असतुचि परि नाहीं। करितुचि न करी कांहीं। फलत्यागी॥ ७५॥
जैसा कां सर्वेश्वरु। पाहिजे तंव निर्व्यापारु। परि तोचि रची विस्तारु। त्रिभुवनाचा॥ ७६॥
आणि कर्ता ऐसें म्हणिपे। तरी कवणें कर्मीं न शिंपे। जे हातुपावो न लिंपे। उदासवृत्तीचा॥ ७७॥
योगनिद्रा तरी न मोडे। अकर्तेपणा सळु न पडे। परी महाभूतांचे दळवाडें। उभारी भलें॥ ७८॥
जगाचां जीवीं आहे। परि कवणाचा कहीं नोहे। जगचि हें होय जाये। तो शुद्धीही नेणे॥ ७९॥
पापपुण्यें अशेषें। पासींचि असतु न देखे। आणि साक्षीही होऊं न ठके। येरी गोठी कायसी॥ ८०॥
पैं मूर्तीचेनि मेळें। तो मूर्तचि होऊनि खेळे। परि अमूर्तपण न मैळे। दादुलयाचें॥ ८१॥
तो सृजी पाळी संहारी। ऐसें बोलती जे चराचरीं। तें अज्ञान गा अवधारीं। पंडुकुमरा॥ ८२॥
तें अज्ञान जैं समूळ तुटे। तैं भ्रांतीचें मसैरें फिटे। मग अकर्तृत्व प्रगटे। ईश्वराचें॥ ८३॥
एथ ईश्वरु एकु अकर्ता। ऐसें मानलें जरी चित्ता। तरी तोचि मी हें स्वभावता। आदीचि आहे॥ ८४॥

ऐसेनि विवेकें उदो चित्तीं। तयासि भेदु कैंचा त्रिजगतीं। देखें आपुलिया प्रतीति। जगचि मुक्त॥ ८५ ॥
जैशी पूर्वदिशेच्या राउळीं। उदया येतांचि सूर्य दिवाळी। कीं येरींही दिशा तियेचि काळीं। काळिमा नाहीं॥ ८६ ॥

अर्थ—जो आत्मैक्याने संपन्न झाला व जो कर्माचें फळ जें विषयसुख, त्यालाहि विटला, त्यालाच या जगांत शांतीने त्याच्या घरीं येऊन त्याच्याशीं आपलें लग्न लावलें. ॥ ७१ ॥ बाकीचे जे आत्मैक्याने संपन्न नाहीत ते विषयवासनेच्या गांठीने कर्मफळाचें खुंटीवर लटकले राहतात. ॥ ७२ ॥ कर्मफळाचे आशेने कर्म करणारा ज्या तत्परतेने कर्म करितो, त्याच तत्परतेने कर्मफळाची आशा न करिता योगी कर्म करितो, पण मी कर्ता नाही या अनुभवाने तो त्या फळाची उपेक्षा करितो. ॥ ७३ ॥ असा योगी जिकडे दृष्टि देतो तेवढें आत्मसुखच त्याच्या प्रत्ययाला येतें. तो म्हणेल तेथे आत्मबोध प्रगट होतो. ॥ ७४ ॥ नवछिद्रांच्या या देहपुरांत, तो असून नसतो व फळत्याग केल्यामुळे कर्म करूनहि कांही करीत नाही. ॥ ७५ ॥ ज्याप्रमाणे परमात्मा अखंड कर्मरहितच आहे, पण तोच ब्रह्मांडाचीं उत्पत्ति, स्थिति, प्रलय करितो. ॥ ७६ ॥ आणि जर परमेश्वराला ब्रह्मांडाचा कर्ता म्हणावें तर, तो कोणत्याहि कर्माला स्पर्श करीत नाही; कारण उदासवृत्तीमुळे त्याचे हातापायाकडून कोणते कर्मच होत नाही. ॥ ७७ ॥ त्याची योगनिद्रा म्हणजे निर्विकल्प स्थिति तर यत्किंचित् भंग पावत नाही आणि अकर्तेपणा यत्किंचित् मोडत नाही. तरी पंचभूतांचा एवढा मोठा समुदाय उत्पन्न करितो. ॥ ७८ ॥ तो सर्व जगाच्या अंतर्यामि आहे, पण कधी कोणाचा होत नाही. जगच उत्पन्न होतें व नाश पावतें; पण त्याला त्याची शुद्धिहि नाही. ॥ ७९ ॥ पापपुण्यें, जवळ असून देखील तो जाणत नाही. त्या बाकीच्या गोष्टी तर असोत, पण तो त्यांचा साक्षी देखील होऊं इच्छित नाही. ॥ ८० ॥ नामरूपांच्या योगाने सगुण साकार देह घेऊन तो लीला करितो, पण त्या जगताच्या स्वामीचें निराकारपण भंगत नाही. ॥ ८१ ॥ परमेश्वर सृष्टि उत्पन्न करितो, तिचें पोषण करितो व तिचा संहारहि तोच करितो असें जें जगांत बोललें जातें, अर्जुना! तें सर्व लोकाचे अज्ञान होय. ॥ ८२ ॥ हें अज्ञान नि:शेष नाहिसें झालें असतां परमेश्वराच्या कर्तृत्वाची भ्रांति नाश पावते व मग ईश्वराचे ठिकाणीं कर्म व कर्तृत्व दोन्ही मुळीच नाही असें जाणलें जातें. ॥ ८३ ॥ मग ईश्वर अकर्ता आहे, म्हणून सृष्टि झालीच नाही ही गोष्ट चित्ताला पटली की, सृष्टि मुळीच नसल्यामुळे, मुळांत परमेश्वर व मी एकच आहोंत असा सहजच अनुभव येतो. ॥ ८४ ॥ असा जेव्हा विवेक चित्तांत प्रगट होतो, तेव्हा तिन्ही लोकांत त्याला आपल्याहून भिन्न वस्तुच दिसत नाही आणि त्या अनुभवाने, तो आपल्याप्रमाणे सर्व जीवांना उपाधिरहित म्हणजे मुक्त समजतो. ॥ ८५ ॥ ज्याप्रमाणे पूर्व दिशेच्या घरीं सूर्याचा उदय झाल्याबरोबर जिकडे तिकडे सूर्यप्रकाशाची दिवाळी होते किंवा पूर्वदिशेप्रमाणे इतर दिशांचे ठिकाणीं अंधार नाहिसा होऊन प्रकाश होतो. ॥ ८६ ॥

गूढार्थदीपिका—एका आत्मवस्तूवांचून, जीवदशा, कर्म व कर्तृत्व, कर्मफळ इत्यादि आपले ठिकाणीं व कर्मफलदातृत्व, सृष्टिउत्पत्त्यादि कर्म व त्याचें कर्तृत्व परमेश्वराचे ठिकाणीं जीवानेच आपल्या अज्ञानभ्रांतीने आरोपित केलें आहे. वस्तुत: यापैकी कांहीच नाही. केवळ एक सच्चिदानंदपरब्रह्मच आहे. असा परमेश्वराचा व आत्मज्ञानी पुरुषाचा एकच अनुभव असतो असा अर्थ.

तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः । गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥ १७ ॥
विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि। शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ॥ १८ ॥
इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः। निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥ १९ ॥

अर्थ—ज्यांनी बुद्धीने आत्मज्ञानाचाच निश्चय केला. मी ब्रह्म असेंच सर्वकाळ समजतात, ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणीं कर्मसमर्पणरूप कर्मयोगाने चित्त स्थिर झालें व सर्व कर्मांचा परमेश्वराचे ठिकाणीच संन्यास केला, असे पुरुष आत्मज्ञानाने संपूर्ण पापरहित होऊन पुन: जन्माला येत नाहीत. ॥ १७ ॥ विद्याविनयादि सद्‌गुणसंपन्न ब्राह्मणाचे ठिकाणीं व गाय, हत्ती, कुत्रें व चांडाळ या सर्वांचे ठिकाणीं ज्ञानी पुरुषाची समदृष्टिच असते. ॥ १८ ॥ ज्यांचें चित्त समतेला पावलें, त्यांनी येथे जीवंतपणीच हा संसार जिंकला असतो, कारण समता ही शुद्ध ब्रह्मच होय, म्हणून समचित्त झालेले पुरुष ब्रम्हस्वरूपाचे ठिकाणीच स्थिर असतात. ॥ १९ ॥

बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान। ब्रह्मरूप भावी आपणा आपण। ब्रह्मनिष्ठा राखे पूर्ण। तत्परायण अहर्निशीं॥ ८७ ॥
ऐसें व्यापक ज्ञान भलें। जयांचिया हृदयातें गिंवसित आलें। तयांचि समता दृष्टि बोलें। विशेषूं काई॥ ८८ ॥
एक आपणपेंचि पां जैसें। ते देखती विश्व तैसें। हें बोलणें कायसें। नवलु एथ॥ ८९ ॥
परी दैव जैसें कवतिकें। कहींचि दैन्य न देखे। कां विवेकु हा नोळखे। भ्रांतीतें जेवीं॥ ९० ॥
नातरी अंधकाराची वानी। जैसा सूर्यो न देखे स्वप्नीं। अमृत नायके कानीं। मृत्युकथा॥ ९१ ॥
हें असो संतापु कैसा। चंद्र न स्मरे जैसा। भूतीं भेदु नेणती तैसा। ज्ञानिये ते॥ ९२ ॥
मग हा मशकु हा गजु। कीं हा श्वपचु हा द्विजु। पैल इतरु हा आत्मजु। हें उरेल कें॥ ९३ ॥
ना तरी हे धेनु हें श्वान। एक गुरु एक हीन। हें असो कैचें स्वप्न। जागतया॥ ९४ ॥
एथ भेदु तरी कीं देखावा। जरी अहंभाव उरला होआवा। तो आधींचि नाहीं आघवा। आतां विषम काई॥ ९५ ॥
म्हणोनि सर्वत्र सदा सम। तें आपणचि अद्वय ब्रह्म। हें संपूर्ण जाणे वर्म। समदृष्टीचें॥ ९६ ॥
जिहीं विषयसंगु न सांडितां। इंद्रियांतें न दंडितां। परि भोगिली निःसंगता। कामेंविण॥ ९७ ॥
जिहीं लोकांचेनि आधारें। लौकिकेंचि व्यापारें। पण सांडिलें निदसुरें। लौकिकु हें॥ ९८ ॥
जैसा जनामाजि खेचरु। असतुचि जना नोहे गोचरु। तैसा शरीरीं परि संसारु। नोळखे तयांतें॥ ९९ ॥
हें असो पवनाचेनि मेळें। जैसें जळींचि जळ लोळे। तें आणिकें म्हणती वेगळें। कल्लोळ हे॥ १०० ॥
तैसें नाम रूप तयाचें। एऱ्हवीं ब्रह्मचि तो साचें। मन साम्या आलें जयाचें। सर्वत्र गा॥ १०१ ॥
ऐसेनि समदृष्टी जो होये। तया पुरुषा लक्षणही आहे। अर्जुना संक्षेपें सांगेन पाहें। अच्युत म्हणे॥ १०२ ॥

अर्थ—बुद्धीचा निश्चय होऊन आत्मज्ञान झाल्यामुळे, जे सर्वकाळ आपल्याला ब्रह्मस्वरूपच समजतात; ब्रह्माचे ठिकाणीं कर्म समर्पण करून चित्त स्थिर करतात व जे याप्रमाणे अखंड ब्रह्मपरायण होतात. ॥ ८७ ॥ असे व्यापक ज्ञान ज्यांना प्राप्त झालें, त्यांची समतादृष्टि, अर्जुना! काय विशेष शब्दाने वर्णन करायची? ॥ ८८ ॥ आपण जसें आपल्याला अनुभववितात, तसेंच ते सर्व विश्व पाहतात. असा हा अपूर्व प्रत्यय आहे. शब्दाने सांगतां येत नाही. ॥ ८९ ॥ ज्याप्रमाणे भाग्याला दारिद्र्य कधीच दृष्टीस पडत नाही किंवा विवेकाला भ्रांति कधी समोर दिसत नाही. ॥ ९० ॥ अथवा सूर्याला स्वप्नांत देखील अंधाराचा मासला पाहायला मिळत नाही किंवा अमृताला मृत्यूची गोष्टी ऐकण्याचा कधीं प्रसंग येत नाही. ॥ ९१ ॥ हें असूं दे, पण चंद्राला उकाड्याचें कधी ज्ञान होतें का? कधी होत नाही. त्याप्रमाणे त्या ज्ञानीं पुरुषांना भेद म्हणजे ब्रह्माहून ही भूतसृष्टि निराळी आहे किंवा भूतें परस्परांहून भिन्न आहेत असा भेद दिसत नाही. ॥ ९२ ॥ मग हा मशक, हा हत्ती, हा चांडाळ, हा ब्राह्मण असा किंवा हा माझा मुलगा व इतर परके असा भेदभाव उरेल काय? ॥ ९३ ॥ अथवा ही गाय, हा कुत्रा, हा श्रेष्ठ, हा कनिष्ठ हा भेद तरी कोठला राहणार? जागणाऱ्या मनुष्याला स्वप्न कसें दिसेल? ॥ ९४ ॥ जर कशाचा अहंकार उरला तरच भेदाचा प्रत्यय येतो. तो अहंकार तर पूर्वीच निःशेष नाहिसा झाला, मग विषमपणाचा प्रत्यय कोठून येणार? ॥ ९५ ॥ म्हणून ज्ञानी पुरुष सर्वत्र सर्वदा समबुद्धिच असतात. ते आपणच अद्वैत ब्रह्मस्वरूप होतात व हीच खरोखर समदृष्टीची गुह्य खूण आहे. ॥ ९६ ॥ ज्यांनी विषयाचा संग न सोडतां व इंद्रियांना बळजबरीने न आवरतां, विषयसुखाची निःशेष कामना सोडल्यामुळे निःसंगपणाचा अनुभव घेतला. ॥ ९७ ॥ जो लोकांत राहूनच लोक करतात तसे व्यापार करतांना दिसतो पण हें अज्ञान-भ्रांतिजन्य लोक व लौकिक व्यापार ज्यांनी मनांतून सोडले (किंवा जो विसरला). ॥ ९८ ॥ ज्याप्रमाणे आकाशांत संचार करणारे पिशाचादिक असून लोकांना दिसत नाहीत, त्याप्रमाणे शरीरादिकांच्या ठिकाणीं होणारा संसार तो मुळीच जाणत नसतो. ॥ ९९ ॥ हें असूं दे, वाऱ्याच्या योगाने पाणीच पाण्यावर लोळतें, पण दुसरे अज्ञानी लोक त्या पाण्याच्या लोळण्याला वेगळें समजून त्याला तरंग म्हणतात. ॥ १०० ॥ त्याप्रमाणे ज्याची सर्वत्र समदृष्टि झाली असा ज्ञानी पुरुष केवळ नामरूपाने निराळा दिसतो वस्तुतः तो परब्रह्मच असतो. ॥ १०१ ॥ देव म्हणतात, अर्जुना! जो पुरुष समदृष्टि झाला त्या पुरुषाला ज्या लक्षणावरून ओळखतां येतें तें लक्षण तुला संक्षेपाने सांगतों. ॥ १०२ ॥

गूढार्थदीपिका—वरील श्लोकांत व त्यावरील ओव्यांत जी समदृष्टि वर्णिली आहे ती समदृष्टि म्हणजे ब्रह्मदृष्टि होय. त्या समदृष्टीने एक सच्चिदानंद परब्रह्मच अनुभवाला येतें; म्हणजे वस्तुमात्र सच्चिदानंदब्रह्मस्वरूपच भासतात व दीन-श्रीमंत, जड-चेतन, मनुष्य-पशु, सुखी-दु:खी, दुष्ट-सुष्ट इत्यादि सर्व विषम भावांचा विसर पडतो. ब्राह्मण जातीचे व मांग जातीचे किंवा पक्वान्नें व विष्ठा यांचें ज्ञान होऊन त्यांना समान लेखणें असा समदृष्टीचा अर्थ नाही.

"भावाद्वैतं सदा कुर्यात् क्रियाद्वैतं न कर्हिचित्"॥ ८७॥ (शंकराचार्य तत्त्वोपदेश)

सर्व जगताचें कारण जी परब्रह्म वस्तु तीच सर्वत्र निरनिराळ्या नामरूपांत भरलेली आहे, असें परब्रह्माचें एक वस्तुत्व जाणणें यालाच आचार्यांनी भावाद्वैत-समदृष्टि किंवा अद्वैतदृष्टि म्हटलें आहे. भगवंतांनी गीतेंत "अविभक्तंच भूतेषु" या श्लोकांत निरनिराळ्या नामरूपांमुळे पृथक्-पृथक् भासणाऱ्या भावामध्ये किंवा वस्तूमध्ये एक अविनाशी परब्रह्म वस्तुच भरली आहे, असें पाहणें यालाच ज्ञान किंवा ज्ञानदृष्टि म्हटलें आहे.

या अद्वैत ज्ञानदृष्टींत किंवा समदृष्टींत व्यवहार होतच नाही. ज्ञान्यांचा व्यवहार, ही दृष्टि कायम राहून होत असला तरी, ज्ञान्यांची ही दृष्टि व्यवहार करीत नाही. ती परब्रह्माचे ठिकाणीं अभ्यासाने अखंड स्थिर झालेली असते आणि व्यवहारकालीं स्फुरणारा अहंकार हाच प्रारब्धानुसार व्यवहार करीत असतो. ज्ञानी व अज्ञानी या दोघांच्याहि ठिकाणीं दिसणारा व्यवहार अहंकारच करीत असतांना, अज्ञानी पुरुष अहंकाराचें कर्मकर्तृत्व आपल्यावर ओढून घेतो व ज्ञानी पुरुष समदृष्टीमुळे अहंकाराशीं संबंधच ठेवीत नाही व अहंकाराचें कर्मकर्तृत्व आपल्यावर ओढून घेत नाही, असा दोघांत फरक असतो.

साम्यदृष्टि किंवा अद्वैत ज्ञानदृष्टि प्राप्त होण्यापूर्वी ती प्राप्त होण्याकरिता, ज्ञानीपुरुष साधकदशेंत जें कर्मयोगाचें अनुष्ठान करितो, त्या अनुष्ठानाने तो भगवदाज्ञेच्या परतंत्र होत असल्यामुळे व त्याच्या अहंकारादि वृत्तीला भगवंताच्या आज्ञेच्या परतंत्र वागण्याचीच संवय असल्यामुळे, ज्ञान झाल्यावर किंवा समदृष्टि प्राप्त झाल्यावर, ज्ञानी पुरुषाला धर्ममर्यादा लागूं नसली तरी किंवा धर्ममर्यादेनुसार वागणें हें माझें कर्तृत्व आहे अशी कर्तव्यबुद्धि तो वागवूं शकत नसला तरी, ज्ञानी पुरुषाची अहंकारादि तत्त्वें भगवत्परायण होऊन धर्मरूप आज्ञेला अनुसरूनच वागत असतात किंवा व्यवहार करीत असतात. ते वाटेल तसे वागूं शकत नाहीत. कारण देहाहंकारामुळेच वाटेल तसें वागणें होऊं शकतें व तो अहंकार ज्ञान्याचे ठिकाणीं नसतो, असें "न च नियोगाभावात्सम्यग्दर्शिनो यथेष्टचेष्टाप्रसंग:। सर्वत्राभिमांनस्यैव प्रवर्तकत्वादभिमानाभावाच्च सम्यग्दर्शिन:" (ब्र० सू० २। ३। ४८ शां० भा०) या वचनानें भगवान आचार्यांनी सांगितलें आहे.

वरील शास्त्रास सोडून असलेल्या अद्वैतव्यवहाराचा किंवा समदृष्टीच्या व्यवहाराचा आचार्यादि ज्ञानी पुरुषांनी निषेधच केला आहे.

"बुध्द्याद्वैत स्वतत्वस्य यथेष्टाचरणं यदि: शुनां तत्वदृशां चैव को भेदोऽशुचि भक्षणे॥ ५५॥"

(पं० द० द्वैतविवेक)

"भेटलेया वाटेवरी। चोखी आणि माहारी। तेथ नातळे तियापरी। राहाटो जाणे॥ ४७९॥" (ज्ञाने० अ० १३)

"ना ना चांडाळ मंदिराशी। अवचटें आलिया संन्यासी। मग लाज होय जैसी। उत्तमा तया॥ १७६॥" (ज्ञाने० अ० १६)

"सांगें शूद्रघरीं आघवीं। पक्वान्नें आहाति बरवीं। तीं द्विजें केंवीं सेवावीं। दुर्बळु जरी जाहला॥ २२१॥"

(ज्ञाने० अ० ३)

गुरुमार्गामुळे भ्रष्ट सर्वकाळ। म्हणती यातीकुळ नाही ब्रह्मीं॥ १॥
पवित्राला म्हणती नको हा कंटक। मानिती आत्मिक अनामिका॥ २॥
× × × ×
नसता करूनि होम खाती एके ठायीं। म्हणती पाप नाहीं मोक्ष येणें॥ ५॥
× × ×

नाहीं शास्त्राधार पात्रापात्र नेणें। उपदेशून घेणें द्रव्य कांहीं॥ ७॥
तुका म्हणे ऐसे गुरुशिष्य पूर्ण। विठोबाची आण नरका जाती॥ ८॥

(तु० गा० सरकारी प्रत अ० २९७३)

समदृष्टि नोहे मांगासवें खाणें। यथेच्छ सेंवणें वेश्येलागीं॥ १॥
समदृष्टीसाठीं देह व्हावा तृण। क्षणोक्षणीं प्राण कासावीस॥ २॥
जोडा आणि तोंड एकाचि चर्माचें। संघट्टन त्याचें करूं नये॥ ३॥
अन्न आणि विष्ठा एकाचि धान्याची। साम्यता दोहोंची म्हणूं नये॥ ४॥
देह प्राण मन बुद्धि ह्या उपाधि। सोडिलिया शुद्धि समता ये॥ ५॥
ज्ञानेश्वरस्वामी न होतां कृपाळ। वटवट वेळ वृथा सारी॥ ६॥

गुलाबराव महाराज—अभंग गाथा (१२६२)

कोण्याहि प्राचीन अनुभवी पुरुषाचा प्रारब्धानुसार होणारा व्यवहार, धर्माला सोडून झालेला दिसून येत नाही धर्माला सोडून होणारें आचरण लोकसंग्रहकारकहि होत नाही. उलट लोकांचा अध:पात करणारें होतें; कारण लोकसंग्रह म्हणजे लोकांना केवळ आपल्या मताचे अनुयायी करणे नव्हे तर आपण धर्मांप्रमाणे वागून लोकांनाहि धर्मपरायण करणें होय. हाच अर्थ भगवंतांनी "लोकसंग्रहमेवापि" या श्लोकांत व्यक्त केला आहे. आत्मस्वरूप झालेल्या ज्ञान्याच्या समदृष्टीला पृथक्‌पृथक् व विषम पदार्थांच्या अस्तित्वाचें ज्ञानच होत नाही असा भाव.

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाऽप्रियम्। स्थिरबुद्धिरसम्मूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थित:॥ २०॥
बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम्। स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षयमश्नुते॥ २१॥

अर्थ—प्रिय वस्तु प्राप्त झाली असतां ज्याला आनंद होत नाही व अप्रिय वस्तु प्राप्त झाली असतां ज्याला उद्वेग वाटत नाही अशी ज्यांची स्थिति झाली तोच ब्रह्मज्ञानी होय. ज्याची बुद्धि आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर झाली, त्याला कधी मोह उत्पन्न होत नाही. तो ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर झाला.॥ २०॥ बाह्य विषयसुखांत ज्याचें चित्ताला आनंद वाटत नाही, ज्याला आत्म्याच्या ठिकाणचे सुख प्राप्त होते, तो पुरुष ब्रह्माशीं ऐक्य पावून, त्या ऐक्याने अक्षय सुख भोगतो.॥ २१॥

तरी मृगजळाचेनि पूरें। जैसें न लोटिजे कां गिरिवरें। तैसा शुभाशुभीं न विकरे। पातलिया जो॥ १०३॥
तोचि तो निरुता। समदृष्टि तत्त्वता। हरि म्हणे पंडुसुता। तोचि ब्रह्म॥ १०४॥
जया आपणपें सांडूनि कहीं। इंद्रियग्रामावरी येणें नाहीं। तो विषय न सेवी हें काई। विचित्र येथ॥ १०५॥
सहजें स्वसुखाचेनि अपारें। सुरवाडले नि अंतरें। रचिला म्हणऊनि बाहिरें। पाऊल न घाली॥ १०६॥
सांगें कुमुददळाचेनि ताटें। जो जेविला चंद्रकिरणें चोखटें। तो चकोरु काई वाळुवंटें। चुंबितु आहे॥ १०७॥
तैसें आत्मसुख उपाइलें। जयासि आपणपांचि फावलें। तया विषय सहज सांडवले। म्हणो काई॥ १०८॥
एऱ्हवीं तरी कौतुकें। विचारूनि पाहें पां निकें। या विषयांचेनि सुखे। झकवती कवण॥ १०९॥

अर्थ—ज्याप्रमाणे मृगजळाच्या पूराने पर्वत वाहून जात नाही, त्याप्रमाणे प्रिय अप्रिय कांही प्राप्त झालें तरी ज्याच्या मनांत हर्षशोकादि विकार उठत नाहीत.॥ १०३॥ अर्जुना! तोच खरा समदृष्टीचा पुरुष होय व तोच ब्रह्मस्वरूप झाला असें जाण.॥ १०४॥ जो आत्मस्वरूप सोडून कधी इंद्रियांवर येत नाही, तो विषयाचें सेवन करीत नाही यांत कांही आश्चर्य नाही.॥ १०५॥ आत्म्याचें अमर्याद सुखाने त्याचें अंत:करण भरून जातें, म्हणून तें अंत:करण, बाहेर पाय ठेवित नाही.॥ १०६॥ अर्जुना! सांग बरें, जो चकोर पक्षी चंद्रविकासी कमळाच्या दळाचें ताट करून चंद्रकिरणांतील अमृतकणाचें भोजन करीतो तो वाळवंटांतील वाळूचे कण सेवन करील काय?॥ १०७॥ त्याप्रमाणे अमर्याद जें आत्मसुख ते ज्यांना आपल्या ठिकाणीच प्राप्त झालें, त्यांना विषयाचा विसर पडतो हें काय सांगायला पाहीजे?॥ १०८॥ साधारणत: या विषयसुखाने कोण फसले जातात. याचा सहज कौतुकाने नीट विचार करून पहा.॥ १०९॥

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते। आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः॥ २२॥

अर्थ—बाह्य विषयाच्या संयोगाने होणारे भोग, उत्पन्न होणारे व नाश पावणारे असल्यामुळे, दुःख देणारेच असतात; म्हणून शहाणा पुरुष त्यांत रममाण होत नसतो. ॥ २२ ॥

जिहीं आपणपें नाहीं देखिलें। तेचि इहीं इंद्रियार्थीं रंजले। जैसें रंक कां आळुकैलें। तुषांतें सेवी॥ ११०॥
नातरी मृगें तृषापीडितें। संभ्रमें विसरोनि जळातें। मग तोयबुद्धी बरडीतें। ठाकूनि येती॥ १११॥
तैसें आपणपें नाहीं दिठे। जयातें स्वसुखाचे सदा खरांटे। तयासीचि विषय हे गोमटे। आवडती॥ ११२॥
एऱ्हवीं विषयीं काइ सुख आहे। हें बोलणेंचि सारिखें नोहे। तरी विद्युत्स्फुरणें कां न पाहे। जगामाजीं॥ ११३॥
सांगें वातवर्षआतपु धरे। ऐसें अभ्रच्छायाचि जरी सरे। तरी त्रिमाळिकें धवळारें। करावीं कां॥ ११४॥
म्हणोनि विषयसुख जें बोलिजे। तें नेणतां गा वायां जल्पिजे। जैसें महूर कां म्हणिजे। विषकंदातें॥ ११५॥
नातरी भौमा नाम मंगळु। रोहिणीतें म्हणती जळु। तैसा सुखप्रवादु बरळु। विषयिक हा॥ ११६॥
हे असो आघवी बोली। सांग पां सर्पफणीची साउली। ते शीतल होईल केतुली। मूषकासी॥ ११७॥
जैसा आमिषकवळु पांडवा। मीनु न सेवी तंवचि बरवा। तैसा विषयसंगु आघवा। निभ्रांत जाणें॥ ११८॥
हे विरक्तांचिये दिठी। जैं न्याहाळिजे किरीटी। तैं पांडुरोगाचिये पुष्टी। सारिखें दिसे॥ ११९॥
म्हणोनि विषयभोगीं जें सुख। तें साद्यंतचि जाण दुःख। परि काय करिती मूर्ख। न सेवितां न सरे॥ १२०॥
तें अंतर नेणती बापुडे। म्हणोनि अगत्य सेवणें घडे। सांगें पूयपंकींचे किडे। काय चिळसी घेती॥ १२१॥
तयां दुःखियां दुःखचि जिव्हार। ते विषयकर्दमींचे दर्दुर। ते भोगजळातें जलचर। सांडिती केवीं॥ १२२॥
आणि दुःखयोनि जिया आहाती। तिया निरर्थका तरी नव्हती। जरी विषयांवरी विरक्ती। धरिती जीव॥ १२३॥
नातरी गर्भवासादि संकट। कां जन्ममरणींचे कष्ट। हे विसांवे वीण वाट। वाहावी कवणें॥ १२४॥
जरी विषयीं विषयो सांडिजेल। तरी महादोषी कें वसिजेल। आणि संसारु हा शब्दु नव्हेल। लटिका जगीं॥ १२५ ॥
म्हणोनि अविद्याजात नाथिलें। तें तिहींचि साच दाविलें। जिहीं सुखबुद्धी घेतलें। विषयदुःख॥ १२६॥
या कारणें गा सुभटा। हा विचारितां विषय वोखटा। तूं झणें कहीं या वाटा। विसरोनि जाशी॥ १२७॥
पैं यातें विरक्त पुरुष। त्यजिती कां जैसें विष। निराशा तयां दुःख। दाविलें नावडे॥ १२८॥

अर्थ—ज्याप्रमाणे भुकेने व्याकुळ होणारा दरिद्री पुरुष धान्याचा कोंडाच आनंदाने खातो, त्याप्रमाणे ज्यांनी आपलें स्वरूप जाणलें नाही, तेच पुरुष या विषयांच्या सुखांत आनंद मानतात. ॥ ११० ॥ किंवा तहानेने व्याकुळ झालेले हरिण पाणी सोडून भ्रमाने बरड जमिनीवर भासणाऱ्या मृगजळालाच पाणी समजून तेथे धांवून येतात. ॥ १११ ॥ त्याप्रमाणे ज्यांनी आपल्या आत्मस्वरूपाला जाणलें नाही, म्हणून ज्यांना आत्मसुखाचा सदाच दुष्काळ आहे, त्यांनाच हे विषय सुंदर वाटतात व आवडतात. ॥ ११२ ॥ खरें पाहूं जातां विषयांत सुख आहे हें बोलणेंच योग्य नाही. मग जगामध्ये लोकांनी विजेच्या चमकण्याने क्षणभर होणाऱ्या प्रकाशानेच व्यवहार कां करूं नये? ॥ ११३ ॥ सांग बरें, अर्जुना! ऊन, वायु, पाऊस, यांच्यापासून आपलें संरक्षण होण्याकरिता अभ्रामुळे पडलेली छाया जर समर्थ झाली तर लोकांनी तीन मजली घरें कशाला बांधावीं? ॥ ११४ ॥ ज्याप्रमाणे बचनागाच्या कंदाला मधुर असा नुसता शब्दच लावावा त्याप्रमाणे विषयांत सुख आहे हें बोलणें देखील न जाणतां व्यर्थ बडबड करणें होय. ॥ ११५ ॥ किंवा मंगळ या भयंकर उग्र ग्रहाला आपण मंगळ म्हणतो किंवा मृगजळाला जळ म्हणतों, त्याप्रमाणें विषयापासून होणाऱ्या सुखाला सुख म्हणण्याचा जो लोकांत प्रघात पडला. तो नुसता निरर्थक शब्दमात्रच आहे. ॥ ११६ ॥ अर्जुना! असो हें बोलणें, पण सांग बरें, सर्पाने आपल्या फणांनी उंदरावर केलेली सावली उंदराला कितीशी सुखकारक होईल? ॥ ११७ ॥ ज्याप्रमाणे आकडीला लागलेला मांसाचा तुकडा जोपर्यंत मासा गिळत नाही तोपर्यंत तो सुखी असतो, त्याप्रमाणेच संपूर्ण विषयांचा संबंध आहे, असे निःसंशय जाण. ॥ ११८ ॥ विरक्त पुरुषाचे दृष्टीने या विषयसुखाकडे पाहिलें असतां हें विषयसुख पांडुरोगांत होणाऱ्या अंगपुष्टीसारखेंच वाटते. ॥ ११९ ॥ म्हणून

विषयभोगांत जें सुख आहे ते सुख नसून संपूर्ण सुरवातीपासून तर शेवटपर्यंत दु:खच आहे, पण मूर्खांना तें विषयसुख भोगल्यावांचून राहवत नाही. ॥ १२० ॥ ते मूर्ख अविचारी लोक आत्मसुखांत व विषयसुखांत काय फरक आहे हें जाणत नाहीत; म्हणून विषयसुखच त्यांना भोगावेसे वाटतें. अर्जुना! सांग, पूवाच्या चिखलांतील किड्यांना पूवाची किळस येते का? ॥ १२१ ॥ त्याप्रमाणे नेहमी दु:ख भोगणाऱ्यांना दु:खच अत्यंत प्रिय होतें. ते विषयरूप चिखल खाणाऱ्या व चिखलांतच राहणाऱ्या बेडक्या होत. किंवा ते विषयभोगरूपी जळांत नेहमी राहाणारे जळचर प्राणीच होत. मग ते विषय कसें सोडतील? ॥ १२२ ॥ आणि हे मूर्ख अविचारी लोक जर विषयाचा कंटाळा करतील तर ज्या योनींत अत्यंत दु:ख आहे अशा योनी (त्या योनींत जाणारे कोणीच राहणार नाहीत तर) व्यर्थ होणार नाहीत का? ॥ १२३ ॥ किंवा ज्या संसार वाटेने गर्भवासाचे जन्ममरणाचें घोर दु:ख भोगावें लागतें ती संसारवाट कांही एक विश्रांती न घेता सारखी मग कोणी चालायची? ॥ १२४ ॥ जर विषयासक्त लोकांनी विषयसुखाचा त्याग करावा तर महादोषांनी कोठे राहावें? आणि संसार हा शब्दच निरर्थक होणार नाही का? ॥ १२५ ॥ म्हणून ज्यांनी विषयाच्या दु:खाचे ठिकाणीं सुखबुद्धि केली त्यांनीच हां संसाररूपी संपूर्ण खोटा अविद्याभ्रम खरा करून दाखविला. ॥ १२६ ॥ यास्तव हे उत्तम् योद्ध्या, अर्जुना विचार करून पाहतां विषय दु:खदायक आहेत. तूं कदाचित् चुकून या विषयाचे वाटेने जाशील? (म्हणजे जाऊं नकोस). ॥ १२७ ॥ पण विरक्त पुरुष या विषयसुखाच्या मार्गाचा हें विष आहे असें समजून त्याग करितात. ज्यांची विषयसुखाची इच्छा नि:शेष नाहिशी झाली अशा निरिच्छ पुरुषांना, विषयाचें सुख हें दु:खच वाटतें; म्हणून असें सुखरूप दु:ख आवडत नाही. ॥ १२८ ॥

शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् । कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥ २३ ॥
योऽन्तःसुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव यः । स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ २४ ॥
लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः । छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥ २५ ॥

अर्थ—हें शरीर पडण्यापूर्वीच जो मनातील कामक्रोधाचे वेग सहन करूं शकतो, त्याचीच बुद्धि सम झाली व तोच सुखी होय. ॥ २३ ॥ जो अंत:करणांत सुखी झाला व आत्मस्वरूपींच रममाण होतो व आंतील आत्मज्ञानज्योति प्राप्त झाली असा तो योगी ब्रह्मभूत होऊन शेवटी ब्रह्मांत मिळतो. ॥ २४ ॥ निष्पाप झालेले, ज्यांचा द्वैतप्रत्यय नि:शेष नाहिंसा झाला, ज्यांनी अंत:करण स्वाधीन केलें व सर्व भूतांचें कल्याण इच्छिणारे जे ऋषि त्यांना शेवटची ब्रह्मस्थिति प्राप्त होते. ॥ २५ ॥

ज्ञानियांचां हन ठायीं। यांची मातुही कीर नाहीं। देहीं देहभावो जिहीं। स्ववश केले ॥ १२९ ॥
'जयांतें बाह्याची भाष। नेणिजेचि नि:शेष। अंतरीं सुख। एक आथि ॥ १३० ॥
परी तें वेगळेपणें भोगिजे। जैमें पक्षियें फळ चुंबिजे। तैसें नव्हे तेथ विसरिजे। भोगितेपणही ॥ १३१ ॥
भोगीं अवस्था एकी उठी। ते अहंकाराचा अचळु लोटी। मग सुखेंसि घे आंठी। गाढेपणें ॥ १३२ ॥
तिये आलिंगनमेळीं। होय आपेंआप कवळी। तेथ जळ जैसें जळीं। वेगळें न दिसे ॥ १३३ ॥
कां आकाशीं वायु हारपे। तेथ दोन्ही हे भाष लोपे। तैसें सुखचि उरे स्वरूपें। सुरतीं तिये ॥ १३४ ॥
ऐशी द्वैताची भाष जाय। मग म्हणों जरी एकचि होय। तरी तेथ साक्षी कवणु आहे। जाणतें जें ॥ १३५ ॥
म्हणोनि असो हें आघवें। एथ न बोलणें काय बोलावें। ते खुणचि पावेल स्वभावें। आत्माराम ॥ १३६ ॥
जे ऐसेनि सुखें मातले। आपणपांचि आपण गुंतले। ते मी जाणें निखळ वोतले। सामरस्याचे ॥ १३७ ॥
ते आनंदाचे अनुकार। सुखाचे अंकुर। कीं महाबोधें विहार। केले जैसे ॥ १३८ ॥
ते विवेकाचे गांव। कीं परब्रह्मींचे स्वभाव। नातरी अळंकारले अवयव। ब्रह्मविद्येचे ॥ १३९ ॥
ते सत्त्वाचे सात्त्विक। कीं चैतन्याचे आंगिक। हें बहु असो एकैक। वानिसी काई ॥ १४० ॥
तूं संतस्तवनीं रतसी। तरी कथेची से न करिसी। कीं निराळीं बोल देखसी। सनागर ॥ १४१ ॥
परि तो रसातिशयो मुकुळीं। मग ग्रंथार्थदीपु उजळीं। करीं साधुहृदयराउळीं। मंगळ उखा ॥ १४२ ॥

ऐसा गुरूचा उवायिला। निवृत्तिदासासी पातला। मग तो म्हणे श्रीकृष्ण बोलिला। तेंचि आइका॥ १४३॥
अर्जुना अनंत सुखाच्या डोहीं। एकसरा तळुचि घेतला जिहीं। मग स्थिराऊनि तेही। तेंचि जाहले॥ १४४॥
अथवा आत्मप्रकाशें चोखें। जो आपणपेंचि विश्व देखे। तो देहेंचि परब्रह्म सुखें। मानूं येईल॥ १४५॥
जें साचोकारें परम। ना तें अक्षर निःसीम। जिये गांवींचे निष्काम। अधिकारिये॥ १४६॥
जें महर्षी वाढलें। विरक्तां भागा फिटलें। जें निःसंशया पिकलें। निरंतर॥ १४७॥

अर्थ—ज्ञानी पुरुषांच्या ठिकाणीं या विषयांची निश्चयाने मुळीच गोष्ट देखील नसते. (त्यांना विषय भासत नाहीत असा अर्थ) त्यांनी देहांत असूनच देहाचे विकार स्वाधीन करुन घेतलेले असतात.॥ १२९॥ ज्यांना बाह्य पदार्थाचें मुळी ज्ञानच नसतें व एक आत्मसुखच अंतःकरणात भरलेंले असतें.॥ १३०॥ ज्याप्रमाणे पक्षी फळाहून वेगळा राहून फळाचा, स्वाद घेतो, त्याप्रमाणे आपल्याला वेगळें ठेवून ज्ञानी पुरुष तें सुख भोगत नाही तर, तेथे भोक्तेपणहि विसरलें जातें विषयसुखाच्या भोगांत भोक्ता, भोग्य, भोग अशी जशी त्रिपुटी राहते, तशी आत्मसुखभोगांत राहत नाही.॥ १३१॥ या आत्मसुखाच्या भोगांत अशी कांही सुखाची स्थिति असते की तींत भोग झाला असतां अहंकाराचा पडदाच राहत नाही आणि चित्त आत्मसुखाशीं दृढ मिठी मारतें म्हणजे चित्त केवळ सुखस्वरूप होते.॥ १३२॥ चित्त व आत्मसुख यांच्या या आलिंगनांत जाणीवरहित सहज ऐक्य होतें व जळांत जळ मिळालें असतां तें मग वेगळें दिसत नाही, त्याप्रमाणे ज्ञानी व आत्मा त्या सुखांत वेगळे राहत नाहीत.॥ १३३॥ किंवा आकाशांत वायु लोपला गेला म्हणजे मग आकाश व वायु अशी दोनपणाची भाषाच राहत नाही. तसेंच ज्ञानी व आत्मा यांचें ऐक्य झालें की त्या ऐक्यांत ज्ञानी व आत्मा हे दोन शब्द जाऊन एक सुखच उरतें म्हणजे शब्दमात्र देखील दोनपणे राहत नाही.॥ १३४॥ अशी द्वैताची भाषा नाहिशी होते व मग तेथे दोघे एक झाले असे म्हणावें तर त्या ऐक्याची जाणीव ठेवणारा साक्षी तरी कोण राहतो?॥ १३५॥

गूढार्थदीपिका—आत्मसुखांत जाणीवच राहत नाही किंवा जाणीव ठेवून आत्मसुख किंवा ब्रह्मसुख मिळत नाही.

अर्थ—म्हणून अर्जुना! हें सर्व असूं दे. येथे जी स्थिति असते ती बोलतांच येत नाही मग कोणी काय बोलावें? आत्माराम झालेले पुरुष स्वभावतःच ह्या अनुभवाच्या खुणा जाणतात.॥ १३६॥ जे पुरुष अशा जाणीवरहित आत्मसुखाने मत्त झाले व केवळ आपणच होऊन राहिले ते पुरुष समरसतेच्या ओतलेंल्या मूर्ति आहेत असे मी म्हणतो.॥ १३७॥ ते ब्रह्मानंदाला आलेले आकार होत. ब्रह्मसुखाचे अंकुर होत किंवा पूर्ण आत्मज्ञानाने केलेली क्रीडा होय.॥ १३८॥ ते विवेकाचे मूळ गांव होय किंवा त्यांची मूर्ति म्हणजे परब्रह्माचा स्वभावच म्हणतां येतो. अथवा त्यांना ब्रह्मविद्येचे अलंकाराने भूषित केलेले अवयव म्हणतां येईल.॥ १३९॥ ते ज्ञानी पुरुष सत्वाचेंहि शुद्ध सत्व होत किंवा ते चैतन्याचे अवयव होत. हें वर्णन ऐकून श्रीगुरु निवृत्तिनाथ म्हणतात, हें असूं दे. हें एकेक किती आता वर्णन करशील?॥ १४०॥ तूं संतांचें स्तवन करतांना त्यांत इतका रंगून जातोस की तूं श्रीकृष्णार्जुनांचा संवाद सांगत आहेस हेंहि तुला भान राहत नाही आणि निर्गुणस्वरूपाचेंहि सुंदर गोड शब्दांनी वर्णन करतोस.॥ १४१॥ पण आता रसाचा पूर आवरता घे व ग्रंथाचा अर्थरूप दिवा लाव आणि श्रवण करणाऱ्या संतांच्या हृदयमंदिरांत आत्मकल्याणाचा प्रातःकाळ होऊं दे.॥ १४२॥ याप्रमाणे श्रीगुरु निवृत्तिनाथांचा ऐकण्याचा उल्हास पाहून श्रीनिवृत्तिनाथांचे दास श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनाहि तसाच उल्हास प्राप्त झाला. मग श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणाले, की आता श्रीकृष्ण भगवान काय बोलले तेंच ऐका.॥ १४३॥ अर्जुना! अत्यंत अमर्याद व खोल आत्मसुखाच्या डोहांत ज्यांनी एकदम एकसारखा तळच गांठला व तेथेच कायमचे स्थिर झाले व तद्रूप बनले॥ १४४॥ किंवा जो स्पष्ट आत्मप्रकाशाने सर्व विश्वच आत्मस्वरूप पाहतो, तो देहासहच

सुखाने परब्रह्मरूप झाला असें मानितां येईल. ॥ १४५ ॥ जी परब्रह्मस्थिति अत्यंत सत्यरूप आहे किंवा जी निःसीम अविनाश आहे, ज्यांच्या मनांतून विषयसुखाची कामना निःशेष निघून गेली असे पुरुषच ज्या ब्रह्मस्थितीचे अधिकारी असतात. ॥ १४६ ॥ जी ब्रह्मस्थिति इंद्रियादिकांना जिंकणाऱ्या महर्षीपुढे वाढली जाते, अत्यंत विरक्त झालेल्या पुरुषांच्याच वांट्याला येते आणि अखंड संदेहरहित झालेल्यांच्या ठिकाणी जिचें मुबलक पीक येतें. ॥ १४७ ॥

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् । अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥ २६ ॥
स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः । प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ॥ २७ ॥
यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः । विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ॥ २८ ॥

अर्थ—ज्यांनी अंतःकरणाचा निग्रह केला आहे, कामक्रोधादि विकाररहित जे झाले आहेत आणि आत्मस्वरूप ज्यांनी जाणलें आहे, अशा ज्ञानी पुरुषाला सर्वत्र मुक्तस्थितिच प्रत्ययाला येते. किंवा सर्व आंत बाहेर ब्रह्मच दिसतें. ॥ २६ ॥ देहाच्या बाहेर असणारे जे शब्दादि विषय यांना बाहेरच ठेवून म्हणजे त्यांचें चिंतन न करतां (विषय चिंतनाने विषय मनांत शिरतात म्हणून) दोन भ्रुकुटीच्यामध्ये दृष्टि ठेवून, नाकांतून वाहणारे प्राण व अपान यांना सम करून. ॥ २७ ॥ ज्यांनी इंद्रियें, मन व बुद्धि यांचा निरोध केला व जो मोक्षपरायण झाला व विषयवासना भय, क्रोध या विरहित झाला असा मुनि सदा मुक्तच असतो. ॥ २८ ॥

जिहीं विषयापासोनि हिरतलें । चित्त आपुलें आपण जिंतिलें । ते निश्चित जेथ सुतले । चेतीचिना ॥ १४८ ॥
तें परब्रह्म निर्वाण । जें आत्मविदांचें कारण । तेंचि ते पुरुष जाण । पंडुकुमरा ॥ १४९ ॥
ते ऐसे कैसेनि जहाले । जे देहींचि ब्रह्मत्वा आले । हें ही पुससी तरी भलें । संक्षेपें सांगों ॥ १५० ॥
तरी वैराग्याचेनि आधारें । जिहीं विषय दवडूनि बाहिरें । शरीरीं एकंदरें । केलें मन ॥ १५१ ॥
सहजें तिहीं संधी भेटी । जेथ भ्रूपल्लवां पडे गांठी । तेथ पाठिमोरी दिठी । पारुखोनियां ॥ १५२ ॥
सांडूनि दक्षिण वाम । प्राणापानसम । चित्तेंसीं व्योम- । गामिये करिती ॥ १५३ ॥
तेथ जैसीं रथ्योदकें सकळें । घेऊनि गंगा समुद्रीं मिळे । मग एकेक वेगळें । निवडूं नये ॥ १५४ ॥
तैसी वासनांतराची विवंचना । मग आपैसी पारुखे अर्जुना । जे वेळीं गगनीं लयो मना । पवनें कीजे ॥ १५५ ॥
जेथ हें संसारचित्र उमटे । तो मनोरूपु पटु फाटे । जैसें सरोवर आटे । मग प्रतिभा नाहीं ॥ १५६ ॥
तैसें मनपण मुदल जाये । मग अहंभावादिक कें आहे । म्हणोनि शरीरेंचि ब्रह्म होये । अनुभवी तो ॥ १५७ ॥

अर्थ—ज्यांनी आपलें चित्त विषयांपासून हिरावून घेतलें व अशा रीतीने आपणच आपल्या चित्ताला जिंकलें, ते पुरुष, जेथे निजलें असतां पुनः जागे होत नाहीत; म्हणजे ज्यांचे ठिकाणीं पुनः देहबुद्धि उत्पन्न होंत नाही. ॥ १४८ ॥ तें ब्रह्मच शेवटली स्थिति आहे. तें जाणूनच ब्रह्मविद् होत असतात; म्हणून ते पुरुषहि ब्रह्मच होतात. ॥ १४९ ॥ ते पुरुष देहासकट ब्रह्मरूप कसे झाले असें जर विचारशील तर संक्षेपाने सांगतो ऐक. ॥ १५० ॥ विषयांविषयीच्या वैराग्याने ज्यांनी विषयांचे चिंतन करणें सोडून देऊन विषयांना मनांतून बाहेर घालवून दिलें व संपूर्ण मनच केलें. ॥ १५१ ॥

गूढार्थदीपिका—बाहेरच्या विषयांचें सेवन करण्याकरिता मनच इंद्रियरूप होते. बाहेरच्या विषयांचें सेवन करण्याचा व्यापार बंद पडला की सर्व इंद्रियें मनरूप होऊन राहतात व मग एकंदर सर्व एक मनच राहतें.

अर्थ—मग दोन भ्रुकुटींची जेथे गांठ पडते व इडापिंगळा व सुषुम्ना ह्या ज्या संधीचे ठिकाणीं एकवटतात, त्या भ्रुकुटींच्या मध्यांत दृष्टि अंतर्मुख करून, डावी नाकपुडी उजवी नाकपुडीचे हे मार्ग सोडून, प्राण अपान यांना एक करून चित्ताला आकाशांत मिळवतात किंवा आकाशरूप करीतात. ॥ १५२-१५३ ॥ मग ज्याप्रमाणें रस्त्यावरील

सर्व पाणी घेऊन गंगा समुद्रांत मिळाली असतां मग पाणी अलग अलग निवडलें जात नाही. ॥ १५४ ॥ त्याप्रमाणे ज्या वेळीं प्राणायामाने मनाचा आकाशांत लय केला जातो, त्यावेळी सर्व प्रकारच्या वासना आपोआप नाहिशा होतात. ॥ १५५ ॥ ज्या मनोरूप वस्त्रावर हें जगाचें चित्र भासतें तें मनोरूप वस्त्र फाटलें जातें. मग ज्याप्रमाणे सरोवरांतील पाणी आटलें म्हणजे त्यांतील प्रतिबिंब नाहिसें होते. ॥ १५६ ॥ त्याप्रमाणे सर्व जगाच्या भासाला कारण असणारें मुख्य मनच नाहिसें झाल्यावर अहंभावादिक तत्वें कोठून भासणार? म्हणून अशा रीतीने तो आत्मानुभवी पुरुष शरीरानेच ब्रह्म होतो. ॥ १५७ ॥

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम्। सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति ॥ २९ ॥

अर्थ—यज्ञ तप या कर्माचा भोक्ता, सर्व लोकांचा शास्ता सर्व जीवांचा अहेतुक कल्याणकर्ता असा जो मी, त्या मला जाणून पुरुष परम शांतीला प्राप्त होतो. ॥ २९ ॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
कर्मसंन्यासयोगो नाम पञ्चमोऽध्याय: ॥ ५ ॥

आम्ही मागां हन सांगितलें। जे देहींचि ब्रह्मत्व पावले। ते येणें मार्गे आले। म्हणऊनियां ॥ १५८ ॥
आणि यमनियमांचे डोंगर। अभ्यासाचे सागर। क्रमोनि हे पार। पातले ते ॥ १५९ ॥
तिहीं आपणपें करूनि निर्लेप। प्रपंचाचें घेतलें माप। मग साचाचेंचि रूप। होऊनि ठेले ॥ १६० ॥
ऐसा योगयुक्तीचा उद्देशु। जेथ बोलिला हृषीकेशु। तेथ अर्जुनु सुदंशु। म्हणोनि चमत्कारला ॥ १६१ ॥
तें देखिलिया कृष्णें जाणितलें। मग हांसोनि पार्थातें म्हणितलें। काई पां चित्त उवाइलें। इये बोलीं तुझें ॥ १६२ ॥
तंव अर्जुन म्हणे देवो। परचित्तलक्षणांचा रावो। भला जाणितला जी भावो। मानसु माझा ॥ १६३ ॥
म्यां जें कांहीं विवरूनि पुसावें। तें आधींचि कळिलें देवें। तरी बोलिलें तेंचि सांगावें। विवळ करूनि ॥ १६४ ॥
एऱ्हवीं तरी अवधारा। जो दाविला तुम्ही अनुसारा। तो पव्हण्याहूनि पायउतारा। सोहपा जैसा ॥ १६५ ॥
तैसा सांख्याहूनि प्रांजळा। परी आम्हांसारिखियां अभोळां। एथ आहाति परि कांहीं काळा। तो साहों ये वर ॥ १६६ ॥
म्हणोनि एक वेळ देवा। तोचि पडताळा घेयावा। विस्तरेल तरी सांगावा। साद्यंतुचि ॥ १६७ ॥
तंव श्रीकृष्ण म्हणती हो कां। तुज हा मार्गु गमला निका। तरी काय जाहलें आईकीजो कां। सुखें बोलों ॥ १६८ ॥
अर्जुना तूं परिससी। परिसोनि अनुष्ठिसी। तरी आम्हांसीचि वानी कायसी। सांगावयाची ॥ १६९ ॥
आधींच चित्त मायेचें। वरी मिष जाहलें पढियंतयाचें। आतां तें अद्‌भुतपण स्नेहाचें। कवण जाणे ॥ १७० ॥
ते म्हणो कारुण्यरसाची वृष्टि। कीं नवया स्नेहाची सृष्टि। हें असो नेणिजे दृष्टी। हरीची वानूं ॥ १७१ ॥
जे अमृताची वोतली। कीं प्रेमचि पिऊन मातली। म्हणोनि अर्जुनमोहें गुंतली। निघों नेणें ॥ १७२ ॥
हें बहु जें जें जल्पिजेल। तेथें कथेसी फांकु होईल। परि तें स्नेहरूपा न येल। बोलवरी ॥ १७३ ॥
म्हणोनि विसुरा काय येणें। तो ईश्वरु कवळावा कवणें। जो आपुलें मान नेणे। आपणचि ॥ १७४ ॥
तरी मागीला ध्वनीआंतु। मज गमला सावियाचि मोहितु। जे बलात्कारें असे म्हणतु। परिस बापा ॥ १७५ ॥
अर्जुना जेणें जेणें भेदें। तुझें कां चित्त बोधे। तैसें तैसें विनोदें। निरूपिजेल ॥ १७६ ॥
तो काइसया नाम योगु। तयाचा कवण उपेगु। अथवा अधिकारप्रसंगु। कवणा येथ ॥ १७७ ॥
ऐसें जें जें कांहीं। उक्त असे इये ठाईं। तें आघवेंचि पाहीं। सांगेन आतां ॥ १७८ ॥
तूं चित्त देऊनि अवधारीं। ऐसें म्हणोनि श्रीहरी। बोलिजेल ते पुढारी। कथा आहे ॥ १७९ ॥
श्रीकृष्ण अर्जुनासी संगु। न सांडोनि सांगेल योगु। तो व्यक्त करूं प्रसंगु। म्हणे निवृत्तिदासु ॥ १८० ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां पंचमोऽध्याय: ॥ ५ ॥

अर्थ—ज्ञानी पुरुष सदेह ब्रम्हरूप होतात असे जें आम्ही सांगितलें तें या मार्गाने आले म्हणून सदेह ब्रम्हरूप होतात. ॥ १५८ ॥ आणि यमनियमाचे डोंगर उतरून व अभ्यासाचे सागर तरून ते पार होतात. ॥ १५९ ॥ त्या ज्ञानी पुरुषांनी कर्मादि उपाधिरहित आपल्याला करून सर्व प्रपंच मनोमात्र आहे असें प्रत्यक्ष अनुभवाने त्याचें माप केलें म्हणजे वस्तुत: प्रपंच मुळीच नाही असा प्रपंचाचा अंत पाहिला व मग केवळ शांतीचें स्वरूप म्हणजे नि:शेष वासनारहित ब्रम्हस्वरूप होऊन राहिले. ॥ १६० ॥ याप्रमाणे अभ्यासरूपी योगाच्या युक्तीचा सदेह ब्रम्ह होणें हा उद्देश आहे असें भगवान बोलले, तेव्हा त्या चतुर अर्जुनाला त्या मार्गाचा मोठा चमत्कार वाटला. ॥ १६१ ॥ तें पाहून भगवान हसून म्हणाले, काय अर्जुना! माझे हें बोलणें ऐकून तुझें चित्त उल्हासित झालें असें दिसतें. ॥ १६२ ॥ तेव्हा अर्जुन म्हणतो, देवा! तूं अंतर्यामी आहेस. दुसऱ्याचें चित्तांतलें जाणणाऱ्यांचा तूं राजा आहेस. माझ्या मनांतील भाव आपण बरोबर ओळखला. ॥ १६३ ॥ मी जें कांही विचार करून आपणाला म्हणणार होतो तें आपण अगोदरच जाणलें, तर मग तेंच आता स्पष्ट आपण सांगा. ॥ १६४ ॥ साधारणत: पहा देवा! जो तुम्ही आता मार्ग दाखविला तो पाण्यांतून पोहून जाण्यापेक्षा जसा पाणउतार मार्ग सोपा असतो. ॥ १६५ ॥ तसा तो आमच्यासारख्या अशक्तांना ज्ञानमार्गाहून सरळ सोपा वाटतो. पण त्यांत सिद्धि होण्याला काळ लागतो. तो काळ एकदांचा खुशाल सहन करतां येईल. ॥ १६६ ॥ म्हणून देवा! पुन: एकदा त्याचीच मजपुढे उजळणी करा. विस्तार करून सांगत असाल तर सविस्तर सांगा. ॥ १६७ ॥ तेव्हा भगवान म्हणतात, बरें आहे. अर्जुना! हाच मार्ग तुला उत्तम वाटतो ना! तर हरकत काय आहे? तोच आम्ही तुला आनंदाने सांगतों, ऐक. ॥ १६८ ॥ अर्जुना! तू जर लक्ष देऊन ऐकशील आणि ऐकून त्याचें आचरण करशील तर आम्ही काय सांगण्यास कमी करूं? ॥ १६९ ॥ (श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात) अगोदरच मायेचें चित्त प्रेमळ असतें. त्यांतहि आवडत्याचें निमित्त झालें तर त्या अद्‌भुत प्रेमाचें कोण वर्णन करूं शकेल? ॥ १७० ॥ अर्जुनाचे ठिकाणीं भगवंताची जी प्रेमदृष्टि होतो ती म्हणजे करुणरसाचा वर्षाव होय असें म्हणावें! की ती नव्या नव्या प्रेमाची भगवंताने सृष्टिच निर्माण केली असें म्हणावें! कांही असो. भगवंताच्या प्रेमदृष्टीचें शब्दाने वर्णन करणें शक्य नाही. ॥ १७१ ॥ ती केवळ अमृताची ओतलेली होती किंवा अर्जुनाचें प्रेम पिऊन तिला उन्माद झाला होता, म्हणूनच ती अर्जुनाचे मोहाने इतकी अर्जुनाचे ठिकाणीं आसक्त झाली की ती अर्जुनाहून निघत नव्हती. ॥ १७२ ॥ अशी आपण कितीहि बडबड केली केली तरी कथा सुटून विषयांतर होईल, पण त्या प्रेमदृष्टीचे शब्दाने यथार्थ वर्णन होणार नाही. ॥ १७३ ॥


गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे गाईला वासरें पुष्कळ असतात, पण वासराला गाय एकच असते, म्हणून वासरालाच गाईचें अनन्य प्रेम असतें; पण गाईला वासराचें प्रेम तितकें नसतें असें म्हणतां येत नाही. गाईचेंहि वासरावर अत्यंत प्रेम असतें. त्याप्रमाणेच भक्ताला एकच भगवान असतो आणि भगवंताला भक्त पुष्कळ असतात, म्हणून भक्ताचेंच भगवंतावर नि:सीम प्रेम असतें, पण भगवंताचें मात्र भक्तावर तितकें प्रेम राहत नाही असें नाही. लहान मुलावर आई जशी आपल्या सर्वस्वीं प्रेमाची छाया करिते त्याप्रमाणे भगवानहि आपल्या प्रेमाने अत्यंत अहंकाररहित झालेल्या म्हणजेच अत्यंत बाल झालेल्या भक्तावरहि तशीच अपल्या नि:सीम प्रेमाची छाया करितो. असें देव-भक्त परस्परांवर स्वाभाविक नि:सीम प्रेम करतात. याचें कारण असें आहे की जीवाने मी ब्रह्म आहे हें ओळखल्यावांचून तो मुक्त होत नाही. जीवाला मोक्षमार्गाचा उपदेश करण्याकरिता प्रतिबिंबरूप असलेल्या जीवाच्या अपेक्षेने बिंबरूप परमेश्वराचे ठिकाणीं हीच अहंब्रह्मास्मि विद्यावृत्ति व त्या वृत्तींतूनच जीवाला कल्याणमार्गाचा उपदेश करणारे वेद प्रगट होतात. ही अहंब्रह्मास्मि विद्यावृत्ति श्रीगुरूचें मूळ रूप होय असें अमृतानुभवांतील मंगलाचरणांत ''गुरुरित्याख्यया लोके विद्या साक्षाद्धि शांकरी'' या श्लोकाने माऊलींनी सांगितले आहे. म्हणजे परमेश्वरच गुरुरूपाने नटतो.

शिष्याच्या निष्कपट सेवेने श्रीगुरु प्रसन्न झाले असतां ते या आपल्या अहंब्रह्मास्मिविद्यावृत्तिरूपाने शिष्याचे हृदयांत प्रगट होतात. पण मूळ ब्रह्मस्थिति निर्विकल्प आहे म्हणजे तेथे स्वरूपाचीहि जाणीव नाही. ती मूळची जाणीवरहित निर्विकल्पस्थिति नित्य कायम ठेवण्याकरिता अहंब्रह्मास्मि ही जाणीव नाहिशी झाली पाहिजे. ती प्रेमांत नाहिशी होते. म्हणून भक्त निर्विकल्प होण्याकरिता भगवंताचें नि:सीम प्रेम करतो व भगवंतहि भक्तावर नि:सीम प्रेम करीत असतो.

नि:सीम प्रेम हें आत्म्याचें स्वरूप आहे, म्हणून भगवान भक्ताचा आत्मा होतो व भक्त भगवंताचा आत्मा होतो. ''ज्ञानी त्वात्मैव मे मतम्'' असे भगवंताने म्हटलेंच आहे.

अर्थ—म्हणून या शब्द विस्ताराचा काय उपयोग? जो अमर्याद भगवान आपली मर्यादा आपण जाणूं शकत नाही. तेथे दुसरा कोण त्याला मर्यादा घालूं शकेल? (म्हणजे भगवंताचें प्रेमाला मर्यादाच नाही म्हणजे शब्दाने त्याचे वर्णन होवू शकत नाही असा अर्थ). ॥ १७४ ॥ वर भगवंतांनी अर्जुनाच्या मनांतला आशय जाणला असें जें म्हटलें, त्यावरून मला वाटतें की भगवान खरोखर अर्जुनाच्या प्रेमाने अर्जुनाच्या सर्वस्वीं स्वाधीन होऊन गेले कारण आपण होऊन भगवान अर्जुनाला म्हणतात, बापा अर्जुना! ऐक. ॥ १७५ ॥ अर्जुना! ज्या ज्या रीतीने तुझें समाधान होईल व तुला समजेल, त्या त्या रीतीने मोठ्या आनंदाने सांगेन पहा. ॥ १७६ ॥ योग हें नांव कशाला आहे? त्याने कोणता लाभ होतो किंवा त्याचा अधिकार कोणाला आहे? ॥ १७७ ॥ असें जें जें सांगणे अवश्य आहे तें सर्व आता सांगतों पहा. ॥ १७८ ॥ तूं मात्र एकाग्र चित्ताने श्रवण कर. असें म्हणून भगवान श्रीकृष्ण जें सांगणार तेंच पुढे निरूपण होणार आहे. ॥ १७९ ॥ भगवंताचा अर्जुनाशीं जो सख्यप्रेमाचा संबंध होता तो, श्रीनिवृत्तिनाथाचे दास श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, पुढे स्पष्ट करून सांगूं. ॥ १८० ॥

श्रीसद्‌गुरुकृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या पांचव्या अध्यायाचा गूढार्थदीपिकेसह अनुवाद पूर्ण झाला तो सद्‌गुरुचरणीं समर्पण असो.



समारोप

कर्मयोग व संन्यास या दोन्ही मार्गांचें सरमिसळ निरूपण ऐकून अर्जुनाच्या मनांत घोटाळा उत्पन्न झाला व आपल्याला श्रेयस्कर मार्ग कोणता याचा निवाडा त्याला करतां आला नाही, म्हणून त्याने भगवंताला यांपैकी मला श्रेयस्कर मार्ग कोणता हें सांगा म्हणून विनंती केली. भगवंतांनी पुन: दोन्ही मार्ग मोक्षमार्गच किंवा भगवत्प्राप्ति करून देणारेच आहेत, पण त्यांतल्या त्यांत कर्मयोगच अधिक चांगला असें सांगितलें व पुढे म्हणाले की, अर्जुना! संन्यासदेखील कर्मयोगाचें अनुष्ठान केल्यावांचून प्राप्त होत नाही. विषयसुखाची इच्छा नि:शेष सोडून निष्काम चित्ताने कर्मयोगाचें अनुष्ठान होऊं लागलें असतां चित्त सम होतें. ही चित्ताची समस्थिति म्हणजे साक्षीरूप ज्ञानस्थिति होय. यां ज्ञानरूप साक्षीस्थितींत ज्ञानी पुरुष ''सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते'' मनाने सर्व कर्मांचा संन्यास करून राहतो. मनाने सर्व कर्मांचा संन्यास करणे म्हणजे आत्मज्ञानाचे अनुभवाने मी केवळ साक्षी आहे, माझे ठिकाणीं कर्म नाही व मी कर्ता नाही, मी सर्वांहून निराळा असंग आहे, असें पाहणें होय, श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात की जोपर्यंत कर्तृत्वबुद्धि जात नाही तोपर्यंत मनुष्य नैष्कर्म किंवा कर्मरहित होत नाही, ही नैष्कर्मतेची गुरुगम्य खूण आहे. हा सर्वकर्मसंन्यास व भगवें वस्त्र परिधान करून संन्यासविधीने विहित कर्माचा त्याग करणें हा संन्यास, एक नव्हेत. सर्वकर्मसन्यास बाह्य नाही, आंतर आहे व तो ''सर्वकामपरित्यागे च सर्वकर्मसंन्यास: सिद्धो भवति'' (गी० भा० अ० ६) सर्व कामना नाहिशा झाल्या की सर्वकर्मसंन्यास होतो, म्हणजे कर्तृत्वबुद्धिच राहत नाही—असें आचार्य म्हणतात.

असें आपलें सर्वकर्मरहित साक्षीस्वरूप कळल्यानंतर तो साक्षीरूप निर्गुण स्वरूपाचा प्रत्यय दृढ करण्याकरिता अभ्यास करतां यावा व त्याला जितका अधिक अवसर मिळेल तितका मिळाला पाहिजे म्हणून बाहेरहि विहित कर्माचा त्यागरूप संन्यास करावा लागतो.

त्या ज्ञानी पुरुषाच्या देहादिकांचे ठिकाणीं कर्मकर्तृत्वादि सर्व दुसऱ्याला जरी दिसत असले तरी तो ज्ञानीपुरुष त्यांचा संबंध कधीहि वागवीत नाही, म्हणजे कर्म व कर्तृत्व यांच्या अस्तित्वाचें त्याला ज्ञानच होत नाही, म्हणून त्याचा सर्वकर्मसंन्यास होतो. कर्माचें व कर्तृत्वाचें ज्ञान होतें तोपर्यंत सर्वकर्मसंन्यास होणें कसें शक्य आहे? ज्ञानी पुरुषाचे ठिकाणीं जेव्हा बाहेर कोणतेंच कर्म होतांना दिसत नाही. तेव्हा त्याचा सर्वकर्मसंन्यास होतो असे कोणी म्हणत नाही, कारण तसा बाह्य सर्वकर्मसंन्यास कोणाचाच होत नाही. कर्म व कर्माचें कर्तृत्व हे दोन्ही वस्तुत: आत्म्याचे ठिकाणीं नाहीत, ते अज्ञानामुळे भासतात व अज्ञान ज्ञानाने नाहिसें झालें की मग सूर्यप्रकाशाप्रमाणें सर्वत्र एक आत्म्याचाच अनुभव येतो, त्यावांचून दुसऱ्या कशाचाच प्रत्यय येत नाही, असें भगवंतांनीच सांगितलें आहे. असा हा कर्मसंन्यास कर्मयोग्याचाहि होतो. म्हणजे बाहेर तो कर्मे करीत असलेला दिसतो, पण अंत:करणांत मी कर्म करितों अशी त्याचे ठिकाणीं कर्तृत्वबुद्धि उत्पन्न होत नाही.

अशा रीतीने कर्मयोग्याचा कर्मयोग त्याच्या ठिकाणीं सर्वकर्मसंन्यासरूप ज्ञान उत्पन्न करून देऊन पुढे चालू राहतो; हेंच या पांचव्या अध्यायांत सांगितलें असल्यामुळे या अध्यायातील विषयाला संन्यासयोग हें नाव दिलें आहे. आपल्या ठिकाणीं कर्म नाही व त्याचें कर्तृत्वहि नाही, याचा साक्षात् अपरोक्ष अनुभव घेऊन पाहण्यासाठी भगवंतांनी योगाभ्यासहि सांगितला.

कर्मयोग्याने, कर्मयोगाबरोबर योगाभ्यास केला असतां, त्याला सदेह सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप असल्याचा अनुभव येतो व सर्व विषयवासनाशून्य अशी परमशांति प्राप्त होते.

॥ श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय सहावा

अवतरणिका-मागील पांचव्या अध्यायांत अर्जुनाचे इच्छेनुसार जे ध्यानरूप लययोगाचें भगवंतांनी संक्षेपाने वर्णन केलें, त्याचेंच सविस्तर वर्णन, या सहाव्या अध्यायांत केलें आहे.

मग रायातें म्हणें संजयो। तोचि अभिप्रावो अवधारिजो। श्रीकृष्ण सांगती आतां जो। योगरूप॥ १॥
सहजें ब्रह्मरसाचें पारणें। केलें अर्जुनालागीं नारायणें। कीं तेचि अवसरीं पाहुणे। पातलों आम्ही॥ २॥
कैसी दैवाची थोरी नेणिजे। जैसें तान्हेलिया तोय सेविजे। कीं तेंचि चवी करूनि पाहिजे। तंव अमृत आहे॥ ३॥

अर्थ—मग संजय राजा धृतराष्ट्राला म्हणाला, भगवान श्रीकृष्ण आता अर्जुनाला जें योगमार्गाचें निरूपण सांगणार आहेत, तेंच आपण ऐका.॥ १॥ राजा! भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला युद्धाला प्रवृत्त करीत असतां, अनायासें ब्रह्मानंदाची मेजवानी केली व आपणहि अगदी वेळेवर अनायासें पाहुण्याप्रमाणे येऊन पोहोंचलों.॥ २॥ ज्याप्रमाणे पाण्यासाठी तळमळणाऱ्या एखाद्या तहानलेल्या मनुष्याने पाणी प्यावयास घेतलें, पण तें पाणी तोंडाला लावल्याबरोबर, त्याला तें अमृत आहे, असें कळून आलें, तर त्याचें केवढें थोर भाग्य, याची कल्पना देखील करतां येणार नाही.॥ ३.॥

गूढार्थदीपिका-कैसी दैवाची थोरी नेणिजे—"**अनंत जन्मांचें पुण्य जोडे। तरीच हा परमार्थ घडें। मुख्य परमात्मा आतुडे। स्वानुभवेसि**"॥ ४॥ (दासबोध दश १-स-९) अनुभवी संतांचे मुखाने परब्रह्मवस्तूचें निरूपण ऐकावयास मिळणें, याला महद्भाग्यच लागतें. अनंत जन्मांतील पुण्यसंचयाने भगवत्कृपा होऊनच तें भाग्य प्राप्त होतें. "**परी कोणें काळें कोणें देशीं। कोण समय विशेषी। हरि कृपा करितो कैसी। कोणासी कळेना.॥ ४४१॥**" (ए० भा० अ० २३)

तैसें आम्हां तुम्हां जाहलें। जें आडमुठीं तत्त्व फावलें। तंव धृतराष्ट्रें म्हणितलें। हें न पुसों तूंतें॥ ४॥
तया संजया येणें बोलें। रायाचें हृदय चोजवलें। जें अवसरीं आहे घेतलें। कुमरांचिया॥ ५॥
हें जाणोनि मनीं हांसिला। म्हणे म्हातारा मोहें नाशिला। एऱ्हवीं बोलु तरी भला जाहला। आवसरीं इये॥ ६॥

अर्थ—त्याप्रमाणे तुम्हाला व मला येथे, या प्रसंगी झालें, कारण तशी कांही इच्छा न करतां व कल्पनाहि नसतांना अकस्मात् आत्मतत्वाची प्राप्ति झाली हें ऐकून राजा धृतराष्ट्र म्हणाला, संजया! हें कांही तुला मी विचारीत नाही.॥ ४॥ राजाचें भाषण ऐकून, संजयाला राजाचें अंत:करण कळून आलें व वाटलें की, ह्यावेळीं आपल्या मुलांकडे राजाचें लक्ष लागलें आहे.॥ ५॥ अशी राजाच्या मनाची स्थिति कळून आली, तेव्हा संजयाला हसूं आलें व आपल्याशींच तो म्हणाला, हा म्हातारा पुत्रमोहाने भगवंताच्या उपदेशाकडे लक्ष न देतां आपला घात करून घेत आहे. खरें पाहतां ह्या वेळीं भगवंताने अर्जुनाला कसा सुंदर उपदेश केला आहे!॥ ६॥

गूढार्थदीपिका-म्हणे म्हातारा मोहें नाशिला—जोपर्यंत मनुष्याचें चित्त संसारात आसक्त असतें, तोपर्यंत "गोड परमार्थ लागे कडू। कडू विषय तो गोडू। जीवासी जाहाला॥" १५९, (ज्ञा० अ०१०) अखंड परमानंदाचा लाभ करून देणारा परमार्थ मनुष्याला रुचत नाही. सांसारिक गोष्टीच ऐकाव्याशा वाटतात. येथे साक्षात परब्रह्ममूर्ति परमात्मा श्रीकृष्ण परब्रह्माचा उपदेश करणारे व भक्तराज अर्जुन-श्रवण करणारा असा संवादाचा प्रसंग असूनहि धृतराष्ट्राच्या मनावर त्याचा कांही एक परिणाम झाला नाही. पण संजयाला मात्र आपल्या थोर भाग्याने हा संवाद अनायासें ऐकायला मिळाला असें वाटत होतें.

परि तें तैसें कैसेनि होईल। जात्यंधा कैसें पाहेल। तेवींची येरु से घेईल। म्हणोनि बिहे॥ ७॥
परि आपण चित्तीं आपुलां। निकियापरी संतोषला। जे तो संवादु फावला। श्रीकृष्णार्जुनांचा॥ ८॥

अर्थ—पण जन्मत: आंधळां असलेल्या धृतराष्ट्राला तो, भगवंताच्या उपदेशाचा प्रकाश मिळेल, असें होणें कसें शक्य आहे ? तितक्यांत राजाला आपल्या म्हणण्याचा कदाचित राग येईल, म्हणून संजय भ्याला. ॥ ७ ॥ पण (थोर भाग्याने) आपल्याला श्रीकृष्णार्जुनांचा संवाद ऐकायला मिळाला असें वाटून, स्वत: संजयाला मात्र अत्यंत संतोष वाटला. ॥ ८ ॥

गूढार्थदीपिका-परि आपण चित्तीं आपुला। निकियापरी संतोषला॥—सज्जनांना मात्र परमार्थग्रंथाचें श्रवण व परमार्थ ग्रंथाचे वाचन करण्यांत आनंद वाटतो॥ जेथें नाही आत्मज्ञान। तया नांव करमणूक॥ असें त्यांचें निश्चित मत असतें, म्हणून ते दुसऱ्यालाहि परमार्थच सांगतात.

तेणें आनंदाचेनि धालेपणें। साभिप्राय अंत:करणें। आतां आदरेसीं बोलणें। घडेल तया॥ ९ ॥
तो गीतेमाजि षष्ठींचा। प्रसंगु असे आयणीचा। जैसा क्षीरार्णवीं अमृताचा। निवाडु जाहला॥ १०॥
तैसें गीतार्थाचें सार। जें विवेकसिंधूचें पार। नाना योगविभवभांडार। उघडलें कां॥ ११॥

अर्थ—त्या आनंदाने तृप्त होऊन व श्रीकृष्णाच्या उपदेशांतील अभिप्राय नीट ओळखून, संजय आता पुढे धृतराष्ट्राला आदरपूर्वक कृष्णार्जुनांचा संवाद निवेदन करील. ॥ ९ ॥ ज्याप्रमाणे क्षीरसमुद्राच्या मंथनातून निघालेल्या वस्तूंतून अमृत हें देवांनी घेण्याजोगें ठरविलें, त्याप्रमाणे गीतेमध्ये या सहाव्या अध्यायांतील निरूपण प्रत्यक्ष आत्मानुभव प्राप्त करून देणारें असल्यामुळें, ऐकण्याजोगें आहे. ॥ १० ॥ त्याचप्रमाणें तें निरूपण गीतार्थांचे सारभूतच म्हणता येईल किंवा तें आत्मानात्मविवेकरूपी समुद्राचें पैलतीर म्हणतां येईल. अथवा योगैश्वर्याचें उघडलें गेलेलें कोठार म्हणतां येईल. ॥ ११ ॥

गूढार्थदीपिका-गीतार्थाचें सार—सहाव्या अध्यायांत सांगितलेला योग म्हणजे संपूर्ण गीतेचें सार होय, असें श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, असा या चरणाचा अर्थ नाही. गीताशास्त्र हें वेदान्तशास्त्र आहे. वेदान्तशास्त्राप्रमाणेच गीतोपदेशांतील सार किंवा प्रयोजनहि जीवब्रह्माचें ऐक्य हेच आहे. हें सार किंवा प्रयोजन योगाने प्रत्यक्ष साध्य होतें, म्हणून या अध्यायांतील निरूपणाला गीतार्थाचें सार म्हटले आहे.

विवेकसिंधूचे पार—विवेक म्हणजे विचार. मी सर्व जाणणारा असून, बुद्धीपासून देहापर्यंत जेवढें पदार्थ आहेत, तेवढे सर्व जाणले जाणारे आहेत. म्हणून या सर्वांहून मी निराळा आहे. मी जागृती, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्था जाणतो; म्हणून त्या अवस्थांहूनहि निराळा आहे व चेतनस्वरूप आहे. मी आपल्या नाशाची कल्पना करूं शकत नाही; म्हणून अविनाशी सत्स्वरूप आहे आणि मला ज्या अखंडसुखाची इच्छा आहे, तें जगांत कोठें मिळूं शकत नाही; म्हणून मीच अखंड सुखस्वरूप आहे. असा मी सच्चिदानंदस्वरूप आहे असें जाणणें याला विवेक म्हणतात.

हा विवेक ज्ञानमार्गांत केला जातो आणि या विवेकाने जीव ब्रह्मस्वरूप होतो. पण अशा या विवेकाने जीवाचें परब्रह्माशीं होणारें ऐक्य नुसतें विचारमूलक असल्यामुळें-अनुमानजन्यच असतें; म्हणून नुसत्या विचाराने ब्रह्मस्वरूप होणाऱ्या व्यतिरेक ज्ञान्यांना मरेतोपर्यंत असा विवेकच करीत राहावें लागतें. त्यांचा तो विवेक बंद पडत नाही. हे ''विवेकसिंधु'' या पदाने सुचविलें आहे.

आत्मा व अनात्मा किंवा चेतन व जड असे दोन पदार्थ परस्परांत मिसळलेले जोपर्यंत भासतात, तोपर्यंत विवेक करावा लागतो. पण योगाने अद्वैत ब्रह्मस्वरूपाशीं ऐक्य होऊन, अद्वैतदृष्टि म्हणजे एका सच्चिदानंद परब्रह्मावांचून दुसरी वस्तु नाही, अशी दृष्टि दृढ झाली म्हणजे मग विवेक करायला दोन वस्तुच राहत नाहीत. म्हणून विवेक बंद पडतो. हेंच 'पार' या शब्दाने सुचविलें आहे. योगाभ्यासाने अद्वैताचा प्रत्यक्ष अनुभव येतो व तो अनुभव दृढ झाला असतां, पुढे विवेकाचें कामच पडत नाही. अशा रीतीने योग हा विवेक सिंधूचा पार आहे.

योगविभव भांडार—नुसत्या ज्ञान्याला कांही एक ऐश्वर्य प्राप्त होत नाही. पण योग्याला अनेक प्रकारचें सामर्थ्य प्राप्त होतें.

जें आदिप्रकृतीचें विसवणें। जें शब्दब्रह्मासि न बोलणें। जेथूनि गीतावल्लीचें ठाणें। प्ररोहो पावे॥ १२॥

अर्थ—जेथे मूळ प्रकृति लीन होते. जें वेदरूप शब्दाने देखील बोलतां आलें नाही व ज्या ठिकाणाहून या गीतारूपवल्लीचें (भवौषधीचें) बीजरूप अस्तित्व व्यक्तदशेला येतें.॥ १२॥

गूढार्थदीपिका-**जें आदिप्रकृतीचें विसवणें**—या सहाव्या अध्यायांत सांगितलेल्या योगाने, जीव ज्या परब्रह्म स्वरूपाशीं ऐक्य पावतो, त्या परब्रह्माचें या ओवींत माऊली वर्णन करीत आहेत.

परब्रह्म हें आदिप्रकृतीचें विश्रांतिस्थान होय. नाथांनी आदि प्रकृतीचें म्हणजे मूळमायेचें वर्णन केलें आहे "**स्वरूप निर्विकल्प पूर्ण। तेथ मी म्हणावया असे कोण। ऐसेहि ठायीं स्फुरे मीपण। तें मुख्यत्वें जाण मूळमाया**"॥ ७२॥ (ए० भा० अ० ३) मूळमाया, म्हणजे 'अहंब्रह्मास्मि' हें स्फुण होय. या स्फुरणाला मूळमाया म्हणण्याचें कारण असें आहे की, हें स्फुरण होतांक्षणींच, जीवाला सर्व नामरूपात्मक सृष्टि प्रगट झालेली दिसते. परमात्मा या मूळमायेचें विश्रांतिस्थान आहे असें माऊली म्हणतात. 'अहंब्रह्मास्मि' हें स्फुरण झालें की, जाणीव स्फुरते. त्यापूर्वी परब्रह्म जाणीवरहित निर्विकल्प असतें. परब्रह्माची मूळची जाणीवरहित अवस्था, हीच 'अहंब्रह्मास्मि' या जाणीवरूप मूळमायेचें विश्रांतिस्थान होय.

शब्दब्रह्मासि न बोलणें—शब्दब्रह्म म्हणजे वेद. परमात्मा नित्य निर्विकल्पच आहे. "**जाणीव नेणीव भगवंती नाही**" असे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी हरिपाठाच्या अभंगांत म्हटलें आहे. नाथहि म्हणतात—**विजातीय भेद 'मी देह म्हणणें।' सजातीय भेद 'मी जीवपणे।' स्वगत भेद 'मी ब्रह्म' स्फुरणें। हे तिन्ही नेणें परमात्मा॥ ५२६॥** (ए० भा० अ० २८) मी देह म्हणणें व मी जीव म्हणणें ही स्वरूपाची नेणीव व मी ब्रह्म म्हणणें ही स्वरूपाची जाणीव किंवा ज्ञान हे तिन्ही स्वरूपाचे ठिकाणीं नसतात. हें सर्व जीवाच्या दृष्टीने सांगितलें गेलें आहे. जाणीव स्फुरली असतांनाच कशाचेंहि वर्णन होऊं शकतें. जाणीवरहित निर्विकल्प अवस्थेंत जाणीवच स्फुरत नाही. म्हणून जाणीवरूप वेदहि निर्विकल्प परमात्म्याचें वर्णन करूं शकत नाहीत.

जेथूनि गीतावल्लीचें ठाणें। प्ररोह पावे—जेथून म्हणजे या निर्विकल्प स्वरूपाच्या ठिकाणीं, गीतावेली बीजरूपाने असते व ती तेथूनच पुढे प्रगट होते, असें माऊलीचें म्हणणें आहे. पण भगवान श्रीकृष्णाच्या मुखाने गीता सांगितली गेली हें प्रसिद्ध आहे. या दोहींचाहि विचार केल्यास, भगवान् श्रीकृष्ण निर्विकल्प स्वरूप आहेत असाच श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या म्हणण्याचा निष्कर्ष निघतो. मायाभ्रांतीमुळे जीवाच्या स्वरूपांत जशी अपूर्णता येते, तशी परमेश्वराच्या स्वरूपांत येत नाही म्हणून परमात्म्याचे अवतारहि पूर्ण निर्विकल्प ब्रह्मस्वरूप असतात व गीतोपदेशाची वेली, ज्या श्रीकृष्णस्वरूपापासून प्रगट झाली, तें श्रीकृष्णस्वरूप पूर्ण निर्विकल्प ब्रह्म होय, असें माऊलींनी या चरणांत सुचविलें आहे.

तो अध्याय हा सहावा। वरि साहित्याचिया बरवा। सांगिजैल म्हणोनि परिसावा। चित्त देउनी॥ १३॥
माझा मराठाचि बोलु कौतुकें। परि अमृतातेंही पैजा जिंकें। ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन॥ १४॥
जिये कोंवळिकेचेनि पाडें। दिसती नादींचे रंग थोडे। वेधें परिमळाचें बीक मोडे। जयाचेनि॥ १५॥
ऐका रसाळपणाचिया लोभा। कीं श्रवणींचि होति जिभा। बोलें इंद्रियां लागे कळंभा। एकमेकां॥ १६॥
सहजें शब्दु तरी विषो श्रवणाचा। परि रसना म्हणे हा रसु आमुचा। घ्राणासि भावो जाय परिमळाचा। हा तोचि होईल॥ १७॥
नवल बोलतीये रेखेची वाहणी। देखतां डोळ्यांही पुरों लागे धणी। ते म्हणती उघडली खाणी। रूपाची हे॥ १८॥
जेथ संपूर्ण पद उभारे। तेथ मनचि धांवे बाहिरें। बोलु भुजाही आविष्करे। आलिंगावया॥ १९॥
ऐशीं इंद्रियें आपुलालिया भावीं। झोंबती परि तो सरिसेपणेंचि बुझावी। जैसा एकला जग चेववी। सहस्रकरु॥ २०॥
तैसें शब्दाचें व्यापकपण। देखिजे असाधारण। पाहातयां भावज्ञां फावती गुण। चिंतामणिचे॥ २१॥

अर्थ—तो हा (अनिर्वाच्य ब्रह्मस्थितीचा अनुभव देणारा) सहावा अध्याय होय. तो आता उत्तम अलंकारिक भाषेंत सांगितला जाईल; म्हणून अत्यंत एकाग्रचित्ताने श्रवण करा. ॥ १३ ॥ माझी ही भाषा प्राकृत आहे खरी, पण ती अमृतालाहि पैज मारून जिंकील, अशी त्यांत रसाळ शब्दांची योजना करीन. ॥ १४ ॥ त्या अक्षराच्या कोमलपणाच्या मानाने पाहिलें असतां सप्तसुरांतील कोमलपणाहि थोडाच दिसेल आणि त्यांच्या चित्ताकर्षणाने सुगंधाचें चित्ताकर्षक सामर्थ्यहि नाहिसें होईल. ॥ १५ ॥ त्याचप्रमाणे हेंहि लक्षांत ठेवा की, भाषेच्या रसाळपणाच्या लोभाने श्रवणेंद्रियाच्या ठिकाणीं रसनेंद्रिय येतील आणि या भाषेने इंद्रियांमध्ये परस्परांत भांडण सुरू होईल. ॥ १६ ॥ खरोखर, शब्द हा कानाचा विषय होय, पण जिभेला हा शब्द माझा विषय आहे असें वाटेल. नाकाला, त्या शब्दाचे ठिकाणी आपला सुगंध विषय आहे असें वाटेल व तो शब्द नाकाला सुगंधाचाच अनुभव देईल. ॥ १७ ॥ भाषेच्या मर्यादेची पद्धत अशी आश्चर्यकारक की तें पाहून डोळ्यांचें पारणें फिटेल व त्यांची इच्छा तृप्त होईल व ते म्हणतील की हे शब्द म्हणजे रूपाची खाणीच आहे. ॥ १८ ॥ जेथे संपूर्ण पद उभारलें जाईल, तेथे मन इंद्रियांना मागे सारून, त्या बोलाला बाह्या पसरून, आलिंगन देण्याला बाहेर धावेल. ॥ १९ ॥ याप्रमाणे ही इंद्रिये, त्या शब्दाला विषय समजून झोंबतील, पण ज्याप्रमाणे एकच सूर्य उदय पावून, सर्व जगाला जागे करितो, त्याप्रमाणे माझा तो शब्दहि, सर्वांचे सारखें समाधान करील. ॥ २० ॥ त्याप्रमाणेच त्या शब्दाचा अर्थहि असामान्य व्यापक व खोल आहें असें दिसेल. त्यांतील गुप्त अभिप्रायाकडे पाहणाऱ्याला, त्यांत चिंतामणीचे गुण दिसतील. ॥ २१ ॥

गूढार्थदीपिका-'वाचामर्थोऽनुधावति'—श्रीज्ञानेश्वर महाराजांसारख्या ज्ञानी भक्ताचे सर्व मनोरथ भगवान पूर्ण करतो. नव्हे, तेच स्वत: सत्यसंकल्प असे भगवद्रूप असतात, म्हणून त्यांची इच्छा पूर्ण होते. स्वत: सरस्वतीच, त्यांचेसमोर हात जोडून उभी असते. किंवा ज्ञानीभक्त, आपल्या ज्ञानभक्तीच्या बळाने जेवढा भगवान, तेवढे ते होतात म्हणजे सर्व स्वरूपच ते होऊन राहतात; म्हणून सरस्वतिहि तेच असल्यामुळे, श्रीज्ञानेश्वर महाराजांचे, वरील आत्मविश्वासाचे उद्गार योग्यच आहेत. त्यांच्यासारख्या पुरुषांनी जसा संकल्प करावा, तसा तो एकदम सिद्ध होतो. त्यांना योग्य शब्द शोधावे लागत नाहीत व पदरचनेचा विचार करावा लागत नाही ''वाचामर्थोऽनुधावति'' त्यांच्या तोंडातून शब्द निघाला, की अर्थ त्यांत तात्काल शिरतो. त्याचप्रमाणे सर्व अलंकारादि गुणहि तेथे हजर होतात.

हें असोतु या बोलांचीं ताटें भलीं। वरी कैवल्यरसें वोगरलीं। ही प्रतिपत्ति मियां केली। निष्कामासी ॥ २२ ॥

अर्थ—हें असों. अशा प्रकारच्या साहित्यपूर्ण शब्दांची उत्तम ताटें मांडून त्यांत ब्रह्मरस वाढला जाईल. पण हें माझे निवेदन निष्काम पुरुषांकरिता आहें. ॥ २२ ॥

गूढार्थदीपिका—ही प्रतिपत्ति मिया केली। निष्कामासि॥—विषयसुखाने घेरलेले चित्त, कितीहि उपदेश, केला, तरी ब्रह्माकार होत नाही. म्हणून विषयसुखाचा वीट येऊन, ज्यांना ब्रह्मसुखाच्या प्राप्तीची तळमळ लागली, तेच विरागी पुरुष योगाचे अधिकारी होत.

आतां आत्मप्रभा नीच नवी। तेचि करूनि ठाणदिवी। जो इंद्रियांतें चोरूनि जेवी। तयासीचि फावे ॥ २३ ॥

(निष्काम पुरुषाचें निवेदन माऊली या ओवींत करीत आहे.)

अर्थ—आता नित्य नूतन एकसारखा प्रकाशणारा नित्य ज्ञानरूप जो आत्मप्रकाश, त्याला ठाणदिवी करून म्हणजे स्थिर करून, इंद्रियांना न कळूं देता, जो या ताटांत जेवील, त्यालाच त्या कैवल्यरसाचा स्वाद घेतां येईल. ॥ २३ ॥

गूढार्थदीपिका—आत्मप्रभा नित्य नवी—''द्वे दृष्टी चक्षुषोऽनित्या दृष्टिर्नित्याच आत्मन:'' (ऐत० २-४-१) मनुष्याच्या ठिकाणीं दोन ज्ञानदृष्टि आहेंत. एक नित्य ज्ञानदृष्टि व दुसरी अनित्य ज्ञानदृष्टि आहे. इंद्रिय ज्ञानदृष्टि ही अंधारांत पाहूं शकत नाही. उजेडांतच पाहूं शकते; म्हणून ती अनित्य आहें. या दृष्टीने जागृतींत, सूर्यप्रकाशाच्या साह्याने, बाहेरचे पदार्थच दिसतात. आत्म्याची ज्ञानरूप दृष्टि ही नित्य आहें. या दृष्टीने जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्थेंत दिसते. अंधार पडला तरी त्या दृष्टीने दिसूं शकते.

कैवल्यरसाने म्हणजे अखंड ब्रह्मानंदाने भरलेले आत्मस्वरूप हें या आत्मज्ञान दृष्टीनेच अनुभवाला येतें. तें अनित्य इंद्रिय दृष्टीने अनुभवितां येत नाही. म्हणून आत्मस्वरूपाचा अनुभव घेण्याकरिता, इंद्रियरूप अनित्य ज्ञानदृष्टीचा त्याग करून, अखंड नित्यदृष्टीचा आश्रय केला पाहिजे. या नित्यज्ञानदृष्टीलाच वेदान्तांत साक्षी म्हणतात.

जो इंद्रियातें चोरूनि जेवी। तयासीचि फावे—इंद्रियाची बाह्य विषयांकडेच धाव असल्यामुळे, जे जे ज्ञान किंवा जे जें सुख इंद्रियाच्या द्वारा होतें, तें तें ज्ञान किंवा तें तें सुख विषयाच्या ज्ञानाप्रमाणे किंवा सुखाप्रमाणे अनित्य असें अनुभवाला येतें; म्हणून नित्यज्ञानदृष्टिरूप आत्म्याचा नित्य अनुभव येण्याकरिता; तीव्र वैराग्याने विषयसुखाचा त्याग करून व इंद्रियांचा रोध करून, आपल्या साक्षी स्वरूपाचेंच अखंड अनुसंधान केलें पाहिजे.

येथ श्रवणाचेनि पांगे-। वीण श्रोतयां होआवे लागे। हें मनाचेनि निजांगें। भोगिजे गा॥ २४॥
आहाच बोलाची वालीफ फेडिजे। आणि ब्रह्माचियाचि आंगा घडिजे। मग सुखेंसीं सुरवाडिजे। सुखाचिमाजि॥ २५ ॥

अर्थ—तेथे श्रोत्याने श्रवणेंद्रियाचाहि संबंध सोडला पाहिजे व नुसत्या मनानेच तें भोगलें पाहिजे. ॥२४॥ बोलीचे दिसत असलेलें आच्छादन दूर करून, आंतील अर्थ जे ब्रह्म. त्याशीं समरस होऊन जावें व मन सुखांत मग्न होऊन सुख भोगावें. ॥ २५ ॥

गूढार्थदीपिका—आहाच बोलाची वालिफ फेडिजे। आणि ब्रह्माचियाचि आंगा घडिजे—ब्रह्मस्वरूपाचें निरूपण ऐकतांना शब्दावर दृष्टि न जाऊं देतां, अर्थावर दृष्टि देत गेलें पाहिजे म्हणजे आपलें चित्त ब्रह्माकार होत जाते. चित्ताचें ब्रह्माकार होणे, हेंच ब्रह्माच्या आंगावर घडणें म्हणजे ब्रह्माशीं ऐक्य पावणें होय.

मग सुखेसी सुरवाडिजे—चित्त ब्रह्माकार झालें म्हणजे चित्त सुखरूप होऊन राहतें.

ऐसें हळुवारपण जरी येईल। तरीच हें उपेगा जाईल। एऱ्हवीं आघवी गोठी होईल। मुकया बहिरयाची॥ २६॥

अर्थ—जर चित्त असें हळुवार म्हणजे कोमल होईल, तरच त्या चित्ताचा येथे उपयोग होईल (म्हणजे त्या चित्ताला मोक्षलाभ घेतां येईल) नाही तर पुढे होणारें योगाचें विवेचन मुक्याबहिऱ्यांनी ऐकल्यासारखे निरर्थक होईल. ॥ २६ ॥

गूढार्थदीपिका—ऐसे हळुवारपण—एखाद्याने, एखाद्या आपल्या आप्ताची उपेक्षा केली तर त्याचें चित्त निष्ठुर झालें असें आपण म्हणतों आणि तो जर त्याच्याकरिता तळमळत असला, तर त्याचें चित्त मोठें कोमल आहे, असें आपण म्हणतों. त्याचप्रमाणे विषयसुखाकरिता तळमळणारें चित्त, विषयाविषयी हळुवार असतें व त्याचा त्याग करणारें चित्त, विषयाविषयी निष्ठुर होतें. ''काठिण्य विषये कुर्यात् द्रवत्वं भगवत्पदे'' विषयाचा त्याग करून त्याविषयी निष्ठुर झालेलें व ब्रह्मप्राप्तीविषयी तळमळणारे म्हणून कोमल झालेलें चित्तच परब्रह्मप्राप्ति करून घेऊ शकतें.

परी तें असो आतां आघवें। नलगे श्रोतयांतें कडसावें। जे अधिकारिये एथ स्वभावें। निष्कामकामु॥ २७॥
जिहीं आत्मबोधाचिया आवडी। केली स्वर्गसंसाराची कुरोंडी। ते वांचूनि एथींची गोडी। नेणती आणिक॥ २८ ॥
जैसा वायसीं चंद्र नोळखिजे। तैसा प्राकृतीं हा ग्रंथु नेणिजे। आणि तो हिमांशुचि जेविं खाजें। चकोराचें॥ २९॥
तैसा सज्ञानासी तरी हा ठावो। आणि अज्ञानासी आन गांवो। म्हणोनि बोलावया विषय पहा हो। विशेषें नाहीं॥ ३० ॥
परि अनुवादलों मी प्रसंगे। तें सज्जनी उपसाहावें लागे। आतां सांगेन काय श्रीरंगे। निरोपिलें जें॥ ३१॥
तें बुद्धीही आकळितां सांकडें। म्हणऊनि बोलीं विपायें सांपडे। परि निवृत्तिकृपादीपउजियेडें। देखेन मी॥ ३२ ॥
जें दिठीही न पविजे। तें दिठीविण देखिजे। जरी अतींद्रिय लाहिजे। ज्ञानबळ॥ ३३॥
ना तरी जें धातुवादाही न जोडे। तें लोहींचि पंधरें सांपडे। जरी दैवयोगें चढे। परिसु हातां॥ ३४॥
तैसी सद्गुरुकृपा होये। तरी करितां काय आपु नोहे। म्हणऊनि ते अपार मातें आहे। ज्ञानदेवो म्हणे॥ ३५॥

अर्थ—पण हें बोलणें येथेच पुरे, कारण या ग्रंथाचें श्रवण करणारे निष्कामच असल्यामुळे स्वभावत:च ते श्रवणाःला अधिकारी आहेत, म्हणून त्यांना निक्षून सांगण्याची गरज नाही. ॥ २७ ॥ ज्यांनी आत्मबोधाच्या आवडीवरून स्वर्गीय सुख व संसार सुख या दोन्ही सुखांना ओवाळून टाकून दिलें अशा पुरुषांवाचून, दुसऱ्या कोणालाच

कैवल्यानंद भोगतां येणार नाही. ॥ २८ ॥ ज्याप्रमाणे कावळ्याला चंद्राची कधी ओळखच नाही, त्याप्रमाणे अज्ञानी संसारासक्त अशा पुरुषांना हा ग्रंथ कधी समजणार नाही आणि ज्याप्रमाणे चंद्राचे किरणहि चकोराचाच खाऊ होतो. (दुसऱ्या कोणाचा नव्हे). ॥ २९ ॥ त्याप्रमाणे ज्ञानियांना हा ग्रंथ ब्रह्मप्राप्तीचें ठिकाण वाटेल, आणि विषयासक्त अज्ञानी पुरुषाला भलत्याच गांवाला जाणारा मार्ग वाटेल म्हणून येथे विशेष कांही सांगतां येण्याजोगा विषय नाही. ॥ ३० ॥ पण मी प्रसंगोपात्त त्या विषयाचा पुन: उच्चार केला आहे. तेवढी पुनरुक्ति, आपण सज्जनांनी सहन करावी. आता श्रीकृष्णाने अर्जुनाला काय सांगितलें तेंच सांगतों. ॥ ३१ ॥ जें बुद्धीला आकलन करणें कठीण आहे, म्हणूनच तें शब्दाने क्वचित् बोललें जातें. पण मी तें श्रीसद्गुरू निवृत्तिनाथांच्या कृपारूप दिव्याच्या प्रकाशाने पाहीन ॥ ३२ ॥ जर इंद्रियातीत अशा आत्म्याच्या नित्य ज्ञानदृष्टीचें बळ असलें तर, इंद्रिय दृष्टीलाहि जें दिसूं शकत नाही तें इंद्रियांवांचूनहि पाहतां येते. ॥ ३३ ॥ किमयाने धातूचें जातिवंत सोनें होऊं शकत नाही. पण जर दैवाने परिस हातीं आला तर त्या परिसाने मात्र धातूचें जातिवंत सोनें होऊं शकतें. ॥ ३४ ॥ त्याप्रमाणे श्रीगुरूची कृपा झाली, तर प्रयत्नाने काय साध्य होणार नाही? श्रीज्ञानेश्वरमाऊली म्हणतात ती श्रीगुरूची कृपा माझेवर अमर्याद आहे. ॥ ३५ ॥

गूढार्थदीपिका—बुद्धीहि आकळितां सांकडे। म्हणवुनि बोलीं विपाये सांपडे—बुद्ध्यादिकांनी ग्रहण केली जाणारी वस्तु शब्दाने सांगतां येते; पण बुद्ध्यादिकांच्या पलीकडे असणारी परब्रह्मवस्तु बुद्ध्यादिकांनी ग्रहण केली जात नाही. म्हणून ती शब्दाने सांगणे कठीण आहे. या सर्व ओव्यांतून श्रीज्ञानेश्वर माऊलींनी सद्गुरूच्या किंवा संताच्या कृपेची व समागमाची अत्यंत महती गायिली आहे. एका सद्गुरूच्या कृपेने असाध्य असलेलें देखील साध्य होतें असें माऊलीचें अनुभवाचें म्हणणें आहे. "**न करितां व्युत्पत्तीचा श्रम। सकळ शास्त्रार्थ होय सुगम। सत्समागमाचें वर्म। तें हें असें॥ ३८ ॥ जें व्युत्पत्तीने न कळे। तें सत्समागमें कळे। सकळ शास्त्रार्थ आकळे। स्वानुभवासी॥ ३९ ॥** (दासबोध द० ७ स० १) असें समर्थहि म्हणतात.

तेणें कारणें मी बोलेन। बोलीं अरूपाचें रूप दावीन। अतींद्रिय परि भोगवीन। इंद्रियांकरवीं॥ ३६ ॥

अर्थ—त्याच कृपेच्या विश्वासावर मी असें सांगतों की शब्दाने देखील अरूप ब्रह्माचें रूप दाखवीन आणि तें अतींद्रिय आहे तरी इंद्रियांकडूनहि भोगवीन. ॥३६ ॥

गूढार्थदीपिका—अरूप अतींद्रिय अशी ब्रह्मस्थिति श्रीगुरूच्या कृपेने जशीच्या तशीच शुद्ध ठेवून इंद्रियांकडून अनुभवितां येणें शक्य आहे. म्हणूनच श्रीज्ञानेश्वर माउलींनी "बोली अरूपाचें रूप दावीन। अतींद्रिय परी भोगवीन। इंद्रियां करवीं" अशी प्रतिज्ञा केली आहे. नाहीतर माऊलीची ही प्रतिज्ञा व्यर्थ होईल.

श्रीगुरुकृपेनेच त्रिगुणात्मक अज्ञान नाहीसे झाल्यावर, पूर्वीची मायिक म्हणून समजलीं गेलेलीं नामरूपें देखील, पूर्ण सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप आहेत असा अन्वयाने अनुभव येऊन, जेथें शब्दाचा लाग नाही व जें अतींद्रिय आहे, तेंच परब्रह्म, नामरूपासह सगुण साकार झालेलें असें इंद्रियाने देखील अनुभविलें जातें असा श्रीज्ञानेश्वर महाराजांचा अभिप्राय आहे.

नाथहि म्हणतात "**ब्रह्म इंद्रियां गोचर नसे। गुण गेलिया डोळां दिसे। हें अनुभविथासीचि भासे। बोला ऐसें तें नव्हे.॥ १५१ ॥** (ए० भा० अ० ९) परब्रह्म त्रिगुणात्मक मायेमुळें इंद्रियाला गोचर होत नाही, पण त्रिगुणात्मक मायेचा नाश झाल्यावर, तेंच शुद्ध परब्रह्म सगुणसाकार रूपाने डोळ्याला गोचर होते; हें अनुभवी पुरुषालाच माहित आहे. इतरांना सांगण्यासारखें नाहीं. "**तेव्हां अंतरी चैतन्यघन, बाह्य चिन्मात्र परिपूर्ण। आणिक न दिसे गा जाण। वृत्तीने आण वाहिली**"॥ १४८ ॥ (ए० भा० अ० ९) पूर्ण अनुभवसंपन्न ज्ञान्याला ब्रह्माशिवाय कांहीच दिसत नाही आणि असा हा आंतबाहेर चैतन्यघन आत्मानुभव श्रीगुरुकृपेशिवाय येतच नाही.

श्रीभगवानुवाच

अनाश्रित: कर्मफलं कार्यं कर्म करोति य: । स सन्न्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रिय: ॥ १ ॥

अर्थ—भगवान म्हणतात, अर्जुना! कर्माच्या फळाची इच्छा न करतां जो आपलें विहित कर्म करतो, तोच

संन्यासी होय व तोच योगीहि होय. नुसता अग्नीचा उत्सर्ग केला किंवा अग्नि नाहीसा केला व कर्म सोडलें, म्हणजेच संन्यासी झाला असें नव्हे. ॥ १ ॥

आइका यश श्री औदार्य। ज्ञान वैराग्य ऐश्वर्य। हे साही गुणवर्य। वसती जेथ॥ ३७॥
म्हणोनि तो भगवंतु। जो निःसंगाचा सांगातु। तो म्हणे पार्था दत्तचित्तु। होईं आतां॥ ३८॥
आइकें योगी आणि संन्यासी जनीं। हे एकचि सिनानें झणीं मानीं। एऱ्हवीं विचारिजती जंव दोन्ही। तंव एकचि ते॥ ३९ ॥
सांडिजे दुजया नामाचा आभासु। तरी योगु तोचि संन्यासु। पाहतां ब्रह्मीं नाहीं अवकाशु। दोहींमाजी॥ ४०॥
जैसें नामाचेनि अनारिसेपणें। एका पुरुषातें बोलावणें। कां दोहींमार्गीं जाणें। एकाचि ठायां॥ ४१॥
नातरी एकचि उदक सहजें। परि सिनाना घटीं भरिजे। तैसें भिन्नत्व हें जाणिजे। योगसंन्यासांचें॥ ४२॥
आइकें सकळ संमतें जगीं। अर्जुना गा तोचि योगी। जो कर्मे करूनि रागी। नोहेचि फळीं॥ ४३॥
जैसी मही हे उद्भिजें। जनी अहंबुद्धीवीण सहजें। आणि तेथिंचीं तिये बीजें। अपेक्षीना॥ ४४॥
तैसा अन्वयाचेनि आधारें। जातीचेनि अनुकारें। जें जेणें अवसरें। करणें पावे॥ ४५॥
तें तैसेंचि उचित करी। परी साटोपु नोहे शरीरीं। आणि बुद्धिही करोनि फळवेरी। जायेचिना॥ ४६॥
ऐसा तोचि संन्यासी। पार्था गा परियेसीं। तोचि भरंवसेनिसीं। योगीश्वरु॥ ४७॥

अर्थ—ऐका. यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य हे सहा गुण श्रीकृष्णाच्या ठिकाणीं पूर्णपणें व नित्य असतात. ॥ ३७॥ म्हणून त्याला भगवान म्हणतात. सर्व संग सोडून निःसंग झालेल्याचा जो सांगाती म्हणजे मित्र, तो भगवान श्रीकृष्ण म्हणाला, अर्जुना! आतां माझ्या म्हणण्याकडे नीट चित्त दे. ॥ ३८॥ ऐक, अर्जुना! जगांत योगी व संन्यासी हे एकच आहेत. पण तू कदाचित् निरनिराळे मानशील. साधारणतः दोघांचाहि विचार केला असतां ते एकच आहेत असें दिसेल. ॥ ३९ ॥ योग व संन्यास या दोन नांवाच्या निराळेपणाचा भास सोडून दिल्यास, जो योग, तो संन्यासच आहे. कारण विचार करून पाहतां अद्वैत ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं योग व संन्यास यांच्या भिन्न अर्थाला अवकाश नाही. ॥ ४० ॥ ज्याप्रमाणे एका मनुष्याला दोन निराळ्या नांवांनी संबोधावें किंवा एकाच गावाला जाण्याचे दोन मार्ग असावेत. ॥ ४१ ॥ किंवा एक पाणी दोन निरनिराळ्या भांड्यांत भरावें, त्याप्रमाणे योग व संन्यास यांचें निराळेपण आहे, असें जाण. ॥ ४२ ॥ अर्जुना! जगांतील सर्व जाणत्या पुरूषांच्या मताने, जो आपलीं विहित कर्में करून कर्मफळाची इच्छा धरीत नाही, तोच योगी होय. ॥ ४३ ॥ ज्याप्रमाणे पृथ्वी, उत्पन्न केल्याचा अभिमान न वागवितां, सहज झाडें उत्पन्न करते आणि त्या झाडाला येणाऱ्या फळरूपी बीजाचीहि इच्छा करीत नाही. ॥ ४४ ॥ त्याप्रमाणे, आपल्या वंशांत परंपरेने किंवा जातीला धरून जीं आचारकर्में चालत आलीं असतील, तीं ज्या ज्या काळीं करावयाचीं असतात. ॥ ४५ ॥ त्या त्या काळीं बरोबर तशींच योग्य प्रकारें जो करतो, पण शरीराच्या ठिकाणीं कर्तृत्वाच्या अहंकाराने फुगून जात नाही व ज्याची बुद्धिहि फळापर्यंत जात नाही (म्हणजे जो फळाची इच्छा करीत नाही). ॥ ४६ ॥ अर्जुना! ऐक. अशा रीतीने जो कर्म करणारा आहे. तोच संन्यासी होय व निश्चयाने कर्मयोगीहि तोच होय. ॥ ४७ ॥

गूढार्थदीपिका—योग म्हणजे परमेश्वरस्वरूपाशीं ऐक्य पावणे होय. हें मागें दुसऱ्या अध्यायांत सांगितलेच आहे. हा योग किंवा हें ऐक्य अंतःकरणवृत्ति परमेश्वराचे ठिकाणीं स्थिर झाली की साधलें जाते आणि विषय, देह, इंद्रियें, मन यांच्यांत आसक्त झालेलें अंतःकरण, त्यांना सोडून अलग झालें की तें स्वभावतः परमेश्वराचे ठिकाणीं स्थिर होतें. संन्यासाने जसें अंतःकरण विषयादिकांपासून सुटून अलग होतें, तसेंच योगानेहि होते. म्हणून योग व संन्यास एकच आहेत, असें येथे सांगितले आहे.

वांचूनि उचित कर्म प्रासंगिक। तयातें म्हणे हें सांडीन बद्धक। तरी टांकोटांकीं आणिक एक। मांडीचि तो॥ ४८॥

अर्थ—प्रसंगोपात्त जें विहित कर्म तें बंधनकारक आहे, तें सोडलें पाहिजे असें म्हणून तें केलें नाही तरी, लागलीच दुसरें कर्म तो करतोच. ॥ ४८ ॥

गूढार्थदीपिका—'कर्माचा त्याग' हा 'संन्यास' शब्दाचा खरा अर्थ नव्हे. मी प्रकृतीहून निराळा आहे म्हणजे कर्म, कर्तृत्व व भोक्तृत्व हें सर्व प्रकृतीचें कार्य आहे, माझ्याशीं त्याचा कांही एक संबंध नाही हें ओळखणें याला खरोखर संन्यास म्हणतात. म्हणून "म्हणऊनि संग जंव प्रकृतीचा। तंव त्याग न घडे कर्माचा"॥ ६३ ॥ (ज्ञा० अ० ३) 'विहितकर्मत्यागाने मी कर्मसंन्यास केला' असें प्रकृतिबद्धाने म्हणणें, हा त्याचा आग्रह होय, मी प्रकृतीहून निराळा आहे, असें जोपर्यंत तो ओळखत नाही व मी कर्ताभोक्ता आहे असें आपल्याला समजतो, तोपर्यंत त्याचा कर्मसंन्यास होत नाही. एक कर्म सोडले तरी तो लगेच दुसरें कर्म करतो.

जैसा क्षाळूनियां लेपु एकु। सवेंचि लाविजे आणिकु। तैसेनि आग्रहाचा पाइकु। विचंबे वायां॥ ४९॥
गृहस्थाश्रमाचें ओझें। कपाळीं आधींचि आहे सहजें। कीं तेंचि संन्याससवा ठेविजे। सरिसें पुढती॥ ५०॥
म्हणूनि अग्निसेवा न सांडितां। कर्माची रेखा नोलांडितां। आहे योगसुख स्वभावतां। आपणपांचि॥ ५१॥

अर्थ—ज्याप्रमाणें लावलेला एक लेप धुवून टाकून दुसरा लेप लावतात, त्याप्रमाणें कर्म सोडण्याचा आग्रह धरणारा, कर्मरहित न होतां, व्यर्थ दुसऱ्या कर्मात गुरफटला जातो. ॥ ४९ ॥ गृहस्थाश्रमांतील कर्तव्यकर्माचें ओझें आधीच दैवाने सहज प्राप्त झालेलें आहे. तें टाकून देऊन लगेच पुन: संन्यासाश्रमांतील कर्तव्याच्या रूपाने तें वाढविणें म्हणजे घेणे होय॥ ५० ॥ म्हणून अग्नीची सेवा म्हणजे अग्निहोत्रादि कर्में न सोडतां व कर्माची मर्यादा न उल्लंघितांच (म्हणजे कर्म करीतच) आपल्या ठिकाणीं सहज ब्रह्मैक्यभावरूपी योगाचें सुख मिळतें. ॥ ५१ ॥

गूढार्थदीपिका—आहे योगसुख स्वभावतां। आपणपांचि—कर्मफळाची इच्छा न करितां, परमेश्वराची आज्ञा समजून, केलेलें विहितकर्मांनुष्ठान देखील, आत्मस्वरूपाचें ठिकाणीं आपलें अंत:करण स्थिर करते व आपल्या ठिकाणींच आपल्याला ऐक्याचें सुख मिळतें.

यं सन्न्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव। न ह्यसन्न्यस्तसङ्कल्पो योगी भवति कश्चन॥ २॥

अर्थ—ज्याला संन्यास म्हणतात तोच योग होय असे जाण. ज्याने संकल्पाचा त्याग केला नाही तो योगी कधीं होत नाही. ॥ २ ॥

ऐकें संन्यासी तोचि योगी। ऐसी एकवाक्यतेची जगीं। गुढी उभविली अनेगीं। शास्त्रांतरीं॥ ५२॥
जेथ संन्यासिला संकल्पु तुटे। तेथेंचि योगाचें सार भेटे। ऐसें हें अनुभवाचेनि धटें। साचें जया॥ ५३॥

अर्थ—अर्जुना! ऐक. जो संन्यासी आहे तोच योगीहि होय. अशा दोन्ही मार्गाच्या एकवाक्यतेचा झेंडा, पुष्कळ लोकांनी शास्त्रांच्या आधारें या लोकांत फडकविला आहे. ॥ ५२ ॥ जेथें टाकून दिलेला संकल्प मुळींच राहत नाही, तेंच कर्मयोगाचेंहि सार आहे, असें दृढ अनुभवाचे बळावर जो निश्चित जाणतो. ॥ ५३ ॥

गूढार्थदीपिका—संन्यासी तोचि योगी—संन्यास किंवा योग या दोहोंनीहि एकच अनुभव येतो. म्हणून यादृष्टीने योग व संन्यास यांचे ऐक्यच आहे, असें शास्त्रकारांनी सांगितलें आहे. कारण ज्यांनी आत्मस्वरूप जाणून, कर्म, कर्तृत्व कर्मफळ या सर्वांहून आपल्याला निराळें पाहिलें, तो साक्षीस्वरूप झालेला ज्ञानी, कर्मादिकांचा आपल्याशीं संबंधच वागवित नसतो; म्हणून त्याला सर्वकर्मसंन्यास घडतो.

कर्मयोग्यालाहि निष्काम कर्मानुष्ठान करण्याकरितां, भगवंताचे ठिकाणीं चित्त ठेवून, संकल्पाचा म्हणजे कर्मफळाच्या इच्छेचा त्याग करावाच लागतो. (संकल्पाचा त्याग केला असतां,) कर्मयोग्याचें चित्त जसजसें भगवंताचे ठिकाणी स्थिर होतें, तसतसा त्यालाहि, मी सर्व कर्मरहित आहे असा अनुभव येतो. याप्रमाणें संन्यासी व योगी दोघांनाहि आपल्या कर्मरहित आत्मस्थितीचा अनुभव येतो, म्हणून दोन्ही मार्ग एकच आहेत असें भगवान म्हणतात.

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते। योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते॥ ३॥

अर्थ—ब्रह्मैक्य पदावर चढूं इच्छिणाऱ्याला कर्मच कारण आहे व ब्रह्मैक्यपदावर आरूढ झालेल्यांना शमच कारण आहे. ॥ ३ ॥

आतां योगाचळाचा निमथा। जरी ठाकावा आथि पार्था। तरी सोपाना या कर्मपथा। चुका झणीं॥ ५४॥
येणें यमनियमांचेनि तळवटें। रिगे आसनाचिये पाउलवाटें। येई प्राणायामाचेनि आडकंठें। वरौता गा॥ ५५॥

अर्थ—योगरूपी पर्वताचा माथा म्हणजे परब्रह्म, तेथें जर प्राप्त व्हावयाचें असेल तर अर्जुना! कर्ममार्गाची पायरी चुकतां कामा नये.॥ ५४॥ अर्जुना! (येणें म्हणजे कर्मयोगाने सिद्ध होणाऱ्या) यमनियमरूपी खालच्या पायऱ्यांनी आसनाच्या पाऊलवाटेने चढण्याला सुरुवात करून प्राणायामरूपी बाजूच्या कांठाने वर चढावे.॥ ५५॥

गूंढार्थदीपिका—येणें यमनियमाचेनि तळवटें—कर्मयोग म्हणजे योगाभ्यासांतील यमनियमरूपी खालच्या पायऱ्याच होत. निष्काम विहितकर्मानुष्ठानाने यमनियम हीं योगाचीं दोन अंगें साध्य होतात, अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य व अपरिग्रह, असे हे योगशास्त्रांत यम सांगितले आहेत. अहिंसा म्हणजे मनवाचाकायेने कोण्याहि प्राण्याला दुःख न देणे. सत्य म्हणजे मनवाचाकायेने असत्य न बोलणे. अस्तेय म्हणजे मनवाचाकायेने देखील दुसऱ्याच्या वस्तूंचा अभिलाष न धरणें. ब्रह्मचर्य म्हणजे मनवाचाकायेने स्त्रीसंगाची इच्छा न करणें व अपरिग्रह म्हणजे कोणत्याहि वस्तूंचा संग्रह न करणें.

परमेश्वरप्राप्तीकरिता कराव्या लागणाऱ्या निष्काम कर्मानुष्ठानांत "**निष्कामासी यागयजन। स्वधर्मार्थ करावे यज्ञ। तेथ पशूचें आलभन। सर्वथा हनन करूं नये.॥ २६४॥' पशूंचें करूं नये हनन। देवतोद्देशें अंगस्पर्शन या नांव बोलिजे आलभन। हें यज्ञाचरण निष्काम**'॥ २६५॥ (ए० भा० अ० ५) पशूंची हिंसा करावयाची नसते. असें नाथांनी म्हटलें आहे. हिंसारूपी यज्ञ हा स्वर्गप्राप्तीकरितां म्हणून सांगितला आहे; परमेश्वरप्राप्तीकरिता नाही. त्याचप्रमाणें फक्त ऋतुकाळीं सकृत् स्वस्त्रीगमन करणें हेंहि ब्रह्मचर्यच होय, असे शास्त्रांत सांगितलें आहे. म्हणून निष्कामकर्मानुष्ठानाने योगांतील यम साधले जातात. शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान असे हे नियम योगशास्त्रांत सांगितले आहेत. शौच म्हणजे पाणी व माती यांनी शरीरशुद्धी करणें. संतोष म्हणजे दैवाने मिळेल त्यांत संतुष्ट असणें, तप म्हणजे व्रतादिकांनी शरीर कृश करणें, स्वाध्याय म्हणजे वेदाध्ययन करणें व ईश्वरप्रणिधान म्हणजे परमेश्वराचे नामस्मरण व ध्यान करणें, हे सर्व नियम धर्मशास्त्रांतून सांगितले असल्यामुळे, त्यांचें निष्काम अनुष्ठान विहितच आहे. म्हणून निष्काम विहितकर्मानुष्ठानरूप कर्मयोगाने नियमहि साधतात. याप्रमाणें निष्कामकर्मानुष्ठानाने योगमार्गांतील यम व नियम ह्या दोन पायऱ्या साधल्या जातात.

आसनाचिये पाउलवाटे—पाउलवाट म्हणजे सुखाने चालतां येणारी वाट.

"स्थिरसुखमासनम्" योगामध्यें पुष्कळ वेळ सुखानें बसतां येईल असें आसन घालून बसायला सांगितलें जातें, म्हणून त्या आसनाला पाउलवाट म्हटलें आहे. यम, नियम इत्यादि सर्व साधनें मनाच्या खंबीर निश्चयाने केलीं जातात.

येई प्राणायामाचेनि आडकंठें। वरौता गा—प्राणायाम म्हणजे प्राणापान यांच्या गतींचा रोध. मन ज्ञानशक्तिरूप असून, त्याचीच क्रियारूपशक्ति म्हणजे प्राण होय; म्हणून प्राणायामाला आडकांठ म्हणजे बाजूचा कांठ म्हटलें आहे. या प्राणायामाच्या योगाने मनाचें चांचल्य नाहिसे होतें, हेंच मनाचें वर म्हणजे चवथ्या अंगावर आरूढ होणें होय.

मग प्रत्याहाराचा अधाडा। जो बुद्धीचियाही पाया निसरडा। जेथ हटिये सांडिती होडा। कडेलग॥ ५६॥

अर्थ—पुढें प्रत्याहाररूपी तुटलेला कडा लागतो, जेथे बुद्धीचे पाय देखील घसरतील, असा तो पुढें प्रत्याहाररूपी कडा चढावा लागतो. मोठमोठ्या हठयोग्यांना देखील या कड्याशीं आल्यावर आपला हट्ट सोडून द्यावा लागतो.॥ ५६॥

गूढार्थदीपिका—मग प्रत्याहाराचा अधाडा—"स्वविषयासम्प्रयोगे चित्तस्य स्वरूपानुकार इवेंद्रियाणां प्रत्याहारः"

इंद्रियांचा आपआपल्या विषयाशीं संबंध सुटून, त्या चित्ताच्या स्वरूपाचें अनुकरण करणें याला प्रत्याहार म्हणतात. म्हणजे प्रत्याहारांत इंद्रिये चित्ताच्या स्वाधीन होतात. या प्रत्याहाराला श्रीज्ञानेश्वर माऊलींनी 'अधाडा म्हणजे पर्वताचा तुटलेला कडा' म्हटलें आहे. तुटलेल्या कड्यावर चढणें जसें कठीण असते, तसेंच प्रत्याहार साधणें अत्यंत कठीण आहे, हेंच या उपमेने दाखविलें आहे.

बुद्धिचिया ही पायां निसरडा—जीवाची बुद्धि आत्मस्वरूप विसरून, मनाच्या स्वाधीन असते. योग सिद्ध होण्याकरितां म्हणजे बुद्धीचें आत्म्याशी ऐक्य होण्याकरितां, मन इंद्रियें यांच्या पारतंत्र्यांतून बुद्धीची सुटका झाली पाहिजे. ''इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मन:'' विषयसक्तीमुळें जीवाचे ठिकाणीं इंद्रियांचेंच प्राबल्य असतें तीं मनांला ओढतात व मन बुद्धीला ओढते. अशा रीतीने बुद्धि आत्म्याच्या ठिकाणीं स्थिर न होतां तेथून घसरून देहासक्त व विषयासक्त होते.

तरी अभ्यासाचेनि बळें। प्रत्याहारीं निराळें। नखी लागेल ढाळें ढाळें। वैराग्याची॥५७॥

अर्थ—पण अभ्यासाचे बळाने, प्रत्याहाररूपी निरालंब भूमिकेंत, हळुहळु वैराग्याचीं नखें रोवलीं जाऊं शकतात. ॥ ५७ ॥

गूढार्थदीपिका—''अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोध:''—अनंतजन्मापासून विषयाकडे धांवण्याचा अभ्यास असलेल्या चित्ताला, इंद्रियांच्या स्वाधीन होऊन, विषयाकडे न धावूं देण्याचा सतत प्रयत्न करणें, याला अभ्यास म्हणतात. आणि इहपरलोकांतील विषयसुखाची यत्किंचित् इच्छा नसणें, याला वैराग्य म्हणतात. ज्याप्रमाणें घोरपड, ज्या ठिकाणीं चढण्यांचे साधन नाही, अशा किल्ल्यावर फेकली असतां ती आपलीं नखे रोवून, आपल्या सामर्थ्याने चिकटून बसते व तिच्या साह्याने मनुष्य किल्ल्यावर चढतो; त्याप्रमाणें अभ्यासाचे सामर्थ्य व वैराग्याचीं नखें असलीं तरच मनुष्य प्रत्याहाररूपी कड्यावर चढूं शकतो.

ऐसा पवनाचेनि पाठारें। येतां धारणेचेनि पैसारें। क्रमी ध्यानाचें चवरें। सांडे तंव॥५८॥

अर्थ—अशा प्रकारें प्राणवायूच्या आश्रयाने, धारणारूपी विस्तृत मार्गाने ध्यानाचें शिखर गांठेपर्यंत, वर चालावें. ॥ ५८ ॥

गूढार्थदीपिका—ऐसे पवनाचेनि पाठारें। धारणेचेनि पैसारें—पुढील मार्ग प्राणाचे साह्यानेच आक्रमावा लागतो. ''देशबंधश्चित्तस्य धारणा'' आधारचक्रादि देशांचे ठिकाणीं चित्त बांधलें जाणें किंवा स्थिर होणें, याला धारणा म्हणतात.

ज्याप्रमाणे विस्तृत रस्त्यावर पडण्याची भीति नसते, त्याप्रमाणें धारणा सिद्ध झाली असतां, पडण्याची भीति राहत नाही; म्हणून येथें धारणेला विस्तृत मार्गाची उपमा दिली आहे.

क्रमी ध्यानाचें चवरें। सांडे तंव—''तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम्'' त्या देशाचे ठिकाणीं असलेल्या परमेश्वरस्वरूपाचे ठिकाणीं एकसारखा चित्ताचा प्रवाह राहणें याला ध्यान म्हणतात. ध्यान या भूमिकेपर्यंत मार्गक्रमणा आहे; म्हणून ध्यानाला चवरें म्हणजे मार्गक्रमणाचा शेवट म्हटलें आहे.

मग तया मार्गाची धांव। पुरेल प्रवृत्तीची हांव। जेथ साध्यसाधना खेंव। समरसें होय॥५९॥
जेथ पुढील पैस पारुखे। मागील स्मरावें तें ठाके। ऐसिये सरिसीये भूमिके। समाधि राहे॥६०॥

अर्थ—मग या ध्यान भूमिकेवर चालण्याची धांव बंद पडते. प्रवृत्तिहि वोहटीला लागते आणि मग तेथें साध्य व साधन यांची एकरूप मिठी पडते—म्हणजे साधन सरून साध्यच राहते.॥५९॥ तेथें पुढील जाणण्याची प्रवृत्ति बंद पडते व मागीलहि कांही स्मरलें जात नाही, अशा सर्वांपेक्षा सरस भूमिकेवर समाधिस्थिति राहते.॥६०॥

गूढार्थदीपिका—जेथ पुढील पैस पारुखे। मागील स्मरावें ते ठाके—''तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूप-शून्यमिव समाधि:'' जेव्हा ध्यान करणाऱ्याचे चित्त, मी ध्यान करीत आहे. असे आपले स्वरूप विसरून, केवळ ध्येयाकार होऊन जाते, तेव्हा ते ध्यानच समाधि होते. ध्यानांत मी ध्यान करतों अशी जाणीव राहते, म्हणून त्रिपुटी राहते. ही जाणीव नाहिशी झाली की ती ध्यानस्थितीच समाधि होते; म्हणून समाधि ही जाणीवरहित व त्रिपुटीरहित स्थिति होय. हेच श्रीज्ञानेश्वर माऊलींनी ''जेथ पुढील पैस पारुखे। मागील स्मरावें ते ठाके'' या चरणांत सांगितले आहे.

ऐसिये सरिसीये भूमिके। समाधि राहे—जाणीव स्फुरली की, जाणणारा व जाणली जाणारी वस्तु असें द्वैत

भासते. ही द्वैतस्थिति ध्यानापर्यंत राहते. आणि जाणीव नाहिशी झाली की, त्यापेक्षां सरस अशी जाणीवरहित अत्यंत एकरूप आनंदाची स्थिति राहते. समाधींत जाणीव राहत नाही, म्हणून समाधि ही ''सरिसिये भूमिके। समाधि राहे'' अत्यंत एकरूप किंवा अद्वैतस्थिति होय, असे माऊलीचें सांगणें आहे.

येणें उपायें योगारूढु। जो निरवधि जाहला प्रौढु। तयाचिया चिन्हांचा निवाडु। सांगेन आइकें॥ ६१॥

अर्थ—वरील उपायाने जो योगारूढ होऊन, अखंड पूर्ण व्यापक स्वरूप झाला, त्याचीं चिन्हें स्पष्ट करून सांगतों ऐक.॥ ६१॥

गूढार्थदीपिका—निरवधि जाहला प्रौढु—समाधिरूप भूमिकेवर आरूढ झालेला पुरुष अमर्याद व्यापक होतो.

यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते। सर्वसङ्कल्पसन्न्यासी योगारूढस्तदोच्यते॥ ४॥

अर्थ—जेव्हा योगी इंद्रियांच्या विषयांचे ठिकाणीं व कर्माचे ठिकाणीं मुळींच आसक्त राहत नाहीं व कर्म करण्याची किंवा कर्माचें फळ भोगण्याची त्याच्या मनांत वासनाच उत्पन्न होत नाही, तेव्हा तो पुरुष योगारूढ म्हटला जातो.॥ ४॥

तरी जयाचिया इंद्रियांचिया घरा। नाहीं विषयांचिया येरझारा। जो आत्माबोधाचिया वोवरां। पहुडला असे॥ ६२॥
जयाचें सुखदु:खाचेनि आंगें। झगटलें मानस चेवो नेघे। विषय पासींही आलिया से न रिघे। हें काय म्हणऊनि॥ ६३॥
इंद्रियें कर्माचां ठायीं। वाढीनलीं परि कहीं। फळहेतूची चाड नाहीं। अंत:करणीं॥ ६४॥
असतेनि देहें एतुला। जो चेतुचि दिसे निदेला। तोचि योगारूढु भला। वोळखें तूं॥ ६५॥

अर्थ—ज्याचें आत्मस्वरूपाचे ठिकाणी जडलेलें मन, प्राप्त झालेल्या सुखदु:खाला जाणून, जागे होत नाही. म्हणजे देहावर येऊन भोग भोगत नाही—एवढेंच नव्हे तर विषय जवळ आले असतां, हें काय आहे, इतके देखील ज्याला स्मरण होत नाही.॥ ६३॥ इंद्रियें कर्माचे ठिकाणीं प्रवृत्त झालीं तरी, अंत:करणांत कर्माचें फळ भोगावें अशी इच्छा, कधी उत्पन्न होत नाही.॥ ६४॥ देह असतांनाच जो याप्रमाणें आत्मस्वरूपाचे ठिकाणी जागा राहून विषयाचे ठिकाणीं निजला आहे—म्हणजे विषयाचें विस्मरण झालें—तो पुरुष पूर्ण योगारूढ झाला, असें समज.॥ ६५॥

गूढार्थदीपिका—तोचि योगारूढ भला—बुद्धि अत्यंत शुद्ध झालीं असतां, त्या बुद्धीने आत्मसाक्षात्कार होतो. विषय, इंद्रियें मन यांच्यापासून बुद्धि निराळी झाली की, ती शुद्ध होते. ही बुद्धि एकदां आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर झाली म्हणजे विषय, इंद्रियें व मन यांच्याशीं पुन: ऐक्य पावत नाही. तीच साक्षीरूप होऊन राहते व तिला एका ब्रह्मावांचून दुसरें कांहीच वस्तुस्वरूपाने भासत नाही. अशा योगारूढ पुरुषाचे ठिकाणीं इतरांना जे सुखदु:खाचे भोग होतांना दिसतात ते त्याला होत नसून, प्रारब्धापर्यंत असणाऱ्या अहंकाराला होतात. पण अज्ञान्याला, योगारूढ पुरुष भोग भोगतो असे त्याच्या अज्ञानामुळें वाटते. ''दृष्टा श्रोता वक्ता कर्ता भोक्ता भवत्यहंकार:'' (वे० सि० सा० सं० श्लो० ४२४) असे आचार्यांनीहि म्हटलें आहे.

तेथ अर्जुन म्हणे अनंता। हें मज विस्मो बहु आइकतां। सांगें तया ऐसी हे योग्यता। कवणें दीजे॥ ६६॥

अर्थ—तेव्हा अर्जुन म्हणतो, अनंता! हें मी ऐकतांना, मला मोठें आश्चर्य वाटते की एवढी स्थिति त्यांना कोण प्राप्त करून देतो?॥ ६६॥

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्। आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मन:॥ ५॥

अर्थ—आपणच आपला उद्धार करून घेतला पाहिजे. आपण आपला अध:पात करून घेऊ नये. (आपला आपण उद्धार करून घेतो म्हणून) आपणच आपला बंधु होतो व आपणच आपले शत्रु होतो.॥ ५॥

तव हांसोनि कृष्ण म्हणे। तुझें नवल ना हें बोलणें। कवणासि काय दिजेल कवणें। अद्वैतीं इये॥ ६७॥
पैं व्यामोहाचिया शेजे। बळिया अविद्या निद्रित होईजे। ते वेळीं दु:स्वप्न हा भोगिजे। जन्ममृत्यूंचा॥ ६८॥
पाठीं अवसांत ये चेवो। तैं तें अवघेंचि होय वावो। ऐसा उपजे नित्य सद्भावो। तोहि आपणपांचि॥ ६९॥
म्हणऊनि आपणचि आपणपेया। घातु कीजतु असे धनंजया। चित्त देऊनि नाथिलिया। देहाभिमाना॥ ७०॥

अर्थ—तेव्हा भगवान श्रीकृष्ण हंसून अर्जुनास म्हणतात, अर्जुना! तुझेंच बोलणें आश्चर्यकारक नाही का? या अद्वैत स्थितीत कोण कोणाला काय देईल?॥ ६७॥ जेव्हा हा जीवात्मा आपण बळेच दुस्तर अनादि अविद्येने भ्रांतिरूप आंथरूणावर निजतो तेव्हा तो आपणच आपल्या जन्ममृत्यूचे दुष्ट स्वप्न पाहतो.॥ ६८॥ नंतर अकस्मात्, पूर्व पुण्याने जेव्हा तो जागा होतो तेव्हा तें सर्व स्वप्न त्याला खोटे आहे व मी जन्ममृत्युरहित नित्य आहे, असा जो भाव उत्पन्न होतो; तोहि त्याच्याच ठिकाणीं होतो.॥ ६९॥ म्हणून अर्जुना! या खोट्या देहाभिमानाकडे चित्त देऊन—म्हणजे खोट्या देहालाच मी असे समजून, आपणच आपला घात करून घेतो.॥ ७०॥

गूढार्थदीपिका—जीवाने आपल्या स्वरूपाचा विचार न करतां, मी देह आहे, अशी दृढ विपरीत कल्पना जशी करून घेतली. तशीच त्याने मी सच्चिदानंद स्वरूप आहे, अशी दृढ कल्पना करून घ्यायला पाहिजे.

बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः। अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत्॥ ६॥

अर्थ—ज्यांनी (विपरीत कल्पना करणारें) आपलें अंत:करण जिंकलें म्हणजे आपल्या स्वाधीन केलें, त्यांचा आत्माच त्यांचा बंधु म्हणजे हितकर्ता असतो आणि ज्यांनी अंत:करणादिकांना जिंकलें नाही त्यांचा आत्मा शत्रूप्रमाणें त्यांच्याशीं शत्रुत्व करतो.॥ ६॥

हा विचारूनि अहंकारु सांडिजे। मग असतीच वस्तु होईजे। तरी आपली स्वस्ति सहजें। आपण केली॥ ७१॥
एऱ्हवीं कोशकीटकाचिया परी। तो आपणपया आपण वैरी। जो आत्मबुद्धि शरीरीं। चारुस्थळी॥ ७२॥
कैसे प्राप्तीचिये वेळे। निदैवा अंधळेपणाचे डोहळे। कीं असते आपुले डोळे। आपण झांकी॥ ७३॥
कां कवण एकु भ्रमलेपणें। मी तो नव्हे गा चोरलों म्हणे। ऐसा नाथिला छंदु अंत:करणें। घेऊनि ठाके॥ ७४॥
एऱ्हवीं होय तें तोचि आहे। परि काई कीजे बुद्धि तैशी नोहे। देखा स्वप्नींचेनि घायें। कीं मरे साचें॥ ७५॥
जैसी ते शुकाचेनि आंगभारें। नळिका भोविन्नली एरी मोहरें। तरी तेणें उडावें परि न पुरे। मनशंका॥ ७६॥
वायांचि मान पिळी। अटुवें हियें आवळी। टिटांतु नळी। धरूनि ठाके॥ ७७॥
म्हणे बांधला मी फुडा। ऐसिया भावनेचिया पडे खोडां। कीं मोकळिया पायांचा चवडा। गोंवी अधिकें॥ ७८॥
ऐसा काजेंवीण आंतुडला। तो सांग पां काय आणिकें बांधला। मग नोसंडी च जऱ्ही नेला। तोडूनि अर्धा॥ ७९॥
म्हणऊनि आपणपया आपणचि रिपु। जेणें वाढविला हा संकल्पु। येर स्वयंबुद्धि म्हणे बापु। जो नाथिलें नेघे॥ ८०॥

अर्थ—(आपण ज्या देहाचा अभिमान धारण करतो तो खोटा आहे) असा विचार करून, अर्जुना! आपण देहाचा अभिमान सोडला असतां मूळची जी आत्मवस्तु आहे, तीच आपण होतो. अशा रीतीने आपणच आपले कल्याण करून घेतो.॥ ७१॥ वास्तविक जो शरीराला सुंदर समजून ते शरीर मी आहे अशी बुद्धि धारण करितो, तो कोशकीड्याप्रमाणें आपण आपला वैरी होतो. (म्हणजे आपल्या आत्मस्थितीचा नाश करून घेतो.)॥ ७२॥ दुर्दैव्याला जसें अत्यंत थोर लाभ होण्याचे वेळीं आपण आंधळे व्हावे अशी इच्छा होऊन तो उघडे असलेले आपले डोळे आपण झांकून घेतो.॥ ७३॥ किंवा एखादा कोणी भ्रांत होऊन "मी हारवलों, मी तो नव्हे" असें तो म्हणतो व खोटीच मनाची समज करून बसतो.॥ ७४॥ एरवीं विचाराने जें आत्मस्वरूप तो होतो, ते तो असतोच. पण काय करावे, तशी त्याची बुद्धीच होत नाही. स्वप्नांतील शस्त्राच्या घावाने तो खरेंच मरतो, पहा!॥ ७५॥ ज्याप्रमाणे राघूला धरण्याकरितां टांगलेली नळी राघूच्या अंगाच्या भारानेच सहज समोर फिरली असतां, त्याने उडून जावे, पण त्याच्या मनांतील शंकाच जात नाही.॥ ७६॥ व्यर्थच तो राघू मानेला पिळ देतो व घट्ट छातीने आवळून ती नळी, तो पायांच्या चवड्यांत धरून ठेवतो.॥ ७७॥ पण तो आपल्याला 'मी बांधला गेलों' असें व्यर्थच म्हणतो व या भावनेच्या खोड्यांत पडतो. मग आपल्या पायांचा मोकळा असलेला चवडा अधिक गुंतवून घेतो.॥ ७८॥ याप्रमाणे तो राघू, विनाकारण आपणच अडकून पडतो. अर्जुना! सांग बरें! तो दुसऱ्याकडून बांधला गेला आहे काय? मग अर्धा तोडून जरी नेला तरी तो ती नळी सोडत नाही.॥ ७९॥ म्हणून, जगाचे बाप असे श्रीकृष्ण म्हणतात, ज्याने 'मी म्हणजे देह' ही कल्पना दृढ केली, तो आपणच आपला वैरी होय आणि इतर, जो खोट्या देहाचा अभिमान धारण करीत नाही, तो मात्र आत्मबुद्धि धारण करणारा होय.॥ ८०॥

गूढार्थदीपिका—स्वयंबुद्धि—विचार करून पाहातां आत्म्यावांचून दुसरी वस्तु नाही असे श्रुतिसंतांनी सांगितले असल्यामुळे, आत्म्याहून निराळे भासणारे जीवजगत्, इत्यादी पदार्थ मुळींच अस्तित्वांत नाहीत, ते खोटे आहेत, असे जो जाणतो त्याला स्वयंबुद्धि म्हणतात.

जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः। शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः॥ ७॥
ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रियः। युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चनः॥ ८॥

अर्थ—ज्याने आपले अंत:करण पूर्णपणें जिंकले, म्हणून जो सदा प्रसन्नचित्त असतो त्याला आपलेच ठिकाणीं परमेश्वरस्वरूपाचा अनुभव येतो. आणि तो शीत-उष्ण, सुख-दुख, मान-अपमान इत्यादि सर्व द्वंद्वे सारखीच पाहतो.॥ ७॥ ज्ञानाने विज्ञानरूप प्रपंचाचा आत्मस्वरूपाने अनुभव घेऊन, जो परम निर्वासन झाला, जो अखंड अविकारी असतो, ज्याने आपलीं इंद्रिये पूर्ण जिंकलीं आहेत व जो सोनें माती सारखेंच समजतो, तोच युक्त (मनइंद्रियांना जिंकणारा) पुरुष योगी म्हटला जातो.॥ ८॥

तया स्वांतःकरणजिता। सकळकामोपशांता। परमात्मा परौता। दूरी नाहीं॥ ८१॥

अर्थ—ज्याने आपले अंत:करण जिंकले आहे, म्हणून जो सर्व विषयवासनारहित झाला, त्याला परमात्मा, त्याच्या पलीकडे म्हणजे त्याच्याहून निराळा असा, दूर नाही. (तोच परमात्मा होतो असा अर्थ).॥ ८१॥

गूढार्थदीपिका—स्वांतःकरणजिता। जीव हा मूळांत परब्रह्मस्वरूपच आहे; पण तो अंत:करण उपाधीच्या स्वाधीन असल्यामुळे, आपल्या मूळच्या स्वरूपस्थितीस पारखा झाला. अंत:करणाकडून होणाऱ्या निरनिराळ्या व्यापारामुळे, एकच अंत:करण निरनिराळ्या नावांने संबोधिले जाते. ते परब्रह्मवस्तूहून निराळ्या वस्तूंची कल्पना करते, म्हणून त्याला मन म्हणतात. चिंतन करते, म्हणून त्याला चित्त म्हणतात व देहाचा अहंकार धारण करते, म्हणून तेच अहंकारहि होते. याप्रमाणें जीव हा अंत:करण उपाधीने परब्रह्माहून विषयासक्त होऊन निराळा पडला; पण आपल्या मूळ परब्रह्मस्वरूपाच्या विचाराने, तो अंत:करण जिंकू शकतो—म्हणजे आत्मस्वरूपाच्या विचाराने विषय खोटे आहेत व एक परब्रह्मच सत्य आहे असे जाणले असतां, अंत:करण परब्रह्माचे ठिकाणीं स्थिर होते. ज्यानें अंत:करण परब्रह्माचे ठिकाणीं स्थिर केलें, त्यानें आपलें अंत:करण जिंकलें असे समजावें.

सकळकामोपशांता। अंत:करण आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर झालें असतां, विषय खोटें वाटतात व विषयसुखाची वासना नाहीशी होते व अंत:करण विषयसुखावांचूनच अखंड प्रसन्न राहते.

परमात्मा परौता दूर नाहीं—अशी अंत:करणाची जी स्थिति, त्यालाच परमात्मा म्हणतात. अर्थात् अज्ञान व सर्व वासना नाहिशा झाल्या असतां, जीवच परमात्मस्वरूप होतो. हेंच "परमात्मा परौता दूर नाही" या चरणाने माऊलींनी सांगितलें आहे.

जैसा किडाळाचा दोषु जाये। तरी पंधरें तेंचि होये। तैसे जीवा ब्रह्मत्व आहे। संकल्पलोपीं॥ ८२॥

अर्थ—ज्याप्रमाणें हिणकसपणाचा कलंक नाहिसा झाला की तेंच शुद्ध सोनें होतें, त्याप्रमाणें मी ब्रह्म नाही, ही जीवाची कल्पना नाहिशी झाली, की जीव ब्रह्मस्वरूप झालाच म्हणून समज.॥ ८२॥

गूढार्थदीपिका—जीवा ब्रह्मत्व आहे। संकल्पलोपीं—ब्रह्मज्ञानाची किल्ली। सांगेन एक्याची बोली। ज्याची कल्पना निमाली। ते प्राप्त पुरुष॥ ४२१॥ (स्वात्मसुख) मी सच्चिदानंदस्वरूप नाही, मी देहस्वरूप आहे, मला जन्ममृत्यु, आहेत, मी कर्ताभोक्ता आणि अपूर्ण आहे, अशी जीवाने आपल्याविषयीं कल्पना करून घेतली आहे. ती नि:शेष नाहिशी झाली म्हणजे, मी म्हणजे देह, ही समजूत जितकी अत्यंत दृढ आहे, तितकीच मी ब्रह्मस्वरूप आहे. ही कल्पना अत्यंत दृढ झाली असतां, जीव ब्रह्मस्वरूप होतो. "**देहात्मज्ञानवज्ज्ञानं देहात्मज्ञानबाधकम्। आत्मन्येव भवेद्यस्य स नेच्छन्नपि मुच्यते**"॥ २०॥ (पं० द० तृप्तिदीप).

हा घटाकारु जैसा। निमालिया तया अवकाशा। नलगे मिळों जाणें आकाशा। आना ठाया॥ ८३॥
तैसा देहाहंकारु नाथिला। हा समूळ जयाचा नाशिला। तोचि परमात्मा संचला। आधींचि आहे॥ ८४॥

अर्थ—ह्या घटाचा नाश झाला म्हणजे घटांतील आकाशाला बाहेरच्या आकाशाशीं मिळण्याकरितां दुसऱ्या ठिकाणीं जावें लागत नाही. (तेथल्या तेथे तें मिळतें असा अर्थ) ॥ ८३ ॥ त्याप्रमाणे हा देहाचा खोटा अहंकार ज्याचा नि:शेष नाहिसा झाला, तो मूळचाच परमात्मस्वरूप होऊन राहतो. ॥ ८४ ॥

गूढार्थदीपिका—देहाच्या अहंकारामुळेच जीव हा परमेश्वराहून निराळा झाला. देहवस्तूची कल्पना करून, तिचा दृढ अहंकार तो धारण करतो व परमेश्वराहून निराळा पडतो. अर्थातूच. तो अहंकार नाहिसा झाल्याबरोबर, तो (जीव) आपल्या मूळच्या परमात्मा स्वरूपाशीं ऐक्य पावतो.

समूळ—आत्मज्ञानाने 'मी देह आहे' हा अहंकार नाहिसा होऊन, 'मी ब्रम्ह आहे' हा अहंकार उत्पन्न होतो. पण अद्वैतस्वरूपाच्या ठिकाणी मीं ब्रम्ह म्हणणारा दुसरा कोणी नाही. अर्थात् मी ब्रम्ह आहे असे चिंतन करितांना, 'मी' म्हणून व्यक्तिरूप स्थूल देहाकारच घेतला जातो; म्हणून देहाहंकाराबरोबर मी ब्रम्ह आहे, हा ज्ञानाहंकारहि नाहिसा झाला पाहिजे, हें 'समूळ' या शब्दाने माऊलींनी सुचविले आहे.

आतां शीतोष्णाचिया वाहणी। तेथ सुखदु:खाची कडसणी। इयें न समाती कांहीं बोलणीं। मानापमानाचीं॥ ८५ ॥
जे जया वाटा सूर्यु जाये। तेउतें तेजाचें विश्व होये। तैसें तया पावे तें आहे। तोचि म्हणउनी॥ ८६ ॥
देखें मेघौनि सुटती धारा। तिया न रुपती जैसिया सागरा। तैंशीं शुभाशुभें योगीश्वरा। नव्हती आनें॥ ८७ ॥
जो हा विज्ञानात्मकु भावो। तया विवरितां जाहला वावो। मग लागला जंव पाहों। तंव ज्ञान तें तोचि॥ ८८ ॥

अर्थ—अशा रीतीने जीव परमात्मस्वरूप झाला असतां, हें शीत हें उष्ण असा विचारप्रवाह, हें सुख हें दु:ख अशी निवड, किंवा हा मान हा अपमान, असे बोलणें, यापैकीं कांही एक, तेथें संभवत नाही. ॥ ८५ ॥ ज्याप्रमाणें ज्या दिशेने सूर्य जातो, त्या दिशेने सर्व जगच प्रकाशमय होते, त्याप्रमाणे, त्याला जें जें प्राप्त होतें, तें तें तो आत्मस्वरूपच पाहतो. ॥ ८६ ॥ अर्जुना! पहा, आकाशांतील मेघांतून पडणाऱ्या पाणाच्या धारा, (पाणीच असल्यामुळें,) ज्याप्रमाणे समुद्राला बोचत नाहीत, त्याप्रमाणे योग्याला शुभाशुभ देखील, आपल्याहून भिन्न आहेत, असे वाटत नाही (तेहि त्याला ब्रह्मस्वरूपच वाटतात). ॥ ८७ ॥ जो हा विज्ञानात्मकम्हणजे नामरूपात्मक प्रपंच-भाव आहे, त्याचा विचार करून पाहतां, तो खोटा आहे, असा अनुभव येतो. मग त्या ज्ञानाने नामरूपात्मक प्रपंचाकडे जेव्हा तो पाहतो, तेव्हा तो प्रपंच ज्ञानरूपच आहे, असा त्याला अनुभव येतो. ॥ ८८ ॥

गूढार्थदीपिका—ज्ञान म्हणजे आत्मज्ञान किंवा आत्मानुभव. हा आत्म्याचा ''द्वेधा ब्रह्मप्रतीति:'' अनुभव दोन प्रकारचा असतो ''आदौ ब्रह्माहमस्मीत्यनुभव उदिते खल्विदं ब्रह्म पश्चात्'' (श० श्लो०-श्लोक-३) मी ब्रह्म आहे असा एक व हा सर्व नामरूपात्मक पसारा ब्रह्म आहे, असा दुसरा ही दोन प्रकारची ब्रह्मप्रतीति, श्री आचार्यांनी 'शतश्लोकी' या ग्रंथांत सांगितलीं आहे. वर ''तैसा देहाहंकार नाथिला। हा समूळ जयाचा नाशिला। तोचि परमात्मा संचला। आधींचि आहे'' या ओवीने मी ब्रह्म आहे हा पहिला अनुभव सांगितला व या ओवींत, आतां दुसरा अनुभव, श्रीमाऊली सांगत आहे.

माऊली म्हणतात, अज्ञान आहे तोपर्यंत सर्व नामरूपाचा पसारा ही एक प्रपंचरूपवस्तु आहे, असे वाटत असते आत्मविचार केला असतां, प्रपंच म्हणून कांही वस्तु नसून, तें सर्व व्यापक नामरूपात्मक ज्ञानस्वरूप ब्रह्मच आहे व तें मीच झालों आहे, असा अनुभव येतो.

आतां व्यापकु कीं एकदेशी। हे ऊहापोही जे ऐसी। ते करावी ठेली आपैशी। दुजेनवीण॥ ८९ ॥
ऐसा शरीरीचि परि कौतुकें। परब्रह्माचेनि पाडें तुके। जेणें जिंतलीं एकें। इंद्रियें गा॥ ९० ॥

अर्थ—असा अनुभव आला असतां, मी एकदेशी म्हणजे मर्यादित आहे किंवा मी व्यापक म्हणजे अमर्याद आहे, अशी जी चिकित्सा पूर्वी केली जाते, ती करणें, अद्वैत ब्रह्माशिवाय कांहीच नाही. असा अनुभव आल्यामुळे आपोआप बंद पडते. ॥ ८९ ॥ ज्या कोणी पुरुषाने आपलीं इंद्रियें पूर्ण जिंकलीं, तो याप्रमाणे शरीरधारी, पण सहज परब्रह्मस्वरूप होतो. ॥ ९० ॥

गूढार्थदीपिका—शरीरीचि परि कौतुकें। परब्रह्माचेनि पाडें तुके। वरील ८८ ओवीमध्ये आत्मस्वरूपाचा विचार करून पाहतां, सर्व नामरूपात्मक प्रपंच नसून, तें ज्ञानच आहे, असें कळून येते, असे सांगितलें आहे. म्हणून "शरीरीचि" म्हणजे शरीर राहून तो ब्रह्मस्वरूप होतो, असा अर्थ करितां येत नसून, तें त्याचें शरीर दिसत असलें, तरी तो शरीरासह ब्रह्मस्वरूप होतो, असा अर्थ करावा लागतो.

तो जितेंद्रियु सहजें। तोचि योगयुक्तु म्हणिजे। जेणें सानें थोर नेणिजे। कवणे काळीं॥ ९१॥
देखें सोनयाचें निखळ। मेरुयेसणें ढिसाळ। आणि मातियेचें डिखळ। सरिसेंचि मानी॥ ९२॥
पाहतां पृथ्वीचें मोल थोडें। ऐसें अनर्घ्य रत्न चोखडें। देखे दगडाचेनि पाडें। निचाडु ऐसा॥ ९३॥

अर्थ—तो सहजच जितेंद्रिय असतो, त्यालाच योगयुक्त म्हणतां येते. तो केव्हाहि श्रेष्ठ-कनिष्ठ भाव जाणत नाही. ॥ ९१ ॥ अर्जुना! पहा, शुद्ध सोन्याचा मेरुपर्वताएवढा ढीग व मातीचें ढेंकूळ, दोन्ही तो सारखेंच मानतो. ॥ ९२ ॥ ज्याचे मोल पाहूं गेल्यास, सर्व पृथ्वीचें मोल देखील त्याच्या बरोबरीचें होणार नाही, असे अमोल रत्न देखील, तो दगडासारखें पाहतो. असा तो निरिच्छ असतो. ॥ ९३ ॥

गूढार्थदीपिका—आत्मा अस्फुट अद्वैतरूप असल्यामुळें "**जगज्जीवादि रूपेण पश्यन्नपि परात्मवित्। न तत्पश्यति तद्रूपं ब्रह्मवस्त्वेव पश्यति**"॥ ५४॥ (य० वै० खं० सू० सं० उपरिभाग अ० ४) आत्माज्ञानी पुरुष, जगज्जीवादि पाहत असला, तरी ते तो तद्रूपाने म्हणजे जगज्जीव रूपाने पाहत नाही, ब्रह्मरूपानेच पाहतो. त्याला अद्वैत सच्चिदानंद लक्षणस्वरूप परब्रह्माहून भिन्न लक्षणाचें, दुसरें कांही दिसत नाही.

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबन्धुषु । साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते॥ ९॥

अर्थ—सुहृद म्हणजे निरपेक्ष हितकर्ता, मित्र, शत्रु, उदासीन, मध्यस्थ, अप्रिय, संबंधी, साधु व पापी यांचे ठिकाणी समबुद्धि ठेवणारा श्रेष्ठ होय.

तेथ सुहृद आणि शत्रु। कां उदासु आणि मित्रु। हा भावभेदु विचित्रु। कल्पूं कैंचा॥ ९४॥
तया बंधु कोण काह्याचा। द्वेषिया कवणु तयाचा। मीचि विश्व ऐसा जयाचा। बोधु जाहला॥ ९५॥
मग तयाचिये दिठी। अधमोत्तम असे किरीटी। काय परिसाचिया कसवटी। वानिया कीजे॥ ९६॥
ते जैशी निर्वाण सुवर्णुचि करी। तैसी जयाची बुद्धि चराचरीं। होय साम्याची उजरी। निरंतर॥ ९७॥
जे ते विश्वाळंकाराचे विसुरे। जरी आहाती आनानें आकारें। तरी घडले एकेचि भांगारें। परब्रह्में॥ ९८॥

अर्थ—तेथे म्हणजे अद्वैत ब्रह्म स्थितींत, हा सुहृद, हा शत्रु, किंवा हा उदास आणि हा मित्र, असा पदार्थांचा नाना प्रकारचा भेद, तो अद्वैतदृष्टीचा पुरुष कसा करूं शकणार?॥ ९४॥ मीच एक विश्वांत भरून आहे, असें ज्ञान झालें असतां, मग त्याला बंधु (मित्र) कोण असणार? किंवा त्याला द्वेष्य (शत्रु) तरी कोण असणार?॥ ९५॥ मग त्याच्या अद्वैतदृष्टींत श्रेष्ठ कनिष्ठभाव राहतील काय? परिसावर घासलेल्या लोखंडाचे निरनिराळे कस लागतील काय!॥ ९६॥ तो परीस ज्याप्रमाणे लोखंडाला पूर्ण शंभर नंबरी सोनें करितो, त्याप्रमाणे ज्याच्या बुद्धीला सर्व चराचर विश्वांत एक साम्य ब्रह्मस्थितीचा नित्य अनुभव येतो.॥ ९७॥ जो आपण विश्वरूपी अलंकाराचा निरनिराळ्या नामरूपाने विस्तार पाहतो, तो एका परब्रह्मरूपी सोन्याचाच घडलेला आहे.॥ ९८॥

गूढार्थदीपिका—कार्य आपल्या कारणाहून मुळींच निराळे नाही, तें कारणरूपच आहे. असे पाहणें, याला अन्वय म्हणतात. सोन्याचें कार्य अलंकार होय. तो आपल्या सोनेरूप कारणाहून मुळींच निराळा नसतो. तो केवळ सोनेरूपच असतो. त्याप्रमाणे विश्वाचीं म्हणून समजली गेलेलीं नामरूपें, एका परब्रह्मवस्तुचाच नामरूपात्मक अलंकार आहे; म्हणून तो परब्रह्माहून मुळींच निराळा नाही. तो एक ब्रह्मवस्तुरूपच आहे, असे योगी पाहतो, असे श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणते.

ऐसें जाणणें जें बरवें। तें फावलें तया आघवें। म्हणोनि आहाचवाहाचे न झकवे। येणें आकारचित्रें॥ ९९॥

अर्थ—असे जे यथार्थ जाणणें आहे, ते त्या ज्ञानी पुरुषाला पूर्ण प्राप्त झालेलें असतें, म्हणून वरवर दिसणाऱ्या आकाररूप चित्राने तो भ्रम पावत नाही.॥ ९९॥

गूढार्थदीपिका—जाणणे जें बरवें। सर्व जगत् पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे, असा योगाने अनुभव येणें, हीच ज्ञान्याची पूर्ण ब्रह्मस्थिति होय, असें "जाणणें जें बरवें" या पदाने सुचविलें आहे.

घापें पटामाजीं दृष्टी। दिसे तंतूंची सैंघ सृष्टी। परि तो एकवांचूनि गोठी। दुजी नाहीं॥ १००॥
ऐसेनि प्रतीती हे गवसे। ऐसा अनुभव जयातें असे। तोचि समबुद्धि हें अनारिसें। नव्हे जाणें॥ १०१॥
जयाचें नांव तीर्थरावो। दर्शनें प्रशस्तीसि ठावो। जयाचेनि संगें ब्रह्मभावो। भ्रांतासही॥ १०२॥
जयाचेनि बोलें धर्मु जिये। दिठी महासिद्धीतें विये। देखें स्वर्गसुखादि इयें। खेळु जयाचा॥ १०३॥
विपायें जरी आठवला चित्ता। तरी दे आपुली योग्यता। हें असो तयातें प्रशंसितां। लाभु आथि॥ १०४॥

अर्थ—वस्त्राकडे सूक्ष्मदृष्टीने पाहिलें असतां, जसें वस्त्र म्हणजे केवळ तंतूचाच विस्तार आहे. असें कळतें, त्याप्रमाणे, सर्व सृष्टि म्हणजे केवळ परब्रह्मच नामरूपाने विस्तारलें आहे, दुसरे कांही नाही, असें दिसून येतें. ॥ १००॥ असा अनुभव ज्याला प्राप्त झाला, तोच, अर्जुना! समबुद्धि होय. हें खोटे नाही, असें पक्के जाण. ॥ १०१॥ तो सर्व तीर्थांत तीर्थराज होय. त्याच्या दर्शनाने संपूर्ण समाधान लाभतें व त्याच्या संगाने भ्रांत जीवालाहि ब्रह्मस्थिति प्राप्त होते. ॥ १०२॥ त्याच्या बोलण्याने धर्म जीवंत असतो—म्हणजे त्याचें सहज बोलणें देखील धर्माला धरून असते. त्याच्या कृपादृष्टीने महासिद्धि प्राप्त होतात आणि स्वर्गादिसुखाची प्राप्ति तर त्याचा खेळ आहे—म्हणजे त्याच्या म्हणण्याने देखील स्वर्ग प्राप्त होतो. ॥ १०३॥ एखादे वेळीं, सहजच त्याचें स्मरण झालें तर, तेवढ्यानेच आपली योग्यता त्याला तो प्राप्त करून देतो. असो, अशा ज्ञानी पुरुषाची कीर्ति गाण्यांत मोठा लाभ होतो. ॥ १०४॥

गूढार्थदीपिका—जो लाभ ब्रह्म प्राप्तींत आहे तोच लाभ सत्पुरुषांच्या संगांत आहे. ज्ञानी पुरुषहि पूर्ण ब्रह्मस्वरूपच होय. किंवा ज्ञानी पुरुष म्हणजे व्यक्त झालेलें, म्हणजे डोळ्यांना दिसण्याजोगे झालेलें, पूर्ण ब्रह्म होय, असा अर्थ.

ज्ञानीभक्तांत व पूर्णब्रह्मांत यत्किंचित्हि भेद राहत नसल्यामुळें, परमेश्वराच्या दर्शनाने, स्मरणाने, गुणकीर्तनाने व ध्यानाने जो लाभ होतो; तोच संपूर्ण लाभ ज्ञानीभक्तांच्या दर्शनाने, स्मरणाने व ध्यानानेहि होतो. पण ज्ञानीभक्तांत व परमेश्वरांत यत्किंचित्हि केव्हाहि भेदबुद्धि किंवा जीवबुद्धि होतां कामा नये.

योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः। एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः॥ १०॥

अर्थ—योग्याने एकान्तांत कोणाचेंहि साह्य न घेता एकटे, आपले चित्त व देह आपल्या स्वाधीन करून, कशाचाहि संग्रह न करितां सर्व कामनारहित होऊन आपलें अंतःकरण अखंड ध्यानांत लावावें. ॥ १०॥

पुढती अस्तवेना ऐसें। जया पाहलें अद्वैतदिवसें। मग आपणपांचि आपण असे। अखंडित॥ १०५॥
ऐसिया दृष्टी जो विवेकी। पार्था तो एकाकी। सहजें अपरिग्रही जे तिहीं लोकीं। तोचि म्हणऊनि॥ १०६॥
ऐसियें असाधारणें। निष्पन्नाचीं लक्षणें। आपुलेनि बहुवसपणें। श्रीकृष्ण म्हणे॥ १०७॥

अर्थ—पुनः केव्हांहि अस्त होत नाही, अशा प्रकारें ज्याला अद्वैत दिवसाचा प्रकाश झाला, त्याला मग अखंड, आपण आपल्या ठिकाणीं आहो (दुसरें आपल्याहून कांही नाही) असा अनुभव येतो. ॥ १०५॥ अर्जुना! जो, असा ज्ञानदृष्टीचा विवेकी आहे, तो एकटाच असतो, म्हणून तो तिन्ही लोकांत व्यापून असल्यामुळें, अपरिग्रही म्हणजे कशाचाहि संग्रह न करणारा-असतो. ॥ १०६॥ (सामान्य पुरुषांच्या ठिकाणीं न राहणारी व प्राप्त पुरुषांच्या ठिकाणींच राहणारी) अशी ही प्राप्त पुरुषांची विशेष लक्षणें, भगवंताचे ठिकाणीं संपूर्णच असल्यामुळें भगवान श्रीकृष्णांनी (अर्जुनाला) तीं सांगितलीं. ॥ १०७॥

गूढार्थदीपिका—'आपुलेनि बहुवसपणें'—ज्या लक्षणांनी युक्त होऊन, सत्पुरुष पूर्ण ब्रह्मस्वरूप होतात, तीं लक्षणें, सर्व सत्पुरुषांच्या ठिकाणीं राहतातच, असा नियम नाही. त्यांच्या निरनिराळ्या प्रारब्धामुळे, कोणाचे ठिकाणीं कांही लक्षणें व कोणाचे ठिकाणीं कांही लक्षणें दिसून येतात. पण भगवान श्रीकृष्ण हे प्रारब्धरहित

लीलाविग्रही असल्यामुळें, त्यांचे ठिकाणीं मात्र संपूर्ण लक्षणे असतात, हेंच माऊलींनी ''आपुलेनि बहुवसपणें'' या पंक्तीने दाखविलें आहे.

जो ज्ञानियांचा बापु। देखणेयांचे दिठीचा दीपु। जया दादुलयाचा संकल्पु। विश्व रची॥ १०८॥

अर्थ—जो ज्ञानियांचा आद्य गुरु होय, जो सर्व पाहणाऱ्यांच्या दृष्टीलाहि प्रकाश देणारा दिवा होय; ज्या सर्वसमर्थाचा नुसता संकल्प विश्वाची उभारणी करतो. ॥१०८॥

गूढार्थदीपिका—'ज्ञानियांचा बापु'-''स पूर्वेषामपि गुरुः कालनेनावच्छेदात्'' (पातंजल योगसूत्र २६) ज्या तत्त्वमस्यादि महावाक्याच्या विचाराने पुरुष ब्रह्मज्ञानी होतो, तीं महावाक्यें परमेश्वराने निर्माण केलेल्या वेदांतील असल्यामुळे, परमेश्वर सर्व ज्ञान्यांचा आद्य गुरु आहे. परमेश्वर आपल्या स्वरूपाला कधीं न विसरणारा आहे. म्हणून त्याला कोणीच गुरु नाही.

'देखणेयांचे दिठीचा दीपु'—परमेश्वर हा जीवाची चक्ष्वेंद्रियरूपदृष्टीचा दिवा म्हणजे चक्ष्वेंद्रियरूप दृष्टीला प्रकाश देणारा आहे. तो नित्यदृष्टीरूप आहे असा अर्थ.

'जया दादुलयाचा संकल्पु। विश्व रची'—विश्वाची उत्पत्ति करणारा संकल्प, सर्वसमर्थ अशा परमेश्वराचाच असतो. तो संकल्प म्हणजे ''अहं बहुस्यां प्रजायेय'' हा होय. ''ज्ञानीयांचा बापु'' ''दिठीचा दीपु'' ''दादुलयाचा संकल्पु। विश्व रची'' हीं सर्व विशेषणें नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, सर्वज्ञ सर्व शक्तिमान अशा परब्रह्माची आहेत. आणि हीं विशेषणें माऊलींनी भगवान श्रीकृष्णाला लाविलीं आहेत. याचा अर्थ असा की, भगवान श्रीकृष्ण सगुण विग्रही जरीं असले, तरी त्यांची पूर्ण ब्रह्मस्थिति अवतारकालींहि कायमच असते.

प्रणवाचिये पेठे। जाहलें शब्दब्रह्म माजिठें। तें जयाचिये यशा धाकुटें। वेढूं न पुरे॥ १०९॥

अर्थ—ॐकाराचे पेठेंत वैदिक वाङ्मयरूपी निर्माण झालेले उत्कृष्ट वस्त्र देखील, ज्याचे यश वेढण्याला पुरेसें झालें नाही (म्हणजे कमी पडलें)-म्हणजे वेद देखील भगवंताच्या पूर्ण यशाचें वर्णन करूं शकले नाहीत असा अर्थ. ॥ १०९॥

गूढार्थदीपिका—ज्या यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, या षड्गुणाने भगवान सगुण साकार होतो, तें भगवंताचे षड्गुणैश्वर्य अमर्याद असतें, असें ''तत्र निरतिशयं सर्वज्ञबीजम्'' (समाधिपाद सूत्र २५) योगसूत्रांत सांगितलें असून, आचार्यांनींहि ''ज्ञानैश्वर्यशक्ति बलवीर्यं तेजोभि: सदा संपन्न'' भगवान ज्ञान ऐश्वर्यादिकांनी सदा संपन्न असतो, असें म्हटलें आहे. याप्रमाणे भगवान व भगवंताचे गुण सदा सर्वदा अमर्यादच असल्यामुळें, वैदिक शब्दाने देखील त्यांचें वर्णन होऊं शकत नाही, असा भाव.

जयाचेनि आंगिकें तेजें। आवो रविशशीचिये वणिजे। म्हणऊनि जग हें वेसजे-। वीण असे तया॥ ११०॥

अर्थ—ज्याच्या अंगच्या तेजापासून सूर्यचंद्रांना प्रकाशाचें बळ प्राप्त होते व ते त्या तेजाच्या बळावर जगाला प्रकाशित करण्याचा आपला व्यापार करतात; म्हणून त्याच्यावांचून जग हें प्रकाशहीन आहे. (म्हणजे त्याच्यावांचून जगच नाही. जग हे ज्ञातसत्ताक आहे म्हणजे कळते तेव्हाच असतें. न कळतां तें राहूं शकत नाही, असा भाव).

गूढार्थदीपिका—''यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम्।'' या श्लोकाने जें परब्रह्माचें वर्णन, श्रीकृष्णांनी गीतेच्या पंधराव्या अध्यायांत केलें आहे; तेंच येथेहि, या ओवींत, श्रीज्ञानेश्वर माऊलींनी भगवान श्रीकृष्णाचें केलें आहे. भाव असा की, भगवान श्रीकृष्ण परब्रह्मस्वरूपच आहेत.

हां गा नांवचि एक जयाचें। पाहतां गगनही दिसे टांचें। गुण एकैक काय तयाचे। आकळिशील तूं॥ १११॥

अर्थ—बा अर्जुना! ज्याच्या एका नामाचाच विचार केला असतां, आकाश हेंहि त्यापेक्षां कमीच वाटतें, अशा त्या भगवंताच्या एका एका गुणाचा पार, तुला काय कळणार आहे? ॥१११॥

गूढार्थदीपिका—हां गा नांवचि एक जयाचें। पाहतां गगनही दिसे टांचें—सगुण भगवंताच्या एका नावांपेक्षादेखील आकाश लहान आहे, असें माऊली म्हणतात. हरिपाठांतहि ''गगनाहूनि वाड नाम आहे'' आकाशापेक्षां नाम व्यापक आहे, असे माऊलींनी म्हटलें आहे.

"आत्मन आकाश: संभूत:" (तै० उ० २-१) आत्म्यापासून आकाश झालें अशी श्रुति असल्यामुळें निर्गुण ब्रह्मस्वरूप प्रकृतीच्या पलिकडे आहे, हे सर्वच वेदान्त्यांना मान्य आहे. अद्वैतवादी भगवान शंकराचार्यांवांचून दुसरे कोणीहि निर्गुणपरमात्मा मानीत नाहीत.

परमात्मा सगुण आहे व तो प्रकृतीच्या पलिकडे आहे असे द्वैतवादी रामानुजाचार्य वगैरे यांचें म्हणणें आहे. पण भगवान शंकराचार्यांनी या त्यांच्या मताचें खंडन केलें नाही. याचा अर्थ असा होतो की परमात्म्याची सगुण व निर्गुण दोन्ही रूपें प्रकृतीच्या पलिकडे आहेत हे आचार्यांना मान्य आहे. अर्थात् निर्गुण परमात्मा जसा व्यापक आहे, तसाच सगुण परमात्माहि प्रकृतीच्या पलिकडे असल्यामुळें, प्रकृतीपेक्षां व्यापक आहे; म्हणून प्रकृतीच्या पलिकडे असणाऱ्या परमेश्वराचें नांवहि, प्रकृतिजन्य नसल्यामुळें, प्रकृति व प्रकृतीचें आकाशादि कार्य यांच्यापेक्षां तें व्यापक आहे. हेंच माऊलींनी "हा गा नांवचि एक जयाचे। पाहतां गगनहि दिसे टांचें" या चरणांनी दाखविले आहे.

गुण एकैक काय तयाचे। आकळिशील तूं—परमेश्वर जसा अनंत अपार आहे, तसेंच त्याचे गुणहि अनंत अपार आहेत. "अनंताचे गुण अनंत अपार।" असे श्रीएकनाथमहाराजहि म्हणतात. ब्रह्मदेवाने भगवंताची स्तुति करतांना "**को वेत्ति भूमन् भगवन् परात्मन् योगेश्वरोतीर्भवतस्त्रिलोक्याम्**" (भाग० स्कं० १० अ० १४-२१) असे उद्गार काढले आहेत.

म्हणोनि असो हें वानणें। सांगों नेणों कवणाचीं लक्षणें। दावावीं मिषें येणें। कां बोलिला तें॥ ११२॥

अर्थ—आतां हें गौरवाचें बोलणें पुरे. प्राप्त पुरुषांचीं लक्षणें दाखवावीं या मिषाने जीं काय लक्षणें आम्ही बोलिलो तीं कोणाचीं (श्रीकृष्णाचीं किंवा अर्जुनाचीं) हे आम्ही सांगूं शकत नाही॥ ११२॥

गूढार्थदीपिका—भगवान श्रीकृष्ण संतांचें ध्येय असल्यामुळें व अर्जुन थोर भगवद्भक्त संतच असल्यामुळे दोघांचेहि ठिकाणीं संतांचीं लक्षणें पूर्णपणें होतीं; म्हणून श्रीज्ञानेश्वर माऊलींनी "सांगो नेणों कवणाची लक्षणें" असें म्हटलें आहे.

ऐकें द्वैताचा ठावोचि फेडी। ते ब्रह्मविद्या कीजेल उघडी। तरि अर्जुनु पढिये ही गोडी। नासेल हन॥ ११३॥

म्हणोनि तें तैसें बोलणें। नव्हे सपातळ आड लावणें। केले मनचि वेगळवाणें। भोगावया॥ ११४॥

अर्थ—पहा द्वैताचा जेथें मागमूसहि राहात नाही, ती ब्रह्मविद्या प्रगट करावी तर त्या जीवब्रह्मैक्यज्ञानाने अर्जुनाला अत्यंत प्रिय असलेली सगुणाची प्रेमगोडी नाहिशी होईल. ॥ ११३॥ म्हणून भगवंताचे बोलणें तशा प्रकारचें (म्हणजे प्रेमाचा नाश करणारें) नव्हतें तर, तें बोलणें अत्यंत पातळ पडदा आड लावण्याप्रमाणे प्रेमसुख भोगण्याकरितां, केवळ मनच वेगळे दिसण्यासारखे ठेविलें होतें. ॥ ११४॥

जया सोहंभाव हा अटकु। मोक्षसुखालागोनि रंकु। तयाचिये दिठीचा झणें कळंकु। लागेल तुझिया प्रेमा॥ ११५॥

अर्थ—(श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणते, भगवान श्रीकृष्ण मनांत म्हणूं लागले की सगुणाच्या भक्तिप्रेमाची इच्छा सोडून) ज्यांचे ठिकाणीं मी ब्रह्म आहे हा अडथळा आहे व जे ब्रह्मैक्यरूप मोक्षसुखाकरितां दीन झालेले असतात. त्यांच्या या (अविद्यालेशरूप) दृष्टीचा डाग तुझ्या प्रेमाला लागण्याचा संभव आहे. ॥११५॥

गूढार्थदीपिका—जया सोहंभाव अटकु—ज्या अविद्येने जीव परब्रह्माहून आपल्याला निराळे मानतो, ती अविद्या मुळीं वस्तुच नाही; म्हणून जीव खरोखर परब्रह्माहून निराळा नाही. तो आपल्या निराळेपणाची भ्रांत कल्पना करतो. नंतर मी म्हणजे देह व सर्व नामरूपें म्हणजें जगत ही विपरीत समजूत नाहिशी करून, मी ब्रह्मस्वरूप आहे अशी ऐक्याची कल्पना करितो. ही कल्पनाहि निराळेपणाच्या कल्पनेला धरूनच असल्यामुळे, तीहि भ्रांतच म्हटली पाहिजे. म्हणूनच श्रीज्ञानेश्वर महाराजांनी या ऐक्यरूप भ्रांत कल्पनेला "निमाली अविद्या" "वाचाऋण" असे म्हटलें आहे. आणि वेदान्तग्रंथांतून हिला "अविद्यालेश" म्हटलें आहे.

प्रेमाचा किंवा आनंदाचा असा स्वभाव आहे की, जाणीव झाली असतां, तो कमी होतो आणि जाणीव होत नाही अशा निर्विकल्पस्थितींत, पूर्ण सुखरूप किंवा पूर्ण आनंदरूप स्थिति असते. हेच "**तद्यथा प्रियया स्त्रिया**

संपरिष्वक्तो न बाह्यं किंचन वेद नान्तरम्'' (बृ० उ० ४-३-२१) या श्रुतींत सांगितले असून, विद्यारण्यांनी आपल्या पंचदशी ग्रंथांत ''**ब्रह्मानंदे योगानंदः**'' या अकराव्या प्रकरणांत ही श्रुति प्रमाण देऊन हाच सिद्धान्त स्पष्ट केला आहे.

म्हणून परब्रह्माचीही निर्विकल्प अवस्था प्राप्त होण्याकरितां ब्रह्मज्ञानाने उत्पन्न होणारी ऐक्याची जाणीव नाहीशी झाली पाहिजे. ती जाणीव, ज्ञानाने उत्पन्न होते, पण नाहिशी होत नाही. म्हणूनच सोहंभावस्थितीला श्रीज्ञानेश्वर महाराजांनी ''अटकु'' म्हणजे निर्विकल्पस्थितीला प्रतिबंध करणारी असे म्हटलें आहे.

मोक्षसुखालागोनि रंकु—एकाच मोक्षाची दोन अंगें आहेत. सर्व दुःखनिवृत्ति हें एक अंग असून, परमानंदप्राप्ति हें दुसरें अंग आहे. सोहंभावरूप जीवब्रह्मैक्यज्ञान अत्यंत दृढ़ झालें, तर सर्वदुःखनिवृत्तिरूप मोक्ष मिळतो—म्हणजे जग अत्यंत खोटें वाटल्यामुळें, दुःखाचा भोग होत नाही—असा ज्ञानी, जर योगाभ्यास करणारा असला, तर समाधिकालीं जाणीव राहत नसल्यामुळे, तो ब्रह्मानंदरूप होतो. पण प्रारब्धाने व्युत्थान झाले असतां, व्यवहारकालीं त्याचा ब्रह्मानंद कायम राहत नाही. व्यवहारकालीं ऐक्याच्या जाणीवेचा सामान्य अहंकार असतो व त्या सामान्य अहंकाराने ब्रह्मानंद आच्छादित होतो. व्यवहाराविषयी तो उदासीन असून, आनंद आहे असे म्हणत असला तरी तो मुख्य ब्रह्मानंद नव्हे. तो ''वासनानंद'' आहे असे विद्यारण्यांनी पंचदशीच्या ११ व्या प्रकरणांत ९५-९६ श्लोकांनी सांगितलें आहे. आणि पूर्ण अहंकार नाहिसा झाला म्हणजे पूर्ण ब्रह्मानंद प्राप्त होतो किंवा पूर्ण ब्रह्मस्वरूप होतो. ''सर्वात्मना विस्मृतः सन्``````स ब्रह्मानंद इत्याह भगवानर्जुनं प्रति'' (पंचदशी प्र० ११-९९-१००) सारांश ज्ञानाच्या ठिकाणीं सोहंभावामुळे परमानंदरूप मोक्ष प्राप्त झालेला नसतो, म्हणून तो परमानंदरूप मोक्षप्राप्तीकरितां विदेहमुक्ति होई-तोपर्यंत दीन होऊन राहतो.

तयाचिये दिठीचा कलंकु। लागेल तुझिया प्रेमा—''**प्रेमाची तंव जाती ऐसी। आठवो येवो नेदी आठवणेसी। हा भावो जाणावे सज्जनासी। जे भक्तिप्रेमासी जाणते**'' (ए० भा० अ० ११-६०७) जाणीव नाहीशी करणें हा प्रेमाचा स्वभाव आहे. जीवब्रह्मैक्य झाल्यावर सगुण भगवंताची परमप्रेमरूप भक्ति करणारे संतच सोहंभावरूप जाणीवरहित होतात. माऊलींनीही या ब्रह्मैक्याने होणारी सोहंभावरूप जाणीव 'तें ऋणशेष वाचा इया। न फेडवेचि मरोनियां। तें पाया पडोनि मियां। सोडविलें' (अमृ० प्र० ३-३२) श्रीगुरूची परमप्रेमरूप भक्ति केल्याने नाहिशी होते, असा हा अनुभव या ओवींत सांगितला आहे. अर्जुन हा श्रीकृष्णाची परम प्रेमरूप भक्ति करणारा भक्त होता; म्हणून ब्रह्मविद्या जर उघडी करून सांगितली आणि अर्जुनाचे ठिकाणीं सोहंभावरूप ऐक्याची जाणीव उत्पन्न झाली, तर त्याचें भक्तिप्रेम कमी होऊन, त्याच्या भक्तिप्रेमाला कलंक लागेल असे देवाला वाटलें तें योग्यच होतें.

विपायें अहंभाव ययाचा जाईल। मी तेंचि हा जरी होईल। तरि मग काय कीजेल। एकलेया॥ ११६॥

अर्थ—(असा डाग लागून) जर या अर्जुनाचा मीपणा नाहिसा झाला व हा माझ्याशीं ऐक्य पावला (म्हणजें मीच ब्रह्म आहे अशी जाणीव उत्पन्न झाली) तर मग मला एकट्याला कसे करमेल?॥ ११६॥

गूढार्थदीपिका—मग काय कीजेल। एकलेया—ज्यांनी भक्तिप्रेमाचे सुख अनुभविलें आहे, त्यांना ''भक्त्यर्थ कल्पित द्वैतमद्वैतादपि सुंदरम्'' भक्तिप्रेमाकरितां केलेलें द्वैत अद्वैतापेक्षांही गोड वाटते. नाथांनीही ''**इतर मी सांगूं कायी। मोक्षसुखाच्याहि ठायीं। या सुखाची गोठी नाही। धन्य पाही हरिभक्त**'' (ए० भा० अ० १४-२०३) असेच उद्गार काढलें असून ''अद्वैतीं तो नाही माझें समाधान। देवभक्तपण गोड वाटे॥'' असा तुकाराम महाराजहि आपला अनुभव सांगतात. परमात्मा भक्तांच्या संगतींत व भक्त भगवंताच्या संगतींत ब्रह्मानंद लुटतात, हेंच भगवंतांनी ''काय कीजेल एकलेया'' इत्यादि उदगारांनी सुचविलें आहे.

दिठीचि पाहतां निविजे। कां तोंड भरोनि बोलिजे। नातरी दाटूनि खेंव दीजे। ऐसें कोण आहे॥ ११७॥
आपुलिया मना बरवी। असमाई गोठी जीवीं। ते कवणेंसि चावळावी। जरी ऐक्य जाहलें॥ ११८॥
इया काकुळती जनार्दनें। अन्योपदेशाचेनि हातासनें। बोलामाजी मन मनें। आलिंगूं सरलें॥ ११९॥

अर्थ—ज्याला नुसते डोळ्यांनी पाहिले असतां, मनाला परम समाधान होईल किंवा मनाला वाटेल तितकें तोंड

भरून ज्याच्याशीं बोलतां येईल, अथवा प्रेमाने ज्याला कडकडून आलिंगन देतां येईल, असा अर्जुनाशिवाय कोण आहे?॥ ११७॥ जर अर्जुनाचें व माझें ऐक्य झालें तर आपल्या मनाजोगी व मनात न सामावणारी, एका प्रेमाच्या मनुष्यालाच सांगण्याजोगी, जिव्हाळ्याची गोष्ट कोणापाशीं सांगतां येईल?॥ ११८॥ अशा रीतीने मन व्याकुळ झाल्यामुळें, भगवान् योगाचा उपदेश, मला करीत नसून, दुसऱ्याला करीत आहेत असे अर्जुनाला वाटेल अशा हातवटीने सांगत असतां, त्या बोलण्यात भगवंताचे मन अर्जुनाच्या मनाला, प्रेमाने आलिंगन देऊं लागलें. ॥ ११९॥

गूढार्थदीपिका—बोलामाजी मन मनें। आलिंगूं सरलें—ज्याप्रमाणे योगाने समाधि साधली जाते, त्याप्रमाणें ती भक्तीनेहि साधली जाते. "**स्वकीये हृदये ध्यायेदिष्टदेवस्य रूपकम्। चिंतयेद्भक्तियोगेन परमाल्हादपूर्वकम्। आनंदाश्रुपुलकेन दशभावः प्रजायते। समाधिःसंभवेत्तेन संभवेच्च मनोन्मनी**" असे घेरंडसंहितेत सांगितले आहे. योगांतील क्रियासाध्य समाधींतून व्युत्थान होतें पण भक्तियोगाने साधणारी समाधि, भक्तिप्रेमाच्या अखंडतेमुळे अखंड राहते. अर्जुन भक्त होता. त्याचें प्रेम अखंड होतें. अशा अखंडसमाधिस्थ भक्ताने, आपल्या प्रिय भगवंताला योगाचें निरूपण करण्याची विनंति केली.

भक्तीने अर्जुन अखंड समाधिस्थ म्हणजे भगवंताच्या ठिकाणीं त्याची वृत्तिअखंड स्थिर झाली असून, तो त्याची जाणीव वागवित नाही म्हणून त्याची निर्विकल्प अवस्था आहे, हे पाहून भगवंताला अत्यंत संतोष झाला व योगाचें निरूपण करीत असतांनाच, भगवंताचें मन अर्जुनाचे मनाला आलिंगन देऊं लागलें.

हे परिसतां जरी कानडें। तरि जाण पां पार्थ उघडें। कृष्णसुखाचेंचि रूपडें। वोतलें गा॥ १२०॥

अर्थ—हे ऐकतांना जरा विचित्र वाटेल, पण अर्जुन हा श्रीकृष्णाच्या आत्मसुखाची ओतीव मूर्ति होता. ॥ १२०॥

गूढार्थदीपिका—ज्ञानीभक्ताला भगवंताची सगुण मूर्तिही आपल्या आत्मप्रेमाची मूर्ति वाटते व भगवंताला ज्ञानीभक्त म्हणजे आपल्या आत्मप्रेमाची मूर्ति वाटते "ज्ञानी त्वात्मैव मे मतम्" असें भगवंतांनी पुढे सातव्या अध्यायांत म्हटले आहे व "एऱ्हवीं ज्ञानिया जो म्हणिजे। चैतन्यचि केवळ माझे" असे माऊलीनेहि म्हटलें आहे. म्हणजे भक्त भगवंताला आत्म्याप्रमाणे परम प्रिय असतो, असा त्याचा अर्थ.

हें असो वयसेचिये शेवटीं। जैसें एकचि विये वांझोटी। मग ते मोहाची त्रिपुटी। नाचों लागे॥ १२१॥
तैसें जाहलें श्रीअनंता। ऐसें तरि मी न म्हणतां। जरी तयाचा न देखतां। अतिशयो एथ॥ १२२॥
पाहा पां नवल कैसे चोज। कें उपदेशु केउतें झुंज। परि पुढें वालभाचें भोज। नाचत असे॥ १२३॥

अर्थ—हे असो. ज्या वर्षापर्यंत संतति होऊं शकते, अशा वयाचे शेवटीं, एखाद्या वांझ स्त्रियेस संतति झाली असतां, जसे तिचे, त्या संततीवरील प्रेम हें सारखें उफाळून दिसत असतें. ॥१२१॥ त्याप्रमाणेंच भगवंताचे ठिकाणी अर्जुनाविषयींचे प्रेम उफाळून दिसत होतें, भगवान् अर्जुनावर अत्यंत लुब्ध झाले असें जें दिसत होतें, तें न दिसतें तर, मी असें म्हटलेंहि नसतें. ॥१२२॥ श्रीकृष्णाचें अर्जुनावर विलक्षण प्रेम होतें पहा! कोण तो युद्धाचा प्रसंग आणि तेथें कोण हा उपदेश! पण अर्जुनाच्या प्रेमाची मूर्ति भगवान श्रीकृष्ण, त्याच्यासमोर नाचत आहेत (म्हणजे भगवान अर्जुन जसे म्हणेल, तसे करीत आहेत.) ॥१२३॥

गूढार्थदीपिका—भगवंताचें प्रेम करणारा भक्त आपले यत्किंचित्हि स्वत्व न वागवितां प्रेमानें सर्वस्वीं भगवंताच्या परतंत्र होतो; म्हणूनच भगवानहि भक्तावर तसेच प्रेम करीत असल्यामुळें, तोहि भक्ताच्या सर्वस्वीं स्वाधीन होतो. सर्वस्वीं स्वाधीन होणें किंवा परतंत्र होणें हेंच प्रेमाचें लक्षण आहे. प्रेमांत नेहमीं "तत्सुखसुखित्वम्" त्याच्या सुखाने सुखी होणें हेच मुख्य तत्त्व असतें.

आवडी आणि लाजवी। व्यसन आणि शिणवी। पिसें आणि न भुलवी। तरीं तेंचि काई॥ १२४॥
म्हणऊनि भावार्थु तो ऐसा। अर्जुन मैत्रियेचा कुवासा। कीं सुखें शृंगारलिया मानसा। दर्पणु तो॥ १२५॥
यापरी बाप पुण्यपवित्र। जगीं भक्तिबीजासि सुक्षेत्र। तो श्रीकृष्णकृपे पात्र। याचिलागीं॥ १२६॥

अर्थ—आवडी असून लाज वाटेल तर ती आवडीच नव्हे, किंवा एखादे व्यसन असून त्याचा शीण वाटेल

तर, तें व्यसंनच नव्हे व वेड असून जर भ्रम होणार नाही तर, तें वेडच नव्हे. ॥ १२४ ॥ म्हणून या सर्वांचा भावार्थ किंवा अभिप्राय इतकाच की अर्जुन हा सख्यभक्तिचें पूर्ण आश्रयस्थान होता किंवा अर्जुनाची सख्यभक्ति पाहून, अत्यंत सुखसंपन्न झालेल्या भगवंताच्या मनाचा तो अर्जुन आरसाच होता. ॥ १२५ ॥ याप्रमाणे अर्जुन खरोखर थोर भाग्यवान, अत्यंत पुण्यवान व पवित्र होता आणि जणुं जगामध्यें प्रेमभक्तीचें बीज पेरण्याकरितां तयार झालेलें उत्तम शेतच होता. म्हणूनच तो भगवान श्रीकृष्णाच्या कृपेस पात्र होता. ॥ १२६ ॥

गूढार्थदीपिका—"कोटी जन्मार्जितैः पुण्यैः शिवे भक्तिः प्रजायते" (शि० गी०) अनंत जन्मांतील पुण्याचा सांठा पदरीं असल्यावांचून, परमेश्वराची प्रेमभक्ति प्राप्त होत नाही व अशा प्रेमभक्तीवांचून भगवानहि वश होत नाही, असा भाव.

हो कां आत्मनिवेदनातळींची। जे पीठिका आहे सख्याची। पार्थु अधिष्ठात्री तेथिंची। मातृका गा॥ १२७॥
पासींचि गोसावी वर न वानिजे। मग पाइकाचा गुण घेईजे। ऐसा अर्जुनुचि तो सहजें। पढिये हरी॥ १२८॥

अर्थ—किंवा अर्जुन म्हणजे आत्मनिवेदनरूप भक्तीच्या खालची जी सख्यभक्ति आहे, तेथील मुख्य देवताच होय असें म्हणतां येईल॥ १२७॥ जवळच असलेल्या ब्रह्मांडाधीश भगवान श्रीकृष्णाचें वर्णन न करितां, भक्ताच्या भक्तगुणाचे गुणवर्णन करावेसे वाटावें, इतका हा अर्जुन भगवंताला स्वाभाविक प्रिय होता. ॥ १२८ ॥

गूढार्थदीपिका—भगवंताला आपल्या भक्ताचें निःसीम प्रेम असल्यामुळें, आपल्यावर प्रेम करणाऱ्यापेक्षां, भक्तावर प्रेम करणाराच विशेष आवडतो, असा भाव.

पाहा पां अनुरागें भजे। जे प्रियोत्तमें मानिजे। ते पतीहीहूनि काय न वर्णिजे। पतिव्रता॥ १२९॥
तैसा अर्जुनुचि विशेषें स्तवावा। ऐसें आवडलें मज जीवा। जे तो त्रिभुवनींचियां दैवां। एकायतनु जाहला॥ १३०॥
जयाचिया आवडीचेनि पांगें। अमूर्तुहो मूर्ति आवगे। पूर्णाहि परी लागे। अवस्था जयाची॥ १३१॥

अर्थ—अत्यंत प्रेमाने जी पतीची सेवा करते, म्हणून पतीला जी अत्यंत आवडते, त्या पतिव्रतेची सर्व लोक पतीपेक्षां अधिक स्तुति करीत नाहीत काय?॥ १२९ ॥ त्याप्रमाणें त्रैलोक्यात जेवढे कांही थोर भाग्य असेल, त्या सर्व भाग्याला, एक अर्जुनच आज आश्रय झाला असल्यामुळें, अर्जुनाचीच खरोखर थोरवी गावी, असेंच माझ्या मनाला आवडलें. ॥ १३० ॥ अर्जुनाच्या प्रेमसंबंधामुळें, अव्यक्त परमात्मा, व्यक्त होतो, परिपूर्ण असूनहि त्याला त्याचा (अर्जुनाचा) ध्यास लागतो. ॥ १३१ ॥

गूढार्थदीपिका—अद्वैतभक्तीची प्राप्ति होणें यासारखें. थोर भाग्य नाही. भक्ताच्या निःसीम प्रेमाला भाळूनच परमात्मा सगुण साकार होतो व भक्ताच्या सर्वस्वीं स्वाधीन होऊन राहतो. भगवंतासह सर्व संत या ज्ञानीभक्ताच्या प्रेमभक्तीची मोठ्या आवडीने गोडवी गातात. असा हा ज्ञानीभक्त परम भाग्यवान असतो. "उपमा त्या दैवाची कोण वाणी" (ज्ञान० हरिपाठ-२१) अशा भाग्यवानाच्या भाग्याला देण्याजोगी उपमाच नाही. त्याचें भाग्य निरूपम होय हेच वरील ओव्यांचें सार आहे.

तंव श्रोते म्हणती दैव। कैसी बोलाची हवाव। काय नादातें हन बरव। जिणोनि आली॥ १३२॥
हां हो नवल नोहे देशी। मऱ्हाटी बोलिजे तरी ऐसी। वाणें उमटताहे आकाशीं। साहित्यरंगाचें॥ १३३॥
कैसें उन्मेख चांदिणें तार। आणि भावार्था पडे गार। हेचि श्लोकार्थकुमुदिनी फार। साविया होती॥ १३४॥
चाडचि निचाडां करी। ऐसी मनोरथीं ये थोरी। तेणें विवळले अंतरीं। तेथ डोलु आला॥ १३५॥
तें निवृत्तिदासें जाणितलें। मग अवधान द्या म्हणितलें। नवल पांडवकुळीं पाहलें। कृष्णदिवसें॥ १३६॥
देवकीया उदरीं वाहिला। यशोदा सायासें पाळिला। शेखीं उपेगा गेला। पांडवांसी॥ १३७॥
म्हणऊनि बहुदिवस वोळगावा। कां अवसरु पाहोनि विनवावा। हाही सोसु तया सदैवा। पडेचिना॥ १३८॥
हें असो कथा सांगें वेगीं। मग अर्जुन म्हणे सलगी। देवा इयें संतचिन्हें हन आंगीं। न ठकती माझ्या॥ १३९॥
एऱ्हवीं या लक्षणांचिया निजसारा। मी अपाडें कीर अपुरा। परि तुमचेनि बोलें अवधारा। थोरावें जरी॥ १४०॥

अर्थ—हे वर्णन ऐकून श्रोते म्हणतात, महत्‌भाग्य आमचे! काय ही सुंदर भाषा! ती ससुरांच्या कोमलपणाला जिंकून आली की काय असे वाटते. ॥ १३२ ॥ अहो! यांत आश्चर्य नाही. देशी मराठी भाषा बोलायची ती अशी बोलावी की, जी बोलल्याबरोबर आकाशांत उपमाअलंकारादि साहित्याचे नाना रंग उमटलेले दिसतील. ॥ १३३ ॥ या शब्दाने ब्रह्मज्ञानरूपी चकचकित आणि भावार्थरूपी गार असा प्रकाश, कसा पडला आहे पहा! ह्याच्याचमुळें श्लोकांचे जे अर्थ तेच कोणी चंद्रविकासी कमळें, ती सहज उमललीं जातात. (दृष्टान्तरूप उपमा अलंकाराने श्लोकांचे अर्थ स्पष्ट होतात असा भाव). ॥ १३४ ॥ अशी भाषा ब्रह्मज्ञान ऐकण्याची इच्छा नसणाऱ्यालाहि ब्रह्मज्ञान ऐकण्याची इच्छा उत्पन्न करते, अशी या भाषेची थोरवी आहे. असे श्रोत्यांच्या मनोरथांत येऊन ते अंत:करणांत प्रसन्न झाले व आनंदाने डोलू लागले. ॥ १३५ ॥ हे निवृत्तिनाथांचे दास श्रीज्ञानेश्वर महाराज यांनी जाणलें व श्रोत्यांना निरूपणाकडे लक्ष देण्याची विनंति केली. आश्चर्य हे की श्रीकृष्णरूपी दिवस, पांडवांचे कुळाचे ठिकाणी उजाडला आहे. (ज्याप्रमाणे दिवस हा मनुष्याच्या कर्म करण्यास उपयोगी पडतो त्याप्रमाणें पांडवांच्या सर्व कर्मात भगवान श्रीकृष्ण उपयोगी पडत असत.-पंडूच्या सर्व वंशजावर भगवंताची अत्यंत कृपा होती असा अर्थ). ॥ १३६ ॥ देवकीने आपल्या पोटांत ज्याला वागविले, यशोदेने ज्याचे अत्यंत काळजीने संगोपन केले, पण सरते शेवटी तो पांडवांच्या उपयोगी पडला. ॥ १३७ ॥ म्हणून कांही दिवस सेवा करून किंवा समय पाहून विनंति करावी, अशी कांही त्या भाग्यवान अर्जुनाला चिंता करावी लागत नसे. ॥ १३८ ॥ हे असूं द्या, आतां पुढे काय झालें तेंच सांगतो. मग अर्जुन मोठ्या लडिवाळपणाने म्हणाला, देवा! हीं आपण सांगितलेलीं संतचिन्हें माझ्या आंगीं मुळींच दिसत नाहीत. ॥ १३९ ॥ साधारणत: ''या लक्षणाचिया निजसारा'' म्हणजे या लक्षणांची खास सारभूत ज्या संतव्यक्ति, त्यांच्याशीं तुलना करून पाहतां, निश्चयाने मी त्यांच्या बरोबरीचा नाही. मी अपुरा आहे. पण तुमच्या उपदेशाने जर त्यांच्या बरोबरीचा होईन तर पहा. ॥ १४० ॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे अग्नीचा प्रकाश व उष्ण असा स्वभाव असला तरी, त्याला तरी, त्याच्या स्वभावाची जाणीव होत नाही, त्याप्रमाणेच ब्रह्मबोध झालेल्या संतांचे ठिकाणीं असलेलीं लक्षणे, त्यांचा ब्रह्मस्वभाव होत असल्यामुळें, तीं ते जाणत नसतात. वस्तुत: वस्तूचा स्वभाव, वस्तु जाणत नसते, हा नियम आहे. म्हणूनच परम भक्त अशा अर्जुनाचे ठिकाणीं, संपूर्ण संतांचीं चिन्हें स्वाभाविक असूनहि, अर्जुनाच्या मुखांतून हीं चिन्हें माझे ठिकाणीं बाणलीं नाहीत, असे अत्यंत निरहंकारपणाचे उद्गार निघावेत, हे साहजिकच आहे.

जी तुम्ही चित्त देयाल। तरी ब्रह्म मियां होइजेल। काय जहालें अभ्यासिजेल। सांगाल तें॥ १४१ ॥
हां हो नेणों कवणाची काहाणी। आइकोनि श्लाघत असों अंत:करणीं। ऐसी जाहलेपणाची शिरयाणी। कायसी देवा॥ १४२ ॥
हें आंगें म्यां होइजो कां। येतुलें गोसावी आपुलेपणें कीजो कां। तंव हांसोनि श्रीकृष्ण हो कां। करूं म्हणती॥ १४३ ॥

अर्थ—देवा! हें माझें म्हणणें तुम्ही मनावर घेतले तर मी ब्रह्मरूप होईन व ती ब्रह्मस्थिति प्राप्त होण्याकरितां जे कांही केलें पाहिजे म्हणून सांगाल, त्याचा अभ्यास करीन. ॥ १४१ ॥ अहो देवा! तुम्ही कोणाचें वर्णन केलें हें समजत नाही, पण तें ऐकूनच जर मन त्यांच्या स्थितीची प्रशंसा करतें तर मग, प्रत्यक्ष तशी ब्रह्मस्थिती प्राप्त झाली असतां आनंदाला पारावारच नाही. ॥ १४२ ॥ असा ब्रह्मरूपी मी स्वत: होईन काय? व प्रभो! मला आपला समजून ही ब्रह्मस्थिति प्राप्त करून द्याल काय? हें अर्जुनाचे बोलणें ऐकून, भगवान श्रीकृष्ण हसले व म्हणाले, अर्जुना! तुला ब्रह्मरूप करूं बरें! ॥ १४३ ॥

गूढार्थदीपिका—भक्त भगवत्प्रेमाने भगवत्स्वरूपच झालेले असतात, पण प्रेमामुळें भगवंताशीं ऐक्य पावल्याची त्यांना जाणीव उत्पन्न होत नाही किंवा जाणीवेचा अहंकार उत्पन्न होत नाही. कारण अशा अहंकारामुळें सगुण साक्षात्कार लोपला जातो. हे गोपिकांच्या रासक्रीडेंत भगवंताच्या झालेल्या अंतर्धानावरून कळून येते. भक्त भगवंताच्या प्राप्तीची जाणीव न वागवितां अज्ञान्याप्रमाणे नदी समुद्रास मिळालेली असली तरी, मिळतच राहते, त्याप्रमाणे भगवंताच्या प्राप्तीची उत्कंठा वागवित असतात.

देखा संतोषु एक न जोडे। तंवचि सुखाचें सैंघ सांकडें। मग जोडलिया कवणेकडे। अपुरें असे॥ १४४॥
तैसा सर्वेश्वरु बळिया सेवकें। म्हणोनि ब्रह्महीं होय तो कौतुकें। परि कैसा भारें आतला पिकें। दैवाचेनि॥ १४५॥

अर्थ—पहा, मनाला संतोष जोपर्यंत प्राप्त होत नाही, तोपर्यंत सुखाचा जिकडे तिकडे दुष्काळ असतो. संतोष प्राप्त झाल्यानंतर मग सुखाची उणीव कोठे असणार?॥ १४४॥ त्याप्रमाणे अनंतब्रह्मांडाचा स्वामी सर्वसमर्थ भगवान श्रीकृष्ण, याचा अर्जुन एकनिष्ठ सेवक असल्यामुळें, तो सहज लीलीने ब्रह्मस्वरूप होणार, पण अर्जुनाच्या भाग्याला कसें बहारीचें पीक आलें व त्या पिकाच्या भाराने तो कसा संपन्न झाला, पहा!॥ १४५॥

गूढार्थदीपिका—प्रेमळ माता आपल्या लाडक्याचे जसें लाड पुरविते, त्याप्रमाणे भगवद्भक्ताचे स्वाधीन झालेला परमात्माहि आपल्या भक्ताचे लाड पुरवितो.

जो जन्मसहस्त्रांचियासाठीं। इंद्रादिकांहीं महागु भेटी। तो आधीनु केतुला किरीटी। जे बोलुही न साहे॥ १४६॥
मग ऐका जें पांडवें। म्हणितलें म्यां ब्रह्म होआवें। तें अशेषही देवें। अवधारिलें॥ १४७॥
तेथ ऐसेंचि एक विचारिलें। जे या ब्रह्मत्वाचे डोहळे जाहले। परि उदरा वैराग्य आहे आलें। बुद्धीचिया॥ १४८॥
एऱ्हवीं दिवस तरी अपुरे। परी वैराग्यवसंताचेनि भरें। जें सोऽहंभाव महुरें। मोडोनि आला॥ १४९॥
म्हणोनि प्राप्तिफळें फळतां। यासि वेळु न लागेल आतां। होय विरक्तु ऐसा अनंता। भरंवसा जाहला॥ १५०॥
म्हणे जें जें हा अधिष्ठील। तें आरंभींच यया फळेल। म्हणोनि सांगीतला न वचेल। अभ्यासु वायां॥ १५१॥

अर्थ—हजारों जन्म तप करूनहि इंद्रादिकांना ज्या परमेश्वराची भेट होणें दुरापास्त आहे, तो परमात्मा अर्जुनाच्या किती स्वाधीन झाला, पहा! अर्जुनाने तोंडाने कांही मागावें, इतकेहि त्याला सहन होत नव्हते.॥ १४६॥ (श्रीज्ञानेश्वर महाराज श्रोत्यांना म्हणतात) पुढें ऐका. मी ब्रह्मस्वरूप व्हावें अशी आपली जी इच्छा अर्जुनाने बोलून दाखविली, ती देवाने पूर्णपणें लक्षांत घेतली.॥ १४७॥ देव आपल्याशींच विचार करूं लागले की ब्रह्मस्वरूप होण्याचे डोहळे ज्याअर्थी याला झाले आहेत, त्याअर्थी याच्या बुद्धीचे ठिकाणीं वैराग्याचा अंकुर उत्पन्न झाला आहे, हे खास.॥ १४८॥ साधारणत: ह्या अंकुराची पुरेशी वाढ झाली नाही, पण वैराग्यरूपी वसंतऋतूच्या भराने व मी ब्रह्म आहे अशा मोहराने हा डवरून गेला आहे.॥ १४९॥ म्हणून ब्रह्मप्राप्तीरूपफळाने दाटून येण्याला याला वेळ लागणार नाही व हा पूर्ण विरक्त होईल असा देवाला भरंवसा वाटला॥ १५०॥ देव मनांत म्हणतात, जो जो अभ्यास हा करील, तो तो एकदम सुरुवातीलाच याला फलद्रूप होईल, म्हणून याला जर अभ्यास सांगितला तर तो वायां जाणार नाही.॥ १५१॥

गूढार्थदीपिका—भगवत्प्रेमामुळे व भगवंताच्या साह्याने "**जितोत्तर भूमिकस्यच नाधरभूमिषु परचित्तज्ञानादिषु संयमो युक्त:**" (सू० ६-वि० पा०) खालच्या भूमिकेचा अभ्यास करावा न लागतां, भक्त एकदम वरच्या भूमिकेवर चढतो, असे योग सूत्रभाष्यात म्हटलें आहे; म्हणून भगवद्भक्ताला योगाभ्यासांत कष्ट पडत नाहीत. सहजच त्याला योग साधतो असा अर्थ.

ऐसें विवरोनियां श्रीहरी। म्हणितलें तिये अवसरीं। अर्जुना हा अवधारीं। पंथराजु॥ ५२॥

अर्थ—असा सर्व विचार करून देव त्यावेळीं अर्जुनाला म्हणतात, अर्जुना! आतां तुला जो श्रेष्ठ मार्ग आहे तो सांगतों ऐक.॥ १५२॥

गूढार्थदीपिका—सर्व योगांत "योगीनामपि सर्वेषाम्" "यो मे भक्त: स मे प्रिय:" इत्यादी अनेक श्लोकांनीं भगवंतानी भक्ताचे श्रेष्ठत्व सांगितलें आहे आणि "ब्रह्मणी हि प्रतिष्ठाऽहम्" या श्लोकांत मी ब्रह्माची प्रतिष्ठा आहे—म्हणजे मूळ आहे—असे सांगून, अनिर्वाच्य निर्गुण परब्रह्माप्रमाणेंच आपल्या सगुणस्वरूपाचें पूर्ण ब्रह्मत्व दर्शविलें आहे.

तसेंच श्रीज्ञानेश्वर महाराजांनीहि "जे उन्मनियेचे लावण्य", "वन्हि आणि ज्वाळ। दोन्ही वन्हीचि केवळ", "तरी पार्था परियेसा। मी तंव येथ ऐसा" इत्यादि ओव्यांत निर्गुणाचे व सगुणाचे अत्यंत ऐक्य आहे, असें जे सांगितलें आहे,

त्याचा साक्षात् अनुभव या योगमार्गाने घेतां येतो व त्या अनुभवामुळे, सगुणस्वरूपाचे ठिकाणीं अकृत्रिम भक्ति होते.

अशा रीतीने सर्वश्रेष्ठ भक्तियोगाला सहायक होणाऱ्या या योगमार्गाला ''पंथराजु'' म्हणून संबोधिलें यांत आश्चर्य नाही.

तेथ प्रवृत्तितरूच्या बुडीं। दिसती निवृत्तिफळाचिया कोडी। जिये मार्गींचा कापडी। महेशु आझुनी॥ १५३॥

अर्थ—हा मार्ग म्हणजे कर्मप्रवृत्तिरूप एक वृक्षच आहे, पण याच्या बुडाशी मात्र कर्मनिवृत्तिरूप असंख्य फळें आहेत. भगवान शंकर या मार्गाने अजून प्रवास करीत आहेत.॥ १५३॥

गूढार्थदीपिका—तेथ प्रवृत्तितरूचां बुडी। दिसती निवृत्तिफळाचिया कोडी—आत्मप्राप्तीकरितां केलेला योगाभ्यास हें कर्माचरणच आहे खरें, पण शेवटीं अभ्यास पूर्ण होऊन जेव्हां जीवब्रह्मैक्य होतें तेव्हा योग्याला, माझे ठिकाणीं कर्म नाही व कर्माचें कर्तृत्वहि नाही, मी सर्वकर्मकर्तृत्वरहित केवळ सच्चिदानंदस्वरूप आहे, असा अनुभव येतो, या अनुभवाने सर्व कर्माची व कर्तृत्वाची निवृत्ति होते.

जियें मार्गींचा कापडी। महेश आजुनी—हा योगमार्ग अत्यंत कष्टतर असल्यामुळें, जीवाला जवळ जवळ असाध्यच आहे आणि साध्य झाल्यानंतरहि मरेतोपर्यंत तो अभ्यास चालूंच ठेवावा लागतो, असा भाव.

पैं योगिवृंदें वहिलीं। आडवीं आकाशीं निघालीं। कीं तेथ अनुभवाचां पाउलीं। धोरणु पडिला॥ १५४॥

अर्थ—पण योगीलोकांनी खरोखर, मार्ग नसलेल्या अरण्यांत किंवा आकाशांत वाट चालण्याला सुरुवात केली. तेथे येत जाणारा जो अनुभव तेच पाऊल होय व अनुभवाच्या पाठी येत गेलेला अनुभव ही रुळलेली पाऊलवाट होय.

तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें। धांव घेतली एकसरें। कीं येर सकळ मार्ग निदसुरे। सांडूनिया॥ १५५॥

अर्थ—आत्मबोधाला प्रतिबंधक ऋद्धिसिद्धि प्राप्त करून घेणें इत्यादि अज्ञानी लोकांचे जे मार्ग होते, ते सोडून आत्मानुभवाचा जो सरळ मार्ग होता, त्या मार्गाने त्यांनी एकसारखी धांव घेतली.॥ १५५॥

गूढार्थदीपिका—येर सकळ मार्ग निदसुरे। सांडूनियां—''ते ममाधावुपसर्गा व्युत्थाने सिद्धयः'' (यो० सू० वि० पा० ३७) योगाच्या अभ्यासाने प्राप्त होणाऱ्या सिद्धी समाधींत म्हणजे आत्मैक्यांत विघ्न करणाऱ्या असतात. कारण व्युत्थानात—म्हणजे आत्मस्वरूपाशीं झालेलें ऐक्य नाहिसे होऊन द्वैत भासूं लागलें असतांच-त्या अनुभवाला येतात असें योगसूत्रात सांगितलें आहे.

आत्मबोधाचेनि उजुकारें। धांव घेंतली एकसरें।—अर्थात् योगाने आत्म्याशीं ऐक्य साधूं पाहणारे योगी-पुरुष योगसिद्धि मिळविण्याकरितां योगाचा अभ्यास करणें, हा अज्ञानाचा मार्ग आहे असे समजून, सिद्धी मिळविण्याच्या भ्रांतींत पडत नाहीत सिद्धींचा अव्हेर करून ते आत्मैक्याचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करतात.

पाठीं महर्षी येणें आले। साधकांचे सिद्ध जाहाले। आत्मविद थोरावले। येणेंचि पंथें॥ १५६॥

अर्थ—नंतर ऋषिमुनी या मार्गाने येऊं लागले व साधकदशेंतून सिद्ध दशेंत गेले. आत्मज्ञानी पुरुष देखील या मार्गाचा अवलंब करूनच थोर जगन्मान्य झाले.॥ १५६॥

गूढार्थदीपिका—साधकांचे सिद्ध जाहाले—''ऐका सिद्धांचे लक्षण। सिद्ध म्हणजे स्वरूप जाण'' ''स्वरूप होऊनि राहिजे। तया नाम सिद्ध बोलिजे'' (दासबोध द० ८ स ९) सिद्ध म्हणजे स्वत:सिद्ध ब्रह्मस्वरूपच असल्यामुळें, सिद्ध हें नांव ब्रह्मस्वरूपासच आहे आणि जे असे केवळ ब्रह्मस्वरूप होऊन राहतात, त्यांनाहि सिद्ध म्हणतात. योगाभ्यासाने साधक सिद्ध होतो म्हणजे परब्रह्माशीं पूर्ण ऐक्य पावतो.

आत्मविद थोरावले—योगाभ्यास न करतां, केवळ तत्त्वमस्यादि महावाक्याच्या योगाने, ज्यांना 'मी' सच्चिदानंद आत्मस्वरूप आहे असे ज्ञान होते, त्यांना आत्मविद म्हणतात. पण असें हें आत्मज्ञान झालें तरी, बाह्य विषयाचा भास होऊन, ज्ञान्यांचें मन विषयाकार होत राहतें व आत्मस्वरूपाची विस्मृति राहते; म्हणून त्यांचे आत्मैक्यज्ञान आनुमानिक व अदृढ असते. बाह्य विषयांचा विसर पडून, केवळ ब्रह्मैक्याचा साक्षात् अपरोक्ष अनुभव त्यांना मिळत

नाही. योगाभ्यासाने तसा अपरोक्ष अनुभव घेतां येतो व ज्ञान दृढ होतें. म्हणून केवळ ज्ञान्यापेक्षा योगाभ्यास करणारे ज्ञानी श्रेष्ठ समजले जातात असे ''आत्मविद थोरावले'' या चरणाने माऊलींनी सांगितलें आहे. ''**क्रियावानेष ब्रह्मविदां वरिष्ठः**'' (मुं० उ० ३-१-४) अशी श्रुतिहि असून ज्ञान, ध्यान, वैराग्यादिकांनी युक्त असलेला क्रियावान ज्ञानी, ज्ञान्यात श्रेष्ठ होय असे आचार्यांनी त्यावरील भाष्यांत म्हटलें आहे.

हा मार्गु जैं देखिजे। तैं तहान भूक विसरिजे। रात्रिदिवसु नेणिजे। वाटे इये॥ १५७॥

अर्थ—या मार्गाला जो लागला, तो तहान भूक देखील विसरतो व रात्रीदिवसांचे देखील त्याला ज्ञान होत नाही. ॥ १५७॥

गूढार्थदीपिका—''प्राणस्य धर्मावशनापिपासे'' (विवेक चूडामणि श्लो० १०४) तहान व भूक हे प्राणाचे धर्म आहेत. योगाने प्राणाचा निरोध होऊन तहानभूक विसरली जाते.

योगाभ्यासांत बाह्य पदार्थांचा विसर पडल्यामुळें रात्र व दिवस भासत नाहीत.

चालतां पाऊल जेथ पडे। तेथ अपवर्गाची खाणी उघडे। आव्हांटलिया तरी जोडे। स्वर्गसुख॥ १५८॥

अर्थ—चालत असतांना त्याचे जेथें जेथें पाउल पडेल, तेथें तेथें मोक्षाचा त्याला अनुभव येतो. यदाकदाचित् मार्ग चुकला तर स्वर्गसुख भोगायला मिळतें. ॥ १५८॥

निगिजे पूर्वीलिया मोहरा। कीं येईजे पश्चिमेचिया घरा। निश्चळपणें धनुर्धरा। चालणें एथिंचें॥ १५९॥

अर्थ—हा मार्ग म्हणजे पूर्व दिशेने निघून पश्चिम दिशेला पोहोंचावे असा आहे. या मार्गाचें चालणें म्हणजे अत्यंत दृढ श्रद्धा ठेवणें होय. ॥ १५९॥

गूढार्थदीपिका—या योगप्रक्रियारूप अपरोक्ष अनुभवाचा मार्ग गुरूपासूनच जाणवयाचा असतो व श्रीगुरुच्या सहायावाचून, त्या मार्गाची वाटचाल होऊं शकत नाही; म्हणून येथें विशेष स्पष्टीकरण करतां येत नाही.

निगिजे पूर्वीलिया मोहरा। कीं येइजे पश्चिमेचिया घरा—कुंडलिनीच्या सहायाने प्राणाचा सुषुम्नानाडींत प्रवेश करून; आधारादि षट्चक्राचे अनुसंधान व तेथील गणेशादि देवतांचें अनुसंधान व पूजन करून, त्यांच्या अनुग्रहाने सहस्रदलांचे ठिकाणीं शिवशक्तीचें ऐक्य करणें याला पूर्वमार्ग म्हणतात.

आणि कुंडलिनी शक्तीच्या सहायाने सुषुम्नामार्गाचा वळसा घेऊन त्रिकूटापासून ब्रह्मरंध्रांत गमन करणें याला पश्चिममार्ग म्हणतात.

पूर्वमार्ग साधल्यानंतर पश्चिममार्ग साधायचा असतो, म्हणून येथें ''निगिजे पूर्वीलिया मोहरा। की येइजे पश्चिमेचिया घरा'' असे म्हटले आहे.

येणें मार्गें जया ठाया जाईजे। तो गांवो आपणचि होईजे। हें सांगों काय सहजें। जाणसी तूं॥ १६०॥
तेथ पार्थें म्हणितलें देवा। तरि तेंचि मग केव्हां। कां आर्तिसमुद्रौनि न काढावा। बुडतु जी मी॥ १६१॥
तंव श्रीकृष्ण म्हणती ऐसें। हें उत्सृंखळ बोलणें कायसें। आम्ही सांगतसों आपैसें। वरि पुशिलें तुवां॥ १६२॥

अर्थ—या मार्गाने ज्या गांवाला पोहोंचायचें असते, तो गांव योगी आपणच होतो हे तुला काय सांगूं? तुला आपोआप पुढें कळून येईल. ॥ १६०॥ हें ऐकून अर्जुन म्हणतो, देवा! मग आतां केव्हां ती स्थिति प्राप्त करून द्याल? या उत्कंठारूप समुद्रांत मी बुडत आहे. त्यातून मला काढणार की नाहीं?॥ १६१॥ तेव्हा भगवान श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना! असे काय उतावीळपणाने बोलतोस? अरे! आपण होऊन सांगणार होतोच, आणखी तूंहि विचारलेस एवढेंच. ॥ १६२॥

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः। नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम्॥ ११॥

अर्थ—अत्यंत शुद्ध पवित्र स्थळीं, अत्यंत उंच होणार नाही व अत्यंत भूमीशीं लागून होणार नाही, असे आपलें स्थिर आसन, खाली दर्भ आंथरून, त्यावर मृगचर्म व त्यावर वस्त्राची घडी टाकून, तयार करावे. ॥ ११॥

तरी विशेषें आतांचि बोलिजेल। परि तें अनुभवें उपेगा जाईल। म्हणोनि तैसें एक लागेल। स्थान पाहावें॥ १६३ ॥
जेथ आराणुकेचेनि कोडें। बैसलिया उठों नावडे। वैराग्यासी दुणीव चढे। देखिलिया जें॥ १६४॥
जो संतीं वसविला ठावो। संतोषासि सावावो। मना होय उत्सावो। धैर्याचा॥ १६५॥
अभ्यासुचि आपणयातें करी। हृदयातें अनुभव वरी। ऐसी रम्यपणाची थोरी। अखंड जेथ॥ १६६॥
जया आड जातां पार्था। तपश्चर्या मनोरथा। पाखांडियाही आस्था। समूळ होय॥ १६७॥
स्वभावें वाटे येतां। जरी वरपडा जाहला अवचितां। तरी सकामुही परि माघौता। निघों विसरे॥ १६८॥
ऐसेनि न राहतयातें राहवी। भ्रमतयातें बैसवी। थापटूनि चेववी। विरक्तीतें॥ १६९॥
हें राज्य वर सांडिजे। मग निवांता एथेंचि असिजे। ऐसें शृंगारियांहि उपजे। देखतखेवों॥ १७०॥
जें येणेंमानें बरवंट। आणि तैसेंचि अति चोखट। जेथ अधिष्ठान प्रगट। डोळां दिसे॥ १७१॥
आणिकही एक पहावें। जें साधकीं वसतें होआवें। आणि जनाचेनि पायरवें। मैळेचिना॥ १७२॥
जेथ अमृताचेनि पाडें। मुळेंहीसकट गोडें। जोडती दाटें झाडें। सदा फळतीं॥ १७३॥
पाउला पाउला उदकें। वर्षाकाळावीण अति चोखें। निर्झरें कां विशेखें। सुलभें जेथ॥ १७४॥
हा आतपुही अळुमाळु। जाणिजे तरी शीतळु। पवनु अति निश्चळु। मंद झुळके॥ १७५॥
बहुत करूनि निःशब्द। दाट न रिगे श्वापद। शुक हन षट्पद। तेउतें नाहीं॥ १७६॥
पाणिलगें हंसे। दोनी चारी सारसें। कवणे एके वेळे बैसे। तरी कोकिळही हो॥ १७७॥
निरंतर नाहीं। तरि आलीं गेलीं कांहीं। होतु कां मयुरेंही। आम्ही ना न म्हणों॥ १७८॥
परी अवश्यक पांडवा। ऐसा ठावो जोडावा। तेथ निगूढ मठ होआवा। कां शिवालय॥ १७९॥
दोहींमाजि आवडे तें। जें मानलें होय चित्तें। बहुतकरूनि एकांतें। बैसिजे गा॥ १८०॥
म्हणोनि तैसें तें जाणावें। मन राहतें पाहावें। राहेल तेथ रचावें। आसन ऐसें॥ १८१॥
वरी चोखट मृगसेवडी। माजीं धूतवस्त्राची घडी। तळवटीं अमोडी। कुशांकुर॥ १८२॥
सकोमळ सरिसे। सुबद्ध राहती आपैसे। एकेंपाडें तैसे। वोजा घालीं॥ १८३॥
परि सावियाचि उंच होईल। तरी आंग हन डोलेल। नीच तरी पावेल। भूमिदोषु॥ १८४॥
म्हणोनि तैसें न करावें। समभावें धरावें। हें बहु असो होआवें। आसन ऐसें॥ १८५॥

अर्थ—आता अर्जुना! येथून योगाचें सविस्तर रीतीनें विवेचन करणार आहे. पण तें सर्व, तसा अनुभव घेतला तर, उपयोगाचें होईल. म्हणून अभ्यास करण्याकरिता तसें एकांताचे स्थान पाहून घ्यावें. ॥ १६३ ॥ थोडा वेळ आनंदांत बसावें या इच्छेने, जेथें बसलें असतां, पुन: उठावें असें वाटणार नाही व जें पाहतांक्षणींच वैराग्य दुप्पट वाढेल. ॥ १६४ ॥ जेथें, संतसज्जनांची वस्तीं आहे व विषयांवांचून मनाच्या संतोषाला साह्य होईल आणि मनाला धैर्य धरण्याचा उल्हास वाटेल. ॥ १६५ ॥ अभ्यासच आपण योग्याकडून अभ्यास करवून घेईल व अनुभव आपणच अंत:करणाचा स्वीकार करील, अशी थोर रमणीयता सदासर्वदा जेथें असेल. ॥ १६६ ॥ सहज एखादा नास्तिक त्या ठिकाणाहून गेला असतां, त्यालाहि तेथें तपश्चर्या करावी, अशी मनापासून इच्छा उत्पन्न होईल. ॥ १६७ ॥ सहज वाटेने जात असतां, जर एखादा कामी पुरुष अकस्मात् तेथें प्राप्त झाला, तर त्यालाहि परत जाण्याचें भान राहणार नाही. ॥ १६८ ॥ याप्रमाणें, राहूं न इच्छिणाऱ्याला राहायला लावणारें, व्यर्थ भटकणाऱ्याला बसविणारें व वैराग्याला थापटून जागे करणारें. ॥ १६९ ॥ हें स्थान, पाहिल्याबरोबर संपूर्ण राज्यवैभव सोडून एकटेंच आनंदाने येथे राहावें, असें विलासी पुरुषालाहि वाटेल. ॥ १७० ॥ या सर्व रीतीने जें उत्तम आहे आणि अति पवित्र आहे व त्याचप्रमाणें जेथें सर्व जगाचें अधिष्ठान जें ब्रह्मस्वरूप तें प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसतें. ॥ १७१ ॥ आणखी एक गोष्ट तेथें पाहिली पाहिजे. योगाभ्यासी, साधक पुरुषाचे जेथे राहणें असेल व विषयासक्त पुरुषांचे तेथें मुळींच येणें जाणें नसेल. ॥ १७२ ॥ जीं मुळासह अमृततुल्य गोड असून, जीं सदा फळणारीं आहेत अशा फळांचीं तेथें दाट झाडें आहेत. ॥ १७३ ॥

पावसाळा नसतांना देखील पावलापावलावर जेथें स्वच्छ पाणी किंवा झरें सुलभ सांपडतात. ॥ १७४॥ सूर्याचें ऊन देखील जेथें थोडें शीतळ वाटेल व वाऱ्याची सारखी मंद झुळक येंत राहील. ॥ १७५ ॥ बहुतकरून जेथें शब्दच ऐकूं येत नाहीत. जेथें श्वापदें फार नसतील. राघू किंवा भ्रमर हेंहि जेथें नाहींत. ॥ १७६ ॥ पाण्याच्या आश्रयाने राहणारे हंस, दोन चार सारस पक्षी, एखादे वेळीं कोकिळा बसली तरी चालेल. ॥ १७७॥ नेहमीं नाही तरी, एखादे वेळीं मधून मधून मोर येत जात असले तर आम्ही नको असें म्हणत नाही. ॥ १७८ ॥ पण असें एखादें निवांत स्थान मात्र असणें आवश्यक आहे. तेथें कोणाच्या दृष्टीस पडणार नाही, असा गुप्त मठ किंवा शिवमंदिर पहावें. ॥ १७९ ॥ यापैकीं जे आवडेल किंवा मनाला रुचेल तें घ्यावें. पण या सर्वांचें तात्पर्य हेंच आहे की योगाभ्यासाकरितां असें एकान्तात बसावें. ॥ १८० ॥ तशी त्या जागेची परीक्षा करून घ्यावी व मनाला तेथे उल्हास वाटतो किंवा नाही हें पहावे आणि उल्हास वाटत असला तर, मग तेथे बसण्याकरितां आसनाची अशी रचना करावी. ॥ १८१ ॥ सर्वांच्या वर हरिणाचे मृदु कातडें आंथरावे, त्याचे खालीं स्वच्छ धुतलेल्या वस्त्राची घडी घालावी व सर्वांच्या खालीं अग्रासह असलेले दर्भ आंथरावे. ॥ १८२ ॥ हे दर्भ कोवळे, सारख्या लांबी रुदीचे व सारखे एकमेकांस घट्ट धरून राहतील अशा रीतीने नीट सपाट जमिनीवर आंथरावे. ॥ १८३ ॥ अशा रीतीने रचलेलें आसन जर का उंच झालें तर, शरीर हालेल आणि खालीं जमिनीशीं फार लागून झालें तर, भूमीचे ओलावा इत्यादि दोष लागतील. ॥ १८४॥ म्हणून तसें करूं नये. सारखें ठेवावें. फार सांगत नाही. असें आसन असावें. ॥ १८५ ॥

तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः। उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये॥ १२ ॥

अर्थ—नंतर त्या आसनावर बसून आत्मानुभव घेण्याकरितां, मन इंद्रियें यांच्या व्यापाराचा निरोध करून व मन एकाग्र करून योगाभ्यास करावा. ॥ १२ ॥

मग तेथ आपण। एकाग्र अंतःकरण। करूनि सद्‍गुरूस्मरण। अनुभविजे॥ १८६ ॥
तैसें स्मरतेनि आदरें। सबाह्य सात्त्विकें भरे। जंव कठिणपण विरे। अहंभावाचें॥ १८७॥

अर्थ—मग मन अत्यंत एकाग्र करावें व सदगुरूंचे अत्यंत प्रेमाने स्मरण करून अनुभव घ्यावा. ॥ १८६ ॥ ज्या सद्‍गुरूच्या अत्यंत प्रेमपूर्वक केलेल्या स्मरणाने मन सात्विक अष्टभावाने भरून आलें असतां, देहाचे आंत व बाहेर सर्व सत्वगुणाची वृद्धि होऊन अहंभावाचें काठिण्य नाहीसें होतें. ॥ १८७ ॥

गूढार्थदीपिका-अहंभावाचें काठिण्य—काठिण्य म्हणजे वेगळेपणा. मातीचा घट भाजला जात नाही तोपर्यंत तो मातीच असतो व मातींत मिळूं शकतो. पण एकदां भाजला गेला म्हणजे कठीण होऊन मातीहून वेगळा पडतो व मातींत मिळूं शकत नाही. "अर्जुनपण न घेतां। मी ऐसे जे पंडुसुता। उठतसे ते तत्वतां। तयाचें रूप" (ज्ञा० अ० १८-१३१५) "**तस्मात्सर्व शरीरेष्वहमहमित्येव भासते स्पष्टः। यः प्रत्ययः विशुद्धः तस्य ब्रह्मैव भवति मुख्योऽर्थः**" (स्वात्मनिरूपण श्लो० ८८). वास्तविक पाहतां आपलें ठिकाणीं 'मी' म्हणून जे वृत्तीचें स्फुरण होतें, ते त्यारूपाने परमेश्वराहून स्फुरते; पण तें स्फुरण म्हणजे मी असे जीव समजतो व परमेश्वराहून वेगळा पडतो हा वेगळेपणाचा अहंभाव जोपर्यंत असतो, तोपर्यंत जीव, परमेश्वराशीं ऐक्य पावूं शकत नाही. म्हणून 'मी' म्हणजे जीव, परमेश्वराहून निराळा आहे, अशी अहंभावरूप वेगळेपणाची जाणीव, हेंच काठिण्य होय.

विषयांचा विसरु पडे। इंद्रियांची कसमस मोडे। मनाची घडी घडे। हृदयामाजीं॥ १८८ ॥

अर्थ—अहंभाव गळला की विषयांचा सर्वस्वीं विसर पडतो. इंद्रियांची विषयसुखाविषयींची व्याकुळता नाहीशी होते व संपूर्ण मनाची हृदयाचे ठिकाणीं घडी होऊन राहते. ॥ १८८ ॥

गूढार्थदीपिका—इंद्रियांची बाह्य विषयांकडील धांव व मनाचे विषयाविषयीं होणारे संकल्पविकल्प, हे व्यापार बंद पडतात व अशा रीतीने मन व इंद्रियें हीं अंतःकरणरूप म्हणजे केवळ वृत्तिरूप होऊन राहतात.

ऐसें ऐक्य हें सहजें। फावे तंव राहिजे। मग तेणेंचि बोधें बैसिजे। आसनावरी॥ १८९ ॥
आतां आंगातें आंग वरी। पवनातें पवनुचि धरी। ऐसी अनुभवाची उजरी। होंचि लागे॥ १९० ॥

प्रवृत्ति माघौति मोहरे। समाधि ऐलाडी उतरे। आघवें अभ्यासूं सरे। बैसत। खेवों॥ १९१॥

अर्थ—असें हें मन, इंद्रियें व अंत:करण यांचें मूळचें ऐक्य होई पर्यंत प्रेमाने सद्‌गुरूंचे स्मरण करीत राहावें व या ऐक्यबोधाला घेऊनच आसनावर बसावें. ॥ १८९ ॥ मग शरीराला सावरणारा दुसरा कोणी नसून, शरीरच शरीराला सांभाळतें व प्राणवायूला देखील धरून ठेवणारा दुसरा कोणी नसून, प्राणच प्राणाला धरून ठेवतो. असा पुढें पुढें उत्तरोत्तर वाढता अनुभव येऊं लागतो. ॥ १९० ॥ सर्व प्रवृत्ति बंद पडते व समाधिदशा अलिकडेच सांपडते किंवा हातीं लागते. अशा रीतीने आसनावर बसल्याबरोबरच सर्व समाधीपर्यंतचा अभ्यास संपून जातो. ॥ १९१ ॥

गूढार्थदीपिका—शिष्याच्या मनांत श्रीगुरुविषयीं जें नितांत प्रेम असतें व त्या प्रेमामुळें श्रीगुरूंची शिष्यावर जी पूर्ण कृपा होते, त्या प्रेमानेच व त्या कृपनेच हें फळ प्राप्त होतें.

मुद्रेची प्रौढी ऐशी। तेचि सांगिजेल आतां परियेसीं। तरि ऊरु या जघनासी। जडोनि घालीं॥ १९२॥
चरणतळें देव्हडीं। आधारद्रुमाचां बुडीं। सुघटितें गाढीं। संचरीं पां॥ १९३॥
सव्य तें तळीं ठेविजे। तेणें सिवणीमध्यु पीडिजे। वरी बैसे तो सहजें। वामचरणु॥ १९४॥
गुदमेढ्राआंतौतीं। चारी अंगुळें निगुतीं। तेथ सार्ध सार्ध प्रांतीं। सांडूनियां॥ १९५॥
माजि अंगुळ एक निगे। तेथ टांचेचेनि उत्तरभागें। नेहेटिजे वरि आंगें। पेललेनी॥ १९६॥
उचलिलें कां नेणिजे। तैसें पृष्ठांत उचलिजे। गुल्फद्वय धरिजे। तेणेंचि मानें॥ १९७॥
मग शरीरसंचु पार्था। अशेषही सर्वथा। पार्ष्णीचा माथा। स्वयंभु होय॥ १९८॥
अर्जुना हें जाण। मूळबंधाचें लक्षण। वज्रासन गौण। नाम यासी॥ १९९॥
ऐसी आधारीं मुद्रा पडे। आणि आधींचा मार्गु मोडे। तेथ अपानु आंतुलेकडे। वोहोटों लागे॥ २००॥

अर्थ—अर्जुना! ज्या मुद्रेच्या थोरवीने हा अभ्यास साधतो ती मुद्रा मी आतां तुला सांगतों, ऐक. आपल्या मांड्या पोटरीशी घट्ट धराव्या. ॥ १९२ ॥ मग एका पायाच्या तळव्यावर दुसरा पायाचा तळवा वांकडा ठेवून, आधारचक्ररूपी वृक्षाच्या बुडाशीं म्हणजे गुदस्थानाचे ठिकाणीं ते चांगले स्थिर व घट्ट लावावे. ॥ १९३ ॥ त्यांत उजव्या पायाची टांच खाली ठेवून, त्या टांचेने शिवण मधोमध पक्की दाबावी म्हणजें सहज उजव्या पायाच्या तळव्यावर डाव्या पायाचा तळवा राहतो. ॥ १९४ ॥ गुद आणि शिश्न यांच्यामध्यें जी चार बोटें जागा असते, त्यापैकीं इकडील व तिकडील दीड दीड बोटें जागा सोडून द्यावी. ॥ १९५ ॥ राहिलेली मधलीं एका बोटाची ची जागा, ती उजव्या पायाच्या टांचेच्या मागल्या भागाने, शरीराचा तोल सांभाळून वर रेटावी. ॥ १९६ ॥ शरीर वर उचललें गेलें हें समजणार सुद्धां नाही, अशा रीतीने हळूच पाठीचा खालचा भाग किंचित् वर उचलावा व तशाच रीतीने पायाचे दोन्ही घोटेहि वर धरावे. ॥ १९७ ॥ अर्जुना! मग या संपूर्ण शरीराचा सांगाडा घोट्यांवर स्वयंभू राहतो. (त्या घोट्यांवरच संपूर्ण शरीराचा सांगाडा धरला जाईल, असा अर्थ). ॥ १९८ ॥ अर्जुना! ज्याला मूळबंध म्हणतात, त्याचें हें लक्षण आहे. वज्रासन हेंहि त्याला दुसरें (गौण) नांव आहे. ॥ १९९ ॥ याप्रमाणें गुदाचे ठिकाणीं असलेल्या मूलाधार चक्राचे ठिकाणीं, अशी मूळबंधाची ठेवण बरोबर बसली की, अपान वायूचा खालीं वाहण्याचा मार्ग बंद होतो व तो आंतल्या भागाने संकोचू लागतो म्हणजे वर जातो. ॥ २०० ॥

गूढार्थदीपिका—आधारचक्र—हे चक्र गुदस्थानाचे ठिकाणीं असून चार दलाचें असते. हें अग्निप्रमाणें तेजस्वी आहे व याच्या 'वं शं षं सं' ह्या मातृका आहेत, याची देवता गणेश आहे.

समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिर:। सम्प्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्॥ १३॥

अर्थ—अत्यंत निश्चल होऊन शरीर, मान व डोकें सरळ एका रेषेंत धरून इकडे तिकडे न पाहता, सरळ आपल्या नाकाच्या शेंड्याकडे दृष्टि देऊन. ॥ १३ ॥

तंव करसंपुट आपैसें। वामचरणीं बैसे। बाहुमूळीं दिसे। थोरीव आली॥ २०१॥
माजि उभारलेनि दंडें। शिरकमळ होय गाढें। नेत्रद्वारींचीं कवाडें। लागूं पाहती॥ २०२॥

वरचिलें पातीं ढळती। तळींचीं तळीं पुंजाळती। तेथ अर्धोन्मीलित स्थिती। उपजे तया॥ २०३॥
दिठी राहोनी आंतुलीकडे। बाहेर पाऊल घाली कोडें। ते ठायीं ठावो पडे। नासाग्रपीठीं॥ २०४॥
ऐसें आंतुचां आंतुचि रचे। बाहेरी मागुतें न वचे। म्हणोनि राहणें आधिये दिठीचें। तेथेंचि होय॥ २०५॥
आतां दिशांची भेटी घ्यावी। कां रूपाची वाट पहावी। हे चाड सरे आघवी। आपैसया॥ २०६॥
मग कंठनाळ आटे। हनुवटी हे हडौती दाटे। ते गाढी होऊनि नेहटे। वक्षःस्थळीं॥ २०७॥
माजि घंटिका लोपे। वरी बंधु जो आरोपे। तो जालंधरु म्हणिपे। पंडुकुमरा॥ २०८॥
नाभी वरी पोखे। उदर हें थोके। अंतरीं फांके। हृदयकोशु॥ २०९॥
स्वाधिष्ठानावरिचिले कांठीं। नाभिस्थानातळवटीं। बंधु पडे किरीटी। वोढियाणा तो॥ २१०॥

अर्थ—तेव्हा दोन्ही हात आपोआप जोडले जाऊन, त्यांची ती संपुटी डाव्या पायावर टेकली जाते व हाताचे खांदे उचलले जातात. ॥ २०१ ॥ हाताचे खांदे उचलले गेल्याने, डोकें त्यांत गढलें जातें व डोळ्यांच्या पापण्या लागूं पाहतात. ॥ २०२ ॥ वरच्या पापण्या हालत नाहीत म्हणजें वर जात नाहीत व खालच्या पापण्या खालींच राहतात. त्यामुळें डोळे अर्धवट उघडे राहतात, अशी अर्धोन्मीलित स्थिति त्याला प्राप्त होते. ॥ २०३ ॥ अशा स्थितींत दृष्टि आंतच राहते व आंत राहूनच कौतुकाने ती दृष्टि बाहेर निघाली तर ती नाकाच्या शेंड्यावर पडते. ॥ २०४ ॥ अशी दृष्टि आंतल्या आंतच राहते व बाहेर जात नाही; म्हणून त्या अर्धोन्मीलित दृष्टीचें नासाग्रीच राहणें होते. ॥ २०५ ॥ मग दिशांकडे पाहावें किंवा कोण्या रूपाकडे दृष्टि द्यावी ही इच्छा आपोआप नाहिशी होते. ॥ २०६ ॥ मग कंठनाळ म्हणजे मानेचा भाग आंखडला जातो व हनुवटी ही मानेच्या खालच्या भागाला असलेल्या खळगींत गढली जाऊन, छातीला घट्ट चिकटून बसते. ॥ २०७ ॥ त्यांत नरडीचें हाड दिसेनासें होतें, असा हा जो वरील बंध सिद्ध होतो, त्याला अर्जुना! जालंधर बंध म्हणतात. ॥ २०८ ॥ बेंवी वर फुगते, पोट सपाट होतें आणि हृदयकमल आंत विकसित होतें. ॥ २०९ ॥ शिश्नाचे वर बेंबीच्या खालीं जो बंध पडतो, त्याला वोढियाणा बंध म्हणतात. ॥ २१० ॥

गूढार्थदीपिका—स्वाधिष्ठान—हे दुसरें चक्र असून, तें लिंगस्थानाचे ठिकाणी आहे. हें सूर्याप्रमाणें तेजस्वी असून तें षट् दलात्मक आहे. याच्या बं, भं, मं, यं, रं, लं, ह्या मातृका असून याची देवता भगवान ब्रह्मा आहे.

प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः। मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः॥ १४॥

अर्थ—योग्याने मनाची विषयांकडील ओढ निःशेष नाहीशी करून व निःशेष भीति सोडून, नैष्ठिक ब्रह्मचारी होत्साता, मनाला आवरून, माझे ठिकाणीं चित्त स्थिर करून मत्परायण होऊन राहावे. ॥ १४ ॥

ऐसी शरीराबाहेरलीकडे। अभ्यासाची पांखर पडे। तंव आंतु त्राय मोडे। मनोधर्माची॥ २११॥
कल्पना निमे। प्रवृत्ती शमे। आंग मन विरमे। सावियाचि॥ २१२॥
क्षुधा काय जाहाली। निद्रा केउती गेली। हे आठवणही हारपली। न दिसे वेगां॥ २१३॥
जो मूळबंधें कोंडला। अपानु माघौता मुरडला। तो सवेंचि वरी सांकडला। धरी फुगुं॥ २१४॥
क्षोभलेपणें माजे। उवाइला ठायीं गाजे। मणिपूरेंसीं झुंजे। राहोनियां॥ २१५॥

अर्थ—याप्रमाणे शरीराच्या बाहेरच्या भागांत अभ्यासाचा कृपाप्रसाद घडून घेतो. व त्याबरोबर आंत सर्व मनोधर्माचें अस्तित्व नाहीसें होतें. ॥ २११ ॥ बाहेरच्या पदार्थाची आहे—नाही असे जें मन कल्पना करीत राहतें, ती कल्पना नाहीशी होते. प्रवृत्ति म्हणजे कर्म करण्याची इच्छा बंद पडते व त्याबरोबर सहजच मन व शरीर यांचा विसर पडतो. ॥ २१२ ॥ भूक कोठें गेली, निद्रा काय झाली, यांचें स्मरणहि राहत नाही व त्यांचे वेगहि दिसत नाहीत. ॥ २१३ ॥ जो अपानवायु मूळबंधामुळें कोंडला जाऊन मागे फिरला होता तो वर कैचींत सांपडला जाऊन लगेंच फुगूं लागतो. ॥ २१४ ॥ तो क्षुब्ध झालेला अपानवायु माजून तेथल्या तेथेंच गुरगुरूं लागतो व राहून राहून मणिपूरचक्राशीं झुंज घेतो. ॥ २१५ ॥

गूढार्थदीपिका—मणिपूरचक्र—हें तिसरें चक्र असून तें दशदलात्मक आहे. तें रक्तवर्ण असून 'डं ढं णं तं थं दं धं नं पं फं' ह्या त्याच्या मातृका आहेत. हें नाभिदेशांत असून याची देवता भगवान विष्णु आहे.

मग थावली ते वाहटुळी। सैंघ घेऊनि घर डहुळी। बाळपणींची कुहीटुळी। बाहेर घाली॥ २१६॥
भीतरीं वळी न धरे। कोठ्यामाजी संचरे। कफपित्तांचे थारे। उरों नेदी॥ २१७॥
धातूंचे समुद्र उलंडी। मेदाचे पर्वत फोडी। आंतली मज्जा काढी। अस्थिगत॥ २१८॥
नाडीतें सोडवी। गात्रांतें विघडवी। साधकातें भेडसावी। परि बिहावें ना॥ २१९॥
व्याधीतें दावी। सवेंचि हरवी। आप पृथ्वी कालवी। एकवाट॥ २२०॥
तंव येरीकडे धनुर्धरा। आसनाचा उबारा। शक्ति करी उजगरा। कुंडलिनीये॥ २२१॥

अर्थ—ही अपानवायूची उठलेली वाहटूळ थोडी शांत होऊन सर्व शरीर ढवळून टाकते व बाळपणांतील सांचलेली सर्व घाण बाहेर फेकते. ॥ २१६ ॥ तो अपानवायु आंत एक ठिकाण धरून मर्यादित जागेंत राहात नाही. मग तो कोठ्यांत शिरतो व कफ व पित्त यांचे नावहि ठेवीत नाही. ॥ २१७ ॥ रसरक्तादि सात धातूंचे समुद्र पालथे करून ठेवतो. मेदाचे पर्वत फोडून टाकतो. हाडांतील मज्जा देखील नाहीशी करतो. ॥ २१८ ॥ नाड्या सोडवितो, सर्व शरीराचे अवयवसंधी सैल करतो, अभ्यास करणाऱ्या साधकाला भिववितो, पण भिऊन जाऊं नये. ॥ २१९ ॥ व्याधी उत्पन्न करतो, लगेच नाहीशा करतो. शरीरांतील कफपित्त हे आपाचे अंश व मांसादि पृथ्वीचे अंश हे एकत्र कालवितो. ॥ २२० ॥ अर्जुना! अपानवायूचें असें कार्य चाललें असतांनाच इकडे काय होतें पहा! आसनाची उष्णता कुंडलिनी शक्तीला जागी करते. ॥ २२१ ॥

गूढार्थदीपिका—वस्तूची शक्ति वस्तूशीं समव्याप्त असते; पण ज्याप्रमाणे जलाशयातील पाणी वाहूं लागलें असतां मर्यादित होतें, त्याप्रमाणे वस्तूची शक्तिहि, कार्यरूप होतांना मर्यादित होते. तशीच जीवाची शक्ति जेव्हां कार्यरूप होते, तेव्हा ती मर्यादित होते व वाहणारें पाणी मर्यादित होण्याचे कारण जसा अमिनीचा बांध असतो, त्याप्रमाणे जीवाची शक्ति कार्यरूप होतांना जी मर्यादित होते, त्याचें कारण ती सूक्ष्म नाड्यांतून वाहाते हें होय. ह्या नाड्या मांसमय नसल्यामुळें, मनाप्रमाणे शस्त्राने तुटत नाहीत, अग्नीने जळत नाहीत व प्रेत जळल्यावरहि त्या जळत नाहीत, या नाड्यांच्याच योगाने जीव, सर्व लोकांत गमनागमन करीत असतो. या नाड्यांची जी साडे तीन वेड्यांची गुंडाळी आहे, तिला कुंडलिनी म्हणतात. ही कुंडलिनी केवळ योगाभ्यासानेच दृश्य होणारी आहे.

नागिणीचें पिलें। कुंकुमें नाहलें। वळण घेऊनि आलें। सेजे जैसें॥ २२२॥
तैशी ते कुंडलिनी। मोटकी औट वळणी। अधोमुख सर्पिणी। निदेली असे॥ २२३॥

अर्थ—जसे केशराने न्हालेलें नागीणसर्पाचें पिलूं वेटाळी घालून निजलेलें असावे. ॥ २२२ ॥ तसे ती साडेतीन वेढ्यांनी युक्त लहानशी सर्पासारखी कुंडलिनी वेंटाळी घालून अधोमुख अशी निजलेली आहे. ॥ २२३ ॥

गूढार्थदीपिका—या भगवच्छक्ति कुंडलिनीचे जे साडे तीन वेढे आहेत, ते ॐकाराच्या अ, उ, म, व अर्धमात्रा अशा साडे तीन मात्रांची मूळ स्थिति होय. ॐकार त्यावेळीं कुंडलिनी शक्तीशीं एकरूप असतो. वर सांगितल्याप्रमाणें शक्तीं ही परमेश्वराप्रमाणे शुद्ध चैतन्यस्वरूपच आहे, पण 'मी' या वृत्तीरूपाने स्फुरण पावून, अज्ञानभ्रमाने ती आपले चैतन्यस्वरूप विसरली, म्हणून "तैसी अज्ञानांगीकारें। निघाली वृत्ति विखुरे। ते सत्वरजद्वारें। तमहि होय" (ज्ञा० अ० १४-१४४) त्रिगुणात्मक होते. सत्वगुणाने ती शक्ति प्रकाशरूप असते, रजोगुणाने क्रियारूप होते व तमोगुणांमुळें जडपदार्थरूप होते. अशा या शक्तिपासून शब्दद्वारा स्थूल, सूक्ष्म व कारणरूप सृष्टि उत्पन्न होते.

कुंडलिनी निजली असते म्हणजे आपलें चैतन्यस्वरूपाशीं असलेलें ऐक्य विसरलेली असते. अधोमुख असते म्हणजे सृष्टीचें कारण जो परमात्मा, त्याला विसरून नामरूपात्मक कार्यरूपसृष्टीच्या अभिमुख असते. कार्याच्या पूर्वी कारण असतें, म्हणून कारणाला कार्याचे 'ऊर्ध्व' म्हणतात. कार्य कारणाच्या नंतर होते, म्हणून कार्याला कारणाच्या दृष्टीने 'अध' म्हणतात.

''ऊर्ध्वमूल'' या वचनाने भगवंतांनीच, कारणाला 'ऊर्ध्व' म्हटले आहे. 'मी' या वृत्तीरूपाने भासणारा जीव, आपलें परमेश्वराशीं असलेलें ऐक्य विसरून, जोपर्यंत आपलें निराळें अस्तित्व मानतो, तोपर्यंत तो सृष्टिरूप कार्याशीं अहंकाराचे द्वारा ऐक्य करून राहतो, म्हणजे सृष्टींतील देहादिक जड पदार्थाशीं ऐक्य करतो. सृष्टींतील कर्माचा अहंकार धरतो व सृष्टींतील पदार्थ जाणतो. योगासनाने प्राणशक्तीचा रोध झाला असतां, बाह्य जड देहादिकांवरील अहंकार नाहीसा होतो व त्यांचा विसर पडल्यामुळें ते पदार्थ लय पावतात.

सारांश, शक्ति अधोमुख असते तेव्हा जगत् प्रसवते ऊर्ध्वमुख झाली असतां, जगाचा नाश करते व ब्रह्मरूप होते. शक्ति जागी झाली म्हणजे ती तेजोमय होते.

विद्युल्लतेची विडी। वन्हिज्वाळांची घडी। पंधरेयाची चोखडी। घोंटीव जैशी॥ २२४॥
तैशी सुबद्ध आटली। पुटीं होती दाटली। ते वज्रासनें चिमुटली। सावध होय॥ २२५॥
तेथ नक्षत्र जैसें उलंडलें। कीं सूर्याचें आसन मोडलें। तेजाचें बीज विरूढलें। अंकुरेंशीं॥ २२६॥
तैशी वेढियातें सोडिती। कवतिकें आंग मोडिती। कंदावरी शक्ती। उठली दिसे॥ २२७॥
सहजें बहुतां दिवसांची भूक। वरि चेवविली तें होय मिष। मग आवेशें पसरी मुख। उर्ध्वा उजू॥ २२८॥
तेथ हृदयकोशातळवटीं। जो पवनु भरे किरीटी। तया सगळेयाचि मिठी। देऊनि घाली॥ २२९॥
मुखींच्या ज्वाळीं। तळीं वरी कवळी। मांसाची वडवाळी। आरोगूं लागे॥ २३०॥
जे जे ठाय समांस। तेथ आहाच जोडे घाउस। पाठी एकदोनी घांस। हियाही भरी॥ २३१॥
मग तळवे तळहात शोधी। उर्ध्वींचे खंड भेदी। झाडा घे संधी। प्रत्यंगाचा॥ २३२॥
अधोभाग तरी न सांडी। परि नखींचेंही सत्त्व काढी। त्वचा धुवूनि जडी। पांजरेंशी॥ २३३॥
अस्थींचे नळे निरपे। शिरांचे हीर वोरपे। तंव बाहेरी विरूढी करपे। रोमबीजांची॥ २३४॥
मग सप्तधातूंच्या सागरीं। ताहानेली घोट भरी। आणि सवेंचि उन्हाळा करी। खडखडीत॥ २३५॥
नासापुटौनि वारा। जो जातसे अंगुळें बारा। तो गचिये धरूनि माघारा। आंतु घाली॥ २३६॥
तेथ अध वरौतें आकुंचे। ऊर्ध्व तळौतें खाचे। तया खेवामाजि चक्रांचे। पदर उरती॥ २३७॥
एऱ्हवीं तरी दोन्ही तेव्हांचि मिळती। परी कुंडलिनी नावेक दुश्चित्त होती। ते तयातें म्हणे परौती। तुम्हीचि काय एथें॥ २३८॥
आइकें पार्थिव धातु आघवी। आरोगितां कांहीं नुरवी। आणि आपातें तंव ठेवी। पुसोनियां॥ २३९॥
ऐसी दोनी भूतें खाये। ते वेळीं संपूर्ण धाये। मग सौम्य होऊनि राहे। सुषुम्नेपाशीं॥ २४०॥
तेथ तृप्तीचेनि संतोषें। गरळ जें वमी मुखें। तेणें तियेचेनि पीयूषें। प्राणु जिये॥ २४१॥
तो अग्नि आंतूनि निघे। परि सबाह्य निववूंचि लागे। ते वेळीं कसु बांधिती आंगें। सांडिला पुढती॥ २४२॥
मार्ग मोडिती नाडीचे। नवविधपण वायुचें। जाय म्हणऊनि शरीराचे। धर्मु नाहीं॥ २४३॥
इडा पिंगळा एकवटती। गांठी तिन्ही सुटती। साही पदर फुटती। चक्रांचे हे॥ २४४॥

अर्थ—विजेची जशी कडी असावी किंवा अग्नीच्या ज्वालांची जशी घडी असावी अथवा उत्तम सोन्याच्या लगडीचे घांसून चकचकीत केलेले वेढें असावे. ॥ २२४॥ त्याप्रमाणें जी कुंडलिनी नीट घट्ट, संकोचून साडेतीन पुटांत दाटून बसली होती. ती वज्रासनाचा चिमटा बसल्याबरोबर जागी झाली. ॥ २२५॥ तेव्हा तारा जसा तुटून पडावा किंवा सूर्याचें आसन सुटावे अथवा एखाद्या तेजाला अंकुर फुटावा. ॥ २२६॥ तशी ती कुंडलिनी आपल्या वेढ्याला सोडते व सहज आंगाला आळेपिळे देते व नाभिकंदावर उभी झालेली अनुभवाला येते. ॥ २२७॥ बरेच दिवसांची निजली असल्यामुळें सहजच भुकेने ती व्याकुळ असते व आणखी तिला जागे करण्याचेहि निमित्त होते. त्यामुळे ती मोठ्या आवेशाने खाण्याकरितां आपले मुख सरळ वर पसरते. ॥ २२८॥ मग हृदयकमळाचे खालीं जो अपानवायु भरलेला असतो त्या संपूर्ण वायुला ती मिठी मारते-म्हणजे गिळून टाकते. ॥ २२९॥ आपल्या मुखांतील ज्वालांनी, खाली वर व्यापते व मांसाचे घांस खाऊं लागते. ॥ २३०॥ जे जे भाग मांससहित आहेत त्यांचे ती घांस घेते व नंतर हृदयाचेहि

एकदोन घांस घेते. ॥ २३१ ॥ मग पायाचें तळवे व तळहात येथील मांसाचे शोधन करून, वरचे भाग जे आहेत त्यांचाहि भेद करते व प्रत्येक अवयवसंधीचाहि झाडा घेते. ॥ २३२ ॥ खालचा भागहि सोडत नाही. नखाचे देखील सत्व ठेवित नाही. त्वचा धुवून पुसून हाडाच्या सांपळ्याला नेऊन चिकटविते. ॥ २३३ ॥ हाडांच्या नळ्या निरपून काढते. शिराशिरा कोरून घेते, तेव्हा बाहेर रोमरंध्रातून वाढणाऱ्या केसांचे बीज जळून जाते. ॥ २३४ ॥ इतके खाऊन तहान लागली असतां, मग ती कुंडलिनी, सप्तधातूरूपी सागरांत आपली पूर्ण तहान भागविते आणि लागलीच जिकडे तिकडे अगदीं खडखडीत उन्हाळा करते (ओलेपणाचें नांव ठेवित नाही). ॥ २३५ ॥ नाकपुड्यांतून बाहेर जो बारा अंगुळें प्राणवायु वाहतो, त्याची मानगुटी धरून त्याला माघारा आंत घालते. ॥ २३६ ॥ तेव्हा अपानवायु वर संकोचित होतो व ऊर्ध्व जाणारा प्राणवायु खाली जातो—म्हणजे अपान व प्राण या दोघांचें ऐक्य होते-त्या ऐक्यामध्ये चक्रांचे दळ तेवढे उरतात. ॥ २३७ ॥ वास्तविक पाहतां दोन्ही वायूंचे ऐक्य पहिलेच होते; पण कुंडलिनी तेव्हा क्षणभर व्यग्र होती, ती त्यांना म्हणते. आतां या पलिकडे येथे तुम्ही तरी काय राहणार? ॥ २३८ ॥ अर्जुना! ऐक पंचधातूपैकीं पृथ्वी संपूर्ण खाऊन टाकून काही शिल्लक ठेवित नाही आणि आपधातु देखील साफ पुसून ठेविली जाते. ॥ २३९ ॥ याप्रमाणे पृथ्वी व आप या दोन भूतांना खाल्ल्यावर ती कुंडलिनी पूर्ण तृप्त होते व सौम्य होऊन सूषुम्नानाडीचे मुळाशीं राहते. ॥ २४० ॥ मग तेथे ती, तृप्तीच्या संतोषामुळे जे गरळ ओकते, त्या गरळरूपी अमृताने प्राणाचें रक्षण होते. ॥ २४१ ॥ ते गरळ अग्निच होय, त्यांतून तो अग्निच बाहेर निघतो, पण तो आंत बाहेर गारवाच देतो. त्यावेळी सर्व अवयवांचे गेलेले सामर्थ्य पुनः प्राप्त होते. ॥ २४२ ॥ सुषुम्नानाडी सोडून, बाकीच्या सर्व नाड्यांचे मार्ग बंद होतात, वायूचा नवविधपणाहि नाहिसा होतो. म्हणून त्या योग्याच्या शरीराचे ठिकाणीं पूर्वीच्या शरीराचे धर्म राहत नाहीत. ॥ २४३ ॥ इडा पिंगळा एक होतात. तिन्ही नाड्यांच्या ग्रंथी सुटतात म्हणजे इडा पिंगळा ह्या नाड्यांचें वाहणे बंद पडून एक सुषुम्ना नाडीच राहते-व षट्चक्रांचा भेद होतो. ॥ २४४ ॥

गूढार्थदीपिका—योगशास्त्रांत जी आधारादि षट्चक्रें सांगितलीं आहेत ती षट्चक्रेंदेखील शक्तिवाहन नाड्यांचीच बनलेली आहेत. तीहि मांसमय नाहीत. म्हणून केवळ योगाभ्यासानेच त्यांचा अनुभव येतो.

आंतड्यांच्या गोळ्यांचे ठिकाणीं चक्रांची कल्पना केली आहे, असे जे विवेकसिंधुग्रंथांत सांगितलें आहे, ते अज्ञान्याकरितां स्थूलदृष्टीने म्हटलें आहे असे समजावे. म्हणजे सूक्ष्म अशा आंतड्यांच्या मांसांच्या गोळ्यांचे ठिकाणीं, चक्रांची कल्पना स्थूलारुधंतीन्यायाने करण्यास सांगितलें आहे.

मग शशी आणि भानु। ऐसा कल्पिजे जो अनुमानु। तो वातीवरी पवनु। गिंवसितां न दिसे॥ २४५ ॥
बुद्धीची पुळिका विरे। परिमळु घ्राणीं उरे। तोही शक्तीसवें संचरे। मध्यमेमाजी॥ २४६ ॥
तंव वरिलेकडोनि ढाळें। चंद्रामृताचें तळें। कानवडोनि मिळे। शक्तिमुखीं॥ २४७ ॥
तेणें नाळकें रस भरे। तो सर्वांगामाजीं संचरे। जेथिंचा तेथ मुरे। प्राणपवनु॥ २४८ ॥
तातलिये मुसें। मेण निघोनि जाय जैसें। मग कोंदली राहे रसें। वोतलेनि॥ २४९ ॥
तैसें पिंडाचेनि आकारें। ते कळाचि कां अवतरे। वरि त्वचेचेनि पदरें। पांघुरली असे॥ २५० ॥
जैशी आभाळाची बुंथी। करूनि राहे गभस्ती। मग फिटलिया दीप्ति। धरूनि ये॥ २५१ ॥
तैसा आहाचवरि कोरडा। त्वचेचा असे पातोडा। तो झडोनि जाय कोंडा। जैसा होय॥ २५२ ॥
मग काश्मीरीचे स्वयंभ। कां रत्नबीजा निघाले कोंभ। अवयवकांतीची भांब। तैसी दिसे॥ २५३ ॥
नातरी संध्यारागींचे रंग। काढूनि वळिलें तें आंग। कीं अंतर्ज्योतीचें लिंग। निर्वाळिलें॥ २५४ ॥
कुंकुमाचें भरींव। सिद्धरसाचें वोतींव। मज पाहतां सावेव। शांतीचि ते॥ २५५ ॥
तें आनंदचित्रींचे लेप। नातरी महासुखाचें रूप। कीं संतोषतरूचें रोप। थांबलें जैसें॥ २५६ ॥
तो कनकचंपकाचा कळा। कीं अमृताचा पुतळा। नाना सासिन्नला मळा। कोंवळिकेचा॥ २५७ ॥
हो कां जे शारदियेचेनि वोलें। चंद्रबिंब पाल्हेलें। कां तेजचि मूर्त बैसलें। आसनावरी॥ २५८ ॥

तैसें शरीर होये। जे वेळीं कुंडलिनी चंद्र पिये। मग देहाकृति बिहे। कृतांतु गा॥ २५९॥
वृद्धाप्य तरी बहुडे। तारुण्याची गांठी विघडे। लोपली उघडे। बाळदशा॥ २६०॥
वयसा तरी येतुलेवरी। एऱ्हवीं बळाचा बळार्थु करी। धैर्याची थोरी। निरुपमु॥ २६१॥
कनकद्रुमाच्या पालवीं। रत्नकळिका नित्य नवी। नखें तैसी बरवीं। नवीं निघति॥ २६२॥
दांतही आन होती। परि अपाडें सानेजती। जैसी दुबाहीं बैसे पांती। हिरेयांची॥ २६३॥
माणिकुलियांचिया कणिया। सावियाचि अणुमानिया। तैसिया सर्वांगीं उधवती अणियां। रोमांचिया॥ २६४॥
करचरणतळें। जैसीं कां रातोत्पलें। पाखाळींव होती डोळे। काय सांगों॥ २६५॥
निडाराचेनि कोंदाटें। मोतियें नावरती संपुटें। मग शिवणी जैशी उतटे। शुक्तिपल्लवांची॥ २६६॥
तैशी पातियांचिये कवळिये न समाये। दिठी जाकळोनि निघों पाहे। आधिलीचि परी होये। गगना कवळिती॥ २६७॥
आइकें देह होय सोनियाचे। परि लाघव ये वायूचें। जे आपा आणि पृथ्वीचे। अंशु नाहीं॥ २६८॥
मग समुद्रापैलाडी देखे। स्वर्गींचा आलोचु आइके। मनोगत वोळखे। मुंगियेचें॥ २६९॥
पवनाचा वारिका वळघे। चाले तरी उदकीं पाउल न लागे। येणें येणें प्रसंगें। येती बहुता सिद्धि॥ २७०॥
आइकें प्राणाचा हातु धरूनी। गगनाची पाउटी करूनी। मध्यमेचेनि दादराहुनी। हृदया आली॥ २७१॥
तें कुंडलिनी जगदंबा। जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा। जिया विश्वबीजाचिया कोंभा। साउली केली॥ २७२॥

अर्थ—मग चंद्र व सूर्य हे जे डाव्या व उजव्या नाकपुडींतून वाहणारे वायू असे मानले जातात, त्यांचा नाकापुढे वात उजळुन शोध केला तरी कोठे पत्ता लागत नाही. ॥ २४५ ॥ बुद्धीची जाणीव बंद पडते व घ्राणेंद्रियाचा विषय जो परिमळ तो घ्राणेंद्रियरूप होऊन राहतो आणि तोहि कुंडलिनीबरोबर सुषुम्नानाडींत प्रविष्ट होतो. ॥ २४६ ॥ तेव्हा वरच्या बाजूने ढाळ किंवा उतार असल्यामुळे चंद्रामृताचे तळें कानवडे होऊन कुंडलिनीशक्तीच्या मुखांत तें चंद्रामृत पडतें. ॥ २४७ ॥ तेथून त्या नळींत भरलेला रस सर्व अंगांत पसरतो व प्राणवायूचें योगाने जेथला तेथे मुरतो. ॥ २४८ ॥ मेणाची मूस करून, त्या मुसेंत एखाद्या धातूचा उष्ण रस ओतला असतां रसाच्या उष्णतेने मेण पातळ होऊन निघून जाते, पण त्या धातूच्या रसाला मुसेचा आकार येऊन जातो. किंवा त्या मुसेच्या आकारांत नुसता रसच भरून राहतो. ॥ २४९ ॥ त्याप्रमाणे या पिंडरूप शरीराचे आकाराने अमृतकलाच जणूं अवतरते व वरवर त्वचेचें वस्त्र पांघरलेले असतें. ॥ २५० ॥ ज्याप्रमाणे सूर्यापुढें ढगाचें आवरण आलें असतां, त्याचें तेज झांकले जाते, पण तें आवरण निघून गेल्यावर तो आपल्या तेजोमय प्रकाशाने प्रकाशित होतो. ॥ २५१ ॥ त्या प्रमाणें वर वर दिसणारा त्वचेचा पापुद्रा कोंड्यासारखा झडून जातो. ॥ २५२ ॥ मग स्वयंभू स्फटीकाचे असावे किंवा रत्नाचे बीजालाच कोंभ निघावा, अशाप्रमाणे त्या योग्याच्या शरीराच्या कांतीची झांक दिसते. ॥ २५३ ॥ किंवा मावळणाऱ्या सूर्याचे रंग काढून योग्याचे शरीर बनविले आहे की काय? किंवा शुद्ध निर्मळ अंतर्ज्योतीचे म्हणजे चैतन्य प्रकाशाचे तें लिंग आहे की काय, असें वाटते. ॥ २५४ ॥ संपूर्ण भरीव केशराचेच किंवा सिद्ध केलेल्या पारदाचे ओतलेलें म्हणजे हरगौरीसृष्टींतील किंवा मला तर वाटतें की प्रत्यक्ष शांतीनेच ते शरीर धारण केलें की काय? ॥ २५५ ॥ आनंदाचें चित्रांत भरलेला रंग होय किंवा ब्रह्मसुखाने धरलेले रूप होय किंवा संतोषवृक्षाचे लावलेले रोप होय. ॥ २५६ ॥ तो सोनचांफ्याची कळी होंय, किंवा अमृताचा पुतळा होय; अथवा कोमळपणाच्या भरास आलेला मळा होय. ॥ २५७ ॥ योग्याचें शरीर म्हणजे शरदृतूंतील पौर्णिमेच्या थंडाव्याने विकसित झालेलें जणूं चंद्रबिंबच होय, किंवा मूर्तिमंत चंद्राचे तेजच आसनावर बसलेलें आहे. ॥ २५८ ॥ जेव्हा कुंडलिनी चंद्रामृत पिते तेव्हा योग्याचे शरीर याप्रमाणे होते. त्या देहाच्या आकृतीला यमहि भितो. ॥ २५९ ॥ वार्धक्य मागे फिरते. योग्याच्या शरीराला जरा प्राप्त होत नाही तारुण्यही राहत नाही व पूर्वीची गेलेली बाळदशा प्रगट होते (बाल्यदशेतील शरीराप्रमाणे योग्याचे शरीर अति कोमल असते). ॥ २६० ॥ वयाच्या दृष्टीने योग्याचे शरीर बालस्वरूप असलें तरी बलाचे दृष्टीने ते मूर्तिमंत बलरूपच असते. त्याच्या धैर्याला उपमाच नसते. ॥ २६१ ॥ सुवर्णवृक्षाच्या पानावर रत्नाची नित्य नवी कळी यावी, त्याप्रमाणे त्या योग्याला उत्तम नवी नखें

येतात. ॥ २६२ ॥ दांतहि नवेच येतात. पण त्यांच्या बारीकपणाशीं कोणाच्या दांताच्या बारीकपणाची तुलना करितां येणार नाही, इतके ते लहान असतात. जणूं काय दोन्ही बाजूला हिऱ्यांच्या पंक्ती बसविल्या आहेत. ॥ २६३ ॥ अणुसमान माणिकांच्या कळ्या म्हणजे अत्यंत लहान तुकडे असावे, तसे त्या योग्याचें शरीरावर रोमांचीं सूक्ष्म अग्रें निघतात. ॥ २६४ ॥ हातपायांचे तळवे तर तांबड्या कमळांप्रमाणें असतात, डोळे तर काय सांगूं, अत्यंत तेजस्वी होतात. ॥ २६५ ॥ पूर्ण वाढ झाली म्हणजे मोती शिंपल्यांच्या पुडांत सामावत नाहीत, मग त्या शिंपल्यांच्या पुडांतील शिवण उलते. ॥ २६६ ॥ त्याप्रमाणेच योग्याची दृष्टिहि दोन पापण्यांच्या मिठींत मावेनाशी होते. ती व्यापक होऊन आवेशाने बाहेर निघूं पाहते. ती पूर्वीचीच दृष्टि असते, पण ती आकाशालाहि कवळूं पाहते. ॥ २६७ ॥ अर्जुना! ऐक. देह सुवर्णमय कांतीचा होतो, पण वायूप्रमाणे हलका असतो. कारण देहाच्या जडपणाला कारण असणारे पृथ्वी आणि आप या भूतांचे अंश, त्या शरीरात नसतात. ॥ २६८ ॥ मग तो योगी समुद्रापलीकडील पाहूं शकतो. स्वर्गातील शब्द ऐकूं शकतो व मुंगीचें मनोगत देखील तो ओळखतो. ॥ २६९ ॥ वायूच्या घोड्यावर तो स्वार होतो—म्हणजे वाऱ्यासारखी त्याची गति असते. समुद्रावर तो चालतो, पण पायाला पाणी लागत नाही. अशाप्रमाणे अनेक सिद्धि योग्याला प्राप्त होतात. ॥ २७० ॥ प्राणाचा हात धरून व आकाशाची पायरी करून, सुषुम्नेच्या जिन्याने, ती कुंडलिनी हृदयाचे ठिकाणीं येते. ॥ २७१ ॥ ती कुंडलिनी जगदंबा म्हणजे जगाची माता आहे. चैतन्यरूपी सार्वभौमाची ऐश्वर्यरूप शोभा आहे. जिने जगद्रूपी बीजाच्या अंकुरावर सावली केली. ॥ २७२ ॥

गूढार्थदीपिका—ते कुंडलिनी जगदंबा। जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा।—परमेश्वराची जी ब्रह्मांडचालक शक्ति, तीच परमेश्वरासह पिंडांत किंवा जीवाच्या शरीरांत अंश रूपाने आहे. त्या शक्तीला कुंडलिनी हें नांव आहे. ही कुंडलिनी म्हणजे जीवशक्तिवृत्ति होय. "**परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च**" (श्वेताश्वतर उ० ६-८) परमेश्वराची शक्ति, ज्ञानशक्ति व क्रियाशक्ति अशी दोन रूपाने प्रतीत होते. तीच परमेश्वरशक्ति, जीवाचें शरीरांत आहे. तिलाच कुंडलिनी म्हणतात. जीवाचे ठिकाणीं ही ज्ञानशक्ति मनामध्ये जाणीवरूपाने प्रतीत होते व क्रियाशक्ति प्राणरूपाने प्रतीत होते.

मुळांत मन विभू आहे हें खरें, पण तें बाहेरचे पदार्थ जाणण्याकरितां इंद्रियरूप होऊन जेव्हा बाहेर निघतें, तेव्हा तें पूर्ण बाहेर निघत नाही. तें मन किंवा ज्ञानशक्ति मर्यादित होऊन निघते. म्हणूनच एका इंद्रियाचा व्यापार, दुसऱ्या इंद्रियाला कळत नाही. असे बाहेर निघालेलें मन मर्यादित होण्याचें कारण हें आहे की, मनाला बाहेर निघण्याकरितां मनोवाहक नाड्या आहेत. त्या मनाप्रमाणेच सूक्ष्म असून, त्या मनाप्रमाणे दिसत नाहीत. त्या योगाभ्यासानेच दिसतात, हे मागे सांगितलेच आहे.

जया विश्वबीजाचिया कोंभा। साउली केली॥—ब्रह्मवस्तु विश्वाचें बीज आहे व त्याठिकाणीं स्फुरणारी अहंवृत्ति हा अंकुर आहे. या अहंवृत्तिरूप ब्रह्मांकुराला सावली केली—म्हणजे अहं हा परमेश्वराचेच स्फुरण आहे; पण जीव आपल्या वेगळेपणाचा अहंकार धारण करून आपल्या ब्रह्मभावाला विसरला आहे व जीवरूप झाला आहे.

जे शून्यलिंगाची पिंडी। जे परमात्मया शिवाची करंडी। जे प्राणाची उघडी। जन्मभूमि॥ २७३॥

अर्थ—जी शून्यमय असलेलें अशा निर्विकल्प लिंगाची पिंडी होय. जी परमात्मा शिवाची संबळी होय व जी ओंकाराची जन्मभूमि होय. ॥ २७३ ॥

गूढार्थदीपिका—शून्य लिंगाची पिंडी—ज्याप्रमाणे अव्यक्तदशेंत असलेलें लिंग, पिंडीच्या सहायाने व्यक्त होऊन दर्शनाला योग्य होतें, त्याप्रमाणे निर्विकल्प परब्रह्मस्वरूप, शक्तीच्या सहायाने व्यक्त होऊन, साक्षात्काराला योग्य होतें.

परमात्मया शिवाची करंडी—ज्याप्रमाणे आपण करंडी देव ठेवण्याच्या कामाकरितां उपयोगांत आणतो, त्यांत दुसरें कांही ठेवित नाही, त्याप्रमाणे या कुंडलिनीशक्तिरूपी करंडीत देखील एका परमात्म्या शिवावांचून दुसरें कांहीच नसते. शक्ति म्हटलीं तरी शक्तींत शक्तच असतो असा अर्थ.

प्रणवाची उघडी। जन्मभूमी—या कुंडलिनी शक्तींतूनच अव्यक्त असलेला ॐकार प्रगट होतो.

हें असो ते कुंडलीनी बाळी। हृदयाआंतु आली। तंव अनाहताचां बोली। चावळे ते॥ २७४॥

अर्थ—असो. ही कुंडलिनी बाळी हृदयाचे ठिकाणी आली असतां ती तेथे अनाहताची बोली बोलूं लागते. ॥ २७४॥

गूढार्थदीपिका—हृदयदेशांत 'कं० खं गं घं ङं चं छं जं झं ञं टं ठं' या बारा वर्णांनी चिन्हित अशा बारा पांकळ्यांनी युक्त, सुवर्णवर्ण, खालीं मुख केलेलें असें अनाहतचक्र आहे. याची देवता भगवान शंकर आहे. या हृदयस्थ अनाहतचक्राचे ठिकाणी "चिणेति प्रथमो नादश्चिण्चिणीति द्वितीयकः। घंटानादस्तृतीयश्च शंखनादश्चतुर्थकः॥ ७॥ पंचमस्तंत्रिनादश्च तालनादश्च षष्ठकः। सप्तमो वेणुनादश्च मृदंगश्च तथाष्टमः॥ ८॥ नवमो भेरिनादश्च, मेघाख्यो दशमः स्मृतः" पहिला चिणनाद, दुसरा चिण्चिणिनाद् तिसरा घंटानाद, चवथा शंखनाद. पांचवा तंतुनाद, सहावा तालनाद, सातवा वेणुनाद, आठवा मृदंगनाद, नववा भेरीनाद, व दहावा मेघ नांवाचा नाद असे दशविध अनाहत नाद ऐकूं येतात.

योगातील अनाहत नाद=वेद

कानांत बोट घातले असतां जो नाद ऐकूं येतो, तोच अनाहतनाद होय, असे कित्येक अज्ञलोक म्हणतात; पण ते बरोबर नाही, 'प्रणवरूप' ज्ञातजप व 'हंसः' हा अज्ञातजप यांचा समन्वय करून "स एवं जपकोट्यानादगनुभवति" एक कोटी अजपाजप झाला असतां, हे अनाहतनाद ऐकूं येतात, असें श्रुतीने सांगितलें आहे व "**योगी म्हणती अनाहत शब्दू। वेदांती म्हणती सूक्ष्म नादू। आम्ही म्हणों शुद्ध वेदू। असो अनुवादू हा नांवाचा.॥ ४०७॥** (ए० भा० अ० २१) या अनाहत नादापासूनच सर्व वेदांची उत्पत्ति आहे, असे नाथादि संताचें म्हणणें आहे.

ज्याप्रमाणे बाजारांत अनेक माणसें अनेक माणसाशीं बोलत असतात, दूरून ऐकणाऱ्याला त्या बोलण्याचा निरनिराळ्या रीतीने नाद ऐकायला येतो व बाजारांत जाऊन पाहिले असतां कोण कोणाशी काय बोलतो हे समजून येतें; त्याप्रमाणेच हे नादहि सुषुम्नानाडीने परमेश्वराची भेट घेण्याकरितां ब्रह्मरंध्राकडे जाणाऱ्या साधकाला ऐकू येतात. पण अनाहत चक्रावर संयम करून पाहणाऱ्याला स्पष्ट वेदरूपशब्दाने ऐकूं येतात.

शक्तीचिया आंगा लागलें। बुद्धीचें चैतन्य होतें जाहाले। तें तेणें आइकिलें। अळुमाळु॥ २७५॥
घोषाचां कुंडीं। नादचित्रांचीं रूपडीं। प्रणवाचिया मोडी। रेखिलीं ऐसीं॥ २७६॥
हेंचि कल्पावें तरी जाणिजे। परी आतां कल्पितें कैंचें आणिजे। परी नेणों काय गाजे। तिये ठायीं॥ २७७॥
विसरोनि गेलों अर्जुना। जंव नाशु नाहीं पवना। तंव वाचा आथी गगना। म्हणऊनि घुमे॥ २७८॥
तया अनाहताचेनि मेघें। मग आकाश दुमदुमों लागे। तंव ब्रह्मस्थानींचें बेगें। सहज फिटे॥ २७९॥
आइकें कमळगर्भाकारें। जें महदाकाश दुसरें। जेथ चैतन्य आधातुरें। करूनि असिजे॥ २८०॥

अर्थ—बुद्धि कुंडलिनी शक्तीच्या अंगाला लागली असतां ती चैतन्यस्वरूप होते व ती नाद सहज ऐकते. ॥ २७५॥ तेथे नादाचें कुंडच असते—म्हणजे सारखा घोषच होत असतो. पण त्यांत दहा प्रकारचे नाद असतात आणि ते प्रणवाच्या आकारांत जशा रेषा असतात तसे ते दशनाद नादमय घोषांत असतात. ॥ २७६॥ पण त्यांची कल्पना केली तर जाणतां येते, पण तेथे कल्पना करणारा कोण आणायचा? तरी कसा घोष होतो हें सांगतां येत नाही. ॥ २७७॥ पण, अर्जुना! सांगावयाचे राहिलें तें हें की, जोपर्यंत प्राणवायूचा लय होत नाही तोपर्यंत आकाशांत शब्द होतो, म्हणून नाद तेथे राहतो. ॥ २७८॥ त्या अनाहत नादांतील दहाव्या मेघाख्य नादाने, आकाश दुमदुमून जातें व ब्रह्मस्थानाचा मार्ग मोकळा होतो. ॥ २७९॥ अर्जुना! ऐक, जें कमळाच्या गर्भाच्या आकाराचें आहे व जें दुसरे महाकाशच म्हणतां येतें असें जें हृदयाकाश, तेथें शक्तीशी ऐक्य पावण्याकरितां चैतन्य हें उत्कंठितच असतें. ॥ २८०॥

गूढार्थदीपिका—चैतन्य आधातुरे। होऊनि असिजे—परमप्रेमरूप चैतन्याची शक्ति परमप्रेमरूपच असते. कुंडलिनी ही परमेश्वराची शक्ति आहे. चैतन्याचे ठिकाणी तिच्याशी ऐक्य पावण्याची प्रेमोत्कंठा व शक्तीचें ठिकाणी

आपल्या स्वरूपभूत चैतन्याशी ऐक्य पावण्याची प्रेमोत्कंठा साहजिकच असते.

तया हृदयाचां परिवरीं। कुंडलिनिया परमेश्वरी। तेजाची शिदोरी। विनियोगिली॥ २८१॥

अर्थ—मग त्या हृदयाच्या घरी कुंडलिनी शक्ति, परमेश्वराच्या ठिकाणी आपल्या तेजाची शिदोरी चैतन्याला अर्पण करते. ॥ २८१ ॥

गूढार्थदीपिका—वेदान्तांत परमेश्वराचा साक्षात्कार करून घेण्याकरितां ज्या ज्या ठिकाणी परमेश्वराची अभिव्यक्ति होते म्हणून स्थानें सांगितली आहेत, त्यांत हृदयकमल हें एक स्थान आहे. "**स वा एष आत्मा हृदि तस्यैतदेव निरुक्तं हृद्ययमिति**" (छां० उ० ८-३-३) या हृदयापर्यंत कुंडलिंनीशक्ति आली असतां, तेथेच तिचें व परमेश्वराचें ऐक्य होते—म्हणजे ह्या हृदयदेशाचे ठिकाणी कुंडलिनीशक्ति चैतन्याहून अलग राहूं शकत नाही.

बुद्धीचेनि शाकें। हातबोनें निकें। द्वैत जेथ न देखे। तैसें केलें॥ २८२॥
ऐसी निजकांती हारविली। मग प्राणुचि केवळ जाहाली। ते वेळीं कैसी गमली। म्हणावी पां॥ २८३॥
हो कां जे पवनाची पुतळी। पांघुरली होती सोनसळी। ते फेडुनियां वेगळी। ठेविली तिया॥ २८४॥
नातरी वायूचेनि आंगें झगटली। दीपाची दिठी निवटली। कां लखलखोनि हारपली। वीजु गगनीं॥ २८५॥
तैशी हृदयकमळवेऱ्हीं। दिसे जैशी सोनियाची सरी। नातरी प्रकाशजळाची झरी। वाहत आली॥ २८६॥
मग तिये हृदयभूमी पोकळे। जिराली कां एके वेळे। तैसें शक्तीचें रूप मावळे। शक्तीचिमाजी॥ २८७॥
तेव्हां तरी शक्तीचि म्हणिजे। एऱ्हवीं तो प्राणु केवळ जाणिजे। आतां नाद बिंदु नेणिजे। कळा ज्योती॥ २८८ ॥
मनाचा हन मारु। कां पवनाचा आधारु। ध्यानाचा आदरु। नाहीं परी॥ २८९॥
हे कल्पना घे सांडी। ते नाहीं इये परवडी। हे महाभूतांची फुडी। आटणी देखा॥ २९०॥
पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतींचा दंशु। परि दावूनि गेला उद्देशु। महाविष्णु॥ २९१॥

अर्थ—बुद्धीच्या शाकेसह शिदोरीचा उत्तम नैवेद्य अर्पण करून, तेथें द्वैताचा मागमूसहि दिसणार नाही असे करून, टाकते. ॥ २८२ ॥ आपले तेज समर्पण करून ती कुंडलिनीशक्ति, केवळ प्राणस्वरूप होऊन राहते तेव्हा ती कशी दिसते असे म्हणतां येईल तें सांगतों. ॥ २८३ ॥ एखाद्या वायूच्या केलेल्या बाहुलीला सोन्यासारखा पीतांबर पांघरावा व तो सोडून मग तिला वेगळे करून ठेवावे. ॥ २८४ ॥ किंवा वायूची झुळुक लागून दिव्याची ज्योति विझली जावी अथवा आकाशांत वीज चमकून एकदम आकाशांतच नाहीशी व्हावी. ॥ २८५ ॥ त्याप्रमाणें हृदयकमलावर ती सोन्याच्या सरी सारखी दिसते किंवा प्रकाशरूप जळाचा थोडासा झरा वाहत असावा. ॥ २८६ ॥ व मग तो हृदयरूपी भूमीच्या पोकळीत एकदांचा जिरावा, त्याप्रमाणें शक्तीचें रूप शक्तींतच मावळते. ॥ २८७ ॥ तेव्हा तरी ती शक्तिच म्हटली जाते. एरव्ही ती प्राणरूपाने जाणली जाते. याठिकाणी नादबिंदु, कळाज्योति हा प्रकार किंवा भेद कांही एक राहत नाही. ॥ २८८ ॥ मन मारावें लागत नाही. वायूचा आधार घ्यावा लागत नाही किंवा ध्यानाचाहि आदर राहत नाही—म्हणजे ध्यान करावें लागत नाही. ॥ २८९ ॥ एक कल्पना करायची किंवा एखादी कल्पना सोडायची हाहि प्रकार या स्थितींत होत नसतो. ही स्थिति म्हणजे पंचमहाभूतांची स्पष्ट आटणी किंवा लय होय. (याला लययोग म्हणतात). ॥ २९० ॥ पिंडाने म्हणजे चैतन्यमय देहाकृतीने, पिंडाचा म्हणजे पांच भौतिक देहाकृतीचा, ग्रास म्हणजे नाश करण्याचा हा नाथसंप्रदायांत जो अद्वैतदृष्टीचा अनुभव घेण्याचा मार्ग आहे, त्याचा भगवंतांनी हेतुपूर्वक थोडा उल्लेख केला. ॥ २९१ ॥

गूढार्थदीपिका—या योगाचा अभ्यास करणाऱ्या योग्यांचा पांचभौतिक देह जर सच्चिदानंदमय होतो तर सर्व योग्यांचा प्रणेता जो भगवान, त्याचा अवतार देह पांचभौतिक राहतो असे मानणें कसे शक्य आहे?

तया ध्वनिताचें केणें सोडुनी। यथार्थाची घडी झाडुनी। उपलविली म्यां जाणुनी। ग्राहीक श्रोते॥ २९२॥
ऐकें शक्तीचें तेज जेव्हां लोपे। तेथ देहींचें रूप हारपे। मग तो डोळियांचि माजीं लपे। जगाचिया॥ २९३॥
एऱ्हवीं आधिलाचि ऐसें। सावयव तरी असे। परि वायूचें कां जैसें। वळिलें होय॥ २९४॥

नातरी कर्दळीचा गाभा। बुंथी सांडोनी उभा। कां अवयवचि नभा। तो॥ २९५॥
तैसें होय शरीर। तैं तें म्हणिजे खेचर। हें पद होतां चमत्कार। पिंडजनीं॥ २९६॥
देखें साधकु निघोनि जाये। मागां पाउलांची वोळ राहे। तेथ ठायीं ठायीं होये। हे अणिमादिक॥ २९७॥
परि तेणें काय काज आपणपयां। अवधारीं ऐसा धनंजया। लोप आथी भूतत्रया। देहींचा देहीं॥ २९८॥
पृथ्वीतें आप विरवी। आपातें तेज जिरवी। तेजातें पवनु हरवी। हृदयामाजीं॥ २९९॥
पाठीं आपण एकला उरे। परि शरीराचेनि अनुकारें। मग तोही निगे अंतरें। गगना मिळे॥ ३००॥
ते वेळीं कुंडलिनी हे भाष जाये। मग मारुत ऐसें नाम होये। परि शक्तिपण तें आहे। जंव न मिळे शिवीं॥ ३०१॥
मग जालंधर सांडी। ककारांत फोडी। गगनाचिये पाहाडीं। पैठी होय॥ ३०२॥
ते ॐकाराचिये पाठी। पाय देत उठाउठी। पश्यंतीचिये पाउटी। मागां घाली॥ ३०३॥
पुढां तन्मात्रा अर्धवेरी। आकाशाचां अंतरीं। भरती गमे सागरीं। सरिता जैशी॥ ३०४॥

अर्थ—त्याच उल्लेखरूपी मालाची घडी तुम्हां संतांसारखे गिऱ्हाईक पाहून मी संपूर्ण उकलून दाखिविली. ॥ २९२ ॥ अर्जुना! ऐक. जेव्हा शक्तीचें तेज नाहीसें होतें, तेव्हा मग देहाचें पांचभौतिक स्थूलरूपहि राहात नाही. मग तो योगी जगाच्या डोळ्यामध्यें लोपूं शकतो (म्हणजे तो असून देखील लोकांच्या डोळ्याने दिसत नाही) ॥ २९३ ॥ एरव्हीं पूर्वीप्रमाणेच त्याचें शरीर सावयव दिसतें, पण जणूं काय वायूचेंच बनलें आहे असें तें होतें. ॥ २९४ ॥ किंवा केळीच्या गाभ्याचा भाग, जसा वरील पापुद्रे निघाल्यानंतर उभा असावा किंवा आकाशालाच अवयव व्हावे, तसा तो योगी राहतो. ॥ २९५ ॥ याप्रमाणें योग्याचें शरीर झालें असता, योगी आकाशांत संचार करीत असतो व हे पद त्याला प्राप्त झालें असतां शरीरधारी जीवांना तो चमत्कार वाटतो. ॥ २९६ ॥ अर्जुना! पहा. योगाचा अभ्यास करणारा साधक अभ्यास करीत पुढें निघून जातो. पण जातांना मागें त्याच्या पावलांच्या चिन्हांची जी रांग राहते, तेथे ठिकठिकाणीं अणिमादिक सिद्धी असतात—म्हणजे योग्याच्या मागें अणिमादिक सिद्धी धावत राहातात (समाधि साधणाऱ्याने सिद्धीच्या नादीं लागूं नये असा या चरणाचा अर्थ.) ॥ २९७ ॥ पण या सिद्धीचे आपल्याला काय करावयाचे? पुढें ऐक. याप्रमाणें देहांतील पृथ्वी, आप, तेज, या तीन भूतांचा देहांतच लय होतो. ॥ २९८ ॥ पृथ्वी आपांत विरते. आपाला तेज खातें व तेजाला हृदयामध्यें वायु खातो. ॥ २९९ ॥ नंतर नुसता प्राणवायु राहतो; पण तो शरीराच्या आकाराचा होऊन राहतो. मग पुढे तोहि आंत आकाशांत मिळण्याकरितां जातो. ॥ ३०० ॥ तेव्हां कुंडलिनी हें नांव जाऊन, त्या शक्तीला वायु हें नाव प्राप्त होते, पण जोपर्यंत ती शिवांत मिळत नाही, तोपर्यंत तिचे शक्तिपण मात्र जात नाही. ॥ ३०१ ॥ मग जालंधर बंध टाकून, सुषुम्ना नाडीचें मुख फोडून आकाशाच्या बरोबरीची म्हणजे आकाशरूप होऊन जाते. ॥ ३०२ ॥ पुढें प्रणवाचे पाठीवर पाय देऊन लगेच पश्यंतिवाणीलाहि मागें टाकते (येथें ॐकार अनुच्चारित होतो असा अर्थ). ॥ ३०३ ॥ पुढें अर्धमात्रापर्यंत आकाशामध्यें राहून ज्याप्रमाणे समुद्रांत नदी पाण्याची भरती घेऊन वेगाने मिळूं पाहाते, त्याप्रमाणे. ॥ ३०४ ॥

गूढार्थदीपिका—कंठ देशात अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ लृ ॡ ए ऐ ओ औ अं अः या सोळा वर्णांनी अंकित अशा सोळा पाकळ्यांनी युक्त चंद्रवर्णासमान असे विशुद्धि चक्र आहे.त्याच्या डाव्याबाजूस इडा व उजव्या बाजूस पिंगला व मध्यभागीं सुषुम्ना आहे. यांची देवता रुद्र आहे. तसेंच दोन्ही भुंवयांमध्ये हं आणि क्षं या दोन अक्षरांनी अंकित अशा दोन्ही पाकळ्यांनी युक्त रक्तवर्ण असे आज्ञाचक्र आहे. याला बिंदुस्थान असेहि म्हणतात. हे नासिका मूलाच्या नादोत्पतीचे स्थान आहे. योगी या दोन्ही चक्रांचा भेद करून आकाशांत प्रविष्ट होतो.

युञ्जन्नेवं सदाऽऽत्मानं योगी नियतमानसः। शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति॥ १५॥

अर्थ—असा अखंड माझ्याठिकाणीं मन लावून राहणारा जो योगी असतो, त्याला माझ्या ठिकाणीं नित्य असणारी व जी शेवटली स्थिति म्हटली जाते, ती परम निर्वासन स्थिति प्राप्त होते. ॥ १५ ॥

मग ब्रह्मरंध्रीं स्थिरावोनी। सोहंभावाच्या बाह्या पसरुनी। परमात्मलिंगा धांवोनी। आंगा घडे॥ ३०५॥

तंव महाभूतांची जवनिक फिटे। मग दोहींसि होय झटे। तेथ गगनासकट आटे। समरसीं तिये॥ ३०६॥
पैं मेघाचेनि मुखीं निवडला। समुद्र कां वोघीं पडिला। तो मागुता जैसा आला। आपणपेयां॥ ३०७॥
तेवीं पिंडाचेनि मिषें। पदीं पद प्रवेशे। तें एकत्व होय तैसें। पंडुकुमरा॥ ३०८॥

अर्थ—पुढें ब्रह्मरंध्राचे ठिकाणीं स्थिर होऊन व सोहंभावाचे बाहू पसरून परमात्मलिंगाला धांवून आलिंगन देते व अंगरूप होऊन जाते. ॥ ३०५ ॥ इतक्यांत महाभूतांचा पडदा दूर होतो व दोघांचेहि ऐक्य होतें व त्या समरसस्थितीमध्यें आकाशासहित सर्व भूतांचा लय होतो. ॥ ३०६ ॥ ज्याप्रमाणे मेघाचे रूपांत गेलेला समुद्र जमिनीवर पडून ओघाचे रूपाने वाहूं लागतो व पुन: सर्व ओघ शेवटी समुद्रात मिळतात, म्हणून तो पुन: आपण आपल्याच मूळच्या समुद्ररूपाला येतो. ॥ ३०७ ॥ त्याप्रमाणे अर्जुना! पिंडाचेनि मिषें म्हणजे चैतन्यमय शरीराकृतीनेच-पद म्हणजे त्वंपद जीव-पदीं म्हणजे परमेश्वराशीं-प्रवेशे म्हणजे ऐक्य पावतो. अशा प्रकारें तें जीवशिवाचें ऐक्य होतें. ॥ ३०८ ॥

गूढार्थदीपिका—या लययोगाने जीवाचे पांचभौतिक शरीर जाऊन, त्याचें तें शरीर चैतन्यमय होतें व ज्याप्रमाणे नदी समुद्राला मिळतेवेळी, आपल्या मर्यादितपणामुळें समुद्राच्या एका भागांत मिळते व समुद्राच्या तेवढ्या भागाला साकार करते, त्याप्रमाणे चैतन्यमय शरीरधारी 'त्वंपद' जीव हा 'तत्पद' परमेश्वराशी ऐक्य पावतेवेळी आपल्या साकारपणामुळें 'तत्पद' परमेश्वराला साकार करतो व त्या साकार परमेश्वराशीच ऐक्य पावतो.

नदी समुद्राच्या एका भागांत मिळते, तरी तो समुद्राचा भाग सर्व समुद्राहून निराळा नसून, समुद्राशीं एकरूप असल्यामुळें, ती नदी सर्व समुद्रांतच मिळते, त्याप्रमाणे 'त्वंपद' जीव चैतन्यमय साकार होऊन, चैतन्यमय तत्पद साकार परमेश्वराशीं ऐक्य पावत असला तरी, चैतन्यमय साकार जीव चैतन्यमय परमेश्वराच्या ज्या भागाशीं ऐक्य पावतो, तो भाग निराकार चैतन्यस्वरूपापासून निराळा नसून, त्याच्याशीं एकरूपच असल्यामुळें, तो 'त्वंपद' जीव पूर्ण निराकार ब्रह्माशींच ऐक्य पावतो. म्हणजे परमेश्वराचें निर्गुण निराकार व रामकृष्णादि सगुण साकार स्वरूप हीं दोन्ही शुद्ध असून, त्यांचें ऐक्यच असल्यामुळें, सगुण स्वरूपाशीं ऐंक्य पावणें, हें निर्गुणस्वरूपाशीं ऐक्य पावणेंच होय असा भाव.

वेदान्तसूत्रांतील चवथ्या अध्यायाच्या चवथ्या 'मुक्ति' पादांत भगवान व्यासांनी ''जीव चैतन्यमात्रपरब्रह्मात मिळतो (वे० सू० ४-४-६) व ''जीव सगुण परमेश्वरांत मिळतो'' (वे० सू० ४-४-५) अशीं दोन्ही मतें देऊन, शेवटीं ''एवमप्युपन्यासात् पूर्वभावादविरोधं बादरायण:'' (वे० सू० ४-४-७) या सूत्राने जीव हा भगवंताच्या सगुणनिर्गुणस्वरूपापैकीं कोणत्याहि स्वरूपांत मिळाला तरी तो पूर्ण ब्रह्मस्वरूपच होतो, असा सिद्धान्त केला आहे.

आतां दुजें हन होतें। कीं एकचि हें आइतें। ऐशिये विवंचनेपुरतें। उरेचिना॥ ३०९॥
गगनीं गगन लया जाये। ऐसें जें कांहीं आहे। तें अनुभवें जो होये। तो होऊनि ठाके॥ ३१०॥
म्हणोनि तेथिंची मातु। न चढेचि बोलाचा हातु। जेणें संवादाचिया गांवाआंतु। पैठी कीजे॥ ३११॥
अर्जुना एऱ्हवीं तरी। इया अभिप्रायाचा जे गर्व धरी। ते पाहें पां वैखरी। दुरी ठेली॥ ३१२॥
भ्रूलता मागलीकडे। तेथ मकाराचेंचि आंग न मांडे। सडेया प्राणा सांकडें। गगन येतां॥ ३१३॥
पाठीं तेथेंचि तो भेसळला। तंव शब्दाचा दिवो मावळला। मग तयाहिवरी आटु भविन्नला। आकाशाचा॥ ३१४॥
आतां महाशून्याचिया डोहीं॥ जेथ गगनासीचि ठावो नाहीं। तेथ तागा लागेल काई। बोलाचा या॥ ३१५॥
म्हणूनि आखरामाजि सांपडे। कीं कानावरी जोडे। हें तैसें नव्हे फुडें। त्रिशुद्धी गा॥ ३१६॥
जैं कहीं दैवें। अनुभविलें फावे। तैं आपणचि हें ठाकावें। होऊनियां॥ ३१७॥
पुढती जाणणें तें नाहींचि। म्हणोनि असो किती हेंचि। बोलावें आतां वायांचि। धनुर्धरा॥ ३१८॥
ऐसें शब्दजात माघौतें सरे। तेथ संकल्पाचें आयुष्य पुरे। वाराही जेथ न शिरे। विचाराचा॥ ३१९॥
जें उन्मनियेचें लावण्य। जें तुर्येचें तारुण्य। अनादि जें अगण्य। परमतत्त्व॥ ३२०॥
जे विश्वाचें मूळ। जें योगद्रुमाचें फळ। जें आनंदाचें केवळ। चैतन्य गा॥ ३२१॥

जें आकाराचा प्रांतु। जें मोक्षाचा एकांतु। जेथ आदि आणि अंतु। विरोनी गेले॥ ३२२॥
जें महाभूतांचें बीज। जें महातेजाचें तेज। एवं पार्था जें निज। स्वरूप माझें॥ ३२३॥
ते हे चतुर्भुज कोंभेली। जयाची शोभा रूपा आली। देखोनि नास्तिकीं नोकिलीं। भक्तवृंदें॥ ३२४॥

अर्थ—आतां दुसरें कांही होते की मूळचे हें एकच सिद्ध आहे असा विचार करण्यापुरतें कांही उरत नाही. ॥ ३०९ ॥ आकाशांत आकाशाचा लय होतो, अशी जी कांही वस्तूस्थिति आहे ती अनुभवाने प्राप्त करून घेतो व तो त्या स्थितिरूप होऊन राहतो. ॥ ३१० ॥ ज्या शब्दाच्या योगाने आपण एखाद्या वस्तूचा संवाद किंवा चर्चा करतो, त्या शब्दाचा हात या स्थितीचे ठिकाणीं पोहोचूं शकत नाही म्हणजे ती स्थिति शब्दांनी सांगतां येत नाही. ॥ ३११ ॥ अर्जुना! कोणताहि अनुभव बोलून दाखविण्याचा अभिमान धारण करणारी वैखरी वाणी तीच या स्थितीपासून फार दूर असते. ॥ ३१२ ॥ भृकुटीच्या मागल्या भागांत मकार म्हणजे जेथें कारणदेहहि राहत नाही नुसत्या एकट्या प्राणाला देखील आकाशांत मिळण्याकरितां येतांना त्रास होतो. ॥ ३१३ ॥ नंतर तो तेथेंच मिसळतो. तेव्हा शब्दच राहत नसल्यामुळें शब्दाने कळणे नाहिसें होतें व त्यानंतर आकाशाचीहि आटणी होते. ॥ ३१४ ॥ जेथें आकाशाचा पत्ता लागत नाही, अशा महाशून्यस्थितींत शब्दाचा ठावठिकाण राहूं शकेल काय?॥ ३१५ ॥ म्हणून ती स्थिति शब्दाने सांगतां येईल किंवा कानाला ऐकतां येईल, अशी मुळींच नाही, हे त्रिवार सत्य आहे. ॥ ३१६ ॥ महद्भाग्याने हा अनुभव प्राप्त झाला असतां, केवळ आपण अनुभवरूप होऊन राहावें, एवढेंच. ॥ ३१७ ॥ पुढें जाणीवच बंद पडते, म्हणून अर्जुना! हेंच व्यर्थ कितीदां पुनः पुनः सांगायचें. ॥ ३१८ ॥ या प्रमाणे सर्व शब्दप्रवृत्ति नाहिशी होते. त्याठिकाणीं संकल्पहि जिवंत राहत नाही व विचाररूपी वाऱ्याचा स्पर्शहि तेथें होत नाही. ॥ ३१९ ॥ जे उन्मनीदशेचें सौंदर्य होय. जें तूर्येचें तरुणपण होय. जें अनादि अमर्याद असें परमतत्वच होय. ॥ ३२० ॥ जें विश्वाचें मूळ होय. जें योगवृक्षाचें फळ होय. जें आनंदाचें सोलीव चैतन्य होय. ॥ ३२१ ॥ जें आकाराचा शेवट होय. जो मोक्षाचा अद्वैत भाव होय. ज्या ठिकाणीं आदि आणि अंत लय पावले. ॥ ३२२ ॥ जें महाभूतांचे मूळ कारण आहे. जें महातेजाचेंहि तेज होय. असे जें अर्जुना! माझें मूळरूप आहे. ॥ ३२३ ॥ तेंच हें माझें प्रगट झालेलें चतुर्भुज रूप होय. जेव्हां नास्तिक माझ्या प्रेमळ भक्तांना अत्यंत पीडा देतात. तेव्हा ती परब्रह्माची संपूर्ण शोभा किंवा सौंदर्यच, या सगुण साकार चतुर्भुज रूपाने प्रगट होते. ॥ ३२४ ॥

गूढार्थदीपिका—या ओव्यांत श्रीज्ञानेश्वर माऊलींनी अनुभवी पुरुषांना भगवंताचें सगुण साकार रामकृष्णादि स्वरूप कसें पूर्ण ब्रह्मरूपाने प्रत्ययाला येतें, हें सांगितलें आहे. व सगुण साकार रामकृष्णादि रूप भौतिक आहे किंवा मायिक आहे असें जें कित्येक शाब्दिक ज्ञान्यांना वाटतें, त्यांना चोख उत्तर दिलें आहे.

ज्याप्रमाणे "सोऽयं देवदत्तः" तोच हा देवदत्त होय या वाक्याने, पूर्वी पाहिलेल्या व वर्तमानकाळीं दृष्टीसमोर असलेल्या देवदेवत्ताचें अत्यंत ऐक्य दाखविलें जातें, त्याप्रमाणे श्रीज्ञानेश्वर माऊलींनी, पंचभूतांचा लय करून ज्या अत्यंत निरुपाधिक आत्मस्वरूपाचा अनुभव येतो, तें निरुपाधिक आत्मस्वरूप भक्ताकरितां चतुर्भुज साकार झालें आहे, असें विधान करून, अनुभवाने निर्गुणसगुण यांचें पूर्ण ऐक्य असतें, यांचें मुळींच भिन्नत्व नसतें, निर्गुणाची शोभा म्हणजे सगुण होय असें स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. रत्नाची कांति रत्नाला सोडून कधीच राहत नाही. ती रत्नासह नेहमी राहते. त्याप्रमाणेच निर्गुण परब्रह्माची शोभा, निर्गुण परब्रह्माला सोडून कधीं राहत नाही व ती शोभाच सगुण चतुर्भुजरूप होय—म्हणजे भगवंताचें सगुण स्वरूपहि निर्गुणाला सोडुन राहत नाही. रत्न व त्याची कांति मिळूनच एक रत्नवस्तु जशी असते, त्याप्रमाणे सगुण निर्गुण मिळूनच एक परब्रह्म वस्तु आहे. रत्न आहे तोपर्यंत त्याची कांति राहते, त्याप्रमाणे निर्गुण आहे तोपर्यंत सगुण राहते; म्हणून सगुणहि नित्य मानणें भाग आहे व तसा अनुभवी पुरुषाचा अनुभवहि असतो.

श्रीज्ञानेश्वरी अ० १४ ओवी ३७३-३८० यांत श्रीज्ञानेश्वर महाराजांनी स्वमुखांनेच निर्गुणसगुणाचें ऐक्य व समता दाखविली आहे.

गीता अ० १४ यावरील भाष्यांत श्रीभगवान आचार्यांनीहि निर्गुण परब्रह्माचें सगुण अवतार यांचा शक्तिमान व शक्ति यासारखा संबंध असून त्यांचें ऐक्य व पूर्ण निरुपाधिकत्व असतें असें स्पष्ट म्हटलें आहे.

तें अनिर्वाच्य महासुख। पैं आपणचि जाहले जे पुरुष। जयांचे कां निष्कर्ष। प्राप्तिवेरीं॥ ३२५॥
आम्हीं साधन हें जें सांगितलें। तेंचि शरीर जिहीं केलें। ते आमुचेनि पाडें आले। निर्वाळलेया॥ ३२६॥
परब्रह्माचेनि रसें। देहाकृतीचिये मुसें। वोतींव जाहले तैसे। दिसती आंगें॥ ३२७॥
जरि हे प्रतीति हन अंतरीं फांके। तरी विश्वचि हें अवघें झांके। तंव अर्जुन म्हणे निकें। साचचि जी हें॥ ३२८॥

अर्थ—शब्दाने ज्याचें वर्णनच होऊं शकत नाही असें जें अनिर्वचनीय महासुख तेंच जे पुरुष स्वत: झाले व ज्यांच्या अभ्यासाचा शेवट त्या सुखाच्या प्राप्तींतच झाला.॥ ३२५॥ अर्जुना! आम्हीं हें जें लययोगाचें साधन सांगितलें, तेंच ज्यांनी आपल्या शरीराकडून केलें, ते आमच्या अत्यंत शुद्ध निरुपाधिक सगुणनिर्गुण स्वरूपासारखेंच शुद्ध निरुपाधिक सगुण निर्गुणस्वरूप झाले.॥ ३२६॥ देहाकृतीचे मुंशीमध्यें निरुपाधिक परब्रह्माचा रस ओतून त्यांचें शरीर घडलेलें आहे असे ते होतात.॥ ३२७॥ अर्जुना! हा अनुभव अंत:करणांत प्रगट झाला की संपूर्ण जडविनाशी विश्वाचा प्रत्यय नाहीसा होतो. तेव्हा अर्जुन म्हणतो, भगवंता! आपलें म्हणणे अगदी सत्य आहे.॥ ३२८॥

गूढार्थदीपिका—जरी हे प्रतीति हन अंतरीं फाके—मागें १५२ ओवीवर सांगितल्याप्रमाणे, या योगाभ्यासाने निरुपाधिक निर्गुण परमात्मा आपल्या स्वरूपाशी एकरूप असलेल्या सच्चिदानंदशक्तीनेच नामरूपात्मक होतो, म्हणून नामरूपें देखील जडविनाशी नसून सच्चिदानंदस्वरूपच आहेत. असा जेव्हा अनुभव येतो, तेव्हा सच्चिदानंद परब्रह्माहून भिन्न अशा जडविनाशी जगताचा प्रत्यय संपूर्ण नाहीसा होतो, असे श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी स्पष्ट सांगून, हा योगमार्ग, षट्चक्रभेदरूप किंवा लययोगमार्ग सगुणभक्तीला कसा पोषक आहे आणि याला 'पंथराज' कां म्हणतात हे त्यांनी स्पष्ट केले आहे.

कां जे आपण आतां देवो। हा बोल्लिे जो उपावो। तो प्राप्तीचा ठावो। म्हणोनि घडे॥ ३२९॥
इये अभ्यासीं जे दृढ होती। ते भरवसेनि ब्रह्मत्वा येती। हें सांगतियाचि रीती। कळलें मज॥ ३३०॥
देवा गोठीचि हे ऐकतां। बोधु उपजतसे चित्ता। मा अनुभवें तल्लीनता। नव्हेल केवीं॥ ३३१॥
म्हणऊनि एथ कांहीं। अनारिसें नाहीं। परी नावभरी चित्त देईं। बोला एका॥ ३३२॥
आतां कृष्णा तुवां सांगितला योगु। तो मना तरी आला चांगु। परि न शके करूं पांगु। योग्यतेचा॥ ३३३॥
सहजें आंगिक जेतुली आहे। तेतुलियाची जरी सिद्धि जाये। तरी हाचि मार्गु सुखोपायें। अभ्यासीन॥ ३३४॥
नातरी देवो जैसें सांगतील। तैसें आपणपां जरी न ठकेल। तरी योग्यतेवीण होईल। तेंचि पुसों॥ ३३५॥
जीवींचिये ऐसी धारण। म्हणोनि पुसावया जाहलें कारण। मग म्हणे तरी आपण। चित्त देइजो॥ ३३६॥
हां हो जी अवधारिलें। हें जें साधन तुम्हीं निरूपिलें। तें आवडतयाहि अभ्यासिलें। फावों शके॥ ३३७॥
कीं योग्यतेवीण नाहीं। ऐसें हन आहे कांहीं। तेथ श्रीकृष्ण म्हणती तरी काई। धनुर्धरा॥ ३३८॥
हें काज कीर निर्वाण। परि आणिकही जें कांहीं साधारण। तेंही अधिकाराचे वोडवेविण। काय सिद्धि जाय॥ ३३९॥
पैं योग्यता जे म्हणिजे। ते प्राप्तीची अधीन जाणिजे। कां जे योग्य होऊनि कीजे। तें आरंभीं फळे॥ ३४०॥
तरी तैसी एथ कांहीं। सावियाची केणी नाहीं। आणी योग्यतेची काई। खाणी असे॥ ३४१॥
नावेक विरक्तु। जाहला देहधर्मीं नियतु। तरि तोचि नव्हे व्यवस्थितु। अधिकारिया॥ ३४२॥
येतुलालिये आयणीमाजी येवढें। योग्यपण तूंतेंही जोडे। ऐसें प्रसंगें सांकडें। फेडिलें तयाचें॥ ३४३॥
मग म्हणे गा पार्था। ते हे ऐसी व्यवस्था। अनियतासि सर्वथा। योग्यता नाहीं॥ ३४४॥

अर्थ—आतां आपण जो उपाय सांगितला, तो ब्रह्मप्राप्तीचें ठिकाणच होय; म्हणूनच तसा अनुभव येतो.॥ ३२९॥ या योगाभ्यासाचे ठिकाणी जे दृढनिश्चयाने लागतात, ते खात्रीने ब्रह्मरूप होतात; हें आपण सांगितलेल्या रीतीवरून मला कळून आलें.॥ ३३०॥ देवा! या मार्गाचें निरूपण ऐकूनच जर जीव ब्रह्मस्वरूप आहे असें ज्ञान

होतें, तर अनुभव आला असतां तद्रूपता कां होणार नाही. ॥ ३३१ ॥ म्हणून येथें आपलें म्हणणें अन्यथा नाही, पण क्षणभर माझ्या एका बोलण्याकडे लक्ष द्या. ॥ ३३२ ॥ आतां देवा! तुम्ही जो योग सांगितला तो माझ्या मनाला बरा वाटला, पण अभ्यास करण्याची जी योग्यता पाहिजे त्या योग्यतेचा आश्रय मी करूं शकत नाही. ॥ ३३३ ॥ सहजपणें जेवढें अंगचें सामर्थ्य आहे, तेवढ्या सामर्थ्यानें, जर अभ्यास सिद्ध होत असेल, तर या योमार्गाचाच आनंदाने अभ्यास करींन. ॥ ३३४ ॥ किंवा देवा! आपण जसें सांगितलें तसे माझ्याकडून होण्याजोगे नसेल, तर योग्यतेची आवश्यकता नाही, असेंच एखादें साधन विचारीन. ॥ ३३५ ॥ माझ्या मनाची अशी समजूत झाली, म्हणून पुसण्याला कारण झालें. मग अर्जुन म्हणाला, देवा! इकडे लक्ष द्या. ॥ ३३६ ॥ अहो देवा! तुम्ही हें जें सांगितलें ते माझ्या पूर्ण लक्षांत आलें, पण अभ्यास केला असतां, वाटेल त्याला हा योग प्राप्त होतो!॥ ३३७ ॥ की योग्यते वांचून साधूं शकत नाही असे कांही आहे? तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, अर्जुना! हे काय विचारतोस?॥ ३३८ ॥ हें, तर अंतिम प्राप्तीचें साधन आहे, पण आणखीहि ज्या कांही साधारण प्राप्ती असतात, त्याहि देखील अधिकाराची योग्यता असल्यावांचून सिद्धीस जातात काय?॥ ३३९ ॥ आणि योग्यता जी आपण म्हणतो, ती तरी प्राप्तीवरूनच जाणली जाते. आपण योग्य होऊन कार्याला आरंभ केला की तो प्रयत्न सफल होतोच. ॥ ३४० ॥ म्हणून या योगमार्गांत, खरोखर तसा कांही प्रकार नाही आणि योग्यतेची खाण असते की काय?॥ ३४१ ॥ योगाभ्यास सिद्ध होईपर्यंत विषयसुखाचा वीट येऊन, देहादिकांच्या व्यापारांचे नियमन केलें, तर तोच योग्य अधिकारी होणार नाही काय?॥ ३४२ ॥ अशा प्रकारच्या प्राप्तीची इच्छा झाल्यास एवढी लागणारी योग्यता, तुझ्या ठिकाणींहि आहे, असें म्हणून त्याच्या संशयरूप संकटाचें निवारण केलें. ॥ ३४३ ॥ मग भगवान म्हणतात, अर्जुना! योगाभ्यासाची योग्यता संपादन करण्याकरितां अशी व्यवस्था असायला पाहिजे. जो स्वैर वागणारा आहे, त्याला योग्याभ्यासाची योग्यता नसतें. ॥ ३४४ ॥

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः । न चाति स्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन॥ १६ ॥

अर्थ—अति खाणाऱ्याला, मुळींच न खाणाऱ्याला, अति झोंपणाऱ्याला किंवा मुळींच झोंप न घेणाऱ्याला अर्जुना! योग साधत नाही. ॥ १६ ॥

जो रसनेंद्रियाचा अंकिला। कां निद्रेसी जीवें विकला। तो नाहीं एथ म्हणितला। अधिकारिया॥ ३४५ ॥
अथवा आग्रहाचिये बांदोडी। क्षुधा तृषा कोंडी। आहारातें तोडी। मारूनियां॥ ३४६ ॥
निद्रेचिया वाटा न वचे। ऐसा दृढिवेचेनि अवतरणें नाचे। तें शरीरचि नव्हे तयाचें। मा योगु कवणाचा॥ ३४७ ॥
म्हणोनि अतिशयें विषय सेवावा। तैसा बोधु नहावा। कां सर्वथा निरोध करावा। हेंही नको॥ ३४८ ॥

अर्थ—जो भेदाच्या सर्वस्वीं स्वाधीन आहे किंवा झोंपेला विकला गेला, असा पुरुष योगाभ्यासाचा अधिकारी सांगितला नाही. ॥ ३४५ ॥ किंवा आग्रहाचे तावडींत जाऊन भूक तहानेचा कोंडमारा करून, आहारादि न घेतां भूक तहान मारतो. ॥ ३४६ ॥ निद्रेच्या मार्गाने कधी जायचें नाही-म्हणजे झोप घ्यायची नाही-असा दृढ निश्चय अंत:करणांत धरून जो वागतो, त्याचें शरीरच, त्याचे स्वाधीन राहत नाही, मग योग कोठून साधला जाणार?॥ ३४७ ॥ म्हणून योगाभ्यासाकरितां मन मानेल तसे विषय भोगले तरी हरकत नाही, असा समज करून घेऊं नये. किंवा सर्वथा विषयसेवन वर्ज्य केलें पाहिजे, असेहि समजूं नये. ॥ ३४८ ॥

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु । युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दु:खहा॥ १७ ॥

अर्थ—शास्त्रोक्त आहारविहार करणारा, शास्त्रानुसार नियमित देहादिकांचे व्यापार करणारा, झोंपणें व जागणें हेंहि जो नियमितच करतो, त्याला योग हा दु:खांचा नाश करणारा होतो. ॥ १७ ॥

आहार तरी सेविजे। परी युक्तीचेनि मापें मविजे। क्रियाजात आचरिजे। तयाचि स्थिती॥ ३४९ ॥

अर्थ—आहार घ्यावा तो देखील परिमित युक्तीच्या मापाने मोजलेला घ्यावा त्याचप्रमाणे सर्व क्रियाहि शरीराला थकवा वाटणार नाही अशा नियमित कराव्या. ॥ ३४९ ॥

गूढार्थदीपिका—युक्तीचेनि मापें मविजे—आळस, निद्रा वाढणार नाही, क्षुधेची पीडा होणार नाही आणि

शरीराचे ठिकाणी हलकेपणा राहून अभ्यास करावयास उल्हास वाटेल इतका व असा आहार असावा.

मापितला बोली बोलिजे। मितलिया पाउलीं चालिजे। निद्रेही मानु दीजे। अवसरें एकें॥ ३५०॥
जागणें जरी जाहलें। तरी व्हावें तें मितलें। येतुलेनि धातुसाम्य संचलें। असेल सुखें॥ ३५१॥
ऐसें युक्तीचेनि हातें। जैं इंद्रियां वोपिजे मातें। तैं संतोषासी वाढतें। मनचि करी॥ ३५२॥

अर्थ—बोलणेंहि नियमित मोजकें असावें. तसेंच चालणे देखील नियमित असावें. निद्रेच्या वेळीं तिलाहि मान द्यावा.॥ ३५०॥ जागणेंहि परिमितच असावें. अशा रीतीने शरीर योग्य रीतीने चालण्याकरितां शरीरांतील धातूंचें जें प्रमाण असायला पाहिजे तें कायम राहील व प्रकृतिस्वास्थामुळें सुखहि होईल.॥ ३५१॥ अशा युक्तीरूपी हातानें इंद्रियांना विषयाचा भोग दिला असतां, मनाचा संतोष वाढत जातो.॥ ३५२॥

गूढार्थदीपिका—"धर्मस्य ह्यापवर्गस्य" (भाग स्कं० १-२-९) धर्म हा परमेश्वर प्राप्तीकरितांच सांगितला आहे असें स्मृतिवचन आहे. ह्या वचनानुसार आर्षधर्मशास्त्रांतून सर्वत्र परमेश्वर प्राप्तीला अनुकूल होतील अशाच रीतीने मनुष्यांनी आपल्या मनइंद्रियांचा निग्रह करून, आहारविहारादि सर्व कर्में करावीं असें सांगितलें आहे. म्हणून धर्मशास्त्रांचे नियम पाळून, आहारविहार करणारा पुरुष युक्त होतो व त्याला कर्मयोगाची सिद्धि मिळते; असा भाव.

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते । निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा॥ १८॥

अर्थ—जेव्हां बाह्य विषयांपासून आवरलेलें चित्त सर्व विषयसुखाची इच्छा सोडून, आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर होतें तेव्हा तें युक्त म्हटलें जातें.॥ १८॥

बाहेर युक्तीची मुद्रा पडे। तंव आंत सुख वाढे। तेथें सहजेंचि योगु घडे। नाभ्यासितां॥ ३५३॥

अर्थ—बाहेर मन, इंद्रिये व शरीर यांचा शास्त्रमर्यादेने व्यापार झाला असतां, अंतःकरणांत सुख वाढत जाते. अशा रीतीने अभ्यास न करतांच योग घडत जातो.॥ ३५३॥

गूढार्थदीपिका—योगाभ्यासाने आत्मस्वरूपाचे ठिकाणीं, मन ऐक्य पावून जें आत्मसुख प्राप्त होतें, तेंच आत्मसुख, विषयसुख भोगण्याची इच्छा सोडून, केवळ परमेश्वर आज्ञा समजून, परमेश्वराचे ठिकाणीं चित्त ठेवून, अत्यंत निष्ठेने शास्त्रमर्यादा पाळणाऱ्या कर्मयोग्यांना प्राप्त होतें, असा भाव.

जैसें भाग्याचिये भडसें। उद्यमाचेनि मिसें। मग समृद्धिजात आपैसें। घर रिघे॥ ३५४॥
तैसा युक्तिमंतु कौतुकें। अभ्यासाचिया मोहरा ठाके। आणि आत्मसिद्धीचि पिके। अनुभवु तयाचा॥ ३५५॥
म्हणोनि युक्ति हे पांडवा। घडे जया सदैवा। तो अपवर्गीचिये राणिवा। अळंकरिजे॥ ३५६॥

अर्थ—ज्याप्रमाणे भाग्याचा उदय होण्याचा काल आला असतां, भाग्य भरभरून येतें न नुसतें प्रयत्नाचें निमित्त होऊन आपोआप सर्व संपत्ति घरांत शिरते.॥ ३५४॥ त्याप्रमाणे मित आहारविहारादि युक्तीने वागणारा पुरुषहि, सहजच अभ्यासाच्या मार्गासच लागला असतो आणि त्याच्या अनुभवाला आत्मसिद्धीचें पीक येतें.॥ ३५५॥ म्हणून ज्या भाग्यवानाला मनइंद्रियें स्वाधीन ठेवण्याची ही युक्ति साधली तो मोक्षाच्या राज्यप्राप्तीने शोभिवंत होतो.॥ ३५६॥

यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता । योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः॥ १९॥

अर्थ—ज्याप्रमाणे निर्वात ठिकाणच्या दिव्याची ज्योति यत्किंचित् न हालतां सरळ राहते, तशा ज्योतीचीच उपमा, चित्त स्वाधीन करून तें आत्मस्वरूपाकडे लावणाऱ्या योग्याच्या चित्ताला दिलेली आहे.॥ १९॥

युक्ति योगाचें आंग पावे। ऐसें प्रयाग जेथ होय बरवें। तेथ क्षेत्रसंन्यासें स्थिरावें। मानस जयाचें॥ ३५७॥
तयातें योगयुक्त म्हण। हेंही प्रसंगें जाण। तें दीपाचें उपलक्षण। निर्वातींचिया॥ ३५८॥
आतां तुझें मनोगत जाणोनि। कांहीं एक आम्ही म्हणोनि। तें निकें चित्त देऊनी। परिसावें गा॥ ३५९॥
तूं प्राप्तीची चाड वाहसी। परि अभ्यासीं दक्षु नव्हसी। तें सांग पां काय बिहसी। दुवाडपणा॥ ३६०॥
तरी पार्था हें झणें। सायास घेशी हो मनें। वायां बागूल इये दुर्जनें। इंद्रियें करिती॥ ३६१॥
पाहें पां आयुष्याचा अढळ करी। जें सरतें जीवित वारी। तया औषधातें वैरी। काय जिव्हा न म्हणे॥ ३६२॥

ऐसें हितासि जें जें निकें। तें सदाचि या इंद्रियां दुखे। एऱ्हवीं सोपें योगासारिखें। कांहीं आहे॥ ३६३॥

अर्थ—गंगा यमुना यांचा प्रयागक्षेत्रांत जसा संगम झाला, तसा परिमितपणा हे योगाचें अंग होऊन झालेल्या उत्तम प्रयागक्षेत्राचे ठिकाणीं, ज्याचें मन कायमचे स्थिर झालें. ॥ ३५७ ॥ अर्जुना! त्यालाच योगयुक्त तूं जाण. हेहि प्रसंगोपात्त तूं लक्षात ठेव की त्यां योग्याच्या चित्ताच्या स्थिरतेला निर्वात ठिकाणच्या दिव्याचीच उपमा देतां येईल. ॥ ३५८ ॥ आतां तू ज्या अभिप्रायाला धरून शंका काढलीस, तो तुझ्या मनांतील अभिप्राय जाणून जे कांही मी म्हणेन, ते लक्ष देऊन ऐक. ॥ ३५९ ॥ तुला ब्रह्मस्थिति प्राप्त व्हावी असें तर वाटतें, पण योगाभ्यास करायला कचरतोस. योगमार्गांत फार कष्ट आहेत असें समजून भितोस की काय? सांग बरें॥ ३६० ॥ कदाचित् तूं आपल्या मनांत हा योगमार्ग फार कष्टदायक आहे अशी समजूत करून घेशील, पण अर्जुना! हीं दुर्जय इंद्रियें, या योगाभ्यासाचा बागुलबोवा निर्माण करितात. ॥ ३६१ ॥ अर्जुना! पहा. जे आयुष्याला स्थिर करते व जीवितयात्रेंचें संपणें टाळतें, त्या औषधाला ही आपली जिव्हा वैरी समजत नाही काय?॥ ३६२ ॥ याप्रमाणे जे जें आपल्या कल्याणाचें असतें तें तें या इंद्रियांना दुःखदायक वाटतें वास्तविक योगासारखे सोपें कांही आहे काय?॥ ३६३ ॥

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया। यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति॥ २०॥

अर्थ—या योगाभ्यासाने निरुद्ध झालेलें मन विषयाला विसरतें व चित्ताला आत्मदर्शन होऊन, तें आत्म्यातच तल्लीन होते. ॥ २० ॥

म्हणोनि आसनाचिया गाढिका। जो आम्हीं अभ्यासु सांगितला निका। तेणें होईल तरी हो कां। निरोधु यया॥ ३६४ ॥
एऱ्हवीं तरी येणें योगें। जैं इंद्रियां विंदाण लागे। तैं चित्त भेटों रिगे। आपणपेयां॥ ३६५॥
परतोनि पाठिमोरें ठाके। आणि आपणियांतें आपण देखे। देखतखेवों वोळखे। म्हणे तत्त्व तें मी॥ ३६६ ॥

अर्थ—म्हणून सांगितलेल्या दृढ आसनाच्या सहायाने आम्ही जो उत्तम अभ्यास सांगितला, त्याच्याने मन इंद्रियें यांचा निरोध झाला तर होईल. ॥ ३६४ ॥ येऱ्हवीं या योगाभ्यासाने जेव्हा इंद्रियांना नियमितपणाचा वेध लागतो, तेव्हा चित्त आपल्या मूळ स्वरूपाला आपोआप भेटायला जातें. ॥ ३६५ ॥ परतून पाठमोरें होतें, तेव्हा आपणच आपल्याला पाहतें. पाहिल्याबरोबर हेंच तत्त्व मी आहे-म्हणजे हेच माझें स्वरूप आहे—असें तें म्हणते. ॥ ३६६ ॥

सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम्। वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः॥ २१॥

अर्थ—इंद्रियांच्या पलीकडे असलेलें, बुद्धीनेच ज्याचें ग्रहण केलें जातें असें जें आत्यंतिक सुख, तें तो अनुभवितो व त्या सुखांतच राहून तेथून कधी बाहेर येत नाही. ॥ २१ ॥

तिये ओळखीचिसरिसें। सुखाचियां साम्राज्यीं बैसे। चित्तपण समरसें। विरोनि जाय॥ ३६७॥
जयापरतें आणिक नाहीं। जयातें इंद्रियें नेणती कहीं। तें आपणचि आपुला ठायीं। होऊनि ठाके॥ ३६८॥

अर्थ—त्या ओळखी बरोबर सुखाच्या साम्राज्यावर तो आरूढ होतो व मग त्या सुखाशीं समरस होऊन विरून जातो. ॥ ३६७ ॥ ज्या समरस सुखस्थितीपेक्षां दुसरे कांही श्रेष्ठ नाही व ज्या स्थितीला इंद्रियें कधींच जाणत नाहीत, ती सुखस्थिति आपणच आपल्या ठिकाणीं होऊन राहतो. ॥ ३६८ ॥

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः। यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते॥ २२॥

अर्थ—जें सुख प्राप्त झालें असतां, त्यापेक्षां त्याला कोणताच सुखलाभ श्रेष्ठ वाटत नाही व त्या सुखांत निमग्न राहून, अत्यंत भयंकर दुःखानेहि ती स्थिती नाहिशी होत नाही. ॥ २२ ॥

मग मेरूपासूनि थोरें। देह दुःखाचेनि डोंगरें। दाटिजो पां परि भारें। चित्त न दटे॥ ३६९॥
कां शस्त्रवरी तोडिलिया। देह अग्निमाजी पडलिया। चित्त महासुखीं पहुडलिया। चेवोचि नये॥ ३७०॥
ऐसे आपणपां रिगोनि ठाये। मग देहाची वास न पाहे। आणिकचि सुख होऊनि जाये। म्हणूनि विसरे॥ ३७१॥

अर्थ—मग मेरुपर्वताहून थोर अशा दुःखाच्या डोंगराच्या भाराने खालीं जरी दडपला गेला, तरी त्याचें चित्त दडपलें जात नाही—म्हणजे तो दुःखी होत नाही. ॥ ३६९ ॥ किंवा शस्त्राने त्याचें शरीर तोडलें अथवा त्याचा देह

अग्नींत पडला, तरी त्याचें चित्त जें महासुखांत निंजलें असतें, तें जागे होत नाही. ॥ ३७० ॥ याप्रमाणे योगी आपल्यांतच मिळून राहतो व त्याला देहाची आठवणच होत नाही; कारण तो अनिर्वाच्य सुखस्वरूप होऊन राहतो म्हणून त्याला सर्व विसर पडतो. ॥ ३७१ ॥

तं विद्याद् दु:खसंयोगवियोगं योगसञ्ज्ञितम् । स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ॥ २३ ॥

अर्थ—नि:शेष दु:खसंबंधरहित होणे यालाच योग हें नांव आहे, असें जाणावें. दृढ निश्चयाने व यत्किंचित्हि न कंटाळता उल्हासयुक्त मनाने योगाचा अभ्यास करावा. ॥ २३ ॥

जया सुखाचिया गोडी। मन आर्तीची सेचिं सोडी। संसाराचिया तोंडीं। गुंतलें जें॥ ३७२ ॥
जें योगाची बरव। संतोषाची राणीव। ज्ञानाची जाणीव। जयालागीं॥ ३७३ ॥
तें अभ्यासिलेनि योगें। सावयव देखावें लागे। देखिलें तरी आंगें। होइजेल गा॥ ३७४ ॥

अर्थ—संसारांतील विषयसुखाच्या ठिकाणीं आसक्त असलेले मन, ज्या योगसुखाच्या गोडीने विषयसुखाची आठवण विसरतें. ॥ ३७२ ॥ जें सुख योगाचें सर्वस्व सार होय, जें समाधानाचें राज्य होय, ज्याच्याकरितां ज्ञानाची जाणीव प्राप्त करावयाची असतें. ॥ ३७३ ॥ तें योगाचा अभ्यास केल्याने साक्षात् अनुभविलें जाते व अनुभवले असतां, आपण स्वत:च तद्रूप होऊन जातो. ॥ ३७४ ॥

संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषत: । मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्तत: ॥ २४ ॥
शनै: शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया । आत्मसंस्थं मन: कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत् ॥ २५ ॥

अर्थ—विषयांत सुख आहे या संकल्पापासून उत्पन्न झालेल्या विषयभोगाच्या वासना नि:शेष सोडून देऊन व सर्व बाजूने मनाने इंद्रियांचें नियमन करून. ॥ २४ ॥ धैर्यानें हळुहळु बुद्धीलाही आवरावे म्हणजे बुद्धीला अत्यंत धैर्ययुक्त करावें व मनाला आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर करून, कशाचेंहि चिंतन करू नये. ॥ २५ ॥

परि तोचि योगु बापा। एके परी आहे सोपा। जरी पुत्रशोकु संकल्पा। दाखविजे॥ ३७५ ॥

अर्थ—बा अर्जुना! या एका मार्गानें योग सोपा होऊं शकतो-म्हणजे सुलभ प्राप्त होऊं शकतो. संकल्पाला पुत्रशोक उत्पन्न करून द्यावा. ॥ ३७५ ॥

गूढार्थदीपिका—"श्रुते दृष्टेऽपि वा भोग्ये यस्मिन्कस्मिंश्च वस्तुनि। समीचीनत्वधी" शास्त्रांतून किंवा दुसऱ्याच्या मुखाने ऐकलेल्या पाहिलेल्या अशा कोणत्याहि भोग्य वस्तूविषयीं, ही चांगलीं आहेत अशी जी बुद्धि होते त्याला संकल्प म्हणतात व त्या वस्तूच्या प्राप्तीची इच्छा हा काम होय. संकल्पापासून काम होतो—म्हणजे वस्तु चांगली आहे असे मनाला वाटतें, तेव्हाच त्या वस्तूच्या प्राप्तीची इच्छा होते. म्हणून काम हा संकल्पाचा पुत्र होय.

हा विषयांतें निमालिया आइके। इंद्रियें नेमाचिया धारणीं देखे। तरी हियें घालूनि मुके। जीवितासी॥ ३७६ ॥

अर्थ—हा संकल्प, विषय नाहीसे झाले असें ऐंकून व इंद्रिये नेमाच्या बंधांत सांपडलीं आहेत असें पाहून, हाय खाऊन एकदम प्राण सोडतो. ॥ ३७६ ॥

गूढार्थदीपिका—विषयांते निमालिया—अद्वैत आत्मस्वरूपाचे ठिकाणीं आत्मस्वरूपाहून भिन्न असे विषय राहणें शक्य नाही; म्हणून ते केवळ मन:कल्पित आहेत असे आत्मविचाराने कळून येते व विषयांचे अस्तित्व नाहीसे होतें.

इंद्रियें नेमाचिया धारणीं देखे—पण विषयांचे ठिकाणीं आसक्त असलेल्या इंद्रियांमुळें, पुन: पुन: अविवेकाने विषयांचे अस्तित्व स्वीकारलें जातें. इंद्रियांचीं स्वैर विषयप्रवृत्ति, शास्त्रनियमाने नियमित केली असतां, इंद्रियांची विषयासक्ति क्षीण होत जाते. याप्रमाणे "तेसें संसारा या समस्तां। जाणिजें जै अनित्यता। तै वैराग्य दवडितां। पाठी लागे" (ज्ञा० अ० १५-३९) आत्मविचाराने विषय हे अनित्य म्हणजे मन:कल्पित आहेत, हे बुद्धींत दृढ झाले असतां, विषयवैराग्य उत्पन्न होतें आणि त्या वैराग्यानेच "विरक्तीवांचूनि कहीं। ज्ञानासी तगणेचि नाहीं" ज्ञान दृढ होते. अशा रीतीने ज्ञानाने वैराग्य व वैराग्याने ज्ञान दृढ झाले असतां, संकल्प नाहीसा होतो व त्याबरोबर सर्व विषयवासना नाहीशा होऊन बुद्धि आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर होते.

ऐसें वैराग्य हें करी। तरी संकल्पाची सरे वारी। सुखें धृतीचिया धवळारीं। बुद्धि नांदे॥ ३७७॥
बुद्धि धैर्या होय वसौटा। तरी मनातें अनुभवाचिया वाटा। हळु हळु करी प्रतिष्ठा। आत्मभुवनीं॥ ३७८॥
याही एके परी। प्राप्ति आहे विचारीं। हें न ठके तरी सोपारी। आणिक ऐकें॥ ३७९॥

अर्थ—वैराग्य हातीं आलें असतां संकल्पाची यात्राच संपते—म्हणजे संकल्पच उठत नाही आणि बुद्धि आनंदाने धैर्याच्या मंदिरात नांदते (म्हणजे ती धैर्य कधी सोडतच नाही व अत्यंत धैर्यसंपन्न होते असा अर्थ) ॥ ३७७ ॥ याप्रमाणे जर बुद्धि धैर्याला आश्रय होऊन बसली, तर तीं अनुभवाच्या मार्गाने हळुहळु आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर होते. ॥ ३७८ ॥ याहि एका मार्गाने, अर्जुना! ब्रह्मप्राप्ति होऊं शकते. पहा, हाहि मार्ग साधत नसेल, तर आणखीं दुसरा मार्ग सांगतो, ऐक. ॥ ३७९ ॥

यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम् । ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत्॥ २६॥

अर्थ—हे चंचल व अस्थिर मन ज्या ज्या विषयाकडे बाहेर धावते त्या त्या विषयापासून त्याला आवरून आत्म्याचे स्वाधीन करावें म्हणजे स्थिर करावें. ॥ २६ ॥

आतां नियमुचि हा एकला। जीवें करावा आपुला। जैसा कृतनिश्चयाचिया बोला- । बाहेरा नोहे॥ ३८०॥
जरी येतुलेनि चित्त स्थिरावें। तरी काजा आलें स्वभावें। न राहे तरी घालावें। मोकलुनी॥ ३८१॥
मग मोकलिलें जेथ जेथ जाईल। तेथूनि नियमूचि घेऊनि येईल। ऐसेनि स्थैर्याची होईल। सवे यया॥ ३८२॥

अर्थ—ज्याप्रमाणे केलेला निश्चय टळूं देऊं नये त्याप्रमाणे साधकाने आपण एक नियमरूपच होऊन राहावे. ॥ ३८० ॥ जर एवढ्याने चित्त स्थिर झालें तर सहज कार्य झालें. जर तें तेवढ्याने स्थिर झाले नाहीं, तर मनाला मोकळें सोडावे. ॥ ३८१ ॥ मग तें मोकळें सोडलेलें मन, जेथे जाईल तेथून नियमित होऊनच येईल. अशा रीतीने निश्चयाने मनाचे स्थैर्य साधेल. ॥ ३८२ ॥

गूढार्थदीपिका—स्वैर सोडलेल्या मनाला दु:खच प्राप्त होतें व त्या दु:खाने तें शेवटीं विषयभोगास कंटाळून स्थिर होते.

प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् । उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम्॥ २७॥
युञ्जन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः। सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते॥ २८॥

अर्थ—अशा शांतचित्त झालेल्या योग्याला ज्यांत रजोगुणात्मक मोहादि दु:ख नाही व अधर्मरूप पापहि नसून जें ब्रह्मस्वरूप आहे असें परम सुख प्राप्त होतें. ॥ २७॥ जो योगी पापपुण्यरहित होऊन सदा आपलें मन आत्मस्वरूपाकडे लावतो, त्याला ब्रह्मप्राप्तीने होणारे अत्यंत सुख अनायासें प्राप्त होतें. ॥ २८ ॥

पाठीं केतुलेनि एके वेळे। तया स्थैर्याचेनि मेळें। आत्मस्वरूपाजवळें। येईल सहजें॥ ३८३॥
तयातें देखोनि आंगा घडेल। तेथ अद्वैतीं द्वैत बुडेल। आणि ऐक्यतेजें उघडेल। त्रैलोक्य हें॥ ३८४॥

अर्थ—नंतर कांही काळाने चित्त अत्यंत स्थिर झाल्यामुळे तें सहजच आत्मस्वरूपाजवळ येईल. ॥ ३८३ ॥ नंतर आत्मस्वरूपाला पाहून तें त्याच्या अंगाशीं मिळून जाईल—म्हणजे तद्रूप होईल. अशा स्थितींत द्वैत नाहीसें होऊन एक अद्वैतच राहील व हें सर्व त्रैलोक्य ऐक्यरूपज्ञानप्रकाशाने प्रकाशित होईल—म्हणजे जीव, जगत्, ब्रह्म असा भेद न राहतां, एक सर्वत्र ब्रह्मचैतन्यच भरलें आहे असा अनुभव येईल. ॥ ३८४॥

गूढार्थदीपिका—ऐक्यतेजें उघडेल। त्रैलोक्य हें—येथें श्रीज्ञानेश्वर माऊलींनी आत्मज्ञानाचा किंवा ब्रह्मज्ञानाचा पूर्ण अपरोक्ष अनुभव सगुणच असतो, असें दाखविलें आहे. ज्याप्रमाणें अव्यक्त किंवा निर्गुण सोन्याचें ज्ञान, सोनें आहे असें केवळ सत्ता रूपाने होतें, पण त्याचें प्रत्यक्ष ज्ञान मात्र अलंकाराचे रूपाने होतें, त्याप्रमाणे निर्गुणब्रह्माचें ज्ञानहि सच्चिदानंद ब्रह्म आहे असे केवळ सत्तारूपानेच होते आणि जेव्हा जगाशीं अद्वैतरूपाने त्याचें ज्ञान होते तेव्हाच तें पूर्ण अपरोक्ष होते. हे ''ऐक्य तेजें उघडेल। त्रैलोक्य हें'' या चरणांनी दाखविलें आहे.

''म्हणे म्यां सोनेंचि पहावें दिठीं। तरी पुढें ठेविजेल खोटी। परी खोटी वेगळी भेटी। सुवर्णी न घडे''॥ ८६॥

(स्वात्मसुख) नाथांनीहि म्हटलें आहे की सोनें प्रत्यक्ष पहावयाचें असल्यास कोणत्या तरी आकारांत तें समोर घ्यावयास पाहिजे. आकारावांचून सोनें प्रत्यक्ष होणें शक्य नाही'' ''तैसें जगदाकारें प्रकाशे। निर्विकार आत्मा'' त्याप्रमाणे निर्विकार आत्मस्वरूपाचें प्रत्यक्ष ज्ञानहि आत्मस्वरूपाला जगद्रूपाशीं अभिन्न पाहूनच होऊं शकतें. दुसऱ्या रीतीनें होऊं शकत नाही. सोन्याचें ज्ञान व अलंकाराचें ज्ञान जसें अभिन्नरूपानेच होतें, म्हणजे सोन्याच्या ठिकाणी अलंकाराच्या आकाराचें ज्ञान व अलंकाराच्या आकाराचे ठिकाणी सोन्याचें ज्ञान होतें, त्याप्रमाणे निर्गुणाचें ज्ञान व सगुणाचें ज्ञान नेहमीं अभिन्नरूपानेंच होतें, एकमेकांपासून निराळे काढून होत नाही.

आकाशीं दिसे दुसरें। तें अभ्र जैं विरे। तैं गगनचि कां भरे। विश्व जैसें॥ ३८५॥
तैसें चित्त लया जाये। आणि चैतन्यचि आघवें होये। ऐसी प्राप्ति सुखोपायें। आहे येणें॥ ३८६॥
या सोपिया योगस्थिती। उकलु देखिला गा बहुतीं। संकल्पाचिया संपत्ती। रुसोनियां॥ ३८७॥
ते सुखाचेनि सांगातें। आलें परब्रह्मा आंतौते। तेथ लवण जैसें जळातें। सांडूं नेणे॥ ३८८॥
तैसें होय तिये मेळीं। मग सामरस्याचिया राउळीं। महासुखाची दिवाळी। जगेंसि दिसे॥ ३८९॥

अर्थ—आकाशांत अभ्र आलें असतां, तें अभ्र आकाशाहून निराळें दिसतें, मग अभ्र जेव्हा नाहीसें होतें, तेव्हा सर्वत्र जिकडें तिकडे जगांत आकाशच भरलेलें दिसतें. ॥ ३८५ ॥ त्याप्रमाणें चित्ताचा लय झाला की सर्व दूर चेतनाचाच अनुभव येतो. या योगाने अशा सुलभ रीतीने आत्मप्राप्ति होते. ॥ ६८६ ॥ संकल्पानुसार प्राप्त होणाऱ्या संपत्तीचा—म्हणजे सर्व प्रकारच्या विषयसुखाच्या कामनेचा—कंटाळा उत्पन्न होऊन, पुष्कळ लोकांनी या सोप्या योगस्थितीच्या द्वारा आत्मस्वरूपाचा उलगडा किंवा निर्णय करून घेतला—म्हणजे आपल्या खऱ्या आत्मस्वरूपाचा अनुभव घेतला. ॥ ३८७ ॥ ते आत्मस्वरूपाच्या अत्यंत सुखाचा अनुभव घेऊन परब्रह्मांत मिळतात; मग मीठ पाण्यांत मिळाल्यावर जसें पाण्याहून अलग होत नाही. ॥ ३८८ ॥ त्याप्रमाणेच परब्रह्माशीं मिळणें होतें. त्या समरसतेच्या मंदीरांत जगासह ते महासुखाची दिवाळी पाहतात. ॥ ३८९ ॥

गूढार्थदीपिका—जगाची जडविनाशी दुखरूप व ब्रह्माहून भिन्न जी वस्तुस्थिति ती नाहीशी होऊन, तो सर्व संसार ब्रह्मसुखाचा होतो.

ऐसें आपुले पायवरी। चालिजे आपुले पाठीवरी। हें पार्था नागवे तरी। आन ऐकें॥ ३९०॥

अर्थ—अर्जुना! असा हा आपल्या पायाने आपल्या पाठीवर चालण्याचा मार्ग आहे. मार्ग आटोक्यांत येत नसेल, तर दुसरा मार्ग ऐक. ॥ ३९० ॥

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि। ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः॥ २९॥
यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति। तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति॥ ३०॥

अर्थ—जो, सर्व भूतांचे ठिकाणीं मी आहे व माझे ठिकाणीं सर्व भूतें आहेत असे पहातो. किंवा सर्व चराचर सृष्टीचे ठिकाणीं एक ब्रह्मच भरलें आहे असें जो पाहतो त्याचें अंत:करण आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर झालेलें असतें. ॥ २९ ॥ जो मला सर्व वस्तुमात्रांत पाहतो व सर्व वस्तुमात्र माझे ठिकाणी पाहतो, त्याला मी अंतरत नाही व तो मला अंतरत नाही. ॥ ३० ॥

तरि मी तंव सकळ देहीं। असें एथ विचारु नाहीं। आणि तैसेंचि माझ्या ठायीं। सकळ असे॥ ३९१॥
हें ऐसेंचि संचलें। परस्परें मिसळलें। बुद्धि घेपे एतुलें। होआवें गा॥ ३९२॥
एऱ्हवीं तरी अर्जुना। जो एकवटलिया भावना। सर्वभूतीं अभिन्ना। मातें भजे॥ ३९३॥
भूतांचेनि अनेकपणें। अनेक नोहे अंत:करणें। केवल एकत्वचि माझें जाणे। सर्वत्र जो॥ ३९४॥
मग तो एक हा मियां। बोलतां दिसतसे वायां। एऱ्हवीं न बोलिजे तरि धनंजया। तो मीचि आहें॥ ३९५॥
दीपा आणि प्रकाशा। एकवंकीचा पाडु जैसा। तो माझां ठायीं तैसा। मी तयामाजीं॥ ३९६॥
जैसा उदकाचेनि आयुष्यें रसु। कां गगनाचेनि मानें अवकाशु। तैसा माझेनि रूपें रूपसु। पुरुषु तो गा॥ ३९७॥

अर्थ—अर्जुना! तरी मी सर्व देहांत आहे, तसेंच सर्व प्राणिमात्र माझ्या ठिकाणीं आहेत यांत शंकाच नाहीं. ॥ ३९१ ॥ अशी कायमचीच स्थिति आहे व परस्परात मिसळलेले आहेत असें बुद्धीने ग्रहण केलें जाईल, एवढें आपण व्हावयास पाहिजे. ॥ ३९२ ॥ एरव्हीं अर्जुना! जो, सर्व भूतांचे ठिकाणीं एक परमात्मवस्तुच भरली आहे, अशा एकवस्तुभावनेने किंवा अद्वैत भावनेने सर्व भूतांचे ठिकाणीं असणाऱ्या माझें भजन करतो. ॥ ३९३ ॥ भूतांचे अनेकपण दिसत असलें, तरी अंत:करणाने भूतांचे अनेकपण घेतलें जात नाही; उलट सर्वत्र मी केवळ एकच आहे असेंच तो जाणतो. ॥ ३९४ ॥ तो मग माझ्याशीं एक झाला हें बोलणेंच व्यर्थ आहे, कारण हें बोललें नाही, तरी अर्जुना! तो मीच आहे (म्हणजे माझ्याशी ऐक्य पावलेलाच आहे). ॥ ३९५ ॥ दिवा व दिव्याचा प्रकाश, या दोन्ही ठिकाणीं दोघांचें ऐक्य मानण्याजोगी, ज्या तऱ्हेची त्यांची बरोबरी आहे, त्याप्रमाणे तो माझ्या ठिकाणीं आहे व मी त्याचे ठिकाणीं आहे. ॥ ३९६ ॥ ज्याप्रमाणे पाण्याचें आयुष्य म्हणजेच रसाचें आयुष्य होय किंवा आकाशाची व्यापकता म्हणजे अवकाश अथवा पोकळीची व्यापकता असते, त्याप्रमाणे माझ्या रूपानेच तो पुरुष असतो. ॥ ३९७ ॥

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः। सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥ ३१ ॥

अर्थ—सर्व भूतमात्राचे ठिकाणीं माझेंच एक वस्तुत्व किंवा मीच एक वस्तु आहे असें जाणून जो माझें भजन करतो, तो देहादिकांसह असला तरी सर्वथा तो माझ्याशींच मिळालेला असतो. ॥ ३१ ॥

जेणें ऐक्याचिये दिठी। सर्वत्र मातेंचि किरीटी। देखिला जैसा पटीं। तंतु एकु ॥ ३९८ ॥
कां स्वरूपें तरी बहुतें आहाती। परी तैसीं सोनीं बहुवें न होती। ऐसी ऐक्याचळाची स्थिती। केली जेणें ॥ ३९९ ॥
नातरी वृक्षांचीं पानें जेतुलीं। तेतुलीं रोपें नाहीं लाविलीं। ऐसी अद्वैतदिवसें पाहली। रात्री जया ॥ ४०० ॥
तो पंचात्मकीं सांपडे। तरि मग सांग पां कैसेनि अडे। जो प्रतीतीचेनि पाडें। मजसीं तुके ॥ ४०१ ॥
माझें व्यापकपण आघवें। गवसलें तयाचेनि अनुभवे। तरी न म्हणतां स्वभावें। व्यापकु जाहला ॥ ४०२ ॥
आतां शरीरीं तरी आहे। परी शरीराचा तो नोहे। ऐसें बोलवरी होये। तें करूं ये काई ॥ ४०३ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे सर्व वस्त्रांत एक सूतच असतें, त्याप्रमाणे सर्वत्र एक मीच भरलों आहे, अशा या अद्वैत दृष्टीने ज्याने सर्वत्र मला एकालाच पाहिलें. ॥ ३९८ ॥ किंवा ज्याप्रमाणे सोन्यापासून होणाऱ्या अलंकाराचे आकार, पुष्कळ प्रकारचे असले तरी सोनें बहु होत नाही, तें एकच राहतें, त्याप्रमाणे ज्याने आपल्या बुद्धींत माझ्या ऐक्यरूप पर्वताची स्थिति मानिली. ॥ ३९९ ॥ किंवा ज्याप्रमाणे झाडाची जितकीं पानें असतात, तितकीं कांही झाडाची रोपें लाविलीं जात नाहीत. त्याप्रमाणे अशा अद्वैतदृष्टीच्या प्रकाशाने ज्याचा जगत्‌रूपी द्वैतआंधार नाहीसा झाला. ॥ ४०० ॥ अशा रीतीने जो आपल्या अद्वैतज्ञानदृष्टीने माझ्या तुल्य झाला, तो या पांचभौतिक देहात सांपडला असला, तरी त्यांतच कसा अडकून राहील? (म्हणजे मी देहापुरता आहे असें तो आपल्याला मर्यादित कसा समजूं शकेल?) ॥ ४०१ ॥ माझें संपूर्ण व्यापकपण त्याने आपल्या अद्वैत अनुभवाने प्राप्त करून घेतलें असतें; म्हणून तो व्यापक झाला असें न म्हणतां देखील स्वभावत: तो व्यापक होतो. ॥ ४०२ ॥ आतां तो शरीरांत तरी राहतो, पण शरीराचा होत नाही, हे शब्दाने सांगतां येईल असे करतां येईल काय? ॥ ४०३ ॥

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन। सुखं वा यदि वा दु:खं स योगी परमो मतः ॥ ३२ ॥

अर्थ—सर्व प्राणिमात्र व सुखदु:ख देखील जो आत्मस्वरूप पहातो, तो परमयोगी होय. ॥ ३२ ॥

म्हणोनि असो तें विशेषें। आपणपेयासारिखें। जो चराचर देखे। अखंडित ॥ ४०४ ॥
सुखदु:खादि वर्मे। कां शुभाशुभें कर्मे। दोनी ऐसीं मनोधर्मे। नेणेचि जो ॥ ४०५ ॥
हे समविषम भाव। आणिकही विचित्र जें सर्व। तें मानी जैसे अवयव। आपुले होती ॥ ४०६ ॥
हें एकैक काय सांगावें। जया त्रैलोक्यचि आघवें। मी ऐसें स्वभावें। बोधा आलें ॥ ४०७ ॥

अर्थ—परंतु अर्जुना! हे विशेष वर्णन असो, किंवा जो पुरुष सर्व चराचरसृष्टि अखंड आपल्यासारखीच पाहतो. ॥ ४०४ ॥ सुखदु:खादिक जीवदशेचें वर्म किंवा पापपुण्यकर्मे ही दोन्ही मनाचे धर्म आहेत असे तो जाणत

नाही. ॥ ४०५ ॥ हें सुखदु:ख व पापपुण्यासारखे समविषम भाव आणि याहून विविध प्रकारचे जे भाव असतील ते सर्व तो आपलेच अवयव आहेत असे मानतो. ॥ ४०६ ॥ अर्जुना! हे एक एक किती सांगू! ज्याला संपूर्ण त्रैलोक्यच मी झालों आहे असा अनुभव आला. ॥ ४०७ ॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे शरीराचे ठिकाणीं अनेक अवयव असले, तरी ते सर्व अवयव मिळूनच एक शरीर आपण समजतों आणि तें मी आहे असें समजून त्या शरीरावर प्रेम करतों. त्यामुळेच कोणतेहि अवयव आपल्याला आपल्याहून भिन्न वाटत नाहीत व सर्व अवयवांवर आपलें सारखें प्रेम असतें. त्याप्रमाणे सर्व जगतांतील पदार्थमात्र मिळून एक मी अद्वैतवस्तु आहे असा अद्वैतबोध ज्याच्या ठिकाणीं झाला, तोहि ब्रह्मस्वरूपच होतो.

तयाही देह एकु कीर आथी। लौकिकीं सुखदु:खी तयातें म्हणती। परी आम्हांतें ऐसीचि प्रतीती। परब्रह्मचि हा॥ ४०८ ॥
म्हणोनि आपणपां विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे। ऐसें साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा॥ ४०९ ॥
हें तूतें बहुतीं प्रसंगीं। आम्ही म्हणों याचिलागीं। जे साम्यापरौती जगीं। प्राप्ति नाहीं॥ ४१० ॥

अर्थ—त्यांचे ठिकाणींहि देह असतो, साधारण माणसें त्याला सुखदु:ख होतें असें म्हणतात, पण, अर्जुना! तो परब्रह्मच आहे असा आमचा अनुभव असतो. ॥ ४०८ ॥ म्हणून आपल्या ठिकाणीं संपूर्ण जग पाहावें किंवा आपणच सर्व विश्व आहों अशा समदृष्टीचेंच अर्जुना! चिंतन करावें. ॥ ४०९ ॥ साम्यस्थितीपेक्षा दुसरी जगांत श्रेष्ठ प्राप्ति कोणती नाही, हें वेळोवेळीं तुला याच कारणामुळें मी सांगत आलों आहे. ॥ ४१० ॥

अर्जुन उवाच

योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन। एतस्याहं न पश्यामि चञ्चलत्वात्स्थितिं स्थिराम्॥ ३३ ॥
चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम्। तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम्॥ ३४॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, मधुसूदना! हा जो आपण साम्यबुद्धिरूप योग सांगितला त्याची मनाच्या चंचलपणामुळें स्थिर स्थिति राहील असें मला दिसत नाही. ॥ ३३ ॥ हे कृष्णा! हें मन अति चंचल असून, शरीर इंद्रियें यांना क्षोभविणारें आहे, बलवान् आहे व लवकर स्वाधीन होत नाही. अशा मनाचा निग्रह करणें, वायूचा निग्रह करण्यासारखें दुष्कर आहे. ॥ ३४ ॥

तंव अर्जुन म्हणे देवा। तुम्ही सांगा कीर आमुचिया कणवा। परी न पुरों जी स्वभावा। मनाचिया॥ ४११ ॥
हें मन कैसें केवढें। ऐसें पाहों म्हणों तरी न सांपडे। एऱ्हवीं राहाटावया थोडें। त्रैलोक्य यया॥ ४१२ ॥
म्हणोनि ऐसें कैंसें घडेल। जे मर्कट समाधी येईल। कां राहे म्हणितलिया राहेल। महावातु॥ ४१३ ॥
जें बुद्धीतें सळी। निश्चयातें टाळी। धैर्येसीं हातफळी। मिळऊनि जाय॥ ४१४ ॥
जें विवेकातें भुलवी। संतोषासी चाड लावी। बैसिजे तरी हिंडवी। दाही दिशा॥ ४१५ ॥
जें निरोधलें घे उवावो। जया संयमुचि होय सावावो। तें मन आपुला स्वभावो। सांडील काई॥ ४१६ ॥
म्हणोनि मन एक निश्चळ राहेल। मग आम्हांसि साम्य येईल। हें विशेषेंही न घडेल। याचिलागीं॥ ४१७ ॥

अर्थ—तेव्हा अर्जुन म्हणतो, देवा! खरोखर तुम्ही आमच्या अत्यंत प्रेमाने आमची कींव करतां व हा उपदेश करतां यांत शंका नाही, पण आम्ही या मनाच्या स्वभावाला पुरें पडत नाही. ॥ ४११ ॥ हें मन कसें आहे, केवढें आहे, हें जर पाहूं म्हटलें तर हातीं सांपडत नाही; पण त्याच्या भटकण्यास त्रैलोक्यहि कमीच पडतें. ॥ ४१२ ॥ म्हणून जें हें मन अत्यंत मर्कट-म्हणजे चंचल-आहे तें स्थिर होईल असें कसें शक्य आहे? सोसाट्याच्या वाऱ्याला, वाहणें थांबीव म्हटल्यास त्याचें वाहणें बंद होईल काय. ॥ ४१३ ॥ जें बुद्धीलाहि छळतें जें निश्चय बाणूं देत नाही, धैर्यालाहि हातोहातीं आपल्यांत मिळवून घेतें-म्हणजे आपल्या स्वाधीन करून घेते. ॥ ४१४ ॥ जें मन विवेकालाहि भ्रम उत्पन्न करितें, संतोषालाहि इच्छा उत्पन्न करतें, स्वस्थ बसूं म्हटलें, तरी दाही दिशेला हिंडवितें. ॥ ४१५ ॥ जें निरोधिलें असतां अधिक उसळतें, ज्याला संयम देखील सहायभूत होतो, असें हें मन आपला स्वभाव टाकून स्थिर होईल काय? ॥ ४१६ ॥ म्हणून मन एकदाचें स्थिर होऊन, आपली बुद्धि सम होईल हें विशेषेंकरून घडून येणार नाही. ॥ ४१७ ॥

श्रीभगवानुवाच

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् । अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते॥ ३५॥
असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः । वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः॥ ३६॥

अर्थ—भगवान म्हणतात, हे महाबाहो अर्जुना! मन अत्यंत चंचल आहे व त्याचा निग्रह करणें अत्यंत कठीण आहे, यांत शंकाच नाही, पण कौंतेया! अभ्यास व वैराग्य यांच्या सहायाने तें आवरलें जातें.॥ ३५॥ अभ्यास व वैराग्य यांनीं आपलें मन जे आवरूं पाहत नाहीत, त्यांना साम्यबुद्धिरूप योग साधणें शक्य नाहीं, असें माझेहि मत आहे. पण अभ्यास व वैराग्य या उपायांनी ज्यांनी आपलें मन ताब्यांत आणण्याचा प्रयत्न केला, त्याला हा योग साधणें शक्य आहे.॥ ३६॥

तंव कृष्ण म्हणती साचचि। बोलत आहासि तें तैसेंचि। यया मनाचा कीर चपळचि। स्वभावो गा॥ ४१८॥
परि वैराग्याचेनि आधारें। जरि लाविलें अभ्यासाचिये मोहरें। तरि केतुलेनि एके अवसरें। स्थिरावेल॥ ४१९॥
कां जें यया मनाचें एक निकें। जे हें देखिले गोडीचिया ठाया सोके। म्हणोनि अनुभवसुखचि कवतिकें। दावीत जाइजे॥ ४२०॥
एऱ्हवीं विरक्ति जयांसि नाहीं। जे अभ्यासीं न रिघती कहीं। तयां नाकळे हें आम्हीही। न मनूं कायी॥ ४२१॥
परि यमनियमांचिया वाटा न वचिजे। कहीं वैराग्याची से न करिजे। केवळ विषयजळीं ठाकिजे। बुडी देउनी॥ ४२२॥
यया जालिया मानसा कहीं। युक्तीची कांबी लागली नाहीं। तरी निश्चळ होईल काई। कैसेनि सांगें॥ ४२३॥
म्हणोनि मनाचा निग्रहो होये। ऐसा उपाय जो आहे। तो आरंभीं मग नोहे। कैसा पाहों॥ ४२४॥
तरी योगसाधन जितुकें। तें अवघेंचि काय लटिकें। परि आपणपयां अभ्यासूं न ठाके। हेंचि म्हणे॥ ४२५॥
आंगीं योगाचें होय बळ। तरि मन केतुलें चपळ। काय महदादि हें सकळ। आपु नोहे॥ ४२६॥
तेथ अर्जुनु म्हणे निकें। देवो बोलती तें न चुके। साच योगबळेंसीं न तुके। मनोबळ॥ ४२७॥
तरि तोचि योगु कैसा केवीं जाणों। आम्ही येतुले दिवस याची मातुही नेणों। म्हणोनि मनातें जी म्हणों। अनावर हें॥ ४२८॥
हा आतां अघवेया जन्मा। तुझेनि प्रसादें पुरुषोत्तमा। योगपरिचयो आम्हां। जाहला आजी॥ ४२९॥

अर्थ—अर्जुनाचें भाषण ऐकून, भगवान म्हणतात, अर्जुना! खरोखरच तूं म्हणतोस तसेंच तें आहे. या मनाचा स्वभाव चंचल आहे हें निश्चित.॥ ४१८॥ पण वैराग्याच्या सहायाने, जर त्याला अभ्यासाकडे लाविलें, तर कांही काळाने तें स्थिर होईलच.॥ ४१९॥ कारण मन हें चंचल आहे, तरी त्याचा एक उत्तम स्वभाव आहे, तो हा की, जेथे त्या मनाला गोडी लागेल, तेथें तें आपण होऊन चिकटतें म्हणजे स्थिर होते; म्हणून त्याला आत्मानुभवाचे सुख दाखवित जावें.॥ ४२०॥ एऱ्हवीं ज्यांना वैराग्य बाणलें नाहीं, म्हणून जे मनाचा निग्रह करण्याचा अभ्यास करण्यास प्रवृत्त होत नाहीत, त्यांना हा साम्यबुद्धिरूप योग साधणें शक्य नाही हे आम्ही मानित नाही काय?॥ ४२१॥ यमनियमांच्या मार्गाने कधीं जायचें नाही, कधीं वैराग्याची आठवणहि करायचीं नाही आणि केवळ विषयरूपी पाण्यांतच बुडून राहायचें.॥ ४२२॥ या मनाला जन्मापासून कधीं आवरण्याचा चिमटा बसलाच नाही, तर ते कशा रीतींने स्थिर होईल, सांग बरें!॥ ४२३॥ म्हणून ज्या उपायांने मनाचा निग्रह होतो असे सांगितले आहे, तो करायला सुरुवात कर, मग कसें मन स्थिर होत नाही, ते पाहूं!॥ ४२४॥ योगमार्गात जेवढे मनोनिग्रहाचे उपाय सांगितले आहेत ते सर्वच निरर्थक आहेत काय? पण माझ्याच्याने अभ्यासाचे कष्ट होत नाहीत, असें म्हण.॥ ४२५॥ आपल्या आंगी योगाभ्यासाचें सामर्थ्य आलें, तर सर्व महदादिब्रह्मांड स्वाधीन होत नाही काय! अशा योगाच्या सामर्थ्यापुढें त्या मनाची चपलता काय पदार्थ आहे!॥ ४२६॥ तेव्हां अर्जुन म्हणाला, देवा! खरोखर तुमचें म्हणणें खोटें नाही. खरोखर मनाचें सामर्थ्य, योग सामर्थ्याची बरोबरी करूं शकत नाही.॥ ४२७॥ पण तो योग कसा असतो व कसा जाणायचा, याची वार्ताहि इतके दिवस आमच्या कानावर नसल्यामुळें, आम्ही मन अनावर आहे असें म्हणत होतो.॥ ४२८॥ सर्व आयुष्यांत ही आतांच तुझ्यां कृपाप्रसादाने योगाची आम्हांला ओळख झाली.॥ ४२९॥

अर्जुन उवाच

अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः। अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति॥ ३७॥
कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति। अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि॥ ३८॥
एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः। त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते॥ ३९॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, कृष्णा! श्रद्धेने योग करायला लागला, पण इंद्रियनिग्रह साधला नसल्यामुळें, मरणकाळीं योग, म्हणजें ब्रह्माचे ठिकाणीं स्थिर बुद्धि, राहिली नाही, असा योगसिद्धि प्राप्त न झालेला पुरुष कोणत्या गतीला जातो?॥ ३७॥ आधारापासून पडलेल्या अभ्राप्रमाणे कर्ममार्ग व योगमार्ग या दोन्हीपासून भ्रष्ट निराधार व ब्रह्मप्राप्तीच्या मार्गांत मोह पावलेला असा हा पुरुष नाश तर पावत नाही!॥ ३८॥ हा माझा संशय, श्रीकृष्णा! निःशेष नाहीसा करण्यास तूंच एक योग्य आहेस. तुझ्यावाचून माझ्या संशयाचें निराकरण करणारा दुसरा कोणी दिसत नाही.॥ ३९॥

परि आणिक एक गोसांविया। मज संशयो असे साविया। तो तूंवांचूनि फेडावया। समर्थु नाहीं॥ ४३०॥
म्हणोनि सांगें श्रीगोविंदा। कवण एकु मोक्षपदा। झोंबत होत श्रद्धा। उपायेंविण॥ ४३१॥
इंद्रियग्रामोनि निगाला। आस्थेचिया वाटा लागला। आत्मसिद्धीचिया पुढिला। नगरा यावया॥ ४३२॥
तंव आत्मसिद्धि न ठकेचि। आणि मागुतें न येववेचि। ऐसा अस्तु गेला माझारींचि। आयुष्यभानु॥ ४३३॥
जैसें अकाळीं आभाळ। अळुमाळु सपातळ। विपायें आलें केवळ। वसे ना वर्षे॥ ४३४॥
तैसीं दोन्ही दुरावलीं। जे प्राप्ति तंव अलग ठेली। आणि अप्राप्तिही सांडवली। श्रद्धा तया॥ ४३५॥
ऐसा दोहोंळा अंतरला का जीं। जो श्रद्धेच्या समाजीं। बुडाला तया हो जी। कवण गति॥ ४३६॥

अर्थ—पण हे स्वामी भगवंता! आणखी एक खराच मला संशय आहे. तो नाहीसा करणारा तुझ्यावांचून दुसरा समर्थ नाही.॥ ४३०॥ म्हणून तुला विचारतों, भगवंता, सांग. कोणी पुरुष इंद्रियांचा निरोध न करितां केवळ श्रद्धेच्या बळावर योगाभ्यासाने मोक्षपद मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे.॥ ४३१॥ इंद्रियांच्या गांवाहून निघून, पुढील आत्मसिद्धीच्या नगराला जाण्याकरितां श्रद्धेच्या वाटेने जाऊं लागला.॥ ४३२॥ पण आत्मसिद्धि प्राप्त झाली नाही आणि मागें पाऊलहि घेववत नाही, अशा स्थितींत आयुष्यरूपी सूर्य मध्येंच मावळला.॥ ४३३॥ ज्याप्रमाणे अकाळीं केव्हां केव्हां जे अभ्र येते ते फार दाट राहत नाही व त्यामुळें ते फार वेळ राहत नाही व वर्षावहि होत नाही.॥ ४३४॥ त्याप्रमाणे दोन्ही अंतरली, कारण आत्मप्राप्ति दूर राहिली व श्रद्धेमुळें आत्मप्राप्ति होणार नाही असेंहि वाटत नाही.॥ ४३५॥ याप्रमाणे दोहोलाहि जो पुरुष अंतरला, तरी जो श्रद्धा धरूनच मेला, त्याची गति काय होईल?॥ ४३६॥

श्रीभगवानुवाच

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते। न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति॥ ४०॥

अर्थ—भगवान म्हणतात, बा अर्जुना! इहलोकांत किंवा परलोकांत त्याची अधोगति होत नाही. कारण पुण्यकर्में करणारा, बाबा! कधीं दुर्गतीला जात नाही.॥ ४०॥

तंव कृष्ण म्हणती पार्था। जया मोक्षसुखीं आस्था। तया मोक्षावांचूनि अन्यथा। गती आहे गा॥ ४३७॥

अर्थ—तेव्हा श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना! ज्याला मोक्षाच्या ठिकाणीं दृढ श्रद्धा आहे. त्याला मोक्षावांचून दुसरी गति कशी राहील?॥ ४३७॥

गूढार्थदीपिका—भगवत्प्राप्तीकरितां केलेला प्रयत्न, कांही प्रतिबंधामुळें तात्काळ फलदायी झाला नाही, तरी विषयसुखाच्या प्राप्तीकरितां केलेल्या प्रयत्नाप्रमाणे तो खंडित होऊन निष्फळ होत नाही. भगवत्कृपेने, पुढें त्या प्रयत्नाकडे तो अनायासें वाहविला जातो व शेवटीं त्याला भगवत्प्राप्ति होते.

परि एतुलेंचि एक घडे। जें माझारीं विसवावें पडे। तेंही परी ऐसेनि सुरवाडें। जो देवां नाहीं॥ ४३८॥
एऱ्हवीं अभ्यासाचां उचलता। पाउलीं जरी चालता। तरि दिवसाआधीं ठाकिता। सोऽहंसिद्धीतें॥ ४३९॥

परि तेतुला वेगु नव्हेचि। म्हणऊनि विसांवा तरी निकाचि। पाठीं मोक्षु तंव तैसाचि। ठेविला असे॥ ४४०॥

अर्थ—पण एवढेंच मात्र होतें की, मध्यें थोडी त्याला विश्रांति घ्यावी लागते व तीहि विश्रांति देवालाहि प्राप्त होणार नाही, अशी श्रेष्ठ सुखरूप असते. ॥ ४३८ ॥ जर अभ्यासाच्या उचलत्या पावलाने तो चालतां तर त्याने दिवस म्हणजे आयुष्य संपण्याचे अगोदर सोहंसिद्धि गांठली असती. ॥ ४३९ ॥ पण तेवढा वेग नव्हता म्हणून झालेला विसावा ही योग्यच ठरतो. पण शेवटीं त्याला मोक्षप्राप्ति ठेविलीच असते. ॥ ४४० ॥

प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः। शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते॥ ४१॥
अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्। एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम्॥ ४२॥

अर्थ—पुण्यवान पुरुष ज्या लोकांना जातात, त्या लोकांना जाऊन, तेथें पुष्कळ वर्षें राहतात व मग पवित्र व श्रीमंत अशा घरी ते योगभ्रष्ट जन्म घेतात. ॥ ४१ ॥ किंवा बुद्धिमान योग्यांचे कुळांत जन्म घेतात पण हे असे आहे की, अशा प्रकारचा जन्म इतरांना या लोकामध्ये दुर्लभ असतो. ॥ ४२ ॥

ऐकें कवतिक हें कैसें। जे शतमखा लोक सायासें। ते तो पावे अनायासें। कैवल्यकामु॥ ४४१॥
मग तेथिंचे जे अमोघ। अलौकिक भोग। भोगितांही सांग। कांटाळे मन॥ ४४२॥
हा अंतरायो अवचितां। कां वोढवला श्रीभगवंता। ऐसा दिविभोग भोगितां। अनुतापी नित्य॥ ४४३॥
पाठीं जन्मे संसारीं। परी सकळ धर्मांचिया माहेरीं। लांबा उगवे आगरीं। विभवश्रियेचां॥ ४४४॥
जयातें नीतिपंथें चालिजे। सत्यधूत बोलिजे। देखावें तें देखिजे। शास्त्रदृष्टी॥ ४४५॥
वेद तो जागेश्वरु। जया व्यवसाय निजाचारु। सारासार विचारु। मंत्री जया॥ ४४६॥
जयाच्या कुळीं चिंता। जाली ईश्वराची पतिव्रता। जयातें गृहदेवता। आदि ऋद्धि॥ ४४७॥
ऐसी निजपुण्याचिया जोडी। वाढिन्नली सर्वसुखाची कुळवाडी। तिये जन्मे तो सुरवाडी। योगच्युतु॥ ४४८॥
अथवा ज्ञानाग्निहोत्री। जे परब्रह्म श्रोत्री। महासुखक्षेत्रीं। आदिवंत॥ ४४९॥
जे सिद्धांताचिया सिंहासनीं। राज्य करिती त्रिभुवनीं। जे कूजती कोकील वनीं। संतोषाच्या॥ ४५०॥
जे विवेकद्रुमाचे मुळीं। बैसले आहाति नित्य फळीं। तया योगियांचियां कुळीं। जन्म पावे॥ ४५१॥

अर्थ—अर्जुना! कशी मौज आहे, ती ऐक. जे इंद्रादिलोक, शंभर यज्ञ करणाऱ्यांनाहि मोठ्या कष्टाने मिळतात, ते लोक, कैवल्याची इच्छा करणाऱ्या या योगभ्रष्टाला अनायासें मिळतात. ॥ ४४१ ॥ मग त्या लोकांतील अलौकिक व इच्छा केल्याबरोबर मिळणारे दिव्य भोग भोगत असतांना त्याचें मन पूर्ण कंटाळतें. ॥ ४४२ ॥ आणि स्वर्गातील भोग भोगित असतांना तो, "भगवंता! तुझ्या प्राप्तींत हें विघ्न अकस्मात् कसें उत्पन्न झालें," असा नित्य अनुताप करीत असतो. ॥ ४४३ ॥ पण सर्व धर्माचें केवळ माहेरघर व सर्व संपत्तीचें कोठार असे जे कुळ असेल, त्या कुळांत तो, नव्या कोंभाप्रमाणे नंतर पुनः मृत्युलोकांत जन्म घेतो. ॥ ४४४ ॥ ज्या कुळांतील माणसांचें वागणें नीतीच्या मार्गानेच आहे, सत्याने शुद्ध केलेलेंच बोललें जातें, जे जे पहावयाचे ते ते शास्त्रदृष्टीनेच पाहिले जाते. ॥ ४४५ ॥ ज्या कुळांत वेद हे जागतें दैवत आहे, विहित धर्माचरण हा ज्यांचा धंदा व सारासार विचार हा ज्या कुळांत सल्ला देणारा मंत्री आहे. ॥ ४४६ ॥ ज्या कुळांत चिंता ही ईश्वराची पतिव्रता झाली—म्हणजे पतिव्रतेला जशी अखंड पतीची चिंता असते त्याप्रमाणे ज्या कुळांत ईश्वरप्राप्तीचीच चिंता वागवितात—आणि ज्या कुळांत ऋद्धि ह्या गृहदेवता आहेत. ॥ ४४७ ॥ याप्रमाणे आपल्या पुण्याच्या योगाने, ज्या कुळांतील पुरुषांनी अशी जोडी करून घेतली व जें कुळ म्हणजे संपूर्ण सुखाचें साक्षात् उदीमच होय, अशा उत्तम कुळांत तो जन्म घेतो. ॥ ४४८ ॥ अथवा ज्या कुळांत ज्ञानरूपी अग्नि ठेवून अग्निहोत्र चाललें आहे असे परब्रह्माचे उपासक आहेत व महासुखरूपी म्हणजे ब्रह्मसुखरूपी क्षेत्रांतील मूळचे रहिवासी आहेत. ॥ ४४९ ॥ जें अद्वैतब्रह्मसिद्धान्ताचे सिंहासनावर त्रैलोक्याचें राज्य करितात—म्हणजे सर्व ब्रह्मांड अद्वैतरूप पाहतात व जे परमसमाधानाचे वनामधील मधुर स्वर काढणारे कोकिळा आहेत—म्हणजे जे सदा प्रसन्नचित्त असतात. ॥ ४५० ॥ मोक्षरूपी फळांनी युक्त अशा आत्मानात्मविवेकरूपी वृक्षाचे मुळाशीं जे बसलेले असतात, अशा योग्यांच्या कुळांत ते जन्माला येतात. ॥ ४५१ ॥

तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् । यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन ॥ ४३ ॥

अर्थ—त्याठिकाणीं त्यांना पूर्वदेहांतील सात्विकबुद्धि प्राप्त होते व अर्जुना! त्या सात्विकबुद्धीच्या संस्काराने तो या जन्मांत पुनः मोक्षसिद्धीकरितां अधिक नेटाने प्रयत्न करतो. ॥ ४३ ॥

मोटकी देहाकृति उमटे। आणि निजज्ञानाची पहाट फुटे। सूर्यापुढां प्रगटे। प्रकाशु जैसा ॥ ४५२ ॥
तैशी दशेची वाट न पाहतां। वयसेचिया गांवा न येतां। बाळपणींच सर्वज्ञता। वरी तयातें ॥ ४५३ ॥
तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें। मनचि सारस्वतें दुभे। मग सकळ शास्त्रें स्वयंभें। निघती मुखें ॥ ४५४ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे सूर्य उगवण्यापूर्वी उजेड पडतो त्याप्रमाणे योगभ्रष्टालाहि जन्मल्याबरोबर जें बाळशरीर प्राप्त होतें, त्या शरीरातच आत्मज्ञानाचा उदय होतो. ॥ ४५२ ॥ तशीच प्रौढ दशा प्राप्त होण्याची वाट न पाहतां किंवा वयस्कपणाच्या गांवाला येण्यापूर्वी, बाळपणींच त्याला सर्वज्ञता माळ घालते. ॥ ४५३ ॥ अशा सिद्धबुद्धीच्या प्राप्तीमुळें त्याचें मनच सर्व विद्यासंपन्न होतें व अध्ययनावांचून आपोआप त्याचे मुखांतून सर्व शास्त्रें प्रगट होतात. ॥ ४५४ ॥

गूढार्थदीपिका—सिद्ध प्रज्ञेचेनि लाभे—योगशास्त्रांतील समाधिपदांत जी ऋतंभरा' प्रज्ञा म्हणून सांगितली आहे तिलाच येथे श्री ज्ञानेश्वर माऊलींनी 'सिद्धप्रज्ञा' हें नांव देऊन उल्लेख केला आहे.

बुद्धि ही मुळांत सत्वगुणाचें कार्य असल्यामुळें शुद्ध स्वच्छ कांचेंतून ज्याप्रमाणे वस्तूचें यथार्थ ज्ञान होतें त्याप्रमाणे बुद्धिहि मूळच्या स्वरूपांत यथार्थ पदार्थज्ञान ग्रहण करणारीच आहे. पण जीवाच्या ठिकाणीं असणाऱ्या आवरणादि दोषामुळे ती मलीन झाली आहे. विपरीत कांचेंतून जसा पदार्थ विकृत दिसतो, त्याप्रमाणे जीवाची बुद्धि विपरीतार्थ ग्रहणकरणारी झाली आहे. अत्यंत श्रद्धेने शास्त्रैकनिष्ठ होऊन, परमेश्वर प्राप्तीकरितां निष्कामचित्ताने कर्मयोगादिकांचे साधन करणाऱ्या पुरुषाची बुद्धि, शुद्ध होऊन आपल्या पूर्वरूपाला येते.

बुद्धीचें हें पूर्वरूप म्हणजे तिचें मूळचें सिद्धस्वरूप असल्यामुळें या रूपाला आल्यानंतर तिला सिद्धप्रज्ञा म्हणतात. पूर्वरूपाला आलेली बुद्धि जें खरें असेंल तेच जाणते व तेच ग्रहण करते. तिच्या ठिकाणी कधीं विपरीत ज्ञानाचा गंध नसतो; म्हणूनच तिला योगशास्त्रांत 'ऋतंभराप्रज्ञा' म्हणतात. याच बुद्धीच्या सहायाने अध्यात्मप्रसाद किंवा आत्मज्ञान होत असते.

ऐसें जें जन्म। जयालागीं देव सकाम। स्वर्गीं ठेले जप होम। करिती सदा ॥ ४५५ ॥
अमरीं भाट होईजे। मग मृत्युलोकातें वानिजे। ऐसें जन्म पार्था गा जें। तें तो पावे ॥ ४५६ ॥

अर्थ—अशा प्रकारचा जन्म प्राप्त व्हावा अशी देवांना देखील इच्छा राहते व म्हणून स्वर्गामध्यें ते देव, अशा जन्माच्या प्राप्तीकरितां जपहोमादि कर्मे सदा करीत असतात. ॥ ४५५ ॥ देवहि भाट होऊन ज्या अशा प्रकारच्या जन्माकरितां मृत्युलोकाची प्रशंशा करतात, तसा जन्म त्या योगभ्रष्टाला प्राप्त होतो. ॥ ४५६ ॥

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः। जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ४४ ॥

अर्थ—योगभ्रष्ट पुरुष आपल्या पूर्वजन्मातील योगाभ्यासाचे संस्काराने पुनः या जन्मांत अभ्यास परतंत्र होऊन अभ्यासाकडे आपोआप ओढला जातो व शब्दब्रह्म म्हणजे वेद, यांच्याहि पलीकडे जातो (म्हणजे शब्दब्रह्म जे वेद, त्यांनी सांगितलेल्या कर्मफळाच्या पलीकडे जातो कर्मफळापेक्षां त्याला श्रेष्ठ फळ प्राप्त होतें) ॥ ४४ ॥

आणि मागील जे सद्बुद्धि। जेथ जीविता जाहाली होती अवधि। मग तेचि पुढती निरवधि। नवी लाहे ॥ ४५७ ॥
तेथ सदैवा आणि पायाळा। वरि दिव्यांजन होय डोळां। मग देखे जैसीं अवलीळा। पाताळधनें ॥ ४५८ ॥
तैसे दुर्भेद जे अभिप्राय। कां गुरुगम्य हन ठाय। तेथ सौरसेंवीण जाय। बुद्धि तयाची ॥ ४५९ ॥
बळियें इंद्रियें येती मना। मन एकवटे पवना। पवन सहजें गगना। मिळोंचि लागे ॥ ४६० ॥
ऐसें नेणों काय आपैसें। तयातेंचि कीजे अभ्यासें। समाधि घर पुसे। मानसाचें ॥ ४६१ ॥
जाणिजे योगपीठीचा भैरवु। काय हा आरंभरंभेचा गौरवु। कीं वैराग्यसिद्धीचा अनुभवु। रूपा आला ॥ ४६२ ॥
हा संसार उमाणितें माप। कां अष्टांगसामग्रीचे दीप। जैसें परिमळेंचि धरिजे रूप। चंदनाचें ॥ ४६३ ॥

तैसा संतोषाचा काय घडिला। कीं सिद्धभांडारींहूनि काढिला। दिसे तेणें मानें रूढला। साधकदशे॥ ४६४॥

अर्थ—आणि पूर्वजन्मांतील, जी योगमार्गाकडे प्रवृत्त झालेली बुद्धि होती व जी आयुष्य संपल्याबरोबर नाहीशी झाली होती, ती पुन: नवीन व अमर्याद अशी होते. ॥ ४५७ ॥ ज्याप्रमाणे एखादा पुरुष आधींच भाग्यवान व पायाळु आहे व त्याच्या डोळ्याला आणखी मंत्रविलेलें अंजन लावले, तर त्याला जमिनींतील कोठलेंहि धन सहज दिसूं लागतें. ॥ ४५८ ॥ त्याप्रमाणे योगभ्रष्टाची बुद्धिहि इतकी सूक्ष्म होते की, साधारण बुद्धीला जी रहस्यें अगम्य असतात किंवा जे गुरुवांचून कळूंच शकत नाही, तेथे त्याची बुद्धि न चांचपडतां अचूक प्रवेश करते. ॥ ४५९ ॥ इंद्रियें बलवान आहेत खरी, पण तीं आपोआप मनाच्या स्वाधीन होतात. मन प्राणाशीं ऐक्य पावून, प्राण आकाशांत मिळूं लागतो. ॥ ४६० ॥ असें कसें होतें हें सांगतां येत नाही; पण योगाभ्यास आपण होऊन त्याला बाणत जातो व समाधि त्याच्या मनाच्या घराचा शोध करीत येते. ॥ ४६१ ॥ हा योगभ्रष्ट साधक म्हणजें जणूं काय योगस्थानावरची अधिदेवता किंवा योगाच्या आरंभास लागणाऱ्या उल्हासाचा आदर किंवा पूर्ण वैराग्याने साध्य होणारा अनुभवच रूपाला आला. ॥ ४६२ ॥ किंवा जणूं काय संपूर्ण संसार मोजून काढणारें मापच होय किंवा योगाच्या अष्टांगसाधन सामग्रीचें बेटच होय. ज्याप्रमाणे सुगंधाने चंदनाचें रूप घ्यावें. ॥ ४६३ ॥ त्याप्रमाणे तो संतोषाची जणूं काय घडलेली मूर्ति होय किंवा तो साधकदशेपासूनच सिद्धीचें भांडार घेऊन आला आहे, अशा प्रकारचा संपन्न असलेला दिसतो. ॥ ४६४ ॥

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः। अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्॥ ४५॥

अर्थ—योगाचा प्रयत्न करणारा योगी, योगाभ्यासाने अत्यंत शुद्ध पापरहित होऊन, अनेक जन्मांत सिद्ध होऊन, परम अशा ब्रह्मगतीला प्राप्त होतो. ॥ ४५ ॥

जे वर्षशतांचिया कोडी। जन्मसहस्रांचिया आडी। लंघिता पातला थडी। आत्मसिद्धीची॥ ४६५॥

अर्थ—वयाच्या शेंकडो वर्षांच्या चळथी व हजारो जन्मांचे प्रतिबंध ओलांडून, आत्मसिद्धीचा किनारा ज्याने गांठला. ॥ ४६५ ॥

गूढार्थदीपिका—सगुण भगवंताच्या नामस्मरणादि भक्तीचा आश्रय न करितां केवळ कर्मज्ञानमार्गाने आत्मप्राप्ति करून घेऊं पाहणाऱ्याविषयी हे माऊलीचें विधान आहे. कारण भगवंताच्या निरपराध नामस्मरणादि भक्तिमार्गाने मनुष्य लवकरच आत्मप्राप्ति करून घेऊं शकतो; म्हणून त्यांच्याविषयीं हें विधान लागूं शकत नाही.

किंवा ''बहुतां सुकृताची जोडी। म्हणूनि विठ्ठलीं आवडी'' भगवंताच्या नामस्मरणादिभक्तीचे ठिकाणीं आवड उत्पन्न होण्याकरिताच अनंत जन्माचें सुकृत पदरीं असावयास पाहिजे; म्हणून भगवंताच्या नामस्मरणादि भक्तिविषयीं आवड उत्पन्न होण्यापूर्वीविषयीं हें विधान लागूं आहे असें समजावें.

म्हणोनि साधनजात आघवें। अनुसरे तया स्वभावें। मग तो आयतिये बैसे राणिवे। विवेकाचिये॥ ४६६॥
पाठीं विचारितया वेगा। तो विवेकुही ठाके मागां। मग अविचारणीय तें आंगा। घडोनि जाय॥ ४६७॥
तेथ मनाचें मेहुडें विरे। पवनाचें पवनपण सरे। आपणपां आपण मुरे। आकाशही॥ ४६८॥
प्रणवाचा माथा बुडे। येतुलेनि अनिर्वाच्य सुख जोडे। म्हणोनि आधींचि बोलु बहुडे। तयालागीं॥ ४६९॥
ऐसी ब्रह्मींची स्थिती। जे सकळा गतींसी गती। तया अमूर्ताची मूर्ति। होऊनि ठाके॥ ४७०॥
तेणें बहुतीं जन्मीं मागिलीं। विक्षेपांची पाणिवळें झाडिलीं। म्हणोनि उपजतखेवों बुडाली। लग्नघटिका॥ ४७१॥

अर्थ—म्हणून योगाभ्यासाचीं सर्व साधनें स्वभावत:च त्याचे ठिकाणीं प्रगट होतात व मग तो आयत्या आत्मानात्मविवेकाच्या राज्यावर बसतो. ॥ ४६६ ॥ नंतर विचाराचा जो वेग वाढतो, तेथें विवेकहि मागें राहतो व विचाराच्या पलीकडे असणाऱ्या ब्रह्मवस्तूशीं एकरूप होतो. ॥ ४६७ ॥ तेथें मनरूपी मेघ नाहिसे होतात, प्राणवायूचें प्राणपण राहात नाही, आकाशहि जागच्या जागीं नाहिसें होतें. ॥ ४६८ ॥ प्रणवाची अर्धमात्राबिंदूस्थिति मावळते-म्हणजे नादबिंदू, कळाज्योति हे कांही राहत नाही. एवढ्याने जाणीव नाहीशी होऊन अपार सुख प्राप्त होतें, म्हणून तेथें शब्दाची प्रवृत्ति होत नाही व बोलणें बंद पडतें. ॥ ४६९ ॥ याप्रमाणे संपूर्ण गतीची गति अशी जी ब्रह्मस्थिति,

त्या अमूर्त ब्रह्मस्थितीची मूर्ति होऊन, तो योगी राहतो. ॥ ४७० ॥ त्याने मागील अनेक जन्मांत सत्कर्में करून चित्तरूपी पाण्यांतील चांचल्यरूपी केरकचरा साफ केल्यामुळे जन्मल्याबरोबरच लग्नघटिका बुडली-म्हणजे त्याचें ब्रह्माशीं ऐक्य झालें. ॥ ४७१ ॥

गूढार्थदीपिका—वधुवरांचें लग्न ज्या वेळेला लागायचे असतें, ती वेळ जाणण्याकरितां ज्योतिषी लग्नघटिका लावून ठेवतात व लग्नघटिका बुडल्याबरोबर वधुवराचे लग्न लागलें म्हणून वधुवरावर अक्षता टाकतात; तसेंच योगभ्रष्ट पुरुषाचा अभ्यास, पूर्वजन्मांपासून चालू असल्यामुळें व चित्त अत्यंत शुद्ध होऊन सहज एकाग्र होत असल्यामुळें जन्मल्याबरोबरच त्याला ब्रह्मैक्याचा अनुभव येतो.

आणि तद्रूपतेसी सुलग्न। लागोनि ठेलें अभिन्न। जैसें लोपलें अभ्र गगन। होऊनि ठाके॥ ४७२॥
तैसें विश्व जेथ होये। मागौतें जेथ लया जाये। तें विद्यमानेंचि देहें। जाहला तो गा॥ ४७३॥

अर्थ—आणि ज्याप्रमाणे नाहिसें झालेलें अभ्र आकाशाशीं एकरूप होऊन जातें-म्हणजे आकाशरूप होतें-त्याप्रमाणे तद्रूपतेचें सुलग्न लागलें की तो साधक ब्रह्माशीं एकरूप होऊन राहतो. ॥ ४७२ ॥ ज्या ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणीं विश्व भासतें व जेथे लय पावतें, तें ब्रह्मस्वरूप तो योगी आपल्या असलेल्या देहासह होतो. ॥ ४७३ ॥

गूढार्थदीपिका—शिष्याचे डोक्यावर हात ठेवून श्रीगुरु शिष्याला आपल्या केवळ सामर्थ्याने कृतार्थ करतात, या मूर्ख समजुतीचा येथे निरास करून, शिष्याने प्रयत्न केल्यावांचून तो कृतार्थ होऊं शकत नाही, हें या श्लोकांत व त्यावरील ओव्यांत श्रीज्ञानेश्वर महाराजांनी प्रतिपादिलें आहे.

"उपदेशक्रमो रामव्यवस्थामात्रपालनम्। ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शिष्यप्रज्ञैव केवला॥" (योगवासिष्ठ) असें योगवासिष्ठांत श्रीरामाला सांगितलें असून "रघुराया उपदेश तत्वतां। दाखवी नानापरी व्यवस्था। परी शिष्याचा प्रयत्न नसतां। होय वृथा सकळही॥ २६ ॥ जरी शिष्यप्रयत्नावीण। गुरूपदेशें होईल कल्याण। तरी श्वान आणि वृक्षपाषाण। जावोत उद्धरोन क्षणमात्रे.॥ २७॥ मग वेदीं मनुष्यजन्मप्रशंसा। ही व्यर्थ कां केली दंतमीमांसा। एवढा आयाता मोक्षठसा। असतां हातीं॥ २८॥ जरी मस्तकीं हस्त ठेवून। मुक्त होऊं शकेल जाण। तरी "ज्ञानादेव तु कैवल्यम्" हें श्रुतिवचन। पावलें मरण सर्वस्वीं.॥ २९ ॥ 'उपदेशं विनाऽपि' कृपें करून। जरी होतें म्हणावें ज्ञान। तरी महावाक्याचे कारण। नाहींच जाण सर्वथा॥ ३०॥ आतां श्रवण केलियावीण निश्चिती। महावाक्येही येतील चित्तीं। हे मनसाही कल्पितां नये स्थिति। मग घडेल ती रीती आम्ही नेणों. ॥ ३१ ॥" (श्रीगुलाबरावमहाराजकृत भगवद्भक्ति सौरभ-पंचम पराग) असे आमच्या श्रीसद्‌गुरु आईचेंहि म्हणणें आहे; म्हणून परमार्थांत श्रीगुरूंच्या सांगण्याप्रमाणे प्रयत्न करायला पाहिजे.

वेदान्तश्रवण करतांना विविध वचनांची एकवाक्यता कशी करायची, मननामध्ये कोणत्या युक्तीने वेदान्तसिद्धान्त दृढ करायचा, निदिध्यासन करतांना वृत्ति कशी असायला पाहिजे आणि अनुभव कसा असतो व कसा घ्यावा इत्यादि व्यवस्था सांगण्याकरितां परमार्थांत श्रीगुरूंची आवश्यकता असते.

निषिद्धाचरणरूप पापकर्माच्या योगाने संशय, विपर्यय, वासना, बुद्धिमांद्य इत्यादि प्रतिबंध परमार्थांत उत्पन्न होत असतात.

संशय—म्हणजे परमेश्वराच्या अस्तित्वाविषयीं किंवा परमेश्वर प्राप्तिच्या सांगितलेल्या मार्गाविषयीं संशय असणें.

विपर्यय—म्हणजे मी देह आहे अशी बुद्धि असणें.

वासना—म्हणजे विषयांकडे चित्ताची धांव. व

बुद्धिमांद्य—म्हणजे परमेश्वराच्या स्वरूपाविषयींचा सूक्ष्मविचार बुद्धीला ग्रहण न होणें.

हें दोष जोपर्यंत आहेत तोपर्यंत परमेश्वरप्राप्ति होत नाही. सगुण रामकृष्णादि परमेश्वराचे भक्तीने हीं विघ्नें क्रमाक्रमाने दूर होऊन, मनुष्य कांही जन्मांनीं कृतार्थ होतो; म्हणून ईश्वरभक्तीची आवश्यकता आहे.

सारांश "सद्‌गुरु उपदेश व्यवस्थिती। यत्ननिश्चय आपुल्या चित्तीं। ईश्वर दूर करी विघ्नपंक्ती। तैं जीवन्मुक्ति

सांपडे॥ २४॥ (श्रीगुलाबरावमहाराजकृत भगवद्भक्तिसौरभ-पंचमपराग) याप्रमाणे श्रवण मनन निदिध्यासन यांची व्यवस्था व अनुभवरहस्य सांगणाऱ्या श्रीगुरूची प्राप्ति, आपला निश्चयपूर्वक प्रयत्न व ईश्वरभक्ति या तिघांचा संगम झाला असतांच जीवन्मुक्तस्थिति प्राप्त होते.

अशा रीतीने परमार्थाचा प्रयत्न करणारा पुरुष, प्रतिबंधामुळें त्याच जन्मांत मुक्त झाला नाही, तर पुढील जन्मांत बाळपणींच त्याला जीवन्मुक्ति वरते.

श्रीगुरूच्या शक्तिपाताने शिष्य कृतार्थ होतो असे वेदान्तांत सांगितलें नसलें, तरी आगमांत सांगितलें आहे. हा शक्तिपातहि परमेश्वरप्राप्तीची उत्कट तळमळ लागलेल्याला व श्रीगुरूशीं प्रतारणा न करणाऱ्या अनन्य व प्रेमळ शिष्याचे ठिकाणींच होऊं शकतो. याचे पुढें योग्य स्थळीं सविस्तार निरूपण करूं.

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः। कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन॥ ४६॥

अर्थ—योगी हा तपस्व्यापेक्षां, ज्ञान्यापेक्षां व कर्म करणाऱ्या पुरुषापेक्षांहि श्रेष्ठ होय, म्हणून अर्जुना! तूं योगी हो.॥ ४६॥

जया लाभाचिया आशा। करूनि धैर्यबाहूंचा भरंवसा। घालीत षट्कर्मांचा धारसा। कर्मनिष्ठ॥ ४७४॥
कां जिये एकी वस्तूलागीं। बाणोनि ज्ञानाची वज्रांगी। झुंजत प्रपंचेंशीं समरंगीं। ज्ञानिये गा॥ ४७५॥
अथवा निलागें निसरडा। तपोदुर्गाचा आडकडा। झोंबती तपिये चाडा। जयाचिया॥ ४७६॥
जें भजतियांसी भज्य। याज्ञिकांचें याज्य। एवं जें पूज्य। सकळां सदा॥ ४७७॥
तेंचि तो आपण। स्वयें जाहला निर्वाण। जें साधकांचें कारण। सिद्ध तत्त्व॥ ४७८॥
म्हणोनि कर्मनिष्ठां वंद्यु। तो ज्ञानियांसी वेद्यु। तापसांचा आद्यु। तपोनाथु॥ ४७९॥
पैं जीवपरमात्मसंगमा। जयाचें येणें जाहलें मनोधर्मा। तो शरीरीचि परी महिमा। ऐशी पावे॥ ४८०॥
म्हणोनि याकारणें। तूतें मी सदा म्हणें। योगी होय अंतःकरणें। पंडुकुमरा॥ ४८१॥

अर्थ—ज्या ब्रह्मप्राप्तीच्या आशेने धैर्यरूपाचा भरंवसा बाळगून, कर्मनिष्ठ पुरुष षट्कर्माचरणाचा (अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, प्रतिग्रह, व दान ही ब्राह्मणाची षट्कर्मे होत) सारखा प्रवाह चालूं ठेवतात.॥ ४७४॥ किंवा ज्या एका ब्रह्मवस्तूच्या प्राप्तीसाठी आत्मज्ञानाचें दृढ कवच घालून ज्ञानी पुरुष प्रपंचाशीं समरंगणांत युद्ध करतात.॥ ४७५॥ अथवा ज्याच्या प्राप्तीच्या इच्छने, जेथें पाय रोवण्याला आधार नाही व पाय ठेविला की पाय घसरतोच अशा तपरूपी किल्ल्याच्या तुटलेल्या कड्याचा जे आश्रय करतात.॥ ४७६॥ भजन करणारे, ज्याचें भजन करतात, यज्ञ करणारे ज्याचें यजन करतात, याप्रमाणे जो सर्वांना सदा पूज्य आहे.॥ ४७७॥ ज्याच्या करितां साधक साधनें करतात व जे स्वयंसिद्ध तत्व होय, असे जें परब्रह्म, तें केवळ परब्रह्मच योगी होऊन राहतो.॥ ४७८॥ म्हणून कर्मनिष्ठ ज्यांना वंदन करतात व ज्ञानी ज्याला जाणतात व तपस्वियांचा मूळ स्वामी जो परमात्मा तो, योगी होऊन राहतो.॥ ४७९॥ ज्याचा मनोधर्म जीव व परमात्मा यांच्या ऐक्याच्या ठिकाणीं आला-म्हणजे ज्याच्या मनाने जीवपरमात्मैक्य जाणून अनुभविलें-तो शरीरधारी असतानांच, वर वर्णन केलेल्या योग्यतेचा होतो.॥ ४८०॥ म्हणून या कारणास्तव, अर्जुना! मी तुला अंतःकरणाने योगी हो असे म्हणत असतो—म्हणजे अखंड चित्तवृत्ति आत्मस्वरूपी ठेव असें सदा म्हणत असतो.॥ ४८१॥

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना। श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः॥ ४७॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे आत्मसंयमयोगो नाम षष्ठोऽध्यायः॥ ६॥

अर्थ—सर्व योग्यामध्यें माझ्या सगुणस्वरूपाचे ठिकाणीं अंतःकरण ठेवून प्रेमपूर्वक जो माझ्या सगुणस्वरूपाचें भजन करतो, तो माझ्याशीं अत्यंत समरस होऊन निर्विकल्प ऐक्य पावतो.॥ ४७॥

अगा योगी जो म्हणिजे। तो देवांचा देव जाणिजे। आणि सुखसर्वस्व माझें। चैतन्य तो॥ ४८२॥

अर्थ—बा अर्जुना! जो योगी आहे तो देवांचा देव आहे असे समज आणि तो माझे चैतन्यच होय व आत्मसुखहि होय. ॥ ४८२ ॥

गूढार्थदीपिका—सगुण भगवंताचे ठिकाणीं ज्याचें अत्यंत प्रेम जडलें, तो ऐक्याच्या जाणीवेवांचून केवळ चिदानंदस्वरूप होऊन राहतो असा अर्थ.

तेथ भजता भजन भजावें। हें भक्तिसाधन जें आघवें। तें मीचि जाहलों अनुभवें। अखंडित॥ ४८३॥
मग तया आम्हां प्रीतीचें। स्वरूप बोलीं निर्वचे। ऐसें नव्हे गा तो साचें। सुभद्रापती॥ ४८४॥
तया एकवटलिया प्रेमा। जरी पाडें पाहिजे उपमा। तरी मी देह तो आत्मा। हेचि होय॥ ४८५॥

अर्थ—तेथें भजन करणारा, भजन करणें, ज्याचें भजन करायचें तो देव, ही जी भक्तीची साधनरूप संपूर्ण त्रिपुटी ती तो अखंड स्वानुभवाने मद्रूपच पाहतो-म्हणजे त्याला, त्याचा प्रिय परमात्मा जो सगुण भगवान त्यावांचून दुसरें कांही दिसत नाही, असा भाव. ॥ ४८३ ॥ तेव्हां आम्हां दोघांत परस्परांचे जें प्रेम असतें ते शब्दानें सांगतां येईल असा तो, अर्जुना! खरोखर राहत नाही. ॥ ४८४ ॥ त्या आमच्या ऐक्यप्रेमाला बरोबरीची उपमा पाहिजे असल्यास मी देह व तो आत्मा हीच उपमा द्यावी लागेल. ॥ ४८५ ॥

गूढार्थदीपिका—"मी देह तो आत्मा"-योग म्हणजे परमेश्वराच्या ठिकाणीं चित्त स्थिर करून, त्याचें परमेश्वराशीं ऐक्य करणें होय, हे मागें सांगितलेंच आहे. कर्मद्वारा परमेश्वराचे ठिकाणीं चित्तवृत्ति स्थिर करणें याला कर्मयोग म्हणतात. ज्ञानद्वारा परमेश्वराशीं ऐक्य करणें याला ज्ञानयोग म्हणतात व प्रेमद्वारा परमेश्वराच्या ठिकाणीं चित्तवृत्ति स्थिर करणें ह्याला भक्तियोग म्हणतात. सगुण परमेश्वराच्या नि:सीम प्रेमाने केलेल्या भक्तियोगांत जाणीवरहित निर्विकल्प ऐक्य होत असल्यामुळें व इतर योगांत जाणीवसहित ऐक्य होत असल्यामुळें, सर्व योग्यामध्यें भक्तियोगी युक्ततम होय असे भगवान म्हणतात आणि श्रीज्ञानेश्वर माऊलींनी "मी देह तो आत्मा" या चरणाने तोच भाव दाखविला आहे.

ऐसें भक्तचकोरचंद्रें। तेथ त्रिभुवनैकनरेंद्रें। बोलिलें गुणसमुद्रें। संजयो म्हणे॥ ४८६॥
तेथ आदिपासूनि पार्था। ऐकिजे ऐसीचि आस्था। दुणावली हें यदुनाथा। भावों सरलें॥ ४८७॥
कीं सावियाचि मनीं संतोषला। जे बोला आरिसा जोडला। तेणें हरिखें आतां उपलवला। निरूपील॥ ४८८॥
तो प्रसंगु आहे पुढां। तेथ शांतु दिसेल उघडा। तो पालविजेल मुडा। प्रमेयबीजाचा॥ ४८९॥
जे सात्त्विकाचेनि वडपें। गेलें आध्यात्मिक खरपें। सहजें निडारलें वाफे। चतुरचित्ताचे॥ ४९०॥
वरी अवधानाचा वाफसा। लाधला सोनया ऐसा। म्हणोनि पेरावया धिंवसा। श्रीनिवृत्तीसी॥ ४९१॥
ज्ञानदेव म्हणे मी चाडें। सद्गुरुनी केले कोडें। माथां हात ठेविला तें फुडें। बीजचि वाइलें॥ ४९२॥

अर्थ—संजय म्हणतो, राजा धृतराष्ट्रा! याप्रमाणे भक्तरूपी चकोरांचा चंद्र, अनंत सद्गुणांचा सागर व त्रैलोक्याचा स्वामी जो भगवान श्रीकृष्ण, तो अर्जुनाला म्हणाला. ॥ ४८६ ॥ प्रथमपासूनच अर्जुनाला निरूपण ऐकण्याची आवडी होती, ती आवडी माझ्या मुखाने निरूपण ऐकल्यावर आणखी दुप्पट वाढली आहे, असे भगवंताला दिसून आलें. ॥ ४८७ ॥ किंवा माझ्या निरूपणाला अर्जुन हा आरसा झाला (आरशांत जसें प्रतिबिंब पडतें, तसें मी जें निरूपण करतों, तें तसेंच्या तसेंच अर्जुनाच्या अंत:करणांत बिंबतें) हे पाहून भगवंताला फार संतोष वाटला. आतां पुढे त्या आनंदाने उचंबळून जाऊन भगवान निरूपण करतील. ॥ ४८८ ॥ तो प्रसंग पुढें असून त्यांत शांतरस (ज्ञान निरूपण) इतका स्पष्ट दिसेल की ते सिद्धान्तरूपी प्रमेयाला अंकुर उत्पन्न करील म्हणजे अंत:करणांत वेदान्तसिद्धान्ताचा पूर्ण प्रकाश पडेल. ॥ ४८९ ॥ कारण शांतरसांतील सात्विक गुणांच्या वृष्टीमुळें अंत:करणांतील

वासनारूपी आध्यात्मिक तापांची ढेंकळे विरालीं आणि श्रोत्यांच्या विवेकसंपन्न चित्ताचे वाफे तयार केले गेले. ॥ ४९० ॥ त्यांत पुन: एकाग्र चित्ताने श्रवण करण्याची सोन्यासारखी त्याला ऊन मिळाली, म्हणून श्रीनिवृत्तिनाथांना पेरण्याचा हुरूप वाटतो. ॥ ४९१ ॥ श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, मी बीज पेरण्याचे चाडे आहे. श्रीनिवृत्तिनाथानी असें कांही नवल केलें की, त्यांनी माझ्या डोक्यावर जो हात ठेवला ते माझ्या अंत:करणांत सिद्धान्तरूपी बीजच घातलें. ॥ ४९२ ॥

गूढार्थदीपिका—श्रीज्ञानेश्वर महाराजांनी अमृतानुभव ग्रंथांतील मंगलाचरणाच्या ''गुरुरित्याख्यया लोके विद्या साक्षाद्धि शांकरी'' या श्लोकांत श्री गुरु म्हणजे साक्षात् ब्रह्मविद्या होय असे म्हटलें आहे. श्रीगुरु आपल्या शिष्यावर, त्याच्या अनन्यसेवेने व अनन्यप्रेमाने प्रसन्न होऊन जेव्हा त्याच्या डोक्यावर हात ठेवितात तेव्हा साक्षात् ब्रह्मविद्यारूपाने म्हणजे ''अहंब्रह्मास्मि'' या वृत्तिरूपाने शिष्याचे अंत:करणांत प्रगट होतात. ''अहंब्रह्मास्मि'' ही ब्रह्मविद्या सर्व अद्वैतसिद्धान्ताचें बीज आहे. शिष्याचे अंत:करणात ''अहंब्रह्मास्मि'' या विद्यावृत्तीने श्रीगुरुं राहत असून, तेच बाहेर निरुपाधिक सगुण साकाररूपाने शिष्याला प्रतीत होतात.

म्हणऊनि येणें मुखें जे जें निगे। तें संतांच्या हृदयीं साचचि लागे। हें असो सांगो श्रीरंगे। बोलिलें जें॥ ४९३ ॥
परीं तें मनाच्या कानीं ऐकावें। बोल बुद्धीच्या डोळां देखावें। हे साटोवाटीं घ्यावे। चित्ताचिया॥ ४९४॥
अवधानाचेनि हातें। नेयावें हृदयाआंतौतें। हे रिझवितील आयणीतें। सज्जनांचिये॥ ४९५॥
हे स्वहितातें निववितीं। परिणामातें जीवविती। सुखाची वाहविती। लाखोली जिवा॥ ४९६॥
आतां अर्जुनेंसीं मुकुंदें। नागर बोलिजेल विनोदें। तें ओवियेचेनि प्रबंधें। सांगेन मी॥ ४९७॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां षष्ठोऽध्याय: ॥ ६ ॥

अर्थ—श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात की, म्हणूनच या माझ्या मुखावाटें जें बोललें जातें, तें संतश्रोत्यांच्या हृदयाला खरें वाटतें-म्हणजे सिद्धान्तभूतच वाटतें. हे आतां असो. पुढें श्रीभगवंतांनी काय सांगितले तेच सांगतों. ॥ ४९३ ॥ पण तें मनाच्या कानांनी ऐकावें-म्हणजे संपूर्ण मन एका कर्णेद्रियाचे ठिकाणीं आणून ऐकावें आणि माझें बोलणें बुद्धीच्या डोळ्यांनी पहावें-म्हणजे अर्थाकडे दृष्टि द्यावी किंवा बोल ऐकल्याबरोबर बुद्धि अर्थाकार व्हावी हें सर्व चित्ताच्या मोबदल्यांत व्हावें-म्हणजे चित्त मला देऊन, त्याच्या मोबदल्यांत माझ्या बोलण्यातील अर्थ घ्यावा. (अत्यंत एकाग्रतेने श्रवण करा हा भाव). ॥ ४९४ ॥ एकाग्र अंत:करणाचे हाताने हे माझें बोल हृदयांत नेऊन ठेवल्यास संतजनांची ब्रह्मानुभवाची इच्छा सफल होईल (अत्यंत एकाग्र चित्ताने श्रवण केल्यास तें श्रवणच अनुभव पर्यवसायी होतें असा अर्थ). ॥ ४९५ ॥ ह्या बोलांनी स्वहिताची तळमळ शांत होते, ब्रह्मस्थिति दृढ होते व त्यायोगें जीवाला आत्मसुखाची लाखोली वाहिली जाईल-म्हणजे अखंड आत्मसुख मिळेल. ॥ ४९६ ॥ आतां भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सुंदर निरूपण ऐकवील. तेंच मी ओवीप्रबंधाने तुम्हाला सांगतों. ॥ ४९७ ॥

श्रीसद्गुरुकृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायाचा गूढार्थदीपिकेसह अनुवाद पूर्ण झाला तो सद्गुरुचरणीं समर्पण असो.

समारोप

ज्ञानेश्वरींतील हा सहावा अध्याय म्हणजे जीवाचे मूळस्वरूप जें ब्रह्म, त्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार करून घेण्याचा मार्ग होय. वास्तविक ब्रह्मस्थिति ही शब्दानें सांगण्यासारखी नाहीं, तरी श्रीज्ञानेश्वर माऊलींनी अत्यंत सुरस व सूक्ष्मार्थरूप ब्रह्माचा, अंत:करणांत बोध उत्पन्न होईल, अशा कोमल व अनुभवानें भरलेल्या शब्दांनी, प्रेमळ व एकाग्र चित्तांच्या श्रोत्यांना योगाचे निरूपण करण्याची प्रतिज्ञा केली आहे. कोमल शब्दाचें योजनेनें चित्त शब्दाकडे ओढलें जातें व ब्रह्मासारखा सूक्ष्म अर्थ ग्रहण करण्याला योग्य असे चित्त बनतें.

कर्मयोग व संन्यास यांचे आंतरदृष्टीनें ऐक्य—नुसते कर्म करणारा कर्मयोगी नव्हे व अग्नीचे विसर्जन करून कर्म सोडले म्हणजे संन्यासी झाला असाहि अर्थ नाही. भगवंताचे ठिकाणी चित्त स्थिर करून कर्मानुष्ठान करणाऱ्याला कर्मयोगी ही संज्ञा आहे. पण विषयांत आसक्त असलेले चित्त जोपर्यंत विषयसुखाची नि:शेष इच्छा सोडत नाही, तोपर्यंत ते भगवंताचे ठिकाणी स्थिर होत नाही; म्हणून कर्मयोगी होण्याकरितां नि:शेष विषयकामना सुटली पाहिजे. त्याचप्रमाणे खरोखर कर्मसंन्यास होण्याकरितां माझ्या सच्चिदानंद आत्मस्वरूपाचे ठिकाणी कर्म नाही व कर्तृत्व नाही. मी कर्म व कर्तृत्व याहून साक्षीस्वरूप अत्यंत निराळा आहे असे ज्ञान झालें पाहिजे. हें ज्ञान होण्याकरितां आत्मस्वरूपाचे ठिकाणी चित्तवृत्ति स्थिर झाली पाहिजे व आत्मस्वरूपाचे ठिकाणी चित्त स्थिर होण्याकरितां विषयसुखाकरितां बाहेर विषयाकडे धावणाऱ्या चित्तांतून विषयसुखाची किंवा कर्मफळाची इच्छा समूळ नाहीशी झाली पाहिजे म्हणजे कर्मयोगी व संन्यासी या दोघांच्याहि ठिकाणी असलेली नि:शेष विषयसुखाची कामना नाहिशी झाली पाहिजे. विषयकामनारहित चित्त झाले असतां चित्त परमेश्वराचे ठिकाणी स्थिर होते व योगी व संन्यासी हे दोघेहि आपल्याला कर्म व कर्तृत्व याहून निराळे पाहतात व सर्वकर्मसंन्यासी होतात. सर्वकर्मसंन्यास याचा अर्थ देहाचे ठिकाणी कोणतेहि कर्म न होणें असा नसून, शरीर, मन, इंद्रिये याची कर्में होत राहिली, तरी मी, त्या सर्व कर्माहून व कर्तृत्वाहून निराळा आहे, माझ्याशीं त्यांचा कांही संबंध नाही असा अनुभव येणें, असा आहे. परमेश्वर जसा कर्म करून आंतरप्रतीतीने सर्वकर्मसंन्यासी असतो, तसाच कर्मयोगी व संन्यासीहि कर्म करीत असतांना दिसला, तरी सर्वकर्मसंन्यासी असतो. "सर्वकामपरित्यागे च सर्वकर्मसंन्यास: सिध्दो भवति" (गीताभाष्य अ० ६ श्लो० ४) या भाष्यपंक्तींत आचार्यांनी हेंच प्रतिपादिलें आहे.

योग साधनेने चित्त निष्काम होतें—"अगा करितेनिविण कर्म। तेचि जाणिजे निष्कर्म" कर्म नाही व त्याचा कर्ताहि कोणी नाही असा जेव्हा अनुभव येतो तेव्हा कर्म निष्काम होतें, असा गुरुगम्य अनुभव माऊलींनी मागे सांगितला आहे. विषय सत्य वाटतात व त्यांत सुख आहे अशी जोपर्यंत बुद्धि आहे, तोपर्यंत विषयसुखाची वासना जात नाही व विषयसुखाची इच्छा आहे, तोपर्यंत त्याकरिता कर्म होणार व त्या कर्माचें कर्तृत्वहि उत्पन्न होणारच. अल्प देखील विषयवासना असली, तरी निष्काम कर्मानुष्ठान होणे शक्य नाही. योगसाधनाने आत्मवस्तूचे ठिकाणीं चित्त स्थिर होतें व तसे तें स्थिर झालें असतां तेथे एका आत्मवस्तूवांचून दुसरें कर्म, कर्तृत्व व विषय यापैंकीं कशाचेंहि अस्तित्व प्रत्ययाला येत नाही. त्यामुळे बुद्धि एका आत्म्यावांचून दुसऱ्या कशाचेंहि अस्तित्व ग्रहण करीत नाही व आत्मस्वरूपाचे ठिकाणींच स्थिर होते. आत्मस्वरूपाचे ठिकाणीं चित्त स्थिर करून कर्म कर म्हणजे कर्म निष्काम होतें असेच भगवंतांनी "योगस्थ: कुरु कर्माणि" या श्लोकांत सांगितलें आहे.

जीवच स्वत:चा शत्रु व मित्र—जीवाचें मूळ स्वरूप अद्वैत सच्चिदानंदरूप आहे. त्याची ही मूळची स्थिति दुसऱ्याने कोणी नाहीशी केली नाही. त्यानेच स्वत: त्या सच्चिदानंदरूपाहून आपल्या निराळेपणाची कल्पना केली व त्या निराळेपणाचा अहंकार धरिला, म्हणून ती त्याची मूळची सच्चिदानंदस्थिति, त्याला प्रतीत होत नाहीं. अशा

रितीने तोच आपला शत्रु बनला. पुन: ही कल्पना सोडून दिल्यास तोच आपल्या पूर्वपदावर आरूढ़ होतो. अनंत जन्मांतल्या दृढ संस्कारामुळे केलेली विपरीत कल्पना लवकर सुटत नाही, म्हणून योगाभ्यासाने आपल्या मूळ स्वरूपाचा प्रत्यय आल्यावर ती कल्पना नाहीशी होते. एकदा असा आत्मस्वरूपाचा प्रत्यय आला म्हणजे त्या योग्याला सर्वत्र एक आत्मस्वरूपच दिसतें. सच्चिदानंद आत्मस्वरूपावांचून दुसरें कशाचेंच ज्ञान होत नाही. सर्वत्र एक आत्मस्वरूपच पाहणाऱ्या दृष्टीला समदृष्टि म्हणतात.

योगसाधनेला श्रीगुरूचें ठिकाणीं अत्यंत प्रेम पाहिजे—अर्जुनाच्या प्रेमाला भाळलेला श्रीकृष्ण भगवान, येथे योगाचें साधन अर्जुनाला सांगत आहे. भगवद्भक्ताला किंवा गुरुभक्ताला योग साधायला कष्ट पडत नाही. भक्तीने विरक्तिहि साधते. भगवत्प्रेमाने विषयाचें प्रेम जसे नि:शेष नाहिसे होतें, तसें कोणत्याहि साधनाने नाहीसे होत नाही. म्हणून भगवद्भक्त अर्जुनाला योगसाधन सांगितलें तर वाया जाणार नाही असें भगवंताला वाटलें. योग साधन करितांना जें कांही या अध्यायांत सांगितलेले अनुभव येतात, ते ज्यांचा गुरूचे वचनावर अत्यंत विश्वास असेल, त्यांनाच येतात गुरुविश्वासावांचून व गुरुप्रेमावांचून हा मार्ग असाध्य आहे.

योगाभ्यास—योगाभ्यासाकरितां एकाग्र, पवित्र व रमणीय स्थळाची आवश्यकता आहे. तेथे सांगितल्याप्रमाणे अभ्यास करण्याकरिता अत्यंत प्रेमाने श्रीगुरूचें चिंतन करून आसन मांडावे लागते. त्या आसनाने शरीराचे ठिकाणीं जें योगाचें कार्य होतें, त्यामुळे खाली, वर, मध्ये, असें तीन बंध पडून प्राणवायूचा बाहेर पडण्याचा मार्ग बंद होतो व बाहेरचे सर्व विसरलें जाते. देहावर वृत्ति येत नाही. कोंडलेला प्राणवायु अत्यंत क्षुब्ध होऊन सर्व शरीर ढवळून काढितो व मृत्यूचें भय दाखवितों, पण श्रीगुरूच्या विश्वासाने तेवढेहि सहन करण्याचें धैर्य येतें. प्राणवायु कोंडल्यामुळे व क्षुब्ध झाल्यामुळे उष्णता अत्यंत वाढते व त्यामुळे कुंडलिनी जागी होते. ती शरीराचे आंत असलेलें पृथ्वीतत्त्व व आपतत्त्व दोन्ही नाहिसे, करिते. मग शरीराचे ठिकाणीं शरीराचे जडधर्म राहत नाहीत व ते अत्यंत हलके होऊन तेजस्वी व सामर्थ्य संपन्न होते. योगाभ्यासाने सिद्धी प्राप्त होतात.

कुंडलिनी विचार—श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात कीं "ते कुंडलिनी जगदंबा। जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा। जिया विश्वबीजाचिया कोंभा। साउली केली॥" कुंडलिनी ही जगदंबा परमेश्वराची शक्ति होय. ती जगताला जन्म देते, चक्रवर्तीराजा जसा सर्व पृथ्वीचे राज्य करितो, त्याप्रमाणे चैतन्यरूप परमात्मा अनंत ब्रह्मांडाचा शास्ता आहे. कुंडलिनी त्या चैतन्यरूप परमेश्वराचे सर्व सौंदर्य आहे व सर्व वैभव आहे. हिच्या योगानेंच परमेश्वराचे परमेश्वरत्व आहे असें अमृतानुभवग्रंथांतहि "ऐश्वर्येंसि ईश्वरा। जियचे अंग संसारा" या ओवीने माऊलींनी सांगितलें आहे. ज्या प्रमाणे एका सपाट मैदानावर जेवढी घरें बांधलीं जातील त्या प्रत्येक घरांत त्या सपाट मैदानाचा भागच शिरलेला असतो, त्याप्रमाणें चैतन्यचक्रवर्ती परमेश्वराचे सत्तेवर जेवढी कांहीं ब्रह्मांडरूपाने जीवसृष्टि भासते, तींत परमेश्वर व त्याची शक्तीच भरलेली आहे. परमेश्वराच्या या शक्तीने जगताचे बीज जो शिव, त्याचे ठिकाणीं मी वृत्तिरूपाने स्फुरणारा अंकुर झांकून टाकिला व त्याला जीव बनविले. तीच शक्ति येथे कुंडलिनी या नांवाने संबोधिली आहे. ही परमेश्वराची कुंडलिनीशक्ति, जीवाचे ठिकाणीं 'मी' वृत्तिरूपाने स्फुरत असते. किंवा जीव हा 'मी' वृत्तिरूपच असल्यामुळें अहं अहं म्हणणारा जीवच परमेश्वराची शक्ति होय असे म्हटले तरी वावगे होत नाही व भगवंतांनी जीवभूत माझी पराप्रकृति होय असें म्हटलेहि आहे. मूळांत ही शक्ति सच्चिदानंद परमेश्वराची असल्यामुळें तीहि सच्चिदानंदरूपच आहे, पण जीवशरीराचे ठिकाणीं ती साडेतीन वेढे करून अधोमुख निजलेली आहे, असे माऊलींनी सांगितले आहे.

कुंडलिनी जागृत झाली म्हणजे ती षट्चक्रावरून ब्रह्मरंध्रांत जाते व तेथे ब्रह्मरूप होते ही निर्विकल्प व स्थिर आहे. श्रीज्ञानेश्वर माऊलींनी येथे सुंदर रहस्य सांगितले आहे. श्रीज्ञानेश्वर माउली म्हणतात "ऐसे पार्था जे निज स्वरूप माझे" शक्तीचा शक्तीत लय करून ज्या माझ्या निर्विकल्प स्वरूपाचा अनुभव येतो ते निर्विकल्प स्वरूपच "ते हे

चतुर्भुज कोंभेली। जयाची शोभा रूपांसी आली। देखोनि नास्तिकी नोकिली भक्तवृंदें" अंकुरित झालें. निर्विकल्प स्वरूपाच्या शोभेनेच चतुर्भुजरूप धारण केलें आहे. कर्मयोगांत ज्या भगवंताच्या रूपाचे ठिकाणीं चित्त स्थिर करून कर्म केलें असतां निष्कामकर्मानुष्ठान सिद्ध होतें, त्या भगवंताचे चतुर्भुज स्वरूपहि अत्यंत निर्विकल्पच आहे असा लययोगानेंच अनुभव येतो. हा अनुभव सांगण्याचे कारण असे की, अर्जुन हा सगुणभक्त असल्यामुळें सगुण भक्ताचें चित्त सगुण भगवंताचे ठिकाणींच स्थिर असलें तरी तें निर्विकल्प स्वरूपाचे ठिकाणींच स्थिर आहे व त्याला लय योग करण्याची गरज नाही. सगुण भगवंताच्या भक्तीने भगवद्ध्यान दृढ झाले असतां एका भगवंतावांचून दुसरे जग वगैरे कांहीं दिसत नाहीं असा भक्तीनें जगाचा नि:शेष लय होतो.

साम्ययोगाचे आणखी प्रकार—परमात्मा समस्वरूप आहे, पण त्याचे ठिकाणी सर्व विषम सृष्टि निर्माण झाली. या विषम सृष्टिकडे जोपर्यंत बुद्धि जाते, तोपर्यंत ती विषमच राहते. सांगितलेल्या लययोगानें सृष्टीचा लय झाला की, ती बुद्धि समस्वरूप भगवंताचे ठिकाणीं स्थिर होऊन सम होते. ही साम्यस्थिति इंद्रियांचे जो नियमन करीत नाही त्याला प्राप्त होत नाही. योगांत इंद्रियाचा व मनाचा निरोध करणें हेच मुख्य कर्तव्य आहे; म्हणून युक्ताहारविहार राहून इंद्रियें स्वाधीन करावी व सर्व विषयसुखाची वासना सोडून देऊन, चित्त परमेश्वराचे ठिकाणीं स्थिर करावे म्हणजे परमसुखाचा लाभ होतो. हा अभ्यास हळूहळू सावकाश करीत राहीले असतां मन वश होते. किंवा सर्व भूताचे ठिकाणीं एक परमेश्वरच भरला आहे व तीं भूतें परमेश्वरसत्तेवरच कल्पनेनें भासतात, अशी दृष्टि केली तरी चित्त परमेश्वराचे ठिकाणीं स्थिर होते. चित्त परमेश्वराचे ठिकाणीं स्थिर झाले की जीव ब्रह्मस्वरूप होतो किंवा ब्रह्म सम असल्यामुळे त्याला साम्यदशा प्राप्त होते, सर्व भूतांचे ठिकाणी परमात्मा एकरूप आहे अशी दृष्टि ठेवली असताही बुद्धीला साम्यदशा येते किंवा आपल्याप्रमाणेच सर्व जीवालाहि सुखदु:ख होते हे अखंड चित्तांत वागविले असताहि समदृष्टि होते. मीच सर्व सृष्टिरूप झालों आहे, म्हणून सुखदु:खादि कांही एक माझ्याहून भिन्न नाहीत असे जो अखंड पाहतो त्याचीहि समदृष्टि होते.

योगभ्रष्टाची गति—योगाभ्यास करीत असलेल्या पुरुषाला योगसिद्धि न होतांच मरण आले, तरी त्याचा मार्ग सुटत नाही. पुढल्या जन्मीं त्याला भगवत्कृपेने तो अभ्यास सहज साध्य होतो म्हणजे योगसिद्धि होईल अशीच सर्व सामुग्री प्राप्त होते. कितीहि जन्म गेले किंवा लागले तरी परमार्थ मार्गाला म्हणजे परमेश्वर प्राप्तीच्या मार्गाला-निश्चयपूर्वक लागलेल्या पुरुषाचा प्रत्येक जन्मांतील प्रयत्न उपयोगी पडतो. कोणताच सत्प्रयत्न वायां जात नाही.

सर्व योग्यांत भक्तियोगी श्रेष्ठ—कर्म करणारा, तपस्वी, शाब्दिक ज्ञानी या सर्वापेक्षां ज्याने आत्मस्वरूपाचे ठिकाणीं चित्त स्थिर करून प्रत्यक्ष ब्रह्मसुखाचा अनुभव घेतला तो श्रेष्ठ होय आणि आत्मस्वरूपाचें ठिकाणीं चित्त स्थिर करून, ब्रह्मसुख अनुभविण्याचे जेवढे मार्ग आहेत, त्या मार्गाने जाणाऱ्या सर्व योगापेक्षां, सगुण भगवंताचे ठिकाणीं ज्याचे प्रेम बसलें व त्या प्रेमानेच सर्व कांही साधतें अशी श्रद्धां ठेवून जो अहर्निश भगवंताचे भजन करितो, त्याचें चित्त अत्यंत निर्विकल्प अशा साम्यदशेला प्राप्त होत असल्यामुळे, तो सगुणभक्त सर्व योग्यांत श्रेष्ठ व भगवंताशी अत्यंत एकरूप झालेला होय.

॥ श्रीमद्सद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

श्रीज्ञानेश्वरी-गूढार्थदीपिका



गीताप्रेस, गोरखपुर

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय सातवा

अवतरणिका—योगमार्गाने परमेश्वराचा साक्षात् अनुभव घेतला, तरी प्रारब्धाने व्युत्थान झाल्यावर जडसृष्टि भासूं लागते आणि त्या दशेंत बुद्धि परमेश्वराकार न राहतां, विषयाकार होते.

वास्तविक, परमेश्वर व्यापक असल्यामुळें तो जसा आत आहे तसा बाहेरहि आहे. त्यावांचून दुसरी वस्तुच नाही. योगानें जगरहित केवळ अद्वैतपरमेश्वराचा, आत अनुभव घेतल्यानंतर, बाहेरहि तसाच अनुभव येण्याकरितां, व्युत्थानकालीं येणाऱ्या विषयांचा अनुभव नाहीसा व्हावयास पाहिजे व तो येण्याकरितां बाहेरच्या विषयरूप जगताचा देखावा, खोटा किंवा भ्रमरूप आहे, असें कळणें आवश्यक आहे.

भगवंताचे ठिकाणीं खऱ्या किंवा खोट्या जगताचें अस्तित्वच सिद्ध होत नाही व सर्वत्र एक परमात्माच अनुभवाला येतो. असें असूनहि जीव जगत् पाहतो व खरें समजतो. जगताचा प्रत्यय नाहिसा होऊन केवळ अद्वैतब्रह्मस्वरूपाचा प्रत्यय जीवाला यावा, म्हणून प्रपंचासहित ज्ञानरूप परमेश्वराचें निरूपण करीत, ज्ञानाने जगत् मिथ्या ठरवावें आणि ज्ञानानंतर सगुणभगवंताच्या प्रेमभक्तीने, जगताचा मिथ्या भासहि नाहीसा करावा, असें या अध्यायांत श्रीभगवान अर्जुनाला सांगत आहेत.

श्रीभगवानुवाच

मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः। असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु॥ १॥
ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः। यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते॥ २॥

अर्थ—श्रीभगवान म्हणतात, अर्जुना! माझ्या सगुण स्वरूपाचे ठिकाणीं चित्त, प्रेमाने आसक्त करून माझाच आश्रय करून, ऐक्यरूपी योग साधला असतां, माझ्या संपूर्ण ऐश्वर्यसंपन्न स्वरूपाला ज्या रीतीने तूं निःसंशय जाणूं शकशील तें सांगतो, ऐक.॥ १॥ मी आतां विज्ञानासहित संपूर्ण ज्ञान तुला सांगतों, जे ज्ञान जाणलें असतां, पुनः जाणावयाचें कांही राहत नाही.॥ २॥

आइकां मग तो श्रीअनंतु। पार्थातें असे म्हणतु। पैं गा तूं योगयुक्तु। जालासि आतां॥ १॥

अर्थ—श्रोते हो! पुढे ऐका. मग तो भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतो की अर्जुना! तूं आता खरोखर योगयुक्त झाला आहेस.॥ १॥

गूढार्थदीपिका—एकच परमात्मा सगुण व निर्गुण आहे. निर्गुणस्वरूप जेवढें शुद्ध आहे, तेवढेंच भगवंताचें सगुणस्वरूपहि शुद्ध आहे, हें मागें सहाव्या अध्यायांत श्रीज्ञानेश्वर माऊलींनी सांगितलेंच आहे; म्हणून भगवंताच्या सगुणस्वरूपाचे ठिकाणीं, ज्या अर्जुनाचें, प्रेम असल्यामुळे, चित्त स्थिर झालें होतें, तो अर्जुन योगयुक्त होता यांत शंकाच नाही.

मज समग्रातें जाणसी ऐसें। आपुलिया तळहातींचें रत्न जैसें। तुज ज्ञान सांगेन तैसें। विज्ञानेंसी॥ २॥

अर्थ—ज्याप्रमाणे तळहातांत असलेलें रत्न आपण संपूर्ण पाहूं शकतो, त्याप्रमाणे तूं मला ज्या ज्ञानाने संपूर्ण जाणशील, तें ज्ञान मी आता तुला विज्ञानासह सांगणार आहे.॥ २॥

गूढार्थदीपिका—मज समग्रातें जाणसी ऐसें—अत्यंत अद्वैत परमेश्वराचे ठिकाणीं, त्याहून दुसरें कांहीच नसल्यामुळें "तें हें आघवेचि मी द्रष्टा। ऐसिया बोधाचा माजिवटा। अनुभवाचा सुभटा। धेंडा तो नाचे"(ज्ञा. अ. १८-११८७) जे कांही सगुण निर्गुण अनुभवाला येतें, तें सर्व पूर्ण ब्रह्मच आहे, असें जाणणें, तें समग्र परमेश्वराला जाणणेंच होय, असें परमेश्वराला संपूर्ण जाणणें, हें ज्ञानविज्ञानाच्या विचारानेच होऊं शकतें.

एथ विज्ञानें काय करावें। ऐसें घेसी जरी मनोभावें। तरी पैं आधीं जाणावें। तेंचि लागे॥ ३॥

अर्थ—येथें विज्ञानाचा काय उपयोग आहे असें तुला वाटेल. पण तेंच अगोदर जाणलें गेलें पाहिजे. ॥ ३ ॥

गूढार्थदीपिका—विज्ञान म्हणजे प्रपंचज्ञान. हें प्रपंचाचें ज्ञान, प्रपंचांत नानाप्रकारचे पदार्थ, नानागुणधर्मांने नटलेले आहेत, अशा रीतीने आपल्याला होतें. एका अद्वैत सच्चिदानंद परमात्मवस्तूचे ठिकाणीं, जडविनाशी अशा नाना प्रकारच्या विशेष पदार्थांचें ज्ञान होणें हेंच प्रपंचज्ञान होय. अर्थात् असा प्रपंच, अद्वैतस्वरूपाचे ठिकाणीं अस्तित्वांत असणेंच शक्य नसल्यामुळें तो भ्रमरूप आहे, असें ज्ञानाने कळून आल्यावर, सर्वच विज्ञानरूप प्रपंच केवळ ज्ञानरूप आहे, असें अनुभवाला येतें. म्हणून आधीं विज्ञानरूप प्रपंचाचा विचार करावा लागतो; हें 'तरी पैं जाणावे। तेचि लागे'' या चरणांनी माऊलींनी दाखविलें आहे. ''**तरंगफेनभ्रमबुदबुदादि सर्वं स्वरूपेण जलं यथा तथा। चिदेव देहाद्यहमन्तमेतत् सर्वं चिदेवैकरसं विशुद्धम्**''॥ ३९१ ॥ (विवेक चूडामणि) असा आचार्यांनीहि आपला या श्लोकांत अनुभव सांगितला आहे. श्री ज्ञानेश्वरमाऊलींनीहि पुढें याच अध्यायांत हा भाव ''हे समस्तहि श्रीवासुदेवो। ऐंसा प्रतीतीरसाचा ओतला भावो।'' या ओवींत सांगितला आहे.

मग ज्ञानाचिये वेळे। झांकती जाणिवेचे डोळे। जैसी तीरीं नाव न ढळे। टेकलीसांती॥ ४॥
तैसी जाणीव जेथ न रिघे। विचार मागुता पाउलीं निघे। तर्कु आयणी नेघे। आंगीं जयाचां॥ ५॥
अर्जुना तया नांव ज्ञान। येर प्रपंचु हें विज्ञान। तेथ सत्यबुद्धि तें अज्ञान। हेंही जाण॥ ६॥
आतां अज्ञान अवघें हरपे। विज्ञान निःशेष करपे। आणि ज्ञान तें स्वरूपें। होऊनि जाइजे॥ ७॥

अर्थ—ज्याप्रमाणे नदीच्या कांठाला लागलेली नाव अढळ राहते, त्याप्रमाणे ज्ञान प्राप्त झालें असतां जाणीवच उरत नाही. ॥ ४॥ जें जाणीवेने जाणतां येत नाही, जेथें विचार मागल्या पायींच परततो, तर्क ज्याच्या स्वरूपापर्यंत पोहोचत नांही॥ ५ ॥ त्याला ज्ञान म्हणतात व बाकीचा नामरूपात्मक प्रपंच म्हणजे नाना प्रकारच्या विशेष वस्तूंचें विशेष ज्ञान, हें विज्ञान होय आणि या प्रपंचाचे ठिकाणीं जी सत्यबुद्धि तिला अज्ञान म्हणतात. ॥ ६ ॥ अज्ञान निःशेष नाहीसें होऊन, विज्ञानहि निःशेष वाळून गेले पाहिजे आणि आपण केवळ ज्ञानरूप होऊन राहिले पाहिजे. ॥ ७॥

गूढार्थदीपिका—अज्ञान अवघें हारपें—''न चेयं परमार्थविषया सृष्टिस्थिति:'' (ब्र. सू०. २-१-३३) प्रपंच नांवाची एक वस्तु परमेश्वरापासून निर्माण झाली आहे व ती सत्य आहे असे जें वाटतें तें अवघें अज्ञान होय. तें संपूर्ण नाहिसे झालें पाहिजे असें श्रीज्ञानेश्वर माऊलीचें म्हणणें असून ''आत्मन आकाश: संभूत:। आकाशाद्वायु:'' आत्म्यापासून आकाश झालें, आकाशापासून वायु झाला अशी सृष्टीची उत्पत्ति सांगणारी श्रुति खरोखरच परमेश्वरापासून सृष्टि झाली, असें सांगत नाही. ''ब्रह्मात्मभावप्रतिपादनपरत्वाच्चेत्येतदपि नैव विस्मर्तव्यम्'' कारणापासून होणारें कार्य आपल्या कारणाशीं अभिन्न असतें किंवा कारणरूपच असतें; म्हणून सच्चिदानंद ब्रह्मापासून झालेलें जगद्रूप कार्यहि पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे, असें प्रतिपादन करण्याच्या उद्देशाने परब्रह्मापासून सृष्टि झाली, असा सृष्टीचा व परब्रह्माचा कार्यकारणभाव श्रुतीने प्रतिपादन केला आहे, हेहि कोणी विसरूं नये असें आचार्यहि म्हणतात.

विज्ञान निःशेष करणे—अज्ञान निःशेष नाहीसें झालें म्हणजे विज्ञान—म्हणजे नामरूपांचा अनेक भिन्न भिन्न पदार्थांचे रूपाने दिसणारा संपूर्ण नामरूपात्मक विशेषभाव-निःशेष नाहीसा होतो, हा विशेषभाव, वास्तविक परब्रह्माचे दृष्टीने नाही, जीवच त्याची कल्पना करतो; कारण हा विशेषभाव, ''विशेषरूपं चिद्रूपं जडरूपं वा भवेत्'' (सूत सं. य. वै. खं. अ. १९ श्लो. २१-२२), वास्तविक असेल तर तो जडरूप किंवा चेतनरूप यापैकीं कोणत्या तरी रूपाने मानावा लागेल.

चिद्रूप मानल्यास तो साक्षीस्वरूपच ठरणार व साक्षीस्वरूप सामान्य (स्वरूप) असल्यामुळें विशेषभावरहित आहे, म्हणून विशेषभाव सिद्ध होणार नाही आणि विशेषभाव जडरूप मानल्यास, चिद्रूपसाक्षीस्वरूपाहून त्याचें स्वतंत्र अस्तित्व सिद्ध होऊं शकत नाही; म्हणून अद्वैत सम अशा ब्रह्मवस्तूचा विचार केला असतां विशेषभाव हा काल्पनिक ठरतो.

सारांश, नामरूपात्मक सगुणप्रपंच विशेषभावरहित सामान्यसच्चिदानंदादस्वरूपच आहे असें कळून आल्यावर प्रपंच म्हणून वस्तुच राहात नाही.

ज्ञान तें स्वरूपें होऊनि जाइजे—"नाप्रतीतिस्तयोर्बाधा किंतु मिथ्यात्वनिश्चयः"॥ १३॥ (पंचदशी तृ. दी.) दोरीवर दिसणाऱ्या सर्पाची ज्याप्रमाणे नामरूपासह निवृत्ति होते, त्याप्रमाणे अज्ञान भ्रमजन्य प्रपंचाची निवृत्ति नामरूपासह होत नाही. ती नामरूपें मिथ्या आहेत, म्हणजे परब्रह्माहून निराळी नाहीत, ब्रह्माहून त्यांचा निराळेपणा खोटा आहे, असा निश्चय होतो व नामरूपे परब्रह्मावर भासतात असें सांगून "निवृत्त एवं यस्मात्ते तत्सत्यत्वमतिर्गता। ईदृङ्गनिवृत्ति रेवात्र बोधजा नत्वभासनम्॥ ४६॥ (पंचदशी अद्वैतानंद प्र.) परब्रह्माच्या अद्वैतसत्तेवर व्यक्त होणारीं नामरूपें परब्रह्माहून निराळी सत्यरूप जगद्वस्तु आहे, असा जो त्याच्या सत्यत्वाचा व स्वतंत्रत्वाचा भास होतो तो नाहिसा होणे, असेंच ज्ञानाने होणाऱ्या अज्ञानाच्या निवृत्तीचें स्वरूप आहे; असें विद्यारण्यांनी सांगितले आहे.

अर्थात् ज्ञानाने प्रपंचाविषयीचें सत्यत्वबुद्धिरूप अज्ञान नाहिसें होऊन-म्हणजे प्रपंचाचा नाश होऊन-सर्व नामरूपात्मक प्रपंच सच्चिदानंदरूप पूर्ण ब्रह्मच आहे, असा अनुभव येतो. हेंच "ज्ञान तें स्वरूप। होऊनि जाइजे" या चरणाने माऊलींनी सांगितलें आहे.

"**न विश्वं नाम पुरुषादन्यत्किंचिदस्ति**" (मुं. उ. २-१-१० भाष्य) "**किंबहुना ब्रह्मैवेदं विश्वं समस्तमिदं जगद्वरिष्ठं वरतमम्**" (मुं. उ. २-२-१२ भाष्य) असेंच श्रुतीत व त्यावरील भाष्यांतहि सांगितलें आहे.

जेणें सांगतयाचें बोलणें खुंटे। ऐकतयाचें व्यसन तुटे। हें जाणणें सानें मोठें। उरों नेदी॥ ८॥

अर्थ—ज्या ज्ञानाचा अनुभव आल्यावर सांगणाऱ्याला त्याच्या पलीकडे सांगण्याजोगें राहत नसल्यामुळे त्याचें सांगणेच बंद पडते, ऐकणाऱ्याचें ऐकण्याचें व्यसनहि नाहीसें होतें व जे ज्ञान लहान मोठे हा भिन्न भाव उरूं देत नाही. ॥ ८॥

गूढार्थदीपिका—सर्व द्रष्टा दृश्य यांचे ठिकाणीं ज्ञान्याची एक अद्वैत सच्चिदानंद ब्रह्मदृष्टिच होते. त्याला ब्रह्माशिवाय कांही दिसतच नाही असा भाव. ब्रह्मणोऽन्यत् सदा नास्ति वस्तुतोऽवस्तुतोऽपिच। तथा सति शिवादन्यत्कथं पश्यति तत्त्ववित्॥ ५५॥ (सू. सं. य. वै. खं. अ. ४) जर अद्वैत परब्रह्माहून दुसरी निराळी अशी, सत्य किंवा मिथ्या वस्तुच नाही, तर ज्ञानीपुरुष परब्रह्माहून अन्य काही आहे असे कसा पाहूं शकेल? असें सूतसंहितेतहि म्हटले आहे.

ऐसें वर्म जें गूढ। तें किजेल वाक्यारूढ। जेणें थोडेनि पुरे कोड। बहुत मनींचें॥ ९॥

अर्थ—असें जे गुप्त ज्ञानरहस्य आहे ते आतां शब्दाने तुला सांगतों. ते थोडेहि प्राप्त झाले असतां मनातील सर्व इच्छा पूर्ण होऊन मन निरिच्छ होते. ॥ ९॥

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये। यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः॥ ३॥

अर्थ—हजारो मनुष्यांत एखादाच परमेश्वरप्राप्तीचा प्रयत्न करतो व अशा प्रयत्न करणाऱ्यांमध्ये एखादाच पुरुष मला यथार्थपणे जाणतो. ॥ ३॥

पैं गा मनुष्यांचिया सहस्रशां-। माजि विपाइलेयाची येथ धिंवसा। तैसेयां धिंवसेकरां बहुवसां। माजि विरळा जाणे॥ १०॥
जैसा भरलेया त्रिभुवना। आंतु एकएकु चांगु अर्जुना। निवडूनि कीजे सेना। लक्षवरी॥ ११॥
कीं तयाही पाठीं। जे वेळीं लोह मांसातें घांटी। ते वेळीं विजयश्रियेचां पाटीं। एकुचि बैसे॥ १२॥
तैसे आस्थेच्या महापुरीं। रिघताति कोटिवरी। परी प्राप्तीच्या पैल्तीरीं। विपाइला निगे॥ १३॥
म्हणऊनि सामान्य गा नोहे। हें सांगता वडिल गोठी गा आहे। परी तें बोलें येईल पाहें। आतां प्रस्तुत ऐकें॥ १४॥

अर्थ—खरोखर अर्जुना! हजारों मनुष्यामध्ये क्वचित् एखाद्याचेच ठिकाणीं आत्मप्राप्तीकरीतां धैर्य दिसून येते आणि अशा पुष्कळ धैर्यवानांपैकीं एखादाच मला जाणतो. ॥ १०॥ ज्याप्रमाणे मनुष्याने भरलेल्या त्रैलोक्यांतून एक एक धडधाकट धैर्यवान निवडून, लक्षावधि सेना उभारली जाते. ॥ ११॥ पुनः त्यांतहि युद्धांत शस्त्राचे शरीरावर

लागणारे घावापाठी घाव धैर्याने सहन करून एखादाच शूर, विजयश्री संपादन करतो. ॥ १२ ॥ त्याप्रमाणे परमेश्वरप्राप्तीच्या आस्थेच्या महापुरांत कोट्यावधि लोक शिरतात म्हणजे अनेक लोक परमेश्वर प्राप्तीची इच्छा करतात, पण प्राप्तीच्या पलीकडील तीरावर एखादाच जातो—म्हणजे एखादाच परमेश्वरप्राप्ति करून घेतो. ॥ १३ ॥ म्हणून परमेश्वरप्राप्तीचा परमार्थमार्ग सामान्य—म्हणजे कोणीहि सहज करून घेऊ शकतो असा-नाही. परमेश्वरप्राप्ति होणे कठीण आहे, ते पुढे सांगतां येईल. सध्या हें ऐक. ॥ १४ ॥

गूढार्थदीपिका—सामान्य गा नोहे। हें सांगतां वडिल गोठि गा आहे—जीवाच्या ठिकाणीं मूळांतच आत्मविस्मृतिरूप अविद्यादोष असून, त्यामुळें त्याच्या ठिकाणीं 'देह म्हणजे मी' असा आत्मसुखाचा विसर पडून, विषयसुखाची दृढ वासना उत्पन्न झाली आहे आणि या विषयवासनेमुळे होणाऱ्या पापकर्माने त्याची बुद्धि मंद होऊन विचारहीन झालेली आहे.

परमेश्वर प्राप्तीकरितां शास्त्रैकनिष्ठेनेच निष्कामकर्म करून, भगवदाज्ञापालनरूप भगवंताची भक्ति केली असतां, जीव निष्पाप होऊन, वैराग्यसंपन्न होतो व मग त्याची बुद्धि आत्मविचार करण्याजोगी शुद्ध होते व त्यायोगें त्याला परमेश्वर प्राप्ति होते. अशी भगवंताची प्राप्ति करून घेण्याकरितां एखादाच प्रयत्न करतो व कृतार्थ होतो; म्हणून परमार्थमार्ग थोर आहे व कठीण आहे.

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च। अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥
अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्। जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥

अर्थ—पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धि आणि अहंकार अशी आठ प्रकारची, भिन्न भिन्न झालेली प्रकृति हीच अपरा किंवा कार्यप्रकृति होय. ॥ ४ ॥ हे महाबाहो अर्जुना! जिने जगत् धारण केलें ती जीवभूत प्रकृति म्हणजे पराप्रकृति होय, असें जाण. ॥ ५ ॥

तरी अवधारीं गा धनंजया। हे महदादिक माझी माया। जैसी प्रतिबिंबे छाया। निजांगाची ॥ १५ ॥

अर्थ—अर्जुना! आता लक्ष दे. हे बुद्ध्यादि आठ पदार्थ माझी माया आहे. आपल्या आंगची सावली जशी भासमात्र असते त्याप्रमाणे ती आहे. ॥ १५ ॥

गूढार्थदीपिका—हे महदादिक माझी माया—"कापुसापासोनि होय दोरा। परी तो कापूसचि खरा। तैसे मनबुद्धिचित्तअहंकारा। होणे स्वरूपापासूनि" या मुकुंदराज महाराजांच्या वचनाप्रमाणें दोरा हें नांव व त्या नांवाने दाखविलेलें रूप किंवा आकार हे दोन्ही जसे कापूस या वस्तूचे ठिकाणीच असतात, त्याप्रमाणें पृथ्वी, आप, तेज, वायु इत्यादि नांवे व नांवानी दाखविलेली रूपें हीं दोन्ही अधिष्ठानभूत परब्रह्मवस्तूचे ठिकाणींच प्रगट होतात, म्हणून भूम्यादि सर्व नामरूपाने एक परब्रह्मवस्तूच व्यक्त झाली आहे. पण या नामरूपामुळें जीवाला भ्रम होऊन तो, त्या भिन्न वस्तु समजतो; म्हणून भूम्यादिकांना श्रीज्ञानेश्वर महाराजांनी "माया" म्हटलें आहे.

प्रतिबिंबे छाया। निजांगाची—मनुष्याची पडलेली छाया जशी भासमात्र असते तसे भूम्यादिकाचे परब्रह्माहून भिन्न वस्तुत्व सर्व भासमात्र किंवा खोटे आहे असा अर्थ.

आणि इयेतें प्रकृति म्हणिजे। जे अष्टधा भिन्न जाणिजे। लोकत्रय निपजे। इयेस्तव ॥ १६ ॥

अर्थ—हिला प्रकृति म्हणतात. ती आठ प्रकारची, परस्परांहून भिन्न आहे. हिच्यापासून संपूर्ण त्रैलोक्य उत्पन्न होतें. ॥ १६ ॥

गूढार्थदीपिका—इयेतें प्रकृति म्हणिजे—प्रकृति म्हणजे कारण. ह्या भ्रमजन्य महदादिक वस्तूपासूनच सर्व कार्यरूप ब्रह्मांड निर्माण होते; म्हणून या आठ वस्तूंना अपराप्रकृति असे येथें म्हटलें आहे. अपर म्हणजे त्या कार्यरूप किंवा उत्पन्न होणाऱ्या असून, प्रकृति म्हणजे त्या पुढील सर्व स्थूल भूतसृष्टीचें कारण आहे.

सांख्यशास्त्रांतहि मन सोडून राहिलेल्या महत्, अहंकार व पंचतन्मात्रा "प्रकृतिविकृतयः सप्त" या सात पदार्थांना प्रकृतिविकृति म्हटलें आहे. विकृति म्हणजे मूळ प्रकृतीचें कार्य व प्रकृति म्हणजे स्थूलभूत सृष्टीचें कारण

असा अर्थ. येथे भगवंतांनी व श्रीज्ञानेश्वर माऊलींनी, वेदान्ताशीं विरोध न येऊं देतां, सांख्यप्रक्रियाच मांडली आहे आणि महदादिक आठ पदार्थ माया म्हणजे भ्रमजन्य आहेत असें म्हणून, स्थूल सूक्ष्म सर्व ब्रह्मांड भ्रमाचा पसारा आहे, असें सूचित केलें आहे.

हे अष्टधा भिन्न कैसी। ऐसा ध्वनि धरिसी जरी मानसीं। तरी तेचि गा आतां परियेसीं। विवंचना॥ १७॥
आप तेज गगन। मही मारुत मन। बुद्धि अहंकार हे भिन्न। आठै भाग॥ १८॥
आणि या आठांची जे साम्यावस्था। ते माझी परम प्रकृति पार्था। तिये नाम व्यवस्था। जीवु ऐसी॥ १९॥

अर्थ—ही आठ प्रकाराने भिन्न असलेली प्रकृति कोणती आहे, अशी तुला जाणण्याची इच्छा होईल, तर तेंच आतां स्पष्ट करून सांगतो, ऐक.॥ १७॥ पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, मन, बुद्धि व अहंकार हे तिचे आठ भिन्न भिन्न भाग आहेत.॥ १८॥ आणि या आठ पदार्थांची जी साम्यावस्था म्हणजे अव्यक्तदशा, ती माझी परम प्रकृति म्हटली जाते. तिला जीव हें नांव आहे.॥ १९॥

गूढार्थदीपिका—आठांची जी साम्यावस्था—ज्या अवस्थेंत कोणत्याहि कार्यभूत पदार्थाची विशेषभावाने प्रतीति येत नाही, तिला त्या पदार्थाची साम्यावस्था म्हणतात. हिलाच पदार्थाची कारणावस्था किंवा अव्यक्त अवस्था अशीहि नांवें आहेत. जीवाने मानलेले महादादिक पदार्थ प्रथम साम्यावस्थेंत किंवा अव्यक्त असतात. मूळांत वस्तु एक रूपाची असून, भ्रमाने ती भलत्याच प्रकारची दिसण्यापूर्वी, ज्या साम्यावस्थेंत म्हणजे विशेषरहित अवस्थेंत असते, ती अवस्था म्हणजे मूळ वस्तूचें अज्ञानच असणार. म्हणून येथें सच्चिदानंदस्वरूपाचे ठिकाणी भ्रमाने महदादिक पदार्थाचा भास होण्यापूर्वी ते महदादिक पदार्थ ज्या साम्यावस्थेंत होते ती साम्यावस्था म्हणजे सच्चिदानंदस्वरूपाचें अज्ञानच होय.

तिचे नाम व्यवस्था जीव ऐसी—सर्व ब्रह्मांडाचें साम्यावस्थारूप जें मूळ कारण आहे, तें कारण म्हणजे जीव होय, असें माऊलीनी येथे म्हटलें आहे याचा अर्थ असा आहे की ''अज्ञानप्रतिबिंबचैतन्यं जीव:'' ब्रह्मस्वरूपाचें जें अज्ञान, त्यांत प्रतिबिंबित झालेलें चैतन्य तो जीव होय, असें वेदान्तशास्त्रांत म्हटलें आहे, म्हणजे चैतन्य व अज्ञान यांचा संबंध ही जीवदशा होय. जीवांतील चैतन्यांश जड विनाशी नसल्यामुळें तो जड विनाशी अशा महादादिकाची प्रकृतिरूप साम्यावस्था होऊं शकत नाही. कारण समानधर्मियांचाच कार्यकारणभाव सिद्ध होत असतो. विषमधर्मियांचा कार्यकारणभाव सिद्ध होत नाही. म्हणून ज्या अज्ञानांत प्रतिबिंबित झाल्यामुळें चैतन्याला जीवसंज्ञा प्राप्त झाली तें अज्ञानच महदादिक पदार्थाची साम्यावस्था होय, असें मानावें लागतें. आणि हेंच ''तिये नाम व्यवस्था जीव ऐसी'', या चरणाने माऊलींनी सुचविलें आहे.

वेदान्तातहि परब्रह्मस्वरूपाचें अज्ञान, हें सर्व जडविनाशी जगत्प्रतीतीला कारण आहे असेंच मानलें आहे. वेदान्तात जीव एक आहे व जीव अनेक आहेत असे दोन वाद आहेत. अज्ञान एक आहे व त्यांत प्रतिबिंबित किंवा तदुपहित चैतन्यरूप जीव एक आहे असा एकजीववाद्यांचा सिद्धान्त असून, अज्ञानें अनेक असून त्यांत प्रतिबिंबित चैतन्यरूप जीव अनेक आहेत असा अनेकजीववाद्यांचा सिद्धान्त आहे. अनेकजीववादांत ईश्वर सृष्टिकर्ता असून, एकजीववादांत ''अस्मिन्पक्षे जीव एव स्वाज्ञानवशात् जगदुपादानं निमित्तं च'' जीव हा आपल्या अज्ञानाने जगाचें उपादान व निमित्त असें दोन्ही प्रकारचें कारण होतो-म्हणजे तोच सच्चिदानंदस्वरूपाला विसरून स्वप्नाप्रमाणे आपली जगद्रूपाने कल्पना करतो. ''ध्यायतीव लेलायतीव'' (बृ. उ. ४-३-७) असें श्रुतीने सांगितलें आहे.

या दोन वादांतील भेद पुढे नवव्या अध्यायांत विशेष रीतीने सांगण्यात येईल.

''जीव'' या एकवचनी प्रयोगावरून श्रीज्ञानेश्वर माऊलींनी येथे एकजीववादच स्वीकारला आहे हें स्पष्ट होतें.

जे जडातें जीववी। चेतनेतें चेतवी। मनाकरवीं मानवी। शोक मोहो॥ २०॥
पैं बुद्धीच्या अंगीं जाणणें। तें जियेचिये जवळिकेचे करणें। जिया अहंकाराचेनि विंदाणें। जगचि धरिजे॥ २१॥

अर्थ—जी जड पदार्थ अस्तित्वांत आणते, निष्क्रिय चैतन्याकडून क्रिया करविते व मनाला शोक, मोह

मानायला लावते. ॥ २० ॥ बुद्धीचा जाणणें हा धर्म तिच्या सान्निध्यानेच उत्पन्न होतो व अहंकाररूपी खेळाने जग धरून ठेविलें जातें. ॥ २१ ॥

गूढार्थदीपिका—बुद्धीच्या अंगीं जाणणें। ते जिये जवळिकेचे करणें—प्रकृतीचा संबंध वागविला जातो तोपर्यंत बुद्धींत जाणीव स्फुरते. वास्तविक पाहतां परब्रह्म जाणीवरहित निर्विकल्प आहे असा भाव.

जया अहंकाराचे बिंदाणें। जगचि धरिजे—प्रकृतीचें कार्य जो मिथ्या अहंकार, त्यामुळेच जीवाला जगाचा प्रत्यय येतो. अहंकार नि:शेष नाहीसा झाला की जगाचा मुळींच प्रत्यय येत नाही.

एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय । अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ ६ ॥

अर्थ—अर्जुना! सर्व भूतें यांच्यापासून उत्पन्न झालीं असें जाण. मीच संपूर्ण जगाच्या उत्पत्तिस्थितिलयांचें स्थान आहे. ॥ ६ ॥

ते सूक्ष्म प्रकृति कोडें। जैं स्थूळाचिया आंगा घडे। तैं भूतसृष्टीची पडे। टांकसाळ॥ २२ ॥
चतुर्विधु ठसा। उमटों लागे आपैसा। मोला तरी सरिसा। परी थरचि आनान॥ २३ ॥
होती चौऱ्यांशीं लक्ष थरा। येरा मिती नेणिजे भांडारा। भरे आदिशून्याचा गाभारा। नाणेयांसी॥ २४ ॥

अर्थ—ती सूक्ष्मप्रकृति-महादादिक अपरा-जेव्हा स्थूल सृष्टीला जन्म देते, तेव्हा सर्व भूतसृष्टि, टांकसाळेतील नाण्याप्रमाणे उत्पन्न होते. ॥ २२ ॥ जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज अशी चार प्रकारची सृष्टि आपोआप उत्पन्न होते. सर्वांचे मोल सारखेंच असते—म्हणजे सर्व भूतसृष्टि पांच-भौतिकच असते-त्यांत नामरूपांचा प्रकार निरनिराळा असतो, इतकेच. ॥ २३ ॥ असे हे भूतांचे प्रकार किंवा योनि चौऱ्यांशी लक्ष आहेत. त्यांतील भूतांची गणतीच करतां येत नाही. ज्या परमेश्वराचे ठिकाणीं जगाचें मूळींच अस्तित्व नाही, त्या परमेश्वराचें आदिशून्याचागाभारा म्हणजे जगरहित अस्तित्वस्वरूपदालन, भूतसृष्टिरूप नाण्याने भरून जातें. ॥ २४ ॥

गूढार्थदीपिका—आदिशून्याचा गाभारा—"सर्व शून्याचा निष्कर्षु। जिया बाईला केला पुरुषु" (अमृ. प्र. १-२७). ज्या ठिकांणीं कोणत्याहि ज्ञानाची जाणीव नसते, असें निर्विकल्प चिन्मात्र ब्रह्मस्वरूप हा आदिशून्याचा गाभारा होय.

ऐसें एकतुके पांचभौतिक। पडती बहुवस टांक। मग तिये समृद्धीचे लेख। प्रकृतीचि धरी॥ २५ ॥
जे आंखूनि नाणें विस्तारी। पाठीं तयांची आटणी करी। माजी कर्माकर्माचिया व्यवहारीं। प्रवर्तु दावी॥ २६ ॥
हें रूपक परी असो। सांगों उघड जैसें परियेसों। तरी नामरूपाचा अतिसो। प्रकृतीच कीजे॥ २७ ॥
आणि प्रकृति तंव माझ्या ठायीं। बिंबे येथ आन नाहीं। म्हणोनि आदि मध्य अवसान पाहीं। जगासि मी॥ २८ ॥

अर्थ—याप्रमाणे एकसारखीं अनेक पांचभौतिक भूतरूपी नाणीं पडतात आणि त्या वाढीची मोजदाद प्रकृतीच करते. ॥ २५ ॥ ही प्रकृति भूतसृष्टीच्या नाण्यांची बरोबर त्यांच्या आकाराला धरून उत्पत्ति करते व नंतर त्याचा पुनः लय करते. उत्पत्तिलयांच्या मध्यें पापपुण्यांच्या व्यवहाराची प्रवृत्ति हीच करते. ॥ २६ ॥ पण हें रूपक असूं द्या. स्पष्ट समजेल, असें आतां सांगतों. ज्याला आपण जगत् म्हणतो, तो केवळ नामरूपाचा विस्तार—म्हणजे निरनिराळ्या नामरूपांचें निरनिराळे पदार्थ-आहे. तो असा विस्तार प्रकृतीनेच केला आहे. ॥ २७ ॥ आणि ही अज्ञानरूप प्रकृति माझ्या ठिकाणींच कल्पिली जाते. हें काही खोटें नाही; म्हणून जगाचें आदि, मध्य, अंत मीच आहे, असें जाण ॥ २८ ॥

मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनञ्जय । मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥

अर्थ—अर्जुना! मी अत्यंत अद्वैतस्वरूप असल्यामुळे माझ्याहून दुसरी निराळी वस्तूच नाही. म्हणून सूत्रांत मणी असावे, त्याप्रमाणे हें सर्व माझ्यांत भरलेले आहे.

हें रोहिणीचें जळ। तयाचें पाहातां येईजे मूळ। तैं रश्मि नव्हती केवळ। होय तें भानु॥ २९ ॥
तयाचिपरी किरीटी। इया प्रकृती जालिये सृष्टी। जैं उपसंहरूनि कीजेल ठी। तैं मीचि आहें॥ ३० ॥

ऐसें होय दिसे न दिसे। हें मजचि माजिवडें असे। मियां विश्व धरिजे जैसें। सूत्रें मणि॥ ३१ ॥
सुवर्णाचे मणी केले। ते सोनियाचे सुतीं वोविले। तैसें म्यां जग धरिलें। सबाह्याभ्यंतरीं॥ ३२ ॥

अर्थ—अर्जुना! हें मृगजळ यांचें मूळ पाहूं गेले असतां केवळ किरण हें मूळ नसून, साक्षात् सूर्य हाच एक मूळ असतो. ॥ २९ ॥ त्याचप्रमाणे अर्जुना! ही जी प्रकृति सृष्टि झाली, त्या सृष्टीचा उपसंहार करून पाहिलें तर मीच आहे असा अनुभव येतो. ॥ ३० ॥ सृष्टीचें उत्पन्न होणें, दिसणें, न दिसणें हे सर्व भास माझ्या ठिकाणीं आहेत व ज्याप्रमाणे सुतांत ओवलेल्या मण्यांना सूत्र धरून ठेवतें, त्याप्रमाणे मी जगाला धारण करतो. ॥ ३१ ॥ ज्याप्रमाणे सोन्याचे मणी करून, सोन्याचे सुतांत ओवावें, त्याप्रमाणे आंतून बाहेरून मी जगाला धरून ठेविलें आहे—म्हणजे नामरूपरहित व नामरूपसहित मीच आहे. ॥ ३२ ॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे सूर्याच्या प्रकाशाच्या होणाऱ्या सूक्ष्म कंपनावर मृगजळाचा भ्रम होतो. तें जळ नसून सूर्यप्रकाशाचें कंपन होय. त्यापमाणे अज्ञानप्रकृतीपासून झालेल्या सृष्टीचा लय करून किंवा कल्पना सोडून पाहूं लागल्यास, सृष्टि नाही, एक मीच आहे, असा अनुभव येतो. म्हणून हें भूतसृष्टिरूप जगत् सच्चिदानंद परमेश्वरापासून झालें नसून, अज्ञान-भ्रमरूप जी पराप्रकृति तिच्यापासून तें झालें आहे. परमात्मा केवळ त्या जगद्रूपभ्रमाचा आधार आहे-म्हणजे जगद्रूपभ्रमाची कल्पना परमेश्वरावर केली गेली आहे. असे येथे दाखविलें आहे. वास्तविक नामरूपात्मक प्रपंच म्हणून कांही एक निराळी वस्तु नसून, ज्याला जीव नामरूपात्मक प्रपंच म्हणतो, तो परब्रह्माचाच नामरूपात्मक देखावा आहे, असें कळून येते, हें माऊलींनी या ओव्यांतून स्पष्ट केलें आहे.

रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययोः । प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु॥ ८ ॥
पुण्यो गन्धः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ । जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु॥ ९ ॥
बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् । बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम्॥ १० ॥
बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम् । धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ॥ ११ ॥

अर्थ—अर्जुना! पाण्याचे ठिकाणीं असलेला रस, चंद्रसूर्याचे ठिकाणीं असलेली प्रभा आणि मनुष्यांत असणारें पौरुष हे सर्व मी आहे. ॥ ८ ॥ पृथ्वीमध्यें असलेला शुद्ध गंध, अग्नीच्या ठिकाणचें तेज, सर्व भूतें ज्यावर जगतात तें जीवन आणि तपस्वियांच्या ठिकाणचें तप मी आहे. ॥ ९ ॥ अर्जुना! सर्व भूतांचे अनादि शाश्वत बीज मीच आहे, असें जाण बुद्धिमंताचे ठिकाणीं असलेली बुद्धि मीच आहे. तेजस्वी पुरुषाचे ठिकाणीं असलेलें तेज मीच आहे. ॥ १० ॥ हे भरतश्रेष्ठ! बलवानाचे ठिकाणीं असणारे बल व धर्माचे अविरोधी जी विषयकामना आहे, ती वासना किंवा काम मी आहे. ॥ ११ ॥

म्हणोनि उदकीं रसु। कां पवनीं जो स्पर्शु। शशिसूर्यी जो प्रकाशु। तो मीचि जाण॥ ३३ ॥
तैसाचि नैसर्गिकु शुद्धु। मी पृथ्वीच्या ठायीं गंधु। गगनीं मी शब्दु। वेदीं प्रणवु॥ ३४॥
नराच्या ठायीं नरत्व। जें अहंभाविये सत्त्व। तें पौरुष मी हें तत्त्व। बोलिजत असें॥ ३५ ॥
अग्नि ऐसें आहाच। तेजीं नामाचें आहे कवच। तें परतें केलिया साच। निजतेज तें मी॥ ३६ ॥
आणि नानाविध योनीं। जन्मोनि भूतें त्रिभुवनीं। वर्तत आहाति जीवनीं। आपुलाल्या॥ ३७॥
एकें पवनेंचि पिती। एकें तृणास्तव जिती। एकें अन्नाधारें राहती। जळें एकें॥ ३८ ॥
ऐसें भूताप्रति आनान। जें प्रकृतिवशें दिसे जीवन। तें आघवांठायीं अभिन्न। मीचि एक॥ ३९ ॥

अर्थ—म्हणून पाण्याच्या ठिकाणी जो रस आहे, वायूच्या ठिकाणी जो स्पर्श आहे, चंद्रसूर्याचे ठिकाणीं जो प्रकाश आहे, तो मी आहे. ॥ ३३ ॥ त्याचप्रमाणे पृथ्वीचे ठिकाणीं जो स्वाभाविक शुद्ध वास आहे, आकाशांत जो शब्द आहे व वेदांत जो प्रणव आहे, तो मी आहे. ॥ ३४ ॥ मनुष्याचे ठिकाणी मनुष्यत्व म्हणजे जें मीपणाने स्फुरणारें सत्व आहे, तें मीच आहे, असा सिद्धांत देव सांगत आहेत. ॥ ३५ ॥ तेजाचे ठिकाणीं अग्नि या नामाचे वरवर कवच दिसतें, तें नाहिसे झाल्यावर जें तेज राहतें, तें माझें निजतेज आहे. ॥ ३६ ॥ नानाप्रकारच्या योनींत जन्मलेले सर्व

ब्रह्मांडांतील प्राणी आपल्या निरनिराळ्या पदार्थावर जगतात. ॥ ३७ ॥ कोणी वायूवरच जगतात, कोणी तृणावर जगतात, कित्येक अन्नावर जगतात व कोणी पाण्यावर पोसले जातात. ॥ ३८ ॥ याप्रमाणे जीवाजीवाचे भिन्न भिन्न जीवन आहे तें प्रकृतीमुळें भिन्न भिन्न दिसतें, एऱ्हवीं सर्व भूतांचे ठिकाणीं एक मीच अभिन्न जीवन आहे. ॥ ३९ ॥

गूढार्थदीपिका—सृष्टींतील पदार्थांत जें वस्तुत्व आहे तें सर्व वस्तुत्व एक भगवानच आहेत. भगवंतावांचून निराळें वस्तुत्व नाही. एका भगवंताचीच निरनिराळ्या वस्तुत्वाने कल्पना केली गेली आहे. पदार्थांत जे पदार्थाचें अस्तित्व आहे, तें पदार्थाचें स्वतंत्र अस्तित्व नसून परमात्म्याचें अस्तित्व आहे. पदार्थांत जो चैतन्यांश आहे, तो परमेश्वराचा अंश होय आणि पदार्थ भोगून ज्या सुखभोगावर प्राणी जगतो, तें सुख परमात्माच होय असा अर्थ.

पैं आदिचेनि अवसरें। विरूढे गगनाचेनि अंकुरे। जें अंतीं गिळी अक्षरें। प्रणवपीठींचीं॥ ४० ॥
जंव हा विश्वाकार असे। तंव जें विश्वाचिसारखें दिसे। मग महाप्रळयदशे। कैसेंही नव्हे॥ ४१ ॥

अर्थ—सृष्टीच्या उत्पत्तीच्या वेळेस जें आकाशरूपी अंकुराने वाढतें व प्रलयाचे वेळीं शेवटीं जें प्रणवाची अ, उ, म, हीं अक्षरें गिळून सर्व सृष्टीचा लय करतें. ॥ ४० ॥ जोपर्यंत हा विश्वाचा आकार आहे, तोपर्यंत जें विश्वाच्या आकाराचें दिसतें व महाप्रलयामध्यें जें कोणत्याहि प्रकाराने राहत नाही. ॥ ४१ ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्माचें अद्वैतत्व केव्हाहि नाहीसे होत नाही ''आंगचिया आटणिया। कांतु उवाया आणिला जिया। स्वसंकोचे प्रिया। रूढविली जेणें॥ ३२ ॥'' (अमृ. प्र० १) परब्रह्म सृष्टीकालीं आपल्या शक्तीशीं एकरूप होऊन केवळ एका शक्तीरूपाने अद्वैतरूप राहतें आणि महाप्रलयांत सर्व शक्त्याविर्भावाचे आपल्याशीं ऐक्य करून घेऊन, केवळ आपल्या स्वरूपाने अद्वैतरूप राहतें.

ऐसें अनादि जें सहज। तें मी गा विश्वबीज। हें हातातळीं तुज। देइजत असे॥ ४२ ॥
मग उघड करूनि पांडवा। जैं हें आणिसील सांख्याचिया गांवा। तैं ययाचा उपेगु बरवा। देखशील॥ ४३ ॥

अर्थ—असें अनादि व स्वाभाविक जें विश्वाचें बीज तें मी आहे. हा सिद्धांत तुझ्या हातांत देत आहे म्हणजे स्पष्ट सांगत आहे. ॥ ४२ ॥ मग हा सिद्धान्त जेव्हा सांख्यशास्त्राच्या साहाय्याने म्हणजे आत्मानात्म व्यतिरेकाने उघड म्हणजे स्पष्ट करून घेशील, तेव्हा या सिद्धान्ताचा उपयोग तुला कळूं लागेल. ॥ ४३ ॥

गूढार्थदीपिका—भूतसृष्टि ही सत्य आहे असे जोपर्यंत वाटतें तोपर्यंत त्या सर्व सृष्टीला कारण असलेल्या परमेश्वराचा अनुभव घेण्याकरितां, व्यतिरेक करून म्हणजे परमेश्वराला सृष्टीहून निराळे समजून व अलग करून, घेतलें पाहिजे.

परी हे अप्रासंगिक आलप। आतां असतु बोलों संक्षेप। जाण तपियांचां ठायीं तप। तें स्वरूप माझें॥ ४४ ॥
बळियांमाजीं बळ। तें मी जाणें अढळ। बुद्धिमंतीं केवळ। बुद्धि ते मी॥ ४५ ॥
भूतांचां ठायीं कामु। तो मी म्हणे आत्मारामु। जेणें अर्थास्तव धर्मु। थोरु होय॥ ४६ ॥

अर्थ—पण आतां हें प्रस्तुत विषयाला सोडून असलेलें भाषण पुरे. तें मी बोलत नाही. आतां पुढें संक्षेपाने सांगतो. तपस्वियांचे ठिकाणीं जें तप असतें तें माझें रूप होय. ॥ ४४ ॥ बलवंतामध्यें जें बल असतें तें निश्चित मी आहे. बुद्धिमंताचे ठिकाणीं जी बुद्धि आहे ती मी आहे. ॥ ४५ ॥ ज्या विषयसुखाच्या वासनेने केवळ धर्मपुरुषार्थ साधण्याकरितांच धन संपादन केलें जातें, ती जीवाच्या ठिकाणीं असणारी वासना, माझें स्वरूप होय, असें आत्मस्वरूपांत रममाण होणारे भगवान श्रीकृष्ण म्हणाले. ॥ ४६ ॥

एऱ्हवीं विकाराचेनि पैसें। करी कीर इंद्रियांच्याचि ऐसें। परी धर्मासि वेखासें। जावों नेदी॥ ४७ ॥
जे अप्रवृत्तीचा अव्हांटा। सांडूनि विधीचिया निघे वाटा। तेवींचि नियमाचा दिवटा। सवें चाले॥ ४८ ॥
कामु ऐशिया वोजा प्रवर्ते। म्हणोनि धर्मासि होय पुरतें। मोक्षतीर्थीचें मुक्तें। संसारु भोगी॥ ४९ ॥
जो श्रुतिगौरवाच्या मांडवीं। काम सृष्टीचा वेलु वाढवी। जंव कर्मफळेंसीं पाल्वी। अपवर्गीं टेके॥ ५० ॥

अर्थ—एऱ्हवीं वाढलेल्या विकारानुसारच इंद्रियांना आवडेल तसेंच वागतो पण तें वागणें धर्माच्या विरुद्ध कधीं

होऊ देत नाही. ॥ ४७ ॥ शास्त्राने निषेध केलेल्या अपप्रवृत्तीचा आडमार्ग सोडून, शास्त्राने सांगितलेल्या मार्गानेच जो जातो व त्याचप्रमाणे शास्त्रोक्त नियमाची मशाल बरोबर घेऊन जो चालतो. ॥ ४८ ॥ विषयवासनेची पूर्ति, अशी शास्त्रीय मार्गानेच होत असल्यामुळें धर्माचें पूर्ण आचरण होतें. असें शास्त्राने सांगितल्याप्रमाणे विषयांचें सेवन करणारे पुरुष संसारसुख भोगणारे मोक्षतीर्थांतील मोतींच होत. किंवा मोक्षतीर्थांत मुक्त होऊन संसार भोगतात, असा अर्थ. ॥ ४९ ॥ जो वेदाज्ञेचा अत्यंत आदर बाळगून, त्या आदररूपी मांडवावरच, आपल्या नानाप्रकारच्या विषयवासनेचा वेल, त्याचीं पानें, फुलें मोक्षाला टेकेपर्यंत वाढवितो. ॥ ५० ॥

गूढार्थदीपिका—"धर्मस्य ह्यापवर्गस्य" (भाग० स्कं० १-२) प्रवृत्तिधर्महि स्वैर विषयसुख भोगाकरितां निर्माण झाला नसून, स्वैर विषयसेवनास आळा बसून जीवाला मोक्ष प्राप्त व्हावा, याच उद्देशाने निर्माण झाला आहे. आपली स्वतंत्र विषयसुखभोगाची इच्छा न ठेवता, केवळ भगवंताची आज्ञा समजून शास्त्रानुसार विषयसेवन करणाऱ्याचें विषयसेवनही, अपवर्ग म्हणजे मोक्षप्राप्ति, करून देणारें होतें, असें भगवंताचें व माऊलीचें म्हणणे आहे.

ऐसा नियतु कां कंदर्पु। जो भूतां यां बीजरूपु। तो मी म्हणे बापु। योगियांचा॥ ५१ ॥
हें एकैक किती सांगावें। आतां वस्तुजातचि आघवें। मजपासूनि जाणावें। विकरलें असे॥ ५२ ॥

अर्थ—अशी शास्त्रनियमित विषयवासना व जी या सर्व भूतसृष्टीच्या उत्पत्तीला बीजभूत आहे, ती वासना मी आहे, असें सर्व योगियांचा बाप म्हणतो. ॥ ५१ ॥ अर्जुना! हे एक एक निराळे किती सांगूं! जेवढी कांही वस्तु आहे, ती संपूर्ण वस्तु मजपासूनच उत्पन्न झाली आहे, असें समज. ॥ ५२ ॥

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये। मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि॥ १२॥

अर्थ—जे कांही सात्विक, राजस, तामस भाव आहेत, ते सर्व माझ्यापासूनच प्रगट झाले आहेत, असें जाण; पण ते माझ्या ठिकाणीं भासत असले, तरी त्यांच्यांत मी नाही. ॥ १२ ॥

जे सात्त्विक हन भाव। कां रजतमादि सर्व। ते ममरूपसंभव। वोळखे तूं॥ ५३ ॥
हे जाले तरी माझां ठायीं। परी ययांमाजीं मी नाहीं। जैसी स्वप्नींचां डोहीं। जागृति न बुडे॥ ५४॥
नातरी रसाचीचि सुघट। बीजकणिका तरी घनवट। परी तियेस्तव होय काष्ठ। अंकुरद्वारें॥ ५५ ॥
मग तया काष्ठाचां ठायीं। सांग पां बीजपण असे काई। तैसा मी विकारीं नाहीं। जरी विकारला दिसें॥ ५६ ॥
पैं गगनीं उपजे आभाळ। परी तेथ गगन नाहीं केवळ। अथवा आभाळीं होय सलिल। तेथ अभ्र नाहीं॥ ५७ ॥
मग तया उदकाचेनि आवेशें। प्रगटलें तेज जें लखलखीत दिसे। तिये विजूमाजीं असे। सलिल कायी॥ ५८ ॥
सांगें अग्नीस्तव धूम होये। तिये धूमीं काय अग्नि आहे। तैसा विकारु हा मी नोहें। जरी विकारला असें॥ ५९ ॥

अर्थ—अर्जुना! जे कांही सात्विक, राजस, तामस भाव आहेत, ते सर्व माझ्या स्वरूपापासून झाले, असे जाण. ॥ ५३ ॥ ज्याप्रमाणे स्वप्न जागृतीच्या संस्काराने होतें, तरी स्वप्नांत जागृती राहत नाही, त्याप्रमांणे हे सात्विकादि सर्व भाव माझ्या ठिकाणीं भासत असले, तरी त्यांत मात्र मी नाही. ॥ ५४॥ ज्याप्रमाणे छोटेसें व घन असलेलें बीं केवळ रसाचेंच बनलेंले असतें आणि त्यापासूनच अंकूर उत्पन्न होऊन, पुढें त्याचें काष्ठ होतें. ॥ ५५ ॥ मग उत्पन्न झालेल्या काष्ठाचे ठिकाणीं बीज असतें काय? अर्जुना! सांग बरें. त्याप्रमाणे त्रिगुणात्मक कार्यरूपाने मीच कार्यरूप झालों, असें दिसत असलें, तरी त्या कार्यांत मी मात्र नाही. ॥ ५६ ॥ वास्तविक आकाशांतच अभ्रें येतात, पण त्या अभ्रांत आकाश नसतें, किंवा अभ्रापांसून पाऊस पडतो, पण त्या पावसांत अभ्रें नसतात. ॥ ५७॥ पाण्याने भरलेल्या मेघांच्या संघर्षणाने लखलखीत अशी वीज चमकते, पण त्या वीजेमध्ये पाणी असतें काय? ॥ ५८ ॥ अर्जुना! सांग, अग्नीपासून धूर होतो, पण त्या धुरांत अग्नि असतो काय? त्याप्रमाणेच हें सर्व त्रिगुणात्मक सृष्टिकार्य माझ्या ठिकाणीं भासत असलें, तरी तें कार्य मात्र मी नव्हे. ॥ ५९ ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्मापासून झालेली सृष्टी, जोपर्यंत जीव परब्रह्माहून निराळी वस्तु समजतो, तोपर्यंत त्या सृष्टीत, त्याला परब्रह्माचा अनुभव येणें शक्य नाही असा भाव.

त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् । मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम्॥ १३ ॥

अर्थ—त्रिगुणात्मक ह्या सर्व भावांनी सर्व प्राणी मोहित झाले आहेत, म्हणून या त्रिगुणात्मक भावाचे पलीकडे किंवा त्रिगुणात्मकभावातीत असलेला मी अविनाशी आहे, असें मला जाणत नाहीत. ॥ १३ ॥

परी उदकीं झाली बाबुळी। ते उदकातें जैसी झांकोळी। कां वायांचि आभाळीं। आकाश लोपे॥ ६० ॥
हां गा स्वप्न हें लटिकें म्हणों ये। परि निद्रावशें बाणलें होये। तंव आठवु काय देत आहे। आपणपेयां॥ ६१ ॥
हें असो डोळ्यांचें। डोळांचि पडळ रचे। तेणें देखणेंपण डोळ्यांचें। न गिळिजे कायि॥ ६२ ॥
तैसी हे माझीच बिंबली। त्रिगुणात्मक साउली। कीं मजचि आड वोडवली। जवनिका जैसी॥ ६३ ॥
म्हणऊनि भूतें मातें नेणती। माझींच परी मी नव्हती। जैसी जळींचीं जळीं न विरती। मुक्ताफळें॥ ६४ ॥
पैं पृथ्वीयेचा घटु कीजे। सवेंचि पृथ्वीसि मिळे जरी मेळविजे। एऱ्हवीं तोचि अग्निसंगें सिजे। तरी वेगळा होय॥ ६५ ॥
तैसें भूतजात सर्व। हे माझेचि कीर अवयव। परी मायायोगें जीव-। दशे आले॥ ६६ ॥
म्हणोनि माझेचि मी नव्हती। माझेचि मज नोळखती। अहंममताभ्रांती। विषयांध झाले॥ ६७ ॥

अर्थ—पाण्यापासूनच शेवाळ होतें व पाण्यालाच आच्छादितें किंवा व्यर्थ च मेघाचे योगाने आकाश दिसत नाही, असें वाटतें. ॥ ६० ॥ दिसलेलें स्वप्न खोटें असतें हें खरें, पण निद्रेमुळें जेव्हा स्वप्न पाहतो, तेव्हा तें स्वप्न आपल्याला आपलें स्मरण होऊं देतें काय?॥ ६१ ॥ हे असो, डोळ्यावर येणारा पडदा डोळ्यापासूनच उत्पन्न होतो, पण त्याच्यायोगाने डोळ्याचें पाहणें नाहिसें होत नाही काय?॥ ६२ ॥ याप्रमाणे माझ्या शुद्ध शक्तीच्या ठिकाणीं कल्पिलेली ही त्रिगुणात्मक छाया पडद्याप्रमाणे माझ्या आड आली म्हणजे माझा अनुभव जीवाला येऊं देत नाही. ॥ ६३ ॥ म्हणून ज्याप्रमाणे पाण्यापासून झालेलीं मोत्यें पाण्यांत पुनः विरत नाहीत, त्याप्रमाणे माझ्यापासूनच झालेलीं भूतें मला जाणत नाहीत व माझ्याशीं ऐक्य पावत नाहीत. ॥ ६४ ॥ मातीपासून केलेला घट लगेच मातींत मिळविला तर मिळू शकतो, पण एकदा विस्तवांत भाजला गेला की, मग मातीहून वेगळा पडतो, म्हणजे मातींत मिळत नाही. ॥ ६५ ॥ त्याप्रमाणे सर्व प्राणी, वास्तविक माझेच अंश आहेत. पण मायाभ्रांतीने किंवा अज्ञानामुळें जीवदशेला आलेत म्हणजे आपल्याला माझ्याहून निराळे समजतात. ॥ ६६ ॥ म्हणून प्राणी माझेच असून मत्स्वरूप होत नाहीत. माझेच असून मला ओळखत नाहीत. देह म्हणजे मी व स्त्रीपुत्रादि विषय हें माझें, अशा अहंताममता भ्रांतीने (माझ्याहून निराळे पडून) विषयासक्त झाले. ॥ ६७ ॥

गूढार्थदीपिका—कोणतीहि वस्तु व तिची शक्ति यांचें ऐक्यच असतें. वस्तु म्हणजे शक्ति व शक्ति म्हणजे वस्तुच होय. शक्तीची अव्यक्तदशा म्हणजे वस्तु व वस्तूची व्यक्तदशा म्हणजे शक्ति होय, असेहि म्हणण्यास हरकत नाही. परमेश्वर व परमेश्वराची मायाशक्ति, यांचेंहि असेंच ऐक्य आहे. ''जैसी कां समोरसकट गति। कां सीतयासकट कान्ति। तैसी शिवेसी शक्ति। आघवीचि जे. ॥ ४१ ॥ कां कस्तुरीसकट परिमळू। कां उष्मेसकट अनळू। तैसी शक्तीसी केवळू। शिवूचि जो. ॥ ४२ ॥'' (अमृ. प्र. १) हे श्रीज्ञानेश्वर माऊलींनी या ओव्यांत सांगितले आहे.

अर्थात् परमेश्वर सच्चिदानंदरूप असल्यामुळें त्याची शक्तिहि सच्चिदानंदस्वरूप आहे. यात शंका नाही, किंबहुना परमेश्वराने सच्चिदानंदरूपाने प्रगट होणे म्हणजे तो शक्तीचा आविष्कारच होय. म्हणून मूळांत परमेश्वराची शक्ति सच्चिदानंदरूप आहे. त्रिगुणात्मक नाही. ही परमेश्वराची शक्ति सच्चिदानंदधर्मयुक्त नामरूपाने अभिव्यक्त होते. ज्याप्रमाणे तरंग जसा पाण्यावर स्फुरतो म्हणून त्याचें पाण्याशी ऐक्य असतें. त्याप्रमाणे परमेश्वरशक्ति परमेश्वरावर स्फुरत असल्यामुळे तिचेंहि परमेश्वराशीं ऐक्य असतें असें श्रीज्ञानेश्वर माऊलींनी 'दोघां एकसत्तेचें बैसणें। दोघा एका प्रकाशाचें लेणें' या ओवीने सांगितलें आहे.

पण जीव हा परमेश्वराचे व मायाशक्तीचें ऐक्य जाणत नाही व तो नामरूपाकडेच लक्ष देतो. त्यामुळे परमेश्वराचा त्याला विसर पडून नामरूपात्मकशक्ति, परमेश्वराहून भिन्न वस्तुरूपाने व भिन्न लक्षणाने त्याच्या अनुभवाला येते—म्हणजे त्याला ती परमेश्वराची शक्ति, त्याच्या अज्ञानामुळें, त्रिगुणात्मक मायारूप भासते.

परमेश्वराच्या मायाशक्तीचें व परमेश्वराचें ऐक्य विसरणें, यालाच अज्ञान किंवा मायाभ्रान्ति म्हणतात. "तैसी अज्ञानांगीकारे। निघाली वृत्ति विखुरे। ते सत्वरजद्वारें। तमही होय" (ज्ञाने. १४-१४४) जीवाने अज्ञानाचा अंगीकार केला—म्हणजे परमेश्वर व परमेश्वराची शक्ति यांचें ऐक्य विसरला—की वृत्तिरूपाने भासणारी परमेश्वराची सच्चिदानंदरूपशक्ति सत्व, रज, तम या तीन गुणांनी युक्त अशी त्याला भासते, असें या ओवीने श्रीज्ञानेश्वर माऊलींनी सांगितलें आहे.

अर्थात्, हा मायेचा त्रिगुणात्मक अनुभव, मूळमायेच्या अनुभवाच्या विपरीत असल्यामुळें, तो परमेश्वरस्वरूपाच्या खऱ्या अनुभवाचे आड येतो. म्हणून भगवान म्हणतात, ही जी त्रिगुणात्मक नामरूपात्मक जडविनाशी कार्यसृष्टि आहे, ती माझ्या ठिकाणींच जरी भासते किंवा मीच त्या रूपाने जरी भासतो, तरी पण तो तसा सृष्टींचा अनुभव भ्रांत असल्यामुळें, त्या भ्रांतसृष्टींत मी नाहीं.

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया। मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते॥ १४॥

अर्थ—मज देवाची ही त्रिगुणात्मक माया, जीवाला आपल्या सामर्थ्याने तरून जाण्याला अत्यंत दुस्तर आहे. सर्व भावाने मलाच भजणारे व शरण येणारेच ती माया तरून जातात. ॥ १४ ॥

आतां महदादि हे माझी माया। उतरोनियां धनंजया। मी होइजे हें आया। कैसेनि ये॥ ६८॥

अर्थ—आतां महदादि प्रकृतीच्या पार होऊन, मज परमेश्वराशीं कसें ऐक्य प्राप्त करून घेतां येईल?॥ ६८॥

गूढार्थदीपिका—आतां महदादि हे माझी माया-महदादिक पदार्थ हे वस्तुत: भगवंताची माया म्हणजें शक्ति नव्हे हे वरील निरूपणावरून स्पष्ट होते. येथें "माझी माया" या शब्दाने परमेश्वराच्या मूळ सच्चिदानंदस्वरूपशक्तीचे ठिकाणींच भ्रांतिरूप मायाशक्तीची कल्पना होते एवढेंच सुचविलें आहे. किंवा "महदादि हे माझी माया" या चरणाचा, माझें ठिकाणी भासणारी महदादि भिन्न पदार्थांची भ्रांति असा अर्थ करावा.

जिये ब्रह्माचळाचां आधाडां। पहिलिया संकल्पजळाचा उभडा। सवेंचि महाभूतांचा बुडबुडा। साना आला॥ ६९॥

अर्थ—ज्या ब्रह्मरूपी पर्वताच्या प्रथम तुटलेल्या कड्यांत "अहं बहुस्यां प्रजायेय"-मी पुष्कळ स्वरूपाचा होवो, असा संकल्परूप जळाचा झरा उसळला त्याबरोबरच सूक्ष्म महाभूतांचा बुडबुडा उठला. ॥ ६९ ॥

गूढार्थदीपिका—ब्रह्माचळाचां आधाडां-येथे परब्रह्माला अचळ म्हणजे पर्वताची उपमा देऊन परब्रह्म नित्य, कूटस्थ, अविकारी असे दाखविलें आहे. "जैसी कां समीरेसकट गति।", "कां कस्तुरीसकट परिमळु।" (अमृ. प्र. १). या ओव्यांनी परब्रह्मांत सर्व शक्तिच भरली असून शक्तींत केवळ सर्व परब्रह्म भरलें आहे, असे प्रतिपादून, माऊलींनी परब्रह्म व त्याच्या शक्तीचे अत्यंत ऐक्य आहे, असे सांगितले आहे, अर्थात् परब्रह्माप्रमाणे त्याची शक्तिहि कूटस्थ अविकारी आहे हें सिद्धच आहे. अशा परब्रह्माचा तुटलेला कडा राहणेंच शक्य नाही; कारण परब्रह्म निरवयव असल्यामुळे "**न कश्चिदव्यवैः स्फुटति**" (मां. उ. ३-२) ते अवयवांनी फुटत नाही किंवा त्याचा तुकडा पडत नाही.

पण या विषयीचें अज्ञान असलेला जीव परब्रह्माच्या नामरूपात्मक सृष्टीला परब्रह्माहून भ्रमाने निराळी वस्तु समजतो व अस्फुट अद्वैत अशा परब्रह्माचे ठिकाणीं द्वैताची भ्रांत कल्पना करतो. जीवाच्या भ्रांत समजुतीने परब्रह्माहून निराळी झालेली शक्ति, हाच परब्रह्माचा तुटलेला कडा होय.

पहिल्या संकल्पजळाचा उभडा—आपण आपल्याच ठिकाणीं प्रेमरूप क्रीडा करण्याकरितां, मी सच्चिदानंदरूपाने बहूरूप व्हावें असे परब्रह्माचे जे स्वाभाविक स्फुरण होते, तेच जीवाला भ्रांतीने जगद्विषयक वाटतें व मी जगद्रूपांने बहुरूप व्हावे असा परमात्मा संकल्प करतो, असा त्या संकल्पाचा तो अर्थ करतो. हाच तो संकल्पजळाचा 'उभडा' होय, ही द्वैत भ्रांतीच मायानदीचा उगम होय, असा अर्थ.

जे सृष्टिविस्ताराचेनि वोघें। चढत काळकलनेचेनि वेगें। प्रवृत्तिनिवृत्तीची तुंगें। तटें सांडी॥ ७०॥

अर्थ—मग तेथे सृष्टिविस्तराच्या ओघाने व कालाच्या गतीने प्रवृत्ति म्हणजे विषयसुख किंवा प्रपंचसुख व निवृत्ति म्हणजे मोक्षसुख यांची उंचतटें सांडून मायानदी वाहूं लागली. ॥ ७० ॥

गूढार्थदीपिका—याप्रमाणे अद्वैत परब्रह्माचे ठिकाणीं द्वैताचा भ्रम झाला की पुढें द्वैत वाढतच जातें.

जे गुणघनाचेनि वृष्टिभरें। भरली मोहाचेनि महापूरें। घेऊनि जात नगरें। यमनियमांचीं॥ ७१॥

अर्थ—त्रिगुणरूपी मेघाच्या सारख्या वर्षावामुळें त्या मायानदीला भ्रांतींचा महापूर आला व ती यमनियमांची नगरें वाहून घेऊन जाऊं लागलीं॥ ७१॥

गूढार्थदीपिका—तैसी अज्ञ नांगीकारे। निघाली वृत्ति विखुरे। ते सत्वरजद्वारें तमही होय.॥ १४३॥ (ज्ञा. अ. १४) आत्म्याची अद्वैतस्थिति विसरून द्वैताची भ्रांति झाली की, आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्फुरणारी वृत्तिरूपशक्ति त्रिगुणात्मक भासूं लागते व जीव सर्वस्वी गुणाच्या स्वाधीन होऊन वागूं लागतो.

मनुष्य जितका जितका गुणांच्या स्वाधीन होतो, तितका तितका तो अविवेकी होत जातो आणि त्याच्याकडून शास्त्रमर्यादा सोडून स्वैर वर्तन घडते.

जे द्वेषाचां आवर्ती दाटत। मत्सराचे वळसे पडत। माजी प्रमदादि तळपत। महामीन॥ ७२॥

अर्थ—त्या मायानदीच्या प्रवाहांत जागोजाग द्वेषाचे भवरे व मत्सराचीं वळणें पडतात व त्यांत बुद्धिपुर:सर शास्त्राच्या विरुद्ध वागणें हे मोठमोठे मासे भासूं लागतात.॥ ७२॥

गूढार्थदीपिका—आत्मवस्तु अद्वैत व परमप्रिय असल्यामुळें तिचे ठिकाणीं आपल्याविषयींच द्वेषादि विकार उठूं शकत नाहीं. आपल्याहून भिन्न वस्तु आहे असे भ्रांतीने जेव्हां मानलें जातें तेव्हांच हे द्वेषादि षड्विकार उठू शकतात.

जेथ प्रपंचाचीं वळणें। कर्माकर्मांचीं वोभाणें। वरी तरताती वोसाणें। सुखदु:खांची॥ ७३॥
रतीचिया बेटा। आदळती कामाचिया लाटा। जेथ जीवफेन संघाटा। सैंघ दिसे॥ ७४॥
अहंकाराच्या चळिया। वरि मदत्रयाचिया उकळिया। जेथ विषयोर्मीच्या आकळिया। उल्लाळ घेती॥ ७५॥
उदयास्ताचे लोंढे। पाडीत जन्ममृत्यूचे चोंढे। जेथ पांचभौतिक बुडबुडे। होती जाती॥ ७६॥
संमोह विभ्रम मासे। गिळित धैर्याचीं आमिषे। तेथ देव्हडे भोंवत वळसे। अज्ञानाचे॥ ७७॥
भ्रांतीचेनि खडुळें। रेवलें आस्थेचे अवगाळें। रजोगुणाचेनि खळाळें। स्वर्गु गाजे॥ ७८॥

अर्थ—त्या मायानदीच्या प्रवाहांत प्रपंचाची वळणें पडली, पापपुण्याचे लोंढे येऊं लागले व त्यावर सुखदु:खाचा केरकचरा तरंगू लागला.॥ ७३॥ विषयसुखाच्या बेटावर कामाच्या लाटा आदळूं लागल्या व त्याठिकाणीं संपूर्ण जीवरूपी फेंस सांचलेला दिसूं लागला.॥ ७४॥ अहंकाराचे हेलकावे उठून, वर त्यांत धन, विद्या, सामर्थ्य यांच्या मदाच्या उकळ्या उठून जेंथे विषयवासनेच्या उंच उंच लाटा उठत आहेत.॥ ७५॥ सूर्योदय व सूर्यास्त यांचे एका मागून येणारे लोट हे जन्ममरणं यांचे मोठे धोंडे पाडत राहतात आणि तेथें कितीतरी पांचभौतिक देहरूपी बुडबुडे उत्पन्न होतात व नाहीसे होतात.॥ ७६॥ अविवेक व भ्रम हे मासे, धैर्याचें अमिष खाऊन टाकतात व त्या नदींत अज्ञानाचे वांकडे वळसे फिरत असतात.॥ ७७॥ देहादि विषय सत्य आहेत, या अविद्याभ्रांतिरूप गढूळ पाण्यामुळे विषयसुखाच्या आस्थेचे गाळ खालीं बसले आहेत व रजोगुणाचा खळखळाट स्वर्गापर्यंत गाजतो.॥ ७८॥

गूढार्थदीपिका—भ्रांतीचेनि खडुळें। रेवलें आस्थेचें अवगाळें-अविद्याभ्रांतीने उत्पन्न झालेली विषयसुखाची आस्था हा मोठा खोल गाळ आहे. अशा खोल गाळांत गाडलेला मनुष्य जसा निघणे कठीण, त्याप्रमाणे विषयसुखाच्या आस्थेतून सुटणे कठीण आहे, असा भाव.

रजोगुणाचेनि खळाळे। स्वर्ग गाजे—विषयसुखाचे प्रयत्नावाचून एक क्षणभर देखील स्वस्थ बसावेसे न वाटणें, याला रजोगुणाचा खळाळ म्हणतात. हा खळखळाट स्वर्गापर्यंत गेला आहे-म्हणजे काम्यकर्माचें अंतिम फळ स्वर्ग आहे, या रजोगुणाच्या खळाळांतून म्हणजे काम्यकर्माच्या प्रवृत्तींतून निघणें म्हणजे वैराग्य होणें, हेंहि फार कठीण आहे.

ह्या द्वैत भ्रांतिरूप मायानदीचा प्रवाह कसा विस्तार पावला याचें माऊलींनी वरील ओव्यांतून वर्णन केलें आहे.

तमाचे धारसे वाड। सत्त्वाचें स्थिरपण जाड। किंबहुना हे दुवाड। मायानदी॥ ७९॥

अर्थ—यांत तमाचे मोठे जोराचे प्रवाह आहेत व सत्वगुणाचा भक्कम स्थिरपणा आहे. अशी ही मायानदी दुस्तर आहे. ॥ ७९ ॥

गूढार्थदीपिका—तमाचे धारसे वाड—या मायानदींत तमोगुणाचे अविवेक, आळस, निद्रा असे मोठमोठे प्रवाह आहेत. त्यांना चुकविणें किंवा जिंकणें कठीणच असते.

सत्वाचे स्थिरपण जाड—"सत्वं यद्ब्रह्मदर्शनम्" सत्वगुण हा ब्रह्मप्राप्तीला कारणीभूत आहे, असें भागवतांत सांगितलें आहे, पण नाथांनी "रजतम नाशी सत्व वाढे" रजोगुण तमोगुण यांचा नाश झाल्याने सत्वगुण वाढतो असें म्हणून "वाढलें सत्व बाधक फुडे". वाढलेलें सत्व तसेंच राहूं दिल्यास बाधक होतें, असें म्हटलें आहे. भगवंतांनीहि सत्वगुण ज्ञानाचा व सुखप्राप्तीचा अहंकार उत्पन्न करतो, म्हणजे तो केवळ ज्ञानरूप किंवा सुखरूप होऊं देत नाही, असें त्याचें बंधकत्व सांगितलें आहे. म्हणून सत्वगुणाच्या बंधनांतून सुटणें फार कठीण असतें. "तेविं अज्ञान अभिमान आहे। तो सर्वथा तत्काळ जाये। ज्ञानाभिमान कठिण पाहे। गोंविताहे मुक्तत्वें" (ए. भा.)

सत्वगुण आहे तोपर्यंत निर्विकल्प समाधिहि साधत नाही; म्हणूनच "तत्परं पुरुषख्यातेर्गुणवैतृष्ण्यम्" (योगसूत्र स. पा. १६) निर्विकल्पसमाधिकरितां गुणवैतृष्ण्यरूप म्हणजे सात्विकगुणहि नको असे परवैराग्य आवश्यक आहे. असे योगांत मानले जातें आणि हे गुणवैतृष्ण्यरूप परवैराग्य इतर उपायापेक्षां परमेश्वरभक्तीने सुगम साधले जाते असे "ईश्वरप्रणिधानाद्वा"॥ २३॥ योगसूत्रांत सांगितलें आहे. "शांतिक्षमा दया। त्याहि नको पंढरीराया॥" (तु. गा.)

पैं पुनरावृत्तीचेनि उभडें। झळंबती सत्यलोकींचे हुडे। घायें गडबडती धोंडें। ब्रह्मगोळकाचे॥ ८०॥

अर्थ—यांतील पुनरावृत्तीचे उभळे सत्यलोकरूपी बुरुजांनाहि लागतात व त्या उभळीच्यां आघाताने ब्रह्मांडरूपी धोंडे गडबडतात. ॥ ८० ॥

गूढार्थदीपिका—पै पुनरावृत्तीचेनि उभडे। झळंबती सत्यलोकींचे हुडे—"अनावृत्तिः शब्दादनावृत्तिः शब्दात्" (ब्र. सू. ४-४-२२) या वेदान्तसूत्रांत, ब्रह्मलोकांत गेलेले पुरुष संसारांत येत नाहीत, ते पुढें ब्रह्मदेवाबरोबर मुक्त होतात, असा सिद्धान्त केला आहे आणि श्रीज्ञानेश्वर माऊलींनी या ओवींत पुनरावृत्तीची झळ सत्यलोकांतील जीवांनाहि लागते, असें सांगितलें आहे. या दोन विधानांचा समन्वय असा आहे की, संसारांतून मुक्त व्हावें या इच्छेने अर्चिरादि मार्गाचा अवलंब करून ब्रह्मलोकांत गेलेले पुरुष, पुनः संसारांत येत नाहीत, असा वरील सूत्राचा अर्थ असून, विषयसुखाची इच्छा राहून ब्रह्मलोकासारख्या श्रेष्ठ लोकांत गेलेल्या पुरुषांनाहि पुनरावृत्ति चुकत नाही, असा माऊलीच्या म्हणण्याचा अर्थ आहे.

तया पाणियाचेनि वहिलेपणें। अझुनी न धरती वोभाणें। ऐसा मायापूर हा कवणें। तरिजेल गा॥ ८१॥

अर्थ—त्या पाण्याचा वर्षाव सारखा होत असल्यामुळें, त्या मायेचा पूर अजूनपर्यंत ओसरला नाही. अर्जुना! असा हा मायानदीचा पूर कोण तरून जाईल, सांग बरें. ॥ ८१ ॥

गूढार्थदीपिका—तया पाणियाचेनि वहिलेपणें—मागील ७१ व्या ओवींत "गुणघनाचेनि वृष्टिभरें" त्रिगुणरूपी मेघांतून सारखी वृष्टि होते, असें सांगितलें आहे, तोच वृष्टिरूपी पाण्याचा सारखा होत असलेला वर्षाव "तया पाणियाचेनि वहिलेपणें" या चरणाने माऊलींनी येथें सांगितला आहे.

येथ एक नवलावो। जो जो कीजे तरणोपावो। तो तो अपावो। होय तें ऐक॥ ८२॥

अर्थ—आणखी येथें असे एक आश्चर्य आहे की ही मायानदी तरून जाण्याकरितां जो जो उपाय करावा, तो तो अपायच होतो, पहा. ॥ ८२ ॥

गूढार्थदीपिका—येथ एक नवलावो। जो जो कीजे तरणोपावो—अकर्मरूप अशा परब्रह्माचे ठिकाणीं कर्माचें व कर्तृत्वाचें अस्तित्व मानणें हीच माया आहे आणि या मायेवर आरूढ होऊन ही मायानदी तरण्याचा जो जो उपाय केला जाईल, तो तो उपाय कर्मकर्तृत्वबुद्धि दृढ करणाराच होत असल्यामुळें तो उपाय न होतां अपायच होणार, हें स्पष्ट आहे.

एक स्वयंबुध्दीच्या बाहीं। रिगाले तयांची शुध्दीचि नाहीं। एक जाणिवेचे डोहीं। गर्वेचि गिळिले ॥ ८३ ॥

अर्थ—जे कोणी आपल्या केवळ बुद्धीच्या भरंवशावर ही मायानदी तरून जाण्याचां प्रयत्न करीत होते ते कोठें गेलेत याचा अजून पत्ताहि नाही. एक जे कोणी ''आम्हांला समजतें'' या शहाणपणाचे डोहांत गेले, ते गर्वानें गिळले गेले. ॥ ८३ ॥

गूढार्थदीपिका—एक स्वयंबुद्धीच्या बाहीं—''तद्विज्ञानार्थं सद्गुरुमेवाभिगच्छेत्'' (मुं. उ. १-२-१२) **''शास्त्रज्ञोऽपि स्वातंत्र्येण ब्रह्मज्ञानान्वेषणं न कुर्यात्। इत्येतत् गुरुमेवेत्यवधारणफलम्''** ब्रह्मप्राप्ति करून घेऊन माया तरून जाण्याकरितां श्रीगुरुलाच शरण गेलें पाहिजे अशी श्रुति असून, पुरुष शास्त्रज्ञ झाला तरी त्याने अनुभवी गुरुवांचून **''जयास मोक्ष व्हावा। तेणें सद्गुरु करावा। सद्गुरुविणें मोक्ष पावावा। हे कल्पांतीं, न घडे''** (दास. द. ५-स. १) असेंच समर्थहि म्हणतात.

एक जाणिवेचां डोहीं। गर्वेचि गिळिले—मी ब्रह्म जाणलें असें म्हणणारा ज्ञानरूपाने ब्रह्मांपासून निराळा पडतो व त्याचे ठिकाणीं ब्रह्मैक्यता न राहतां नुसता, अहंकारच राहतो. ''एथ जाणीव करी तोचि नेणे। आथिलेपण मिरवी तेचि उणें। आम्ही जाहालों ऐसे जो म्हणे। तो कांहीचि नव्हे'' (ज्ञानेश्वरी) केवळ आपल्या स्वतंत्र बुद्धीने ब्रह्मज्ञान करून घेण्याचा प्रयत्न करु नये असे आचार्यानीही म्हटले आहे. असो.

एकीं वेदत्रयाचिया सांगडी। घेतल्या अहंभावाचिया धोंडी। ते मदमीनाचां तोंडी। सगळेचि गेले॥ ८४॥

अर्थ—जे कोणी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद या तीन वेदांची सांगड बांधून त्यांत अहंकाराचे धोंडे घेऊन बसले, ते मदरूपी माशाच्या तोंडांत सगळेच्या सगळे गेले. ॥ ८४ ॥

गूढार्थदीपिका—संपूर्ण ऋग्वेदादि तीन वेदांच्या अध्ययनरूपी कर्मानेहि परमेश्वरप्राप्ति होत नाही. उलट पुरुष अध्ययनाच्या मदाच्या स्वाधीनच होतो, असा अर्थ.

एकीं वयसेचें जाड बांधले। मग मन्मथाचिये कासे लागले। ते विषयमगरीं सांडिले। चघळूनियां॥ ८५ ॥
आतां वार्धक्याच्या तरंगा-। माजीं मतिभ्रंशाचा जरंगा। तेणें कवळिजताती पैं गा। चहूंकडे॥ ८६ ॥
आणि शोकाचा कडा उपडत। क्रोधाच्या आवर्ती दाटत। आपदागिधीं चुंबिजत। उधवला ठायीं॥ ८७ ॥
मग दु:खाचेनि बरबटें बोंबले। पाठीं मरणाचिये रेवे रेवले। ऐसे कामाचे कासे लागले। ते गेले वायां॥ ८८ ॥
एकीं यजनक्रियेची पेटी। बांधोनि घातली पोटीं। ते स्वर्गसुखाचां कपाटीं। शिरकोनि ठेले॥ ८९ ॥
एकीं मोक्षीं लागावयाचिया आशा। केला कर्मबाह्यांचा भरंवसा। परि ते पडिले वळसां। विधिनिषेधांच्या॥ ९० ॥
जेथ वैराग्याची नाव न रिगे। विवेकाचा तागा न लगे। वरि कांहीं तरों ये योगें। तरी विपाय तो॥ ९१ ॥
ऐसें ये जीवाचिये आंगवणें। इये मायानदीचें तरणें। हें कासयासारिखें बोलणें। म्हणावें पां॥ ९२ ॥
जरी अपथ्यशीळा व्याधी। कळे साधूसी दुर्जनाची बुद्धि। कीं रागी सांडी रिद्धी। आली सांती॥ ९३ ॥
जरी चोरां सभा दाटे। अथवा मीना गळु घोटे। ना तरी भेडा उल्टे। विवसी जरी॥ ९४ ॥
पाडस वागुर करांडी। जरी मुंगी मेरु वोलांडी। तरी मायेची पैलथडी। देखती जीव॥ ९५ ॥
म्हणऊन गा पंडुसुता। जैसी सकामा न जिणवेचि वनिता। तैसी मायामय हे सरिता। न तरवे जीवां॥ ९६ ॥
येथ एकचि लीला तरले। जे सर्वभावें मज भजले। तयां ऐलीच थडिये सरलें। मायाजळ॥ ९७ ॥

अर्थ—कोणी ही मायानदी तरून जाण्याकरितां, कंबरेला तारुण्याची कास बांधली, पण ते मदनाच्या ताब्यांत गेले व शेवटीं विषयरूपी मगरांनी त्यांना चघळून टाकून दिलें. ॥ ८५ ॥ आतां पुढें म्हातारपणाच्या लाटेंत सांपडून ते बुद्धिभ्रंशाच्या जाळयांत अटकले, म्हणून ते जें जें दिसेल त्याला कवटाळत जातात. ॥ ८६ ॥ आणि शोकाच्या काठावर आदळत जातात, क्रोधाच्या भोंवऱ्यांत सांपडून कासावीस होतात व थोडें वर आले की नानाप्रकारचीं दु:खरूपी गिधाडें त्यांना टोंचतात. ॥ ८७ ॥ मग दु:खरूपी चिखलाने माखले गेले, नंतर शेवटीं मरणरूपी गाळांत [illegible] गेले. याप्रमाणे विषयसुखाचे जे मागे लागले ते असे वायां गेले. ॥ ८८ ॥ कोणी यजनक्रियेची पेटी आपल्या [illegible] बांधून, ते स्वर्गांतील सुखाच्या कपाटींत शिरले व तेथेच राहिले. ॥ ८९ ॥ कोणी मोक्षाला प्राप्त होणाच्या आशेने

कर्मरूपी हातांचा विश्वास धरला, पण ते मायानदीच्या विधिनिषेधरूप प्रवाहांत सांपडले. ॥ ९० ॥ या मायानदींत वैराग्याची नाव शिरणें कठीण आहे. विवेकाचा टिकाव लागत नाही आणि दुसऱ्या कांही उपायाने तरण्याचा प्रयत्न केला तरी तो विपायच होतो. ॥ ९१ ॥ अशा स्थितींत, जीवाने आपल्या सामर्थ्याने मायानदी तरून जाण्याची भाषा बोलणें, कशासारखें आहे, तें सांगतों. ॥ ९२ ॥ जर व्याधि पथ्य न करणाऱ्याच्या आटोक्यांत येईल, दुर्जनाची दुष्ट बुद्धि साधूच्या लक्षांत येईल किंवा विषयासक्त पुरुष ऋद्धि म्हणजें आपलें वाढलेलें ऐश्वर्य भोगणार नाही. ॥ ९३ ॥ जर चोराला न्याय करणारे सभासद भितील, किंवा गळच माश्याला गिळील, किंवा भित्रा पुरुष द्रव्यावर असलेल्या पिशाच्चाला घालवू शकेल. ॥ ९४ ॥ हरणाचें पोर व्याधाचें जाळें तोडील किंवा मुंगी मेरू ओलांडील, हें होणें शक्य असेल तरच जीव हा केवळ स्वसामर्थ्याने मायानदीच्या पैलतीराला लागेल. ॥ ९५ ॥ म्हणून, अर्जुना! कामी पुरुषाला जसे स्त्री जिंकणें शक्य नाही त्याप्रमाणे ही मायानदी, जीवाला स्वसामर्थ्याने तरून जाणें शक्य नाही. ॥ ९६ ॥ जो सर्वभावाने मज परमेश्वराचें भजन करतो त्याला, या तीरावरच असतांना, मायानदी आटलेली अनुभवाला येते. ॥ ९७ ॥

गूढार्थदीपिका—येथें हें रहस्य आहे की "अविद्याकल्पिते नामरूपे.....संसारप्रपंचबीजभूते सर्वज्ञस्येश्वरस्य मायाशक्तिः प्रकृतिरिति च श्रुतिस्मृत्योरभिलप्येते" (ब्र. सू. शां. भा. २-१-१४) परब्रह्माचे ठिकाणीं प्रगट होणाऱ्या नामरूपांना जीव, अज्ञानभ्रांतीने परब्रह्माहून निराळी वस्तु समजतो व तीं नामरूपें त्याच्या कल्पनेनुसार त्याच्या जगद्भासाला कारणीभूत होतात, म्हणून या नामरूपाना श्रुतिस्मृतितून परमेश्वराची मायाशक्ति म्हटले आहे, असे आचार्य ब्रह्मसूत्रभाष्यांत म्हणतात.

या मायेच्या निवृत्तीचे कर्मज्ञानादि जे उपाय सांगितले आहेत ते तिला सत्यत्व देऊनच सांगितले आहेत. मिथ्या किंवा काल्पनिक अशा मायावस्तूला सत्यत्व दिल्यावांचून तिच्या निवृत्तीचा उपाय संभवत नाही. मायाभ्रांतीला सत्यत्व देणें, हीच मुळांत भ्रांति आहे; म्हणून तिच्या निवृत्तीचा प्रयत्न करणारा भ्रांतीतच राहतो, भ्रांतीबाहेर होत नाही. रज्जूवर भासणाऱ्या सर्पाला भिऊन पळणारा मूर्ख भ्रांतच म्हणावा लागतो, पण रज्जुसर्पाला शस्त्र घेऊन मारणारा काय शहाणा ठरेल? याप्रमाणेच मायाभ्रांतीचा अंगीकार करणारा जसा भ्रांत, तसा माया निवृत्तीचा प्रयत्न करणाराहि भ्रांतच समजला जातो. वास्तविक माया नाही, देह नाही व दुःखहि नाही. एक सच्चिदानंद ब्रह्मच आहे व तेंहि अद्वैतस्वरूप असल्यामुळे त्याला स्वतःचा व दुसऱ्या कशाचाहि अहंकार नाही. तें निःशेष अहंकाररहित आहे. अशा त्या निःशेष अहंकाररहित परब्रह्माशीं ऐक्य पावण्याकरितां जीवालाहि निःशेष अहंकाररहित झालें पाहिजे.

परंतु कोणताहि क्रियारूप प्रत्यय अहंकारपूर्वक होत असल्यामुळे क्रियारूप प्रयत्नाने अहंकाररहित होणें शक्य नाही, म्हणून कोणताहि क्रियारूप प्रयत्न अपायकारकच होतो, असें माऊलींनी येथे सांगितलें आहे. आत्मज्ञानप्राप्तीच्या प्रयत्नांतहि अहंकार असतोच आणि मी ब्रह्मस्वरूप आहे अशी अपरोक्ष ज्ञानप्राप्ति झाल्यावरहि, मी व्यापक व अद्वितीय, अशा परब्रह्मांत "मी ब्रह्म" म्हणून उठणारा व्यक्तिरूप ज्ञानाहंकार उरतो; म्हणून ज्ञानमार्गातहि जीव निःशेष अहंकाररहित होऊं शकत नाही. अहंकार धरून अहंकाराची निवृत्ति होण्याऐवजी अहंकारच बळावतो आणि अहंकार ही मायाच असल्यामुळें अहंकार बळावला म्हणजे मायाच दृढ होते. "नवल अहंकाराची गोठी। विशेषें न लगे अज्ञानापाठीं। सज्ञानाचे झोंबे कंठीं। नाना संकटीं नाचवी" (ज्ञा. अ. १३-८२) असें माऊलींनी सांगितलें आहे. जोपर्यंत अहंकारनिवृत्ति होत नाही तोपर्यंत माया निवृत्त होत नाही. पण ज्या मायेने हा सर्व जगत् पसारा निर्माण केला ती नामरूपेंच, नामरूपात्मक रामकृष्णादि सगुण भगवंताच्या प्रेमभक्तीने पूर्ण ब्रह्मस्वरूप आहेत असा अनुभव येत असल्यामुळें नामरूपाचें मायात्वच नाहीसे होते याप्रमाणें भगवद्भक्ताला तरून जाण्याकरितां मायानदीच शिल्लक राहत नाही. "साधन संपत्ति हेचि माझें धन। सकळ चरण विठोबाचें. ॥ १ ॥ शीतल हा पंथ माहेराची वाट। जवळीच नीट सुखरूप ॥ २ ॥ भवनदी आड नव्हतीशी झाली। कोरडीच चाली जावे पायी. ॥ ३ ॥" (तु. गा.) तुकाराम महाराजहि आपला असाच अनुभव सांगतात. माया ही वस्तुच नाहीशी झाल्यानंतर तिचें कार्य जो अहंकार तोहि निःशेष मावळतो.

जयां सद्‌गुरु तारू फुडें। जे अनुभवाचे कासे गाढे। जयां आत्मनिवेदनतरांडें। आकळलें॥ ९८॥

अर्थ—सगुण-निर्गुण स्वरूपाचा ज्याला पूर्ण अनुभव आहे असा सद्‌गुरु ज्यांना खरोखर नावाडी मिळाला, त्यांना अहंताममतासमर्पणरूप पूर्ण आत्मनिवेदनाचा ताफा सांपडला. ॥ ९८॥

गूढार्थदीपिका—सद्‌गुरु तारू फुडे। जे अनुभवाचे कासे गाढे—"जो शब्दज्ञानें पारंगतु। ब्रह्मानंदे सदा डुल्लतु। शिष्य प्रबोधनीं समर्थु। यथोचितु निजभावें॥ २८९॥ (ए. भा. अ. ३)-ज्याप्रमाणे अलंकाराचें प्रेम कायम राहण्याकरिता, तो सोन्याचा आहे, हें कळणें आवश्यक असतें, त्याप्रमाणेच सगुण परमेश्वराचें प्रेम कायम टिकण्याकरिता, तो माझा परमप्रेमरूप आत्माच आहे, असें समजणें आवश्यक असतें; म्हणून हें ऐक्यज्ञान होण्याकरिता श्रीगुरूची प्रथम आवश्यकता आहे. हें ऐक्यज्ञान, "**जेणें स्वयें चाखिली नाही चवी। तो दुजियाते गोडी केवि लावी। यालागीं पूर्ण जो अनुभवी। तो तारी सच्छिष्यांसी**" (ए. भा.) अनुभवी गुरुवांचून शब्दज्ञानी गुरु, शिष्याला अनुभवाला आणून देऊं शकत नाही.

जया आत्मनिवेदनतरांडे। आकळले—ज्याची नि:शेष अहंताममता समर्पण झाली—म्हणजे भगवंताहून मी म्हणून कोणी निराळा नसून एक भगवानच आहे व त्याचीच सर्व क्रीडा आहे, अशी दृष्टि ज्यांना प्राप्त झाली, त्यांनाच हा अनुभव असतो.

जे अहंभावाचें वोझें सांडुनी। विकल्पाचिया झुळका चुकाउनि। अनुरागाचा निरुता होउनी। पाणिढाळु॥ ९९॥

अर्थ—ज्यांनी अहंभावाचें म्हणजे अहंकाराचें ओझें टाकून दिलें. विकल्परूप वाऱ्याच्या मंद झुळुका चुकवून जे भगवत्‌च्चरणाचे ठिकाणीं वाहणाऱ्या शुद्ध प्रेमजळांचा उतार होऊन राहिले. ॥ ९९॥

गूढार्थदीपिका—अहंभावाचें ओझें सांडूनि—अहंभाव हा दोन प्रकारचा आहे. मीं देहरूप आहे हा एक व मी ब्रह्म आहे हा दुसरा. "अहंभावीदयाभावी बोधस्य परमोऽवधि:" (वि. चू. ४२५) ब्रह्मबोध पूर्ण झाला असतां, मी देह आहे हा अहंभाव नाहिसा होतो आणि ज्ञानानंतर होणाऱ्या सगुणभक्तीने, मी ब्रह्म आहे, हा अहंकारहि नाहिसा होतो; असा ज्ञान व भक्ति यांच्या योगाने ज्यांनी संपूर्ण अहंभाव नाहीसा केला.

विकल्पाचिया झुळका। चुकाउनि—मन हें विकल्पात्मक आहे. "विकल्पाचिया झुळुका चुकाऊनि" म्हणजे ज्यांनी मनाची उन्मनदशा केली आहे किंवा ज्याचें मन भगवंतावांचून इतर विषयांविषयीचे संकल्पविकल्प करीत नाही.

जया ऐक्याचिया उतारा। बोधाचा जोडला तारा। मग निवृत्तीचिया पैल तीरा। झेंपावले जे॥ १००॥

अर्थ—ज्यांनी जीवेश्वराच्या ऐक्याच्या उतारावरहि आत्मज्ञानाची सांगड बांधली-म्हणजे भगवच्चरणाचे ठिकाणीं वाहणाऱ्या शुद्ध प्रेमामुळें ज्यांना सहज आत्मबोध व ऐक्य प्राप्त झालें-व मग मायानदीच्या निवृत्तिरूप पैतलीरावर ते सहज गेले. ॥ १००॥

गूढार्थदीपिका—ऐक्याचिया उतारा। बोधाचा जोडला तारा—ज्याप्रमाणे नदीला उतार असता नदी पार होणें सोपें असतें व त्यांतच सांगड प्राप्त झाली असतां पायाला पाणी न लागतां मनुष्य नदी पार होतो; त्याप्रमाणे ज्यांना सगुण परमेश्वराची भक्ति असते. त्यांना ऐक्याचा उतार असतो-म्हणजे त्यांचे परमेश्वराशीं ऐक्य होतें. कारण भक्तीनेच ऐक्यबोधाची सांगड त्यांना प्राप्त होते व भक्तीच्या योगाने त्यांना मायानदीच्या पाण्याचा स्पर्श होत नाही.

ते उपरतीचां वांवीं सेलत्त। सोहंभावाचेनि थावें पेलत्त। मग निघाले अनकळित। निवृत्तितटीं॥ १०१॥

अर्थ—जे उपरतीच्या हातांनी पाणी तोडीत व सोहंभावाच्या बळाने पोहत सहज निवृत्तिरूप कांठावर जातात. ॥ १०१॥

गूढार्थदीपिका—उपरतीचां वावीं सेलत—"लीनवृत्तेरनुत्पत्तिर्मर्यादोपरतेस्तु स:" (वि. चू. ४२५) परमेश्वराचे ठिकाणीं लीन झालेली वृत्ति-म्हणजे तदाकार झालेली वृत्ति पुन: देहावर न येणें याला उपरति म्हणतात ही उपरतिच ज्ञानीभक्ताचे हात होत. या हातांनी ते मायानदीचे पाणी तोडतात व सोहंभाव रूप ऐक्यबळाने मायानदीवर तरंगत, मायानदी सहज पार करतात.

येणें उपायें मज भजले। ते हे माझी माया तरले। परि ऐसे भक्त विपाइले। बहुवस नाहीं॥ १०२॥

अर्थ—अशा उपायांनी जे माझें भजन करतात तेच माझी ही दुस्तर माया तरून जातात. पण अर्जुना! असे ज्ञानीभक्त क्वचित्‌च असतात, फार नाही. ॥ १०२ ॥

गूढार्थदीपिका—या वरील ओव्यांचा भावार्थ असा आहे की मायानदी तरण्याकरिता सद्‌गुरूची प्राप्ति, आत्मानुभव, आत्मनिवेदन इत्यादि जी साधनसामुग्री आवश्यक असते, ती भगवद्भक्ताला भगवत्कृपेने अनायासें प्राप्त होते.

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः। माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः॥ १५॥

चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन। आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ॥ १६॥

अर्थ—माझ्या मायेने यथार्थ ज्ञान नष्ट होऊन, भ्रांत झालेले व हिंसादिक आसुरी भावांचा आश्रय करणारे पापी, अविवेकी, अत्यंत दुष्ट पुरुष मला शरण येत नाहीत. ॥ १५ ॥ आर्त म्हणजे रोगादिकांच्या दुःखांनी ग्रस्त झालेले, जिज्ञासु म्हणजे भगवंताचें स्वरूप जाणण्याची इच्छा करणारे, अर्थार्थी म्हणजे धनाच्या प्राप्तीची इच्छा करणारे व ज्ञानी म्हणजे आत्मस्वरूप जाणणारे, असे चार प्रकारचे पुण्यशील लोक मात्र माझें भजन करतात. ॥ १६ ॥

जे बहुतां एका अवांतरु। अहंकाराचा भूतसंचारु। जाहला म्हणोनि विसरु। आत्मबोधाचा॥ १०३॥

अर्थ—भक्तांना सोडून बाकी बहुतेक सर्व जीवांना देहाहंकाररूपी पिशाच्चाने पछाडल्यामुळें आत्मबोधाचा विसर पडला. ॥ १०३ ॥

गूढार्थदीपिका—देहाहंकाराने आत्मबोधाचा विसर पडतो आणि आत्मबोधाची विस्मृति झाली असतांच देहाहंकार राहतो, असे माऊलींनी या ओवींत सुचविलें आहे.

ते वेळीं नियमाचें वस्त्र नाठवें। पुढिले अधोगतीची लाज नेणवे। आणि करितात जें न करावें। वेदु म्हणे॥ १०४॥

अर्थ—त्यावेळीं आपण नियमाचें वस्त्र नेसलें पाहिजे ही आठवण राहत नाही, मेल्यानंतर अशा स्वैर वर्तनामुळें अधोगति होईल याची लाज वाटत नाही आणि वेदशास्त्रांनी जे करूं नये म्हणून सांगितलें तेच नेमके करितात. ॥ १०४ ॥

गूढार्थदीपिका—देहाहंकारानेच आत्मविस्मृति होऊन स्वैराचार वाढतो. जसाजसा देहाहंकार वाढतो, तसा तसा स्वैराचार वाढतो, असा अर्थ.

पाहें पां शरीराचिया गांवा। जयालागीं आले पांडवा। तो कार्यार्थु आघवा। सांडुनियां॥ १०५॥
इंद्रियग्रामींचां राजबिदीं। अहंममतेचिया जल्पवादीं। विकारांतरांची मांदी। मेळवितातीं॥ १०६॥
दुःखशोकांचां घाईं। मारिलीयाची सेचि नाहीं। हें सांगावया कारण काई। जे ग्रासिले माया॥ १०७॥
म्हणोनि ते मातें चुकले। आइकां चतुर्विध मज भजले। जिहीं आत्महित केलें। वाढतें गा॥ १०८॥
तो पहिला आर्तु म्हणिजे। दुसरा जिज्ञासु बोलिजे। तिजा अर्थार्थी जाणिजे। ज्ञानिया चौथा॥ १०९॥

अर्थ—अर्जुना! पहा, ज्या परमेश्वरप्राप्तीच्या उद्देशाने आपल्याला पमेश्वराने मनुष्यजन्मांत घातलें, तो कार्यभाव साधण्याचें सोडून. ॥ १०५ ॥ इंद्रियांच्या समुदायरूप राजमार्गावर अनेक विकारांचा समुदाय मिळवून किंवा एकत्र करून, हा मी व हें माझें अशी अहंताममतेची व्यर्थ बडबड करीत. ॥ १०६ ॥ दुःखशोकांच्या घावाने मारले जात असतांहि त्याची त्यांना स्मृति देखील नसते. हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच की अशारीतीने सर्व लोक माझ्या मायेने ग्रासिलेले आहेत. ॥ १०७ ॥ म्हणून ते मला शरण येत नाहीत. बाकी ज्यांनी आपलें वाढतें कल्याण करून घेतलें असे चार प्रकारचे लोक मात्र मला भजतात. ॥ १०८ ॥ पहिला म्हणजे आर्तभक्त, दुसर जिज्ञासु म्हटला जातो, तिसरा अर्थार्थी होय व चवथा ज्ञानी होय. ॥ १०९ ॥

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते। प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः॥ १७॥

अर्थ—त्यांमध्ये ज्ञानीभक्त मात्र माझें अखंड भजन करतो. तो माझ्या प्रेमाशिवाय दुसरें कांही करीत नाही;

म्हणून तो सर्वांत श्रेष्ठ होय. मी ज्ञान्याला अत्यंत प्रिय असतो व तो मला अत्यंत प्रिय असतो. ॥ १७ ॥

तेथ आर्तु तो आर्तीचेनि व्याजें। जिज्ञासु तो जाणावयालागीं भजे। तिजेनि तेणें इच्छिजे। अर्थसिद्धि॥ ११० ॥

अर्थ—आर्तभक्त आपलें दु:ख नाहीसे होण्याकरिता, माझे भजन करतो. जिज्ञासुभक्त मला जाणण्याकरितां मला भजतो आणि तिसरा अर्थार्थी भक्त धनाकरिता माझें भजन करीत असतो. ॥ ११० ॥

गूढार्थदीपिका—या तिन्ही भक्तांची भक्ति कामनिक असल्यामुळे गौण असली, तरी ती अनन्य असते म्हणजे कामना—सिद्धि व्हावी म्हणून जरी ते भक्ति करीत असले, तरी ते आपल्या उपास्याला सोडून दुसऱ्या देवतांची भक्ति करीत नाहीत—म्हणजे दुसऱ्या देवतांना शरण जात नाहीत. या एकनिष्ठेतेनेच त्यांची कामवासना नाहीशी होऊन त्यांचें वाढतें आत्महित होतें व शेवटीं ते निष्काम ज्ञानीभक्त होतात. "न मय्यावेशितधियां काम: कामाय कल्पते। भर्जिता क्वथिता धाना प्रायो बीजाय नेष्यते॥" (१०-२२-२६ भागवत.)

भाजलेलें किंवा उकडलेलें बीज जसें अंकुरित होत नाही, तशी माझी सकाम भक्ति करणाऱ्याचीहि कामवासना क्रमाने नाहीशी होते, ती वाढत नाही.

मग चौथियाच्या ठायीं। कांहींचि करणें नाहीं। म्हणोनि भक्तु एकु पाहीं। ज्ञानिया जो॥ १११ ॥
जे तया ज्ञानाचेनि प्रकाशें। फिटलें भेदभेदांचें कडवसें। मग मीचि जाहाला समरसें। आणि भक्तुही तेवींचि॥ ११२ ॥

अर्थ—जो ज्ञानी आहे तो कोणत्याही कामनेने माझें भजन करीत नाही म्हणून जो ज्ञानीभक्त असतो तोच एक खराभक्त होय. ॥ १११ ॥ कारण ज्ञानाच्या प्रकाशाने माझ्याहून तो आपल्याला भिन्न समजत नाही. माझ्याशीं तो समरस मिळाला असतो व आणखी भक्तहि राहतो. ॥ ११२ ॥

गूढार्थदीपिका—मीचि जाहाला समरसें। भक्तुही तेविंचि—आत्मज्ञानाने जीवात्मैक्य झाल्यावर सगुणभक्ति राहू शकत नाही, असे जे अननुभवी ज्ञान्यांचें म्हणणें असतें, त्याला श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी, भेद नाहिसा होऊन समरस ऐक्य झाल्यावरहि भक्ति राहते असते, असे चोख उत्तर दिलें आहे.

दृढ आत्मज्ञान झाल्यावर व्युत्थानकालीं जो जगताचा मिथ्या प्रत्यय उरतो, तो नाहिसा होऊन, आंत आत्मस्वरूपाचा निर्गुण प्रत्यय व बाहेर परब्रह्माचा सगुण प्रत्यय येऊन, परब्रह्माचें पूर्ण अद्वैतत्व अनुभवाला येण्याकरिता ज्ञानानंतर सगुण भगवंताच्या प्रेमभक्तीची आवश्यकता असते.

"विशुद्धज्ञानमुत्पन्नं यस्य तस्य महात्मन:।..................शिवलिंगस्य पूजायां शिवस्थानेषु सुव्रत:। प्रियबुद्धि: प्रजायेत स्वभावादेव सर्वदा॥"

य: स विज्ञानिनस्तेषु प्रद्वेषाऽपि जायते। उपेक्षा वा न स ज्ञानी पशुविज्ञानवंचक:॥ ७२॥ (सू. सं.)

खऱ्या अनुभवी ज्ञान्याला निर्गुणस्वरूपाप्रमाणेच सगुण स्वरूपाचेंहि स्वाभाविक प्रेम असतें, असें सूतसंहितेंत म्हटलें आहे.

परि आणिकांचिये दिठी नावेक। जैसा स्फटिकुचि आभासे उदक। तैसा ज्ञानी नव्हे कौतुक। सांगतां तो॥ ११३ ॥

अर्थ—परंतु ज्याप्रमाणे स्फटिकमणि पाण्यांत अलग असतो पण अज्ञान्याला पाणीरूपच दिसतो तसा ज्ञानी नसतो, त्याची स्थिति आश्चर्यकारक असते. ॥ ११३ ॥

गूढार्थदीपिका—पाण्यांत पडलेला स्फटिकमणि पाण्याहून निराळा असतो, पण अज्ञान्याला तो पाणीस्वरूप भासतो. ज्ञानीभक्ताची गोष्ट तशी नाही. म्हणजे पाण्याचें व स्फटिकमण्याचें द्वैत किंवा निराळेपणा सत्य असून अद्वैत किंवा एकरूपता भासमात्र असते आणि ज्ञान्याचें परमेश्वराशीं ऐक्य सत्य असून द्वैत किंवा निराळेपणा भासमात्र असतो असा अर्थ.

ज्ञानीभक्त हा परमेश्वराशीं समरस ऐक्य पावलेला असतो, पण तो बाहेर भक्तीमुळें अज्ञान्याला परमेश्वराहून निराळा भासतो. भक्तीमुळें भासणारा हा द्वैताचा भास परमेश्वराचें व जीवाचें द्वैत किंवा निराळेपणा वाढविणारा नसून अद्वैत किंवा ऐक्यच वाढविणारा आहे. जसें "द्वैतदशेनें आंगण। अद्वैत ओळगे आपण। भेद तव तंव दूण।

अभेदासी'' (अमृ. प्र. ९-२८) असें श्रीज्ञानेश्वर माऊलींनी अमृतानुभवांत म्हटले आहे.

''भक्त्यर्थ कल्पितं द्वैतं अद्वैतादपि सुंदरम्'' असा एका भक्तानेहि आपला अनुभव सांगितला आहे.

जैसा वारा कां गगनीं विरे। मग वारेपण वेगळें नुरे। तेविं भक्त हे पैज न सरे। जरी ऐक्या आला॥ ११४॥

अर्थ—ज्याप्रमाणे वारा आकाशांत विरला म्हणजे मग वेगळा दिसत नाही, त्याप्रमाणे ज्ञानीपुरुषाचे माझ्याशी अत्यंत ऐक्य असते, पण तो ज्ञानीपुरुष आपलें भक्तपण सोडत नाही.॥ ११४॥

गूढार्थदीपिका—भक्त हे पैज न सरे। जरी ऐक्या आला—आकाशांत विरलेला वायु ज्याप्रमाणे असतो पण वेगळा अनुभवाला येत नाही, त्याप्रमाणे परमेश्वराशीं ऐक्य पावलेल्या ज्ञान्याची, ऐक्य न मोडतांच, भक्ति होत असते असा अर्थ.

जरी पवन हाल्वूनि पाहिजे। तरी गगना वेगळा देखिजे। एऱ्हवीं गगन तो सहजें। असे जैसें॥ ११५॥
तैसें शरीरीं हन कर्में। तो भक्त ऐसा गमे। परी अंतरें प्रतीतिधर्में। मीचि जाहला॥ ११६॥
आणि ज्ञानाचेनि उजिडलेपणें। मी आत्मा ऐसें तो जाणे। म्हणऊनि मीही तैसेंचि म्हणें। उचंबळला सांता॥ ११७॥
हां गा जीवापैलीकडिली खुणे। जो पावोनि वावरोंही जाणे। तो देहाचेनि वेगळेपणें। काय वेगळा होय॥ ११८॥

अर्थ—जर वायु हालवून पाहिला तर त्याचा आकाशाहून निराळेपणा प्रत्ययाला येतो, नाहीतर जशाच्या तसा आकाशरूपच तो भासतो.॥ ११५॥ त्याप्रमाणे शरीराकडून होणाऱ्या कर्मामुळें तो भक्त असा भासतो, पण अंत:करणांतील अनुभवाने तो मीच झालेला असतो.॥ ११६॥ आणि त्याचे ठिकाणीं माझ्या स्वरूपाचें ज्ञान प्रकाशित झाल्यामुळें मला तो आपला आत्मा म्हणतो.॥ ११७॥ अर्जुना! जीवदशेच्या पलीकडे जे शुद्ध आत्मस्वरूप त्याची खूण ओळखून, तोच मी आहे, असें ऐक्य ओळखून, जो शुद्ध आत्मस्वरूप झाला व त्या अनुभवानेच जो व्यवहार करतो, तो नुसत्या देहाचे वेगळेपणाने वेगळा होईल काय?॥ ११८॥

उदारा: सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम्। आस्थित: स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम्॥ १८॥

अर्थ—हे सर्व चार प्रकारचे माझे प्रिय भक्तच आहेत. पण ज्ञानी मात्र माझा आत्माच आहे, (म्हणजे मला अत्यंत प्रिय आहे); कारण माझे ठिकाणींच त्याचें चित्त स्थिर झालें असल्यामुळें, अत्युत्तम गति जो मी, त्या मला तो प्राप्त होतो.॥ १८॥

म्हणोनि आपुलाल्या हिताचेनि लोभें। मज आवडे तोही भक्त झोंबे। परी मीचि करी वालभें। ऐसा ज्ञानिया एकु॥ ११९॥
पाहें पां दुभतेयाचिया आशा। जगचि धेनूसि करीताहे फांसा। परि दोरेंवीण कैसा। वत्साचा बळी॥ १२०॥
कां जे तनुमनुप्राणें। तें आणिक कांहींचि नेणे। देखे तयातें म्हणे। हे मायचि कीं माझी॥ १२१॥
तें येणें मानें अनन्यगती। म्हणूनि धेनुही तैसीचि प्रीती। यालागीं लक्ष्मीपती। बोलिले साच॥ १२२॥
हें असो मग म्हणितलें। जे कां तुज सांगितले। तेही भक्त भले। पढियंते आम्हां॥ १२३॥
परि जाणोनियां मातें। जो पाहों विसरला मागौतें। जैसें सागरा येऊनि सरिते। मुरडावें ठेलें॥ १२४॥
तैसी अंत:करणकुहरीं उपजली। जयाची प्रतीतिगंगा मज मिनली। तो मी हे काय बोली। फार करूं॥ १२५॥
एऱ्हवीं ज्ञानिया जो म्हणिजे। तो चैतन्यचि केवळ माझें। हें न म्हणावें परि काय कीजे। न बोलणें बोलें॥ १२६॥

अर्थ—म्हणून अर्जुना! आपल्या कल्याणाकरिता कोणीहि माझी भक्ति करितो, पण माझेंच एक प्रेम ज्याला आहे. असा एक ज्ञानीभक्तच असतो.॥ ११९॥ पहा, अर्जुना! दूध मिळावें म्हणून दुधाचे आशेने लोक गायीला दाव्याने बांधून ठेवतात किंवा आडी घालतात पण ती दोरावांचून वासरांच्या स्वाधीन कशी होते, पहा.॥ १२०॥ कारण शरीर, मन, प्राण हे तिन्ही वासराने गायीकडेच लावलेलें असतें. तें वासरू गायीवांचून दुसरें कांही जाणत नाही. गायीला पाहिल्याबरोबर तें वासरू 'माझी माय' म्हणून हंबरतें.॥ १२१॥ तें वासरू अशारीतीने गायीच्या ठिकाणीं अनन्य असतें, म्हणूनच गायहि त्या वासराचे ठिकाणीं अनन्य प्रेम करते; म्हणूनच लक्ष्मीपति भगवान श्रीकृष्णांनी वर जें सांगितलें तें खरें आहे.॥ १२२॥ हे असो, भगवान मग म्हणाले, अर्जुना! जे दुसरे इतर भक्त मी सांगितलें,

तेहि चांगले असून मला प्रिय आहेत. ॥ १२३ ॥ ज्याप्रमाणे समुद्राला येऊन मिळालेले नदीचें पाणी मागें मुरडणे बंद होतें, त्याप्रमाणे मला जाणून जे मागें सोडलेल्या संसाराला विसरले. ॥ १२४ ॥ व ज्याच्या अंत:करणरूपी गुहेंत जन्माला आलेली अनुभवगंगा मला येऊन मिळाली, तो मीच होतो, हें शब्दाने काय विस्तारून सांगू. ॥ १२५ ॥ वास्तविक ज्ञानी पुरुष म्हणजे माझें केवळ चैतन्यस्वरूप होय. असें बोलूं नये खरें, पण काय करूं जें बोलूं नये तें बोललों. ॥ १२६ ॥

गूढार्थदीपिका—तो चैतन्यचि केवळ माझें—''एकभक्तिर्विशिष्यते'' असें जें ज्ञानीभक्ताविषयीं भगवंतांनी मागें म्हटलें आहे. त्याचेंच येथे स्पष्टींकरण केलें आहे. या भक्तींत दोन गोष्टी मुख्य असतात. अनन्यता व दीनता. ''अन्याश्रयाणां, त्यागोऽनन्यता'' (ना. भ. सू. १०) एका भगवंतावांचून दुसरें कांहीच नाही हें जाणून, इंद्रादिदेवतांचा आश्रय सोडणें व एका भगवंतालाच शरण जाणें हीच अनन्यता होय. ही अनन्यता ज्ञान्याचें ठिकाणीं आत्मज्ञानामुळें सहजच येते. ''माझेकडून भगवंता! तुझ्या प्राप्तीचें साधन कांहीच यथायोग्य होत नाही, तूंच कृपा करशील, तर माझा उद्धार होईल'' अशी मनोवृत्ति ठेवणें याला दीनता म्हणतात. या सानन्यदीनतापूर्वक केलेल्या प्रेमभक्तीने ज्ञानीभक्त भगवंताशीं जाणीवरहित समरस ऐक्य पावतो हें ''चैतन्यचि केवळ माझें'' या पंक्तीने दाखविलें आहें.

बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते । वासुदेव: सर्वमिति स महात्मा सुदुर्लभ: ॥ १९ ॥

अर्थ—पुष्कळ जन्मानंतर, माझ्या स्वरूपाचा साक्षात्कार होऊन तो मला प्राप्त होतो. सर्व एक नामरूपासह पूर्ण ब्रह्मच असते, त्यावाचून दुसरे कांही नाही असे जाणणारा महात्मा दुर्लभ आहे. ॥ १९ ॥

गूढार्थदीपिका—येथें पहिल्या चरणांत 'मी ब्रह्मरूप आहे' अशा व्यतिरेकज्ञानानें होणाऱ्या आत्मप्राप्तीचा उल्लेख असून, दुसऱ्या चरणांत अन्वयाने होणाऱ्या ''सर्व खल्विदं ब्रह्म'' या व्यापक ब्रह्मप्राप्तीचा उल्लेख आहे. बहुतेक ज्ञानीपुरुष व्यतिरेकाने येणाऱ्या अनुभवांतच तृप्ति मानून राहतात आणि या व्यतिरेक ज्ञानानंतर सगुणस्वरूपाची प्रेमभक्ति करून अन्वयाने सर्व नामरूपासह पूर्ण एक सच्चिदानंद परमात्माच आहे. असा व्यापक अनुभव (सगुणाला तुच्छ समजून) घेण्याच्या भरीस पडत नाहीत. पण नुसत्या व्यतिरेकाने आत्मानुभव घेणाऱ्या ज्ञान्यांपेक्षां, व्यतिरेकानंतर अन्वयाचा नामरूपासह व्यापक अनुभव घेणारा महात्मा श्रेष्ठ होय हेच ''वासुदेव: सर्वमिति स महात्मा सुदुर्लभ:'' या चरणाने सांगितलें आहे.

जे तो विषयांची दाट झाडी। माजीं कामक्रोधांचीं सांकडीं। चुकावूनि आला पाडी। सद्वासनेचिया॥ १२७॥

अर्थ—शब्दादि पंचविषयांचें दाट अरण्य व त्यांतील कामक्रोधादि संकटें किंवा भीति यांना चुकवून सद्वासनेच्या ओसाड जमिनीवर तो पुरुष येतो. ॥ १२७ ॥

गूढार्थदीपिका—संसारात पडलेल्या जीवाला मुक्त होण्यास अनेक जन्म कसे लागतात याचें माऊलींनी या श्लोकावरील ओव्यांत वर्णन केलें आहे.

प्रथम शास्त्रानुसार वागत असतां, कांही कालाने, विषयवासना व त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या कामक्रोधादिकांतून सुटून, परमेश्वर प्राप्ति करून घ्यावी अशी सद्वासना उत्पन्न होते.

मग साधुसंगे सुभटा। उजू सत्कर्माचिया वाटा। अप्रवृत्तीचा अव्हांटा। डावलूनि॥ १२८॥

अर्थ—मग अर्जुना! साधूच्या संगतीने शास्त्रविरुद्ध वागण्याची आडवाट सोडून, सरळ सत्कर्माचरणाची वाट धरतो. ॥ १२८ ॥

गूढार्थदीपिका—परमेश्वरकृपेने सद्वासना उत्पन्न झाल्यानंतर परमेश्वरकृपेनेच सत्पुरुषाचा संग घडतो. त्यांच्या उपदेशाने विषयसुखाच्या प्राप्तीकरिता कर्म करणें बंद पडून, भगवत्प्राप्तीकरिताच निष्कामचित्ताने कर्माचरण होऊं लागतें, असा अर्थ.

आणि जन्मशतांचा वाहतवणा। तेवीं आस्थेचिया न लेचि वाहणा। तेथ फलहेतूचा उगाणा। कवणु चाळी॥ १२९ ॥

अर्थ—आणि अशा सन्मार्गाने शेकडों जन्म तो वाट चालत राहतो; पण विषयसुखरूपी आशेच्या वाहणा तो

कधीं घालत नाही. तेथे फळाची इच्छा धरणें, याचा हिशेब कोण पाहतो?॥ १२९॥

गूढार्थदीपिका—आस्थेचिया न लेचि वाहणा—केलें जाणाऱ्या निष्काम कर्माच्या योगाने पुढे विषयसुखाकडे ढुंकून न पाहतां परमेश्वरप्राप्तीकरितां शेंकडों जन्म लागलें तरी ते घालविण्याचे त्याला धैर्य येतें.

ऐसा शरीरसंयोगाचिये राती। माजीं धांवतां सडिया आयती। तंव कर्मक्षयाची पाहाती। पाहांट जाली॥ १३०॥

अर्थ—याप्रमाणे शरीराच्या संयोगरूप रात्रीमध्ये सर्व संग सोडून, एकटाच धांवू लागला असतां, कर्मक्षयाची उजेडरूप पहाट होते.॥ १३०॥

गूढार्थदीपिका—शरीरसंयोगाचिये राती।-माजी धांवतां सडिया आयती—प्रारब्धकर्माने प्राप्त झालेल्या पांचभौतिक देहामुळें आत्मविस्मृति झालीं असतांहि, त्या देहबुद्धि मन इंद्रिये इत्यादिकांहून मी निराळा आहे, असें जाणून त्याचें प्रेम न धरतां, चित्तांत परमेश्वरप्राप्तीची सारखी तळमळ वागविली असतां, सर्व कर्माचा नाश होतो.

तैसीच गुरुकृपाउखा उजळली। ज्ञानाची वोतपली पडली। तेथ साम्याची ऋद्धि उघडली। तयाचिये दिठी॥ १३१॥

अर्थ—त्या बरोबर गुरुकृपारूप उष:काल होऊन, तिच्यायोगाने आत्मैक्यज्ञानदृष्टिरूप तिरीप पडते. ज्ञानाची तिरीप पडल्यामुळें त्याच्या दृष्टिसमोर साम्यतेचें भांडार उघडलें जातें.॥ १३१॥

गूढार्थदीपिका—गुरुकृपा उखा उजळली—परमेश्वरप्राप्तीच्या तळमळीने परमेश्वरकृपा होऊन सद्गुरुची प्राप्ति होते व सद्गुरुकृपेने आत्मज्ञान होऊन ज्ञानाच्या दृष्टीला सर्वत्र सम असलेल्या एका ब्रह्माचाच अनुभव येतो.

ते वेळीं जयाकडे वास पाहे। तेउता मीचि तया एकु आहे। अथवा निवांत जरी राहे। तरी मीचि तया॥ १३२॥
हें असो आणिक कांहीं। तया सर्वत्र मीवांचूनि नाहीं। जैसें सबाह्य जळ डोहीं। बुडालिया घटा॥ १३३॥
तैसा तो मजभीतरीं। मी तया आंतुबाहेरी। हें सांगिजे बोलवरी। तैसें नव्हे॥ १३४॥
म्हणोनि असो हें इयापरी। तो देखे ज्ञानाची वाखारी। तेणें संसरलेनि करी। आपु विश्व॥ १३५॥
हें समस्तही श्रीवासुदेवो। ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो। म्हणोनि भक्तांमाजीं रावो। आणि ज्ञानिया तोचि॥ १३६॥

अर्थ—तेव्हा जेथे जेथे तो दृष्टि देतो तेथे तेथे त्याला मीच एक दिसतो किंवा कोणीहिकडे दृष्टि न देतां, निवांत राहिला तरी, मीच त्याला दिसतो.॥ १३२॥ हें असो. अर्जुना! ज्याप्रमाणे पाण्यांत बुडालेल्या घटाला आंतबाहेर पाणीच असतें, त्याप्रमाणे त्याला माझ्यावांचून दुसरें कांहीच दिसत नाही.॥ १३३॥ तसा तो ज्ञानीभक्त माझ्या आंत असतो व त्याच्या आंत बाहेर मी असतो, अर्जुना! ही स्थिति बोलण्याने सांगतां येण्याजोगी नाही.॥ १३४॥ म्हणून हे असो. याप्रमाणे तो सर्वत्र ज्ञानाचें कोठारच पाहतो—म्हणजे त्याला सर्वत्र ज्ञानरूप आत्माच दिसतो—व त्या ज्ञानाने सर्व व्यवहार करीत असतांना, सर्व विश्वच आपण होऊन जातो.॥ १३५॥ हे सर्व नामरूपात्मक श्रीवासुदेवच आहे असा त्यांच्या अंतकरणांत अनुभवाचा ठसा ओतला गेला असतो म्हणूनच तो ज्ञान्यांतहि श्रेष्ठ होय व भक्तांतहि श्रेष्ठ होय.॥ १३६॥

गूढार्थदीपिका—नामरूपासह सर्व परब्रह्म आहे, दुसरें कांही नाही अशी ज्ञान्याची परानिष्ठा प्राप्त झाली असतां सगुणाचे ठिकाणीं आपोआप प्रेम जडून ज्ञानी भक्त होतो.

जयाचिये प्रतीतीचां वाखारां। पवाडु होय चराचरा। तो महात्मा धनुर्धरा। दुर्लभु आथी॥ १३७॥
येर बहु जोडती किरीटी। जयांचीं भजनें भोगासाठीं। जे आशातिमिरें दृष्टी। मंद जाले॥ १३८॥

अर्थ—ज्याच्या अनुभवाच्या कोठारांत संपूर्ण विश्वाचा विस्तार झालेला असतो, असा सिद्ध पुरुष अर्जुना! दुर्लभ असतो.॥ १३७॥ हे अर्जुना! विषयसुखाचे आशेने ज्यांची दृष्टि मंद होऊन जे विषयांध झाले आहेत व विषयभोगाच्या प्राप्तीसाठीच माझें भजन करतात, असे या महात्म्याहून इतर पुष्कळ सांपडतात.॥ १३८॥

कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवताः। तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया॥ २०॥

अर्थ—पुत्र धन इत्यादि विषयसुखाच्या वासनेने हें विवेकज्ञान नष्ट झाल्यामुळें आपल्या प्रकृतीच्या सर्वस्वीं स्वाधीन होऊन निरनिराळ्या देवतांच्या आराधनेचे नियम पाळून कामनापूर्तीकरितां मला सोडून जे इतर निरनिराळ्या देवतांना शरण जातात.॥ २०॥

आणि फळाचिया हांवा। हृदयीं कामा जाला रिगावा। कीं तयाचिये घसणी दिवा। ज्ञानाचा गेला॥ १३९॥
ऐसे उभयतां आंधारीं पडले। म्हणोनि पासींचि मातें चुकले। मग सर्वभावें अनुसरले। देवतांतरां॥ १४०॥
आधींच प्रकृतीचे पाइक। वरी भोगालागीं तंव रंक। मग तेणें लोलुप्यें कौतुक। कैसे भजती॥ १४१॥
कवणी तिया नियमबुद्धि। कैसिया हन उपचारसमृद्धि। कां अर्पण यथाविधि। विहित करणें॥ १४२॥

अर्थ—कर्माचें फळ मिळावें या तीव्र इच्छेने अंत:करणांत वासना शिरली व वासनेच्या संघर्षाने ज्ञानाचा दिवा विझला. ॥ १३९ ॥ या रीतीने आंतबाहेर दोन्हीकडे अज्ञानांध:कारांत ते पडतात, म्हणून मी जवळ असून त्यांना दिसत नाही. मला चुकल्यामुळें इतर देवतांचें ते सर्व भावाने भजन करितात. ॥ १४० ॥ अगोदर प्रकृतीच्या स्वाधीन झालेले असतात व त्यांत पुन: विषयसुखाकरिता दीन झालेले असतात. मग विषयलंपट होऊन देवतांची कशी उल्हासाने सेवा करतात; पहा. ॥ १४१ ॥ देवतांचे आराधनेकरितां जे नियम सांगितले असतील ते पाळण्याविषयीं, जें उपचार सांगितले असतील ते मिळविण्याविषयी आणि जें विहित कर्म सांगितलें असेल तें यथाविधि करण्याविषयीं, कशी काळजी घेतात पहा. ॥ १४२ ॥

यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धयार्चितुमिच्छति । तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम्॥ २१॥

अर्थ—जो जो उपासक श्रद्धेने ज्या ज्या भगवत्तनूचें अर्चन करूं इच्छितो, त्या त्या स्वरूपाचे ठिकाणीं त्याची ती श्रद्धाच मी दृढ करतों॥ २१ ॥

पै जो जिये देवतांतरी। भजावयाची चाड करी। तयाची ते चाड पुरी। पुरविता मी॥ १४३॥
देवोदेवीं मीचि पाहीं। हाही निश्चय त्यासि नाहीं। भाव ते ते ठायीं। वेगळाला धरी॥ १४४॥

अर्थ—पण जो ज्या देवतेचें भजन करण्याची इच्छा करतो त्याची ती इच्छा मीच पूर्ण करतों. ॥ १४३ ॥ वास्तविक देवोदेवी मीच झालों आहे, पण हा निश्चय त्याला नसतो व प्रत्येक देवतेच्या ठिकाणीं निरनिराळा भाव धरतो. ॥ १४४ ॥

गूढार्थदीपिका—नित्यशुद्धबुद्धमुक्त सर्वज्ञ सर्वशक्ति असा एकच परमात्मा आहे आणि एका परमेश्वराचे ठिकाणींच निरनिराळे उपासक, आपल्या निरनिराळ्या उपास्यांचीं भावना करतात. पण पूजनीय ईश्वर एक आहे अशी एकेश्वर भावना न राहतां त्यांच्या अनेकेश्वर भावनेमुळें त्यांच्या अशा आराधनेने परमेश्वर प्राप्ति होत नाही.

स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते । लभते च तत: कामान्मयैव विहितान्हि तान्॥ २२॥

मग तिया श्रद्धायुक्त। तेथिंचे आराधन जें उचित। तें सिद्धीवरी समस्त। वर्तों लागे॥ १४५॥
ऐसें जेणें जें भाविजे। तें फळ तेणें पाविजें। परी तेंही सकळ निपजे। मजचिस्तव॥ १४६॥

अर्थ—मग त्या देवतेचें, श्रद्धेने जें आराधन केलें जातें तें सिद्ध होई पर्यंत तसे वागतो. ॥ १४५ ॥ अशा रीतीने ज्या इच्छेने तें आराधन केलें जातें तसें फळ त्यांना मिळतें, पण जें फळ मिळतें तें मात्र माझ्यामुळेंच मिळतें. ॥ १४६ ॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे राज्यशासनव्यवस्थेंत लोकांचा निग्रह व लोकांवर अनुग्रह करणारे मर्यादित सत्तेच्या अधिकाराचे अधिकारी असतात, त्याप्रमाणेच भगवंतांनी निर्माण कलेल्या सृष्टींतील इंद्रादिक देवता ह्या मर्यादित अधिकारयुक्त असे नेमलेले अधिकारिक जीव आहेत, असे शास्त्रांतून सांगितलें आहे. लोकशासनाचे द्वारा राजशासनसत्ताच लोकांचे शासन करीत असतें, त्याप्रमाणे इंद्रादिक देवतांच्या अधिकारांचे द्वारा जगाची उत्पत्ती स्थिति लय करणारा सर्वज्ञ सर्व शक्ति असा परमेश्वरच जगताचें सर्व शासन करीत असतो. जगताच्या शासनांत, जीवाच्या कर्माचें फळ देणे, हेंहि येत असल्यामुळें सर्व जीवांच्या कर्माचें फळ एका सर्वज्ञ सर्वशक्ति परमात्म्यावांचून दुसरा कोणी देऊं शकत नाही. असा ''फलमत उपपत्ते:'' या वेदान्तसूत्र अधिकरणांत भगवान व्यासांनी सिद्धान्त केला आहे आणि तोच भगवान श्रीकृष्णांनी व ज्ञानेश्वर माऊलींनी येथे मांडला आहे.

अन्तवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् । देवान्देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि॥ २३॥

अर्थ—या मंदबुद्धीच्या उपासकांना, त्यांच्या उपासनेचें जें फळ मिळतें, तें मात्र नाशिवंत असते. देवाचें यजन

करणारे देवाला पावतात व माझें यजन करणारे मलाच मिळतात. ॥ २३ ॥

परी ते भक्त मातें नेणती। जे कल्पनेबाहेरी न निघती। म्हणोनि कल्पित फळ पावती। अंतवंत॥ १४७॥
किंबहुना ऐसें जें भजन। तें संसाराचेंचि साधन। येर फळभोग तो स्वप्न। नावभरी दिसे॥ १४८॥
हें असो परौतें। मग हो का आवडे तें। परि यजी जो देवतांतें। तो देवत्वासीचि ये॥ १४९॥
येर तनुमनुप्राणीं। जे अनुसरले माझेयाचि वाहणीं। ते देहाचां निर्वाणीं। मीचि होती॥ १५०॥

अर्थ—असे हे भक्त मला जाणत नाहीत, म्हणून नाशिवंत असें विषयसुखरूप कल्पित फळ त्यांना मिळतें. ॥ १४७ ॥ किंबहुना अशा रीतीचें आराधन संसारालाच कारणीभूत होतें. बाकी कर्माचें फळ जो सुखभोग, तो मात्र स्वप्नाप्रमाणें, क्षणभर भासतो. ॥ १४८ ॥ हें असो. पलीकडे प्रिय दैवत कां असेना, पण जो ज्या देवतेचें यजन करतो, तो त्या देवतेला प्राप्त होतो. ॥ १४९ ॥ बाकीचे जे शरीराने मनाने व प्राणाने अखंड माझ्याकडे लागले ते देह पडल्यावर मीच होतात. ॥ १५० ॥

गूढार्थदीपिका—इंद्रादिक देवताच सर्वश्रेष्ठ समजून त्यांच्या प्रीत्यर्थ केलेल्या कर्मानुष्ठानाचें फळ नाशिवंत आहे. तशा कर्मानुष्ठानानें त्या त्या देवतेच्या लोकांची प्राप्ति होऊन, नंतर पुन: मृत्युलोकांत यावें लागतें. निष्कामचित्ताने परमेश्वराकडे लक्ष ठेवून व परमेश्वराची आज्ञा समजून, देवतांचें यजन केलें असतां, त्या कर्मयोगाचे अनुष्ठानाने ज्ञान प्राप्त होतें, हें मागें चवथ्या अध्यायांत सांगितलेच आहे. जे सगुण रामकृष्णादि परमेश्वराचे ठिकाणीं चित्त स्थिर करून तत्प्रीत्यर्थ सर्व कर्मांचें अनुष्ठान करतात, तें सगुण रामकृष्णादि परब्रह्माला मिळतात-म्हणजे सगुण परमात्माहि क्षेत्रज्ञच असल्यामुळें त्यांत मिळणें म्हणजे मुक्त होणेंच होय, म्हणून मुक्त होतात-असा अर्थ.

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धय: । परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम्॥ २४॥

अर्थ—कधींहि नष्ट न होणारा व इंद्रियाला गोचर न होणारा व्यापक असा माझा जो सर्वोत्तम परब्रह्मभाव तो न जाणणारे मूर्ख लोक, मला एक मर्यादित व विवक्षित व्यक्तिरूप समजतात. ॥ २४॥

परी तैसें न करिती प्राणिये। वांयां आपुला हितीं वाणिये। पैं पोंहताती पाणिये। तळहातींचेनि॥ १५१॥
नाना अमृताच्या सागरीं बुडिजे। मग तोंडा कां वज्रमिठी पाडिजे। आणि मनीं तरी आठविजे। थिल्लोदकातें॥ १५२॥
हें ऐसें कासया करावें। जें अमृतींही रिगोनि मरावें। तें सुखें अमृत होऊनि कां नसावें। अमृतामाजीं॥ १५३॥
तैसा फळहेतूचा पांजरा। सांडूनियां धनुर्धरा। कां प्रतीतिपाखीं चिदंबरा। गोसावियां नोहावें॥ १५४॥
जेथ उंचावलेनि पवाडें। सुखाचा पैसारु जोडे। आपुलेनि सुरवाडें। उडों ये ऐसा॥ १५५॥
तया उमपा माप कां सुवावें। मज अव्यक्ता व्यक्त कां मानावें। सिद्ध असतां कां निमावें। साधनवरी॥ १५६॥
परि हा बोल आघवा। जरी विचारिजतसे पांडवा। तरी विशेषें या जीवां। न चोजवे गा॥ १५७॥

अर्थ—पण जेणें करून माझी प्राप्ति होईल, अशा रीतीने माझ्या ठिकाणीं चित्त स्थिर करून, माझ्याकरितां, लोक कर्मानुष्ठान करीत नाहीत व माझी प्राप्ति, हें जें त्यांचें हित त्या हिताला ते उणेपणा आणतात, कारण ते तळहातातील पाण्यांत पोहण्याचा प्रयत्न करतात (म्हणजे तळहातांतील पाण्यांत पोहण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ प्रयास होय.) त्याप्रमाणे माझी व्यापकता न जाणतां देवतांना माझ्याहून भिन्न ईश्वर समजून त्यांचें यजन करणें व्यर्थ होय. ॥ १५१ ॥ किंवा अमृताच्या सागरांत बुडल्यावर तोंड कां पक्कें मिटून घ्यावें आणि एखाद्या डबक्यांतील पाण्याचें कां चिंतन करावें ?॥ १५२ ॥ अमर करणाऱ्या अमृतांत शिरूनहि, तोंडाला मिठी मारून तोंडात अमृत जाऊं न देतां, मरावें असे कां करावें ? त्यापेक्षां अमृत पिऊन सुखाने अमृत होऊन अमृतामध्यें कां राहूं नये ?॥ १५३ ॥ त्याप्रमाणे, अर्जुना! विषयसुखाच्या फळाची इच्छा या पिंजऱ्यांचा त्याग करून अनुभवाच्या पंखाने अमर्याद सुखस्वरूप चिदाकाशाचे स्वामी कां होऊं नये ?॥ १५४ ॥ सर्वांचे पलीकडे अमर्याद पसरलेल्या ज्या चिदाकाशांत आपल्याला, आनंदाने संचार करीत असतां, सुखाचा अपार लाभ होतो. ॥ १५५ ॥ त्या मला अपरिमिताला परिमित कां करावें ? इंद्रियातीत अशा मला इंद्रियगोचर असा भौतिक कां मानावें ? आणि मी सिद्धवस्तु असतांना त्याच्या प्राप्तीकरितां

साधनें करित कां मरावें?॥ १५६ ॥ पण जरी हें माझें सर्व बोलणें विचार करण्याजोगें आहे, तरी तें जीवाला विशेषेंकरून आवडत नाही. ॥ १५७ ॥

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः। मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम्॥ २५॥

अर्थ—योगमायेने आवृत झाल्यामुळें मी सर्वांनाच प्रकाशित होत नाही. मूर्ख अज्ञानी पुरुष मी जन्मरहित व अविनाशी आहे. असें मला जाणत नाही. ॥ २५ ॥

कां जे योगमायापडळें। हे जाले आहाती आंधळे। म्हणोनि प्रकाशाचेनि देहबळें। न देखती मातें॥ १५८ ॥

एऱ्हवीं मी नसें ऐसें। कांहीं वस्तुजात असे। पाहें पां कवण जळ रसें-। रहित आहे॥ १५९ ॥

पवन कवणातें न शिवेचि। आकाश कें न समायेचि। हें असो एक मीचि। विश्वीं असें॥ १६० ॥

अर्थ—कारण हे जीव, त्यांच्या डोळ्यांत योगमायेचें म्हणजे त्रिगुणात्मक मायेचें पटल असल्यामुळें ते आंधळे झाले आहेत म्हणून 'प्रकाशाचेनि देहबळे'-म्हणजे 'मी म्हणजे मर्यादित' या समजुतीमुळें, ते मला पाहूं शकत नाहीत. ॥ १५८ ॥ नाही तर 'मी नाही' अशी वस्तुच जगांत नाही. अर्जुना! विचार कर. कोणतें पाणी रसावांचून असतें? ॥ १५९ ॥ वारा कोण्या वस्तुला स्पर्श करीत नाही? आकाश कशांत भरून नाही? हे असूं दे. मीच एक जगांत भरलो आहे. ॥ १६० ॥

वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन। भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन॥ २६ ॥

अर्थ—अर्जुना! मी पूर्वी होऊन गेलेली, सध्या भासत असलेली व पुढें होणारी सर्व भूतसृष्टि जाणतो, पण त्यापैकीं मला मात्र कोणीहि जाणत नाही. ॥ २६ ॥

येथें भूतें जियें अतीतलीं। तियें मीचि होऊनि ठेलीं। आणि वर्तत आहाति जेतुलीं। तींही मीचि॥ १६१ ॥

कां भविष्यमाणें जियें हीं। तींही मजवेगळीं नाहीं। हा बोलचि एऱ्हवीं कांहीं। होय ना जाय॥ १६२ ॥

दोराचिया सापासी। डोंबा बडीया ना गव्हाळा ऐसी। संख्या न करवे कोण्हासी। तेवीं भूतांसि मिथ्यत्वें॥ १६३ ॥

ऐसा मी पंडुसुता। अनुस्यूत सदा असतां। यां संसार जो भूतां। तो आनें बोलें॥ १६४॥

अर्थ—या जगांत जेवढे प्राणी पूर्वी होऊन गेले, ते सर्व मीच झालों आणि जेवढे सध्या वर्तमानकाळीं आहेत, तेहि मीच आहे. ॥ १६१ ॥ किंवा पुढें जेवढे उत्पन्न होतील, तेहि माझ्याहून निराळे राहूं शकत नाही. अर्जुना! हे नुसते शब्दच उच्चारिले जातात, वास्तविक कांही उत्पन्न होत नाही व कांही नाशहि पावत नाही. ॥ १६२ ॥ दोरीवर भासणारा सर्प ज्याप्रमाणे कोणाला डोंबा, कोणाला कवड्या, अशी गणना केलीं जाणार नाही असा अनेक प्रकारें, मिथ्या भासतो. त्या प्रमाणेच माझ्या ठिकाणीं मिथ्या भासणाऱ्या भूतसृष्टीची गणना करतां येत नाही. (म्हणजे जीवजगत् व त्यांची संख्या हे सर्व समूळ खोटे आहेत असा अर्थ) ॥ १६३ ॥ याप्रमाणे अर्जुना! या सर्व विश्वांत मीच एक घनदाट भरलों असतांना, जीवाला हा जो माझ्याहून निराळा संसार भासतो, तो निराळ्या विचाराने भासतो. ॥ १६४ ॥

गूढार्थदीपिका—परमात्मा एक अद्वैतरूप असून, त्यावांचून अन्य वस्तुच नसल्यामुळें, तो अव्यक्त नाही व व्यक्तहि नाही—म्हणजे आतांपर्यंत दिसत नव्हतां पण आतां दिसतो, असें त्याच्या ठिकाणीं म्हणतां येत नाही, पण मूर्ख अज्ञानी लोक तसें मानतात. परमात्मा अव्यक्त होता, आतां व्यक्त झाला असे अज्ञानीच म्हणतात. खरोखर जें कांही भासतें तें तोच भासतो. इतकेंच की अज्ञानदृष्टीने पाहिलें असतां तोच परमात्मा जीवजगत्स्वरूप दिसतो, ज्ञानदृष्टीने पाहिलें, तर तोच अव्यक्त म्हणजे इंद्रियातीत भासतो व प्रेमरूप भक्तिदृष्टीने पाहिलें असतां व्यक्त म्हणजे नामरूपासह सच्चिदानंदस्वरूप अनुभवाला येतो. कारण भगवंताच्या इंद्रियातीत निर्गुणस्वरूपाचे ठिकाणींच नामरूपात्मक सगुणस्वरूप प्रेमाने भासत असतें.

भगवंताच्या मायेने भ्रांत झालेल्या व भगवंताची कृपा नसलेल्या मूर्खांना मात्र, सगुण स्वरूपाच्या पूर्ण ब्रह्मत्वाची ओळख पटत नाही व ते भगवंताचें सगुण स्वरूप आपल्या देहाप्रमाणे स्थूल पांचभौतिक मर्यादित आहे असें समजतात.

हाच सर्व आशय भगवंतांनी २४-२५ व २६ या श्लोकांतून व श्रीज्ञानेश्वर माऊलींनी त्यावरील ओव्यांतून सांगितला आहे.

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत। सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परन्तप॥ २७॥

अर्थ—हे शत्रूला ताप देणाऱ्या अर्जुना! सर्व प्राणी सृष्टिउत्पत्तीच्या वेळीं राग द्वेष यापासून उत्पन्न झालेल्या शीतउष्ण, सुखदु:ख इत्यादि द्वंद्वाचे मोहाने अविवेक संपन्नच असतात. ॥ २७॥

तरी तेचि आतां थोडीसी। गोठी सांगिजेल परियेसीं। जेथ अहंकार तनूंसी। वालभ पडिलें॥ १६५॥

अर्थ—ज्या गोष्टीमुळें संसार भासतो ती गोष्ट कोणती हें थोडेसें सांगतो अर्जुना! ऐक. जेथे देह व अहंकार यांचें प्रेम जुळलें. ॥ १६५॥

गूढार्थदीपिका—देहाचे प्रेमाने मी देह असा देहाहंकार जीवाचे ठिकाणीं अनादिकालापासून आहे हें ''जेथ'' या शब्दाने दाखविले आहे.

तेथ इच्छा हे कुमारी जाली। मग ते कामाचिया तारुण्या आली। तेथ द्वेषेंसीं मांडिली। वराडिक॥ १६६॥

अर्थ—तेच इच्छा हे मुलगी उत्पन्न झाली व ती विषयवासनारूपी तारुण्यदशेला आली. तेव्हा द्वेषाशीं तिचा विवाहसंबंध झाला. ॥ १६६॥

गूढार्थदीपिका—आपल्या आवडत्या विषयाची भोगवासना उत्पन्न झाली असतां, त्याबरोबर नावडत्या विषयाचा द्वेष उत्पन्न होतो, असा अर्थ.

तया दोघांस्तव जन्मला। ऐसा द्वंद्वमोह जाला। मग तो आजेयाने वाढविला। अहंकारें॥ १६७॥

अर्थ—या दोघांपासून द्वंद्वमोह जन्माला आला व मग तो अहंकार या आज्याने, त्याचें संगोपन करून मोठा केला. ॥ १६७॥

गूढार्थदीपिका—द्वंद्वमोह—म्हणजे सुखदु:खाच्या स्वाधीन झाल्यामुळे विचार नाहिसा होणें.

आजेयानें वाढविला—जसा देहाहंकार बळावतो तसा तसा अविचार चढत जातो.

जो धृतीसि सदा प्रतिकूळु। नियमाही नागवे सळु। आशारसें दोंदिलु। जाला सांता॥ १६८॥
असंतुष्टीचिया मदिरा। मत्त होवोनि धनुर्धरा। विषयांचे वोवरां। विकृतीसीं असे॥ १६९॥
तेणें भावशुद्धीचिया वाटे। विखुरले विकल्पाचे कांटे। मग चिरिले अव्हांटे। अप्रवृत्तीचे॥ १७०॥
तेणें भूतें भांबावलीं। म्हणोनि संसाराचिया आडवामाजीं पडिलीं। मग महादु:खाच्या घेतलीं। दांडे वरी॥ १७१॥

अर्थ—आशारूपी रसाने पुष्ट झालेला असा तो दांडगा, नियमाचे आटोक्यात येत नाही व धैयाला नेहमीं प्रतिकूल असतो. ॥ १६८॥ असंतोषरूपी मदिरा पिऊन धुंद झालेला तो, अर्जुना! विषयरूपी खोलीमध्ये विकाररूपी स्त्रीसह राहतो. ॥ १६९॥ त्यामुळें शुद्धभावाच्या किंवा शुद्ध श्रद्धेच्या वाटेमध्यें नाना विकल्पाचे अश्रद्धेचे कांटे पसरले व त्या विकल्पाचे तेथून शास्त्रविरुद्ध वर्तनाचे आडमार्ग फुटले. ॥ १७०॥ ते फुटलेले आडमार्ग पाहून भूतें बुचकळ्यांत पडलीं, म्हणून संसाररूपी दाट अरण्यांत पडलीं व परम दु:खाच्या दंडुकाने बडवली गेलीं. ॥ १७१॥

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्। ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रता:॥ २८॥

अर्थ—ज्या पुण्यशील लोकांचें पाप नाहिसें झालेले असतें, तेच या द्वंद्वमोहापासून मुक्त होतात व माझें भजन करायचें, असे दृढ व्रत धारण करून, माझें भजन करतात. ॥ २८॥

ऐसे विकल्पाचे वांयाणे। कांटे देखोनि सणाणे। जे मतिभ्रमाचें पासवणें। घेतीचिना॥ १७२॥
उजू एकनिष्ठेच्या पाउलीं। रगडूनि विकल्पाचिया भालीं। महापातकांची सांडिली। अटवी जिहीं॥ १७३॥
मग पुण्याचे धांवा घेतले। आणि माझी जवळीक पातले। किंबहुना ते चुकले। वाटवधेयां॥ १७४॥

अर्थ—अशा प्रकारच्या विकल्पाचे तीक्ष्ण कांटे खोटे आहेत असें पाहून, बुद्धिभ्रमाचें सान्निध्य जे करीत नाहीत. ॥ १७२॥ 'माझे ठिकाणीं एकनिष्ठ होणें' या सरळ पाउलाने, विकल्पाची तीक्ष्ण भाल्यासारखीं टोकें रगडून

टाकिलीं आणि महापातकांचें अरण्य ज्यांनी ओलांडिलें. ॥ १७३ ॥ आणि जे पुण्यमार्गाने धांवत सुटले व माझ्या जवळ आले, अर्जुना! ते मात्र वाटमाऱ्यापासून-भगवत्प्राप्तीच्या मार्गावरील मारेकऱ्यापासून-सुटले. ॥ १७४ ॥

जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये। ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम्॥ २९ ॥

अर्थ—माझ्या सगुण रामकृष्णादि स्वरूपाचा आश्रय करून जे कोणी जन्ममरणापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करतात, ते संपूर्ण ब्रह्म जाणतात, अध्यात्म जाणतात व संपूर्ण कर्महि जाणतात. ॥ २९ ॥

एऱ्हवीं तरी पार्था। जन्ममरणाची निमे कथा। ऐसिया प्रयत्नातें आस्था। विये जयांची॥ १७५ ॥
तयां तो प्रयत्नुचि एके वेळे। मग समग्रें परब्रह्में फळे। जया पिकलेया रसु गळे। पूर्णतेचा॥ १७६ ॥

अर्थ—अर्जुना! नाही तरी, ही जन्ममरणाची कथा पुनः ऐकूं नये, या सदिच्छेने ज्यांचा प्रयत्न सुरूं झाला. ॥ १७५ ॥ मग तो प्रयत्न एकदांचा नामरूपासह सर्वच ब्रह्म आहे अशा अनुभवाने फलद्रूप होतो व ते अनुभवरूप फळ पिकलें असतां, पूर्णतेचा रस गळायला लागतो. ॥ १७६ ॥

गूढार्थदीपिका—नामरूपासह सर्व पूर्ण परब्रह्मच आहे, असा अनुभव येणे; अशा पूर्णतेचें माऊलींनी येथे लक्षण केलें आहे.

ते वेळीं कृतकृत्यता जग भरे। तेथ अध्यात्माचें नवलपण पुरे। कर्माचें काम सरे। विरमे मन॥ १७७ ॥
ऐसा अध्यात्मलाभ तया। होय गा धनंजया। भांडवल जया। उद्यमीं मी॥ १७८ ॥

अर्थ—(ही पूर्णता प्राप्त झाली असतां) सर्व जग कृतकृत्यतेने भरून जातें—म्हणजे सर्वत्र पूर्ण परब्रह्माचाच अनुभव येतो—व अध्यात्मप्राप्तीचें कौतुकहि संपते. कर्माचा उपयोग राहत नाही व मनहि उन्मन होतें. ॥ १७७ ॥ अर्जुना! जो कोणी माझ्या सगुण स्वरूपाच्या भांडवलावर एवढा उद्योग करतो, त्याला एवढी अध्यात्मप्राप्ति होतो. ॥ १७८ ॥

गूढार्थदीपिका—सगुण भगवंताच्या भक्तीने, निर्गुणस्वरूपाचें ज्ञान होऊन, कर्माचें यथार्थ स्वरूप काय, हेंहि कळतें व मन उन्मन होतें.

तयातें साम्याचिये वाढी। ऐक्याची सांदे कुळवाडी। तेथ भेदाचिया दुबळवाडी। नेणिजे तो॥ १७९ ॥

अर्थ—त्याच्या साम्यदृष्टिरूप व्याजावर ऐक्याचा सर्व व्यवहार चालतो. मग तेथे द्वैताचें दारिद्र्य तो कधींच जाणत नाही. ॥ १७९ ॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञानानंतर केलेल्या सगुणभक्तीने व्यवहार कालीं भक्ताची अद्वैतब्रह्मस्थिति नाहीशी होत नाही असा अर्थ.

"**ब्रह्मैव सर्वनामानि रूपाणि विविधानि च। कर्माण्यपि समग्राणि बिभर्तीति श्रुतिर्जगौ॥**" (अपरोक्षानुभूति)
ज्ञानीभक्ताला परमेश्वरावांचून दुसरें कांही दिसतच नाही असा आचार्यांचाहि आशय आहे.

साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः। प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः॥ ३० ॥

॥ इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानविज्ञानयोगो नाम सप्तमोऽध्यायः॥

अर्थ—आणि अधिभूत, अधिदैव व अधियज्ञासह मीच आहे, असें जे कोणी मला जाणतात, ते माझ्या ठिकाणीं चित्त स्थिर झालेले पुरुष, मरणसमयीं, मलाच जाणतात. ॥ ३० ॥

जिहीं साधिभूता मातें। प्रतीतीचेनि हातें। धरूनि अधिदैवातें। शिवतलें गा॥ १८० ॥
जया जाणिवेचेनि वेगें। मी अधियज्ञु दृष्टी रिगें। ते तनूचेनि वियोगें। विऱ्हये नव्हती॥ १८१ ॥
एऱ्हवीं आयुष्याचें सूत्र विघडतां। भूतांची उमटे खडाडता। काय न मरतयाहि चित्ता। युगांतु नोहे॥ १८२ ॥
परी नेणों कैसे पैं गा। जे जडोनि गेले माझिया आंगा। ते प्रयाणींचिया लगबगा। न सांडितीच मातें॥ १८३ ॥

अर्थ—ज्यांनी आपल्या पूर्ण आत्मानुभवाच्या बळाने, अधिभूत मीच आहे, असे जाणून आधिदैवताला (जीवाला) स्पर्श केला म्हणजे जीवस्वरूपहि मीच आहे असे जाणलें. ॥ १८० ॥ त्याचप्रमाणे त्या जाणीवेच्या बळाने अधियज्ञहि मीच आहे, अशी ज्यांची ज्ञानदृष्टि आहे, ते शरीर सोडतेवेळीं विव्हल होत नाहीत. ॥ १८१ ॥ खरोखर

पाहिलें तर आयुष्याची दोरी तुटली की पंचभूतांत एकमेकांना सोडण्याची खळबळ सुरू होते, तेव्हा न मरणाऱ्यांच्या (म्हणजे मरण पहाणाऱ्यांच्या) चित्ताला देखील प्रलयासारखे भयंकर दु:ख होत नाही काय ? ॥ १८२ ॥ पण अर्जुना! जे माझ्या सगुण स्वरूपाशीं ऐक्य पावले, ते त्या प्रलयकालच्या व्याकुळतेमध्यें देखील मला कसे सोडत नाहीत, हें समजत नाही. ॥ १८३ ॥

गूढार्थदीपिका—सगुण स्वरूपाची प्रेमभक्ति करणाऱ्या पुरुषांना अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ इत्यादि सर्व सगुणब्रह्मस्वरूपच दिसतात आणि त्याहून भिन्न अशा विनाशी भौतिक वस्तूची कल्पनाच त्यांच्या अंत:करणाला शिवत नसल्यामुळें लवमात्र देखील मरणाचें दु:ख त्यांना होत नाही.

एऱ्हवीं तरी जाण। ऐसे जे निपुण। तेचि अंत:करण-। युक्त योगी ॥ १८४ ॥
तंव इये शब्दकुपिकेतळीं। नोडवेचि अवधानाची अंजुळी। जे नावेक अर्जुन तये वेळीं। मागांचि होता ॥ १८५ ॥
जेथ तद्ब्रह्मवाक्यफळें। जियें नानार्थरसें रसाळें। बहकते आहाती परिमळें। भावाचेनि ॥ १८६ ॥
सहज कृपामंदानिळें। कृष्णद्रुमाचीं वचनफळें। अर्जुनश्रवणाचिये खोळें। अवचित पडिलीं ॥ १८७ ॥
तियें प्रमेयाचीच हो कां वळलीं। कीं ब्रह्मरसाच्या सागरीं चुबुकळिलीं। मग तैसींच कां घोळिलीं। परमानंदें ॥ १८८ ॥
तेणें बरवेपणें निर्मळें। अर्जुना उन्मेषाचे डोहळे। घेताति गळाळे। विस्मयामृताचे ॥ १८९ ॥
तिया सुखसंपत्ति जोडलिया। मग स्वर्गा वाये वांकुलिया। हृदयाचां जीवीं गुतकुलिया। होत आहाती ॥ १९० ॥
ऐसें वरचिलीचि बरवा। सुख जावों लागलें फावा। तंव रसस्वादाचिया हांवा। लाहो केला ॥ १९१ ॥
झाकरी अनुमानाचेनि करतळें। घेऊनि तियें वाक्यफळें। प्रतीतिमुखीं एके वेळे। घालूं पाहे ॥ १९२ ॥
तंव विचाराचिया रसना न दाटती। परी हेतूचाहि दशनीं न फुटती। ऐसें जाणोनि सुभद्रापती। चुंबीचिना ॥ १९३ ॥
मग चमत्कारला म्हणे। इयें जळींचीं मा तारांगणें। कैसा झकविलों असलगपणें। अक्षरांचेनि ॥ १९४ ॥
इयें पदें नव्हती फुडिया। गगनाचियाचि घडिया। येथ आमुची मती बुडलिया। थाव न निघे ॥ १९५ ॥
वांचूनि जाणावयाची कें गोठी। ऐसें जीवीं कल्पूनि किरीटी। तियें पुनरपि केली दृष्टी। यादवेंद्रा ॥ १९६ ॥
मग विनविलें सुभटें। हां हो जी यें एकवाटे। सातही पदें अनुच्छिष्टें। नवलें आहाती ॥ १९७ ॥
एऱ्हवीं अवधानाचेनि वहिलेपणें। नाना प्रमेयांचे उगाणे। काय श्रवणाचेनि आंगणे। बोलें लाहाती ॥ १९८ ॥
परि तैसें हें नोहेचि देवा। देखिला अक्षरांचा मेळावा। आणि विस्मयाचिया जीवा। विस्मयो जाला ॥ १९९ ॥
कानाचेनि गवाक्षद्वारें। बोलाचे रश्मी अभ्यंतरें। पाहेना तंव चमत्कारें। अवधान ठकलें ॥ २०० ॥
तेवींचि अर्थाचि चाड मज आहे। ते सांगतांही वेळु न साहे। म्हणूनि निरूपण लवलाहें। किजो देवा ॥ २०१ ॥
ऐसा मागील पडताळा घेउनी। पुढां अभिप्रावो दृष्टी सूनी। तेवींचि माजीं शिरऊनि। आर्ती आपुली ॥ २०२ ॥
कैसी पुसती पाहें पां जाणिव। भिडेंचि तरी लंघों नेदी शिव। एऱ्हवीं श्रीकृष्णहृदयासि खेंव। देवों सरला ॥ २०३ ॥
अगा श्रीगुरूतें जैं पुसावें। तें येणें मानें सावध होआवें। हें एकचि जाणे आघवें। सव्यसाची ॥ २०४ ॥
आतां तयाचें तें प्रश्न करणें। वरी सर्वज्ञ श्रीहरीचें बोलणें। हें संजयो आवडलेपणें। सांगेल कैसे ॥ २०५ ॥
तिये अवधान द्यावें गोठी। बोलिजेल नीट मऱ्हाटी। जैसी कानाचे आधीं दृष्टी। उपेगा जाये ॥ २०६ ॥
बुद्धीचिया जिभा। बोलाचा न चाखतां गाभा। अक्षरांचियाचि भांबा। इंद्रियें जिती ॥ २०७ ॥
पाह पां मालतीचे कळे। घ्राणासि कीर वाटले परिमळे। परि वरचियां बरवा काइ डोळे। सुखिये नव्हती ॥ २०८ ॥
तैसें देशियेचिया हवावा। इंद्रियें करिती राणिवा। मग प्रमेयाचिया गांवा। लेसा जाइजे ॥ २०९ ॥
ऐसेनि नागरपणें। बोलु निमे तें बोलणें। ऐका ज्ञानदेव म्हणे। निवृत्तीचा ॥ २१० ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां सप्तमोऽध्याय: ॥ ७ ॥

अर्थ—वास्तविक असे जे अनुभवनिपुण पुरुष आहेत तेच युक्त—म्हणजे ज्याचें अंत:करण अखंड माझे ठिकाणीं लागले आहे—असे योगी होत असें समज. ॥ १८४ ॥ पण या शब्दरूपी कुपिकेखालीं अर्जुन एकाग्रचित्ताची ओंजळ धरूं शकला नाही; कारण भगवंताच्या शब्दाचे तो थोडा मागे होता (म्हणजे भगवंताच्या रसाळ व

नानाभावयुक्त शब्दांनी मुग्ध झाल्यामुळें अर्जुनाचें लक्ष अर्थाकडे जाऊं शकले नाही). ॥ १८५ ॥ ज्या भगवंताचे बोलण्यांत, नाना अर्थरूपरसाने रसाळ झालेली आणि भक्तिप्रेमाच्या सुगंधाने दरवळलेली अशी "तद्ब्रह्म" इत्यादि वाक्यरूपफळें होतीं ॥ १८६ ॥ अर्जुनाच्या ठिकाणीं असलेलीं भगवंताची स्वाभाविक कृपा हाच मंदवायु होता; त्या मंद वायूने श्रीकृष्णरूप वृक्षाची वचनरूप फळें अर्जुनाच्या श्रवणरूप झोळींत अकस्मात् पडलीं. ॥ १८७ ॥ तीं वाक्यरूपीं फळें सिद्धान्ताचींच बनलीं होतीं किंवा ब्रह्मरसाच्या समुद्रांत बुडविली होतीं. त्याचप्रमाणे आणखी तीं परमानंदांत घोळिलीं होती. ॥ १८८ ॥ अशी ती शुद्ध व उत्कृष्ट फळें पाहून अर्जुनाचे ठिकाणीं त्या वाक्यांच्या ज्ञानाचे डोहळे उत्पन्न होऊन, तो चमत्काररूपी अमृताचे घोट घेऊं लागला. ॥ १८९ ॥ अशा त्या रसाळ स्वादाच्या सुखाने तो संपन्न झाला असतां, स्वर्गसुखाला वेडावूं लागला आणि त्याच्या हृदयांत गुदगुल्या होऊं लागल्या. ॥ १९० ॥ अशा रीतीने भगवंताचे तोंडांतून निघालेल्या शब्दांचें वरचें सौंदर्य पाहूनच अर्जुनाचे मनांत सुख उचंबळून आलें. तितक्यांत त्या शब्दांतील रसाचा स्वाद घेण्याची त्याला उत्कट इच्छा झाली. ॥ १९१ ॥ म्हणून झटकन अनुमानाचे हाताने भगवन्मुखीचीं तीं वाक्यरूपीं फळें अनुभवाच्या मुखांत एकदम घालण्याची त्याने इच्छा केली. ॥ १९२ ॥ पण तीं वाक्यफळें विचाररूपी जीभेने चघळली जाऊं शकत नव्हती, हेतुरूप (अनुमानांतील एक अवयव) दातांनी तीं फुटूं शकत नव्हतीं, हें पाहून अर्जुनाने त्या फळांना स्पर्शच केला नाही. ॥ १९३ ॥ मग आश्चर्याने थक्क होऊन अर्जुन मनांत म्हणूं लागला, हे भगवन्मुखीचे शब्द म्हणजे ताऱ्यांचें पाण्यांत पडलेलें प्रतिबिंब होय. अक्षरांचा परस्पर संबंध न घेतां आल्यामुळे, मी कसा फसलों गेलों, पहा. ॥ १९४ ॥ खरोखर हीं पदें नव्हेत. आकाशाच्या एकावर एक रचलेल्या घड्या वाटतात. येथें माझ्या बुद्धीने बुडी मारली तरी अर्थाचा थांग लागणार नाही. ॥ १९५ ॥ अर्थाचा थांग लागल्यावांचून जाणण्याची गोष्टच नको. अशा रीतीने मनांत विचार करून, पुन: एकदां भगवंताकडे दृष्टि केली. ॥ १९६ ॥ मग त्या श्रेष्ठ योद्ध्याने भगवंताला प्रार्थना केली, भगवंता! तुम्हीं जीं ब्रह्मादि सात पदें उच्चारिलीं, तीं सातहि पदें सारखी अनुच्छिष्ट राहिलीं (म्हणजे त्यांतील कोणाचाहि अर्थ ग्रहण करतां आला नाही) अशी आश्चर्यकारक आहेत. ॥ १९७ ॥ अत्यंत अवधानामुळेच होणारे, नानाप्रकारच्या सिद्धान्ताचे उलगडे, नुसत्या श्रवणाच्या बळावर बोलतां येतील काय? ॥ १९८ ॥ पण हे आपण उच्चारिलेले तसे दिसत नाहीत. तुमच्या मुखांतून शब्दांचा समुदाय निघतांना पाहिला व विस्मयालाहि विस्मय वाटला. ॥ १९९ ॥ मी कानाच्या झरोक्यांतून आपल्या शब्दाचे किरण हृदयाचे आंत आलेलें पाहतो तोंच मन आश्चर्यचकित झालें व अर्थानुसंधान सुटलें. ॥ २०० ॥ त्याचप्रमाणे मला अर्थ जाणण्याची इच्छा आहे, हें तुम्हाला सांगण्याचाहि विलंब मला सहन होत नाही. म्हणून, भगवंता! त्या सात पदांचें लवकर निरूपण करा. ॥ २०१ । अशारीतीने मागील विषयसंबंध घेऊन व पुढें अभिप्रायाकडे दृष्टि ठेवून व त्याचप्रमाणें त्यांत आपली उत्कट इच्छा प्रगट करून (अर्जुनाने देवाची प्रार्थना केली) ॥ २०२ ॥ श्रीगुरूला प्रश्न करण्याचें अर्जुनाचें शहाणपण पहा कसें आहे? गुरुशिष्य संबंधाची मर्यादा सांभाळून, श्रीकृष्णाच्या अंत:करणाला आलिंगन द्यावयास तो पुढे सरसावला. ॥ २०३ ॥ खरोखर श्रीगुरूला जर प्रश्न करायचा असला, तर अशा सावधानतेने विचारला पाहिजे, पण ही कला एका अर्जुनालाच ठाऊक आहे. ॥ २०४ ॥ आता अर्जुनाचें प्रश्न करणें व भगवंताचें उत्तर देणें हे दोन्ही, संजय राजा धृतराष्ट्राला आवडीप्रमाणे कसे सांगणार आहे. ॥ २०५ ॥ त्या गोष्टीकडे श्रोत्यांनी कृपा करून लक्ष द्यावें. कानांत शब्द पडण्यापूर्वीच दृष्टीचा उपयोग होईल, अशा सुंदर मराठी भाषेने मी ते सर्व सांगणार आहे. ॥ २०६ ॥ बोलाचा गाभा जो अर्थ तो बुद्धीने चाखण्यापूर्वीच शब्दांच्या शोभेने इंद्रियांचें पोषण होईल. ॥ २०७ ॥ हे पहा, मालतीच्या फुलांच्या कळ्या सुगंधामुळें घ्राणेंद्रियाला सुखावह असतात, पण वरच्या त्यांच्या सौंदर्याने डोळे सुखी होत नाहीत काय? ॥ २०८ ॥ त्याप्रमाणे मराठी भाषेच्या शोभेने इंद्रियेंहि सुखाचें राज्य करतील, मग त्यांतून मांडलेल्या सिद्धान्तांच्या गांवाला उत्तम रीतीने जातां येईल. ॥ २०९ ॥ अशा सुंदर भाषेने जेथे बोलच खुंटतो तें सांगितलें जाणार आहे, म्हणून श्रीनिवृत्तिनाथांचे शिष्य श्रीज्ञानेश्वर महाराज श्रोत्यांना म्हणतात तुम्ही ऐका. ॥ २१० ॥

श्रीगुरुकृपेने श्रीज्ञानेश्वरी अध्याय सातव्याचा अनुवाद संपला तो श्रीगुरुचरणीं समर्पण असो!

समारोप

मागील सहाव्या अध्यायांत योगाने परमेश्वराचा साक्षात् अनुभव आंत कसा घेतां येतो याचें वर्णन करून या अध्यायांत तोच अनुभव बाहेरहि कसा व्यापक करावयाचा हें भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगत आहेत.

परमेश्वर व्यापक आहे, तो जसा आंत आहे तसा बाहेरहि आहे, त्याचें ठिकाणीं खऱ्या खोट्या जगताचे अस्तित्व सिद्ध होत नाही, पण जीव जगत् पाहतो व तें खरें समजतो. जगताचा जड विनाशी प्रत्यय नाहीसा व्हावा व केवळ अद्वैत सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपाचा प्रत्यय जीवाला यावा, याकरिता विज्ञानरूप प्रपंचासहित ज्ञानरूप परमेश्वराचें निरूपण भगवंतांनी अर्जुनाला सांगितलें.

मी देह आहे, मी ब्रह्म आहे ही जाणीव न स्फुरणें याला ज्ञान म्हणतात, विज्ञान म्हणजे नामरूपात्मक प्रपंच व नाम रूपात्मक प्रपंच सत्य आहे असें समजणें हें अज्ञान होय.

आत्मविचाराने अज्ञान नि:शेष नाहीसें झालें म्हणजे विज्ञान म्हणजे नामरूपाचा भिन्न भिन्न रूपाने दिसणाऱ्या प्रपंचाचा विशेष भाव नाहीसा होतो व एक सच्चिदानंद परब्रह्मच सृष्टींत भरलें आहे असा अनुभव येतो.

हें ज्ञान-रहस्य अत्यंत गुप्त आहे. हजारों लोकांत एखाद्यासच याची प्राप्ति होते.

जीवाचें परब्रह्माविषयीचें अज्ञान हीच माया किंवा प्रकृति होय, ही परा व अपरा अशी दोन प्रकारची आहे. अपरा म्हणणे कार्यरूप व परा म्हणजे कारणरूप, पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धि अहंकार ही अपरा प्रकृति असून जीवाचें परब्रह्माविषयी जें मूळ अज्ञान ही परा प्रकृति होय.

सर्व जड विनाशी जगत् प्रतीतीला हें अज्ञानच मूळ कारण आहे. वास्तविक एक परमेश्वरच सत्य आहे. त्यावाचून दुसरी वस्तुच नाही; पण या त्रिगुणात्मक मायेने अज्ञानी लोक मोहित झाले आहेत. ते भगवंताचें खरें स्वरूप जाणत नाहीत. जे भगवंताला शरण येऊन त्याचें भजन करतात ते मात्र ही माया सहज तरून जातात, किंबहुना त्यांना तरून जाण्याकरिता मायाच शिल्लक उरत नाही. आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व ज्ञानी असे चार प्रकारचे भक्त आहेत. त्यांत आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी यांची भक्ति सकाम असते व ज्ञानीभक्त हाच खरा निष्काम भक्त होय. संसार खरा वाटतो तोपर्यंत निष्काम भक्ति होऊं शकत नाही.

विषयकामनेच्या मागे लागून जीव परमेश्वराला विसरतो व नाना देवतांची उपासना करतो व त्यांना त्या उपासनेचें संसाररूप विनाशी फळ मिळतें. सगुण परमेश्वराची भक्ति करणाऱ्यांना अविनाशी सगुण परमेश्वराचीच प्राप्ति होते. परमेश्वर सगुण झाला तरी त्याचें मूळचें पूर्णत्व नष्ट होत नाही. पण मूर्खांना हे समजत नाही. परमेश्वराची भक्ति करतां करतां ज्याचें पाप क्षीण झालें अशा पुरुषांना परमेश्वराच्या सगुण स्वरूपाचें पूर्ण ब्रह्मत्व अनुभवाला येते व तो सर्व नामरूपात्मक स्थूल सूक्ष्म पसारा किंवा आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक पसारा पूर्ण ब्रम्हस्वरूपच आहे असा अनुभव घेतो. सच्चिदानंद परब्रह्मावांचून दुसरें कांही नाही हें जें श्रुतीचें म्हणणें आहे त्याचा ज्ञानीभक्तच खरोखर अनुभव घेतो.

अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ, इत्यादि सर्व सगुण परमात्माच आहे, असे ज्यांनी जाणलें त्याचें मरणसमयीं देखील भगवंताचे ठिकाणीं चित्त स्थिर राहतें.

॥ श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय आठवा

अवतरणिका—मागे सातव्या अध्यायांत जन्ममरणरूपी संसारांतून सुटण्याकरितां भगवंताच्या श्रीकृष्णस्वरूपाचा जे आश्रय करतात त्यांना ब्रह्म, कर्म, अध्यात्म, अधिभूत, अधिदैव इत्यादि परस्परांहून भिन्न दिसणारे पदार्थ एकमेकांपासून भिन्न नसून, ते सर्व म्हणजे एक श्रीकृष्ण परमात्मा आहे असा अनुभव येतो, असें भगवंतांनी सांगितलें, या निरूपणाचें नीट आकलन अर्जुनाला होऊं शकलें नाही म्हणून त्याचे स्पष्टीकरणार्थ या अध्यायांत अर्जुनाने प्रश्न केला व त्याचें भगवंतांनी सविस्तर निरूपण केलें.

अर्जुन उवाच

किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम। अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते॥ १॥
अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन। प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः॥ २॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, भगवंता! तें ब्रह्म काय आहे? तें अध्यात्म काय आहे? कर्म म्हणजे काय? अधिभूत तें काय? व अधिदेव कशाला म्हणतात.॥ १॥ हे मधुसूदना! अधियज्ञ म्हणजे काय? व या देहामध्यें तो कोण आहे आणि मरणसमयीं जितेंद्रिय पुरुषाकडून तूं कसा जाणला जाऊं शकतोस?॥ २॥

मग अर्जुनें म्हणितलें। हां हो जी अवधारिलें। जें म्यां पुसिलें। तें निरूपिजो॥ १॥
सांगा कवण तें ब्रह्म। कायसया नाम कर्म। अथवा अध्यात्म। काय म्हणिपे॥ २॥
अधिभूत तें कैसें। एथ अधिदैव तें कवण असे। हें उघड मी परियेसें। तैसे बोला॥ ३॥
देवा अधियज्ञ तो काई। कवण पां इये देहीं। हें अनुमानासि कांहीं। दिठी न भरे॥ ४॥
आणि नियता अंतःकरणीं। तूं जाणिजसी देहप्रयाणीं। तें कैसेनि हें शार्ङ्गपाणी। परिसवा मातें॥ ५॥
देखा धवळारीं चिंतामणींचां। जरी पहुडला होय दैवाचा। तरी वोसणतांही बोलु तयाचा। परी सोपु न वचे॥ ६॥
तैसें अर्जुनाचिया बोलासवें। आलें तेंचि म्हणितलें देवें। परियेसें गा बरवें। जें पुसिलें तुवां॥ ७॥
किरीटी कामधेनूचा पाडा। वरी कल्पतरूचा आहे मांदोडा। म्हणोनि मनोरथसिद्धीचिया चाडा। तो नवल नोहे॥ ८॥
श्रीकृष्ण कोपोनि ज्यासी मारी। तो पावे परब्रह्मसाक्षात्कारी। मा कृपेनें उपदेशु करी। तो कैशापरी न पवेल॥ ९॥

अर्थ—मग अर्जुन म्हणाला, देवा! तुमचें म्हणणें मीं ऐकलें. आता मीं विचारलें त्याचें निरूपण करा.॥ १॥ ब्रह्म म्हणजे काय? कर्म कशाला नांव आहे? आणि अध्यात्म कशाला म्हणतात?॥ २॥ अधिभूत कोणतें होय व अधिदैवत तें काय आहे? हें सर्व मी समजेन, अशा रीतीने बोला.॥ ३॥ देवा! त्याचप्रमाणे अधियज्ञ म्हणजे काय? व या देहामध्ये कोण अधियज्ञ आहे, हें मला विचार करूनहि कांही लक्षांत येत नाही.॥ ४॥ ज्यानी आपलें अंतःकरण तुझ्या ठिकाणीं स्थिर केलें, त्याच्याकडून तूं मरणसमयीहि जाणला जातोस, तें कशारीतीने, ते सर्व मला सांगा॥ ५॥ पहा, चिंतामणीच्या केलेल्या मंदीरांत जर एखादा भाग्यवान पुरुष निजला, तर झोपेंत केलेली त्याची बडबड देखील निष्फळ होत नाही.॥ ६॥ त्याप्रमाणे अर्जुनाच्या बोलण्याबरोबर जें देवाच्या मनांत आलें, तेंच देव म्हणाले. अर्जुना! तूं विचारलेंस तेंच सांगतों, लक्ष देऊन ऐक.॥ ७॥ अर्जुन हा कामधेनूचें वासरू होय. त्याच्यावर कल्पतरुचा मांडव आहे, म्हणून त्याने मनोरथसिद्धीची इच्छा करावी, हें आश्चर्य नाही.॥ ८॥ भगवान श्रीकृष्ण रागावून ज्याला मारतो तो जर परब्रह्माला प्राप्त होतो, तर ज्याला कृपेने उपदेश करतो तो कसा परब्रह्माला प्राप्त होणार नाही?॥ ९॥

गूढार्थदीपिका—या ओवींत सगुण श्रीकृष्णस्वरूपाचें पूर्णब्रह्मत्व माऊलींनी दाखविलें आहे.

जैं कृष्णचि होइजे आपण। तैं कृष्ण होय आपुलें अंतःकरण। मग संकल्पाचें आंगण। वोळगती सिद्धी॥ १०॥

अर्थ—जेव्हा आपण श्रीकृष्णरूप होतो तेव्हा आपलें अंत:करणच श्रीकृष्णरूप होतें व तेव्हा कोणताहि केलेला संकल्प सिद्धींला जातो. ॥ १० ॥

गूढार्थदीपिका—जेव्हा श्रीकृष्णस्वरूपाचें नि:सीम प्रेम लागून पुरुष श्रीकृष्णस्वरूप होतो तेव्हा त्याचें अंत:करणच श्रीकृष्णस्वरूप होतें किंवा अंत:करणात श्रीकृष्णस्वरूपाचें ध्यान प्रेमाने दृढ झालें म्हणजे पुरुष श्रीकृष्णस्वरूप झाला असें समजावें. तेव्हा तो सत्यसंकल्प होतो. म्हणजे तो जो जो संकल्प करतो तो पूर्ण होतो व हें जग संकल्पमात्र कसें आहे. याचा त्याला अनुभव येतो.

परि ऐसें जें प्रेम। तें अर्जुनींचि आथि निःस्सीम। म्हणऊनि तयाचे काम। सदा सफल॥ ११॥
याकारणें श्रीअनंतें। तें मनोगत तयाचें पुसतें। होईल जाणूनि आइतें। वोगरूनि ठेविलें॥ १२॥
जें अपत्य थानींहूनि निगे। तयाची भूक ते मायेसीचि लागे। एऱ्हवीं तें शब्दें काय सांगे। मग स्तन्य दे येरी॥ १३॥
म्हणोनि कृपाळुवा गुरूचिया ठायीं। हें नवल नोहे कांहीं। परि तें असो आइका काई। जें देव बोल्ते जाहाले॥ १४॥

अर्थ—अंत:करण श्रीकृष्णस्वरूप करून सोडणारे असें जें भगवंताचें नि:सीम प्रेम तें अर्जुनाचेच ठिकाणीं होतें; म्हणूनच त्याची कोणतीहि इच्छा सदा सफळ होत असे. ॥ ११ ॥ त्यामुळेंच श्री भगवंतांनी अर्जुन जें काय विचारणार तें त्याच्या मनांतील ओळखून अगोदरच त्याच्यापुढें वाढून ठेविलें. ॥ १२ ॥ जें मूल स्तनपान करणारे असतें त्याची भूक ती आईलाच लागते. नाहीतर ते मूल शब्दाने सांगतें व मग आई स्तनपान करविते काय ? ॥ १३ ॥ म्हणून अत्यंत कृपाळू अशा गुरुचे ठिकाणीं हें कांही आश्चर्य नव्हे. पण हें असो. देव पुढें काय बोलले तें ऐका. ॥ १४ ॥

गूढार्थदीपिका—भगवान आपल्या प्रेमळ भक्तावर व श्रीगुरु आपल्या प्रेमळ शिष्यावर इतके लुब्ध होतात की त्यांना ब्रह्मसाक्षात्कार लीलेने होतो. भगवान पूर्ण ब्रह्मस्वरूपच असतो. तसेंच श्रीगुरुहि पूर्ण ब्रह्मरूपच असतात. त्यांचें लुब्ध होणें म्हणजे ब्रह्माचेंच लुब्ध होणें होय व ब्रह्मच प्रेमाला भाळल्यावर साक्षात्काराला काय वेळ लागणार ? लोहचुंबक जसा लोखंडाला ओढतो त्याप्रमाणे प्रेम प्रिय वस्तूचें आपल्याशी ऐक्य करून घेतें.

श्रीभगवानुवाच

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते । भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसञ्ज्ञितः ॥ ३ ॥

अर्थ—भगवान म्हणतात, अर्जुना! अविनाशी तें परब्रह्म होय. त्याच परब्रह्माचें, प्रत्येक देहाचे ठिकाणीं, देहाने मर्यादित केलेलें शुद्ध अस्तित्व, त्याला अध्यात्म म्हणतात. सर्व भूतांचें अस्तित्वांत येणें, ज्या उत्पत्तिरूप व्यापारामुळे भासतें त्या उत्पत्तिरूप व्यापाराला कर्म म्हणतात. ॥ ३ ॥

मग म्हणितलें सर्वेश्वरें। जें आकारीं इये खोंकरें। कोंदलें असत न खिरे। कवणें काळीं॥ १५॥
एऱ्हवीं सपूरपण तयाचें पाहावें। तरि शून्यचि नव्हे स्वभावें। वरि गगनाचेनि पाल्वें। गाळूनि घेतलें॥ १६॥
जें ऐसेंही परि विरुळें। इये विज्ञानाचिये खोळे। हालवलेंही न गळे। तें परब्रह्म॥ १७॥

अर्थ—तेव्हा सर्वांचे स्वामी भगवान् श्रीकृष्ण म्हणाले, अर्जुना! जें या छिद्रमय शरीरांत कोंडलें असून केव्हाहि गळून पडत नाही. ॥ १५ ॥ एऱ्हवीं अणु रेणूंतून घनदाट भरून असलेली त्याची व्याप्ति पाहावी तर आपल्या सत्तेमुळें तें शून्य आहे, असें म्हणतां येत नाही (स्थूल म्हणावें तर) जें आकाशांतूनही गाळले जातें-म्हणजे आकाशापेक्षाहि सूक्ष्म आहे. ॥ १६ ॥ असें सूक्ष्म आहे, तरी या नामरूपात्मक प्रपंचाच्या झोळींतून हालवूनहि जें गळत नाही, त्याला परब्रह्म म्हणतात. ॥ १७ ॥

गूढार्थदीपिका—या ओव्यांतून माऊलींनी परब्रह्माचें लक्षण केले आहें. हें परब्रह्म म्हणजे निर्गुण स्वरूप होय. नामरूपरहित स्वरूपाला निर्गुण स्वरूप म्हणतात आणि तें निर्गुण स्वरूप म्हणजे केवळ सत्तारूप घेतलें जातें किंवा परब्रह्माचा केवळ अविनाशी सत्तारूपाने अनुभव येणें, यालाच निर्गुण परब्रह्माचा अनुभव म्हणतात. माऊलींनी पुढे

तेराव्या अध्यायांतहि "तरि केवळ जे सत्ता। तो पुरुष गा पंडुसुता" (ज्ञा. अ. १३-९६६) या निर्गुण परब्रह्मस्वरूपाची ओळख सांगितली असून नाथांनीहि "सत्पद तें ब्रह्म" (हरिपाठ अभंग ११) "सत्पद ते निर्गुण" या वचन पंक्तींनी सत्, चित्, आनंद या तीन अंशापैकी केवळ सद्अंशाचा अनुभव हाच निर्गुण परब्रह्माचा अनुभव होय, असें म्हटलें आहे.

आणि आकाराचेनि जालेपणें। जन्मधर्मातें नेणे। आकारलोपीं निमणें। नाहीं कहीं॥ १८॥
ऐशिया आपुलियाची सहजस्थिती। जया ब्रह्माची नित्यता असती। तया नाम सुभद्रापती। अध्यात्म गा॥ १९॥

अर्थ—आणि आकार उत्पन्न झाला, तरी आकाराबरोबर जे उत्पन्न होत नाही आणि आकार नाहीसा झाला, तरी जें कधीं नाश पावत नाही.॥ १८॥ अशी या परब्रह्माचीच जी आपल्या ठिकाणीं म्हणजे जीवाच्या ठिकाणीं अविनाशी सत्ता व्यापून आहे तिलाच अर्जुना! अध्यात्म म्हणतात.॥ १९॥

गूढार्थदीपिका—जीवाला आपल्या निर्गुण आत्मस्वरूपाचा जो अनुभव येतो, तो देखील केवळ अविनाशी सत्तारूपानेच येतो, असा अर्थ.

मग गगनीं जेविं निर्मळें। नेणों कैंचीं एके वेळे। उठती घनपटळें। नाना वर्णें॥ २०॥
तैसें अमूर्तीं तिये विशुद्धें। महदादि भूतभेदें। ब्रह्मांडाचे बांधे। होंचि लागती॥ २१॥

अर्थ—मग निर्मळ अशा आकाशांत, ज्याप्रमाणे एकाएकी नाना रंगांच्या मेघांचे समुदाय कोठून उठतात हे समजत नाही.॥ २०॥ त्याप्रमाणे शुद्ध निराकार परब्रह्माचे ठिकाणीं बुद्ध्यादिक नाना प्रकारचीं भिन्न भिन्न भूतें उत्पन्न होऊन नाना ब्रह्मांडाचे आकार निर्माण होतात.॥ २१॥

गूढार्थदीपिका—निरुपाधिक निराकार परब्रह्माचे ठिकाणीं जगत्-ब्रह्मांडाची प्रतीति कल्पनामात्र आहे, असा अर्थ.

पैं निर्विकल्पाचिये बरडी। फुटे आदिसंकल्पाची विरूढी। आणि ते सवेंचि मोडोनि ये ढोंढी। ब्रह्म गोळकांच्या॥ २२॥

अर्थ—निर्विकल्प अशा माळ जमिनींत आदिसंकल्पाचा अंकुर उत्पन्न होतो आणि लगेच त्याबरोबर तो अंकुर ब्रह्मांडरूप आकारांनी भरून (लदबदून) येतो.॥ २२॥

गूढार्थदीपिका—निर्विकल्पाचिया बरडीं—येथे ज्या निर्गुण निराकार परब्रह्माचे ठिकाणीं जगताचा प्रत्यय येतो, त्या परब्रह्माला माऊलींनी निर्विकल्प म्हटलें असून; त्याला माळजमिनीची उपमा दिली आहे. ज्याप्रमाणे माळजमीनींत अंकुर फुटणें शक्य नाही, पण तेथे जर अंकुराचा प्रत्यय आला तर तो भ्रमरूपच म्हणावा लागेल. त्याप्रमाणे जें परब्रह्म निर्विकल्प आहे—म्हणजे ज्या परब्रह्माच्या ठिकाणीं परब्रह्माहून भिन्न वस्तूच्या विकल्पाचा प्रत्ययच येऊं शकत नाही त्या परब्रह्माचे ठिकाणीं जड, विनाशी ब्रह्मगोलकाचा प्रत्यय भ्रांतच असणार, असा अर्थ.

आदिसंकल्पाची विरूढी—"सोऽकामयत बहुस्यां प्रजायेय" मी बहुरूप व्हावें, अशी प्रारंभीं परमात्मा कामना करतो, असें तैत्तिरीय उपनिषदांत सांगितलें आहे. हाच आदिसंकल्प होय. पण नित्यमुक्त भगवंताला, आपल्या अखंडानंद स्वरूपावांचून दुसरा प्रत्ययच नसल्यामुळें, त्याचा तो 'आदिसंकल्प' सच्चिदानंदस्वरूपच असतो—म्हणजे मीच सच्चिदानंदस्वरूपाने बहुरूप व्हावें, असाच त्या संकल्पाचा अर्थ असतो—असा त्या श्रुतीवर आचार्यांनी केलेल्या भाष्याचा अभिप्राय आहे.

जीव अनादि अविद्याभ्रमाने युक्त असल्यामुळे तो भगवंताचा विशुद्ध संकल्प सृष्टिविषयक समजतो व तसा त्याला सृष्टीचा प्रत्यय येतो. वास्तविक पाहतां हा सृष्टिविषयक संकल्प खोटा आहे. "हरिसंकल्प तोही। समूळ मिथ्या"॥ २४॥ (अन्वय व्यतिरेक स. १०-समर्थ)

तया एकैकाचे भीतरीं पाहिजे। तंव बीजाचाचि भरिला देखिजे। माजि होतियां जातियां नेणिजे। लेख जीवां॥ २३॥

अर्थ—त्या एकेकाचे आंत पाहिल्यास तो बीजानेच भरलेला दिसतो. त्यांत उत्पन्न होणाऱ्या व नाश पावणाऱ्या जीवांची तर संख्याच करतां येत नाही.॥ २३॥

गूढार्थदीपिका—जड विनाशी सृष्टीचें उत्पत्तिस्थान कल्पना हेच असून, सर्व सृष्टि कल्पनामय असल्यामुळे, प्रत्येक ब्रह्मगोळकाच्या आंत बीजच भरले आहे असें म्हटले आहे.

मग तया ब्रह्मगोळकांचे अंशांश। प्रसवती आदिसंकल्प असमसहास। हें असो ऐसी बहुवस। सृष्टि वाढे॥ २४॥

अर्थ—मग त्या ब्रह्मांडाच्या अंशाचेहि अंशापासून असंख्य आदिसंकल्प उठतात व अशी असंख्य सृष्टीची उत्पत्ति होते. ॥ २४ ॥

गूढार्थदीपिका—निर्विकल्प परब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं भासलेल्या ब्रह्मांडरूप सृष्टींतील जीवहि नाना प्रकारचे संकल्प करून बहुरूप होत जातात असा अर्थ.

परि दुजेनविण एकला। परब्रह्मचि संचला। अनेकत्वाचा आला। पूर जैसा॥ २५॥

अर्थ—पण एवढीहि असंख्य सृष्टि झाली, तरी एका परब्रह्मावांचून दुसरी यत्किंचित् वस्तु अस्तित्वांत येत नाही. एक परब्रह्मच सर्वत्र भरलेंले असतें व अनेकत्वाचा नुसता पूर येतो. ॥ २५ ॥

गूढार्थदीपिका—सर्व सृष्टि काल्पनिक असल्यामुळे मूळच्या परब्रह्माच्या अद्वैत सच्चिदानंद अवस्थेंत कांही एक फरक होत नाही, असा अर्थ. हाच आशय आचार्यांनीहि वेदान्तसूत्रावरील अध्यास भाष्यांत "तत्रैवं सति यत्र यदध्यासस्तत्कृतेन दोषेण गुणेन वाऽणूमात्रेणापि स न संबध्यते" या पंक्तीने दाखविला आहे.

तैसें समविषमत्व नेणों कैंचें। वायांचि चराचर रचे। पाहातां प्रसवतिया योनींचे। लक्ष दिसती॥ २६॥

येरी जीवभावाचिये पाल्लविये। कांहीं मर्यादाच करूं नये। पाहिजे कवण हें आधवें विये। तंव मूळ तें शून्य॥ २७॥

अर्थ—त्याप्रमाणे ही समविषम सृष्टि कशी काय भासते, हें समजत देखील नाही, पण व्यर्थ सजीव निर्जीव सृष्टीचा भास होतो व लक्षावधि जीव योनि निर्माण झालेल्या दिसतात. ॥ २६ ॥ येऱ्हवीं जीवभावरूपी अंकुराची मर्यादा करतां येत नाही आणि हें सर्व कोणापासून उत्पन्न होतें. याचा विचार केला, तर कारणच सांपडत नाही. ॥ २७ ॥

गूढार्थदीपिका—तंव मूळ तें शून्य—येथील २०-२९ पर्यंतच्या ओव्यांमध्ये श्रीज्ञानेश्वर माऊलींनी कर्माचें स्वरूप सांगितलें आहे. कर्म म्हणजे व्यापार. हा व्यापार कर्त्यावांचून होत नाही. आणि कांही तरी कार्य घडून आणण्याकरितां, हा व्यापार होत असतो. म्हणून कार्याची उत्पत्ति होतांना कर्मरूप व्यापाराचा प्रत्यय येत असतो. परब्रह्म अद्वैतरूप आहे. त्यावांचून दुसरी वस्तूच नाही, म्हणून जीवाला ज्या जडविनाशी जगताचा प्रत्यय आहे, त्या जगताचे परब्रह्माव्यतिरिक्त दुसरें मूळ कारण सांपडत नाही.

म्हणूनि कर्ता मुदल न दिसे। आणि शेखीं कारणही कांहीं नसे। माजीं कार्यचि आपैसें। वाढों लागे॥ २८॥

अर्थ—म्हणून सृष्टीचा मुळांत कोणी कर्ता दिसत नाही व तसेंच त्या सृष्टीचें कारणहि कांही सांपडत नाही. पण हें नुसतें सृष्टिरूप कार्यच वाढलेलें दिसतें. ॥ २८ ॥

गूढार्थदीपिका—कर्ता मुदल न दिसे। आणि सेखीं कारणही कांहीं नसे—परब्रह्म अकर्तृ आहे म्हणून तें जगताच्या उत्पत्तिरूप कर्माचें निमित्तकारण होऊं शकत नाही आणि परब्रह्म अविकारी असल्यामुळें तें स्वत: जगताचें उपादानकारणहि होऊं शकत नाही. याप्रमाणे जीवाला प्रतीत होणाऱ्या जगताचें कोणतेंहि कारण सांपडत नाही.

माजि कार्यचि आपैसे। वाढोंचि लागे—असें जगद्रूप कार्य कारणावांचून मध्येच भासणारें आहे म्हणजे भ्रमरूप आहे; असा अर्थ.

ऐसा करितेनवीण गोचरु। अव्यक्तीं हा आकारु। निपजे जो व्यापारु। तया नाम कर्म॥ २९॥

अर्थ—याप्रमाणे अव्यक्त ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणीं व्यापार करणाऱ्या कर्त्यावांचून आकार उत्पन्न करणारा जो व्यापार दिसतो, त्याला कर्म म्हणतात. ॥ २९ ॥

गूढार्थदीपिका—अर्थात्, जडविनाशी सृष्टीचें कारणच सांपडत नसल्यामुळे, ती जशी खोटी भ्रमरूप आहे, त्याप्रमाणेच अव्यक्त ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणीं सृष्टीचा आकार निर्माण करणारा व्यापार, कर्त्यावांचून दिसत असल्यामुळे, तोहि अर्थात् खोटा किंवा भ्रमरूप आहे, असा अर्थ.

ज्याप्रमाणे पाणीच तरंगाकार झालें असतां, मूर्खाला तरंगाच्या उत्पत्तीच्या क्रियेचा भास होतो. त्याप्रमाणे परब्रह्माचे ठिकाणीं होणाऱ्या नामरूपाचा, स्वाभाविक शक्तिस्फुरणाचे ठिकाणीं जीवाला उत्पत्ति व्यापाररूप कर्माचा, भ्रमाने भास होतो. याचें मागे चवथ्या अध्यायांत स्पष्टीकरण केलेंच आहे. (किं कर्म किमकर्मेति........अ. ४-१६)

अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम्। अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर॥ ४॥

अर्थ—विनाशी भावाला अधिभूत म्हणतात. जीवाला अधिदैवत म्हणतात आणि देहधारी जीवांमध्ये श्रेष्ठ अशा अर्जुना! या देहामध्ये राहणारा अधियज्ञ तो मीच आहे. ॥ ४॥

आतां अधिभूत जें म्हणिपे। तेंहि सांगों संक्षेपें। तरी होय आणि हारपे। अभ्र जैसें॥ ३०॥
तैसें असतेपण आहाच। नाहीं होइजे हें साच। जयातें रूपा आणिती पांचपांच। मिळोनियां॥ ३१॥
भूतांतें अधिकरूनि असे। आणि भूतसंयोगें तरि दिसे। जें वियोगवेळे भ्रंशे। नामरूपादिक॥ ३२॥
तयातें अधिभूत म्हणिजे। मग अधिदैवत पुरुष जाणिजे। जेणें प्रकृतीचें भोगिजे। उपार्जिलें॥ ३३॥
जो चेतनेचा चक्षु। जो इंद्रियदेशींचा अध्यक्षु। जो देहास्तमानीं वृक्षु। संकल्पविहंगमाचा॥ ३४॥
जो परमात्माचि परि दुसरा। जे अहंकारनिद्रा निदसुरा। म्हणोनि स्वप्नीचिया वोरबारा। संतोषे शिणे॥ ३५॥

अर्थ—आतां अधिभूत जें म्हटलें जातें तें काय, हेंहि संक्षेपाने सांगतों. ज्याप्रमाणे अभ्र येतें व नाहीसें होतें. ॥ ३०॥ त्याप्रमाणे ज्याचें अस्तित्व भासमात्र आहे, 'नसणें' हेंच त्याचे खरें स्वरूप आहे, पांच भूतें परस्परांत मिळून ज्याला रूपाला आणतात. ॥ ३१॥ जें नामरूपात्मक शरीर पंचभूतांना धरून असतें, पंचभूतांचा संयोग झाला असतां दिसतें आणि भूतांचा वियोग झाला असतां नाहीसें होतें. ॥ ३२॥ त्या शरीराला अधिभूत म्हणतात; आणि जो प्रकृतीने केलेलें कर्म मी केलें म्हणतों, म्हणून त्याचें फळ आपण भोगतों, तो जीवपुरुष अधिदैवत होय. ॥ ३३॥ जो जीव जाणीवरहित चैतन्याची जाणणारी दृष्टी होय किंवा जो प्रमाणाने जाणणारा प्रमाता होय; जो इंद्रियांचा प्रवर्तक आहे म्हणजे जो इंद्रियांवर आरूढ होऊनच व्यवहार करतो व जो स्थूल देहाचा संबंध सुटला असतां संकल्परूपी पक्ष्यांचा आश्रय करून राहण्याचा वृक्ष होय. ॥ ३४॥ जो खरोखर परमात्माच आहे, पण आपल्या निराळेपणाच्या अहंकारनिद्रेने झोपला असल्यामुळे जो परमात्म्याहून वेगळा झाला आहे. जो स्वप्नांतील व्यवहाराने संतोष पावतो व कष्टी होतो. ॥ ३५॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे घटांतील आकाश घटामुळे मर्यादित दिसलें तरी बाहेरच्या आकाशाप्रमाणे ते शुद्धच असतें व बाहेरच्या आकाशीं मिळालेलेंच असतें, त्याप्रमाणे वृत्त्यवच्छिन्न चैतन्यस्वरूप जीवहि वृत्तीमुळे मर्यादित दिसत असला, तरी शुद्ध चैतन्यस्वरूपच असतो व शुद्ध ब्रह्मचैतन्याशी मिळालेलाच असतो. पण तो वृत्तिमर्यादेचा अहंकार धारण करून आपल्या शुद्ध सच्चिदानंदस्वरूपाला व शुद्ध चैतन्यस्वरूपाशीं असलेल्या ऐक्याला विसरल्यामुळे परमेश्वराहून वेगळा झाला आहे. त्याचा जागृतींतील सर्व व्यवहार स्वप्नाप्रमाणे काल्पनिक असून त्याचे सुखदु:खाचे भोगहि काल्पनिक असतात.

स्वप्नीचिया वोरबारा। संतोषे शिणे—ज्ञानदृष्टीने पाहतां जागृति देखील स्वप्नच होय, असे माऊलींनी येथे सुचविलें आहे. आचार्यांनीहि ऐतरेयोपनिषदावरील भाष्यांत ''त्रयः स्वप्ना जागृत्स्वप्नसुषुप्त्याख्याः'' जागृति, स्वप्न, सुषुप्ति हे तिन्हीहि स्वप्नच आहेत, असें म्हटलें आहे.

जीव येणें नांवें। जयातें आळविजे स्वभावें। तें अधिदैवत जाणावें। पंचायतनींचें॥ ३६॥
आतां इयेचि शरीरग्रामी। जो शरीरभावातें उपशमी। तो अधियज्ञु एथ गा मी। पंडुकुमरा॥ ३७॥

अर्थ—ज्याला आपण जीव या नांवाने संबोधतों, तो जीवच पंचभूतांपासून बनलेल्या शरीरांतील अधिदैवत होय. ॥ ३६॥ आता याच शरीरात असून ज्याचे ठिकाणीं हा पांचभौतिक शरीरभाव मुळीच नाही किंवा ज्याच्या योगाने जीवाचा पांचभौतिक शरीरभाव नाहीसा होतो, असा जो अधियज्ञ, तो मीच आहे. ॥ ३७॥

गूढार्थदीपिका—येथे श्रीज्ञानेश्वर माऊलींनी या शरीरांतच, जीव व परमात्मा यांचा अनुभव घेतां येतो, असें सांगून दोघांचें स्वरूप दाखविलें आहे.

देहाहंकाराने देहाशीं आपल्या ऐक्याची कल्पना करणारा जीव असून, देहांत राहून देहाशीं ऐक्य न करणारा, तो परमात्मा होय, असें माउलीचें म्हणणें आहे.

आचार्यांनीहि वेदान्तसूत्राच्या पहिल्या अध्यायाच्या द्वितीय पादांतील तिसऱ्या सूत्रावर भाष्य करतांना ''सत्यं (ईश्वरः)। शरीरे भवति न तु शरीर एव भवति.......जीवस्तु शरीर एव भवति'' असा जीव व ईश्वर यांचा वेगळेपणा दाखविला आहे.

येर अधिदैवाधिभूत। तेही मीचि कीर समस्त। परि पंधरें किडाळा मिळत। तें काय सांकें नोहे॥ ३८॥
तरि तें पंधरेपण न मैळे। आणि किडळाचियाही अंशा न मिळे। परि जंव असे तयाचेनि मेळें। तंव सांकेंचि म्हणिजे॥ ३९॥
तैसें अधिभूतादि आघवें। हें अविद्येचेनि पाल्वें। झांकलें तंव मानावें। वेगळें ऐसें॥ ४०॥

अर्थ—बाकीचें जें अधिदैव व अधिभूत तें देखील सर्व मीच—म्हणजे तें सर्व खरोखर सच्चिदानंद ब्रह्मरूपच आहेत, पण शुद्ध सोनें हीणकसात मिळविलें असतां ते हीणकस होत नाही काय?॥ ३८॥ वास्तविक शुद्ध सोनें कांही अशुद्ध होत नाही व हीणकसपणालाहि येत नाही (कारण शुद्ध सोनें हीणकसाहून निराळें करतां येतें), पण जोपर्यंत, तें शुद्ध सोनें हीणकसाबरोबर आहे तोपर्यंत तें हीणकसच म्हटलें जातें. ॥ ३९॥ त्याप्रमाणे अधिभूत, अधिदैव हे जोपर्यंत अविद्यारूप वस्त्राने झांकले आहेत, तोपर्यंत ते माझ्याहून निराळे मानले जातात. ॥ ४०॥

गूढार्थदीपिका—अविद्येचेनि पालवें। झांकलें तंव—अधिभूतादिक हे पूर्णब्रह्मस्वरूपच आहेत, असें त्याचें जोंपर्यंत यथार्थ ज्ञान होत नाही व ते जड विनाशी पांचभौतिक पदार्थ आहेत, अशी जोंपर्यंत जीव कल्पना करतो तोंपर्यंतच भेदाचा भास आहे.

तेचि अविद्येची जवनिक फिटे। आणि भेदभावाची अवधी तुटे। मग म्हणों एक होऊनि जरी आटे। तरि काय दोनी होती॥ ४१॥

अर्थ—अविद्यारूपी विपरीत कल्पनेचा पडदा बाजूला सारला गेला की अधिदैव व अधिभूत यांचा निराळेपणा संपतो—म्हणजे माझ्याशी ते ऐक्य पावतात—मग ते ऐक्य पावले, त्यांचा भेद आटला, असें म्हणावें, तर खरोखरच ते निराळे झाले होते काय?॥ ४१॥

गूढार्थदीपिका—परब्रह्म हीच एक अस्फुट निरवयव वस्तु असल्यामुळे जीवजगत् तिच्याहून मुळींच निराळे झाले नाहीत, म्हणून ते निराळे आहेत, असें वाटणें जसें अज्ञानमूलकच आहे, तसेंच ज्ञानाने ज्यांचें परब्रह्माशीं ऐक्य होतें, असें वाटणेंहि अज्ञानमूलकच आहे असा भाव. ''**न हि वस्तुतो मुक्तामुक्तत्व विशेषाऽस्ति आत्मनो नित्यैकरूपत्वात्**'', ''**तस्मान्न आत्मनः स्वतो बद्धमुक्तज्ञानाज्ञानकृतो विशेषोऽस्ति सर्वदा समयैकरसस्वाभाव्यादभ्युपगमात्**'' (बृ. ४-४-६) या बृहदारण्यक भाष्यपंक्तींत आचार्यांनी असेंच सांगितलें आहे.

पैं केशांचा गुंडाळा। वरि ठेविली स्फटिकशिळा। ते वरी पाहिली डोळां। तंव भेदली गमली॥ ४२॥
पाठीं केश परौते नेले। आणि भेदलेपण काय नेणों जाहालें। तरि डांक देऊनि सांदिलें। शिळेतें काई॥ ४३॥
ना ते अखंडचि आयती। परि संगें भिन्न गमली होती। ते सारीलिया मागौती। जैसी कां तैसी॥ ४४॥
तेवीं अहंभावो जाये। तरी ऐक्य तें आधींचि आहे। हेंचि साचें जेथ होये। तो अधियज्ञु मी॥ ४५॥

अर्थ—ज्याप्रमाणे केसाच्या गुंडाळ्यावर स्फटिकाचा दगड ठेवला व आपण पाहूं लागलों, तर तो दगड फुटलासा दिसतो. ॥ ४२॥ नंतर केसांचा गुंडाळा बाजूला केल्याबरोबर स्फटिकाचें फुटणे कोठे गेलें, समजत नाही. खरोखर स्फटिक फुटला होता व नंतर तो जोडला गेला काय?॥ ४३॥ किंवा तो स्फटिक जसाचा तसा अखंडच होता, पण केसाच्या संबंधामुळे फुटला, असें वाटत होतें आणि केसाचा गुंडाळा बाजूला केल्याबरोबर पुनः तो जसाचा तसा अभंग दिसूं लागला. ॥ ४४॥ त्याप्रमाणे आपल्या निराळेपणाचा अहंकार नाहिसा झाला की, जीव मूळचाच ब्रह्माशीं एकरूप आहे, असा सत्य अनुभव जेथे येतो तो, अर्जुना! अधियज्ञ मीच होय. ॥ ४५॥

गूढार्थदीपिका—''तस्मात्सर्वशरीरेष्वहमहमित्येव भासते स्पष्टः।
यः प्रत्ययो विशुद्धस्तस्य ब्रह्मैव भवति मुख्योऽर्थः॥ ८८॥'' (स्वात्मनिरूपण)

शरीरामध्ये जें 'अहं' म्हणजे 'मी स्फुरण' तें खरोखर ब्रह्मस्फुरणच होय, असें आचार्यांनी म्हटलें आहे. हाच 'अहं' देहावर बसला की तो जीव होतो. श्रीज्ञानेश्वर माऊलींनीहि 'अर्जुनपण न घेतां। मी ऐसें जें पंडुसुता। उठतसे तें तत्त्वतां। तयाचें रूप'॥ १३१५॥ (ज्ञा. अ. १८) देहाहंकार हा जीव असून नुसता अहं किंवा मी स्फुरण परमात्मा आहे, असे या ओवींत सांगितलें आहे.

याप्रमाणे अहं हें वृत्तिस्फुरण परब्रह्माचेंच असल्यामुळे त्यांत सत्, चित्, आनंद हे तिन्ही अंश एकत्र भरलेले असतात आणि आहेपणा, जाणणेपणा व आनंद या धर्मांचे द्वारा त्याचा आपण अनुभवहि घेतोच. अर्थात् हें सच्चिदानंदाचें वृत्तिस्फुरण मर्यादित असल्यामुळे सच्चिदानंदधर्माने युक्त म्हणून सगुण व वृत्तीने मर्यादित म्हणून साकार असतें. म्हणून केवळ अहंवृत्तीने स्फुरण परमात्मा व देहाहंकाराने स्फुरणारा जीव, हे दोघेहि सगुण साकारच आहेत. फरक इतकाच की परमात्मा आपल्या स्वरूपाला विसरत नाही व देहाची अहंता वागवीत नाही, म्हणून परमेश्वराचा सगुण साकार पांचभौतिक होत नाही व देहावर अहंभाव धरणारा जीव आपली मूळ परब्रह्मस्थिति विसरून, पांचभौतिक देहावर अज्ञानाने अहंभाव ठेवतो, म्हणून त्याचा सगुण साकार पांचभौतिक असतो.

जीवाच्या हृदयांत केवळ अहंरूपाने स्फुरणाऱ्या या सगुण साकार परमेश्वराला येथे माऊलींनी अधियज्ञ म्हटलें आहे.

या सगुण साकार अधियज्ञ परमेश्वराला जाणल्यानेच जीव कल्पित अज्ञानादि उपाधीपासून मुक्त होऊन, आपली अभंग असलेली ब्रह्मस्थिति अनुभवितो, असा अर्थ.

पैं गा आम्ही तुज। सकळ यज्ञ कर्मज। सांगितलें कां जें काज। मनीं धरूनि॥ ४६॥

अर्थ—अर्जुना! ज्याच्या प्राप्तीचा हेतु मनांत धरून आम्ही तुला कर्माने सिद्ध होणारे जेवढे यज्ञ आहेत, ते सर्व सांगितले. ॥ ४६ ॥

गूढार्थदीपिका—सांडोनि देहींची अहंता। सकळ भोग ईश्वरु भोक्ता। ऐंशी दृढ भावना भावितां। पाविजे परमार्था अपरोक्षसिद्धी.॥ ८५९॥ (ए. भा. अ. ३)

कायिक, वाचिक, मानसिक जेवढे कर्मसाध्य यज्ञ आहेत ते सर्व सगुण भगवंताच्या प्राप्तीकरिता, त्याची आज्ञा म्हणून, निष्काम चित्ताने केले असतां हृदयस्थ अशा सगुण परमेश्वराची प्राप्ति होते.

निर्गुण परमेश्वरप्राप्तीकरिता संन्यासयोग आहे. परमेश्वराची सगुण निर्गुण दोन्ही रूपें पूर्ण निरुपाधिक-म्हणजे त्रिगुणात्मक मायारहित-असल्यामुळे सगुण परमेश्वराची प्राप्ति व निर्गुण परमेश्वराची प्राप्ति सारखीच आहे. त्यांत श्रेष्ठ-कनिष्ठ भाव नाहीत. किंबहुना परमेश्वराचें सगुण स्वरूप, बर्फ पाण्याला सोडून नसतो, त्याप्रमाणे निर्गुणस्वरूपाला मुळींच सोडून नसतें. म्हणून निर्गुणस्वरूपांत सगुणाची प्राप्ति नाही, पण सगुणस्वरूपांत मात्र निर्गुणाची प्राप्ति होतेच, असें श्रीज्ञानेश्वर माउलींनी ''म्हणोनि नाम वज्रकवच। तोचि निर्गुणाचा अभ्यास'' या अभंगचरणांत सांगितलें आहे.

तो हा सकळ जीवांचा विसांवा। नैष्कर्म्यसुखाचा ठेवा। परि उघड करूनि पांडवा। दाविजत असे॥ ४७॥
पहिलें वैराग्यइंधन परिपूर्तीं। इंद्रियानळीं प्रदीप्तीं। विषयद्रव्याचिया आहुती। देऊनियां॥ ४८॥
मग वज्रासन तेचि उर्वी। शोधूनि आधारमुद्रा बरवी। वेदिका रचे मांडवीं। शरीराच्या॥ ४९॥
तेथ संयमाग्रीचीं कुंडें। इंद्रियद्रव्याचेनि पवाडें। यजिजती उदंडें। युक्तिघोषें॥ ५०॥
मग मनप्राणसंयमु। हाचि हवनसंपदेचा संभ्रमु। येणें संतोषविजे निर्धूमु। ज्ञानानळु॥ ५१॥
ऐसेनि हें सकळ ज्ञानीं समर्पे। मग ज्ञान तें ज्ञेयीं हारपे। पाठीं ज्ञेयचि स्वरूपें। निखिल उरे॥ ५२॥
तया नांव गा अधियज्ञु। ऐसें बोलला जंव सर्वज्ञु। तंव अर्जुन अतिप्राज्ञु। तया पातलें तें॥ ५३॥
हें जाणोनि म्हणितलें देवें। पार्था परिसतु आहासि बरवें। या कृष्णाचिया बोला सवे। येरु सुखाचा जाहला॥ ५४ ॥
देखा बाळकाचिया धणी धाइजे। कां शिष्याचेनि जाहलेपणें होईजे। हें सद्गुरुचि एकलेनि जाणिजे। कां प्रसवतिया॥ ५५ ॥

अर्थ—तो हा अधियज्ञ सर्व जीवांचा विसांवा होय-म्हणजे ज्याची प्राप्ति झाली असतां जीवांना संसारदु:खांचा

विसर पडतो—व हाच नैष्कर्म्यसुखाचा-म्हणजे कर्मरहित अथा ब्रह्मसुखाचा-ठेवा होय. पण अर्जुना! मी तुला स्पष्ट करून दाखवित आहे. ॥ ४७ ॥ प्रथम वैराग्यरूपी लाकडांचा पूर्ण पुरवठा करून इंद्रियरूपी अग्नि प्रज्वलित करावा व मग त्यांत विषयरूपी द्रव्याच्या आहुती द्याव्या. (प्रथम तीव्र विषयवैराग्य संपादन करावें असा अर्थ). ॥ ४८ ॥ मग वज्रासन हीच पृथ्वी, ती शुद्ध करून घेऊन, तेथ शरीररूपी मंडपांत मूळबंधरूपी उत्तम स्थंडिल किंवा ओटा रचावा. ॥ ४९ ॥ तेथे इंद्रियरूप पुष्कळ द्रव्याच्या साहाय्याने संयमाग्नीची (संयम म्हणजे धारणा, ध्यान, समाधि हे तिन्ही एका ठिकाणीं करणें) कुंडे युक्तिरूप-म्हणजे नियमित आहारविहाररूप-मंत्राच्या घोषाने दीर्घकाल पूजावीं. ॥ ५० ॥ मग मन व प्राण यांचा निग्रह हा त्या हवनसंपत्तीचा समारंभ होय. त्याने धूररहित स्वच्छ ज्ञानाग्नि संतुष्ट करावा. ॥ ५१ ॥ अशा रीतीने द्रव्य, कर्म वगैरे सर्व ज्ञानाचे ठिकाणीं समर्पण केले जातात व मग ज्ञानहि ज्ञेयपरब्रह्मांत नाहीसें होऊन, केवळ ज्ञेयस्वरूप उर्वरित राहतें. ॥ ५२ ॥ त्या ज्ञेयाला अधियज्ञ म्हणतात, असें भगवान श्रीकृष्ण बोलत आहेत, तोंच अर्जुन अति बुद्धिमान असल्यामुळे, त्याला ती स्थिती प्राप्त झाली. ॥ ५३ ॥ हें देवाला समजलें, म्हणूनच भगवान म्हणाले, अर्जुना! नीट लक्ष देऊन ऐकतोस ना! हे श्रीकृष्णाचें बोल ऐकून अर्जुन सहाजिकच अति समाधान पावला. ॥ ५४ ॥ पहा, आपल्या मुलाला सुखसंपन्न पाहून आपल्याला कसें सुख वाटतें, हे त्याच्या आईलाच माहीत किंवा शिष्य कृतार्थ झाला असतां श्रीगुरुला कसा आनंद होतो, हें एका सद्गुरुलाच माहीत. ॥ ५५ ॥

गूढार्थदीपिका—आपल्या सुखाने सुखी होणें व दुसऱ्याच्या सुखाने सुखी होणें अशा दोन प्रकारांनी व्यवहारांत सुखभोग घेता येतो. आपल्या सुखानें सुखी होणे, हा सुखभोग 'रजोरागात्मकं विद्धि' या भगवद्वचनाप्रमाणे रजोगुणात्मक आहे आणि दुसऱ्याच्या सुखाने सुखी होणें, हा सुखभोग अर्थातच सत्त्वगुणात्मक आहे. ज्याप्रमाणे गढूळ पाण्यापेक्षा स्वच्छ पाण्यांत प्रतिबिंब अधिक स्पष्ट दिसतें, त्याप्रमाणे रजोगुणापेक्षा सत्त्वगुणांत आत्म्याचें सुख अधिक प्रतिबिंबित होत असल्यामुळे, आपल्या सुखाने सुखी होणें, या रजोगुणात्मक सुखभोगापेक्षा दुसऱ्याच्या सुखाने सुखी होणें, हा सुखभोग अर्थातच अधिक सुखकारक असतो. पण व्यवहारांत सर्व पुरुष "**आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति**" या श्रुतिप्रमाणे आपलें सुख पाहत असतात. म्हणून त्यांना दुसऱ्याच्या सुखाने सुखी होण्यांत काय अधिक लाभ आहे, याचा अनुभव येत नाही. आपल्याला सुख व्हावें अशी कांही एक इच्छा न करतां केवळ आपल्यासारखेंच शिष्याला सुख प्राप्त व्हावें, असा शिष्याच्या कृतार्थतेने कृतार्थ होऊं पाहणाऱ्या श्रीगुरुलाच किंवा मुलाच्या सुखाने सुखी होऊं इच्छिणाऱ्या आईलाच, हा सुखाचा अनुभव घेतां येतो.

म्हणोनि सात्त्विक भावांची मांदी। कृष्णाआंगीं अर्जुनाआधीं। न समातसे परी बुद्धी। सांवरूनि देवें॥ ५६ ॥
मग पिकलिया सुखाचा परिमळु। कां निवालिया अमृताचा कल्लोळु। तैसा कोंवळा आणि रसाळु। बोलु बोलिला॥ ५७॥
म्हणे परिसणेयांच्या राया। आइकें बापा धनंजया। ऐसी जळों सरलिया माया। तेथ जाळितें तेंही जळे॥ ५८ ॥

अर्थ—म्हणूनच अर्जुनाचे अगोदर भगवान श्रीकृष्णाचे ठिकाणीं अष्टसात्विकभाव दाटून आले व मावेनासे झाले. पण भगवंताने अष्टसात्विकभावांत बुद्धि विरूं न देतां सावरून धरली. ॥ ५६ ॥ मग जणूं काय पिकलेल्या सुखाचा सुगंधच किंवा थंड केलेल्या अमृताची लहरीच, अशा मृदु आणि रसाळ शब्दाने, भगवान अर्जुनाला बोलूं लागले. ॥ ५७ ॥ भगवान म्हणतात, श्रवण करणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ अशा बापा अर्जुना! असा ज्ञानाने मायेचा नाश झाला की मायेचा नाश करणारें ज्ञानहि नाश पावते. ॥ ५८ ॥

गूढार्थदीपिका—"मी ब्रह्म आहे या जाणीवरूप ज्ञानाने, अविद्येचा नाश झाला असतां, तें ज्ञानहि आपोआप नाहिसें होते." असा या ओवीचा अर्थ केला जाण्याचा संभव आहे; पण येथे निःशेष अविद्येचा नाश झाल्यावर, अविद्येचा नाश करणारें ज्ञानहि नाहिसें होतें, एवढेंच सांगितले आहे. आत्मज्ञानानेंच निःशेष अविद्येचा नाश होऊन, अविद्यालेशहि उरत नाही किंवा ज्ञानाची जाणीवहि उरत नाही, असें येथें सांगितले नाही.

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्। यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः॥ ५॥

अर्थ—मरणसमयीं माझें स्मरण करून जो देह सोडतो व जातो तो माझ्या स्वरूपांशीं ऐक्य पावतो यांत मुळींच संशय नाही. ॥ ५ ॥

जें आतांचि सांगितलें होतें। अगा अधियज्ञ म्हणितला जयातें। जे आर्धीचि तया मातें। जाणोनि अंतीं॥ ५९॥

अर्थ—अर्जुना! ज्याला अधियज्ञ म्हणतात तो मीच आहे, हें तुला आतांच सांगितलें होतें, त्या मला प्रथमपासून जाणून ते मरणसमयींहि माझ्या ठिकाणीं चित्त ठेवतात.॥५९॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञानाने अविद्या मिथ्या ठरल्यानंतर प्रारब्ध आहे तोंपर्यंत अविद्येचे लेश म्हणजे पूर्वीच्या बद्धस्थितीचें स्मरण व मिथ्या जगताचा भास हे कायम राहतात व प्रारब्ध संपल्यानंतरच ते विदेहमुक्तीने नाहिसे होतात, असे ज्ञानमार्गांत सर्वत्र मानलेलें आहे, हें सूतसंहितेत ज्ञान्याच्या जीवन्मुक्तीचें वर्णन करतांना विद्यारण्यांनी जें स्पष्टीकरण केलें आहे, त्यावरून कळून येतें.

''तिस्रोहि मायावस्थाः। दृश्यस्य वास्तवत्वाभिमानात्मिका प्रथमा। प्रथमा सा युक्तिशास्त्रजनितविवेकज्ञानान्निवर्तते। तन्निवृत्तावपि प्रागेव साभिनिवेशव्यवहारहेतु द्वितीया। सा तत्त्वसाक्षात्कारान्निवर्तते। तन्निवृत्तावपि देहाभास जगदादौभास हेतुरूपा तृतीया। सा प्रारब्धकर्मावसाने निवर्तते'' (सू. सं. मु. खं. अ २-५४)

विद्यारण्य म्हणतात, मायेच्या तीन अवस्था आहेत. दृश्य प्रपंच सत्य आहे, असा अभिमान ज्यांत असतो. ती पहिली बद्ध अवस्था होय. ही शास्त्र युक्ति यांनी उत्पन्न झालेल्या विवेकज्ञानाने (परोक्षज्ञानाने) नाहिशी होते. ती नाहिशी झाली तरी, पूर्वीप्रमाणेच जीमध्ये अभिमानपूर्वक व्यवहार होतो, ती दुसरी अवस्था होय. ही अवस्था आत्म्याचा दृढ अपरोक्ष साक्षात्कार झाला असतां नाहिशी होते; आणि अपरोक्ष साक्षात्काराने ही दुसरी अवस्था नाहिशी झाल्यावरहि देहाभास व जगदाभास कायम राहतो ही तिसरी अवस्था होय. ही प्रारब्धकर्म संपल्यानंतर नाहिशी होते.

पण हें आत्मैक्य जाणीवरूप ज्ञान व त्यामुळे भासणारा अविद्येचा लेश, मेल्यानेहि नाहिसा होत नाही. तो अविद्यालेश मी ''तैसें ग्रासूनि दुसरें। स्वरूपीं स्वरूपाकारें। आपुलेपणें उरें। बाधू जो कीं॥ ३१॥ तें ऋणशेष वाचा इया। न फेडवेचि मरोनियां। तें पाया पडूनि मियां। सोडवलें॥ ३२॥'' (अमृ. प्र. ३) श्रीगुरुपरमेश्वराच्या पायां पडून म्हणजे श्रीगुरुचरणीं भक्तिप्रेमाने लीन होऊन जीवंतपणींच नाहिसा केला, असा स्वानुभव श्रीज्ञानेश्वर माऊलींनी सांगून, ज्ञानानंतर केलेल्या सगुण भक्तीने ज्ञानाची जाणीव व अविद्यालेश नाहिसे होतात, असें अमृतानुभवांत प्रतिपादिलें आहे व तेच येथेहि सांगतात.

अधियज्ञ जो श्रीकृष्ण सगुण परमात्मा, त्याचे ठिकाणीं कर्मरूप यज्ञ समर्पण करतां करतां, सगुण ध्यानाने व प्रेमाने जीवाचा, पृथक्‌पणाचा अहंकार जाऊन, सगुणांशीं ऐक्य झालें की, हेंच ऐक्यज्ञानहि सगुणाचे प्रेमाने पुढे राहत नाही. यालाच ज्ञानोत्तरभक्ति म्हणतात.

ते देह झोळ ऐसें मानुनी। ठेले आपणपें आपणचि होउनी। जैसा मठ गगना भरुनी। गगनींचि असे॥ ६०॥
ये प्रतीतीचिया माजघरीं। तयां निश्चयाची वोवरी। ज आली म्हणोनि बाहेरी। नव्हेचि से॥ ६१॥

अर्थ—ज्याप्रमाणे घर आंत बाहेर आकाशाने भरलें असल्यामुळें तें आकाशांतच असतें, त्याप्रमाणे ते पुरुष देहादिक केवळ काल्पनिक आहेत, असें समजून व देहबुद्धि विसरून आपल्या सच्चिदानंद आत्मस्वरूपाशीं ऐक्य पावून राहतात.॥६०॥ या आत्मानुभवाचे माजघरांतच त्या दृढनिश्चयाची खोली असल्यामुळें, त्याना बाहेरच्या देहादिकांचे स्मरणच होत नाही.॥६१॥

गूढार्थदीपिका—''विस्मरत्वेव सा ध्यानाद्विस्मृतिर्न तु वेदनात्॥ ९६॥'' (पंचदशी ध्यानदीप) ब्रह्मज्ञानाने द्वैताची विस्मृती होत नसते; ती ध्यानाने होते, असे विद्यारण्य म्हणतात.

अधियज्ञ जो श्रीकृष्ण परमात्मा, त्याच्या भक्तीने देहादि मिथ्या ठरून व त्याच्याशीं ऐक्य होऊन, त्या ऐक्यानुभवाने, व अधियज्ञ परमात्मा भगवान श्रीकृष्णच आहे, या निश्चयाने, जें भगवान श्रीकृष्णाचें ध्यान होतें, त्या ध्यानाने भक्ताला द्वैताभासाचा संपूर्ण विसर पडतो, असा अर्थ.

ऐसें सबाह्य ऐक्य संचलें। मीचि होऊनि असतां रचिलें। बाहेरी भूतांचीं पांचही खवळे। नेणतांचि पडिलीं॥ ६२॥
आता उभयां उभेपण नाहीं जयाचें। मा पडिलिया गहन कवण तयाचें। म्हणोनि प्रतीतीचिये पोटींचें। पाणी न हाले॥ ६३॥
ते ऐक्याची आहे वोतिली। कीं नित्यतेचिया हृदयीं घातली। जैसी समरससमुद्रीं धुतली। रुळेचिना॥ ६४॥
पैं अथावीं घट बुडाला। तो आंतबाहेरी उदकें भरला। पाठीं दैवगत्या जरी फुटला। तरी उदक काय फुटे॥ ६५॥
नातरी सर्पे कवच सांडिलें। कां उबारेनें वस्त्र फेडिलें। तरी सांग पां कांहीं मोडलें। अवेवामाजीं॥ ६६॥
तैसा आकारु हा आहाच भ्रंशे। वांचूनि वस्तु ते सांचलीचि असे। तेचि बुद्धि जालिया विसुकुसे। कैसेनि आतां॥ ६७॥

अर्थ—अशा रीतीने आंतबाहेर आत्मस्वरूपाशीं ऐक्य होऊन ते मीच होऊन राहिले असतां, बाहेर देहरूपाने रचलेल्या पंचभूतांच्या खपल्या, त्यांना न समजतांच पडतात. ॥ ६२ ॥ आता ज्यांना, देह उभा असतां, त्यांचें उभेंपण समजत नव्हतें, मग तो पडला असता त्यांना त्यांचें काय दु:ख वाटणार आहे? म्हणून त्यांच्या अद्वैत अनुभवांत यत्किंचित् देखील केव्हाहि बिघाड होत नाही. ॥ ६३ ॥ त्यांची ती प्रतीति जणूं काय ऐक्याच्या रसाची ओतली असते किंवा नित्यतेच्या हृदयांत ती घातली असते किंवा जशी कांही समरसरूपी समुद्रांत धुतली असते म्हणून ती कधी मळत नाही. ॥ ६४ ॥ अथांग पाण्यांत घट बुडला असतां तो आंतबाहेर पाण्यानेच भरला असतो, नंतर जरी तो दैववशात् फुटला म्हणून पाणी फुटतें काय? ॥ ६५ ॥ किंवा सर्पाने जरी आपली कात टाकली, किंवा उकडतें म्हणून अंगावरील वस्त्र काढून टाकलें, तरी त्यांच्या अवयवांमध्ये कांही बिघाड होतो काय? ॥ ६६ ॥ त्यप्रमाणे वरवर नुसता दिसणारा जो आकार तोच नाहिसा होतो. बाकी आत्मवस्तु तशीच राहते. बुद्धि आत्मवस्त्वाकार झाल्यावर तिची आत्माकारता कशी भंग पावेल? ॥ ६७ ॥

गूढार्थदीपिका—सगुण परमेश्वराचे ठिकाणीं ज्याचें चित्त आसक्त झाले, त्याचें चित्त अखंड भगवदाकारच असतें. कारण भगवंतावांचून सर्वांचाच त्याला विसर पडतो. भगवद्भक्त दु:ख करतांना दिसतो, तो आपलें भक्तिप्रेम लोकांना दिसूं नये, म्हणून करतो.

विषयाचें दु:ख झालें असतां, ज्या विषयाचें दु:ख असतें त्या विषयाच्या आकाराचें मन होऊन राहतें; पण दु:खाचे वेळीं भगवद्भक्ताचें तसें होत नाही. ज्याप्रमाणे आईपासून जबरदस्तीने ओढलें जाणारें मूल जेव्हा रडतें, तेव्हा तें आईकरितांच रडतें व त्याच्या चित्तांत आईचेंच ध्यान असतें, त्याप्रमाणे प्रारब्धाने प्राप्त झालेल्या दु:खाचे वेळीं, दु:खाने भगवंतापासून चित्त निघून विषयाकडे धावूं नये म्हणूनच भक्त रडतो व ईश्वराचा धांवा करून भगवदाकार चित्त करीत राहतो.

ज्याप्रमाणे पक्व झालेल्या नारळांतील डोल, बाहेरच्या कवटीपासून अलग होतो. पुन: कवटीशीं युक्त होत नाही व कवटीवर मारलेला. घाव त्याला लागत नाही, त्याप्रमाणे भक्ताची भगवदाकार झालेली बुद्धि पुन: अहंकाराशीं कधी युक्त होत नाही. हा अनुभव नसणाऱ्या जनांना, भक्तहि सुखदु:ख भोगतो, असें वाटतें. वास्तविक "कर्ता भोक्ता भवत्यहंकार:" तो सर्व भोग अहंकाराला होतो व भक्ताला तें माहीतहि नसतें.

म्हणोनि यापरी मातें। अंत:काळीं जाणतसाते। जे मोकलिती देहातें। ते मीचि होती॥ ६८॥

अर्थ—म्हणून याप्रमाणे मरणसमयीं मला जाणून, जे माझें स्मरण ठेवतात व देह सोडतात, ते मद्रूप होतात. ॥ ६८ ॥

यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम्। तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावित:॥ ६॥
तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च। मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम्॥ ७॥

अर्थ—अर्जुना! जो मनुष्य ज्या वस्तूचें अखंड चिंतन करतो व ज्या वस्तूच्या अखंड चिंतनाने ध्यान घडल्यामुळे मरणसमयींहि ज्या वस्तूचें चिंतन करीतच देह सोडतो, तो त्या वस्तूला प्राप्त होतो. ॥ ६ ॥ म्हणून, सदा सर्वदा माझे स्मरण असूं दे व युद्ध कर. अशारीतीने तुझी मनबुद्धि माझे ठिकाणी अर्पण झाली म्हणजे तू मला खात्रीने प्राप्त होशील. ॥ ७ ॥

एऱ्हवीं तरी साधारण। उरीं आदळलिया मरण। जो आठवु धरी अंतःकरण। तेंचि होईजे॥ ६९॥
जैसा कवणु एकु काकुळती। पळतां पवनगती। दुपाउलीं अवचितीं। कुहामाजीं पडियेला॥ ७०॥
आतां तया पडणयाआरौतें। पडण चुकवावया परौतें। नाहीं म्हणोनि तेथें। पडावेंचि पडे॥ ७१॥
तेविं मृत्यूचेनि अवसरें एकें। जें येऊनि जीवासमोर ठाके। तें होणें मग न चुके। भलतयापरी॥ ७२॥
आणि जागता जंव असिजे। तंव जेणें ध्यानें भावना भाविजे। डोळां लागतखेंवो देखिजे। तेंचि स्वप्नी॥ ७३॥
तेविं जितेनि अवसरें। जें आवडोनि जीवीं उरे। तेंचि मरणाचिये मेरे। फार हों लागे॥ ७४॥
आणि मरणीं जया जें आठवे। तो तेचि गतीतें पावे। म्हणोनि सदां स्मरावें। मातेंचि तुवां॥ ७५॥

अर्थ—एऱ्हवीं साधारणपणें पाहतां, असें दिसतें की, मरणकाल प्राप्त झाला असतां, मनुष्याच्या मनांत ज्या वस्तूचें स्मरण असतें, त्या वस्तूला तो प्राप्त होतो. ॥ ६९ ॥ ज्याप्रमाणे एखादा पुरुष अत्यंत भयभीत होऊन प्राण वांचविण्याकरितां वायूच्या वेगाने पळूं लागला असतां, दोन पावलांवरच अकस्मात् विहिरींत पडला. ॥ ७० ॥ आतां त्याला विहिरींत पडण्यापूर्वी, पुढील विहिरींत पडणें चुकविण्याकरितां, अवसरच नसल्यामुळे, पडणे भागच होतें ॥ ७१ ॥ त्याप्रमाणे मरणाचे वेळी जें कांही आपल्या मनांत येतें तें होणे, कांही केलें तरी चुकत नाही. ॥ ७२ ॥ आणि मनुष्य जोपर्यंत जागा आहे, तोपर्यंत ज्या वस्तूचें ध्यान करीत असतो तीच वस्तु डोळा लागल्याबरोबर स्वप्नात तो पाहतो. ॥ ७३ ॥ त्याप्रमाणे जोपर्यंत आपण जीवंत आहो, तोंपर्यंत ज्या आवडत्या वस्तूचें मनांत ध्यान असतें, त्याच वस्तूचें मरणाचे वेळीं जास्त ध्यान लागतें. ॥ ७४ ॥ आणि मरणाचे वेळी ज्याला जें आठवते, त्याच वस्तूला तो प्राप्त होतो, म्हणून अर्जुना! सदा सर्वदा तूं माझेंच स्मरण कर. ॥ ७५ ॥

गूढार्थदीपिका—तुकाराम महाराजहि म्हणतात. "ज्याचें जया ध्यान। तेचि होय त्याचें मन॥ म्हणोनि अवघे दूर सारा। पांडुरंग दृढ धरा॥"

डोळां जें देखावें। कां कानीं हन ऐकावें। मनीं जें भावावें। बोलावें वाचे॥ ७६॥
तें आंत बाहेरी आघवें। मीचि करूनि घालावें। मग सर्वीं काळीं स्वभावें। मीचि आहें॥ ७७॥
अगा ऐसें जाहालिया। मग न मरिजे देह गेलिया। मा संग्रामु केलिया। भय काय तुज॥ ७८॥
तूं मन बुद्धि सांचेंसीं। जरी माझिया स्वरूपीं अर्पिसी। तरी मातेंचि गा पावसी। हे माझी भाक॥ ७९॥
हेंच कायिसयावरी होये। ऐसा जरी संदेहो वर्तत आहे। तरी अभ्यासूनि आदीं पाहें। मग नव्हे तरी कोपें॥ ८०॥

अर्थ—डोळ्याने जें पाहायचें किंवा कानाने जें ऐकायचें अथवा मनाने ज्याचें चिंतन करायचें किंवा वाणीने जें बोलायचें. ॥ ७६ ॥ तें सर्व आंत बाहेर (देहाचे आंत व देहाचे बाहेर) मलाच करून ठेव. असें झालें असतां, अर्जुना! सदा सर्वदा मींच स्वाभाविकपणे अनुभविला जाईन॥ ७७॥ अर्जुना असें झालें असतां तुला कशाचें भय राहणार ?॥ ७८ ॥ तूं जर मन व बुद्धि खरोखरच माझे सगुण स्वरूपाचे ठिकाणीं लावशील, तर मलाच प्राप्त होशील, असें तुला मी वचन देतों. ॥ ७९ ॥ अशी प्राप्ति कशी होईल, अशी जर तुला शंका येत असेल, तर आधीं तसा अभ्यास करून पाहा. जर तसें होणार नाही, तर मग रागाव. ॥ ८० ॥

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना। परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन्॥ ८॥

अर्थ—अभ्यासयोगाने युक्त झालेल्या व दुसरे कोठेहि (विषयाकडे) न जाणाऱ्या चित्ताने दिव्य परम पुरुषाचें चिंतन करीत राहिलें असतां, असा पुरुष परमपुरुषाला प्राप्त होतो. ॥ ८ ॥

येणेंचि अभ्यासेंसीं योगु। चित्तासि करी पां चांगु। अगा उपायबळें पंगु। पहाड़ ठाकी॥ ८१॥
तेविं सदभ्यासे निरंतर। चित्तासि परमपुरुषाची मोहर। लावीं मग शरीर। असो अथवा जावो॥ ८२॥
जें नाना गतीते पाववितें। तें चित्त वरील आत्मयातें। मग कवण आठवी देहातें। गेलें कीं आहे॥ ८३॥
पैं सरितेचेनि ओघें। सिंधुजळा मीनलें घोघें। तें काय वर्तत आहे मागें। म्हणोनि पाहों येती॥ ८४॥
ना तें समुद्रचि होऊन ठेलें। तेविं चित्ताचें चैतन्य जाहालें। जेथ यातायात निमालें। घनानंद जे॥ ८५॥

अर्थ—याच अभ्यासाचा आपल्या चित्ताशी चांगला योग होऊ दे. अर्जुना! अभ्यासाने पांगळा मनुष्य देखील डोंगर चढून जाऊं शकतो. ॥ ८१ ॥ त्याप्रमाणे नीट शास्त्रानुसार अभ्यास करून आपल्या चित्ताला अखंड परमपुरुषाचें ध्यान लाव. मग शरीर राहो की जावो, याचा विचार करूं नकोस. ॥ ८२ ॥ ज्या मनानेच नाना गतीरूप योनी प्राप्त होतात त्या मनानेच आत्मस्वरूपाला वरलें. म्हणजे ते मन आत्माकार झालें असतां, शरीर आहे की पडलें अशी देहाची चिंता करणारा कोण उरतो ? ॥ ८३ ॥ नदीच्या रूपाने समुद्राच्या जळांत घों घों करीत प्रवाह मिळालेले असतात, ते मागे काय चाललें आहे म्हणून पाहायला येतात! ॥ ८४ ॥ कीं समुद्रच होऊन राहतात? त्याप्रमाणे चित्त परमपुरुषाकडे लावण्याच्या अभ्यासाने, चित्ताचें चैतन्य होतें. जें चैतन्य घनानंदस्वरूप असून जेथे प्राप्त झालें असतां जन्ममरणाची यातायात मुळींच राहत नाही. ॥ ८५ ॥

कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्यः। सर्वस्य धातारमचिन्त्यरूपमादित्यवर्णं तमसः परस्तात्॥ ९ ॥

अर्थ—जो सर्वज्ञ आहे, सूक्ष्माहून सूक्ष्म आहे, जो सर्व प्राण्याच्या कर्माप्रमाणे फळ देणारा आहे, ज्याचें स्वरूप कल्पनातीत आहे, ज्याचा सूर्याप्रमाणे नित्यचैतन्यप्रकाश हाच वर्ण आहे व जो प्रकृतिरूप अंधाराच्या पलीकडे आहे, अशा परमेश्वराचें जो चिंतन करतो. ॥ ९ ॥

जयाचें आकारावीण असणें। जया जन्म ना निमणें। जें आघवेंचि आघवेपणें। देखत असे॥ ८६ ॥
जें गगनाहूनि जुनें। जें परमाणूहूनि सानें। जयाचेनि सन्निधानें। विश्व चळे॥ ८७॥
जे सर्वांतें यया विये। विश्व सर्व जेणें जिये। हेतु जया बिहे। अचिंत्य जें॥ ८८ ॥
देखें वोळंबा इंगळु न चरे। तेजीं तिमिर जेथ न शिरे। जें दिहाचें आंधारें। चर्मचक्षूसीं॥ ८९ ॥
सुसडा सूर्यकिरणांचीराशी। जो नित्य उदो ज्ञानियांसी। अस्तमानाचें जयासी। आडनांव नाहीं॥ ९० ॥

अर्थ—जो आकारावांचून राहतो, ज्याला जन्ममृत्यु नाहीत, जो सर्वव्यापक असल्यामुळे सर्व जाणतो. ॥ ८६ ॥ जो आकाशाहून पुरातन आहे, जो परमाणुहूनहि सूक्ष्म आहे व ज्याच्या सान्निध्यामुळे जगाचे व्यापार होतात. ॥ ८७ ॥ ज्यापासून सर्व जग उत्पन्न होतें, ज्याच्या योगाने विश्व भासतें, किंवा ज्याच्या योगाने जगाचें अस्तित्व भासतें, जें मनाच्या कल्पनेंत येत नसून अनुमानादि तर्क ज्याला जाणू शकत नाहीत. ॥ ८८ ॥ ज्याप्रमाणे वाळवी विस्तवाला लागत नाही किंवा प्रकाशात अंधार राहूं शकत नाही, त्याप्रमाणे जें चर्मचक्षूला दिवसा देखील अंधाररूप आहे—म्हणजे दिसत नाही. ॥ ८९ ॥ जें परब्रह्म, ज्ञानी पुरुषाला, स्वच्छ प्रकाशरूप सूर्यकिरणाच्या राशीरूपाने कधीं न मावळणारें व नित्य उदय पावलेंलें, असें अनुभवाला येतें. ॥ ९० ॥

गूढार्थदीपिका—ज्ञानी पुरुषांना आपल्या आत्मरूप ज्ञानसूर्याचा अपरोक्ष साक्षात्कार हजारों चिद्वृत्तिरूप किरणांनी होतो, असें माऊलींनी अठराव्या अध्यायांत "चिद्वृत्तीच्या सहस्रकरीं" या ओवीने सांगितलें आहे.

प्रयाणकाले मनसाचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव । भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक् स तं परं पुरुषमुपैति दिव्यम्॥ १० ॥

अर्थ—मरणसमयीं स्थिरचित्ताने भक्तियुक्त होऊन व योगबलाने दोन भुवयांमध्ये प्राण स्थिर करून, जो त्या परमेश्वराचें चिंतन करतो, तो त्या दिव्य परमेश्वराला प्राप्त होतो. ॥ १० ॥

तया अव्यंगवाणेया ब्रह्मातें। प्रयाणकाले प्राप्ते। जो स्थिरावलेनि चित्तें। जाणोनि स्मरे॥ ९१ ॥
बाहेरी पद्मासन रचुनी। उत्तराभिमुख बैसोनि। जीवीं सुख सूनि। कर्मयोगाचें॥ ९२ ॥
आंतु मीनलेनि मनोधर्में। स्वरूपप्राप्तीचेनि प्रेमें। आपेंआप संभ्रमें। मिळावया॥ ९३ ॥
आकळलेनि योगें। मध्यमा मध्यमार्गें। अग्निस्थानौनि निगे। ब्रह्मरंध्रा॥ ९४ ॥
तेथ अचेत चित्ताचा सांगातु। आहाचवाणा दिसे मांडतु। तेथ प्राणु गगनाआंतु। संचरे कां॥ ९५ ॥
परी मनाचेनि स्थैर्यें धरिला। भक्तीचिया भावना भरला। योगबळें आवरला। सज्ज होउनी॥ ९६ ॥
तो जडा जडातें विरवितु। भ्रूलतामाजीं संरचतु। जैसा घंटानाद लयस्तु। घंटेसीच होय॥ ९७॥
कां झांकलिये घटींचा दिवा। नेणिजे काय जाहला केव्हां। या रीती जो पांडवा। देह ठेवी॥ ९८ ॥

तो केवळ परब्रह्म। जया परमपुरुष ऐसें नाम। तें माझें निजधाम। होऊनि ठाके॥ ९९॥

अर्थ—मरणकाळ प्राप्त झाला असतां, परिपूर्ण अशा त्या परब्रह्माच्या ठिकाणीं स्थिर चित्ताने, जो जाणून ध्यान करतो. ॥ ९१ ॥ बाहेर पद्मासन घालून उत्तरेकडे तोंड करून आणि अंत:करणात कर्मयोगाचा-म्हणजे क्रियायोगाने परमेश्वरप्राप्ति होते हा-आनंद मानून. ॥ ९२ ॥ व सर्व व्यापार एकवटलेल्या मनोधर्माने व स्वरूपप्राप्ति व्हावी या प्रेमाने आपोआप मिळण्याच्या लगबगीने. ॥ ९३ ॥ प्राप्त करून घेतलेल्या योगाभ्यासाच्या साहाय्याने सुषुम्ना नाडीद्वारें ब्रह्मरंध्राला जाण्याकरिता आधारचक्रापासून निघतो. ॥ ९४ ॥ जेथें मग प्राणवायु आकाशांत प्रवेश करतो. तेथे जडचेतनाचा संबंध वरवरच म्हणजे कल्पनामात्र आहे, असें कळून येतें. ॥ ९५ ॥ पण तो प्राण मनाचे धैर्याने धरला असल्यामुळे, भक्तीच्या भावनेने भरला असल्यामुळे व योगबलाने आवरला जाऊन पुढे जाण्याला सज्ज असल्यामुळे. ॥ ९६ ॥ तो प्राण, जड व चेतन यांची जाणीव नाहिशी करतो व भ्रुकुटीच्या ठिकाणीं प्रवेश करून, ज्याप्रमाणे घंटेचा नाद घंटेचे ठिकाणींच लय पावतो. ॥ ९७ ॥ किंवा मडक्यात ठेंवून झांकलेला दिवा केव्हा नाहिसा झाला समजत नाही, त्याप्रमाणे न समजतां त्याचा प्राण लय पावतो व त्याचा देह सुटतो. ॥ ९८ ॥ ज्याला परमपुरुष म्हणतात व जे माझें स्वरूप होय, तें तो केवळ परब्रह्म होऊन राहतो. ॥ ९९ ॥

यदक्षरं वेदविदो वदन्ति विशन्ति यद्यतयो वीतरागा:। यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं सङ्ग्रहेण प्रवक्ष्ये॥ ११ ॥

अर्थ—ज्याला वेदवेत्ते पुरुष अक्षर म्हणतात, वैराग्यशील यति ज्याला प्राप्त होतात व ज्याची इच्छा करीत ब्रह्मचारी पुरुष ब्रह्मचर्य पाळतात, तें पद तुला संक्षेपाने पुन: सांगतों. ॥ ११ ॥

सकळां जाणणेयां जे लाणी। तिये जाणिवेची जे खाणी। तयां ज्ञानियांचिये आयणी। जयातें अक्षर म्हणिपे॥ १०० ॥
चंडवातेंही न मोडे। तें गगनचि कीं फुडें। वांचूनि जरी होईल मेहुडें। तरी उरेल कैंचें॥ १०१ ॥

अर्थ—सर्व ज्ञानाचा शेवट असणाऱ्या आत्मज्ञानाची जे ब्रह्मज्ञानी खाणी आहेत, त्या ब्रह्मज्ञान्यांची बुद्धि ज्याला अक्षर म्हणते. ॥ १०० ॥ जें भयंकर झंझावातानेहि नाहिसें होत नाही, जें खरोखर आकाशच होय; जर तें आकाश नसतें व अभ्र असतें तर त्या झंझावातापुढे कसें टिकलें असतें? ॥ १०१ ॥

तेविं जाणणेया जें आकळिलें। तें जाणवलेपणेंचि उमाणलें। मग नेणवेचि तयातें म्हणितलें। अक्षर सहजें॥ १०२ ॥

अर्थ—त्याप्रमाणे ज्ञानाने जें जाणलें गेलें, तें ज्ञानाच्या आटोक्यांत आलें-म्हणजें ज्ञानकालापुरतेंच त्यांचें अस्तित्व सिद्ध झालें; म्हणून जें ज्ञानाने जाणलें जात नाही, त्याला अक्षर म्हटलें जातें. ॥ १०२ ॥

गूढार्थदीपिका—वेदान्तात पदार्थाच्या ज्ञातसत्ता व अज्ञातसत्ता अशा दोन सत्ता मानल्या आहेत.

पदार्थ जाणला जातो तेव्हाच त्याचें अस्तित्व असतें व जेव्हा तो जाणला जात नाही तेव्हा त्याचें अस्तित्व नसतें, असें ज्या पदार्थाविषयीं मानलें जातें, तो पदार्थ ज्ञातसत्ताक म्हटला जातो आणि पदार्थ जाणला जातो, तेव्हा त्याचें अस्तित्व असतेंच, पण तो जेव्हा जाणला जात नाही तेव्हाहि त्याचे अस्तित्व असतेच असें ज्या पदार्थाविषयीं मानलें जातें, तो पदार्थ 'अज्ञातसत्ताक' म्हटला जातो.

ज्ञातसत्तेचा पदार्थ 'काल्पनिक' असतो व अज्ञातसत्तेचा पदार्थ 'अकल्पित' असतो.

वेदान्तांने सर्व कार्यरूप सृष्टीची ज्ञातसत्ता मानली असून त्या अधिष्ठानरूप ब्रह्मचैतन्याची अज्ञातसत्ता मानली आहे. जाणलें जाणारें संपूर्ण जगत् ज्ञातसत्ताक असून, अज्ञात असलेलें परब्रह्म अक्षर म्हणजे सदा सर्वदा राहणारें अविनाशी असें अज्ञातसत्ताक आहे, हेंच श्रीज्ञानेश्वर माऊलींनी या ओवींत दाखविलें आहे.

म्हणोनि वेदविद नर। म्हणती जयातें अक्षर। जें प्रकृतीसी पर। परमात्मरूप॥ १०३ ॥
आणि विषयांचे विष उलंडूनि। जे सर्वेंद्रियां प्रायश्चित्त देऊनि। आहाति देहाचिया बैसोनि। झाडातळीं॥ १०४ ॥
ते यापरी विरक्त। जयाची निरंतर वाट पाहात। निष्कामासि अभिप्रेत। सर्वदा जें॥ १०५ ॥
जयाचिया आवडी। न गणिती ब्रह्मचर्याचीं सांकडीं। निष्ठुर होऊनि बापुडीं। इंद्रियें करिती॥ १०६ ॥
ऐसें जें पद। दुर्लभ आणि अगाध। जयाचिये थडियेचि वेद। चुबुकळिले ठेले॥ १०७ ॥

तें ते पुरुष होती। जे यापरी लया जाती। तरी पार्था हेचि स्थिती। एक वेळ सांगों॥ १०८॥
तेथ अर्जुनें म्हणितलें स्वामी। हेंचि म्हणावया होतों पां मी। तंव सहजें कृपा केली तुम्हीं। तरी बोलिजो कां जी॥ १०९॥
परि बोलावें तें अति सोहोपें। तेथें म्हणितलें त्रिभुवनदीपें। तुज काय नेणों संक्षेपें। सांगेन ऐक॥ ११०॥

अर्थ—म्हणून वेदवेत्ते पुरुष ज्याला अक्षर म्हणतात, जें प्रकृतीच्या पलीकडे असून परमात्मस्वरूप आहे. ॥ १०३ ॥ आणि विषयाचें विष (विषय हे विषासारखे मारक म्हणजे आत्मघात करणारे आहेत, म्हणून विषयाला विष म्हटलें आहे) फेंकून देऊन व सर्व इंद्रियांना प्रायश्चित्त देऊन—म्हणजे सर्व इंद्रियांचे विषयभोग तोडून, केवळ देहरूपी झाडाखाली बसून राहतात—म्हणजे प्रारब्धभोगापुरता देहाचा संबंध वागवितात॥ १०४॥ असे जे विरक्त झाले ते ज्या वस्तूच्या प्राप्तीची सारखी इच्छा करीत राहतात आणि निष्काम पुरुषांना जें नेहमीं प्रिय असतें. ॥ १०५ ॥ ज्याच्या प्राप्तीच्या आवडीने ब्रह्मचारी पुरुष ब्रह्मचर्याश्रमांतील खडतर व्रताचे कष्ट जुमानीत नाहीत आणि इंद्रियांविषयीं कठोर होऊन त्यांना (इंद्रियांना) दीन करून आपल्या स्वाधीन ठेवतात. ॥ १०६ ॥ अर्जुना! ज्याच्या कांठावरच वेद बुडून गेलेत, असें जें दुर्लभ व अत्यंत थोर पद आहे. ॥ १०७ ॥ वर सांगितल्याप्रमाणे ज्यांनी आपल्या प्राणाचा परब्रह्मांत लय केला, ते या पदाशीं ऐक्य पावतात. तरी पण अर्जुना! हीच स्थिति तुला पुन: एक वेळ सांगतों. ॥ १०८ ॥ तेव्हा अर्जुन म्हणतो, देवा! ही स्थिति पुन: एक वेळ सांगा, असें मीच म्हणणार होतो, पण आपणच, देवा! कृपा केली तर ते पुन: एक वेळ सांगाच. ॥ १०९ ॥ पण, देवा! अति सोपें करून सांगा. तेव्हा त्रैलोक्याचे प्रकाशक भगवान, म्हणतात, अर्जुना! तुझा अधिकार मी ओळखत नाही काय? मी संक्षेपानेच सांगतों, ऐक. ॥ ११० ॥

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च । मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम्॥ १२॥

अर्थ—सर्व इंद्रियांचा निग्रह करून, मनाचा हृदयकमलाच्या ठिकाणीं निरोध करून, मग आपला प्राण सुषुम्ना नाडीच्या द्वारा मूर्ध्नस्थानीं स्थापन करून, योगधारणा करण्यास प्रवृत्त झालेला योगी. ॥ १२ ॥

तरी मना या बाहेरिलीकडे। यावयाची साविया सवें मोडे। हें हृदयाचिया डोहीं बुडे। तैसें कीजे॥ १११॥
परि हें तरीच घडे। जरी संयमाचीं अखंडे। सर्वद्वारीं कवाडें। कळासती॥ ११२॥
तरी सहजें मन कोंडलें। हृदयींचि असेल उगलें। जैसें करचरणीं मोडलें। परिवरु न संडी॥ ११३॥
तैसें चित्त राहिल्या पांडवा। प्राणांचा प्रणवुचि करावा। मग अनुवृत्तिपंथें आणावा। मूर्ध्निवरी॥ ११४॥

अर्थ—तरी मनाची बाहेर विषयांकडे धांवण्याची संवय सर्वथा नाहिशी होईल व तें हृदयाच्या डोहांतच बुडून जाईल, असें केलें पाहिजे. ॥ १११ ॥ पण जर सर्व इंद्रियांच्या द्वाराला निग्रहाची अखंड मजबूत कवाडें लावलीं राहतील, तरच हें घडणें शक्य आहे. ॥ ११२ ॥ तर, ज्याप्रमाणे हातपाय मोडलेला मनुष्य आपल्या कुटुंबाच्या माणसाला सोडून जात नाही त्याप्रमाणे आंत कोंडलें गेलेलें मन, सहजच हृदयाचे ठिकाणीं अगदी स्वस्थ राहतें. ॥ ११३ ॥ अर्जुना! असें चित्त स्थिर झालें असतां, प्राणाचा प्रणव करावा-म्हणजे प्राणांतील 'हंस:' असा जो अज्ञातजप होतो, त्याच्याशीं ॐकार या ज्ञातजपाचा समन्वय करावा व पुढे त्या समन्वित जपाला, आधारचक्राच्या क्रमाने, ब्रह्मरंध्रापर्यंत आणावें. ॥ ११४ ॥

तेथ आकाशीं मिळे न मिळे। तैसा धरावा धारणाबळें। जंव मात्रात्रय मावळे। अर्धबिंबीं॥ ११५॥
तंववरी तो समीरु। निराळीं कीजे स्थिरु। मग लग्नीं जेवीं ॐकारु। बिंबींचि विलसे॥ ११६॥

अर्थ—मग अ, उ, म् या प्रणवाच्या मात्रा अर्धबिंबांत मिळेतोंपर्यंत धारणेच्या बळाने आकाशांत मिळतो न मिळतो असा प्रणव धरून ठेवावा. ॥११५ ॥ तो प्राण आकाशांत स्थिर करावा व मग ऐक्य झाल्यावर, तो ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणींच भासतो. ॥ ११६ ॥

ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्। यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्॥ १३॥

अर्थ—ॐ ह्या एकाक्षरी ब्रह्माचा उच्चार करून, त्याचा वाच्य जो मी, त्या माझें नंतर स्मरण करून, जो देह सोडतो, तो परम गतीला प्राप्त होतो. ॥१३ ॥

तैसें ॐ हें स्मरों सरे। आणि तेथेंचि प्राणु पुरे। मग प्रणवांतीं उरे। पूर्णघन जें॥ ११७॥
म्हणोनि प्रणवैकनाम। हें एकाक्षर ब्रह्म। जो माझें स्वरूप परम। स्मरतसाता॥ ११८॥

अर्थ—तसें झालें म्हणजे प्रणव अनुच्चार्य होतो व तेथेच प्राणहि लीन होतो. मग प्रणववाच्य, प्रणवातीत. असें जें पूर्ण ब्रह्म तें, तो योगी होऊन राहतो. ॥ ११७ ॥ म्हणून प्रणव म्हणजे ॐ हें एक नाव एकाक्षर ब्रह्मच आहे. जो कोणी माझ्या परम स्वरूपाचें स्मरण करीत. ॥ ११८ ॥

गूढार्थदीपिका—येथे ॐ हें एकाक्षरी ब्रह्मच आहे, असें सांगितलें आहे, असें कित्येक समजतात, पण तो समज चुकीचा आहे, कारण ब्रह्म एकच असून ते उत्पत्तिनाशरहित आहे आणि ॐकाराची उत्पत्ति सांगितली आहे, म्हणून ॐ हे प्रत्यक्ष ब्रह्म होऊं शकत नाही. येथे ॐ ह्या एकाक्षराच्या ठिकाणीं ''इति'' या शब्दाने परब्रह्माची भावना करण्यास सांगितली आहे आणि ''ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात्'' (ब्र. सू. ४-१-५) या वेदान्तसूत्रावर भाष्य करितांना ''ब्रह्मेत्यादेश:'' ''ब्रह्मेत्युपासीत्'' इत्यादि श्रुतींतील ''इति'' शब्दाचा अर्थ ''ब्रह्माची भावना करावी'', असा केला आहे. तोच अर्थ येथेहि घेतला पाहिजे. ॐकार हा कार्यरूप व कारणरूप अशा दोन्ही प्रकारच्या ब्रह्माचें आलंबन होतें व त्याची ब्रह्मभावनेने उपासना केली जाते, असें कठोपनिषदांत (२-१६) भगवान आचार्यांनी सांगितले आहे.

यापरी त्यजी देहातें। तो त्रिशुद्धी पावे मातें। जया पावणया परौतें। आणिक पावणें नाहीं॥ ११९॥

अर्थ—वर सांगितल्याप्रमाणे देह सोडतो, तो मला पावतो, हें त्रिवार सत्य आहे. या प्राप्तीपेक्षा दुसरी श्रेष्ठ प्राप्ति नाही. ॥ ११९ ॥

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः। तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः॥ १४॥

अर्थ—एक माझेच ठिकाणीं सतत चित्त ठेवून, माझें अखंड स्मरण जो करतो, त्या माझ्याशीं नित्य ऐक्य पावलेल्या योग्याला, अर्जुना! मी अत्यंत सुलभ प्राप्त होतो. ॥ १४ ॥

येथ अर्जुना जरी विपायें। तुझ्या जीवीं हन ऐसें जाये। ना हें स्मरण मग होये। कायसयावरी अंतीं॥ १२०॥
इंद्रियां अनुघडु पडलिया। जीविताचें सुख बुडालिया। आंतुबाहेरी उघडलिया। मृत्युचिन्हें॥ १२१॥
ते वेळीं बैसावेंचि कवणें। मग कवण निरोधी करणें। तेथ काह्याचेनि अंत:करणें। प्रणव स्मरावा॥ १२२॥
तरि अगा ऐशिया ध्वनी। झणें थारा देशी हो मनीं। पैं नित्य सेविला मी निदानीं। सेवकु होय॥ १२३॥

अर्थ—हें ऐकून, अर्जुना! जर कदाचित् तुझ्या मनांत असें येईल की अंतकाळी हें तुझें स्मरण कसें होणें शक्य आहे?॥ १२० ॥ इंद्रियांचे व्यापार बंद पडले व जीवंतपणाचें सुख नाहिसें झालें आणि आंतबाहेर मरणाचीं लक्षणें दिसूं लागलीं. ॥ १२१ ॥ तेव्हा कोणी बसायचें? कोण इंद्रियांचा निरोध करील? व कोणत्या अंत:करणाने प्रणवाचें चिंतन करायचें?॥ १२२ ॥ अर्जुना! कदाचित् अशा संशयाला तूं अंत:करणांत अवसर देशील, पण हें एक लक्षांत ठेव की, माझें नित्य सेवन करणारा जो आहे, त्याचा मी मरणसमयी सेवक होतो. ॥ १२३ ॥

गूढार्थदीपिका—सगुण भगवंताची भक्ति न करतां, नुसता योगाचा अभ्यास करणाऱ्या योग्यांना योग साधणें व मरणाचे वेळीं योगाभ्यास करून प्रणवोच्चारपूर्वक देहत्याग करणें, अत्यंत कठीण आहे. पण सगुणाची भक्ति करणाऱ्या योग्यांना मात्र तें सर्व भगवत्कृपेने सहज साधतें. कारण प्रेमळ भक्त ज्या नि:सीम प्रेमानें आपल्या भगवंताची स्मरणादिद्वारा निष्काम सेवा करतो, त्या प्रेमाच्या मोबदल्याचीं तो भक्त कधीं चुकून देखील इच्छा करीत नाही. म्हणूनच भगवानहि आपलें भगवंतपण विसरून त्याच्या सेवेची संधि पाहत असतात. मरणसमयीं भगवान भक्ताचीं इंद्रियें, अंत:करण, इत्यादिकांना, इतर जीवांप्रमाणे वैकल्य प्राप्त होऊं देत नाही व देह सोडण्याच्या क्षणापर्यंत भक्ताला आपली स्मृति ठेवतो. भगवान आपल्या प्रेमळ भक्तांच्या अंतकाळीं त्यांचा सेवक कसा होतो, हेंच पुढे माउली सांगत आहे.

जे विषयांसि तिळांजळी देऊनि। प्रवृत्तीवरी निगड वाऊनि। मातें हृदयीं सूनि। भोगिताती॥ १२४॥
परि भोगितया नाराणुका। भेटणें नाहीं क्षुधादिकां। तेथ चक्षुरादि रंका। कवण पाडु॥ १२५॥

ऐसे निरंतर एकवटले। जे अंत:करणीं मजशीं लिगटले। मीचि होऊनि आटले। उपासिती॥ १२६ ॥
तयां देहावसान जैं पावे। तैं तिहीं मातें स्मरावें। मग म्यां जरी पावावें। तरि उपास्ति ते कायसी॥ १२७॥
पैं रंकु एक आडलेपणें। काकुळती अंतीं धांवा गा धांवा म्हणे। तरि तयाचिये ग्लानी धांवणें। काय न घडे मज॥ १२८ ॥
आणि भक्तांही तेचि दशा। तरी भक्तीचा सोसु कायसा। म्हणऊनि हा ध्वनि ऐसा। न वाखाणावा॥ १२९॥
तिहीं जे वेळीं मी स्मरावा। ते वेळीं स्मरला कीं पावावा। तो आभारुही जीवा। साहवेचि ना॥ १३०॥
तें ऋणवैपण देखोनि आंगीं। मी आपुलियाचि उत्तीर्णत्वालागीं। भक्तांचियां तनुत्यागीं। परिचर्या करीं॥ १३१॥
देहवैकल्याचा वारा। झणें लागेल या सुकुमारा। म्हणोनि आत्मबोधाचां पांजिरां। सूयें तयातें॥ १३२॥
वरि आपुलिया स्मरणाची उवाइली। हींव ऐसी करीं साउली। ऐसेनि नित्यबुद्धी संचली। मी आणीं तयातें॥ १३३॥

अर्थ—ज्यांनी विषयसुखावर पाणी सोडले, विषयसुखाच्या होणाऱ्या प्रयत्नात बेडी घातली व हृदयामध्ये मला एकट्यालाच सांठवून जे माझें सुख भोगतात. ॥ १२४॥ पण माझें सुख भोगतांना, ज्यांना कधी तृप्तीच होत नाही व त्या सुखांतून ते निघत नाहीत, म्हणून त्यांना क्षुधातृषेची आठवण होत नाही, तेथे भिकारड्या चक्षुरादि इंद्रियांवर येण्याची गोष्ट दूर राहिली. ॥ १२५ ॥ जे अखंड मत्परायण झाले, अंत:करणांत माझ्या ठिकाणीं जडले व ज्यांनी आपला निराळेपणा नि:शेष नाहीसा केला, अशा रीतींने पूर्ण मद्रूप होऊन जे माझी भक्ति करतात. ॥ १२६ ॥ त्यांना मरणकाळ प्राप्त झाला असतां, त्यांनी माझें स्मरण करावें, आणि तेव्हा जर मी धांवून यावें तर मग त्यांच्या भक्तीची किंमत काय?॥ १२७॥ एखादा भिकारी संकटांत सापडला व त्याने जर 'भगवंता धांव' म्हणून अत्यंत कळवळून धांवा केला, तर त्याची दीन वाणी ऐकून, मी धांवून जात नाही काय?॥ १२८ ॥ आणि प्रेमळ भक्तहि जेव्हा माझा धांवा करतील तेव्हाच मी जर धांवून जाऊं लागलों, तर मग माझ्या भक्तीच्या हव्यासाला काय किंमत? म्हणून अशा शंकेला तूं आपल्या चित्तांत थारा देऊं नकोस. ॥ १२९ ॥ भक्तांनी माझा जेंव्हा धांवा करावा, तेव्हा मीं धांवून जावें, हें धावा करण्याचें ओझें देखील मला सहन होत नाही. ॥ १३० ॥ भक्ताच्या निष्काम प्रेमभक्तीचें माझ्यावर जें ऋण होते, तें थोडे तरी फेडावें, म्हणून प्रेमळ भक्ताच्या मरणाचे वेळीं मी स्वत: आपण होऊनच त्याची सेवा करतो. ॥ १३१ ॥ देह सोडतेवेळीं जीवाला जी विकलता उत्पन्न होत असते तिचा माझ्या सुकुमार प्रेमळ भक्ताला कदाचित् स्पर्श होईल, म्हणून मी त्याला अगोदरच, आत्मज्ञानाच्या पिंजऱ्यांत घालून ठेवतों. ॥ १३२॥ आणखी वर आपल्या सगुण स्वरूपाच्या स्मरणाची थंडगार सावली करतों. अशारीतीने मी त्याला नित्य संचली बुद्धि प्राप्त करून देतों. ॥ १३३ ॥

गूढार्थदीपिका—देहामुळे प्राप्त झालेल्या मरणाचे भीतीने मरणसमयीं जीव अत्यंत व्याकुळ होतो. हें मरणाचें भय मी देहरूप नसून अविनाशी सच्चिदानंदस्वरूप आहे, असें दृढ आत्मज्ञान झालें असतां नाहिसें होतें. भगवान आपल्या प्रेमळ भक्ताला, या आत्मज्ञानाची बुद्धि मरणापूर्वीच देऊन व मरणकालींहि ती कायम ठेवून मरणाची भीति नाहिशी करतो आणि आणखी आपल्या सगुण स्वरूपाच्या अखंड स्मरणाने, आपल्या सगुण स्वरूपाचें ध्यान दृढ़ करून देहादिकांचा विसर पाडतों.

म्हणोनि देहांतींचें सांकडें। माझिया कहींचि न पडे। मी आपुलियातें आपुलीकडे। सुखेंचि आणी॥ १३४॥
वरचील देहाची गंवसणी फेडुनी। आहाच अहंकाराचे रज झाडुनी। शुद्ध वासना निवडुनी। आपणपां मेळवी॥ १३५ ॥
आणि भक्तां तरी देहीं। विशेष एकवंकीचा ठाव नाहीं। म्हणऊनि अव्हेरु करितां कांहीं। वियोगु ऐसा न वाटे॥ १३६ ॥
नातरी देहांतींचि मियां यावें। मग आपणयातें न्यावें। हेंही नाहीं स्वभावें। जे आधींचि मज मीनले॥ १३७॥
येरी शरीराचिया सलिलीं। असतेपण हेचि साउली। वांचूनि चंद्रिका ते ठेली। चंद्रींच आहे॥ १३८॥
ऐसे जे नित्ययुक्त। तयांसि सुलभ मी सतत। म्हणऊनि देहांतीं निश्चित। मीचि होती॥ १३९॥

अर्थ—म्हणून मरणाच्या वेळेचें संकट माझ्या भक्ताला कधींच पडत नाही. मी आपल्या भक्ताला आपल्याकडे सुखाने सहज आणतों. ॥ १३४॥ वरची देहाची खोळ बाजूला सारून, व्यर्थच दिसणारी अहंकाराची धूळ झाडून

टाकून, त्याची वासना शुद्ध करून, आपल्यांत त्याला मिळवितों. ॥ १३५ ॥ आणि माझा भक्त तरी आपल्या देहाशीं 'मी देह आहे' असें तादात्म्य किंवा ऐक्य वागवीत नाही; म्हणून देह सोडतांना त्याला देहाच्या वियोगाचें दुःख होत नाही. ॥ १३६ ॥ किंवा भक्ताच्या मरणाचे वेळींच मीं यावें व मग मी भक्ताला आपल्यांत मिळवावें, असेंहि कांही नाही, कारण तो मरणाचे अगोदरच, ज्ञानभक्तीच्या योगाने, माझ्याशीं सहजच मिळालेला असतो. ॥ १३७ ॥ बाकी पाण्यांत चंद्राचा प्रकाश पडलेला दिसत असला, तरी तो पाण्यांत नसून, जसा चंद्राचे ठिकाणींच असतो, त्याप्रमाणे जीवचैतन्य, शरीररूपी पाण्यांत जरी दिसत असलें, तरी त्याचें देहाचे ठिकाणीं असणें, ही नुसती सावलीच असते. (वास्तविक जीवचेतन परमेश्वर चेतनाचे ठिकाणींच असतो. जीवचेतन व परमेश्वर चेतन यांचा कधीं वियोग नाही) ॥ १३८ ॥ असें ज्ञानभक्तीने माझ्याशीं अखंड एकरूप झालेले जे आहेत त्यांना मी सदासर्वदा सुलभ प्राप्त आहे. म्हणून मरणाचे वेळीं निश्चितपणें ते मलाच प्राप्त होतात. ॥ १३९ ॥

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्। नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः॥ १५॥

अर्थ—मला प्राप्त झालेले व परमगतीला गेलेले महात्मे, सर्व अध्यात्मिकादि त्रिविध दुखांचें माहेरघर असलेल्या, व विनाशी अशा क्षणभंगुर पुनर्जन्माला प्राप्त होत नाहीत. ॥ १५ ॥

मग क्लेशतरूची वाडी। जे तापत्रयाग्रीची सगडी। जे मृत्युकाकासि कुरोंडी। सांडिली आहे॥ १४०॥
जें दैन्याचें दुभतें। जें महाभयातें वाढवितें। जें सकळ दुःखाचें पुरतें। भांडवल॥ १४१॥
जें दुर्मतीचें मूळ। जें कुकर्माचें फळ। जें व्यामोहाचें केवळ। स्वरूपचि॥ १४२॥
जें संसाराचें बैसणें। जें विकाराचें उद्यानें। जें सकळ रोगांचें भाणें। वाढिलें आहे॥ १४३॥
जें काळाचा खिच उशिटा। जें आशेचा आंगवठा। जन्ममरणाचा वोलिंवटा। स्वभावें जें॥ १४४॥
जें भुलीचें भरिव। जें विकल्पाचें वोतिंव। किंबहुना पेंव। विंचुवांचें॥ १४५॥
जें व्याघ्राचें क्षेत्र। जें पण्यांगनेचें मैत्र। जें विषयविज्ञानयंत्र। सुपूजित॥ १४६॥
जें लावेचा कळवळा। निवालिया विषोदकाचा गळाळा। जें विश्वासु आंगवळा। संवचोराचा॥ १४७॥
जें कोढियाचें खेव। जें काळसर्पाचें मार्दव। गोरीयेचे स्वभाव। गायन जें॥ १४८॥
जें वैरियाचा पाहुणेरु। जें दुर्जनाचा आदरु। हें असो जें सागरु। अनर्थांचा॥ १४९॥
जें स्वप्नीं देखिलें स्वप्न। जें मृगजळें सासिन्नलें वन। जें धूम्ररजांचें गगन। ओतलें आहे॥ १५०॥

अर्थ—मग कष्टरूपी वृक्षांची बाग, जे तिन्ही प्रकारच्या दुःखाची शेगडी. जें मृत्युरूपी कावळ्याला उतरून टाकलेला बळी आहे. ॥ १४० ॥ जें अखंड दैन्याला उत्पन्न करतें, जें महाभयाला म्हणजे मृत्यूच्या भयाला वाढविणारें आहे, जें उत्पन्न होणाऱ्या सर्व दुःखाचें पूर्ण भांडवल आहे. ॥ १४१ ॥ जें दुर्बुद्धीचे उगमस्थान होय. जें पापकर्माचें फळ होय, जें अविवेकाचें केवळ स्वरूपच होय. ॥ १४२ ॥ जें संसाराचें वसतिस्थान होय, जें कामक्रोधादि विकारांचें विहारस्थान होय व जें रोगांचें वाढलेलें ताट होय. ॥ १४३ ॥ जें काळाची उष्टी खिचडी आहे, जे आशेचें घर होय आणि स्वभावतःच जें जन्ममरणाची वाहती वाट आहे. ॥ १४४ ॥ ज्यांत भ्रमच भरला आहे, जें विपरीत समजुतीचें ओतलेलें आहे, किंबहुना जे विंचवांचें पेवच आहे. ॥ १४५ ॥ जें व्याघ्राचें वसतिस्थान आहे, जें वेश्यांचा मित्र आहे. (वेश्येप्रमाणे मोह उत्पन्न करणारें आहे) जें विषयांचा अनुभव देणारें चांगलें पूजलेलें यंत्र होय. ॥ १४६ ॥ जें जखिणीची मारक ममता होय, जें निवलेल्या विषमिश्रित पाण्याचा घोट होय, वरून सावासारख्या दिसणाऱ्या ठकाप्रमाणे विश्वास उत्पन्न करून बनलेला सांगातीं आहे. ॥ १४७ ॥ (मेद, मांस, रक्त यांनी भरलें असल्यामुळे) जे कुष्ठी माणसाचें आलिंगन होय, जे काळरूपी सर्पाचा नरमपणा होय, जे चित्तास मोहून घेणारे पारध्याचें स्वाभाविक गायन होय. ॥ १४८ ॥ जें शत्रूला पाहुणचार होय, जें दुर्जनांचा सत्कार होय अर्जुना! हे वर्णन असो, जें सर्व अनर्थांचा समुद्र होय. ॥ १४९ ॥ जें स्वप्नामध्ये स्वप्न पाहणें होय, जें मृगजळाने टवटवीत दिसणारें अरण्य होय, जे धुराच्या कणांचें ओतीव आकाश आहे. ॥ १५० ॥

गूढार्थदीपिका—जीवाचें मूळ आत्मस्वरूप अखंड सुखरूप आहे, तेथे दु:खाचा लेश नाही. किंवा सर्व दु:खांची निवृत्ति आहे, अशा जीवाला सर्व दु:खांची प्राप्ति देहासक्तीमुळेच आहे. या देहासक्तीमुळे आत्मस्वरूपाचा विसर पडतो. मृत्यूची भीति वाटते, विषयसुखाकरितां दीन होतो. स्वैर वर्तनाची दुर्बुद्धि या देहासक्तीनेच वाढून बुद्धि अत्यंत अविवेकी होते. अशारीतीने पांचभौतिक शरीराची प्राप्ति, ही मुळांत सुखस्वरूप असलेल्या आत्म्याला स्वप्नाप्रमाणे "सुख पाहतां जवापाडें। दु:ख पर्वता एवढें" सर्वस्वी निरर्थक, कल्पित व दु:खांत लोटणारी आहे. अशा शरीराची प्राप्ति कधी न होण्याकरिता, सगुण परमेश्वराच्या भजनाने सगुण परमेश्वरस्वरूपच झालें पाहिजे, असा या वरील सर्व ओव्यांचा आशय आहे.

ऐसें जें हें शरीर। तें ते न पवतीचि पुढती नर। जे होऊनि ठेले अपार। स्वरूप माझें॥ १५१॥

अर्थ—असें जें वर वर्णिलेलें शरीर आहे, तें माझ्या अमर्याद स्वरूपाशीं जे ऐक्य पावलें, त्यांना पुन: प्राप्त होत नाही. ॥ १५१ ॥

आब्रह्मभुवनाल्लोका: पुनरावर्तिनोऽर्जुन। मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते॥ १६॥

अर्थ—ब्रह्मलोकापर्यंत किंवा सत्यलोकापर्यंत जितके लोक आहेत, त्या सर्व लोकांतून पुन: पुन: जन्म घ्यावा लागतो; परंतु कुंतिपुत्रा अर्जुना! मला प्राप्त झाल्यानंतर पुनर्जन्म प्राप्त होत नाही. ॥ १६ ॥

एऱ्हवीं ब्रह्मपणाचिये भडसे। चुकतीचि पुनरावृत्तीचे वळसे। परि निवटलियाचें जैसें। पोट न दुखे॥ १५२॥

अर्थ—एऱ्हवीं, अर्जुना! ब्रह्मलोकासारख्या थोर लोकांची प्राप्ति झाली, तरी पुनर्जन्माचे फेरे चुकत नाहीत; पण मेलेल्या माणसाचें पोट दुखणें जसें बंद पडतें. ॥ १५२ ॥

गूढार्थदीपिका—येथे ब्रह्मलोकापर्यंत पुनरावृत्ति आहे, असें जें सांगितलें आहे, तें सकाम उपासकाविषयी सांगितलें आहे, असे समजावयाचें, कारण निष्काम चित्ताने अक्षि पुरुषासारख्या कार्यब्रह्माची उपासना करून अर्चिरादि मार्गाने ब्रह्मलोकाला गेलेले उपासक, पुन: जन्माला येत नाहीत, असा ब्रह्मसूत्रांत सिद्धान्त केला आहे. (ब्र. सू. ४-४-२२). ते प्रलयकाल प्राप्त झाला असतां, ब्रह्मज्ञानाने संपन्न होऊन, ब्रह्मदेवाबरोबर मुक्त होतात, असा वेदान्तसिद्धान्त आहे (४-३-१०). हें मागें सांगितलेंच आहे.

नातरी चेइलियानंतरें। न बुडिजे स्वप्नींचेनि महापूरें। तेवीं मातें पावले ते संसारें। लिंपतीचि ना॥ १५३॥
एऱ्हवीं जगदाकाराचें सिरें। जें चिरस्थायीयांचे धुरे। ब्रह्मभुवन गा चवरें। लोकाचळाचें॥ १५४॥
जिये गांवींचा पहारु दिवोवेरी। एका अमरेंद्राचें आयुष्य न धरी। विळोनि पातीं उठी एकीसरीं। चवदाजणांचीं॥ १५५ ॥

अर्थ—किंवा जागे झाल्यावर स्वप्नातील महापुरांत मनुष्य बुडत नाही, त्याप्रमाणे जे मला प्राप्त झाले, ते मग संसाराने लिप्त होत नाहीत. ॥ १५३ ॥ एऱ्हवीं सर्व ब्रह्मांडाचा शिरोभाग व बहुत काळपर्यंत नाश न पावणारे जे लोक आहेत, त्या लोकामध्यें अग्रस्थान असलेला व त्रैलोक्यरूप पर्वताचें शिखर, असा जो ब्रह्मलोक. ॥ १५४॥ ज्या ब्रह्मलोकांतील दिवसाच्या प्रहरभर देखील एका एका देवाधिपति इंद्राचें आयुष्य नसतें; तर एका दिवसांत एकामागून एक चौदा इंद्र होऊन जातात. ॥ १५५ ॥

सहस्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदु:। रात्रिं युगसहस्रान्तां तेऽहोरात्रविदो जना:॥ १७॥

अर्थ—रात्र व दिवस जाणणारे पुरुष, ब्रह्मदेवाचा दिवस एक हजार युगच असून, एक हजार युगच त्याची रात्रहि आहे, असें जाणतात. ॥ १७ ॥

जैं चौकडिया सहस्र जाये। तैं ठायेठावो विळुचि होये। आणि तैसेंचि सहस्रें वरियें पाहें। रात्री जेथ॥ १५६॥
येवढें अहोरात्र जेथिंचें। तेणें न लोटती जे भाग्याचे। देखती ते स्वर्गींचे। चिरंजीव॥ १५७॥
येरां सुरगणांची नवाई। विशेष सांगावी येथ काई। मुदला इंद्राचीचि दशा पाहीं। जे दिहाचे चौदा॥ १५८॥
परि ब्रह्मयाचियाहि आठां प्रहरांतें। आपुलियां डोळां देखते। जे आहाति गा तयांतें। अहोरात्रविद म्हणिपे॥ १५९॥

अर्थ—कृत, त्रेत, द्वापार, कली या चार युगाची एक चौकडी होते. अशा हजार चौकड्या झाल्या असतां,

वास्तविक ब्रह्मदेवाचा दिवस होतो. तशाचप्रमाणे हजार चौकड्यांची ब्रह्मदेवाची रात्र होते. ॥ १५६ ॥ एवढे मोठे दिवस व रात्र जेथे आहेत, त्या दिवसरात्रींत न मरतां, जें भाग्याचे पुरुष ब्रह्मदेवाचा दिवसरात्र पाहतात, ते स्वर्गातील चिरंजीव होत. ॥ १५७ ॥ बाकीच्या देवांचें विशेष नवल काय सांगायचें! त्यांत मुख्य जो इंद्र त्याचीच दशा अशी आहे की ब्रह्मदेवाचे दिवसांत ते चौदा होतात. ॥ १५८ ॥ पण ब्रह्मदेवाच्या आठहि प्रहराला—म्हणजे पूर्ण दिवसरात्रीला-आपल्या डोळ्यांनी जे पाहणारे आहेत, त्यांना अहोरात्र जाणणारें असे म्हणतात. ॥ १५९ ॥

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे । रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसञ्ज्ञके ॥ १८ ॥

अर्थ—ब्रह्मदेवाचा दिवस उगवला असतां, ब्रह्मदेवाच्या सुषुप्ति अवस्थेंत लीन असलेली सर्व व्यक्त सृष्टि प्रगट होते व ब्रह्मदेवाची रात्र झाली म्हणजे पुनः त्याच अव्यक्तरूप सुषुप्तावस्थेंत सर्व सृष्टि लीन होते. ॥ १८ ॥

तिये ब्रह्मभुवनीं दिवसें पाहे। ते वेळीं गणना केंहीं न समाये। ऐसें अव्यक्ताचें होये। व्यक्त विश्व ॥ १६० ॥
पुढती दिहाची चौपाहारी फिटे। आणि हा आकारसमुद्र आटे। पाठीं तैसाचि मग पाहांटे। भरों लागे ॥ १६१ ॥
शारदीयेचिये प्रवेशीं। अभ्रें जिरती आकाशीं। मग ग्रीष्मांतीं जैशीं। निगती पुढती ॥ १६२ ॥
तैशी ब्रह्मदिनाचिये आदी। हे भूतसृष्टीची मांदी। मिळे जंव सहस्त्रावधी। निमित्त पुरे ॥ १६३ ॥
पाठीं रात्रीचा अवसरु होये। आणि विश्व अव्यक्तीं ल्या जाये। तोही युगसहस्त्र मोटका पाहे। आणि तैसेंचि रचे ॥ १६४ ॥
हें सांगावया काय उपपत्ती। जे जगाचा प्रळयो आणि संभूती। इये ब्रह्मभुवनींचिया होती। अहोरात्रामाजीं ॥ १६५ ॥
कैसें थोरिवेचें मान पाहें पां। तो सृष्टिबीजाचा साटोपा। परि पुनरावृत्तीचिया मापा। शीग जाहला ॥ १६६ ॥

अर्थ—त्या ब्रह्मलोकांत जेव्हा दिवस उगवतो, तेव्हा ब्रह्मदेवाच्या सुषुप्तींत अव्यक्त असलेलें विश्व, संख्या करवत नाही असें, असंख्य व्यक्त होतें. ॥ १६० ॥ पुढे पुनः दिवसाचे चार प्रहर लोटले की हा सृष्टींचा व्यक्त आकारसमुद्र नाहिसा होतो. नंतर पुनः पहाट झाली की पुनः तसाच पूर्वीप्रमाणे तो आकारसमुद्र भरूं लागतो. ॥ १६१ ॥ शरद्‌ऋतूचा प्रवेश झाल्याबरोबर, ज्याप्रमाणें अभ्रें आकाशांत जिरतात व मग ग्रीष्मऋतु संपला की पुनः अभ्रें उत्पन्न होतात. ॥ १६२ ॥ त्याप्रमाणे ब्रह्मदेवांचे दिवसाचे आरंभ हा भूतसृष्टीचा पसारा, हजार चौकड्यांचा काल हें निमित्त पूर्ण होईपर्यंत दिसूं लागतो. ॥ १६३ ॥ नंतर ब्रह्मदेवाच्या रात्रीचा समय आला, की सर्व सृष्टि अव्यक्तांत लीन होते, तोहि रात्रीचा काल हजार चौकड्यांचा आहे आणि दिवस उजाडला, की तसेंच विश्व रचिलें जातें. ॥ १६४ ॥ ही उपपत्ति सांगण्याचें कारण असें की, ब्रह्मदेवाच्या अहोरात्रीमध्ये जगाची उत्पत्ति व लय होतात हें समजावें. ॥ १६५ ॥ अर्जुना! या ब्रह्मलोकाची थोरवी केवढी आहे पाहा, की जो सर्व बीजाची सांठवण, पण तोहि पुनरावृत्तीच्या मापाचा शीग झाला आहे—म्हणजे ब्रम्हलोकापर्यंत पुनरावृत्ति आहे, असा अर्थ. ॥ १६६ ॥

भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते । रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥ १९ ॥

अर्थ—अर्जुना! हा स्थावरजंगमात्मक भूतसमुदाय कालवश होऊन ब्रह्मदेवाच्या रात्रींत लय पावत जातो व ब्रह्मदेवाचा दिवस उगवला असतां उत्पन्न होत जातो. ॥ १९ ॥

एऱ्हवीं त्रैलोक्य हें धनुर्धरा। तिये गांवींचा गा पसारा। तो हा दिनोदयीं एकसरां। मांडत असे ॥ १६७ ॥
पाठीं रात्रीचा समो पावे। आणि आपैसाचि सांठवे। म्हणिये जेथिंचें तेथ स्वभावें। साम्यासि ये ॥ १६८ ॥
जैसें वृक्षपण बीजासि आलें। कीं मेघ हें गगन जाहालें। तैसें अनेकत्व जेथ सामावलें। तें साम्य म्हणिपे ॥ १६९ ॥

अर्थ—एऱ्हवीं अर्जुना! हें त्रैलोक्य म्हणजे ब्रह्मलोकाचा पसारा आहे. एकसारखा मांडला जातो. ॥ १६७ ॥ नंतर रात्रीचा समय प्राप्त झाला, की आपोआप जेथल्या तेथे सांठवला जाऊन, साम्यावस्थेला जातो. ॥ १६८ ॥ ज्याप्रमाणे वृक्षपण बीजावस्थेला येतें अथवा अभ्रें आकाशरूप होऊन राहतात, त्याप्रमाणे हा सृष्टीचा अनेकत्वाचा पसारा जेथे सांठविला जातो, त्याला साम्यावस्था किंवा अव्यक्त म्हणतात. ॥ १६९ ॥

गूढार्थदीपिका—बीजांकुरन्यायाने ही सर्व सृष्टि अनादि असून जीवाच्या ठिकाणीं मायाभ्रांति आहे तोपर्यंत तिचे आविर्भाव म्हणजे उत्पत्ति व तिरोभाव म्हणजे लय किंवा व्यक्ताव्यक्त भाव भासत असतात (ब्र. सू. २-१-३६).

परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः। यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति॥ २०॥

अर्थ—त्या साम्यावस्थारूप अव्यक्ताहून भिन्न असा जो दुसरा सनातन अव्यक्तभाव आहे, तो मात्र सर्व भूतें नष्ट झालीं तरी नष्ट होत नाही. ॥ २० ॥

तेथ समविषम न दिसे कांहीं। म्हणोनि भूतें हे भाष नाहीं। जेविं दूधचि जाहालिया दहीं। नामरूप जाय॥ १७० ॥

तेवीं आकारलोपासरिसें। जगाचें जगपण भ्रंशे। परि जेथें जाहालें तें जैसें। तैसेंचि असे॥ १७१ ॥

अर्थ—जगाच्या त्या साम्यावस्थारूप अव्यक्त दशेत सारखे किंवा भिन्न भाव दिसत नाहीत, म्हणून तेथे भूतसृष्टि हा शब्दहि लागत नाही. ज्याप्रमाणे दूधच दही झाल्यावर दुधाचें नामरूप नाहिसें होतें. ॥ १७० ॥ त्याप्रमाणे आकार दिसेनासा झाला की जगाचें जगपणच राहत नाही. पण ज्या वस्तूचे ठिकाणीं हें जग असते, ती वस्तु मात्र जशीच्या तशीच म्हणजे अविकारी असते. ॥ १७१ ॥

गूढार्थदीपिका—जेथे जाहालें तें जैसें। तैसेंचि असें—जेव्हा जगताचीं नामरूपें दिसतात, तेव्हा ती जगताची व्यक्त दशा म्हटली जाते. जेव्हा जगताची नामरूपें दिसत नाहीत तेव्हा ती जगताची अव्यक्त दशा म्हटली जाते. जगताच्या ह्या दोन्ही दशा सत्तारूप परब्रह्माच्या ठिकाणीं भासतात असे "जेथें जाहालें" या पदाने सुचविलें असून, तीं सत्तारूप परब्रह्मावर भासतात तरी तें परब्रह्म मात्र अविकारीच असतें. जगताच्या व्यक्ताव्यक्त या दशेच्या रूपाने परिणाम पावत नाही. म्हणजे जगत् व जगताच्या व्यक्ताव्यक्त दशा परब्रह्माचे ठिकाणीं कल्पित आहेत, हा "जैसें। तैसेचि असें" या शब्दसमूहाचा भाव आहे.

तैं तया नांव सहज अव्यक्त। आणि आकारा ये तेंचि व्यक्त। हें एकास्तव एक सूचित। एऱ्हवीं दोनी नाहीं॥ १७२ ॥

अर्थ—त्या वस्तूला स्वाभाविकच अव्यक्त म्हणतात आणि आकाराला जें आलें त्याला व्यक्त म्हणतात, पण ही व्यक्त अव्यक्त भाषा एकमेकांच्या अपेक्षेने आहे. वास्तविक तेथें दोन्ही अवस्था नाहीत. ॥ १७२ ॥

गूढार्थदीपिका—तया नांव सहज अव्यक्त—जगद्भ्रमाला आधार असणारें परब्रह्माचें सत्तारूप निर्गुण स्वरूप नामरूपरहित असल्यामुळे तें अव्यक्त होत नाही, तर तें मूळचेंच अव्यक्त आहे व त्यावरच जगताच्या साम्यरूप अव्यक्तदशेचा भ्रम होतो असें "सहज अव्यक्त" या शब्दांनी सांगितलें आहे.

आकारा ये तेंचि व्यक्त—त्या सत्तारूप अव्यक्त स्वरूपाचे ठिकाणीं नामरूपें व्यक्त झालीं असतां, तें नामरूपाच्या सत्तारूपानेच नामरूपाशीं ऐक्य पावतें असें "आकारा ये तेंचि व्यक्त" या वचनाने माऊलींनी सांगितलें आहे.

जैसे आटलिया रूपें। आटलेपण ते खोटी म्हणिपे। पुढती तो घनाकारु हारपे। जे वेळीं अळंकार होती॥ १७३ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे अलंकारांची रूपें आटलीं गेलीं असतां त्या सर्वांचे आटणेंपणाला खोटी म्हणतात आणि नंतर जेव्हा तिचे अलंकार केले जातात तेव्हा, त्या खोटीचा आकार नाहिसा होऊन. अनेक अलंकार उत्पन्न होतात. ॥ १७३ ॥

हीं दोन्हीं जैशीं होणीं। एकीं साक्षीभूत सुवर्णी। तैसी व्यक्ताव्यक्ताची कडसणी। वस्तूच्या ठायीं॥ १७४ ॥

तें तरी व्यक्त ना अव्यक्त। नित्य ना नाशवंत। या दोहीं भावां अतीत। अनादिसिद्ध॥ १७५ ॥

जें हें विश्वचि होऊनि असे। परि विश्वपण नासिलेनि न नासे। अक्षरें पुसिल्या न पुसे। अर्थु जैसा॥ १७६ ॥

अर्थ—पण लगड किंवा अलंकार हे दोन्ही भाव ज्याप्रमाणें केवळ आधारभूत सोन्याचे ठिकाणी भासतात, त्याप्रमाणे जगताच्या व्यक्ताव्यक्तत्वाचा विचार, आधार असलेल्या सत्तारूप परब्रह्मवस्तूच्या ठिकाणीं होतो. ॥ १७४ ॥ वास्तविक ती सनातन ब्रह्मवस्तु व्यक्त होत नाही किंवा अव्यक्त होत नाही, नित्य नाही किंवा नाशिवंत नाही; या दोन्ही भावांहून निराळी, अशी ती अनादि व सिद्ध वस्तु आहे. ॥ १७५ ॥ ज्याप्रमाणे शब्दाचा अर्थ समजल्यावर शब्द पुसून टाकला तरी, अर्थ पुसला जात नाही, त्याप्रमाणे जगत् नाहिसे झाले असतां म्हणजे अव्यक्त झालें असतां—तें नाश पावत नाही—म्हणजे त्या जगताच्या अव्यक्त दशेलाहि परब्रह्म सत्तारूपाने आधार असतें. ॥ १७६ ॥

पाहें पां तरंग तरी होत जात। परि तेथ उदक तें अखंड असत। तेवीं भूतभावीं नाशिवंत। अविनाश जें॥ १७७ ॥

नातरी आटतिये अळंकारीं। नाटतें कनक असे जयापरी। तेवीं मरतिये जीवाकारीं। अमर जें आहे॥ १७८ ॥

अर्थ—हें पहा, अर्जुना! पाण्यावर तरंग उत्पन्न होतात, पण पाणी मात्र उत्पन्न होत नाही किंवा नाश पावत नाही. ते अखंड असतें. तसेंच भूतसृष्टि नाहिशी झाली, तरी जें नाश पावत नाही, अखंड असतें. ॥१७७॥ किंवा आटल्या जाणाऱ्या अलंकारांत जसें न आटलें जाणारें सोनें असतें, त्याप्रमाणे जीवाच्या नाशिवंत आकारात जें अविनाशी राहतें. ॥ १७८ ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्मवस्तु अखंड अनादिसिद्ध असल्यामुळे तिचे व्यक्त किंवा अव्यक्तभाव किंवा उत्पत्ति-नाश सिद्ध होत नाहीत. पण त्याचे ठिकाणीं भासणाऱ्या जगताचे व्यक्त किंवा अव्यक्त भाव किंवा उत्पत्ति-नाश हे प्रत्ययाला येतात. याचें कारण असें आहे की ज्याप्रमाणे तरंग ही पाणी वस्तु आहे हें विसरून, तरंग ही पाण्याहून निराळी वस्तु आहे, अशी समजूत असली तरच, तरंगाचे व्यक्ताव्यक्त भाव किंवा उत्पत्ति-नाश दिसत असतात; त्याप्रमाणे परब्रह्माचे ठिकाणीं भासणारें जगत् परब्रह्माहून निराळी वस्तु आहे अशी अज्ञानाने जीवाची भ्रांत समजूत झाली असल्यामुळे, जीवाला जगताचें व्यक्ताव्यक्तभाव किंवा उत्पत्ति-नाश प्रत्ययाला येतात.

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् । यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ २१ ॥
पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया । यस्यान्तःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥ २२ ॥

अर्थ—ज्याला अव्यक्त अक्षर असें म्हटले आहे, तीच माझी परमगति होय. तीच माझी स्वरूपस्थिति असून तिला प्राप्त झाले असतां, पुरुष पुनः संसारात येत नाहीत. ॥ २१ ॥ अर्जुना! ज्या ह्या प्रकृतीच्या पलीकडे असणाऱ्या अक्षर पुरुषाचें ठिकाणीं हीं सर्व भूतें भासतात व जो ह्या सर्व भूतसृष्टींत भरून आहे तो परम पुरुष, माझ्या अनन्य भक्तीनेच प्राप्त होऊं शकतो. ॥ २२ ॥

जयातें अव्यक्त म्हणों ये कोडें। म्हणतां स्तुति हे ऐसें नावडे। जें मना बुद्धि न सांपडे। म्हणऊनियां ॥ १७९ ॥
आणि आकारा आलिया जयाचें। निराकारपण न वचे। आकारलोपें न विसंचे। नित्यता गा ॥ १८० ॥
म्हणोनि अक्षर जें म्हणिजे। तेवींचि म्हणतां बोधुही उपजे। जयापरौता पैसु न देखिजे। या नाम परमगती ॥ १८१ ॥
पै आघवा इहीं देहपुरीं॥ आहे निजेलियाचे परी। जे व्यापारु करवी ना करी। म्हणऊनियां ॥ १८२ ॥
एऱ्हवीं जे शारीरचेष्टा। त्यांमाजीं एकही न ठके गा सुभटा। दाहीं इंद्रियांचिया वाटा। वाहतचि आहाती ॥ १८३ ॥
उकलूंनि विषयांचा पेठा। होत मनाचां चोहटां। तो सुखदुःखाचा राजवांटा। भितराहि पावे ॥ १८४ ॥
परि रावो पहुडलिया सुखें। जैसा देशींचा व्यापारु न ठके। प्रजा आपुलालेनि अभिलाखें। करितचि असती ॥ १८५ ॥
तैसें बुद्धीचें हन जाणणें। कां मनाचे घेणें देणें। इंद्रियांचें करणें। स्फुरण वायूचें ॥ १८६ ॥
हे देहक्रिया आघवी। न करवितां होय बरवी। जैसा न चलवितेनि रवी। लोकु चाले ॥ १८७ ॥

अर्थ—अक्षर परब्रह्म मनबुद्धीने जाणलें जाऊं शकत नाही, म्हणूनच त्याला कौतुकाने जें अव्यक्त म्हटलें जातें, ती त्याची स्तुति नव्हे. ॥ १७९ ॥ आणि जें साकार स्वरूप झालें तरी त्याचें निराकारपण यत्किंचित्हि कमी होत नाही. तसेंच आकार नाहिसा झाला तरी ज्याची नित्यता कधी जात नाही. ॥ १८० ॥ म्हणूनच त्याला अक्षर म्हणतात व तसेंच त्याने त्याचें ज्ञानहि होतें. ज्याच्या पलीकडे कांहीच नाही, म्हणूनच त्याला परमगति म्हणतात. ॥ १८१ ॥ या सर्व शरीरामध्ये जें व्यापार करीत नाही किंवा करवीत नाही, म्हणून निजल्यासारखे आहे. ॥ १८२ ॥ आणि पाहूं गेलें तर देहाच्या जेवढ्या क्रिया होतात, त्यापैकी एकहि त्याच्या सान्निध्यामुळे बंद पडत नाही. दहाहि इंद्रियांचे व्यापाररूपी मार्ग सारखें वाहतच असतात. ॥ १८३ ॥ विषयांचा बाजार मांडला जाऊन, मन त्या बाजारांतील चावडी होते. त्यामुळे राजाचा हिस्सा राजाला मिळावा, त्याप्रमाणे तेथील सुखदुःखाचा वांटा आंत मनाला मिळतो. ॥ १८४॥ पण राजा सुखाने झोंपला असतांहि, ज्याप्रमाणे शहरांतील व्यापार बंद पडत नाहीत, प्रजा आपआपल्या इच्छेप्रमाणे व्यापार करीतच असतात. ॥ १८५ ॥ त्याप्रमाणे बुद्धीचा जाणणें हा व्यापार, किंवा मनाचे त्याग-स्वीकार हे व्यापार, इंद्रियांचा क्रिया हा व्यापार, स्फुरणें हा वायूचा व्यापार ॥ १८६ ॥ ह्या संपूर्ण क्रिया देहाचे ठिकाणीं, ज्याप्रमाणे सूर्य लोकांना चालवीत नाही पण लोक चालतात, त्याप्रमाणे पुरुषाकडून न करविल्या जातां, होत असतात. ॥ १८७ ॥

गूढार्थदीपिका—अद्वैत परब्रह्माचे ठिकाणीं त्याहून दुसरें कांहीच नाही व तें केवळ चैतन्यस्वरूप असल्यामुळे कांही व्यापार करीत नाही व करवित नाही. आपल्या आत्मस्वरूपाचें ज्ञान नसल्यामुळे जीवाला शरीरादिकांचा व त्यांच्या व्यापारांचा व त्यापासून होणाऱ्या सुखदु:खभोगांचा, जो अनुभव येतो तो सर्व भ्रांतीने येतो, असें वरील ओव्यांचें तात्पर्य आहे व श्रीज्ञानेश्वर माऊलींनी पांचव्या अध्यायांतील श्लोक १४ व १५ यावर टीका करतांना हें स्पष्टहि केले आहे.

अर्जुना तयापरी। सुतला ऐसा आहे शरीरीं। म्हणोनि पुरुषु गा अवधारीं। म्हणिपे जयातें॥ १८८॥
आणि प्रकृति पतिव्रते। पडिला एकपत्नीव्रतें। येणेंही कारणें जयातें। पुरुषु म्हणों ये॥ १८९॥
पैं वेदांचें बहुवसपण। देखेचिना जयाचें आंगण। हें गगनाचें पांघरूण। होय देखा॥ १९०॥
ऐसें जाणूनि योगीश्वर। जयातें म्हणती परात्पर। जें अनन्यगतीचें घर। गिंवसीत ये॥ १९१॥
जे तनुवाचाचित्तें। नाइकती दुजिये गोष्टीतें। तयां एकनिष्ठेचें पिकतें। सुक्षेत्र जें॥ १९२॥

अर्थ—अर्जुना! याप्रमाणे हा अक्षर पुरुष या देहाचे ठिकाणीं निजल्यासारखा आहे; म्हणून याला पुरुष असें म्हणतात. (पुरि शयनात् पुरुषत:) ॥ १८८॥ आणखी याला पुरुष म्हणण्याचें दुसरें कारण असेंहि आहे की, प्रकृति अत्यंत पतिव्रता आहे. ती या अक्षर स्वरूपाला सोडून क्षणभरहि स्वतंत्र राहत नाही, म्हणून त्या प्रकृतिपतिव्रतेशीं हाहि एकपत्नीव्रताने राहतो. म्हणूनहि त्याला पुरुष म्हणतात (उत्तम पुरुष एकपत्नीव्रतच असतो)॥ १८९॥ हा अक्षर पुरुष गगनाचें पांघरूण-म्हणजे आकाशापेक्षांहि सूक्ष्म व व्यापक असल्यामुळे वेदाने प्रतिपादिलेल्या कर्म, देवता, कर्मांची फळें म्हणून सांगितलेले लोकालोक इत्यादि विषयांचें अनेकत्व त्याच्या अद्वितीय व्यापकतेत राहूं शकत नाही. ॥ १९०॥ असें जाणून, श्रेष्ठ योगीजन, ज्या अक्षर पुरुषाला परात्पर म्हणतात आणि जो आपल्या अनन्य भक्ताच्या घराचा शोध करीत येतो. ॥ १९१॥ जे कोणी कायावाचामनाने एका अक्षर पुरुषावांचून दुसरी गोष्टच ऐकत नाहीत, अशा एकनिष्ठ पुरुषाच्या एकनिष्ठेचें उत्तम पीक देणारें, हा अक्षर पुरुष शेतच होय. ॥ १९२॥

गूढार्थदीपिका—जो अक्षर पुरुष एकनिष्ठ भक्तालाच प्राप्त होतो, असा अर्थ.

हें त्रैलोक्यचि पुरुषोत्तमु। ऐसा साचु जयांचा मनोधर्मु। तयां आस्तिकांचा आश्रमु। पांडवा गा॥ १९३॥

अर्थ—हें संपूर्ण त्रैलोक्य सच्चिदानंद भगवद्रूपच आहे, असा ज्याच्या मनाचा पक्का निश्चय झाला, त्या आस्तिक पुरुषाचा, अर्जुना! हा अक्षर पुरुष म्हणजे राहण्याचा आश्रय आहे. ॥ १९३॥

गूढार्थदीपिका—संपूर्ण त्रैलोक्य भगवंताहून निराळे नाही, भगवद्रूपच आहे असा आस्तिकांचा अनुभव असतो असा अर्थ.

जें निगर्वाचें गौरव। जें निर्गुणाची जाणिव। जें सुखाची राणिव। निराशांसी॥ १९४॥

अर्थ—जो निरभिमान्यांचें थोरपण आहे, जो निर्गुणस्वरूप झालेल्या पुरुषाची केवळ जाणीव आहे व जो अक्षर पुरुष, विषयसुखाविषयीं निरीच्छ झालेल्या पुरुषाचें, परमसुखाचें राज्य होय. ॥ १९४॥

गूढार्थदीपिका—निगर्वाचें गौरव—म्हणजे अत्यंत निरभिमानी पुरुषालाच जो अत्यंत श्रेष्ठ पुरुष वाटतो.

जे निर्गुणाची जाणीव—त्रिगुणातीत झाल्यावरच ज्याचा अनुभव येतो.

सुखाची राणिव। निराशांसी—विषयवासनारहित झालेल्या पुरुषांनाच, हा अक्षर पुरुष अपरिमित सुखाचें स्थान आहे, असा अनुभव येतो.

जें संतोषियां वाढिलें ताट। जें अचिंतां अनाथांचें मायपोट। भक्तीसी उजू वाट। जया गांवा॥ १९५॥

अर्थ—जें अखंड संतुष्ट राहणाऱ्या पुरुषापुढे वाढलेलें ताट आहे, संसाराची चिंता सोडून निश्चिंत झालेल्यांना व परमेश्वरावांचून ज्यांना दुसरा स्वामी नाही अशांना, जो अक्षर पुरुष आईप्रमाणे पोटाशीं घेणारा आहे आणि ज्या अक्षरपुरुषरूप गांवाला जाण्याकरिता भक्ति हाच सरळ मार्ग आहे. ॥ १९५॥

गूढार्थदीपिका—संतोषियां वाढिलें ताट—म्हणजे प्रारब्धाने प्राप्त होणाऱ्या सुखदु:खाचा हर्षविषाद न मानतां

चित्तात अखंड समाधान ठेवणाऱ्या पुरूषांनाच, समोर वाढलेल्या ताटाप्रमाणेच, ज्याची सुलभ प्राप्ति होते.

हें एकैक सांगोनि वाया। काय फार करूं धनंजया। पैं गेलिया जया ठाया। तो ठावोचि होइजे॥ १९६॥

हिंवाचिया झुळुका। जैसें हिंवचि पडे उष्णोदका। कां समोर जालिया अर्का। तमचि प्रकाशु होय॥ १९७॥

तैसा संसारु जया गांवा। गेला सांता पांडवा। होऊनि ठाके आघवा। मोक्षाचाचि॥ १९८॥

अर्थ—हें याप्रमाणे एक एक गुणाचें वर्णन करून, अर्जुना! किती विस्तार करायचा? ज्या ठिकाणाला गेलें असतां, जाणाराच ठिकाण होऊन जातो. ॥ १९६॥ ज्याप्रमाणे थंड वाऱ्याच्या झुळुकांनी जसें ऊन पाणी थंड होतें किंवा अंधार सूर्याच्या समोर आला की ज्याप्रमाणे तोहि प्रकाश होऊन जातो. ॥ १९७॥ त्याप्रमाणे ज्या गांवाला गेलें असतां अर्जुना! संपूर्ण संसारच मोक्षरूप होऊन जातो॥ १९८॥

गूढार्थदीपिका—ज्याला आपण संसार, जीव, सुख, दु:ख, इत्यादि म्हणतो, तो सर्व मूळांत सच्चिदानंद परब्रह्म आहे. त्याचे ठिकाणीं अज्ञानाने सच्चिदानंद परब्रह्माहून भिन्न वस्तुत्वाची व भिन्न धर्माची कल्पना केली जाते व ती कल्पना आहे तोपर्यंत त्यांचा तसा अनुभव येतो. सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपाच्या विचाराने भिन्न वस्तुत्वाची व भिन्न धर्माची कल्पना नाहिशी झाल्यावर, सर्व नामरूपात्मक संसार पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे, असा अनुभव येतो. हेंच संसाराचे मोक्षरूप होणें होय.

तरि अग्नीमाजीं आलें। जैसें इंधनचि अग्नि जाहालें। पाठीं न निवडेचि कांहीं केलें। काष्ठपण॥ १९९॥

नातरी साखरेचा माधौता। बुद्धिमंतपणेंही करितां। परि ऊंस नव्हे पंडुसुता। जियापरी॥ २००॥

लोहाचें कनक जहालें। हें एकें परिसें केलें। आतां आणिक कैंचें तें गेलें। लोहत्व आणी॥ २०१॥

म्हणोनि तूप होऊनि माघौतें। जेवीं दुधपणा न येचि निरुतें। तेविं पावोनियां जयातें। पुनरावृत्ति नाहीं॥ २०२॥

अर्थ—जशीं लाकडें अग्नींत घातलीं की अग्निस्वरूप होऊन जातात; नंतर अग्नीपासून त्यांचें लांकूडपण अलग राहत नाही. ॥ १९९॥ किंवा मोठाहि बुद्धिमान झाला, तरी ज्याप्रमाणे एकदां ऊंसाची साखर झाल्यानंतर पुन: त्या साखरेचा ऊंस तो करूं शकत नाही. ॥ २००॥ एका परिसाच्या योगानेच लोखंडाचें सोनें झालें. आतां ते गेलेले लोखंडपण, आणिक म्हणजे पुन: परत कसें आणणार?॥ २०१॥ म्हणून ज्याप्रमाणे दूधाचे तूप होऊन गेल्यावर त्या तुपाला पुन: दूध निश्चयाने करता येत नाही. त्याप्रमाणे, ज्या अक्षर पुरुषाला प्राप्त झाले असता, पुन: जन्ममरणरूपी संसार प्राप्त होत नाही. ॥ २०२॥

गूढार्थदीपिका—धर्माधर्माचें फळ जें सुखदु:ख तें ज्या शरीराचें ठिकाणीं भोगलें जातें, त्या शरीराची प्राप्ति न होणें याला मोक्ष म्हणतात. हा मोक्ष अविद्यादोषरहित सच्चिदानंद परमेश्वराच्या प्राप्तीने होतो आणि सच्चिदानंद परब्रह्म नित्यसिद्ध व जीवाचें मूळ स्वरूपच असल्यामुळे 'तस्य स्वाभाविकत्वात्' ज्याला ब्रह्मप्राप्तिरूप मोक्ष स्वाभाविक आहे, म्हणून नित्य आहे. "नित्यश्च मोक्ष: सर्वैर्मोक्षवादिभिरभ्युपगम्यते।" (ब्रह्मसूत्र १-१-४), सर्व दर्शनकारांनी मुक्ति नित्य मानली आहे, असें ब्रह्मसूत्रभाष्यांत आचार्य म्हणतात व माऊलींनी हेंच येथें सांगितलें आहे. मोक्ष किंवा परमेश्वरप्राप्ति नित्य आहे, त्या म्हणण्याचा अर्थ असा आहे का, सर्व कर्माचें फळ नाशिवंत आहे, असें सांगितले असल्यामुळे, मोक्ष हा कर्माचें फळ नव्हे आणि मोक्ष किंवा परमेश्वरप्राप्ति एकदां झाली म्हणजे पुन: ती नाहिशीं होते, त्याची (परमेश्वराची) विस्मृति होते व हा संसार प्राप्त होतो किंवा जीवदशा उत्पन्न होते, असें नाही, कारण जीवदशेचा आरंभ होतो, हें सिद्ध करतां येत नाही; पण ती परमेश्वरप्राप्तीने नाहिशी होणारी व पुन: उत्पन्न न होणारी आहे, असा वेदान्ताचा सिद्धान्त आहे.

तें माझें परम। साचोकारें निजधाम। हें आंतुवट तुज वर्म। दाविजत असे॥ २०३॥

अर्थ—अर्जुना! हेंच माझे खरोखर अविनाशी प्राप्तव्य स्वरूप होय. हें मी माझ्या अंत:करणांतील गुह्य तुला दाखवीत आहे. ॥ २०३॥

यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिन:। प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ॥ २३॥

अर्थ—अर्जुना! ज्याकाळीं योगीलोक देह सोडून गेले असतां पुन: संसारात जन्म घेत नाहीत व ज्या काळी देह सोडून गेले असतां पुन: जन्म घेतात तो काळ मी तुला सांगतों, ऐक. ॥ २३ ॥

तेवींचि आणिकेंही एकें प्रकारें। हें जाणतां आहे सोपारें। तरि देह सांडितेनि अवसरें। जेथै मिळती योगी॥ २०४॥
अथवा अवचटें ऐसें घडे। जे अनवसरें देह सांडे। तरि माघौतें येणें घडे। देहासीचि॥ २०५॥
म्हणोनि काळशुद्धी जरी देह ठेविती। तरी ठेवितखेवीं ब्रह्मचि होती। एऱ्हवीं अकाळीं तरी येती। संसारा पुढती॥ २०६॥
तैसें सायुज्य आणि पुनरावृत्ती। ये दोन्ही अवसराआधीन आहाती। तो अवसरु तुजप्रती। प्रसंगें सांगों॥ २०७॥
तरि ऐकें गा सुभटा। पातलिया मरणाचा माजिवटा। पांचै आपुलालिया वाटा। निघती अंतीं॥ २०८॥
ऐसा वरिपडिला प्रयाणकाळीं। बुद्धीतें भ्रमु न गिळी। स्मृति नव्हे आंधळी। न मरे मन॥ २०९॥
हा चेतनावर्गु आघवा। मरणीं असे टवटवा। परि अनुभविलिया ब्रह्मभावा। गंवसणी होऊनि॥ २१०॥
ऐसा सावध हा समवावो। आणि निर्वाणवेऱ्हीं निर्वाहो। हें तरीच घडे जरी सावावो। अग्नीचा आथी॥ २११॥
पाहा पां वारेन कां उदकें। जैं दिवियाचें दिवेपण झांके। तैं असतीच काय देखे। दिठी आपुली॥ २१२॥
तैसें देहांतींचेनि विषमवातें। देह आंत बाहेरि श्लेष्मा आते। तैं विझोनि जाय उजितें। अग्नीचें जेव्हां॥ २१३॥
ते वेळीं प्राणासीचि प्राणु नाहीं। तेथ बुद्धि असोनि करील काई। म्हणोनि अग्नीविण देहीं। चेतना न थारे॥ २१४॥
अगा देहींचा अग्नि जरी गेला। तरी देह नव्हे चिखलु वोला। वायां आयुष्यवेळु आपुला। आंधारां गिंवसी॥ २१५॥
आणि मागील स्मरण आघवें। तें तेणें अवसरे सांभाळावें। मग देह त्यजुनि मिळावें। स्वरूपीं कीं॥ २१६॥
तंव तया देहश्लेष्माचे चिखलीं। चेतनाचि बुडोनि गेली। तेथ मागिली पुढिली ही ठेली। आठवण सहजें॥ २१७॥
म्हणोनि आदीचि अभ्यासु जो केला। तो मरण न येतांचि निमोनि गेला। जैसें ठेवणें न दिसतां मालवला। दीपु हातींचा॥ २१८॥
आतां असो हें सकळ। जाण पां ज्ञानासि अग्नि मूळ। तया अग्नीचें प्रयाणीं बळ। संपूर्ण आथी॥ २१९॥

अर्थ—त्याचप्रमाणे माझें परमधाम कोणतें, हें अणिक एका प्रकाराने जाणतां येणें सोपें आहे. मरणसमयीं देह सोडल्यावर शेवटीं जेथे योगी मिळतात, तें माझें परमधाम होय. ॥ २०४॥ किंवा अकस्मात् असेंहि घडून येतें, की अकाळीच देह सोडला जातो व मग पुन: त्याला पुनर्जन्म घ्यावा लागतो. ॥ २०५ ॥ म्हणून शास्त्राने माझा प्राप्तिकाल जो सांगितला आहे, तो काळ पाहून योगी देहाचा त्याग करतील, तर देह सुटल्याबरोबर ते ब्रह्मरूपच होतात. नाही तर अकाळीं देह सोडला असतां, पुन: त्यांना संसारात यावें लागतें. ॥ २०६ ॥ त्याप्रमाणे ब्रह्मस्वरूप होणें व संसारात येणें, अशा या दोन्हीहि गती कालाच्या स्वाधीन आहेत. तोच प्रत्येक गतीचा काल कोणता, हें तुला या प्रसंगाने सांगतो. ॥ २०७ ॥ हे थोर योद्धया, अर्जुना! इकडे लक्ष दे. मरणकाळाची मूर्च्छा प्राप्त झाली असतां देहांत असलेलीं हीं पंचमहाभूतें शेवटीं आपल्या वाटेने-म्हणजे बाहेरच्या आपआपल्या भूतात मिळण्याकरितां-निघतात. ॥ २०८ ॥ अशारीतीने मरणकाळ येऊन पडला असतां, बुद्धि भ्रमाने गिळली गेली नाही—म्हणजे बुद्धीला भ्रम झाला नाही, स्मरणशक्ति ही आंधळी झाली नाही—म्हणजे स्मरणशक्ति उत्तम राहिली-व मन मेलें नाही—म्हणजे मन सावध आहे. ॥ २०९ ॥ याप्रमाणे सर्व चेतनतत्त्वें मरणाचे वेळीं टवटवीत-म्हणजे आपआपलीं कार्यें करण्यास समर्थ असतात, पण जर आपलें अंत:करण ब्रह्मभावाला गंवसणी होऊन ब्रह्मभावाचा अनुभव आला असेल, तरच हें घडणें शक्य आहे. ॥ २१० ॥ असा हा तत्त्वांचा समुदाय सावध असणें व मरेपर्यंत त्यांचा सावधपणा टिकून राहणें, हें अग्नीचें साह्य असलें तरच घडणें शक्य आहे. ॥ २११ ॥ अर्जुना! पहा, वाऱ्याने किंवा पाण्याने दिव्याचा प्रकाश विझला असतां, आपली दृष्टी जरी असली तरी दृष्टीला दिसते का? ॥ २१२ ॥ त्याप्रमाणे मरणाचे वेळीं त्रिदोषांच्या प्रकोपाने, देहाचे आंत व बाहेर, कफ व्यापतो, तेव्हा अग्नीचें तेज नाहीसें होतें. ॥ २१३ ॥ तेव्हा प्राणाचे ठिकाणीं जेथे प्राणशक्ति राहत नाही, तेथे बुद्धि असून ती काय करणार आहे? म्हणून अग्नीच्या बळावांचून—म्हणजे उष्णतेवांचून, देहामध्ये चैतन्यशक्ति राहूं शकत नाही. ॥ २१४ ॥ अर्जुना! देहांतील अग्नि म्हणजे उष्णता एकदा नाहिशी झाली की मग तो देह राहत नाही. तो देह म्हणजे ओला चिखल होय. त्या अंधारांत आयुष्य आपली संपायची वेळ पाहत

राहतें. ॥ २१५ ॥ आणि मागे प्राप्त करून घेतलेले ब्रह्मभावाचें स्मरण, त्यावेळी सांभाळलें गेलें, तरच देह टाकल्याबरोबर योगी ब्रह्मस्वरूपांत मिळतो. ॥ २१६ ॥ पण त्यावेळीं तर, देहाच्या आंतबाहेर व्यापलेल्या कफाच्या चिखलामध्ये चेतनाच बुडून गेली असल्यामुळे, मागील पुढील कांहीच आठवण राहत नाही. ॥ २१७ ॥ ज्याप्रमाणे ठेवलेली वस्तु दिव्याने शोधत असतां, ती सांपडण्यापूर्वीच हातांतील दिवा विझावा, त्याप्रमाणे अगोदर जो अभ्यास केलेला असतो, तो देह पडण्यापूर्वीच विसरला जातो. ॥ २१८ ॥ अर्जुना! हें निरूपण असूं दे. एवढे लक्षांत ठेव की मरतेवेळीं ब्रह्मज्ञानाचें स्मरण राहण्याकरिता, मुख्य अग्नी किंवा उष्णता कारण आहे. शरीरात अग्नीची उष्णता असली तर मरतेवेळीं त्या अग्नीचें संपूर्ण शरीराला किंवा शरीरांतील बुद्ध्यादी तत्त्वांना सामर्थ्य मिळतें. ॥ २१९ ॥

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् । तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ २४ ॥

अर्थ—आंत अग्नि व ज्योतीचा प्रकाश, बाहेर दिवस, शुक्लपक्ष, उत्तरायणांतील कोणता तरी महिना, असा उत्तरायण असतांना, ब्रह्माचा अनुभव घेतलेला योगी मरण पावला असतां, ब्रह्मस्वरूपाला प्राप्त होतो. ॥ २४ ॥

आंत अग्निज्योतीचा प्रकाशु । बाहेरी शुक्लपक्षु आणि दिवसु । आणि सामासांमाजीं मासु । उत्तरायण ॥ २२० ॥
ऐशिया समयोगाची निरुती । लाहोनि जे देह ठेविती । ते ब्रह्मचि होती । ब्रह्मविद ॥ २२१ ॥
अवधारीं गा धनुर्धरा । येथवरी सामर्थ्य यया अवसरा । तेवींचि हा उजू मार्ग स्वपुरा । यावयासी ॥ २२२ ॥
एथ अग्नी हें पहिलें पायतरें । ज्योतिर्मय हें दुसरें । दिवस जाणें तिसरें । चौथें शुक्लपक्ष ॥ २२३ ॥
आणि सामास उत्तरायण । तें वरचील गा सोपान । येणें सायुज्यसिद्धिसदन । पावती योगी ॥ २२४ ॥
हा उत्तम काळु जाणिजे । यातें अर्चिरादि मार्गु म्हणिजे । आतां अकाळु तोही सहजें । सांगेन आईक ॥ २२५ ॥

अर्थ—देहाचे आंत-अग्नि व जीवज्योतीचा प्रकाश असून; बाहेर-शुक्लपक्ष, दिवस व उत्तरायणांतील एखादा महिना. ॥ २२० ॥ अशा सर्व योगांची प्राप्ति असून जे ब्रह्मोपासक देह ठेवतात, ते शेवटीं ब्रह्मच होतात. ॥ २२१ ॥ अर्जुना! वर सांगितलेल्या गोष्टी एकत्र प्राप्त झाल्या आहेत अशा या काळाला एवढें सामर्थ्य आहे हें लक्षांत ठेव. त्याचप्रमाणे आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाला प्राप्त होण्याकरिता हा मार्गहि सरळ आहे. ॥ २२२ ॥ या मार्गात अग्नि ही पहिली पायरी होय. तेज किंवा प्रकाश ही दुसरी पायरी आहे. दिवस ही तिसरी आणि शुक्लपक्ष ही चवथी पायरी होय. ॥ २२३ ॥ आणि उत्तरायणाचे सहा महिने ही वरची पायरी होय, असें समज. या मार्गाने योगी मोक्ष-सिद्धिरूप घराला प्राप्त करून घेतात. ॥ २२४ ॥ अर्जुना! हा काळ प्रयाणाला उत्तम असून याला अर्चिरादि मार्ग म्हणतात. आतां, अयोग्य काळ कोणता तो सांगतों ऐक. ॥ २२५ ॥

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् । तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥ २५ ॥

अर्थ—ज्या मार्गात धूर, रात्र, कृष्णपक्ष, दक्षिणायनांतील सहा महिन्यांतील एखादा महिना आहे. अशा मार्गाने गेलेला कर्मयोगी चंद्रलोकाला प्राप्त होऊन, पुनः संसारांत येतो. ॥ २५ ॥

तरि प्रयाणाचेनि अवसरें । वातुश्लेष्मु सुभरे । तेणें अंतःकरणीं आंधारें । कोंदलें ठाके ॥ २२६ ॥
सर्वेंद्रियां लाकुड पडे । स्मृति भ्रमामाजीं बुडे । मन होय वेडें । कोंडे प्राण ॥ २२७ ॥
अग्नीचें अग्निपण जाये । मग तो धूमचि अवघा होये । तेणें चेतना गिंवसिली ठाये । शरीरींची ॥ २२८ ॥
जैसें चंद्राआड आभाळ । सदट दाटे सजळ । मग गडद ना उजाळ । ऐसें झांवळें होय ॥ २२९ ॥
कां मरे ना सावध । ऐसें जीवितासि पडे स्तब्ध । आयुष्य मरणाची मर्याद । वेळु ठाकी ॥ २३० ॥
ऐसी मनबुद्धिकरणीं । सभोंवतीं धूमाकुळाची कोंडणी । तेथ जन्में जोडलिये वाहणीं । युगचि बुडे ॥ २३१ ॥
हां गा हातींचे जे वेळीं जाये । ते वेळीं आणिका लाभाची गोठी कें आहे । म्हणऊनि प्रयाणीं तंव होये । येतुली दशा ॥ २३२ ॥
आणि देहाआंतु ऐसी स्थिती । बाहेरी कृष्णपक्षु वरि राती । आणि सामासही ते वोडवती । दक्षिणायन ॥ २३३ ॥
इये पुनरावृत्तीचीं घराणीं । आघवीं एकवटती जयाचिया प्रयाणीं । तो स्वरूपसिद्धीची काहाणी । कैसेनि आइके ॥ २३४ ॥
ऐसा जयाचा देह पडे । तया योगी म्हणोनि चंद्रवरी जाणें घडे । मग तेथूनि मागुता बहुडे । संसारा ये ॥ २३५ ॥

आम्हीं अकाळु जो पांडवा। म्हणितला तो हा जाणावा। आणि हाचि धूम्रमार्गु गांवा। पुनरावृत्तीचिया॥ २३६॥
येर तो अर्चिरादि मार्गु। तो वसता आणि असलगु। साविया स्वस्त चांगु। निवृत्तीवरी॥ २३७॥

अर्थ—मरणसमयीं वातकफाच्या वृद्धीमुळे अंत:करणांत अंधारच अंधार होऊन राहतो. ॥ २२६ ॥ सर्व इंद्रिये लांकडासारखी व्यापाररहित होतात, स्मृति भ्रमांत बुडून जाते, मनाला कांही कळेनासें होते व प्राण कोंडला जातो. ॥ २२७॥ अग्नी विझून जातो, मग सर्व धूरच होतो. त्यामुळे त्या धुरांत शरीरांतील चेतना सांपडली जाते. ॥ २२८ ॥ ज्याप्रमाणे चंद्राचे आड भरगच्च व पाण्याने भरलेली अभ्रें आलीं असतां, अगदी अंधार नाही तर उजेडहि नाही, असें झुंजुक होऊन जाते. ॥ २२९ ॥ त्याप्रमाणे मेला नाही किंवा सावधहि नाही, अशी जीविताची स्तब्ध दशा होते आणि आयुष्य मरणाच्या मर्यादारूप वेळेवर येऊन राहते. ॥ २३० ॥ अशी मन, बुद्धि, इंद्रिये यांची स्थिति असते. सभोंवार संपूर्ण धूर कोंडलेला असतो. अशा स्थितींत, जन्मभर जो अभ्यास केला, तो सर्वस्वीं वायां जातो. ॥ २३१ ॥ अर्जुना! ज्यावेळीं हातीं आलेलें नाहिसें होते, त्या वेळीं अधिक लाभ होणें दूरच राहिले; म्हणून मरणाचे वेळीं अशी स्थिति होते. ॥ २३२ ॥ अशी देहाचे आंत स्थिति होते व बाहेर कृष्णपक्ष असून, त्यांतहि रात्र आहे आणि सहा महिन्यांचें दक्षिणायन आहे. ॥ २३३ ॥ हीं सर्व पुन्हा जन्माला घालणारीं कुळें, ज्याच्या मरणकाळीं एकत्र होतात, तो आत्मस्वरूपाच्या प्राप्तीची वार्ता कशी ऐकणार?॥ २३४ ॥ अशा समयीं ज्याचा देह पडतो, तो योगी म्हणून चंद्रलोकापर्यंत जातो, पण मग तेथून पुन: माघारा फिरून संसारांत येतो. ॥ २३५ ॥ अर्जुना! मरण्याला अकाल किंवा अयोग्य काल म्हणून जो मी तुला सांगितला, तो हा होय आणि पुन: संसारांत टाकणारा हाच धूम्रमार्ग म्हटला जातो. ॥ २३६ ॥ बाकीचा अर्चिरादि मार्ग जो आहे, तो 'वसता' म्हणजे ज्या मार्गाने लोक जातात असा (किंवा अर्चिरादि मार्गाने ब्रह्मलोकांत जाऊन तेथे पुष्कळ काळ राहण्याजोगा म्हणून तो वसता मार्ग होय) व पुनरावृत्तीच्या मार्गाहून स्वतंत्र आहे. तो स्वस्थ अंत:करणाने जाण्याजोगा असा खरोखर चांगला आहे. ॥ २३७ ॥

गूढार्थदीपिका—प्रथम सूर्यादिलोकांत भोग भोगून, नंतर ब्रह्मलोकांत जाणें, ह्याला अर्चिरादि मार्ग म्हणतात आणि अशा रीतीने ब्रह्मलोकांत गेल्यावर शुद्ध ब्रह्माचें ज्ञान होऊन महाप्रलयांत ब्रह्मदेवाबरोबर मुक्त होणें, याला क्रममुक्ति म्हणतात.

येथे अर्चिरादि मार्गाने जाणारा व धूम्रमार्गाने चंद्रलोकाला जाऊन परत पुनर्जन्माला येणारा, अशा दोघांनाहि 'योगी' म्हणून म्हटलें आहे.

'योग' या शब्दाचा अर्थ भगवंताच्या ठिकाणीं चित्त स्थिर करणे असा आहे, हें मागे आम्ही सांगितलेंच आहे. हा योग निरनिराळ्या साधनांनी साधू शकतो.

निर्गुण व सम अशा पूर्णब्रह्माचा, ज्ञानाने विचार करून, जे त्याचे अखंड अनुसंधान करतात, ते ज्ञानयोगी होत.

सगुण साकार रामकृष्णादि पूर्ण परब्रह्मस्वरूप भगवंताचे ठिकाणीं सर्वकर्मसमर्पणद्वारा व नामस्मरणादिद्वारा प्रेमाने चित्तवृत्ति स्थिर करून, जे भगवंताचे अखंड ध्यान करतात, ते भक्तियोगी होत. हे दोन प्रकारचे योगी (ज्ञानयोगी व भक्तियोगी) ज्ञानयोगी ज्ञानमार्गाने व भक्तियोगी भक्तिप्रेमाने-येथेच पूर्णब्रह्मस्वरूपाशीं ऐक्य पावतात व तद्रूप होतात. त्यांना अर्चिरादि मार्गाने जावें लागत नाही. किंवा त्यांना काळाची मुळीच अपेक्षा नाही; म्हणून या ठिकाणीं हे योगी अभिप्रेत नाहीत.

भक्तियोगी हे एकान्तभक्तीने कसे भगवत्स्वरूप होतात, याचें सविस्तर वर्णन पुढील नवव्या अध्यायांत करण्यांत देईल.

उपनिषदांतून कारणब्रह्म व कार्यब्रह्म असे ब्रह्माचे दोन प्रकार सांगितले आहेत. ज्या स्वरूपाला नित्यमुक्त, अमर्याद, सर्वज्ञ, सर्वशक्ति म्हटलें जातें तें कारणब्रह्म किंवा पूर्णब्रह्म होय.

जें हृदयदेशादिकांच्या उपाधीमुळे मर्यादित सगुण झालें आहे व ज्याचें सर्वज्ञत्वादि ऐश्वर्य मर्यादित सांगितलें आहे, अशा प्रादेशिक सगुण ब्रह्माला कार्यब्रह्म म्हणतात. अशी कार्यब्रह्माची उपासना श्रुतींत सांगितली आहे. ही

श्रौतउपासना करणारे जे योगी आहेत, त्यांनाहि काळाची अपेक्षा नाही. त्यांच्या उपासनाबलाने अर्चिरादि मार्गावरील अग्न्यादि अभिमानी देवता त्यांना ब्रह्मलोकांत नेतात, असा ब्रह्मसूत्रांत सिद्धान्त केला आहे. (ब्र. सू. ४-३-४).

ज्यांना ब्रह्मलोकांत जाण्याकरिता काळाची अपेक्षा आहे म्हणून वरील श्लोकांत सांगितले आहे, ते योगी म्हणजे सगुणाच्या भक्तीवांचून पातंजलक्रियायोग करणारे व तसेंच सांख्यशास्त्राप्रमाणे केवळ प्रकृतिपुरुषविवेक किंवा व्यतिरेक करणारे, असे स्मार्तयोगी होत (ब्र. सू. ४-२-२१).

खरोखर केवळ परमेश्वराची प्राप्ति व्हावी म्हणून निष्काम चिताने परमेश्वरप्रीत्यर्थ धर्माचरण करणाऱ्यांनाच कर्मयोगी ही संज्ञा दिली जाते; पण येथे चंद्रलोकात जाऊन परत मृत्युलोकांत येणारे जे लोक आहेत, त्यांनाहि येथे योगी म्हटलें आहे. याचे कारण हें आहे कीं, ते परमेश्वरैक्यरूप मुक्तीला प्राप्त करून घेण्याकरिता, विषयसुखाची आशा सोडून, निष्काम चित्ताने, परमेश्वरप्रीत्यर्थ धर्मानुष्ठान करणाऱ्या कर्मयोग्याप्रमाणे, या लोकांचें आचरण नसून, ते इहपरलोकांत विषयसुख प्राप्त होण्याकरिता तेवढ्यापुरते परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे धर्माचरण करतात, म्हणून या सामान्य अर्थाने यांना योगी म्हटलें आहे.

जें केवळ परमेश्वरप्रीत्यर्थ किंवा इहपरलोकांत विषयसुखभोगाकरिता परमेश्वराचे आज्ञेप्रमाणे धर्माचरण करीत नाहीत व इंद्रियांना वाटेल तसें स्वैर वागूं देतात; असे लोक सामान्ययोगी यांच्या वर्गांतहि येत नाहीत आणि ते चंद्रलोकांत जात नसून यमलोकांत जातात व तेथेच यमयातना भोगतात असा ब्रह्मसूत्रांत सिद्धान्त आहे (ब्र. सू. ३-१-१३). म्हणजे त्यांना सुखच मिळत नाही असा अर्थ.

शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते। एकया यात्यनावृत्तिमन्ययावर्तते पुनः ॥ २६ ॥

अर्थ—शुक्ल म्हणजे ज्ञानप्रकाशरूप व कृष्ण म्हणजे अज्ञान अंधःकाररूप, अशा ह्या दोन जगाच्या शाश्वत गती आहेत. पहिल्या गतीने पुरुष पुनः संसारांत येत नाही व दुसऱ्या गतीने मनुष्य संसारांत येतो. ॥ २६ ॥

ऐसिया अनादि या दोन्ही वाटा । एकी उजू एकी अव्हांटा । म्हणऊनि बुद्धिपूर्वक सुभटा । दाविलिया तुज ॥ २३८ ॥
कां जे मार्गामार्ग देखावे। साच लटिकें वोळखावें। हिताहित जाणावें। हिताचिलागीं ॥ २३९ ॥
पाहें पां नाव देखतां बरवी । कोणी आड घालीं काय अथावीं । कां सुपंथ जाणोनियां अडवीं । रिगवत असे ॥ २४० ॥
जो विष अमृत वोळखे । तो अमृत काय सांडूं शके । तेविं जो उजू वाट देखे । तो अव्हांटा न वचे ॥ २४१ ॥
म्हणोनि फुडें। पारखावें खरें कुडें। पारखिलें तरी न पडे। अनवसरें कहीं ॥ २४२ ॥
एऱ्हवीं देहांतीं थोर विषम । या मार्गाचें आहे संभ्रम । जन्में अभ्यासिलियाचें हन काम । जाईल वायां ॥ २४३ ॥
जरी अर्चिरादि मार्गु चुकलिया । अवचटें धूम्रपंथी पडलिया । तरी संसारपाथी जुंतलिया । भंवताचि असावें ॥ २४४ ॥
हे सायास देखोनि मोठे । आतां कैसेनि पां एकवेळ फिटे । म्हणोनि योगमार्ग गोमटे । शोधले दोन्ही ॥ २४५ ॥
तंव एकें ब्रह्मत्वा जाइजे । आणि एकें पुनरावृत्ती येइजे । परि दैवगत्या जो लाहिजे । देहांतीं जेणे ॥ २४६ ॥

अर्थ—अशा दोन अनादि वाटा आहेत. एक ब्रह्माकडे जाणारी सरळ वाट आहे व दुसरी ब्रह्माला सोडून संसाराकडे जाणारी आडवाट आहे. म्हणून अर्जुना! मुद्दाम तुला त्या सांगितल्या आहेत. ॥ २३८ ॥ कारण आपल्या हिताकरितांच परमेश्वरप्राप्तीचा मार्ग कोणता व संसारप्राप्तीचा मार्ग कोणता हें पाहिलें पाहिजे. खरें काय? खोटें काय? हें ओळखिलें पाहिजे व आपलें हित कशांत आहे व अहित कशांत आहे, हे जाणलें पाहिजे. ॥ २३९ ॥ हे पहा अर्जुना! चांगली नाव आहे. असें कळल्यावर कोणीहि, बाजूला असलेल्या अथांग पाण्यांत, उडी टाकील काय? किंवा राजमार्ग सोडून कोणी आडरानाने जाईल काय? ॥ २४० ॥ जो हें विष होय व हें अमृत होय, असें ओळखतो तो अमृत टाकून देईल काय? याप्रमाणे जो, सरळ मार्ग कोणता हें जाणतो, तो आडमार्गाने जात नाही. ॥ २४१ ॥ म्हणून खरें काय व खोटें काय, तें स्पष्ट जाणून घ्यावें. असें जो स्पष्ट पाहून घेतो त्याला अकालाचा प्रश्नच राहत नाही. ॥ २४२ ॥ नाही तर मरणाचे वेळीं, या धूम्रमार्गांतील भ्रांतीचें मोठें संकट असतें आणि जन्मभर केलेला अभ्यास वायां जातो. ॥ २४३ ॥ जर अर्चिरादि मार्ग चुकला व अकस्मात् धूम्रमार्गाची वाट लागली, तर संसारमार्गांत पुरुष

जुंपला जाऊन, त्याला सारखे जन्ममरणाचे फेर भोगावे लागतात. ॥ २४४ ॥ त्याप्रमाणे धूम्रमार्गाने मोठे कष्ट आहेत व ते एकदांचे कसें चुकतील म्हणून या दोन्ही मार्गांचा विचार केला आहे. ॥ २४५ ॥ त्यांत एका मार्गाने जाणारा पुरुष ब्रह्मस्वरूपाला मिळतो आणि दुसऱ्या मार्गाने जाणारा पुरुष संसारांत येतो. पण हें ब्रह्मस्वरूपाला येणें किंवा संसारांत येणें, मरणाचे वेळीं दैवाने जो मार्ग मिळेल त्यावर अवलंबून आहे. ॥ २४६ ॥

नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन। तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥ २७॥

अर्थ—हे दोन मार्ग अशा प्रकारें अनिश्चित आहेत असें जाणून विचार करणारा योगी, मोह पावत नाही. म्हणून अर्जुना! आत्मस्वरूपाचा विचार. करून, सदा सर्वदा तेथे चित्तवृत्ति स्थिर कर. ॥ २७ ॥

ते वेळीं म्हणितलें हें नव्हें। वायां अवचटें काय पावे। देह जाऊनि वस्तु होआवें। मार्गेंच कीं॥ २४७॥

तरी आतां देह असो अथवा जावो। आम्ही तों केवळ वस्तूचि आहों। कां जे दोरीं सर्पत्व वावो। दोराचिकडुनी॥ २४८ ॥

अर्थ—तेव्हा देव म्हणतात, अर्जुना! यांत अर्थ नाही. व्यर्थ अनिश्चितपणाने काय प्राप्ति होणार? देह सोडून या अर्चिरादि मार्गाने ब्रह्मस्वरूपच व्हायचें ना!॥ २४७ ॥ ज्याप्रमाणे दोरी कळून आली असतां, दोरीवरील सर्प मिथ्या ठरतो. (त्याप्रमाणे आपण केवळ ब्रह्मस्वरूपच आहों असें ज्ञान झाल्यानंतर देहाचें मिथ्यात्व अनुभवाला येतें). देह असो की जावो, आम्ही केवळ ब्रह्मस्वरूपच आहों. ॥ २४८ ॥

गूढार्थदीपिका—सगुण भगवंताची भक्ति करणाऱ्या योग्याला मी सच्चिदानंदरूप आहे व देहादिक पदार्थ खोटे आहेत, असें व्यतिरेकपूर्वक जेव्हा आत्मज्ञान होतें, तेव्हाच त्याचें देहावरील प्रेम नाहिसें होऊन, तो देहाची काळजी करीत नाही.

मज तरंगपण असे का नसे। ऐसें हें उदकासी कहीं प्रतिभासे। तें भलतेव्हां जैसें तैसें। उदकचि कीं॥ २४९ ॥

तरंगाकारें न जन्मेचि। ना तरंगलोपें न निमेचि। तेविं देहीं जे देहेंचि। वस्तु जाहले॥ २५०॥

अर्थ—मी आतां तरंगरूप झालों किंवा मी आता तरंगरूप नाही, असें पाण्याला कधी ज्ञान होतें काय? कारण तें केव्हाहि जसेंच्या तसें पाणीच असतें. ॥ २४९ ॥ पाणी तरंगाकार झालें तरी (तरंग पाणीच असल्यामुळे व तें तरंगाकार होण्यापूर्वीहि असतें म्हणून) तरंगरूपानेहि पाण्याचा जन्म मानतां येत नाही. किंवा (तरंग नाहिसा झाला असतां पाणी असतेंच म्हणून) तरंगाच्या लोपाने पाण्याचा नाश मानतां येत नाही. त्याप्रमाणे दुसऱ्याला देहधारी दिसत असले तरी स्वत: अनुभवाने जे देहासह ब्रह्मस्वरूप झाले. ॥ २५० ॥

गूढार्थदीपिका—पुढे एक अखंड अद्वैत परब्रह्मच आहे. त्यावांचून सत्य किंवा मिथ्या, किंवा उत्पन्न होणारें व नाश पावणारें, असें दुसरें काहीच नाही; अशा उपपत्तीने देहादिक दृश्य देखील परब्रह्माहून वेगळें नसून, परब्रह्मस्वरूप आहेत, असा अन्वयज्ञानाचा अनुभव येतो.

आतां शरीराचें तयाचिया ठाईं। आडनांवही उरले नाहीं। तरी कोणें काळें काई। निमे तें पाहें पां॥ २५१ ॥

अर्थ—आतां त्याचे ठिकाणीं देहाचें आडनांवहि उरत नाही; तर मग केव्हा काय नाहिसें होतें, याचा, अर्जुना! विचार कर. ॥ २५१ ॥

गूढार्थदीपिका—ब्रह्मवस्तु अविनाशी असल्यामुळे ती जन्मत नाही व नाश पावत नाही. अशी ब्रह्मवस्तूच देहासह आपण आहों, असा अनुभव आल्यानंतर नाशाची कल्पनाच नाहिशी होते.

मग मार्गाते कासया शोधावे। कोणें कोठूनि कें जावें। जरी देशकालादि आघवें। आपणचि असिजे॥ २५२ ॥

अर्थ—आपण ब्रह्मस्वरूप असून, देह, देश, काल, इत्यादि सर्व जर ब्रह्मस्वरूप आहेत, तर मग ब्रह्मप्राप्तीच्या मार्गाचा विचार कशाला करायला पाहिजे आणि त्या मार्गाने कोण, कोठून व कोठें जाणार?॥ २५२ ॥

आणि हां गा घटु जे वेळीं फुटे। ते वेळीं तेथिंचे आकाश लागे नीटे वाटे। वाटा लागे तरि गगना भेटे। एऱ्हवीं चुके॥ २५३ ॥

पाहें पां ऐसें हन आहे। कीं तो आकारुचि म्हणों जाये। येर गगन तें गगनींचि आहे। घटत्वाहि आधीं॥ २५४ ॥

ऐसिया बोधाचेनि सुरवाडें। मार्गामार्गाचें सांकडें। तया सोहंसिद्धां न पडे। योगियांसी॥ २५५ ॥

अर्थ—बा अर्जुना! जेव्हा घट फुटतो तेव्हाच, त्यांतील आकाश बाहेरच्या आकाशाशीं मिळण्याच्या नीट वाटेला लागते; नाही तर तें बाहेरच्या आकाशांत मिळत नाही, असें आहे की, घट फुटला असता, घटाचा नुसता आकारच नाहिसा होतो, बाकी घटांतील आकाश, बाहेरच्या आकाशाशीं, घट फुटण्यापूर्वीच मिळालेलें असतें. याचा विचार कर. ॥ २५३-२५४ ॥ एक सच्चिदानंद परब्रह्मच आहे, त्यावांचून दुसरे कांहीच नाही, म्हणून माझें त्या परब्रह्माशीं मूळचेंच ऐक्य आहे, म्हणजे मीच परब्रह्म आहे. असा उत्तम बोध ज्याला झाला आहे. अशा ज्ञानयोग्याला अर्चिरादि मार्गाचें संकट पडत नाहीं. ॥ २५५ ॥

गूढार्थदीपिका—एकदेशीय परब्रह्माचे ज्ञान ज्या योग्यांना आहे, तेच अर्चिरादि मार्गाने जाणारे असल्यामुळे, त्यांना मार्गामार्गाची काळजी घ्यावी लागते. पण सर्वव्यापक अद्वैत परब्रह्माचें ज्यांना ज्ञान झाले आहे. अशा व्यापक ब्रह्मज्ञान्याला "**न तस्य प्राणा उत्क्रामन्ति। ब्रह्मैव सन् ब्रह्माप्येति**" (बृ. उ. ४-४-६) त्यांचे प्राण कोठे जात नाहीत, येथेच लीन होतात व ते मूळचे ब्रह्मस्वरूप असलेले ब्रह्मस्वरूपच होऊन राहतात असें श्रुतीने सांगितलें आहे.

याकारणें पंडुसुता। तुवां होआवें योगयुक्ता। येतुलेंनि सर्वकाळी साम्यता। आपणपां होईल॥ २५६ ॥
मग भलतेथ भलतेव्हां। देहबंधु असो अथवा जावा। परि अबंधा नित्य ब्रह्मभावा। विघड नाहीं॥ २५७ ॥
तो कल्पादि जन्मा नागवे। कल्पांतीं मरणें नाप्लवे। माजि स्वर्गसंसाराचेनि लाघवें। झकवेना॥ २५८ ॥
येणें बोधें जो योगी होये। तयासीचि या बोधाचेंचि नीटपण आहे। कां जे भोगातें पेलूनि पायें। निजरूपा ये॥ २५९ ॥
पैं गा इंद्रादिकां देवां। जयां सर्वस्वें गाजती राणिवा। तें सांडणें मानूनि पांडवा। डावली जो॥ २६० ॥

अर्थ—म्हणून अर्जुना! तूं योगयुक्त व्हावें. योगयुक्त झालास की सदासर्वदा तुझें समब्रह्माशीं आपोआप ऐक्य होऊन राहील. ॥ २५६ ॥ मग कोठेहि व केव्हाहि, देह जावो कीं राहो, तुझ्या देहादि उपाधीरहित अखंड अविनाशी ब्रह्मस्थितीचा कधी भंग होणार नाही. ॥ २५७ ॥ हा अखंड ब्रह्मभाव कल्पादि जन्मत नाही, कल्पाच्या नाशाने नाश पावत नाही आणि मध्ये स्वर्गसंसाराच्या भासाने फसत नाही. ॥ २५८ ॥ अशा ज्ञानाने जो ज्ञानयोगी झाला त्यालाच या ज्ञानाचा उत्तम उपयोग होतो. कारण तो विषयभोगाला पायाने लोटून देऊन आपल्या मूळच्या ब्रह्मस्वरूपाला प्राप्त होतो. ॥ २५९ ॥ जें इंद्रादिक देवांचें सर्वस्वी राज्य म्हणून प्रसिद्ध आहे तें त्याज्य समजून जो दूर लोटतो. ॥ २६० ॥

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् । अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम्॥ २८ ॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्मयोगो नामाष्टमोऽध्यायः॥ ८ ॥

अर्थ—ज्याचें चित्त भगवंताचे ठिकाणीं स्थिर झालें आहे तो योगी, हें वर सांगितलेलें सर्व जाणून वेदाध्ययनाने, यज्ञाने, तपाने, दानाने जें पुण्यफळ मिळतें म्हणून. शास्त्रांत सांगितलें आहे, तें सर्व मार्ग टाकून जातो आणि श्रेष्ठ व मूळ कारणरूप असें जें ब्रह्मपद, त्याला प्राप्त होतो. ॥ २८ ॥

जरी वेदाध्ययनाचें जालें। अथवा यज्ञाचें शेतचि पिकलें। कां तपोदानांचे जोडलें। सर्वस्व हन जें॥ २६१ ॥
तया आघवयांचि पुण्याचा मळा। भारु आंतौनि जया ये फळा। जें परब्रह्मा निर्मळा। सांठि न सरे॥ २६२ ॥
जें नित्यानंदाचेनि मानें। उपमेचा कांटाळां न दिसे सानें। पाहा पां वेदयज्ञादि साधनें। जया सुखा॥ २६३ ॥
जें विटे ना सरे। भोगितयाचेनि पवाडें पुरे। पुढती महासुखाचें सोयरें। भावंडचि॥ २६४ ॥
ऐसें दृष्टीचेनि सुखपणें। जयासी अदृष्टाचें बैसणें। जें शतमखींही आंगवणें। नोहेचि एका॥ २६५ ॥
तयातें योगीश्वर अलौकिकें। दिठीचेनि हाततुकें। अनुमानिती कौतुकें। तंव हळुवट आवडे॥ २६६ ॥
मग तया सुखाची किरीटी। करूनियां गा पाउठी। परब्रह्माचिये पाठीं। आरूढती॥ २६७ ॥

अर्थ—जरी वेदाध्ययनाचें पुण्य प्राप्त झालें किंवा यज्ञानुष्ठानरूप पुण्याचें शेतच पिकलें अथवा तपदान यांच्यापासून उत्पन्न होणारें सर्व पुण्य प्राप्त झालें. ॥ २६१ ॥ या सर्व पुण्यांचा मेळ होऊन, त्या पुण्याच्या मेळाव्यांचे आंतून भरभराटून, जें फळ येईल, तें शुद्ध अशा परब्रह्माच्या प्राप्तीच्या लाभाची बरोबरी करूं शकत नाही. ॥ २६२ ॥ जे परब्रह्माच्या नित्यानंदाच्या मानाने पाहतां, उपमेच्यां तराजूत कमी भरणार नाही आणि ज्या सुखाच्या प्राप्तीकरिता

देवयज्ञादि साधने सांगितलीं आहेत. ॥ २६३ ॥ ज्या सुखाचा वीट येत नाही किंवा जें संपत नाही. भोगणाऱ्याची जितकी इच्छा असेल तितकें तें भोगतां येतें. पुढती म्हणजे आणखी परब्रह्माचें जें महासुख, त्याचें हें सुख सोयरें किंवा भावंड म्हणतां येईल. ॥ २६४ ॥ जें सुख दृष्टविषयसुखाचे अपेक्षेने अदृष्ट किंवा मेल्यावर मिळणारें सुख, अशा संज्ञेस प्राप्त झालें व जें सुख एखाद्या शंभर यज्ञ करून झालेल्या इंद्रालाहि प्राप्त होत नाही. ॥ २६५ ॥ जें सुख योगेश्वरांनी अलौकिक ज्ञानदृष्टिरूप हाताने सहज तोलून पाहिलें, तेव्हा त्यांना तें कमी प्रतीचें वाटलें. ॥ २६६ ॥ अर्जुना! म्हणून मग त्या अशा ब्रह्मलोकांतील सुखाची पायरी करून योगी परब्रह्मस्थितीवर आरूढ होतात. ॥ २६७ ॥

गूढार्थदीपिका—येथें महासुखाचें म्हणजे ब्रह्मसुखाचें भावंड म्हणून ज्या सुखाचें माऊलींनी वर्णन केलें आहें. तें स्वर्गसुख नसून ब्रह्मलोकांतील सुख होय. ब्रह्मलोक व ब्रह्मलोकांतील सुख यापेक्षां स्वर्गलोकांतील सुख कितीतरी अनित्य आहे, हें मागें सांगितलेंच आहे.

ब्रह्मलोकांतील सुखच महाकल्पपर्यंत विटत नाही. शंभर यज्ञ करणारा स्वर्गाधिपति इंद्र, पण अशा इंद्रालाहि ब्रह्मलोकांतील सुख प्राप्त होत नाही, आणि हेंच ब्रह्मलोकांतील सुख भोगून आणि अर्चिरादि मार्गाने ब्रह्मलोकांत गेलेले योगी, तेथूनच ब्रह्मदेवाबरोबर मुक्त होतात, असें सांगितलें असल्यामुळे ब्रह्मलोकांतील सुखच परब्रह्मरूप मोक्षसुखाची पायरी होऊं शकते.

स्वर्गलोकांतून कोणी मुक्त होऊं शकत नाही. स्वर्गलोकांत गेलेले योगी पुन: परत येतात हें मागे सांगितलेंच आहे व पुढेहि "त्रैविद्या मां सोमपा: पूतपापा" या श्लोकाने सांगितलें आहे.

पुण्यकर्माने प्राप्त होणारें श्रेष्ठांत श्रेष्ठ फळ स्वर्ग नसून, ब्रह्मलोक आहे, असें श्रुतींत सांगितलें आहे.

त्याचप्रमाणे तैत्तिरीय उपनिषदांतील ब्रह्मानंदवल्लीत (तै, उ० २-८) आनंदाची मीमांसा केलीं आहे, तींत ब्रह्मानंदाला लागून ब्रह्मानंदाचे पूर्वी ब्रह्मदेवाचा म्हणजे ब्रह्मलोकाचा आनंद सांगून, तोच ब्रह्मानंदाची पायरी किंवा भावंड होण्यास योग्य आहे.

इंद्राच्या स्वर्गलोकांतील आनंद त्यापेक्षा कितीतरी पटीने कमी दाखविला आहे.

ऐसें चराचरैकभाग्य। जें ब्रह्मेशां आराधनायोग्य। योगियांचें भोग्य। भोगधन जें॥ २६८ ॥
जो सकळ कळांची कळा। जो परमानंदाचा पुतळा। जो जिवाचा जिव्हाळा। विश्वाचिया॥ २६९ ॥
जो सर्वज्ञतेचा वोलावा। जो यादवकुळींचा कुळदिवा। तो श्रीकृष्ण जी पांडवा-। प्रती बोलिला॥ २७० ॥

अर्थ—याप्रमाणे (पूर्ण ब्रह्म असल्यामुळे) जें स्थावर जंगम ब्रह्मांडाचें एक थोर भाग्यच होय, जें ब्रह्मा व शंकर यांनाहि उपास्य आहे आणि जें योग्यांना भोगण्याजोगें योगरूप धन होय. ॥ २६८ ॥ जो सर्व कळांचीहि कळा आहे, जो परमानंदाची मूर्ति आहे व या विश्वांतील सर्व जीवांचा जो जिव्हाळा आहे. ॥ २६९ ॥ जो सर्वज्ञतेचें जीवन आहे, जो यादवकुळाचा कुलदीपक आहे, तो भगवान श्रीकृष्ण, अर्जुनाशीं याप्रमाणे बोलला. ॥ २७० ॥

गूढार्थदीपिका—येथे श्रीज्ञानेश्वर माऊलींनी परब्रह्माचें, चराचरैकभाग्य, ब्रह्माशंकर यांना सेव्य, सर्व कळांची कळा व परमानंदमूर्ति असें वर्णन करून, तोच भगवान श्रीकृष्ण होय, असें म्हणून भगवान श्रीकृष्णाचें पूर्ण ब्रह्मत्व पुन: प्रतिपादिलें आहे.

ऐसा कुरुक्षेत्रींचा वृत्तांतु। संजयो रायासी असे सांगतु। तेचि परियसा पुढां मातु। ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचा॥ २७१ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां अष्टमोऽध्याय:॥ ८ ॥

अर्थ—श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात असा कुरुक्षेत्रांत झालेला सर्व वृत्तांत संजय धृतराष्ट्राला सांगत आहे. तोच पुढील वृत्तान्त तुम्ही ऐका. ॥ २७१ ॥

याप्रमाणे श्रीसद्‌गुरु कृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या आठव्या अध्यायाचा अनुवाद पूर्ण झाला. तो त्यांचे चरणीं समर्पण असो!

समारोप

ब्रह्म म्हणजे काय, अध्यात्म म्हणजे काय, कर्म कशाला म्हणतात अधिभूत, म्हणजे काय, अधिदैवत तें कोणतें, अधियज्ञ कोण आहे व मरणाचे वेळी भगवंताची आठवण कशी राहील, असे सात प्रश्न, अर्जुनाने भगवंताला विचारलें. त्या प्रश्नांचे या अध्यायांत भगवंतांनी उत्तर दिलें आहे. आपल्या प्रियभक्त अर्जुनाचें भगवंताला अत्यंत प्रेम असल्यामुळे अर्जुनाचीं कोणतीहि इच्छा सफल व्हावयाला वेळच लागत नसे. किंबहुना अर्जुनाच्या अंत:करणांतील इच्छा जाणून भगवान आपणच त्याच्या शंकांचें उत्तर देऊन त्याचें समाधान करीत.

सर्व नामरूपात्मक प्रपंच कार्यरूप म्हणजे उत्पन्न होणारा व नाश पावणारा आहे; म्हणून तो अनित्य व खोटा आहे. नित्यता, अनित्यता ही नित्यतेच्या अपेक्षेनेच राहत असते. नित्यता म्हणजें सदा सर्वदा कोठेहि व केव्हाहि असणें होय. किंवा ज्या अस्तित्वाला अमुक काळीं आहे, अमुक ठिकाणीं आहे व ही अमुक आहे अशी मर्यादा नसते त्यालाच नित्य अस्तित्व म्हणतां येते. अशा व्यापक अस्तित्वाचे ठिकाणींच नित्यता असते. हें नित्य अस्तित्व स्वत:सिद्ध अविनाशीच असूं शकतें. तें शून्यरूप किंवा अभावरूप असूं शकत नाही. किंबहुना शून्यभाव किंवा अभाव देखील त्या अस्तित्वाचे आश्रयानेच भासतो. ही जी नित्य अस्तित्व किंवा सत्ता आहे, तिच्यावरच सर्व नामरूपाचा भास व त्याचा उत्पत्ति-नाश किंवा बदल भासत असतो. या नित्यसत्तेवरच सर्व जगत् सांठविणारी आकाशरूप पोकळीची कल्पना झाली आहे; म्हणून ती आकाशाच्या पूर्वी आहे. या नित्यसत्तेला परब्रह्म म्हणतात. या नित्यसत्तारूप परब्रह्मांत नित्य अस्तित्व, नित्य ज्ञान व नित्य आनंद हे तिन्ही धर्म राहतात. कारण ते एकमेकांना सोडून बुद्धीला ग्रहण करतां येत नाहीत, म्हणून सत्तामात्र सच्चिदानंद स्थितीला परब्रह्म म्हणतात.

उत्पत्तिरहित व नाशरहित अशा या सत्तामात्र सच्चिदानंद परब्रह्माचा प्रत्येक नामरूपाने किंवा शरीराने मर्यादित केलेला प्रत्येक शरीरांत जो स्वाभाविक भाव आहे, ज्याला प्रत्यगात्मा म्हणतात—त्याला अध्यात्म म्हणतात.

निर्मल आकाशांत ज्याप्रमाणे अभ्रे उत्पन्न होतात, त्याप्रमाणे उत्पत्तिनाशरहित अशा निर्विकल्प सच्चिदानंद परब्रह्माचे ठिकाणीं महदादि कार्यसृष्टीची जी उत्पत्ति दिसते त्या उत्पत्तीला कर्म म्हणतात. अशी अनंत सृष्टि उत्पन्न झालेली भासत असली तरी परब्रह्माच्या अमर्याद अफूट अद्वैतसत्तेच्या सृष्टीने पाहतां एका परब्रह्मावांचून जडविनाशी सृष्टीचें अस्तित्वच मानतां येत नाही; म्हणून ती सर्व काल्पनिक आहे, सृष्टीची काल्पनिक उत्पत्ति ही जीवाला काल्पनिक न वाटतां खरी वाटते, म्हणूनच त्याला उत्पत्तिरूप कर्माचा भास होतो.

ज्या नामरूपाचे ठिकाणीं उत्पत्तिनाश दिसतात त्या नामरूपाला जीव भूतसृष्टि समजतो. वास्तविक हीं नामरूपें परब्रह्माच्या सत्तेवरच भासत असल्यामुळे व त्यांना परब्रह्माचीच सत्ता असल्यामुळे ते परब्रह्माहून निराळे नसून ब्रह्मस्वरूपच आहेत; पण जीव मात्र त्यांना परब्रह्माहून निराळे समजतो व त्यांचे ठिकाणीं भूतसृष्टीची कल्पना करतो, म्हणून त्यांना अधिभूत संज्ञा प्राप्त झाली आहे.

देहामध्ये सुखदु:खाचा भोग घेणारा जो जीव त्याला अधिदैव ही संज्ञा आहे. खऱ्या दृष्टीने पाहतां जीव पूर्ण ब्रह्मरूपच आहे, पण आपल्या विवक्षित नामरूपाचा अभिमान धरून आत्मस्वरूपाला तो विसरला आहे.

आत्मस्वरूपाला विसरून मी म्हणजे देह असा देहाशीं ऐक्य करून ऐक्याहंकार वागविणाऱ्या जीवाचा देहभाव, ज्या भगवंताच्या सगुण स्वरूपाचे ठिकाणी चित्तवृत्ति स्थिर झाली असतां, नि:शेष नाहिसा होतो, तो मी सगुण परमात्मा या शरीरांत अधियज्ञ आहे असें भगवान म्हणतात.

सारांश कर्म, आधिभूत, अधिदैव, हे भाव सच्चिदानंद परब्रह्माचे ठिकाणी जीवाने भ्रांतीनेच कल्पिले आहेत,

बाकी राहिलेले ब्रह्मभाव, अध्यात्मभाव व अधियज्ञ हे तीन भाव स्वत: उत्पत्तिनाशरहित असून त्यांचे उत्पत्तिनाश सांगितले नाहीत, म्हणून ते नित्य आहेत हें सिद्ध होते. त्यांच्या ठिकाणीं अहंकार नाही व अहंकाराने होणारे आत्मविस्मृतिरूप अविद्याहि नाही. ते केवळ सच्चिदानंदरूपच आहेत; म्हणूनच ब्रह्म, अध्यात्म म्हणजे आत्मस्वरूप किंवा अधियज्ञ म्हणजे सगुण रामकृष्णादिस्वरूप या तीनपैकी कोठेहि चित्तवृत्ति स्थिर झाली असतां, जीव आत्मविस्मृतिरूप अविद्या व देहभाव या विरहित होऊन, मुक्त होतो-म्हणजे ब्रह्मरूपांत मिळतो, त्यांतल्यात्यांत अधियज्ञाचे ठिकाणीं चित्तवृत्ति स्थिर करून ब्रह्मरूप होणें सुलभ व निश्चित आहे.

श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात हा अधियज्ञ भगवान श्रीकृष्ण सर्व जीवाचें विश्रांतिस्थान असून पूर्ण नैष्कर्म्य-सुखाचा म्हणजे ब्रह्मसुखाचा सांठा आहे, म्हणून जेवढे कांही जीवाकडून कर्मरूप यज्ञ होतात, ते त्यांनी त्याच्या ठिकाणीं चित्तवृत्ति स्थिर करून केले असतां, त्याच्या ध्यानाने त्याला समर्पण होऊन, समर्पण करणारा जीव नैष्कर्म होतो—म्हणजे केवळ ज्ञानरूप ब्रह्म होऊन राहतो—व तेथे तें ज्ञान, मायेचा नि:शेष नाशकरून, तेंहि नाहीसे होतें.

भगवान् श्रीकृष्ण शुद्ध निरुपाधिक ब्रह्मस्वरूप असल्यामुळेंच मरणाचे वेळी त्याचे स्मरण जर केले, तर त्या स्मरणाने त्याचें जे ध्यान घडतें त्या ध्यानाने तो जीव श्रीकृष्णस्वरूपांत मिळतो. प्रथमपासून कर्मयोगीभक्त भगवंताचे ठिकाणीं चित्त ठेवूनच भगवंताला सर्व कर्मे समर्पण करीत असल्यामुळे मरणकाळपर्यंत त्याला भगवंताचें ध्यान दृढ होतें व मरणसमयीं पूर्व अभ्यासामुळे भगवंताचे त्याला स्मरण व ध्यान कायम राहतें; म्हणून तो देह सोडल्याबरोबर भगवंतांत मिळतो. ज्या वस्तुचें सदा समर्पण व ध्यान घडतें त्या वस्तूला जीव प्राप्त होतो हा नियम आहे, म्हणून भगवान म्हणतात माझें सदा स्मरण करावें. त्या स्मरणाने मन व बुद्धि सहज भगवंताला अर्पण होतात, म्हणजे मनाने भगवंताचें स्मरण व बुद्धीने भगवंताचें ध्यान घडत जातें. मनांत भगवंताचें ध्यान अखंड राहण्याकरिता बाहेर इंद्रियांद्वारा राहाटणाऱ्या मनाचे सर्व इंद्रियव्यापार भगवत्परायण झाले पाहिजेत.

मरणाच्या अत्यंत विकल स्थितींतहि भगवान आपल्या भक्ताला सांभाळतो व आपली प्राप्ति करून देतो. पण अभक्तयोग्याला मात्र काळशुद्धि पाहून प्राण सोडला असतांच ब्रह्मलोक मिळतो, नाही तर परत संसारांत येतो. तसेच परब्रह्मावांचून दुसरे कांहीच नसल्यामुळे मीहि सच्चिदानंद परब्रह्मस्वरूपच आहे त्याहून निराळा नाही असे ज्याचे ज्ञान अत्यंत दृढ आहे, त्याचे प्राणहि ब्रह्मलोकास न जातां परब्रह्मांत लीन होतात.

ज्ञानी पुरुषाला निर्गुण परब्रह्माची प्राप्ति होते हें येथे सांगून, पुढील अध्यायांत भक्तांना परब्रह्माची प्राप्ति कशी सुलभ होते हें भगवान व माऊली सांगतील.

श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

अध्याय नववा

अवतरणिका—सगुणस्वरूपाची भक्ति न केल्यास सांख्ययोगी व पांतजलयोगी यांना मार्गामार्गाचें सांकडे पडते, पण माझें सगुणस्वरूपहि पूर्ण ब्रह्म आहे हें जाणून त्याची भक्ति करणाऱ्यांना मार्गामार्गाचे सांकडे पडत नाही व ते देह सोडण्यापूर्वीच परब्रह्मस्वरूप होतात; म्हणून माझ्या सगुणस्वरूपाची भक्ति करणें चांगलें, असा आशय, मागील आठव्या अध्यायांत भगवंतांनी व्यक्त केला आणि या भक्तिधर्माची सर्वश्रेष्ठता अर्जुनाला पटवून देऊन, अर्जुनाने त्या मार्गाचाच अवलंब करावा, म्हणून भगवंतांनी या नवव्या अध्यायांत भक्तिमार्गाचें किंवा एकान्तधर्माचें विवेचन केलें आहे.

महाभारतांतील शांतिपर्वात एक नारदनारायण संवाद आला आहें. त्यांत भगवंतांनी नारदाला तीन प्रकारचे धर्म सांगितले आहेत.

(१) संन्यासियांचा यतिधर्म (२) परमेश्वराची आज्ञा समजून परमेश्वरप्रीत्यर्थ निष्कामचित्ताने यज्ञादिक दैव व पितृ कर्म करणें व (३) एकान्तधर्म; असे हे तीन धर्म होत. हेच धर्म भगवद्गीतेंत, भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितले आहेत असेंहि त्यांत म्हटलें आहे. पण "यतीनां चापि यो धर्मः स ते पूर्वं नृपोत्तम। कथितो हरिगीतासु समासविधिकल्पितः" (शां. प. अ. ३४८, श्लो. ५३) "एवमेष महान् धर्मःसते पूर्वं नृपोत्तम। कथितो हरिगीतासु समासविधिकल्पितः" (शां. प. अ. ३४६-११) या श्लोकांनी संन्यासियांचा यतिधर्म व मर्यादित कर्मयोग, हे दोन्ही संक्षेपाने सांगितले आहेत, असें म्हटलें आहे.

तिसरा जो एकान्तधर्म, तो सांगतांना "समूपोढेष्वनीकेषु कुरुपांडवयोर्युधे। अर्जुने विमनस्के च गीता भगवता स्वयम्" (श. पं. अ. ३४८-८) कौरव पांडवांच्या युद्धाचा उल्लेख करून त्या प्रसंगी विमनस्क व युद्धापासून पराङ्मुख झालेल्या अर्जुनाला, भगवान् श्रीकृष्णांनी हा एकान्तधर्म सांगितला असें म्हटलें आहे. संक्षेपाने तो सांगितला, असें म्हटलें नाही.

वक्त्याला ज्या विषयाचा ठसा श्रोत्यांच्या मनांवर बिंबवावयाचा असतो, त्या विषयाचे निरूपण तो वक्ता सविस्तरपणे करीत असतो व ज्या विषयाचा ठसा श्रोत्यांच्या मनांत उमटवायचा नसतो त्या प्रासंगिक विषयाचें तो ओझरतें किंवा संक्षिप्त निरूपण करीत असतो. हा सर्वांचा अनुभव आहे या अनुभवानुसार भगवंतांनी अर्जुनाला मुख्यतः एकान्त अशा भक्तिधर्माचाच उपदेश केला, असें म्हणावें लागतें.

हा एकान्तधर्म, सृष्टीच्या आरंभी जें कृतयुग असतें त्या कृतयुगांतच प्रवृत्त होतो व त्याचेंच त्या युगांत सर्व लोक अनुष्ठान करीत असतात "ततः प्रावर्तत तदा आदौ कृतयुगं शुभम्। ततो हि सात्वतो धर्मो व्याप्त लोकानवस्थितः" (शां. पं. अ. ३४८-३४) असें या श्लोकांत महाभारतकारांनी म्हटलें आहे.

एकान्तधर्म ज्या विशेषामुळें कर्मयोगाहून व यतिधर्माहून निराळा व श्रेष्ठ मानला जातो ते विशेष या अध्यायांत योग्य प्रसंगी दाखविले जातील.

तत्पूर्वी "माझी भक्ति आणि नामकीर्ती। यांची जननी सत्संगती। तो सत्संग जोडल्या हातीं। विघ्नें न बाधिती साधका"॥ ६३६ ॥ (ए. भा. अ. २८) हा एकान्तधर्म किंवा भक्ति "मुख्यतस्तु महत्कृपयैव"॥ ३८ ॥ (नारदभक्ति सूत्र) संताच्या कृपेशिवाय प्राप्त होऊं शकत नाही हें श्रीज्ञानेश्वर महाराजांनी संतांची स्तुति करून दाखविलें आहे.

तरी अवधान एकलें दीजे। मग सर्वसुखासि पात्र होइजे। हें प्रतिज्ञोत्तर माझें। उघड ऐका॥ १ ॥

अर्थ—(श्रीज्ञानेश्वर माऊली सर्व श्रोते मंडळीना उद्देशून म्हणतात की, महाराज!) आपण माझें म्हणणे नुसते अत्यंत लक्ष देऊन ऐकलें की पुरे. तेवढ्यानेच आपल्याला सर्व सुखाची प्राप्ति होईल, असें मी उघड प्रतिज्ञा करून सांगतों. ॥ १ ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्माची प्राप्ति होण्याकरिता ब्रह्मसूत्रभाष्यांत ''आवृत्तिरसकृदुपदेशात्'' (ब्र. सू. ४-१-१) या सूत्राने परब्रह्मस्वरूपाचे वारंवार श्रवण, मनन, निदिध्यासन करावें असें सांगितले आहे. श्रवण, मनन, निदिध्यासनांत श्रवणच मुख्य आहे. जितक्या आवडीने व एकाग्रतेने श्रवण होईल, तितकेंच श्रवणाबरोबर मनन निदिध्यासन दृढ होत जातें; म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज येथे ''येकलें अवधान'' द्या असे म्हणत आहेत.

येकलें अवधान—अत्यंत आवडीने श्रवण करण्याकरिता एकाग्र केलेलें चित्त ''येकलें अवधान'' होय. चुकल्या पुत्राची शुद्धिवार्ता। जेणें सादरें एके माता। तेणें आदरें हरिकथा। सार्थकता परिसावी. ॥ ५१९ ॥ (ए. भा. अ. २) या ओवींत एकाग्र श्रवणाचें लक्षण केलें आहे. हेंच ''येकलें अवधान'' होय. किंवा श्रवण करतांना लय, विक्षेप, कषाय, रसास्वाद हीं विघ्नें उत्पन्न होत असतात. लय म्हणजे चित्त झोपेंत जाणें. विक्षेप म्हणजे चित्त दुसरीकडे ओढले जाणें, कषाय म्हणजे श्रवणाचा विषय चित्तांत शिरणार नाही असे चित्त अभिमानादिकांनी ताठ किंवा स्तब्ध होणें व रसास्वाद म्हणजे आपल्याला समजतें, आपण धन्य आहो, असें वाटणें. या विघ्नांनी श्रवणाची एकतानता नाहीशी होते. म्हणून ही विघ्नें उत्पन्न होणार नाहीत, अशा रीतीने अवधान देणें याला ''येकलें अवधान'' म्हणतात.

असें अवधान प्रेमपूर्वक श्रवणांतच राहूं शकतें; म्हणून ''येकलें अवधान दीजे'' याचा अर्थ अत्यंत प्रेमाने श्रवण करा असा होतो. अशा प्रकारच्या श्रवणांत तात्काळ मनननिदिध्यासनहि होतें. ''काना वचनाचिये भेटी-। सरिसाचि पैं किरीटी। वस्तु होऊनि उठी। कवणि एक जो''॥ ९९१ ॥ (ज्ञा. अ. १८) माऊलींनी या ओवींतहि असें म्हटले आहे. म्हणजे प्रेमाने श्रवण करणाऱ्याला स्वतंत्र मनननिदिध्यासन करावे लागत नाही.

सर्व सुखासि—परब्रह्म सुखस्वरूप असून त्यावांचून दुसरी वस्तुच नाही, म्हणून आपण जेवढें सुख भोगतों, तें सर्व परब्रह्माचेंच सुख होय. ''यस्य कस्यापि योगेन यत्र कुत्रापि दृश्यते। आनंदः स परस्यैव ब्रह्मणः स्फूर्तिलक्षणः'' (स. वे. सि. सा. सं. ६७१) भोगकालीं भोग्यविषयाचे ठिकाणीं चित्तवृत्ति एकाग्र होते व त्या एकाग्रतेमुळें सत्त्वगुणाचा उत्कर्ष होतो, ज्याप्रमाणे निर्मळ पाण्यांत सूर्याचें प्रतिबिंब दिसतें, त्याप्रमाणे विषयाचे ठिकाणीं एकाग्र होऊन सात्विक झालेल्या चित्तांत, आधार असलेल्या सुखरूप परब्रह्माचें सुख प्रतिबिंबित होतें व तें आपण भोगतों. ''सत्त्वप्रधाने चित्तेऽस्मिंस्त्वात्मैव प्रतिबिंबति आनंदलक्षणः स्वच्छे पयसीव सुधाकरः'' (स. वे. सि. सा, सं. ६४०) पण हें ज्ञान नसल्यामुळें आपण भ्रांतीने विषयसुख भोगलें, असें समजतों याप्रमाणें संसारांत भोगलें जाणारें सर्व सुख ब्रह्मसुखच असून, ब्रह्मानुभवांत तें एकवटलेलें अनुभविलें जाते, म्हणून 'सर्व सुख' म्हणजे ब्रह्मसुख असा अर्थ आहे.

किंवा कोणत्याही प्रकारचा दुःखाचा अनुभव न येता सर्व संसारच सुखमय होणें असाहि सर्वसुखाचा अर्थ करतां येतो. ''अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदें भरीन तिन्ही लोक'' (ज्ञा. गा. अभंग ८१) अशा या सुखाची प्राप्ति अत्यंत आवडीने व एकाग्रतेने केलेल्या एकट्या श्रवणानेच होईल, असे श्रीज्ञानेश्वर महाराज प्रतिज्ञेने सांगतात.

परि प्रौढी न बोलें हो जी। तुम्हां सर्वज्ञांचां समाजीं। देयावें अवधान हे माझी। विनवणी सलगीची॥ २ ॥

अर्थ—परंतु महाराज! तुम्हा सर्वज्ञ संतांच्या समाजापुढे मी आढ्यतेनें बोलत नाही. आपण अवधान द्यावें अशी माझी लडिवाळपणाची विनंति आहे (हे आपण जाणतां)॥ २ ॥

गूढार्थदीपिका—''आतां नमूं संतजन। जे सर्वांगीं चैतन्यघन। जया सगुण निर्गुण समसमान। जे निजजीवन सद्भावा॥ ७ ॥'' (ए. भा.) ज्यांना परब्रह्माच्या सगुण निर्गुण दोन्ही स्वरूपांचा, ज्ञान व भक्ति यांच्या योगाने पूर्ण अनुभव आला व जे नामरूपासहित सर्व सच्चिदानंदघनच पाहतात त्यांनाच नाथांनी 'संत' संज्ञा दिली

आहे. सच्चिदानंदघन निर्गुण परमात्माच, आपल्या सच्चिदानंदघन स्वरूपाला धरून असलेल्या सर्वज्ञ सर्वशक्तिमत्वादि षड्‌गुणैश्वर्याने सगुण होतो. असा परमात्मा, ज्ञानभक्तीच्या बळाने ज्यांच्या हृदयांत शिरून राहिला व त्या परमात्म्याशीं ज्यांचे ऐक्य झालें "तैसे मी होऊनि माझे भक्त। अनन्यभावें मजचि भजत। तैं माझें ऐश्वर्य समस्त। प्रतिबिंबित तयामाजी"॥ ११३४॥ (ए. भा. अ. ११) असे संतहि सगुण परमेश्वराप्रमाणे सर्वज्ञत्वादि षड्‌गुणैश्वर्यसंपन्न होतात. म्हणून येथे श्रीज्ञानेश्वर माउलींनी "तुम्हां सर्वज्ञांच्या समाजीं" असे संबोधिले आहे. एवढेच नव्हे तर "मुक्तीवरील मागतां भक्ति। श्रीकृष्णाची अवतारशक्ति। मायानियंतृत्वाची पूर्ण स्थिति। उद्धवाचे हातीं स्वयें आलीं"॥ ७७०॥ (ए. भा. अ. २९) ज्ञानानंतर होणाऱ्या भक्तीच्या योगानें संत, परमेश्वरप्रमाणें मायानियंते होतात. असें नाथांनीं म्हटले आहें.

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, अशा संतांना माहित नाही असें सांगण्याजोगे कांही राहणे शक्य नाही, म्हणून अवधान द्या, हें माझें बोलणें आढ्यतेचें नव्हे, केवळ लडिवाळपणाची विनंति आहे, हें तुम्ही सर्वज्ञ असल्यामुळें जाणतां "न करिता व्युत्पत्तींचा श्रम। सकळ शास्त्रार्थ होय सुगम। सत्समागमाचें वर्म। तें हें ऐसें असें॥ ३८॥ जें व्युत्पत्तीने न कळे। तें सत्समागमें कळे। सकळ शास्त्रार्थ आकळे। स्वानुभवेसी"॥ ३९॥ (दासबोध द. ७ स. १) असा तुम्हां संतांच्या सलगीचा महिमा असल्यामुळे मला गीतार्थाचें यथार्थ आकलन व्हावें याकरितां मी आपल्याशीं सलगी करीत आहे.

मग येथे अशी शंका येतें की, श्रीज्ञानेश्वर महाराजांनी श्रोत्यांपुढे निरूपण कशाकरितां केलें?

त्याचें उत्तर असें आहे की, "पढियंते सदा तेचि। परि भोगी यवी रुचि। म्हणूनि उचितचि। अनुवादु सिद्धु"॥ १३॥ (अमृ. प्र. १०) सत्पुरुषांना परमप्रेमरूप असलेलें परब्रह्मच सदा आवडत असते. सदा आवडणे यालाच परमप्रेम किंवा अवीट प्रेम म्हणतात. ज्याप्रमाणें विषयासक्तजनांना विषयाचें सामान्यतः अवीट किंवा सदा प्रेम असतें, म्हणून ते भोगलेलेच विषय वारंवार भोगत असतात, त्याप्रमाणे भगवंताचें अवीट किंवा सदा प्रेम असलेल्या संतांनाहि वारंवार, भगवंताच्या स्वरूपाची चर्चा करून व भगवंताचे गुणानुवाद गाऊन किंवा श्रवण करून अखंड भगवत्प्रेमांत मग्न असावें असें वाटत असतें.

त्याचप्रमाणे जीवाची अहंकार ही मोठी दृढ उपाधि आहे. त्यामुळें तो आपलेपणा वागवून परमेश्वरापासून भिन्न राहत असतो. अहंकार आहे तोपर्यंत आपलेपणा जात नाही व आपलेपणा आहे तोपर्यंत अहंकार जात नाही. "तैसा देहाहंकार नाथिला। हा समूळ जयाचा नाशिला। तोचि परमात्मा संचला। आधींचि आहे"॥ ८४॥ (ज्ञाने. अ. ६) अहंकार नाहीसा झाला की जीव परमेश्वरस्वरूप होतो. म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराजांनी "म्हणोनि थोरपण पऱ्हा सांडिजे। एथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे। जैं जगा धाकुटें होइजे। तैं जवळीक माझी"॥ ३७८॥ (ज्ञा. अ. ९) असे सांगितले आहे.

ही शिकवण प्राप्तपुरुषांच्या ठिकाणीं स्वाभाविक झालेली असते किंवा आंगवळणी पडलेली असते. त्या स्वाभाविक धर्माने संतांची प्रार्थना करून इतर जीवांनी संतांची कृपा कशी संपादन करावी याचा, श्रीज्ञानेश्वर महाराज धडा घालून देत आहेत.

लीनपणाच्या भाषणाने प्रेम उत्पन्न होते व साहंकार भाषेने असलेले प्रेम नाहीसे होते असा सर्वांचा अनुभवहि आहे.

कां जे ल्लेयांचे ल्ले सरती। मनोरथांचे मनोरथ पुरती। जरी माहेरें श्रीमंतें होती। तुम्हांऐसीं॥ ३॥

अर्थ—महाराज! तुमच्यासारखे प्रेमळ व श्रीमंत आईबाप ज्या लाडक्यांना प्राप्त होतात त्यांनी जी जी आळी घ्यावी किंवा जे जे मनोरथ करावे, ती तीं आळी व ते ते त्यांचे मनोरथ सहज पूर्ण होतात.॥ ३॥

गूढार्थदीपिका—येथे आळी घेणाऱ्या व मनोरथ करणाऱ्या मुलांचा व ते पूर्ण करणाऱ्या मायबापांचा जो उल्लेख केला आहे, तो विषयाविषयींची आळी घेणारा किंवा विषयाच्या प्राप्तीचे मनोरथ करणाऱ्या मुलाचा व ते पूर्ण करणाऱ्या आईबापांचा उल्लेख नाही. कारण "जो अमृतासि ठी ठेवी। तो जैसा कांजी न सेवी" (ज्ञा. अ. २-३६४) अमृताकडे

दृष्टि ठेवणारा जशी कांजीची इच्छा करीत नाही, त्याप्रमाणे अखंड ब्रह्मरस गोडी चाखणारा विषयसुखाकडे कधी ढुंकूनहि पाहत नाही व त्याची इच्छा करणाऱ्याचे तो लाडहि करीत नाही. त्याच्या दृष्टीने लौकिक, नाशिवंत अशी विषयसमृद्धि म्हणजे श्रीमंती नव्हे, तर "तुका म्हणे धन। ज्याचे निज नारायण" (तु. गा. १९३०) "परमार्थ महाधन। जोडी देवाचे चरण" (तु. गा. ३०६४) अनंत ब्रह्मांडाचा स्वामी जो परमात्मा त्याची प्राप्ति हीच संताना अविनाशी म्हणून खरी श्रीमंती वाटत असते.

संत हे अशा श्रीमंतीनेच संपन्न असतात आणि परमेश्वर-प्राप्तीकरिता तळमळणारे व संतांच्या वचनावर विश्वास ठेवणारे जीव हे त्यांना लाडके वाटतात. अशा लाडक्या जीवांनी परमेश्वर प्राप्ति व्हावी म्हणून ज्ञानाची किंवा भक्तीची आळी घेतली असतां किंवा मनोरथ केले असतां, ते सहज केवळ कृपादृष्टीने पुरवूं शकतात, इतके ते समर्थ असतात. "मोक्षाची सोडी बांधी करी"॥ २२०॥ (ज्ञाने. अ. १२), "तो म्हणे तेथ राहे। महाबोधु"॥ ७४॥ (ज्ञाने. अ. ५)

तुमचेया दिठिवेयाचिये वोलें। सासिन्नले प्रसन्नतेचे मळे। ते साउली देखोनि लोळें। श्रांतु जी मी॥ ४॥

अर्थ—तुमच्या कृपादृष्टीचा ओलावा, माझ्या अंतःकरणांत प्राप्त झाल्यामुळे जिकडे तिकडे प्रसन्नतेचे हिरवेगार मळे भरास आले. ती सावली पाहून संसारतापाने तापलेला जो मी, त्या सावलींत आनंदाने लोळत आहे. (म्हणजे तुमच्या कृपादृष्टीमुळे जिकडे तिकडे चित्ताची प्रसन्नताच झाली व त्यामुळे माझा त्रिविधताप नाहीसा झाला असा भाव). ॥ ४॥

गूढार्थदीपिका—श्रीगुरुच्या किंवा संतांच्या कृपादृष्टीचें अगाध सामर्थ्य असतें. "जयाचेनि अपांगपातें। बंध मोक्षपणीं आते.॥ ४॥", "जयाचेनि कृपातुषारें। परतले अविद्येचि मोहिरे॥ १४॥" (अमृ. प्र. २), "तो जयाकडे वास पाहे। तेऊति सुखाची सृष्टी होये"॥ ७४॥ (ज्ञाने. अ. ५) ती कृपादृष्टि झाली असतां त्रिविध तापाला कारणीभूत असलेला संसार मुळींच अस्तित्वांत नाही व एक परमसुखरूप भगवंतच सर्वत्र आहे असा प्रत्यय येऊन, भगवंताचें प्रेम लागते व दुःखाची निःशेष निवृत्ति होते "त्रिविधतापाची जाहाली बोळवण। देखिल्या चरण वैष्णवांचे" (एक. अभंगगाथा—११७४).

अध्यात्मिकादि त्रिविधतापाने जो पोळलेला आहे तोच येथे "श्रांत" या शब्दांने घेतला आहे. त्याच्यावरच संत कृपा करून त्याला ते अखंड ब्रह्मसुखाचा लाभ करून देतात "तैसे अध्यात्मशास्त्रीं इये। अंतरंगचि अधिकारिये"॥ १७५०॥ (ज्ञाने. अ. १८)

प्रभू तुम्ही सुखामृताचे डोहो। म्हणोनि आम्ही आपुलिया स्वेच्छा वोलावो लाहों। येथही जरी सलगी करूं बिहों। तरी निवों कें पां॥ ५॥

अर्थ—महाराज! तुम्ही संत त्या सुखरूप अमृताचे अथांग खोल डोह आहांत, म्हणून आपले इच्छेनुसार मला त्यांत मनसोक्त स्नान करतां येतें. अशा तुमच्या ठिकाणींहि जर आम्ही सलगी करायला भ्यालों, तर आमचा ताप कोठें शांत होईल?॥ ५॥

गूढार्थदीपिका—"आनंदपदी जया म्हणती हरी" (एक. गाथा हरिपाठ अभंग ११) सगुण परमात्मा हा परब्रह्माचा साकारलेला आनंदांश होय, असे नाथादिक संत म्हणतात. त्या सगुणाच्या प्रेमभक्तीने संतहि परमानंदाचे डोह होतात. आनंदरूप परब्रह्म अखंड निरवयव व अखंड पूर्ण असल्यामुळें, तें केव्हाहि कोठेहि अपूर्ण होत नाही. म्हणून असीम ब्रह्मानंदरूप सगुण स्वरूपाशीं मिळालेले किंवा ऐक्य पावलेले संतहि असीम ब्रह्मानंदरूपच असतात, म्हणून त्यांना "सुखामृताचे डोहो" म्हटले आहे. "अर्जुना अनंतसुखाच्या डोहीं। एकसरां तळचि घेतला जिहीं। मग थिराऊनि तेही। तेंचि जाहले"॥ १४४॥ (ज्ञा. अ. ५). सुखामृताचे डोहो असलेल्या संताचे ठिकाणीं आत्मप्रेमाप्रमाणे जो संकोचरहित प्रेम करतो, तोच सर्व संसारदुःखापासून सुटतो.

संसारदुःखापासून सुटण्याकरिता निःशेष अहंकार सोडून संताचें प्रेम करणें याशिवाय दुसरा उपाय नाही. आसक्ति किंवा मोह याची वेदांतशास्त्रात निंदा केली आहे खरी, पण परमप्रेमरूप आत्म्याला न जाणतां जडविनाशी अशा देहालाच आत्मा समजून त्या देहाचे ठिकाणीं जी आसक्ति असते त्या आसक्तीचीच ती निंदा आहे. परमप्रेमरूप

आत्म्याच्या आसक्तीची ती निंदा नव्हे. त्याचप्रमाणे ''प्रसंगमजरं पाशमात्मन: कवयो विदु:। स एव साधुषु कृतो मोक्षद्वारमपावृतम्'' (भाग. स्कं. ३, अ. २५ श्लोक २०) विषयाची आसक्ति ही संसारांत गुंतविणारें एक जाळेंच आहे, पण तीच संतजनाचे ठिकाणीं ठेविली असतां मोक्षाचें द्वार खुलें होतें—म्हणजे विषयाची आसक्ति सोडून संताचे ठिकाणीं आसक्ति ठेविली असतां पुरुष मुक्त होतो—असें भागवतांत स्पष्ट विधान आहे.

नातरी बालक बोबडा बोलीं। कां वांकुडा विचुका पाउलीं। ते चोज करूनि माउली। रिझे जेवीं॥ ६॥

तेवीं तुम्हां संतांचा पढियावो। कैसेनि तरी आम्हांवरी हो। या बहुवा आळुकिया जी आहों। सलगी करित॥ ७॥

अर्थ—किंवा लहान मूल जरी बोबडें बोलतें व वांकडें तिकडें पाऊल टाकून चालूं लागतें, तरी आई त्याचें कौतुक करून आनंद मानते. ॥ ६ ॥ त्याप्रमाणेच तुम्हां संताचें मजवर कोणत्या तरी निमित्ताने प्रेम बसावें, म्हणून मी मोठ्या आवडीने आपल्याशीं सलगी करीत आहे. ॥ ७ ॥

गूढार्थदीपिका—पूर्ण ब्रह्मस्वरूप झालेले संत हे ''अमूर्तचि मूर्तू कारुण्याचा'' (अमृ. प्र. २ ओ. १) संसाररूपी दु:खसागरांत बुडणाऱ्या जीवाच्या कळवळ्याने त्याचा उद्धार करण्याकरिता गुरुरूपाने अवतरलेलें परब्रह्मच होय. ''ब्रह्म एव गुरुरूपेण अवतिष्ठते'' अशी श्रुति असून ''म्हणूनिया तुका येतो काकुळती'' असें तुकाराम महाराजहि म्हणतात.

या जीवाच्या प्रेमामुळे, ज्याप्रमाणे आईला आपल्या अपत्याचें बोलणे कौतुकाचें वाटतें, त्यांप्रमाणे परमेश्वरप्राप्तीच्या तळमळीने संताना शरण गेलेल्या जीवाचेंहि संत कौतुक करतात व त्याच्यावर प्रेम करतात, असा हा संतांचा स्वभाव आहे, म्हणून अपत्याच्या लडिवाळपणाने आईचें प्रेम जसें दुणावते, त्याप्रमाणे परमार्थ साधूं पाहणारा पुरुष आपला सर्व अहंकार सोडून लडिवाळपणाने संतांना शरण गेला असतां संत त्याच्यावर कृपा करतात.

भगवंताचे ठिकाणीं व संताचें ठिकाणीं आत्मवत् प्रेम असणें याला भक्ति म्हणतात. हे भक्तिप्रेम प्राप्त होण्याकरिता सर्व भक्त भगवंताचे व श्रीगुरुचे ठिकाणीं व्यवहारांतील प्रेमाचे नातेसंबंध ठेवीत असतात. श्रीज्ञानेश्वर महाराज, येथे गुरुस्वरूप संतांशीं आईचें प्रेमळ नातें लावून, त्यांच्याशीं प्रेमसलगीने बोलत आहेत. ''दोषाननवलोकनं प्रेम'' (प्रेम रसायन) हें प्रेमाचें लक्षण घेऊन श्रीज्ञानेश्वर महाराज संतांची प्रार्थना करतात की, ज्याप्रमाणे प्रेमळ आई अपत्याच्या बोबडे बोलण्याकडे व वांकडे तिकडे पाऊल टाकण्याकडे दोषदृष्टि करीत नाही, उलट त्याचें कौतुक करून ती आनंद मानते. त्याप्रमाणेच माझ्या निरूपणांतील दोषाकडे आपलें मुळीच लक्ष जाणार नाही व त्याचेंच आपण मोठ्या प्रेमाने कौतुक कराल, असें मातृप्रेम माझ्यावर तुमचें असावें, म्हणून मोठ्या आवडीने मी आपल्याशीं सलगी करीत आहे.

''वेदस्येश्वरवाक्यत्वाद्यथार्थत्वे न संशय:।'' मुक्तस्येश्वररूपत्वाद्गुरोर्वागपि तादृशीं॥

(२१६-२१७) सर्व वेदान्त सि. सा. सं.

परमात्मा नित्य मुक्त असल्यामुळे त्याचें ज्ञान भ्रमरहित आहे. म्हणूनच त्याच्यापासून निर्माण झालेल्या वेदोपनिषदादिकांचें परम प्रामाण्य मानले जातें. तसेंच ज्ञानभक्तीच्या योगाने नि:शेष अहंकाररहित होऊन परमेश्वराशीं समरस झालेल्या संतांच्या हृदयांत स्वत: परमात्मा बसून त्यांचे मुखाने बोलत असल्यामुळे संताचें वचन देखील भगवंताच्या वेदवचनाप्रमाणे प्रमाण मानावें लागतें, असें आचार्य म्हणतात. असे संत ज्याच्यावर कृपा करतील त्यांच्या मुखाने ते स्वत:च बोलत असल्यामुळे, त्यांच्या मुखांतूनहि अपसिद्धान्त निघणे शक्य नसतें असा भाव.

वांचूनि माझिये बोलतिये योग्यते। सर्वज्ञ भवादृश श्रोते। काय धड्यावरी सारस्वतें। पढों सिकिजे॥ ८॥

अर्थ—(मी तुमचें प्रेम संपादन करण्याकरिता सलगी करीत आहे) त्यावांचून माझ्या गीतार्थ निरूपण करण्याच्या योग्यतेच्या दृष्टीने आपल्यासारख्या सर्वज्ञांना श्रोते होण्यासारखें-म्हणजे श्रवण करण्यासारखें-कांही नाही. कारण सरस्वतीच्या मुलाला धडे घेऊन शिकायला पाहिजें काय?॥ ८॥

गूढार्थदीपिका—वक्त्याने श्रोत्याचा गौरव करून आपल्या ठिकाणीं लहानपणा घेतला असतां, श्रोत्याच्या

ठिकाणीं, साहजिकच वक्त्याविषयीं प्रेम उत्पन्न होतें असा सामान्य नियम आहे, मग खरोखरच संतांच्या श्रेष्ठत्वाचा योग्य गौरव करून संतापुढे असें आपलें लहानपण व्यक्त केलें असतां त्यांना प्रेम उत्पन्न होईल, हें काय सांगायचें? म्हणून येथे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी संतांचें प्रेम उत्पन्न होण्याकरिता वरील गौरवाचे उद्‌गार काढले आहेत व आपला लहानपणा दाखविला आहे. अहंकार हा अविद्यारूप भ्रमाचें कार्य असल्यामुळे, जाणीवेचा अहंकार उत्पन्न झाला की तो बुद्धींत अर्थाचा भ्रम उत्पन्न करतो, पण नि:शेष अहंकाररहित बोलणें हें परमेश्वराचेच होत असल्यामुळें, तें भ्रमरहित राहतें असा भाव.

अवधारां आवडे तेसणां धुंधुरु। परि महातेजीं न मिरवे काय करूं। अमृताचिया ताटीं वोगरूं। ऐसी रससोय कैंची॥ ९ ॥
हां हो हिमकरासी विंजणें। की नादापुढें आइकवणें। लेणियासी लेणें। हें कहीं आथी॥ १०॥
सांगा परिमळें काय तुरंबावें। सागरें कवणे ठायीं नाहावें। हें गगनचि आडे आघवें। ऐसा पवाडु कैंचा॥ ११॥
तैसें तुमचें अवधान धाये। आणि तुम्ही म्हणा हें होये। ऐसें वक्तृत्व कवणा आहे। जेणें रिझा तुम्ही॥ १२॥

अर्थ—महाराज! पहा केवढ्याहि मोठ्या काजव्याचा किंवा टेंभ्याचा प्रकाश असला, तरी तो महातेजरूपी सूर्यप्रकाशापुढे आपलें तेज मिरवूं शकत नाही, काय करणार? अमृत वाढलेल्या ताटांत त्याच्या बरोबरीने वाढतां येईल, असें योग्य पक्वान्न कोणतें असणार?॥ ९ ॥ अहो! हें पहा चंद्राला वारा घालणें किंवा सुस्वरालाच सुस्वर ऐकविणें अथवा अलंकाराला अलंकार घालणें, हें कधी कोठे दिसतें काय?॥ १० ॥ सांगा बरें! सुवासाने कशाचा वास घ्यावयाचा? किंवा समुद्राने कोठे जाऊन आंघोळ करावी? अथवा आकाशाचा जीमध्ये समावेश होईल, अशी जगांत (आकाशापेक्षा) मोठी वस्तु कोठून असणार?॥ ११ ॥ त्याप्रमाणे महाराज! तुम्हां सर्वज्ञ संतांच्या, एकाग्र करून श्रवण करणाऱ्या चित्ताची तृप्ति होईल व तुम्हाला संतोष होऊन "हें होय वक्तृत्व" असें तुम्ही म्हणाल, असें वक्तृत्व कोणापाशीं असणें शक्य आहे?॥ १२ ॥

गूढार्थदीपिका—संत परिपूर्ण होऊनहि त्यांना पूर्णत्वाचा यत्किंचित्‌हि अभिमान नसतो. ते आपल्याकडे अत्यंत लहानपणा घेऊनच राहतात. कारण "गुरुत्वें जेवढा चांगु। तेवढाचि तारूनि लघु। गुरु लघु जाणे जो पांगु। तुझा करी"॥ ६७॥ (अमृ. प्र. ९) श्रेष्ठपणा व लहानपणा हे विरुद्ध धर्म आहेत, हें खरें आणि ते जगांत कोण्या वस्तूचे ठिकाणीं राहूं शकत नाहींत, पण ते परमेश्वराचे ठिकाणीं व संताचे ठिकाणीं अविरोधाने राहतात. म्हणजे जो अत्यंत थोर, तोच अत्यंत लघु असतो. जो आपल्याला अत्यंत लघु समजतो तोच अत्यंत श्रेष्ठ असतो. अत्यंत श्रेष्ठपणा व अत्यंत लहानपणा यांना आधार असलेले संत, यांच्या सर्वस्वीं जे स्वाधीन होतात त्यांनाच या लहानपणाचा व श्रेष्ठपणाचा अनुभव येतो.

तरि विश्वप्रगटितया गभस्ती। काय हातिवेन न कीजे आरती। कां चुळोदकें अपांपती। अर्घ्यु नेदिजे॥ १३॥
प्रभू तुम्ही महेशाचिया मूर्ती। आणि मी दुबळा अर्चितसें भक्ती। म्हणोनि बोल जऱ्ही गंगावती। तऱ्ही स्वीकाराल कीं॥ १४ ॥
बाळक बापाचिये ताटीं रिगे। रिगौनि बापातेंच जेवऊं लागे। कीं तो संतोषलेनि वेगें। मुखचि वोडवी॥ १५॥
तैसा मी जरी तुम्हांप्रती। चावटी करीतसें बाळमती। तरी तुम्ही तोषिजे ऐसी जाती। प्रेमाची या॥ १६॥
आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें। तुम्ही संत घेतले असा बहुवें। म्हणोनि केलिये सलगीचा नोहे। आभारु तुम्हां॥ १७ ॥
अहो तान्हयाची लागतां झटें। तरी अधिकचि पान्हा फुटे। रोषें प्रेम दुणवटे। पढियंतयाचेनि॥ १८॥

अर्थ—तरी पण सर्व जगताला प्रकाशित करणाऱ्या तेजस्वी सूर्याला प्रेमाने काडवातीने ओवाळीत नसतात काय? किंवा समुद्राला समुद्राचें पाणी घेऊन आदरपूर्वक अर्घ्य देत नसतात काय?॥ १३॥ महाराज! आपण शंकराच्या मूर्ती आहांत व मी अत्यंत दरिद्री, प्रेमभक्तीने माझ्या निर्गुडीच्या पानाप्रमाणे असलेल्या बोलाने तुमचें अर्चन करीत आहे, तें तुम्ही स्वीकारालच॥ १४॥ लहान मुलगा आपल्या बापाचे ताटांत जेवायला बसतो व बापाला जेऊं घालतो. ते पाहून बापाला अत्यंत आनंद होतो व आनंदाने मुलाच्या हातचा घांस घेण्याकरिता आपलें तोंड पुढें करतो॥ १५ ॥ त्याप्रमाणे मी जरीं तुमच्यापुढे नेणतेपणाने गीतार्थ निरूपणाचा चावटपणा केला तरी तुम्ही संतुष्ट व्हावें

असा प्रेमाचा स्वभावच आहे॥ १६ ॥ आणि तुम्हा संतांचे ठिकाणीं शरण आलेल्याविषयीं आपलेपणाचा मोह फारच असतो, म्हणून मी आपल्याशीं केलेल्या सलगीचा किंवा लडिवाळपणाचा आपल्याला भार वाटणार नाही॥ १७॥ महाराज! तान्ह्या वासराने गाईच्या स्तनास जसजशा ढुसण्या द्याव्या तसतसा गाईला जास्त पान्हा फुटतो, तसेंच लाडक्याच्या रागावण्याने त्याच्या विषयीचें प्रेम दुप्पट वाढतें. ॥ १८॥

गूढार्थदीपिका—भक्तिप्रेमाची वृद्धि होण्याकरिता "कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम्" (ना. भ. सू.) भगवंताचे ठिकाणीं आपले कामक्रोधादिक विकार समर्पण करावे, असें नारदभक्तिसूत्रांत प्रतिपादिले आहे.

म्हणऊनि मज लेंकुरुवाचेनि बोलें। तुमचें कृपाळूपण निदैलें। तें चेइलें हें जी जाणवलें। यालागीं बोलिलों मी॥ १९॥

अर्थ—म्हणून मज लेकराच्या बोलण्याने तुमचें निजलेलें किंवा सुप्त असलेलें कृपाळुपण जागें झालें, असें कळून आलें म्हणून "अवधान द्या" असें मी बोलिलों॥ १९॥

गूढार्थदीपिका—अविद्यावर्ती जीवाचें प्रेम करणें म्हणजे आपणहि अविद्येत पडणें आहे. कारण एक जीव दुसऱ्या जीवाचें प्रेम करतांना त्याच्या शुद्ध आत्मस्वरूपावर प्रेम करीत नसतो, तर त्याच्या नाशिवंत अज्ञानजन्य देहावर करीत असतो. प्रेम करणारा व ज्यावर प्रेम करावयाचें ते दोघेहि "आपण कोण" हें जाणत नसतात. मी म्हणजे देह हीच दोघांची समजूत असते. तें प्रेम विचारपूर्वक किंवा विवेकपूर्वक नसतें, त्या प्रेमाला मोह म्हणतात. तसा तो मोह घातक आहे, पण संतजन हे ज्ञानभक्तीने पूर्ण ब्रह्मस्वरूप झालेले असतात. त्यांचे ठिकाणीं चित्त आसक्त झालें असतां त्यांचें जें ध्यान घडतें तें ब्रह्माचें ध्यान होतें व त्या ध्यानाने, भगवंताच्या ध्यानाप्रमाणे जीव मुक्त होतो म्हणजे ब्रह्मांत मिळतो.

अशा प्रेमळ लाडक्याचे ठिकाणीं संतांचेंहि चित्त आसक्त होते; पण "शिष्याची जो नेघे सेवा। मानी देवासारिखें" या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे ते शिष्यालाहि ब्रह्मस्वरूपच पाहत असल्यामुळे, त्यांना ती आसक्ति बाधत नाही.

एऱ्हवीं चांदिणें पिकविजत आहे चेपणीं। कीं वारया घापत आहे वाहणी। हां हो गगनासि गंवसणी। घालिजे केवीं॥ २०॥
आइकां पाणी वोथिजावें न लगे। नवनीतीं माथुला न रिगे। तेवीं लाजिलें व्याख्यान न निगे। देखोनि जयांतें॥ २१॥
हें असो शब्दब्रह्म जिये बाजे। शब्द मावळलेया निवांतु निजे। तो गीतार्थु म्हाटीया बोलिजे। हा पाडु काई॥ २२॥

अर्थ—आढीमध्यें घालून चांदिणें पिकवितात काय? वाऱ्याला लोटून वाहावें लागतें काय? अहो महाराज! तसेंच आकाशाला गवसणी कशी घातली जाईल?॥ २०॥ महाराज! ऐका. पाणी पातळ करावें लागत नाही, लोण्यांत रवी शिरूं शकत नाही, त्याप्रमाणे ज्या वस्तूला पाहतांच तिचें वर्णन करणारे शब्द लाजून मागें फिरतात. ॥ २१॥ हें असो. ज्या ब्रह्मवस्तूचें ठिकाणी शब्दाची प्रवृत्ति नाही असें जाणून वेद देखील मौन धारण करतो व परब्रह्मरूप होऊन राहतो, ती गीतेची अर्थरूप ब्रह्मवस्तु मराठी भाषेंत सांगतां येईल अशी योग्यता कोठली?॥ २२॥

गूढार्थदीपिका—बोलणारा, शब्दाने ज्या वस्तूचा उल्लेख करीत असतो तो ती वस्तु आपल्याहून निराळी मानीत असतो. पण परब्रह्म किंवा आत्मा, बोलणाऱ्यांचें केवळ स्वरूपच असल्यामुळे तो तें आपल्याहून निराळें करूं शकत नाही, म्हणून शब्दाने बोलूं शकत नाही असें "जें जें बोलिजें तें तें नव्हे। होय तें तंव न बोलवे" (अमृ. प्र. ५-२६) या वचनाने माऊलींनी सांगितलें आहे.

आचार्यांनीहि "तस्मादेव च न ज्ञानशब्दवाच्यमपि तद् ब्रह्म", "सत्यशब्देनापि न तु सत्यशब्दवाच्यमेव ब्रह्म" (तै. उ. २-१) या पंक्तींनी तैत्तिरीयोपनिषदांतील भाष्यांत असेंच सांगितलें आहे. "वेद वानुनि तंवचि चांग। जंव न दिसे तुझें अंग। मग आम्हां तया मुग। एके पांती" (ज्ञा. अ. १४-११), "वेदु काय काय न बोले। परि नांवचि नाहीं घेतलें। ऐसें कांही जोडलें। नाही जेणें" (अमृ. प्र. ७-१०७).

परि ऐसियाही मज धिंवसा। तो पुढतियाचि येकी आशा। जे धिटींवा करूनि भवादृशां। पढियंतया होआवें॥ २३॥

अर्थ—गीतार्थ निरूपण करण्यास मी असा अयोग्य असूनहि निरूपण करण्यास धजलों, तें एकाच आशेने

की धीटाई करून तुमच्यासारख्या संतांचें आवडते किंवा लाडकें व्हावें. ॥ २३ ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्माचें ज्ञान नसल्यामुळें जोपर्यंत नामरूपें परब्रह्माहून निराळी वस्तु वाटते व त्यामुळें परब्रह्म झांकलें जातें, तोपर्यंत त्या नामरूपाचा परब्रह्माशीं संबंध नसतो; म्हणून नामरूपें निराळीं करून परब्रह्माचें ज्ञान करून घ्यावें लागतें. पण परब्रह्माहून निराळीं केलेलीं नामरूपें मिथ्या-म्हणजे त्यांना स्वतंत्र अस्तित्व व वस्तुत्व नाही असें-ठरल्यावर अन्वयाने परब्रह्माशीं ऐक्य होऊन ''सदात्मना सत्यत्वाभ्युपगमात् सर्वं च नामरूपादि सदात्मनैव सत्यं विकारजातम्'' (छां. उ. ६-३-२ आचार्यभाष्य) नामरूपें परब्रह्मस्वरूपच होतात.

असें हे नामरूपाने भासणारें परब्रह्म सगुणच राहणार यांत शंका नाही; पण तें सगुण असलें तरी निर्गुण म्हणजे मायागुणरहित असतें. मायारहित म्हणून निर्गुण व सर्वज्ञ सर्वशक्ति व षड्गुणैश्वर्याने संपन्न असते म्हणून सगुण, अशा नामरूपाने सगुण झालेल्या भगवद्रूपाचे ठिकाणीं संतांच्या कृपेने प्राप्त झालेल्या आत्मप्रेमाने भक्ति करून ज्याची ब्रह्मैक्याची जाणीव नाहीशी झाली, अशा पूर्ण ब्रह्मस्वरूप झालेल्या प्रेमळ भक्ताच्या मुखांतून निघणाऱ्या शब्दाने परब्रह्म वर्णिलें जाऊं शकतें असा भाव.

अशा भक्तांनी परब्रह्माचें वर्णन करणें म्हणजें परब्रह्मानेंच परब्रह्माचें वर्णन करणें होय.

दशमस्कंधांतर्गत वेदस्तुतींतील ''ब्रह्मन् ब्रह्मण्यनिर्देशे निर्गुणे गुणवृत्तय:'' या श्लोकावर टीका करतांना श्रीधराचार्यांनी ''सगुणमेव गुणैरनभिभूत..........सच्चिदानंदं भगवंतं श्रुतय: प्रतिपादयन्ति'' या वचनाने हाच भाव दाखविला आहे.

म्हणून मी लाडका झालों, तर भगवंताचें प्रेम प्राप्त होऊन माझीं ब्रह्मैक्य जाणीव नाहीशी होईल व मग गीतार्थाचें वर्णन माझेकडून होऊं शकेल, असें श्रीज्ञानेश्वर महाराज सुचवित आहेत.

परि आतां चंद्रापासोनि निववितें। जें अमृताहूनि जीववितें। तेणें अवधानें कीजे वाढतें। मनोरथा माझिया॥ २४॥

अर्थ—तरी चंद्रापेक्षाहि प्रसन्नता उत्पन्न करणाऱ्या किंवा अमृताहूनहि जीवित अमर करणाऱ्या एकाग्रचित्ताने श्रवण करून, गीतार्थ निरूपण करण्याचा माझा मनोरथ उत्तेजित करा. ॥ २४ ॥

गूढार्थदीपिका—श्रोते वक्त्याचें निरूपण जर निर्मत्सर दृष्टीने व प्रेमाने ऐकत असले, तर वक्त्यालाहि प्रेम उत्पन्न होऊन तोहि अधिक उल्हासाने निरूपण करतो.

कां जैं दिठिवा तुमचा वरुषे। तैं सकळार्थसिद्धि मती पिके। एऱ्हवीं कोंभेला उन्मेषु सुके। जरी उदास तुम्ही॥ २५॥

अर्थ—कारण तुमच्या कृपादृष्टीचा वर्षाव झाला असतां, बुद्धीच्या ठिकाणीं सर्व अर्थसिद्धीचें पीक येतें-म्हणजे बुद्धीत सर्व शब्दार्थ बरोबर स्फुरतात-आणि जर तुम्ही उदासीन राहिला, तर ज्ञानाचा फुटलेला अंकुरहि सुकून जातो. ॥ २५ ॥

गूढार्थदीपिका—ज्ञानभक्तीने कृतार्थ झालेल्या संतरूपी सद्गुरुंच्या कृपादृष्टीचा वर्षाव अत्यंत निरहंकार पुरुषावरच होतो व तो इतका समर्थ असतो की त्याच्या बुद्धींत यथार्थाचें ज्ञान होऊन तो कृतार्थ होतो. ''जी आपुलिया स्नेहाची वागेश्वरी। जरी मुकेयाते अंगीकारी। तो वाचस्पतीसीं करी। प्रबंध होडा'' (ज्ञा. अ. १०-८) आणि त्याच्या जाणीवेचा अहंकार पाहून ते संत उदास राहिले असतां, प्राप्त झालेले ज्ञानहि मावळतें हाच सिद्धान्त श्रीज्ञानेश्वर माऊलींनी ''जयाचेनि सावायें। जीव ब्रह्म उपरो लाहे। ब्रह्महि हातातळील जाये। उदासें जेणे'' (अमृ. प्र. २-१६) या अमृतानुभवांतील ओवींतहि मांडला आहे.

सहजें तरी अवधारा। वक्तृत्वा अवधानाचा होय चारा। तरी दोंदें पेलती अक्षरां। प्रमेयाचीं॥ २६॥
अर्थ बोलाची वाट पाहे। तेथ अभिप्रावो अभिप्रायातें विये। भावाचा फुलौरा होत जाये। मतिवरी॥ २७॥
म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे। तरी हृदयाकाशा सारस्वतें वोळे। आणि श्रोता दुश्चित तरि वितुळे। मांडला रसु॥ २८ ॥

अर्थ—महाराज! हे स्वभाविकच आहे पहा, जर वक्त्याच्या वक्तृत्वाला श्रोत्याच्या एकाग्रतेने व प्रेमाने श्रवण करण्याचे खाद्य मिळालें, तर वक्त्याच्या मुखांतून जीं अक्षरें निघतात, ती सिद्धान्ताने भरलेलीं असतात. ॥ २६ ॥ अर्थ

बोलण्याचीच वाट पाहत असतो (म्हणजे तोंडांतून अक्षरें निघण्याचीच वाट, की लगेच अर्थ शब्दांत शिरतो.) तेथे मग अभिप्रायांतून अभिप्राय उत्पन्न होऊं लागतात व बुद्धीवर सद्भावाची किंवा तद्रूपतेची पुष्पवृष्टि होते किंवा त्याच्या बुद्धीवर सद्भावाचा फुलवरा बांधला जातो--म्हणजे बुद्धि यथार्थाकार होत जाते. ॥ २७ ॥ म्हणून संवादाचा अनुकूल वायु वाहला तर वक्त्याच्या अंत:करणांत ब्रह्मविद्येचे मेघ वळून येतात, आणि श्रोता दुश्चित्ताने ऐकत असला तर मांडलेला रसहि नाहीसा होतो. ॥ २८ ॥

गूढार्थदीपिका—संवादाचा सुवावो ढळे—संवाद म्हणजे श्रोत्याची वक्त्याच्या विचाराशीं अनुकूलता. या संवादाला श्रीज्ञानेश्वर महाराजांनी सुवायूची उपमा दिली आहे. सुवायु म्हणजे जलवर्षाव करणाऱ्या मेघांना एकत्र करणारा वायु होय. ज्याप्रमाणे सुवायूच्या योगाने मेघ एकत्र होऊन जलवर्षाव करतात, त्याप्रमाणे संवादरूपी सुवायूच्या योगाने भक्ताच्या हृदयांत ब्रह्मविद्येचे मेघ वळून येतात.

श्रोता दुश्चित तरी वितुळे। मांडला रसु—आणि श्रोता दुश्चित म्हणजे लय विक्षेपादि विघ्नांनी युक्त किंवा आढ्यतादि विकाराने युक्त असला, तर वक्त्याचें रसाळ निरूपणहि वक्त्याला किंवा श्रोत्याला दोघांनाहि आनंद उत्पन्न करूं शकत नाही.

अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये। परि ते हातवटी चंद्रीं कीं आहे। म्हणऊनि वक्ता तो वक्ताचि नोहे। श्रोतेनिविण ॥ २९ ॥

अर्थ—अहो महाराज! चंद्रकांतमणि पाझरतो यांत शंकाच नाही, पण त्याला पाझर फोडण्याची कला मात्र चंद्राचे ठिकाणींच असते. म्हणून प्रेमपूर्वक एकाग्रतेने श्रवण करणाऱ्या श्रोत्यावांचून वक्त्याचेंहि वक्तृत्व उचंबळून येत नाही. ॥ २९ ॥

गूढार्थदीपिका—या ओवींत श्रीज्ञानेश्वर माऊलींनी श्रोता व वक्ता यांच्या संवादांत श्रोता व वक्ता या दोघांनाहि त्या संवादापासून आनंद प्राप्त होण्याची जबाबदारी सर्वस्वीं श्रोत्यावरच टाकली आहे. वक्त्याविषयी प्रेम बाळगून एकाग्र अंत:करणाने श्रवण करणारा श्रोता, वक्त्याच्या वक्तृत्वाला पुष्टि देणारा होतो व दोषैकदृष्टि ठेवून श्रवण करणारा श्रोता स्वत:हि आनंद भोगत नाही व वक्त्याला आनंद भोगूं देत नाही, तो आपलाच मोठा गौरव करून, अहंकाराच्या नाठरवृत्तींत मग्न असतो.

परी आतां आमुतें गोड करावें। ऐसें हें तांदुळीं कासया विनवावें। साइखडियानें काइ प्रार्थावें। सूत्रधारातें॥ ३० ॥
तो काय बाहुलियांचिया काजा नाचवी। की आपुलिये जाणिवेची कळा वाढवी। म्हणऊनि आम्हां या ठेवाठेवी। काय काज ॥ ३१ ॥

अर्थ—पण आम्हांला गोड करून घ्या, अशी तांदुळाने जेवणारांना प्रार्थना कशाला करायला पाहिजे? किंवा आम्हांला चांगलें नाचवा अशी कळसूत्री बाहुल्यांनी सूत्रधाराला प्रार्थना करायची असते काय?॥ ३० ॥ सूत्रधार कळीच्या बाहुल्या बाहुल्यांकरिता नाचवितों काय? कीं आपल्या ठिकाणचें कलाकौशल्य दाखविण्याकरिता नाचवितो? म्हणून मला या प्रार्थना वगैरेची उठाठेव करण्याची आवश्यकता नाही. ॥ ३१ ॥

गूढार्थदीपिका—ज्ञानभक्तीने पूर्ण अद्वैतरूप झालेल्या संतांच्या अद्वैतज्ञानाची बैठक केव्हाहि भंग पावत नाही. "म्हणोनि शिष्य आणि गुरुनाथु। या दोहो शब्दांचा अर्थु। श्रीगुरुचि परी होतु। दोहो ठायी" ॥ ६१ ॥ (अमृ. प्र., २) शिष्य व गुरु, भक्त व भगवान, वक्ता व श्रोता इत्यादि सर्व भावाने एक भगवान किंवा श्रीगुरुच अखंड लीलानाट्य दाखवित आहेत, असेंच संत समजत असतात.

आपल्या भक्तिप्रेमाने त्यांचा व्यष्ट्यहंकार संपूर्ण नाहीसा झालेला असतो व सर्व भगवंताची लीला आहे असेच ते दृढ समजत असल्यामुळे त्यांच्या ठिकाणीं व्यष्ट्यहंकार पुन: कधी उत्पन्न होत नाही.

हाच भाव वरील ३०-३१ या ओव्यांत श्रीमाऊलींनी सुचविला आहे.

तंव श्रीगुरु म्हणती काइ जाहलें। हें समस्तही आम्हां पावलें। आतां सांगें जें निरोपिलें। नारायणें॥ ३२ ॥
येथ संतोषोनि निवृत्तिदासें। जी जी म्हणऊनि उल्हासें। अवधारां श्रीकृष्ण ऐसें। बोलते जाहले॥ ३३ ॥

अर्थ—तेव्हा श्रीगुरू निवृत्तिनाथ म्हणतात, अरे बाबा! कां चिंता करतोस? तुझें सर्व म्हणणें आम्ही मान्य

केलें आहे. आता तूं श्रीकृष्णाने अर्जुनाला जें कांही सांगितलें, तें आम्हांला सांग म्हणजे झालें. ॥ ३२ ॥ निवृत्तिदास श्रीज्ञानेश्वर महाराजांना श्रीगुरुचें भाषण ऐकून संतोष झाला व ते उल्हासाने म्हणाले की, अहो जी सद्गुरुनाथ! भगवान श्रीकृष्ण काय बोलले, तें ऐका. ॥ ३३ ॥

अवतरणिका—एकान्तभक्ति म्हणजे सगुण परमेश्वरचें निःसीम प्रेम होय. असें निःसीम प्रेम, आपल्या आत्म्याचे ठिकाणींच असतें. ते निःसीम प्रेम सगुण परमेश्वराचे ठिकाणीं होण्याकरिता आत्मा व सगुणपरमात्मा एकच आहे—म्हणजे परमेश्वराचें निर्गुणस्वरूप जसें शुद्ध निरुपाधिक आहे, तसेंच परमेश्वराचें सगुण स्वरूपहि शुद्ध निरुपाधिक आहे—हें ज्ञान आवश्यक आहे म्हणून आता भगवान विज्ञानासह ज्ञानाचें म्हणजे ज्ञानदृष्टिनें पाहतां, विज्ञान म्हणजे प्रपंचहि ज्ञानस्वरूपच आहे असें निरूपण करतात.

श्रीभगवानुवाच

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे। ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्॥ १ ॥

अर्थ—श्रीभगवान म्हणतात—अर्जुना! जें जाणून तूं सर्व धर्माधर्मरूप पापापासून मुक्त होशील असें हें अत्यंत गूढ जें विज्ञानासह ज्ञान तें आता मी, निर्मत्सर अशा तुला सांगतों. ॥ १ ॥

नातरि अर्जुना हें बीज। पुढती सांगिजेल तुज। जें हें अंतःकरणींचें गुज। जिवाचिये॥ ३४॥

अर्थ—किंवा अर्जुना! जें सर्वांचें मूळ कारण आणि सर्व जीवांच्या अंतःकरणांत गुप्त असलेली अशी जी वस्तु ती, मी आता तुला पुढे सांगत आहे. ॥ ३४॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे झाडाच्या बीजापासून झाडाचा विस्तार होतो, त्याप्रमाणे ज्ञानविज्ञान समजल्याने, ज्ञान हेच विज्ञानाचें बीज असून, विज्ञान हा ज्ञानाचा विस्तार होय, असा अनुभव येतो. म्हणून येथें भगवंतांनी ज्ञानाला विज्ञानाचें बीज म्हटलें आहे आणि ही ज्ञानविज्ञान स्थिति जीवाला न कळलेली व जीवाच्या अंतःकरणांत गुप्त असलेली गोष्टहि होय; म्हणून याला गूजहि म्हटलें आहे.

कृतार्थ झालेल्या ज्ञानी पुरुषांना हें ज्ञानविज्ञान अत्यंत गुह्य म्हणूनच गुरुपरंपरेने प्राप्त झालेलें असतें आणि ते ज्ञानी पुरुष कोणालाहि सहजासहजीं न सांगण्याजोगें असें गुह्य म्हणूनच वागवितात.

येणें मानें जीवाचें हियें फोडावें। मग गुज कां पां मज सांगावें। ऐसें कांहीं स्वभावें। कल्पिशी जरी॥ ३५॥

तरी परियेसीं गा प्राज्ञा। तूं आस्थेचीच संज्ञा। बोलिलिये गोष्टीची अवज्ञा। नेणसी करूं॥ ३६॥

अर्थ—अशा प्रकारें जीवाचें अंतःकरण उघडें करावें व त्यांतील गुप्त गोष्ट मला कां सांगावी, असें कदाचित् मनुष्यस्वभावानुसार तूं कल्पना करशील. ॥ ३५ ॥ तर, सुबुद्धि अर्जुना! सांगतों ऐक, तुझें अर्जुन हें नांव म्हणजे आस्थेचेंच किंवा श्रद्धेचेंच दुसरें नाव आहें आणि तूं सांगितलेल्या गोष्टीचा कधीहि अनादर करीत नाहीस. ॥ ३६ ॥

गूढार्थदीपिका—प्राज्ञ—प्रज्ञा म्हणजे बुद्धि. ती ज्यांना प्राप्त झाली, त्यांना 'प्राज्ञ' म्हणतात. व्यवसायात्मिका व अव्यवसायात्मिका अशी दोन प्रकारची बुद्धि आहे. व्यवसायात्मिका म्हणजे अत्यंत सत्याचा निश्चय करणारी व अव्यवसायात्मिका म्हणजे वाटेल त्याला सत्य समजणारी बुद्धी.

मुळांत बुद्धि ही सत्वगुणाचें कार्य असल्यामुळें, ती शुद्धच आहे, पण जीवाच्या पापकर्माने ती अशुद्ध होते व तींत काम म्हणजे विषयवासना, बुद्धिमांद्य इत्यादि दोष उत्पन्न होतात. हे दोष नाहीसे झाले की, ती आपल्या मूळच्या स्वरूपाला प्राप्त होते. आपल्या मूळच्या स्वरूपाला प्राप्त झालेल्या शुद्धबुद्धीला किंवा सात्विकबुद्धीला चरमबुद्धि किंवा अग्रबुद्धि किंवा सूक्ष्मबुद्धि म्हणतात. "दृश्यते त्वग्रया बुद्ध्या" ही सूक्ष्म बुद्धीच आत्मज्ञानाला उपयोगी असते. हीच खरी प्रज्ञा होय. ही ज्यांना प्राप्त झाली तेच खरे प्राज्ञ होत.

भगवद्भक्तीनें बुद्धींतील दोष नाहीसे होऊन, ती शुद्ध होते. अर्जुन भक्त असल्यामुळे त्याची बुद्धि सूक्ष्म झाली होती, म्हणूनच ज्ञानेश्वर महाराजांनी त्याला 'प्राज्ञ' असें म्हटलें आहे. अशा प्राज्ञपुरुषाच्या ठिकाणीं ज्ञानाची आस्था किंवा अत्यंत आवड असते आणि ते ज्ञानाचा अनादर कधी करीत नाहीत.

अर्जुन माझा भक्त आहे, "तैसे स्वामिचिया मनोभावा। न चुके हेचि परमसेवा" सांगितलेलें ज्ञान, अनादर न करतां अत्यंत आस्थेने घेईल असा भगवंतांनी येथे आत्मविश्वास व्यक्त केला आहे, आणि त्याचप्रमाणे "आस्थेचीच संज्ञा" या पदाने जो श्रद्धास्वरूप होऊन जातो, त्यालाच ज्ञान प्राप्त होतें असें सुचविलें आहे.

म्हणोनि गूढपण आपुलें मोडो। वरि न बोलावेंही बोलावें घडो। परि आमुचिये जीवींचें पडो। तुझ्या जिवीं॥ ३७॥
अगा थानीं कीर दूध गूढ। परि थानासीचि नव्हे कीं गोड। म्हणोनि सरो कां सेवितयाची चाड। जरी अनन्य मिळे॥ ३८॥
मुडाहूनि बीज काढिलें। मग निर्वाळलिये भूमीं पेरिलें। तरि तें सांडीविखुरीं गेलें। म्हणों ये कायी॥ ३९॥
यालागीं सुमनु आणि शुद्धमती। जो अनिंदकु अनन्यगती। पैं गा गौप्यही परी तयाप्रती। चावळिजे सुखें॥ ४०॥

अर्थ—म्हणून तें ज्ञानाचें गुप्तपण नाहीसें होवो व बोलण्याजोगे नाही तें बोलावें लागो, पण माझ्या अंत:करणांत जी गुप्त गोष्ट आहे ती तुझ्या अंत:करणांत प्राप्त होवो!॥ ३७॥ बा अर्जुना! दूध स्तनांतच असतें पण स्तनाला त्याची गोडी मिळत नाही; म्हणून दुधासाठी तळमळणाऱ्या व आईवर विसंबून असणाऱ्या लेकराची इच्छा पूर्ण होवो, असें आईला वाटतें.॥ ३८॥ कणगींतून बीजाचें धान्य काढून जर उत्तम मशागत केलेल्या जमिनीत तें पेरलें तर तें व्यर्थ सांडलें गेलें, असें म्हणतां येईल काय?॥ ३९॥ म्हणून जो शुद्ध मनाचा, शुद्ध बुद्धीचा, निंदा न करणारा आणि अनन्य आहे, अशालाच जिव्हाळ्याची गोष्ट खुशाल सांगावी.॥ ४०॥

गूढार्थदीपिका—सुमन म्हणजे ज्याचें मन संकल्पविकल्प सोडून श्रुतिसंतांच्या वचनावर दृढ विश्वास ठेवणारें असें श्रद्धाळू आहे.

शुद्धमति—म्हणजे दृढ वैराग्याने ज्याच्या बुद्धीतील विषयवासनारूपी मल व साधनाची चंचलता म्हणजे विक्षेप नाहीसे होऊन, ज्याची बुद्धि सूक्ष्म आत्मज्ञान समजून घेण्याला पात्र झाली.

अनिंदक—म्हणजे जो परमार्थसाधनाकडे किंवा परमार्थ साधन सांगणाऱ्याकडें दोषदृष्टीने पाहत नाही.

अनन्य—म्हणजे जो एकनिष्ठ आहे "और तु सन्त सवै सिर ऊपर। सुंदर के उर है गुरु दादू॥ ५॥" (सुंदर विलास) सर्व संतांना पूज्य मानणारा पण आपल्या गुरूला श्रेष्ठ समजून अखंड शरण असणारा.

आत्मज्ञान, हें जीवाला कृतार्थ म्हणजे संपूर्ण दु:खरहित करणारें आहे. तें गुरुपरंपरेनेच प्राप्त होतें व सुमन, शुद्धमति अनिंदक, अनन्यगति इत्यादि गुणांनी युक्त होऊन तें घेतलें असतां टिकतें व कृतार्थ करणारें होतें; म्हणून तशा गुणांनी युक्त असलेल्या शिष्यालाच श्रीगुरु तें देतात. "ब्रूयु: स्निग्धस्य शिष्यस्य गुरवो गुह्यमप्युत" (भाग. स्कं. १०) श्रीगुरुनी आपल्या प्रेमळ शिष्यालाच आत्मज्ञानासारखे गुह्यज्ञान द्यावें असें भागवतांत सांगितलें आहे.

तरि प्रस्तुत आतां गुणीं इहीं। तूंवांचूनि आणिक नाहीं। म्हणोनि गुज तरी तुझां ठायीं। लपवूं नये॥ ४१॥
आतां किती नावानावा गुज। म्हणतां कानडें वाटेल तुज। तरि ज्ञान सांगेन सहज। विज्ञानेंसीं॥ ४२॥
परि तेंचि ऐसेनि निवाडें। जैसें भेसळलें खरें कुडें। मग काढिजे फाडोवाडें। पारखूनियां॥ ४३॥
कां चांचूचेनि सांडसें। खांडिजे पय पाणी राजहंसें। तुज ज्ञान विज्ञान तैसें। वांटूनि देऊं॥ ४४॥
मग वारयाचियां धारसा। पडिन्नला कोंडा कां नुरेचि जैसा। आणि अन्न कणांचा आपैसा। राशिवा जोडे॥ ४५॥
तैसें जें जाणितलेयासाठीं। संसार संसाराचिये गांठीं। लाऊनि बैसवी पाटीं। मोक्षश्रियेच्या॥ ४६॥

अर्थ—माझ्या अंत:करणांत असलेली गुप्त गोष्ट सांगण्याकरिता जसा सद्गुणी पुरुष आवश्यक आहे, तसा सद्गुणी सध्यां तरी तुझ्यावांचून कोणी नाही; म्हणूनच अंत:करणांतील गुप्त गोष्ट आहे तरी मला तुझ्यापासून लपवून ठेवतां येत नाही.॥ ४१॥ आतां अर्जुना! मी तुला वारंवार गुज सांगतों, गुज सांगतों म्हणतानां कंटाळा वाटेल; तेव्हा विज्ञानासह ज्ञान मी तुला सांगणार आहे.॥ ४२॥ खरी व खोटी वस्तु परस्परांत मिसळल्या असतां, ज्याप्रमाणे त्यांना पारखून अलग केलें जातें त्याप्रमाणे ज्ञान विज्ञान पारखून अलग करून सांगणार आहे.॥ ४३॥ किंवा ज्याप्रमाणे राजहंसाने आपल्या चोंचरूपी चिमट्याने, मिसळलेलें दूधपाणी अलग करावें त्याप्रमाणे मी हें तुला मिसळलेलें ज्ञानविज्ञान अलग करून सांगतों.॥ ४४॥ किंवा मळलेलें धान्य, भूस व बीं मिळून असतें आणि तें वाऱ्याच्या प्रवाहांत

धरल्यावर कोंडा उडून जातो आणि खाली सहजच धान्याचा ढीग पडतो. ॥ ४५ ॥ त्याप्रमाणे जें विज्ञानासहित ज्ञान जाणले असतां विज्ञानरूप सर्व संसार संसाराचे गांठीं लावला जातो व पुरुषाला मोक्षलक्ष्मीच्या सिंहासनावर बसविते ॥ ४६ ॥

गूढार्थदीपिका—तैसें जें जाणितलेयासाठीं—एका सच्चिदानंद अद्वैत परब्रह्मावांचून दुसरी वस्तुच नाही, असें जाणणें याला ज्ञान म्हणतात. हें ज्ञान बुद्धींत दृढ ठसवावयाचें असतें आणि तें बुद्धींत दृढ ढसलें गेलें की सर्व संसाराचा निरास होतो. आता ज्ञानाने संसाराचा नाश कसा होतो हें सांगतात.

संसार संसाराचिया गांठीं। लावूनि—ज्ञानाने संसाराची संसाराशीं गांठ लाविली जाते. परब्रह्माला विसरून भासणारीं नामरूपें ही एक स्वतंत्र वस्तु आहे, असें जें जीव मानतो, हाच संसार होय.

मूळांत जी परब्रह्म वस्तु आहे, ती विसरून, तिच्या ठिकाणीं भासणाऱ्या नामरूपाला जगद्वस्तु समजून, जीव ब्रह्मवस्तूशीं व संसार वस्तूशीं गांठ बांधतो—म्हणजे संबंध लावतो व त्याच्या समजुतीप्रमाणेच शास्त्रानेहि संसार किंवा जगत् व परब्रह्म यांचा कार्यकारणसंबंध लावला आहे; पण आत्मज्ञान झाल्यावर तें ज्ञान, नामरूपात्मक संसाराची परब्रह्माशीं लावलेली गांठ तोडून, संसाराची संसाराशीं गांठ बांधते—म्हणजे नामरूपात्मक मानलेली संसारवस्तु परब्रह्माचे ठिकाणीं मुळींच नाही, संसाराचेच ठिकाणीं आहे—म्हणजे संसारवस्तु केवळ नाममात्र आहे असा अनुभव आणून देतें.

''**वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम्**'' (छां. उ. ६-१-४) या श्रुतीने हाच सिद्धान्त सांगितला असून श्रीज्ञानेश्वर माउलींनी ''संसार संसाराचिये गांठीं। लावूनि'' या पदांनी तोच सिद्धान्त मांडला आहे.

मोक्षश्रियेच्या पाटीं बैसवी—मोक्ष म्हणजे ब्रह्मस्थिति, ही एकच आहे, पण सर्वदु:खनिवृत्ति व परमानंदप्राप्ति अशी तिचीं दोन अंगे आहेत.

मोक्षाचें, सर्वदु:खनिवृत्तिरूप अंग, आत्मज्ञानाने सर्व संसार केवळ शब्दमात्र आहे, वस्तुत: नाही असे कळल्याने साध्य होतें, पण परमानंदप्राप्तिरूप अंग साधत नाही. समाधिव्युत्थानीं अखंड आनंद असणे याला परमानंदप्राप्ति म्हणतात.

नामरूपाच्या आविष्काराला जो आपण संसार म्हणून म्हणत होतो तो वस्तुत: नाही, असें ज्ञानाने कळले तरी पूर्वसंस्काराने आविष्काराचे ठिकाणीं जगताची स्मृति होते व त्या ठिकाणीं उपेक्षाबुद्धि होते. ही उपेक्षावृत्ति अखंड ब्रह्मानंदाला विरोधि होते; म्हणून उपेक्षावृत्ति जोपर्यंत आहे तोपर्यंत परमानंद मिळत नाही.

चैतन्यवत् सुखं चास्य स्वभावश्चेद् चिदात्मन:। धीवृत्तिष्वनुवर्तेत सर्वास्वपि चितिर्यथा॥ ७३ ॥ (पं. द. प्र. १२)

चैतन्याप्रमाणेच सुखहि परब्रह्माचा स्वभावच असल्यामुळे, ज्ञान झाल्याबरोबर, ज्याप्रमाणे सर्व वृत्तीत चैतन्यच भरलें असा अनुभव येतो, त्याप्रमाणें तेथे सुखाचीहि अनुवृत्ति राहिलीच पाहिजे, असें जें भक्तिरहित ज्ञानी प्रतिपादन करतात त्यांना विद्यारण्यस्वामींनी चोख उत्तर दिलें आहे. स्वामी म्हणतात—

मैवमुष्णप्रकाशात्मा दीपस्तस्य प्रभा गृहे। व्याप्नोति नोष्णता तद्वच्चितेरेवानुवर्तनम्॥ ७४॥ (पं. द. प्र. १२)

प्रकाश व उष्णता असा दिव्याचा दोन प्रकारचा स्वभाव आहे, परंतु घरांत दिवा लावला असतां, प्रकाशाचा जसा विशेष अनुभव येतो, तसा त्याच्या उष्णतेचा येत नाही. त्याप्रमाणेच जीव हा वृत्तिस्वरूप आहे, म्हणूनच त्याच्या वृत्तिरूपतेमुळे त्याला परब्रह्माचा अनुभव घेतांना प्रथम परोक्षज्ञानाने सदंशाचा अनुभव येतो व नंतर अपरोक्षज्ञानाने चिदंशाचा अनुभव येतो व प्रेमवृत्तीने परमानंदाचा अनुभव येतो.

ज्ञाननिष्ठेच्या परिपाकाने, नंतर एकजिनसी अद्वैत असा परब्रह्माचे ठिकाणीं॥ ''ग्राह्यं वा शंकरादन्यत् त्याज्यं वा यदि विद्यते''॥ ५९ ॥ (सू. सं. य. वै. खं.) ग्राह्य किंवा त्याज्य अशी परब्रह्माहून दुसरी कोणतीच वस्तु अनुभवाला येणें शक्य नाही. म्हणून परब्रह्माच्या सत्तेवर भासणारीं नामरूपें परब्रह्माच्या स्वाभाविक चैतन्यशक्तीचाच आविर्भाव असून तीं परब्रह्मस्वरूपच आहेत, असा अन्वयरूप अनुभव येतो.

मग परब्रह्म परमप्रेमस्वरूप असल्यामुळें, परब्रह्मस्वरूप झालेल्या नामरूपावरहि प्रेम बसतें. अशा रीतीने नामरूपासह परब्रह्माचें जें परमप्रेम लागतें त्यालाच भक्ति म्हणतात.

ही भक्ति पूर्ण ज्ञाननिष्ठा बाणल्यावर प्रगट होते ''ते ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे। तेथ भक्ति माझी उल्लसे''॥ १२४८॥ (ज्ञा. अ. १८) असें माऊलींनी म्हटलें आहे. या भक्तीनेच मोक्षाचें जें परमानंदरूप दुसरें अंग तें साध्य होतें. अशा रीतीने साधक दु:खरहित परमानंदप्राप्तिरूप मोक्षलक्ष्मीच्या सिंहासनावर आरूढ होतो.

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम्। प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम्॥ २॥

अर्थ—हें ज्ञान म्हणजे सर्व विद्येंत म्हणजे सर्व ज्ञानांत श्रेष्ठ होय व सर्व गुह्यांतहि गुह्य होय. हें अत्यंत पवित्र म्हणजे सर्व पवित्रांत पवित्र आहे. त्याचा साक्षात् अनुभव येतो. हें ज्ञान धर्माला धरून आहे. तें प्राप्त करून घ्यायला अत्यंत सोपें आहे व प्राप्त झाल्यावर अक्षय टिकणारें आहे. ॥ २ ॥

जें जाणणें या सुविद्येच्या गांवीं। गुरुत्वाची आचार्यपदवी। जें सकळ गुह्यांचा गोसावी। पवित्रां रावो॥ ४७॥

अर्थ—जाणण्याला योग्य अशा जितक्या उत्तम विद्या आहेत त्या सर्व विद्यामध्ये या ब्रह्मविद्येला सर्वश्रेष्ठ अशी थोरपणाची आचार्य ही पदवी मिळाली आहे आणि सर्व गुह्यांत गुह्य अशी ही ब्रह्मविद्या गुह्यांचा राजा आहे व सर्व पावन करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ आहे. ॥ ४७ ॥

गूढार्थदीपिका—जाणणेया या सुविद्येच्या गांवीं। गुरुत्वाची आचार्य पदवी—''**द्वे विद्ये वेदितव्ये...........परा चैवापरा च**'' (मुं. उ. १-१-४) जाणण्याजोग्या अशा दोन विद्या आहेत. एक परा व दुसरी अपरा, पराविद्या ही ब्रह्मविद्या होय. अपरा ही अविद्या होय. अविद्यारूप सर्व अपराविद्या संसारदायक म्हणून दु:खदायक आहे. आणि पराविद्या ही, सर्व अविद्याजन्य दु:खाचें निर्मूलन करून सच्चिदानंद परब्रह्माची प्राप्ति करून देणारी आहे. दु:ख मुळींच नको व अखंड सुख असावें अशी प्रत्येक जीवाची जी इच्छा ती पूर्ण करणारी हीच एक विद्या आहे; म्हणून ब्रह्मविद्या सर्व विद्येंत श्रेष्ठ म्हणून गणली गेली आहे. अर्थात् तिला 'आचार्य' अशी जी पदवी श्रीमाऊलींनी येथे दिली आहे ती सार्थच आहे.

सकळ गुह्यांचा गोसावी—व्यवहारामध्ये पुष्कळ गुह्य गोष्टी असतात. त्या व्यवहारांतील तज्ज्ञापासून जाणल्या जातात पण आत्मज्ञानरूपी गुह्य गोष्ट ही कोणत्याहि व्यावहारिक पुरुषांकडून कळूं शकत नाही. तिचा बोध करून देणारा पुरुष दुर्मिळ असतो आणि ती कळली असतां सर्व गुह्यगोष्टींचा गुह्यपणा तुच्छ ठरतो; पण आत्मज्ञानरूपी गुह्यगोष्टीचा गुह्यपणा कायमच राहतो, म्हणून ब्रह्मविद्या ही सर्व विद्येंतील गुह्यामध्ये गुह्य आहे.

पवित्रां रावो—जो पदार्थ अशुद्धि नाहीशी करतो त्याला पवित्र म्हणतात. परब्रह्म अत्यंत शुद्ध असून, जीवहि पूर्ण ब्रह्म आहे, म्हणून शुद्ध आहे. पण अविद्यारूप अशुद्धीने तो अशुद्ध झाला आहे. त्याच्या ठिकाणची ही अविद्यारूप अशुद्धि, सत्कर्म, प्रायश्चित्त, तीर्थ इत्यादि जेवढ्या अशुद्धि नाहीशी करणाऱ्या म्हणून पवित्र वस्तु सांगितल्या आहेत, त्यांच्या संगतींत कितीहि काळ राहिलें तरी ती अशुद्धि जात नाही. कारण त्या सर्वांचे अस्तित्व मुळीं अविद्यारूप अशुद्धिवरच अवलंबून असतें. अशी अविद्यारूप अशुद्धि नाहीशी करून, जीवाला मूळचें अविनाशी शुद्धस्वरूप प्राप्त करून देण्याकरिता, एक अध्यात्मज्ञानच समर्थ आहे. हें अध्यात्मज्ञान प्राप्त झालें असतां अशुद्धीचें नांवच राहत नाही. त्याच्या पवित्रपणाला उपमा देण्यासारखा दुसरा पदार्थ नाही; म्हणून अध्यात्मज्ञान सर्व पवित्रांत पवित्र आहे.

आणि धर्माचें निजधाम। तेविचि उत्तमाचें उत्तम। पैं जया येतां नाहीं काम। जन्मांतराचें॥ ४८॥

अर्थ—त्याचप्रमाणे ही ब्रह्मविद्या, सर्व धर्माचें नित्य राहण्याचें ठिकाण आहे व उत्तमाचें उत्तम-म्हणजे हिच्यापेक्षा उत्तम दुसरी कोणतीच विद्या नाही. ही विद्या प्राप्त झाली असतां पुन: जन्ममरणाचें दु:ख भोगावें लागत नाही. ॥ ४८ ॥

गूढार्थदीपिका—धर्माचें निजधाम—प्रत्येक मनुष्याला अखंड सुख असावेसें वाटतें. अखंड सुखप्राप्तीलाच

मोक्ष म्हणतात; म्हणून प्रत्येक मनुष्याची मोक्षप्राप्ति हें ध्येय आहे, असें म्हणतां येतें ''धर्मस्य ह्यापवर्ग्यस्य'' (भाग. स्क. १-२-९) धर्म हा मुख्यत: मोक्षसुखाच्या प्राप्तीकरिताच आहे, असें भागवतादिकांतून सांगितलें आहे. पण परमार्थपराङ्मुख अशा विषयासक्त पुरुषांनाहि त्यांच्या इच्छेप्रमाणे सुख मिळावें, म्हणून भगवदाज्ञेने धर्मशास्त्र निर्माण करणाऱ्या पुरुषांनी, विषयासक्त पुरुषाची दया येऊन त्याच धर्माचरणाने विषयसुखहि मिळेल अशी व्यवस्था करून ठेविली आहे. पण ''भवत्यधर्मो धर्मोहि धर्माधर्मावुभावपि। कारणात् देशकालस्य'' (महाभारत) देशकालानुसार धर्मच अधर्म होतो व अधर्म धर्म होतो असे भारतांत सांगितलें आहे.

कोणतेवेळीं कोणता धर्म आपल्याला कल्याणकारक होईल हें विषयासक्त पुरुषाला समजणें अत्यंत कठीण असतें. ''सर्वमात्मनि संपश्यन् नाधर्मे कुरुते मन:'' (मनु. स्मृ. १२-११८) ''नाकृतात्मा वेदयते धर्माधर्म विनिश्चियम्'' ''महाजनो येन गत: स पंथा:'' रजस्तमोगुणी विषयसुखाची वासना नि:शेष नाहीशी झाल्यामुळें, ज्यांच्या ठिकाणीं सत्वगुणाचा उत्कर्ष झाला व ज्यांनी पूर्ण आत्मज्ञान संपादन केलें अशा पुरुषांचे मनांत अधर्म येतच नाही—म्हणजे अशा पुरुषानाच धर्माधर्म निर्णय कळतो असें मनुस्मृतींत व भारतांत सांगितलें आहे व ''वेदाचा तो अर्थ आम्हांसीची ठावा। येरांनीं वहावा भार माथां'' (तु. गा. १८८८) असे तुकाराम महाराजांनीहि म्हटलें आहे. सारांश आत्मज्ञान हे धर्माचें निजधाम आहे, हें सिद्ध आहे.

उत्तमाचें उत्तम। जया येतां नाहीं काम। जन्मांतराचें—''तैसें येणें पाहलेया। ज्ञानजात जाय लया। म्हणोनिया धनंजया। उत्तम हें'' (ज्ञा. अ. १४-४८) आत्मज्ञानाच्या दृष्टीने बाकींचीं सर्व ज्ञानें विपरीत आहेत. आत्मज्ञान झाल्यावर तीं सर्व ज्ञानें नाहीशी होतात, म्हणून आत्मज्ञान हें जन्मांतराचें खंडण करून पुनर्जन्मच न देणारें आहे.

जैसी अमृताची चवी निवडिजे ''तरी अमृताचि सारखी म्हणिजे। तैसें ज्ञान हें उपमिजे। ज्ञानेसींचि'' (ज्ञा. अ. ४-१८३) आत्मज्ञान हें सर्व ज्ञानापेक्षा उत्तम कां आहे हें श्रीज्ञानेश्वर माऊलींनीच आपल्या मुखाने सांगितलें आहे.

मोटकें गुरुमुखें उदैजत दिसे। आणि हृदयीं स्वयंभचि असे। प्रत्यक्ष फावों लगे तैसें। आपैसयाचि॥ ४९॥

अर्थ—श्रीगुरुमुखाने आत्मज्ञानाचा थोडा उदय झाला की तें आपल्या हृदयांत मूळचेंच आहे असा आपोआप प्रत्यक्ष अनुभव येतो.॥ ४९॥

गूढार्थदीपिका—जाणीवेने जाणली जाणारी वस्तु जाणीवेहून निराळी असल्यामुळें जाणलीं जाते; पण ''एवं वस्तूसी जाणो जातां। जाणणेंचि वस्तु तत्वतां। मग जाणणें आणि जाणता। कैंचा उरे'' (अमृ. प्र. ५-१८) ''तैसें आपणया आपण। जाणतें नव्हे जाण। म्हणोनि ज्ञानपणेंविण। ज्ञानमात्र जें''॥ २२॥ (अमृ. प्र. ४) ज्या जाणीवेने वस्तु जाणली जाते त्या जाणीवेच्या ठिकाणीं जाणणें आणि जाणता हें राहत नाहीत—म्हणजे ती जाणीव जाणली जात नाही—ती जाणीवच ब्रह्मरूप असून जीवाचें तेंच स्वरूप आहे. परंतु जीवभ्रमाने मी ब्रह्मस्वरूप जाणत नाही, असें जे म्हणतो, ती त्याची भ्रांति नाहीशी करण्याकरिता गुरुपदेशाची आवश्यकता आहे.

गुरुहि, उपनिषदादि ग्रंथांतून जी आत्मस्वरूपाची चर्चा केली गेली आहे, तदनुसार आत्मस्वरूपाचा बोध करून देतात. आणि मी आत्मस्वरूप जाणत नाही, असें आत्मस्वरूपाविषयीं प्रगट केलेलें अज्ञान जाणणारा तूं, त्या अज्ञान भ्रांतीहून निराळा, केवळ ज्ञानस्वरूप आहेस, इतक्याच बोधाने, मी मूळचाच ''सर्वदु:खविनिर्मुक्तैकचैतन्यात्मकोऽहमित्येष आत्मानुभव:'' (ब्र. सू. ४-१-२) सर्व दु:खरहित केवल ज्ञानमात्र चैतन्यस्वरूप आहे ''कोणाचें कांहीं न घेसी। आपुलेंही तैसेंचि न देसी''॥ ६६॥ (अ. प्र. ९) गुरुने माझें कांही घेतलें नाही किंवा आपलें कांही दिलेंहि नाही, असा प्रत्यक्ष आपोआप अनुभव येतो.

तेवीचि गा सुखाचां पाउटीं। चढतां येइजे जयाचिया भेटी। मग भेटल्या कीर मिठी। भोगणेंयाहि पडे॥ ५०॥

अर्थ—ज्या ब्रह्मवस्तूच्या भेटीला, सुखाच्या पायरी पायरीने चढतां येते आणि मग ब्रह्मवस्तु भेटल्यावर भोक्तेपणालाहि मिठी पडते॥ ५०॥

गूढार्थदीपिका—तेवींचि गा सुखाच्या पाउटीं। चढतां येईजे जयाच्या भेटी—परब्रह्म हें जीवाचें मूळ स्वरूपच

आहे, तरी जोपर्यंत परब्रह्माशीं त्याचें ऐक्य होत नाही तोपर्यंत तो तें, आपल्याहून निराळें समजतो आणि म्हणूनच त्याला परब्रह्माशीं ऐक्य पावण्याकरिता पायरी पायरीने चढावें लागतें. ह्या पायऱ्या, शुभेच्छा, सुविचारणा, तनुमानसा, सत्त्वापत्ति, असंसक्ति, पदार्थाभाविनी व तूर्यगा अशा सात, योगवासिष्ठांत सांगितल्या आहेत.

(१) गुरुमुखाने वेदान्ताचें श्रवण व शास्त्रसज्जनांच्या साहाय्याने आत्मप्राप्ति करून घेतली पाहिजे अशी जी इच्छा, तिला शुभेच्छा म्हणतात. या पायरीवर चढल्यानंतर संसारदु:खाची उपेक्षा झाल्यामुळें थोडें समाधान प्राप्त होतें.

(२) पुढें संत व सच्छास्त्र यांच्या सहवासांत वैराग्यपूर्वक आत्मस्वरूपाचा विचार करणें याला सुविचारणाभूमिका, म्हणतात.

(३) आत्मस्वरूपाच्या विचाराने विषयाविषयीं दृढ वैराग्य उत्पन्न होऊन आत्मस्वरूपाकडेच चित्त लागणें, याला तनुमानसा भूमिका म्हणतात.

विषय हे स्थूल आहेत, म्हणून विषयाकार चित्त स्थूल म्हटलें जातें. वैराग्याने चित्ताचें विषयाकार होणें बंद पडलें आणि तें सूक्ष्म आत्माकार होऊं लागलें म्हणजे त्या चित्ताला तनुमानस म्हणतात (तनुमानस म्हणजे मनाचा सूक्ष्मपणा).

(४) या तीन भूमिकांच्या दृढ अभ्यासाने चित्त आत्म्याचे ठिकाणीं स्थिर झालें असतां त्याला सत्त्वापत्ति म्हणतात. या भूमिकेवर सत्व म्हणजे ब्रह्म, त्याची आपंत्ति म्हणजे प्राप्ति होते—म्हणजे या भूमिकेवर ब्रह्मसाक्षात्कार किंवा आत्मसाक्षात्कार होतो.

(५) या चार भूमिकांच्या अभ्यासाने चित्त विषयांशीं संसर्ग न ठेवतां आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर होतें, याला असंसक्ति भूमिका म्हणतात.

(६) कोणत्याहि बाह्य किंवा आंतर पदार्थाच्या आकाराचें चित्त न होतां केवळ तें आत्माकार होऊन राहतें तेव्हा ती चित्ताची पदार्थाभाविनी भूमिका होय.

(७) प्रयत्नाने आत्मस्वरूपाकडे चित्त लावलें न जातां, जेव्हां तें प्रयत्नावांचून आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर राहतें तेव्हा त्या चित्ताची ती तूर्यगा भूमिका होय. तूर्यगाभूमिकेवरच वृत्ति, आत्मस्वरूपाचे ठिकाणीं निश्चळ होते.

या सात भूमिकांवरून चित्त, वरच्या वरच्या भूमिकेवर जातांना, जसें जसें चढतें, तसा तसा सत्वगुणांचा उत्कर्ष होतो आणि सुखरूप आत्मा त्यांत प्रतिबिंबित होत असल्यामुळे सुख वाढत जाते, म्हणून या सात भूमिकांना, सुखाच्या पायऱ्या म्हटलें आहे.

मग भेटलिया कीर मिठी। भोगणेयाहि पडे—या सात भूमिकांवर आत्मैक्याची व आत्मसुखाची जाणीव राहते. जाणीव नाहीशी झाली असतां निर्विकल्प समाधि साधला जातो.

निर्विकल्प ब्रह्मस्थितीचा अनुभव जीवाला व्यवहारांत क्षणोक्षणीं जो येत असतो तो आता श्रीज्ञानेश्वर माऊली येथे दाखवित आहेत.

परि भोगाचिया ऐलीकडिलिये मेरे। चित्त उभें ठेलेंचि सुखा भरे। ऐसें सुलभ आणि सोपारें। वरि परब्रह्म ॥ ५१ ॥

अर्थ—पण भोगाच्या अलीकडील कांठावरच चित्त केवळ सुखाने भरून राहतें, असे तें सुलभ आणि सोपें असून शिवाय तेंच परब्रह्महि आहे. ॥ ५१ ॥

गूढार्थदीपिका—''भोग'' म्हणजे मी सुखी झालों व मला सुख झालें अशी जाणीव. ''ऐलीकडिलिये मेरे'' म्हणजे सुखाच्या भोक्तृत्वाची जाणीव होण्यापूर्वी, ''सुखभरें उभें ठेलें'' म्हणजे चित्त केवळ सुखरूप होऊन राहतें.

सुखाची जाणीव किंवा मी सुखी झालों, अशी जी वृत्ति, तिचे स्फुरण होण्यापूर्वी चित्त केवळ सुखरूप होऊन राहते. हीच समाधीची स्थिति होय.

कोणताहि विषय जाणतांना किंवा कोणताहि विषय भोगतांना मला विषय कळला, ही जाणीव उत्पन्न होते, त्याचप्रमाणे विषय भोगल्यावर मी सुखी झालों किंवा मला सुख झालें, अशी भोगाची जाणीव उत्पन्न होण्यापूर्वीचा

क्षण असा असतो की तेव्हा चित्त जाणीवरहित ब्रह्मस्वरूप होऊन राहते. चिताच्या या स्थितीला निर्विकल्पसमाधि किंवा ब्रह्मस्थिति म्हणतात, हें श्रीज्ञानेश्वर माऊलींनी ''भोगाचिये ऐलीकडिलिये मेरे। चित्त उभे ठेलें सुखभरें'' व ''वरि परब्रह्म'' ह्या चरणांनी दाखविलें आहे.

सुलभ आणि सोपारे—ही ब्रह्मस्थिति केवळ संतांच्या कृपेने प्राप्त होते म्हणून सुलभ आणि कष्टाशिवाय प्राप्त होते, म्हणून सोपी आहे.

परब्रह्मस्थितीची जाणीव व ब्रह्मसुखाचें भोक्तृत्व उठूं दिलें नाही म्हणजे जीव निर्विकल्प ब्रह्मस्थितींतच राहतो, असें माऊलींनी येथे सुचविलें आहे.

पैं गा आणिकही एक याचें। जें हाता आलें तरी न वचे। आणि अनुभवितां कांहीं न वेचे। वरी विटेहि ना॥ ५२॥

अर्थ—परंतु, अर्जुना! आणखीहि एक या ब्रह्मज्ञानप्राप्तीचा विशेष असा आहे की ही प्राप्ती झाली असतां कधीं नाहीशी होत नाही, तिचा अनुभव घेत असतांना कांही कमी होत नाही, शिवाय कधीं तिचा वीट येंत नाही. ॥ ५२ ॥

गूढार्थदीपिका—जी सावयव वस्तु असते ती नाश पावते, कमी होते व स्वत:विकृत होते पण परब्रह्म हें निरवयव व अविनाशी असल्यामुळें, तें नाश पावणें, कमी होणें किंवा विकृत होणें शक्य नाही, उलट ''इयं ज्ञानकला राजन् सकृज्ज्ञाताभिवर्धते'' ती वाढते म्हणजे व्यापक होते, असें योगवासिष्ठांत म्हटलें असून ''तैसें आत्मत्वें वेठिला होये। तो जयातया दृश्यातें पाहे। तें दृश्य दृष्टेपणेंसीं होत जाये। तयाचेचि रूप''॥ ४१०॥ (ज्ञा. अ. १८) असें श्रीज्ञानेश्वरमाऊलींनीहि पुढें अठराव्या अध्यायांत सांगितलें आहे.

''विटे हि ना'' या पदाचा वीट येत नाही असाहि अर्थ करतां येईल. आत्मा परमप्रेमरूप असल्यामुळें त्याचा वीट येणें शक्य नाही.

येथ जरी तूं तार्किका। ऐसी हन घेसी शंका। ना येवढी वस्तु हे लोकां। उरली केविं॥ ५३॥

अर्थ—हे तर्क करणाऱ्या अर्जुना! या माझ्या म्हणण्यावर तूं कदाचित् अशी शंका घेशील की एवढी ही थोर लाभाची वस्तु लोकांपासून वांचली कशी? (म्हणजे लोक तिच्या प्राप्तीची इच्छा कां करीत नाहीत?) ॥ ५३ ॥

जे एकोत्तरेयाचिया वाढी। जळतिये आगीं घालिती उडी। ते अनायासें स्वगोडी। सांडिती केविं॥ ५४॥

अर्थ—(आपल्यापाशी असलेल्या रकमेंत) एक रुपयाने जरी अधिक भर पडत असली तरी जळत्या आगींत देखील उडी घेण्याचें साहस करणारें, अनायासें आत्मगोडी कशी सोडतील? ॥ ५४ ॥

गूढार्थदीपिका—येथें ''एकोत्तरेयाचिया'' या शब्दाचा एक आणि अधिक असा अर्थ आहे. ''सहस्त्रवरी बाहिया। आहाति सहस्त्रार्जुना राया। तरी तो काय तिया। एकोत्तरावा''॥१४०॥ (अमृ. प्र. ७) अमृतानुभवांतील या ओवीत हा अर्थ आला आहे.

तरि पवित्र आणि रम्य। तेविंचि सुखोपायेंचि गम्य। आणि सुसुख परम धर्म्य। वरि आपणपां जोडे॥ ५५॥

ऐसा अवघाचिहा सुरवाडु आहे। तरी जनाहातीं केवीं उरों ल्हे। हा शंकेचा ठाव कीर होये। परि न धरावी तुवां॥ ५६॥

अर्थ—पुन: हें ज्ञान अत्यंत पवित्र म्हणजे शुद्ध असून, रम्य म्हणजे मनाला तल्लीन करून सोडणारें आहे, तसेंच तें सुलभ उपायाने प्राप्त होणारे आहे. तें अत्यंत सुख स्वरूप असून परम धर्मस्वरूप आहे. शिवाय आपणच तें आहों असा अनुभव आणून देणारें आहे. ॥ ५५ ॥ अशा सर्वच प्रकाराने जर आत्मज्ञान उत्तम आहे तर लोक त्याची प्राप्ति कां करून घेत नाहीत, अशी शंका येणें साहजिक आहे, पण ती शंका तूं धरूं नकोस॥ ५६ ॥

अश्रद्दधाना: पुरुषा धर्मस्यास्य परन्तप। अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि॥ ३॥

अर्थ—शत्रूला ताप देणाऱ्या अर्जुना! या आत्मज्ञानरूप परमधर्मावर पुरुष श्रद्धा ठेवीत नाहीत, म्हणून ते मला प्राप्त न होतां मृत्युरूपी संसारमार्गांतच पुन: पुन: परत येतात. ॥ ३ ॥

पाहें पां दूध पवित्र आणि गोड। पासीं त्वचेचिया पदराआड। परि तें अव्हेरूनि गोचिड। अशुद्ध चि सेवी॥ ५७॥

कां कमलकंदा आणि दर्दुरीं। नांदणूक एकेचि घरीं। परि परागु सेविजे भ्रमरीं। जवळिलां चिखलुचि उरे॥ ५८॥

नातरि निदैवाचां परिवरीं। लोह्या रुतलिया आहाति सहस्त्रवरी। परि तेथ बैसोनि उपवासु करी। कां दरिद्रें जिये॥ ५९॥

तैसा हृदयामध्यें मी रामु। असतां सर्वसुखाचा आरामु। कीं भ्रांतासि कामु। विषयावरी॥ ६०॥

अर्थ—अर्जुना! पहा. पवित्र आणि गोड दूध जवळच कातडीरूपी पडद्याच्या आड असते, पण तें टाकून गोचीड रक्ताचेंच सेवन करीत असतो.॥ ५७॥ किंवा कमलाचा कंद आणि बेडुक एके ठिकाणीच असतात, पण भ्रमर परागाचेच सेवन करतो आणि बेडकाला चिखलच मिळतो.॥ ५८॥ किंवा दुर्दैवी पुरुषाच्या घरी (त्याच्या पूर्वजांनी) हजारों मोहरा पुरलेल्या असल्या तरी त्याला ठिकाण माहीत नसल्यामुळे तो (दरिद्री) तेथेच राहून उपवास करतो किंवा दारिद्र्यात दिवस काढतो.॥ ५९॥ त्याप्रमाणे सर्वांच्या हृदयामध्यें सर्व सुखाचा बगीचा असा मी राम आहे, पण मला न जाणणारा भ्रांत पुरुष विषयसुखांचीच इच्छा करतो.॥ ६०॥

गूढार्थदीपिका—मनुष्याच्या बुद्धीला जें खरें वाटतें, तेंच ती बुद्धि धरून ठेवते. बुद्धीच्या या धरून ठेंवण्याच्या व्यापाराला श्रद्धा किंवा विश्वास म्हणतात व त्याच्याच प्राप्तीचा मग इंद्रियांकडून प्रयत्न होतो. अत्यंत सत्य एक आत्माच आहे व इतर सर्व विषयादि संसार खोटा आहे; पण मनुष्य आत्म्याचा विचार करीत नाही, म्हणून मनुष्याची विषयासक्त रजोगुणी बुद्धि विषयाला सत्य समजते व त्या रजोगुणी बुद्धीची तेथेच श्रद्धा बसते.

कोणालाहि विषयापासून अखंड सुख मिळालें असा अनुभव नाही, म्हणून विषयापासून अखंड सुखाची इच्छा करणे शुद्ध भ्रांति आहें. अखंड सुख इतरत्र कोठें नसून अखंड सुखाची इच्छा करणाऱ्याचे ठिकाणीच तें असतें पण रजस्तमोगुणाने घेरलेल्या व देहादिक विषयावर अहंताममता ठेवून आसक्त झालेल्याची श्रुतिसंतावर श्रद्धा बसत नाही व त्यांना अखंड सुखाचा लाभ होत नाही.

बहु मृगजळ देखोनि डोळां। थुंकिजे अमृताचा गिळितां गळाला। तोडिला परिसु बांधिला गळा। शुक्तिकालाभें॥ ६१॥

तैसी अहंममतेचिये लवडसवडीं। मातें न पवतीचि बापुडीं। म्हणोनि जन्ममरणाचिये दुथडीं। डहुळितें ठेलीं॥ ६२॥

अर्थ—(मला सोडून विषयसुखाची इच्छा करणें म्हणजे) पुष्कळ पसरलेलें मृगजळ डोळ्याने पाहून तोंडांतील अमृताचा गुळणा न गिळतां थुंकून द्यावा किंवा शुक्तिकेची प्राप्ति होते, असें पाहून गळ्यांत बांधलेला परिस तोडून फेकून द्यावा (याप्रमाणे होय)॥ ६१॥ त्याप्रमाणे देहादिकांचे ठिकाणीं अहंताममतेच्या लगबगीमुळें बिचारे जीव, मला प्राप्त होत नाहीत, म्हणून जन्ममरणाच्या दोन्ही तीरांच्या मध्यें फिरत राहतात.॥ ६२॥

गूढार्थदीपिका—अहंता म्हणजे बुद्धि, मन, इंद्रियें व देह हें मी आहे असा अहंकार धारण करणें.

ममता—म्हणजे बुद्धि, मन, इंद्रियादिकांसह बाह्य विषय माझे आहेत असा अहंकार धरणें.

ह्या अहंताममतावृत्ती जीवाच्या ठिकाणीं अखंड उठत राहतात व जीव तद्रूप होत राहतो, म्हणून या सर्वांच्या अंतर्यामीं राहणाऱ्या परमेश्वराला जीव विसरला आहे व त्यामुळें तो जन्मपरंपरा भोगतो. ''देहयोगाद्वा सोऽपि'' (ब्र. सू. ३-२-६) या सूत्रावर भाष्य करतांना आचार्यांनीहि म्हटलें आहे की ''जीवस्य ज्ञानैश्वर्यतिरोभावो देह योगादेहेंद्रियमनोबुद्धि-विषयवेदनादियोगाद्भवति'' जीव मुळांत ब्रह्मस्वरूप म्हणजे ज्ञानऐश्वर्यादि संपन्न आहे, पण देह इंद्रियादिकांचे ठिकाणीं अत्यंत (अहंता-ममता) अहंकार असल्यामुळे त्याची ब्रह्मरूपता झांकली गेली आहे. याप्रमाणे जीवाची अहंताममता हीच मुख्य उपाधि होय. एवढी उपाधि गेली की तो पूर्ण ब्रह्मस्वरूप होतो.

एऱ्हवीं मी तरी कैसा। मुखाप्रति भानु कां जैसा। कहीं दिसे न दिसे ऐसा। वाणीचा नोहे॥ ६३॥

अर्थ—खरोखर पाहतां मी कसा आहें तें सांगतों. ज्याप्रमाणे सूर्य सदा सन्मुख असतो, तसा मी सर्वांच्या समोर आहे. कोठें नाही म्हणून दिसत नाही असा दुर्मिळ नाही.॥ ६३॥

गूढार्थदीपिका—जेवढें दृश्य दिसतें तेवढे सर्व खरोखर दृष्ट चैतन्यच आहे. ''यालागीं वस्तुप्रभा। वस्तूचि पावे शोभा। जातसे लाभा। वस्तूचिया''॥ २९१॥ (अमृ. प्र. ७) चैतन्यस्वरूप भगवान, आपल्या प्रेमाचें सुख भोगण्याकरिता आपणच द्रष्टा व दृश्य स्वरूप झाला आहे; म्हणून तोच सर्वत्र आहे व सूर्यप्रकाशाप्रमाणे सुलभ आहे. पण जीवाला हें कळत नाही व तो दृश्याला द्रष्ट्याहून (आपल्याहून) निराळें समजतो. दृश्य द्रष्ट्याहून निराळें आहें

असें जीवाला वाटतें म्हणूनच त्याला तें दृश्य चेतन दिसत नाही जडविनाशी असें तें त्याच्या अनुभवाला येतें.

आत्मविचाराने म्हणजे परोक्ष ज्ञान होऊन, आत्मा सच्चिदानंदरूप असून तोच सर्व ब्रह्मांडाचें उपादान व निमित्तकारण, म्हणजे तोच एक आहे, दुसरें कांही नाही असें कळून येत असल्यामुळे तो कोठें नाही असा विकल्प राहत नाही. उलट तो सर्वत्र आहे व कोठेहि त्याचा अनुभव घेतां येतो असा निश्चय होतो.

पुढे आत्म्याच्या अपरोक्षज्ञानाने देहादिकांहून मी निराळा सच्चिदानंदस्वरूप आहे असा अनुभव येऊन देहादिकांवरील अहंता नाहीशी होते आणि पुढें सगुण भगवंताच्या भक्तीने ''विषयचि त्यांचा झाला नारायण'' सर्व दृश्य, भगवत्स्वरूप भासतें आणि ममता अहंकार नाहीसा होतो.

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना। मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः॥ ४॥

अर्थ—मी आपल्या अव्यक्तमूर्तीने म्हणजे सर्व नामरूपाने नटलेल्या अतींद्रिय व व्यापक अशा सगुण स्वरूपाने सर्व जगांत व्यापून आहे. माझ्या ठिकाणीं सर्व भूतें आहेत पण मी त्यांत नाही. ॥ ४॥

माझेया विस्तारलेंपणाचेनि नांवें। हें जगचि नोहे आघवें। जैसें दूध मुरालें स्वभावें। तरि तेंचि दहीं॥ ६४॥

अर्थ—ज्याप्रमाणे स्वभावतःच विरजलेलें दूध दही म्हटलें जातें, त्याप्रमाणे माझ्या नामरूपाने होणाऱ्या विस्ताराचेंच जग हें नांव नाही काय? (म्हणजे परब्रह्माच्या नामरूपाने होणाऱ्या विस्तारालाच जग हें नांव आहे, असें माऊलीचें म्हणणें आहे). ॥ ६४॥

गूढार्थदीपिका—वर अर्जुनाला भगवंतांनी मी तुला ज्ञानविचार सांगतों असें जें म्हटलें आहे, तेंच आता भगवान सांगत आहेत.

ज्ञान म्हणजे आत्मवस्तूचें यथार्थ स्वरूप समजणें होय. हें यथार्थस्वरूप जाणलें असतां विज्ञान म्हणजे प्रपंचाचेंहि यथार्थ स्वरूप कळून येतें.

या श्लोकांत भगवान म्हणतात, माझ्या अव्यक्तमूर्तीने हें जग व्यापिलें आहे. श्रीज्ञानेश्वर माऊलींनी ''अव्यक्तमूर्ति'' शब्दाचा अर्थ ''माझिये विस्तारलेपणाचेनि नांवें'' असा केला आहे—म्हणजे माझा विस्तारच जग नव्हे काय? असा प्रश्न करून भगवंताचा विस्तार म्हणजेच जग होय असा सिद्धान्त केला आहे.

भगवान अखंड, निरवयव, पूर्ण सच्चिदानंदस्वरूप, अद्वितीय व अविकारी असल्यामुळे तो संकोच पावूं शकत नाही किंवा विकास पावूं शकत नाही. मग भगवंताचा विस्तार कसा होतो, हें जाणणें आवश्यक आहे.

विस्तार म्हणजे बहुरूप होणें, हेंच सर्वांना माहीत आहे. तैत्तिरीयश्रुतीत व त्यावरील भाष्यांत आचार्यांनी भगवंताचा विस्तार कसा होतो याचा उलगडा केला आहे. सर्व नामरूपासह अत्यंत एकरूप असलेला परमात्मा ''**सोऽकामयत। बहुत स्यां प्रजायेय**'' मी बहूरूप व्हावें अशी इच्छा करिता झाला. इच्छा सुखाच्या प्राप्तीकरितां होते. भगवान स्वतः परमसुखरूपच आहे. तेव्हा ''आप्तकामस्य का स्पृहा'' आप्तकाम परमेश्वराला इच्छा कशी होणार? परंतु ही इच्छा म्हणजे सुखप्राप्तीकरिता नसून परमेश्वराच्या परमप्रेमस्वरूपाची ही स्वाभाविक लीला होय. परमेश्वर '**एकाकी न रमते**' (बृ. उ. १-४-३) सदा सर्वदा एकरूपच राहत नाही असें सांगितलें असून ''जे एकचि नव्हे एकसरें'' असें माऊलीनीहि अमृतानुभवांत म्हटले आहे. म्हणजे अत्यंत एकरूप राहणे हा जसा परब्रह्माचा स्वभाव आहे तसा बहुरूप होणें हाहि परब्रह्माचा स्वभावच आहे. ''एवमीश्वरस्याप्यनपेक्ष्य किंचित्प्रयोजनान्तरं स्वभावादेव केवलं लीलारूपा प्रवृत्तिर्भविष्यति'' (ब्र. सू. २-१-३३) कांही एक प्रयोजनावांचून परमेश्वराची, लीलामात्र बहुरूप होण्याची प्रवृत्ति होते, असा भाव वेदान्तसूत्राने व त्यावरील भाष्याने दाखविला आहे.

''स्वरूप निर्विकल्प पूर्ण। तेथ मी म्हणाया म्हणतें कोण। ऐसेहि ठायी स्फुरे 'मी' पण। तें मुख्यत्वें जाण मूळमाया॥ ७२॥ तया मीपणाचे पोटी। म्हणे मजचि मियां पहावें दिठी। मजसी मियां सांगाव्या गोठी। अत्यादरें भेटी माझी मज होवावी॥ ७३॥ मज माझी अती प्रीति। माझी मज होवावि रति। माझ्याचि मियां घेऊनि युक्ति। मज माझी प्राप्ति सद्बोधे॥ ७४॥ म्हणे मज मिया आलिंगावें। मज मियां संभोगावें। मज मियां नियोगावें। स्वामीसेवकत्वें''॥ ७५॥

(ए. भा. अ. ३) इत्यादि ओव्यांतून नाथांनी हाच आशय प्रगट केला आहे. अर्थात् परमात्म्याचें बहुरूप होण्यावी इच्छा परमात्म्याप्रमाणे "**सत्यज्ञानलक्षणाः स्वात्मभूतत्वाद्विशुद्धाः**" (तै. उ. ३-६) सत्यज्ञानस्वरूप व परमात्म्याशी एकरूप अभिन्नच असतें, म्हणून ती शुद्धच असते, असे आचार्यांनी म्हटलें आहे.

याचा अर्थ असा की परमात्मा अद्वैतस्वरूप असल्यामुळे मी बहुरूप व्हावें—म्हणजे मी सच्चिदानंदस्वरूपाने बहूरूप व्हावें—अशी तो इच्छा करतो. "नहि पुत्रोत्पत्तेरिवार्थान्तरविषयं बहुभवनम्" मी आपल्या सच्चिदानंदस्वरूपाहून अनेक भिन्न वस्तुरूपाने बहुरूप व्हावें अशी इच्छा करीत नाही, तर "आत्मस्थानभिव्यक्तनामरूपाभिव्यक्त्या........... आत्म-स्वरूपापरित्यागेनैव ब्रह्मणाऽप्रविभक्तदेशकाले सर्वावस्थासु व्याक्रियेते। तदेतन्नामरूपव्याकरणं ब्रह्मणो बहुभवनम्" परमात्म्याच्या शक्तिरूपाने परमात्म्याशीं एकरूप होऊन राहिलेली अव्यक्तनामरूपें जेव्हा व्यक्त होतात, तेव्हा तीं सर्व अवस्थेंत आपलें नामरूपात्मक स्वरूप कायम ठेवून, परब्रह्माशी अभिन्न एकरूप राहून, परब्रह्मसत्तेवरच व्यक्त होतात, अशारीतीने नामरूपाने व्यक्त होणें हेंच परमात्म्याचें बहुभवन होय आणि श्रीज्ञानेश्वर माऊलींनी "माझिये विस्तारलेपणाचेनि नांवें" या चरणाने परमात्मा नामरूपाने जो व्यक्त होतो तोच त्याचा विस्तार होय, असें सुचविलें आहे.

सच्चिदानंद परमात्मा अतींद्रिय म्हणजे ज्ञानदृष्टिगम्य आहे, म्हणून त्याच्याशीं अभिन्न राहून, त्याच्याच ठिकाणीं भासणारा नामरूपात्मक विस्तारहि ज्ञानदृष्टिगम्यच आहे, असा वरील श्लोकांतील "अव्यक्त" शब्दाचा अर्थ असून, नामरूपाने परमात्मा व्यक्त झाल्यावर सगुणहि होतो हेंच "मूर्ति" या शब्दाने दाखविलें आहे.

अव्यक्तमूर्ति म्हणजें सर्व नामरूपाने नटलेलें परमेश्वराचें व्यापक सगुणसाकार विश्वरूप होय. ज्ञानदृष्टिगम्य अशा या अव्यक्तमूर्तीने मी या जगांत कसा व्यापून आहे, हें भगवंताने अर्जुनाला ज्ञानदृष्टि देऊन पुढें अकराव्या अध्यायांत प्रत्यक्ष दाखविलें आहे.

हा नामरूपाने झालेला परमात्म्याचा विस्तार, परमेश्वराच्या परमार्थसत्तेवरच व परमात्मस्वरूपानेच होत असल्यामुळें, परमात्म्याच्यां परमार्थसत्तेवांचून दुसरी सत्ता त्याला राहणें शक्य नाही.

जैसे दुध मुरालें स्वभावे। तरि तेंचि दहीं—श्रीज्ञानेश्वर माऊलींनी परमात्म्याच्या नामरूपविस्ताराला दुधापासून स्वभावतः होणाऱ्या दह्याचा दृष्टान्त दिला आहे.

दुधापासून ज्या रीतीने दहीरूप कार्य होतें, तसें कार्य होण्याला परिणामकार्य म्हणतात. परिणामकार्यांत कारण नाहीसें होतें व कार्याचे ठिकाणी कारणाहून भिन्न धर्म उत्पन्न होऊन, कार्यहि कारणाहून वस्तूरूपाने भिन्न पडते. दुधाचा दहीरूप जो परिणाम होतो. तो दोन प्रकारचा होतो. दूध कांही काल तसेंच राहिलें, तर आपोआप दहीरूप होतें, हा एक प्रकार आणि आंबटांचे विरजण घालून दुधाचे दही करतां येतें, हा दुसरा प्रकार होय.

परब्रह्माच्या नामरूपाने नटण्यास येथें दुधाचें दही होण्याचा दृष्टांत दिला असला, तरी सावयव विकारी व नाशिवंत अशा वस्तूचाच परिणाम होऊं शकतो आणि परब्रह्म नित्य, निरवयव, अविकारी आणि अद्वितीय असल्यामुळें त्याचें नामरूपात्मक अवस्थांतर होतांना त्याचा नाश होतो व तें अवस्थांतर परब्रह्माहून निराळ्या वस्तुरूपाने प्रगट होतें, असें मानतां यावयाचें नाहीं; म्हणून दुधाचें आंबट विरजणावांचून स्वभावतः दहीरूपकार्य होण्याचा जो दृष्टान्त येथे परब्रह्माच्या नामरूपाने प्रगट होण्याकरिता दिला आहे, त्याचा एवढाच अर्थ आहे की, परमात्मा त्रिगुणात्मक मायेवांचूनच स्वभावाने नामरूपात्मक होतो.

नामरूपात्मक होण्यांत तोच उपादान कारण आहे व निमित्त कारणहि आहे—म्हणजे तोच आपल्याला नामरूपात्मक करून घेतो "**तदात्मानं स्वयमकुरुत**" (तै. उ. २-७) परमात्मा आपणच आपल्याला नामरूपात्मक करून घेतो अशी श्रुतीहि आहे आणि या श्रुतीवर आधारलेल्या "आत्मकृतेः परिणामात्" (ब्र. सू. १-४-२६) या सूत्रावर भाष्य करतांना आचार्यांनीहि "स्वयमिति....................निमित्तान्तरानपेक्षत्वमपि प्रतीयते", "आत्मा विशेषेण विकारात्मना परिणामः आत्मानमिति" माया वगैरे दुसरें कांहीहि एक निमित्त

नसतांना, परमात्मा नामरूपाने व्यक्त होतो, असें म्हटलें आहे.

सारांश, नित्य, निरवयव, अविकारी व अद्वितीय सच्चिदानंदरूप असणारा परमात्मा, मायेवांचूनच नामरूपात्मक होतो; म्हणून नामरूपात्मक दशेंतहि तो पूर्ण अद्वैत ब्रह्मरूपच असतो. अशा पूर्ण अद्वैत ब्रह्मरूप नामरूपात्मक दशेलाच जग हें नांव आहे असा माऊलीच्या म्हणण्याचा अर्थ आहे.

कां बीजचि जाहलें तरु। अथवा भांगारचि अळंकारु। तैसा मज एकाचा विस्तारु। तें हें जग॥ ६५॥

अर्थ—किंवा बीजच जसें झाड होतें अथवा सोनेंच अलंकार होतें, असें हें जग म्हणजे केवळ माझ्या एकाचाच विस्तार होय.॥ ६५॥

गूढार्थदीपिका—परमेश्वराचें नामरूपात्मक होणें परिणामरूप नाही, तें विवर्तरूप आहे, असें माऊली सांगत आहेत.

ज्याप्रमाणे प्रथम बीज, ही एक वस्तु असते व मग त्यापासून खोड, फांद्या, पानें, फुलें, फळें असा विस्तार होतो, पण त्या सर्वांसह एक झाडवस्तुच असतें. किंवा सोन्याचे अलंकार अनेक असले तरी त्या अलंकारासह सोनें हीच एक वस्तु असते, त्याप्रमाणे परब्रह्माचा अनेकरूपाने विस्तार झाला तरी त्याचें अद्वैतरूप एक वस्तुत्व नाहीसें होत नाही. ''गुण भूतें विषय करणें। जीव भोक्ता सुखदु:खपणें। ज्ञान क्रिया कर्माचरणें। हें सर्व जाणणें पूर्ण ब्रह्म॥ ७०४॥ साखरेचा फणस प्रबळ। तेथे कांटे त्वचा बीज गोळ। अवघे साखरचि केवळ। तेविं ब्रह्मचि सकळ जगदाकारें''॥ ७०५॥ (ए. भा. अ. ३) ''पूर्वावस्थामपरित्यज्यैवावस्थांतरभानं विवर्त:'' कारणाचा नाश न होतां कारणाहून भिन्न वस्तूने वेगळें न पडतां कारणाचा नुसता रूपांतराने प्रत्यय येणें, याला विवर्त असें वेदान्तांत म्हटलें आहे. परमेश्वराची मूळस्थिति कायम ठेवूनच केवळ नामरूपाने परमेश्वराचें जगद्रूप अवस्थांतर होतें, म्हणून हें जगद्रूप अवस्थांतर सच्चिदानंदरूप परमेश्वराचें विवर्तकार्य मानावें लागतें व शास्त्रांतून तसें सांगितलेंहि आहे.

हें विवर्तकार्यहि दोन प्रकारचें आहे. एक अनध्यस्तविवर्त व दुसरा अध्यस्तविवर्त. ज्या विवर्तांत विशेषरूपाने अधिष्ठानभूत वस्तुच प्रतीत होते, त्याला अनध्यस्तविवर्त म्हणतात व ज्या विवर्तात अधिष्ठानभूत वस्तु न दिसतां, अधिष्ठानभूत वस्तुच भिन्न वस्तुरूपाने प्रत्ययाला येते त्याला अध्यस्तविवर्त म्हणतात.

जग हें नांव, परब्रह्माच्या नामरूपात्मक विस्तारालाच असल्यामुळें मुळांत जग हें परब्रह्माचें निरुपाधिक किंवा अनध्यस्त विवर्त कार्य आहे. असें हें कार्य ''**अत: सदात्मना सर्वव्यवहाराणां सर्वविकाराणां च सत्यत्वम्**'' (छां. उ. ६-३-२) परब्रह्माशीं एकरूप आहे म्हणून तें सत्य आहे, असें आचार्य म्हणतात.

हें अव्यक्तपणें थिजलें। तेंचि मग विश्वाकारें वोथिजलें। तैसें अमूर्तमूर्ति मियां विस्तारलें। त्रैलोक्य जाणें॥ ६६॥

अर्थ—ज्याप्रमाणे हे जग अव्यक्तपणाने थिजल्यासारखें असतें. तेंच मग विश्वरूपाने प्रगट होतें, त्याप्रमाणे अमूर्तमूर्ति असा जो मी, तोच नामरूपाने विस्तारलें गेलेलें त्रैलोक्य होय असें जाण.॥ ६६॥

गूढार्थदीपिका—मागीत ६५ व्या ओवीच्या शेवटील चरणांत ''जग'' हा शब्द आला असून, त्या लागूनच या ओवींत ''हें'' हा शब्द आला असल्यामुळे ''हें'' हा शब्द मागील ''जग'' या शब्दाचाच दर्शक आहे हें स्पष्ट आहे.

जगाच्या व्यक्त व अव्यक्त अशा दोन दशा आहेत. अव्यक्तदशेंत तें जग थिजल्याप्रमाणे सर्वनामरूपासह एक वस्तुरूप होऊन राहतें आणि तेंच मग ''विश्वाकारें वोथिजलें'' म्हणजे अनेक नामरूपात्मक भिन्न भिन्न वस्तुरूपाने प्रगट होतें. त्याप्रमाणे अत्यंत एकरूप निर्विकल्प अवस्थेंत असलेलें सच्चिदानंद परब्रह्म आपल्या स्वभावशक्तीने जें नामरूपाने प्रगट होतें, तेंच त्रैलोक्य होय असें श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात—म्हणजे जग दुसरें कांही नसून सच्चिदानंद परब्रह्माच्या नामरूप विस्तारालाच जग हें नांव आहे. अर्थात् जग मुळांत पूर्ण ब्रह्मस्वरूपच किंवा अनध्यस्तविवर्त आहे. ''घृताचें थिजलेपण। न मोडितां धृतचि जाण। कां नाटितां कंकण। सोनेचि तें॥ ३७८॥ न उकलितां पटु। तंतूचि असे स्पष्टु। न विरवितां घटु। मृत्तिका जेवीं॥ ३७९॥ म्हणोनि विश्वपण जावें। मग तैं मातें घेयावें। तैसा नव्हें आघवें। सकटचि मी''॥ ३८०॥ (ज्ञा. अ. १४) असें श्रीज्ञानेश्वर माउलींनीच स्वत: चवदाव्या अध्यायांत पुढें सांगितलें आहे.

''अव्याकृत नामरूपभेदमात्मभूतमात्मैकशब्दप्रत्ययगोचरं जगत् व्याकृतनामरूपभेदत्वादनेकशब्दप्रत्ययगोचर-मात्मैकशब्दगोचरं चेति'' (ऐ. उ. १-१ शंक. भाष्य.) परब्रह्माची निरवयव, अविकारी, अद्वितीय सच्चिदानंदरूप अवस्था नाहीशीं न होतांच, परमेश्वराच्या स्वभावशक्तिस्वरूपाने, परमेश्वराशीं अभिन्न एकवस्तुरूप होऊन असलेलीं, परमेश्वर या शब्दानेच निर्देशिलीं जाणारी व केवळ परमेश्वरस्वरूपाने अनुभवाला येणारीं, नामरूपें पृथक-पृथक होऊन अनेक शब्दांनी जेव्हा त्यांची प्रतीति येते, तेव्हा त्याला अज्ञानी जीव, जगत् म्हणतो असें आचार्यहि म्हणतात.

महदादि देहांतें। इयें अशेषेंही भूतें। परि माझ्या ठायीं बिंबितें। जैसें जळीं फेण॥ ६७॥

अर्थ—बुद्धीपासून देहापर्यंत जीं संपूर्ण भूतें दिसतात, तीं पाण्यावर जसा फेंस असतो, त्याप्रमाणे माझ्या ठिकाणीं बिंबित झालीं आहेत. ॥ ६७ ॥

गूढार्थदीपिका—मागील ओव्यांतून परब्रह्माचा स्वाभाविक नामरूपात्मक विकास जग होय—म्हणजे जग हें मुळांत अनध्यस्तविवर्त किंवा एक पूर्ण ब्रह्मवस्तुरूपच आहे, असें माऊलींनी प्रतिपादिलें आहे.

हें अनध्यस्तविवर्तरूप जगत् ज्ञानदृष्टिगम्य आहे. ज्ञानदृष्टि नसलेल्या अज्ञानी जीवाला तेंच ब्रह्मवस्तूहून जडविनाशी अशा महदादि भिन्न भिन्न वस्तुरूपाने व भिन्न भिन्न धर्माने प्रतीत होतें, म्हणून असें प्रतीत होणारें जग अध्यस्तविवर्तरूप आहे, हे माऊलींनी ''माझ्याठायीं बिंबितें। जैसें जळीं फेण'' या चरणाने सांगितलें आहे.

माझ्या ठायीं—परब्रह्म अमर्याद, व्यापक व अद्वितीय असल्यामुळें त्याहून भिन्न धर्माच्या वस्तूचें अस्तित्व त्यावर कल्पितच असणार हें उघड आहे. पण ज्ञानाचा विषय न होणाऱ्या परब्रह्माच्या निर्गुण स्वरूपावर अध्यास होणें शक्य नाही. तें स्वरूप जेव्हा ज्ञानाचा विषय होईल तेव्हाच त्याच्यावर अध्यास होऊं शकतो. निर्गुणस्वरूप जेव्हा नामरूपाने नटून, आपणच आपल्याला विषय करतें, तेव्हाच विषयरूप झालेल्या अंशावर अध्यासरूप भ्रम होतो; असा आचार्यांनी अध्यासभाष्यांत आशय दाखविला आहे. म्हणून माझें सर्व नामरूपाने नटलेले अव्यक्त म्हणजे अतींद्रिय किंवा ज्ञानदृष्टिगम्य असें सगुण स्वरूपच जीवाला त्याच्या अज्ञानानामुळें अध्यस्तविवर्त असें जड विनाशी जगद्रूप भासतें, असा ''माझे ठायी'' या चरणाचा अर्थ आहे.

''**बिंबितें**''—येथे बिंबिते या शब्दाने वरील तत्त्वच श्रीमाऊलींनी प्रतिबिंबवादाचा आश्रय करून स्पष्ट केलें आहे. ''तस्य च प्रतिबिंबस्य सत्यत्वमेवेति प्रतिबिंबवादिनः'' (सि. बिं. श्लो. १) प्रतिबिंबवादांत, प्रतिबिंब हें बिंबच असल्यामुळे तें सत्य आहे. त्याचें प्रतिबिंबत्व म्हणजे उपाधिमुळे भासणारें त्याचें बिंबाहून निराळे वस्तुत्व व निराळे धर्म हे खोटे किंवा अज्ञानमूलक आहेत, असें मानिलें जातें.

येथेहि जगत् हें परब्रह्माहून निराळी वस्तु नसून, तिचे धर्महि निराळे नाहीत, पण अज्ञानामुळें जगत् परब्रह्माहून निराळी वस्तु आहे, असें वाटतें व तिचे धर्महि परब्रह्माच्या सच्चिदानंदधर्माहून निराळे असे जडविनाशी प्रतीत होतात, असें माऊलींनी ''बिंबितें'' या शब्दाने सुचविलें आहे.

जैसें जळीं फेण—ज्याप्रमाणें जलापासून झालेला फेंस जलस्वरूपच असतो, फेंस जळाहून निराळी वस्तु आहे, असें अज्ञान्याचें म्हणणें मिथ्या ठरतें, त्याप्रमाणें जगत् परमेश्वराहून निराळी वस्तु आहे, असें अज्ञान्याचें म्हणणेंहि खोटें मानिलें पाहिजे असें ''**सतोऽन्यत्वे चानृतत्वम्**'' (छां. उ. ६-३-२) या पंक्तीने आचार्यांनी प्रतिपादिलें असून ''**अब्रह्मप्रत्ययः सर्वोऽविद्यामात्रो रज्ज्वामिव सर्पप्रत्ययः**'' (मुंडक. उ. २-२-१२) दोरीवर भासणाऱ्या मिथ्या सर्पाप्रमाणे अब्रह्मप्रत्ययाचें—म्हणजे जडविनाशीस्वरूपाचें— जगत् अविद्याजन्य आहे म्हणजे खोटेंच म्हटलें पाहिजे, असें मुंडकोपनिषदांतहि त्यांनी (आचार्यांनी) म्हटलें आहे.

परि तया फेणांआंतु पाहतां। जेवीं जळ न दिसे पंडुसुता। नातरी स्वप्नींची अनेकता। चेइलिया नोहिजे॥ ६८ ॥

अर्थ—पण, अर्जुना! त्या फेसाआंत पाणी पाहूं गेल्यास दिसत नाही किंवा स्वप्नांत आपणच आपल्या कल्पनेनुसार जे अनेकपदार्थरूप होतो, तो आपला अनेकपणा जागृतींत दिसत नाही. ॥ ६८ ॥

तैसीं भूतें इयें माझा ठायीं। बिंबती तयांमाजि मी नाहीं। इया उपपत्ती तुज पाहीं। सांगितलिया मागां॥ ६९ ॥

अर्थ—त्याप्रमाणें ही सर्व भूतसृष्टि माझे ठिकाणीं भासते, पण त्या भूतसृष्टींत मी नाही. हें मागेंहि तुला अनेक दृष्टान्तांनी सांगितलें आहे. ॥ ६९ ॥

गूढार्थदीपिका—फेंस पाण्यापासूनच होतो, पण पाण्याच्या पातळपणाहून भिन्न अशा घनरूपाने तो प्रतीत होत असल्यामुळे, त्यांत जसें पाणी दिसत नाही. किंवा स्वप्नाहून भिन्न असलेल्या जागृति अवस्थेंत जशी स्वप्नाची अनेकता राहू शकत नाही, त्याप्रमाणे सच्चिदानंद परमेश्वरावर भ्रांतीने जडविनाशी धर्माने भासत असलेल्या व परब्रह्माहून वस्तुरूपाने भिन्न पडलेल्या मिथ्या जगताचे ठिकाणीं सच्चिदानंद परब्रह्माचा अनुभव येणें शक्य नाही असें माऊलींचें म्हणणें आहे.

म्हणऊनि बोलिलिया बोलाचा अतिसो। न कीजे यालागीं हें असो। परि मजआंत पैसो। दिठी तुझी॥ ७० ॥

अर्थ—सांगितलेल्या गोष्टीच पुनः पुनः सांगून विस्तार करणें योग्य नाही, म्हणून आता हें पुरे. पण माझ्या स्वरूपाचे ठिकाणीं तुझी दृष्टि प्रवेश करो॥ ७० ॥

गूढार्थदीपिका—अज्ञानी जीवाला परब्रह्माचा नामरूप विस्तार, परब्रह्माहून निराळी वस्तु आहे, असे जोपर्यंत वाटतें, तोपर्यंत परब्रह्मवस्तु झांकली जाऊन त्याला तिचा अनुभव येत नाही; म्हणून ज्याप्रमाणे फेंसांनी झांकलें गेलेलें पाणी फेंस अलग करून घ्यावें लागतें, त्याप्रमाणे नामरूपाचे ठिकाणीं कल्पिली गेलेली जगद्वस्तु सोडून देऊन एक सच्चिदानंद परमात्माच नामरूपाने नटला आहे, अशी दृढ बुद्धि ठेविली असतां परमेश्वराचे ठिकाणीं बुद्धीचा प्रवेश होतो, असें माऊली येथे सांगत आहेत.

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम्। भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः॥ ५॥

अर्थ—माझ्या ईश्वरस्वरूपाचा विचार करून पाहशील तर माझें—ईश्वरस्वरूप सर्व भूतांचें धारण पोषण करणारें व सर्व भूतांना उत्पन्न करणारें आहे असें (अज्ञान्याला) वाटत असलें तरी मी भूतांचे ठिकाणीं नाही व भूतें माझ्या ठिकाणीं नाहीत (असें तुला कळून येईल)॥ ५॥

गूढार्थदीपिका—"पतीचेनि अरूपपणें। लाजोनि अंगाचें मिरवणें। केलें जगाएवढें लेणें। नामरूपाचे" (अमृ. प्र. १-३०) परब्रह्माचे ठिकाणीं लीन असलेलीं नामरूपें जेव्हां परब्रह्माचे स्वभावशक्तीने परब्रह्मावरच व्यक्त होतात, तेव्हा त्या नामरूपाचे योगाने परब्रह्मच सगुण होतें. म्हणोनि वन्हि आणि ज्वाळ। दोन्ही वन्हीचि केवळ। तेवीं मी गा सकळ। संबंध वावो"॥ १२३॥ (ज्ञाने. अ. १४) ज्याप्रमाणे वन्हि आणि ज्वाळ हे दोन्ही जसा एक अग्निच असतो त्या दोन भिन्न वस्तु नाहीत, म्हणून त्यांचा कार्यकारणसंबंध खोटा आहे, त्याप्रमाणें परब्रह्म व नामरूपें दोन्ही एक पूर्ण परब्रह्मस्वरूपच आहेत. त्या दोन निराळ्या वस्तु नाहीत; असें भगवान सांगत आहेत.

आमुचा प्रकृतीपैलीकडील भावो। जरी कल्पनेवीण लागसी पाहों। तरी मजमाजीं भूतें हेंही वावो। जें मी सर्व म्हणऊनि॥ ७१ ॥

अर्थ—अर्जुना! माझे प्रकृतीच्या पलीकडील जें स्वरूप आहे तें, जर दुसऱ्या कांही वस्तूची कल्पना न करितां तूं पाहूं लागशील, तर मीच सर्व आहे—म्हणजे माझ्या ठिकाणीं भूतें आहेत, हें म्हणणें व्यर्थ आहे—असें तुला कळून येईल. ॥ ७१ ॥

गूढार्थदीपिका—अविनाशी सच्चिदानंद परब्रह्मापासून जडविनाशी अशा भिन्न धर्माचें जगत् कसें झालें, हे दृष्टिसृष्टि व सृष्टिदृष्टि या दोन वादांनी वेदान्तशास्त्रांतून सांगितलें आहे.

जडविनाशी सृष्टि खोटी किंवा मिथ्या आहे असेंच दोन्ही वादांचें तात्पर्य असलें तरी या दोन वादांत संक्षेपतः फरक असा आहे—

(१) सृष्टिदृष्टिवादांत, शुद्धब्रह्म, मायाविशिष्ट ईश्वर व अज्ञानोपाधिक जगत्‌रूप जीवसृष्टि असे तीन पदार्थ मानले आहेत, तर दृष्टिसृष्टिवादांत "अज्ञानानुपहितं चैतन्यमीश्वरः। अज्ञानोपहितं जीव इति" अज्ञानाला आधार असलेलें चैतन्य, जीव असून, त्याच्या अपेक्षेने अज्ञानरहित शुद्ध चैतन्यच ईश्वर आहे, असे दोनच पदार्थ मानले आहेत.

(२) सृष्टिदृष्टिवादांत ब्रह्माची पारमार्थिकसत्ता, जीवजगत्‌ईश्वर यांची व्यावहारिकसत्ता आणि रज्जुसर्पादिकांची

प्रातिभासिकसत्ता, अशा तीन सत्ता मानल्या आहेत, तर दृष्टिसृष्टिवादांत परब्रह्माची किंवा ईश्वराची परमार्थिकसत्ता व परब्रह्माव्यतिरिक्त सर्वांची प्रातिभासिक म्हणजे काल्पनिकसत्ता, अशा दोनच सत्ता मानल्या आहेत.

पारमार्थिकसत्ता म्हणजे अविनाशी अस्तित्व, व्यावहारिकसत्ता म्हणजे ब्रह्मज्ञान होईपर्यंत अविनाशी वाटणारें अस्तित्व व प्रातिभासिकसत्ता म्हणजे पदार्थ कळतो तेव्हाच त्याचें अस्तित्व असणें.

(३) सृष्टिदृष्टिवादांत मायोपाधिक ईश्वर सृष्टीचा कर्ता असून दृष्टिसृष्टिवादांत जीवाच्या कल्पनेनुसार सृष्टि भासते, असें मानिलें जातें.

(४) सृष्टिदृष्टिवादांत ईश्वर मायोपहित असला तरी त्याला बंध मोक्ष नाहीत. तसेच दृष्टिसृष्टिवादांत अज्ञानोपहित जो जीव त्यालाहि बंधमोक्ष नाहीत.

(५) सृष्टिदृष्टिवादांत अज्ञान नाना असून तत्प्रतिबिंबित जीवहि अनेक आहेत व त्यांनाच बंधमोक्ष आहेत; पण दृष्टिसृष्टि-वादांत अज्ञान एकच मानलें असून, अज्ञानाचें कार्य जें अंत:करण तें नाना असून त्यांत पडलेलें प्रतिबिंबरूप जीवाभास अनेक आहेत व त्यालाच बंधमोक्ष आहे असें मानिलें आहे.

(६) सृष्टिदृष्टिवादांत ब्रह्मप्राप्तीकरिता वेदान्तविचाराने जीव व ईश्वर या दोघांच्याहि उपाधीचा निरास करावा लागतो, पण दृष्टिसृष्टिवादांत नुसत्या अंत:करणप्रतिबिंबितजीवाभासाच्या अंत:करणउपाधीचा निरास केला की पुरे. श्रीज्ञानेश्वर माऊलींनी ''तैसा देहाहंकार नाथिला। हा समूळ जयाचा नाशिला। तोचि परमात्मा संचला। आधींचि आहे''॥ ८४॥ (ज्ञाने. अ. ६) या ओवींतहि हेच सांगितलें आहे.

(७) सृष्टिदृष्टिवादांत कार्यरूप सृष्टीची उत्पत्ति क्रमवार होते, असें मानलें जातें, पण ज्याप्रमाणें स्वप्नात बाप व मुलगा एकदमच उत्पन्न होतात, तरी मुलगा, माझा बाप माझ्यापूर्वी उत्पन्न झाला अशी कल्पना करतो, त्याप्रमाणें दृष्टिसृष्टिवादांत अनादिषट् पदार्थ सोडून बाकीचा कारणकार्यरूप प्रपंच एकदम उत्पन्न होतो असे मानलें जातें.

हा वाद बौद्धांच्या विज्ञानवादावारखा आहे, अशी कित्येक विद्वानांची गैरसमजूत होते. पण विज्ञानवादांत व दृष्टिसृष्टिवादांत फरक आहे.

विज्ञानवादांत ''सर्वं क्षणिक क्षणिकम्'' आत्म्यासह सर्व क्षणिक मानलें जातें, तर दृष्टिसृष्टिवादांत आत्मा अविनाशी मानला जातो. आणि ''यावद्दृष्टि: तावत्सृष्टि:'' म्हणजे जोपर्यंत पदार्थाचें ज्ञान किंवा पदार्थाची कल्पना आहे तोपर्यंत पदार्थाचें बाह्य अस्तित्व मानिलें जातें व विज्ञानवादी वस्तूचें बाह्य अस्तित्व मुळींच मानत नाहीत.

हा दृष्टिसृष्टिवाद योगवासिष्ठ, बृहदारण्यकोपनिषद्, मांडुक्यकारिका इत्यादि ग्रंथांत निरूपिला गेला असून, हा वादच वेदान्तांत मुख्य मानिला आहे, असे सिद्धान्तबिंदूत श्रीमधुसूदनसरस्वति म्हणतात आणि श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपल्या भावार्थदीपिकेंत व अमृतानुभवग्रंथांत विशेषत: दृष्टिसृष्टिवादच प्रतिपादिला आहे.

या वादानुसार अर्थ भूतसृष्टि जीवकल्पित आहे, हें आतां श्रीज्ञानेश्वर माऊली दाखवित आहेत.

प्रकृति म्हणजे अविद्या किंवा त्रिगुणात्मक माया ''न ह्यस्त्यविद्या मनसोऽतिरिक्ता''॥ १७१॥ (विवेकचू.) ही मनापासून निराळी नाही. मन म्हणजेच अविद्या असे आचार्य म्हणतात, ''वायां मन हें नांव। एऱ्हवीं कल्पनाचि सावेव''॥ ११०॥ (ज्ञाने. अ. १३) आणि मन म्हणजे कल्पना दुसरे काही नाही असें माऊलींनीहि म्हटले आहे; म्हणून माया म्हणजेच कल्पना होय.

ही कल्पना दोन प्रकारची आहे. एक यथार्थ कल्पना व दुसरी विपरीत कल्पना. ब्रह्मवस्तु ज्या लक्षणाची सांगितली आहे तशी ती अंत:करणांत ग्रहण करणें ही यथार्थ कल्पना होय. हिलाच विद्याहि म्हणतात आणि शास्त्रांवरून ब्रह्मवस्तूचें लक्षण न जाणतां, त्या वस्तूची मूळ लक्षणाहून निराळ्या लक्षणाची कल्पना होणें याला विपरीत कल्पना म्हणतात. हिला अविद्या असेंहि नांव आहे.

येथे 'प्रकृति' या शब्दाने विपरीत कल्पनारूप अविद्या घेतली आहे. ही विपरीत कल्पना ज्या परब्रह्म स्वरूपाच्या ठिकाणीं होते, त्या परब्रह्माचा, त्या विपरीत कल्पनेशीं कांही संबंध नसल्यामुळें, तें परब्रह्म अर्थात्

कल्पनेच्या पलीकडे असते आणि या विपरीत कल्पनेच्या पलीकडे असलेला जो ब्रह्मभाव किंवा ईश्वरभाव आहे, तो नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, कूटस्थ, निरवयव, अद्वैत सच्चिदानंदघन असा आहे.

या ब्रह्मभावाचा, त्याच्याहून विपरीत लक्षणाच्या भिन्न जगत्वस्तूची कल्पना न करतां जर विचार केला तर ''परि काळकुटी चोखट। सुधा कैची'' ज्याप्रमाणे काळकूट विषापासून त्याच्या विरुद्ध धर्माचें अमृत उत्पन्न होणें शक्य नाही, त्याप्रमाणे अस्फुट अद्वैत सच्चिदानंद अशा परब्रह्मापासून त्याच्या विशुद्ध धर्माची जडविनाशी भूतसृष्टिच उत्पन्न होणें शक्य नाहीं; म्हणून सर्व नामरूपासह एक परब्रह्मच आहे असा अनुभव येतो. या ठिकाणीं जगत् हें जीवकल्पित आहे हा दृष्टिसृष्टिवादाचा सिद्धान्त माऊलींनी स्वीकारला आहे.

एऱ्हवीं संकल्पाचिये सांजवेळे। नावेक तिमिरेजती बुद्धीचे डोळे। म्हणोनि अखंडित परि झांवळे। भूतभिन्न ऐसें देखे॥ ७२॥

अर्थ—विचार करून पाहतां, परब्रह्मावर भासणारीं नामरूपें यांचे ठिकाणीं परब्रह्म विसरल्यामुळें, परब्रह्माहून भिन्न जगद्वस्तूची जी कल्पना होते, तो संध्यासमय होय. त्या संध्यासमयीं बुद्धीचे ज्ञानडोळे, तेवढ्यापुरते अंधुक होतात व एक अखंड ब्रह्म असलें, तरी तें अंधुक डोळ्यांनी नानाप्रकारच्या भूतांनी विभागलें गेलें असें दिसतें. ॥ ७२॥

गूढार्थ दीपिका—प्रत्येक वस्तु नामरूपात्मक आहे. त्या नामरूपाने ती वस्तु ओळखिली जाते. सूर्यप्रकाशांत वस्तूचीं नामरूपें कळून आलीं म्हणजे ही अमुक वस्तु आहे असा यथार्थ निश्चय होतो; म्हणून त्या वस्तूवर दुसऱ्या वस्तूचा कधीं भ्रम होत नाही. पण सायंकाळीं जेव्हा कोणत्या वस्तूचीं हीं नामरूपें आहेत हें स्पष्ट कळून येत नाही, तेव्हा दुसऱ्या वस्तूचा भ्रम होतो.

परब्रह्म सर्व नामरूपासह अखंड एकरूप आहे, पण ही नामरूपें परब्रह्माचीं आहेत हें ज्ञान जीवाला नाही. हीच सांजवेळ होय. या सांजवेळेमुळें नामरूपासहित असलेलें अखंड परब्रह्म त्याला अनेक नामरूपद्वारा भिन्न भिन्न भूतरूपाने दिसूं लागतें.

तेचि संकल्पाची सांज जैं लोपे। तैं अखंडितचि आहे स्वरूपें। जैसें शंका जातखेवों लोपे। सापपण माळेचें॥ ७३॥

अर्थ—ज्याप्रमाणे समोर पडलेल्या माळेवर सर्पाची कल्पना होते आणि सर्पाची कल्पना निघून गेली की, माळेवर सर्प दिसत नाही, त्याप्रमाणे भूतांची कल्पनारूपी सायंकाल निघून गेली की, तें ब्रह्मस्वरूप अखंडच आहे. तें विभागलें गेलें नाही असा अनुभव येतो. ॥ ७३॥

गूढार्थदीपिका—जीवाला, वेदान्तविचाराने आपल्या नित्यज्ञानदृष्टिरूप साक्षीस्वरूपाचा अनुभव आला म्हणजे सर्वच कल्पितसृष्टीच्या भासाचा नाश होतो व माझ्या कूटस्थ आत्मस्वरूपाचे ठिकाणीं, आत्म्याहून निराळी असलेली जगद्वस्तु पूर्वी केव्हा नव्हती, आतां नाही व पुढें कधीं राहणार नाही असा निश्चय होतो.

एऱ्हवीं तरी भूमीआंतूनि स्वयंभ। काय घडेया गाडगेयांचे निघती कोंभ। परि ते कुलालमतीचे गर्भ। उमटले कीं॥ ७४॥

अर्थ—नाही तर अर्जुना! जमिनींतून आपोआप घडेगाडग्याचे स्वयंभ कोंभ निघतात काय? परंतु ते सर्व मातीचे घडेगाडगे म्हणजे कुंभाराच्या बुद्धींत जे गुप्त आकार होते, तेच मातीच्या ठिकाणीं प्रकट झाले. ॥ ७४॥

गूढार्थदीपिका—कांहीं वेदान्ती असा प्रश्न करतात की ''एका वस्तूवर दुसऱ्या वस्तूचा जेव्हा भ्रम होतो, तेव्हा त्याला अधिष्ठानभूत मूळ वस्तूचें अज्ञान आणि ज्या वस्तूचा भ्रम होतो त्या वस्तूच्या अनुभवाचा पूर्वी मनावर संस्कार असतो, पण परब्रह्मावर जेव्हा प्रथमच जीवाला भ्रम झाला, तेव्हा त्याला कारणभूत असणारा पूर्व जगताचा संस्कार नव्हता. मग जगद्भ्रम कसा झाला हें सांगता येत नाही. पारमार्थिक दृष्टिसृष्टिवादमतें, ज्यावेळीं जो सृष्टिविषयक पदार्थ मनांत येतो, त्याचवेळी व त्याचकाळीं तो उत्पन्न झाल्याचें भासतें, असें म्हणणें संयुक्तिक ठरते.''

पण हे म्हणणें वेदान्ताला धरून नाही. जगताचा भ्रम ज्याला होतो त्याला जीव म्हणतात. या जगद्भ्रमाचा आदि किंवा प्रथमच आरंभ मानला, तर हा भ्रम जीवाला झाला, त्याच्यापूर्वी जीव भ्रमरहित मुक्त होता किंवा पूर्ण ब्रह्मस्वरूप होता आणि मग त्याला भ्रम झाला म्हणजे जीवदशा उत्पन्न झाली असा त्याचा अर्थ होतो. असें मानलें तर ज्याप्रमाणें आधीं ब्रह्मस्वरूप असलेलें चेतन जीवदशेला आलें त्याप्रमाणें वेदान्तविचाराने व गुरुकृपेने पूर्ण मुक्त

झालेलें पुरुषहि पुन: भ्रमयुक्त होऊन जीवदशेला येणारच. असें झाल्यास वेदान्ताची मोक्षस्थिति अनित्य होईल व मोक्षाकरिता सांगितलेलीं साधनें व्यर्थ ठरतील.

त्याचप्रमाणे ''ब्रह्मभावश्च मोक्ष:'' (ब्र. सू. १-१-४) वेदान्तांत ब्रह्मभावाला मोक्ष म्हटलें असून तो नित्य आहे असे मानिलें आहे. ''नित्यश्च मोक्ष: सर्वैर्मोक्षवादिभिरभ्युपगम्यते'' आणि सर्व दर्शनकारांनीहि मोक्ष नित्यच मानला आहे. कोणीहि अनित्य मानला नाही. मोक्ष अनित्य ठरल्यास ब्रह्मभावच अनित्य ठरतो. जीवाच्या ठिकाणीं जो जगद्भ्रम आहे तो प्रथम केव्हा तरी झाला, असें मानण्यात वरप्रमाणें अनर्थपरंपरा उत्पन्न होते; म्हणून ''उत्पत्त्यसंभवात'' (ब्र. सू. २-२-४२) या सूत्रात जीवाची उत्पत्ति संभवत नाही असा सिद्धान्त भगवान व्यासांनी मांडला आहे.

जीवदशेची उत्पत्ति होत नाही असा सिद्धान्त आहे आणि ज्या जगद्भ्रमामुळे जीव पदार्थ मानला गेला, तो जगद्भ्रमहि अर्थातच प्रथम केव्हा तरी उत्पन्न होतो असें मानतां येत नाही. म्हणूनच पूर्व सर्व वेदान्त्यांनी ''जीव ईशो विशुद्धाचित् तथा जीवेशयोर्भिदा। अविद्या तत् चित्तोर्योग:षडस्माकमनादय:'' जीव, ईश्वर, शुद्ध चैतन्य, जीव व ईश्वर यांचा भेद, अविद्याभ्रम व त्याचा चैतन्याशीं संबंध ह्या सहा गोष्टी अनादि म्हणजे प्रथमारंभरहित आहेत, असें मानलें आहे.

वेदान्तांत दृष्टिसृष्टिवाद प्रमाण मानला असला तरी ''अनाद्यतिरिक्तसृष्टिविषय एव दृष्टिसृष्टिस्वीकारात्। कारणात्मना च स्थायित्वस्वीकाराच्च'' तो कार्यरूप जगताविषयींच मानला आहे. कार्यरूप जगताचे कारणभूत असे जे अनादि षट्पदार्थ मानले आहेत ते दृष्टिसृष्टिवादांतहि ब्रह्म सोडून बाकीचे पांच ब्रह्मज्ञान होईपर्यंत स्थिर मानले असल्यामुळें त्यांचे ठिकाणीं दृष्टिसृष्टिवाद मानतां येत नाही असे मधुसूदनसरस्वतींनी अद्वैतसिद्धींत म्हटले आहे, परब्रह्म हे अनादि अनंत आहे.

किंवा अनादिपदार्थाचे ठिकाणीं दृष्टिसृष्टिवाद जर मानला तर अंत:करणवृत्त्यवच्छिन्न जो जीवाभास तोच सृष्टीची कल्पना करीत असल्यामुळें त्यानेच जीव, ईश, जीव व ईश्वर याचा भेद, अविद्याभ्रम व त्याचा चैतन्याशीं संबंध या पांच पदार्थाचे ठिकाणीं अनादित्वाची ब्रह्मज्ञान होईपर्यंत स्थिरत्वाची कल्पना केली आहे असें मानावें लागतें म्हणून दृष्टिसृष्टिवादांतहि जगद्रूपभ्रम होण्याकरिता पूर्व जगताच्या संस्काराची अडचण येत नाही. ''न च सुषुप्तं प्रति संस्कारादेरप्यभावेन तस्य पुन: प्रबोधायोग: कारणात्मना संस्कारादे: सत्वात्'' सुषुप्तींत गेलेल्या पुरुषाचे ठिकाणीं संस्कारादि राहत नसल्यामुळें पुन: तो जागा होणार नाही अशी शंका येत नाही. कारण संस्कारादिकांचा कारणांतच अंतर्भाव होत असल्यामुळे ते संस्कारादि स्थिर राहतातच, असें मधुसूदनसरस्वतींनीच म्हटलें आहे.

नातरी सागरींच्या पाणीं। काय तरंगाचिया आहाती खाणी। ते अवांतर करणी। वारयाची नव्हे॥ ७५॥
पाहें पां कापसाचां पोटीं। काय कापडाची होती पेटी। तो वेढितयाचिया दिठी। कापड जाहला॥ ७६॥
जरी सोनें लेणें होऊनि घडे। तरी तयाचें सोनेंपण न मोडे। येर अळंकार हे वरचिलीकडे। लेतयाचेनि भावें॥ ७७॥
सांगें पडिसादाची प्रत्युत्तरें। कां आरिसा जें आविष्करे। तें आपलें कीं साचोकारें। तेथेंचि होतें॥ ७८॥
तैसी इये निर्मळ माझ्या स्वरूपीं। जो भूतभावना आरोपी। तयासि तयाचां संकल्पीं। भूताभासु असे॥ ७९॥

अर्थ—किंवा समुद्राच्या पाण्यांत तरंगाच्या खाणी आहेत काय? ते वाऱ्याचेंच निराळें आनुषंगिक कार्य नव्हे काय?॥ ७५॥ किंवा कापसाच्या पोटांत कापडाचा गठ्ठा असतो काय की तो वस्त्र नेसणाऱ्याच्या कल्पनेनुसार कापडरूप झाला?॥ ७६॥ सोनें जरी अलंकाररूपाने घडलें गेले तरी त्याचें सोनेपण नाहीसें होत नाही. बाकी सोन्याला अलंकार जें म्हटले जातें तें अलंकार घालणाऱ्याच्या वरच्या दृष्टीने असते.॥ ७७॥ सांग बरें, अर्जुना! एखादें ठिकाणीं जेथें आपल्या बोलण्याचा प्रतिध्वनि येतो तो किंवा आपल्यासमोर धरलेल्या आरशामध्ये जें (प्रतिबिंब) दिसतें तें खरोखर आपले कीं तेथेच होतें.॥ ७८॥ त्याप्रमाणे माझ्या सर्व नामरूपाने नटलेल्या शुद्ध निरुपाधिक स्वरूपाचे ठिकाणीं जो भूतसृष्टीची कल्पना करतो, त्यालाच त्याच्या कल्पनेमुळें भूतसृष्टि भासते.॥ ७९॥

गूढार्थदीपिका—मातीपासून होणारे गाडगेघडे, समुद्राच्या पाण्यावर उठणारे तरंग, कापसापासून होणारें कापड, प्रतिध्वनि, प्रतिबिंब इत्यादि दृष्टान्त, जीवाला शुद्ध सच्चिदानंदस्वरूपाचे ठिकाणी जगद्भ्रम कसा होतो हें दाखविण्याकरितां दिले आहेत.

मातीपासून झालेला घडा म्हणजे वस्तुतः मातीलाच आलेला आकार होय, कारण मातीवस्तूहून घडा म्हणून यत्किंचित्हि निराळी वस्तु नाही. फरक इतकाच झाला की पूर्वी ज्या आकाराला आपण घडा म्हणत होतो तो आकार नव्हतां व घडा हें नावहि नव्हतें, तेव्हा माती किंवा मातीचा पेंड, हें नांव व त्याचा आकार जो होता, तो जाऊन मातीचेच ठिकाणीं घडा हें नांव व दुसरा आकार आला. पण दोन्ही नामरूपांत एक मातीच आहे, "अवतरली गाडग्यां घडां। पृथ्वी अनोळख झाली मूढा" (ज्ञा. अ. १८-५४३) हें अद्वैतज्ञान ज्याला नाही तो पुरुष मातीवस्तूहुन निराळ्या घडावस्तूची कल्पना करतो व घडांवस्तूची तीं नामरूपें आहेत असें समजतो.

त्याचप्रमाणे "कापूसापासोनी होय दोरा। परि तो कापुसचि खरा" (परमामृत) कापसापासून झालेला दोरा कापूसच असतो. पण हे न जाणणारा मूर्ख पुरुष कापसापासून झालेल्या दोऱ्याला कापसाहून निराळी वस्तू समजतो व दोरा हें नांव व त्याचा आकार, दोरा वस्तूचीं आहेत. असे समजतो.

याप्रमाणेच एका अद्वैतसच्चिदानंद परब्रह्मवस्तुचे ठिकाणीं सर्व नामरूपें आहेत व त्या नामरूपाने ती परब्रह्मवस्तूच नटली आहे. परमेश्वराचें हें स्वरूप निर्मळ म्हणजे शुद्ध निरुपाधिकच आहे. परमेश्वराचें निर्गुणस्वरूप शुद्ध आहे असें जें वेदन्तांत म्हटले जातें त्याचा अर्थ "सत्वरजतमांसिगुणाः तद्रहितम्" परमेश्वराचे ठिकाणीं मायेचे सत्व, रज, तम हे तीन गुण नाहीत एवढाच आहे आणि हें स्वरूपहि परमेश्वर, मायेवांचून स्वभावशक्तीने घेतो, म्हणून तें शुद्ध निर्गुणच आहे. पण अज्ञानी जीवाला हें ज्ञान नसल्यामुळें तो प्रत्येक नामरूपाचे ठिकाणीं निरनिराळ्या वस्तूची कल्पना करतो.

येथे कोणी अशी शंका घेतील की जगताचें अधिष्ठानभूत म्हणून तुम्ही वर सांगितलेलें स्वरूप सगुण साकार आहे. पण परमेश्वर निर्गुण असून तो नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, सच्चिदानंदस्वरूप आहे, असे वेदान्तांत सांगितलें आहे.

याचें उत्तर असें की "सत्यादीनि हि त्रीणि विशेषणार्थानि पदानि विशेषस्य ब्रह्मणः" (तै. उ. २-१) विशेष्यरूप परब्रह्माची सत्, चित्, आनंद, शुद्ध, बुद्ध, मुक्त इत्यादि पदें विशेषणरूप आहेत असें आचार्य म्हणतात.

त्या विशेषणांनी विशेष्य झालेलें परब्रह्म सगुणच होणार. अशा विशेषणविशेष्य परब्रह्माला त्रिपादमहानारायणोपनिषदांत ब्रह्मविद्यासाकार म्हटलें आहे.

तेचि कल्पिती प्रकृती पुरे। आणि भूताभासु आधींच सरे। मग स्वरूप उरे एकसरें। निखळ माझें॥ ८०॥

अर्थ—भूतसृष्टीची कल्पनारूपी प्रकृति नाहीशी झाली की भूताभास मुळीं नव्हताच असा तो होऊन राहतो आणि एक माझें शुद्ध अखंड स्वरूपच उरतें. ॥ ८० ॥

गूढार्थदीपिका—कल्पिती प्रकृतिं पुरे—येथे "कल्पिती प्रकृती पुरे" या शब्दांनी माऊलींनी वेदान्तांतील एक रहस्य प्रगट केलें आहे. तें असें की सच्चिदानंद परब्रह्मापासून निराळे नामरूपात्मक जडविनाशी जगज्जीवादि पदार्थ उत्पन्न झाले आहेत, असें जें वेदान्तशास्त्रांतून सांगितलें आहे, तें कांही एक उत्पन्न झालें नसून, त्यांच्या उत्पत्तीची, त्यांच्या निराळ्या वस्तुत्वाची व जडविनाशीपणाची वगैरे केवळ जीवाची कल्पनाच झाली आहे व कल्पनेप्रमाणे ते तसे त्याच्या अनुभवाला येतात.

तरी भूताभास आधींच सरे। मग स्वरूप उरे एकसरें। निखळ माझें—नामरूपादि भूतसृष्टीची कल्पना सोडून पाहतां, जेवढें कांही वस्तुरूपाने अनुभविलें जातें, तेवढे सर्व पूर्ण सच्चिदानंद परब्रह्मच आहे, म्हणून कल्पना नाहीशी झाल्याबरोबर तसाच अनुभव येतो.

आत्मज्ञानाने भूतसृष्टीची कल्पना नाहीशी झाल्यावर भूतसृष्टि भासत होती तेव्हाहि ती नव्हती, आतांहि ती नाही व पुढें कधीं होणार नाही अशी तिची त्रैकालिक निवृत्ति अनुभवाला येते.

''दिसतचि स्वप्न लटिके। हें जागरीं होय ठाउके। तेविं अविद्याकाळीं सतुके। अविद्या नाही''॥ ३१ ॥ (अमृ. प्र. ६) भूतसृष्टीचें अस्तित्व केवळ कल्पनामात्र असतें, म्हणून ज्ञानानंतर तिची त्रैकालिक निवृत्ति होते असें श्रीज्ञानेश्वर माऊलींनी अमृतानुभवांतहि सांगितलें आहे.

हें असो आंगीं भरलिया भवंडी। जैशा भोंवत दिसती अरडीदरडी। तैशीं आपुलिया कल्पना अखंडीं। गमती भूतें॥ ८१ ॥

तेचि कल्पना सांडूनि पाहीं। तरि मी भूतीं भूतें माझिया ठायीं। हें स्वप्नीही परि नाहीं। कल्पावयाजोगें॥ ८२ ॥

आतां मी एक भूतांतें धर्ता। अथवा भूतांमाजीं मी असता। या संकल्पसन्निपाता-। आंतुलिया बोलिया॥ ८३ ॥

म्हणोनि परियेसीं गा प्रियोत्तमा। यापरी मी विश्वेंसीं विश्वात्मा। जो इया लटकिया भूतग्रामा। भाव्यु सदा॥ ८४ ॥

रश्मीचेनि आधारें जैसें। नव्हतेंचि मृगजळ आभासे। माझां ठायीं भूतजात तैसें। आणि मातेंही भावीं॥ ८५ ॥

मी ये परीचा भूतभावनु। परि सर्व भूतांसि अभिन्नु। जैसी प्रभा आणि भानु। एकचि ते॥ ८६ ॥

हा आमुचा ऐश्वर्ययोगु। तुवां देखिला कीं चांगु। आतां सांगें कांहीं एथ लागु। भूतभेदाचा असे॥ ८७ ॥

अर्थ—हे असो. ज्याप्रमाणे आंगांत भोवंड भरली असतां आजूबाजूच्या सर्व अरडीदरडी देखील फिरतांना दिसतात, त्याप्रमाणे भूतांची कल्पना झाली असतां, अखंड आत्मस्वरूपाचे ठिकाणीं भूतसृष्टि भासूं लागते. ॥ ८१ ॥ केलेली ती कल्पना सोडून देऊन पाहशील, तर मी भूतांमध्यें आहे व भूतें माझ्या ठिकाणीं आहेत असें स्वप्नात देखील मानतां येण्याजोगें नाही. ॥ ८२ ॥ अशा स्थितींत मीच एक सर्व भूतसृष्टीला धारण करणारा आहे किंवा भूतसृष्टीमध्ये असणारा आहे, हें म्हणणें कल्पनारूपं सन्निपातांतील बडबड आहे. ॥ ८३ ॥ हे प्रियोत्तमा अर्जुना! ऐक, मी याप्रमाणे संपूर्ण विश्वाचा आत्मा होऊन मिथ्याभूत सृष्टीचा आधार झालों आहे. ॥ ८४॥ सूर्याच्या किरणाच्या आधारावर जसें नसत्या मृगजळाची कल्पना होते, त्याप्रमाणे माझ्या ठिकाणी भूतसृष्टीची आणि भूतसृष्टीच्या ठिकाणीं माझी कल्पना केली जाते, असें समज. ॥ ८५ ॥ याप्रमाणे मी भूतसृष्टि उत्पन्न करणारा आहे. तरीपण ज्याप्रमाणे सूर्य व प्रकाश दोन्ही एकच असतात, त्याप्रमाणे मी सर्व भूतसृष्टीशीं एकरूप आहे. ॥ ८६ ॥ अर्जुना! ही माझी ईश्वरी घटना तूं नीट ओळखिलीस ना! मग माझ्या ठिकाणीं माझ्याहून भिन्न असा भूतसृष्टीचा संबंध आहे काय, सांग बरें. ॥ ८७ ॥

गूढार्थदीपिका—गीतेंत ऐश्वर्ययोग म्हणून जो कित्येक ठिकाणीं शब्द आला आहे, याचा अर्थ ''सर्व भूतांसि अभिन्नु। जैसी प्रभा आणि भानु। एकचि ते'' या चरणाने माऊलींनी स्पष्ट केला आहे. सर्व नामरूपासह पूर्ण ब्रह्मस्वरूप होऊन राहणें हा परमेश्वराचा ऐश्वर्ययोग होय असा अर्थ. हा ऐश्वर्ययोग अनुभवाला आला असतां जडविनाशी सृष्टीचें नांवच राहत नाही.

यालागीं मजपासूनि भूतें। आनें नव्हती हें निरुतें। आणि भूतांवेगळिया मातें। कहींच न मनीं हो॥ ८८ ॥

अर्थ—म्हणून माझ्याहून भूतसृष्टि कधी निराळी नाही व भूतसृष्टीहून मी निराळा आहे, असें कधी मनांत येऊं देऊं नकोस. ॥ ८८ ॥

गूढार्थदीपिका—अज्ञानी लोक ज्याला जगत् म्हणतात तें खरोखर जगत् नसून, सच्चिदानंद परब्रह्माचा निरुपाधिक असा नामरूपाचा आविष्कार आहे, हाच माऊलींच्या निरूपणाचा सारांश असून, तो या ओवींत माऊलींनी स्पष्ट केला आहे.

मागील श्लोक व त्यावरील विवरणांत, जगत् हे परब्रह्माचा विवर्त मानिला पाहिजे असें सांगितलेंच आहे. ''की चिद्रत्नाची कीळ। तें हें चराचर सकळ। ऐसी कळा न दिसे तें समूळ। पडळसृष्टि॥'' (स्वात्म सुख ७४) हा चराचर प्रपंच परब्रह्मरूपी रत्नाची कांति आहे, असे जोपर्यंत कळत नाही तोपर्यंत त्या दृष्टींत अविद्यारूपी पडळ (अविद्यालेश) कायम आहे, असे समजावें.

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान्। तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय॥ ६ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे सर्वत्र संचार करणारा व थोर असा वायु आकाशाच्या ठिकाणीं नित्य असतो, त्याप्रमाणें सर्व भूतसृष्टि माझे ठिकाणीं आहे असें जाण॥ ६ ॥

पैं गगन जेवढें जैसें। पवनु गगनीं तेवढाचि असे। सहजें हालविलिया वेगळा दिसे। एऱ्हवीं गगन तेंचि तो॥ ८९॥

अर्थ—जेवढें आकाश आहे, तेवढाच आकाशाचे ठिकाणीं राहणारा वायूहि आहे, सहज हालवला गेला, तर तो आकाशाहून निराळा दिसतो; नाही तर आकाशाशीं एकरूप होऊन राहतो.॥ ८९॥

गूढार्थदीपिका—भ्रमजन्य कार्याचा असा नियम आहे की तें ज्या वस्तूवर भासतें, त्या वस्तूचें जें परिणाम असेल तेंच परिणाम भ्रमजन्य कार्यवस्तुचेंहि असतें. दोरीवर भासणारा सर्प, जेवढी दोरी तेवढा असतो, त्याप्रमाणे अनंत अशा परब्रह्मावर होणारा जगद् भ्रमहि अनंतच भासतो.

तैसें भूतजात माझ्या ठायीं। कल्पिजे तरी आभासे कांहीं। निर्विकल्पीं तरि नाहीं। तेथ मीचि मी आघवें॥ ९०॥
म्हणऊनि नाहीं आणि असे। हे कल्पनेचेनि सौरसें। जें कल्पनालोपें भ्रंशे। आणि कल्पनेसवें होय॥ ९१॥
तेंचि कल्पितें मुदल जाये। तैं असे नाहीं हें कें आहे। म्हणऊनि पुढती तूं पाहें। हा ऐश्वर्ययोगु॥ ९२॥

अर्थ—याप्रमाणें माझे ठिकाणीं भूतांची कल्पना झाली, तर भूतें भासतात आणि कल्पना झाली नाही, तर सर्व एक मीच असतो.॥ ९०॥ म्हणून नाही आणि आहे, हे परब्रह्माहून निराळ्या वस्तूची कल्पना करूनच तिच्या विषयीं म्हटलें जातें. कारण भूतांची कल्पना नाहीशी झाली की भूतें दिसत नाहीत आणि भूतांची कल्पना केली जाते तोपर्यंत तीं दिसतात.॥ ९१॥ आणि भूतसृष्टीच्या भासाला कारण जी कल्पना तीच नि:शेष नाहीशी झाली की, आहे-नाही हे म्हणणें कोठे राहिले? म्हणून अर्जुना! माझी ही ईश्वरीसामर्थ्यघटना कशी आहे, हें पुन: पहा॥ ९२॥

गूढार्थदीपिका—आकाशांत असलेला वायु वाहतो, त्यावेळीं तो आकाशांहून निराळा पडतो आणि वाहत नाही तेव्हा आकाशाशीं एकरूप असतो. त्याप्रमाणेच भूतसृष्टीची कल्पना झाल्याबरोबर परब्रह्माचे ठिकाणीं परब्रह्माहून निराळ्या अशा भूतसृष्टीची अनिर्वचनीय (काल्पनिक) उत्पत्ति होते आणि तेव्हा तिच्याविषयीं आहे—नाही, असें म्हणतां येतें. भूतसृष्टीची कल्पना जेव्हा नसते, तेव्हा स्वत:सिद्ध निर्विकल्प अशा पूर्ण परब्रह्माचे ठिकाणीं आहे—नाही हे शब्द लागूं शकत नाहीत.

ऐसिया प्रतीतिबोधसागरीं। तूं आपणेयातें कल्लोळु एक करीं। मग जंव पाहासी चराचरीं। तंव तूंचि आहासी॥ ९३॥
या जाणणेयाचा चेवो। तुज आला ना म्हणती देवो। तरी आतां द्वैतस्वप्न वावो। जालें कीं ना॥ ९४॥

अर्थ—(सर्व नामरूपात्मक देखावा निरुपाधिक सगुण ब्रह्माकार आहे) अशा ज्ञानानुभवरूप समुद्रांत, अर्जुना! तूं एक ज्ञानानुभवरूप समुद्राचा तरंग होऊन राहा. मग त्या तरंगरूप ज्ञानवृत्तीने चराचर भूतसृष्टीकडे पाहशील, तेव्हा सर्व तूंच आहेस, असें तुला कळून येईल.॥ ९३॥ देव म्हणतात, अर्जुना! हा अनुभवरूप बोध तुझ्या ठिकाणीं जागृत झाला ना! मग आता आत्म्याहून जडविनाशीधर्माने भिन्न भासणारी भूतसृष्टि खोटी झाली की नाही, सांग॥ ९४॥

गूढार्थदीपिका—सच्चिदानंद आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं जडविनाशी जगताच्या प्रत्ययाला, कोणत्याच दृष्टीने अवकाश नसल्यामुळें, जडविनाशी जगताचा प्रत्यय काल्पनिक म्हणावा लागतो. "प्रपंच मुळीं झांलाचि नाहीं। हें कळलें जयाच्या ठायीं। तोचि देहीं विदेही। निरस्तोपाधि पाहे तो एक"॥ ११७॥ (हस्तामलक).

तरी पुढती जरी विपायें। बुद्धीसि कल्पनेची झोंप ये। तरी अभेदबोधु जाये। जैं स्वप्नीं पडिजे॥ ९५॥
म्हणोनि ये निद्रेची वाट मोडे। निखळ उद्बोधाचेंचि आपणपें घडे। ऐसें वर्म जें आहे फुडें। तें दावों आतां॥ ९६॥
तरी धनुर्धरा धैर्या। निकें अवधान देईं बा धनंजया। पैं सर्व भूतांतें माया। करी हरी गा॥ ९७॥

अर्थ—जडविनाशी भूतसृष्टि खोटी आहे, असें कळल्यावरहि (ब्रह्माद्वैतबोध दृढ झाला नसल्यामुळें) पुन: जर बुद्धीला कदाचित् तिच्या कल्पनेची झोंप येईल व द्वैतरूप स्वप्नांत पडशील, तर सर्व सच्चिदानंद परब्रह्मच आहे हा अद्वैतबोध नाहीसा होईल.॥ ९५॥ ह्या कल्पनारूपी झोंपेची वाट नि:शेष नाहीशी होईल आणि संपूर्ण सच्चिदानंदस्वरूप मीच झालों आहे असा शुद्ध बोध होईल, असे जें वर्म तें मी आतां स्पष्ट करून सांगतों.॥ ९६॥ तर मूर्तिमंत धैर्यस्वरूप अशा धनुर्धारी अर्जुना! माझ्या म्हणण्याकडे उत्तमप्रकारें लक्ष देऊन श्रवण कर. ही जडविनाशी भूतसृष्टि मायाच उत्पन्न करते आणि तीच त्याचा नाश करते.॥ ९७॥

गूढार्थदीपिका—द्वैतरूप संसाराचा अनंत जन्माचा संस्कार असल्यामुळें तो एकदम नाहीसा होऊन अद्वैतब्रह्मदृष्टि दृढ होत नाही. द्वैतबुद्धि नाहीशी होऊन अद्वैतबोध, ज्या उपायाने होईल तो उपाय श्रीज्ञानेश्वर महाराज सांगत आहेत. तो उपाय म्हणजे सर्व भूतसृष्टीची उत्पत्ति व नाश हे दोन्ही केवळ कल्पनारूप मायेनेच होतात, आत्म्याचा येथे कांही संबंध नाही, आत्मा केवळ साक्षी आहे, असें जाणून आपण कल्पनेचे साक्षी होऊन राहणें हा होय.

सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम् । कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥ ७ ॥

अर्थ—हे कौन्तेय! ही सर्व भूतसृष्टि कल्पाचे शेवटीं माझ्या प्रकृतींत किंवा मायेत लीन होते व कल्पाच्या आरंभीं पुन: मी तिला उत्पन्न करतों. ॥ ७ ॥

जिये नांव गा प्रकृती। जे द्विविध सांगितली तुजप्रती। एकीं अष्टधा भेदव्यक्ती। दुजी जीवरूपा॥ ९८ ॥
हा प्रकृतीविखो आघवा। तुवां मागां परिसिलासे पांडवा। म्हणोनि असो काइ सांगावा। पुढतपुढतीं॥ ९९ ॥
तरी ये माझिये प्रकृती। महाकल्पाचां अंती। सर्व भूतें अव्यक्तीं। ऐक्यासि येती॥ १०० ॥

अर्थ—अर्जुना! जिला प्रकृति हें नांव आहे. ती दोन प्रकारची आहे हें तुला मागें सांगितलेंच आहे. एक प्रकृति आठ पदार्थांच्या भेदाने भिन्न अशी असून, दुसरी जीवरूप आहे. ॥ ९८ ॥ हा प्रकृतिविषय मागें तूं ऐकलाच आहेस, म्हणून पुन: पुन: काय सांगायचा? ॥ ९९ ॥ महाकल्पाच्या शेवटीं ही सर्व भूतसृष्टि माझ्या अव्यक्त प्रकृतींत लीन होते. ॥ १०० ॥

गूढार्थदीपिका—कल्पान्त म्हणजे ब्रह्मदेवाच्या रात्रींत सर्व कार्यसृष्टि अव्यक्त होणें आणि महाकल्पान्त म्हणजे ब्रह्मदेवासह सर्व सृष्टि अव्यक्त होणें.

ग्रीष्माचां अतिरसीं। सबीजें तृणें जैसीं। मागुती भूमीसी। सुलीनें होती॥ १०१ ॥
कां वार्षिये ढेंढें फिटे। जेव्हां शारदीयेचा अनुघडु फुटे। तेव्हां घनजात आटे। गगनींचें गगनीं॥ १०२ ॥

अर्थ—ग्रीष्मऋतूच्या कडक उन्हाळ्यांत, ज्याप्रमाणें गवत वाळून जाऊन बीजरूप होतें व नंतर जमिनींत अगदी लीन होते. ॥ १०१ ॥ वर्षाऋतूंतील अभ्रांचें अवडंबर नाहीसें होऊन, जेव्हा त्यामागून येणाऱ्या शरद्ऋतूचें आगमन व्यक्त होते, तेव्हा संपूर्ण आकाशांतील अभ्रे आकाशांतच नाहीशीं होतात. ॥ १०२ ॥

नातरी आकाशाचिये खोंपे। वायु निवांतुचि लोपे। कां तरंगता हारपे। जळीं जेवीं॥ १०३ ॥
अथवा जागिनलिये वेळे। स्वप्न मनींचें मनीं मावळे। तैसें प्राकृत प्रकृतीं मिळे। कल्पक्षयीं॥ १०४ ॥
मग कल्पादीं पुढती। मीचि सृजीं ऐसी वदंती। तरी इयेविषयीं निरुती। उपपत्ति आईक॥ १०५ ॥

अर्थ—किंवा आकाशाचे पोकळींत वायू निवांत होऊन नाहीसा होतो किंवा तरंगाचे आकार पाण्यांतच नाहीसे होतात. ॥ १०३ ॥ अथवा जाग आल्याबरोबर स्वप्न मनांतल्या मनांत मावळते, त्याप्रमाणें प्रकृतीपासून झालेली ही भूतसृष्टि कल्पाचे शेवटीं प्रकृतींतच मिळून जाते. ॥ १०४ ॥ मग कल्पाच्या आरंभीं मीच पुन: सर्व सृष्टि निर्माण करतों, अशी जी बोलवा आहे त्या विषयीचा खरा विचार ऐक. ॥ १०५ ॥

प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुन: पुन:। भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात्॥ ८ ॥

अर्थ—अर्जुना! मी प्रकृतीला आपल्या स्वाधीन ठेवून प्रकृतीच्या स्वाधीन असलेली ही संपूर्ण भूतसृष्टि प्रकृतीच्या स्वभावानुसार पुन: पुन: उत्पन्न करीत असतों. ॥ ८ ॥

तरी हेचि प्रकृति किरीटी। मी स्वकीया सहजें अधिष्ठीं। तेथ तंतुसमवाय पटीं। जेविं विणावणी दिसे॥ १०६ ॥

अर्थ—अर्जुना! मी ह्या आपल्या प्रकृतीला सहज अधिष्ठानभूत झालों की तंतूंचा संबंध होऊन असलेल्या वस्त्राच्या ठिकाणीं ज्याप्रमाणे वस्त्राची वीण दिसून पडते. ॥ १०६ ॥

गूढार्थदीपिका—तरी हेचि प्रकृती किरीटी—'प्रकृति' शब्दाने येथे जीवाची कल्पनारूप त्रिगुणात्मक प्रकृति घेतली आहे. आत्मस्वरूपाला विसरून जी कल्पना उठते, ती आपोआप त्रिगुणात्मक होते, असें ''तैसे अज्ञानांगीकारे।

निघाली वृत्ति विखुरे। ते सत्वरजद्वारें। तमहि होय'' (ज्ञाने. अ. १४-१४४) श्रीज्ञानेश्वर माऊलींनी म्हटलें आहे.

मी स्वकीया—येथे भगवंतांनी त्रिगुणात्मक प्रकृतीला स्वकीया म्हणजे माझी प्रकृति असें जें म्हटलें आहे तें परमेश्वराची जी मूळ चैतन्यशक्ति तीच जीवाला अज्ञानामुळें त्रिगुणात्मक प्रकृतिरूप भासते म्हणून जीवाचे दृष्टीने म्हटलें आहे.

''सूर्य आंधाराते नाशी। परि तो सन्मुख नये तयेपाशी। तेविं मायानियंता हृषीकेशी। परि माया देवासी दृष्ट नव्हे.॥ १९४॥'' (ए. भा. अ. २५)

एऱ्हवीं ज्याप्रमाणे सूर्य अंध:काराचा नाश करतो असें म्हटलें जातें, पण अंध:कार सूर्याला कधींहि दिसत नाही. त्याप्रमाणे मायेचा अंगीकार करून परमात्मा सृष्टि निर्माण करतो असें वेदान्तांत म्हटलें असलें तरी जगत्कारण जी माया ती परमेश्वराला कधीं गोचर होत नाही; म्हणून परमात्मा मायेचा अंगीकार करून सृष्टि निर्माण करतो, हें म्हणणेंहि खरें नाही. ''प्रकृतिं स्वामवष्टभ्य'' या पदाचा मी प्रकृतीला वश करून—म्हणजे मी प्रकृतीला सहज अधिष्ठानभूत होऊन—असा अर्थ करावा लागतो.

सहजें अधिष्ठी—परमेश्वराचें प्रकृतीला आपल्या स्वाधीन करणें म्हणजे प्रकृतीला सहज अधिष्ठानभूत होणे किंवा आश्रयभूत होणे होय. परमेश्वराच्या चैतन्यशक्तीचीच त्रिगुणात्मक मायारूपाने जीव कल्पना करतो व ती कल्पना परमेश्वरस्वरूपावरच भासते, म्हणून परमेश्वर सहजच तिला अधिष्ठानभूत होतो. त्याला स्वतंत्रपणें तिचा अंगीकार करावा लागत नाही.

तेथ तंतुसमवाय पटीं—याप्रमाणें जीवाच्या कल्पनारूप त्रिगुणात्मक प्रकृतीला परमात्मा सहज आधार झाला की कल्पनेनुसार सृष्टि होऊं लागते, हेंच ''हेंच तंतुसमवाय पटीं। जेवि विणावणी दिसे'' या चरणांनी व पुढील ओवीने दाखविलें आहे.

''समवाय'' हा न्यायशास्त्रांतील पारिभाषित शब्द असून त्याचा ''नित्यसंबंधस्समवाय:'' नित्यसंबंध असा अर्थ आहे, पण तो शब्द येथें संबंध या सामान्य अर्थानेच वापरला गेला आहे.

मग तिये विणावणीचेनि आधारें। ल्हाना चौकडियां पटत्व भरे। तैसी पंचात्मकें आकारें। प्रकृतीचि होये॥ १०७॥
जैसें विरजणियाचेनि संगें। दूधचि आटेजों लागे। तैशी प्रकृती आंगा रिगे। सृष्टिपणाचिया॥ १०८॥

अर्थ—मग त्या विणकरीच्या आधाराने लहान लहान चौकड्याने जसें वस्त्र भरलें जातें तशी पंचभूतांच्या आकाराची प्रकृतिच होते. ॥ १०७॥ ज्याप्रमाणे विरजणाच्या संगाने दूधच आटून दही होतें त्याप्रमाणे प्रकृतिच सृष्टीच्या रूपाने परिणाम पावते. ॥ १०८॥

गूढार्थदीपिका—वरील १०६ ते १०८ ओव्यांचें तात्पर्य असें आहे की परमात्मा जगताला विवर्तोपादन कारण आहे म्हणजे परमेश्वराची सत्ताच जगताला आधार आहे आणि जीवाची कल्पना ही जी त्रिगुणात्मक प्रकृति, ती जगाचे परिणामउपादानकारण आहे—म्हणजे जीवाची कल्पनाच जगद्रूपाने परिणाम पावते. परमेश्वराची सत्ताच जीवाच्या कल्पनेनुसार सृष्टिरूप भासते असा भाव.

बीज जळाची जवळीक ल्हहे। आणि तेंचि शाखोपशाखीं होये। तैसें मज करणें आहे। भूतांचे हें॥ १०९॥

अर्थ—बीजाला पाण्याचें सान्निध्य प्राप्त झालें की तेंच अनेक लहानमोठ्या डाहाळ्याच्या रूपाने विस्तार पावतें, तसा मी भूतांचें उत्पत्तीला कारण आहे. ॥ १०९॥

अगा नगर हें रायें केलें। या म्हणणया साचपण कीर आलें। परि निरुतें पाहतां काय शिणले। रायाचे हात॥ ११०॥
अणि मी प्रकृती अधिष्ठीं तें कैसें। जैसा स्वप्नीं जो असे। मग तोचि प्रवेशे। जागृतावस्थे॥ १११॥
तरि स्वप्नौनि जागृती येतां। काय पाय दुखती पंडुसुता। कीं स्वप्नमाजीं असतां। प्रवासु होय॥ ११२॥
या आघवियाचा अभिप्रावो कायी। जे हें भूतसृष्टीचें कांहीं। मज एकही करणें नाहीं। ऐसाचि अर्थु॥ ११३॥
जैशी रायें अधिष्ठिली प्रजा। व्यापारे आपुलालिया काजा। तैसा प्रकृतिसंगु माझा। येर करणें तें इयेचें॥ ११४॥

पाहें पां पूर्णचंद्राचिये भेटी। समुद्रीं भरते अपार दाटी। तेथ चंद्रासि काय किरीटी। उपखा पडे॥ ११५॥
जड परि जवळिका। लोह चळे तरि चळो कां। कवणु शीणु भ्रामका। सन्निधानाचा॥ ११६॥
किंबहुना यापरी। मी निजप्रकृती अंगीकारीं। आणि भूतसृष्टी एकसरी। प्रसवोंचि लागे॥ ११७॥

अर्थ—बा अर्जुना! राजाने शहर वसविलें हें म्हणणें खरें समजलें जातें, पण खरोखर पाहूं गेलें तर शहर वसवितांना राजाच्या हाताला कांही श्रम करावे लागले काय?॥ ११०॥ आणि मी प्रकृतीचा अधिष्ठाता होतो तो कसा, असें विचारशील तर जसा स्वप्नावस्थेंत असलेला मनुष्य जागृतावस्थेंत येतो.॥ १११॥ तर स्वप्नावस्थेंतून जागृतावस्थेंत येतांना, अर्जुना! त्याचे पाय दुखतात काय? किंवा स्वप्नात प्रवास केला, तर तो प्रवास होतो काय?॥ ११२॥ या सर्व म्हणण्याचा अभिप्राय हाच की, या भूतसृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयाचें मला कांही एक करावें लागत नाही. माझा भूतसृष्टीशीं संबंधच नाही.॥ ११३॥ ज्याप्रमाणें (प्रजेला) राजा असला की, प्रजा आपआपले व्यापार करते, त्याप्रमाणे माझा व प्रकृतीचा केवळ जीवाने कल्पिलेला संबंध आहे बाकी सर्व प्रकृतीच करते.॥ ११४॥ हे पहा, अर्जुना! पौर्णिमेला चंद्र पूर्ण झाला की समुद्राला भरती दाटून येते. तेथे चंद्राला काय श्रम पडतात? सांग बरें॥ ११५॥ लोखंडाचा तुकडा चुंबकाच्याजवळ असला तर तो ओढला जातो तरी ओढला जावो! पण तेथे चुंबकाला जवळ असण्यांत काय श्रम होतात?॥ ११६॥ किंबहुना याप्रमाणे मी आपल्या प्रकृतीचा अंगीकार करतो आणि प्रकृतीपासून भूतसृष्टि एकदम होऊं लागते.॥ ११७॥

गूढार्थदीपिका—परमेश्वरसत्तेचा व प्रकृतीचा नुसता संबंध हाच केवळ भूतसृष्टीच्या उत्पत्तीचें निमित्तकारण आहे.

जो हा भूतग्रामु आघवा। असे प्रकृतिअधीन पांडवा। जैसी बीजाचिया वेलपाल्वा। समर्थ भूमि॥ ११८॥
नातरि बाळादिकां वयसा। गोसावी देहसंगु जैसा। अथवा घनावळी आकाशा। वार्षिये जेवीं॥ ११९॥
कां स्वप्नासि कारण निद्रा। तैसी प्रकृती हे नरेंद्रा। या अशेषाहि भूतसमुद्रा। गोसाविणी गा॥ १२०॥
स्थावरा आणि जंगमा। स्थूळा अथवा सूक्ष्मा। हे असो भूतग्रामा। प्रकृतीचि मूळ॥ १२१॥

अर्थ—ज्याप्रमाणे बीजाला वेल-पानें उत्पन्न करण्याची शक्ति भूमींतच आहे, त्याप्रमाणे ही सर्व भूतसृष्टि प्रकृतीच्या स्वाधीन आहे.॥ ११८॥ किंवा बाल्य, यौवन, वार्धक्य या वयाला जसा देहाचा संबंधच मुख्य कारण आहे, किंवा पाऊस पाडणारे मेघ आकाशांत जमण्याकरिता वर्षाऋतुच कारण आहे.॥ ११९॥ किंवा स्वप्न पडण्याला जशी निद्राच कारण असते, त्याप्रमाणे नरश्रेष्ठ अर्जुना! ही जीवाची कल्पनारूप प्रकृतिच या सर्व भूतसृष्टीचें मुख्य कारण होय.॥ १२०॥ स्थावर, जंगम, स्थूल, सूक्ष्म या सर्व जीवसृष्टीला प्रकृतिच कारण आहे.॥ १२१॥

न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय। उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु॥ ९॥

अर्थ—जड विनाशी जगाच्या उत्पत्ति, स्थिति, लय या कर्माचे ठिकाणीं उदासीन पुरुषाप्रमाणें, आसक्तिरहित, केवळ साक्षीभूत होऊन मी राहत असल्यामुळे तीं कर्में मला बांधू शकत नाहीत.॥ ९॥

म्हणोनि भूतें हन सृजावीं। कां सृजिलीं प्रतिपाळावीं। इयें करणीं न येती आघवीं। आमुचिया आंगा॥ १२२॥
जळीं चंद्रिकेचिया पसरती वेली। ते वाढी चंद्रे नाहीं वाढविली। तेविं मातें पावोनि ठेलीं। दूरी कर्मे॥ १२३॥
आणि सुटलिया सिंधुजळाचा लोटु। न शके धरूं सैंधवाचा घाटु। तेविं सकळ कर्मा मीच शेवटु। तीं काय बांधती मातें॥ १२४॥

अर्थ—म्हणून भूतसृष्टि निर्माण करावी किंवा निर्माण केलेल्या सृष्टीचें पालन करावें, हें कर्माचें कर्तृत्व माझ्याकडे मुळींच येत नाही.॥ १२२॥ ज्याप्रमाणे पाण्यांत चंद्राच्या प्रकाशाचा ताटवा पसरलेला दिसतो, पण तो विस्तार चंद्राने केलेला नसतो, त्याप्रमाणे अज्ञान्याला माझ्याशीं कर्माचा संबंध दिसत असला, तरी मी असंग असल्यामुळे खरोखर माझा संबंध मुळींच नसतो.॥ १२३॥ ज्याप्रमाणे समुद्राच्या पाण्याचा लोंढा वाहूं लागला असतां त्याला मिठाचा बांधलेला बांध थोपवून धरूं शकत नाही, त्याप्रमाणे भगवान म्हणतात, अर्जुना! ज्या कर्माचा मीच शेवट आहे—म्हणजे यथार्थ-विचाराने सर्व कर्में मद्रूपच होतात—तीं कर्में मला कशी बांधूं शकतील?॥ १२४॥

गूढार्थदीपिका—या ओवींत भगवान मला कर्माचा बंध होत नाही असें सांगत आहेत.

कर्माचा बंध म्हणजे कर्तृत्व व फळाचें भोक्तृत्व उत्पन्न होणें होय. कर्तृत्व म्हणजे मी कर्म केलें असें वाटणें व भोक्तृत्व म्हणजे कर्माने प्राप्त होणाऱ्या विषयसुखाने मी सुखी झालों असें वाटणें. एका अद्वैत परमेश्वरावांचून दुसरी वस्तुच नाही असें ज्ञान ज्यांना नाही, त्या जीवांनाच कर्म आहे, भोक्तृत्व आहे इत्यादि द्वैत सत्य वाटतें व तेच आपल्याला कर्माचे कर्ते व भोक्ते समजून कर्माने बद्ध होतात, पण परमेश्वराला आपल्या अद्वैत सच्चिदानंदघन स्वरूपाचें पूर्णज्ञान अखंड असल्यामुळे, त्याच्यावांचून दुसरी वस्तूच भासत नाही व जीवाने खोटेंच मानून घेतलेल्या कर्म, कर्तृत्व, भोक्तृत्व, इत्यादिकांचा तो साक्षी होऊन राहतो.

या परमेश्वराचे ज्या जीवाला ज्ञान होऊन मीच तो परमेश्वर आहे असा अनुभव येतो, त्याच्याहि सर्व कर्मकर्तृत्व-भोक्तृत्वाचा अद्वैतबोधामुळे शेवट होतो. अशा परमेश्वराचे ठिकाणीं उत्पत्ति स्थिति-लय-रूप कर्म व कर्तृत्व कोठून असणार व त्याला ते काय बंधनकारक होऊं शकेल?

धूम्ररजांची पिंजरी। वाजतिया वायूतें जरी होकारी। कां सूर्यबिंबामाझारीं। आंधारें शिरे॥ १२५॥
हें असो पर्वताचिये हृदयींचें। जेविं पर्जन्यधारास्तव न खोंचे। तेविं कर्मजात प्रकृतीचें। न लगे मज॥ १२६॥
एऱ्हवीं इये प्रकृतीं विकारीं। एकु मीचि असे अवधारीं। परि उदासीनाचिया परी। करीं ना करवीं॥ १२७॥

अर्थ—धूराच्या कणांचा पिंजरा शब्द करीत वाहत असलेल्या वायुला थांबवील? की सूर्यबिंबामध्ये आंधार शिरूं शकेल!॥ १२५॥ हे असूं दे. पावसाच्या धारा पर्वताच्या आंतील भागांपर्यंत शिरत नाहीत, त्याप्रमाणे प्रकृतीचा झालेला कर्मसमूह मला लागत नाही.॥ १२६॥ खरोखर पाहता या प्रकृतीपासून निर्माण झालेल्या कार्यरूप भूतसृष्टींत एका माझ्यावांचून दुसरी वस्तूच नाही; पण मी तेथे उदासीनाप्रमाणे असून, कांही करीत नाही व करवितहि नाही.॥ १२७॥

गूढार्थदीपिका—वेदान्तांत प्रमाता आणि साक्षी असा चैतन्याचा दोन प्रकारचा भेद केला आहे.

प्रत्यक्षादिक प्रमाणाने वस्तु जाणून ती खरी समजणारा प्रमाता म्हटला जातो. या प्रमात्यालाच जीव म्हणतात. आणि जीवाच्या कर्तृत्व, भोक्तृत्व, ज्ञातृत्व, इत्यादि सर्व राहाटीला खोटे समजून—म्हणजे यांपैकीं कांही एक अस्तित्वांत नाही, असे समजून—त्रयस्थाप्रमाणे केवळ पाहत राहणारा याला साक्षी म्हणतात.

जैसा दीपु ठेविला परिवरीं। कवणातें नियमी ना निवारी। आणि कवण कवणिये व्यापारीं। राहाटे तेंहि नेणें॥ १२८॥
तो जैसा कां साक्षिभूतु। गृहव्यापारप्रवृत्तिहेतु। तैसा भूतकर्मीं अनासक्तु। मी भूतीं असें॥ १२९॥

अर्थ—ज्याप्रमाणे घरांत दिवा ठेविला असतां तो कोणाला कर्म करण्याला लावत नाही किंवा कोणाला कर्मापासून परावृत्त करीत नाही व कोण कोणता व्यापार करीत आहे, हेहि तो जाणत नाही.॥ १२८॥ तो दिवा जसा साक्षीभूत राहून घरांतील सर्व व्यापार होण्याला निमित्त होतो, त्याप्रमाणे सर्व भूतांत मी असतो, पण त्यांच्या कर्माचे ठिकाणीं मी अनासक्त म्हणजे साक्षीभूत राहतों.॥ १२९॥

गूढार्थदीपिका—परमेश्वराच्या केवळ सत्तामात्रें करून सृष्टीची उत्पत्त्यादि व सृष्टींतील जीवांचीं सर्व कर्में होतात व परमात्मा केवळ साक्षी राहतो.

हा एकचि अभिप्रावो पुढतपुढती। काय सांगों बहुतां उपपत्तीं। येथ एकवेळां सुभद्रापती। येतुलें जाण पां॥ १३०॥

अर्थ—हा एकच अभिप्राय वारंवार निरनिराळे दृष्टान्त देऊन काय सांगूं? सुभद्रापति अर्जुना! येथे एकदां एवढें जाण॥ १३०॥

मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्। हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते॥ १०॥

अर्थ—मी प्रकृतीचा अध्यक्ष झालों असतां—म्हणजे ज्ञानरूपाने प्रकृतीचां साक्षी झालों असतां-प्रकृति सर्व चराचर उत्पन्न करिते व एवढ्याच माझ्या निमित्ताने, हे अर्जुना! जगताच्या उत्पत्तिनाशादि सर्व घडामोडी होतात.॥ १०॥

जे लोकचेष्टां समस्तां। जैसा निमित्तमात्र कां सविता। तैसा जगत्प्रभवीं पंडुसुता। हेतु मी जाणें॥ १३१॥
कां जे मियां अधिष्ठिलिया प्रकृती। होती चराचराचिया संभूती। म्हणोनि मी हेतु हे उपपत्ती। घडे यया॥ १३२॥

अर्थ—ज्याप्रमाणे भूतांच्या व्यापाराला सूर्य निमित्तमात्र आहे, त्याप्रमाणे, अर्जुना! जगाच्या उत्पत्त्यादिकांचे ठिकाणीं मीहि निमित्त आहे, असें जाण॥ १३१ ॥ कारण मी प्रकृतीला आश्रय झाल्यामुळेंच चराचर सृष्टीची उत्पत्ति होते; म्हणून मी जगाचे उत्पत्त्यादिकाला निमित्तकारण आहे अशी उपपत्ति दिली जाते. ॥ १३२ ॥

गूढार्थदीपिका—कोणतेंहि कार्य उत्पन्न होण्याला उपादान व निमित्त अशीं दोन कारणें लागत असतात, हें मागें सांगितलेंच आहे. जडविनाशी अशा जगद्रूपकार्यांत परमेश्वराची एक अखंड सत्ताच भरलेली असल्यामुळे, सत्तारूपाने भगवान्, जगताचें विवर्तउपादान कारण आहे. किंवा भगवंताच्या सत्तेच्या ठिकाणींच जगद्रूप वस्तु कल्पिली गेली आहे हें मागें सांगून, आता येथे भगवान आपल्या ज्ञानरूप साक्षीस्वरूपाने जगताचें निमित्त कारणहि आहे, हें माऊली सांगत आहे.

ज्याप्रमाणे दोन पुरुषांचें भांडण मिटविण्याचें सामर्थ्य असणारा पुरुष तें न मिटवितां, तटस्थ होऊन नुसतें भांडण पाहत राहिल्यास, तो जसा त्या भांडण्याला अनुमोदन देणारा व भांडण कायम ठेवण्याला निमित्त समजला जातो, त्याप्रमाणें जीव व जीवाची सृष्टिविषयक कल्पना हे दोन्ही साक्षीरूप असलेल्या परमेश्वराच्या ज्ञानाचे विषय झाले की तो (परमात्मा) अनुमोदन देणारा समजला जाऊन, त्याद्वारा सृष्टीच्या उत्पत्तीचें निमित्त होतो. हेंच भगवंताचें अध्यक्ष होणें होय.

आतां येणें उजिवडें निरुतें। न्याहाळीं पां ऐश्वर्ययोगातें। जे माझ्या ठायीं भूतें। परी भूतीं मी नसें॥ १३३ ॥

अर्थ—आतां माझ्या या सर्व नामरूपाने नटलेल्या व्यापक स्वरूपाकडे या शुद्ध ज्ञानदृष्टीने पहा म्हणजे माझ्या ठिकाणीं भूतसृष्टि जीवाला भासते, पण मी त्या कल्पनामात्र भूतसृष्टीत मुळींच नाही हें तुला कळून येईल. ॥ १३३ ॥

गूढार्थदीपिका—आतां येणें उजियेडें निरूतें—या नामरूपात्मक सृष्टीमध्यें केवळ एक सच्चिदानंद परमेश्वराची सत्ताच भरली आहे, म्हणून नामरूपात्मक भूतसृष्टीचें स्वतंत्र अस्तित्व नाही आणि भूतसृष्टीचें वस्तुत्वहि कल्पनाजन्यच आहे असें भगवंतांनी प्रतिपादन केलें आहे, म्हणून जडविनाशी भूतसृष्टि मुळींच नाही, असें जाणणें हाच ''उजियेडें निरुतें'' म्हणजे सत्यज्ञानप्रकाश होय.

न्याहाळी पां ऐश्वर्य योगातें—या सत्यज्ञानप्रकाशाने पाहिले असतां एक सच्चिदानंद परमात्माच नामरूपाने नटला आहे, असा अनुभव येतो.

अथवा भूतें ना माझ्या ठायीं। आणि भूतांमाजि मी नाहीं। या खुणा तूं कहीं। चुकों नको॥ १३४॥
हें सर्वस्व आमुचें गूढ। परि दाविलें तुज उघड। आतां इंद्रियां देऊनि कवाड। हृदयीं भोगीं॥ १३५ ॥

अर्थ—किंवा भूतसृष्टीं माझ्या ठिकाणीं मुळींच नाही व त्या भूतसृष्टींत मी नाही ही माझी खूण, कधी अर्जुना! विसरू नकोस. ॥ १३४ ॥ हें माझ्या स्वरूपाचें सर्वस्वीं गूढ वर्म आहे, पण तुला उघड करून दाखविले आहे. आतां इंद्रियांचीं द्वारें बंद करून—म्हणजे इंद्रियांचे द्वारा विषयाकार न घेतां-आपल्या अंत:करणांत त्याचा अनुभव घें. ॥ १३५ ॥

गूढार्थदीपिका—हें सर्वस्व आमुचें गूढ—नामरूपासह एक परमात्माच आहे, त्याच्यांवांचून दुसरें कांही नाही, हाच परमेश्वराचा व सर्व पूर्ण संतांचा अनुभव असतो; पण जोपर्यंत जीवाला नामरूपात्मक हें जगत आहे व तें सत्य आहे असें वाटतें तोपर्यंत त्याला नामरूपासह पूर्ण ब्रह्म आहें असा अन्वयाचा अनुभव येत नाही व श्रीगुरु तो देतहि नाहीत; म्हणूनच या अनुभवाला गूढ म्हटलें आहे.

परि दाविलें तुज उघड—पण भगवद्भक्तालाच हा अन्वयाचा अनुभव सुखाने येत असल्यामुळें व अर्जुन भक्त असल्यामुळें, भगवान ''दाविलें तुज उघड'' तुझ्यापाशीं हा अनुभव उघड केला आहे, असें म्हणत आहेत.

इंद्रियां देऊनि कवाड। हृदयीं भोगीं—सर्वनामरूपासह पूर्ण ब्रह्म आहे असा अन्वयाचा अनुभव येण्याकरितां ''इद्रियांचीं द्वारें बंद कर'' म्हणजे अंत:करणांत सगुण परमेश्वराला धरून ठेव, असा येथे सगुणाचा व्यतिरेकाने अनुभव घेण्यास सांगितले आहे.

सच्चिदानंद भगवंताला विसरून, बाह्य सृष्टि सत्य आहे, अशी दृढ समजूत झाल्यामुळे, अंत:करणाला इंद्रियद्वारा सृष्टींतील विषयाच्या आकाराचे होण्याची जी सवय पडली, ती कायम आहे, तोपर्यंत नामरूपासह पूर्ण सच्चिदानंद परब्रह्म आहे असा अनुभव येणे शक्य नाही.

नामरूपात्मक सगुण परमात्म्याचे इंद्रियांना ध्यान लागून, हृदयांत ते ध्यान ठसलें गेलें की, सर्व विषयच परमात्मस्वरूप आहेत असा अन्वयाचा अनुभव येतो. ''विषयचि ज्याचा झाला नारयण'' ''विषयी विसर पडला नि:शेष। आंगीं ब्रह्मरस ठसावला'' असा तुकाराम महाराजांनी आपला अनुभव सांगितला असून ''अनंतवेशे अनंतरूपें देखिलें म्यां त्यासी'', ''लाजलें गा माय आतां कवणा ओवाळू। जिकडे पाहे तिकडे अवघा गोविंदा गोपाळु'' इत्यादि वचनांनी माऊलींनी व नामदेव महाराजांनी असाच आपला अनुभव सांगितला आहे.

नाथ म्हणतात ''ब्रह्म इंद्रियां गोचर नसे। गुण गेलिया डोळां दिसे। हे अनुभवियासीचि भासे। बोलावें ऐसें तें नव्हें'' (ए. भा. अ. ९-१५१)

व्यतिरेककालीं जें परब्रह्म इंद्रियांना गोचर होत नाही, तें परब्रह्म अन्वयाने सत्वादि त्रिगुणाची नि:शेष निवृत्ति झाली असतां, डोळ्यानेहि दिसूं लागते—म्हणजे नामरूपासह ब्रह्म पूर्ण निरुपाधिक आहे असा अनुभव येतो.

नाथांनी व्यतिरेक आणि अन्वय यांचा उलगडा आपल्या ग्रंथांतून केला आहे. ''कारणापासोनि कार्य अभिन्न। या नांव अन्वय जाण। कार्य मिथ्या सत्य कारण तें व्यतिरेक लक्षण विधातिया ऐक'' (ए. भा. ६००) कार्य पूर्ण कारणरूपच असतें, असे पाहणे याला अन्वय म्हणतात आणि कारण खरें असून कार्य खोटें आहे असें पाहणें याला व्यतिरेक म्हणतात.

हा दंशु जंव न ये हातां। तंव माझें साचोकारपण पार्था। न संपडे गा सर्वथा। जेविं तुषीं कणु॥ १३६॥

अर्थ—हें खरें वर्म जोपर्यंत अर्जुना! हातीं येत नाही, तोपर्यंत ज्याप्रमाणे भुश्यांत धान्याचा कण सांपडत नाही, त्याप्रमाणे माझे यथार्थ स्वरूप समजत नाही.॥ १३६॥

गूढार्थदीपिका—हा दंश जंव न ये हातां—नामरूपाचें कारण जें सच्चिदानंद ब्रह्म, त्या परब्रह्माशीं कार्यरूप नामरूपें यांचें पूर्ण ऐक्य आहे—म्हणजे नामरूपें हीं पूर्ण ब्रह्मस्वरूप आहेत—हा अन्वयबोध येथील दंश म्हणजे वर्म होय.

तंव माझें साचोकारपण पार्था। न सांपडे गा—अन्वय दृढ झाल्याखेरीज नुसत्या व्यतिरेक विचाराने—म्हणजे ब्रह्म सत्य आहे व नामरूपें मिथ्या आहेत या विचाराने—कृतार्थता किंवा परमानंदाचा लाभ होत नाही.

एऱ्हवीं अनुमानाचेनि पैसें। आवडे कीर कळलें ऐसें। परि मृगजळाचेनि वोलांशें। काय भूमि तिमे॥ १३७॥
जें जाळ जळीं पांगिलें। तेथ चंद्रबिंब दिसे आतुडलें। परि थडिये काढूनि झाडिलें। तेव्हां बिंब कें सांगें॥ १३८॥
तैसें बोलवरी वाचाबळें। वायांचि झकविजती प्रतीतीचे डोळे। मग साचोकारें बोधावेळे। आथि ना होईजे॥ १३९॥

अर्थ—येऱ्हवीं व्यतिरेक विचारांत, कराव्या लागणाऱ्या अनुमानाचे योगाने, ब्रह्मस्वरूप कळलें असें वाटतें खरें, पण मृगजळाच्या ओलाव्याने जमीन ओली होते काय?॥ १३७॥ पाण्यांत जाळें पसरले असतां, त्यात चंद्रबिंब सापडले असें दिसतें पण जाळें बाहेर काढून झाडल्यानंतर त्या जाळ्यांत चंद्रबिंब राहतें काय? सांग बरे॥ १३८॥ त्याप्रमाणे वाचेच्या बळावर शब्दांनी माझ्या स्वरूपाचा कितीहि विचार केला, तरी ते शब्द आपल्या अनुभवदृष्टीला फसवितात. मग नुसत्या शब्दाने खरोखर अनुभव आला काय, हें पाहूं गेल्यास, तो आला नाही व येणे शक्य नाही, असें कळून येतें.॥ १३९॥

गूढार्थदीपिका—सत्वं न चेद्धातरिदं निजं भवेत् विज्ञानमज्ञानभिदापमार्जनम्। गुणप्रकाशैरनुमीयते भवान् प्रकाशते यस्य च येन वा गुण: (भाग. स्कं. १०-२-३५) नामरूपासह पूर्ण सच्चिदानंद ब्रह्म आहे अशा अन्वयविचाराने सगुण साकार परमेश्वराचा आश्रय केला नाही, तर परब्रह्म सत्य आहे व नामरूपें मिथ्या आहेत, या नुसत्या व्यतिरेकविचाराने अज्ञान नाहीसें करणारें विज्ञान म्हणजे अपरोक्ष ज्ञान हातीं लागत नाही. तें ज्ञान, ज्याच्या

योगानें गुण प्रकाशित होतें तें परब्रह्म होय असें आनुमानिकच राहतें असें श्रीमद्‌भागवतांत म्हटलें असून तोच आशय श्रीज्ञानेश्वर माऊलींनी "येऱ्हवीं अनुमानाचेनि पैसें" इत्यादि चरणांनी सांगितला आहे.

अवतरणिका—वर सांगितल्याप्रमाणे नामरूपासह पूर्ण ब्रह्म असलेल्या सगुण साकार परमेश्वराचें ध्यान लागलें, तरच सर्व नामरूपासह पूर्ण ब्रह्म आहे, असा अन्वयाचा व्यापक अनुभव येतो. अशा रीतीने परमेश्वराला जाणणें हेंच त्याचें खरें जाणणें होय. म्हणून नामरूपासह सगुण साकार झालेल्या परमेश्वराचा अनादर करणाऱ्यांची भगवंतांनी मूर्ख म्हणून निंदा केली आहे.

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् । परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम्॥ ११ ॥

अर्थ—मी मनुष्यदेहासारखा देह धारण केला, तरी मी सर्व ब्रह्मांडाचा स्वामी आहे, हा माझा शुद्ध ब्रह्मभाव, मूर्ख लोक जाणत नसल्यामुळें, तें माझ्या सगुण साकार स्वरूपाला तुच्छ लेखतात. ॥ ११ ॥

गूढार्थदीपिका—जी वस्तु इंद्रियगोचर असून तुच्छ वाटते तिचाच अनादर होत असतो. परमेश्वराचें निर्गुणस्वरूप इंद्रियातीत असून, सर्व जीवांचें तें परमप्रिय आत्मस्वरूप असल्यामुळें, त्या स्वरूपाचा कोणी अनादर करतात असें भगवंताचें म्हणणें संभवत नाही.

परमेश्वराचें सगुणस्वरूप सर्वांना अवतारकाळीं इंद्रियगोचर होत असल्यामुळें, त्या स्वरूपाविषयीं अनादर संभवतो, म्हणून येथें भगवंतांनी आपल्या सगुणस्वरूपाचा अनादर करणाऱ्यांनाच मूर्ख म्हटलें आहे, असें म्हणावें लागतें.

ह्या मुद्याचा अंगीकार करूनहि या श्लोकाचा अर्थ कित्येक असा करतात की (मानुषीं तनुम्) मनुष्याच्या देहाप्रमाणे पांच भौतिक देह मी घेतला, तरी मी आपल्या अविनाशी व सर्व ब्रह्मांडाचा स्वामी अशा ब्रह्मभावाला विसरत नसतो. हें न जाणतां माझ्या सगुणस्वरूपाचा अनादर, करणारे मूर्ख होत, असें भगवान म्हणतात.

दुसरें कित्येक असा अर्थ करतात की, मी आपल्या नामरूपात्मक सगुण साकार देहासह पूर्ण सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपच असल्यामुळें, मी अविनाशी आहे व सर्व ब्रह्मांडाचा स्वामी आहे, पण हें न जाणतां माझ्या सगुण स्वरूपाचा अनादर करणारे मूर्ख होत, असें भगवान म्हणतात.

यापैकीं कोणता अर्थ वेदान्ताला अनुसरून आहे, हें आता पाहूं—

(१) जीव या ज्ञानऐश्वर्यसंपन्न अशा परमेश्वराचाच अंश असतांना त्याची ऐश्वर्यसंपन्न परमेश्वरस्थिति कां नाहीशी झाली, याचा विचार वेदान्तसूत्रांत केला गेला असून "देहयोगाद्वा सोऽपि" (ब्र. सू. ३-२-६) या सूत्राने भगवान व्यासांनी व त्यावरील भाष्यांत आचार्यांनी पांचभौतिक देहामुळे जीवाचा ईश्वरभाव नाहीसा झाला असें म्हटलें आहे. याचा अर्थ असा की पांचभौतिक देह हा ब्रह्मभावाची विस्मृति करणारा आहे, असा वेदान्ताचा सिद्धान्त आहे.

इतर वेदान्तग्रंथांतूनहि, आत्मविस्मृति, आत्मविस्मृतीमुळेंच कर्म व कर्माने पांचभौतिक देहाची प्राप्ति होते असाच पांचभौतिक देहाच्या प्राप्तीचा क्रम सांगितला आहे. या क्रमावांचून दुसऱ्या कोणत्याहि प्रकाराने पांचभौतिक देहाची प्राप्ति होते, असें वेदान्तात कोठेहि मानिलें नाही. म्हणून परमेश्वराला पांचभौतिक देहाची प्राप्ति होऊन, त्याचा परंभाव म्हणजे ब्रह्मभाव कायम राहतो किंवा आपला परंभाव कायम ठेऊन-म्हणजे आत्मविस्मृति न होऊं देतां-परमेश्वर पांचभौतिक देह धारण करूं शकतो, असें वेदान्ताला अनुसरून म्हणतां येणें शक्य नाही. आणि परंभाव कायम ठेवून, परमेश्वर पांचभौतिक देह धारण करूं शकत असेल, तर तसें पांचभौतिक जडविनाशी सगुणस्वरूप भगवंतांनी व सर्व संतांनी तुच्छच मानलें असल्यामुळें, त्याचा अनादर करणाऱ्यांना भगवान मूर्ख म्हणतील असें संभवत नाही.

(२) आत्मज्ञानाने आत्मविस्मृति व कर्म नाश पावून मुक्त झाल्यावर मुक्तांना जर पांचभौतिक देह, पुनः घेतां येत नाही, तर जे अवतार—

ब्रह्माविष्णुमहेशानामाविर्भावाऽपि द्विजाः। परमात्मविभागस्था न जीव व्यूहसंस्थिताः॥ १४॥

परमेश्वर कोटींतच असतात—म्हणजे नित्यमुक्त असतात—त्यांना पांचभौतिक देह घेतां येतो, असेहि वेदान्ताच्या आधारें म्हणतां येणें शक्य नाही.

म्हणून माझा देह पांचभौतिक असला, तरी माझा परंभाव कायमच असतो हें न जाणतां, माझा अनादर करणारे लोक मूर्ख होत, असें भगवंताचें म्हणणें आहे, असा वरील श्लोकाचा अर्थ करतां येत नाही. परिशेषात्, अखंड सच्चिदानंदरूप असलेल्या परमेश्वराचा सगुण विग्रहहि पूर्ण ब्रह्मस्वरूपच असतो; म्हणून त्याचा अनादर करणाऱ्यांना भगवंतांनी मूर्ख म्हटलें आहे असा या श्लोकाचा अर्थ करणेंच वेदान्तसिद्धान्ताला धरून होतें.

परमेश्वराचा अवतार सदेहसच्चिदानंदरूपच असतो असें श्रुत्यादिकांतून प्रतिपादिलेल्यां वेदान्तशास्त्राचें मत आहे.

''पूर्णमद: पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते'' (बृ. उ. ५-१-१) या श्रुतींत व त्यावरील भाष्यांत आचार्यांनी ब्रह्म पूर्ण, अस्फुट, सच्चिदानंदस्वरूप असून, त्यापासून झालेलें कार्यरूप जगतहि, पूर्ण सच्चिदानंदस्वरूपच आहे, असें म्हटलें आहे.

पांचभौतिक दिसणारें जगत्, जर खरोखर सच्चिदानंद स्वरूपच आहे, तर अवतारदेह पांचभौतिक असतो असें कशाच्या आधारें म्हणतां येईल? मूळांत सच्चिदानंदस्वरूप असलेली सृष्टि, अज्ञान्याला जशी पांचभौतिक दिसते, तसा सदेह सच्चिदानंद परमेश्वराचा देहहि अज्ञान्याला पांचभौतिक वाटतो, असा या श्रुतीचा व त्यावरील भाष्यांतून आशय निघतो.

भगवान मायेनेच देहधारण करतो, असेंहि कोठे कोठे वेदान्तशास्त्रांतून सांगितलें आहे, पण आत्मज्ञानाने माया नाश पावते व भगवान नित्य आत्मज्ञानी आहे. अशा भगवंताचे ठिकणीं माया म्हणजे अविद्या राहणें शक्यच नाही. म्हणून येथील 'माया' शब्दाचा अविद्या असा अर्थ नसून, विद्या असा करावा लागतो आणि विद्या ही सच्चिदानंदस्वरूप असल्यामुळें, भगवंताचा देह ब्रह्मस्वरूपच ठरतो, हें मागे (अ. ४-श्लो. ६) विशद केलेंच आहे.

किंवा 'माया' शब्दाचा अविद्या असाच अर्थ केला, तर वेदान्तसिद्धान्ताला बाध न येऊं देतां, ''भगवान मायेने देह धारण करतो'' या वचनाचा असा अर्थ करावा लागतो की, ज्याप्रमाणे पाण्यावर तरंग उत्पन्न होण्याला, वायु हा निमित्त असला तरी तो तरंगांत राहत नाही. किंवा तरंग त्याचा बनलेला नसतो तो पाण्याचाच असतो. त्याप्रमाणे जीवाचे ठिकाणीं असणारी त्रिगुणात्मक माया, शुद्ध सच्चिदानंद निरुपाधिक परब्रह्माच्या सगुण साकार देहाला निमित्त असली, तरी त्यांत ती मुळींच नसते. किंवा भगवंताचा तो साकार देह मायेचा बनलेला नसतो, शुद्ध परब्रह्माचाच बनलेला असतो.

सारांश परमेश्वराचा अवतारदेह पूर्ण ब्रह्मस्वरूप असतो, असेंच वेदान्तविचाराने सिद्ध होतें.

संतांनीहि असाच आपला अनुभव सांगितला आहे—

''भगवद्देह चैतन्यघन। तेथ वसेना देहाभिमान''॥ ४५॥ (ए. भा.)

''केवळ चैतन्यविग्रहो। सत्यसंकल्प भगवद्देहो''॥ ५४॥

''निर्गुणाहूनि सगुण न्यून। म्हणे तो केवळ मूर्ख जाण।
सगुण निर्गुण दोन्ही समान। न्यून पूर्ण असेना''॥ १४५७॥ (ए. भा. अ. ११)

''घृतकाठिन्यवन्मूर्ति सच्चिदानंदलक्षणा।'' (सूतसंहिता य. वै. खं. अ. ५)

अर्थ—ज्याप्रमाणे पातळ तूप थिजलें म्हणजे साकार होते, त्याप्रमाणे सच्चिदानंद निराकार स्वरूपाची सच्चिदानंद साकारमूर्ति बनते.

''**अथ च रामकृष्णाद्यवतारेष्वद्वैतपरमानन्द लक्षणपरब्रह्मण: परमतत्त्वपरमविभवानुसंधानं स्वीयत्वेन श्रूयते सर्वत्र.........तस्मात् परब्रह्मण: परमार्थत: साकारनिराकारौ स्वभावसिद्धौ**'' (त्रिमहानारायण उपनिषद् अ. २)

अर्थ—रामकृष्णादि अवताराचे ठिकाणी अद्वैत परमानंदलक्षणात्मक परब्रह्माचें परमतत्त्व व परमैश्वर्याचें अनुसंधान असतें असें सर्वत्र सांगितलें आहे. म्हणून परब्रह्माचीं साकारनिराकार दोन्ही रूपें स्वभावसिद्ध आहेत.

निर्गुण, निरवयव, निराकार परमात्मा सगुणसाकार कसा होतो अशी सामान्य माणसाला शंका येते. त्याला नाथांनी "तू स्वलीला देह कैसा धरिसी। अवतार चरित्रें कैसें करिसी। कैसेनि देह सांडसी। हे ब्रह्मादिकां कळेना"॥ २६८॥ (ए. भा. अ. ३०) असें उत्तर दिलें आहे.

किंबहुना भवा बिहा या। आणि साचें चाड आथि जरी मियां। तरि तुम्हीं गा उपपत्ती इया। जतन कीजे॥ १४०॥
एऱ्हवीं दिठी वेधली कवळें। तैं चांदणियातें म्हणे पिवळें। तेविं माझां स्वरूपीं निर्मळें। देखाल दोष॥ १४१॥

अर्थ—किंबहुना अर्जुना! तुला या संसाराचें भय वाटत असेल व माझी प्राप्ति व्हावी अशी जर खरी इच्छा असेल तर आतां सांगितलेली सयुक्तिक विचारसरणी नीट लक्षांत ठेव. ॥ १४०॥ नांही तर, डोळ्याला कावीळ रोग झाला असतां, तो रोगी चंद्राच्या पांढऱ्या स्वच्छ प्रकाशालाहि पिवळें म्हणतो, त्याप्रमाणे माझ्या निर्मळ–म्हणजे निरुपाधिक सगुण–स्वरूपाचे ठिकाणीं देखील दोष अज्ञ लोक पाहतात. ॥ १४१॥

गूढार्थदीपिका—कोणी असें म्हणतात की "मायाविशिष्ट चैतन्य अथवा ईश्वर हा सर्वांना उपास्य आहे. विष्णुशिवादि हे कार्यब्रह्म होत. या कार्यब्रह्माच्या उपासनेने निर्गुण ब्रह्माची प्राप्ति व्हावी, म्हणूनच सगुणोपासना किंवा कार्यब्रह्माची उपासना सांगितली आहे. या सगुणोपासनेने किंवा कार्यब्रह्माच्या उपासनेने मायाविशिष्ट निर्गुण अशा कारणब्रह्माची जी प्राप्ति होते, तो संवादिभ्रम होय."

पण हें म्हणणें वेदान्ताला धरून नाही.

(१) नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, सर्वज्ञ, सर्वशक्ति, असें आचार्यांनी ब्रह्मसूत्रांत कारणब्रह्माचें लक्षण केलें आहे. म्हणजे कारणब्रह्म शुद्ध सच्चिदानंदस्वरूप असून त्याचें सर्वज्ञत्वादि षड्गुणैश्वर्य अमर्याद असतें व त्याच्या उपासनेने साक्षान्मुक्ति मिळते असे गीतेंतच सांगितलें आहे. पण कार्यब्रह्माचें ऐश्वर्य मर्यादित असतें व त्याच्या उपासनेने क्रममुक्ति मिळते हें छांदोग्यउपनिषदांत ज्या अक्षिपुरुषादि कार्यब्रह्माच्या उपासना सांगितल्या आहेत त्यावरून स्पष्ट होतें. रामकृष्णादि अवतार पूर्ण सच्चिदानंदस्वरूप असून ते ज्ञानऐश्वर्यादि षड्गुणसंपत्तीने सदा पूर्ण असतात व सर्व ब्रह्मांडाचे स्वामी असतात, असें भगवान आचार्यांनीहि गीताभाष्याच्या आरंभीं सांगून, त्यांचें कारणब्रह्मत्व मान्य केलें आहे. म्हणून रामकृष्णादि अवतारांची उपासना कारणब्रह्माचीच उपासना होय, कार्यब्रह्माची नव्हे, हें सिद्ध आहे.

(२) भ्रम संवादि असो की विसंवादि असो. दोन्ही प्रकारच्या भ्रमांत मूळवस्तूचें परोक्ष किंवा अपरोक्ष ज्ञान नसतें, असें विद्यारण्यांनी संवादिभ्रमाचें लक्षण करतांना "अयथावस्तुविज्ञानात्फल लभ्यत ईप्सितम्। काकतालीयत: सोऽयं संवादिभ्रम उच्यते"॥ १२॥ (पं. द. ध्यानदीप) सांगितलें आहे. विसंवादिभ्रमांत मूळवस्तूहून विपरीत वस्तूची कल्पना केली जाते आणि संवादिभ्रमांत मूळवस्तूचें ज्ञान नसतांना काकतालीयन्यायाने मूळ वस्तूची कल्पना केली जाते, असा या दोन भ्रमांत फरक आहे.

पण "शास्त्रोक्तेनैव मार्गेण सच्चिदानंद निश्चयात्। परोक्षमपि तज्ज्ञानं तत्त्वज्ञानं न तु भ्रम:॥ १९॥ (पं. द. ध्या. दी.) रामकृष्णादि अवतार सच्चिदानंदस्वरूप आहेत असें शास्त्रावरून जाणून त्यांची उपासना केली जाते; म्हणून तो भ्रम नसून, तें परोक्षज्ञान आहे, असें पुन: विद्यारण्यच म्हणतात. अर्थात् रामकृष्णादि सगुणस्वरूपाच्या उपासनेने निर्गुणब्रह्माची प्राप्ति होणे, हा संवादिभ्रम होय असें म्हणणें अज्ञानमूलक आहे. कारण त्यांच्या (रामकृष्णादिकांच्या) प्राप्तीहून निर्गुणब्रह्माची प्राप्ति निराळी राहत नाही.

नातरी ज्वरें विटाळलें मुख। तें दुधातें म्हणे कडू विख। तेविं अमानुषा मानुष। मानाल मातें॥ १४२॥
म्हणऊनि पुढत पुढतीं धनंजया। झणें विसंबसी या अभिप्राया। जे इयां स्थूलदृष्टीं वायां। जाइजेल गा॥ १४३॥
पैं स्थूलदृष्टी देखती मातें। तेंचि न देखणें जाण निरुतें। जैसें स्वप्नींचेनि अमृतें। अमर नोहीजे॥ १४४॥
एऱ्हवीं स्थूलदृष्टी मूढ। मातें जाणती कीर दृढ। परि तें जाणणेंचि जाणणेया आड। रिगोनि ठाके॥ १४५॥
जैसा नक्षत्राचिया आभासा–। साठीं घातु झाला तया हंसा। माजी रत्नबुद्धीचिया आशा। रिगोनियां॥ १४६॥
सांगें गंगा या बुद्धी मृगजळ। ठाकोनि आलियाचें कवण फळ। काय सुरतरु म्हणोनि बाबुळ। सेविली करी॥ १४७॥

हा निळयाचाचि दूसरा। या बुद्धी हातु घातला विखारा। कां रत्ने म्हणोनि गारा। वेंची जेविं॥ १४८॥
अथवा निधान हें प्रगटलें। म्हणोनि खदिरांगार खोळे भरिले। कां साउली नेणतां घातलें। कुहां सिंहें॥ १४९॥
तेविं मी म्हणोनि प्रपंची। जिहीं बुडी दिधली कृतनिश्चयाची। तिहीं चंद्रासाठीं जेविं जळींची। प्रतिमा धरिली॥ १५०॥
तैसा कृतनिश्चय वायां गेला। जैसा कोण्ही एकु कांजी प्याला। मग परिणाम पाहों लागला। अमृताचा॥ १५१॥
तैसें स्थूळाकारीं नाशिवंतें। भरंवसा बांधोनि चित्तें। पाहती मज अविनाशातें। तरि कैंचा दिसें॥ १५२॥
काइ पश्चिमसमुद्राचिया तटा। निघिजेत आहे पूर्विलिया वाटा। कां कोंडा कांडतां सुभटा। कणु आतुडे॥ १५३॥
तैसें विकारलें हें स्थूळ। जाणितलेया मी जाणवतसें केवळ। काइ फेण पितां जळ। सेविलें होय॥ १५४॥
म्हणोनि मोहिलेनि मनोधर्मे। हेंचि मी मानूनि संभ्रमें। मग येथिंची जियें जन्मकर्मे। तियें मजचि म्हणती॥ १५५॥
येतुलेनि अनामा नाम। मज अक्रियासि कर्म। विदेहासि देहधर्म। आरोपिती॥ १५६॥
मज आकारशून्या आकारु। निरुपाधिका उपचारु। मग विधिविवर्जिता व्यवहारु। आचारादिक॥ १५७॥
मज वर्णहीना वर्णु। गुणातीतासि गुणु। मज अचरणा चरणु। अपाणिया पाणी॥ १५८॥
मज अमेया मान। सर्वगतासी स्थान। जैसें सेजेमाजी वन। निदेला देखे॥ १५९॥
तैसें अश्रवणा श्रोत्र। मज अचक्षूसी नेत्र। अगोत्रा गोत्र। अरूपा रूप॥ १६०॥
मज अव्यक्तासि व्यक्ती। अनार्तासि आर्ती। स्वयंतृप्ता तृप्ती। भाविती गा॥ १६१॥
मज अनावरणा प्रावरण। भूषणातीतासि भूषण। मज सकळ कारणा कारण। देखती ते॥ १६२॥
मज सहजातें करिती। स्वयंभातें प्रतिष्ठिती। निरंतरातें आव्हानिती। विसर्जिती गा॥ १६३॥
मी सर्वदा स्वतःसिद्धु। तो कीं बाळ तरुण वृद्धु। मज एकरूपा संबंधु। जाणती ऐसे॥ १६४॥
मज अद्वैतासि दुजें। मज अकर्तयासि काजें। मी अभोक्ता कीं भुंजें। ऐसें म्हणती॥ १६५॥
मज अकुळाचें कुळ वानिती। मज नित्याचेनि निधनें शिणती। मज सर्वांतरातें कल्पिती। अरि मित्र गा॥ १६६॥
मी स्वानंदाभिरामु। तया मज अनेकां सुखाचा कामु। आघवाचि मी असें समु। कीं म्हणती एकदेशी॥ १६७॥
मी आत्मा एक चराचरीं। म्हणती एकाचा कैंपक्ष करीं। आणि कोपोनि एकातें मारीं। हेंचि वाढविती॥ १६८॥
किंबहुना ऐसे समस्त। जे हे मनुष्यधर्म प्राकृत। तयाचि नांव मी ऐसें विपरीत। ज्ञान तयांचे॥ १६९॥
जंव आकारु एक पुढां देखती। तंव हा देव येणें भावें भजती। मग तोचि विघडलिया टाकिती। नाहीं म्हणोनि॥ १७०॥
मातें येणें येणें प्रकारें। जाणती मनुष्य ऐसेनि आकारें। म्हणऊनि ज्ञानचि तें आंधारें। ज्ञानासि करी॥ १७१॥

अर्थ—किंवा ज्वराने तोंड दूषित झालें असतां त्या तोंडाला दूधहि विषासारखें कडू वाटतें, त्याप्रमाणें अमानुषा म्हणजे मनुष्यधर्म नाहीत अशा पूर्णब्रह्मस्वरूप असलेल्या मला मनुष्यदेहधारी जीव समजतात.॥ १४२॥ म्हणून अर्जुना! वारंवार तुला सांगणें आहे की माझ्या सगुणस्वरूपाला स्थूलदृष्टीने म्हणजे पांचभौतिक दृष्टीने पाहणें चुकीचें आहे. हा माझ्या म्हणण्याचा अभिप्राय तूं कदाचित् विसरशील॥ १४३॥ परंतु ज्याप्रमाणें स्वप्नातील अमृत पिऊन मनुष्य अमर होत नाही, त्याप्रमाणें स्थूलदृष्टीने मला जे पाहतात, त्यांचें तें मला पाहणेच नव्हे, हें सत्य जाण.॥ १४४॥ साधारणतः मूर्खलोक मला, स्थूलदृष्टीने म्हणजे माझा विग्रह पांचभौतिक आहे असें पक्कें समजतात, पण तें त्यांचें विपरीत जाणणेंच, खऱ्या जाणण्याच्या—म्हणजे माझा विग्रह पूर्ण सच्चिदानंदस्वरूप आहे असें जाणण्याच्या आड येतें.॥ १४५॥ ज्याप्रमाणें पाण्यांत पडलेल्या नक्षत्राच्या आभासाला पाहून, हीं रत्ने आहेत अशा आशेने हंस पाण्यांत बुडून आपला नाश करून घेतो.॥ १४६॥ अर्जुना! मृगजळाला गंगाप्रवाह समजून कोणी एखादा, त्या मृगजळापाशीं स्नान करावयास आला, तर त्याचें त्याला काय फल मिळेल? सांग बरें. बाभळीच्या झाडाची कल्पतरु म्हणून सेवा केली, तर ती बाभूळ काय इच्छापूर्ति करील?॥ १४७॥ दोन सरांचा हा नीलमण्यांचा हार आहे असें समजून काळ्या विषारी सर्पाला हातीं धरलें किंवा रत्ने समजून गारा वेंचिल्या॥ १४८॥ किंवा सोन्याचा ढीग समजून खदिराचे लाल तप्त निखारे पिशवींत भरले, किंवा माझीच ही पडछाया आहे असें न जाणतां, दुसरा सिंह आहे, असें वाटून सिंहाने

विहिरींत उडी टाकली॥ १४९॥ त्याप्रमाणें हा भौतिक जडविनाशी प्रपंच म्हणजेच परमात्मा आहे किंवा सगुण श्रीकृष्णस्वरूप प्रपंचाप्रमाणेच भौतिक आहे, असा ठाम निश्चय करून ज्यांनी तेथेंच बुडी मारली म्हणजे बुद्धि स्थिर केली त्यांनी सत्य चंद्र मिळावा म्हणून पाण्यांत पडलेल्या चंद्राच्या प्रतिबिंबाला धरलें॥ १५०॥ ज्याप्रमाणे एखाद्या मनुष्याने कांजी पिऊन अमृताचा परिणाम पहावा—म्हणजे अमर होण्याची आशा बाळगावी—त्याप्रमाणे त्या मनुष्याचा केलेला निश्चय व्यर्थ गेला समज. ॥ १५१॥ त्याचप्रमाणे मीं नाशिवंत, दृश्य असा, स्थूलाकाराने आहे असा चित्तांत भरंवसा ठेवून जे कोणी अविनाशी अशा मला पाहतील, तर त्यांना मी कसा दिसणार?॥ १५२॥ बा! उत्तम योद्ध्या! पश्चिम समुद्राच्या किनाऱ्याला येण्याकरिता पूर्वदिशेच्या वाटेने कोणी निघतो काय? किंवा नुसता कोंडा कांडल्याने धान्याचा कण सांपडेल काय?॥ १५३॥ फेंस पिल्याने पाणी पिण्यासारखे होतें काय? त्याप्रमाणे जडविनाशी वस्तुरूपाने परिणाम पावलेला हा स्थूल प्रपंच जाणल्याने माझे सगुणस्वरूप जाणले जाईल काय?॥ १५४॥ म्हणून अविचारी भ्रांत मनाने, त्रिगुणात्मक स्थूल प्रपंचासारखें, माझें सगुणस्वरूप आहे, असें समजून जगांतील पदार्थाच्या जन्मकर्माप्रमाणे माझें जन्मकर्म आहेत असे अज्ञानी समजतात. ॥ १५५॥ नामरहित अशा मला नाम ठेवलें जातें, अकर्ता असा जो मी, त्या माझ्या ठिकाणीं कर्म मानतात व पांचभौतिक देहाचे धर्म मानतात. ॥ १५६॥ तशाप्रमाणे आकाराहून मला निराळे समजून माझे ठिकाणीं आकाराचा संबंध झाला असें मानतात. उपाधिरहिताला मला उपचारांनी संतोष होतो, असें समजतात आणि मी विधिवर्जित आहे पण मलाहि आचारआदिक व्यवहार कर्तव्य आहे असें मानतात.॥ १५७॥ वर्णरहित अशा माझ्या सच्चिदानंद स्वरूपाचे ठिकाणीं पांचभौतिक देहाप्रमाणे वर्ण मानतात. त्रिगुणातीत अशा माझ्या ठिकाणीं त्रिगुण मानतात. व भौतिक करचरणरहित अशा माझे ठिकाणीं भौतिक करचरणाची कल्पना करतात. ॥ १५८॥ ज्याप्रमाणे झोंपलेला मनुष्य स्वप्नांत अरण्य पाहतो त्याप्रमाणे प्रमाणरहिताला मला प्रमाणगम्य मानतात, सर्व व्यापकाला मला विवक्षित स्थान मानतात. ॥ १५९॥ भौतिक श्रवणेंद्रिय व चक्षुरिंद्रिय नसलेल्या माझ्या ठिकाणीं भौतिक श्रवणेंद्रिय व चक्षुरिंद्रिय आहेत असे मानतात. तसेंच भौतिक देहाचे ठिकाणीं राहत असलेला गोत्रसंबंध माझ्या अभौतिक देहाचे ठिकाणीं मानतात. भौतिकरूप नसलेल्या क्रिया माझ्या ठिकाणीं भौतिकरूप मानतात.॥ १६०॥ अव्यक्त म्हणजे अतींद्रिय असा मी, भौतिक इंद्रियांनी गोचर होतो, असें समजतात. इच्छारहित अशा मला इच्छा आहे, असे समजतात. स्वयंतृप्ताला मला विषयवासनेने तृप्ति होते असें मानतात.॥ १६१॥ सर्वदा आवरणरहित किंवा उघडा असणाऱ्या मला वस्त्रांनी झांकण्याची गरज मानतात. भूषणावांचून अपरिमित सुंदर अशा माझे ठिकाणीं, भूषणाची आवश्यकता मानतात—म्हणजे भूषणांनी मला सौंदर्य येतें, असें समजतात. सर्व ब्रह्मांडाचें कारण व स्वत:सिद्ध असा जो मी, त्या मला कारण आहे, असें समजतात—म्हणजे आईबापापासून उत्पन्न झालों असें समजतात.॥ १६२॥ जो मी स्वभावत:च आहे, त्या मला तयार करतात, स्वयंभू जो मी, त्या माझी प्रतिष्ठा करतात. अखंड असणारा जो मी, त्या माझें आवाहन विसर्जन करतात.॥ १६३॥ मी सदासर्वदा स्वत:सिद्ध आहे, पण मला बाल, तरुण, वृद्ध समजतात. याप्रमाणे एक अद्वैतरूप असणाऱ्या मला असें संबंध आहेत, असें समजतात.॥ १६४॥ अखंड अद्वैत ब्रह्मस्वरूपाहून मला निराळें समजतात. मी अकर्ता असतां माझे ठिकाणीं कर्मकर्तृत्व पाहतात आणि मी अभोक्ता असतां, मला भोक्ता समजतात.॥ १६५॥ मला कुळ नाही, पण कुळाचा संबंध लावून, माझ्या कुळाचें वर्णन करतात मी अविनाशी आहे पण मी मेलों असें समजून दु:खी होतात आणि सर्वांच्या अंतर्यामी राहणाऱ्या मला शत्रुमित्र मानतात.॥ १६६॥ अर्जुना! मी निजानंदांत अखंड निमग्न असणारा आहे, पण मला अनेक सुखाची इच्छा आहे, असें मानतात. मी सर्व असून, सर्वत्र सम आहे पण मला एके ठिकाणीं राहणारा मानतात.॥ १६७॥ सर्व चराचर सृष्टींत मीच एक सर्वांचा आत्मा आहे, पण मी आपल्या भक्तांचा पक्ष घेतों व दुष्टांचा संहार करतों, असें जगांत रूढ करितात.॥ १६८॥ विशेष काय सांगूं, संपूर्ण जीवाचे व जीवाच्या देहाचे ठिकाणी राहणारे संपूर्ण अज्ञानजन्य जे धर्म आहेत तेच माझ्या ठिकाणीं (म्हणजे मी जीव असून माझा देहहि पांचभौतिक) आहेत असे त्यांचें विपरींत ज्ञान असते.॥ १६९॥ समोर एखादा आकार पाहून त्याचें, देव म्हणून भजन

करतात आणि तो भंगला असतां आतां हा देव नाही, असे वाटून टाकून देतात. ॥ १७० ॥ पण, अर्जुना! अशा नाना प्रकाराने मला मनुष्याकारच समजतात; म्हणून त्यांचें हें विपरीत ज्ञान माझ्या सगुण साकार स्वरूपाच्या यथार्थ ज्ञानाला झांकून टाकतें (माझें खरें ज्ञान होऊं देत नाही) ॥ १७१ ॥

गूढार्थदीपिका—या ओव्यांवरून नामरूपरहित अशा निर्गुण स्वरूपाहून, भगवंताचें नामरूपात्मक सगुणस्वरूप कनिष्ठ आहे, असे कोणी म्हणतील, पण तें बरोबर नाही, हें वर जें सगुण स्वरूपाचें विवेचन केलें आहे त्यावरून कळून येईल. ज्याप्रमाणे परिसाच्या संगाने झालेल्या सोन्यांत, कमी अधिक कसोटी असूं शकत नाही, त्याप्रमाणे पूर्णब्रह्म नित्य, शुद्ध, बुद्ध, निरवयव, अस्फूट, स्वयंभू, व्यापक, अद्वितीय, नामरूपसंबंधरहित, कर्मकर्तृत्वरहित अशा लक्षणाचें आहे म्हणून त्याची सगुणनिर्गुण दोन्ही स्वरूपेंहि पूर्ण ब्रह्मच असतात असे वेदान्तांत सांगितलें आहे. फरक इतकाच की, निर्गुण परब्रह्म नामरूपरहित घेतले जाते, तर सगुण परब्रह्म अखंड नामरूपसहित घेतलें जातें. "अनामा नाम" या चरणाचा सगुणदृष्टीने अर्थ करायचा म्हणजे सगुण परमात्मा अखंड नामरूपसहितच असतो, हें न जाणणरे मूर्ख लोक, ज्याप्रमाणे जीव जन्माला येण्यापूर्वी नामरूपरहित असतो व तो देहधारी होऊन जन्माला आला की त्याला नाम ठेविलें जातें, तसेंच सगुण परमेश्वराला जीव समजून तो जन्मला व त्याला नांव ठेविलें गेलें किंवा नामाचा व भगवंताचा आतां संबंध झाला, असें समजतात, असा माऊलींच्या म्हणण्याचा अर्थ होतो.

सगुण परमात्मा अद्वितीय व व्यापक असल्यामुळे कर्म नाही व अहंकार नसल्यामुळे कर्तृत्वहि नाही म्हणून तो अकर्ताच आहे. याप्रमाणेच शेष ओव्यांचाहि अर्थ सगुणाच्या दृष्टीने लावतां येतो.

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः । राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ॥ १२ ॥

अर्थ—सगुण भगवंताला तुच्छ समजून त्याचे ठिकाणीं चित्त न लावणारे जे पुरुष असतात, ते अत्यंत अविवेक उत्पन्न करणाऱ्या राक्षसी किंवा आसुरी प्रकृतीचा आश्रय करून राहतात. म्हणून त्यांचे मनोरथ व्यर्थ होतात, त्यांचीं कर्मेहि निष्फळ होतात. त्यांचें ज्ञानहि व्यर्थच असतें. ॥ १२ ॥

यालागीं जन्मलेचि ते मोघ। जैसें वार्षियेवीण मेघ। कां मृगजळाचे तरंग। दुरूनीचि पाहावे॥ १७२ ॥
अथवा कोल्हेरीचे असिवार। नातरी वोडंबरीचे अळंकार। की गंधर्वनगरीचे आवार। आभासती कां॥ १७३ ॥
साबरी वाढिन्नल्या सरळा। वरी फळ ना आंतु पोकळा। कां स्तन जाले गळां। शेळिये जैसें॥ १७४ ॥
तैसें मूर्खांचें तयां जियालें। आणि धिग कर्म तयांचें निपजलें। जैसें सांवरी फळ आलें। घेपे ना दीजे॥ १७५ ॥
मग जें कांहीं ते पढिन्नलें। तें मर्कटें नारळ तोडिले। कां आंधळ्या हातीं पडिलें। मोतीं जैसें॥ १७६ ॥
किंबहुना तयांचीं शास्त्रें। जैशीं कुमारीहातीं दीधलीं शस्त्रें। कां अशौच्या मंत्रें। बीजें कथिलीं॥ १७७ ॥
तैसें ज्ञानजात तया। आणि जें कांहीं आचरलें गा धनंजया। तें आघवेंचि गेलें वायां। जें चित्तहीन॥ १७८ ॥
पैं तमोगुणाची राक्षसी। जें सद्बुद्धीतें ग्रासी। विवेकाचा ठावोचि पुसी। निशाचरी जे॥ १७९ ॥
तिये प्रकृती वरपडे जाले। म्हणऊनि चितेंचेनि कपाटें गेले। वरि तामसीयेचिये पडिले। मुखामाजीं॥ १८० ॥
जेथ आशेचिये लाळे। आंतु हिंसा जीभ लोळे। तेवींचि असंतोषाचे चाकळे। अखंड चघळी॥ १८१ ॥
जे अनर्थाचे कानवेरी। आवाळुवें चाटीत निघे बाहेरी। जे प्रमादपर्वतींची दरी। सदाचि मातली॥ १८२ ॥
जेथ द्वेषाचिया दाढा। खसखसां ज्ञानाचा करिती रगडा। जे त्वगस्थि गवसणी मूढां। स्थूळबुद्धि॥ १८३ ॥
ऐसे आसुरिये प्रकृतीचे तोंडीं। जे जाले गा भूतोंडीं। ते बुडोनि गेले कुंडीं। व्यामोहाचां॥ १८४ ॥
एवं तमाचिये पडिले गर्ते। न पविजतीचि विचाराचेनि हातें। हें असो ते गेले जेथें। तें शुद्धीचि नाहीं॥ १८५ ॥

अर्थ—म्हणूनच ज्याप्रमाणे वर्षाऋतुवांचून आलेले मेघ व्यर्थ असतात किंवा मृगजळाचे तरंग केवळ दुरून पाहण्याजोगे असतात, त्याप्रमाणे भगवंताच्या सगुण स्वरूपाला भौतिक समजून तुच्छ लेखणारे लोक व्यर्थच जन्माला आले म्हणजे त्यांचा जन्म व्यर्थ असतो. ॥ १७२ ॥ किंवा जसे मातीचे घोडेस्वार दिसावे किंवा जसे गारूड्यांनी केलेले अलंकार दिसावे किंवा जशी आकाशांतील ढगांची नगराप्रमाणे दिसणारी रचना असते. ॥ १७३ ॥ साबर निवडुंगाचे

झाड सरळ वाढलें, तरी त्याला फळ नसल्यामुळे व आंतून पोकळ असल्यामुळे तें जसें निरर्थक असते किंवा शेळीच्या गळ्याला असलेले स्तन निरर्थक असतात. ॥ १७४ ॥ किंवा सांवरीच्या झाडाला आलेलें फळ घेतां येत नाही व देतां येत नाही, त्याप्रमाणे भगवंताच्या सगुण स्वरूपाचा अनादर करणाऱ्या त्या मूर्खांचें जीवन व त्यांच्याकडून घडलेलीं कर्में व्यर्थ होत. ॥ १७५ ॥ पुढे त्यांनी जेवढें कांही अध्ययन करून ज्ञान संपादन केलेंले असतें, तें सर्व वानरांनी नारळ तोडल्याप्रमाणे किंवा आंधळ्याहातीं मोतीं पडल्याप्रमाणेच निरर्थक समजावें. ॥ १७६ ॥ एवढेंच नाही, तर ज्याप्रमाणे लहान मुलीचे हातीं दिलेली शस्त्रे किंवा अपवित्र माणसाला दिलेले सबीज मंत्र हानिकारक होतात. ॥ १७७ ॥ त्याचप्रमाणे माझ्या सगुण परमेश्वराच्या ठिकाणीं आदरयुक्त चित्त नसल्यामुळे त्यांचें नानाप्रकारचें ज्ञान व नानाप्रकारचें धर्माचरण हीं सर्व व्यर्थ होत. ॥ १७८ ॥ आणखी सुबुद्धीचा नाश करणारी, विवेकाचा ठावठिकाण नाहीसा करणारी, अशी जी तमोगुणात्मक अत्यंत अविवेकरूप अज्ञानांत वावरणारी राक्षसी प्रकृति आहे. ॥ १७९ ॥ त्या राक्षसी प्रकृतीच्या स्वाधीन होतात; म्हणून चिंतेच्या कपाटांत शिरतात (म्हणजे अखंड चिताक्रांत असतात) आणि मग तमोगुणी प्रकृतीच्या मुखांतच सांठवितात. ॥ १८० ॥ (तामसी प्रकृतीच्या मुखांत साठवितात म्हणजे काय याचें स्पष्टीकरण करतात) ज्या तामसी प्रकृतीच्या मुखामध्ये आशा हीच लाळ आहे, त्यांत हिंसारूप जीभ लळलळ करते आणि असंतोषरूपी मांसाचे तुकडे सारखे चघळत असते. ॥ १८१ ॥ ती जीभहि अनर्थ म्हणजे दुःखद परिणाम हाच कोणी कान, त्या कानापर्यंत ओंठ चाटीत बाहेर निघते. अशी ही राक्षसी प्रकृति, प्रमाद—जाणून बुजून पाप करण्याची प्रवृत्ति-हाच कोणी पर्वत, त्या पर्वताची सदा माजलेली दरीच होय. (त्या राक्षसी प्रकृतीच्या माणसाचे ठिकाणीं अखंड पाप करण्याची किंवा दुसऱ्याला दुःख देण्याची प्रवृत्ति भरलेली असते. दुसऱ्याला सुख द्यावें, हें त्याच्या मनांत कधीं येतच नाही असा अर्थ). ॥ १८२ ॥ ज्या ठिकाणीं तामसप्रकृतीच्या द्वेषरूपी दाढेने विचाररूपी ज्ञानाचा निःशेष चुराडा केला जातो आणि जी तामसी प्रकृति स्थूलबुद्धि—म्हणजे स्थूल पांचभौतिक शरीरादिक सत्य आहेत अशी बुद्धि-उत्पन्न करून मूर्खांना त्वचा आणि अस्थि यांची गवसणी करते—म्हणजे शरीराहून मी भिन्न आहे असा विवेक होऊं देत नाही. ॥ १८३ ॥ असे हे, त्यां आसुरीप्रकृतीच्या तोंडांत बळी होतात व ते (अर्जुना!) अज्ञानभ्रांतीच्या डोहांत बुडून जातात, असें समज. ॥ १८४ ॥ तसेंच ते तमोगुणाच्या खाईतच पडलेले असतात. विचाराचे हाताला कधीं सांपडत नाहीत. असो काय सांगू! त्यांची काय गति होते याचा पत्ता लागत नांही. किंवा आपली काय गति झाली, हें त्यांना समजत देखील नाही. ॥ १८५ ॥

गूढार्थदीपिका—रामकृष्णादि सगुण परमेश्वराला तुच्छ लेखणाऱ्या पुरुषांचे ठिकाणीं सत्वगुणाची वृद्धि न होतां रजोगुण तमोगुणाचीच वृद्धि होते, म्हणून त्यांना परमेश्वरप्राप्ती किंवा मोक्षप्राप्ति कधीं होत नाही असा भाव.

म्हणोनि असोतु इयें वायाणीं। कायशीं मूर्खांचीं बोलणीं। वायां वाढवितां वाणी। शिणेल हन॥ १८६ ॥
ऐसें बोलिलें देवें। तेथ जी जी म्हणितलें पांडवें। आइकें जेथ वाचा विसवे। ते साधुकथा॥ १८७ ॥

अर्थ—म्हणून या राक्षसी प्रकृतीच्या मूर्ख लोकांचें वर्णन करणें व्यर्थ आहे. जितकी त्यांची कथा सांगावी तितका वाणीला व्यर्थ शीणच देणें होय. ॥ १८६ ॥ असें देवांनी म्हटलें असतां, अर्जुन म्हणतो, देवा! तुमचें म्हणणें अगदीं यथार्थ आहे. यावर देव म्हणतात, अर्जुना! ज्यांची कथा वर्णन केली असतां वाणीला विसावा किंवा सुख मिळतें, त्या सत्पुरुषांची आतां कथा ऐक. ॥ १८७ ॥

गूढार्थदीपिका—साधुकथा म्हणजे सत्पुरुषांचें वर्णन किंवा अंतश्चिन्हें किंवा स्वाभाविक लक्षणें. सत्पुरुषांची अंतःस्थिति, परमात्मा अंतर्यामी असल्यामुळें जाणूं शकतो. दुसरा जाणूं शकत नाही. बाह्यचिन्हांवरूनहि तीं कळूं शकत नाहीत. "तुका म्हणे हे तो ठांवे पांडुरंगा। काय करी जगा अंतरींचे" "भक्ताचा महिमा भक्तचि जाणती। दुर्लभ या गती आणिकांसि" किंवा स्वतः जो भक्त असेल त्यालाहि भक्ताचें अंतःकरण कळूं शकतें.

जेथ वाचा विसवे—सत्पुरुषांचे गुण वर्णन करण्यातच वाणीला समाधान मिळतें व तिचें सार्थक होतें. तिला दुसरें बोलावेसें वाटत नाही. "जेणें सांगतयाचे बोलणें खुंटे। ऐकतयाचे व्यसन तुटे" त्याचप्रमाणें 'जे मुक्ताते निर्धारितां।

लाभे आपलीच मुक्तता। जैसी दीपे दिसे पाहतां। आपली वस्तु''॥ ३९७॥ (ज्ञाने. अ. १८) तैंसै हारपलें आपणवें पावें। तैं संताते पाहातां गिवसावें। म्हणोनि वानावें ऐकावें। तेचि सदा''॥ ४००॥ (ज्ञा. अ. १८) संतांची कथा वर्णन करतांना व ऐकतांना आपल्यालाच ज्ञानाची व भक्तीची प्राप्ति होते अशी ही साधुकथा श्रेष्ठलाभ करून देणारी आहे ''संत होऊनियां संतासी पाहावें। तरीच तरावे तुका म्हणे''.

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः। भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम्॥ १३॥

अर्थ—महात्मे जे पुरुष असतात, ते सात्विक अशा दैवी प्रकृतीचा आश्रय करून मला सर्व सृष्टीचें कारण व अविनाशी असें समजून, अनन्यभावाने माझें भजन करतात.॥ १३॥

तरी जयांचिये चोखटे मानसीं। मी होऊनि असें क्षेत्रसंन्यासी। जयां निजेलियांतें उपासी। वैराग्य गा॥ १८८॥

अर्थ—त्या महात्मे पुरुषांच्या निर्मळ अंत:करणांत मी क्षेत्रसंन्यासी होऊन राहतो. जे निजले असतां देखील वैराग्य त्यांची उपासना करीत राहते.॥ १८८॥

गूढार्थदीपिका—जयांचिया चोखटें मानसीं—चोखट मानस म्हणजे शुद्ध मन. येथें मन हा शब्द अंत:करण, किंवा बुद्धिवाचक आहे. बुद्धि, अंत:करण मन हे शब्द पुष्कळदां समानार्थी वापरले जातात. अंत:करण सत्वगुणाचें कार्य असल्यामुळें, मुळात तें स्वच्छच आहे; पण अविद्याजन्य कामादिदोषांनी युक्त होऊन तें अशुद्ध होतें. ''मनोहि द्विविधं प्रोक्तं शुद्धं चाशुद्धमेव च। अशुद्धं कामसंकल्पं शुद्धं कामविवर्जितम्'' (अमृत. उप) दोषरहित मनाला शुद्धमन म्हणतात. या शुद्धमनाला येथें ''चोखटें मानस'' म्हटलें आहे.

अविद्या म्हणजे आत्मस्वरूपाला विसरणें. जीव आपल्या सच्चिदानंद आत्मस्वरूपाला विसरला आहे; म्हणून त्याचें ठिकाणीं अविद्या आहे. या अविद्येपासून आवरण, विक्षेप, संशय, विपर्यय, असंभावना, विषयासक्ति, बुद्धिमांद्य असे अनेक दोष अंत:करणांत शिरले आहेत.

आवरण हें अविद्येचेच वृत्तिस्वरूप आहे—म्हणजे मूळ अविद्या अंत:करणांत ज्या वृत्तिरूपाने आहे त्या वृत्तिरूपाला आवरण म्हणतात. तें आवरण असत्वापादक व अभानापादक असें दोन प्रकारचें आहें. सच्चिदानंद ब्रह्म नाही अशी जी अंत:करणांत वृत्ति उत्पन्न होते, त्याला असत्वापादक आवरण म्हणतात व सच्चिदानंद परब्रह्म आहे, पण मला तें कळत नाही, अशा वृत्तीला अभानापादक आवरण म्हणतात.

विक्षेप म्हणजे परब्रह्मवस्तुच्या यथार्थज्ञानाला बाधक असें परब्रह्मवस्तुचेंच निराळ्या वस्तूच्या रूपाने ज्ञान होणें होय. हा विक्षेप आवरणामुळेंच उत्पन्न होतो व तो मलयुक्त विक्षेप व अमलयुक्त विक्षेप असा दोन प्रकारचा आहे. दृढ विषयासक्तीमुळें विषयसुख प्राप्त करून घेण्याकरितां, धर्मशास्त्राविरुद्ध वागण्याची जी पापप्रवृत्ति तिला मलयुक्त विक्षेप म्हणतात. ब्रह्मज्ञान झाल्यावर प्रारब्धबळाने जो जगताचा भास व विषयप्रवृत्ति राहते त्याला अमलयुक्त विक्षेप म्हणतात. हा विक्षेप सगुण भगवंताच्या भक्तीने नाहीसा होतो.

हें खरें की तें खरें अशा द्विकोटिक ज्ञानाला संशय म्हणतात. हा संशयहि वाचकगतसंशय व वाच्यागत संशय असा दोन प्रकारचा आहे. वेदाने परब्रह्माचें प्रतिपादन केले आहे की धर्माचें प्रतिपादन केलें आहे याचा निश्चय न होणें याला वाचकगतसंशय म्हणतात (वाचक म्हणजे वेद) आणि वेदान्तदर्शनाप्रमाणे जगताचे कारण ब्रह्म आहे किंवा इतर सांख्यादिकांच्या मताप्रमाणें प्रधानादिक आहेत अशी अनिश्चितवृत्ति याला वाच्यागतसंशय म्हणतात (वाच्य म्हणजे ब्रह्म).

वस्तुस्थितीच्या उलट भावना करणें याला विपर्यय किंवा विपरीत भावना म्हणतात. ही शब्दरूप विपरीतभावना व अर्थरूप विपरीतभावना अशी दोन प्रकारची आहे. आपल्या व्युत्पत्तीच्या अभिमानाने संतादिक आप्तांच्या वचनांना प्रमाण न मानणें ही शब्दरूप विपरीतभावना होय व ब्रह्म खोटें आहे आणि देहादिक विषय सत्य आहेत, असें मानून देहादिकांचें सुख भोगणें, ही अर्थरूप विपरीतभावना होय.

ब्रह्मवस्तुचें अस्तित्व सिद्ध होणार नाही अशा युक्तीने झालेल्या निश्चयास असंभावना म्हणतात. ती

प्रमाणअसंभवना व प्रमेयअसंभावना अशी दोन प्रकारची आहें न्यायसांख्यादि दर्शनांनी मानलेल्या प्रत्यक्षादि प्रमाणाने ब्रह्म कळूं शकत असल्यामुळें, ते श्रुतीवरूनच कळतें असें नाही अशी जी निश्चयवृत्ति तिला प्रमाणअसंभावना म्हणतात (प्रमाण म्हणजे वेदरूप शब्द प्रमाण) आणि ब्रह्म व जगत परस्पराहून भिन्न लक्षणाचे आहेत, म्हणून जगताचे कारण ब्रह्म नाही अशी जी निश्चयवृत्ति तिला प्रमेयअसंभावना म्हणतात (प्रमेय म्हणजे ब्रह्म).

विषयसुखाच्या प्राप्तीची इच्छा याला विषयासक्ति म्हणतात. ही सर्व इहपरलोकांतील विषयाविषयी असते. ही अनेक प्रकारची आहे.

''येन तात्पर्यतश्चापि श्रुतं बुद्धिमनारूहेत्। तज्जाड्यं हि महान्दोषः पुरुषार्थविनाशिनः'' (त्रि. र. अ. २०-९७) ज्याच्या योगाने श्रवण केलेला अर्थ संक्षेपरूपानेहि बुद्धीत शिरूं शकत नाही, हा बुद्धिमांद्यरूपी दोष होय. हा दोष मोक्षपुरुषार्थाचा सर्वस्वीं नाश करणारा असल्यामुळें, हा दोष परमेश्वर भक्तीवांचून इतर प्रयत्नांनी जिंकण्यास कठीण आहे. हें संपूर्ण दोष परमेश्वरप्राप्तीला प्रतिबंधक असल्यामुळें ते, जोपर्यंत बुद्धींत आहेत तोपर्यंत ती बुद्धि अशुद्ध किंवा परमेश्वरप्राप्तीला अयोग्य म्हटली जाते.

ही बुद्धि चोखट होण्याचे मार्ग सांगितले आहेत ते असें—

''विपरीत निश्चयेन नश्येदेतद्व्रयं क्रमात्''

वेदान्त, शास्त्र व गुरु यांच्या उपदेशावर विश्वास ठेवून असंभावनेच्या विरुद्ध निश्चय केला असतां क्रमाने दोन्ही प्रकारच्या असंभावना नाहीशा होतात.

अनाश्वासस्य मूलं तु विरुद्धतर्कचिंतनम्। तत्परित्यज्य सत्तर्कावर्तनस्य प्रसाधने॥ ८७॥ ततः श्रद्धा समुदयादनाश्वासः प्रणश्यति॥ ८८॥ बहुतेक संशय व विपर्यय अशा दोन्ही प्रकारच्या अविश्वासाचें मूळ कारण शास्त्रविरुद्ध तर्क करणें, हें आहे. म्हणून शास्त्रविरुद्ध तर्क करणे सोडून देऊन सत्तर्क म्हणजे नेहमी शास्त्रानुकूल तर्क करण्याने शास्त्रावर श्रद्धा उत्पन्न होते व त्यामुळे विपर्यय रूप व संशयरूप असा दोन्ही प्रकारचा अविश्वास दोष नाहीसा होतो, असें शास्त्र म्हणतें.

''कामादिवासनां तस्माज्जयेद्वैराग्य संपदा''॥ ६१॥ विषयासक्ति हा दोष वैराग्याने नाहीसा होतो. हे सर्व दोष नाहीसे झाले तरी जाड्यता जो दोष आहे तो नाहींसा करण्याकरितां ''तत्रात्मदेवतासेवामृते नान्यद्धि कारणम्'' परमेश्वर सेवेवांचून दुसरा उपायच नाही. जाड्यतादोष जोपर्यंत नाहीसा होत नाही. तोपर्यंत आत्मज्ञान होणें शक्य नाही-म्हणजे इतर दोषहि नाहीसे होत नाहीत. किंवा सर्व साधनसंपत्तिर्ममैव प्रणिधानतः। उपायाति च यो भक्त्या सर्वदा मात्रकैतवात्''॥ १००॥ (त्रि. र.) वर बुद्धींतील दोषांचें निराकारण करण्याकरितां जी सत्तर्क चिंतनादि साधनें सांगितलीं आहेत, ती सर्व साधनसंपत्ति एका भगवंताच्या दंभरहित निष्कपट नामस्मरणरूप व ध्यानरूप भक्तीने प्राप्त होते, असें त्रिपुरारहस्यांत सांगितलें आहे.

सारांश भक्तीने बुद्धींतील अविद्याजन्यदोष संपूर्ण नाहीसे होऊन जसें चित्त अत्यंत शुद्ध होते व पूर्ण परमेश्वर प्राप्ति होते. तशी कोणत्याहि साधनाने होत नाही.

''यथायथा परिमृज्यतेऽसौ मत्पुण्यगाथा श्रवणाभिधानैः तथातथा पश्यति वस्तु सूक्ष्मं चक्षुर्यथैवाञ्जनसंप्रयुक्तम्''॥ २६॥ (भाग. स्कं. ११-१४) ज्याप्रमाणे मातीच्या खड्यावर पाणी टाकून ती विरघळली असतां तिच्यांतील खडे आपोआप बाहेर पडतात व माती शुद्ध होते, त्याप्रमाणें भगवंताच्या नामस्मरण, कथाश्रवण, कीर्तनादिरूप भक्तीच्या योगाने, चित्त प्रेमळ होऊन आर्द्र झालें असतां, चित्तांतील संपूर्ण दोष आपोआप नाहीसे होतात आणि चित्त शुद्ध होऊन त्या चित्तांत अंजन लावलेल्या डोळ्याने जशी भूमिगत वस्तु दिसते, त्याप्रमाणे या बुद्धीलाहि सर्वान्तर्यामी परब्रह्माचा अनायासें साक्षात्कार होतो असें भागवतकारांनी म्हटलें असून नाथांनीहि ''सद्भावें करितां भगवद्भक्ति। भक्ति विरक्ति भगवत्प्राप्ति। तिन्ही एकेकाळीं होती। ऐशिया युक्ति जाणिजे राया''॥ ३१३॥ (ए. भा. अ. २) असें म्हटलें आहे. म्हणून नामस्मरणादिक भगवदुपासनेने सर्व दोषरहित झालेली बुद्धीच येथे ''चोखटें मानस'' या शब्दांनी घेतली आहे.

क्षेत्र संन्यासी—क्षेत्रसंन्यासी म्हणजे आमरण क्षेत्र न सोडून जाण्याचा संकल्प करणारा संन्यासी होय.

भगवान म्हणतात ज्ञानभक्तीने ज्याचें चित्त अत्यंत शुद्ध झाले आहे अशा सत्पुरुषाचे चित्तांत, मी क्षेत्रसंन्यासी होऊन राहतो—म्हणजे सगुण स्वरूपाने मी त्यांच्या चित्तांत अखंड राहतो.

''मी सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप आहे असा अनुभव येणे, हेंच भगवंताचें, चित्तांत क्षेत्रसंन्यासी होऊन राहणें होय असा कित्येक लोक त्याचा अर्थ करतात'' पण तो अर्थ बरोबर नाही. कारण भगवंताच्या सगुण स्वरूपाविषयींच हें सर्व प्रकरण चाललें असून ''मां'' म्हणून भगवंतांनी आपल्या सगुण स्वरूपाचा निर्देश केला आहे, म्हणून भगवान निर्गुण स्वरूपाने क्षेत्रसंन्यासी होऊन राहतो असा अर्थ करणें योग्य होत नाही.

''माया निवर्तक ज्ञान प्राप्ति। न करितां हरिभक्ति कदा नुपजे''॥ ६९ ॥ (ए. भा. अ. २) पुन: मी सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप आहे असें दृढ जाणणे हें मायानिवर्तक ज्ञान होय, हें मायानिर्वतक ज्ञान सगुण भगवंताची भक्ति केल्याशिवाय कधीहि प्राप्त होत नाही, असें नाथ म्हणतात. ज्ञानानंतर हीच भक्ति अनन्य होऊन मी सच्चिदानंदरूप ब्रह्म आहे ही जाणीवहि नाहीशी होते व मग भक्ताच्या चित्तांत एक सगुण परमात्माच राहतो. म्हणून येथे वर सांगितल्याप्रमाणें क्षेत्रसंन्यासी हें विशेषण सगुण स्वरूपाला धरून दिलें आहे, असेंच म्हणावें लागतें.

''विसृजति हृदयं न यस्य........प्रणयरशनया धृतांघ्रिपद्म:'' (भाग. स्कं. ११-२-५५) भक्तांनी आपल्या प्रेमरज्जूनी भगवंताचे पाय धरून ठेवले असल्यामुळे भगवान भक्तांच्या हृदयांतून कधीहि जात नाही, असें भागवतकारांनी म्हटलें असून ''हें नाम प्रीतीवरी। हृदयी रिगाला श्रीहरी। तो निघो विसरे बाहेरी। भक्ता प्रीती करी कृपाळु''॥ ७७९ ॥ (ए. भा. अ. २) ''तेविं भक्ताचिया प्रेमप्रीती। हृदयी कोंडला श्रीपती'' नाथांनीहि असेंच म्हटलें आहे. आणि ''सगुण निर्गुण हरि पायीं'' सगुण निर्गुण हीं दोन्हीं रूपें सगुण परमेश्वराचे ठिकाणीं एकत्र असतात; म्हणून मी सगुण स्वरूपाने भक्तांच्या हृदयांत क्षेत्रसंन्यासी होऊन राहतों, असें भगवान म्हणतात असा अर्थ करणे योग्य होतें.

जया निजेलियाते उपासी। वैराग्य गा—भगवत्प्रेमाने त्यांना ''पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं। जागृतीं स्वप्नीं पांडुरंग'', ''विषयचि ज्यांचा झाला नारायण'' सर्व काळ व सर्व ठिकाणीं भगवत्स्वरूप दिसत असल्यामुळे विषयांचा विसर पडलेला असतो. त्यामुळे त्यांना कोणत्याहि अवस्थेंत वैराग्य सोडून राहत नाही असा भाव.

जयांचिया आस्थेचिया सद्भावा। आंतु धर्म करी राणिवा। जयांचें मन ओलावा। विवेकासी॥ १८९॥

अर्थ—ज्यांची भगवद्वचनावर इतकी उत्कट आस्था किंवा श्रद्धा असते की त्यांना अधर्माचरणाचा स्पर्शच होत नाही किंवा त्यांचें कोणतेंहि आचरण शास्त्रमर्यादा सोडून नसतें आणि ज्यांच्या मनांत अखंड विवेक जागृत असतो. ॥ १८९ ॥

गूढार्थदीपिका—जयाचिया आस्थेचिया सद्भावा। आंतु धर्म करी राणिवा—प्रेमाचा असा स्वभाव आहे की, तो प्रेम करणाऱ्याला ज्याच्यावर प्रेम करायचें त्याच्या सर्वस्वी स्वाधीन करतो. देहाचे प्रेमामुळे आपण सर्वस्वी देहाचे स्वाधीन होतो, असा सर्वांचा अनुभव आहे. त्याचप्रमाणे भगवद्भक्त भगवंताच्या प्रेमामुळे भगवंताच्या सर्वस्वीं स्वाधीन असतात. स्वाधीन होणें म्हणजे ज्याच्या स्वाधीन व्हावयाचें त्याची आज्ञा न मोडणें, भगवंताच्या स्वाधीन झालेले भक्त, भगवंताची आज्ञा मोडत नाहीत. भगवंताची आज्ञा हाच धर्म होय; म्हणून भक्तांचें चित्त नेहमी धर्मपरायण असतें व अधर्म त्यांच्या चित्ताला कधी शिवत नाही. ते सांगतील तें सर्व धर्मरूपच असतें.

जयाचें मन ओलावा। विवेकासी—भगवंताचें प्रेम सर्व विवेकाचें मूळ आहे. भगवंताचें प्रेम ज्या चित्तांत नाही, तें चित्त अविवेकसंपन्नच असतें; म्हणून भगवंताच्या प्रेमाने ओले झालेल्या भक्ताच्या मनाचा, विवेकाला ओलावा मिळतो, हें माऊलीचें म्हणणे यथार्थ आहे.

जे ज्ञानगंगे नाहाले। पूर्णता जेऊनि धाले। जे शांतीसि झाले। पालव नवे॥ १९०॥

अर्थ—ते अखंड ज्ञानगंगेमध्ये स्नान करीत असतात. पूर्ण ब्रह्मस्थितीचें भोजन करून ते तृप्त झालेले असतात

आणि असे ते महात्मे ब्रह्मशांतीला किंवा अत्यंत निर्वासन स्थितीला फुटलेली नवी कोंवळी पालवीच होय. ॥ १९० ॥

गूढार्थदीपिका—जे ज्ञानगंगे नाहाले—गंगेंत स्नान करणाऱ्या पुरुषाचा देह पवित्र होतो—म्हणजे त्या देहाने जीं कांही पातकें झालीं असतील, तीं नाहीशी होतात. पण देहाच्या ठिकाणचा अविद्याजन्य जडपणा व नाशिवंतपणा जात नाही आणि गंगेंत अखंड बुडी मारून राहतां येत नाही; कारण तसें केल्यास मरणाचा प्रसंग येतो.

पण भक्त हे अखंड आत्मज्ञानरूपी गंगेंतच राहत असल्यामुळे त्यांच्या पूर्वजन्मातील देहाने व मनाने केलेलीं संपूर्ण पापें भस्मसात होऊन, त्यांच्या वर्तमान देहाच्या ठिकाणचे जडविनाशी धर्म हेहि नाहिसे होतात. त्यांचा देह "यथैव मृण्मय: कुंभस्तद्वद्देहोऽपि चिन्मय:" (अपरो. ६८) पूर्ण ज्ञानगंगास्वरूपच होऊन राहतो. "उपासनया ये मुक्तिं गतास्तेषां साकारो मुक्तसाकार:। तस्याखण्डज्ञानेनाविर्भावो भवति। सोऽपि शाश्वत:॥" (त्रिमहानारायण उपनिषद्) असे ते अमर होतात.

पूर्णता जेऊनि धाले—पूर्णता म्हणजे परब्रह्माच्या निर्गुण व सगुण अशा दोन्ही स्वरूपाशीं ऐक्य होणे होय. ही पूर्णता भक्तांनाच प्राप्त होते. त्यांना "धाले" म्हणजे कांहीच प्राप्त करून घ्यावयाचें नसतें, असे ते पूर्ण सुखरूप असतात.

ते शांतीसि झाले। पालव नवे—"तरी गिळोनि ज्ञेयातें। ज्ञाता ज्ञानही माघौतें। हारपे निरुतें। ते शांति पैं गा"॥ १३७॥ (ज्ञाने. अ. १६) अशी श्रीज्ञानेश्वर माऊलींनी शांतीची व्याख्या केली आहे. ज्या स्थितींत ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय ही त्रिपुटीच राहत नाही, त्या स्थितीला शांती म्हणतात.

येथें ज्ञाता म्हणजे ज्ञानी, ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान व ज्ञेय म्हणजे ब्रह्म असे अर्थ, ब्रह्मज्ञानांत त्रिपुटी राहत नसल्यामुळें घेतां येत नाहीत; म्हणून येथील ज्ञाताज्ञानज्ञेयत्रिपुटी ही, ज्ञाता म्हणजे विषयाला जाणणारा, ज्ञेय म्हणजे विषय व ज्ञान म्हणजे विषयाचें ज्ञान अशीच घेतली पाहिजे. अर्थात् शांति म्हणजे चित्ताची नि:शेष निर्वासन स्थिति होय. अशी चित्ताची निर्वासन स्थिति झालीं असतां "ब्रह्मरस गोडी तयासी फावली। वासना निमाली सकळ ज्याची" (तु. गा. १५२९) "तयातेंचि गिवसित। तें ज्ञान पावे निश्चित। जयामाजि अचुंबित। शांति असे", "ते ज्ञान हृदयीं प्रतिष्ठे। आणि शांतीचा अंकुर फुटे॥" (ज्ञाने. अ. ४-१८९-१९०) चित्त परब्रह्मस्वरूपाचे ठिकाणीं अखंड स्थिर राहतें व ब्रह्मानंद मिळतो. म्हणून भक्तीने ब्रह्मानंदरसभरित झालेल्या भक्ताला श्रीज्ञानेश्वर माऊलींनी चित्ताच्या निर्वासनरूप शांतस्थितीला निघालेले कोंवळे पल्लव होत, असें म्हटलें आहे.

जे परिणामा निघाले कोंभ। जे धैर्यमंडपाचे स्तंभ। जे आनंदसमुद्रीं कुंभ। चुबकळोनि भरिले॥ १९१ ॥

अर्थ—ते ब्रह्मस्थितीला निघालेले कोंभ होत, ते धैर्यमंडपाचे खांब होत व ब्रह्मानंदसमुद्रांत बुडवून भरलेले घट होत. ॥ १९१ ॥

गूढार्थदीपिका—परिणामा निघाले कोंभ-परिणाम म्हणजे शेवट. सर्व दृश्य वस्तूंचा निरास केला असतां शेवटीं परब्रह्मच राहतें. संत हे असे पूर्णब्रह्मस्थितीचे कोंभ आहेत—म्हणजे देहासह पूर्ण ब्रह्मस्वरूप आहेत असा भाव. "ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं" भक्तीने त्यांचें देह ब्रह्मस्वरूप होतात.

यांत पल्लव, कोंभ, स्तंभ, कुंभ इत्यादि मर्यादाबोधक किंवा व्यक्तिबोधक शब्दांनी त्यांच्या देहाचाच उल्लेख केला आहे.

धैर्य मंडपाचे स्तंभ—आपल्याहून निराळ्या वस्तुपासून देहाच्या नाशाची भीति असते व असा प्रसंग आला असतां धैर्य धरावें लागतें. पण ही नाशाची भीति "द्वितीयाद्वैभयंभवति" (बृ. उ. १-४-२) आपल्याहून निराळे पदार्थ आहेत ही द्वैतभावना जोपर्यंत असते तोपर्यंत ती भीति असते व धैर्य धरावें लागतें.

आत्मज्ञानाने अद्वैतरूप झाल्यानंतरहि आत्मज्ञान प्राप्त होणाऱ्या साक्षीस्थितीचा, कशाचा विरोध नसल्यामुळे, जगताचा भास व त्यापासून होणाऱ्या भीति इत्यादि वृत्तीचा भास प्रारब्धबलाने राहूं शकतो. पण "मन्येऽकुतश्चिद्भयमच्युतस्य पादाम्बुजोपासनमत्र नित्यम्। उद्विग्नबुद्धेरसदात्मभावाद्विश्वासत्मना यत्र निवर्तते भी:" (भाग. स्कं. ११-२-३३)

भगवंताच्या चरणाचें सेवन हें संपूर्ण भयाचे निःशेष नाश करणारें असतें व देह, इंद्रियें, मन, बुद्धि व त्यांचे व्यापार सर्व भगवंतालाच समर्पण होत असतात; म्हणून भगवद्भक्तांना केव्हाहि भीतीची शंकाच येत नाही. ते अखंड निर्भय असतात व जेथे जेथे धैर्याचा प्रसंग असेल ''त्रिविध मुख्य आघवे। उपद्रवाचे मेळावे। वरिपडिलिया नव्हे। वांकडा जो'' (ज्ञाने. अ. १३-३४४) त्या प्रसंगाला न भितां, त्या संपूर्ण धैर्यमंडपाचें स्तंभ म्हणजे आधार म्हणून राहतात. ''तुका म्हणे आम्हां भय कासयाचें। मारूं ब्रह्मयाचे तोंडावरी.''

आनंदसमुद्रीं कुंभ चुबुकळोनि भरले—सुखाची जाणीव होंणें याला भोक्तृत्व म्हणतात. ही जाणीव उत्पन्न होण्यापूर्वी केवळ सुखरूप स्थिति असते. या स्थितीत कांही जाणले जात नाही. यालाच ब्रह्मसुख म्हणतात. ''तें वेगळेपणें भोगिजे। जैसें पक्षियें फळ चुंबिजे। तैसें नव्हे विसरिजे। भोगितेपणहि''॥ १३१ ॥ (ज्ञाने. अ. ५) असें माऊलींनीच ब्रह्मसुखाचें लक्षण केलें आहे. असें हें ब्रह्मसुख, जीवाला निर्विकल्पसमाधींत मिळतें.

प्रेमाने जाणीव नाहीशी होते, म्हणून भक्त जाणीवरहित अशा अखंड सुखांत असतो. ''प्रेमाची जाति ऐसी। आठवो नेदी आठवणेसी'' ६८७ (ए. भा. अ. ११) म्हणून भक्त सुखाचा अनुभव घेत नाही. अखंड सुखस्वरूपच असतो.

जयां भक्तीची येतुली प्राप्ती। जे कैवल्यातें परौतें सर म्हणती। जयांचिये लीलेमाजीं नीति। जियाली दिसे॥ १९२॥

अर्थ—त्यांना सगुण भगवंताचें इतके प्रेम लागलेलें असतें. की मोक्षसुखहि त्यांना तुच्छ वाटतें. त्यांच्या प्रयोजनरहित प्रवृत्तीमध्ये देखील धर्म जीवंत राहतो—म्हणजे त्यांचें सहज वागणें देखील धर्माला सोडून नसतें. ॥ १९२ ॥

गूढार्थदीपिका—जया भक्तीची येतुली प्राप्ती। जे कैवल्यातें परतें सर म्हणती—पूर्ण पुरुषाला भगवंताच्या सगुणस्वरूपाचा ठिकाणीं इतकें प्रेम असतें की त्या प्रेमापुढें त्यांना निर्गुण स्वरूपाच्या ठिकाणीं ज्ञानाने प्राप्त होणारी कैवल्यस्थिति—म्हणजे माझ्या ज्ञानस्वरूपावांचून दुसरें यत्किंचित्हि कांही नाही, अशी अद्वैताची जाणीव-तुच्छ वाटते. ''इतर मी सांगूं काई। मोक्षसुखाच्या ठायीं। त्या सुखाची गोडी नाहीं। धन्य पाही हरिभक्त॥२०३॥ (ए. भा. अ. १४) असा त्यांचा स्वतःचा अनुभव असतो ''ज्ञान सांगतां अति सुगम। भक्तिरहस्य गुह्य परम। अकृत्रिम उपजे प्रेम। ऐसें हें वर्म लाविल्या न लगे॥२४२॥'' (ए. भा. अ. १४) ''सगुण सुरूप समर्थ भर्ता। निघोन गेलियां तत्त्वतां। त्यालागीं तळमळी जैसी कांता॥ तैशी कळवळतां जैं उठी। त्या नांव गा माझी भक्ति''॥२४८॥ (ए. भा. अ. १४) आत्मज्ञानरूप भक्तिप्रेमाच्या दृष्टीने ब्रह्मज्ञानप्राप्ति सोपी आहे. साधनचतुष्टयसंपत्तीने ज्ञान प्राप्त होऊं शकतें, पण भक्ति म्हणजे सगुणभगवंताकडे प्रेम लावण्याचा प्रयत्न नव्हे. आपल्या आत्मस्वरूपाचे ठिकाणीं सर्व जीवांना जसें साहजिक प्रेम आहे तसे साहजिक प्रेम रामकृष्णादिकांचे ठिकाणीं लागणें ही भक्ति होय. हेंच खरें भक्तीचें स्वरूप आहे. हें लावण्याने लागत नाही. असें प्रेम ''मुख्यतस्तु महत्कृपयैव'' संताच्या कृपेने किंवा भगवंताच्या कृपेनेच प्राप्त होतें.

जयाचिये लीलेमाजि नीती। जियाली दिसे—लीला म्हणजे क्रीडाविहारादिकांचे ठिकाणीं असलेली निष्ठायोजन किंवा सहज प्रवृत्ति होय.

ज्ञानभक्ति प्राप्त होण्याकरिता धर्मरूप भगवदाज्ञेचें जें निष्ठेने पालन केलें जातें तेंच आंगवळणी पडून ज्ञानभक्ति प्राप्त झाल्यावरहि तें भक्ताच्या ठिकाणीं निष्प्रयोजन किंवा सहजच चालूं राहतें. अशा त्यांच्या लीलाप्रवृत्तींत ''तुका म्हणे आतां। उरलो उपकारापुरता'' इतर अज्ञानी जीवांना सर्वच कल्याणाचा मार्ग सांपडतो. म्हणून त्यांची लीलाप्रवृत्ति नीतीला किंवा धर्माला जीवदान देणारी होते ''सहज बोलणें हित उपदेश। करूनि सायास शिकविती''

जे आघवांचि करणीं। लेइले शांतीचीं लेणीं। जयांचें चित्त गवसणी। व्यापका मज॥ १९३॥

अर्थ—त्यांच्या इंद्रियांच्या होणाऱ्या व्यापारांतून, विषयभोगाची इच्छा निःशेष नाहीशी झालेली असते, म्हणूनच मी व्यापक आहे, तरी त्यांचे चित्त मला संपूर्ण सांठवूं शकते. ॥ १९३ ॥

गूढार्थदीपिका—जे आघवाचि करणीं। लेइले शांतीचीं लेणीं—''इंद्रियें कोंडितां न कोंडिती। विषय सांडितां

न सांडिती। पुढतपुढती बाधूं येती। यालागीं भक्ति द्योतिली वेदें"॥ २९३॥ (ए. भा. अ. २) इंद्रियांना विषयापासून कितीकहि आवरले तरी तीं आवरलीं जात नाहीत व मन विषयरहित होत नाही; पण "भक्त भगवंतीं अर्पिती। तेणें ते होती नित्यमुक्त"॥ २९६॥ (ए. भा. अ. २) तींच सगुण भगवंतांच्या भक्तींत लांविलीं असतां "विषयीं विसर पडिला नि:शेष। अंगीं ब्रह्मरस ठसावला" भक्तीने अंत:करणांत ब्रह्मसुख सांठविलें जाऊन इंद्रियांना विषयांचा नि:शेष विसर पडतो. असा विषयांचा विसर पडणें हेंच इंद्रियांना शांतीचें लेणें आहे.

जयाचें चित्त गवसणी। व्यापका मज—सर्व नामरूपांचा संबंध घेंऊन परमेश्वराला व्यापक व विवक्षित नामरूपाचा संबंध घेऊन त्याला एकदेशीय म्हटले जाते. पण हीं दोन्हीं रूपें परस्परांहून भिन्न नसतात. सर्वनामरूपाने व्यापक असलेलें रूपच भक्ताच्या नि:सीमप्रेमाने त्याच्या हृदयांत एकदेशीय होऊन संपूर्ण सांठविलें जातें. "दीपकळिका हातीं चढे। तैं घरभरीं प्रकाश सांपडे। माझी मूर्ति जैं ध्यानीं जडे। तैं चैतन्य आतुडे अवघेंचि"॥१४९९॥ (ए. भा. अ. ११) म्हणूनच एकदेशीय सगुणस्वरूपाच्या साक्षात्काराने सर्व व्यापक अनुभव येतो असें नाथांनी म्हटलें आहे.

ऐसे जे महानुभाव। जे दैविये प्रकृतीचें दैव। जे जाणोनियां सर्व। स्वरूप माझें॥ १९४॥

अर्थ—अशा प्रकारचे जे अनुभवी महात्मे असतात ते दैवी प्रकृतींचे साक्षात् दैवी किंवा भाग्य होय. ते माझें सर्व म्हणजे सगुण निर्गुण स्वरूप जाणून.॥ १९४॥

मग वाढतेनि प्रेमें। मातें भजती जे महात्मे। परि दुजेपण मनोधर्में। शिवतलें नाहीं॥ १९५॥

अर्थ—नंतर वाढत्या प्रेमाने माझी भक्ति करतात, पण द्वैतभावना त्यांच्या मनाला शिवत नाही.॥ १९५॥

गूढार्थदीपिका—वाढतेनि प्रेमें—जीव जेवढे काही करतो ते आपल्या सुखाकरिताच करतो "**आत्मानस्तु कामाय सर्वं प्रियं भवति**" (बृ. उ. ४-५-६) दुसऱ्यावर तो जें प्रेम करतो तें देखील आपल्या सुखाकरितांच करतो, म्हणून आपलें आपल्याला अत्यंत प्रेम आहे, असें श्रुतीने सांगितलें आहे. आत्मप्रेम करायचें म्हणून करीत नसतो व प्रेम करतांना मी प्रेम करतों अशी जाणीवहि होत नाही. असे हें आपलें आपल्याला सहज अकृत्रिम प्रेम आहे, अशा या अकृत्रिम प्रेमाला माऊलींनी "वाढतें प्रेम" म्हटलें आहे.

परि दुजेपण मनोधर्में। शिवतलें नाही—या प्रेमांत भक्त व भगवान असें द्वैत दिसत असलें, तरीं द्वैतभेदाचा चित्ताला स्पर्श होत नाही. कारण "द्वैतदशेचे आंगण। अद्वैत ओळगे आपण। भेद तंव तंव दूण। अभेदासी" (अमृ. प्र. ९-२८) भक्तिप्रेमांत नुसता द्वैताचा भासच असतो; पण खरोखर अद्वैतच असतें, असें माऊलींनी म्हटलें आहे.

ऐसें मीच होऊनि पांडवा। करिती माझी सेवा। परि नवलावो तो सांगावा। असे आइक॥ १९६॥

अर्थ—अर्जुना! अशा रीतीने ते माझ्याशीं ऐक्य पावून माझ्या सगुण स्वरूपाची सेवा करतात. ते सेवेंचें कौतुक सांगण्याजोगे आहे, तें ऐक.॥ १९६॥

गूढार्थदीपिका—समुद्रास मिळालेली नदी समुद्रांत मिळतच राहते, त्याप्रमाणे "शिवो भूत्वा शिवं यजेत्" भक्तहि परमेश्वराशी ज्ञानाने ऐक्य पावून सगुणपरमेश्वराची स्वाभाविक प्रेमभक्ति करीतच राहतो.

अवतरणिका—मागें तिसऱ्या अध्यायांत परमेश्वरप्राप्तीचा मार्ग म्हणून जो मर्यादित कर्मयोग सांगितला आहे, त्याचें वर्णन केलें गेलेंच आहे. त्या कर्मयोगाचें फळ म्हणजे क्रमाने परमेश्वराशीं ऐक्य पावणें हें आहे, महाभारतांतील नारायणीय धर्मांतील ३४४ व्या अध्यायांत त्याचें वर्णन आलें आहे तें असें—

निष्काम चित्ताने परमेश्वरप्रीत्यर्थ केवळ देवपित्र्यकर्माचे द्वारा इंद्रादिकदेवतांचें व पितरांचें यजन करणारा कर्मयोगी, पुण्यपापरहित शुद्धचित्त असा होऊन आदित्यांत मिळतो. तेथून क्रमाने अनिरुद्ध. प्रद्युम्न यांच्यात मिळून पुढे सांख्ययोगी म्हणजे ज्ञानसंपन्न होतो व शेवटीं त्रिगुणरहित होऊन निर्गुण क्षेत्रज्ञ परमात्म्यांत मिळतो. अशारीतीने हा कर्मयोग ज्ञानप्राप्तींत समाप्त होतो, असे सांगितलें आहे. पण

"भक्त्या संपूजयन्त्याशु गतिं चैषां ददाति सः। ये तु तद्भाविता लोके ह्येकान्तित्वं समास्थिताः॥

एतदभ्यधिकं तेषां यत् ते तं प्रविशन्त्युतं॥ ४४॥ (महाभारत शां. प. अ. ३३४)

शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें रामकृष्णादिकांना कारणब्रह्म म्हणजे पूर्णब्रह्म जाणून त्यांची जे एकनिष्ठ प्रेमभक्ति करतात त्याने क्रमाने मुक्त पावणाऱ्या कर्मयोग्यापेक्षां विशेष गति प्राप्त होते, असें सांगितलें आहे. ती विशेष गति म्हणजे "चतुर्थ्यां चैव ते गत्यां गच्छन्ति पुरुषोत्तमम्। एकान्तिनस्तु पुरुषा गच्छन्ति परम पदम्॥ ३॥ (म. भा. शां. प. अ. ३४८)", "नूनं एकान्तधर्मोऽयं श्रेष्ठो नारायणप्रियः। अगत्वा गतयस्तिस्त्रो यद्गच्छत्यव्ययं हरिम्"॥ ४॥ या श्लोकांत सांगितल्याप्रमाणे एकान्तभक्त, क्रमाने मुक्तीला न जातां, साक्षान्मुक्तीला जातो.

म्हणूनच "सम्मितः सामवेदेन पुरैवादि युगे कृतः। धार्यते स्वयमीशेन राजन् नारायणेन च"॥ १०॥ या श्लोकांत सामवेदांतील 'तत्त्वमसि' महावाक्याच्या विचाराने जसा ज्ञानी साक्षात्मुक्तीला जातो, तसाच एकान्तभक्तहि साक्षात्मुक्तीला जातो. म्हणजे ज्ञानमार्गाच्या बरोबरीचा एकान्तधर्म आहे, असें महाभारतकारांनी म्हटलें आहे.

गीतेंतहि हेंच तत्व मान्य केलें असून भगवंतांनी अर्जुनाला या एकान्तभक्तिधर्माचाच कटाक्षाने उपदेश केला आहे.

एकान्तधर्माचे, (१) भगवंताचें सतत नामस्मरण व कीर्तन करणें (२) सर्वाभूतीं भगवद्भाव ठेवून नमन करणें (३) सगुण भगवंताचे ठिकाणीं समाधि लावणें व (४) सर्व लौकिक व अलौकिक कर्म भगवंताला समर्पण करणें, असे हे जे चार प्रकार कर्मयोगापेक्षा किंवा ज्ञानयोगापेक्षा विशेष आहेत ते आतां भगवान पुढील श्लोकांतून सांगत आहेत.

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः। नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते॥ १४॥

अर्थ—माझे एकान्तभक्त अहोरात्र माझें नामस्मरण करतात व माझ्या लीला गातात. दृढनिश्चयपूर्वक शमदमादि साधनाने इंद्रियनिग्रह व मनोनिग्रह करतात आणि प्रेमाने सर्वत्र मला अखंड नमस्कार करतात. याप्रमाणे माझें ठिकाणीं अखंड चित्तवृत्ति ठेवून माझी उपासना करतात. ॥ १४॥

गूढार्थदीपिका—या एकान्तभक्तीमध्ये परमेश्वराचें सतत नामस्मरण व कीर्तन केलें जातें हा पहिला विशेष भगवान सांगत आहेत.

तरी कीर्तनाचेनि नटनाचें। नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे। जे नामचि नाहीं पापाचें। ऐसें केलें॥ १९७॥

अर्थ—भगवंताचें अखंड नामस्मरण, कथाश्रवण, कीर्तन व भगवंताच्या लीलांचें अनुकरण यांच्या योगाने पापांचें नांवच नाहीसे केल्यामुळे सर्व कर्मरूप प्रायश्चित्तांचे पापनाशनादि व्यापार बंद पाडले. ॥१९७॥

गूढार्थदीपिका—मनुष्याकडून जीं पापकर्में होतात त्या पापकर्मांनी मनुष्याला इहपरलोकांत दुःख प्राप्त होतें व त्या पापानेच भगवत्प्राप्तींतहि प्रतिबंध वाढत जातो. पापामुळेंच मनुष्य अधिक देहात्मवादी होत जातो. विषयवासना वाढतात. मनुष्याचें मन अत्यंत चंचल होतें. तें स्थिर होत नाही व बुद्धिमांद्यहि प्राप्त होतें.

मनुष्याला मुळींच दुःख नको असतें. त्याला अखंड सुखाचीच इच्छा असते. तें अखंड सुख नाशिवंत विषयांत मिळूं शकत नाही. एक परमेश्वरच अखंड सुखस्वरूप आहे. अर्थात् सर्व दुःख नाहीसें होऊन परमेश्वर प्राप्ति व्हावी हीच प्रत्येक मनुष्याची अंतःकरणांतील इच्छा असते; पण त्या दिशेने प्रयत्न मात्र महात्मेच करितात.

मनुष्याच्या अनंत जन्मांतील अनंत पातकें असतात व त्या पापाचरणामुळें पापप्रवृत्तिहि दृढ झालेली असते. तितकीं पातकें कर्मरूप प्रायश्चित्ताने नाहीशी होत नाहीत व करतां येणेंहि शक्य नाही.

भगवन्नामस्मरणाने भगवन्नामस्मरणापूर्वीचीं सर्व पातकें नाहीशी होतात असा "नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचें" या चरणाचा अर्थ आहे.

किंबहुना "जेवढी नामाची शक्ति। तेवढें पाप नाही त्रिजगतीं" (ए. भा. अ. २-५५१) "नाम्नोऽस्ति यावती शक्तिः पापनिर्बहरणे हरेः। तावत्कर्तुं न शक्नोति पातकं पातकीजनः" भगवन्नामस्मरणाने नाहीसें होऊं शकत नाही असें पातकच मनुष्य करूं शकत नाही, असा नामाचा महिमा सांगितला आहे. पाप हें तीन प्रकारचें आहे. भगवंताला

विसरणें हें अविद्यारूप मुख्य पाप असून त्यामुळें देहात्मवादी होणें हें दुसरें पाप आहे ''बळें देह मी म्हणतां। कोटी ब्रह्महत्या माथां'' (तु. गा.) व भगवंताच्या आज्ञेच्या विरुद्ध वागणें हे तिसरें पाप होय.

ज्याप्रमाणे पायांत जोडा न घालतां किंवा पाय अग्नीने भाजणार नाही अशा औषधि, मणि, मंत्र यांचा उपयोग न करतां अग्नीवर पाय पडल्याबरोबर अग्नीने पाय तात्काळ भाजला जातो, त्याप्रमाणे नामस्मरणाने मागील सर्व पापें जळून भस्म होतात, असें एक भगवन्नामच समर्थ आहे. हें नामस्मरण सारखें करीत राहिल्यास पापप्रवृत्ति नष्ट होऊन पापाचा नामधारकाला स्पर्शच होत नाही. अशा नामधारकाला कर्मरूप प्रायश्चित्ताचा उपयोग करण्याचें कामच पडत नाही. त्याच्या दृष्टीने सर्वकर्मरूप प्रायश्चित्तें निरुपयोगी होऊन पडलीं राहतात.

येथून संपूर्ण नाममाहात्म्य जें सांगितलें आहे तें अखंड नामस्मरण करणाऱ्या निरपराध नामधारकाविषयीं सांगितले आहे असें समजावें.

पाय ठेवल्याबरोबर तात्काळ पाय जाळणें हा अग्नीचा स्वभाव असला तरी ज्याप्रमाणे, जोडा, औषधि इत्यादि कांही पदार्थ असे आहेत की ते अग्नीच्या तात्काळ जाळण्याला प्रतिबंध करतात त्याप्रमाणे नाम घेतल्याबरोबर तात्काळ पाप जाळणे हा हरिनामाग्नीचा स्वभाव असला तरी कांही पापें अशीं आहेत की तीं हरिनामाने तात्काळ जळत नाहीत. तीं नाहीशी होण्यास कांही काळ लागतो. अशा पापांना नामापराध ही संज्ञा आहे.

निरपराध नामधारक व सापराध नामधारक असा दोन प्रकारचा नामधारक असतो.

नामाचें माहात्म्य समजल्यानंतर, नामाचे जे अपराध सांगितले आहेत. ते न होऊं देतां, नामस्मरण करणारा निरपराध नामधारक होय. त्या अखंड नामस्मरण करणाऱ्या निरपराध नामधारकाला या ओव्यांतून सांगितलेलें भगवन्नामस्मरणाचें पूर्ण फल शीघ्र प्राप्त होतें. नामाचे अपराध करून नामस्मरण केलें असतां नामस्मरण सापराध होतें, व जें न केलें असतां नामस्मरण निरपराध होते ते खालीलप्रमाणे आहेत.

सन्निंदाऽसति नामवैभवकथा श्रीशेषयोर्भेदधीः। अश्रद्धा श्रुतिशास्त्रदेशिकगिरां नाम्न्यर्थवादभ्रमः॥

नामास्तीति निषिद्धवृत्ति विहितत्यागो हि धर्मान्तरैः। साम्यं नाम्नि जपे शिवस्य च हरेर्नामापराधा दश॥ (पद्मपुराण)

(१) **सन्निंदा**—म्हणजे संताची निंदा. सगुण भगवंतावर व भगवन्नामस्मरणावर ज्यांची श्रद्धा किंवा प्रेम नाही असे अत्यंत धार्मिक असले, तरी त्यांची ''विप्राद्द्विषड्गुणयुतादरविंदनाभपादारविंद विमुखाच्छ्वपचं वरिष्ठम्। मन्ये तदर्पितमनोवचनेहितार्थप्राण पुनाति सकुलं न तु भूरिमानः''॥ १०॥ (भाग. स्कं. ७-९) इत्यादि श्लोकांत शास्त्रांनीच निंदा केली असल्यामुळे तेथे अशा पुरुषांची निंदा म्हणजे सन्निदा मानली गेली नाही, तर भगवन्नामावर अत्यंत श्रद्धा ठेवून अखंड निरपराध नामस्मरण करणाऱ्या भक्तांची निंदा ती सन्निदा येथे अभिप्रेत आहे. अशा नामधारकाची निंदा करणें हा नामापराध होतो. ''संतनिंदा ज्याचे घरीं। नव्हे घर ते यमपुरी'' ''संत निंदा आवडे ज्यासी। तो जिताचि नर्कवासी'' (तु. गा. २७९३)

(२) **असति नामवैभवकथा**—म्हणजे दुष्ट पुरुषाला नामाचा महिमा सांगणें.

येथे दुष्ट म्हणजे निषिद्धाचरण करून भगवंताचें नामस्मरण न करणारा व सन्मार्गावर येऊं न इच्छिणारा पुरुष होय.

(३) **श्रीशेषयोर्भेदधी**—म्हणजे शिव व विष्णु यांच्यांत भेद पाहणे.

(४) **अश्रद्धाश्रुतिगिराम्**—म्हणजे वेदवचनावर अविश्वास. वेदांत नित्यनैमित्तिककर्माचे महत्व सांगितलें आहे; पण त्या सर्वापेक्षा भगवन्नामस्मरणाचें महत्व अधिक सांगितलें आहे ''**मर्ता अमर्तस्य ते भूरि नाम मनामहे। विप्रासो जातवेदसः**'' (ऋग्वेद मं. ८-व. ३५ अ. २-मु. ११) आम्ही मनुष्य जन्ममरणरहित अशा परमेश्वराचे नांव श्रेष्ठ मानतों असे ऋग्वेदांतहि म्हटलें आहे. नाथांनीहि ''ज्याची श्रद्धा कर्मावरी। तोचि कर्माचा अधिकारी। ज्याची श्रद्धा श्रीधरीं। तो नव्हे अधिकारी कर्माचा॥''॥ १०८७॥ (ए. भा. अ. ११) या ओवींत कर्मप्रतिपादक व

नाममाहात्म्यप्रतिपादक वेदवचनाची अशी व्यवस्था लाविली आहे; म्हणून नाममाहात्म्यवेदवचनावर अविश्वास करणे हा नामाचा अपराध होतो.

(५) **अश्रद्धाशास्त्रगिराम्**—म्हणजे शास्त्रवचनावर अविश्वास करणे. शास्त्र म्हणजे स्मृति, गीता, भागवत, पुराणें, भारत इत्यादि. कर्मप्रतिपादक स्मृतींच्या आग्रहाने, नाममाहात्म्याचें प्रतिपादन करणाऱ्या गीता, स्मृति, भागवत इत्यादि शास्त्रवचनावर अविश्वास करणें हा नामापराध होतो.

(६) **अश्रद्धा देशिकगिराम्**—म्हणजे गुरुवचनावर अविश्वास हा महत् अपराध आहे. येथे गुरु या शब्दाने भगवंताच्या स्वरूपाचें पूर्ण ज्ञान असून त्याचें अत्यंत आवडीने नामस्मरण करणारा भक्त घेतला पाहिजे. "जो शब्दज्ञानें पारंगतु। ब्रह्मानंदे सदा डुल्लतु। शिष्य प्रबोधनीं समर्थु। यथोचितु निजभावे"॥ २९८॥ (ए. भा. अ. ३) असें नाथांनी श्रीगुरुचें लक्षण केलें आहे.

(७) **नाम्न्यर्थवादभ्रमः**—भगवंताचे नाममाहात्म्य अर्थवादरूप आहे म्हणजे केवळ तें स्तुतिरूप आहे, खरे नाही असा भ्रम होणें हाहि अपराध आहे. "**अर्थवादं हरेर्नाम्नि संभावयति यो नरः। स पापिष्ठो मनुष्याणां नरके पतति स्फुटम्**" (कात्यायन संहिता) नामाचें माहात्म्य अर्थवादरूप आहे असें जो म्हणणारा आहे तो सर्वांत अत्यंत पापी होय. त्याला नरकाची प्राप्ति होते, असे शास्त्रवचन आहे. "नामें तरला नाहीं कोण। ऐसा द्यावा निवडोन" "नामरूपा नाही मेळ। अवघा वाचेचा गोंधळ" अशी संतांची परस्पर विरुद्ध वचनें आहेत, म्हणून कित्येक लोक नामाचें माहात्म्य अर्थवादरूप आहे, असें म्हणतात; परंतु अशा वचनांनी सापराधनामधारकापेक्षा निरपराध नामधारकाची श्रेष्ठता सांगितली आहे, तर कोठें सगुण परमेश्वराचें भक्तिप्रेम प्रगट होण्याकरितां नामस्मरणाबरोबर परमेश्वराच्या रूपाचें ध्यान होईल अशा एकाग्र चित्ताने नामस्मरण केलें पाहिजे हे सांगितलें आहे.

(८) **नामास्तौति निषिद्धवृत्तिः**—म्हणजे नामाच्या बळावर निषिद्धाचरण करणें. हाहि एक अपराध आहे. पण "देव जोडें तरी करावा अधर्म" (तु. गा.) "ईश्वरार्थधिया पापान्यऽपि सुव्रताः। भवन्ति पूतान्यत्यन्तसत्यमेव न संशयः" (सू. सं.) अशी संतांची व शास्त्राची प्रमाणवचनें असून भगवंताप्रीत्यर्थ व संताप्रीत्यर्थ चौर्यादि निषिद्धकर्मे करून पुरुष उद्धरल्याचीं उदाहरणें असल्यामुळे, केवळ परमेश्वरासाठीच केलेलें निषिद्धाचरण नामापराध होत नाही.

अर्थात् भगवत्प्रीत्यर्थ नसलेलें व आपली स्वैर विषयवासना तृप्त करण्याकरिता केलेलें निषिद्धाचरणच नामापराध होतो.

(९) **विहितत्यागो धर्मान्तरैः**—म्हणजे दुसऱ्याच्या धर्माचें आचरण करून आपल्या धर्माचा त्याग करणें.

आपल्या विहित आचरणाने परमेश्वराचें पूजन करावें असा भागवतधर्मांत विधि असल्यामुळे आपल्या विहिताचरणाचा त्याग करून दुसऱ्या धर्मांचें आचरण करणें हाहि एक नामापराध आहे. पण कर्मकालीं भगवत्कथा श्रवण करीत असतां अथवा स्वतः कीर्तन करीत असतां किंवा नामस्मरण करीत असतां कर्माचा लोप झाला तर नामापराध होत नाही. कारण "मत्कर्म कुर्वतां पुंसां कर्मलोपो भवेद्यदि तत्कर्म तेषां कुर्वन्ति तिस्रः कोट्यो महर्षयः"॥ ९॥ (भाग. स्कं. ११-२०) असें भागवतांत स्पष्ट म्हटलें आहे. पण एखादे वेळीं होत असलेल्या नामस्मरणाच्या बळावर आपल्याला विहित असलेला धर्म सोडून, आपल्याला विहित नसलेल्या धर्माचें आचरण करणें हा नामापराध आहे.

(१०) **साम्यं नाम्नि शिवस्य च हरेः**—म्हणजे शिव-विष्णु यांच्या नामाशीं इतर इंद्रादि देवतांच्या नामांचें साम्य पाहणें. हा नामापराध होय; पण राधाकृष्ण, विठ्ठल-रुक्मिणी, उमाशिव, सद्गुरु-रामकृष्ण या नामांचें साम्य मानण्यांत नामापराध होत नाही, तर इंद्रादिक जीव कोटींत असल्यामुळे त्यांचीं नामें शिवाच्या नामाप्रमाणेच समान समजणें हा नामापराध होतो, असे हे नामापराध नामस्मरणाने तात्काळ नाहीसे होत नसलें तरीं ते अखंड नामस्मरणानेच नाहीसे होतात असे पुढील श्लोकावरून स्पष्ट आहे.

"नामापराधयुक्तानां नामान्येव हरंत्यघम्। अविश्रांतिप्रयुक्तानि तान्येवार्थकराणि यत्"॥ २१॥ (प. पु. ब्रं. खं. अ. २५)

म्हणून भगवत्प्रेमाने अखंड नामस्मरण करणाऱ्यांना दुसऱ्या कर्मरूप प्रायश्चित्ताची आवश्यकता नाही, असें पद्मपुराणांत सांगितलें आहे.

''कीर्तनाचेनि नटनाचें'' या चरणाने अविश्रांत नामस्मरण करावें असें सांगितलें आहे व ''नांवचि नाही पापाचें'' या चरणाने अखंड नामस्मरण करणाऱ्याची पापप्रवृत्ति नाहीशी होते, असें सांगितलें आहे.

यमदमा अवकळा आणिली। तीर्थे ठायावरूनि उठविलीं। यमलोकींची खुंटिली। राहाटी आघवी॥ १९८॥

अर्थ—यमदमांना म्हणजे मनोनिग्रह व इंद्रियनिग्रह यांनाहि नामस्मरणाने अवकळा आणली म्हणजे यमदम या साधनांना निरुपयोगिता आणली. तीर्थरूप प्रायश्चित्तेंहि आपलें ठिकाण सोडून भटकत फिरूं लागतात यमलोकांतील सर्व राहाटीच बंद पडते—म्हणजे पाप्याचें यमलोकांत जाणें व तेथून येणें हें बंद पडते.॥ १९८॥

गूढार्थदीपिका—यमदमा अवकळा आणिली—यम म्हणजे मनाला विषयांच्या ध्यासापासून आवरणें. अखंड नामस्मरण होणाऱ्या भगवंताच्या ध्यानाने ''पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं। जागृतीं स्वप्नीं पांडुरंग'' (तु. गा.) मन विषयाकार होत नाही. अशा रीतीने भक्तांना यम साधतो आणि ''पडले वळण इंद्रियां सकळा। भाव तो निराळा नाही दुजा'' भगवंताच्या ध्यानामुळे भक्ताची इंद्रियेहि मनाबरोबर विषयाला सोडून भगवत्परायण होतात—म्हणजे सर्व इंद्रियें भगवत्सेवेंत लागतात. अशा रीतीने नामधारकाला अनायासें दम साधतो.

नाम घेतां वाचे इंद्रियां विस्मृती। या नांव बोलतो यम भक्त॥ ४६॥

नामामध्ये एक वाणीचि गुंतत। इंद्रियेंहि होत आधीन की॥ ४८॥ (श्रीगुलाबराव महाराज कृत अभंगगाथा-नामपर) असा माझ्या श्रीगुरुआईंनीहि आपला अनुभव सांगितला आहे.

तीर्थे ठायावरूनि उठविलीं—तीर्थे हीं पापक्षालन करणारीं आहेत असें शास्त्रांतून सांगितलें आहे. परंतु भगवन्नामाचें पापक्षालनसामर्थ्य एवढें थोर आहे की अखंड नामस्मरण करणाऱ्याला तीर्थरूप प्रायश्चित्तें आचरण्याची आवश्यकताच राहत नाही. किंवा ''पुण्य पर्वकाळ तीर्थे हीं सकळ। कथा सिंधुजळ न्हाऊं येती'', ''कथा त्रिवेणी संगम। देवभक्त आणि नाम'' या तुकाराम महाराजांच्या वचनाप्रमाणे सर्व तीर्थांत त्रिवेणीसंगम जसें श्रेष्ठ तीर्थ त्याप्रमाणे भगवत्कथा हेंहि त्रिवेणीसंगमरूप तीर्थ आहे. या तीर्थांत अखंड स्नान करणाऱ्यांना सर्व तीर्थांचें स्नान होत असल्यामुळे कोठे तीर्थाला जावें लागत नाही.

यमलोकींची खुंटिली। राहाटी आघवीं—यमलोक म्हणजे, पापीलोक आपल्या पापाचें ज्या लोकांत फळं भोगतात तो लोक होय. पापी त्या लोकांत जाऊन पापभोग भोगतात. शेषपापाने मृत्युलोकांत येऊन दु:ख भोगतात. ही अशी राहाटी अखंड चालू असतें. पण अखंड नामस्मरणाने अनेक जन्मांतील नि:शेष पापाची धुणी होत असल्यामुळे ही राहाटी संपूर्ण बंद पडते.

यमु म्हणे काय यमावें। दमु म्हणे कवणातें दमावें। तीर्थे म्हणती काय खावें। दोष ओखदासि नाहीं॥ १९९॥

अर्थ—यम म्हणतो मी कोण्या मनाचा निग्रह करावा? दम म्हणतो मी कोण्या इंद्रियाला आवरूं? तीर्थे म्हणतात औषधाला देखील पाप मिळत नाही तेथे मी कोणतें पाप नाहिसे करूं?॥ १९९॥

गूढार्थदीपिका—या ओवींत नामस्मरणाने यम, दम व तीर्थे यांचा नामधारकाला आश्रय करावा लागत नाही, हें सांगितलें आहे.

ऐसे माझेनि नामघोषें। नाहीं करिती विश्वाचीं दु:खें। अवघें जगचि महासुखें। दुमदुमित भरलें॥ २००॥

अर्थ—याप्रमाणे अर्जुना! माझ्या नामाचा घोष करीत असतांना नामधारक आपलेच नाही, तर सर्व जगाला भगवंताचें नाम ऐकवून सर्व जगाचें दु:ख नाहीसे करतो व अशारीतीने संपूर्ण जग ब्रह्मसुखाने दुमदुमित करून सोडतो.॥ २००॥

गूढार्थदीपिका—आतापर्यंत नामधारक कसा निष्पाप होतो. हें सांगितलें. या ओवींत नामधारकाकडून भगवत्प्रेमामुळे होणाऱ्या नामघोषाने चेतन अचेतन श्रोते देखील पावन होतात. असें सांगत आहेत.

माझेनि नामघोषें—उपांशु व घोष असे दोन प्रकारचें नामस्मरण आहे. आपल्यालाच ऐकूं येईल असे हळू नामस्मरण करणें याला उपांशु नामस्मरण म्हणतात आणि कोणालाहि ऐकू जाईल असें मोठ्याने नामस्मरण करणें याला नामघोष म्हणतात.

नाहींचि करिती विश्वाचीं दुःखें। अवघें जगचि महासुखे। दुमदुमित भरलें—नामधारक नामघोष करीत असतांना तो नामघोष ज्या ज्या जडचेतन जीवांच्या कानीं पडतो. त्या त्या सर्व जीवांचें पाप नाहीसें होते असा नामाचा-महिमा आहे.

नामघोष करणारे नामधारक अशा रींतीने विश्वांतील सर्व जीवांची पापें नाहीशीं करून त्यांचीं दुःखेंहि नाहीशीं करतात व सर्वांना महासुखाचा म्हणजे परमेश्वरसुखाचा लाभ करून देतात.

"रामकृष्णनाम सर्व दोषां हरण। जडजीवा तारण हरि एक" (ज्ञाने. हरिपाठ अभंग-२१) असें श्रीज्ञानेश्वर माऊलीनी हरिपाठाचे अभंगांत म्हटलें आहे.

"**तद्भूरिभाग्यमिहजन्मकिमप्यटव्यायद्गोकुळेऽपिकतमांघ्रिरजोभिषेकम्**" (भाग, स्कं. १०-१४-३४)

वृन्दावनांतील ज्या वृक्षपाषाणांना गोपगोपीसारख्या महात्म्यांच्या रजधुळीचा लाभ घेऊन त्यांच्या संगतींत भगवन्नाम श्रवण करायला मिळतें. त्या वृक्षापाषाणादि योनींत माझा जन्म व्हावा अशी ब्रह्मदेवाने इच्छा प्रगट केली व असा जन्म प्राप्त होणे थोर भाग्य होय असे त्यांनी उद्गार काढले. यावरून वृक्षपाषाणादि योनींत असलेलेहि भगवन्नामश्रवणाने तरतात असा महात्म्यांचा अनुभव आहे.

ते पाहांटेवीण पाहावित। अमृतेंवीण जीववित। योगेंवीण दावित। कैवल्य डोळां॥ २०१॥

अर्थ—असे नामधारक महात्मे सूर्यप्रकाशावांचून पाहावयाला लावतात, अमृतावांचून अमर करतात आणि योगावांचून डोळ्याने देखील मोक्षस्थिति दाखवितात. ॥ २०१ ॥

गूढार्थदीपिका—पाहाटेविण पाहावित—नामरूपात्मक जगत् आहे अशी ज्याची कल्पना आहे, तो तें जगत् सूर्यप्रकाश व चक्षुरिंद्रियरूपदृष्टि यांच्या साहाय्याने पाहत असतो. पण ही दृष्टि परमेश्वर पाहण्याला उपयोगी पडत नाही. परमेश्वर पाहण्याकरितां ज्ञानदृष्टिच उपयोगी पडत असते. भगवंताच्या निरपराध व अखंड नामस्मरणाच्या योगाने नामधारकाला सर्व सृष्टिच भगवत्स्वरूप भासू लागते. म्हणून त्यांना भौतिकदृष्टीचा व सूर्यप्रकाशाचा उपयोगच करावा लागत नाही. अखंड त्यांची ज्ञानदृष्टिच असते आणि ते ज्यांच्यावर कृपा करतील त्यांना ते अखंड ज्ञानदृष्टिच प्राप्त करून देतात.

अमृतेविण जीववित—म्हणजे ज्ञानीभक्त सदेह भगवंतासारखें अमर होतात—म्हणजे नित्य असतात.

सच्चिदानंदस्वरूप आत्मा हा मूळचाच अविनाशी आहे. तसेच देहादिक पदार्थहि, आपण आपल्या कल्पनारूप मायेमुळें जडविनाशी व परब्रह्माहून निराळें आहेत, असें समजत असलो, तरी ते अन्वयदृष्टीनें पाहतां मूळात परब्रह्माहून निराळी वस्तु नसून परब्रह्म सच्चिदानंद वस्तुच आहे, असें सिद्ध होतें.

योगी किंवा ज्ञानी, यांना देहादिक अविद्याजन्य पांचभौतिक आहेत व ते नाश पावतात असा भास कायम राहत असला, तरी भक्तांना मात्र ते पूर्ण ब्रह्मस्वरूपच आहेत असा अनुभव असतो. या अनुभवामुळें भक्तांना परब्रह्माहून कांही निराळी नाश पावणारी वस्तु आहे असा अनुभवच नसतो, म्हणूनच त्यांचे देहहि त्यांना अविनाशी ब्रह्मरूपच भासतात. "कामास्तु वांछितास्तस्य गावो गोपाश्च गोपिकाः। नित्याः सर्वे विहाराद्या आप्तकामस्तु तत्वयम्" (स्कं. पु.) परमेश्वर, परमेश्वराची इच्छा, व परमेश्वराचे इच्छित गायी, गोपी, गोपाळ हे सर्व अविद्येच्या पलीकडे असल्यामुळे सच्चिदानंदस्वरूप व नित्य आहेत, असें स्कंदपुराणांत सांगितलें आहे.

ज्ञानीभक्त अशा महानुभवी श्रीज्ञानेश्वर महाराज, तुकारामादि संतांचीं शरीरें नित्य असतात, म्हणून रामकृष्णादि सगुण विग्रहाचा जसा केव्हाहि साक्षात्कार होऊं शकतो तशा प्रमाणेच त्यांचाहि साक्षात्कार भक्तांना होत असतो. "ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं। भाग्य तरी ऋणी देवा ऐसा" (तु. गा.) भगवद्भक्तीने देहहि ब्रह्मभूत होतो असें तुकाराम महाराजांनी म्हटलें आहे.

योगेविण दावित। कैवल्य डोळां—नामधारक संताना भगवन्नामस्मरणानेच, योगाने येणारा अनुभव, योगावांचून येतो आणि नामस्मरणानेच त्रिगुणात्मक मायेचीं निवृत्ति होऊन सर्वनामरूपांत ब्रह्मच आहे असा योग्यांना न येणारा अनुभव देखील नामधारक आपल्या डोळ्यांनी घेतो व दुसऱ्यांना आणून देतो. या व पुढील ओवींत संत हे सदा पूर्ण अविनाशी व सर्व समर्थ असतात, असें माऊली सांगत आहे. "ब्रह्म इंद्रियां गोचर नसे। गुण गेलिया डोळा दिसे", "तेव्हां अंतरीं चैतन्यघन। बाह्य चिन्मात्र परिपूर्ण" असा नाथादि संतांनीहि आपला अनुभव सांगितला आहे.

परि राया रंका पाड धरूं। नेणती सानेयां थोरां कडसणी करूं। एकसरें आनंदाचें आवारू । होत जगा॥ २०२॥

अर्थ—हा राजा आहे की दारिद्री आहे असा योग्यायोग्यतेचा ते विचार करीत नाहीत. थोर व लहान असा भेद ते करीत नाहीत. सतत सर्व जगाला ते आनंदाचे कसूं होतात. ॥ २०२॥

गूढार्थदीपिका—राया रंका पाड धरूं—भगवंताच्या नामस्मरणाने भगवंताचे ठिकाणीं परमप्रेमसंपन्न झालेल्या संतांना सर्वत्र अद्वैतब्रह्माचाच अनुभव असल्यामुळे त्यांना राव-रंक, थोर-सान हा भेदच दिसत नाही व "सकळांसी येथे आहे अधिकार" (तु. गा. २२०९) नामस्मरणादि भक्तिमार्गाचा सर्वांनाच अधिकार असल्यामुळे त्या मार्गाचाच ते उपदेश करतात.

एकसरें आनंदाचें आवारू। होत जगा—ज्याप्रमाणे एखादी भाग्यवंत मुलगी एखाद्या लक्ष्मीपुत्राचे घरी दिली गेली असतां ती आपल्याला झालेली मुलगीहि आपल्याप्रमाणेच अत्यंत श्रीमंताकडे पडावी अशीच इच्छा करते, त्याप्रमाणे भगवद्भक्तीने अखंड ब्रह्मानंदात लोळत असलेल्या सत्पुरुषांनाहि संसारांत होरपळत असलेल्या इतर जीवांनाहि ती आपली स्थिति प्राप्त व्हावी अशी अत्यंत कळकळ असते व त्या कळकळीने ते प्रेरित होऊन ते सर्वांना अखंड नामस्मरणरूप ब्रह्मसुख प्राप्तीच्या भक्तिरूप मार्गाचाच उपदेश करतात; म्हणून ते सर्व जगाचे आनंदाचे कसूं होतात. अशा सत्पुरुषापासून कोणाला कधीं दुःख प्राप्त होत नाही.

कहीं एकाधेनि वैकुंठा जावें। तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें। ऐसें नामघोषगौरवें। धवळले विश्व॥ २०३॥

अर्थ—एखादा विष्णूचा उपासक असला, तर तो विष्णुलोकाला जातों, पण नामधारक महात्मे नामस्मरणाने व ध्यानाने सर्व विश्वच वैकुंठ करून टाकतात. अशा भगवन्नामाच्या गजराने सर्व जगच चिन्मात्रप्रकाशरूप करून सोडतात. ॥ २०३॥

गूढार्थदीपिका—वैकुंठ म्हणजे भगवान विष्णूचा जेथे वास असतो तें ठिकाण.

कृतयुगाचे ठिकाणीं "वैकुंठ जावया तपाचे सायास" (तु. गा. २३४३) तपादिकांचे सायास करावे लागत असत व तेवढे सायास करून मरणानंतर एखादाच वैकुंठाला जात असे. पण कलियुगांत संतांनी आपल्या उत्कट प्रेमभक्तीने भगवंताला या भूमीवर आणून तेथेच अखंड राहावयास लावून "तुका म्हणे पेंठ। भूवरी हे वैकुंठ" (तु. गा.) "सर्वत्र वैकुंठ केले असे" (ज्ञा. गा.) या भूलोकालाच वैकुंठ करून सोडलें.

नामघोषगौरवें। धवळलें विश्व—ज्याप्रमाणे सूर्याच्या सान्निध्यांत अंधःकार प्रकाशरूप होतो, त्याप्रमाणें सच्चिदानंदघन परमेश्वराच्या सान्निध्याने हा जडविनाशी भासणारा भूलोक नामधारकाला नामस्मरणादि भक्तीच्या योगाने चिन्मय प्रकाशरूप अनुभवाला येतो. "ज्ञानदेव म्हणे नयनाची ज्योति" (ज्ञा. गा.) नयनाची ज्योति जें चिन्मयरूप तेंच नामरूपाने नटलें आहे असा अनुभव येणें यालाच "विश्वाचे धवळणें" म्हणतात.

तेजें सूर्य तैसे सोज्वळ। परि तोहि अस्तवे हें किडाळ। चंद्र संपूर्ण एखादे वेळ। हे सदा पुरते॥ २०४॥

अर्थ—संतांना सूर्याची उपमा द्यावी तर ते सूर्यासारखे तेजस्वी असतात पण सूर्याचे ठिकाणीं मावळणे हा दोष आहे. त्यांना चंद्राची उपमा द्यावी तर चंद्र एखादे वेळी म्हणजे पौर्णिमेलाच पूर्ण असतो, पण संत हे अखंड पूर्ण असतात. ॥ २०४॥

गूढार्थदीपिका—या व पुढील ओवींत संत हे सदा पूर्ण अविनाशी व सर्वसमर्थ असतात, असें माऊली सांगत आहेत.

सूर्य तैसें सोज्वळ। परि तोहि अस्तवें हें किडाळ—ज्याप्रमाणें सूर्यप्रकाशाने बाहेरच्या वस्तु कळतात त्याप्रमाणें संतहि ज्ञानप्रकाशाने आत्मवस्तु जाणतात. म्हणून त्यांना सूर्याची उपमा द्यावी, तर सूर्य मावळतो व मग वस्तु दिसत नाहीत, हा त्या सूर्याचे ठिकाणीं दोष आहे, पण संत हे अविनाशी ज्ञानस्वरूप होऊन राहतात म्हणून त्यांचा ज्ञानप्रकाशहि नित्य असतों.

चंद्र संपूर्ण एखादे वेळ। हे सदा पुरते—पूर्ण चंद्राचा प्रकाश शीतल व आल्हादकारक असतो पण तो फक्त पौर्णिमेच्या दिवशींच असतो. संत हे सदा पूर्ण व प्रसन्न असतात.

मेघ उदार परी वोसरे। म्हणऊनि उपमेसी न पुरे। हे निःशंकपणें सपांखरे। पंचानन॥ २०५॥

अर्थ—मेघ उदार असतात पण ते ओसरतात. म्हणून त्यांची संतांना उपमा देतां येत नाही. संत हे निर्धास्त व कृपाळु सिंहासारखे आहेत. ॥ २०५ ॥

गूढार्थदीपिका—मेघ उदार परी वोसरे। म्हणऊनि उपमेसि न पुरे—उदारतेमध्ये जे मेघ, कल्पतरू इत्यादि पदार्थ प्रसिद्ध आहेत त्यांचीं संताच्या उदारतेला उपमा देणें योग्य होत नाही; कारण ते पदार्थ कितीहि थोर उदार असले तरी ते आपली स्वभावस्थिति देऊं शकत नाहीत. पण संत हे इतके थोर उदार आहेत की जसे रामकृष्णादिकांच्या प्रेमभक्तीने ते सदेह सच्चिदानंद स्वरूप होऊन सर्वज्ञ, सर्वशक्ति, औदार्यादि षड्गुणैश्वर्याने परिपूर्ण असतात तसेच ते प्रसन्न झाले असतां आपल्या शिष्याला तसेच परिपूर्ण करतात.

निःशंकपणें—ज्याप्रमाणे पशूंचा राजा सिंह हा सर्वांपेक्षा समर्थ असल्यामुळें त्याला कोणत्याच पशूची भीती वाटत नाही व कोणीहि पशु त्याचा घात करण्यास धजत नाही, त्याप्रमाणे ब्रह्मांडाचा स्वामी जो परमेश्वर त्याच्या भक्तीने ''बळियाचे अंकित आम्ही जालो बळिवंत। करूं सर्व सत्ता सर्वांवरी'' (तु. गा.) संत हे ब्रह्मांडाचे स्वामी होतात, म्हणून ते पूर्ण निर्धास्त असतात हेच ''निःशंकपणें'' या शब्दाने दाखविलें आहे.

पंचानन—परमेश्वरालां विसरून उन्मत्त होऊन उन्मार्गगामी झालेल्या व परमेश्वर सन्मुख असलेल्यांना त्रास देणाऱ्या, थोर पराक्रमी देवादिकांना देखील आपल्या सामर्थ्याने शिक्षा करतात म्हणून संतांना येथें माऊलींनी ''पंचानन'' असें म्हटलें आहे.

सपांखरें—त्याचप्रमाणे ते सर्वांवर कृपादृष्टीचा वर्षाव करणारे असल्यामुळें, त्यांचे दुष्टांना शासन करणें देखील दुष्टांच्या कल्याणाचे उद्देशानेच असतें, हें ''क्रोधोऽपिऽनुग्रह एव संमतः'' इत्यादि वचनाने व नारदादि संतांनी दुष्टांना दिलेल्या शापादि कथेवरून दिसून येतें. हेंच माऊलींनी येथें ''सपांखरें'' या शब्दाने दाखविलें आहे.

''मेणाहूनि मऊ आम्ही विष्णुदास। कठीण वज्रास भेदू ऐसे। मायबापाहून होऊं कृपावंत। करूं घातपात शत्रूहूनि'' (तु. गा.) तुकाराम महाराजांनी या अभंगांतील चरणांने असाच संतांचा स्वभाव सांगितला आहे.

जयांचे वाचेपुढां भोजें। अखंड नाम नाचत असे माझें। जें जन्मसहस्त्रीं वोळगिजे। एकवेळ यावया॥ २०६॥

अर्थ—जें माझे नांव एकवेळ देखील मनुष्याच्या मुखांत येण्याकरिता, हजारों जन्मांत केलेल्या सत्कर्मांचे पुण्य पदरीं असायला पाहिजे, ते माझे नांव या सत्पुरुषांचे मुखांत अखंड आनंदाने नाचत राहतें. ॥ २०६ ॥

गूढार्थदीपिका—भगवंताचे नांव इतकें थोर आहे की तें एकवेळ देखील मुखांत येण्याकरिता, अनेक जन्मांत आचरण केलेल्या निष्काम धर्मानुष्ठानाचे पुण्य पदरीं असायला पाहिजे म्हणजे त्या पुण्याने भगवंताचें नाम घ्यावें अशी श्रद्धा उत्पन्न होते. ''अनंत जन्माचें तप एक नाम'' असे माऊलींनी हरिपाठाचे अभंगांतहि म्हटलें आहे. ''अनंत जन्माचें सुकृत पदरीं। त्याचे मुखीं हरि पैठा होय'' (नाथ हरिपाठ ११२७) किंवा हजारों जन्मांत केलेलें पुण्य एकवेळ मुखांत आलेल्या नामाबरोबर आहे.

तो मी वैकुंठीं नसे। एक वेळ भानुबिंबींही न दिसें। वरी योगियांचींही मानसें। उमरडोनि जाय॥ २०७॥

अर्थ—तो मी वैकुंठांत राहत नाही. एखादे वेळीं सूर्यबिंबाचे ठिकाणींहि मी दिसणार नाही. आणखी योग्यांच्या मनालाहि ओलांडून जाईन. ॥ २०७॥

गूढार्थदीपिका—शास्त्रांतून परमेश्वराच्या प्राप्तीचीं स्थाने सांगितलीं आहेत. भगवान सदा वैकुंठांत असतो व विष्णूच्या उपासकांना तो प्राप्त होतो.

सूर्यबिंबाच्या ठिकाणींहि भगवंताच्या सुवर्णासारख्या स्वरूपाची प्राप्ति सांगितली आहे. त्याविषयी "**य एषोऽन्तरादित्ये हिरण्मयः पुरुषो दृश्यते**" (छां. १-६) ही श्रुति प्रमाण आहे.

योग्यांना आपल्या हृदयांत प्रत्यक्ष परमेश्वराला पाहतां येतें, हें "अपि च संराधने प्रत्यक्षानुमानाभ्याम्" (ब्र. सू. ३-२-२४) या सूत्रांत सांगितलें आहे. पण हीं सर्व स्थानें मायिक आहेत व प्रेमाशिवाय या साधनांनी भगवंताची प्राप्ति होणें कठीण आहे.

परी तयांपाशीं पांडवा। मी हारपला गिंवसावा। जेथ नामघोषु बरवा। करिती ते माझे॥ २०८॥

अर्थ—पण या सर्व ठिकाणीं न सांपडणारा मी प्रेमाने माझा नामघोष करणाऱ्या नामधारकाचे ठिकाणीं अवश्य सांपडतो. ॥ २०८ ॥

गूढार्थदीपिका—परमात्मा परमप्रेमरूप आहे. तो नामरूपासह पूर्ण असल्यामुळे त्याला आपल्या नामरूपाचेंहि परम प्रेम असतें. "तुका म्हणे त्याला गोडी कीर्तनाची। नाही आणिकांची प्रीति ऐसी" (तु. गा. २१७१) म्हणूनच नामधारकांच्या प्रेमाला वश झालेला परमात्मा त्यांच्या चित्तांत अखंड राहतो, असा भाव.

कैसे माझां गुणीं धाले। देशकाळातें विसरले। कीर्तनसुखें झाले। आपणपांचि॥ २०९॥

अर्थ—माझे गुणानुवाद गाण्यांत ते इतके रंगून जातात की ते देशकाळ विसरतात—म्हणजे त्यांना देशकाळाचें भान राहत नाही-आणि कीर्तनाच्या सुखाने आपणच सुखस्वरूप होऊन राहतात. ॥ २०९ ॥

गूढार्थदीपिका—संतांना हरिनामाची अवीट गोडी असते "अवीट हें क्षीर हरिकथा माउली। सेवितां सेविली वैष्णवजनी". (तु. गा. २१५३)

कृष्ण विष्णु हरि गोविंद। या नामाचे निखळ प्रबंध। माजीं आत्मचर्चा विशद। उदंड गाती॥ २१०॥

अर्थ—कृष्ण, विष्णु, हरि, गोविंद, अशीं हीं नावें आणि तीं नांवें ज्यांत ग्रथित केलीं आहेत, असे अभंग, पदें इत्यादि कवित्व त्याच्या मुखावाटें सारखे म्हटलें जाते व नामस्मरण व गुणानुवाद गात असतां, मध्यें आत्मस्वरूपाची मोकळी चर्चाहि ते अहोरात्र करीत असतात. ॥ २१० ॥

गूढार्थदीपिका—आत्मचर्चा म्हणजे निरुपाधिक निर्गुण स्वरूपाप्रमाणे भगवंताचें सगुणस्वरूप व त्याचें नांव, ही दोन्हीहि पूर्ण निरुपाधिक ब्रह्मस्वरूप आहेत अशी चर्चा.

हें बहु असो यापरी। कीर्तित मातें अवधारीं। एक विचरती चराचरीं। पंडुकुमरा॥ २११॥

अर्थ—अर्जुना! हा आतां विस्तार पुरे. याप्रमाणे कोणी माझें कीर्तन करीत—म्हणजे गुणानुवाद गात-विश्वांत संचार करतात. ॥ २११ ॥

गूढार्थदीपिका—आतापर्यंत माऊलींनी एकान्तभक्तीच्या नामस्मरणरूप अंगाचें विवरण केलें. आता पुढील ओवीपासून तों ओवी. २१८ पर्यंत एकान्तभक्तीच्या ध्यानरूप आंगाचें माऊली वर्णन करीत आहेत.

कित्येक भक्ताचे ठिकाणीं भक्तीचें नामस्मरणरूप अंगच प्रधान असतें, तर कित्येक भक्तांचे ठिकाणीं ध्यानरूप अंग प्रधान असतें; म्हणून येथे आतां सगुण भगवंताचें ध्यान करणारे भक्त, सगुण भगवंताचें ध्यान कशा रीतीने करतात, हें माऊली सांगत आहे.

मग आणिक ते अर्जुना। साविया बहुवा जतना। पंचप्राणा मना। पाढाऊ घेउनी॥ २१२॥
बाहेरी यमनियमांची कांटी लाविली। आंतु वज्रासनाची पौळी पन्नासिली। वरी प्राणायामाचीं मांडिलीं। वाहातीं यंत्रें॥ २१३ ॥
तेथ उल्हाट शक्तीचेनि उजिवडें। मन पवनाचेनि सुरवाडे। सतरावियेचें पाणियाडें। बळाविलें॥ २१४॥
तेव्हां प्रत्याहारें ख्याति केली। विकारांचीं संपिलीं बोहली। इंद्रियें बांधोनि आणिलीं। हृदयाआंतु॥ २१५॥
तंव धारणावारू दाटिले। महाभूतांतें एकवटिलें। मग चतुरंग सैन्य निवटिलें। संकल्पाचें॥ २१६॥

अर्थ—दुसरे कोणी आपल्या अंत:करणांत माझ्या सगुण स्वरूपाचें चांगल्या रीतीने म्हणजे अखंड जतन करण्याकरितां पंचप्राण व मन यांना वाटाड्या करतात. ॥ २१२ ॥ इंद्रियें विषयांकडे जाऊं नयेत म्हणून शरीराचे बाहेर यमनियमांचें कांटेरी कुंपण करून, शरीराचे आंत मुळबंधाचा परकोट तयार करून, त्यावर प्राणायामाच्या तोफा चालूं ठेवतात. ॥ २१३ ॥ तेथें कुंडलिनी ऊर्ध्वमुख होऊन प्रकाशित झाली असतां त्या प्रकाशाने व मनप्राणांच्या अनुकूलतेने सतराव्या कलेचे अमृतकुंड स्वाधीन करतात. ॥ २१४ ॥ तेव्हां प्रत्याहार-म्हणजे विषयांपासून इंद्रियांना आवरणें-हा पूर्ण सिद्ध होतो त्यायोगें विकाराचें नांवहि राहत नाही. इंद्रियें हृदयांतच बांधून आणलीं जातात. ॥ २१५ ॥ प्रत्याहार सिद्ध झाला की धारणारूप घोडे पुढे हांकले जातात—म्हणजे धारणेची भूमिका सिद्ध होते-व त्या योगाने सर्व पंचमहाभूतांची आटणी होते. येथें संकल्प करणाऱ्या अंत:करणाचें चतुरंग सैन्य-म्हणजे मन, बुद्धि, चित्त, अहंकार यांचे विषयांविषयीं व्यापार बंद पडतात. ॥ २१६ ॥

गूढार्थदीपिका—चतुरंग सैन्य निवटले। संकल्पाचे—''समीचीनत्वधी: संकल्प'' एखादी गोष्ट बरी आहे असें वाटणे याला संकल्प म्हणतात. हा संकल्प जीवाच्या ठिकाणीं सदा असतो, म्हणूनच या संकल्पामुळें वस्तुविषयीं बुद्धीचा निश्चयरूप व्यापार होतो. यामुळेच वस्तूचे चिंतन हा चित्तरूप व्यापार होतो. मनहि संकल्प विकल्पात्मक—आहे नाही असा-व्यापार करतें आणि अहंकार अहंताममता धारण करतो. हे सर्व चतुरंग सैन्य धारणा सिद्ध झाल्यावर नाश पावतें.

तयावरी जैत रे जैत। म्हणोनि ध्यानाचें निशाण वाजत। दिसे तन्मयाचें झळकत। एकछत्र ॥ २१७ ॥
पाठी समाधिश्रियेचा अशेखा। आत्मानुभवराज्यसुखा। पट्टाभिषेकु देखा। समरसें जाहला ॥ २१८ ॥

अर्थ—त्याच्यापुढें मग जिंकलें रे जिंकलें म्हणून ध्यानाच्या भेरी झडूं लागतात व तन्मयतेचे एकछत्र फडकूं लागतें. ॥ २१७ ॥ नंतर समाधिलक्ष्मीचें संपूर्ण आत्मानुभवरूप जें राज्यसुख त्या राज्यावर समरसतेने त्याला राज्याभिषेक होतो. ॥ २१८ ॥

ऐसें हें गहन। अर्जुना माझें भजन। आतां ऐकें सांगेन। जे करिती एक ॥ २१९ ॥

अर्थ—अर्जुना! अशा रीतीनें माझें अत्यंत कठीण कष्टदायक भजन कित्येक करितात. आतां दुसरे कित्येक महात्मे माझें कसें भजन करतात, तेंहि सांगतों, ऐक. ॥ २१९ ॥

गूढार्थदीपिका—कित्येक भक्त सर्वाभूतीं भगवद्भाव ठेवून परमेश्वराचें कसें भजन करतात हे माऊली पुढील ओवी २२०-२२८ मध्ये सांगत आहे.

तरी दोन्ही पाल्ववेरी। जैसा एक तंतू अंबरीं। तैसा मीवांचूनि चराचरीं। जाणती ना ॥ २२० ॥
आदि ब्रह्मा करूनी। शेवटीं मशक धरूनी। माजी समस्त हें जाणोनी। स्वरूप माझें ॥ २२१ ॥

अर्थ—ज्याप्रमाणें वस्त्राचे दोन्ही पदरापर्यंत एकच सूत असतें, त्याप्रमाणें या चराचर सृष्टींत माझ्यावांचून दुसरी वस्तूच जाणत नाहीत. (संपूर्ण नामरूपाने मीच नटलों आहे असें पाहतात असा अर्थ) ॥ २२० ॥ ब्रह्मदेवापासून तर मशकापर्यंत जेवढीं नामरूपें आहेत तीं सर्व माझीं रूपें आहेत असें ते जाणतात. ॥ २२१ ॥

गूढार्थदीपिका—सर्व चराचर सृष्टीचे ठिकाणीं सत्पुरुष एकसारखी समदृष्टि करितात. विवक्षित जातीपुरतीच किंवा विवक्षित समाजापुरतीच त्यांची समदृष्टि मर्यादित नसते असा भाव.

मग वाड धाकुटें न म्हणती। सजीव निर्जीव नेणती। देखिलिये वस्तु उजू लुंटिती। मीचि म्हणोनि ॥ २२२ ॥
आपुलें उत्तमत्व नाठवे। पुढील योग्यायोग्य नेणवे। एकसरें व्यक्तिमात्राचेनि नांवें। नमूंचि आवडे ॥ २२३ ॥

अर्थ—मग अमुक मोठा किंवा अमुक लहान, हा जीवंत पदार्थ किंवा हा निर्जीव पदार्थ असा कांही एक भेद न करतां दृष्टीला पडेल ती वस्तु भगवान श्रीकृष्णच आहे, असें समजून तिला सरळ लोटांगण घालतात. ॥ २२२ ॥ त्यांना आपल्या उत्तमत्वाचे किंवा श्रेष्ठपणाचें स्मरणच होत नाही. समोरचा नमस्कारास योग्य आहे की अयोग्य आहे हेंहि त्यांच्या मनांत येत नाही. व्यक्तिमात्र भगवत्स्वरूप जाणून त्यांना सरसकट नमस्कार करावा असें त्यांना वाटतें. ॥ २२३ ॥

गूढार्थदीपिका—"समासमाभ्यां विषमसमे पूजात:" अशी स्मृति आहे. अध्ययनादि गुणाने समान असलेल्या पुष्कळ पुरुषांचा एकाच वेळीं विषम म्हणजे कमी जास्त सत्कार करणें आणि अध्ययनादि गुणाने विषम म्हणजे कमी जास्त असणाऱ्या पुरुषांचा एकाचवेळीं समान पूजादिसन्मान करणे हा दोष आहे. असा त्या स्मृतीचा अर्थ आहे. पण हे सूत्रांतील विधान देह म्हणजे मी असें समजणाऱ्या अज्ञानी लोकांना व अज्ञानी लोकांविषयींच लागूं आहे, सर्वत्र परमेश्वर आहे, असें जाणून किंवा तशी बुद्धि ठेवून मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत जेवढे जीव आहेत, तेवढ्यांनाहि परमेश्वरभावनेने नमस्कार केला असतां तो दोष होत नाही, हे आचार्यांनी पांचव्या अध्यायांत (श्लो. १९) मान्य केलें आहे व श्रीज्ञानेश्वर माउलींनीहि तेंच येथे सांगितलें आहे.

जैसें उंचीं उदक पडिलें। तें तळवटवरी ये उगेलें। तैसें नमिजे भूतजात देखिलें। ऐसा स्वभावोचि तयांचा॥ २२४॥
कां फळलिया तरूची शाखा। सहजें भूमीसी उतरे देखा। तैसें जीवमात्रां अशेखां। खालावती ते॥ २२५॥
अखंड अगर्वता होऊनि असती। तयांची विनय हेचि संपत्ती। जे जयजयमंत्रें अर्पिती। माझांचि ठायीं॥ २२६॥

अर्थ—ज्याप्रमाणे उंच ठिकाणावर पाणी पडलें असतां ते स्वभावत: खालीं येते. त्याप्रमाणे दृष्टीला पडेल त्या जीवाला भगवद्भावनेने नमस्कार करावा असा त्या महात्म्यांचा स्वभावच बनून जातो.॥ २२४॥ फळाने अगदीं बहरलेल्या झाडाची फांदी ज्याप्रमाणे वांकून जमिनीला टेंकते, त्याप्रमाणे महात्मे संपूर्ण जीवमात्रांचे ठिकाणीं लीन होऊन राहतात.॥ २२५॥ ते अखंड निरहंकार असतात व नम्रता हेंच त्यांचें वैभव असतें आणि वस्तु दृष्टीला पडल्याबरोबर भगवंताचें दर्शन झालें. असें समजून माझा जयजयकार करितात व अशा रीतीने माझे ठिकाणीं ते आपल्याला अर्पण करतात.॥ २२६॥

गूढार्थदीपिका—जीव हा परमेश्वरस्वरूपच आहे, पण तो मी म्हणून आपल्या निराळेपणाचा अभिमान धारण करतो, म्हणून परमेश्वराहून निराळा झाला. त्यांनी आपल्या निराळेपणाचा अभिमान सोडला किंवा निराळेपणाचा त्याचा अभिमान सुटला की त्याचे परमेश्वराशीं असलेलें मूळचें ऐक्य प्रगट होतें, हें मागें माऊलींनी सांगितलेंच आहे.

सर्व भूतांचे ठिकाणीं परमेश्वरभावनेने लीन झालेला पुरुष अत्यंत निरभिमानी होतो. त्याला देहादिकांचा अभिमान उत्पन्न होत नाही आणि सर्व भूतांचे ठिकाणीं एक सम परमात्माच आहे अशी अखंड दृष्टि ठेवणाऱ्या पुरुषाचे ठिकाणीं, श्रेष्ठ-कनिष्ठ हे विषमभाव उत्पन्नच होत नाहीत. म्हणून सर्वाभूतीं परमेश्वर भावनेने अखंड लीन झालेला पुरुष सहज परमेश्वरालाच अर्पण होतो म्हणजे सहज परमेश्वराशीं ऐक्य पावतो.

नमितां मानाभिमान गळाले। म्हणोनि अवचिता ते मीचि जहाले। ऐसे निरंतर मिसळले। उपासिती॥ २२७॥
अर्जुना हे गुरुवी भक्ती। सांगितली तुजप्रती। आतां ज्ञानयज्ञें यजिती। ते भक्त आइकें॥ २२८॥

अर्थ—सर्व भूतांचे ठिकाणीं परमेश्वर भावनेने लीन झाले असतां मान अपमानाची भावना नाहीशी होते; म्हणून अकस्मात् ते माझ्याशीं ऐक्य पावतात. अशा रीतीने अखंड ऐक्य पावून माझी उपासना करतात.॥ २२७॥ अर्जुना! ही चौथी श्रेष्ठभक्ति तुला सांगितली. आतां ज्ञानाने भजन करणारे जे भक्त आहेत ते भजन कसे करितात, हें सांगतो ऐक.॥ २२८॥

गूढार्थदीपिका—आता पुढील ओव्यांतून ज्ञानाने भजन करणाऱ्याच्या मार्गाचें माउली वर्णन करीत आहे. या सर्व भजनांत सगुणाचेंच भजन आहे हे लक्षांत ठेविलें पाहिजे.

परि भजन करिती हातवटी। तूं जाणत आहासि किरीटी। जे मागां इया गोष्टी। केलिया आम्हीं॥ २२९॥
तंव आथि जी अर्जुन म्हणे। ते दैविकिया प्रसादाचें करणें। तरि काय अमृताचें आरोगणें। पुरे म्हणवे॥ २३०॥

अर्थ—पण अर्जुना! ज्ञानाने भजन करण्याची पद्धति तुला मागें सांगितलीच असल्यामुळे तूं ती जाणतोस.॥ २२९॥ तेंव्हा अर्जुन म्हणतो देवा! ज्ञानयज्ञाने तुझें यजन करण्याची हातवटी मी जाणतो, हें तुज देवाच्या कृपेचेंच फळ होय आणि मी जाणतों तरी अमृताचें भोजनाला पुरे म्हणवेल काय?॥ २३०॥

गूढार्थदीपिका—अनंत जन्मांतील अभ्यासाने—म्हणजे वारंवार सेवनाने-संसार जसा दृढ झाला आहे, तसाच

परमार्थ दृढ होण्याकरितां परमार्थ श्रवणाचा कंटाळा न येतां, वारंवार नव्या प्रेमाने श्रवण केलें गेलें पाहिजें हेंच येथें "तरि काय अमृताचे आरोगणे। पुरे म्हणवेल" या चरणांनी माऊलींनी सुचविले आहे.

श्रीशुकाचार्यांनीहि "यन्नूतनयशीयस्य शृण्वन् अपि कथां मुहु:" असें म्हणून राजा परीक्षिताच्या कथाश्रवणाच्या प्रेमाची प्रशंसा केली आहे.

या बोला श्रीअनंतें। लागट देखिलें तयातें। कीं सुखावलेनि चित्तें। डोलतु असे॥ २३१॥

अर्थ—अर्जुनाचें भाषण ऐकून अर्जुनाला या निरूपण ऐकण्याची गोडी आहे, असें देवाला वाटलें व भगवंताच्या चित्ताला अत्यंत सुख झालें व त्या सुखांत भगवान डोलूं लागले. ॥ २३१ ॥

गूढार्थदीपिका—शिष्याला परमार्थाची जितकी अधिक गोडी लागेल, तितकें अधिक सुख श्रीगुरुला होतें संसाराच्या गोडीने जसा संसार दृढ होतो तसा परमार्थाच्या गोडीने परमार्थ चित्तांत दृढ होतो.

म्हणे भलें केलें पार्था। एऱ्हवीं हा अनवसरु सर्वथा। परि बोलवीतसे आस्था। तुझी मातें॥ २३२॥
तंव अर्जुन म्हणे हें कायी। चकोरेंवीण चांदिणेंचि नाहीं। जग निवविजे हा तयाचां ठायीं। स्वभावो कीं जी॥ २३३॥
येरें चकोरें तियें आपुलिये चाडे। चांचू करिती चंद्राकडे। तेविं आम्ही विनवूं तें थोकडें। देवो कृपासिंधु॥ २३४॥
जो मेघ आपुलिये प्रौढी। जगाची आर्ती दवडी। वांचूनि चातकाची ताहान केवढी। तो वर्षावो पाहुनी॥ २३५॥
परि चुळा एकाचिया चाडे। जेविं गंगेतेंचि ठाकावें पडे। तेविं आर्त बहु कां थोडें। तरि सांगावें देवा॥ २३६॥

अर्थ—भगवान म्हणतात, अर्जुना! वाहवा! फार सुंदर बोललास! वास्तविक पाहतां पुन: पुन: तींच ती गोष्ट सांगावी असा प्रस्तुतचा प्रसंग नाही, परंतु श्रवणाचें ठिकाणीं असलेली तुझी गोडीच मला बोलायला लावते. ॥ २३२ ॥ हें भगवंताचें बोलणें ऐकून, अर्जुन म्हणतो देवा! असें कां बरें म्हणतां! चकोरावांचून चंद्रप्रकाश नसतोच का? चकोराकरितांच प्रकाश असतो, असें नव्हे. जगताचा ताप नाहीसा करावा हा चंद्राचा स्वभाव आहे. त्या स्वभावानुसार चंद्र प्रकाशतो. ॥ २३३ ॥ आणि अनायासें चकोर स्वाभाविकपणे चंद्रप्रकाशांतील अमृतकण वेंचण्याच्या इच्छेने ज्याप्रमाणे चंद्राकडे चोंच करीत असतात, त्याप्रमाणे आपण कृपासिंधु आहां, पण आमची विनंति केवळ निमित्तमात्र आहे. ॥ २३४ ॥ मेघ आपल्या औदार्याने सर्व जगाचें दु:ख नाहीसें करितो. येऱ्हवीं वर्षावाच्या मानाने चातकाची तहान कितीतरी अल्प असते. ॥ २३५ ॥ पण त्या चातकांना चूळभर पाण्याची इच्छा असली तरी ज्याप्रमाणे मेघरूपाने वर्षाव करण्याकरिता गंगेलाच यावें लागतें, त्याप्रमाणे आमची ऐकण्याची इच्छा बहु किंवा थोडी असली तरी देवांनी बोलावेंच. ॥ २३६ ॥

गूढार्थदीपिका—"जेविं गंगेतेंचि ठाकावें पडे"—आयुर्वेदांत "धाराजलं च द्विविधं गांगसामुद्रभेदत:" (भा. प्र. स्व. १-वारिवर्ग श्लो. ८) वर्षावाने पडणारे पाणी गांग व सामुद्र असे दोन प्रकारचें सांगितलें आहे.

गंगेच्या पाण्यापासून तयार झालेल्या मेघांतून जो वर्षाव होतो त्याला गांगजल म्हणतात व समुद्राच्या पाण्यापासून तयार झालेल्या मेघांतून होणाऱ्या वर्षावाला सामुद्रजल म्हणतात. चातकपक्षी गंगेच्या पाण्यापासून तयार झालेल्या मेघांतून होणाऱ्या गांगवर्षावाचेंच पाणी पीत असतात; म्हणून त्यांच्याकरिता गंगेलाच वर्षावरूपाने यावें लागतें व हेंच "गंगेतेचि ठाकावें पडे" या चरणाने माऊलीनी सांगितलें आहे.

तेथें देवें म्हणितलें राहें। जो संतोषु आम्हां जाहाला आहे। तयावरी स्तुति साहे। ऐसें उरलें नाहीं॥ २३७॥
पैं परिसतु आहासि निकियापरी। तेंचि वक्तृत्वा व्हाडीक करी। ऐसें पुरस्करोनि श्रीहरी। आदरिलें बोलों॥ २३८॥

अर्थ—त्यावर देव म्हणतात अर्जुना! हें आतां पुरे कर. तुझी श्रवणाची आस्था पाहून आम्हाला जो आनंद झाला आहे त्यावर आता स्तुतीने संतोष होईल असें मुळींच उरलें नाही. ॥ २३७ ॥ परंतु ज्या अत्यंत आवडींने तूं श्रवण करीत आहेस ती तुझी आवडीच माझ्या वक्तृत्वाशीं सोयरीक करते, असा प्रस्ताव करून भगवंतांनी बोलण्याला सुरुवात केली. ॥ २३८ ॥

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते । एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम्॥ १५॥

अर्थ—दुसरे ज्ञानयज्ञाने यजन करणारे कोणी एकत्वाने, कोणी नानारूपाने व कोणी विश्वरूपाने माझी उपासना करतात. ॥ १५ ॥

तरि ज्ञानयज्ञु तो एवंरूपु। तेथ आदिसंकल्पु हा यूपु। महाभूतें मंडपु। भेदु तो पशु॥ २३९ ॥

अर्थ—तर आतां तो अद्वैतज्ञानयज्ञ असा आहे. या यज्ञांत प्रथम संकल्प हा यूप-म्हणजें मारला जाणारा पशु, बांधून ठेवितात तो खांब-आहे, पंचमहाभूतें हा मंडप आहे व भेद हा पशु आहे. ॥२३९ ॥

गूढार्थदीपिका—ज्ञानयज्ञु—सगुण परमात्माहि पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे, असें जें भगवंताच्या स्वरूपाचें ज्ञान, त्याच ज्ञानाने (म्हणजे हें जाणून व इतर देवतांची उपासना सोडून) एका भगवंताचीच उपासना करणें याला ज्ञानयज्ञ म्हणतात.

आदिसंकल्प हा यूपु—''सोऽकामयत बहु स्यां प्रजायेय'' सृष्टीच्या आरंभी मी बहुरूप व्हावें असा जो परमेश्वर संकल्प करतो त्याला ''आदिसंकल्प'' म्हणतात. या संकल्पाचा अर्थ मी सच्चिदानंद बहुरूप व्हावें असा असतो; पण जीव त्याचा अनेक भिन्न भिन्न रूप व्हावें असा सृष्टिविषयक अर्थ करतो, हे मागें सांगितलेंच आहे. अर्थात् यज्ञांतील यूपाशीं जसा पशु बांधला जातो त्याप्रमाणेंच जीवाने मानलेला भेदरूप पशुहि आदिसंकल्पाशीं संबद्ध असल्यामुळे येथें आदिसंकल्पाला ''यूप'' म्हटलें आहे.

भेद तो पशु—ज्याप्रमाणे कर्मरूप यज्ञांत पशु मारला जातो, त्याप्रमाणे या ज्ञानयज्ञांत मारला जाणारा पशु भेद किंवा द्वैत होय. जीव ईश्वर यांचा परस्पर भेद. जीवजीव यांचा परस्पर भेद, जीवजड यांचा परस्पर भेद, जडजड यांचा परस्पर भेद व जडईश्वर यांचा परस्पर भेद, असा हा पांच प्रकारचा भेद जीवाला दिसतो. मूळांत एक अद्वैत परब्रह्म वस्तु असतांना तिचे ठिकाणीं हा जो पांच प्रकारचा भेद दिसतो, त्या भेदामुळें परब्रह्माचें अद्वैत ज्ञान होत नाही आणि हा भेदच जीवाच्या दुःखाचें कारण आहे असें ''द्वितायाद्वै भयं भवति'' या श्रुतीने सांगितलें आहे. ब्रह्मज्ञानाने तोच नाहीसा करावयाचा असतो; म्हणून त्या भेदाला येथे यज्ञांतील वध्य पशूची उपमा दिली आहे.

महाभूतें मंडपु—यज्ञ, बाहेर मंडप घालून केला जातो. ज्या अद्वैत ज्ञानदृष्टीने यज्ञ होतो ती अद्वैतज्ञानदृष्टि बुद्धीचें ठिकाणीं उत्पन्न होते आणि बुद्धि किंवा अंतःकरण पंचमहाभूताचें कार्य असल्यामुळें पंचमहाभूतें उत्पन्न झाल्याशिवाय बुद्धि व्यक्त होऊं शकत नाही. अर्थात् असा हा ज्ञानयज्ञ पंचमहाभूतांचें कार्य मिळून घातलेल्या जगतरूप मंडपांतच होत असतो. म्हणून पंचमहाभूतांवर मंडपाचें येथें माऊलींनी रूपक केलें आहे.

मग पांचांचे जे विशेष गुण। अथवा इंद्रियें आणि प्राण। हेचि यज्ञोपचारभरण। अज्ञान घृत॥ २४० ॥

अर्थ—पुढें पंचमहाभूतांचे विशेष गुण अथवा इंद्रियें प्राण वगैरे त्या ज्ञानयज्ञांतील हवनीय पदार्थ होत व अज्ञान हें तूप होय. ॥ २४० ॥

गूढार्थदीपिका—पंचमहाभूतांचे विशेष गुण जे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध अथवा दहा इंद्रियें आणि पंचप्राण हे यज्ञोपचारभरण-म्हणजे यज्ञसाहित्य होय.

अज्ञानघृत—आत्मवस्तूचें विस्मरण हेंच अज्ञान होय. याच अज्ञानाने ब्रह्मव्यतिरिक्त पंचमहाभूतादिक पदार्थाची कल्पना केली गेली आहे. अर्थात् हे सर्व पदार्थ अज्ञानासहच असतात आणि ज्याप्रमाणें प्रत्येक हवनीय पदार्थ घृतासह हवन केला जातो त्याप्रमाणें या ज्ञानयज्ञांतील शब्दस्पर्शादि सर्व पदार्थाचे हवन अज्ञानासहच केलें. जातें, म्हणून येथे अज्ञानावर घृताचें रुपक केलें आहे.

तेथ मनबुद्धीचिया कुंडा-। आंतु ज्ञानाग्नि धडफुडा। साम्य तेचि सुहाडा। वेदि जाणें॥ २४१ ॥

अर्थ—त्यांत मन बुद्धि हीं दोन कुंडे आहेत, त्यांत ज्ञानाग्नि प्रज्वलित होतो व समता हा कुंडावरील, हे अर्जुना! ओटा आहे. ॥ २४१ ॥

गूढार्थदीपिका-मनबुद्धीचिया कुंडा—यज्ञामध्यें ज्या अग्नींत हविर्भाग टाकले जातात तो अग्नि कुंडांत असतो. ज्ञानरूपी अग्नि मनोबुद्धीत प्रज्वलित होतो म्हणून मनबुद्धीवर येथें कुंडाचें रूपक केलें आहे. बुद्धिरूपी कुंडात निर्गुण ज्ञानाग्नि पेटतो व मनरूपी कुंडात सगुणज्ञानाग्नि पेटविला जातो.

साम्य तेचि-वेदिका जाणे—दोन्ही कुंडाला समतारूपी ओटा असतो. निर्गुणब्रह्मप्रत्ययांत सर्व एक पूर्ण ब्रह्मच आहे असा जसा समभावाचा प्रत्यय असतो, तसाच सगुणब्रह्मप्रत्ययांतहि एक सर्वत्र सगुण परब्रह्मच आहे, न्यूनपूर्ण असा विषमभाव नाही, असाच समभावाचा प्रत्यय असतो.

सविवेकमतिपाटव। तेचि मंत्र विद्यागौरव। शांति स्त्रुक्स्त्रुव। जीवु यज्वा॥ २४२॥

अर्थ—आत्मानात्मविचार करण्याचें बुद्धीचें चातुर्य हेंच ज्ञानयज्ञांतील मंत्र होत. ब्रह्मज्ञानाची दृढता हे स्त्रुक् असून मनाची निर्वासन किंवा विषयरहित स्थिति ही स्त्रुवा होय. जीव यज्ञ करणारा यजमान होय.॥ २४२॥

तो प्रतीतीचेनि पात्रें। विवेकमहामंत्रें। ज्ञानाग्निहोत्रें। भेदु नाशी॥ २४३॥

अर्थ—अशा रीतीने जीवरूपी यजमान अनुभवरूपी यज्ञपात्र घेऊन आत्मानात्मविवेकरूपी मंत्राने ब्रह्म ज्ञानरूपी अग्निहोत्राचे अनुष्ठान करून संपूर्ण भेदाचा नाश करतो.॥ २४३॥

गूढार्थदीपिका—ज्ञानाग्निहोत्रें भेदु नाशी-बुद्धिरूपी कुंडांत ब्रह्म हें अद्वैतस्वरूप आहे, त्यावांचून दुसरी सत्ताच नाही असा अद्वैतज्ञानाग्नी पेटलेला असतो. त्यांत जीवजगत् इत्यादिकांच्या भिन्न सत्तेचा नाश होतो आणि सर्व नामरूपासह एक परब्रह्मच आविष्कृत झालें आहे, परब्रह्मावांचून दुसऱ्या जीवजगत् इत्यादिक कांही एक वस्तु नाहीत, असा मनोरूपी कुंडांत सगुणज्ञानाग्नी पेटला जातो. त्यांत जीव जगत् यांच्या वस्तुत्वांचें हवन केलें जाऊन त्यांच्या वस्तुभेदाचा नाश होतो.

तेथ अज्ञान सरोनि जाये। आणि यजिता यजन हें ठाये। आत्मसमरसीं न्हायें। अवभृथीं जेव्हां॥ २४४॥
तेव्हां भूतें विषय करणें। हें वेगळालें कांहीं न म्हणे। आघवें एकचि ऐसें जाणे। आत्मबुद्धि॥ २४५॥
जैसा चेइला तो अर्जुना। म्हणे स्वप्नींची हे विचित्र सेना। मीचि जाहालों होतों ना। निद्रावशें॥ २४६॥
आतां सेना ते सेना नव्हे। हें मीच एक आघवें। ऐसें एकत्वें मानवें। विश्व तया॥ २४७॥

अर्थ—हें अग्निहोत्राचें अनुष्ठान पूर्ण झालें असतां, अज्ञान निःशेष नाश पावतें. यजन व यजन करणारा हा भेदहि राहत नाही. एक समरस आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं जीवरूप यजमान जेव्हा अवभृथ स्नान करितो म्हणजे अद्वैत आत्म्याशीं ऐक्य पावतो.॥ २४४॥ तेव्हां पंचमहाभूतें, विषय, इंद्रियें यांचें वेगळे अस्तित्व व वस्तुत्वच अनुभवाला येत नाही. एक आत्माकार बुद्धि राहते व त्या बुद्धीने तो सर्व आत्मस्वरूपच पाहतो.॥ २४५॥ ज्याप्रमाणे जागा झालेला पुरुष मीच निद्रावश होऊन स्वप्नांतील नाना प्रकारचें सेनारूप झालों होतो, असें म्हणतो.॥ २४६॥ आतां माझ्याहून जी सेना वस्तु निराळी वाटत होती ती सेनावस्तु निराळी नाही, सर्व मीच एक होतो, असें जागा झालेल्या पुरुषाला जसें वाटतें, त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाला सर्व विश्व मीच आहे असें अद्वैतज्ञान होते.॥ २४७॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञानाने नामरूपांचा नाश न होतां, नामरूपें ह्या भिन्न वस्तु आहेत अशी भ्रमाने जी कल्पना होती तिचाच नाश होतो व नामरूपाचे आत्म्याशीं ऐक्य होतें— म्हणजे नामरूपासह मी एक सच्चिदानंद आत्मस्वरूप आहे असा ज्ञान्याला अनुभव येतो. हा या वरील ओव्यांचा भाव आहें. याचें विवेचन मागें सातव्या अध्यायांत आलें आहे व तेच माऊलींनी येथे पुनः सांगितलें आहे.

मग तो जीवु हे भाष सरे। आब्रह्म परमात्मबोधें भरे। ऐसे भजती ज्ञानाध्वरें। एकत्वें येणें॥ २४८॥

अर्थ—मग जीव हें नांवच राहत नाही. तृणापासून तर ब्रह्मदेवापर्यंत सर्व सृष्टि त्याला सगुण परमेश्वर स्वरूप भासते. याप्रमाणे सर्व नामरूपाने एक परमात्माच आहे अशा ज्ञानयज्ञाने ते माझें भजन करतात.॥ २४८॥

गूढार्थदीपिका—वरील श्लोकांत एकत्वाने, पृथकत्वाने व विश्वतोमुखाने असे ज्ञानयज्ञाने भगवंताची उपासना करण्याचे तीन प्रकार सांगितले आहेत. त्यापैकी एकत्वाने उपासना करण्याचा पहिला प्रकार श्रीमाऊलींनी ओवी २३९-२४८ पर्यंत सांगितला आहे.

एकत्वाने म्हणजे आपल्यासह सर्व नामरूपाने एक परमात्मा किंवा मीच नटलों आहे असें जाणून व नामरूपाचें अनेकत्व सोडून केवळ एका परमेश्वराचे किंवा आत्मस्वरूपाचें ध्यान ठेविलें जातें.

अथवा अनादि हें अनेक। जें आनासारिखें एका एक। आणि नामरूपादिक। तेंही विषम॥ २४९॥
म्हणोनि विश्व भिन्न भिन्न। परि न भेदे तयांचें ज्ञान। जैसे अवयव तरी आन आन। परि एकेचि देहींचें॥ २५०॥
कां शाखा सानिया थोरा। परि आहाति एकाचिये तरुवरा। बहु रश्मि परि दिनकरा। एकाचे जेवीं॥ २५१॥
तेविं नानाविधा व्यक्ती। आनानें नामें आनानी वृत्ती। ऐसें जाणती भेदलां भूतीं। अभेदा मातें॥ २५२॥
येणें वेगळालेपणें पांडवा। करिती ज्ञानयज्ञु बरवा। जे न भेदती जाणिवा। जाणते म्हणउनी॥ २५३॥

अर्थ—किंवा जे हे पदार्थ एकमेकाला दुसऱ्या पदार्थासारखे आहेत, तें त्यांचें अनेकत्व अनादि आहे व त्यांचें नामरूपादिक हेहि निरनिराळे आहेत. ॥ २४९ ॥ म्हणून जगांत भिन्नता दिसून येते, पण त्यांचें ज्ञान भिन्न होत नाही (म्हणजे निरनिराळ्या पदार्थाचें निरनिराळे स्वतंत्र अस्तित्व व वस्तुत्व आहे असे त्यांना ज्ञान होत नाही). ज्याप्रमाणे निरनिराळे अवयव भासत असले तरी ते एका शरीराचेच असतात त्याप्रमाणे एकाच मज परब्रह्माचे ठिकाणीं नामरूपामुळे नानात्वाचा भास होतो, पण त्यासह ते एकच परब्रह्म समजतात. ॥ २५० ॥ किंवा लहान मोठ्या डाहाळ्या असल्या तरी त्या एकाच झाडाच्या असतात किंवा अनेक किरणें असलीं, तरी तीं एका सूर्याचींच असतात. ॥ २५१ ॥ त्याप्रमाणे नानाप्रकारच्या व्यक्ती त्यांचीं निरनिराळीं नावें व निरनिराळे स्वभाव असले तरी त्या सर्वांचे ठिकाणीं एक परमात्माच भरला आहे असे ते पाहत असतात. ॥ २५२ ॥ अर्जुना! अशा या वेगवेगळेपणाने ते ज्ञानयज्ञ करीत असले, तरी ते माझें एकपण जाणत असल्यामुळे ते ज्ञानांत भेद करीत नाहीत. ॥ २५३ ॥

गूढार्थदीपिका—येणे वेगळेपणें-म्हणजे अशा वेगवेगळ्या रूपाने, जाणते म्हणऊनि-म्हणजे माझें एकपण जाणत असल्यामुळें, जे न भेदती जाणिवा-म्हणजे पदार्थाचे अस्तित्व ग्रहण करीत नाहीत.

येथे ओवी २४९ ते २५३ पर्यंत श्रीमाऊली ज्ञानयज्ञाचा दुसरा (म्हणजे पृथकत्वाने यजन करण्याचा) यजन प्रकार सांगत आहेत.

या प्रकारांत इंद्र, सोम, सूर्य इत्यादि ज्या उपास्य देवता सांगितल्या आहेत, त्या त्या स्वरूपाने एक परमात्माच अवस्थित आहे किंवा त्या स्वरूपांत एक परमात्माच प्रगट झाला आहे, असें ध्यान ठेवून त्या देवतांची उपासना केली जाते.

ना तरी जेधवां जिये ठायीं। देखती कां जें जें कांहीं। तें मीवांचूनि नाहीं। ऐसाचि बोधु॥ २५४॥

अर्थ—किंवा जेव्हा जेव्हा व जेथे जेथे जे कांही ते पाहतात ते सर्व परमात्माच आहे असेच त्यांचें ज्ञान असतें. ॥ २५४ ॥

पाहें पां बुडबुडा जेउता जाये। तेउतें जळचि एक तया आहे। मग विरे अथवा राहे। तऱ्ही जळाचिमाजीं॥ २५५॥
कां पवनें परमाणु उचलले। ते पृथ्वीपणावेगळे नाहीं गेले। आणि माघौतें जरी पडले। तरी पृथ्वीचिवरी॥ २५६॥
तैसें भलतेथ भलतेणें भावें। भलतेंही न हो अथवा होआवें। परि तें मी ऐसें आघवें। होऊनि ठेलें॥ २५७॥
अगा हे जेव्हडी माझी व्याप्ती। तेव्हडीचि तयांचि प्रतीती। ऐसें बहुधाकारीं वर्तती। बहुचि होउनि॥ २५८॥

अर्थ—हे पहा अर्जुना! पाण्यावर उठलेला बुडबुडा जेथे जातो तेथे त्याला एक पाणीच असते. तो राहिला किंवा नाहीसा झाला तरी पाण्यांतच राहतो. ॥ २५५ ॥ किंवा वाऱ्याने मातीचे कण उडले तरी ते मातीहून अलग होत नाहीत ते मातीरूपच असतात आणि खालीं पडले तरी मातीवरच पडतात. ॥ २५६ ॥ त्याप्रमाणें कोठेहि, कोणत्याहि भावानें व कोणत्याहि रूपाने असोत किंवा नसोत पण ते सर्व मीच (परमेश्वरच) आहें असे पाहतात. ॥ २५७ ॥ बा अर्जुना! मी जितका व्यापक आहे तितकाच त्यांचा अनुभवहि व्यापक असतो आणि तसें ते सर्वरूपाने सर्व होऊन राहतात. ॥ २५८ ॥

गूढार्थदीपिका—हा तिसरा यजनप्रकार (म्हणजे विश्वतोमुखाने यजन करण्याचा प्रकार) माऊलींनी ओवी २५३ ते २५८ मध्यें वर्णन केला आहे. या यजनप्रकारांत सर्व नामरूपासह एक सच्चिदानंद परमात्माच सर्वत्र सर्वभावाने प्रगट झाला आहे, असें समजलें जात असल्यामुळें अशा प्रत्ययांत ग्राह्य किंवा त्याज्य असें कांही उरत नाही; म्हणून यांत भजन न करतांहि भजन होतें.

हें भानुबिंब आवडे तया। सन्मुख जैसें धनंजया। तैसे ते विश्वा या। समोर सदा॥ २५९॥

अर्थ—अर्जुना! हें सूर्यबिंब ज्याप्रमाणें वाटेल त्याच्यासमोर असते, त्याप्रमाणे भगवंताच्या सर्व व्यापक स्वरूपाहून ते निराळे राहत नसल्यामुळे भगवंताप्रमाणे सदा सर्वदा ते या विश्वांतील सर्व जीवाच्या दृष्टीसमोर आहेच. ॥ २५९ ॥

गूढार्थदीपिका—सगुण परमात्मा एकदेशीय दिसत असला तरी सर्वत्र अणुरेणूंतहि व्यापून असल्यामुळे तो सर्व जीवाच्या समोरच असतो, म्हणून समोरच्या पदार्थावर भगवद्भावना दृढ झाली असतां तेथे तो तात्काळ प्रगट होऊं शकतो. (उदा. खांबात नरसिंहरूपाने भगवान् प्रगट झाले) त्याचप्रमाणे संतहि एकदेशीय दिसत असले तरी सर्वत्र व्यापक असल्यामुळे जो जेथे त्यांची दृढ भावना करील तेथे ते प्रगट होऊं शकतात.

अगा तयांचिया ज्ञाना। पाठी पोट नाहीं अर्जुना। वायु जैसा गगना। सर्वांगीं असे॥ २६०॥
तैसा मी जेतुला आघवा। तेंचि तुक तयांचिया सद्भावा। तरी न करितां पांडवा। भजन जहालें॥ २६१॥
एऱ्हवीं तरी सकळ मीचि आहें। तरी कवणी कें उपासिला नोहें। एथ एके जाणणेवीण ठाये। अप्राप्तासी॥ २६२॥
परि तें असो येणें उचितें। ज्ञानयज्ञें यजितसांते। उपासिती मातें। तें सांगितले॥ २६३॥
अखंड सकळ हें सकळां मुखीं। सहज अर्पत असे मज एकीं। कीं नेणणेयासाठीं मूर्खीं। न पविजेचि मातें॥ २६४॥

अर्थ—बा अर्जुना! त्या महात्म्यांच्या ज्ञानाला पाठ व पोट किंवा वरची बाजू व खालची बाजू असा भेद नसतो. ज्याप्रमाणे वायु हा आकाशाच्या सर्व आंगाचे ठिकाणीं राहतो. ॥ २६० ॥ त्याप्रमाणे मी जेवढा व्यापक आहे तेच व्यापकतेचे प्रमाण त्यांच्या झालेल्या ब्रह्मभावाचें असतें; म्हणून भजन न करितांहि तें माझें भजन होतें. ॥ २६१ ॥ नाही तरी सर्व मीच असल्यामुळे कोणाकडून माझी उपासना होत नाही? अशा स्थितीत माझ्या व्यापक स्वरूपाची एक जाणीव नसल्यामुळे त्यांना (अज्ञान्यांना) माझें भजन घडत नाही. ॥ २६२ ॥ परंतु तें असो. या योग्य अशा ज्ञानयज्ञाने यजन करीत जे माझी उपासना करतात त्यांचें वर्णन मी केलें॥ २६३ ॥ अखंड सर्वांच्या द्वारा जेवढें कांही कर्म होतें, तें सर्व एका मलाच अर्पण होत असतें, पण मूर्ख लोक हें जाणत नसल्यामुळें, ते माझें यजन करीत असूनहि मला प्राप्त होत नाहीत. ॥ २६४ ॥

गूढार्थदीपिका—यच्चयावत् नामरूपाने एक भगवानच व्यक्त झाला आहे. हें न जाणतां जीव त्याचें ठिकाणीं सृष्टीची दृढ कल्पना करतो या केवळ कल्पनेमुळेंच त्याला भगवंतांची प्राप्ती होत नाही हें माऊलींनी वरील ओव्यांतून सांगितलें आहे.

अवतरणिका—एक परमात्माच सर्व वस्तुमात्र कसा नटला आहे याचें वर्णन भगवान स्वमुखाने करतात.

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम्। मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम्॥ १६॥

अर्थ—मीच श्रौतयज्ञ होय. मीच स्मार्तयज्ञहि आहे. मीच स्वधा म्हणजे पितरांना दिलें जाणारें अन्न असून, मीच औषधि म्हणजे सर्व प्राण्यांचें भक्ष्यस्थान आहे. मीच मंत्र असून, मीच घृत आहे. मीच अग्नि मीच हवन केलें जाणारें द्रव्य आहे. ॥ १६ ॥

तोचि जाणिवेचा जरी उदयो होये। तरी मुदल वेदु मीचि आहे। आणि तो विधानातें जया विये। तो क्रतुही मीचि॥ २६५ ॥
मग तया कर्मापासूनि बरवा। जो सांगोपांगु आघवा। यज्ञु प्रगटे पांडवा। तोहि मी गा॥ २६६॥
स्वाहा मी स्वधा। सोमादि औषधी विविधा। आज्य मी समिधा। मंत्रु मी हवि॥ २६७॥
होता मी हवन कीजे। तेथ अग्नी तो स्वरूप माझें। आणि हुत वस्तु जें जें। तेंही मीचि॥ २६८॥

अर्थ—अर्जुना! तोच जर पूर्ण ब्रह्मज्ञानाचा अंत:करणांत प्रकाश पडला तर असें कळून येतें की वेद मूळात मीच आहे आणि त्या वेदाने जे श्रौतयज्ञाचें विधान म्हणजे कर्मानुष्ठान सांगितलें तो श्रौतयज्ञहि मीच आहे. ॥ २६५ ॥ मग त्या कर्मानुष्ठानापासून जो अंगउपांगासह यज्ञ सिद्ध होतो तो यज्ञहि मीच आहे. ॥ २६६ ॥ (देवांना स्वाहा शब्द म्हणून हवि दिला जातो) तो स्वाहा मीच आहे. (पितरांना अर्पण करावयाचें तें स्वधा

या शब्दाने अर्पण केलें जातें) तो स्वधा मी आहे. सोमादि नानाप्रकारच्या हवनीय वनस्पती, घृत, समिधा, मंत्र, हवनीय द्रव्य, हें सर्व मीच आहे. ॥ २६७ ॥ हवन करणारा व हवन जेथे केलें जातें तो अग्नि माझेंच स्वरूप होय आणि सर्व हवनीय वस्तु मीच आहे. ॥ २६८ ॥

गूढार्थदीपिका—अज्ञानी सर्व नामरूपाला भिन्न भिन्न जडविनाशी वस्तुरूपाने पाहतो व ज्ञानी सर्व नामरूपाला ब्रह्मदृष्टीने पाहतो असा या ओव्यांचा आशय आहे.

पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः। वेद्यं पवित्रमोङ्कार ऋक्साम यजुरेव च॥ १७॥

अर्थ—मीच या जगाचा पिता असून माता, धाता म्हणजे जगांचें धारण करून पोषण करणारा व पित्याचाहि पिता मींच आहे. वेद्य जें कांही आहे तें मीच असून पवित्रहि मीच आहे. ॐकार मीच असून ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद मीच आहे. ॥ १७ ॥

पैं जयाचेनि अंगसंगे। इये प्रकृतीस्तव अष्टांगें। जन्म पाविजत असे जगें। तो पिता मी गा॥ २६९ ॥

अर्थ—तसेंच ज्याचा अंगसंग झाला असतां प्रकृती पासून अष्टविध अपरा कार्यप्रकृति व जगत उत्पन्न होते तो जगाचा पिता मीच आहे. ॥ २६९ ॥

गूढार्थदीपिका—पिता मी गा—म्हणजे पित्याप्रमाणे जग उत्पन्न करणारा. एकजीववादाप्रमाणे किंवा दृष्टिसृष्टिवादाप्रमाणे जीवच जगाची कल्पना करणारा पिता आहे, पण "अनेन जीवेन आत्मनानुप्रविश्य नामरूपे व्याकरवाणि" इत्यादि श्रुतीवर जीव वस्तु रूपाने प्रतीत होतो, म्हणून भगवंतांनी मी जीवरूपाने जगताचा पिता आहे, असें सांगितलें आहे.

अर्धनारीनटेश्वरीं। जो पुरुष तोचि नारी। तेविं मी चराचरीं। माताही होय॥ २७० ॥

अर्थ—अर्धनारी नटेश्वराच्या ठिकाणीं ज्याप्रमाणे जो पुरुष असतो तोच स्त्री झालेला असतो, त्याप्रमाणे या चराचर विश्वाची माताहि मींच आहे. ॥ २७० ॥

गूढार्थदीपिका—माता म्हणजे मातेप्रमाणे जग प्रसवणारी प्रकृति. परमात्मा स्फुरण पावला असतां अज्ञान्याला तें भगवंताचे स्फुरण प्रकृतिरूप भासतें, म्हणून भगवंतांनी जगताची मी माता आहे, असें म्हटलें आहे.

आणि जाहालें जग जेथ राहे। जेणें जीवित वाढत आहे। तें मीवांचूनि नोहे। आन निरुतें॥ २७१ ॥

अर्थ—त्याप्रमाणे जन्माला आलेलें जग ज्याचें ठिकाणी राहतें व ज्याच्या योगाने त्या जगाचें आयुष्य वाढत जातें, तेंहि माझायावांचून दुसरें नाही, हें अगदीं सत्य आहे. ॥ २७१ ॥

गूढार्थदीपिका—जाहालें जगत् जेथ राहे—म्हणजे जगताला तें परब्रह्म आधार आहे.

जेणे जीवीत वाढत आहे—म्हणजे ज्या परब्रह्मावर जगत् भासतें ते परब्रह्म. परब्रह्म नित्य असल्यामुळे अज्ञान्याला जगत्‌हि नित्य वाटतें असा अर्थ.

इयें प्रकृतिपुरुषें दोन्ही। उपजलीं जयाचिया अमनमनीं। तो पितामह त्रिभुवनीं। विश्वाचा मी॥ २७२ ॥

अर्थ—जीव व प्रकृति हीं दोन्ही ज्याच्या अमनमनांत म्हणजे मनरहित मनांत स्फुरली, तो सर्व जगाचा पितामह मीच आहे. ॥ २७२ ॥

गूढार्थदीपिका—जयाचिया अमनमनीं—परब्रह्माहून निराळ्या पदार्थाची कल्पना होणें याला मन म्हणतात. नित्य अज्ञानरहित अशा परमेश्वराचे ठिकाणीं त्याच्याहून निराळ्या वस्तुची कल्पना करणारें मन नसते; "बहु स्यां प्रजायेय" हा त्याचा संकल्प स्वरूपभूतच असतो; म्हणून त्याला अमनमनोरूप म्हटले जातें.

पितामह त्रिभुवनीं। विश्वाचा मी—याच संकल्पाचे ठिकाणीं अज्ञानरूप भ्रांति व भ्रांतियुक्त जग हे दोन्ही भासत असतात, म्हणून त्याला आधार असलेला परमात्मा पितामह होतो.

आणि आघवेया जाणणेयाचिया वाटा। जया गांवा येती गा सुभटा। जे वेदांचिया चोहटां। वेद्य जें म्हणिजे॥ २७३ ॥
जेथ नानामतां बुझावणी जाहाली। एकमेकां शास्त्रांची अनोळखी फिटली। चुकलीं ज्ञानें जेथ मिळों आलीं। जें पवित्र म्हणिजे॥ २७४ ॥

अर्थ—आणि संपूर्ण जाणण्याचे जे अनेक मार्ग शास्त्राने प्रगट केले आहेत, ते सर्व मार्ग ज्या गांवाला येऊन

पोहचतात व चारी वेदांत वेद्य म्हणजे जाणावयाचे म्हणून जें कांही सांगितलें आहे, तें मीच आहे. ॥ २७३ ॥ ज्या ठिकाणी निरनिराळ्या सर्व मताचा विरोध नाहीसा होतो, एका शास्त्रांतील प्रतिपाद्य विषयाची दुसऱ्या शास्त्रांतील प्रतिपाद्य विषयाशीं दिसून येणारी विसंगति जेथें नाहीशी होते, चुकलेलीं मते देखील जेथें मिळून जातात—म्हणजे त्यांचीहि एकवाक्यता करतां येते—आणि जे अत्यंत पवित्र म्हटलें जाते ते मीच आहें. ॥ २७४ ॥

गूढार्थदीपिका—"सर्वोषां च प्रस्थानकर्तृणां मुनीनां.......अद्वितीये परमेश्वरे एव तात्पर्यम्। नहि ते मुनयो भ्रांता: सर्वज्ञात्वात्तेषाम्" (महिम्नस्तोत्र श्लो. ७ मधुसूदनीं टीका) सर्व शास्त्रकारांनी व सर्व मतप्रवर्तकांनी एका परब्रह्माचेच वर्णन केलें आहे किंवा परब्रह्माच्या प्राप्तीचा मार्ग सांगितला आहे. फरक इतकाच की, ज्याप्रमाणे एकाच गांवाला जाणाऱ्या दोन मार्गांपैकीं एक मार्ग सरळ थेट त्या गांवालाच जाणारा असतो व दुसरा मार्ग दुसऱ्या गांवावरून जाणारा असतो. त्याप्रमाणे कांही शास्त्रकारांनी साक्षात् परब्रह्मप्राप्तीचा मार्ग सांगितला आहें व कांही शास्त्रकारांनी क्रमाक्रमाने किंवा परंपरेने भगवत्प्राप्तीचा मार्ग सांगितला आहे, शास्त्रकार कांही मूर्ख नव्हते. भगवंताच्या उपासनेने भगवंताच्या कृपेला पात्र असल्यामुळें भगवंतांनी त्यांना तें तें शास्त्र निर्माण करण्याचा अधिकार दिलेला असतो.

पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरु। घोषध्वनीनादाकारु। तयांचें गा भुवन जो ॐकारु। तोही मी गा॥ २७५ ॥
जया ॐकाराचिये कुशी। अक्षरें होती अउमकारेंसीं। जियें उपजत वेदेंसीं। उठलीं तीन्ही॥ २७६ ॥
म्हणोनि ऋग् यजुः सामु। हे तीन्ही म्हणें मी आत्मारामु। एवं मीचि कुळक्रमु। शब्दब्रह्माचा॥ २७७ ॥

अर्थ—तसेच ब्रह्मरूपी बीजाला घोष, ध्वनि, नाद व आकार या रूपाने किंवा परा, पश्यंति, मध्यमा, वैखरी या वाणीरूपाने जो अंकुर फुटला त्याचे राहण्याचें वसतिस्थान जो ॐकार तोहि मीच आहे. ॥ २७५ ॥ ज्या ॐकाराचे पोटांत अ, उ, म अशीं अक्षरें होतीं व जीं अ, उ, म अक्षरें उपजत असतांच वेदाला घेऊन उत्पन्न झालीं॥ २७६ ॥ म्हणून ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हे तिन्ही वेद मी आत्मारामच आहे. याप्रमाणे सर्व वैदिकवाङ्मयाची वंशपरंपरा मीच आहे. ॥ २७७ ॥

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्। प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम्॥ १८ ॥

अर्थ—गति म्हणजे प्रकृतीचा शेवट, भर्ता म्हणजे सर्व सृष्टीचें पोषण करणारा, प्रभु म्हणजे सर्व सृष्टीचा स्वामी, साक्षी म्हणजे अकर्ता, निवास म्हणजे सर्व सृष्टींत आंतबाहेर व्यापून असणारा, शरण म्हणजे सर्व भूतांना शरण जाण्यास योग्य, सुहृद म्हणजे सर्व भूतांचा निरपेक्ष हितकर्ता व सृष्टीची उत्पत्ति, नाश व स्थान यांचें नित्य असें बीज जेथे राहतें तें निधान, हें सर्व मीच आहे. ॥ १८ ॥

हें चराचर आघवें। जियें प्रकृतीआंत सांठवें। ते शिणली जेथ विसवे। ते परमगती मी॥ २७८ ॥
आणि जयाचेनि प्रकृती जिये। जेणें अधिष्ठिली विश्व विये। जो येऊनि प्रकृती इये। गुणातें भोगी॥ २७९ ॥
तो विश्वश्रियेचा भर्ता। मीचि गा पंडुसुता। मी गोसावी समस्ता। त्रैलोक्याचा॥ २८० ॥
आकाशें सर्वत्र वसावें। वायूनें नांवभरी उगें नसावें। पावकें दहावें। वर्षावें जळें॥ २८१ ॥
पर्वतीं बैसका न संडावी। समुद्रीं रेखा नोलांडावी। पृथ्वीया भूतें वाहावीं। हे आज्ञा माझी॥ २८२ ॥
म्यां बोलविल्या वेदु बोले। म्यां चालविल्या सूर्यु चाले। म्यां हालविल्या प्राणु हाले। जो जगातें चाळिता॥ २८३ ॥
मियांचि नियमिलासांता। काळु ग्रासितसे भूतां। इयें म्हणियागतें पंडुसुता। सकळें जयाचीं॥ २८४ ॥
ऐसा जो समर्थु। तो मी जगाचा नाथु। आणि गगनाऐसा साक्षिभूतु। तोही मीचि॥ २८५ ॥

अर्थ—ही सर्व भूतसृष्टि ज्या प्रकृतींत सांठविली जाते, ती शिणलेली प्रकृति जेथे विश्रांति पावते, ती शेवटली गति मी आहे. ॥ २७८ ॥ आणि ज्याच्यामुळें प्रकृति चेतनाप्रमाणे भासते व ज्याची सत्ता मिळाली असतां जी जगाला प्रसवते व जो या प्रकृतींत येऊन त्रिगुणाचा भोग घेतो. ॥ २७९ ॥ तो या सृष्टिवैभवाचा पोषण करणारा, अर्जुना! मीच आहे. मी सर्व ब्रह्मांडाचा स्वामीं व नियंता आहे. ॥ २८० ॥ आकाशाने सर्व सृष्टीला व्यापून असावे, वायूने क्षणभरहि स्वस्थ नसावें, अग्नीने प्रकाश द्यावा व पाण्याने वर्षाव करावा. ॥ २८१ ॥ पर्वताने आपली एका ठिकाणची बैठक

सोडू नये. समुद्राने आपल्या मर्यादेचे उल्लंघन करूं नये. पृथ्वीने भूतसृष्टीचें ओझें वहावें, ही माझीच आज्ञा आहे. ॥ २८२ ॥ मी बोलवितो म्हणून वेद बोलतो, मी चालवितो म्हणून सूर्य चालतो व सर्व जगाला कार्यक्षम करणारा जो प्राण, तो मी गति देतो म्हणून वाहतो. ॥ २८३ ॥ माझ्या आज्ञेनुसारच मृत्यु प्राण्यांना खातो; हे सर्व माझ्या म्हणण्याप्रमाणे वागणारे आहेत. ॥ २८४ ॥ असा जो सर्व समर्थ, तो मी जगाचा स्वामी आहे आणि कांही न करतां किंवा करवितां असा साक्षी होऊन राहणाराहि मीच आहे. ॥ २८५ ॥

गूढार्थदीपिका—हे सर्व धर्म भगवंताचे ठिकाणीं आरोपित आहेत असा वेदान्तसिद्धान्त आहे.

इहीं नामरूपीं आघवा। जो भरला असे पांडवा। आणि नामरूपांही वोल्हावा। आपणचि जो॥ २८६ ॥
जैसें जळाचे कल्लोळ। आणि कल्लोळीं आथी जळ। ऐसेनि वसवीतसे सकळ। तो निवासु मी॥ २८७ ॥
जो मज होय अनन्य शरण। त्याचें निवारीं मी जन्ममरण। यालागीं शरणागता शरण्य। मीचि एकु॥ २८८ ॥
मीचि एक अनेकपणें। वेगळालेनि प्रकृतिगुणें। जीत जगाचेनि प्राणें। वर्तत असें॥ २८९ ॥
जैसा समुद्र थिल्लर न म्हणतां। भलतेथ बिंबे सविता। तैसा ब्रह्मादि सर्वां भूतां। सुहृद तो मी॥ २९० ॥
मीचि गा पांडवा। या त्रिभुवनासि वोलावा। सृष्टिक्षयप्रभवा। मूळ तें मी॥ २९१ ॥
बीज शाखांतें प्रसवे। मग तें रूखपण बीजीं सामावे। तैसें संकल्पें होय आघवें। पाठीं संकल्पीं मिळे॥ २९२ ॥
ऐसें जगाचें बीज जो संकल्पु। अव्यक्त वासनारूपु। तया कल्पांतीं जेथ निक्षेपु। होय तें मी॥ २९३ ॥
इयें नामरूपें लोटती। वर्णव्यक्ती आटती। जातीचे भेद फिटती। जैं आकारु नाहीं॥ २९४ ॥
तैं संकल्पुवासनासंस्कार। माघौतें रचावया आकार। जेथ राहोनि असती अमर। तें निधान मी॥ २९५ ॥

अर्थ—अर्जुना! या संपूर्ण नामरूपांत जो भरला आहे व जो आपण नामरूपाचा जिव्हाळाहि आहे—म्हणजे नामरूपाला जें अस्तित्व आहे तें त्याचीच सत्ता होय. ॥ २८६ ॥ ज्याप्रमाणें पाण्याचेच तरंग होतात आणि तरंगांत पाणीच असतें, अशाप्रमाणें सर्व सृष्टि आपल्या ठिकाणीं जो धारण करतो, तो निवास मीच आहे. ॥ २८७ ॥ जो सर्वांचा आश्रय सोडून मला शरण आला, त्याचे जन्ममृत्यु मी नाहीसे करतो; म्हणून शरण जाणाऱ्यांना मीच एक शरण जाण्याला योग्य आहे. ॥ २८८ ॥ अर्जुना! प्रकृतीच्या वेगवेगळ्या गुणामुळें अनेकपणाने मीच भासतो व जगाचा प्राण जो मी त्या माझ्यामुळें जिवंत असे राहतात. ॥ २८९ ॥ ज्याप्रमाणे हा समुद्र आहे की डबकें आहे याचा विचार न करितां कोठेहि पाण्यात प्रतिबिंब पडतें, त्याप्रमाणें ब्रह्मादि सर्व भूतांचा अनादि निरपेक्ष हितकर्ता मीच आहे. ॥ २९० ॥ अर्जुना! या सर्व ब्रह्मांडाचा जिव्हाळा मीच असून सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयाचें मूळहि मीच आहे. ॥ २९१ ॥ ज्याप्रमाणें बीजापासून फांद्या उत्पन्न होऊन वृक्ष होतो व पुन: तो वृक्ष बीजांत लीन होतो, त्याप्रमाणें संकल्पापासून सृष्टी होते व पुन: ती सृष्टी संकल्पांतच लीन होते. ॥ २९२ ॥ याप्रमाणें अव्यक्त वासनारूप जो जगाचा बीजभूत संकल्प आहे, तो सृष्टिप्रळयाचे वेळीं जेथें ठेविला जातो तें ठिकाण मीच आहे. ॥ २९३ ॥ हीं सर्व नामरूपें नाहीशीं होतात, वर्णव्यक्तिहि राहत नाहीत, जातीचे जे भेद तेहि नाहीसे होतात व जेंव्हा आकार संपूर्ण लुप्त होतो. ॥ २९४ ॥ तेव्हा पुन: सृष्टीची उत्पत्ति करण्याकरितां सृष्टीचें कारणरूप संकल्प, वासना, संस्कार जेथे नाश न पावतां राहतात, तें निधान मी आहे. ॥ २९५ ॥

गूढार्थदीपिका—सच्चिदानंद परब्रह्माचे ठिकाणीं त्रिगुणात्मक मायेने भ्रांत झालेल्या जीवाच्या कल्पनेनुसार सृष्टि उत्पन्न होते हें माऊलींनी मागें सांगितलेंच आहे. पण त्या सृष्टीला कारण असणारी अविद्या, संस्कार इत्यादि कारणसामुग्रीहि ब्रह्मज्ञान होईपर्यंत नाश पावत नाही, हा आम्ही मागें सांगितलेला विचार माऊलींनीं येथे स्पष्ट केला आहे.

तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च। अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन॥ १९ ॥

अर्थ—अर्जुना! मीच सूर्य होऊन तापतो, त्यामुळे उष्णता किरणाचे रूपाने उत्पन्न होते, त्या उष्णतेमुळे मी पाणी शोषून घेतो व पुन: पाण्याचा वर्षाव करितो, अमरत्व, मृत्यु, सत्, असत्, कार्य, कारण या रूपानेहि मीच असतो. ॥ १९ ॥

मी सूर्याचेनि वेषें। तपें तैं हें शोषे। पाठीं इंद्र होऊनि वर्षे। तैं पुढती भरे॥ २९६॥
अग्नि काष्ठें खाये। तें काष्ठचि अग्नि होये। तैसें मरतें मारितें पाहें। स्वरूप माझें॥ २९७॥
यालागीं मृत्यूच्या भागीं जें जें। ते तेंही पैं रूप माझें। आणि न मरतें तंव सहजें। अविनाश मी॥ २९८॥
आतां बहु बोलोनि सांगावें। तें एकिहेळां घे पां आघवें। तरी सतासतही जाणावें। मीचि पैं गा॥ २९९॥

अर्थ—मी सूर्याच्या रूपानें जेव्हा तपतो जेव्हा हें सर्व शोषून घेतो आणि पुन: इंद्र या रूपाने वर्षाव करितो तेव्हा सर्व पुन: भरून जातें. ॥ २९६ ॥ ज्याप्रमाणे अग्नीने लांकूड जाळलें की लाकूडच अग्नि होतें, त्याप्रमाणे मरणारा मारणारा ही दोन्ही माझींच रूपें आहेत. ॥ २९७ ॥ म्हणून जें जें मृत्यूने ग्रासिलें आहे तें मीच आहे आणि न मरणारे म्हणजे अविनाशी जें आहे ते तर स्वभावत: मीच आहे. ॥ २९८ ॥ आतां विस्ताराने जें सांगायचें ते एकदाच सांगतो. जेवढे कांही सत्-असत् म्हणजे आहे-नाही म्हटलें जातें किंवा व्यक्त-अव्यक्त आहे अथवा अविनाशी व विनाशी आहे तें सर्व मीच आहे. ॥ २९९ ॥

गूढार्थदीपिका—या ओव्यांचा आशय हा आहे की भगवान नित्य सच्चिदानंद स्वरूपच आहे. देवता मनुष्य इत्यादिक व त्यांचीं कार्य हे सर्व जीवाने भगवंताचे ठिकाणीं कल्पिले आहेत; म्हणून एक भगवानच सर्व स्वरूपाने भासतो.

म्हणोनि अर्जुना मी नसें। ऐसा कवणु ठाव असे। परि प्राणियांचें दैव कैसें। जे न देखती मातें॥ ३००॥
तरंग पाणियेवीण सुकती। रश्मि वातीवीण न देखती। तैसे मीचि ते मी नव्हती। विस्मो देखें॥ ३०१॥
हें आंत बाहेर मियां कोंदलें। जग निखिल माझेंचि वोतिलें। कीं कैसें कर्म तयां आले। जे मीचि नाहीं म्हणती॥ ३०२॥
परि अमृतकुहां पडिजे। कां आपणयातें कडिये काढिजे। ऐसें आथी काय कीजे। अप्राप्तासी॥ ३०३॥
ग्रासा एका अन्नासाठीं। अंधु धांवताहे किरीटी। आडळला चिंतामणि पायें लोटी। आंधळेपणें॥ ३०४॥
तैसें ज्ञान जैं सांडूनि जाये। तैं ऐसी हे दशा आहे। म्हणोनि कीजे तें केलें नोहे। ज्ञानेंवीण॥ ३०५॥
आंधळेया गरुडाचे पांख आहाती। ते कवणा उपेगा जाती। तैसें सत्कर्माचे उपखे ठाती। ज्ञानेंवीण॥ ३०६॥

अर्थ—म्हणून अर्जुना! मी नाही असें कोणतें ठिकाण आहे सांग पाहू. पण प्राण्यांचें दुर्दैव पहा कसें आहे, सर्वत्र मीच असून ते मला पाहत नाहीत. ॥ ३०० ॥ पाण्यावांचून तरंग आटावे किंवा सूर्याच्या किरणाला वातीच्या प्रकाशावांचून दिसूं नये, त्याप्रमाणे सर्व जीव मद्रूपच आहेत, पण त्यांना तसे वाटत नाही, कसें आश्चर्य आहे पहा. ॥ ३०१ ॥ या जगाच्या आंतबाहेर मींच व्यापून आहे. एवढेंच नाही, तर संपूर्ण जग माझीच ओतलेली मूर्ति आहे, पण असें असून सुद्धा प्राण्यांचे दुर्दैव आड आल्यामुळे मीच नाहीं, असें ते म्हणतात. ॥ ३०२ ॥ सुदैवाने एखाद्याने अकस्मात अमृताच्या विहिरींत पडावें व आपल्यालाच बाहेर काढावें. अमृताची प्राप्ति व्हावयाची नसते म्हणून असें होत असतें त्याला काय करणार ? ॥ ३०३ ॥ हे अर्जुना! आंधळा भिकारी एका घांसभर अन्नाकरितां दारोदार धांवतो आणि समोर पडलेला चिंतामणि आंधळेपणाने न दिसल्यामुळे पायाने लाटतो. ॥ ३०४ ॥ त्याप्रमाणे ज्यांना यथार्थ ज्ञान नाही, त्यांची अशीच दशा होते. म्हणून जीवाकडून ज्ञान नसतांना जें केलें जातें तें योग्य केलें जात नाही. ॥ ३०५ ॥ आंधळ्या गरुडाला पंख असले तरी त्याला त्याचा काय उपयोग होणार ? त्याप्रमाणे ज्ञानावाचून सत्कर्माचे श्रम व्यर्थ जातात. ॥ ३०६ ॥

गूढार्थदीपिका—वास्तविक पाहतां भगवानच सर्व नामरूपाने नटला आहे. त्यावांचून दुसरी वस्तुच नाही. जीवाला हें ज्ञान नसल्यामुळें तो प्रत्येक नामरूपाचे ठिकाणीं परमेश्वराहून भिन्न वस्तूची कल्पना करतो, या नुसत्या कल्पनेमुळेच अत्यंत प्राप्त असलेला परमात्मा जीवाला अप्राप्त झाला आहे, हेंच माउलींनी या ओव्यांतून सांगितलें आहे.

त्रैविद्या मां सोमपा: पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते। ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोकमश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान्॥ २०॥

अर्थ—ज्यांनी ऋग्वेदादि तिन्ही वेदांचें अध्ययन केलें आहे व सोमपान करून निष्पाप झाले आहेत, असे

पुरुष यज्ञानी माझें यजन करून स्वर्गप्राप्ति व्हावी म्हणून माझी प्रार्थना करतात. ते पुण्यकारक अशा इंद्रलोकांस प्राप्त होऊन तेथे (स्वर्गांत) देवांचे अलौकिक भोग भोगतात. ॥ २० ॥

देख पां गा किरीटी। आश्रमधर्मांचिया राहाटी। विधिमार्गा कसवटी। जे आपणचि होती॥ ३०७॥
यजन करितां कौतुकें। तिहीं वेदांचा माथा तुके। क्रिया फळेंसि उभी ठाके। पुढां जयां॥ ३०८॥
ऐसे दीक्षित जे सोमप। जे आपणचि यज्ञाचें स्वरूप। तिहीं तया पुण्याचेनि नांवें पाप। जोडिलें देखें॥ ३०९॥
जे श्रुतित्रयातें जाणोनि। शतवरी यज्ञ करूनि। यजिलिया मातें चुकोनि। स्वर्गु वरिती॥ ३१०॥
जैसें कल्पतरुतळवटीं। बैसोनि झोळिये देतसे गांठी। मग निदैव निघे किरीटी। दैन्यचि करूं॥ ३११॥
तैसे शतक्रतूं यजिलें मातें। कीं ईप्सितातिं स्वर्गसुखांतें। आतां पुण्य कीं हें निरुतें। पाप नोहे॥ ३१२॥
म्हणोनि मजवीण पाविजे स्वर्गु। तो अज्ञानाचा पुण्यमार्गु। ज्ञानिये तयातें उपसर्गु। हानि म्हणती॥ ३१३॥
एऱ्हवीं तरी नरकींचें दुःख। पावोनि स्वर्गा नाम कीं सुख। वांचूनि नित्यानंद गा निर्दोष। तें स्वरूप माझें॥ ३१४॥
मज येतां पैं सुभटा। या द्विविधा गा अव्हांटा। स्वर्गु नरकु या वाटा। चोरांचिया॥ ३१५॥

अर्थ—बा अर्जुना! पहा, आश्रमधर्माचें अनुष्ठान करीत असतांना जें आपणच प्रत्यक्ष विधिमार्गाची कसोटी बनतात—(म्हणजें ज्यांच्या आश्रमधर्माप्रमाणे वागण्यावरून यथार्थ विधिमार्गाचें आचरण कसें करावें हें कळतें) ॥ ३०७ ॥ ते यजन करीत असतांना तिन्ही वेद कौतुकाने डोलूं लागतात. ज्याची झालेली यज्ञक्रिया फळासह साक्षात् त्यांच्यापुढे उभी राहते. ॥ ३०८ ॥ याप्रमाणे यज्ञाकरितां दीक्षा घेऊन सोमपान करणारे जे आपण साक्षात् यज्ञाचें स्वरूपच आहेत. पण त्यांनी, अर्जुना! पुण्याचे नांवाने पापाचीच जोडी केली असें समज. ॥ ३०९ ॥ कारण ते ऋग्वेदादि तीन वेदांचें अध्ययन करून असे शेकडों यज्ञ करून माझें यजन करतात, पण मला सोडून स्वर्गाला जातात. ॥ ३१० ॥ ज्याप्रमाणे कल्पतरूच्याखाली एखाद्याने बसून झोळीला गांठ द्यावी, मग त्या झोळींत कांहीच न पडल्यामुळें त्या दुर्दैवी प्राण्याने भीक मागायला निघावें. ॥ ३११ ॥ त्याप्रमाणे शंभर यज्ञ करून माझें यजन केलें व स्वर्गप्राप्तीची इच्छा मनांत धरिली, अर्जुना! सांग हे आतां पुण्य म्हणावें काय? खरोखर पाप नव्हे काय!॥ ३१२ ॥ म्हणून मला सोडून स्वर्गाची प्राप्ति होणे हा अज्ञानी मूर्खाचा पुण्यमार्ग होय. ज्ञानी किंवा जाणते जे आहेत ते मात्र स्वर्गप्राप्तीला, भगवत्प्राप्तीची हानी करणारीं म्हणजे भगवत्प्राप्तीला प्रतिबंध करणारी समजतात. ॥ ३१३ ॥ खरोखर पाहतां नरकातील दुःखाचे अपेक्षेने स्वर्गाला सुख हें नांव आहे. नरकांतील दुःख व स्वर्गातील क्षणिक सुख हे दोन्ही सोडून निर्दोष दुःखरहित असा जो नित्यानंद तें माझें स्वरूप आहे. ॥ ३१४ ॥ हें उत्तम योद्ध्या अर्जुना? माझ्याकडे येण्याच्या वाटेला लागलें असतां हे दोन आड मार्ग आहेत. स्वर्ग नरक या वाटा चोरांच्या म्हणजे आत्मचोरांच्या आहेत. ॥ ३१५ ॥

गूढार्थदीपिका—चोरी म्हणजे अपल्या मालकीची वस्तु आपल्यापासून न कळत दूर करणें. आत्मा हा जीवाचीच मूळ वस्तु आहे. स्वर्गप्राप्तीचीं पुण्यकर्मे व नरकप्राप्तीची पापकर्मे करून जीव हा आपल्या आत्मरूप मूळ स्वरूपाला विसरला-म्हणजे आपल्या मूळ स्वरूपाला दूर केलें म्हणून जीवाने आपल्या मूळ स्वरूपाची चोरी केली यास्तव तो आत्मचोर आहे.

स्वर्गा पुण्यात्मकें पापें येइजे। पापात्मकें पापें नरका जाइजे। मग मातें जेणें पाविजे। तें शुद्ध पुण्य॥ ३१६॥

अर्थ—ज्याला अज्ञानी लोक पुण्य म्हणतात, पण ज्याच्या योगाने परमेश्वर प्राप्ति होत नाही, म्हणून जें खरोखर पाप होय, त्या पुण्यरूप पापाने स्वर्गालां येतात व ज्याला अज्ञानी लोक पाप म्हणतात व ज्यायोगे परमेश्वर प्राप्ति होत नाही व पुनः नरकाला जावें लागतें म्हणून जें पापरूप पाप आहे, त्या पापरूप पापाने नरकाला जातात, पण अर्जुना! ज्याच्या योगाने माझी प्राप्ति होते तेंच शुद्ध पुण्य होय. ॥ ३१६ ॥

गूढार्थदीपिका—''प्रतिकूलवेदनीयं दुःखम्'' मनाच्या प्रतिकूल जें असतें त्याच्या योगाने दुःख होतें, नरकांतील यातना मनाला प्रतिकूल असतात म्हणून दुःखरूप आहेतच, पण ज्या पुण्याने स्वर्गातील सुख प्राप्ति होतें तें सुखहि अल्पकाळ टिकणारें असल्यामुळें ''दुःखमल्पसुखं स्मृतम्'' तेंहि मनाच्या प्रतिकूल असल्यामुळें दुःखरूपच

आहे. दुःख हें पापाचें फळ आहे. म्हणून येथें स्वर्गांतील सुखाला पुण्यरूप पाप व नरकांतील दुःखाला पापरूप पाप म्हटलें आहे. अर्थात् भगवंताची प्राप्ति अखंड सुखरूप असल्यामुळें ज्या कर्मानें ती प्राप्ति होते तें शुद्ध पुण्य होय असें माऊलीचें म्हणणें आहे.

आणि मजचिमाजीं असतां। जेणें मी दूरी होय पंडुसुता। तें पुण्य ऐसें म्हणतां। जीभ न तुटे काई॥ ३१७॥

अर्थ—आणि खरें पाहू गेलें असतां अर्जुना! जीव हा माझ्यांतच व मद्रूपच असतांना, ज्याच्या योगें माझी प्राप्ति दुरावते किंवा अंतरली जाते, त्याला पुण्य हें नांव देतांना जीभ झडणार नाही काय?॥ ३१७॥

परि हें असो आतां प्रस्तुत। ऐकें यापरी तें दीक्षित। यजूनि मातें याचित। स्वर्गभोगु॥ ३१८॥
मग मी न पविजे ऐसें। जें पापरूप पुण्य असे। तेणें लाधलेनि सौरसें। स्वर्गा येती॥ ३१९॥
जेथ अमरत्व हेंचि सिंहासन। ऐरावतासारिखें वाहन। राजधानी भुवन। अमरावती॥ ३२०॥
जेथ महासिद्धींचीं भांडारें। अमृताचीं कोठारें। जिये गांवीं खिल्लारें। कामधेनूंची॥ ३२१॥
जेथ वोळगे देव पाइका। सैंघ चिंतामणीचिया भूमिका। विनोदवनवाटिका सुरतरूंचिया॥ ३२२॥
गंधर्व गात गाणीं। जेथ रंभे ऐशिया नाचणी। उर्वशी मुख्य विलासिनी। अंतौरिया॥ ३२३॥
मदन वोळगे शेजारें। जेथ चंद्र शिंपे सांबरें। पवना ऐसें म्हणियारें। धांवणें जेथ॥ ३२४॥
पैं बृहस्पति मुख्य आपण। ऐसे स्वस्तीश्रियेचे ब्राह्मण। भाटिवेचे सुरगण। बहुवस जेथें॥ ३२५॥
लोकपाळ रांगेचे। राउत जिये पदवीचे। उच्चैःश्रवा खांचे। खोलणिये॥ ३२६॥
हें असो बहु ऐसें। भोग इंद्रसुखासरिसे। ते भोगिजती जंव असे। पुण्यलेशु॥ ३२७॥

अर्थ—पण अर्जुना हें आतां असूं दे. आता प्रस्तुत ऐक. याप्रमाणें ते दीक्षित माझेंच यजन करून माझ्या प्राप्तीची इच्छा न करितां स्वर्गसुखाची इच्छा करितात. ॥ ३१८॥ मग ज्या पुण्याने माझी प्राप्ती होत नाही त्या पुण्यरूप पापाने प्राप्त झालेल्या थोरपणामुळें स्वर्गाला येतात. ॥ ३१९॥ अर्जुना! ज्या स्वर्गामध्ये अमरत्व हें सिंहासन आहे. ऐरावत हत्तीसारखे वाहन मिळतें व अमरावतीसारख्या राजधानींत रहायला मिळतें. ॥ ३२०॥ जेथे अणिमादि सिद्धींचीं भांडारें म्हणजे खजीने आहेत अमृताचीं मोठमोठीं कोठारें आहेत आणि कामधेनूचे कळप आहेत. ॥ ३२१॥ ज्या स्वर्गांत देवसमुदाय चाकर होऊन राबतांत. जेथील सर्व जमीन चिंतामणी मण्यांची केलेली आहे व जेथें विहार करण्याकरितां कल्पतरूचे बाग उपवनें आहेत. ॥ ३२२॥ स्वर्गवासी लोकांच्या करमणुकीकरितां गंधर्व गाणीं गातात. रंभेसारख्या अप्सरा नर्तकी असतात व कामविलास करण्याकरितां मुख्य उर्वशीसारख्या स्त्रिया असतात. ॥ ३२३॥ शयनगृहांत प्रत्यक्ष मदनच सेवा करितो आणि चंद्र आपल्या अमृतकिरणांनी सडासंमार्जन करीत असतो. तोंडांतून शब्द निघाल्याबरोबर एकदम धांवून काम करणारें वायूसारखे चाकर आहेत. ॥ ३२४॥ बृहस्पति ज्यांत मुख्य आहे असे ब्राह्मण आशीर्वाद देऊन आपलें कल्याण इच्छिणारे असतात आणि भाटासारखे आपल्या गुणांचे वर्णन करून स्तुतिपाठ करणारे अनेक देव आहेत. ॥ ३२५॥ जेथे लोकपाळांच्या योग्यतेचे देव घोडेस्वारांच्या स्थानीं असतात आणि इंद्राचा उच्चैःश्रवा घोडा पुढे चालणारा असतो. ॥ ३२६॥ अर्जुना! हें आतां पुरें. सांगायचें तें हे की जोपर्यंत पुण्य आहे तोपर्यंत इंद्राच्या सुखभोगासारखा भोग भोगायला मिळतो. ॥ ३२७॥

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति।
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते॥ २१॥

अर्थ—अशा विस्तीर्ण स्वर्गलोकांतील भोग भोगून पुण्य क्षीण झाल्याबरोबर ते मृत्युलोकांत परत येतात. याप्रमाणे तीन वेदांनी सांगितलेल्या वैदिकधर्माचें अनुष्ठान करणारे विषयसुखाचीच इच्छा करतात आणि जाणें—येणें करीत असतात. ॥ २१॥

मग तया पुण्याची पाउटी सरे। सवेंचि इंद्रपणाची उटी उतरे। आणि येऊं लागती माघारे। मृत्युलोका॥ ३२८॥
जैसा वेश्याभोगी कवडा वेंचे। मग दारही चेपूं न ये तियेचें। तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें। काय सांगों॥ ३२९॥

एवं थितिया मातें चुकले। जिहीं पुण्यें स्वर्ग कामिले। तया अमरपण तें वावो जालें। आतां मृत्युलोक॥ ३३०॥
मातेचिया उदरकुहरीं। पचूनि विष्ठेचां दाथरीं। उकडूनि नवमासवरी। जन्मजन्मोनि मरती॥ ३३१॥
अगा स्वप्नी निधान फावे। परि चेइलिया हारपे आघवें। तैसें स्वर्गसुख जाणावें। वेदज्ञाचें॥ ३३२॥
अर्जुना वेदविद जऱ्ही जाहला। तरि मातें नेणतां वायां गेला। कणु सांडूनि उपणिला। कोंडा जैसा॥ ३३३॥
म्हणऊनि मज एकेविण। हे त्रयीधर्म अकारण। आतां मातें जाणोनि कांहीं नेण। तूं सुखिया होसी॥ ३३४॥

अर्थ—मग ज्या पुण्यरूप पायरीने स्वर्गाला गेलें त्या पुण्याची पायरी नाहीशी झाली म्हणजे तत्क्षणी प्राप्त झालेले तें इंद्रपणाचें वैभव नाहीसें होतें आणि परत मृत्यु लोकांत ते येऊं लागतात. ॥ ३२८ ॥ ज्याप्रमाणे वेश्येच्या समागमांत संपूर्ण द्रव्य नाहीसें झालें असता मग तिच्यां दाराला देखील हात लावतां येत नाही, त्याप्रमाणे, अर्जुना! काय सांगू! या दीक्षितांची लाजिरवाणी स्थिति होत असते. ॥ ३२९ ॥ याप्रमाणे जे पुण्य करून स्वर्गाची इच्छा करितात, हे त्यांच्याच ठिकाणीं असलेल्या मला विसरतात व त्यांचें अमरत्वहि व्यर्थ होऊन शेवटीं मृत्युलोकांत येतात. ॥ ३३० ॥ आईच्या पोटांतील गर्भाशयरूपी गुहेंत विष्ठेच्या संचयाने उत्पन्न झालेल्या उष्ण घाणींत नव महिनेपर्यंत शिजत राहून ते जन्माला येत असतात व मरत असतात. ॥ ३३१ ॥ बा अर्जुना! ज्याप्रमाणे स्वप्नामध्ये धन सांपडते व जाग आल्यावर सर्व नाहीसें होतें, त्याप्रमाणेच (स्वर्गाकरितां कर्म करावें अशी वेदाची आज्ञा आहे असा वेदाचा अर्थ करणारे) जे वेदज्ञ आहेत त्यांनी मिळविलेलें स्वर्गसुख असे असतें. ॥ ३३२ ॥ ज्याप्रमाणे धान्यरहित नुसता कोंडा वाऱ्यावेंर उडविणें व्यर्थ आहे, त्याप्रमाणे अर्जुना! असा वेदज्ञ जरी असला तरी माझ्या प्राप्तीवांचून त्याचें जिणें व्यर्थ आहे. ॥ ३३३ ॥ म्हणून एका माझ्या प्राप्तीवांचून स्वर्गाकरितां केलेले वेदोक्त कर्म व्यर्थ आहे. आतां कांही एक दुसरे न जाणतां मला एकाला जाणलें तर तूं सुखी होशील. ॥ ३३४ ॥

गूढार्थदीपिका—प्रवृत्तिरूप वैदिक धर्म देखील खरोखर भगवत्प्राप्ति करून घेण्याकरितांच निर्माण झाला आहे. म्हणून त्यांत सांगिलेल्या स्वर्गादि फळांची इच्छा सोडून निष्कामचित्ताने भगवत्प्रीत्यर्थ त्याचें अनुष्ठान करावें असा भाव.

आतां पुढील श्लोकांत सर्व देवतांचा आश्रय सोडून एका भगवंताचीच अनन्यभावाने उपासना करणें या एकान्तभक्तींतील विशेषाचें भगवान वर्णन करतात.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥ २२॥

अर्थ—सर्वांचा आश्रय सोडून व माझ्याशीं अनन्य होऊन जे लोक माझें चिंतन करीत माझी सर्वभावाने उपासना करितात, त्या एकनिष्ठ उपासकांचा योगक्षेम मी चालवितों. ॥ २२ ॥

पैं सर्वभावेंसीं उखितें। जे वोपिले मज चित्तें। जैसा गर्भगोळु उद्यमातें। कोण्याही नेणे॥ ३३५॥

अर्थ—ज्याप्रमाणे गर्भांतील पिंड आपल्याकरिता कोणताहि प्रयत्न करीत नाही, त्याप्रमाणे सर्व भाव मला समर्पण करून जे चित्ताने मला समर्पण झाले. ॥ ३३५ ॥

गूढार्थदीपिका—सर्व भावेसीं उखितें। वोपिले मज चित्तें—उखिते म्हणजे निःशेष. अज्ञानी पुरुष बुद्धि, मन, अहंकार, इंद्रियें, देह, प्राण वगैरे यांचें सर्व व्यापार किंवा सर्व राहाटी एका आपल्याकरिताच करीत असतो, म्हणून जीवाचे निराळें अस्तित्व कायम राहते; पण हेच सर्वभाव भगवंताकरिता झाले असतां तो भगवंताला समर्पण होतो म्हणजे भगवत्स्वरूप होतो.

जीवाचे ठिकाणीं अहंता किंवा मीपण व ममता किंवा माझेपण असे दोन भाव आहेत. हे दोन्ही भाव तो देहाचे ठिकाणीं वागवितो. या दोन भावाने देहाचें संपूर्ण प्रेम केलें जातें व देहभावना दृढ होते. अहंताभावाने देहाशीं ऐक्य होतें व ममताभावाने देहाचें प्रेम केलें जातें. देहाचे ठिकाणीं जीव माझेपण वागवितो, म्हणून त्याला त्याचें सर्वांपेक्षा अत्यंत प्रेम असतें व देहाच्या सुखाला कारणीभूत होणाऱ्या घर, दार, मुलें, धन इत्यादि पदार्थांवरहि तो माझें माझें म्हणून ममताप्रेम करीत असतो. या देहाच्या ममताप्रेमामुळे त्याची देहावर अहंताहि बसली आहे किंवा देहाशी ऐक्यहि झालें आहे.

देहाप्रमाणेच, सगुण भगवंताला, तोच एक माझा समजून प्रेम केल्यास, जेवढ्या पदार्थांना माझें माझें म्हणून म्हणतो व निरनिराळ्या रीतीने त्याचे प्रेमसंबंध जोडतो, तेवढे सर्व पदार्थ व त्यांचे संबंध, सगुण भगवंताकडे जोडले जातात.

अशा रीतीने सर्व माझेपण किंवा ममताप्रेम भगवंतावर करणें यालाच भक्ति म्हणतात. "हेचि थोर भक्ति आवडते देवा। संकल्पावी माया संसाराची" असें तुकाराम महाराजांचेहि म्हणणे आहे. "यद्धामार्थसुहृत्प्रियात्मत-नयप्राणाशयास्त्वत्कृते" (भाग. स्कं. १० अ. १४-३५) गोपिकांनीहि आपले मित्र, प्रियपदार्थ, देह, पुत्र, प्राण व मन इत्यादि सर्व भगवंताला समर्पण केले होते, असें श्रीशुकाचार्यांनी त्यांच्या भक्तीचें वर्णन केलें आहे. हेंच 'उखितें' सर्वं भावाने भगवंताला समर्पण करणें होय. या सर्वभावसमर्पणाने शेवटीं भक्ताचें मीपणहि माझेपणाबरोबर न कळत भगवंतावर बसतें-म्हणजे त्याचें भगवंताशीं जाणीवरहित ऐक्य होतें. याप्रमाणे मीपण व माझेपण किंवा अहंताममता भगवंतावर बसली की त्याला देहाचा विसर पडून त्याचें संपूर्ण प्रेम भगवंतावर बसतें यालाच माऊलींनी "वोपिलें मज चित्तें" म्हटलें आहे.

की गर्भगोळ उद्यमातें। कोण्याहि नेणें—अशा रीतीने अहंता-ममता समर्पण झाल्यावर भक्ताकडून आपल्या देहाच्या सुखाचा किंवा संसाराचा कोणताहि प्रयत्न होत नाही, हेंच माऊलींनी गर्भगोळाचा दृष्टान्त देऊन सुचविलें आहे.

तैसा मीवांचूनि कांहीं। आणीक गोमटेंचि नाहीं। मजचि नाम पाहीं। जिणेया ठेविलें॥ ३३६ ॥

अर्थ—त्याप्रमाणे माझ्यावांचून ज्यांना कांहीच गोड वाटत नाही व जगणें हें नांव ज्यांनी मलाच ठेविलें-म्हणजे माझे प्रेमाकरिताच जे जिवंत राहतात. ॥ ३३६ ॥

गूढार्थदीपिका—तैसा मीवांचूनि कांहीं। आणीक गोमटेंचि नाहीं—या चरणाने भक्ताचा संपूर्ण मनोभाव भगवंताला समर्पण होतो हें दाखविलें आहे.

"आत्मनस्तु कामाय सर्वं प्रिय भवति" या श्रुतीने निर्गुण प्रत्यगात्मस्वरूप हें परमप्रिय आहे असें सांगितलें आहे, पण भक्तांना "प्रत्यगात्मयातें मीपण। तेहि मानोनियां गौण" (ए. भा. अ. २-६४२) प्रत्यगात्मस्वरूपहि त्याच्या मनाला, भगवंताच्या सगुणस्वरूपा इतकें गोड वाटत नाही. तेथे देह व विषय हें गोड वाटणें दूरच राहिलें.

"अद्वैतीं तो नाहीं माझें समाधान। गोड हे चरण सेवा तुझी" "नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितिभाव। मी भक्त तूं देव ऐसे करी" इत्यादि तुकाराम महाराजांचीं वचनें आहेत. भगवंताचें षड्गुणैश्वर्यसंपन्न सगुणस्वरूप भक्ताच्या मनाला व इंद्रियांना इतके मोहून घेणारें होतें की त्यांचीं मन, इंद्रियें सर्व भगवंताच्या सगुणस्वरूपाचे ठिकाणीं गुंतून राहतात.

मजचि नाम पाही। जिणेया ठेविलें—मनाला जें गोड वाटतें त्याचेंच बुद्धींत ध्यान होतें. भगवंताचे सगुणस्वरूप मनाला गोड वाटून मन भगवंताला समर्पण झालें की त्यामुळें बुद्धीलाहि भगवंताचेंच ध्यान होतें व त्या ध्यानाने ती भगवत्अर्पण होते.

"यज्जीवितं तु निखिलं भगवान्मुकुंद:" भक्ताचें सर्व जीवन—म्हणजे देह, दहा इंद्रियें, पंचप्राण, मन, बुद्धि या सर्वांचे व्यापार एक भगवंताकरितांच होऊन त्यांचें सर्व जीवन भगवन्मय होतें व भगवत्प्रेमाकरिताच भक्त जिवंत राहतात.

ऐसें अनन्यगतिकें चित्तें। चिंतितसांते मातें। जे उपासिती तयांतें। मीचि सेवीं॥ ३३७॥
ते एकवटूनि जिये क्षणीं। अनुसरले गा माझिये वाहणीं। तेव्हांचि तयांची चिंतवणी। मजचि पडली॥ ३३८ ॥
मग तिहीं जें जें करावें। तें मजचि पडिलें आघवें। जैसी अजातपक्षांचेनि जीवें। पक्षिणी जिये॥ ३३९ ॥

अर्थ—असे जे अनन्यचित्ताने माझें चिंतन करीत माझी उपासना करितात, त्यांची मी सेवा करितो. ॥ ३३७॥ माझ्याशीं ऐक्य पांवून व सर्व इंद्रियें, मन, बुद्धि या सर्वांचे व्यापार माझे ठिकाणीं लावून अनन्यचित्ताने ज्याक्षणीं माझ्या सेवेंत लागले, त्याक्षणींच त्यांची सर्व काळजी मला लागली. ॥ ३३८ ॥ ज्याप्रमाणें ज्यांना पंख फुटले नाहीत,

त्या पिलांच्या जीवनाच्या रूपाने पक्षीण जगते किंवा पिलांचें जीवनच पक्षिणीचें जीवन होऊन राहतें, त्याप्रमाणे भक्तांनी आपल्याकरिता जें जें करायला पाहिजे तें तें सर्व मीच करतों. ॥ ३३९ ॥

गूढार्थदीपिका—जैसी अजातपक्षाचेनि जीवें। पक्षिणी जिये— भक्त जसा भगवंताचें नि:सीम प्रेम करतो, तसा भगवंतहि भक्ताचे नि:सीम प्रेम करतो, असे "म्हणाल भक्त केवळ वेडीं। तुझिया भजनीं धरिती गोडी। परि तुज तयांची आवडी। नसेल गाढी अणि प्रीति॥ १३५॥ भजनीं भक्तांचा शुद्ध भावो। तेथ मजही पहाहो। अति प्रीती॥ १३९॥ (ए. भा. अ. १४) नाथ म्हणतात. सगुण भगवानहि समस्वरूप आहे, म्हणूनच तो भावनेप्रमाणें अनुभवास येतो. ज्यांना भगवंताचें प्रेम नाही त्यांना भगवंताच्या प्रेमाचा अनुभव येत नाही. भक्ताचें भगवंतावर नि:सीम प्रेम असतें; म्हणून त्यांना भगवंताच्या नि:सीम प्रेमाचा अनुभव येतो. भक्त भगवत्प्रेमाकरिता जगतो, तर भगवानहि भक्तिप्रेमामुळेच सगुण होतो.

आपुली तहानभूक नेणे। तान्हया निकें तें माउलीसीचि करणें। तैसे अनुसरले जे मज प्राणें। तयांचे सर्व मी करी॥ ३४०॥

अर्थ—लहान मूल आपली तहान भूक कांही जाणत नाही, त्याची सर्व चिंता आईलाच करावी लागते, त्याप्रमाणे सर्व जीव-प्राण मला अर्पण करून जे माझी उपासना करतात त्यांचे सर्व मीहि तितक्याच प्रेमाने करीत असतो. ॥ ३४० ॥

गूढार्थदीपिका—सर्व मी करी—

किमलभ्यं भगवति प्रसन्ने श्रीनिकेतने। तथापि तत्परा राजन्न हि वांछन्ति किंचन॥ (भाग. स्कं. १० अ. ३९-२)

लक्ष्मीपति प्रसन्न झाला असतां अलभ्य असें कांही नसतें, हें भक्त जाणून असतात, पण आपल्या सुखाकरिता प्रिय परमात्म्याला शिणविणें हें प्रेमाचें लक्षण नव्हे; म्हणून भक्त भगवंताला आपल्याकरिता यत्किंचित्हि श्रम देऊं इच्छित नाही व भगवंतापासून कांही मागतहि नाही; पण भक्ताची इच्छा नसली, तरी त्याचें निष्काम परम प्रेम "ते ऋणवैपण देखोनि आंगीं" हें आपल्यावर ऋण आहे असें समजून भगवानच "उत्तीर्णत्वालागीं। परिचर्या करी" आपण होऊन त्याचें कांही उणें पडूं देत नाही.

तया माझिया सायुज्याची चाड। तरि तेंचि पुरवीं कोड। कां सेवा म्हणती तरी आड। प्रेम सुयें॥ ३४१॥
ऐसा मनीं जो जो धरिती भावो। तो तो पुढां पुढां लागें तयां देवों। आणि दिधलियाचा निर्वाहो। तोही मीचि करीं॥ ३४२॥
हा योगक्षेमु आघवा। तयांचा मजचि पडिला पांडवा। जयांचिया सर्वभावा। आश्रयो मी॥ ३४३॥

अर्थ—माझ्या परम भक्तांना माझ्या ऐक्याची इच्छा असली, तर तीच त्यांची इच्छा मी पुरवितों आणि माझ्या सगुण स्वरूपाची प्रेमभक्तिसेवा करावी अशी इच्छा असल्यास त्याच्या अंत:करणांत परम प्रेम प्रगट करतों. ॥ ३४१ ॥ याप्रमाणे जो जो भाव धरून ते माझी उपासना करितात, तो तो भाव मी पूर्ण करतो व दिलेल्या भावाचें रक्षणहि मीच करतों. ॥ ३४२ ॥ अर्जुना! ज्यांच्या सर्व प्रेमभावाला मीच आश्रय झालों त्यांचा योगक्षेम मलाच चालवावा लागतों. ॥ ३४३ ॥

गूढार्थदीपिका—सायुज्यता म्हणजे सगुण भगवंताशीं जिवंतपणीं व मेल्यावरहि अखंड ऐक्य राहणें.

योग म्हणजे अप्राप्तीची प्राप्ति आणि क्षेम म्हणजे त्या प्राप्तीचें रक्षण, असे माऊलींनीच अर्थ केले आहेत. भक्तांना भगवंताची अप्राप्ति असते व त्याची प्राप्ति व्हावी असें वाटतें आणि ती प्राप्ति झाल्यावर ती तशी अखंड राहावी असेंहि वाटतें. "आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राही। जों मी तुज पाही पांडुरंगा" असें तुकाराम महाराज म्हणतात. पण हे दोन्ही भगवंतच करूं शकतो. तरंग जसा सर्वस्वीं व्यापक समुद्राचे स्वाधीन असतो तसा जीवहि परमेश्वराच्या परतंत्र आहे. "परात्तु तत्श्रुतेः" (ब्र. सू. २-३-४१) जीवाचें जसें बरें वाईट पूर्वकर्म व वासना असेल तसें तो परमात्मा "एष ह्येव साधुकर्म कारयति" त्या जीवाकडून कर्म करवितो व त्याचे फल देतो असा वेदान्त सिद्धान्त आहे. त्या त्या कर्माचा भगवंताशीं कांही एक संबंध नाही जीवाकडून ते कर्म करविणें व त्याचे फळ देणें हे दोन्ही जर भगवंताच्या स्वाधीन आहे, तर स्वतः भगवान सगुणरूप व प्रेमरूप असल्यामुळे त्याचे भक्ताचे हृदयांत

सगुणरूपाने व प्रेमरूपाने प्रगट होणें सर्वस्वीं भगवंताचे स्वाधीन आहे, हे काय सांगायचे? भक्तांनी मागावे व भगवंतांनी ते पूर्ण करावें हाच सिद्धांत आहे.

''मुख्यतस्तु भगवत्कृपालेशाद्वा'' भगवत्प्रेम भगवंतच देऊं शकतो असें भक्तिसूत्र असून ''माझे हातीं आहे करावें चिंतन। तुम्ही कृपादान प्रेम द्यावे'' असें तुकाराम महाराजहि म्हणतात.

येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः। तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम्॥ २३॥

अर्थ—दुसऱ्या देवतांची अत्यंत श्रद्धेने उपासना करणारे जे भक्त आहेत ते देखील अविधिपूर्वक माझेंच यजन करितात. ॥ २३ ॥

आतां आणीकही संप्रदायें। परि मातें नेणती समवायें। जें अग्निइंद्रसूर्यसोमां ये। म्हणऊनि यजिती॥ ३४४॥
तेही कीर मातेंचि होये। कां जे हें आघवें मीचि आहें। परि ते भजती उजरी नव्हे। विषम पडे॥ ३४५॥

अर्थ—अर्जुना! (आणिकहि दुसऱ्या देवतांच्या यजनाचा संप्रदाय आहे) त्यांत अग्नि, इंद्र, सूर्य, सोम इत्यादि देवतांचें यजन केलें जातें, पण त्या दैवतांतहि मीच एक भरून आहे, हें तें सांप्रदायिक जाणत नाहीत. ॥ ३४४॥ मीच सर्व नामरूपांत भरून असल्यामुळे अग्नि इंद्र, सूर्य, सोमादि देवतांचें जें यजन केलें जातें तें सर्व यजन खरोखर माझेंच होतें यांत शंका नाही. पण तें भजन मला सोडून साक्षात् देवतांच्या भावनेने होत असल्यामुळे, तें माझें सरळ भजन न होतां वांकडें भजन होतें. ॥ ३४५॥

गूढार्थदीपिका—''एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः'' (ऋग्वेद)

एकाच सद्ब्रह्मवस्तूला ऋषीनी अग्नि, इंद्र, सोम, सूर्य इत्यादि नावें दिलीं आहेत अशी ऋग्वेदांत ऋचा असून इंद्रादि देवता परमेश्वराहून भिन्न नाहीत. एक परमेश्वरच त्या त्या नांवाने संबोधिला गेला आहे, असा त्या ऋचेचा अर्थ आहे; म्हणून इंद्रादिकदेवतांचें यजन म्हणजे परमेश्वराचेंच यजन होत असलें, तरी परमेश्वर विसरून व परमेश्वराहून इंद्रादि देवतांना निराळें मानून त्यांचें यजन करणें हें परमेश्वराचें अविधि यजन होतें, विधिपूर्वक यजन होत नाही.

इंद्रादि देवतांत परमेश्वराची भावना ठेवून व परमेश्वराकडेच चित्त ठेवून इंद्रादि देवतांचे यजन करणें हें विधिपूर्वक परमेश्वराचें यजन होते असा अर्थ.

पाहें पां शाखा पल्लव वृक्षाचे। हे काय नव्हती एकाचि बीजाचे। परि पाणी घेणें मुळाचें। तें मुळींचि घापे॥ ३४६॥
कां दहाही इंद्रियें आहाती। इयें जरी एकेचि देहींचीं होती। आणि इहीं सेविले विषयो जाती। एकाचि ठायां॥ ३४७॥
तरि करोनि रससोय बरवी। कानीं केविं भरावी। फुलें आणोनि बांधावीं। डोळां केविं॥ ३४८॥
तेथ रसु तो मुखेंचि सेवावा। परिमळु तो घ्राणेंचि घ्यावा। तैसा मी तो यजावा। मीचि म्हणोनि॥ ३४९॥
येर मातें नेणोनि भजन। तें वायांचि गा आनेंआन। म्हणोनि कर्माचे डोळे ज्ञान। तें निर्दोष होआवें॥ ३५०॥

अर्थ—हें पहा अर्जुना! झाडाला फांद्या, पानें वगैरे असतात. ते सर्व एकाच बीजाचे नव्हेत काय? पण पाणी घेण्याचें काम मुळाचें असल्यामुळे, मुळाशींच पाणी घातलें पाहिजे. ॥ ३४६॥ किंवा दहा इंद्रियें आहेत व तीं एकाच देहाचीं असतात आणि त्यांच्याद्वारा जे विषय भोगले जातात तेहि एकाच ठिकाणीं जातात. ॥ ३४७॥ म्हणून उत्तम पंचपक्वान्न तयार करून, तें पंचपक्वान्न कानांत घालावें काय? फुलें आणून डोळ्यानी त्यांचा वास घ्यावा काय?॥ ३४८॥ असें नाही तर रसविषयाचें सेवन मुखानेच केलें पाहिजे. सुवास नाकाने घ्यावयाचां असतो त्याप्रमाणे माझें भजन करावयाचें तर माझ्याच भावनेने केलें पाहिजे. ॥ ३४९॥ यावांचून मला विसरून दुसऱ्याच्या भावनेने जें माझें भजन केलें जातें तें व्यर्थ होतें, म्हणून कर्म करावें. हे ज्ञानरूपी कर्माचे डोळे निर्दोष स्वच्छ असायला पाहिजेत. ॥ ३५०॥

गूढार्थदीपिका—निष्काम कर्माने श्रेय प्राप्ति होते हें मागें दुसऱ्या अध्यायांत सांगितलें आहे. देव व पितर यांचें निष्काम यजन, त्याचें ध्यान ठेवून करायचें असतें व त्या यजनाने त्यांच्या प्राप्तीद्वारा मोक्षप्राप्ति होते.

निष्कामकर्मद्वारा सगुण भगवंताची प्राप्ति व्हावी अशी इच्छा असल्यास, सगुण भगवंताचें ध्यान ठेवून तत्प्रीत्यर्थच कर्म केलें पाहिजे. हेंच ज्ञान, कर्म करणाऱ्याला असायला पाहिजे.

अवतरणिका—**इंद्रादि देवतांनाच मुख्य समजून यज्ञाचरण करणें, हें योग्य कसें आहे, हें आतां भगवान सांगतात.**

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च। न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते॥ २४॥

अर्थ—अर्जुना! मीच सर्व यज्ञांचा भोक्ता असून स्वामी आहे, पण मला या तात्त्विकदृष्टीने कोणी जाणत नाहीत म्हणून त्यांना माझी प्राप्ति होत नाही. ॥ २४ ॥

गूढार्थदीपिका—प्रभू म्हणजे स्वामी जीवाच्या कर्माप्रमाणे एक भगवानच निग्रह व अनुग्रहरूप फळ देणारा आहे असा ''फलमत उपपत्तेः'' (वे. सू. ३-२-३८) या सूत्रांत सिद्धान्त केला आहे व यज्ञादि कर्माचें फळ देणारा मीच आहे, असें ''प्रभू'' या शब्दाने भगवंतांनी येथें स्पष्ट केलें आहे.

त्याचप्रमाणे भगवान म्हणतात मीच भोक्ता आहे, 'भोक्ता' या शब्दाचा भोग घेणारा किंवा सुख मानणारा असा अर्थ असला तरी आप्तकाम भगवान भोक्ता होत नसल्यामुळे, तो अर्थ येथे घेतां येत नाही. येथें 'भोक्ता या शब्दाचा अर्थ समर्पण केलेले उपचार ग्रहण करणारा किंवा स्वीकारणारा असा आहे. जो कर्मफल देणारा असतो त्यालाच कर्म समर्पण केलें जातें व तोच कर्माचा अंगीकार करतो.

एक परमात्माच वरीलप्रमाणे कर्माचें फळ देणारा असल्यामुळें तोच भोक्ताहि आहे आणि कर्माअंतीं सर्व कर्म भगवंताला अर्पण केलेंहि जातें.

एऱ्हवीं पाहें पां पंडुसुता। या यज्ञोपहारां समस्तां। मीवांचूनि भोक्ता। कवणु आहे॥ ३५१ ॥
मी सकळां यज्ञांचा आदि। आणि यजना या मीचि अवधि। कीं मातें चुकोनि दुर्बुद्धि। देवां भजले॥ ३५२ ॥

अर्थ—हे पहा अर्जुना! या यज्ञांत जेवढें कांही समर्पण केलें जातें, त्याचा भोक्ता माझ्यावांचून कोण आहे?॥ ३५१ ॥ मी सर्व यज्ञांचें मूळ आहे. सर्व यज्ञ माझ्यापासून प्रगट झाले आणि या सर्व यज्ञक्रिया माझ्याच ठिकाणीं समाप्त होतात, असें असून माझी भावना न ठेवतां हे दुर्बुद्धि याज्ञिक देवतांची भावना ठेवतात व देवतांचें यजन करतात. ॥ ३५२ ॥

गूढार्थदीपिका—माते चुकोनि दुर्बुद्धि। देवा भजले—सर्व भावाने परमात्माच प्रगट आहे आणि ही बुद्धि ठेवून यजन केलें असतां, अनायासें परमात्मा प्राप्त होतो, पण सर्वव्यापी परमेश्वराला विसरून, त्याच्याहून निराळ्या इंद्रादिक देवतांची कल्पना करून व त्यांना मुख्य मानून त्यांचेंच यजन केलें असतां, परमेश्वर प्राप्ति होत नसल्यामुळें अशी बुद्धि दुर्बुद्धिच ठरते.

गंगेचें उदक गंगे जैसें। अर्पिजे देवपितरोद्देशें। माझें मज देती तैसें। परि आनानीं भावीं॥ ३५३ ॥
म्हणऊनि ते पार्था। मातें न पवतीचि सर्वथा। मग मनीं वाहिली जे आस्था। तेथ आले॥ ३५४ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे गंगेवर बसून गंगेच्या पाण्याने तर्पण करणारा गंगेचें पाणी गंगेलाच अर्पण करितो, पण देव-पितर यांची भावना ठेऊन अर्पण करितो, त्याप्रमाणे मीच सर्व आहे, मीच सर्व कर्माचा भोक्ता व स्वामी आहे, म्हणून माझेंच मला दिलें जातें, हें खरें, पण भावना मात्र निरनिराळी असते. ॥ ३५३ ॥ म्हणूनच अर्जुना! ते मला प्राप्त होत नाहीत, त्यांच्या मनांत ज्या देवतेची श्रद्धा असते त्या देवतेलाच ते प्राप्त होतात. ॥ ३५४ ॥

यान्ति देवव्रता देवान्पितॄन्यान्ति पितृव्रताः। भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम्॥ २५ ॥

अर्थ—देवाची भक्ति करणारे देवाला प्राप्त होतात, पितरांची भक्ति करणारे पितरांना प्राप्त होतात, भूतादिकांचें यजन करणारे भूतादिकांना प्राप्त होतात आणि तसेंच माझी भक्ति करणारे मला प्राप्त होतात. ॥ २५ ॥

मनें वाचा करणीं। जयांची भजनें देवांचिया वाहणीं। ते शरीर जातियेक्षणीं। देवचि जाले॥ ३५५ ॥
अथवा पितरांचीं व्रतें। वाहती जयांचीं चित्तें। जीवित सरलिया तयांतें। पितृत्व वरी॥ ३५६ ॥
कां क्षुद्रदेवतादि भूतें। तियेंचि जयांचीं परमदैवतें। जिहीं अभिचारिकीं तयांतें। उपासिलें॥ ३५७ ॥

तयां देहाची जवनिका फिटली। आणि भूतत्वाची प्राप्ति जाहली। एवं संकल्पवशें फळलीं। कर्में तयां॥ ३५८॥
मग मीचि डोळां देखिला। जिहीं कानीं मीचि ऐकिला। मनीं मी भाविला। वानिला वाचा॥ ३५९॥
सर्वांगीं सर्वाठायीं। मीचि नमस्कारिला जिहीं। दानपुण्यादिकें जें कांहीं। तें माझियाचि मोहरां॥ ३६०॥
जिहीं मातेंचि अध्ययन केलें। जे आंतबाहेरि मियांचि धाले। जयांचें जीवित्व जोडलें। मजचिलागीं॥ ३६१॥
जे अहंकारु वाहत आंगीं। आम्ही हरीचे भूषावयालागीं। जे लोभिये एकचि जगीं। माझेनि लोभें॥ ३६२॥
जे माझेनि कामें सकाम। जे माझेनि प्रेमें सप्रेम। जे माझिया भुली सभ्रम। नेणती लोक॥ ३६३॥
जयांची जाणती मजचि शास्त्रें। मी जोडें जयांचेनि मंत्रे। ऐसे जे चेष्टामात्रें। भजले मज॥ ३६४॥

अर्थ—ज्यांची मन, वाणी इंद्रियें देवांच्याच भजनांत लागलीं ते मेल्यानंतर देवत्वाला प्राप्त होतात. ॥ ३५५॥ किंवा ज्यांच्या चित्तांत पितरांचेच व्रतनियम करण्याची प्रवृत्ति असते, ते मेल्यानंतर पितर होतात. ॥ ३५६॥ किंवा भूतपिशाचादिक क्षुद्रदेवताच ज्याना परम दैवत वाटते व जारणमारणादि अभिचारविधीनें त्यांचें पूजन करतात. ॥ ३५७॥ त्यांना हा स्थूल देहाचा पडदा दूर झाला की भूतप्रेत यांची प्राप्ति होते. याप्रमाणे संकल्प म्हणजे ध्यान जसें असेल तसें त्यांचे यजन फलद्रूप होतें. ॥ ३५८॥ मग जें कोणी डोळ्यांनी माझेंच रूप पाहतात, कानाने माझेच गुण ऐकतात, मनाने माझेंच ध्यान करतात आणि वाणीने माझेच गुण गातात. ॥ ३५९॥ जे सर्वत्र मला जाणून सर्वांगीं—म्हणजे साष्टांग—नमस्कार करतात व जीं कांही दानादिक पुण्यादि कर्में आहेत तींहि माझ्याचकरिता करतात. ॥ ३६०॥ ज्यांचें अध्ययन किंवा अखंड नामस्मरण हेंच ज्यांचें अध्ययन असतें, आंत बाहेर जे माझ्याच प्रेमाने तृप्त असतात, जे माझ्या करितांच जिवंत राहतात. ॥ ३६१॥ श्रीहरीचे गुण वर्णन करून व कीर्ति वाढवून भगवंताला शोभिवंत करणारे आम्ही हरीचे भूषण आहों असा जे अहंकार बाळगतात आणि माझ्या लोभानेच जे लोभी असतात. ॥ ३६२॥ जे एक माझ्या प्राप्तीचीच इच्छा धरतात व एक माझेंच प्रेम करतात आणि जें माझ्या आवडीने इतके वेडे झालेले असतात की ज्यांना जगाचाच विसर पडतो. ॥ ३६३॥ ज्यांच्यां शास्त्राचे सार म्हणजे एक परमात्माच आहे असे जें जाणतात, ज्यांच्या मंत्रजपाने केवळ माझीच प्राप्ति होते, अशारीतीने ज्यांचे जेवढे कांही व्यापार आहेत, ते सर्व माझ्याकरितांच होतात. ॥ ३६४॥

गूढार्थदीपिका—ऐसे जे चेष्टामात्रे। भजले मज—''मनीषितं च प्राप्नोति चिन्तयन् पुरुषोत्तमम्। एकान्तभक्तिः सततं नारायणपरायणः''॥ ७८॥ (शां. प. अ. ३४८)

अखंड नारायणपरायण असणे म्हणजे भगवत्प्रीत्यर्थ देह, इंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार यांचे व्यापार करणें हें एकान्तभक्तीचें लक्षण महाभारतान्तर्गत शान्तिपर्वात सांगितलें आहे. तेच श्रीज्ञानेश्वर माऊलींनी ''ऐसे जे चेष्टामात्रें। भजले मज'' या चरणांनी व्यक्त केलें असून त्याचेच ३५९ ते ३६४ या ओव्यांतून संकलन केले आहे.

मनाचे विचारात्मक व विकारात्मक असे दोन भाग आहेत. खरें काय याचा विचार करणें हा विचारात्मक भाग होय आणि देहाच्या प्रेमाने उठणारे काम, क्रोध, अहंकारादि विकार हा मनाचा विकारात्मक भाग होय. ज्ञानमार्गांत ''ज्ञानं सम्यगवेक्षणम्'' योग्य विचार करणें हेच मुख्य साधन असल्यामुळे ज्ञान्याच्या मनाचा विचारात्मक भाग निर्गुण आत्मस्वरूपाच्या विचारात लावला जातो. पण विकारात्मक भाग निर्गुण आत्मस्वरूपांच्या ठिकाणीं लागूं शकत नाही.

अतएव प्रारब्धाने उठणाऱ्या कामक्रोधादि विचारांचे वेग सहन करून त्यांना दाबण्याचा प्रयत्न करण्यासच ज्ञानमार्गांत सांगितलें आहे, पण विकार दाबण्यांचा प्रयत्न करण्यात कर्तृत्व उत्पन्न होत असल्यामुळे ज्ञान्याला आपले अकर्तृस्वरूप-साक्षित्व सांभाळतां येत नाही आणि विकार उत्पन्न होऊं दिल्यास देहाच्या प्रेमाने विकार उत्पन्न होत असल्यामुळे वृत्ति देहाकार झाल्याशिवाय राहत नाही. अशी देहाकार वृत्ति झाली की आत्माकारता नाहीशी होते. या अडचणीमुळे ज्ञान्यांच्या ठिकाणी विकार दिसून पडतात व त्यांना जीवन्मुक्ति साधणें दुष्कर होते.

पण भक्ताच्या मनाचा विचारात्मक भाग भगवंताचे सगुणस्वरूपहि पूर्ण ब्रह्मच आहे याची मीमांसा करण्यात

जसा लावला जातो, तसा काम-क्रोधादि विकारात्मक भागहि, भगवदर्पण करून भगवत्प्रेम व भगवद्ध्यान वाढविण्याकरिता लावला जातो. म्हणून विकारकाली देखील भक्ताचे चित्त देहाकार न होता भगवदाकारच राहते व ते भक्त दृढ ध्यानाने अखंड भगवद्रूप होऊन राहतात.

हाच आशय नाथांनी ''योगी इंद्रिये कोंडिती। ते कोंडितांचि कष्टी होती। भक्त भगवंतीं अर्पिती। तेणे ते होती नित्यमुक्त''॥ २९०॥ (ए. भा. अ. २) या ओविने सांगितला आहे.

भगवंताचे ठिकाणी नि:सीम प्रेम होण्याकरिता व ध्यान दृढ होण्याकरिता मनाचा विकारात्मक भागहि भगवत् अर्पण झाला पाहिजे असें भगवान नारदांनीहि ''तदर्पिताखिलाचार: सन् कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम्'' या भक्तीसूत्रांत सांगितले आहे.

वरील ओव्यांत देखील सर्व मनोवृत्ती भगवदर्पण कशा करावयाच्या याचेच वर्णन माऊलीनी केले आहे.

ते मरणाऐलीचकडे। मज मिळोनि गेले फुडे। मग मरणीं आणिकीकडे। जातील केविं॥ ३६५॥

अर्थ—अर्जुना! असे भक्त मरणाच्या पूर्वीच माझ्याशी ऐक्य पावतात, मग मेल्यावर दुसरीकडे कसे जातील?॥ ३६५॥

गूढार्थदीपिका—वर सांगितल्याप्रमाणे संपूर्ण ममताप्रेम अर्पण केल्यामुळेच देहाची अहंता नाहीशी होते व भगवत्स्वरूपाचे ठिकाणीं जाणीवरहित मीपण बसून भगवंताशीं ऐक्य होतें, हे माऊलींनीच या ओवीत स्पष्ट केले आहे.

म्हणोनि मद्याजी जे जाहाले। ते माझिया सायुज्या आले। जिहीं उपचारमिषें दिधलें। आपणपें मज॥ ३६६॥

पैं अर्जुना माझे ठायीं। आपणपेवीण सौरसु नाहीं। मी उपचारीं कवणाही। नाकळें गा॥ ३६७॥

अर्थ—म्हणून ज्यांनी आपल्यालाच उपचाररूपाने माझे ठिकाणीं समर्पण करून दिलें, अशा रीतीने जे माझें यजन करणारे झाले ते माझ्याशीं ऐक्य पावले॥ ३६६॥ अर्जुना! आपणच मी होऊन जाणें—म्हणजे संपूर्ण अहंताममता समर्पण करून मी होऊन जाणें—या वांचून माझ्या प्राप्तीचा दुसरा उत्तम मार्ग नाही. कारण उपचारांदिकानी मी प्राप्त होऊ शकत नाही.॥ ३६७॥

गूढार्थदीपिका—समर्पण केलेल्या उपराचादिकांनी संतुष्ट होण्यासारखे षड्गुणैश्वर्य परमेश्वराच्या ठिकाणीं कांहीच उणें नसतें असा भाव.

एथ जाणीव करी तोचि नेणे। आथिलेपण मिरवी तेंचि उणें। आम्ही जाहलों ऐसें जो म्हणे। तो कांहींचि नव्हे॥ ३६८॥

अर्थ—माझी जाणीव मिरवणें हीच माझी अप्राप्ति होय. आपली संपन्नता मिरवणें हाच माझ्या प्राप्तींतील उणेपणा होय व आम्ही कृतार्थ झालों, असें म्हणणें कांहीच न होणें होय.॥ ३६८॥

गूढार्थदीपिका—जीव मुळांत ब्रह्मस्वरूपच आहे. तो परब्रह्माहून मूळींच निराळा नाही असा वेदांतसिद्धांत आहे. पण तो आपलें स्वरूप विसरला असल्यामुळें, त्याला आपल्या स्वरूपाची जाणीव होणें प्रथम आवश्यक असतें. परमात्म्याचे ठिकांणीं स्वरूपाची विस्मृती किंवा अज्ञान मुळींच नसतें; म्हणून त्याला स्व-स्वरूपाची जाणीव करून घेण्याची आवश्यकता नसते. ''जाणीव नेणीव भगवंतीं नाही'' (हरिपाठ), असा हा परमात्मा जाणीवनेणीवरहित आहे. त्या परमेश्वराशीं जीवाचें मूळचे ऐक्य प्राप्त होण्याकरिता तोहि (जीवहि) जाणीवनेणीवरहितच झाला पाहिजे. आपल्या स्वरूपाहून भिन्न असलेल्या देहादि पदार्थाशीं मनुष्य जेव्हा भ्रांतीने आपले ऐक्य करतो तेव्हा ते ऐक्य अहंकाराचे द्वाराच केले जात असते. पण भगवान आपला आत्माच असल्यामुळें (अहंकाराचे द्वारा) जोपर्यंत आपण जाणीवेच्या वगैरे अहंकाराने त्याच्याशीं ऐक्य करतो किंवा ऐक्याच्या जाणीवेचा वगैरे जीव अहंकार वागवितो, तोपर्यंत तो भगवंताला आपल्याहून निराळाच ठेवित असल्यामुळें भगवंताशीं त्याचें मूळचें जाणीवनेणीवरहित असें समरस ऐक्य होत नाही असा अर्थ.

मी ब्रह्म म्हणणे स्वगत भेद होय असें नाथानी म्हटलें आहे तें मागें सांगितलेंच आहे.

अथवा यज्ञदानादि किरीटी। कां तपे हन जे हुटहुटी। ते तृणा एकासाठीं। न सरे एथ॥ ३६९॥
पाहें पां जाणिवेचेनि बळें। कोण्ही वेदापासूनि असे आगळें। कीं शेषाहूनि तोंडागळें। बोल्कें आथी॥ ३७०॥
तोही आंथरुणातळवटीं दडे। येरु नेति नेति म्हणोनि बहुडे। एथ सनकादिक वेडे। पिसे जाहाले॥ ३७१॥

अर्थ—अथवा यज्ञदानादि तपें व कर्में हीं परमेश्वरप्राप्तीचे ठिकाणीं गवताच्या काडी इतकीहि प्रतिष्ठा मिरवूं शकत नाहीत. ॥ ३६९ ॥ अर्जुना! वेदापेक्षा ज्ञानाचें अधिक बळ कोणापाशीं आहे किंवा शेषाहून अधिक बोलका कोण आहे?॥ ३७० ॥ पण तो शेषहि भगवंताचें अंथरूण झाला आहे आणि वेदहि हें नव्हें, हें नव्हे, असें म्हणून मागें सरला. माझ्या ठिकाणीं सनकादिकहि वेडे पिसे झाले. ॥ ३७१ ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्म सत्स्वरूप असलें व त्याचे सत्, चित्, आनंद हे धर्म परस्परांहून निराळे होत नसले तरी परब्रह्म सदंश-प्रधान, चिदंश-प्रधान व आनंदांश-प्रधान असें अनुभविलें जातें. सदंशप्रधानामध्ये चित् आणि आनंद हे अंश सामान्य असतात. अशा या सदंशप्रधान परब्रह्माला निर्गुण परब्रह्म म्हणतात व तें निरूपिलें जातें व जाणले जातें हें "ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि" या भगवंताचे गीतावचनावरून सिद्ध आहे.

सगुणपरमात्मा आनंदांशप्रधान असतो हें "आनंदपदीं जया म्हणती हरि" या नाथ महाराजांच्या वचनावरून सिद्ध आहे. पण चिदंश प्रधान असतो तेव्हाच जाणीव होत असते, आनंदांश प्रधान झाला असतां ज्ञानांश त्याच्यांत सामान्यपणाने असतो, विशेषपणाने नसतो. म्हणून आनंदांशप्रधान अशा सगुण परमेश्वराच्या स्वरूपाचें किंवा गुणाचें वर्णन कोणालाच करतां येत नाही. असें माऊलीचें म्हणणें आहे.

इदानीं यद्यप्युभयोरविशेषेण दुर्ज्ञेयत्वमुक्तं तथापि गुणातीतस्य ज्ञानं कथचिद्भवेन्न तु सगुणस्य तवाचिन्त्यानन्तगुणत्वादिति" (श्रीधरी टीका भाग. स्कं. १०-अ. १४ श्लो. ६) भगवंताची सगुण निर्गुण अशीं दोन्ही रूपें दुर्ज्ञेय असली तरी निर्गुण स्वरूपाचे कसे तरी एकदाचें ज्ञान होऊं शकतें, परंतु सगुणाचें ज्ञान होणें दुरापास्त आहे असे श्रीधरस्वामींनीहि भागवतावरील टीकेंत म्हटलें आहे. "अनंताचे गुण अनंत अपार। न कळेचि पार श्रुतिशास्त्रां" असा श्रीनाथांनीहि आपला अनुभव सांगितला आहे.

करितां तापसांची कडसणी। कवणु जवळां ठेविजैल शूळपाणी। तोहि अभिमानु सांडूनि पायवणी। माथां वाहे॥ ३७२ ॥
नातरि आथिलेपणें सरिसी। कवणी आहे लक्ष्मियेऐसी। श्रियेसारिखिया दासी। घरीं जियेतें॥ ३७३॥
तिया खेळतां करिती घरकुलीं। तयां नामें अमरपुरें जरि ठेविलीं। तरि न होती काय बाहुलीं। इंद्रादिक तयांचीं॥ ३७४ ॥
तिया नावडोनि जेव्हां मोडती। तेव्हां महेंद्राचे रंक होती। तिया झाडां जेउते जयां पाहती। ते कल्पवृक्ष॥ ३७५ ॥
ऐसिया जियेचिया जवळिका। सामर्थ्य घरींचिया पाइका। ते लक्ष्मी मुख्यनायका। न मनेचि एथ॥ ३७६॥
मग सर्वस्वें करूनि सेवा। अभिमानु सांडूनि पांडवा। तें पाय धुवावयाचिया दैवा। पात्र जाहाली॥ ३७७॥
म्हणोनि थोरपण पर्‍हांचि सांडिजे। व्युत्पत्ति आघवी विसरिजे। जैं जगा धाकुटें होइजे। तैं जवळीक माझी॥ ३७८ ॥

अर्थ—तपस्व्यांत श्रेष्ठ कोण, हें पाहूं गेल्यास शंकराचे बरोबरीने कोणाला बसवितां येईल? पण ते शंकरहि सर्व अभिमान सोडून माझें चरणतीर्थ जी गंगा ती मस्तकावर धारण करितात. ॥ ३७२ ॥ नाही तर त्या लक्ष्मीसारखी संपन्नपणाने दुसरी कोण दाखवितां येईल? श्रियेसारख्या दासी ज्या लक्ष्मीच्या घरीं राबतात. ॥ ३७३ ॥ त्या दासींनी खेळतांना खोपटें केलें व त्याला अमरावती हें नांव दिलें तर इंद्रादिक त्यांतील बाहुल्या होणार नाहीत काय?॥ ३७४॥ त्यांना वाटेल हें खोपटें मोडून टाकावें तेव्हा इंद्राचे रंक बनतील, त्या दासी ज्या झाडाकडे पाहतील ते कल्पवृक्ष होतील. ॥ ३७५ ॥ अशारीतीने ज्या लक्ष्मीच्या घरीं असलेल्या दासींचे सामर्थ्य आहे, त्या लक्ष्मीची देखील भगवंताचे ठिकाणीं किंमत नाही. ॥ ३७६ ॥ मग अर्जुना! जेव्हा ती सर्व अभिमान टाकून देऊन सर्व भावाने माझी सेवा करायला लागली, तेव्हा ती माझे पाय धुण्याकरितां पात्र झाली. ॥ ३७७॥ म्हणून थोरपण बाजूला ठेवावें, सर्व शहाणपणा विसरावा व सर्व जगापेक्षा लहान व्हावें, तेव्हाच माझी प्राप्ति होते. ॥ ३७८ ॥

गूढार्थदीपिका—परमेश्वर व्यापक आहे. तो इतका व्यापक आहे की, त्याच्यावांचून दुसरी वस्तूच मानतां येत

नाही. किंवा त्याच्यावांचून दुसरी वस्तूच नसल्यामुळे त्याला व्यापक देखील म्हणतां येत नाही. व्यापकत्व हें सूक्ष्मतेवर अवलंबून असतें. पर्वत स्थूल आहे म्हणून तो घटांत शिरूं शकत नाही, पण आकाश सूक्ष्म असल्यामुळें कोठेंहि शिरूं शकतें.

जीवहि वेदान्तसिद्धान्ताप्रमाणे व्यापकच आहे. पण तो आपल्याला देहापुरता मर्यादित मानतो, म्हणून तो मर्यादित एकदेशी झाला आहे. परमात्मा निर्गुण स्वरूपाने जसा व्यापक आहे तसा तो सगुणरूपानेहि व्यापकच आहे; कारण मूळची जी व्यापकता आहे, तिचा अनुभव न येणें, हें मी व्यापक नाही, देहापुरता मर्यादित आहे, अशी विपरीत कल्पना झाल्याशिवाय घडूं शकत नाही. सगुण परमात्माहि जरी इतरांना एकदेशीय मर्यादित दिसत असला तरी आपल्याला तो मर्यादित एकदेशी समजत नाही, म्हणून तो व्यापकच राहतो—म्हणजे अत्यंत सूक्ष्मच असतो.

परमेश्वराशी ऐक्य व्हावयाचे म्हणजे त्याच्यासारखे सूक्ष्म झालें पाहिजे. जीव हा देहादिकांचा अहंकार धरल्यामुळे स्थूल झाला आहे; म्हणून जीवाने सर्व अहंकार सोडून माझ्यासारखें व्हावें असें भगवंताचें म्हणणें माऊलींनी या ओव्यांतून स्पष्ट केलें आहे.

अमृतानुभवांतहि माऊली म्हणतात ''लघुत्वाचेनि मुद्दलें। बैसला गुरुत्वाचे सेले'' परमात्मा अत्यन्त अहंकाररहित आहे म्हणूनच तो अत्यंत सूक्ष्म आहे व अत्यंत थोर आहे. अशा परमेश्वराशी ऐक्य पावण्याकरिता जीवानेहि आपला नि:शेष अहंकार सोडून अत्यंत लघुत्व म्हणजे नि:साधन दीनभाव घेतला पाहिजे.

जगा धाकुटें होईजे—म्हणजे मीपण सोडून सर्व जगाला परमेश्वर समजून सर्व जीवाचे ठिकाणी लीन व्हावें.

थोरपण—म्हणजे मी पूर्ण किंवा कृतार्थ झालों, मी धन्य आहे असा अभिमान. यालाच रसास्वाद म्हणतात.

या धन्यताभिमानाने ब्रह्मसुखाचें भोक्तृत्व उत्पन्न होतें, जीवाची तादात्म्य ऐक्यस्थिति जाऊन तो ब्रह्माहून निराळा पडतो; सगुण परमेश्वराचे ठिकाणी नि:सीम प्रेम राहत नाही व परमेश्वराचें सगुणस्वरूप अंतर्धान पावतें.

अगा सहस्त्रकिरणाचिये दिठी-। पुढां चंद्रुही लोपे किरीटी। तेथ खद्योत कां हुटहुटी। आपुलेनि तेजें॥ ३७९॥
तैसें लक्ष्मियेचें थोरपण न सरे। जेथ शंभूचेंही तप न पुरे। तेथ येर प्राकृत हेंदरें। केविं जाणों लाहे॥ ३८०॥
यालागीं शरीर सांडोवा कीजे। सकळगुणांचें लोण उतरिजे। संपत्तिमदु सांडिजे। कुरवंडी करुनी॥ ३८१॥

अर्थ—अर्जुना! जेथे सूर्याच्या प्रकाशापुढे चंद्राचें तेज लोपलें जातें तेथे काजवा आपल्या तेजाची काय टिमकी मिरविणार?॥ ३७९॥ त्याप्रमाणें ज्याच्या प्राप्तीकरितां लक्ष्मीचे मोठेपण चालत नाही, शंकराचें तपहि अपुरेंच होतें, तेथें सामान्य गावंढळ माणूस मला काय जाणूं शकणार!॥ ३८०॥ म्हणून शरीराची नि:शेष ममता सोडून, आपल्या सर्व गुणांचें निंबलोण करून व सर्व संपत्ति भगवंतावरून ओवाळून टाकून त्यांचा मद टाकावा.॥ ३८१॥

गूढार्थदीपिका—जीवाने कोणत्याहि साधनांचा व अपल्या ठिकाणच्या गुणांचा यत्किंचित्‌हि अभिमान न बाळगतां अति हीन-दीन होऊन मला शरण यावें असा अर्थ.

''तुझी निष्ठा पंढरीराया। सारभूत माझी काया'' या अभंगांत श्रीतुकाराम महाराजांनी हीनदीनतेची कल्पना दिली आहे.

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति। तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मन:॥ २६॥

अर्थ—पान असो, फूल असो, फळ असो, की केवळ पाणी असो, अत्यंत प्रेमाने व दीन होऊन जो मला अर्पण करतो, त्याचें तें मी, भक्तिभावाने व अत्यंत शुद्ध चित्ताने अर्पण केलेलें असल्यामुळे सेवन करितों.॥ २६॥

मग निस्सीमभावउल्हासें। मज अर्पावयाचेनि मिसें। फळ एक आवडे तैसें। भक्तयाचें हो॥ ३८२॥
भक्तु माझियाकडे दावी। आणि मी दोन्ही हात वोडवीं। मग देंठु न फेडितां सेवीं। आदरेंशीं॥ ३८३॥
पैं गा भक्तीचेनि नांवें। फूल एक मज द्यावें। तें लेखें तरि म्यां तुरंबावें। परि मुखींचि घालीं॥ ३८४॥

अर्थ—अत्यंत प्रेमोल्हासाने व मलाच द्यावें, या इच्छेने कशाचेंहि वाटेल तें फळ असलें तरी.॥ ३८२॥ भक्त मला तें दाखवितो व तें घेण्याकरिता मी दोन्ही हात पुढे करितों. मग देंठ न काढता प्रेमानें तें मी भक्षण

करितों. ॥ ३८३ ॥ परंतु भक्तिप्रेमाने कोणी एखाद्याने मला फूल जर दिलें, तर खरे पाहतां तें हुंगायला पाहिजे, पण मी तें मुखांतच घालतो. ॥ ३८४ ॥

गूढार्थदीपिका—भक्तिप्रेमामध्ये तल्लीन झालेल्या भक्ताला देहाचें भान न राहिल्यामुळे त्याचे व्यवहार असंबद्ध होतात.

हें असो कायसीं फुलें। पानचि एक आवडते जाहलें। तें साजुकही न हो सुकलें। भलतैसें॥ ३८५ ॥
परि सर्वभावें भरलें देखें। आणि भुकेला अमृतें तोखे। तैसें पत्रचि परि तेणें सुखें। आरोगूं लागें॥ ३८६ ॥
अथवा ऐसेंही एक घडे। जे पाल्लही परि न जोडे। तरि उदकाचें तंव सांकडें। नव्हेल कीं॥ ३८७ ॥
तें भलतेथ निमोलें। न जोडितां आहे जोडलें। तेंचि सर्वस्व करूनि अर्पिलें। जेणें मज॥ ३८८ ॥

अर्थ—अर्जुना! हे असूं दे. फुलंच काय, पण प्रेमाने दिलेलें पानही मला प्रिय असतें, मग तें कसेंहि ताजे असो वा शिळें, सुकलेलें असो. ॥ ३८५ ॥ भुकेलेल्या माणसाला अमृत मिळाल्यास जसा आनंद होतो, तसा मलाहि तें सर्वस्वीं प्रेमाने अर्पण केलेलें पानच पाहून अत्यंत सुख होतें व त्या सुखाने मी तें पान खाऊं लागतों. ॥ ३८६ ॥ किंवा पालाहि मिळणार नाही, असें होऊं शकतें, पण पाण्याचा तर कोठें दुष्काळ पडत नाही ना? ॥ ३८७ ॥ तें वाटेल तेथे विना मोल मिळूं शकतें. मोल देऊन प्राप्त करून घ्यावें लागत नाही. तेंच देवा! माझ्यापाशी इतकें पाणीच आहे असें म्हणून ज्याने अर्पण केलें. ॥ ३८८ ॥

गूढार्थदीपिका—अत्यंत दरिद्री पण अत्यंत प्रेमळ अशा भक्ताच्या अर्पणाविषयीं, हें म्हटलेलें आहे. सर्व संपत्ति प्राप्त असून कृपणतेने भगवंताला जल अर्पण करणाराविषयीं हें म्हटलेलें नाही. अशा कृपण पुरुषाचें प्रेम संपत्तीवर असतें, भगवंतावर नसतें.

तेणें वैकुंठापासोनि विशाळें। मजलागीं केलीं राउळें। कौस्तुभाहोनि निर्मळें। लेणीं दिधलीं॥ ३८९ ॥
दुधाचीं शेजारें। क्षीराब्धीऐसीं मनोहरें। मजलागीं अपारें। सृजिलीं तेणें॥ ३९० ॥
कर्पूर चंदन अगरु। ऐसेया सुगंधाचा महामेरु। मज हातीं लाविला दिनकरु। दीपमाळे॥ ३९१ ॥
गरुडासारिखीं वाहनें। मज सुरतरूंचीं उद्यानें। कामधेनुंचीं गोधनें। अर्पिलीं तेणें॥ ३९२ ॥
मज अमृताहूनि सुरसें। बोनीं वोगरिलीं बहुवसें। ऐसा भक्तांचेनि उदकलेशें। परितोषें गा॥ ३९३ ॥

अर्थ—त्याने वैकुंठाहून विशाल असें माझ्याकरिता मंदीर बांधून दिलें. कौस्तुभमण्याहून तेजस्वी मण्याचे अलंकार मला त्याने समर्पण केले. ॥ ३८९ ॥ क्षीरसमुद्रासारखीं अनेक, सुंदर दुधाची शय्यास्थानें त्याने निर्माण केली. ॥ ३९० ॥ कापूर, चंदन, अगरु अशा सुगंधित द्रव्यांचा मेरूपर्वत मला त्याने दिला. त्याने माझ्या दीपमाळेवर सूर्याची काडवात आपल्या हाताने लाविली. ॥ ३९१ ॥ गरुडासारखी वाहनें, कल्पतरूचे बगीचे व कामधेनूंचे कळप मला त्याने समर्पण केलेत. ॥ ३९२ ॥ अमृतापेक्षांहि सुरस पंचपक्वान्नांचीं ताटें भरून वाढलीं, अशा भक्ताने अर्पिलेल्या थोड्याशा पाण्याने देखील मी संतुष्ट होतो. ॥ ३९३ ॥

गूढार्थदीपिका—परमात्मा नित्यतृप्त व षड्गुणैश्वर्यसंपन्न आहे, पण तो त्याच्या अत्यंत दरिद्री भक्तानेहि अर्पण केलेले हीनभोग भोगतांना आपली स्थिति विसरून भक्ताच्या अर्पण केलेल्या भोगाने सुखी होतो, असें हे भगवत्प्रेमाचें कौतुक आहे.

हें सांगावें काय किरीटी। तुम्हीचि देखिलें आपुलिया दिठी। मी सुदामयाचिया सोडीं गांठी। पव्हयालागीं॥ ३९४ ॥
पैं भक्ति एकी मी जाणें। तेथ सानें थोर न म्हणें। आम्ही भावाचे पाहुणे। भलतेया॥ ३९५ ॥

अर्थ—अर्जुना! हें काय सांगायला पाहिजे! मी पोह्यासाठी सुदाम्याची पोटली सोडली हें तूं आपल्या दृष्टीनेच पाहिलें आहेस. ॥ ३९४(परंतु मी एक प्रेम पाहतों. तें पाहतांना लहान थोर याचा विचार करीत नाही. वाटेल त्याच्या प्रेमाचा पाहुणा होतो. ॥ ३९५ ॥

गूढार्थदीपिका—"भावबळें आकळे येऱ्हवी नाकळे। करतळीं आवळे तैसा हरि" (ज्ञा. म. हरिपाठ).

''आम्हापाशीं सरे एक शुद्धभाव। चतुराई जाणीव न लगे कळा (तु. गा. ३२९०), ''देखोन भोळिया भक्तासी। मीचि सामोरा धांवें त्यासी। त्यापाशीं मी अहर्निशीं। भुललो भावासी सर्वथा'' (ए. भा. अ. ११-११७४) असें सर्व संताचें म्हणणें आहे.

येर पत्र पुष्प फळ। हें भजावया मिस केवळ। वांचूनि आमुचा लाग निष्कळ। भक्तितत्त्व॥ ३९६॥

म्हणोनि अर्जुना अवधारीं। तूं बुद्धि एकी सोपारीं करीं। तरी सहजें आपुलिया मनोमंदिरीं। न विसंबें मातें॥ ३९७॥

अर्थ—बाकी पान, फूल, फळ, हीं केवळ प्रेमाचें निमित्त आहेत. यावांचून माझ्या प्राप्तीकरिता नि:सीम प्रेमभक्तिच उपयोगी आहे. ॥ ३९६ ॥ म्हणून अर्जुना! हें ऐक, तुला आपल्या एक बुद्धींत माझी सुलभ प्राप्ति व्हावीं असे वाटत असेल, तर चुकून देखील आपल्या मनोरूपी मंदिरांत मला विसरू नकोस. ॥ ३९७ ॥

अवतरणिका—लौकिक अलौकिक सर्व कर्म भगवंताचे प्राप्तीकरिता भगवंताला अर्पण करणें हाहि एक एकान्तभक्तींतील विशेष आहे. तो पुढील श्लोकाने भगवान सांगत आहेत.

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्। यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम्॥ २७॥

अर्थ—अर्जुना! तूं जें जें करशील, जें जें भोगशील, जें जें अग्नींत हवन करशील, जें जें दुसऱ्यांला देशील व जें जें तप करशील, तें सर्व मला अर्पण कर. ॥ २७ ॥

जे जे कांहीं व्यापार करिसी। कां भोग हन भोगिसी। अथवा यज्ञीं यजिसी। नानाविधीं॥ ३९८॥

ना तरी पात्रविशेषें दानें। कां सेवकां देसी जीवनें। तपादि हन साधनें। व्रतें करिसी॥ ३९९॥

तें क्रियाजात आघवें। जें जैसें निपजेल स्वभावें। तें भावना करोनि करावें। माझिया मोहरा॥ ४००॥

परि सर्वथा आपुले जीवीं। केलियाची से कांहींचि नुरवीं। ऐसीं धुवोनि कर्में द्यावीं। माझिया हातीं॥ ४०१॥

अर्थ—अर्जुना! तूं जे जे कांही व्यापार करशील किंवा जे कांही भोग भोगशील अथवा नाना प्रकारचे यज्ञ करशील. ॥ ३९८ ॥ किंवा पात्र पाहून जें दान देशील किंवा सेवकजनांना जें कांही त्यांच्या सेवेबद्दल मोबदला म्हणून वेतन देशील, नाना प्रकारचीं तपादिव्रतें, साधनें करशील. ॥ ३९९ ॥ त्या सर्व क्रिया, ज्या रीतीने जशा होतील तशा माझ्या प्रीत्यर्थ, माझें ध्यान ठेवून करीत जा. ॥ ४०० ॥ पण आपल्या अंत:करणांत मी अमुक केलें अशी कर्तृत्वाची यत्किंचित् देखील आठवण होणार नाही, अशी धुतल्याप्रमाणे सर्व कर्में मला अर्पण कर. ॥ ४०१ ॥

गूढार्थदीपिका—कर्मकर्तृत्व व भोक्तृत्व हीच जीवाची उपाधि आहे व तीच जीवाला जन्ममरण परंपरेंत टाकणारी आहे.

कर्माचें कर्तृत्व आपले ठिकाणीं ठेवून कर्म भगवंताला अर्पण केल्यास कर्मफळभोक्तृत्व चुकत नाही; म्हणून माऊलींनी कर्माचें कर्तृत्व म्हणजे मी कर्म केलें याची अंत:करणांत आठवण होऊं देऊं नये असे सांगितलें आहे. कर्मकर्तृत्व सुटलें की पुढे भोक्तृत्वाचा प्रसंगच येत नाही, हें माऊलींनी पुढील ओव्यांत सांगितलें आहें.

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनै: । सन्न्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि॥ २८॥

अर्थ—पुण्यपापरूप कर्माचीं सुखदु:खरूप जीं फळें तींच कर्माचीं बंधनें आहेत, त्या बंधनापासून अर्जुना! तूं मुक्त होशील व अशा रीतीने तुझें अंत:करण योगयुक्त झाल्यामुळे तूं मुक्त होऊन मला प्राप्त होशील. ॥ २८ ॥

मग अग्निकुंडीं बीजें घातलीं। तियें अंकुरदशे जेविं मुकलीं। तेविं न फळतीचि मज अर्पिलीं। शुभाशुभें॥ ४०२॥

अगा कर्में जैं उरावें। तैं तिहीं सुखदु:खीं फळावें। आणि तयातें भोगावया यावें। देहा एका॥ ४०३॥

तें उगाणिलें मज कर्म। तेव्हांचि पुसिलें मरण जन्म। जन्मासवें श्रम। वरचिलही गेले॥ ४०४॥

म्हणऊनि अर्जुना यापरी। पाहेचा वेळु नव्हेल भारी। हे संन्यासयुक्ति सोपारी। दिधली तुज॥ ४०५॥

या देहाचिया बांदोडीं न पडिजे। सुखदु:खाचिया सागरीं न बुडिजे। सुखें सुखरूपा घडिजे। माझियाचि अंगा॥ ४०६ ॥

अर्थ—मग अग्निकुंडांत घातलेले बीं जसे अंकुरदशेला येत नाही, त्याप्रमाणे मला अर्पण केलेले पुण्यपापरूप कर्महीं सुखदु:खरूप फळ देत नाही. ॥ ४०२ ॥ अर्जुना कर्म जर राहील तर त्याचें सुख किंवा दु:ख फळ होईल

आणि तें कर्मफळ भोगण्याकरिता देह घ्यावा लागणार म्हणजे जन्माला यावें लागणार. ॥ ४०३ ॥ तें कर्मच जर कर्तृत्वासह मला अर्पण केलें, तर कर्माच्या अर्पणाबरोबरच जन्ममरण पुसलें जातें आणि जन्म नाहीसा झाल्याबरोबर जन्मान्तरी मिळणारें दुःखहि नाहीसें होतें. ॥ ४०४ ॥ म्हणून अर्जुना! कर्मकर्तृत्व व भोक्तृत्वरहित होऊन मद्रूप होण्याची ही सोपी युक्ति तुला सांगितली आहे आणि याप्रमाणे याचा अनुभव घेण्याला तुला फार वेळ लागणार नाही. ॥ ४०५ ॥ या संन्यासयुक्तीने देहाच्या बंदीवासांत पडावे लागत नाही. सुखदुःखाच्या समुद्रांत बुडावें लागत नाही व सुखाने माझ्या सुखस्वरूप अशा अंगाशीं तूं मिळून जाशील किंवा मद्रूप होशील. ॥ ४०६ ॥

गूढार्थदीपिका— भगवंताला कर्तृत्वासह सर्व कर्मे अर्पण करतां करतां मनुष्य आपल्याला सर्वकर्मकर्तृत्व व भोक्तृत्व यारहित पाहतों व भगवान हा कर्मकर्तृत्व-भोक्तृत्वरहितच असल्यामुळें जीव सहजच परमेश्वरस्वरूप होतो.

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः। ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्॥ २९ ॥

अर्थ— मी सर्व भूतांचे ठिकाणीं सारखा आहे व मला कोणी प्रिय नाही व माझा कोणी शत्रु नाही, पण जे कोणी माझें प्रेम करतात त्यांचे ठिकाणीं मी आहे व माझे ठिकाणीं ते आहेत. ॥ २९ ॥

तो मी पुससी कैसा। तरि जो सर्वभूतीं सदा सरिसा। जेथ आपपरु ऐसा। भागु नाहीं॥ ४०७॥

अर्थ— तो मी कसा आहे, असें जर तूं विचारशील, अर्जुना! तर तो मी सर्व भूतांचे ठिकाणी सारखाच आहे म्हणजे संपूर्ण विषमभावरहित आहे. माझें ठिकाणीं आपपर असा भेद नाहीं. ॥ ४०७ ॥

गूढार्थदीपिका— "समोऽहं सर्व भूतेषु" या श्लोकांत व या ओवींत निर्गुण अशा सन्मात्रस्वरूपाने मी सर्वत्र सारखा व्यापक आहे, हें सांगितलें गेलें आहे. भगवंताचें सन्मात्रस्वरूप कोठे असणें-नसणें किंवा कमी-जास्त होणें अशा विषमभावाला प्राप्त होत नाही.

जे ऐसिया मातें जाणोनि। अहंकाराचा कुरुठा मोडोनि। जे जीवें कर्मे करूनि। भजती मातें॥ ४०८ ॥

अर्थ— सर्वत्र भगवान सम आहे, असें माझें स्वरूप जाणून व अहंकाराचें घर मोडून, जे जीवभावाने व कर्माचे द्वारा माझी भक्ति करितात. ॥ ४०८ ॥

गूढार्थदीपिका—ऐसिया मातें जाणोनि-पाण्यावरच लहरी उठते, त्याप्रमाणे सन्मात्र अशा निर्गुण स्वरूपावरच आनंद किंवा प्रेमवृत्तींत प्रगट होणारा सगुण परमात्मा द्वैतरूपाने अनुभवाला येत असल्यामुळे, त्याचें निर्गुणत्व नष्ट होत नसतें. हेंच माऊलींनी "ऐसिया मातें जाणोनि" या चरणाने दाखविलें आहे.

अहंकाराचा कुरुठा मोडोनि। जे जीवें कर्मे करूनि। मातें भजले— सर्वकर्मसमर्पणरूप व प्रेमरूप भक्ति सगुणस्वरूपाचे ठिकाणींच होत असल्यामुळें येथें या चरणांनी माऊलींनी सन्मात्र निर्गुणस्वरूपाचे ठिकाणीं अनध्यस्तविवर्तस्वरूपाने अनुभवाला येणाऱ्या सगुण स्वरूपाचा उल्लेख केला आहे.

ते वर्तत दिसती देहीं। परि ते देहीं ना माझां ठायीं। आणि मी तयांचां हृदयीं। समग्र असें॥ ४०९ ॥

अर्थ— ते आपल्या देहाचे ठिकाणीं आहेत, असे दिसत असले, तरी ते आपल्या देहाचे ठिकाणीं नसतात. माझे ठिकाणीं असतात आणि मी त्यांच्या हृदयांत संपूर्ण असतो. ॥ ४०९ ॥

गूढार्थदीपिका—मी तयांचां हृदयीं। समग्र असे— ज्ञान्याच्या हृदयांत परमात्मा सत्‌चित् अशा निर्गुण स्वरूपानेच अनुभवाला येतो. संपूर्ण सत्‌चित्‌आनंदांशरूपाने म्हणजे सगुण स्वरूपाने अनुभवाला येत नाही. पण भक्ताचे हृदयांत "भगवान् परमानंदस्वरूपः स्वयमेवहि" प्रगट असणारा सगुण परमात्मा आनंदस्वरूपच असल्यामुळें आणि त्या आनंदांशांत सत्‌चित् हे दोन्ही अंश मिळून जातात, असें "येऱ्हवीं सच्चिदानंदभेदे। चालिली तीन्ही पदे। परि तिन्ही उणी आनंदें। केली येणें" (अमृ. प्र. ५-६) माऊलींनी सांगितलें असल्यामुळें भक्तांच्या हृदयांत प्रगट असणारा परमात्मा, "समोऽहं" इत्यादि निर्गुणाचे धर्म व षड्गुणैश्वर्यादि सगुणाचे धर्म या दोन्ही धर्मानी युक्त असतो, म्हणून माऊलींनी येथे मी भक्ताचे हृदयांत समग्र असतो, असें म्हटलें आहे.

सविस्तर वटत्व जैसें। बीजकणिकेमाजीं असें। आणि बीजकणु वसे। वटीं जेवीं॥ ४१०॥

तेवीं आम्हां तयां परस्परें। बाहेरी नामाचींचि अंतरें। वांचुनि आंतुवट वस्तुविचारें। मी तेचि ते॥ ४११॥
आतां जायांचें जैसें लेणें। आंगावरी आहाचवाणें। तैसें देह धरणें। उदास तयाचें॥ ४१२॥
परिमळु निघालिया पवनापाठीं। मागें वोस फूल राहे देठीं। तैसें आयुष्याचिये मुठीं। केवळ देह॥ ४१३॥
येर अवष्टंभु जो आघवा। तो आरूढोनि मद्भावा। मजचि आंतु पांडवा। पैठा जाहाला॥ ४१४॥

अर्थ—वडाच्या वृक्षाचा संपूर्ण विस्तार असा त्याच्या छोट्याशा बीजांत असतो आणि तें छोटेसें बीं वडाच्या वृक्षांत असतें. ॥ ४१० ॥ त्याप्रमाणे मी व माझे भक्त यांचा परस्परांत बाहेर नांवाचाच भेद असतो. आंत असलेल्या आत्मवस्तूचा विचार करून पाहतां ते आणि मी एकच आहोत. ॥ ४११ ॥ उसने आणलेले दागिने जसे परत द्यावे लागत असल्यामुळें नुसते आंगावर घातले जातात त्याप्रमाणें माझें भक्त उदास राहून देह धारण करतात. ॥ ४१२ ॥ फुलाचा सुगंध वाऱ्याबरोबर जाऊं लागला की मागें नुसतें फूल देठाला धरून राहतें, त्याप्रमाणें माझ्या भक्ताचे देह केवळ प्रारब्धाच्या मुठींत असतात. ॥ ४१३ ॥ बाकीचा जो अहंकारादिकांचा खटाटोप भक्ताचे ठिकाणीं दिसतो तो, माझ्याशीं झालेल्या ऐक्यभावाला धरूनच असल्यामुळे, माझ्याठिकाणी असतो किंवा तो खटाटोप माझाच असतो. ॥ ४१४ ॥

गूढार्थदीपिका—भक्ताचें मन व बुद्धि भगवदर्पण झाल्यामुळें बुद्धींतील सर्व विचार व मनांत उठणारे अहंकारादि विकार हे सर्व भगवदर्पणच झालेले असतात व तो पूर्ण भगवद्रूप झालेला असतो. म्हणून त्याच्या प्रारब्धानुसार उठणारे सर्व अहंकारादि विकार व सर्व सुखादि भोग भगवंताकरितांच असतात व भगवंतालाच समर्पण होतात. "तदर्पिताखिलाचार:सन् कामक्रोधादिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम्" ॥६५॥ सर्व कर्में भगवंताला अर्पण झालीं असतां काम, क्रोध, अभिमान सर्व त्याचे ठिकाणीच करावयाचे असतात, असें नारदभक्तिसूत्रांत सांगितलें असून "देवासी अवतार भक्तासी संसार। दोहींचा विचार एकपणें", देव त्याच्या संगें सुख भोगी. देवाच्या अवतारलीला भक्ताकरितांच असतात व भक्त देवाकरितांच संसार करतो, असें तुकाराम महाराजांनीहि म्हटलें आहे.

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् । साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ ३० ॥

अर्थ—अर्जुना! जरी पुरुष प्रथम अत्यंत दुराचारी असला, तरी अनन्यभावाने जर माझें भजन करीत असेल तर त्याने आतां सन्मार्गाने वागण्याचा निश्चय केला असल्यामुळे त्याला सत्पुरुष समजलें पाहिजे. ॥ ३० ॥

ऐसें भजतेनि प्रेमभावें। जयां शरीरही पाठीं न पवे। तेणें भलतया व्हावें। जातीचिया॥ ४१५॥
आणि आचरण पाहातां सुभटा। तो दुष्कृताचा कीर सेल वांटा। परि जीवित वेंचिलें चोहटां। भक्तीचिया कीं॥ ४१६॥

अर्थ—याप्रमाणे अनन्यप्रेमाने जो माझें भजन करितो, तो कोणत्या ही भलत्या जातीचा असला तरी त्याला पुन्हा जन्मच प्राप्त होत नाही. ॥ ४१५ ॥ आणि हे उत्तम योद्ध्या अर्जुना! ज्याचे आचरण पाहूं गेल्यास, तें पापाचरणाचें अंतिम टोक आहे. चारहि बाजूने येणारे रस्ते ज्याप्रमाणे एखाद्या चौकांत मिळतात, त्याप्रमाणे चतुर्विध पुरुषार्थ ज्या भक्तींत एकीभूत होतात, त्या माझ्या भक्तीला ज्याने आपलें जीवित अर्पण केलें आहे. ॥ ४१६ ॥

गूढार्थदीपिका—चोहटा-धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ साधण्याचे जे चार साधनमार्ग आहेत, त्या चारहि साधनामार्गांमध्ये निरनिराळ्या रीतीने भगवंताची भक्ति सांगितलीच आहे. भगवंताच्या भक्तिवांचून हे पुरुषार्थ प्राप्त होत नाहीत. अशारीतीने या चारी पुरुषार्थांचे साधनमार्ग भक्तींतच येऊन मिळत असल्यामुळे आणि "या वै साधनसंपत्तिः पुरुषार्थचतुष्टये। तयाविना तदाप्नोति नरो नारायणाश्रयाः" या चारी पुरुषार्थाच्या चार निरनिराळ्या साधनमार्गाचा आश्रय न करतांहि केवळ एका सगुण भगवंताचा आश्रय करणाऱ्याला हे चारी पुरुषार्थ प्राप्त होऊं शकतात असें सांगितलें असल्यामुळे, येथे भक्तीला "चोहटा" म्हटलें आहे.

अगा अंतींचिया मती। साचपण पुढिले गती। म्हणोनि जीवित जेणें भक्ती। दिधलें शेखीं॥ ४१७॥
तो आधीं जरी दुराचारी। तरी सर्वोत्तमुचि अवधारीं। जैसा बुडाला महापूरीं। न मरतु निघाला॥ ४१८॥

अर्थ—बा अर्जुना! शेवटीं मरणाचे वेळीं जशी बुद्धि राहील त्याप्रमाणेच पुढे निश्चित गति होत असल्यामुळें,

ज्याने आपलें जीवित माझ्या भक्तीला समर्पण केलें. ॥ ४१७ ॥ तो प्रथम जरी अत्यंत पापाचरण करणारा असला तरी ज्याप्रमाणे एखादा महापुरांत बुडालेला न मरतां जीवंत निघावा त्याप्रमाणे तो सर्वांपेक्षा श्रेष्ठ पुण्यवान होतो. ॥ ४१८ ॥

गूढार्थदीपिका—भगवंताच्या भक्तीमार्गाचा आश्रय केल्यानंतर दुराचारी पुरुषाचें निःशेष दुराचरण सुटतें व भक्तीने मागींल सर्व पापांची निष्कृति होते; म्हणून तो सर्वोत्तम होतो. भगवंताचें भक्ति प्रेम लागलें म्हणजे भगवंताच्या आज्ञेविरुद्ध वागणें शक्य नसल्यामुळें पुढे पापाचरण होऊं शकत नाही, असा भाव.

तयाचें जीवित ऐलथडिये आलें। म्हणोनि बुडालेपण जेवीं वायां गेलें। तेवीं नुरेचि पाप केलें। शेवटलिये भक्ती॥ ४१९ ॥

यालागीं दुष्कृती जर्‍ही जाहाला। तरि अनुतापतीर्थी न्हाला। न्हाऊनि मजआंतु आला। सर्वभावें॥ ४२० ॥

तरि आतां पवित्र तयाचेंचि कुळ। अभिजात्य तेंचि निर्मळ। जन्मलेया फळ। तयासीच जोडलें॥ ४२१ ॥

तो सकळही पढिन्नला। तपें तोचि तपिन्नला। अष्टांग अभ्यासिला। योगु तेणें॥ ४२२ ॥

अर्थ—महापुरांत बुडालेला न मरतां महापुरांतून ऐलथडीवर जीवंत आला म्हणून, ज्याप्रमाणे त्याचें बुडणें व्यर्थ गेलें, त्याप्रमाणें दुराचारानंतर शेवटीं अनन्यभक्ति केल्यामुळें, त्याचें संपूर्ण मागील पाप नाहीसें झालें व त्याची पाप करण्याची प्रवृत्तिहि नाहीशी झाली. ॥ ४१९ ॥ म्हणून प्रथम दुराचारी होता तरी जर त्याने अनुतापतीर्थांत स्नान करून (म्हणजे कृतकर्माचा अत्यंत पश्चात्ताप होऊन) सर्व प्रेमभावाने माझे ठिकाणीं प्रेम करूं लागला. ॥ ४२० ॥ तर आतां त्याचें सर्व कुळ अत्यंत पवित्र झालें, त्याचेच कुळ कुलीन होय आणि त्यानेच आपल्या जन्माचें सार्थक केलें. ॥ ४२१ ॥ त्याने सर्व शास्त्राचें अध्ययन केलें त्याने सर्व तपें केलीं व त्यानें अष्टांगयोग केला. ॥ ४२२ ॥

गूढार्थदीपिका—केलेल्या साधनाचें फळ ज्याला मिळालें त्याचें साधनानुष्ठान सार्थक झालें किंवा त्यानेच खरोखर साधनानुष्ठान केलें, असें म्हटलें पाहिजे आणि फळप्राप्ति झाली नाही तर साधनानुष्ठान व्यर्थ किंवा करून न केल्यासारखेंच होय. परमात्म्यावांचून इतर फळांची सर्व संतांनी निंदा केली असल्यामुळे सर्व साधनांचें फळ एक परमात्माच आहे; म्हणून "योगाचें तें भाग्य क्षमा। आधीं दमा इंद्रियें॥ अवघीं भाग्यें येती घरां। देव सोयरा जालिया॥" (तु. गा.) भक्तिभावाने ज्यांनी परमात्मा स्वाधीन करून घेतला त्यांनीच खरोखर परमात्मप्राप्तीच्या सर्व साधनांचें अनुष्ठान केलें, असें म्हटलें पाहिजे.

हें असो बहुत पार्था। तो उतरला कर्मे सर्वथा। जयाची अखंड गा आस्था। मजचिलागीं॥ ४२३ ॥

अर्थ—अर्जुना! हें पुष्कळ बोलणें असूं दे. ज्याला माझें अखंड प्रेम लागलें तोच सर्व कर्मांतून सुटला. ॥ ४२३ ॥

गूढार्थदीपिका—"प्रारब्ध क्रियमाण। भक्तां संचित नाही जाण" (३०८१ तु. गा.) संपूर्ण संचित, क्रियमाण, प्रारब्ध, हें तिन्ही प्रकारचें कर्म भगवद्भक्तांना लागत नाही. भगवन्नामस्मरणाने संचित नाहीसें होतें. कर्मरहित असा सच्चिदानंद परमात्मा हृदयांत सांठविला असल्यामुळे, मी कर्माचा कर्ता आहे असें कर्तृत्वहि त्याचे ठिकाणीं उत्पन्न होत नाही, म्हणून क्रियमाण कर्महि त्यांना स्पर्श करूं शकत नाही व अखंड भगवत्प्रेमांत रंगून गेल्यामुळे प्रारब्धकर्माचाहि त्याना भोग होत नाही, असें श्रीतुकाराम महाराजांनी म्हटलें आहे. अशारीतीने भगवद्भक्त संपूर्ण कर्मांपासून अलिप्त असतात.

अवधिया मनोबुद्धीचिया राहटी। भरोनि एकनिष्ठेचिया पेटीं। जेणें मजमाजीं किरीटी। निक्षेपिली॥ ४२४ ॥

अर्थ—जेवढे कांही मनबुद्धीचे व्यापार आहेत ते सर्वं एकनिष्ठेच्या पेटींत भरून माझ्याठिकाणीं ती एकनिष्ठेची पेटीं ज्यांनी ठेवून दिली (तो सर्व कर्मांहून सुटला)॥ ४२४॥

गूढार्थदीपिका—एक निष्ठेची पेटी—"आम्हां विष्णुदासा। एकविधभाव। न म्हणों या देव। आणिकांसी" (तु. गा. ४१५) भगवद्भक्त आपल्या उपास्याचे ठिकाणीं एकनिष्ठ असल्यामुळे, त्यांच्या सर्व मनबुद्धिइंद्रियांदिकांचे व्यापार "एकान्तभक्तिः सततं नारायणपरायणः" भगवत्परायणच होतात. यालाच एकान्तभक्ति म्हणतात.

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति। कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति॥ ३१॥

अर्थ—माझ्या भक्तीच्या योगाने पुरुष धर्मात्मा म्हणजे केवळ भगवदाज्ञेप्रमाणे वागणारा होतो व त्याला अखंड शांति प्राप्त होते. हे कुंतिसुता अर्जुना! माझा भक्त कधीं नाश पावत नाही असें निश्चित जाण. ॥ ३१ ॥

तो आतां अवसरें मजसारिखा होईल। ऐसाही हन भाव तुज जाईल। हां गा अमृताआंत राहील। तया मरण कैचें॥ ४२५ ॥

अर्थ—अर्जुना! असें तुला कदाचित् वाटेल की माझा भक्त कांही काळाने माझ्यासारखाच होईल, पण बाबा! अमृतामध्यें राहणाऱ्याला कसें मरण येईल. ॥ ४२५ ॥

गूढार्थदीपिका—**तो आतां अवसरें मजसारिखा होईल**—वस्तुत: जडविनाशी पांचभौतिक असें कांही एक नाही, नामरूपासह संपूर्ण परब्रह्मच आहे, असा वेदान्ताचा सिद्धान्त आहे. जीवाला पूर्ण अशा परब्रह्माचा, जडविनाशी पांचभौतिकरूपानें जो अनुभव येतो तो केवळ त्याच्या अविद्यारूप भ्रांतकल्पनेचा परिणाम आहे.

भगवद्भक्ताला अखंड भगवत्प्रेमामुळे देहादिकांचा विसर पडून देहादिकांच्या जडविनाशी पांचभौतिकधर्माचा प्रत्ययच नसतो; म्हणूनच त्याची भगवंताचे ठिकाणीं नि:सीम प्रेमरूप भक्ति झाल्याबरोबर भगवंताप्रमाणेच तो सदेह सच्चिदानंदरूप होतो, असा भाव.

पैं सूर्य जो वेळु नुदैजे। तया वेळा कीं रात्रि म्हणिजे। तेवीं माझिये भक्तीविण जें कीजे। तें महापाप नोहे॥ ४२६ ॥
म्हणोनि तयाचिया चित्ता। माझी जवळिक पांडुसुता। तेव्हांचि तो तत्त्वता। स्वरूप माझें॥ ४२७ ॥
जैसा दीपें दीपु लाविजे। तेथ आदील कोण हें नोळखिजे। तैसा सर्वस्वें जो मज भजे। तो मी होऊनि ठाके॥ ४२८ ॥
मग माझी नित्य शांती। तया दशा तेचि कांती। किंबहुना जिती। माझेनि जीवें॥ ४२९ ॥
एथ पार्था पुढतपुढती। तेंचि तें सांगों किती। जरी मियां चाड तरी भक्ती। न विसंबिजे गा॥ ४३० ॥
अगा कुळाचिया चोखटपणा नलगा। आभिजात्य झणीं शलाघा। व्युत्पत्तीचा वाउगा। सोसु कां वाहावा॥ ४३१ ॥

अर्थ—जोपर्यंत सूर्य उगवत नाही तोपर्यंत रात्र म्हटली जाते. तसें माझ्या भक्तीवांचून जें केलें ते महापाप नव्हे काय? (माझी भक्ति हाच खरा धर्म होय व माझा भक्तच खरा धर्मात्मा होय असा भाव) ॥ ४२६ ॥ म्हणूनच माझ्या भक्तीने जेव्हा त्यांनी आपल्या हृदयांत मला जवळ केलें तेव्हाच तो माझें स्वरूप झाला. ॥ ४२७ ॥ ज्याप्रमाणे एका दिव्याने दुसरा दिवा लावला असतां पहिला दिवा कोणता, हें ओळखतां येत नाही, त्याप्रमाणे सर्वभावाने माझें भजन करणारा, मीच होऊन जातो. ॥ ४२८ ॥ मग माझी जी नित्य आत्मशांति तीच त्याची दशा असते व तेंच तेजहि असतें. किंबहुना माझें जगणे हेंच त्याचें जगणे होय—म्हणजे माझ्याहून माझा भक्त यत्किंचित् निराळा नसतो असा अर्थ. ॥ ४२९ ॥ अर्जुना! आतां वारंवार तेंच ते काय सांगायचे! माझी प्राप्ति व्हावी अशी इच्छा असेल तर माझी प्रेमभक्ति टाकू नकोस. ॥ ४३० ॥ मला प्राप्त होण्याला उत्तम कुळात जन्मण्याची गरज नाही. कुळाच्या कुलीनत्वाची प्रशंसा करावी लागत नाही, मी ब्रह्म आहें अशा ज्ञानाहंतेचा हव्यास कशाला करावा? ॥ ४३१ ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्माचे सत् चित्, आनंद हे तिन्ही अंश एकवटून झालेलें भगवंताचें जे सगुण स्वरूप तें अंत:करणांत सांठविणे हीच परब्रह्माची पूर्ण प्राप्ति आहे आणि ती प्रेमभक्तीनेच होते. सगुणाच्या भक्तिप्रेमावांचून ज्ञानादिकांनी होणारी परमेश्वरप्राप्ति अंशभूत असते असा अर्थ.

कर्म, ज्ञान, योग इत्यादि मार्गाने जी सांश भगवत्प्राप्ति होते ती देखील त्या मार्गांत भक्तीचे साह्य घेतल्यावांचून सिद्ध होत नाही आणि इतर मार्गाचा आश्रय न करतां देखील केवळ भक्तीने भगवंताची पूर्ण प्राप्ति होते, म्हणूनहि येथे भक्तिची महति वाखाणिलेली आहे.

कां रूपें वयसा माजा। आथिलेपणें कां गाजा। एक भाव नाहीं माझा। तरी पाल्हाळ तें॥ ४३२ ॥
कणेंविण सोपटें। कणसें लागलीं आथी घनदाटे। काय करावें गोमटें। वोस नगर॥ ४३३ ॥
नातरी सरोवर आटलें। रानी दु:खिया दु:खी भेटलें। कां वांझ फुलीं फुल्लें। झाड जैसें॥ ४३४ ॥
तैसें सकळ तें वैभव। अथवा कुळजातिगौरव। जैसें शरीर आहे सावेव। परि जीवचि नाहीं॥ ४३५ ॥

अर्थ—रूप व वय यांचा मान किंवा अभिमान व संपत्तीचा डौल मिरविण्याची आवश्यकता नाही; एक माझें

अनन्य प्रेम नसेल तर हें सर्व व्यर्थ आहे. ॥ ४३२ ॥ दाण्यावाचून घनदाट फोल कणसें जरी लागलीं असलीं तरी काय उपयोग? नगर सुंदर आहे, पण माणसांवांचून ओस आहे तर काय उपयोग?॥ ४३३ ॥ सरोवर आटलें असावें, अरण्यांत एका दु:खिताला दुसरा दु:खी मनुष्य भेटावा किंवा फळावांचून नुसतें फुललेलें झाड असावें, त्याप्रमाणे. ॥ ४३४ ॥ माझ्या भक्तीवांचून उत्तम जन्म, उत्तम कुळ, उत्तम संपत्ति इत्यादि सर्व मोठेपण, जीवावांचून शरीर असावें तसें आहे. ॥ ४३५ ॥

तैसें माझिये भक्तीविण। जळो तें जियालेपण। अगा पृथ्वीवरी पाषाण। नसती काई॥ ४३६ ॥
पैं हिंवराची दाट साउली। सज्जनीं जैसी वाळिली। तैसीं पुण्यें डावलूनि गेलीं। अभक्तांतें॥ ४३७॥
निंब निंबोळियां मोडोनि आला। तरी तो काउळियांसीचि सुकाळु जाहला। तैसा भक्तिहीनु वाढिन्नला। दोषांचिलागीं॥ ४३८ ॥
कां षड्रस खापरीं वाढिलें। वाढूनि चोहटां ठेविलें। ते सुणियांचे उपेगा गेले। जियापरी॥ ४३९ ॥
तैसें भक्तिहीनाचें जिणें। जो स्वप्नीहि परि सुकृत नेणे। तेणें संसारदु:खासि भाणें। वोगरिलें गा॥ ४४० ॥
म्हणोनि कुळ उत्तम नोहावें। जाती अंत्यजही व्हावें। वरि देहाचेनि नांवें। पशूचेंही लाभो॥ ४४१ ॥
पाहें पां सावजें हातिरू धरिलें। तेणें तया काकुळती मातें स्मरलें। कीं तयाचें पशुत्व वावो जाहलें। पावलिया मातें॥ ४४२ ॥

अर्थ—त्या प्रमाणेच माझ्या भक्तीवांचून जें जीवंतपण त्याला आग लागो. असें जर मनुष्याचेहि जिणें असेल तर पृथ्वीवर थोडे का दगड आहेत!॥ ४३६ ॥ हिवराच्या झाडाची दाट सावली असली तरी सज्जन पुरुष ज्याप्रमाणे तिचा त्याग करितात त्याप्रमाणे अभक्त पुरुषाच्या वाऱ्याला देखील पुण्य राहत नाही. ॥ ४३७ ॥ कडुनिंबाच्या वृक्षाच्या फांद्या भूमीला टेकतील इतक्या निंबोळ्या आल्या तरी त्या कावळ्यांनाच सुकाळ होतात. त्याप्रमाणे माझी भक्ति न करणारा पापाची जोडी करण्याकरितांच जगतो. ॥ ४३८ ॥ षड्रसयुक्त पक्वान्नांचें ताट वाढून चौरस्त्यावर ठेविलें तर त्याप्रमाणे ज्या पुण्याने माझी प्राप्ति होते असें पुण्य स्वप्नांत देखील ज्याच्याकडून घडत नाही, अशा भक्तिहीनाचें जीवित तें अन्न जसे कुत्र्यांना घालण्याच्या उपयोगी असतें. ॥ ४३९ ॥ म्हणजे संसारदु:खापुढे वाढलेलें ताटच होय. ॥ ४४० ॥ म्हणून उत्तम कुळांतील जन्म नसो, जातीने अंत्यज असला तरी चालेल, आणखी देह पशूचा आला तरी हरकत नाही, एक माझी भक्ति असली की पुरे. ॥ ४४१ ॥ अर्जुना! पहा. नक्राने गजेंद्राला धरलें तेव्हा त्या गजेंद्राने अत्यंत काकुळतीने माझा धांवा केला व माझी प्राप्ति झाल्यामुळे त्याचें पशुत्व व्यर्थच ठरलें—म्हणजे माझ्या प्राप्तीला प्रतिबंधक झालें नाही. ॥ ४४२ ॥

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्यु: पापयोनय:। स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्॥ ३२ ॥

अर्थ—स्त्री, वैश्य, शूद्र इत्यादि पापयोनींत जन्मलेले जे लोक आहेत ते देखील माझा आश्रय करून भक्तीच्या योगाने परमगतीला प्राप्त होतात. ॥ ३२ ॥

अगा नांवें घेतां वोखटीं। जे आघवेया अधमांचिये शेवटीं। तिये पापयोनींही किरीटी। जन्मले जे॥ ४४३ ॥
ते पापयोनि मूढ। मूर्ख जैसे कां दगड। परि माझ्या ठायीं दृढ। सर्वभावें॥ ४४४॥
जयांचिये वाचे माझे आलाप। दृष्टि भोगी माझेंचि रूप। जयांचें मन संकल्प। माझाचि वाहे॥ ४४५ ॥
माझिया कीर्तीविण। जयांचे रिते नाहीं श्रवण। जयां सर्वांगीं भूषण। माझी सेवा॥ ४४६ ॥
जयांचें ज्ञान विषो नेणे। जाणीव मजचि एकातें जाणे। जयां ऐसें लाभे तरी जिणें। एऱ्हवीं मरण॥ ४४७ ॥

अर्थ—बा अर्जुना! ज्यांचें नाव घेण्यातहि पाप लागतें व जे अत्यंत अधमांतल्या अधम अशा पापयोनींत जन्माला आलें. ॥ ४४३ ॥ ते पापयोनींत जन्मले व पापकर्मानेच अत्यंत दगडाप्रमाणे मतिमंद असले तरी सर्वभावाने माझ्या ठिकाणीं दृढचित्त झाले आहेत. ॥ ४४४ ॥ ज्यांचे वाणीचे ठिकाणी अखंड माझ्या नामाचा व गुणांचा उच्चार होत राहतो, ज्यांच्या दृष्टीला माझें रूप पाहण्यांतच सुख वाटतें, ज्यांचें मन माझेंच अखंड ध्यान करीतें. ॥ ४४५ ॥ ज्यांचे कान माझी कीर्ति ऐकल्यावांचून कधीं रिकामे राहत नाहीत. सर्व भावाने सेवा हेच ज्यांच्या अंगावरील दागिने होत. ॥ ४४६ ॥ ज्यांचे ज्ञान शब्दादिक विषयांना न जाणतां मला एकालाच जाणतें. अशा रीतीने सर्व इंद्रियें, मन,

बुद्धि माझ्याकडे लागली असलीं तरच ते जगूं इच्छितात, नाही तर ज्यांचे प्राण माझ्या विरहाने देहाला सोडून जाऊं पाहतात. ॥ ४४७ ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्माहून निराळ्या अशा जडविनाशी जगाचा जीवाला अनुभव आणून देणारी मन बुद्धी इंद्रियें हीं सर्व परमात्मपरायण झालीं असतां, जीव पूर्ण ब्रह्मस्वरूप होतो, निर्गुण परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं वाचा व्यापार संभवत नाही; पण रामकृष्णादि सगुणस्वरूपाचे ठिकाणीं मात्र इंद्रियांचा व्यापार संभवतो. हें रामकृष्णादी सगुणस्वरूप पूर्ण ब्रह्मच असल्यामुळें त्यांच्या भजनाने जीव पूर्ण ब्रह्मस्वरूप होतो; म्हणून हीं मनबुद्ध्यादिकांची सगुणपरायणता कशी साधायची हेंच माऊलींनी या ओव्यांनी सांगितले आहे.

ऐसा आघवाचि परी पांडवा। जिहीं आपुलिया सर्वभावा। जियावयालागीं वोलावा। मींचि केला ॥ ४४८ ॥

ते पापयोनीही होतु कां। ते श्रुताधीतही न होतु कां। परि मजसीं तुकितां तुका। तुटी नाहीं ॥ ४४९ ॥

अर्थ—याप्रमाणे अर्जुना! जीवंत राहण्याकरिता ज्यांनी आपल्या सर्व प्रेमभावाचा जिव्हाळा, मलाच मानून घेतलें. ॥ ४४८ ॥ ते पापयोनींत जन्मले असोत की त्यांनी कांही अध्ययन केलेलें नसो किंवा श्रवण केलेंलें नसो, पण माझ्याशीं त्यांची तुलना केली असतां, माझ्याहून ते यत्किंचित् कमी ठरणार नाहीत. ॥ ४४९ ॥

गूढार्थदीपिका—ते श्रुताधीतही न होतु कां—परमात्माविषयक पराविद्या व धर्माधर्मविषयक अपराविद्या या दोन विद्या आहेत हें मागें सांगितलेंच आहे. तत्त्वमस्यादि निर्गुण विद्या व सगुण परब्रह्माची प्रेमभक्ति ह्या पराविद्येंत मोडतात व श्रुताधीत म्हणजे शास्त्रांचे श्रवण, अध्ययन इत्यादि अपराविद्येंत मोडतात. ब्रह्मविद्या हीच खरी विद्या असून इतर सर्व विद्या भ्रांतिरूप अविद्येचेंच कार्य आहे. त्या नाहीशाच करावयाच्या असतात. अभक्ताला निर्गुणस्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून घेण्याकरितां लागणाऱ्या चित्तशुद्धीसाठीं निष्कामचित्ताने अपराविद्येच्या अनुष्ठानाची आवश्यकता असते; पण ज्यांना भगवत्प्रेम प्राप्त झालें आहे, त्यांची त्या प्रेमानेच चित्तशुद्धि होऊन पूर्ण सगुणनिर्गुण भगवत्प्राप्ति होत असल्यामुळे, त्यांना अपराविद्येच्या अनुष्ठानाची आवश्यकता नसते. हेंच माऊलींनी "श्रुताधीतही न होतु कां" या चरणाने प्रतिपादिलें आहे.

पाहें पां भक्तीचेनि आथिलेपणें। दैत्यीं देवां आणिलें उणें। माझें नृसिंहत्व लेणें। जयाचिये महिमें ॥ ४५० ॥

तो प्रल्हादु गा मजसाठीं। घेतां बहुतें सदा किरीटी। कां जें मियां द्यावें ते गोष्टी। तयाचिया जोडे ॥ ४५१ ॥

एऱ्हवीं दैत्यकुळ साचोकारें। परि इंद्रही सरि न लाहे उपरें। म्हणोनि भक्ति गा एथ सरे। जाति अप्रमाण ॥ ४५२ ॥

अर्थ—पहा बरें अर्जुना! माझ्या भक्तीने संपन्न झालेल्या दैत्यांनी देवांना देखील आपल्यापेक्षा कनिष्ठ ठरविलें. ज्याच्या थोर भक्तीमुळे मला नृसिंहाचा अलंकार घालावा लागला. ॥ ४५० ॥ त्या प्रल्हादाची व माझी तुलना करून पाहतां तो माझ्यासारखाच सदा थोर ठरेल, कारण मी जें देऊं शकेन तेंच त्याच्यानेहि प्राप्त होऊं शकतें. ॥ ४५१ ॥ साधारणपणे पाहतां प्रल्हादाचे खरोखर दैत्यकुळ होय; पण त्याची इंद्रालाहि बरोबरी करतां येत नाही मग अधिकपणा तर दूरच राहिला, म्हणून माझ्या प्राप्तीकरिता एक भक्तींच समर्थ आहे येथे जातीला महत्व नाही. ॥ ४५२ ॥

गूढार्थदीपिका—भक्ति गा एथ सरे—भक्ति म्हणजे सगुण भगवंताचें प्रेम लागणें होय. "भक्त म्हणवितां गोड वाटे। परि मजलागी जै कां हृदय फुटे। अकृत्रिम भक्ति तैं उमटे। तैं मी भेटे उद्धवा"॥ ११२३ ॥ "जीवाहिहूनि वरौती। माझ्या ठायीं अत्यंत प्रीती। तिये नांव गा माझी भक्ति। जाण निश्चिती उद्धवा"॥ १३१६ ॥ (ए. भा. अ. ११) हें परमप्रेमच भगवंताचें स्वरूप आहे. हें परमप्रेम अंत:करणांत उमटलें की सगुणसायुज्यता—म्हणजे सगुण परमेश्वराशीं ऐक्य—होतें.

जाति अप्रमाण—अशा प्रकारें अखंड भगवद्ध्यानाने भगवद्रूप झालेला संत कोणत्याहि जातीचा असो, केवळ जातीमुळे त्याचा अवमान करणें हें भगवंताला आवडत नाही. तो भगवंताप्रमाणेच पूज्य मानला पाहिजे, असा भाव.

राजाज्ञेचीं अक्षरें आहाती। तियें चामा एका जया पडती। तया चामासाठीं जोडती। सकळ वस्तु ॥ ४५३ ॥

वांचूनि सोनें रुपें प्रमाण नोहे। एथ राजाज्ञाचि समर्थ आहे। तेंचि चाम एक जैं लाहे। तेणें विकती आघवीं ॥ ४५४ ॥

तैसें उत्तमत्व तैंचि तरे। तैंचि सर्वज्ञता सरे। जैं मनोबुद्धि भरे। माझेनि प्रेमें॥ ४५५॥
म्हणोनि कुळ जाति वर्ण। हें आघवेंचि गा अकारण। एथ अर्जुना माझेपण। सार्थक एक॥ ४५६॥
तेंचि भल्तेणें भावें। मन मजआंतु येतें होआवें। आलें तरी आघवें। मागील वावो॥ ४५७॥

अर्थ—राजाच्या आज्ञेचीं जी अक्षरें असतात तीं ज्या चामड्याच्या तुकड्यावर पडतील, त्या चामड्याच्या तुकड्याने सर्व वस्तु प्राप्त होऊं शकतात. ॥ ४५३ ॥ त्या चामड्यावांचून सोनें, रुपें यांनाहि मान्यता मिळत नाही. कारण येथे राजाचा हुकूम हाच समर्थ असतो. तोच राजाच्या हुकुमाचीं अक्षरें असलेला चामड्याचा तुकडा प्राप्त झाल्यास त्याने सर्व वस्तु विकत मिळतात. ॥ ४५४ ॥ त्याप्रमाणे माझ्या प्रेमाने अंत:करण, मन, बुद्धि भरून जाईल तरच जाति, कुळ, संपन्नता या सर्वांची थोरवी व सर्व शास्त्रांचें ज्ञान यांची सार्थकता आहे. ॥ ४५५ ॥ म्हणून कुळ, जाति, वर्ण हे कांही एक माझ्या प्राप्तीचें साधन होऊं शकत नाहीत. माझ्या प्राप्तीचें साधन, माझे होऊन जाणें, हेंच एक उपयोगाचें आहे. ॥ ४५६ ॥ तें माझेपण किंवा माझें होऊन जाणें कोणत्याहि भावाने असो. मन माझ्या ठिकाणी जडले पाहिजे मन माझ्या ठिकाणी जडलें कीं पूर्वीचें सर्व व्यर्थ होतें. ॥ ४५७ ॥

गूढार्थदीपिका—आलें तरी आघवें। मागील वावो—भगवत्प्रेमाने एकदां चित्त भरून गेलें की ते भगवद्रूपच होतें. म्हणून भगवान जसा सर्व जात्यादिदोषापासून निर्लेप असतो तसाच भक्तहि मागील सर्व पापें नाहीशी होऊन जात्यादि दोषापासून निर्लेप होतो व भगवत्प्रेमाने चित्त अत्यंत सात्विक झाल्यामुळे पापप्रवृत्ति नाहीशी होऊन, पुढे त्याच्याकडून दोषच घडत नाही, असा भाव.

''**भक्तिः पुनाति मन्निष्ठा श्वपाकानपि संभवात्**'' (भाग. स्कं. ११—१४—२१)

या श्लोकावर टीका करतांना श्रीधराचार्यांनीहि ''संभवाज्जोतिदोषादपि'' अत्यंत प्रेमाने माझी एकनिष्ठ भक्ति करणारा अंत्यज देखील जातिदोषापासून मुक्त होतो असें म्हटलें आहे.

जैसे तंवचि वहाळ वोहळ। जंव न पवती गंगाजळ। मग होऊनि ठाकती केवळ। गंगारूप॥ ४५८॥
कां खैर चंदन काष्ठें। हे विवंचना तंवचि घटे। जंव न घापती एकवटे। अग्नीमाजीं॥ ४५९॥
तैसें क्षत्री वैश्य स्त्रिया। कां शूद्र अंत्यजादि इया। जाती तंवचि वेगळालिया। जंव न पवती मातें॥ ४६०॥

अर्थ—गंगेंत मिळत नाही तोपर्यंत वाहणाऱ्या पाण्याला ओघ म्हणतां येते. मिळाल्यावर ते गंगारूप होऊन जातात. ॥ ४५८ ॥ किंवा जोपर्यंत अग्नीत पडत नाहीत तोपर्यंत हें चंदनाचे लांकूड व खैराचें लांकूड हा भेद असतो. ॥ ४५९ ॥ त्याप्रमाणे क्षत्रिय, वैश्य, स्त्रिया किंवा शूद्र, अंत्यज ह्या जाती मला प्राप्त होत नाहीत तोपर्यंत वेगळ्या मानल्या जातात. ॥ ४६० ॥

गूढार्थदीपिका—भगवंताला पावणें म्हणजे आपणच भगवान होणें होय आणि आपण भगवान होणें म्हणजें ''जैं कृष्ण होईजे आपण। तैं कृष्ण होईजे आपुलें अंत:करण'' या ओवींत सांगितल्याप्रमाणे आपलें अंत:करण भगवद्रूप होणें होय. म्हणून माऊली म्हणतात की भगवंताच्या परमप्रेमाने अंत:करण भगवद्रूप होऊन जाई पर्यंत जातिनिर्बंध राहतात.

मग जाती व्यक्ती पडे बिंदुलें। जेव्हां भावे होती मज मीनले। जैसे लवणकण घातले। सागरामाजीं॥ ४६१॥
तंववरी नदानदींचीं नांवें। तंवचि पूर्वपश्चिमेचे यावे। जंव न येती आघवे। समुद्रामाजीं॥ ४६२॥
हेंचि कवणें एके मिसें। चित्त माझे ठायीं प्रवेशे। येतुलें हो मग आपैसें। मी होणें असे॥ ४६३॥
अगा वरी फोडावयाचि लागीं। लोहो मिळो कां परिसाचां आंगीं। कां जे मिळतिये प्रसंगीं। सोनेंचि होईल॥ ४६४॥
पाहें पां वालभाचेनि व्याजें। तिया व्रजांगनांचीं निजें। मज मीनलिया काय माझें। स्वरूप नव्हती॥ ४६५॥
नातरी भयाचेनि मिसें। मातें न पविजेचि काय कंसें। कीं अखंड वैरवशें। चैद्यादिकीं॥ ४६६॥
अगा सोयरेपणेंचि पांडवा। माझें सायुज्य यादवां। कीं ममत्वें वसुदेवा-। दिकां सकळां॥ ४६७॥
नारदा ध्रुवा अक्रूरा। शुका हन सनत्कुमारा। यां भक्ती मी धनुर्धरा। प्राप्यु जैसा॥ ४६८॥

तैसाचि गोपिकांसि कामें। तया कंसा भयसंभ्रमें। येरां घातकेयां मनोधर्में। शिशुपालादिकां॥ ४६९ ॥
अगा मी एकलाणीचें खागें। मज येवों ये भलतेनि मार्गें। भक्ती कां विषयें विरागें। अथवा वैरें॥ ४७० ॥
म्हणोनि पार्था पाहीं। प्रवेशावया माझां ठायीं। उपायांची नाहीं। वाणी एथ॥ ४७१ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे समुद्रांत मिठाचा खडा मिळाला असतां त्याचें अस्तीत्व राहत नाही, त्याप्रमाणे जेव्हा पुरुष अनन्यभावाने माझ्यांत मिळतो तेव्हा मग त्याचेंहि व्यक्तिजातीवर शून्य पडतें—म्हणजे जातिव्यक्ति राहत नाही. ॥ ४६१ ॥ तसेंच तोपर्यंत नद्या समुद्रांत मिळत नाहीत तोपर्यंतच ही अमुक नदी पूर्वेकडून आली, ही अमुक नदी पश्चिमेकडून आली, असा निराळेपणा राहतो. ॥ ४६२ ॥ त्याप्रमाणे हें चित्तच कोणत्याहि निमित्ताने माझ्या ठिकाणीं जडलें की मग सहजच तो पुरुष मद्रूप होतो. ॥ ४६३ ॥ बा अर्जुना! परिसाला फोडण्यासाठी जरी लोखंड व परीस यांचा संबंध झाला तरी संबंध झाल्याबरोबर लोखंड सोनेंच होईल. ॥ ४६४ ॥ माझ्या ठिकाणीं पतिबुद्धीच्या मिषाने मला आपला देह समर्पण करून त्या व्रजांतील गोपस्त्रिया मत्स्वरूप झाल्या नाहीत काय? ॥ ४६५ ॥ किंवा माझ्यापासून मृत्यु आहे, हें कळून आल्यावर मृत्यूच्या भयाच्या निमित्ताने कंस माझ्यांत मिळाला नाही काय? किंवा अखंड माझे वैर करून त्या मिषाने शिशुपालादिक मला मिळाले नाहीत? ॥ ४६६ ॥ बा अर्जुना! सोयरेपणाचा संबंध ठेवून माझे ठिकाणी चित्त लागल्यामुळें यादवांना माझ्यांत मिळतां आले किंवा माझ्या ठिकाणीं पुत्र प्रेम ठेवून वसुदेवादिकांना माझी प्राप्ति झाली. ॥ ४६७ ॥ नारद, ध्रुव, अक्रुर, शुकाचार्य, सनत्कुमार यांना जसा भक्तीने मी प्राप्त झालों॥ ४६८ ॥ तसाच गोपिकांना, माझे ठिकाणीं पतिभावनेने कामवासना ठेवून, माझी प्राप्ती झाली. त्या कंसाला भीतीनेच माझी प्राप्ती झाली, माझा घात करूं पाहणाऱ्या शिशुपालादिकांना त्या द्वेषरूप मनोधर्माने माझी प्राप्ती झाली. ॥ ४६९ ॥ बा अर्जुना! मी एक सर्व मार्ग जेथें मिळतात असे एक स्थान आहे. म्हणून भक्ति असो, विषयवासना असो, विरक्ति असो, भय, वैर असो, कोणत्याहि मार्गाने मजकडे येतां येते. ॥ ४७० ॥ म्हणून माझ्या ठिकाणीं प्राप्त होण्याकरिता उपायाची कमतरता मुळीच नाही. ॥ ४७१ ॥

गूढार्थदीपिका—जसें निर्गुण परब्रह्माच्या प्राप्तीकरिता ज्ञान मुख्य आहे तसेंच सगुण परब्रह्माच्या प्राप्तीकरिता सगुणाचें ध्यान मुख्य आहे. हें ध्यान विकाराने होवो किंवा प्रेमाने होवो, कोणत्याहि निमित्ताने झालें तरी चालतें; पण चित्त अखंड भगवदाकार राहील इतकें तें ध्यान दृढ असले पाहिजे.

आणि भलतिया जातीं जन्मावें। मग भजिजे कां विरोधावें। परि भक्त कां वैरिया व्हावें। माझियाचि॥ ४७२ ॥
अगा कवणे एके बोलें। माझेपण जऱ्ही जाहालें। तरी मी होणें आलें। हाता निरुतें॥ ४७३ ॥
यांपरी पापयोनीही अर्जुना। कां वैश्य शूद्र अंगना। मातें भजतां सदना। माझिया येती॥ ४७४ ॥

अर्थ—भलत्या जातींत जन्मावें व मग माझी भक्ति करावी किंवा माझा द्वेष करावा, पण भक्त व्हावयाचें असेल तरी माझाच भक्त व्हावें, किंवा वैर करावयाचें असेल तरी तें माझेच करावें. ॥ ४७२ ॥ अर्जुना! कोणत्या कां निमित्ताने होईना, माझा संबंध जुळला व माझें ध्यान लागलें की खात्रीने तुझ्या हाती माझी प्राप्ति आलीच समज. ॥ ४७३ ॥ म्हणून अर्जुना! पापयोनि अंत्यजादि असो किंवा वैश्य, शूद्र, स्त्रिया ह्या असोत; कोणीहि माझी भक्ति केली असतां मला प्राप्त होतात. ॥ ४७४ ॥

किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा। अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्॥ ३३ ॥

अर्थ—मग पुण्यशील ब्राह्मण व राजर्षि जर माझें भक्त असले तर ते मला पावतात हे काय सांगायचें! म्हणून अर्जुना! या नाशिवंत व दुःखदायक मृत्युलोकांत तूं जन्मला आहेस, म्हणून माझें भजन कर. ॥ ३३ ॥

मग वर्णांमाजीं छत्रचामर। स्वर्ग जयांचें अग्रहार। मंत्रविद्येसि माहेर। ब्राह्मण जे॥ ४७५ ॥
जे पृथ्वीतळींचे देव। जे तपोवतार सावयव। सकळ तीर्थांसि दैव। उदयलें जें॥ ४७६ ॥
जेथ अखंड वसिजे यागीं। जे वेदांची वज्रांगी। जयांचिये दिठीचिया उत्संगीं। मंगळ वाढे॥ ४७७ ॥
जयांचिये आस्थेचिनि वोलें। सत्कर्म पाल्हाळीं गेलें। संकल्पें सत्य जियालें। जयांचेनि॥ ४७८ ॥

जयांचेनि गा बोलें। अग्नीसि आयुष्य जाहलें। म्हणोनि समुद्रें पाणी आपुलें। दिधलें यांचिया प्रीती॥ ४७९ ॥
मियां लक्ष्मी डावलोनि केली परौती। फेडोनि कौस्तुभ घेतला हातीं। मग वोढविली वक्षस्थळाची वाखती। चरणरजां॥ ४८० ॥
आझूनि पाउलाची मुद्रा। मी हृदयीं वाहें गा सुभद्रा। जे आपुलिया दैवसमुद्रा। जतनेलागीं॥ ४८१ ॥
जयांचा कोप सुभटा। काळाग्निरुद्राचा वसौटा। जयांचां प्रसादीं फुकटा। जोडती सिद्धी॥ ४८२ ॥

अर्थ—राजाचें चिन्हांत जसें छत्रचामर हें चिन्ह श्रेष्ठ त्याप्रमाणे सर्व वर्णांमध्ये जे ब्राह्मण श्रेष्ठ मानिले जातात, स्वर्ग म्हणजे ज्यांचा इनामगांव होय व जे मंत्रविद्येचे माहेरघर होत. ॥ ४७५ ॥ जे भूमीवरील देव होत, जे मूर्तिमंत तपच अवतीर्ण झाले व जे सर्व तीर्थाचे उदयाला आलेलें भाग्यच होय. ॥ ४७६ ॥ ज्यांचे ठिकाणीं यज्ञ हा नित्य वास करितो, जे वेदांचें कवच आहेत. ज्यांच्या कृपादृष्टीच्या मांडीवर बसले असतां सर्व कल्याण होते. ॥ ४७७ ॥ ज्यांच्या धर्मश्रद्धेच्या ओलाव्याने पुण्यकर्माचा विस्तार झाला व ज्यांच्या सत्य संकल्पाच्या सामर्थ्यानेच जगांत सत्य जिवंत राहतें. ॥ ४७८ ॥ ज्यांच्या वचनाने अग्नीला आयुष्य प्राप्त झालें म्हणून ज्यांच्या प्रेमाकरिता समुद्राने आपल्या पाण्यांत अग्नीला राहण्यास मान्यता दिली. ॥ ४७९ ॥ अर्जुना माझ्या वक्षस्थलाचे ठिकाणीं असलेल्या लक्ष्मीला मी तेथून दूर केलें व वक्षस्थळावर असणारा कौस्तुभमणीही तेथून काढून हातीं घेतला व मग ज्यांच्या चरणाचें रज:कण धारण करण्याकरिता मीं आपल्या वक्षस्थळाची खळगी ज्यांच्यासमोर केली. ॥ ४८० ॥ माझ्या ठिकाणीं असलेल्या दैवी संपत्तीचें संरक्षण करण्याकरिता मी अजूनपर्यंत आपल्या हृदयाचें ठिकाणीं ज्यांच्या पावलाचा ठसा वागवित आहे. ॥ ४८१ ॥ हे उत्तम योद्ध्या अर्जुना! ज्यांचा क्रोध हा प्रलयांतील अग्नीचें राहण्याचें ठिकाण होय आणि ज्यांच्या प्रसन्नतेमुळे सर्व सिद्धींची अनायासें प्राप्ति होते. ॥ ४८२ ॥

गूढार्थदीपिका—जयांचे प्रसादी फुकटा। जोडतीं सिद्धी—पुण्यकर्मानेच ब्राह्मणयोनि प्राप्त होते असें श्रुतींत सांगितलें असल्यामुळें "गायत्रीरहितो विप्र: शूद्रात्प्रत्यवरो भवेत्" स्वधर्म सोडून वागणारा ब्राह्मण स्वधर्माने वागणाऱ्या शूद्रापेक्षा कनिष्ठ होय अशी स्मृति आहे. त्यामुळे येथे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णांमध्ये ब्राह्मणाचें जें श्रेष्ठत्व सांगितलें आहे तें त्यांच्या पूर्वजन्मांतील पुण्यकर्माने प्राप्त झालेल्या जातीला आणि वर्तमान जन्मांतील शास्त्रानुसार असलेल्या आचरणाला धरून सांगितलें आहे. आणि हें श्रेष्ठत्व कर्ममार्गापुरतेच मर्यादित आहे.

ऐसे पुण्यपूज्य जे ब्राह्मण। आणि माझां ठायीं अतिनिपुण। आतां मातें पावती हें कवण। समर्थणें॥ ४८३ ॥
पाहें पां चंदनाचेनि अंगानिळें। शिवतिले निंब होते जे जवळें। तिहीं निर्जीवींही देवांचीं निडळें। बैसणीं केलीं॥ ४८४ ॥
मग तो चंदनु तेथ न पवे। ऐसें मनीं कैसेनि धरावें। अथवा पातला हें समर्थावें। तेव्हां कायि साच॥ ४८५ ॥
तेथ निववील ऐसिया आशा। हरें चंद्रमा आधा ऐसा। वाहिजत असे शिरसा। निरंतर॥ ४८६ ॥
तेथ निवविता आणि सगळा। परिमळें चंद्राहून आगळा। तो चंदनु केविं अवलीळा। सर्वांगीं न बैसे॥ ४८७ ॥
कां रथ्योदकें जियेचिये कासे। लागलिया समुद्र जाली अनायासें। तिये गंगेसि काय अनारिसें। गत्यंतर असे॥ ४८८ ॥
म्हणोनि राजर्षि कां ब्राह्मण। जयां गती मती मीचि शरण। तयां त्रिशुद्धी मीचि निर्वाण। स्थितिही मीचि॥ ४८९ ॥
यालागीं शतजर्जर नावे। रिगोनि केविं निश्चिंत होआवें। कैसेनि उघडिया असावें। शस्त्रवर्षी॥ ४९० ॥
अंगावरी पडतां पाषाण। न सुवावें केविं वोडण। रोगें दाटला आणि उदासपण। वोखदेंसी॥ ४९१ ॥
जेथ चहूंकडे जळत वणवा। तेथूनि न निगिजे केविं पांडवा। तेविं लोका येऊनिया सोपद्रवा। केविं न भजिजे मातें॥ ४९२ ॥

अर्थ—असे ते पुण्यवान व सर्वांना पूज्य असलेले व माझ्या ठिकाणीं प्रेमाने आसक्त झालेले ब्राह्मण मला प्राप्त होतात हें काय प्रतिपादन करावयास हवें?॥ ४८३ ॥ हे पहा अर्जुना! चंदनाच्या झाडावरून वाहणाऱ्या वाऱ्याच्या स्पर्शाने जर जवळ असलेलीं निर्जीव निबांचीं झाडें सुगंधित होऊन गंधाचे द्वारा देवाचे मस्तकावर धारण करण्याला योग्य होतात. ॥ ४८४ ॥ तर तो चंदनच देवाचे मस्तकावर गंधाचे द्वारा धारण केला जात नाही असे कसें म्हणतां येईल? किंवा धारण केला जातो असें सांगितल्यावर तें खरें मानायचें नाही तर काय खोटें मानायचें?॥ ४८५ ॥ हालाहल विषप्राशनाने झालेला अंगाचा दाह नाहीसा होईल या आशेने भगवान शंकर अर्धा चंद्र मस्तकावर सदा

सर्वदा धारण करीत आहेत. ॥ ४८६ ॥ त्यांत चंदन हा दाह शांत करणारा असून पूर्ण आहे. चंद्रापेक्षा सुवास हा एक त्याचे ठिकाणीं अधिक गुण आहे. असा तो चंदन शंकराचे सर्वांगावर सहज कां बसूं शकणार नाही ? ॥ ४८७ ॥ किंवा ज्या गंगेच्या आश्रयाने रस्त्यावरील पाण्याचे ओघ देखील समुद्र होऊन जातात, त्या गंगेला समुद्राला मिळण्यावांचून दुसरी कोणती गति आहे ? ॥ ४८८ ॥ म्हणून राजर्षि असोत की ब्राह्मण असोत, जे गति म्हणजे मलाच एक प्राप्त होण्याची इच्छा धरून व अंत:करण एक माझें ठिकाणींच आसक्त होऊन मला शरण आले, ते माझ्या ठिकाणीच राहतात व शेवटी मलाच मिळतात हें त्रिवार सत्य आहे. ॥ ४८९ ॥ म्हणून शेंकडो ठिकाणी खिळखिळ्या झालेल्या नावेंत बसून स्वस्थ कसें राहतां येईल ? शस्त्रांचा भडिमार जेथे होतो तेथें उघड्यां अंगाने तो कसा सहन करतां येईल ? ॥ ४९० ॥ अंगावर दगड पडत असतांना संरक्षणाला मध्ये कांही आच्छादन कसें घेऊं नये ? रोगाने अत्यंत पीडित होऊनहि औषधाविषयी उदासीन असणें कसें योग्य होईल ? ॥ ४९१ ॥ जेथें चोहोबाजूंनी वणवा पेटला, अर्जुना ! तेथून निघून जाऊं नये काय ? त्याप्रमाणें अनेक प्रकारच्या दु:खांनी भरलेल्या या मृत्युलोकांत येऊन माझी भक्ति कशी करूं नये किंवा माझ्या भक्तीवांचून काय सुख मिळेल ? ॥ ४९२ ॥

गूढार्थदीपिका—केविं न भजिजे मातें—परमात्मा सर्वज्ञ, सर्वशक्तिमान व स्वतंत्र (केवळ कर्मपरतंत्र होऊन फळ देणारा नसल्यामुळे) असल्यामुळे तोच एक शरण आलेल्यांच्या दु:खाचा परिहार करूं शकतो. ''प्रारब्ध नियतिर्वापि महेशविमुखे भवेत्'' (त्रि. र. ७-६०) प्रारब्ध म्हणजे व्यक्तीचें फलद्रूप झालेलें कर्म व नियति म्हणजे समष्टीचें फलद्रूप झालेलें कर्म. ही कर्मे भगवद्विमुखांना मुळींच टाळतां येत नाहीत. भगवदेकशरणांना मात्र भगवंताचें साह्य असल्यामुळे तीं कर्मे दु:खदायक होत नाहीत. निष्काम भक्ताला भगवान सर्वतोपरि सांभाळतो आणि सकाम भक्ताचे दु:ख त्याच्या भक्तीनुसार कमी करतो असें त्रिपुररहस्यांतील सातव्या अध्यायांत सांगितलें आहे. म्हणून संसारासक्त पुरुषांनी देखील दु:ख होऊ नये म्हणून भगवंताची भक्ति करावी असा माऊलींनी अज्ञान्यांना कळवळून उपदेश केला आहे.

अगा मातें न भजावयालागीं। कवण बळ पां आपुलां आंगीं। काइ घरीं कीं भोगीं। निश्चिंती केली॥ ४९३ ॥
नातरी विद्या कीं वयसा। यां प्राणियांसि हा ऐसा। मज न भजतां भरंवसा। सुखाचा कोण॥ ४९४॥

अर्थ—अर्जुना ! माझे भजन न करतां जीवाचे ठिकाणीं असे कोणते सामर्थ्य आहे की ज्या सामर्थ्याचे बळावर संसाराविषयी किंवा भोगविषयी त्याला काळजी करण्याचें कारणच राहणार नाही. ॥ ४९३ ॥ माझे भजन न करण्याजोग्या प्राण्यांना सुखाचा भरंवसा कोणाविषयी असतो ? विद्या की वय ? ॥ ४९४ ॥

गूढार्थदीपिका—मज न भजतां भरंवसा। सुखाचा कोण—प्रारब्धाने प्राप्त होणाऱ्या दु:खाच्या परिहाराकरिता मणि मंत्र, औषधि, योग इत्यादि उपाय शास्त्रांतून सांगितले असले, तरी भगवत्कृपेवांचून त्यांच्या योगने दु:खाची आत्यंतिक निवृत्ति होत नाही, हेंच माउली आतां स्पष्ट करीत आहे.

तरी भोग्यजात जेतुलें। तें एका देहाचिया निकिया लागलें। आणि येथ देह तंव असे पडिलें। काळाचां तोंडी॥ ४९५ ॥
बाप दु:खाचें केणें सुटलें। जेथ मरणाचें भरे लोटले। तिये मृत्युलोकींचिये शेवटिलें। येणें जाहालें हाटवेळे॥ ४९६ ॥

अर्थ—जेवढे भोग्य विषय आहेत ते तर एका देहाच्या सुखाकरिता आहेत आणि देहाचा विचार केला तर तो काळाच्या तोंडांत पडला आहे. ॥ ४९५ ॥ अशा या मृत्युलोकीच्या बाजारांत, सर्व दु:खरूपी मालाच्या गाठी सुटल्या आहेत व तो सर्व माल मोजून देण्याकरिता सर्व दूर मरणाचें माप लागलें आहे आणि शेवटीं किंवा बाजार उठण्याचे वेळीं आपले येणे झाले आहे. ॥ ४९६ ॥

गूढार्थदीपिका—मृत्युलोकींचिये शेवटिलें। येणें जाहालें हाटवेळे—स्वर्ग प्राप्त करून देणरें पुण्याचें आधिक्य व पश्वादी योनि प्राप्त करून देणारें पापांचें आधिक्य नसणे यालाच पापपुण्याची समता म्हणतात. अशी समता असतांना मनुष्यदेहांची प्राप्ति होते. या देहांतूनच पुन: कर्मानुसार खाली वर येणे सुरूं होतें; पण तो मनुष्यदेहहि केव्हा उठून जाईल व जीवाला कोणत्या योनींत जावें लागेल याचा नेम नाही; म्हणून मनुष्यदेहांला ''शेवटली

हाटवेळ'' म्हणजे बाजार उठण्याची वेळ म्हटले आहे.

कोणत्याहि आर्षग्रथांत किंवा संतांच्या ग्रंथांत आधुनिक उत्क्रांतिवादासारखे निर्बुद्ध विचार कोंठें सांपडत नाहीत. त्यांत गुणकर्मानुसार उत्क्रांति किंवा अपक्रांति होत जाते असेच मानिलें आहे.

आतां सुखेंसि जीविता। कैंची ग्राहिकी कीजेल पंडुसुता। काय राखोंडी फुंकिता। दीपु लागे॥ ४९७॥
अगा विषाचे कांदे वाटुनी। जो रसु घेइजे पिळुनी। तया नाम अमृत ठेउनी। जैसें अमर होणें॥ ४९८॥
तेविं विषयांचे जे सुख। तें केवळ परम दुःख। परि काय कीजे मूर्ख। न सेवितां न सरे॥ ४९९॥
कां शीस खांडुनि आपुलें। पायींचां खतीं बांधिलें। तैसें मृत्युलोकीचें भलें। आहे आघवें॥ ५००॥

अर्थ—आतां अर्जुना! अशा बाजारांत सुखाचे जीवित हा माल घेण्यास गेलों तर तो कोठें मिळणार? राखोंडी फुंकून काय दिवा लागणार आहे?॥ ४९७॥ ज्याप्रमाणे विषाचे कांदे वाटून त्याचा रस काढावा व त्याला अमृत हें नांव देऊन तो प्यावा आणि अमर होण्याची इच्छा करावी.॥ ४९८॥ त्याप्रमाणे विषयापासून होणारें जें सुख आहे तें सुख नव्हे परमदुःख होय; पण काय करावें, मूर्ख लोक विषयसुख भोगल्यावाचून राहत नाहीत.॥ ४९९॥ किंवा आपलें मस्तक तोडून ते जसे पायाला झालेल्या क्षतावर बांधावे, त्या प्रमाणे या मृत्युलोकांतील सर्व विषयसुख आहे.॥ ५००॥

गूढार्थदीपिका—तैसें मृत्युलोकीचें भलें। आहे आघवें—दुःखानेच दुःखाचा परिहार करून नाहीसे झालेल्या दुःखाचें मनुष्य सुख मानतो; परंतु त्याबरोबर दुसरें दुःख ओढवून घेतलें हें तो लक्षांत घेत नाही. जसें ज्वर जाण्याकरितां कडु औषध पिण्याचें दुःख सहन करावें लागतें. गळूंपासून होणारें दुःख नाहीसे करण्याकरिता शस्त्राने कापण्याचें दुःख सहन करावे लागतें.

म्हणोनि मृत्युलोकीं सुखाची कहाणी। ऐकिजेल कवणाचां श्रवणीं। कैंची सुखनिद्रा आंथरुणीं। इंगळांच्या॥ ५०१॥
जिये लोकींचा चंद्र क्षयरोगी। जेथ उदयो होय अस्तालागीं। दुःख लेऊनि सुखाची आंगी। सळित जगातें॥ ५०२॥
जेथ मंगळाचां अंकुरीं। सवेंचि अमंगळाची पडे पारी। मृत्यु उदराचां परिवरीं। गर्भु गिंवसी॥ ५०३॥
जे नाहीं तयांतें चिंतवी। तंव तेंचि नेइजे गंधर्वी। गेलियाची कवणें गांवीं। शुद्धि न लभे॥ ५०४॥

अर्थ—म्हणून मृत्युलोकांत सुखाची वार्ता कोणाला ऐकायला सांपडत नाही. विंचवांच्या आंथरूणावर निजल्यास सुखाने झोप कशी लागणार.॥ ५०१॥ ज्या मृत्युलोकांतील चंद्र क्षयरोगाने (कृष्णपक्षांत एक एक त्याची कला क्षीण होते) पछाडला आहे, जेथे सूर्य मावळण्याकरितांच उगवतो आणि जेथे दुःख हें सुखाचा आंगरखा घालून लोकांना छळतें (विषयसुख वरून गोड वाटलें तरी परिणामी दुःखच असते)॥ ५०२॥ ज्या मृत्युलोकात मंगलाचा उदय होतो न होतो तोच त्यावर अमंगलाची झडप पडते व उदरांतील गर्भाशयांत असलेल्या गर्भालादेखील मरण येते.॥ ५०३॥ मृत्युलोकांत जें होणें शक्य नाही ते जीवाला असावेसे वाटतें पण असे मनोरथ करीत असतांच ते सर्व अदृश्य होते व कोठे गेले याचा पत्ताहि लागत नाही.॥ ५०४॥

अगा गिंवसितां आघविया वाटीं। परतलें पाउलचि नाहीं किरीटी। सैंघ निमालियांच्या गोष्टी। तियें पुराणें जेथिंची॥ ५०५॥
जेथींचिये अनित्यतेची थोरी। करितया ब्रह्मयाचे आयुष्यवेरी। कैसें नाही होणें अवधारीं। निपटूनियां॥ ५०६॥
ऐसी लोकींची जिये नांदणूक। तेथ जन्मले आथि जे लोक। तयांचिये निश्चिंतीचें कौतुक। दिसत असे॥ ५०७॥
पैं दृष्टादृष्टींचिये जोडी-। लागीं भांडवल न सुटे कवडी। जेथ सर्वस्वे हानि तेथ कोडी। वेंचिती गा॥ ५०८॥
जो बहुवें विषयविलासें गुंफे। तो म्हणती उवाबें पडिला सापें। जो अभिलाषभारें दडपे। तयातें सज्ञान म्हणती॥ ५०९॥
जयाचें आयुष्य धाकुटें होय। बळ प्रज्ञा जिरौनि जाय। तयाचे नमस्कारिती पाय। वडिल म्हणुनि॥ ५१०॥
जंव जंव बाळ बळिया वाढे। तंव तंव भोजें नाचती कोडें। आयुष्य निमालें आंतुलियेकडे। ते ग्लानीचि नाहीं॥ ५११॥
जन्मलिया दिवसदिवसें। हों लागे काळाचियाचि ऐसें। कीं वाढती करिती उल्हासें। उभविती गुढिया॥ ५१२॥
अगा मर हा बोलु न साहती। आणि मेलिया तरी रडती। परि असतें जात न गणिती। गहिंसपणें॥ ५१३॥
दर्दुर सापें गिळिजतु आहे उभा। कीं तो मासिया वेटाळी जिभा। तैसें प्राणिये कवणा लोभा। वाढविती तृष्णा॥ ५१४॥

अहा कटकटा हें वोखटें। मृत्युलोकींचें उफराटें। एथ अर्जुना जरी अवचटें। जन्मलासी तूं॥ ५१५॥
तरी झडझडोनि वाहिला निघ। इये भक्तीचिये वाटे लाग। जिया पावसी अव्यंग। निजधाम माझें॥ ५१६॥

अर्थ—बा अर्जुना! सर्व मार्गांनी शोध केला तरी परत आलेल्या माणसाचीं पाउले दिसत नाहीत व ज्या मृत्युलोकांतील पुराणें म्हणजे मेलेल्या माणसांच्या कथा होत॥ ५०५॥ हा संसार इतका अनित्य आहे की सृष्टि उत्पन्न करणाऱ्या ब्रह्मदेवाच्या आयुष्यापर्यंत ती अनित्यता गेली आहे—म्हणजे तोहि अनित्यच आहे येथील पदार्थ इतका अनित्य आहे की तो नाहीसा होतो तो निःशेष नाहीसा होतो—म्हणजें सर्व काल्पनिक आहे, असा अर्थ॥ ५०६॥ अशी या मृत्युलोकांतील जीवांची स्थिती आहे. त्या मृत्युलोकांत जन्मून जे नित्य अशा परमेश्वरप्राप्तीविषयीं निश्चित राहतात, त्यांच्या निश्चितपणाचें आश्चर्य वाटतें.॥ ५०७॥ ऐहिक व पारलौकिक सुखाची प्राप्ति जेणेकरून होईल अशाकरिता आपल्या भांडवलांतून एक कवडीहि खर्चण्यास तयार होत नाहीत, पण जें केल्याने पुढें सर्वस्वीं अहित होणार अशा कामाकरिता मात्र कोट्यावधि द्रव्य खर्च करतात.॥ ५०८॥ जो अत्यंत भोगासक्त असतो त्याला सध्या सुखांत आहे असें म्हणतात. विषयसुखाचा अत्यन्त हव्यास धरून नाना प्रकारचे प्रयत्न करणाऱ्याला अत्यंत व्यवहारकुशल म्हणतात.॥ ५०९॥ ज्यांचें आयुष्य कमी होत आहे व इंद्रिये, देह, वाणी यांचें सामर्थ्य नाहीसें होत आहे, त्याला वडील म्हणून त्याच्या पायावर डोकें ठेवतात.॥ ५१०॥ मूल जों जों मोठें होत जातें तों तों आनंदाने नाचतात; पण एक एक दिवस त्याचें आयुष्य कमी होत जात आहे याची त्यांना खंती वाटत नाही.॥ ५११॥ जन्मल्यापासून जसे जसे दिवस जातात तसा तसा प्राणी काळाच्या अधिकाधिक स्वाधीन होत जातो, पण गुढ्या वगैरे उभारून, त्याचा वाढदिवस साजरा करितात.॥ ५१२॥ बा अर्जुना! काय सांगावें! कोणी मर म्हटलें तर तें सहन होत नाही आणि मेल्याबरोबर तर रडतातच, पण असलेलें आयुष्य निघून जात आहे, हे मूर्खपणामुळे जाणत नाहीत.॥ ५१३॥ ज्याप्रमाणे साप बेडकाला धरितो, तरीपण तो माशांना जिभेने पकडून खात असतो, त्याप्रमाणे काळाच्या जबड्यांत असलेले मनुष्यप्राणी कोणत्या लाभाकरिता विषयवासना वाढवितात हें कांही समजत नाही.॥ ५१४॥ अरेरे! मृत्युलोकांतील मनुष्य प्राण्याची ही उलटी रीत अत्यंत घातक आहे. अर्जुना येथे दैववशात् जरी तूं जन्मला असलास.॥ ५१५॥ तरी या संसारचक्रांतून आंग झाडून बाहेर निघ व माझ्या भक्तिमार्गाला लाग. या भक्तींमार्गाने माझ्या दुःखादि दोषरहित अशा शुद्धस्वरूपाला प्राप्त होशील.॥ ५१६॥

गूढार्थदीपिका—जिया पावसी अव्यंग। निजधाम माझें—सर्वोपाधिरहित, पूर्ण, निर्विकल्प असे जे भगवंताचें जाणीवरहित केवळ सच्चिदानंदमात्र सगुणस्वरूप तेंच अव्यंग निजधाम होय. एका भक्तीनेच या स्वरूपाची प्राप्ति होते.

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः॥ ३४॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे राजविद्याराजगुह्ययोगो नाम नवमोऽध्यायः॥ ९॥

अर्थ—अर्जुना! आपलें मन मद्रूप कर म्हणजे विषयाचें ध्यान मनांत न ठेवतां माझेंच ध्यान असूं दे. माझेंच प्रेम कर व सर्व कर्में मत्प्रीत्यर्थ करून, तीं मलाच अर्पण कर. सर्वत्र मलाच नमस्कार कर. अशाप्रमाणे माझ्या परायण होऊन माझे ठिकाणीं तुझें मन स्थिर झालें असतां सर्वभूताचा आत्मा जो मी त्या मला प्राप्त होशील.॥ ३४॥

गूढार्थदीपिका—प्रत्येक मार्गांत कांही तरी गुह्य असतेंच व तें त्या मार्गांतील निष्णात लोकांकडून, त्या मार्गांतील अधिकाऱ्यालाच सांगितलें जातें. वेदान्तशास्त्रांतहि परब्रह्म अत्यंत गुह्य वस्तु आहे. तिचें परोक्षज्ञान शास्त्राद्वारे सर्वांनाच करून दिलें जातें, पण अपरोक्षज्ञान मात्र शमादिसाधनसंपन्न अधिकाऱ्यालाच करून दिलें जातें; म्हणून तें गुह्यच म्हटलें जातें. त्यांतहि आत्मा परमप्रेमास्पद असल्यामुळे परमप्रेमास्पद आत्म्याचें प्रेम, हें सर्व गुह्यांतील गुह्य आहे. "ब्रूहयुः स्निग्धस्य शिष्यस्य गुरवो गुह्यमप्युत" हें भक्तिरूप गुह्य, भक्तिप्रेमसंपन्न श्रीगुरु, भगवत्प्राप्तीची आवडी असलेल्या शिष्यालाच सांगतात, येथे भगवान श्रीकृष्ण आपली परमप्रेमरूप भक्ति संपादन करण्याचें-म्हणजे एकान्तधर्माचें-गुह्य आपल्या प्रेमळभक्त अर्जुनाला सांगत आहेत.

तूं मन हें मीचि करीं। माझां भजनीं प्रेम धरीं। सर्वत्र नमस्कारीं। मज एकातें॥ ५१७॥

अर्थ—तूं आपलें मन मीच कर, माझ्या भजनांत प्रेमाने तुझें चित्त रंगू दे. माझा प्रेमळ भक्त हो. पदार्थमात्राला मी समजून नमस्कार कर.॥ ५१७॥

गूढार्थदीपिका—तूं मन हें मीचि करीं—"ज्याचें जया ध्यान। तेंचि होय त्याचें मन" या तुकाराम महाराजांच्या वचनाप्रमाणे तूं आपलें मन मीच कर असें जें भगवंतांनी अर्जुनाला सांगितलें आहे त्याचा अर्थ माझेंच ध्यान कर, माझ्याहून इतर वस्तूंची कधी कल्पनाच करूं नकोस, असा होतो. सगुणभगवंताच्या प्राप्तीला ध्यान हेंच मुख्य कारण आहे.

माझिया भजनीं प्रेम धरीं—ध्यानरूपक्रियेने भगवंताच्या स्वरूपाचें ध्यान केलें असतां "मी भगवंताचें ध्यान करतों" अशी भावना त्या ध्यानांत राहते, त्यामुळे भगवंताच्या मूर्तीचा सचेतन अनुभव येणें कठीण असते; पण प्रेमाने भजन करण्यांत ध्यानक्रियेचा विसर पडत असल्यामुळे सप्रेम भजनाने भगवंताच्या सचेतन मूर्तीचा सुलभ अनुभव येतो. तें ध्यान दृढ होण्याकरिता भगवंताने 'आपलें नामसंकीर्तन व गुणलीलासंकीर्तन अत्यंत प्रेमाने केलें पाहिजे' हें गुह्य सांगितलें आहे.

सर्वत्र नमस्कारीं। मत एकातें—भगवंताचें ध्यान दृढ होण्याकरिता मनांत दुसऱ्या पदार्थांची कल्पनाच येतां कामा नये. ती येऊं नये म्हणूनच भगवंतांनी "सर्वत्र नमस्कारीं। मज एकातें" म्हणजे सर्व वस्तूंच्या ठिकाणीं माझी भावना करून व तेथे अत्यंत नम्रता धारण करून नमस्कार कर असा अत्यंत नम्रभाव धारण करण्यास सांगितलें आहे. नम्रभावाने जीव देहाहंकारावर आरूढ होत नसल्यामुळे भगवंताचें ध्यान नाहीसे होत नाही व भगवत्प्रेमहि वाढतें. देहाहंकारावर आरूढ झाल्यामुळेच भगवंताचा विसर पडतो.

माझेनि अनुसंधानें देख। संकल्पु जाळणें निःशेख। मद्याजी चोख। याचि नांव॥ ५१८॥

अर्थ—माझे ठिकाणीं चित्त ठेवून व माझी प्राप्ति व्हावी असा संकल्प करून विषयप्राप्तीचा संकल्प निःशेष जाळून टाक हेंच माझे यजन होय.॥ ५१८॥

गूढार्थदीपिका—मागील ओवींत सांगितलेली भगवद्भावना पदार्थमात्रावर होण्याकरिता परमेश्वरावांचून कोणत्याहि लोकांतील विषयसुखाच्या प्राप्तीच्या इच्छेने कर्म करतां कामा नये. हें गुह्यच भगवंतांनी या ओवींत प्रगट केलें आहे.

ऐसा मियां आथिला होसी। तेथ माझियाचि स्वरूपा पावसी। हें अंतःकरणींचे तुजपासीं। बोलिजत असें॥ ५१९॥
अगा अवघिया चोरिया आपुलें। जें सर्वस्व आम्हीं असे ठेविलें। तें पावोनि सुख संचलें। होऊनि ठासी॥ ५२०॥
ऐसें सांवळेनि परब्रह्में। भक्तकामकल्पद्रुमें। बोलिलें आत्मारामें। संजयो म्हणे॥ ५२१॥

अर्थ—याप्रमाणे तुझें अंतःकरण माझ्या प्राप्तीने संपन्न होईल व त्यामुळे माझ्या स्वरूपाला पावशील. अर्जुना! हें मी आपल्या मनांतील गुह्य तुझ्यापाशी सांगत आहे.॥ ५१९॥ बा अर्जुना! तुम्हां भक्ताकरिताच म्हणून कर्मी, योगी, ज्ञानी या सर्वांपासून चोरून ठेविलेलें किंवा कोणालाहि कधीं न सांगितलेलें हें गुपित तुला प्राप्त होऊन तूं अखंड सुखाकार होऊन राहशील.॥ ५२०॥ संजय म्हणतो राजा! भक्तांचा कल्पतरु, स्वरूपीं रमणारा आणि सांवळा असा जो पूर्णब्रह्म भगवान श्रीकृष्ण तो याप्रमाणे अर्जुनाला बोलला.॥ ५२१॥

गूढार्थदीपिका—सांवळेनि परब्रह्में—उपनिषदादि वेदान्तग्रंथांतून सर्वत्र "ब्रह्म" हा शब्द ब्रह्मरूप नसलेल्या, पण ब्रह्मभावना करायला सांगितलेल्या पदार्थाचे ठिकाणीं योजिलेला असून "परब्रह्म" हा शब्द मात्र मुख्य अशा पूर्ण ब्रह्माचें ठिकाणींच योजिलेला आहे.

येथे माऊलींनी "सावळेनि परब्रह्में" या शब्दांनी श्रीकृष्ण स्वरूपाचें पूर्णब्रह्मत्व आणि "आत्मारामें" या शब्दाने त्याचे निर्गुण आत्मस्वरूपाशीं अत्यंत ऐक्य दाखविलें आहे.

अहो ऐकिजत असे कीं अवधारा। तंव इया बोला निवांत म्हातारा। जैसा म्हैसा नुठी कां पुरा। तैसा उगाचि असे॥ ५२२॥
तेथ संजयें माथा तुकिला। अहा अमृताचा पाऊस वर्षला। कीं हा एथ असतुचि गेला। सेजिया गांवा॥ ५२३॥
तऱ्ही दातारु हा आमुचा। म्हणोनि हें बोलतां मैळेल वाचा। काय कीजे ययाचा। स्वभावोचि ऐसा॥ ५२४॥
परि बाप भाग्य माझें। जें वृत्तांतु सांगावयाचेनि व्याजें। कैसा रक्षिलों मुनिराजें। श्रीव्यासदेवें॥ ५२५॥
येतुलें हें वाडें सायासें। जंव बोलत असे दृढें मानसें। तंव न धरवेचि आपुलिया ऐसें। सात्त्विकें केलें॥ ५२६॥

चित्त चाकाटलें आटु घेत। वाचा पांगुळली जेथिंची तेथ। आपादकंचुकित। रोमांच आले॥ ५२७॥
अर्धोन्मीलित डोळे। वर्षताति आनंदजळें। आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें। बाहेरि कांपे॥ ५२८॥
पैं आघवांचि रोममूळीं। आली स्वेदकणिका निर्मळीं। लेइला मोतियांची कडियाळीं। आवडे तैसा॥ ५२९॥
ऐसा महासुखाचेनि अतिरसें। जेथ आटणी हों पाहे जीवदशे। तेथ निरोपिलें व्यासें। तें नेदीच हों॥ ५३०॥
आणि श्रीकृष्णाचे बोलणें। घोंकरी आलें श्रवणें। कीं देहस्मृतीचा तेणें। वापसा केला॥ ५३१॥
तेव्हां नेत्रींचे जळ विसर्जी। सर्वांगींचा स्वेद परिमार्जी। तेवींचि अवधारा म्हणे हो जी। धृतराष्ट्रातें॥ ५३२॥
आतां श्रीकृष्णवाक्यबीजा निवाडु। आणि संजय सात्त्विकाचा बिवडु। म्हणोनि श्रोतयां होईल सुरवाडु। प्रमेयपिकाचा॥ ५३३ ॥
अहो अळुमाळ अवधान देयावें। येतुलेनि आनंदाचे राशीवरी बैसावें। बाप श्रवणेंद्रिया दैवें। घातली माळ॥ ५३४॥
म्हणोनि विभूतींचा ठावो। अर्जुना दावील सिद्धांचा रावो। तो ऐका म्हणे ज्ञानदेवो। निवृत्तीचा॥ ५३५॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां नवमोऽध्यायः॥ ९॥

अर्थ—राजा धृतराष्ट्रा! ऐकत आहेस ना! असें संजय म्हणाला, पण धृतराष्ट्र मात्र स्वस्थच दिसला. त्याच्या मनाला या प्रेमळ निरूपणामुळे आनंद झालेला दिसला नाही. ज्याप्रमाणे म्हैस पुरामधून उठत नाही तसा धृतराष्ट्रहि पुत्रांच्या मोहांत गुंतून स्तब्धच राहिला.॥ ५२२॥ तें पाहून संजयाने मान हालविली. संजय मनांत म्हणतो, ''अहो काय सांगावें पहा! आज येथे अमृताचा पाऊस पडला; परंतु हा म्हातारा येथें असून जवळच्या दुसऱ्या गांवाला गेलेल्या माणसाप्रमाणे याच्या आंगाला या अमृताच्या पावसाचा एक थेंबहि लागला नाही''॥ ५२३॥ पण हा आपला स्वामी आहे म्हणून असें आपण त्याला म्हणणें हा वाचेला दोष होईल. काय करावें याचा स्वभावच असा आहे.॥ ५२४॥ पण माझें मात्र थोर भाग्य खरें. धृतराष्ट्राला युद्धांतील वर्तमान सांगण्याची आज्ञा करून त्या निमित्ताने सर्व मुनिश्रेष्ठ अशा श्रीगुरु भगवान व्यासांनी मला संवाद ऐकण्याचा प्रसंग आणून दिला व जन्ममरणापासून माझें रक्षण केलें.॥ ५२५॥ मनाला दृढ सांवरून धरून इतके मोठें भाषण संजय करीत आहे, तितक्यांत प्रेमाने त्याचा अष्टसात्विकभाव दाटून येऊन त्याला आपलें मन सांवरून धरितां आलें नाही.॥ ५२६॥ चित्त आश्चर्याने थक्क होऊन त्याची आटणी होऊं लागली. जागच्या जागीं वाणीला मौन पडलें. पायापासून मस्तकापर्यंत सर्व आंगाला धाम आला.॥ ५२७॥ डोळे अर्धवट उघडे व अर्धत्रट लागलेले असे झाले व डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले. आंतल्या सुखाने बाहेर आंग कापूं लागलें.॥ ५२८॥ सर्व आंगावरील रोमरंध्राचे ठिकाणीं घामाचें कण उमटले व संजय मोत्याची माळ घातल्याप्रमाणे दिसूं लागला.॥ ५२९॥ याप्रमाणे अंत:करणांत झालेल्या अत्यंत सुखानें त्याच्या जीवदशेची आटणी होऊं पाहत होती—म्हणजे त्याला समाधिच लागायची-पण भगवान व्यासांनी त्या संजयाकडे जी कामगिरी सोंपविली होती, तिने त्याला समाधि लागूं दिली नाही.॥ ५३०॥ आणि वर श्रीकृष्णाचें बोलणें घों घों करीत कानावर आल्यामुळे संजयाला परत देहस्मृति होऊन तो देहावर आला.॥ ५३१॥ तेव्हा त्याने डोळे पुसले. सर्वांगाला आलेला घाम पुसला व धृतराष्ट्राला, राजा! ऐक असें म्हणूं लागला.॥ ५३२॥ आतां भगवान श्रीकृष्णाचें वचन हेंच कोणी शुद्ध निवडलेलें बी आणि हा सत्वगुणरूप खताने खतविलेली जमीन होय; म्हणून श्रोत्यांना वेदान्तांतील सिद्धान्तरूपी प्रमेयाचे पिकाचा उत्तम लाभ होईल.॥ ५३३॥ अहो श्रोतेजन! सहज थोडे निरूपणाकडे लक्ष द्याल तर आनंदाचे राशीवर बसाल, असें निरूपण श्रवणेंद्रियाला मिळणार, तेव्हा भाग्यानेच या श्रवणेंद्रियाला माळ घालून वरिलें आहे.॥ ५३४॥ सर्व सिद्धांचा राजा भगवान श्रीकृष्ण आता अर्जुनाला आपल्या विभूती जाणण्याचीं स्थानें सांगणार आहे, म्हणून श्रीनिवृत्तिनाथांचे ज्ञानदेव श्रोत्यांना ऐकण्याची विनंति करतात.॥ ५३५॥

श्रीमद्सद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराजविरचित श्रीज्ञानेश्वरींतील नवव्या अध्यायाचा अनुवाद पुरा झाला
तो श्रीगुरुचरणीं समर्पण असो!

समारोप

भगवान श्रीकृष्णांनी मुख्यत: ज्या एकान्तधर्माचा किंवा भक्तिमार्गाचा आपल्या प्रेमळ भक्त अर्जुनाला उपदेश केला, त्याचेच या अध्यायांत सविस्तर निरूपण आलेलें आहे. ज्या रामकृष्णादि सगुण विग्रहाची भक्ति केली जाते ते रामकृष्णादि सगुणविग्रह पूर्ण ब्रह्मस्वरूप आहेत, हेंच भगवंतांनी अर्जुनाला येथे समजावून दिलें.

मागें सातव्या अध्यायांत, नामरूपात्मक प्रपंच, मायेने म्हणजे भ्रमाने भासतो असें सांगितलें आहे. तो नामरूपात्मक प्रपंचाचा भ्रम, ज्याप्रमाणे दोरीवर सर्प भासतो त्याप्रमाणे निरुपाधिक स्थितींतच स्वभावशक्तीने, नामरूपाने प्रगट झालेल्या परब्रह्मावर भासतो; म्हणून प्रपंच सत्य नाही व अज्ञानी जीव त्याच्या उत्पत्त्यादि कर्मांचें कर्तृत्व मजकडे देत असला तरी मी त्या कर्माचा कर्ता होत नाही. प्रपंच सत्य आहे, परमेश्वर त्याची उत्पत्ति, स्थिति, लय करतो हे सर्व देखील अज्ञानभ्रमामुळे वाटते. भ्रमाने भासलेल्या कार्यवस्तूचा मूळच्या यथार्थ वस्तूशीं कांहीहि संबंध नसतो. ही अज्ञानभ्रांति आहे तोपर्यंतच प्रपंचाचे उत्पत्तिनाश भासत राहतात आणि त्या प्रपंचाला अधिष्ठानभूत असलेला मी उदासीनाप्रमाणे साक्षी स्वरूप असतो. हें माझें साक्षीपण जीवाच्या कल्पनेनुसार त्याला प्रपंच भासविण्याला निमित्तमात्र होतें. एवढ्यानेच माझ्या अधिष्ठानावर भासणाऱ्या भ्रमरूप प्रपंचाचें उपादान व निमित्त कारण मी आहे असे जीव समजतो. वास्तविक हा सर्व अज्ञानभ्रांतीचा परिणाम आहे. या भ्रांतीने मोहित होऊन मला प्रपंचाप्रमाणे पांचभौतिक समजून जीव माझा अनादर करतात.

माझा हा सगुणविग्रह, प्रपंचाला अधिष्ठानभूत असणाऱ्या व्यापक अशा सर्वनामरूपात्मक विग्रहाप्रमाणे निरुपाधिकच आहे, हे अज्ञानभ्रांतीमुळे जीव जाणत नाही. मला प्रपंचाप्रमाणे भौतिक समजून माझा अनादर करतो व माझें प्रेमभजन करीत नाही. पण माझ्या सगुणस्वरूपाचा अनादर करणारे हे जीव राक्षसी किंवा आसुरी प्रकृतीचे असतात. त्यांचे ज्ञान, कर्म वगैरे सर्व कांही परमार्थदृष्टीने निरर्थक असतात.

महात्मे पुरुष मात्र माझ्या सगुणस्वरूपाचें पूर्ण ब्रह्मत्व जाणून माझें अत्यंत प्रेमाने व सर्वभावाने भजन करतात. ते माझें अखंड नामस्मरण करून माझे गुण व लीला गातात. माझ्या प्राप्तीकरितां इंद्रियें व मन यांचा निरोध करून माझ्या ध्यानाने मद्रूप होतात आणि या नामरूपात्मक प्रपंचांत माझ्यावांचून दुसरी वस्तुच नाही, सर्व नामरूपाने मीच नटलों आहे, असे समजून वस्तुमात्राला नमन करितात. असे हे अत्यंत निरभिमान होऊन मद्रूप झालेले महात्मे माझ्या भजनाने आपण तरून जाऊन दुसऱ्यालाही तारतात.

दुसरे कित्येक पुरुष माझें ज्ञानाने यजन करतात. मीच एक सत्य असून बाकी सर्व खोटें आहें अशा ज्ञानाने भजन करणें किंवा एक परमात्मा असून तोच देवतारूपाने नटला आहे अशी भावना ठेऊन देवतांचें यजन करणें, अथवा सर्व भगवंतच आहे अशा ज्ञानाने सर्वत्र ब्रह्मभावना करणें असे ज्ञानाने यजन करण्याचे तीन प्रकार आहेत. सर्वत्र सर्वरूपाने मीच असल्यामुळे खरोखर माझी प्राप्ति अत्यंत सुकर आहे, पण हे ज्ञान नसल्यामुळे माझी प्राप्ति जीवाना दुष्कर झाली आहे. ते माझ्या प्राप्तीची इच्छा न करतां स्वर्गांतील विषयभोगाच्या इच्छेने नाना प्रकारचे यज्ञ करतात व जन्ममरणाची परंपरा भोगतात.

माझें अनन्यचित्ताने भजन करणाऱ्या पुरुषांच्या योगक्षेमाची सर्व काळजी मीच वाहतो. दुसऱ्या देवतांचें यजन करणें हेहि माझेंच यजन होत असलें तरी माझ्या प्राप्तीकरितां जसे यजन व्हायला पाहिजे तसे यजन तें होत नाही, म्हणून ते मला प्राप्त होत नाहीत. देवतादिकांचे यजन करणारे देवतादिकांनाच प्राप्त होतात व माझें साक्षात् यजन करणारे मला प्राप्त होतात.

माझें यजन करणें अत्यंत सोपें आहे. मी एका प्रेमाशिवाय इतर उपचारांनी संतुष्ट होत नाही. म्हणून अर्जुना!

तूं जे करशील, जे भोगशील, जे हवन करशील किंवा जे तप करशील ते सर्व साक्षात् मला प्रेमाने समर्पण करीत जा. असे मला समर्पण केल्याने, पापपुण्यरूपकर्माने तूं बद्ध होणार नाहीस. सर्व कर्मापासून मुक्त राहशील व मला प्राप्त होशील. अंतर्यामीरूपाने सर्व भूतांचे ठिकाणीं मी व्याप्त असल्यामुळे मला कोणी प्रिय नाही किंवा द्वेष्यहि नाही. पण माझी प्रेमभक्ति करणारे माझ्या ठिकाणीं असतात व मी त्यांचे ठिकाणीं असतो.

कर्मपतित म्हणजे शास्त्रनिषिद्ध आचरणाने पतित झालेल्या दुराचारी पुरुषांनीहि माझी अनन्यभावाने भक्ति केल्यास त्या प्रेमभक्तीने शीघ्र सन्मार्गाला लागतात व सन्मार्गाला लागून साधु होतात. म्हणून अर्जुना परम दुराचारी असला तरी माझा भक्त जन्ममरणरूपी संसारांत न सांपडतां मलाच प्राप्त होतो.

तसेंच जातिपतित .म्हणजे निकृष्ट जातींत जन्मलेले अत्यंजादि देखील माझ्या भक्तीने मुक्त होतात. मग सत्कर्म निरत व सर्व जातींत पूज्य असलेले ब्राह्मण आणि राजर्षि माझ्या भक्तीने परमपदाला प्राप्त होतात हे काय सांगायला हवे ?

अर्जुना! तूं अपल्या पूर्वकर्माने नाशिवंत व दुःखदायी संसारांत जन्माला आला आहेस, तेव्हा त्यांतून सुटण्याकरितां माझे प्रेमानें भजन कर. चित्तांत अखंड माझें ध्यान असूं दे. सर्वत्र माझी भावना करून मला सर्वत्र नमस्कार करीत जा. अशारीतीने तुझीं इंद्रियें, मन, बुद्ध्यादिक माझ्या ठिकाणीं लागून तूं मत्परायण झाला असतां मला प्राप्त होशील.

अशा रीतीने नवव्या अध्यायांत सर्व गुह्यांत श्रेष्ठ असलेले सगुणभगवंताचे पूर्णब्रह्मत्व आणि भगवद्भक्तीचा अगाध महिमा या दोन गोष्टी भगवंतांनी अर्जुनाला सांगितल्या आहेत.

॥ श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥



॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय दहावा

अवतरणिका—मागील अध्यायांत "इये भक्तिचिये वाटे लाग। जिया पावसी अव्यंग। निजधाम माझें" माझ्या सगुणस्वरूपाची प्रेमभक्ति केली असतां, माझें निजधाम जें पूर्ण ब्रह्मस्वरूप, त्याला तूं तात्काळ प्राप्त होशील म्हणजे मुक्त होशील, असे भगवंतांनी शेवटीं नवव्या अध्यायांत सांगितलें; पण मुक्ति ही नित्य, बुद्ध, शुद्ध, मुक्त, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, जगत्उत्पत्तिस्थितिलय करणारे असे जे कारणब्रह्म याच्याशीं ऐक्य पावलें असतांच होते, असा ब्रह्मसूत्रांत सिद्धान्त केला असतांना; नामरूपाने व्यक्त झालेल्या कार्यरूप अशा सगुणस्वरूपाच्या भक्तीने, परब्रह्माची साक्षात्प्राप्ती होऊन जीव तात्काळ मुक्त होणें कसें शक्य आहे, अशी अर्जुनाचे मनांत शंका आली. ती जाणून, माझें सगुण श्रीकृष्णस्वरूपहि कारणब्रह्म किंवा पूर्ण परब्रह्मच आहे-कार्य ब्रह्म नाही-म्हणून माझ्या भक्तीने माझ्याशीं ऐक्य पावून जीव तात्काळ मुक्त होतो हेच या अध्यायांत भगवंतांनी सांगितलें आहे.

महाभारताचे टीकाकार श्री नीळकंठाचार्य यांनीहि, "न कार्यत्वादनित्योऽयं नंदनंदनविग्रहः। औपचाराद्धि कार्मत्वं तत्र पौराणिका जगुः" भगवंताचे श्रीकृष्णस्वरूप नामरूपाने व्यक्त झाल्यामुळे कार्यब्रह्मरूप आहे व तें अनित्य आहे असे नाही-म्हणजे तें नित्य कारणब्रह्मस्वरूपच आहे—पुराणांनी औपचारिकरीत्याच श्रीकृष्णविग्रहाला कार्यरूप म्हटलें आहे, वास्तविक नाही, असे महाभारतावरील टीकेच्या उपोद्घातांत म्हटलें आहे.

नमो विशदबोधविदग्धा। विद्यारविंदप्रबोधा। पराप्रमेयप्रमदा-। विलासिया॥ १॥

अर्थ—स्पष्ट ब्रह्मबोध करून देण्यांत निपुण असणारे, ब्रह्मविद्यारूपी कमलाला विकसित करणारे, पराविद्येचे प्रमेय जें परब्रह्म-तीच कोणी स्त्री-तिच्याशीं विलास करणारे, अशा तुम्हांला, हे श्रीगुरो! माझा नमस्कार असो॥ १॥

गूढार्थदीपिका—विशदबोधविदग्धा—'बोध' या शब्दाने, येथे परब्रह्माचा बोध विवक्षित आहे. तो परोक्ष व अपरोक्ष असा दोन प्रकारचा आहे. परोक्षबोध म्हणजे सर्वसंशयनिवृत्तिपूर्वक ब्रह्मस्वरूपाचे ज्ञान होणे आणि अपरोक्षबोध म्हणजे आपल्या ठिकाणीच तें स्वरूप मी आहे, असा अनुभव येणे. हा दोन्ही प्रकारचा ब्रह्मबोध श्रीगुरुच्या साहाय्यावांचून केवळ स्वतंत्र बुद्धीने होऊं शकत नाही.

परोक्षज्ञानहि श्रीगुरुपासूनच प्राप्त होते असे सुंदरदासांनीहि "शब्द सुनाय संदेह मिटावत। सुंदर वा गुरुकी बलिहारी" (सुंदरविलास) या पंक्तीने दाखविलें असून "शास्त्रज्ञोऽपि स्वातंत्र्येण ब्रह्मज्ञानान्वेषणं न कुर्यात्" असे आचार्यहि म्हणतात हे मागें सांगितलेच आहे. म्हणून परोक्ष व अपरोक्ष असे दोन्ही प्रकारचे ज्ञान करून देण्यांत श्रीगुरुच निपुण असतात. असे येथे "विशदबोधविदग्धा" या पदाने माऊलींनी श्रीगुरुचें वर्णन केलें आहे.

विद्यारविंद प्रबोधा—त्याचप्रमाणे श्रीगुरुच्या कृपेनेच आत्मबोध सदा तेजस्वी राहतो. शिष्याच्या अविनीतत्त्वादिदुर्गुणामुळे श्रीगुरु त्याविषयीं उदास झाल्यास, शिष्याचा अपरोक्ष बोधहि नाहीसा होऊन त्याच्या हातीं नुसता अभिमानच शिल्लक राहतो, असे "जयाचेनि सावाये जीव ब्रह्मउपरो लाहे। ब्रह्महि हातातळील जाये। उदासे जेणें" (अमृ. प्र. २-१६) या ओवींत माऊलींनी सांगितलें आहे. म्हणून श्रीगुरुला "विद्यारविंदप्रबोधा" हें विशेषण दिलें आहे.

पराप्रमेय प्रमदा विलासिया—"परा यया तदक्षरमधिगम्यते" (मुं. उ. १-१-५). परा म्हणजे पराविद्या. (त्याचें वर्णन मागें आलेंच आहे).

प्रमेय म्हणजे तिच्या योगाने कळणारें ब्रह्मतत्त्व-हीच कोणी प्रमदा म्हणजे स्त्री-तिच्या ठिकाणीं रममाण होणारा. संत, सर्व अवस्थेंत परब्रह्मस्वरूपाचें ठिकाणींच स्थित असतात असा भाव.

नमो संसारतमसूर्या। अप्रतिमपरमवीर्या। तरुणतरतूर्या-। लालनलीला॥ २॥

अर्थ—जे अज्ञानरूपी अंध:काराचा नाश करणारे सूर्य आहेत, उपमा देतां येणार नाही असे जे अगाध सामर्थ्यवान आहेत, तरुण म्हणजे उत्पत्तिनाशरहित व तरुणतर म्हणजे प्रयत्नावांचून अखंड कायम राहणाऱ्या अशा तूर्यावस्थेचें जे पालन करण्याची लीला करणारे आहेत, अशा श्रीगुरो! तुम्हाला नमस्कार असो.॥ २॥

गूढार्थदीपिका—संसारतमसूर्या—ज्याप्रमाणे सूर्याचे ठिकाणीं अंध:कार कधीच राहत नाही, तसेंच त्याच्या सर्वत्र असलेल्या प्रकाशामुळे दुसऱ्यालाही कोठे अंध:कार दिसत नाही, त्याप्रमाणे ज्याच्या ठिकाणीं संसाररूपी अंध:कार मुळीच नसून, जो दुसऱ्याचा संसाररूपी अंध:कारही समूळ नाहीसा करून, त्याला प्रकाशरूप करून सोडतात.

अप्रतिम—"न तस्य प्रतिमा विद्यते" (श्वे. उ. अ. ४-१९) या श्रुतीचा अर्थ, आचार्यांनी "याचासारखा दुसरा पदार्थ नसल्यामुळे त्याला प्रतिमा म्हणजे उपमा देता येत नाही" असा केला आहे, म्हणून "अप्रतिम" याचा अर्थ अनुपमेय असा आहे.

परमवीर्या—भगवंताचे जें अगाध सामर्थ्य असतें, तेच भगवदैक्यामुळे संतांचेंहि असतें; म्हणून सद्‌गुरुला "परमवीर्या" असें म्हटलें आहे.

तरुणतरतूर्या—"जाणे ब्रह्म जाणे माया जाणें अनुभवाचे ठाया। ती एक जाणावी तूर्या। "सर्वसाक्षिणी" (दास. द. ७ स. ४) ज्या अवस्थेंत, ब्रह्म, माया, अनुभव हे तिन्ही जाणले जातात, तिला 'तूर्या' अवस्था म्हणतात. हिलाच 'साक्षी' अवस्थाहि म्हणतात.

प्रत्येक वस्तूच्या, प्रथमावस्था, मध्यमावस्था व उत्तरावस्था अशा तीन अवस्था आपण अनुभवित असतो.

प्रथमावस्थेंत त्या वस्तूच्या शक्तीचा अल्प प्रादुर्भाव असतो, मध्यमावस्थेंत शक्तीची पूर्णता अनुभवात येते व उत्तरावस्थेंत शक्तीचा ऱ्हास होतो.

सूर्य उगवतो, तेव्हा त्याच्या प्रकाशाने संपूर्ण अंध:कार नाहीसा होत नाही, त्याचप्रमाणे तो जेव्हा मावळूं लागतो तेव्हाहि अंध:कार सुरूं होतो. पण मध्यमावस्थेंत म्हणजे माध्यान्हकाळीं कोठेहि अंध:कार राहत नाही. त्याकाळीं सूर्याची, अंध:कार नाश करण्याची शक्ति पूर्णपणे प्रगट असते.

तूर्यारूपसाक्षी अवस्था किंवा ज्ञानावस्था हीहि तरुण म्हणजे पूर्ण झाली असतां, अज्ञान अंध:कार कोठेंहि उरूं देत नाही. एवढेच नाही, तर ती तरुणतर असते-म्हणजे सूर्याच्या माध्यान्ह अवस्थेपेक्षा तूर्येची तरुणावस्था विशेष आहे. तो विशेष म्हणजे सूर्याची माध्यान्हकाळाची पूर्ण प्रकाशावस्था पुढे क्षीण होतांना आपण पाहतो; पण तूर्येची तरुणावस्था "इयं ज्ञानकला राजन् सकृज्जाताभिवर्धते" (योगवासिष्ठ) तशीच वाढत जाते व मावळत नाही किंवा क्षीण होत नाही. ज्याप्रमाणे सूर्यप्रकाशाचे ठिकाणीं दिसणारें मृगजळ, हा नुसता पाण्याचा भास आहे, खरोखर तें सूर्यप्रकाशाचें कंपन आहे असेंच मनुष्याला वाटतें. त्याप्रमाणें दृढज्ञानीपुरुषालाहि, ज्या नामरूपाला आपण माया म्हणतो, तीं नामरूपेंहि परब्रह्माचा विसर पाडणारी अशी मायारूप नव्हेत असा अनुभव येतो. ती तूर्यावस्था "अहं ब्रह्मास्मि" मी ब्रह्म आहे अशी व्यक्तिपुरती मर्यादित न राहतां "सर्व खल्विदं ब्रह्म" अशी व्यापकस्वरूप होते.

श्रीज्ञानेश्वर माऊलींनी अमृतानुभव प्रकरण चार मध्ये "तैंसे अज्ञान आटोनियां। ज्ञान येते उवाया। ज्ञानाज्ञान गिळोनियां। ज्ञानचि होय॥ १५॥ असेच सांगितलें आहे. म्हणूनच येथे निदिध्यासनादि प्रयत्न सुटून स्थिर होणाऱ्या तूर्यावस्थेला "तरुणतर" म्हटलें आहे.

लालनलीला—"अनाविष्कुर्वन्नन्वयात्" (ब्र. सू. ३-४-५०) या सूत्रामध्ये ज्ञान्यांनी प्राप्त झालेली आपली ज्ञानावस्था, तिच्या संरक्षणाचा प्रयत्न सुटून ती अखंड राहावी म्हणून, लहान मूल जसें अहंकारदंभदर्परहित राहते, त्याप्रमाणे ज्ञानाहंकार व दंभदर्परहित राहावें असे सांगितले आहे; तसे राहिले असतां तूर्यावस्थेचें, प्रयत्न न करतांच संगोपन होते "लालनलीला" या शब्दाने माऊलींनी सुचविलें आहे.

नमो जगदखिलपालना। मंगळमणिनिधाना। स्वजनवनचंदना। आराध्यलिंगा॥ ३॥

अर्थ—जें संपूर्ण जगाचें पालन करणारे आहेत, जे संपूर्ण कल्याणरूपी रत्नांचा सांठा आहेत किंवा सर्व कल्याणांत श्रेष्ठ असे जे आत्मकल्याणाचा सांठा आहेत, जे सज्जनरूपी वनास चंदनासारखे सुगंधित करून सोडणारे आहेत, ब्रह्मादिकांना सेव्य हेच ज्यांचें चिन्ह आहे, हे श्रीगुरो! अशा तुम्हाला माझा नमस्कार असो. ॥ ३ ॥

गूढार्थदीपिका—जगदखिलपालना—"तस्मिंस्तज्जने भेदाभावात्" या सूत्रांत सांगितल्याप्रमाणे भगवान व त्यांचे भक्तजन, यांच्यांत कांहीहि भेद नसल्यामुळे, ज्या विशेषणांनी भगवंताची स्तुति केली जाते, त्या विशेषणांनीच सद्गुरुरूपी संतांचीहि स्तुति होऊ शकते; म्हणून माऊलींनी येथे भगवंताला लागू होणाऱ्या "जगदखिलपालना" इत्यादि विशेषणांनी श्रीगुरुची स्तुति केली आहे.

विष्णु जीवाचे पालन करतो, पण त्यांच्या कर्मानुसारच सुख देतो आणि श्रीगुरु सर्व संसारदु:खातून सोडवून जीवांना सुखच देतात.

मंगळमणिनिधाना—परब्रह्माचा अपरोक्ष साक्षात्कार सर्वांना एकाच प्रक्रियेने होत नसतो; म्हणून शिष्याच्या अधिकारानुसार श्रीगुरु निरनिराळ्या शिष्यांना निरनिराळ्या प्रक्रिया सांगतात. या तत्वाला धरून सुरेश्वराचार्यांनी "यया यया भवेत्पुंसांव्युत्पत्तिः प्रत्यगात्मनि। सा सैव प्रक्रियेह स्यात् साध्वी साचानवस्थिता"॥ ४०२॥ (सुरे. बृहदारण्यकोपनिषद्भाष्य वार्तिक अ. १-४) ज्याला ज्या प्रक्रियेने आत्मसाक्षात्कार होईल, त्याला तीच प्रक्रिया योग्य होय असे म्हटलें आहे. अर्थात् आत्मसाक्षात्कार करून देण्यास समर्थ असलेले श्रींगुरु, आत्मसाक्षात्काराच्या अनेक प्रक्रियारूपी रत्नांची ठेव असतात, हे सिद्ध आहे व माऊलींनी या सिद्धान्ताला धरून येथे श्रीगुरुला "मंगळमणिनिधाना" हें विशेषण लाविलें आहे.

"ब्रह्मनिष्ठसाक्षात्कृत। तद्रचित जे ग्रंथ। ते नाना प्रक्रियासमन्वित। शिष्यबोधार्थ प्रगटती"॥ ४८॥

(श्रीगुलाबरावमहाराजकृत श्रीभगवद्गीतासंगति)

सज्जनवनचंदना—अरण्यांत असलेलें चंदनाचें झाड जसें आपल्या सभोंवार असलेल्या झाडांना चंदनरूप करून सोडतें, त्याप्रमाणे सज्जन म्हणजे संसारदु:खाने तप्त होऊन परमेश्वरप्राप्तिकरितां तळमळणारे जे जीव त्यांच्या वनाला म्हणजे समुदायाला, श्रीगुरु आपल्यासारखेच पूर्ण परब्रह्मस्वरूप व निर्वासन असे शांत करून सोडणारे होतात.

आराध्यलिंगा—जीवाला परमपदाची प्राप्ति करून देण्याचें सामर्थ्य, एका गुरुरूपावांचून ईश्वररूपांतहि नसल्यामुळें श्रीगुरुच, मनुष्यापासून ब्रह्मदेवापर्यंत सर्व जीवांना आराध्य आहेत असा अर्थ.

नमो चतुरचित्तचकोरचंद्रा। आत्मानुभवनरेंद्रा। श्रुतिसारसमुद्रा। मन्मथमन्मथा॥ ४॥

अर्थ—जे चतुरांच्या चित्तरूपी चकोराला चंद्राप्रमाणे आल्हादकारक आहेत, जे आत्मानुभवाचे राजे आहेत, श्रुतीचे सार जें ब्रह्मज्ञान, त्याचा जे समुद्र आहेत व जे कामालाहि मोहून घेणारे किंवा जिंकणारे आहेत, अशा श्रीगुरुराया! तुम्हांला माझा नमस्कार असो. ॥ ४॥

गूढार्थदीपिका—चतुरचित्तचकोरचंद्रा—असार अशा संसाराला सत्य समजून त्याचे ठिकाणी आसक्त होणारा मूर्ख होय. संसार असार आहे व एक परब्रह्मच अविनाशी सुखरूप आहे; म्हणून त्याच्याच प्राप्तीचा प्रयत्न करणें योग्य, हें जो जाणतो, तोच चतुर होय.

सारभूत परमात्म्याची प्राप्ति श्रीगुरुशिवाय कल्पान्तींहि होत नाही "असो जयास मोक्ष व्हावा। तेणें सद्गुरु करावा। सद्गुरुविणे मोक्ष व्हावा। हें कल्पांती न घडे"॥ ४४॥ (दास. द. ५ स. १) म्हणूनच, चकोराला पूर्ण चंद्रापासून जसा अत्यानंद होतो, तसेंच चतुरपुरुषाच्या चित्तालाहि श्रीगुरुची प्राप्ति, ब्रह्मानंद देणारी असते.

ज्याप्रमाणे चंद्राच्या प्रकाशांतील अमृतकण वेंचण्याचें शहाणपण चकोरालाच असतें, त्याप्रमाणे चतुर पुरुषाच्या चित्तालाच श्रीगुरुच्या प्राप्तीचा लाभ घेतां येतो. शिष्य जर चतुर नसला, तर खऱ्या श्रीगुरुची प्राप्ति व त्या प्राप्तीचा लाभ होत नाही, असा अर्थ.

आत्मानुभवनरेंद्रा—आत्मानुभवाचा राजा म्हणजे, राजाचे सेवक जसे राजाचा हुकूम पाळतात, त्याप्रमाणे

आत्मानुभवहि श्रीगुरुंचा हुकूम पाळतो. जेथे श्रीगुरु त्याला पाठवितील, तेथे तो जातो, श्रीज्ञानेश्वरमाऊली म्हणतात "मोक्ष दुराराध्य कीर होय। परि तोहि आराधी तुझे पाय। म्हणोनि धाडिसी तेथ जाय। पाईक जैसा" (ज्ञा. अ. ११-९९).

भगवान श्रीकृष्णच अर्जुनाचे गुरु असल्यामुळे, अर्जुनाने श्रीकृष्णाला उद्देशून जें म्हटले तें, श्रीकृष्णाच्या ईश्वररूपाकडे लक्ष देऊन म्हटलें नाही, तर श्रीकृष्णाला गुरु समजून म्हटलें आहे. आत्मानुभवाचा नियामक गुरु आहे, असा अर्थ.

अथवा

जसा राजा वैभवाने युक्त असतो, तसे श्रीगुरु आत्मानुभवसूचक लक्षणाने संपन्न असतात.

मन्मथमन्मथा—मन्मथ म्हणजे मदन. हा सर्व जगाला मोह पाडून आपल्या वश करून घेतो, पण श्रीगुरु, अशा मदनालाहि आपल्या स्वाधीन ठेवणारे आहेत. जो काम कशानेहि वश होत नाहीं किंवा जिंकला जात नाही, त्या कामाला श्रीगुरु आत्मानुभव दाखवून व आत्मप्रेम लावून जिंकतात. बुद्धीच्या पलिकडे असलेल्या आत्म्याचा अद्वैत अनुभव आला की, काम जिंकला जातो, हें मागें तिसऱ्या अध्यायांत सांगितले आहे (श्लोक ४३).

नमो सुभावभजनभाजना। भवेभकुंभभंजना। विश्वोद्भवभुवना। श्रीगुरुराया॥ ५॥

अर्थ—जे निष्काम प्रेमाने भजन करण्यास योग्य आहेत, जे संसाररूपी हत्तीचे गंडस्थल फोडणारे आहेत, जे सर्व जगताच्या उत्पत्तीला किंवा भासाला अधिष्ठानभूत आहेत, अशा श्रीगुरुनाथा! तुम्हांला नमस्कार असो. ॥ ५॥

गूढार्थदीपिका—सुभावभजनभाजना—सुभाव म्हणजे निष्काम प्रेम किंवा शुद्ध प्रेम.

ज्यावर प्रेम करावयाचें, त्याच्यापासून कोणत्याहि सुखाच्या प्राप्तीची इच्छा न करतां, केवळ त्याचें प्रेम करणे याला शुद्ध प्रेम म्हणतात. प्रत्येक पुरुषाला आपल्या आत्मस्वरूपाचें असे स्वाभाविक शुद्ध प्रेम आहे आणि आत्मा, परमात्मा व श्रीगुरु हे तिन्ही एकरूपच असल्यामुळे, श्रीगुरुहि शुद्ध प्रेमाच्या भजनास योग्य आहेत असे माऊलींनी येथे म्हटलें आहे.

भवेभकुंभभंजना—अशा शुद्ध प्रेमभावाने श्रीगुरुचें भजन केलें असतां, श्रीगुरुकृपेने संसाररूपी गजाचें गंडस्थळ फुटून संसार नाहीसा होतो-म्हणजे पुरुष पूर्ण मुक्त होतो.

विश्वोद्भवभुवना—कारण ज्याप्रमाणे दोरीवर भासणाऱ्या सर्पाच्या भासाला दोरीच आधार असते व म्हणूनच दोरी कळून, दोरीच्या आकाराचें भान झालें, की सर्प नि:शेष नाहीसा होतो, त्याप्रमाणे श्रीगुरुहि, विश्वाच्या भासाला अधिष्ठान असल्यामुळेंच, त्यांच्या भजनाने विश्वाचा भास नाहीसा होतो.

तुमचा अनुग्रहो गणेशु। जैं दे आपुला सौरसु। तैं सारस्वतीं प्रवेशु। बाळकाही आथी॥ ६॥

अर्थ—श्रीगुरुनाथा! तुमची कृपा हीच गणेश देवता होय. तिने आपला प्रसाद केला असतां, अज्ञ नेणता बालक देखील सर्वविद्यापारंगत होतो. ॥ ६॥

गूढार्थदीपिका—हे कांही केवळ श्रीगुरुची केवळ स्तुति करावी म्हणून म्हटलें नाही. भगवंताचें जें सामर्थ्य असते, तेच ज्ञानभक्तिसंपन्न श्रीगुरुचेहि असते. भगवंतांनी ध्रुवाच्या कपोलाला आपल्या शंखाचा स्पर्श केल्याबरोबर ध्रुवांनी, वेदांत सांगितलेल्या सर्व अर्थांनी भरलेली अशी भगवंताची स्तुति केली; तसेंच श्रीगुरुकृपेनेहि शिष्य, सर्व शास्त्रांत प्रवीण होऊं शकतो, पण शिष्याने एवढाच एक प्रयत्न केला पाहिजे की, आपल्या प्रेमळ, निष्कपट अंत:करणाने त्यांची सेवा करून, समभाव असलेल्या श्रीगुरुचा कृपाप्रवाह आपल्याकडे ओढून घेतला पाहिजे. मग श्रीगुरुची कृपा होऊन, माऊलींनी वर्णन केल्याप्रमाणे, श्रीगुरुकृपेचा अनुभव येतो.

जी दैविकी उदार वाचा। जैं उद्देशु दे नाभिकाराचा। तैं नवरसदीपांचा। थावो लाभे॥ ७॥

जी आपुलिया स्नेहाची वागीश्वरी। जरी मुकेयातें अंगीकारी। तो वाचस्पतीशीं करी। प्रबंधु होडा॥ ८॥

हें असो दिठी जयावरी झळके। कीं हा पद्मकरु माथां पारुखे। तो जीवचि परि तुके। महेशेंशीं॥ ९॥

एवढें जिये महिमेचें करणें। ते वाचा बळें वानूं मी कवणें। का सूर्याचिया आंगा उटणें। लागत असे॥ १०॥
केउता कल्पतरुवरी फुलौरा। कायसेनि पाहुणेरु क्षीरसागरा। ऐसा कवणें वासीं कापुरा। सुवासु देवों॥ ११॥
चंदनातें कायसेनि चर्चावें। अमृतातें केउतें रांधावें। गगनावरी उभवावें। घडे केवीं॥ १२॥
तैसें श्रीगुरुचें महिमान। आकळितें कें असे साधन। हें जाणोनि मियां नमन। निवांत केलें॥ १३॥

अर्थ—अहो जी श्रीगुरुनाथा! तुम्हा देवाच्या थोर औदार्याने संपन्न असलेल्या वाणीकडून, ''भिऊं नकोस'' असें अभयवचन मिळाले असतां, शृंगारादि नवरसरूपी अमृताच्या समुद्राचाहि थांग घेतां येतो. ॥ ७ ॥ श्रीगुरुनाथा! आपले प्रेम हीच कोणी सरस्वती होय. हिने जर मुक्याचा अंगीकार केला, तर तो बृहस्पतीशीं देखील ग्रंथरचनेत प्रतिज्ञेने पैज लावूं शकेल. ॥ ८ ॥ हें असो, श्रीगुरुराया! तुमची कृपादृष्टि ज्याच्यावर आपला ज्ञानप्रकाश पाडील किंवा हें तुमचें हस्तकमल ज्याच्या डोक्यावर ठेविलें जाईल, तो जीव जरी असला. तरी तो शंकरासमान होतो. ॥ ९ ॥ श्रीगुरुच्या महिमेचें असें अगाध सामर्थ्य मी कोणत्या वाणीच्या बळाने वर्णन करूं! सूर्याच्या अंगाला उटणें लावून स्वच्छ करावें लागतें काय?॥ १० ॥ कामनापूर्तीकरितां कल्पतरुवर नवरसाचा फुलवरा (नवसाप्रित्यर्थ देवतेवर पात्या, करंज्या लावून फुलवरा बांधतात तो प्रकार) बांधायला पाहिजे काय? क्षीरसागराला कशाचा पाहुणचार करतां येईल? कापुराला कोणत्या सुवासाने सुवासित करतां येईल? चंदनाला कशाची उटी लावावी? अमृताला शिजविण्याचें काय प्रयोजन आहे? आकाशांपेक्षा उंच होणे कसें घडणार?॥ ११-१२ ॥ त्याप्रमाणे श्रीगुरुचे माहात्म्य आंकलन करतां येण्याजोगें कोणतें साधन आहे? (कोणतेंच नाहीं) हें जाणून मी मुकाट्याने तुमच्या पायावर डोकें ठेविलें आहे. ॥ १३ ॥

गूढार्थदीपिका—श्रीगुरुचे महिमान। आकळतें कें असे साधन—मर्यादित वस्तूचे गुण मर्यादित असतात, तसेंच अमर्याद वस्तूचे गुणहि समव्याप्तिमुळे अमर्यादच असतात. परब्रह्माचीं सगुण व निर्गुण अशीं दोन्हीं स्वरूपें असून तीं दोन्हीं रूपें अनाकलनीय आहेत. निर्गुणस्वरूप, विषयकोटींतील नसल्यामुळे, अनाकलनीय असून सगुणस्वरूपाचे षड्गुणैश्वर्यादि गुण अनंत व अपार असल्यामुहे तेहि अनाकलनीय आहे. या दोन्ही स्वरूपाचे ठिकाणीं ज्ञानभक्तीने ऐक्य पावलेल्या सद्गुरुचें स्वरूपहि अर्थात् अनाकलनीयच असतें.

जीव अल्पज्ञ, अल्पशक्ति आहे. अशा जीवाकडून श्रीगुरुचें यथार्थ म्हणजे अनंत व अपार वर्णन होणें शक्यच नसतें.

ज्याप्रमाणे समुद्राचें वर्णन, एखाद्या मोठ्या सरोवराची उपमा देऊन केलें असतां, ती समुद्राची निंदाच होते, त्याप्रमाणे जगांतील कोणत्याहि परिमित वस्तूची किंवा वस्तुधर्माची उपमा देऊन श्रीगुरुचें वर्णन करणें ही निंदाच होते; म्हणून त्यांची स्तुति करण्याचा अहंकार न बाळगतां, ''मज पामराकडून त्या अनंत अपाराचे गुण काय वर्णन केलें जाऊं शकतील'' अशा लीन व दीन भावनेने त्यांच्या चरणावर मस्तक ठेवणें, हीच त्यांची खरी स्तुति होय, असा भाव श्रीमाऊलींनी दाखविला आहे.

जरी प्रज्ञेचेनि आथिलेपणें। श्रीगुरुसामर्थ्या रूप करुं म्हणे। तरि मोतियांसी भिंग देणें। तैसें होईल॥ १४॥
कां साडेपंधरया रजतवणी। तैशीं स्तुतीचीं बोलणीं। उगियाचि माथा ठेविजे चरणीं। हेंचि भलें॥ १५॥
मग म्हणितलें जी स्वामी। भलेनि ममत्वें देखिलें तुम्हीं। म्हणोनि कृष्णार्जुनसंगमीं। प्रयागवटु जाहलों॥ १६॥

अर्थ—जर बुद्धीच्या व्युत्पत्त्यादि सामर्थ्याने श्रीगुरुच्या सामर्थ्याचें वर्णन करीन, असे कोणी म्हणेल, तर तें त्याचें करणें, पाणीदार मोत्याला अभ्रकाचें पुट लावण्यासारखें होईल. ॥ १४ ॥ किंवा श्रीगुरुची शब्दाने स्तुति करणें, हें शुद्ध सोन्याला रुप्याचें पाणी देण्यासारखे होणार आहे; म्हणून मुकाट्याने त्यांच्या चरणावर मस्तक ठेवणें हेंच मी उत्तम समजतों. ॥ १५ ॥ नंतर श्रीज्ञानेश्वर महाराज श्रीगुरुनिवृत्तिनाथांना म्हणतात, अहो जी श्रीगुरुनाथा! माझ्यावर तुम्ही अत्यंत ममता करीत आहां, म्हणूनच श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या संवादरूपी संगमाचे ठिकाणीं मी, प्रयागांतील (त्रिवेणी संसमावरील) वटवृक्षाप्रमाणे झालों. ॥ १६ ॥

गूढार्थदीपिका—प्रयागवट जाहलों—प्रयाग येथील वटाला अक्षय किंवा अविनाशी वट म्हणतात. तो, प्रयाग क्षेत्राच्या व गंगेच्या थोर माहात्म्यामुळे व शंकरादि देव त्याचें रक्षण करीत असल्यामुळे अक्षय झाला आहे. तसेच श्रीगुरुहि शिष्याचें प्रेम व लीनत्वादि गुणाला पाहून जेव्हा शिष्यावर अत्यंत प्रेम करतात, तेव्हाच त्याला अध्यात्मचर्चेची गोडी लागून, त्याचा ज्ञानचर्चेतच अक्षय काल जातो व त्यामुळे तो अक्षय ब्रह्मस्वरूप होतो असा भाव.

मागां दूध दे म्हणतलियासाठीं। आघविया क्षीराब्धीची करूनि वाटी। उपमन्यूपुढें धूर्जटी। ठेविली जैसी॥ १७॥

ना तरी वैकुंठपीठनायकें। रुसला ध्रुव कवतिकें। बुझाविला देऊनि भातुकें। ध्रुवपदाचें॥ १८॥

अर्थ—मागें उपमन्यूने दूध मागितलें असतां क्षीरसमुद्राचीच वाटी करून ज्याप्रमाणे शंकराने त्याच्या पुढें ठेविली. ॥ १७॥ किंवा वैकुंठलोकाचा स्वामी जो भगवान विष्णु, त्याने रुसलेल्या ध्रुवाला ध्रुवपदाचे भातुकें देऊन त्याचें सहज सांत्वन केलें. ॥ १८॥

गूढार्थदीपिका—भक्त किंवा शिष्य अज्ञानी असल्यामुळें ते जरी अल्प मागत असलें, तरी भगवंत व श्रीगुरु पूर्ण असल्यामुळे ते पूर्णच देतात.

तैसी जै ब्रह्मविद्यारावो। सकळ शास्त्रांचा विसंवता ठावो। ते भगवद्गीता वोविया गावों। ऐसें केलें॥ १९॥

अर्थ—त्याप्रमाणे ब्रह्मविद्येचा राजा आणि सर्व शास्त्रांचें विश्रांतिस्थान अशी जी भगवद्गीता, ती माझ्याकडून ओवीरूप छंदात तुम्ही गाववून दाखविली. ॥ १९॥

गूढार्थदीपिका—ब्रह्मविद्यारावो। सकळ शास्त्रांचा विसंवता ठावो—ब्रह्म-प्राप्तीची जी विद्या ती ब्रह्मविद्या होय. ती ब्रह्मविद्या, निर्गुणब्रह्मप्रतिपादक व सगुणब्रह्मप्रतिपादक अशी दोन प्रकारची आहे. पुन: सगुणब्रह्मविद्या हीहि कार्यब्रह्मप्रतिपादक व कारणब्रह्मप्रतिपादक अशी दोन प्रकारची आहे. उपनिषदांतून बहुश: निर्गुणब्रह्मविद्याच सांगितली आहे. तिला ब्रह्मज्ञान म्हणतात. कार्य ब्रह्मप्रतिपादकब्रह्मविद्या छांदोग्यादि उपनिषदांतून सांगितली आहे आणि रामकृष्णादि सगुण कारणब्रह्माचें प्रतिपादन करणारी ब्रह्मविद्या श्वेताश्वतरोपनिषत्, त्रिपादमहानारायणोपनिषत्, वगैरे उपनिषदांतून व भागवतादि पुराणांतून सांगितली आहे. याला भक्ति असेहि म्हणतात.

या भक्तिरूप ब्रह्मविद्येचाच भगवंतांनी अर्जुनाला मुख्यत: गीतेंत उपदेश केला असून, ही भक्तिरूप ब्रह्मविद्या नि:सीम प्रेमरूप सहजस्थितीची प्राप्ति करून देणारी असल्यामुळे, आत्मज्ञानरूप ब्रह्मविद्येने प्राप्त होणाऱ्या, जीवब्रह्मैक्याच्या जाणीवेसहित असणाऱ्या, ब्रह्मस्थितिपेक्षा श्रेष्ठ आहे; म्हणून श्रीज्ञानेश्वर माऊलींनी गीतेंतील ब्रह्मविद्येला "ब्रह्मविद्यारावो" असें म्हटलें आहे.

ते भगवद्गीता वोवियें गावों। ऐसे केलें—भक्ति म्हणजे प्रेम. ज्याप्रमाणे, साखर, आंबे, द्राक्षें यांची रुचि घेतली असतां, त्यांच्या रुचींतील भिन्नपणा सांगतां येत नाही, त्याप्रमाणे "अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम्" प्रेमहि शब्दाने बोलून दाखवितां येत नाही; पण श्रीगुरुच्या कृपेने चित्त प्रेमसंपन्न झाल्यांस भगवद्भक्ताला मात्र, मी प्रेम बोलून दाखवित आहे अशी जाणीव न स्फुरता प्रेमाचें वर्णन करतां येते, असा भाव.

जे बोलणियाचे रानीं हिंडतां। नायकिजे फळलिया अक्षरांची वार्ता। परि ते वाचाचि केली कल्पलता। विवेकाची॥ २०॥

अर्थ—येथे वाणीने बोलल्या जाणाऱ्या शब्दांच्या जंगलांत हिंडत असतां, आत्मज्ञानरूप अर्थफळाने फळणाऱ्या अक्षराची वार्ता देखील ऐकायला येत नाही; पण आपण माझी वाणी विवेक-ज्ञानरूप अर्थफळाने फळणारी कल्पलताच केली. ॥ २०॥

गूढार्थदीपिका—अज्ञानी लोकांच्या मुखांतून वायफळ शब्दच निघतात, पण श्रीगुरुकृपा झालेल्या पुरुषांच्या मुखांतून निघणारे शब्द विवेकज्ञानाने भरलेले असतात. "सहज बोलणें हितगुज मात" असें तुकाराम महाराजांनी म्हटलें असून, माऊलींनीहि पुढे अठराव्या अध्यायांत "तयाचे बिसाट शब्द। सुखे म्हणो येती वेद" (ज्ञा. अ. १८-१६४६) या ओवीने हाच अभिप्राय दाखविला आहे.

होती देहबुद्धि एकसरी। ते आनंदभांडारा केली वोवरी। मन गीतार्थसागरीं। जळशयन जालें॥ २१॥

अर्थ—माझ्या ठिकाणी एकसारखी जी देहबुद्धी-म्हणजे मी देह आहे अशी बुद्धी-होती, ती आपण आज ब्रह्मानंदाचे भांडार सांठविलेली खोली केली आणि म्हणूनच निरनिराळ्या पदार्थांचा संकल्पविकल्प करणाऱ्या मनाचे-गीतेचा अर्थ जो ब्रह्मानंद, हाच कोणी सागर-त्या सागराच्या जलामध्ये निजणें झालें म्हणजे तें निमग्न झालें. ॥ २१ ॥

गूढार्थदीपिका—आनंद भांडार—मनुष्यानंदापासून ब्रह्मदेवाच्या आनंदापर्यंत जेवढे आनंद आहेत, ते सर्व ब्रह्मानंदाचे लेशरूप आनंद आहेत, असे तैत्तिरीयउपनिषदांत सांगितले असल्यामुळे "आनंद भांडार" म्हणजे संपूर्ण आनंदाचें भांडार असणारा ब्रह्मानंद होय. अज्ञानदशेतील देहबुद्धि नाहीशी होऊन त्या बुद्धींत एक ब्रह्मानंदच प्रगट झाला म्हणजे मनाचा बाह्यविषयाविषयींचा संकल्पविकल्पात्मक व्यापार नाहीसा होऊन त्या मनोवृत्तींत ब्रह्मानंद खेळूं लागतो.

ऐसें एकेक देवांचें करणें। ते अपार बोलें केवि मी जाणें। तऱ्ही अनुवादलों धीटपणें। तें उपसाहिजो जी॥ २२ ॥
आतां आपुलेनि कृपाप्रसादें। मियां भगवद्गीता वोवीप्रबंधें। पूर्वखंड विनोदें। वाखाणिलें॥ २३ ॥
प्रथमीं अर्जुनाचा विषादु। दुजीं बोलिला योगु विशदु। परि सांख्यबुद्धीसि भेदु। दाऊनियां॥ २४ ॥
तिजीं केवळ कर्म प्रतिष्ठिलें। तेंचि चतुर्थी ज्ञानेंशीं प्रगटिलें। पंचमीं गव्हरिलें। योगतत्त्व॥ २५ ॥
तेंचि षष्ठामाजीं प्रगट। आसनालागोनि स्पष्ट। जीवात्मभाव एकवट। होती जेणें॥ २६ ॥
तैसीचि जे योगस्थिति। आणि योगभ्रष्टां जे गति। ते आघवीचि उपपत्ती। सांगितली॥ २७ ॥
तयावरी सप्तमीं। प्रकृतिपरिहार उपक्रमीं। भजति जे पुरुषोत्तमीं। ते बोलिले चाऱ्ही॥ २८ ॥
पाठीं सप्तमींची प्रश्नसिद्धी। बोलोनि प्रयाणसमयशुद्धि। एवं ते सकळ वाक्यावधी। अष्टमाध्यायीं॥ २९ ॥
आतां शब्दब्रह्मीं असंख्याकें। जेतुला कांहीं अभिप्राय पिकें। तेतुला महाभारतें एकें। लक्षें जोडे॥ ३० ॥
तिये आघवांचि जे महाभारतीं। तें लाभे कृष्णार्जुन वाचोक्तीं। आणि जो अभिप्रावो गीते सातेंशतीं। तो एकलाचि नवमीं॥ ३१ ॥

अर्थ—ही आपली एक एक कृति अगाध सामर्थ्याने भरलेली आहे, ती मी शब्दानें कशी वर्णन करूं? असे असूनहि धीट होऊन, मी तिचा अनुवाद केला, तो माझा अपराध सहन करा. ॥ २२ ॥ आतां आपल्या कृपाप्रसादाने मी ओवीबद्धछंदांत गीतेच्या पूर्वखंडाचे सहज स्पष्टीकरण केलें आहे. ॥ २३ ॥ पहिल्या अध्यायांत अर्जुनाला झालेल्या विषादाचें वर्णन केलें असून, दुसऱ्या अध्यायांत सांख्यबुद्धि व योगबुद्धि यांत काय भेद आहे हें दाखवून कर्मयोगाचें स्वरूप स्पष्ट केलें आहे. ॥ २४ ॥ तिसऱ्या अध्यांयात केवळ कर्ममार्गाचेंच वर्णन केलें असून, चवथ्या अध्यांयात तेंच कर्म ज्ञानपूर्वक कसें करावें हें सांगितलें. पांचव्या अध्यायांत योगतत्वाचें (म्हणजे परमेश्वराचे ठिकाणी बुद्धि स्थिर करण्याचें जें तत्त्व त्याचें) गूढपणानें निरूपण केलें. ॥ २५ ॥ ज्या योगाने जीवात्मभावाचें ऐक्य होतें, तेंच योगतत्व सहाव्या अध्यायांत, आसनादि अंगासह स्पष्ट करून सांगितले. ॥ २६ ॥ त्याचप्रमाणे योग्यांना प्राप्त होणारी स्थिति व योगभ्रष्टांना प्राप्त होणारी गति, हे संपूर्ण वर्णन सहाव्या अध्यायांत सांगितलें आहे. ॥ २७ ॥ त्यानंतर सातव्या अध्यायांत प्रकृतिनाश कसा करावयाचा, याचा उपक्रम करतांना, भगवंताचें भजन करणाऱ्या चार भक्तांचें वर्णन केलें. ॥ २८ ॥ नंतर सात प्रश्नांची उत्तरें देऊन, मरणकाळी जी काळशुद्धि पाहिजें, तिचें वर्णन केलें. याप्रमाणे आठव्या अध्यायांतील भगवद्वाक्यांची समाप्ति झाली. ॥ २९ ॥ जेवढें असंख्यात शब्दब्रह्म म्हणजे वैदिक वाङ्मय आहे, त्यांतून जो कांही निष्कर्ष निघतो, तितका सर्व एक लक्ष श्लोकसंख्या असलेल्या महाभारतांतून मांडलेला आहे. ॥ ३० ॥ आणि संपूर्ण महाभारतात जे सांगितले आहे, ते सर्व कृष्णार्जुन संवादभूत गीतेंत सांगितले असून, या सातशें श्लोकरूपी गीतेचा जो मथितार्थ आहे, तो एकट्या नवव्या अध्यायांत आहे. ॥ ३१ ॥

गूढार्थदीपिका—या नवव्या अध्यायांत सगुण भगवंताच्या पूर्णब्रह्मत्वाचे व त्याच्या भक्तीचे प्रतिपादन केले असल्यामुळें संपूर्णगीतेचा मथितार्थ म्हणजे हा नववा अध्याय होय, असे जे माऊलींनी म्हटलें आहे त्याचा, भगवद्गीतेचा प्रतिपाद्य विषय भगवद्भक्ति आहे असाच अर्थ होतो.

म्हणोनि नवमींचिया अभिप्राया। सहसा मुद्रा लावावया। बिहाला वेद मग वायां। गर्व कां करूं॥ ३२ ॥

अहो गुळा साखरे मालेयाचे। हे बांधे तरि एकाचि रसाचे। परि स्वाद गोडियेचे। आन आन जैसें॥ ३३॥
एक जाणोनियां बोल्ती। एक ठायें ठावो जाणविती। एक जाणों जातां हारपती। जाणते गुणेंशीं॥ ३४॥

अर्थ—म्हणून नवव्या अध्यायांतील अभिप्रायावर एकदम मत देण्याचे जेथे वेदाला देखील भय वाटतें, तेथे मी व्यर्थच अभिमान कशाला वागवूं॥ ३२॥ गुळ, साखर, राब हे एका उसाच्या रसाचेंच घनीभूत प्रकार असले तरी त्याच्या गोडीची रुचि जशी निरनिराळी असते (त्याप्रमाणे येथील अध्याय एका ब्रह्माचेच प्रतिपादन करीत असले तरी त्यांच्या प्रतिपादनाची गोडी निरनिराळी आहे)॥ ३३॥ कांही अध्याय ब्रह्म जाणून त्याविषयीं बोलतात, तर कांही अध्याय तेथल्या तेथें दुसऱ्याला परब्रह्मवस्तूची जाणीव करून देतात. कांही अध्याय परब्रह्माला जाणण्याकरितां गेले असतां जाणिवेसहित लय पावतात.॥ ३४॥

गूढार्थदीपिका—जाणोनियां बोलती—म्हणजे आपण जाणलेल्या परब्रह्माच्या स्वरूपाचें दुसऱ्याला परोक्षज्ञान करून देतात.

ठायें ठावो जाणविली—म्हणजे तेथल्या तेथेंच "तूं परब्रह्म स्वरूप आहेस" असें जीवाला अपरोक्षज्ञान करून देतात.

"जाणों जातां हारपती। जाणते गुणेंशी"—म्हणजे कांही अध्याय जीवाचें अंत:करणात सगुण भगवंताचें भक्तिप्रेम उत्पन्न करून देऊन त्याचे ठिकाणी "अहं ब्रह्मास्मि" या ऐक्याची जाणीवहि उरूं देत नाहीत व त्या अध्यायांतील विषय प्रतिपादन करणारे शब्द स्वत:च लय पावतात.

हे ऐसे अध्याय गीतेचे। परि अनिर्वाच्य नवमाचें। तो अनुवादलों हें तुमचें। सामर्थ्य प्रभू॥ ३५॥

अर्थ—असे हे गीतेचे अध्याय आहेत. पण हा नववा अध्याय अनिर्वाच्य आहे. त्याचें वर्णनच करवत नाही, पण त्याचाहि अनुवाद केला गेला हे, महाराज श्रीगुरुनाथा! तुमचेंच सामर्थ्य होय.॥ ३५॥

गूढार्थदीपिका—अनिर्वाच्यपण नवमाचें—अनिर्वाच्य भगवद्भक्ति प्रेमाचा अनुवाद करणारा अध्याय म्हणून नववा अध्याय अनिर्वाच्य म्हटला आहें.

अहो एकाची शाटि तपिन्नली। एकी सृष्टीवरी सृष्टी केली। एकीं पाषाण वाऊनि उतरलीं। समुद्रीं कटकें॥ ३६॥
एकीं आकाशीं सूर्यातें धरिलें। एकीं समुद्र चुळी भरिलें। तैसें मज नेणतयाकरवीं बोलविलें। अनिर्वाच्य तुम्ही॥ ३७॥
परि हें असो एथ ऐसें। राम रावण झुंजिन्नले कैसें। राम रावण जैसे। मीनले समरीं॥ ३८॥
तैसें नवमीं कृष्णाचें बोलणें। तें नवमींचियाचि ऐसें मी म्हणें। या निवाडा तत्त्वज्ञु जाणे। जया गीतार्थु हातीं॥ ३९॥
एवं नवही अध्याय पहिले। मियां मतीसारिखे वाखाणिले। आतां उत्तरखंड उपाइलें। ग्रंथाचें ऐका॥ ४०॥
येथ विभूती प्रति विभूती। प्रस्तुत अर्जुना सांगिजेती। ते विदग्धा रसवृत्ती। म्हणिपैल कथा॥ ४१॥
देशियेचेनि नागरपणें। शांतु शृंगारातें जिणें। तरि ओंविया होती लेणें। साहित्यासी॥ ४२॥
मूळग्रंथींचिया संस्कृता। वरि मऱ्हाटी नीट पाहातां। अभिप्राय मानलिया चित्ता। कवण भूमी हें न चोजवे॥ ४३॥
जैसें अंगाचेनि सुंदरपणें। लेणियासी आंगचि होय लेणें। तेथ अळंकारिलें कवण कवणें। हें निर्वचेना॥ ४४॥
तैसी देशी आणि संस्कृत वाणी। एका भावार्थाच्या सुखासनीं। शोभती आयणी। चोखट आइका॥ ४५॥

अर्थ—अहो श्रीगुरुराया! एकाच्या (वसिष्ठाच्या) छाटीने प्रकाश देण्याची कामगिरी केली. एकाने (विश्वामित्राने) सृष्टिसारखी प्रतिसृष्टि उत्पन्न करून दाखविली. एकाने (नीलवानराने) समुद्रांत दगड तरवून त्यावरून सैन्य उतरविले.॥ ३६॥ एकाने (मारुतींने) आकाशांतील सूर्याला धरले. एकाने (अगस्ति ऋषीने) संपूर्ण समुद्र एकाच चुळीने पोटांत सांठविला; त्याप्रमाणे मज मुक्याकडून तुम्ही ह्या अनिर्वाच्य अशा नवव्या अध्यायांतील विषय प्रगट करविला.॥ ३७॥ पण हे असो. ज्याप्रमाणे श्रीराम व रावण यांचे युद्ध कसे झाले असे विचारल्यास श्रीराम-रावणासारखे झाले असे म्हणावें लागते (त्याला त्याचाच दृष्टान्त द्यावा लागतो. दुसरा दृष्टान्तच नाही असा भाव)॥ ३८॥ त्याप्रमाणे येथे नवव्या अध्यायांतील भगवान श्रीकृष्णाचे बोलणे नवव्या अध्यायांतील बोलण्यासारखेच

आहे. त्याला दुसऱ्या अध्यायाचा दृष्टान्त देतां येत नाही, असे मी म्हणतो. व हा माझा निर्णय बरोबर आहे किंवा नाही हे, ज्याच्या दृष्टीसमोर गीतार्थ आहे ते तत्वज्ञ पुरुष जाणतात. ॥ ३९ ॥ याप्रमाणे पहिल्या नऊ अध्यायांचे यथामति व्याख्यान मी केलें आहे. येथून ग्रंथाच्या उत्तरखंडाचे क्रमप्राप्त व्याख्यान श्रवण करा. ॥ ४० ॥ जेथें या अध्यायांत भगवान अर्जुनाला अपल्या प्रधान व गौण विभूती आतां सांगणार आहेत, ती कथा अत्यंत रसभरीत शब्दाने मी तुम्हाला निरूपण करणार आहे. ॥ ४१ ॥ (ज्या देशी मराठी भाषेंत मी, ती कथा निरूपण करणार आहे) त्या मराठी भाषेच्या सौंदर्यामुळे त्यांत प्रतिपादिलेला शांतरस, शृंगाररसाला देखील फिका पाडील, तेव्हा माझ्या ओव्या साहित्यालाहि अलंकाराप्रमाणे सुशोभित करतील. ॥ ४२ ॥ गीता ग्रंथाच्या मूळच्या संस्कृत भाषेवर माझी केलेली मराठी भाषेंतील टीका नीट पडताळून पाहतां, मी काढलेला अभिप्राय योग्य आहे असे मान्य झाल्यास, मूळ कोणते हें निवडतां येणार नाही. ॥ ४३ ॥ ज्याप्रमाणे अत्यंत सुंदर शरीरावर घातलेल्या अलंकाराला तें शरीरच लेणें होतें म्हणजे शोभा आणते, मग कोणी कोणाला शोभा आणली हें सांगतां येत नाही. ॥ ४४ ॥ त्याप्रमाणे मूळ गीताग्रंथाची संस्कृत भाषा व माझ्या टीकेची मराठी भाषा ह्या दोन्ही एका भावार्थरूप पालखींत बसून कशा चातुर्याने शोभतात, हे लक्ष देऊन ऐका. ॥ ४५ ॥

गूढार्थदीपिका—एका भावार्थाच्या सुखासनी— भगवंताच्या संस्कृत भाषेंतून व माझ्या मराठी भाषेतून सहजरीत्या निघणारा यथार्थ अभिप्राय एकच आहे असा अर्थ.

शोभती आयणी— भगवंताच्या संस्कृत भाषेच्या ठिकाणीं भगवंताचा यथार्थ अभिप्राय व्यक्त करण्याचे जसे चातुर्य आहे, तसेच माझ्या मराठी भाषेच्या ठिकाणींहि तोच अभिप्राय व्यक्त करण्याचे चातुर्य आहे.

आर्षग्रंथांतील संस्कृतभाषेने जशी ज्ञानभक्तीची प्राप्ति होते, तशीच प्राप्ति संताच्या मराठी भाषेतील ग्रंथांतून होते. भाषेमुळे ब्रह्मबोधांत फरक पडत नाही असा भाव.

संस्कृत वाणी देवें केली। तरी प्राकृत काय चोरापासोनि जाली। असोतु या अभिमानभुली। वृथा बोली काय काज. ॥ १२८ ॥ आतां संस्कृता किंवा प्राकृता। भाषा जाली जे हरिकथा। ते पावनचि तत्वतां। सत्य सर्वथा मानली. ॥ १२९ ॥ (ए. भा. अ. १) असे नाथहि म्हणतात.

उदयलिया भावा रूप। करितां रसवृत्तीचें लागे वडप। चातुर्य म्हणे पडप। जोडलें आम्हां॥ ४६ ॥
तैसें देशियेचें लावण्य। हिरोनि रसां अणिलें तारुण्य। मग रचिलें अगण्य। गीतातत्त्व॥ ४७ ॥

अर्थ— चित्तांत स्फुरलेल्या भावार्थाचें स्पष्टीकरण करतांना किंवा तो व्यक्त करतांना, त्याला रसभरित भाषेचा पाऊस लागेल व त्यामुळे आजच्या जगांत या अशा भाषेने आम्हांला प्रतिष्ठा प्राप्त झाली असे चातुर्य म्हणेल. ॥ ४६ ॥ तसे मराठी भाषेचे सर्व सौंदर्य एकत्र करून रसाला तारुण्य आणले व मग त्या योगाने अमर्याद अशा गीतातत्वाची मराठी भाषेत रचना केली. ॥ ४७ ॥

गूढार्थदीपिका—उदयलिया भावा— कोणत्याहि ग्रंथकर्त्याचा, त्याच्या अमुकग्रंथातील अभिप्राय किंवा विषय काय आहे, हे कोण बरोबर सांगूं शकतो किंवा त्या ग्रंथावर ज्या पुष्कळांनी टीका केल्या असतील त्यापैकीं मूळ ग्रंथकाराचा अभिप्राय तंतोतंत कोणी जाणला, या प्रश्नाचा विचार केल्यास असे निःसंशय म्हणतां येते की, ज्या टीकाकाराचा ग्रंथकर्त्याशीं अत्यंत स्नेहसंबंध असेल त्यालाच ग्रंथकर्त्याच्या मनांतील खरा अभिप्राय कळणें शक्य आहे. कारण त्याला ग्रंथकर्त्याच्या मतांची विशेष जाणीव असते.

पण जेथे टीकाकार व ग्रंथकार यांचे अत्यंत सख्य नाही तेथे टीकाकार, आपल्या बुद्धीच्या अनुमानाने ग्रंथकर्त्याचा अभिप्राय ठरवित असल्यामुळे, तो बरोबरच राहील असा निश्चय करतां येत नाही. म्हणून अद्वैत संप्रदायांत जीव, परमेश्वराशीं ज्ञान व भक्ति या दोन्ही मार्गाने अत्यंत समरस ऐक्य पावत असल्यामुळे-म्हणजे परमेश्वराच्या सगुण निर्गुण दोन्ही रूपाशीं जीवाचे ऐक्य होत असल्यामुळे-ज्ञानींभक्तासच भगवंताचें खरें हृद्गत कळणें शक्य असते असे म्हणतां येते "यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ। तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥"

सगुण भगवान व श्रीगुरु यांचे ठिकाणी निःसीम प्रेमरूप पराभक्ति करणाऱ्यांनाच भगवंताच्या वचनांचा खरा अर्थ समजूं शकतो, असे प्रत्यक्ष श्वेताश्वतर श्रुतीनेच म्हटले आहे.

जो चराचरपरमगुरु। चतुरचित्तचमत्कारु। तो ऐका यादवेश्वरु। बोलता जाहला॥ ४८॥

अर्थ—जो चराचर ब्रह्मांडाचा आद्य गुरु, थोर जाणत्याच्याहि चित्ताला आश्चर्यचकित करून सोडणारा, असा तो यादवांचा राजा भगवान श्रीकृष्ण पुढे बोलूं लागला. ॥ ४८ ॥

गूढार्थदीपिका—चराचरपरमगुरु—ज्या वेदांतील ज्ञानाने पुरुष, ज्ञानी होतो, तो वेद भगवन्निर्मित असल्यामुळे, परमात्मा सर्वांचा आद्य गुरु ठरतो.

चतुरचित्तचमत्कारु—भगवंताची लीला अगम्य असल्यामुळे थोर महात्म्यांच्या चित्तालाहि ती आश्चर्यचकित करणारी आहे.

यादवेश्वरु—तोच परमात्मा आपल्या सर्वज्ञत्वादि सर्वशक्तिसह यादव कुलांत उत्पन्न झाला असे "यादवेश्वरु" या शब्दाने सुचविलें आहे.

ज्ञानदेव निवृत्तीचा म्हणे। ऐसें बोलिलें श्रीहरी तेणें। अर्जुना आघवियाचि मातु अंतःकरणें। धडौता आहासि॥ ४९॥

अर्थ—श्रीनिवृत्तिनाथांचे ज्ञानदेव म्हणतात, त्या श्रीकृष्णाने अर्जुनाला म्हटलें, की अर्जुना! सर्वच गोष्टी ऐकतांना तूं अंतःकरणाने योग्य असतोस म्हणजे एकाग्र चित्ताने ऐकतोस. ॥ ४९ ॥

गूढार्थदीपिका—आघवियाची मातू अंतःकरणें। धडौता आहासी—वक्त्याच्या तोंडून जें जें निघेल तें तें ऐकावेसेच वाटतें, हेंच श्रोत्याचें प्रेमाने श्रवण करण्याचें लक्षण आहे.

श्रीभगवानुवाच

भूय एव महाबाहो शृणु मे परमं वचः। यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया॥ १॥

अर्थ—भगवान् म्हणतात, हे आजानुबाहो अर्जुना! अत्यंत श्रेष्ठ म्हणजे परब्रह्मवस्तूचें यथार्थ ज्ञान करून देणारे माझें भाषण पुनः ऐक. माझें भाषण प्रिय वाटणाऱ्या तुला, तुझ्या हिताच्या इच्छेनेच मी सांगत आहे. ॥ १ ॥

आम्हीं मागील जें निरूपण केलें। तें तुझें अवधानचि पाहिलें। तंव टांचें नव्हे भलें। पुरतें आहे॥ ५०॥

अर्थ—अर्जुना! मी मागें जें निरूपण केलें, तें तुझें चित्त एकाग्र आहे किंवा नाही हें पाहण्याकरितांच होतें, पण तें अर्धवट नसून पूर्ण एकाग्र होतें, हें कळून आले. ॥ ५० ॥

गूढार्थदीपिका—अवधानचि पाहिले—ब्रह्मज्ञानाची गोडी असली, तरच ऐंकलेलें ब्रह्मनिरूपण चित्तांत ठसतें व चित्त ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर होतें, नाहीतर त्याचा कांही उपयोग होत नाही.

"मननावांचूनि श्रवण करी। जैसिया पालथी घागरी। पर्जन्यांत ठेबिलिया जन्मवरी। अंतरीं बिंदु न सांठवे" (हरिविजय अ. २५) असे श्रीधरांनी हरिविजयांत म्हटलें आहे; म्हणून शिष्याच्या चित्ताची परीक्षा करूनच सद्गुरु शिष्याला श्रवण करवित असतात.

पिता जसा कष्टाने व प्रेमाने जमविलेले व रक्षण केलेलें धन उधळ्या मुलाचे स्वाधीन करुं इच्छित नाही त्याप्रमाणेच कष्टाने व प्रेमाने प्राप्त केलेली व अत्यंत जपून ठेवलेली ब्रह्मस्थिति सद्गुरुही अनवधानाने श्रवण करणाऱ्या शिष्याच्या हातीं देत नसतात.

घटीं थोडेसे उदक घालिजे। तेणें न गळे तरी वरिता भरिजे। तैसा परिसौनि पाहिलासि तंव परिसविजे। ऐसेंचि होतसे॥ ५१॥

अवचितयावरी सर्वस्व सांडिजे। मग चोख तरी तोचि भांडारी कीजे। तैसा किरीटी तूं आतां माझें। निजधाम कीं॥ ५२॥

अर्थ—घागरींत थोडेसें पाणी भरावें व तेवढें पाणी तसेंच राहिले, गळलें नाही, तर ती आणखी भरावी, त्याप्रमाणे मी थोडें निरूपण करून, तुला श्रवण करवून पाहिलें, तेव्हा आणखी श्रवण करवावें असेच दिसून आलें. ॥ ५१ ॥ एखादे वेळीं येणाऱ्या माणसावर प्रथम घरांतील सर्व सोपवून पहावें व त्याची सचोटी दिसून आली, तर मग त्यास खजिनदार करावें, त्याप्रमाणे, अर्जुना! माझें अखंड राहण्याचें ठिकाण जें परब्रह्म तें तूं झाला आहेस. ॥ ५२ ॥

गूढार्थदीपिका—निजधाम—एकाग्र चित्तवृत्तिलाच सूक्ष्मबुद्धिवृत्ति किंवा अग्रबुद्धि म्हणतात. सूक्ष्म अशा या अग्रबुद्धिवृत्तिनेच ब्रह्म जाणलें जातें किंवा जीव ब्रह्मस्वरूप होतो, म्हणूनच अत्यंत एकाग्र चित्ताने श्रवण करणाऱ्या अर्जुनाला, भगवंताने ''तू'' ''निजधाम'' म्हणजे ब्रह्मस्वरूप झालास असें म्हटलें आहे.

ऐसें अर्जुना येउतें सर्वेश्वरें। पाहोनि बोलिलें अत्यादरें। गिरी देखोनि सुभरे। मेघु जैसा॥ ५३॥
तैसा कृपाळुवांचा रावो। म्हणे आइकें गा महाबाहो। सांगितलाचि अभिप्रावो। सांगेन पुढती॥ ५४॥
पैं प्रतिवर्षी क्षेत्र पेरिजे। पिकाची जंव जंव वाढी देखिजे। यालागीं नुबगिजे। वाहो करितां॥ ५५॥
पुढतपुढती पुटें देतां। जोडे वानियेची अधिकता। म्हणोनि सोनें पांडुसुता। शोधूंचि आवडे॥ ५६॥
तैसें येथ पार्था। तुज आभार नाहीं सर्वथा। आम्ही आपुलियाचि स्वार्था। बोलो पुढती॥ ५७॥

अर्थ—अर्जुनाला अत्यंत एकाग्रतेने ऐकताना पाहून, सर्व देवांचा देव भगवान श्रीकृष्ण, वर सांगितल्याप्रमाणे अत्यंत आदराने बोलले आणि ज्याप्रमाणे पर्वताला पाहून पाण्याने भरलेले मेघ पर्वतावर वळून येतात, त्याप्रमाणे कृपाळूंचा राजा भगवान श्रीकृष्ण म्हणतो, ''महाबाहो अर्जुना! सांगितलेला भावार्थच पुढें पुन: सांगणार आहे. ऐक''॥ ५३-५४॥ कारण दरवर्षी शेत पेरावें व जसजशी पिकांची वाढी होत असलेली पाहावी तसतशी त्या शेताची मशागत करण्याचा त्रास मानूं नये.॥ ५५॥ वारंवार पुटें दिलीं असतां सोन्याचा कस वाढतो, म्हणून वारंवार सोनें शोधावेसेंच वाटते.॥ ५६॥ त्याचप्रमाणे अर्जुना! तुला वारंवार सांगण्यांत तुझ्यावर उपकार करतो असे नसून, मी आपल्याच स्वार्थाकरितां पुन: बोलत आहे.॥ ५७॥

गूढार्थदीपिका—आम्ही आपुलियाचि स्वार्था। बोलों पुढती—शिष्य कृतार्थ झाला असतां, श्रीगुरुनाही सात्विक असा निष्काम आनंद प्राप्त होतो, हें मागें आठव्या अध्यायांत (ओवी ५५ गू. दी.) सांगितलेच आहे त्याचाच माऊलींनी ''आम्ही आपुलियाची स्वार्था। बोलों पुढती'' या चरणाने उल्लेख केला आहे. परमप्रेमरूप परब्रह्माची चर्चा परमप्रेमांत निमग्न करणारीच होते.

जैसें बाळका लेवविजे लेणें। तें शृंगारातें काइ जाणे। परि ते सुखाचे सोहळे भोगणें। माउलियें दिठी॥ ५८॥
तैसें तुझें हित आघवें। जंव जंव कां तुज फावें। तंव तंव आमुचें सुख दुणावें। ऐसें असे॥ ५९॥
आतां अर्जुना हे विकडी। मज उघड तुझी आवडी। म्हणोनि तृप्तीची सवडी। बोलतां न पडे॥ ६०॥

अर्थ—ज्याप्रमाणे आई आपल्या बाळाच्या आंगावर अलंकार घालते, पण त्या अलंकार घालण्याचा जो आनंद, तो बालक काय जाणत असतो? पण ते सुखाचे सोहळे, आईच आपल्या दृष्टीने भोगत असते.॥ ५८॥ त्याप्रमाणे अर्जुना! आमचें निरूपण ऐकून ब्रह्मबोध ठसल्यामुळे जसें जसें तुला आत्मसुख प्राप्त होईल, तसें तसें आमचेंहि सुख दुप्पट वाढत जातें.॥ ५९॥ आतां अर्जुना! हें अलंकारिक भाषण असो. मला तुझें अत्यंत प्रेम असल्यामुळेच तुझ्याशीं बोलत असतांना तृप्तीचा अवसर लाभत नाही.॥ ६०॥

गूढार्थदीपिका—म्हणोनि तृप्तीची सवडी। बोलतां न पडे—ज्याप्रमाणे सेवलेलेच विषय वारंवार सेवन करण्यांत विषयाच्या ठिकाणीं असेलेलें आपलें परमप्रेम व्यक्त होतें, त्याचप्रमाणे परमप्रेमरूप आत्म्याचे निरूपण करण्यांत तृप्ति न वाटणें, हेंच आत्म्याच्या परमप्रेमाचें निदर्शक असतें. तृप्ति वाटणे हें परमप्रेमाचें चिन्ह नव्हें, हें मागें नवव्या अध्यायांत सांगितलेंच आहे (ओ. २ गू. दी.)

आम्हां येतुलियाचि कारणें। तेंचि तें तुजशीं बोलणें। परि असो हें अंत:करणें। अवधान देईं॥ ६१॥

अर्थ—या कारणामुळेच (आत्म्याच्या परमप्रेमामुळेच) मी तेंच तें (आत्मस्वरूपाविषयीचें) तुला सांगणार आहे. बरें हें असो. आतां मनापासून माझ्या बोलण्याकडे लक्ष दे.॥ ६१॥

गूढार्थदीपिका—तेंचि तें तुजशीं बोलणें—परब्रह्माचें परमप्रेम असल्यामुळें वारंवार परब्रह्माविषयीं बोलावेसें वाटतें व तुझेंहि परम प्रेम असल्यामुळे वारंवार तुझ्याशींच बोलावेसे वाटतें.

तरी ऐकें ऐकें गा सुवर्म। वाक्य माझें परम। जें अक्षरें लेऊनि परब्रह्म। तुज खेवासि आलें॥ ६२॥

अर्थ—तरी हे अर्जुना! माझें हें अत्यंत मार्मिक व श्रेष्ठ वचन ऐक. हें माझें वाक्य म्हणजे साक्षात् शुद्ध परब्रह्मच अक्षरांचा आंगरखा घालून तुला आलिंगन देत आहे. असें समज. ॥ ६२ ॥

न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः। अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः॥ २॥

अर्थ—मी आपल्या अचिन्त्य शक्तिसामर्थ्यानें कसा नामरूपासह व्यक्त होतो, हें देवादिक किंवा महर्षि देखील जाणूं शकत नाहीत; कारण सर्व देवांचे व महर्षीचें उत्पत्तिकारण मीच आहे. ॥ २ ॥

अवतरणिका—अध्यायारंभीं अवतरणिकेंत सांगितल्याप्रमाणे श्रीकृष्णस्वरूप हे कार्यब्रह्म आहे—पूर्णब्रह्म नाही—असे जे अर्जुनाला वाटत होतें त्याचाच या पुढील ओवींत भगवंतांनी उल्लेख करून आपलें स्वरूप कारणब्रह्मच आहे हे सांगण्यास सुरुवात केली आहे.

तरी किरीटी तूं मातें। नेणसी ना निरुतें। तरि तो गा जो मी एथें। तें विश्वचि हें॥ ६३॥

अर्थ—तर अर्जुना! तूं मला खरोखर जाणत नाहीस ना! तर जो मी तुझ्यासमोर येथे आहे, तोच मी हें विश्वरूप झालों आहे. ॥ ६३ ॥

गूढार्थदीपिका—तरि तो गा जो मी—वरील श्लोकांतील "अहं" म्हणजे "मी" हा शब्द भगवंतांनी आपल्या सगुण स्वरूपाला धरूनच योजिला आहे व श्रीज्ञानेश्वर माऊलींनी 'मी' या शब्दाचा तसाच अनुवाद केला आहे. भगवान म्हणतात "अर्जुना! जो मी तुझ्यासमोर मर्यादित, सगुण, साकार श्रीकृष्ण स्वरूपाने आहे, तोच 'मी' विश्वरूपाने आहे."

भगवंताच्या या म्हणण्याचे स्पष्टीकरण असें आहे—

विषयकोटींत न येणाऱ्या म्हणजे ज्ञेय न होणाऱ्या पदार्थावर, दुसऱ्या पदार्थाचा कधीं भ्रम होत नाही. परब्रह्मस्वरूप अविषय कोटींतील आहे. किंवा कळण्याजोगें नाही असे वेदान्तांत म्हटलें असलें, तरी "दृश्यते त्वग्रया बुद्ध्या" "न तावदयमेकान्तेनाविषयः। अस्मत्प्रत्ययविषयत्वात्, अपरोक्षत्वाच्च" ब्रह्माचा साक्षात्कार होतो व ते 'मी' या वृत्तीचा विषय होतें म्हणून सदासर्वदा तें अविषयकोटींतच असतें असें नाही, असें आचार्यांनी ब्रह्मसूत्रावरील भाष्याच्या प्रारभीं म्हटलें आहे.

अर्थात् परब्रह्म विषयकोटींत असतें म्हणूनच त्याच्यावर जगद्रूप भ्रम झाला आहे.

परब्रह्मावर झालेला हा विश्वरूपभ्रम कसा होतो हें आतां आपण पाहूं—

विश्व म्हणजे नामरूपाचा भास होय. हा नामरूपाचा भास माया उपाधीने किंवा अज्ञानउपाधीने होतो असे वेदान्तशास्त्र म्हणतें. पण याचा अर्थ, माया नामरूपाने परिणाम पावली असा अर्थ करावयाचा किंवा परब्रह्मच नामरूपाने स्फुरलें आहे व जीवाला त्या परब्रह्माचें यथार्थ ज्ञान नसल्यामुळे नामरूपाने नटलेल्या परब्रह्मालाच तो भ्रमाने परब्रह्माहून निराळी अशी जगद्वस्तु मानतो, असा अर्थ करावयाचा हा येथे प्रश्न उत्पन्न होतो.

मायाच नामरूपाने परिणाम पावली असा अर्थ घेतल्यास, माया एक वस्तु आहे असे मानावें लागतें. पण परब्रह्म अद्वैत स्वरूप आहे. त्याच्यावांचून दुसरी खरी वस्तु नाही व खोटीहि वस्तु नाही असा वेदान्तसिद्धान्त आहे व आचार्यांनीहि "न वास्तवः कश्चिदुपाधिरेषः" (वि. चू.) ॥ २४५ ॥ जीवाची माया उपाधि वास्तविक नाही असें म्हटलें आहे. म्हणजे उपाधि ही जीवाने कल्पिलेलीच आहे असा त्याचा अर्थ होतो. वेदान्तांत मायाउपाधीला अनिर्वचनीय जें म्हटलें आहे, त्याचा अर्थहि श्रीमाऊलींनी "अविद्या येणें नावें। मी विद्यामानचि नव्हे। हें अविद्याचि स्वभावें। सांगतसें॥ ३८ ॥ आणि इये अनिर्वाच्यपण। तें दुजेहि देवांगण। आपुला अभावो आपण। साधितसे"॥ ३९ ॥ (अमृ. प्र. ६) अज्ञानउपाधि खरी नसून केवळ काल्पनिक आहे असेच या ओव्यांतून सांगितलें आहे.

अर्थात् मायोपाधि किंवा अज्ञानउपाधि खरोखर अस्तित्वांत नसल्यामुळे, ती नामरूपाने परिणाम पावतें हें म्हणणें विसंगत आहे. "केउते मेलिया माया। होऊं पाहिजे" (अमृ. प्र. ८) म्हणून नामरूपाने स्फुरण पावलेल्या परब्रह्मालाच, अज्ञानी जीव विश्व किंवा जगत् ही संज्ञा देतो असेच म्हणावे लागतें व असाच वेदान्ताचा सिद्धांत आहे. परब्रह्मच,

नामरूपाने स्फुरण पावतें, असे न जाणणारा अज्ञानी जीव, त्या परब्रह्माच्या नामरूपात्मक आविष्काराला परब्रह्माहून पृथक् मानून, जगत् हें नांव देत असला तरी परमात्मा, मीच नामरूपाने नटलों आहों, हें पूर्णपणें जाणत असतो व हें त्याचें ज्ञान तो कधी विसरत नाही. आणि भक्तांचें प्रेम वाढविण्याकरितां आणि दुष्टांचा नाश करून सज्जनांचे पालन करण्याकरितां परमात्माच मर्यादित असे सगुण साकार श्रीकृष्णस्वरूप घेऊन अवतीर्ण होत असतो; म्हणून पाण्याहून उठणारी लहरी पाण्याचेच रूपांतर असून, पाण्यावरच स्फुरत असल्यामुळे, जसा पाण्याचा व तिचा संबंध सुटत नाही, तसा नित्य, शुद्ध, मुक्त, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, ज्ञानसंपन्न, अस्फुट व पूर्ण असा परमात्मा आपल्यावरच अवताररूपाने स्फुरत असल्यामुळे, रामकृष्णादि अवतारहि पूर्णब्रह्म परमात्मस्वरूप म्हणजे सृष्टि उत्पत्तिस्थितिलय करणारे कारण-ब्रह्मच असतात. हाच सिद्धान्त "मी येथे। ते विश्वचि हे" या चरणांनी माऊलींनी सांगितला आहे.

एथ वेद मुके जाहाले। मन पवन पांगुळले। रातीविण मावळले। रविशशी॥ ६४॥
अगा उदरींचा गर्भु जैसा। न देखे आंपुलिया मायेची वयसा। मी आघवेयां देवां तैसा। नेणवे काही॥ ६५॥
आणि जळचरां उदधींचें मान। मशकां नोलांडवेंचि गगन। तैसे महर्षींचें ज्ञान। न देखेचि माते॥ ६६॥
मी कवण पां कां केतुला। कवणाचा कैं जाहला। या निरुती करितां बोला। कल्पेले॥ ६७॥
कां महर्षी आणि या देवां। येरां भूतजातां सर्वां। मी आदि म्हणोनि पांडवा। अवघड जाणतां॥ ६८॥
उतरलें उदक पर्वत वळघे। कां वाढते झाड मुळीं लागे। तरी मियां जालेनि जगें। जाणिजे मातें॥ ६९॥
कां गाभेवने वटु गिंवसवे। जरी तरंगीं सागरु सांठवे। कां परमाणूमाजीं सामावे। भूगोलु हा॥ ७०॥
तरि मियां जालिया जीवां। महर्षी अथवा देवां। मातें जाणावया होआवा। अवकाशु गा॥ ७१॥

अर्थ—मी आपल्या अचिंत्यशक्तीने नामरूपात्मक कसा होतो किंवा प्रगट होतो याचा वेदालाहि पत्ता लागला नाही; म्हणून त्यांनी त्याविषयीं मौन घेतलें (म्हणजे तेथे शब्दप्रवृत्तीहि नाहीं असा अर्थ). तेथे मन, प्राण यांचींहि वाटचाल कुंठित झाली (म्हणजे मनाचे संकल्प किंवा प्राणाची क्रिया यांचाहि तेथें मागमूस नाही). रात्र नसतांना देखील सूर्यचंद्र यांचा प्रकाश अस्ताला गेला (म्हणजे ज्ञानप्रकाश येवढा प्रचंड आहे की, त्यांत सूर्यचंद्राचेहि प्रकाश लोपून जातात)॥ ६४॥ बा अर्जुना! ज्याप्रमाणे गर्भातील जीव, आपल्या आईचें वय जाणूं शकत नाही, त्याप्रमाणे कोणीहि देव मला जाणू शकत नाही.॥ ६५॥ आणि समुद्रांतील प्राण्यांना समुद्राचा विस्तार कळत नाही किंवा मशकाला आकाश ओलांडून जाणें शक्य नाही, त्याप्रमाणेच महर्षीचें ज्ञान देखील या माझ्या शक्तिस्वरूपाचा ठाव घेऊं शकत नाही.॥ ६६॥ मी कोण आहे, केवढा आहे, कोणाचा आहे, केव्हा झालों इत्यादि गोष्टींचा सत्य विचार करतां करतां कितीतरी कल्प लोटले.॥ ६७॥ अर्जुना! महर्षि असोत किंवा देव-असोत, त्याचप्रमाणे सर्व भूतप्राणि असोत, या सर्वांचे कारण मीच असल्यामुळे किंवा या सर्वांची उत्पत्ति माझ्यापासून असल्यामुळे, त्यांना आपल्या बुद्धीने मला जाणणें दुरापास्त आहे.॥ ६८॥ पर्वतावरून खालीं उतरत पायथ्याशीं येणारे पाणी जर पुन: पर्वतावर चढेल, वर वाढत जात असलेलें झाड जर मुळाकडे वाढत जाईल, तरच माझ्यापासून उत्पन्न झालेल्या जगाला मला जाणतां येणें शक्य आहे.॥ ६९॥ किंवा वटबीजाला अंकुर फुटल्यावर जर त्यांत संपूर्ण वटवृक्ष दृष्टीस पडेल, समुद्राच्या एका तरंगांत जर संपूर्ण समुद्र सांठविला जाईल किंवा एका परमाणुमध्ये ही संपूर्ण भूमि जर सांठविली जाईल.॥ ७०॥ तरच माझ्यापासून झालेले महर्षि, देव, इत्यादि जीवांना मला जाणण्याला जागा राहील.॥ ७१॥

गूढार्थदीपिका—भगवंताच्या व्यापक स्वरूपाप्रमाणेच त्याचें एकदेशीय सगुण साकार स्वरूपहि कसें पूर्णब्रह्म असते हे जीवाला अनाकलनीय आहे.

वास्तविक जीव पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे; पण त्याने आपल्या ठिकाणीं अपूर्णतेची कल्पना करून घेतली असल्यामुळे ती अपूर्णतेचीं कल्पना जोपर्यंत आहे तो पर्यंत तो जसा, आपलें मूळचें पूर्ण ब्रह्मस्वरूप जाणूं शकत नाही, तसेच परमेश्वराच्यां एकदेशीय सगुण साकार स्वरूपाचें पूर्ण ब्रह्मत्वहि त्याला आकलन होऊं शकत नाही, असा या सर्व ओव्यांतील भाव आहे.

यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम्। असम्मूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते॥ ३॥

अर्थ—मी जन्मरहित आहे आणि अनादि असून सर्व ब्रह्मांडाचा शास्ता महेश्वर आहे, असे जो मला ओळखतो, तो सर्व मनुष्यांमध्ये ज्ञानी होय व तो सर्व पापांपासून मुक्त होतो. ॥ ३ ॥

ऐसाही जरी विपायें। सांडुनि पुढील पाये। सर्वेंद्रियांसि होये। पाठिमोरा जो॥ ७२॥
प्रवर्तलाही वेगीं बहुडे। देह सांडूनि मागलीकडे। महाभूतांचिया चढे। माथयावरी॥ ७३॥
तैसा राहोनि ठायठिके। स्वप्रकाशें चोखें। अजत्व माझें देखे। आपुलिया डोळां॥ ७४॥

अर्थ—असे जरी आहे तरी कदाचित् बाह्य विषयांकडील धांव निःशेष सोडून देऊन जो इंद्रियांच्या प्रवृत्तीला पाठमोरा होतो. ॥ ७२ ॥ इंद्रियांबरोबर विषयांकडे प्रवृत्त झाला तरी एकदम जो मागें फिरतो व देहावरील अहंता सोडून जो मन अंतर्मुख करता करतां महाभूतांच्या माथ्यावर किंवा डोक्यावर चढतो—म्हणजे ज्या आत्मस्वरूपापासून भूतांची उत्पत्ति भासली त्या कारणरूप आत्मस्वरूपाचे ठिकाणी जो जातो. ॥ ७३ ॥ महाभूतांच्या पलीकडे असणारें जें माझें स्वयंप्रकाशित स्वरूप, त्या ठिकाणी स्थिर राहून आपल्या स्वयंप्रकाशरूपाने तो आपल्या डोळ्याने माझें अजत्व पाहतो. ॥ ७४ ॥

गूढार्थदीपिका—अजत्व माझें देखे। आपुलिये डोळा॥ भगवंताचें सगुणस्वरूप कसें पूर्णब्रह्म आहे हें समजण्याकरितां त्याचें निर्गुणस्वरूप जाणणें अवश्य आहे. ज्याप्रमाणे सोनें कळून आल्यानंतर त्याचे दागिनेहि निखालस सोनें आहे असा निश्चय होतो, त्याप्रमाणे ज्याला निर्गुणस्वरूपाचा अनुभव आला तोच भगवंताचे सगुणस्वरूपहि कसें निरुपाधिक व शुद्ध आहे हें जाणतो.

"परमेश्वराचे अनंत गुण। मनुष्यें काय सांगावी खूण। परंतु अध्यात्मग्रंथ श्रवण। होतां उमजे।" (दास. द. १८ स. ४) नाथहि म्हणतात "ब्रह्म इंद्रियां गोचर नसे। गुण गेलिया डोळां दिसे। हे अनुभवियासीचि भासे। बोलावें ऐसें तें नव्हें"॥ १५१॥ (ए. भा. अ. ९) जोपर्यंत पुरुष मायेच्या गुणाने बांधला असतो, तोपर्यंत त्याला सर्वच नामरूपात्मक सगुण गुणात्मक दिसतें व आत्मानुभवाने जेव्हा गुणांचें व मायेचें अस्तित्वच शिल्लक राहत नाही. तेव्हा मग तें सगुणही निरुपाधिक होतें व पूर्णब्रह्मरूपाने डोळ्याला अनुभवितां येते. तसेंच तें अजहि आहे हें कळून येतें.

मी आदीसि परु। सकळलोकमहेश्वरु। ऐसिया मातें जो नरु। यापरी जाणे॥ ७५॥

अर्थ—मी आदिसी पर म्हणजे मी उत्पत्तिरहित आहे, म्हणून मी सर्व ब्रह्मांडाचा नियंता आहे. असा मी आहे असे जो मनुष्य मला जाणतो. ॥ ७५ ॥

गूढार्थदीपिका—आदिसी पर—वर सांगितल्याप्रमाणे भगवंताचे सगुणस्वरूपहि उत्पन्न होत नाही, अजच आहे हेंच "आदिसी पर" या चरणांत माऊलींनी स्पष्ट सांगितलें आहे.

सकळलोकमहेश्वरु —या एकदेशीय सगुणस्वरूपाने देखील भगवान श्रीकृष्ण सर्व ब्रह्मांडाचा नियंता आहे हे 'सकळलोकमहेश्वरु ' या पदाने दाखविलें आहे. याप्रमाणे या दोन्ही चरणांनी भगवान श्रीकृष्ण 'कारणब्रह्म' आहे हें सुचविलें आहे.

तो पाषाणांमाजि परिसु। रसांमाजीं सिद्धरसु। तैसा मनुष्याकृति अंशु। तो माझाचि जाण॥ ७६॥

अर्थ—जसा पाषाणांत परिस श्रेष्ठ आहे किंवा सर्व रसांत सिद्धरस म्हणजे अमृत श्रेष्ठ आहे, त्याप्रमाणे तो सर्व मनुष्यांत माझा अंश होय, हें जाण॥ ७६ ॥

गूढार्थदीपिका—तो पाषाणामाजि परिसु—माऊलींनी या चरणांत भगवान श्रीकृष्ण पूर्णब्रह्म आहे असे न जाणणाऱ्यांना पाषाणाची उपमा देऊन जाणणाऱ्यांना परिसाची उपमा दिली आहे.

तो चाल्तें ज्ञानाचें बिंब। तयाचे अवयव ते सुखाचें कोंभ। येर माणुसपण ते भांब। लौकिक भागु॥ ७७॥

अर्थ—असा मनुष्य, अर्जुना! ज्ञानाचें चालतें बोलतें बिंब होय, त्याचे जे अवयव दिसतात ते ब्रह्मसुखाला निघालेले कोंभ होत असें समज, बाकी वर वर जो मनुष्यपणाचा भाग दिसतो तो केवळ अज्ञानभ्रमाने दिसतो. ॥ ७७ ॥

गूढार्थदीपिका—चालतें ज्ञानाचें बिंब—ज्याप्रमाणे निराकार प्रकाशाचे सूर्यबिंब हें अभिन्न असें साकार स्वरूप आहे, त्याप्रमाणेंच सगुण साकार श्रीकृष्ण स्वरूप व त्याला पूर्णब्रह्मत्वाने ओळखणारे ज्ञानी भक्त हीं दोन्हीं निराकार चित्स्वरूपाची अभिन्न अशीं सगुण साकार स्वरूपें आहेत.

तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ—त्यांचे करचरणादि अवयवासह शरीर हें देखील सच्चिदानंदस्वरूपच असते, "सदेह सच्चिदानंद कां नोहावे ते" असे माउलींनी पुढे १८ व्या अध्यायांत म्हटलेंहि आहे.

येरमाणुसपणते भांब। लौकिक भाग—लौकिक-म्हणजे अज्ञानी लोकांना दिसणारा-जो त्यांचे ठिकाणी माणुसपणाचा भाग दिसतो, तो त्यांच्या (अज्ञानी लोकांच्या) अज्ञानभ्रांतिमुळे होय.

अगा अवचिता कापुरा-। माजीं सांपडला हिरा। वरि पडिलिया नीरा। न निगे केवीं॥ ७८॥
तैसा मनुष्यलोकाआंतु। तो जरी जाहाला प्राकृतु। तऱ्ही प्रकृतिदोषाची मातु। नेणेचि कीं॥ ७९॥

अर्थ—बा अर्जुना! कापुरामध्ये अकस्मात् हिरा मिसळला, तरी त्यावर पाणी पडलें असतां त्या पाण्याने जसा त्याचा हिरेपणा जात नाही. ॥ ७८॥ त्याप्रमाणे माझ्या स्वरूपाला जाणणारा पुरुष, जरी या मनुष्यलोकांत सामान्य प्राकृतिक माणसासारखा दिसत असला, तरी त्याच्या ठिकाणी प्रकृतिरूप दोषांचा स्पर्शहि नसतो. ॥ ७९॥

गूढार्थदीपिका—तरी प्रकृतिदोषाची मातु। नेणेचि की—"अध्यस्तस्य कुतः सत्त्व असत्यस्य कुतो जनिः" (वि. चू. २६२) परब्रह्मावांचून माया व मायाकार्य किंवा अविद्या व अविद्येचें कार्य हे सर्व जीवाने भ्रांतीने कल्पिले असल्यामुळें त्यांचें अस्तित्वच नाही असे ज्ञानाने कळून येते; म्हणून ज्ञानानंतर त्यांचा संबंधच राहणें शक्य नाही.

तो आपभयेंचि सांडिजे पापीं। जैसा जळत चंदनु सर्पीं। तैसा मातें जाणे तो संकल्पीं। वर्जूनि घापे॥ ८०॥
तेंचि आमुतें कैसें जाणिजे। ऐसें कल्पी जरी चित्त तुझें। तरी मी ऐसा हे माझे। भाव ऐकें॥ ८१॥

अर्थ—भीतीनें आपण होऊनच पापें त्यांच्यापाशीं येत नाहीत. ज्याप्रमाणे सर्प जळत असलेल्या चंदनाच्या झाडाला सोडून देतात त्याप्रमणे माझ्या श्रीकृष्णस्वरूपाचें पूर्णब्रह्मत्व जो जाणतो त्याचा सर्व संकल्प संबंध सोडतात. ॥ ८०॥ तेच माझे जगात व्यापून असणे कसें जाणावे असे जर तुझ्या चित्तांत वाटत असेल, तर जगांत मी असा आहे व हे माझे विकार आहेत, ते सांगतों ऐक. ॥ ८१॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे कारणच कार्यरूपाने प्रगट होतें. त्याप्रमाणे मीच सर्व कार्यरूप ब्रह्मांडाचें कारण असल्यामुळे, ब्रह्मांडांतील निरनिराळ्या कार्यरूप पदार्थांच्या रूपाने मीच असतो असे येथे भगवान सांगत आहेत.

जे वेगळालिया भूतीं। सारिखे होऊनि प्रकृती। विखुरले आहेति त्रिजगतीं। आघवियें॥ ८२॥

अर्थ—हे विकार, निरनिराळ्या प्राण्यांमध्ये, त्यांच्या प्रकृतीसारखे होऊन संपूर्ण ब्रह्मांडांत पसरलेले आहेत. ॥ ८२॥

गूढार्थदीपिका—दोरीच सर्पस्वरूप भासत असते किंवा मातीचा कुंभ केला असतां मातीच त्या स्वरूपाची भासूं लागते, त्याप्रमाणे नामरूपाने नटलेल्या परब्रह्माचे ठिकाणी प्रत्येक नामरूपागणिक भिन्न वस्तूची कल्पना झाल्यामुळें, परब्रह्मच, निरनिराळ्या त्या त्या वस्तूच्या रूपाने भासूं लागतें.

बुद्धिर्ज्ञानमसम्मोहः क्षमा सत्यं दमः शमः। सुखं दुःखं भवोऽभावो भयं चाभयमेव च॥ ४॥
अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः। भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः॥ ५॥

अर्थ—बुद्धि, ज्ञान, असंमोह, क्षमा, सत्य, दम, शम, सुख, दुःख, भव, अभाव, भय, अभय, अहिंसा, समता, संतोष तप, दान, यश, अपयश हे सर्व निरनिराळे भाव (विकार किंवा कार्यरूप पदार्थ) सर्व भूतांचे ठिकाणीं असून ते सर्व माझ्यापासून प्रगट झाले आहेत. ॥ ४-५॥

ते प्रथम जाण बुद्धि। मग ज्ञान जें निरवधि। असंमोहन सहन सिद्धी। क्षमा सत्य॥ ८३॥

अर्थ—प्रथम भाव बुद्धि होय, हें लक्षांत ठेव. त्यानंतर जें अमर्याद ज्ञान हा दुसरा भाव होय. मोह नसणें, सर्व सहन करणें, क्षमा म्हणजे कोणी अपकार केल्यास त्याला प्रत्यपकार न करण्याची बुद्धि, सत्य म्हणजे जसें ऐकिलें किंवा पाहिले असेल तसेंच सांगणें. ॥ ८३ ॥

गूढार्थदीपिका—तेथ प्रथम जाण बुद्धि—बुद्धि हें तत्व मूळांत शुद्धसत्वात्मक असून अज्ञानामुळे तें त्रिगुणात्मक झालें आहे. तसेंच ज्ञान हें मूळांत अमर्याद ब्रह्मस्वरूप असून अज्ञानामुळे तें सावधि व त्रिगुणात्मक झालें आहे.

अज्ञान नाहीसे होऊन ती बुद्धि आपल्या मूळ शुद्धसात्विक स्वरूपाला प्राप्त झाली म्हणजे तिच्यांत निरवधि ज्ञान प्रगट होतें व असंमोह, क्षमा, सत्य, शम, दम, इत्यादि सात्विक भाव आपोआप व्यक्त होतात.

मग शम दम दोन्ही। सुखदुःख वर्तत जनीं। अर्जुना भावाभाव मानीं। भावाचिमाजीं ॥ ८४ ॥

अर्थ—दम म्हणजे-इंद्रियनिग्रह किंवा इंद्रियांचे शास्त्रानुसार नियमन, शम म्हणजे—मनोनिग्रह किंवा मनांतील विषयवासना क्षीण होणें हे दोन भाव, सुख म्हणजे मनाच्या अनुकूल असणें दुःख म्हणजे मनाच्या विरूद्ध असणें हे जे जगांत दिसून येते, त्याचप्रमाणे भावाभाव म्हणजे असणें व नसणें, हे दोन्ही भाव, भावामध्ये किंवा भावरूपच आहेत असें समज. ॥ ८४ ॥

गूढार्थदीपिका—भावाभाव मानी भावाचिमाजी—"घटस्येतरेतराभावो घटादन्यो दृष्टः..........तथैव भावात्मकताऽभावानाम्" (९ बृ. १-२-१ शं. भा.) ज्याप्रमाणे घटाचा अन्योन्याभाव पटरूप असा भावरूप असतो, त्याप्रमाणेच सर्व अभावरूपच असतात असें आचार्यांनी बृहदारण्य भाष्यांत म्हटलें आहे. पुनः भावरूप पदार्थ असला तरच त्याचे प्रकार असूं शकतात. जो भावरूप पदार्थ नाही त्याचे प्रकार राहूं शकत नाहीत. प्रागभाव, प्रध्वंसाभाव, अन्योन्याभाव, अत्यंताभाव सामायिकाभाव असे अभावाचे प्रकार सांगितले आहेत; म्हणून अभावरूपच आहे.

तसेंच प्रमाणाने जें जें कळतें तें तें भावरूपच असते. भावरूप पदार्थ जाणण्याकरितांच प्रमाणाची आवश्यकता आहे. वेदान्तशास्त्राने एक अनुपलब्धि प्रमाण मानिलें असून, त्या प्रमाणाने अभाव जाणला जातो असे वेदान्तांचें म्हणणें आहे. म्हणून अभावहि भावरूप मानला आहे. तेच माऊलींनी येथे "भावाभाव मानीं। भावाचिमाजी" या चरणांनीं प्रतिपादिलें आहे.

पैं भय आणि निर्भयता। अहिंसा आणि समता। तुष्टि तप पांडुसुता। ओळख तू ॥ ८५ ॥
अगा दान यश अपकीर्ति। हे जे भाव सर्वत्र दिसती। ते मजचि पासूनि होती। भूतांचिया ठायीं ॥ ८६ ॥
जैसीं भूतें आहाती सिनानीं। तैसेंचि हे वेगळाले मानी। एक उपजती माझ्या ज्ञानीं। एक नेणती मातें ॥ ८७ ॥

अर्थ—आणखी अर्जुना! भय व निर्भयता, अहिंसा म्हणजे कायावाचा मनाने कोणत्याहि प्राण्याला दुःख न देता सुखच देण्याची प्रवृत्ति आणि समता म्हणजे सर्व प्राणिमात्रांना एकसारखे पाहणें, तुष्टि म्हणजे संतोष, तपादिक हें माझें रूप आहे असें जाण. ॥ ८५ ॥ बा अर्जुना! दान, यश, अपकीर्ति, हे जे सर्व भाव जगांत दिसून येतात, ते सर्व प्राण्यांच्या ठिकाणीं माझ्यापासूनच प्रगट झाले आहेत. ॥ ८६ ॥ ज्याप्रमाणे निरनिराळे प्राणी आहेत, त्याप्रमाणेच हे निरनिराळे भाव आहेत असें जाण. कांही भाव माझ्या स्वरूपाचें ज्ञान करून देणारे आहेत व कांही माझ्या स्वरूपाच्या ज्ञानाला प्रतिबंध करणारे आहेत. ॥ ८७ ॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे संपूर्ण विकृतिरहित अशा पारदर्शक कांचेंतून कांचेमागील वस्तु जशी यथार्थ आहे, तशीच दिसून येते. विकृत कांचेंतून ती विपरीत दिसते आणि अपारदर्शक कांचेतून ती मुळींच दिसत नाही; त्याप्रमाणे परब्रह्मावर जीवाने कल्पिलेल्या त्रिगुणात्मक मायेच्या कार्यरूप अंतःकरणवृत्ती, शुद्ध सात्विक झाल्यास तो, असंमोह, क्षमा, शम, दम, समता, तुष्टि, तप, दान, इत्यादी सात्विक गुणाने युक्त होउन, त्याला निरवधि ज्ञानरूप अशा परब्रह्माचा साक्षात्कार होतो आणि जर ती अंतःकरणवृत्ती रजोगुण, तमोगुण यांच्या उत्कर्षाने युक्त असली, तर

परब्रह्माच्या प्रत्ययाचा लोप होऊन त्याला परब्रह्मच दुःख, भावाभाव, भय, अपकीर्ति इत्यादि विपरीत भावयुक्त जगद्रूपाने भासू लागते.

अगा प्रकाश आणि कडवसें। हें सूर्याचिस्तव जैसें। प्रकाश उदयीं दिसे। तम अस्तुसीं॥ ८८॥

अर्थ—प्रकाश व आंधार हे दोन्ही सूर्यामुळेंच होत असतात. सूर्योदय झाला असतां प्रकाश होतो व सूर्यास्त झाला की आंधार होतो. ॥ ८८ ॥

आणि माझें जे जाणणें नेणणें। तें तंव भूतांचिया दैवांचे करणें। म्हणोनि भूतीं भावाचे या होणें। विषम पडे॥ ८९॥

अर्थ—आणि मला जाणणें किंवा न जाणणें हे जीवांच्या पूर्वजन्मांतील पापपुण्यरूप कर्माप्रमाणें होत असते; म्हणून भूतांचे ठिकाणीं माझें हें कार्यरूपभावाने प्रगट होणें विषम म्हणजे माझ्या ज्ञानाला कोठें अनुकूल व कोठें प्रतिकूल असें झालें आहे. ॥ ८९ ॥

गूढार्थदीपिका—पापकर्माने देहासक्तिद्वारा अज्ञानच वाढीस लागतें व आत्मज्ञानाला प्रतिबंध होतो. पुण्यकर्माने देहासक्ति कमी होऊन तद्वारा अज्ञानहि क्षीण होते व सत्वगुण वाढून चैतन्यप्रकाशरूप आत्म्यांचें ज्ञान होण्यास मदत होते.

यापरी माझियां भावीं। हे जीवसृष्टि आहे आघवी। गुंतली असे जाणावी। पांडुकुमरा॥ ९०॥

आतां इये जे सृष्टीचे पालक। जयां आधीन वर्तती लोक। ते अकरा भाव आणिक। सांगेन तुज॥ ९१॥

अर्थ—याप्रमाने माझ्यापासून उत्पन्न झालेल्या कार्यरूप भावांचे ठिकाणी सर्व जीव गुंतून पडले आहेत, असें अर्जुना! जाण. ॥ ९० ॥ आतां या सृष्टीने पालक म्हणून परमेश्वराने नेमलेले व ज्यांच्या आज्ञेनुसार सर्व लोक वागतात ते अकरा भाव आणखी तुला सांगतों. ॥ ९१ ॥

महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा। मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः॥ ६॥

अर्थ—माझ्या ठिकाणी ज्यांचें चित्त आहे व मी मनाने उत्पन्न केलें म्हणून माझ्या ईश्वरी सामर्थ्याने जे युक्त आहेत, असे पूर्वी होऊन गेलेले जे आधिकारिक सात महर्षि व चार मनु यांच्यापासून सर्व स्वर्गादि लोक व स्थावर जंगमात्मक प्रजा उत्पन्न झाली. ॥ ६ ॥

तरी आघवांचि गुणीं वृद्ध। जे महर्षीमाजि प्रबुद्ध। कश्यपादि प्रसिद्ध। सप्तऋषी॥ ९२॥

अर्थ—तरी ज्ञानतपादि सर्व गुणांनी श्रेष्ठ व सर्व महर्षिमध्यें ज्ञाते असे जे कश्यपादि प्रसिद्ध सप्तर्षि आहेत. ॥ ९२ ॥

गूढार्थदीपिका—पूर्वी सगुण भगवंताच्या भक्तीने संपन्न असलेले जे जीव, त्यांना भगवान उत्तरसृष्टींतील आधिकारि म्हणून नियुक्त करीत असतो व त्यांचे ठिकाणी आपलें ज्ञानऐश्वर्यादिसामर्थ्य देऊन, त्यांच्याकडून सृष्ट्युत्पत्त्यादि कार्य करवितो. ज्याप्रमाणे राजा, मंत्रि इत्यादि संज्ञा अधिकारपदाच्या असतात, त्याप्रमाणे कश्यपादि व मन्वादि संज्ञा देखील भगवंताच्या सृष्टींतील निरनिराळ्या अधिकारपदाच्या आहेत. आपल्या पुण्यकर्माने त्या पदावर येणाऱ्या व्यक्तींना शास्त्रांतून आधिकारिक ही संज्ञा दिली आहे, हें मागें सांगितलेच आहे.

आणिकही सांगिजतील। जे कां चौदा आंतुल मुद्दल। स्वायंभू मुख्य वडील। चारी मनु॥ ९३॥
ऐसे हे अकरा। माझां मनीं जाहाले धनुर्धरा। सृष्टीचिया व्यापारा-। लागोनियां॥ ९४॥
जैं लोकांची व्यवस्था न पडे। जैं या त्रिभुवनाचें कांहीं न मांडे। तैं महाभूतांचें दळवाडें। अचुंबित असे॥ ९५॥
तैंचि जे जाहाले। मग इहीं लोक केले। तेथ अध्यक्ष रचूनि ठेविले। इहीं जन॥ ९६॥
म्हणोनि अकरा हे राजा। मग येर जग यांचिया प्रजा। ऐसा विश्व विस्तारु हा माझा। ऐसेंचि जाण॥ ९७॥
पाहें पां आरंभीं बीज एकलें। मग तेचि विरूढलिया बूड जाहालें। बुडीं कोंभ निघालें। खांदियांचे॥ ९८॥
खांदियांपासूनि अनेका। फुटलिया नाना शाखा। शाखांस्तव देखा। पल्लव पानें॥ ९९॥

पल्लवीं फूल फळ। एवं वृक्षत्व जाहालें सकळ। तें निर्धारितां केवळ। बीजचि आघवे॥ १००॥
तैसें मी एकचि पहिलें। मग मी तेंचि मनातें व्यालें। तेथ सप्तऋषी जाहाले। आणि चारी मनु॥ १०१॥
इहीं लोकपाळ केले। लोकपाळीं विविध लोक स्त्रजिले। लोकांपासूनि निपजलें। प्रजाजात॥ १०२॥
ऐसेनि हें विश्व येथें। मीचि विस्तारिलोंसे निरुतें। परी भावाचेनि हातें। मानें जया॥ १०३॥

अर्थ—आणखी सांगतों ऐक. मूळांत असलेल्या चौदा मनूमध्ये पहिले स्वायंभुव वगैरे जे चार मुख्य मनु आहेत. ॥ ९३ ॥ अर्जुना! असे हे अकराजण पुढील सृष्टीचा उत्पत्त्यादि व्यापार करण्याकरीतां माझ्या मनापासून उत्पन्न झाले. ॥ ९४॥ जेव्हा त्रिभुवनाची मांडणी व लोकांची उत्पत्ति होत नाही आणि पंचभूतांचा समुदाय क्रियारहित असतो. ॥ ९५ ॥ तेव्हा हे अकराजण उत्पन्न झाले व त्यांनी मग हे स्वर्गादि लोक निर्माण केले व तेथे पूर्वपुण्यानुसार अधिकार प्राप्त झालेले अध्यक्ष नेमले व त्यांनी पुढे प्रजा निर्माण केली. ॥ ९६ ॥ म्हणून ह्या अकराजणांचा समुदाय, राजा असून बाकींचे जग त्यांची प्रजा होय, याप्रमाणे हा संपूर्ण विश्वाचा विस्तार माझाच आहे, असें समज. ॥ ९७ ॥ हें पहा, अर्जुना! पहिलें एक बीजच असतें, मग तेंच वाढलें की बूड होतें, पुढे त्या बुडाला फांद्याचे कोंभ निघतात. ॥ ९८ ॥ त्या फांद्यापासून अनेक शाखा फुटतात व त्या शाखांना कोंवळीं करडीं पानें येतात. ॥ ९९ ॥ पाना नंतर फुलें, फळें येतात. याप्रमाणे संपूर्ण झाडाचा विस्तार होतो. या सर्वांचा विचार केला असतां, ते सर्व एक बीजच होय. ॥ १०० ॥ याप्रमाणे या सृष्टीच्या पूर्वी मीच एक असतो. मग त्या माझ्यापासून मनाची उत्पत्ति होते व त्या मनापासून सप्तर्षि व चार मनु उत्पन्न होतात. ॥ १०१ ॥ मग ते लोकपाळांना उत्पन्न करतात लोकपाळ तेथील जनांना उत्पन्न करतात. अशा प्रकारें लोकांपासून अनेक प्रकारची प्रजा निर्माण होते. ॥ १०२ ॥ याप्रमाणे येथें हें जग म्हणजे मीच खरोखर विस्तारलों आहे, पण हें, माझ्या वचनावर दृढ विश्वास असल्यामुळे ज्याला पटेल, त्यालाच कळेल. ॥ १०३ ॥

गूढार्थदीपिका—मीचि विस्तारलोंसे निरुते—परब्रह्म सच्चिदानंद स्वरूप आहे असे शास्त्रांत सांगितलें आहे आणि जगत्, जड विनाशी भासतें. पण सच्चिदानंद परब्रह्मापासून जड, विनाशी सृष्टि उत्पन्न झाली असें जें शास्त्रांतून सांगितलें आहे, तें खरोखर, तशीच जड, विनाशी सृष्टि उत्पन्न झाली असे सांगण्याकरितां नसून परब्रह्मापासून झालेली सृष्टि परब्रह्मस्वरूपच आहे, ती जड विनाशी नाही, हें सिद्ध करण्याकरितांच सांगितलें आहे. याचें आम्ही मागें सातव्या अध्यायांत निरूपण केलेंच आहे आणि हेंच येथे माऊलींनी ''मीचि विस्तारलोंसे निरुते'' या चरणाने सांगितले आहे.

भावाचेनि हातें माने जया—परब्रह्माच्या सच्चिदानंदलक्षणाहून भिन्न अशा जड, विनाशी लक्षणाने भासणारें जगत् जोपर्यंत सत्य आहे, असें वाटतें, तोपर्यंत सच्चिदानंद परब्रह्मच जगद्रूपाने नटलें आहे, म्हणून जगत्हि सच्चिदानंदस्वरूप आहे, जड विनाशी नाही, असा अनुभव येऊं शकत नाही; तसा अनुभव येण्यापूर्वी, परमात्मा किंवा सद्गुरु जे सांगतील त्यावर दृढ विश्वासच ठेवला पाहिजे, असा भाव.

एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः। सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशयः॥ ७॥

अर्थ—हा माझा जगरूपाने विस्तार व जगद्रूपाशीं ऐक्य जो कोणी यथार्थ दृष्टीने जाणतो, तो माझ्याशीं अचल असें ऐक्य पावतो, यांत संशय नाही. ॥ ७ ॥

यालागीं सुभद्रापती। हे भाव इया माझिया विभूती। आणि यांचिया व्याप्तीं। व्यापिलें विश्व॥ १०४॥
म्हणोनि गा यापरी। ब्रह्मादिपिपीलिकावरी। मीवांचूनि दुसरी। गोठी नाहीं॥ १०५॥
ऐसें जाणे जो साचें। तया चेइरें जाहालें ज्ञानाचें। म्हणोनि उत्तमाधम भेदाचें। दुःस्वप्न न देखे॥ १०६॥

अर्थ—म्हणून सुभद्रापते अर्जुना! हे सर्व अस्तित्वांत आलेले कार्यपदार्थ माझ्या विभूतिं आहेत व यांच्या योगानेच सर्व जग व्यापिलें आहे. ॥ १०४॥ म्हणून, बा अर्जुना! याप्रमाणे ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत माझ्यावांचून दुसऱ्या वस्तूची गोष्ट देखील नाही. ॥ १०५॥ जड-विनाशीभाव जाऊन ज्याला सर्व सच्चिदानंदस्वरूप दिसतें त्याला

शुद्ध ब्रह्मज्ञान झालें असे समज; म्हणून तो उत्तम, मध्यम, कनिष्ठ या भावांचें स्वप्न पाहत नाही. ॥ १०६ ॥

गूढार्थदीपिका—अस्फुट परब्रह्माचे ठिकाणी द्वैताचा प्रत्यय जीवकल्पित आहे, म्हणूनच तो, परब्रह्माच्या यथार्थ ज्ञानाने समूळ नाहीसा होतो.

मी माझिया विभूती। विभूतीं अधिष्ठिलिया व्यक्ती। हें आघवें योगप्रतीती। एकचि मानी॥ १०७॥

म्हणोनि निःशंकें येणें महायोगें। मज मीनला मनाचेनि आंगें। एथ संशय करणें न लगे। तो त्रिशुद्धी जाहला॥ १०८॥

कां जे ऐसें किरीटी। मातें भजे जो अभेदा दिठी। तयाचिये भजनाचिये नाटीं। सूती मज॥ १०९॥

अर्थ—मी, माझ्या विभूती व त्या विभूतीला अधिष्ठानभूत व्यक्ति ह्या सर्वांचे माझ्याशीं ऐक्य आहे, या अनुभवाने तो सर्व मद्रूपच मानतो. ॥ १०७ ॥ म्हणून (ज्याने भिन्न वस्तुत्वाची शंका निःशेष नाहीशी होते) अशा या अद्वैतदृष्टिरूप श्रेष्ठ योगाने जो माझ्याशीं मनाने ऐक्य पावला तो मद्रूप होतो, हे मी त्रिवार प्रतिज्ञा करून सांगतों. येथें संशय घेण्याचें कारणच नाही. ॥ १०८ ॥ कारण अर्जुना! जो अभेददृष्टीने माझें याप्रमाणे भजन करतो, त्या त्याच्या भजनाचे व्यवहारात एक मलाच घेतलेंले असतें. ॥ १०९ ॥

गूढार्थदीपिका—ज्ञानाने भगवंताशीं ऐक्य झाल्यावरहि जी भगवंताची भक्ति केली जाते, त्यांत भक्त आपली यत्किंचित् निराळी स्थिति न वागवितां, भगवानच आपलें स्वाभाविक प्रेम करण्याकरितां भक्त व भगवान या रूपाने नटला आहे, असे पूर्णपणें जाणत असतो, असा अर्थ.

म्हणऊनि अभेदें जो भक्तियोगु। तेथ शंका नाहीं नये खंगु। करितां ठेला तरी चांगु। तें सांगितलें षष्ठीं॥ ११०॥

अर्थ—म्हणून अभेदाने होणारा जो भक्तियोग, त्यांत पूर्णब्रह्मस्थिति प्राप्त होईल किंवा नाही, ही शंका घेण्याचें कारणच राहत नाही व तो खंडितहि होत नाही आणि खंड पडला तरी तें कल्याणाचें असतें; कारण तो (भक्तियोग) भगवंताच्या कृपेने पुनः सुरू होतो, हें सहाव्या अध्यायांत सांगितलेंच आहे. ॥ ११० ॥

गूढार्थदीपिका—भक्ति करीत असतांना भगवान व भक्त, असा भेद पाहणाऱ्याला दिसत असला, तरी भक्ताला भेदाची जाणीव होत नाही किंबहुना जितका जितका भक्तीचा व्यवहार होतो, तितका तितका भेदाचा भास नाहीसा होऊन, अभेदच दृढ होतो, हेच माऊलींनी "भेद तंव तंव दूण। अभेदासी" या ओवीने अमृतानुभवांत प्रतिपादिलें आहे.

तोचि अभेदु कैसा। हें जाणावया मानसा। साद जाली तरी परियेसा। बोलिजेल॥ १११॥

अर्थ—ज्या अभेदाने भक्ति केली जाते म्हणून मी सांगितले, तो अभेद कसा आहे हे जाणावें असा जर तुझ्या मनांत ध्वनि उमटला असेल, तर सांगतों, ऐक. ॥ १११ ॥

अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते। इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः॥ ८॥

अर्थ—मी सर्व जगाचें कारण असून माझ्यापासूनच सर्व म्हणजे जगताची स्थिति, नाश, कर्म, त्याचें फळ, भोग इत्यादि, यांची प्रवृत्ति होते, असे जाणून ज्ञानीपुरुष अत्यंत श्रद्धेने माझें भजन करतात. ॥ ८ ॥

तरी मीचि एक सर्वा। या जगा जन्म पांडवा। आणि मजचिपासूनि आघवा। निर्वाहो यांचा॥ ११२॥

अर्थ—तरी या सर्व जगाला अर्जुना! मीच एक जन्म देणारा आहे आणि या सर्व जगाची स्थितिहि मजपासूनच होते. ॥ ११२ ॥

गूढार्थदीपिका—"ज्यापासून सर्व जगताची स्थिति, उत्पत्ति, लय होतात, तो मायानियंता, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् परमात्मा मीच आहे" असे सांगून भगवंताचे सगुण स्वरूप पूर्णब्रह्माहून यत्किंचित्हि न्यून नाही व तें पूर्णब्रह्म किंवा कारणब्रह्मच आहे असे भगवंतांनी वरील श्लोकांत व माऊलींनी या ओवींतून स्पष्ट सांगितलें आहे.

"**जगद्व्यापारवर्जं प्रकरणादसंनिहितत्वाच्च**" (ब्र. सू. ४-४-१७)

या सूत्रांत परमेश्वराशीं मनाने ऐक्य पावून मुक्त झालेल्या ज्ञानी पुरुषांना जगताची उत्पत्ति, स्थिति लयादि व्यापार करण्याचे ऐश्वर्य प्राप्त होत नाही, तें ऐश्वर्य, एका पूर्ण परब्रह्माचे ठिकाणीच असते, असा वेदान्तसिद्धान्त, भगवान

व्यासांनी मांडला आहे आणि या ठिकाणी भगवान श्रीकृष्णाने माझ्यापासूनच जगताचे उत्पत्तिस्थितिलय होतात असे सांगितलें असल्यामुळे, भगवान म्हणजे मुक्त जीव नव्हे, पूर्ण परमात्माच होय हें उघड होतें.

चवथ्या अध्यायांतील पांचव्या श्लोकावर टीका करतांना श्रीमच्छंकाराचार्यांनीहि अवतारांचे ठिकाणी परमेश्वराचे अमर्यादसर्वज्ञता अमर्यादशक्तिमत्ता इत्यादि गुण नाहीसे होतात—म्हणजे अवतार हे आपल्या परमेश्वरापासून च्युत होतात—असे समजणाऱ्यांची 'मूर्ख' म्हणून निंदा करून, अवतार हे पूर्णब्रह्मच असतात, हें स्पष्ट केलें आहे.

कल्लोळमाळा अनेगा। जन्म जळींचि पैं गा। आणि तयां जळचि आश्रयो तरंगा। जीवनही जळ॥ १३॥
ऐसें आघवांचि ठायीं। तयां जळचि जेविं पाहीं। तैसा मीवांचूनि नाहीं। विश्वीं इये॥ १४॥

अर्थ—लाटांच्या माळा म्हणजे लाटांपाठीं लाटा, अशा अनेक लाटा उठल्या असल्या, तरी त्या सर्वांचा जन्म एका पाण्यापासूनच होतो. तें पाणीच त्यांना आधार असते व त्यांतहि केवळ पाणीच असतें. ॥ ११३ ॥ ज्याप्रमाणे त्या लाटांच्या सर्व ठिकाणी एक पाणीच असतें, दुसरें कांहीच नसतें, त्याप्रमाणे या जगामध्ये माझ्यावांचून दुसरें लवमात्र कांही नाही. संपूर्ण मीच आहे. ॥ ११४ ॥

गूढार्थदीपिका—या जगांत वस्तुरूपाने व नामरूपाने जेंवढें कांही आहेसें वाटतें तें संपूर्ण, एका सच्चिदानंद परमेश्वरावाचून दुसरे यत्किंचित्हि नाही; म्हणून खरोखर पाहतां मूळांत विश्व पूर्ण सच्चिदानंदस्वरूपच आहे, हेंच माऊलींनी या दोन ओव्यांतून दाखविलें आहे.

ऐसिया व्यापका मातें। मानूनि जे भजती भल्तेथें। परि साचोकारें उदितें। प्रेमभावें॥ १५॥
देश काळ वर्तमान। आघवें मजसीं करूनि अभिन्न। जैसा वायु होऊनि गगन। गगनींचि विचरे॥ १६॥
ऐसेनि जे निजज्ञानीं। खेळत सुखें त्रिभुवनीं। जगद्रूपा मनीं। सांठऊनि मातें॥ १७॥

अर्थ—एकदेशीय सगुण साकार स्वरूपाने मी दिसत असलों तरी आतां सांगितल्याप्रमाणे मीच व्यापकहि आहे असें जाणून जे प्रगट झालेल्या निष्कपट प्रेमाने माझें कोठेहि भजन करतात. ॥ ११५ ॥ ज्याप्रमाणे वायु आकाशाशीं एकरूप होऊन आकाशांतच संचार करतो, त्याप्रमाणे देश, काळ व वर्तमान (घडणाऱ्या गोष्टी) हे सर्व माझ्याशीं अभिन्न करून म्हणजे भगवत्स्वरूपच आहेत असे समजून. ॥ ११६ ॥ याप्रमाणे आत्मस्वरूपालाहि जाणून व जगद्रूप असा जो मी. त्या मला अंत:करणांत सांठवून जे आनंदाने त्रिभुवनांत भक्तिप्रेमलीला करतात. ॥ ११७ ॥

गूढार्थदीपिका—ऐसेनि जे निजज्ञानी—व्यापक परमात्मा माझा आत्माच होय असे आत्मैक्यज्ञान ज्यांना झालें ते निजज्ञानी होत. असे व्यापकज्ञान ज्यांना झालें आहे असे ज्ञानी देखील ज्ञानानंतर सगुण भगवंताची भक्ति करूं शकतात, हें माऊलींनी ''ऐसेनि जें निजज्ञानी'' या चरणाने दाखविलें आहे.

जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत। हा भक्तियोगु निश्चित। जाण माझा॥ १८॥

अर्थ—जो जो प्राणि समोर येईल तो तो प्राणि साक्षात् भगवंत आहे, असें मानणें हाच, अर्जुना! माझा भक्तियोग होय असे निश्चित् जाण. ॥ ११८ ॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञानानंतर होणाऱ्या भक्तीचें स्वरूप येथें वर्णन केलें आहे.

भक्ति ही पूर्ण प्रेमरूप असून, त्या पूर्ण प्रेमरूप भक्तीच्या प्राप्तिकरितांच भक्ति केली जाते; म्हणून तीहि पूर्ण अशा भगवंताचीच होऊं शकते, अपूर्ण जीवाची होऊं शकत नाही, असा ब्रह्मसूत्र प्रथमाध्याय द्वितीय पदांतील 'सर्वत्र प्रसिद्ध्यधिकरणम्' यांत सिद्धान्त केला आहे.

भेटेल त्या प्राण्याला भगवंत मानणें म्हणजे ज्या नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, सर्वज्ञ, सर्वशक्तिमत्वादि गुणांनी भगवान अखंड युक्त असतो, तसाच तोहि त्या संपूर्ण गुणांनी पूर्णपणे अखंड युक्त आहे असें मानणें होय.

असे न मानतां कोणत्याहि गुणाच्या दृष्टीने त्याला अपूर्ण मानून, त्याची सेवा केल्यास ती सेवा भगवद्भक्ति होत नाही, ती दया होते व त्याने दयेचें फळ मिळते, भक्तीचें फळ मिळत नाही.

मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम्। कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च॥ ९॥

अर्थ—एक माझेच ठिकाणी चित्त व प्राण ठेवून परस्पर माझा बोध करून देण्यांत व माझे गुण वर्णन करण्यांतच जे सदा संतोष मानतात व रममाण होतात. ॥ ९ ॥

चित्तें मीचि जाहाले। मियेंचि प्राणें धालें। जीवों मरों विसरले। बोधाचिया भुली॥ ११९॥

अर्थ—जे चित्ताने मद्रूप झालें, जे मलाच आपला प्राण समजून तृप्त असतात, जे माझें सगुणस्वरूपहि पूर्ण ब्रह्म आहे या ज्ञानांत तल्लीन राहत असल्यामुळे जन्ममरणांचाहि त्यांना विसर पडतो. ॥ ११९ ॥

गूढार्थदीपिका—चित्तें मीचि जाहालें—''ज्याचें जया ध्यान। तेचि होय त्याचे मन'' (तु. गा. ३७२१) या तुकाराम महाराजांच्या वचनाप्रमाणे ''चित्तें मीचि'' म्हणजे भक्ताच्या अंत:करणांत एक सगुण भगवंताचेंच ध्यान असतें दुसरे कशाचेंहि नसतें.

''**मियेंचि प्राणे धालें**'' म्हणजे मनुष्य जसा प्राणाने जगतो तसा भक्त केवळ भगवंतामुळेच जगतो.

''**जीवों मरों विसरलें**'' या चरणाने भक्तांना देहासह जन्ममरणाचा विसर पडतो असे सांगितलें आहे.

''**बोधाचिया भूली**'' म्हणजे भगवंताचें सगुणस्वरूपहि पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे या ज्ञानांत निमग्न झाल्यामुळे.

निर्गुणस्वरूप नित्यसाक्षी असल्यामुळे, चित्ताने आकलन करण्याजोगे नाही, तेथे प्रेम करतां येत नाही व त्या ज्ञानाने देहादिकांचा विसरहि पडत नाही. म्हणून येथील ''बोध'' या शब्दाचा, ''सगुणस्वरूपाच्या पूर्णब्रह्मत्वाचा बोध'' असा अर्थ केला पाहिजे, ''निर्गुणस्वरूपाचा बोध'' असा अर्थ करतां येत नाही.

मग तया बोधाचेनि माजें। नाचती संवादसुखाचीं भोजें। आतां एकमेकां घेपे दीजे। बोधचि वरी॥ १२०॥

अर्थ—मग माझ्या स्वरूपाच्या ज्ञानाने उन्मत्त होऊन संवादाने उत्पन्न होणाऱ्या सुखाच्या मूर्ती होऊन नाचतात आणि परस्पर एकमेकांस माझ्या स्वरूपाचाच बोध घेतात व देतात. ॥ १२० ॥

गूढार्थदीपिका—तया बोधाचेनि माजें—मत्तपणा म्हणजे न जिंकला जाणारा परमात्मा जिंकला गेला असे वाटणें किंवा परमात्मा अधीन झाला असे वाटण्यांत निमग्न होणे.

केवळ निर्गुणज्ञान्यांना जाणीवेचा अहंकार उत्पन्न न होऊं देतां, केवळ ज्ञानस्थितींत मत्त राहतां येत नाही व निर्गुण प्राप्तीने मत्त झाल्यास अहंकार वाढून निर्गुणप्रत्ययाचा लोप होतो.

आवडता अलंकार सोन्याचा आहे असे कळून आल्याने, जसें त्यावरील प्रेम वाढतें, त्याप्रमाणे परमेश्वराचें आवडलेलें सगुणस्वरूप पूर्ण ब्रह्म आहे हें कळून आल्याने, भक्ताचें प्रेम वाढून, तो त्या प्रेमाने वेडा होतो—म्हणजे त्याला त्यापुढे परमेश्वराचे निर्गुणस्वरूपहि गोड लागत नाही.

भगवान नारदांनीहि ''यज्ज्ञात्वा मत्तो भवति स्तब्धो भवति'' असे भक्तिसूत्रांत भक्ताचें वर्णन केलें आहे.

नाचती संवादसुखाची भोजें—ज्ञानीभक्त, सगुणभगवंताच्या निरुपाधिक पूर्ण ब्रह्मत्वाची व त्यांच्या प्रेमाची अखंड चर्चा करीत असल्यामुळें त्यांच्या पूर्वदेहाची पांचभौतिकता नाहीशी होऊन, ते ब्रह्मसुखाच्या मूर्ति बनतात व भगवत्प्रेमाने नाचूं लागतात.

एवंव्रतः स्वप्रियनामकीर्त्या जातानुरागो द्रुतचित्तउच्चैः। हसत्यथो रोदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः॥

(भाग. स्कं. ११-२-४०)

असें व्रत धारण करून भक्त आपल्या प्रिय भगवंताच्या नामसंकीर्तनाने उत्पन्न झालेल्या प्रेमाने आर्द्रचित्त होऊन प्रेमवश असा मोठ्याने हसतो, रडतो, आक्रोश करू लागतो व गायन करूं लागतो.

जो मोलें मदिरा खाये। तो मदिरानंदे नाचे गाये। जेणे ब्रह्मानंदु सेविलाहे। तो केविं राहे आवरला॥

(ए. भा. अ. २-५७७)

असे भागवतांत व त्यावरील टीकेंत श्रीएकनाथ महाराजहि म्हणतात.

एकमेकां घेपे दीजे। बोधचि वरी—असे झाले असतां त्या भगवत्प्रेमाने ते एकमेकांना सगुण स्वरूपाचा बोधच घेतात व देतात.

जैसीं जवळिकेंचीं सरोवरें। उचंबळलिया कालवती परस्परें। मग तरंगासि धवळारें। तरंगचि होती॥ १२१॥
तैसी येरयेरांचिये मिळणी। पडत आनंदकल्लोळांची वेणी। तेथ बोध बोधाचीं लेणीं। बोधेंचि मिरवी॥ १२२॥

अर्थ—ज्याप्रमाणे अत्यंत जवळ असलेल्या दोन सरोवरांतील पाणी उचंबळून आलें असतां दोन्ही सरोवरें परस्परांत मिसळतात व तरंगच तरंगाची घरें होतात.॥ १२१॥ त्याप्रमाणे ज्ञानीभक्त, परस्परांना भेटले असतां ब्रह्मानंदाचे कल्लोळ उठून त्यांची वेणीच गुंतली जाते आणि तेथे बोधबोधांचे अलंकार बोधांनीच घातले जातात.॥ १२२॥

गूढार्थदीपिका—तैसी येरयेरांचियें मिळणीं। पडत आनंदकल्लोळांची वेणी—'बोध' म्हणजे ज्ञान व 'आनंद' म्हणजे सुख. हे दोन्ही ब्रह्माचेच धर्म असून ते परस्परांना सोडून नसतात, असे जरी वेदान्तांत सांगितलें आहे, तरीपण जीवाच्या वृत्तिउपाधीने ते अंशरूपाने परस्परांपासून भिन्न इव झाल्यामुळे, ज्ञानांशाच्या अनुभवाबरोबर आनंदाचा अनुभव येतोच असे नाही, असे विद्यारण्यांनी पंचदशीच्या आत्मानंदनामक बाराव्या प्रकरणांत ७३-७४ श्लोकांनी सांगितले आहे. आणि योगानंदरूप अकराव्या प्रकरणांतील ९८ श्लोकामध्ये ज्ञानाहंकार संपूर्ण विसरल्याशिवाय आनंद प्रगट होत नाही, असे सांगून, आत्मानंदरूप बाराव्या प्रकरणांत जशी जशी प्रेमाची वृद्धि होते, तशी तशी आनंदाची व सुखाची वृद्धि होते असे ७२ व्या श्लोकाने सांगितलें आहे.

या सर्वांचा विचार केला असतां, ज्ञानस्थितींत जी ऐक्याची जाणीव राहत असते तिच्यामुळे केवळ निर्गुणज्ञान्यांना मुख्य ब्रह्मानंद नसतो, ब्रह्मानंदाचा वासनानंद असतो, असे विद्यारण्यस्वामींनी पंचदशीच्या योगानंद प्रकरणांतील ९६-९७ श्लोकांनी सांगितलें आहे, पण निर्गुणस्वरूपाचे ज्ञानांत निपुण असून सगुण भगवंताचें प्रेम असलेल्या भक्तांचा काल, सदा भगवंताच्या स्वरूपचर्चेत व गुणकीर्तनांतच जात असल्यांमुळे, त्यांना जाणीवाहंकार स्फुरतच नाही, म्हणून ते अखंड ब्रह्मानंदांत निमग्न असतात.

बोधबोधांची लेणीं। बोधेचि मिरवी—अशा भक्ताचे ठिकाणी ब्रह्मबोध नसतो असे नाही, पण तो असतो तरी ज्ञान्याप्रमाणे ते बोधाहंकार वागवित नसून, बोधच बोधाला वागवितो म्हणजे ज्ञान्याचे ठिकाणीं बोध, जाणीवेच्या अहंकारासहित असतो व भक्तांचे ठिकाणी बोध, जाणिवेरहित चिन्मात्र असतो असा अर्थ.

जैसें सूर्यें सूर्यातें वोवाळिलें। कीं चंद्रें चंद्रम्या क्षेम दिधलें। नातरी सरिसेनि पाडें मीनले। दोनी ओघ॥ १२३॥
तैसें प्रयाग होत सामरस्याचें। वरी वोसाण तरत सात्त्विकाचें। ते संवादचतुष्पथींचे। गणेश जाहालें॥ १२४॥

अर्थ—ज्याप्रमाणे एका सूर्याने दुसऱ्या सूर्याला ओवाळावें किंवा एका चंद्राने दुसऱ्या चंद्राला आलिंगन द्यावे अथवा दोन ओघ सारखे एकमेकांत मिसळावे.॥ १२३॥ त्याप्रमाणे दोन भक्तांच्यां प्रेमसंवादांत दोन प्रेमळ भक्तांचे प्रेम व परमेश्वररूप भगवान या तिघांच्या प्रेमाचा संगम होऊन ते एक समरस प्रेमाचे प्रयाग झाले व त्या प्रेमाच्या संगमावर अष्टसात्विकभावरूपी जाणीवेचा केरकचरा वर तरंगत राहून, भक्त त्या संवादरूपी चव्हाट्यावर गणेश होऊन राहतात.॥ १२४॥

गूढार्थदीपिका—संवादचतुष्पथींचे। गणेश जाहाले-संवाद म्हणजे निरनिराळ्या शास्त्रांतील परस्पर विरोधी सिद्धान्ताची एकवाक्यतारूप चर्चा.

चतुष्पथ म्हणजे परस्पर विरोधी दिशेकडून आलेले चार रस्ते जेथे एकत्र मिळतात तें स्थान.

गणेश म्हणजे शब्दाचा जो विवक्षित अर्थ तो जाणणारी व त्याच अर्थाचा दुसऱ्याच्या बुद्धींत प्रकाश करणारी देवता.

निरनिराळ्या शास्त्रांतील, वर वर पाहतां विरोधी दिसणाऱ्या सिद्धान्तांची एकवाक्यता माझ्या स्वरूपाच्या ठिकाणी आहे असे जाणून व तेथे स्थिर राहून म्हणजे पूर्ण अद्वैतरूप होऊन, ज्ञानीभक्त चर्चा करीत असतात व तेच दुसऱ्यालाहि तशीच एकवाक्यता करणारी बुद्धि देऊं शकतात; म्हणून त्यांना ''संवाद चतुष्पथींचे गणेश'' म्हटलें आहे.

यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ। तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः॥ (श्वे. उ. ६-२३)

ज्यांची भगवंताचे ठिकाणी किंवा श्रीगुरुचे ठिकाणी परम प्रेमरूप भक्ति आहे, अशा ज्ञानीभक्तालाच शास्त्रांत सांगितलेल्या शब्दांचे अर्थ समजतात असे श्वेताश्वतरश्रुतींत सांगितले आहे.

तेव्हां तया महासुखाचेनि भरें। धांवोनि देहाचिये गावांबाहेरें। मिया धाले तेणें उद्गारें। लागती गाजों॥ १२५॥

अर्थ—तेव्हा त्या भगवत्प्रेमाच्या अत्यंत सुखामुळे ते देहगांवाच्या बाहेर धांवतात आणि माझ्या प्रेमाने आकंठ तृप्त होऊन तृप्तीमुळे येणाऱ्या ढेंकराने गाजूं लागतात.॥ १२५॥

गूढार्थदीपिका—तेव्हा तया महासुखाचेनि भरें। धांवोनि देहाचियें गांवाबाहेरें—या चरणांनी भगवद्भक्तांना देहाचें भान, भगवंताच्या परम प्रेमामुळे राहत नाही, हें सुचविलें आहे.

मियां धाले तेणें उद्गारें। लागती गाजों—"धालेपणाचे ढेकर। जेविं देती जेवणार। तेविं आनंदाचे उद्गार। अनिर्वाच्य वदवी"॥ ६२॥ (शुकाष्टक)

भोजन करून तृप्त झालेला पुरुष जसे तृप्तीचे ढेंकर देतो, त्याप्रमाणे भगवंताच्या परमप्रेमाने ते परमसुखरूप झाले, हे व्यक्त करणारे अखंड भगवन्नामस्मरणरूप व अखंड गुणवर्णनरूप भक्तिमार्गाचे ढेंकर, ते देत असतात.

पैं गुरुशिष्यांचिया एकांती। जे अक्षरा एकाचि वदंती। ते मेघाचियापरी त्रिजगतीं। गर्जती सैंघ॥ १२६॥

अर्थ—तसेच गुरूशिष्याच्या एकान्तात, ज्या एका अविनाशी वस्तुविषयींच्या रहस्याची चर्चा होते, ती चर्चा ते भक्त मेघगर्जनेप्रमाणे त्रैलोक्यांत गर्जून सांगतात.॥ १२६॥

गूढार्थदीपिका—परब्रह्मस्वरूपाची विशेष चर्चा गुरूंनी शिष्याशीं एकान्तांत करावी, लोकान्तात करूं नये, असा निर्बंध आहे असे बृहदारण्यकोपनिषदांत (३-२-१३) व त्यावरील आचार्यभाष्यांत सांगितलें आहे.

जैसी कमळकळिका जालेपणें। हृदयींचिया मकरंदातें राखों नेणे। दे राया रंका पारणें। आमोदाचें॥ १२७॥
तैसेंचि मातें विश्वीं कथित। कथितेनि तोषें कथूं विसरत। मग तया विसरामाजीं विरत। आंगें जीवें॥ १२८॥

अर्थ—ज्याप्रमाणे कमळाची कळी उमलून विकसित झाली असतां, आपल्या ठिकाणचा सुवास ती गुप्त ठेऊं शकत नाही आणि राजापासून रंकापर्यंत ती आपल्या सुवासाचें भोजन घालते.॥ १२७॥ त्याप्रमाणेच ते ज्ञानीभक्त, सर्व विश्वांत मोकळ्या मनाने, माझ्या गुणादि वर्णनाचे द्वारा, माझ्या सगुण स्वरूपाचे जगांत निरूपण करतात. निरूपण करतां करतां प्रेम दाटून येऊन, ते निरूपण करणेंहि विसरतात व त्यांत जीवभाव व शरीरभावहि विसरतात.॥ १२८॥

गूढार्थदीपिका—मातें विश्वीं कथित—भगवंताच्या सगुणस्वरूपांत निर्गुण स्वरूपच सांठविलेंले असतें; म्हणून प्रेमळ ज्ञानीभक्त सगुणभगवंताच्या लीलांचे व स्वरूपाचेंच कथन करीत असतात.

कथितेनि तोषें कथूं विसरत—भक्तांना भगवंताच्या गुणकथनाचे इतकें प्रेम असतें, की, ती गुणकथा वर्णन करण्याचा प्रसंग आला असतां, त्यांना परमानंद होतो व गुणकथा वर्णन करतां करतां त्यांची निःशब्द स्थिति होते.

मग तया विसरामाजी विरत। आंगें जीवें—त्याप्रमाणे त्यांना देहभाव व जीवभाव यांचा विसर पडतो म्हणजे त्यांना सगुणस्वरूपाचे ठिकाणीं प्रेमसमाधि लागते—असा अर्थ.

ब्रह्मानंद हा जाणीवरहित आहे—म्हणजे ब्रह्मानंद असतो तेव्हा जाणीव स्फुरत नाही किंवा जाणीव स्फुरत नाही तेव्हाच ब्रह्मानंद असतो—हे मागें बृहदारण्यक श्रुतीच्या आधारें सांगितलेंच आहे.

ऐसें प्रेमाचेनि बहुवसपणें। नाहीं राती दिवो जाणणें। केलें माझें सुख अव्यंगवाणें। आपणपेयां जिहीं॥ १२९॥

अर्थ—अशा निःसीम प्रेमामुळे त्यांना रात्र व दिवस यांचाहि विसर पडतो व असे ते आपणच आपले ठिकाणी संपूर्ण सुखरूप होऊन राहतात.॥ १२९॥

गूढार्थदीपिका—आपणच आपलें ठिकाणी सुखस्वरूप राहणें हीच प्रेमसमाधि होय. मागें पांचव्या अध्यायांतहि माऊलींनी "तैसें सुखची उरे स्वरूपें। सुरतीं तिये" या चरणाने सांगितलें आहे.

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम्। ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते॥ १०॥

अर्थ—परम प्रेमाने माझें भजन करीत, माझाशीं अखंड ऐक्य पावलेल्यांना, ते मला अखंड प्राप्त झालेले

राहतील असा बुद्धियोग मी त्यांना देतो—म्हणजे त्यांच्या स्थिर झालेल्या बुद्धीचें मी संरक्षण करतो—आपल्यापासून त्यांची बुद्धि ढळूं देत नाही. ॥ १० ॥

तयां मग जें आम्हीं कांहीं। द्यावें अर्जुना पाहीं। ते ठायींचीच तिहीं। घेतली सेल॥ १३०॥

अर्थ—मग जी कांही स्थिति, अर्जुना! आम्ही त्यांना प्राप्त करून द्यायची, ती मुळांत असलेली नि:सीम स्थिति त्यांनीच प्राप्त करून घेतली असते, पहा. ॥ १३० ॥

कां जे ते जिया वाटा। निगाले गा सुभटा। ते सोय पाहोनि अव्हांटा। स्वर्गापवर्ग॥ १३१॥

अर्थ—कारण थोर योद्धया अर्जुना! ते ज्या मार्गाने जायला निघाले, त्या मार्गाची सुखरूपता पाहिली असतां स्वर्ग व मोक्ष ह्या आडवाटा ठरतात. ॥ १३१ ॥

गूढार्थदीपिका—सगुण भगवंताच्या परम प्रेमाने प्राप्त होणाऱ्या जाणीवरहित परमानंदरूपमोक्षांच्या दृष्टीने, ब्रह्मैक्यजाणीवरूप मोक्षाला येथे आडमार्ग म्हटलें आहे, त्यावरून जाणीवेमुळे अत्यंत समरस असें ब्रह्मैक्य होत नाही. हेंच माउलींनी सुचविलें आहे.

म्हणोनि तिहीं जें प्रेम धरिलें। तेंचि आमुचें देणें उपाइलें। परि आम्हीं देयावें हेंहि केलें। तिहींचि म्हणियें॥ १३२॥

अर्थ—म्हणून भक्तांनी जें प्रेम धरलें, तें आमचें देणें होय असें प्रसिद्ध झालें, पण प्रेम आम्ही द्यायचें असतें, हेहि त्यांनीच रूढ केलें, असें म्हणावे लागतें. ॥ १३२ ॥

गूढार्थदीपिका—भक्तांचे ठिकाणीं भगवंताविषयीं जें प्रेम असते, ते मी दिले नाही, भक्तानेच माझ्या ठिकाणीं तसें प्रेम धरलें आहे, असे भगवंताला निरहंकारतेमुळे वाटतें आणि भक्तहि तसेच, मी भगवंतावर प्रेम करतो असा त्याचे ठिकाणी लेशमात्र अहंकार उत्पन्न न होतां भगवंतांनी प्रेम द्यावे, अशी भगवंतापाशीं अखंड याचना करीत असतो. माझें हातीं आहे करावें चिंतन। तुम्ही कृपादान प्रेम द्यावें'' (तु. गा. ८२७)

वास्तविक भगवच्चिंतनाचा प्रयत्न भगवत्प्रेमामुळेच होणें शक्य आहे, पण तुकाराम महाराजांना प्रेमामुळे त्याची जाणीव न होतां ते प्रेमाची याचना करीत आहेत.

भगवच्चिंतन करणें, माझें ठिकाणीं प्रेम नाही असे समजणें व त्या प्रेमाकरितां तळमळणें व भगवंतापाशीं प्रेमाची याचना करणें हे एका प्रेमाचेच प्रकार आहेत आणि या प्रकारांनीच भक्तांचें प्रेम व्यक्त होत असतें किंवा असा हा भक्ताने भगवंताविषयीं धरलेल्या प्रेमाचा प्रकार असतो.

आतां यावरी येतुलें घडे। जें तेंचि सुख आगळें वाढे। आणि काळाची दिठी न पडे। हें आम्हां करणें॥ १३३॥

अर्थ—आतां यानंतर एवढे व्हावें की, त्यांचे माझे ठिकाणी असलेलें प्रेम नि:सीम वाढेल आणि कालांतरानेहि तें प्रेम क्षीण होणार नाही, इतकेच आम्हांला करायचे असते. ॥ १३३ ॥

गूढार्थदीपिका—प्रेमळ भक्त भगवंताचें जे निष्काम प्रेम करतो, ते प्रेमाचें ऋण समजून, त्यांतून उत्तीर्ण होण्याकरितां, संपूर्ण जीव-प्राण्यांचा अधिष्ठानभूत असलेला सर्वसमर्थ परमात्मा, भक्ताच्या ठिकाणी प्रेमाच्या जाणीवेचा किंवा मी प्रेम करतों असा प्रेमाला क्षीण करणारा किंवा नाहीसा करणारा अहंकार उत्पन्न न होऊं देतां, आपल्या भक्ताचें प्रेम वाढवितो.

ळ्ळेयाचिया बाळका किरीटी। गवसणी करूनि स्नेहाचिया दिठी। जैसी खेळतां पाठोपाठीं। माउली धांवे॥ १३४॥
तें जो जो खेळ दावी। तो तो पुढें सोनयाचा करूनि ठेवी। तैसी उपास्तीची पदवी। पोषित मी जायें॥ १३५॥
जिये पदवीचेनि पोषकें। ते मातें पावती यथासुखें। हे पाळती मज विशेखें। आवडे करूं॥ १३६॥

अर्थ—अर्जुना! अत्यंत लाडक्या मुलाला, आई आपल्या प्रेमळ दृष्टीची खोळ करून, मूल खेळत असतां जशी ती त्याच्या पाठीमागें धांवत असते. ॥ १३४ ॥ व तें लाडकें मूल जो जो खेळ बोटाने दाखवून मागेल, तो तो खेळ ती तान्हुल्याच्या स्वाधीन, ज्या प्रमाणे, करते, त्याप्रमाणे मीहि आपल्या भक्ताच्या भक्तिप्रेमाच्या नि:सीम भूमिकेचें संरक्षण करीत असतो. ॥ १३५ ॥ ज्या प्रेमस्थितीचें पोषण केलें असतां ते मला सुखाने प्राप्त होतील, अशा रीतीने तिचें पालन-पोषण करणें, हेंच मला विशेषत: आवडतें. ॥ १३६ ॥

गूढार्थदीपिका—मातें पावती यथासुखें—परमेश्वर जसा सदेह असीम ब्रह्मसुखाची मूर्ति आहे, तसेच भक्तहि सदेह असीम सुखाची मूर्ति होऊन राहतात.

पैं गा भक्तांसि माझें कोड। मज तयाचे अनन्यगतीची चाड। कां जें प्रेमळांचें सांकड। आमुचिया घरीं॥ १३७॥

अर्थ—असो पण बा अर्जुना! भक्ताला माझे अत्यंत प्रेम असतें व मलाहि त्याच्या अनन्यतेची गोडी असते. कारण आमच्या घरीं—म्हणजे माझ्या सगुण स्वरूपाचे ठिकाणी निःसींम प्रेम करणाऱ्या प्रेमळ भक्ताचाच दुष्काळ आहे. ॥ १३७ ॥

गूढार्थदीपिका—प्रेमळाचें सांकड। आमुचिया घरीं—माझें सगुणस्वरूपहि पूर्ण ब्रह्म आहे. म्हणून माझ्या सगुण स्वरूपाच्या प्रेमभक्तीने सर्वच साधते, हें जाणून, केवळ माझ्या सगुण स्वरूपाचें प्रेम करणारे प्रेमळ भक्त दुर्मिळ असतात, असा अर्थ.

पाहें पां स्वर्ग मोक्ष उपायिले। दोन्ही मार्ग तयांचिये वाहणी केले। आम्ही आंगही शेषा वेंचिलें। लक्ष्मीयेसी॥ १३८॥

अर्थ—हे पहा अर्जुना! स्वर्ग व मोक्ष हे दोन मार्ग मी प्रगट केलें असून, ते दोन्ही मार्ग त्यांच्या—म्हणजे माझी सकाम व निष्काम उपासना करणाऱ्यांच्या—आचरणांच्या प्रवाहांत ठेविले. आणखी लक्ष्मीसह त्यांच्या कामना पूर्ण करण्याकरितां शरीरहि झिजविलें. ॥ १३८ ॥

गूढार्थदीपिका—पाहें पां स्वर्ग मोक्ष उपायिले। दोन्ही मार्ग तयांचिये वाहणी केले—कर्ममिश्र व शुद्धप्रेमरूप अशी दोन प्रकारची भक्ति आहे. कर्ममिश्रभक्तीला गौणभक्ति म्हणतात ती गौणभक्ति सकाम व निष्काम अशी दोन प्रकारची आहे. सकाम गौणभक्तीने स्वर्ग मिळतो व निष्काम गौणभक्तीने ज्ञानजन्य मोक्ष मिळतो, असा अर्थ.

आम्हीं आंगही शेषा वेंचिलें। लक्ष्मियेसि—सकाम सगुणभक्ताचे सर्व मनोरथ भगवान लक्ष्मीसह जातीने स्वतः पूर्ण करतो.

परि आपणपेंवीण जें एक। तें तैसेंचि सुख साजुक। सप्रेमळांलागीं देख। ठेविलें जतन॥ १३९॥

अर्थ—पण मीपणाचे जाणीवेवांचून असणारे व न विटणारें असें जें केवळ प्रेमसुख आहे, तें तसेच आपल्या प्रेमळ भक्ताला देण्याकरितां जपून ठेविलेंले असतें. ॥ १३९ ॥

गूढार्थदीपिका—प्रेमळ भक्त अखंड अविनाशी, सच्चिदानंदी अशा सगुण स्वरूपाशीं ऐक्य पावून राहतात असा भाव.

हा ठायवरी किरीटी। आम्ही प्रेमळु घेवों आपणयासाठीं। या बोलीं बोलिजत गोष्टी। तैसिया नव्हती गा॥ १४०॥

अर्थ—अर्जुना! आम्ही आपल्या प्रेमळ भक्तावर आपल्यासाठीच इतकें प्रेम करतो, पण ह्या, शब्दाने सांगण्यासारख्या गोष्टी नव्हेत. ॥ १४० ॥

गूढार्थदीपिका—आम्ही प्रेमळ घेवों। आपणयासाठीं—ज्या प्रमाणे वाऱ्याने पाण्यावर लाट उठली असतां, ती दुसऱ्या लाटेला उत्पन्न करते, त्याप्रमाणे अविद्याउपाधिमुळे जीवाचे ठिकाणी "देहोऽहं" इत्यादि विपरीतवृत्तीचें जे स्फुरण आहे, त्याच्या अपेक्षेने परमेश्वराचे ठिकाणी "अहं ब्रह्मास्मि" इत्यादि विद्यावृत्तीचें स्फुरण होतें, त्यामुळें त्याची जाणीव झाल्यास अखंड ब्रह्मानंदाला खंड पडण्याचा संभव असतो, पण भक्ताचे अंतःकरणांत भगवंताविषयीं जे निःसीम प्रेम असतें, त्याच्या अपेक्षेने भगवंताच्या अंतःकरणातहि आपल्या भक्ताचें निःसीम प्रेम स्फुरतें व त्यामुळेच भगवंताला "अहं ब्रह्मास्मि" वृत्तीची जाणीव उत्पन्न होत नाही व त्याचा ब्रह्मानंद खंडित होत नाही. हेच माऊलींनी "आपणयासाठी" या पदाने सुचविलें आहे.

तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः । नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता॥ ११॥

अर्थ—सर्वस्वीं माझ्या ठिकाणी अनन्य झालेल्या भक्तांवर कृपा करण्याकरितां, त्यांच्या अंतःकरणांत राहूनच, त्यांचा अविवेकरूपी अंधःकार, मी आपल्या प्रकाशमान ज्ञानदीपाने नाहीसा करतों. ॥ ११ ॥

म्हणोनि मज आत्मयाचा भावो। जिहीं जियावया केला ठावो। एक मीवांचूनि वावो। येर मानिलें जिहीं॥ १४१॥

तयां तत्त्वज्ञां चोखटां। दिवी पोतासाची सुभटा। मग मीचि होऊनि दिवटा। पुढां पुढां चाले॥ १४२॥

अर्थ—(अर्जुना!) मज सगुणस्वरूप झालेल्या आत्माचें प्रेम, हेच ज्यांनी आपल्या जिवंत राहण्याचें ठिकाण केलें आणि माझ्यावांचून जेवढे कांही आहे असें वाटतें, तें सर्व खोटें मानलें.॥ १४१॥ हे उत्तम योद्ध्या अर्जुना! या त्याच्या यथार्थ-विवेक-ज्ञानरूप कापराच्या अल्पज्योतीचा, मग मीच मोठा टेंभा होऊन पुढें पुढें चालतो.॥ १४२॥

गूढार्थदीपिका—श्री माऊलींनी या ओवींतून निर्गुण साक्षात्कार व सगुण साक्षात्कार यांत काय फरक आहे हे दाखविलें आहे.

दिवी पोतासाची—आत्मानात्मरूप व्यतिरेकज्ञानाने जो अहं ब्रह्मास्मि म्हणून निर्गुण स्वरूपाचा आत्मसाक्षात्कार होतो, तो, कापराच्या अल्पजोतिप्रमाणे अल्पप्रकाश देणारा आहे—म्हणजे सर्वत्र एक अद्वितीय सच्चिदानंद परब्रह्मच भरले असतांना, भगवान व नामरूपात्मक जगत् अशा दोन सत्य वस्तु आहेत असा जो भेद, अज्ञानाने मानला जात असतो, तो तो आत्मज्ञानाने नाहीसा झाला, तरी आत्मरूपाने मी, सत्य असून व नामारूपात्मक जगत् मिथ्या आहे, असा अविद्यालेशरूप सत्यमिथ्यात्वाचा भेद, ज्ञान्याचे ठिकाणी उरत असतो. "सर्वं खल्विदं ब्रह्म" या श्रुतींत सांगितल्याप्रमाणे एका पूर्ण अद्वैत सच्चिदानंदाचाच बोध राहत नाही, म्हणून व्यक्तिरेकाने होणाऱ्या "अहं ब्रह्मास्मि" अज्ञानाला "पोतासाची दिवी" असे माऊलींनी म्हटलें आहे.

मीचि होऊनि दिवटा—पुढे, व्यतिरेक ज्ञानानंतर उरलेला अविद्यालेशरूप सत्यमिथ्यात्वाचा भेद नाहीसा होऊन "खल्विदं ब्रह्म" या श्रुतींत सांगितल्याप्रमाणे नामरूपासह एक अद्वैत पूर्ण सच्चिदानंद परब्रह्मच आहे, असा व्यापक अनुभव, रामकृष्णादि सगुण साकार स्वरूपाच्या प्रेमभक्तीनेच येतो, हेंच माऊलींनी "मीचि होऊनि दिवटा। पुढां पुढां चालें" या चरणाने सांगितलें आहे.

अज्ञानाचिये राती-। माजी तमाची मिळणी दाटती। ते नाशूनि घालीं परौती। करीं नित्योदयो॥ १४३॥

अर्थ—आत्मविस्मृतिरूप अज्ञानाचे रात्रीमध्ये नानाप्रकारच्या अज्ञानरूप अंध:काराच्या मिळणीची दाटी होत असते; ती नि:शेष नाहीशी करून, मी भक्ताचे ठिकाणी नित्य अशा ज्ञानरूप प्रकाशाचा उदय करून देतों.॥ १४३॥

गूढार्थदीपिका—सगुणाच्या भक्तिवांचून केवळ शमदमादि साधनसंपत्तीच्या साह्याने आत्मज्ञान होणे अत्यंत कठीण आहे; हें मागें सांगितलेंच आहे व तें झालें तरी नुसते शाब्दिक किंवा आनुमानिकच राहते. पण भक्तीच्या साह्याने झालेलें ज्ञान मात्र सूर्याप्रमाणे अपरोक्ष व अखंड प्रकाशरूप असतें, श्री नाथांनीहि "शब्दज्ञानाची व्युत्पत्ति। दाटुगी होय लौकिकस्थिति। माया निवर्तक ज्ञानप्राप्ति। न करतां हरिभक्ति कदा नुपजे॥ ३१०॥ (ए. भा. अ. २)" "ज्ञान साधावयां लागीं जाण। कष्टावे न लगे गा आपण। सप्रेम करितां माझे भजन। दवडितां ज्ञान। घर रिघे"॥ १३६॥ (ए. भा. अ. २०) "ऐसें श्रेष्ठ जें ब्रह्मज्ञान। तें भक्तीचें पोषण जाण। न करितां भगवद्भजन। ब्रह्मज्ञान कदा नुपजे॥ ४६७॥ (ए. भा. अ. २)" या ओव्यांतून हाच भाव प्रगट केला आहे.

अर्जुन उवाच

परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान्। पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम्॥ १२॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, भगवंता! तूंच परब्रह्म आहेस, तूंच परमधाम म्हणजे शेवटीं प्राप्त होणारी गति आहेस. अत्यंत पवित्र तूंच आहेस. शाश्वत, दिव्य, आदिदेव, जन्मरहित व व्यापक असा पुरुष तो तूंच आहेस.॥ १२॥

ऐसें प्रेमळाचेनि प्रियोत्तमें। बोलिलें जेथ पुरुषोत्तमें। तेथ अर्जुन मनोधर्मे। निवालों म्हणतसे॥ १४४॥
हां हो जी अवधारा। भला केरु फेडिला संसारा। जाहलों जननीजठरजोहरा-। वेगळा प्रभू॥ १४५॥

अर्थ—याप्रमाणे सर्व प्रेमळ भक्तांचा प्रियतम जो परमात्मा श्रीकृष्ण, त्याने अर्जुनाला असे म्हटलें असतां अर्जुन म्हणतो, देवा! माझें मन अत्यंत समाधान पावलें आहे.॥ १४४॥ अहो जी भगवंता! ऐका. माझ्या अंत:करणांत जो संसाररूपी केरकचरा सांचला होता, तो तुम्ही झाडून नाहीसा केला, म्हणून आज मी आईच्या जठररूपी लाक्षागृहांतून मुक्त झालों म्हणजे जन्ममरणापासून मुक्त झालो.॥ १४५॥

गूढार्थदीपिका—भला केरू फेडिला संसारा—जड विनाशीं पांचभौतिक अशी एक संसार वस्तु आहे ही विपरीत समजूत नाहीशी केली.

जी जन्मलेपण आपुलें। हें आजि मियां डोळां देखिलें। जीवित हाता चढलें। आवडेतैसें॥ १४६॥

अर्थ—हे श्रीकृष्ण प्रभो! आज मी आपल्या डोळ्यांनी आपला जन्म पाहिला आणि वाटेल तसें आयुष्य माझ्या हातीं आलें—म्हणजे मी जन्ममरणरहित अविनाशीस्वरूप झालों. ॥ १४६ ॥

गूढार्थदीपिका—जन्मलेपण आपुलें। हें आजि मियां डोळां देखिलें—मी अविनाशी सच्चिदानंदस्वरूप आहे हे विसरल्यामुळे अज्ञानाने जन्माचा अनुभव घेत होतो—किंवा माझा पांचभौतिक देह नाहीसा होऊन, आज मी सच्चिदानंदरूप देहाने जन्मास आलो असे पाहिलें.

जीवित हाता चढलें—माझ्या देहाला जन्ममरण राहिले नाही असा अर्थ.

आजि आयुष्या उजवण जाहली। माझिया दैवा दशा उदयली। जे वाक्यकृपा लाधली। दैविकेनि मुखें॥ १४७॥

अर्थ—देवाच्या मुखाने माझ्यावर बोधामृतरूपी वचनाची कृपा झाली; म्हणून तें वचन ऐकून आज माझ्या आयुष्याची सफलता झाली व माझ्या दैवाच्या भाग्यदशेस प्रारंभ झाला. ॥ १४७ ॥

आतां येणें वचनतेजाकारें। फिटलें आंतील बाहेरील आंधारें। म्हणोनि देखतसें साचोकारें। स्वरूप तुझें॥ १४८॥

अर्थ—आतां तुझ्या या वचनाच्या अर्थरूप ज्ञानप्रकाशाने आंतील व बाहेरील अज्ञान-अंध:कार नाहीसा झाला, म्हणून आतां तुझें खरें स्वरूप मी पाहात आहे. ॥ १४८ ॥

गूढार्थदीपिका—फिटलें आंतील बाहेरील आंधारें—भगवंताच्या वाक्याने अर्जुनाचे अंत:करणांतील "मी ब्रह्म नाही" व "मला ब्रह्म दिसत नाही" असा दोन्ही प्रकारचा हृदयांतील आवरणात्मक अज्ञानांध:कार व "मी देह आहे" व "नामरूपात्मक जगत् आहे" हा बाहेरील आवरणासह असणारा विक्षेप अंध:कार नाहीसा झाला.

म्हणोनि देखतसें साचोकारें। स्वरूप तुझें "पुरुष एवेदं विश्वम्" (मुं. २-१-१०) या श्रुतींत व त्यावरील भाष्यांत "न विश्वं नाम पुरुषादन्यत्किंचिदस्ति" या भाष्यपंक्तींत संपूर्ण नामरूपात्मक सर्व विश्वच खरोखर ब्रह्मस्वरूप आहे असे जेथे म्हटलें आहे, तेथे भगवंताचा सगुणविग्रह पूर्ण ब्रह्मस्वरूप नाही असे कोणत्या ज्ञान्याला म्हणतां येईल?

नामरूपें सोडून "विश्व" हा शब्द लागू होत नसल्यामुळे येथें "विश्व" या शब्दाने "नामरूपें" हाच अर्थ घेतला पाहिजे म्हणजे नामरूपासहित पूर्णब्रह्म आहे असाच श्रुति व त्यावरील आचार्यांच्या भाष्याचा अर्थ आहे.

तरी होसी गा तूं परब्रह्म। जें या महाभूतां विसंवतें धाम। पवित्र तूं परम। जगन्नाथा॥ १४९॥

तूं परम दैवत तिहीं देवां। तूं पुरुष जी पंचविसावा। दिव्य तूं प्रकृतीभावा-। पैलीकडील॥ १५०॥

अर्थ—ज्या ठिकाणीं संपूर्ण महाभूतें विश्राम पावतात तें परब्रह्म तूंच आहेस. हे जगन्नाथा! तूं अत्यंत पवित्र आहेस. ॥ १४९ ॥ ब्रह्मा, विष्णु, महेश्वर या तिन्ही देवांचे श्रेष्ठ दैवत तूंच आहेस. सांख्यांचा पंचविसावा असंग पुरुष तूंच आहेस आणि प्रकृतीच्या पलीकडे जी दिव्य तेजोमय वस्तु सांगितली आहे, तीहि तूच आहेस. ॥ १५० ॥

गूढार्थदीपिका—तूं परम दैवत तिहीं देवा—ब्रह्मा, विष्णु, महेश्वर हे कार्यब्रह्म असून भगवान श्रीकृष्ण कारणब्रह्म म्हणजे पूर्णब्रह्म आहे असे या चरणांत दाखविलें आहे.

तूं पुरुष जी पंचविसावा। दिव्य तूं प्रकृतीभावा-पैलीकडील—आणि सांख्यशास्त्रांच्या मते प्रकृतिसह चोविस तत्वांच्या पलिकडे असणारा जो पंचविसावा निर्गुण पुरुष तो भगवान श्रीकृष्ण आहे, असे सांगून भगवान श्रीकृष्णाच्या सगुण स्वरूपाचें व पंचविसाव्या निर्गुण स्वरूपाचें ऐक्य दाखविलें आहे. तसेच भगवंताचें सगुणस्वरूप कारणब्रह्म कां समजावें याचे "प्रकृति-पैलीकडील" म्हणून कारणहि दिलें आहे.

अनादिसिद्ध तूं स्वामी। जो नाकळिजसी जन्मधर्मीं। तो तूं हें आम्हीं। जाणितलें आतां॥ १५१॥

अर्थ—प्रभो श्रीकृष्णा! तू अनादि व स्वत:सिद्ध ब्रह्मांडाचा स्वामी आहेस. तूं जन्मादिधर्मांत सांपडत नाहीस-म्हणजे तुला जन्मादिक नाहीत असा तूं आहेस, हें आज मी आतां जाणलें. ॥ १५१ ॥

गूढार्थदीपिका—हे अनादिसिद्ध तूं स्वामी। जो नाकळिजसी जन्मधर्मी—परमेश्वराचे रामकृष्णादि अवतार विग्रही अनादिसिद्धच असतात. त्यांना जन्म-मरण नाही असे महावराह पुराणांत "सर्व नित्या: शाश्वताश्च देहास्तस्य परात्मन:" या श्लोकांत सांगितले आहे. भगवान रामकृष्णादिकांचा जन्म झाला, असा अज्ञानी लोकांना, त्यांच्या अज्ञानामुळे भ्रम होतो. वास्तविक अज्ञानी लोकांप्रमाणे परमेश्वराचा जन्म होत नाही हे मागें चवथ्या अध्यायांतील ६ व्या श्लोकावर आचार्यांच्या भाष्याधारें आम्ही स्पष्ट केलेंच आहे.

तूं या कालयंत्रासि सूत्री। तूं जीवकळेची अधिष्ठात्री। तूं ब्रह्मकटाहधात्री। हें कळलें फुडें॥ १५२॥

अर्थ—तूं कालरूपी यंत्राचा सूत्रधार आहेस. तूं या जीवरूपी चैतन्यांशाला अधिष्ठान आहेस. तूंच या सर्व ब्रह्मांडाला धारण करणारा आहेस हें मला स्पष्ट कळून आलें. ॥ १५२ ॥

गूढार्थदीपिका—पुन: या ओवींतहि "तूं कालयंत्रासि सूत्री" "जीवकळेची अधिष्ठात्री" "ब्रह्मकटाहधात्री" या विशेषणांनी माऊलींनी भगवंताच्या श्रीकृष्णस्वरूपाचें कारणब्रह्मत्वच प्रतिपादिले आहे.

हें कळतें फुडें—उपासना कारणब्रह्माचीच होते. उपास्य कार्यब्रह्म—म्हणजे मर्यादित सामर्थ्यानी युक्त-आहे असे त्याचें ज्ञान असल्यास, त्या ठिकाणीं कारणब्रह्माची भावना म्हणजे तें कारणब्रह्मच आहे, अशी भावना करून उपासना करावी लागते. असे "ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात्" (ब्र. सू. ४-१-५) या सूत्रांत सांगितले आहे. आणि ही कार्यब्रह्माची उपासना होते हे कशावरून समजायचे हेहि तेथेच स्पष्ट केलें आहे.

उपास्य कारणब्रह्म असल्यास—म्हणजे अनुभवजन्य ज्ञानाने तें अगाध सामर्थ्यादि गुणांनी युक्त पूर्णब्रह्म आहे. असे कळून आल्यास-तेथे 'ब्रह्मभावना' करावी लागत नाही आणि ती करायला सांगितलीहि नाही. येथे भगवंताचे श्रीकृष्णस्वरूप पूर्णब्रह्म आहे असा स्वत:चा अनुभव अर्जुन सांगत आहे हें "कळलें फुडें" या पदावरून स्पष्ट होतें. म्हणून अर्जुनाने श्रीकृष्णस्वरूपाचे ठिकाणीं ब्रह्मभावना करून हे श्रीकृष्णस्वरूपांचे वर्णन केलें आहे, असे म्हणतां येत नाही.

आहुस्त्वामृषय: सर्वे देवर्षिर्नारदस्तथा । असितो देवलो व्यास: स्वयं चैव ब्रवीषि मे॥ १३॥

अर्थ—देवा! सर्व ऋषी, देवर्षि नारद, त्याचप्रमाणे असित देवल, व्यास हे सर्व तुझ्याविषयीं असेच सांगत असत आणि प्रत्यक्ष तूंहि आपल्याविषयीं असेच मला सांगत असतोस. ॥ १३ ॥

पैं आणिकही एके परी। इयेचि प्रतीतीची येतसे थोरी। जे मागें ऐसेंचि ऋषीश्वरी। सांगीतलें तूंतें॥ १५३॥
परि तया सांगितलियाचें साचपण। हें आतां माझे देखतसे अंत:करण। जे कृपा केली आपण। म्हणोनि देवा॥ १५४॥
येन्हवीं नारदु अखंड जवळां ये। तोही ऐसीचि वचनें गाये। परि अर्थ न बुजोनि ठाये। गीत सुखचि ऐकों॥ १५५॥
हां गा आंधळेयांच्या गांवीं। आपणपें प्रगटले रवीं। तरि तिहीं वोतपलीचि घ्यावी। वांचूनि प्रकाशु कैंचा॥ १५६॥
परि देवर्षिही अध्यात्म गातां। आहाच रागांगेंसी जे मधुरता। तेचि फावे येर चित्ता। नलगेचि कांहीं॥ १५७॥
पैं असिता देवलाचेनहि मुखें। मी एवंविधा तूंतें आइकें। परि तैं बुद्धी विषयविखें। घारिली होती॥ १५८॥
विषयविषाचा पडिपाडू। गोड परमार्थु लागे कडू। कडू विषय तो गोडू। जीवासी जाहला॥ १५९॥

अर्थ—तुझ्या वाक्याने जो अनुभव आला त्याची आणखीहि एका दृष्टीने थोरवी माझ्या अनुभवास आली कारण मागें मोठमोठ्या ऋषींनी असेच तुझ्याविषयीं सांगितलें होतें. ॥ १५३ ॥ पण त्या सांगितलेल्याची सत्यता, आज माझ्या अंत:करणाला पटली; याचें कारण, देवा! आपण माझ्यावर कृपा केली हें होय. ॥ १५४ ॥ नाहीं तरी नारदमुनि नेहमी आमचेकडे येत असत. तेहि अशारीतीने तुझे वर्णन करीत असत; पण त्यावेळीं त्यांच्या वचनांचा अर्थ न समजतां तुझ्या गायनाचें सुखच आम्हांला प्राप्त होत असे. ॥ १५५ ॥ अहो जी भगवंता! आंधळ्यांच्या गावांत जर सूर्य आपण होऊन प्रकाशित झाला तर त्या आंधळ्यांना सूर्याची कोंवळी ऊनच घेतां येईल. त्याशिवाय प्रकाश मिळणें कसें शक्य

आहे ?॥ १५६॥ त्याप्रमाणेच देवर्षि नारदमुनि देखील तुझ्या अध्यात्मस्वरूपाचेंच वर्णन करीत असत; पण त्या वर्णनाला रागरागिणीमुळे जी वरवर गोडी येत होती, तिचाच आमच्या चित्ताला लाभ होत होता, दुसरा कोणताहि लाभ होत नव्हता. ॥ १५७॥ तसेंच असित, देवल, या ऋषीच्या मुखाने असेच तुझें वर्णन आम्ही ऐकत असूं; पण त्यावेळीं आमचें अंत:करण विषयरूपी विषानें व्यापिलें होतें. ॥ १५८॥ विषयरूपी विषाचा एवढा प्रताप आहे की जीवाला, परमार्थ गोड असून कडू वाटतो व विषय कडू असूनहि गोड वाटतात. ॥ १५९॥

गूढार्थदीपिका—जोपर्यंत विषयसुखाचें प्रेम असतें, तोपर्यंत ब्रह्मबोधाकडे जीवाची प्रवृत्तिच होत नाही, असा अर्थ.

आणि हें आणिकांचें काय सांगावें। राउळा आपणचि येऊनि व्यासदेवें। तुझे स्वरूप आघवें। सर्वदा सांगिजे॥ १६०॥
परि तो अंधारीं चिंतामणि देखिला। जेवीं नव्हे या बुद्धी उपेक्षिला। पाठीं दिनोदयीं वोळखिला। होय म्हणोनि॥ १६१॥
तैसीं व्यासादिकांची बोलणीं। तिया मजपाशीं चिद्रत्नांचिया खाणी। परि उपेक्षिल्या जात होतिया तरणी। तुजवीण कृष्णा॥ १६२॥

अर्थ—भगवंता! दुसऱ्याचें कशाला सांगूं! पुष्कळदां स्वत: भगवान व्यासांनी आमच्या राजवाड्यांत येऊन तुझ्या स्वरूपाचें सदा संपूर्ण वर्णन करीत असावें. ॥ १६०॥ पण ज्याप्रमाणे आंधारांत चिंतामणि पडला असतां तो चिंतामणि नव्हे या बुद्धीने उपेक्षा होते. नंतर उजाडल्यावर, तो चिंतामणिच होय असा ओळखला जातो. ॥ १६१॥ त्याप्रमाणे व्यासादिकाचीं बोलणीं म्हणजे मला प्राप्त झालेल्या चैतन्यरूपी रत्नांच्या खाणीच होत्या; पण हे श्रीकृष्णा! तुझ्या सूर्यप्रकाशाच्या अभावीं त्यांची उपेक्षाच होत होती. ॥ १६२॥

सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव। न हि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवा:॥ १४॥

अर्थ—हे भगवंता! केशवा! तू जें मला सांगतोस तें सर्व खरें आहे. तुझ्या या व्यक्त सगुण श्रीकृष्णस्वरूपाचा महिमा, देव, दानव यापैकीं कोणीहि जाणूं शकत नाहीत. ॥ १४॥

ते आतां वाक्यसूर्यकर तुझे फांकले। आणि ऋषींनी मार्ग होते जे कथिले। तयां आघवयांचेंचि फिटलें। अनोळखपण॥ १६३॥
जी ज्ञानाचें बीज तयांचे बोल। माझिये हृदयभूमिके पडिले सखोल। वरि इये कृपेची जाहाली वोल। म्हणोनि संवादफळेंसी उठलें॥ १६४॥

अर्थ—तेंच आतां तुझें वाक्यरूपी सूर्यकिरण माझ्या अंत:करणांत फांकल्यामुळे पूर्वी ऋषींनी जे मार्ग सांगून ठेविले आहेत त्या सर्वांची आज ओळख पटली—म्हणजे त्यांनी जे तुझ्या स्वरूपाचें पूर्ण ब्रह्मत्वाने वर्णन केलें होतें, तें सर्व यथार्थ होतें, याचा आज मला अनुभव आला. ॥ १६३॥ देवा! त्या ऋषीचें बोलणें हें आत्मज्ञानाचे बीज होय. तें माझ्या हृदयरूपी भूमींत खोल पडलें व त्यावर तुझ्या कृपेचा ओलावा मिळाल्यामुळे तें बीज अंकुरित होऊन, तें सर्व संवादरूपी यथार्थबोधाने फलद्रूप झालें. ॥ १६४॥

गूढार्थदीपिका—परमेश्वर कृपेने व श्रीगुरुच्या मुखाने जोपर्यंत अद्वैत आत्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान होत नाही, तोपर्यंतच निरनिराळीं शास्त्रें करणाऱ्या ऋषींच्या वचनांत विरोध दिसून पडतो. अद्वैत आत्मस्वरूपाचें ज्ञान झाल्यावर आत्म्याचे ठिकाणीं सर्व विरोधी वाक्यांची साक्षात् किंवा परंपरेने एकवाक्यता आहे असे कळून येतें, असा भाव.

"**सर्वेषां च प्रस्थानकर्तृणा मनीनां विवर्तवादपर्यवसानेनाद्वितीये परमेश्वरे एव वेदान्तप्रतिपाद्ये तात्पर्यम्। न हि ते मुनयो भ्रान्ता: सर्वज्ञात्वात्तेषाम्**" सर्व दर्शनकार भगवत्कृपेने सर्वज्ञ होते, भ्रांत नव्हते. म्हणून त्यांनी रचलेल्या दर्शनांचे साक्षात् किंवा परंपरेने एका भगवंताचे ठिकाणीच पर्यवसान आहे, असेच मधुसुदन सरस्वतीनींहि महिम्नस्तोत्रावरील आपल्या टीकेंत म्हटलें आहे. विद्यारण्य स्वामींनीहि हाच भाव आपल्या सूतसंहितेवरील टीकेंतून व्यक्त केला आहे.

अहो नारदादिकां संतां। त्यांचिया उक्तिरूप सरिता। मी महोदधी जाहालों अनंता। संवादसुखाचा॥ १६५॥
प्रभु आघवेनि येणें जन्में। जियें पुण्यें केलीं मियां उत्तमें। तयांची न ठकतीचि अंगीं कामें। सद्गुरू तुवां॥ १६६॥

अर्थ—देवा! नारदादि संतांच्या वचनरूप नद्यांना मी एकवाक्यतारूप संवादसुखाचा समुद्र झालों. ॥ १६५॥ देवा! या आणि मागील सर्व जन्मांत जेवढे कांही निष्काम पुण्य केले असेल त्यांचें, सद्गुरुप्राप्ति हें जें फळ, तें कधीं होत नाही असे नाही. म्हणूनच तूं मला सद्गुरु प्राप्त झालास. ॥ १६६॥

गूढार्थदीपिका—अनेक जन्मांतील निष्काम पुण्यकर्माचरण हें सद्गुरुच्या प्राप्तीचें साधन असतें, असा भाव.

एऱ्हवीं वडिलवडिलांचेनि मुखें। मी सदा तूंतें कानीं आइकें। परि कृपा न किजेचि तुवां एकें। तंव नेणवेचि कांहीं॥ १६७॥

म्हणोनि भाग्य जैं सानुकूळ। जालिया केले उद्यम सदा सफळ। तैसें श्रुताधीत सकळ। गुरुकृपा साच॥ १६८॥

अर्थ—वस्तुत: वाडवडिलांच्या मुखाने मी तुझ्या स्वरूपाचा महिमा सदा कानाने ऐकत होतो, पण जोपर्यंत तुझी कृपा झाली नव्हती, तोपर्यंत मला तुझा महिमा कळूं शकला नाही. ॥ १६७ ॥ म्हणून ज्याप्रमाणे आपलें दैव जेव्हा अनुकूल होतें तेव्हा केलेले सर्व प्रयत्न सफळ होंतात, त्याप्रमाणे श्रीगुरुकृपेनेच संपूर्ण श्रवण व पठण केलेल्या वचनांचा यथार्थ बोध होतो. ॥ १६८ ॥

गूढार्थदीपिका—तैसें श्रुताधीत सकळ। गुरुकृपा साच—नित्यज्ञानसंपन्न अशा परमेश्वरापासून जसे मंत्रब्राह्मणात्मक वेद निर्माण झाले, तसेच आत्मबोधाने परिपूर्ण असलेल्या आधिकारिक ऋषींच्या द्वारा भगवंतांनीच वेदोपजीवी इतर इतिहासपुराणादि ग्रंथ निर्माण केंले असल्यामुळे तेहि ईश्वरप्रणीतच ठरतात. म्हणूनच सर्व वेदादीशास्त्रांची एकवाक्यता आहे असें मानिलें पाहिजे आणि समन्वयाने व एकवाक्यतेने जो बोध होतो तोच परमेश्वराला संमत असलेला यथार्थ बोध असूं शकतो.

हा यथार्थ बोध, ज्ञानभक्तीने संपन्न असलेले श्रीगुरु आपल्या शिष्यांना शास्त्रवचनांचा समन्वय व एकवाक्यता करूनच नेहमी करून देत असतात. त्यांच्या उपदेशावांचून शास्त्रांचा समन्वय आपल्या बुद्धीने कळूं शकत नाही. हेंच माऊलींनी ''तैसे श्रुताधीत सकळ। गुरुकृपा साच'' या वचनाने सांगितलें आहे.

जी बनकरू झाडें सिंपी जीवें साटीं। पाडूनि जन्में काढी आटी। परि फळेंसी तैंचि भेटी। जैं वसंतु पावे॥ १६९॥

अहो विषमा जैं वोहट पडे। तैं मधूर तें मधुर आवडें। पैं रसायनें तैं गोडें। जैं आरोग्य देहीं॥ १७०॥

अर्थ—देवा! माळ्याने आपल्या जीवाच्या मोबदल्याने-म्हणजे झाडाचे जगणे तेंच आपलें जगणे असे समजून-झाडांना पाणी घातलें आणि जन्मापाठीं जन्म घेऊन असेच कष्ट केलें, तरीपण एवढ्या कष्टानेहि झाडांना फळें येतातच असे नाही; तें वसंतऋतूच्या स्वाधीन आहे. ॥ १६९ ॥ त्याचप्रमाणे देवा! त्रिदोषाची विषमता कमी झाली असतां, मधुररस मधुर लागतो; आणि देहाचे ठिकाणीं आरोग्य असलें तरच रसायन परिणामकारक होतें. ॥ १७० ॥

(टीप-औषध हें रोगनिवृत्तिकर असतें व तें रोग्याला दिलें जातें. रसायन हें जरानिवारक व आयुष्यवर्धक असतें व तें निरोगी मनुष्याला दिलें जातें, असे वैद्यशास्त्राचें मत आहे.)

कां इंद्रियें वाचा प्राण। यां जालियांचें तैंचि सार्थकपण। जैं चैतन्य येऊनि आपण। संचरे माजीं॥ १७१॥

तैसें शब्दजात आलोडिलें। अथवा योगादिक जैं अभ्यासिलें। तें तैंचि म्हणों ये आपुलें। जैं सानुकूल श्रीगुरु॥ १७२॥

ऐसिये जालिये प्रतीतीचेनि माजें। अर्जुन निश्चयाची नाचतुसे भोजें। तेवींचि म्हणे देवा तुझें। वाक्य मज मानलें॥ १७३॥

तरि साचचि हे कैवल्यपती। मज त्रिशुद्धी आली प्रतीती। जे तूं देवदानवांचिये मती-। जोगा नव्हसी॥ १७४॥

तुझें वाक्य व्यक्ती न येतां देवा। आपुलिया जाणे जाणिवा। तैंसा कहींचि नाहीं हें मद्भावा। भरंवसेनि आलें॥ १७५॥

अर्थ—चैतन्य शरीरांत प्रवेश करीते तेव्हाच इंद्रियें, वाणी, प्राण याचें असण्याचें सार्थक होतें. ॥१७१॥ त्याप्रमाणे मनुष्य जेवढें कांही शास्त्रावलोकन करतो किंवा योगादिक मार्गाचा अभ्यास करतो, तेवढे सर्व श्रीगुरुची कृपा झाली तरच खरोखर आपल्या स्वाधीन होते. ॥ १७२ ॥ (श्रीगुरुकृपेनेच शब्द यथार्थ समजूं शकतात) या आलेल्या अनुभवाने अर्जुन मत्त होऊन, दृढ निश्चयाची मूर्ति होऊन, नाचूं लागला व तसेंच, 'देवा! तुझें म्हणणें मला पटले' असें म्हणू लागला. ॥ १७३ ॥ हे कैवल्याचे स्वामी भगवंता! तरी तूं खरोखरच देवदानवांच्या बुद्धीस आकलन होण्यासारखा नाहीस, हें त्रिवार सत्य आहे, असा मला अनुभव आला. ॥ १७४ ॥ तुझ्या कृपेने जोपर्यंत तुझ्या वचनाचा यथार्थ व स्पष्ट बोध होत नाही, तोपर्यंत आपल्या बुद्धीनेच जाणण्याचा एखाद्याने कितीहि प्रयत्न केला, तरी त्याला त्यांचा यथार्थ बोध कधीहि होणें शक्य नाही, हे मला निश्चित कळून आलें. ॥ १७५ ॥

स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम। भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते॥ १५॥

अर्थ—हे पुरुषोत्तमा! हे जगत्कर्त्या! हे जगन्नियंत्या! हे देवाधिदेवा! हे जगत्पते! तूंच एक स्वत:ला जाणूं शकतोस. ॥ १५ ॥

एथ आपुलें वाडपण जैसें। आपणचि जाणिजे आकाशें। कां मी येतुली घनवट ऐसें। पृथ्वीचि जाणे॥ १७६ ॥
तैसा आपुलिये सर्वशक्ती। तुज तूंचि जाणसी लक्ष्मीपती। येर वेदादिक मती। मिरवती वायां॥ १७७॥
हां गा मनातें मागां सांडावें। पवनातें वावीं मवावें। आदिशून्य उतरोनि जावें। केउतें बाहीं॥ १७८ ॥
तैसें हें तुझें जाणणें आहे। म्हणोनि कोणाही ठाकतें नोहे। आतां तुझें ज्ञान होये। तुजचिजोगें॥ १७९ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे आकाश आपला अफाट विस्तार आपणच जाणूं शकतें किंवा मी इतकी घन आहे असा आपला घनवटपणा पृथ्वीच जाणूं शकते. ॥ १७६ ॥ त्याप्रमाणे भगवंता! आपल्या सर्व शक्तिसामर्थ्याला तूंच एक जाणूं शकतोस, बाकी तेथे वेदादिक शास्त्रें तुला जाणण्याचा अभिमान व्यर्थच वागवितात. ॥ १७७ ॥ बा अर्जुना! मनाला मागें कसें टाकतां येईल? वाऱ्याला हाताने कसें मोजतां येईल? बाहुच्या बळावर सृष्टिपूर्वीची शून्यस्थिति कशी तरून जातां येईल? ॥ १७८ ॥ त्याप्रमाणे तुझ्या स्वरूपाला जाणणें अशक्य आहे; म्हणूनच कोणालाहि तुझें स्वरूप कळत नाही. तुझ्या स्वरूपाचें ज्ञान तुलाच होण्याजोगें आहे. ॥ १७९ ॥

गूढार्थदीपिका—निर्गुणाचें ज्ञान एकदाचें कसें तरी होऊं शकतें, पण सगुणाचें ज्ञान होणें दुरापास्त आहे. याचें थोडक्यांत विवरण मागे नवव्या अध्यायांतील ३७१ ओवीवरील गूढार्थदीपिकेंत आम्ही केलें आहे. पण निर्गुणस्वरूपापेक्षा सगुणस्वरूप कनिष्ठ आहे, असे मानणाऱ्यांच्या मताचें परिवर्तन व्हावें, म्हणून येथे त्याचा पुन: विशेष विचार करावासा वाटतो.

"**तथापि भूमन् महिमागुणस्य ते विबोद्धुमर्हत्यमलान्तरात्मभि:। अविक्रियात्स्वानुभवादरूपतो ह्यनन्यबोध्यात्मतया न चान्यथा॥**" (भाग. स्कं. १०-१४-६) हे भगवंता! तुझ्या निर्गुणस्वरूपाचा महिमा, निर्मळ अंत:करणाच्या योग्यांनाच जाणतां येतो; कारण तें स्वरूप निर्विकार, स्वानुभवरूप व रूपातीत असल्यामुळे आपल्या स्वप्रकाशरूप आत्मस्वरूपाने समजण्यासारखें आहे. दुसऱ्या कोणत्याहि मार्गाने त्याचें ज्ञान होत नाही. या श्लोकावरील टीकेंत श्रीधरस्वामी म्हणतात—

"**इदानीं यद्यप्युभयोरविशेषेण दुर्ज्ञेयत्वमुक्तं तथापि गुणातीतस्य ज्ञानं कथंचिद्भवेन्नतु सगुणस्य तव अचिन्त्यानन्तगुणत्वादिति**"-तुझ्या सगुण निर्गुण या दोन्ही स्वरूपाचें ज्ञान होणें दुस्तर असलें, तरी गुणातीत अशा निर्गुणाचें ज्ञान एकदाचें होऊं शकतें; पण अचिन्त्य, अनंत, अपार, गुण असलेल्या तुझ्या सगुण स्वरूपाचें पूर्ण ज्ञान होणें शक्य नाही.

निर्गुणस्वरूपाचें तरी एकदाचें ज्ञान होणें कसें शक्य आहे, हें सांगतांना स्वामी म्हणतात, "स्वानुभवादात्माकारान्त:करणसाक्षात्कारात्"-म्हणजे विशेषरहित असा जो आत्मा, तदाकार झालेल्या अंत:-करणाचा साक्षात्कार हेंच निर्गुणाचें ज्ञान होय.

"**नन्वंत:करणमपि सविकारमेव विषयी करोतीति कथमात्माकारता तस्येत्यत आह-अविक्रियादिति। विक्रिया विशेषाकारस्तद्रहितात्। विशेषपरित्याग एवात्माकारतेत्यर्थ:**" अंत:करणाला कार्यरूप विशेष पदार्थाचेंच ज्ञान होत असतें, तेव्हां ते निर्गुण आत्माकार कसें होऊं शकतें, अशी कोणी शंका करतील. त्याला स्वामींनी उत्तर दिलें आहे की, अंत:करणांतील नामरूपात्मक विशेषभाव नाहीसे झाले की अंत:करण आत्माकार होतें; म्हणून अंत:करणांतील सर्व नामरूपात्मक विशेषभाव नाहीसे करून, निर्गुणस्वरूपाचा साक्षात्कार करून घेणें, एकदाचें शक्य आहे; पण अचिन्त्य, अनंत, अपारगुणसागर अशा सगुण परमेश्वराच्या स्वरूपाचें ज्ञान करून घेणें जीवाला कधीहि शक्य होत नाही.

येथें भगवद्भक्त श्रीधराचार्यांच्या या मताप्रमाणेच माऊलींनी आपलें मत प्रदर्शित केलें आहे व असेंच सर्व संतांचें मत असून "अनंताचे गुण अनंत अपार। न कळेचि पार श्रुति शास्त्रा॥ तो हा महाराज विटेवरी उभा। लावण्याचा गाभा शोभतसे" असे श्रीएकनाथ महाराजांनीहि म्हटलें आहे.

जी आपणपयातें तूंचि जाणसी। आणिकांतें सांगावयाही समर्थ होसी। तरि आतां एक वेळ घाम पुसीं। आर्तीचिये निडळींचा॥ १८०॥

अर्थ—देवा! तूच आपल्याला जाणू शकतोस व दुसऱ्यालाहि आपल्या स्वरूपाचें ज्ञान करून देण्यास तूच समर्थ आहेस. तर देवा! एक वेळ, आतां, माझ्या इच्छेच्या कपाळावरील घाम पुसून टाक-म्हणजे माझी इच्छा पूर्ण कर. ॥ १८० ॥

गूढार्थदीपिका—आपणयातें तूंचि जाणसी। आणीकांतें सांगावयाही समर्थ होसी—सगुण परमात्मा अनंत गुणसागर कसा आहे, तो अवतार कसा घेतो व त्याचा अवतारहि अनादिसिद्ध कसा राहूं शकतो, इत्यादि त्याची लीला जीवाला सर्वस्वीं अगम्य व अतर्क्य आहे असें मागील ओवींत सांगून, या ओवींत माऊली म्हणतात, परमेश्वरवचनानेच परमेश्वराच्या सगुण स्वरूपाचें ज्ञान होऊं शकतें, जीवाला तें स्वतःच्या बुद्धीने होऊं शकत नाही.

हें आइकिलें कीं भूतभावना। भव गजपंचानना। सकळदेवदेवतार्चना। जगन्नायका॥१८१॥
जरी थोरी तुझी पाहत आहों। तरी पासीं उभे ठाकावयाही योग्य नोहों। या शोच्यता जरी विनवूं बिहों। तरी आन उपायो नाहीं॥ १८२॥
भरले सरिता समुद्र चहूंकडे। परि तें बापियासि कोरडें। कां जैं मेघौनि थेंबुटा पडे। तैं पाणि कीं तया॥१८३॥
तैसें श्रीगुरु सर्वत्र आथी। परि कृष्णा आम्हां तूंचि गती। हें असो मजप्रती। विभूती सांगें॥१८४॥

अर्थ—हे प्राणिमात्राला उत्पन्न करणाऱ्या! हे संसाररूपी हत्तींचा नाश करणाऱ्या! हे सकळ देवांना पूज्य असणाऱ्या! हे जगताचे स्वामी असणाऱ्या! माझें हें बोलणें ऐकलेंस काय?॥ १८१ ॥ अनुभविलेल्या तुझ्या थोरवीकडे लक्ष दिले असतां, तुझ्यापाशीं उभे राहण्यापुरती देखील आमची योग्यता नाही. या अपात्रतेचे वाईट वाटून जरीं तुम्हाला विनंति करायला भ्यालों तरीपण त्यावांचून दुसरा उपायहि नाही. ॥ १८२ ॥ चहूंकडे समुद्र, नद्या, इत्यादि जलाशय जरी भरले, तरी त्या बापड्या चातकाच्या दृष्टीने मात्र ते सर्व कोरडेच होत; कारण जेव्हा मेघांतून पाण्याचा थेंब पडतो, तेव्हाच तो तें पाणी पीत असतो. ॥ १८३ ॥ त्या प्रमाणे उपदेश करणारे श्रीगुरु सर्वत्र असले तरी श्रीकृष्णा! आम्हाला मात्र शरण जाऊन विचारण्याला तूंच एक गति आहेस. हे असो. मला आतां आपल्या विभूति सांग. ॥ १८४ ॥

गूढार्थदीपिका—तैसें श्रीगुरु सर्वत्र आथी। परि कृष्णा आम्हां तूंचि गती—ज्ञानी भक्तच 'श्रीगुरु' या संज्ञेस पात्र असतात. असें ज्ञानीभक्त श्रीगुरुरूपाने सर्वत्र असलें, तरी श्रीगुरुरूपाने ज्या ज्ञानीभक्ताचा शिष्याशीं संबंध झाला असेल तोच त्याचा सर्वस्वीं शरण जाण्याला योग्य श्रीगुरु असतो व त्यांच्यापासूनच शिष्यांनी आपल्या सर्व शंका निरसन करून घेऊन परोक्ष ज्ञान व अपरोक्ष ज्ञान प्राप्त करून घ्यावें.

वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः। याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि॥ १६॥
कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन्। केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया॥ १७॥

अर्थ—भगवंता! ज्या विभूतींच्या द्वारा या त्रैलोक्याला तूं व्यापून आहेस त्या संपूर्ण आपल्या दिव्य विभूती मला सांग. ॥ १६ ॥ हे योगेश्वरा! तुझें अखंड चिंतन करण्याकरितां मी तुला कोठें कोठें जाणावें व कोणकोणत्या पदार्थाचे ठिकाणी माझ्याकडून तूं चिंतिला जाण्याजोगा आहेस?॥ १७॥

जी तुझिया विभूती आघविया। परि व्यापिती या शक्ति दिव्या जिया। तिया आपुलिया दावाविया। आपण मज॥ १८५॥
जिहीं विभूतीं ययां समस्तां। लोकांतें व्यापूनि आहासी अनंता। तिया प्रधाना नामांकिता। प्रगटा करीं॥ १८६॥
जी कैसें मियां तूंतें जाणावें। काय जाणोनि सदा चिंतावें। जरी तूंचि म्हणों आघवें। तरि चिंतनचि न घडे॥ १८७॥

अर्थ—देवा! दिव्यशक्तीने व्यापून असलेल्या ज्या तुझ्या संपूर्ण विभूती आहेत, त्या आपल्या आपण मला दाखवाव्यात. ॥ १८५ ॥ ज्या विभूतींनी या सर्व त्रैलोक्याला तूं व्यापून आहेस, त्यापैकीं मुख्य व नामांकित अशा ज्या असतील, त्या आपण मला सांगा. ॥ १८६ ॥ देवा! मी तुला कशा रीतीने जाणूं शकेन? काय जाणून सर्वदा तुझें चिंतन करतां येईल. हे सांग. सर्व तूंच आहेस असे समजलें तर चिंतनच होऊं शकत नाही. ॥ १८७ ॥

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन। भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम्॥ १८॥

अर्थ—हे जनार्दना! आपले योगसामर्थ्य म्हणजे बहुरूप होण्याचे सामर्थ्य व विभूति यांचे विस्ताराने वर्णन करून पुनः सांगा, तुमच्या वचनामृताचे कितीहि श्रवण केले तरी माझी तृप्ति होत नाही. ॥ १८ ॥

म्हणोनि मागां भाव जैसें। आपुले सांगितले तुवां उद्देशें। आतां विस्तारोनि तैसें। एक वेळ बोलें॥ १८८ ॥
जया जया भावाचिया ठायीं। तूते चिंतितां मज सायास नाहीं। तो विवळ करूनि देई। योग आपुला॥ १८९ ॥

अर्थ—म्हणून मागे जसे आपण संक्षेपाने आपले भाव सांगितले, तसेच आतां विस्ताराने एक वेळ पुनः सांगा. ॥ १८८ ॥ ज्या ज्या भावाचे ठिकाणी तुझे चिंतन करणे मला सोपे जाईल, तो तो आपला योग मला स्पष्ट करून सांगा. ॥ १८९ ॥

गूढार्थदीपिका—योग आपुला—योग म्हणजे ऐक्य हे मागे सांगितलेंच आहे. नामरूपांचे परमेश्वराशीं जे ऐक्य आहे किंवा परमेश्वरच नामरूपाने जो प्रगट झाला आहे, तें ऐक्यच येथे ''योग'' या शब्दाने सूचित केले आहे.

आणि पुसलिया जिया विभूती। त्याही बोलाविया भूतपती। एथ म्हणसी जरी पुढतीं। काय सांगों॥ १९० ॥

अर्थ—आणि देवा! आपल्या ज्या प्रधान विभूति सांगा म्हणून, मी प्रार्थना केली, त्याहि मला सांगा. येथें कदाचित् असे म्हणाल की पुनः पुनः काय सांगायचे आहे!॥ १९० ॥

गूढार्थदीपिका—विभूति-भगवान ज्या अगाधसामर्थ्यादि ऐश्वर्याने मूळचाच युक्त असल्यामुळें सर्वश्रेष्ठ होतो; तें त्याचें सर्वश्रेष्ठत्व जीववर्गातील एखाद्या जीवव्यक्तीच्या ठिकाणीं अंशाने प्रगट झालें असतां, ती व्यक्ति त्या वर्गांत श्रेष्ठ समजली जाते व तिलाच विभूति म्हणतात. सारांश विभूती ही अपूर्ण असा जीव असतो व अवतार हा पूर्णब्रह्म असतो असा या दोहोंत फरक आहे.

जीव मूळांत खरोखर पूर्णब्रह्म असतांना, अज्ञानामुळें आपल्याला अपूर्ण मानतो व त्याला सर्वत्र अपूर्णताच दिसते. आणि जगांत परमेश्वरच जगद्रूपाने प्रगट झाला असला, तरी त्याचा जीवाला अनुभव येत नाही. तो अनुभव विभूतीच्या द्वारा थोडातरी त्याला येऊं शकेल, या भावनेने, अज्ञानी लोकांची भूमिका घेऊन अर्जुनाने भगवंताला, आपल्या विभूती सांगण्याविषयीं प्रार्थना केली.

तरी हा भाव मना। झणें जाय हो जनार्दना। पैं प्राकृताही अमृतपाना। ना न म्हणवे जी॥ १९१ ॥
जें काळकूटाचें सहोदर। जें मृत्युभेणें प्याले अमर। तरि दिहाचे पुरंदर। चौदा जाती॥ १९२ ॥
ऐसा कवण एक क्षीराब्धीचा रस। जया वायांचि अमृतपणाचा आभासु। तयाचाही मिठांशु। जे पुरे म्हणों नेदी॥ १९३ ॥
तया पाबळेयाही येतुलेवरी। गोडियेची आथि थोरी। मग हें तंव अवधारीं। परमामृत सांचें॥ १९४॥
जें मंदराचळु न ढाळितां। क्षीरसागरु न डहुळितां। अनादि स्वभावता। आइतें आहे॥ १९५ ॥
जें द्रव ना नव्हे बद्ध। जेथ नेणिजती रस गंध। जें भलतयांही सिद्ध। आठवलेंचि फावे॥ १९६ ॥
जयाची गोठीचि ऐकतखेंवो। आघवा संसारु होय वावो। बळिया नित्यता लागे येवों। आपणपेयां॥ १९७ ॥
जन्ममृत्यूची भाख। हारपोनि जाय निःशेख। आंत बाहेरी महासुख। वाढोंचि लागे॥ १९८॥
मग दैवगत्या जरी सेविजे। तरि तें आपणचि होऊनि ठाकिजे। तें तुज देतां चित्त माझें। पुरे म्हणों न शके॥ १९९ ॥

अर्थ—देवा जनार्दना! अशी तुझ्या मनांत कदाचित् कल्पना येईल, पण प्रकृतिजन्यहि अमृत प्यायला मिळालें असतां जसें कोणाच्याने नको म्हणवत नाही. ॥ १९१ ॥ जें अमृत, काळकूटाचा भाऊ होय, मृत्यु येऊं नये म्हणून तें इंद्रादी प्यालें, तरी ब्रह्मदेवाचे एक दिवसांत चौदा इंद्र होतात. ॥ १९२ ॥ असा कोणी एक क्षीरसमुद्रांतून निघालेला जो रस, त्याचे ठिकाणी व्यर्थच अमरपणाचा भास आहे; पण त्याचीहि गोडी, 'पुरे' असे म्हणूं देत नाही. ॥ १९३ ॥ अशा त्या क्षुद्र पदार्थाच्या गोडीची एवढी थोरवी आहे. मग पहा, हें तर खरोखर परमामृतच आहे. ॥ १९४॥ या परमामृताकरितां मंदराचलाला फिरवावें लागलें नाही, क्षीरसमुद्राला डहुळावें लागलें नाही, हें अनादि, स्वाभाविक व सिद्ध आहे. ॥ १९५ ॥ जें पातळ नाही, घट्ट नाही, ज्याचे ठिकाणीं रसगंधादि गुणहि नाहीत व जें स्मरण झाल्याबरोबर आपल्या ठिकाणीं मूळचेच आहे असा कोणलाहि अनुभव येतो. ॥ १९६ ॥ या परमामृताचे नुसतें वर्णन

ऐकतांच सर्व संसार खोटा ठरतो व आपला विनाशीपणा जाऊन, बळेंच आपल्याठिकाणी नित्यता धर्म येतो. ॥ १९७ ॥ जन्ममरणाची भाषा नि:शेष नाहीशी होते व आंतबाहेर परमसुख वाढूं लागतें. ॥ १९८ ॥ सुदैवाने या परमामृताचें सेवन झालें असतां, तें आपणच होऊन राहतें, असें हें परमामृत तूं मला पाजीत असतांना माझें चित्त पुरें म्हणूं शकत नाही. ॥ १९९ ॥

तंव तुझें नामचि आम्हां आवडे। वरि भेटी होय आणि जवळिक जोडे। पाठीं गोठी सांगसी सुरवाडें। आनंदाचेनि॥ २००॥

अर्थ— भगवंता! तुझें नांवच तर आम्हाला अत्यंत प्रिय वाटतें. त्यांतहि पुन: तुझें दर्शन होऊन नित्य सान्निध्य आहे. त्यांत पुन: प्रेमाने गोड गोड गोष्टी सांगतोस. ॥ २०० ॥

गूढार्थदीपिका— भक्ताला, भगवंताच्या सगुण स्वरूपाचें व त्याच्या गुणाचें कसें अनुपम व अवीट प्रेम असतें याचें अर्जुनाने, अनुभवाने वर्णन केलें आहे. भगवंताचे स्वरूप पाहतां पाहतां व गुण ऐकतां ऐकतां भक्ताच्या मनाची कधी तृप्तिच होत नाही. "गोपीनां परमानंद आसीद् गोविंददर्शने। क्षणं युगशतमिव यासां येन विनाभवत्॥" (भाग. स्कं, १० अ. १९ श्लो. १६) प्रेमसंपन्न गोपींना नुसत्या भगवंताच्या दर्शनाने देखील परमानंद किंवा ब्रह्मानंद होत होता व त्या देहभान विसरत होत्या. परमात्मा क्षणभर जर त्यांना दिसला नाही तर तो क्षणाचा काळ, त्यांना शेकडों युगासारखा जावा, इतके त्यांना श्रीकृष्णाच्या विरहाचें दु:ख होत होतें.

आतां हें सुख कायिसयासारिखें। कांहीं निर्वचेना मज परितोखें। तरि येतुलें जाणें जें येणें मुखें। पुनरुक्तीही हो॥ २०१॥
हां गा सूर्य काय शिळा। अग्नि म्हणों येत आहे वोंवळा। कां नित्य वाहातया गंगाजळा। पारसेपण असे॥ २०२॥
तुवां स्वमुखें जें बोलिलें। हें आम्हीं नादासि रूप देखिलें। आजि चंदनतरूचीं फुलें। तुरंबीत आहों मां॥ २०३॥
तया पार्थाचिया बोला। सर्वांगें श्रीकृष्ण डोलला। म्हणे भक्तिज्ञानासि जाहला। आगरु हा॥ २०४॥
ऐसा पतिकराचिया तोषाआंतु। प्रेमाचा वेग उचंबळतु। तो सायासें सांवरूनि अनंतु। काय बोले॥ २०५॥

अर्थ— आतां हें होणारें सुख कशासारखें आहे, हें मला झालेल्या आनंदामुळे शब्दाने कांही सांगतां येत नाही. पण एवढें मात्र मला सांगतां येतें की तुमच्या मुखाने तेंच तें सांगितलें गेलें, तरी तें गोडच लागतें. ॥ २०१ ॥ भगवंता! सूर्य शिळा होतो काय? अग्नीला ओवळा म्हणता येते काय? नित्य वाहणाऱ्या गंगाजळाला पारोसेपण असतें काय?॥ २०२ ॥ तुम्ही जें स्वमुखाने सांगितलें, तें ऐकून आम्ही मूर्तिमंत नादब्रह्मच पाहिला किंवा आज सुवासिक अशा चंदनाच्या झाडाच्या फुलांचा सुवास घेत आहों असें वाटलें. ॥ २०३ ॥ असें अर्जुनाचें बोलणें ऐकून श्रीकृष्ण सर्वांगाने डोलूं लागले व खरोखर, अर्जुन हा भक्तिज्ञानाचें कोठार झाला, असें मनांत म्हणाले. ॥ २०४ ॥ याप्रमाणे अर्जुनाच्या ठिकाणीं भक्तिज्ञानाचा आविष्कार पाहून, भगवंताला झालेल्या संतोषाने, भगवंताच्या अंत:करणांत प्रेम उचंबळू लागलें. पण मोठ्या प्रयत्नाने तो प्रेमाचा वेग आवरून देव पुढें बोलू लागलें. ॥ २०५ ॥

श्रीभगवानुवाच

हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः। प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे॥ १९॥

अर्थ— भगवान म्हणतात, हे कुरुकुलांत श्रेष्ठ असणाऱ्या अर्जुना! माझ्या विस्ताराला मर्यादा नसल्यामुळे मी आतां तुला, माझ्या दिव्य अशा मुख्य विभूति सांगतों. ॥ १९ ॥

मी पितामहाचा पिता। हें आठवितांही नाठवे चित्ता। कीं म्हणतसे बा पांडुसुता। भलें केलें॥ २०६॥

अर्थ— (अर्जुनाचें प्रेमांत भगवान इतके मग्न होते की) मी ब्रह्मदेवाचाहि पिता आहे याची आठवण करतांही भगवंताला आठवण होऊं शकत नव्हती; म्हणून भगवंतांनी अर्जुनाला, "बापा अर्जुना!" बरें केलेंस असें म्हटलें. ॥ २०६ ॥

गूढार्थदीपिका— जीवाला अज्ञान असल्यामुळे कशाचीहि विस्मृति होते आणि भगवंताला कधीच अज्ञान नसल्यामुळे व तो सर्वज्ञ असल्यामुळे त्याला विस्मृति कधीच नसते. पण अर्जुनावरील प्रेमामुळे त्याला (भगवंताला) विसर पडला व अर्जुनाला "बापा अर्जुना" असें म्हटलें. आपला विसर पडणें हा प्रेमाचा स्वभावच आहे.

अर्जुनातें बा म्हणे एथ कांहीं। आम्हां विस्मो करावया कारण नाहीं। अंगें तो लेंकरूं काई। नव्हेचि नंदाचें॥ २०७॥

अर्थ—येथें भगवंतांनी अर्जुनाला "बापा अर्जुना" म्हटलें याचें आपणाला आश्चर्य वाटण्याचें कारण नाही. भगवान स्वत: नंदाचें लेंकरूं झालें नाही काय?॥ २०७॥

गूढार्थदीपिका—लौकिकांतहि बाप, प्रेमाने मुलाला बाबा म्हणतांना दिसतो, हें एक प्रेमाचें लक्षण आहे. त्याच लक्षणाने अर्जुनावरील भगवंताच्या प्रेमाचा माऊलींनी उल्लेख केला आहे. भगवान पितामहाचा पिता खरा, पण आपल्या भक्ताचें प्रेम वाढविण्याकरितां आपल्या भक्ताशीं बालभावानेहि क्रीडा करतो.

परि प्रस्तुत ऐसें असो। हें करवी आवडीचा अतिसो। मग म्हणे आइकें सांगतसों। धनुर्धरा॥ २०८॥
तरि तुवां पुसलिया विभूती। तयांचें अपारपण सुभद्रापती। ज्या माझियाचि परी माझिये मती। आकळती ना॥ २०९॥

अर्थ—पण सध्यां हे बाजूला ठेवू. मनांत असलेलें अतिशय प्रेमच असा प्रकार करवित असतें. मग भगवान म्हणतात, धनुर्धरा! सांगतों ते ऐक.॥ २०८॥ तू माझ्या विभूति विचारल्यास, पण अर्जुना! त्यांना मर्यादाच नाही. कारण मलाच माझ्या विभूतींची संख्या करवत नाही.॥ २०९॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे दोरीवर भासणारा सर्प, दोरी जितकी लांब असते तितकाच तो लांब भासतो, त्याप्रमाणे परमात्मा अमर्याद आहे, म्हणून त्याच्याशीं ऐक्य राहून जेवढें कांही भासतें तें सर्व अमर्यादच असतें, हा नियम आहे.

अंगीचिया रोमा किती। जयाचिया तयासि न गणवती। तैसिया माझिया विभूति। असंख्य मज॥ २१०॥
एऱ्हवीं तरी मी कैसा केवढा। म्हणोनि आपणपयाही नव्हेचि फुडा। यालागीं प्रधाना जिया रूढा। तिया विभूती आइकें॥ २११॥
जिया जाणितलियासाठीं। आघविया जाणितलिया होती किरीटी। जैसें बीज आलिया मुठीं। तरूचि आला होय॥ २१२॥
कां उद्यान हातां चढिन्नले। तरी आपैसीं सांपडलीं फळें फुलें। तेवीं देखिलिया जिया देखवलें। विश्व सकळ॥ २१३॥
एऱ्हवीं साचचि गा धनुर्धरा। नाहीं शेवटु माझिया विस्तारा। पैं गगना ऐसिया अपारा। मजमाजीं लपणें॥ २१४॥

अर्थ—आंगावर रोम कितीं आहेत, हें ज्याचे त्याला जसें मोजून सांगतां येत नाही, त्याप्रमाणे माझ्या विभूती मलाच मोजतां येण्याजोग्या नाहीत.॥ २१०॥ एरवीं मी कसा व केवढा आहे, हें मलाच स्पष्ट कळत नाही, म्हणून मुख्य मुख्य विभूती ज्या प्रसिद्ध आहेत त्या सांगतों, ऐक.॥ २११॥ ज्याप्रमाणे बीज हातीं आलें असतां वृक्षच हातात आल्यासारखा होतो, त्याप्रमााणे ज्या माझ्या मुख्य मुख्य विभूती जाणल्या असतां, संपूर्ण विभूती जाणल्या जातील.॥ २१२॥ किंवा बगीचा हातांत आला असतां, त्यांतील फुलें, फळेंहि अनायासें हातांत येतात, त्याप्रमाण ज्या विभूती समजल्याबरोबर सर्व विश्वच विभूतीमय दिसू लागेल.॥ २१३॥ वस्तुत: धनुर्धरा! माझ्या विस्ताराला खरोखर अंत नाही, कारण ज्याला आपण अमर्याद म्हणतो असें आकाशहि माझ्या ठिकाणींच असतें.॥ २१४॥

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थित:। अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च॥ २०॥

अर्थ—हे निद्रा जिंकणाऱ्या अर्जुना! मीच सर्वांचा आत्मा असून, सर्व भूतांच्या हृदयांत आहें, म्हणून सर्व भूतांचा आदि, मध्य व अंत मीच आहे.॥ २०॥

आइकें कुटिलालकमस्तका। धनुर्वेदत्र्यंबका। मी आत्मा असें एकैका। भूतमात्राचां ठायीं॥ २१५॥
आंतुलीकडे मीचि यांचे अंत:करणीं। भूतांबाहेरी माझीचि गंवसणी। आदि मी निर्वाणीं। मध्यही मीचि॥ २१६॥

अर्थ—काळें कुरळें केस मस्तकावर धारण करणाऱ्या, धनुर्विद्येत दुसरा शंकर असलेल्या अशा अर्जुना! ऐक, मी प्रत्येक भूताचे ठिकाणी आत्मरूपाने आहे.॥ २१५॥ या भूतांच्या आंत अंत:करणांत-मीच असून, बाहेरून सर्व भूतांना माझीच खोळ घातलेली आहे व भूतांच्या आदी, अंतीं व मध्येहि मीच आहे.॥ २१६॥

गूढार्थदीपिका—भूतांच्या आंत, बाहेर मीच आहे असें म्हणून भगवंतांनी आपल्या अद्वैतस्वरूपाचे ठिकाणी, त्याच्याहून भूतांचें किंवा नामरूपांचें भिन्न अस्तित्व मानण्यास जागा नाही, हेंच दाखविले आहे.

जैसें मेघां या तळी वरी। एक आकाशचि आंत बाहेरी। आणि आकाशींचि जाले अवधारीं। असणेंही आकाशीं॥ २१७॥
पाठीं लया जे वेळीं जाती। ते वेळीं आकाशचि होऊनि ठाती। तेविं आदि स्थिती अंतगती। भूतांसि मी॥ २१८॥

अर्थ—ज्याप्रमाणे मेघाला खाली-वर, आंत-बाहेर एक आकाशच असतें. आकाशांतच मेघ उत्पन्न होतात व आकाशांतच राहतात.॥ २१७॥ शेवटीं जेव्हा ते नाहीसे होतात, तेव्हा आकाशरूपच होऊन जातात, त्याप्रमाणे सर्व भूतांचे उत्पत्ति, स्थिति, लय मीच आहे.॥ २१८॥

गूढार्थदीपिका—नामरूपात्मक जगांत केवळ भगवंताचेंच एकवस्तुत्व आहे, असें दाखविण्याकरितां, येथे जे दृष्टान्त दिले आहेत, त्यांत मेघ व आकाश अशा भिन्न पदार्थांचा उल्लेख केला असला, तरी परमात्मा अद्वैतस्वरूप असल्यामुळे त्याचे ठिकाणी तो व जग अशा दोन भिन्न पदार्थांचें अस्तित्व मानतां येत नाही.

भगवंताच्या अद्वैताचा बोध होईल, असा जगांत दृष्टान्तच सांपडूं शकत नाही; म्हणून जीवाला भगवंताच्या अद्वैतसत्तेचा बोध करून देण्याकरितां द्वैतांतीलच दृष्टान्त जरी दिले गेले असले, तरी भाषेंतील द्वैताकडे लक्ष न देतां अर्थांतील अद्वैत घेतलें पाहिजे.

ऐसें बहुवस आणि व्यापकपण। माझें विभूतियोगें जाण। तरी जीवचि करूनि श्रवण। आइकोनि आइक॥ २१९॥

अर्थ—असे माझें नानाविध व व्यापक होणें हें माझ्या विभूति व योगामुळे होत असतें असें समज. तर आतां आपल्या जीवाचे व श्रवणेंद्रियाचे ऐक्य करून श्रवणेंद्रियांच्या द्वारा ऐक-म्हणजे अत्यंत एकाग्रचित्ताने ऐक.॥ २१९॥

गूढार्थदीपिका—ऐसें बहुवस आणि व्यापकपण। माझें विभूतियोगें जाण—विभूतीमुळे-म्हणजे विभूति नाना असल्यामुळे-माझे नानात्व असून, योगाने-म्हणजे संपूर्ण नानारूपाशीं माझें ऐक्यच असल्यामुळें माझें व्यापकत्वहि आहे.

याहीवरी त्या विभूती। सांगणें ठेलें सुभद्रापती। सांगेन म्हणितले तुजप्रीती। त्या प्रधाना आइकें॥ २२०॥

अर्थ—मी सर्वत्र नामरूपांत व्यापून असल्यामुळें, विभूति सांगणें खरोखर संपलें; पण अर्जुना! तुला विभूति सांगतों असें म्हटलें, म्हणून माझ्या मुख्य मुख्य विभूति ऐक.॥ २२०॥

आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान्। मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी॥ २१॥
वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः। इन्द्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना॥ २२॥
रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम्। वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम्॥ २३॥

अर्थ—आदित्यांत मी विष्णु असून प्रकाशवंतांत मी किरणवान् सूर्य आहे. मरुद्गणांत मी मरीचि असून, नक्षत्रामध्ये मी चंद्र आहे.॥ २१॥ वेदांमध्ये मी सामवेद असून देवांमध्ये मी इंद्र आहे. इंद्रियामध्ये मी मन असून प्राण्यांमध्ये मी चैतन्य आहे.॥ २२॥ रुद्रांमध्ये मी शंकर आहे, यक्षराक्षसांमध्ये मी कुबेर आहे. वसुमध्ये अग्नी मी आहे आणि उंच शिखर असणाऱ्यांमध्ये मी मेरु आहे.॥ २३॥

हें बोलोनि तो कृपावंतु। म्हणें विष्णु मी आदित्यांआंतु। रवी मी रश्मिवंतु। सुप्रभांमाजी॥ २२१॥
मरुद्गणांचां वर्गीं। मरीचि म्हणे मी शार्ङ्गी। चंद्र मी गगनरंगीं। तारांमाजीं॥ २२२॥
वेदांआंतु सामवेदु। तो मी म्हणे गोविंदु। देवांमाजी मरुद्बंधु। महेंद्र तो मी॥ २२३॥
इंद्रियांआंतु अकरावें। मन तें मी हें जाणावें। भूतांमाजीं स्वभावें। चेतना ते मी॥ २२४॥
अशेषांही रुद्रांमाझारीं। शंकर जो मदनारी। तो मी येथ न धरीं। भ्रांति कांहीं॥ २२५॥
यक्षरक्षोगणांआंतु। शंभूचा सखा जो धनवंतु। तो कुबेरु मी हें अनंतु। म्हणता जाहला॥ २२६॥
मग आठांही वसूंमाझारी। पावकु तो मी अवधारीं। शिखराथिलियां सर्वोपरी। मेरु तो मी॥ २२७॥

अर्थ—असें म्हणून तो कृपाळु भगवान म्हणाला, आदित्यांत मी विष्णु आहे. चांगल्या प्रकाशवान् पदार्थांमध्ये किरणयुक्त असणारा सूर्य मी आहे.॥ २२१॥ मरुद्गणांच्या समुदायात, भगवान म्हणाले, मी मरीचि आहे. आकाशमंडळांतील नक्षत्रांमध्ये चंद्र मी आहे.॥ २२२॥ भगवान म्हणतात, वेदांत सामवेद तो मी आहे. देवांमध्ये

मरुतांचा भाऊ जो इंद्र तो मी आहे. ॥ २२३ ॥ इंद्रियांमध्ये अकरावें जें मन, तें मी आहे असें जाण. भूतमात्रांमध्ये सर्वांच्या ठिकाणी स्वाभाविक असणारें चैतन्य, तें मी आहे. ॥ २२४ ॥ सर्व रुद्रांमध्ये मदनाचा नाश करणारा जो शंकर तो मी आहे, याविषयीं शंका घेऊं नकोस. ॥ २२५ ॥ यक्षराक्षस यांच्या समुदायांत शंकराचा मित्र जो धनसंपन्न कुबेर, तो माझी विभूति होय, असें अनंत म्हणाला. ॥ २२६ ॥ मग अष्टवसूंमध्ये जो अग्नि, तो मी आहे, हें जाण आणि उंच शिखर असलेल्या पर्वतांत मेरु मी आहे. ॥ २२७ ॥

पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम्। सेनानीनामहं स्कन्दः सरसामस्मि सागरः ॥ २४ ॥
महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम्। यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ॥ २५ ॥

अर्थ—अर्जुना! पुरोहितांमध्ये मुख्य जो बृहस्पति, तो मी आहे, असें जाण, सेनापतींमध्ये कार्तिकेय स्वामी माझें स्वरूप होय. सर्व जलाशयांमध्ये सागर हा मी आहे. ॥ २४ ॥ महर्षींमध्ये भृगु हें माझें स्वरूप असून, वाणीने उच्चारिल्या जाणाऱ्या शब्दांमध्यें एकाक्षर जो प्रणव, तो माझें स्वरूप होय. यज्ञांमध्ये जपयज्ञ हा मी आहे. स्थावर पदार्थांमध्ये हिमालय हें माझें स्वरूप होय. ॥ २५ ॥

जो स्वर्गसिंहासना सावावो। सर्वज्ञते आदीचा ठावो। तो पुरोहितांमाजीं रावो। बृहस्पती मी ॥ २२८ ॥

अर्थ—स्वर्गाच्या सिंहासनाला सहायभूत, सर्वज्ञतादि गुणांचें राहतें घर व पुरोहितांचा राजा असा जो बृहस्पति तो मी आहे. ॥ २२८ ॥

गूढार्थदीपिका—स्वर्गाच्या सिंहासनाला म्हणजे इंद्रपदाला दैत्यांकडून भय उत्पन्न झालें असतां बृहस्पतीच्या सल्ल्यानुसार त्याचें संरक्षण केलें जातें, म्हणून बृहस्पतीला "स्वर्गसिंहासना सावावो" हें विशेषण दिलें आहे.

त्रिभुवनींचिया सेनापतीं-। आंत स्कंदु तो मी महामती। जो हरवीर्ये अग्निसंगती। कृत्तिकाआंतु जाहला ॥ २२९ ॥
सकळिकां सरोवरांसीं। माजि समुद्र तो मी जळराशी। महर्षीआंतु तपोराशी। भृगु तो मी ॥ २३० ॥
अशेषांही वाचा-। माजीं नटनाच सत्याचा। तें अक्षर एक मी वैकुंठींचा। वेल्हाळु म्हणे ॥ २३१ ॥
समस्तांही यज्ञांच्यापैकीं। जपयज्ञु तो मी ये लोकीं। जो कर्मत्यागें प्रणवादिकीं। निपजविजे ॥ २३२ ॥

अर्थ—हे महामति अर्जुना! त्रैलोक्यांतील सेनापतिमध्ये श्रेष्ठ, शंकराच्या वीर्यापासून, अग्नीच्या संगतीने, कृत्तिकेच्या पोटीं जन्मलेला, जो कार्तिकस्वामी, तो माझें स्वरूप होय. ॥ २२९ ॥ समस्त सरोवरांमध्ये अगाध जळराशी जो समुद्र तो मी आहे व महर्षीमध्ये तपोराशी जो भृगुऋषि तो मी आहे. ॥ २३० ॥ वाणीने उच्चारिले जाणाऱ्या संपूर्ण शब्दांमध्ये अविनाशीपणाचें नृत्य करणारे जें ॐकाररूपी एक अक्षर तें मी होय, असे वैकुंठांत विलास करणारा भगवान श्रीकृष्ण म्हणतो. ॥ २३१ ॥ जो जपयज्ञ, यज्ञादि कर्म न करतां ॐकारादिकांच्या योगाने प्रगट केला जातो, तो या लोकांतील संपूर्ण यज्ञापैकीं मी आहे. ॥ २३२ ॥

गूढार्थदीपिका—"प्रणवादिकीं" या शब्दाने त्यांत भगवन्नामस्मरणाचा अंतर्भाव केला आहे.

नामजपयज्ञु तो परम। बाधूं न शके स्नानादि कर्म। नामें पावन धर्माधर्म। नाम परब्रह्म वेदार्थी ॥ २३३ ॥

अर्थ—नामजपयज्ञ हा सर्व यज्ञांत श्रेष्ठ आहे. त्याला स्नानादि कर्मांचें बंधन नाही. उलट त्या नामजपयज्ञानेच धर्माधर्म देखील पावन व पूर्ण होतात; कारण नाम हें परब्रह्म आहे असाच वेदार्थ आहे. ॥ २३३ ॥

गूढार्थदीपिका—नामें पावन धर्माधर्म—भगवन्नामानें धर्म पदरीं पडतो व अधर्मादि दोष नाहीसे होतात.

नाम परब्रह्म वेदार्थी—"वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम्" (छां. उ. ६-१-४) या छांदोग्योपनिषदांतील श्रुतीचा "सर्वच नामरूपादि सदात्मनैव सत्यं विकारजातम्" सद्ब्रह्मावर व्यक्त होणारी नामरूपें सद्ब्रह्मरूपच आहेत असा आचार्यांनी भावार्थ व्यक्त केला आहे.

या श्रुतिवचनाच्या आधारें माऊलींनीहि "नाम परब्रह्म वेदार्थी" असे म्हटलें आहे.

अज्ञानाने नामरूपांचे परब्रह्माहून निराळे मानलेलें वस्तुत्व व अस्तित्व, आत्मज्ञानाने नाहीसे झाल्यावर जर तीं नामरूपें सद्ब्रह्माशीं ऐक्य पावतात, म्हणजे सद्ब्रह्माची होतात, म्हणून सद्ब्रह्मरूप होतात, तर पूर्णब्रह्मरूप सगुण

राम-कृष्णाच्या ठिकाणी ऐक्याने असलेलीं त्यांचीं नामें पूर्णब्रह्मस्वरूपच असतात यांत संशय नाही. "भगवन्नामानि तु अखंडशब्दब्रह्मरूपाणि" (उज्वलनीलमणी श्लो. १८). भगवंताचीं नांवें अखंडब्रह्मरूपच आहेत असे उज्वलनीलमणी या ग्रंथावरील आनंदचंद्रिका या टीकेंत विश्वनाथ चक्रवर्तीहि म्हणतात.

स्थावरां गिरीं आंतु। पुण्यपुंज जो हिमवंतु। तो मी म्हणे कांतु। लक्ष्मीयेचा॥ २३४॥

अर्थ—स्थावर जे पर्वतादिक पदार्थ त्यांत पुण्याची राशी जो हिमालय तो मी आहे असें लक्ष्मीचा पति भगवान श्रीकृष्ण म्हणाले.॥ २३४॥

अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः। गन्धर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः॥ २६॥
उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम्। ऐरावतं गजेन्द्राणां नराणां च नराधिपम्॥ २७॥
आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक्। प्रजनश्चास्मि कन्दर्पः सर्पाणामस्मि वासुकिः॥ २८॥
अनन्तश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम्। पितॄणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम्॥ २९॥

अर्थ—सर्व वृक्षांमध्ये अश्वत्थवृक्ष मी आहे. देवर्षिमध्ये नारद मी आहे. गंधर्वामध्ये चित्ररथ गंधर्व मी आहे. सिद्धांमध्ये कपिल महामुनि मी आहे॥ २६॥ सर्व घोड्यांमध्ये व सर्व गजांमध्ये अमृताकरितां मंथन केलेल्या क्षीरसमुद्रांतून उत्पन्न झालेला उच्चैःश्रवा घोडा व ऐरावत गज मी आहे. मनुष्यांमध्ये राजा माझी विभूति आहे.॥ २७॥ आयुधांमध्ये वज्र मी आहे, गाईमध्ये कामधेनु मी आहे. संतति उत्पन्न करणाऱ्यांमध्ये मदन मी आहे. सर्पांमध्ये वासुकि मी आहे.॥ २८॥ नागांमध्ये अनंत मी आहे. जळांत राहणाऱ्यांमध्ये वरुण मी आहे. पितृगणांमध्ये अर्यमा माझी विभूति आहे आणि शासन करणाऱ्यांमध्ये यम मी आहे.॥ २९॥

कल्पद्रुम हन पारिजातु। गुणें चंदनुही वाड विख्यातु। तरि ययां वृक्षजातांआंतु। अश्वत्थु तो मी॥ २३५॥
देवऋषी आंतु पांडवा। नारदु तो मी जाणावा। चित्ररथु मी गंधर्वां। सकळिकांमाजीं॥ २३६॥
ययां अशेषांही सिद्धां-। माजीं कपिलाचार्यु मी प्रबुद्धा। तुरंगजातां प्रसिद्धां-। आंत उच्चैःश्रवा मी॥ २३७॥
राजभूषण गजांआंतु। अर्जुना मी गा ऐरावतु। पयोराशी सुरमथितु। अमृतांशु तो मी॥ २३८॥
ययां नरांमाजीं राजा। तो विभूतिविशेष माझा। जयातें सकळ लोक प्रजा। होऊनि सेविती॥ २३९॥
पैं आघवेयां हातियेरां-। आंत वज्र तें मी धनुर्धरा। जें शतमखोत्तीर्णकरा। आरूढोनि असे॥ २४०॥
धेनूंमध्यें कामधेनु। ते मी म्हणे विष्वक्सेनु। जन्मवितयाआंत मदनु। तो मी जाणें॥ २४१॥
सर्पकुळाआंत अधिष्ठाता। वासुकी गा मी कुंतीसुता। नागांमाजी समस्तां। अनंतु तो मी॥ २४२॥

अर्थ—गुणाने, कल्पवृक्ष, पारिजात, चंदन हे वृक्ष श्रेष्ठ म्हणून प्रसिद्ध आहेत; तरीपण या सर्व वृक्षामध्ये अश्वत्थवृक्ष मी आहे.॥ २३५॥ अर्जुना! देवर्षीमध्ये नारदऋषि मी आहे असे जाण. सर्व गंधर्वामध्ये चित्ररथ गंधर्व हा मी होय.॥ २३६॥ या सर्व सिद्धांमध्ये, सूज्ञ अर्जुना! कपिलाचार्य मी होय. अमृतासाठी देवांनी केलेल्या क्षीरसागराच्या मंथनांतून निघालेले उच्चैःश्रवा व ऐरावत अनुक्रमें हे दोन, अश्वांच्या प्रसिद्ध असलेल्या जातिमध्ये व राज्यभूषण जे गज त्यामध्ये, माझ्या विभूति आहेत.॥ २३७-२३८॥ ज्याची सर्व लोक प्रजाजन होऊन सेवा करतात तो राजा, सर्व मनुष्यांमध्ये माझी विभूति होय.॥ २३९॥ संपूर्ण हत्यारांमध्ये जे शंभर यज्ञ करणाऱ्या इंद्राच्या हातांत असतें तें वज्र मी आहे.॥ २४०॥ गायींमध्ये कामधेनु ती मी होय, असें भगवान म्हणतात. जन्म देणाऱ्यांमध्ये मदन हा माझें स्वरूप होय असें जाण.॥ २४१॥ अर्जुना! संपूर्ण सर्पकुळांमध्ये त्या कुळाचा अधिपति जो वासुकि तो मी आहे व सर्व नागांमध्ये अनंत मी आहे.॥ २४२॥

गूढार्थदीपिका—विषारी ते सर्प व निर्विष ते नाग अशा भेदाला धरून सर्प व नाग असे दोन प्रकार सांगितले आहेत.

अगा यादसांआंतु। जो पश्चिमप्रमदेचा कांतु। तो वरुण मी हें अनंतु। सांगत असे॥ २४३॥
आणि पितृगणां समस्तां-। माजीं अर्यमा जो पितृदेवता। तो मी हें तत्त्वतां। बोलत आहें॥ २४४॥

जगाचीं शुभाशुभें लिहिती। प्राणियांचिया मानसाचा झाडा घेती। मग केलियानुरूप होती। भोगनियम जे॥ २४५॥
तयां नियमितयां माजी यमु। जो कर्मसाक्षी धर्मु। तो मी म्हणे आत्मारामु। रमापती॥ २४६॥

अर्थ—अर्जुना! जलांत राहणाऱ्या प्राण्यांमध्ये पश्चिमदिशारूपी स्त्रियेचा पति जो वरुण तो मी आहे असे श्रीकृष्ण सांगूं लागले.॥ २४३॥ सर्व पितरांच्या समुदायांत अर्यमा नावांची पितृदेवता मी आहे, हें मी खरें सांगतों.॥ २४४॥ सर्व प्राण्यांची पापपुण्यें लिहून ठेऊन व त्यांच्या मनांतील सर्व जाणून, त्याप्रमाणे प्राण्यांना नियमित जे सुखदु:खांचे भोग देतात.॥ २४५॥ असे भोगांचें नियमन करणाऱ्यामध्ये, कर्माचा साक्षी जो यमधर्मराज तो मी आहे, असें रमेचा पति आत्माराम भगवान श्रीकृष्ण म्हणाले.॥ २४६॥

प्रह्लादश्चास्मि दैत्यानां कालः कलयतामहम्। मृगाणां च मृगेन्द्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम्॥ ३०॥
पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम्। झषाणां मकरश्चास्मि स्त्रोतसामस्मि जाह्नवी॥ ३१॥

अर्थ—दैत्यांमध्ये प्रह्लाद हा मी आहे. गणना करणाऱ्यांमध्ये काल माझें स्वरूप आहे. श्वापदांमध्ये सिंह मी आहे व पक्ष्यांमध्ये गरुड मी आहे.॥ ३०॥ वाहणाऱ्यांमध्ये वायु मी आहे. शस्त्र धरणाऱ्यांमध्ये राम मी आहे, जलांत राहणाऱ्या पुच्छवान प्राण्यांमध्ये मगर मी आहे व संपूर्ण नद्यांमध्ये जान्हवी मी आहे.॥ ३१॥

अगा दैत्यांचियां कुळीं। प्रल्हादु तो मी न्याहाळीं। म्हणोनि दैत्यभावादिमेळीं। लिंपेचिना॥ २४७॥
पैं कळितयांमाजीं महाकाळु। तो मी म्हणे गोपाळु। श्वापदांआंतु शार्दुळु। तो मी जाण॥ २४८॥
पक्षिजातीमाझारीं। गरुड तो मी अवधारीं। यालागीं जो पाठीवरी। वाहों शके मातें॥ २४९॥
पृथ्वीचिया पैसारा-। माजीं घडी न लगतां धनुर्धरा। एकेंचि उड्डाणें सातांहि सागरां। प्रदक्षिणा करी जो॥ २५०॥
तयां वहिलियां गतिमंतां-। आंत पवनु तो मी पांडुसुता। शस्त्रधरां समस्तां-। माजीं श्रीराम तो मी॥ २५१॥

अर्थ—अर्जुना! दैत्यांच्या कुळांमध्ये प्रह्लाद मी आहे, पहा. म्हणूनच त्याच्या ठिकाणीं दैत्यांच्या स्वभावाचा स्पर्श नव्हता.॥ २४७॥ श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना! गणना करणाऱ्यांमध्ये महाकाळ मी आहे आणि वन्यपशूमध्ये सिंह मी आहे असें जाण.॥ २४८॥ सर्व पक्षिजातीमध्ये गरुड मी आहे हें जाण, म्हणूनच तो मला पाठीवर वाहूं शकतो.॥ २४९॥ एका उड्डाणासरसे साताहि सागराला प्रदक्षिणा होईल अशा वेगाने वाहणारे जेवढे या संपूर्ण पृथ्वींवर पदार्थ आहेत, त्यांत वायु तो मी आहे आणि शस्त्र धारण करणाऱ्यांमध्ये प्रभू रामचंद्र मी आहे.॥ २५०-२५१॥

जेणें सांकडलिया धर्माचेन कैवारे। आपणपयां धनुष्य करूनि दुसरें। विजयलक्ष्मीये एक मोहरें। केलें त्रेतीं॥ २५२॥

अर्थ—ज्यांनी संकटांत पडलेल्या धर्माचा कैवार घेऊन व आपल्याच आपल्याहून निराळे असें धनुष्य करून घेऊन त्रेतायुगामध्यें एका विजयरूपी लक्ष्मीला आपल्याच समोर केले—म्हणजे संकटांत सांपडलेल्या धर्माला एकसारखा विजयच मिळवून दिला असा अर्थ.॥ २५२॥

गूढार्थदीपिका—आपणपयां धनुष्य करूनि दुसरें—मायामोहित जीवाचा देह जडविनाशी असतो; म्हणून त्या देहधारी जीवाने धारण केलेली आयुधेंहि जडविनाशी असतात. पण पूर्णब्रह्म अशा रामचंद्रादि अवतारांचे देह पूर्णब्रह्मच असल्यामुळे आणि पूर्णब्रह्माच्या ज्ञानाने, माया ही वस्तुच नाही असा त्यांना अनुभव येत असल्यामुळे, त्याच्या ठिकाणीं असणारीं आयुधें जडविनाशी राहूं शकत नाहीत. तीं चेतनच असतात.

"कैकय्यां भरतो जज्ञे पांचजन्यांशसंभवः" "सुदर्शनांशाच्छत्रुघ्नः" (पद्मपुराण उत्तरखंड अ. २६) भरत हा भगवान विष्णूच्या हातांत असलेल्या पांचजन्याचा अंश असून शत्रुघ्न हा सुदर्शनाचा अंश होय, असें पद्मपुराणांत सांगितलें आहे. वाल्मिकी रामायण बालकांड अध्याय १५ श्लोक २१ यांतील "कृत्वात्मानं चतुर्विधम्" या पदावर टीका करतांना टीकाकार म्हणतात "अत्रात्मानमित्युक्त्या शंखचक्रानन्तानामपि भगवद्रूपता सूचिता" भगवंतानी आपल्यालाच चार प्रकारचे करून घेतले असें जें म्हटले आहे त्यांत भगवान विष्णुच्या देहाच्या ठिकाणीं असलेली शंखचक्रादि आयुधें सच्चिदानंद भगवद्रूपच होतीं, असें सुचविले आहे.

पाठीं उभें ठाकूनि सुवेळीं। प्रतापलंकेश्वराचीं सिसाळीं। गगनीं उदो म्हणतया हस्तबळी। दिधलीं भूतां॥ २५३॥

जेणें देवांचा मानु गिंवसिला। धर्मासि जीर्णोद्धारु केला। सूर्यवंशीं उदेला। सूर्य जो कां॥ २५४॥
तो हतियेरुपरजितयांआंतु। रामचंद्र मी जानकीकांतु। मकर मी पुच्छवंतु। जळचरांमाजीं॥ २५५॥
पैं समस्तांही वोघां-। मध्यें जे भगीरथें आणितां गंगा। जन्हूनें गिळिली मग जंघा। फाडूनि दिधली॥ २५६॥
ते त्रिभुवनैकसरिता। जान्हवी मी पंडुसुता। जळप्रवाहां समस्तां-। माझारीं जाणें॥ २५७॥
ऐसेनि वेगळालां सृष्टीपैकीं। विभूती नाम सुतां एकेकीं। सगळेन जन्मसहस्रें अवलोकीं। अर्ध्या नव्हती॥ २५८॥

अर्थ—नंतर सुवेल पर्वतावर उभे राहून, मूर्तिमंत प्रताप असा जो लंकेचा राजा रावण, त्याचीं मस्तकें. आकाशात उदोउदो करणारीं भूतपिशाच्चें, यांच्या हातांत त्यांना बळी म्हणून ज्याने अर्पण केलीं.॥ २५३॥ ज्याने देवाचा मान पुनः त्यांना प्राप्त करून दिला व धर्माचा जीर्णोद्धार केला, जो सूर्यवंशामध्ये मूर्तिमंत उगवलेला सूर्यच होय.॥ २५४॥ हत्यार धारण करणाऱ्यांमध्ये तो सीतापति रामचंद्र, मी आहे. जलामध्ये राहणाऱ्या पुच्छवंत प्राण्यामध्ये मगर मी आहे.॥ २५५॥ आणखी संपूर्ण प्रवाहांमध्ये जी गंगा, भगीरथ राजा पृथ्वीतलावर आणीत असतां, जन्हुराजाने गिळली व मग आपली मांडीं फाडून परत सोडली.॥ २५६॥ अशी त्रिभुवनांत एकच वाहणारी, अर्जुना! जान्हवी नदी, ती सर्व जलप्रवाहांमध्ये माझें रूप होय असें जाण.॥ २५७॥ याप्रमाणे निरनिराळ्या भूतसृष्टीमधील एका एका विभूतीचें नांव सांगतांना हजारों जन्म खर्ची घातले, तरी अर्ध्या देखील विभूति सांगणें होणार नाही, पहा!॥ २५८॥

सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन। अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम्॥ ३२॥
अक्षराणामकारोऽस्मि द्वन्द्वः सामासिकस्य च। अहमेवाक्षयः कालो धाताहं विश्वतोमुखः॥ ३३॥

अर्थ—या सर्व कार्यसृष्टीचा आदि, मध्य व अंत, अर्जुना! मीच आहे. विद्यांमध्ये अध्यात्मविद्या मी आहे. बोलणाऱ्यांच्या बोलण्यांत वाद मी आहे.॥ ३२॥ अक्षरांमध्ये अकार मी आहे. सर्व समासांमध्यें द्वंद्वसमास मी आहे. सर्वांचा ग्रास करणारा असा जो अक्षय काल तो मीच असून, सर्व प्राण्यांच्या कर्मांचें फळ देणारा व सर्वत्र मुखें असणारा मीच आहे.॥ ३३॥

जैसीं अवघींचि नक्षत्रें वेंचावीं। ऐसी चाड उपजेल जैं जीवीं। तैं गगनाची बांधावी। लोथ जेवीं॥ २५९॥
कां पृथ्वीये परमाणूंचा उगाणा घ्यावा। तरि भूगोलुचि काखे सुवावा। तैसा विस्तरु माझा पहावा। तरि जाणावें मातें॥ २६०॥
जैसें शाखांसी फूलफळ। एकिहेळां वेटाळूं म्हणिजे सकळ। तरि उपडूनियां मूळ। जेवीं हातीं घेपे॥ २६१॥
तेवीं माझे विभूतिविशेष। जरी जाणों पाहिजेती अशेष। तरी स्वरूप एक निर्दोष। जाणिजे माझें॥ २६२॥
येऱ्हवीं वेगळालिया विभूती। कायिएक परिससी किती। म्हणोनि एकीहेळां महामती। सर्व मी जाण॥ २६३॥
मी आघवियेचि सृष्टी। आदिमध्यांतीं किरीटी। ओतप्रोत पटीं। तंतु जेवीं॥ २६४॥
ऐसिया व्यापका मातें जैं जाणावें। तैं विभूतिभेदें काय करावें। परि हे तुझी योग्यता नव्हे। म्हणोनि असो॥ २६५॥

अर्थ—सर्व नक्षत्रें वेंचून घ्यावीं अशी जर आपल्याला मनांत इच्छा झाली तर, ज्याप्रमाणे आकाशाची मोट बांधली पाहिजे.॥ २५९॥ किंवा पृथ्वीच्या संपूर्ण परमाणूंचा झाडा घ्यावा अशी इच्छा झाल्यास, ज्याप्रमाणे संबंध भू गोलच खाकेंत उचलून घेतला पाहिजे, त्याप्रमाणे माझा संपूर्ण विस्तार पाहावयाचा असल्यास मलाच जाणलें पाहिजे.॥ २६०॥ ज्याप्रमाणे वृक्षाचीं संपूर्ण फुलें, फळें फांद्यासह एकदम घ्यावीं असें म्हटल्यास झाडाचें मूळच उपटून हातीं घ्यावें लागतें.॥ २६१॥ त्याप्रमाणे संपूर्ण माझे विभूतिविशेष जाणूं म्हटल्यास, माझें एक शुद्ध स्वरूपच जाणलें पाहिजे.॥ २६२॥ नाही तर वेगळ्या एक एक विभूति, अर्जुना! तूं काय व किती ऐकशील? म्हणून बुद्धिमंता! मीच सर्व आहे हें एकदा जाणून घे.॥ २६३॥ ज्याप्रमाणें वस्त्राचे आदी, मध्य व अंती एक सूतच ओतप्रोत भरलेले असतें, त्याप्रमाणे या संपूर्ण सृष्टीचे आदी, मध्य व अंती एक मीच संपूर्ण भरून आहे.॥ २६४॥ अशा सर्वव्यापक मला जर जाणलें, तर या भिन्न-भिन्न विभूति जाणण्याचा काय उपयोग आहे? पण असें मला व्यापक स्वरूपाने जाणण्याला तुझी योग्यता नाही; म्हणून तें सांगून उपयोग नाहीं.॥ २६५॥

गूढार्थदीपिका—संपूर्ण सृष्टींत एक भगवंतच भरलेला आहे किंवा परमेश्वराचे व नानारूपाचें अत्यंत ऐक्य

असून परमेश्वरच नामरूपाने नटला आहे. असें जाणणें, याला योग म्हणतात, हें मागें सांगितलेंच आहे. ज्ञानी पुरुषालाच या योगाचा अनुभव येतो. विभूति ह्या अज्ञान्याकरिता असतात असें जें आम्ही मागें म्हटलें आहे तें माऊलीच्या या ओवीच्या वचनाच्या आधारेच म्हटलें आहे.

कां जे तुवां पुसलिया विभूती। म्हणोनि तिया आईक सुभद्रापती। तरी विद्यांमाजीं प्रस्तुती। अध्यात्मविद्या ते मी॥ २६६ ॥
अगा बोलतयांचिया ठायीं। वादु तो मी पाहीं। जो सकलशास्त्रसंमतें कहीं। सरेचिना॥ २६७॥
जो निर्वचूं जातां वाढे। आइकतयां उत्प्रेक्षा सळु चढे। जयावरी बोलतयांचीं गोडें। बोलणीं होती॥ २६८॥
ऐसा प्रतिपादनामाजी वादु। तो मी म्हणे गोविंदु। अक्षरांआंतु विशदु। अकारु तो मी॥ २६९॥

अर्थ—हे अर्जुना! त्वां मला माझ्या विभूती सांग असें म्हटलें, म्हणून त्याच ऐक. सर्व विद्येमध्ये अध्यात्मविद्या मी आहे. ॥ २६६ ॥ अर्जुना! बोलणाऱ्यांच्या ठिकाणी सर्व शास्त्रांचे आधारें होणारा व कधी न संपणारा जो वाद तो मी आहे. ॥ २६७ ॥ जो प्रतिपादन करूं जातां वाढतो, ऐकणाऱ्यांच्या मनांत कोट्या करण्याच्या उर्मी उठतात आणि ज्यांत बोलणांऱ्यांचीं गोड बोलणीं होतात. ॥ २६८ ॥ असा जो वाद, तो सर्व प्रकारच्या प्रतिपादनामध्ये मी आहे असे भगवान म्हणतात. अक्षरांमध्ये स्पष्ट जो 'अ' कार तो माझें स्वरूप होय. ॥ २६९ ॥

गूढार्थदीपिका—प्रतिपादनामाजी वाद—बोलण्याचे जल्प, वितंड, वाद असे तीन प्रकार आहेत. वादाचें बोलणें निराग्रही बुद्धीने व शास्त्राचा प्रमाण मानून गोड भाषेंत होत असतें, म्हणून त्या वादाला भगवंतांनी आपली विभूति म्हटलें आहे.

पैं गा समासांमाझारीं। द्वन्द्व तो मी अवधारीं। मशकाललगोनि ब्रह्मावेरीं। ग्रासिता तो मी॥ २७०॥
मेरुमंदरादिकीं सर्वीं। सहित पृथ्वीतें विरवी। जो एकार्णवातेंही जिरवीं। जेथिंचा तेथें॥ २७१॥
जो प्रळयतेजा देत मिठी। सगळिया पवनातें गिळी किरीटी। आकाश जयाचिया पोटीं। सामावलें॥ २७२॥
ऐसा अपार जो काळु। तो मी लक्ष्मीलीळु। मग पुढती सृष्टीचा मेळु। सृजिता तो मी॥ २७३॥

अर्थ—आणि सर्व समासांमध्ये द्वंद्वसमास मी आहे असें जाण. मशकापासून ब्रह्मदेवापर्यंत सर्वांना ग्रासणारा (अक्षय जो काळ) तो मी आहे. ॥ २७० ॥ सातहि समुद्राचा एक समुद्र करून मेरुमंदार इत्यादि सर्व पर्वतासहित संपूर्ण पृथ्वीला त्या झालेल्या समुद्रांत नाहीसे करतो व त्या एकरूप झालेल्या समुद्रालाहि (प्रलय तेजाने) जेथल्या तेथे शोषून टाकतो. ॥ २७१ ॥ पुढें जो प्रलयकालच्या तेजालाहि मिठी मारून सर्व वायूलाहि जो गिळतो आणि शेवटीं आकाशहि ज्याच्या पोटांत, अर्जुना! सामाविलें जातें. ॥ २७२ ॥ असा अमर्याद जो काळ, तो मी होय, असें लक्ष्मीशीं कीडा करणारा श्रीकृष्ण म्हणूं लागला. मग पुनः सृष्टीचा समुदाय उत्पन्न करणारा तोहि मीच आहे. ॥ २७३ ॥

गूढार्थदीपिका—सृष्टीचा मेळ। सृजिता तो मी—कार्य उत्पन्न करणाऱ्याला निमित्तकारण म्हणतात. भगवानच सृष्टिकार्याचें निमित्तकारण आहे असा अर्थ.

मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम्। किर्तिः श्रीर्वाक् च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा॥ ३४॥
बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम्। मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः॥ ३५॥

अर्थ—सर्व नाहीसे करणारा मृत्यु मीच आहे. उत्पन्न होणाऱ्या वस्तूंना उत्पन्न करणारा मीच आहे. स्त्रियांमध्ये कीर्ति, श्री, वाणी, स्मृति, मेधा, धृति, क्षमा ह्या माझ्या विभूति आहेत. ॥ ३४ ॥ सामामध्ये बृहत्साम हे माझे स्वरूप होय. छंदांमध्ये गायत्री छंद, महिन्यांत मार्गशीर्ष व ऋतूंमध्ये वसंत ऋतु मी आहे. ॥ ३५ ॥

सृजिलिया भूतांते मीचि धरीं। सकळां जीवनही मीचि अवधारीं। शेखीं सर्वांतें या संहारीं। तेव्हा मृत्युही मीचि॥ २७४॥

अर्थ—उत्पन्न झालेल्या भूतसृष्टीला मीच धारण करतो. सर्व सृष्टीला मीच जीवन आहे—म्हणजे माझ्यामुळें त्यांचें पोषण होते व वृद्धि होते-शेवटीं सर्वांचा संहार मीच करतों, म्हणून मृत्युहि मीच आहे. ॥ २७४ ॥

गूढार्थदीपिका—कोणतेहि कार्य आपल्या उपादान कारणाचें ठिकाणींच उत्पन्न होतें, तेथेंच त्याची स्थिति असते व शेवटीं तेथेच त्याचा लय होतो; म्हणून सर्व सृष्टीचें भगवानच उपादानकारण आहे असा या ओवीचा अर्थ आहे.

आतां स्त्रीगणांचां पैंकीं। माझिया विभूती सात आणिकी। तिया ऐक कवतिकीं। सांगिजतील॥ २७५॥
तरी नित्य नवी जे कीर्ति। अर्जुना ते माझी मूर्ती। आणि औदार्येसीं जे संपत्ती। तेही मीचि जाणें॥ २७६॥

अर्थ—आतां स्त्रीजातीपैकीं माझ्या आणखी सात विभूति आहेत. त्याहि कौतुकाने सांगतो, ऐक.॥ २७५॥ तरी नित्य नवी जी कीर्ति आहे ती, अर्जुना! माझी विभूति होय आणि औदार्यासह जी संपत्ति तीहि माझी विभूति होय, असें जाण.॥ २७६॥

गूढार्थदीपिका—नित्य नवी जे कीर्ती। अर्जुना ते माझी मूर्ती—लोकांत निष्कलंक कीर्ति होऊन पुन: नव्या नव्या कीर्तीची त्यात भर पडत जाणें याला नित्य नवी कीर्ति म्हणतात. हें सात्विक सदाचरणाचें फळ असल्यामुळे अशा कीर्तीला भगवंतांनी आपली विभूति म्हटलें आहे.

औदार्येसीं जे संपत्ती—राजस पुण्यकर्माने जी संपत्ति प्राप्त होते, तींत औदार्य नसतें. ती कृपणादि दुर्गुणासह असते आणि तिचा विनियोग सकामतेने केला जातो, सात्विक पुण्याने जी संपत्ति प्राप्त होते. ती औदार्यासहित असते-म्हणजे निष्काम चित्ताने सात्विक कर्मांतच उदारपणें तिचा विनियोग केला जातो-म्हणून ही संपत्ति माझें स्वरूप होय असें भगवान म्हणतात.

आणि ते गा मी वाचा। जे सुखासनीं न्यायाचां। आरूढोनि विवेकाचां। मार्गी चाले॥ २७७॥
देखिलेनि पदार्थें। जे आठवूनि दे मातें। ते स्मृतिही पै एथें। त्रिशुद्धी मी॥ २७८॥
पैं स्वहिता अनुयायिनी। मेधा ते गा मी इये जनीं। धृती मी त्रिभुवनीं। क्षमा ते मी॥ २७९॥
एवं नारींमाझारीं। या सातही शक्ति मीचि अवधारी। ऐसें संसारगजकेसरी। म्हणता जाहला॥ २८०॥
वेदराशीचिया सामा-। आंत बृहत्साम जें प्रियोत्तमा। तें मी म्हणे रमा-। प्राणेश्वरु॥ २८१॥

अर्थ—आणि जी वाणी न्यायाला व विवेकाला धरून असते ती माझी विभूति होय.॥ २७७॥ पदार्थ पाहिल्याबरोबर माझी आठवण करून देणारी स्तुति, माझी विभूति होय हें त्रिवार सत्य जाण.॥ २७८॥ आपल्या आत्महिताचा घात न करणारी धारणाशक्ति, ही माझी विभूति होय आणि आत्मप्राप्तिकरितां शमदमादिसाधनांचें दु:ख, ज्या धैर्याने सहन केलें जातें, ते धैर्य व कोणी अपकार केला असतां, उलट त्याच्यावर अपकार करण्याची वृत्ति न उठणें, ही जी क्षमा, ती माझी विभूति होय.॥ २७९॥ याप्रमाणे स्त्री जातिपैकीं या सात शक्ति माझ्या विभूति आहेत, हें जाण, असें संसारहत्तीचा नाश करणारा सिंह, भगवान श्रीकृष्ण म्हणते झाले.॥ २८०॥ हे प्रियतम अर्जुना! संपूर्ण वेदराशींत श्रेष्ठ असलेल्या सामवेदांत, बृहत्साम हें माझें स्वरूप आहे, असे रमेचे प्राणेश्वर भगवान श्रीकृष्ण म्हणतात.॥ २८१॥

गूढार्थदीपिका—''वेदानां सामवेदोऽस्मि'' सर्व वेदांत सामवेद माझी विभूति आहे, असे मागें भगवंतांनी सांगितले. येथे पुन: त्या सामवेदांतील ''त्वामिद्धि हवामहे'' या ऋचाने जें इंद्राचें परमेश्वरस्वरूपाने विशेष गायन केलें आहे व ज्याला बृहत्साम म्हणतात, त्या स्तोत्राला भगवंतांनी आपली विभूति म्हटलें आहे. येथे सर्व वेदांत आपल्या वैदिक भगवत्स्तुत्यात्मक सामवेदभागाला भगवंतांनी स्वविभूतित्व सांगून, सर्व कर्मरूपधर्मापेक्षा आपल्या स्तवनरूप धर्माचें श्रेष्ठत्व दाखविलें आहे.

भारतातील विष्णुसहस्त्रनामाचे प्रारंभी धर्मराजाने भीष्माला ''को धर्म: सर्वधर्माणां भवत: परमो मत:'' आपल्या मतें सर्व धर्मांत कोणता धर्म श्रेष्ठ आहे, असा प्रश्न केला असतां, भीष्माने'' ''यद्भक्त्या पुंडरीकाक्षं स्तवैरर्चयेन्नर: सदा'' भक्तिभावाने भगवंताची स्तुति करणें हाच सर्व धर्मांत श्रेष्ठ धर्म आहे, असे उत्तर दिलें आहे.

गायत्रीछंद जें म्हणिजे। तें सकळां छंदांमाजि माझें। स्वरूप हें जाणिजे। निभ्रांत तुवां॥ २८२॥
मासांआंत मार्गशीरु। तो मी म्हणे शार्ङ्गधरु। ऋतूंमाजीं कुसुमाकरु। वसंतु तो मी॥ २८३॥

अर्थ—ज्याला गायत्री छंद म्हणतात, तें सर्व छंदामध्ये माझें स्वरूप आहे, हें नि:संशय जाण.॥ २८२॥ मासांमध्ये मार्गशीर्षमास मी आहे व ऋतूंमध्ये वसंतऋतु मी आहे, असें श्रीकृष्ण म्हणाले.॥ २८३॥

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम्। जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम्॥ ३६॥
वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पाण्डवानां धनञ्जयः। मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः॥ ३७॥

अर्थ—छळणाऱ्यांमध्ये द्यूत ही माझी विभूति आहे. तेजस्वी पदार्थांमध्ये तेज माझी विभूति आहे. जय मिळविणाऱ्यांमध्ये जय ही माझी विभूति होय. उद्यमामध्ये न्यायाने केलेला उद्यम मी आहे. सत्व ज्यांच्यात आहे अशा सात्विकांमध्ये सत्व मी आहे. ॥ ३६ ॥ यादवकुळांत वासुदेव मी आहे, पांडवांत अर्जुन मी आहे. मुनीमध्यें व्यास मी आहे व कवीमध्ये शुक्राचार्य मी आहे. ॥ ३७ ॥

छळितयां विंदाणा-। माजीं जूं तें मी विचक्षणा। म्हणोनि चोहटां चोरी परी कवणा। निवारूं न ये॥ २८४॥
अगा अशेषांही तेजसां-। आंत तेज तें मी भरंवसा। विजयो मी कार्योद्देशां। सकळांमाजीं॥ २८५॥
जेणें चोखाळत दिसे न्याय। तो व्यवसायांत व्यवसाय। माझेंचि स्वरूप हें राय। सुरांचा म्हणे॥ २८६॥
सत्त्वाथिलियांआंतु। सत्त्व मी म्हणे अनंतु। यादवांमाजीं श्रीमंतु। तोचि तो मी॥ २८७॥
जो देवकी वसुदेवास्तव जाहला। कुमारीसाठीं गोकुळीं गेला। तो मी प्राणासकट पियाला। पूतनेतें॥ २८८॥
नुघडतां बाळपणाची फुली। जेणें मिया अदानवी सृष्टि केली। करीं गिरि धरूनि उमाणिली। महेंद्रमहिमा॥ २८९॥
कालिंदीचें हृदयशल्य फेडिलें। जेणें मियां जळत गोकुळ राखिलें। वासरुवांसाठीं लाविलें। विरंचीस पिसें॥ २९०॥
प्रथमदशेचिये पहांटे-। माजि कंसा ऐशीं अचाटें। महाधेंडीं अवचटें। लीळाचि नासिलीं॥ २९१॥
हें काय कितीएक सांगावें। तुवांही देखिलें ऐकिलें असे आघवें। तरि यादवांमाजीं जाणावें। हेंचि स्वरूप माझें॥ २९२॥

अर्थ—हे सूज्ञ अर्जुना! छळणाऱ्या प्रकारांत जुगार हें माझें स्वरूप होय. म्हणून द्यूत, उघड चव्हाट्यावर चोरी करणेंच होय; पण कोणाला त्यापासून परावृत्त करूं नये. ॥ २८४ ॥ अर्जुना! संपूर्ण तेजस्वी पदार्थांत तेज माझें स्वरूप होय, हें निश्चयाने जाण. कार्य करण्याचे जे विजयाचे उद्देश असतात, त्या सर्वांमध्ये जय माझी विभूति होय. ॥ २८५ ॥ सर्व उद्योगांमध्ये ज्या उद्योगांत न्याय स्पष्ट दिसतो तें माझे स्वरूप होय; असे देवाधिदेव श्रीकृष्ण म्हणतात. ॥ २८६ ॥ सात्विकांमध्ये राहणारें सत्व मी आहे. यादवांमध्ये जो श्रीमंत तोच मी आहे असे श्रीकृष्ण म्हणतात. ॥ २८७ ॥ जो देवकीवसुदेवाच्या तपामुळे प्रगट झाला, जो गोपकुमारीकरितां गोकुळांत गेला व ज्याने प्राणासकट पूतनेचें प्राशन केलें तोच मी होय. ॥ २८८ ॥ बाळपणाची अवस्था संपण्यापूर्वी दैत्यरहित पृथ्वी केली आणि हातावर पर्वत धरून इंद्राचा पराक्रम अजमाविला. ॥ २८९ ॥ यमुनेच्या हृदयांतील दुःख नाहिसे केलें, गोकुळ जळण्याची भीति प्राप्त झाली असतां, तेवढा अग्नी पिवून गोकुळाचें रक्षण केलें. वांसरें चोरून नेणाऱ्या ब्रह्मदेवास वेड लाविलें. ॥ २९० ॥ कुमारदशेंतच कंसासारख्या अचाट पराक्रमी वीरांचा सहज लीलेनें नाश केला. ॥ २९१ ॥ अर्जुना! हें किती वर्णन करायचें? तूं देखील हे सर्व पाहिलें व ऐकिलें आहेस, तर यादवांमध्ये हेंच माझें स्वरूप होय. ॥ २९२ ॥

गूढार्थदीपिका—यादवामाजि जाणावें। हेंचि स्वरूप माझें—निरनिराळ्या जीववर्गांत, त्या वर्गांतील श्रेष्ठ जीवांना, भगवंतांनी आपली श्रेष्ठ विभूति म्हटलें आहे, हें आम्हीं मागे सांगितले आहे; पण भगवान श्रीकृष्ण व भगवान रामचंद्र पूर्णब्रह्म ईश्वर असूनहि त्यांचें जें विभूतित्व सांगितलें आहे त्याचे कारण, ते जीव होते असें नसून वृष्णिकुलामध्ये व रघुकुलामध्ये त्यांच्याशिवाय दुसरा कोणी श्रेष्ठ नव्हता, म्हणून सांगितलें आहे.

आणि सोमवंशीं तुम्हां पांडवां-। माजीं अर्जुन तो मी जाणावा। म्हणोनि एकमेकांचिया प्रेमभावा। विघडु न पडे॥ २९३॥
संन्यासी तुवां होऊनि जनीं। चोरूनि नेली माझी भगिनी। तऱ्ही विकल्पु नुपजे मनीं। मी तूं दोन्ही स्वरूप एक॥ २९४॥
मुनीआंत व्यासदेवो। तो मी म्हणे यादवरावो। कवीश्वरांमाजीं धैर्या ठावो। उशनाचार्य मी॥ २९५॥

अर्थ—आणि चंद्रवंशांत उत्पन्न झालेल्या तुम्हां पांडवांमध्ये अर्जुन मी आहे, म्हणूनच आपल्या परस्परांच्या प्रेमांत कशानेहि बिघाड होत नाही. ॥ २९३ ॥ लोकांत बाह्यतः संन्यासी होऊन तूं माझी बहीण चोरून नेलीस; पण मी व तूं एक स्वरूप असल्यामुळे माझ्या मनांत कांही विकल्प उठला नाही. ॥ २९४ ॥ सर्व मुनीमध्ये व्यासदेव तो

मी आहे आणि कवीश्वरामध्ये, सर्व धैर्याचें वसतें ठिकाण जो शुक्राचार्य तो मी आहे, असे यादवश्रेष्ठ भगवान श्रीकृष्ण म्हणतात. ॥ २९५ ॥

दण्डो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम्। मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम्॥ ३८ ॥
यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन। न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम्॥ ३९ ॥
नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परन्तप। एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया॥ ४० ॥

अर्थ—निग्रह करणाऱ्यांमध्ये दंड मी आहे. जिंकूं इच्छिणाऱ्यामध्ये नीति मी आहे. गुप्त ठेवणाऱ्यामध्ये मौन मी आहे. ज्ञानवानांमध्ये ज्ञान मी आहे. ॥ ३८ ॥ अर्जुना! सर्व भूतांचें जें कांहीं बीज किंवा उत्पत्तिकारण असेल तें मी आहे, कारण जें जें चराचरभूत आहे तें तें माझ्यावांचून नाही. ॥ ३९ ॥ शत्रूला ताप देणाऱ्या अर्जुना! माझ्या दिव्य विभूतींना अंतच नाही. मी माझ्या विभूतीचा हा विस्तार, विचारलास तेवढ्या पुरता संक्षेपाने सांगितला. ॥ ४० ॥

अगा दमितयांमाझारीं। अनिवार दंडु तो मी अवधारीं। जो मुंगियेलागोनि ब्रह्यावेरीं। नियमित पावे॥ २९६ ॥
पैं सारासार निर्धारितयां। धर्मज्ञानाचा पक्षु धरितयां। सकळशास्त्रांमाजीं ययां। नीतिशास्त्र तें मी॥ २९७ ॥

अर्थ—निग्रह करणाऱ्यांमध्ये, अर्जुना! मुंगीपासून तर ब्रह्मदेवापर्यंत त्यांच्या कर्मानुसार कधी न चुकतां अवश्य दंड जो मिळतो, तो मी आहे. ॥ २९६ ॥ सर्व शास्त्रांमध्ये सार काय, असार काय, यांचा निर्णय करणारे व धर्मज्ञान यांचा पक्ष धरणारें जें नीतिशास्त्र तें मी आहे. ॥ २९७ ॥

गूढार्थदीपिका—नीतिशास्त्र तें मी—धर्म, ज्ञान व सारासार विचार याला धरून आर्षनीतिशास्त्र निर्माण झालें आहे, ह्याचा विचार अ. ४ ओ. ५३ वरील गूढार्थदीपिकेंत केला आहे.

आघवियाचि गूढां-। माजीं मौन तें मी सुहाडा। म्हणोनि न बोलतयां पुढां। स्त्रष्टाही नेण होय॥ २९८ ॥
अगा ज्ञानियांचां ठायीं। ज्ञान तें मी पाहीं। आतां असो हें ययां कांहीं। पार न देखों॥ २९९ ॥

अर्थ—संपूर्ण गुप्त ठेवणाऱ्यामध्ये, सख्या अर्जुना! मौन तें मी आहे. म्हणूनच बोलणाऱ्यांच्या मनांतील, सृष्टि उत्पन्न करणारा ब्रह्मदेवहि जाणूं शकत नाही. ॥ २९८ ॥ अगा अर्जुना! ज्ञानियांचे ठिकाणी जें ज्ञान असतें, तें, मी आहे. आतां पुरें. या माझ्या विभूतींना मर्यादाच नाही. ॥ २९९ ॥

गूढार्थदीपिका—ज्ञानियांचियाठायीं। ज्ञान तें मी पाही—ज्ञान हें एकच असलें तरीं अंतःकरणवृत्तीमुळे तें वृत्तिसहित व वृत्तिरहित असे दोन प्रकारचें होतें.

विभूति ही विशेषगुणाला धरून असते हें वर सांगितलेंच आहे. ज्या ज्ञानांत मला कळलें किंवा मला जाणीव झाली असा हा विशेष स्फुरत नाही, त्या ज्ञानाला वृत्तिरहितज्ञान किंवा चिन्मात्र ज्ञान म्हणतात आणि ज्या ज्ञानांत हा विशेष स्फुरतो त्या ज्ञानाला वृत्तिरूप ज्ञान म्हणतात.

चिन्मात्रज्ञान पूर्ण ब्रह्मस्वरूप असून; ज्ञानी अज्ञानी या सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणीं ते मूळचेंच असून, त्या ज्ञानाने आपल्याला कोणी ज्ञानवान् समजत नाही; पण मला कळले मी जाणलें असे ज्या वृत्तिरूपज्ञानांत स्फुरतें, त्या ज्ञानाने मनुष्य मी ज्ञानवान् झालों असें समजतो.

म्हणून येथील 'ज्ञान' या शब्दाचा, वृत्तिरूपज्ञान किंवा मला कळलें अशा जाणिवेने युक्त असलेलें ज्ञान, असा अर्थ आहे.

पैं पर्जन्याचिया धारां। वरी लेख करवेल धनुर्धरा। कां पृथ्वीचिया तृणांकुरां। होईल ठी॥ ३०० ॥
पैं महोदधिचिया तरंगां। व्यवस्था धरूं नये जेवीं गा। तेविं माझिया विशेषलिंगां। नाहीं मिती॥ ३०१ ॥
ऐशियाही सातपांच प्रधाना। विभूती सांगितलिया तुज अर्जुना। तो हा उद्देशु जो गा मना। आहाच गमला॥ ३०२ ॥
येरां विभूतिविस्तारांसि कांहीं। एथ सर्वथा लेख नाहीं। म्हणोनि परिससी तूं काई। आम्ही सांगों किती॥ ३०३ ॥
ययालागीं एकीहेळां तुज। दाऊं आतां वर्म निज। तरी सर्वभूतांकुरें बीज। विरूढत असे तें मी॥ ३०४ ॥
म्हणोनि सानें थोर न म्हणावें। उंच नीच भाव सांडावे। एक मीचि ऐसें मानावें। वस्तुजातातें॥ ३०५ ॥

तरी यावरी साधारण। आईक पां आणिकही खूण। तरि अर्जुना तें तूं जाण। विभूति माझी॥ ३०६॥

अर्थ—अर्जुना! एकदां पावसाच्या धारा मोजतां येतील किंवा पृथ्वीवरील गवताच्या संपूर्ण अंकुराचे ठिकाणीं देखील मर्यादेची दृष्टि होऊं शकेल. ॥ ३०० ॥ परंतु महासमुद्राचे तरंगांची गणती ज्याप्रमाणे करतां येत नाही, त्याप्रमाणे माझ्या विशेषरूपचिन्ह असलेल्या विभूतींची संख्याच करतां यावयाची नाही. ॥ ३०१ ॥ अशांतहि मुख्य मुख्य सातवर पांच म्हणजे पंच्याहत्तरं विभूति, अर्जुना! तुला सांगितल्या, तो हा विचारण्यापुरता जो मी थोडा विभूतिविस्तार केला, तो मनाला वरवर झाला असेंच वाटतें. ॥ ३०२ ॥ बाकींच्या विभूतिविस्ताराची मर्यादा किंवा संख्याच करवत नाही; म्हणून तूं ऐकणार किती व आम्ही सांगणार तरी कोठवर?॥ ३०३ ॥ म्हणून एकदांचें तुला आपल्या विभूतीचें वर्म सांगून ठेवतों की जें बीज सर्व भूतरूप अंकुरानें उगवत असतें ते मी आहे—म्हणजे मीच सर्व सृष्टिरूप झालों आहे. ॥ ३०४॥ म्हणून येथें लहानथोर, उंच-नीच असा भेदभाव करूं नये. संपूर्ण एक परमेश्वरच सर्व स्वरूपाने नटला आहे असें मानावें. ॥ ३०५ ॥ तर यावरहि मी विभूति ओळखण्याची आणखीहि साधारण खूण सांगतों, त्यावरून अर्जुना! माझी विभूति जाणून घेत जा. ॥ ३०६ ॥

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवाऽवगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम्॥ ४१॥

अर्थ—या जगात जी जी वस्तु माझ्या विशेषगुणांनी विशिष्ट व संपत्तींनी युक्त असेल ती ती वस्तु, माझ्या ईश्वरी तेजाचाच अंश आहे असे समज. ॥ ४१ ॥

जेथ जेथ संपत्ति आणि दया। दोन्ही वसती आलिया ठाया। ते ते जाण धनंजया। विभूति माझी॥ ३०७॥

अर्थ—संपत्ति व दया ह्या दोन्ही ज्या वस्तुचे ठिकाणीं एकत्र वसत असतील, ते ते अर्जुना! माझे अंश होत असे जाण. ॥ ३०७॥

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन। विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्॥ ४२॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विभूतियोगो नाम दशमोऽध्यायः॥ १०॥

अर्थ—किंवा नाना प्रकारच्या विभूतिद्वारा, अर्जुना मला जाणण्यांत तुला कांही लाभ होणार नाही, हे संपूर्ण जगत् एका अंशाने व्यापून मी स्थित आहे—म्हणजे हे संपूर्ण जगत् माझ्या एका अंशावर भासतें असा अर्थ. ॥ ४२ ॥

अथवा एकलें एक बिंब गगनीं। तरि प्रभा फांके त्रिभुवनीं। तेवीं एकाकियाचि सकळ जनीं। आज्ञा पाळिजे॥ ३०८॥

अर्थ—अथवा ज्याप्रमाणे आकाशांत एकच सूर्यबिंब असतें आणि किरणाच्या द्वारें त्याचा प्रकाश त्रिभुवनांत पसरतो, त्याप्रमाणे सर्वत्र मी परिपूर्ण रूपानेच असल्यामुळे संपूर्ण जगांत विभूतीच्या द्वारे देखील माझीच आज्ञा पाळली जाते. ॥ ३०८ ॥

तयांतें एकलें झणीं म्हण। ते निर्धन या भाषा नेण। काय कामधेनुसवें सर्व साहान। चालत असे॥ ३०९॥
तियेतें जें जेधवां जो मागे। तें ते एकसरेंचि प्रसवों लागे। तेवीं विश्वविभव तया अंगें। होऊनि असती॥ ३१०॥
तयातें वोळखावया हेचि संज्ञा। जे जगें नमस्कारिजे आज्ञा। ऐसें आथि ते जाण प्राज्ञा। अवतार माझे॥ ३११॥

अर्थ—म्हणून त्यांना एकलें—म्हणजे मर्यादित ऐश्वर्याने युक्त-असे कदाचित् म्हणशील (पण असें त्यांना म्हणूं नकोस) त्यांना दरिद्री हे शब्द लावूं नकोस. कामधेनुबरोबर सर्व सामग्री चालत असते काय?॥ ३०९ ॥ त्या कामधेनूला जो जेव्हा जे कांहीं मागतो तेव्हा ती सर्व एकदम आपल्यापासून प्रगट करते, त्याप्रमाणे तेहि स्वतःअंगाने, विश्वच ज्यांचें ऐश्वर्य आहे, असे भगवत्स्वरूपच असतात. ॥ ३१० ॥ त्यांना ओळखण्याची ही एक खूण आहे की सर्व जीव त्यांची आज्ञा शिरसा मान्य करतात. बुद्धिमान् अर्जुना! हे असे जे असतील ते माझें अवतार होत हें जाण. ॥ ३११ ॥

गूढार्थदीपिका—अपूर्णता हा जीवपणा आहे आणि विभूतींचे ठिकाणी भगवंताच्या अपरिमित ऐश्वर्याचा एक अंश असतो, म्हणूनच विभूति हे जीव असतात. हें मागें सांगितलेंच आहे.

पण वास्तविक पाहतां भगवंताचें सच्चिदानंदस्वरूप नित्य पूर्ण असतें—म्हणजे नामरूपात्मक दशेंतहि तें कधी अपूर्ण होत नाही. (बृ. उ. अ. ५ भाष्यारंभ) आणि "न कचिदवयवैः स्फुटति" (मा. का. ३-२) तें नित्य अस्फुट राहतें. म्हणजे कधीं अंशभूत होत नाही, असे आचार्यांनी म्हटलें असून "हे सरले अद्वैता अस्फुटामाजि" (अ. प्र. ९-६) भगवंताची अद्वैतस्थिति अस्फुट आहे, असे श्रीमाऊलींनीहि अमृतानुभवांत म्हटलें असल्यामुळें, त्या भगवंताचे ज्ञानवैराग्यादि षड्गुणैश्वर्यहि नित्य, अपरिमित असते. म्हणून सर्व नाम-रूपात्मक सृष्टीच्या आंत-बाहेर व्यापून असलेला परमात्मा, सर्वत्रच पूर्ण सच्चिदानंदस्वरूप व पूर्ण ऐश्वर्यसंपन्नच असतो, हें सिद्ध आहे.

पूर्ण ब्रह्मस्वरूप व पूर्ण ऐश्वर्यसंपन्न अशा नामरूपात्मक विग्रहालाच अवतार ही संज्ञा असल्यामुळें, खरोखर प्रत्येक नामरूपात्मक विग्रह परमेश्वराचा अवतारच होय असें म्हणावें लागतें.

या सिद्धान्ताला धरून माऊलींनी, माझ्या ठिकाणीं अपूर्णतारूप विभूतीचे अनुसंधान न करतां, पूर्ण अशा अवताराचेच अनुसंधान करावें असे या ओव्यांतून म्हटलें आहे.

आतां सामान्य विशेष। हें जाणणें एथ महादोष। कां जे मीचि एक अशेष। विश्व आहे म्हणोनि॥ ३१२॥

अर्थ—आणि मीच एक सर्व जगद्रूप झालों असून, मी सर्वत्र सारखा असल्यामुळें, सामान्य-विशेष पाहणें हा मोठा दोष आहे.॥ ३१२॥

गूढार्थदीपिका—सामान्य म्हणजे साधारण किंवा कनिष्ठ, विशेष म्हणजे अधिक किंवा श्रेष्ठ परब्रह्म अस्फुट, अद्वैत, अविकारी व पूर्ण असून तें नामरूपात्मक किंवा जगद्रूप झालें तरी जसेच्या तसेच अस्फुट, अद्वितीय, अविकारी व पूर्णच राहतें; म्हणून त्याचे ठिकाणी कोणत्याहि प्रकारचा भेद किंवा कमी-अधिकपणा मानतां येत नाही. तो अविचारामुळेच मानला जातो असा भाव. माऊलींनी चांगदेव पासष्टींत "सोनें सोनेपणा उणें। न येतांचि झालें लेणें। तेविं न वेंचता जग होणें। अंगे जया"॥ ४॥ या ओवीने हाच सिद्धान्त मांडला असून, "विशेषाकारतो भेदं वदन्ति भुवि केचन। ते महामोहसर्पेण दंष्टा एव न संशयः" (य. वै. खं. अ. १९) या श्लोकाने सूतसंहितेंतहि असेच सांगितलें आहे.

तरी आतां साधारण आणि चांगु। ऐसा कैंसेनि पां कल्पावा विभागु। वायां आपुलियेचि मती वंगु। भेदाचा लावावा॥ ३१३॥
एऱ्हवीं तरी तूप कासया घुसळावें। अमृत कां रांधूनि अर्धे करावें। हा गां वायूसि काय डावें उजवें। अंग आहे॥ ३१४॥
पैं सूर्यबिंबासि पोट पाठीं। पाहातां नासेल आपुली दिठी। तेवीं माझां स्वरूपीं गोठीं। सामान्यविशेषाची नाहीं॥ ३१५॥
आणि सिनाना इहीं विभूती। मज अपारातें मविसील किती। म्हणोनि किंबहुना सुभद्रापती। असो हें जाणणें॥ ३१६॥
आतां पैं माझेनि एकें अंशें। हें जग व्यापिलें असे। यालागीं भेदु सांडूनि सरिसें। साम्यें भज॥ ३१७॥
ऐसें विबुधवनवसंतें। तेणें विरक्तांचेनि एकांते। बोलिलें जेथ श्रीमंतें। श्रीकृष्णदेवें॥ ३१८॥
तेथ अर्जुन म्हणे स्वामी। येतुलें हें राभस्य बोलिलेती तुम्हीं। जे भेदु एक आणि आम्हीं। सांडावा कीं॥ ३१९॥
हां हो सूर्य म्हणे काय जगातें। अंधारें दवडा कां परौतें। केवीं धसाळ म्हणों देवा तूंते। तरी अधिक हा बोलु॥ ३२०॥
तुझें नावंचि एक कोण्ही वेळें। जयांचिये मुखासि कां काना मिळे। तयांचिया हृदयातें सांडूनि पळे। भेदु जी साच॥ ३२१॥

अर्थ—म्हणून निर्विशेष आत्मस्वरूपाचे ठिकाणीं साधारण व चांगला असा विभाग कां कल्पावा व व्यर्थच आपल्या बुद्धीला भेदाचा डाग कां लावावा?॥ ३१३॥ नाही तरी तूप व्यर्थच कशाला घुसळायचे, अमृताला शिजवून व्यर्थच कां अर्धे करावें? अर्जुना! वायुला डावें उजवें अंग आहे काय?॥ ३१४॥ तसेंच सूर्यबिंबाचे ठिकाणी पोट पाठ पहायला गेलों तर आपली दृष्टि नष्ट होईल, त्याप्रमाणें माझ्या स्वरूपाचे ठिकाणीं सामान्य-विशेष अशा भागाची मुळी गोष्टच नाही.॥ ३१५॥ या निरनिराळ्या विभूतींच्या द्वारें माझ्या अपार स्वरूपाची काय मोजणी होणार आहे?

म्हणून, सुभद्रापति अर्जुना! हें विभूतीचें जाणणें पुरें ॥ ३१६ ॥ आतां माझ्या एका अंशाने हें जग व्यापिलें आहे, म्हणून भेद सोडून व एक समदृष्टि ठेवूनच माझें भजन कर (सर्वत्र एक पूर्ण सच्चिदानंद परब्रह्मच पाहा, असा अर्थ.) ॥ ३१७ ॥ याप्रमाणें ज्ञानरूपी वनाला वसंताप्रमाणे प्रसन्न करणारा, विरक्त पुरुषाचा जो एकान्त म्हणजे विरक्त पुरुष सर्व संग परित्याग करून ज्या एकाचाच आश्रय करतात, असे षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवान श्रीकृष्ण याप्रमाणें बोलले. ॥ ३१८ ॥ तेव्हा अर्जुन म्हणतो, प्रभो! एक भेद आहे असे पाहणारे जे आम्ही त्यांनीं तो भेद टाकावा असे जें तुम्हीं म्हटलें तें थोडें विचार न करतां बोलले असें वाटतें. ॥ ३१९ ॥ का हो देवा! (जेथे सूर्य उगवल्याबरोबर आंधार आपोआप नाहिसा होतो तेथे) आतां आंधार दूर करा असे सूर्य लोकांना म्हणतो काय? त्याप्रमाणे भेद टाकून दे, असे सांगणाऱ्या तुम्हांला, देवा! अविचारी म्हणावें, तर तें अमर्यादेचें बोलणें होतें. ॥ ३२० ॥ एक तुझें नामच जर एखादे वेळीं ज्याच्या मुखांत आलें किंवा कानांत पडलें, तर त्याच्या हृदयांतून खरोखर भेद निघून जातो. ॥३२१ ॥

गूढार्थदीपिका—"एक तत्त्व नाम दृढ धरी मना" "एक नाम हरि द्वैतनाम दुरी। अद्वैत कुसरी विरळा जाणे" इत्यादि हरिपाठांतील अभंगांत श्री ज्ञानेश्वर माऊलींनी भगवंताचें रूप जसें अद्वैतस्वरूप आहे, तसेंच भगवंताचें नामहि अद्वैतरूप आहे, पण नामाचें अद्वैतत्व जाणणारा विरळा असतो, असें प्रतिपादिलें आहे. भगवद्ध्यानाने जसा अनुभव येतो, तसा भगवन्नामस्मरणानेहि अद्वैत अनुभव येतो, असा त्याचा अर्थ आहे. भगवन्नामस्मरणाने अद्वैताचा अनुभव येण्याकरितां तें "वाचेसी सद्गद् जपे आधीं" सद्गद अंतःकरणाने केलें पाहिजे असे माऊलीचें म्हणणें आहे.

येथेहि ज्या नामस्मरणाने व श्रवणाने हृदयांतील भेद नाहिसा होतो असे म्हटलें आहे, तें सद्गद अंतःकरणाने होणाऱ्या किंवा ऐकले जाणाऱ्या नामस्मरणाविषयींच म्हटलें आहे असें समजावें.

तो तूं परब्रह्मचि असकें। मज दैवें दिधलासि हस्तोदकें। तरी आतां भेदु कायसा कें। देखावा कवणें॥ ३२२॥
जी चंद्रबिंबाचां गाभारां। रिगालियावरीही उबारा। परि राणेपणें शार्ङ्गधरा। बोला हें तुम्ही॥ ३२३॥
तेथ सावियाचि परितोषोनि देवें। अर्जुनातें आलिंगिलें जीवें। मग म्हणे तुवां न कोपावें। आमुचिया बोला॥ ३२४॥
आम्हीं तुज भेदाचिया वाहाणीं। सांगीतलीं जे विभूतींची कहाणी। ते अभेदें काय अंतःकरणीं। मानिलीं कीं न मने॥ ३२५॥
हेंचि पाहावयालागीं। नावेक बोलिलों बाहेरिसवडिया भंगीं। तंव विभूती तुज चांगी। आलिया बोधा॥ ३२६॥
येथ अर्जुन म्हणे देवें। हें आपुलें आपण जाणावें। परि देखतसे विश्व आघवें। तुवां भरलें॥ ३२७॥
पैं राया तो पांडुसुतु। ऐसिये प्रतीतीसि जाहला वरितु। या संजयाचिया बोला निवांतु। धृतराष्ट्र राहे॥ ३२८॥
कीं संजयो दुखवलेनि अंतःकरणें। म्हणतसे नवल नव्हे दैव दवडणें। हा जीवें धडसा आहे मी म्हणें। तंव आंतुही आंधळा॥ ३२९॥
परि असो हें तो अर्जुनु। स्वहिताचा वाढवितसे मानु। कीं याहीवरी तया आनु। धिंवसा उपनला॥ ३३०॥
म्हणे हेचि हृदयाआंतुली प्रतीती। बाहेरी अवतरो कां डोळ्यांप्रती। इये आर्तीचांया पाउलीं मती। उठती जाहली॥ ३३१॥
मियां इहींच दोहीं डोळां। झोंबावें विश्वरुपा सकळा। एवढी हांव तो दैवाआगळा। म्हणऊनि करी॥ ३३२॥
आजि तो कल्पतरूची शाखा। म्हणोनि वांझोळें न लगती देखा। जें जें येईल तयाचिया मुखा। तें तें साच करीतसे येरु॥ ३३३॥
जो प्रल्हादाचिया बोला। विषाहीसकट आपणचि जाहला। तो सद्गुरु असे जोडला। किरीटीसीं॥ ३३४॥
म्हणोनि विश्वरूप पुसावयालागीं। पार्थ रिगता होईल कवणें भंगीं। तें सांगेन पुढिलिये प्रसंगीं। ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचा॥ ३३५॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां दशमोऽध्यायः ॥ १० ॥

अर्थ—पूर्णब्रह्मच असलेला तो तूं, माझ्या सुदैवाने, माझ्या हातावर पाणी सोडून दान दिल्या गेला– म्हणजे माझ्या सुदैवाने सर्वस्वीं तूं माझ्या स्वाधीन झाला आहेस तेव्हा आतां कशाचा, कोठे व कोणी भेद

पाहावा ? ॥ ३२२ ॥ देवा! चंद्रबिंबाच्या गाभाऱ्यामध्ये—म्हणजे मध्यभागीं शिरल्यानंतरहि उकडूं लागेल काय? पण देवा! स्वामीपणाचे नात्याने हे तुम्ही बोलत आहां. ॥ ३२३ ॥ अर्जुनाचें भाषण ऐकून भगवंताला खरोखर आनंद झाला व त्यांनी अर्जुनाला प्रेमाने आलिंगन दिलें. नंतर भगवान म्हणतात, अर्जुना! माझ्या बोलण्याचा राग मानूं नकोस. ॥ ३२४ ॥ आम्ही भेदाला धरूनच तुला जो विभूतीचा विस्तार सांगितला, तो अभेदपूर्वक तुझ्या अंत:करणांत ठसला की नाही. ॥ ३२५ ॥ हें पाहण्याकरितांच असे मी थोडेसें बाह्यात्कारी बोललों; पण तुला विभूतीचा बोध उत्तम प्रकारें झाला आहे हें समजून आलें. ॥ ३२६ ॥ तें ऐकून अर्जुन म्हणतो, देवा! हें आपलें आपण जाणां; पण सर्व जगांत तूच एक व्यापून भरला आहेस, असे मात्र मी पाहत आहे. ॥ ३२७ ॥ संजय म्हणतो, राजा धृतराष्ट्रा! तो पांडुसुत अर्जुन असा अभेद किंवा अद्वैताचा अनुभव घेऊं लागला; परंतु संजयाचें भाषण ऐकून धृतराष्ट्र स्तब्धच राहिला. ॥ ३२८ ॥ हें पाहून, संजयाला धृतराष्ट्राविषयीं थोडे दु:ख झालें व तो म्हणूं लागला की भगवंताच्या मुखाने असा अद्वैतज्ञानाचा उपदेश ऐकण्याचें सद्भाग्य प्राप्त होऊनहि, हा त्या भाग्याला दूर लोटतो हें आश्चर्य नव्हे काय? हा धृतराष्ट्र वरून आंधळा आहे; पण अंत:करणांतून आंधळा नसेल असें मला वाटत होतें, परंतु तो आंतहि आंधळाच आहे-म्हणजे त्याच्या अंत:करणांत ज्ञानसूर्याचीं किरणें शिरत नाहीत असे मला आतां वाटू लागले. ॥ ३२९ ॥ पण असो. याचें आपल्याला काय करायचें आहे. अर्जुन मात्र आपलें वाढतें आत्मकल्याण करून घेण्याची इच्छा करूं लागला; कारण यानंतरहि त्याच्या अंत:करणांत दुसऱ्या गोष्टीविषयीं भरंवसा वाटू लागला. ॥ ३३० ॥ संजय म्हणतो हा हृदयांतील अनुभव बाहेर डोळ्याला प्रत्यक्ष दिसावा अशा इच्छेच्या पावलाने त्याची बुद्धि उसळू लागली. ॥ ३३१ ॥ अर्जुन हा थोर भाग्यवान होता, म्हणूनच याच दोन्ही डोळ्यांनी भगवंताच्या विश्वरूपाला मिठी मारावी अशी थोर हांव करीत होता. ॥ ३३२ ॥ प्रस्तुत अर्जुन कल्पतरुची फांदी होता, म्हणूनच तिला वांझ फूल लागत नव्हतें. जी जी इच्छा त्याने बोलून दाखवावी ती ती भगवान पूर्ण करीत असे. ॥ ३३३ ॥ जो प्रल्हादाच्या शब्दासाठी विषहि आपण झाला, तो श्रीकृष्ण भगवान, अर्जुनाला गुरुरूपाने प्राप्त झाला होता. ॥ ३३४ ॥ म्हणून अर्जुन आतां विश्वरूपाच्या दर्शनाकरितां कोणत्या रीतीने प्रश्न करील हें श्रीनिवृत्तिनाथांचे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, पुढील अध्यायांत सांगणार आहे. ॥ ३३५ ॥

श्रीसद्गुरुकृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायाचा मराठी अनुवाद गूढार्थदीपिकेसह समाप्त झाला तो सद्गुरुचरणीं समर्पण असो.



समारोप

मागील नवव्या अध्यायांतील शेवटील श्लोकांत भगवंतांनी अर्जुनाला सांगितलें की, अर्जुना! माझेंच ध्यान कर, माझेंच प्रेमाने भजन कर, माझ्या संकल्पाने कर्म करून विषयांचा संकल्प नि:शेष नाहीसा कर व सर्वत्र मद्रूप पाहून नमस्कार कर म्हणजे मला तूं नि:संशय प्राप्त होशील. असें हें भगवंतांनी संपूर्ण भगवद्भक्तीचेंच वर्णन केलें. हें ऐकून स्वरूपाने व ऐश्वर्यादि गुणाने अमर्याद असलेल्या परमेश्वराला, सर्व दृष्टीने अपूर्ण असलेल्या या जगांत कसें ओळखतां येईल अशी शंका येऊन अर्जुनाने भगवंताला प्रार्थना केली की, भगवंता! मला आपलें विभूतित्व किंवा श्रेष्ठत्व कोठे कोठे आहे, ते सांगा.

भगवान म्हणतात, अर्जुना! ज्याप्रमाणे पाण्यावर उठलेल्या तरंगाच्या आंत-बाहेर पाणीच असतें, त्याप्रमाणे या संपूर्ण जगाचें आदिकारण मीच असल्यामुळे संपूर्ण जगांत व्यापून असलेला मी, पुन: जगांतच सगुण साकार व्यक्तरूपाने कसा प्रगट होतो हे, देव किंवा महर्षि यापैकीं कोणालाहि कळूं शकत नाही, मी जगांत सगुण साकारस्वरूपाने प्रगट झालों, तरी मी अनादि, जन्मरहित व सर्व ब्रह्मांडाचा स्वामी राहतो; हें जो जाणतो तो सर्व कर्मापासून मुक्त होतो.

बुद्धि, ज्ञान, क्षमा, सत्य इत्यादि सूक्ष्मभाव व महर्षि इत्यादि स्थूलभाव माझ्यापासूनच झाले आहेत; म्हणून या सर्व माझ्या विभूतिच आहेत, हें जो जाणतो तो माझ्याशीं निश्चळ ऐक्य पावतो; म्हणूनच हें ज्ञान संपादन करून सर्व ज्ञाते पुरुष माझ्या एकाचेंच प्रेमाने भजन करतात. चित्तांत माझें अखंड ध्यान ठेऊन जे माझें भजन करण्याकरितांच प्राण धारण करतात, त्यांना माझ्या ऐक्यज्ञानामुळे आपल्या जन्ममरणाचीहि कल्पना येत नाही. अशा रीतीने प्रेमाने भजन करीत माझ्याशीं अखंड एकरूप झालेल्या भक्तांच्या ऐक्यस्थितीचें मी संरक्षण करतो—म्हणजे माझ्यापासून त्यांचें चित्त ढळूं देत नाही.

त्यावर अर्जुन म्हणतो, देवा! आतां आपण जसें सांगितलें तसेंच व्यासादि महर्षि नेहमीं घरीं येऊन सांगत असत, पण माझ्यावर कृपा करून स्वत: तुम्ही सांगेतोपर्यंत त्याचा बोध माझे अंत:करणांत ठसत नसे. आज मात्र आपल्या कृपेने तुझ्या स्वरूपाविषयीं पूर्ण बोध अंत:करणांत ठसला गेला.

आतां या सृष्टींत जेथे तुमच्या श्रेष्ठत्वाचें किंवा विभूतीचें दर्शन घडेल अशा कोणकोणत्या विभूति आहेत त्या मला सांगा. ही प्रार्थना ऐकून अर्जुन हा निर्गुण ज्ञानाने व सगुणाच्या प्रेमाने संपन्न झाला असे वाटून, भगवंताला अत्यंत आनंद झाला. पुढे भगवंतांनी त्याला आपल्या मुख्य मुख्य पंच्याहत्तर विभूति सांगितल्या.

विभूति सांगितल्यानंतर, भगवान म्हणतात, अर्जुना! मी निर्गुणस्वरूपाने तसाच सगुणस्वरूपानेहि पूर्ण अद्वैत स्वरूप असल्यामुळे, विषमभावरहित असा सदासर्वदा निर्विशेष स्वरूप आहे; म्हणून जगांतहि मला पाहतांना चांगला, वाईट, अपूर्ण असा कांही एक भेद ठेवूं नकोस. मी सर्वत्र परिपूर्ण आहे, हीच एक दृष्टि ठेव.

॥ श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

श्रीज्ञानेश्वरी-गूढार्थदीपिका



गीताप्रेस, गोरखपुर

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय अकरावा

अवतरणिका—मागील दहाव्या अध्यायांत, भगवंतांनी आपल्या विभूति सांगितल्या; पण त्या ऐकून, अर्जुनाचें समाधान न होतां, सर्व नामरूपांत पूर्ण सच्चिदानंद, एक अद्वैत परब्रह्मच कसें भरलें आहे, हें प्रत्यक्ष डोळ्यांनीच अनुभवितां आले, तर फार बरें होईल, अशी त्याची उत्कंठा वाढून, अर्जुनाने भगवंताला आपली उत्कंठा निवेदन केली व विश्वरूपाचें दर्शनाविषयीं भगवंतापाशीं आळ घेतली, भगवंतांनी त्याला दिव्य दृष्टि देऊन विश्वरूपदर्शनाची ती आळ पुरविली, हेंच या अध्यायांत सांगितलें आहे.

आतां यावरी एकादशीं। कथा आहे दोन्ही रसीं। येथ पार्था विश्वरूपेसीं। होईल भेटी॥ १॥

अर्थ—यानंतर आतां जेथें अर्जुनाला विश्वरूपाचें दर्शन होणार आहे, त्या अकराव्या अध्यायांतील कथाभागांत दोन रस मुख्यत: व्यक्त झालेले आहेत.॥ १॥

जेथ शांताचिया घरा। अद्भुत आला आहे पाहुणेरा। आणि येरांही रसां पांतिकरां। जाहला मानु॥ २॥

अर्थ—याप्रमाणे या अध्यायांत शांतरसाचे घरीं, अद्भुत रस हा पाहुणचाराला आला आहे असें दिसेल आणि इतरहि रसांना त्यांच्या पंक्तीस पाहुणचार घेण्याचा मान मिळणार आहे॥ २॥

गूढार्थदीपिका—शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत व शांत असे नव रस आहेत. रति, हास, शोक, क्रोध, उत्साह, भय, तिटकारा, आश्चर्य व निर्वेद (वैराग्य) हे मनोविकार क्रमाने नवरसांचे स्थायिभाव आहेत. हे मनोविकार मनुष्याचे ठिकाणी सूक्ष्मरूपाने नेहमींच असतात, म्हणून यांना स्थायिभाव म्हणतात.

विभाव, अनुभाव, व्यभिचारीभाव यांच्या योगाने स्थायिभाव उत्कट वाढून, पुरुष 'तदेकचित्त' झाला असतां, रस प्रगट होतो.

विभाव हा आलंबन विभाव व उद्दीपन विभाव असा दोन प्रकारचा आहे. ज्या विषयाला धरून रस उत्पन्न होतो त्याला 'आलंबन विभाव' म्हणतात व ज्यांच्या योगाने स्थायिभाव उद्दीपित होतात म्हणजे वाढतात, त्याला 'उद्दीपन विभाव' म्हणतात.

रसोत्पत्तिनंतर शरीराचे ठिकाणी अनुभविले जाणारे जे भाव, त्यांना अनुभाव म्हणतात. स्थायिभावाच्या उद्दीपनाला सहायभूत होणारे आणखी व्यभिचारी भावहि असतात.

'भगवद्भक्ति चंद्रिकामृतरसोल्हास' या ग्रंथांत ग्रंथकाराने व सर्व संतांनी भगवद्भक्ति हा दहावा रस मानला आहे. तो या अध्यायांत विशेषत: व्यक्त झालेला नाही; कारण या रसाचा, प्रेम हा स्थायिभाव आहे व विश्वरूपाचें दर्शनाने अर्जुनाला, त्याविषयी प्रेम उत्पन्न झालें नाही, हें अर्जुनानेच, पुढें "बुद्धीतें सांडूनि ज्ञान। भेणें वळघलें रान। अहंकारें मन। देशधडी जाहालें" (ओ० ६६४) या ओवीने सांगितलें आहे.

शांताचिया घरा। अद्भुत आला आहे पाहुणेरा—निर्वेद म्हणजे विषयवैराग्य, हा शांतरसाचा स्थायिभाव होय हे वर सांगितलेंच आहे. या शांतरसाचें आलंबन व्यापक ब्रह्मस्वरूप असतें. भगवंतांनी आपल्या व्यापक विश्वरूपाचें दर्शन करून देऊन अर्जुनाचे मनांत प्रथम शांतरस उत्पन्न केला आणि नंतर तें अत्यंत आश्चर्यकारक विश्वरूप पाहून त्याचे ठिकाणी अद्भुतरसहि उत्पन्न झाला, हेच "शांताचिया घरां। अद्भुत आला आहे पाहुणेरा" या चरणांनी माऊलींनी सुचविलें आहे.

येरांहि रसां पांतिकरा। जाहाला मान—इतरहि जे हास्य, करुण, रौद्र, भयानक इत्यादि रस आहेत, तेहि अर्जुनाचे ठिकाणीं उत्पन्न होतांना दिसतील असा अर्थ.

अहो वधुवरांचिये मिळणीं। जैशीं वराडियांही लुगडीं लेणीं। तैसे देशियेच्या सुखासनी। मिरविले रस॥ ३॥

अर्थ—अहो! ज्याप्रमाणे मुलामुलीच्या लग्नांत आलेले पाहुणे वस्त्रालंकारांनी सुशोभित होऊन मिरवितात. त्याप्रमाणे या मराठी भाषेच्या पालखींत बसून हे सर्व रस मिरवितील॥३॥

परि शांताद्भुत बरवे। जे डोळियांचां अंजुळीं घ्यावे। जैसे हरिहर प्रेमभावें। आले खेंवा॥ ४॥

अर्थ—पण ज्याप्रमाणे हरिहरांनी प्रेमाने आलिंगन द्यावें, त्याप्रमाणें शांत व अद्भुत हे दोन रस मात्र डोळ्यांच्या आंजोळीने म्हणजे स्पष्टपणे घेता येतील॥ ४॥

गूढार्थदीपिका—हरिहर प्रेमभावें। आले खेंवा—हरि हे संपूर्ण ऐश्वर्यसंपन्न असून वैकुंठवासी आहेत, तर हर हे कडकडित वैराग्यसंपन्न असून श्मशानवासी आहेत. या दोघांच्या मिळणीची येथे शांतरस व अद्भुतरस यांच्या मिळणीला जी उपमा दिली आहे, ती अत्यंत उचित आहे; कारण हराच्या आलंबनाने त्यांचे ज्ञान, वैराग्य इत्यादि गुण ऐकून शांतरस उत्पन्न होतो व हरीच्या आलंबनाने त्यांचे अद्भुत पराक्रमादि गुण ऐकून अद्भुतरस उत्पन्न होतो.

ना तरी अंवसेचां दिवशीं। भेटलीं बिंबें दोनी जैशीं। तेवीं एकवळा रसीं। केला एथ॥ ५॥

अर्थ—किंवा अमावस्येच्या दिवशीं, ज्याप्रमाणें सूर्यबिंब व चंद्रबिंब हीं दोन्ही बिंबें मिळून जातात, त्याप्रमाणें या अध्यायांत दोन रस एकत्र मिळालेले आहेत.॥ ५॥

गूढार्थदीपिका—सूर्याचा प्रकाश अद्भुत असल्यामुळे व चंद्राचा प्रकाश शांत असल्यामुळे सूर्यबिंबाची व चंद्रबिंबाची दिलेली ही उपमा अत्यंत उचित आहे.

मीनले गंगेयमुनचे ओघ। तैसें रसां जाहलें प्रयाग। म्हणोनि सुस्नात होत जग। आवघें एथ॥ ६॥
माजि गीता सरस्वती गुप्त। आणि दोनी रस ते ओघ मूर्त। यालागी त्रिवेणी हे उचित। फावली बापा॥ ७॥
एथ श्रवणाचेनि द्वारें। तीर्थीं रिघतां सोपारें। ज्ञानदेव म्हणे दातारें। माझेनि केलें॥ ८॥
तीरें संस्कृताची गहनें। तोडोनि मऱ्हाठिया शब्दसोपानें। रचिलीं धर्मनिधानें। श्रीनिवृत्तिदेवें॥ ९॥
म्हणौनि भलतेणें एथ सद्भावें नाहावें। प्रयागमाधव विश्वरूप पाहावें। येतुलेनि संसारासि द्यावें। तिळोदक॥ १०॥

अर्थ—किंवा ज्याप्रमाणे गंगायमुना यांचे प्रवाह प्रयागाचे ठिकाणी एकत्र झाले, त्याप्रमाणे हा अध्याय शांत व अद्भुत या रसांचें प्रयागस्थळ झालें आहे; म्हणून सर्व जग प्रयागक्षेत्राप्रमाणे येथे स्नान करून पवित्र होईल॥ ६॥ ज्याप्रमाणे प्रयागाचे ठिकाणी गंगा यमुना यांच्या संगमांत गुप्तपणें सरस्वति नदीचा संगम होऊन, प्रयाग हें त्रिवेणी संगमाचें स्थान झालें आहे, त्याप्रमाणे या अध्यायांतहि शांत व अद्भुत या दोन रसांचे प्रगट प्रवाह असून त्यामध्ये भगवंताची गीतारूप रसाळवाणीरूपी सरस्वति नदीचा गुप्त प्रवाह असल्यामुळे, बापहो! हा अध्याय म्हणजे योग्य असा त्रिवेणीसंगमच झाला आहे॥ ७॥ श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, स्वामी निवृत्तिनाथांनी मला निमित्त करून या त्रिवेणीक्षेत्रांत जाण्याकरितां श्रवणाचा सोपा मार्ग करून दिला॥ ८॥ संपूर्ण धर्माची ठेव अशा श्रीनिवृत्तिनाथांनी या संगमाच्या तीरावरील मूळच्या संस्कृत भाषेचीं दुर्गम अरण्यें तोडून मराठी शब्दरूपी पायऱ्या बांधल्या॥ ९॥ म्हणून कोणीहि येथे सद्भाव धरून स्नान करावें व या प्रयागांतील माधव जें विश्वरूप त्याचें दर्शन घ्यावें. एवढ्यानेच त्यांना संसाराचा निरास करतां येईल॥ १०॥

गूढार्थदीपिका—भगवंताचे त्रिगुणरहित निर्गुणस्वरूप त्रिगुणरहित राहूनच अनंत नामरूपाने नटलेलें विश्वरूप होतें. अशा विश्वरूपाचा अनुभव आला असतां, ज्या नामरूपाच्या देखाव्याला आपण संसार म्हणतो, त्या संसाराचा ठावठिकाणच उरत नाही, असा अर्थ.

हें असो ऐसे सावयव। येथ सासिन्नलें आथी रसभाव। तेथ श्रवणसुखाची राणीव। जोडली जगा॥ ११॥

अर्थ—असे हें सावयव रूपकाचें निरूपण पुरे. या अध्यायांत रसभाव भरास आलेले आहेत आणि येथे सर्व

जगाला श्रवणाच्या आनंदाचें राज्यच प्राप्त होईल (श्रवणापासून परम सुख प्राप्त होईल असा अर्थ) ॥११॥

गूढार्थदीपिका—हें असो ऐसें सावयव-साहित्यशास्त्रांत रूपक हें सावयव व निरवयव असे दोन प्रकारचे सांगितलें आहे. रूपकांची परस्पर सापेक्षता असणाऱ्या रूपकांच्या समूहाला सावयवरूपक म्हणतात व तशी सापेक्षता नसलेल्या रूपकाला निरवयव रूपक म्हणतात. येथील रूपकें परस्पर सापेक्ष असल्यामुळे हीं रूपकें सावयव आहेत असे माउलीचे म्हणणे आहे.

जेथ शांताद्भुत रोकडे। आणि येरां रसां पडप जोडे। हें अल्पचि परि उघडें। कैवल्य जेथ॥ १२॥

अर्थ—जेथे केवळ शांतरस व अद्भुतरस हे स्पष्ट आहेत आणि बाकींच्या रसांनाहि शोभा म्हणजे मान प्राप्त झाला आहे. हे थोडे असले तरी उघड मोक्ष प्राप्त करून देणारे आहेत॥ १२॥

तो हा अकरावा अध्यायो। जो देवाचा आपणपें विसंवता ठावो। परि अर्जुन सदैवांचा रावो। जे एथही पातला॥ १३॥

अर्थ—तो हा अकरावा अध्याय म्हणजे स्वत: भगवान श्रीकृष्णाच्या विश्रांतीच्या ठिकाणाचें निरूपण करणारा होय. पण अर्जुन मात्र सर्व भाग्यवानांमध्ये थोर भाग्यवान आहे, कारण तो येथेहि प्राप्त झाला॥ १३॥

गूढार्थदीपिका—जो देवाचा आपणपें विसंवता ठावो-भगवंताचा सगुण साकार चतुर्भुजादि मूर्त्याविष्कार या विश्वरूपापासूनच होतो व तेथेच पुन: अंतर्धान पावतो असा अर्थ.

एथ अर्जुनचि काय म्हणों पातला। आजि आवडतयाही सुकाळु जाहला। जे गीतार्थु हा आला। मऱ्हाठिये॥ १४॥
याचिलागीं माझें। विनविलें तें आइकिजे। तरि अवधान दीजे। सज्जनीं तुम्हीं॥ १५॥
तेवींचि तुम्हां संतांचिये सभे। ऐसी सलगी कीर करूं न लभे। परि मानावें जी तुम्ही लोभें। अपत्या मज॥ १६॥
अहो पुंसा आपणचि पढविजे। मग पढे तरी माथा तुकिजे। कां करविलेंनि चोजें न रिझे। बाळका माय॥ १७॥
तेवीं मी जें जें बोलें। तें प्रभु तुमचेंचि शिकविलें। म्हणोनि अवधारिजो आपुलें। आपण देवा॥ १८॥

अर्थ—एकट्या अर्जुनालाच हा लाभ प्राप्त झाला असे कां म्हणावें? गीतार्थ हा आतां मराठी भाषेंत आला असल्यामुळे, वाटेल त्याला सहज प्राप्त होण्याजोगा झाला आहे॥ १४॥ म्हणूनच तुम्ही संतजनांनी एकाग्र चित्त द्यावें व माझी विनंति ऐकावी॥ १५॥ त्याचप्रमाणे तुमच्यासारख्या संतसमाजांमध्ये मी असा धीटपणा करणें खरोखर बरें नाही, पण तुम्ही आईबापांनी माझ्यासारख्या लेंकराच्या विनंतीला पुत्रलोभाने मान द्यावा॥ १६॥ अहो! राघूला आपणच शिकवावें व शिकून तो राघू बोलूं लागला म्हणजे आपणच आनंदाने मान डोलवावी किंवा लेंकराकडून एखादी कौतुकाची गोष्ट करवून, ती पाहून आई आपणच आनंदित होत नाही काय?॥ १७॥ त्याप्रमाणे मी जें जें बोलतों तें तें, महाराज! तुम्हीं शिकविलेलेंच बोलतों, म्हणून देवा! तुमचे शिकविलेलेंच तुम्ही ऐका॥ १८॥

गूढार्थदीपिका—प्राप्त झालेलें ज्ञान, श्रीगुरुकृपेचेंच फळ आहे अशी कृतज्ञताबुद्धि सत्पुरुष अखंड वागवितात.

हें सारस्वताचें गोड। तुम्हींचि लाविलें जी झाड। तरी आतां अवधानामृतें वाड। सिंपोनि कीजो॥ १९॥
मग हें रसभावफुलीं फुलेल। नानार्थफळभारें फळा येईल। तुमचेनि धर्मे होईल। सुकाळ जगा॥ २०॥
या बोला संत रिझले। म्हणती तोषलों गा भलें केलें। आतां सांगे जें बोलिलें। अर्जुनें तेथ॥ २१॥

अर्थ—हें ललितवाङ्मयाचे मधुर झाड तुम्हींच लाविलें, तेव्हा आतां त्यावर अवधानरूपी अमृताचें सिंचन करून त्याचें पोषण करावें॥ १९॥ मग हें झाड, नानारसभावरूपी फुलाने फुलून जाईल आणि अनेक अर्थरूपी फळभाराने तें फलद्रूप होईल. तुमच्या या परोपकाररूपी धर्माने सर्व जगाला सुखाचा लाभ होईल॥ २०॥ श्रीज्ञानेश्वर माउलीच्या या बोलण्याने संतांना फार समाधान झालें व ते म्हणाले, बाबा! फार चांगले बोललास! आम्हांला संतोष झाला आतां पुढे अर्जुन काय म्हणाला तें सांगा॥ २१॥

गूढार्थदीपिका—संत स्वत: निरहंकारी व अत्यंत नम्र असतात; म्हणूनच त्यांना निरहंकाराने व नम्रतेने विनंति करणाऱ्यांचें प्रेम उत्पन्न होतें.

तंव निवृत्तिदास म्हणे। जी कृष्णार्जुनांचें बोलणें। मी प्राकृत काय सांगों जाणें। परि सांगवा तुम्ही॥ २२॥
अहो रानींचिया पालेखाइरा। नेवाणें करविजे लंकेश्वरा। एकला अर्जुन परी अक्षौहिणी अकरा। न जिणेचि काई॥ २३॥
म्हणोनि समर्थ जें जें करी। तें न हो न ये चराचरीं। तुम्ही संत तयापरी। बोलवा मातें॥ २४॥
आतां बोलिजतसे आइका। हा गीताभाव निका। जो श्रीवैकुंठनायका। मुखौनि निघाला॥ २५॥
बाप बाप ग्रंथ गीता। जो वेदीं प्रतिपाद्य देवता। तो श्रीकृष्ण वक्ता। जिये ग्रंथी॥ २६॥

अर्थ—तेव्हा निवृत्तिनाथांचे दास श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, अहो महाराज! श्रीकृष्णार्जुनाचे पुढें काय बोलणें झालें, हें मज अज्ञानी लेंकराला काय सांगतां येईल? परंतु तुम्हीच माझ्याकडून बोलवा॥ २२॥ अहो! जंगलांतील झाडांचा पाला खाऊन राहणाऱ्या वानरांकडून लंकेश्वर जो रावण त्याचा श्रीरामांनी पराभव करविला. एकटा अर्जुन, पण त्याने कौरवांचे अकरा अक्षौहिणी सैन्य जिंकलें नाही काय?॥ २३॥ म्हणून समर्थ जे करूं म्हणतील जे जगांत घडून येणार नाही असे होत नाही. त्याप्रमाणे आपण संतजनांनीहि माझ्याकडून बोलवावें॥ २४॥ श्रीवैकुंठीचा स्वामी जो भगवान श्रीकृष्ण, त्याच्या मुखांतून जो उत्तम गीतोपदेश निघाला तो मी आतां सांगतों, ऐका॥ २५॥ धन्य धन्य हा गीता ग्रंथ! कारण संपूर्ण वेदांनी ज्याचें वर्णन केलें, तोच भगवान श्रीकृष्ण साक्षात् हा ग्रंथ सांगत आहे॥ २६॥

गूढार्थदीपिका—बाप बाप ग्रंथ गीता-या वचनाने गीतेचें वेदतुल्य सर्वोच्च प्रामाण्य दाखविलें आहे.

जो वेदीं प्रतिपाद्य देवता। तो श्रीकृष्ण वक्ता। जिये ग्रंथीं-या चरणांनी वेद निर्माणकर्ता व वेदांनी प्रतिपादिलेला जो भगवान, तोच भगवान श्रीकृष्ण असून, त्यांनीच गीता सांगितली आहे, हे गीतेच्या सर्वोच्च प्रामाण्याचें कारण दिलें आहे. तसेच वेदाने ज्या देवतेचें किंवा ज्या परमेश्वराचें प्रतिपादन केलें, तोच श्रीकृष्ण होय असे म्हणून, माउलींनी भगवान श्रीकृष्णाचें पूर्णब्रह्मत्व दाखविलें असून, गीता ही त्यांनीच सांगितली असल्यामुळे गीतेचें व वेदांचें तुल्य प्रामाण्य आहे असें सुचविलें आहे.

तेथिंचे गौरव कैसें वानावें। जें श्रीशंभूचिये मती नागवे। तें आतां नमस्कारिजे जीवेंभावें। हेंचि भलें॥ २७॥
मग आइका तो किरीटी। घालूनि विश्वरूपीं दिठी। पहिली कैसी गोठी। करिता जाहला॥ २८॥
हें सर्वही सर्वेश्वरु। ऐसा प्रतीतिगत जो पतिकरु। तो बाहेरी होआवा गोचरु। लोचनासी॥ २९॥
हे जीवाआंतुली चाड। परि देवासि सांगतां सांकड। कां जें विश्वरूप गूढ। कैसेनि पुसावें॥ ३०॥
म्हणे मागां कवणीं कहीं। जे पढियंतेनें पुसिलें नाहीं। सहसा कैसें काई। सांगा म्हणों॥ ३१॥
मी जरी सलगीचा चांगु। तरी काय आइसीहुनि अंतरंगु। परि तेही हा प्रसंगु। बिहाली पुसों॥ ३२॥
माझी आवडे तैसी सेवा जाहली। तरि काय होईल गरुडाचिया येतुली। परि तोही हे बोली। करीचिना॥ ३३॥
मी काय सनकादिकांहूनि जवळां। परि तयांही नागवेचि हा चाळा। मी आवडेन काय प्रेमळां। गोकुळींचिया ऐसा॥ ३४॥
तयांतेंही लेंकुरपणें झकविलें। एकाचे गर्भवासही साहिले। परि विश्वरूप हें राहविलें। न दावीच कवणा॥ ३५॥

अर्थ—ज्या गीताग्रंथाची थोरवी, साक्षात् शंकरालाहि कळली नाही, त्याची ती थोरवी मी कशी वर्णन करणार? तेव्हा मनोभावाने तिला नमस्कार करावा, हेंच उत्तम॥ २७॥ मग विश्वरूपदर्शनाचे ठिकाणीं लक्ष ठेऊन, त्या अर्जुनाने भगवंताशीं बोलण्याला कशी सुरुवात केली, ते ऐका॥ २८॥ हें सर्व चराचर जग, भगवानच नटला आहे असा बुद्धींत अनुभवाचा जो अविष्कार झाला, तो बाहेर डोळ्याला प्रत्यक्ष दिसावा॥ २९॥ अशी त्याच्या अंत:करणांत इच्छा उत्पन्न झाली; पण ही इच्छा देवाला सांगणे त्याला जरा कठीण वाटलें कारण जें विश्वरूप, भगवान अत्यंत गुप्त ठेवतात, कोणाला दाखवित नाहीत, तें दाखवा म्हणून आपण कसें म्हणावें?॥ ३०॥ अर्जुन मनांत म्हणतो, पूर्वी कधीं कोणी अत्यंत आवडत्या भक्तांनीहि जें विचारलें नाही, तें मला सांगा, असें एकदम कसें म्हणूं॥ ३१॥ मी जरी अत्यंत प्रेमांतील असलो, तरी आई लक्ष्मीपेक्षा जवळचा कसा होईन? पण तीहि विश्वरूपदर्शनाची गोष्ट काढण्यास भ्याली॥ ३२॥ मी वाटेल तशी भगवंताची सेवा केली असली, तरी ती गरुडाच्या सेवेची बरोबरी करील काय? पण त्यानेहि हीं गोष्ट काढली नाही॥ ३३॥ मी काय सनकादिकांपेक्षाहि जवळचा निकटवर्ती आहे? पण त्यांनाहि

हो इच्छा धरतां आली नाही. प्रेमळ गोकुळवासी जनांसारखा मी भगवंताला आवडतो काय?॥ ३४॥ पण त्यांनाहि बाळपणाने, आपलें सामर्थ्य झांकून टाकून फसविले. आपल्या अंबरीष भक्ताचे गर्भवास आपण सोसले, पण आपलें विश्वरूप गुप्तच ठेवलें, कोणासच दाखिविलें नाही.॥ ३५॥

गूढार्थदीपिका—पूर्वी केवढे थोर थोर प्रेमळ भक्त होऊन गेले, पण त्यापैकीं एकाचीहि आपण बरोबरी करूं शकत नाही किंवा एकाशींहि आपली तुलना होऊं शकत नाही असें वाटणें, हेंच प्रेमाचें लक्षण आहे. मला भगवंताचें प्रेम आहे असे वाटणें, हा अहंकार होतो व त्यामुळे सगुण साक्षात्कार होत नाही. "साधितां माझी भक्ति कां ज्ञान। ज्यासी चढे ज्ञानाभिमान। तो म्यां आपुलेनि हातें जाण। दिधला आंदण महादोषा॥ १४३॥" (ए० भा० अ० २०) भक्ताला नेहमीं माझे ठिकाणीं भगवत्प्रेम नाही, असेंच वाटत असतें.

हा ठायवरी गुज। याचिये अंतरींचें हें निज। केविं उराउरी मज। पुसों ये पां॥ ३६॥
आणि न पुसेंचि जरी म्हणें। तरि विश्वरूप देखिलियाविणें। सुख नोहेचि परि जिणें। तेंही विपायें॥ ३७॥
म्हणोनि आतां पुसों अळुमाळसें। मग करूं देवा ठाके तैसें। येणें प्रवर्तला साध्वसें। पार्थु बोलों॥ ३८॥
परि तेंचि ऐसेनि भावें। जें एका दों उत्तरांसवें। दावी विश्वरूप आघवें। झाडा देउनी॥ ३९॥
अहो वांसरूं देखिलियाचिसाठीं। धेनु खडबडोनि मोहें उठी। मग स्तनामुखाचिये भेटी। काय पान्हा न ये॥ ४०॥
पाहा पां तया पांडवाचेनि नांवें। जो कृष्ण रानींही प्रतिपाळूं धांवे। तयांतें अर्जुनें जंव पुसावें। तंव साहील काई॥ ४१॥
तो सहजेंचि स्नेहाचें अवतरण। आणि येरु स्नेहा घातलें आहे माजवण। ऐसिये मिळणी वेगळेपण। उरे हेंचि बहु॥ ४२॥

अर्थ—इतकें हें अत्यंत गुप्त ठेवलेलें व भगवंतांनी अंत:करणांत माझें मूलरूप होय असे ज्याला मानलें, तें हें विश्वरूप एकदम मला कसें विचारतां येईल?॥ ३६॥ आणि जाऊं द्या, पुसूंच नये! असें म्हणून सोडून द्यावें, तर विश्वरूप पाहिल्यावांचून मनाची तळमळ जाऊन सुख होणार नाही. एवढेंच नाही, तर तळमळीमुळे वांचणेंहि कठीण आहे॥ ३७॥ म्हणून सहजगत्या थोडेसें विचारून पाहावें; मग देव वाटेल ते करोत, असा विचार करून भीत भीत अर्जुनाने बोलायला सुरुवात केली॥ ३८॥ पण तेंच विचारणें अशा प्रेमभावाने केलें, की अर्जुनाचे मुखांतून एक दोन शब्द निघतात न निघतात, तोंच भगवंतांनी आपलें झाडून संपूर्ण विश्वरूप दाखविलें॥ ३९॥ अहो! वांसरूं पाहिल्याबरोबर गाय, प्रेमाने एकदम खडबडून उठते मग वांसराचे तोंड तिच्या स्तनाला लागल्यानंतर तिला पान्हा धरवेल काय?॥ ४०॥ त्याचप्रमाणे हे पहा, जो भगवान श्रीकृष्ण त्या पांडवांचें नांव ऐकल्याबरोबर त्यांचा प्रतिपाळ करण्याकरितां रानांतहि धांवून जातो, त्याला अर्जुनाने तोंड भरून विचारलें असतां तो स्वस्थ राहील काय?॥ ४१॥ आधींच भगवान श्रीकृष्ण प्रेमाचीच मूर्ति होय. त्यांत अर्जुन हा, त्या स्नेहाला माजविणारा मादक पदार्थ मिळाला, अशा मिळणींत श्रीकृष्ण व अर्जुन यांचे वेगळेपण राहिलें, हेंच फार झाले॥ ४२॥

गूढार्थदीपिका—सहजेंचि स्नेहाचें अवतरण—सगुण श्रीकृष्ण परमात्मा, हा "आनंद पदीं जया म्हणती हरि" आनंदांशाने आनंदाची किंवा प्रेमाची मूर्ति आहे असें जें नाथांनी म्हटलें आहे, तसेंच आपलें स्वानुभवी मत, माऊलींनी "स्नेहाचें अवतरण" या शब्दांनी व्यक्त केलें आहे.

ऐसिये मिळणी वेगळेपण। उरे हेंचि बहु—भक्त व देव यांचे प्रेमाने ऐक्य झाल्यावरहि, केवळ सारखा प्रेमाचा प्रवाह चालूं राहावा. म्हणूनच देव, भक्त असे दोनपण वागविले जातें.

म्हणोनि अर्जुनाचिया बोलासरिसा। देव विश्वरूप होईल आपैसा। तोचि पहिला प्रसंगु ऐसा। ऐकिजो तरी॥ ४३॥

अर्थ—म्हणून अर्जुन बोलल्याबरोबर, देव जसें आहेत तसेंच विश्वरूप होतील, तरी आरंभीचा तोच प्रसंग ऐका॥ ४३॥

गूढार्थदीपिका—भगवान श्रीकृष्ण, सहज-म्हणजे आपलें श्रीकृष्णस्वरूप न सोडतांच-विश्वरूप होतील या म्हणण्याने श्रीमाउलींनी, श्रीकृष्णाचें रूप हें मूळांत विश्वरूपच असून ते भक्ताच्या प्रेमाने भक्ताला मर्यादित एकदेशीय भासते, असें जें पुढें म्हटलें आहे, तेंच येथें सुचविलें आहे.

अर्जुन उवाच

मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसञ्ज्ञितम्। यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम॥ १॥

अर्थ—अर्जुन म्हणाला—माझ्यावर कृपा करून मला जो आपण अत्यंत गुह्य अशा आत्मविषयक वचनांचा उपदेश केला त्या उपदेशाने हा माझा संसारमोह संपूर्ण नाहीसा झाला॥ १॥

मग पार्थु देवातें म्हणे। जी तुम्ही मजकारणें। वाच्य केलें न बोलणें। कृपानिधे॥ ४४॥
जैं महाभूतें ब्रह्मीं आटती। जीवमहदादींचे ठाय फिटती। तैं जें देव होऊनि ठाकती। तें विसवणें शेषींचें॥ ४५॥

अर्थ—मग अर्जुन देवाला म्हणतात, देवा! तुम्ही अत्यंत कृपासागर आहांत, म्हणूनच जें बोललें जात नाही, तें आपण माझ्यावर कृपा करून शब्दाने सांगितलें॥ ४४॥ जेव्हा हीं संपूर्ण महाभूतें परब्रह्मांत लय पावतात व जीवरूप पराप्रकृति व महदादिरूप अपराप्रकृति यांचे नांवहि राहत नाही, तेव्हा तुम्ही, देवा! जे होऊन राहतां, तें तुमचें शेवटचें विश्रांतिस्थान होय॥ ४५॥

गूढार्थदीपिका—जें महाभूते ब्रह्मीं आटती। जीवमहदादिचे ठाय फिटती-स्थूल पंचमहाभूतें, महदादि सूक्ष्म पदार्थ व जीवदशा असे हें जडविनाशी जगत् परब्रह्माचे ठिकाणीं अध्यस्तविवर्तरूप-म्हणजे अज्ञानी जीवाने भ्रांतीने कल्पिले आहे असें वेदान्तांत म्हटलें आहे; म्हणून पूर्ण सच्चिदानंद परब्रह्माशीं त्याचा कांही एक संबंध राहत नाही, हें "यत्र जगद्ध्यास: तत्कृतेन दोषेण गुणेन वा अणुमात्रेणापि स न संबध्यते" (ब्र० सू० १-१ उपोद्घात) या आचार्यवचनानुसार सिद्ध होते.

या वचनपंक्तीचा भावार्थ असा की, जगत् व परब्रह्म यांचा कार्यकारणभाव सांगण्यकरितां जो वेदान्ताने विवर्तवाद मानला आहे, त्या विवर्तनवादानुसार पाहतां, कारणाच्या स्वरूपलक्षणांत यत्किंचित् बदल न होतां, कारण हें जसेच्या तसेच, कार्यरूप अवस्थांतराला येतें, असे मानले असल्यामुळे व जगांत परब्रह्म, आपल्या सच्चिदानंदधर्माने प्रत्ययाला येत नसल्यामुळे, या जडविनाशी जगताचे, शुद्ध सच्चिदानंदपरब्रह्म, हें साक्षात्कारण नव्हे; असें निश्चित ठरवून, परब्रह्म व जगत् यांच्यामध्ये जीवाने कल्पिलेली व परब्रह्माच्या आधाराने राहणारी त्रिगुणात्मक माया, वेदान्ताने मानली आहे.

ही त्रिगुणात्मक मायाच, जडविनाशी जगताचे उपादानकारण होय; म्हणून या जडविनाशी त्रिगुणात्मक मायेपासून महाभूतादि संपूर्ण सृष्टि उत्पन्न होते व तिच्या ठिकाणीच, प्रलयांत ती लीन होऊन, महाभूतादिक निरनिराळ्या पदार्थांचें अस्तित्व व वस्तुत्व नाहीसे होतें असा वेदान्ताचा सिद्धान्त आहें.

अशी ही सृष्टीची उत्पत्तिलयादि घडामोड, तिचें कारण जी माया तिच्यासह, परब्रह्मावरच अध्यस्तविवर्तरूप आहे व परब्रह्म हें, त्या सर्वांचे (सृष्टीचें व मायेचे) विवर्तोपादानकारण मानले आहे; म्हणून येथील "ब्रह्मीं" या शब्दाने जगताचें विवर्तोपादानकारण असलेलें त्रिगुणात्मक मायोपहित परब्रह्म घ्यावें लागतें.

आतां मायोपहित परब्रह्माचें माउलींनी मानलेलें स्वरूप काय आहे हें पाहिलें पाहिजे.

अद्वैत, निरवयव, अशा सच्चिदानंद परब्रह्माच्या अनुभवाने ज्या त्रिगुणात्मक मायेचा व तिच्या कार्याचा, "अविद्याकाळी सतुकें। अविद्या नाही" (अमृ० प्र० ६-३१) या माउलींच्या वचनाप्रमाणे, ती भासत होती तेव्हहि नव्हती, आता नाही व पुढेहि राहणें शक्य नाही, असा त्रैकालिक अत्यंत निवृत्तिरूप अनुभव येतो, तिच्यापासून जगद्रूप कार्य होणे दुरापास्त आहे असे "केउते मेलिया माया। होऊं पाहिजे" (अमृ० प्र० ८-९) या ओवीने माउलींनी सांगितलें आहे.

म्हणून आम्ही मागें सांगितल्याप्रमाणे, सच्चिदानंद परब्रह्म, आपल्या स्वाभाविक नामरूपात्मक सच्चिदानंद शक्तीने स्फुरण पावतें; पण या सत्यवस्तुस्थितीचें जीवाला ज्ञान नसल्यामुळे, त्याला ती त्रिगुणात्मक माया व तिचें नामरूपात्मक कार्य जगद्रूपाने भासते. असें मानलें असतां, सच्चिदानंदरूप नामरूपाने आविष्कृत झालेलें परब्रह्मच, जीवाच्या भ्रांतिकल्पित मायेला व सृष्टिकार्याला आधार असते, असें म्हणावें लागतें.

भगवंताच्या याच स्वरूपाला, पुढें विश्वरूप हें नांव दिलें गेलें आहे. आणि त्रिगुणात्मक मायोपहित परब्रह्म म्हणजे त्रिगुणात्मक मायेला आधार असणारें व सच्चिदानंदरूप नामरूपाने आविष्कार पावलेलें परब्रह्मच होय.

तैं जे होऊनि ठाकती। तें विसवणें शेषींचें—आणि हें स्वरूप वर सांगितल्याप्रमाणें अध्यस्तविवर्त अशा माया व मायाजन्य सृष्टीच्या गुणदोषाने यत्किंचितहि लिप्त न होतां, शुद्ध सच्चिदानंदस्वरूपच राहतें. रामकृष्णादिस्वरूपे, प्रगट होत असून, त्यांतच पुन: सामाविलीं जातात, असें माउलीचें म्हणणें वाहे. यावरून सर्व सृष्टि परमेश्वरावर भासणाऱ्या मायेंत लीन होते आणि रामकृष्णादिरूपें मायेला आधार असणाऱ्या, पण मायेचा स्पर्श नसलेल्या सगुणस्वरूपांत अंतर्भूत होऊन राहतात. या माउलीच्या म्हणण्याचा भावार्थ असा की भगवंताचें सर्वनामरूपात्मक विश्वरूप व श्रीकृष्णादिस्वरूपें त्रिगुणात्मक मायारहितच आहेत.

होतें हृदयाचिये परीवरीं। रोंविलें कृपणाचिये परी। शब्दब्रह्मासिही चोरी। जयाची केली॥ ४६॥

अर्थ—कृपण मनुष्याप्रमाणे जें हृदयमंदीरांत लपवून ठेवलें होतें आणि शब्दब्रह्मापासून म्हणजे वेदापासून जें चोरून ठेवलें होतें—म्हणजे वेद देखील या स्वरूपाला जाणूं शकला नाही॥ ४६॥

गूढार्थदीपिका—या स्वरूपाचा अनुभव नुसत्या ज्ञान्याला येत नाही. हा अनुभव भक्तांनाच येतो.

तें तुम्हीं आजि आपुलें। मजपुढां हियें फोडिलें। जया अध्यात्मा वोवाळिलें। ऐश्वर्य हरें॥ ४७॥

अर्थ—तें तुम्ही आज माझ्यापुढें आपलें हृदय उघडें केलें, या अध्यात्मस्वरूपावरून शंकराने कैलासाचें राज्य ओवाळून टाकलें व श्मशानांत वास केला॥ ४७॥

गूढार्थदीपिका—शुद्ध आत्मस्वरूपाला धरून जेवढें असतें, त्याला अध्यात्म म्हणतात, भगवंताचे निर्गुणस्वरूप स्वाभाविक असल्यामुळें जसें तें अध्यात्म म्हटलें जातें, तसेंच विश्वरूपहि स्वाभाविक असल्यामुळे, येथे त्यालाहि अध्यात्म म्हटलें आहे.

ते वस्तु मज स्वामी। एकिहेळां दिधली तुम्हीं। हें बोलों तरि आम्ही। तुज पावोनि कैंचे॥ ४८॥
परि साचचि महामोहाचिये पुरीं। बुडालेया देखोनि सीसवरी। तुवां आपणपें घालोनी श्रीहरी। मग काढिलें मातें॥ ४९॥
एक तूंवांचूनि कांहीं। विश्वीं दुजियाची भाष नाहीं। कीं आमुचें कर्म पाहीं। जें आम्ही आथी म्हणों॥ ५०॥

अर्थ—ती अध्यात्मवस्तु, प्रभो! मला एकदम तुम्ही दिली असें म्हणावें, तर आम्ही तुझ्यापासून निराळे कोठे आहों?॥ ४८॥ पण खरोखरच मी या संसाररूपी महामोहाच्या पुरांत डोक्यापर्यंत बुडलों आहे, हे पाहून देवा! आपण स्वत: त्यांत उडी टाकून मला बाहेर काढलें॥ ४९॥ अद्वैतदृष्टीने पाहतां, तिन्ही काळीं एका तुझ्यावांचून या संपूर्ण विश्वांत दुसऱ्या वस्तुची गोष्ट देखील नाही; पण 'आम्ही आहों' असें म्हणतों, हें आमचें दुर्दैव पहा कसे आहे?॥ ५०॥

गूढार्थदीपिका—सर्वनामरूपाने एक भगवानच नटला आहे, हाहि अद्वैतप्रत्ययच होय.

मी जगीं एक अर्जुनु। ऐसा देहीं वाहे अभिमानु। आणि कौरवांतें इया स्वजनु। आपुला म्हणें॥ ५१॥
याहीवरी यांतें मी मारीन। म्हणें तेणें पापें कें रिगेन। ऐसें देखत होतों दु:स्वप्न। तो चेवविला प्रभु॥ ५२॥
देवा गंधर्वनगरींची वस्ती। सोडुनि निघालें लक्ष्मीपती। होतों उदकाचिया आर्ती। रोहिणी पीत॥ ५३॥
जी किरडूं तरी कापडाचें। परी ल्हरी येत होतिया साचें। ऐसें वायां मरतया जीवाचें। श्रेय तुवां घेतलें॥ ५४॥
आपुलें प्रतिबिंब नेणतां। सिंह कुहां घालील देखोनि आतां। जैसा धरिजे तेवीं अनंता। राखिलें मातें॥ ५५॥
एऱ्हवीं माझा तरी येतुलेवरी। एथ निश्चय होता अवधारीं। जें आतांचि सातांहि सागरीं। एकत्र मिळिजे॥ ५६॥
हें जगचि आघवें बुडावें। वरि आकाशहि तुटोनि पडावें। परि झुंजणें न घडावें। गोत्रेजेंशीं मज॥ ५७॥
ऐसिया अहंकाराचिये वाढी। मियां आग्रहजळीं दिधली होती बुडी। चांगचि तूं जवळा येऱ्हवीं काढी। कवणु मातें॥ ५८॥
नाथिलें आपणपें एक मानिलें। आणि नव्हतया नाम गोत्र ठेविलें। थोर पिसें होतें लागलें। परि राखिलें तुम्हीं॥ ५९॥
मागां जळत काढिलें जोहरीं। तैं तें देहासीच भय अवधारीं। आतां हे जोहरवाहर दुसरी। चैतन्यासकट॥ ६०॥

अर्थ—या जगांत मी एक कोणी अर्जुन आहे, असा या देहाच्या ठिकाणीं मी अभिमान वागवित होतों व हे कौरव माझे सोयरे आहेत असे म्हणत होतों॥ ५१॥ यावरहि आणखी मी यांना मारीन, तर त्या पापामुळे माझी काय गति होईल असें खोटेंच स्वप्न पाहत होतों; पण भगवंता! तूं मला जागें केलेंस॥ ५२॥ हे देवा! खरी वस्ती सोडून आकाशांतील गंधर्वनगराकडे जायला निघालों. पाणी पिण्याच्या इच्छेने मृगजळच पीत होतों॥ ५३॥ खरोखर कापडाचा केलेला साप, पण तो सत्य मानल्यामुळे त्याच्या विषाची बाधा होऊन लहरी येऊं लागल्या होत्या आणि आता मी मरणार अशी व्यर्थ कल्पना करणाऱ्या जीवाला वांचविण्याचें श्रेय तुम्ही घेतलें॥ ५४॥ आपलेंच प्रतिबिंब आहे असे न जाणतां (हा दुसरा सिंह आहे असे जाणून त्याच्याशीं लढण्याकरितां आतां) हा सिंह उडी टाकतो असे पाहून त्याला मागे जसें धरून ठेवावें, त्याप्रमाणे देवा! तुम्ही माझें रक्षण केले॥ ५५॥ नाही तर, पहा देवा! माझा असा पक्का निश्चय होता की आतांच सातही समुद्र मिळून सर्व जग बुडो की आकाश तुटून पडो, पण कांही झालें तरी आपल्याच स्वजनाशीं लढूं नये॥ ५६-५७॥ अशा प्रबल अहंकाराने मी आग्रहरूपी जळांत बुडी मारून बसलों होतों, पण इतकें फार चांगले झालें की तूं जवळच होतास, नाही तर कोणी मला त्यांतून काढिलें असते?॥ ५८॥ मी म्हणून कोणी निराळा नसतांना, मी एक कोणी आहे अशी कल्पना केली आणि माझ्याहून कोणी निराळा नसतांना निराळे मानून त्याला गोत्रज हे नांव ठेवलें. असा मला विलक्षण भ्रम झाला होता, पण तूं माझें रक्षण केलेंस॥ ५९॥ पूर्वी जळत असलेल्या लाक्षागृहांतून आम्हांला वांचविलेस, मात्र त्यावेळी देहालाच भीति होती, पण ही दुसरी लाक्षागृहाची भीति चैतन्यासहित देहाला प्राप्त झाली॥ ६०॥

गूढार्थदीपिका—लौकिक अग्नि देहाचा नाश करतो; पण अविवेकरूपी अग्नि चैतन्यासहित देहांच्या नाशाची भीति उत्पन्न करतो, असा अर्थ.

दुराग्रहें हिरण्याक्षें। माझी बुद्धि वसुंधरा सूदली काखे। मग मोहार्णवगवाक्षें। रिघोनि ठेला॥ ६१॥
तेथ तुझेनि गोसावीपणें। एकवेळ बुद्धीचिया ठाया येणें। हें दुसरें वराह होणें। पडिलें तुज॥ ६२॥
ऐसें अपार तुझें केलें। एकी वाचा काय मी बोलें। परि पांचही पालव मोकलिले। मजप्रती॥ ६३॥
तें कांही न वचेचि वायां। भलें यश फावलें देवराया। जे साद्यंत माया। निरसिली माझी॥ ६४॥
आजी आनंदसरोवरींचीं कमळें। तैसे जे हे तुझे डोळे। आपुलिया प्रसादाचीं राऊळें। जयालागीं करिती॥ ६५॥
हां हो तयाही आणि मोहाची भेटी। हे कायसी पाबळी गोठी। केउती मृगजळाची वृष्टी। वडवानळेंसी॥ ६६॥
आणि मी तंव दातारा। ये कृपेचिये रिघोनि गाभारां। घेत आहें चारा। ब्रह्मरसाचा॥ ६७॥
तेणें माझा जी मोह जाये। एथ विस्मो कांहीं आहे। तरी उद्धरलो की तुझे पाये। शिवतले आहाती॥ ६८॥

अर्थ—मी युद्ध करणार नाही, या दुराग्रहरूपी हिरण्याक्षाने माझी बुद्धिरूपी पृथ्वी आपल्या काखेंत घालून अविवेकरूपीं समुद्राच्या भगदाडांतून तो पाताळांत जाऊन राहिला होता-(म्हणजे कांही झालें तरी मी युद्ध करणारच नाही अशा अट्टाहासामुळे माझी बुद्धि विचारहीन होऊन अविवेकाने कौरव हे माझे स्वजन आहेत या मोहांत सापडली होती)॥ ६१॥ तेथे तुझ्यासारखा समर्थ स्वामी मिळाल्यामुळे, माझी बुद्धि एकदांची विवेकरूपी आपल्या मूळ ठिकाणावर आली. माझ्या बुद्धीचा उद्धार करण्याकरितां तुला दुसऱ्यांदा हे असें वराह व्हावें लागले॥ ६२॥ देवा! तुझे असे अपार उपकार मी या एका वाचेने काय सांगणार? पण एवढें मात्र खरें की तूं माझ्या ठिकाणीं आपले पंचप्राण अर्पण केलें आहेस॥ ६३॥ देवा! तूं माझ्याकरितां श्रम केलेस, ते कांही वायां गेले नाहीत; कारण तूं माझा संपूर्ण अज्ञानभ्रम नाहीसा केलास असें थोर यश तुला प्राप्त झालें॥ ६४॥ परमानंदरूपी सरोवरांतील जणूं काय कमळेंच, असे हे तुझे डोळे, ज्याच्यावर कृपेचें मंदिर करतील॥ ६५॥ अशा त्याच्याशी मोहाची किंवा अविवेकाची गांठ पडणे, ही अगदींच दुर्घट गोष्ट तेथे कशी असणार? (जो) वडवानळ (समुद्राचे) पाण्याने विझत नाही, त्याला मृगजळाच्या वृष्टीने काय होईल॥ ६६॥ आणि प्रभो! कृपासागरा! मी तर तुमच्या कृपेच्या गाभाऱ्यांतच बसून ब्रह्मानंदाचा आस्वाद घेंत आहे॥ ६७॥ त्यामुळे माझें मोहरूपी अज्ञान नाहीसें झालें त्यात काय आश्चर्य आहे? पण आपल्या कृपेने माझा उद्धार झाला हें मी आपल्या पायावर हात ठेवून सांगतों॥ ६८॥

भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया। त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम्॥ २॥

अर्थ—हे कमलपत्राप्रमाणे डोळे असणाऱ्या भगवंता! तुझ्यापासून या भूतसृष्टीचे उत्पत्तिलय कसें होतात, हें मी सविस्तर ऐकिलें, त्याचप्रमाणे तुझें अविनाशी सामर्थ्यहि ऐकिलें॥ २॥

पैं कमळायतडोळसा। सूर्यकोटितेजसा। मियां तुजपासोनि महेशा। परिसिलें आजि॥ ६९॥
इयें भूतें जयापरी होती। अथवा ल्या हन जैसेनि जाती। ते मजपुढां प्रकृती। विवंचिली देवें॥ ७०॥
आणि प्रकृती कीर उगाणा दिधला। वरि पुरुषाचाही ठावो दाविला। जयाचा महिमा पांघरोनि जाहला। धडौता वेदु॥ ७१॥
जी शब्दराशी वाढे जिये। कां धर्माऐशिया रत्नातें विये। ते एथिंचे प्रभेचे पाये। वोळगे म्हणोनि॥ ७२॥
ऐसें अगाध माहात्म्य। जें सकळमार्गैकगम्य। जैं स्वात्मानुभवरम्य। तें इयापरी दाविलें॥ ७३॥
जैसा केरु फिटलिया आभाळीं। दिठी रिगे सूर्यमंडळीं। कां हातें सारूनि बाबुळी। जळ देखिजे॥ ७४॥
नातरी उकलूनियां सापाचे वेढे। जैसें चंदना खेंव देणें घडे। अथवा विवसी पळे मग चढे। निधान हातां॥ ७५॥
तैसी प्रकृति हे आड होती। ते देवेंचि सारिली परौती। मग परतत्त्व माझिये मती। शेजार केले॥ ७६॥
म्हणोनि इये विषयींचा मज देवा। भरंवसा कीर जाहला जीवा। परि आणिक एक हेवा। उपनला असे॥ ७७॥
तो भिडां जरी म्हणों राहों। तरी आना कवणा पुसों जावों। काय तूजवांचोनि ठावो। जाणत आहों आम्ही॥ ७८॥
जळचरु जळाचा आभारु धरी। बाळक स्तनपानीं उपरोधु करी। तरी तया जिणयासी श्रीहरी। आन उपायो असे॥ ७९॥
म्हणोनि भीडसांकडी न धरावे। जीवी आवडे तेंही तुजपुढां बोलावें। तंव राहें म्हणितलें देवें। चाड सांगे॥ ८०॥

अर्थ—हे कमळाला आश्रय होणारे ज्याचे डोळे आहेत अशा व कोटी सूर्यांचे तेजाप्रमाणे ज्याची अंगकांति अशा सर्वेश्वरा! मी तुझ्यापासून आज ऐकिलें॥ ६९॥ ही सर्व भूतसृष्टि ज्या प्रकृतिपासून उत्पन्न होते व जी मध्ये पुनः लय पावते, त्या प्रकृतीचें संपूर्ण विवेचन आपण माझ्यासमोर केलें॥ ७०॥ आणि प्रकृतीचें झाडून विवेचन केलें तसेंच ज्याचे कीर्तिरूप वस्त्र पांघरून वेद सवस्त्र झाला, त्या परमात्म्याची स्वरूपस्थितिहि सांगितली॥ ७१॥ अहोजी महाराज! शब्दराशीरूप वेदाचा जो एवढा विस्तार झाला आहे व टिकून राहिला आहे किंवा धर्मासारख्या रत्नाला त्यांनी जो जन्म दिला, तो आपल्या सामर्थ्यरूप पायाचा आश्रय केला म्हणूनच होय॥ ७२॥ असें आपलें सर्व मार्गाच्या ऐक्यतेने कळणारे व स्वानुभवालाहि रमविणारें जें तुझे अगाध माहात्म्य मला तुम्हीं दाखविलें॥ ७३॥ ज्याप्रमाणे आकाशांत आलेले ढंग नाहीसे झाले असतां सूर्यमंडलाचें ठिकाणीं दृष्टि जाते किंवा हाताने शेवाळ बाजूला सारूनच पाणी पाहतां येतें॥ ७४॥ किंवा सर्पांचे वेढे दूर केलें असतांच चंदनाच्या झाडाला मिठी मारतां येते अथवा द्रव्यावर बसलेलें पिशाच्च पळालें की तें द्रव्य आपल्या हातीं येते॥ ७५॥ त्याप्रमाणें माझ्या व आत्मस्वरूपाच्या मध्ये जो अज्ञानप्रकृतीचा पडदा होता, तो आपण देवा! दूर सारला आणि माझ्या बुद्धीला परतत्वाचें शय्याघर केलें॥ ७६॥ म्हणून या आत्मस्वरूपाविषयीं आतां माझा दृढ विश्वास झाला आहे; पण आणखी एक उत्कट इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली आहे॥ ७७॥ भिडेने तीं इच्छा आतां बोलून दाखवत नाही असें म्हणावें, तर दुसऱ्या कोणाला मी तिच्याविषयी विचारणार? तुझ्यावांचून आम्ही दुसरें ठिकाण जाणतो काय?॥ ७८॥ पाण्यांत राहणाऱ्या प्राण्यांनी पाण्यांत राहण्याचा संकोच केला किंवा लहान मुलाने आईच्या स्तनपानाविषयीं भीड धरली, तर त्याच्या जगण्याला दुसरा उपाय आहे काय?॥ ७९॥ म्हणून भीड किंवा संकोच धरूं नये व आपल्या मनाला वाटते तें खुशाल तुमच्यासमोर बोलावें, असें वाटतें. तेव्हा भगवान म्हणाले, अर्जुना! (पाल्हाळ) बोलूं नकोस. मनांतील इच्छा सांग॥ ८०॥

एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर। द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम॥ ३॥

अर्थ—हे परमेश्वरा भगवंता! याप्रमाणे हें जें मला तूं आपल्या स्वरूपाविषयीं सांगितलेंस, तें तुझें ईश्वरस्वरूप, पुरुषोत्तमा! मी डोळ्यांनी पाहुं इच्छितों॥ ३॥

मग बोलिला तो किरीटी। म्हणे तुम्हीं केली जे गोठी। तिया प्रतीतीची दिठी। निवाली माझी॥ ८१॥

आतां जयाचेनि संकल्पें। हे लोकपरंपरा होय हारपे। जया ठायातें आपणपें। मी ऐसें म्हणसी॥ ८२॥
ते मुद्दल स्वरूप तुझें। जेथूनि इये द्विभुजें हन चतुर्भुजें। सुरकार्याचेनि व्याजें। घेवोंघेवों येसी॥ ८३॥
पैं जळशयनाचिया अवगणिया। कां मत्स्य कूर्म इया मिरवणिया। खेळु सरलिया तूं गुणिया। सांठविसी जेथ॥ ८४॥

अर्थ—त्यावर तो अर्जुन बोलला; अर्जुन म्हणतो, देवा! तुम्ही आपल्या परमेश्वरस्वरूपाविषयीं जें निरूपण केलें, त्यायोगें आता माझ्या बौद्धिक अनुभवदृष्टीचें समाधान झालें॥ ८१॥ आतां ज्याच्या संकल्पाने ही सृष्टिपरंपरा होते व लय पावते व ज्या स्वरूपाला 'तें स्वत: मी आहे' असें म्हणतोस॥ ८२॥ जेथून तूं द्विभुज किंवा चतुर्भुज रूप धारण करून देवादिकांचे कार्य करण्याकरितां वारंवार जगांत प्रगट होतोस, तें तुझे मूळचें रूप॥ ८३॥ क्षीराब्धींतील जलावर शयन करणारें सोंग असो किंवा मत्स्य, कूर्म इत्यादीरूपाने मिरवणे असो, हे खेळ करणाऱ्या गारूड्या! हे तुझे खेळ संपले की ही तुझीं रूपें ज्याठिकाणी सांठविलीं जातात॥ ८४॥

गूढार्थदीपिका—येथे 'खेळ' या शब्दाचा ''खोटा'' असा अर्थ नसून ''लीलेने विग्रह धरणें'' असा आहे. या ओवींत भगवंताच्या क्षीराब्धिजळशायीरूप व मत्स्यादिरूपें घेण्याला खेळ म्हटलें आहे; म्हणून तीं रूपें मिथ्या आहेत असे समजतां येत नाही. कारण वेदान्तदृष्टीने एक अविद्येचे कार्यच मिथ्या व नाशिवंत आहे. ''नित्याविद्यानिवृत्तत्वात्'' भगवान नित्य अविद्यारहित आहे असे वेदान्तांत मानले असल्यामुळे भगवंताचें कोणतेंहि रूप अविद्याजन्य नसतें. अर्थात् 'भगवंताचीं हीं रूपें घेणें हा खेळ आहे' या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, भगवंताचीं हीं सर्व रूपें व विश्वरूपहि पूर्ण सच्चिदानंद स्वरूप राहूनच, ती सहज लीलेने घेतलीं जातात. त्यांत विश्वरूप हें पहिलें लीलाविग्रहीरूप असून क्षीराब्धिजळशायी किंवा मत्स्यकूर्मादि हीं विश्वरूपाचीं लीलाविग्रही रूपें आहेत. अर्थात् जडविनाशी, कल्पित अशा अविद्येच्या अपेक्षेने विद्योपाधि ही संज्ञा असलेल्या ज्ञानप्रधान विद्यावृत्तीने हीं सर्व रूपें भगवान घेत असल्यामुळे व विद्यावृत्तीनेच त्यांचा अनुभव येत असल्यामुळे, तीं खोटी, विनाशी म्हणतां येत नाहीत.

भगवंताचीं रूपें विद्याउपाधिजन्य आहेत हे म्हणणेंहि जीवाच्या ठिकाणीं असलेल्या अविद्येच्या अपेक्षेनेच आहे. अविद्योपाधीचा त्रैकालिक नाश झाल्यावर, विद्योपाधि ही संज्ञा नाहीशी होते व परब्रह्माचीं विश्वरूप, मत्स्यकूर्मादिरूपें पूर्ण निरुपाधिक ब्रह्मस्वरूप आहेत असा अनुभव येतो.

उपनिषदें जें गाती। योगिये हृदयीं रिगोनी पाहाती। जयातें सनकादिक आहाती। पोटाळुनियां॥ ८५॥

अर्थ—उपनिषदें ज्याचें वर्णन करतात, योगीलोक अंतर्मुखदृष्टि करून जे पाहतात आणि सनकादिक ज्या स्वरूपाला नेहमी मिठी मारून आहेत॥ ८५॥

गूढार्थदीपिका—वर सांगितल्याप्रमाणे, भगवंताचें विश्वरूप निरुपाधिक लीलाविग्रही आहे, म्हणूनच या ओवींत ''उपनिषदें जें गाती। योगिये हृदयीं रिगोनि पाहती। जयातें सनकादिक आहाती। पोटाळुनिया'' असा त्याचा महिमा गायिला आहे. त्रिगुणात्मक मायाउपाधिजन्य साकार स्वरूपाचा हा महिमा असणे शक्यच नाही.

ऐसें अगाध जें तुझें। विश्वरूप कानीं ऐकिजे। तें देखावया चित्त माझें। उतावीळ देवा॥ ८६॥
देवें फेडूनियां सांकड। लोभें पुसिली जरी चाड। तरि हेचि एकी वाड। आर्ती जी मज॥ ८७॥
तुझें विश्वरूपपण आघवें। माझिये दिठीसि गोचर होआवें। ऐशी थोर आस जीवें। बांधोनि आहें॥ ८८॥

अर्थ—असें अतर्क्य जें तुझें विश्वरूप नुसतें कानांनीं ऐकतो, तें डोळ्यांनी पाहण्याकरितां मी फार उतावीळ झालों आहे॥ ८६॥ देवांनी माझ्या मनांतील संकोच नाहीसा करून, काय इच्छा आहे ती सांग, असे मोठ्या प्रेमाने विचारलें. म्हणून सांगतों कीं माझ्या मनांत हीच एक भारी इच्छा आहे.॥ ८७॥ तुझें संपूर्ण विश्वरूप माझ्या दृष्टीस दिसावें अशी तीव्र इच्छा मी मनांत धरून आहे॥ ८८॥

मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो। योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम्॥ ४॥

अर्थ—पण देवा! तें तुझें विश्वरूप मी पाहणें शक्य आहे असे जर तुला वाटत असेल, तर हे योगेश्वरा कृष्णा! तें तूं आपलें अविनाशी स्वरूप मला दाखव॥ ४॥

परि आणीक एक एथ शार्ङ्गी। तुज विश्वरूपातें देखावयालागीं। योग्यता माझां आंगीं। असे कीं नाहीं॥ ८९॥
हें आपलें आपण मी नेणें। तें कां नेणसी जरी देव म्हणे। तरी सरोगु काय जाणे। निदान रोगाचें॥ ९०॥
आणि जी आर्तीचेनि पडिभरें। आर्तु आपुलीं ठाकी पैं विसरे। तान्हेला म्हणे न पुरे। समुद्र मज॥ ९१॥
ऐशा सचाडपणाचिये भुली। न सांभाळवे समस्या आपुली। यालागीं योग्यता जेवीं माउली। बालकाची जाणे॥ ९२॥
तयापरी श्रीजनार्दना। विचारिजो माझी संभावना। मग विश्वरूपदर्शना। उपक्रम कीजे॥ ९३॥
तरि ऐसी ते कृपा करा। एऱ्हवीं नव्हे हें म्हणा अवधारा। वायां पंचमालापें बधिरा। सुख केउतें देणें॥ ९४॥
एऱ्हवीं एकल्या बापियाचिया तृषे। मेघ जगापुरतें काय न वर्षे। परि जहालीही वृष्टि उपखे। जऱ्हीं खडकीं होय॥ ९५॥
चकोरा चंद्रामृत फावलें। येरां आण वाहूनि काय वारिलें। परि डोळ्यावीण पाहलें। वायां जाय॥ ९६॥
म्हणोनि विश्वरूप तूं सहसा। दाविसी हा कीर भरंवसा। कां जे कडाडां आणि गहिंसां-। मार्जीं नीच नवा तूं कीं॥ ९७॥
तुझें औदार्य जाणों स्वतंत्र। देतां न म्हणसी पात्रापात्र। पैं कैवल्या ऐसें पवित्र। कीं वैरियांही दिधलें॥ ९८॥
मोक्षु दुराराध्यु कीर होय। परि तोही आराधी तुझे पाय। म्हणोनि धाडिसी तेथ जाय। पाइकु जैसा॥ ९९॥

अर्थ—पण देवा! येथे आणखी एक गोष्ट आहे, तुझ्या विश्वरूपाला पाहण्याकरितां लागणारी योग्यता माझ्या आंगी आहे किंवा नाहीं हे मी आपलें आपणच जाणूं शकत नाही. तुझी योग्यता आहे किंवा नाहीं, हें तूं कां जाणूं शकत नाहींस असे जर, देवा! तुम्ही म्हणाल, तर रोगी आपल्या रोगाचें निदान जाणतो काय?॥ ८९-९० ॥ आणि ज्याप्रमाणे अत्यंत तहानलेला पुरुष जसा मला समुद्रहि पुरेसा होत नाही असें म्हणतो, त्याप्रमाणे महाराज! इच्छा करणाऱ्या पुरुषाची इच्छा अत्यंत वाढली असतां त्याला आपल्या योग्यतेचा विसर पडतो॥ ९१ ॥ अशाप्रमाणे अत्यंत इच्छेच्या वेगामुळेच भूल पडून, माझ्याने आपली योग्यता सांभाळली जात नाही; म्हणून आई जशी आपल्या मुलाला काय व किती पचेल, हें जाणते॥ ९२ ॥ त्याप्रमाणें, जनार्दना! माझ्या योग्यतेचा विचार करा व मग विश्वरूप दाखविण्याला प्रारंभ करा॥ ९३ ॥ म्हणून योग्यता असेल, तर विश्वरूप दाखविण्याची कृपा करा, नाहीतर विश्वरूप पाहण्याची तुझी योग्यता नाही, असे म्हणा. बहिऱ्याला व्यर्थ कोमल स्वराचें काय सुख द्यायचें? (त्याप्रमाणे माझी योग्यता नसतांना आपण विश्वरूप दाखविलें तरी मला काय त्याचें सुख होणार?)॥ ९४॥ नाही तरी एका भाग्यवान चातकाकरितां वर्षाव करतांना मेघ सर्व पृथ्वीवर पाऊस पाडीत नाहीत काय? पण पृथ्वीवर वर्षाव झाला तरी खडकावर झालेला वर्षाव व्यर्थच जातो॥ ९५॥ पूर्ण चंद्राच्या प्रकाशांत चकोरांना अमृतकण मिळतात आणि बाकीच्यांना चंद्राने आपल्या प्रकाशांतील अमृतकण वेचायला शपथ वाहून मनाई केली आहे काय? पण चकोराची अमृतकण पाहण्याची दृष्टि इतरांना नसल्यामुळे, नुसता चंद्राचा प्रकाश पाहण्याने तो लाभ होत नाही॥ ९६ ॥ म्हणून म्हटल्याबरोबर तूं एकदम विश्वरूप दाखविशील हा मला पक्का विश्वास आहे; कारण उतावळीने व अविचाराने देणाऱ्यामध्ये तुझें देणें नेहमीच अपूर्व असतें॥ ९७॥ तुझें औदार्य निरपेक्ष आहे. हें मी जाणतों; पण देतांना तूं पात्रापात्रतेचा विचार करीत नाहीस. मोक्षासारखी शुद्ध अशी स्थिति तूं आपल्या शत्रूलाहि दिलीस॥ ९८॥ खरोखरच मोक्षाची आराधना करणें (मोक्ष प्राप्त करून घेणे) अत्यंत कठीण आहे; पण तोहि तुझ्या पायाची आराधना करतो म्हणजे तो तुझ्या पायाच्या आश्रयानेच मिळतो-म्हणून तूं जेथें त्याला पाठवितोस, तेथें तो सेवकाप्रमाणे जातो॥ ९९ ॥

गूढार्थदीपिका—त्रिविधदु:खात्यंतनिवृत्तिपूर्वक परमानंदप्राप्तिरूप मोक्ष, सगुण भगवंताच्या भक्तिवांचून प्राप्त होणें अशक्य आहे असा भाव.

तुवां सनकादिकांचेनि मानें। सायुज्यीं सौरसु दिधला पूतने। जे विषाचेनि स्तनपानें। मारूं आली॥ १००॥
हां गा राजसूययागाचिया सभासदीं। देखतां त्रिभुवनाची मांदी। कैसा शतधा दुर्वादीं। निस्तेजिलासी॥ १०१॥
ऐशिया अपराधिया शिशुपाळा। आपणपयां ठावो दिधला गोपाळा। आणि उत्तानचरणाचिया बाळा। काय ध्रुवपदीं चाड॥ १०२॥
तो वना आला याचिलागीं। जे बैसावें पितयाचां उत्संगीं। कीं तो चंद्रसूर्यादिकांपरिस जगीं। श्लाघ्यु केला॥ १०३॥
ऐसा वनवासियां सकळां। देता एकचि तूं धसाळा। पुत्रा आळवितां अजामिळा। आपणपें देसी॥ १०४॥

जेणें उरीं हाणितलासि पांपरा। तयाचा चरणु वाहासी दातारा। अझुनी वैरियांचियां कलेवरा। विसंबसीना॥ १०५॥
ऐसा अपकारियां तुझा उपकारु। तूं अपात्रींही परि उदारु। दान मागोनि दारवंटेकरु। जाहलासी बळीचा॥ १०६॥
तूंतें आराधी ना आयके। होती पुंसा बोलावीत कौतुकें। तिये वैकुंठीं तुवां गणिके। सुरवाडु केला॥ १०७॥

अर्थ—विषाने स्तन भरून तूझा प्राण घेण्याकरितां आलेल्या पुतनेलाहि, भगवंता! त्वां सनकादिकांच्या प्रमाणे आपल्या सायुज्यमुक्तीचें सुख दिलें॥ १००॥ त्याचप्रमाणे दुसरा प्रसंग पहा! पांडवांच्या राजसूययज्ञामध्यें सर्व सभासदांच्या समोर, त्रैलोक्यांतील समुदाय जमला असतांना, त्या शिशुपालाकडून हजारों अपशब्दांनी तुमचा कसा पाणउतारा केला गेला॥ १०१ ॥ तसा घोर अपराध करणाऱ्या शिशुपालाला देखील गोपाळा! तुम्ही आपल्यांत मिळवून घेतले आणि उत्तानपादराजाच्या मुलाला-ध्रुवाला-काय ध्रुवपदाच्या प्राप्तीची इच्छा होती?॥ १०२ ॥ पित्याच्या मांडीवर बसावे याच उद्देशाने तपश्चर्या करण्याकरितां तो अरण्यांत आला होता, पण तुम्ही त्याला चंद्रसूर्यांपेक्षाहि श्रेष्ठ केला॥ १०३ ॥ अशा रीतीने तुझ्या करीतां वनवास करणाऱ्यांना तूंच एक विचार न करतां देणारा आहेस. अजामेळ पुत्राला प्रेमाने बोलावित असतां तुम्ही त्याला आपलीच प्राप्ति करून दिली॥ १०४॥ ज्याने तुमच्या वक्षस्थलावर लाथ मारली, त्याच्या चरणाचा ठसा, अझून तुम्ही वक्षस्थलावर धारण केला आहे. अझूनहि आपल्या (शंखासुर या) शत्रूच्या शरीराला (म्हणजे शंखाला) आपण दूर करीत नाही॥ १०५॥ असे तुम्ही अपकार करणाऱ्यावरहि उपकार करणारे आहांत. दानाला अयोग्य असणाऱ्यावरहि आपण उदार होऊन दान दिलें आहे, बळीने सर्व पृथ्वीचें दान केलें म्हणून आपण त्याचे द्वाररक्षक झालांत॥ १०६ ॥ नामस्मरणाने तुझी आराधना करीत नव्हती किंवा तुझें नांव ऐकतहि नव्हती. कौतुकाने राघुला रामकृष्ण म्हणून बोलण्यास शिकवित होती; पण त्या वेश्येला आपण वैकुंठसुख दिलें॥ १०७॥

गूढार्थदीपिका (महानंदा)—गणिका पाळलेल्या राघूला 'राम कृष्ण हरि' हे शब्द केवळ बोलण्याला शिकवित होती, त्यांत आपण नामस्मरण करून भगवंताची आराधना करावी किंवा राघूच्या मुखांतून आपण भगवंताचे नाव ऐकावे असा कांही एक उद्देश तिने धरला नव्हता; तरीपण कोणत्याहि निमित्ताने भगवंताचें नाव मुखीं आलें असतां मनुष्य उद्धरला जातो, अशा नामाच्या माहात्म्यबळामुळे व भगवंताच्या नामांतच रंगून तिची पापप्रवृत्ति बंद पडल्यामुळे, ती तत्काळ उद्धरली गेली.

ऐसीं पाहूनि वायाणीं मिषें। आपणपें देवों लागसी वानिवसें। तो तूं कां अनारिसें। मजलागीं करिसी॥ १०८॥
हां गा दुभतयाचेनि पवाडें। जे जगाचें फेडी सांकडें। तिये कामधेनूचे पाडे। काय भुकेले ठाती॥ १०९॥
म्हणोनि मियां जे विनवलें कांहीं। तें देव न दाखविती हें कीर नाहीं। परि देखावयालागीं देईं। पात्रता मज॥ ११० ॥
तुझें विश्वरूप आकळे। ऐसें जरी जाणसी माझे डोळे। तरि आर्तीचे डोहळे। पुरवीं देवा॥ १११॥
ऐसी ठायेंठावो विनंती। जंव करूं सरला सुभद्रापती। तंव तया षड्गुणचक्रवर्ती। साहवेचिना॥ ११२॥
तो कृपापीयूषसजळु। आणि येरु जवळां आला वर्षाकाळु। नाना श्रीकृष्णकोकिळु। अर्जुन वसंतु॥ ११३॥
नातरी चंद्रबिंब वाटोळें। देखोनि क्षीरसागर उचंबळे। तैसा दुणेंहीवरी प्रेमबळें। उल्लसितु जाहला॥ ११४॥

अर्थ—असें कांही तरी फोल निमित्त पाहून जो तूं आपली कौतुकाने प्राप्ति करून देतोस, तो तूं इतका उदार, मी विश्वरूप दाखीव म्हटल्यानंतर भलतेंच कसें करशील?॥ १०८॥ दुभत्याच्या प्रभावाने-म्हणजे इच्छिलें तें देण्यास समर्थ असल्यामुळे-जी कामधेनू सर्व जगाचें दु:ख नाहीसे करते, त्या कामधेनूचेंच वासरूं भुकेले राहील काय?॥ १०९॥ म्हणून मी जें आपल्याला विनंति करून विश्वरूप दाखवा म्हणून म्हटले, तें आपण दाखविणार नाही असे मुळींच नाही; पण तें विश्वरूप पाहण्याची पात्रता मला द्या॥ ११०॥ माझ्या या दोन्ही डोळ्यांनी विश्वरूप पाहण्याजोगें आहे, असें जर आपणांला वाटत असेल, तर देवा! माझी विश्वरूपदर्शनाची इच्छा पूर्ण करा॥ १११॥ सुभद्रापती अर्जुन अशी यथायोग्य विनंति जेव्हां करूं लागला तेव्हा षड्गुणैश्वर्याचा सार्वभौम राजा-म्हणजे अमर्याद षड्गुणैश्वर्यसंपन्न-जो भगवान श्रीकृष्ण, त्याला धीर धरवला नाही॥ ११२॥ कारण भगवान श्रीकृष्ण, कृपारूपी

अमृताने वळून आलेला जलयुक्त मेघ होता आणि अर्जुन हा अत्यंत जवळ येऊन ठेपलेला पावसाळा होता किंवा श्रीकृष्ण कोकिळपक्षी होता व अर्जुन वसंतऋतु होता॥ ११३॥ किंवा वाटोळें पूर्ण चंद्रबिंब पाहून जसा क्षीरसागर उचंबळतो, त्याप्रमाणें अर्जुनावरील द्विगुणित झालेल्या प्रेमाने भगवान अत्यंत आनंदित झाले॥ ११४॥

श्रीभगवानुवाच

पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः। नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च॥ ५॥

अर्थ—भगवान श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना! माझीं नाना प्रकारचीं व नाना प्रकारच्या दिव्य वर्णांनी व आकृतींनी युक्त असलेली शेकडों हजारों म्हणजे अनंत रूपें पहा॥ ५॥

मग तिये प्रसन्नतेचेनि आटोपें। गाजोनि म्हणितलें सकृपें। पार्था देख देख अमुपें। स्वरूपें माझीं॥ ११५॥

अर्थ—मग त्या प्रसन्नचित्ताच्या आवेशाने भगवान श्रीकृष्ण गर्जना करून व दयार्द्र होऊन म्हणाले, अर्जुना! माझीं असंख्य स्वरूपें पहा! पहा!॥ ११५॥

गूढार्थदीपिका—हें विश्वरूप म्हणजे विराट्स्वरूप होय असे कित्येक समजतात; पण संपूर्ण स्थूल ब्रह्मांडाला विराट्स्वरूप म्हणतात. आणि तें विश्वरूपाच्या एका अंशावर भासलेलें अर्जुनाने पाहिलें; म्हणून तें विश्वरूपापेक्षां मर्यादित आहे, हें सिद्ध आहे. पुरुषसूक्तांत "सहस्रशीर्षा पुरुषः" असे पहिल्या पुरुषाचें वर्णन करून "ततो विराडजायत" त्या पुरुषापासून विराट पुरुष उत्पन्न होतो असें सांगितलें आहे. अर्थात् येंथील विश्वरूपाचा प्रत्यय, म्हणजे पुरुषसूक्तांनी, ज्या सहस्रशीर्ष पुरुषापासून स्थूल ब्रह्मांडरूप विराटपुरुषाचा भास किंवा उत्पत्ति होते असें सांगितलें आहे, त्या सहस्रशीर्ष अशा पुरुषाचाच प्रत्यय होय, हें सिद्ध होतें.

एकचि विश्वरूप देखावें। ऐसा मनोरथु केला पांडवें। कीं विश्वरूपमय आघवें। करूनि घातलें॥ ११६॥
बाप उदार देवो अपरिमितु। याचक स्वेच्छा सदोदितु। असे सहस्रवरी देतु। सर्वस्व आपुलें॥ ११७॥
अहो शेषाचेहि डोळे चोरिले। वेद जयालागीं झकविले। लक्ष्मीयेही राहाविले। जिव्हार जें॥ ११८॥
तें आतां प्रगटुनी अनेकधा। करीत विश्वरूपदर्शनाचा धांदा। बाप भाग्या अगाधा। पार्थाचिया॥ ११९॥
जो जागता स्वप्नावस्थे जाये। तो जेवीं स्वप्नीचें आघवें होये। तेवीं अनंत ब्रह्मकटाह आहे। आपणचि जाहला॥ १२०॥

अर्थ—एकच विश्वरूप पहावें अशी अर्जुनाने इच्छा केली होती; पण भगवंतांनीं सर्व विश्वरूपमय करून टाकलें॥ ११६॥ धन्य आहे हा अमर्याद उदार परमात्मा! याचकाचीं इच्छा पूर्ण करण्यास हा सदा सिद्ध असतो आणि याचकाच्या मागण्याच्या सहस्रपट देतो किंवा आपलें सर्वस्वहि देतो॥ ११७॥ अहो, जें विश्वरूप अत्यंत गुह्य म्हणून शेषाच्या डोळ्यालाहि दिसूं दिलें नाही, वेदाला कळूं दिलें नाही व लक्ष्मीलाहि ज्यापासून दूर ठेविलें॥ ११८॥ असें विश्वरूप आतां त्या धन्य व थोर भाग्यवान अर्जुनासाठी अनेक प्रकारें प्रगट करून, भगवान विश्वरूपदर्शनाचा खटाटोप करीत आहेत॥ ११९॥ जो जागा असलेला पुरुष, पुढें स्वप्नांत जातो व तो मग स्वप्नांत जेवढें कांहीं दिसतें, तें सर्व आपणच होतो, त्याप्रमाणे श्रीकृष्ण भगवान, आपणच अनंतब्रह्मांडरूप झाले॥ १२०॥

गूढार्थदीपिका—येथे भगवंताच्या विश्वरूपाने प्रगट होण्यास जो स्वप्नाचा दृष्टान्त दिसला, तो एकच पुरुष अनेकरूप कसा होतो हें जीवाला स्वप्न दृष्टान्तावरूनच समजत असल्यामुळे, दिला आहे.

स्वप्न जसें भ्रमजन्य काल्पनिक खोटें असतें, तसें भगवंताचें हें विश्वरूप भ्रमजन्य काल्पनिक खोटे आहे, हें सांगण्याकरितां दिला नाही. भगवंताचें हे स्वरूप तसें 'अज्ञानजन्य, काल्पनिक, खोटें असते, तर स्वप्नांत जसा मनुष्य, एक मीच अनेकरूप झालों आहों हें जाणत नाही, तसें भगवंतांनीहि आपलें एकवस्तुत्व व अद्वैतत्व जाणलें नसतें आणि अर्जुनालाहि विश्वरूपदर्शनांत भगवंताचें एक अद्वैतवस्तुत्व अनुभवाला आलें नसतें व त्याला पाहण्याकरितां दिव्यदृष्टीची आवश्यकता लागली नसती.

ते सहसा मुद्रा सोडिली। आणि स्थूळदृष्टीची जवनिका फेडिली। किंबहुना उघडिली। योगऋद्धी॥ १२१॥

अर्थ—आपल्या मर्यादित श्रीकृष्णस्वरूपाचा आकार एकदम लुप्त केला आणि ज्या अज्ञानजन्य स्थूलदृष्टीने

भगवंताचें श्रीकृष्णस्वरूप व जगत् निरनिराळें पांचभौतिक स्थूल दिसत होते, त्या स्थूलदृष्टीचा पडदा दूर केला; किंबहुना भगवंताने आपलें परमैश्वर्य प्रगट केले॥१२१॥

गूढार्थदीपिका—स्थूलदृष्टीची जवनिका फेडिली-स्थूल दृष्टि-संपूर्ण नामरूपात्मकदृश्य, नाना, जडविनाशीं व पांचभौतिक वस्तुरूप आहे असें समजणें, याला स्थूलदृष्टि म्हणतात. ही स्थूलदृष्टि अज्ञानदशेंत सर्वांच्या ठिकाणी असते.

जवनिका—ही दृष्टि, विश्वरूपाच्या दर्शनाला प्रतिबंधक आहे हें "जवनिका" शब्दाने सुचविलें आहे.

फेडिली—भगवंताने आपल्या सामर्थ्यांने ती नाहीशी केली.

परि हा हें देखेल की नाहीं। ऐसी सेचि न करी कांहीं। एकसरां म्हणतसे पाहीं। स्नेहातुर॥ १२२॥
अर्जुना तुवां एक दावा म्हणितलें। आणि तेंचि दावूं तरि काय दाविलें। आतां देखें आघवें भरिलें। माझ्याचि रूपीं॥ १२३॥

अर्थ—पण हा अर्जुन हें पाहील किंवा नाही याची भगवंताला आठवण झाली नाहीं. प्रेमानें उतावीळ होऊन, अर्जुना! विश्वरूप पहा, असें एकसारखें भगवान म्हणूं लागलें॥ १२२॥ भगवान म्हणतात, अर्जुना! तूं एक विश्वरूप दाखवा असें म्हटलेंस; आणि मी एकच विश्वरूप दाखविलें, तर मी आपलें पूर्ण विश्वरूप दाखविलें असें होणार नाही म्हणून जेवढें कांही आहे, ते सर्व माझ्याच रूपाने भरलें आहे पहा!॥ १२३॥

गूढार्थदीपिका—आतां देखें आघवें भरिलें। माझ्याचि रूपी—भगवान श्रीकृष्णांनी, आपल्या श्रीकृष्णस्वरूपाचे ठिकाणीच अनंत ब्रह्मांडें दाखिविलीं. अनंत ब्रह्मांडाला आधार असणारें श्रीकृष्णस्वरूप, भक्तांना प्रेमवृत्तिमुळे व इतरांना अज्ञानामुळे एकदेशीय दिसत असलें, तरी तें व्यापकच असतें. त्याची व्यापकता नाहीशी होत नाही. भगवंताच्या श्रीकृष्णस्वरूपाचा हा महिमा ज्ञानदृष्टीनेच कळतो. भगवंताची व्यापकता ज्ञानीभक्त विसरत नसतात.

एकें कृशें एकें स्थूळें। एकें ऱ्हस्वें एकें विशाळें। पृथुतरें सरळें। अप्रांतें एकें॥ १२४॥
एकें अनावरें प्रांजळें। सव्यापारें एकें निश्चळें। उदासीनें स्नेहाळें। तीव्रें एकें॥ १२५॥
एकें घूर्णितें सावधें। असलगें एकें अगाधें। एकें उदारें अतिबद्धें। क्रुद्धे एकें॥ १२६॥
एकें शांते सन्मदें। स्तब्धें एकें सानंदें। गर्जितें निःशब्दें। सौम्यें एकें॥ १२७॥
एकें साभिलाषें विरक्तें। उन्निद्रितें एकें निद्रितें। परितुष्टें एकें आर्तें। प्रसन्नें एकें॥ १२८॥
एकें अशस्त्रें सशस्त्रें। एकें रौद्रें अतिमित्रें। भयानकें एकें विचित्रें। लयस्थें एकें॥ १२९॥
एकें जननलीला विलासें। एकें पालनशीलें लालसें। एकें संहारकें सावेशें। साक्षिभूतें एकें॥ १३०॥
एवं नानाविधें परि बहुवसें। आणि दिव्यतेजप्रकाशें। तेवींचि एकएकाऐसें। वर्णेही नव्हे॥ १३१॥
एकें तातलें साडेपंधरें। तैसीं कपिलवर्णें अपारें। एकें सर्वांगी जैसें सिंदुरें। डवरलें नभ॥ १३२॥
एकें सावियाचि चुळुकीं। जैसें ब्रह्मकटाह खचिलें माणिकीं। एकें अरुणोदयासारिखीं। कुंकुमवर्णें॥ १३३॥
एकें शुद्धस्फटिक सोज्वळें। एकें इंद्रनीळ सुनीळें। एकें अंजनावर्णे सकाळें। रक्तवर्णें एकें॥ १३४॥
एकें लसत्कांचनसम पिंवळीं। एकें नवजलदश्यामळीं। एकें चांपेगौरी केवळीं। हरितें एकें॥ १३५॥
एकें तप्ततांम्रतांबडीं। एकें श्वेतचंद्र चोखडीं। ऐसीं नानावर्णें रूपडीं। देखे माझीं॥ १३६॥
हे जैसें कां आनान वर्ण। तैसें आकृतींही अनारिसेपण। लाजा कंदर्प रिघाला शरण। तैसीं सुंदरें एकें॥ १३७॥
एकें अतिलावण्यसाकारें। एकें स्निग्धवपु मनोहरें। शृंगारश्रियेचीं भांडारें। उघडिलीं जैसीं॥ १३८॥
एकें पीनावयव मांसाळें। एकें शुष्कें अतिविक्राळें। एकें दीर्घकंठें विताळें। विकटें एकें॥ १३९॥
एवं नानाविधाकृती। इयां पाहतां पारु नाहीं सुभद्रापती। ययांचां एकेकीं अंगप्रांतीं। देख पां जग॥ १४०॥

अर्थ—एक रोड तर एक स्थूळ, एक ठेंगणें तर एक उंच, एक जाड पसरलेलें तर एक सरळ, एक अमर्याद॥ १२४॥ एक न आवरण्याजोगें, तर एक सुलभ आहे. एक व्यापार करीत असलेलें, तर एक निश्चळ आहे. कांही उदासींन रूपें, तर कांही प्रेमळ रूपे आहेत व कांही तीव्र वाटत आहेत॥ १२५॥ कांही रूपें धुंदीत असलेली,

तर कांही सावध दिसत आहेत. कांही सूक्ष्म दिसतात, तर कांही रूपे फार मोठीं आहेत. कांही रूपें उदार, कांही कृपण व कांही क्रुद्ध आहेत ॥ १२६ ॥ कांही रूपें शांत दिसत आहेत, तर कांही मदयुक्त दिसत आहेत. कांही स्तब्ध, कांही आनंदयुक्त, कांही रूपें गर्जना करीत असलेलीं, तर कांहीच्या तोंडून एक शब्दहि निघतांना दिसत नाही व कांही अत्यंत सौम्य आहेत ॥ १२७ ॥ कांही रूपांचे ठिकाणी अभिलाष दिसून येतो, तर कांही निरिच्छ आहेत. कांही रूपें जागी, तर काही निजलेलीं, कांही रूपें अत्यंत संतोषयुक्त, तर कांही रूपे सवासन आहेत व कांही प्रसन्न आहेत ॥ १२८ ॥ कांही रूपें शस्त्ररहित दिसतात, तर काही शस्त्रसहित दिसतात. कांही रूपें अति भयंकर आहेत, तर कांही रूपें अत्यंत मित्राप्रमाणे भासतात आणि कांही रूपे विक्राळं आहेत तर कांही विचित्र आहेत व कांही रूपे सर्व वृत्तींचा लय करून समाधिस्थ झालेली दिसत आहेत ॥ १२९ ॥ कांही रूपें प्रजोत्पत्तिरूप लीला करीत आहेत, पर कांही रूपांचे ठिकाणी प्रजा पालनाची इच्छा दिसून येते. कांहींच्या ठिकाणी सर्व सृष्टीचा संहार करण्याचा आवेश दिसून येतो, तर कांही रूपे केवळ साक्षीस्वरूप दिसत आहेत ॥ १३० ॥ अशा रीतीने नानाप्रकारचीं अनंत रूपें दिसतात, तरी ती असंख्य आहेत आणि त्या सर्वांचें तेजहि अपरिमित आहे. त्याचप्रमाणे त्या सर्व रूपांचें वर्णहि एकसारखे नाहीत ॥ १३१ ॥ तापलेल्या सोन्याप्रमाणे लालसर अशीं कांही रूपें अमर्याद आहेत व आकाशाला शेंदूर फासावा, त्याप्रमाणे कांहींचे सर्वांग शेंदरी रंगाचे आहे ॥ १३२ ॥ माणिकांनी जडविलेल्या ब्रह्मांडाप्रमाणे कित्येक स्वाभाविकपणें सुंदर व चमकणारीं आहेत. कांही रूपें अरुणोदयासारखीं कुंकुमवर्णाचीं आहेत ॥ १३३ ॥ कित्येक शुद्ध स्फटिकप्रमाणे पांढरीं आहेत. कित्येक नीलमण्यासारखीं नीलवर्ण आहेत. कित्येक काजळासारखी काळीकुट्ट आहेत, तर कित्येक लाल रंगाचीं आहेत ॥ १३४ ॥ कित्येक रूपें चमकणाऱ्या सोन्यासारखीं पिवळीं, कित्येक नवमेघाप्रमाणें श्यामवर्ण, कित्येक चांफ्याच्या फुलासारखीं गौरवर्ण आहेत व कित्येक केवळ हिरवीं आहेत ॥ १३५ ॥ कित्येक तापविलेल्या तांब्याप्रमाणे तांबडीं, तर कित्येक पांढऱ्या चंद्राप्रमाणे पांढरीं आहेत. अशा प्रकारें नाना प्रकारच्या वर्णांचीं माझीं रूपें पहा ॥ १३६ ॥ हे जसे नानाप्रकारचे वर्ण आहेत, तसेच आकृतीतही नाना प्रकार आहेत. कांही रूपें अशी सुंदर आहेत की मदनही लाजेने शरण जाईल ॥ १३७ ॥ शृंगारसंपत्तीची भांडारें उघडल्याप्रमाणे, कांही रूपें, अत्यंत सौंदर्य साकार व्हावें, अशीं होतीं, तर कांही मनोहर तुकतुकिंत शरीराचीं होतीं ॥ १३८ ॥ कित्येकांचें अवयव पुष्ट व मांसल आहेत, तर कित्येकांचे देह शुष्क-रोड व अति विक्राळ दिसतात. कित्येक देह, लांब मान व मोठे डोकीं असलेले आहेत, तर कित्येक वांकडे तिकडे आकाराचे आहेत ॥ १३९ ॥ या प्रकारें नानाप्रकारच्या आकृती पाहतां, अर्जुना! अंत सांपडणार नाही आणि या एकएकाच्या अवयवांवर एक एक जग दिसत आहे, पहा! ॥ १४० ॥

गूढार्थदीपिका—ययांच्या एकेकीं अंगप्रांतीं। देख पां जग—जीव अंत:करणवृत्तीनेच जगाचा अनुभव घेतो; म्हणूनच त्याच्या केवळ अंत:करणवृत्तिमुळे त्याला परमेश्वराच्या स्वरूप, गुण व आकृति इत्यादिकांचा साकार किंवा मर्यादित अनुभव येतो.

पण परमात्मा मूळांत अस्फुट, अद्वैत, निरवयव, निरंश व अमर्याद असून, त्याचे हे धर्म बदलणारे किंवा नाहीसे होणारे नसल्यामुळे, त्याच्या साकार सगुणपणांतहि हे धर्म राहतातच-म्हणजे साकार सगुण भगवंताचा आकार, गुण इत्यादि हे सर्व अस्फुट, अद्वैत, निरवयव व अमर्याद असतात. हेंच ''ययांच्या एकेकीं अंगप्रांतीं। देख पां जग'' या चरणांनी माऊलींनी सुचविलें आहे.

मागेहि चवथ्या अध्यायांत माऊलींनी ''माझें अजत्वें जन्मणे। अक्रियताचि कर्म करणें। हें अविकार जो जाणें तो परम मुक्त'' या ओवीने हेंच सांगितलें आहे.

पश्यादित्यान्वसून्रुद्रानश्विनौ मरुतस्तथा। बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ॥ ६ ॥

इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम्। मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ ७ ॥

अर्थ—अर्जुना! सर्व आदित्य पहा, सर्व वसु पहा, सर्व रुद्र पहा, अश्विनीकुमार पहा, मरुतांचा समूह पहा, त्याचप्रमाणे पूर्वी कधीं पाहिलीं नाहीस अशीं नानाप्रकारचीं आश्चर्यें पहा ॥ ६ ॥ अर्जुना! या माझ्या विश्वरूप मूर्तीच्या

ठिकाणीं संपूर्ण चराचरात्मक जगत् कसें आहे हें आज पाहून घें. एवढेंच नाही, तर जें कांही आणखी तुला पाहण्याची इच्छा असेल, तेंहि तूं येथेंच पाहूं शकतोस॥ ७॥

जेथ उन्मीलन होत आहे दिठी। तेथ पसरती आदित्यांचिया सृष्टी। पुढती निमीलनीं मिठी। देत आहाती॥ १४१॥
वदनींचिया वाफेसवें। होत ज्वाळामय आघवें। जेथ पावकादिक पावे। समूह वसूंचें॥ १४२॥
आणि भ्रुलतांचे शेवट। कोपें मिळों पाहती एकवाट। तेथ रुद्रगणांचे संघाट। अवतरत देखें॥ १४३॥
पैं सौम्यतेचा वोलावा। मिती नेणिजे अश्विनौदेवां। श्रोत्रीं होती पांडवा। अनेक वायु॥ १४४॥
यापरी एकेकाचिये लीळे। जन्मती सुरसिद्धांचीं कुळें। ऐसीं अपारें आणि विशाळें। रूपें इयें पाहीं॥ १४५॥
जयांतें सांगावया वेद बोबडे। पहावया काळाचेंही आयुष्य थोकडे। धातयाही परि न सांपडे। ठाव ज्यां॥ १४६॥
जयांतें वेदत्रयी कधी नायके। तियें इयें प्रत्यक्ष देख अनेकें। भोगीं आश्चर्याचीं कवतिके। महासिद्धी॥ १४७॥
इया मूर्तीचिया किरीटी। रोममूळीं देखें पां सृष्टी। सुरतरुतळवटीं। तृणांकुर जैसे॥ १४८॥
वातायनाचेनि प्रकाशें। उडत परमाणु दिसती जैसें। भ्रमत ब्रह्मकटाह तैसें। अवयवसंधीं॥ १४९॥
एथ एकैकाचिया प्रदेशीं। विश्व देख विस्तारेंशीं। आणि विश्वाही परौतें मानसीं। जरी देखावें वर्ते॥ १५०॥

अर्थ—ज्या विश्वरूपाच्या ठिकाणी दृष्टि उघडल्या बरोबर सर्व बाराही आदित्यांची उत्पत्ति होते व लावल्या बरोबर त्यांचा लोप होतो॥ १४१॥ तोंडांतून निघणाऱ्या वाफेबरोबर सर्व ज्वालामयच होऊन जाते व त्यांतच अग्नि इत्यादि सर्व वसूंचा समूह दिसूं लागतो॥ १४२॥ आणि जेथे क्रोधाने भृकुटींचे शेवट एकत्र होऊं पाहत आहेत, तेथे रुद्रगणांचा समूह उत्पन्न होत आहे, पहा॥ १४३॥ माझ्या विश्वरूपाचे ठिकाणीं, जेथे सौम्यपणाचा थोडा थंडावा दिसेल, तेथे असंख्य अश्विनौ देव उत्पन्न झालेले दिसतील आणि कानाचे ठिकाणीं अनेक वायु उत्पन्न झालेले आहेत, पहा॥ १४४॥ याप्रमाणे एका एका माझ्या रूपाच्या या लीलेमध्यें अनेक देव, सिद्ध यांचीं कुळें जन्माला येतात. अशीं माझीं हीं अनंत व विशाल रूपें पहा॥ १४५॥ ज्या विश्वरूपाचें वर्णन करतां करतां वेदाची बोबडी वळली, ज्याला पाहण्याकरितां काळाचें आयुष्य अपुरें पडतें-म्हणजे जेथे काळाचाहि अंत होतो व ब्रह्मदेवालाही ज्याचा पत्ता लागत नाही॥ १४६॥ ज्या स्वरूपाची गोष्ट तिन्ही वेदांना देखील ऐकायला कधीं मिळत नाही, तीं माझीं रूपें तू आतां प्रत्यक्ष पहा व आश्चर्याचें कौतुक किंवा आनंद हीच कोणी महासिद्धि, तिचें सुख भोग॥ १४७॥ ज्याप्रमाणे कल्पतरुच्या बुडाशीं गवताचें अंकुर वाढावें, त्याप्रमाणे या विश्वमूर्तीच्या रोमारोमांचे ठिकाणी तुला सृष्टि दिसेल, पहा!॥ १४८॥ एखाद्या गवाक्षांतून आलेल्या सूर्याचे किरणांत परमाणु उडत असेलेले दिसतात, त्याप्रमाणे माझ्या विश्वरूपाच्या अवयवसंधींत अनेक ब्रह्मांडें फिरत असलेली दिसतील॥ १४९॥ येथे एका एका अवयव प्रदेशावर सर्व विस्तृत ब्रह्मांडरचना आहे, पहा! आणि ब्रह्मांडाचे पलीकडेहि पाहण्याची जर इच्छा असेल॥ १५०॥

गूढार्थदीपिका—एथ एकैकाचिया प्रदेशीं। विश्व देख विस्तारेंसीं—या वचनाने मागे सांगितल्याप्रमाणे विश्वरूपाचे ठिकाणी अर्जुनाला जगताचा मिथ्या भास दिसत होता हें दाखविलें आहे. आणि "विश्वाही परौतें मानसीं। देखावें वर्ते" या चरणाने अर्जुनाला सृष्टीच्या भासावांचून विश्वरूपाचा केवल सच्चिदानंदात्मकहि प्रत्यय येत होता, असें सुचविलें आहे; म्हणून विश्वरूपांत अर्जुनाला येत असलेला विश्वाचा प्रत्यय, हा सत्य नसून मृगजळाप्रमाणेंच मिथ्या होता असें म्हणावें लागतें; कारण सच्चिदानंदाचा प्रत्यय लोपल्याखेरीज, विश्वाचा सत्य प्रत्यय येणें शक्य नाहीं.

तरी तियेही विषयींचें कांहीं। एथ सर्वथा सांकडें नाहीं। सुखें आवडे तें माझिया देहीं। देखसी तूं॥ १५१॥

अर्थ—तर तेहि पाहणें कठीण नाही. तुला जें पाहावेसें वाटेल, तें खुशाल माझ्या देहाच्या ठिकाणी पाहूं शकतोस॥ १५१॥

ऐसें विश्वमूर्ती तेणें। बोलिलें कारुण्यपूर्णें। तंव देखत आहे कीं नाहीं न म्हणे। निवांतचि येरु॥ १५२॥
एथ कां पां हा उगला। म्हणोनि श्रीकृष्णें जंव पाहिला। तंव आर्तीचें लेणें लेइला। तैसाचि आहे॥ १५३॥

अर्थ—करुणासंपन्न अशा त्या विश्वमूर्तीने असे म्हटलें, तरी अर्जुन स्तब्धच होता. मी विश्वरूप पाहत आहे

किंवा पाहत नाही, असे तो कांही बोलला नाही॥ १५२॥ असा हा अर्जुन कांही बोलत नाही, उगाच कां आहे, असे म्हणून श्रीकृष्णाने त्याचेकडे जेव्हा पाहिलें तेव्हा तो पूर्वी जसा भगवंताच्या विश्वरूपाच्या दर्शनाची इच्छा करीत होता, तसाच तो दिसला॥ १५३॥

न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा। दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम्॥ ८॥

अर्थ—(भगवान म्हणतात, अर्जुना!) तूं आपल्या चर्मचक्षुने माझ्या या विश्वरूपाला पाहूं शकत नाहीस. मी तुला दिव्य चक्षु देतो. त्या दिव्यचक्षुने मग मी परमेश्वर, सर्व सामर्थ्याने कसा नटलो आहे, पहा!॥ ८॥

मग म्हणे उत्कंठे वोहट न पडे। अझुनी सुखाची सोय न सांपडे। परि दाविलें तें फुडें। नाकळेचि यया॥ १५४॥
हें बोलोनि देवो हांसिले। हांसोनि देखणिया म्हणितलें। आम्हीं विश्वरूप तरी दाविलें। परि न देखसीच तूं॥ १५५॥
यया बोला येरें विचक्षणें। म्हणितलें हां जी कवणासि तें उणें। तुम्ही बकाकरवीं चांदिणें। चरवूं पहामा॥ १५६॥
हां हो उटोनियां आरिसा। आंधळिया दावूं बैसा। बहिरीयापुढें हृषीकेशा। गाणीव करा॥ १५७॥
मकरंदकणाचा चारा। जाणतां घालूनि दर्दुरा। वायां धाडा शार्ङ्गधरा। कोपा कवणा॥ १५८॥
जें अतींद्रिय म्हणोनि व्यवस्थिलें। केवळ ज्ञानदृष्टीचिया विभागा फिटलें। तें तुम्हीं चर्मचक्षूंपुढें सूदलें। मी कैसेंनि देखे॥ १५९॥

अर्थ—मग श्रीकृष्ण मनांत म्हणाले, की माझें विश्वरूप पाहण्याची उत्कंठा अजून कमी झालेली दिसत नाही आणि विश्वरूपाच्या दर्शनाने व्हावयाचें जें सुख तेंहि झालेलें दिसत नाही, कारण मी जे विश्वरूप दाखविलें, तें अजून त्याला आकलन झालें नाही॥ १५४॥ असें मनांत बोलून देव हसले व हसून विश्वरूप पाहण्याची इच्छा करणाऱ्या अर्जुनाला म्हणाले, (अर्जुना!) आम्हीं तुझ्या इच्छेप्रमाणे विश्वरूप दाखविलें असतां, तूं तर पाहतच नाहीस?॥ १५५॥ या भगवंताच्या बोलण्याला त्या बुद्धिमान अर्जुनाने असे उत्तर दिलें की, अहो देवा! हा उणेपणाचा दोष कोणाकडे आहे? तुम्ही बगळ्याकडून चंद्राच्या प्रकाशांतील अमृतकण चरवूं पाहतां काय?॥ १५६॥ अहो हृषीकेशा! तुम्ही आरसा स्वच्छ करून तो आंधळ्याला दाखवूं पाहतां किंवा बहिऱ्यापुढें गायन करतां!॥ १५७॥ फुलांतील मधाचा चारा जाणूनबुजून बेडकाला घालून वायां घालवितां! मग हे शारंगधरा! कोणावर रागावतां?॥ १५८॥ जें विश्वरूप इंद्रियाने दिसण्याजोगें नाही, केवळ ज्ञानदृष्टीच्या आटोक्यांतील आहे, असें शास्त्राचें म्हणणें आहे, तें विश्वरूप तुम्ही माझ्या ह्या चर्मचक्षुंपुढें मांडलें, मग मी कसा पाहणार?॥ १५९॥

गूढार्थदीपिका—अतींद्रिय म्हणोनि व्यवस्थिलें—या चरणांत माऊलींनी विश्वरूप हें अतींद्रिय असल्यामुळे ज्ञानदृष्टीने दिसण्याजोगें आहे, अज्ञानजन्य स्थूलदृष्टीने दिसण्याजोगें नाही, असें अर्जुनाचे मुखाने वदवून, विश्वरूपाच्या मायिकपणाविषयीच्या शंकेचा निरास केला आहे.

चर्मचक्षु—ज्या दृष्टीला सच्चिदानंदस्वरूपाचें मुळींच ज्ञान नसतें व जी दृष्टा दृश्य यांचा भेद पाहून दृश्याला जडविनाशी व अनेकवस्तुरूप मानते, त्या दृष्टीला 'चर्मचक्षु' म्हणतात.

ज्ञानदृष्टि—ज्या दृष्टीने शुद्ध सच्चिदानंदस्वरूपाचें ज्ञान होतें, त्या दृष्टीला ज्ञानदृष्टि किंवा अतींद्रियदृष्टि म्हणतात.

परि हें तुमचें उणें न बोलावें। मीचि साहें तेंचि बरवें। एथ आथि म्हणितलें देवें। मानूं बापा॥ १६०॥
साच स्वरूप जरी आम्हीं दावावें। तरी आधीं देखावया सामर्थ्य कीं द्यावें। परि बोलत प्रेमभावें। धसाळ गेलों॥ १६१॥
काय जाहलें न वाहतां भुईं पेरिजे। तरी तो वेलु विलया जाइजे। तरी आतां माझें निजरूप देखिजे। ते दृष्टी देवों तुज॥ १६२॥
मग तिया दृष्टी पांडवा। आमुचा ऐश्वर्ययोगु आघवा। देखोनियां अनुभवा। माजिवडा करीं॥ १६३॥

अर्थ—पण तुमचा दोष काढूं नये. तो मी आपल्याकडेच घेणें बरें. या अर्जुनाच्या बोलण्यावर भगवान म्हणतात, बा अर्जुना! तुझें म्हणणें मला मान्य आहे॥ १६०॥ खरेंच आहे, जर आम्ही तुला विश्वरूप दाखवावयाचें, तर अगोदर तें विश्वरूप पाहण्याचें तुला सामर्थ्य द्यायला पाहिजे; पण अर्जुना! प्रेमाच्या वेगांत विचार सुचला नाही॥ १६१॥ कांही झालें तरी मशागत न करतां जमिनींत पेरलेला वेल नाश पावतो, असो. आतां ज्या दृष्टीने माझें विश्वरूप तुला पाहतां येईल, ती दृष्टि देतों॥ १६२॥ मग त्या दृष्टीच्या साहाय्याने माझा संपूर्ण ऐश्वर्ययोग पाहून तो अनुभवांत दृढ कर॥ १६३॥

गूढार्थदीपिका—ऐश्वर्ययोग आघवा। देखोनिया अनुभवा-माजिवडा करी—मीच एक जो सच्चिदानंदस्वरूप, तोच संपूर्ण नामरूपाने नटलों असून, नामरूपाचें व माझें अत्यंत ऐक्य असल्यामुळें, नामरूपें देखील सच्चिदानंदस्वरूपच आहेत, अशा परमेश्वराच्या अनुभवाला परमेश्वराचा ऐश्वर्ययोग म्हणतात, हें मागें सांगितलेंच आहे.

सच्चिदानंद परब्रह्माची मूळशक्ति चैतन्यस्वरूपच आहे. ''संविदेव पराशक्तिः'' असे सूतसंहितेंत म्हटलें असून ''**परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबल क्रिया च**'' (श्वे० उ० ६-८) परब्रह्माची, ज्ञानरूप म्हणजे संपूर्ण जाणण्याची किंवा सर्वज्ञतारूप व बलक्रियारूप म्हणजे अमर्याद सामर्थ्यरूप, शक्ति नानाप्रकारची म्हणजे अनंतनामरूपाने व षड्गुणैश्वर्याने आविष्कार पावणारी स्वाभाविक आहे, असें श्वेताश्वतर उपनिषदांत म्हटलें आहे.

''चित्पद ते माया'' असे नाथहि म्हणतात. जीवाच्या ठिकाणीं असणाऱ्या अविद्येच्या अपेक्षेने या भगवंताच्या पराशक्तीलाच वेदान्तातून ''विद्या'' असें नांव देण्यांत आलें आहे.

भगवान सृष्टिउत्पत्तिकालीं, आपल्या चैतन्यात्मक विद्याशक्तीशीं व जीवाच्या ठिकाणी असलेल्या अविद्याशक्तीशीं क्रीडा करतो व वेदाने त्या दोन्ही प्रकारच्या क्रीडेचें वर्णन केलें आहे, असे भागवतांत ''क्वचिदजयाऽऽत्मना च चरतोऽनुचरेन्निगमः'' (भाग० स्कं० १०-८७-१४) या श्लोकाने सांगितलें आहे.

स्कंदपुराणांतील श्रीभागवतमाहात्म्यांत ''**लीलैवं द्विविधा तस्य वास्तवी व्यावहारिकी। वास्तवी तत्स्वसंवेद्या जीवानां व्यावहारिकी॥ आद्यांविना द्वितीया न द्वितीया नाद्यगा क्वचित्**'' (स्कं० पू० वै० खं० भागवतमाहात्म्य अ० १-२६-२७) भगवंताची दोन प्रकारची लीला सांगितली आहे. वास्तवी व व्यावहारिकी. वास्तवी-म्हणजे सत्य अविनाशी. पहिली लीला सच्चिदानंदनामरूपात्मक असते. भगवंताचे अवतार, भक्त, व्रजवासी जन, गायी, गोपादिक इत्यादि नामरूपादिक सच्चिदानंदस्वरूपाचा आविष्कार होणें, ही पहिली लीला होय.

तैत्तिरीयोपनिषदांत ''सोऽकामयत बहुस्यां प्रजायेयेति'' या श्रुतीवर भाष्य करतांना आचार्य म्हणतात, भगवंताचा प्रथम होणारा संकल्प, सत्यज्ञानलक्षणात्मक स्वात्मभूत असल्यामुळे विशुद्ध असतो-म्हणजे मी सच्चिदानंदात्मक नामरूपाने बहुरूप व्हावें, असाच भगवंताच्या प्रथम संकल्पाचा मूळ अर्थ असतो.

व्यावहारिकी-म्हणजे ब्रह्मज्ञान होत नाही तोपर्यंत भासणारी अशी जडविनाशी पांचभौतिक सृष्टिरूप ही दुसरी लीला होय.

'सत्यलीला' स्वयंवेद्य असून, ज्ञानी भक्ताच्या अनुभवाला येते व 'व्यावहारिक' लीला अज्ञानी जनांच्या अनुभवाला येते असें म्हटलें आहे. पहिली लीला अगोदर होते व दुसरी लीला नंतर होते. दुसरी लीला अगोदर कधी होत नाही.

परमार्थस्त्वमेवैको नान्योऽस्ति जगतः पते। तवैष महिमा येन व्याप्तमेतच्चराचरम्॥ ३८॥
यदेतद् दृश्यते मूर्तमेतज्ज्ञानात्मनस्तव। भ्रांतिज्ञानेन पश्यंति जगद्रूपमयोगिनः॥ ३९॥

(विष्णुपुराण-प्रथम अंश-अ० ४)

भगवंता! तूंच एक असून, तुझ्यावांचून दुसरी वस्तु नाही. तूं संपूर्ण नामरूपात्मक चराचराच्या आंतबाहेर व्यापून आहेस-म्हणजे तूंच संपूर्ण चराचरात्मक झाला आहेस. हें तुझें अगाध सामर्थ्य होय. जेवढें कांही नामरूपात्मक सगुण दिसतें, तें सर्व ज्ञानस्वरूप तूंच झाला आहेस. असे असतांना अविद्याभ्रांतिजन्य विपरीतज्ञानाने युक्त असलेले अज्ञानी लोक, तुझ्या त्या नामरूपात्मक आविष्काराला जडविनाशी जगद्रूप समजतात, असें विष्णुपुराणांत सांगितलें आहे.

या सर्वाचा निष्कर्ष असा आहे की, आम्ही मागें सांगितल्याप्रमाणे, निर्विकल्प परब्रह्म, आपल्या स्वाभाविक ज्ञानशक्तीने स्फुरण पावून, सर्वनामरूपात्मक षड्गुणैश्वर्यसंपन्न विश्वरूपाकार होतें आणि तेंच भगवंताचें विश्वरूप अविद्याभ्रांतियुक्त जनांना नाना, जड, विनाशी व पांचभौतिक पदार्थाकार दिसतें. हा भगवंताचा विश्वरूपाकार ऐश्वर्ययोग, ''सर्वं खल्विदं ब्रह्म'' ''पुरुष एवेदं विश्वम्'' या श्रुतींतील व त्यावरील आचार्यांच्या ''न विश्वं नाम पुरुषादन्यत् किंचिदस्ति'' या भाष्यपंक्तींतील वचनानुसार, संपूर्ण चिन्मयच असल्यामुळे, भगवान, अर्जुनाला तो ''अनुभवामाजिवडा करी'' अनुभवांत दृढ कर, असें म्हणत आहेत.

ऐसें तेणें वेदांतवेद्यें। सकळलोकआद्यें। बोलिलें आराध्यें। जगाचेनि॥ १६४॥

अर्थ—वेदान्तविचाराने कळणारा, सर्व सृष्टीच्या पूर्वी कारणरूपाने असणारा व सर्व जगाचें आराध्य दैवत असा जो परमात्मा, तो याप्रमाणे बोलला॥ १६४॥

गूढार्थदीपिका-बोलिलें आराध्ये जगाचेनि—परमात्मा भगवान श्रीकृष्ण अद्वैतरूप असून, त्याच्यावांचून दुसरी वस्तुच नसल्यामुळे, निरनिराळ्या धर्मांतील लोक, त्याचीच निरनिराळ्या उपास्यांच्या रूपाने कल्पना करून, उपासना करीत असले, तरी ती भगवान श्रीकृष्णाचीच होते, असे "बोलिलें आराध्यें जगाचेनि" या वचनाने माऊलींनी सांगितलें आहे. "रुचीनां वैचित्र्यात् ऋजुकुटिलनानापथजुषाम्। नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णवमिव" असे महिम्नस्तोत्रांतहि म्हटलें आहे.

पण उपासकांची भावना निरनिराळी असल्यामुळें, फळ मात्र निरनिराळें मिळतें, हें मागील नवव्या अध्यायांतील २३ व्या श्लोकांत सांगितलेंच आहे.

संजय उवाच

एवमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः। दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम्॥ ९॥

अर्थ—संजय म्हणतो, राजा! महायोगेश्वर भगवान श्रीकृष्णाने असे बोलून, अर्जुनाला आपलें श्रेष्ठ असें ईश्वरीस्वरूप दाखविलें॥ ९॥

पैं कौरवकुळचक्रवर्ती। मज हाचि विस्मयो पुढतपुढती। जें श्रियेहूनि त्रिजगतीं। सदैव असे कवणी॥ १६५॥
ना तरी खुणेचें वानावयालागीं। श्रुतीवांचूनि दावा पां जगीं। ना सेवकपण तरी अंगीं। शेषाच्याचि आथि॥ १६६॥
हां हो जयाचेनि सोसें। शिणत आठही पाहार योगी जैसें। अनुसरलें गरुडाऐसें। कवण आहे॥ १६७॥
परि तें आघवेंचि एकीकडे ठेलें। सापें कृष्णसुखा एकंदरें जाहलें। जिये दिवसींहूनि जन्मलें। पांडव हे॥ १६८॥
परि पांचांही आंतु अर्जुना। श्रीकृष्ण सावियाचि जाहला अधीना। कामुक कां जैसा अंगना। आपैता कीजे॥ १६९॥
पढविलें पाखिरूं ऐसें न बोले। यापरी क्रीडामृगही तैसा न चले। कैसें दैव एथें सुरवाडलें। तें जाणों न ये॥ १७०॥
आजि परब्रह्म हें सगळें। भोगावया सदैव याचेचि डोळे। कैसें वाचेचे हन लळे। पाळीत असे॥ १७१॥
हा कोपे कीं निवांत साहे। हा रुसे तरी बुझावीत जाये। नवल पिसें लागलें आहे। पार्थाचें देवा॥ १७२॥
येऱ्हवीं विषय जिणोनि जन्मले। जे शुकादिक दादुले। ते विषयोचि वानितां जाहले। भाट ययाचे॥ १७३॥
हा योगियांचें समाधिधन। कीं होऊनि ठेलें पार्थाअधीन। यालागीं विस्मयो माझें मन। करीतसे राया॥ १७४॥

अर्थ—संजय म्हणतो, हे कौरवांच्या कुळांत उत्पन्न झालेंच्या सार्वभौमराजा धृतराष्ट्रा! मला वारंवार याचेंच आश्चर्य वाटतें की, या त्रैलोक्यांत श्रीलक्ष्मीपेक्षा भाग्यवान दुसरी कोणती स्त्री आहे?॥ १६५॥ किंवा आत्मस्वरूपाची खुणेने ओळख पटवून देणारा वेदाशिवाय जगांत दुसरा कोण आहे? किंवा खरें सेवकपण भगवंताची अखंड शय्या होऊन राहणाऱ्या शेषाच्याच ठिकाणी आहे॥ १६६॥ ज्याचा ध्यास लागून योग्याप्रमाणे आठहि प्रहर अविश्रान्त सेवा करणारा गरुडासारखा दुसरा कोण आहे?॥ १६७॥ पण ते सर्व बाजूला राहिले आणि सांप्रत पांडव जन्मले त्या दिवसापासून यांचेच ठिकाणीं भगवान श्रीकृष्णाचे संपूर्ण सुख एकवटून राहिलें॥ १६८॥ पण जसा कामासक्त पुरुष स्त्रियेच्या सर्वस्वीं स्वाधीन होतो, तसा श्रीकृष्ण हा, त्या पांचांहि पाडवांमध्यें खरोखरच अर्जुनाच्या सर्वस्वीं स्वाधीन झाला॥ १६९॥ (भगवान श्रीकृष्ण, अर्जुनाच्या जसा स्वाधीन झाला) तसा शिकविलेला पक्षीही शिकविणाऱ्यांचें सर्वस्वी स्वाधीन होऊन बोलणार नाही किंवा करमणुकीकरितां पाळलेले हरिणहि असे स्वाधीन होऊन चालणार नाही. अर्जुनाचें थोर भाग्य कसें उदयाला आलें तें समजत नाही॥ १७०॥ श्रीकृष्णरूपाने प्रगट झालेलें संपूर्ण परब्रह्म सर्वदा भोगण्याकरितां याचेच डोळे होते. अर्जुनाच्या बोलण्याचे भगवान कसे लळे पाहतो, पहा!॥ १७१॥ अर्जुन रागावला तर भगवान मुकाट्याने तें सहन करतात, अर्जुन रुसला तर स्वतः भगवान त्याला समजवितात, असे कांही अर्जुनाचें विलक्षण वेड श्रीभगवंताला लागलें आहे॥ १७२॥ संपूर्ण विषयवासना जिंकून जन्माला आले, असे जे

समर्थ शुकादिक मुनी, ते देखील या भगवंताच्या विषयभोगादि लीलांचें वर्णन करणारे भाट झाले॥ १७३॥ (जो भगवान श्रीकृष्ण) खरोखर योगियांचा समाधिरूप ठेवा होय, पण तोच अर्जुनाच्या स्वाधीन होऊन राहिला; म्हणून, राजा धृतराष्ट्रा! माझ्या मनाला याचेंच वारंवार आश्चर्य वाटतें॥ १७४॥

गूढार्थदीपिका—योगी ज्या निर्गुण, निराकार स्वरूपाचे ठिकाणी अत्यंत कष्टाने चित्त स्थिर करून, समाधि साधतात, तेंच स्वरूप, भक्ताच्या परमप्रेमामुळे सगुण साकार होऊन, भक्ताच्याच सर्वस्वीं स्वाधीन होऊन राहते. असें परमप्रेमरूपभक्तीचें आश्चर्यकारक कौतुक आहे, असा भाव माऊलींनी सूचित केला आहे.

तेवींचि संजय म्हणे कायसा। विस्मयो एथें कौरवेशा। श्रीकृष्णें स्वीकारिजे तया ऐसा। भाग्योदय होय॥ १७५॥

अर्थ—पुन: संजय आपणच म्हणतो, हे कौरवांच्या स्वामी धृतराष्ट्रा! येथें आश्चर्य करण्याचें कारणच नाही. भगवान श्रीकृष्णांनी आपला म्हणून ज्याचा अंगीकार केला, त्याचा भाग्योदय असाच होत असतो॥ १७५॥

गूढार्थदीपिका—**"नायं सुखापो भगवान् देहिनां गोपिकासुत। ज्ञानिनां चात्मभूतानां यथाभक्तिमतामिह॥"** (भाग० स्कं० १०-९-२१)

पूर्णब्रह्मप्राप्ति, भक्तांना जितकी सुलभ होते, तितकी निर्गुणआत्मस्वरूप झालेल्या ज्ञान्यांनाहि होत नाही. ज्ञान्यांना व योग्यांना, भगवंताला वृत्तीने धरून ठेंवावें लागतें, पण भगवान भक्तांच्या स्वाधीनच होऊन राहतो व स्वत: त्यांच्या पूर्णस्थितीचें संगोपन करतो; म्हणूनच त्यांना भाग्यवान म्हटलें जातें.

म्हणोनि तो देवांचा रावो। म्हणे पार्थाते तुज दृष्टि देवों। जया विश्वरूपाचा ठावो। देखसी तूं॥ १७६॥
ऐसीं श्रीमुखौनि अक्षरें। निघती ना जंव एकसरें। तंव अविद्येचें आंधारें। जावोंचि लागे॥ १७७॥

अर्थ—म्हणून तो देवांचाहि देव भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाला, ज्या दृष्टिने माझ्या विश्वरूपाचा ठाव घेशील, अशी दृष्टि तुला देतो॥ १७६॥ श्रीकृष्णाच्या मुखांतून अशी अक्षरें निघाल्याबरोबर एकदम अविद्यारूपी अंध:कार नाहीसा झाला॥ १७७॥

गूढार्थदीपिका—सर्वांच्या अंत:करणांत ज्या परमेश्वराचा अखंड वास आहे व ज्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करावयाचा असतो, तोच परमात्मा अर्जुनाला बाहेर सद्‌गुरुरूपाने जर प्राप्त झाला, तर त्या सत्यसंकल्प परमेश्वराने दिव्यदृष्टि देतो असा संकल्प केल्याबरोबर अविद्या अंध:कार नाहीसा व्हावा, यांत आश्चर्य नाही. तोच अंतर्यामी परमात्मा आत्मज्ञानाच्या रूपाने प्रगट होतो व भक्ताच्या अंत:करणांतील अविद्या अंध:कार नाहीसा करतो. अविद्या अंध:कार नाहीसा होऊन ज्ञानदृष्टीने पाहिलें जाणारें विश्वरूपहि अर्थात्‌च खोटें असणें शक्य नाही.

"त्वं सर्वभूतहृदयेषु कृतालयोऽपि त्वं मंत्रजाप्यविमुखेषु तनोषि मायाम्॥ त्वन्मंत्रसाधनेष्वपयाति माया। सेवानुरूपफलदोऽसि यथा महीपः॥" (अहिल्यास्तव-अध्यात्मरामायण)

जे भगवंताला विन्मुख असतात, त्यांना भगवंताची शक्ति भ्रम उत्पन्न करते; म्हणून त्यांच्या दृष्टीने ती शक्ति, अविद्या या संज्ञेला पात्र होते व जे भगवंताच्या सदा सन्मुख असतात, भगवंताला आठवितात, त्यांना भगवंताची शक्ति, भगवंताचे शुद्धस्वरूप दाखविते; म्हणून तिला "विद्या" किंवा "शुद्धसत्वात्मक माया" हें नांव प्राप्त होतें.

येऱ्हवीं माया ही मूळांत चैतन्यस्वरूप असल्यामुळे, ती परमेश्वराप्रमाणे सच्चिदानंदस्वरूप आहे. तीच स्फुरण पावली असतां दृष्टिरूप किंवा वृत्तिरूप होते किंवा शक्तिस्फुरणाला किंवा शक्तीच्या व्यक्त होण्याला दृष्टि किंवा वृत्ति म्हणतात. म्हणून अर्जुनाला भगवंतांनी जी दिव्यदृष्टि देतो म्हणून म्हटलें, ती दिव्यदृष्टि म्हणजे ज्ञानदृष्टि होय.

ही ज्ञानदृष्टि व्यतिरेकाने येणारी व अन्वयाने येणारी अशी दोन प्रकारची असून, ही दोन्ही प्रकारची ज्ञानदृष्टि भगवंतांनी अर्जुनाला दिली होती, हें पुढें १९५ व्या ओवींत सांगितलें आहे.

वस्तूची शक्ति स्फुरली की वस्तु व वस्तूची शक्ति असे दोनपण येते; म्हणून दोनपण हे शक्तीचें कार्य आहे. हें दोनपण दिसलें, तरी दोन्ही मिळून एक वस्तुच असते. जीवाला तें दोनपण द्वैतरूप भासते म्हणजे त्या दोनपणाला जीव स्वतंत्र अस्तित्वाच्या व वस्तुत्वाच्या दोन वस्तु, अज्ञानाने समजतो व एक वस्तु दोनपणाने भासते, हे तो विसरतो;

म्हणून त्याची ती भ्रांति किंवा अविद्या समजली जाते. ज्ञानीपुरुष दोनपणा दिसत असला तरी दोन्ही मिळून एक वस्तु आहे असें समजतो. "अद्वैतं परमार्थोऽयं द्वैतं तद्भेद उच्यते" (मां० का०) या मांडुक्यकारिकेवर भाष्य करतांना द्वैत हें अद्वैताचेंच कार्य असल्यामुळे, द्वैत हें अद्वैताचे विरोधी नाही असें आचार्यांनी म्हटलें असून माझ्या सद्‌गुरु आईनीहि "द्वैत निषेधें अद्वैत। हा वनवासियांचा सिद्धान्त। अद्वैत हानी न करीं द्वैत। हा सिद्धान्त निगमाचा॥ ७९॥" (प्रीतिनर्तन पदन्यास-१) असेच म्हटलें आहे.

"**भेद तंव तंव दूण। अभेदासी**" हें अमृतानुभवांतील माऊलीचे वचन याच सिद्धान्ताला पुष्टि देणारें आहे.

सारांश, ज्ञानदृष्टीने संपूर्ण नामरूपें हीं एका परब्रह्माच्या सच्चिदानंदशक्तीचा आविष्कार आहे असें कळून येतें अर्जुनाला भगवंतांनी हीच ज्ञानदृष्टि दिली होती.

भगवान श्रीकृष्णाचे ठिकाणीं, अर्जुन विश्वरूप पाहत होता, तरी तो विश्वरूपाला श्रीकृष्णाहून निराळे समजत नव्हता-म्हणजे विश्वरूपाचा अनेकपणा पाहत होता, तरी एक भगवान श्रीकृष्ण आपल्या शक्तीने बहुरूप झाला हे त्याला माहित होतें तें तो विसरला नव्हता; म्हणून विश्वरूपदर्शन ज्ञानदृष्टीने येणारा अनुभव होय-भ्रांतीचा प्रत्यय नव्हे-हें सिद्ध आहे.

तीं अक्षरें नव्हती देखा। ब्रह्मसाम्राज्यदीपिका। अर्जुनालागीं चित्कळिका। उजळलिया कृष्णें॥ १७८॥

अर्थ—श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, भगवंताचे मुखांतून "मी तुला दिव्यदृष्टि देतो" हीं जीं अक्षरें निघाली ती अक्षरे नव्हती, ती ब्रह्मस्वरूपाचे साम्राज्य दाखविणारी ज्योति होती. ती ज्ञानज्योति अर्जुनाकरितां भगवंतांनी उजळली होती॥ १७८॥

गूढार्थदीपिका—ब्रह्मसाम्राज्यदीपिका—भगवंतानी अर्जुनाला जी दिव्य दृष्टि दिली, ती "चित्कळिका" म्हणजे चैतन्याची ज्योति होती आणि ती "ब्रह्मसाम्राज्यदीपिका" म्हणजे परब्रह्माचा संपूर्ण नामरूपात्मक आविष्कार सच्चिदानंदस्वरूप आहे असा प्रत्यय आणून देणारी होती, हें श्री ज्ञानेश्वरमाउलींनीच येथें स्पष्ट केलें आहे.

चित्कळिका उजळलिया श्रीकृष्णें—निर्गुण व सगुणस्वरूपाचें ऐक्यच असल्यामुळे, भगवान श्रीकृष्णहि सर्व ब्रह्मांडाचें अधिष्ठान आहेत; म्हणून ते (श्रीकृष्ण) स्वत: अमर्याद ज्ञान-ऐश्वर्यादिगुणांनी युक्त असून सर्व जीवांचे अंतर्यामि असल्यामुळे, तेच सर्व जीवांच्या अंत:करणांत त्यांच्या कर्मानुसार ज्ञान अज्ञानशक्तींचा उद्बोध करणारे आहेत, असे भागवतांत "अगजगदौकसामखिलशक्त्यबोधक ते" (भा० द० ८४-१४) या पंक्तीने सांगितलें आहे.

माउलीनी, याच अर्थाने अर्जुनाच्या अंत:करणांत श्रीकृष्णांनी "चित्कळिका उजळली" असें म्हटलें आहे.

मग दिव्यचक्षु प्रकाशु प्रगटला। तया ज्ञानदृष्टी फाटा फुटला। ययापरी दाविता जाहला। ऐश्वर्य आपुलें॥ १७९॥

अर्थ—मग (भगवंतांनी म्हटल्याबरोबर) अज्ञानांध:कार नाहीसा होऊन चैतन्याचा प्रकाश झाल्यामुळे, त्याला (अर्जुनाला) सर्वत्र एक अस्फुट अद्वैत श्रीकृष्णवस्तुच आहे, अशी ज्ञानदृष्टि प्राप्त झाली. या प्रमाणे भगवंतांनी अर्जुनाला विश्वरूप ऐश्वर्य दाखविलें॥ १७९॥

हे अवतार जे सकळ। ते जिये समुद्रींचें कां कल्लोळ। विश्व हे मृगजळ। जया रश्मीस्तव दिसे॥ १८०॥

अर्थ—संपूर्ण अवतार हे त्या समुद्राचे तरंग असून जग त्याच्या वृत्तिरूप किरणामुळे दिसणारे मृगजळ आहे॥ १८०॥

गूढार्थदीपिका—भगवंताचा सगुण साकार विग्रह व सगुण साकार जगत् या दोहोंमध्ये कसा फरक आहे, हें या ओवींतून माऊलींनी दाखविलें आहे.

सर्व केवलाद्वैतवादी आचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराजादि संत यांनी सच्चिदानंदपरब्रह्माहून भिन्न भासणारे जीव, जगत्, परमात्मा, अवतार यांचें परब्रह्माशीं ऐक्य आहे हें सांगण्याकरितां, परब्रह्माचे ठिकाणी हे निवर्तरूप आहेत असे मानलें आहे.

अनुभवी गुरुच्या मुखाने वेदान्तसिद्धान्ताचें श्रवण न केलेले वेदान्ती, अध्यस्तविवर्त, हाच एक विवर्त आहे,

दुसरा विवर्त नाही असे म्हणतांना दिसतात. पण हें मत माऊलींना मान्य असते, तर त्यांनी, अवताराला समुद्राच्या कल्लोळाचा व जगाला मृगजळाचा असा भिन्न भिन्न दृष्टान्त देण्याचें कारणच नव्हतें. अवताराला व जीवाला दोन भिन्न दृष्टान्त देऊन माऊलींनी विवर्त हा एक प्रकारचा नसून, दोन प्रकारचा आहे, हें स्वमुखानेच स्पष्ट केलें आहे. या दोन विवर्ताविषयीचें विवेचन आम्ही नवव्या अध्यायांत ओवी ६५ वरील गूढार्थदीपिकेंत केलेंच आहे.

हें सूर्याचें कंपन आहे, असे न जाणणाऱ्या मृगांना, जसें तें कंपन, भ्रांतीने विपरीत असे जलरूप दिसतें, त्याप्रमाणे सच्चिदानंद परब्रह्मच नामरूपाने आविष्कृत झालें आहे, असें न जाणणाऱ्या जीवांना तो परब्रह्माचा नामरूपात्मक आविष्कारच जड-विनाशी जगद्रूप भासतो; म्हणून जगत् हें अध्यस्तविवर्त आहे, असें ''विश्व हें मृगजळ'' या चरणाने माऊलींनी सुचविलें आहे.

पण समुद्रावर उठणाऱ्या कल्लोळरूप विवर्तांत, समुद्रच भरला आहे व त्याचें समुद्राशीं पूर्ण ऐक्य आहे, असाच प्रत्यय येतो; म्हणून तो अध्यस्तविवर्त नव्हे. तो अनध्यस्तविवर्त होय. त्याप्रमाणे अवताररूप विवर्ताचे ठिकाणी देखील अधिष्ठानभूत परब्रह्माच्या सच्चिदानंदादि लक्षणांचा व त्याचे परब्रह्माशीं असलेल्या ऐक्याचा अनुभव येत असल्यामुळे, अवतार हे भ्रांतिजन्य अध्यस्तविवर्त आहेत-असेंच म्हटलें पाहिजे, असे माऊलींनी अवतार हे ''समुद्रीचे कल्लोळ'' या चरणाने सुचविलें आहे.

जगद्रूप अध्यस्तविवर्ताचे, आत्मज्ञानाने भिन्न वस्तुत्व व भिन्न धर्मत्व नाहीसें झाल्यावर, हा जगद्रूपविवर्त, अधिष्ठानरूप परब्रह्माशीं ऐक्य पावून पूर्ण सच्चिदानंदरूपानेच अनुभवाला येतो आणि अवताररूप विवर्त, जशाच्या तसाच पूर्णब्रह्मत्वाने अनुभवाला येतो, आत्मज्ञानाने देखील नाहीसें होण्याजोगें त्याच्या ठिकाणीं कांही नसतें.

केवलाद्वैतवादी आचार्य व श्रीज्ञानेश्वरादि संत यांना अवतारांचे पूर्णब्रह्मत्व मान्य आहे हें आम्ही मागे नवव्या अध्यायांत त्यांचीच वचनें उदाहृत करून दाखविलें आहे. पण त्यांनी अवतारांना अनध्यस्तविवर्त हे नांव दिलेले नाही. माझ्या सद्गुरुआईनी आपल्या ग्रंथांतून अवतारांना 'अनध्यस्तविवर्त' हे नांव देऊन ती उणीव भरून काढली आहे.

जिये अनादिभूमिके निटे। चराचर हें चित्र उमटे। आपणपें वैकुंठें। दाविलें तया॥ १८१॥

अर्थ—सच्चिदानंदनामरूपाने नटलेल्या ज्या विश्वरूप अनादि भूमिकेवर हें चराचरविश्वाचें चित्र उमटतें, तें विश्वरूप आपणच आहों असे भगवंतांनी अर्जुनाला दाखविलें॥ १८१॥

गूढार्थदीपिका—भगवंताच्या विश्वरूपावरच, जडविनाशी जगताचा भास होतो, असें जें आम्ही मागें १६३ ओवीवरील गूढार्थदीपिकेंत म्हटलें आहे तें या ओवीच्या आधारानेच म्हटलें आहे.

येथे विश्वरूप अनादि आहे हें ''अनादिभूमिके'' या शब्दाने माऊलींनी सांगितलें आहे.

मागां बाळपणीं येणें श्रीपती। जैं एक वेळ खादली होती माती। तैं कोपोनियां हातीं। यशोदा धरिला॥ १८२॥
मग भेणें भेणें जैसें। मुखीं झाडा द्यावयाचेनि मिसें। चवदाही भुवनें सावकाशें। दाविलीं तिये॥ १८३॥
नातरी मधुवनीं ध्रुवासि केलें। जैसें कपोलशंखें शिवतलें। आणि वेदांचियेही मती ठेलें। तें लागला बोलों॥ १८४॥

अर्थ—मागें एकदां जेव्हा भगवंतांनी बाळपणीं मातीं खाल्ली होती, तेव्हा यशोदेने रागावून त्यांना हातांत धरलें॥ १८२॥ तेव्हा मग भगवान श्रीकृष्णाने 'भ्यालों' असे दाखवून 'मी माती खाल्ली नाही' हे दाखविण्याकरितां तोंड उघडलें असतां, आपल्या तोंडात संपूर्ण चवदाहि भुवनाची सृष्टि यशोदेला दाखविली॥ १८३॥ किंवां मधुवनात तपश्चर्या करीत असलेल्या व भगवंताची स्तुति करूं इच्छिणाऱ्या ध्रुवाचे गालाला आपल्या हातांतील शंखाचा स्पर्श केल्याबरोबर जे वेदालाहि अगम्य, तें तो बोलूं लागला॥ १८४॥

गूढार्थदीपिका—सत्य संकल्प, सर्वसमर्थ भगवंताच्या मनांत जसें येतें तसें तात्काळ सृष्टींत घडून येते.

तैसा अनुग्रहो पैं राया। श्रीहरी केला धनंजया। आतां कवणेकडेही माया। ऐसी भाष नेणें तो॥ १८५॥

अर्थ—संजय म्हणतो. राजा धृतराष्ट्रा! भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनावर तशीच कृपा केली. त्यामुळे माया व तिचा कार्यपसारा या शब्दांचे देखील त्याला ज्ञान होत नव्हते॥ १८५॥

गूढार्थदीपिका—येथे 'माया' हा शब्द त्रिगुणात्मक अविद्या व सत्य वाटणारें तिचें जडविनाशी असे अनेकवस्तुरूप जगत्कार्य, या अर्थाने आलेला आहे. आणि अर्जुनाला प्राप्त झालेल्या विश्वरूपदर्शनाने तिचा संपूर्ण नाश होऊन. नामरूपा सह सर्वत्र एका सच्चिदानंदाचाच त्याला अनुभव येत होता. अर्थात् विश्वरूप म्हणजे ज्ञानदृष्टीने दिसणारें मायारहित स्वरूप होय असे माउलीचें मत असल्याचें, या ओवीवरून स्पष्ट होतें.

एकसरें ऐश्वर्यतेजें पाहलें। तया चमत्काराचें एकार्णव जाहलें। चित्त समाजीं बुडोनि ठेलें। विस्मयाचां॥ १८६॥

अर्थ—एकसारखें जिकडे तिकडे ऐश्वर्यतेजच प्रकाशमान झालेलें दिसूं लागलें. तो आश्चर्याचा सर्वत्र समुद्रच पसरलेला आहे. असें पाहूं लागला आणि त्याचें चित्त त्या आश्चर्याच्या समुदायांत बुडून गेलें॥ १८६॥

गूढार्थदीपिका—चित्त समाजीं बुडोनि ठेले। विस्मयाचिया—हाच अर्जुनाचे ठिकाणी प्रगट झालेला अद्भुतरस होय. ज्ञानदृष्टिपूर्वी, अविद्याभ्रमामुळे सत्य मानलेल्या मर्यादित व अनेक वस्तुधर्मयुक्त अशा जगताच्या प्रत्ययाने, जगताला अधिष्ठानभूत असलेलें अमर्याद ऐश्वर्यसम्पन्न असें भगवंताचे स्वरूप झांकले गेले होतें. ज्ञानदृष्टीने तो अविद्याभ्रम नाहीसा झाल्याबरोबर, अनेक वस्तूची व धर्माची देश काल वस्तु ह्या तिन्ही मर्यादा नाहीशा होऊन, ते स्वरूप, भगवंताच्या सर्व अमर्याद ऐश्वर्यरूपानेच दिसूं लागलें. तें पाहून अर्जुनाचे चित्तांत अद्भुतरस प्रगट झाला.

जैसा आब्रह्म पूर्णोदकीं। पव्हे मार्कंडेय एकाकी। तैसा विश्वरूपकौतुकीं। पार्थु लोळे॥ १८७॥
म्हणे केवढें गगन एथ होतें। तें कवणें नेलें पां केउतें। तीं चराचरें महाभूतें। काय जाहलीं॥ १८८॥

अर्थ—ब्रह्मलोकापर्यंत संपूर्ण ब्रह्मांड जलमय झालें असतां, ज्याप्रमाणे एकटे मार्कण्डेय ऋषीच त्या जलांत पोहत असतात, त्याप्रमाणे विश्वरूपाच्या दर्शनाने झालेल्या विस्मयसमुद्रावर अर्जुनहि लोळूं लागला॥ १८७॥ अर्जुन म्हणतो. (मी विश्वरूप पाहण्यापूर्वी) येथें केवढें मोठें आकाश होतें, तें आतां कोणी कोठें नेलें समजत नाही आणि त्या आकाशांत दिसणारी ती भूतसृष्टिहि काय झाली कोणाला माहित?॥ १८८॥

दिशांचे ठावही हारपले। अधोर्ध्व काय नेणों जाहलें। चेइलिया स्वप्न तैसें गेले। लोकाकार॥ १८९॥
नाना सूर्यतेजप्रतापें। सचंद्र तारागण जैसें लोपें। तैसीं गिळिलीं विश्वरूपें। प्रपंचरचना॥ १९०॥

अर्थ—दिशांचा ठावठिकाण राहिला नाही. खाली-वर ह्या दिशाही काय झाल्या समजत नाही? ज्याप्रमाणे जागें झाल्याबरोबर संपूर्ण स्वप्न मावळतें, तसें संपूर्ण लोकालोकांचा प्रत्यय नाहीसा झाला॥ १८९॥ किंवा सूर्य उगवल्याबरोबर, त्याच्या प्रखर तेजाने, ज्याप्रमाणे चंद्रासह सर्व नक्षत्रे त्याच्यात लोपून जातात, त्याप्रमाणे विश्वरूपदर्शनाने सर्व प्रपंचभाव नाहीसा झाला॥ १९०॥

गूढार्थदीपिका—तैसी गिळिलीं विश्वरूपें। प्रपंचरचना—प्रपंचरचना म्हणजे जडविनाशी अशा नानावस्तूंचें स्वतंत्र अस्तित्व व वस्तुत्व होय.

विश्वरूप म्हणजे अविनाशी, अस्फुट व निरवयव अशा एका अद्वैत परब्रह्मवस्तूचेंच नानारूपाने नटणें होय. प्रत्येक नामरूपाचें परब्रह्माहून स्वतंत्र व अस्तित्व वस्तुत्व मानून, ती सर्व नामरूपें एकत्र मिळून, ही एक सत्य पण जडविनाशी जगद्वस्तु आहे अशी अज्ञानदशेंत भ्रांतबुद्धि उत्पन्न झालेली असते. ज्ञानदशा प्राप्त झाल्यानंतर, जगताविषयीची ती सत्यत्वबुद्धी नाहीशी होते. त्या सत्यत्वबुद्धिबरोबरच वस्तुत्वबुद्धिहि नाहीशी होते; पण नामरूपाची प्रतीति मात्र नाहीशी होत नाही, असा विद्यारण्यांनी "निवृत्त एव यस्मात्ते तत्सत्यत्वमतिर्गता। ईदृङ निवृत्तिरेवात्र बोधजा नन्वभासनम्"॥ ४६॥ (पं० द० प्र० १३) या श्लोकांत ज्ञान्याचा अनुभव सांगितला आहे.

अर्जुनाला प्राप्त झालेल्या ज्ञानदृष्टिमुळें त्याचे ठिकाणी, पूर्वी असलेली जगताविषयीची सत्यत्वबुद्धि व वस्तुत्वबुद्धि सपशेल नाहीशी झाली; पण नामरूपाची प्रतीति नाहीशी झाली नाही. त्या संपूर्ण नामरूपाने एक परमात्माच नटला आहे, असें त्याला दिसूं लागलें.

नामरूपामुळेच सच्चिदानंद परब्रह्माहून स्वतंत्र अशा जडविनाशी जगद्वस्तूचा भ्रम झाला व ब्रह्मवस्तूचा विसर पडला; म्हणून वेदान्तांत नामरूपें हीं माया आहे असें अज्ञानाच्या दृष्टीने म्हटलें असलें, तरी ज्ञानाने अविद्याभ्रमाचा

निरास झाल्यावरही नामरूपाची प्रतीति येणें बंद पडत नाही. त्यामुळे नामरूपें ही परमेश्वराची स्वाभाविक शक्ति आहे, असें मानावें लागते.

या ओव्यांतून जें विश्वरूपदर्शनाचें वर्णन आलें आहे. त्यावरून आमच्याच मताला पुष्टि मिळते. पुन: पंचदशीच्या वरील श्लोकावर जी रामकृष्णटीका आहे, तीहि आमच्या मताला पुष्टि देणारी आहे.

टीकाकार म्हणतात, निरुपाधिकभ्रम व सोपाधिकभ्रम असा दोन प्रकारचा भ्रम आहे.

अधिष्ठानज्ञान झाल्याबरोबर, ज्या भ्रमांत भासलेल्या वस्तूची नामरूपासह निवृत्ति होते, त्याला निरुपाधिक भ्रम म्हणतात आणि अधिष्ठानाचे ज्ञान झाल्यावर, ज्या भ्रमांत भासलेल्या वस्तुविषयीची नुसती सत्यत्वबुद्धिच नाहीशी होते, नामरूप नाहीसे होत नाही, त्याला सोपाधिकभ्रम म्हणतात.

रज्जूचें ज्ञान झाल्यावर, नामरूपासह सर्पाची निवृत्ति होते. म्हणून रज्जुसर्प हा निरुपाधिकभ्रम आहे आणि अधिष्ठानरूप ब्रह्माचें ज्ञान होऊन, जगताविषयीची सत्यत्वबुद्धि नाहीशी होते, पण नामरूपाची प्रतीति नाहीशी होत नाही, म्हणून जगद्रूप सोपाधिकभ्रम होय.

या टीकेचा विचार केला असतां हें स्पष्ट होतें की, ज्याप्रमाणे दोरीवर भ्रमाने भासलेल्या सर्पाचीं नामरूपें त्याचीं (सर्पाची) असतात म्हणूनच अधिष्ठानज्ञानाने त्याची नामरूपासह निवृत्ति होते आणि जगद्वस्तूचे ठिकाणी भासणारीं नामरूपें तिची (जगद्वस्तूची) नसतात. उलट तीं, जगत् अधिष्ठानभूत असलेल्या परब्रह्माचीं असतात आणि ती परब्रह्माचे ठिकाणी विवर्तरूप असून, भिन्न इव स्फुरत असल्यामुळे उपाधिभूत होऊन, जगद्भ्रम उत्पन्न करतात. या भ्रमालाच अविद्या किंवा त्रिगुणात्मक माया म्हणतात, ही जीवाचे-ठिकाणी अनादि आहे. अशा रीतीने नामरूपानेच त्रिगुणात्मक मायेचा भ्रम होत असल्यामुळे, हीं नामरूपें परमेश्वराची त्रिगुणात्मक मायाशक्ति किंवा प्रकृति होय असे आचार्यांनी म्हटलें आहे. (ब्र. सू. २-१-१४)

अन्यथाभानहेतुत्वादियं मायेति कीर्तिता ॥ १८ ॥
आत्मतत्वतिरस्कारात्तम इत्युच्यते बुधैः । विद्यानाश्यत्वतोऽविद्या मोहस्तत्कारणत्वत: ॥ १९ ॥
सद्वैलक्षण्यदृष्ट्येयमसदित्युदिता बुधैः । कार्यनिष्पत्तिहेतुत्वात्कारणं प्रोच्यते बुधैः ॥ २० ॥
कार्यवद्व्यक्तताभावादव्यक्तमिति गीयते । (सूतसंहिता-शिवमाहात्म्यखंड अ. ८)

मुळांत परमेश्वराची शक्ति नामरूपात्मक असून अज्ञान्यांला ती भलतेंच भासविते, म्हणून त्या नामरूपाला माया हे नांव दिलें गेले. नामरूपें हीं परब्रह्माला झांकून टाकतात म्हणून त्यांना तम म्हणतात. ज्ञानविचाराने त्यांच्या पृथक् अस्तित्वाचा व वस्तुत्वाचा नि:शेष नाश होतो, म्हणून त्यांना अविद्या असे म्हणतात. नामरूपें हींच जडविनाशी व नानावस्तुरूप अशा जगताचा भ्रम होण्याला कारण असल्यामुळे त्यांना मोह म्हणतात. तीं सत् म्हणजे नित्य किंवा अखंड या लक्षणाहून विलक्षण असल्यामुळे त्यांना असत् किंवा अनिर्वचनीय म्हणतात. तीं कार्यनिष्पत्तीला निमित्त असल्यामुळे, त्यांना कारण म्हणतात आणि प्रथम ती परब्रह्माशीं अत्यंत एकरूप राहत असल्यामुळें व्यक्त नसतात, म्हणून त्यांना अव्यक्त असेहि म्हणतात.

नामरूपें हीं अविद्येचें विक्षेपरूप कार्य आहे असें कदाचित् कोणी म्हणतील; पण वेदान्तांत नामरूपाला विक्षेप म्हटलें नसून नामरूपें हीं सच्चिदानंद परब्रह्माहून निराळी एक जडविनाशी सत्य वस्तु आहे असें वाटणें, याला विक्षेप म्हटलें आहे.

असो भगवंतांनी दाखविलेल्या या विश्वरूपदर्शनांत दोन प्रकारचा प्रत्यय दिसतो. येथें "गिळिलीं विश्वरूपें प्रपंचरचना" या चरणाने सांगितलेल्या पहिल्या प्रत्ययांत, संपूर्ण नामरूपासह एका सच्चिदानंदाशिवाय, जगताचा सत्य किंवा मिथ्या, असा दुसरा कोणताच प्रत्यय दिसून येत नाही आणि हा विश्वरूपाचा प्रत्यय, परब्रह्मावरच विवर्तरूप भासत असल्यामुळे, त्याला परब्रह्माची सत्ता असते; म्हणून तो परब्रह्मरूप व सत्य आहे. "सर्वच नामरूपादि सदात्मनैव विकारजातम् सत्यम्" (छां. उ. ६-३-२ शं. भा.) असे आचार्य म्हणत असून, श्रीज्ञानेश्वर माऊलींनी

"म्हणून विश्वपण जावें। मग मातें घेयावें। तैसा नव्हे आघवें सकटचि मी" (ज्ञा. अ. १४-३८०) "भलतैसा फांके। परी एकपणा न मुके। नाना संकोचे तरी असके। हाचि आथि॥ २५७॥ सिंधूची शींव न मोडे। पाणीपणा सळू न पडे। जरी मोडुत गाडे। तरंगाचे॥ २६१" (अमृ. प्र. ७) इत्यादि ओव्यांतून हाच सिद्धान्त मांडला आहे. हा विश्वरूपाचा प्रत्यय भगवान भक्तालाच देतो.

अर्जुनाला आलेला विश्वरूपाचा दुसरा प्रत्यय पुढे ओवी २४२ नंतर सांगितला आहे.

तेव्हां मनासी मनपण न स्फुरे। बुद्धि आपणपें न सांवरे। इंद्रियांचे रश्मी माघारे। हृदयवरी भरले॥ १९१॥
तेथ ताटस्थ्या ताटस्थ्य पडिलें। टकासी टक लागलें। जैसें मोहनास्त्र घातलें। विचारजातां॥ १९२॥
तैसा विस्मितु पाहे कोडें। तंव पुढां होतें चतुर्भुज रूपडें। तेंचि नानारूप चहूंकडे। मांडोनि ठेलें॥ १९३॥

अर्थ—(अशी विश्वरूपाने सर्व प्रपंचरचना गिळलेली पाहून) अर्जुनाच्या मनाचें मनपण स्फुरत नव्हतें-म्हणजे मनाचा बाह्यविषयाविषयीं होणारा संकल्पविकल्पात्मक व्यापार बंद पडला. बुद्धि निश्चयाचा व्यापार करीनाशी झाली व इंद्रियांच्या प्रवृत्ति माघाऱ्या होऊन हृदयाच्या ठिकाणीं एकवटल्या॥ १९१॥ जणूंकाय मोहनास्त्र घालून संपूर्ण विचार बंद पडावे, त्याप्रमाणे ताटस्थ्यहि तटस्थ्य राहिलें-म्हणजे साक्षित्वहि आठवेनासें झालें-एकसारखे टक लावून विश्वरूपाकडे पाहणें हेंहि विसरला॥ १९२॥ असा आश्चर्यचकित होऊन कौतुकाने तो पाहूं लागला, तेव्हा त्याला असें दिसलें की आपल्यासमोर भगवान श्रीकृष्णाचीं जी चतुर्भुज मूर्ति होती, तीच सर्वत्र अनेक नामरूपात्मक झाली॥ १९३॥

गूढार्थदीपिका—मागील ओवी १८० व ही ओवी १९३ या दोहींचा विचार केला तर चतुर्भुज श्रीकृष्णस्वरूपाचें व विश्वरूपाचें पूर्ण ऐक्य असतें, हेंच दिसून येतें.

जैसे वर्षाकाळींचे मेघौडें। कां महाप्रळयींचें तेज वाढे। तैसें आपणेनवीण कवणीकडे। नेदीचि उरों॥ १९४॥
प्रथम स्वरूप समाधान। पावोनि ठेला अर्जुन। सवेंचि उघडी लोचन। तंव विश्वरूप देखे॥ १९५॥

अर्थ—ज्याप्रमाणे वर्षाऋतूंत जिकडे तिकडे मेघच दिसतात किंवा प्रलयांत वाढलेलें तेज जिकडे तिकडे दिसतें, त्याप्रमाणे भगवंतानी आपल्यावांचून कोठेंच कांही उरूं दिलें नाही-सर्वत्र नामरूपाने एक परमात्मा श्रीकृष्णच अनुभवाला येत होता, असा अर्थ॥ १९४॥ प्रथम अर्जुन आपल्या सच्चिदानंद आत्मस्वरूपाच्या प्राप्तीने पूर्ण समाधान पावला व मग लगेच डोळे उघडून पाहतो तों त्याला विश्वरूप दिसू लागलें॥ १९५॥

गूढार्थदीपिका-प्रथम स्वरूपसमाधान। पावोनि ठेला अर्जुन—या ओवींत अर्जुनाला विश्वरूप कसें दिसलें हें स्पष्ट केलें आहे. भगवंतांनी अर्जुनाला प्रथम, स्वरूपप्राप्ति करून दिली-म्हणजे 'मी-मी' म्हणून स्फुरणाऱ्या वृत्तीचा आधारभूत जो सच्चिदानंद आत्मा, तोच अर्जुनाचें मूळस्वरूप असल्यामुळे त्या स्वरूपाच्या ठिकाणी त्याची 'मी' म्हणून स्फुरणारी बुद्धिवृत्ति स्थिर केली. आत्मस्वरूपाचे ठिकाणी बुद्धि स्थिर झाल्यामुळे, त्याच्या बुद्धीला आत्मैक्यस्वरूपसमाधि प्राप्त झाली. यालाच व्यतिरेकाने येणारा आत्मानुभव म्हणतात. "सर्वदु:खविनि-र्मुक्तैकचैतन्यात्मकोऽहमित्येष आत्मानुभव:" संपूर्ण त्रिविधदुख:खापासून मुक्त असलेला मी, केवळ चित्स्वरूप आहे, असा हा अनुभव आहे, असे आचार्यांनी म्हटलें आहे.

सवेंचि उघडी लोचन। तंव विश्वरूप देखें—असे झाल्यानंतर अर्जुनाने जेव्हा डोळे उघडून बाहेर पाहिलें, तेव्हा त्याला विश्वरूपाचा अनुभव आला-म्हणजे सर्व संसारवस्तूंचे अस्तित्व नाहीसे होऊन, त्या जागीं सर्वनामरूपाने एक परमात्माच नटला आहे, असा अनुभव आला. यालाच अन्वयरूप अनुभव म्हणतात. हाच अनुभव "सर्वं खल्विदं ब्रह्म" या श्रुतींत सांगितला असून आचार्यांनींहि आपल्या ग्रंथांतून "तरंगफेनभ्रमबुद्बुदादि सर्वं स्वरूपेण जल यथातथा। चिदेवदेहाद्यहमंतमेतत्सर्वं चिदेवैकरसं विशुद्धम्॥ ३९१॥" (वि. चू.) "यथैव मृन्मय: कुंभस्तद्वद्देहोऽपि चिन्मय:" (अपरोक्षानुभूति) इत्यादि श्लोकांनी असेंच सांगितलें आहे.

पहिला अनुभव आल्याशिवाय दुसरा अनुभव येत नसतो हे "प्रथम" व "सवेंचि" या दोन शब्दांवरून स्पष्ट होते.

इहींचि दोहीं डोळां। पाहावें विश्वरूपा सकळा। तो श्रीकृष्णें सोहळा। पुरविला ऐसा॥ १९६॥

अर्थ—याच दोन्ही डोळ्यांनी मी संपूर्ण विश्वरूप पाहावें, अशी जी अर्जुनाची इच्छा होती, ती भगवान श्रीकृष्णांनी, पुढें सांगितल्याप्रमाणे पूर्ण केली॥ १९६॥

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् । अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम्॥ १०॥

अर्थ—त्या विश्वरूपाचे ठिकाणी अनेक तोंडें होतीं, अनेकप्रकारचे अद्भुत दर्शन होत होतें, अनेक प्रकारचे दिव्य अलंकार होते व जें विश्वरूप अनेक प्रकारच्या दिव्य आयुधांनी उद्युक्त दिसत होतें॥ १०॥

मग तेथ सैंघ देखे वदनें। जैसीं रमानायकाचीं राजभुवनें। नाना प्रगटलीं निधानें। लावण्यश्रियेचीं॥ १९७॥
कीं आनंदाचीं वनें सासिन्नलीं। जैसी सौंदर्या राणीव जोडली। तैसीं मनोहरें देखिलीं। हरीचीं वक्त्रें तेणें॥ १९८॥
तयांहीमाजीं एकैकें। सावियाचि भयानकें। काळरात्रीचीं कटकें। उठावलीं जैसीं॥ १९९॥
कीं यें मृत्यूसीचि मुखे जाहलीं। हो कां जे भयाचीं दुर्गें पन्नासिलीं। कीं महाकुंडें उघडलीं। प्रळयानळाचीं॥ २००॥
तैसी अद्भुतें भयासुरें। तेथ वदनें देखिलीं वीरें। आणिकें असाधारणें साळंकारें। सौम्यें बहुतें॥ २०१॥
पैं ज्ञानदृष्टीचेनि अवलोकें। परि वदनांचा शेवटु न टके। मग लोचन ते कवतिकें। लागला पाहों॥ २०२॥

अर्थ—वैकुंठासारखे किंवा सौंदर्यलक्ष्मीचे ठेवेच पसरल्याप्रमाणे भगवंताचीं तोंडें जिकडे तिकडे दिसत होतीं॥ १९७॥ किंवा आनंदाची वनेंच भरास आलीं अथवा संपूर्ण सौंदर्याचें राज्य दिसावें-म्हणजे नि:सीम सौंदर्यवान-अशी तीं, भगवान विश्वरूपाचीं अत्यंत मनोहर मुखें अर्जुनाने पाहिलीं॥ १९८॥ तेथेंच पुन: कांही मुखें काळरात्रीच्या सैन्याने उठाव केल्याप्रमाणे खरोखर अत्यंत भयानक अशीं होतीं॥ १९९॥ किंवा मृत्यूलाच मुखें प्राप्त झालीं किंवा भयंकर भीतीचे किल्लेच पसरलेले आहेत किंवा प्रलयकालच्या अग्नीची कुंडें उघडीं केलीं जावीं॥ २००॥ त्याप्रमाणे भगवंताची अत्यंत भ्यासुर मुखें अर्जुनाने पाहिलीं तेथेंच आणखीं कांही अप्रतिम अलंकारांनी अलंकृत केलेलीं व सौम्य अशीं पुष्कळशीं तोंडें पाहिलीं॥ २०१॥ परंतु (अर्जुन) ज्ञानदृष्टीने पाहत होता, तरी त्या मुखांचा शेवट किंवा अंत त्याला लागत नव्हता; मग भगवंताचे डोळे कोणीकडे आहेत, हें तो कौतुकाने पाहूं लागला॥ २०२॥

गूढार्थदीपिका—अर्जुन ज्ञानदृष्टीने पाहत होता, तरी तोंडाचा अंत त्याला लागला नाही, या माऊलींच्या वचनावरून विश्वरूप हा अमर्याद अशा सच्चिदानंद परब्रह्माचाच, नामरूपात्मक आविष्कार असल्यामुळे, परब्रह्माप्रमाणेच त्याचा व त्याच्या एका एका अवयवाचा देखील शेवट दिसत नव्हता, हे साहजिक आहे.

तंव नानावर्णें कमळवनें। की विकासिलीं तैसें अर्जुनें। डोळे देखिले पालिंगनें। आदित्यांचीं॥ २०३॥
तेथेंचि कृष्णमेघाचिया दाटी-। माजीं कल्पांत विजूचिया स्फुटी। तैसिया वन्हि पिंगळा दिठी। भ्रूभंगातळी॥ २०४॥
हें एकैक आश्चर्य पाहतां। तिये एकेचि रूपीं पांडुसुता। दर्शनाची अनेकता। प्रतिफळली॥ २०५॥
मग म्हणे चरण ते कवणेकडे। केउते मुकुट कें दोर्दंडें। ऐसी वाढविताहे कोडें। चाड देखावयाची॥ २०६॥
तेथ भाग्यनिधि पार्था। कां विफलत्व होईल मनोरथा। काय पिनाकपाणीचिया भाता। वायकांडीं आहाती॥ २०७॥
ना तरी चतुराननाचिये वाचे। काय आहाती लटिकिया अक्षरांचे सांचे। म्हणोनि साद्यंतपण अपरांचें। देखिलें तेणें॥ २०८॥
जयाची सोय वेदा नाकळे। तयाचे सकळावयव एकेचि वेळे। अर्जुनाचे दोन्ही डोळे। भोगिते जाहले॥ २०९॥
चरणौनी मुकुटवरी। देखत विश्वरूपाची थोरी। जे नाना रत्न अलंकारीं। मिरवत असे॥ २१०॥
परब्रह्म आपुलेनि आंगें। ल्यावया आपणचि जाहला अनेगें। तियें लेणीं मी सांगें। काइसयासारिखीं॥ २११॥

अर्थ—तेव्हा अनेक रंगाच्या कमळाचीं वनें प्रफुल्लित झालेलीं दिसावीं व सूर्यांच्या रांगा लागाव्या, त्याप्रमाणे अर्जुनाने देवांच्या डोळ्यांच्या रांगा पाहिल्या॥ २०३॥ तेथेच, ज्याप्रमाणे प्रलयकालीं पाण्याने भरलेल्या काळ्या मेघांच्या गर्दीत विजा चमकाव्या, त्याप्रमाणे भुंवयाखालीं भगवंताची अग्निसारखी पिंगटदृष्टि अर्जुन पाहूं लागला॥ २०४॥ असें एक एक आश्चर्य पाहतां पाहतां, एका विश्वरूपाचे ठिकाणीच अर्जुनाला अनेक प्रकारचे दर्शन

होऊं लागलें॥ २०५॥ मग अर्जुन म्हणतो, देवाचे चरण कोठे आहेत? देवाचा मुकुट कोठे आहे व बाहूकोठे आहेत? अशाप्रमाणे भगवंताचे निरनिराळे अवयव पाहण्याची, अर्जुन इच्छा वाढवूं लागला॥ २०६॥ संपूर्ण भाग्याचा सांठा अशा अर्जुनाचे मनोरथ कसें व्यर्थ जातील? पिनाक धनुष्य धारण करणाऱ्या शंकराच्या भात्यांत निष्फळ होणारे बाण राहतील काय?॥ २०७॥ किंवा ब्रह्मदेवाच्या वाणींत अर्थहीन अक्षरांचे सांचे राहूं शकतात काय? म्हणूनच त्या भाग्यवान अर्जुनाने अपार अशा विश्वरूपालाहि संपूर्ण पाहिले॥ २०८॥ ज्या विश्वरूपाची स्थिति वेदालाहि अगम्य आहे, त्या विश्वरूपाचे सर्व अवयव अर्जुन दोन्ही डोळ्यांनी एकदमच पाहूं लागला॥ २०९॥ नाना प्रकारच्या रत्नालंकारांनी सुशोभित झालेलें विश्वरूपाचें वैभव, अर्जुन पायापासून मस्तकापर्यंत पाहूं लागला॥ २१०॥ परमात्मा आपल्या अनेक आंगावर घालण्याकरितां आपणच अनेक अलंकाररूप झाला होता. ते अलंकार कशासारखे होते ते मी सांगतों॥ २११॥

जिये प्रभेचिये झळाळा। उजाळू चंद्रादित्यमंडळा। जे महातेजाचा जिव्हाळा। जेणें विश्व प्रगटे॥ २१२॥
तो दिव्यतेज शृंगारु। कोणाचिये मतीसी होय गोचरु। देव आपणपेंचि लेइलें ऐसें वीरु। देखत असे॥ २१३॥
आपण आंग आपण अलंकार। आपण हात आपण हातियर। आपण जीव आपण शरीर। देखे चराचर कोंदलें देवें॥ २१४॥
मग तेथेंचि ज्ञानाचां डोळां। पहात करपल्लवां जंव सरळा। तंव तोडित कल्पांतींचिया ज्वाळा। तैसीं शस्त्रें झळकत देखे॥ २१५॥

अर्थ—ज्याच्या प्रभेच्या कांतीने चंद्रमंडळ व सूर्यमंडळ यांना तेज प्राप्त झाले आहे आणि जे महातेजाचाहि जिव्हाळा असून, ज्यामुळे हे विश्व म्हणजे हा नामरूपाचा पसारा प्रगट होतो॥ २१२॥ त्या दिव्यतेजरूप शृंगाराचे कोणाच्या बुद्धीला आंकलन होऊं शकेल? देवाने आपणच अलंकाररूप होऊन, आपणच ते अलंकार घातले आहेत, असें वीर अर्जुन पाहत होता॥ २१३॥ पुन: तेथेच अर्जुन ज्ञानदृष्टीने, सरळ अशा हाताकडे पाहत असतां, त्या हाताचे ठिकाणी कल्पांतीच्या अग्नीच्या ज्वाळा तोडणारी तेजस्वीं शस्त्रे झळकत असलेलीं तो पाहूं लागला॥ २१४॥ भगवान आपणच आंग व आपणच अलंकार झाले. आपणच हात असून, आपणच हातांतील हत्यारहि झाले, आपणच जीव असून, आपणच शरीर झाले. अशी संपूर्ण चराचरसृष्टि देवानेच व्यापिली आहे, असे तो अर्जुन पाहूं लागला॥ २१५॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे प्रकाश व अंध:कार परस्परविरोध-म्हणजे परस्परांचे नाशक-असल्यामुळे एकेठिकाणी राहूं शकत नाहीत, त्याप्रमाणे सच्चिदानंदधर्म व जडविनाशीधर्म परस्परविरोधी असल्यामुळे, ते एके ठिकाणीं राहूं शकत नाहीत; म्हणून सच्चिदानंद परब्रह्माचे ठिकाणीं अनध्यस्तविवर्तरूपाने किंवा पूर्णब्रह्मस्वरूपाने स्फुरणारें विश्वरूप, त्यांचे शरीर, अवयव, त्यावरील अलंकार, अवयवांचे ठिकाणीं असणारी आयुधें, हे सर्व परमात्मा आपणच नटला आहे, असें अर्जुन पाहू लागला, हेच या ओवींतून माऊलींनी प्रतिपादिलें आहे-म्हणजे विश्वरूपाचे ठिकाणी अर्जुनाला संपूर्ण सच्चिनंदाचाच प्रत्यय होता; कोठेहि जडविनाशी असा प्रत्यय नव्हता, असें माउलीचें म्हणणें आहे.

जयांचिया किरणांचे निखरेपणें। नक्षत्रांचे होत फुटाणे। तेजें खिरडला वह्नि म्हणे। समुद्रीं रिघों॥ २१६॥
मग काळकूटकल्लोळीं कवळिलें। नाना महाविजूंचे दांग उमटले। तैसे अपार कर देखिले। उद्यतायुधीं॥ २१७॥

अर्थ—ज्या शस्त्रांच्या तेजस्वी किरणांच्या प्रखरतेमुळे नक्षत्रांचे देखील फुटाणे फुटत होते आणि ज्या तेजाने संतप्त झालेला अग्निदेखील, दाह शमविण्याकरितां समुद्रांत शिरण्याची इच्छा करीत होता॥ २१६॥ मग जणूं काय समुद्राच्या लाटांनी संपूर्ण काळकूट विषच भरून घ्यावे किंवा प्रलयसमयींच्या वीजांचे समुदाय प्रगट व्हावेत, त्याप्रमाणे नानाप्रकारचीं आयुधें धारण केलेले भगवंतांचे अनंत हात अर्जुन पाहूं लागला॥ २१७॥

दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम्। सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम्॥ ११॥

अर्थ—त्या विश्वरूप भगवंताने दिव्यमाळा व दिव्यवस्त्र धारण केलें आहे, दिव्यगंधाची उटी लावली आहे, त्याला सर्वत्र मुखें आहेत व तें सर्व आश्चर्यमय आहे, असें अर्जुनाने पाहिलें॥ ११॥

कीं भेणें तेथूनि काढिली दिठी। मग कंठमुगुट पाहातसे किरीटी। तंव सुरतरुंची सृष्टी। जयापासोनि का जाहली॥ २१८॥
जियें महासिद्धींचीं मूळपीठें। शिणली कमळा जेथ वावटे। तैसीं कुसुमें अति चोखटें। तुरंबिलीं देखिलीं॥ २१९॥
मुगुटावरी स्तबक। ठायीं ठायीं पूजाबंध अनेक। कंठीं रुळताति अलौकिक। माळादंड॥ २२०॥
स्वर्गे सूर्यतेज वेढिलें। जैसें पंधरेनें मेरूतें मढिलें। तैसें नितंबावरी गाढिलें। पीतांबरु झळके॥ २२१॥
श्रीमहादेवो कापुरें उटिला। कां कैलासु पारदें डवरिला। नाना क्षीरोदकें पांघरविला। क्षीरार्णवो जैसा॥ २२२॥
जैसी चंद्रमयाची घडी उपलविली। मग गगनाकरवीं बुंथी घेवविली। तैसी चंदन-पिंजरी देखिली। सर्वांगीं तेणें॥ २२३॥
जेणें स्वप्रकाशा कांती चढे। ब्रह्मानंदाचा निदाघु मोडे। जयाचेनि सौरभ्यें जीवित जोडे। वेधवतीये॥ २२४॥

अर्थ—अर्जुनाने भीतीने आपली दृष्टि तेथून काढली व भगवंताच्या कंठाकडे व मुकुटाकडे अर्जुन पाहूं लागला, तेव्हा सर्व इंद्राच्या नंदनवनांतील पुष्पवृक्षांची ज्यापासून उत्पत्ति झाली असे म्हणतां येईल॥ २१८॥ ज्याच्यापासून महासिद्धि प्राप्त होतात व लक्ष्मीलाहि आपला शीण भागविण्याकरितां विश्रांति घेतां येईल, अशी सुंदर व सुगंधित फुलें, ज्याच्या कंठातील माळेंत व मुकुटाचे ठिकाणी खोवलेलीं दिसत होतीं॥ २१९॥ मुकुटावर फुलांचे गुच्छ खोवले आहेत, ठिकठिकाणी अनेक प्रकारच्या पूजा बांधल्या आहेत, गळ्यांत अनेक दिव्यफुलांचे हार रुळतांना दिसत आहेत॥ २२०॥ जणूं स्वर्गाने सूर्याचें तेज वेढल्याप्रमाणे किंवा सोन्याने मेरु पर्वताला मढविल्याप्रमाणे भगवंताच्या कमरेभोंवतीं घट्ट नेसलेला पिंवळा पीतांबर झळकत होता॥ २२१॥ धवलवर्ण महादेवाला कापराची उटी लावावी किंवा कैलास पर्वताला पाऱ्याचा लेप लावावा अथवा क्षीरसमुद्राला दुग्धरूपी उदकाचेच पांघरूण घालावें॥ २२२॥ किंवा ज्याप्रमाणे चंद्राची घडी उकलून त्याचें पाघरूण आकाशाकडून घेववावे, त्याप्रमाणे विश्वरूपाच्या सर्वांगावर शुभ्रचंदनाची उटी लावलेली पाहिली॥ २२३॥ ज्या दिव्य सुगंधयुक्त चंदनाच्या उटीने सच्चिदानंदरूप भगवंताच्या स्वप्रकाशरूप चिन्मय देहालाहि विशेष कांति प्राप्त होऊन शोभा येते व ब्रह्मानंदाचाच विग्रह अशा भगवंताचा ग्रीष्मऋतूंतील तापहि नाहीसा होतो व ज्याच्या दिव्य सुगंधामुळे चित्तवेधक गुणालाहि आयुष्य लाभतें॥ २२४॥

गूढार्थदीपिका-स्वप्रकाशा—चैतन्य हें स्वयंप्रकाश असल्यामुळे, स्वप्रकाश हा शब्द चैतन्याला लावला जातो आणि भगवान श्रीकृष्णाचा देह "श्रीकृष्ण देहो चैतन्य घन" (ए. भा. अ. २-३०) चिन्मय असें नाथांनी जें म्हटलें आहे त्याला अनुसरून "स्वप्रकाश" म्हणजे "भगवंताच्या चिन्मय देहाला" असा अर्थ होतो.

ब्रह्मानंदाचा—"आनंदपदीं जया म्हणती हरी" (ए. हरि.) "आनंदविग्रही श्रीकृष्ण" (ए. भा. अ. २१-५२०) इत्यादि वचनांतून नाथांनी भगवान श्रीकृष्णाचा देह ब्रह्मानंदाचा विग्रह आहे असे जे म्हटलें आहे, त्याला अनुसरून "ब्रह्मानंद" म्हणजे "ब्रह्मानंदाची मूर्ति" असा त्याचा अर्थ होतो.

जयाचे निर्लेप अनुलेपु करी। जें अनंगुही सर्वांगीं धरी। तया सुगंधाची थोरी। कवण वानी॥ २२५॥
ऐसी एकैक श्रृंगारशोभा। पाहतां अर्जुन जातसे क्षोभा। तेवींचि देवो बैसला कीं उभा। कां सेयांतु हें नेणवे॥ २२६॥
बाहेर दिठी उघडोनि पाहे। तव आघवें मूर्तिमय देखतु जाये। मग आतां न पाहे म्हणोनि उगा राहे। तरी आंतुही तैसेंचि॥ २२७॥
अनावरें मुखें समोर देखें। तयाभेणें पाठीमोरा जंव ठाके। तंव तयाहीकडे श्रीमुखें। करचरण तैसेचि॥ २२८॥
अहो पाहतां कीर प्रतिभासे। एथ नवलावो काइ असे। परि न पाहतांही दिसे। चोज आइका॥ २२९॥
कैसें अनुग्रहाचें करणें। पार्थाचें पाहणें आणि न पाहणें। तयाहीसकट नारायणें। व्यापूनि घातलें॥ २३०॥

अर्थ—अलिप्त परमात्मा, ज्या चंदनाच्या उटीचा आपल्या आंगाला लेप करतो, स्वत: सर्वांगसुंदर असा मदनहिं आपल्या सर्वांगावर (ज्या उटीला) धारण करतो, त्या चंदनाच्या सुगंधाचे वर्णन कोण करूं शकेल॥ २२५॥ अशा रीतीने विश्वरूपाची एक एक सौंदर्य शोभा पाहत असतां, अर्जुन अगदी भांबावून गेला. तसेच देव बसले आहेत, उभे आहेत, की निजले आहेत हे त्याला कांहीच कळेना॥ २२६॥ अर्जुन दृष्टि उबडून बाहेर पाहूं लागला, तेव्हा त्याला सर्व मूर्तिमय दिसूं लागलें आणि आतां बाहेर दृष्टि उघडून पाहत नाही असे म्हणून तो डोळे मिटून स्तब्ध

राहिला, तर आंतहि त्याला तसेच सर्व मूर्तिमय दिसूं लागलें॥ २२७॥ दृष्टिसमोर विश्वरूपाची असंख्य विशाल मुखें पाहून, भीतीने अर्जुन विश्वरूपाकडे पाठ करून उभा राहिला असतां, तिकडेहि त्याला तशीच विश्वरूपाची असंख्य व विशाल मुखें व करचरणादिक दिसूं लागले॥ २२८॥ अहो! दृष्टीने पाहात असतांना अर्जुनाला विश्वरूप दिसावें यांत काय आश्चर्य आहे; पण तो पाहत नसतांना देखील त्याला विश्वरूप दिसत होते, हें नवल ऐका!॥ २२९॥ भगवंताच्या कृपेचें करणें कसें आहे, पहा! अर्जुनाचे पाहणें व न पाहणें या दोहोलाहि भगवंतांनी व्यापून घेतलें॥ २३०॥

गूढार्थदीपिका—जेवढें कांही पांचभौतिक जडविनाशी पदार्थ आहेत, ते सर्व देश, काल, वस्तु या तिन्ही मर्यादेने मर्यादित असल्यामुळे ते, ज्ञानाने, आहेत असे करतात, तेव्हाच ते असतात. जेव्हां त्यांचे ज्ञान होत नाही- म्हणजे ते आहेत असे कळत नाही-तेव्हा ते नसतात; पण परब्रह्म, अद्वैत, एक जिनसी व त्याच्याहून दुसऱ्या वस्तूचें अस्तित्वच मानतां येत नाही, इतकें व्यापक असल्यामुळे व त्याची ज्ञानदृष्टिहि तशीच नित्य अविनाशी असल्यामुळे, ज्याप्रमाणे त्या परब्रह्माचें अस्तित्व व नास्तित्व पाहण्यावर किंवा न पाहण्यावर अवलंबून नसतें; त्याप्रमाणेच श्री ज्ञानेश्वर माउलींनी येथील विश्वरूपाचें अस्तित्व व नास्तित्व अर्जुनाच्या पाहण्यावर किंवा न पाहण्यावर अवलंवून नव्हतें, असे विधान करून, परमेश्वराचें नामरूपरहित असणारें साकारस्वरूपदेखील, परमेश्वराच्या नामरूपरहित निराकार स्वरूपाप्रमाणेंच शुद्ध व नित्य असतें, असें दाखविलें आहे.

म्हणोनि आश्चर्याच्या पुरी एकीं। पडिला ठायेंठाव थडी ठाकी। तंव चमत्काराचिया आणिकीं। महार्णवीं पडे॥ २३१॥
ऐसा अर्जुनु असाधारणें। आपुलिया दर्शनाचेनि विंदाणें। कवळूनि घेतला तेणें। अनंतरूपें॥ २३२॥
तो विश्वतोमुख स्वभावें। आणि तेंचि दावावयालागीं पांडवें। प्रार्थिला आतां आघवें। होऊनि ठेला॥ २३३॥
आणि दीपें कां सूर्ये प्रगटे। अथवा निमुटलिया देखावेंचि खुंटे। तैसी दिठी नव्हे जे वैकुंठें। दिधली आहे॥ २३४॥
म्हणोनि किरीटीसि दोहीं परी। तें देखणें देखें अंधारीं। हे संजयो हस्तिनापुरीं। सांगतसे राया॥ २३५॥
म्हणे किंबहुना अवधारिलें। पार्थे विश्वरूप देखिलें। नाना आभरणीं भरलें। विश्वतोमुख॥ २३६॥

अर्थ—म्हणून एका आश्चर्याच्या पुरांत पडलेला अर्जुन, त्या आश्चर्याच्या पुरांतून बाहेर पडून थडीला लागतो तोंच, तो तेथल्या तेथें दुसऱ्या चमत्काराच्या समुद्रांत पडत असे॥ २३१॥ याप्रमाणे अलौकिक अशीं अनंत रूपें धारण करणाऱ्या विश्वरूप परमेश्वराने आपल्या विश्वरूपाच्या दर्शनाची लीला दाखवून, अर्जुनाला संपूर्ण व्यापून टाकलें॥ २३२॥ भगवान श्रीकृष्ण स्वभावत:च सर्वव्यापी व सर्वतोमुख आहे आणि अर्जुनाने तो स्वभावत:च सर्वतोमुख व सर्वव्यापक कसा आहे, हेच पाहण्याची इच्छा करून, तसें विश्वरूप दाखविण्याची भगवंताला प्रार्थना केली व भगवान त्याच्यासमोर तात्काळ विश्वरूप होऊन राहिले॥ २३३॥ भगवंतांनी विश्वरूप पाहण्याकरितां अर्जुनाला जी दृष्टि दिली ती दिव्याच्या किंवा सूर्याच्या साहाय्याने पाहूं शकणारी किंवा "ती मिटली असतां पाहणेंच होणार नाही" अशी नव्हती॥ २३४॥ म्हणून अर्जुन, डोळे मिटून व डोळे उघडे ठेवून, अशा दोन्ही प्रकाराने आंधारीं म्हणजे दिव्याच्या किंवा सूर्याच्या प्रकाशावांचून विश्वरूप पाहात होता; असे हस्तिनापुरी धृतराष्ट्राला संजय सांगूं लागला॥ २३५॥ संजय म्हणतो, किंबहुना नाना अलंकाराने अलंकृत झालेलें व सर्वत्र मुखें असलेलें, असें विश्वरूप अर्जुनाने पाहिलें, हे आपण ऐकिलें ना!॥ २३६॥

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता। यदि भा: सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मन:॥ १२॥
तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा। अपश्यद्देवदेवस्य शरीरे पाण्डवस्तदा॥ १३॥
तत: स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनञ्जय:। प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत॥ १४॥

अर्थ—आकाशांत हजारों सूर्य एकदम प्रगट झाले असतां जो प्रकाश होईल, त्या प्रकाशाची माहात्म्या विश्वरूपाच्या तेजाला कांहीशी उपमा देतां येईल॥ १२॥ तेव्हा अर्जुनाने देवांचा देव जो विश्वरूप परमात्मा, त्यांच्या शरीरांत एका ठिकाणीं स्थित असलेलें व अनेक प्रकाराने भिन्न असलेलें संपूर्ण जगत् तेथेच पाहिलें॥ १३॥ त्यामुळे

अर्जुन अत्यंत आश्चर्यचकित झाला व त्याच्या शरीरावर सर्व आनंदाचे रोमांच उभे रहिले आणि मस्तक खालीं करून त्याने देवाला नमस्कार केला व हात जोडून म्हणाला॥ १४॥

तिये अंगप्रभेचा देवा। नवलावो काइसया ऐसा सांगावा। कल्पांती एकुचि मेळावा। द्वादशादित्यांचा होय॥ २३७॥
तैसे ते दिव्यसूर्य सहस्त्रवरी। जरी उदयजती कां एकेचि अवसरीं। तऱ्ही तया तेजाची थोरी। उपमूं न ये॥ २३८॥
आघवयाचि विजूंचा मेळावा कीजे। आणि प्रळयाग्नीची सर्व सामग्री आणिजे। तेवींचि दशकुही मेळविजे। महातेजांचा॥ २३९॥
तऱ्ही तिये अंगप्रभेचेनि पाडें। हें तेज कांहीं होईल थोडें। आणि तयाऐसें कीर चोखडें। त्रिशुद्धी नोहे॥ २४०॥
ऐसें माहात्म या श्रीहरीचें सहज। फांकतसे सर्वांगींचे तेज। तें मुनिकृपा जी मज। दृश्य जाहलें॥ २४१॥

अर्थ—महाराजा धृतराष्ट्रा! विश्वरूपाच्या आंगचें तेज कशासारखें होतें तें सांगू गेल्यास, कल्पान्तसमयीं बारा आदित्यांचा समुदाय एकत्र होतो॥ २३७॥ असे ते हजारों दिव्य सूर्य जरी एकाच वेळीं उदय पावलेत, तरी त्यांच्या त्या एकत्रित झालेल्या तेजांच्या थोरवीची देखील विश्वरूपाच्या तेजाला उपमा देतां येणार नाही॥ २३८॥ त्यांतच संपूर्ण विजांचा प्रकाश एकत्र करून आणि प्रलयांतील अग्नीची संपूर्ण सामग्री आणून तसेंच दहा महातेजहि मिळविले असतां॥ २३९॥ ते तेज विश्वरूपाच्या अंगप्रभेशीं कांही थोडीशी बरोबरी करूं शकेल; पण तें तंतोतंत विश्वरूपाच्या तेजासारखें कधीच होणार नाही॥ २४०॥ असें माहात्म्या विश्वरूप श्रीहरीच्या सर्वांगाचे ठिकाणी असणारें जें साहाजिक तेज होतें ते भगवान व्यासमुनींच्या कृपेने मीहि पाहूं शकलों॥ २४१॥

गूढार्थदीपिका-तें मुनिकृपा जी मज दृश्य जाहलें—भगवान श्रीकृष्णाच्या कृपेने अर्जुनाला विश्वरूपाचें दर्शन झालें व संजयाला श्रीगुरु व्यासांच्या कृपेने त्याच विश्वरूपाचें दर्शन झालें. यावरून श्रीगुरुच्या कृपेनेहि विश्वरूपाचें दर्शन होतें, असें स्पष्ट दिसतें.

आणि तिये विश्वरूपीं एकीकडे। जग आघवें आपुलेनि पवाडें। जैसें महोदधीमाजीं बुडबुडे। सिनाने दिसती॥ २४२॥

अर्थ—आणि महासमुद्राचे ठिकाणी, जसे निरनिराळें अनेक बुडबुडे दिसतात, तसे त्या विश्वरूपांत एका बाजूला संपूर्ण जग आपल्या विस्ताराने भासत होतें॥ २४२॥

गूढार्थदीपिका—येथून आपल्या विश्वरूपाचे ठिकाणींच जगाचे उत्पत्ति, स्थिति, लय कसे होतात, हें भगवंतांनी अर्जुनाला दाखवावयास सुरुवात केली आहे.

सर्व नामरूपाने एक भगवानच नटला आहे, असे ज्ञान नसलेल्या अज्ञानी जीवांना, सर्व नामरूपाचा पसारा, भ्रमाने जगद्रूप व सत्य भासत असतो; पण भगवंताच्या अद्वैतस्वरूपाचें ज्ञान झाल्यावर मात्र, तो संपूर्ण जगत्पसारा भ्रमजन्य भास आहे, असा अनुभव येतो. हेंच माऊलींनी पुढील "आकाशीं गंधर्वनगर" इत्यादि ओव्यांतून सांगितलें आहे.

मागे ओवी १९० यांतील गूढार्थदीपिकेंत विश्वरूपाचा जो दुसरा प्रत्यय म्हणून निर्देशिला आहे, तो हाच प्रत्यय होय.

कां आकाशीं गंधर्वनगर। भूतळीं पिपीलिका बांधे घर। नाना मेरूवरी सपूर। परमाणु जैसे॥ २४३॥
विश्व आघवेंचि तयापरी। तया देवचक्रवर्तीचिया शरीरीं। अर्जुन तिये अवसरीं। देखता जाहला॥ २४४॥
तेथ एक विश्व एक आपण। ऐसें अळुमाळ होतें जें दुजेपण। तेंही आटोनि गेलें अंत:करण। विरालें सहसा॥ २४५॥

अर्थ—आकाशांत गंधर्वनगर दिसावें किंवा जमिनीवर मुंग्यांनी वारुळ उभारावें अथवा मेरु पर्वतावर सूक्ष्म परमाणु पसरले असावे॥ २४३॥ त्याप्रमाणे त्यावेळीं भगवंताच्या विश्वरूप शरीराचे ठिकाणी, अर्जुन संपूर्ण जगदाभास पाहतां झाला॥ २४४॥ तेथें जग ही एक वस्तु असून तिला पाहणारा तिच्याहून निराळा मीहि एक आहे, असें जें थोडेसें द्वैत सत्य वाटत होतें, तें नाहीसें होऊन अंत:करण एकाएकीं विरून गेलें॥ २४५॥

आंतुला महानंदा चेइरें जाहलें। बाहेरि गात्रांचें बळ हारपोनि गेलें। आपाद पां गुंतलें। पुल्कांचले॥ २४६॥
वार्षिये प्रथमदशे। वोहळलया शैलाचें सर्वांग जैसें। विरूढें कोमलांकुरीं तैसें। रोमांच जाहाले॥ २४७॥
शिवतला चंद्रकरीं। सोमकांतु द्रावो धरी। तैसिया स्वेदकणिका शरीरीं। दाटलिया॥ २४८॥

माजीं सांपडलेनि अलिकुळें। जळावरी कमळकळिका जेवीं आंदोळे। तेवीं आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें। बाहेरि कांपे॥ २४९॥
कर्पूरकेळीचीं गर्भपुटें। उकलतां कापुराचेनि कोंदाटें। पुलिका गळती तेवीं थेबुटें। नेत्रोनि पडती॥ २५०॥
ऐसा सात्त्विकांही आठां भावां। परस्परें वर्ततसे हेवा। तेथ ब्रह्मानंदाची जीवा। राणीव फावली॥ २५१॥
उदयलेनि सुधाकरें। जैसा भरलाचि समुद्र भरे। तैसा वेळोवेळां ऊर्मिभरें। उचंबळत असे॥ २५२॥
तैसाचि तया सुखानुभवापाठीं। केला द्वैताचा सांभाळु दिठी। मग उससौनि किरीटी। वास पाहिली॥ २५३॥
तेथ बैसला होता जिया सवा। तियाचिकडे मस्तक खालविला देवा। मग जोडूनि करसंपुट बरवा। बोलतु असे॥ २५४॥

अर्थ—आंतील महानंद प्रगट झाला, बाहेर शरीराच्या अवयवांचें ठिकाणी जें बळ होतें, तें नाहीसें झालें व पायापासून मस्तकापर्यंत सर्व शरीरावर रोमांच उभे राहिले॥ २४६॥ वर्षाऋतूच्या आरंभीं, ज्याप्रमाणे पर्वताच्या आंगावरून पावसाचें पाणी वाहून गेल्यानंतर, गवताचे कोवळें अंकुर फुटतात, त्याप्रमाणे अर्जुनाच्या आंगावर रोमांच उभे राहिले॥ २४७॥ सोमकांतमण्याशीं चंद्राच्या किरणांचा स्पर्श झाला असतां, तो सोमकांतमणि जसा पाझरतो, तसें अर्जुनाच्या सर्व शरीरावर धर्मबिंदु दाटून आले॥ २४८॥ पाण्यावरील कमळाच्या कळींत सापडलेल्या भ्रमराच्या समुदायाने, ज्याप्रमाणे कमळाची कळी हालूं लागते, त्याप्रमाणे आंत उठणाऱ्या सुखाच्या उमाळ्यामुळे बाहेर अर्जुनाचें आंग कापूं लागलें॥ २४९॥ कापूर उत्पन्न करणाऱ्या कापूरकेळींत कापूर दाटला असतां ज्याप्रमाणे त्या कापुरकेळीची सोपटें उकललीं जाऊन, त्यांतून कापराचे कण गळूं लागतात, त्याप्रमाणे अर्जुनाच्या नेत्रांतून जलबिंदू पडूं लागले॥ २५०॥ पौर्णिमेला पूर्णचंद्राचा उदय झाला असतां, ज्याप्रमाणे भरलेल्या समुद्राला भरती येते, त्याप्रमाणे आंत वेळोवेळीं उठत असलेल्या आनंदाच्या उर्मीमुळें अर्जुन वारंवार उचंबळूं लागला॥ २५१॥ याप्रमाणे अर्जुनाचे ठिकाणी प्रगट झालेल्या अष्टसात्विकभावांत परस्पर स्पर्धा होऊं लागली असतां, अर्जुनाच्या जीवाला ब्रह्मानंदाचें राज्य प्राप्त झालें॥ २५२॥ तसेंच त्या ब्रह्मसुखानुभवा नंतर पुन: देहावर येऊन व द्वैतसृष्टीचा अंगीकार करून, अर्जुनाने एक उसासा टाकला व विश्वरूपाकडे दृष्टि केली॥ २५३॥ तेथे अर्जुन जिकडे बसला होता, तिकडेच अर्जुनाने आपलें मस्तक वांकवून देवाला नमस्कार केला व दोन्ही हात जोडून देवाशीं प्रेमाने बोलूं लागला॥ २५४॥

अर्जुन उवाच

पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसङ्घान्। ब्रह्माणमीशं कमलासनस्थमृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान्॥ १५॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, देवा! मी तुमच्या या विश्वरूप शरीराचे ठिकाणी सर्व देव, स्थावरजंगम प्राण्यांचे निरनिराळे समुदाय, ब्रह्मदेव, विष्णु शंकर, सर्व ऋषि व दिव्य नागादिक पाहत आहे.॥ १५॥

म्हणे जयजयाजी स्वामी। नवल कृपा केली तुम्हीं। जें हें विश्वरूप कीं आम्ही। प्राकृत देखों॥ २५५॥
परि साचचि भलें केलें गोसाविया। मज परितोषु जाहला साविया। जी देखिलासि जो इया। सृष्टिसी तूं आश्रयो॥ २५६॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, देवा! तुमचा जयजयकार असो. आपण माझ्यावर विलक्षण कृपा केली, त्यामुळे मी सामान्यपुरुष देखील तुमचे हें विश्वरूप पाहत आहे॥ २५५॥ हे स्वामी भगवंता! खरोखरच त्वां माझ्या इच्छेप्रमाणे केलेंस आणि मला त्यामुळे अत्यंत संतोष झाला. या संपूर्ण सृष्टीला तूंच आश्रय आहेस, हें मी आज पाहिलें॥ २५६॥

गूढार्थदीपिका—भगवंताच्या विश्वरूपाचे ठिकाणीच सृष्टीचा भास आहे हें येथे स्पष्टच सांगितलें आहे.

देवा मंदराचेनि अंगलगें। ठायीं ठायीं श्वापदांचीं दांगें। तैसीं इयें तुझ्या देहीं अनेगें। देखतसें भुवनें॥ २५७॥
अहो आकाशाचिये खोळे। दिसती ग्रहगणांचीं कुळें। कां महावृक्षीं अविसाळें। पक्षिजातीचीं॥ २५८॥
तयापरी श्रीहरी। तुझिया विश्वात्मकीं इये शरीरीं। स्वर्गु देखतसें अवधारीं। सुरगणेंसीं॥ २५९॥
प्रभु महाभूतांचें पंचक। येथ देखत आहें अनेक। आणि भूतग्राम एकेक। भूतसृष्टीचें॥ २६०॥
जी सत्यलोकु तुजमाजीं आहे। देखिला चतुरानन हा नोहे। आणि येरीकडे जंव पाहें। तंव कैलासही दिसे॥ २६१॥
श्रीमहादेव भवानियेंशीं। तुझ्या दिसतसे एके अंशीं। आणि तूतेंही गा हृषीकेशी। तुजमाजीं देखें॥ २६२॥
पैं कश्यपादि ऋषिकुळें। इयें तुझिया स्वरूपीं सकळें। देखतसें पाताळें। पन्नगेशीं॥ २६३॥

किंबहुना त्रैलोक्यपती। तुझिया एकेकाचि अवयवाचिये भिंती। इयें चतुर्दशभुवनें चित्राकृती। अंकुरलीं जाणों॥ २६४॥

अर्थ—देवा! ज्याप्रमाणे मंदार पर्वताचे अंगावर श्वापदांचे कळप असावे, त्याप्रमाणे या तुझ्या विश्वरूपाचे ठिकाणीं अनेक भुवनें मी पाहत आहे. ॥ २५७ ॥ अहो देवा आकाशाच्या पोटांत ज्याप्रमाणे ग्रहांचे समुदाय दिसावे किंवा एखाद्या मोठ्या वृक्षाचे ठिकाणीं पक्षांचीं घरटीं असावींत॥ २५८ ॥ त्याप्रमाणे भगवंता! या तुझ्या विश्वरूप शरीराचे ठिकाणी सर्व देवसमुदायासह मी स्वर्गलोक पाहत आहे॥ २५९ ॥ प्रभो! येथे पंचमहाभूतांचे अनेक समुदाय मी पाहत असून, एक एक सृष्टीचे जारज अंडजादि प्राणीसमुदायहि पाहत आहे॥ २६० ॥ भगवंता! तुझ्या ठिकाणीच सत्यलोक आहे. पाहिलेला हा ब्रह्मदेव नव्हे काय! आणि दुसरीकडे जों मी पाहतो तों तुझ्याठिकाणी कैलासहि दिसूं लागला॥ २६१ ॥ पार्वतीसहवर्तमान भगवान शंकर तुझ्या एका अंशावर दिसत असून, भगवंता! तुझें चतुर्भुजरूपहि मी तुझ्या विश्वरूपाचे ठिकाणी पाहत आहे॥ २६२॥ त्याचप्रमाणे कश्यपादि संपूर्ण ऋषींचीं कुळें, या तुझ्या विश्वरूपाचे ठिकाणी मी पाहत असून, नागासहवर्तमान अनेक पाताळलोकहि तुझ्या ठिकाणी पाहत आहे॥ २६३ ॥ हे त्रैलोक्यनाथा! किंबहुना तुझ्या एक एक अवयवरूप भिंतीचे ठिकाणी चवदा लोकांच्या चित्रांची आकृति चितारलेली दिसत आहे. ॥ २६४ ॥

आणि तेथिंचे जे जे लोक। ते चित्ररचना जी अनेक। ऐसें देखतसें अलौकिक। गांभीर्य तुझें॥ २६५ ॥

अर्थ—आणि त्या चवदा लोकांतील संपूर्ण प्राणी म्हणजे अनेक चित्रांची रचनाच होय. अशी मी तुझी असामान्य थोरवी पाहत आहे. ॥ २६५ ॥

अनेक बाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनन्तरूपम्। नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप॥ १६ ॥

अर्थ—सर्व ब्रह्मांडाचें नियमन करणाऱ्या विश्वरूपा जगन्नायका! तुझें हे अनेक बाहु, अनेक उदरें, अनेक मुखें अनेक डोळें असलेल्या तुला सर्वत्र अनंतरूपाने मी पाहत आहे. त्या तुझ्या विश्वरूपाला आदि, मध्य, तसेंच अन्त हे तिन्ही नाहीत हेहि मी पाहात आहे॥ १६ ॥

त्या दिव्यचक्षूंचेनि पैसें। चहूंकडे जंव पाहत असें। तंव दोर्दंडीं जैसें। आकाश कोंभैलें॥ २६६ ॥
तैसे एकेक निरंतर। देवा देखत असें तुझे कर। करीत आघवेचि व्यापार। एकेचि काळीं॥ २६७॥

अर्थ—हे देवा! तुवां दिलेल्या ज्ञानदृष्टीचा संपूर्ण विकास करून चोहोंबाजूला मी जों पाहूं लागलों, तों जणू काय आकाशाला कोंभ फुटावें असे तुझे दोन बाहु दिसत आहेत॥ २६६ ॥ त्याचप्रमाणें तुझा एक एक हात एकाचवेळीं अखंड सर्व व्यापार करीत आहे असें मी पाहात आहे॥ २६७॥

गूढार्थदीपिका—जीवाच्या मर्यादित स्वरूपामुळें व अल्पशक्ति मुळें, जीवाच्या ठिकाणीं कर्माचा किंवा व्यापाराचा आरंभादि क्रम दिसून पडतो आणि त्याच्या अल्पज्ञतेमुळें त्याचें ज्ञान भूत, भविष्य वर्तमान असे तिन्ही कालांनी विभागलें जातें. पण परमेश्वर सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् व सर्वव्यापक असल्यामुळे त्याचे ठिकाणी सर्व व्यापार व सर्व ज्ञानें एकदम एका वर्तमानकालींच असतात. परमेश्वराच्या शक्तिव्यापाराला व ज्ञानाला भूत, भविष्य, वर्तमान अशी कालाची मर्यादा नसते.

मग महाशून्याचेनि पैसारें। उघडलीं ब्रह्मकटाहाचीं भांडारें। तैसी देखतसें अपारें। उदरें तुझीं॥ २६८ ॥
जी सहस्त्रशीर्षं याचें दाखले। कोडीवरी होताति एकिवेळें। कीं परब्रह्मचि वदनफळें। मोडोनि आलें॥ २६९ ॥
तैसीं वक्त्रें जी जेउतीं तेउतीं। तुझीं देखतसें विश्वमूर्ती। आणि तयाचिपरी नेत्रपंक्ति। अनेका सैंघ॥ २७० ॥
हें असो स्वर्ग पाताळ। कीं भूमी दिशा अंतराळ। हे विवक्षा ठेली सकळ। मूर्तिमय देखतसें॥ २७१ ॥

अर्थ—परब्रह्म जेवढें अमर्याद आहे, तेवढेच त्याच्यावर भासणाऱ्या तुझ्या विश्वरूपाचीं उदरें, जणू काय अपार ब्रह्मांडाचीं भांडारें उघडल्याप्रमाणे दिसत आहेत॥ ३६८ ॥ अहो जी देवा! तुम्ही सहस्त्रशीर्ष आहांत, याची एकाच वेळीं कोट्यावधी प्रत्यंतरें येत आहेत किंवा जणुं काय परब्रह्मच मुखरूपी फळाने भरभराटून आले॥ ३६९ ॥ अशीं, हीं विश्वरूपा! तुझीं मुखें मी जिकडे तिकडे पाहांत आहे; त्याप्रमाणे डोळ्यांच्याही अनेक रांगा मी सर्वत्र पाहात

आहे ॥ २७० ॥ हें असूं दे. पण हा सर्व स्वर्ग, हे पाताळ किंवा ही भूमी, ह्या दिशा, हें आकाश, ही निरनिराळी भाषा वापरण्याची देखील सोय राहीली नाही. तुला संपूर्ण मूर्तिरूप मी पाहत आहे ॥ २७१ ॥

गूढार्थदीपिका—मूढ मृगांना, मृगजळ हें पाणीच वाटतें; म्हणून मनुष्य त्याला मृगजळ म्हणत असला, तरी त्याला तें जसें सूर्य प्रकाशाचें कंपन वाटतें. त्याप्रमाणे अज्ञानी जीवांना, भगवंताचें विश्वरूप अनेक प्रकारच्या वस्तूंनी भरलेलें जगत वाटत असलें, तरी ज्ञानीभक्ताला एक भगवानच सर्ववस्तुरूपाने दिसतो.

तुजवीण एकादियाकडे। परमाणुहि एतुला कोडें। अवकाशु पाहतसें परि न सांपडे। ऐसें व्यापिलें तुवां॥ २७२॥
इयें नानापरी अपरिमितें। जेतुलीं सांठविलीं होतीं महाभूतें। तेतुलाही पवाडु तुवां अनंतें। कोंदला देखतसें॥ २७३॥
ऐसा कवणे ठायाहूनि तूं आलासी। एथ बैसलासि कीं उभा आहासी। आणि तूं कवणिये मायेचिये पोटीं होतासी। तुझें ठाण केवढें॥ २७४॥
तुझें रूप वय कैसें। तुज पैलीकडे काय असे। तूं काइसयावरी आहासि ऐसें। पाहिलें मियां॥ २७५॥

अर्थ—तूं नाहीस अशी परमाणु इतकी सूक्ष्म तरी पोकळी कोठें आहे काय, हें मी कौतुकाने पाहत आहे, पण ती कोठें सांपडत नाही असे तुवां व्यापिलें आहे ॥ २७२ ॥ ही नाना प्रकारचीं जेवढी अपरिमित महाभूतें ब्रह्मांडांत सांठविली दिसत होती, तेवढाहि संपूर्ण विस्तार, अनंता! एका तुझ्यानेच भरलेला आहे असें मी पाहत आहे ॥ २७३ ॥ असा तूं विश्वव्यापक कोणत्या ठिकाणाहून आलास? येथे तूं बसला आहेस की उभा आहेस? तूं कोणत्या मातेच्या पोटी होतास? तुझें तें स्थान केवढें आहे?॥ २७४ ॥ तुझें रूप व वय कसें आहे? तुझ्या पलीकडे काय आहे? तू कशावर आहेस? हें मी संपूर्ण निरखून पाहिलें ॥ २७५ ॥

तंव देखिलें जी आघवेंचि। तरि आतां तुझा ठावो तूंचि। तूं कवणाचा नव्हेसि ऐसाचि। अनादि आयता॥ २७६॥

अर्थ—हें संपूर्ण मी पाहिलें, तेव्हा कळून आलें की तुझें स्थान तूंच आहेस-म्हणजे तुझ्याहून तुझे स्थान निराळे नाही. तूं कोणाचाहि नव्हेस-म्हणजे तूं कोणापासून उत्पन्न झाला नाहीस-असा तूं अनादि व सिद्ध आहेस ॥ २७६ ॥

गूढार्थदीपिका-तुझा ठाव तूंचि—"स भगव: कस्मिन्प्रतिष्ठित इति। स्वे महिम्नि" (छां. उ. ७-२४-१) या श्रुतीचाच हे चरण अनुवाद आहे.

तूं कवणाचा नव्हेसि ऐसाचि। अनादि आयता—विश्वरूपाचे ठिकाणी विश्वरूपाहून दुसऱ्या पदार्थाचा अनुभवच नाही, म्हणून दुसऱ्या कोणापासून त्याची उत्पत्ति मानतां येत नाही. अर्थात् "अनादि आयता" म्हणजे विश्वरूप हें उत्पत्तिरहित स्वत:सिद्ध वस्तुस्वरूप आहे असा अर्थ.

तूं उभा ना बैठा। दिघडु ना खुजटा। तुज तळीं वरी वैकुंठा। तूंचि आहासी॥ २७७॥
तूं रूपें आपणयांचि ऐसा। देवा तुझी तूंचि वयसा। पाठी पोट परेशा। तुझें तूं गा॥ २७८॥
किंबहुना आतां। तुझें तूंचि आघवें अनंता। हें पुढत पुढती पाहतां। देखिलें मियां॥ २७९॥

अर्थ—तूं उभा नाहीस किंवा बसला नाहीस. तूं उंच नाहीस, ठेंगणा नाहीस. भगवंता! तुझ्या खाली-वर सर्वत्र एक तूंच भरला आहेस ॥ २७७ ॥ देवा! तूं रूपाने आपल्यासारखाच आहेस-म्हणजे तूं जसा अपरिमित तसें तुझें रूपहि अपरिमित आहे. तूंच तुझें वय आहेस-म्हणजे तुला जशी मर्यादा नाही तशी तुझ्या विश्वरूपालाहि मर्यादा नाही व तुझें पाठ पोट तूंच आहेस म्हणजे तुझें पाठ पोट इत्यादि अवयवयुक्त शरीर तूंच आहेस ॥ २७८ ॥ किंबहुना आतां तुझें सर्व तूंच आहेस म्हणजे तूं जसा सच्चिदानंदस्वरूप तसें तुझें अवयवयुक्त शरीर सच्चिदानंदस्वरूप आहे असेच मी वारंवार पाहिलें आहे ॥ २७९ ॥

परि या तुझिया रूपाआंतु। जी उणीव एक असें देखतु। जे आदि मध्य अंतु। तिन्हीं नाहीं॥ २८०॥

अर्थ—पण या विश्वरूपांत एकच मला उणीव दिसत आहे, ती म्हणजे तुझ्या विश्वरूपाचे ठिकाणी आदि, मध्य, अन्त हे तिन्ही नाहीत ॥ २८० ॥

गूढार्थदीपिका-"अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्यय:" (गीता अ. १३-३१)

"ए एवाधस्तात्स उपरिष्टात्स पश्चात्स पुरस्तात्स दक्षिणत: स उत्तरत: स एवेदं इति" (छां. उ. ७-२५-१)

"स भूमि विश्वतो वृत्वा" (श्वे उ. ३-१४) इत्यादि श्रुतींतून भगवंताच्या नामरूपरहित निराकार-स्वरूपाचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत, तीच संपूर्ण लक्षणें, त्याच्या सगुणसाकार स्वरूपाचींहि असतात, हेंच माउलींनी वरील ओव्यांतून सांगितलें आहे.

एऱ्हवीं गिंवसिलें आघवां ठायीं। परि सोय न लाहेचि कहीं। म्हणोनि त्रिशुद्धी हे नाहीं। तिन्ही एथ॥ २८१॥
एवं आदिमध्यांतरहिता। विश्वेश्वरा अपरिमिता। तूं देखिलासि जी तत्त्वतां। विश्वरूपा॥ २८२॥
तुज महामूर्तीचियां आंगीं। उमटलिया पृथक् मूर्ती अनेगी। लेइलासि वानेंपरींची आंगी। ऐसा आवडतु आहासी॥ २८३॥
नाना पृथक् मूर्ती तिया द्रुमवेली। तुझां स्वरूपमहाचळीं। दिव्यालंकार फुलीं फळीं। सासिन्नलिया॥ २८४॥
हो कां जे महोदधी तूं देवा। जाहलासि तरंगीं मूर्ती हेलावा। कीं तूं वृक्षु एक बरवा। मूर्तिफळीं फळलासि॥ २८५॥
जी भूतीं भूतळ मांडिलें। जैसें नक्षत्रीं गगन गुढारले। तैसें मूर्तिमय भरलें। देखतसें तुझें रूप॥ २८६॥

अर्थ—तुला आदि, मध्य, अन्त कोठे आहेत, हे सर्व ठिकाणी मी निरखून पाहिलें, परंतु त्यांचा कोठे थांग लागत नाही; म्हणून हे तिन्ही तुझ्या ठिकाणीं नाहीत हे त्रिवार सत्य आहे॥ २८१॥ हे आदिमध्यान्तरहिता! हे सर्व ब्रह्माण्डाच्या नियंत्या! हे अमर्यादरूपा! हे विश्वरूपा! याप्रमाणे तूं खरोखर आहेस, हें मी पाहिलें॥ २८२॥ तुझ्या विश्वरूप महामूर्तीच्या आंगावर ज्या अनेक निरनिराळ्या मूर्ती प्रगट झाल्या आहेत त्या पाहतां, तूं नाना प्रकारची आंगडीं घातली आहेस, असा वाटतोस॥ २८३॥ किंवा नाना प्रकारच्या निरनिराळ्या मूर्ती ह्याच कोणी निरनिराळे वृक्ष व वेली असून, त्या तुझ्या विश्वरूपी महापर्वताचे ठिकाणी दिव्य अलंकाररूपी फळा-फुलांनी भरास आल्या आहेत॥ २८४॥ किंवा देवा! असेहि वाटते की तूं महासमुद्र असून, मूर्ती ह्या तुझेच तरंगरूप हेलकावे आहेत किंवा तूं एक सुंदर वृक्ष असून मूर्तीरूप फळांनी फलद्रूप झाला आहेस॥ २८५॥ अहो जी देवा! जशी पृथ्वी भूतांनी व्यापिली आहे किंवा आकाश नक्षत्रांनी भरलें आहे, त्याप्रमाणे तुझें विश्वरूप मूर्तीने भरलेलें मी पाहत आहे॥ २८६॥

जी एकेकीचां अंगप्रांतीं। होय जाय हें त्रिजगती। एवढियाही तुझां आंगीं मूर्ती। कीं रोमां जालिया॥ २८७॥
ऐसा पवाडु मांडूनि विश्वाचा। तूं कवण पां एथ कोणाचा। हें पाहिलें तंव आमुचा। सारथी तोचि तूं॥ २८८॥

अर्थ—देवा! काय सांगूं! तुझ्या आंगावर दिसणाऱ्या एका एका मूर्तीच्या एका एका अवयवावर हें त्रैलोक्य, उत्पन्न व नष्ट होत असून, एवढ्याहि मूर्ती तुझ्या आंगाचे ठिकाणी रोमाप्रमाणे दिसत आहेत॥ २८७॥ असा हा विश्वरूपाचा विस्तार मांडून राहिलेला तूं कोण व कोणाचा हे मी पाहिलें, तेव्हा आमचा जो सारथी श्रीकृष्ण, तोच तूं आहेस, असें दिसून आलें॥ २८८॥

गूढार्थदीपिका—आपल्या सारथि श्रीकृष्णाच्या एकदेशीयस्वरूपाचे ठिकाणीच अर्जुनाला विश्वरूपाचें दर्शन होत होतें, असें माउलीचें म्हणणें आहे. अर्थात् श्रीकृष्णस्वरूप व विश्वरूप असा या दोन्ही स्वरूपांचा प्रत्यय अर्जुनाला विश्वरूपदर्शनांत येत होता असें स्पष्ट दिसतें. यावरून भगवंताच्या एकदेशीय श्रीकृष्णस्वरूपाचा व विश्वरूपाचा केव्हाच विरोध नसतो व बीजवृक्षाप्रमाणे एकदेशीय श्रीकृष्णस्वरूपाचे ठिकाणी संपूर्ण विश्वरूप व विश्वरूपांत श्रीकृष्णस्वरूप समाविष्ट असते, असेंच सिद्ध होतें.

तरि मज पाहतां मुकुंदा। तूं ऐसाचि व्यापकु सर्वदा। भक्तानुग्रहें तया मुग्धा। रूपातें धरिसी॥ २८९॥

अर्थ—भगवंता! मला असें वाटतें की तूं असाच सदासर्वदा व्यापक आहेस, पण भक्तांवर प्रेमवृद्धिरूप अनुग्रह करण्याकरितां तू सुंदर गोजिरवाणें एकदेशीय श्रीकृष्णस्वरूप धारण करतोस॥ २८९॥

गूढार्थदीपिका—समुद्राचे कांठी उभे राहून समुद्राकडे पाहिले असतां, जसा तो विस्तीर्ण समुद्र मनुष्याच्या मर्यादित दृष्टीने मर्यादित पाहिला जातो, तरीपण, समुद्र विस्तीर्ण आहे, हें तो विसरत नसतो, त्याप्रमाणे भगवान सदा सर्वदा व्यापक असतो तरी भक्ताच्या प्रेमवृत्तीच्या मर्यादेमुळे, तो भक्ताकडून एकदेशीय घेतला जातो, तरीपण भक्त भगवंताचो व्यापकता विसरत नसतो. "प्रेम गली अति साकली तामे दो न समाय" प्रेमाची गल्ली अत्यंत अरुंद

असल्यामुळे भगवंताचें सगुणसाकारस्वरूपच, प्रेमाचा विषय होऊं शकतें, व्यापकस्वरूप होऊं शकत नाही; हेंच माउलींनी या ओवींत सांगितलें आहे.

कैसें चहूं भुजांचें सांवळें। पाहतां वोल्हावती मन डोळे। खेंव देऊं जाइजे तरि आकळे। दोहींचि बाहीं॥ २९०॥

अर्थ—तुझें तें चतुर्भुजरूप कसें सुंदर व गोजिरवाणें आहे की जें पाहतांक्षणीं मनाची व डोळ्यांची तृप्ति होते आणि प्रेमाने आलिंगन देऊं म्हटल्यास आम्हांला आपल्या दोन हातांनी ते कवटाळतां येतें॥ २९०॥

ऐसी मूर्ति कोडिसवाणी कृपा-। करूनि होसी विश्वरूपा। कीं आमुचियाचि दिठी सलेपा। जे सामान्यत्वें देखती॥ २९१॥

अर्थ—हे विश्वरूपा भगवंता! याप्रकारें आम्हां भक्तांवर कृपा करून, अशी ही गोजिरवाणी सगुण सांवळी मूर्ति धारण करतोस, पण आमची दृष्टिच अविद्येने दूषित असल्यामुळें आम्ही त्या तुझ्या सगुणस्वरूपाला सामान्य मनुष्याप्रमाणेच पांचभौतिक लेखतो॥ २९१॥

गूढार्थदीपिका—भगवंताच्या सगुण श्रीकृष्णस्वरूपाला सामान्यत्वाने-म्हणजे इतर अज्ञानी जीवाच्या शरीराप्रमाणे-पांचभौतिक जडविनाशी समजणाऱ्यांची दृष्टि अविद्यादोषाने दूषितच असते असें माउलीचें स्पष्ट म्हणणें आहे.

तरी आतां दिठीचा विटाळु गेला। तुवां सहजें दिव्यचक्षू केला। म्हणोनि यथारूपें देखवला। महिमा तुझा॥ २९२॥

अर्थ—परंतु देवा! तुम्ही सहज माझ्यावर कृपा करून जी ज्ञानदृष्टि दिली, त्या ज्ञानदृष्टिने माझ्या पूर्वदृष्टींतील अविद्येचा दोष नाहीसा झाल्यामुळे तुझ्या सगुणसाकारस्वरूपाचें यथार्थ ज्ञान होऊन, त्या सगुणस्वरूपाचा खरा महिमा आतां मला कळून आला॥ २९२॥

गूढार्थदीपिका—समर्थांनीहि "सगुण इच्छावें। आणि निर्गुण प्रतिपादावें। परि ते निर्गुणचि स्वभावें। सगुण होतें" (र. च. स. १५-१६) "परमेश्वराचे अनंत गुण। मनुष्यें काय सांगावीं खुण। परि ते अध्यात्मग्रंथश्रवण। होतां उमजे"॥ ४०॥ (दास. द. १८-४) या ओव्यांतून हाच आशय व्यक्त केला आहे.

परि मकरतुंडामागिलेकडे। होतासि तोचि तूं एवढें। रूप जाहलासि हें फुडें। वोळखिलें मियां॥ २९३॥

अर्थ—आणि मगराच्या तोंडाच्या आकाराप्रमाणे असलेल्या जुंवाच्या मागच्या बाजूला जे तुम्ही बसलां होता, त्याच तुम्ही एवढें विश्वरूप धारण केलें, हें मी पक्कें ओळखलें॥ २९३॥

किरीटिनं गदिनं चक्रिणं च तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम्।
पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ताद्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम्॥ १७॥

अर्थ—किरीट धारण केलेला, हातांत गदा व सुदर्शनचक्र असलेला, अत्यंत दैदीप्यमान, सर्वत्र ज्याचें तेज फांकलेले आहे असा अत्यंत तेजोराशी, दृष्टीने सर्वत्र पाहिला न जाणारा व अत्यंत प्रदीप्त झालेल्या अग्नीच्या व सूर्याच्या तेजाप्रमाणे तेजस्वी असलेला, प्रत्यक्षहि प्रमाणाने कळूं न शकणारा, अशा तुला मी पाहत आहे॥ १७॥

नोहे तोचि हा शिरीं। मुकुट लेइलासि श्रीहरी। परि आतांचें तेज आणि थोरी। नवल कीं बहु हें॥ २९४॥
तेंचि हें वरिलियेचि हातीं। चक्र परिजितया आयती। सांवरितासि विश्वमूर्ती। ते न मोडे खूण॥ २९५॥
येरीकडे तेचि हे नोहे गदा। आणि तळिलिया दोनी भुजा निरायुधा। वागोरे सांवरावया गोविंदा। संसरिलिया॥ २९६॥
आणि तेणेंचि वेगें सहसा। माझिया मनोरथासरिसा। जाहलासि विश्वरूपा विश्वेशा। म्हणोनि जाणें॥ २९७॥
परि कायसें बा हें चोज। विस्मयों करावयाहि पवाडु नाहीं मज। चित्त होऊनि जातसे निर्बुज। आश्चर्यें येणें॥ २९८॥
हें एथ आथी कां येथ नाहीं। ऐसें विवरों नये कांहीं। नवल अंगप्रभेची नवाई। कैसी कोंदली सैंघ॥ २९९॥
एथ अग्नीचीही दिठी करपत। सूर्य खद्योतु तैसा हारपत। ऐसें तीव्रपण अद्भुत। तेजाचें यया॥ ३००॥
हो कां जे महातेजाचिया महार्णवीं। बुडोनि गेली सृष्टि आघवी। कीं युगांतविजूंच्या पालवीं। झांकलें गगन॥ ३०१॥
नातरी संहार तेजाचिया ज्वाळा। तोडोनि माचु बांधला अंतराळा। आतां दिव्य ज्ञानाचिया डोळां। पाहवेना॥ ३०२॥
उजाळु अधिकाधिक बहुवसु। धडाडीत आहे अतिदाहसु। पडत दिव्यचक्षूंसही त्रासु। न्याहाळितां॥ ३०३॥
हो कां जे महाप्रळयींचा भडाडु। होता काळाग्निरुद्राचां ठायीं गूढु। तो तृतीयनयनाचा मढु। फुटला जैसा॥ ३०४॥

तैसें पसरलेंनि प्रकाशें। सैंघ पांचवनिया ज्वाळांचे वळसे। पडतां ब्रह्मकटाह कोळिसे। होत आहाती॥ ३०५॥
ऐसा अदभुत् तेजोराशी। जन्मा नवल म्यां देखिलासि। नाहीं व्याप्ती आणि कांतीसी। पारु जी तुझिया॥ ३०६॥

अर्थ—श्रीहरी भगवंता! तुझ्या चतुर्भुजमूर्तीच्या मस्तकावर जो मुकुट घातला जात असे, तोच हा आतां घातलेला मकुट नव्हे काय? पण आतां त्या मुकुटाचें तेज आणि थोरवी कांही अपूर्व आहे, हें नवल आहे॥ २९४॥ (हे विश्वरूपा भगवंता!) शत्रूच्या वधार्थ फिरविण्याकरितां जें चक्र तुझ्या वरच्या हातांत सज्ज असतें, तेंच तूं सांवरून धरीत आहेस, ती खूण नाहीशी झाली नाही॥ २९५॥ हे गोविंदा! दुसरीकडे जी गदा आहे ती, तीच नव्हे काय? आणि शस्त्ररहित असलेल्या खालच्या दोन्ही भुजा घोड्याचा लगाम धरण्याकरितां पुढें सरसाविल्या आहेत॥ २९६॥ आणि माझ्या इच्छेबरोबर हे विश्वेशा! आपण ''तेणेचि'' म्हणजे त्याच सगुण श्रीकृष्णरूपाने एकदम विश्वरूप झालांत, हे मला कळून आलें॥ २९७॥ पण कसें हें आश्चर्य पहा की या विश्वरूपाच्या दर्शनाने माझें चित्त दिङ्मूढ होऊन गेलें आहे आणि मला आश्चर्य करण्यापुरतीहि योग्यता राहिली नाही॥ २९८॥ हें विश्वरूप येथे आहे किंवा नाही, याचा माझें मन कांही विचार करूं शकत नाही, तुझ्या अंग्रप्रभेचें विलक्षण अपूर्वत्व असून, ती कशी सर्वत्र भरली आहे, पहा॥ २९९॥ या प्रभेपुढें अग्नीची दृष्टि देखील होरपळून जाईल, सूर्याचें तेज देखील काजव्याच्या तेजाप्रमाणे या प्रभेंत लोपून जाईल, असे या तुझ्या अद्‌भुत तेजाचें तीव्रपण आहे॥ ३००॥ असें वाटतें जणुं काय या तुझ्या महातेजाच्या समुद्रांत सर्व सृष्टि बुडून गेली आहे किंवा कल्पान्तसमयींच्या विजांच्या वस्त्रांनी सर्व आकाश झांकून टाकलें आहे॥ ३०१॥ किंवा सर्व सृष्टीचा प्रलयकालीं संहार करणाऱ्या ज्वाळा तोडून जणुं काय आकाशांत माळाच बांधला; म्हणूनच आतां ह्या माझ्या दिव्यदृष्टीनेहि तें तेज पाहवत नाही॥ ३०२॥ तें तेज अधिकाधिक फार वाढून अत्यंत दाहक होत आहे व तें पाहतांना माझ्या दिव्यचक्षूलाहि त्रास होत आहे॥ ३०३॥ असें वाटते की महाप्रलयांतील महातेजाचा भडका, काळाग्निरुद्राच्या ठिकाणी जो गुप्त होता, तो तृतीय नेत्ररूप तेजाचा सांठाच जणुं काय बाहेर पडला॥ ३०४॥ तशा त्या सर्वत्र पसरलेल्या तेजाने संपूर्ण पांचही अग्नीच्या (गार्हपत्य, आहवनीय, दाक्षिणाग्नि, सभ्य आणि आवसथ्य असे पांच अग्नि) ज्वाळांचे वेढे पडल्यामुळे सर्व ब्रह्मांडाचे कोळसे होत आहेत॥ ३०५॥ याप्रमाणे जणुं काय अद्भुत तेजाची राशीच असा अत्यंत आश्चर्यकारक, मी तुला जन्मापासून आजच पाहत आहे. या तुझ्या व्याप्तीला व कान्तीला मर्यादाच नाही॥ ३०६॥

त्वमक्षरं परमं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य परं निधानम्। त्वमव्यय: शाश्वतधर्मगोप्ता सनातनस्त्वं पुरुषो मतो मे॥ १८॥
अनादिमध्यान्तमनन्तवीर्यमनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम्। पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम्॥ १९॥
द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वा:। दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन्॥ २०॥

अर्थ—देवा! सर्व जाणण्यायोग्य वस्तुमध्ये श्रेष्ठ, प्रकृतीच्याहि पलीकडे असलेलें जें अविनाशी परब्रह्म, तें तूं आहेस. संपूर्ण विश्व सांठविण्याचें श्रेष्ठ ठिकाण तूंच आहेस. तूं कधीहि नाश पावणारा नसून, या शाश्वत, सनातन वैदिक धर्माचा संरक्षण करणारा तूंच आहेस आणि ज्याला सनातन पुराणपुरुष म्हणतात, तोहि तूंच आहेस, हे मला कळून आलें॥ १८॥ तूं आदि, मध्य, अन्त रहित असून, अगाध सामर्थ्यवान आहेस. तुला अनंत बाहु आहेत. चंद्र व सूर्य हे तुझे नेत्र आहेत. पेटलेल्या अग्निप्रमाणे तुझें मुख आहे. आपल्या तेजाने या संपूर्ण विश्वाला तूं संतप्त करीत आहेस, असें मी पाहत आहे॥ १९॥ हे महात्म्या! स्वर्ग, पृथ्वी यांच्यामधील संपूर्ण अंतराळ प्रदेश व संपूर्ण दिशा त्वां एकट्यानेच व्यापिल्या आहेत. हें तुझें अत्यंत अद्‌भुत उग्र विश्वरूप पाहून तिन्ही लोक अत्यंत भयभीत व व्याकुळ झाले आहेत.॥ २०॥

देवा तूं अक्षर। औटाविये मात्रेसि पर। श्रुती जयाचें घर। गिंवसीत आहाती॥ ३०७॥

अर्थ—देवा! वेद ज्या तुझ्या ठिकाणाचा शोध करीत आहे, तो तूं अविनाशी असून ओंकाराच्या साडेतीन मात्रेच्या पलीकडे आहेस-म्हणजे ॐकारालाहि तूं अगम्य आहेस॥ ३०७॥

गूढार्थदीपिका—निर्गुण स्वरूपाप्रमाणे परमेश्वराचे सगुणस्वरूपहि शब्दाला अगम्य आहे असा अर्थ.

जें आकाराचें आयतन। जे विश्वनिक्षेपैक-निधान। तें अव्यय तूं गहन। अविनाश जी॥ ३०८॥
तूं धर्माचा वोलावा। अनादिसिद्ध तूं नित्य नवा। जाणें मी सदतिसावा। पुरुष विशेष तूं॥ ३०९॥

अर्थ—तूं सर्व आकारांचा आश्रय आहेस म्हणजे सर्व नामरूपें तुझ्यावरच भासतात. संपूर्ण विश्व सांठविण्याचें एकमेव, नाश न पावणारे असे अविनाशी व अपार असें स्थान तूंच आहेस॥ ३०८॥ तूं धर्माचे जीवन असून, तूं अनादि, स्वत:सिद्ध व नित्य नूतन आहेस. प्रकृतिजन्य छत्तीस तत्वांच्या पलीकडे सदतिसावा विशेष पुरुष म्हणून जो सांगितला आहे, तो तूं आहेस, हें मी आतां जाणलें॥ ३०९॥

गूढार्थदीपिका—सांख्यशास्त्राच्या मतें पुरुष सोडून, कार्यप्रपंच म्हणून जी चोवीस तत्वें सांगितलीं आहेत, त्यांच्या थोडा विस्तार करून, माउलींनी छत्तीस तत्वें मानली आहेत. हीं छत्तीस तत्वें पुढें तेराव्या अध्यायांत क्षेत्राचें वर्णन करतांना सांगितलीं आहेत. आणि सांख्यांत जसा चोवीस तत्वाव्यतिरिक्त पंचविसावा पुरुष मानला आहे, तसा येथे छत्तीस तत्वाव्यतिरिक्त सदतिसावा पुरुष म्हणून, विश्वरूपाला मानलें आहे. या प्रतिपादनानें भगवंताचीं सगुण व निर्गुण हीं दोन्हीं रूपें छत्तीस तत्वांच्या पलीकडे असल्यामुळे तीं त्रिगुणात्मक मायारहित किंवा अविद्यारहित आहेत, असें सुचविलें आहे.

तू आदिमध्यांतरहितु। स्वसामर्थ्ये तूं अनंतु। विश्वबाहु अपरिमितु। विश्वचरण तूं॥ ३१०॥
पैं चंद्र चंडांशु डोळां। दावितासि कोपप्रसाद लीळा। एकां रुससी तमाचां डोळां। एकां पाळितोसि कृपादृष्टी॥ ३११॥
जी एवंविधा तूंते। मी देखतसें हें निरुतें। पेटले प्रळयाग्नीचें उजितें। तैसें वक्त्र हें तुझें॥ ३१२॥
वणिवेनि पेटले पर्वत। कवळूनि ज्वाळांचे उभड उठत। तैसी चाटीत दाढा दांत। जीभ लोळे॥ ३१३॥
इये वदनींचिया उबा। आणि जी सर्वांगकांतीचिया प्रभा। विश्व तातलें अति क्षोभा। जात आहे॥ ३१४॥
कां जे द्योर्लोक आणि पाताळ। पृथिवी हन अंतराळ। अथवा दशदिशा समाकुळ। दिशाचक्र॥ ३१५॥
हें आघवेंचि तुवां एकें। भरलें देखत आहे कौतुकें। परि गगनाहीसकट भयानकें। आप्लविजे जेवीं॥ ३१६॥

अर्थ—तुला आदि, मध्य, अंत नाहीत. स्वत:च्या सामर्थ्याच्या दृष्टीने तूं अनंत आहेस-म्हणजे तुझें सामर्थ्य अपरिमित आहे. सर्वत्र अपरिमित असे तुझे बाहु व चरण आहेत॥ ३१०॥ तूं आपल्या सूर्य व चंद्र या डोळ्यांनी कोप व अनुग्रह अशी लीला दाखवितोस. सूर्यरूपी क्रुद्ध (तीक्ष्ण) डोळ्याने कोणावर रुसून नाश करतोस, तर चंद्ररूपी डोळ्याने कोणावर कृपा करून त्याचें संरक्षण करतोस॥ ३११॥ भगवंता! याप्रमाणेच खरोखर मी तुला पाहत आहे. जणुं काय प्रलयांतील पेटलेल्या अग्नीचा लखलखाटच, असें हें तुझें मुख दिसत आहे॥ ३१२॥ जंगलांत लागलेल्या अग्नीने पर्वत पेटून जशा सर्व ज्वाला मिळून त्यांचा एकच भडका उठावा, त्याप्रमाणे दांत व दाढा चाटीत जीभ तोंडात सारखी फिरत आहे॥ ३१३॥ या तुझ्या मुखांतील ज्वाळांच्या उष्णतेने आणि तुझ्या सर्वांगाच्या अदभुत तेजाने संपूर्ण विश्व होरपळून गेलें असून अत्यंत व्याकूळ होत आहे॥ ३१४॥ कारण स्वर्ग, पाताळ, पृथ्वी आणि अंतराळ अथवा दशदिशासहित संपूर्ण दिङ्मंडळ, आकाशासहित हें संपूर्ण विश्व बुडवून टाकावे, त्याप्रमाणे तूं आपल्या एका भयंकर मुखांत सहज भरलें आहेस असे मी आश्चर्यचकित होऊन पाहत आहे.॥ ३१५-३१६॥

नातरी अद्भुतरसाचां कल्लोळीं। जाहली चवदाही भुवनांसि कडियाळी। तैसें आश्चर्यचि मग मी आकळीं। काय एक॥ ३१७॥
नावरे व्याप्ती हे असाधारण। न साहवें रूपाचें उग्रपण। सुख दूरी गेलें परी प्राण। विपायें धरी जग॥ ३१८॥
देवा ऐसे देखोनियां तूंतें। नेणों कैसें आलें भयाचें भरितें। आतां दु:खकल्लोळीं झळंबतें। तीन्हीं भुवनें॥ ३१९॥
एऱ्हवीं तुज महात्मयाचें देखणें। तरि भयदु:खासि कां मेळवणें। परि हें सुख नव्हेचि जेणें गुणें। तें जाणवत आहे मज॥ ३२०॥
जंव तुझें रूप नोहे दिठें। तंव जगासि संसारिक गोमटें। आतां देखिलासि तरी विषयविटें। उपनला त्रासु॥ ३२१॥
तेवींचि तुज देखिल्यिासाठीं। काइ सहसा तुज देवों येईल मिठी। आणि नेदीं तरी संकटीं। राहों केवीं॥ ३२२॥
म्हणोनि मागां सरों तंव संसारु। आडवीत येतसे अनिवारु। आणि पुढां तूं तंव अनावरु। न येसि घेवों॥ ३२३॥

अर्थ—किंवा अदभुतरसाच्या कल्लोळांनी चवदाहि भुवनाला जसा वेढा दिला तसेच मीहि एक काय तें

आश्चर्यच अनुभवित आहे (एका आश्चर्याशिवाय मला कांही दिसत नाही असा अर्थ) ॥ ३१७ ॥ तुझा हा असामान्य व्यापकपणा आकलन होत नाही व तुझ्या रूपाचें उग्रपणहि सहन करवत नाही. सुख होणे तर दूरच राहिलें; पण जगाला प्राण धारण करणें देखील कठीण झालें आहे ॥ ३१८ ॥ देवा! तुझ्या अशा विश्वस्वरूपाला पाहून अशी भयंकर भीति कां वाटत आहे हें सांगवत नाही; पण हें संपूर्ण त्रिभुवन या दु:खाच्या लाटामध्ये गटांगळ्या खात आहे ॥ ३१९ ॥ खरोखर पाहतां, तुज माहात्म्याच्या दर्शनाने भीतिरूप दु:खांची प्राप्ति कां व्हावी? पण ज्या गुणामुळे या विश्वरूपदर्शनाचें सुख होत नाही, तो गुण मलाहि कळून येत आहे ॥ ३२० ॥ जोपर्यंत तुझें हें विश्वरूप दृष्टीस पडत नाही, तोपर्यंत जीवांना संसारसुखच गोड वाटतें आणि आतां तुझ्या विश्वरूपदर्शनाने विषयसुखाचा वीट येऊन विषयांचा कंटाळा उत्पन्न झाला आहे ॥ ३२१ ॥ त्याचप्रमाणे तुझ्या भयंकर रूपाला पाहिल्यानंतर एकदम तुला प्रेमाने मिठी मारतां येईल काय? आणि प्रेमाने मिठी मारतां येणार नाही, तर त्यावांचून विरहशोकसंकटात तरी कसें राहायचें!॥ ३२२ ॥ म्हणून तुजपासून मागें सरावें, तर हा अनिवार संसार मागें फिरूं देत नाही आणि समोर तुझें अनिवार स्वरूप आकलन करतां येत नाही ॥ ३२३ ॥

गूढार्थदीपिका—एकदेशीय सगुणाच्या प्रेमभक्तिवांचून त्रिगुणमायारहित व्यापक स्वरूपाच्या प्राप्तीचा प्रयत्न केवळ दु:खदायीच होतो हें येथे दाखविलें आहे. कारण वैराग्याने विषयाचा कंटाळा येतो आणि व्यापक स्वरूपावर प्रेम करतां येत नाही, अशा रीतीने साधक दु:खच भोगत राहतो.

ऐसा माझारिलीं सांकडां। बापुड्या त्रैलोक्याचा होतसे हुरडा। ऐसा हा ध्वनि जी फुडा। चोजवला मज ॥ ३२४ ॥
जैसा आरंबळला आगीं। समुद्रा ये निवावयालागीं। तंव कल्लोळपाणियाचिया तरंगीं। आगळा बिहे ॥ ३२५ ॥
तैसें या जगासि जाहलें। तूंतें देखोनि तळमळित ठेलें। यामाजीं पैल भले। ज्ञानसुरांचे मेळावे ॥ ३२६ ॥

अर्थ—याप्रमाणे संसारांचें भय आणि विश्वरूपाचें भय या दोन संकटाच्या कात्रींत सांपडलेल्या बिचाऱ्या त्रैलोक्याचा होरपळा होत आहे, असा आशय मला स्पष्ट कळला आहे ॥ ३२४ ॥ ज्याप्रमाणे अग्नीने होरपळलेला मनुष्य, शरीराचा दाह नाहीसा करण्याकरितां, समुद्रावर जातो आणि त्या समुद्रावर उठणाऱ्या भयंकर लाटांना पाहून, तो अत्यंत भितो ॥ ३२५ ॥ त्याप्रमाणे या संपूर्ण त्रैलोक्याला झालें असून, तुला पाहून, तें अत्यंत तळमळत आहे. यामध्यें पलीकडे मोठमोठे ज्ञानियांचे मेळावेहि आहेत ॥ ३२६ ॥

अमी हि त्वां सुरसङ्घा विशन्ति केचिद्भीताः प्राञ्जलयो गृणन्ति।
स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसङ्घाः स्तुवन्ति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः ॥ २१ ॥

अर्थ—हे सुरांचे समुदाय तुझ्यांत प्रविष्ट होत आहेत, कित्येक भयभीत होऊन व हात जोडून तुझी प्रार्थना करीत आहेत, आणि महर्षि, सिद्ध यांचे समुदाय 'तुझें कल्याण असो' असें म्हणून नानाप्रकारच्या स्तुतींनी तुझें स्वतन करीत आहेत ॥ २१ ॥

हे तुझेनि आंगिकें तेजें। जाळूनि सर्व कर्मांचीं बीजें। मिळत तुजआंतु निजें। सद्भावेंसीं ॥ ३२७ ॥

अर्थ—हे देवांचे समुदाय, तुझ्या आंगच्या तेजानें आपल्या सर्व कर्मांची बीजें जाळून आपल्या सद्भावाने तुझ्यांत मिळत आहेत ॥ ३२७ ॥

गूढार्थदीपिका—तुझेनि आंगिकें तेजें। जाळूनि सर्व कर्मांचीं बीजें—चैतन्य प्रकाशरूप परमेश्वराचे ठिकाणी, त्यावांचून कर्म म्हणून दुसरी वस्तुच नाही, या ज्ञानाने किंवा कर्मरूपानेहि परमेश्वरच भासतो, या ज्ञानाने भगवदाज्ञा समजून भगवत्प्रीत्यर्थ निष्काम कर्मयोगानुष्ठान करून आपलें कर्मकर्तृत्व नि:शेष नाहीसे करतात.

आणिक एक साविया भयभीरु। सर्वस्वें धरूनि तुझी मोहरु। तुज प्रार्थिताति करु। जोडोनियां ॥ ३२८ ॥
देवा अविद्यार्णवीं पडिलों। जी विषयवागुरें आतुडलों। स्वर्गसंसाराचां सांकडलों। दोन्हीं भागीं ॥ ३२९ ॥
ऐसें आमुचें सोडवणें। तुजवांचोनि कीजेल कवणें। तुज शरण गा सर्वप्राणें। म्हणत देवा ॥ ३३० ॥
आणि महर्षी अथवा सिद्ध। कां विद्याधरसमूह विविध। हे बोलत तुज स्वस्तिवाद। करिती स्तवन ॥ ३३१ ॥

अर्थ—आणि कित्येक खरोखरच भयभीत होऊन व सर्वस्वीं तुझ्याकडे दृष्टि देऊन, हात जोडून तुझी प्रार्थना करीत आहेत की॥ ३२८ ॥ देवा! आम्हीं तुला निःशेष विसरलों आहों व विषयासक्तिरूप जाळ्यांत सांपडलों आहों. त्यामुळें स्वर्गसुख व संसारसुख या दोहोंच्या कात्रींत अडकून पडलों आहो॥ ३२९ ॥ अशा आमची, येथून सुटका आतां तुझ्यावांचून कोण करणार? देवा! आम्ही तुलाच पंचप्राण समर्पण करून शरण आलों आहों, असे म्हणत आहेत॥ ३३० ॥ आणि महर्षि अथवा सिद्ध, तसेच नानाविध विद्याधरांचे समुदाय ''तुझें कल्याण असो'' असे म्हणून तुझें स्तवन करीत आहेत॥ ३३१ ॥

रुद्रादित्या वसवो ये च साध्या विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च।
गन्धर्वयक्षासुरसिद्धसङ्घा वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे॥ २२॥

अर्थ—रुद्र, आदित्य, वसु, साध्य, विश्वदेव, अश्विनीकुमार, मरुद्गण, पितर, गंधर्व, यक्ष, असुर, सिद्ध, यांचे समुदाय हे सर्व अत्यंत आश्चर्यचकित होऊन तुला पाहात आहेत॥ २२ ॥

हे रुद्रादित्यांचे मेळावे। वसु हन साध्य आघवे। अश्विनौदेव विश्वेदेव विभवें। वायुही हे जी॥ ३३२ ॥
अवधारा अग्नि हन गंधर्व। पैल यक्षरक्षोगण सर्व। जी महेंद्रमुख्य देव। कां सिद्धादिक॥ ३३३ ॥
हे आघवेची आपुलांलिया लोकीं। सोत्कंठित अवलोकीं। हे महामूर्ती दैविकी। पाहात आहाती॥ ३३४ ॥
मग पाहात पाहात प्रतिक्षणीं। विस्मित होऊनि अंतःकरणीं। करित निजमुकुटीं वोवाळणी। प्रभुजी तुज॥ ३३५ ॥
ते जयजय घोष कलरवें। स्वर्ग गाजविताती आघवे। ठेवित ललाटावरी बरवे। करसंपुट॥ ३३६ ॥
तिये विनयद्रुमाचिये आरवीं। सुरवाडली सात्त्विकांची माधवी। म्हणोनि करसंपुटपल्लवीं। तूं होतासि फळ॥ ३३७ ॥

अर्थ—अकरा रुद्रांचा समूह, बारा सूर्याचा समूह, आठ वसु, सर्व साध्य, अश्विनीकुमार, वैभवाने युक्त असे विश्वदेव, तसेच वायु॥ ३३२ ॥ पहा! पितर, गंधर्व, पलीकडें असलेले यक्षराक्षसगण, इंद्रादिदेव आणि सिद्धादिक॥ ३३३ ॥ हे सर्वच आपआपल्या लोकांमध्ये अत्यंत उत्कंठित होऊन तुझ्या या दैवी महामूर्तीकडे पाहत आहेत, हे पहा॥ ३३४ ॥ मग पाहत पाहत क्षणोक्षणीं अंतःकरणांत आश्चर्यचकित होऊन, आपल्या शिरावर असलेल्या मुकुटांची तुझ्यावरून ओवाळणी करीत आहेत॥ ३३५ ॥ ते, मंजुळ शब्दांनी तुझा जयघोष करून, संपूर्ण स्वर्ग दुमदुमून टाकीत आहेत आणि सुंदर जोडलेले हात ते मस्तकावर ठेवित आहेत॥ ३३६ ॥ त्या अत्यंत नम्रतारूप वृक्षाच्या अरण्यांत. सात्विक गुणांच्या वसंतऋतूचें ऐश्वर्य प्रगट झालें; म्हणून त्यांच्या जोडलेल्या हस्तरूपी पदरांत फळरूपाने तूं प्राप्त होतोस॥ ३३७ ॥

रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं महाबाहो बहुबाहूरुपादम्।
बहूदरं बहुदंष्ट्राकरालं दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाहम्॥ २३ ॥

अर्थ—हे आजानुबाहो कृष्णा! ज्याला असंख्य मुखें व नेत्र आहेत, तसेंच असंख्य बाहु, मांड्या व पाय आहेत, ज्याला असंख्य उदरें आहेत व जें असंख्य दाढांनी विक्राळ झालें आहे, असें तें तुझें भयंकर रूप पाहून संपूर्ण त्रैलोक्यांतील प्राणी व मी देखील अत्यंत भयभीत झालों आहे॥ २३ ॥

जी लोचना भाग्य उदेलें। जीवा सुखाचें सुयाणें पाहलें। जे अगाध तुझें देखिलें। विश्वरूप इहीं॥ ३३८ ॥
हें लोकव्यापक रूपडें। पाहतां देवांही वचकु पडे। याचें सन्मुखपण जोडे। भलतयाकडुनी॥ ३३९ ॥
ऐसें एकचि परि विचित्रें। आणि भयानकें तेवींचि बहु वक्त्रें। बहुलोचन हे सशस्त्रें। अनंतभुजा॥ ३४० ॥
अनंत ऊरु बाहु चरण। बहु उदर आणि नानावर्ण। कैसें प्रतिवदनीं मातलेपण। आवेशाचें॥ ३४१ ॥
हो कां जे महाकल्पाचां अंतीं। तवकलेनि यमें जेउतंतेउतीं। प्रळयाग्नीचीं उजितीं। आंबुखिलीं जैसीं॥ ३४२ ॥
नातरी संहारत्रिपुरारीचीं यंत्रें। कीं प्रळयभैरवांचीं क्षेत्रें। नाना युगांतशक्तीचीं पात्रें। भूतखिचा वोढविलीं॥ ३४३ ॥
तैसीं जियेतियेकडे। तुझीं वक्त्रें जी प्रचंडें। न समाती दरीमाजीं सिंहाडें। तैसे दांत दिसती रागीट॥ ३४४ ॥
जैसें काळरात्रीचेनि अंधारें। उल्हासत निघती संहारखेचरें। तैसिया वदनीं प्रळयरुधिरें। काटलिया दाढा॥ ३४५ ॥
हें असो काळें अवंतिलें रण। कां सर्वसंहारें मातलें मरण। तैसें अति भिंगुळवाणेंपण। वदनीं तुझिये॥ ३४६ ॥

हे बापडी लोकसृष्टी। मोटकीये चि पाहिली दिठी। आणि दु:खकालिंदीचिया तटीं। झाड होऊनि ठेली॥ ३४७॥
तुज महामृत्यूचिया सागरीं। आतां हे त्रैलोक्यजीविताची तरी। शोकदुर्वातलहरी। आंदोळत असे॥ ३४८॥
एथ कोपोनि जरी वैकुंठें। ऐसें हन म्हणिपैल अवचटें। जें तुज लोकांचे काइ वाटे। तूं ध्यानसुख हें भोगी॥ ३४९॥
तरी जी लोकांचें कीर साधारण। वायां आड सूतसे वोडण। केवीं सहसा म्हणों प्राण। माझेचि कांपती॥ ३५०॥
ज्या मज संहाररूद्र वासिपे। ज्या मजभेणें मृत्यु लपे। तो मी अहाळबाहळीं कांपें। ऐसें तुवां केलें॥ ३५१॥
परि नवल बापा हे महामारी। इया नाम विश्वरूप जरी। हें भ्यासुरपणें हारी। भयासि आणी॥ ३५२॥

अर्थ—अहो जी भगवंता! मन व डोळे यांनी जें तुझें अगाध विश्वरूप पाहिलें, तें डोळ्यांचे भाग्य उदयाला आलें व मनाने सुखाचा सुकाळ पाहिला॥ ३३८॥ हें तिन्ही लोकांना व्यापून असणारें तुझें विश्वरूप पाहतांना देवांनाहिं धाक उत्पन्न होतो आणि कोणालाहि तें सन्मुखच वाटतें॥ ३३९॥ याप्रमाणे हें तुझें विश्वरूप एकच पण विचित्र आणि भयानक अशा असंख्य मुखांनी, असंख्य नेत्रानी व शस्त्रयुक्त अनंत भुजांनी युक्त आहे॥ ३४०॥ या विश्वरूपाचे ठिकाणी असंख्य उर, बाहू व चरण असून बहु उदरें आणि नाना वर्ण आहेत आणि प्रत्येक मुखाचे ठिकाणी खाण्याच्या आवेशाचा माज कसा दिसून येतो, पहा!॥ ३४१॥ जणुं काय महाकल्पाच्या शेवटीं क्रुद्ध झालेल्या यमाने जिंकडे तिकडे प्रलयकालच्या अग्नीच्या होळ्याच पसरल्या आहेत॥ ३४२॥ किंवा ती सृष्टि संहार करणाऱ्या शंकराचीं शस्त्रास्त्रेंच. की प्रलयकालच्या भैरवाचीं शरीरेंच किंवा युगाचा अंत करणाऱ्या शक्तीचीं सोंगे भूतांचा नाश करण्याकरितां प्राप्त झाली॥ ३४३॥ त्याप्रमाणे जिकडे तिकडे तुझीं असलेलीं भयंकर मुखें मावत नाहीत आणि तसेंच त्यांतील दांत दरीतील क्रुद्ध सिंहाप्रमाणे रागीट दिसतात॥ ३४४॥ ज्याप्रमाणे प्रलयकाळाच्या गदड अंधाराचा आश्रय करून प्राण्यांचा नाश करणारी पिशाच्चें अत्यंत उल्हासाने वावरतात, त्याप्रमाणे तुमच्या मुखांतील दाढा, जणुं काय प्रलयकालीं संहार पावणाऱ्या प्राण्यांच्या रक्ताने माखलेल्या आहेत॥ ३४५॥ हे असो, काळानेच युद्धाला आमंत्रण दिल्याप्रमाणे किंवा सर्व प्राण्यांचा संहार करून मरणाने माजावें, त्याप्रमाणे तुझ्या या मुखांचा देखावा अत्यंत भयंकर दिसत आहे॥ ३४६॥ ही बिचारी सृष्टि, तूं सहज दृष्टीने पाहिलीस आणि ती दु:खरूपी यमुनानदीच्या तीरावरील कालियासर्पाच्या विषाने करपलेल्या वृक्षाप्रमाणे होऊन राहिली आहे॥ ३४७॥ तुझ्या या महामृत्यूच्या सागरांत, त्रैलोक्याच्या आयुष्याची नौका, दु:खरूपी वादळांतील लाटांनी हेलकावे खात आहे॥ ३४८॥ या माझ्या म्हणण्याचा राग येऊन, भगवंता! आपण, जर कदाचित असे म्हणाल की, तुला या लोकांचे काय उगीच वाईट वाटत आहे! तूं माझ्या विश्वरूप ध्यानाचें सुख भोग॥ ३४९॥ पण खरोखर देवा! भीतीने माझ्या जीवाचा थरकाप झाला आहे, असे मी एकदम कसें म्हणूं? म्हणूनच मी, व्यर्थ लोकांच्या दु:खांचे सामान्य निमित्त पुढें करीत आहे॥ ३५०॥ ज्या मला सृष्टीचा संहार करणारा रुद्र भितो, ज्या मला भिऊन मृत्युदेखील तोंड लपवितो. त्या मलाहि अत्यंत थरकांप सुटावा, असा विश्वरूप तूं झाला आहेस॥ ३५१॥ पण याला विश्वरूप हें जरी नांव आहे, तरी भगवंता! ही विलक्षण महामारी आहे. हें विश्वरूप, आपल्या भयंकर विक्राळ स्वरूपामुळे साक्षात् भयालाही हार खायला लावणारें आहे॥ ३५२॥

नभ:स्पृशं दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम्।
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा धृतिं न विन्दामि शमं च विष्णो॥ २४॥

अर्थ—हे भगवंता! ज्यांनी आकाशाला स्पर्श केला आहे, ज्यांत प्रज्वलित अशीं अनेक वर्णयुक्त पसरलेलीं तोंडें आहेत, ज्यांत प्रज्वलित व विशाल नेत्र आहेत, अशा रूपाने युक्त असलेल्या तुला पाहून माझें अंत:करण अत्यंत दु:खित झाल्यामुळे त्याला धैर्य व सुख प्राप्त होत नाही॥ २४॥

ठेलीं महाकाळेंसी हटेंतटें। तैसीं कितीएकें मुखें रागिटें। इहीं वाढोनियां धाकुटें। आकाश केलें॥ ३५३॥
गगनाचेनि वाडपणें नाकळे। त्रिभुवनींचियाही वारिया न वेंटाळे। ययाचेनि वाफा आगी जळे। कैसें धडाडीत असे॥ ३५४॥
तेवींचि एकासरिखें एक नोहे। एथ वर्णावर्णाचा भेदु आहे। हो कां जे प्रळयीं सावावो लाहे। वह्नी ययाचा॥ ३५५॥

जयाचिये आंगींची दीप्ती येवढी। जे त्रैलोक्य कीजे राखोंडी। कीं तयाही तोंडें आणि तोंडीं। दांत दाढा॥ ३५६॥
कैसा वारया धनुर्वात चढला। समुद्र कीं महापूरीं पडिला। विषाग्नि मारा प्रवर्तला। वडवानळासी॥ ३५७॥
हळाहळ अग्नि पियालें। नवल मरण मारा प्रवर्तले। तैसें संहारतेजा या जाहलें। वदन देखा॥ ३५८॥
परि कोणें मानें विशाळ। जैसें तुटिलिया अंतराळ। आकाशासि कव्हळ। पडोनि ठेलें॥ ३५९॥
नातरी काखें सूनि वसुंधरी। जैं हिरण्याक्षु रिगाला विवरीं। तैं उघडलें हाटकेश्वरीं। जेवीं पाताळकुहर॥ ३६०॥
तैसा वक्त्रांचा विकास। माजीं जिव्हांचा आगळाचि आवेशु। विश्व न पुरे म्हणोनि घांसु। न भरीचि कोडें॥ ३६१॥
आणि पाताळव्याळांचियां फूत्कारीं। गरळज्वाळा लागती अंबरीं। तैसी पसरलिये वदनदरी-। माजीं हे जिव्हा॥ ३६२॥
काढूनि प्रळयविजूंचीं जुंबाडें। जैसे पन्नासिले गगनाचे हुडे। तैसे आवाळुवांवरीं आंकडे। धगधगीत दाढांचे॥ ३६३॥
आणि ललाटपटाचिये खोळे। कैसे भयातें भेडविताती डोळे। हो कां जे महामृत्यूचे उमाळे। कडवसां राहिले॥ ३६४॥
ऐसें दाऊनि भयाचें भोज। एथ काय निपजवूं पाहतोसि काज। तें नेणें परी मज। मरणभय आलें॥ ३६५॥
देवा विश्वरूप पहावयाचे डोहळे। केले तियें पावलों प्रतिफळें। बापा देखिलासि आतां डोळे। निवावे तैसे निवाले॥ ३६६॥
अहो देहो पार्थिव कीर जाये। ययाची काकुळती कवणा आहे। परि आतां चैतन्य माझें विपायें। वाचें की न वांचे॥ ३६७॥
एऱ्हवीं भयास्तव आंग कांपे। नावेक आगळें तरि मन तापे। अथवा बुद्धीही वासिपे। अभिमानु विसरिजे॥ ३६८॥
परि येतुलियाही वेगळा। जो केवळ आनंदैककळा। तया अंतरात्मयाही निश्चळा। आली शियारी॥ ३६९॥
बाप साक्षात्काराचा वेधु। कैसा देशधडी केला बोधु। हा गुरुशिष्यसंबंधु। विपायें नांदे॥ ३७०॥
देवा तुझ्या ये दर्शनीं। जें वैकल्य उपजलें आहे अंतःकरणीं। तें सांवरावयालागीं गंवसणी। धैर्याची करितसें॥ ३७१॥
तंव माझेनि नामें धैर्य हारपलें। कीं तयाहीवरी विश्वरूपदर्शन जाहलें। हें असो परि मज भलें आतुडविलें। उपदेशाइया॥ ३७२॥
जीव विसंवावयाचिया चाडा। सैंघ धांवाधांवी करितसे बापुडा। परि सोय ही कवणेकडा। न लभे एथ॥ ३७३॥
ऐसें विश्वरूपाचिया महामारी। जीवित्व गेलें आहे चराचरीं। जी न बोलें तरि काय करीं। कैसेनि राहें॥ ३७४॥

अर्थ—तुझीं कित्येक क्रुद्ध मुखें, जणुंकाय महाकाळाशीं पैज मारून आहेत, तशी रागीट आहेत, त्यांनी आपल्या विस्तृतपणाने आकाशालाहि लहान केलें आहे॥ ३५३॥ हीं अफाट वाढलेलीं मुखें एवढ्या विस्तीर्ण आकाशांतहि सामावत नाहीत. त्रिभुवनांत वाहणारा वारादेखील त्यांना वेटाळूं शकत नाही. त्यांच्या वाफेने अग्निदेखील जळूं शकेल, अशी प्रज्वलित आहेत॥ ३५४॥ त्याचप्रमाणे सर्व मुखें एकसारखीं नसून त्यांचे वर्णही भिन्न भिन्न आहेत, जणुं काय प्रलयकालीं अग्नीला यांचेंच साहाय्य मिळतें॥ ३५५॥ ज्यांच्या आंगचें तेज एवढें भयंकर आहे की, जें त्रैलोक्याची राखरांगोळी करील. त्यांतहि आणखी तोंडें असून, त्या तोंडात भयंकर दांत दाढा आहेत॥ ३५६॥ जणुं काय वाऱ्याला धनुर्वात झाला किंवा समुद्र महापुरांत पडला अथवा विषरूपी अग्नि, समुद्रांत असणाऱ्या वडवाग्नीला मिळून, मारण्याला प्रवृत्त झाला॥ ३५७॥ किंवा अग्नीने हलाहल विष प्राशन केलें किंवा स्वतः मरणच मारायला प्रवृत्त झालें. त्याप्रमाणे या सृष्टिचा संहार करणाऱ्या या अंगच्या तेजाला, तुझीं मुखें आणखी सहायभूत झालीं आहेत॥ ३५८॥ पण हीं तुझीं मुखें कशाप्रमाणे अशी विशाल पसरलेलीं आहेत, असें म्हणशील, तर ज्याप्रमाणे अंतराळ तुटून आकाशांत जणुं काय भगदाड पडलें आहे॥ ३५९॥ किंवा जेंव्हा हिरण्याक्ष राक्षस, पृथ्वी खाकेंत मारून पाताळांत जाण्याकरितां समुद्राच्या विवराने शिरला, तेव्हा, ज्याप्रमाणे पाताळांतील हाटकेश्वराने पाताळाचें विवर खुलें केलें॥ ३६०॥ त्याप्रमाणे तुझ्या मुखांचा विस्तार असून, त्यांत जिभांचा विलक्षण आवेश आहे. संपूर्ण विश्व एका घांसापुरतेंहि नाही. म्हणून तें तुं कौतुकाने तोंडात भरलें नाहीस॥ ३६१॥ आणि पाताळांतील विषारी सर्पाच्या फुत्काराने विषाच्या उठणाऱ्या ज्वाळा आकाशांत लागाव्या, त्याप्रमाणें पसरलेल्या तुझ्या प्रत्येक मुखरूपी दरीमध्ये ह्या एक एक जिव्हा आहेत॥ ३६२॥ प्रलयकालच्या बीजांचे गठ्ठे घेऊन आकाशाचे बुरुज शृंगारावेत, त्याप्रमाणे तोंडाच्या जबड्याच्या दोन्ही भागाला दाढांची आंकडे धगधगित आहेत॥ ३६३॥ कपाळभागांच्या खळगीत असणारे व भयालाहि भय उत्पन्न करणारे तुझे डोळे, महामृत्युचे उठावच आंधारांत लपून राहिलेले आहेत, अशा

प्रमाणे वाटतात॥ ३६४॥ ऐसी केवळ भीतीची मूर्ति धारण करून काय कार्यसिद्धि करू पाहतोस, हें मला कळत नाही; पण मला मात्र मरणाचें भय उत्पन्न झालें आहे॥ ३६५॥ तेव्हा मला विश्वरूप पाहण्याची अत्यंत उत्कंठा लागली होती व त्याचें फळ मला मिळालें. बा भगवंता! तुझें विश्वरूप पाहून माझ्या डोळ्याचें जसें समाधान व्हायला पाहिजे तसें झालें॥ ३६६॥ अहो देवा! हा पांचभौतिक देह जाईल याचा मला खेद वाटत नाही; परंतु माझें चैतन्यहि कदाचित् वांचेल की नाही, असें मला वाटतें॥ ३६७॥ खरोखरच भयाने माझें आंग कांपत आहे. मनहि घटकाभर शरीराहून सूक्ष्म असलें, तरी तेंहि व्याकुळ होत आहे किंवा बुद्धिहि भयभीत झाली असून, ती अभिमानाला विसरली आहे॥ ३६८॥ पण देह, मन, बुद्धि यांच्याहून निराळा, केवळ आनंदस्वरूप व निश्चळ असा जो अंतरात्मा, त्यालाहि तुझें हें विश्वरूप पाहून शिसारी आली आहे॥ ३६९॥ तुमच्या विश्वरूपाच्या साक्षात्काराच्या छंदाने कसा आत्मबोधहि देशोधडीस लागला आणि आतां हा गुरुशिष्यसंबंधदेखील क्वचितच टिकेल॥ ३७०॥ देवा! या तुझ्या विश्वरूपदर्शनाने माझ्या मनांत जी कांही व्याकुळता उत्पन्न झाली, ती सांवरण्याकरितां मी धैर्याची खोळ करण्याचा प्रयत्न करीत आहे॥ ३७१॥ तेव्हा माझ्या 'अर्जुन' या नावाने धैर्य नाहीसें झालें; कारण विश्वरूपाचें दर्शन धैर्याच्या मर्यादेपेक्षाहि श्रेष्ठ झालें (म्हणजे मी अर्जुन धैर्यवान् खरा, पण विश्वरूपाच्या दर्शनाने जी भीति वाटली, ती भीति माझ्या धैर्य धरण्याच्या मर्यादापेक्षा फार भयकंर होती; म्हणून माझें धैर्य नाहीसें झालें, असा अर्थ) हे असो. पण तुम्ही मला या उपदेशाने-म्हणजे विश्वरूपदर्शनाने-बरें संकटांत टाकलें॥ ३७२॥ बापडा माझा जीव निर्धास्त होऊन विश्रांति मिळावी म्हणून सर्वत्र धांवाधांवी करीत आहे; पण या विश्वरूपांत तशी सोय कोठेहि प्राप्त होत नाही॥ ३७३॥ याप्रमाणे या विश्वरूपाच्या महामारींत सर्व स्थावरजंगम जीवांचें जीवित्व नाहीसें झालें आहे. देवा! हें बोलूं नये, पण काय करूं बोलण्यावांचून राहवत नाही.॥ ३७४॥

द्रंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैव कालानलसन्निभानि।
दिशो न जाने न लभे च शर्म प्रसीद देवेश जगन्निवास॥ २५॥

अर्थ—भयंकर दाढांनी प्रलयकालच्या अग्निसारखीं विक्राळ झालेलीं तुझीं मुखें पाहून मला दिशांचा देखील विसर पडला व समाधान कसें वाटत नाहीं. हे जगन्निवासा देवाधिदेवा! मजवर प्रसन्न हो॥ २५॥

पैं अखंड डोळ्यांपुढें। फुटलें जैसें महाभयाचें भांडें। तैशीं तुझीं मुखें वितंडें। पसरलीं देखें॥ ३७५॥
असो दांतदाढांची दाटी। न झांकवे मा दोहों वोठीं। सैंघ प्रळयशस्त्रांचिया दाट कांटी। लागलिया जैशा॥ ३७६॥
जैसें तक्षका विष भरलें। हो कां जे काळरात्रीं भूत संचरलें। कीं अग्नेयास्त्र परजिलें। वज्राग्नि जैसें॥ ३७७॥
तैशी तुझीं वक्त्रें प्रचंडें। वरी आवेश हा बाहेरी वोसंडे। आले मरणरसाचे लोंढें। आम्हांवरी॥ ३७८॥
संहारसमयींचा चंडानिळु। आणि महाकल्पांत प्रळयानळु। या दोहीं जैं होय मेळु। तैं काय एक न जळे॥ ३७९॥
तैसीं संहारकें तुझीं मुखें। देखोनि धीरु कां आम्हां पारुखे। आतां भुललों मी दिशा न देखें। आपणपें नेणें॥ ३८०॥
मोटकें विश्वरूप डोळां देखिलें। आणि सुखाचें अवर्षण पडिलें। आतां जापाणीं जापाणीं आपुलें। अस्ताव्यस्त हें॥ ३८१॥
ऐसें करिसी म्हणोनि जरि जाणें। तरि हे गोष्टि सांगावी कां मी म्हणें। आतां एकवेळ वांचवी जी प्राणें। या स्वरूपप्रळयापासोनि॥ ३८२॥
जरि तूं गोसावी आमुचा अनंता। तरि सुई वोडण माझिया जीविता। सांटवीं पसारा हा मागुता। महामारीचा॥ ३८३॥
आइकें सकळ देवांचिया परदेवते। तुवां चैतन्यें गा विश्व वसतें। तें विसरलासी हें उपरते। संहारूं आदरिलें॥ ३८४॥
म्हणोनि वेगीं प्रसन्न होईं देवराया। संहरीं संहरीं आपुली माया। काढीं मातें महाभया-। पासोनियां॥ ३८५॥
हा ठायवरी पुढतपुढती। तूंतें म्हणिजे बहुधा काकुळती। ऐसा मी विश्वमूर्ती। भेडका जाहलों॥ ३८६॥
जैं अमरावतीये आला धाडा। तै म्यां एकलेनि केला उवेडा। जो मी काळाचियाही तोंडा। वासिपू न धरीं॥ ३८७॥
परि तया आंतुल नव्हे हें देवा। एथ मृत्यूसही करूनि चढावा। तुवां आमुचाचि घोटु भरावा। या सकळ विश्वेंसीं॥ ३८८॥
कैसा नव्हता प्रळयाचा वेळु। गोखा तूंचि मिनलासि काळु। बापुडा हा त्रिभुवनगोळु। अल्पायु जाहला॥ ३८९॥
अहा भाग्या विपरीता। विघ्न उठिलें शांति करितां। कटकटा विश्व गेलें आतां। तूं लागलासि ग्रासूं॥ ३९०॥

हें नव्हें मां रोकडें। सैंघ पसरूनियां तोंडे। कवळितासि चहूंकडे। सैन्यें इयें॥ ३९१॥

अर्थ—महाभय साठविलेलें भांडे फुटल्याप्रमणे तुझीं विक्राळ मुखें मी अखंड डोळ्यासमोर पसरलेलीं पाहत आहे॥ ३७५॥ हें असो संपूर्ण प्रलयकालच्या शस्त्रांचे दाट कुंपण लागावें, त्याप्रमाणे तुझ्या मुखांतील दांतदाढांची असलेली दाटी दोन्ही ओठांनी झांकली जात नाही॥ ३७६॥ जणुं काय विषारी तक्षकाचे ठिकाणीं विष भरलें, प्रलयकालच्या रात्रीं भुतांचा संचार झाला किंवा प्रलयाग्नीने पुनः आग्नेयास्त्र हातांत घेतलें॥ ३७७॥ त्याप्रमाणे तुझीं हीं प्रचंड व भयंकर मुखें असून त्यांतहि पुनः त्यांचा आवेश बाहेर प्रगट होत आहे. असें वाटतें की त्यातून आम्हांवर मरणरूपी रसाचे लोंढे आले आहेत॥ ३७८॥ देवा! प्रलयकाळचा भयंकर वायु व महाकल्पाच्या वेळचा प्रलयाग्नि, हे दोन्ही मिळाले असतां काय जळणार नाही?॥ ३७९॥ त्याप्रमाणेच तुझीं सर्व ब्रह्मांडाचा संहार करणारीं मुखें पाहून, धैर्य आम्हांला स्पर्श करील काय? आतां मी भ्रमिष्ट व दिङ्मूढ झालों व मला माझेंहि भान राहिलें नाही॥ ३८०॥ तुझे विश्वरूप डोळ्याने पाहिलें मात्र, तोंच सुखाचा दुष्काळ पडला; म्हणून आपले हे अवाढव्य पसरलेलें विश्वरूप आतां आवरा, आवरा॥ ३८१॥ (हें आपले भयंकर विश्वरूप दाखवून आम्हांला) अशाप्रकारें अत्यंत भयभीत करशील असें जर मला माहित असतें, तर विश्वरूप दाखवा, असें मी कशाला म्हटले असतें? तरी आतां, देवा! एकवेळ प्राणदान देऊन, या माझ्या जीवाच्या होऊं पाहणाऱ्या स्वरूपप्रलयापासून-म्हणजे माझीं संपूर्ण स्थूळ सूक्ष्मतत्वें अव्यक्तांत मिळूं पाहत आहेत त्यापासून-प्राणाने मला वांचवा-म्हणजे माझे प्राण जिवंत ठेवा॥ ३८२॥ भगवंता! जर तूं आमचा स्वामी म्हणवितोस, तर माझ्या, जीवितावर आडपडदा घालून माझे संरक्षण कर व हा महामारीचा पसारा पुनः फिरून आपले ठिकाणीं सांठवून घे॥ ३८३॥ हे सर्व देवांच्याहि परम देवा! माझें म्हणणें ऐक. तूंच चैतन्यस्वरूपाने सर्व विश्वांत वास करतोस, हें तूं विसरलास आणि उलट सर्व विश्वाचा संहार करावयास उठलास॥ ३८४॥ म्हणून देवा! त्वरित प्रसन्न होऊन या आपल्या मायेचा, येथून उपसंहार कर व या महाभयपासून मला सोडव॥ ३८५॥ अशाप्रकारें वारंवार तुला अत्यंत ककुळती येऊन म्हणावें, इतका मी, विश्वरूपा भगवंता! अत्यंत भित्रा झालों आहे॥ ३८६॥ जेव्हा इंद्राच्या अमरावती राजधानीवर राक्षसांची धाड पडली, तेव्हा ज्या मी एकट्यानेच त्यांचा पराभव केला, कारण मी मृत्यूच्या तोंडाचेंहि भय बाळगित नाही॥ ३८७॥ पण देवा! हें तुझें विश्वरूप त्यापैकीं दिसत नाही. येथे मृत्युवरही ताण करून सर्व ब्रह्मांडासह आमचा घास घ्यावा, असे तूं केलें आहेस॥ ३८८॥ खरोखर हा सृष्टीच्या प्रलयाचा काल नसतांना मध्येंच कसा तूं काळ होऊन प्राप्त झालास? पहा! बिचारे हें संपूर्ण ब्रह्मांड अल्पायुषी झालें आहे॥ ३८९॥ आहारे माझ्या दुर्दैवा! विश्वरूपदर्शनाने सुख प्राप्ति व्हावी म्हणून प्रयत्न करीत असतां, हें विघ्न उत्पन्न झालें. हाय, हाय! तूं ग्रासू लागल्यामुळे आतां हें सर्व विश्व नाहीसें होणार!॥ ३९०॥ जिकडे तिकडे मुखें पसरून या दोन्ही सैन्याला चहूंकडून आपल्या तोंडांत टाकीत आहेस, हें स्पष्ट दिसत नाही काय?॥ ३९१॥

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः सर्वे सहैवावनिपालसङ्घैः।
भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ सहास्मदीयैरपि योधमुख्यैः॥ २६॥

अर्थ—दुर्योधनादिक धृतराष्ट्राचे पुत्र, भीष्माचार्य, द्रोणाचार्य, सूतपुत्र कर्ण हे आपल्याकडील मोठमोठ्या राजांच्या समुदायासह व आमच्याकडील मुख्य मुख्य योद्ध्यासह तुझ्या ठिकाणी प्राप्त होत आहेत॥ २६॥

नोहेति हे कौरवकुळींचे वीर। आंधळिया धृतराष्ट्राचे कुमर। हे गेले गेले सहपरिवार। तुझियां वदनी॥ ३९२॥
आणि जे जे यांचेनि सावायें। आले देशोदेशींचे राये। तयांचें सांगावया जावों न लाहे। ऐसे सरकटितु आहासी॥ ३९३॥
मदमुखाचिया संघटा। घेत आहासि घटघटां। आरणीं हन थाटा। देतोसि मिठी॥ ३९४॥
जंत्रावरिचील मार। पदातींचे मोगर। मुखाआंत भार। हारपताति मा॥ ३९५॥
कृतांताचिया जावळी। जें एकचि विश्वातें गिळी। तियें कोटीवरील सगळीं। गिळीतासि शस्त्रें॥ ३९६॥
चतुरंगा परिवारा। संजोडियां रहंवरां। दांत न लाविसी मा परमेश्वरा। कैसा तुष्टलासि बरवा॥ ३९७॥
हां गा भीष्माऐसा कवणु। सत्यशौर्यनिपुणु। तोही आणि ब्राह्मण द्रोणु। ग्रासिलासि कटकटा॥ ३९८॥

अहा सहस्त्रकराचा कुमरु। एथ गेला गेला कर्णवीरु। आणि आमुचिया आघवयांचा केरु। फेडिला देखें॥ ३९९॥
कटकटा धातया। कैसें जाहले अनुग्रहा यया। मियां प्रार्थूनि जगा बापुडिया। आणिलें मरण॥ ४००॥
मागां थोडिया बहुवा उपपत्ती। येणें सांगितलिया विभूती। तैसा नसेचि मा पुढती। बैसलों पुसों॥ ४०१॥
म्हणोनि भोग्य तें त्रिशुद्धी न चुके। आणि बुद्धिही होणारासारिखी ठाके। माझां कपाळीं पिटावें लोकें। तें लोटेल काह्या॥ ४०२॥
पूर्वीं अमृतही हातां आलें। परि देव नसतीचि उगले। मग काळकूट उठविलें। शेवटीं जैसें॥ ४०३॥
परि तें एकबगीं थोडें। केलिया प्रतिकारामाजिवडें। आणि तियें अवसरींचें तें सांकडें। निस्तरविलें शंभू॥ ४०४॥
आतां हा जळता वारा कें वेंटाळे। कोणा हे विषा भरलें गगन गिळे। महाकाळेंसि कें खेळें। आंगवत असे॥ ४०५॥
ऐसा अर्जुन दुःखें शिणतु। शोचित असे जिवाआंतु। परि न देखे तो प्रस्तुतु। अभिप्राय देवाचा॥ ४०६॥
जे मी मारिता हे कौरव मरते। ऐसेनि वेंटाळिला होता मोहें बहुतें। तो फेडावयालागीं अनंतें। हें दाखविलें निज॥ ४०७॥
अरे कोण्ही कोणातें न मारी। एथ मीचि हो सर्व संहारीं। हें विश्वरूपव्याजें हरी। प्रकटित असे॥ ४०८॥

अर्थ—हे कौरवकुळांतील वीर आणि आंधळ्या धृतराष्ट्राचे पुत्र नव्हते काय? हे सर्व आपल्या परिवारासह तुझ्या मुखांत शिरलेत॥ ३९२॥ आणि युद्धांत यांचें साहाय्य करण्याकरितां इतर देशींचे जे जे राजे आले आहेत, त्यांची मृत्युवार्ताहि सांगायला कोणी उरणार नाही. अशा रीतीने सरसकट सर्वांना गिळित आहेस॥ ३९३॥ मदोन्मत्त हत्तींच्या समुदायांना तोंडांत घटघट ओतीत आहेस व त्याचप्रमाणे युद्धांत थाटलेल्या संपूर्ण सैन्यरचनेला मिठी मारत आहेस॥ ३९४॥ तोफादिक यंत्रांचा मारा करणारे व पायदळांचे मुख्य यांच्या झुंडीच्या झुंडी तुझ्या मुख्रात गडप होत आहेत ना?॥ ३९५॥ एकच शस्त्र संपूर्ण विश्वाचा संहार करतें व म्हणून मृत्यूचें भावंड होय, अशी कोट्यावधि शस्त्रें तूं गिळित आहेस॥ ३९६॥ हत्ती, घोडे, रथ, पायदळ अशा चतुरंग सेनेचा संपूर्ण परिवार व घोडे जोडलेले रथ यांना, भगवंता! कसा प्रसन्न झाला आहेस पहा की, यांना तूं दांत न लागूं देतां गिळून टाकीत आहेस॥ ३९७॥ देवा! भीष्माचार्यासारखा सत्यवचनी व शौर्यात अत्यंत निपुण असा कोण आहे? पण अरेरे! त्याला व द्रोणाचार्यासारख्या ब्राह्मणालाहि ग्रासून टाकलेंस॥ ३९८॥ हाय! हाय! सूर्यपुत्र जो महायोद्धा कर्ण, तोहि तुझ्या मुखांत गेला आणि आमच्या सर्वांचा केरकचरा नाहीसा केलास, असें मी पाहत आहे॥ ३९९॥ अरेरे ब्रह्मदेवा! विश्वरूप दर्शनाचा अनुग्रह कसा फळला पहा! मी विश्वरूपदर्शनाकरितां भगवंताची प्रार्थना करून बिचाऱ्या जगावर मरणाचा प्रसंग आणला॥ ४००॥ पूर्वी थोड्याबहुत युक्तींने भगवंताने आपल्या विभूती सांगितल्या, त्या ऐकून तसाच मी राहिलों नाही आणि पुन: पुढे विश्वरूपदर्शनाविषयीं विचारूं लागलों॥ ४०१॥ म्हणून प्रारब्धभोग चुकत नाही म्हणतात, तें त्रिवार सत्य आहे आणि प्रारब्धानुसार जें होणार असेल त्याप्रमाणेच बुद्धि होते. लोकांनी माझ्या नांवाने रडावें, असें माझ्या कपाळीं होतें, तें चुकेल कसें?॥ ४०२॥ पूर्वी समुद्रमंथन करतां करितां अमृत हातीं लागलें; पण त्यांतच संतोष मानून देव मंथन सोडून उगे राहिले नाहीत, शेवटी हालाहल विष समुद्रांतून निघाले॥ ४०३॥ क्षीराब्धीने केलेल्या चौदा रत्नांच्या आविष्कारामध्यें काळकूटाचा आविष्कार एका परीने थोडा होता आणि त्यावेळचें संकट भगवान शंकरांनी निवारण केलें॥ ४०४॥ आतांचा हा पेटलेला वारा कसा आवरला जाणार? हे संपूर्ण विषाने भरलेलें आकाश कोण गिळणार? या महामृत्यूशीं खेळण्याचें सामर्थ्य कोण आंगीं वागवितो?॥ ४०५॥ याप्रमाणे अर्जुन, दु:खाने अत्यंत व्याकुळ होऊन, अंत:करणांत शोक करूं लागला; पण भगवंताच्या विश्वरूपदर्शनाचा प्रस्तुत हेतु काय आहे, हें तो जाणत नव्हता॥ ४०६॥ मी मारणार व कौरव माझ्याकडून मारले जाणारे, अशा थोर अविवेकाने तो ग्रासला गेला होता. तो अविवेक नाहीसा करण्याकरितां भगवंतांनी आपले हें विश्वरूप दाखविलें॥ ४०७॥ अरे! कोणी कोणाचा नाश करित नाही. एक मीच सर्वांचा नाश करणारा आहे, हेंच भगवंतांनी विश्वरूपाच्या मिषाने स्पष्ट दाखविलें॥ ४०८॥

गूढार्थदीपिका—जगांतील प्राण्यांच्या उत्पत्तिस्थितिसंहाराचा व्यापार, जीवांच्या कर्मानुसार एक परमेश्वरच करीत असतो; उत्पत्तिस्थितिलयाशीं संबंधित असलेले पदार्थ केवळ निमित्तमात्र असतात, असा वेदान्ताचा सिद्धान्त आहे.

परि वायांचि व्याकुळता। तें न चोजवेचि पांडुसुता। मग अहा कंपु नव्हता। वाढवित असे॥ ४०९॥

अर्थ—पण अर्जुन हें न जाणतां दु:खाने व्याकुळ होऊन नसताच थरकांप वाढवित होता॥ ४०९॥

वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति दंष्ट्राकरालानि भयानकानि।
केचिद्विलग्ना दशनान्तरेषु सन्दृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गैः॥ २७॥

अर्थ—विक्राळ दाढांनी भयंकर दिसत असलेल्या तुझ्या मुखांत ते मोठ्या त्वरेने शिरत आहेत. त्यांतील कांही, चूर्ण झालेल्या मस्तकांनी दातांच्या फटींत अडकून राहिलेले दिसतात.॥ २७॥

तेथ म्हणे पाहा हो एके वेळे। सासिकवचेंसि दोन्ही दळें। वदनीं गेलीं आभाळें। गगनीं कां जैसीं॥ ४१०॥
कां महाकल्पाचां शेवटीं। जैं कृतांतु कोपला होय सृष्टी। तैं एकविसांही स्वर्गा मिठी। पाताळासकट दे॥ ४११॥
नातरी उदासीनें दैवें। संचकाचीं वैभवें। जेथींची तेथ स्वभावें। विल्या जाती॥ ४१२॥
तैसीं ससिन्नलीं सैन्यें एकवटें। इयें मुखीं जाहलीं प्रविष्टें। परि एकही तोंडौनि न सुटे। कैसें कर्म देखा॥ ४१३॥
अशोकाचे अंगवसे। चघळिले कन्हेनि जैसें। लोक वक्त्रामाजीं तैसें। वायां गेले॥ ४१४॥
परि सिसाळें मुकुटेंसीं। पडिलीं दाढांचे सांडसीं। पीठ होत कैसीं। दिसत आहाती॥ ४१५॥
तियें रत्ने दातांचिये सवडी। कूट लागलें जिभेच्या बुडीं॥ कांहीं कांही आगरडीं। दंष्ट्रांचीं माखलीं॥ ४१६॥
हो कां जे विश्वरूपें काळें। ग्रासिलीं लोकांचीं शरीरें बळें। परि जीवदेहींचीं सिसाळें। अवश्य कीं राखिलीं॥ ४१७॥
तैसीं शरीरामाजीं चोखडीं। इये उत्तमांगें होती फुडीं। म्हणोनि महाकाळाचियांहि तोंडीं। परि उरली शेखीं॥ ४१८॥
मग म्हणे हें काई। जन्मलयां आन मोहरचि नाहीं। जग आपैसेचि वदनडोहीं। संचरताहे मा॥ ४१९॥
यया आपेआप आघविया सृष्टी। लागलिया आहाति वदनाचिया वाटीं। आणि हा जेथिंचिया तेथ मिठी। देतसे उगला॥ ४२०॥
ब्रह्मादिक समस्त। उंचा मुखामाजीं धांवत। येर सामान्य हे भरत। ऐलीच वदनीं॥ ४२१॥
आणीकही भूतजात। जें उपजलेचि ठायीं ग्रासित। परि याचिया मुखा निभ्रांत। न सुटेचि कांहीं॥ ४२२॥

अर्थ—त्या वेळेला अर्जुन पुन: म्हणाला, अहो देवा! पहा! आकाशांत जसे मेघ नाहीसे होतात, त्याप्रमाणे आंगावरील चिलखतें व हातांतील तलवारीसह दोन्ही कडील सैन्यें, एकाच वेळीं तोंडांत गेली आहेत॥ ४१०॥ किंवा महाकल्पाच्या शेवटीं संपूर्ण सृष्टीचा नाश करण्याकरितां जेव्हा कृतान्त सर्व सृष्टीवर क्रुद्ध होतो, तेव्हा तो पाताळासकट एकवींस स्वर्गांना ग्रासून टाकतो॥ ४११॥ अथवा दैव प्रतिकूल झालें असतां, धनसंचय करणाऱ्याची संपत्ति, जशी जागच्या जागीं नाहीशी होते॥ ४१२॥ त्याप्रमाणे युद्धाला सज्ज झालेलीं हीं दोन्ही सैन्यें, तुझ्या मुखांत एकत्र शिरलीं आहेत. त्यापैकीं, तुझ्या मुखांतून एकहि सुटत नाही. कसें त्यांचें कर्म आहे, पहा!॥ ४१३॥ ऊंटाने अशोकवृक्षाचे डाखळे जसे चघळावें, त्याप्रमाणे सर्व लोक तुझ्या तोंडांत व्यर्थ गेले आहेत॥ ४१४॥ राजांची मुकुटासहित शिरें दाढांच्या सांडशीत सांपडून त्यांचें कसे पीठ होतांना दिसत आहे.॥ ४१५॥ मुकुटांतील रत्नें दातांच्या संधींत असून, मस्तकांचें चूर्ण जिभेच्या बुडाशीं लागलें आहे व कांहीं कांही दाढांचीं टोकेंही माखलीं आहेत॥ ४१६॥ हो! एक गोष्ट मात्र दिसते की, या विश्वरूपी काळाने लोकांचीं शरीरें व बळें ग्रासून टाकली; पण त्या जीवांच्या शरीरांचीं मस्तकें मात्र, न गिळतां तशींच ठेवलीं॥ ४१७॥ हीं सुंदर मस्तकें म्हणजे शरीरांतील खरोखर उत्तम अंगें असल्यामुळे, ती महाकाळाच्याही तोंडांत शेवटीं उरली आहेत॥ ४१८॥ पुढे अर्जुन म्हणतो, अरें! हें काय आश्चर्य! जन्माला आलेल्या प्राण्यांला दुसरी गतिच दिसत नाही. सर्व जगत् आपण होऊन विश्वरूपाच्या मुखरूपी डोहांत शिरत आहे ना!॥ ४१९॥ ह्या संपूर्ण सृष्टी सहजगत्या विश्वरूपाच्या मुखांत जाण्याच्या मार्गास लागल्या आहेत आणि हा विश्वरूप भगवान जागच्या जागींच स्वस्थ त्यांना गिळीत आहे॥ ४२०॥ हे सर्व ब्रह्मादिकदेव वर असलेल्या मुखामध्यें वेगाने शिरत असून, बाकीचे सर्व सामान्य लोक हे अलीकडील मुखांतच भरले जात आहेत॥ ४२१॥ आणि कित्येक प्राणिजात उत्पन्न झाल्याबरोबर ग्रासले जात आहेत; पण याच्या मुखांतून निश्चित् कांही एक सुटत नाही॥ ४२२॥

गूढार्थदीपिका—येथे प्राण्यांच्या तीन गती दाखविल्या आहेत. ब्रह्मादिक देवांना उंचलोक म्हणजे

सत्यलोकप्राप्ति होते. सामान्य म्हणजे भगवत्प्रीत्यर्थ निष्कामचित्ताने विहित कर्माचें अनुष्ठान न करतां स्वर्गादि लोकांच्या प्राप्तिकरितां कर्म करणारे जे पुरुष असतात, त्यांना चंद्रलोकप्राप्ति होऊन, ते तेथें सुख भोगून परत संसारांत येतात व अत्यंत पातकी लोक, सुखभोगाकरितां कोणत्याहि लोकांत न जातां "जायस्व म्रियस्व" (छं. उ. ५-१०-७) या श्रुतींत सांगितल्याप्रमाणे जन्मानंतर मरण व मरणानंतर जन्म असे केवळ दु:खच भोगत असतात.

यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति।
तथा तवामी नरलोकवीरा विशन्ति वक्त्राण्यभि विज्वलन्ति॥ २८॥
यथा प्रदीप्तं ज्वलनं पतङ्गा विशन्ति नाशाय समृद्धवेगाः।
तथैव नाशाय विशन्ति लोकास्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः॥ २९॥

अर्थ—ज्याप्रमाणे नद्यांचे अनेक प्रवाह समुद्राला सन्मुख करून वाहतात, त्याप्रमाणे मनुष्यलोकांतील वीर, हे आपला नाश करून घेण्याकरितां सर्व बाजूंनी पेटलेल्या तुझ्या मुखामध्यें प्रवेश करीत आहेत॥ २८॥ ज्याप्रमाणे पतंग, नाश करून घेण्याकरितां अत्यंत वेगाने प्रदीप्त अग्नीत शिरतात, त्याचप्रमाणे हे संपूर्ण लोक, अत्यंत वेगाने नाश करून घेण्याकरितां तुझ्या मुखांत शिरत आहेत॥ २९॥

जैसे महानदीचे वोघ। वहिले ठाकिती समुद्राचे आंग। तैसें आघवांचिकडूनि जग। प्रवेशत मुखीं॥ ४२३॥
आयुष्यपंथें प्राणिगणीं। करोनि अहोरात्रांची सोवाणीं। वेगें वक्त्र मिळणीं। साधिजत आहाती॥ ४२४॥
जळतया गिरीच्या गवखा-। माजीं घापती पतंगाचिया झाका। तैसे समग्र लोक देखा। इये वदनीं पडती॥ ४२५॥
परि जेतुलें येथ प्रवेशलें। तें तातलिया लोहें पाणीचि पां गिळिलें। वहिवाटींहि पुसिलें। नामरूप तयांचें॥ ४२६॥

अर्थ—जसे महानदीचे प्रवाह मोठ्या वेगाने समुद्रांत येऊन मिळतात, तशी सर्व बाजूनी ही सृष्टि तुझ्या मुखांत प्रविष्ट होत आहे॥ ४२३॥ सर्व प्राणिसमुदाय, आपल्या आयुष्यरूपी मार्गाने दिवस आणि रात्र यांच्या पायऱ्या करून अत्यंत त्वरेने तुझ्या मुखांत पडण्याचे साधित आहेत॥ ४२४॥ पेटलेल्या पर्वताच्या दरीत ज्याप्रमाणे पतंगाच्या झुंडीच्या झुंडी जाऊन पडतात, त्याप्रमाणे हे सर्व लोक तुझ्या मुखांत पडत आहेत॥ ४२५॥ पण तुझ्या मुखांत जेवढे कांही गेले, तेवढे सर्व तापलेल्या लोखंडावर टाकलेल्या पाण्याप्रमाणे गिळले गेले त्यांचे वहिवाटीपुरतें देखील नामरूप राहिलें नाही॥ ४२६॥

लेलिह्यसे ग्रसमानः समन्ताल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः।
तेजोभिरापूर्य जगत्समग्रं भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो॥ ३०॥

अर्थ—हे विष्णो! आपल्या पेटलेल्या मुखांनी, सर्व लोकांना, सर्व बाजूंनी तूं गिळित आहेस आणि जिभांनी त्यांची रुचि घेत आहेस. संपूर्ण जगाला आपल्या तेजाने तूं व्यापिलें असून तुझें तें अत्यंत उग्र तेज संपूर्ण जगाला संतप्त करीत आहे॥ ३०॥

आणि येतुलियाही आरोगण। करितां भुके नाहीं उणेपण। कैसें दीपन असाधारण। उदयलें यया॥ ४२७॥
जैसा रोगिया ज्वराहूनि उठिला। कां भणगा दुष्काळु पाहला। तैसा जिभांचा लळलळाटु देखिला। आवाळुवें चाटितां॥ ४२८॥
तैसें आहाराचेन नावें कांहीं। तोंडापासूनि उरलेंचि नाहीं। कैसी समसमित नवाई। भुकेलेपणाची॥ ४२९॥
काय सागराचा घोंटु भरावा। कीं पर्वताचा घांसु करावा। ब्रह्मकटाहो घालावा। आघवाचि दाढे॥ ४३०॥
दिशा सगळियाचि गिळावियां। चांदणिया चाटूनि घ्यावियां। ऐसें वर्तत आहे साविया। लोलुप्य बा तुझें॥ ४३१॥
जैसा भोगीं कामु वाढे। कां इंधनें आगीसि हकाक चढे। तैसीं खातखातांचि तोंडें। खाखातें ठेलीं॥ ४३२॥
कैसें एकचि केवढें पसरलें। त्रिभुवन जिव्हाग्रीं आहे टेंकलें। जैसें कां कवींठ घातलें। वडवानळीं॥ ४३३॥
ऐसीं अपारें वदनें। आतां येतुलीं कैंचीं त्रिभुवनें। कां आहारु न मिळतां येणें मानें। वाढविलीं असह्या॥ ४३४॥
अगा हा लोकु बापुडा। जाहला वदनज्वाळां वरपडा। जैसीं वणवेयाचिया वेढां। सांपडती मृगें॥ ४३५॥
आतां तैसें या विश्वा जाहालें। देवा नव्हे हें कर्म आलें। की जगजळचरां पांगिलें। जाळे काळेंत॥ ४३६॥

आतां इये अंगप्रभेचिये वागुरे। कोणीकडूनि निगिजैल चराचरें। वक्त्रें नव्हतीं जोहरें। वोडवलीं जगा॥ ४३७॥
आगी आपुलेनि दाहकपणें। कैसेनि पोळिजे तें नेणें। परि जया लागे तया प्राणें। सुटिका नाहीं॥ ४३८॥
नातरी माझेनि तिखटपणें। कैसें निवटे हें शस्त्र कायि जाणें। कां आपुलियां मारा नेणें। विष जैसें॥ ४३९॥
तैसी तुज काहीं। आपुलिया उग्रपणाची सेचि नाहीं। परि ऐलीकडिले मुखीं खाई। हों सरली जगाची॥ ४४०॥
अगा आत्मा तूं एकु। सकळ विश्वव्यापकु। तरि कां आम्हां अंतकु। वोडवलासी॥ ४४१॥
तरि मियां सांडिली जीवित्वाची चाड। आणि तुवांही न धरावी भीड। मनीं आहे तें उघड। बोल पां सुखें॥ ४४२॥
किती वाढविसी या उग्ररूपा। अंगींचें भगवंतपण आठवीं बापा। नाहीं तरि कृपा। मजपुरती पाहीं॥ ४४३॥

अर्थ—आणि इतकेंहि भक्षण करून याची भूक यत्किंचितहि शांत झाली नाही. कसा याचा जठराग्नि अत्यंत प्रदीप्त झाला आहे!॥ ४२७॥ ज्याप्रमाणे ज्वरांतून उठलेला रोगी किंवा दुष्काळांत सांपडलेला भिकारी खायखाय करतो, त्याप्रमाणे ओठ चाटतांना जिभांची अत्यंत वळवळ दिसत अहे॥ ४२८॥ तसेच तुझ्या खाण्याचा नव्हे असा कोणताच पदार्थ तुझ्या तोंडापासून सुटला नाही. अत्यंत खरमरीत भुकेचे नवल कसें आहे!॥ ४२९॥ संपूर्ण समुद्राचा घोट घ्यावा की सगळ्या पर्वताचा एकच घांस करावा अथवा हें सर्व ब्रह्मांड असेच्या असेंच दाढेखालीं घालावें॥ ४३०॥ सगळ्या दिशा गिळून टाकाव्या कीं चांदण्या चाटून घ्याव्या, अशा प्रकारचा खरोखर तुझा हांवरेपणा दिसत आहे॥ ४३१॥ ज्याप्रमाणे भोगाने भोगवासना वाढत जाते किंवा लांकडें घातल्याने अग्नि भडकतो, त्याप्रमाणे ही सर्व तुझीं मुखें खातांखातांच खाखावलेलीं आहेत॥ ४३२॥ तुझें एकच मुख कसें विस्तीर्ण पसरलें आहे, पहा! ज्याप्रमाणे वडवाग्निमध्यें कवठ घालावें, त्याप्रमाणे हें संपूर्ण त्रिभुवन तुझ्या नुसत्या जिभेच्या टोंकाला लागलें आहे॥ ४३३॥ अशीं हीं असंख्य मुखें आहेत. आतां तितकीं त्रिभुवनें कोठलीं आणणार? पुरेसा आहार मिळत नसतांना ज्यांचा ताप असह्य होतो, अशीं मुखें कां असंख्य वाढविलींस?॥ ४३४॥ देवा! ज्याप्रमाणे वणव्याचा वेढा पडून, त्यांत जनावरें सांपडतात, त्याप्रमाणे तुझ्या मुखांतील पेटलेल्या ज्वालांना हें बिचारें ब्रह्मांड बळी पडलें आहे॥ ४३५॥ आतां तसेंच या विश्वाला झालें. हें विश्वरूप म्हणजे देव नव्हे, हें लोकांचें दुर्दैव आहे किंवा जगरूपी जलचरांना पकडण्याकरितां काळाने आपलें जाळेंच पसरलें आहे॥ ४३६॥ आतां या अंगकांतिरूप पाशांतून, हें चराचर प्राणी कोणीकडून बाहेर पडतील? हीं तुझीं मुखें नसून, हीं जगाला लाक्षागृहें झालीं आहे॥ ४३७॥ अग्नीला आपल्या दाहकशक्तीने दुसऱ्याला मी कसें जाळतों, हें समजत नाही; पण ज्याला अग्नि लागतो, तो मात्र जिवंत राहत नाही॥ ४३८॥ किंवा माझ्या तीक्ष्णपणाने पदार्थ कसा कापला जातो, हें शस्त्राला माहित नसतें. किंवा माझ्याने मनुष्य कसा मरतो, हे विषाला ज्याप्रमाणे कळत नाही॥ ४३९॥ त्याप्रमाणे तुझें हें विश्वरूप कसें अत्यंत उग्र व भयंकर आहे याची तुला जाणीव नाही; पण अलीकडील मुखरूपी खाईंत संपूर्ण जगच नाहीसें झालें॥ ४४०॥ अहो देवा! तूं सर्व ब्रह्मांडाचा एक अंतरात्मा असून सर्व जगतांत भरला आहेस, मग आम्हांला कां असा प्राण घेणारा मृत्यु झालास?॥ ४४१॥ तरी मी जिवंत राहण्याची आशा सोडली आहे. आणखी तूंहि कांहीं संकोच करूं नकोस. तुझ्या मनांत जें कांही असेल तें स्पष्ट खुशाल सांग॥ ४४२॥ आतां या आपल्या रूपाचा भयंकरपणा किती वाढवितोस? तुझ्या स्वत:चे आंगीं असलेल्या भगवंतपणाचें स्मरण ठेव. नाही तर माझ्यापुरती तरी कृपा कर॥ ४४३॥

गूढार्थदीपिका—अंगींचें भगवंतपण आठवीं बापा—यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य असे हे लोकांना एक सुखच देणारे, सहा श्रेष्ठ गुण भगवंताचें ठिकाणीं नित्य असतात; म्हणून त्याला भगवान म्हणतात. यांत संहार करण्याचा गुण नाही याची भगवंताला आठवण करून देण्याकरितां अर्जुनाने येथें ''आंगीचें भगवंतपण आठवी बापा'' असें म्हटलें आहे.

आख्याहि मे को भवानुग्ररूपो नमोऽस्तु ते देववर प्रसीद।
विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यं न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम्॥ ३१॥

अर्थ—हे देवाधिदेवा! तुला नमस्कार असो. माझ्यावर कृपा कर! असें उग्र रूप धारण करणारा तूं कोण

आहेस, हें मला सांग. आपण जगाच्या पूर्वी असणारे-म्हणजे जगाचें आदिकारण-आहां, त्या तुम्हांला मी जाणण्याची इच्छा करतों; कारण तूं एवढें भयंकर विश्वरूप धारण करून काय करणार आहेस हें मला समजत नाही॥ ३१ ॥

तरि एक वेळ वेदवेद्या। त्रिभुवनाचिया आद्या। विनवणी विश्ववंद्या। आइकें माझी॥ ४४४॥
ऐसें बोलोनि वीरें। चरण नमस्कारिले शिरें। मग म्हणे तरी सर्वेश्वरें। अवधारिजो॥ ४४५॥
मियां होआवया समाधान। पुसिलें विश्वरूपध्यान। आणि एकें काळें त्रिभुवन। गिळितुचि उठिलासी॥ ४४६॥
तरि तूं कोण कां येतुलीं। इयें भ्यासुरें मुखें कां मेळविलीं। अवधियाचि करीं परजिलीं। शस्त्रें काह्या॥ ४४७॥
जी जंव तंव रागीटपणें। वाढोनि गगना आणितोसि उणें। कां डोळे करूनि भिंगुळवाणे। भेडसावीत आहासी॥ ४४८॥
एथ कृतांतेंसीं देवा। कासया किजतसे हेवा। आपुला तुवां सांगावा। अभिप्राय मज॥ ४४९॥
या बोला म्हणे अनंतु। मी कोण हें आहासी पुसतु। आणि कायिसयालागीं असें वाढतु। उग्रतेसीं॥ ४५०॥

अर्थ—वेदानेच जाणला जाणाऱ्या, त्रैलोक्याच्या मूळ कारणा व त्रैलोक्याला पूज्य अशा भगवंता! एक वेळ माझी प्रार्थना ऐक॥ ४४४॥ असें बोलून, त्या श्रेष्ठ अर्जुनाने भगवंताच्या पायांवर मस्तक ठेवलें व म्हणाला, हे सर्वेश्वरा! ऐंक॥ ४४५॥ माझें समाधान व्हावें म्हणून मी तुला विश्वरूप दाखविण्याची प्रार्थना केली आणि तूं तात्काळ संपूर्ण ब्रह्मांड गिळितच प्रगट झालास॥ ४४६॥ तरी तूं कोण आहेस? अशीं एवढीं मुखें कशाकरिता घेतलीस? व संपूर्ण हातामध्यें परजलेली शस्त्रे कशाला धारण केलीस?॥ ४४७॥ आणि देवा! जेव्हा तेव्हा क्रुद्धपणाने वाढून आकाशाला कां मागें टाकतोस आणि अत्यंत लाल डोळे वटारून आम्हांला कां भीति दाखवितोस?॥ ४४८॥ देवा! या ठिकाणी महामृत्यूशीं तूं कशाला स्पर्धा करीत आहेस? असें करण्यांत तुझ्या मनांतील हेतु काय आहे, तो मला सांग॥ ४४९॥ हें अर्जुनाचें म्हणणें ऐकून, भगवान म्हणतांत, मी कोण आहे व आपलें एवढें उग्र स्वरूप कां वाढवित आहे, हेच तूं विचारित आहेस॥ ४५०॥

श्रीभगवानुवाच

कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः।
ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः॥ ३२॥

अर्थ—भगवान म्हणतात, मी सर्व सृष्टीचा संहार करणारा काळ असून, अत्यंत वाढून लोकांचा संहार करण्याकरितां यावेळीं प्रवृत्त झालों आहे. तुम्हांला सोडून शत्रूच्या सैन्यांत जे थोर थोर योद्धे दिसत आहेत, ते सर्व नाहीसे होणार आहेत. ॥ ३२॥

तरि मी काळु गा हें फुडें। लोक संहारावयालागीं वाढे। सैंघ पसरिलीं आहाती तोंडें। आतां ग्रासीन हें आघवे॥ ४५१॥
तेथ अर्जुन म्हणे कटकटां। उबगिलों मागिल्या संकटा। म्हणोनि आळविला तंव वोखटा। उवाइला हा॥ ४५२॥
तेवींचि कठीण बोलें आसतुटी। अर्जुन होईल हिंपुटी। म्हणोनि सवेंचि म्हणे किरीटी। परि आन एक असे॥ ४५३॥
तरि आतांचि ये संहारवाहरे। तुम्ही पांडव असा बाहिरे। तेथ जातजातां धनुर्धरें। सांवरिले प्राण॥ ४५४॥
होता मरणमहामारीं गेला। तो मागुता सावधु जाहला। मग लागला बोला। चित्त देऊं॥ ४५५॥
ऐसें म्हणिजत आहे देवें। अर्जुना तुम्ही माझें हें जाणावें। येर जाण मी आघवें। सरलों ग्रासूं॥ ४५६॥
वज्रानळीं प्रचंडीं। जैसी घापे लोणियाची उंडी। तैसें जग हें माझिया तोंडी। तुवां देखिलें जें॥ ४५७॥
तरि तयामाझारीं कांहीं। भरंवसेनि उणें नाहीं। इयें वायांचि सैन्यें पाहीं। वल्गिजत आहाती॥ ४५८॥
हे जे मिळोनियां मेळे। कुंथती वीरवृत्तीचेनि बळें। यमावरी गजदळें। वाखाणिजताती॥ ४५९॥
म्हणती सृष्टीवरी सृष्टी करूं। आण वाहूनि मृत्यूतें मारूं। जगाचा भरूं। घोंटु यया॥ ४६०॥
पृथ्वी सगळीचि गिळूं। आकाश वरिचियांवरि जाळूं। काय बाणवरी खिळूं। वारयातें॥ ४६१॥
ऐशा चतुरंगाचिया संपदा। करित महाकाळेंसीं स्पर्धा। वांटिवेचिया मदा। वळंघले जें॥ ४६२॥
बोल हतियेराहूनि तिखट। दिसती अग्निपरिस दासट। मारकपणें काळकूट। महुर म्हणत॥ ४६३॥

तरि हे गंधर्वनगरींचें उमाळे। जाण पोकळीचे पेंडवळे। अगा चित्रींचे पुतळे। वीर हे देखें॥ ४६४॥
हा गा मृगजळाचा पूर आला। दळ नव्हे कापडाचा साप केला। इया शृंगारूनियां खाला। मांडिलिया पैं॥ ४६५॥
येर चेष्टविते जें बळ। तें मागांचि मियां ग्रासिलें सकळ। आतां कोल्हेरिचे वेताळ। तैसे निर्जीव हे आहाती॥ ४६६॥
हालविती दोरी तुटली। तरि तियें खांबावरील बाहुलीं। भलतेणें लोटिलीं। उलथोनि पडती॥ ४६७॥

अर्थ—तर अर्जुना! मी (खरोखर काळ) आहे, हें स्पष्ट जाण. सर्व लोकांचा संहार करण्याकरितां मी वाढत आहे. हीं जिकडे तिकडे सर्वत्र माझीं उग्र मुखे पसरलीं असून, या सर्व विश्वाला आतां मी गिळून टाकीन॥ ४५१॥ तेव्हा अर्जुन म्हणतो, अरेरे! अगोदर विश्वरूपाच्या मुखांत होत असलेल्या सर्व लोकांच्या संहाराच्या संकटाला पाहून मी त्रस्त झालों होतों; म्हणून भगवंताची प्रार्थना केली, तों तो अधिकच निष्ठुरपणाने प्रगट झाला॥ ४५२॥ तसेच जीवाची आशा नाहीशी करणाऱ्या निष्ठुर बोलण्याने अर्जुन अत्यंत कष्टी होईल, म्हणून भगवान लगेच म्हणाले, अर्जुना! पण त्यांत दुसरें एक आहे॥ ४५३॥ तुम्ही पांडव मात्र आतां होणाऱ्या या संहाररूपी बाधेच्या बाहेर आहांत. हें ऐकतांच अर्जुनाने जात असलेले प्राण सांवरले॥ ४५४॥ अर्जुन मरणाच्या महामारींत सांपडला होता; पण भगवंताच्या आश्वासनाने पुन: देहावर आला आणि मग भगवंताच्या बोलण्याकडे चित्त देऊं लागला॥ ४५५॥ देव असें म्हणू लागले की, अर्जुना! तुम्ही माझे आहांत, हें लक्षांत असू दे. बाकीच्या सर्वांना ग्रासण्याकरितां मी प्रवृत्त झालों आहे॥ ४५६॥ प्रलयकालच्या प्रचंड अग्निमध्ये, ज्याप्रमाणे लोण्याचा गोळा घालावा, त्याप्रमाणे हें संपूर्ण जग, माझ्या तोंडांत जात आहे, हें जें तू पाहिलेंस॥ ४५७॥ त्यांत तर यत्किंचितहि अन्यथा होणार नाही. दोन्हीकडील सैन्यें व्यर्थच आपल्या पराक्रमाची फुशारकी मारत आहेत॥ ४५८॥ असे हे सैन्याचे मिळालेले समुदाय, पराक्रमाचें बळ आणून कुंथूं लागले आहेत आणि यमापेक्षाहि आमचें गजदळ श्रेष्ठ आहे अशी त्यांची प्रशंसा करतात॥ ४५९॥ हे म्हणतात की, या सृष्टीवर दुसरी सृष्टि निर्माण करूं. पैज बांधून मृत्यूला मारूं आणि या सर्व जगाचा घोंट भरूं॥ ४६०॥ सर्व पृथ्वी गिळूं. वरच्या वरच आकाश जाळूं. वाऱ्याला देखील बाणाने जखडून टाकूं॥ ४६१॥ पराक्रमाच्या मदाने मत्त होऊन अशा या चतुरंग सैन्यसंपत्तीच्या बळावर ते कृतान्ताशीं स्पर्धा करीत आहेत॥ ४६२॥ यांचे हे सर्व शब्द शस्त्रांपेक्षां तीक्ष्ण आणि अग्निपेक्षा दाहक दिसतात आणि प्राण घेण्यांत त्यांच्यापेक्षा काळकूटहि मधुरच म्हणावें लागेल॥ ४६३॥ परंतु अर्जुना! हे सर्व योद्धे गंधर्वनगरीचे देखावे किंवा पोकळीचे भेंडोळे अथवा चित्रांतील पुतळे आहेत, पहा!॥ ४६४॥ अरे! हीं सर्व सैन्यें म्हणजे मृगजळाचा पूर होय, हीं सैन्यें नसून कापडाचा साप आहे किंवा कातड्यांत भुसा भरून तयार केलेल्या व शृंगारलेल्या ह्या बाहुल्या मांडल्या आहेत॥ ४६५॥ बाकी हालचाल करविणारें जें बळ मी पहिलेच गिळून टाकलें आहे. आतां हे सर्व सैन्य कुंभाराने केलेल्या मातीच्या वेताळाप्रमाणे निर्जीव आहे॥ ४६६॥ बाहुलीला नाचविणारी दोरी तुटली तर, खांबावरील बाहुल्या वाटेल त्याने लोटल्या की उलथून खालीं पडतात॥ ४६७॥

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम्।
मयैवैते निहता: पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्॥ ३३॥

अर्थ—म्हणून तूं उठ. (शस्त्र घे.) यश संपादन कर. शत्रूंना जिंकून या संपन्न राज्याचा उपभोग घे. यांना मी पूर्वीच मारलें आहे. अर्जुना! तूं आतां निमित्तमात्र हो॥ ३३॥

तैसा सैन्याचा यया बगा। मोडतां वेळु नलगे पैं गा। म्हणोनि उठीं उठीं वेगां। शाहाणा होईं॥ ४६८॥
तुवां गोग्रहणाचेनि अवसरें। घातलें मोहनास्त्र एकसरें। मग विराटाचेनि महाभेडें उत्तरें। आसडूनि नागविलें॥ ४६९॥
आतां हें त्याहूनि निपटारें जाहालें। निवटीं आयितें रण पडिलें। घेई यश रिपु जिंतिले। एकलेनि अर्जुनें॥ ४७०॥
आणि कोरडें यशचि नोहे। समग्र राज्यही आलें आहे। तूं निमित्तमात्रचि होये। सव्यसाची॥ ४७१॥

अर्थ—त्याप्रमाणे सैन्याची ही रचना मोडण्याला, अर्जुना! वेळ लागणार नाही; म्हणून एकदम उठ, शहाणा हो॥ ४६८॥ गोग्रहणाचे वेळीं तूं संपूर्ण शत्रूसैन्यावर मोहनास्त्र घातलेंस व मग विराटराजाच्या अति भित्र्या उत्तराने

सैन्याचीं वस्त्रें हिसकावून त्यांना नग्न केलें॥ ४६९ ॥ आतां हें सैन्य त्याच्याहूनहि निकृष्ट दर्जाचें झालें आहे. आधींच मरून पडलेलें सैन्य नाहीसें कर व एकट्या अर्जुनाने शत्रूला जिंकलें असें यश घे॥ ४७० ॥ नुसतें यशच नाही तर, संपूर्ण राज्यहि तुला प्राप्त झालें आहे. अर्जुना! यांच्या नाशाला तूं नुसता निमित्तमात्रच होणार आहेस॥ ४७१ ॥

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च कर्णं तथान्यानपि योधवीरान्।
मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठायुध्यस्व जेतासि रणे सपत्नान्॥ ३४॥

अर्थ—द्रोणाचार्य, भीष्माचार्य, जयद्रथ, कर्ण तसेच इतर मोठमोठें योद्धें यांना मी मारलेलेंच आहे. तू आतां त्यांना मार, दु:ख करूं नकोस, युद्ध कर आणि तूं रणांत शत्रूंना जिंकशील॥ ३४॥

द्रोणाचा पाडु न करीं। भीष्माचें भय न धरीं। कैसेनि कर्णावरी। परजूं हें न म्हण॥ ४७२॥
कोण उपायो जयद्रथा कीजे। हें न चिंतू चित्त तुझें। आणीकही आथि जे जे। नावाणिगे वीर॥ ४७३॥
तेही एक एक आघवे। चित्रींचे सिंहाडें मानावें। जैसें वोलेनि हातें घ्यावें। पुसोनियां॥ ४७४॥
यावरी पांडवा। काइसा युद्धाचा मेळावा। हा आभासु गा आघवा। येर ग्रासिलें मियां॥ ४७५॥
जेव्हां तुवां देखिले। हे माझिया वदनीं पडिले। तेव्हांचि यांचें आयुष्य सरलें। आतां रितीं सोपें॥ ४७६॥
म्हणोनि वहिला उठीं। मियां मारिले तूं निवटीं। न रिगे शोकसंकटीं। नाथिलिया॥ ४७७॥
आपणचि आडखिळा कीजे। तो कौतुकें तैसा विंधोनि पाडिजे। तैसें देखें गा तुझें। निमित्त आहे॥ ४७८॥
बापा विरुद्ध जें जाहलें। तें उपजतांचि वाघें नेलें। आतां राज्येंशीं संचलें। यश तूं भोगीं॥ ४७९॥
सावियाचि उतत होते दायाद। आणि बळिये जगीं दुर्मद। ते वधिलें विशद। सायासु न लागतां॥ ४८०॥
ऐसिया इया गोष्टी। विश्वाच्या वाक्पटीं। लिहूनि घालीं किरीटी। विजयी होई॥ ४८१॥

अर्थ—द्रोणाच्या बरोबरीचा मी नाही असे मनांत आणूं नकोस. भीष्माची भीति बाळगूं नकोस. कर्णावर शस्त्र कसें चालवूं असें म्हणूं नकोस॥ ४७२ ॥ जयद्रथाला मारण्याकरितां कोणता उपाय करावा, याचें चिंतन मनांत करूं नकोस. आणखी जे जे नांवाजलेले पराक्रमी वीर आहेत॥ ४७३ ॥ ते सर्व ओल्या हातांनी पुसून घेण्यासारखे भिंतीवर काढलेल्या सिंहाचीं चित्रे आहेत असें मान॥ ४७४॥ अशा स्थितींत अर्जुना! हे काय युद्धाकरितां जमलेलें सैन्य आहे? हा सर्व भास असून, बाकीचे हें सर्व मी गिळून टाकले आहेत॥ ४७५ ॥ जेव्हा तूं हे सर्व माझ्या तोंडांत पडले असें पाहिलेस, तेव्हाच त्यांचें आयुष्य संपलें. हीं आतां रिकामी सोपटीं आहेत॥ ४७६ ॥ म्हणून लवकर उठ. मी मारलेल्यांना तूं नाहीसें कर आणि व्यर्थ शोकसंकटांत पडूं नकोस॥ ४७७ ॥ आपणच एखादें निशाण उभें करावें आणि कौतुकाने त्याला बाण मारून पाडावें, त्याप्रमाणे यांच्या नाशाला तुझें नुसतें निमित्त आहे, पहा!॥ ४७८ ॥ बा अर्जुना! जे तुझे वैरी जन्मास आले, ते जन्मल्याबरोबरच वाघाने नेले (असे समज) आतां राज्यासह मिळविलेल्या यशाचा तूं उपभोग घे॥ ४७९ ॥ खरोखरच, हे तुझे भाऊबंद अत्यंत उन्मत्त, मदांध व जगामध्यें जे बलवान् झाले आहेत, ते तूं कांही श्रम न पडतां सहज मारलेस॥ ४८० ॥ अशा प्रकारच्या गोष्टी जगामध्यें सर्व लोकांच्या मुखरूपी पटावर, अर्जुना! तूं लिहून ठेव-म्हणजे सर्व लोकांच्या तोंडीं होऊ दे व विजयी हो॥ ४८१ ॥

सञ्जय उवाच

एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य कृताञ्जलिर्वेपमान: किरीटी।
नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं सगद्गदं भीतभीत: प्रणम्य॥ ३५॥

अर्थ—संजय म्हणतो, भगवंताचें हें वचन ऐकून, हात जोडून, कांपत कांपत नमस्कार करून व भीत भीत अत्यंत नम्र होऊन पुन: सद्गद अंतकरणाने अर्जुन श्रीकृष्णाला म्हणाला॥ ३५॥

ऐसी आघवीचि हे कथा। तया अपूर्णमनोरथा। संजयो सांगे कुरुनाथा। ज्ञानदेवो म्हणे॥ ४८२॥
मग सत्यलोकौनि गंगाजळ। सुटलिया वाजत खळाळ। तैशी वाचा विशाळ। बोलतां तया॥ ४८३॥
नातरी महामेघांचे उमाळे। घडघडीत एके वेळे। कां घुमघुमिला मंदराचळें। क्षीराब्धी जैसा॥ ४८४॥

तैसें गंभीरें महानादें। हें वाक्य विश्वकंदें। बोल्लिलें अगाधें। अनंतरूपें॥ ४८५ ॥
तें अर्जुनें मोटकें ऐकिलें। आणि सुख कीं भय दुणावलें। हें नेणों परि कांपिन्नलें। सर्वांग तयाचें॥ ४८६ ॥
सखोलपणें वळली मोट। आणि तैसैचि जोडले करसंपुट। वेळोवळां ललाट। चरणीं ठेवी॥ ४८७ ॥
तेवींचि कांहीं बोलों जाये। तंव गळा बुजालाचि ठाये। हें सुख कीं भय होये। हें विचारा तुम्ही॥ ४८८ ॥
परि तेव्हां देवाचेनि बोलें। अर्जुना हें ऐसें जाहलें। मियां पदांवरी देखिलें। श्लोकाचिया॥ ४८९ ॥
मग तैसाचि भेणभेण। पुढती जोहारूनि चरण। मग म्हणे जी आपण। ऐसें बोल्लिलेति॥ ४९० ॥

अर्थ—श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, हें संपूर्ण वर्तमान ज्याचे मनोरथ पूर्ण झाले नाहीत, अशा कुरुराज धृतराष्ट्राला संजय सांगूं लागला॥ ४८२ ॥ मग ज्याप्रमाणे सत्यलोकापासून उगम पावलेल्या गंगाजळाचा खळाळ वाजतो, तशी अर्जुनाशीं बोलतांना भगवंताची वाणी गंभीर होती॥ ४८३ ॥ किंवा आकाशांत महामेघाचे उमाळे उठले असतां एकदम घडघड असा आवाज होतो किंवा क्षीरसमुद्राच्या मंथनाचे वेळीं मंदराचलाच्या मंथनाचा आवाज घुमूं लागला॥ ४८४ ॥ त्याप्रमाणे विश्वरूप धारण करणाऱ्या व विश्वांचें कारण असणाऱ्या अगाध भगवंताने गंभीर व थोर नाद करणाऱ्या वाणीने हें वाक्य उच्चारिलें॥ ४८५ ॥ तें वाक्य अर्जुनाने केवळ ऐकलें मात्र आणि त्याच्या मनांत सुख झालें की भीति दुप्पट वाढली. हें आम्ही जाणत नाही; पण त्याचें सर्वांग मात्र कांपू लागलें॥ ४८६ ॥ त्याचा शब्द खोल जाऊन मुरकुंडी वळली व तशा स्थितींतच त्याने हात जोडले व वारंवार चरणावर मस्तक ठेऊं लागला॥ ४८७ ॥ त्याचप्रमाणे कांही बोलण्याचा प्रयत्न करूं लागता त्याचा कंठ भरून येई. हें सुखाचें लक्षण आहे की भीतीचें लक्षण होय याचा तुम्हीच विचार करा॥ ४८८ ॥ पण तेव्हा देवाच्या बोलण्याने अर्जुनाची अशी स्थिति झाली ती श्लोकांतील पदावरून मी जाणली आहे॥ ४८९ ॥ मग तसाच भीत भीत पुन: भगवंताच्या चरणांना नमस्कार करून अर्जुन म्हणतो, अहो जी भगवंता! आपण असे बोललांत॥ ४९० ॥

अर्जुन उवाच

स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च।
रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति सर्वे नमस्यन्ति च सिद्धसङ्घाः॥ ३६ ॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, हे ऋषीकेशा! सर्व जगत्, तुझी कीर्ति श्रवण करून व गाऊन, आनंदित होतें व तुझें प्रेम करतें, ते योग्यच आहे. तसेंच राक्षस हे तुझ्या भीतीने दशदिशेला पळतात हे त्यांना योग्यच आहे आणि सिद्धांचे समुदाय तुला नमस्कार करतात, हेहि त्यांना उचितच आहे॥ ३६ ॥

ना तरी अर्जुना मी काळु। आणि ग्रासिजे तो माझा खेळु। हा बोलु तुझा कीर अढळु। मानूं आम्ही॥ ४९१ ॥
परि तुवां जी काळें। आजि स्थितीचिये वेळे। ग्रासिजे हें न मिळें। विचारासी॥ ४९२ ॥
कैसेनि आंगीचें तारुण्य काढावे। कैचें नव्हेते वार्धक्य आणावें। म्हणोनि करूं म्हणसी तें नव्हे। बहुतकरुनी॥ ४९३ ॥
हां जी चौपाहारी न भरतां। कोणेही वेळे श्रीअनंता। काय माध्यान्हीं सविता। मावळतु आहे॥ ४९४ ॥
पैं तुज अखंडिता काळा। तिन्ही आहाती जी वेळा। तया तिन्ही परी सबळा। आपुलालियां समयीं॥ ४९५ ॥
जे वेळीं हो लागे उत्पत्ती। ते वेळीं स्थिति प्रळयो हारपती। आणि स्थितिकाळीं न मिरविती। उत्पत्ति प्रळयो॥ ४९६ ॥
पाठीं प्रळयाचिये वेळे। उत्पत्ति स्थिति मावळे। हें कायसेनही न ढळे। अनादि ऐसें॥ ४९७ ॥
म्हणोनि आजि तरी भरें भोगें। स्थिती वर्जिजत आहे जगें। एथ ग्रसिसी तूं हें नलगे। माझां जीवीं॥ ४९८ ॥
तंव संकेतें देव बोले। अगा या दोन्हीं सैन्यांसींचि मरण पुरलें। तें प्रत्यक्ष तुज दाविलें। येर यथाकाळें जाण॥ ४९९ ॥

अर्थ—नाही तरी अर्जुना! मी काळ आहे आणि सर्व सृष्टीचा संहार करणें हा माझा खेळ आहे, असें जे भगवंता! तूं बोललास, तें निश्चयाने आम्ही खरें मानतो॥ ४९१ ॥ पण देवा! तूं काळ असलास तरी आज जगताचें पालन करण्याचा समय असतांना, काळरूपी त्वां सर्व जगताचा संहार करावा, हें विचार करून पाहतां विसंगत दिसतें॥ ४९२ ॥ तारुण्यपणांत आंगचें तारुण्य काढून, नसलेलें वार्धक्य कसें आणतां येईल? म्हणून तूं जो संहार

करूं म्हणतोस, तो बहुतकरून होऊं नये॥ ४९३ ॥ अहो जी देवा! दिवसाचे चार प्रहर न संपतांच, कोणतेहि वेळीं माध्यान्हकाळींच सूर्य कधीं मावळतो काय?॥ ४९४॥ तूं जरी अखंड काळस्वरूप असलास, तरी तुला तीन वेळा आहेत. त्या तिन्ही आपआपल्या काळीं बलवान असतात॥ ४९५ ॥ जेव्हा विश्वाची उत्पत्ति होऊं लागते, तेव्हा स्थिति व प्रलय राहत नाहीत आणि स्थितीकाळीं उत्पत्ति प्रलय दिसत नाहीत॥ ४९६ ॥ नंतर प्रलयाचे वेळीं उत्पत्ति स्थिति नसतात. हा प्रवाह अनादि असून, तो कधींहि बदलत नाही॥ ४९७॥ म्हणून आज हें सर्व भोगाने संपन्न असलेलें जग स्थिति अवस्थेंत आहे. अशा स्थितींत या जगाला तूं ग्रासतोस हें म्हणणे माझ्या मनाला पटत नाही॥ ४९८॥ तेव्हा भगवान म्हणाले बा अर्जुना! संकेतदृष्टीने पाहतां या दोन्ही सैन्याचा माझा पालनकाल संपला आहे हें तुला मी प्रत्यक्षच दाखविलें. बाकी प्रत्यक्ष संहार कालानुसारच होणार, हें जाण॥ ४९९॥

गूढार्थदीपिका—संकेंतें—म्हणजे ईश्वराच्या सर्वज्ञतारूप ज्ञानदृष्टीने. या दृष्टीने पाहतां भूत भविष्य व वर्तमान असा काळाचा त्रिविध भेद प्रत्ययाला येत नाही व सृष्टीची उत्पत्ति, स्थिति, लय हे तिन्ही एकदमच दिसतात.

हा संकेतु जंव अनंता। वेळु लागला बोलतां। तंव अर्जुनें लोकु मागुता। देखिला यथास्थिति॥ ५००॥

अर्थ—हा संकेत सांगता असतांना जो थोडा वेळ लागला, तितक्या वेळांत, पूर्वी लोक जशा स्थितींत होते तशा स्थितींतच, अर्जुनाने सर्व लोक पाहिले॥ ५००॥

मग म्हणतसे देवा। तूं सूत्री विश्वलाघवा। जग आला मा आघवा। पूर्वस्थिति पुढती॥ ५०१॥
परि पडिलिया दुःखसागरीं। तूं काढिसी कां जयापरी। ते कीर्ति तुझी हरी। आठवित असें॥ ५०२॥
कीर्ति आठवितां वेळोवेळां। भोगीतसे महासुखाचा सोहळा। तेथ हर्षामृतकल्लोळा। वरि लोळत आहों॥ ५०३॥

अर्थ—तेव्हा मग अर्जुन म्हणूं लागला, देवा! विश्वरूपी मायाखेळाचा तूं सूत्रधार आहेस. पुनः हें जग पूर्वस्थितींत आले ना!॥ ५०१ ॥ परंतु दुःखसागरांत पडलेल्या आपल्या भक्तांना तूं बाहेर काढतोस, अशी जी तुझी कीर्ति आहे, त्या कीर्तीची माझ्या अंतःकरणांत आठवण होत आहे॥ ५०२॥ ती कीर्ति पुनः पुनः आठवितांना मी चित्तांत अत्यंत सुखाचा सोहळाहि भोगत आहे आणि तेथे त्या सुखांतील हर्षरूपी अमृताच्या लाटांवर मी लोळत आहे॥ ५०३॥

गूढार्थदीपिका—भगवंताची भक्तवत्सलता वारंवर आठवून. भक्तांना अत्यंत प्रेम व सुख प्राप्त होतें.

देवा जियालेपणें जग। धरी तुझां ठायीं अनुराग। आणि दुष्टां तयां भंग। अधिकाधिक॥ ५०४॥
पैं त्रिभुवनींचिया राक्षसां। महाभय तूं हृषीकेशा। म्हणोनि पळताती दिशां। पैलीकडे॥ ५०५॥
येर सुरनर सिद्ध किन्नर। किंबहुना चराचर। ते तुज देखोनि हर्षनिर्भर। नमस्कारित असती॥ ५०६॥

अर्थ—देवा! तूं जीवदान दिल्यामुळें हे जग तुझ्या ठिकाणी प्रेम करीत आहे आणि दुष्टांचा अधिकाधिक मनोभंग होत आहे॥ ५०४॥ कारण त्रैलोक्याच्या सर्व राक्षसांना, भगवंता! तूं महाभयरूप वाटतोस; म्हणून ते दाही दिशेच्या पलीकडे पळून जात आहेत॥ ५०५॥ बाकीचे देव, मनुष्य, सिद्ध, किन्नर, किंबहुना सर्व प्राणी तुला पाहून अत्यंत आनंदित होत्साते, तुला नमस्कार करीत आहेत॥ ५०६॥

कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे।
अनन्त देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्तत्परं यत्॥ ३७॥

अर्थ—ब्रह्मदेवाचा उत्पन्नकर्ता म्हणून श्रेष्ठ अशा महात्म्या हे राक्षस तुला कां बरें नमस्कार करीत नाहीत! हे अनंता! देवदेवा, जगन्निवासा! सत् व असत् किंवा कार्य-कारण जगताचें पलीकडे असणारें जें आहे तें अक्षरस्वरूप तूंच आहेस॥ ३७॥

एथ गा कवणा कारणा। राक्षस हे नारायणा। न लगतीचि चरणा। पळते जाहले॥ ५०७॥
आणि हें तूतें काइ पुसावें। येतुलाले आम्हांसिही जाणवे। तरी सूर्योदयीं राहावें। कैसेनि तमें॥ ५०८॥
तूं स्वप्रकाशाचा आगरु। आणि जाहाला आहासि गोचरु। म्हणोनियां निशाचरां केरु। फिटला सहजें॥ ५०९॥

हें येतुले दिवस आम्हां। कांहीं नेणवेंचि श्रीरामा। आतां देखतसों महिमा। गंभीर तुझा॥ ५१०॥
जेथूनि नाना सृष्टीचिया वोळी। पसरती भूतग्रामाचिया वेली। तया महद्ब्रह्मातें व्याली। दैविकी इच्छा॥ ५११॥
देवो निःसीमतत्त्व सदोदितु। देवो निःसीमगुण अनंतु। देवो निःसीमसाम्य सततु। नरेंद्र देवांचा॥ ५१२॥
जी तु त्रिजगतिये वोलावा। अक्षर तूं सदाशिवा। तूंचि संतासंत देवा। तयाही अतीत तें तूं॥ ५१३॥

अर्थ—हे नारायणा! येथे हे राक्षस कोणत्या कारणाने तुझ्या चरणाला नमस्कार न करतांच पळून जात आहेत?॥ ५०७॥ आणि हे तुला कशाला विचारायला पाहिजे? एवढें आम्हांलाहि कळतें की, सूर्योदय झाल्यावर आंधाराने कसे राहावयाचें॥ ५०८॥ देवा! तूंच स्वयंप्रकाशाचें अमर्याद कोठार आहेस आणि तोच तूं आम्हाला प्रत्यक्ष दृष्टीस पडला आहेस; म्हणून संपूर्ण राक्षसरूपी केर सहजच नाहीसा झाला॥ ५०९॥ इतके दिवस, हे भगवंता! आम्ही हे कांहीच जाणत नव्हतों. आतां तुझा अगाध महिमा आम्हांला कळून आला आहे. ॥ ५१०॥ जेथून अनंत सृष्टीच्या रांगा व चतुर्विध प्राण्यांच्या वेली पसरतात त्या अव्यक्त मायेला तुज देवाच्या इच्छेने जन्म दिला॥ ५११॥ सदासर्वदा असणारी अमर्याद सत्ता देवा! तूच आहेस. अनंत व अमर्याद गुणस्वरूप तूच आहेंस. नित्य व अमर्याद अशी समब्रह्मस्थिति तूंच आहेस. तूं देवांचाहि देव आहेस॥ ५१२॥ तूं त्रैलोक्याचा जिव्हाळा असून, हे सदाशिवा! तूं अविनाशी आहेंस. कार्यकारणरूप जगत् तूंच झाला असून, त्यावेगळे जें आहे, तेंहि तूंच आहेस॥ ५१३॥

त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनन्तरूप॥ ३८॥

अर्थ—आदिदेव व पुराण पुरुष तूंच आहेस. तूंच या जगाला अंतिम आश्रय आहेस, जाणणारा तूंच असून जाणलें जाणारेंहि तूच आहेंस. अत्यंत श्रेष्ठ गति तूच असून, हें विश्वरूपा! तूच या जगाला व्यापिलें आहेस॥ ३८॥

तु प्रकृति पुरुषांचियां आदी। जी महत्तत्त्वां तूंचि अवधी। स्वयें तूं अनादी। पुरातन॥ ५१४॥
तूं सकळ विश्वजीवन। जीवांसि तूंचि निधान। भूतभविष्याचें ज्ञान। तुझ्याचि हाती॥ ५१५॥
जी श्रुतीचिया लोचना। स्वरूपसुख तूंचि अभिन्ना। त्रिभुवनाचिया आयतना। आयतन तूं॥ ५१६॥

अर्थ—देवा! तू या प्रकृतिपुरुषाचाही आदि म्हणजें कारण आहेस. जी भगवंता! महत्तत्त्वाचे शेवटही तूच आहेस. स्वतः तूं अनादि पुरातन आहेस॥ २१४॥ तूं सर्व विश्वाचें जीवन असून, सर्व जीवाचें अधिष्ठान तूच आहेस आणि भूत-भविष्यज्ञान तुझ्या स्वाधीन आहे॥ ५१५॥ तू वेदाचे डोळे आहेस. आत्मस्वरूपाशीं तूं अभिन्न आहेस आणि म्हणून आत्मस्वरूपाचें सुखहि तूच आहेस. तूच संपूर्ण त्रिभुवनाला आधार असणाऱ्या विश्वरूपालाहि आधार आहेस॥ ५१६॥

गूढार्थदीपिका—त्रिभुवनाचिया आयतना। आयतन तूं—आयतन म्हणजे आधार. या शब्दाचा "माया" असा अर्थ करून, माया ही त्रिभुवनाला आधार आहे, असे कोणी म्हणतात.

पण त्रिगुणात्मक माया व तिचें कार्य त्रिभुवन, हे दोन्ही भ्रमरूपच आहेत आणि भ्रमच भ्रमाला आधार होऊं शकत नाही. भ्रमाला आधार सत्य वस्तु असली पाहिजे, असे वेदान्तांत मानलें असल्यामुळे, येथे त्रिगुणात्मक माया ही त्रिभुवनाला आधार आहे असे म्हणतां येत नाही.

कोणी म्हणतील की, ज्ञानदृष्टीने पाहतां, दोरी ही वस्तु भ्रमजन्यच आहे, तरीपण तिच्यावर सर्पवस्तूचा भ्रम होतोच की नाही? या शंकेला उत्तर असे आहे की, दोरीवर सर्पाचा भ्रम होतो, असे अज्ञानी मूर्ख जरी म्हणत असले, तरी वेदान्तशास्त्राचें तसें म्हणणे नाही. चैतन्य हें सत्य असून, सर्व वस्तूंचे ठिकाणी व्यापक असल्यामुळे तें दोरींतहि आहे आणि दोरीला आधार असणाऱ्या त्या चैतन्यावरच सर्पाचा भ्रम होतो, दोरीवर होत नाही असे वेदान्त शास्त्रांतून सांगितलें आहे.

भगवंतांनी जेव्हा अर्जुनाला विश्वरूप दाखविलें, तेव्हा अर्जुनाला भगवंताच्या श्रीकृष्णस्वरूपाचे ठिकाणी विश्वरूप (ओ. २९१-अ. ११) व विश्वरूपाचे ठिकाणी त्रिभुवन आहे (ओ. २४४-अ. ११) असे जे स्पष्ट दिसत

होते, त्याचाच उल्लेख करून, "देवा! तूं विश्वरूपाने त्रिभुवनाला आधार असून, श्रीकृष्णस्वरूपाने विश्वरूपालाहि आधार आहेस" अशी अर्जुनाने भगवान श्रीकृष्णाची स्तुति केली आहे; म्हणून या ओवींतील "त्रिभुवनाचिया आयतना" या तिसऱ्या चरणांतील "आयतन" या शब्दाचा "विश्वरूप" व "आयतन तूं" या चवथ्या चरणांतील "आयतन" या शब्दाचा "श्रीकृष्णस्वरूप" असा अर्थ केला पाहिजे.

म्हणोनि जी परम। तूंतें म्हणिजे महाधाम। कल्पांतीं महद्ब्रह्म। तुजमाजीं रिगे॥ ५१७॥
किंबहुना तुवां देवें। विश्व विस्तारिलें आहे आघवें। तरि अनंतरूपा वानावें। कवणें तूंतें॥ ५१८॥

अर्थ—म्हणून भगवंता! तुला सर्वश्रेष्ठ म्हणतात व सर्वाचें अंतिम वसतिस्थान तुलाच म्हणतात. कल्पाचे शेवटीं ही माया तुझ्या ठिकाणींच लीन होते॥ ५१७॥ किंबहुना तूंच संपूर्ण जगत्स्वरूपाने प्रगट झाला आहेस, तेव्हा हे विश्वरूपा! तुझें वर्णन करण्यास कोण समर्थ आहे?॥ ५१८॥

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते॥ ३९॥
नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व।
अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः॥ ४०॥

अर्थ—वायु, यम, अग्नि, वरुण, चंद्र, ब्रह्मदेव व ब्रह्मदेवाचा पिता तूच आहेस. तुला सहस्रशः प्रणाम असोत. पुनः वारंवार तुला नमस्कार करतो॥ ३९॥ पूर्वदिशेस तुला नमस्कार असो. पश्चिमदिशेस तुला नमस्कार असो, हे सर्वरूपा! अनंत सामर्थ्य असलेल्या व अनंत पराक्रम करणाऱ्या! संपूर्ण जगत् तू एका आत्म्यानेच व्यापतोस; म्हणून तू सर्वरूप आहेस. अशा तुला सर्वत्र सर्व ठिकाणीं नमस्कार असो॥ ४०॥

जी काय एक तूं नव्हसी। कवणे ठायीं नससी। हें असो जैसा आहासी। तैसिया नमों॥ ५१९॥
वायु तूं श्रीअनंता। यम तूं नियमिता। प्राणिगणीं वसता। अग्नि तो तूं॥ ५२०॥
वरुण तूं सोम। स्त्रष्टा तूं ब्रह्म। पितामहाचा परम। आदि जनक तूं॥ ५२१॥
आणीकही जें जें कांहीं। रूप आथि अथवा नाहीं। तया नमो तुज तैसयाही। श्रीजगन्नाथा॥ ५२२॥
ऐसें सानुरागें चित्तें। स्तवन केलें पांडुसुतें। मग पुढती म्हणे नमस्ते। नमस्ते प्रभो॥ ५२३॥
पाठीं तिये साद्यंतें। न्याहाळी श्रीमूर्तीतें। आणि पुढती म्हणे नमस्ते। नमस्ते प्रभो॥ ५२४॥
पाहतां पाहतां प्रांतें। समाधान पावे चित्तें। आणि पुढती म्हणे नमस्ते। नमस्ते प्रभो॥ ५२५॥
इये चराचरीं जीं भूतें। सर्वत्र देखे तयांतें। आणि पुढती म्हणे नमस्ते। नमस्ते प्रभो॥ ५२६॥
ऐसी रूपें तियें अद्भुते। आश्चर्यें स्फुरती अनंतें। तंव तंव नमस्ते। नमस्तेचि म्हणे॥ ५२७॥
आणिक स्तुति ही नाठवे। आणि निवांतुही न बैसवे। नेणों कैसा प्रेमभावें। गाजोंचि लागे॥ ५२८॥
किंबहुना इयापरी। नमन केलें सहस्रवरी। कीं पुढती म्हणे श्रीहरी। तुज सन्मुखा नमो॥ ५२९॥
देवासि पाठी पोट आथि कीं नाहीं। येणें उपयोगु आम्हां काई। तरि तुज पाठिमोरेयाही। नमो स्वामी॥ ५३०॥
उभा माझिये पाठीसीं। म्हणोनि पाठिमोरें म्हणावें तुम्हांसी। सन्मुख विमुख जगेंसीं। न घडे तुज॥ ५३१॥
आतां वेगळालिया अवयवां। नेणें रूप करूं देवा। म्हणोनि नमो तुज सर्वा। सर्वात्मका॥ ५३२॥
जी अनंतबळसंभ्रमा। तुज नमो अमितविक्रमा। सकळकाळीं समा। सर्वदेशा॥ ५३३॥
आधविया अवकाशीं जैसें। अवकाशचि होऊनि आकाश असे। तूं सर्वपणें तैसें। पातलासि सर्व॥ ५३४॥
किंबहुना केवळ। सर्व हें तूंचि निखळ। परि क्षीरार्णवीं कल्लोळ। पयाचे जैसे॥ ५३५॥
म्हणोनियां देवा। तूं वेगळा नव्हसी सर्वां। हे आलें मज सद्भावा। आतां तूंचि सर्व॥ ५३६॥

अर्थ—देवा! तूं काय एक नाहीस व कोण्या ठिकाणी नाहीस? हे असो. जसा तूं आहेस तशाच तुला नमस्कार असो॥ ५१९॥ अनंता! तूंच वायु असून, प्राण्यांना कर्माप्रमाणे शासन करणारा यम, तूंच आहेस. सर्व प्राणिमात्रांच्या

जठरांत राहणारा अग्नि तूंच आहेस॥ ५२०॥ वरुण, सोम, सृष्टी उत्पन्न करणारा ब्रह्मदेव व ब्रह्मदेवाचाहि उत्पन्नकर्ता असा परम कारण तूच आहेस॥ ५२१॥ आणीकहि रूप आहे किंवा रूप नाही-जें जें कांही आहे, तें तूच आहेस. देवा! तशा तुला नमस्कार असो॥ ५२२॥ अशारीतीने प्रेमयुक्त चित्ताने भगवंताला अर्जुनाने नमन केले आणि पुन: भगवंता! तुला नमस्कार असो, तुला नमस्कार असो! असें म्हणूं लागला॥ ५२३॥ नंतर त्या संपूर्ण विश्वरूपाकडे पाहून पुन: भगवंता! तुला नमस्कार असो, तुला नमस्कार असो, असेंच म्हणू लागला॥ ५२४॥ एका एका अवयवाकडे पाहत पाहत, मनांत परम संतोष मानून पुन:, भगवंता! तुला नमस्कार असो, तुला नमस्कार असो, असें म्हणूं लागला॥ ५२५॥ हीं स्थावर-जंगम जीं भूतें आहेत, तीं सर्वत्र पाहूं लागला व पुन: पुन:, भगवंता! तुला नमस्कार असो, तुला नमस्कार असो, असेंच म्हणू लागला॥ ५२६॥ भगवंताची अद्भुत आश्चर्याने युक्त अशी असंख्य रूपें जों जों पाहूं लागला, तों तों तुला नमस्कार असो, तुला नमस्कार असो असेंच म्हणून लागला॥ ५२७॥ आणखी काय स्तुति करावी हें त्याला आठवत नव्हतें आणि मौनहि धरून राहवेना. प्रेमभावाने तो कसा नमस्ते, नमस्ते असा घोष करूं लागला, हे मला समजत नाही॥ ५२८॥ किंबहुना याप्रमाणे हजारों वेळा त्याने नमन केलें व पुन: हे श्रीहरी! माझ्या समोर असणाऱ्या तुला नमस्कार असो, असें म्हणू लागला॥ ५२९॥ देवाला पाठ व पोट आहे किंवा नाही, या विचाराचा आम्हाला काय उपयोग? तरी पाठीमागें असणाऱ्या तुला भगवंता! नमस्कार असो!॥ ५३०॥ माझ्या पाठीशीं उभा आहेस, म्हणून तुला पाठमोरे म्हणायचें, एरव्हीं तूं जगाच्या सन्मुख किंवा विन्मुख होऊं शकत नाहीस॥ ५३१॥ आतां तुझ्या वेगवेगळ्या अवयवांचें मी वर्णन करूं शकत नाही; म्हणून सर्वरूप व सर्वात्मक असलेल्या तुला नमस्कार असो॥ ५३२॥ अगाध सामर्थ्यसंपन्न व अगाध पराक्रम असणाऱ्या, सर्वकाळीं सर्व देशांत एकरूप, एकसारखा असणाऱ्या तुला भगवंता! नमस्कार असो॥ ५३३॥ ज्याप्रमाणे सर्व आकाशांत पोकळीच आकाशरूप होऊन आहे, त्याप्रमाणे सर्व नामरूपाने तू सर्व झाला आहेस॥ ५३४॥ पण क्षीरसमुद्रावर जसे दूधाचे तरंग उठावे, त्याप्रमाणे हे सर्व तूच केवळ नटला आहेस॥ ५३५॥ म्हणून देवा! या सर्व नामरूपाहून तूं वेगळा नाहीस आतां सर्व तूच आहेस, हें माझ्या पूर्ण प्रत्ययाला आलें॥ ५३६॥

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति।
अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वापि॥ ४१॥
यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु ।
एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम्॥ ४२॥

अर्थ—देवा! तुझा अगाध महिमा न जाणतां, चुकून किंवा प्रेमाने, तुला आपल्या बरोबरीचा आपला मित्र समजून अनादराने, हे कृष्णा! हे यादवा! हे सख्या! असे जे मी तुला मागें बोललों॥ ४१॥ तुजबरोबर, चालतांना किंवा फिरतांना, निजतांना, बसतांना, जेवतांना, तुझी थट्टा करून, मीच एकटा असतांना किंवा लोकांसमोर तुझा पुष्कळ अनादर केला, त्या संपूर्ण अपराधाची, प्रमाणाने न कळणाऱ्या तुज परमेश्वरापाशीं क्षमा मागतों॥ ४२॥

परि ऐसिया तूंतें स्वामी। कहींच नेणों जी आम्ही। म्हणोनि सोयरें संबंधधर्मीं। राहाटलों तुजसीं॥ ५३७॥
अहा थोर वाउर जाहलें। अमृतें संमार्जन म्यां केलें। वारिकें घेऊनि दिधलें। कामधेनूतें॥ ५३८॥
परिसाचा खडवाचि जोडला। कीं फोडोनि गांडोरा आम्ही घातला। कल्पतरू तोडोनि केला। कुंपु शेता॥ ५३९॥
चिंतामणीची खाणी लागली। परी नोळखेचि म्हणौनि अव्हेरिली। तैसी तुझी जवळिक धाडिली। सांगातीपणें॥ ५४०॥
हे आजिचेंचि पाहें पां रोकडें। कवण झुंज हें केवढें। एथ परब्रह्म तूं उघडें। सारथी केलासी॥ ५४१॥
ययां कौरवांचिया घरा। शिष्टाई धाडिलासि दातारा। ऐसा वणिजेसाठीं जगेश्वरा। विकलासि आम्हीं॥ ५४२॥
तूं योगियांचें समाधिसुख। कैसा जाणेचिना मी मूर्ख। उपरोधु जी सन्मुख। तुजसीं करूं॥ ५४३॥
तूं या विश्वाची अनादि आदी। बैससी जिये सभासदीं। तेथें सोयरीकीचिया संबंधी। रळीं बोलें॥ ५४४॥
विपायें राउळा येवों। तरि तुझेनि अंगें मानु पावों। न मानसी तरी जावों। रुसोनि सलगी॥ ५४५॥

पायां लागोनि बुझावणी। तुझा ठायीं शार्ङ्गपाणीं। पाहिजे ऐशी करणी। बहु केली आम्हीं॥ ५४६॥
सजनपणाचिया वाटा। तुजपुढें बैसें उफराटा। हा पाडु काय वैकुंठा। परि चुकलों आम्ही॥ ५४७॥
देवेंसि कोल्काठी धरूं। आखाडां झोंबीलेंबी करूं। सारी खेळतां तस्करूं। निकरेंही भांडों॥ ५४८॥
चांग तें उराउरी मागों। सर्वज्ञासि कीं बुद्धी सांगों। तेवींचि म्हणों काय लागों। तुझें आम्ही॥ ५४९॥
ऐसा अपराधु हा आहे। जो त्रिभुवनीं न समाये। जी नेणतांचि कीं पाये। शिवतले तुझे॥ ५५०॥
देवो बोनयाच्या अवसरीं। लोभें कीर आठवण करी। परि माझा निसुग गर्व अवधारीं। जे फुगूनचि बैसें॥ ५५१॥
देवाचिया भोगायतनीं। खेळतां आशंकेना मनीं। जी रिगोनियां शयनीं। सरिसा पहुडें॥ ५५२॥
'कृष्णा' म्हणोनि हाकारिजे। यादवपणें तूंतें लेखिजे। आपली आण घालिजे। जातां तुज॥ ५५३॥
मज एकासनीं बैसणें। कां तुझा बोल न मानणें। हें वोळखीचेनि दाटपणें। बहुत घडलें॥ ५५४॥
म्हणोनि काय काय आतां। निवेदिजेल अनंता। मी राशि आहें समस्तां। अपराधांची॥ ५५५॥
यालागीं पुढां अथवा पाठीं। जियें राहाटलों बहुवें वोखटीं। तियें मायेचिया परी पोटीं। सामावीं प्रभो॥ ५५६॥
जी कोणी एके वेळें। सरिता घेऊनि येती खडुळें। तियें सामाविजेति सिंधुजळे। आन उपाय नाहीं॥ ५५७॥
तैसीं प्रीती कां प्रमादें। देवेंसीं मज विरुद्धें। बोलविलीं तियें मुकुंदें। उपसाहावीं जी॥ ५५८॥
आणि देवाचेनि क्षमत्वें क्षमा। आधारु जाली आहे या भूतग्रामा। म्हणोनि जीजी पुरुषोत्तमा। विनवूं तें थोडें॥ ५५९॥
तरि आतां अप्रमेया। मज शरणागता आपुलिया। क्षमा कीजो जी यया। अपराधांसी॥ ५६०॥

अर्थ—पण, महाराज! सर्व नामरूपाने तूंच नटला आहेस असे आम्ही पूर्वी कधीं जाणत नव्हतो, म्हणूनच तुझ्याशीं सोयरेपणाच्या नात्याने वागलों॥ ५३७॥ हाय हाय! माझें फार अनुचित वर्तन झालें. मी अमृताने सडासंमार्जन केलें. कामधेनूला देऊन तिच्याबद्दल मी शिंगरूं घेतलें॥ ५३८॥ प्रत्यक्ष परिसाचा खडक प्राप्त झाला असतांना, आम्ही तो फोडून घराच्या पायऱ्यांत घातला आणि कल्पतरूच्या डाहाळ्या तोडून शेताला कुंपण केलें॥ ५३९॥ चिंतामणीची खाण लागली असतां, ओळखता न आल्यामुळे तिची उपेक्षा केली जावी, त्याप्रमाणे तुमच्याशीं अति सलगीने वागून तुमची प्राप्ति व्यर्थ दवडिली॥ ५४०॥ प्रत्यक्ष आजचीच गोष्ट पाहा. हें युद्ध काय आहे आणि कितीसें आहे; पण तूं स्पष्ट परब्रह्म असूनहि तुला मी आपला सारथि केला॥ ५४१॥ आणि जगन्नाथा! या कौरवांच्या घरी तडजोड करण्याकरितां आम्ही तुला पाठविलें. याप्रमाणे आम्ही आपले क्षुल्लक व्यवहारदेखील तुझ्याकडून करविलें॥ ५४२॥ योगीलोक तुझ्याच ठिकाणीं समाधि लावून सुख भोगतात; पण मी मूर्ख, हें कसें म्हणून जाणत नव्हतो आणि तुझ्या तोंडावर तुझी थट्टा करीत असे॥ ५४३॥ तूं या विश्वाचें अनादिकारण असतांना, तूं ज्या सभासदांमध्यें बसत होतास, त्या सभासदांच्या समोर सोयरिकीच्याच नात्याने तुझ्याशी चेष्टा करीत होतों॥ ५४४॥ कदाचित् तुमच्या राजमंदिरात मी आलो तर, तुमच्याकडून सत्कार करून घेत असे. जर मानाने तसें वागविलें नाही तर अत्यंत सलगीमुळें मी तुमच्यावर रुसूनहि जात होतों॥ ५४५॥ हे शार्ङ्गपाणि भगवंता! खरोखर तुझ्या पाया पडून व क्षमेकरितां तुझी याचना करून, तुझें सांत्वन केलें पाहिजे, अशा प्रकारची वागणूक माझ्याकडून फार झाली॥ ५४६॥ सोयरेपणाच्या नात्याने तुझ्याकडे पाठ करून बसत असे, भगवंता! हे योग्य होतें काय? पण आम्ही चुकलों॥ ५४७॥ देवा! तुमच्या बरोबर दांडपट्टा खेळलों, आखाड्यांत तुमच्याशी झोंबाझोंबीं केली. सोंगट्या खेळतांना खोटे दान देत असूं आणि हातघाईवर येऊन, तुमच्याशीं भांडतहि असूं॥ ५४८॥ जी चांगली वस्तु असेल, ती बळजबरीने मागत असू. सर्वज्ञ अशा तुला शहाणपण सांगत असू त्याचप्रमाणे केव्हा 'आम्ही तुझे काय लागतो' असेहि म्हणत असूं॥ ५४९॥ असे हे त्रैलोक्यांत मावणार नाही इतके अपराध माझ्याकडून झाले आहेत; पण देवा! हे सर्व अज्ञानामुळे घडले आहेत, हे तुझ्या पायाला स्पर्श करून सांगतों॥ ५५०॥ देवा! तुम्ही जेवणाचे वेळीं माझी खरोखर प्रेमाने आठवण करीत असां, पण मी फुगूनच बसत असे. हा माझा निर्लज्ज गर्व पहा!॥ ५५१॥ देवाच्या अंत:पुरांत खेळतांना मनांत शंका देखील येत नसे. देवा! तुझ्या आंथरुणावर तुझ्याबरोबर निजत असे॥ ५५२॥ 'अरे कृष्णा!' म्हणून तुला हांक मारावी. तूं एक यादव आमचा

सोयरा आहेस, असें समजावें. तूं जायला लागलास की तुला मी आपली आण वाहून 'जाऊं नकोस' असें म्हणत असे ॥ ५५३ ॥ तूं बसलेल्या आसनावर मी बसणें किंवा तुझें म्हणणेंहि न ऐकणें, हे अतिपरिचयामुळें पुष्कळ वेळां घडून आले आहे; म्हणून, अनंता! काय काय अपराध सांगूं? मी सर्व अपराधांची राशीच आहे ॥ ५५४-५५५ ॥ म्हणून प्रत्यक्ष तुमच्यासमोर किंवा तुमच्या पश्चात्, जें कांही माझ्याकडून वाईट वागणें झालें, भगवंता! तें सर्व आईप्रमाणे पोटांत घाल ॥ ५५६ ॥ देवा! कोणे एखादे वेळीं नद्या गढूळ पाण्याचे प्रवाह घेऊन समुद्राकडे येतात व दुसरा उपायच नसल्यामुळें समुद्र, त्या पाण्याला आपल्यांत सामावून घेतो ॥ ५५७ ॥ त्याप्रमाणे प्रेमाने असो की प्रमादाने असो, बोलू नये असें, सलगीमुळे संवयीने जे शब्द बोलविले गेले असतील, ते सर्व भगवंताने पोटांत घालावें ॥ ५५८ ॥ आणि देवाच्या क्षमागुणाच्या अंशामुळे पृथ्वी क्षमा संज्ञेला पात्र झाली, म्हणून ती सर्व भूतसृष्टीला आधार झाली आहे; म्हणून पुरुषोत्तमा! मी काय विनंति करूं! ॥ ५५९ ॥ तरी आतां प्रमाणाच्या आटोक्यांत न येणाऱ्या भगवंता! मज आपल्या शरणागताला या सर्व अपराधांची क्षमा कर ॥ ५६० ॥

पितासि लोकस्य चराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान्।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव ॥ ४३ ॥
तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीशमीड्यम्।
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥ ४४ ॥

अर्थ—हे अगाध सामर्थ्यवान् भगवंता! तूं या ब्रह्मांडांतील स्थावरजंगम प्राण्यांचा जनक असून, सर्वांना वंदनीय व सर्वांपेक्षा श्रेष्ठ म्हणून सर्वांचा गुरु आहेस. त्रैलोक्यांत तुझ्या सारखाच जर कोणी नाही, तर अधिक कोठून असणार! ॥ ४३ ॥ म्हणून तुला शिरसाष्टांग प्रणाम करून, सर्वांचा ईश्वर व स्तुतीला पात्र अशा तुला, प्रसन्न होण्याकरितां प्रार्थना करतो. देवा! जसा पुत्राचा अपराध पितां, मित्राचा अपराध मित्र व पत्नीचा अपराध पती सहन करतो, तसा माझा अपराध तूं सहन करण्यास योग्य आहेस ॥ ४४ ॥

जी जाणितलें मियां साचें। महिमान आतां देवाचें। देवो होय चराचराचें। जन्मस्थान ॥ ५६१ ॥
हरिहरादि समस्तां। देवा तूं परम देवता। वेदांतेंही पढविता। आदिगुरु तूं ॥ ५६२ ॥

अर्थ—अहो जी देवा! आतां मी यथार्थ महिमा जाणला आहे. तूं सर्व ब्रह्मांडाचे उत्पत्तिस्थान आहेस ॥ ५६१ ॥ हरिहरादि सर्व देवांची तूं परम पूज्य देवता असून, वेदालाहि उपदेश करणारा आद्य व परम गुरु तूं आहेस ॥ ५६२ ॥

गूढार्थदीपिका—वेदातेंहि पढवितां। आद्य गुरु तूं—वेदालाहि बोलायला लावणारा तूं आहेस. "स पूर्वेषामपि गुरुः कालेनानयच्छेदात्" असे योगसूत्र, परमेश्वराचे ठिकाणी कालमर्यादा नसल्यामुळें, तोच सर्व ब्रह्मदेव, ऋषी वगैरे यांचा ज्ञानदाता आहे. वेदादिशास्त्रें, जीवापासून उत्पन्न झालीं नसून परमेश्वरापासूनच जीवाला प्राप्त झालीं आहेत, असा अर्थ.

गंभीर तूं श्रीरामा। नानाभूतैकसमा। सकळगुणीं अप्रतिमा। अद्वितीया ॥ ५६३ ॥
तुजसी नाहीं सरिसें। हें प्रतिपादनचि कायसें। तुवां जालेनि आकाशें। सामाविलें जग ॥ ५६४ ॥
तया तुझेनि पाडें दुजें। ऐसें बोल्तांचि लाजिजे। तेथ अधिकाचि कीजे। गोष्टी केवीं ॥ ५६५ ॥
म्हणोनि त्रिभुवनीं तूं एकु। तुजसारिखा ना आणिकु। तुझा महिमा अलौकिकु। नेणिजे वानूं ॥ ५६६ ॥
ऐसें अर्जुनें म्हणितलें। मग पुढती दंडवत घातलें। तेथें सात्त्विकाचें आलें। भरतें तया ॥ ५६७ ॥
मग म्हणतसे प्रसीद प्रसीद। वाचा होतसें सद्गद। काढी जी अपराध-। समुद्रौनि मातें ॥ ५६८ ॥
तुज विश्वसुहृदातें कहीं। सोयरेपणें न मनूंचि पाहीं। तुज विश्वेश्वराचिया ठायीं। आश्चर्य केलें ॥ ५६९ ॥
तूं वर्णनीय परी लोभें। मातें वर्णिसी पां सभे। तरि मियां वल्गिजे क्षोभें। अधिकाधिक ॥ ५७० ॥
आतां ऐसिया अपराधां। मर्यादा नाहीं मुकुंदा। म्हणोनि रक्ष रक्ष प्रमादा। पासोनियां ॥ ५७१ ॥
जी हेंचि विनवावयाल्गीं। कैंची योग्यता माझिया आंगीं। परि अपत्य जैसें सल्गी। बापेंसि बोलें ॥ ५७२ ॥

पुत्राचे अपराध। जरी जाहले अगाध। तरी पिता साहे निर्द्वंद्व। तैसें साहिजो जी॥ ५७३॥
सख्याचें उद्धत। सखा साहे निवांत। तैसें तुवां समस्त। साहिजो जी॥ ५७४॥
प्रियाचियां ठायीं सन्मान। प्रिय न पाहे सर्वथा जाण। तेवीं उच्छिष्ट काढिलें आपण। तें क्षमा कीजो॥ ५७५॥
नातरि प्राणाचें सोयरें भेटे। मग जीवें भूतलीं जियें संकटें। तियें निवेदितां न वाटे। संकोच कांहीं॥ ५७६॥
कां उखितें आंगे जीवें। आपणपें दिधलें जिया मनो भावें। तिये कांत मिनलिया न राहवें। हृदय जेवीं॥ ५७७॥
तयापरी जी मियां। हें विनविलें तुमतें गोसाविया। आणिक कांहीं एक म्हणावया। कारण असे॥ ५७८॥

अर्थ—हे श्रीरामा तूं अति गंभीर असून, सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणी एकसारखा व्यापून आहेस. तुझ्या ठिकाणी सर्व ज्ञान ऐश्वर्यादि षड्गुण निरतिशय असून तुझ्यावांचून दुसरी वस्तुच नाही॥ ५६३॥ तुझ्या बरोबरीचे दुसरें कांही नाही, हें काय बोलायचें? आकाशरूप झालेल्या तुझ्या ठिकाणीच संपूर्ण त्रिभुवन सामावलें आहे॥ ५६४॥ तुझ्या बरोबरीचें दुसरें आहे, हे म्हणतांच जेथे लाज वाटतें, तेथें तुझ्यापेक्षा दुसरा श्रेष्ठ आहे हें कसे म्हणतां येईल?॥ ५६५॥ म्हणून या संपूर्ण त्रिभुवनांत तूंच एक असून, तुझ्यासारखा किंवा तुझ्यापेक्षा अधिक दुसरा कोणी नाही. तुझा अगाध महिमा वर्णन करतांना आमची मति कुंठित होते॥ ५६६॥ अर्जुन असें बोलला व भगवंताला पुन: त्याने साष्टांग नमस्कार घातला, तेव्हा त्याला अष्टसात्विकभाव दाटून आले॥ ५६७॥ मग अत्यंत गहिंवरून गद्गद वाणीने भगवंताला म्हणाला, भगवंता! कृपा कर, कृपा कर व मला या अपराधसमुद्रांतून बाहेर काढ॥ ५६८॥ तूं सर्व ब्रह्मांडाचा अहेतुक कल्याणकर्ता असूनहि, सोयरेपणामुळें आम्ही असें मानित नव्हतों तूं सर्व सृष्टीचा चालक, पण आम्हांला ते आश्चर्यकारक वाटत असे॥ ५६९॥ तूंच एक सर्वस्वी वर्णन करण्यास योग्य, परंतु सभेमध्यें प्रेमाने तूं माझें वर्णन करावें व मी तें पाहून गर्वाने फुगून अधिकच बडबड करीत असे॥ ५७०॥ भगवंता! आतां अशा माझ्या अपराधाला मर्यादाच नाही म्हणून या अपराधांपासून माझें रक्षण कर रक्षण कर॥ ५७१॥ माझे इतके असंख्य अपराध आहेत की अपराधांपासून माझें रक्षण कर अशी प्रार्थना करण्याचीहि माझ्या आंगी योग्यता रहिली नाही. पण मुलगा जसा बापाशीं सलगीने बोलतो तसे मी बोलत आहे॥ ५७२॥ पुत्राचे असंख्य अपराध झाले तरी, पिता जसा ते सर्व अपराध दुजाभाव सोडून देऊन सहन करतो, तसें माझें सर्व अपराध, देवा! सहन कर॥ ५७३॥ मित्राचा उद्दामपणा, जसा मित्र मनांत कांही न येऊं देतां सहन करतो, त्याप्रमाणे माझें सर्व अपराध तूं पोटांत घाल॥ ५७४॥ प्रिय, प्रियेच्या ठिकाणी मानाची मुळींच इच्छा करीत नाही, त्याप्रमाणे आपण राजसूय-यज्ञांत उच्छिष्ट पानें काढलीं, त्याची क्षमा करा॥ ५७५॥ किंवा अत्यंत जिवलग सोयऱ्याची भेट झाली असतां, मग आपण भोगलेले दु:खाचें प्रसंग, त्याला सांगतांना मनांत कांही संकोच वाटत नाही॥ ५७६॥ किंवा जिने आपलें एकंदर शरीर व प्राण, ज्याला मनोभावाने समर्पण केलें, त्या पतीची भेट झाल्यानंतर, आपल्या मनांतील गोष्ट सांगितल्यावाचून, ज्याप्रमाणे तिला राहवत नाही॥ ५७७॥ त्याप्रमाणे देवा! मी तुमच्या सलगीने प्रार्थना केली आहे. तसेंच प्रार्थना करण्याचें दुसरें आणखी एक कारण आहे॥ ५७८॥

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितं मनो मे।
तदेव मे दर्शय देवरूपं प्रसीद देवेश जगन्निवास॥ ४५॥

अर्थ—भगवंता! पूर्वी कधीं न पाहिलेलें हें तुझें विश्वरूप पाहून मी आनंदित झालों व तसेंच माझें मन भयाने दु:खी झालें. आतां हे जगन्निवास! देवाधिदेवा! मजवर कृपा करून तें पूर्वीचें रूप मला दाखव॥ ४५॥

तरि देवेंसीं सलगी केली। जे विश्वरूपाची आळी घेतली। ते मायबापें पुरविली। स्नेहाळाचेनि॥ ५७९॥
सुरतरूंचीं झाडें। आंगणीं लावावीं कोडें। देयावें कामधेनूचें पाडें। खेळावया॥ ५८०॥
मियां नक्षत्रीं डाव पाडावा। चंद्र चेंडुवालागीं देयावा। हा छंदु सिद्धी नेला आघवा। माउलिये तुवां॥ ५८१॥
जिया अमृतलेशालागीं सायास। तयाचा पाऊस केला चारी मास। पृथ्वी वाहून चासेचास। चिंतामणि पेरिले॥ ५८२॥
ऐसा कृतकृत्य केला स्वामी। बहुवे लळा पाळिला तुम्हीं। दाविलें जें हरब्रह्मीं। नायकिजे कानीं॥ ५८३॥

मा देखावयाची केउती गोठी। जयाची उपनिषदां नाहीं भेटी। ते जिव्हारींचीं गांठी। मजलागीं सोडिली॥ ५८४॥
जी कल्पादीलागोनी। आजिची घडी धरुनी। माझीं जेतुलीं होउनि। गेलीं जन्में॥ ५८५॥
तयां आघवियांचिआंतु। घरडोळी घेऊनि असें पाहतु। परि ही देखिली ऐकिली मातु। आतुडेचिना॥ ५८६॥
बुद्धीचें जाणणें। कहीं न वचेचि याचेनि आंगणें। हें सादही अंतःकरणें। करवेचिना॥ ५८७॥
तेथ डोळ्यां देखी होआवी। ही गोष्टीचि कायसया करावी। किंबहुना ऐसें पूर्वी। दृष्ट ना श्रुत॥ ५८८॥
तें हें विश्वरूप आपुलें। तुम्ही मज डोळां दाविलें। तरि माझें मन झालें। हृष्ट देवा॥ ५८९॥
परि आतां ऐसी चाड जीवीं। जे तुजसी गोठी करावी। जवळीक हे भोगावी। आलिंगावयासी॥ ५९०॥
ते इयेचि रूपीं करूं म्हणिजे। तरि कोणे एके मुखेंसीं चावळिजे। आणि कोणा खेंव देइजे। तुज लेख नाहीं॥ ५९१॥
म्हणोनि वारियासवें धांवणें। न ठके गगना खेंव देणें। जळकेली खेळणें। समुद्रीं केउतें॥ ५९२॥
यालागीं जी देवा। एथीचें भय उपजतसे जीवा। म्हणोनि येतुला ळा पाळावा। जें पुरे हें आतां॥ ५९३॥
पैं चराचर विनोदें पाहिजे। मग तेणें सुखें घरीं राहिजे। तैसें चर्तुर्भुज रूप तुझें। तो विसांवा आम्हां॥ ५९४॥

अर्थ—देवा! मी तुझ्याशीं सलगी करून तुझें विश्वरूप पहाण्याचा हट्ट धरला आणि प्रेमळभक्ताच्या मायबापाने तुवां, तो माझा हट्ट पुरविला॥ ५७९॥ ज्याप्रमाणे कौतुकाने आंगणांत कल्पतरूचीं झाडें लावातींत किंवा कामधेनुचें वासरू खेळावयाला आणून द्यावें॥ ५८०॥ नक्षत्ररूप फाश्यांनी डाव टाकावा व चेंडू खेळण्याकरिता चंद्र द्यावा इत्यादि हट्टासारखाच असलेला माझा विश्वरूप-दर्शनाचा हट्ट, आई! तूं पूर्णपणें सिद्धीस नेला॥ ५८१॥ ज्या अमृताचा एक थेंब मिळविण्याकरितां देखील अत्यंत प्रयास पडतात, त्याचा चार महिने सारखा पाऊस पाडावा किंवा संपूर्ण पृथ्वीची मशागत करून वाफ्यावाफ्यांत चिंतामणी पेरावेत॥ ५८२॥ त्याप्रमाणे भगवंता! मला अत्यंत कृतार्थ केलें. माझा तुम्ही पुष्कळ लाड पुरविला आणि जें विश्वरूप दाखविलें, तें शंकर, ब्रह्मदेव यांनी कानांनी देखील ऐकिलें नाही॥ ५८३॥ मग प्रत्यक्ष विश्वरूप पाहण्याची गोष्ट दूरच राहिली. ज्या विश्वरूपाची वेदालाहि भेट घेतां आली नाही, ती हृदयांतील विश्वरूपाची गांठ, आपण माझ्याकरिता सोडली॥ ५८४॥ देवा! कल्पांच्या आरंभापासून या क्षणापर्यंत माझे जेवढे जन्म होऊन गेले॥ ५८५॥ त्या प्रत्येक जन्मांतील घराघराचा शोध करून पाहतांहि हे विश्वरूप मी पाहिलें किंवा ऐकिलें असें म्हणणारा कोणी सांपडत नाही॥ ५८६॥ या विश्वरूपाच्या अंगणांत सुद्धां बुद्धीचा प्रवेश होत नाही. जेथें अंतःकरणालाहि याची कल्पना करतां येत नाही॥ ५८७॥ तेथे डोळ्यांनी कोणी पाहिलें असेल ही गोष्टच कशी करायची! किंबहुना हे विश्वरूप पूर्वी कोणी पाहिलें नाहीं किंवा ऐकिलेहि नाही॥ ५८८॥ तें हें आपलें विश्वरूप आपण माझ्या डोळ्याला दाखविलें. त्यामुळे मला अत्यंत आनंद झाला॥ ५८९॥ पण अंतःकरणांत आतां अशी इच्छा आहे की, तुझ्याशीं चार गोष्टी कराव्या व तुला आलिंगन देण्याकरिता तुझें सान्निध्य प्राप्त व्हावें॥ ५९०॥ ह्या सर्व गोष्टी, या विश्वरूपाशीं करूं म्हटल्यास, तुझ्या या विश्वरूपाला संख्याच नसल्यामुळे कोणत्या एका मुखाशीं बोलावें व कोणत्या रूपाला आलिंगन द्यावें?॥ ५९१॥ म्हणून वाऱ्या बरोबर धांवणें किंवा आकाशाला आलिंगन देणें शक्य नाही. समुद्रांत जलक्रीडा कशी करायची?॥ ५९२॥ याकरितां, हे देवा! माझ्या मनांत या विश्वरूपाचें भय वाटते; म्हणून हा माझा हट्ट पुरवा, आतां हें विश्वरूपाचें दर्शन पुरें॥ ५९३॥ ज्याप्रमाणे कौतुकाने सर्व पृथ्वीचा प्रवास केल्यावर प्रवासाची दगदग नाहीशी करण्याकरितां परत घरीं येऊन, सुखाने विश्रांति घ्यावी, त्याप्रमाणे तुझें हें चतुर्भुजरूप आमचा सर्व शीण नाहीसा करणारें आमचें विश्रांतिस्थान आहे॥ ५९४॥

गूढार्थदीपिका—चतुर्भुज रूप तुझें। तो विसांवा आम्हां—परब्रह्मप्राप्तिकरितां लागणारी शमादि साधनसंपत्ति, भक्तिवांचून नुसत्या अभ्यासाने आंगीं बाणवितांना अत्यंत क्लेश होतात.

शम म्हणजे मनाचा निग्रह साधणे, हा दम म्हणजे इंद्रियांचा निग्रह साधण्यावर अवलंबून आहे. तसेंच मुमुक्षुता हा वैराग्यावर अवलंबून असून, वैराग्य हें मुमुक्षतेवर अवलंबून आहे. देहाची आसक्ति नाहीशी झाल्याखेरीज,

तितीक्षा बाणणें कठीण असते व परब्रह्मप्राप्ति न होतां समाधान ठेवणें कठीण असते आणि समाधानाचे अभावीं इतर साधनांचा अभ्यास होत नाही.

अशी स्थिति असल्यामुळे शमादिसाधनसंपत्ति प्राप्त होण्याकरितां किती क्लेश होतात, हें एका खऱ्या मुमुक्षूलाच माहित. त्यांतहि ज्याप्रमाणे नदी, आपल्या बाहूने तरून जाणारा पुरुष, परतीराला पोहोंचल्यावर, एकदाचा तीरावर पोहोचलो असा जरी समाधानाचा निःश्वास टाकीत असला तरी, थंड वाऱ्याची झुळूक आल्यावरच त्याच्या सर्व श्रमांचा परिहार होतो, त्याप्रमाणे निर्गुण ब्रह्मप्राप्तिकरितां करावे लागणारे शमादि साधनसंपत्तीचे संपूर्ण श्रम त्रिविधदुःखनिवृत्तिरूप निर्गुण ब्रह्मप्राप्ति होऊनहि, अखंड आनंदाच्या प्राप्तीच्या अभावीं निःशेष नाहीसे होत नाहीत. ते, सगुण परमेश्वराच्या भक्तीने अखंड परमानंदाची प्राप्ति होऊन देहाचा विसर पडला म्हणजेच नाहीसे होतात, असाच भक्तांचा अनुभव आहे. हेंच अर्जुन स्वानुभवाने ''विसावा आम्हां'' असें म्हणून येथें सांगत आहे.

आम्ही योगजात अभ्यासावें। तेणें याचि अनुभवा यावें। शास्त्रांतें आलोडावें। परि सिद्धांतु तो हाचि ॥ ५९५ ॥
आम्हीं यजनें किजती सकळें। परि तियें फळावीं येणेंचि फळें। तीर्थें होतु सकळें। याचिलागीं ॥ ५९६ ॥
आणिकही कांहीं जें जें। दान पुण्य आम्हीं कीजे। तया फळीं फळ हेंचि तुझें। चतुर्भुज रूप ॥ ५९७ ॥

अर्थ—आम्ही सर्व योगांचा अभ्यास करून शेवटीं याच चतुर्भुज मूर्तीच्या सुखाचा अनुभव घ्यावा. सर्व शास्त्रांचे अध्ययन करावें, पण शेवटीं एका तुझ्या चतुर्भुज मूर्तीच्या आश्रयानेच पूर्ण सुखाची प्राप्ति होते, हाच सर्व शास्त्रांचा सिद्धान्त आहे ॥ ५९५ ॥ आम्ही नानाप्रकारच्या सर्व यज्ञांचें अनुष्ठान करावें, पण त्या सर्व यज्ञांच्या अनुष्ठानाचें फळ मात्र तुझ्या चतुर्भुज मूर्तीची प्राप्ति व्हावी, हेंच असावें. या चतुर्भुज मूर्तीच्या प्राप्तिकरितां सर्व तीर्थाटन असावें ॥ ५९६ ॥ आणिकहि कांही जीं जीं दानादिक पुण्यें आम्ही करूं त्या सर्व पुण्याने तुझ्या चतुर्भुज मूर्तीची प्राप्ति व्हावी ॥ ५९७ ॥

गूढार्थदीपिका—तया फळीं फळ हेचि तुझें। चतुर्भुज रूप—''सत तेंचि चिद। चिद तोचि आनंद। वस्तु नोहे त्रिविध। एक पद निजानंदें'' (एक. हरिपाठ) परब्रह्माचें सत्, चित्, आनंद हे धर्म एकमेकांना सोडून मुळीच नसतात; म्हणून ते पृथक् नसून सच्चिदानंद हें एकच पद आहे, असें श्रीनाथांनी म्हटलें आहे; पण बुद्धिवृत्तीने अनुभव घेणाऱ्या जीवाला, त्या सच्चिदानंदाचा सत्, चित्, आनंद असा त्रिविध अनुभव येतो, असे माउलींनी ''येऱ्हवीं सच्चिदानंद भेदें। चालिलीं तिन्हीं पदे''। (अमृ. प्र. ५) या चरणाने म्हटलें असून पंचपादिकाकारांनी ''आनंदोविषयानुभवी नित्यत्वं चेति सन्ति धर्मा ब्रह्मणो ह्यपृथक्त्वेऽपि पृथगिवावभासन्ते'' या वचनाने असेच सांगितलें आहे.

परब्रह्माच्या या सत्, चित्, आनंद या तीन अंशांचा अनुभव पाहिला असतां, सदंशाच्या अनुभवांत सदंश प्रधान असून चिदानंद सामान्य असतात. चिदंशाच्या अनुभवांत चिदंश प्रधान असून सदंश हा त्याच्याशी एकरूप होऊन असतो, पण आनंदांश सामान्य असतो. असा आशय विद्यारण्यांनी पंचदशीच्या योगानंद नामक बाराव्या प्रकरणांतील ७३-७४ या श्लोकांतून दाखविला आहे. आनंदांशाच्या अनुभवांत मात्र, सच्चिदानंदाच्या तीनपणाचा भेद जाऊन सच्चिदानंदघन असे एकच पद होतें असें माउलींनी ''परी तिन्ही उणी आनंदें। केली येणे'' (अमृ. प्र. ५) या चरणाने सांगितलें आहे.

हें सच्चिदानंदघन एक पदच अनध्यस्तविवर्त अशा सगुण श्रीकृष्णस्वरूपाने, भक्तांच्या अनुभवाला येतें असे, ''आनंदपदी जया म्हणती हरी'' या चरणाने श्रीनाथांनी सांगितलें आहे.

''भगवान् परमानंदस्वरूपः स्वयमेवहि'' सगुण परमात्मा साक्षात् परमानंदस्वरूप आहे, असें मधुसूदनसरस्वतिहि आपल्या 'भक्तिरसायनांत' म्हणतात.

श्रीज्ञानेश्वर माऊलीनीहि आपल्या ज्ञानेश्वर्यादि ग्रंथांतून व अभंगांतून ''येणें आनंदघनें'' ''चिदानंदाची मांदुसें'' इत्यादि पदांनी सगुण परमात्मा आनंदघन किंवा आनंदाची मूर्ति आहे असेच सांगितलें आहे.

भागवतांतहि "यन्मित्रं परमानंदम्" "केवलानुभवानन्दस्वरूप:" (भाग. १० स्कं. अ. ३) इत्यादि श्लोकांतून भगवंताचे श्रीकृष्णस्वरूप केवळ आनंदरूपच आहे असे सांगितलें आहे. म्हणूनच सगुण साकार भगवंताच्या प्रेमभक्तीनेच जीवाला पूर्ण सच्चिदानंदघन ब्रह्मस्थिति प्राप्त होते आणि हाच आपला स्वानुभव अर्जुनाने "तया फळीं फळ तुझें। चतुर्भुजरूप" या दोन चरणांत सांगितला आहे.

ऐसी तेथिंची जीवा आवडी। म्हणोनि तेंचि देखावया ल्वडसवडी। वर्तत असे ते सांकडी। फेडीं वेगी॥ ५९८॥

अर्थ—अशी तुझ्या चतुर्भुजमूर्तीच्या विषयीं माझ्या मनांत आवडी असल्यामुळें, तें तुझे रूप पाहण्याची मनाला अत्यंत तळमळ लागली आहे. ती तळमळ लवकर नाहीशी कर॥ ५९८॥

अगा जीवींचे जाणतेया। सकळ विश्ववसवितेया। प्रसन्न होईं पूजितया। देवांचिया देवा॥ ५९९॥

अर्थ—हे अंत:करणांतील जाणणाऱ्या, सर्व जगाला आधार असणाऱ्या व सर्व देवांना पूज्य असणाऱ्या देवाच्या देवा! माझ्यावर प्रसन्न हो॥ ५९९॥

किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव।
तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते॥ ४६॥

अर्थ—किरीटयुक्त; गदा व चक्र हातांत घेतलेल्या तुला, पूर्वीच्या चतुर्भुजरूपानें पाहण्याची मला इच्छा आहे; म्हणून हे विश्वरूपा! हे सहस्रबाहो! तूं चतुर्भुजरूपाने प्रगट हो॥ ४६॥

कैसें नीलोत्पलातें रांवित। आकाशाही रंगु लावित। तेजाची वोज दावित। इंद्रनीळा॥ ६००॥
जैसा परिमळ जाहला मरगजा। कां आनंदासीचि निघालिया भुजा। ज्याचें जानूवरी मकरध्वजा। जोडली बरव॥ ६०१॥
मस्तकीं मुकुटातें ठेविलें। कीं मुकुटा मुकुट मस्तक झालें। शृंगारा लेणें लाधलें। आंगाचेनि जया॥ ६०२॥
इंद्रधनुष्याचिये आडणी। माजीं मेघ गगनरंगणीं। तैसें आवरिलें शार्ङ्गपाणी। वैजयंतिया॥ ६०३॥
आतां कवणी ते उदार गदा। असुरां देत कैवल्य पदा। कैसें चक्र हन गोविंदा। सौम्यतेजें मिरवे॥ ६०४॥
किंबहुना स्वामी। तें देखावया उत्कंठित पां मी। म्हणोनि आतां तुम्हीं। तैसया होआवें॥ ६०५॥
हे विश्वरूपाचे सोहळे। भोगूनि निवाले जी डोळे। आतां होताति आधले। कृष्णमूर्तिलागीं॥ ६०६॥
तें साकार कृष्णरूपडें। वांचूनि पाहों नावडे। तें न देखतां थोडें। मानिताति हे॥ ६०७॥
आम्हां भोगमोक्षाचियां ठायीं। श्रीमूर्तीवांचूनि नाहीं। म्हणोनि तैसाचि साकारू होईं। हें उपसंहारी आतां॥ ६०८॥

अर्थ—भगवंताच्या आंगच्या स्वयंभू नीलवर्णाने निळ्या कमळाला व आकाशाला कसा नील वर्ण दिला आहे पाहा! भगवंताच्या आंगचें तेज इंद्रनील मण्याचे ठिकाणी कशी झांक दाखवित आहे, पहा॥ ६००॥ ज्याच्या आंगचा सुगंध म्हणजे जणुं काय मरगजाला प्राप्त झालेला सुगंध होय. भगवंताचे बाहु म्हणजे ब्रह्मानंदालाच निघालेल्या भुजा होत. ज्याच्या गुडघ्याचे सौंदर्य मदनाला प्राप्त झालें आहे॥ ६०१॥ मस्तकावर मुकुट ठेवल्याने मस्तकाला शोभा आली नसून, भगवंताचें मस्तकच मुकुटाला शोभा आणीत आहे. शृंगारानें भगवंताचें आंग अलंकृत केले नसून, भगवंताच्या अंगानेच शृंगाराला अलंकृत केलें आहें॥ ६०२॥ आकाशांत उठलेला मेघ, जसा इंद्रधनुष्याने वेढलेला दिसतो, तसा वैजयंतीमाळेने भगवान वेढलेला दिसतो॥ ६०३॥ असुरांचा प्राण घेऊन त्यांना मोक्ष देणारी तुझ्या हातांतील कशी ती उदार गदा आहें आणि गोविंदा! तुझ्या हातांतील सुदर्शनचक्रहि, सौम्यतेजाने कसें युक्त दिसत आहे॥ ६०४॥ किंबहुना प्रभो तें असें तुझें रूप पाहण्याकरितां मला अत्यंत उत्कंठा लागली आहे, म्हणून तूं तसाच चतुर्भुज हो॥ ६०५॥ हा विश्वरूपाचा आनंद भोगून माझे डोळे तृप्त झाले. आतां ते, तुझें पूर्वीचें श्रीकृष्णस्वरूप पाहण्याकरितां आतुर झाले आहेत॥ ६०६॥ त्या साकार श्रीकृष्णस्वरूपावाचून माझ्या डोळ्याला दुसरें कांहीं पाहणें आवडत नाही. श्रीकृष्णस्वरूप न पाहतां हे विश्वरूप देखील माझ्या डोळ्यांना कमी प्रतीचे वाटतें॥ ६०७॥ आम्हां तुझ्या भक्ताना-भोग म्हणजे दृष्ट परमानंद व मोक्ष म्हणजे विदेहमुक्ति-या दोहोकरितां, तुझ्या सगुण साकार मूर्तिवांचून दुसरें काही लागत नाही; म्हणूनच आतां विश्वरूपाचा उपसंहार कर व सगुण श्रीकृष्णरूपाने प्रगट हो॥ ६०८॥

गूढार्थदीपिका—आम्हां भोगमोक्षांचियां ठायीं। श्रीमूर्तिवांचूनि नाहीं—भगवद्भक्ताला, एक भगवंताचेच प्रेम असल्यामुळें त्याची विषयभोगाची इच्छा नि:शेष नाहीशी झालेली असते. प्रारब्धाने प्राप्त होणारे सांसारिक भोग भोगण्याची देखील त्याला इच्छा नसते. आणि ते भोग भोगण्याकरितां श्रीकृष्णमूर्तीची आवश्यकताहि नाही. पण भोगाकरितां तुझी श्रीकृष्णमूर्ति पाहिजे आहे असे अर्जुनाने म्हटलें आहे; म्हणून येथे ''भोग'' या शब्दाचा ''सांसारिकभोग'' असा अर्थ न घेता, 'जीवन्मुक्त स्थितींतील दृष्ट परमानंद' असा अर्थ घेतला पाहिजे, असे माझ्या सद्गुरुआईंनी आपल्या निदिध्यासनप्रकाश नामक ग्रंथांतील समास आठमध्ये म्हटलें आहे.

दृष्ट परमानंद म्हणजे जिवंतपणीच अंत:करण ब्रह्मानंदाकार होणें होय. हीच भक्ताची जीवन्मुक्त-स्थिति असते आणि या ब्रह्मानंद स्थितींतून, भक्ताचें जेव्हा कधीही व्युत्थानच होत नाही, तेव्हा ती भक्ताची विदेहमुक्ति होते. ही विदेहमुक्ति भक्ताला प्रेमामुळे स्वेच्छेने होते आणि ज्ञान्याला ती प्राप्त होण्याकरितां प्रारब्ध संपेपर्यंत वाट पाहावी लागते.

कोणी असे म्हणतात की, विदेहमुक्ति ही देहपातावर अवलंबून आहे, पण हें म्हणणें बरोबर नाही. कारण ''तस्मान्मिथ्याप्रत्ययनिमित्तत्वात्सशरीरत्वस्य सिद्धं जीवतोऽपि विदुषोऽशरीरत्वम्'' (ब्र. सू. १-१-४) देह व देहाचा आत्म्याशीं संबंध हे दोन्ही अज्ञानभ्रांतिकल्पित असल्यामुळे, ज्ञानाने अज्ञानभ्रांति नाहीशीं झाल्याबरोबर देह व देहाचा संबंध यांचें अस्तित्वच नाही, असाच ज्ञानीपुरुषाला अनुभव येत असल्यामुळे, अज्ञानी पुरुषांना ज्ञानीपुरुषाचा देह व त्याचा, त्याच्याशीं संबंध दिसत असला तरी ज्ञानीपुरुष अशरीर म्हणजे विदेहच असतो, असे आचार्यांनी ब्रह्मसूत्रभाष्यांत म्हटलें आहे.

ज्ञानानंतर, भक्ति न करणाऱ्या ज्ञान्याचे ठिकाणीं मिथ्या देहाभास व जगदाभास असतो, हे मागें सांगितलेंच आहे; म्हणून तो असतो तोपर्यंत जीवन्मुक्ति, व प्रारब्ध संपून तो नाहीसा झाल्यावर विदेहमुक्ति, असा जरी ज्ञानमार्गात मुक्तीचा भेद मानला असला, तरी तो ज्ञान्याच्या देह असण्यावर किंवा देहपातावर अवलंबून नसून, त्याला देह व जगत् यांचा मिथ्या प्रत्यय येणें व तो न येणें यावरच अवलंबून असतो; म्हणून जिवंतपणींच देहाचा भास व जगदाभास नाहीसा झाल्यास, देह न पडतां देखील विदेहमुक्तीची स्थिति राहूं शकते, हें सिद्ध होतें. आणि

नंदनंदनें या मधुसूदनें लावियलें गे पिसें । कीं जनि वनिं अवघा आपण दिसे॥
कंसमर्दनें मुरलीवादनें अघटित केलें कसें?। किं आभास काहिंच उरला नसें॥

सगुण साकार भगवंताच्या प्रेमभक्तीने संपूर्ण देह व जगदभास नाहीसा होतो, असा एकनाथादि भक्तांनी आपला अनुभव सांगितला आहे.

हा भक्तांचा अनुभव स्वीकारूनच, अर्जुनाने आम्हां भक्तांना, तुझ्या सगुण श्रीकृष्णस्वरूपाच्या आश्रयानेच दृष्ट परमानंदरूप जीवन्मुक्ति व अखंड परमानंदरूप विदेहमुक्ति प्राप्त होते, असें म्हटले आहे.

श्रीभगवानुवाच

मया प्रसन्नेन तवार्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात्।
तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम्॥ ४७॥

अर्थ—भगवान म्हणतात, अर्जुना! मी प्रसन्न होऊन, अत्यंत तेजोमय, अमर्याद, आद्य म्हणजे सृष्टीच्या पूर्वी असणारें, पण पूर्वी तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणी न पाहिलेलें असें हे आपलें श्रेष्ठ स्वरूप, तुला आपल्या योगसामर्थ्यानें दाखविलें॥ ४७॥

या अर्जुनाचिया बोला। विश्वरूपा विस्मयो जाहाला। म्हणे ऐसा नाहीं देखिला। धसाळ कोणी॥ ६०९॥
कोण हे वस्तु पावला आहासी। तया लाभाचा तोषु न घेसी। मा भेणें काय नेणों बोलसी। हेकड ऐसा॥ ६१०॥
आम्हीं सावियाचि जैं प्रसन्न होणें। तैं आंगचिवरी म्हणे देणें। वांचोनि जीव असे वेंचणें। कवणासि गा॥ ६११॥
तें हें तुझिये चाडें। आजि जिवाचेंचि दळवाडें। कामऊनियां येवढें। रचिलें ध्यान॥ ६१२॥
ऐसी काय नेणों तुझिये आवडी। जाहली प्रसन्नता आमुची वेडी। म्हणोनि गौप्याची ही गुढी। उभविली जगीं॥ ६१३॥

तें हें अपरां अपार। स्वरूप माझें परात्पर। एथूनि ते अवतार। कृष्णादिक॥६१४॥

अर्थ—अर्जुनाचें हें म्हणणे ऐकून, विश्वरूप भगवंताला आश्चर्य वाटलें आणि भगवान म्हणाले, अर्जुना! तुझ्यासारखा अविचारी, दुसरा कोणी मी पाहिला नाही॥ ६०९ ॥ अरे! केवढी ही थोर वस्तु तुला प्राप्त झाली, त्याच्या लाभाचा संतोष तुला होत नाही आणि त्या रूपाच्या दर्शनाने भयभीत होऊन, एखाद्या दुराग्रही माणसाप्रमाणे, हें काय बोलत आहेस, कळत नाहीं॥ ६१० ॥ खरोखर, आम्ही जेव्हा प्रसन्न होतो, तेव्हा सर्व आपल्या शरीरासह त्यांच्या स्वाधीन होतो. प्रसन्नतेवांचून असा जीवभाव, आम्ही कोणाकरितांच वेंचत नसतो॥ ६११ ॥ पण आमच्या ठिकाणीं असलेलें सर्व सामर्थ्य वेंचून जें हें आम्ही विश्वरूपाचें ध्यान प्रगट केलें, तें तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितांच केलें॥ ६१२ ॥ तुझें अत्यंत प्रेम लागून आमची प्रसन्नता कशी वेडी झाली हे समजत नाही; म्हणून सर्वांपासून गुप्त अशा विश्वरूपाचीहि जगांत ध्वजा उभारिली॥ ६१३ ॥ तें हें माझें विश्वरूप, सर्व आकाशादिक अमर्याद वस्तुपेक्षाहि अमर्याद असून मायेच्याहि पलीकडे आहे व येथूनच हे कृष्णादिक अवतार होतात॥ ६१४ ॥

हें ज्ञानतेजाचें निखळ। विश्वात्मक केवळ। अनंत हें अढळ। आद्य सकळां॥६१५॥
हें तुजवांचोनि अर्जुना। पूर्वी श्रुत दृष्ट नाहीं आना। जें जोगें नव्हे साधना। म्हणोनियां॥६१६॥

अर्थ—हें विश्वरूप, संपूर्ण केवळ ज्ञानतेजाचेंच विश्वात्मक झालें आहे. हें अनंत, अढळ असून सर्व ब्रह्मांडाचें मूळ होय॥ ५१५ ॥ अर्जुना! तुझ्यावांचून कोणी तें पाहिलें नाही व ऐकलेंहि नाही; कारण ते साधनाने प्राप्त होण्याजोगें नाही॥ ६१६ ॥

गूढार्थदीपिका—व्यापक विश्वरूपापेक्षा, एकदेशीय श्रीकृष्ण स्वरूपाचे ठिकाणी प्रेम धरणाऱ्या अर्जुनाची भगवंतांनी या ओव्यांतून निंदा केली, म्हणून श्रीकृष्णस्वरूपापेक्षा विश्वरूप श्रेष्ठ आहे, असेच भगवंताचें म्हणणें आहे, असे कोणी समजू नये.

कारण परब्रह्म अस्फुट, पूर्ण असून, अपूर्ण कधीच होत नाही. नामरूपादि कार्यदशेंतहि तें पूर्णच राहतें. त्याचे ठिकाणीं जीवाला, अपूर्णता भ्रांतीने भासते असा वेदान्तसिद्धान्त असल्यामुळे, ज्ञानदृष्टीने विश्वरूप, अवतार, सर्व नामरूपादि सृष्टि, हे सर्व पूर्णब्रह्मरूपच आहेत, हें आम्ही मागें सांगितलेंच आहे; म्हणून ज्ञानरूप यथार्थदृष्टीने विश्वरूप व श्रीकृष्णस्वरूप यांत श्रेष्ठ, कनिष्ठ भाव मुळींच मानतां येत नाहीत.

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैर्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः।
एवंरूपः शक्य अहं नृलोके द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर॥४८॥

अर्थ—या मृत्युलोकाचे ठिकाणीं तुझ्यावांचून दुसऱ्या कोणालाहि वेद, यज्ञ, अध्ययन, दानादिक क्रियेने अथवा उग्रतपाने देखील हें रूप पाहणें शक्य नाही॥ ४८ ॥

याची सोय पातले। आणि वेदीं मौनचि घेतलें। यज्ञ कीर माघौते आले। स्वर्गौनिया॥६१७॥
साधकीं देखिला आयासु। म्हणोनि वाळिला योगाभ्यासु। आणि अध्ययनें सौरसु। नाहीं एथ॥६१८॥
सीगेचीं सत्कर्में। धाविन्नलीं स्वसंभ्रमें। तिहीं बहुतेकीं श्रमें। सत्यलोकु ठाकिला॥६१९॥
तपीं ऐश्वर्य देखिलें। आणि उभयांचि उग्रपण सांडिलें। एवं तपसाधना जें ठेलें। अपारांतरें॥६२०॥

अर्थ—या स्वरूपापर्यंत येतांच वेदांनी मौन धारण केलें, यज्ञहि स्वर्गापासूनच मागें फिरले॥ ६१७॥ याच्या प्राप्तिकरितां कराव्या लागणाऱ्या योगाभ्यासांत अत्यंत कष्ट आहेत. असें पाहून, साधकांनी योगाभ्यासाचा मार्ग सोडला आणि वेदशास्त्राध्ययनानेहि हें प्राप्त होत नाही॥ ६१८॥ पूर्ण झालेलीं सत्कर्मे देखील या स्वरूपाची प्राप्ति करून घेण्याकरितां लगबगीने धांवलीं, पण त्या बहुतेकांनी मोठ्या कष्टाने कसा तरी सत्यलोक गांठला॥ ६१९ ॥ तपांनी विश्वरूपात्मक ऐश्वर्य पाहिलें व या विश्वरूपाच्या दर्शनापुढे आपल्या उग्रपणाची कांही मात्रा चालत नाही हें जाणून, त्याने उभ्या उभ्याच आपलें उग्रपण टाकून दिलें. याप्रमाणे तपरूपसाधनापासूनहि हें विश्वरूप फार दूर राहिलें. ॥ ६२० ॥

गूढार्थदीपिका—उत्पन्न होणारें व नाश पावणारें फळच कर्माने प्राप्त होत असते, पण विश्वरूप हें अनादि स्वयंसिद्ध व अविनाशी असल्यामुळे ज्ञानाशिवाय व भगवत्कृपेशिवाय कर्माने तें प्राप्त होऊं शकत नाही, असा भाव.

तें हें तुवां अनायासें। विश्वरूप देखिलें जैसें। इये मनुष्यलोकीं तैसे। न फावेचि कवणा॥ ६२१॥
आजि ध्यानसंपत्तीलागीं। तूंचि एकु आथिला जगीं। हें परमभाग्य आंगीं। विरंचीही नाहीं॥ ६२२॥

अर्थ—तुवां अनायासें-म्हणजे केवळ माझ्या कृपेने जसें हें विश्वरूप पाहिलेंस, तसें या मृत्युलोकांत कोणालाच प्राप्त झालें नाही॥ ६२१॥ आज या विश्वरूपाच्या ध्यानसंपत्तिकरितां तूंच एक जगांत भाग्यवान निघालास, हें परमभाग्य ब्रह्मदेवालाहि प्राप्त झाले नाही॥ ६२२॥

मा ते व्यथा मा च विमूढभावो दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदम्।
व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं तदेव मे रूपमिदं प्रपश्य॥ ४९॥

अर्थ—अशा प्रकारचें हें माझें भयंकर रूप पाहून तूं दुःखी व अविचारी होऊं नकोस. भीति सोडून अत्यंत प्रसन्न अंतःकरणाने पुनः माझें तें विश्वरूपच तूं पहा॥ ४९॥

म्हणोनि विश्वरूपलाभें श्लाघ। एथिंचें भय नेघ नेघ। हें वांचूनि अन्य चांग। न मनीं कांहीं॥ ६२३॥
हां गा समुद्र अमृताचा भरला। आणि अवसांत वरपडा जाहला। मग कोणीही आथि वोसंडिला। बुडिजेल म्हणोनि॥ ६२४॥
नातरी सोनयाचा डोंगरु। येसणा न चले हा थोरु। ऐसें म्हणोनि अव्हेरु। करणें घडे॥ ६२५॥
दैवें चिंतामणि लेईजे। कीं हे ओझें म्हणोनि सांडिजे। कामधेनु दवडिजे। न पोसवे म्हणोनि॥ ६२६॥
चंद्रमा आलिया घरा। म्हणिजे निगें करितोसि उबारा। पडिसायि पडितोसि दिनकरा। परता सर॥ ६२७॥
तैसें ऐश्वर्य हें महातेज। आजि हातां आलें आहे सहज। कीं एथ तुज गजबज। होआवी कां॥ ६२८॥
परि नेणसीच गांवढिया। काय कोपों आतां धनंजया। आंग सांडोनि छाया। आलिंगितोसि मा॥ ६२९॥
हें नव्हे जो मी साचें। एथ मन करूनियां काचें। प्रेम धरिसी अवगणियेचें। चतुर्भुज जें॥ ६३०॥

अर्थ—म्हणून या विश्वरूपाच्या प्राप्तीने अपल्याला धन्य समज. विश्वरूपाच्या दर्शनाची भीती बाळगूं नकोस व या विश्वरूपावांचून दुसरें कांही चांगलें आहे, असे मनांतहि कांही आणूं नकोस॥ ६२३॥ अमृताने भरलेला समुद्र, अकस्मात् प्राप्त झाला असतां, त्याच्यांत बुडून प्राण जाईल, असें समजून कोणी त्याचा त्याग केला आहे?॥ ६२४॥ किंवा सोन्याचा पर्वत दृष्टीस पडला असतां, एवढा थोर पर्वत नेतां येत नाही, म्हणून त्याची उपेक्षा करावी काय?॥ ६२५॥ सुदैवाने चिंतामणि आंगावर घातला गेला की, त्याचें ओझें होतें म्हणून जसा टाकून द्यावा किंवा कामधेनु आपल्याच्याने पोसवत नाही, म्हणून तिला हांकून द्यावे?॥ ६२६॥ चंद्र घरीं चालत आला असतां त्याला, तुझ्यापासून आम्हांला उष्णता होते, म्हणून येथून जा असें म्हणावें किंवा सूर्य घरीं आला असतां, सावली पाडतोस, म्हणून दूर हो, असें म्हणावे काय?॥ ६२७॥ त्याप्रमाणे अत्यंत तेजात्मक असें हें माझें विश्वरूप-ऐश्वर्य आज अनायासें तुझ्या हातीं आलें असतांना, तुझा जीव एवढा व्याकुळ कां व्हावा?॥ ६२८॥ हे गावंढळ अर्जुना! पण तूं हें कांही जाणत नाहीस. तुझ्यावर काय रागावूं! तूं शरीर सोडून शरीराच्या छायेला आलिंगन देऊं पाहतोस ना!॥ ६२९॥ हें विश्वरूप माझें खरें स्वरूप असतांना तू खरें समजत नाहीस. येथें विश्वस्वरूपाचे विषयीं मनांत भीति बाळगतोस आणि माझें कनिष्ठ असे जें चतुर्भुज, त्याचें प्रेम करतोस॥ ६३०॥

गूढार्थदीपिका—या ओव्यांतून श्रीज्ञानेश्वर माऊलींनी, विश्वरूपापेक्षा सगुण एकदेशीय श्रीकृष्णस्वरूपाचे ठिकाणीं आपलें अत्यंत प्रेम दाखविणाऱ्या अर्जुनाला, आंगाला सोडून छायेला आलिंगन देणारा किंवा सत्य विश्वरूपाचे ठिकाणीं अप्रीति दाखवून, एकदेशीय व कनिष्ठ अशा श्रीकृष्णस्वरूपाचे ठिकाणी प्रेम करणारा, व मूर्ख आहेस, असें जें म्हटलें आहे, तें सिद्धान्तभूत मानतां येत नाही.

कारण भगवान श्रीकृष्णांनी किंवा श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी वेदान्त सिद्धान्ताला बाध येईल, असें कांही प्रतिपादन करणें शक्य नाही.

पूर्ण ब्रह्माच्या ठिकाणीं केवळ अविद्याभ्रमामुळेंच अपूर्णता व तुच्छता मानली जाते. पण परमेश्वर अखंड अविद्यारहितच असतो; म्हणून त्याचे अवतारहि पूर्ण अविद्यारहित असतात. हें मागें सांगितलेंच आहे आणि माउलींनीहि याच अध्यायांत ''श्रीकृष्णच कैवल्य उघडें'' श्रीकृष्ण स्वरूप हें 'उघडे' म्हणजे प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहतां येण्याजोगे, ''कैवल्य'' म्हणजे पूर्ण ब्रह्मस्वरूप होय, असे स्वमुखाने सांगितलें आहे. तसेच पुढे बाराव्या अध्यायांत, ईश्वरस्वरूपाच्या उपासकांपेक्षा एकदेशीय सगुण भगवंताची भक्ति करणारेच युक्ततम होतात, असे स्पष्टच सांगितलें असल्यामुळे ''आंग सांडोनि छाया। आलिंगितोसि मा'' ''प्रेम धरिसी अवगणियेचे। चतुर्भुज जे'' इत्यादि भगवंताचे म्हणणें, श्रीकृष्ण स्वरूपाचे ठिकाणीं अर्जुनाचे किती प्रेम होतें व त्या स्वरूपाविषयीं त्याचा काय अनुभव आहे, हे त्याच्या मुखाने वदविण्याकरितांच होते, वस्तुत: नव्हते, असें म्हणणें भाग आहे.

तरि अझुनिवरी पार्था। सांडीं सांडीं हे आस्था। इयेविषयीं अनास्था। करिसी झणें॥ ६३१॥
हें रूप जरी घोर। विकृति आणि थोर। तरी कृतनिश्चयाचें घर। हेंचि करीं॥ ६३२॥
कृपण चित्तवृत्ति जैसी। रोवोनि घाली ठेवयापासीं। मग नुसधेनि देहेंसीं। आपण असे॥ ६३३॥
कां अजातपक्षिया जवळा। जीव ठेऊनि अविसाळां। पक्षिणी अंतराळा-। माजीं जाय॥ ६३४॥
नाना गाय चरे डोंगरीं। परि चित्त बांधिलें वत्सें घरीं। तैसें प्रेम एथिंचें करीं। स्थानपती॥ ६३५॥
येरें वरिचिलेनि चित्तें। बाह्य सख्य सुखापुरतें। भोगिजो कां श्रीमूर्तीतें। चतुर्भुज॥ ६३६॥
परि पुढतपुढती पांडवा। हा एक बोलु न विसरावा। जे इये स्वरूपौनि सद्भावा। नेदावें निघों॥ ६३७॥
हें कहीं नव्हतेंचि देखिलें। म्हणोनि भय जे तुज उपजलें। तें सांडीं एथ संचलें। असों दे प्रेम॥ ६३८॥
आतां करूं तुजयासारिखें। ऐसे म्हणितलें विश्वतोमुखें। तरि मागील रूप सुखें। न्याहाळीं पां तूं॥ ६३९॥

अर्थ—अरे अर्जुना! अझून तरी माझ्या चतुर्भुजस्वरूपाची आस्था सोड आणि या विश्वरूपाची उपेक्षा करूं नकोस॥ ६३१॥ हें माझें विश्वरूप भयंकर विक्राळ व अमर्याद असलें, तरी भगवंताचें खरें स्वरूप हेच होय; असाच त्याविषयीं निश्चय कर॥ ६३२॥ कृपण पुरुष, ज्याप्रमाणे आपलें चित्त धनापाशीं रोवून ठेवतो व मग नुसत्या देहाने आपण बाहेर असतो॥ ६३३॥ किंवा पंख न फुटलेल्या व घरट्यांत राहणाऱ्या पिलापाशीं जीव ठेवून, जशी पक्षिणी आकाशांत फिरते॥ ६३४॥ किंवा गाय डोंगरावर चरत असते, पण तिचें चित्त घरीं असलेल्या वत्साकडे लागलेंले असतें त्याप्रमाणे तूं आपलें प्रेम या एका विश्वरूपाच्या ठिकाणीच राहूं दे॥ ६३५॥ बाकी वरवर चित्ताने, बाहेर सख्यभक्तीचें सुख भोगण्याकरितां, या माझ्या चतुर्भुजमूर्तीचें प्रेम कर॥ ६३६॥ पण अर्जुना! वारंवार सांगायचे हें की, या माझ्या विश्वरूपाहून आपलें प्रेम निघूं देऊं नकोस, हें माझें विश्वरूप विसरूं नकोस॥ ६३७॥ हे केव्हा पूर्वी पाहिलेंच नव्हते, म्हणून तें पाहिल्याबरोबर तुला भीती उत्पन्न झाली. तें भय सोड आणि येथें प्रेम संचलें राहूं दे॥ ६३८॥ विश्वरूपभगवंतांनी 'तुझ्या म्हणण्याप्रमाणे करतो. माझें मागील चतुर्भुजरूप आनंदाने पाहा' असें म्हटलें॥ ६३९॥

सञ्जय उवाच

इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा स्वकं रूपं दर्शयामास भूयः।
आश्वासयामास च भीतमेनं भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा॥ ५०॥

अर्थ—संजय म्हणाला, राजा! भगवान वासुदेवाने, अशाप्रकारें अर्जुनाला म्हणून, परत आपलें पूर्वीचें श्रीकृष्णस्वरूप दाखविलें व असें सौम्यरूप धारण करून, त्या भ्यालेल्या अर्जुनाला धीर दिला॥ ५०॥

ऐसें वाक्य जी बोलतखेंवो। मागुता मनुष्य जाहला देवो। हें ना परि नवलावो। आवडीचा तिये॥ ६४०॥
श्रीकृष्णचि कैवल्य उघडें। वरि सर्वस्व विश्वरूपायेवढें। हातीं दिधलें कीं नावडें। अर्जुनासी॥ ६४१॥

अर्थ—असें वाक्य तोंडातून निघाल्याबरोबर, भगवान मनुष्यासारखा देहधारी झाला, हे मोठेसे आश्चर्य नव्हे. पण भगवंताला अर्जुनाचें जें प्रेम होतें, त्या प्रेमाचेंच आश्चर्य वाटतें॥ ६४०॥ खरोखर पाहतां, भगवान श्रीकृष्ण उघडें म्हणजे डोळ्यांनी पाहतां येणारे, अद्वैत पूर्णब्रह्म होय. त्यांतहि आणखी भगवंतांनी आपलें विश्वरूपासारखें सर्वस्व

अर्जुनाच्या हातांत दिलें; पण अर्जुनाला तें आवडलें नाही॥ ६४१ ॥

गूढार्थदीपिका—श्रीकृष्णचि कैवल्य उघडें—या चरणावरूनहि श्रीज्ञानेश्वरमाऊलींना वेदान्तसिद्धान्तानुसार श्रीकृष्णस्वरूपाचें पूर्णब्रह्मत्वच मान्य होतें हें स्पष्ट दिसतें.

वस्तु घेऊनि वाळिजे। जैसें रत्नासि दूषण ठेविजे। नातरी कन्या पाहूनियां म्हणिजे। मना न ये हे॥ ६४२ ॥
तया विश्वरूपायेवढी दशा। करितां प्रीतीचा वाढू कैसा। शेल दिधलीसे उपदेशा। किरीटीसि देवें॥ ६४३ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे एखादी वस्तु घेऊन ती टाकून द्यावी किंवा चांगल्या रत्नास दूषण ठेवावें अथवा मुलीला पाहून ती 'ही पसंत नाही' असें म्हणावें॥ ६४२ ॥ (त्याप्रमाणे) आपल्या श्रीकृष्णस्वरूपाची विश्वरूपा एवढी व्यापकदशा करण्यांत अर्जुनाविषयी भगवंताच्या ठिकाणीं कशी प्रीतीची वाढ झाली पहा, भगवंतांनी अर्जुनाला केलेल्या उपदेशाचा शेवट-म्हणजे सर्वनामरूपासह पूर्ण ब्रह्मच आहे हा अनुभव-आणून दिला.॥ ६४३ ॥

गूढार्थदीपिका—शेल दिधलीसे उपदेशा—श्रीगुरुने केलेल्या उपदेशाचा शेवट ब्रह्मानुभव हा होय. "द्विधा ब्रह्मप्रतीतिः" हा ब्रह्मानुभव, आधीं "अहं ब्रह्मास्मि" व नंतर "सर्व खल्विदं ब्रह्म" असा दोन प्रकारचा आहे, हें मागें आचार्यांचें शतश्लोकींतील वचन प्रमाण देऊन सांगितलेंच आहे.

"सर्व खल्विदं ब्रह्म" म्हणजे सर्व नामरूपासह एक अद्वैत पूर्णब्रह्मच आहे असा जो शेवटला अनुभव, तोच भगवंतांनी अर्जुनाला विश्वरूपदर्शनाने आणून दिला.

मोडोनि भांगाराचा रवा। लेणें घडिलें आपलिया सवा। मग नावडे जरी जीवा। तरी आटिजे पुढती॥ ६४४॥
तैसें शिष्याचिये प्रीती जाहलें। कृष्णत्व होतें तें विश्वरूप केलें। तें मना न येचि मग आणिलें। कृष्णपण मागुतें॥ ६४५ ॥
हा ठाववरी शिष्याची निकसी। सहाते गुरु आहाती कवणे देशीं। परी नेणिजे आवडी कैशी। संजयो म्हणे॥ ६४६ ॥
मग विश्वरूप व्यापूनि भोंवतें। जें दिव्य योगतेज प्रगटलें होतें। तेंचि सामावले मागुतें। कृष्णारूपीं तिये॥ ६४७॥

अर्थ—सोन्याचा रवा वितळवून आपल्या आवडीप्रमाणे त्याचा अलंकार केल्यावर, मनाला आवडला नाही, तर तो पुनः आटून टाकावा॥ ६४४॥ त्याप्रमाणे येथेहि शिष्याच्या प्रेमाप्रमाणे झालें. पूर्वी असलेल्या कृष्णरूपाला भगवंतांनी विश्वरूप केलें, पण तें अर्जुनाच्या मनाला आवडलें नाही; म्हणून पुनः पूर्वीचेंच कृष्णरूप धारण केलें॥ ६४५ ॥ संजय म्हणतो, शिष्याने दिलेला त्रास येथपर्यंत सहन करणारे गुरु कोणत्या स्थळीं आहेत? पण भगवंताला अर्जुनाविषयीं कसें विलक्षण प्रेम आहे, हें सांगतां येत नाही॥ ६४६ ॥ मग संपूर्ण नामरूपात्मक जगताला व्यापून सभोंवार जें दिव्यतेज पसरलें होतें, तें संपूर्ण पुनश्च श्रीकृष्णस्वरूपाचे ठिकाणी सांठवलें गेलें॥ ६४७॥

गूढार्थदीपिका—वर सांगितल्याप्रमाणे श्रीकृष्णस्वरूप व विश्वरूप या दोघांचा येथे बीजवृक्षाप्रमाणे संबंध दाखवून, बीज व वृक्ष दोन्हीहि, ज्याप्रमाणे एकरूप व सत्य असतात, त्याप्रमाणे विश्वरूप व श्रीकृष्णरूप हीं दोन्हीहि एकरूप व सत्य म्हणजे अनध्यस्तविवर्तरूप किंवा मायारहितविवर्तरूप आहेत हेच येथे दाखविलें आहे.

जैसें त्वंपद हें आघवें। तत्पदार्थीं सामावे। अथवा द्रुमाकारु सांठवे। बीजकणिके जेवीं॥ ६४८॥
नातरी स्वप्नसंभ्रमु जैसा। गिळी चेइली जीवदशा। श्रीकृष्णें योगु हा तैसा। संहारिला तो॥ ६४९॥
जैसी प्रभा हारपली बिंबीं। की जळदसंपत्ती नभीं। नाना भरतें सिंधुगर्भीं। रिगालें राया॥ ६५०॥
हो कां जे कृष्णाकृतीचिये मोडी। होती विश्वरूपपटाची घडी। ते अर्जुनाचिये आवडी। उकलूनी दाविली॥ ६५१ ॥
तंव परिमाणु व रंगु। तेणें देखिले साविया चांगु। तेथ ग्राहकीये नव्हेचि लागु। म्हणोनि घडी केली पुढती॥ ६५२॥
तैसें वाढीचेनि बहुवसपणें। रूपें विश्व जिंतिलें जेणें। तें सौम्य कोडिसवाणें। साकार जाहलें॥ ६५३॥

अर्थ—ज्याप्रमाणे त्वंपद तत्पदार्थाचे ठिकाणी ऐक्य पावतें अथवा संपूर्ण वृक्ष छोट्याशा बीजांत सांठविला जातो॥ ६४८ ॥ किंवा ज्याप्रमाणे स्वप्नांतील कल्पित पसारा, जीवाची जागृतदशा गिळून घेते, त्याप्रमाणे भगवान श्रीकृष्णांनी आपल्या स्वरूपाचे ठिकाणीं आपल्या योग ऐश्वर्यांचा उपसंहार केला॥ ६४९ ॥ ज्याप्रमाणे सूर्यादिकाचें तेज, सूर्यादिक बिंबाचे ठिकाणींच लोप पावतें किंवा पाण्याने भरलेले मेघ, आकाशांत नाहीसे होतात किंवा संपूर्ण

भरती समुद्रांतच नाहीशी होते॥ ६५०॥ असें वाटतें की, मर्यादित श्रीकृष्णरूपाच्या आकारांत जी व्यापक विश्वरूपवस्त्राची घडी होती, ती अर्जुनाच्या प्रेमाकरितां उकलून दाखविली॥ ६५१ ॥ तेव्हा अर्जुनाने तिचा विस्तार व रंग चांगलें लक्ष देऊन पाहिलें, पण गिऱ्हाईकीचा संबंध झाला नाही-ग्राहकाला आवडले नाही-म्हणून परत त्याची भगवंताने घडी केली॥ ६५२ ॥ त्याप्रमाणे ज्या विश्वरूपाच्या अपार विस्तारामुळे, संपूर्ण विश्व व्यापिलें गेलें, तेंच सौम्य व गोजिरवाणें असें मर्यादित साकार झालें॥ ६५३ ॥

गूढार्थदीपिका—विश्वरूप व श्रीकृष्णस्वरूप हे दोन्ही खरोखर एकरूपच आहेत; म्हणून त्यांचा दोनपणा किंवा भिन्नपणा मानणें, हा भ्रम होय. हेंच तत्व माउलींनी वरील ओव्यांत निरनिराळे दृष्टान्त देऊन प्रतिपादिलें आहे.

किंबहुना अनंतें। धरिलें धाकुटपण मागुतें। परि आश्वासिलें पार्थातें। बिहालियासी॥ ६५४॥
तेथ जो स्वप्नीं स्वर्गा गेला। तो अवसांत जैसा चेइला। तैसा विस्मयो जाहला। किरीटीसी॥ ६५५॥
नातरी गुरुकृपेसवें। वोसरलेया प्रपंचज्ञान आघवें। स्फुरें तत्त्व तेवीं पांडवें। श्रीमूर्ति देखिली॥ ६५६॥
तया पांडवा ऐसें चित्तीं। आड विश्वरूपाची जवनिका होती। ते फिटोनी गेली परौती। हें भले जाहलें॥ ६५७॥
काय काळातें जिणोनि आला। कीं महावातु मागां सांडिला। आपुलिया बाहीं उतरला। सात सिंधु॥ ६५८॥
ऐसा संतोषु बहु चित्तें। घेइजत असे पंडुसुतें। विश्वरूपापाठीं श्रीकृष्णातें। देखोनियां॥ ६५९॥

अर्थ—किंबहुना भगवान श्रीकृष्णांनी पुन: लहानसें रूप घेतलें, पण विश्वरूपाला पाहून भ्यालेल्या अर्जुनाला धीर दिला॥ ६५४॥ तेव्हा स्वप्नांत "मी स्वर्गाला गेलों" असें पाहणारा पुरुष, जसा अकस्मात जागा होऊन आश्चर्य चकित व्हावा, त्याप्रमाणे अर्जुन आश्चर्यचकित झाला॥ ६५५॥ किंवा गुरुची कृपा झाल्याबरोबर, ज्याप्रमाणे संपूर्ण प्रपंचज्ञान मावळून आत्मतत्व अनुभवाला येतें, त्याप्रमाणे अर्जुनाने विश्वरूपानंतर भगवंताची सगुण साकार श्रीकृष्णमूर्ति पाहिली॥ ६५६॥ ती श्रीकृष्णमूर्ति पाहिल्यावर, अर्जुनाच्या मनांत असें वाटलें की, श्रीकृष्ण व माझ्यामध्यें जो विश्वरूपाचा पडदा आड होता, तो बाजूला सारला गेला, हें फार बरें झालें॥ ६५७॥ जणुं काय काळाला जिंकून परत आला किंवा भयंकर सोसाट्याच्या वाऱ्याला मागें हटविलें अथवा सातहि समुद्र आपल्या हाताने तरून जाऊन कांठास लागला॥ ६५८॥ अशा प्रकारचा अत्यंत संतोष, विश्वरूपानंतर श्रीकृष्णमूर्तीला पाहून अर्जुनाच्या मनाला वाटला॥ ६५९॥

गूढार्थदीपिका—या ओव्यातून विश्वरूप व श्रीकृष्णस्वरूप या दोन रूपांच्या सुखानुभवांत काय फरक अर्जुनाला वाटला हें दाखविलें आहे.

मग सूर्याचियां अस्तमानीं। मागुती तारा उगवती गगनीं। तैसी देखों लागला अवनी। लोकांसहित॥ ६६०॥

अर्थ—मग सूर्य अस्तास गेला असतां, ज्याप्रमाणें आकाशांत नक्षत्रे चमकूं लागतात, त्याप्रमाणे श्रीकृष्णमूर्ति बरोबर अर्जुन सर्व भूतसृष्टिसहित पृथ्वी पाहूं लागला॥ ६६०॥

गूढार्थदीपिका—भगवंतांनी अर्जुनाला आपलें विश्वरूप पाहण्याकरितां व्यापक ज्ञानदृष्टि दिली व नंतर ती तिरोहित केली; म्हणून अर्जुनाला पूर्ववत् सृष्टि दिसूं लागली. याचा गूढभाव असा आहे की, श्रीगुरुने आपल्या सामर्थ्याने शिष्याला आत्मानुभव आणून दिला तरी, जोपर्यंत शिष्य, आपल्या प्रयत्नाने तो आंगीं बाणवून घेऊन, आपल्या स्वाधीन करून घेत नाही, तोपर्यंत तो अखंड टिकून राहत नाही.

श्रीमुकुंदराजांनी जयपाळ राजाला समाधि लावून दिल्यावरहि, त्याला विवेकसिंधु इत्यादि ग्रंथ सांगून, ती स्थिति त्याच्याकडून जेव्हा बाणवून घेवविली, तेव्हाच तो कृतार्थ झाला.

पाहे तंव तेंचि कुरुक्षेत्र। तैसेंचि दोहीं भागीं झालें गोत्र। वीर वर्षताती शस्त्रास्त्र। संघाटवरी॥ ६६१॥
तया बाणांचिया मांडवाआंतु। तैसाचि रथु आहे निवांतु। धुरे बैसला लक्ष्मीकांतु। आपण तळीं॥ ६६२॥

अर्थ—अर्जुन पाहतो तों तेंच पूर्वीचें कुरुक्षेत्र, तसेंच दोन्ही दळांना गोत्रज उभे असून, दळांतील वीर परस्परांवर शस्त्रास्त्रांच्या समुदायांचा वर्षाव करीत आहेत॥ ६६१॥ आणि त्या बाणांच्या मांडवाआंत रथ स्थिर असून, रथाच्या

धुरेवर भगवान श्रीकृष्ण बसले आहेत आणि आपण त्याच्या खालीं बसलों आहो, असें तो पाहूं लागला॥ ६६२ ॥

अर्जुन उवाच

दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन। इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः॥ ५१॥

अर्थ—अर्जुन म्हणाला, हे जनार्दना! तुझें हें मनुष्याकृति असे सौम्य स्वरूप पाहून मी प्रसन्नचित्त झाल्यामुळें, पूर्वीच्या स्वभावस्वास्थ्याला प्राप्त झालों आहे॥ ५१ ॥

एवं मागील जैसें तैसें। तेणें देखिलें वीरविलासें। मग म्हणे जियालों ऐसें। जाहलें आतां॥ ६६३ ॥
बुद्धीतें सांडोनि ज्ञान। भेणें वळघलें रान। अहंकारेंसीं मन। देशधडी जाहलें॥ ६६४॥
इंद्रियें प्रवृत्ती भुललीं। वाचा प्राणा चुकली। ऐसी आपांपरी होती जाली। शरीरग्रामीं॥ ६६५ ॥
तियें आघवींचि मागुतीं। जिवंत भेटलीं प्रकृती। आतां जिताणें श्रीमूर्ती। जाहलें इयां॥ ६६६ ॥
ऐसें सुख जीवीं घेतलें। मग कृष्णातें जी म्हणितलें। मियां तुमचें रूप देखिलें। मानुष हें॥ ६६७॥
हें रूप दाखविणें देवराया। कीं मज अपत्या चुकलिया। बुझावोनि तुवां माया। स्तनपान दिधलें॥ ६६८ ॥
जी विश्वरूपाचां सागरीं। होतों तरंग मवित वांवेवरी। तो इये निजमूर्तीचां तीरीं। निगालों आतां॥ ६६९ ॥
आइकें द्वारकापुर सुहाडा। मज सुकतीया जी झाडा। हे भेटी नव्हे बहुडा। मेघाचा केला॥ ६७० ॥
सावियाचि तृषा फुटला। तया मज अमृतसिंधु हा भेटला। आतां जिणयाचा फिटला। अभरंवसा॥ ६७१ ॥
माझिया हृदयरंगणीं। होताहे हरिखलतांची लावणी। सुखेंसीं बुझावणीं। जाहली मज॥ ६७२ ॥

अर्थ—याप्रमाणे पराक्रमाचा खेळ करणाऱ्या अर्जुनाने जसें मागितलें, तसें पाहिलें व मग मनांत म्हणाला, आतां माझ्या कुडींत प्राण आला असें वाटतें॥ ६६३ ॥ आतां पर्यंत माझें ज्ञान बुद्धीला सोडून विश्वरूपाच्या भीतीने जंगलांत पळालें होतें व अहंकारासहित मन देशोधडीस लागलें होतें॥ ६६४॥ इंद्रियांना कर्में करण्याचें भान राहिले नाही, वाचेचे ठिकाणी शब्द उच्चारण्याची शक्ति राहिली नाही, अशी शरीराचे ठिकाणीं सर्वांची दुर्दशा झाली होती॥ ६६५ ॥ अर्जुन मनांत म्हणतो, या श्रीमूर्तीच्या योगाने हीं संपूर्ण इंद्रियें पुनः जिवंत प्रकृतीला भेटली म्हणजे सजीव झाली आणि या मूर्तिमुळेच आतां मी वांचलों असे मला वाटत आहे॥ ६६६ ॥ याप्रमाणे अर्जुन मनात अत्यंत समाधान पावून, मग श्रीकृष्णाला म्हणाला, मी तुमचें मनुष्यासारखें असलेलें हें रूप पाहिलें॥ ६६७॥ देवराया! मला तुम्ही हें रूप दाखविणें म्हणजे आईशीं चुकामुक झालेल्या मज लेंकराचें सांत्वन करून तुंवा आईने स्तनपानच दिलें आहे॥ ६६८ ॥ जी देवा! जो मी या विश्वरूप सागरांत दोन हातांनी लाटा मोजित होतो, तो आतां मी श्रीकृष्णमूर्तिरूपी तीरास लागलों आहे॥ ६६९ ॥ हे द्वारकापुरांतील मित्रा! ऐक. मला तूं या रूपाने पुनः भेट दिलीस, ती भेट नसून, सुकूं लागलेल्या मज झाडावर मेघांचा वर्षावच केलास॥ ६७० ॥ खरोखरच तृषेने पीडलेल्या मला, तुज कृष्णमूर्तीचें दर्शन म्हणजे अमृताच्या समुद्राचीच प्राप्ति होय. आतां जो जगण्याचा भरंवसा नव्हता, तो नाहीसा झाला॥ ६७१ ॥ माझ्या हृदयदेशांत हर्षरूपी वेली लावल्या जात असून आतां माझी व सुखाची फारकत नाहीशी होऊन ऐक्य झालें आहे॥ ६७२ ॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे झाडाची फांदी वाकवितां वाकवितां कांही कालाने ती, स्वाभाविक वांकल्याप्रमाणे होऊन राहते किंवा संसारांत सर्व प्राण्यांचें, आपल्या अपत्याविषयीं जसें स्वाभाविक प्रेम असतें, तेथें प्रेमकरणरूप क्रिया करावी लागत नाही, त्याप्रमाणेच, प्रेमळ भक्ताचें, आपल्या सगुण भगवंताचे ठिकाणीहि असलेलें प्रेम स्वाभाविक होऊन जाते. तेथेंहि प्रेम करण्याची क्रिया राहत नाही, असा भक्तांचा अनुभव असतो, हेंच या ओव्यांतून दाखविलें आहे. श्रीज्ञानेश्वर माऊलींनी, पुढे अठराव्या अध्यायांत ''तैसी क्रिया कीर न साहे। परी अद्वैतीं भक्ति आहे। हे अनुभवाचि जोगें नोहे। बोला ऐसे'' या ओवीने हाच भाव दाखविला आहे.

श्रीभगवानुवाच

सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम। देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिणः॥ ५२॥

अर्थ—श्रीभगवान म्हणाले, अर्जुना मला ज्या रूपाने तूं पाहिलें आहेस, त्या रूपाने पाहणें अत्यंत दुर्लभ आहे. देवादिक देखील या माझ्या विश्वरूपाच्या दर्शनाची नित्य उत्कंठा बाळगतात॥ ५२॥

यया पार्थाचिया बोलासवें। हें काय म्हणितलें देवें। तुवां प्रेम ठेवूनि यावें। विश्वरूपीं कीं॥ ६७३॥
मग इये श्रीमूर्ती। भेटावें सडिया आयती। ते शिकवण सुभद्रापती। विसरलासि मा॥ ६७४॥
अगा आंधळिया अर्जुना। हाता आलिया मेरूही होय साना। ऐसा आथी मना। चुकीचा भावो॥ ६७५॥
तरी विश्वात्मक रूपडें। जें दाविलें आम्हीं तुजपुढें। तें शंभूही परि न जोडे। तपें करितां॥ ६७६॥
आणि अष्टांगादिसंकटीं। योगी शिणताती किरीटी। परि अवसरु नाहीं भेटी। जयाचिये॥ ६७७॥
तें विश्वरूप एकादे वेळ। कैंसेनि देखों अळुमाळ। ऐसें स्मरतां काळ। जातसे देवां॥ ६७८॥
आशेचिया अंजुळी। ठेऊनि हृदयाचां निडळीं। चातक निराळीं। लागलें जैसें॥ ६७९॥
तैसें उत्कंठानिर्भर। होऊनियां सुरवर। घोकीत आठही पाहार। भेटी जयाची॥ ६८०॥
परि विश्वरूपासारिखें। स्वप्नीही कोण्ही न देखे। तें प्रत्यक्ष तुवां सुखें। देखिलें हें॥ ६८१॥

अर्थ—याप्रमाणे अर्जुन बोलला असतां, देव म्हणाले, बा अर्जुना! हें काय बोलतोस? तूं माझ्या विश्वरूपाचे ठिकाणी प्रेम ठेवून ये॥ ६७३॥ आणि मग तूं एकट्याने (म्हणजे नुसत्या देहाने) या माझ्या श्रीकृष्णमूर्तीला भेटावें, ही जी मी तुला शिकवण दिली, ती तूं सुभद्रापति अर्जुना! विसरलास ना॥ ६७४॥ हे आंधळ्या अर्जुना! अनायासें प्राप्त झालेल्या सुवर्णमेरूचाहि विशेष आदर वाटत नाही, असा हा मनाचा विपरीत स्वभाव आहे॥ ६७५॥ पण आम्ही तुझ्यापुढे आपलें जें विश्वव्यापकरूप दाखविलें, तें कितीहि तप करून शंकराला देखील प्राप्त होत नाही॥ ६७६॥ आणि अत्यंत श्रमदायक अशा योगाच्या यमनियमादि अष्टांगांचा अभ्यास करतांना योगी शीणतात; पण त्यांनाहि ज्या विश्वरूपाच्या भेटीचा योग येत नाही॥ ६७७॥ तें विश्वरूप एखादे वेळीं एवढेसें तरी कसें दिसेल, असें चिंतन करितां करितांच देवांचेंहि आयुष्य जातें॥ ६७८॥ जसें चातकपक्षी आकाशाकडे लागतात म्हणजे सारखी दृष्टि देऊन राहतात त्याप्रमाणे हृदयाच्या कपाळावर आशेची अंजुली ठेऊन, अत्यंत उत्कंठतेने देव, ज्याची भेट व्हावी म्हणून आठहि प्रहर चिंतन करीत असतात॥ ६७९-६८०॥ पण विश्वरूपासारखे कोणाच्या स्वप्नांतहि पाहण्यांत येत नाही. तें विश्वरूप तूं अनायासें प्रत्यक्ष पाहिलेस॥ ६८१॥

नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया। शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा॥ ५३॥

अर्थ—अर्जुना! मला तूं ज्याप्रकारचें पाहिलेंस तसें मला वेदाध्ययनाने, तपाने, दानाने किंवा यज्ञाने पाहणें शक्य नाही॥ ५३॥

पैं उपायांसि वाटा। न वाहती एथ सुभटा। साहीसहित वोहटा। वाहिला वेदीं॥ ८२॥
मज विश्वरूपाचिया मोहरा। चालावया धनुर्धरा। तपांचियाही सर्वभारा। नव्हेचि लागु॥ ८३॥
आणि दानादि कीर कानडें। मी यज्ञींही तैसा न सांपडें। जैसेनि कां सुरवाडें। देखिला तुवां॥ ८४॥

अर्थ—हे उत्तम योद्ध्या! येथे येण्याकरितां कर्मरूप साधनांना मार्ग नाही, साही शास्त्रांसह वेदाने माघार घेतली॥ ६८२॥ हे धनुर्धारी अर्जुना! माझ्या विश्वरूपाकडे येण्याकरितां नानाप्रकारच्या तपांच्या समुदायांचाहि लाग नाही॥ ६८३॥ आणि ज्याप्रमाणे तूं विश्वरूपाला उत्तम रीतीने पाहिलेस, तसें तें विश्वरूप दानादिकांनी खरोखर प्राप्त होणें कठीण असून, तसा मी यज्ञादिकांनीहि प्राप्त होत नाही॥ ६८४॥

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन। ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परन्तप॥ ५४॥

अर्थ—माझ्या अनन्यभक्तीनेच अशाप्रकारें मला जाणणें, मला पाहणें व माझ्यांत तत्त्वत: प्रवेश करणें-म्हणजे मला मिळून जाणें-शक्य आहे॥ ५४॥

तैसा मी एकीचि परी। आतुडें गा अवधारी। जरी भक्ति येउनि वरी। चित्ताते गा॥ ६८५॥

अर्थ—माझ्या प्रेमभक्तीने चित्ताला वरलें-म्हणजे माझी प्रेमभक्ति चित्ताला उत्पन्न झाली-तर मात्र या एकाच गोष्टीने माझ्या या रूपाची प्राप्ति होते॥ ५८५॥

परि तेचि भक्ति ऐसी। पर्जन्याची सुटिका जैसी। धरावांचूनि अनारिसी। गतीचि नेणे॥ ६८६॥
कां सकळ जळसंपत्ती। घेऊनि समुद्रातें गिंवसिती। गंगा जैसी अनन्यगती। मिळालीचि मिळे॥ ६८७॥
तैसें सर्वभावसंभारें। न धरत प्रेम एकसरें। मजमाजीं संचरे। मीचि होऊनि॥ ६८८॥

अर्थ—पण ती भक्ति अशी आहे, ज्याप्रमाणे पावसाच्या वर्षावाला पृथ्वीवांचून दुसरी गतिच ठाऊक नसते॥ ६८६॥ ज्याप्रमाणे जलसंपत्ति घेऊन, गंगा अनन्यगतिक होऊन समुद्राला मिळते व मिळाल्यानंतरहि मिळतच राहते॥ ६८७॥ त्याप्रमाणे माझ्याशीं ऐक्य पावून व सर्व प्रेमसंबंधाचा समुदाय घेऊन, खंड न पडतां, माझे ठिकाणी एकसारखें प्रेम होत राहतें॥ ६८८॥

गूढार्थदीपिका—विश्वरूपाचे ठिकाणी प्रेम लागूं शकत नाही असा अर्जुनाने आपला अनुभव मागें सांगितला आहे आणि "भक्ति सगुणाचीच घडे" (र. च.) भक्ति रामकृष्णादि सगुणस्वरूपाचीच होऊं शकते, असें समर्थानीहि म्हटलें आहे.

येथेहि भक्ति जी सांगितली आहे. ती एकदेशीय सगुण साकार श्रीकृष्णाचीच सांगितली आहे.

ज्याप्रमाणे समुद्राच्या कोणत्याहि एका भागावर बुडी मारली, तरी ती बुडी समुद्रांतच मारली जाते, त्याप्रमाणे एकदेशीय सगुणसाकारस्वरूपहि पूर्णब्रह्मच असल्यामुळे, एकदेशीय सगुणस्वरूपाच्या भक्तीने त्याच्याशीं ऐक्य पावणें म्हणजे विश्वरूपाशीं ऐक्य पावणें होय, हेच या ओवींतून सांगितले आहे.

आणि तेवींचि मी ऐसा। थडिये माझारीं सरिसा। क्षीराब्धि कां जैसा। क्षीराचाचि॥ ६८९॥
तैसें मजलागुनि मुंगीवरी। किंबहुना चराचरीं। भजनासि कां दुसरी। परीचि नाहीं॥ ६९०॥
तयाचि क्षणासवें। एवंविध मी जाणवें। जाणितला तरी स्वभावें। दृष्टही होय॥ ६९१॥

अर्थ—आणि त्याचप्रमाणे मीहि असा आहे की, जसा क्षीरसागर कांठाशीं व मध्यें एकसारखा दुधाचाच असतो॥ ६८९॥ तसेंच मजपासून मुंगीपर्यंत, किंबहुना संपूर्ण चराचर विश्वांत, भजण्याकरितां-म्हणजे प्रेम करण्याकरितां माझ्यावांचून दुसरी निराळी वस्तुच नाही॥ ६९०॥ ज्याक्षणीं, असें माझें प्रेम जडतें, त्याक्षणींच मी याप्रमाणें विश्वव्यापक आहे, असा जाणला जातो आणि जाणला गेलों की, सहजच विश्वरूपाने प्रत्यक्ष होतो॥ ६९१॥

गूढार्थदीपिका—एवंविध मी जाणवें—एकदेशीय सगुण परमात्म्याच्या भक्तीने, तो एकदेशीय नसून, सर्वनामरूपाने नटला आहे, असाच त्याचा व्यापक अनुभव येतो व तो डोळ्याने दिसतोहि. यालाच "सर्वं खल्विदं ब्रह्म" म्हणजे अन्वयाचा अनुभव म्हणतात.

मग इंधनीं अग्नि उद्दीपे। आणि इंधन हे भाष हारपे। तें अग्नीचि होऊनि आरोपे। मूर्त जेवीं॥ ६९२॥
कां उदय न कीजे तेजाकारें। तंव गगनचि होऊनि असे आंधारें। मग उदैल्यिां एकसरें। प्रकाशु होय॥ ६९३॥
तैसें माझिये साक्षात्कारीं। सरे अहंकाराची वारी। अहंकारलोपीं अवधारीं। द्वैत जाय॥ ६९४॥
मग मी तो हें आघवें। एक मीचि आथी स्वभावें। किंबहुना सामावे। समरसे तो॥ ६९५॥

अर्थ—मग लांकडाचे ठिकाणीं अग्नि प्रगट झाला असतां, 'लांकूड' हा शब्द नाहीसा होतो व तें लांकूड मूर्तिमंत अग्निच होतें॥ ६९२॥ किंवा जोपर्यंत सूर्यच प्रकाशरूपाने आपला उदय करीत नाही, तोपर्यंत आकाशच काळोखरूप होऊन राहतें आणि सूर्य प्रकाशल्याबरोबर, मग तें आकाश एकसारखें प्रकाशच होऊन राहतें॥ ६९३॥ त्याप्रमाणे (माझ्या प्रेमभक्तीने) माझ्या सगुण स्वरूपाचा साक्षात्कार झाला असतां, अहंकारावर येणें समूळ नाहीसें होतें आणि अहंकार नाहीसा झाला की, द्वैत मुळींच भासत नाही॥ ६९४॥ मग 'मी' व 'तो' हे सर्व स्वभावत: मीच एक होऊन राहतो. इतकेंच नव्हे तर, तो माझे ठिकाणीं समरस ऐक्य पावतो॥ ६९५॥

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः। निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव॥५५॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विश्वरूपदर्शनयोगो नामैकादशोऽध्यायः॥ ११॥

अर्थ—अर्जुना! एका माझ्याकरितांच कर्मे करणारा, मीच ज्याची शेवटली प्राप्तव्य गति आहे, माझेंच अनन्य प्रेम करणारा, माझ्यावांचून ज्याचें कोठेंहि प्रेम नाही व सर्व भूताचे ठिकाणी शत्रुभाव न ठेवणारा, असा तो मला प्राप्त होतो—म्हणजे माझ्याशीं ऐक्य पावतो॥ ५५॥

जो मजचि एकालागीं। कर्मे वाहातसे आंगीं। जया मजवांचोनि जगीं। गोमटें नाहीं॥ ६९६॥
दृष्टादृष्ट सकळ। जयाचें मीचि केवळ। जेणें जिणयाचें फळ। मजचि नाम ठेविलें॥ ६९७॥
भूतें हें भाष विसरला। जे दिठी मीचि आहे बांधला। म्हणोनि निर्वैर जाहला। सर्वत्र भजे॥ ६९८॥
ऐसा जो भक्त होये। तयाचें त्रिधातुक हें जैं जाये। तैं मीचि होऊनि ठाये। पांडवा गा॥ ६९९॥

अर्थ—जो केवळ एका माझ्याकरितांच शरीरादिकांनी होणारीं कर्मे करीत असतो, ज्याला माझ्यावांचून जगांत कांहीच गोड वाटत नाही किंवा आवडत नाही॥ ६९६॥ ज्याचे जिवंतपणीचें व मरणानंतरचें प्राप्तव्य केवळ मीच एक आहे आणि माझी प्राप्ति होणें, हेंच ज्याला जीविताचें फळ आहे असे वाटतें॥ ६९७॥ अशा माझ्या प्रेमामुळे जो माझ्याहून दुसरें प्राणी आहेत ही भाषाच विसरला, आपल्या दृष्टींत ज्याने मलाच भरून ठेवलें, म्हणून ज्याला कोणी वैरीच उरला नाही आणि सर्वत्र माझेंच भजन करतो॥ ६९८॥ असा जो माझा भक्त आहे, त्याचे हें वातपित्तकफात्मक शरीर नाहीसें झाले असतां, बा अर्जुना! तो मीच होऊन राहतो॥ ६९९॥

गूढार्थदीपिका—पांचभौतिक देह हा भ्रांतिजन्य असून, दृष्टिसृष्टिवादानुसार त्याचें ज्ञान होतें तोपर्यंतच त्याचें अस्तित्व असतें आणि त्याचा विसर पडला की त्याचें अस्तित्व नाहीसें होतें. भगवंताच्या निःसीम प्रेमामुळे भक्तांना देहाचा विसर पडतो व ते भगवंताशीं पूर्ण ऐक्य पावतात; पण अज्ञानी लोकांना त्यांचा देह दिसतो तोपर्यंत, त्यांच्याठिकाणी जो देव व भक्त असा भेद दिसून पडतो, तोहि त्यांचें शरीर पडल्यानंतर नाहीसा होऊन ते केवळ भगवत्स्वरूपच होऊन राहतात.

ऐसें जगदुदरदोंदिलें। तेणें करुणारसरसाळें। संजयो म्हणे बोलिलें। श्रीकृष्णदेवें॥ ७००॥
ययावरी तो पांडुकुमरु। जाहला आनंदसंपदा थोरु। आणि कृष्णचरणचतुरु। एक तो जगीं॥ ७०१॥

अर्थ—जगत् सांठविल्यामुळे पोट मोठे असलेले व करुणारसाने रसाळ असलेले श्रीकृष्णदेव याप्रमाणें बोलले, असे संजयाने धृतराष्ट्राला सांगितलें॥ ७००॥ यानंतर तो पांडूचा कुमार अर्जुन आनंदसंपदेने संपन्न झाला व तोच एकटा जगामध्ये श्रीकृष्णचरणाची थोरवी जाणणारा चतुर होता॥ ७०१॥

गूढार्थदीपिका—कृष्ण चरण चतुर। एक तो जगीं—जगाचे उत्पत्तिस्थितिलयरूप तटस्थलक्षणात्मक भगवान श्रीकृष्ण असून, ज्ञानरूप स्वरूपलक्षणात्मकहि श्रीकृष्णरूपच आहे; म्हणून श्रीकृष्णाचीं दोन्हीं रूपें पूर्णब्रह्मच आहेत आणि बीजवृक्षाप्रमाणे श्रीकृष्णस्वरूप व विश्वरूप यांचा संबंध असून, दोघांत, स्वरूपाने दृष्टीने कांही फरक नसला तरी, बाहेर स्वाभाविक व निःसीम आत्मप्रेमसुखाचा लाभ, एका श्रीकृष्ण स्वरूपाचे ठिकाणीच होतो; विश्वरूपाचे ठिकाणी होत नाही.

अर्थात् विश्वरूपापेक्षा तेंच अधिक प्रिय होय, असा श्रीकृष्णाच्या चरणाचा महिमा, प्रत्यक्ष अनुभविण्याचें चातुर्य, अर्जुनाचे ठिकाणींच माऊलींना दिसलें; म्हणून माऊलींनी अर्जुनाला "श्रीकृष्णचरणचतुर" हें विशेषण दिलें.

तेणें देवाचिया दोनही मूर्ती। निकिया न्याहाळिलिया चित्तीं। तंव विश्वरूपाहूनि कृष्णाकृती। देखिला लाभु॥ ७०२॥

अर्थ—त्याने देवाच्या दोन्ही मूर्ती चित्तांत चांगल्या न्याहाळून पाहिल्या तेव्हा त्याला विश्वरूपापेक्षां सगुण श्रीकृष्णमूर्तीचे ठिकाणी सुखाचा विशेष लाभ दिसून आला॥ ७०२॥

गूढार्थदीपिका—श्रीकृष्णाच्या चरणाचे माहात्म्य जाणण्याचें चातुर्य अर्जुनाचे ठिकाणीं कोणतें होतें, हें या ओवीतून दाखविलें आहे.

परि तयाचिये जाणिवे। मानु न कीजेचि देवें। जे व्यापकाहूनि नव्हे। एकदेशी॥ ७०३॥
हेंचि समर्थावयालागीं। एक दोन चांगी। उपपत्ती शार्ङ्गी। दाविता जाहला॥ ७०४॥
तिया ऐकोनी सुभद्राकांतु। चित्तीं आहे म्हणतु। तरि होय बरवें दोन्हींआंतु। तें पुढती पुसों॥ ७०५॥
ऐसा आलोच करूनि जीवीं। आतां पुसती वोज बरवी। आदरील ते परिसावी। पुढें कथा॥ ७०६॥
प्रांजळ ओंवीप्रबंधें। गोष्टी सांगिजेल विनोदें। निवृत्तिपादप्रसादे। ज्ञानदेवो म्हणे॥ ७०७॥
भरोनि सद्भावाची अंजुळी। मियां वोंवियाफुलें मोकळीं। अर्पिली अंघ्रियुगुळीं। विश्वरूपाच्या॥ ७०८॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां एकादशोऽध्यायः॥ ११॥

अर्थ—पण व्यापक विश्वरूपाहून एकदेशी श्रीकृष्णस्वरूप अधिक लाभदायक किंवा श्रेष्ठ असूं शकत नाही, असें म्हणून भगवंतांनी त्याच्या या अनुभवाला मान्यता दिली नाही॥ ७०३॥ आणि आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ भगवंतांनी एक दोन उपपत्ति किंवा दृष्टान्तहि अर्जुनाला सांगितले॥ ७०४॥ सुभद्रापति अर्जुन, त्या उपपत्ति ऐकून मनांत म्हणूं लागला की, दोन्ही मूर्तींमध्यें चांगली लाभदायक कोणती, हें आपण भगवंताला पुढें विचारूं॥ ७०५॥ असा मनांत विचार करून आतां तो श्रीगुरुला प्रश्न विचारण्याची जी सुंदर पद्धति स्वीकारील, ती कथा पुढें ऐका॥ ७०६॥ श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, श्रीनिवृत्तिनाथांच्या चरणप्रसादाने, सरळ ओवीप्रबंधांत ती गोष्ट मी सहज लीलेने सांगणार आहे, ती ऐका॥ ७०७॥ ओवीरूपीं मोकळीं फुलें, मी प्रेमभावाच्या ओंजळींमध्यें भरून विश्वरूपाच्या दोन्ही पायावर अर्पण केलीं॥ ७०८॥

श्रीसद्गुरुकृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या अकराव्या अध्यायाचा गूढार्थदीपिकेसह अनुवाद पूर्ण झाला, तो श्रीसद्गुरुचरणीं समर्पण असो.



समारोप

या अकराव्या अध्यायांतील कथानक म्हणजे शांत व अद्‌भुत या दोन रसांचें मिश्रण आहे. भगवंतांनी अर्जुनाला ब्रह्मज्ञान देऊन त्याच्या ठिकाणी शांतरसाची प्राप्ति करून दिली व त्यानंतर आपलें जें सर्व नामरूपात्मक विश्वरूप तें दाखवून त्याच्या ठिकाणी अद्‌भुतरस उत्पन्न केला. तेथेच बाकींच्या रसांचे मिश्रणहि या अध्यायांत आले आहे. सच्चिदानंद भगवानच सर्व जगद्रूपाने नटला आहे, हें मागील अध्यायांत ऐकून प्रत्यक्ष डोळ्यांनी त्याचा आपण अनुभव घ्यावा अशी अर्जुनाला इच्छा झाली व त्याप्रमाणे विश्वरूप दाखविण्याविषयीं त्याने भगवंताला प्रार्थना केली.

अर्जुन म्हणतो, भगवंता! माझ्यावर अनुग्रह करून आपण मला जें गूढ अध्यात्मज्ञान सांगितलें त्यायोगें माझा आप्तेष्टाविषयींचा मोह नाहीसा झाला. उत्पत्ति, स्थिति, लय आपल्यापासूनच होतात, हा आपला अगाध महिमा मी श्रवण केला. आतां ज्या स्वरूपाने तूं या सर्व ब्रह्मांडरूपाने नटला आहेस, तें तुझें विश्वरूप, मी आपल्या डोळ्यांनी पाहावे, अशी मला अत्यंत इच्छा उत्पन्न झाली आहे; पण ते पाहण्याला मी योग्य असल्यास मला एकदां तें आपलें रूप दाखव.

अर्जुनाने, अत्यंत प्रेमाने अशी इच्छा प्रगट केल्याबरोबर भगवान म्हणतात, अर्जुना! अनंत वर्णांनी, अनंत आकृतींनी भरलेलें व नाना दिव्य रूपांनी व्याप्त असें हें माझें विश्वरूप दाखविलें आहे, तें पहा. त्यांत पूर्वी न पाहिलेले सूर्य, वसु, रुद्र, अश्विनौदेव, मरुत् वगैरे हे संपूर्ण दिसत आहेत, पहा. या माझ्या एकाच स्वरूपाचे ठिकाणी संपूर्ण चराचरात्मक जगत् तुला दिसेल.

भगवंतांनी असें विश्वरूप दाखविलें तरी अर्जुन तें पाहूं शकला नाही; हें जाणून भगवंतांनी अर्जुनाला दिव्य दृष्टि दिली. नंतर अर्जुन भगवंताचें विश्वरूप पाहूं लागला.

भगवंताचें तें विश्वरूप, अनंत तोंडें, अनंत डोळे, अनंत हातपाय व अनंत प्रकारचीं दिव्य वस्त्रें व आभरणें यांनी सुशोभित झालेलें होतें. त्या विश्वरूपाचे आंगावर, दिव्य सुमनांच्या माळा होत्या व दिव्य चंदनाचे लेप लावलेले होते. आकाशांत हजारों सूर्यांचा, विजांचा व अग्नींचा प्रकाश प्रगट झाला असतां जें तेज प्रगट होईल, त्या तेजापेक्षा कितीतरी पटीने तें भगवंताचें विश्वरूप तेजस्वी होतें, त्या विश्वरूपाच्या एका एका भागावर अनेक भिन्न भिन्न प्रकाराने विभक्त झालेलें संपूर्ण जगत् अर्जुन पाहूं लागला. असें तें विश्वरूप पाहतांच अर्जुन अत्यंत आश्चर्ययुक्त होऊन हर्षाने रोमांचित झाला व त्याने भगवंताला नमस्कार करून भगवंतांची स्तुति करण्यास प्रारंभ केला.

त्या विश्वरूपांत भगवंताची कांही रूपें अत्यंत सुंदर होतीं व कांही आक्राळविक्राळ दाढांनी युक्त अशा मुखांनी सर्व सैन्याचा संहार करणारीं दिसत होतीं.

भगवंताने तें भयानक विश्वरूप धारण केलेलें पाहून अर्जुनाला आपल्याहि मृत्यूची शंका येऊं लागली. त्याचा धीर खचला व अत्यंत घाबरून जाऊन त्याने भगवंताला विचारलें की एवढें भयानक रूप धारण करून आपण काय करूं इच्छितां हें मला सांगा. त्यावर भगवान म्हणतात, अर्जुना! सर्व सृष्टीचा संहार करणारा मी काल असून दोन्ही सैन्यांतील युद्धाकरितां सज्ज झालेल्या सर्व लोकांचा संहार करण्याकरितांच मी प्रवृत्त झालों आहे. पण तुम्ही पांडव मात्र त्यांत नाही. कौरवाकडील भीष्म, कर्ण वगैरे सर्व पराक्रमी वीरांना मी पूर्वीच मारले आहे. तूं आतां निमित्तमात्र हो. भगवान श्रीकृष्णाचा असा थोर महिमा पाहून अर्जुनाला, आपण आजपर्यंत सामान्य पुरुष समजून, भगवंतांशीं कसें वागलों, याचा पश्चात्ताप झाला. नंतर अर्जुनाने भगवंताला शतशः प्रणाम करून आपल्या अपराधांची क्षमा मागितली व पुनः पूर्वीचे चतुर्भुजरूपच दाखवा म्हणून भगवंताची प्रार्थना केली.

त्यावर भगवान म्हणाले हे अर्जुना! मी तुझ्या भक्तीने तुजवर प्रसन्न झालों आहे; म्हणूनच कधी कोणी न पाहिलेलें असें अत्यंत देदीप्यमान विश्वरूप तुला दाखविलें आहे. हें विश्वरूप भयंकर असलें तरी त्याचें तूं भय बाळगूं नकोस. येथेच प्रेम ठेव व या माझ्या विश्वरूपापेक्षा चतुर्भुजरूप श्रेष्ठ समजूं नकोस. असे बोलून अर्जुनाचे इच्छेवरून भगवंतांनी त्या विश्वरूपाचा उपसंहार केला व पुनः चतुर्भुजरूप धारण केलें. तें सौम्य चतुर्भुजरूप पाहून अर्जुनाचें समाधान झालें.

भगवान म्हणतात, अर्जुना! या माझ्या विश्वरूपाचें दर्शन, वेदाने, तपाने, दानाने किंवा यज्ञाने देखील होणें शक्य नाहीं. तें एका अनन्य भक्तीनेच होऊं शकतें. संग सोडून व सर्व प्राणिमात्राशीं द्वेषरहित होऊन जो मत्प्रीत्यर्थ कर्म करून मत्परायण व माझा भक्त झाला, तोच मला प्राप्त होतो.

॥ श्रीमद्‌सद्‌गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय बारावा

अवतरणिका—मागील अकराव्या अध्यायांत एकदेशीय सगुण श्रीकृष्णास्वरूपापेक्षा व्यापक विश्वरूपाचे ठिकाणी प्रेम ठेव, असें भगवंतानी अर्जुनाला सांगितलें; पण विश्वरूपापेक्षा एकदेशीय सगुण श्रीकृष्णाचे ठिकाणीच प्रेमभक्ति करणें शक्य, सोपें व भगवंताशीं जाणीवरहित निर्विकल्प ऐक्य करून देणारें आहे, म्हणून उघड ब्रह्मानंद भोगण्याच्या दृष्टीने, विश्वरूपाहून भगवंताचें एकदेशीय स्वरूपच श्रेष्ठ आहे, असा अर्जुनाचा भक्त्यनुभव होता.

अर्थात् भगवंताचें सांगणे अर्जुनाला स्वानुभवाच्या विरुद्ध वाटत होतें. स्वानुभवच सत्य आहे किंवा भगवंताचें म्हणणें सत्य आहे, याचा निर्णय भगवंताच्या मुखानेच करून घ्यावा, या दृष्टीने अर्जुनाने फारच सुंदर व मार्मिक प्रश्न केला आहे. तो असा की, भगवंता! तुझ्या विश्वरूपाचे उपासक व तुझ्या एकदेशीय श्रीकृष्णाचे उपासक या दोहोंपैकीं तुझ्याशीं कोण युक्ततम होतो-म्हणजे तुझ्याशीं कोणाचें जाणीवरहित असे निर्विकल्प ऐक्य होतें-हें मला सांग.

भगवंतांनी या अध्यायांत अर्जुनाचा अनुभवच यथार्थ आहे आणि मागील एकदेशीय स्वरूपाविषयीचे तुच्छत्वादि उद्गार, अर्जुनाचा अनुभव व भक्तिप्रेम पाहण्याकरितां होते, हें आपल्या मुखाने स्पष्ट केलें आहे.

श्रीगुरुच्या ज्या कृपादृष्टीने ज्ञान-भक्तिसंपन्न होऊन शिष्य कृतार्थ होतो, त्या कृपादृष्टीचा येथे महिमा वर्णन करीत माऊलींनी श्रीगुरुची स्तुति केली आहे.

जय जय वो शुद्धे। उदारे प्रसिद्धे। अनवरत आनंदे। वर्षतिये॥ १॥

अर्थ—हे सद्गुरु आई! तूं शुद्ध म्हणजे अखंड अज्ञानादि दोषरहित आहेस, तूं एक अत्यंत उदार म्हणून प्रसिद्ध आहेस व तूं अखंड आनंदस्वरूप किंवा प्रेमरूप असून शिष्याचे ठिकाणी अखंड परमानंदाचा वर्षाव करणारी किंवा परमानंदरूप प्रेमाची प्राप्ति करून देणारी आहेस॥ १॥

गूढार्थदीपिका—श्रीगुरुंचा जयजयकार करून व आपल्याकडे बालपण घेऊन श्रीज्ञानेश्वर महाराज लडिवाळपणाने श्रीगुरुंचें स्तवन करतात.

"नाद्वैतं गुरुणासह" ज्ञानाने आलेल्या ऐक्याची जाणीव नाहीशी होऊन परमानंदाची प्राप्ति होण्याकरितां श्रीगुरुशीं अद्वैत-ऐक्याची वागणूक न ठेवतां नम्रपणाच्या शेवटील टोंकावर शिष्याने राहायला पाहिजे, हीच सर्व आचार्यादि संतांची शिकवणूक आहे.

जयजय वो शुद्धे—येथे "शुद्ध" हें विशेषण जीवाच्या ठिकाणी असलेल्या अशुद्धीच्या अपेक्षेने आहे. जीवाच्या ठिकाणी अज्ञान व अज्ञानजन्य अनेकत्व, कर्तृत्व, भोक्तृत्व, राग, द्वेष, अभिनिवेश, पाप इत्यादि नाना प्रकारची अशुद्धि आहे. तसेच त्याची ज्ञानदृष्टिहि विपरीत-ज्ञानरूप अशी अशुद्ध असून, त्याचे देहादिक पांचभौतिकहि अशुद्ध आहेत.

पण श्रीगुरुची दृष्टि शुद्ध चिन्मय असून ज्ञानभक्तीने त्याची सगुण साकार मूर्तिहि चिन्मयच झालेली असते-म्हणजे श्रीगुरु आंत-बाहेर पूर्ण चिन्मयच असतात-म्हणून ते सर्वतोपरि उपाधिरहित-म्हणने शुद्ध-आहेत किंवा पूर्ण ब्रह्म आहेत, असें 'शुद्ध' या शब्दाने माउलींनी संबोधून त्यांचा जयजयकार केला आहे.

उदारे प्रसिद्धे—जगांत जेवढे उदार व समर्थ म्हणून पुरुष व पदार्थ प्रसिद्ध आहेत, त्या सर्वांनी विनाशी

सुख प्राप्त करून देणाऱ्या वस्तु देऊनच जगांत आपलें औदार्य दाखविलें आहे. कोणीहि आपल्यासारखे दुसऱ्याला केलें नाही.

पण श्रीगुरु, कोणत्याहि साधनाने प्राप्त न होणारी व अप्राप्त असलेली ब्रह्मस्थिति प्राप्त करून देऊन, आपल्यासारखेच सर्व उपाधिरहित असे शुद्ध करून सोडतात. एवढेंच नाही तर दुसऱ्याला आपल्यासारखें पूर्ण करून देण्याचे सामर्थ्यहि त्याला देतात; म्हणून श्रीगुरुच एक उदारांत उदार, म्हणून प्रसिद्ध आहेत. "लोह परिसाची न साहे उपमा" "आपणासारिखे करिती तात्काळ" (तु. गा.) परिस लोखंडाचें सोनें करतो, पण त्याला परिस करीत नाही. श्रीगुरु मात्र शिष्याला आपल्यासारखेच करून सोडतात; म्हणून श्रीगुरुला परिसाची सुद्धां उपमा देतां येत नाही, असें श्रीतुकाराम महाराज म्हणतात.

अनवरत आनंदे वर्षतिये—आनंदाचा किंवा सुखाचा भोग होऊन 'मला आनंद झाला, मी सुखी झालों' असे भोकृत्व उत्पन्न झालें की, आनंदांत खंड पडतो; म्हणून "अनवरत आनंद" म्हणजे भोकृत्व उत्पन्न न होतां आनंदस्वरूप राहणें. अशा आनंदालाच ब्रह्मानंद म्हणतात. श्रीगुरु स्वत: ज्ञानभक्तीने अखंड आनंदांत किंवा अखंड भगवत्प्रेमांत निमग्न राहतात आणि तसेंच ते आपल्या शिष्यालाहि ज्ञानप्राप्ति करून देऊन अखंड आनंदस्वरूप करून सोडतात; म्हणून ते ब्रह्मानंदाचा वर्षाव करणारे आहेत.

विषयव्याळें मिठी। दिधलिया नुठी ताठी। ते तुझिये गुरुकृपादृष्टी। निर्विष होय॥ २॥

अर्थ—विषयरूपी भयंकर सर्पाने जीवाच्या ठिकाणी मिठी मारल्यामुळे जी त्याला आत्मविस्मृतिरूप मूर्च्छा आली आहे, ती कशानेहि नाहीशी होत नाही, पण हे श्रीगुरो! एक तुझ्या कृपादृष्टीनेच विषयरूपी सर्पाचें विष उतरून ती मूर्च्छा नाहीशी होते॥ २॥

गूढार्थदीपिका—परमार्थांत संसारनिवृत्तिरूप मोक्षप्राप्तिकरितां ज्ञानभक्तिनिष्ठ श्रीगुरुकृपेवांचून दुसरा उपाय नाही, असा भाव.

तरि कवणातें तापु पोळी। कैसेनि वो शोकु जाळी। जरि प्रसादरसकल्लोळीं। पूरें येसि तूं॥ ३॥

अर्थ—तुझ्या अंत:करणांत ज्याच्याविषयीं कृपाप्रेमाचा पूर येऊन त्याच्या लाटा उसळूं लागल्या असतां, संसारांतील त्रिविधतापाने कोण पोळला जाईल? व त्याला प्रियवस्तूचा वियोग व अप्रियवस्तूचा संयोग यांच्या विषयींचा शोक कसा जाळूं शकेल?॥ ३॥

गूढार्थदीपिका—श्रीगुरुच्या कृपेने प्रेमळ शिष्याचे ठिकाणी सर्वत्र एका परब्रह्माचाच आविष्कार आहे, अशी अद्वैतज्ञानदृष्टि उत्पन्न होते व सर्व दु:खाला कारण असणारी द्वैतबुद्धि नाहीशी होऊन सर्व दु:खांचा नि:शेष नाश होतो.

योगसुखाचे सोहळे। सेवकां तुझेनि स्नेहाळे। सोहंसिद्धीचे लळे। पाळिसी तूं॥ ४॥

अर्थ—हे प्रेमळ सद्गुरु आई! तूं आपल्या प्रेमळ अनन्य सेवकांना आपल्या प्रेमानेच योगसुखाचे सोहळे भोगवितेस आणि त्यांचे सोहंसिद्धीचे लळे-म्हणजे आळ-तूं पुरवितेस॥ ४॥

गूढार्थदीपिका—योगसुखाचे सोहळे। सेवकां तुझेनि स्नेहाळे—योग म्हणजे जीवब्रह्मैक्य. त्याच्या "सुखाचे सोहळे" म्हणजे ज्ञानाच्या जीवब्रह्मैक्यरूप सत्त्वापत्तिपासून पुढील पुढील भूमिकेंवरील ऐक्याच्या दृढतेमुळे उत्तरोत्तर प्राप्त होणाऱ्या अधिक सुखाचा लाभ.

श्रीगुरुची अत्यंत प्रेमाने सेवा करणारे जे असतात, त्यांना सेवक म्हणतात. अशा सेवकांवर श्रीगुरुहि अत्यंत स्नेहाळ असतात. त्या स्नेहामुळेच श्रीगुरुची कृपा होऊन शिष्याला परमेश्वर ऐक्याचा व त्यामुळे होणाऱ्या सुखाचा लाभ होतो, असे या ओवीच्या पहिल्या दोन चरणांत सांगितलें आहे.

सोहंसिद्धीचे लळे। पाळिसी तूं—"गुरुरित्याख्यया लोके विद्यासाक्षाद्धि शांकरी" शंकरापासून प्रगट झालेली जी ब्रह्मविद्या म्हणजे अहंब्रह्मास्मिवृत्तिज्ञान, तेंच विग्रहधारी होऊन या लोकामध्ये 'गुरु' या नांवाने प्रगट झालें आहे, असे माउलींनीच अमृतानुभवांत म्हटलें आहे. म्हणून श्रीगुरु प्रसन्न झाले असता ते शिष्याच्या हृदयांत

अहंब्रह्मास्मिवृत्तिरूपाने स्थिर होतात. हे ''सोहंसिद्धीचे लळे। पाळिसी तूं'' या चरणाने दाखविलें आहे.

आधारशक्तीचियां अंकीं। वाढविसी कौतुकीं। हृदयाकाशपालखीं। परियें देसी निजे॥ ५॥

अर्थ—आधारशक्तीच्या मांडीवर, कुंडलिनीशक्ति जागी करून, तिच्या साहाय्याने, सेवकाला कौतुकाने वर नेतेस आणि हृदयाकाशरूपी पाळण्यांत, त्याला आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाच्या ऐक्याचे झोके देतेस॥ ५॥

गूढार्थदीपिका—केवळ श्रीगुरुच्या कृपेनेच कुंडलिनीउत्थानादि संपूर्ण योग साधतो, असा अर्थ.

प्रत्यग्ज्योतीची वोवाळणी। करिसी मनपवनाचीं खेळणीं। आत्मसुखाचीं बाळलेणीं। लेवविसी॥ ६॥

अर्थ—तूं आपल्या सेवकाला प्रत्यग्ज्योतीची ओवाळणी करून मनपवनाची खेळणी करून देतेस व आत्मसुखाचीं बाळलेणीं लेववितेस॥ ६॥

गूढार्थदीपिका—प्रत्यग्ज्योतीची ओवाळणी—प्रत्यग्ज्योति-म्हणजे देहापासून बुद्धिपर्यंत जेवढीं स्थूलसूक्ष्म तत्वें आहेत, त्या सर्वांच्या अंतर्यामि राहणारें चैतन्य.

ज्याप्रमाणे आई आपल्या मुलाला प्रेमाने ओवाळते, त्याप्रमाणे श्रीगुरुहि आपल्या प्रेमळ सेवकाला हृदयाकाशाच्या ठिकाणी, स्वयंज्योति अशा प्रत्यक्आत्मचैतन्यरूप ज्योतीने ओवाळतात म्हणजे त्याला सर्व उपाधिरहित प्रत्यक्चैतन्यस्वरूप करून सोडतात.

करिसी मनपवनाची खेळणीं—या प्रत्यक्चैतन्याच्या प्राप्तिकरिता मनाचा व प्राणाचा निरोध व्हायला पाहिजे; पण ''चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम्'' (गी. अ. ६) ''अप्यब्धिपानान्महतः सुमेरून् मूलनादपि। अपि वन्ह्यशनात् साधो विषमश्चित्तनिग्रहः'' (पंचदशी-तृप्तिदीप-१२१) इत्यादि श्लोकांतून शास्त्रकारांनी समुद्र पिऊन टाकण्यापेक्षा, मेरुपर्वत उपटून टाकण्यापेक्षा किंवा अग्नि प्राशन करण्यापेक्षा, चित्ताचा निग्रह करणें कठीण आहे, असे सांगून ठेविलें आहे. तसेंच प्राणाचा निग्रह करणेंहि कठीण आहे. पण आईबापांकडून मुलांना, जशी श्रमावांचून सहज खेळणीं मिळतात, त्याप्रमाणे गुरुसेवकाला मनपवनाच्या निरोधाचा अभ्यास सहज साधतो. असा भाव.

आत्मसुखाचीं बाळलेणीं। लेवविसी—बाळलेणीं म्हणजे बालपणी घातले जाणारे अलंकार. आई जसें आपल्या मुलाला लहानपणी सोन्याचे अलंकार घालते, त्याप्रमाणें श्रीगुरुआई आपल्या सेवकाला त्याच्या बालपणांत आत्मसुखाचे अलंकार घालते. हें बालपण असें आहे—

''तस्माद्ब्राह्मणः पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत्'' (बृ. उ. ३-५-१) 'ज्ञान्यांनी पूर्ण ब्रह्मज्ञान झाल्यावर बालाप्रमाणे वागावें', असें श्रुतीत विधान केलें आहे. वाटेल तें खाणें व मलमूत्रांत लोळणें, असें तें बालपण नसून, विकल्प न उठणें. मन, इंद्रियें, अहंकार इत्यादि वृत्तीवर आरूढ न होणें, हे जे बालकाचे ठिकाणी धर्म असतात, ते धर्म ज्ञान्यांनी आपल्या आंगी बाणवून घ्यावें, असा 'बाल्य' या शब्दाचा अर्थ आचार्यांनी ''अनाविष्कुर्वन्नन्वयात्'' (ब्र. सू. ३-४-५०) या सूत्रांतील भाष्यांत केला आहे.

अर्थात् गुरुसेवकाचें बालपण म्हणजे ज्ञानाहंकाररहित असणें होय. या ज्ञानाहंकाररहिततेमुळेच सेवकाचें आंगी दंभदर्पादिरहित असणें, मनइंद्रियादिक देहाच्या सुखाकरितां विषयाकडे न धांवतां शांत असणें, हर्ष-दुःख, मान-अपमान, इत्यादि द्वंद्वाचे ठिकाणी चित्ताची समता असणें हे सर्व गुण सहज बाणतात व आत्मसुखाची प्राप्ति होते. हे सर्व श्रीगुरुच्या कृपेनेच साधले जाते, हें 'लेवविसी' या शब्दाने माउलीनी सुचविलें आहे.

सतरावियेचें स्तन्य देसी। अनाहताचा हल्रुरु गासी। समाधिबोधें निजविसी। बुझाउनि॥ ७॥

अर्थ—(तसेंच) त्याला सतराव्या अमृत कलेचें स्तन्य पाजून अनाहताचें गाणें गातेस आणि ऐक्यज्ञानाच्या उपदेशाने त्याचें समाधान करून त्याला समाधि साधून देतेस व निजवितेस॥ ७॥

गूढार्थदीपिका—सतरावियेचें स्तन्य देसी—सतरावी-म्हणजे योगशास्त्रांतील अमृतकलां. तिचें स्तन्य म्हणजे दुग्ध. चंद्राच्या सोळा कला सांगितल्या आहेत. कृष्णपक्षांत एक एक कला क्षीण होऊन अमावस्येला तो चंद्र दिसेनासा होतो व शुक्लपक्षांत एक एक कला वाढत जाऊन पौर्णिमेला सोळा कलांनी तो पूर्ण होतो, असे आपणाला

दिसते. पण हे सर्व पृथ्वीच्या उपाधीमुळे आहे. वास्तविक चंद्र हा अखंड सोळा कलांनी पूर्णच असतो. ही त्याची अखंड पूर्णता सतरावी कला म्हटली जाते.

त्याप्रमाणेच देहउपाधीने जीवाचे ठिकाणी भासणारे जन्ममृत्यु नाहीसे होऊन, तो जीव ज्या स्थितीत आपलें मूळचें अविनाशित्वाचें सुख अनुभवितो, त्या स्थितीला सतरावी कला म्हणतात व त्या सुखभोगाला अमृतपान म्हणतात.

अनाहताचा हल्लर गासी—अनाहतनादाचें निरूपण मागें सहाव्या अध्यायांत आम्ही केलेंच आहे.

समाधिबोधें निजविसी—समाधिबोधें-म्हणजे जीवब्रह्मैक्यज्ञान करून देऊन.

निजविसी—म्हणजे संसारसुख भासूं देत नाहींस.

बुझाउनी—म्हणजे आत्मव्यतिरिक्त सर्व मिथ्या आहे-म्हणजे मुळीच नाही-या ज्ञानाने त्याचें समाधान करून.

ज्याप्रमाणे लहान मुलाचा अपल्या आईच्या वचनावर विकल्परहित विश्वास असतो, त्याप्रमाणे सद्‌गुरुवचनावर अत्यंत विश्वास असणाऱ्या शिष्याला वरील सर्व योगसुखाचा अनायासें लाभ होतो. आपल्या बुद्धीने स्वतंत्रपणें विचार करून झालेल्या ज्ञानाचा लाभ, बुद्धीतच विकल्पहि उठत असल्यामुळे लवकर दृढ होत नाही; पण श्रद्धेच्या योगाने झालेला लाभ मात्र तात्काळ दृढ व विकल्परहित होतो.

"**एक श्रीगुरु नसतां शिरावरी। निद्राचि लागें समाधि अवसरी।**" (श्रीगुलाबराव महाराजकृत यष्टि-१४. पा. १४७)

श्रीगुरुकृपेवांचून ब्रह्मज्ञान होंत नाही व समाधिहि साधत नाही, असा भाव.

म्हणोनि साधकां तूं माउली। पिके सारस्वत तुझियां पाउलीं। याकारणें मी साउली। न संडीं तुझी॥ ८॥

अर्थ—म्हणून, हे सद्‌गुरु आई! तूं साधकाची सतत कृपादृष्टीने सांभाळ करणारी आई आहेस, तुझे चरण ज्या साधकाच्या हृदयांत राहतील, त्याला सर्व प्रकारच्या विद्या प्राप्त होतात. यास्तव मी तुझ्या कृपेची सावली सोडत नाही॥ ८॥

गूढार्थदीपिका—पिके सारस्वत तुझिया पाउली—ज्ञानभक्तीची पूर्ण प्राप्ति झालेल्या श्रीगुरुच्या कृपेने देखील साधक निष्णात साहित्यिक होतो, हें श्रीज्ञानेश्वरमाऊलीचे विधान, अतिशयोक्तीचे नसून, यथार्थ आहे. कारण, भगवान जसा सत्यसंकल्प आहे, तसें त्याचे प्रेमळभक्तहि सत्यसंकल्पच असतात. पांच वर्षाचा ध्रुवबाळ, पण भगवंतांनी आपल्या शंखाचा, त्याच्या गालाला स्पर्श केल्याबरोबर, तो भगवंताची स्तुति करूं लागला. तुकाराम महाराजांनी एकाला बारा अभंगाच्या पठणाने महापंडित करून सोडलें. स्वत: श्रीज्ञानेश्वर महाराजांनी रेड्यामुखी वेद बोलविलें. ही उदाहरणें सर्वश्रुतच आहेत.

समर्थ श्रीगुरु, ज्याच्या विषयी 'हा निष्णात साहित्यिक होवो' असा संकल्प करतील तो, तात्काळ तसा होऊं शकतो.

अहो सद्‌गुरूचिये कृपादृष्टी। तुझें कारुण्य जयातें अधिष्ठी। तो सकळ विद्यांचिये सृष्टी। धात्रा होय॥ ९॥

अर्थ—हे सद्‌गुरुचे कृपादृष्टि! तुझ्या करुणेला जो आश्रय होईल, तो सृष्टि निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाप्रमाणे नाना विद्यांची सृष्टि निर्माण करणारा ब्रह्मदेव होतो॥ ९॥

गूढार्थदीपिका—पण हा प्रसाद प्राप्त करून घेण्याकरितां, अत्यंत श्रद्धेने श्रीगुरुच्या सर्वस्वी स्वाधीन होऊन जाणें, असा शिष्याचा प्रयत्न मात्र असायला पाहिजे.

म्हणोनि अंबे श्रीमंते। निजजनकल्पलते आज्ञापीं मातें। ग्रंथनिरूपणीं॥ १०॥

अर्थ—म्हणून हे माते! परमेश्वराप्रमाणे तू षड्‌गुणैश्वर्यसंपन्न असल्यामुळे श्रीमंत आहेस आणि म्हणूनच आपल्या भक्तजनांची कामना पूर्ण करणारा कल्पतरु आहेस. (आतां) मला ग्रंथ निरूपण करण्याला आज्ञा कर॥ १०॥

नवरसीं भरवीं सागरु। करवीं उचित रत्नांचे आगरु। भावार्थाचे गिरिवरु। निफजवीं माये॥ ११॥

साहित्यसोनियाचिया खाणी। उघडवीं देशियेचिया क्षोणी। विवेकवल्लीची लावणी। हो देईं सैंघ॥ १२॥

संवादफळनिधानें। प्रमेयांचीं उद्यानें। लावीं म्हणे गहनें। निरंतर॥ १३॥
पाखांडाचे दरकुटे। मोडीं वाग्वादअव्हांटे। कुतर्कांचीं दुष्टें। सावजें फेडीं॥ १४॥

अर्थ—माझें हें निरूपण नवरस सागरांनी भरून जाऊ दे-म्हणजे माझ्या निरूपणांत नवहि रस अमर्याद भरलेले असूं दे. वेदान्तमान्य अशा सिद्धान्तरूप रत्नांचे तें भांडारगृह कर व त्यांतून गूढार्थाचे मोठमोठे पर्वत निर्माण कर॥११॥ या माझ्या मराठी भाषेच्या भूमींत साहित्य-म्हणजे उपमा, अलंकार इत्यादि-सोन्याच्या खाणी जागोजागीं निघूं दे आणि सर्वत्र आत्मानात्मविवेकरूपी वेलींची लागवण होऊं दे॥ १२॥ (संवाद म्हणजे विरोधि वाक्यांची एकवाक्यता) या संवादरूपी फळाला आश्रयस्थान होणाऱ्या सिद्धान्ताच्या मोठमोठ्या बागा सर्वकाळ लाव-म्हणजे पूर्वोत्तर निरूपणांत परस्पर विरोध राहील व सिद्धान्ताला बाध येईल असें निरूपण होऊं देऊं नकोस॥ १३॥ पाखांड-म्हणजे श्रुतिस्मृतिपुराणे यांना सोडून असणारे विचार, ह्याच कोणी दऱ्या आणि वितंडवादाच्या आडवाटा यांचा विध्वंस कर. कुतर्क-म्हणजे प्रमाणावर उभारले नसलेले तर्क--हेच कोणी हिंसक प्राणी, यांचा नायनाट कर-म्हणजे नास्तिक विचारांचा, वितंडवादाचा व कुतर्कांचा सहज नाश होईल असे माझें निरूपण होऊं दे!॥ १४॥

गूढार्थदीपिका—वरील ११ ते १४ ओव्यांतून श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी अध्यात्मग्रंथ कसा असावा याविषयीं आपलें थोडक्यांत मत दिलें आहे, तें असें—

(१) ग्रंथ शक्य तो साहित्यसंपन्न असून त्यांतून वाचकांच्या मनावर श्रद्धा, प्रेम, यथार्थबोध व आत्मानात्मविवेक यांचा वारंवार ठसा उमटत जावा.

(२) त्यांत पूर्वापार विधानांचा विरोध न दाखवितां, त्यांची एकवाक्यता केलेली असावी.

(३) त्यांत ठिकठिकाणी सिद्धान्त सांगितलेले असावेत.

(४) वेदबाह्यमते, शुष्कवाद, कुतर्क या सर्वांचें त्यांत खंडन असून भगवंताच्या गुणानुवादाने तो भरलेला असावा.

अशाच ग्रंथाच्या श्रवणाने श्रोता ब्रह्मसुखाचा भागी होतो. श्रीसमर्थानीहि "जेणे परमार्थ वाढे। आंगीं अनुताप चढे। भक्तिसाधन आवडे। त्या नांव ग्रंथ॥ ३०॥ जेणें परत्रसाधन। जेणे ग्रंथे होय ज्ञान। जेणें होईजे पावन। या नांव ग्रंथ॥ ३३॥" (दासबोध द. ७-९) या ओव्यांतून हाच भाव प्रगट केला आहे.

श्रीकृष्णगुणीं मातें। सर्वत्र करीं वो सरतें। राणिवे बैसवीं श्रोते। श्रवणाचिये॥ १५॥

अर्थ—सर्वत्र श्रीकृष्णाचे गुणवर्णन करण्यांत मला उल्हास वाटेल, असे कर आणि श्रोतेजनांना एकाग्र श्रवणांच्या राज्यावर बसव-म्हणजे श्रोत्यांकडून अत्यंत एकाग्रतेने श्रवण होऊं दे॥ १५॥

गूढार्थदीपिका—"इतर जे प्रापंचिक। हास्यविनोद नवरसिक। हित नव्हे तें पुस्तक। परमार्थासी" (दासबोध द. ७-९) ज्या ग्रंथांत भगवद्गुणानुवाद नाहीत असा साहित्यसंपन्न ग्रंथ असला, तरी तो व्यर्थ आहे, असे समर्थांनी म्हटलें असून भागवतांत "मृषा गिरस्ता ह्यसतीरसत्कथा न कथ्यते यद्भगवानधोक्षजः" (भाग. स्कं. १२-१२-४८) या श्लोकाने हेंच सांगितले आहे. श्रीतुकाराममहाराजहि "गोविंदावांचूनि वदे ज्याची वाणी। हागवण घाणी पिटपिट ते" (तु. गा. २७८४) या अभंगात असेंच म्हणतात.

ये म्हाठियेचियां नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं। घेणें देणें सुखचिवरी। हों देईं या जगा॥ १६॥

अर्थ—या मराठी भाषेच्या नगरांत ब्रह्मविद्येचा सुकाळ कर आणि या जगांतील सर्व लोकांचा घेण्यादेण्याचा व्यवहार ब्रह्मसुखाचाच होऊं दे॥ १६॥

गूढार्थदीपिका—ये म्हाठियेचिया नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकाळु करी—श्रीमुकुंदराज महाराज व श्रीज्ञानेश्वर महाराज यांचा अवतार होण्यापूर्वी ब्रह्मविद्या संस्कृत ग्रंथातूनच होती. पुढे या संतमंडळींनी ब्रह्मविद्येचा मराठी भाषेंत सुकाळ करून मराठी भाषिकांवर अनंत उपकार केले आहेत. कोणत्याहि भाषेंतून ब्रह्मविद्या ग्रहण केली तरी ती समफलच देते.

घेणें देणें सुखचिवरी। हो देईं या जगा—अद्वैतब्रह्मज्ञान दृढ होऊन सगुण भगवंताच्या प्रेमभक्तींत रंगलेल्या पुरुषांची अद्वैतब्रह्मदृष्टि क्षणभर देखील भंग पावत नसल्यामुळे, त्यांचा व्यवहार म्हणजे ब्रह्माचा ब्रह्माशीं ब्रह्मरूपच व्यवहार होत असतो. अमृतानुभवांतहि श्रींमाऊलींनी "शिव शिव समर्था स्वामी, एवढिये आनंदभूमी। घेपे दीजे एके आम्ही। ऐसें केलें" (अ. प्र. ९) या ओवींत हाच सिद्धान्त मांडला आहे आणि आचार्यादिकांचेहि हेच म्हणणें आहे, सर्व जगाला अशी जीवन्मुक्तस्थिति प्राप्त व्हावीं असें माऊलींनी श्रीगुरुनाथांना आशीर्वचन मागितलें आहे.

तूं आपुलेनि स्नेहपल्लवें। मातें पांघुरविशील सदैवें। तरि आतांचि हें आघवें। निर्मीन माये॥ १७॥

इये विनवणीयेसाठी। अवलोकिलें गुरुकृपादृष्टी। म्हणे गीतार्थेंसीं उठीं। न बोलें बहु॥ १८॥

अर्थ—हे सद्‌गुरु जननी! महद्भाग्यवान पुरुषांनाच प्राप्त होणाऱ्या आपल्या कृपादृष्टिरूप प्रेमपदरानें मला झांकशील, तर वर वर्णन केलेल्या गुणांनी युक्त असें संपूर्ण निरूपण आतांच निर्माण करीन॥ १७॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी, अशी सद्‌गुरु निवृत्तिनाथांची प्रार्थना केल्याबरोबर, श्रीनिवृत्तिनाथांनी त्यांच्याकडे कृपादृष्टीने पाहिलें व गीतार्थ सांगण्यास सुरुवात कर, फार बोलू नको, असे ते म्हणाले॥ १८॥

गूढार्थदीपिका—अवलोकिलें गुरुकृपादृष्टि—जीवदशा ही सर्व अहंकारयुक्त असते आणि सद्‌गुरुरूप ज्ञानीभक्त, सर्व अहंकाररहित परमेश्वरस्वरूप होऊन राहतात. ही त्यांची अत्यंत आवडती स्थिति असते. शिष्यहि, श्रीगुरुच्या निःसीम प्रेमाने अत्यंत विनीत होऊन, सर्व अहंकाररहित झाला, की श्रीगुरुची तीं आवडती स्थिति, त्याच्याठिकाणी प्रादुर्भूत होते. हेंच श्रीगुरुचें कृपादृष्टीने अवलोकन करणें होय.

तेथ जी जी महाप्रसादु। म्हणोनि साविया जाहला आनंदु। आतां निरोपीन प्रबंधु। अवधान दीजे॥ १९॥

अर्थ—श्रीनिवृत्तिनाथांचे वचन ऐकून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, "अहोजी महाराज! हे आपलें म्हणणें म्हणजे महान् प्रसादच आहे" असे म्हणून ते (श्रीज्ञानेश्वर महाराज) फार आनंदित झाले आणि "आतां ग्रंथाचें निरूपण करितो, लक्ष द्यावे" अशी त्यांनी प्रार्थना केली॥ १९॥

अर्जुन उवाच

एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते। ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः॥ १॥

अर्थ—अर्जुन म्हणाला—मागें सांगितल्याप्रमाणे, तुझ्या एकदेशीय सगुणस्वरूपाप्रीत्यर्थ नामस्मरणध्यानादि योगाने तुझ्या सगुणस्वरूपाशी एकरूप होऊन जे भक्त तुझी उपासना करतात आणि जे तुझ्या अविनाशी अशा विश्वरूपाची उपासना करतात, त्या दोघांमध्ये तुझ्याशी अत्यंत समरस ऐक्य कोण पावतात?॥ १॥

गूढार्थदीपिका-योगवित्तमाः—येथील "योगवित्तमाः" या शब्दयोजनेचा असा भाव आहे—

परब्रह्म सच्चिदानंदरूप असून, तें निरवयव, अस्फुट व अविकारी-म्हणजे न बदलणारे-आहे, त्याला आपल्या स्वरूपाची जाणीवहि नाही, असें तें अद्वैत आहे. जीवाचे हेंच मूळचें स्वरूप आहे. पण अविद्याभ्रांतीने, तो आपल्याला ब्रह्माहून निराळा आणि अपूर्ण असे समजतो. आत्मज्ञानाने ही भ्रांति नाहीशी होऊन, मी ब्रह्मस्वरूप आहे" अशी ब्रह्मैक्याची जाणीव उत्पन्न होते. ही जाणीव ज्याला उत्पन्न झाली, त्याला "योगवित्" म्हणतात. आणि ही ऐक्याची जाणीवहि नाहीशी होऊन मूळची जाणीवरहित ऐक्यस्थिति ज्याला प्राप्त होते, त्याला "योगवित्तम" म्हणतात.

तरि सकळवीराधिराजु। जो सोमवंशीं विजयध्वजु। तो बोलता जाहला आत्मजु। पांडुनृपाचा॥ २०॥

कृष्णातें म्हणे अवधारिलें। आपण विश्वरूप मज दाविलें। तंव नवल म्हणोनि बिहालें। चित्त माझें॥ २१॥

अर्थ—नंतर संपूर्ण पराक्रमी वीरांमध्ये श्रेष्ठ व जो सोमवंशांतील विजयरूपी ध्वजच होय, असा तो पांडुराजाचा पुत्र अर्जुन भगवंताला म्हणाला॥ २०॥ भगवन श्रीकृष्णाला अर्जुन म्हणतो, ऐकले का देवा! आपण मला जें विश्वरूप दाखविलें, तें पूर्वी कधी न पाहिलेलें असें अद्भुतच होतें; म्हणून तें पाहिल्याबरोबर माझ्या चित्ताला भीति वाटली॥ २१॥

गूढार्थदीपिका—विश्वरूप हे प्रेमाचें आलंबन होऊं शकत नाही, हें अर्जुनाने या उद्‌गारावरून स्पष्ट केलें आहे.

आणि यें कृष्णमूर्तीची सवें। यालागीं सोय धरिली जीवें। तंव नको म्हणोनि देवें। वारिलें मातें॥ २२॥
तरि व्यक्त आणि अव्यक्त। हें तूंचि एक निभ्रांत। भक्तीं पाविजे व्यक्त। अव्यक्त योगें॥ २३॥

अर्थ—आणि या तुमच्या श्रीकृष्णमूर्तीच्या सहवासाचा सतत अभ्यास व गोडी असल्यामुळे ती पाहण्याचाच मला ध्यास लागला; पण तसें करणें चांगलें नव्हे, म्हणून आपण मला परावृत्त केले॥ २२॥ पण तुझें व्यक्त-म्हणजे एकदेशीय श्रीकृष्णस्वरूप-व अव्यक्त विश्वरूप हे दोन्ही नि:संशय तूच एक आहेस. भक्तीने तुझें व्यक्तस्वरूप प्राप्त होतें व योगाने तुझें अव्यक्त विश्वरूप प्राप्त होतें॥ २३॥

गूढार्थदीपिका—तरि व्यक्त आणि अव्यक्त—मागें अकराव्या अध्यायांत भगवंतांनी अर्जुनाला विश्वरूप दाखविल्यावर भगवंताच्या एकदेशीय श्रीकृष्णस्वरूपाच्या सुखानुभवांत व विश्वरूपाच्या सुखानुभवांत जो फरक आढळून आला, त्याची शहानिशा करण्याकरितांच बाराव्या अध्यायांत अर्जुनाने शंका विचारली असल्यामुळे, येथे "व्यक्त" या शब्दाने भगवंताच्या एकदेशीय श्रीकृष्णस्वरूपाचा व "अव्यक्त" या शब्दाने व्यापक विश्वस्वरूपाचाच उल्लेख केला आहे, हें उघड आहे.

हें तूंचि एक निभ्रांत—अव्यक्त विश्वरूप व व्यक्त श्रीकृष्णस्वरूप हीं दोन्ही एका अस्फुट, अद्वैत अशा पूर्ण सच्चिदानंद परब्रह्माचींच रूपें आहेत. या दोहोत सच्चिदानंद भगवंतावाचून दुसरें कांहीच राहू शकत नाही; म्हणून व्यक्त आणि अव्यक्त दोन्ही भगवंतच आहे, असा भाव.

भक्तीं पाविजे व्यक्त—भगवंताचें सगुण, साकार, श्रीकृष्णस्वरूप परब्रह्माच्या ब्रह्मानंदाची मूर्ति किंवा परमप्रेमाची मूर्ति असल्यामुळे ती भक्तिरूप परमप्रेमानेच प्राप्त होते.

अव्यक्त योगें—आणि अव्यक्त विश्वरूप चैतन्याचा नामरूपात्मकविलास असल्यामुळेच त्याची प्राप्ति ज्ञानयोगाने होते.

या दोनी जी वाटा। तूंतें पाववया वैकुंठा। व्यक्ताव्यक्त दारवंठा। रिगिजे येथ॥ २४॥

अर्थ—हे वैकुंठनाथा! तुझ्याशीं ऐक्य पावण्याकरितां भक्तियोग व ज्ञानयोग असे दोन मार्ग असून तुझें एकदेशीय सगुण-साकारस्वरूप व अव्यक्त विश्वरूप हे अनुक्रमें, त्या मार्गाचे दोन दारवंठे आहेत. त्या दारवंठ्यांनी तुझ्या ठिकाणी येतां येते॥ २४॥

गूढार्थदीपिका—तूतें-एकदेशीय भगवान श्रीकृष्ण व पूर्ण परब्रह्मस्थिति हे दोन्ही अत्यंत अभिन्न आहेत, हे "तूतें" या शब्दाने दाखविलें आहे.

पाववया—म्हणजे तद्रूप होण्याकरितां.

व्यक्ताव्यक्त दारवंठा—भगवंताच्या ज्या पूर्ण ब्रह्मस्थितीशी ऐक्य पाववयाचे, त्या पूर्ण ब्रह्मस्थितीचे, ही दोन्ही रूपें दारवंठे आहेत, असें येथे म्हटले आहे; पण त्याचा अर्थ, पूर्ण ब्रह्मस्थिति व व्यक्त-अव्यक्तरूपें हीं दोन्हीं निराळीं आहेत, असा नसून, ज्याप्रमाणे दारवंठा हा घराचाच भाग असतो; म्हणून त्यांत शिरणे म्हणजे घरांतच शिरणें होतें किंवा समुद्रावर उठणारी लाट समुद्राचाच भाग असतो, म्हणून त्यांत शिरलेला मनुष्य समुद्रांतच शिरतो, त्याप्रमाणे अव्यक्त किंवा व्यक्त हीं दोन्ही स्वरूपें पूर्णब्रह्म अशीं विवर्तरूपेंच असल्यामुळे त्यांच्यांत शिरणें म्हणजे पूर्ण ब्रह्मस्थितीशी ऐक्य पावणेंच होय; असा त्याचा अर्थ आहे.

पैं जे वानी श्यातुका। तेचि वेगळिया वाला येका। म्हणोनि एकदेशीया व्यापका। सरिसा पाड॥ २५॥
अमृताचिया सागरीं। जे लाभे सामर्थ्याची थोरी। तेचि दे अमृतलहरी। चुळीं घेतलिया॥ २६॥

अर्थ—पण एका शंभर नंबरी सोन्याच्या लगडीला जो कस असतो; तोच कस त्याच्यांतून तोडलेल्या वालभर सोन्याचा असतो; म्हणून तुझें एकदेशीय, डोळ्यांनी दिसणारें व्यक्तस्वरूप आणि तुझें व्यापक विश्वरूप यांची सारखीच योग्यता आहे॥ २५॥ अमृताच्या समुद्रांत अमर करण्याचें जें थोर सामर्थ्य असतें, तेंच त्याच्या एका लहरींतून निघालेल्या चूळभर अमृतांतहि असतें॥ २६॥

हे कीर माझां चित्तीं। प्रतीति आथि जी निरुती। परि पुसणें योगपती। तें याचिलागीं॥ २७॥
जें देवा तुम्हीं नावेक। अंगिकारिलें व्यापक। तें साचचि कीं कवतिक। हें जाणावया॥ २८॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, भगवंता! त्याप्रमाणेच तुझीं व्यक्त व अव्यक्त हीं दोन्हीं स्वरूपें पूर्ण ब्रह्मस्वरूप आहेत, असाच माझ्या चित्ताचा निश्चित् अनुभव आहे; पण योगपति देवा! तुम्ही जें थोडा वेळ व्यापकरूप धारण केलें, तेंच तुमचें खरें स्वरूप होय, की क्षणभर त्या स्वरूपाचें लीला-कौतुक मला दाखविलें, हें जाणून घेण्याकरितां मी पुढील प्रश्न विचारीत आहे॥ २७-२८॥

तरि तुजलागीं कर्म। तूंचि जयांचें परम। भक्तीसि मनोधर्म। विकोनि घातला॥ २९॥
इत्यादि सर्वोपरी। जे भक्त तूंतें श्रीहरी। बांधोनियां जिव्हारीं। उपासिती॥ ३०॥
आणि जें प्रणवापैलीकडे। वैखरीयेसि जें कानडें। कायिसयाहि सांगडें। नव्हेंचि जें वस्तु॥ ३१॥
तें अक्षर जी अव्यक्त। निर्देश देशरहित। सोहंभावें उपासित। ज्ञानिये जे॥ ३२॥

अर्थ—ज्यांचीं सर्व कर्मे तुझ्याकरितां होतात, जे तुलाच आपली परमगति समजतात, ज्यांचे सर्व मनोविकार देखील तुझ्या एका प्रेमाकरितांच उठतात॥ २९॥ हे भगवंता! याप्रमाणे तुझ्याठिकाणीं सर्वभाव समर्पण करून व तुला अंत:करणांत सांठवून, जे भक्त तुझ्या एकदेशीय साकारस्वरूपाची उपासना करतात॥ ३०॥ आणि जे ज्ञानीपुरुष प्रणवाच्या पलीकडे असलेल्या, शब्दाचा विषय न होणाऱ्या, किंवा जे कशासारखे आहे असे दाखवितां न येणाऱ्या, अविनाशी, इंद्रियातीत, संपूर्ण दोषरहित—म्हणजे शुद्ध-व देशांनी मर्यादित नसलेल्या, तुझ्या व्यापक स्वरूपाची सोहंभावाने म्हणजे "मी तें ब्रह्म आहे" अशा ध्यानाने उपासना करतात॥ ३१-३२॥

गूढार्थदीपिका—सगुणस्वरूपाची भक्ति करणाऱ्या भक्तांची, परम प्रेमामुळे जाणीवरहित भगवदाकारता असते आणि ज्ञान्याचे, अव्यक्तस्वरूपाशीं "मी तें स्वरूप आहे" अशा जाणीवेने ऐक्य केलें जातें; हा जो भक्ताच्या व ज्ञान्याच्या भगवदैक्यस्थितींत फरक असतो, तो येथे ३० ते ३२ पर्यंतच्या ओव्यांतून माऊलींनी दाखविला आहे.

तयां आणि जी भक्तां। येरयेरांमाजीं अनंता। कवणें योगु तत्त्वता। जाणितला सांगा॥ ३३॥
इया किरीटीचिया बोला। तो जगद्‍बंधु संतोषला। म्हणे हो प्रश्नु भला। जाणसी करूं॥ ३४॥

अर्थ—असे हे ज्ञानी आणि भक्त या दोहोंमध्यें, हे अनंता! खरें ऐक्याचें स्वरूप कोण जाणतो, हे मला सांग॥ ३३॥ असे अर्जुनाचें भाषण ऐकून तो जगद्‍बंधु परमात्मा श्रीकृष्ण अत्यंत संतुष्ट झाला व म्हणाला अर्जुना! उत्तम प्रश्न कसा करावा हें तूंच जाणतोस॥ ३४॥

श्रीभगवानुवाच

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते। श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः॥ २॥

अर्थ—माझ्या एकदेशी सगुण श्रीकृष्ण स्वरूपाचे ठिकाणीच मन लावून व सर्व कर्मे मत्प्रीत्यर्थ करून, जे माझी परम प्रेमाने उपासना करतात, त्यांचेच ठिकाणी माझें मूळचें जाणीवरहित ऐक्य झालेलें असतें असे मी समजतों॥ २॥

अवतरणिका—भगवंतांनी व श्रीज्ञानेश्वर माउलींनी "श्रद्धा" हा शब्द "प्रेम" या अर्थी वापरला आहे.

तरि अस्तुगिरीचियां उपकंठीं। रिगालिया रविबिंबापाठीं। रश्मी जैसे किरीटी। संचरती॥ ३५॥

अर्थ—सूर्यबिंब अस्ताचलाच्या आड झाले असतां, सूर्यबिंबाच्यामागून ज्याप्रमाणे अर्जुना! त्याचीं किरणेंहि जातात॥ ३५॥

का वर्षाकाळीं सरिता। जैसी चढों लागें पांडुसुता। तैसी नीच नवी भजतां। श्रद्धा दिसे॥ ३६॥

अर्थ—किंवा अर्जुना! पावसाळ्यांत जसा नदीला पूर येतो, त्याप्रमाणे माझें भजन करीत असतांना ज्याचे ठिकाणी नित्य नवी श्रद्धा किंवा वाढतें प्रेम दिसून येतें॥ ३६॥

गूढार्थदीपिका—नीच नवी.......श्रद्धा दिसे—प्रथम क्षणीं जशी उत्कंठा असते, तशीच ती उत्कंठा पुढे देखील

प्रतिक्षणीं कायम राहणें याला "नीच नवी श्रद्धा" म्हणतात.

केलें पाहिजे म्हणून जें केलें जात नाही व जें कितीहि केलें तरी पुरें झालें असें वाटत नाही, किंबहुना जाणून अथवा न जाणून जें करावेसें वाटते, अशा स्वाभाविक प्रेमाला परम प्रेम म्हणतात.

"**भक्त म्हणवितां गोड वाटे। परि मजलागीं जैं कां हृदय फुटे। अकृत्रिम भक्ति जैं उमटे। तैं मी भेटे उद्धवा**"॥ १३२६॥ (ए. भा. अ. ११) यालाच अकृत्रिम भक्ति म्हणतात. या परमभक्तींत क्षणभर देखील भगवंताचा वियोग सहन होत नाही. एवढेच नाही तर भगवंताच्या वियोगाच्या कल्पनेने देखील भक्तांचें हृदय फुटते, असे नाथांनी म्हटले आहे.

वर्षाकालांत जसा नदीला पूर येतो, त्याप्रमाणेच प्रेम वाढतां वाढतां-क्रमाने भक्तांना परमप्रेमाची दशा प्राप्त होते.

परि ठाकिलियाहि सागरु। जैसा मागीलही यावा अनिवारु। तिये गंगेचिये ऐसा पडिभरु। प्रेमभावा॥ ३७॥

अर्थ—ज्याप्रमाणे गंगा समुद्रास मिळाल्यानंतरहि तिच्या मागच्या प्रवाहाचे वेग सारखे वाहतच असतात, त्याप्रमाणे ज्याच्या प्रेमभावाचा भगवंताकडे अखंड सारखा वेग असतो॥ ३७॥

गूढार्थदीपिका—भक्तींने सगुण भगवंताशी ऐक्य पावलेल्या भक्तांचा प्रेमप्रवाह बंद न पडतां, पूर्वीप्रमाणेच सारखा चालू राहतो. अशा या प्रेमभक्तीने भक्ताची जाणीवरहित, निर्विकल्प व अनिर्वाच्य स्थिति होते. हीच त्याची मूळची स्थिति होय, हें मागें आम्हीं सांगितलेंच आहे.

तैसें सर्वेंद्रियांसहित। मजमाजी सूनि चित्त। जे रात्री दिवस न म्हणत। उपासिती॥ ३८॥

अर्थ—त्याप्रमाणे सर्व इंद्रियांसह माझ्या ठिकाणी चित्त ठेऊन-म्हणजे एका मलाच आपल्या सर्व इंद्रियांसह मनाचा विषय करून-जे अहोरात्र न पाहतां माझी उपासना करतात॥ ३८॥

गूढार्थदीपिका—या ओवींतून भक्ताच्या एकनिष्ठतेचें वर्णन केलें आहे. ज्याप्रमाणे अज्ञानी लोकांच्या अहोरात्रींच्या यच्चयावत् सर्व व्यवहारांचा देहसुख पाहणें, हाच एक उद्देश असतो, त्याप्रमाणे भक्तांचीं सर्व इंद्रियें, मन यांचा विषय एक परमात्माच असून त्याच्या सुखाच्या उद्देशानेच भक्तांचे यच्चयावत् व्यापार होतात, असा अर्थ. "**विषय तो त्यांचा झाला नारायण। नावडे धन जन माता पिता**" (तु. गा. अ. १९९७)

इयापरी जे भक्त। आपणपें मज देत। तेचि मी योगयुक्त। परम मानीं॥ ३९॥

अर्थ—याप्रमाणे ज्या भक्तांनी आपल्याला माझ्या ठिकाणी संपूर्ण समर्पण केलें, तेच माझ्याशीं अत्यंत ऐक्य पावले, असे मी समजतो.॥ ३९॥

गूढार्थदीपिका—आपणपें मज देत—जीवाला ही अशी जाणीवरहित परम प्रेमरूप निर्विकल्पस्थिति प्राप्त झाली, की तो ऐक्याच्या जाणीवेवांचून सर्वस्वीं भगवंतांत मिळून जात असल्यामुळे युक्ततम किंवा परमयुक्त म्हटला जातो.

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते। सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम्॥ ३॥
सन्नियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः। ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः॥ ४॥

अर्थ—दुसरें, आपल्यापासून प्राणिमात्राला सुख व्हावें अशा बुद्धीने वागून किंवा सर्व भूतमात्रांचे समानसुखरूप असें जें परब्रह्म, त्याचेच ठिकाणी रममाण होऊन, सर्व इंद्रियांचा निरोध करून व सर्वत्र समबुद्धि धारण करून, जे पुरुष, अविनाशी, शब्दाने सांगतां न येण्याजोगे, इंद्रियातीत, सर्वत्र व्यापक, मनानेहि ज्याचें चिंतन करतां येत नाही, सदासर्वदा एकसारखे राहणाऱ्या अशा अविकारी, स्थिर व नित्य परब्रह्माची उपासना करतात, तेही मलाच प्राप्त होतात॥ ३-४॥

अवतरणिका—निर्गुणस्वरूपाची प्राप्ती करून घेणाऱ्याला "अहं ब्रह्मास्मि" या वृत्तीच्या द्वाराच ऐक्याचें चिंतन किंवा ध्यान कां करावें लागतें व त्यांच्या चित्ताची निर्गुणस्वरूपाशीं तद्रूपता का होऊं शकत नाही, हें आतां माऊली पुढें सांगत आहेत.

आणि येर तेही पांडवा। जे आरूढोनि सोहंभावा। झोंबती निरवयवा। अक्षरासी॥ ४०॥

अर्थ—अर्जुना! आणि दुसरें जे "ब्रह्म मी आहे" अशा वृत्तीचा अभिमान धरून निरवयव व अविनाशी अशा ब्रह्मस्वरूपाला कवटाळतात॥ ४०॥

गूढार्थदीपिका—मागील श्लोकांत, एकदेशीय सगुण श्रीकृष्णस्वरूपाचीं भक्ति करणारे युक्ततम होतात असे जसे म्हटलें आहे, तसे निरवयव अशा ब्रह्माची "मी ते ब्रह्म आहे" अशी ऐक्याची जाणीव ठेवून ध्यानाने ऐक्य करणारे निर्गुण उपासक युक्ततम होतात, असे म्हटलें नाही. आणि तसे न म्हणण्याचें कारण, त्यांचे ठिकाणी अहंभाव व अहंभावामुळे जाणीव, यांचा भास कायम राहतो, हें होय.

मनाची नखी न लगे। जेथ बुद्धीची दृष्टी न रिगे। इंद्रियां कीर जोगें। कायि होईल॥ ४१॥
परि ध्यानाही कुवाडें। म्हणोनि एकें ठायीं न सांपडे। व्यक्तीसि माजिवडें। कवणेही नोहे॥ ४२॥
जया सर्वत्र सर्वपणें। सर्वांही काळीं असणें। जें पावूनि चिंतवणें। हिंपुटी जाहलें॥ ४३॥
जें होय ना नोहे। जें नाहीं ना आहे। ऐसें म्हणोनि उपाये। उपजतीचिना॥ ४४॥
जें चळे ना ढळे। सरे ना मैळे। तें आपुलेनीचि बळें। आंगविलें जिहीं॥ ४५॥

अर्थ—ज्या अव्यक्त परब्रह्मवस्तुचे ठिकाणी मनाचा स्पर्श देखील होऊं शकत नाही व बुद्धीची दृष्टि प्रवेश करूं शकत नाही, मग तें इंद्रियांनी ग्रहण करण्याजोगें होईल काय?॥ ४१॥ इतकेंच नाही, तर ती एखाद्या मर्यादित वस्तुरूपानेच प्राप्त करून घेण्याजोगी नसल्यामुळे, त्याचें ध्यानहि होणें शक्य नाही॥ ४२॥ जी वस्तु सर्वत्र, सर्वभावाने व सर्वकाळीं आहे असें पाहून, चिंतनहि अत्यंत कष्टी होते-म्हणजे चिंतनहि करतां येंत नाही॥ ४३॥ जी उत्पन्न होत नाही किंवा नाहीशी होत नाही, जी नाही किंवा आहे म्हणतां येत नाही. असे असल्यामुळे जिच्या प्राप्तीचे उपायच उत्पन्न होत नाहीत॥ ४४॥ जी इकडे तिकडे क्षुब्ध पावत नाही किंवा हालत नाही आणि जी संपत नाही व मलीनहि होत नाही, अशी ती परब्रह्मवस्तु ज्यांनी "तेंच मी आहे" या वृत्तीच्या अभ्यासबळाने आपल्या ठिकाणी प्राप्त करून घेतली॥ ४५॥

अवतरणिका—निर्गुण परब्रह्माच्या तद्रूपतेचा अनुभव घेण्याकरितां योगाभ्यासच केला पाहिजे असे माऊली पुढें सांगत आहेत.

पैं वैराग्यमहापावकें। जाळूनि विषयांचीं कटकें। अधपलीं तवकें। इंद्रियें धरिलीं॥ ४६॥
मग संयमाची धाटी। सूनि मुरडिलीं उफराटीं। इंद्रियें कोंडिलीं कपाटीं। हृदयाचिया॥ ४७॥
अपानींचिया तोंडा। लावोनि आसनमुद्रा सुहाडा। मूळबंधाचा हुडा। पन्नासिला॥ ४८॥
आशेचे लाग तोडिले। अधैर्याचे कडे झाडिले। निद्रेचें शोधिलें। काळवखें॥ ४९॥
वज्राग्नीचियां ज्वाळीं। करूनि सप्तधातूंची होळी। व्याधींच्या सिसाळीं। पूजिलीं यंत्रें॥ ५०॥

अर्थ—ज्यांनी वैराग्यरूपी अत्यंत प्रखर अग्नींत पंचविषयांचे समूह जाळून, त्या अग्नीने होरपळलेलीं इंद्रियें धैर्याने आवरून ठेवलीं॥ ४६॥ आणि ज्यानी मग त्यांना संयमाच्या (धारणा, ध्यान व समाधि यांच्या) मार्गांत घालून-म्हणजे त्यांना त्यांचा (संयमाचा) अभ्यास लावून हृदयाकडे मुरडवून हृदयाच्या पोकळींत कोंडले॥ ४७॥ ज्यांनी अपानवायूच्या तोंडाशीं वज्रासनाची दृढ मुद्रा लावून मूळबंधाचा किल्ला बांधला॥ ४८॥ ज्यानी आशेचे संबंध तोडून टाकलें, घाबरटपणाचे कडे नाहीसे केलें आणि तिचा काळोख नाहीसा केला-म्हणजे अहंवृत्तीला सुषुप्तिरूपी अज्ञानांत लीन होऊं दिलें नाही॥ ४९॥ वज्रासनाच्या योगाने पेटलेल्या अग्नीच्या ज्वाळेंत सप्त धातु (रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व रेत) यांची होळी करून व्याधींच्या मुंडक्यांचे यंत्रांना बळीदेऊन त्यांचें पूजन केलें-म्हणजे पोटांतील घाण नाहीशी करून सर्व रोगांचा उद्भवच नाहीसा केला॥ ५०॥

गूढार्थदीपिका—अशा रीतीने योग्यांच्या स्थूलदेहांचें निरसन होतें, हें येथें सांगितलें आहे.

मग कुंडलिनियेचा टेंभा। आधारीं केला उभा। तया चोजवलें प्रभा। निमथावरी॥ ५१॥

नवद्वारांचिया चौचकीं। बाणूनि संयतीची आडवंकी। उघडली खिडकी। ककारांतींची॥ ५२॥
प्राणशक्तिचांमुडे। प्रहारूनि संकल्पमेंढे। मनोमहिषाचेनि मुंडें। दिधलीं बळी॥ ५३॥

अर्थ—आणि मग, त्याच वज्राग्नीच्या प्रखर उष्णतेने तेजस्वी झालेल्या कुंडलिनीशक्तीचा टेंभा, आधारचक्रावर उभा करून, त्याच्या योगाने ब्रह्मरंध्रापर्यंतचा सुषुम्नानाडीचा मार्ग ज्यांनी प्रकाशित केला॥ ५१ ॥ शरीराच्या नवद्वारांच्या कवाडांना निग्रहाची खीळ घालून, ककारांतीची खिडकी (म्हणजे हृदयापासून ब्रह्मरंध्रापर्यंत गेलेल्या सुषुम्नानाडीचे शेवटील द्वार) उघडी केली॥ ५२॥ प्राणशक्ति हीच कोणी चामुंडादेवी, तिला संकल्परूपी मेंढे मारून मनोरूपी महिषासुराच्या मुंडक्यासह बळी दिले॥ ५३॥

गूढार्थदीपिका—प्राणशक्तीने सुषुम्नानाडींत प्रवेश करून तिची ऊर्ध्व ब्रह्मरंध्राकडे गति होऊं लागली असतां, मन व मनाचे संकल्प विकल्प हे संपूर्ण नाहीसे होतात, असा अर्थ.

चंद्रसूर्यां बुझावणी। करूनि अनाहताची सुडावणी। सतरावियेचें पाणी। जिंतिलें वेगें॥ ५४॥

अर्थ—इडा, पिंगळा यांचें ऐक्य करून व अनाहतनादाला स्पष्ट करून, ज्यांनी सतराव्या कलेचे अमृतरूप पाणी वेगाने प्राप्त करून घेतलें॥ ५४॥

गूढार्थदीपिका—चंद्र किंवा इडा नाडी, ही डाव्या नाकपुडीच्या ठिकाणी असून, त्या नाडीवाटे डाव्या नाकपुडींतील वायु वाहत असतो. सूर्य किंवा पिंगळा नाडी, ही उजव्या नाकपुडीच्या ठिकाणी असून, त्या नाडीचे द्वारा उजव्या नाकपुडींतून वायु वाहत असतो. इडा, पिंगळा या नाड्यांचा निग्रह करून-म्हणजे त्यांना आपआपल्या नाडींतून वाहूं न दिले असतां-त्यांची बुझावणी म्हणजे ऐक्य होतें. असें ऐक्य झालें असतां हृदयांतील अनाहतनादहि स्पष्ट ऐकूं येऊं लागतो व सतराव्या कलेचें अमृतपान होतें.

या भूमिकेवर योग्याच्या सूक्ष्म किंवा लिंगदेहाचें निरसन होतें.

मग मध्यमा मध्यविवरें। तेणें कोरिवें दादरें। ठाकिलें चवरें। ब्रह्मरंध्र॥ ५५॥

अर्थ—मग मध्यमा-म्हणजे प्राण व अपान या दोन नाड्यांच्या मध्ये असणारी जी सुषुम्ना नाडी-हेच कोणी विवर, त्या विवरांत असणाऱ्या षट्चक्रांच्या पाकळ्या व मात्रा यांनी कोरलेल्या जिन्याने, ज्यांनी सर्वांच्या शेवटीं असलेलें ब्रह्मरंध्र गांठलें. ॥ ५५॥

वरी मकारांत सोपान। तें सांडोनिया गहन। काखे सूनियां गगन। भरलें ब्रह्मीं॥ ५६॥

अर्थ—मग, मकारान्त म्हणजे धन-अज्ञानसुषुप्तिरूप जो कारण देह-हीच कोणी पायरी-ही बिकट पायरी ओलांडून, आकाशहि काखेंत मारून, योगी ब्रह्मरूपाशीं ऐक्य पावतो॥ ५६ ॥

गूढार्थदीपिका—या भूमिकेवर योग्याच्या कारणदेहाचा निरास होतो.

ऐसे जे समबुद्धी। गिळावया सोहंसिद्धी। आंगवितातिं निरवधी। योगदुर्गें॥ ५७॥

अर्थ—अशा रीतीने जे समबुद्धि म्हणजे ब्रह्मबुद्धि होतात, ते "मी ब्रह्म आहे" ही आपली सोहंसिद्धीची जाणीव नाहीशी करण्याकरितां-म्हणजे मूळची जाणीवरहित स्थिति प्राप्त होण्याकरितां-बिकट योगरूपी किल्ले स्वाधीन ठेवण्याचा अखंड-म्हणजे मरेपर्यंत-प्रयत्न करतात॥ ५७॥

गूढार्थदीपिका—ब्रह्मज्ञान्याला योगाभ्यासाचे मरेतोपर्यंत अखंड कष्ट करून, सोहंसिद्धीची जाणीव, समाधीने नाहीशी करावी लागते, तेव्हा ते मरणानंतर जाणीवनेणीवरहित अशा निर्विकल्प विदेहमुक्तीला प्राप्त होतात. पण इतके कष्ट करूनहि प्रकृतीअधीन जीवाला, योगाने किल्ले स्वाधीन करून घेणें अत्यंत दुष्कर असल्यामुळे, अमुक अवधींत ते स्वाधीन होतील असें मुळींच सांगतां येत नाही, हे माऊलींनी "आंगवितातिं निरवधि" या पदाने दाखविलें आहे. मागें सहाव्या अध्यायांतहि योगाचें दु:साध्यत्व सांगतांना माऊलींनी "जया मार्गीचा कापडी। महेश अझूनि" या योगमार्गाचा भगवान शंकरहि अझूनपर्यंत अभ्यास करीतच आहेत, असें म्हटलें आहे.

आपुलिया साटोवाटी। शून्य घेती उठाउठी। तेही मातेंचि किरीटी। पावती गा॥ ५८॥

अर्थ—जे योगी, आपला जीवभाव निःशेष नाहीसा करून, त्याच्या मोबदल्यांत तात्काळ शून्यस्वरूप अशी निर्विकल्प ब्रह्मस्थिति प्राप्त करून घेतात, तेहि अर्जुना! भक्ताप्रमाणे मलाच प्राप्त होतात॥ ५८॥

गूढार्थदीपिका—येथे "शून्य" हा शब्द बौद्धमताप्रमाणे अभाववाचक नसून केवळ सत्तारूप निर्विकल्प परब्रह्मवाचक आहे. माऊलींनी या अर्थी हा "शून्य" शब्द ज्ञानेश्वरींतून पुष्कळ ठिकाणीं वापरला आहे.

एकदेशीय सगुण साकार श्रीकृष्णस्वरूपाचे ठिकाणी प्रेम करणारे भक्त, हे जसे निर्विकल्प होतात, तसेच योगाने असंप्रज्ञात अशी निर्विकल्प समाधि साधणारेहि निर्विकल्प होतात. फरक इतकाच की परमप्रेमामुळे भक्तांची अखंड निर्विकल्प समाधि असते व योगी समाधीकालींच निर्विकल्प असतात आणि प्रारब्धबळाने समाधींतून जेव्हा व्युत्थान होतें, तेव्हा ते "अहंब्रह्मास्मि" द्वारा ब्रह्मैक्याचे चिंतन करीत असतात.

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् । अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते॥ ५॥

अर्थ—देहधारी पुरुषाला, निराकार, इंद्रियातीत अशा परब्रह्माची प्राप्ति अत्यंत कष्टानेच होऊं शकते; म्हणून निराकार, इंद्रियातीत ब्रह्मस्वरूपाची आसक्ति ज्यांचें चित्तांत आहे, अशांना भक्तापेक्षा एका क्लेशाचीच अधिक प्राप्ति आहे.॥ ५॥

वांचूनि योगाचेनि बळें। अधिक कांही मिळे। ऐसें नाहीं आगळें। कष्टचि तया॥ ५९॥

अर्थ—माझ्या प्राप्तिवांचून योगाने योगाभ्यासाच्या बळावर योग्यांना अधिक कांही प्राप्त होते असे नाही. भक्तापेक्षा योग्यांना एका कष्टाचीच अधिक प्राप्ति असते॥ ५९॥

जिहीं सकळभूतांचिया हिती। निरालंबीं अव्यक्तीं। पसरलिया आसक्ती। भक्तीवीण॥ ६०॥

अर्थ—जे कोणी सगुण स्वरूपाच्या भक्तिवांचून, सर्व प्राणिमात्रांचे एक समान कल्याणरूप किंवा सुखरूप असणारें, चित्ताचे आलंबन न होणारें, इंद्रियातीत असें जें परब्रह्म, त्याच्या प्राप्तीची मनांत तीव्र इच्छा धारण करतात॥ ६०॥

अवतरणिका—सगुण भगवंताच्या भक्तिवांचूत केवळ योगमार्गाचे अवलंबन करणाऱ्यांना जीं विघ्नें येतात व कष्ट सोसावे लागतात, त्याचें माउली आतां वर्णन करीत आहे.

तयां महेंद्रादि पदें। करिताति वाटवधें। आणि ऋद्धिसिद्धींचीं द्वंद्वें। पडोनि ठाती॥ ६१॥

अर्थ—त्यांना महेंद्रादि देव, त्यांच्या परमार्थमार्गांत वाटमारेपणा करतात-म्हणजे त्यांच्या ठिकाणीं इंद्रादिपदाच्या प्राप्तीची इच्छा उत्पन्न करून परमेश्वरप्राप्तिपासून भ्रष्ट करतात-आणि ऋद्धिसिद्धीच्या जोड्या प्राप्त होऊन त्यांच्या परमार्थमार्गाच्या आड येतात-म्हणजे ऋद्धिसिद्धि त्यांना प्राप्त होऊन त्या सुखांत ते गुंतून पडतात॥ ६१॥

गूढार्थदीपिका—**"त्वां सेवतां सुरकृता बहवोऽन्तरायाः"** (भाग. स्कं. ११-४-१०) सगुण भगवंताच्या भक्तिवांचून योगाभ्यास करणाऱ्यांच्या परमार्थमार्गांत देवता, नानाप्रकारचीं विघ्नें उत्पन्न करतात, असें जें श्रीभागवतांत म्हटलें आहे, त्याचेंच येथे माउली वर्णन करीत आहेत.

कामक्रोधांचे विलग। उठावती अनेग। आणि शून्येंसीं आंग। झुंझवावें कीं॥ ६२॥
ताहानें ताहानचि पियावी। भुकेलिया भूकचि खावी। अहोरात्र वावीं। मवावा वारा॥ ६३॥
उन्निद्रेयाचें पहुडणें। निरोधाचें वेल्हावणें। झाडासि साजणें। चावळावें गा॥ ६४॥
शीत वेढावें। उष्ण पांघुरावें। वृष्टीचिया असावें। घराआंतु॥ ६५॥
किंबहुना पांडवा। हा अग्निप्रवेशु नीच नवा। भातारेंवीण करावा। तो हा योगु॥ ६६॥

अर्थ—कामक्रोधादि विकारांचे अनेक उपद्रव चित्तांत उठावणी करतात आणि त्यांचा प्रतिकार करणें म्हणजे शून्याशींच शरीराने भांडण्यासारखे आहे॥ ६२॥ किंवा तहान लागलेल्या पुरुषानें तहान पिऊनच तहान शमवावी, भूक लागलेल्या पुरुषाने अन्न न खाता भूक खाऊनच तृप्ति मानावी, किंवा वारा मोजू पाहणाऱ्यांनी अहोरात्र दोन्ही हात पसरून ठेऊनच तो मोजावा॥ ६३॥ किंवा जागण्यांतच निद्रेचें सुख मानावें, इंद्रियनिग्रहांतच इंद्रियांचे सुख मानावें

व झाडाशीं सख्य करून मैत्रीचें सुख भोगावें ॥ ६४ ॥ शीताचें वेष्टण करायचे, उष्णताच पांघरायची आणि पावसाच्या घरांत राहायचे (अशासारखे योगसुख आहे) ॥ ६५ ॥ किंबहुना अर्जुना! हा योग म्हणजे पतिवांचून करावा लागणारा नित्यनवा अग्निप्रवेश आहे ॥ ६६ ॥

गूढार्थदीपिका—भक्तिवांचून निर्गुण प्राप्ति कशी अशक्य आहे, हे माउलींनी वरील ओव्यांतून प्रतिपादिलें आहे. याचें विवरण मागें अकराव्या अध्यायांतील ५९४ ओवीवरील गूढार्थदीपिकेंत आम्ही केलेंच आहे.

एथ स्वामीचें काज। ना बापिकें व्याज। परि मरणेंसीं झुंज। नीच नवें॥ ६७॥

अर्थ—येथें पतीच्या उद्धाराचें किंवा पित्याच्या उद्धाराचे निमित्त नाही. पण मरणाशीं नित्य युद्ध करावें लागतें ॥ ६७ ॥

गूढार्थदीपिका—उभयोर्वशयो: स्वर्गो भर्तुरात्मन एव च ॥ ६३ ॥

सुरापं विप्रहन्तारं सर्वपापयुतं पतिम्। पङ्कात्पूतं नयेत् स्वर्गं भर्तारं याऽनुगच्छति॥ ६७॥

पतिव्रता स्त्री, पतीने जन्म घेतलेल्या कुळाचा व आपण जन्म घेतलेल्या कुळाचा उद्धार करते. तसेंच दारु पिणारा, ब्रह्महत्या करणारा व सर्व पापयुक्त असा पति असला, तरी त्याला ती, पापपङ्कांतून शुद्ध करून स्वर्गांत नेते, असें पद्मपुराणांत सांगितलें आहे.

ऐसें मृत्यूहूनि तिख। कां घोंटे कढत विख। डोंगर गिळितां मुख। न फाटे काई॥ ६८॥
म्हणोनि योगाचिया वाटा। जे निगाले गा सुभटा। तयां दु:खाचाचि वाटा। भागा आला॥ ६९॥
पाहें पां लोहाचे चणे। जैं बोचरिया पडती खाणें। तैं पोट भरणें कीं प्राणें। शुद्धी म्हणो॥ ७०॥

अर्थ—किंवा असें हें योगाचें कष्ट, अत्यंत कढत विष पिण्यासारखें मृत्यूच्या दु:खापेक्षाहि तीव्र आहे. डोंगर गिळला असतां मुख फाटणार नाही काय? ॥ ६८ ॥ हे उत्तम योद्ध्या अर्जुना! जे योगमार्गाचा अभ्यास करण्याला निघाले, त्यांच्या वांटेला नुसतें दु:खच आलें ॥ ६९ ॥ अर्जुना! विचार कर. बोचऱ्या (दंतहीन) माणसाला लोखंडाचे चणे खाण्याचा प्रसंग आला असतां, ते त्याचे पोट भरणें म्हणावें लागेल की प्राणें-म्हणजे प्राणांतिक प्रायश्चित घेऊन-शुद्ध होणें म्हणावें लागेल. ॥ ७० ॥

गूढार्थदीपिका—प्राणांतिक प्रायश्चित्ताने महापापाची शुद्धि होते, असे शास्त्रांतून सांगितलें आहे.

म्हणोनि समुद्र बाहीं। तरणें आथि केंही। कां गगनामाजीं पायीं। खोलिजत असे॥ ७१॥
वळघलिया रणाची थाटी। आंगीं न लागतां काठी। सूर्याची पाउठी। कां होय गा॥ ७२॥
यालागीं पांगुळा हेवा। नव्हे वायूसि पांडवा। तेवीं देहवंतां जीवां। अव्यक्तीं गति॥ ७३॥
ऐसाही जरी धिंवसा। बांधोनियां आकाशा। झोंबती तरी क्लेशा। पात्र होती॥ ७४॥
म्हणोनि येर ते पार्था। नेणतीचि हे व्यथा। जे कां भक्तिपंथा। वोटंगले॥ ७५॥

अर्थ—म्हणून हाताने समुद्र तरणें किंवा पायाने आकाशांत चालणें कधी तरी होईल काय? ॥ ७१ ॥ हे अर्जुना! युद्धाला सज्ज झालेल्याला रणांगणांत उतरल्यानंतर शरीराला काठीचा देखील प्रहार न लागतां (स्वर्गप्राप्तिकरितां) सूर्यमंडळाची प्राप्ति होईल काय? ॥ ७२ ॥ म्हणून अर्जुना! ज्याप्रमाणे पांगळा मनुष्य, वायूशीं गतींत स्पर्धा करूं शकत नाही, त्याप्रमाणे देहधारी जीवाला निराकार इंद्रियातीत अशा ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति होणें अत्यंत कठीण आहे ॥ ७३ ॥ असे असूनहि, आकाशासारख्या शून्यरूप निराकार परब्रह्माशीं झोंबण्याचें धैर्य धरलेच, तर ते क्लेशालाच पात्र होतात ॥ ७४ ॥ म्हणून, अर्जुना! दुसरे जे सगुण भगवंताच्या भक्तिमार्गाचा अवलंब करतात, त्यांना असें दु:ख भोगण्याचा कधी प्रसंगच येत नाही ॥ ७५ ॥

ये तु सर्वाणि कर्माणि मयि सन्न्यस्य मत्परा:। अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते॥ ६॥
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्। भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्॥ ७॥

अर्थ—पण जे आपलीं सर्व कर्में कर्मकर्तृत्वासह मला अर्पण करून मत्परायण होऊन व अनन्यभावाने माझें

ध्यान करीत, माझी उपासना करतात॥ ६॥ त्यांनी आपलें चित्त माझ्या ठिकाणीच लावले असल्यामुळे मी, या मृत्युरूपी संसारसागरांतून त्यांचा तात्काळ उद्धार करणारा होतों॥ ७॥

कर्मेंद्रियें सुखें। करिती कर्में अशेखें। जियें कां वर्णविशेखें। भागा आलीं॥ ७६॥

अर्थ—भगवंतांनी निरनिराळ्या वर्णाश्रमाला धरून जीं कर्में विहित केलीं असतील, तीं सर्व कर्में भक्त, भगवंताची आज्ञा समजून कर्मेंद्रियांच्या द्वारा, प्रेमाने करीत असतात॥ ७६॥

विधीतें पाळित। निषेधातें गाळित। मज देऊनि जाळित। कर्मफळें॥ ७७॥

अर्थ—जें करावें म्हणून सांगितलें असेल, तेंच भक्त करतात व जें करूं नये म्हणून सांगितलें असेल; तें ते कधी करीत नाहीत. अशा रीतीने मला कर्म समर्पण करून संपूर्ण कर्मांचीं फळें ते जाळून टाकतात—म्हणजे आपल्या भोगाकरितां कर्माचें फळ ते उत्पन्न होऊं देत नाहीत॥ ७७॥

गूढार्थदीपिका—मज देऊनि जाळित कर्मफळें—

भगवंताची आज्ञा समजून भगवत्प्रीत्यर्थ कर्म केल्याने कर्माचें फळ मिळत नाही, असा भाव.

ययापरी पाहीं। अर्जुना माझे ठायीं। संन्यासूनि नाहीं। करिती कर्में॥ ७८॥

अर्थ—याप्रमाणे, अर्जुना! माझे ठिकाणी सर्व कर्मांचा संन्यास करून कर्में नाहीशी करतात, पहा॥ ७८॥

गूढार्थदीपिका—संन्यसूनि नाहीं। करिती कर्में—कर्म कर्तृत्व व भोक्तृत्व यांना जाणणारा मी, या सर्वांहून निराळा ज्ञानस्वरूप आहे, यांचा माझा कांही संबंध नाही, असा अनुभव येणें, हा संन्यासाचा खरा अर्थ आहे. आणि स्वत:चें कर्तृत्व व भोक्तृत्व न वागवितां, परमेश्वरच कर्ता व भोक्ता आहे, अशा भावनेने कर्में केलीं असतां कर्माचा संबंध वागविला जात नाही; म्हणून यालाहि संन्यासच म्हटलें आहे.

आणिकही जे जे सर्व। कायिक वाचिक मानसिक भाव। तयां मीवांचूनि धांव। आनौती नाहीं॥ ७९॥

अर्थ—आणखीहि शरीर, वाणी, मन यांच्याकडून होणाऱ्या सर्व कर्मांची एक माझ्यावांचून दुसरीकडे प्रवृत्तिच नसते-म्हणजे भक्तांचे संपूर्ण व्यापार केवळ एका भगवंताला विषय करूनच होतात॥ ७९॥

गूढार्थदीपिका—वरील ७६-७९ पर्यंतच्या ओव्यांतून माउलींनी भक्तांच्या अनन्यत्वाचें लक्षण केलें आहे.

ऐसे जे मत्पर। उपासिती निरंतर। ध्यानमिषें घर। माझें झालें॥ ८०॥
जयांचिये आवडी। केली मजशीं कुळवाडी। भोग मोक्ष बापुडीं। त्यजिलीं कुळें॥ ८१॥
ऐसें अनन्ययोगें। विकले जीवें मनें आंगें। तयांचें कायि एक सांगें। जें सर्व मी करीं॥ ८२॥

अर्थ—असे अनन्य व मत्परायण झालेले भक्त, माझी अखंड उपासना करतात व त्या अखंड उपासनेने माझें ध्यान होऊन त्यांचें चित्त, माझें राहण्याचें घर होऊन बसतें॥ ८०॥ ज्यांच्या आवडीनें एका माझ्याशींच संपूर्ण व्यवहार केला व माझ्या प्रेमसुखाच्या दृष्टीने तुच्छ भासणारें विषयसुख व मोक्षसुख या दोन्ही कुळांचा त्याग केला॥ ८१॥ अशा रीतीने अनन्य होऊन ज्यांनी आपलें शरीर, मन व जीवभाव मला समर्पण केले, त्यांचे सर्व काम मीच करीत असल्यामुळे कोणतें एखादेंच काम करतों, सांग बरें!॥ ८२॥

गूढार्थदीपिका-अनन्य योगें—"अन्याश्रयाणां त्यागोऽनन्यता" (नारदभक्तिसूत्र) सर्व समर्थ अशा एका भगवंतावांचून दुसऱ्या कोणत्याहि देवतेचा यत्किंचितहि आश्रय न करणें, याला अनन्यता म्हणतात.

विकलें जीवें—ज्याप्रमाणे अज्ञानी जीवाने आपला जीवभाव देहाला विकला आहे म्हणजे तो क्षणभर देखील देहाला सोडून राहूं इच्छित नाही; म्हणूनच मरण समयीं देह सोडण्याचा प्रसंग येतो तेव्हा त्यांचा जीव अत्यंत कासाविस होतो, त्याचप्रमाणे "त्रुटिर्युगायते त्वामपश्यताम्" (भाग. स्कं. १०-३१-१५) "तूं डोळ्यासमोर क्षणभर दिसला नाहीस तर तो क्षण आम्हांला युगासारखा वाटतो" या गोपींच्या म्हणण्याप्रमाणे किंवा "जीवनावेगळी मासोळी। तुका तैसा तळमळी" या श्रीतुकाराम महाराजांच्या वचनाप्रमाणे, क्षणभर परमात्मा दिसला नाही, एवढेंच नाही तर भगवंताच्या वियोगाच्या कल्पनेने देखील मनाला मरणासारखें दु:ख होते, याला "परमेश्वराला जीवें विकणें" म्हणतात.

विकलें मनें—जेव्हा मनाला भगवंतावांचून दुसरे कांहीच गोड वाटत नाही, म्हणून मन, भगवंतावांचून दुसरे कशाचेंहि ध्यान करीत नाही, तेव्हा ''भगवंताला मन विकलें'' म्हटले जातें.

विकलें अंगें—त्याचप्रमाणे ज्याच्या शरीराचे संपूर्ण व्यापार स्वतः विषयसुख भोगण्याकरितां न होतां, केवळ एका भगवंताला सुख देण्याकरितांच होतात, तेव्हा तो अंगाने भगवंताला विकला गेंला, असें म्हटले जातें.

जे मी सर्व करी—''नित्यसमाधियुक्तानां गोपीनां व्यवहारनिष्पत्तिर्भगवतैव परमकारुणिकेन निर्वाह्यते तासु भूतावेशन्यायेन प्रवेशोपगमात्'' ज्याप्रमाणे भूतसंचार झालेल्या माणसाचे व्यापार भूताचेच असतात, त्याचे नसतात, त्याप्रमाणे जीवाने, मनाने व अंगाने विकलेल्या भक्ताचे व्यापार, त्याच्या हृदयांत असलेल्या भगवंताकडूनच होतात, असें प्रेमरसायन खंड १ श्लोक १०२ यावरील टीकेंत विश्वनाथांनी म्हटलें आहे आणि माझ्या सद्‌गुरु आईंनीहि हाच भाव—

ऐसिया नित्यप्रेमसमाधिस्थांच्या शरीरीं। भूतावेशन्यायें प्रवेशोनि हरी। प्रारब्ध व्यवहार आघवा करी। म्हणोनि भक्ता प्रारब्धाभिभवो''॥ ९३॥ श्रीगुलाबराव महाराजकृत (प्रेमनिकुंजवल्ली चवथी)

या ओव्यांतून दाखविला आहे; म्हणूनच भक्तांना प्रारब्धभोग होत नाही. श्रीतुकाराम महाराजांनीहि,

''संचित क्रियमाण। भक्तां प्रारब्ध नाहीं जाण'' ''मन मिळाले रे मना। भोग अंतरीचा पावे नारायणा'' ''भक्तासी सोहळे देवाचिया आंगें। देव त्याच्या संगे क्रीडा करी''.

इत्यादि अभंगांतून वरील तत्वच प्रतिपादिलें आहे. (येथे ''संगें'' या शब्दाचा ''त्याच्याबरोबर'' असा अर्थ नसून ''भक्ताच्या शरीर, मन, वाणी इत्यादिकांच्या द्वारा'' असा अर्थ आहे.) सारांश, भगवंताला विकल्या गेलेल्या पुरुषाचे जीव, मन व अंग किंवा शरीर हे सर्व पूर्णब्रह्म श्रीकृष्णस्वरूपच होऊन जातात, असा भाव.

किंबहुना धनुर्धरा। जो मातेचिया ये उदरा। तो मातेचा सोयरा। केतुला पां॥ ८३॥

अर्थ—किंबहुना अर्जुना! जो मातेच्या उदरीं येतों, तो मातेचा कितपत सोयरा असतो, बरें॥ ८३॥

गूढार्थदीपिका—आईच्या उदरीं आलेला गर्भ मातेचा कितीसा सोयरा असतो, असें म्हणून, माउलींचे पोटच्या मुलावर स्वाभाविक प्रेम असतें व सोयरेसंबंधीचे प्रेम गुणदोषांवर अवलंबून असल्यामुळे तें कमी-अधिक होतें, हें येथे सुचविले आहे.

तेवीं मी तयां। जैसे असती तैसियां। कळिकाळ नोकोनियां। घेतला पटा॥ ८४॥

अर्थ—त्याप्रमाणेच माझे भक्त जशा स्थितींत असतील तशा स्थितींत मी त्यांच्यावर, प्रेम करून व त्यांच्या कळिकाळाचें निर्दाळन करून, त्यांना आपल्या पदरांत घेतलें आहे॥ ८४॥

गूढार्थदीपिका-जैसे असती तैसिया—आई जशी आपल्या मुलाच्या गुणदोषांचा विचार न करतां स्वाभाविक प्रेम करते, तसेच भगवानहि आपल्या प्रेमळ भक्तावर, त्याचे गुणदोष न पाहतां स्वाभाविक प्रेम करतो. ''हे जैसे असती तैसिया'' या चरणाने दाखविलें आहे. ''अंतकाळी तैसा संकटाचे वेळीं। हरि तया सांभाळी अंतर्बाह्य'' (हरिपाठ ज्ञानदेवकृत)

एऱ्हवीं तरी माझिया भक्तां। आणि संसाराची चिंता। काय समर्थाची कांता। कोरान्न मागे॥ ८५॥

अर्थ—(भगवान म्हणतात, अर्जुना!) माझ्या भक्ताला संसाराची कधी चिंता नसते. समर्थाच्या स्त्रियेला कोरान्न (म्हणजे कोरडी भिक्षा) मागण्याचा प्रसंग येतो काय?॥ ८५॥

गूढार्थदीपिका—सकाम व निष्काम असे दोन प्रकारचे भक्त असतात, हे मागें सातव्या अध्यायांत सांगितलेंच आहे. 'भगवान आपल्या भक्ताचा संसार सुखाचा करून ठेवतो म्हणून भक्ताला संसाराची चिंता नसते' असा अर्थ, निष्काम-भक्ताच्या बाबतीत करतां येत नाहीं. ज्याप्रमाणे संपन्न पुरुषाच्या स्त्रियेला दारिद्र्याचा कधीच अनुभव येत नाही, म्हणून तिला कधीच भिक्षा मागावी लागत नाही, त्याप्रमाणे ज्यांना एक भगवंतच गोड वाटतो व भगवंताच्या ध्यानाने ज्यांना सर्व संसार भगवत्स्वरूप भासतो, अशा निष्काम भक्तांना संसाराचा भासच नसतो;

नग संसाराची चिंता कोठून असणार? पण अशाहि भक्ताचे, अभक्तांना उणे दिसून त्यांच्याकडून भक्ताची विटंबना भगवंत होऊं देत नाही, असा भाव.

तसेंच ज्याप्रमाणे संपन्न पुरुष आपल्या स्त्रियेची सर्व इच्छा पूर्ण करीत असल्यामुळे तिला कोरान्न मागण्याचा प्रसंग येत नाहीं, त्याप्रमाणे सर्व समर्थ भगवानहि, आपल्या सकाम एकनिष्ठ भक्ताला संसाराची चिंता करण्याचा प्रसंग येऊं देत नाही. आणि शेवटीं सकाम भक्तहि अत्यंत निष्काम होतो.

तैसे ते माझें। कलत्र हें जाणिजे। कायिसेनिही न लाजें। तयांचेनि मी॥ ८६॥

अर्थ—त्याप्रमाणे माझा भक्त म्हणजे माझी पत्नी होय, असें समज. म्हणून (ज्याप्रमाणे आपल्या पत्नीचे पडेल तें काम करायला पुरुषाला लाज वाटत नाही, त्याप्रमाणे) भक्ताचे पडेल तें काम करण्यास मलाही लाज वाटत नाही॥ ८६॥

गूढार्थदीपिका—स्वत:चे कितीहि नीच काम असलें, तरी तें स्वत: करण्यांत मनुष्याला लाज वाटत नाही.

पतिपत्नीच्या प्रेमसंबंधांत पतिपत्नी एकरूप होऊन गेलेले असतात; म्हणूनच पतीला तिचें कोणतेंहि काम करण्यांत लाज वाटत नाही. त्याप्रमाणेच भक्तावरील भगवंताच्या व भगवंतावरील भक्ताच्या परम प्रेमामुळे भगवान व भक्त एकरूप होऊन गेलेले असतात; म्हणूनच भगवंतालाहि आपल्या एकरूप झालेल्या भक्ताचे कोणतेहि नीच काम करण्यांत लाज वाटत नाही.

या ओवींत माऊलींनी भगवान व भक्त यांना पतिपत्नीचा दृष्टान्त देऊन पतिपत्नीभावाने केल्या जाणाऱ्या भक्तींत, भक्त भगवंताशीं अत्यंत एकरूप होतो, हें सुचविलें आहे.

जन्ममृत्यूचियां लाटीं। झळंबती इया सृष्टी। तें देखोनियां पोटीं। ऐसें जाहलें॥ ८७॥

अर्थ—ही भूतसृष्टि, भवसमुद्रांतील जन्ममृत्यूंच्या लाटांमध्ये सारखी गटांगळ्या खात आहे. तें पाहून माझ्या पोटांत असे झाले आहे की॥ ८७॥

भवसिंधूचेनि माजें। कवणासि धाकु नुपजे। तेथ जरी कीं माझे। बिहिती हन॥ ८८॥
म्हणोनि गा पांडवा। मूर्तीचा मेळावा। करूनि त्यांचिया गांवा। धांवतु आलों॥ ८९॥

अर्थ—(अशा रीतीने) हा संसारसमुद्र खवळलेला पाहून कोणाला त्याची भीती वाटणार नाही आणि तेथे न जाणो, माझे भक्तहि कदाचित् त्याला पाहून भितील॥ ८८॥ म्हणून, अर्जुना! त्यांचा सांभाळ करण्याकरितां मी सगुणसाकार रामकृष्णादि मूर्ती धारण करून, त्यांच्या या संसाररूपी गावांत धांवून आलों॥ ८९॥

गूढार्थदीपिका—आपल्या लहान बाळाचा सांभाळ करण्याकरितां आईच्या पोटांत ज्याप्रमाणे अखंड कळवळा असतो, त्याप्रमाणे भगवंताच्या पोटांतहि आपल्या भक्ताचा सांभाळ करण्याचा अखंड कळवळा असतो, असा भाव.

नामाचिया सहस्रवरी। नावा इया अवधारीं। सजूनियां संसारीं। तारू जाहलों॥ ९०॥

अर्थ—माझी रामकृष्णादि जीं अनंत नामें, ह्याच नावा होत, असे समज. हा संसार तरून जाण्याकरितां, त्या नामरूपी नावा संसारसमुद्रावर सज्ज करून मी भक्तांचा नावाडी झालों आहे॥ ९०॥

गूढार्थदीपिका—सगुण भगवंताच्या प्राप्तीची इच्छा ठेऊन भगवंताच्या एका नुसत्या अखंड नामस्मरणाने देखील, जीव भगवंताला प्राप्त होतो असे येथें सुचविलें आहे. "या वै साधनसंपत्ति: पुरुषार्थचतुष्टये। तया विना तदाप्नोति नरो नारायणाश्रय:" पुरुषार्थाकरितां जीं कांही साधनें सांगितलीं आहेत, ती न करतां, एका भगवंताचाच आश्रय केला असतां सर्व साधनसंपत्तिसह पुरुषार्थ प्राप्त होतो, असे पुराणवचनहि आहे.

सडे जे देखिले। ते ध्यानकासे लाविले। परिग्रही घातले। तरियावरी॥ ९१॥

अर्थ—एकटे जे असतील त्यांना मी ध्यानमार्गाची कांस लावली आणि जे गृहस्थाश्रमी आहेत त्यांना मी नामरूपी नावेवर बसविले॥ ९१॥

गूढार्थदीपिका—सडे जे देखिले। ते ध्यान कासे लाविले—सडे म्हणजे तीव्र वैराग्यामुळे सर्वसंग परित्याग

करून असंग झालेले पुरुष. हे विशेषत: ध्यानरूप क्रियामार्गाचे अधिकारी असतात; कारण त्यांचे चित्त वैराग्याने रुक्ष होत असल्यामुळे, प्रथम विशेष प्रेमसंपन्न राहू शकत नाही. परंतु वैराग्यामुळे ते विक्षेपरहित व निष्पाप होतात व त्यांना भगवंताच्या प्राप्तीची इच्छा असल्यामुळे भगवंताच्या स्वरूपाच्या ध्यानरूप भक्तिमार्गाचा अवलंब करून, क्रमाने ते प्रेमसंपन्न होतात व कृतार्थ होतात.

परिग्रही घातले। तरियावरी—परिग्रही म्हणजे गृहस्थाश्रमी—जे गृहस्थाश्रमी असून रामकृष्णादि सगुण भगवंताच्या प्राप्तीची इच्छा करणारे आहेत, ते अत्यंत विरक्त नसतात व अत्यंत विषयासक्तहि नसतात; म्हणून त्यांच्याकरितां विशेषत: भगवन्नामस्मरणरूप भक्तिमार्ग प्रगट केला आहे. या अशा भगवन्नामस्मरणाने ते (गृहस्थाश्रमी) निष्पाप व वैराग्यसंपन्न होतात व त्यांना भगवंताचें प्रेमहि उत्पन्न होतें.

प्रेमाची पेटी। बांधली एकाचियां पोटीं। मग आणिले तटीं। सायुज्याचियां॥ ९२॥

अर्थ—मी आपल्या प्रेमाची पेटी एकाच्या पोटांत बांधली आणि मग सर्वांना सायुज्याच्या तटीं आणलें-म्हणजे संसार समुद्राचे परतीर जे माझें सगुणस्वरूप, त्या सगुण स्वरूपाशीं त्यांचें ऐक्य केलें॥ ९२॥

गूढार्थदीपिका—प्रेमाची पेटी। बांधली एकाचां पोटीं—प्रेमाची पेटी बांधली—म्हणजे चित्तांत आपले अखंड प्रेम दिलें.

पूर्वी अनेक जन्मांत भगवंताप्रीत्यर्थ आचारलेल्या भागवतधर्मामुळे, ज्यांच्या चित्तांत भगवन्नामस्मरण, भगवत्कथाश्रवण इत्यादिकांविषयीं जें स्वाभविक प्रेम उत्पन्न झालेलें असतें, तें भगवत्कृपेनेच झालेलें असतें; म्हणूनच येथे "मी त्यांच्या पोटांत प्रेमाची पेटी बांधली" असें भगवान म्हणत आहेत.

"एकाचिया" या पदाने "एवंभूता भक्तिप्रधाना विरला" (श्री. टी. भाग. स्कं. ६-१-१५) अशा प्रकारचे भाग्यवान क्वचित्‌च असतात, हें सुचविलें आहे.

परि भक्तांचेनि नांवें। चतुष्पदादि आघवे। वैकुंठीचिये राणिवे। योग्य केलें॥ ९३॥

अर्थ—इतकेच नव्हे तर, 'भक्त' या नांवास पात्र झालेल्या पश्वादि प्राण्यांना देखील वैकुंठाच्या राज्यावर बसण्यास योग्य केलें॥ ९३॥

गूढार्थदीपिका—"तथा न ते माधव तावका: क्वचिद् भ्रश्यन्ति मार्गात्त्वयि बद्धसौहृदा:" (भागवत स्कं० १०)

प्रेमाने भगवंताशीं बद्ध झालेले भगवद्भक्त कोणत्याहि योनींत गेले, तरी भक्तिमार्गापासून भ्रष्ट होत नाहीत, असा भाव.

म्हणोनि गा भक्तां। नाहीं एकही चिंता। तयांतें समुद्धर्ता। आथि मी सदा॥ ९४॥

अर्थ—म्हणून, हे अर्जुना! भक्तांना कशाचीहि चिंता नसते. त्यांना सर्व संकटातून मुक्त करण्याकरितां मी सर्वदा सज्ज असतो.॥ ९४॥

गूढार्थदीपिका—"त्वयाभिगुप्ता विचरन्ति निर्भया विनायकानीकपमूर्धसु प्रभो" (भाग. १०-२-३३) भगवान अखंड त्यांचे संरक्षण करीत असल्यामुळे सर्व विघ्नांच्या डोक्यावर पाय ठेऊन ते निर्भय असतात, असे भागवतांत म्हटलें आहे.

"**आम्हां हरीच्या दासां कांहीं। भय नाहीं त्रैलोक्यी॥ १॥ देव उभा मागे पुढें। उगवीं कोडें संकट**"॥ २॥

(तु. गा. १७२८)

आणि जेव्हांचि कां भक्तीं। दिधली आपुली चित्तवृत्ती। तेव्हांचि मज सूती। तयांचिये नाटीं॥ ९५॥

अर्थ—आणि ज्या क्षणीं भक्त आपली चित्तवृत्ति मला नि:शेष समर्पण करतात, त्या क्षणीं ते मला आपल्या सर्व व्यवहारांत घालतात—म्हणजे त्या क्षणापासून त्यांचा सर्व व्यवहार मीच करीत असतो॥ ९५॥

गूढार्थदीपिका—मागें ८२ व्या ओवींत भक्तांचे जीवभाव, मन व अंग भगवंताला समर्पण झाल्यामुळे ते भगवंताहून यत्किंचितहि अलग राहत नाहीत; म्हणून भक्तांचे ठिकाणी दिसत असलेले सर्व व्यवहार 'भूतावेशन्यायाने'

भगवंताचेच असतात, असा जो आम्ही अर्थ केला आहे, तोच अर्थ, माउलींनी पुन: या ओवींत व्यक्त केला आहे.

याकारणें गा भक्तराया। हा मंत्र तुवां धनंजया। कीजे जे यया। मार्गा भजिजे॥ ९६॥

अर्थ—म्हणूनच भक्तश्रेष्ठ अर्जुना तूं किंवा सर्वच जीवांनी माझ्या या भक्तिमार्गाचाच आश्रय करावा, हाच माझा गूढ उपदेश आहे, हें पक्कें जाणून घे॥ ९६॥

गूढार्थदीपिका—भगवद्‌गीतेंत कर्ममार्ग, ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग या तिन्ही मार्गांचे वर्णन केलें असलें, तरी भगवंतांनी अर्जुनाच्या मनावर मुख्यत: सोप्या व निर्विघ्न अशा भक्तिमार्गाचेंच श्रेष्ठत्व बिंबविलें आहे, असे जे आम्हीं मागें सांगितले आहे, तेच या ओवीने माऊलींनी स्पष्ट केलें आहे.

अवतरणिका—येथून भगवंतांनी, आपल्या शुद्ध परब्रह्मस्वरूपाशीं जीवाला ऐक्य करतां येईल, अशा प्रक्रिया सांगितल्या आहेत.

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय। निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशय:॥ ८॥

अर्थ—आपलें मन माझेच ठिकाणी स्थिर कर. आपली बुद्धि माझ्या ठिकाणी प्रविष्ट कर. असें झाल्यानंतर तूं माझ्या ठिकाणीच राहशील—म्हणजे माझ्याशीं अखंड ऐक्य पावशील—यांत संशय नाही॥ ८॥

अगा मानस हें एक। माझां स्वरूपीं सवृत्तिक। करूनि घालीं निष्टंक। बुद्धि निश्चयेंसीं॥ ९७॥

अर्थ—बा अर्जुना! तूं आपलें संपूर्ण वृत्तिसह एक हें मन व तसेच निश्चयव्यापारासह बुद्धि माझ्या स्वरूपाच्या ठिकाणी दृढ लावून घाल॥ ९७॥

गूढार्थदीपिका—देह, इंद्रियें, अहंकार मन, बुद्धि इत्यादि तत्त्वांमध्ये, मन व बुद्धि हीं दोन तत्वेंच मुख्य असल्यामुळे, तीं परमेश्वराच्या ठिकाणी लागलीं असतां, बाकींची सर्व तत्वें आपोआप परमेश्वरपरायण होऊन जीवाचा जीवभाव नाहीसा होतो व तो परमेश्वराशीं ऐक्य पावतो; म्हणून पुढील सर्व प्रक्रियेंतून भगवंताचे ठिकाणी मन व बुद्धि स्थिर करण्याचे निरनिराळे उपायच सांगितले आहेत.

इयें दोनीं सरिसीं। मजमाजीं प्रेमेंसीं। रिगालीं तरि पावसी। मातें तूं गा॥ ९८॥
जे मन बुद्धि इहीं। घर केलें माझ्या ठायीं। तरि सांगें मग काई। मी तूं उरे॥ ९९॥

अर्थ—बुद्धि आणि मन हीं दोन्ही माझ्या ठिकाणी प्रेमाने सारखींच जडली तर तूं मला प्राप्त होशील॥ ९८॥ कारण मन व बुद्धि यांनी माझ्या स्वरूपाचे ठिकाणी अखंड वस्ती केली असतां ''मी-तूं'' असा जो भेद दिसतो तो मग, राहील काय? हें सांग॥ ९९॥

गूढार्थदीपिका—मी तूं उरे-''मी'' व ''तूं'' या शब्दांनी दोन भिन्न पदार्थांचा भेद दाखविला आहे. तो भेद असा-'मी' या वृत्तीने चैतन्यच स्फुरत असल्यामुळे येथे 'मी' या शब्दाने जाणणारा चेतन दृष्टा घेतला आहे आणि जाणल्या जाणाऱ्या दृश्य पदार्थांना ''तूं'' हा शब्द लावला जात असल्यामुळे ''तूं'' या शब्दाने त्या चैतन्याहून निराळे देहादिक पदार्थ घेतले आहेत.

चैतन्य हे एक अद्वितीय व व्यापक असल्यामुळे या चैतन्याहून दुसरा पदार्थच राहूं शकत नाही; म्हणून 'तूं' या शब्दाने निर्देशिल्या जाणाऱ्या देहादिक पदार्थांची मनानेच कल्पना केली असून, बुद्धीने त्याच्या अस्तित्वाचा निश्चय केला आहे. अशा रीतीने मनबुद्धिमुळेच 'मी-तूं' हा भेद झाला आहे.

एक परमात्माच सत्य आहे, त्यावांचून दुसरी वस्तुच नाही, असा बुद्धीचा दृढ निश्चय झाला असतां, बुद्धि परमेश्वरस्वरूपाचे ठिकाणी दृढ स्थापन होते. बुद्धीच्या पाठीमागें मनाला भगवंताचें ध्यान लागून, तेहि सर्व वृत्तिसह देहादिकांची कल्पना सोडून देते व परमेश्वराचे ठिकाणी स्थिर होते. अशारीतीने मन, बुद्धि परमेश्वराचे ठिकाणीं स्थिर झाली असतां 'मी-तूं' या शब्दांनी भासणारा भेद मुळींच उरत नाही व जीव अद्वैतब्रह्मस्वरूप होतो.

म्हणोनि दीप पाल्वे। सवेंचि तेज माल्वें। कां रविबिंबासवें। प्रकाशु जाय॥ १००॥
उचललेया प्राणासरिसीं। इंद्रियेंही निगती जैसीं। तैसा मनोबुद्धिपासीं। अहंकारु ये॥ १०१॥

अर्थ—म्हणून ज्याप्रमाणे दिव्याला फडक्याने वारा घातल्याबरोबर दिव्याचा प्रकाश नाहीसा होतो किंवा ज्याप्रमाणे सूर्यबिंब अस्तास गेलें असतां, त्याचा प्रकाशहि जातो॥ १००॥ किंवा ज्याप्रमाणे प्राण निघून गेल्याबरोबर इंद्रियेंहि प्राणाबरोबर निघून जातात, त्याप्रमाणे मन व बुद्धि जेथे जडतात तेथेच अहंकारहि राहतो॥ १०१॥

गूढार्थदीपिका—'मी' म्हणून स्फुरणाऱ्या चैतन्याचे देहाशीं जें ऐक्य झालें आहे, तें अहंकारानेच झालें आहे; म्हणून अहंकार हा दोन वस्तूंचे ऐक्य करणारा आहे. मन व बुद्धि ज्या वस्तूचे ठिकाणी लागतात त्या वस्तूशींच अहंकाराने ऐक्य होतें, असा सर्व जीवांचा अनुभव आहे.

मन व बुद्धि परमेश्वराचे ठिकाणी स्थिर झाल्याबरोबर त्यांच्यापाशीच अहंकार येतो-म्हणजे देहाशीं झालेल्या ऐक्याचा अहंकार सुटून परमेश्वराशीं झालेल्या ऐक्याचा अहंकार स्फुरूं लागतो.

म्हणोनि माझिया स्वरूपीं। मनबुद्धि इयें निक्षेपीं। येतुलेनि सर्वव्यापी। मीचि होसी॥ १०२॥

अर्थ—म्हणून माझ्या स्वरूपाचे ठिकाणी (अर्जुना!) आपली मनबुद्धि लाव म्हणजे एवढ्यानेच सर्वव्यापी असा जो मी तोच तूं होशील॥ १०२॥

गूढार्थदीपिका—ही अनुभवाची प्रक्रियाच, भगवंतांनी अर्जुनाला आपल्या स्वरूपाशीं ऐक्य करण्याकरितां सांगितली आहे.

यया बोला कांहीं। अनारिसें नाहीं। आपली आण पाहीं। वाहतु असे गा॥ १०३॥

अर्थ—हें माझें बोलणें यत्किंचितहि अन्यथा नाही, हें मी आपली शपथ वाहून सांगतों॥ १०३॥

गूढार्थदीपिका—भगवान अर्जुनाशीं मित्रत्वाच्या नात्यांनी बोलत असल्यामुळे आपलें बोलणें, अर्जुनाने या कानाने ऐकून त्या कानाने सोडूं नये व आपल्या बोलण्यावर अर्जुनाचा अविश्वास होऊं नये, म्हणून भगवान येथे आपली शपथ वाहत आहेत.

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम्। अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनञ्जय॥ ९॥

अर्थ—अर्जुना! जर कदाचित् माझे ठिकाणी तूं आपलें चित्त (एकदम) स्थिर ठेवूं शकत नसलास, तर वारंवार चित्त स्थिर करण्याच्या अभ्यासाचे द्वारा मला प्राप्त करून घेण्याची इच्छा कर॥ ९॥

अथवा हें चित्त। मनबुद्धीसहित। माझ्या हातीं अचुंबित। न शकसी देवों॥ १०४॥
तरि गा ऐसें करीं। यया आठां पाहारांमाझारीं। मोटकें निमिषभरी। देतु जाय॥ १०५॥
मग जें जें कां निमिख। देखेल माझें सुख। तेतुलें अरोचक। विषयीं घेईल॥ १०६॥
जैसें शरत्कालु रिगे। आणि सरिता वोहटूं लागे। तैसें चित्त काढेल वेगें। प्रपंचौनि॥ १०७॥
मग पुनवेहूनि जैसें। शशिबिंब दिसें दिसें। हारपत अंवसे। नाहींचि होय॥ १०८॥
तैसें भोगाआंतूनि निगतां। चित्त मजमाजीं रिगतां। हळू हळू पांडुसुता। मीचि होसील॥ १०९॥
अगा अभ्यासयोगु म्हणिजे। तो हा एकु जाणिजे। येणें कांहीं न निपजे। ऐसें नाहीं॥ ११०॥

अर्थ—किंवा मनबुद्धिसहित हें चित्त जर एकदम माझ्या स्वाधीन करूं शकत नसलास॥ १०४॥ तर, हे अर्जुना! असें कर की, या चोवीस तासांमध्ये घटकाभर थोडेसें माझ्याकडे चित्त लावण्याचा प्रयत्न करीत जा॥ १०५॥ मग असा प्रयत्न करीत असतां, माझें सुख अनुभविण्यांत जसा जसा क्षण जाईल तसा तसा चित्ताला विषयसुखाचा कंटाळा येत जाईल॥ १०६॥ ज्याप्रमाणे शरदृतूला प्रारंभ झाला असतां नद्यांचे पाणी ओसरूं लागते, त्याप्रमाणे विषयसुखाचा वीट येतां येतां, तुझें चित्त विषयसुखांतून वेगाने निघेल॥ १०७॥ मग ज्याप्रमाणे चंद्रबिंब, पौर्णिमेपासून दिवसेंदिवस कमी होत होत अमावस्येला नाहीसें होतें॥ १०८॥ त्याप्रमाणे चित्त विषयसुखाच्या वासनेंतून क्रमाने निघून, माझ्याठिकाणी प्रविष्ट होऊं लागलें असतां अर्जुना! तूं हळूहळू मीच होशील॥ १०९॥ बा अर्जुना! ज्याला अभ्यासयोग म्हणतात, तो हाच होय, असें जाण. या अभ्यासयोगानें प्राप्त होत नाही असे कांहीहि नाहीं॥ ११०॥

गूढार्थदीपिका—दुसऱ्याची मुलगी, विवाहाने घरीं आल्यावर अभ्यासाने तिच्या ठिकाणीं प्रेम उत्पन्न होतें

आणि दत्तक मुलाचेहि अभ्यासाने स्वपुत्रवत् प्रेम जडतें. जीवाचा असा अनुभव असल्यामुळे त्या अनुभवानुसारच येथे परमेश्वर प्राप्तीकरितां अभ्यासाची प्रक्रिया सांगितली आहे.

पैं अभ्यासाचेनि बळें। एकां गति अंतराळें। व्याघ्र सर्प प्रांजळे। केले एकीं॥ १११॥
विष कीं आहारीं पडे। समुद्रीं पायवाट जोडे। एकी वाग्ब्रह्म थोकडें। अभ्यासें केलें॥ ११२॥
म्हणोनि अभ्यासासि कांहीं। सर्वथा दुष्कर नाहीं। यालागीं माझां ठायीं। अभ्यासें मिळ॥ ११३॥

अर्थ—कारण अभ्यासाच्या बळाने कोणी आकाशगामी झाले. कोणी व्याघ्र, सर्प अशा दुष्ट प्राण्यांना सुस्वभावी केले॥ १११॥ अभ्यासाने विषहि आहार होऊं शकतें, समुद्रावरूनहि पायवाटाप्रमाणें चालतां येते. कोणी अभ्यासाच्या बळाने संपूर्ण वेदादिशास्त्रें मुखोद्गत केलीं॥ ११२॥ याप्रमाणे अभ्यासाला कांहीहि एक असाध्य नाही; म्हणून अभ्यासांने माझी प्राप्ति होऊं शकते॥ ११३॥

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव। मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि॥ १०॥

अर्थ—(अर्जुना!) असा अभ्यासयोग करण्यास तूं समर्थ नसशील, तर केवळ एका माझ्या प्राप्तीच्या उद्देशानेच कर्म करणारा हो. केवळ माझ्या प्राप्तीच्या उद्देशानेहि कर्में करून तुला ऐक्यरूप सिद्धि प्राप्त होईल॥ १०॥

कां अभ्यासाही लागीं। कसु नाहीं तुझां आंगीं। तरी आहासी जया भंगीं। तैसाचि अस॥ ११४॥

अर्थ—किंवा हा अभ्यास करण्याचेंहि तुझ्या आंगीं सामर्थ्य नसेल तर तुझी क्षात्र-प्रकृति या गुणभागाची बनली असेल तशा प्रकृतींतच तूं राहा॥ ११४॥

गूढार्थदीपिका—पूर्वकर्मानुसार ज्या गुणाची प्रकृती बनली असेल ती बदलविण्याची आवश्यकता नाही त्या प्रकृतीनुसार विहित असलेलीं कर्में होत असतांना, परमेश्वर प्राप्ति कशी करून घेतां येते, ही प्रक्रिया येथे माउलींनी सांगितली आहे.

इंद्रियें न कोंडीं। भोगातें न तोडीं। अभिमानु न संडीं। स्वजातीचा॥ ११५॥
कुळधर्मु चाळीं। विधिनिषेध पाळीं। मग सुखें तुज सरळी। दिधली आहे॥ ११६॥
परि मनें वाचा देहें। जैसा जो व्यापारु होये। तो मी करीतु आहें। ऐसें न म्हणें॥ ११७॥

अर्थ—इंद्रियांचा निग्रह करूं नकोस, विषयभोगाचा त्यागहि करूं नकोस व आपल्या जातीचाहि अभिमान सोडूं नकोस॥ ११५॥ कुलपरंपरागत धर्माचे आचरण कर. अमुक कर व अमुक करूं नकोस, असे जे शास्त्रांनी तुला सांगितले असेल, त्या विधिनिषेधांचे पालन कर. याप्रमाणे तुला वागण्याची सुखाने मोकळीक दिली आहे॥ ११६॥ पण मन-वाचा-शरीर यांच्याकडून जसा व जो व्यापार होईल, तो मी करीत आहे, असे मात्र म्हणू नकोस-म्हणजे असे तुझ्या चित्तांत उठतां कामा नये॥ ११७॥

गूढार्थदीपिका—मन, वाणी, देह यांच्याकडून होणारा व्यापार किंवा कर्म व त्यांचे कर्तृत्व हे सर्व प्रकृतीचे कार्य आहे व प्रकृतींतच त्या सर्वांचा अंतर्भाव होतो आणि प्रकृतीचा नियंता परमेश्वर आहे; म्हणून कर्माचे कर्तृत्व जीवाकडे येत नाही, असे वेदान्तशास्त्राने व सर्व संतांनी मानिले आहे. पण 'मी कर्म करतो' असा कर्तृत्वाचा अहंकार, जीव व्यर्थच धारण करतो व संसारदुःखांत पडतो. म्हणूनच माउलींनी येथे कर्माचे कर्तृत्व आपल्यावर ओढवून घेऊ नये, असे सांगितले आहे.

करणें कां न करणें। हें आघवें तोचि जाणे। विश्व चळतसे जेणें। परमात्मेनि॥ ११८॥

अर्थ—अद्वैत व पूर्ण सच्चिदानंदस्वरूप परमात्म्यावरच कर्म स्फुरत असल्यामुळे, उत्पन्न होणाऱ्या कर्माच्या पूर्वी, कर्मांत व कर्माचे शेवटीं तोच असतो. त्याच्याच योगाने विश्वांतील सर्व घडामोडी होतात; म्हणून कर्म करणे किंवा न करणे हे त्यालाच माहित (असे समजावे)॥ ११८॥

गूढार्थदीपिका—परमेश्वर नित्य ज्ञानसंपन्न असल्यामुळे त्याचे ठिकाणी कर्तृत्व मुळींच नाही. पण जीव कर्तृत्वभोक्तृत्व उपाधींतून मुक्त होऊन परमेश्वरस्वरूप व्हावा म्हणून, परमेश्वराच्या सान्निध्याने सृष्टींतील सर्व

घडामोडीरूप कर्म होतें-म्हणजे परमेश्वरच सर्व कर्मांचा कर्ता आहे-असे जीवाने मानावें, असें येथे सांगितलें आहे.

उपनिषदांतूनहि हीच प्रक्रिया, ''एष एव साधुकर्म कारयति'' हा परमात्माच पूर्वकर्मानुसार जीवाकडून बरे-वाईट कर्मे करवितो, या पंक्तीने सांगितली असून आचार्यांनीहि त्या पंक्तीवर भाष्य करतांना ''सर्वास्वेव प्रवृत्तिष्वीश्वरो हेतुकर्तेति श्रुतेः अवसीयते'' (ब्र. सू. भा. २-३-४१) जीवाच्या सर्व प्रकृतीच्या ठिकाणी ईश्वरच निमित्तकारण आहे असें श्रुतिवरून दिसतें, असे म्हटले आहे. जीव ज्यांचा ज्याचा अभिमान धारण करतो तें तें त्याला चिकटतें व ज्याचा ज्याचा अभिमान धारण करीत नाही तें तें परमेश्वराला समर्पण होतें असा वेदान्ताचा सिद्धान्त आहे. त्या सिद्धान्तानुसारच जीवाने कर्तृत्वाचा अभिमान सोडला असतां कर्म बाधक-म्हणजे संसारदायक-होत नाही.

उणयापुरेयाचें कांहीं। उरों नेदीं आपुलां ठायीं। स्वजातीचि करूनि घेईं। जीवत्व हे॥ ११९॥

अर्थ—हें कर्म उणें झालें की पुरें झालें असे कांही एक मनांत राहू देऊं नकोस. आपलें जीवत्व-म्हणजे जीवन सजात-म्हणजे केवळ कर्माच्या जातीचे किंवा केवळ कर्मरूपच-करून घे॥ ११९॥

माळियें जेउतें नेलें। तेउतें निवांतचि गेलें। तया पाणिया ऐसें केलें। होआवें गा॥ १२०॥

अर्थ—जसें पाणी, माळी जिकडे नेतो तिकडे तें शांतपणें जातें, त्या पाण्याप्रमाणे तूं आपलें कर्म होऊं दे॥ १२०॥

गूढार्थदीपिका—या उदाहरणाने माऊलींनी आपला जीवभाव कसा सजात करायचा हें सांगितलें आहे.

म्हणोनि प्रवृत्ति आणि निवृत्ती। इयें वोझीं नेघें मती। अखंड चित्तवृत्ती। माझ्या ठायीं॥ १२१॥

अर्थ—म्हणून मी कर्म करतो आणि मी कर्म करीत नाही, असे दोन्ही प्रवृत्ति-निवृत्तिरूप कर्माचें ओझें बुद्धींत वागवूं नकोस, म्हणजे कल्पनारहित झालेली चित्तवृत्ति माझे ठिकाणीच अखंड राहील॥ १२१॥

गूढार्थदीपिका—निरनिराळ्या कल्पनेमुळेच जीवाचें जीवत्व आहे. परमात्मा कल्पनारहित आहे; म्हणून प्रारब्धानुसार होणारीं कर्मे जशी होतील तशीं होऊं देऊन, जीवाने उणें-पुरें इत्यादि कोणतीहि कल्पना केली नाही, तर जीवाचें कल्पनारूप जीवपण नाहीसे होऊन तो कल्पनारहित होतो-म्हणजे परमेश्वरस्वरूप होतो-असा भाव.

''आतां ब्रह्मज्ञानाची किल्ली। सांगेन एक्याची बोलीं। जयांची कल्पना निमाली। ते प्राप्तपुरुष''॥ ४२१॥ (स्वात्मसुख) असें श्रीएकनाथ महाराजांनीहि स्वात्मसुखांत म्हटलें आहे.

एऱ्हवीं तरी सुभटा। उजू कां अव्हांटा। रथु काई खटपटा। करितु असे॥ १२२॥

आणि जें जें कर्म निपजे। तें थोडें बहु न म्हणिजे। निवांतचि अर्पिजे। माझ्या ठायीं॥ १२३॥

अर्थ—हे उत्तम योद्ध्या अर्जुना! रथ आपण होऊन सरळ मार्गाने किंवा आडमार्गांने जाण्याची खटपट करतो काय?॥ १२२॥ आणि जें जें कर्म होत जाईल, तें थोडें झालें किंवा बहु झालें असें न म्हणतां, स्वस्थ चित्ताने माझे ठिकाणी अर्पण करावें॥ १२३॥

ऐसिया मद्भावना। तनुत्यागीं अर्जुना। तूं सायुज्यसदना। माझिया येसी॥ १२४॥

अर्थ—हे अर्जुना! याप्रमाणे माझी भावना करून कर्म करीत राहिलें असतां, देहपातानंतर तूं माझ्या ऐक्यरूपी मंदिरांत प्राप्त होशील॥ १२४॥

गूढार्थदीपिका—अशा रीतीने कर्तृत्व सोडून कर्म केलें असतां भोक्तृत्वहि नाहीसे होऊन जीव कर्तृत्व-भोक्तृत्वरहित असा ब्रह्मस्वरूप होतो.

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः। सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान्॥ ११॥

अर्थ—'मत्प्रीत्यर्थ कर्म करणें' या योगाचा आश्रय करून तूं कर्म करण्यास समर्थ नसलास, तर मनाचा निग्रह करून सर्व कर्मांच्या फळांचा त्याग कर॥ ११॥

ना तरी हेंही तुज। नेदवे कर्म मज। तरी गा तूं भज। पांडुकुमरा॥ १२५॥

बुद्धीचिये पाठीं पोटीं। कर्माआदि कां शेवटीं। मातें बांधणें किरीटी। दुवाड जरी॥ १२६॥

अर्थ—अथवा पांडुकुमारा अर्जुना! जर आपल्या कर्मकर्तृत्वाचा अहंकार सोडून तुझ्याच्याने संपूर्ण कर्म मला अर्पण करवत नसेल, तर तूं अशा रीतीने मला भज॥ १२५॥ बुद्धीच्या आंत-बाहेर व कर्माच्या आदि किंवा अंतीं, मला बांधून ठेवणें, अर्जुना! तुला कठीण वाटत असेल॥ १२६॥

गूढार्थदीपिका—बुद्धीचिये पाठीं पोटीं। मातें बांधणें—ज्याप्रमाणें पाण्यावर उठणाऱ्या लाटांच्या आंतबाहेर पाणीच असतें, त्याप्रमाणे व्यापक परमेश्वरावर स्फुरणाऱ्या बुद्धीच्या आंत-बाहेर एक परमेश्वरचैतन्यच भरलें आहे आणि म्हणूनच कर्माच्या आदि व शेवटीं तोच असल्यामुळे तोच कर्ता होऊं शकतो, असें समजणें, हेच बुद्धीच्या पाठीं-पोटीं व कर्माचें शेवटीं परमेश्वराला बांधणे होय. हीच प्रक्रिया वरील श्लोकांत सांगितली आहे.

तरि हेंही असो। सांडीं माझा अतिसो। परि संयतिसीं वसो। बुद्धि तुझी॥ १२७॥

अर्थ—पण ही परमेश्वराला कर्तृत्व समर्पण करण्याची प्रक्रिया राहूं दे. कर्माच्या आदि-अंतीं माझी आठवण ठेवण्याचा ध्यासहि सोड पण आपल्या बुद्धीने इंद्रियांचा व मनाचा निग्रह करून राहा-म्हणजे इंद्रियें व मन यांना स्वैर सोडून, त्यांच्या स्वाधीन बुद्धीला होऊं देऊं नकोस॥ १२७॥

गूढार्थदीपिका—परी संयतीसी वसो। बुद्धि तुझी—येथें प्रक्रिया सांगण्यापूर्वी बुद्धीने, मन व इंद्रियें यांचा निग्रह करण्यास सांगितलें आहे. याचें कारण असें आहे कीं, बुद्धि, विषय व विषयसुखाला सत्य समजते, म्हणूनच मन व इंद्रियें विषयसुखाचे ठिकाणीं आसक्त असतात. कर्मफलाची आसक्ति सोडण्याकरितां, त्यापूर्वी, बुद्धीने आत्मानात्मविवेकसंपन्न होऊन आणि विषय व विषयसुखाला मिथ्या समजून, मन व इंद्रियें यांच्या स्वाधीन न होतां, भगवत्स्वरूपाचे ठिकाणी स्थिर राहून, त्यांचा निग्रह करायला पाहिजे, असें "संयतीसी वसो बुद्धी तुझी" या चरणाने सांगितलें आहे.

अवतरणिका—वरील ओव्यांतून कर्तृत्व सोडल्याने भोक्तृत्वहि सुटून जीव ब्रह्मस्वरूप होतो, ही प्रक्रिया सांगितली, आतां पुढील ओव्यांतून माउली भोक्तृत्व सोडण्याची प्रक्रिया सांगत आहे. भोक्तृत्व-अहंकार सुटल्याने कर्तृत्व-अहंकार नाहीसा होतो व जीव ब्रह्मस्वरूप होतो; अशी ही प्रक्रिया आहे.

आणि जेणें जेणें वेळें। घडती कर्में सकळें। तयांचीं तियें फळें। त्यजितु जाय॥ १२८॥

अर्थ—आणि ज्या ज्या वेळीं जें जें कर्म घडेल, त्याचें मिळणारें फळ टाकीत जा. -म्हणजे त्याचें फळ मिळण्याची मुळींच इच्छा करूं नकोस॥ १२८॥

गूढार्थदीपिका—या ओवींत सांगितलेल्या प्रक्रियेंत, नुसतें कर्मफळाचें भोक्तृत्व सोडायला सांगितलें आहे-म्हणजें कर्म करतांना "या कर्माचें सुखफळ मला मिळो" या इच्छेने कर्म करूं नये असें सांगितलें आहे.

वृक्ष कां वेली। लोटती फळें आलीं। तैसीं सांडीं निपजलीं। कर्में सिद्धें॥ १२९॥

अर्थ—ज्याप्रमाणे वृक्ष किंवा वेल, आलेल्या फळांचा उपयोग न करतां तशीच राहूं देऊन अखेर गळूं देतात, त्याप्रमाणे झालेलीं कर्में फलाशा न धरतां टाकून दे॥ १२९॥

गूढार्थदीपिका—कर्माच्या फळाची इच्छा धरून मनुष्य कर्म करतो; म्हणून कर्माचें कर्तृत्वाचा अहंकार त्याचे ठिकाणी स्फुरतो. कर्माच्या फळाची इच्छा नाहीशी झाली, की कर्तृत्वाचा अहंकार क्षीण होत जातो व शेवटी नाहीसा होतो. अशा रीतीने कर्माचा संबंध सुटून, जीव कर्तृत्वभोक्तृत्वरहित होऊन परमेश्वरस्वरूप होतो.

परि मातें मनीं धरावें। कां मज उद्देशें करावें। हें कांहीं नको आघवें। जाऊं दे शून्यीं॥ १३०॥

अर्थ—कर्म करतांना माझें ध्यान ठेऊन किंवा माझ्या प्राप्तीच्या उद्देशाने कर्म केलें पाहिजे असे कांही एक मनांत वागवूं नकोस. हीं कर्में शून्यांत जाऊं दे-म्हणजे निरालंब कर्में कर॥ १३०॥

गूढार्थदीपिका—कर्माच्या फळाची इच्छा धरून केलेल्या काम्यकर्मात, आपल्या सुखाचीच इच्छा असल्यामुळे आपणच तेथें आलंबन होतो व निष्काम कर्मात, भगवत्प्रीत्यर्थ कर्म केलें जात असल्यामुळे तेथें भगवान आलंबन असतो. हीं दोन्हीं आलंबन सोडून केलेलें कर्म कांहीच फळ देऊं शकत नाही. अशा रीतीने कर्म कर्तृत्व, भोक्तृत्व

यांचा संबंध सुटून जीव अनायासें ईश्वरस्वरूप होतो.

खडकीं जैसें वर्षलें। कां आगीमाजीं पेरिलें। कर्म मानीं देखिलें। स्वप्न जैसें॥ १३१॥

अर्थ—होणारें कर्म हें खडकावर झालेल्या वर्षावाप्रमाणे किंवा अग्नींत पेरलेल्या बीजाप्रमाणे अथवा स्वप्न पाहिल्याप्रमाणे समज॥ १३१॥

गूढार्थदीपिका—जोपर्यंत बुद्धि, विषयादिकांना सत्य समजते, तोपर्यंत विषयसुखाची इच्छा, कर्म, कर्तृत्व, भोकृत्व यांचा संबंध नाहीसा होणें शक्य नाही. म्हणूनच कर्मादिकांना येथे स्वप्नाप्रमाणे काल्पनिक मानण्यास सांगितलें आहे.

अगा आत्मजेच्या विषीं। जीवु जैसा निरभिलाषी। तैसा कर्मी अशेषीं। निष्कामु होईं॥ १३२॥
वन्हीची ज्वाळा जैसी। वायां जाय आकाशीं। क्रिया जिरों दे तैसी। शून्यामाजीं॥ १३३॥
अर्जुना हा फलत्यागु। आवडे कीर असलगु। परि योगामाजीं योगु। धुरेचा हा॥ १३४॥

अर्थ—बा अर्जुना! मनुष्य जसा आपल्या कन्येच्या ठिकाणीं यत्किंचितहि कामाभिलाष ठेवित नसतो, त्याप्रमाणे संपूर्ण कर्माचे ठिकाणीं तूं फलेच्छारहित हो॥ १३२॥ ज्याप्रमाणे अग्नीची ज्वाळा व्यर्थच आकाशांत जाते, त्याप्रमाणे तूझी संपूर्ण क्रिया शून्यांत जाऊं दे. किंवा निरालंब होऊं दे॥ १३३॥ अर्जुना! हा फलत्याग अत्यंत सोपा दिसतो खरा, पण सर्व योगांमध्ये हा अग्रसर योग आहे॥ १३४॥

गूढार्थदीपिका—योगांमाजी योग। धुरेचा हा—अल्पसायासाचे व सर्व रोगनिवारक असें सुलभ व स्वस्त औषध असले तरी तें जसें सर्वांपेक्षां श्रेष्ठ असतें, तसाच फलत्याग खरोखर सोपा दिसत असला, तरी पूर्ण परमेश्वररूप प्राप्ति करून देणारा आहे, हें माउलींनी "धुरेचा योग" या पदाने सुचविलें आहे.

येणें फलत्यागें सांडें। तें तें कर्म न विरूढे। एकचि वेळे वेळुझाडें। वांझें जैसीं॥ १३५॥
तैसें येणेंचि शरीरें। शरीरा येणें सरे। किंबहुना येरझारे। चिरा पडे॥ १३६॥

अर्थ—ज्याप्रमाणे वेळूचीं झाडें एकदांच फळून वांझ होतात, त्याप्रमाणे या फलत्यागाने ज्या ज्या कर्माचा आपला संबंध सुटतो, तें तें कर्म पुढे फलद्रूप होत नाही॥ १३५॥ त्याचप्रमाणे या प्राप्त शरीराबरोबर पुन: शरीराला येणें नाहीसे होतें. किंबहुना जन्ममरणरूपी फेऱ्याच बंद पडतात॥ १३६॥

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते। ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम्॥ १२॥

अर्थ—अभ्यासापासून लाभदायक अशी आत्मज्ञानाची प्राप्ति होते. आत्मज्ञानापासून विशेष अशी ध्यानाची प्राप्ति होते. ध्यानाने कर्मफलत्याग होऊन, कर्मफलत्यागानंतर शांति प्राप्त होते॥ १२॥

पैं अभ्यासाचिया पाउटीं। ठाकिजे ज्ञान किरीटी। ज्ञानें येइजे भेटी। ध्यानाचिये॥ १३७॥

अर्थ—अर्जुना! अभ्यासाच्या पायरीने आत्मज्ञान प्राप्त करून, पुढे आत्मज्ञानाच्या द्वारा ध्यानाच्या भूमिकेची भेट घ्यावी॥ १३७॥

गूढार्थदीपिका—अभ्यासाचिये पाउटी—म्हणजे मन, इंद्रियें यांचा निरोध करून कर्मफलत्याग करण्याचा जो अभ्यास, त्या अभ्यासाच्या पायरीने.

अभ्यासाने आत्मज्ञान प्राप्त होऊन, त्या ज्ञानाचें, भगवंताचे ध्यानांत पर्यवसान होते. असें झालें तरच अभ्यास व ज्ञान यांचे सार्थक झालें असें समजावें, असा भाव.

मग ध्यानासि खेंव। देती आघवेचि भाव। तेव्हां कर्मजात सर्व। दूरी ठाके॥ १३८॥

अर्थ—याप्रमाणे भगवंताचें ध्यान चित्तांत दृढ झालें असतां, चित्ताचे व इंद्रियांचे सर्व व्यापार सहजच ध्यानांत असलेल्या भगवंताला समर्पण होतात आणि जीवाचा संपूर्ण कर्मांशीं संबंध सुटतो॥ १३८॥

गूढार्थदीपिका—जसें सर्व अज्ञानी जीवांचे "मी देह" म्हणून देहाशीं ऐक्य झालें असल्यामुळे त्यांच्या अंत:करणांत देहाचेंच ध्यान असतें व त्यांच्या मन, इंद्रियें इत्यादिकांचा सर्व व्यापार देहाप्रीत्यर्थ होतो; म्हणूनच ते

कर्माने बांधले जातात, तसेंच अभ्यासाने भगवंताचे ज्ञान व ज्ञानाने त्यांचें अंत:करणांत ध्यान दृढ झालें असतां, सर्व व्यापार भगवंताप्रीत्यर्थच होत जाऊन "कृष्णी ज्याचें निश्चळ मन। त्याचें कर्म तितुकें कृष्णार्पण। त्यासीं न अर्पिताहि जाण। सहजें मदर्पण होतसे" (ए. भा. १०-६६) या नाथांच्या वचनाप्रमाणे, अनायासें जीवाचा कर्माशीं संबंध सुटतो. अर्थ—याप्रमाणे भगवंताचें ध्यान चित्तांत दृढ झालें असतां, चित्ताचे व इंद्रियांचे सर्व व्यापार सहजच ध्यानांत असलेल्या भगवंताला समर्पण होतात आणि जीवाचा संपूर्ण कर्मांशीं संबंध सुटतो॥ १३८॥

गूढार्थदीपिका—जसें सर्व अज्ञानी जीवांचे "मी देह" म्हणून देहाशीं ऐक्य झालें असल्यामुळे त्यांच्या अंत:करणांत देहाचेंच ध्यान असतें व त्यांच्या मन, इंद्रियें इत्यादिकांचा सर्व व्यापार देहाप्रीत्यर्थ होतो; म्हणूनच ते कर्माने बांधले जातात, तसेंच अभ्यासाने भगवंताचे ज्ञान व ज्ञानाने त्यांचें अंत:करणांत ध्यान दृढ झालें असतां, सर्व व्यापार भगवंताप्रीत्यर्थच होत जाऊन "कृष्णी ज्याचें निश्चळ मन। त्याचें कर्म तितुकें कृष्णार्पण। त्यासीं न अर्पिताहि जाण। सहजें मदर्पण होतसे" (ए. भा. १०-६६) या नाथांच्या वचनाप्रमाणे, अनायासें जीवाचा कर्मांशीं संबंध सुटतो.

कर्म जेथ दुरावे। तेथ फलत्यागु संभवे। त्यागास्तव आंगवे। शांति सगळी॥ १३९॥

अर्थ—कर्माचा नि:शेष संबंध सुटला असतांच कर्मफळ भोगण्याचा प्रसंग येत नाही, म्हणून कर्मफलत्याग होतो. अशा कर्मरूपत्यागानेच चित्त पूर्ण शांत होते॥ १३९॥

गूढार्थदीपिका—येथे शांति म्हणजें चित्ताची निर्वासन स्थिति होऊन तें ब्रह्मज्ञानांत निमग्न होणें.

म्हणोनि यावया शांति। हाचि क्रम सुभद्रापती। अभ्यासचि प्रस्तुतीं। करणें एथ॥ १४०॥

अर्थ—म्हणून चित्ताला अशी निर्वासन स्थिति प्राप्त होण्याकरितां, हे अर्जुना! आतां सांगितलेला हाच क्रम इष्ट असून, येथे प्रथम अभ्यासच केला पाहिजे॥ १४०॥

अभ्यासाहूनि गहन। पार्था मग ज्ञान। ज्ञानापासोनि ध्यान। विशेषिजे॥ १४१॥
मग कर्मफलत्यागु। तो ध्यानापासोनि चांगु। त्यागाहूनि भोगु। शांतिसुखाचा॥ १४२॥
ऐसिया यया वाटा। इहींचि पेणा सुभटा। शांतीचा माजिवटा। ठाकिला जेणें॥ १४३॥

अर्थ—हे अर्जुना! अभ्यासापासूनच दुर्गम असें आत्मज्ञान प्राप्त होते. मग त्या ज्ञानापासून विशेष अशा ध्यानाची प्राप्ति होते॥ १४१॥ त्या ध्यानापासून उत्तम असा कर्मफलत्याग प्राप्त होऊन, त्या त्यागापासून परमेश्वराच्या शांतिसुखाचा किंवा निर्वासन अशा ब्रह्मसुखाचा लाभ होतो॥ १४२॥ हे उत्तम योद्ध्या अर्जुना! अशा या ब्रह्मसुखाच्या प्राप्तीच्या निरनिराळ्या प्रक्रियामार्गांने व याच टप्प्याटप्प्याने जाऊन, ज्याने निर्वासन अशी पूर्णब्रह्मस्थिति प्राप्त करून घेतली॥ १४३॥

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च। निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी॥ १३॥
सन्तुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः। मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः॥ १४॥

अर्थ—जो कोणत्याहि प्राण्यांचा द्वेष न करणारा व हितकर्ता आहे, जो सर्व प्राण्यांवर दया करणारा आहे, जो 'मी व माझे' असा अहंकार वागवित नाही, जो दु:ख व सुख समान समजतो, तसेंच जो लोकांचे सर्व अपराध सहन करतो॥ १३॥ आत्मस्वरूपाविषयीं दृढ निश्चय व इंद्रिय-मनोनिग्रह करून जो ज्ञानयोगी अखंड संतुष्ट झाला आहे आणि माझें सगुणस्वरूपाचे ठिकाणीं आपली मनबुद्धि अखंड स्थापन करून जो माझा भक्त झाला आहे, तोच मला प्रिय आहे.॥ १४॥

जो सर्व भूतांच्या ठायीं। द्वेषातें नेणेंचि कहीं। आप पर नाहीं। चैतन्या जैसा॥ १४४॥

अर्थ—ज्याप्रमाणे सर्वव्यापी चैतन्याला आप-पर भाव मुळींच नाही, त्याप्रमाणे अद्वैतचैतन्यस्वरूप झाल्यामुळे ज्याला आप-पर भासतच नाही, म्हणून जो कोणत्याहि प्राण्याचे ठिकाणी द्वेष करीत नाही॥ १४४॥

गूढार्थदीपिका—आपला-परका, लहान-मोठा, उत्तम-अधम इत्यादि सर्व भिन्न भिन्न भासणाऱ्या भावाला

भेदभाव किंवा विशेषभाव म्हणतात. भेदभाव जेथे राहत नाही त्याला सामान्यभाव म्हणतात. विशेषभाव मर्यादित असतो किंवा मर्यादित तितका विशेषभाव म्हटला जातो आणि सामान्यभाव हा व्यापक असतो. पण सामान्यभावावरच विशेषभाव भासत असल्यामुळे सामान्यभावाचा विशेषभावाशीं विरोध नसतो.

चैतन्य हें अणुरेणुपासून सर्वव्यापक असल्यामुळे तें अत्यंत सामान्यस्वरूप आहे व त्यावरच सर्व जगद्रूपी विशेषभाव भासतात. साधु पुरुष, आत्मज्ञानाने अत्यंत सामान्यभावरूप अशा चैतन्य स्वरूपाशीं ऐक्य पावतात व सर्वत्र मीच आहे अशी त्यांची अद्वैतबुद्धि होत असते, म्हणूनच येथून वर्णन केलेलें अद्वेष्टृत्वादि संपूर्ण सद्गुण त्यांचे ठिकाणीं सहजच असतात.

उत्तमातें धरिजे। अधम तरि अव्हेरिजे। हें कांहींचि नेणिजे। वसुधा जेवीं॥ १४५॥
कां रायाचें देह चाळूं। रंका परौतें गाळूं। हें न म्हणेचि कृपाळू। प्राणु पैं गा॥ १४६॥
गाईची तृषा हरूं। कां व्याघ्रा विष होऊनि मारूं। ऐसें नेणेचि कां करूं। तोय जैसें॥ १४७॥
तैसी आघवांचि भूतमात्रीं। एकपणें जया मैत्री। कृपेसी धात्री। आपण जो॥ १४८॥

अर्थ—उत्तम वस्तूंना धारण करावे व सर्व वाईट वस्तूंना दूर लोटावे असा भेदभाव करण्याचे, ज्याप्रमाणे पृथ्वी मनांत आणीत नाही॥ १४५॥ किंवा, बा अर्जुना! राजाच्या देहाचें चलनवलन करीन आणि दरिद्र्याचा देह टाकून देईन, असे सर्वांवर दया करणारा प्राण कधी म्हणत नाही॥ १४६॥ किंवा फक्त गाईचीच तहान भागवीन, पण व्याघ्राचा मात्र विष होऊन प्राण घेईन, असे पाणी कधी करूं इच्छित नाही॥ १४७॥ त्याप्रमाणे सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी एकपणें-म्हणजे प्राणिमात्रांचे ठिकाणी मीच एक आहे या अद्वैत-जाणीवेने जो सर्वांशीं मैत्री करतो-म्हणजे सर्वांच्या हिताची इच्छा ठेवतो-व सर्व प्राणिमात्रावर केल्या जाणाऱ्या कृपेची आपणच जो जन्मदात्री आई होतो॥ १४८॥

गूढार्थदीपिका—कृपेसी धात्री। आपण जो—येथे साधुपुरुषाची भूतमात्राचे ठिकाणी मैत्री असते व तो कृपेची धात्री असतो, असें जें म्हटलें आहे त्याचा, "साधुपुरुष भूतमात्राचें भौतिक सुख साधून देतो", असा अर्थ करतां येत नाही; कारण सर्व भूतमात्राचें भौतिकसुख भिन्न भिन्न व त्यांच्या कर्माधीनहि असल्यामुळे भूतमात्रांचें हें भौतिक सुख साधणें शक्य नसतें व भौतिक सुखांत दुःखाचा मोठा वांटा असल्यामुळे अशा भौतिक सुखाची जीवाला प्राप्ति करून देऊन, त्यांना त्या सुखांत अधिक गुंतवून, चिरकाल दुःखांत पाडावें, असे सत्पुरुषांना, ते दयाळू असल्यामुळे कधी वाटत नाही, हें "म्हणोनियां तुका येतो काकुळती। पुरे यातायाती गर्भवास" इत्यादि संतांच्या वचनावरून सिद्ध आहे. अर्थात् त्यांची सर्व भूतांशीं मैत्री व सर्व भूतांवर कृपा, एक-अखंड सुखरूप अशा परमेश्वराची प्राप्ति करून देण्याकरितांच असते.

आणि मी तूं हे भाष नेणे। माझें कांहींचि न म्हणे। सुखदुःख जाणणें। नाहीं जया॥ १४९॥

अर्थ—आणि हा देह म्हणजे मी, असा देहाहंकार ज्यांना कधी उठत नाही, म्हणून माझे कांही आहे अशी ज्यांच्या चित्तांत आसक्ति नसते व ज्यांना सुखदुःखांचा भोगहि होत नाही॥ १४९॥

गूढार्थदीपिका-सुखदुःख जाणणें—म्हणजे सुखदुःखाचा भोग होणें होय. किंवा सुखदुःखाचा भोग होणें म्हणजें सुखदुःख जाणणेंच होय.

तेवींचि क्षमेलागीं। पृथ्वीसि पवाडु आंगीं। संतोषा उत्संगीं। दिधलें घर॥ १५०॥

अर्थ—त्याचप्रमाणें क्षमेच्या दृष्टीने ज्याच्या आंगीं पृथ्वीचाच विस्तार झाला आहे आणि ज्याने आपल्या ओसंगींच संतोषाला राहण्याला नेहमीं जागा दिली॥ १५०॥

वार्षियेवीण सागरु। जैसा जळें निर्भरु। तैसा निरुपचारु। संतोषी जो॥ १५१॥
वाहूनि आपुली आण। धरी जो अंतःकरण। निश्चया साचपण। जयाचेनि॥ १५२॥
जीवु परमात्मा दोन्ही। बैसले ऐक्यासनीं। जयाचिया हृदयभुवनीं। विराजती॥ १५३॥

अर्थ—ज्याप्रमाणे वर्षाऋतुवांचून देखील समुद्र पूर्ण पाण्याने भरला असतो, त्याप्रमाणे सुखभोग प्राप्त न होतां देखील जो अखंड प्रसन्नचित्त असतो॥ १५१॥ शपथ वाहून जो आपलें अंत:करण आपल्या स्वाधीन ठेवतो-अंत:करणाच्या स्वाधीन होत नाही–आणि ज्याचा निश्चय इतका दृढ असतो की त्याच्याच योगाने निश्चयाला सत्यपणा आलेला आहे॥ १५२॥ ज्याच्या हृदयामध्ये जीव परमात्मा हे दोघेंहि एकाच आसनावर बसून विराजमान झालेले असतात॥ १५३॥

गूढार्थदीपिका—जीव व परमात्मा यांचे ऐक्य व दोनपणा अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे, केवळ शुद्ध बुद्धीनेच तो जाणतां येण्याजोगा आहे. तो दाखविण्याकरितां मानला आहे. पाणी व तरंग, सोनें व अलंकार, यांचें ऐक्य व दोनपणा ज्या विचाराने प्रतिपादिला जातो, त्यालाच विवर्तवाद म्हणतात.

या वादांत एकवस्तुत्वाच्या दृष्टीने ऐक्य व भासणाऱ्या रूपांतरामुळे त्या एक वस्तुचाच दोनपणा मानला जातो. ब्रह्मचैतन्यावर स्फुरणाऱ्या सर्व कार्यपदार्थांत, आंत-बाहेर ब्रह्मच भरलेंले असलें, तरी हृदयामध्येच जीव व परमात्मा यांची विशेष अभिव्यक्ति आहे असें "य वा एष आत्मा हृदि तस्यैतदेव निरुक्तं हृद्यमिति" (छां. उ. ८-३-३) या श्रुतीने सांगितलें असल्यामुळे माऊलींनी येथे "जीव परमात्मा दोनी.......हृदयभुवनीं विराजती" असें म्हटलें आहे.

ज्यप्रमाणे पसरलेलें पाणी, जेव्हा आपणच आपल्यावर मर्यादितपणे स्फुरतें, तेव्हा आपण त्या स्फुरणाला तरंग म्हणतो व तरंगभाव सोडून तरंगभावाच्या आधाराला पाणी म्हणतो, त्याप्रमाणेच वृत्तिरूपाने स्फुरणाऱ्या चैतन्याला जीव म्हणतात आणि वृत्तीला आधार असणाऱ्या चैतन्याला ईश्वर म्हणतात. पण तरंग व तरंगाचा आधार, या दोन्ही ठिकाणी पाणीच असून त्यांचे यत्किंचित्हि वेगळेपण होत नसल्यामुळे त्यांचा दोनपणा जसा शब्दमात्र असतो, त्याप्रमाणे वृत्तिरूप जीव व परमात्मा यांचे वस्तुत्वरूपाने ऐक्यच असून दोनपणा शब्दमात्र असतो. ज्याप्रमाणे तरंगरूप मर्यादित स्फुरण व त्याचा आधार हे दोन्ही एका पाणीरूप वस्तुचेंच असतात, त्याप्रमाणेच वृत्तिरूप जीव व वृत्तीला आधार असणारा परमात्मा हा दोन्ही प्रकारचा भास एका व्यापक ब्रह्मचैतन्यवस्तूचाच असल्यामुळे येथे माउलींनी ब्रह्मचैतन्याला "एकासन" म्हटलें आहे.

श्रीनाथांनीहि जीवशीवांचे ऐक्य व दोनपणा कसा आहे, हें "प्रभा दीपु दवडीना वेगळा। दीपु प्रभेसि नव्हे निराळा। तेविं जीवशिवूंचा मेळा। एकत्र स्वलीला नांदती स्वयें" (ए. भा. अ. ११-१६६) या ओवीने निरोपिलें आहे.

ऐसा योगसमृद्धि। होऊनि जो निरवधि। अर्पी मनोबुद्धि। माझ्या ठायीं॥ १५४॥

अर्थ—अशा रीतीने योगसंपत्तीने समृद्ध होऊन, जो माझ्या सगुण स्वरूपाचे ठिकाणीं मनबुद्धि अखंड अर्पण करतो॥ १५४॥

गूढार्थदीपिका—योग म्हणजे आत्मज्ञानाने परमेश्वराच्या निर्गुणस्वरूपाशीं ऐक्य पावणें.

समृद्धि म्हणजे अव्देष्टुत्वादि गुणसंपत्ति.

आंतु बाहेरि योगु। निर्वाळलेंयाही चांगु। तरि माझा अनुरागु। सप्रेम जया॥ १५५॥

अर्थ—आंतबाहेर दृढ ऐक्य साधल्यावरहि माझ्या सगुण स्वरूपाच्या ठिकाणीं ज्याचें अत्यंत प्रेम आहे॥ १५५॥

गूढार्थदीपिका—स्थूल देहादिकांचा व्यतिरेक करून "मी ब्रह्म आहे" असें अंत:करणवृत्तीने निर्गुण आत्मस्वरूपाशीं ऐक्य साधणें, याला आतील योग म्हणतात. व बाहेरहि सर्व नामरूपांचे ठिकाणी तेंच आत्मस्वरूप भरलें आहे, अशा अन्वयाने सर्व नामरूपांचे परमेश्वराशीं ऐक्य करणें, याला बाहेर योग म्हणतात.

अशा रीतीने व्यतिरेक व अन्वय असा दोन्ही प्रकारचा योग साधल्यावरहि, ज्ञानी पुरुषाचे सगुण रामकृष्णस्वरूपाच्या ठिकाणी प्रेम असायला पाहिजे, असें माऊलीचें म्हणणें आहे. कारण "सर्वत्र नास्ति विद्वेष: साध्यसाधनपूर्वके। साक्षाद्विज्ञानिनां विप्रा उपेक्षा बुद्धिरेव हि॥ ७३॥ (सू. सं. य. वै. खं. अ. २) ज्ञानी पुरुषांना जरी कशाविषयींच द्वेष नसतो, सर्वाविषयीं उपेक्षाबुद्धिच असते, तरी

विशुद्धं ज्ञानमुत्पन्नं यस्य तस्य महात्मनः। शिव रुद्र महादेव ब्रह्मेशानादि नामसु॥ ६९॥
रुद्रमूर्तिषु सर्वासु शांतिदांत्यांदि साधने। तिर्यक् त्रिपुंड्रे रुद्राक्षे तथा भस्मावगुंठने॥ ७०॥
शिवलिंगस्य पूजायां शिवस्थानेषु सुव्रतः। प्रियबुद्धिः प्रजायेत स्वभावादेव सर्वदा॥ ७१॥
यस्य विज्ञानिनस्तेषु प्रद्वेषो यापि जायते। उपेक्षा वा न स ज्ञानी पशुर्विज्ञानवंचकः॥ ७२॥

ज्याला शुद्ध आत्मज्ञान प्राप्त झालें आहे अशा महात्म्याला शिवादिकांचीं नांवें, मूर्ती, शांतिदांत्यादि साधनें, त्रिपुंड्रे, रुद्राक्ष, भस्मावगुंठन, शिवलिंगपूजा, शिवक्षेत्र इत्यादि ठिकाणी मात्र स्वभावत:च प्रेम असतें ज्या ज्ञान्याचे ठिकाणी यांच्याविषयीं द्वेष किंवा उपेक्षा असेल, तो ज्ञानीच नव्हे, असे सूतसंहितेंत स्पष्ट म्हटलें आहे.

मधुसदून सरस्वतींनीहि आपल्या गीतेवरील टीकेच्या उपोद्घातांत ''अद्वेष्टुत्वादिवत्तेषां स्वभावो भजनं हरे:'' ज्ञान्याच्या ठिकाणी अद्वेष्टुत्वादि गुणांची, जशी स्वाभाविक आवडी असते, तशीच त्याच्या ठिकाणी रामकृष्णादि सगुणस्वरूपाची प्रेमभक्ति स्वाभाविकच असते, असें म्हटलें आहे.

पुन: परमात्मा त्रिगुणातीत असल्यामुळे त्यांच्याशीं ऐक्य पावण्याकरितां जीवालाहि त्रिगुणातीत झालें पाहिजे व याकरितांच वैराग्य. ज्ञान व भक्ति हीं साधनें सांगितलीं आहेत.

वैराग्य अपर व पर असे दोन प्रकारचे आहे. इहपरलोकांतील विषयसुखाची आवडी नाहीशी होणें, हें पहिलें-म्हणजें ज्ञानप्राप्ति पूर्वीचें विषयवैतृष्ण्यरूप अपर वैराग्य असून अद्वेष्टुत्वादि सात्विक गुणांची आवड नांहीशी होणें, हें ज्ञानप्राप्तीनंतर होणारें गुणवैतृष्ण्यरूप दुसरें परमवैराग्य होय.

विषयवैराग्य व आत्मज्ञान या योगाने रजोगुण, तमोगुण यांची निवृत्ति होऊन सत्वगुण बाणतो व त्यामुळे त्यांच्या (ज्ञान्याच्या) ठिकाणी ज्ञानस्थिति व अद्वेष्टुत्वादि सत्वगुणाची आवडी उत्पन्न होते. या सत्वगुणाच्या बंधनांतून ज्ञान्याला, परमेश्वराची भक्तिच सुलभ, निश्चित व लवकर मुक्त करूं शकते, असा ''ईश्वरप्रणिधानाद्वा'' या योगसूत्राचा आशय असून, भगवंतांनीहि चवदाव्या अध्यायांत ''मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते। सगुणान्समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते'' या श्लोकाने असेच सांगितलें आहे.

''शांति क्षमा दया। त्याहि नको पंढरीराया'' भगवंता! तुझ्या प्रेमगोडीवांचून शांति, क्षमा, दया इत्यादि सात्विक गुणांची आवडहि मला नकोशी झाली आहे, असे निळोबामहाराजहि म्हणतात.

त्याचप्रमाणे परब्रह्म, अस्फुट, अद्वैतरूप असल्यामुळे ते अखंड, पूर्ण व आनंदरूप असतें. त्याचे ठिकाणी माया मुळीच नाही; म्हणून श्रेष्ठ-कनिष्ठ, न्यून-पूर्ण, सामान्य-विशेष इत्यादि भेदभावहि त्याचे ठिकाणी मुळीच नाहीत. तें सदासर्वदा कोणत्याहि अवस्थेंत तसेंच पूर्णानंदस्वरूप राहतें. पण मायाभ्रांतीने बद्ध झालेल्या जीवानेच त्याचे ठिकाणी सर्व भेद कल्पिले आहेत.

आत्मज्ञानानंतर भेदाची कल्पना नाहीशी झाली, तरी ज्ञान्याचे ठिकाणी उरलेल्या अविद्यालेशाने भेदाचा भास राहतो व त्यामुळे व्युत्थानकालीं त्याचा निर्गुण ब्रह्मानंद भंग पावतो. भेदाभास नाहीसा होऊन ब्रह्मानंद अखंड स्थिर होण्याकरितां निर्गुणस्वरूपाच्या अनुभवानंतरहि ज्ञानीपुरुषाने भगवंताच्या निरुपाधिक साकार सगुण स्वरूपाची प्रेमभक्ति केली असतां भगवंताचे निर्गुणनिराकार व सगुण-साकार हीं दोन्हीही रूपें समसमान पूर्ण ब्रह्मस्वरूपाने अनुभवाला येतात. व्युत्थानकालींहि त्याचा ब्रह्मानंद कायम राहतो, हेंच रहस्य श्रीज्ञानेश्वरमाउलींनी या ओवींत दाखविले आहे.

अर्जुना गा तो भक्तु। तोचि योगी तोचि मुक्तु। तो वल्लभा मी कांतु। ऐसा पढिये॥ १५६॥

अर्थ—अर्जुना तोच भक्त आहे, तोच योगी आहे व तोच मुक्त आहे, असे समज, मी पति व तो पत्नी असा तो मला प्रिय असतो॥ १५६॥

गूढार्थदीपिका—अर्जुना तो भक्तु। तोचि योगी तोचि मुक्तु—ज्याला निराकार अशा अद्वैत साक्षात्काराच्या नंतर सगुणाची भक्ति आहे, असा भक्तच खरोखर आत्मस्वरूपाशीं ऐक्य पावलेला व मुक्त झालेला ज्ञानी होय.

''भावेविण भक्ति भक्तिवीणें मुक्ति......बोलूं नये'' असे हरिपाठांतील अभंगांतहि श्रीमाउलींनी म्हटले आहे.

तो वल्लभा मी कान्त—निर्गुण स्वरूपाचें जसे स्वाभाविक नि:सीम प्रेम असतें, तसेंच भगवंताच्या सगुणस्वरूपाचेंहि स्वाभाविक प्रेम असणें, याला भक्ति म्हणतात. ही ज्ञानानंतरची साहजिक स्थिति आहे आणि ''माझिये सहज स्थिति। भक्ति नाम'' असे पुढे अठराव्या अध्यायांत माउलींनी म्हटलेंहि आहे.

येथें माउलींनी भक्त व भगवान यांच्या परस्पर नि:सीम प्रेमाला पति व पत्नी यांचा दृष्टान्त दिला आहे.

व्यवहारांत जसे लालन, वात्सल्य, सख्य व माधुर्य या चार संबंधाने प्रेम केले जातें, तसेच भक्तहि भगवंताचे ठिकाणी या चार प्रकारांनीच प्रेमाचा संबंध लावतांना दिसतात. या सर्व प्रेमसंबंधांत भक्त, भगवंतापासून यत्किंचितहि सुखाची इच्छा करीत नसतात.

लालन प्रेम—या लालन प्रेमभावांत भक्त, आपल्या ठिकाणी बालभाव धारण करून भगवंताचे मातृपितृभावाने प्रेम करीत असतात व प्रारब्धानुसार अहंकारादि विकार उठले असतां भगवंताचा धांवा करींत असतात.

वात्सल्य प्रेम—म्हणजे भगवंताला आपळे बाळ समजून सर्वतोपरि आईप्रमाणें भगवंतावर प्रेम करणें.

सख्य प्रेम—म्हणजे भगवंताचें ठिकाणी मित्रभावाने प्रेम करणें.

माधुर्य प्रेम—म्हणजे आपल्या स्वत:ला भगवंताची पतिव्रता स्त्री समजून ''भोज्येषु माता'' या श्लोकांत सांगितल्याप्रमाणे वरील सर्व भावांचे द्वारा भगवंताला सुख समर्पण करणें.

हे चारहि प्रकारचे प्रेमसंबंध दृढ अपरोक्षज्ञानाने स्थूल, सूक्ष्म व कारण या तिन्ही देहांचा निरास झाल्यानंतरच केले जातात, असे अगस्तिसंहितेंत ''देहत्रय विनाशं च कृत्वादौ गुरुवक्त्रत:। तत: संबंधयोग्यत्वं प्राप्नोतिमुनिसत्तम'' या श्लोकाने सांगितलें आहे.

लालनादि तीन प्रेमसंबंधांत, सर्व प्रकारच्या प्रेमसंबंधाने प्रेम करतां येत नसल्यामुळे, तेथे भगवंताला मर्यादितच प्रेम समर्पण होतें; पण माधुर्यभक्तींत सर्व प्रेमसंबंध अर्पण होऊन ''तत्सुखसुखित्वम्'' या श्रीनारदसूत्रांत सांगितल्याप्रमाणे केवळ भगवंताच्या सुखांतच भक्त सुख मानित असल्यामुळे, माधुर्यप्रेम लालनादि प्रेमापेक्षां श्रेष्ठ म्हटलें जातें. म्हणूनच माउलींनी भगवंताचे भक्ताच्या ठिकाणी व भक्ताचे भगवंताच्या ठिकाणी असणारे जें नि:सीम प्रेम, तें ''वल्लभा व कान्त'' हा दृष्टांत देऊन व्यक्त केलें आहे. अखंड नि:सीम प्रेम करणाऱ्या भक्ताचें उदाहरण म्हणून भगवान नारदांनीहि ''यथा व्रजगोपिकानाम्'' या आपल्या भक्तिसूत्राने भक्तश्रेष्ठ म्हणून माधुर्यभक्ति करणाऱ्या केवळ गोपिकांचाच उल्लेख केला आहे व प्राधान्याने लालनभक्ति करणाऱ्या श्रीतुकाराम महाराजादि संतांनीहि भगवंताचे ठिकाणी वात्सल्य, सख्य, माधुर्य इत्यादि भावद्वारा भगवंताला प्रेम समर्पण केलें आहे. श्रीज्ञानेश्वरमाउलींनी तर अनेक अभंगांतून माधुर्यप्रेमाने भगवंताला आळविलें आहे आणि येथेहि ''तो वल्लभा मी कान्त'' या चरणाने तेंच माधुर्यप्रेमाने नि:सीमत्व दाखविलें आहे.

प्रेमरसायनकारांनीहि ''नित्यसमाधियुक्तानाम्'' असें गोपिकांना विशेषण लावून त्या, भगवंताच्या अखंड समाधींतच राहत असत असें म्हटलें आहे.

ऐसा पढिये—पतिव्रता स्त्रियेचें नि:सीम प्रेम पाहून जसा पतिहि तिच्यावर नि:सीम प्रेम करतो, त्याप्रमाणे पत्निभावाने केल्या जाणाऱ्या प्रेमांत भक्ताच्या प्रेमाची नि:सीम वाढ होत असल्यामुळे अर्थात्‌च भगवंताचेहि अशा भक्तावर नि:सीम प्रेम असतें.

हें ना तो आवडे। मज जीवाचेनि पाडें। हेंही एथ थोकडें। रूप करणें॥ १५७॥

अर्थ—एवढेंच नाही, तर असा तो ज्ञानी भक्त मला माझ्या प्राणाप्रमाणे आवडतो. पण हीहि उपमा, त्याच्यावर असलेलें माझें प्रेम वर्णन करण्यास कमीच पडते॥ १५७॥

तरी पढियंतयाची कहाणी। हे भुलीची भारणी। इयें तंव न बोलणीं। परि बोलवी श्रद्धा॥ १५८॥

अर्थ—प्रेमळ भक्तांची कथा म्हणजे चित्ताला भूल किंवा विसर पाडणारीच होय; म्हणून ती शब्दाने बोलून दाखविण्यासारखी नाही, तरीपण तुझें माझ्यावरील प्रेमच मला बोलायला लावते॥ १५८॥

म्हणोनि गा आम्हां। वेगा आली उपमा। एऱ्हवीं काय प्रेमा। अनुवादु असे॥ १५९॥

अर्थ—म्हणूनच अर्जुना! भक्तावर माझें प्रेम कसें असतें, हें सांगतांना "तो वल्लभा मी कान्त" "जीवाचेनि पाडें" अशा उपमा माझ्या तोंडांतून एकदम बाहेर पडल्या. येऱ्हवीं पाहतां हें प्रेम शब्दाने सांगतां येतें काय?॥ १५९॥

गूढार्थदीपिका—"अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम्। मूकास्वादनवत्" प्रेमाचें स्वरूप शब्दाने सांगतां येत नाही, असे भक्तिसूत्रकार श्रीनारदाचार्यांनी म्हटलें असून "प्रेम नये सांगतां बोलतां दावितां" असे तुकाराममहाराजहि म्हणतात.

"प्रेमा द्वयो रसिकयोरपि दीप एव हृद्वेश्म भासयति निश्चलमेव भाति। द्वारादय वदनतस्तु बहिष्कृतश्चेन्निर्याति शीघ्रमथवा लघुतामुपैति" (प्रेमसंपुटे) दोघांचे प्रेम हे दिव्यासारखे असून जसा वारा लागला असतां दिवा विझतो किंवा मंद तरी होतो, त्याप्रमाणेच प्रेम बोलून दाखविलें गेलें असतां, तें नाहीसें होतें किंवा कमी तरी होतें, असे एका कवीनेहि म्हटलें आहे.

आतां असो हें किरीटी। पैं प्रियाचिया गोष्टी। दुणा थांव उठी। आवडी गा॥ १६०॥

अर्थ—अर्जुना! आतां हें असो. पण प्रेमळाच्या गोष्टी करण्याने मात्र प्रेम दुप्पट उफाळून येतें. ॥ १६०॥

गूढार्थदीपिका—प्रेमळांच्या कथेचा असा प्रभाव असल्यामुळेच भगवंताच्या व भक्तांच्या कथा श्रवण करण्याचा पुराणादिकांतून उपदेश केला आहे.

तयाही वरी विपायें। प्रेमळु संवादिया होये। तिये गोडीसि आहे। कांटाळें मग॥ १६१॥
म्हणोनि गा पांडुसुता। तूंचि प्रियु आणि तूंचि श्रोता। वरी प्रियाची वार्ता। प्रसंगें आली॥ १६२॥
तरि आतां बोलों। भले या सुखा मीनलों। ऐसें म्हणतखेंवों डोलों। लागले देवो॥ १६३॥
मग म्हणे जाण। तया भक्ताचें लक्षण। जया मी अंत:करण। बैसों घालीं॥ १६४॥

अर्थ—तशांतहि कदाचित् प्रेमळ भक्तांच्या कथा श्रवण करणारा श्रोताहि प्रेमळच असला, तर मग त्या प्रेमगोडीची कशाशीं तुलना करतां येईल काय?॥ १६१॥ म्हणून हे अर्जुना! तूंच माझा अत्यंत प्रेमळ असा प्रिय भक्त आहेस आणि तूंच प्रेमळ श्रोताहि असून, त्यांतच प्रसंगाने प्रेमळाचें निरूपण आलें आहे॥ १६२॥ तर आतां प्रेमळाची कथाच बोलतो. भाग्याने प्रेमळाच्या कथा सांगण्याचें हें सुख प्राप्त झालें, असें म्हणतांक्षणींच देव डोलूं लागलें॥ १६३॥ मग देव म्हणाले, अर्जुना! ज्याला मी बसायला आपल्या अंत:करणाचें आसन घालतो, त्या भक्ताचें लक्षण ऐक॥ १६४॥

गूढार्थदीपिका—भक्त, जसे भगवंताला अंत:करणात अखंड वागवितो तसे भगवानहि, भक्तांना आपल्या अंत:करणांत अखंड वागवितात, असा भाव.

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च य:। हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो य: स च मे प्रिय:॥ १५॥

अर्थ—ज्याच्यापासून लोकांना क्षोभ उत्पन्न होत नाही व लोकांपासून ज्याला क्षोभ उत्पन्न होत नाही; जो हर्ष, क्रोध भय, उद्वेग इत्यादि उर्मीपासून मुक्त झाला आहे; तो मला प्रिय आहे॥ १५॥

तरी सिंधूचेनि माजें। जळचरां भय नुपजे। आणि जळचरीं नुबगिजे। समुद्रु जैसा॥ १६५॥
तेविं उन्मत्तें जगें। जयासि खंती न लगे। आणि जयाचेनि आंगे। न शिणे लोकु॥ १६६॥

अर्थ—ज्याप्रमाणे समुद्रांत भयंकर खळबळ माजली, तरी समुद्रांतील प्राण्यांना भय वाटत नाही आणि समुद्राच्या पाण्यांत भयंकर प्राणी असले तरी समुद्र कंटाळत नाही॥ १६५॥ त्याचप्रमाणे जगाच्या उन्मत्त वागणुकीची सत्पुरुषाला खंती वाटत नाही आणि ज्याच्या वागण्याने लोकांनाहि दु:ख होत नाही॥ १६६॥

गूढार्थदीपिका—तेविं उन्मत्तें जगें। जयासि खंती न लगे—संपूर्ण जगांत मीच एक असून माझ्यावरच संपूर्ण जगाचा मिथ्या भास भासत आहे, या जाणीवेमुळे ज्ञानी पुरुषाला जगाच्या उन्मत्त वागणुकीची खंती वाटत नाही किंवा

आत्मसुखांत रत असलेल्या पुरुषांना बाह्य विषयसुखाची यत्किंचितहि आसक्ति नसल्यामुळे प्रारब्धानुसार

विषयसुखाकरितां होणारा त्यांचा प्रयत्न कोणी उन्मत्त लोकांनी हाणून पाडल्यास ते यत्किंचितहि दु:खी होत नाहीत.

आणि जयाचेनि आंगें। न शिणे लोकु—आपल्या सुखाकरितां दुसऱ्याला दु:ख देण्याची ज्ञानी पुरुषांची प्रवृत्तिच नसते. ते दुसऱ्याच्या सुखांतच सुख मानून राहतात; म्हणून त्यांच्या वागणुकीने कोणालाहि दु:ख होत नाही.

किंबहुना पांडवा। शरीर जैसें अवयवां। तैसा नुबगे जीवां। जीवपणें जो॥ १६७॥

अर्थ—किंबहुना, हे अर्जुना! ज्याप्रमाणे शरीर अपल्या अवयवांचा कंटाळा करीत नाही, त्याप्रमाणे जो पुरुष, सर्व जीवांचे ठिकाणी जीवपणाने मीच आहे असे समजून, कोणाचाहि कंटाळा करीत नाही॥ १६७॥

गूढार्थदीपिका—तैसा नुबगे जीवा। जीवपणें जो—आपल्याला जसे दु:ख नको असून सुखच पाहिजे असतें, तसेच सर्व जीवांना दु:ख नको व सुखच पाहिजे असतें; असें जीवांचें साम्य किंवा ऐक्य लक्षांत घेऊन वागणें, याला "जीवपणें जीवा नुबगणें" म्हणतात.

पण हें जीव साम्य लक्षांत घेऊन असतांना "धर्माणामविरोधेन सर्वेषां प्रियमाचरेत्" ही धर्माज्ञा पाळूनच ते प्राणिमात्रांना सुख देत असतात.

जगचि देह जाहलें। म्हणोनि प्रियाप्रिय गेलें। हर्षामर्ष ठेले। दुजेनविण॥ १६८॥
ऐसा द्वंद्वनिर्मुक्तु। भयोद्वेगरहितु। याही वरि भक्तु। माझ्या ठायीं॥ १६९॥
तरि तयाचा गा मज मोहो। काय सांगों तो पढियावो। हें असो जीवें जीवो। माझेनि तो॥ १७०॥
जो निजानंदें धाला। परिणामु आयुष्या आला। पूर्णते जाहला। वल्लभु जो॥ १७१॥

अर्थ—(सर्व जगांत मीच आहे या जाणीवेने) सर्व जगच ज्याचा देह बनला. त्याच्याहून भिन्न कांही राहिले नाही, म्हणून त्याची आवड-नावड, हर्ष-क्रोध हे संपूर्ण नाहीसे झाले॥ १६८॥ अशा रीतीने जो सर्व द्वंद्वमुक्त होऊन भयोद्वेगरहित झाला आणि शिवाय माझ्या सगुणस्वरूपाचें प्रेम करणारा भक्त असला॥ १६९॥ तर अर्जुना! त्याचा मला कसा मोह असतो व तो मला कसा प्रिय असतो, हें काय सांगूं! हे असो. "माझेनि जीवें" म्हणजे मी सगुणस्वरूपाने प्रगट झालों आहे, म्हणूनच तो जगतो॥ १७०॥ जो आत्मानंदाने तृप्त झाला आणि आत्मानंदाचा परिणाम-म्हणजे शेवट-जो ब्रह्मानंद, तोच जणुं जन्माला आला, असा जो पूर्ण ब्रह्मस्थितीचा पति झाला॥ १७१॥

गूढार्थदीपिका—पूर्णते जाहला वल्लभु जो—पूर्णता-म्हणजे आंत निर्गुणानंद व बाहेर सगुणानंद, अशा दोन्ही आनंदाने अखंड पूर्ण ब्रह्मानंदस्वरूप होऊन राहणें, ज्ञानीभक्तच अखंडानंदरूप पूर्ण ब्रह्मस्वरूप होतात, हा मागील सिद्धान्तच माउलींनी पुन: येथें मांडला आहे.

अनपेक्ष: शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथ:। सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्त: स मे प्रिय:॥ १६॥

अर्थ—जो कशाचीहि अपेक्षा करीत नाही, जो आंतबाहेर शुद्ध आहे, जो तत्वाकडे दृष्टि देणारा आहे, जो आत्मव्यतिरिक्तवस्तूचे ठिकाणी उदासीन आहे, जो संसारविरहित झाला आहे, जो सर्व सकामकर्मांचा त्याग करणारा आहे आणि याशिवाय जो माझ्या सगुणस्वरूपाचे ठिकाणी प्रेमभक्ति करतो, तो मला प्रिय आहे॥ १६॥

जयाचिया ठायीं पांडवा। अपेक्षे नाहीं रिगावा। सुखासि चढावा। जयाचें असणें॥ १७२॥

अर्थ—ज्याच्या अंत:करणांत विषयसुखाच्या वासनेचा शिरकावच होत नाही, म्हणून ज्याचें असणें-म्हणजे ज्याची संगति-दुसऱ्याच्या सुखाची वृद्धि करणारी असते॥ १७२॥

गूढार्थदीपिका—सुखासि चढावा। जयाचें असणें-सत्पुरुष, भक्तिसुख भोगण्याकरितां किंवा भक्तीचा प्रसार करण्याकरितां जिवंत राहत असल्यामुळे त्यांच्या जिवंत राहण्याने भक्तिमार्गाचा प्रसार होऊन, विषयासक्त पुरुषांचीहि क्षणिक अशा विषयसुखाची वासना नाहीशी होत जाऊन, ते अविनाशी अशा ब्रह्मानंदाच्या ठिकाणी स्थिर होत जातात.

मोक्ष देऊनि उदार। काशी होय कीर। परि वेंचणें लागे शरीर। तिये गांवीं॥ १७३॥

अर्थ—काशीक्षेत्र अत्यंत पुण्य भूमि असून निश्चयाने मोक्ष देण्यास उदार आहे, पण त्या क्षेत्रांत मरायला पाहिजे॥ १७३॥

गूढार्थदीपिका-मोक्ष—म्हणजे स्थूल, सूक्ष्म व अज्ञानरूप कारण अशा तिन्ही प्रकारच्या देहादि उपाधिदोषापासून मुक्त होणें.

काशी क्षेत्रांत मरण्याने मोक्ष मिळतो असें येथें सांगितलें आहे आणि ''ज्ञानदेव तु कैवल्यम्'' ज्ञानाने मोक्ष मिळतो, असें श्रुति म्हणते; म्हणून दोन्ही वचनांचा जरी विरोध दिसतो, तरी ''यत्र साक्षान्महादेवो देहान्ते स्वयमीश्वर:। व्याचष्टे तारकं ब्रह्म तत्रैव ह्यविमुक्तके''॥ ४६॥ (पद्मपुराण आदिखंड अ. ३३) काशीक्षेत्रांत मेलेल्या जीवांना भगवान काशीविश्वेश्वर तारकब्रह्माचा उपदेश करून ज्ञान करून देतात व त्यांच्या द्वाराच त्यांना मोक्ष होतो, असे पुराणादिकांतून सांगितले असल्यामुळे दोन्ही वचनांचा विरोध येत नाही.

अन्यक्षेत्रे कृतं पापं काशीक्षेत्रे विनश्यति। काशीक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति॥

असेहि वचन आहे; म्हणून काशी क्षेत्रांत राहून विश्वेश्वराचें दर्शन न घेणारे व गंगेचे स्नान न करतां पाप करणारे पापी लोक भूत-पिशाच्च योनींत जाऊन शिवाच्या सान्निध्यांत शिवगण होऊन राहतात व तें प्रारब्ध संपल्यानंतर काशीविश्वेश्वराच्या उपदेशाने शेवटीं मुक्त होतात.

काशीक्षेत्रांत केलेलें पाप, भगवंताच्या संकल्पाने एकदम प्रारब्धरूप होतें, म्हणून मेल्यानंतर तें भोगावें लागतें व तें भोगल्यानंतर मनुष्य मुक्त होतो असे शिवपुराणांत सांगितलें आहे (अ. ५० श्लो. २-४)

हिमवंतु दोष खाये। परि जीविताची हानि होये। तैसें शुचित्व नोहे। सज्जनाचें॥ १७४॥

अर्थ—हिमालयभूमि निष्पाप करणारी आहे; पण तेथे जो प्राणाला मुकतो, त्यालाच ती निष्पाप करणारी होते. ज्ञानभक्तीने अत्यंत पुनीत झालेल्या सज्जनांचे पावन करणें तशा प्रकारचे (म्हणजे काशीसारखे किंवा हिमालयाच्या भूमीसारखे) नाही-(म्हणजे त्यापेक्षाहि विशेष आहे असा अर्थ)॥ १७४॥

शुचित्वें शुचि गंगा होये। आणि पाप तापही जाये। परि तेथें आहे। बुडणें एक॥ १७५॥

अर्थ—सर्व पवित्र पदार्थांत अत्यंत पवित्र, गंगा होय आणि तिच्या योगाने सर्व पाप व त्रिविध ताप नाहीसे होतात-म्हणजे पुरुष मुक्त होतो-पण या लाभाकरितां गंगेंत बुडून मरावें लागतें॥ १७५॥

गूढार्थदीपिका—पाप तापहि जाये-कुतो वीचिर्वीचिस्तव यदि गता लोचनपथम्। त्वमापीता पीताम्बरपुरनिवासं वितरसि॥ (शंकराचार्य-गंगास्तुति)

'माते गंगे! तुझ्या ठिकाणी उठणारा जलतरंग ज्याच्या दृष्टीस पडतो, त्याचें संपूर्ण पाप नाहीसे होऊन नरकाची वार्ताहि त्याच्या कानीं पडत नाही आणि ज्यांनी तुझें जल प्राशन केलें त्याला तूं विष्णुलोकाची प्राप्ति करून देतेस.' असे भगवान आचार्यांनी गंगेच्या स्तोत्रांत म्हटलें आहे. पण हें फळ, गंगेविषयीं अत्यंत आदर ठेऊन, गंगेच्या योगाने विष्णुपदाला जाईन, असा गंगेच्या माहात्म्याविषयीं दृढ विश्वास ठेऊन बुडणाऱ्यांनाच मिळते, असें समजावें. कारण ''अतित्यायी बुडे गंगे। पाप लागे त्याचे त्या'' (तु. गा. २६७९)

थोड्यासाठी राग आला। जीव दिला गंगेत॥ त्यासी परलोकी नाही मुक्ति। अधोगति चुकेना॥ (तु. गा. २४३२)

इत्यादि वचनांनी रागारागाने गंगेंत जीव देणाऱ्यांना दुर्गति चुकत नाही, असें तुकाराममहाराजांनी म्हटलें आहे.

खोलिये पारु नेणिजे। तरी भक्तीं न बुडिजे। रोकडाचि लाहिजे। न मरतां मोक्षु॥ १७६॥

अर्थ—ज्ञानभक्तीने संतांना जे पावित्र्य येते, या पवित्रतेच्या खोलीला पारच नाही; तरी भक्त त्यांत बुडत नाही आणि न मरतां—म्हणजे जीवंतपणीच, रोकडाचि-म्हणजे प्रत्यक्ष-त्यांना मोक्षाचा लाभ होतो॥ १७६॥

गूढार्थदीपिका-न मरतां मोक्षु—जी विदेहमुक्ति ज्ञान्यांना मरणानंतर होते, त्या विदेहमुक्तींतील सुखस्थिति, भक्तांना जीवंतपणीच प्राप्त होते असा भाव. ''याच देहीं याच डोळां। भोगिजे मुक्तीचा सोहळा'' (आनंदलहरी-एकनाथकृत) असे श्रीनाथहि म्हणतात.

संताचेनि अंगलगें। पापातें जिणणें गंगें। तेणें संतसंगें। शुचित्व कैसें॥ १७७॥

अर्थ—पाप्याचें पाप आपण घेऊन, त्याला निष्पाप करणारी गंगा, ज्या संतांच्या अंगस्पर्शाने शेवटीं निष्पाप

होते; त्या संताच्या संगाने जो पवित्रपणा येतो तो किती अगाध म्हणावा!॥ १७७॥

म्हणोनि असो जो ऐसा। शुचित्वें तीर्थां कुवासा। जेणें उल्लंघविलें दिशा। मनोमळ॥ १७८॥

अर्थ—म्हणून हें पुरे. जो सत्पुरुष असा थोर पवित्र असल्यामुळे सर्व तीर्थांना आश्रय झाला, ज्याने आपल्या मनाचे दोष दिशांच्या पलीकडे पळवून लावले॥ १७८॥

गूढार्थदीपिका-मनोमळ—म्हणजे रजस्तमोगुणजन्य आवरण, विक्षेप, असत्प्रवृत्ति, अविश्वास, संदेह, विपरीत भावना इत्यादि मनांतील दोष.

संत, ज्ञानभक्तीच्या योगाने निःशेष रजोगुणतमोगुणरहित होऊन शुद्ध सात्विक होतात, असा भाव.

आंतु बाहेरि चोखाळु। सूर्य तैसा निर्मलु। आणि तत्त्वार्थीचा पायाळु। देखणा जो॥ १७९॥

अर्थ—ज्याप्रमाणे सूर्य, आंतबाहेर निर्मळ असतो, त्याप्रमाणे जो पुरुष आंत म्हणजे अंतःकरणांत व बाहेर म्हणजे शरीराचे ठिकाणी अत्यंत शुचिर्भूत असतो आणि पायाळू माणसाप्रमाणे सर्वत्र तो ब्रह्मतत्त्वरूपी अर्थच पाहात असतो॥ १७९॥

गूढार्थदीपिका—भक्तीच्या योगाने सर्व मळ नाहीसे होऊन अनायासें ब्रह्मसाक्षात्कार कसा होतो, हें मागें नवव्या अध्यायांत ओवी १८८ वरील गूढार्थदीपिकेंत भागवतांतील श्लोक प्रमाण देऊन सांगितलेंच आहे.

ज्याप्रमाणे सूर्यकान्तमण्यांत सूर्याचीं किरणें केंद्रीभूत झालीं असतां, त्यांत सूर्याप्रमाणे जाळण्याची शक्ति येते, त्याप्रमाणे ज्ञानभक्तीने सदेह सच्चिदानंद झालेल्या संताचें निर्मलत्व किंवा पवित्रपणा पूर्ण परब्रह्मासारखाच असीम असतो.

व्यापक आणि उदास। जैसें कां आकाश। तैसें जयाचें मानस। सर्वत्र गा॥ १८०॥

अर्थ—ज्याप्रमाणे आकाश सर्वत्र व्यापक असून सर्वांपासून अलिप्त असतें, त्याप्रमाणे ज्याचें मन व्यापक असून सर्वत्र अलिप्त असतें॥ १८०॥

गूढार्थदीपिका—वस्तु जितकी सूक्ष्म होते, तितकी ती व्यापक होते व तितकीच ती अलिप्तहि असते. परब्रह्मवस्तु सर्वांपेक्षा सूक्ष्म असल्यामुळे ती व्यापक व सर्वांहून अलिप्त अशी ठरली गेली आहे. अशा व्यापक व उदास परब्रह्माशीं ज्ञानवृत्तीने ऐक्य पावलेल्या सत्पुरुषांचे मनहि सर्वत्र व्यापक व अलिप्त असतें.

संसारव्यथें फिटला। जो नैराश्यें विनटला। व्याधाहातोनि सुटला। विहंगमु जैसा॥ १८१॥
तैसा सतत जो सुखे। कोणीही टवंच न देखे। नेणिजे गतायुषें। लज्जा जेवीं॥ १८२॥

अर्थ—तसेंच पारध्याच्या हातांतून सुटलेल्या पक्षाची जशी दुःखांतून सुटका होते, त्याप्रमाणे अंतःकरणांत तीव्र विषयवैराग्य बाणल्यामुळे जो विषयसुखाची निःशेष आशा सोडून संसारदुःखापासून मुक्त झाला॥ १८१॥ ज्याप्रमाणे मेलेल्या पुरुषाला मुळीच लज्जा नसते, त्याप्रमाणे आत्म्याचें सतत सुख प्राप्त झाल्यामुळे ज्याला कांहीच दुःख भासत नाही॥ १८२॥

आणि कर्मारंभालागीं। जया अहंकृती नाहीं आंगीं। जैसे निरिंधन आगी। विझोनि जाय॥ १८३॥
तैसा उपशमचि भागा। जयासि आला पैं गा। जो मोक्षाचिया आंगा। लिहिला असे॥ १८४॥

अर्थ—कर्म करण्याकरितां लागणारा देहाहंकारच ज्याच्या ठिकाणीं उत्पन्न होत नाही-म्हणजे ज्याच्या ठिकाणीं "मी ब्रह्म आहे" ही वृत्ति इतकी दृढ झाली आहे की त्याला "मी ब्रह्म आहे" असें चिंतनच करावे लागत नाहीं. ज्याप्रमाणे अग्नींत लांकडें घातली नाहीत, तर अग्नि जसा विझून जातो, त्याप्रमाणे मोक्षाचे अंग म्हणून जो उपशम सांगितला आहे, तो उपशमच पूर्णपणें ज्याच्या वांटेला आला आहे॥ १८३-१८४॥

गूढार्थदीपिका-कर्मारंभालागीं जया अहंकृती नाहीं आंगीं—"अहंभावोदयाभावो बोधस्य परमावधिः" (वि. चू. ४२५) आत्मज्ञानाची परमावधि म्हणजेच यत्किंचितहि देहाहंकार न स्फुरणें होय, असें आचार्य विवेकचूडामणींत म्हणतात. दृढज्ञान्याच्या ठिकाणी देहाहंकृतिच स्फुरत नसल्यामुळे तो आपण होऊन कर्म करूं शकत नाही, असा अर्थ.

तैसा उपशमचि भागा। जयासी आला पैं गा। जो मोक्षाचिया आंगा। लिहिला असे—''वृत्तेर्दृश्यपरित्यागः'' वैराग्याने विषयभोगाला कंटाळलेलीं इंद्रियें पुढे जेव्हा आपणच विषयांकडे धांवत नाहीत, तेव्हा त्याला उपरति किंवा उपशम म्हणतात.

मोक्षाचीं त्रिविधदु:खनिवृत्ति व अखंड परमानंदप्राप्ति अशीं दोन अंगें आहेत. ''ज्ञानादेव तु कैवल्यम्'' या श्रुतीने ज्ञानानेच मोक्ष होतो, असें म्हटलें आहे खरें, पण ज्ञान दृढ होण्याकरितां, उपशम आवश्यक आहे; म्हणून उपशमाला मोक्षाचें अंग म्हटलें आहे. या उपशमपूर्वक ज्ञानाने मोक्षाचें त्रिविधदु:खनिवृत्तिरूप प्रथम अंग सिद्ध होतें. यालाच ज्ञान्याची जीवन्मुक्त अवस्था म्हणतात.

विद्यारण्यस्वामींनी सूतसंहितेंतील मुक्तिखंड अध्याय २-श्लोक ५४ वरील आपल्या टीकेंत, ज्ञान्याची जीवन्मुक्तदशा कशी असते हें सांगतांना असे म्हटलें आहे की ''तिस्रोहि मायावस्थाः। दृश्यस्य वास्तवत्वाभिमानात्मिका प्रथमा। सायुक्तिशास्त्रजनित विवेकज्ञानान्निवर्तते। तन्निवृत्तावपि प्रागिव साभिनिवेशव्यवहारहेतु द्वितीया। सा तत्त्वसाक्षात्कारान्निवर्तते। तन्निवृत्तावपि देहाभासजगदवभासहेतुरूपा तृतीया। सा प्रारब्धकर्मणावसाने निवर्तते।''

मायेच्या तीन अवस्था आहेत, दृश्य जगत् सत्य आहे, असें वाटणें ही मायेची पहिली अवस्था होय. ही शास्त्र व तदनुकूल युक्तिविचाराने उत्पन्न झालेल्या विवेकज्ञानाने नाहीशी होते. ती नाहीशी झाल्यावरहि पुर्वीप्रमाणेच अभिनिवेशपूर्वक होणाऱ्या व्यवहाराला निमित्त असणारी मायेची दुसरी अवस्था होय. ती आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर नाहीशी होते; पण ती निवृत्त झाल्यावरहि, जो देहाचा भास व जगताचा भास होत राहतो, त्याला निमित्त असणारी मायेची तिसरी अवस्था होय. हीच ज्ञान्याची जीवन्मुक्त अवस्था असते. ही अवस्था प्रारब्धकर्म संपल्यावर म्हणजे ज्ञानी जेव्हा विदेह मुक्तींत जातो तेव्हाच नाहीशी होते.

अशा या ज्ञान्याच्या जीवन्मुक्ति अवस्थेच्या वर्णनावरून जीवन्मुक्ति अवस्थेंत ज्ञान्याची जी तुर्या अवस्था किंवा साक्षी अवस्था असते, तींत देहाच्या व जगताच्या मिथ्या भासाची व त्याबरोबर आत्मस्वरूपाची जाणीव कायम राहते, हें उघड आहे.

समर्थांनीहि ''जाणे ब्रह्म जाणे माया। जाणे अनुभवाचे ठाया। ते एक म्हणावी तूर्या। सर्व साक्षिणी''॥ ४९॥ (दासबोध द. ७ स ४) असेंच जीवन्मुक्ताच्या तुर्या अवस्थेचें वर्णन केलें आहे. ब्रह्मानंदाचे लक्षण करतांना विद्यारण्यस्वामींनीच पंचदशीच्या योगानंदनामक अकराव्या प्रकरणांत श्लोक ५४ मध्ये ''स्त्रीपरिष्वक्तवद्वेद न बाह्यं नापि चांतरम्'' ब्रह्मानंदांत आंतील किंवा बाहेरील कशाचीच जाणीव नसते, असें म्हटलें आहे.

अर्थात् विद्यारण्यस्वामींच्या या दोन वचनांचा विचार केला असतां, ज्ञानी पुरुषाच्या जीवन्मुक्त अवस्थेंतहि देह व जगत् यांच्या मिथ्याभासामुळे ज्ञान्याच्या त्रिविध दु:खाची निवृत्ति होते; पण त्यांना सुषुप्ति व समाधि या कालावांचून, इतर कालीं ब्रह्मानंदाची प्राप्ति नसते. अर्थात् ते अखंड ब्रह्मानंदांत तल्लीन नसतात, हें उघड होतें.

अर्जुना हा ठाववरी। जो सोहंभावो सरोभरी। तो द्वैताच्या पैलतीरीं। निगों सरला॥ १८५॥

अर्थ—अर्जुना! हा ''ठाववरी'' म्हणजे पूर्ण अहंकृतिरहित होऊन व उपशम साधून जो ''मी ब्रह्म आहे'' अशा अखंड निदिध्यासनाच्या बळावर द्वैताच्या पलीकडील तीराला म्हणजे अद्वैतरूप तीरावर जावयाला निघाला॥ १८५॥

गूढार्थदीपिका—द्वैताच्या पैलतींरी। निगों सरला—''द्वितीयाद्वै भयं भवति'' द्वैतबुद्धि हीच सर्व दु:खाला कारण आहे. ती नाहीशी करण्याकरितां द्वैतबुद्धीचें पैलतीर म्हणजे अद्वैतबुद्धि झाली पाहिजे. या निर्गुणसाक्षात्काराने जें मोक्षाचें अंग प्राप्त होतें, तें दु:खनिवृत्तिरूपच अंग होय.

ही निर्गुणप्राप्तिहि उत्तम अधिकाऱ्यांनाच होते. ''कानावचनाचिये भेटी। सरिसाचि पैं किरीटी। वस्तु होऊनि उठी। कवणी एक जो'' (ज्ञा. अ. १८-९९१) असे माउलींनी उत्तम अधिकाऱ्याचें लक्षण केलें आहे. मोक्षाची संपूर्ण साधनसंपत्ति आंगीं बाणून ज्याच्या चित्ताचा उपशम झाला तोच उत्तम अधिकारी होय, असा या ओवीचा भाव आहे.

पण असा उत्तम अधिकारी "कृतोपासनस्य मुख्याधिकारिण:" ज्यांनी ज्ञानापूर्वी सगुणाची उपासना केली आहे, तोच होतो असे अद्वैतवेदान्तावरील तत्त्वानुसंधान नामक ग्रंथाच्या अद्वैतकौस्तुभटीकेंत म्हटले असून, आचार्यानीहि "मोक्षकारणसामग्र्यां भक्तिरेव गरीयसी" असे विवेकचूडामणींत म्हटलें आहे. आणि "युञ्जानानामभक्तानां प्राणायामादिभिर्मन:। अक्षीणवासनं राजन् दृश्यते पुनरुत्थितम्" या श्लोकाने भक्तिवांचून माझ्या ठकाणी प्राणायामादिकांनी स्थिर करूं पाहणाऱ्यांचें मन, वासना क्षीण होत नसल्यामुळे, स्थिर होत नाही, तें वारंवार व्युत्थान पावतें, असें भगवंतांनी मुचकुंदाला सांगितलें आहे.

मधुसूदन सरस्वति, गीतेच्या आरंभीं उपोद्घातांत म्हणतात की "पूर्वभूमौ कृतां भक्ति उत्तरां भूमिमानयेत्। अन्यथा विघ्नबाहुल्यात् जीवन्मुक्तिस्तुदुर्लभा." ब्रह्मज्ञान होण्यापूर्वी जी भक्ति केली जाते, ती पुढें ज्ञानानंतर कायम ठेवल्यासच, जीवन्मुक्ति साधली जाते, नाही तर अनेक प्रतिबंध उत्पन्न होऊन, ती साधली जात नाही.

सारांश, निर्गुणस्वरूप साक्षात्कार व त्याच्या साह्याने साधणारें मोक्षाचें दु:खनिवृत्तिरूप अंग हीं दोन्ही ज्ञानापूर्वी भक्ति केल्यावांचून साधली जात नाहीत असाच महंतांचा अनुभव आहे.

कीं भक्तिसुखालागीं। आपणपेंचि दोही भागीं। वांटूनिया आंगीं। सेवकै बाणी॥ १८६॥

अर्थ—किंवा भक्तिसुख भोगण्याकरितां जो आपणच आपल्याला दोन भागांत वाटून घेऊन एका अंगाने सेवक किंवा भक्त होतो.

गूढार्थदीपिका—भक्ति सुखालागीं-"भक्ति सगुणाचीच घडे" (र. च. स. १५) भगवंताच्या सगुण स्वरूपाचीच भक्ति होऊं शकते, असे समर्थादि सर्व संतांचें म्हणणें आहे, "स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्यभिधीयते" "स्वात्मतत्वानुसंधानं भक्तिरित्यपरे जगु:" (वि. चू. २-३३). आपल्या निर्गुण स्वरूपाचें अनुसंधान करणें, असे आचार्यांनी विवेकचूडमणींत भक्तीचें जें लक्षण केलें आहे, तें देहादिकांचा व्यतिरेक करून जाणलेल्या आत्मस्वरूपाचे ठिकाणी, स्वाभाविक असलेल्या प्रेमामुळे, जें वारंवार अनुसंधान केलें जाते, त्या प्रेमाने होणाऱ्या अनुसंधानाला भक्ति हें नांव दिलें आहे. अर्थात् भक्ति म्हणजे प्रेम, हाच अर्थ तेथेहि आहे.

सच्चिदानंद परब्रह्माचा नामरूपांत अन्वय असल्यामुळे नामरूपें हीं सच्चिदानंद परब्रह्मस्वरूपच आहेत; म्हणून नामरूपाने नटलेल्या परब्रह्माचें, आत्मवत् स्वाभाविक प्रेम करणें, यालाच संतांनी भक्ति हें नांव दिलें आहे. या भक्तीचाच ज्ञानानंतर उपयोग आहे. या सगुणभक्तीने ज्ञानी अखंड ब्रह्मानंदांतच निमग्न राहूं शकतो. असा हा निर्गुणस्वरूपाचा प्राप्तिपेक्षा सगुणस्वरूपाच्या भक्तींत विशेष लाभ आहे.

"**इतर मी सांगूं काई। मोक्ष सुखाचिया ठायीं। या सुखाची गोडी नाहीं। धन्य पाही हरिभक्त**" (ए. भा. १४-२०३) असें नाथांचें म्हणणें असून तुकाराम महाराजहि

"**सोन्याचे पर्वत करवती पाषाण। अवघे रानोरान कल्पतरु॥ परी हे दुर्लभ विठोबाचे पांय। तेथे हे उपाय न सरती॥ २॥**

तुका म्हणे मोक्ष राहे ऐलीकडे। इतर वापुडे काय तेथे॥ ६॥ (तु. गा. २९११)

भक्ति प्रेम सुख नेणवे आणिका। पंडित वाचकां ज्ञानियासी॥ १॥

आत्मनिष्ठ जरी झाले जीवन्मुक्त। तरी भक्तिसुख दुर्लभ त्या॥ २॥ (तु. गा. ३००२)

या अभंगांत असेच सांगत आहेत.

भागवतांत ध्रुवांनी भगवंताची स्तुति करतांना असे म्हटलेंहि आहे की "या निर्वृतिस्तनुभृतां तव पादपद्म ध्यानाद्भवज्जनकथा श्रवणेन वा स्यात्। सा ब्रह्मणि स्वमहिमन्यपि नाथ मा भूत्........................" (भाग. स्कं. ४-९-१०) हे भगवंता! तुझ्या सगुणस्वरूपाच्या चरणकमलाच्या ध्यानाने किंवा तुझ्या भक्तांच्या कथाश्रवणाने जीवाला जें सुख प्राप्त होतें, तें केवळ सच्चिदानंदस्वरूपाने स्थित असलेल्या निर्गुण ब्रह्माचे ठिकाणीहि प्राप्त होत नाही.

हाच भाव माऊलींनी येथें "भक्तिसुखालागीं" या पदाने व्यक्त केला आहे.

आपणपें दोहीं भागीं। वाटूनियां आंगीं। सेवकै बाणी-अद्वैतानंतरहि, अद्वैत न मोडतां, सगुण परमेश्वराची भक्ति होऊं शकते, हेंच येथें प्रतिपादिलें आहे.

"सागर सरिता जीवन एक। परी मिळणीं भजन दिसे अधिक। तैसें एकपणेंचि देख। भजन सुख उल्हासे" "वामसव्य दोन्ही भाग। परी दो नामीं एकचि अंग। तैसे देवभक्त विभाग। देवपणीं सांग आभासे" (ए. भा.) असे नाथांनी आपल्या ग्रंथांतून सांगितलें असून श्रीमाऊलींनीहि अमृतानुभवांत "द्वैतदशेचें आंगण। अद्वैत ओळगे आपण भेद तंव तंव दूण। अभेदासी"॥ २८॥ (अमृ. प्र. ९) "देव देऊळ परिवारु। कीजे कोरोनि डोंगरु तैसा भक्तीचा व्यवहारु। कां न व्हावा" "कोणी एक अकृत्रिम। भक्तीचें हें वर्म। योगज्ञानादि विश्राम। भूमिका हे" इत्यादि ओव्यांतून हाच भाव व्यक्त केला आहे.

येरा नाम मी ठेवी। मग भजती वोज बरवी। न भजतया दावी। योगिया जो॥ १८७॥

अर्थ—दुसऱ्या भागाला मी म्हणजे देव, हें नांव ठेवतो व मग माझ्या सगुण स्वरूपाचें भजन न करणाऱ्या ज्ञान्यादि योगियांना, अद्वैतांतहि होणाऱ्या सगुण भक्तीचें श्रेष्ठस्वरूप दाखवितो॥ १८७॥

गूढार्थदीपिका—न भजतयां दावी। योगिया जो-ज्ञानाने प्राप्त होणाऱ्या त्रिविधदु:खनिवृत्तिरूप मोक्षसुखापेक्षा श्रेष्ठ असलेलें व सगुणाच्या प्रेमभक्तीने प्राप्त होणारें ब्रह्मसुख अखंड प्राप्त करून घेण्याकरितां—म्हणजे स्वार्थाकरितां-ज्ञानी सगुणाचे भजन करतो, असे "भक्तिसुखालागीं" या पदाने माऊलींनी सांगितलें असल्यामुळे "न भजतया दावी योगिया जो" या चरणाचा "ज्ञानीपुरुष ज्ञानानंतर सगुणाचें जें भजन करीत असतो ते, भजन न करणाऱ्या अज्ञ लोकांना केवळ मार्ग दाखविण्यासाठी-म्हणजे लोकसंग्रहार्थ करतो" असा अर्थ भावार्थ घेतां येत नाही, "स्वत:ला अखंड ब्रह्मसुख प्राप्त व्हावें, म्हणून सगुणाची भक्ति करीत असतांना, अनायासें भक्ति न करणाऱ्या योगियांना तो मार्ग दाखवितो" असाच अर्थ करावा लागतो.

ज्ञानीपुरुष भगवंताचें भजन, लोकसंग्रहार्थ करीत नसून भगवंताच्या केवळ नि:सीम प्रेमानेच करीत असतो आणि म्हणूनच भगवंताला भक्ताचे नि:सीम प्रेम असतें. असा माउलींनीच पुढील ओव्यांतून आशय दाखविला आहे.

तयाचें आम्हां व्यसन। आमुचें तो निजध्यान। किंबहुना समाधान। तो मिळे तैं॥ १८८॥

तयालागीं मज रूपा येणें। तयाचेनि मज एथें असणें। तया लोण कीजे जीवें प्राणें। ऐसा पढिये॥ १८९॥

अर्थ—असा जो ज्ञानी भक्त असतो, त्याचें आम्हांला वेडच लागतें, तोच आमच्या अखंडध्यानाचा विषय असतो. किंबहुना त्याच्याच भेटींत आम्हांला समाधान होते॥ १८८॥ अशा प्रेमळ भक्ताकरितां मी सगुणस्वरूप होतो, त्याच्याकरितांच मी या जगांत असतो आणि तो मला इतका प्रिय असतो की, त्याच्यावरून आम्ही आपले जीव, प्राण ओवाळून टाकावे असें वाटतें॥ १८९॥

गूढार्थदीपिका—परमप्रेमरूप ज्ञानोत्तरभक्ति, ही मूळांत निर्गुण निराकार, सच्चिदानंदस्वरूप असणाऱ्या भगवंताला-त्याचें हें स्वरूप कायम ठेवनूच-स्वरूपानुबंधि, अपरिमित व षड्गुणैश्वर्याने युक्त अशा सगुण साकार स्वरूपाने व्यक्त करून भगवंताच्या अखंड तद्रूपतेमुळे ज्ञान्याच्या चित्ताचें व्युत्थान न होऊं देतां, ज्ञान्याला सगुण भगवंताच्या अखंड प्रेमसमाधींत निमग्न ठेवणारी आहे. म्हणून ज्ञानीपुरुष अखंड समाधिलाभाकरितां सगुण भगवंताची भक्ति करतो, लोकसंग्रहार्थ करीत नाही, हें उघड आहे.

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति। शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्य: स मे प्रिय:॥ १७॥

अर्थ—ज्याला हर्ष होत नाही, ज्याला द्वेष नाही, जो शोक करीत नाही, जो कशाचीहि इच्छा करीत नाही आणि सर्व पुण्यपापरूप कर्मांचा त्याग करून, जो सगुण भगवंताचे ठिकाणी भक्तिसंपन्न झाला, तोच मला प्रिय आहे॥ १७॥

जो आत्मलाभासारिखें। गोमटें कांहींचि न देखे। म्हणोनि भोगविशेखें। हरिखे ना जो॥ १९०॥

आपणचि विश्व जाहला। तरि भेदभावो सहजचि गेला। म्हणोनि द्वेषु ठेला। जया पुरुषा॥ १९१ ॥
पैं आपुलें जें साचें। ते कल्पांतींही न वचे। हें जाणोनि गताचें। न शोची जो॥ १९२ ॥
आणि जयापरौतें कांहीं नाहीं। तें आपणपेंचि आपुलां ठायीं। जाहला यालागीं जो कांहीं। आकांक्षी ना॥ १९३ ॥
वोखटें कां गोमटें। हें कांहींचि तया नुमटे। रात्रिदिवस न घटे। सूर्यासि जेवीं॥ १९४ ॥
ऐसा बोधुचि केवळु। जो होऊनि असे निष्कळु। त्याहीवरी भजनशीळु। माझ्या ठायीं॥ १९५ ॥
तरि तया- ऐसें दुसरें। आम्हां पढियंतें सोयरें। नाहीं गा साचोकारें। तुझी आण॥ १९६ ॥

अर्थ—ज्याला आत्मप्राप्तिवांचून कांहीच गोड वाटत नाही, म्हणूनच विशेष विषयभोग त्याला प्राप्त झालें तरी आनंद होत नाही॥ १९० ॥ संपूर्ण विश्वांत आत्मस्वरूपाने मीच एक भरलेला आहे, या दृढ ज्ञानाने सहजच ज्याला, आपल्याहून दुसरी वस्तुच दिसत नाही आणि म्हणूनच ज्याला कोठेहि द्वेष नसतो॥ १९१ ॥ मी खरोखर आत्मस्वरूप आहे व तें आत्मस्वरूप कधींहि नाश पावत नाही, या दृढ विचाराने जो नाश वस्तुबद्दल कधी दुःख करीत नाही॥ १९२ ॥ आणि ज्या अद्वैत आत्मवस्तूहून दुसरी वस्तुच नाही, ती आत्मवस्तु मीच आहे, असे कळून आल्यामुळे जो कशाचीहि इच्छा करीत नाही॥ १९३ ॥ ज्याप्रमाणे सूर्याला रात्री व दिवस यांचा अनुभव येत नाही, त्याप्रमाणे ज्याच्या अंतःकरणांत हें चांगलें, हें वाईट असे भावच उत्पन्न होत नाहीत॥ १९४ ॥ याप्रमाणे कशाचीहि जाणीव न होतां जो देहासह संपूर्ण केवळ जाणीवरहित चिन्मात्रस्वरूप होऊन राहिला आणि त्यांतहि माझ्या सगुणस्वरूपाचे ठिकाणी प्रेमभक्ति करणें हा ज्याचा स्वभावच बनला॥ १९५ ॥ भगवान म्हणतात, अर्जुना! अशा ज्ञानीभक्तासारखा खरोखर दुसरा आमचा प्रिय सोयराच नाही, हे मी तुझी शपथ घेऊन सांगतों॥ १९६ ॥

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः। शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः॥ १८ ॥

अर्थ—शत्रु, मित्र, मान, अपमान, शीत, उष्ण, सुख, दुःख यांचे ठिकाणी ज्याची समबुद्धि असून जो संग सोडून असंग झाला॥ १८ ॥

पार्था जयाचिया ठायीं। वैषम्याची वार्ता नाहीं। रिपुमित्रां दोहीं। सरिसा पाडु॥ १९७ ॥
कां घरींचियां उजियेडु करावा। पारकियां आंधारु पाडावा। हें नेणेचि गा पांडवा। दीपु जैसा॥ १९८ ॥
जो खांडावया घावो घाली। कां लावणी जयानें केली। दोघां एकचि साउली। वृक्षु दे जैसा॥ १९९ ॥
नातरी इक्षुदंडु। पाळितया गोडु। गाळितया कडु। नोहेचि जेवीं॥ २०० ॥
अरिमित्रीं तैसा। अर्जुना जया भावो ऐसा। मानापमानीं सरिसा। होतु जाय॥ २०१ ॥
तिहीं ऋतूं समान। जैसें कां गगन। तैसें एकचि मान। शीतोष्णीं जया॥ २०२ ॥
दक्षिण उत्तर मारुता। मेरु जैसा पांडुसुता। तैसा सुखदुःखप्राप्तां। मध्यस्थु जो॥ २०३ ॥
माधुर्यें चंद्रिका। सरिसी राया रंका। तैसा जो सकळिकां। भूतां समु॥ २०४ ॥
आघविया जगा एक। सेव्य जैसें उदक। तैसें तयातें तिन्हीं लोक। आकांक्षिती॥ २०५ ॥
जो सबाह्य संगु। सांडोनिया लागु। एकाकी असे आंगु। आंगी सूनीं॥ २०६ ॥

अर्थ—अर्जुना! ज्याच्या ठिकाणी आपपर अशा विषमभावांचा स्पर्श नसतो व जो शत्रु-मित्र या दोघांनाहि सारखेच लेखतो॥ १९७ ॥ अर्जुना! ज्याप्रमाणे, दिवा जें नेहमीं घरांत राहणारे आहेत त्यांना प्रकाश द्यावा व बाहेरून आलेल्या परक्यांना आंधार द्यावा, असे कधी करीत नाही॥ १९८ ॥ किंवा तुकडे करण्याकरितां कुऱ्हाडीने प्रहार करूं इच्छिणाऱ्याला व झाड लावून त्याची वाढ करणाऱ्याला झाड आपली एकसारखी सावलीच देतो॥ १९९ ॥ किंवा ज्याप्रमाणे ऊस पाणी घालून वाढविणाऱ्याला गोड व त्याला चरक्यांत घालून पिळणाऱ्याला कडू असा कधीच होत नाही॥ २०० ॥ त्याप्रमाणे अर्जुना! जो शत्रु-मित्र, मान-अपमान यांचे ठिकाणी एकसारखी समबुद्धि ठेवतो॥ २०१ ॥ ज्याप्रमाणे आकाश तिन्ही ऋतूंमध्ये एकसारखें समानच असतें, त्याप्रमाणे थंडी व ऊन या दोहोंना जो सारखाच लेखतो॥ २०२ ॥ हे अर्जुना! मेरुपर्वत, ज्याप्रमाणे दक्षिणेकडून किंवा उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्याला सारखेच मानतो,

त्याप्रमाणे प्राप्त होणाऱ्या सुखदु:खांना जो सारखे लेखून निर्विकार राहतो॥ २०३ ॥ ज्याप्रमाणे चांदणें, दरिद्र्याला व राजाला सारखेच आल्हादकारक वाटते, त्याप्रमाणे जो पुरुष सर्व भूतमात्राचे ठिकाणी एक दयाबुद्धिच ठेवतो॥ २०४॥ एक पाणी, जसें सर्व जगाला प्यावेसें वाटतें, तसे तिन्ही लोक कृपा व्हावी म्हणून ज्याची इच्छा करतात॥ २०५॥ अंतर्बाह्य संगरूप विषयांचा संबंध सोडल्यामुळे, शरीराच्या ठिकाणीच शरीर घालून जो एकटा आहे॥ २०६॥

गूढार्थदीपिका—सबाह्य संगु-म्हणजे अंतर्बाह्य संग.

आसक्तिमुळे अंतकरणाशीं विषयांचा संग होतो व बाहेर विषयभोगाने विषयाशीं देहाचा संग होतो.

एकाकी असे आंग आंगी सूनी-म्हणजे शरीराचा किंवा अंत:करणाचा बाह्य विषयाशीं संबंध न होऊं देतां शरीराचे ठिकाणी शरीर ठेऊन म्हणजे केवळ शरीराने राहिला.

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी सन्तुष्टो येन केनचित्। अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः॥ १९॥

अर्थ—निंदा व स्तुति ह्या दोन्ही सारख्याच समजणारा, मौन धारण करणारा, कशांतहि संतुष्ट असणारा, एकाच ठिकाणचा आश्रय करून न राहणारा व बुद्धि स्थिर करून असणारा, असा असून जो माझ्या सगुण स्वरूपाचे ठिकाणीं प्रेम करतो, तो पुरुष मला प्रिय आहे.॥ १९॥

जो निंदेतें नेघे। स्तुति न श्लाघे। आकाशा न लगे। लेपु जैसा॥ २०७॥
तैसें निंदे आणि स्तुती। मानु करूनि एके पांती। विचरे प्राणवृत्ती। जनीं वनीं॥ २०८॥
साच लटिकें दोन्हीं। न बोले जाहला मौनी। जे भोगितां उन्मनी। आरायेना॥ २०९॥

अर्थ—ज्याप्रमाणे आकाशाला कशाचाहि लेप लागत नाही, त्याप्रमाणे जो निंदा झाली असे समजून खेद मानीत नाही व स्तुति झाली असे समजून हर्षहि मानीत नाही॥ २०७॥ त्याप्रमाणे निंदा आणि स्तुति या दोघांनाहि एका पंक्तीस बसवून म्हणजे दोघांनाहि सारखेच समजून, प्राणाप्रमाणे लोकांत व वनांत सारखाच वावरतो॥ २०८॥ खरें किंवा खोटे असे दोन्ही प्रकारचे बोलणें सोडून देऊन जो मौन धारण करतो व ज्याला उन्मनी अवस्था भोगतांना पुरें म्हणवत नाही॥ २०९॥

जो यथालाभें न तोखे। अलाभें न पारुखे। पाउसेंवीण न सुके। समुद्रु जैसा॥ २१०॥
आणि वायूसि एके ठायीं। बिढार जैसें नाहीं। तैसा न धरीच केंहीं। आश्रयो जो॥ २११॥
आघवाचि आकाशस्थिति। जेवीं वायूसि नित्य वसति। तेवीं जगचि विश्रांति-। स्थान जया॥ २१२॥
हें विश्वचि माझें घर। ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला॥ २१३॥

अर्थ—प्रारब्धानुसार मिळणाऱ्या सुखलाभाने देखील ज्याला आनंद होत नाही व पाऊस न पडला तरी समुद्र जसा सुकत नाही, तसा सुखलाभ न झाला असतांहि जो खिन्न होत नाही॥ २१०॥ आणि ज्याप्रमाणे वायु एका ठिकाणी स्थिर राहत नाही, त्याप्रमाणे जो एकाच ठिकाणचा आश्रय करीत नाही॥ २११॥ ज्याप्रमाणे वायु, अखंड आकाशांत, आकाशस्वरूपच होऊन राहतो. त्याप्रमाणे संपूर्ण जगत् ज्याचें राहण्याचें स्थान असतें॥ २१२॥ या संपूर्ण चराचरांत ''मी मी'' म्हणून स्फुरणारा मीच एक आहे असें केवळ व्यतिरेकज्ञानच नाही, तर सर्व चराचर रूपाने मीच एक भासतो असें अन्वयज्ञानहि ज्याच्या बुद्धींत दृढ झालें आहे॥ २१३॥

मग यावरीही पार्था। माझां भजनीं आस्था। तरी तयातें मी माथां। मुकुट करीं॥ २१४॥

अर्थ—अर्जुना! मग मी 'यावरीही'-म्हणजे व्यतिरेक व अन्वयज्ञान दृढ झाल्यावरहि-माझ्या सगुणस्वरूपाचें प्रेमाने भजन करण्याची ज्याला गोडी व श्रद्धा आहे, त्याला मी आपल्या शिरावरील मुकुटच करतो-म्हणजे आपल्या शिरावर मुकुटाप्रमाणे धारण करतो॥ २१४॥

गूढार्थदीपिका—वर सांगितल्याप्रमाणे व्यतिरेक व अन्वय यांच्या योगाने पूर्ण ज्ञान झालेल्या ज्ञान्याच्या ठिकाणी मीच एक आहे, अशी जी केवळ आपल्या अद्वैतपणाची जाणीव राहते, ती जाणीव म्हणजे ''विजातीयभेद ''मी देह'' म्हणणें। सजातीय भेद मी जीवपणें। स्वगत भेद मी ब्रह्मस्फुरणें। हे तिन्ही नेणें परमात्मा॥ ५२५॥''

(ए. भा. अ. २८) ज्ञान्याने ''मी अद्वैत ब्रह्मस्वरूप आहे'' अशी जाणीव वागविणें म्हणजे परमात्म्याहून आपलें थोडें निराळें व्यक्तित्व मिरविण्यासारखें असल्यामुळे तो स्वगत म्हणजे ब्रह्मांतच भेद होतो, तो भगवंताशीं समरस मिळत नाही, असे श्रीनाथंचेहि म्हणणें आहे.

सगुण परमात्म्याच्या प्रेमभक्तींत भक्ताला मीपणा मिरविण्याला संधिच सांपडत नसल्यामुळे त्याला मीपण स्फुरतच नाही आणि ''मीपणाविण अवघा देवो। हा समर्थांचा भक्त्यनुभवो।'' (श्रीगुलाबरावमहाराज कृत ''भगवद्भक्तिसौरभ'' प्रथम पराग-१५) मीपणा स्फुरत नसल्यामुळे भगवंताशीं समरस होऊन जातो व त्या स्थितींत एक भगवानच उरतो, असा सर्व संताचा अनुभव आहे. तसेंच जाणीव स्फुरते तोपर्यंत ब्रह्मानंदाचा लाभ होत नाही, हे मागें सांगितलेच आहे.

याप्रमाणे निर्विकल्प ऐक्याचा व ब्रह्मानंदाचा विशेष लाभ, ज्ञानापेक्षा प्रेमभक्तींतच होत असल्यामुळे अद्वैतज्ञान प्राप्त झाल्यानंतरहि सगुण भगवंताचीं भक्ति करणाऱ्यांची येथे प्रशंसा केली आहे. ही केवळ स्तुतिमात्र नाही, हें उघड आहे.

उत्तमासि मस्तक। खालविजे हें काय कौतुक। परि मानु करिती तीन्हीं लोक। पायवणिया॥ २१५॥
तरि श्रद्धावस्तूसि आदरु। करिता जाणिजे प्रकारु। जरी होय श्रीगुरु। सदाशिवु॥ २१६॥

अर्थ—अशा घोर भक्तापुढे माझ्यासारख्या एखाद्याने मस्तक लववावे यांत कांही आश्चर्य नाही, पण माझ्या या उत्तम भक्ताच्या चरणतीर्थाचा तिन्ही भुवनांतील लोक आदर करतात॥ २१५॥ जर भगवान शंकर सद्‌गुरु प्राप्त झाले, तरच श्रद्धावस्तूचा-म्हणजे माझ्यावरील परमप्रेमवस्तूचा-आदर म्हणजे जपणूक-कशा प्रकारें केली पाहिजे, हें जाणता येते॥ २१६॥

गूढार्थदीपिका—या अध्यायांत श्रीमाउलींनी ''श्रद्धा'' हा शब्द प्रेमार्थी वापरला आहे हे मागें श्लोक दोन वर निरूपण करतांना सांगितलेंच आहे.

जरी होय श्रीगुरु सदाशिव—''शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिव:'' शिवाचें हृदय विष्णु आहे व विष्णूचें हृदय शिव होय, असें शास्त्र-वचन आहे. याचा अर्थ असा आहे की शिवाचें विष्णूला व विष्णूचें शिवाला असे परस्परांचे परस्परांना परमप्रेम व ध्यान आहे. शिवाचें परमप्रेम कसें करायचें हें एक विष्णुच जाणतात; म्हणून शिवभक्तांनी शिवाचें प्रेम संपादन करण्याकरितां विष्णूला गुरु मानिलें पाहिजे. तसेंच विष्णूचें प्रेम करावें; हें एक शंकरच जाणतात, म्हणून विष्णुभक्ताने विष्णूचें प्रेम संपादन करण्याकरितां शिवाला गुरु केलें पाहिजे.

भगवान शंकराने परमप्रेमाचा विषय जो भगवान विष्णु, त्याच्या चरणाचें तीर्थ जी गंगा, तिला आपल्या शिरावर धारण करून विष्णूचे ठिकाणी असलेलें आपलें परमप्रेम व्यक्त केलें आहे.

तसेंच पांडुरंगाने आपल्या शिरावर शिवलिंगधारण करून आपलें शिवावरील प्रेम व्यक्त केलें आहे.

भगवान शंकर, हे भगवान विष्णूचे भक्त शिरोमणि असल्यामुळेंच ''माझ्या भक्तिप्रेमाची जोपासना कशी करावी, हें समजण्याकरीतां भगवान शंकर सद्‌गुरु पाहिजे'' असे माउलींनी येथे म्हटले आहे.

परि हें असो आतां। महेशातें वानितां। आत्मस्तुति होता। संचारु असे॥ २१७॥
ययालागीं हे नोहे। म्हणितलें रमानाहें। अर्जुना मी वाहें। शिरीं तयातें॥ २१८॥
जे पुरुषार्थसिद्धी चौथी। घेऊनि आपुलिया हातीं। रिगाला भक्तिपंथीं। जगा देतु॥ २१९॥

अर्थ—पण आतां हें पुरे. भगवान शंकराच्या थोर प्रेमाचें वर्णन करूं लागलों, तर आत्मस्तुतीचा संचार होईल म्हणजे पर्यायाने आत्मस्तुतीच केल्यासारखे होईल॥ २१७॥ म्हणून रमापति श्रीकृष्ण म्हणाले, शंकराच्या प्रेमाची थोरवी गात नाही, पण अर्जुना! (एवढेच सांगतों की) अशा भक्ताला मी शिरावर धारण करतों॥ २१८॥ (कारण) असा हा माझा भक्त, सगुण सायुज्यतारूपी चौथ्या पुरुषार्थाची सिद्धि आपल्या हातीं घेऊन ती, भक्तिमार्गाने जगाला देत निघाला॥ २१९॥

गूढार्थदीपिका—भक्तच जगांत भक्तिमार्गाची स्थापना करतात असा भाव. पद्मपुराणांतर्गत भागवत माहात्म्यांत "घटते कृष्णदासस्य भक्तेः संस्थापना सदा" (अ. २-५५) असेंच म्हटलें आहे.

मन्वादि ऋषी जसे कर्ममार्गाची प्रवृत्ति करणारे अधिकारिक व याज्ञवल्क्यादि ऋषी ज्ञानमार्गाचे प्रवर्तक असे अधिकारिक म्हणून भगवंताकडून ठरले आहेत, तसेच नारदादि संत भक्तिमार्गाची प्रवृत्ति करणरे म्हणून अधिकारिक ठरले गेलें आहेत.

कैवल्याचा अधिकारी। मोक्षाची सोडीबांधी करी। कीं जळाचिये परी। तळवटु घे॥ २२०॥

अर्थ—कैवल्याचा-म्हणजे जीवब्रह्मैक्यरूप अद्वैतब्रह्मज्ञानाचा-जो अधिकारी असेल, त्याला स्वसामर्थ्याने मोक्ष देतो. इतकें सामर्थ्य असूनहि पाणी ज्याप्रमाणे नेहमीं सखोल जमीनीकडे वाहते, त्याप्रमाणे तो आपण सर्वांपेक्षा कनिष्ठ होऊन सर्वांना आपल्यापेक्षा परमेश्वरस्वरूप समजतो॥ २२०॥

गूढार्थदीपिका—"लघुत्वाचेनि मुद्दलें। बैसला गुरुत्वाचेहि सेले" (अमृ. प्र. २-२१) या अमृतानुभवांतील ओवीचा अर्थच माऊलींनी येथें सांगितला आहे.

म्हणोनि गा नमस्कारूं। तयातें आम्ही माथां मुकुट करूं। तयाची टांच धरूं। हृदयीं आम्ही॥ २२१॥

अर्थ—भगवान म्हणतात, अर्जुना! म्हणून आम्ही त्यांनांच नमस्कार करूं. त्यांना आपल्या शिरावर मुकुट करूं व त्यांचे चरण आम्ही आपल्या हृदयांत धरूं॥ २२१॥

गूढार्थदीपिका—भक्ताला भगवान जसा अत्यंत प्रिय व वंदनीय असतो, तसेच भगवंताला भक्तहि अत्यंत प्रिय व वंदनीय असतात.

तयाचिया गुणांची लेणीं। लेववूं आपुलिये वाणी। तयाची कीर्ति श्रवणीं। आम्ही लेऊं॥ २२२॥

अर्थ—त्यांच्या गुणांचे अलंकार आम्ही आपल्या वाणीवर घालूं-म्हणजे त्यांच्या गुणाचें अखंड वर्णन करूं-व त्यांची कीर्ति हाच कोणी अलंकार आपल्या कानाचे ठिकाणी घालूं-म्हणजे त्यांची कीर्तीच आपल्या कानाने श्रवण करूं॥ २२२॥

गूढार्थदीपिका—भक्ताला जशी भगवंताच्या गुणसंकीर्तनाची अत्यंत आवडी असते, तशी भगवंतालाहि भक्ताच्या गुणकीर्तनाची आवडी असते.

तो पहावा हे डोहळे। म्हणोनि अचक्षूसी मज डोळे। हातींचेनि लीलाकमळें। पुजूं तयातें॥ २२३॥
दोंवरी दोनी। भुजा आलों घेऊनी। आलिंगावयालागुनी। तयाचें आंग॥ २२४॥
तया संगाचेनि सुरवाडें। मज विदेहा देह धरणें घडे। किंबहुना आवडे। निरुपमु॥ २२५॥

अर्थ—मी नेत्ररहित असतांहि त्यांना पाहावें या उत्कट इच्छेने नेत्र धारण केले व मी लीलेकरिता घेतलेल्या हातांतील कमळाने त्यांची पूजा करीत असतों॥ २२३॥ त्यांच्या शरीराला आलिंगन देण्याकरितांच दोन भुजावर आणखी दोन भुजा घेऊन आलों-म्हणजे चतुर्भुज झालों (दोन भुजांनी आलिंगन देऊन आलिंगनाचें पूर्ण सूख भोगतां येणार नाही, असे वाटून चतुर्भुज झालों, असा अर्थ)॥ २२४॥ भक्ताच्या संगतींत देखील ब्रह्मसुख असतें, म्हणुनच मी विदेही असूनहि त्यांची संगति करण्याकरितां देह धारण करतों. फार काय सांगू! अशा ज्ञानीभक्तांचें मला जें प्रेम असतें, तें कशाचीहि उपमा देऊन सांगतां येण्याजोगें नाही॥ २२५॥

गूढार्थदीपिका—या २२३ ते २२५ पर्यंतच्या ओव्यांतून भगवान मायेने सगुण होत नसून भक्ताच्या निःसीम प्रेमप्रवृत्तीने सगुण होतो असें माउलीचें म्हणणें आहे, अर्थात् निःसीम प्रेम, परब्रह्माचेंच स्वरूप असल्यामुळें आणि निःसीम प्रेम, परब्रह्माचे ठिकाणींच होऊं शकत असल्यामुळे भगवंताच्या निःसीम प्रेमाचा विषय भक्त व भक्ताच्या निःसीम प्रेमाचा विषय भगवान या दोघांचे विग्रह, "आनंद विग्रह श्रीकृष्ण" या नाथवचनाप्रमाणे "**वै सदेह सच्चिदानंद कां नोहावे ते**" या माउलीच्या वचनाप्रमाणे पूर्णब्रह्म व नित्य असतात; हाच सिद्धान्त आहे. स्कंदपुराणांतर्गत भागवत माहात्म्यातील "कामास्तु वांछितास्तस्य गावो गोपाश्च गोपिकाः। नित्या सर्वे विहाराद्या आप्तकामस्ततस्त्वयम्" या श्लोकाने हाच सिद्धान्त सांगितला आहे.

तेणेंसीं आम्हां मैत्र। एथ कायसें विचित्र। परि तयाचें चरित्र। ऐकती जे॥ २२६॥
तेही प्राणापरौते। आवडती हें निरुतें। जे भक्तचरित्रातें। प्रशंसिती॥ २२७॥
जो हा अर्जुना साद्यंत। सांगितला प्रस्तुत। भक्तियोगु समस्त। योगरूप॥ २२८॥
जे मी प्रीति करीं। कां मनीं शिरसा धरीं। येवढी थोरी। जया स्थितिये॥ २२९॥

अर्थ—अशा भक्ताशीं माझें अत्यंत सख्य असतें, यांत कांही आश्चर्य नाही; पण जे कोणी माझ्या भक्तांचें चरित्र श्रवण करतात॥ २२६॥ तसेच जे कोणी माझ्या भक्तांच्या चरित्राची स्तुति करतात-म्हणजे गुणकीर्तन करतात-ते देखील मला माझ्या प्राणापेक्षा प्रिय असतात, हें अत्यंत सत्य आहे॥ २२७॥ अर्जुना! तुला मी आतांच जो संपूर्ण भक्तियोग सांगितला, त्यांत माझ्याशीं ऐक्य करणारे जेवढे योग आहेत, त्या सर्वांचा अंतर्भाव होतो-म्हणजे भक्तियोगाने सर्व प्रक्रिया अवगत होतात किंवा साधतात॥ २२८॥ ज्या भक्तिस्थितीची एवढी थोरवी आहे की, त्या भक्तिप्रेमामुळेच मीहि आपल्या भक्तांचें अत्यंत प्रेम करतो किंवा त्याला शिरावर धारण करतो॥ २२९॥

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते। श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः॥ २०॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम द्वादशोऽध्यायः॥ १॥

अर्थ—जे कोणी धर्माला धरून असणाऱ्या व अमृतस्वरूप अशा भक्तियोगाचें अत्यंत श्रद्धा व आदर ठेवून व माझ्या सगुणाची प्राप्ति हीच आपली परमगति होय, असें समजून, सांगितल्याप्रमाणे आचरण करतात, ते भक्त मला अत्यंत प्रिय होतात॥ २०॥

ते हे गोष्टी रम्य। अमृतधारा धर्म्य। करिती प्रतीतिगम्य। आइकोनि जे॥ २३०॥

अर्थ—धर्म्य-म्हणजे अवश्य आचरणीय-व चित्ताला मोहक अशी ही अमृताची धारा-म्हणजे अखंड अविनाशी-अशी भक्तियोगाची कथा ऐकून जे कोणी आपल्या अनुभवाला आणून घेतील॥ २३०॥

गूढार्थदीपिका-गोष्टी रम्य—म्हणजे ही भागवतधर्माची कथा मनाला गोडी लावणारी आहे.

अमृतधारा-अमृत म्हणजे अविनाशी परब्रह्म, त्याची धारा-म्हणजे अखंड ब्रह्मस्थिति कायम ठेवणारी.

धर्म्य-म्हणजे धर्माला विरुद्ध नसणारी. हा भक्तियोगरूपी भागवतधर्म वैदिकधर्माच्या विरुद्ध नसून तोच मुख्य व श्रेष्ठ वैदिक धर्म आहे असा अर्थ.

एष मे सर्व धर्माणां धर्मोऽधिकतमो मतः। यद्भक्त्या पुण्डरीकाक्षं स्तवैरर्चेन्नरः॥ ८॥

-सदा सर्वदा स्तुति-स्तोत्र-नामस्मरणादिकांनी भगवंताचे प्रेमभावाने भजन करणें; हाच सर्व श्रौत-स्मार्त धर्मामध्ये श्रेष्ठ धर्म आहे, असे भीष्मांचार्यांनीहि विष्णुसहस्रनामांत म्हटलें आहे.

तैसाचि श्रद्धेचेनि आदरें। जयांचां ठायीं विस्तरे। जीवीं जयां थारे। जे अनुष्ठिती॥ २३१॥
परि निरूपली जैसी। तैसीच स्थिति मानसीं। मग सुक्षेत्रीं जैसी। पेरणी केली॥ २३२॥
परि मातें परम करूनि। इये अर्थी प्रेम धरूनि। हेंचि सर्वस्व मानूनि। घेती जे पैं॥ २३३॥
पार्था गा जगीं। तेचि भक्त तेचि योगी। उत्कंठा तयांलागीं। अखंड मज॥ २३४॥
ते तीर्थ ते क्षेत्र। जगीं तेचि पवित्र। भक्तिकथेसी मैत्र। जयां पुरुषां॥ २३५॥
आम्ही तयाचें करूं ध्यान। तो आमुचें देवतार्चन। तेवांचूनि आन। गोमटे नाहीं॥ २३६॥
तयाचें आम्हां व्यसन। तो आमुचें निधिनिधान। किंबहुना समाधान। तो मिळे तैं॥ २३७॥
पैं प्रेमळाची वार्ता। जे अनुवादती पांडुसुता। ते मानूं परमदेवता। आपुली आम्ही॥ २३८॥
ऐसें निजजनानंदें। तेणें जगदादिकंदें। बोलिलें मुकुंदें। संजयो म्हणे॥ २३९॥
राया जो निर्मळु। निष्कल लोककृपाळु। शरणागतां प्रतिपाळु। शरण्यु जो॥ २४०॥
जो पैं सुरसहायशीळु। लोकलालनलीळु। प्रणतप्रतिपाळु। हा खेळु जयाचा॥ २४१॥
जो धर्मकीर्तिधवळु। अगाधदातृत्वें सरळु। अतुलबळें प्रबळु। बळिबंधनु॥ २४२॥

जो भक्तजनवत्सलु। प्रेमळजनप्रांजळु। सत्यसेतु सकळु। कलानिधि॥ २४३॥

अर्थ—त्याचप्रमाणे अत्यंत श्रद्धा व आदर यांच्या योगाने ज्यांच्या ठिकाणी हा भक्तियोग विस्तार पावला व ज्यांच्या अंत:करणात तो दृढ होऊन जे त्या भक्तीचें अनुष्ठान करतात॥ २३१॥ पण चांगल्या मशागत केलेल्या क्षेत्रांत जशी पेरणी केली जाते, त्याप्रमाणे वर सांगितली तशीच, ज्यांच्या मनाची अत्यंत प्रेमळ स्थिति आहे॥ २३२॥ आणि जे माझ्या सगुण स्वरूपालाच आपली परमगति समजतात, ज्यांना माझ्या सगुणस्वरूपाच्या प्राप्तीचें प्रेम असतें व जे माझ्या सगुण स्वरूपाला सर्वस्व मानून घेतात॥ २३३॥ बा अर्जुना! या जगांत तेच खरे भक्त व तेच खरे योगी होत. मला त्यांच्याच भेटीची अत्यंत उत्कंठा असते.॥ २३४॥ माझ्या भक्तिकथेशीं ज्यांचे सख्य झालें, ते पुरुषच खरोखर पवित्र तीर्थ व पवित्र क्षेत्र होत. त्यांच्यासारखे जगांत दुसरें कांहीहि पवित्र नाही॥ २३५॥ अशा भक्ताचें आम्ही ध्यान करूं तेच आमच्या पूजेंतील देव आहेत. त्यांच्यावांचून आम्हालां कांहीहि एक गोड वाटत नाही॥ २३६॥ आम्हांला त्यांचाच छंद असतो. तेच आमच्या द्रव्याचे सांठे होत. एवढेच नाही. तर त्यांची भेट झाली असतांच आमच्या मनाचें समाधान होतें.॥ २३७॥ अर्जुना! पण जे कोणी अशा प्रेमळ भक्तांच्या गोष्टी करतात किंवा कथा गातात, त्यांना देखील आम्ही आपली परम देवता मानतो॥ २३८॥ संजय म्हणतो, धृतराष्ट्रा! आपल्या भक्तजनांचा ब्रह्मानंद व जगद्रूपी कार्याचें मूळ कारण असा जो भगवान श्रीकृष्ण, तो याप्रमाणे अर्जुनाशीं बोलला॥ २३९॥ राजा धृतराष्ट्रा! जो अविद्यादोषरहित असा शुद्ध आहे, ज्याची कीर्ति कलंकरहित आहे, जो सर्व लोकांवर कृपा करणारा आहे, जो शरणागतांवर आईप्रमाणे प्रेम करणारा आहे आणि जो सर्वांना शरण जाण्याला योग्य आहे॥ २४०॥ देवांचा कैवार घेऊन त्यांना साह्य करण्याचा ज्याचा स्वभाव आहे, त्रैलोक्याचे संगोपन करणें ही ज्याचीं क्रीडा आहे व शरण आलेल्यांचा प्रतिपाळ करणें हाच ज्याचा खेळ आहे (भगवान, भजन करणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांचा सांभाळ करणारा होतो. असा भाव.)॥ २४१॥ धर्माप्रमाणेच वागणारा अशी ज्याची कीर्ति आहे, अगाध दातृत्वामुळे ज्याचे सम वागणें आहे, अमर्याद सामर्थ्याने समर्थ असल्यामुळे जो प्रबळ अशा बळीला बंधन करणारा झाला आहे॥ २४२॥ जो आपल्या भक्तजनांवर आईप्रमाणे प्रेम करणारा आहे आणि प्रेमळजनांशीं निष्कपट आहे. जो आपल्या सत्यस्वरूपाने जगाचे धारण करणारा आहे व जो संपूर्ण कलांचा निधि आहे॥ २४३॥

गूढार्थदीपिका-सत्यसेतु—'सेतु' या शब्दाचा ''सेतुर्विधृति:'' (छां. उ. ८-४-१) असा अर्थ छांदोग्योपनिषदांत दिला आहे. परस्परांचा नाश करणाऱ्या अनेक पदार्थांनी भरलेल्या जगताचा नाश होऊं न देतां, भगवान आपल्या सत्य स्वरूपाचे द्वारा किंवा सत्यादिधर्माचे द्वारा जगताचे धारण करतो, म्हणून भगवंताला येथे माउलींनी सत्यकेतु म्हटलें आहे.

तो श्रीकृष्ण वैकुंठींचा। चक्रवर्ती निजांचा। सांगतुसे येरु दैवाचा। आइकतु असे॥ २४४॥
आतां ययावरी। निरुपिती परी। संजयो म्हणे अवधारीं। धृतराष्ट्रातें॥ २४५॥
तेंचि रसाळ कथा। मऱ्हाठिया प्रतिपथा। आणिजेल आतां। अवधारिजो॥ २४६॥
ज्ञानदेव म्हणे तुम्ही। संत वोळगावेति आम्ही। हें पढविलों जी स्वामी। निवृत्तिदेवे॥ २४७॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां द्वादशोऽध्याय:॥ १२॥

अर्थ—जो वैकुंठीचा स्वामी असून आपल्या भक्तांचा सार्वभौम राजा आहे तो श्रीकृष्ण सांगत असून भाग्यवान अर्जुन श्रवण करीत आहे॥ २४४॥ संजय राजा धृतराष्ट्राला म्हणतो, आतां यापुढें भगवान श्रीकृष्ण काय बोलतात ते ऐका॥ २४५॥ तीच रसाळ कथा मराठी भाषेच्या रूपांतरांत आणली जाईल, आतां लक्ष द्या॥ २४६॥ श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, आम्हीं तुम्हां संतांचे चरण धरावें, हेंच श्री स्वामी निवृत्तिदेवांनी आम्हांला शिकविलें॥ २४७॥

गूढार्थदीपिका—संतांना शरण जाणें व त्यांच्या चरणांचा आश्रय करणें हेंच सर्व साधनांत सारभूत साधन आहे. असेंच सर्व संतांचें म्हणणें आहे, असा भाव.

श्रीसद्गुरुकृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायाचा गूढार्थदीपिकेसह अनुवाद पूर्ण झाला, तो श्रीसद्गुरुचरणीं समर्पण असो!

समारोप

मागील अकराव्या अध्यायांत भगवंतांनी आपल्या एक देशीय सगुण श्रीकृष्णस्वरूपापेक्षा विश्वरूप श्रेष्ठ असून, त्यावरच प्रेम असूं दे असे म्हटलें; हें ऐकून अर्जुनाला भगवंताचें म्हणणें आपल्या अनुभवाशीं विरुद्ध आहे, असें वाटून भगवंताच्या मुखानेच कोणतें रूप श्रेष्ठ आहे, याचा निर्णय करून घेण्याकरितां, विश्वरूप व सगुण चतुर्भुज या दोहोपैकी कोणत्या रूपाचें, प्रेमभक्तीने अखंडानंदरूप परब्रह्माशीं, निर्विकल्प ऐक्य होऊं शकतें, असा मोठा मार्मिक प्रश्न, अर्जुनाने भगवंताला केला.

भगवंतांनी अर्जुनाच्या या प्रश्नाचें उत्तर या अध्यायांत देऊन अर्जुनाच्या अनुभवालाच पुष्टि दिली आहे.

भगवान म्हणतात, अर्जुना! माझ्या सगुण स्वरूपाचे ठिकाणी अखंड मन लावून, जे माझी अत्यंत प्रेमाने भक्ति करतात, तेच युक्ततम होतात-म्हणजे माझ्याशीं निर्विकल्प ऐक्य पावतात, हें जाण आणि अविनाशी, निर्दिष्ट न करतां येण्याजोगे, इंद्रियातीत, सर्व व्यापक, अचिंत्य, कूटस्थ व अचल अशा माझ्या विश्वरूपाची प्रेमपूर्वक उपासना करतां येंणें शक्य नसल्यामुळे, सर्व इंद्रियांचा रोध करून व सर्वत्र समबुद्धि ठेऊन सर्व भूतांचे हिताचे ठिकाणीं रत होऊन, ते मी आहे अशा जाणीवेने, जे माझी उपासना करतात, तेहि शेवटीं मलाच प्राप्त होतात.

पण देहधारी जीवांना, या माझ्या अतींद्रिय विश्वरूपाची प्राप्ति अत्यंत क्लेश सोसूनच होते.

जे काणी, आपल्या संपूर्ण कर्मांचा माझ्या ठिकाणी संन्यास करून, माझे ध्यान करून माझी उपासना करतात, त्यांना कांही एक कष्ट पडू न देतां व फार वेळ लागूं न देतां मी या संसारसमुद्राच्या पार करतो. भगवान म्हणतात, अर्जुना! माझे ठिकाणींच आपलें प्रेम लाव व माझेच ठिकाणी आपली बुद्धि स्थिर कर म्हणजे तूं मला निश्चयाने प्राप्त होशील, यांत संशय नाही. जर तूं आपलें चित्त, माझे ठिकाणी स्थिर करूं शकत नसशील, तर माझ्या ठिकाणीं चित्त लावण्याचा अभ्यास केला असतां हळूहळू माझ्या ठिकाणीं चित्त स्थिर होऊन, तूं मला प्राप्त होशील. जर असाहि अभ्यास तुझ्याच्याने होत नसेल, तर संपूर्ण कर्मे मत्प्रीत्यर्थ करीत जा. मत्प्रीत्यर्थ कर्म केल्यानेहि तुला ऐक्यसिद्धि प्राप्त होईल. हेंहि तुला साध्य होत नसेल, तर जेवढीं कर्मे होतील, त्यांच्या फळांची मुळींच इच्छा करूं नकोस.

अभ्यासानेहि ज्ञानरूपी विशेष उत्पन्न होतो. ज्ञानापासून ध्यान, ध्यानापासून कर्मफलत्याग व त्यागापासून शांति उत्पन्न होते, कोण्याहि भूतांचा द्वेष न करणारा, कोण्याहि भूताशी मैत्री करणारा, करुणासंपन्न, अहंता-ममतारहित, सुखदुःख सारखे मानणारा, क्षमावान्, अखंड संतुष्ट, दृढनिश्चयीं, मनोनिग्रही, असा असून, प्रेमाने ज्याने आपली मनबुद्धि मला समर्पण केली आहे, असा भक्त मला प्रिय असतो.

ज्याच्यापासून लोकांना त्रास होत नाही व लोकांपासूनहि ज्याला त्रास होत नाही व जो हर्ष, शोक, भयरहित झाला आहे आणि इतके असूनहि जो माझ्या सगुण स्वरूपाची भक्ति करतो, तो मला प्रिय आहे. ज्याला कशाचीच अपेक्षा नाही. जो आंत-बाहेर शुचिर्भूत असून, आत्मप्राप्ति करून घेण्यांत दक्ष आहे, बाह्य विषयांचे ठिकाणी जो उदासीन होऊन, शोकरहित झाला आहे आणि सर्वकर्मारंभाचा त्याग करून, जो माझ्या सगुण स्वरूपाच्या ठिकाणी प्रेम करतो, तो मला प्रिय आहे.

ज्याला विषयप्राप्तींत आनंद होत नाही किंवा जो विषयांचा द्वेष करीत नाही, जो कशाची इच्छा करीत नाही व जो कशाबद्दल शोकहि करीत नाही, जो पापपुण्याची बुद्धि सोडून देऊन एक सगुण भगवंताचे ठिकाणीं भक्तिमान् झाला, तोच मला प्रिय आहे.

शत्रु-मित्र, मान-अपमान, शीत-उष्ण, सुख-दुःख या सर्व द्वंद्वाचे ठिकाणी समबुद्धि धारण करणारा, सर्वसंगरहित, निंदा-स्तुति सम लेखणारा, मौन धारण करून कशाहि स्थितींत संतुष्ट असणारा, कोणा एक देशाचा आश्रय न करणारा व आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थिर बुद्धि झालेला आणि माझे ठिकाणीच संपन्न असणारा, मला अत्यंत प्रिय आहे.

अशा या अविनाशी परमधर्मरूप भक्तिमार्गाची, अत्यंत श्रद्धापूर्वक, मत्परायण होऊन, सांगितल्याप्रमाणे जे, माझ्या सगुण स्वरूपाची उपासना करतात, ते भक्त, मला अत्यंत प्रिय असतात व माझ्या भक्तांची कथा सांगणारे व ऐकणारेहि मला आवडतात.

॥ श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय तेरावा

अवतरणिका-मागील बाराव्या अध्यायांत माउलींनी ब्रह्मज्ञानानंतरहि सगुण साकार भगवंताच्या भक्तीची आवश्यकता व थोरवी गायिली आहें.

भगवंताचें मूळचें निर्गुण स्वरूप अपरिणामी, अस्फुट, अद्वैत, सच्चिदानंदस्वरूप असल्यामुळे व तें स्वरूप मायाबद्ध नसल्यामुळे या स्वरूपाचे ठिकाणीं विवर्तरूपाने असणारें त्याचें सगुण स्वरूपहि अनध्यस्त म्हणजे पूर्णब्रह्मस्वरूपच असतें, हें आम्हीं आतांपर्यंत अनेक ठिकाणीं दाखविलेंच आहे.

ज्याप्रमाणे सोन्याची पारख झाल्यावांचून हा अलंकार सोन्याचा आहे अशी खात्री होत नाही व त्याचें प्रेम वाटत नाही, त्याप्रमाणेंच भगवंताच्या निर्गुण स्वरूपाचें निःसंदिग्ध ज्ञान झाल्याखेरीज भगवंताच्या सगुण स्वरूपाचेंहि पूर्णब्रह्मत्व कळून येत नाही.

निर्गुणस्वरूपच अंतःकरणवृत्तींत प्रतिबिंबित झालें असतां त्यास क्षेत्रज्ञ म्हटलें जातें. क्षेत्रज्ञ हा क्षेत्राचा ज्ञाता आहे व क्षेत्र हें जाणलें जाणारें आहे. तो (क्षेत्रज्ञ) क्षेत्राहून निराळा आहे; पण क्षेत्राचे ठिकाणींच क्षेत्रज्ञ असल्यामुळे त्या दोघांचें मिश्रण झालें आहे; म्हणून आकाशाहून अति सूक्ष्म असलेल्या क्षेत्रज्ञाला जाणण्याकरितां संपूर्ण क्षेत्राचा विस्तार कळणें आवश्यक असतें. क्षेत्राचा विस्तार कळला की अनायासें क्षेत्राला जाणणारा क्षेत्रज्ञ क्षेत्राहून निराळा होतो. क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांना परस्परांहून निराळें करणें, यालाच वेदान्तांत व्यतिरेक म्हणतात.

हा व्यतिरेक मागेंहि सांगितला गेला आहे; तरीपण क्षेत्रज्ञाचें स्वरूप अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे तें एकदांच सांगितल्याने किंवा श्रवण केल्याने समजत नाही व दृढ होत नाही; म्हणून वेदान्तांत ''आवृत्तिरसकृदुपदेशात्'' (ब्र. सू. ४-१-१) क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या व्यतिरेकाचें वारंवार श्रवण करावें, असे सांगितलें आहे. या सिद्धान्ताप्रमाणे या अध्यायांत भगवंतांनी व श्रींमाउलींनी पुनः क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचा व्यतिरेक सांगितला आहे.

जयांचे केलिया स्मरण। होय सकळ विद्यांचें अधिकरण। तेचि वंदूं श्रीचरण। श्रीगुरुचे॥ १ ॥
जयांचेनि आठवें। शब्दसृष्टी आंगवे। सारस्वत आघवें। जिव्हेसि ये॥ २ ॥
वक्तृत्व गोडपणें। अमृतातें पारुष म्हणे। रस होती वोळगणें। अक्षरांसी॥ ३ ॥
भावाचें अवतरण। अवतरविती खूण। हाता चढें संपूर्ण। तत्त्वबोध॥ ४ ॥
श्रीगुरूचे पाय। जैं हृदय गिवंसूनि ठाय। तैं येवढें भाग्य होय। उन्मेषासी॥ ५ ॥

अर्थ—ज्या चरणांचें अत्यंत परम आदराने स्मरण केले असतां पुरुष संपूर्ण विद्येचें वसतिस्थान होतो, त्याच श्रीगुरुच्या चरणांना आतां नमस्कार करूं॥ १ ॥ ज्या चरणांचें स्मरण झालें असतां इष्ट अर्थ प्रगट करणारें शब्दभांडार स्वाधीन होतें आणि वाणीचे ठिकाणीं संपूर्ण रसाळ वक्तृत्व प्रगट होतें॥ २ ॥ रसाळ वक्तृत्वाच्या गोडपणापुढे अमृतहि फिकें वाटतें आणि नवरस अक्षरांना धरूनच राहतात॥ ३ ॥ आत्मबोधाचें रहस्य प्रगट करणारी खूण ठिकठिकाणीं भावार्थाला प्रगट करते आणि त्यामुळे अंतःकरणांत आत्मबोध पूर्णपणें यथार्थ अवगत होतो॥ ४॥ जेव्हा श्रीगुरुचे पाय आपल्या हृदयांत राहतात, तेव्हाच ज्ञानाचें एवढें सद्भाग्य प्राप्त होतें॥ ५ ॥

गूढार्थदीपिका—ज्ञानभक्तीने पूर्णब्रह्मस्वरूप झालेल्या श्रीगुरुचे ठिकाणीं ज्याचे निःसीम प्रेम आहे, तोहि त्यांच्याप्रमाणेच ज्ञानभक्तीने पूर्ण साक्षात्कारी होतो व त्याच्याकडून होणारा ग्रंथ अनेक प्रक्रियांनी, रहस्यांनी व साहित्यांनी भरलेला असतो, असा भाव.

''श्रवण करूनि रचित ग्रंथ। तेथ शब्दज्ञान होत। मननैंकरूनि रचित ग्रंथ। तेथ अनुमाने कळती सिद्धान्त आणि पूर्वपक्षच्छेदक बहुत युक्ती असती॥ ११४॥ निदिध्यासक रचित ग्रंथ। तेथ प्रक्रियासहित असती सिद्धान्त। परी निदिध्यासक जी प्रक्रिया करीत तींचि प्रधान राहे॥ ११५॥ ब्रह्मसंपन्न रचित ग्रंथ। तेथ अवर्णनीय अनुभूत सिद्धान्त। नाना प्रक्रिया संभरित। सर्व कांहीं मिळत नि:संशय॥ ११६॥'' (श्रीगुलाबराव महाराजकृत भगवद्‌गीतासंगति)

ग्रंथकार पांच प्रकारचे असतात—

(१) श्रुति, स्मृति, पुराण यांना प्रमाण न मानतां केवळ आपल्या बुद्धीने लिहिलेल्या ग्रंथांत संतांनी अनुभविलेल्या मोक्षमार्गाचा मागमूसहि नसतो; म्हणून ते ग्रंथ मुमुक्षूंना निरुपयोगी असतात.

(२) ज्यांनी श्रुति, स्मृति, पुराण यांचें पुष्कळ श्रवण केलें आहे. अशा पुरुषांनी लिहिलेल्या ग्रंथांत केवल शब्दज्ञान (म्हणजे केवळ प्रमाणवचनांचा संग्रह) पुष्कळ सांपडतें.

(३) सिद्धान्तांचें मनन करणाऱ्या पुरुषांनी लिहिलेल्या ग्रंथांत, सिद्धान्तपोषक व पूर्वपक्षीय शंका निवारण करणाऱ्या युक्त्या पुष्कळ असतात.

(४) निदिध्यासन करणाऱ्या पुरुषांनी लिहिलेल्या ग्रंथांत, त्यांच्या स्वत:च्या निदिध्यासन प्रक्रियेचेंच विशेष वर्णन असतें.

आणि (५) ज्ञानभक्तीने पूर्णब्रह्मस्वरूप झालेल्या सत्पुरुषांचे ग्रंथांत अनेक अनुभूत सिद्धान्त, आत्मसाक्षात्काराच्या प्रक्रिया व रहस्यें हे ठिकठिकाणीं आढळतात.

अशा सत्पुरुषांचेच ग्रंथ सर्व मुमुक्षूंना उपयोगाचे असतात.

ते नमस्कारूनि आतां। तो पितामहाचा पिता। लक्ष्मीयेचा भर्ता। ऐसें म्हणे॥ ६॥

अर्थ—म्हणून त्या चरणांना आम्ही आतां नमस्कार करतो; जो ब्रह्मदेवाचा पिता व लक्ष्मीचा पति होय तो भगवान श्रीकृष्ण पुढें असें म्हणाला॥ ६॥

श्रीभगवानुवाच

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते। एतद्यो वेत्ति तं प्राहु: क्षेत्रज्ञ इति तद्विद:॥ १॥

अर्थ—श्रीभगवान म्हणतात—हे कुंतिपुत्रा अर्जुना! या शरीरालाच क्षेत्र हें नांव आहे, याला जो जाणतो तो क्षेत्रज्ञ होय, असें क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांना जाणणारे म्हणतात॥ १॥

तरि पार्था परिसिजे। देह हें क्षेत्र म्हणिजे। हेंचि जाणे तो बोलिजे। क्षेत्रज्ञु एथें॥ ७॥

अर्थ—तरी हे अर्जुना! ऐक देहाला क्षेत्र म्हणतात व देहाला जो जाणतो त्यालाच येथें क्षेत्रज्ञ म्हटलें आहे॥ ७॥

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत। क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम॥ २॥

अर्थ—अर्जुना! सर्व शरीराचे ठिकाणीं जो क्षेत्रज्ञ आहे तो मीच आहे, असें जाण, क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या स्वरूपाचे जें यथार्थ ज्ञान तेंच खरें ज्ञान होय, असें मी समजतो॥ २॥

तरि क्षेत्रज्ञु जो एथें। तो मी जाण निरुतें। जो सर्व क्षेत्रातें। संगोपोनि असे॥ ८॥

अर्थ—शरीरांत जो क्षेत्रज्ञ म्हणून येथें सांगितला आहे व जो सर्व प्राणिमात्रांच्या शरीरांत व्यापून आहे, तो खरोखर मीच आहे, असे जाण॥ ८॥

गूढार्थदीपिका—आपल्या ठिकाणीं 'मी' म्हणून स्फुरणारी चैतन्यवृत्तिच संपूर्ण देहादि क्षेत्राला जाणत असल्यामुळें तिलाच क्षेत्रज्ञ म्हणतात. हा क्षेत्रज्ञ सर्व क्षेत्राला जाणणारा म्हणून सर्व क्षेत्रांहून खरोखर निराळा व एकच आहे. त्याचा क्षेत्राशीं कांही एक संबंध नाही. त्याचे ठिकाणी भ्रांति नसल्यामुळे तो क्षेत्राशीं आपलें ऐक्य करीत नाही व आपल्याला क्षेत्रापुरतें मर्यादित समजत नाही; म्हणूनच तो सर्व क्षेत्राचें संगोपन करतो. क्षेत्रज्ञाची ही स्वरूपस्थिति नित्य अशीच राहत असल्यामुळे त्या स्वरूपस्थितीला धरून त्याला 'ईश्वर' संज्ञा आहे.

आणि देहादि क्षेत्र म्हणजे ''मी'' अशी क्षेत्रज्ञाचे ठिकाणी जी अनादि भ्रांति दिसून पडते, त्या भ्रांतीला धरून

क्षेत्रज्ञाला 'जीव' म्हटलें जातें.

क्षेत्र आणि क्षेत्रज्ञातें। जाणणें जें निरुतें। ज्ञान ऐसें तयातें। मानूं आम्हीं॥ ९॥

अर्थ—क्षेत्र म्हणजे काय आणि क्षेत्रज्ञ कोण हें यथार्थ जाणणें यालाच आम्ही ज्ञान म्हणतों॥ ९॥

गूढार्थदीपिका—क्षेत्राची व्याप्ति व क्षेत्रज्ञाची स्थिति जाणल्याने संपूर्ण क्षेत्राहून क्षेत्रज्ञ अगदीं निराळा आहे हें कळून येऊन जशी अज्ञानभ्रांतीची व सर्व दु:खांची निवृत्ति होते तशी दुसऱ्या कोणत्याहि ज्ञानाने होत नाही; म्हणून क्षेत्रक्षेत्रज्ञाचे ज्ञान हेंच खरें ज्ञान होय-म्हणजे क्षेत्रक्षेत्रज्ञ यांच्या ज्ञानाहून इतर ज्ञान हें ज्ञान नसून अज्ञानच होय-असा भगवंताच्या व माउलीच्या म्हणण्याचा आशय आहे.

क्षेत्रक्षेत्रज्ञाच्या व्यतिरेकज्ञानाला ब्रह्मज्ञानहि म्हणतात.

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत्। स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु॥ ३॥

अर्थ—तें क्षेत्र कोणतें? कशा प्रकारचें आहे? त्याचे विकार कोणते? तें कशापासून उत्पन्न होतें? तसेच तो क्षेत्रज्ञ कोण? त्याची शक्ति काय आहे? हे सर्व माझ्यापासून संक्षेपाने श्रवण कर॥ ३॥

तरि क्षेत्र येणें नांवें। हें शरीर जेणें भावें। म्हणितलें तें आघवें। सांगो आतां॥ १०॥
हें क्षेत्र कां म्हणिजे। कैसें कें हें उपजे। कवण कवणीं वाढविजे। विकारा एथ॥ ११॥
हें औट हात मोटकें। कीं केवढें पां केतुकें। बरड कीं पिके। कोणाचें हें॥ १२॥
इत्यादि सर्व। जे जे याचे भाव। ते बोलिजती सावेव। अवधान देईं॥ १३॥
पैं याचि स्थळाकारणें। श्रुति सदा बोबाणें। तर्कु येणेंचि ठिकाणें। तोंडाळु केला॥ १४॥

अर्थ—तर आतां हें शरीर ज्या उद्देशाने क्षेत्र या नांवाने संबोधिलें जातें तें संपूर्ण आतां सांगतों॥ १०॥ शरीराला क्षेत्र कां म्हणतात? तें कसें व कशापासून उत्पन्न होतें? कोणकोणत्या कार्यरूपाने त्याची वाढ होते?॥ ११॥ हें एवढेसें साडे तीन हातच आहे किंवा केवढें मोठें आहे? व त्याची मर्यादा किती? तें नापीक आहे किंवा पिकणारें आहे आणि तें कोणाचें आहे?॥ १२॥ इत्यादि जे सर्व भाव असतील ते संपूर्ण सांगतों, लक्ष देऊन ऐक॥ १३॥ उपनिषदांनी सारखा आक्रोश करून या क्षेत्राविषयींच विचार सांगितला आणि याच स्थळाने तर्काला बडबड करायला लावली॥ १४॥

गूढार्थदीपिका-पैं याचि स्थळाकारणें—श्रुतीने क्षेत्राचा वारंवार विचार करून क्षेत्रज्ञ अद्वैत. सच्चिदानंद व क्षेत्र जड-विनाशी, मिथ्या, असे हे परस्पराहून भिन्न आहेत, असें दाखविलें आहे, असा अर्थ.

तर्कु येणेंचि ठिकाणें। तोंडाळु केला—श्रुतीचें म्हणणें पटवून देण्याकरितां तर्काने आपली पराकाष्ठा केली, असा भाव.

चाळितां हेचि बोली। दर्शनें शेवटा आलीं। तेवींचि नाहीं बुझाविलीं। अझुनि द्वंद्वें॥ १५॥

अर्थ—या क्षेत्राची चर्चा करण्यांतच दर्शनांचा शेवट झाला, तरी त्यांच्यातील परस्पर विरोध नाहीसा झाला नाही॥ १५॥

गूढार्थदीपिका-चाळितां हेचि बोली। दर्शनें शेवटा आलीं—"**सर्वेषां प्रस्थानकर्तॄणां मुनीनां विवर्तवाद-पर्यवसानेनाद्वितीये परमेश्वरे एव वेदान्तप्रतिपाद्ये तात्पर्यम्। न हि ते मुनयो भ्रान्ताः सर्वज्ञत्वातेषाम्**" (महिम्न स्तोत्र-मधुसूदनी टीका) दर्शनकार हे भ्रांत नसून सर्वज्ञ आहेत. ते चुकणें शक्य नाही; म्हणून त्यांच्या दर्शनग्रंथांत वरवर मतभिन्नता किंवा विरोध दिसत असला तरी त्यांनी अधिकाऱ्यानुसार आपआपल्या दर्शनाची रचना केली असून शेवटीं त्यांच्या प्रतिपादनाचें पर्यवसान साक्षात् किंवा परंपरेने अद्वैत परब्रह्माचें प्रतिपादन करण्यांत आहे, असे सर्वच अद्वैतवादी मानतात.

तेवींचि नाहीं बुझाविलीं। अझुनी द्वंद्वें—द्वैतवाद्यांना मात्र दर्शनकारांत खरोखरच मतभेद आहे, असें वाटतें व ते परस्परांत वाद घालतात.

शास्त्रांचिये सोयरिके। विचळिजे येणेंचि एकें। याचेनि एकवंके। जगासि वादु॥ १६॥

अर्थ—या एका क्षेत्रामुळेच निर्णयशास्त्रांच्या सोयरीक संबंधांत बिघाड उत्पन्न झाला आणि क्षेत्राचे ठिकाणींच एकनिष्ठ झाल्यामुळे जगांत वाद माजला॥ १६॥

गूढार्थदीपिका-शास्त्रांचिये सोयरिके—"नित्यश्चमोक्ष: सर्वैर्मोक्षवादि-भिरभ्युपगम्यते" (ब्र. सू. शं. भा. १-१-४) सर्व दर्शनकारांनी मोक्ष स्वीकाराला असून तो नित्य मानला आहे. मोक्ष म्हणजे जीवाची संपूर्ण दु:खांपासून अखंड मुक्ति होणें असें इतर शास्त्र मानतात, तर दु:खाचीं अत्यंत निवृत्ति होऊन परमानंद प्राप्ति होणें, असा वेदान्तांत मोक्ष मानला आहे.

कर्माने प्राप्त होणारी कोणतीहि स्थिति नाशिवंत असल्यामुळे नित्य दु:खरहित अशी मोक्षस्थिति कर्माने प्राप्त होऊं शकत नाही. जीवाची ती स्वत:सिद्ध स्थितिच असायला पाहिजे, तरच ती नित्य होईल. नित्यदु:खरहित अशा स्वत:सिद्ध ज्ञानरूप स्थितीलाच वेदांन्तांत परब्रह्म म्हटलें आहे. म्हणून सर्व दर्शनकारांच्या प्रतिपादनाचें पर्यवसान साक्षात् किंवा परंपरेने एका परब्रह्माचे ठिकाणींच आहे, असें म्हणावें लागतें. हीच शास्त्रांची सोयरीक होय. अर्थात् शास्त्रकारांचा विरोध आत्मवस्तूच्या किंवा ब्रह्मवस्तूच्या प्रतिपादनांत नाही.

याचेनि एकवंकें। जगा वाद-क्षेत्रज्ञाला सोडून व क्षेत्राला सत्य मानून क्षेत्राच्याच ठिकाणीं एकनिष्ठ राहिल्याने जगांत वाद माजला आहे.

तोंडेंसी तोंडा न पडे। बोलेंसी बोला न घडे। इया युक्ती बडबडे। त्राय जाहली॥ १७॥
नेणों कोणाचें हें स्थळ॥ परि कैसें अभिलाषाचें बळ। जे घरोघरीं कपाळ। पिटवीत असे॥ १८॥

अर्थ—एकाचें तोंड दुसऱ्याच्या तोंडासमोर होत नाही व एकाचा युक्तिवाद दुसऱ्यास पटत नाही. अशा युक्तिवादामुळे बडबडण्याची सीमा झाली॥ १७॥ हें शरीर कोणाच्या मालकींचें आहे, हें सांगता येत नाही, तरीपण याची आसक्ति इतकी प्रबळ आहे की, घरोघर याच्या करितांच कपाळपिटी होत असते॥ १८॥

गूढार्थदीपिका—नेणों कोणाचें हें स्थळ-क्षेत्रज्ञाच्या स्वरूपाचा विचार केला असतां तो अद्वैत सच्चिदानंदस्वरूप असल्यामुळे त्याहून दुसरी वस्तुच नाही-म्हणजे क्षेत्र मिथ्या कल्पनामात्र आहे-असा अनुभव येतो. अर्थात् क्षेत्रही नाही व त्याचा कोणी मालकहि नाही, असा भाव.

परि कैसें अभिलाषाचें बळ-जीव हा अस्तित्वांत नसलेल्या, म्हणून मिथ्या, अशा शरीरादि क्षेत्राला सत्य समजून त्याचा अभिमान धरतो व त्यांत आसक्त होऊन तें अखंड राहावें अशी इच्छा करतो.

जे घरोघरीं कपाळ। पिटवीत असें-काल्पनिक क्षेत्र नाशिवंतच असणार. हें न समजतां तें नाहीसें होऊं नये अशी जीव इच्छा करतो; म्हणून तें नाहीसें झालें असतां व्यर्थ शोक करण्याचा प्रसंग येतो.

नास्तिका द्यावया तोंड। वेदांचें गाढें बंड। तें देखोनि पाखांड। आनचि वाजे॥ १९॥

अर्थ—नास्तिकांच्या कुतर्कांचें खंडन करण्याकरितां त्यांना तोंड देऊन वेदांनी त्यांच्याविरुद्ध थोर बंड उभारलें, हें पाहून पाखंड्यांनी भलतेंच बोलायला सुरुवात केली॥ १९॥

गूढार्थदीपिका-नास्तिक—म्हणजे देहालाच चेतन आत्मा रामजणारे. ते ईश्वर, वेद, वेदाचें ईश्वरप्रणीतत्व, पाप-पुण्यकर्मे, कर्मानुसार गति, परलोक, पुनर्जन्म, मोक्ष इत्यादि जें श्रुतिमान्य सिद्धान्त आहेत ते मुळींच मानीत नाहीत.

नास्तिका द्यावया तोंड-म्हणजे नास्तिकांचीं अविचारमूलक मतें खोडून काढण्याकरितां.

वेदांचें गाढें बंड—म्हणजे वेदाने अनुमान व अनुभव यांच्या भक्कम आधारावर उभारलेले युक्तिसिद्ध विचार.

पाखंडी—वेदादि शास्त्रांच्या युक्तिअनुभवसिद्ध विचारांचा व सिद्धान्तांचा त्याग करून, विचारास न पटणारे व अनुभवास कधीं न येणारे स्वकपोलकल्पित सिद्धान्त प्रतिपादन करणाऱ्यांना पाखंडी म्हणतात. "पाखंड" या शब्दाने आर्हत किंवा जैनादी अवैदिक मतांचा माउलींनी येथे उल्लेख केला आहे, असें "नागवीं लुंचिती मुंडे" या पुढील ओव्यांतील चरणावरून स्पष्ट होतें.

म्हणे तुम्ही निर्मूळ। लटिकें हें वाग्जाळ। ना म्हणसी तरी पोफळ। घातलें आहे॥ २०॥
पाखांडाचिये कडे। नागवीं लुंचिती मुंडे। नियोजिलीं वितंडें॥ तळासि येती॥ २१॥
मृत्युबळाचेनि माजें। हें जाईल वीण काजें। तें देखोनियां व्याजें। निघाले योगी॥ २२॥

अर्थ—(वेद प्रमाण मानणाऱ्या आस्तिकाला पाखंडी म्हणतो-) तुमचें म्हणणें निराधार व केवळ वायफळ पांडित्य आहे. "नाही! आमचें म्हणणेंच यथार्थ आहे" असें म्हणत असाल, तर ही आम्ही प्रतिज्ञेची सुपारी ठेविली आहे-म्हणजे पैजेने आम्ही आपलें म्हणणें सिद्ध करून देऊं शकतों॥ २०॥ असे हे, पाखंडाचे डफ वाजवून नागवे राहतात व डोक्याचे केस उपटतात आणि आपलें मत प्रतिपादन करण्याकरितां स्वीकारलेल्या वितंडवादानेच ते सर्वांच्या खालीं येतात म्हणजे आपणच आपलीं मतें निराधार ठरवितात॥ २१॥ मृत्यूचें सामर्थ्य अनिवार असल्यामुळें हें क्षेत्र व्यर्थच मृत्यूच्या स्वाधीन होईल, हें जाणून योगी देहाच्या आसक्तीने आयुर्मर्यादा वाढविण्यास निघाले॥ २२॥

मृत्यूनि आधाधिले। तिहीं निरंजन सेविलें। यमदमांचे केले। मेळावे पुरे॥ २३॥

अर्थ—देहाच्यां आसक्तिमुळे मृत्यूला पाहून घाबरलेले ते एकान्तात जाऊन राहिले व त्यांनी नाना प्रकारच्या यमनियमांचे समुदाय आचरणांत आणलें॥ २३॥

गूढार्थदीपिका—"योगिया साधली जीवनकळा" (ज्ञा. हरिपाठ) योगी, आयुष्य वाढविण्याकरितां योगाच्या यमनियमादि अष्टांगसाधनांचा अभ्यास करतात. अर्थात् तेहि क्षेत्राला सत्य समजतात, वेदान्ताप्रमाणें मिथ्या समजत नाहीत, हें सिद्ध आहे.

येणेंचि क्षेत्राभिमानें। राज्य त्यजिलें ईशानें। गुंति जाणोनि स्मशानें। वासु केला॥ २४॥
ऐसिया पैजा महेशा। पांघुरणें दाही दिशा। लांचकर म्हणोनि कोळसा। कामु केला॥ २५॥

अर्थ—या देहाचा अभिमान धरूनच कैलासाचें राज्य करण्यांत बंधन आहे, हें जाणून भगवान शंकराने कैलासाचा त्याग केला व श्मशानांत वास केला॥ २४॥ अशा त्याग करण्याच्या या प्रतिज्ञेनेच शंकराला दिशा पांघराव्या लागल्या-म्हणजे दिगंबर होऊन राहावें लागलें व कामोत्पादक वनशोभेची लांच देऊं पाहणाऱ्या मदनाला जाळून शंकराने त्याचा कोळसा केला.॥ २५॥

गूढार्थदीपिका—पुराणांतून शंकर, विष्णु व ब्रह्मदेव यांच्या ज्या अशा प्रकारच्या कथा वर्णिलेल्या आहेत, त्या परार्थगा असतात-म्हणजे त्यांचें तात्पर्य दुसऱ्यांना उपदेश करण्यांत असतें. वरील २४ व २५ या ओव्यांत वर्णिलेल्या भगवान शंकराच्या कथेने सामान्य जीवांना असा उपदेश केला आहे, की क्षेत्र सत्य वाटतें, म्हणूनच त्याच्या आसक्तीने कामक्रोधादि विकार उत्पन्न होतात व काम क्रोधाधिकांच्या नाशाचा प्रयत्न होतो. क्षेत्र मिथ्या आहे अशी दृढ भावना झाल्यास कामक्रोध उठत नाहीत व त्यांच्या नाशाचा प्रयत्नहि होत नाही; म्हणून मोक्षप्राप्तिकरितां क्षेत्र मिथ्या आहे ही भावना दृढ व्हायला पहिजे.

लांचकर—ज्याप्रमाणे लांच देणारा पुरुष लांच देऊन, आपल्या इच्छेप्रमाणे अधिकाऱ्याकडून काम करवून घेतो, त्याप्रमाणे शंकराने पार्वतीचा अंगीकार करावा म्हणून मदनहि नाना प्रकाराने वन श्रृंगारून कामोत्पादक वनसौंदर्याची लांच शंकरापुढे करून त्याला आपल्या वश करून घेऊं पाहत होता, म्हणून मदनाला येथे 'लांचकर' म्हणजे लांच पुढें करणारा किंवा लांच दाखविणारा असें म्हटलें आहे.

पैं सत्यलोकनाथा। वदनें आलीं बळार्था। तरी तो सर्वथा। जाणेचिना॥ २६॥

अर्थ—बुद्धीचें सामर्थ्य वाढवून क्षेत्रक्षेत्रज्ञाचा विचार करण्याकरितां ब्रह्मदेवाला चार तोंडें प्राप्त झालीं, तरी त्याला क्षेत्राचा निर्णय करतां आला नाही॥ २६॥

गूढार्थदीपिका—ब्रह्मदेवासारखें बुद्धिबळ प्राप्त झालें, तरी अशा बुद्धिबळानेहि मनुष्याला अनुभवी श्रीगुरुच्या साहाय्यावांचून क्षेत्राचें यथार्थ स्वरूप समजूं शकत नाही.

ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिर्विविधैः पृथक् । ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः॥ ४॥

अर्थ—वसिष्ठादिक ऋषींनी बहु प्रकारांनी या क्षेत्रक्षेत्रज्ञाचें वर्णन केलें असून नानाप्रकारांनी त्यांचें विवेकपूर्वक वर्णन केलें आहे. तसेंच परब्रह्माचा निश्चित बोध करून देणाऱ्या युक्तियुक्त वाक्यांनी व पदांनीहि त्यांचें वर्णन केलें आहे ॥ ४ ॥

अवतरणिका—आतां पुढील ओव्यांनी क्षेत्राविषयीं दर्शनकारांचीं मतें माऊली सांगत आहेत. त्यांत प्रथम पूर्वमीमांसादर्शनकाराचें मत सांगत आहे.

एक म्हणती हें स्थळ। जीवाचेंचि समूळ। मग प्राण हें कूळ। तयाचें एथ॥ २७॥

अर्थ—एक म्हणतात क्षेत्र हें स्थळ जीवाच्याच मालकीचें आहे आणि प्राण हा जीवरूपी मालकाची शेती वाहणारें कूळ आहे ॥ २७ ॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे जमिनीचा मालक माझी जमीन म्हणतो, म्हणून तो मालक होतो आणि जमिनीची वाही कूळ करतें, त्याप्रमाणे जीव माझा देह म्हणतो, म्हणून येथे जीवाला देहाचा मालक म्हटलें आहे आणि प्राण आहे तोपर्यंत देहाचे व्यापार चालतात, म्हणून प्राणाला कूळ म्हटलें आहे.

हे स्थळ जीवाचेंचि समूळ—म्हणजे जीव हा क्षेत्राचा कर्ता भोक्ता आहे. (कर्ता-म्हणजे कर्म करून कर्माप्रमाणे शरीर प्राप्त करून घेणारा व भोक्ता-म्हणजे कर्माप्रमाणे त्या शरीराचे द्वारा सुखदु:खाचा भोग भोगणारा).

याप्रमाणे वस्तुत: असंग असलेल्या क्षेत्रज्ञाला कर्ता-भोक्ता मानून त्याच्याशी जडविनाशी क्षेत्राचा कधीं नाहीसा न होणारा संबंध, मीमांसादर्शनाने स्वीकारला आहे.

जया प्राणाचां घरीं। अंगे राबती भाऊ चारी। आणि मना ऐसा आवरी। कुळवाडीकर ॥ २८ ॥

अर्थ—ज्या प्राणाचे, अपान, व्यान, उदान व समान हे चार भाऊ अंगाने घरींच राबतात आणि येथें जीव, या मालकाच्या तर्फे शेतीची देखरेख करून शेती करणारे मन, हें वहिवाटदार आवारी आहे ॥ २८ ॥

गूढार्थदीपिका—देहाच्या ठिकाणीं होणारे सर्व व्यापार प्राणाचे स्वाधीन असून प्राण हा मनाचे स्वाधीन आहे, असा भाव.

तयातें इंद्रियबैलांची पेटी। न म्हणे अवसीं पाहाटीं। विषयक्षेत्रीं आटी। काढी भली॥ २९ ॥

अर्थ—त्याच्या (मनाचे) जवळ ज्ञानेंद्रियरूप व कर्मेंद्रियरूप बैलाच्या जोड्या असून त्यांच्या साहाय्याने तो रात्र व दिवस न पाहतां शब्दस्पर्शादि विषयरूप शेतांत खूप श्रम करतो ॥ २९ ॥

मग विधीची वाफ चुकवी। आणि अन्यायाचें बीज वाफवी। कुकर्माचा करवी। राबु जरी॥ ३० ॥
तरी तयाचिसारिखें। असंभाव्य पाप पिके। मग जन्मकोटी दु:खें। भोगी जीवु॥ ३१ ॥
नातरी विधीचिये वाफे। सत्क्रियाबीज आरोपे। तरी जन्मशत मापें। सुखचि मविजे॥ ३२ ॥

अर्थ—शास्त्रोक्तकर्मरूपी बीजाला ऊब न देतां निषिद्धकर्मरूपी बीजालाच ऊब देऊन वाढविले व अशा रीतीने इंद्रियांकडून कुकर्म करण्याचे जर श्रम करविले ॥ ३० ॥ तर त्या कुकर्मानुसार पापाचेंच अपार पीक येऊन कोटीजन्मपर्यंत जीव दु:खच भोगित राहील ॥ ३१ ॥ किंवा शास्त्रानुसार आचरणरूपी उचित सत्क्रियारूप बीज पेरलें, तर शेंकडों जन्माच्या मापाने जीव सुखच मोजित राहील ॥ ३२ ॥

गूढार्थदीपिका—''असंगो ह्ययं पुरुष:'' क्षेत्रज्ञ पुरुष असंग म्हणजे सर्वांहून निराळा व अलिप्त आहे, असें श्रुतींनी सांगितलें असतांना जैमिनीमतामध्यें शरीर, कर्म, सुख, दु:ख इत्यादि क्षेत्रान्तर्गत पदार्थ सत्यत्वाने मानले आहेत; म्हणून माऊली म्हणतात त्या मतांत क्षेत्रक्षेत्रज्ञाचा योग्य निवाडा झाला नाही.

अवतरणिका—आतां माउली सांख्याचें मत सांगत आहेत.

तंव आणिक म्हणती हें नव्हे। हें जीवाचेंचि न म्हणावें। आमुतें पुसा आघवें। क्षेत्राचे या॥ ३३ ॥
अहो जीवु एथ उखिता। वस्तीकरु वाटे जातां। आणि प्राणु हा बलैता। म्हणोनि जागे॥ ३४ ॥

अर्थ—हें ऐकून दुसरे कित्येक म्हणतात, हें तुमचें म्हणणें बरोबर नाही. हें शरीर जीवाच्या मालकीचें आहे,

असें म्हणूं नका. या क्षेत्राविषयीं जें काय विचारायचें आहे तें सर्व आम्हांला विचारा॥ ३३ ॥ अहो! जीव हा वाटेने जात असतां या शरीराचे ठिकाणीं घटकाभर वस्ती करणारा वाटसरू आहे आणि प्राण हा वतनदार असल्यामुळे क्षेत्रांत जागल्याचे काम करतो॥ ३४ ॥

गूढार्थदीपिका-वाटे जातां—जीव हा मुळांत प्रकृतीहून निराळा असा असंग आहे; पण तो अविवेकाने प्रकृतीशीं ऐक्य पावून जन्ममरणाच्या वाटेने जातांना क्षेत्राचा आश्रय करतो, हे ''वाटे जातां'' या पदाने सुचविलें आहे.

उखिता वस्तीकर—विवेकज्ञान उत्पन्न होईपर्यंतच त्याचा (जीवाचा) व देहाचा संबंध असतो हें ''उखिता वस्तीकर'' या पदाने सांगितलें आहे.

अनादि जे प्रकृती। सांख्य जियेतें गाती। क्षेत्र हे वृत्ती। तियेचि जाणा॥ ३५॥

अर्थ—सांख्य जिला प्रकृति म्हणतात ती अनादि असून क्षेत्र हें तिचें राहण्याचें ठिकाण आहे॥ ३५ ॥

गूढार्थदीपिका—सांख्यशास्त्राप्रमाणे मूळप्रकृति अनादि व अव्यक्त असल्यामुळे ती आपल्या मूळ अव्यक्त अवस्थेंत गोचर होऊं शकत नाही. क्षेत्ररूप कार्यरूपानेच ती गोचर होते-म्हणजे प्रकृतिच क्षेत्ररूपाने प्रकट होते.

आणि तियेतेंचि आघवा। आथी घरमेळावा। म्हणोनि ते वाहिवा। घरीं वाहे॥ ३६॥

अर्थ—आणि तिचे काम करणाऱ्यांचा सर्व मेळावा घरचाच आहे; म्हणून ती घरींच सर्व वाहित करते॥ ३६ ॥

गूढार्थदीपिका—प्राण, मन, इंद्रियें यांच्या उत्पत्तीचे व व्यापाराचें कर्तृत्व प्रकृतिकडे आहे, आत्म्याकडे नाही, असा सांख्याचा सिद्धान्त आहे.

वाहिव्याचिये रहाटी। जे कां मुदल तिघे इये सृष्टी। ते तियेचिया पोटीं। जाहाले गुण॥ ३७॥
रजोगुण पेरी। तेतुलें सत्त्व सोंकरी। एकलें तम करी। सवंगणी॥ ३८॥

अर्थ—क्षेत्राची वाही करण्याच्या कामामध्ये मूलभूत जे या सृष्टींत तीन गुण आहेत, ते या प्रकृतीच्या पोटीं उत्पन्न झाले आहेत॥ ३७ ॥ रजोगुण, कर्मरूपी बीजाची पेरणी करतो, सत्वगुण, जितकी पेरणी झाली तितक्याचें रक्षण करतो आणि मग यथाकाळीं तमोगुण हा त्याची कांपणी करतो॥ ३८ ॥

गूढार्थदीपिका—प्रकृति ही आपल्या सत्व, रज, तम या तीन गुणांच्या द्वारा क्षेत्राची उत्पत्ति, स्थिति, लय करते, असा अर्थ.

रचूनि महत्तत्त्वाचें खळें। मळी एकें काळुगेनि पोळें। तेथ अव्यक्ताची मिळे। सांज भली॥ ३९॥

अर्थ—पुढें त्यापासून महत्तत्वाचें म्हणजें समष्टिबुद्धीचें खळें निर्माण होतें आणि काळरूपी एकट्या बैलाने त्याची मळणी केली जाते. हे करीत असतांना शेवटीं अव्यक्तरूपी संध्याकाळ होते॥ ३९ ॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे खळ्यांत धान्य एकत्र करून व त्याची मळणी करून धान्य व भूस निराळे केले जातात, त्याप्रमाणे बुद्धीच्या साहाय्याने बरें-वाईट, पुण्य-पाप अशी कर्माची विभागणी करून त्याचें सृष्टींत कालांतराने सुखदुःखरूप फळ, प्रकृति पुरुषाला प्राप्त करून देते, असे होत होत शेवटीं सर्व सृष्टि अव्यक्त प्रकृतींत लीन होते. या सांख्यमतांत पुरुष चेतन व असंग आहे. ती तो कर्म करीत नाही! पण त्याच्या सांनिध्याने प्रकृति कर्म करते व त्याच्या ठिकाणीं अविवेक आहे तोपर्यंत क्षेत्रान्तर्गत सुख दुःखाचा संबंध व विवेक झाल्यानंतर सुखाचा संबंध मानला असल्यामुळे त्याच्या (पुरुषाच्या) असंगत्वाला बाध येतो; म्हणून वेदान्त दृष्टीने पाहतां, या मतांतहि क्षेत्रक्षेत्रज्ञाचा निवाडा योग्य रीतीने झाला नाही, असे माउलींचें म्हणणें आहे.

अवतरणिका—येथून आतां माउली योगशास्त्राचें मत सांगत आहेत.

तंव एकीं मतिवंतीं। या बोलाचिया खंती। म्हणितलें यया ज्ञप्ती। अर्वाचीनां॥ ४०॥

अर्थ—हें सांख्याचें मत ऐकून व त्या प्रतिपादनाची खंती वाटून बुद्धिमान योगी म्हणतात, अहो; हें सर्व तुमचें ज्ञान अलीकडील आहे॥ ४० ॥

गूढार्थदीपिका—तव एकीं मतिवंति—केवळ चेतनाच्या सांनिध्याने जड कार्यकारी होतांना दिसत नाही.

चेतनाच्या प्रेरणेने ते कार्यकारी होऊं शकतें. असें पाहण्यांत येतें; म्हणून योगशास्त्रात, ज्याचे ठिकाणीं सत्वगुणाचा अत्यंत उत्कर्ष झाला आहे, असा पुरुषविशेष ईश्वर मानून त्याच्या चित्तांत स्फुरण पावणाऱ्या सृष्टिसंकल्परूप प्रेरणेने प्रकृति कार्यरूप होते, असें मानलें असल्यामुळे येथें सांख्यवाद्यांपेक्षा योग्यांना मतिवान म्हटले आहे.

हां हो परतत्त्वाआंतु। कें प्रकृतीची मातु। हा क्षेत्रवृत्तांतु। उगेंचि आइका॥ ४१॥
शून्यसेजशालिये। सुलीनतेचिये तुळिये। निद्रा केली होती बळियें। संकल्पें येणें॥ ४२॥

अर्थ—अहो; परतत्व म्हणजे प्रकृतीच्या पलीकडे असलेल्या असंग अशा पुरुषाचे ठिकाणी संबंध कसा राहील? ह्या क्षेत्राच्या उत्पत्तीचा वृत्तांत निवान्तपणे ऐंका॥ ४१॥ शून्यसेजशालिये म्हणजे शून्यमय अव्यक्तदशेच्या शय्यागृहांत भगवंताच्या सृष्टि निर्माण करणाऱ्या इच्छारूप संकल्पाने लीनतेच्या गादीवर निद्रा केली होती॥ ४२॥

गूढार्थदीपिका—"प्रकृष्टसत्वोपादानात् ईश्वरस्य शाश्वतिकःउत्कर्षः" (यो. सू. २४-समाधिपाद-व्यासभाष्य)

संसारतप्त जीवांचा, ज्ञानोपदेशद्वारा उद्धार करण्याकरितां आवश्यक असलेलीं शास्त्रें व बुद्धि, मन, इंद्रियें इत्यादि कार्यसृष्टीचा संहार होऊन पुनः तीं निर्माण व्हावीं म्हणून भगवान "शुद्धसत्वात्मकचित्त मी ग्रहण करीन" असा संकल्प करतो व सृष्टीचा संहार होऊन त्या सृष्टिबरोबर भगवंताचा संकल्पहि प्रकृतीच्या साम्यभावाला प्राप्त होतो-म्हणजे प्रकृतींत लीन होतो नंतर ज्याप्रमाणे एखादा मनुष्य मी सकाळीं चार वाजतां उठून अमुक काम करीन असा संकल्प करून निजतो व त्या संकल्पानुसार तो जागा होऊन ठरलेलें काम करतो, त्याप्रमाणे प्रलयाचा अवधि संपल्यावर प्रकृतींत लीन असलेला हा भगवंताचा संकल्प उद्‌भुत होऊन भगवान सर्व सृष्टि निर्माण करतो.

तो अवसांत चेइला। उद्यमीं सदैव भला। म्हणोनि ठेवा जोडला। इच्छावशें॥ ४३॥

अर्थ—तो सर्गारंभीं अकस्मात् जागा झाला आणि प्रयत्न करण्यांत तो सदा तत्पर असल्यामुळे त्याने क्षेत्राचा ठेवा इच्छेने प्राप्त करून घेतला॥ ४३॥

गूढार्थदीपिका-उद्यमीं सदैव भला—हा संकल्प अनादिकालापासून सृष्टीची उत्पत्ति व संहार करीत आहे; असा अर्थ.

निरालंबींची वाडी। होती त्रिभुवनायेवढी। हे तयाचिये जोडी। रूपा आली॥ ४४॥

अर्थ—ही अव्यक्तदशेची वाडी त्रिभुवनाएवढीच असल्यामुळे संकल्पाच्या साहाय्याने ती त्रिभुवनरूप कार्यरूपाने व्यक्त झाली॥ ४४॥

गूढार्थदीपिका-निरालंबींची वाडी। होती त्रिभवनाएवढीं—कोण्याहि भावरूप वस्तूचा अव्यक्तभाव तिच्या भावाएवढाच असतो. या नियमानुसार प्रलयकालीं त्रिभुवनाची झालेली अव्यक्तदशा ही त्रिभुवनाएवढीच असूं शकते. हेंच "निरालंबींची वाडी। होती त्रिभुवनांएवढी" या दोन चरणांनी माउलींनी सांगितलें आहे.

मग महाभूतांचें एकवाट। सैरा वेंटाळूनि भाट। भूतग्रामांचे आघाट। चिरिले चारी॥ ४५॥
यावरी आदी। पांचवटेयांची बांधी। बांधली प्रभेदीं। पांचभौतिकीं॥ ४६॥
कर्माकर्माचे गुंडे। बांध घातले दोन्हींकडे। नपुंसकें बरडें। रानें केलीं॥ ४७॥

अर्थ—मग पंचमहाभूतरूप पडीत जमीन संपूर्ण एकत्र करून जीवांचे चार भाग निर्माण केले॥ ४५॥ यानंतर आधीं पांचभौतिकांचा समुदाय पांचभौतिकरूपानेच निरनिराळ्या भेदाने विभागला गेला॥ ४६॥ मनुष्यशरीररूपीं क्षेत्राच्या दोहों बाजूला कर्म-अकर्मरूपी दगडांचें बांध घातले आणि 'नपुंसकें'-म्हणजे मनुष्यव्यतिरिक्त प्राणी नापीक जमीन बनविली॥ ४७॥

गूढार्थदीपिका—कर्माकर्माचे गुंडे। बांध घातले दोहींकडे-

कर्माकर्म—म्हणजे विधिनिषेध.

हे कर्माकर्म मनुष्यप्राण्याकरितांच सांगितले आहेत. मनुष्य, विहित कर्माप्रमाणे आचरण करून त्या पुण्याचें उत्कर्षरूप पीक प्राप्त करून घेतो व अकर्माचे आचरण करून पापजन्य दुर्गतिरूप पीक घेतो.

नपुंसकें बरडें। रानें केलीं—

नपुंसकें—म्हणजे मानवयोनी नाहीत अशा वृक्षादीयोनी.

बरडे रानें केलीं—म्हणजें ज्यांत क्रियमाण कर्म उत्पन्न होत नाही, अशा केल्या.

मानवयोनिव्यतिरिक्त इतर पशुपक्ष्यादि योनींतील जीवांना, शास्त्राने कर्माकर्मांचे किंवा धर्माधर्माचे विधान लागूं केलें नसल्यामुळे त्या योनींतील जीवांकडून पुण्यपापरूप क्रियमाण कर्म होत नाही; म्हणून त्या योनीतील कर्माने सुखदु:खरूप फळहि मिळत नाही. केवळ प्रारब्धरूप झालेल्या पूर्वीच्या पापकर्मांचें सुखदु:खरूप फळ भोगणाऱ्या त्या योनी आहेत, असा अर्थ.

तेथ येरझारेलागीं। जन्ममृत्यूची सुरंगी। सुहाविली निलागी। संकल्पें येणें॥ ४८॥
मग अहंकारासि एकलाधी। करूनि जीवितावधी। वाहाविलें बुद्धी। चराचर॥ ४९॥

अर्थ—मग जेथे लाग नाही त्या स्थितींत पुन: पुन: जन्ममरणाची येरझार करण्याकरितां या संकल्पाने जन्ममृत्यूंचें भूयार तयार केलें॥ ४८॥ मग आयुष्य आहे तोपर्यंत हा संकल्प अहंकाराशीं ऐक्य करून बुद्धिकडून चराचराची वहिवाट करवितो-म्हणजे क्षेत्रज्ञाला कर्माच्या कर्तृत्वाचा व त्या कर्मानुसार सुखदु:खरूप फळाच्या भोगाचा अनुभव घ्यायला लावतो. ॥ ४९॥

गूढार्थदीपिका—केवळ अहंकारामुळेच जीवाचा क्षेत्राशीं संबंध येतो.

यापरी निराळीं। वाढे संकल्पाची डाहाळी। म्हणोनि तो मुळीं। प्रपंचा यया॥ ५०॥

अर्थ—याप्रमाणे शून्यरूपी अव्यक्तदशेंत संकल्पाची डाहाळी वाढलीं; म्हणून या प्रपंचाला संकल्प मूळ कारण आहे॥ ५०॥

गूढार्थदीपिका—याप्रमाणे योगमतांत सत्वगुण, इच्छा, संकल्प, सृष्टि इत्यादि पदार्थ सत्य मानून त्यांचा क्षेत्रज्ञाशीं संबंध मानला आहे; पण वेदान्तदर्शनाने क्षेत्रज्ञाला अद्वैतस्वरूप ठरवून तद्व्यतिरिक्त सर्वच मिथ्या मानलें आहे. म्हणून वेदान्तदृष्टीने पाहतां योगमतांतहि क्षेत्रक्षेत्रज्ञाचा निवाडा बरोबर झाला असें दिसत नाही.

ययापरी मतमुक्तकीं। तेथ पडिघायिले आणिकीं। म्हणती हां हो विवेकी। तरी तुम्हीं भले॥ ५१॥
परतत्त्वाचियां गावीं। संकल्पसेज देखावी। तरी कां पां न मनावी। प्रकृति तयांची॥ ५२॥
परि असो हें नव्हे। तुम्ही या न लगावें। आतांचि हें आघवें। सांगिजेल॥ ५३॥

अर्थ—याप्रमाणे निराधार मतांचीं मौक्तिकें मुखांतून बाहेर काढणाऱ्यावर दुसऱ्यांनी प्रहार केले. ते म्हणतात, ''अहो! तुम्ही कसा विचार करतां?''॥ ५१॥ प्रकृतीच्या पलीकडे असणाऱ्या तत्त्वांच्या ठिकाणीं तुम्ही जर संकल्पशय्या पाहतां तर मग त्याची प्रकृतिच कां मानूं नये?॥ ५२॥ पण असो. तुमचें म्हणणें बरोबर नाही. तुम्ही या मताचे भ्रांतींत पडूं नये हें सर्व आतां आम्ही सांगतों॥ ५३॥

अवतरणिका—आतां येथून क्षेत्राविषयीं नैय्यायिकांचें मत माउली सांगत आहे.

तरि आकाशीं कवणें। कोणें केलीं मेघाचीं भरणें। अंतरिक्षीं तारागणें। धरी कवण॥ ५४॥
गगनाचा चांदवा। कोणें ओढिला केधवां। पवन हिंडतु असावा। हें कवणाचें मत॥ ५५॥
रोमां कवण पेरी। कोण समुद्र भरी। पर्जन्याचिया करी। धारा कवण॥ ५६॥
तैसें क्षेत्र हें स्वभावें। हे वृत्ती कवणाची नव्हे। हें वाहे तया फावे। येरां तुटे॥ ५७॥

अर्थ—आकाशामध्ये मेघांचा भरणा कोण करतो? अंतरिक्षांत नक्षत्रे कोण धारण करतो?॥ ५४॥ हें आकाशाचें छत कोणी केव्हां ताणून लावलें? वाऱ्याने वाहत असावें ही कोणाची आज्ञा होय?॥ ५५॥ शरीराचे ठिकाणी रोमरंध्रें कोण करतो? समुद्र कोण भरतो? पावसाच्या धारा कोण करतो?॥ ५६॥ याप्रमाणें क्षेत्र हे स्वभावत: कोणाच्या मालकीचें नसतांना त्याची जो मालकी वागवितो, त्याला तें प्राप्त होतें, जो मालकी वागवित नाही त्याचा संबंध सुटतो॥ ५७॥

गूढार्थदीपिका—"ईश्वरः कारणं पुरुषकर्माफल्यदर्शनात्" (न्या. सू. १९-४-१) पुरुषाचे प्रयत्नरूप कर्म निष्फळ होतांना दिसत असल्यामुळे ईश्वर निमित्तकारण आहे.

न्यायमतांत परमेश्वर सृष्टीचें निमित्तकारण आहे व त्याच्या इच्छामात्रेकरून चतुर्विध भूतांच्या परमाणूंचा संयोग होऊन द्व्यणुकादि क्रमाने सर्व सृष्टि उत्पन्न होते, असें मानलें जातें.

याहि मतांत शरीरादिक क्षेत्र सत्य असून त्याचा असंग अशा क्षेत्रज्ञाशीं संबंध होतो व क्षेत्रज्ञाचे ठिकाणीं इच्छा, द्वेष, प्रयत्न, सुख, दुःख हे धर्म मानले असल्यामुळे या मतांतहि क्षेत्रक्षेत्रज्ञाचा योग्य विवेक झाला नाही.

अवतरणिका—यानंतर आतां माउली क्षेत्राविषयीं वैशेषिकांचें मत सांगत आहेत.

तंव आणिकें एकें। क्षोभें म्हणितलें निकें। तरि भोगिजे एकें। काळें केवीं हे॥ ५८॥
तरि ययाचा मारु। देखतांति अनिवारु। परी स्वमतीं भरु। अभिमानियां॥ ५९॥
हें जाणे मृत्यू रागिटा। सिंहाडयाचा दरकुटा। परी काय कीजे वांजटा। पूरीजत असे॥ ६०॥
महाकल्पापरौती। कव घालूनि अवचितीं। सत्यलोकभद्रजाती। आंगविजे॥ ६१॥
लोकपाळ नित्य नवे। दिग्गजांचे मेळावे। स्वर्गीचिये आडवे। रिगोनि मोडी॥ ६२॥
येर ययाचेनि अंगवातें। जन्ममृत्यूचिये गर्तें। निर्जिवें होऊनि भ्रमतें। जीवमृगें॥ ६३॥
न्याहाळा पां केव्हडा। पसरलासे चवडा। करूनियां माजिवडा। आकारगज॥ ६४॥
म्हणोनि काळाची सत्ता। हा बोल निरुता। ऐसे वाद पांडुसुता। क्षेत्रालागीं॥ ६५॥

अर्थ—तेव्हां हे ऐकून, दुसरें कित्येक क्षुब्ध होऊन म्हणतात, तुमचें म्हणणें जर खरें मानलें, तर तें क्षेत्र एका काळाचेंच स्वाधीन कां दिसून येतें?॥ ५८॥ या काळाचा सर्वांवर अचूक घाला पडतो; पण ते अभिमानाने आपल्या मतावरच भर देतात॥ ५९॥ शरीर हें मृत्युरूपीं क्रुद्ध सिंहाच्या राहण्याची दरी आहे, हें आपण सर्व जाणतों, पण काय करावें? व्यर्थ बडबड करणाऱ्याशीं कधीं पुरें पडतां येतें काय?॥ ६०॥ या मृत्युरूपी काळाने महाकल्पाच्या पलीकडेहि अकस्मात् मिठी मारून ब्रह्मलोकरूपी जो हत्ती त्याच्या ठिकाणींहि तो प्राप्त झाला आहे॥ ६१॥ (हा काळ) स्वर्गरूपी अरण्यांत शिरून नित्य नवे लोकपाळ व दिग्गजांचे समुदाय नाहीसे करतो॥ ६२॥ बाकीचे जीवरूपी पशु याच्या आंगच्या वाऱ्यानेच निर्जीव होऊन जन्ममृत्यूच्या खड्ड्यांत भ्रमत राहतात॥ ६३॥ कालरूपी सिंहाने संपूर्ण आकाररूपी हत्ती आंत सांठवून केवढा मोठा तोंडाचा चवडा पसरला आहे, पाहा!॥ ६४॥ म्हणून या क्षेत्रावर काळाचीच सत्ता आहे, हेंच म्हणणें योग्य आहे. अर्जुना! याप्रमाणें क्षेत्राविषयीं मतें आहेत॥ ६५॥

गूढार्थदीपिका—"कारणे कालः" (वै. सू. २५-७-५) सर्व सृष्टीचें निमित्तकारण काल आहे असें वैशेषिकदर्शनसूत्र असल्यामुळें हें मत वैशेषिकाचें आहे, हें उघड आहे.

या वैशेषिकमतांत काळाला सृष्टीचें निमित्तकारण मानलें असलें तरी क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचें स्वरूप नैय्यायिकांप्रमाणेच स्वीकृत असल्यामुळे वेदान्तदृष्टीने पाहतां क्षेत्रक्षेत्रज्ञाचा निवाडा या मतांतहि झालेला नाही.

हे बहु उखिविखी। ऋषीं केली नैमिषीं। पुराणें इयेविषीं। मतपत्रिका॥ ६६॥
अनुष्टुभादि छंदें। प्रबंधीं जियें विविधें। तें पत्रावलंबन मदें। करितांति अज्ञुनी॥ ६७॥
वेदींचे बृहत्सामसूत्र। देखणेपणें पवित्र। परी तयाही हे क्षेत्र। नेणवेचि॥ ६८॥

अर्थ—असा हा पुष्कळ प्रकारचा वादविवाद ऋषींनी नैमिषारण्यांत केला असून पुराणेंहि, या विषयींची मतें दर्शविणाऱ्या पत्रिका आहेत-म्हणजे पुराणांतूनहि हीं भिन्न भिन्न मतें दर्शविलीं आहेत॥ ६६॥ (पुराणादि) प्रबंधांतून अनुष्टुभादि अनेक छंदांनी ह्या ज्या मतपत्रिका ग्रंथित केलेल्या आहेत, त्यांचे लोक आग्रहाने अवलंबन करतात॥ ६७॥ (ज्यांत इंद्रादिकांचें परमेश्वररूपाने वर्णन आलें आहे तें) सामवेदांतील बृहत्सामसूत्र ईश्वराला अनुलक्षून स्तवन करणारें असल्यामुळे सर्व धर्मापेक्षा तें अत्यंत पवित्र करणारें आहे, हें खरें; पण त्यालाहि या क्षेत्रक्षेत्रज्ञाचा निवाडा बरोबर समजला नाही॥ ६८॥

गूढार्थदीपिका—"**त्वामिद्धि हवामहे**" या बृहत्सामसूत्रांत क्षेत्रज्ञ परमेश्वराची स्तुति केली असली, तरी ती क्षेत्राचा संबंध घेऊनच केली असल्यामुळे त्यावरूनहि क्षेत्रक्षेत्रज्ञाचा निवाडा योग्य रीतीने होत नाही, असा भाव.

आणीक आणीकींही बहुतीं। महाकवीं हेतुमंतीं। ययालागीं मती। वेंचिलिया॥ ६९॥
परी ऐसें हें एवढें। कीं अमुकेयाचेंचि फुडें। हें कोणाही वरपडे। होयचिना॥ ७०॥
आतां यावरी जैसें। क्षेत्र हें असे। तुज सांगों तैसें। साद्यंतु गा॥ ७१॥

अर्थ—आणखी उपपत्तिपूर्वक प्रतिपादन करणाऱ्या पुष्कळ महान् कवींनी या क्षेत्राचा ऊहापोह करण्यात आपली बुद्धि चालविली आहे॥ ६९॥ पण क्षेत्र हें असें आहे, एवढे आहे किंवा अमक्याचें आहे, हें कोणालाहि निःसंशय कळून आलें नाही॥ ७०॥ अर्जुना! आतां यानंतर हें क्षेत्र जसें आहे तसें तुला संपूर्ण सांगतों॥ ७१॥

महाभूतान्यहङ्कारो बुद्धिरव्यक्तमेव च । इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः॥ ५॥
इच्छा द्वेषः सुखं दुःखं सङ्घातश्चेतना धृतिः। एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम्॥ ६॥

अर्थ—सूक्ष्म पंचमहाभुतें, अहंकार, बुद्धि, अव्यक्त, दहा इंद्रियें, एक मन व ज्ञानेंद्रियाला गोचर होणारे पांच विषय, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, या सर्वांचा संघात, चेतना व धृति असे हे संक्षेपाने विकारासह क्षेत्र तुला सांगितलें॥ ५-६॥

तरि महाभूतपंचकु। आणि अहंकारु एकु। बुद्धि अव्यक्त दशकु। इंद्रियांचा॥ ७२॥
मन आणीकही एकु। विषयांचा दशकु। सुख दुःख द्वेषु। संघात इच्छा॥ ७३॥
आणि चेतना धृती। एवं क्षेत्रव्यक्ती। सांगितली तुजप्रती। आघवीचि॥ ७४॥

अर्थ—तरी पांच सूक्ष्म महाभूतें आणि एक अहंकार, तसेच बुद्धि, अव्यक्त व दहा इंद्रियें, आणखी एक मन, दहा इंद्रियांचे दहा विषय, द्वेष, सुख, दुःख, संघात, इच्छा, चेतना व धृति याप्रमाणें तुला क्षेत्राचे संपूर्ण स्वरूप सांगितलें॥ ७२-७४॥

आतां महाभूतें कवणें। कवण विषयो कैसीं करणें। हें वेगळालेपणें। एकैक सांगों॥ ७५॥
तरी पृथ्वी आप तेज। वायु व्योम इयें तुज। सांगितलीं बुझ। महाभूतें पांचें॥ ७६॥

अर्थ—आता महाभूतें कोणतीं, विषय कोणते व इंद्रियें कशीं आहेत हें तुला एक एक वेगळेपणाने सांगतों॥ ७५॥ तरी पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं तुला सांगितलेलीं पांच महाभूते होत, असें समज॥ ७६॥

आणि जागतिये दशे। स्वप्न लपालें असे। नातरी अंवसे। चंद्र गूढु॥ ७७॥
ना ना अप्रौढबाळकीं। तारुण्य राहे थोकीं। कां न फुल्तां कळिकीं। आमोदु जैसा॥ ७८॥
किंबहुना काष्ठीं। वन्हि जेवीं किरीटी। तेवीं प्रकृतिचियां पोटीं। गोप्य जो असे॥ ७९॥
जैसा ज्वरु धातुगतु। अपथ्याचें मिष पाहातु। मग जालिया आंतु। बाहेरि व्यापी॥ ८०॥
तैसा पांचांही गांठी पडे। जैं देहाकार उघडे। तैं नाचवी चहूंकडे। तो अहंकार गा॥ ८१॥

अर्थ—आणि ज्याप्रमाणे जागृतिअवस्थेंत स्वप्न लपलेलें असतें किंवा अमावस्येला चंद्र गुप्त असतो अथवा प्रौढदशेला न आलेल्या मुलाचे ठिकाणीं तारुण्य दडलेलें असतें किंवा न फुललेल्या कळीचे ठिकाणीं सुगंध जसा गुप्त असतो॥ ७७-७८॥ एवढेंच नाही, तर लांकडाचे ठिकाणीं, अर्जुना अग्नि गुप्त असतो, त्याप्रमाणे मूळ प्रकृतीचे ठिकाणीं जो गुप्त असतो॥ ७९॥ ज्याप्रमाणे धातुगत ज्वर केवळ कुपथ्याचें निमित्त पाहत असतो आणि मग कुपथ्य झाल्याबरोबर शरीराच्या आंत-बाहेर तो व्यापतो॥ ८०॥ त्याप्रमाणे पांचहि भूतांची एकत्र गांठ पडून, जेव्हा देहाचा आकार व्यक्त होतो, तेव्हा जो जीवाला चहूंकडून नाचवितो, तोच अहंकार होय॥ ८१॥

गूढार्थदीपिका—देहांत 'अहं' 'अहं' म्हणून स्फुरण होतें, त्या वृत्तीने पांचभौतिक जड देहाशीं ऐक्य केलें असतां, त्या देहाकारावर झालेल्या 'अहंला' अहंकार म्हणतात; असें येथें अहंकाराचें स्वरूप सांगितले आहे. अर्थात् देहाचें ऐक्य नाहीसें होऊन नुसती राहिलेली अहंवृत्ति हें शुद्ध जीवाचें किंवा परमेश्वराचें स्वरूप होतें.

नवल अहंकाराची गोठी। विशेषें न लगे अज्ञानापाठीं। सज्ञानाचे झोंबें कंठीं। नाना संकटीं नाचवी॥ ८२॥

अर्थ—या अहंकाराची अशी गंमत आहे की तो विशेषत: अज्ञान्याच्या पाठीस लागत नाही; पण तो सज्ञान्याच्या कंठास झोंबून त्याला नाना संकटांत पाडतो॥ ८२॥

गूढार्थदीपिका—अहंकार हा जाणीववृत्तीच्याच आश्रयाने राहत असल्यामुळे अज्ञान्यापेक्षा ज्ञान्याच्या ठिकाणीं अहंकाराचें प्राबल्य विशेष असतें व त्यामुळेच मनुष्य संकटांत पडतो, असा अर्थ.

आतां बुद्धि जे म्हणिजे। ते ऐसिया चिन्हीं जाणिजे। बोलिलें यदुराजें। तें आइकें सांगों॥ ८३॥
तरी कंदर्पाचेनि बळें। इंद्रियें वृत्तीचेनि बळें। विभांडूनि येती पाळे। विषयांचे॥ ८४॥
तो सुखदु:खांचा नागोवा। जेथ उमाणों लागे जीवा। तेथ दोहींसी बरवा। पाडु जे धरी॥ ८५॥
हें सुख हें दु:ख। हें पुण्य हें दोष। कां हें मैळ हें चोख। ऐसें निवडी॥ ८६॥
जिये अधमोत्तम सुझे। जिये सानें थोर बुझे। जिया दिठी पारखिजे। विषो जीवें॥ ८७॥
जे तेजतत्त्वाची आदी। जे सत्त्वगुणाची वृद्धी। जे आत्मया जीवाची संधी। वसवीत असे॥ ८८॥

अर्थ—आतां जिला बुद्धि म्हणतात, ती अशा लक्षणावरून जाणावी, असें भगवान श्रीकृष्णांनी म्हटलें, तेंच आतां सांगतों, ऐक॥ ८३॥ प्रबळ झालेल्या कामवासनेने इंद्रियें, वृत्तीच्या साहाय्याने विषयांचे समुदाय जिंकून येंतात-म्हणजे विषयांचा भोग घेऊन येतात॥ ८४॥ जीवाला ज्या सुखदु:खांच्या लुटीचा अनुभव येतो, त्या दोघांचा जी अगदीं बरोबर भेद दाखविते॥ ८५॥ हें सुख, हें दु:ख, हें पुण्य, हें पाप हें मलीन, हें शुद्ध अशी जी निवड करते॥ ८६॥ जिला उत्तम, कनिष्ठ हें समजतें, जिला लहान, मोठें समजतें, अशा रीतीने जिच्या दृष्टीच्या सहाय्याने जीव विषयाची परीक्षा करतो॥ ८७॥ जी ज्ञानेंद्रियांचें कारण आहे, जी सत्वगुणाचा उत्कर्ष होय आणि जी आत्मा व जीव यांच्या संधींत राहते॥ ८८॥

गूढार्थदीपिका—जीवाचे ठिकाणीं जी जाणीवरूप ज्ञानवृत्ति स्फुरते, ती बुद्धि होय असे येथें बुद्धीचें लक्षण केलें आहे. या बुद्धींत सत्वगुणाचा उत्कर्ष असल्यामुळे ती मूळांत निर्मळ आहे. म्हणूनच तिच्यांत ज्ञानरूप आत्मा प्रतिबिंबित होतो. त्या ज्ञानप्रकाशाने युक्त असलेली बुद्धिवृत्ति आपल्या पलीकडे असलेल्या शुद्ध आत्मस्थितींला व अलीकडे असलेल्या जीवस्थितीला जाणत असते, म्हणूनच ती आत्मा व जीव यांच्या संधींत असते, असें म्हटलें आहे.

अर्जुना ते गा जाण। बुद्धि तूं संपूर्ण। आतां आइकें वोळखण। अव्यक्ताची॥ ८९॥

अर्थ—अर्जुना! ही सर्व बुद्धि आहे, असें तूं जाण. आतां अव्यक्ताची ओळख ऐक॥ ८९॥

पैं सांख्यांचिया सिद्धांतीं। प्रकृती जे महामती। तेचि एथें प्रस्तुतीं। अव्यक्त गा॥ ९०॥
आणि सांख्ययोगमतें। प्रकृती परिसविली तूंतें। ऐसी दोहीं परी जेथें। विवंचिली॥ ९१॥
तेथ दुजी जे जीवदशा। तिये नांव वीरेशा। येथें अव्यक्त ऐसा। पर्याय हा॥ ९२॥
तऱ्ही पाहालया रजनी। तारा लोपती गगनीं। कां हारपे अस्तमानीं। भूतक्रिया॥ ९३॥
ना तरी देहो गेलिया पाठीं। देहादिक किरीटी। उपाधि लपे पोटीं। कृतकर्माच्या॥ ९४॥
कां बीजमुद्रेआंतु। थोके तरु समस्तु। कां वस्त्रपण तंतु-। दशे राहे॥ ९५॥
तैसें सांडोनियां स्थूळधर्म। महाभूतें भूतग्राम। लया जाती सूक्ष्म। होऊनि जेथें॥ ९६॥
अर्जुना तया नांवें। अव्यक्त हें जाणावें। आतां आइकें आधवे। इंद्रियभेद॥ ९७॥

अर्थ—हे बुद्धिमान अर्जुना! सांख्यवाद्यांनी आपल्या सिद्धान्तांत जडविनाशी क्षेत्राचें कारण म्हणून जी प्रकृति मानली आहे. तीच येथें प्रस्तुत "अव्यक्त" या शब्दाने सांगितली आहे॥ ९०॥ सांख्य व योग यांच्या मताप्रमाणे प्रकृतीचें स्वरूप तुला ऐकविलेंच आहे आणि तेथें 'तीं दोन प्रकाराची आहे, हेंहि सांगितलें गेलें॥ ९१॥ तेथें दुसरी जी जीवदशा म्हणून पराप्रकृति सांगितली, तिलाच हे वीरश्रेष्ठा! येथें अव्यक्त' हा पर्याय शब्द आहे॥ ९२॥ रात्र संपून

उजाडल्यावर आकाशांत तारे नाहीसे होतात किंवा सूर्यास्त झाल्यावर प्राण्यांचे व्यापार बंद पडतात॥ ९३॥ किंवा हे अर्जुना! देह नाहीसां झाला की पूर्वी केलेल्या कर्माच्या पोटांतच देहादिक उपाधी लीन होतात॥ ९४॥ किंवा बीजाच्या आकारांतच संपूर्ण वृक्ष गुप्त असतो किंवा सुताच्या दशेंत वस्त्रपण गुप्त राहतें॥ ९५॥ त्याप्रमाणे संपूर्ण पंचमहाभूतें व सर्व प्राणी आपले स्थूल धर्म सोडून देऊन व सूक्ष्म होऊन जेथें लय पावतात॥ ९६॥ अर्जुना! त्या स्थितीला ''अव्यक्त'' या नांवाने जाण. आतां इंद्रियांचे संपूर्ण भेद ऐक॥ ९७॥

तरी श्रवण नयन। त्वचा घ्राण रसन। इयें जाणें ज्ञान। करणें पांचें॥ ९८ ॥
इये तत्त्वमेळापंकीं। सुख-दुःखाची उखिविखी। बुद्धि करिते मुखीं। पांचें इहीं॥ ९९ ॥
मग वाचा आणि कर। चरण आणि अधोद्वार। पायु हे प्रकार। पांच आणिक॥ १००॥
कर्मेंद्रियें म्हणिपती। तीं इयें जाणिजती। आइकें कैवल्यपती। सांगतसे॥ १०१॥
पैं प्राणाची अंतौरी। क्रियाशक्ति जे शरीरीं। तियेचि रिगिनिगी द्वारीं। पांचें इहीं॥ १०२॥
एवं दाहाही करणें। सांगितलीं देवो म्हणे। परिस आतां फुडेपणें। मन तें ऐसें॥ १०३॥

अर्थ—तरी कान, डोळे, त्वचा, घ्राण, जिह्वा, हीं पांच ज्ञानेंद्रियें आहेत, असें जाण॥ ९८॥ या छत्तीस तत्त्वांच्या समुदायरूपी चिखलांत या पांच ज्ञानेंद्रियरूप मुखांच्या द्वारा बुद्धि सुखदु:खाचा निवाडा करते॥ ९९॥ मग वाणी, हात, पाय, गुदद्वार, उपस्थ असे आणखी पांच प्रकार आहेत. कैवल्याचे देणारे भगवान श्रीकृष्ण म्हणतात. अर्जुना! ऐक. ज्यांना कर्मेंद्रियें म्हणतात, तीं ही जाण॥ १००-१०१॥ प्राणाची पत्नी म्हणून जी क्रियाशक्ति या शरीराचे ठिकाणीं आहे. तिचें आंत येणें व बाहेर जाणें या पांच कर्मेंद्रियांच्या द्वारा होत असतें॥ १०२॥ देव म्हणतात, याप्रमाणे तुला दहा इंद्रियें कोणतीं तीं सांगितलीं. आतां मन स्पष्टपणें असें आहें, तें ऐक॥ १०३॥

जें इंद्रियां आणि बुद्धी। माझारिलिये संधी। रजोगुणाचां खांदी। तरळत असे॥ १०४॥
नीळिमा अंबरीं। कां मृगतृष्णालहरी। तैसें वायांचि फरारी। वावो जाहलें॥ १०५॥
आणि शुक्रशोणिताचा सांधा। मिळतां पांचांचा बांधा। वायुतत्त्व दशधा। एकचि जाहलें॥ १०६॥
मग तिहीं दाहीभागीं। देहधर्माच्या खैवंगीं। अधिष्ठिलें आंगीं। आपुलाल्या॥ १०७॥
तेथ चांचल्य निखळ। एकलें ठेलें निढाळ। म्हणोनि रजाचें बळ। धरिलें तेणें॥ १०८॥
तें बुद्धीसी बाहेरी। अहंकाराचिया उरावरी। ऐशा ठायीं माझारीं। बळियावलें॥ १०९॥

अर्थ—जें इंद्रियें आणि बुद्धि यांच्या मध्यसंधींत रजगुणाच्या खांदीवर चंचळ असें भासत असते॥ १०४॥ आकाशात जसा नीळा रंग किंवा मृगाला तहानेमुळे भासणारी जशी जलाची लहरी, त्याप्रमाणे वायूचें जें व्यर्थ स्फुरण झालें (त्यालाच मन हें नांव आहे)॥ १०५॥ आणि पुरुषाचे रेत व स्त्रियाचें शोणित यांचें मिश्रण होऊन पांच महाभूतांचा बांधा जें शरीर तें उत्पन्न झालें असतां एकच वायुतत्त्व दहा प्रकारचें होतें॥ १०६॥ मग त्या दहा भागांनी आपआपल्या आंगाचा, देहधर्माच्या सामर्थ्याला आश्रय दिला॥ १०७॥ तेथें त्या मनाचे ठिकाणीं एक निव्वळ चंचलताच राहिली, म्हणून तें एकटेंच राहिलें व त्याने रजोगुणाचेंच बळ धरलें॥ १०८॥ तें बुद्धीच्या नंतर व अहंकाराच्या पूर्वी असे मध्यसंधींत बळकट झालें आहे॥ १०९॥

गूढार्थदीपिका—बुद्धीसी बाहेरी। अहंकाराच्या उरावरी—कल्पना करणारें मन बुद्धीच्या ज्ञानाने जाणलें जाऊन बुद्धीचा विषय होतें, म्हणून तें बुद्धीच्या बाहेर आणि कल्पनारूप मन स्फुरल्यानंतर त्याचा अहंकार धरला जातो, म्हणून अहंकाराच्या उरावर म्हणजे पूर्वी, असे बुद्धीच्या आणि अहंकाराच्या संधींत मनाची शक्ति बळकट होते, असें सांगितलें आहे.

ऐसें ठायीं माझारीं। बळियावलें—मनाने चैतन्यरूप जीवाला आपल्या सर्वस्वीं स्वाधीन करून ठेवलें आहे; म्हणून त्याला ''बळियावलें'' म्हणजे बलवान झालें, असें म्हटलें आहे.

वायां मन हें नांव। एऱ्हवीं कल्पनाचि सावेव। जयाचेनि संगें जीव-। दशा वस्तु॥ ११०॥

अर्थ—त्याला मन हें व्यर्थच नांव आहे. खरोखर मन म्हणजे कल्पनाच होय. ज्याच्या संगतीने परब्रह्मवस्तूला जीवदशा प्राप्त झाली आहे ॥ ११० ॥

गूढार्थदीपिका—जयाचेनि संगें जीव-। दशा वस्तु-अद्वैत, अस्फुट आत्मवस्तूचे ठिकाणी जीव म्हणून त्याहून दुसरी वस्तु राहणेंच शक्य नाही. या आत्मवस्तूचे ठिकाणीं जीवदशा ही केवळ काल्पनिक आहे. म्हणजे मी खरोखर अज्ञानी आहे, मी आत्मस्वरूप जाणत नाही, मी कर्मकर्ता आहे, मी सुखदु:खांचा भोक्ता आहे, मी देहरूप आहे इत्यादि ज्या विपरीत कल्पना "अहं" किंवा "मी" या वृत्तिरूप आत्मस्वरूपाचे ठिकाणीं बळावल्या आहेत. या कल्पनेमुळेच "अहं" ला जीव म्हटलें जातें. पण ज्याप्रमाणे दोरीवर भ्रमाने कल्पिलेल्या सर्पाच्या योगाने दोरींत अणुमात्रदेखील बदल होत नाही, त्याप्रमाणेच जीवदशेच्या कल्पनेनेहि शुद्ध आत्मवस्तूंत अणुमात्र देखील बदल न होतां, ती तशीच्या तशीच शुद्ध राहते, असें आचार्यांनी ब्रह्मसूत्रावरील आरंभीच्या अध्यासभाष्यांत "यत्र यदध्यास: तत्कृतेन दोषेण गुणेनाऽणुमात्रेणापि स न संबध्यते" या वचनाने सांगितलें आहे.

जीवदशा कल्पनामूलक आहे, म्हणूनच जीवदशा काल्पनिक आहे हें सिद्ध आहे. विपरीत कल्पना नाहीशी झाली की जीवाला आपल्या अनादि मुक्ततेचा अनुभव येतो.

जें प्रवृत्तीसि मूळ। कामा जयाचें बळ। जें अखंड सूये छळ। अहंकारासी ॥ १११ ॥
जें इच्छेतें वाढवी। आशेतें चढवी। जें पाठी पुरवी। भयासि गा ॥ ११२ ॥
द्वैत जेथें उठी। अविद्या जेणें लाठी। जें इंद्रियांतें लोटी। विषयांमाजी ॥ ११३ ॥
संकल्पें सृष्टी घडी। सवेंचि विकल्पूनि मोडी। मनोरथांचिया उतरंडी। उतरी रची ॥ ११४ ॥

अर्थ—जें सर्व कर्मप्रवृत्तीचें कारण आहे, ज्याच्यामुळे कामवासना ही बलवान होते आणि जीं अहंकाराला नेहमीं उसळवितें ॥ १११ ॥ जें इच्छा वाढवितें, आशेची वृद्धि करतें, जें भयाला वाढवितें ॥ ११२ ॥ केवळ ज्याच्या योगाने द्वैत भासतें, ज्याच्या योगाने आत्मविस्मृतिरूप अविद्या दृढ होते, जें इंद्रियांना विषयांत घालतें ॥ ११३ ॥ जें नुसत्या संकल्पाने म्हणजे 'आहे' या कल्पनेने-सृष्टि उत्पन्न करतें व लगेच नाही अशी कल्पना करून सृष्टि नाहीशी करते, याप्रमाणे नाना प्रकारच्या मनोरथांच्या उतरंडी रचतें व खालीं करतें ॥ ११४ ॥

गूढार्थदीपिका—न ह्यस्त्यविद्या मनसोऽतिरिक्ता। मनोह्यविद्या भवबंधहेतु: ॥
तस्मिन्विनष्टे सकलं विनष्टम्। विजृम्भतेऽस्मिन्सकलं विजृम्भते ॥ १७१ ॥

(वि. चू.)

अविद्या ही मनापासून निराळी नाही. मन म्हणजे मूर्तिमंत अविद्याच होय. म्हणूनच मन आहे तोपर्यंत सर्व अविद्याजन्य द्वैत भासत राहतें व मन नाहीसे झालें की संपूर्ण द्वैत आटतें, असें आचार्यांनीहि म्हटलें आहे.

जें भुलीचें कुहर। वायुतत्त्वाचें अंतर। बुद्धीचें द्वार। झांकविलें जेणें ॥ ११५ ॥

अर्थ—जें भ्रमाचें कोठार असून वायुतत्त्वाचें आंतील अंग आहे आणि बुद्धीचें आत्मज्ञानरूपी द्वार ज्यांने झांकलें आहे ॥ ११५ ॥

गूढार्थदीपिका—बुद्धि सात्त्विक असल्यामुळें तिने एका आत्मतत्त्वाचाच निश्चय करायला पाहिजे, पण या कल्पनारूप मनाच्या स्वाधीन झाल्यामुळें ती आत्मतत्त्वाचा निश्चय करीत नाही.

तें गा किरीटी मन। या बोला नाहीं आन। आतां विषयाभिधान-। भेदु आइकें ॥ ११६ ॥

अर्थ—अर्जुना! तेंच मन होय; हें म्हणणें खोटें नाही. आतां ज्याला विषय हे नांव आहे, त्याचे भेद ऐक ॥ ११६ ॥

तरी स्पर्शु आणि शब्दु। रूप रस गंधु। हा विषयो पंचविधु। ज्ञानेंद्रियांचा ॥ ११७ ॥
इहीं पांचै द्वारीं। ज्ञानासि धांव बाहेरी। जैसा कां हिरविया चारीं। भांबावे पशु ॥ ११८ ॥

मग स्वर वर्ण विसर्गु। अथवा स्वीकार त्यागु। संक्रमण उत्सर्गु। विण्मूत्राचा॥ ११९॥
हे कर्मेंद्रियांचे पांच। विषय गा साच। जे बांधोनियां माच। क्रिया धांवे॥ १२०॥
ऐसे हे दाही। विषय गा इये देहीं। आतां इच्छा तेही। सांगिजैल॥ १२१॥

अर्थ—शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध असा हा ज्ञानेंद्रियांचा पांच प्रकारचा विषय आहे॥११७॥ ज्याप्रमाणे हिरवा चारा पाहून पशु भांबावून जिकडे तिकडे चरत जातो, त्याप्रमाणे या पांच ज्ञानेंद्रियांच्या द्वारा ज्ञानाची धांव बाहेर विषयाकडे असते॥ ११८॥ मग स्वरवर्णाचा उच्चार करणें, वस्तूचा स्वीकार-त्याग करणें, चालणें व मलमूत्रांना बाहेर सोडणें असे, हे अर्जुना! वाणी, हस्त, पाद, गुद व उपस्थ या पांच कर्मेंद्रियांचे पांच विषय आहेत. या पांच कर्मेंद्रियांचा माळा बांधूनच-म्हणजें त्यांच्या आश्रयानेच-क्रिया होत असतात॥ ११९-१२०॥ अर्जुना! असे हे दहा विषय देहांत-म्हणजें क्षेत्रांत-आहेत. आतां, इच्छा म्हणजे काय, तेंहि सांगतों॥ १२१॥

तरि भूतलें आठवे। कां बोलें न झांकवे। ऐसियावरि चेतवे। जे गा वृत्ती॥ १२२॥
इंद्रियाविषयांचिये भेटी-। सरसीच जेगा उठी। कामाची बाहुटीं। धरूनियां॥ १२३॥
जियेचेनि उठिलेपणें। मना सैंघ धांवणें। न रिगावें तेथ करणें। तोंडें सूती॥ १२४॥
जिये वृत्तीचिया आवडी। बुद्धी होय वेडी। विषयां जिया गोडी। ते गा इच्छा॥ १२५॥

अर्थ—तरी मागील अनुभवाची आठवण झाल्यामुळे किंवा कानावर शब्द पडल्यानंतर जी वृत्तीला उत्पन्न करते॥ १२२॥ इंद्रियांशीं विषयांचा संबंध झाल्याबरोबर कामाचा हात धरून जी वृत्ति उत्पन्न होते॥ १२३॥ जी वृत्ति उत्पन्न झाल्याबरोबर मन सारखें बाहेर धांवतें व घालूं नये तेथें इंद्रियें तोंडें घालतात॥ १२४॥ ज्या वृत्तीच्या आवडीमुळे बुद्धि वेडी होते-म्हणजे बुद्धि तिच्या स्वाधीन होते-आणि जिला विषयाची गोडी आहे. अर्जुना! ती इच्छा होय॥ १२५॥

आणि इच्छिलिया सांगडें। इंद्रियां आमिष न जोडे। ऐसियां जो डाव पडे। तोचि द्वेषु॥ १२६॥

अर्थ—आणि इच्छा झाल्याप्रमाणे इंद्रियांना विषयरूप खाद्य मिळालें नाही, तर जो विरोध किंवा जें वैर मनांत उत्पन्न होतें, त्याला द्वेष म्हणतात.॥ १२६॥

आतां यावरी सुख। तें एवंविध देख। जेणें एकेंचि अशेष। विसरे जीवु॥ १२७॥
मना वाचे काये। जें आपुली आण वाये। देहस्मृतीची त्राये। मोडित ये जें॥ १२८॥

अर्थ—आतां यानंतर सुखाचें लक्षण करायचें ते अशा प्रकारें जाण. जें एक प्राप्त झालें असतां जीव संपूर्ण विसरतो॥ १२७॥ कायावाचामनाला जें आपली शपथ घालतें-म्हणजे त्यांचे व्यापार बंद पाडतें-व जें 'मी देहरूप आहे' या मर्यादित कल्पनेचा विसर पाडीत प्राप्त होतें॥ १२८॥

गूढार्थदीपिका—माउलींनी देहादिकांचा विसर पडणें अशी सुखाची व्याख्या करून ज्या आत्मज्ञानांत आत्मैक्याची यथार्थ जाणीव व देह व जगत् यांच्या मिथ्यात्वाची जाणीव राहते, त्या केवळ आत्मज्ञानाने ब्रह्मसुखाची प्राप्ति होत नाही, हें स्पष्ट केलें आहे.

जयाचेनि जालेपणें। पांगुळा होईजे प्राणें। सात्त्विकासी दुणें। वरीही लाभु॥ १२९॥

अर्थ—जें प्राप्त झालें असतां प्राणाची गति बंद पडते-म्हणजे प्राण स्थिर राहतो, सात्विक पुरुषाला, इतर रजोगुणी तमोगुणी पुरुषांपेक्षा दुप्पट अधिक लाभ होतो॥ १२९॥

गूढार्थदीपिका—सात्त्विकासी दुणें। वरीही लाभु—जीव त्रिगुणाने बद्ध असल्यामुळे जोपर्यंत त्याच्यांत रजोगुण व तमोगुण यांचा उत्कर्ष असतो, तोपर्यंत त्याला या सुखाचा अल्पलाभ होतो व सत्वगुणाचा उत्कर्ष झाला असतां त्याला सुखाचा, उत्कर्षानुसार वाढीने अनुभव येतो.

कां आघवियाचि इंद्रियवृत्ती। हृदयाचां एकांतीं। थापटूनि सुषुप्ती। आणी जें गा॥ १३०॥

अर्थ—किंवा संपूर्ण इंद्रियांच्या वृत्तींना थापटून हृदयाच्या एकान्तांत, अर्जुना! जें सुषुप्ति अवस्थेंत आणतें॥ १३०॥

गूढार्थदीपिका—चित्त एकाग्र झाल्याशिवाय सुख होत नाही किंवा चित्त एकाग्र झाले असतांच सुख होतें असा अर्थ.

किंबहुना सोये। जीव आत्मयाची लाहे। तेथ जें होये। तया नाम सुख॥ १३१॥

अर्थ—फार काय सांगावें! जीव आत्मस्वरूपाचे ठिकाणीं प्राप्त झाला असतां तेथे तो जें होतो, त्याला सुख हें नाव आहे॥ १३१॥

गूढार्थदीपिका—मनाला जें अनुकूल वाटतें व प्रसन्न करणारें असतें त्याला सुख म्हणतात. एक आत्माच सुखरूप आहे. त्यावांचून कोठेंच सुख नाही. चित्तवृत्ति एकाग्र झाली असतां ती सात्विक होते व तिच्यांत सुखरूप आत्मा प्रतिबिंबित होतो; म्हणूनच जीवाला जेवढें सुख प्राप्त होतें तेवढें तें एक आत्मस्वरूपाचेंच असतें, पण अज्ञानाने जीव त्या सुखाचा विषयादिकांवर आरोप करतो. हें सुख ज्ञेय असल्यामुळे क्षेत्रात तें समाविष्ट केलें आहे.

आणि ऐसी हे अवस्था। न जोडतां पार्था। जीजे तेंचि सर्वथा। दु:ख जाण॥ १३२॥

अर्थ—अर्जुना अशी ही सुखाची अवस्था प्राप्त झाली नाही, तर मन जें कल्पना करतें तें सर्वस्वीं दु:ख होय॥ १३२॥

गूढार्थदीपिका—"**दु:खमल्पसुखं स्मृतम्**" (त्रि. र. अ. २) अल्पसुख म्हणजे क्षणभर सुखप्राप्ति होणें. हेंच दु:ख होय असे त्रिपुरारहस्यांत म्हटले आहे जीव सुखरहित स्थितीला दु:ख म्हणतो.

तें मनोरथसंगें नव्हे। एऱ्हवीं सिद्धि गेलेंचि आहे। हे दोनीचि उपाये। सुखदु:खासी॥ १३३॥

अर्थ—सुख हें मनोरथाने प्राप्त होणारें नव्हे. तें आत्म्याचा धर्म असल्यामुळे स्वत:सिद्धच आहे याप्रमाणे सुखदु:खाच्या प्राप्तीचीं दोन कारणें आहेत.॥ १३३॥

गूढार्थदीपिका—जीवाला जेथें जेथें सुख होतें तेथें तेथें यांत सुख आहे, अशी त्याची कल्पना असते म्हणून होतें, असे नसून. चित्त एकाग्र होऊन कल्पनारहित झालें असतां त्या एकाग्रवृत्तींत स्वत:सिद्ध सुखरूप आत्माच प्रतिबिंबित होतो व तें सुख अनुभविलें जातें.

कल्पना उठली की या सुखाचा वियोग होतो व जीव सुखाच्या वियोगाचे ठिकाणीं दु:खाची कल्पना करतो.

सारांश, सुख हें सत्य व स्वत:सिद्ध असून दु:ख हें काल्पनिक आहे; म्हणूनच येथे कल्पनारहित होणें, हें सुखाचें कारण असून कल्पना करणें हें दु:खाचें कारण आहे; असें माउलींनी सांगितलें आहे.

आतां असंगा साक्षिभूता। देहीं चैतन्याची जे सत्ता। तिये नाव पांडुसुता। चेतना येथें॥ १३४॥

अर्थ—या देहादि कार्यरूप पदार्थाच्या हालचालीवरून व होत असलेल्या जाणीवेवरून त्याचे ठिकाणीं असंग साक्षिभूत अशा चैतन्याची सत्ता आहे असे कळते, त्या सत्तारूप सामान्यचैतन्याला अर्जुना! चेतना हे नांव आहे.॥ १३४॥

गूढार्थदीपिका-असंग—म्हणजे क्षेत्राचा स्पर्श नसलेला. **साक्षिभूत**—म्हणजे केवळ जाणणारा.

सुखाप्रमाणे चैतन्य क्षेत्रज्ञाचा धर्म असल्यामुळे 'चेतना' या शब्दाने क्षेत्रज्ञाचाच येथे उल्लेख केला आहे. याप्रमाणे सुख व चेतना या दोन शब्दांनी क्षेत्रज्ञाचा येथील श्लोकांत उल्लेख आला असून बाकीच्या शब्दाने नुसतें क्षेत्र सांगितलें गेलें आहे.

क्षेत्रज्ञ हा खरोखर चैतन्यरूप असल्यामुळे क्षेत्राहून निराळा, असंग व त्याचा साक्षिभूत आहे, म्हणून त्याचा (चेतनाचा) क्षेत्रांत अंतर्भाव होऊं शकत नसला, तरी जींवाने आपल्या ठिकाणी बुद्धि, मन, इंद्रियें इत्यादि क्षेत्राच्या स्वरूपाचा अध्यास करून घेंतला आहे व सुख व जाणीव असा ज्ञेयरूपाने क्षेत्रज्ञाचा अनुभवहि क्षेत्रांतच येतो; म्हणून क्षेत्रपदार्थाबरोबर ते सांगितले गेले आहेत. अर्थात् क्षेत्रज्ञहि क्षेत्राबरोबर सांगितला गेला असल्यामुळे क्षेत्राच्या विचाराने क्षेत्रज्ञाचाहि विचार केला जाऊन क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्यांत असलेलें अंतर जाणणारें ज्ञान प्राप्त होतें.

जे नखौनि केशवरी। उभी जागे शरीरीं। जे तिहीं अवस्थांतरीं। पाल्टेना॥ १३५॥
मनबुद्ध्यादि आघवीं। जियेचेनि टवटवी। प्रकृतिवनमाधवी। सदाचि जे॥ १३६॥
जडाजडीं अंशीं। राहाटे जे सरिसी। ते चेतना गा तुजसीं। ल्टिकें नाहीं॥ १३७॥
पैं रावो परिवारु नेणे। आज्ञाचि परचक्र जिणे। कां चंद्राचेनि पूर्णपणें। सिंधू भरती॥ १३८॥
ना ना भ्रामकाचें संन्निधान। लोहो करी सचेतन। कां सूर्यसंगु जन। चेष्टवी गा॥ १३९॥
अगा मुखमेळेंविण। पिलियाचें पोषण। करी निरीक्षण। कूर्मी जेवीं॥ १४०॥
पार्था तयापरी। आत्मसंगती इये शरीरीं। सजीवत्वाचा करी। उपयोग जडा॥ १४१॥

अर्थ—जी पायाच्या नखापासून डोक्याचे केंसापर्यंत या शरीराचें ठिकाणीं अखंड जागृत असते अणि जी जागृत, स्वप्न सुषुप्ति या तिन्ही अवस्थेमध्यें देखील एकसारखीच अविकारी राहते॥ १३५॥ मनबुद्ध्यादि हीं संपूर्ण तत्वें जिच्या योगाने टवटवित दिसतात आणि जी अशा प्रकारच्या कार्यरूप प्रकृतीच्या वनांत वसंत ऋतुप्रमाणे सदा असते॥ १३६॥ जड आणि चैतन्य या दोन्ही ठिकाणीं जी सारखीच राहते, ती चेतना होय; हें मी तुला खोटें सांगत नाही॥ १३७॥ सैनिक राजाला जाणत नसतात, तरी त्यांच्या आज्ञेनेच शत्रूचां पराभव होतो किंवा पौर्णिमेला चंद्र सोळा कलानी पूर्ण झाला की समुद्राला भरती येते॥ १३८॥ अथवा लोहचुंबक जवळ आल्याबरोबर तो लोखंडाला सचेतन करतो म्हणजे हालचाल करायला लावतो-किंवा सूर्यप्रकाशाचा संबंधच लोकांना व्यवहार करायला लावतो॥ १३९॥ पिल्यांच्या मुखाचा संबंध न होऊं देतांच, ज्याप्रमाणे कासवी आपल्या केवळ दृष्टीनेच पिल्यांचें पोषण करते॥ १४०॥ अर्जुना! त्याप्रमाणें या शरीराचे ठिकाणी आत्मसंबंध झाला असल्यामुळे देहादि जड पदार्थांना सजीव करण्यांत त्या आत्मचैतन्याचा उपयोग होतो॥ १४१॥

मग तियेतें चेतना। म्हणिपे पैं अर्जुना। आतां धृतिविवंचना। भेदु आइक॥ १४२॥
तरी तत्त्वां परस्परें। उघड जाति स्वभाववैरें। नोहे पृथ्वीतें नीरें। न नाशिजे॥ १४३॥
नीरातें आटी तेज। तेजा वायूसिं झुंझ। आणि गगन तंव सहज। वायूसी भक्षी॥ १४४॥
तेविंचि कोणेही वेळे। आपण कायिसयाही न मिळे। आंत रिघोनि वेगळें। आकाश हें॥ १४५॥
ऐसीं ही पांचही भूतें। न साहती एकमेकांते। कीं तियेंही ऐक्यातें। देहासी येती॥ १४६॥
द्वंद्वाची उखिविखी। सोडूनि वसती एकीं। एकेकातें पोखी। निजगुणें गा॥ १४७॥
ऐसें न मिळे तयां साजणें। चळे धैर्यें जेणें। तयां नांव म्हणें। धृती मी गा॥ १४८॥

अर्थ—अर्जुना! तिलाच चेतना म्हणतात. आतां धैर्याचा विचार केला असतां या सर्वांहून तें भिन्न कसें आहे तें सांगतो, ऐक॥ १४२॥ तरी आकाशादि पंचतत्त्वांत जातिस्वभावानुसार एकमेकांशीं परस्पर उघड वैर आहे. पाणी पृथ्वीचा नाश करीत नाही, असें नाही॥ १४३॥ पाण्याला अग्नि नाहीसा करतो. अग्नि व वायु यांच्याशीं झुंज लागलेली आहे आणि आकाश हें वायूला सहज गिळंकृत करतें॥ १४४॥ त्याचप्रमाणे आकाश केव्हाहि कशाशीहि मिळत नाही. सर्वांच्या आंत राहूनहि तें सर्वांहून वेगळें राहतें॥ १४५॥ याप्रमाणे पांचहि भूतें एकमेकांना सहन करीत नाहीत; परंतु असें असूनहि देहाचे ठिकाणीं ती महाभूतें एकोप्याने वागतात॥ १४६॥ विरोधाचा विचार सोडून देऊन तीं एकत्र वस्ती करतात आणि आपआपल्या गुणाने एकमेकांचें पोषण करतात॥ १४७॥ याप्रमाणे ज्या धैर्याच्या योगाने कधी न मिळणाऱ्या स्वभाववैऱ्याशीं देखील मैत्री केली जाते, त्याला, अर्जुना! मी धृति म्हणतो॥ १४८॥

आणि जीवेंसी पांडवा। या छत्तिसांचा मेळावा। तो हा एथ जाणावा। संघातु पैं गा॥ १४९॥
एवं छत्तीसही भेद। सांगितले तुज विशद। यया येतुलेयातें प्रसिद्ध। क्षेत्र म्हणिजे॥ १५०॥

अर्थ—आणि अर्जुना! जीवाशीं जो या छत्तीस तत्त्वांच्या समुदायांचा संबंध झाला आहे, त्या समुदायाला संघात म्हणतात॥ १४९॥ याप्रमाणे छत्तीस प्रकारचीं तत्त्वें तुला स्पष्ट करून सांगितलीं. या इतक्यांना मिळून क्षेत्र हें प्रसिद्ध नांव आहे॥ १५०॥

रथांगांचा मेळावा। जेवीं रथु म्हणिजे पांडवा। कां अधोर्ध्व अवेवां। नांव देहो॥ १५१॥
करीतुरंगसमाजें। सेना नाम निफजे। कां वाक्यें म्हणिजती पुंजे। अक्षरांचे॥ १५२॥
कां जळधरांचा मेळा। वाच्य होय आभाळा। नाना लोकां सकळां। नाम जग॥ १५३॥
कां स्नेहसूत्रवन्ही। मेळु एके स्थानीं। धरिजे तो जनीं। दीपु होय॥ १५४॥
तैसीं छत्तीसही इयें तत्त्वें। मिळती जेणें एकत्वें। तेणें समूहपरत्वें। क्षेत्र म्हणिपे॥ १५५॥
आणि वाहतेनि भौतिकें। पाप पुण्य येथें पिके। म्हणोनि आम्ही कौतुकें। क्षेत्र म्हणो॥ १५६॥
आणि एकाचेनि मतें। देह म्हणती ययातें। परि असो हें अनंतें। नामें यया॥ १५७॥
पैं परतत्त्वाआरौतें। आणि स्थावरां आंतौतें। जें कांहीं होतें जातें। ते क्षेत्रचि हें॥ १५८॥

अर्थ—रथाच्या सर्व भागाच्या समुदायाला, ज्याप्रमाणे, अर्जुना! रथ म्हणतात किंवा खालचे वरचे अवयव घेऊन जसें देह हें नांव असतें॥ १५१॥ हत्ती, घोडे, पायदळ मिळून सेना हें नांव येतें किंवा अक्षरांच्या समूहाला वाक्य म्हटलें जातें॥ १५२॥ मेघांच्या समुदायाला आभाळ म्हणतात किंवा नाना प्रकारच्या संपूर्ण लोकांना जग हे नांव असतें॥ १५३॥ किंवा तेल, वात, अग्नि हे तिन्ही एका ठिकाणीं धरले जातात तोच लोकांत दीप म्हटला जातो॥ १५४॥ त्याप्रमाणें हीं छत्तीस तत्त्वें ज्याच्या एकत्वाने एकत्र मिळतात, त्या समुदायाच्या दृष्टीने त्याला क्षेत्र म्हणतात॥ १५५॥ या भौतिक शरीराचा उदीम केला असतां येथें पाप आणि पुण्य यांचें पीक येतें; म्हणूनहि आम्ही या शरीराला कौतुकाने क्षेत्र म्हणतों॥ १५६॥ आणि कोणी याला देह असेंहि म्हणतात; पण असो. याला अनंत नांवें आहेत॥ १५७॥ परतत्त्व-म्हणजे सर्व तत्त्वांच्या पलीकडे असलेले जें परब्रह्मतत्त्व-त्याच्या अलीकडे स्थावरापर्यंत जेवढें कांही उत्पन्न होतें किंवा नाश पावतें ते सर्व क्षेत्रच होय॥ १५८॥

परि सुर नर उरगीं। घडत आहे योनिविभागीं। तें गुणकर्मसंगी। पडिलें सातें॥ १५९॥

अर्थ—पण ते गुणकर्माच्या संगांत पडल्यामुळे देव, मनुष्य, सर्प इत्यादि नाना प्रकारच्या योनिविभागाने निर्माण होत असते॥ १५९॥

गूढार्थदीपिका—प्रत्येक जातींतील प्राण्यांचे विभाग किंवा भिन्नता कृत्रिम किंवा मनुष्यकृत नसून ती त्यांच्या ठिकाणीं असणाऱ्या त्यांच्या पूर्वगुणकर्मानुसार होत असते.

हेंचि गुणविवंचना। पुढां म्हणिपैल अर्जुना। प्रस्तुत आतां ज्ञाना। रूप दावूं॥ १६०॥
क्षेत्र तंव सविस्तर। सांगितलें सविकार। म्हणोनि आतां उदार। ज्ञान आइकें॥ १६१॥

अर्थ—हाच गुणविचार, अर्जुना पुढे सांगितला जाईल. प्रस्तुत तुला ज्ञानाचे स्वरूप दाखवितो॥ १६०॥ क्षेत्राचे वर्णन, त्यांतील संपूर्ण कार्यासह, तुला सविस्तर सांगितले; म्हणून आतां मोक्षप्राप्ति करून देऊन जीवाचा उद्धार करणारे असे जे उदार ज्ञान, ते ऐक॥ १६१॥

जया ज्ञानालगीं। गगन गिळिताती योगी। स्वर्गाची आडवंगी। उमरडोनि॥ १६२॥

अर्थ—ज्या ज्ञानप्राप्तिकरितां योगी लोक स्वर्गाचा आडमार्ग टाकून देऊन आकाशहि गिळतात॥ १६२॥

गूढार्थदीपिका—स्वर्गाची आडवंगी। उमरडोनी—परब्रह्माच्या प्राप्तिकरितां इहपर सर्व लोकांतील सुखभोगाची आसक्ती नाहीशी झाली पाहिजे, ती राहिल्यास बुद्धि विषयाकारच राहते, ब्रह्माकार होत नाही. हें "स्वर्गाची आडवंगी। उमरडोनी" या चरणांनी माउलींनी दाखविलें आहे.

गगन गिळिताति योगी—म्हणजे ज्ञानी. आकाश गिळिताति—म्हणजे बुद्धींत शून्यरूप अशा आकाशाचें अस्तित्व राहूं देत नाहीत.

इहपर विषयांची आसक्ति नाहीशी झाल्यामुळे बुद्धि विषयरहित झाली, तरी ती शून्याकार किंवा गगनाकार होऊन राहते; पण आत्मा आकाशाचेहि पलीकडे असल्यामुळे बुद्धि आत्माकार होण्याकरितां बुद्धींतून शून्याकारता किंवा आकाशाकारता नाहीशी करावी लागते, हें "गगन गिळिताति योगी" या चरणाने सांगितले आहे.

न करिती सिद्धीची चाड। न धरिती ऋद्धीची भीड। योगाऐसें दुवाड। हेळसिती॥ १६३॥

अर्थ—हे सिद्धीची इच्छा करीत नाहीत व ऋद्धीची प्राप्ति झाली असतांहि ते त्याला वश होत नाहीत. ते योगासारखीं साधनें कष्टदायक म्हणून तुच्छ समजतात॥ १६३॥

गूढार्थदीपिका—योगाने ब्रह्मानुभव येत असला, तरी जगत्सत्यात्वबुद्धि तेथेंहि कायम राहत असल्यामुळे ती अद्वैत ब्रह्मानुभवाला प्रतिबंधक होते; म्हणून ज्ञानी पुरुष ज्ञानाच्या दृष्टीने योगाला तुच्छ समजतो. वरील १६२-१६३ या दोन ओव्यांतून ज्ञानप्राप्तीला कोणत्या गोष्टी प्रतिबंधक आहेत, यांचें विवेचन केलें आहे.

तपोदुर्गे वोलांडित। क्रतुकोटि वोवांडित। उलथूनि सांडित। कर्मवल्ली॥ १६४॥

अर्थ—कित्येक ज्ञानप्राप्तिकरतां तपरूपी किल्ले ओलांडून जातात-म्हणजे घोर तपश्चर्येचे कष्ट सहन करतात. कोट्यावधि यज्ञ त्याच्यावरून (ज्ञानावरून) ओवाळून टाकतात-म्हणजे ज्ञानप्राप्तिकरितां कोट्यावधि यज्ञ करण्याचा प्रसंग आला तरी त्यांना त्याचें कांहीच वाटत नाही. व कर्मकांडरूपी वेली उपटून टाकतात-म्हणजें ज्ञानप्राप्तिकरितां संन्यास घेतात. ॥ १६४॥

नाना भजनमार्गीं। धांवत उघडिया आंगी। एक रिगताति सुरंगीं। सुषुम्नेचिये॥ १६५॥

अर्थ—कोणी उघड्या आंगीं-म्हणजे असंग होऊन किंवा सर्व संसारासक्ति सोडून नाना प्रकारच्या उपासनामार्गाने जातात, तर कोणी सुषुम्नेच्या विवरांत शिरतात॥ १६५॥

गूढार्थदीपिका—"नाना भजनमार्गी। धांवत उघडिया आंगीं" या दोन चरणाने सगुणस्वरूपाच्या उपासनाद्वारा ज्ञानप्राप्ति सांगितली असून "एक रिघताती सुरंगीं। सुषुम्नेचिये" या दोन चरणांनी आत्मस्वरूपाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याकरितां षट्चक्रभेदरूपी योगाचा मार्ग सांगितला आहे.

ऐसी जिये ज्ञानीं। मुनीश्वरांसी उतान्ही। वेदतरुच्या पानोवानीं। हिंडताती॥ १६६॥
देईल गुरुसेवा। इया बुद्धि पांडवा। जन्मशतांचा सांडोवा। टाकित जे॥ १६७॥
जया ज्ञानाची रिगवणी। अविद्ये उणें आणी। जीवाआत्मया बुझावणी। मांडूनि दे॥ १६८॥

अर्थ—याप्रमाणे ज्या ज्ञानप्राप्तिकरितां थोर थोर मुनींच्या उत्कट इच्छा वेदवचनाच्या ठिकाणीं हिंडतात-म्हणजे वेदोक्त साधनांचा आश्रय करतात॥ १६६॥ प्रेमाने केलेली श्रीगुरुसेवाच मला ज्ञान प्राप्त करून देईल, या दृढ बुद्धीने, अर्जुना! त्या सेवेकरितां शंभर जन्म घेण्याला तयार होतात॥ १६७॥ जें ज्ञान अंत:करणांत शिरलें असतां अविद्या नि:शेष नाश पावते आणि जीव व परमात्मा यांचें ऐक्य करून देतें॥ १६८॥

गूढार्थदीपिका—जाणीवरहित किंवा वृत्तिरहित व जाणीवसहित किंवा वृत्तिसहित असे दोन प्रकारचें ज्ञान आहे, हें मागें सांगितलेंच आहे. यालाच अनुक्रमें निर्विकल्प व सविकल्प ज्ञान म्हणतात.

निर्विकल्प ज्ञान सर्वाचे ठिकाणीं आहेच. असे असूनहि, जीवाचे ठिकाणीं अविद्याभ्रांति दिसून येते; म्हणून निर्विकल्प ज्ञान अविद्याभ्रांतीला निवर्तक होत नाही, हें उघड आहे. येथे ज्ञान प्राप्त झाले असतां अविद्या नाश पावते, असे माउलींनी म्हटलें आहे; म्हणून येथील अविद्यानिवर्तकज्ञान निर्विकल्पक नसून सविकल्पक आहे असें म्हणावे लागतें. ते सविकल्पक ज्ञान म्हणजे 'मी ब्रह्म आहे' असे जीवब्रह्मैक्याचें जाणीवरूप वृत्तिज्ञान होय.

जें इंद्रियांचीं द्वारें आडी। प्रवृत्तीचे पाय मोडी। जें दैन्यचि फेडी। मानसाचें॥ १६९॥

अर्थ—जें ज्ञान इंद्रियांचीं द्वारें बंद करतें-म्हणजे इंद्रियांना विषयांकडे जाऊं देत नाही. विषयसुखाच्या प्राप्तिकरितां होणाऱ्या कर्माच्या प्रवृत्तीचे पायच मोडते-म्हणजे कर्म करण्याची प्रवृत्तिच होत नाही आणि मनांतील सुखाचें दारिद्र्य नाहीसें करतें॥ १६९॥

गूढार्थदीपिका—ज्ञानाने विषय मिथ्या ठरल्यामुळे मनाची विषयांकडील धांव व इंद्रियांची कर्मप्रवृत्ति बंद पडून मन व इंद्रियें अंतर्मुख होतात व तीं सुखरूप आत्म्याचे ठिकाणीं स्थिर होतात.

द्वैताचा दुकाळु पाहे। साम्याचें सुयाणें होये। जया ज्ञानाची सोये। ऐसें करी॥ १७०॥

अर्थ—ज्या ज्ञानाची प्राप्ति झाली असतां असे होते की द्वैत कोठेंहि दिसत नाही आणि जिकडे तिकडे समरस अशा अद्वैत ब्रह्माच्या प्रत्ययाचा सुकाळ होतो॥ १७० ॥

गूढार्थदीपिका—ब्रह्मज्ञान झालें असतां भिन्न भिन्न पदार्थ आहेत अशी द्वैतदृष्टि नाहीशी होऊन सर्वत्र एकच वस्तु भरलेली असून ती केवळ नामरूपामुळे भिन्नासारखी भासते, अशी एक अद्वैतदृष्टिच राहते.

मदाचा ठावोचि पुसी। जें महामोहातें ग्रासी। नेदी आपपरु ऐसी। भाष उरों॥ १७१॥
जें संसारातें उन्मूळी। संकल्पपंकु पाखाळी। अनावरा तें वेंटाळी। ज्ञेयातें जें॥ १७२॥

अर्थ—जें ज्ञान अहंकाराचा लेशहि ठेवित नाही, जें अनादिभ्रांतीला गिळून टाकते व आपला व परका असा आपपर भाव जें शिल्लक राहूं देत नाही॥ १७१ ॥ जें संसारवृक्षाला मूळासह उपटून टाकतें व मनांतील संकल्परूपी चिखल स्वच्छ धुवून टाकतें व ज्ञेय होणाऱ्या अमर्याद आत्मवस्तूलाहि जें (ज्ञान) व्यापून टाकतें॥ १७२ ॥

गूढार्थदीपिका—वेदान्तांत परब्रह्माचे ठिकाणीं फलव्याप्ति नाही, वृत्तिव्याप्ति आहे, असें जें म्हटलें आहे, तेंच येथें माउलींनी सांगितलें आहे.

जयाचेनि जालेपणें। पांगुळ होइजे प्राणें। जयाचेनि विंदाणें। जग हें चेष्टे॥ १७३॥

अर्थ—जें ज्ञान प्राप्त झालें असतां प्राणहि स्थिर होतो व ज्या ज्ञानाच्या सत्तेने जगांतील व्यापार चालतात॥ १७३ ॥

गूढार्थदीपिका-जयाचेनि विंदाणें। जग हें चेष्टे—प्रतिबिंबरूप जीवाचे ठिकाणीं असलेल्या अज्ञानभ्रांतीच्या अपेक्षेने बिंबरूप परमेश्वराचे ठिकाणीं शुद्धसत्त्वात्मक मायेच्या योगाने "अहं ब्रह्मास्मि" असें ज्ञानवृत्तिचें जें स्फुरण होतें त्या विद्यारूप ज्ञानवृत्तीच्या साहाय्यानेच भगवान् जगद्रूप क्रीडा करतो, असा अर्थ.

जयाचेनि उजाळें। उघडती बुद्धीचे डोळे। जीवु दोंदावरी लोळे। आनंदाचिये॥ १७४॥

अर्थ—ज्याच्या प्रकाशाने बुद्धीची ज्ञानदृष्टि उघडते आणि जीव दु:खरहित होऊन अखंड प्रसन्नचित्त राहतो॥ १७४ ॥

गूढार्थदीपिका—उघडती बुद्धीचे डोळे-बुद्धि हें सत्वगुणाचें कार्य असल्यामुळे तींत शुद्ध ब्रह्मज्ञानरूप चैतन्यप्रकाश झाला आहे, हेच त्या बुद्धीचे डोळे होत; पण बुद्धि मनाच्या स्वाधीन होऊन मनाच्या कल्पनेनुसार निश्चय करते; म्हणून बुद्धीचे डोळे झांकले गेले आहेत. आत्मानात्मविचाराने हे डोळे उघडले जातात.

ऐसें जें ज्ञान। पवित्रैकनिधान। जेथ विटाळलें मन। चोख कीजे॥ १७५॥
आत्मया जीवबुद्धी। जे लागली होती क्षयव्याधी। ते जयाचिया सन्निधी। निरुजा कीजे॥ १७६॥
ते अनिरूप्य कीं निरूपिजे। ऐकतां बुद्धी आणिजे। वांचूनि डोळां देखिजे। ऐसें नाहीं॥ १७७॥

अर्थ—असें जें ब्रह्मज्ञान तें सर्व पावित्र्याचें एकच कोठार आहे व अविद्यादि मलाने अशुद्ध झालेल्या मनाला तें शुद्ध करतें॥ १७५ ॥ आत्मस्वरूपाला, मी जीव आहे-म्हणजे मी कर्ता, भोक्ता, अज्ञानी आहे इत्यादि विपरीत बुद्धीचा जो क्षय रोग लागला होता, तो रोग ज्या ब्रह्मज्ञानाच्या सान्निध्याने नाहीसा होऊन, जीव कायमचा व्याधिमुक्त होतो-म्हणजे निरुपाधिक असा ब्रह्मस्वरूप होतो॥ १७६ ॥ तें ज्ञान सांगतां येंत नाही, असें असलें, तरी सांगितलें जातें आणि तें ऐकून केवळ बुद्धीने ग्रहण करायचें असतें. बुद्धीने ग्रहण करण्यावांचून डोळ्यांनी पाहता येण्याजोगें नाही॥ १७७ ॥

गूढार्थदीपिका—अनिरूप्य कीं निरूपिजे-परब्रह्म निर्विकल्प असल्यामुळे त्याचें शब्दाने ज्ञान करून देणें शक्य नसलें, तरी त्याच्या स्वरूपाचे निरूपण केल्यावांचून मुमुक्षूला त्याचें ज्ञान होणें शक्य नाही; म्हणून सत्पुरुष, शब्दाच्या साहाय्याने त्याचें निरूपण करीत असतात.

ऐकतां बुद्धी आणिजे—सत्पुरुषाच्या मुखांतून निघालेल्या परब्रह्माच्या स्वरूपाचें विवेचन ऐकून मुमुक्षूंनी शब्द सोडून तें अर्थरूपज्ञान शुद्धबुद्धीने ग्रहण करावयाचे असतें.

वांचूनि डोळां देखिजे। ऐसें नाहीं-नामरूपाचा व्यतिरेक करून केवळ सच्चिदानंद अशा निर्गुण आत्मस्वरूपाचा ज्ञानानुभव बुद्धिगम्य असतो, डोळ्यांनी दिसण्याजोगा नसतो.

मग तेंचि इये शरीरीं। जैं आपुला प्रभावो करी। तैं इंद्रियांचां व्यापारीं। डोळांहि दिसे॥ १७८॥

अर्थ—मग तेंच ज्ञान, या शरीराचे ठिकाणीं सर्वत्र व्यापून जेव्हा आपला प्रभाव दाखवितें, तेव्हा इंद्रियांच्या व्यापारांत तें प्रगट होऊन डोळ्यांनाहि दिसूं लागतें॥ १७८॥

गूढार्थदीपिका—मग तेंचि इये शरीरीं। जैं आपुला प्रभावो करीं-तें ज्ञान बुद्धींत दृढ होऊन जेव्हा ज्ञान्याच्या शरीरादिकांचे सर्व व्यापार अद्वैतब्रह्मदृष्टीने होऊं लागतात.

तैं इंद्रियांचिया व्यापारीं। डोळांही दिसे-तेव्हा इंद्रियांच्या त्या व्यापाराच्या द्वारा ते ज्ञान डोळ्यांनाहि दिसूं लागते.

पैं वसंताचे रिगवणें। झाडांचेनि साजेपणें। जाणिजे तेवीं करणें। सांगती ज्ञान॥ १७९॥
अगा वृक्षासि पाताळीं। जळ सांपडे मुळीं। तें शाखांचिये बाहाळीं। बाहेर दिसे॥ १८०॥
कां भूमीचें मार्दव। सांगे कोंभाची लवलव। नाना आचार गौरव। सुकुलीनाचें॥ १८१॥
अथवा संभ्रमाचिया आयती। स्नेहो जैसा ये व्यक्ती। कां दर्शनाचिये प्रशस्ती। पुण्यपुरुष॥ १८२॥
नातरी केळीं कापूर जाहला। जेवीं परिमळें जाणों आला। कां भिंगारीं दीपु ठेविला। बाहेरि फांकें॥ १८३॥
तैसें हृदयींचेनि ज्ञानें। जिये देहीं उमटती चिन्हें। तियें सांगों आतां अवधानें। चांगें आइक॥ १८४॥

अर्थ—ज्याप्रमाणे झाडांच्या टवटवीवरून वसंतऋतूचा आरंभ जाणला जातो, त्याप्रमाणे ज्ञान्याचीं इंद्रिये त्याची ज्ञानस्थिति सांगतात॥ १७९॥ अर्जुना! झाडाला मुळांच्या द्वारा खोल जमिनींत पाणी सांपडत आहे, हे त्याच्या डाहाळांच्या सर्व बाजूंनी होत असलेल्या वाढीवरून बाहेर दिसून येतें॥ १८०॥ किंवा निघालेल्या कोंभाच्या लुसलुशींत कोंवळेपणावरून जमीन मृदु आहे, कडक नाही हे दिसतें. किंवा उत्तम प्रकारच्या आचरणावरून कुलीनपणा दिसून येतो॥ १८१॥ अथवा सत्काराच्या तयारीवरून जसे मनांतील प्रेम दिसून येतें किंवा दर्शनाने झालेल्या चित्ताच्या प्रसन्नतेवरून पुण्यवान पुरुष कळून येतो॥ १८२॥ किंवा केळीमध्ये कापूर तयार झाला, हे जसे त्याच्या सुवासावरून कळून येते किंवा भिंगांत दिवा ठेवला असतां त्याचा प्रकाश बाहेर पडतो॥ १८३॥ त्याप्रमाणे अंत:करणात ज्ञान प्राप्त झाले असतां बाहेर देहाचे ठिकाणीं जीं लक्षणें प्रगट होतात, तीं आतां सांगतों. एकाग्र चित्ताने अवधान देऊन ऐक॥ १८४॥

गूढार्थदीपिका—पुढें जीं अमानित्वादि ज्ञानाचीं लक्षणें सांगितली आहेत, तीं ज्ञान दृढ झाल्यावर ज्ञान्याचीं स्वाभाविक लक्षणे होऊन राहतात आणि तत्पूर्वी ज्ञान दृढ व्हावें, म्हणून साधकाला या लक्षणांचा अभ्यास करावा लागतो.

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम्। आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः॥ ७॥

अर्थ—मानाची इच्छा नसणें, दंभ नसणें, कोण्याहि प्राण्याला दु:ख न देणें, दुसऱ्याने आपला अपराध केला असतां चित्तांत यत्किंचितहि क्रोधाची उर्मी न उठणें, मनमोकळेपणा, श्रीगुरुची प्रेमाने सेवा करणें, शरीर व मन यांची शुद्धि, परमेश्वराचे ठिकाणीं अचल निष्ठा, अंत:करणाचा निग्रह करणें॥ ७॥

तरी कवणेही विषयींचें। साम्य होणें न रुचे। संभावितपणाचें। ओझें जया॥ १८५॥

अर्थ—ज्याला एका आत्मस्वरूपावांचून देहबुद्धि उत्पन्न करणाऱ्या कोण्याहि वृत्तीशीं तन्मय होणें आवडत नाही व ज्याला सज्जन म्हणवून घेण्याचें ओझें वाटते॥ १८५॥

गूढार्थदीपिका—मानित्वादिवृत्ती द्वैतांतच राहत असल्यामुळे त्या अद्वैतब्रह्मदृष्टीला घातक असतात; म्हणून ज्ञान दृढ करूं इच्छिणाऱ्यांनी त्यांचा त्याग करायला पाहिजे.

आथिलेचि गुण वानितां। मान्यपणें मानितां। योग्यतेचें येतां। आंगा रूप॥ १८६॥
तैं गजबजों लागे कैसा। व्याधें रुंधला मृग जैसा। कां बाहीं तरतां वळसां। दाटला जेवीं॥ १८७॥

पार्था तेंणें पाडें। सन्मानें जो सांकडे। गरिमेतें आंगाकडे। येवोंचि नेदी॥ १८८॥
पूज्यता डोळां न देखावी। स्वकीर्ती कानीं नायकावी। हा अमुका ऐसी नोहावी। सेचि लोकां॥ १८९॥
तेथ सत्काराची कें गोठी। कें आदरा देईल भेटी। मरणेंसीं साटी। नमस्कारितां॥ १९०॥
वाचस्पतीचेनि पाडें। सर्वज्ञता तरी जोडे। परि वेडीवेमाजीं दडे। महिमे भेणें॥ १९१॥

अर्थ—कोणी असलेल्या गुणांनी त्याची (ज्ञानी पुरुषाची) स्तुति केली असतां व माननीय म्हणून मान दिला असतां लोकांनी आपली स्तुति करावी किंवा मान द्यावा अशी योग्यता आपल्या आंगीं आली, असें पाहून तो असा व्याकुळ होतो की जसा कांही व्याधाने पाशांत धरलेला हरिण किंवा हाताने नदी पोहून जात असतां भोंवऱ्यांत सांपडलेला मनुष्य॥ १८६-१८७॥ अर्जुना! तत्तुल्यच जो मान प्राप्त झाला असतां दु:खी होऊन कष्टी होतो व आपल्या आंगीं मोठेपणा येऊं देत नाही॥ १८८॥ आपली पूज्यता आपल्या डोळ्यांनी पाहूं नये, आपली कीर्ति आपल्या कानीं पडूं नये आणि हा अमका अशी लोकांना आठवणहि होऊं नये, अशी ज्ञानी पुरुष इच्छा करतो॥ १८९॥ अशा स्थितींत सत्काराची गोष्ट किंवा आदराचा स्वीकार दूरच राहिला. त्याला पूज्य म्हणून कोणी नमस्कार केला असतां, त्याला मरणप्राय दु:ख होतें॥ १९०॥ त्याचे ठिकाणीं बृहस्पतिसारखी सर्वज्ञता असते; पण आपली सर्वज्ञता लोकांना कळून आपली महति वाढूं नये, म्हणून तो बाहेर लोकांमध्ये वेड्याप्रमाणे वागतो॥ १९१॥

गूढार्थदीपिका—वेडिवेमाजीं दडे। महिमे भेणें-अशा सत्पुरुषांना माझ्या सद्‌गुरु आईंनी अलौकिक व्याख्या-नमालेंतील "ध्यान" या व्याख्यानांत "मिथ्योन्मादग्राही" म्हणजे खोटेंच वेड्याचें सोंग घेऊन राहणारे, असें म्हटले आहे. ज्ञानीपुरुष शास्त्र सोडून यथेष्ट वागतो असा याचा अर्थ नाही. कारण यथेष्टाचरणहि अहंकार, दंभ इत्यादि दोषाला धरूनच होऊं शकतें असें आचार्यांनी "न च नियोगाभावात्सम्यग्दर्शिनो यथेष्टचेष्टाप्रसंग:। सर्वत्राभिमानस्यैव प्रवर्तकत्वादभिमानाभावाच्च सम्यग्दर्शिन:। तस्माद्देहसंबंधादेवानुज्ञापरिहारी" (ब्र. सू. शं. भा. २-३-४८) या पंक्तीने ब्रह्मसूत्रभाष्यांत म्हटलें आहे.

पण ज्ञान्याला आपली ब्रह्मस्थिति दृढ करण्याकरितां देहबुद्धि उत्पन्न करणाऱ्या अहंकारादि दोषांचें उन्मूलन करायचे असल्यामुळे व तें शास्त्रानुसार वागूनच साध्य होत असल्यामुळे तो खरोखर शास्त्रमर्यादेचें उल्लंघन न करतां तें केल्यासारखें भासवितो, हे "वेडिवेमाजीं दडे" या चरणाने माऊलींनी सांगितलें आहे.

"तस्माच्चरेत वै योगी सतां धर्ममदूषयन्। जना यथावमन्येरन् गच्छेयुर्नैव संगतिम्" सज्जनांनी घालून दिलेल्या सदाचरणरूप मार्गाचें उल्लंघन न करतां लोक आपली निंदा करतील व आपल्याला पूज्य समजणार नाहीत, असेच ज्ञानी पुरुषांनी वागावें, अशी स्मृतिहि आहे.

चातुर्य लपवी। महत्त्व हारवी। पिसेपण मिरवी। आवडोनि॥ १९२॥
लौकिकाचा उद्वेग। शास्त्रांवरी उबग। उगेपणीं चांग। आथी भर॥ १९३॥
जगें अवज्ञाचि करावी। संबंधीं सोयचि न धरावी। ऐसी ऐसी जीवीं। चाड बहु॥ १९४॥
तळवटपण बाणे। आंगीं हिणावो खेवणें। तें तेंचि करणें। बहुत करूनि॥ १९५॥
हा जीतु ना नोहे। लोक कल्पी येणें भावें। तैसें जिणें होआवे। ऐसी आशा॥ १९६॥
पैं चालतु कां नोहे। कीं वारेनि जातु आहे। जना ऐसा भ्रमु जाये। तैसें होइजे॥ १९७॥
माझें असतपण लोपो। नांवरूप हारपो। मज झणें वासिपो। भूतजात॥ १९८॥

अर्थ—आवडीने वेड्यासारखें वागून आपलें व्यावहारिक शहाणपण दिसूं देत नाही व आपलें मोठेपण नाहीसें करतो॥ १९२॥ त्याला व्यावहारिक गोष्टींचा कंटाळा असतो. शास्त्राध्ययनापासूनहि उपराम पावतो व मौन धरून राहण्यावर तो चांगला भर देतो॥ १९३॥ लोकांनी त्याला तुच्छ लेखावें व सोयऱ्याधायऱ्यांनी आपली पर्वा करूं नये अशीच त्याची अंत:करणांतून अत्यंत इच्छा असते॥ १९४॥ जेणेकरून सर्वांहून लहान होऊन राहणें आंगीं बाणेल आणि लोक तिरस्काराचें कोंदण करतील असेच बहुतकरून त्यांचें नेहमीं वागणें असतें॥ १९५॥ हा जीवंत आहे

की मेला आहे अशी लोकांची कल्पना होईल असें आपलें जीवित असावें अशी तो इच्छा बाळगतो॥ १९६ ॥ हा चालत आहे किंवा चालत नाही किंवा वाऱ्याने ढकलला जात आहे, असा लोकांना संशय उत्पन्न होईल, असें चालणें त्याला आवडतें॥ १९७ ॥ माझें अस्तित्व कोणाला कळूं नये, माझे नांवरूपहि नाहीसें व्हावें-म्हणजे माझे नांव कधीं कोणाचे तोंडीं येऊं नये व माझें रूप कोणाच्या डोळ्यांपुढे येऊं नये, नाही तर प्राण्यांनी तरी मला भिऊन पळून जावें॥ १९८ ॥

गूढार्थदीपिका—मज झणें वासिपो। भूतजात-कामनिक लोकांना टाळण्याकरितां त्यांना भय उत्पन्न होईल असें ते वर्तन करीत असतात.

ऐसी जयाचीं नवसियें। जो नित्य एकांता जातु जाये। नांमेंचि जो जिये। विजनाचेनि॥ १९९ ॥
वायू आणि तया पडे। गगनेसीं बोलों आवडे। जीवें प्राणें झाडें। पढियंतीं जया॥ २०० ॥
किंबहुना ऐस ऐसीं। चिन्हें जया देखसी। जाण तया ज्ञानेंसीं। शेज जाहली॥ २०१ ॥
पैं अमानित्व पुरुषीं। तें जाणावें इहीं मिषीं। आतां अदंभाचिया वोळखिसी। सौरस देवों॥ २०२ ॥

अर्थ—याप्रमाणे जो नवस करीत असतो. जो नित्य एकान्तस्थळीं जात असतो व जनरहित स्थळ ऐकूनच तो जीवंत राहतो॥ १९९ ॥ ज्याचें वायुशींच जमतें, ज्याला आकाशाशींच बोलणें आवडतें, ज्याला झाडें जीवप्राणाप्रमाणे प्रिय वाटतात॥ २०० ॥ किंबहुना अशीं अशीं चिन्हें ज्याचे ठिकाणीं तू पाहशील त्याला आत्मज्ञानाचें आंथरूण झालें, असें समज॥ २०१ ॥ या चिन्हांच्या द्वारा पुरुषाचे ठिकाणीं अमानित्व बाणलें आहे, असें जाणावें. आतां अदंभित्वाची सुलभ रीतीने ओळख करून देतो॥ २०२ ॥

तरि अदंभित्व ऐसें। लोभियाचें मन जैसें। जीवु जावो परि नुमसे। ठेविला ठावो॥ २०३ ॥
तयापरी किरीटी। पडिलाही प्राणसंकटीं। परि सुकृत न प्रकटी। आंगें बोलें॥ २०४ ॥
खडाणे आला पान्हा। पळवी जेवीं अर्जुना। कां लपवी पण्यांगना। वडिलपण॥ २०५ ॥
आढ्य आतुडे आडवीं। मग आढ्यता जेवीं हारवी। नातरी कुळवधू लपवी। अवयवांते॥ २०६ ॥
ना ना कृषीवळु आपुलें। पांघुरवी पेरिलें। तैसें झांकी निपजलें। दानपुण्य॥ २०७ ॥
वरिवरी देह न पूजी। लोकांतें न रंजी। स्वधर्मु वाग्ध्वजीं। बांधों नेणे॥ २०८ ॥
परोपकारु न बोले। न मिरवी अभ्यासिलें। न शके विकूं जोडलें। स्फितीसाठीं॥ २०९ ॥
शरीरभोगांकडे। पाहातां कृपण आवडे। एऱ्हवीं धर्मविषयीं थोडें। बहू न म्हणे॥ २१० ॥
घरीं दिसे सांकड। देहींची आयती रोड। परी दानीं जया होड। सुरतरूसीं॥ २११ ॥
किंबहुना स्वधर्मीं थोरु। अवसरीं उदारु। आत्मचर्चे चतुरु। एऱ्हवीं वेडा॥ २१२ ॥
केळींचें दळवाडें। हळू पोकळ आवडे। परि फळेंनि गाढें। रसाळ जैसें॥ २१३ ॥
कां मेघाचें आंग झील। दिसे वारेनि जैसे जाईल। परि वर्षती नवल। घनवट तें॥ २१४ ॥
तैसा जो पूर्णपणीं। पाहतां धाती आयणी। एऱ्हवीं तरी वाणी। तोचि ठाय॥ २१५ ॥
हें असो या चिन्हांचा। नटनाचु ठायीं जयाच्या। जाण ज्ञान तयाच्या। हाता चढले॥ २१६ ॥
पैं गा अदंभपण। म्हणितलें तें हें जाण। आंता आईक खूण। अहिंसेची॥ २१७ ॥

अर्थ—आतां अदंभित्व असें आहे. ज्याप्रमाणें लोभी मनुष्याचें मन, प्राण जाण्याचा प्रसंग आला तरी गुप्त ठेवलेलें धन कोठें ठेवलें हें कळूं देत नाही॥ २०३ ॥ त्याप्रमाणें, अर्जुना! प्राणावर संकट आलें तरी आपलें केलेलें पुण्यकर्म जो शरीर चेष्टेने किंवा वाचेने प्रकट करीत नाही॥ २०४ ॥ ज्याप्रमाणे, अर्जुना! नाठाळ गाय, आलेला देखील पान्हा सोडत नाही किंवा वेश्या आपलें वाढतें वय लपविण्याचा प्रयत्न करते॥ २०५ ॥ श्रीमंत मनुष्य अरण्यांत सांपडला असतां, ज्याप्रमाणे आपल्या श्रीमंतीचा डामडौल सोडून देतो किंवा कुलीन स्त्री आपले अवयव झांकून घेते॥ २०६ ॥ किंवा ज्याप्रमाणे शेतकरी आपलें पेरलेलें धान्य मातीने झांकून टाकतो, त्याप्रमाणे जो आपलें केलेलें

दानादिक पुण्यकर्म कोणाला कळूं देत नाही॥ २०७॥ वरवर देहाची पूजा करण्याची जो इच्छा करीत नाही. लोकांच्या मनासारखें बोलून त्यांना प्रसन्न करण्याचा प्रयत्न करीत नाही व जो आचरलेला धर्म वाणीरूपी ध्वजावर बांधत नाही–म्हणजे आचरलेल्या धर्माचा तोंडानें जो डांगोरा पिटूं इच्छित नाही॥ २०८॥ दुसऱ्यावर केलेला परोपकार जो बोलून दाखवित नाही. केलेल्या शास्त्राभ्यासाचा जो गाजावाजा करीत नाही आणि जोडलेलें पुण्य प्रतिष्ठा मिळविण्याकरितां कधीं खर्च करूं इच्छित नाही॥ २०९॥ शरीराने विषयसुखाचा भोग घेतांना पाहिले असतां तो अत्यंत कृपण दिसतो; पण धर्माचें आचरण करण्यांत मात्र तो थोडें–बहु म्हणत नाही–म्हणजे भोगाविषयीं तो कृपण असतो व धर्माविषयीं उदार असतो॥ २१०॥ घरांत पाहतां अत्यंत दारिद्र्य आणि देहाची तयारी पाहतां अत्यंत क्षीण, पण दान करण्यांत जो कल्पतरूशीं पैज बांधतो॥ २११॥ फार काय सांगावें, स्वधर्माचें आचरण करण्यांत जो अत्यंत निष्ठावंत, प्रसंगविशेषीं उदार आणि आत्मस्वरूपाची चर्चा करण्यांत अत्यंत कुशल असून बाकी व्यवहारकाळीं जो वेड्यासारखा वागतो॥ २१२॥ केळीचें आंग सुकुमार व पोकळ असतें; पण ती जसें घट्ट व रसाळ अशा फलरूपाने फळते॥ २१३॥ मेघाचें आंग इतकें पातळ असतें की वाऱ्याने उडून जाईल असें तें दिसतें, पण त्यांतून होणाऱ्या पाण्याचा वर्षाव मात्र घनदाट असतो॥ २१४॥ त्याप्रमाणे ज्याचें पूर्णपण पाहतां पाहण्याची इच्छा तृप्त होते. येऱ्हवीं वरवर पाहतां तोच सर्व अपूर्णतेचें ठिकाण दिसतो॥ ५१५॥ हें असो. ज्याच्या ठिकाणीं अशीं हीं चिन्हें मूर्तिमंत दिसून येतात, त्यालाच आत्मज्ञान प्राप्त होतें, असें समज॥ २१६॥ अर्जुना! अदंभपण सांगतो म्हणून जें मी म्हटलें, तें हें होय. आतां अहिंसेची खूण ऐक॥ २१७॥

तरी अहिंसा बहुतीं परी। बोलिली असे अवधारीं। आपुलालिया मतांतरीं। निरूपिली॥ २१८॥
परि ते ऐसी देखा। जैशा खांडुनियां शाखा। मग तयाचिया बुडुखा। कुंप कीजे॥ २१९॥
कां बाहु तोडोनि पचविजे। मग भुकेची पीडा राखिजे। नाना देऊळ मोडूनि कीजे। पौळी देवा॥ २२०॥
तैसी हिंसाचि करूनि अहिंसा। निफजविजे हा ऐसा। पै पूर्वमीमांसा। निर्णय केला॥ २२१॥
जे अवृष्टीचेनि उपद्रवें। गादलें विश्व आघवें। म्हणोनि पर्जन्येष्टी करावे। नाना याग॥ २२२॥
तंव तिये इष्टीचिया बुडीं। पशुहिंसा तंव रोकडी। मग अहिंसेची थडी। कैंची दिसे॥ २२३॥
पेरिजे नुसधी हिंसा। तेथ उगवेल काय अहिंसा। परि नवल बापा धिंवसा। या याज्ञिकांचा॥ २२४॥

अर्थ—निरनिराळ्या लोकांनी आपआपल्या भिन्न भिन्न मताप्रमाणे अहिंसेचें निरूपण केलें असल्यामुळे ती पुष्कळ प्रकारांनी बोलली गेली आहे, ऐक॥ २१८॥ पण त्यांची ती अहिंसा, ज्याप्रमाणे झाडाच्या डाहाळ्या तोडून त्यांचें झाडाच्या बुडाशीं कुंपण करावें, त्याप्रमाणे आहे, पाहा॥ २१९॥ किंवा आपला हात तोडून शिजवावा व त्यायोगाने आपली भुकेची पीडा नाहीशी करावी अथवा देऊळ पाडून त्या सामग्रीचें देवाला आवार करावें॥ २२०॥ त्याप्रमाणे हिंसा करूनच अहिंसा साधली पाहिजे, असा पूर्वमीमांसाशास्त्राने निर्णय केला आहे॥ २२१॥ त्यांचें मत असें की पाऊस न पडल्यामुळे नाना प्रकारचे दुर्भिक्षादि उपद्रव निर्माण होऊन सर्व जग त्रस्त झालें असतां पाऊस पडावा म्हणून पर्जन्य इष्टीसारखे नानाप्रकारचे याग करावेत॥ २२२॥ तर त्या इष्टींतच नेमकी पशुहिंसा केली जात असल्यामुळें मग अहिंसेचें पैलतीर कसें दिसणार?॥ २२३॥ केवळ हिंसेची पेरणी केल्यावर अहिंसारूपाने ती उगवेल काय? पण अर्जुना! याज्ञिकलोक या हिंसामय कर्मालाच अहिंसा म्हणण्याचें धाडस करतात, याचें नवल वाटतें॥ २२४॥

गूढार्थदीपिका—"या वेदविहिता हिंसा न सा हिंसेति कीर्तिता" वेदाने यागादिकांत जी पशुहिंसा सांगितली आहे, ती हिंसा होत नाही, अशी स्मृति असून "अशुद्धमिति चेन्न शब्दात्" (ब्र. सू. शं. भा. ३-१-२५) पशुहिंसात्मक यज्ञकर्म अशुद्ध म्हणजे पापरूप आहे, असें म्हणाल, तर शास्त्रांनीच तें सांगितलें असल्यामुळे ते तसें नाही, असें सूत्र असून या सूत्रावर भाष्य करतांना भगवान आचार्य म्हणतात, "ननु 'न हिंस्यात्सर्व भूतानि' इति शास्त्रमेव भूतविषयां हिंसामधर्म इत्यवगमयति। वाढम् उत्सर्गस्तु सः। अपवादः 'अग्नीष्टोमीयं पशुमालभेत' इति"।

'कोण्याहि प्राण्याची हिंसा करूं नये' या शास्त्रवचनावरून प्राण्याची हिंसा करणें हा अधर्म आहे, असें दिसून येतें, हें खरें; पण तो सामान्य नियम आहे.

'अग्निष्टोम यज्ञामध्यें पशूचें हनन करावें' असा शास्त्राने अपवाद सांगितला आहे.

आणि छांदोग्योपनिषदाच्या पांचव्या अध्यायांतील दशम खंडान्तर्गत "तद्य इत्थं विदुः। ये चेमेऽरण्ये श्रद्धा तप इत्युपासते" या पहिल्या श्रुतीवर भाष्य करतांना भगवान श्रीशंकराचार्य म्हणतात, "ऊर्ध्वरेतस म्हणजे नैष्ठिक ब्रह्मचारी, श्रद्धा व तप यांच्या ठिकाणीं ब्रह्मभावना करून उपासना करणारे वानप्रस्थ व संन्यासी हे तिघेहि अर्चिरादि मार्गाने ब्रह्मलोकांत जाऊन क्रमाने मुक्त होतात, पण गृहस्थ, नैष्ठिक ब्रह्मचारी व वानप्रस्थ यांच्यापेक्षा नाना प्रकारचे कर्म करण्याचे अधिक कष्ट सोशित असले, तरी ब्रह्मलोकांत जात नाहीत; कारण "अपूता हि ते.......हिंसानृतमायाब्रह्मचर्यादि च बहूवशुद्धिकारणमपरिहार्यं तेषाम्। अतोऽपूताः। अपुतत्वान्नोत्तरेण पथा गमनम्........हिंसानृतमायाब्रह्मचर्यादि परिहाराच्च शुद्धात्मनौ हीतरे.........विरजसः, तेषां युक्त उत्तरः पंथाः" उपासना न करतां आश्रमधर्म पाळणाऱ्या गृहस्थांकडून हिंसा, खोटें बोलणें, कपट, ब्रह्मचर्यादिच्या अशुद्धीला कारण असणारे पुष्कळ दोष घडत असल्यामुळे ते अशुद्ध असतात; म्हणून अर्चिरादि उत्तरमार्गाने ते जाऊं शकत नाहीत; पण नैष्ठिक ब्रह्मचारी, वानप्रस्थ व संन्यासी यांच्याकडून असे दोष घडत नसल्यामुळे ते शुद्ध असतात, म्हणून ते उत्तरमार्गाने जातात.

आचार्यांच्या वरील ब्रह्मसूत्रावरील भाष्याचा व छांदोग्योपनिषदांतील भाष्याचा, मिळून विचार केला असतां आचार्यांचा असा निर्णय दिसून येतो की, पापकर्माने दुःख प्राप्त होत असून पुण्यकर्माने सुख प्राप्त होतें. कोण्याहि प्राण्याची हिंसा करूं नये हा सामान्य नियम असून कामनापूर्तीकरितां हिंसा करावी हा विशेष नियम आहे.

पशुहिंसा ही कामनापूर्तीकरितां कराव्या लागणाऱ्या यज्ञांत सांगितली आहे. तसें पशुहिंसायुक्त यज्ञ करणें पापरूप नाही, म्हणजे त्याच्या योगाने नरक इत्यादि दुःख प्राप्त होत नाही, उलट कामना पूर्ण होऊन सुखच प्राप्त होतें.

स्वर्गसुख हे मोक्षसुखापेक्षा अल्प व अल्पकाळ टिकणारें म्हणून दुःखरूपच असल्यामुळे केवळ स्वर्गप्राप्ति करून देणारे हिंसात्मक यज्ञ, मोक्षप्राप्तीच्या दृष्टीने पापरूपच ठरतात.

श्रीज्ञानेश्वरमाउलींनी मागील नवव्या अध्यायांत "स्वर्गा पुण्यात्मकें पापें येइजें। पापात्मकें पापें नरका जाइजे। मग मातें जेंणें पाविजे। तें शुद्ध पुण्य" (ज्ञा. अ. ९-३१६) या ओवीने स्वर्गप्राप्तीच्या दृष्टीने पुण्यकारक म्हणून गणलें गेलेलें पशुहिंसात्मक यज्ञकर्म देखील मोक्षप्राप्तीच्या दृष्टीने पापरूप म्हणून ठरविलें आहे. पशुहिंसेवांचून स्वर्गप्राप्तिकरितां शास्त्रांतून अनेक अहिंसामय धर्म सांगितलें असून तशा धर्माचरणाने स्वर्गप्राप्ति झाल्याचीं उदाहरणेहि त्यांत दिलीं आहेत. सर्व संतमंडळींनी स्वर्गप्राप्तिकरितां केल्या जाणाऱ्या हिंसात्मक यज्ञाची भगवत्प्राप्तीच्या दृष्टीने व्यर्थ म्हणून निंदाच केली आहे.

येथेहि माउलींनी त्याच दृष्टीने हिंसात्मक यज्ञाची निंदा केली आहे.

आणि आयुर्वेदही आघवा। याच मोहोरा पांडवा। जे जीवाकारणें करावा। जीवघात॥ २२५ ॥
नाना रोगें आहाळलीं। लोळतीं भूतें देखिलीं। ते हिंसा निवारावया केली। चिकित्सा पैं॥ २२६ ॥
तंव ते चिकित्से पहिलें। एकाचे कंद खणविले। एका उपडविलें। समूळी सपत्रीं॥ २२७ ॥
एकें आड मोडविली। अजंगमाची खाल काढविली। एकें गर्भिणी उकडविली। पुटामाजीं॥ २२८ ॥
अजातशत्रु तरुवरां। सर्वांगीं देववित्या शिरा। ऐसे जीव घेऊनि धनुर्धरा। कोरडे केले॥ २२९ ॥
आणि जंगमाही हात। लाऊनि काढिलें पित्त। मग राखिले शिणत। आणिक जीव॥ २३० ॥
अहो वसतीं धवळारें। मोडूनि केलें देव्हारे। नागवूनि वेव्हारें। गवादी घातली॥ २३१ ॥
मस्तक पांघुरविलें। तंव तळवटीं उघडें पडलें। घर मोडोनि केले। मांडव पुढें॥ २३२ ॥
ना ना पांघुरणें। जाळूनि जैसें तापणें। कां जालें आंगधुणें। कुंजराचें॥ २३३ ॥
नातरी बैल विकूनि गोठा। पुंस लावोनि बांधिजे गांठा। इया करणी की चेष्टा। काइ हंसों॥ २३४॥

एकीं धर्माचिया वाहणी। गाळूं आदरिलें पाणी। तंव गाळितया आहाळणीं। जीव मेले॥ २३५॥
एक न पचवितीचि कण। इयें हिंसेचे भेण। तेथ कदर्थले प्राण। तेही हिंसा॥ २३६॥
एवं हिंसाचि अहिंसा। कर्मकांडी हा ऐसा। सिद्धांत सुमनसा। वोळखें तूं॥ २३७॥

अर्थ—आणि अर्जुना! संपूर्ण आयुर्वेद तर एक जींव वांचविण्याकरितां दुसऱ्या जीवाचा घात करावा असें सांगत असल्यामुळे अशा हिसेंचाच पुरस्कार करणारा आहे॥ २२५॥ नाना प्रकारच्या रोगांनी पीडिलेले व दुःखांनी तळमळत असलेले जीव पाहून त्यांची ती पीडा नाहीशी करण्याकरितां औषधोपचार केला जातो॥ २२६॥ पण औषधोपचार करण्यापूर्वी एखाद्या वनस्पतीचे कंद खणून आणविले जातात किंवा एखादी वनस्पति पानमूळासह उपटून आणविली जाते॥ २२७॥ एखादी वनस्पति मधूनच मोडून आणविली जाते. कोण्या निर्जीव अशा वसस्पतीची सालच काढविली जाते. कित्येक फुलफळाला येत असलेल्या वनस्पती घेऊन पुटपाकाच्या योगाने उकडून कढविल्या जातात॥ २२८॥ कोणालाहि शत्रु न समजणाऱ्या झाडांच्या सर्व आंगावर त्यांचा रस काढण्याकरितां घाव दिले जातात. याप्रमाणे अर्जुना! त्यांचे जीव घेऊन त्यांना रसरहित केलें जातें॥ २२९॥ आणि एवढेंच नाही, तर सजीव प्राण्यांसहि हात लावून त्यांचे पित काढलें जातें व इतर दुःखी जीवांचे रक्षण केले जाते.॥ २३०॥ अहो! असें करणें म्हणजे नांदत असलेले मोठमोठे वाडे सोडून देवळें करण्यासारखें किंवा लबाडीच्या व्यवहाराने लोकांना लुबाडून अन्नसत्र घालण्यासारखें होय॥ २३१॥ ढुंगणाचे सोडून मस्तकास गुंडाळले तर खालचें आंग उघडें पाडलें, घर मोडून पुढें मांडव केला॥ २३२॥ घरांतील वस्त्रें जाळून तापत बसावें अथवा हत्तीचें आंग धुवावें॥ २३३॥ किंवा बैल विकून गोठा बांधावा. राघोला सोडून देऊन त्यासाठी पिंजरा बांधावा, हे योग्य करणें म्हणावें की मर्कटचेष्टा म्हणून हंसावें॥ २३४॥ धर्ममार्गाप्रमाणे कोणी पाणी गाळून पिऊं पाहतात, पण त्या गाळण्याच्या त्रासाने जीव मरतात॥ २३५॥ कोणी हिंसा घडेल या भीतीने अन्न शिजवित नाहीत, पण त्यायोगाने प्राण व्याकुळ होतात. ती हिंसाच होय॥ २३६॥ हे निर्मळ अंतःकरण असलेल्या अर्जुना! याप्रमाणे सर्व कर्ममार्गामध्ये हिंसाच अहिंसा होय, असा सिद्धान्त आहे, असे जाण॥ २३७॥

पहिलें अहिंसेचें नांव। आम्हीं केलें जंव। तंव स्फूर्ति बांधली हांव। इये मती॥ २३८॥
तरि कैसेनि ययातें गाळावें। म्हणोनि पडिलें बोलावें। तेवींचि तुवांही जाणावें। ऐसा भावो॥ २३९॥
बहुतकरूनि किरीटी। हाचि विषयो इये गोष्टी। एऱ्हवीं कां आडवाटीं। धांविजैल॥ २४०॥
आणि स्वमताचिया निर्धारा-। लागोनियां धनुर्धरा। प्राप्तां मतांतरां। निर्वेच कीजे॥ २४१॥
ऐसी हे अवधारीं। निरूपिती परी। आतां ययावरी। मुख्य जें गा॥ २४२॥
तें स्वमत बोलिजेल। अहिंसे रूप कीजैल। जिया उठलिया आंतुल। ज्ञान दिसे॥ २४३॥
परि तें अधिष्ठिलेनि आंगें। जाणिजे आचरतेनि बागें। जैसी कसवटी सांगे। वानियातें॥ २४४॥
तैसें ज्ञानामनाचिये भेटी। सरिसेंचि अहिंसेचे बिंब उठी। तेंचि ऐसें किरीटी। परिस आतां॥ २४५॥

अर्थ—प्रथम जेव्हा आम्ही लक्षण सांगण्याकरितां अहिंसेचें नांव घेतलें तेव्हा वरील मतांतील अहिंसेचा विचार एकदम मनांत आला आणि तीं सदोष लक्षणें वगळून अहिंसेचे शुद्ध लक्षण कसें करतां येईल, म्हणून इतरांनी केलेलीं अहिंसेचीं लक्षणे सांगावीं लागलीं व तुलाहि तीं समजावीं असा त्या सांगण्याचा अभिप्राय होता॥ २३८-२३९॥ अर्जुना! अहिंसेविषयींचीं इतर मतें सांगतांना विशेषत: हाच उद्देश मनांत होता, नाहीतर आडवाटेने जाण्याचें कारणच काय?॥ २४०॥ आणि अर्जुना! आपलेंच मत योग्य आहे, असा निश्चय होण्याकरितां त्याविषयीं असलेलीं दुसरीं मतेंहि सांगून त्यांतील दोष दाखवावे लागतात॥ २४१॥ याप्रमाणे अशीच विषय निरूपण करण्याची पद्धति आहे, हें लक्षांत ठेव. आतां अहिंसेविषयीं इतर मतें सांगितल्यानंतर ज्यांत स्पष्टपणे आत्मज्ञान दिसून येतें, असें जें मुख्य व आमचे मत आहे त्या मतानुसार अहिंसेचें स्वरूप प्रगट करणार आहे॥ २४२-२४३॥ पण ज्याप्रमाणे सोन्याचा कस कसोटी सांगते, त्याप्रमाणे अहिंसा आंगीं बाणली असतां ती आचरणाच्या द्वारा जाणली जाते॥ २४४॥ त्याप्रमाणे

ज्ञान व मन यांचा संबंध झाल्याबरोबर जें अहिंसेचें स्वरूप प्रगट होतें तें, अर्जुना, असें असते. आतां सांगतों, ऐक ॥ २४५ ॥

गूढार्थदीपिका—आत्मस्वरूपाचे ठिकाणीं बुद्धि स्थिर करणें हा समाधि योग साधण्याकरितां योग्याने "जातिदेशकालासमयानवच्छिन्ना: सार्वभौमा महाव्रतम्" (यो. सू. साधनपाद-३१) विवक्षित जातीची विवक्षित देशांत, विवक्षित कालीं, विवक्षित प्रसंगीं असा अहिंसेचा मर्यादित निर्बंध न वागवितां कोण्याहि जातीच्या प्राण्याची, कोण्याहि जागीं, कोण्याहि कालीं, कसाहि प्रसंग आला तरी, कायावाचामनाने कोण्याहि प्राण्याला दु:ख देणार नाही असा निर्बंध वागवून अहिंसा महाव्रताचें पालन करावें, असें पातंजलयोगसूत्रांत सांगितले आहे.

योगशास्त्राच्या मतें जगत्सत्य असल्यामुळे योग्यांना या अहिंसा महाव्रताचें अत्यंत दक्षतेने पालन करावें लागतें; पण अद्वैत आत्मज्ञान व जगन्मिथ्यात्व हीं दोन्ही ज्याच्या ठिकाणीं दृढ झालीं आहेत, त्यांना आपल्याहून निराळा असा आपल्या विरोधि पदार्थच दिसत नसल्यामुळे त्यांच्या ठिकाणीं कोणाला दु:ख देण्याची वृत्तिच कधीं उत्पन्न होत नाही; म्हणून त्यांना हे अहिंसात्मक महाव्रत सहज साधते.

कांही महात्म्यांविषयीं त्यांनी लोकांना दंड केल्याच्या पुराणादिकांतून ज्या कथा आढळून येतात, त्यांत त्यांच्या पापरूप प्रारब्धामुळे त्यांच्याकडून माहात्म्यांच्या झालेल्या अवमानरूप भंयकर पापांचें फल त्या पुरुषांना मिळूं नये, म्हणून त्या पुरुषांच्या कल्याणाकरितांच आईबापाप्रमाणे कनवाळु होऊन व अल्प दंडाची योजना करून शेवटीं त्यांना भगवत्प्राप्तीचें सुख दिलें आहे.

ज्ञानी पुरुषाला दु:खच होत नाही व झालें तरी तें आपल्या प्रारब्धकर्मावांचून दुसऱ्या कोणालाहि त्या दु:खाबद्दल जबाबदार धरीत नाहीत; म्हणून त्यांचे ठिकाणीं कोणाला दु:ख देण्याची वृत्तिच उठत नाही.

तरि तरंगु नोलांडितु। ल्हरी पायें न फोडितु। सांचलु न मोडितु। पाणियाचा ॥ २४६ ॥
वेगें आणि लेसा। दिठी घालूनि आंविसा। जळीं बकु जैसा। पाऊल सुये ॥ २४७ ॥
कां कमळावरी भ्रमर। पाय ठेविती हळुवार। कुचुंबैल केसर। इया शंका ॥ २४८ ॥
तैसें परमाणु पा गुंतले। जाणूनि जीव सानुले। कारुण्यामाजीं पाउलें। लपवूनि चाले ॥ २४९ ॥
ते वाट कृपेची करितु। ते दिशाचि स्नेहा भरितु। जीवातळीं आंथरितु। आपुला जीवु ॥ २५० ॥

अर्थ—तरंगाला ओलांडून न जातां व तो पायाने न फोडतां आणि पाण्याचा सांठा न हालूं देतां ज्याप्रमाणे बगळा आपल्या भक्ष्याकडे दृष्टि देऊन वेगाने, पण हळु, पाण्यावर पाय ठेवतो ॥ २४६-२४७ ॥ किंवा कमळावरील परागाचे कोमल तंतु चुरगळले जातील अशी शंका घेऊन ज्याप्रमाणे भ्रमर, कमळावर अत्यंत कोमलपणाने पाय ठेवतो ॥ २४८ ॥ त्याप्रमाणे परमाणु-परमाणूंत सूक्ष्म जीव भरले आहेत; म्हणून जे आपल्या चरणाला करुणेने आच्छादन करून-म्हणजे त्या सूक्ष्म जीवाला देखील यत्किंचित् दु:ख होऊं नये अशी अंत:करणांत दयावृत्ति बाळगून-जमिनीवर पाय ठेऊन चालतात ॥ २४९ ॥ ते चालतांना संपूर्ण चालण्याचा मार्ग कृपेचा करून टाकतात, संपूर्ण दिशा प्रेमाने भरून टाकतात आणि जीवातळीं आपला जीव आंथरतात-म्हणजे ज्ञानी पुरुषाचे अंत:करणांत दुसऱ्याच्या जीवाविषयीं आपल्या जीवापेक्षांहि अधिक कळवळा असतो ॥ २५० ॥

गूढार्थदीपिका—मनुष्याच्या अंत:करणांत काम, क्रोध इत्यादि विकार स्वभावत:च आहेत व त्याला धरूनच त्याच्या क्रिया होत असतात. त्याच्या प्रेममूलक क्रियेने दुसऱ्यांना सुख होतें व दु:ख देणाऱ्या द्वेषमूलक क्रियेने दुसऱ्यांना दु:ख होतें. प्राणिमात्रांविषयीं त्यांच्या अंत:करणांत एक प्रेमवृत्तिच असते; म्हणून त्यांची कोणतीहि क्रिया कोणत्याहि जीवाला दु:खदायक होत नाही.

ऐसिया जतना। चालणें जया अर्जुना। हें अनिर्वाच्य परिमाणा। पुरिजेना ॥ २५१ ॥
पैं मोहाचेनि सांगडें। लासी पिलें धरी तोंडें। तेथ दांतांचे आगरडे। लागती जैसे ॥ २५२ ॥
कां स्नेहाळु माये। तान्हयाची वास पाहे। तिये दिठी आहे। हळुवार जें ॥ २५३ ॥

ना ना कमळदळें। डोलविजती ढाळ ढाळें। तो जेणें पाडें बुबुळें। वारा घेपे॥ २५४॥
तैसेनि मार्दवें पाय। भूमीवरी न्यसीत जाय। लागती तेथ होय। जनां सुख॥ २५५॥

अर्थ—अर्जुना! अशाप्रमाणे ज्याचें अत्यंत जपून चालणें असतें, तें त्याचें प्रेम अमर्याद असतें म्हणून शब्दाने सांगतां येत नाही॥ २५१॥ मांजरी प्रेमाने आपल्या पिलांना तोंडांत धरते तेव्हा तिच्या दांतांचीं टोंकें त्या पिलांना जशीं लागतात॥ २५२॥ किंवा प्रेमळ आई आपल्या तान्हुल्याला जेव्हा दृष्टीने पाहते तेव्हा त्या दृष्टींत जें कोमळ प्रेम असतें॥ २५३॥ किंवा एक एक पाकळी अशा क्रमाक्रमाने कमळाच्या पाकळ्या हालवून वारा घेतला असतां तो वारा बुबुळांना जितका कोमल व सुखकर वाटतो॥ २५४॥ तितक्याच कोमल अंत:करणाने तो जमिनीवर पाय ठेवित असतो; म्हणून ते पाय जेथें पडतात तेथील जीवांना सुखच होत असतें॥ २५५॥

गूढार्थदीपिका—लागती तेथ होय। जीवां सुख—''जात्यन्तर परिणामप्रकृत्यापूरात्'' (यो. सू. कैवल्यपाद) तपश्चार्यादिकांनी दुसऱ्या जातीच्या प्रकृतीचा पुरवठा झाल्यामुळे ह्याच जन्मांत शरीराची पूर्वप्रकृति दुसऱ्या जातीच्या प्रकृतींत परिणाम पावते-म्हणजे शरीराचें धर्म बदलून जातात-असें योगसूत्र आहे.

अज्ञानी पुरुषाला 'माझा देह जड आहे' या दृढ विपरीत समजुतीमुळे त्याचा देह जड व भारी झाला असून त्या देहाखालीं सांपडलेल्या जीवाला दु:ख होतें; पण ज्ञानानंतर देहादि पदार्थ वस्तुत: नाहीत, भासमात्र आहेत, या खऱ्या यथार्थ समजुतीमुळे व जीवाविषयीं असलेला अत्यंत कळवळा इत्यादि सात्विकवृत्तीमुळे ज्ञान्याच्या पूर्व जड अशा देहाचा जात्यंतर परिणाम होतो—म्हणजे त्याच्या देहाची जड-तम प्रकृति नाहीशी होऊन तिच्या जागीं अत्यंत हलकी व सुकुमार अशा सात्विक प्रकृतीचा पुरवठा होतो; म्हणून त्याच्या पायादि अवयवांखालीं सांपडलेल्या जीवांना दु:ख न होतां अत्यंत सुख वाटतें.

ऐसिया लघिमा चालतां। कृमि कीटक पांडुसुता। देखे तरि माघौता। हळूचि निघे॥ २५६॥
म्हणे पावो धडफडील। तरि स्वामीची निद्रा मोडेल। रचलेपणा पडैल। झोती हन॥ २५७॥
इया काकुळती। वाहणी घे माघौती। कोणेही व्यक्ती। न वचे वरी॥ २५८॥
जीवाचेनि नांवें। तृणातेंहि नोलांडवे। मग न लेखितां जावें। हें कें गोठी॥ २५९॥
मुंगिये मेरु नोलांडवे। मशका सिंधु न तरवे। तैसा भेटलियां न करवे। अतिक्रमु॥ २६०॥
ऐसी जयाची चाली। कृपा फुलीं फळा आली। देखसी जियाली। दया वाचे॥ २६१॥

अर्थ—अशा रीतीने हलक्या पायाने चालत असतांना, अर्जुना! कृमी, कीटक दृष्टीस पडले तर तो तितक्याच हळुवारपणाने परत फिरतो॥ २५६॥ तो म्हणतो, धडपड करीत पाय टाकल्यास त्या आवाजाने माझ्या प्रभूची सुखनिद्रा मोडेल व असलेल्या शरीरस्थितीला कदाचित् धक्का लागेल॥ २५७॥ अशा कोमल वृत्तीनेच पुढें न जातां तो मागें परततो, आणखी कोण्याहि प्राण्यावर पाय पडूं देत नाही॥ २५८॥ सर्वत्र जीव भरला आहे, या ज्ञानामुळे त्याच्याच्याने गवताला देखील ओलांडून जाववत नाही, मग प्राणी दृष्टीस पडला असतां त्याला तुच्छ समजून त्याच्याकडे न पाहतां जाण्याची गोष्ट दूरच राहिली॥ २५९॥ मुंगीला मेरुपर्वत ओलांडून जाववत नाही, किंवा चिलटाला समुद्र तरून जाववत नाही, त्याप्रमाणे भेटलेल्या प्राण्याला अनादराने उल्लंघन करून ज्याला जाववत नाही॥ २६०॥ चालण्यांत ज्याची कृपा याप्रमाणे फुलून फळाला आली आणि वाणीचे ठिकाणीं मूर्तिमंत दया जीवंत आहे, असें पाहशील॥ २६१॥

स्वयें श्वसणेंचि तें सुकुमार। मुख मोहाचें माहेर। माधुर्या जाहलें अंकुर। दशन तैसे॥ २६२॥
पुढां स्नेह पाझरे। मागां चालती अक्षरें। शब्द पाठीं अवतरे। कृपा आधीं॥ २६३॥
तंव बोलणेंचि नाहीं। बोलों म्हणे जरी कांहीं। तरि बोल कोणाही। खुपेल कां॥ २६४॥
बोलतां अधिकुही निघे। तरि कोण्हाही वर्मी न लगे। आणि कोण्हासि न रिघे। शंका मनीं॥ २६५॥
मांडिली गोठी हन मोडैल। वासिपैल कोणी उडैल। आइकोनिचि बोवांडिल। कोण्ही जरी॥ २६६॥
तरी दुवाळी कोणा न व्हावी। भंवई कवणाची नुचलावी। ऐसा भावो जीवीं। म्हणोनि उगा॥ २६७॥

मग प्रार्थिला विपायें। जरि लोभें बोलों जाये। तरि परिसतया होये। मायबापु॥ २६८॥
कां नादब्रह्मचि मुसे आलें। कीं गंगापय असळलें। पतिव्रते आलें। वार्धक्य जैसें॥ २६९॥
तैसें साच आणि मवाळ। मितलें आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे॥ २७०॥

अर्थ—त्यावे श्वासोच्छ्वास देखील अत्यंत सुकुमार असतात व मुख केवळ प्रेमाचें माहेर असतें. त्याचे दांत म्हणजे जणुं गोडीला आलेले अंकुर होत॥ २६२॥ प्रथम हृदयांत प्रेमाचा पाझर फुटूनच मग त्याच्या मुखांतून अक्षरें निघत असतात, अगोदर, त्याला कृपा उत्पन्न होऊन मागाहून शब्द निघतात॥ २६३॥ तो सदा मौन धरूनच असतो, कारण तो विचार करतो की आपण बोलावें, तर आपलं बोलणें कोणाला खुपेल काय?॥ २६४॥ बोलतां बोलतां एखादा शब्द अधिक निघाला तर तो कोणाच्या वर्मी तर लागणार नाही व कोणाच्या मनांत शंका तर येणार नाही॥ २६५॥ आपल्या बोलण्याने कोणाच्या प्रतिपादनाचें कदाचित् खंडन होऊन ते भिऊन जातील किंवा कोणी आवेशाने निघून जातील किंवा कोणी ऐकून तें तुच्छ लेखतील॥ २६६॥ असे कोणाला कष्ट होऊं नये व कोणाची भुंवई उचलली जाऊं नये असा भाव त्याच्या मनांत असतो; म्हणून तो उगा राहतो॥ २६७॥ मग कदाचित् कोणी त्याने बोलावें म्हणून प्रार्थना केलीच आणि तो प्रेमाने बोलूं लागला असतां चित्त देऊन ऐकणाऱ्याला प्रत्यक्ष माझे मायबाप माझ्या हिताचा उपदेश करीत आहेत, असें वाटतें॥ २६८॥ किंवा नादब्रह्मच मुखरूपी मुशींत आलें किंवा गंगेचें पाणी अंगावर उसळून आलें किंवा पतिव्रतेला वार्धक्य यावें, त्याप्रमाणे ज्ञानीपुरुषाचे शब्द यथार्थ (हितकर) आणि कोमल, मोजके आणि रसाळ, जणुंकाय अमृताचे कल्लोळच, असे वाटतात॥ २६९-२७०॥

गूढार्थदीपिका—नादब्रह्मचि मुसें आलें-पदस्थध्यानाने बाह्याकाश चिदाकाश करून कोटी अजपाजपाने त्या आकाशांत शिवाच्या तांडवाचा किंवा गोपाळकृष्णाच्या वेणूचा जो नाद उठून सर्व नादमय होऊन जातें, तो नाद म्हणजे उघड ब्रह्मदर्शनच असल्यामुळे त्याला नादब्रह्म म्हटलें जातें. यालाच अनाहतनादहि म्हणतात. हा नाद ईश्वरानुग्रहरूप असल्यामुळे अवीट व अत्यंत सुखकारक असतो. या नादापासूनच वेदाची उत्पत्ति आहे, असें भागवतांत म्हटलें आहे.

येथे श्रीमाऊलींनी असें सुचविलें आहे की नादब्रह्म जसें ब्रह्माची अभिव्यक्ति करणारें असतें, तसेंच ज्ञान्याचे शब्द ऐकणाऱ्याला ते ब्रह्मप्रकाशक व आनंददायक होतात.

गंगापय असळलें—या गंगाजळाच्या उपमेने असें सूचित केलें की, गंगाजळ जसें थंड व पवित्र असल्यामुळे तें पापताप नाहिसें करणारें असतें, तसेंच ज्ञान्याचे शब्द ऐकणाऱ्याचे पापताप नाहीसे करणारे असतात.

पतिव्रते आलें। वार्धक्य जैसें-ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री लोकांच्या आदरास पात्र झालेलीं असते व तिला वार्धक्य आलें असतां ती परमादरास पात्र होते, त्याप्रमाणे ज्ञान्याचे शब्दहि ऐकणाऱ्याला अत्यंत आदरणीय वाटतात.

विरोध वाद बळु। प्राणितापढाळु। उपहासु छळू। वर्मस्पर्शु॥ २७१॥
आटु वेगु विंदाणु। आशा शंका प्रतारणु। हे संन्यसिले अवगुणु। जया वाचा॥ २७२॥
आणि तयाचि परी किरीटी। थाउ जयाचिये दिठी। सांडिलिया भ्रुकुटी। मोकळिया॥ २७३॥
कां जे भूतीं वस्तु आहे। तिये रूपों शके विपायें। म्हणोनि वास न पाहे। बहुतकरूनि॥ २७४॥
ऐसाही कोणे एके वेळे। भीतरले कृपेचेनि बळें। उघडोनियां डोळे। दिठी घाली॥ २७५॥
तरि चंद्रबिंबौनि धारा। निघतां नव्हती गोचरा। परि एकसरें चकोरां। निघती दोंदें॥ २७६॥
तैसें प्राणियांसि होये। जरी तो काही वास पाहे। तया अवलोकनाची सोये। कूर्मीही नेणे॥ २७७॥
किंबहुना ऐसी। दिठी जयाची भूतांसी। करही देखसी। तैसेचि ते॥ २७८॥

अर्थ—कारण त्याच्या वाणींतून निघालेल्या शब्दांत विरोध करणें, वाद उत्पन्न करणें, बळ दाखविणें, प्राण्यांना दुःख देण्याची प्रवृत्ति, उपहास, छळ, वर्मी लागणें, हट्ट, आवेश, कपट, आशा, शंका, फसविणें हे दुर्गुण कधींच नसतात॥ २७१-२७२॥ आणि त्याचप्रमाणे अर्जुना! भृकुटी मोकळ्या सोडल्यामुळे ज्याची दृष्टि बाहेर न निघतां

जेथल्या तेथेच स्थिर झाली आहे॥ २७३॥ असें वाटतें की भूतमात्रांत आत्मवस्तु भरली असल्यामुळे बाहेर दृष्टि टाकली असतां ती कदाचित् त्यांना बोचेल म्हणून तो बहुतकरून बाहेर दृष्टि करीत नाही॥ २७४॥ असें असूनहि एखादे वेळीं अंत:करणांत असलेल्या कृपेमुळे तो डोळे उघडून व बाहेर दृष्टि करून पाहूं लागला॥ २७५॥ तर ज्याप्रमाणे चंद्रबिंबापासून अमृताच्या धारा निघाल्या असतां त्या लोकांच्या दृष्टीस पडत नाहीत, पण चकोर पक्ष्यांचीं मात्र पोटें भरून ते एकसारखे पुष्ट होत राहतात त्याप्रमाणे प्राण्यांना सुख प्राप्त होतें. जर एखाद्या वस्तूकडे त्याने दृष्टि टाकली तर त्याच्या दृष्टींतील प्रेम कूर्मीहि करूं जाणत नाही॥ २७६-२७७॥ फार काय सांगावें! सर्व प्राणीमात्रांकडे ज्याची अशी प्रेमदृष्टि असते तसेच त्याचे हातहि तुला दिसून येतील॥ २७८॥

तरी होऊनियां कृतार्थ। राहिले सिद्धाचे मनोरथ। तैसे जयाचे हात। निर्व्यापार॥ २७९॥
अक्षमें आणि संन्यासिलें। कां निरिंधन आणि विझालें। मुकेनि घेतलें। मौन जैसें॥ २८०॥
तयापरी कांहीं। जयां करां करणें नाहीं। जे अकर्तयाच्या ठायीं। बैसों येती॥ २८१॥

अर्थ—ज्याप्रमाणे कृतार्थ झाल्यामुळे सिद्धांना मनोरथ उत्पन्न होत नाहीत, त्याप्रमाणे ज्याचे हात व्यापारच करीत नाहीत॥ २७९॥ ज्याप्रमाणे कर्म करण्यास मुळीं असमर्थ आहे आणि संन्यास घेतला किंवा अग्नींत काष्ठेंच नाहीत आणि विझला किंवा आधींच मुका आणि वर त्याने मौन घेतले॥ २८०॥ त्याप्रमाणे ज्या हातांकडून कांहीच व्यापार होत नाहीत म्हणून जे अकर्ते होऊन वसले आहेत॥ २८१॥

गूढार्थदीपिका—आत्माकार अवस्था व व्युत्थान अवस्था, अशा ज्ञानाच्या दोन अवस्था आहेत, सर्वत्र घनदाट एक अस्फुट, अद्वैत, सच्चिदानंद परब्रह्मवस्तुच भरली आहे, असा अनुभव आलेल्या ज्ञान्याच्या ठिकाणीं जेव्हा त्याची वृत्ति आत्माकार राहते, तेव्हा एका परब्रह्मवस्तूवांचून दुसऱ्या कोणत्याहि वस्तुच्या अस्तित्वाची जाणीवच स्फुरत नसल्यामुळे त्याला देह, देहाचे अवयव, त्यांचीं कर्मे व कर्तृत्व यांच्या अस्तित्वाचें आपणहून कधीं ज्ञानच होत नाही व तो आत्माकार अवस्थेंत आपल्या आत्मस्वरूपाप्रमाणेच केवळ निर्व्यापार असतो.

आसुडैल वारा। नख लागेल अंबरा। इया बुद्धी करां। चळों नेदी॥ २८२॥
तेथ आंगावरिलीं उडवावीं। कां डोळां रिगतें झाडावीं। पशुपक्ष्यां दावावी। त्रासमुद्रा॥ २८३॥
इया केउतिया गोठी। नावडे दंड काठी। मग शस्त्राचें किरीटी। बोलणें कें॥ २८४॥
लीलाकमळें खेळणें। कां पुष्पमाळा झेलणें। न करी म्हणे गोफणें। ऐसें होईल॥ २८५॥
हालवतील रोमावळी। यालागीं आंग न कुरवाळी। नखांची गुंडाळी। बोटांवरी॥ २८६॥
तंव करणेयाचाचि अभावो। परि ऐसाही पडे प्रस्तावो। तरि हातां हाचि सरावो। जे जोडिजती॥ २८७॥

अर्थ—जो वाऱ्याला झटका बसेल किंवा आकाशाला आपलें नख लागेल अशा बुद्धीने हाताची हालचाल होऊं देत नाही॥ २८२॥ अशा स्थितींत आंगावर बसलेल्या प्राण्यांना हातांनी उडवावें किंवा डोळ्यांत जाणाऱ्या प्राण्यांना झाडावें, पशुपक्ष्यांना भीति वाटेल अशी रागीट मुद्रा दाखवावी॥ २८३॥ ह्या गोष्टी कोठून होणार! जेथें हातीं दंड, काठी घेणें आवडत नाही, तेथें मग अर्जुना! शस्त्राचें नांवच घेणें नको॥ २८४॥ सहज कमल घेऊन खेळूं लागणें किंवा पुष्पमाळा झेलणें, हें देखील गोफण मारण्यासारखें दु:खदायक होईल, असें म्हणून जो कांही करत नाही॥ २८५॥ रोमावळी हालविली जाऊन रोमांत असलेल्या जीवांना दु:ख होईल; म्हणून जो आंगदेखील कुरवाळीत नाही आणि बोटांवर नखांची गुंडाळी होऊं देतो॥ २८६॥ याप्रमाणें कर्म करण्याचाच अभाव असतो; पण असें असतांहि प्रारब्धाने होणाऱ्या व्युत्थान अवस्थेंत हातांकडून कर्म होण्याचा प्रसंग आला असतां त्याच्या हाताला साधकदशेपासून हात जोडण्याचा किंवा नमस्कार करण्याचाच अभ्यास झालेला असतो॥ २८७॥

गूढार्थदीपिका—प्रारब्धाने वृत्तीची आत्माकारता नाहीशी होऊन, पण अद्वैतब्रह्मस्थितीची जाणीव राहून जेव्हा देहादिकांचा व त्यांच्या व्यापाराचा मिथ्या भास भासूं लागतो, तेव्हा त्या स्थितीला व्युत्थान अवस्था म्हटली जाते. या अवस्थेंत ज्ञान्याला आपल्या जीवदशेचा व इतर जीवाचा भास होत असल्यामुळे ज्ञानदृष्टीने इतर जीवाशीं वागण्याची त्याची प्रवृत्ति येथें दाखविली आहे.

कां नाभिकारा उचलिजें। हातु पडिलिया देइजे। नातरि आर्तातें स्पर्शिजे। अळुमाळु॥ २८८॥
हेंही उपरोधें करणें। तरी आर्तभय हरणें। नेणती चंद्रकिरणें। जिव्हाळा तो॥ २८९॥
पावोनि तो स्पर्शु। मलयानिळु खरपुसु। येणें मानें पशु। कुरवाळणें॥ २९०॥
जे सदा रिते मोकळे। जैशीं चंदनांगें शीतळे। न फळतांही निर्फळें। होतीचि ना॥ २९१॥
आतां असो हें वाग्जाळ। जाणें तें करतळ। सज्जनाचें शीळ। स्वभाव जैसें॥ २९२॥

अर्थ—किंवा तो अभय देण्याकरितां हात उचलतो किंवा पडलेल्याला हात देतो अथवा अत्यंत दु:खीजनाला आपल्या हातांनी हळुच स्पर्श करतो॥ २८८॥ एवढें करणें देखील, यापेक्षा अधिक कांही करतां येत नाही, म्हणून नाइलाजाने करतो, तरी त्याच्या अंत:करणांत दु:खितांचे दु:ख निवारण करण्याचा जो जिव्हाळा असतो तो चंद्राच्या किरणालाहि माहित नाही॥ २८९॥ हाताचा स्पर्श प्राप्त झाला असतां मलयपर्वतावरील चंदनाने सुगंधित झालेला वायु देखील खरखरित वाटेल, इतक्या कोमल हाताने तो पशुला कुरवाळतो॥ २९०॥ ज्याप्रमाणे चंदनाचें सर्व अंग शीतळ असल्यामुळे फळ येत नाही तरी तें निरुपयोगी होत नाही, त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाचे हातहि सदां रिकामे व मोकळे असले तरी ते निरुपयोगी होत नाहीत. (त्यांनी कृपेने मस्तकावर हात ठेवला असतां त्यांच्या कृपेने सर्व मनोरथ पूर्ण होतात)॥ २९१॥ आतां हें बहु बोलणें पुरें, जसें सज्जनाचें शील व स्वभाव असतो त्याप्रमाणेच त्याचे हातहि असतात, असें समज॥ २९२॥

आतां मन तयाचें। सांगों म्हणों जरी साचें। तरी सांगितले कोणाचे। विलास हे॥ २९३॥
काइ शाखा नव्हे तरु। जळेंवीण असे सागरु। तेज आणि तेजाकारु। आन काई॥ २९४॥
अवयव आणि शरीर। हे वेगळाले काय कीर। कीं रसु आणि नीर। सिनानीं आथी॥ २९५॥
म्हणोनि हे जे सर्व। सांगितले बाह्यभाव। ते मनचि गा सावयव। ऐसें जाणें॥ २९६॥
जें भुई बीज खोंविलें। तेंचि वरी रुख जाहलें। तैसें इंद्रियद्वारा फांकलें। तें अंतरचि॥ २९७॥
पैं मानसींचि जरी। अहिंसेची अवसरी। तरी कैंची बाहेरी। वोसंडेल कीं॥ २९८॥
आवडे ते वृत्ती किरीटी। आधीं मनौनी चि उठी। मग ते वाचे दिठी। करांसि ये॥ २९९॥
वांचूनि मनींचि नाहीं। तें वाचेसि उमटेल काई। बीजेंवीण भुईं। अंकुर असे॥ ३००॥
उगमींचि वाळुनि जाये। तें वोघीं कैचें वाहे। जीवु गेलिया आहे। चेष्टा देहीं॥ ३०१॥
म्हणोनि मनपन जैं मोडे। तैं इंद्रिया आधींचि उबडें। सूत्रधारेंवीण साइखडें। वावो जैसें॥ ३०२॥
तैसें मन हें पांडवा। मूळ यया इंद्रियभावां। हेंचि राहटे आघवां। द्वारीं इहीं॥ ३०३॥
परि जिये वेळीं जैसें। जें होऊनि आंतु असे। बाहेरि ये तैसें। व्यापाररूपें॥ ३०४॥
यालागीं साचोकारें। मनीं अहिंसा थांवे थोरें। जैसी पिकली द्रुती आदरें। बोभात निघे॥ ३०५॥
म्हणोनि इंद्रियें तेचि संपदा। वेचितांही उदावादा। अहिंसेचा धंदा। करितें आहाती॥ ३०६॥
समुद्रीं दाटे भरितें। तैं समुद्रचि भरी तरियांतें। तैसें स्वसंपत्ती चित्तें। इंद्रियां केलें॥ ३०७॥
हें बहु असो पंडितु। धरूनि बाळकाचा हातु। वोळी लिही सुव्यक्तु। आपणचि॥ ३०८॥
तैसें दयाळुत्व आपुलें। मनें हातापायां आणिलें। मग तेथ उपजविलें। अहिंसेतें॥ ३०९॥
याकारणें किरीटी। इंद्रियांचिया गोठी। मनाचियेंचि राहाटी। रूप केलें॥ ३१०॥
ऐसा मनें देहें वाचा। सर्व संन्यासु दंडाचा। जाहला ठायीं जयाचां। देखशील॥ ३११॥
तो जाण वेल्हाळ। ज्ञानाचें वेळाउळ। हें असो निखळ। ज्ञानचि तो॥ ३१२॥

अर्थ—आतां त्याचें मन कसें असतें तें सांगतों, असें जर म्हणूं तर आतापर्यंत ज्या सुंदर वागणुकीचें वर्णन केलें, ती वागणूक कोणाची?॥ २९३॥ फांद्या वृक्ष नव्हेत काय? पाण्याहून समुद्र निराळा असतो काय? प्रकाश आणि दिवा निराळा म्हणतां येतो काय?॥ २९४॥ अवयव आणि शरीर हे खरोखरच वेगवेगळे आहेत काय? किंवा

पाणी आणि त्याचा रसगुण हे निराळे आहेत?॥ २९५ ॥ म्हणूनच आतापर्यंत हे जे सर्व ज्ञान्याच्या शरीराचे भाव सांगितले ते सर्व अवयवधारी मनच होय, असें समज॥ २९६ ॥ जमिनींत जें बी पेरले तेंच वर वृक्षरूपाने वाढलें, त्याप्रमाणे आंतील मनच बाहेर इंद्रियांच्या द्वारा व्यापाररूपाने विस्तार पावतें॥ २९७॥ आणि मनांतच जर अहिंसेचा अभाव असेल तर बाहेर ती कोठून प्रगट होणार?॥ २९८॥ अर्जुना! कोणतीहि वृत्ति आधीं मनांतच उठते व मग ती वाणी, दृष्टि, हात यांच्या ठिकाणीं प्रगट होते॥ २९९ ॥ मनांत असल्यावांचून ती वाणीवर कशी प्रगट होणार? जमिनींत बी नसतां अंकुर येतो काय?॥ ३०० ॥ म्हणून ज्याप्रमाणे नाचविणाऱ्यावांचून बाहुल्या व्यापारहीन असतात, त्याप्रमाणे मनाचें मनपण नाहीसें झालें असतां इंद्रियें आधींच व्यापारहीन अशीं रिकामीं असतात॥ ३०१ ॥ उगमाचे ठिकाणींच नदी कोरडी झाली, तर ती पुढें प्रवाहरूपाने कशी वाहणार? जीव निघून गेल्यानंतर देहाचे ठिकाणीं हालचाल असते काय?॥ ३०२॥ त्याप्रमाणे, हे अर्जुना! मन हें सर्व इंद्रियांच्या राहाटीला मूळ कारण आहे तेंच सर्व इंद्रियांच्या द्वारा व्यापार करीत असतें॥ ३०३॥ पण मन आंत ज्यावेळीं जसें होऊन असतें, तसेंच तें बाहेर व्यापाररूपाने प्रगट होतें॥ ३०४॥ म्हणून ज्याप्रमाणे पिकलेल्या फळाचा वास बाहेर प्रगट होतो, त्याप्रमाणे खरोखर चित्तांत स्थिर बाणलेली अहिंसाच बाहेर इंद्रियांच्या व्यापाररूपाने व्यक्त होते॥ ३०५॥ म्हणून इंद्रियें, मनाची तीच अहिंसारूप संपत्ति खर्च करून पूर्णपणें आपल्या अहिंसेचा धंदा करीत असतात॥ ३०६॥ समुद्रांत जोराची भरती आली असतां, ज्याप्रमाणे समुद्राच्या तीरावरील खळग्यांत समुद्रच भरला जातो, त्याप्रमाणे चित्तच आपल्या गुणसंपत्तीने इंद्रियांत भरून राहते॥ ३०७॥ हा विस्तार पुरे. ज्याप्रमाणे पंतोजी मुलाचा हात धरून आपणच सुस्पष्ट अक्षरांच्या ओळी लिहितो॥ ३०८॥ त्याप्रमाणे मनाने आपलें दयालुत्व आपल्या हातापायाच्या ठिकाणीं आणून तेथें अहिंसेला उत्पन्न केलें असतें॥ ३०९॥ म्हणून, अर्जुना! इंद्रियांचा व्यापार सांगून मानसिक अहिंसेचें स्वरूप स्पष्ट केलें॥ ३१०॥ याप्रमाणे कायावाचामनाने कोण्याहि प्राण्याला कशाहि प्रकारचें दु:ख देण्याचें सोडून दिलें, असें ज्याच्या ठिकाणीं तूं पाहशील॥ ३११॥ तो ज्ञानाचें सुंदर मंदीर होय, असें जाण. एवढेंच काय? तो केवळ ज्ञानच होय॥ ३१२॥

जे अहिंसा कानें ऐकिजे। ग्रंथाधारें निरूपिजे। ते पाहावी हें उपजे। तैं तोचि पाहावा॥ ३१३॥
ऐसें म्हणितलें देवें। तें बोलें एकें सांगावें। परि फांकला हें उपसाहावें। तुम्हीं मज॥ ३१४॥
म्हणाल हिरवे चारीं गुरुं। विसरे मागील मोहर धरूं। कां वारेलगें पांखिरूं। गगनीं भरे॥ ३१५॥
तैसिया प्रेमाचिया स्फूर्तीं। फावलिया रसवृत्ती। वाहविला मती। आकळेना॥ ३१६॥
तरि तैसें नोहे अवधारा। कारण आहे विस्तारा। एऱ्हवी पद तरी अक्षरां। तिहींचेंचि॥ ३१७॥

अर्थ—जी अहिंसा आपण कानाने ऐकतो किंवा ग्रंथाच्या आधाराने सांगितली जाते, ती प्रत्यक्ष पाहावी, असें जेव्हा मनांत येईल, तेव्हा त्यालाच (ज्ञान्यालाच) पहावें॥ ३१३॥ असें भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला म्हटलें, हें भगवंताचें म्हणणें एका शब्दाने सांगायचें, पण विस्तार झाला, त्याबद्दल तुम्ही मला क्षमा करावी॥ ३१४॥ कदाचित् म्हणाल की, जनावर हिरव्या चाऱ्यावर चरत असतांना तें मागें परत जाणें विसरतें किंवा वाऱ्याच्या वेगांत सांपडलेला पक्षी आकाशांतच भराऱ्या मारतो॥ ३१५॥ त्याप्रमाणे प्रेमाच्या वेगाने रसोत्पत्ति होऊन माझी वाहावलेली बुद्धि आवरली गेली नाही॥ ३१६॥ तर ऐका, तसें नव्हे. विस्तार होण्याला कारण आहे. एरव्ही पाहतां अहिंसा हे पद तीन अक्षरांचेंच आहे॥ ३१७॥

अहिंसा म्हणतां थोडी। परि तेचि हे होय उघडी। जैं लोटिजती कोडी। मतांचिया॥ ३१८॥
एऱ्हवीं प्राप्तें मतांतरें। थातंबूनि आंगभरें। बोलिजैल तें न सरे। तुम्हांपाशीं॥ ३१९॥
रत्नपारखियांचां गांवीं। जाईल गंडकी तरि सोडावी। काश्मीरीं न करावी। मिडगण जे॥ ३२०॥
काइसा वासु कापुरा। मंद जेथ अवधारा। पिठाचा विकरा। तिये सातें॥ ३२१॥
म्हणोनि इये सभे। बोलकेपणाचेनि क्षोभें। लागसर न लभे। बोला प्रभु॥ ३२२॥

सामान्या आणि विशेषा। सकळे कीजेल देखा। तरि कानाचेया मुखा-। कडे न्याल ना तुम्ही॥ ३२३॥
शंकेचेनि गदळे। जैं शुद्ध प्रमेय मैळे। तैं मागुतियां पाउलीं पळे। अवधान येतें॥ ३२४॥
कां करूनि बाबुळियेची बुंथी। जळें जियें ठाती। तयांची वास पाहाती। हंस काई॥ ३२५॥
कां अभ्रापैलीकडे। जैं येत चांदिणें कोडें। तैं चकोरें चांचुवडें। उचलिती ना॥ ३२६॥
तैसें तुम्ही वास न पाहाल। ग्रंथु नेघा वरि कोपाल। जरी निर्विवाद नव्हैल। निरूपण॥ ३२७॥
न बुझावितां मतें। न फिटे आक्षेपाचें लागते। तें व्याख्यान जी तुमतें। जोडूनि नेदी॥ ३२८॥
आणि माझें तंव आघवें। ग्रंथन येणेंचि भावें। जे तुम्हीं संतीं होआवें। सन्मुख सदा॥ ३२९॥

अर्थ—आणि अहिंसा म्हणतांना तीन अक्षरांचा एक छोटासा शब्द दिसतो, पण इतर अनेक मतांच्या चळथीचें परीक्षण करून खंडण. केल्यासच तिचा अर्थ किंवा रूप स्पष्ट होणें शक्य आहे॥ ३१८॥ नाही तर, इतर मतें प्राप्त असतां, तीं तशीच ठेऊन अहिंसेचे पुष्कळ वर्णन केलें, तर तसें करणें तुमच्याजवळ चालणार नाही॥ ३१९॥ रत्नाची परीक्षा करणाऱ्यांच्या गांवात गंडकी नदींतील शीळा खपेल तर ती विकायला मांडावी; पण तेथें संगमरवरी दगड विकण्याची लुडबुड करूं नये॥ ३२०॥ हे पहा! या कापराला काय वास आहे—म्हणजे कांहीच वास नाही-असें म्हणून जेथें कापराची विक्रीच मंद होते, तेथें त्याच्या मिश्रणाने पिठाची, कापूर म्हणून, विक्री होईल काय?॥ ३२१॥ म्हणून या तुमच्या सज्जन श्रोत्यांच्या समोर केवळ बोलकेपणाचाच आदेश दाखविल्यास माझ्या बोलण्याला तुमची जवळीक लाभणार नाही. (म्हणजे माझ्या बोलण्याकडे आपण लक्षच देणार नाही)॥ ३२२॥ बोलण्यांत सामान्य आणि विशेष असा भेद न दाखवितां दोहोंची भेसळ झाल्यास माझें बोलणें तुम्ही कानाच्या द्वारापाशीं देखील येऊं देणार नाही॥ ३२३॥ जेव्हा शुद्ध सिद्धान्त नाना शंकांनी युक्त होऊन गढूळ होतो, तेव्हा श्रोत्यांचें अवधान तेथें राहूं शकत नाही, तें मागल्या पायींच परत फिरतें॥ ३२४॥ किंवा ज्या पाण्यांत शेवाळाच्या गुंडाळ्या (दाट शेवाळें) झाल्या आहेत त्या पाण्याकडे हंस कधीं दृष्टि देतात काय?॥ ३२५॥ किंवा जेव्हां चंद्राचा प्रकाश अभ्राच्या पलीकडे राहतो, तेव्हा चकोर पक्षी आपली चोंच उघडित नाही॥ ३२६॥ त्याप्रमाणे निरूपण निर्दोष झालें नाही तर, तुम्ही तिकडे लक्ष देणार नाही, ग्रंथ हातीं धरणार नाही, शिवाय रागवाल॥ ३२७॥ इतर मतांचा विचार केला नाही, तर येणाऱ्या आक्षेपांचें निरसन होणार नाही आणि असें केलेलें व्याख्यान तुमची प्राप्ति करून देणार नाही॥ ३२८॥ आणि तुम्ही सज्जन श्रोत्यांनी सदासर्वदा माझ्या सन्मुख होऊन श्रवण करावें, या एका उद्देशानेच मी ग्रंथाची रचना करीत आहे॥ ३२९॥

एऱ्हवीं तरी साचोकारें। तुम्ही गीतार्थाचे सोइरे। जाणोनि गीता जीवसरे। धरिली मियां॥ ३३०॥
जें आपुलें सर्वस्व द्याल। मग इयेतें सोडवूनि न्याल। म्हणोनि ग्रंथु नव्हे वोल। साचचि हे॥ ३३१॥
कां सर्वस्वाचा लोभु धरा। वोलीचा अव्हेरु करा। तरि गीते मज अवधारा। एकचि गती॥ ३३२॥
किंबहुना मज। तुमचिया कृपा काज। तियेलागीं व्याज। ग्रंथाचें केलें॥ ३३३॥
तरि तुम्हां रसिकांजोगें। व्याख्यान शोधावें लागे। म्हणूनि मतांगें। बोलों गेलों॥ ३३४॥
तंव कथेसि पसरू जाहला। श्लोकार्थ दूरि गेला। कीजो क्षमा यया बोला। अपत्या मज॥ ३३५॥
आणि घांसाआंतिल हरळु। फेडितां लागे वेळु। तें दूषण नव्हे खडळु। सांडावा कीं॥ ३३६॥
कां संवचोरां चुकवितां। दिवस लागलिया माता। कोपावें कीं जीविता। जिताणें कीजे॥ ३३७॥
परि यावरील हें नव्हे। तुम्हीं उपसाहिलें तेंचि बरवें। आतां अवधारिजो देवें। बोलिलें ऐसें॥ ३३८॥

अर्थ—नाही तरी तुम्ही खरोखर गीतार्थाचे जिव्हाळ्याचे सोयरे आहांत, हें जाणून मी गीता एकसारखी हृदयाशीं धरली आहे॥ ३३०॥ कारण, आपण आपलें मला सर्वस्व देऊन गीतेला सोडवून न्याल, असें मला वाटतें; म्हणूनच गीता केवळ ग्रंथ नसून तुमच्या कृपेचें खरोखर तारणच आहे॥ ३३१॥ किंवा इतक्यावरहि सर्वस्वाचा लोभ धरून तारण सोडवून न नेतां त्याचा अव्हेर कराल तर गीतेची व माझी एकच गति होणार, हे लक्षांत असूं द्या—म्हणजे

आपल्याकडून माझ्याबरोबर गीतेचाहि त्याग होईल॥ ३३२॥ काय सांगूं! माझ्यावर तुमची कृपा व्हावी, हेंच माझें साध्यकार्य आहे व त्याकरितांच मी ग्रंथरचनेचें निमित्त केलें॥ ३३३॥ म्हणून तुम्हां रसिकांना मान्य होईल असें निरूपण कसें होईल, याचा शोध करूं लागलों व म्हणून इतर मताचें निरूपण करीत गेलों; तेव्हा साहजिकच निरूपणाचा विस्तार झाला व श्लोकाचा अर्थ बाजूला राहिला. आपण मला लेंकराला या शब्दविस्ताराबद्दल क्षमा करावी॥ ३३४-३३५॥ आणि जेवतांना घासांत खडा लागला व तो काढतांना वेळ लागला, म्हणून दोष देतां येत नाही, कारण खडा काढलाच पाहिजे॥ ३३६॥ किंवा बरोबर प्रवास करीत असलेल्या चोरांना चुकविण्याकरितां दिवस लागले, म्हणून आईनी रागवावे की (बाळ) जिवंत आला म्हणून त्याच्यावरून निंबलोण उतरावें॥ ३३७॥ पण माझ्या निरूपणाचा विस्तार वरप्रमाणे नव्हे; म्हणून तुम्ही क्षमा केलीं तर तेंच बरें होईल. आतां भगवान जें बोललें ते ऐका॥ ३३८॥

म्हणे उन्मेषसुलोचना। सावध होईं अर्जुना। करूं तुज ज्ञाना। वोळखी आतां॥ ३३९॥
तरि ज्ञान गा तें एथें। वोळख तूं निरुतें। आक्रोशेंवीण जेथें। क्षमा असे॥ ३४०॥
अगाध सरोवरीं। कमळिणी जियापरी। कां सदैवाचिया घरीं। संपत्ति जैसी॥ ३४१॥
पार्था तेणें पाडें। क्षमा जयातें वाढे। तेही लक्षे तें फुडें। लक्षण सांगों॥ ३४२॥

अर्थ—श्रीकृष्ण म्हणतात, आत्मज्ञानरूप उत्तम डोळे ज्याला आहेत अशा अर्जुना! सावध हो. तुला आतां ज्ञानाची ओळख करून देतो॥ ३३९॥ बा अर्जुना! ज्याच्या ठिकाणीं यत्किंचितहि संताप उत्पन्न न होतां अपराधाची क्षमा केलेली दिसून येते, तेथें खरोखर ज्ञान आहे, हें तूं जाण॥ ३४०॥ अथांग पाणी असलेल्या तलावांत ज्याप्रमाणे कमळाचीं झाडें राहतात किंवा भाग्यवानाचे घरीं संपत्ति राहते॥ ३४१॥ अर्जुना! त्याप्रमाणेच ज्याच्या आंगीं क्षमा वाढली आहे, असें ज्या लक्षणांवरून स्पष्ट दिसून येतें, तीं लक्षणें सांगतों, ऐक॥ ३४२॥

तरि पढियंतें लेणें। आंगीं भावें जेणें। धरिजे तेवीं साहणें। सर्वचि जया॥ ३४३॥
त्रिविध मुख्य आघवे। उपद्रवांचे मेळावे। वरि पडिलिया नव्हे। वांकडा जो॥ ३४४॥
अपेक्षित पावे। तें जेणें तोषें मानावे। अनपेक्षिताही करवे। मानत्तोचि॥ ३४५॥
जो मानापमानातें साहे। सुखदुःख जेथ सामाये। निंदास्तुती नोहे। दुखंडु जो॥ ३४६॥
उन्हाळेनि जो न तापे। हिमवंतीं न कांपे। कायसेनिही न वासिपे। पातलेया॥ ३४७॥
स्वशिखरांचा भारु। नेणे जैसा मेरु। कीं धरा यज्ञसूकरु। वोझें न म्हणे॥ ३४८॥
नाना चराचरीं भूतीं। दाटणी नव्हे क्षिती। तैसा नाना द्वंद्वी प्राप्तीं। घामेजेना॥ ३४९॥
घेउनी जळाचे लोट। आलिया नदीनदांचे संघाट। करी वाड पोट। समुद्र जेवीं॥ ३५०॥
तैसें जयाचिया ठायीं। न साहणें काहींचि नाहीं। आणि साहतसे ऐसेंही। स्मरण नुरे॥ ३५१॥
आंगा जें पातलें। तें करूनि घाली आपुलें। येथ साहतेनि नवलें। घेपिजेना॥ ३५२॥
हे अनाक्रोश क्षमा। जयापाशीं प्रियोत्तमा। जाण तेणें महिमा। ज्ञानासि गा॥ ३५३॥
तो पुरुषु पांडवा। ज्ञानाचा वोलावा। आतां परिस आर्जवा। रूप करूं॥ ३५४॥

अर्थ—आवडता अलंकार जितक्या हौसेने आपण आंगावर घालतो, तितक्याच हौसेने जो सर्व दुःख सहन करतो॥ ३४३॥ सर्व दुःखात आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक असे तीन प्रकारचीं दुःखें मुख्य आहेत. त्या दुःखांचे समुदाय शरीरादिकांचे ठिकाणीं प्राप्त झाले असतां ज्याला ते यत्किंचितहि मनाच्या विरुद्ध वाटत नाहीत॥ ३४४॥ इच्छिलेलें प्राप्त झालें असतां जितका आनंद होतो तितक्याच आनंदाने इच्छा नसलेल्या वस्तूचा जो स्वीकार करतो॥ ३४५॥ जो मानाप्रमाणेच अपमानहि आनंदाने सहन करतो. ज्याच्या ठिकाणीं सुख-दुःख सारखेच सामावतात आणि ज्याचें चित्त निंदा-स्तुति ऐकून दुःखी व आनंदी असे दोन प्रकारचे होत नाही॥ ३४६॥ ज्याप्रमाणे मेरुपर्वत अत्यंत उन्हाने तापत नाही किंवा अत्यंत थंडीने कांपत नाही व कांही प्राप्त झालें तरी तो भीत नाही॥ ३४७॥

स्वत:च्या शिखराचें त्याला जसें ओझें होत नाही. किंवा वराहावतारीं भगवंताला पृथ्वीचा भार वाटत नाही ॥ ३४८ ॥ किंवा नाना प्रकारच्या स्थावर-जंगम प्राण्यांची दाटी झाली तरी पृथ्वीला त्यांचा भार वाटत नाही, त्याप्रमाणे सुख-दु:खादि द्वंद्वें प्राप्त झालीं असतां ज्याला यत्किंचित् घाम सुटत नाही म्हणजे घाबरा होत नाही ॥ ३४९ ॥ ज्याप्रमाणे पाण्याचे लोट घेऊन नदीनदांचे समूह मिळण्यास आले तरी समुद्र आपलें पोट विस्तीर्ण करतो ॥ ३५० ॥ त्याप्रमाणे जो सर्वच सहन करीत असल्यामुळे ज्याचे ठिकाणीं सहन करीत नाही असें कांहीच नसतें आणि मी सर्व सहन करतो अशी अहंकाराची जाणीव देखील ज्याच्या चित्तांत कधीं उठत नाही ॥ ३५१ ॥ जें जें शरीराच्या ठिकाणीं प्राप्त होतें, तें तें माझ्या शरीराचे ठिकाणीं स्वाभाविक आहे, अशी बुद्धि धारण केल्यामुळे सर्व साहण्याचें त्याला नवल देखील वाटत नाही ॥ ३५२ ॥ अत्यंत प्रिय अर्जुना! संतापावांचून ज्याच्या ठिकाणीं इतकी क्षमावृत्ति आहे त्या पुरुषाच्या योगानेच ज्ञानाला महति प्राप्त झाली आहे, असें समज ॥ ३५३ ॥ अर्जुना! तो पुरुष म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानाचें जीवनच होय. आतां आर्जवाचें स्वरूप सांगतों, ऐक ॥ ३५४ ॥

गूढार्थदीपिका—अशा लक्षणांच्या पुरुषाच्या ठिकाणींच ज्ञानाची वृद्धि होऊन त्याची पूर्णता होत असते, असा भाव.

तरि आर्जव तें ऐसें। प्राणाचें सौजन्य जैसें। आवडे तयाही दोषें। एकचि पैं गा ॥ ३५५ ॥
कां तोंड पाहूनि प्रकाशु। न करी जेवीं चंडांशु। जगा एकुचि अवकाशु। आकाश जैसें ॥ ३५६ ॥
तैसें जयाचें मन। माणुसाप्रती आन आन। नोहे आणि वर्तन। ऐसें पैं तें ॥ ३५७ ॥
जे जगचि सनोळख। जगेंसीं जुनाट सोयरिक। आप पर हे भाख। जाणणें नाहीं ॥ ३५८ ॥
भलतेणेंसींहि मेळु। पाणिया ऐसा ढाळु। कवणेविखीं आडळु। नेघे चित्त ॥ ३५९ ॥
वारियाची धांव। तैसे सरळ भाव। शंका आणि हांव। नाहीं जया ॥ ३६० ॥
मायेपुढें बाळका। रिगतां न पडे आशंका। तैसें मन देतां लोकां। नालोची जो ॥ ३६१ ॥
फांकलिया इंदीवरा। परिवर नाहीं धनुर्धरा। तैसा कोनकोंपरा। नेणेचि जो ॥ ३६२ ॥
चोखाळपण रत्नाचें। रत्नावरी कीर नाचे। तैसें पुढां मन जयाचें। करणें पाठी ॥ ३६३ ॥
आलोचूं जो नेणे। अनुभवचि जोगावणें। धरी मोकली अंत:करणें। नव्हेचि जया ॥ ३६४ ॥
दिठी नोहे मिणधी। बोलणें नाहीं संदिग्धी। कवणेंसीं हीनबुद्धी। राहाटों नेणे ॥ ३६५ ॥
दहाही इंद्रियें प्रांजळें। निष्प्रपंचें निर्मळें। पांचही पालव मोकळे। आठही पाहर ॥ ३६६ ॥
अमृताची धार। तैसें उजू अंतर। किंबहुना जो माहेर। या चिन्हांचे ॥ ३६७ ॥
तो पुरुष सुभटा। आर्जवाचा आंगवटा। जाण तेथेंचि घरटा। ज्ञानें केला ॥ ३६८ ॥

अर्थ—आतां आर्जव तें असें आहे. प्राणाचें बऱ्यावाईट सर्व प्राण्यांशीं एक सौजन्यानेच वागणें असते ॥ ३५५ ॥ किंवा सूर्य ज्याप्रमाणे तोंड पाहून प्रकाश करीत नाही किंवा जसें आकाश सर्व जगाला अवकाश देतें ॥ ३५६ ॥ त्याप्रमाणे ज्याचें मन प्रत्येक प्राण्याशीं निरनिराळें होत नाही व वागणूकहि याप्रमाणे असते ॥ ३५७ ॥ जणुं काय सर्व जगच ओळखीचे आहे किंवा सर्व जगाशीं फार जुना संबंध आहे, अशी वागणूक असते. आप-पर हे शब्दच तो जाणत नसतो ॥ ३५८ ॥ कोणाशींहि मिळणें, अशी त्याची पाण्यासारखी वागणूक असते. कोणाविषयीं त्याचें चित्त विकल्प घेत नाही ॥ ३५९ ॥ वाऱ्याच्या वाहण्याप्रमाणे ज्याचा मनोभाव सरळ असतो. ज्याच्या मनांत शंका किंवा हांव उत्पन्न होत नाही ॥ ३६० ॥ ज्याप्रमाणे मुलाला आपल्या आईच्या ओसंगांत जातांना कांही शंका वाटत नाही, त्याप्रमाणे लोकांपुढे आपलें मनोगत प्रगट करतांना जो मागील-पुढील विचार करीत नाही ॥ ३६१ ॥ कमळाचें फूल संपूर्ण उमललें असतां, अर्जुना! ज्याप्रमाणे आंतील व बाहेरील भाग, असा भेद राहत नाही, त्याप्रमाणे जो मनाला कानाकोंपरा ठेवित नाही-म्हणजे कांही विचार गुप्त ठेवायचे व कांही विचार प्रगट करायचे, असें करीत नाही ॥ ३६२ ॥ किंवा ज्याप्रमाणे रत्नाचें चोखाळपण म्हणजे तेज रत्नावरच नाचते म्हणजे रत्नावरच असतें, म्हणजे आधी त्याचें तेज दृष्टीस पडतें व नंतर

रत्नांचें ज्ञान होतें, त्याप्रमाणे ज्याचें मन प्रथम कळलें जाऊन त्यामागून त्याची क्रिया प्रगट होते॥ ३६३ ॥ जो इतर विचार करीत बसत नाहीं. अंत:करणात आत्मानुभवच दृढ करतो. मन आवरणें किंवा मन मोकळें सोडणें असें ज्याच्याकडून कधीं होत नाही॥ ३६४॥ त्याचें बोलणें कधीं साशंक नसतें किंवा तो कधींहि कोणाशीं हीनबुद्धीने वागूं इच्छित नाही; म्हणून त्याची दृष्टि कोणापुढेहि मिंधी होत नाही॥ ३६५ ॥ दुसऱ्याशीं त्याच्या दहाहि इंद्रियांची वागणूक मोकळी, पंक्तिप्रपंचरहित अशी निर्दोष असते. त्याचे पांचहि प्राण आपल्याप्रमाणे दुसऱ्याकरितां देखील सदासर्वदा सादर असतात॥ ३६६ ॥ अमृताच्या धारेप्रमाणे त्याचें अंत:करण कपटरहित सरळ असतें. एवढेंच नाही, तर जो या चिन्हांचें माहेरघर-म्हणजे राहण्याचें ठिकाणच-होऊन राहिला आहे॥ ३६७॥ हे उत्तम योद्ध्या अर्जुना! तो पुरुष म्हणजे सरळ वागणुकीची मूर्तिच असून ज्ञानाने तेथेंच घर केलें आहे, असें जाण॥ ३६८॥

गूढार्थदीपिका—ज्ञानीपुरुष सर्वत्र चराचरांत एक आपल्यालाच पाहत असल्यामुळे तो आपल्याशीं जसा निष्कपट असतो, तसाच सर्व प्राणिमात्रांशीं निष्कपट असतो.

आतां ययावरी। गुरुभक्तीची परी। सांगों गा अवधारीं। चतुरनाथा॥ ३६९ ॥
आघवियांचि दैवां। जन्मभूमि हे सेवा। जे ब्रह्म करी जीवा। शोच्यातेंही॥ ३७० ॥

अर्थ—हे सर्व चतुर पुरुषांमध्ये श्रेष्ठ अशा अर्जुना! आतां यानंतर गुरुभक्तीचा प्रकार सांगतों, ऐक॥ ३६९ ॥ ही श्रीगुरुसेवा म्हणजे संपूर्ण सद्भाग्याला जन्म देणारी माता आहे. कारण ती त्रिविध दु:खाने पीडलेल्या जीवाला अविनाशी सुखस्वरूप असें ब्रह्म करून सोडते॥ ३७० ॥

गूढार्थदीपिका—आघवियांचि दैवां। जन्मभूमी हे सेवा—सुखाच्या प्राप्तीला भाग्य म्हणतात आणि सर्व प्रकारच्या सुखांचा एका ब्रह्मसुखांतच अंतर्भाव होत असल्यामुळे तें ब्रह्मसुख संपूर्ण सद्भाभाग्यांची सांठवण आहे. हें ब्रह्मसुख ज्या सद्गुरुसेवेने प्राप्त होतें त्या सद्गुरुसेवेला सर्व भाग्यांची जन्मभूमि म्हटलें आहे. हें ब्रह्मसुख सद्गुरुच्या कृपेवांचून स्वत:च्या बुद्धीच्या साहाय्याने किंवा कोणत्या कर्माने प्राप्त होऊं शकत नाही.

''ब्रह्मैव गुरुरूपेणावतिष्ठते'' जीवाचा उद्धार करण्याकरितां परब्रह्मच गुरुरूप धारण करून अवतीर्ण होतें, अशी स्मृति आहे; म्हणून परब्रह्म आणि श्रीगुरु यांत किंचित्‌हि भेद नाही व श्रीगुरुचें रूप म्हणजे जीवाचें शुद्धलक्षांशस्वरूपच होय. अर्थात् श्रीगुरुची सेवा ही साक्षात् परब्रह्माचीच सेवा होय. या सेवेनेच परब्रह्मप्राप्तिकरितां लागणारी चित्ताची अत्यंत निरहंकारस्थिति प्राप्त होते व श्रीगुरुपरब्रह्माशीं ऐक्य होऊन जीव पूर्ण ब्रह्मस्वरूप होतो.

ब्रह्म करी जीवा। शोच्यातेंही—ज्या श्रीगुरुला शरण जावयाचे तो श्रीगुरु श्रोत्रिय म्हणजे विरोधि वचनामुळे उत्पन्न होणाऱ्या शंकांचें समाधान करणारा व ब्रह्मानुभवांत पारंगत असला पाहिजे, असे ''स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणि श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्'' या श्रुतींत सांगितलें आहे. अर्थात् 'गुरु' ही संज्ञा श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ पुरुषाशिवाय दुसऱ्याला नाही. ''जो शब्दज्ञाने पारंगतु। ब्रह्मानंदें सदा डुल्लतु'' ''जेणें स्वयें चाखिली नाहीं चवी। तो दुजियातें गोडी कैसी लावी'' (ए. भा. अ. ३) इत्यादि ओव्यांनी नाथांनीहि अनुभवी पुरुषासच गुरु संज्ञा आहे, असें स्पष्ट सांगितलें आहे. माउलींनी येथें ज्या श्रीगुरुची अनन्यभावाने केलेली सेवा संपूर्ण भाग्याची जन्मभूमी होय, असें म्हटलें आहे, ते सद्गुरु म्हणजे श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ असेच माउलींना अभिप्रेत आहे, हें ''ब्रह्म करी जीवा। शोच्यातेही'' या चरणांवरून स्पष्ट आहे.

ते आचार्योपास्ती। प्रकटिजैल तुजप्रती। बैसों दे एकपांती। अवधानाची॥ ३७१ ॥

अर्थ—ती सद्गुरुची सेवा कशी करायची हे तुला आतां सविस्तर सांगतों. तेथें तुझें संपूर्ण लक्ष एकाग्र होऊन वसूं दे. ॥ ३७१ ॥

गूढार्थदीपिका—या आचार्योपास्तीचा विचार माझ्या सद्गुरु आईंनी आपल्या 'प्रेमनिकुंज' या ग्रंथांत केलेला आहे. त्याचें अवलोकन केलें असतां माउलींनी केलेल्या आचार्योपास्तीच्या निरूपणाचा चांगला उलगडा होतो.

माझी सद्गुरु आई म्हणते—

"सेवेमाजीं तत्व तीन। आधीं तयाचें व्हावें ज्ञान। तरीच सेवेचें विंदान। पूर्ण सेवककरीं चढें॥ ५॥"

श्रीगुरुसेवा करतांना तीन तत्वें पाळिलीं पाहिजेत. तीं तत्वें पाळण्याकरितां आधीं त्यांचें ज्ञान व्हायला पाहिजे. तीं तत्वें कळलीं असताच श्रीगुरुच्या सेवेची संपूर्ण रीति हातीं येते. तीं तत्वें अशीं—

"प्रथम तत्व अद्वैतीं द्वैत। जें जीवन्मुक्ती व्युत्थानीं उचंबळत। द्वितीय तत्त्व विख्यात। वियोगोपलालन संयोगीं॥ ६॥ तृतीय तत्त्व गुणद्वेषरहित। गुणवैतृष्ण्य गुणार्पणयुक्त। एवं तरीच सेवा अखंडित। फोफावत निष्काम॥ ७॥" (प्रे. नि. ४ वल्ली)

पहिलें तत्त्व अद्वैतांत द्वैत पाहणें हें होय. हें जीवन्मुक्तस्थितींत व्युत्थानकालीं भासत असतें. दुसरें तत्त्व प्रख्यात असून तें म्हणजे संयोगांत वियोग करणें होय. तिसरें तत्त्व म्हणजे श्रीगुरुला संपूर्ण गुण समर्पण करून गुणद्वेषरहित होणें होय.

या तीन तत्त्वाला धरून सेवा केली असतां ती निष्काम अखंडित अशी होते.

येथें आचार्योपास्तीला ज्ञानी पुरुषाचें लक्षण करून आचार्योपास्ती जशी ही ज्ञानाच्या पूर्वी करावी लागते तशीच ती ज्ञानाच्या नंतरहि स्वाभाविकपणे प्रेमाने होत राहते, असें सुचविलें आहे. वर सांगितलेलीं आचार्योपास्तींतील तीन तत्त्वें ज्ञानानंतरच्या आचार्योपास्तींतच राहतात, हें उघड आहे.

ज्ञानाच्या पूर्वीं केलेल्या आचार्योपास्तीने जीव ब्रह्मस्वरूप होतो म्हणजे जीव व ब्रह्म ह्या दोन वस्तु नसून एक अस्फुट ब्रह्मवस्तुच आहे, असा त्यांच्या ऐक्याचा अंत:करणांत अपरोक्ष अनुभव येतो. हा अनुभव ज्यांना आला, त्यांना ज्ञानी म्हणतात. आणि हा अनुभव ज्यांच्या ठिकाणीं दृढ झाला त्यांना जीवन्मुक्त म्हणतात.

जीवन्मुक्तपुरुष प्रारब्धाने व्युत्थान पावले असतां त्यांना अशा ब्रह्मैक्यस्थितीचा विसर न पडतां द्वैताचा भास होतो-म्हणजे अज्ञानदशेंत जसें द्वैत सत्य वाटतें तसें तें सत्य न वाटतां-जसें एक पाणीच तरंगरूपाने दोनपणाला येतें, त्याप्रमाणे एक सच्चिदानंद परब्रह्मच अधिष्ठान व वृत्ति असें दोनपणाला आलें आहे, असें ते जाणत असतात-यालाच अद्वैतांतील द्वैत म्हणतात व या दोनपणाला धरूनच सेवा होत असते. अद्वैतांत द्वैत पाहणें या दृष्टीचा असा उपयोग होतो की "शिष्य आणि गुरुनाथु। या दोहों शब्दाचा अर्थु। श्रीगुरुचि परी होतु। दोहीं ठायी" (अमृ. प्र. २). ज्ञानाने माझा आत्मा व श्रीगुरु यांचे अद्वैत किंवा ऐक्य आहे अशी समजूत दृढ झाली असता व्युत्थानकालीं श्रीगुरुवर आत्मवतच परमप्रेम होऊं लागतें आणि त्या प्रेमालाच भक्ति म्हटली जाते.

भगवंताच्या भक्तीच्या ठिकाणींहि हेंच तत्त्व लागूं आहे. "पावावया उपासना। ब्रह्मस्थानीं प्रस्थान" (तु. गा.) ज्याप्रमाणे प्रवासास जायचें असतां निघण्याचा दिवस बरा नसल्यास अगोदर चांगला दिवस पाहून प्रस्थान ठेवित असतात, त्याप्रमाणे "उपासना"-म्हणजे अशी परमप्रेमरूपभक्ति-प्राप्त होण्याकरितांच ब्रह्माचे ठिकाणीं प्रस्थान ठेवायचें असतें-म्हणजे ब्रह्माचें ज्ञान करून घेऊन जीवपरमात्म्याचें ऐक्य जाणून घ्यायचें असतें, असें श्रीतुकाराम महाराजांनीहि सांगून ठेवलें आहे.

तरि सकळ जळसमृद्धी। घेऊनि गंगा निघाली उदधी। कीं श्रुति हे महापदीं। पैठी जाहाली॥ ३७२॥

अर्थ—ज्याप्रमाणे गंगा संपूर्ण पाण्याचे ओघ घेऊन समुद्राला मिळाली तरी पुन: मिळतच राहते किंवा संपूर्ण श्रुती ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणीं प्रविष्ट होतच राहतात॥ ३७२॥

गूढार्थदीपिका—सेवेचेंदुसरें तत्त्व म्हणजे "संयोगेऽपि वियोगोपलालन" हें होय. हे तत्त्व या ओवींत माउलींनी सांगितलें आहे. अन्नमयादि पंचकोशाच्या आंत असलेल्या आत्मस्वरूप श्रीगुरुशीं ऐक्य होऊन बाहेरील सगुणस्वरूप हेंहि पूर्ण ब्रह्मस्वरूपच आहे. असें कळून आल्यावर, त्या सगुणस्वरूपाचा क्षणभरहि वियोग नसावा असें वाटणें, याला "संयोगेऽपि वियोगोपलालन" म्हणतात.

हे संयोगांतील वियोगोपलालन अनेक प्रकारांनी होत असतें. यांत भक्त भगवंताच्या वियोगाची इच्छा करीत नसतो. भगवंताचा अखंड संयोग असावा हीच त्याची इच्छा असते आणि भगवंताची ज्या ज्या गुणवृत्तीने क्षणभर

देखील विस्मृति होण्याचा संभव असेल त्या त्या वृत्ती किंवा ते ते गुण उत्पन्न होऊं नये व भगवंताचा विसर पडूं नये, अशी त्याच्या अंत:करणात अखंड तळमळ राहते. ज्याप्रमाणे संपूर्ण जलप्रवाह घेऊन समुद्राला मिळण्याकडेच गंगेचें लक्षण असतें, किंवा श्रुती भगवत्पदीं मिळून पुन: लक्षणावृत्तीने जीवाला ब्रह्मैक्यबोध करून त्यांच्यासह मिळतच राहते, त्याप्रमाणे भक्ताची प्रेमवृत्ति भगवंताचे ठिकाणीं लागली असली तरी प्रारब्धाने स्फुरणाऱ्या सर्व भावांसह ती पुन: लागतच राहते, असें या ओवीने सूचित केलें आहे.

सकळ जळसमृद्धि। घेऊनि गंगा निघाली उदधी—गंगेप्रमाणेच इतरहि कांही नद्या जलसमृद्धि घेऊन समुद्राला मिळत असतांना, येथें संपूर्ण जलसमृद्धि घेऊन ज्याप्रमाणे गंगा समुद्रास मिळते, असें माउलींनी कां म्हटलें? यांचे कारण, माझी सद्‌गुरु माउली म्हणते, असें आहे की "कलीमाजीं अवघी तीर्थें। गंगेंत निक्षेपती स्वसामर्थ्यें। या पुराणोक्त जलसमृद्धि पदातें। वदलें तात॥ १५१ ॥" (प्रेम निकुंज ४. व.) कलियुगामध्यें पृथ्वीवरील संपूर्ण तीर्थांनी आपआपलें सामर्थ्य गंगेच्या ठिकाणीं ठेवलें आहे, असें पुराणवचन आहे; ही पुराणोक्ति प्रमाण मानूनच माउलींनी "सकळ जळसमृद्धि। घेऊनि गंगा निघाली उदधी" असें म्हटलें आहे.

नाना वेंटाळूनि जीवितें। गुणागुण उखितें। प्राणनाथा उचितें। दिधलें प्रिया॥ ३७३ ॥

अर्थ—किंवा पतिव्रता स्त्री ज्याप्रमाणे आपल्या जीविताला धरून असलेले संपूर्ण गुणागुण योग्य रीतीने पतीलाच समर्पण करते॥ ३७३ ॥

गूढार्थदीपिका—असलेल्या गुणागुणांचा केवल एका पतीच्या सुखाकरितां उपयोग करणें याला गुणागुणांचें समर्पण म्हणतात. भगवान परमात्मा त्रिगुणातीत आहे. अशा त्रिगुणातीत परमेश्वराशीं जीवाचें समरस ऐक्य होण्याकरितां त्यालाहि (जीवालाहि) त्रिगुणातीत व्हायला पाहिजे. अज्ञानदशेंत जीवाच्या ठिकाणीं विषयसुखाच्या आवडीमुळे रजोगुणाची व निद्रा आलस्यादि गुणामुळे तमोगुणाची आसक्ति असते. पूर्वपुण्याने परमेश्वरप्राप्तीची किंवा परमार्थाची आवड उत्पन्न होऊन वैराग्य, आत्मानात्मविवेक, शमदमादि साधनसंपत्ति इत्यादि भगवत्प्राप्तीच्या साधनांचा पुरुष अभ्यास करूं लागला असतां द्वेष उत्पन्न होऊन रजस्तमोगुणांची आसक्ति नाहीशी होते व त्याची सत्वगुणाच्या प्राप्तीचे ठिकाणीं आसक्ति जडते. अशा रीतीने वाढलेल्या सत्वगुणाच्या आसक्तिरूप बंधनांतून सुटून त्रिगुणातीत होण्याकरितां सर्व गुणागुण भगवंताला किंवा श्रीगुरूला अर्पण करणें हाच एक मार्ग आहे, दुसरा मार्ग नाही. हे गुणागुणाचें अर्पण माउलींनी पतिव्रतेचा दृष्टान्त देऊन या व पुढील ओवींत सांगितलें आहे. हेंच सेवेंतील तिसरें तत्त्व होय.

तैसें सबाह्य आपुलें। जेणें गुरुकुळीं वोपिलें। आपणपें केलें। भक्तीचें घर॥ ३७४ ॥

अर्थ—त्याप्रमाणे ज्यानें आपलें अंतर्बाह्य गुरुकुलाला समर्पण केलें आणि आपण श्रीगुरुच्या प्रेमरूपभक्तीचें घर होऊन राहिला॥ ३७४ ॥

गुरुगृह जिये देशीं। तो देशचि वसे मानसीं। विरहिणी कां जैसी। वल्लभातें॥ ३७५ ॥
तियेकडोनि येतसे वारा। देखोनि धांवे सामोरा। आड पडे म्हणे घरा। बीजें कीजो॥ ३७६ ॥
साचा प्रेमाचिया भुली। तया दिशेसीचि आवडे बोली। जीवु थानापती करूनि घाली। गुरुगृहीं जो॥ ३७७ ॥
परि गुरुआज्ञा धरिलें। देह गांवीं असे एकलें। वांसरुवा लाविलें। दावें जैसें॥ ३७८ ॥
म्हणे कैं हें बिरडें फिटेल। कैं तो स्वामी भेटेल। युगाहूनि वडिल। निमिष मानी॥ ३७९ ॥
ऐसेया गुरुग्रामींचें आलें। कां स्वयें गुरुनीं धाडिलें। तरी गतायुष्या जोडलें। आयुष्य जैसें॥ ३८० ॥
कां सुकतया अंकुरा-। वरि पडिलिया पीयूषधारा। ना ना अल्पोदकींचा सागरा। आला मासा॥ ३८१ ॥
ना तरीं रंके निधान देखिलें। कां आंधळिया डोळे उघडले। भणंगाचिया आंगा आलें। इंद्रपद॥ ३८२ ॥
तैसें गरुकुळींचेनि नांवे। महासुखें अति थोरावे। जे कोडेंही हन पोटाळवें। आकाश कां॥ ३८३ ॥
पैं गुरुकुळीं ऐसी। आवडी जया देखसी। जाण ज्ञान तयापासीं। पाइकी करी॥ ३८४॥

अर्थ—ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री पतीचा विरह असतांना मनांत अखंड पतीचेंच चिंतन करते, त्याप्रमाणे गुरुभक्ताचे अंत:करणांत ज्या देशांत श्रीगुरुच्या राहण्याचें घर असेल त्या देशाचेंच सारखें चिंतन असतें॥ ३७५ ॥ त्या देशाकडून वारा आला असतां त्याला पाहून तो सामोरा धांवतो व त्या वाऱ्याला लोटांगण घालून ''माझ्या घरीं आगमन करावें'' अशी प्रार्थना करतो॥ ३७६ ॥ निर्व्याज प्रेमाने वेडा होऊन त्या दिशेशींच त्याला बोलावेसें वाटतें व तो आपला जीव गुरुगृहाचे ठिकाणीं ठाणेदार करून ठेवतो॥ ३७७॥ पण दाव्याने बांधलेल्या वांसराप्रमाणे श्रीगुरुच्या आज्ञारूप दाव्याने तो देहरूपी गांवों 'एकलें' म्हणजे कोठेंहि मन गुंतूं न देतां एकटा बांधला असतो. म्हणजे केवळ श्रीगुरुच्या आज्ञोमुळेंच देह चालवितो॥ ३७८ ॥ आणि केव्हा हें दावें सुटेल व केव्हा ते श्रीगुरुस्वामी भेटतील असा विरह करीत असतांना एक क्षण देखील त्याला युगाहून मोठा वाटतो॥ ३७९ ॥ अशा स्थितींत श्रीगुरुच्या राहत्या गांवाहून कोणी आल्यास किंवा श्रीगुरुनीच त्याच्या समाचाराकरितां कोणास पाठविल्यास आयुष्य संपलेल्याला आयुष्य प्राप्त झाल्यासारखें त्याला वाटतें॥ ३८० ॥ किंवा सुकत असलेल्या अंकुरावर अमृतवर्षाव व्हावा अथवा थोड्याच काळांत पाणी आटून मरणाची पाळी येईल अशा डबक्यांतील माश्यांनी समुद्रांत यावें॥ ३८१ ॥ किंवा दरिद्री मनुष्याने धनाचा हांडा पाहावा किंवा आंधळ्याला डोळे प्राप्त व्हावे किंवा भिकाऱ्याला इंद्रपद प्राप्त व्हावें॥ ३८२ ॥ त्याप्रमाणे श्रीगुरुच्या कुळाचें नांव ऐकतांच त्याला अत्यंत सुख होऊन तो इतका मोठा होतो की तो आकाश देखील सहज कौतुकाने पोटाशीं धरील॥ ३८३ ॥ याप्रमाणे गुरुकुळादिकांचे ठिकाणीं ज्याची अशी तळमळ तुला दिसून येईल त्याच्यापाशीं ज्ञान हें त्याची सेवा करीत आहे, असें समज॥ ३८४॥

गुढार्थदीपिका—ज्ञान तयापासीं। पाइकी करी-अशा श्रीगुरुभक्ताचे ठिकाणीं, साधनचतुष्टयसंपत्तीचा अभ्यास न करतांच, आत्मज्ञान दृढ होतें, असे माउलींनी ''ज्ञान तयापासीं। पाइकी करी'' या चरणांनी सुचविलें आहे.

अवतरणिका—येथून आतां श्रीज्ञानेश्वरमाउली श्रीगुरुच्या अंतरसेवेचें वर्णन करते.

आणि अभ्यंतरिलियेकडे। प्रेमाचेनि पवाडें। श्रीगुरुचें रूपडें। उपासी ध्यानीं॥ ३८५॥
हृदयशुद्धीचियां आवारीं। आराध्यु तो निश्चळ धुरू करी। मग सर्व भावेंसी परिवारी। आपण होय॥ ३८६॥

अर्थ—श्रीगुरुविषयीं अंत:करणांत असलेल्या नितांत प्रेमाच्या योगाने तो श्रीगुरुचें रूप ध्यानांत आणून उपासना करतो॥ ३८५ ॥ शुद्ध अशा हृदयाचा आवार किंवा तट उभारून आराध्य अशा श्रीगुरुच्या रूपाला तो ध्रुवाप्रमाणे अंत:करणांत अचल स्थान करून मग सर्व मनोभाव व सेवासाहित्य यांच्या रूपाने आपणच आहों, अशी बुद्धि धारण करतो॥ ३८६ ॥

गूढार्थदीपिका—कामकर्मासक्ति व चंचलता इत्यादि रजोगुणाचे व निद्रा, आलस्य इत्यादि तमोवृत्तीचे दोष नाहीसे होऊन सत्वगुणाने तदेकपरायण झालेलें हृदय, शुद्ध म्हटलें जातें.

किंवा ज्याप्रमाणे ओल्या झालेल्या मातींतून खडे आपोआप बाहेर पडतात, त्याप्रमाणे सगुणाच्या प्रेमाने आर्द्र झालेल्या हृदयांतून सर्व दोष निघून जात असल्यामुळे प्रेमळ हृदयालाहि 'शुद्ध हृदय' म्हणतात.

कां चैतन्याचिये पोवळी। माजीं आनंदाचियां राउळीं। श्रीगुरुलिंगा ढाळी। ध्यानामृत॥ ३८७॥

अर्थ—किंवा चैतन्याचा आवार करून त्यामध्ये ब्रह्मानंदाचे देऊळ उभारतो व त्या देवळांत श्रीगुरुरूप लिंग स्थापन करून त्यावर ध्यानरूपी अमृताचा अभिषेक करतो॥ ३८७॥

गूढार्थदीपिका—चित्त रजस्तमोगुणरहित होऊन सात्विक झालें असतां त्या चित्ताचा जडभाव नाहीसा होऊन तें चेतन होतें आणि जडभावाविषयीं भासणारा प्रतिकूलपणा नाहीसा होऊन चेतनभावामुळे अनुकूलपणा उत्पन्न होऊन आनंद प्रगट होतो व त्या आनंदात ध्यानाने श्रीगुरुचें स्वरूप स्थापन केलें जातें.

अर्थात् अनुभवास आलेल्या चिदानंदालाच श्रीगुरुचें स्वरूप देण्यांत येत असल्यामुळे या श्रीगुरुच्या स्वरूपाचा केवळ चिदानंदात्मक अनुभव असतो-जडविनाशी नसतो; म्हणून तें त्रिगुणरहित निर्गुण, असें सगुणस्वरूप असतें.

उदयिजतां बोधार्का। बुद्धीची डाल सात्त्विका। भरोनि त्र्यंबका। लाखोली वाहे॥ ३८८॥

अर्थ—ध्यानाने ध्याता व ध्येय यांच्या ऐक्यज्ञानरूपी सूर्याचा उदय होतो व तो (गुरुभक्त) आपल्या बुद्धीची परडी अष्टसात्विकभावरूपी कमळांच्या फुलांनी भरून श्रीगुरुरूप त्र्यंबकाला त्याची लाखोली वाहतो॥ ३८८॥

गूढार्थदीपिका—ध्यानाने ज्ञान होऊन अष्टसात्विकभाव दाटून येतात, असा अर्थ.

काळशुद्धी त्रिकाळीं। जीवदशाधूप जाळी। ज्ञानदीपें वोवाळी। निरंतर॥ ३८९॥

अर्थ—प्रात:काळ, माध्यान्हकाळ व सायंकाळ असे जे शिवपूजेकरितां तीन शुद्ध काळ सांगितले आहेत, त्या तिन्हीं काळीं तो जीवदशेचा धूप जाळीत असतो आणि ज्ञानदीपाने श्रीगुरुला अखंड ओवाळतो॥ ३८९॥

गूढार्थदीपिका—ध्यानाने ऐक्यज्ञान उत्पन्न होऊन अष्टसात्विकभाव दाटून आले असतां जीवदशा नाहीशी होते व ऐक्यज्ञानाचा कधीं विसर पडत नाही.

सामरस्याची रससोय। अखंड अर्पित जाय। आपण भराडा होय। गुरु तो लिंग॥ ३९०॥

अर्थ—श्रीगुरुच्या ऐक्याने प्राप्त झालेल्या समरसस्थितीचा नैवेद्य तो अखंड करीत असतो व याप्रमाणे श्रीगुरुला शिवलिंग करून आपण पुजारी होतो॥ ३९०॥

नातरी जीवाचिये सेजे। गुरु कांतु करूनि भुंजे। ऐसीं प्रेमाची भोजें। बुद्धी वाहे॥ ३९१॥

अर्थ—एखादे वेळीं जीवाच्या शेजेवरच श्रीगुरुला पति करून त्याचा भोग घेतो. अशी नानाप्रकारें प्रेमाच्या उल्हासाने बुद्धि स्फुरत असते॥ ३९१॥

गूढार्थदीपिका—**जीवाचिये सेजे**-या चरणाने श्रीगुरुभक्त आपल्या श्रीगुरुला आपल्याहून निराळे न समजतां ज्या अधिष्ठानरूप शुद्धब्रह्मचैतन्यावर मी विवर्तरूपाने स्फुरतों, तें अधिष्ठानरूप शुद्धब्रह्मचैतन्यच माझ्या प्रेमाने अनध्यस्तविवर्त असे श्रीगुरुरूप झालें आहे, असें तो समजतो.

गुरु कांत करूनि भुंजे—जीवाचें मूळचें शुद्धस्वरूप जे अधिष्ठानरूप ब्रह्मचैतन्य, तेंच शुद्धस्थितीत राहून गुरुरूप सगुणसाकार झाले आहे, असें त्याला ज्ञान असल्यामुळे श्रीगुरुचे ठिकाणीं साहजिकच जें त्याचें प्रेम बसतें, तें परम प्रेमच त्याचा श्रीगुरुचे ठिकाणचा कांतभाव होय.

कोणे एके अवसरीं। अनुरागु भरे अंतरीं। कीं तया नाम करी। क्षीराब्धी॥ ३९२॥
तेथ ध्येयध्यान बहु सुख। तेचि शेषतुळिका निर्दोख। वरि जळशयन देख। भावी गुरु॥ ३९३॥
मग वोळगती पाय। ते लक्ष्मी आपण होय। गरुड होऊनि उभा राहे। आपणचि॥ ३९४॥
नाभीं आपणचि जन्मे। ऐसें गुरुमूर्ति प्रेमें। अनुभवी मनोधर्मैं। ध्यानसुख॥ ३९५॥
एकाधिये वेळें। गुरुमाय करी भावबळें। मग स्तन्यसुखें लोळें। अंकावरी॥ ३९६॥
नातरी गा किरीटी। चैतन्यतरुतळवटीं। गुरु धेनु आपण पोटीं। वत्स होय॥ ३९७॥
गुरुकृपास्नेहसलिलीं। आपण होय मासोळी। कोणे एके वेळीं। हेंचि भावी॥ ३९८॥
गुरुकृपामृताचें वडप। आपण सेवावृत्तीचें होय रोप। ऐसेसे संकल्प। विये मन॥ ३९९॥

अर्थ—एखादे वेळीं अंत:करणांत प्रेम दाटून आलें असतां त्या प्रेमाला क्षीराब्धि समजतो॥ ३९२॥ तेथे ध्येय, ध्यान, अपार सुख ही त्रिपुटीच निर्दोष अशी शेषरूप गादी आहे व त्यावर जलशयन करणारे भगवान विष्णु श्रीगुरु आहेत, अशी भावना करतो॥ ३९३॥ मग त्या श्रीगुरुरूपी विष्णूची सेवा करणारी लक्ष्मी आपण होतो आणि आपणच गरुडहि होऊन होत जोडून सन्मुख उभा राहतो॥ ३९४॥ नाभीपासून जन्मलेला ब्रह्मदेव मीच होय, अशी भावना करतो. याप्रमाणे श्रीगुरुमूर्तीच्या प्रेमाने आपल्या ठिकाणीं नानाप्रकारच्या सेवकाच्या भावना करून ध्यानाचें सुख भोगतो॥ ३९५॥ एखादे वेळीं श्रीगुरुला प्रेमाच्या बळावर आपली जन्मदात्री समजून मी तिचें स्तनपान करीत आनंदाने तिच्या मांडीवर लोळत आहे, अशी भावना करतो॥ ३९६॥ किंवा हे अर्जुना! श्रीगुरुचे ठिकाणी चैतन्यरूपवृक्षाचे खाली बसणाऱ्या गायीची भावना करून आपण तिच्या पोटाशी बसत असलेलें वासरू होतो॥ ३९७॥ एखादे वेळीं श्रीगुरुच्या कृपाप्रेमरूप पाण्यातील मी मासोळी आहे, अशीच भावना करतो॥ ३९८॥ माझें श्रीगुरु कृपारूप अमृताची

दृष्टी असून त्याखालीं मी म्हणजे सेवावृत्तिरूप रोप आहे; याप्रमाणे मन अनेक प्रकारचे संकल्प करीत असतें॥ ३९९॥

गूढार्थदीपिका—श्रीगुरुच्या सेवेचीच अंत:करणांत एक अत्यंत आवडी असावी व श्रीगुरुच्या कृपेचा आपल्यावर अखंड वर्षाव होत असावा, अशी इच्छा श्रीगुरुभक्त करीत असतो, असा भाव.

चक्षुपक्षेंवीण। पिलूं होय आपण। कैसें पैं अपारपण। आवडीचें॥ ४००॥
गुरुतें पक्षिणी करी। चारा घे चांचूवरी। गुरु तारू धरी। आपण कास॥ ४०१॥
ऐसें प्रेमाचेनि थावें। ध्यानचि ध्यानातें प्रसवे। पूर्णसिंधू हेलावे। फुटती जैसे॥ ४०२॥
किंबहुना यापरी। श्रीगुरुमूर्ती अंतरीं। भोगी आतां अवधारीं। बाह्यसेवा॥ ४०३॥

अर्थ—कसें त्याचें अमर्याद प्रेम आहे, पहा! एखादेवेळीं आपण डोळे न उघडलेलें व पंख न फुटलेलें पिलूं होऊन श्रीगुरुला पक्षिणी करतो व तिच्या चोंचींतील चारा घेतो, श्रीगुरु भवसमुद्रांतून तारणारे आहेत व आपण त्यांची कांस धरली आहे, अशी भावना करतो॥ ४००-४०१॥ नेहमीं पूर्ण भरलेल्या समुद्रावर जसें लाटांपाठीं लाटा उठत असतात, त्याप्रमाणे श्रीगुरुभक्ताच्या अंत:करणांत श्रीगुरुविषयीं असलेल्या अथांग प्रेमामुळे नानाप्रकारच्या भावनांनी ध्यानापाठीं ध्यान होत जातें॥ ४०२॥ फार काय सांगावें! याप्रमाणे श्रीगुरुभक्त आपल्या अंत:करणांत श्रीगुरुसेवेचें सुख भोगित असतो. आतां श्रीगुरुची बाह्यसेवा ऐक॥ ४०३॥

तरि जीवीं ऐसें आवांके। म्हणे दास्य करीन निकें। जैसेनि गुरु कौतुकें। माग म्हणती॥ ४०४॥

अर्थ—अंत:करणांत प्रेमाने असे मनोरथ उठतात की, ज्या रीतीने श्रीगुरु माझ्या सेवेचें कौतुक करून प्रसन्न होतील व इच्छित वर माग म्हणतील अशी मी त्यांची सेवा करीन॥ ४०४॥

गूढार्थदीपिका—गुरुसेवेंत कितीहि शारीरिक किंवा मानसिक कष्ट पडले तरी ते आनंदाने सोसण्याचें धैर्य गुरुसेवकाचे आंगीं असायला पाहिजे, असें येथें सुचविलें आहे.

तैसिया साचा उपास्ती। गोसावी सुप्रसन्न होती। तेथ मी विनंती। ऐसी करीन॥ ४०५॥
म्हणेन तुमचा देवा। परिवारु जो आघवा। तेतुलें रूपें होआवा। मीचि एकु॥ ४०६॥
आणि उपकरतीं आपुलीं। उपकरणें आथि जेतुलीं। माझीं रूपें तेतुलीं। होआवीं जी॥ ४०७॥
ऐसा मागेन वरु। तेथ हो म्हणती श्रीगुरु। मग तो परिवारु। मीचि होईन॥ ४०८॥

अर्थ—तशा त्या मनोभावाने केलेल्या निष्कपट सेवेने श्रीगुरुस्वामी प्रसन्न झाले असतां मी त्यांची अशी प्रार्थना करीन॥ ४०५॥ व म्हणेन की, हे श्रीगुरुदेवा! तुमच्या सेवेला जेवढा कांही सेवक वर्ग लागतो, तो संपूर्ण एक मीच व्हावें॥ ४०६॥ आणि आपल्या सेवेला साहाय्यभूत होणारी जेवढी कांही उपकरणरूपसामग्री आहे, ती सर्व माझींच रूपें व्हावींत॥ ४०७॥ असा वर मी मागेन व श्रीगुरु प्रसन्न होऊन 'हो' म्हणतील मग त्यांचा सर्व परिवार व उपचारसामग्री मीच होईन॥ ४०८॥

गूढार्थदीपिका—जेव्हा भक्ताचे ठिकाणीं प्रेम कमी असून त्याचें क्रियेकडे विशेष लक्ष असतें, तेव्हा त्याच्या त्या सेवेला उपासना म्हणतात आणि जेव्हा सेवेंत प्रेमाचेच अत्यंत प्राधान्य असतें, तेव्हा त्या सेवेला भक्ति म्हणतात. असा हा उपासना व भक्ति यांत भेद आहे.

सेवक जोपर्यंत उपासना करणार आहे, तोपर्यंत ''परिवारु मीचि होईन'' म्हणजे मीच सर्व परिवार झालों आहे, अशी तो भावनादृष्टि करीत असतो आणि अत्यंत प्रेम वाढून त्याची उपासना भक्तिसंज्ञेस प्राप्त झाली असतां श्रीगुरुचा सर्व परिवार तोच होतो.

उपकरणजात सकळिक। तें मीचि होईन एकैक। तेव्हां उपास्तीचें कवतिक। देखिजेल॥ ४०९॥
गुरु बहुतांची माये। परि एकलौति होऊनि ठाये। तैसें करूनि आण वाये। कृपे तिये॥ ४१०॥
तया अनुरागा वेधु लावीं। एकपत्नीव्रतचि घेववी। क्षेत्रसंन्यासु करवीं। लोभाकरवीं॥ ४११॥
चतुर्दिक्षु वारा। न लाहे निघोंन बाहिरा। तैसा गुरुकृपे पांजिरा। मीचि होईन॥ ४१२॥

आपुलिया गुणांचीं लेणीं। करीन गुरुसेवे स्वामिणी। हें असो होईन गंवसणी। गुरुभक्तीसी॥ ४१३॥
गुरुस्नेहाचिये वृष्टी। मी पृथ्वी होईन तळवटीं। ऐसिया मनोरथांचिया सृष्टी। अनंता रची॥ ४१४॥

अर्थ—श्रीगुरुच्या सेवेमध्यें जेवढीं उपकरणें लागतात, त्यापैकीं प्रत्येक वस्तु जेव्हा मीच होईन तेव्हाच मला सेवेचें सुख प्राप्त होईल॥ ४०९॥ श्रीगुरु ही पुष्कळांची माउली असणार, पण ती एकुलती—म्हणजे मलाच आपला एकुलता एक मुलगा समजून राहील, तशी सेवा करून तिच्या कृपेला शपथ घालीन॥ ४१०॥ श्रीगुरुच्या प्रेमाला वेध लावील, त्याच्याकडून एकपत्नीव्रत घेववीन व श्रीगुरुच्या लोभाकडून क्षेत्रसंन्यास करवीन॥ ४११॥ ज्याप्रमाणे चार दिशेच्या आंतच वारा वाहतो, तो त्या बाहेर निघूं शकत नाही, त्याप्रमाणे श्रीगुरुच्या कृपेला मीच पिंजरा होऊन राहीन॥ ४१२॥ माझी स्वामिणी जी गुरुसेवा तिला मी आपल्या सद्‌गुणांचे अलंकार घालीन. हें असो मी श्रीगुरुच्या भक्तीला गंवसणी होईन॥ ४१३॥ श्रीगुरुच्या प्रेमाच्या वर्षावाखालीं राहून तो सर्व वर्षाव घेणारी पृथ्वी मी होईन. अशा अनंत प्रकारच्या मनोरथांच्या सृष्टीची रचना तो करतो॥ ४१४॥

गूढार्थदीपिका—या ओव्यांतील वर्णन भक्ताच्या भक्त्यहंकारचें नसून त्याच्या अंत:करणांत असलेल्या गुरुसेवेच्या आवडीचें आहे. श्रीगुरुसेवेच्या प्रेमाने सेवकाचें अंत:करणांत अनेक प्रेमभावना कशा उचंबळत असतात, याचें येथें वर्णन केलें आहे.

म्हणे श्रीगुरुचें भुवन। आपण मी होईन। आणि दास होऊनि करीन। दास्य तेथिंचें॥ ४१५॥
निर्गमागमीं दातारें। जे वोलांडिजती उंबरे। ते मी होईन आणि द्वारें। द्वारपाळु॥ ४१६॥
पाउवा मी होईन। तियां मीचि लेववीन। छत्र मी आणि करीन। बारीपण॥ ४१७॥
मी तळ उपरु जाणविता। चंवरधरु हात देता। स्वामीपुढें खोलता। होईन मी॥ ४१८॥
मीचि होईन सागळा। करूं सुईन गुरुळां। सांडिती तो नेपाळा। पडिघा मीचि॥ ४१९॥
हडप मी वोळगेन। मीचि उगाळु घेईन। उळिग मी करीन। आंघोळीचें॥ ४२०॥
होईन गुरुचें आसन। अळंकार परिधान। चंदनादि होईन। उपचार ते॥ ४२१॥
मीचि होईन सुआरु। वोगरीन उपहारु। आपणपेनि श्रीगुरु। वोंवाळीन॥ ४२२॥
जे वेळीं देवो आरोगिती। तेव्हां पांतीकरु मीचि पांतीं। मीचि होईन पुढती। देईन विडा॥ ४२३॥
ताट मी काढीन। सेज मी झाडीन। चरणसंवाहन। करीन मीचि॥ ४२४॥
सिंहासन होईन आपण। वरि श्रीगुरु करिती आरोहण। होईन पुरेपण। वोळगेचें॥ ४२५॥
श्रीगुरुचें मन। जया देईल अवधान। ते मी पुढां होईन। चमत्कारु॥ ४२६॥
तया श्रवणाचे आंगणीं। होईन शब्दांचिया अक्षौहिणी। स्पर्श होईन घसणी। आंगाचिया॥ ४२७॥
श्रीगुरुचे डोळे। अवलोकनें स्नेहाळें। पाहाती तियें सकळें। होईन रूपें॥ ४२८॥
तिये रसने जो जो रुचेल। तो तो रसु म्यां होईजेल। गंधरूपें कीजेल। घ्राणसेवा॥ ४२९॥
एवं बाह्य मनोगत। श्रीगुरुसेवा समस्त। वेंटाळीन वस्तुजात। होऊनियां॥ ४३०॥

अर्थ—तो म्हणतो, श्रीगुरुचें राहण्याचें घर मीच होईन आणि त्यांच्या चरणाचा दास होऊन तेथील दास्य-म्हणजे सेवकांनी करावयाचीं सर्व कामें-मी करीन॥ ४१५॥ येतां जातां श्रीगुरु ज्या उंबरठ्याला ओलांडतात तें उंबरठें, द्वारें व द्वारपाळ मी होईन॥ ४१६॥ मी पादुका होऊन मीच त्या श्रीगुरुचरणाचे ठिकाणीं घालीन आणि त्यांच्यावरील छत्र मी होऊन छत्री धरण्याचें कामहि मीच करीन॥ ४१७॥ श्रीगुरु चालत असतां उंचवटा व खोलगट यांची जाणीव करून देणारा, चवरी धरणारा, हाताला आश्रय देणारा व त्यांच्यापुढें दिवटी धरून वाट दाखविणारहि मीच होईन॥ ४१८॥ पाण्याची झारी मी होईन, गुळण्या करण्याकरितां पाणी मी घालीन आणि चूळ ज्यांत सांडली जाईल ती पीकदाणी मीच होईन॥ ४१९॥ त्यांचा पानपुडा मीच वागवीन व त्यांचा थुंकलेला विडा मीच घेईन व स्नानाचें सर्व कार्य मी करीन॥ ४२०॥ श्रीगुरुचें आसन, अलंकार, वस्त्र, चंदनादि उपचार मीच होईन॥ ४२१॥ श्रीगुरुचा

स्वयंपाक करणारा मी होईन, श्रीगुरुना जेवावयास मी वाढीन व मी स्वत: श्रीगुरुला निरांजन करीन अथवा आपल्याला श्रीगुरुवरून ओवाळून टाकीन॥ ४२२॥ ज्यावेळीं श्रीगुरु जेवावयास बसतील त्यावेळीं मीच त्यांच्या पंक्तीला बसून मीच पंक्तीकर होईन. मीच त्यांच्या समोर होईन व त्यांना विडा देईन॥ ४२३॥ जेवल्यानंतर त्यांचें उष्टें ताट मी काढीन, मीच त्यांचें आंथरूण झाडून घालीन व मीच त्यांचे पाय दाबीन॥ ४२४॥ मीच त्यांचें सिंहासन होईन व त्यावर श्रीगुरु बसतील. याप्रमाणे सेवेची पूर्णताहि मीच होईन॥ ४२५॥ श्रीगुरुचें मन ज्याचे ठिकाणीं एकाग्र होईल असा तो त्यांच्या दृष्टीपुढील चमत्कार मीच होईन॥ ४२६॥ श्रीगुरुच्या श्रवणेंद्रियाच्या आंगणांतील शब्दाचा फार मोठा समुदाय मीच होईन. श्रीगुरुच्या अंगाला लागणारा स्पर्श मी होईन॥ ४२७॥ श्रीगुरुचे प्रेमाने अवलोकन करणारे डोळे ज्या रूपाला पाहतील ती सर्व रूपें मी होईन॥ ४२८॥ श्रीगुरुच्या जिव्हेला जो जो रस आवडेल तो तो रस मी होईन आणि त्यांच्या घ्राणेंद्रियाला आवडणारा सुवास मी होऊन त्या रूपाने त्यांच्या घ्राणेंद्रियाची सेवा करीन॥ ४२९॥ याप्रमाणे बाह्य व मनोगत सेवेला उपयोगी पडणाऱ्या सर्व वस्तु मी होऊन श्रीगुरुच्या संपूर्ण सेवेला मी व्यापून घेईन॥ ४३०॥

गूढार्थदीपिका—भक्ति म्हणजे भगवंताचें परम प्रेम करणें होय. हें भगवंताचें परम प्रेम कसें करावे, हे माउलींनी येथे सांगितलें आहे. जेव्हा जीव विषय भोगतो तेव्हा तो स्वत: भोक्ता होतो व संपूर्ण विषयाला भोग्य करतो. "**आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति**" या श्रुतींत सांगितल्याप्रमाणे आपल्या सुखाकरितांच तो भोग्य विषयाचें प्रेम करून आपलें आपल्यावरील परम प्रेम व्यक्त करतो. अर्थात् आत्मा भोक्ता झाला असतां जसें त्याचें स्वत:चें परम प्रेम व्यक्त होतें, तसेंच एका भगवंताला भोक्ता करून भक्त सर्व भावाने त्याचें भोग्य झाला असतां त्याचें भगवंतावर परम प्रेम जडतें; म्हणून भगवंताला सर्व समर्पण करून सर्वस्वीं भगवंताला भोक्ता करणें, हेंच बाह्यभक्तीचें लक्षण होय, असें सिद्ध होतें.

जंव देह हें असेल। तंव वोळगी ऐसीं कीजेल। मग देहांतीं नवल। बुद्धि आहे॥ ४३१॥
इये शरीरींची माती। मेळवीन तिये क्षिती। जेथ श्रीचरण उभे ठाती। श्रीगुरुचे॥ ४३२॥
माझा स्वामी कवतिकें। स्पर्शत जियें उदकें। तेथ लया नेईन निकें। आपीं आप॥ ४३३॥
श्रीगुरु वोंवाळिजती। कां भुवनीं जे उजळिती। तयां दीपांचिया दीप्ती। ठेवीन तेज॥ ४३४॥
चंवरी हन विंजणा। तेथ लयो करीन प्राणा। मग आंगाचा वोळगणा। होईन मी॥ ४३५॥
जिये जिये अवकाशीं। श्रीगुरु असती परिवारेंसीं। आकाश लया आकाशीं। नेईन तिये॥ ४३६॥
परि जीत मेला न संडीं। निमेष लोकां न धाडी। ऐसेनि गणाविया कोडी। कल्पांचिया॥ ४३७॥

अर्थ—जोपर्यंत देह आहे तोपर्यंत अशी सेवा केली जाते आणि देहपात झाल्यावरहि भक्ताची सेवेविषयीं बुद्धि कायम असते, हें आश्चर्य आहे॥ ४३१॥ पृथ्वीच्या ज्या भागावर श्रीगुरुचे चरण उभे राहतील त्या मातींत मी शरीरांतील मातीचा अंश मिळवीन, असे तो म्हणतो॥ ४३२॥ माझे श्रीगुरुस्वामी ज्या पाण्याला कौतुकाने स्पर्श करतात, त्या पाण्यामध्ये मी आपल्या शरीरांतील जलाच्या अंशाचा लय करीन॥ ४३३॥ ज्या दिव्याने श्रीगुरुला ओवाळलें जाईल किंवा जे दिवे श्रीगुरुचे घरीं उजळले जातील, त्या दिव्यांच्या तेजांत मी आपल्या शरीरांतील तेजाचा अंश मिळवीन॥ ४३४॥ श्रीगुरुला वारा घालण्याकरितां असलेली जी चवरी किंवा पंखा त्यांत मी आपल्या प्राणवायुचा लय करिन, तरच मी श्रीगुरुच्या आंगाला वारा घालणारा सेवक होईन॥ ४३५॥ ज्या ज्या पोकळींत आपल्या परिवारासह श्रीगुरु असतील, त्या त्या पोकळींत मी आपल्या शरीरांतील पोकळीचा लय करीन॥ ४३६॥ पण जिवंतपणीं व मेल्यावरहि श्रीगुरुची सेवा सोडणार नाही. एक क्षण देखील लोकांकरितां खर्च करणार नाही. अशा प्रकारें सेवा करीतच कल्पाच्या कोटी मोजतो॥ ४३७॥

गूढार्थदीपिका—वरील ओव्यांतून श्रीगुरुसेवेच्या अपार आवडीचें वर्णन केलें आहे.

येतुलेवरी धिंवसा। जयाचिया मानसा। आणि करूनिहि तैसा। अपार जो॥ ४३८॥

रात्र दिवस नेणे। थोडें बहु न म्हणे। म्हणियाचेनि दाटपणें। साजा होय॥ ४३९॥
तो व्यापारु येणें नांवे। गगनाहूनि थोरावे। एकला करी आघवें। एके काळीं॥ ४४०॥
हृदयवृत्ती पुढां। आंगचि घे दवडा। काज करी होडा। मानसेंसी॥ ४४१॥

अर्थ—इतकें ज्याच्या मनांत अपार धैर्य असतें आणि प्रत्यक्ष तशी अपार सेवा करूनहि॥ ४३८॥ आतां दिवस उगवला, आतां रात्र झाली, इकडे ज्याचें लक्ष नसतें किंवा ज्याच्या मनांत ही सेवा थोडी झाली, ही बहु झाली, असें येत नाही; उलट श्रीगुरुची आज्ञा वारंवार होत असतां ज्याला सेवेचा अधिक हुरूप येतो॥ ४३९॥ श्रीगुरुच्या मुखांतून "कर" असे नांव निघाल्याबरोबर तो आनंदाने आकाशापेक्षा मोठा होतो आणि एकटाच संपूर्ण सेवा एकाकाळींच करूं लागतो॥ ४४०॥ त्याचें शरीर अंत:करणवृत्तीच्या पुढें धांव घेतें व शरीराचा व्यापार मनाशीं पैज मारतो॥ ४४१॥

गूढार्थदीपिका—४३८ ते ४४१ पर्यंतच्या ओव्यांतून श्रीगुरुसेवकाचे ठिकाणीं, श्रीगुरुसेवेविषयी असलेल्या उल्हासाचें वर्णन केलें आहे. किंवा श्रीगुरुसेवेचें प्रेम कमी झालें, हें ज्या लक्षणांवरून दिसून येतें तीं लक्षणें येथें माऊलींनी सांगितलीं आहेत, असेंहि म्हणतां येते.

एखादिया वेळां। श्रीगुरुचिया खेळा। लोण करी सकळा। जीविताचें॥ ४४२॥

अर्थ—एखादे वेळीं श्रीगुरुच्या खेळावरून आपल्या संपूर्ण जीविताचें निंबलोण करतो॥ ४४२॥

गूढार्थदीपिका—ही श्रीगुरुचीं लौकिकक्रीडा देखील त्याला परम प्रिय वाटते.

जो गुरुदास्यें कृशु। जो गुरुप्रेमें सपोषु। जो गुरुआज्ञे निवासु। आपणचि॥ ४४३॥
जो गुरुकुळें सुकुलीनु। जो गुरुबंधुसौजन्यें सुजनु। जो गुरुसेवाव्यसनें सव्यसनु। निरंतर॥ ४४४॥
गुरुसंप्रदायधर्म। तेचि जयाचे वर्णाश्रम। गुरुपरिचर्या नित्यकर्म। जयाचें गा॥ ४४५॥
गुरु क्षेत्र गुरु देवता। गुरु माता गुरु पिता। जो गुरुसेवेपरौता। मार्गु नेणे॥ ४४६॥
श्रीगुरुचें द्वार। तें जयाचें सर्वस्व सार। गुरुसेवकां सहोदर-। प्रेमें भजे॥ ४४७॥
जयाचें वक्त्र। वाहे गुरुनामाचे मंत्र। गुरुवाक्यावांचूनि शास्त्र। हातीं न शिवे॥ ४४८॥

अर्थ—श्रीगुरुची सेवा करतां करतां जो कृश होतो; पण श्रीगुरुच्या प्रेमाने पुष्ट असतो. जो आपण स्वत: श्रीगुरुच्या आज्ञेलाच केवळ आश्रयस्थान झाला आहे॥ ४४३॥ आपल्या कुलाच्या कुलीनपणामुळे आपल्याला कुलीन न समजतां केवळ श्रीगुरुच्या कुलीनपणामुळे जो आपल्याला कुलीन समजतो. आपल्या बांधवांच्या सौजन्यामुळे आपण सज्जन आहों, असें न समजतां श्रीगुरुबंधूच्या सौजन्याने आपण सज्जन आहों, असें समजतो व श्रीगुरुसेवेच्या व्यसनानेच जो अखंड व्यसनी झाला आहे॥ ४४४॥ श्रीगुरुच्या संप्रदायांत विहित केलेले धर्म, तेच आपले वर्णाश्रमधर्म आहेत, श्रीगुरुची सेवा हेंच ज्याचें नित्य कर्म आहे, श्रीगुरु हेंच ज्याचें पुण्यक्षेत्र असून श्रीगुरु हीच ज्याची उपास्य देवता आहे. ज्याचे माता, पिता श्रीगुरुच आहेत. ज्याला श्रीगुरुसेवेवांचून दुसरा परमार्थमार्गच माहित नाही॥ ४४५-४४६॥ श्रीगुरुचें द्वार हेंच ज्याचें प्राप्तव्य आहे आणि जो श्रीगुरुच्या, आपल्याप्रमाणे असलेल्या, सेवकावर आपल्या साक्षात् भावाप्रमाणे प्रेम करतो॥ ४४७॥ ज्याचे मुखांत गुरुनामाचा मंत्रच सारखा जपला जातो आणि श्रीगुरुच्या वचनावांचून ज्याला दुसरें शास्त्रच माहित नाही॥ ४४८॥

गूढार्थदीपिका-जयाचें वक्त्र। वाहे गुरुनामाचें मंत्र—

आत्मनाम गुरोर्नाम नामातिकृपणस्य च। श्रेयस्कामो न गृण्हीयात् ज्येष्ठपुत्रकलत्रयो:॥

आपलें कल्याण व्हावें, अशी इच्छा करणाऱ्या मनुष्याने स्वत:चें नांव, गुरुचें नांव, अतिकृपणाचें नांव, सर्वांत वडिल असलेल्या मुलाचें नांव व पत्नीचें नांव वारंवार घेऊं नये. श्रीगुरुंनी आपल्या स्वत:च्या नामाचा जप करण्यास सांगितल्यावांचून आपल्या मनाने श्रीगुरुचें नांव घेतां येत नाही, असें शास्त्र सांगतें, साक्षात्कारीं पुरुष निरहंकारी असल्यामुळे ते आपल्या स्वत:च्या नांवाचा मंत्र कधीं देत नसतात. एखाद्याला भाग्याने तो दिला गेला, तर त्याने

सर्व मंत्रापेक्षा तो श्रेष्ठ समजून जपावा, असा या चरणाचा अर्थ किंवा श्रीगुरुने सांगितलेल्या भगवंताचा नाममंत्रच जपत राहावें असा अर्थ.

गुरुवाक्यावांचून शास्त्र। हातीं न शिवे-

''वेदस्येश्वरप्रोक्तत्वात् यथार्थत्वे न संशयः। मुक्तस्येश्वररूपत्वात् तद्वागपि तादृशी॥''

सर्वज्ञ भ्रमरहित अशा परमेश्वरानेच वेद उत्पन्न केलें असल्यामुळे जशी वेदाच्या प्रामाण्याविषयीं यत्किंचितहि शंका नाही, त्याप्रमाणेच ज्ञानभक्तीने परमेश्वरस्वरूप मुक्त पुरुषांचेहि वचन वेदाप्रमाणेच प्रमाण असतें, असें आचार्य म्हणतात म्हणजे ज्ञानभक्तिसंपन्न सत्पुरुषांचें वचन केव्हाहि वेदविरुद्ध नसल्यामुळे त्या पुरुषाचें वचन प्रमाण मानून वागणारे पुरुष कृतार्थ होतात, असा भाव.

शिवतलें गुरुचरणीं। भलतें जें पाणी। तया तीर्थयात्रे आणी। तीर्थे त्रैलोक्यींची॥ ४४९॥
श्रीगुरुचें उशिटें। लाहे जैं अवचटें। तैं तेणें लाभें विटे। समाधीसी॥ ४५०॥
कैवल्यसुखासाठीं। परमाणु घे किरीटीं। उधळती पायांपाठीं। चालतां जे॥ ४५१॥
हें असो सांगों किती। नाहीं पारु गुरुभक्ती। परी गा उत्क्रांतमती। कारण हें॥ ४५२॥

अर्थ—पाणी कसेही असो, त्याला श्रीगुरुच्या चरणाचा स्पर्श झाला हें पाहून त्यांत ब्रह्मांडाची तीर्थे साठविली आहेत, असे श्रीगुरुभक्त समजतो॥ ४४९॥ श्रीगुरुच्या उच्छिष्ट प्रसाद अकस्मात् प्राप्त झाला असता त्या लाभापुढे त्याला समाधि नकोशी वाटते॥ ४५०॥ अर्जुना! श्रीगुरु चालत असतां त्यांच्या पायामागून जे धुळीचे रजःकण उडतात ते तो कैवल्यसुखाच्या मोबदल्यांत घेतो-म्हणजे श्रीगुरुच्या पायाच्या रजःकणाच्या प्राप्तीत त्याला कैवल्याचे सुख वाटते॥ ४५१॥ अर्जुना! हे असो. श्रीगुरुसेवेचे किती वर्णन करणार! गुरुभक्तीला मर्यादाच नाही; पण माझी श्रीगुरुसेवेविषयी प्रेमाने युक्त झालेली बुद्धि पराकाष्ठेच्या या विस्ताराला कारण झाली आहे॥ ४५२॥

जया इये भक्तीची चाड। जया इये विषयींचें कोड। जो हे सेवेवांचून गोड। न मनी कांहीं॥ ४५३॥
तो तत्त्वज्ञानाचा ठावो। ज्ञाना तेणेंचि आवो। हें असो तो देवो। ज्ञान भक्त॥ ४५४॥
हें जाण पां साचोकारें। तेथ ज्ञान उघडेनि द्वारें। नांदत असे गा पुरे। इया रीती॥ ४५५॥
जिये गुरुसेवेविखीं। माझा जीव अभिलाखी। म्हणोनि सोयचुकी। बोली केली॥ ४५६॥
एऱ्हवीं असतां हातीं खुळा। भजनावधानीं आंधळा। परिचर्येलागीं पांगुळा-। पासूनि मंदु॥ ४५७॥
गुरुवर्णनीं मुका। आळशी पोशिजे फुका। परि मनीं आथी निका। सानुरागु॥ ४५८॥
तेणेंचि पैं कारणें। हें स्थूळ पोसणें। पडलें मज म्हणे। ज्ञानदेवो॥ ४५९॥
परि तो बोलु उपसाहावा। आणि वोळगे अवसरु देयावा। आतां म्हणेन जी बरवा। ग्रंथार्थचि॥ ४६०॥
परिसा परिसा श्रीकृष्णु। जो भूतभारसहिष्णु। तो बोलतसे विष्णु। पार्थु ऐके॥ ४६१॥

अर्थ—ज्याला अशा श्रीगुरुभक्तीची इच्छा आहे, ज्याला या सेवेचेच कौतुक वाटते व त्या सेवेवाचून ज्याला दुसरे कांहीच गोड वाटत नाही॥ ४५३॥ तो म्हणजे तत्त्वज्ञानाचे राहण्याचे ठिकाण होय. त्याच्या योगाने ज्ञानाला शोभा आहे. फार काय सांगायचे! ज्ञान, भक्त असून तो देव आहे-म्हणजे ज्याप्रमाणे भक्त देवाला क्षणभर सोडत नाही, त्याप्रमाणे ज्ञानहि त्याला क्षणभर सोडून राहत नाही॥ ४५४॥ अर्जुना! वर सांगितलेल्या रीतीनुसार त्याचे ठिकाणी पूर्णपणे उघड ज्ञान नांदत असते, हे खचित जाण॥ ४५५॥ या गुरुसेवेविषयीं माझे अंतःकरण नेहमी आतुर असते; म्हणून मी ग्रंथार्थाला सोडून अवांतर बोलत सुटलो॥ ४५६॥ वास्तविक पाहता हात असून मी खुळा आहे, डोळे असून गुरुभजनाकडे लक्ष नसल्यामुळे आंधळा आहे आणि पाय असूनहि गुरुसेवा होत नाही, म्हणून पांगळ्याहून पांगळा आहे॥ ४५७॥ तोंड असून गुरुची स्तुति होत नाही, म्हणून मुका आहे. असा मी आळशी व फुकट पोसला जाणारा आहे. परंतु माझ्या मनांत मात्र गुरुसेवेविषयीं खरोखर प्रेम आहे॥ ४५८॥ श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, या एका कारणामुळेच मला या स्थूल देहांचे पोषण करणे भाग पडले आहे॥ ४५९॥ परंतु

आता माझ्या बोलण्याची क्षमा करून आपण मला आपली सेवा करण्यास अवसर द्यावा. आता नीट ग्रंथार्थच सांगतो॥ ४६०॥ संतसज्जनहो! ऐका ऐका. सर्व भूतांचा भार सहन करणारा प्रत्यक्ष विष्णु असा तो श्रीकृष्ण बोलत असून अर्जुन ऐकत आहे॥ ४६१॥

म्हणे शुचित्व गा ऐसें। जयापाशीं दिसे। आंग मन जैसें। कापुराचें॥ ४६२॥
कां रत्नाचें दळवाडें। जैसें सबाह्य चोखडें। आंत बाहेरि एकें पाडें। सूर्यु जैसा॥ ४६३॥
बाहेरीं कर्में क्षाळला। भीतरीं ज्ञानें उजळला। इहीं दोहीं परी आला। पाखाळा एका॥ ४६४॥
मृत्तिका आणि जळें। बाह्य येणें मेळें। निर्मळु होय बोलें। वेदाचेनि॥ ४६५॥
भलतेथ बुद्धी बळी। रजें आरिसा उजळी। सौदणी फेडी थिगळी। वस्त्रांचिया॥ ४६६॥
किंबहुना इयापरी। बाह्य चोख अवधारीं। आणि ज्ञानदीप अंतरीं। म्हणौनि शुद्ध॥ ४६७॥
एऱ्हवीं तरी पांडुसुता। आंत शुद्ध नसतां। बाहेरी कर्म तो तत्त्वतां। विटंबु गा॥ ४६८॥
मृत जैसा शृंगारिला। गाढव तीर्थी न्हाणिला। कडुदुधिया माखिला। गुळें जैसा॥ ४६९॥
वोस गृहीं तोरण बांधिलें। कां उपवासी अन्नें लिंपिलें। कुंकुमसेंदुर केलें। कांतहीनेने॥ ४७०॥
कळस ढिमाचे पोकळ। जळो वरील ते झळाळ। काय करूं चित्रींव फळ। आंतु शेण॥ ४७१॥
तैसें कर्मी वरिचिले कडां। न सरे थोर मोलें कुडा। नव्हे मदिरेचा घडा। पवित्र गंगे॥ ४७२॥
म्हणोनि अंतरीं ज्ञान व्हावें। मग बाह्य लाभेल स्वभावें। वरी ज्ञानकर्में संभवे। ऐसें कें जोडे॥ ४७३॥
यालागीं बाह्य भागु। कर्में धुतला चांगु। ज्ञानें फेडिला वंगु। अंतरींचा॥ ४७४॥
तेथ अंतरबाह्य गेलें। निर्मलत्व एक जाहलें। किंबहुना उरले। शुचित्वचि॥ ४७५॥
म्हणोनि सद्भाव जीवगत। बाहेरी दिसती फांकत। ते स्फटिकगृहींचे डोलत। दीप जैसे॥ ४७६॥
विकल्प जेणे जेणें उपजे। नाथिली विकृति निपजे। अप्रवृत्तीचीं बीजें। अंकुर घेतीं॥ ४७७॥
तें आइके देखे अथवा भेटे। परि मनीं कांहींचि नुमटे। मेघरंगें न कांटे। व्योम जैसें॥ ४७८॥
एऱ्हवीं इंद्रियांचेनि मेळें। विषयांवरी तरी लोळे। परि विकाराचेनि विटाळें। लिंपिजेना॥ ४७९॥
भेटलेया वाटेवरी। चोखी आणि माहारी। तेथ नातळे तियापरी। राहाटों जाणे॥ ४८०॥
कां पतिपुत्रांते आलिंगी। एकचि ते तरुणांगी। तेथ पुत्रभावाचां आंगीं। न रिगे कामु॥ ४८१॥
तैसें हृदय चोख। संकल्पविकल्पीं सनोळख। कृत्याकृत्य विशेख। फुडें जाणे॥ ४८२॥
पाणिये हिरा न भिजे। आधणीं हरळ न शिजे। तैसी विकल्पजातें न लिंपिजे। मनोवृत्ती॥ ४८३॥
तया नांव शुचिपण। पार्था गा संपूर्ण। हे देखसी तेथ जाण। ज्ञान आहे॥ ४८४॥

अर्थ—भगवान म्हणतात, अर्जुना! ज्याचे बाह्य शरीर व अंतर्मन दोन्ही एकसारखे कापराप्रमाणे निर्मळ असतात, तें शुचित्व होय॥ ४६२॥ किंवा रत्नाचा संपूर्ण भाग ज्याप्रमाणे आंत-बाहेर चकचकित असतो किंवा ज्याप्रमाणे सूर्य आंत-बाहेर एकसारखा प्रकाशरूप असतो॥ ४६३॥ त्याप्रमाणे शास्त्राप्रमाणे कर्म करून ज्याने बाहेरचे शरीर शुद्ध केले व आंत आत्मज्ञानाने मन निर्मळ केले, असा जो अंतर्बाह्य एक निर्मळच झाला॥ ४६४॥ वेदाने सांगितल्याप्रमाणे पाणी व माती यांच्या योगाने शरीराला शुद्ध म्हणजे मळरहित करणे, हे बाह्य निर्मळ होणे होय॥ ४६५॥ कोठेहि, मन नाहीसे करून शुद्धि करण्यांत ज्ञानच सर्वांत बलवान आहे. बाह्यत: धुळीने जसा आरसा स्वच्छ होतो किंवा वस्त्रावरील डाग परीटाचे सतेलें नाहीसे करते॥ ४६६॥ याप्रमाणेच, फार काय सांगायचे, तो बाहेर शुद्ध होतो, असे जाण आणि आंत अंत:करणांत आत्मज्ञानरूप दिवा असतो, म्हणून तो अंत:शुद्ध होतो॥ ४६७॥ वास्तविक पाहता, अर्जुना! ज्ञानाने अंत:करण शुद्ध करून न घेता केवळ बाहेर शरीराचे ठिकाणी कर्माने शुद्धि करणे ही शुद्धीची विटंबनाच होय॥ ४६८॥ ज्याप्रमाणे मेलेल्याला शृंगार करावा, गाढवाला तीर्थात स्नान घालावे, कडु दुध्याला गुळाच्या पाकाचा लेप द्यावा॥ ४६९॥ ज्याप्रमाणे ओसाड अशा घराला तोरण बांधणे जसे व्यर्थ किंवा

उपवासी मनुष्याच्या पोटांत अन्न न घालता वरून पोटाला अन्नाचा लेप लावणे जसे व्यर्थ किंवा पति जीवंत नसलेल्या स्त्रियेने कपाळी कुंक व भांगात शेंदूर घालणे जसे व्यर्थ होय ॥ ४७० ॥ जळो ती मुलाम्याच्या पोकळ कळसाची वरील चकाकी! शेणाचे केलेले फळाचे चित्र काय उपयोगाचे ? ॥ ४७१ ॥ त्याप्रमाणे वरवर केवळ शरीराचे ठिकाणीच शुद्धिकर्म केल्याने खरी शुद्धि होत नाही. श्रीमंतीमुळे किंवा अधिकारामुळे ज्याचे मोल किंवा किमत वाढली आहे, असा क्षुद्रवृत्तीचा मनुष्य थोर होत नाही किंवा मानला जात नाही किंवा आंत मद्य भरलेला घडा गंगेत ठेवला तरी पवित्र होत नाही ॥ ४७२ ॥ म्हणून अंत:करणांत ज्ञान प्राप्त झाले असतां-म्हणजे आत्मज्ञानाने अंत:करण अविद्यादिदोषरहित असे शुद्ध झाले की, मग स्वभावत:च बाह्य देहाचीहि शुद्धि होते. आणखी कर्माने ज्ञान प्राप्त होते, असे कोठे झाले आहे काय ? ॥ ४७३ ॥ याकरिताच बाह्य शरीर शुद्धिकर्माने चांगले निर्मळ करून ज्ञानाने ज्यांनी अंत:करणाचे अविद्यादि मळ नाहीसे केले ॥ ४७४ ॥ त्याचे ठिकाणी निर्मळपणाच होऊन जातो. फार काय सांगावें! एक शुद्धिच उरते ॥ ४७५ ॥ म्हणून ज्याप्रमाणे स्फटिकाच्या घरात असलेल्या दिव्याचा प्रकाश बाहेर पडतो, त्याप्रमाणे अंत:करणांत प्राप्त झालेली शुद्धि किंवा निर्मलत्व बाहेर प्रगट होते ॥ ४७६ ॥ ज्याच्या योगाने संशय प्राप्त होतो, नसतेच विकार उठतात व कुकर्माच्या बीजरूपी वासना अंकुरित होतात असे कांही ऐकले, पाहिले किंवा भेटले तरी ज्याच्या मनांत, मेघाच्या रंगाने आकाश लिप्त होत नाही त्याप्रमाणे, कांहीच कल्पना उठत नाहीत ॥ ४७७-४७८ ॥ साधारणत: तो सर्व इंद्रियांच्या साहाय्याने निरनिराळ्या विषयांचा भोग घेतांना दिसतो; पण त्याच्या मनाला विकारांच्या विटाळाचा स्पर्श होत नाही ॥ ४७९ ॥ ज्याप्रमाणे ब्राह्मणादि स्पृश्य वर्णाचा पुरुष व महारादि अस्पृश्य वर्णाचा पुरुष हे दोघे रस्त्यावर भेटले तरी ते परस्परांना कधी शिवत नाहीत, त्याप्रमाणे चित्ताला विकाराचा स्पर्श न होऊ देता वागायचे, हेच एक ज्याला माहित असते ॥ ४८० ॥ किंवा ज्याप्रमाणे एकच तरुण स्त्री आपल्या पतीला व पुत्राला आलिंगन देते; पण पुत्राला आलिंगन देतेवेळीं अंत:करणात पुत्रभाव असल्यामुळे कामवासना उठत नाही ॥ ४८१ ॥ त्याप्रमाणे निर्मळ अंत:करण चांगल्या—वाईट कल्पनांना ओळखत असते व करण्यास योग्य काय व अयोग्य काय हा विशेषभेदहि ते स्पष्ट जाणत असते ॥ ४८२ ॥ पाण्याने हिरा भिजत नाही किंवा उकळत्या पाण्यांत वाळूचा खडा शिजत नाही. त्याप्रमाणे शुद्ध झालेली मनोवृत्ति कोणत्याही विकल्पाने लिंपित होत नाही ॥ ४८३ ॥ हे अर्जुना! हे संपूर्ण बाह्य व आंतर शुचित्व जेथे तुला दिसेल, तेथे ज्ञान आहे, असे जाण ॥ ४८४ ॥

गूढार्थदीपिका—जीव मूळात ब्रह्मस्वरूपच असल्यामुळे अत्यंत शुद्ध, निर्मळ आहे; पण विपरीत कल्पनेमुळे तो अशुद्ध अशा जीवदशेला आला आहे, आपली शुद्ध ब्रह्मदशा ओळखून त्याने विपरीत कल्पनारूप जीवदशा नाहीशी केली असतां तो आपल्या मूळच्या शुद्धस्वरूपाला प्राप्त होतो; म्हणून जेथे मनाची शुद्धि आहे तेथे ज्ञान आहे. असे माउलीनी म्हटले आहे. ''ब्रह्मज्ञानाची गुरुकिल्ली। सांगेन एक्याची बोली। ज्यांची कल्पना निमाली। ते जाण गा प्राप्त पुरुष। (एकनाथ) या ओवीत नाथांनीहि असे म्हटले आहे.

आणि स्थिरता साचें। घर रिगाली जयाचें। तो पुरुष ज्ञानाचें। आयुष्य गा ॥ ४८५ ॥
देह तरी वरिलीकडे। आपुलिया परी हिंडे। परि बैसका न मोडे। मानसींची ॥ ४८६ ॥
वत्सावरूनि धेनूचें। स्नेह राना न वचे। नव्हती भोग सतियेचे। प्रेमभोग ॥ ४८७ ॥
कां लोभिया दूर जाये। परि जीव ठेवाचि ठाये। तैसा देहो चाळितां नव्हे। चळु चित्ता ॥ ४८८ ॥
जातया अभ्रासवें। जैसें आकाश न धांवे। भ्रमणचक्रीं न भंवे। ध्रुव जैसा ॥ ४८९ ॥
पांथिकाचिया येरझारा। सवें पंथु न वचे धनुर्धरा। कां नाहीं जेवीं तरुवरां। येणें जाणें ॥ ४९० ॥
तैसा चळणवळणात्मकीं। असोनि ये पांचभौतिकीं। भूतोर्मी एकी। चळिजेना ॥ ४९१ ॥
वाहुटोळीचेनि बळें। पृथ्वी जैसी न ढळे। तैसा उपद्रव उमाळें। न लोटे जो ॥ ४९२ ॥
दैन्यदु:खीं न तपे। भयशोकीं न कंपे। देहमृत्यु न वासिपे। पातलेनि ॥ ४९३ ॥
आर्तिआशापडिभरें। वयव्याधीगजरें। उजू असतां पाठिमोरें। नव्हे चित्त ॥ ४९४ ॥

निंदा निस्तेज दंडी। कामलोभा वरपडी। परी रोमा नव्हे वांकुडी। मानसाची॥ ४९५॥
आकाश हे वोसरो। पृथ्वी वरि विरो। परी नेणे मोहरों। चित्तवृत्ती॥ ४९६॥
हाती हाला फुलीं। पासवणा जेवीं न घाली। तैसा न लोटी दुर्वाक्यशेलीं। सेलिला सांता॥ ४९७॥
क्षीरार्णवाचियां कल्लोळीं। कंपु नाहीं मंदराचळी। आकाश न जळे जाळीं। वणवियाच्या॥ ४९८॥
तैशा आल्या गेल्या ऊर्मी। नव्हे गजबज मनोधर्मी। किंबहुना धैर्य क्षमी। कल्पांतींही॥ ४९९॥
पैं स्थैर्य ऐसी भाष। बोलिजे जे सविशेष। ते हे दशा गा देख। देखणेया॥ ५००॥
हें स्थैर्य निधडें। जेथ आंगें जीवें जोडे। तें ज्ञानाचें उघडें। निधान साचें॥ ५०१॥

अर्थ—आणि चित्ताची स्थिरता ज्याला प्राप्त झाली तो पुरुष ज्ञानाचे आयुष्य होय॥ ४८५॥ त्याचा देह बाहेर इच्छेप्रमाणे फिरत असला तरी त्याच्या मनाची, आत्मस्वरूपाचे ठिकाणी झालेली बैठक मोडत नाही॥ ४८६॥ ज्याप्रमाणे गाय चरायला रानांत गेली तरी तिचे प्रेम, घरी असलेल्या वासराचे ठिकाणीच असते. सती जातेवेळी घातलेले अलंकारादि भोग सुखभोग नव्हेत किंवा कृपण मनुष्य दूर गेला तरी त्याचा सर्व जीव पुरलेल्या धनापाशी असतो, त्याप्रमाणे देहाच्या नाना प्रकारच्या हालचाली होत असल्या तरी ज्याच्या चित्ताची स्वरूपापासून यत्किंचित् हालचाल होत नाही॥ ४८७-४८८॥ धावणाऱ्या मेघाबरोबर जसे आकाश धावत नाही किंवा फिरणाऱ्या नक्षत्रमंडळाबरोबर जसा ध्रुवाचा तारा फिरत नाही॥ ४८९॥ येरझारा करणाऱ्या वाटसरुबरोबर जसा मार्ग चालत नाही किंवा वृक्षाला जसे येणे जाणे नसते॥ ४९०॥ त्याप्रमाणे हालचाल करणाऱ्या या पांचभौतिक देहाचे ठिकाणी जो असून देखील ज्याचे चित्त एकाहि भौतिक अशा विकाराच्या उर्मीने चंचल होत नाही॥ ४९१॥ ज्याप्रमाणे वावटळ सुटली असता पृथ्वी जाग्यावरून ढळत नाही, त्याप्रमाणे दु:खाचे प्रसंगामागून प्रसंग येत राहिले तरी जो त्याबरोबर वाहवला जात नाही॥ ४९२॥ हीन परिस्थिति किंवा दु:ख प्राप्त झाले असता तो संतापत नाही. भय किंवा शोक प्राप्त झाला असतां तो डगमगत नाही व देहाला मृत्यु आला असतां तो भीत नाही॥ ४९३॥ इच्छा-आशा यांचा चित्तांत जोर झाला असता, वय-रोग यांची वाढ झाली असता ज्यांचे आत्मसन्मुख झालेले चित्त मागे फिरत नाही॥ ४९४॥ कोणी निंदा केली असता, कोणी अपमान केला असता, कोणी मारले असता, काम, क्रोध इत्यादि विकारांनी झडप घातली असता, ज्याच्या आत्मस्थित मनाचा केसही वांकडा होत नाही॥ ४९५॥ आकाश तुटून पडो, आणखी पृथ्वी विरून जावो; पण ज्याची आत्म्याचे ठिकाणी स्थिर झालेली चित्तवृत्ति मागे फिरत नाही॥ ४९६॥ ज्याप्रमाणे हत्तीला फुलाने मारले असता तो मुरड घेत नाही, त्याप्रमाणे मर्मभेदक शब्दांनी छळला गेला असताहि ज्याचे चित्त आत्मस्वरूपापासून मागे फिरत नाही॥ ४९७॥ ज्याप्रमाणे क्षीरसमुद्राच्या लाटांनी मंदार पर्वत डळमळत नाही किंवा आकाश वणव्याचे जाळाने जळत नाही॥ ४९८॥ त्याप्रमाणे अंत:करणांत उठणाऱ्या व नाहीशा होणाऱ्या विकारांनी त्याच्या मनाच्या स्थिररूपी धर्मात गोंधळ होत नाही. एवढेच नाही तर कल्पान्तसमयीहि त्याचे धैर्य व सहनशीलता कायमच राहते॥ ४९९॥ हे डोळस अर्जुना! जे धैर्य या नांवाने विशेषपणे बोलले जाते, ती ही दशा होय पहा॥ ५००॥ ज्याचे अंत:करण व शरीर यांचे ठिकाणी असे कधीहि न डगमगणारे स्थैर्य आहे, तो ज्ञानाचे खरोखर उघड कोठार होय॥ ५०१॥

गूढार्थदीपिका—देहादिक पदार्थ जोपर्यंत सत्य वाटतात, तोपर्यंतच चित्त आत्मस्वरूपापासून ढळण्याचा धोका असतो; पण दृढ आत्मज्ञानाने, मन, देह इत्यादि सर्व मिथ्या आहेत, असा अनुभव आल्यामुळे आत्मस्वरूपाशी ऐक्य पावून साक्षीस्वरूप होऊन राहिलेली ज्ञान्याची बुद्धिवृत्ति, प्रारब्धानुसार राजस, तामस, सात्विक या गुणांपैकी कोणत्याहि गुणांच्या उर्मी उठल्या तरी आत्मस्वरूपापासून ढळून ती त्या उर्मीशी ऐक्य पावत नाही, इतकी ती आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर झालेली असते, असा भाव.

आणि इसाळु जैसा घरा। कां द्वंद्विया हतियेरा। न विसंबे भांडारा। लुब्धक जैसा॥ ५०२॥
एकलौतिया बाळका-। वरि पडौनि ठाके अंबिका। मधुविषीं मधुमक्षिका। लोभिणी जैसी॥ ५०३॥

अर्जुना जो यापरी। अंत:करण जतन करी। नेदी उभें ठाको द्वारीं। इंद्रियांच्या॥५०४॥
म्हणे काम बागुल ऐकेल। हे आशा सियारी देखैल। तरी जीवा टेंकैल। म्हणोनि बिहे॥५०५॥

अर्थ—आणि भूत जसे झाडाला सोडत नाही किंवा धनावर असलेला सर्प जसे घर सोडत नाही, योद्धा जसे आपले हत्यार विसरत नाही, कृपण आपला ठेवा जसा विसरत नाही॥५०२॥ किंवा एकुलत्या मुलाच्या आईचे लक्ष ज्याप्रमाणे त्या मुलाकडेच लागलेले असते किंवा मधमाधी जशी मधाचे ठिकाणी लुब्ध असते॥५०३॥ अर्जुना! त्याप्रमाणे जो अंत:करणाला आवरून ठेऊन इंद्रियांच्या द्वारात त्याला उभे राहू देत नाही-म्हणजे कधीहि इंद्रियांच्या स्वाधीन होऊ देत नाही॥५०४॥ तो विचार करतो की माझे अंत:करणरूपी बाळ इंद्रियांच्या द्वारी आल्याचे कामरूपी बागुलाने ऐकले किंवा आशा डाकिणीने पाहिले तर त्याच्या जीवाला त्याची बाधा होईल अशी भीति वाटते॥५०५॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे अज्ञान बालकालाच बागुलाची किंवा डाकिणीची भीति असते; म्हणून लहान मुलाचे त्यांच्यापासून संरक्षण करावे लागते, त्याप्रमाणे जीवरूप अज्ञानदशा आहे तोपर्यंत काम, आशा इत्यादि विकारांच्या तडाक्यांत मनुष्य सापडला जातो; म्हणून आत्मज्ञान दृढ होत नाही तोपर्यंत मनाला इंद्रियांच्या स्वाधीन न होऊ देता त्याचा दृढ निग्रहच केला पाहिजे, असा भाव.

"तैसे प्राप्तेहि पुरुषे। इंद्रिये लाळिली जरी कौतुके। तरि आक्रमिला जाय दु:खे। सांसारिकें॥३५०॥ (ज्ञा. अ. २)" असे माउलीनी मागे सांगितलेहि आहे.

बाहेरी धीट जैसी। दाटुगा पति कळासी। करी टेहणी तैसी। प्रवृत्तीसीं॥५०६॥
सचेतनीं वाणेपणें। देहासकट आटणें। संयमावरी करणें। बुझूनि घाली॥५०७॥
मनाचां महाद्वारीं। प्रत्याहाराचिया ठाणांतरीं। जो यमदम शरीरीं। जागवी उभे॥५०८॥
आधारीं नाभीं कंठीं। बंधत्रयाचीं घरटीं। चंद्रसूर्यसंपुटीं। सूये चित्त॥५०९॥
समाधीचे शेजेपासीं। बांधोनि घाली ध्यानासीं। चित्तचैतन्यसमरसीं। आतुर ते॥५१०॥

अर्थ—दांडगा पुरुष आपल्या बाहेरख्याली स्त्रियेला जसा बांधून ठेवतो, त्याप्रमाणे आपल्या अंत:करणाच्या बाह्य प्रवृत्तीवर जो कडक नजर ठेवतो॥५०६॥ जो चेतन प्राण्यांना जणुकाय आपल्या देहाचे वायन दिल्याप्रमाणे किंवा त्यांच्या सुखाकरिता आपण अर्पण केल्याप्रमाणे आपल्या देहाला झिजवितो व इंद्रियांची द्वारे बंद करून जो त्याला संयम-म्हणजे ध्यान, धारणा, समाधि-यांच्याकडे लावतो॥५०७॥ मनाच्या महाद्वारामध्ये प्रत्याहाररूपी जागेत शरीराचे ठिकाणी यम-दम असे पहारेकरी उभे करतो-म्हणजे यमयुक्त मनाने इंद्रियांना विषयांपासून आवरून जो दम साधतो॥५०८॥ आधार, नाभी व कंठ यांचे ठिकाणी अनुक्रमे मूळ, ओढियाणा व जालंधर असे तीन बंधाचे घर करून चंद्रसूर्याच्या संपुटीत असलेल्या सुषुम्ना नाडीत चित्ताचा प्रवेश करतो॥५०९॥ ज्याचे चित्त समाधीचे शेजेपाशी-म्हणजे समाधिस्थितीच्या जवळ असलेल्या खालच्या ध्यानरूपी भूमीशी-बांधून ठेवले असून-म्हणजे स्थिर केले असून-ते तो चैतन्याशी समरस होण्यास आतुर करून ठेवतो॥५१०॥

गूढार्थदीपिका—शास्त्रीय सत्प्रवृत्तीने वैकारिक स्वैर प्रवृत्तीचा व यमदमाने मन, इंद्रिये यांचा निग्रह करून ध्यानाने आत्मस्वरूपाशी ऐक्य पावण्याकरिता आत्मस्वरूपाच्या प्रत्ययाची एकतानता ठेवणे हेच येथे "अंत:करणनिग्रह" या शब्दाने सांगितले आहे.

अगा अंत:करणनिग्रहो जो। तो हा हें जाणिजो। हा आथी तेथ विजयो। ज्ञानाचा पैं॥५११॥

अर्थ—अंत:करणनिग्रह जो म्हणतात; तो हा होय. हा जेथे आहे तेथेच ज्ञानाचा विजय आहे॥५११॥

गूढार्थदीपिका—हा आथि तेथ विजयो। ज्ञानाचा पैं—

याप्रमाणे ज्याने आपले अंत:करण ज्ञानाने आत्मस्वरूपाचे ठिकाणी ध्यानस्थ केले, त्याच्या ठिकाणीच ज्ञान विजयी होते-म्हणजे त्याचेच ज्ञान जगद्रूपकार्यासह त्याच्या अज्ञानाची निवृत्ति करण्यास समर्थ असते असा अर्थ.

जयाची आज्ञा आपण। शिरीं वाहे अंत:करण। मनुष्याकारें जाण। ज्ञानचि तो॥५१२॥

अर्थ—ज्याची आज्ञा, अंत:करण शिरसा वंद्य मानते-म्हणजे जो अंत:करणाच्या स्वाधीन नसून ज्याने अंत:करण आपल्या अत्यंत स्वाधीन ठेवले आहे तो ''मनुष्याकारे जाण। ज्ञानचि तो'' प्रत्यक्ष ज्ञानच मनुष्याच्या आकाराने आहे, असे जाण॥ ५१२॥

गूढार्थदीपिका—देहादिक जगताची जड भौतिकता वास्तविक नसून अज्ञानभ्रमजन्य असल्यामुळे ज्ञानाने ज्याच्या अज्ञानाची कार्यासह निवृत्ति झाली आहे, अशा दृढ ज्ञानाच्या भूमिकेवर आलेल्या ज्ञानी पुरुषाच्या वृत्तीला मग देहादिकांची भौतिकता भासूं शकत नाही.

आचार्य म्हणतात, ''यथा तरंगकल्लोलैर्जलमेव स्फुरत्यलम्। पात्ररूपेण ताम्रं हि ब्रह्माण्डौघैस्तथाऽऽत्मता''॥ ६३॥ (अपरोक्षानुभूति) ज्याप्रमाणे नाना तरंगाच्या रूपाने पाण्याचाच अनुभव येतो किंवा ताम्रपात्रांत तांब्याचाच अनुभव येतो, त्याप्रमाणे दृढ ज्ञान्याला अनंत ब्रह्माण्डाचा प्रवाह चिदात्मस्वरूपानेच अनुभवाला येतो.

इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहङ्कार एव च। जन्ममृत्युजराव्याधिदु:खदोषानुदर्शनम् ॥ ८॥

अर्थ—इंद्रियांच्या विषयरूप अर्थाचे ठिकाणी वैराग्य, तसेच अहंकाररहितता, जन्म, मृत्यु, जरा, व्याधि या प्रत्येकांत असलेल्या दु:खरूप दोषांचे चिंतन करणे॥ ८॥

आणि विषयांविखीं। वैराग्याची निकी। पुरवणी मानसीं कीं। जिती आथी॥ ५१३॥

अर्थ—मनामध्ये विषयांविषयी वैराग्याचा चांगला जिवंत पुरवठा असतो॥ ५१३॥

गूढार्थदीपिका—माउलींनी या ओवीचा अर्थ मागे नवव्या अध्यायांतील ओवी १८८ च्या ''जया निजल्याते उपासी। वैराग्य गा'' या चरणांतून सांगितला आहे.

वमिलिया अन्ना। लाळ न घोंटी जेवीं रसना। कां आंग न सूये आलिंगना। प्रेताचिया॥ ५१४॥
विष खाणें नागवे। जळत घरीं न रिगवे। व्याघ्रविवरां न वचवे। वस्ती जेवीं॥ ५१५॥
धडाडीत लोहरसीं। उडी न घालवे जैसी। न करवे उशी। अजगराची॥ ५१६॥
अर्जुना तेणें पाडें। जयासी विषयवार्ता नावडे। नेदी इंद्रियांचेनि तोंडें। कांहींच जावों॥ ५१७॥
जयाचे मनी आलस्य। देहीं अतिकार्श्य। यमदमीं सामरस्य। जयासि गा॥ ५१८॥
तपोव्रतांचा मेळावा। जयाचे ठायीं पांडवा। युगांत जया गांवा-। आंतु येतां॥ ५१९॥
बहु योगाभ्यासीं हांव। विजनाकडे धांव। न साहे जो नांव। संघाताचें॥ ५२०॥
नाराचांचीं आंथुरणें। पूयपंकीं लोळणें। तैसें लेखी भोगणें। ऐहिकींचें॥ ५२१॥
आणि स्वर्गातें मानसें। ऐकोनि मानीं ऐसें। कुहिलें पिशित जैसें। श्वानाचें कां॥ ५२२॥
तें हें विषयवैराग्य। जें आत्मलाभाचें भाग्य। येणें ब्रह्मानंदा योग्य। जीव होती॥ ५२३॥

अर्थ—ओकलेले अन्न खाण्याकरितां जसे जिभेला पाणी सुटत नाही. किंवा प्रेताला आलिंगन देण्याकरितां कोणी आपले आंग पुढे करीत नाही॥ ५१४॥ हलाहलासारखे विष पचनी पाडता येत नाही, जळत्या घरात जाववत नाही, वाघाच्या खोप्यात ज्याप्रमाणे वस्ति करवत नाही॥ ५१५॥ ज्याप्रमाणे सळसळणाऱ्या लोखंडाचे रसात उडी घालवत नाही किंवा अजगराची उशी करवत नाही॥ ५१६॥ अर्जुना! त्याप्रमाणे ज्याला विषयाची गोष्ट आवडत नाही आणि जो इंद्रियांच्या तोंडात काहीच जाऊ देत नाही॥ ५१७॥ ज्याच्या मनांत विषयसेवनाविषयी आळस असतो, मनसोक्त विषयसेवन नसल्यामुळे ज्याच्या देहाचे ठिकाणी कृशता असते आणि मनाच्या व इंद्रियांच्या निग्रहाचे ठिकाणी ज्याला गोडी वाटते॥ ५१८॥ अर्जुना! जो सारखी नाना प्रकारची तपव्रतें करीत असतो, ज्याला गांवांत आले असता प्रलयासारखे दु:ख होते॥ ५१९॥ योगाभ्यासाकडे व अरण्यात जाऊन बसण्याकडेच ज्याच्या मनाची फार प्रवृत्ति असते व जो लोकसमुदायाचे नावही कधी घेत नाही॥ ५२०॥ इहलोकीचे विषयसुख भोगणे म्हणजे त्याला बाणांच्या शय्येवर निजण्यासारखे दु:खदायक किंवा पुवाच्या चिखलात लोळण्यासारखे किळसवाणे वाटते॥ ५२१॥ आणि स्वर्गसुखाचे वर्णन ऐकून मनांत तो ते कुत्र्याच्या कुजलेल्या मासाप्रमाणे मानतो॥ ५२२॥ अर्जुना! जे

विषयवैराग्य आत्मस्वरूपाचा लाभ करून देणारे सद्भाग्य म्हटले जाते, ते हे होय. यांच्या योगाने जीव निर्गुण आत्मस्वरूपाचे ठिकाणी समाधि साधून ब्रह्मानंद भोगण्याला योग्य होतो॥ ५२३॥

गूढार्थदीपिका—आत्मलाभाचे भाग्य—विषयासक्तीने अखंड विषयाकार होत असलेले मन आत्माकार होऊं शकत नाही. वैराग्याने विषयाचा कंटाळा येऊन अंत:करणाचे विषयाकार होणे बंद पडले की अंत:करण नामरूपात्मक विशेषभावरहित होते व तेच त्याचे आत्माकार होणे होय. हे मागे दहाव्या अध्यायातील १७९ ओवीवरील गूढार्थदीपिकेत श्रीमद्भागवताचे टीकाकार श्रीधराचार्य यांचे वचन उदाहृत करून सांगितलेच आहे.

परब्रह्माचे ठिकाणी फलव्याप्ति नाही, पण वृत्तिप्राप्ति आहे असे जे विद्यारण्यस्वामींनी पंचदशीत म्हटले आहे, त्याचा अर्थ असा—

"वृत्तिप्रतिबिंबित चिदाभासः फलम्" (पं. द. तृप्तिदीप श्लो. ९० वरील रामकृष्णटीका) वृत्तीत प्रतिबिंबित झालेल्या चिदाभासाला फल म्हणतात. अर्थात्च वृत्ति व चिदाभास मिळून फल होते. व्यवहारातील पदार्थ जाणतांना वृत्ति व चिदाभास या दोघांची आवश्यकता असते. ते दोन्हीहि त्या जाणल्या जाणाऱ्या पदार्थांना व्यापतात. "अर्थाकारी भवेद्वृत्तिः फलेनार्थः प्रकाशते। अर्थज्ञानं विजानाति स एव अर्थ प्रकाशते॥ ३०॥" (श्रीशंकराचार्यकृत-सदाचारानुसंधान) वृत्ति पदार्थाकार होते व आपल्याहून भिन्नपणाने पदार्थाचा विशेषपणा व मर्यादितपणा फळाने कळतो. असा आचार्यांच्या वरील श्लोकाचा भावहि आहे.

पण ज्याप्रमाणे अंधारात बसलेल्या मनुष्याला सूर्य दिसत नाही; पण अंधाराबाहेर आल्याबरोबर स्वयंप्रकाशरूप सूर्य त्याला आपोआप दिसू लागतो, तो पाहण्याकरिता त्याला पणतीच्या दिव्याची गरज लागत नाही; त्याप्रमाणे सत्वगुण हा निर्मळ असून चैतन्याचे सान्निध्याने प्रकाशक असल्यामुळे, सात्विकवृत्ति ही ब्रह्माकार होऊन जीवाचे ठिकाणी असलेले, "ब्रह्म नाही" "मी ब्रह्म जाणत नाही" असे परब्रह्माविषयीचे अज्ञानावरण नष्ट करते व मग स्वयंप्रकाशरूप ब्रह्म ऐक्याने अनुभवाला येते.

पुनः व्यवहारांतील, आपल्याहून भिन्न व मर्यादित असा जो जो पदार्थ वृत्तिप्रतिबिंबित चिदाभासाच्या योगाने जाणला जातो, तो 'मी जाणला' असे वाटून ज्ञात झाला असतां त्या पदार्थाचे ठिकाणी ज्याप्रमाणे ज्ञातताधर्म येतो, त्याप्रमाणे परब्रह्माचे ठिकाणी ज्ञातताधर्म येत नाही; कारण जाणणारा चिदाभास परब्रह्माहून अलग न राहता परब्रह्माशी ऐक्य पावलेलाच असतो.

सारांश इतर पदार्थाप्रमाणे "मी ब्रह्म जाणतो" असा आपल्याहून परब्रह्माच्या निराळेपणाचा अनुभव येत नसून "मी परब्रह्म आहे" असा ऐक्यानुभवच येतो.

याप्रमाणे अंत:करण विषयाकारावाचून आत्माकार झाले तरच जीवाला निर्गुण ब्रह्मानंद प्राप्त होतो.

ऐसा उभयभोगीं त्रासु। देखसी जेथ बहुवसु। जाण तेथ रहिवासु। ज्ञानाचा तूं॥ ५२४॥
आणि सचाडाचिये परी। इष्टापूर्ते करी। परी केलेपण शरीरीं। वसों नेदी॥ ५२५॥
वर्णाश्रमपोषकें। कर्मे नित्यनैमित्तिकें। तयांमाजीं कांहीं न ठके। आचरतां॥ २२६॥
परि हें मियां केलें। की हें माझेनि सिद्धी गेले। ऐसें नाहीं ठेविलें। वासनेमाजीं॥ ५२७॥
जैसें अवचितपणें। वायूसि सर्वत्र विचरणें। कीं निरभिमान उदैजणें। सूर्याचें जैसें॥ ५२८॥
कां श्रुति स्वभावता बोले। गंगा काजेविण चाले। तैसें अवष्टंभहीन भलें। वर्तणें जयाचे॥ ५२९॥

अर्थ—याप्रमाणे इहलोकांतील व परलोकांतील विषयभोगाविषयी ज्याचे ठिकाणी अत्यंत कंटाळा तुला दिसून येईल, तेथेच आत्मज्ञान राहते असे तू जाण॥ ५२४॥ आणि यज्ञादि इष्टकर्मे व तलावादि पूतकर्मे यांचे सकाम पुरुषाप्रमाणे अत्यंत आस्थापूर्वक जो आचरण करतो, पण बाहेर शरीराचे ठिकाणी "मी केले" असा कर्तृत्वाभिमान उठू देत नाही॥ ५२५॥ वर्णाश्रमाला पोषक अशी जी नित्यनैमित्तिक कर्मे त्यापैकी कशाचेही आचरण केल्यावाचून राहत नाही॥ ५२६॥ पण "हे मी केले" किंवा "माझ्या योगाने हे सिद्धीस गेले" असा अभिमान वागविण्याचे

तिळमात्र देखील ज्याच्या मनात येत नाही ॥ ५२७ ॥ ज्याप्रमाणे सहजगत्या वायूच सर्वत्र वाहतो किंवा ज्याप्रमाणे सूर्य, उगविण्याचा अभिमान न धरता सहज उगवतो ॥ ५२८ ॥ अथवा ज्याप्रमाणे वेद हे परमेश्वराचे स्वाभाविक शब्द आहेत किंवा लोकोद्धाराच्या प्रयोजनावाचून स्वभावत:च गंगा वाहते, त्याप्रमाणेच ज्याचे शास्त्रानुसार निरभिमान वागणे असते ॥ ५२९ ॥

गूढार्थदीपिका—ज्ञान्याच्या ठिकाणी विद्याभिमान नसतो व त्याचे कर्माचरण निरभिमानाने चालू असते. किंवा मी ज्ञानी आहे, मला कर्म कशाला करायला पाहिजे, असे समजून कर्मत्याग करण्यात भगवत्प्रेम उणे होत असल्यामुळे तो कर्म सोडू शकत नाही. चित्तशुद्धीचे साधन म्हणून साधनदशेत अभ्यासिलेले भागवतधर्माचे आचरण, भगवदाज्ञा समजून निष्कामचित्ताने ज्ञानीपुरुष ज्ञानदशेतही करीत राहतात.

ज्ञानानंतर वर्णाश्रमधर्माचे आचरण न करणे हे अहंकाराला पोषक होते व आचरण करीत राहणे हे निरहंकाराला पोषक होते.

ऋतुकाळीं तरी फळती। परी फळलों हें नेणती। तयां वृक्षांचिये ऐसी वृत्ती। कर्मीं सदा॥ ५३०॥
एवं मनीं कर्मीं बोलीं। जेथ अहंकारा उखी जाहली। एकावळीची काढिली। दोरी जैसी॥ ५३१॥
संबधेंवीण जैसीं। अभ्रें असती आकाशीं। देहीं कर्मे तैसीं। जयासि गा॥ ५३२॥
मद्यपा आंगींचें वस्त्र। कां लेपाहातींचें शस्त्र। बैलावरी शास्त्र। बांधलें आहे॥ ५३३॥
तया पाडें देहीं। जया मी आहे हे सेचि नाहीं। निरहंकारता पाहीं। तया नांव॥ ५३४॥

अर्थ—ज्या ज्या ऋतुत वृक्षांना फळे यायची, त्या त्या ऋतूत वृक्षांना फळे येतात, पण आम्हाला फळे आली, हे ते वृक्ष जाणत नाहीत. त्या वृक्षाप्रमाणेच सर्व प्रकारच्या कर्माचे आचरण करतेवेळी ज्ञानीपुरुषांची वृत्ती असते ॥ ५३० ॥ ज्याप्रमाणे एकपदरी हाराची दोरी काढावी त्याप्रमाणे ज्याच्या मनांतून, कर्मातून व बोलण्यांतून अहंकार नि:शेष नाहीसा झाला ॥ ५३१ ॥ आकाशाशी संबंध न होता, जसे आकाशात अभ्रे राहतात, त्याप्रमाणे कर्तृत्व अहंकाराच्या द्वारा स्वत:शी संबंध न होताच ज्या ज्ञान्याच्या शरीराचे ठिकाणी कर्मे राहतात ॥ ५३२ ॥ मद्य प्यालेल्या मनुष्याच्या आंगावरील वस्त्राप्रमाणे किंवा चित्राच्या हातांतील शस्त्राप्रमाणे किंवा बैलाच्या पाठीवर लादलेल्या शास्त्रसंभाराप्रमाणे ज्या ज्ञान्याला मी देह धारण करणारा आहे अशी आठवणच नाही अशा स्थितीला निरहंकारता म्हणतात. पाहा ॥ ५३३-५३४ ॥

गूढार्थदीपिका—वृत्त्यारूढ किंवा वृत्तीचा अभिमान धारण करून वृत्तिपुरतीच आपली मर्यादित कल्पना करणाऱ्या चैतन्याला जीव म्हणतात. हा जीव असा अभिमान धारण करीत देहापर्यंत येतो-म्हणजे देहाचा अभिमान धारण करतो; पण दृढ आत्मज्ञानाने वृत्ति आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर झाली असता, त्याचा व अहंकाराचा संबंध नि:शेष सुटतो व तो अहंकाराचा साक्षी होऊन राहतो, प्रारब्धानुसार व्यवहार करतांना इतरांना देहाचे ठिकाणी त्याचे मी पण आहे, असे दिसत असले तरी त्याची त्याला आठवण नसते. अशी स्थिति झाली असता, तिला निरहंकारता म्हणतात.

हें संपूर्ण जेथें दिसे। तेथेंचि ज्ञान असे। इयेंविषीं अनारिसें। बोलों नये॥ ५३५॥
जन्ममृत्युदु:खें। व्याधिवार्धक्यकलुषें। इयें अंगा न येतां देखे। दुरूनि जो॥ ५३६॥
साधकु विवसिया। कां उपसर्गु योगिया। पावे उणेयापुरेया। वोथंबा जेवीं॥ ५३७॥
वैर जन्मांतरींचें। सर्पा मनौनि न वचे। तेवी अतीता जन्माचें। उणें जो वाहे॥ ५३८॥
डोळां हरळ न विरे। घायीं कोत न जिरे। तैसें काळींचें न विसरे। जन्मदु:ख॥ ५३९॥

अर्थ—ही निरहंकारता पूर्णपणे जेथे दिसून येते, तेथेच आत्मज्ञान आहे. हे खोटे आहे. असे म्हणू नये ॥ ५३५ ॥ आणि जन्म, मृत्यु, जरा यांचे दु:ख, रोग, म्हातारपण आणि पापे शरीराचे ठिकाणी प्राप्त होण्यापूर्वी ही पुढे प्राप्त होतील अशी कल्पना करून जो सावध होतो ॥ ५३६ ॥ जमिनीतील पुरलेले धन काढू पाहणारा साधक, जसा त्यावरील पिशाच्चाविषयी सावध असतो, किंवा योगी योगांत प्राप्त होणाऱ्या विघ्नाविषयी सावध असतो, अथवा

गवंडी भिंत वाकडी होऊ नये म्हणून सावधपणे वोळंबा बाळगतो॥ ५३७॥ सर्पाच्या मनातून ज्याप्रमाणे जन्मांतरीचे वैर जात नाही, त्याप्रमाणे आत्मस्वरूप विसरल्यामुळे मागील अनंत जन्मामध्ये भोगलेल्या दुःखाची जो सारखी आठवण ठेवतो॥ ५३८॥ ज्याप्रमाणे डोळ्यांत गेलेला खडा विरत नाही किंवा जखमेंत शस्त्र जिरत नाही, त्याप्रमाणे मागील अनेक जन्मामुळे निरनिराळ्या काळी झालेले दुःख जो विसरत नाही॥ ५३९॥

गूढार्थदीपिका—संसाराचा विचार केला असतां "सुख पाहता जवापाडे। दुःख पर्वताएवढे" ही संतवाणी अत्यंत सत्य असल्याचेच कोणालाही अनुभवाला येते; पण जीव सुखाकडे लक्ष देऊन झालेले दुःख विसरत जातो; म्हणूनच त्याची विषयासक्ति कायम राहूत तो परमेश्वरपराङ्मुख असतो. अर्थात् संसारात येणाऱ्या दुःखाची जितकी आठवण राहील तितकी ती परमार्थाला साधक होते, असा भाव.

म्हणे पूयगर्तें रिगाला। अहा मूत्ररंध्रें निघाला। कटा मियां चाटिला। कुचस्वेदु॥ ५४०॥
ऐसिऐसियापरी। जन्माचा कांटाळा धरी। म्हणे आतां तें मी न करीं। जेणें ऐसें होय॥ ५४१॥
हारीं उमचावया। जुंवारी जैसा ये डाया। कीं वैरा बापाचेया। पुत्र जचे॥ ५४२॥
मारिलियाचेनि रागें। पाठीचा जेवीं सूड मागे। तेणें आक्षेपें लागे। जन्मापाठीं॥ ५४३॥
परि जन्मती ते लाज। न सांडी जयाचें निज। संभाविता निस्तेज। न जिरे जेवीं॥ ५४४॥
आणि मृत्यु पुढा आहे। तोचि कल्पांतीं कां पाहे। परि आजीचि होये। सावधु जो॥ ५४५॥
माजीं अथांव म्हणता। थडियेची पांडुसुता। पोहणार आइता। कासेसि जेवीं॥ ५४६॥
कां न पवतां रणाचा ठावो। सांभाळिजे जैसा आवो। ओडण सुइजे घावो। न लागतांचि॥ ५४७॥
पाहेचा पेणा वाटवधा। तंव आजीचि होइजे सावधा। जीव न वचतां औषधा। धांविजे जेवीं॥ ५४८॥
येरवी ऐसें घडे। जो जळत घरीं सांपडे। तो मग न पवाडे। कुहा खणों॥ ५४९॥
चोंढिये पाथरू गेला। तैसेनि जो बुडाला। तो बोंबेहिसकट निमाला। कोण सांगें॥ ५५०॥
म्हणोनि समर्थेसि वैर। जया पडिलें हाडखाइर। तो जैसा आठही पाहर। परजूनि असे॥ ५५१॥
नातरी केळवली नोवरी। कां संन्यासी जयापरी। तैसा न मरतां जो करी। मृत्युसूचना॥ ५५२॥
पैं गा जो ययापरी। जन्मेंची जन्म निवारी। मरणें मृत्यु मारी। आपण उरे॥ ५५३॥

अर्थ—तो विचार करतो की, अरेरे! मी पुवाच्या खड्ड्यात शिरलो व मूत्रद्वाराने बाहेर निघालो, हायरे! देवा! स्तनपान करतांना आईचे स्तनाचे ठिकाणी असलेला घामहि मी चाटला॥ ५४०॥ असा नाना प्रकारच्या दुःखाचा विचार करून जन्माचा तो कंटाळा करतो आणि म्हणतो, आता मी जेणेकरून जन्मास येईन असे करणार नाही॥ ५४१॥ जसा जुवा खेळणारा, हरविलेले धन मिळविण्याकरिताच पुनः खेळायला येतो किंवा जसा मुलगा, पित्याचे वैर करणाऱ्याचा सूड घेण्याचा उद्योग करतो॥ ५४२॥ आपल्या वडील भावाला मारले असे पाहून त्याचा पाठचा भाऊ मारणाऱ्याचा राग येऊन त्याचा ज्याप्रमाणे सूड उगवू पाहतो, तितक्याच त्वेषाने जो जन्म नाहीसे करण्याच्या पाठीमागे लागतो॥ ५४३॥ जसे संभावित पुरुष, झालेला अपमान विसरत नाही, त्याप्रमाणे आपण जन्मरहित सच्चिदानंदरूप असतांना, जन्म व जन्माचे दुःख अनुभवितो, याची लाज वाटून ती, ज्याच्या मनांतून जात नाही॥ ५४४॥ आणि पुढे असलेला मृत्यु कल्पांती कां होईना, पण जो त्याविषयी आजच सावध होतो॥ ५४५॥ मध्ये पाणी अथांग आहे, असे कोणी सांगितल्यास, जसा, अर्जुना! थडीवर उभा असलेला पोहणारा बळकट कांस बांधतो॥ ५४६॥ किंवा ज्याप्रमाणे युद्धस्थानाचे ठिकाणी प्राप्त होण्याचे पूर्वीच आपले अवसान सांभाळले पाहिजे किंवा घाव लागण्यापूर्वीच ढाल पुढे केली पाहिजे॥ ५४७॥ उद्याच्या मुक्कामावर वाटमारा आहे असे कळल्यावर जसे आजच सावध व्हायला पाहिजे, प्राण जाण्याचे पूर्वीच औषधाकरिता वैद्याकडे धावून गेले पाहिजे॥ ५४८॥ नाहीतर, ज्याप्रमाणे जळत्या घरात सापडलेला मनुष्य विहीर खणून पाण्याने आग विझवू शकत नाही, त्याप्रमाणे होईल॥ ५४९॥ ज्याप्रमाणे अथांग डोहांत दगड पडला असता, तो झालेल्या आवाजासह तळाशी जातो, त्याप्रमाणे

जो संसारात बुडाला तोहि आपल्या ओरडण्यासह नाहीसा होतो. त्याची वार्ता सांगणारेहि कोणी राहत नाही॥ ५५०॥ म्हणून, ज्याचे समर्थ पुरुषाशी हाडवैर पडते तो, ज्याप्रमाणे आठहि प्रहर शस्त्र घेऊन सज्ज असतो॥ ५५१॥ किंवा जिचे लग्न ठरले अशी मुलगी लग्न होण्यापूर्वीच माहेरचे प्रेम सोडून पतीच्या घरचे प्रेम लावून घेते किंवा संन्यासी संन्यास घेण्यापूर्वीच संसाराची आशा सोडून राहतो, त्याप्रमाणे मरणापूर्वीच जो आपल्या मनाला मृत्यूची-म्हणजे देहाच्या वियोगाची-सूचना बाळगून असतो॥ ५५२॥ जो याप्रमाणे या जन्मानेच पुढील जन्माची वारी संपवितो आणि या मरणानेच पुढील मृत्यु नाहीसा करून आपण जन्ममरणरहित अशा सच्चिदानंद आत्मरूपाने उरतो॥ ५५३॥

गूढार्थदीपिका—मी सर्व देहादिकांहून निराळा केवळ सच्चिदानंदस्वरूप आहे, मला जन्म नाही, मृत्यु नाही, असा जेव्हा मनाचा नि:संदिग्ध निश्चय होतो, तेव्हा त्या निश्चयाला आत्मानुभव किंवा ज्ञान म्हणतात. आचार्यांनीहि ''तस्मात्सर्वदु:खविनिर्मुक्तैक चैतन्यात्मकोऽहमित्येष आत्मानुभव:'' (ब्र. सू. शां. भा. ४-१-३) या पंक्तीने असेच सांगितले आहे.

हे ज्ञान झाले असता मी देह आहे, देह जन्मतो म्हणजे मी जन्मतो, देह पडला म्हणजे मी मरतो इत्यादि कुकल्पना नाहीशा होऊन आपण सर्व दु:खरहित आहो, असा अनुभव येतो.

तया घरीं ज्ञानाचें। सांकडें नाहीं साचें। जया जन्ममृत्यूचें। निमाले शल्य॥ ५५४॥
आणि तयाचि परी जरा। न टेंकता शरीरा। तारुण्याचिया भरा-। माजीं देखे॥ ५५५॥
म्हणे आजिच्या अवसरीं। पुष्टि जे शरीरीं। ते होईल काचरी। वाळली जैसी॥ ५५६॥
निदैवाचें व्यवसाय। तैसे ठाकती हातपाय। अमंत्रि राज्याची परी होय। बळा यया॥ ५५७॥
फुलांचिया भोगा-। लागीं प्रेम टांगा। ते करेयाचा गुडघा। तैसें होईल॥ ५५८॥

अर्थ—जन्ममृत्युचे भीतिरूपी शल्य ज्याचे मनांतून नाहीसे झाले, त्याचे ठिकाणी आत्मज्ञानाची खरोखर उणीवच नाही॥ ५५४॥ आणि त्याप्रमाणेच जरा प्राप्त होण्यापूर्वी-म्हणजे शरीर बलिपलित होण्यापूर्वी-ऐन तारुण्याच्या भरांतच जो तिला (जरेला) पाहत असतो॥ ५५५॥ आणि म्हणतो की आज या क्षणी माझ्या शरीराचे ठिकाणी जी पुष्टि आहे तो जाऊन, ते (शरीर) वाळलेल्या काचरीप्रमाणे होईल॥ ५५६॥ माझे हातपाय भाग्यहीनाच्या उद्योगाप्रमाणे क्रियाहीन होऊन राहतील आणि मंत्री नसलेल्या राजाप्रमाणे माझ्या शरीरसामर्थ्याची स्थिति होईल॥ ५५७॥ (फूल-पुष्प-म्हणजे ऋतु.) स्वस्त्रियेला प्राप्त होणाऱ्या ऋतूचा भोग होण्याचे कामी उपयोगी म्हणून ज्या मांड्यावर प्रेम केले जाते त्या उंटाच्या गुडघ्याप्रमाणे ओबडधोबड, बेडौल होतील॥ ५५८॥

गूढार्थदीपिका—कोकणांत डोक्यांत फुले खोवतात व डोक्याला ''टांगे'' हा शब्द लावतात; या रूढीला धरून कित्येक विद्वानांनी ''फुलाच्या भोगाकरिता ज्या मस्तकावर प्रेम केले जाते, ते मस्तक उंटाच्या गुडघ्या सारखे होईल'' असा या ओवीचा अर्थ केला आहे. पण पुढे ''मस्तक आदरी शिरो-। भागी कंप'' या ओवींत म्हातारपणाच्या डोक्याचे वर्णन केले गेले आहे व ''टांगे'' याचे ''टांगा'' हें रूप कसे होऊ शकते, याची उपपत्ति लावता येत नाही.

पुन: सर्व लोक फुलांचा उपभोग घेण्याकरिता डोक्याचाच उपयोग करतात, असे नाही, तर निरनिराळ्या अवयवांचाहि उपयोग करतात. पण ''फुल'' म्हणजे ''ऋतु'' याचा मात्र उपयोग ''टांगा'' म्हणजे ''मांड्या'' याच्याच साहाय्याने घेता येतो हा सर्वांचा एकच अनुभव आहे. म्हणून या ओवीत माऊलींनी म्हातारपणांतील मांडीच्या दुर्दशेचे वर्णन केले आहे, असे आम्हाला वाटते.

कोणी फुलांचा संबंध नाकाशी असतो, मस्तकाशी असण्याचे कारण नाही, या कल्पनेने ''टांगा'' हे क्रियापद घेऊन अनुमानाने ''नाक हे उंटाच्या गुडघ्याप्रमाणे ओबडधोवड होईल'' असा अर्थ केला आहे. परंतु नाकाचे वर्णन पुढे ५६३ ओवीत आले असल्यामुळे द्विरुक्तिदोष येण्याचा संभव आहे. दुसरे वृद्धपणी नाकाचा आकार कितीहि विद्रूप झाला तरी त्यास उंटाच्या गुडघ्याची उपमा देता येणार नाही.

पुनरुक्तीचा दोष टाळावयाचा असल्यास ''टांगां'' या शब्दाचा ''मांडी'' हाच अंर्थ करावा लागतो व वरच्या ओवीत आलेल्या करचरणाच्या उल्लेखावरून पुढे ''मांडी'' या अवयवाचा उल्लेख येणेहि सुसंगतच होते, येथे उंटाच्या गुडघ्याची मांडीला उपमा देऊन म्हातारपणांतील ''मांडी'' या अयवयाचा बेडौलपणा दाखविला आहे.

वोढाळाचां खुरीं। आषाढ वातें बुरी। ते दशा मा या शिरीं। पावेल गा॥ ५५९॥
पद्मदळेंसी इसाळे। भांडताति जे हे डोळे। ते होती पडवळें। पिकलीं जैसीं॥ ५६०॥
भंवईचीं पडळें। वोमथती सिनसाळें। उरु कुहिजेल जळें। आंसुवांचेनि॥ ५६१॥
जैसें बाभुळीचें खोड। गिरबडूनी जाती सरड। तैसें पिचडीं तोंड। सरकटिजेल॥ ५६२॥
रांधवणी चुलीपुढें। पऱ्हे उम्हताती खातवडे। तैसींचि यें नाकाडें। बिडबिडती॥ ५६३॥
तांबूलें ओंठ रांऊ। हांसतां दांत दाऊं। सनागर मिरऊं। बोल जेणें॥ ५६४॥
तयाचि पाहे या तोंडा। येईल जलवंठाचा लोंढा। इया उमळती दाढा। दातांसी हिं॥ ५६५॥
कुळवाडी रिणें दाटलीं। कां वांकडिया ढोरें बैसलीं। तैसी नुठी कांही केली। जीभचि हे॥ ५६६॥
कुसळें कोरडीं। वारेनि जाती बरडीं। तैसी आपत्ति तोंडी। दाढियेसी॥ ५६७॥
आषाढीचेनि जळें। जैसीं झिरपती शैलाचीं मौळें। तैसें खाडीहूनि लाळे। पडती पूर॥ ५६८॥
वाचेसि अपवाडु। कानीं अनुघडु। पिंड गरुवा माकडु। होईल हा॥ ५६९॥
तृणाचें बुजवणें। आंदोळे वारेनुगुणें। तैसें येईल कांपणें। सर्वांगासी॥ ५७०॥
पायां पडती वेंगडी। हात वळती मुरकुंडी। बरवेपणा बागडी। नाचविजैल॥ ५७१॥
मळमूत्रद्वारें। होऊनि ठाकती खोंकरें। नवसियें होती इतरें। माझां निधनीं॥ ५७२॥

अर्थ—आषाढ महिन्यांतील वाऱ्याच्या योगाने मोकाट फिरणाऱ्या गुराच्या ठिकाणी बुरशी येऊन जसा पायाचा खुरी रोग होतो, तशी दशा माझ्या डोक्याची होईल॥ ५५९॥ कमळाच्या दळाशी स्पर्धेने भांडणारे हे डोळे पिकलेल्या पडवळाप्रमाणे होतील॥ ५६०॥ डोळ्यांवरील भुवयांचे पटल जुनाट सालीप्रमाणे लोंबू लागतील आणि डोळ्यांतील येणाऱ्या पाण्याच्या योगाने वक्षःस्थल कुजू लागेल॥ ५६१॥ ज्याप्रमाणे सरडे बाभळीच्या खोडाला, चालतांना त्याच्याच चिकाने बरबटून टाकतात, त्याप्रमाणे तोंड थुंकेने बरबटले जाईल॥ ५६२॥ ज्याप्रमाणे स्वयंपाकाच्या चुलीपुढील मोरींत टाकलेल्या घाणेरड्या पाण्याचे बुडबुडे उठतात, त्याप्रमाणे हें नाक शेंबडाने भरून जाईल॥ ५६३॥ ज्या तोंडाचे ओठ विड्याने तांबडे रंगवितो, हासतांना दांत दाखवितो व ज्याच्या योगाने सुंदर बोल बोलतो॥ ५६४॥ त्या या तोंडातून लाळेचा लोंढा येईल आणि दांतासहित दाढा पडतील॥ ५६५॥ शेतीवर अत्यंत कर्ज झाले असतां ती जशी उठविता येत नाही किंवा पावसाच्या झडीत कंबर लागलेली गुरे उठत नाहीत, त्याप्रमाणे जिभेंतून कांही केले तरी शब्द निघत नाहीत, अशी ती जड होईल॥ ५६६॥ वाळलेल्या गवताची कुसळें ज्याप्रमाणे उडून वरडावर जातात, तशीच आपत्ति तोंड व दाढी यांचे ठिकाणी येईल॥ ५६७॥ आषाढ महिन्यांतील पडलेल्या पावसाने, ज्याप्रमाणे पर्वताची शिखरे झिरपूं लागतात, त्याप्रमाणे तोंडाच्या खळगीतून लाळेचे पूर वाहूं लागतात॥ ५६८॥ वाणीला शब्द उच्चारण्याचें सामर्थ्य राहणार नाही, कानाला ऐकूं येणार नाही, असा हा शरीराचा पिंड वृद्ध माकडासारखा होईल॥ ५६९॥ पक्षी उडविण्याकरिता केलेले गवतांचे बुजगावणे जसे वाऱ्याने हालते, त्याप्रमाणे सर्वांगाला कंप सुरू होईल॥ ५७०॥ पाय वांकडेतिकडे पडतील, हाताच्या मुठी वळतील, याप्रमाणे सर्व सौंदर्याचे ऐवजी सोंगच नाचविले जाईल॥ ५७१॥ मळमूत्रांची द्वारे फुटक्या भांड्याप्रमाणे होऊन राहतील. इतर लोक मी मरावे म्हणून नवस करतील॥ ५७२॥

देखोनि थुंकील जगु। मरणाचा पडैल पांगु। सोयरियां उबगु। येईल माझा॥ ५७३॥
स्त्रियां म्हणती विवसी। बाळें जाती मूर्च्छेसी। किंबहुना चिळसी। पात्र होईन॥ ५७४॥
उभळीचा उजगरा। सेजारिया सोइलिया घरा। शिणवील म्हणती म्हातारा। बहुतांते हा॥ ५७५॥

ऐसी वार्धक्याची सूचणी। आपणिया तरुणपणीं। देखे मग मनीं। विटे जो गा॥ ५७६॥
म्हणे पाहे हें येईल। आणि आतांचें भोगितां जाईल। मग काय उरेल। हितालागीं॥ ५७७॥
म्हणोनि नाइकणें पावे। तंव आइकोनि घाली आघवें। पंगु न होतां जावें। तेथ जाय॥ ५७८॥
दृष्टी जंव आहे। तंव पाहावे तेतुलें पाहे। मूकत्वा आधीं वाचा वाहे। सुभाषितें॥ ५७९॥
हात होती खुळे। हें पुढील मोटकें कळे। आणि करूनि घाली सकळें। दानादिकें॥ ५८०॥
ऐसी दशा येईल पुढें। तैं मन होईल वेडें। तंव चिंतूनि ठेवी चोखडें। आत्मज्ञान॥ ५८१॥
जैसे चोर पाहे झोंबती। तंव आजीचि रुसिजे संपत्ती। कां झांकाझांकी वाती। न वचतां कीजे॥ ५८२॥
तैसें वार्धक्य यावें। मग जें वाया जावें। तें आतांचि आघवें। सवतें करी॥ ५८३॥
आतां मोडूनि ठेलीं दुर्गे। कां वळित धरिलें खगें। तेथ उपेक्षूनि जो रिगे। तो नागवला कीं॥ ५८४॥
तैसें वृद्धाप्य होये। आलेपण वायां जाये। जे तो शतवृद्ध आहे। नेणों कैंचा॥ ५८५॥
झाडिलींचि कोळें झाडी। तया न फळे जेवीं बोंडीं। जाहला अग्नि तरी राखोंडी। जाळील काई॥ ५८६॥
म्हणोनि वार्धक्याचेनि आठवें। वार्धक्या जो नागवे। तयाचां ठायीं जाणावें। ज्ञान आहे॥ ५८७॥

अर्थ—अशा स्थितीत मला पाहून लोक माझा धिक्कार करतील, मृत्यूची ददात पडेल-म्हणजे मृत्यु लवकर येणार नाही व सोयरेसंबंधी माझा कंटाळा करतील॥ ५७३॥ बायका मला पिशाच्च म्हणतील, मला पाहून मुलांना मूर्च्छा येईल, फार काय सांगायचे! सर्व प्रकारे लोकांच्या किळसेला मी पात्र होईन॥ ५७४॥ खोकल्याच्या उबळीमुळे शेजारच्या घरांतील निजलेल्या माणसांची झोपमोड झाली असता, हा म्हातारा पुष्कळांना त्रास देईल असे ते म्हणतील॥ ५७५॥ अशी ही म्हातारपणाची सूचना आपल्या तरुणपणातच जो मनात आणून त्याचा कंटाळा करतो॥ ५७६॥ आणि म्हणतो, भोग भोगतां आतांचे तारुण्य नाहीसे होऊन पुढे अशी म्हातारपणची स्थिति येईल; मग आपले आत्महित साधण्याकरिता आपल्या ठिकाणी काय सामर्थ्य राहील?॥ ५७७॥ म्हणून न ऐकण्याची स्थिति येण्यापूर्वीच ऐकण्याजोगे असे भगवंताचे गुणादिक ऐकून घेतो. पाय पंगू होत नाहीत तोच जाण्यायोग्य अशा तीर्थादिकांचे ठिकाणी जातो॥ ५७८॥ जोपर्यंत दृष्टि आहे तोपर्यंत पाहण्या जोगी अशी तीर्थक्षेत्रे व संत-भगवंताच्या मूर्ती पाहून घेतो व बोलणे बंद होण्यापूर्वी वाणीने भगवन्नाम स्तुतिस्तोत्रादि मंगल शब्दांचा अखंड उच्चार करीत राहतो॥ ५७९॥ पुढे हात खुळे होतील हे थोडेसे कळण्यापूर्वीच संपूर्ण दानादिक करून टाकतो॥ ५८०॥ पुढे अशी दशा येईल तेव्हा मनाची विचारशक्ति क्षीण होईल; म्हणून त्यापूर्वीच शुद्ध आत्मज्ञानाचा विचार करून ठेवतो॥ ५८१॥ ज्याप्रमाणे उद्या आपल्याला चोर झोंबतील तर आजच संपत्तीचा विनियोग करून टाकावा किंवा दिवा विझण्यापूर्वीच झाकापाकी करावी, त्याप्रमाणे म्हातारपण यावे आणि जे प्राप्त करून घ्यायाचे ते घेता येऊ नये, यापेक्षा आताच-म्हणजे म्हातारपण येण्यापूर्वीच-जो आपल्या ठिकाणी ते प्राप्त करून घेतो॥ ५८२-५८३॥ सोसाट्याच्या वाऱ्यामुळे जंगलातील रस्ते मोडले गेले किंवा पक्षीहि सरळ उडता येत नाही म्हणून परत येत आहेत, हे पाहत असता त्याची उपेक्षा करून जो बाहेर पडतो तो हिताला नागविणारच!॥ ५८४॥ त्याप्रमाणे म्हातारपण आले असता काही करता येत नाही म्हणून जन्मास आल्याचे सार्थक होत नाही, हे न जाणणारा शंभर वर्षाचा वयोवृद्ध कसा झाला, हे समजत नाही॥ ५८५॥ झाडलेल्या तिळाच्या झाडाच्या कोथळ्या झाडत्या असता ज्याप्रमाणे त्यांच्या बोंडातून कांहीहि तीळ पडत नाहीत किंवा अग्नि जाळणारा झाला तरी तो राखोंडी जाळील काय?॥ ५८६॥ म्हणून म्हातारपण येणार, याची आठवण ठेऊन म्हातारपणाने जो नागवला जात नाही किंवा वार्धक्याला जो नागवितो—म्हणजे त्याचा परिणाम होऊ देत नाही-त्याच्या ठिकाणी ज्ञान आहे, असे जाणावे॥ ५८७॥

तैसेचि नाना रोग। पडिघाती पुढां आंग। आरोग्याचे उपेग। करूनि घाली॥ ५८८॥
सापाचां तोंडीं। पडिली जे उंडी। ते लाऊनि सांडी। प्रबुद्ध जैसा॥ ५८९॥
तैसा वियोग जेणें दुःखें। विपत्ति शोक पोखे। तें स्नेह सांडूनि सुखें। उदास होय॥ ५९०॥

आणि जेणें जेणें कडे। दोष सूतील तोंडें। तयां कर्मरंध्रां गुंडे। नियमाचे दाटी॥ ५९१॥
ऐसऐसिया आइती। जयाची परी असती। तोचि तो ज्ञानसंपत्ती-। गोसावी गा॥ ५९२॥

अर्थ—त्याचप्रमाणे शरीराचे ठिकाणी पुढे येणारे नाना प्रकारचे रोग उद्भवले नाहीत, तोच आपल्या शरीराचे ठिकाणी असणाऱ्या आरोग्याचा परमार्थहित साधण्याकरिता उपयोग करून घेतो॥ ५८८॥ ज्याप्रमाणे शहाणा पुरुष सापाच्या तोंडात पडलेला पिठाचा गोळा त्यालाच खाऊ घालून त्याची आशा सोडतो॥ ५८९॥ त्याप्रमाणे ज्या प्रेमामुळे वियोग झाला असता दुःख, विपत्ति, शोक हे वाढतात ते प्रेम टाकून देऊन जो आनंदाने उदास होऊन राहतो॥ ५९०॥ आणि कर्माचरण करतांना ज्या ज्या व्यंगतारूपी छिद्रांच्या द्वारात दोष शिरत असतात, त्या त्या कर्माच्या व्यंगतारूपी छिद्रांत नियमाचे दगड जो भरीत असतो॥ ५९१॥ अर्जुना! अशा युक्तीने ज्याची वागणूक असते, तोच सर्व ज्ञानसंपत्तीचा स्वामी होऊन राहतो॥ ५९२॥

गूढार्थदीपिका—श्रीगुरुच्या कृपेने प्राप्त झालेले दृढ आत्मज्ञान, मनोनाश व वासनाक्षय या तीन गोष्टी ज्या अवस्थेत समुच्चयाने राहतात, ती जीवन्मुक्तस्थिति प्राप्त होईपर्यंत ज्ञानीपुरुषाने शरीराचा किंवा मनाचा विश्वास बाळगून अभ्यासात शिथिलता येऊं देऊ नये असा या वरील सर्व ओव्यांचा भाव आहे.

हाच भाव माउलीनी मागे "**तैसी प्राप्तेही पुरूषे। इंद्रिये लाळिली जरी कौतुके। तरी आक्रमिला जाण दुःखे। सांसारिके॥**" (ज्ञा. अ. २-३५०) या ओवीने व्यक्त केला आहे.

जीवन्मुक्त अवस्था दृढ झाल्यानंतर प्रारब्धानुसार विषयात रमण्यास हरकत नाही, असेहि पुनः माउलीनी मागे दुसऱ्या अध्यायातील "पार्था आणीकही एक। जरी नाशले हे रागद्वेष। तरी इंद्रिया विषयी बाधक। रमता नाही॥ ३३२॥" या ओवीने सांगितले आहे.

आतां आणीकही एक। लक्षण अलौकिक। सांगेन आइक। धनंजया॥ ५९३॥

अर्थ—त्याच प्रमाणे अर्जुना! ज्ञान्याचे आणखी एक असाधारण लक्षण सांगतो, ऐक॥ ५१३॥

असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु। नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु॥ ९॥

अर्थ—ज्याच्या ठिकाणी सामान्यतः विषयाचे प्रेम नाही व पुत्र, स्त्री घर इत्यादिकांविषयी विशेष प्रेम नाही जो प्रिय वस्तूची प्राप्ति झाली असता हर्ष न वाटू देता किंवा अप्रिय वस्तूची प्राप्ति झाली असता खिन्न न होता, सदासर्वदा हर्षामर्षरहित चित्त ठेवतो॥ ९॥

तरि जो या देहावरी। उदासु ऐसिया परी। उखिता जैसा बिढारीं। बैसविला आहे॥ ५९४॥
कां झाडाचि साउली। वाटे जातां मिनली। घरावरी तेतुली। आस्था नाहीं॥ ५९५॥
साउली सरिसीच असे। परी असे हें नेणिजे जैसें। स्त्रियेचें तैसें। लोलुप्य नाहीं॥ ५९६॥
आणि प्रजा जे जाली। तियें वस्ती करे आलीं। गोरुवे बैसलीं। रुखातळीं॥ ५९७॥
जो संपत्तीमाजी असतां। ऐसा गमे पांडुसुता। जैसा कां वाटे जातां। साक्षी ठेविला॥ ५९८॥
किंबहुना पुंसा। पांजरियामाजीं जैसा। वेदाज्ञेसी तैसा। बिहूनि असे॥ ५९९॥
एऱ्हवीं दारागृहपुत्रीं। नाहीं जया मैत्री। तो जाण पां धात्री। ज्ञानासि गा॥ ६००॥
महासिंधू जैसे। ग्रीष्मवर्षी सरिसे। इष्टानिष्ट तैसें। जयाच्या ठायीं॥ ६०१॥
कां तीन्ही काळ होतां। त्रिधा नव्हे सविता। तैसा सुखदुःखीं चित्ता। भेदु नाहीं॥ ६०२॥
जेथ नभाचेनि पाडें। समत्वा न्यून न पडे। तेथ ज्ञान रोकडें। वोळख तूं॥ ६०३॥

अर्थ—धर्मशाळा इत्यादि वस्तिस्थानात जसा वाटसरु असतो, त्याप्रमाणे जो या देहाचे ठिकाणी उदासीनाप्रमाणे असतो॥ ५९४॥ किंवा रस्त्याने जातांना अनायासे मिळणाऱ्या झाडाच्या सावलीची जशी कोणी आस्था बाळगित नाही, त्याप्रमाणे जो घराच्या ठिकाणी आस्था बाळगित नाही॥ ५९५॥ मनुष्याची सावली सारखी त्याच्या बरोबर राहते, पण हे त्याच्या लक्षातहि नसते, त्याप्रमाणे ज्याच्या मनात स्त्रियेविषयी आसक्ति नसते॥ ५९६॥ आणि आपल्या

झालेल्या संततीला जो धर्मशाळेत थोडावेळ थांबण्याकरिता आलेले वाटसरु किंवा झाडाखाली सावलीत बसणारी गुरे समजतो॥ ५९७॥ जो संपत्तीमध्ये असतांना, हा मार्गाने जाणारा वाटसरु असून त्याला घटकाभर संपत्तीकडे पाहण्याकरिता साक्षी ठेविला आहे, असा वाटतो॥ ५९८॥ फार काय सांगावे! पिंजऱ्यामध्ये राघू जसा राहतो, त्याप्रमाणे जो वेदाज्ञेला भिऊन वागतो-म्हणजे वेदाज्ञेच्या परतंत्र वागतो॥ ५९९ ॥ सारांश, स्त्री, घर, पुत्र यांच्याविषयी ज्याच्या मनात आसक्ति नाही, तो पुरुष ज्ञानाची जन्मदात्री आई होय-म्हणजे ज्ञान त्याच्याच ठिकाणी जन्म घेते-असे समज॥ ६०० ॥ महासमुद्र जसे ग्रीष्मऋतूत व वर्षाऋतूत सारखेच असतात, त्याप्रमाणे ज्याच्या मनाचे ठिकाणी प्रिय व अप्रिय सारखेच वाटतात॥ ६०१ ॥ किंवा ज्या प्रमाणे सूर्य, सकाळ-दुपार-संध्याकाळ या तिन्ही काळी एकसारखाच असतो, तीन प्रकारचा होत नाही, त्याप्रमाणे सुखदु:खाच्या वेळी ज्याच्या चित्तात हे अनुकूल, हे प्रतिकूल असा विषमभाव उत्पन्न होत नाही॥ ६०२ ॥ आकाशाच्या समतेशी तुलना केली असता ज्याच्या चित्ताची समता कधी कमी भासत नाही किंवा आकाशाच्या बरोबरीने ज्याच्या चित्ताची समता अखंड असते, त्याच्या ठिकाणीच निर्भेळ ज्ञान आहे, असे तू समज॥ ६०३ ॥

मयि चाऽनन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी । विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥

अर्थ—माझ्यावाचून चित्ताला दुसरे काहीच गोड लागणार नाही, अशाप्रमाणे एका माझ्या सगुणस्वरूपाचे ठिकाणीच निष्काम-म्हणजे स्वाभाविक-प्रेम करणे, पवित्र व निर्मळ अशा एकान्त देशात राहणे आणि जनसमुदायाचा कंटाळा करणे॥ १० ॥

आणि मीवांचूनी कांहीं। आणीक गोमटें नाहीं। ऐसा निश्चयोचि तिहीं। जयाचां केला॥ ६०४॥
शरीर वाचा मानस। पियालीं कृतनिश्चयाचा कोश। एक मीवांचूनि वास। न पाहती आन॥ ६०५ ॥
किंबहुना निकट निज। जयाचें जाहलें मज। तेणें आपणयां आम्हां सेज। एकी केली॥ ६०६ ॥
रिगतां वल्लभापुढें। नाहीं आंगीं जीवीं सांकडें। तिये कांतेचेनि पाडें। एकसरला जो॥ ६०७॥
मिळोनि मिळतचि असे। समुद्रीं गंगाजळ जैसें। मी होऊनि मज तैसें। सर्वस्वें भजती॥ ६०८ ॥

अर्थ—एका माझ्या सगुणस्वरूपावाचून दुसरे कोठेच सुख नाही, असा कायावाचामनाने माझ्या सगुणस्वरूपाविषयी ज्याने निश्चय केला॥ ६०४॥ माझ्या सगुणरूपावाचून दृष्टीने दुसरी वस्तुच पाहणार नाही, असा दृढ निश्चय करण्याची ज्याच्या शरीर, वाणी, मन ह्यांनी शपथ घेतली॥ ६०५ ॥ फार काय सांगायचे! ज्याचे आपलेपण माझ्या अत्यंत जवळ झाले, त्याने माझी व आपली एकच शय्या केली (असा भक्त माझ्यापासून क्षणभरहि वेगळा नसतो, असा अर्थ)॥ ६०६ ॥ पतिसमागमांत मिळतांना ज्याप्रमाणे स्त्रियेच्या मनात किंवा शरीराचे ठिकाणी यत्किंचितहि संकोच उत्पन्न होत नाही, त्या स्त्रियेच्या तितक्याच प्रेमाने जो माझ्याशी समरस झाला॥ ६०७॥ ज्याप्रमाणे गंगेचे पाणी समुद्रास मिळाल्यानंतरहि अखंड पुन: मिळतच राहते, त्याप्रमाणे जे मद्रूप होऊन सर्व भावाने माझे प्रेम करीतच राहतात॥ ६०८ ॥

गूढार्थदीपिका—माउलीनी येथे ज्ञानोत्तर म्हणजे आत्मज्ञानाने जीवब्रह्म ऐक्य झाल्यावरहि काही एका निमित्तावाचून देखील ज्ञान्याचे सगुण भगवंताचे ठिकाणी स्वाभाविक प्रेम असते, हे दाखविले आहे.

"शिवो भूत्वा शिवं यजेत्" शिव होऊन शिवाचे भजन करावे. असे श्रुतीनीहि ज्ञान्याचे स्वाभाविक भजन सांगितले आहे. "जेवि आपुले सभाग्यपण। आपणा सन्मुख होये जाण। तरी काय होय भाग्यहीन। की दुणावे सुख॥ ५७३ ॥ एवं नम्य आणि नमन। भज्य आणि भजन। हा भेद काही नसून। प्रवाह न खंडे॥ ५७४॥ उपरोधे प्रवाह खंडिता। भेदुचि दुणावे पुरता। तेथे अनुभवाची वार्ता। बोलोचि नये॥ ५७५ ॥" (शिवकल्याणकृत-अमृतानुभव विवरण-प्र. १)

आरशात मुख पाहून आपले सौभाग्य आपल्याला दृग्गोचर झाले असता स्त्रियेला मी भाग्यहीन आहे, असे वाटून दु:ख होते की तिच्या सौभाग्यसुखात भर पडते? त्याप्रमाणेच अद्वैतज्ञानानंतर होणाऱ्या भक्तीत नम्य व नमन,

भज्य व भजन, असा काही भेद न भासता भगवंताचे ठिकाणी अखंड प्रेमप्रवाह वाहत असतो. हट्टाने हा प्रेमप्रवाह बंद केला असता, नाहीसा झालेला भेद दुप्पट वाढतो; म्हणून जेथे सगुणाची प्रेमभक्ति न करण्याचा हट्ट दिसून येतो, तेथे आत्मानुभव नाही, हे पक्के जाणावे; असे अमृतानुभवावरील प्रथम अध्यायातील "अहो ऐक्याचे मुदल न ढळे" (ओ. ५९) या ओवीवर टीका करताना शिवकल्याणस्वामीनी म्हटले आहे.

मी होऊनि मज तैसे। सर्वस्वे भजती-

निर्गुण स्वरूपाशी ऐक्य पावून सगुणस्वरूपाचे भजन करणे व पुढे सगुणस्वरूपाच्या ध्यानाने चित्त भगवत्स्वरूप झाल्यावरहि बाहेर शरीर, मन, वाणीद्वारा सर्व भावाने भगवंताचे प्रेम होत राहणे, असे दोन्ही प्रकार येथे माउलीनी "मी होऊनि मज तैसे। सर्वस्वे भजती" या चरणांनी सूचित केले आहे.

सूर्याच्या होण्या होईजे। कां सूर्यासवेंचि जाईजे। हें विकलेपण साजे। प्रभेसी जेवीं॥ ६०९॥

अर्थ—सूर्याच्या उदयाबरोबर सूर्याची प्रभा फाकते व सूर्य अस्तास गेला असता ती नाहीशी होते, असे सर्वस्वी सूर्याच्या स्वाधीन होऊन राहणे जसे प्रभेला शोभते॥ ६०९॥

गूढार्थदीपिका—ज्ञानीभक्त असे सूर्याच्या प्रभेप्रमाणेच सर्वस्वी भगवद् अधीन होऊन राहतात.

पैं पाणियाचिये भूमिके। पाणी तळपे कौतुकें। ते लहरी म्हणती लौकिकें। येऱ्हवीं तें पाणी॥ ६१०॥
जो अनन्य यापरी। मी जाहलाहि मातें वरी। तोचि तो मूर्तधारी। ज्ञान पैं गा॥ ६११॥

अर्थ—पाण्यावरच पाणी कौतुकाने खेळू लागले असता त्याला अज्ञानी लोक लहरी म्हणतात, पण ते खरोखर पाणीच असते॥ ६१०॥ याप्रमाणे अनन्य म्हणजे इतर देवतांचा आश्रय सोडून व एक माझाच आश्रय करून जो मद्रूप झाला व माझे भजन करतो, अर्जुना! तो म्हणजे केवळ ज्ञानच मूर्तरूपाने प्रगट झाले, असे समज॥ ६११॥

गूढार्थदीपिका—जो अनन्य यापरी। मी जाहलाही माते वरी-

भक्तिरहित ज्ञान्याचा देह पांचभौतिक राहतो; पण ज्ञानीभक्त साकार सच्चिदानंद विग्रहधारी असतात. "ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनी" भक्तीनेच देह सच्चिदानंदस्वरूप होतो, असे तुकाराम महाराजांनी म्हटले असून "पावावया उपासना। ब्रह्मस्थानी प्रस्थान" खरी भक्ति किंवा निष्काम प्रेमरूप भक्ति प्राप्त होण्याकरिता ब्रह्मज्ञान करून घ्यावयाचे असते. "भक्तिभाग्य प्रेमापुरुषार्थ। हाचि ब्रह्मीचा मुख्य अर्थ" ब्रह्मज्ञानप्राप्तीचा मुख्य अर्थ भक्तिच आहे, इत्यादि वचनांनी त्यांनी ब्रह्मज्ञानाचा शेवट भक्तीतच केला आहे.

आणि तीर्थें धौतें तटें। तपोवनें चोखटें। आवडती कपाटें। वसवूं जया॥ ६१२॥
शैलकक्षांचीं कुहरें। जलाशयपरिसरें। अधिष्ठी जो आदरें। नगरा न ये॥ ६१३॥
बहु एकांतावरी प्रीति। जया जनपदाची खंती। जाण मनुष्याकारें मूर्ती। ज्ञानाची तो॥ ६१४॥
आणिकहि पुढती। चिन्हें गा सुमती। ज्ञानाचिये निरुती-। लागीं सांगों॥ ६१५॥

अर्थ—त्याचप्रमाणे पवित्र नद्यांचे काठी किंवा तीर्थात किंवा उत्तम तपोवनात किंवा एकान्तात ज्यांना राहणे आवडते॥ ६१२॥ दोन पर्वतामधील दऱ्या किंवा जलाशयाच्या आसपासचा प्रदेश यांचा ज्याला आदर वाटतो व जो तेथे राहतो, जो नगरात येत नाही॥ ६१३॥ एकान्तावर ज्याचे अत्यंत प्रेम असून ज्याला लोकवस्तीची खंती वाटते, त्याचा मनुष्याकार म्हणजे ज्ञानाची मूर्ति होय, असे समज॥ ६१४॥ हे शुद्धबुद्धि अर्जुना! ज्ञानाचे स्वरूप स्पष्ट होण्याकरिता पुन: आणखी काही लक्षणे सांगतो, ऐक॥ ६१५॥

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम्। एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा॥ ११॥

अर्थ—आत्मस्वरूपाच्या ज्ञानाचे नित्यत्व म्हणजे अविनाशित्व जाणणे व झालेल्या आत्मज्ञानाने परमात्मसाक्षात्कार होणे, हे सर्व ज्ञान म्हटले जात असून याहून जे विपरीत ते अज्ञान होय॥ ११॥

तरी परमात्मा ऐसें। जें एक वस्तु असे। तें जया दिसे। ज्ञानास्तव॥ ६१६॥
तें एकवांचूनि आनें। जिये भवस्वर्गादि ज्ञानें। तें अज्ञान ऐसा मनें। निश्चय केला॥ ६१७॥

स्वर्गा जाणें हें सांडी। भवविषयीं कान झाडी। दे अध्यात्मज्ञानीं बुडी। सद्भावाची॥ ६१८॥
भंगलिये वाटे। शोधूनियां अव्हांटे। निघिजे जेवीं नीटें। राजपंथें॥ ६१९॥
तैसें ज्ञानजाता करी। आघवेंचि एकीकडे सारी। मग मन बुद्धि मोहरी। अध्यात्मज्ञानीं॥ ६२०॥
म्हणें एक हेंचि आथी। येर जाणणें ते भ्रांती। ऐसी निकरेंसी मती। मेरु होय॥ ६२१॥
एवं निश्चय जयाचा। द्वारीं अध्यात्मज्ञानाचां। ध्रुव देवो गगनींचा। तैसा राहिला॥ ६२२॥
तयाचिया ठायीं ज्ञान। या बोला नाही आन। जे ज्ञानीं बैसलें मन। तेव्हांचि तें तो॥ ६२३॥
तरि बैसलेपणें जें होये। तें बैसतांचि बोलें न होये। तरि ज्ञाना तया आहे। सरिसा पाड॥ ६२४॥

अर्थ—परमात्मा म्हणून जी एक वस्तु शास्त्राने सांगितली आहे, ती वस्तु, ज्या ज्ञानामुळे अनुभवाला येते॥ ६१६॥ त्या एका ज्ञानावाचून इतर संसार—स्वर्ग इत्यादिविषयक जी अनेक प्रकारची ज्ञाने आहेत, ते सर्व अज्ञान होय, असा ज्याच्या मनाने दृढ निश्चय केला॥ ६१७॥ आणि म्हणून जो स्वर्गप्राप्तीचा काम्यकर्मरूप प्रयत्न सोडून देतो व हे संसारविषयक ज्ञान ऐकणे पुरे झाले, असे म्हणतो. हे अध्यात्मज्ञानच खरे व सर्व दु:खातून पार करणारे ज्ञान होय, अशी अध्यात्मज्ञानाचे ठिकाणी दृढ श्रद्धा ठेवतो॥ ६१८॥ निरनिराळे रस्ते फुटलेल्या वाटेवर, आडमार्ग शोधून ज्याप्रमाणे सरळ अशा राजमार्गाने जायचे असते॥ ६१९॥ त्याप्रमाणे जो ज्ञानाचे ठिकाणीहि करतो. इतर सर्व ज्ञाने बाजूला सारून एका आत्मज्ञानाकडे मन-बुद्धि लावतो॥ ६२०॥ आत्मज्ञान हेच खरे ज्ञान असून त्यावाचून इतर सर्व ज्ञान भ्रमज्ञान आहे, अशी ज्याची शेवटी मेरुप्रमाणे दृढ अचल बुद्धि होऊन राहते॥ ६२१॥ याप्रमाणे अध्यात्मज्ञानाच्या सामर्थ्याचे ठिकाणी आकाशातील ध्रुवदेवाप्रमाणे ज्याचा दृढ़ निश्चय झाला॥ ६२२॥ त्याच्या ठिकाणीच ज्ञान आहे, हे म्हणणे अन्यथा नाही; कारण जेव्हा त्याचे मन ज्ञानांचे ठिकाणी स्थिर झाले, तेव्हाच तो ज्ञानस्वरूप झाला॥ ६२३॥ ज्ञान होणे, हे ज्ञानलक्षणाचे ठिकाणी मनाचे स्थिर होण्यावर अवलंबून आहे; म्हणून ज्ञानलक्षणाचे ठिकाणी मन स्थिर झाले असताच ज्ञान होते, नुसत्या शब्दाने होत नाही. म्हणूनच ज्ञान आणि ज्ञानी हे दोघेहि एका योग्यतेचेच आहेत॥ ६२४॥

गूढार्थदीपिका—"तत्त्वमसि" इत्यादि महावाक्यांच्या उपदेशाने आत्मज्ञान होऊन पुरुष मुक्त होतो, अशी श्रुति असून "दृश्यते त्वग्रया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभि:" अत्यंत शुद्ध झालेल्या चित्ताने आत्मसाक्षात्कार होतो, असेहि श्रुतीने सांगितले आहे.

या दोन श्रुतींचा विचार केला असता असे स्पष्ट दिसते की, ब्रह्मज्ञान होण्याकरिता शब्द व शुद्धबुद्धि या दोघांच्याहि सहकार्याची आवश्यकता आहे.

शब्दाने ज्ञान होत असले तरी ते परोक्ष राहते. त्याने संसारनिवृत्ति होत नाही. संसारनिवृत्ति अपरोक्ष आत्मसाक्षात्काराने होते आणि अपरोक्ष साक्षात्काराकरिता शुद्ध झालेल्या बुद्धिवृत्तीने आत्मा ग्रहण करण्याची आवश्यकता असते. बुद्धि शुद्ध होणे हे तिच्या ज्ञानलक्षणाचे ठिकाणी अचल स्थिर होण्यावर अवलंबून आहे. याप्रमाणे ब्रह्मज्ञान संपादन करण्याचे कार्य नुसत्या 'तत्त्वमसि' महावाक्यादि शब्दाने होत नसून अद्वैतज्ञानाची जी लक्षणे सांगितली आहेत ती चित्तात बाणली पाहिजेत किंवा त्या लक्षणाचे ठिकाणी चित्त दृढ बसले पाहिजे, असे येथे माउलींनी सांगितले आहे.

आणि तत्त्वज्ञान निर्मळ। फळे जें एक फळ। तें ज्ञेयहीवरी सरळ। दिठी हे जया॥ ६२५॥

अर्थ—आणि असे हे शुद्ध तत्त्वज्ञान, ज्या एका ब्रह्मरूप फळांनी, फलद्रूप होते, त्या ज्ञेय परब्रह्मापर्यंत सरळजाणारी दृष्टि ज्याला प्राप्त झाली आहे॥ ६२५॥

गूढार्थदीपिका—येथे परब्रह्माचे ठिकाणी बुद्धिवृत्तिची व्याप्ति सांगितली आहे.

एऱ्हवीं बोधा आलेनि ज्ञानें। जरी ज्ञेय न दिसेचि मनें। तरी ज्ञानलाभही न मनें। जाहला सांता॥ ६२६॥
आंधळेनि हातीं दिवा। घेऊनि काय करावा। तैसा ज्ञाननिश्चयो आघवा। वायांचि जाय॥ ६२७॥

जरि ज्ञानाचेनि प्रकाशें। परतत्त्वीं दिठी न पैसे। ते स्फूर्तीचि असे। अंध होउनी॥ ६२८॥

अर्थ—नाहीतर समजलेल्या ज्ञानाने जर ज्ञेय परब्रह्माचा, मनोवृत्तिद्वारा साक्षात्कार होणार नाही, तर तसा झालेला ज्ञानलाभ संतांना संमत नाही किंवा अविद्येची निवृत्ति करण्यास समर्थ होत नाही॥ ६२६॥ आंधळ्याने हाती दिवा घेतला असता त्याला त्याचा काय उपयोग? त्याप्रमाणे ब्रह्माचा वृत्तीने अनुभव आल्यावाचून 'मी ब्रह्मरूप आहे' हा नुसता ज्ञाननिश्चय अज्ञान निवृत्त करण्याला निरुपयोगी असतो॥ ६२७॥ झालेल्या ज्ञानप्रकाशाने संपन्न होऊन जर वृत्तिरूपदृष्टि प्रकृतीच्या पलीकडे असलेल्या परब्रह्मतत्त्वापर्यंत पोहोचू शकली नाही, तर ती झालेली ज्ञानस्फूर्ति आंधळी आहे असे म्हटले पाहिजे॥ ६२८॥

गूढार्थदीपिका—अपरोक्ष साक्षात्कारावाचून केवळ शब्दज्ञान व्यर्थ आहे हे येथे माउलीनी दाखविले आहे.

म्हणोनि ज्ञान जेतुलें दावी। तेतुली ही वस्तुचि आघवी। ते देखे ऐसी व्हावी। बुद्धि चोख॥ ६२९॥

अर्थ—म्हणून आत्मविचाराने जे जे कळते ते ते ब्रह्मरूपच राहत असल्यामुळे परब्रह्माचाच अनुभव येईल अशी बुद्धिवृत्ति शुद्ध असायला पाहिजे॥ ६२९॥

गूढार्थदीपिका—बुद्धि रजस्तमोगुणापासून नि:शेष मुक्त होऊन व शुद्ध सात्त्विक होऊन राहिल्यावांचून आत्मसाक्षात्कार होत नाही, हे येथे माऊलींनी दाखविले आहे.

यालागीं ज्ञानें निर्दोखें। दाविलें ज्ञेय देखे। तैसेनि उन्मेखें। आथिला जो॥ ६३०॥
जेवढी ज्ञानाची वृद्धी। तेवढीच जयाची बुद्धी। तो ज्ञान हे शब्दीं। करणें न लगे॥ ६३१॥
पै ज्ञानाचिये प्रभेसवें। जयाची मती ज्ञेयीं पावे। तो हातधरणिया शिवे। परतत्त्वातें॥ ६३२॥

अर्थ—म्हणून शुद्ध ज्ञानाने दाखविलेले ज्ञेयरूप परब्रह्म पाहता येईल, अशा ज्ञानदृष्टीने जो संपन्न झाला आहे॥ ६३०॥ जेवढ़ी ज्ञानाची अमर्याद वाढ झालेली असते, तेवढीच ज्याची बुद्धिहि अमर्याद वाढली तो ज्ञानरूपच झाला, हे शब्दाने सांगणे नको॥ ६३१॥ ज्ञानाच्या प्रकाशाबरोबरच ज्याची बुद्धि ज्ञेय अशा परब्रह्माचे ठिकाणी प्राप्त होते, तो हातधरणी मापाऱ्याप्रमाणे परतत्त्वाला स्पर्श करतो॥ ६३२॥

गूढार्थदीपिका—मापात धान्य भरताना मापारी, मापाच्या वरच्या बाजूला तोंडापाशी डावा हात धरून मापापेक्षा सहजच थोडेसे जास्त धान्य घेत असतो, त्याचप्रमाणे ज्याची बुद्धि ज्ञानाच्या प्रकाशाबरोबर ज्ञेयापर्यंत पोहोचली तो सहजच त्याबरोबर आपल्या बुद्धीने परतत्त्वाला ग्रहण करतो, असा अर्थ.

तोचि ज्ञान हें बोलतां। विस्मयो कवण पांडुसुता। काय सवितयातें सविता। म्हणावें असे॥ ६३३॥
तंव श्रोते म्हणितले असो। न सांगे तयाचा अतिसो। ग्रंथोक्ती तेथ आडसो। घालिसी कां हा॥ ६३४॥
तुझा हाचि आम्हां थोरु। वक्तृत्वाचा पाहुणेरु। जे ज्ञानविषो फारु। निरोपिला॥ ६३५॥
रसु होआवा अतिमात्रु। हा घेतासि कविमंत्रु। तरि अवंतूनि शत्रु। करितोसि कां गा॥ ६३६॥
ठायीं बैसतिये वेळे। जे रससोय घेऊनि पळे। तियेचा येरु वोडव मिळे। कोणा अर्था॥ ६३७॥
आघवांचि विषयीं भादी। परि सांजवणी टेंकों नेदी। ते खुरतोडी नुसधी। पोषी कवण॥ ६३८॥
तैसी ज्ञानीं मती न फांके। येर जल्पती नेणों केतुकें। परि तें असो निकें। केलें तुवां॥ ६३९॥
जया ज्ञानलेशोद्देशें। किजती योगादि सायासें। ते धणीचें आणि तुझिया ऐसें। निरूपण॥ ६४०॥
अमृताची सांतवांकुडी। लागो कां अनुघडी। सुखाचा दिसी कोडी। गणिजतु कां॥ ६४१॥
पूर्णचंद्रेसीं राती। युग एक असो न पाहती। तरि काय पाहत आहाती। चकोरें ते॥ ६४२॥
तैसें ज्ञानाचें बोलणें। आणि येणें रसाळपणें। आतां पुरे कोण म्हणे। आकर्णितां॥ ६४३॥
आणि सभाग्यु पाहुणा ये। सुभगाचि वाढती होये। तैं सरों नेणें रससोये। ऐसें आथी॥ ६४४॥
तैसा जाहला प्रसंगु। जे ज्ञानीं आम्हांसि लागु। आणि तुजही अनुरागु। आथि येथ॥ ६४५॥
म्हणोनि यया व्याख्याना-। पासीं से आली चौगुणा। ना म्हणो नये देखणा। होसी ज्ञानी॥ ६४६॥

तरि आतां ययावरी। प्रज्ञेचा माजु धरीं। पदें साच करीं। निरूपणीं॥ ६४७॥

अर्थ—अशा रीतीने ज्ञानाने परब्रह्माचे आकलन करणारा, ज्ञानस्वरूपच होय, असे कोणी म्हटल्यास, हे अर्जुना! त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काय आहे? हा केवळ सूर्यच आहे, असे सूर्याला म्हणावे लागते?॥ ६३३॥ तेव्हा श्रोते म्हणाले, हे असू दे. ज्ञानीपुरुषाचेच वर्णन करीत बसू नकोस. ग्रंथातील वचनांचा अर्थ सांगत असतांना त्याला खोळंबा का करतोस?॥ ६३४॥ आपण ज्ञानाच्या स्वरूपाचे सविस्तर वर्णन केले, हा आपल्या वक्तृत्वाचा आम्हाला फार मोठा पाहुणचार झाला॥ ६३५॥ निरूपणात रसाचे खूप पोषण करावे, हा काव्य करणाऱ्यांचा मंत्रोपदेश ग्रहण करून व त्याचे सेवन करण्याकरिता आम्हाला आमंत्रण देऊन आता आमच्याशी शत्रुसारखे का (वर्तन) करतोस?॥ ६३६॥ आणि पात्रावर भोजन करण्यास बसण्याचे वेळीच जी बाई शिजवलेले अन्न घेऊन पळते, तिचा अवांतर आदरसत्कार काय कामाचा?॥ ६३७॥ इतर सर्व बाबतीत चांगली आहे; पण दोहावयास बसले असता जिला लाथा झाडण्याची खोड आहे अशी लाथाळ गाय नुसती कोण पोसणार?॥ ६३८॥ त्याप्रमाणे ज्ञानाचे ठिकाणी बुद्धीचा प्रवेश न होता कित्येक अवांतर इतके बोलतात की, सांगता येत नाही; पण ते असो. तू मात्र फार उत्तम केलेस॥ ६३९॥ ज्या आत्मज्ञानाचा अंश तरी प्राप्त व्हावा, म्हणून साधक योगादिकांचे कष्ट सहन करतात, त्या ज्ञानाचे निरूपण तृप्त करून सोडणारे व तुलाच करता येईल असे (गोड) झाले आहे॥ ६४०॥ अमृतवर्षावाची सात दिवस सतत झड लागो किंवा सुखाच्या दिवसांची कोटीवरी गणना होवो, तरी कोणाला कंटाळा येईल?॥ ६४१॥ पाहाट न होता पूर्णचंद्रासह असलेली पोर्णिमेची रात्र एक युगपर्यंत सारखी टिकली, तरी ते चकोर कंटाळून तिला पाहणार नाहीत काय?॥ ६४२॥ त्याप्रमाणे हे आत्मज्ञानाचे सविस्तर निरूपण आणि तेहि अशा रसाळ भाषेत होत असलेले ऐकत असता "आता पुरे" असे कोण म्हणेल?॥ ६४३॥ आणि घरी भाग्यवंत पाहुणा यावा व त्याला जेवायला वाढणारी स्त्रीहि सौंदर्यादि सौभाग्याने युक्त अशी असावी व केलेला स्वयंपाक न संपणारा असा भरपूर असावा, त्याप्रमाणेच हा प्रसंग झाला आहे; कारण ज्ञानाचे ठिकाणी आमचे मन जडले असून तुझेहि तेथेच अत्यंत प्रेम आहे॥ ६४४-६४५॥ म्हणून या तुझ्या व्याख्यानामुळे आमची ज्ञानस्मृति चौपट दृढ झाली आहे. तुला पूर्ण आत्मज्ञान प्राप्त झाले नाही असे तुझ्याविषयी कोणालाहि म्हणता येणार नाही. तू पूर्ण ज्ञानी आहेस॥ ६४६॥ आता पुढे, आपल्या शुद्धबुद्धीच्या स्फूर्तीचा आश्रय करून निरूपणाचे द्वारा भगवंताच्या वचनातील पदांचा खरा अर्थ सांग॥ ६४७॥

गूढार्थदीपिका—सृष्टीतील सर्व कार्यरूप पदार्थ त्रिगुणात्मक असल्यामुळे मनुष्याची बुद्धिहि त्रिगुणात्मकच आहे. त्या बुद्धीच्या द्वाराच मनुष्याला ज्ञान होते व तो दुसऱ्याला ते ज्ञान सांगतो; पण रजोगुणी बुद्धीचा मनुष्य आपल्या बुद्धीचा अभिमान बाळगत असल्यामुळे त्याच्या बुद्धीला यथार्थ काय व अयथार्थ काय याचा विवेक होत नाही आणि तमोगुणी बुद्धि अविवेकयुक्तच असल्यामुळे तिला खोटेच खरे वाटते. रजस्तमोगुणरहित अशा शुद्ध सात्विक बुद्धीला मात्र खरे समजते, असे भगवंतानी पुढे अठराव्या अध्यायात सांगितले आहे.

ज्ञानीभक्त अशा सत्पुरुषाची बुद्धि अखंड शुद्ध सात्विकच असते व ती एका परमेश्वरालाच विषय करीत असल्यामुळे ती अत्यंत स्वच्छ व निर्मळ असते. "यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ। तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः॥" (श्वे. उ.) ज्याची भगवंताचे ठिकाणी व श्रीगुरुचे ठिकाणी परम प्रेमरूप भक्ति आहे त्याच्याच बुद्धीत श्रौतपदातील अर्थ प्रकाशित होतात, असा श्रौतसिद्धान्त या श्रुतीत सांगितला आहे. या सिद्धान्ताला धरूनच श्रीगुरुनिवृत्तिनाथादि संत-श्रोत्यांनी माउलीला "आता ययावरी। प्रज्ञेचा माज धरी। पदे साच करी। निरूपणी" असे म्हटले आहे.

या संतवाक्यासरिसें। म्हणितलें निवृत्तिदासें। माझेंही जी ऐसें। मनोगत॥ ६४८॥
यावरी आतां तुम्हीं। आज्ञापिला स्वामी। वायां वाग्जाळ मी। वाढों नेदी॥ ६४९॥
एवं इये अवधारा। ज्ञानलक्षणें अठरा। श्रीकृष्णें धनुर्धरा। निरूपिलीं॥ ६५०॥
मग म्हणे या नांवें। ज्ञान एथ जाणावें। हें स्वमत आणि आघवें। ज्ञानियेही म्हणती॥ ६५१॥

करतळावरी वाटोळा। डोलतु देखिजे आंवळा। तैसें ज्ञान आम्हीं डोळां। दाविलें तुज॥ ६५२॥
आतां धनंजया महामती। अज्ञान ऐसी वदती। तेही सांगों व्यक्ती। लक्षणेंसीं॥ ६५३॥
एऱ्हवीं ज्ञान फुडें जालिया। अज्ञान जाणवे धनंजया। जें ज्ञान नव्हे तें अपैसया। अज्ञानची॥ ६५४॥
पाहें पां दिवसु आघवा सरे। मग रात्रीची बारी उरे। वांचूनि कांहीं तिसरें। नाहीं जेवीं॥ ६५५॥
तैसें ज्ञान जेथ नाहीं। तेंचि अज्ञान पाहीं। तरि सांगों कांहीं कांहीं। चिन्हें तियें॥ ६५६॥

अर्थ—असे संतश्रोत्याचे भाषण ऐकून श्रीनिवृत्तीनाथाचे दास श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात. महाराज! माझ्याहि मनात असेच आहे॥ ६४८॥ महाराज तुम्ही आज्ञा केली असल्यामुळे आता यानंतर मी निरूपणात व्यर्थ पाल्हाळ होऊ देणार नाही॥ ६४९॥ याप्रमाणे ही अठरा ज्ञानाची लक्षणे श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितली आहेत, पहा॥ ६५०॥ मग भगवान म्हणतात, अर्जुना! येथे सांगितलेल्या या अठरा लक्षणावरून ज्ञान ओळखता येते, असे माझे मत असून सर्व ज्ञानी असेच म्हणतात॥ ६५१॥ ज्याप्रमाणे तळहातावरील वाटोळा डोलत असलेला आवळा पाहावा, त्याप्रमाणे अर्जुना मी तुला ज्ञान हे डोळ्यानी दिसेल असे स्पष्ट दाखविले॥ ६५२॥ हे थोर बुद्धिमान अर्जुना! आता यापुढे ज्याला लोकात अज्ञान म्हणतात, तेहि त्याच्या लक्षणासह स्पष्ट सांगतो॥ ६५३॥ नाहीतरी, अर्जुना! ज्ञान स्पष्ट झाल्यावर अज्ञान जाणले जाते; कारण ज्ञान नव्हे ते आपोआपच अज्ञान ठरते॥ ६५४॥ हे पहा, अर्जुना! संपूर्ण दिवस संपला की त्यानंतर रात्रीचीच पाळी असते. या दोहोवाचून तिसरे जसे काहीच नसते॥ ६५५॥ त्याप्रमाणे ज्याला ज्ञान म्हणता येत नाही, तेच अज्ञान होय; तरी या अज्ञानाची काही काही लक्षणे सांगतो॥ ६५६॥

गूढार्थदीपिका—अज्ञानाचे आवरण व विक्षेप असे दोन प्रकारचे कार्य होते. आवरण म्हणजे आत्मविस्मृति किंवा आत्म्याचे ज्ञान नसणे आणि विक्षेप म्हणजे आत्मस्वरूप सोडून भलतेच भासणे व ते सत्य आहे असे वाटणे. प्रत्येक अज्ञानलक्षणाच्या मुळाशी आत्मविस्मृति असते किंवा आत्म्याचे ज्ञान नसते, हे ''तैसे ज्ञान जेथ नाही। ते अज्ञानची पाही'' या दोन चरणांनी सांगितले आहे. आणि इतर जी अज्ञानाची लक्षणे सांगितली आहेत त्या सर्व चिन्हांनी अज्ञानाच्या विक्षेपाचे वर्णन केले आहे.

तरि संभावने जिये। जो मानाची वाट पाहे। सत्कारें होये। तोषु जया॥ ६५७॥
गर्वे पर्वताचीं शिखरें। तैसा महत्त्वावरूनि नुतरे। तयाचां ठायीं पुरें। अज्ञान आहे॥ ६५८॥

अर्थ—जो मोठेपणाकरिताच जगतो, जो मान मिळविण्याची वाट पाहत राहतो आणि सत्कार झाला असता ज्याला संतोष होतो॥ ६५७॥ ज्याप्रमाणे पर्वताची शिखरे खाली येत नाहीत, त्याप्रमाणे जो गर्वाने मोठेपणाच्या पदावरून खाली उतरू इच्छित नाही, त्याचे ठिकाणी पूर्ण अज्ञान आहे, असे समज॥ ६५८॥

गूढार्थदीपिका—कोणीहि स्वत: स्वत:पासून प्रतिष्ठा-मान-सत्कार मिळविण्याची इच्छा करीत नाही. दुसऱ्यापासूनच ते मिळविण्याची इच्छा होते. सर्वव्यापक व अद्वैत आत्मस्वरूपाहून दुसरे काहीच नसल्यामुळे ज्ञान्याला सत्कार, मान, प्रतिष्ठा मिळविण्याची इच्छा होणेच शक्य नाही. आपल्या आत्मस्वरूपाला विसरून स्थूलदेहाचा अभिमान धरणारा व आपल्याहून निराळ्या देहधारी पुरुषाची कल्पना करणारा पुरुषच दुसऱ्यापासून मान, सत्कार, प्रतिष्ठा मिळविण्याची इच्छा करीत असतो; म्हणूनच ज्याचे ठिकाणी सत्कार, मान, प्रतिष्ठा मिळविण्याची इच्छा असते. त्याचे ठिकाणी अज्ञान आहे, असे येथे म्हटले आहे.

ज्ञानाने अद्वैत परब्रह्माशी ऐक्य होत जाऊन देहाशी झाले असलेले ऐक्य नाहीसे होते, तर अज्ञान लक्षणाने आत्मविस्मृति दृढ होत जाऊन जड पांचभौतिक देहाशी झाले असलेले ऐक्य दृढ होत जाते व मनुष्याची कृमिकीटकादि योनिपर्यंत अधोगति होते.

पुढील सर्व लक्षणेहि अज्ञानाचे ठिकाणी राहत असतात, हेच माऊलीनी दाखविले आहे.

आणि स्वधर्माची मांगळी। बांधे वाचेच्या पिंपळीं। उभिला जैसा देउळीं। जाणोनि कुंचा॥ ६५९॥
घाली विद्येचा पसारा। सुये सुकृताचा डांगोरा। करी तेतुलें मोहरा। स्फीतीचिया॥ ६६०॥

आंग वरिवरी चर्ची। जनातें अभ्यर्चितां वंची। तो जाण पां अज्ञानाची। खाणी एथ॥ ६६१॥

अर्थ—जसा काही देवळात कोणालाहि दिसेल अशा रीतीने कुंचा उभा करून ठेवतात किंवा पिपळाची मुंज झाली असता मुंजीचे चिन्ह म्हणून कोणालाहि दिसेल, अशा रीतीने त्याला मेखला बांधतात, त्याप्रमाणे लोकांना कळावे, म्हणून आपण आचरण केलेल्या धर्माचा, आपल्या वाचेनेच जो डांगोरा पिटतो॥ ६५९॥ आपण अध्ययन केलेल्या विद्येचा जो पसारा मांडतो, केलेल्या पुण्यकर्माचा जो गाजाबाजा करतो, सारांश जेवढे काही तो करतो, त्यात आपल्या कीर्तीचाच उद्देश ठेवतो॥ ६६०॥ मन विकाराने अत्यंत मलीन असते, पण आपण धर्मपरायण आहो, हे दाखविण्याकरिता बाह्यात्कारी शरीराला भस्म, गंध इत्यादिकांच्या लेपनाने जो अलंकृत करतो, दुसऱ्या पुरुषाचे अर्चन करण्याचा प्रसंग आला असता जो ते करीत नाही व ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगून त्यांना फसवितो, तो अज्ञानाची खाणीच होय असे समज॥ ६६१॥

गूढार्थदीपिका—परमेश्वराच्या शास्त्ररूप आज्ञेवर श्रद्धा ठेवून आपल्या कल्याणाकरिता धर्माचे आचरण न करता, ज्या लोकांचा धर्मावर विश्वास आहे, त्यांना आपणहि श्रद्धापूर्वक आचरण करतो, असे वाटावे, म्हणूनच केवळ दाखविण्याकरिता जो धर्माचरण करीत असतो, त्याचे ठिकाणी अज्ञानाशिवाय काही सापडत नाही, असा अर्थ.

आणि वन्ही वनीं विचरे। तेथ जळती जैसी जंगमें स्थावरें। तैसें जयाचेनि आचारें। जगा दु:ख॥ ६६२॥
कौतुकें जें जें जल्पे। तें सबळाहुनि तीख रुपे। विषाहूनि संकल्पें। मारकु जो॥ ६६३॥
तयातें बहु अज्ञान। तो अज्ञानाचें निधान। हिंसेंसि आयतन। जयाचें जिणें॥ ६६४॥

अर्थ—अरण्यात अग्नि लागला असतां, ज्याप्रमाणे त्यात सजीव मृगादि व वृक्षादि प्राणी जळून मरतात, त्याप्रमाणे ज्याच्या आचरणाने जगाला दु:खच होते॥ ६६२। जे जे तो बडबडतो ते ते देखील भाल्यापेक्षाहि तीक्ष्ण असे बोचते आणि त्यातील त्याच्या गर्भित हेतुकडे पाहता, ते विषापेक्षाहि मारक वाटते॥ ६६३॥ अशा रीतीने ज्याचे जीवन हिंसेला-म्हणजे दुसऱ्याच्या दु:खाला-अधिष्ठान असते, त्याचे ठिकाणी प्रबल अज्ञान असून तो अज्ञानाचे भांडारच आहे॥ ६६४॥

गूढार्थदीपिका—अत्यंत अज्ञानी पुरुष आपल्या देहाच्या सुखाशिवाय दुसरे काही जाणत नसतो आणि देहाचे सुख दुसऱ्यावरच अवलंबून असल्यामुळे तो आपल्या देहसुखाकरिता कायावाचामनाने दुसऱ्यांना अखंड दु:ख देतो, असा भाव.

आणि फुंकें भाता फुगे। रेचिलिया सवेंचि उफगे। तैसा संयोगवियोगें। चढे वोहटे॥ ६६५॥
पडली वारयाचियां वळसां। धुळी चढे आकाशा। हरिखा वळघे तैसा। स्तुती वेळे॥ ६६६॥
निंदा मोटकी आइके। आणि कपाळ धरूनि ठाके। थेंबें विरे वारेनि शोखे। चिखलु जैसा॥ ६६७॥
तैसा मानापमानीं होये। जो कोण्हीही उर्मी न साहे। तयाचां ठायीं आहे। अज्ञान पुरें॥ ६६८॥

अर्थ—ज्याप्रमाणे भाता फुंकला असता फुगतो व सोडला असता लगेच रिकामा होतो, त्याप्रमाणे आवडती वस्तु प्राप्त झाली असता जो हर्षाने फुगून जातो व तिचा वियोग झाला असता जो खिन्न होतो॥ ६६५॥ ज्याप्रमाणे वाहटुळीच्या वळशात पडलेली धूळ वर आकाशात उडते, त्याप्रमाणे लोकांनी स्तुति केली असता जो हर्षानेफुगून जातो॥ ६६६॥ थोडकीशी देखील निंदा ऐकल्याबरोबर जो दु:खाने कपाळ धरून बसतो. ज्याप्रमाणे चिखल थेंबभर पाण्याने ओला होतो व थोड्याशा वाऱ्याने सुकू लागतो॥ ६६७॥ त्याप्रमाणे मान-अपमान प्राप्त झाला असता ज्याला होते याप्रमाणे जो कोणतीच उर्मी सहन करू शकत नाही, त्याचे ठिकाणी पूर्ण अज्ञान आहे, असे समज॥ ६६८॥

आणि जयांचियां मनीं गांठी। वरिवरी मोकळी वाचा दिठी। आंगे मिळे जीवें पाठी। भलतया दे॥ ६६९॥
व्याधाचें चारा घालणें। तैसे प्रांजळ जोगावणें। चांगाचीं अंत:करणें। विरू करी॥ ६७०॥
गार शेवाळें गुंडाळलीं। का निंबोळी जैसी पिकली। तैसी जयाची भली। बाह्य क्रिया॥ ६७१॥
अज्ञान तयाचिया ठायीं। ठेविलें असे पाहीं। या बोला आन नाहीं। सत्य मानीं॥ ६७२॥

अर्थ—वर वर पाहिले असता जो बोलण्यात व पाहण्यात मोकळा दिसतो. पण मनांत मात्र अढी असते आणि कोणाशीहि शरीराने मिसळलेला दिसला तरी अंत:करणाने तो पाठमोराच असतो॥ ६६९ ॥ जसे मृगांना पारध्याचे चारा घालणे दिखाऊ असते, त्याप्रमाणे जो दुसऱ्याला प्रांजलपणाने वागण्यासारखे दाखवून सज्जनाचे अंत:करण देखील विरुद्ध करून घेतो॥ ६७० ॥ शेवाळानी गुंडाळलेली गारगोटी जशी बाहेरून पाचूसारखी दिसते व पिकलेली निंबोळी बाहेरून खिरणीच्या गोड फळासारखी दिसते, त्याप्रमाणे ज्याची क्रिया बाहेरून पाहता लोकांच्या हिताची वाटते॥ ६७१ ॥ त्याच्याच ठिकाणी अज्ञान ठेवले आहे, हे म्हणणे अन्यथा नाही, सत्य आहे असे समज॥ ६७२ ॥

आणि गुरुकुळीं लाजे। जो गुरुभक्ती उभजे। विद्या घेऊनि माजे। गुरुसींचि जो॥ ६७३ ॥
तयाचें नाव घेणें। हे वाचे शूद्रान्न होणें। परि घडलें लक्षणें। बोलता इयें॥ ६७४ ॥
आतां गुरुभक्तांचें नांव घेवों। तेणें वाचे प्रायश्चित्त देवों। गुरुभक्ताचे नांव पाहा हो। सूर्य जैसा॥ ६७५ ॥
येतुलेनि पांगु पापाचा। निस्तरेल हे वाचा। जो गुरुतल्पगाचा। नामीं जाला॥ ६७६ ॥
हा ठायवरी। तया नामाचें भय हरी। मग म्हणें अवधारीं। आणिक चिन्हें॥ ६७७ ॥

अर्थ—आणि गुरुकुळाचा, संबंध वागविण्याची ज्याला लाज वाटते, गुरुसेवेचा ज्याला कंटाळा वाटतो. गुरुपासून विद्या प्राप्त झाल्यावर जो विद्येच्या अभिमानाने गुरुला तुच्छ लेखू लागतो॥ ६७३ ॥ त्याचे नाव तोंडात येणे म्हणजे शूद्रान्न भक्षण केल्याचे पाप करणे होय; पण अज्ञानाची लक्षणे सांगताना त्याचे नाव घेणे भाग पडते॥ ६७४ ॥ आता गुरुभक्ताचे नाव उच्चारून त्याच्या योगाने वाणीला प्रायश्चित्त देऊ. जसा सूर्य तसे गुरुभक्ताचे नाव आहे, पहा— म्हणजे सूर्य जसा अंध:काराचा नाश करतो तसे गुरुभक्ताचे नाव सर्व पापाचे निरसन करते, असे आम्ही समजतो॥ ६७५ ॥ गुरुमातागमन करणाऱ्या या अभक्ताचे नाव घेतल्याने माझ्या वाणीशी जो पापाचा संबंध झाला त्या पापसंबंधापासून माझी वाणी केवळ गुरुभक्तांचे नाव घेतल्यानेच मुक्त होईल॥ ६७६ ॥ अभक्ताच्या नामोच्चारणाच्या पापाने होणाऱ्या दु:खाचे भय नाहीसे करते, एथवर श्रीगुरुभक्ताच्या नामोच्चारात सामर्थ्य आहे. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, मग देव म्हणाले, अज्ञानाची आणखी चिन्हे ऐक॥ ६७७ ॥

तरी आंगें कर्मे ढिला। जो मनें विकल्पें भरला। अडवींचा अवगळला। कुहा जैसा॥ ६७८ ॥
तया तोंडी कांटिवडें। आंतु नुसतीं हाडें। अशुचि तेणें पाडें। सबाह्य जो॥ ६७९ ॥
जैसें पोटालागीं सुणें। उघडें झांकलें न म्हणे। तैसें आपलें परावें नेणे। द्रव्यालागीं॥ ६८० ॥
इया ग्रामसिंहाचिया ठायीं। जैसा मिळणी ठावो अठावो नाहीं। तैसा स्त्रीविषयीं कांहीं। विचारीना॥ ६८१ ॥
कर्माचा वेळु चुके। कां नित्य नैमित्तिक ठाके। तें जया न दुखे। जीवामाजीं॥ ६८२ ॥
पापी जो निसुगु। पुण्याविषयीं अति निलागु। जयाचां मनीं वेगु। विकल्पाचा॥ ६८३ ॥
तो जाण निखळा। अज्ञानाचा पुतळा। जो बांधोनि असे डोळां। वित्ताशेतें॥ ६८४ ॥

अर्थ—आडरानातील अवगळलेली विहीर जशी असते, त्याप्रमाणे जो शरीराने शास्त्रानुसार कर्म करण्यास आळस करून व नाना प्रकारच्या विकल्पाने मन भरलेले ठेऊन अखंड अवगळलेला असतो॥ ६७८ ॥ ज्याप्रमाणे त्या विहीरीच्या तोंडाशी काटे असून आत नुसती हाडे भरली असतात, त्याप्रमाणे जो अंतर्बाह्य अशुद्ध असतो॥ ६७९ ॥ ज्याप्रमाणे कुत्रे पोट भरताना अन्न उघडे आहे की झाकले आहे, याचा विचार करीत नाहीत, त्याप्रमाणे जो धनाविषयी हे आपले की परक्याचे हा विचार करीत नाही॥ ६८० ॥ जसे श्वान समागमाकरिता ठिकाणाचा योग्य, अयोग्य विचार करीत नाही, त्याप्रमाणेच स्त्रीसमागमाविषयी जो काही विचार करीत नाही॥ ६८१ ॥ स्नानसंध्यादि कर्माची वेळ चुकली किंवा नित्यनैमित्तिक कर्मे राहिली तर त्याचे ज्याच्या अंत:-करणात काही दु:ख वाटत नाही॥ ६८२ ॥ याप्रमाणे पाप करण्यात जो निर्लज्ज असतो आणि पुण्यकर्माचा आपल्याशी कधी संबंध होऊ देत नाही. ज्याच्या मनात नेहमी विकल्प उठत राहतात॥ ६८३ ॥ तो केवळ अज्ञानाचा पुतळाच होय. जो अखंड आपल्या दृष्टिसमोर धनाचीच आशा ठेवतो॥ ६८४ ॥

आणि स्वार्थे अळुमाळें। जो धैर्यापासोनि चळे। जैसें तृणबीज ढळे। मुंगियेचेनि॥ ६८५॥
पावो सूदलियासवें। जैसें थिल्लर कालवे। तैसा भयाचेनि नांवें। गजबजे जो॥ ६८६॥
वायुचेनि सावायें। धूई दिगंतरा जाये। दुःखवार्ता होये। तैसें जया॥ ६८७॥
मनोरथांचिया धारसा। वाहणें जयाचिया मानसा। पूरीं पडिला जैसा। दुधिया पाहीं॥ ६८८॥
वाउधणाचिया परी। आश्रय कहींचि न धरी। क्षेत्रीं तीर्थीं पुरीं। थारों नेणें॥ ६८९॥
कां मातलिया सरडा। पुढती बुडु पुढती शेंडा। हिंडण वारा कोरडा। तैसा जया॥ ६९०॥
जैसा रोंविल्याविणें। रांजणु थारों नेणे। तैसा पडे तैं राहणें। एऱ्हवीं हिंडे॥ ६९१॥
तयाचा ठायीं उदंड। अज्ञान असे वितंड। जो चांचल्यें भावंड। मर्कटाचें॥ ६९२॥

अर्थ—आणि ज्याप्रमाणे मुंगीने तृणाचे बीज ओढले जाते, त्याप्रमाणे जो थोड्याशा स्वार्थाकरिता देखील धैर्यापासून ढळतो॥ ६८५॥ ज्याप्रमाणे पाय ठेवल्याबरोबर डबके कालवले जाऊन गढूळ होते, त्याप्रमाणे नुसते भीतीचे नाव ऐकल्याबरोबर जो घाबरतो॥ ६८६॥ पुरात पडून वाहत जाणाऱ्या दुध्याप्रमाणे ज्याचे मन अखंड मनोरथांच्या धारेत सापडून वाहत असते॥ ६८७॥ वायूच्या साहाय्याने ज्याप्रमाणे धूळ एक दिशेहून दुसऱ्या दिशेस जाते, त्याप्रमाणे दुःखाची वार्ता ऐकल्याबरोबर ज्याचे चित्त अस्वस्थ होते॥ ६८८॥ ज्याप्रमाणे वावटळ कोठेहि स्थिर होत नाही त्याप्रमाणे ज्याला तीर्थात, क्षेत्रात किंवा नगरात कोठेहि स्थिर राहणे ठाऊक नाही॥ ६८९॥ किंवा सरडा माजला असता वारंवार बुडावरून शेंड्याला व शेंड्यावरून बुडाला, अशा व्यर्थच खेपा करीत हिंडतो, त्याप्रमाणे जो निरर्थक रिकामा हिंडतो॥ ६९०॥ ज्याप्रमाणे रोवल्यावाचून रांजण स्थिर राहू शकत नाही, त्याप्रमाणे जो निजला असताच एका ठिकाणी राहतो, नाहीतर हिंडतच असतो॥ ६९१॥ अशाप्रमाणे चांचल्यामुळे जो मर्कटाचे भावंड झाला आहे, त्याचे ठिकाणी भयंकर अज्ञान आहे, असे समज॥ ६९२॥

आणि पैं गा धनुर्धरा। जयाचिया अंतरा। नाहीं वोढावारा। संयमाचा॥ ६९३॥
लेंडिये आला लोंढा। न मनी वाळुवेचा वरवंडा। तैसा निषेधाचिया तोंडा। बिहेना जो॥ ६९४॥
व्रतातें आड मोडी। स्वधर्मु पायें वोलांडी। नियमाची आस तोडी। जयाची क्रिया॥ ६९५॥
नाहीं पापाचा कंटाळा। नेदी पुण्यासी जिव्हाळा। लाजेचा पेंडवळा। खाणोनि घाली॥ ६९६॥
कुळेंसीं जो पाठमोरा। वेदाज्ञेसी दुऱ्हा। कृत्याकृत्यव्यापारा। निवाडु नेणे॥ ६९७॥
वसू जैसा मोकाटु। वारा जैसा अफाटु। फुटला जैसा पाटु। निरंजनीं॥ ६९८॥
आंधळें हातिरूं मातलें। कां डोंगरीं जैसें पेटलें। तैसें विषयीं सुटलें। चित्त जयाचें॥ ६९९॥
पैं उकरडा काइ न पडे। मोकाटु कोणां नातुडे। ग्रामद्वारींचें आडें। नोलांडी कोण॥ ७००॥
जैसें सत्रीं अन्न जालें। कीं सामान्या बीक आलें। वाणसियेचें उभलें। कोण न रिगे॥ ७०१॥
तैसें जयाचें अंतःकरण। तयाचा ठायीं संपूर्ण। अज्ञानाची जाण। ऋद्धि आहे॥ ७०२॥

अर्थ—आणि याप्रमाणे अर्जुना! ज्याच्या अंतःकरणाला संयमाचा म्हणजे निग्रह करण्याचा मुळीच धरबंध नाही॥ ६९३॥ ओढ्याला पूर आला असता तो जसा वाळूच्या बांधाला जुमानित नाही, त्याप्रमाणे जो शास्त्राच्या निषेध-आज्ञेला जुमानित नाही॥ ६९४॥ ज्याचे आचरण, व्रताला मध्येच खंड पाडणारे, स्वधर्माला पायाने ओलांडणारे म्हणजे तुच्छ लेखणारे व नियमाने वागण्याची आशा तोडणारे असते॥ ६९५॥ ज्याला पापाचरणाचा कंटाळा वाटत नाही, पुण्याची कळकळ नाही आणि जो मनातून संपूर्ण लाजेचा भेंडोळा खणून काढतो म्हणजे जो पूर्ण निर्लज्ज बनतो॥ ६९६॥ जो आपल्या कुलाचाराकडे पाहत नाही, वेदाची आज्ञा मानित नाही, कोणते करणीय, कोणते अकरणीय हा निवाडा जाणत नाही॥ ६९७॥ देवाला वाहिलेला सांड जसा मोकाट फिरतो, वारा जसा मर्यादारहित वाहतो किंवा बांधलेल्या पाण्याचा फुटलेला पाट अरण्यात अमर्याद वाहतो॥ ६९८॥ आंधळा हत्ती जसा मस्त व्हावा किंवा डोंगर जसा पेटावा, त्याप्रमाणेच ज्याचे चित्त विषयाचे ठिकाणी स्वैर सुटले आहे॥ ६९९॥ उकरड्यावर काय

पडत नाही? मोकाट ढोर कोणाच्या हाती लागत नाही? गावाच्या द्वाराचा उंबरठा कोण ओलांडित नाही?॥ ७०० ॥ ज्याप्रमाणे सत्रात शिजविलेले अन्न कोणीहि खातो. सामान्य माणसाला अधिकार प्राप्त झाला असता तो काहीहि करतो व वाण्याचे दुकान उघडे असता त्यात कोणीहि शिरतो किंवा सौंदर्य प्राप्त झाले तर तिचा कोणीहि भोग घेतो॥ ७०१ ॥ त्याप्रमाणे जो स्वैर वर्तन करतो, त्याच्या ठिकाणी संपूर्ण अज्ञानाची समृद्धि आहे, असे जाण॥ ७०२ ॥

आणि विषयांची गोडी। जो जीत मेला न सांडी। स्वर्गींही खावया गोडी। एथुनीची॥ ७०३ ॥
जो अखंड भोगा जचे। जया व्यसन काम्यक्रियेचें। मुख देखोनि विरक्ताचें। सचैल करी॥ ७०४ ॥
विषो शिणोनि या राहे। परि न शिणे सावधु नोहे। कुहिला हातीं खाये। कोढी जैसा॥ ७०५ ॥
खरी टेंको नेदी उडे। लातौनि फोडी नाकाडें। तऱ्ही जेवीं न काढे। माघौता खर॥ ७०६ ॥
तैसा जो विषयांलागीं। उडी घाली जळतिये आगीं। व्यसनाची आंगीं। लेणीं मिरवी॥ ७०७ ॥
फुटोनि पडे तंव। मृग वाढवी हांव। परि न म्हणे ते माव। रोहिणीची॥ ७०८ ॥
तैसा जन्मोनि मृत्यूवरी। विषयीं त्रासितां बहुतीं परी। तऱ्ही त्रासु नेघे धरी। अधिक प्रेम॥ ७०९ ॥
पहिलिये बाळदशे। आई बा हेंचि पिसें। तें सरे मग स्त्रीमांसें। भुलोनि ठाके॥ ७१० ॥
मग स्त्री भोगितां थावो। वृद्धाप्य लागे येवों। तेव्हां तोचि प्रेमभावो। बाळकासि आणी॥ ७११ ॥
आंधळें व्यालें जैसें। तैसा बाळें परिवसे। परी मरे तो न त्रासे। विषयांसि जो॥ ७१२ ॥
जाण तयाचां ठायीं। अज्ञानासि पार नाहीं। आतां आणीकें कांहीं। चिन्हें सांगों॥ ७१३ ॥

अर्थ—जिवंतपणी व मेल्यावरहि ज्याच्या अंत:करणातून विषयाची आसक्ति जात नाही आणि मेल्यावर स्वर्गात विषयसुख भोगता यावे, म्हणून जीवंत असता या लोकातच यज्ञादिद्वारा ते प्राप्त करून ठेवतो॥ ७०३ ॥ जो अखंड विषयभोगाकरिता श्रमतो, ज्याला काम्यकर्म करण्याचा छंद लागला व वैराग्यशील पुरुषाचे तोंड पाहताच जो आंगावरील कपड्यासहित स्नान करतो-म्हणजे ज्याला विषयवैराग्याचा अत्यंत तिटकारा वाटतो॥ ७०४ ॥ विषय भोगता भोगता विषय शिणून नाहीशी होतात; पण जसा कुष्ठरोगी आपल्या कुष्ठभरित हातानेच जेवतो-कंटाळा करीत नाही-तसा विषय भोगणारा शिणत नाही व तो सावधही होत नाही॥ ७०५ ॥ ज्याप्रमाणे गाढवी लाथा झाडून, लाथेने नाक फोडून गाढवाला समागम करू देत नाही, पण इतके करूनहि तो गाढव जसा माघारा फिरत नाही॥ ७०६ ॥ त्याप्रमाणे जो विषयसुख भोगण्याकरिता जळत्या आगीत म्हणजे दु:खाच्या खाईत उडी घालतो आणि अलंकाराप्रमाणे नाना प्रकारचे विषयभोगरूप छंद आंगावर मिरवितो॥ ७०७ ॥ पाणी आहे, असे समजून ते पिण्याची हाव धरून हरिण छाती फुटून पडे तोपर्यंत धावतो, पण जळाचा भ्रम आहे, हे तो जाणत नाही॥ ७०८ ॥ त्याप्रमाणे जन्मल्यापासून मरेपर्यंत विषयांपासून नाना प्रकारचे दु:ख अनुभविले असताहि विषयभोगाचा ज्याला कंटाळा येत नाही उलट त्याचे अधिक प्रेम करतो॥ ७०९ ॥ प्रथम बाळपणात आईबाप याचेच वेड लागून राहते. पुढे ते नाहीसे होऊन तो स्त्रियेच्या शरीराचे ठिकाणी भूलून राहतो॥ ७१० ॥ मग स्त्री भोगत असता त्यालाहि मर्यादा येते व म्हातारपण येऊ लागते, तेव्हा तीच प्रेमासक्ती मुलांचे ठिकाणी आणून ठेवतो॥ ७११ ॥ ज्याप्रमाणे आंधळे मूल जन्मले असता त्याला आई प्रेमाने गोंजारते, त्याप्रमाणे जो म्हातारपणी मुलाबाळांना आपल्या हातानी गोंजारतो, पण मरेपर्यंत ज्याला विषयाचा कंटाळा येत नाही॥ ७१२ ॥ अर्जुना! त्याच्या ठिकाणी असलेल्या अज्ञानाला मर्यादाच नाही, असे जाण. आता आणखी काही अज्ञानाची लक्षण सांगतो॥ ७१३ ॥

तरि देह हेचि आत्मा। ऐसेया जो मनोधर्मा। वळघोनियां कर्मा। आरंभु करी॥ ७१४ ॥
आणि उणें कां पुरें। जें जें कांहीं आचरे। तयाचेनि आविष्कारें। कुंथों लागे॥ ७१५ ॥
डोईये ठेविलेनि भोजें। देवलविसें जेवीं फुंजे। तैसा विद्यावयसा माजे। उताणा चाले॥ ७१६ ॥
म्हणे मीचि एकु आथी। माझ्याचि घरीं संपत्ती। माझी आचरती रिती। कोणा आहे॥ ७१७ ॥
नाहीं माझेनि पाडें वाडु। मी सर्वज्ञु एकुचि रूढु। ऐसा गर्वतुष्टीगंडु। घेऊनि ठाके॥ ७१८ ॥

व्याधि लागलिया माणुसा। नयेची भोग दाऊं जैसा। निकें न साहे जो तैसा। पुढिलांचें॥ ७१९॥
पैं गुणु तेतुला खाय। स्नेह कीं जाळितु जाय। जेथ ठेविजे तेथ होय। मसीऐसें॥ ७२०॥
जीवनें शिंपिला तिडपिडी। वीजिला प्राण सांडी। लागला तरी काडी। उरों नेदी॥ ७२१॥
अळुमाळ प्रकाशु करी। तेतुलेनीचि उबारा धरी। तैसिया दीपाचिया परी। सुविद्यु जो॥ ७२२॥

अर्थ—देह हाच मी आत्मा होय, अशी दृढ बुद्धि बाळगून जो कर्मे करीत असतो॥ ७१४॥ आणि उणे किंवा पुरे जे काही कर्म त्याच्याकडून होते, ते प्रगट करून पूर्ण झालेल्या कर्माबद्दल प्रयत्नाची बढाई मारतो व अपूर्ण झालेल्या कर्माबद्दल खेद करतो॥ ७१५॥ डोक्यावर ठेवलेल्या देवाच्या प्रतिमेमुळे भगत जसा गर्वाने देवता-संचार झाल्यासारखे दाखवितो, त्या प्रमाणे विद्येने व वयाने हा उन्मत्त मत्त होऊन छाती काढून चालतो॥ ७१६॥ तो म्हणतो मीच एक कोणी आहे, माझ्याच घरी सर्व संपत्ति आहे, माझी जशी वागण्याची रीति आहे, तशी दुसऱ्या कोणाची आहे, सांगा!॥ ७१७॥ माझ्या बरोबरीचा दुसरा कोणी नाही. मीच एक सर्वज्ञ म्हणून प्रसिद्ध आहे. याप्रमाणे सर्व प्रकारच्या मोठेपणाची फुशारकी मारत राहतो॥ ७१८॥ ज्याप्रमाणे व्याधिग्रस्त पुरुषापुढे आपले विषयभोग मुळीच दाखवू नये, कारण त्याला ते बरे वाटत नाहीत, त्याप्रमाणे ज्याच्याने दुसऱ्याचे सुख पाहून बरे वाटत नाही॥ ७१९॥ ज्याप्रमाणे दिवा जळताना जेवढी वात असते तेवढी संपवितो, तेल असेल तितके नाहीसे करीत जातो, जेथे ठेवावा तेथे काजळ करतो, पाण्याने शिपडला गेला असता तिडतिड करतो, वारां घालत असता प्राण सोडतो-म्हणजे विझतो, कशास लागला असता काडी देखील उरू देत नाही-म्हणजे भस्म करतो. थोडासा प्रकाश करतो तेवढ्यानेच तो उष्णता ठेवतो, अशा दिव्याप्रमाणे जो शहाणपणा मिरविणारा असतो॥ ७२०-७२२॥

गूढार्थदीपिका—जो गुण म्हणजे सद्गुण मातीत मिळवितो, स्नेह-म्हणजे प्रेम उरू देत नाही. ''जेथ ठेविजे तेथ होय। मसी ऐसे''-म्हणजे ज्या कुटुंबात तो असतो, त्या कुटुंबाला आपल्यासारखे अविवेकी बनवितो. ''जीवने शिंपीला तिडपिडी''-म्हणजे उत्तम जीवनाचा उपदेश केला असता जो रागावतो. ''बीजिला प्राण सांडी''-म्हणजे कोणी फार विरोध केल्यास प्राण देतो, ''लागला तरी काड़ी। उरो नेदी''-म्हणजे ज्याच्याशी त्याचा संबंध होतो त्याचा सर्व नाश करतो ''अळुमाळ प्रकाश करी। तेतुलेनिच उबारा धरी''-म्हणजे जे थोडेसे त्याच्यापाशी ज्ञान असते तेवढ्यानेच तो गर्विष्ट होतो. असा दिव्याप्रमाणे जो शहाणपण मिरविणारा असतो.

औषधाचेनि नांवें अमृतें। जैसा नवज्वरु आंबुथे। कां विषचि होऊनि परतें। सर्पा दूध॥ ७२३॥
तैसा सद्गुणीं मत्सरु। व्युत्पत्ती अहंकारु। तपोज्ञानें अपारु। ताठा चढे॥ ७२४॥
अंत्यु राणिवे बैसविला। आरें धारणु गिळिला। तैसा गर्वे फुगला। देखसी जो॥ ७२५॥
जो लाटणें ऐसा न लवे। पाथरु तेवीं न द्रवे। गुणियासि नागवे। फोडसें जैसें॥ ७२६॥
किंबहुना तयापासीं। अज्ञान आहे वाढीसी। हें निकरें गा तुजसीं। बोलत असों॥ ७२७॥

अर्थ—गाईचे दूध औषध म्हणूनहि दिले तरी त्या योगाने जसा नवज्वराचा प्रकोप होतो किंवा सर्पाला दिलेले दूध विषरूपाने परिणाम पावते॥ ७२३॥ त्याप्रमाणे ज्याला सद्गुणाचा मत्सर वाटतो, शास्त्रीय व्युत्पत्तीने अहंकार चढ़तो, संपादन केलेल्या तपाने व ज्ञानाने अमर्याद ताठा चढतो॥ ७२४॥ अंत्यज राज्यावर बसविला असता जसा तो गर्वाने फुगून जातो किंवा अजगराने खांब गिळला असता तो अजगर वाकत नाही, त्याप्रमाणे जो गर्वाने फुगला आहे, असे दिसेल॥ ७२५॥ लाटण्याप्रमाणे जो कोणास नमत नाही. पाषाणाप्रमाणे ज्याचे चित्त द्रवत नाही व फोडसे नावाच्या सर्पाची विषबाधा ज्याप्रमाणे मांत्रिकाला काढता येत नाही, त्याप्रमाणे जो कोणाच्या आटोक्यात येत नाही॥ ७२६॥ फार काय सांगावे, अर्जुना! त्याच्यापाशी पूर्ण वाढ झालेले अज्ञान आहे, हे मी तुला अगदी निक्षून सांगत आहे॥ ७२७॥

आणीक पाही धनंजया। जो गृहदेह सामग्रिया। न देखे कालचेया। जन्मातें गा॥ ७२८॥
कृतघ्ना उपकार केला। कां चोरा व्यवहार दिधला। निसुग स्तविला। विसरे जैसा॥ ७२९॥

वोढाळितां लाविलें। तें तैसेंच कान पूंस वोलें। कीं पुढती वोढाळूं आलें। सुणें जैसें॥ ७३०॥
बेडूक सापाचियां तोंडीं। जातसे सबुडबुडीं। तो मक्षिकांचिया कोडीं। स्मरेना कांहीं॥ ७३१॥
तैसीं नवही द्वारें स्त्रवती। आंगीं देहाची लुती जिती। जेणें जाली तें चित्तीं। सलेना जया॥ ७३२॥
मातेच्या उदरकुहरीं। सूनि विष्ठेच्या दाथरीं। जठरीं नवमासवरी। उकडला जैं॥ ७३३॥
ते गर्भींची जे व्यथा। कां जें जालें उपजतां। तें कांहींचि सर्वथा। नाठवी जो॥ ७३४॥
मलमूत्रपंकीं। जे लोळतें बाळ अंकीं। तें देखोनि जो न थुंकी। त्रासु नेघे॥ ७३५॥
कालचि ना जन्म गेलें। पाहेच पुढती आलें। ऐसें हें कांहीं वाटलें। नाहीं जया॥ ७३६॥

अर्थ—अर्जुना! आणखी जो घर, देह आणि संसारसामुग्री यांच्या मोहामुळे कालच म्हणजे मागील झालेल्या जन्माकडे लक्ष देत नाही॥ ७२८॥ कृतघ्न, केलेला उपकार, चोर, व्यवहाराकरिता दिलेला पैसा व निर्लज्ज पुरुष, केलेली स्तुति, ज्याप्रमाणे विसरतो॥ ७२९॥ भटकणाऱ्या कुत्र्याचे कान व शेपूट कापून हाकून लाविले तरी ते जसे ओल्या आंगानेच पुन: घरात शिरण्याकरिता येते॥ ७३०॥ बेडुक सापाच्या तोंडात सगळा जात असताहि माश्यांचा समुदाय पाहून आपण मरतो, याची त्याला काहीहि आठवण होत नाही॥ ७३१॥ त्याप्रमाणे नवहि द्वारे स्त्रवू लागतात, देहाचे ठिकाणी होणारा त्वचा रोग सर्व अवयवावर प्रत्यक्ष दिसू लागतो, पण तो ज्यामुळे झाला त्या जन्माचे ज्याला मनात दु:ख वाटत नाही॥ ७३२॥ विष्ठेचा संचय असलेल्या आईच्या उदररूपी गुहेत घालून घेऊन जो जठराग्नीने नवमासपर्यंत उकडला गेला॥ ७३३॥ गर्भात असतांना किंवा जन्मताना जे दु:ख झाले ते जो मुळीच आठवत नाही॥ ७३४॥ जे मूल मलमूत्राच्या पंकात लोळते, तेच अंकावर पाहून ज्याला किळस वाटून जो थुंकत नाही व ज्याला त्याचा त्रास वाटत नाही॥ ७३५॥ कालच एक जन्म गेलां, पुन: उद्या जन्म येणार ना! असे काही ज्याला वाटत नाही॥ ७३६॥

आणि पैं तयाची परी। जीविताची फरारी। देखोनि जो न करी। मृत्युचिंता॥ ७३७॥
जिणेयाचेनि विश्वासें। मृत्यु एक एथ असे। हें जयाचेनि मानसें। मानिजेना॥ ७३८॥
अल्पोदकींचा मासा। हें नाटे ऐसिया आशा। न वचेचि कां जैसा। अगाध डोहा॥ ७३९॥
कां गोरीचिया भुली। मृग व्याधा दिठी न घाली। गळु न पाहाता गिळिली। उंडी मीनें॥ ७४०॥
दीपाचिया झगमगा। जाळील हें पतंगा। नेणवेचि पैं गा। जयापरी॥ ७४१॥
गंवार निद्रासुखें। घर जळत असे तें न देखे। नेणतां जेवीं विखें। रांधिलें अन्न॥ ७४२॥
तैसा जीविताचेनि मिषें। हा मृत्यूचि आला असे। हें नेणेचि राजसें। सुखें जो गा॥ ७४३॥
शरीरींची वाढी। अहोरात्रांची जोडी। विषयसुखप्रौढी। साचचि मानी॥ ७४४॥
परि बापुडा ऐसें नेणे। जें वेश्येचें सर्वस्व देणें। तेंचि तें नागवणें। रूप एथ॥ ७४५॥
संवचोराचें साजणें। तेंचि तें प्राण घेणें। लेपा स्नपन करणें। तोचि नाश॥ ७४६॥
पांडुरोगें आंग सुटलें। तें तयाचि नांवें खुंटलें। तैसें नेणे भुललें। आहारनिद्रा॥ ७४७॥
सन्मुख शूला। धांवतया पायें चपळा। प्रतिपदीं ये जवळा। मृत्यु जेवीं॥ ७४८॥
तेवीं देहा जंव जंव वाढु। जंव जंव दिवसांचा पवाडु। जंव जंव सुरवाडु। भोगांचा हा॥ ७४९॥
तंव तंव अधिकाधिकें। मरण आयुष्यातें जिंके। मीठ जेवीं उदकें। घांसिजत असे॥ ७५०॥
तैसें जीवित जाये। तयास्तव काळाते पाहे। हें हातोहातींचें न होये। ठाउकें जया॥ ७५१॥
किंबहुना पांडवा। हा आंगींचा मृत्यु नित्य नवा। न देखे जो मावा। विषयांचिया॥ ७५२॥
तो अज्ञानदेशींचा रावो। या बोला महाबाहो। न पडे गा ठावो। आणिकांचा॥ ७५३॥

अर्थ—आणि त्याचप्रमाणे जीवन भरभर संपत चाललेले पाहून ज्याला मृत्यूची चिंता वाटत नाही॥ ७३७॥ आपण जसे जिवंतच राहणार या विश्वासामुळे, जगात एक मृत्यु आहे, असे ज्याच्या मनाला वाटतच नाही॥ ७३८॥

डबक्यात असलेला मासा, हे आटणार नाही, असा आशेने जसा अथांग डोहात जात नाही॥ ७३९ ॥ व्याधाच्या गाण्याने लुब्ध झालेला हरिण जसा व्याधाकडे दृष्टि देत नाही किंवा मासा, गळ न पाहताच त्याला लावलेला कणिकेचा गोळा गिळतो॥ ७४० ॥ किंवा अर्जुना! ज्याप्रमाणे दिव्याच्या झगमग प्रकाशाला भाळलेला पतंगकिडा, हा मला जाळील, असे जाणत नाही॥ ७४१ ॥ मूर्ख मनुष्य, झोपेच्या सुखापुढे ज्या घरात 'मी निजलो आहे' ते घर जळत आहे, त्याच्या विचार करीत नाही, किंवा ठाऊक नसल्यामुळे विषमिश्रित शिजविलेले अन्न मनुष्य खातो॥ ७४२ ॥ त्याप्रमाणे जन्माच्या निमित्ताने हा आपल्याला मृत्युच आला आहे, असे राजस विषयसुखाला भुलुन जो जाणत नाही॥ ७४३ ॥ शरीराच्या ठिकाणची वाढ, दिवस आणि रात्र यांची जोडी आणि विषमसुखाची महती, हे सर्व जो खरे मानतो॥ ७४४ ॥ पण बापडा, हे जाणत नाही की वेश्येचे, तनमनधनाने पुरुषाच्या स्वाधीन होणे जे आहे, तेच पुरुषाला सर्वस्वी लुबाडल्या गेल्याचे स्वरूप होय॥ ७४५ ॥ बरोबर प्रवासास निघालेल्या चोराची मैत्री म्हणजे ते प्राण घेणेच होय. भिंतीवर काढलेल्या चित्राला स्नान घालणे म्हणजे त्याचा नाशच होय॥ ७४६ ॥ पांडुरोगामुळे जे शरीर पुष्ट होते त्याचेच नाव ते खुंटले असे आहे. त्याप्रमाणे आहार व निद्रा यात भुलून आयुष्य संपत आहे, हे जो जाणत नाही॥ ७४७ ॥ शूळी जाण्याची शिक्षा झालेला पुरुष जसजसा धावत्या पायाने लवकर जातो, तसतसा त्याला पावलोंपावली मृत्यु जवळ येतो॥ ७४८ ॥ त्याप्रमाणे जसजसा देह वाढतो, दिवसापाठी दिवस सुखात निघून जातात आणि विषयसुखाचा उत्कर्ष होतो॥ ७४९ ॥ तसतसे मनुष्याचे आयुष्य अधिकाधिक मृत्युचे स्वाधीन होत जाते. मीठ जसे पाण्याने विरत जाते॥ ७५० ॥ त्याप्रमाणे जसजसे आयुष्य सरत जाते तसतसा मृत्यु जवळ येतो. असा हा चटकन् होणारा प्रकार ज्याच्या लक्षात येत नाही॥ ७५१ ॥ फार काय सांगावे, अर्जुना! हा शरीराचे ठिकाणी क्षणोक्षणी येणारा मृत्यु, विषयाच्या मोहामुळे जो जाणत नाही॥ ७५२ ॥ हे महाबाहो अर्जुना! तो संपूर्ण अज्ञानदेशाचा राजा होय; याहून दुसरे बोलणे संभवत नाही॥ ७५३ ॥

पैं जीविताचेनि तोषें। जैसा कां मृत्यु न देखे। तैसाचि तारुण्ये तोषे। जरा न गणी॥ ७५४ ॥
कडाडीं लोटला गाडा। कां शिखरौनि सुटला धोंडा। तैसा न देखे जो पुढां। वार्धक्य आहे॥ ७५५ ॥
कां आडवोहळा पाणी आलें। कां जैसे म्हैसयाचें झुंज मातलें। तैसें तारुण्याचें चढलें। भुरें जया॥ ७५६ ॥
पुष्टि लागे विघरों। कांति पाहे निसरों। माथा आदरी शिरों-। भागीकंप॥ ७५७ ॥
दाढी साउळ धरी। मान हालौनि वारी। तरी जो करी। मायेचा पैसु॥ ७५८ ॥
पुढील उरीं आदळे। तंव न देखे जेवीं आंधळें। कां डोळ्यावरलें निगळें। आळशी तोषे॥ ७५९ ॥
तैसें तारुण्य आजिचें। भोगितां वृद्धाप्य पाहेचें। न देखे तोचि साचें। अज्ञानु गा॥ ७६० ॥

अर्थ—समृद्ध जीविताच्या संतोषांत मग्न असल्यामुळे जसा तो पुढील येणाऱ्या मृत्युकडे पाहत नाही, तसेच तरुणपणाच्या पुष्टीमुळे पुढे येणाऱ्या म्हातारपणाची काळजी करीत नाही॥ ७५४॥ अत्यंत वेगाने लोटल्या गेलेल्या गाड्याला किंवा पर्वताच्या शिखरावरून सुटलेल्या पाषाणाला पुढे आपले तुकडे तुकडे होणार हे जसे कळत नाही, त्याप्रमाणे तारुण्याच्या मदाने पुढे म्हातारपण येणार, हे जो जाणत नाही॥ ७५५ ॥ आडरानांत ओढ्याला भरमसाट पाणी यावे किंवा माजलेल्या रेड्यांची झुंज लागावी, त्याप्रमाणे ज्याच्या आंगी तारुण्याची धुंदी चढली असते॥ ७५६ ॥ आंगची पुष्टि कमी होऊ लागते, आंगचे तेज नाहीसे होऊ पाहते आणि शरीराचे वरभागी असलेले मस्तक कंपाचा स्वीकार करते॥ ७५७ ॥ दाढी पांढरी होते, मान हालू लागून ''नाही नाही'' म्हणते; अशी स्थिति प्राप्त झाली असताहि जो मायेचा पसारा करीतच असतो॥ ७५८ ॥ पुढे असलेला पदार्थ उरावर येऊन आदळेपर्यंत जसा आंधळा मनुष्य जाणत नाही किंवा सर्वत्र गळत असले तरी डोळ्यावर गळत नाही याच्यातच आळशी मनुष्य संतोष मानतो; पण सर्वत्र गळत आहे, ते पुढे डोक्यावरहि गळेल हे तो जाणत नाही॥ ७५९ ॥ त्याप्रमाणे आजची तरुणदशा भोगता भोगता उद्या म्हातारपण येईल हे जो जाणत नाही तोच खरा अज्ञानाची मूर्ति होय॥ ७६० ॥

देखे अक्षमें कुब्जें। कीं विटावूं लागे फुंजें। परि न म्हणे पाहे माझें। ऐसेचि होईल॥ ७६१ ॥

आणि आंगीं वृध्दतेचि। संज्ञा ये मरणाची। परि जया तारुण्याची। भुली न फिटे॥ ७६२॥
तो अज्ञानाचें घर। हें साचचि घे उत्तर। तेवींचि परियेसीं थोर। चिन्हें आणिक॥ ७६३॥

अर्थ—लुळा, पांगळा अशा सर्वथा असमर्थ किंवा कुबड्या माणसाला पाहून जो तारुण्याच्या गर्वाने त्यांना वेडावू लागतो पण माझेहि उद्या असेच होईल, असे जो लक्षात घेत नाही॥ ७६१ ॥ आणि ज्याला मरण हेच नाव आहे, ते म्हातारपण शरीराचे ठिकाणी आले, तरी ज्याच्या ठिकाणची तारुण्याची भ्रांति नाहीशी होत नाही॥ ७६२ ॥ तो अज्ञानाचे घरच होय, असे त्याच्याविषयी माझे खरोखर उत्तर आहे. तसेच आणखीहि अज्ञानाची महत्वाची लक्षणे ऐक॥ ७६३ ॥

तरि वाघाचिये अडवे। एक वेळ आला चरोनि दैवें। तेणें विश्वासे पुढती धांवे। वसू जैसा॥ ७६४॥
तैसेचि अवचटें हें। एकदोनी वेळांचि लाहे। एथ उरग एक आहे। हें मानीना जो॥ ७६५॥
कां सर्पघराआंतु। अवचटें ठेवा आणिला स्वस्थु। येतुलियासाठीं निश्चित। नास्तिक होय॥ ७६६॥
वैरिया नीद आली। आतां द्वंद्वे माझीं सरलीं। हें मानी तो सपिलीं। मुकला जेवीं॥ ७६७॥
तैसी आहारनिद्रेची उजरी। रोग निवांत जोंवरी। तंव जो न करी। व्याधीचिंता॥ ७६८॥
आणि स्त्रीपुत्रादिमेळें। संपत्ति जंव जंव फळे। तेणें रजें डोळे। जाती जयाचे॥ ७६९॥
सवळेचि वियोगु पडैल। विळौनि विपत्ति येईल। हें दुःख पुढील। देखेना जो॥ ७७०॥
तो अज्ञान गा पांडवा। आणि तोही तोचि जाणावा। जो इंद्रियें अव्हासवा। चारी एथ॥ ७७१॥

अर्थ—ज्याप्रमाणे गावाच्या दरीत एकदा दैवाने सुरक्षितपणे चरून आला म्हणून, प्राणास काही धोका नाही, या विश्वासाने जसा सांड पुनः तेथेच चरायला जातो॥ ७६४॥ त्याप्रमाणेच एकदोन वेळा अकस्मात् शरीर धोक्यात सापडूनही काही झाले नाही; म्हणून या धनावर सर्प आहे, यावर तो विश्वास ठेवित नाही॥ ७६५ ॥ किंवा पुरून ठेवलेल्या संपत्तीवर सर्प असलेल्या घरातून काही अपाय न होता धन आणता आले, एवढ्यासाठी ज्याचा शास्त्रावरील विश्वास नाहीसा होतो॥ ७६६ ॥ माझ्या शत्रूला झोप लागली आहे, तेव्हा आता माझी सर्व संकटे नाहीशी झाली असे समजून जो पक्षी स्वस्थ राहतो, तो ज्याप्रमाणे पिलासह प्राणाला मुकतो॥ ७६७॥ त्याप्रमाणे जोपर्यंत आहार व निद्रा उत्तम रीतीने चालू आहेत आणि शरीराचे ठिकाणी रोग उद्भवला नाही, तोपर्यंत जो पुढे शरीराला रोग होईल याची काळजीच करीत नाही॥ ७६८॥ स्त्रीपुत्रादिकाच्या मेळाव्याने जसजशी भोगसंपत्ती वाढत जाते तसतसे वाढत्या रजोगुणाने धुंद होऊन त्याचे डोळे जातात-म्हणजे अविवेक वाढून त्याला पुढील परिणाम कळत नाही॥ ७६९॥ लगेच याचा वियोग होईल आणि वियोग झाला असता दारिद्र्य प्राप्त होईल, असे हे पुढील दुःख ज्याला दिसत नाही॥ ७७० ॥ अर्जुना! तोहि मूर्तिमंत अज्ञान आहे, असे समज. आणि जो इंद्रियाच्या द्वारा स्वैर विषयसेवन करतो तोहि अज्ञानाची मूर्ति समजावी॥ ७७१ ॥

वयसेचेनि उवायें। संपत्तीचेनि सावायें। सेव्यासेव्य जाये। सरकटितु॥ ७७२॥
न करावें तें करी। असंभाव्य मनीं धरी। चिंतूं नये तें विचारी। जयाची मती॥ ७७३॥
रिघे जेथ न रिघावें। मागे जें न घ्यावें। स्पर्शे जेथ न लागावें। आंग मन॥ ७७४॥
न जावे तेथ जाये। न पाहावें तें जो पाहे। न खावें तें खाये। तेवींचि तोषे॥ ७७५॥
न धरावा तो संगु। न लगावें तेथ लागु। नाचरावा तो मार्गु। आचरे जो॥ ७७६॥
नायकावें तें आइके। न बोलावें तें बके। परि दोष होईल हें न देखे। प्रवर्ततां॥ ७७७॥
अंगा मनासि रुचावे। येतुलेनि कृत्याकृत्य नाठवे। जो करणेयाचेनि नांवें। भलतेंचि करी॥ ७७८॥
परि पाप मज होईल। कां नरकयातना येईल। हें कांहींचि पुढील। देखेना जो॥ ७७९॥
तयाचेनि आंगलगें। अज्ञान जगीं दाटुगें। जें सज्ञानाही संगें। झोंबों सके॥ ७८०॥
असो हें आइक। अज्ञानचिन्हें आणिक। जेणें तुज सम्यक्। जाणवे तें॥ ७८१॥

अर्थ—तारुण्याच्या उत्कर्षाने व संपत्तीच्या साहाय्याने, शास्त्राने विहित व शास्त्रनिषिद्ध असे दोन्ही प्रकारचे विषय, काही विचार न करता सरसकट भोगित जातो॥ ७७२॥ शास्त्र व संत यांनी करू नये म्हणून जे सांगितले, ते करतो. शक्य नसलेल्या गोष्टी मनात आणतो, ज्याचा विचार करू नये त्याचाच ज्याची बुद्धि विचार करते॥ ७७३॥ जेथे शिरू नये तेथे शिरतो, जे घेऊ नये ते मागतो आणि ज्याला शरीर व मन लागू नये, त्यालाच जो स्पर्श करतो॥ ७७४॥ जाऊ नये तेथे जातो, पाहु नये ते पाहतो, खाऊ नये ते खातो, असे करण्यातच त्याला आनंद वाटतो॥ ७७५॥ ज्याचा संग नको त्याचाच संग धरतो, जेथे लागू नये तेथेच लागतो आणि ज्याचे आचरण करू नये अशा मार्गाचे आचरण करतो॥ ७७६॥ ऐकू नये ते ऐकतो, बोलू नये ते बोलतो; पण असे करीत असताना आपल्याला दोष होतील हे तो जाणत नाही॥ ७७७॥ शरीराला व मनाला आवडते एवढ्यानेच काय करावे, काय करू नये, हा विचारच ज्याला येत नाही आणि जो करायचे म्हणून भलतेच करतो॥ ७७८॥ पण मला पाप होईल व पुढे नरकयातना प्राप्त होईल, हे पुढील काही तो लक्षात आणीत नाही॥ ७७९॥ अर्जुना! त्याच्याच आश्रयाने जगामध्ये अज्ञान इतके बलवान झाले आहे की त्याचा संग झाला असता ज्ञानी पुरुषालाहि ते झोंबू शकते॥ ७८०॥ परंतु ते असो. ज्या लक्षणाने अज्ञान बरोबर जाणता येईल अशी आणखी लक्षणे ऐक॥ ७८१॥

तरी जयाची प्रीति पुरी। गुंतली देखसी घरीं। नवगंधकेसरीं। भ्रमरी जैशी॥ ७८२॥
साकरेचिया राशी। बैसली नुठे माशी। तैसेनि स्त्रीचित्त आवेशी। जयाचें मन॥ ७८३॥
ठेला बेडूक कुंडीं। मशक गुंतला शेंबुडीं। ढोरु सबुडबुडीं। रुतला पंकीं॥ ७८४॥
तैसें घरींहूनि निघणें। नाहीं जीवें मनें प्राणें। जया साप होऊनि असणें। भाटीं तिये॥ ७८५॥
प्रियोत्तमाचियां कंठीं। प्रमादा घे आटी। तैशी जीवेंसी कोंपटी। धरूनि ठाके॥ ७८६॥
मधुरसोद्देशें। मधुकरी जचे जैसें। गृहसंगोपन तैसें। करी जो गा॥ ७८७॥
म्हातारपणीं जालें। आणिक एक विपायिलें। तयाचें कां जेतुलें। मातापितरां॥ ७८८॥
तेतुलेनि पाडें पार्था। घरीं जया प्रेमआस्था। आणि स्त्रीवांचूनि सर्वथा। जाणेना जो॥ ७८९॥

अर्थ—नव्यासुगंधाने युक्त अशा कमळाच्या केसराचे ठिकाणी जशी भ्रमरी सुवासाने लुब्ध होऊन त्यांत गुंतून पडते त्याप्रमाणे ज्याचे प्रेम घरावर पूर्णपणे गुंतलेले दिसून पडेल॥ ७८२॥ साखरेच्या राशीवर बसलेली माशी, जशी साखरेवरून उठत नाही, त्याप्रमाणे ज्याचे मन स्त्रीचित्ताचे ठिकाणी आसक्त होऊन राहते॥ ७८३॥ ज्याप्रमाणे बेडूक कुंडातच राहतो, बाहेर निघत नाही. शेंबडात मच्छर गुंतले, तर त्यातून ते निघत नाहीत, किंवा बुडबुडे येत असलेल्या अशा फसफसलेल्या किंवा डेरें पडलेल्या जमिनीत (टीप-फसफसलेल्या जमिनीला वऱ्हाडात डेरे पडलेली जमीन म्हणतात. या जमिनीत रुतलेला मनुष्य निघण्याचा जितका प्रयत्न करतो तितका आणखी फसला जातो) रुतलेले ढोर त्यातून निघू शकत नाही॥ ७८४॥ त्याप्रमाणे जिवंत आहे तोपर्यंत ज्याचे जीव, मन व प्राण घरातून निघत नाहीत व म्हणूनच मेल्यानंतर जो त्या ओसाड घरात साप होऊन राहतो॥ ७८५॥ स्त्री आपल्या प्रिय पतीच्या गळ्याला जशी मिठी मारते, त्याप्रमाणे जो आपला जीव खोपटीच्या ठिकाणी धरून राहतो॥ ७८६॥ मधुर रस प्राप्त करून घेण्याकरिता मधमाशा जसे कष्ट करतात, त्याप्रमाणे कष्ट करून जो घराचे संगोपन करतो॥ ७८७॥ सुदैवाने म्हातारपणी झालेल्या आणि एकुलत्या एक पुत्ररत्नाचे आईबापांना जितके प्रेम वाटते॥ ७८८॥ त्याच्या तोडीने, अर्जुना! ज्याचे घराचे ठिकाणी प्रेम व आस्था गुंतली असते आणि जो स्त्रियेवाचून दुसरे काहीच जाणत नाही॥ ७८९॥

महापुरुषाचें चित्त। जालिया वस्तुगत। ठाके व्यवहारजात। जयापरी॥ ७९०॥
तैसा स्त्रीदेहीं जो जीवें। पडोनियां सर्वभावें। कोण मी काय करावें। कांही नेणे॥ ७९१॥
हानि लज्जा न देखे। परापवादु नाइके। जयाचीं इंद्रियें एकमुखें। स्त्रिया केलीं॥ ७९२॥
चित्त आराधी स्त्रियेचें। आणि तियेचेनि छंदें नाचे। माकड गारुडियाचें। जैसें होय॥ ७९३॥
आपणपेंही शिणवी। इष्टमित्र दुखवी। मग कवडाचि वाढवी। लोभी जैसा॥ ७९४॥

तैसा दानपुण्यें खांची। गोत्रकुटुंबा वंची। परी बाइणी स्त्रियेची। उणी हों नेदी॥ ७९५॥
पूजितीं दैवतें जोगावी। गुरुतें बोलें झकवी। मायबापां दावी। निदारपण॥ ७९६॥
स्त्रियेच्या तरी विखीं। भोगसंपत्ति अनेकीं। आणी वस्तु निकी। जे जे देखे॥ ७९७॥
प्रेमाथिलेनि भक्तें। जैसेनि भजिजे कुळदैवतें। तैसा एकाग्रचित्तें। स्त्री जो उपासी॥ ७९८॥
साच आणि चोख। तें स्त्रियेसीचि अशेख। येरांविषयीं जोगावणूक। तेही नाहीं॥ ७९९॥
इयेतें हन कोणी देखेल। इयेसी वेखासें जाईल। तरि युगचि बुडेल। ऐसें जया॥ ८००॥
नायटेयां भेण। न मोडिजे नागांची आण। तैसी पाळी उणखुण। स्त्रियेची जो॥ ८०१॥
किंबहुना धनंजया। स्त्रीचि सर्वस्व जया। आणि तियेचिया जालियां-। लागीं प्रेम॥ ८०२॥
आणिकही जें समस्त। तेथिंचें संपत्तिजात। तें जीवाहूनि आप्त। मानी जो कां॥ ८०३॥
तो अज्ञानासी मूळ। अज्ञाना तेणे बळ। हें असो केवळ। तो तेंचि रूप॥ ८०४॥

अर्थ—ज्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाचे चित्त आत्माकार झाले असता त्याचा व्यवहार बंद पडतो, त्याचप्रमाणे स्त्रियेच्या देहाचे ठिकाणी अंत:करणातून जो सर्व भावाने आसक्त राहून मी कोण व मी काय केले पाहिजे, हे काही जाणत नाही॥ ७९०-७९१॥ ज्याची सर्व इंद्रिये स्त्रियेने आपल्याकडे एकतंत्र केली, तो हानि, लज्जा पाहत नाही व लोक काय म्हणतात इकडे लक्ष देत नाही॥ ७९२॥ गारुड्याचे, माकड जसे गारोड्याच्या तंत्राने वागते, त्याप्रमाणे तो स्त्रियेच्या चित्ताची आराधना करतो व तिच्या तंत्राप्रमाणे नाचतो॥ ७९३॥ ज्याप्रमाणे लोभी मनुष्य स्वत: अन्नवस्त्रादिकाचे दारिद्र्य सहन करून इष्टमित्रांना दुखवून केवळ धनच वाढवितो॥ ७९४॥ त्याप्रमाणे दानादि पुण्यकर्माला फाटा देतो, गोत्रजाना व कुटुंबातील माणसांना थापा देतो, पण स्त्रियेचा तगादा मात्र पूर्ण करतो, उणे पडू देत नाही॥ ७९५॥ पूजावयाच्या दैवताचे कसे तरी पूजन करतो, श्रीगुरुपाशी थापा मारतो, मायाबापांनी पैसा मागितला असता पैसाच नाही म्हणून सांगतो॥ ७९६॥ स्त्रियेकरिता मात्र अनेक प्रकारचे भोगऐश्वर्य संपादन करून जी जी चांगली वस्तु दिसेल, ती ती विकत आणतो॥ ७९७॥ ज्याप्रमाणे प्रेमळ भक्ताने आपल्या कुलदेवतेची उपासना करावी, त्याप्रमाणे जो आपल्या स्त्रियेची एकाग्र चित्ताने उपासना करतो॥ ७९८॥ खरे व उत्तम ते संपूर्ण एका स्त्रियेकरिता असते व इतरांना कसेबसे निर्वाहापुरते अन्नवस्त्र तेहि देत नाही॥ ७९९॥ ह्या स्त्रियेकडे कोणी पाहिल्यास किंवा तिच्या विरुद्ध कोणी गेल्यास ज्याला कल्पान्त झाल्याचे दु:ख होते॥ ८००॥ नायटे होतील या भीतीने ज्याप्रमाणे नागाकरिता केलेला नवस मोडू नये, त्याप्रमाणे जो स्त्रियेच्या मनातील अल्प देखील इच्छा पुरवितो॥ ८०१॥ फार काय सांगावे, अर्जुना! ज्याला स्त्रीच एक सर्वस्व वाटते आणि तिचे जे होऊन राहिले त्याचे ज्याला प्रेम वाटते॥ ८०२॥ आणखीहि तिची संपूर्ण भोगसंपत्ति आपल्या जीवापेक्षाहि जो प्रिय समजतो॥ ८०३॥ तो अज्ञानाला जन्म देणारे कारण-असून त्याच्याच योगाने अज्ञानाला बळ प्राप्त झाले आहे. हे असो. तो केवळ अज्ञानाचेच रूप होय॥ ८०४॥

आणि मातलिया सागरीं। मोकळिलिया तरी। लाटांचां येरझारीं। आंदोळे जेवीं॥ ८०५॥
तेवीं प्रिय वस्तु पावे। आणि सुखें जो उंचावे। तैसाचि अप्रियासवें। तळवट घे॥ ८०६॥
ऐसेनि जयाचे चित्तीं। वैषम्यसाम्याची वाखती। वाहे तो महामती। अज्ञान गा॥ ८०७॥

अर्थ—खळवळलेल्या समुद्रात नाव मोकळी सोडत असता ती जशी लाटाच्या येण्याजाण्याने हेलकावे खाते॥ ८०५॥ त्याप्रमाणे आवडती वस्तु प्राप्त झाली असता जो सुखाने आपल्याला थोर भाग्यवान समझतो व त्याचप्रमाणे अप्रिय वस्तु प्राप्त झाली असता जो आपल्याला अत्यंत भाग्यहीन समजून दु:ख करतो॥ ८०६॥ याप्रमाणे जो आपल्या चित्तात विषमपणाचा खळगा वागवितो, हे महामति अर्जुना! तो अज्ञान होय॥ ८०७॥

आणि माझां ठायीं भक्ती। फळालागीं जया आर्ती। धनोद्देशें विरक्ती। नटणें जेवीं॥ ८०८॥
ना तरी कांताच्या मानसीं। रिगोनि स्वैरिणी जैसी। राहाटे जारेंसीं। जावयालागीं॥ ८०९॥

तैसा मातें किरीटी। भजती गा पाउटी। करूनि जो दिठी। विषो सूये॥ ८१०॥
आणि भजिन्नलियासवें। तो विषो जरी न पावे। तरी सांडी म्हणे आघवें। टवाळ हें॥ ८११॥
कुणबट कुळवाडी। तैसा आन आन देव मांडी। आदिलाची परवडी। करी तया॥ ८१२॥
तया गुरुमार्गा टेंके। जयाचा सुगरवा देखे। तरी तयाचा मंत्र शिके। येरु नेघे॥ ८१३॥
प्राणिजातेंसीं निष्ठुरु। स्थावरी बहु भरु। तेवींचि नाहीं एकसरु। निर्वार जया॥ ८१४॥
माझी मूर्ति निफजवी। ते घराचां कोनीं बैसवी। आपण देवो देवी। यात्रे जाय॥ ८१५॥
नित्य आराधन माझें। काजीं कुळदेवता भजे। पर्वविशेषें कीजे। पूजा आना॥ ८१६॥
माझें अधिष्ठान घरीं। आणि वोवसे आनाचे करी। पितृकार्यावसरीं। पितरांचा होय॥ ८१७॥
एकादशीचां दिवसीं। जेतुला पाडु आम्हांसी। तेतुलाचि नागांसी। पंचमीच्या दिवशीं॥ ८१८॥
चौथ मोटकी पाहे। आणि गणेशाचाचि होये। चउदसी म्हणे माये। तुझाच वो दुर्गे॥ ८१९॥
नित्यनैमित्तिकें कर्मे सांडी। मग बैंसे नवचंडी। आदित्यवारीं वाढी। भैरवां पात्रीं॥ ८२०॥
पाठी सोमवार पावे। आणि बेलेंसी लिंगा धांवे। ऐसा एकलाचि आघवे। जोगावी जो॥ ८२१॥
ऐसा अखंड भजन करी। उगा नोहे क्षणभरी। आघवेनि गांवद्वारीं। अहेव जैसी॥ ८२२॥
ऐसेनि जो भक्तु। देखसी सैरा धांवतु। जाण अज्ञानाचा मूर्तु। अवतार तो॥ ८२३॥

अर्थ—आणि द्रव्य मिळविण्याकरिता ज्याप्रमाणे वैराग्याचे सोंग दाखवावे, त्याप्रमाणे जो माझ्या ठिकाणी भक्ति दाखवितो; पण चित्तात विषयसुखाची उत्कट इच्छा असते॥ ८०८॥ किंवा ज्याप्रमाणे जाराकडे जाता यावे म्हणून व्यभिचारिणी स्त्री, पतीच्या मनाप्रमाणे वागल्यासारखे दाखविते॥ ८०९॥ त्याप्रमाणे, अर्जुना जो माझे भजन करतो व माझ्या भजनाची पायरी (निमित्त) करून विषयप्राप्तिकडे दृष्टि ठेवितो॥ ८१०॥ आणि भजन केल्या बरोबर इच्छित विषय प्राप्त झाला नाही तर, हे खोटे आहे, असे म्हणून तो भजन टाकून देतो॥ ८११॥ ज्याप्रमाणे कुणबी नवी नवी शेती करतो, त्याप्रमाणे जो निरनिराळे देव मांडून पहिल्याला केलेला पूजादि प्रकार त्या नव्यालाहि करतो॥ ८१२॥ ज्याचा विशेष थाटमाट दिसेल त्या गुरुच्या मार्गाचा आश्रय करतो व त्याच्यापासूनच मंत्र घेतो, ज्याचा थाटमाट दिसत नाही, अशा गुरुचा मंत्र घेऊ इच्छित नाही॥ ८१३॥ सचेतन प्राण्याशी जो तिरसटपणाने वागतो, पण अचलमूर्तीचे ठिकाणी मात्र मोठा आदर ठेवतो, त्याप्रमाणे ज्याच्याने कोठेहि एकनिष्ठ राहणे होत नाही॥ ८१४॥ माझी मूर्ति तयार करवून त्याची घराच्या कोपऱ्यात प्रतिष्ठा करतो व आपण देव देवी यांच्या यात्रेला जातो॥ ८१५॥ नित्य माझी उपासना करतो, पण लग्न इत्यादि प्रसंगविशेषी माझे पूजन सोडून तशाच भावाने कुलदेवतेचेच पूजन करतो; तसेच एखादा पर्वकाळ आल्यास त्या पर्वकाळी ज्या देवतेचे विशेष माहात्म्य सांगितले असेल, त्याचीच पूजा करतो॥ ८१६॥ किंवा मी प्रत्यक्ष घरात असताना मला सोडून दुसऱ्याचे नवस करतो. पितराचे श्राद्धादिकार्य करणे प्राप्त झाले असता सर्वस्वी पितरांचा भक्त बनतो॥ ८१७॥ एकादशीच्या दिवशी आमच्या ठिकाणी जितका आदर दाखवितो तितकाच आदर नागपंचमीच्या दिवशी सर्पदंशाच्या भीतीने नागाचे ठिकाणी दाखवितो॥ ८१८॥ चतुर्थी आली रे आली की, तो गणेशाचा भक्त होतो आणि महामारीच्या भीतीने "माते दुर्गे! मी सर्वस्वी तुझे लेकरू आहे" असे म्हणून चतुर्दशीच्या दिवशी देवीला शरण जातो॥ ८१९॥ दररोज करायचे ते नित्य व श्राद्धादि निमित्ताने करायचे ते नैमित्तिक, अशी ही दोन्ही कर्मे सोडून देऊन शत्रूचा घात करण्याकरिता नवचंडीचे अनुष्ठान करायला बसतो. रविवार आला असता पात्रात खिचडी वाढून कालभैरवाला नैवेद्य दाखवितो॥ ८२०॥ नंतर सोमवार आला की बेल घेवून शिवलिंगाच्या पूजेला धावतो. याप्रमाणे एकटा सर्व देवाचा भक्त आहे, असे दाखवितो॥ ८२१॥ ज्याप्रमाणे बहुतेक गावातील सर्व द्वारात फिरणाऱ्या वेश्येचे गावातील पुरुष पति असल्यामुळे ती अखंड सौभाग्यवती असते, त्याप्रमाणे जो क्षणभर उगा न राहता सर्व देवांचे अखंड भजन करणारा असतो॥ ८२२॥ अशा रीतीने जो भक्त तुला चोहोकडे धावत असलेला दिसेल तो अज्ञानाचा मूर्त अवतार आहे, असे समज॥ ८२३॥

आणि एकांतें चोखटें। तपोवनें तीर्थें तटें। देखोनि जो गा विटे। तोहि तोचि॥ ८२४॥
जया जनपदीं सुख। गजबजेचें कवतिक। वानूं आवडे लौकिक। तोही तोचि॥ ८२५॥
आणि आत्मा गोचरु होये। ऐसी जे विद्या आहे। ते आइकोनि डौर वाहे। विद्वांसू जो॥ ८२६॥
उपनिषदांकडे न वचे। योगशास्त्र न रुचे। अध्यात्मज्ञानीं जयाचें। मनचि नाहीं॥ ८२७॥
आत्मचर्चा एकी आथी। ऐसिये बुद्धीची भिंती। पाडूनि जयाची मती। वोढाळ जाहली॥ ८२८॥
कर्मकांड तरी जाणे। मुखोद्गत पुराणें। ज्योतिषीं तो म्हणे। तैसेंचि होय॥ ८२९॥
शिल्पीं अति निपुण। सूपकर्मीही प्रवीण। विधि आथर्वण। हातीं आथी॥ ८३०॥
कोकीं नाहीं ठेलें। भारत कीर म्हणितलें। आगम आपाविले। मूर्त होती॥ ८३१॥
नीतिजात सुझे। वैद्यकही बुझे। काव्यनाटकीं दुजें। चतुर नाहीं॥ ८३२॥
स्मृतींची चर्चा। दंशु जाणे गारुडिचा। निघंट प्रज्ञेचा। पाइकी करी॥ ८३३॥
पैं व्याकरणीं चोखडा। तर्कीं अतिगाढा। परि एक अध्यात्मज्ञानीं फुडा। जात्यंध जो॥ ८३४॥
तें एकवांचूनि आघवां शास्त्रीं। सिद्धांतनिर्माणधात्री। परि जळो तें मूळनक्षत्रीं। न पाहें गा॥ ८३५॥

अर्थ—आणखी तपोवन, तीर्थ, नद्यांचे तीर इत्यादि एकांतातील उत्तम स्थाने पाहून ज्याला वीट येतो, तोहि अज्ञानत्वाचा मूर्त अवतार आहे॥ ८२४॥ ज्याला लोकात राहण्यानेच सुख होते, गोंगाट-गर्दी याचे कौतुक वाटते आणि लौकिक गोष्टीचीच स्तुति करावीशी वाटते, तोहि अज्ञानाचा मूर्त अवतार होय॥ ८२५॥ आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करून देणारी अशी जी ब्रह्मविद्या ती ऐकल्याबरोबर जो शहाणा पुरुष हातात डमरू वाजवून तिचा उपहास करतो॥ ८२६॥ जो उपनिषदाकडे कधी वळत नाही, योगशास्त्र ज्याला आवडत नाही व अध्यात्मज्ञानाचे ठिकाणी ज्याचे मन घेत नाही॥ ८२७॥ आत्मचर्चा म्हणून एक अशी आवश्यक बाब आहे की शाहाणे पुरुष आपल्या परम कल्याणाकरिता ती करीत असतात, अशा बुद्धीची भिंत पाडून ज्याची बुद्धी वाटेल तेथे भटकणारी झाली आहे॥ ८२८॥ संपूर्ण कर्मकांड जाणतो, पुराणे मुखोद्गत आहेत, जसे म्हणतो तसेच होते, असा फलज्योतिष्यात जो पारंगत आहे॥ ८२९॥ शिल्पशास्त्रात निपुण असून पाककर्मातहि प्रवीण आहे, अथर्व वेदातील अभिचारिक विधि सर्व अवगत आहेत॥ ८३०॥ कामशास्त्रात काही जाणावयाचे राहिले नाही, संपूर्ण भारत म्हटले गेले, शास्त्रे इतकी स्वाधीन केली की ती मूर्त होऊन समोर उभी राहतात॥ ८३१॥ सर्व प्रकारच्या नीती चांगल्या समजतात वैद्यशास्त्रहि जणतो, काव्य-नाटक इत्यादि साहित्यात त्याच्यासारखा दुसरा चतुर नाही॥ ८३२॥ स्मृतीची चर्चा करणे, तसेच गारुडीविद्येचे मर्म तो जाणतो, वैदिकशब्दाचा कोश तर त्याच्या बुद्धीच्या आकलनशक्तीची चाकरीच करतो॥ ८३३॥ व्याकरणशास्त्रात त्याचा उत्तम हातखंडा असून तर्कशास्त्रात अत्यंत गाढा विद्वान आहे; पण अध्यात्मशास्त्रातील आत्मज्ञानविषयी मात्र जो खरोखर जन्मांध आहे॥ ८३४॥ एका अध्यात्म ज्ञानावाचून इतर सर्व शास्त्रामध्ये सिद्धान्ताला प्रसवणारी ती जननीच आहे; पण आग लागो अशा ज्ञानाला! मूळनक्षत्रावर जन्मलेले मूल जसे पाहू नये, त्याप्रमाणे त्याच्याकडे ढुंकून देखील पाहू नकोस॥ ८३५॥

मोरांचा आंगीं अशेषें। पिसें असती डोळसें। परी एकली दिठी नसे। तैसें तें गा॥ ८३६॥
जरी परमाणूएवढें। संजीवनीमूळ जोडे। तरी बहु काय गाडे। भरणें येरें॥ ८३७॥
आयुष्यावीण लक्षणें। सिसेंवीण अळंकरणें। वोहरेंवीण वाधावणें। तो विटंबु गा॥ ८३८॥
तैसें शास्त्रजात जाण। आघवेंचि अप्रमाण। अध्यात्मज्ञानेंविण। एकलेनी॥ ८३९॥

अर्थ—ज्याप्रमाणे मोराच्या आंगावर सर्वच डोळे असलेली पिसे असतात; पण त्या पिसाच्या डोळ्यामध्ये एक दृष्टि मात्र नसते; म्हणून त्या डोळ्यांचा काही उपयोग नाही; त्याप्रमाणे अध्यात्मज्ञानावाचून इतर शास्त्राचे पुष्कळहि ज्ञान असले, तरी ते व्यर्थ होय॥ ८३६॥ मेलेल्या मनुष्यासहि जिवंत करणारी संजीवनी मुळी परमाणुएवढी जरी जवळ असेल तर बाकीच्या गाडाभर इतर पुष्कळ औषधि कशाला बाळगायच्या?॥ ८३७॥ आयुष्य सरलेल्याची

सामुद्रिक लक्षणे सांगणे, शीर नाही त्याला अलंकार घालणे, वधुवराशिवाय वर्धावा धाडणे, ही विटंबनाच होय॥ ८३८॥ त्याप्रमाणे अर्जुना! एका अध्यात्मज्ञानावाचून इतर नाना-प्रकारच्या शास्त्राचे ज्ञान अविद्याविषयक म्हणून अप्रमाण आहे, असे जाण॥ ८३९॥

गूढार्थदीपिका-आघवेचि अप्रमाण—

''द्वे विद्ये वेदितव्ये इति ह स्म यद्ब्रह्मविदो वदन्ति परा चैवापरा च॥ ४॥ तत्रापरा ऋग्वेदो यजुर्वेद: सामवेदोऽथर्ववेद: शिक्षा कल्पो व्याकरण निरुक्तं छंदो ज्योतिषामिति। अथ परा यया तदक्षरमधिगम्यते॥ ५॥'' (मुं० उ० १-१-४-५)

विद्या, परा व अपरा, अशी दोन प्रकारची आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतिष इत्यादि सर्व अपरा विद्या असून ज्या विद्येने परमात्म्याला जाणता येते, तिला परा विद्या म्हणतात, असे मुंडकोपनिषदातील श्रुतीत सांगितले आहे. ''अपरा हि विद्या अविद्या सा'' संपूर्ण अपरा विद्या अविद्याजन्य किंवा भ्रांतिजन्य म्हणजे संसारविषयक आहे, असे आचार्यांनी त्यावरील भाष्यात म्हटले असल्यामुळे अर्थातच ती प्रमाणभूत होऊ शकत नाही. माउलींनी हेच येथे ''आघवेचि अप्रमाण'' या चरणाने सांगून परा विद्या ही जीवाला त्याच्या अविनाशी सुखरूप अशा आत्मस्थितीची प्राप्ति करून देणारी आहे असे सूचित केले आहे.

सारांश, अपराविद्या संसारदायक असल्यामुळे जीवाची दु:खातून कायमची सुटका करून देऊन अविनाशी सुखस्थिति प्राप्त करून देणारी नाही; म्हणून प्रमाण नाही.

यालागीं अर्जुना पाहीं। अध्यात्मज्ञानाच्या ठायीं। जया नित्यबोधु नाहीं। शास्त्रमूढा॥ ८४०॥
तया शरीर जें जालें। तें अज्ञानाचें बीं विरूढलें। तयाचें व्युत्पन्नत्व गेलें। अज्ञानवेलीं॥ ८४१॥
तो जें जें बोले। तें अज्ञानचि फुललें। तयाचें पुण्य जें फळलें। तें अज्ञानचि गा॥ ८४२॥
आणि अध्यात्मज्ञान कहीं। जेणें मानिलेंचि नाहीं। तो ज्ञानार्थु न देखे काई। हें बोलावें असे॥ ८४३॥

अर्थ—म्हणून अर्जुना! हे लक्षात ठेव की, शास्त्र पढूनहि ज्या मूर्खाला अध्यात्मशास्त्राचे महत्व न कळल्यामुळे अध्यात्म ज्ञान हेच एक नित्य ज्ञान असून बाकीची ज्ञाने व्यर्थ आहेत असा बोध झाला नाही॥ ८४०॥ त्याच्या ठिकाणी जे शरीर प्राप्त झाले, ते अज्ञानाचे बीज उगवले होय. त्याचे शास्त्रनैपुण्य म्हणजे वाढत गेलेली अज्ञानवेली होय॥ ८४१॥ तो जे जे बोलतो ते ते अज्ञानच फुलले, असे समज आणि त्याचे जे पुण्य फलद्रूप झाले तेहि अज्ञानच होय॥ ८४२॥ आणि अध्यात्मज्ञान म्हणून काही आहे, हे जो मानितच नाही, त्याला 'ज्ञान' या शब्दाचा अर्थ समजत नाही, हे सांगितले पाहिजे काय?॥ ८४३॥

गूढार्थदीपिका—तो ज्ञानार्थ न देखे काई। हे बोलावे असे

सत्य व मिथ्या दोन वस्तु आहेत. सत्य म्हणजे अविनाशी, सदासर्वदा असणारी. मिथ्या म्हणजे अस्तित्वात नसताना 'आहे' अशी वाटणारी. परब्रह्म जी अध्यात्मवस्तु ती सदासर्वदा अविनाशी असल्यामुळे तिच्या ज्ञानाला खरोखर ज्ञान शब्द लावता येईल. अस्तित्वात नसलेल्या, पण आहे अशी कल्पना झालेल्या वस्तूचे ज्ञान, हे काल्पनिकच असल्यामुळे ते प्रमाणभूत म्हणता येत नाही. म्हणून मिथ्या अशा सांसारिक वस्तूच्या काल्पनिक ज्ञानाला खरे समजणाऱ्या पुरुषाला, ज्ञान कशाला म्हणतात किंवा ज्ञानाचा खरा अर्थ काय, हे समजत नसते, हे उघड आहे.

ऐलीचि थडी न पवतां। पळे जो माघौता। तया पैलद्वीपींची वार्ता। काय होय॥ ८४४॥
कां दारवंठांचि जयाचें। शीर रोंविलें खांचे। तो केवीं परिवरींचें। ठेविलें देखे॥ ८४५॥
तेवीं अध्यात्मज्ञानीं जया। अनोळख धनंजया। तया ज्ञानार्थु देखावया। विषो काई॥ ८४६॥
म्हणोनि आतां विशेषें। तो ज्ञानाचें तत्त्व न देखे। हें सांगावें आखेंलेखें। न लगे तुज॥ ८४७॥
जेव्हां सगर्भे वाढिलें। तेव्हांचि पोटींचें धालें। तैसें मागिलें पदें बोलिलें। हेचि होय॥ ८४८॥
वांचूनियां वेगळें। रूप करणें हें न मिळे। जेवीं अवंतिलें आंधळें। तें दुजेनसीं ये॥ ८४९॥

एवं इये उपरतीं। ज्ञानचिन्हें मागुती। अमानित्वादि प्रभृति। वाखाणिलीं॥ ८५० ॥
जे ज्ञानपदें अठरा। केलियां येरी मोहरां। अज्ञान या आकारा। सहजें येती॥ ८५१ ॥
मागां श्लोकाचेनि अर्धार्धें। ऐसें सांगितलें श्रीमुकुंदें। ना उफराटीं इये ज्ञानपदें। तेंचि अज्ञान॥ ८५२ ॥
म्हणोनि इया वाहणी। केली म्यां उपलवणी। वांचूनि दुधा मेळऊनि पाणी। फार कीजे काई॥ ८५३ ॥
तैसें जी न बडबडी। पदाची कोर न सांडीं। मूळध्वनींचिये वाढी। निमित्त जाहालो॥ ८५४ ॥

अर्थ—अलीकडील तीरावर न पोहोचताच जो परत माघारा पळतो त्याला पलीकडच्या तीरावरील वार्ता कशी कळणार ?॥ ८४४ ॥ किंवा दारवट्यांत खळगा खणून ज्याने त्यात अपले शीर रोवून घेतले म्हणजे शरीरासह जो खळग्यात सामावला गेला तो घरात ठेवलेले कसे पाहणार ?॥ ८४५ ॥ त्याप्रमाणे हे अर्जुना! अध्यात्मज्ञानाची ज्याला यत्किंचित् ओळख नाही, त्याला खऱ्या ज्ञानाचा अर्थ जे ब्रह्म ते जाणण्याकरिता विषय राहतो काय? किंवा त्याला ज्ञानाचा अर्थ जाणण्याकरिता ज्ञानाचा विषयच कोठे राहतो ?॥ ८४६ ॥ म्हणून असा पुरुष, खऱ्या ज्ञानाने कळणारी तात्त्विक परब्रह्मवस्तु जाणत नाही, हे तुला आणखी विशेष रीतीने स्पष्ट करून सांगण्याची आवश्यकता नाही॥ ८४७ ॥ जेव्हा गर्भवती स्त्रीयेला पान वाढून जेवायला बसवावे तेव्हा तिच्याबरोबर तिच्या पोटातील गर्भहि तृप्त होतो किंवा आंधळ्याला आमंत्रण द्यावे म्हणजे तो दुसऱ्याला घेऊन येतो, त्या प्रमाणे ज्ञानाच्या जे विरुद्ध ते अज्ञानच होत असल्यामुळे मागील ज्ञानाच्या लक्षणाचा बोध करणाऱ्या पदानी अज्ञानहि बोलले गेले आहे. त्यावाचून अज्ञानाचे वेगळे लक्षण करणे संभवत नाही॥ ८४८-८४९ ॥ याप्रमाणे ज्ञानलक्षणाच्या उलट अज्ञान चिन्हे सांगून अमानित्वादिप्रभृति ज्ञानलक्षणाचीच पुन: स्तुति केली आहे॥ ८५० ॥ कारण, ज्ञानाची ही अठरा लक्षणे सांगणारी पदे दुसऱ्या बाजूने केली असता, म्हणजे उलट केली असता सहजच ती अज्ञान या आकाराला येतात॥ ८५१ ॥ मागील अर्ध्या श्लोकाने ही ज्ञानपदे उफराटी केली असता तेच अज्ञान होय, असे भगवंतानीच सांगितले आहे॥ ८५२ ॥ म्हणून (भगवंताच्या म्हणण्यानुसार) अशा प्रकारे मी अज्ञानलक्षणाचे विस्ताराने वर्णन केले. तसे न करता दुधात पाणी मिळवून ते वाढवावे, त्याप्रमाणे, महाराज! मी बडबड न करता व शब्दार्थाला यत्किंचित् न सोडता भगवंताच्या शब्दात जो ध्वनि असेल, तो स्पष्ट करण्यास निमित्त झालो आहे॥ ८५३-८५४ ॥

तंव श्रोते म्हणती राहें। कें परिहारा ठावो आहे। बिहिसी कां वाये। कविपोषका॥ ८५५ ॥
तूतें श्रीमुरारीं। म्हणितलें प्रगट करीं। जे अभिप्राय गव्हरीं। झांकिले आम्हीं॥ ८५६ ॥
तें देवाचें मनोगत। दावित आहासी तूं मूर्त। हेंहीं म्हणतां चित्त। दाटेल तुझें॥ ८५७ ॥
म्हणोनि असो हें न बोलों। परि साविया गा तोषलों। जे ज्ञानतरिये मेळविलों। श्रवणसुखाचे॥ ८५८ ॥
आतां इयावरी। जे तो श्रीहरी। बोलिला तें करीं। कथन वेगां॥ ८५९ ॥
इया संतवाक्यासरिसें। म्हणितलें निवृत्तिदासें। जी अवधारा तरी ऐसें। बोलिलें देवें॥ ८६० ॥
म्हणती तुवां पांडवा। हा चिन्हसमुच्चयो आघवा। आयकिला तो जाणावा। अज्ञानभाग॥ ८६१ ॥
इया अज्ञानभागा। पाठी देऊनि पैं गा। ज्ञानविखीं चांगा। दृढा होइजे॥ ८६२ ॥
मग निर्वाळिलेनि ज्ञानें। ज्ञेय भेटेल मनें। तें जाणावया अर्जुनें। आस केली॥ ८६३ ॥

अर्थ—तेव्हा श्रोते म्हणतात, हे कवींना रसपुष्टि देणाऱ्या ज्ञानदेवा! थांब! तुझ्या निरूपणात खुलासा करण्याचे कारणच नाही. व्यर्थ कां भीतोस ?॥ ८५५ ॥ "आम्ही जे अभिप्राय गीतेतील शब्दरूपी गुहेत गुप्त झाकून ठेवले आहेत, ते तू प्रगट कर" असे तुला भगवंतानीच सांगितले आहे॥ ८५६ ॥ ते तू भगवंताचे हृद्गतच स्पष्ट व्यक्त करून दाखवित आहेस, असे म्हणतानाहि तुझे चित्त प्रेमाने गहिवरून येईल॥ ८५७ ॥ म्हणून असो. असेहि आम्ही म्हणत नाही. पण केवळ श्रवणानेच सुख होईल अशा ज्ञाननौकेवर आम्हाला बसविलेस; म्हणून खरोखर आम्हाला फार संतोष झाला आहे॥ ८५८ ॥ आता यानंतर तो श्रीहरी जे काही बोलिला ते आम्हाला लवकर कथन कर॥ ८५९ ॥ असे संतांचे वाक्य ऐकल्याबरोबर श्रीनिवृत्तिनाथ महाराजाचे दास श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, अहो जी महाराज!

देव असे बोलले, ते ऐका॥ ८६०॥ देव म्हणतात, अर्जुना! तू हा जो संपूर्ण लक्षणसमुदाय ऐकलास, तो अज्ञानाचा भाग आहे, असे समज॥ ८६१॥ या अज्ञान भागाला पाठमोरा होऊन ज्ञानलक्षणाचे ठिकाणी चांगले दृढ होवावे-म्हणजे ज्ञानलक्षणे आंगी चांगली ठसू द्यावी॥ ८६२॥ मग मनात ठसलेल्या त्या शुद्ध ज्ञानाने मनोवृत्ति ज्या ज्ञेयाला भेटेल ते ज्ञेय जाणण्याची अर्जुनाने इच्छा केली॥ ८६३॥

गूढार्थदीपिका—येथे भेटेल या शब्दाने चित्तवृत्तीचे व ज्ञेय परब्रह्माचे ऐक्य होते असे माउलीनी सुचविले आहे. वृत्तीला जो परब्रह्माचा साक्षात्कार होतो तो ऐक्याने होतो-म्हणजे वृत्ति ब्रह्माकार होऊन जाते. ब्रह्म हे इतर ज्ञेय पदार्थाप्रमाणे ब्रह्माकारवृत्तीहून निराळे राहत नाही.

तंव सर्वज्ञांचा रावो। म्हणे जाणोनि तयाचा भावो। परिसे ज्ञेयाचा अभिप्रावो। सांगों आतां॥ ८६४॥

अर्थ—तेव्हा सर्वज्ञांचा राजा जो भगवान तो अर्जुनाच्या अंत:करणातील भाव जाणून म्हणतो, अर्जुना! आता ज्ञेयाचे स्वरूप सांगतो, ऐक॥ ८६४॥

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते। अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते॥ १२॥

अर्थ—ज्याला ज्ञेय म्हणतात, ते मी सांगतो. जे जाणले असता जीव अविनाशी होतो, ते उत्पत्तिरहित असलेले परब्रह्म होय. त्याला सत् म्हणता येत नाही व असत्‌हि म्हणता येत नाही॥ १२॥

तरि ज्ञेय ऐसें म्हणणें। वस्तुतें येणेंचि कारणें। जें ज्ञानेंवांचूनि कवणें। उपाया न ये॥ ८६५॥

अर्थ—ज्ञानेवाचूनि-म्हणजे एका त्याच्या जाणिवेवाचून-दुसऱ्या कोणत्याहि उपायाने ते प्राप्त होत नाही, या कारणामुळेच परब्रह्मवस्तूला ज्ञेय असे म्हणतात॥ ८६५॥

गूढार्थदीपिका—ज्ञानेवाचूनि कवणे। उपाया न ये-

येथे ''ज्ञान'' या शब्दाने रजस्तमगुणरहित अशा सात्विकबुद्धीत 'मी ब्रह्म आहे' या जाणीवरूपाने प्रगट झालेला आत्मप्रकाश घेतला आहे. त्यालाच सूक्ष्मबुद्धि, अग्रबुद्धि, चरमबुद्धि, विद्यावृत्ति इत्यादि नावे आहेत.

या ज्ञानवृत्तीनेच परब्रह्म जाणले जाते, म्हणून परब्रह्माला ज्ञेय म्हटले आहे. परब्रह्माचा सविकल्प व निर्विकल्प असा दोन प्रकारचा जीवाला अनुभव येतो. परब्रह्माचा, सच्चिदानंद धर्माने जेव्हा अनुभव घेतला जातो, तेव्हा ते परब्रह्म सविकल्प म्हटले जाते. असा अनुभव ज्ञानवृत्तीने येतो; अर्थात् येथे सात्विक ज्ञानाने कळणारे म्हणून जे ज्ञेयपरब्रह्म म्हटले आहे, ते सच्चिदानंदधर्माने अनुभवास येणारे सविकल्प परब्रह्म होय. त्याला जाणणे हीच त्याची प्राप्ति होय. ही ऐक्याची जाणीव किंवा ज्ञानाची जाणीव व त्या जाणिवेने जाणणारा, असे दोन्ही जेथे उरत नाहीत ते परब्रह्म निर्विकल्प म्हटले जाते.

आणि जाणितलेया वरौतें। कांहीं करणें नाहीं जेथें। जाणणेंचि तन्मयातें। आणी जयाचें॥ ८६६॥

अर्थ—आणि ज्याचे केवळ जाणणेच जीवाला तद्रूप करून सोडते, म्हणून जाणल्यानंतर जेथे दुसरे काहीच करायचे नसते॥ ८६६॥

गूढार्थदीपिका—जाणतलेयावरौते। काही करणे नाही जेथे-

उत्पन्न होऊन अस्तित्वात येणाऱ्या पदार्थाच्या प्राप्तिकरिता क्रिया उपयोगी असते; पण परब्रह्म उत्पत्तिरहित स्वत:सिद्ध असल्यामुळे त्याच्या प्राप्तीकरिता क्रिया इत्यादि उपाय उपयोगाचे नसतात. त्याला जाणणे हाच एक त्याच्या प्राप्तीचा उपाय होऊ शकतो आणि केवळ जाणण्यानेच जीव त्याच्याशी तद्रूप होऊ शकतो-म्हणजे परब्रह्माचे म्हणून सांगितलेल्या सच्चिदानंदधर्माचा, जीव आपल्याच ठिकाणी अनुभव घेतो. हीच त्याची तन्मयता किंवा तद्रूपता होय.

जें जाणितलेयाचिसाठीं। संसार काढूनियां कांठी। जिरोनि जाइजे पोटीं। नित्यानंदाच्या॥ ८६७॥

अर्थ—हे परब्रह्म जाणले असता व संसाराला त्याच्या नि:शेष बाहेर काढले असता जीवाने नित्यानंदाच्या पोटात जिरून जावे॥ ८६७॥

गूढार्थदीपिका—संसार काढूनिया कांठी—

ज्याप्रमाणे नदीत बुडी मारणारा सर्व अंगावरील कपडे काठावर काढून ठेवतो व त्यापासून अलग होतो, त्याप्रमाणे व्यतिरेकाने स्थूल, सूक्ष्म, कारण या तिन्ही देहाहून माझे मूळचे परब्रह्मस्वरूप निराळे आहे असे जाणून व संपूर्ण संसाराहून अलग होऊन त्याला (संसाराला) विसरला असता जीव नित्यानंदरूप आपल्या मूळच्या स्वरूपाशी ऐक्यरूप समाधि साधतो व आनंदरूप होतो.

तें ज्ञेय गा ऐसें। आदि जया नसे। परब्रह्म आपैसें। नांव जया॥ ८६८॥

अर्थ—अर्जुना! ते ज्ञेय परब्रह्म उत्पत्तिरहित आहे. त्याला परब्रह्म हे नाव सहज प्राप्त झालेले आहे-म्हणजे त्याचे नाव सर्वनिरपेक्ष आहे॥ ८६८॥

गूढार्थदीपिका—जीवाचे मूळचे स्वरूप निर्विकल्प आहे. अशा निर्विकल्प स्वरूपाचे, शब्दादिकांचे द्वारा ज्ञान होणेच शक्य नसल्यामुळे व ज्ञान झाल्याखेरीज जीव अज्ञानादि उपाधीतून मुक्त होणे शक्य नसल्यामुळे जीवाला, स्वरूपाचे ज्ञान व्हावे म्हणून श्रुतीने स्वरूपाचे ठिकाणी शब्द प्रवृत्ति केली आहे. ती शब्दप्रवृत्ति साक्षात् वाचकरूपाने होत नसून स्वरूपाच्या विरुद्धधर्माची व्यावृत्ति करणारी, अशी विशेषरूपाने होत असली, तरी काही शब्दाची प्रवृत्ति विशेषणरूप असून लक्षणरूपहि असते. ''समानजातीयेभ्य एव निवर्तकानि विशेषणानि विशेषस्य। लक्षणं तु सर्वत एव यथावकाशप्रदात्राकाशमिति'' (तै० उ० २-१ शां० भा०) ''विशेषण हे वस्तूच्या सजातीय पदार्था पासून वस्तूला निराळे करणारे असते आणि लक्षण हे सर्व पदार्थापासून वस्तूला निराळे करणारे असते. जसे आकाश अवकाशाला देणारे आहे'' असे आचार्यांनी विशेषण व लक्षण यात भेद दाखविला आहे. म्हणून विशेषणार्थक शब्द, हे विरुद्धधर्माची व्यावृत्ति करतात व लक्षणार्थक शब्द हे विरुद्धधर्माची व्यावृत्ति करून वस्तूच्या स्वरूपधर्माचाहि बोध करून देतात. 'परब्रह्म' हा शब्द असाच लक्षणार्थक असल्यामुळे सविकल्पदशेत तो स्वरूपाचा सहज वाचकासारखा झाला आहे, असे माउलीचे येथे म्हणणे आहे.

लक्षणार्थक शब्दाच्या साहाय्याने परब्रह्म ज्ञेय करून जाणतांना वृत्ति अर्थाकार झाली की लक्षणार्थक शब्दहि मागे राहतो.

जें नाही म्हणो जाइजे। तंव विश्वाकारें देखिजे। आणि विश्वचि ऐसें म्हणिजे। तरि हे माया॥ ८६९॥

अर्थ—बुद्धिवृत्ति शुद्ध होईपर्यंत हे ज्ञेय परब्रह्म जाणले जात नाही, तरी तेच नामरूपात्मक जगद्रूपाने प्रत्ययाला येत असते. आणि प्रत्ययाला येणारे जड-विनाशी व पृथक्-पृथक् वस्तुरूप असे जगत् म्हणजेच परब्रह्म असे म्हणावे. तर तसेहि नाही. तसा जगाचा प्रत्यय ही माया होय॥ ८६९॥

गूढार्थदीपिका—

दंतिनि दारुविकारे दारु तिरोभवति सोऽपि तत्रैव। जगति तथा परमात्मा परात्मन्यपि जगत्तिरोधते॥ १४॥

(शंकराचार्यकृत-स्वात्मनिरूपण)

ज्याप्रमाणे लाकडाचे ठिकाणी हत्ती वगैरेचे नामरूप प्रगट करून त्या नामरूपाकडेच लक्षण देणाऱ्याला तेथेच असलेले लाकूड दिसेनासे होऊन हत्ती अशी लाकडाहून निराळी वस्तुच प्रत्ययाला येते, त्याप्रमाणे परब्रह्मसत्तेवर प्रगट झालेल्या नामरूपाकडेच लक्ष देणाऱ्या जीवाला, आधारभूत परब्रह्माची सत्ता दिसेनाशी होऊन तिचा पूर्ण विसर पडतो व परब्रह्माहून निराळे नामरूपात्मक जड-विनाशी व पृथक्-पृथक् वस्तुरूप असे जगत् प्रत्ययाला आले आहे; म्हणून असा विश्वाकार प्रत्यय ही माया किंवा भ्रम होय. परब्रह्म न विसरता विश्वाकाराचा परब्रह्माप्रमाणे सच्चिदानंदात्मक प्रत्यय आला असता तर तो प्रत्यय मायिक किंवा भ्रमजन्य, खोटा असा म्हणता आला नसता; म्हणून येथे जड-विनाशी व पृथक् पृथक् वस्तुरूपाने प्रत्ययाला येणाऱ्या विश्वालाच खोटे किंवा मायिक म्हटले आहे.

रूप वर्ण व्यक्ती। नाहीं दृश्य द्रष्टा स्थिती। तरि कोणें कैसे आथी। म्हणावें पां॥ ८७०॥

अर्थ—या परब्रह्माचे ठिकाणी रूप, वर्ण, व्यक्ति, मर्यादा किंवा दृश्य, दृष्टा ही स्थिति नाही. त्या परब्रह्माला कशाप्रकारचे आहे म्हणून कोणाला म्हणता येईल?॥ ८७०॥

गूढार्थदीपिका—वस्तूहून निराळ्या असलेल्या रूप, वर्ण, व्यक्ति, दृश्य, दृष्टा इत्यादिकांच्या द्वारा वस्तु अशा प्रकारची आहे, असे त्या वस्तूचे वर्णन करता येते; पण परब्रह्माहून निराळे काहीच नसल्यामुळे किंवा आहे ते सर्व शुद्ध परब्रह्मच असल्यामुळे परब्रह्म अशा प्रकारचे आहे असे कोणाच्या द्वारा व कोणाला वर्णन करता येईल?

सारांश परब्रह्म निर्विकल्प आहे.

आणि साचचि जरी नाहीं। तरि महदादिक कोणें ठायीं। स्फुरत कैचें काईं। तेणेंवीण असे॥ ८७१॥

अर्थ—आणि ज्ञेय परब्रह्मवस्तू खरोखरच नाही, असे म्हणावे तर त्या सत्यवस्तु वाचून ही भ्रमजन्य संपूर्ण महदादि सूक्ष्म व स्थूळ सृष्टि कोणत्या आधारावर व कशी भासते?॥ ८७१॥

गूढार्थदीपिका—सत्यवस्तूच्या आधारावाचून भ्रम होऊ शकत नाही किंवा भ्रमजन्य वस्तूला सत्य वस्तूचा आधार असावा लागतो. सत् परब्रह्मवस्तु मूळात नसती व तिचा आधार नसता तर महदादि प्रपंचाचा भ्रम होणेच शक्य नव्हते.

म्हणोनि आथी नाथी हे बोली। जें देखोनि मुकी जाहली। विचारासीं मोडली। वाट जेथें॥ ८७२॥

अर्थ—म्हणून परब्रह्माचे ठिकाणी "आहे नाही" हे शब्दच परब्रह्माला पाहून मुके झाले—म्हणजे ते प्रवृत्त होत नाहीत. तेथे विचाराची देखील वाट खुंटली॥ ८७२॥

गूढार्थदीपिका—म्हणोनि आथी नाथी हे बोली। जे देखोनि मुकी जाहली—

एका ठिकाणी व एका काळी राहून दुसऱ्या ठिकाणाहून दुसऱ्या काळी राहत नसणाऱ्या, तसेच उत्पन्न होऊन अस्तित्वात येणाऱ्या व ते अस्तित्व नाहीसे होणाऱ्या पदार्थांना 'आहे-नाही' म्हणता येते; पण आत्मस्वरूप अणुरेणूतून देखील सदासर्वदा व्यापक असल्यामुळे व तसेच ते उत्पत्तिनाशरहित अनादि स्वत:सिद्ध असल्यामुळे, तेथे 'आहे-नाही' हे शब्द लावता येत नाहीत.

परब्रह्माला 'आहे' म्हणता येत नाही व 'नाही' म्हणता येत नाही असे येथे जे म्हटले आहे, त्याचा परब्रह्म सदसत् विलक्षण अनिर्वचनीय-म्हणजे काल्पनिक किंवा खोटे आहे, असा अर्थ, ते अस्तित्वात असल्यामुळे करतां येत नाही. त्याचे हे अस्तित्व "आपणा भागु तैसे। असणेचि जे असे। असे नाही हे ओसे। पाडूनिया" (अमृ० प्र० ४-४०) या अमृतानुभवातील ओवीत सांगितल्याप्रमाणे 'आहे-नाही' यावाचून आहे.

विचाराची मोडली। वाट जेथे-

परब्रह्म, विचाराला जाणणारे म्हणून विचाराच्या पलीकडे, विचारावाचून केवल अद्वैतरूप आहे व त्याचे ठिकाणी विचाराची प्रवृत्तिहि होत नाही, असे येथे "विचाराची मोडली वाट" या पदाने सांगितले वाहे.

जैसी भांडघटशरावीं। तदाकारें असे पृथ्वी। तैसें सर्व होऊनियां सर्वीं। असे जे वस्तु॥ ८७३॥

अर्थ—ज्याप्रमाणे भांडे, घट, वेळणी इत्यादि मातीच्या पदार्थात मातीच तदाकार होऊन असते, दुसरे काही नसते, त्याप्रमाणे जी परब्रह्म वस्तु सर्व होऊनच सर्वात भरून आहे॥ ८७३॥

गूढार्थदीपिका—जगद्वस्तु परब्रह्माहून निराळी अशी खरी वाटते तोपर्यंत त्याला आधारभूत असलेले परब्रह्म झाकले जाते; म्हणून परब्रह्म जाणण्याकरिता प्रथम व्यतिरेक सांगितला जातो-म्हणजे जगताला परब्रह्माहून निराळे पाहायला सांगितले जाते. जगताचा व्यतिरेक करून परब्रह्माला पाहिले असता जगताचे भिन्न वस्तुत्वच नाहीसे होऊन सर्व नामरूपाने व सर्व नामरूपात एक परब्रह्मवस्तूच नंतर अनुभवाला येते, असे या ओवीत सांगितले आहे.

सर्वत: पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम्। सर्वत:श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति॥ १३॥

अर्थ—हे परब्रह्म, सर्वत्र हात, पाय, डोळे, शिरे, मुखे, श्रवण इत्यादि असलेले व विश्वामध्ये जेवढे कांही आहे ते सर्व व्यापून राहते॥ १३॥

आघवांचि देशीं काळीं। नव्हतां देशकाळांवेगळी। जे क्रिया स्थूळास्थूळीं। तेचि हात जयाचे॥ ८७४॥
तयातें याकारणें। विश्वबाहु ऐसें म्हणणें। जें सर्वचि सर्वपणें। सर्वदा करी॥ ८७५॥

अर्थ—स्थूळ व सूक्ष्म पदार्थरूप संपूर्ण देशाचे ठिकाणी व संपूर्ण काली त्या त्या देशकालाहून वेगळे न होता जी क्रिया होते, तेच ज्याचे हात आहेत॥ ८७४॥ सर्व पदार्थाचे ठिकाणी सर्वदा व सर्व होणाऱ्या क्रिया आत्मसत्तेनेच होत असल्यामुळे त्याला संपूर्ण जिकडे तिकडे हात आहेत असे म्हटले जाते॥ ८७५॥

गूढार्थदीपिका—सत्तामात्र निर्गुण स्वरूपाचे ठिकाणी भासणाऱ्या ब्रह्मांडांत जेवढ्या काही पदार्थमात्राच्या सर्व काळी क्रिया होतात, त्या सर्व विश्वाच्या अंतर्यामि असणाऱ्या परमेश्वराचे सत्तेनेच होतात; असे दाखवून माउलीनी नामरूपरहित बुद्धिगम्य अशा सत्तामात्र निर्गुणस्वरूपाचे ठिकाणी जीवाच्या बुद्धीचा प्रवेश करून दिला आहे.

आणि समस्तांही ठायां। एके काळीं धनंजया। आलें असे म्हणोनि जया। विश्वांघ्रि नाम॥ ८७६॥

अर्थ—आणि अर्जुना! आत्मस्वरूप संपूर्ण ठिकाणी एकाच वेळी व्यापून असल्यामुळे त्याला ''विश्वांघ्रि'' म्हणजे जिकडे तिकडे सर्वत्र पाय आहेत, असे नाव प्राप्त झाले आहे॥ ८७६॥

गूढार्थदीपिका—एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचे काम पाय करीत असतात व आत्मा व्यापक आहे म्हणजे एकाच काळी सर्वत्र गेल्यासारखा आहे; म्हणून त्याच्या या व्यापक धर्माचे ठिकाणी पायाची कल्पना केली आहे.

पैं सवितया आंग डोळे। नाहींत वेगळवेगळे। तैसें सर्वद्रष्टें सकळें। स्वरूपें जें॥ ८७७॥
म्हणोनि विश्वतश्चक्षु। हा अचक्षुच्या ठायीं पक्षु। बोलावया दक्षु। जाहला वेदु॥ ८७८॥

अर्थ—ज्याप्रमाणे प्रकाशरूप सूर्याचे अंग व डोळे वेगळे वेगळे नाहीत, त्याप्रमाणे जे आत्मस्वरूप सर्वरूपाने सर्वदृष्ट आहे॥ ८७७॥ म्हणूनच जाणत्या वेदाने चक्षुरिंद्रियरहित अशा आत्मस्वरूपाला जिकडे तिकडे चक्षुरिंद्रिये आहेत, असे म्हटले आहे॥ ८७८॥

गूढार्थदीपिका—यच्चयावत् जीवाच्या जाणणाऱ्या वृत्तीचे ठिकाणी चैतन्यरूप आत्माच अधिष्ठानभूत असल्यामुळे यच्चयावत् प्राणि जे जे जाणतात ते ते सर्वच अंतर्यामि परमात्मा अनायासे जाणतो.

जें सर्वांचिया शिरावरी। जे नित्य नांदे सर्वांपरी। ऐसिये स्थितीवरी। विश्वमूर्धा म्हणिपे॥ ८७९॥

अर्थ—जी आत्मवस्तु सर्व प्रकारे सर्वाच्याशिरावर-म्हणजे सर्वाच्या पलीकडे-अखंड आहे. अशी स्थिति असल्यामुळे तिला विश्वमूर्धा असे वेद म्हणतो॥ ८७९॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे मनुष्याचे शिर सर्व अवयवांचे वर आहे, त्याप्रमाणे आत्मवस्तुहि सर्व कार्यकारणरूप पदार्थांचे वर आहे व अशीच ती सदासर्वदा राहते; म्हणूनच त्यांच्या, सर्व धर्माचे वर असणे, या धर्माच्या ठिकाणी शिराची कल्पना करून त्याला (आत्मस्वरूपाला) विश्वमूर्धा—म्हणजे ज्याला जिकडे तिकडे शिरे आहेत असे म्हटले आहे.

पैं गा मूर्ति तेंचि मुख। हुताशनीं जैसें देख। तैसें सर्वपणें अशेख। भोक्तें जें॥ ८८०॥
यालागीं तया पार्था। विश्वतोमुख हे व्यवस्था। आली वाक्पथा। श्रुतीचिया॥ ८८१॥

अर्थ—तसेच अर्जुना! ज्याप्रमाणे जेवढी अग्नीची मूर्ति तेवढेहि त्याचे मुखच असते-म्हणजे त्याच्या कोणत्याहि भागावर टाकलेली आहुति अग्नीतच पडते, त्याप्रमाणे आत्मस्वरूप सर्व आपणच झाले असल्यामुळे सर्व भोगणारेहि तेच आहे॥ ८८०॥ म्हणूनच अर्जुना! त्याला जिकडे तिकडे मुख आहेत असे श्रुतीला म्हणावे लागले॥ ८८१॥

गूढार्थदीपिका—जीव भ्रांतीनेच आपल्याला निराळा व भोक्ता समजतो. वस्तुत: एक परमात्माच अद्वैतस्वरूप सर्व त्यालाच समर्पण होते; म्हणून तोच एक भोक्ता आहे, असे श्रुतीने सांगितले आहे.

आणि वस्तुमात्रीं गगन। जैसें असे संलग्न। तैसे शब्दजातीं कान। सर्वत्र जया॥ ८८२॥
म्हणोनि आम्ही तयातें। म्हणों सर्वत्र आइकतें। एवं जें सर्वांतें। आवरूनि असे॥ ८८३॥
एऱ्हवीं तरी महामती। विश्वतश्चक्षु इया श्रुती। तयाचिये व्याप्ती। रूप केलें॥ ८८४॥

वांचूनि हस्त नेत्र पाये। हे भाष तेथ कें आहे। सर्व शून्याचा साहे। निष्कर्षु जें॥ ८८५॥

अर्थ—आणि ज्यप्रमाणे आकाश, यच्चयावत वस्तूशी संलग्न आहे, त्याप्रमाणे जे सर्वत्र ओतप्रोत भरले असल्यामुळे संपूर्ण शब्दजात हेच ज्याचे सर्वत्र कान आहेत॥ ८८२॥ म्हणून 'सर्वत्र ऐकणारे' असे आम्ही त्याला म्हणतो. याप्रमाणे जे सर्व पदार्थमात्राला व्यापून आहे॥ ८८३॥ हे थोर बुद्धिमान अर्जुना! नाहीतरी ''विश्वतश्चक्षु'' म्हणजे ज्याला सर्वत्र डोळे आहेत, या श्रुतीने परब्रह्माचे जे वर्णन केले आहे, ते त्याची व्याप्ति दाखविण्याकरिता-म्हणजे ते अद्वैतरूप असल्यामुळे तेच सर्वत्र व्यापक आहे, त्यावाचून दुसरी वस्तुच नाही, हे सांगण्याकरिता-केले आहे॥ ८८४॥ नाहीतर जे परब्रह्म केवळ सर्व शून्याचा-म्हणजे सर्व सत्तेची-कसोटीच सहन करते. अशा परब्रह्माचे ठिकाणी हात, पाय, डोळे इत्यादि शरीराच्या अवयवाची भाषा कोठून असणार?॥ ८८५॥

गूढार्थदीपिका—सर्व शून्याचा साहे। निष्कर्ष जे-

''सर्व शून्याचा निष्कर्ष'' या चरणाचा अर्थ करताना माझी सद्‌गुरु आई म्हणते ''सर्व शून्य म्हणजे सर्व सत्ता। अभाव नोहे सर्वथा। हे गणितशास्त्र पाहता। येईल कळोनि॥ ६८॥ शून्य दाखवावे जरी झाले। तरी करणे लागे बिंदुले। अभाव दाखववया वहिले। काहीच न लगे॥ ६९॥ शून्य अंकाच्या माथा चढे। तेव्हा दशगुण मूळ वाढे। अंकाभाव अंक माथा चढे। तरी मूळ वाढे हे दिसेना॥ ७०॥'' (भगवद्भक्ति सौरभ-पराग १-श्रीगुलाबराव महाराजकृत) येथे 'शून्य' हा शब्द अभाव किंवा काहीच नसणे, या अर्थाने योजिला नसून शून्य म्हणजे 'सत्ता या अर्थी योजिला आहे. सर्व शून्य म्हणजे सर्वसत्तारूप परब्रह्म, असा अर्थ होतो. ''शून्य'' शब्दाचा सत्ता हा अर्थ आहे, हे गणितशास्त्राचा विचार केला असता कळून येते.

गणितशास्त्रात शून्य दाखविण्याकरिता बिंदू उपयोगात असतात. ''शून्य'' शब्दाचा ''अभाव'' किंवा ''काहीच नाही'' असा अर्थ घेतला तर काहीच नाही हे दाखविण्याकरिता बिंदू देखील करायला नको.

तसेच 'शून्य' म्हणजे 'अभाव' असा अर्थ घेतल्यास ज्याप्रमाणे एका आकड्यांवर दुसऱ्या आकड्याचा अभाव असताना त्याचे मूल्य वाढलेले दिसून येत नाही, त्याप्रमाणेच आकड्यावर अभावरूप शून्य दिले असतानाहि त्या आकड्याचे मोल वाढू नये; पण उलट ज्याप्रमाणे एका आकड्यावर दुसरा आकडा ठेवला असता त्याचे मोल वाढताना दिसून येते, त्याप्रमाणे कोणत्याहि आकड्यावर शून्य दिले असता त्याची दसपट किंमत वाढते, हे आपण पाहतो. म्हणून ''शून्य'' हा शब्द अभाव वाचक नसून भावरूप सत्तावाचक आहे असे म्हणावे लागते.

अमृतानुभव प्र० ४ ओ० २४-३१ या ओव्यातून माऊलीने ''शून्य'' शब्दाचा ''सत्ता'' हा अर्थ आहे, हेच सिद्ध केले याप्रमाणे ''शून्य'' शब्दाचा ''सत्ता'' हा अर्थ असून ''सर्व शून्याचा साहे। निष्कर्ष जे'' म्हणजे परब्रह्म केवळ सत्तारूप किंवा सन्मात्र आहे. असा या चरणाचा अर्थ होतो.

वाचूनि हस्त नेत्र पाये। हे भाष तेथ के आहे-

चार चरणपंक्तीत माऊलीनी सन्मात्र आत्मस्वरूपाचे ठिकाणी हात, पाय, डोळे इत्यादि भौतिक अवयव असणे शक्य नाही, हे दाखविले आहे.

पैं कल्लोळातें कल्लोळें। ग्रसिजत असे ऐसें कळे। परि ग्रसितें ग्रासावेगळें। असे काई॥ ८८६॥

अर्थ—समुद्रावर अनेक लाटा उसळल्या असता एका लाटेने दुसऱ्या लाटेला नाहीसे केले असे दिसते, पण तेथे नाहीशी करणारी लाट व नाहीशी होणारी लाट, पाणी या स्वरूपाने पाहता परस्पराहून वेगळ्या असतात काय?॥ ८८६॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे ''पाणी'' या वस्तुरूपाने पाहता सर्व लाटा पाणीरूपच असतात, त्याप्रमाणे अमर्याद, व्यापक अशा आत्मस्वरूपाचे ठिकाणी त्याच्याहून भिन्न वस्तु व तिचे उत्पत्ति-नाश मुळीच संभवत नाहीत; म्हणून अशा आत्मवस्तूचे ठिकाणी जेवढे काही भासेल ती सर्व वस्तूची लीलाच होय.

आत्मा सच्चिदानंदस्वरूप असल्यामुळे जेव्हा त्याची लीला एक अद्वैत सच्चिदानंदस्वरूपानेच अनुभवाला येते

तेव्हा ती स्वरूपलीला होते व याच्या उलट, ती लीला जड-विनाशी अशा अनेक भिन्न भिन्न वस्तुरूपाने अनुभवास येते, तेव्हा ती अविद्या भ्रांतिजन्य लीला समजली जाते.

या स्वरूपलीलेचा अनुभव ज्ञानीभक्त घेतात व अज्ञानी लोक अज्ञानामुळे भ्रांतिजन्य लीलेचा अनुभव घेतात.

तैसें साचचि जें एक। तेथ कें व्याप्यव्यापक। परि बोलावया नावेक। करावें लागे॥ ८८७॥
पैं शून्य जैं दावावें जाहलें। तैं बिंदुलें एक पाहिजे केलें। तैसें अद्वैत सांगावें बोलें। तै द्वैत कीजे॥ ८८८॥

अर्थ—त्याप्रमाणे खरोखरच जी परब्रह्मवस्तु अस्फुट अद्वैतस्वरूप आहे, तेथे व्यापणारा व व्यापिला जाणारा असे दोन पदार्थ कोठून राहणार? पण अद्वैत परब्रह्माविषयी क्षणभर बोलण्यापुरते द्वैत स्वीकारावे लागते॥ ८८७॥ दुसऱ्याला शून्य दाखवावयाचे असले म्हणजे एक बिंदू करून दाखवितात, त्याप्रमाणे अद्वैतवस्तु शब्दाने सांगावयाची असली म्हणजे द्वैत करून-म्हणजे तिला आपल्या शब्दाचा विषय करूनच-सांगावी लागते॥ ८८८॥

एऱ्हवीं तरी पार्था। गुरुशिष्यसत्पथा। आडळु पडे सर्वथा। बोल खुंटे॥ ८८९॥
म्हणोनि गा श्रुती। द्वैतभावें अद्वैतीं। निरूपणाची वाहती। वाट केली॥ ८९०॥

अर्थ—खरोखर पाहता, अर्जुना! सच्चिन्मात्र परब्रह्माचे ठिकाणी शब्दप्रवृत्ति होत नाही आणि गुरुशिष्यपरंपरेलाहि आडखीळ पडते॥ ८८९॥ म्हणूनच श्रुतीने अज्ञानी लोकांना परब्रह्माचे सत्यत्व व जगताचे मिथ्यात्व समजावून देण्याकरिता अद्वैत परब्रह्माचे द्वैतभावाने निरूपण करण्याची वाट वाहती केली-म्हणजे रूढ केली॥ ८९०॥

गूढार्थदीपिका—सच्चिन्मात्र आत्मस्वरूपाचे ठिकाणी, सांगणारी व सांगितली जाणारी वस्तु एकरूप होऊन जात असल्यामुळे तिथे बोलण्याला मौन पडते व गुरुशिष्य मार्गालाहि अवकाश नसतो. पण अज्ञान्याची द्वैतभावना नाहीशी करून आत्म्याची अद्वैतस्थिति त्याला पटवून देण्याकरिता अद्वैतस्वरूपाचे शब्दाने वर्णन करणे अवश्य असते. ते शब्दाने वर्णन होत असतांना सच्चिन्मात्रस्वरूपाचे ठिकाणी शब्दमात्र द्वैत उत्पन्न करावे लागते.

तेंचि आतां अवधारी। इये नेत्रगोचरें आकारीं। तें ज्ञेय गा जयापरी। व्यापक असे॥ ८९१॥

अर्थ—या संपूर्ण डोळ्याने दिसणाऱ्या नामरूपात ते ज्ञेय ज्या रीतीने व्यापक आहे, तेच आता सांगतो, ऐक॥ ८९१॥

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम्। असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च॥ १४॥

अर्थ—जे ज्ञेय, मनबुद्धिसह संपूर्ण इंद्रिये व सत्वादिगुण या रूपाने प्रत्ययाला येते; पण जे सर्व मन, इंद्रिये व गुण यापासून निराळे आहे, जे कशाशीहि लिंपित नसून सर्वांना धारण करणारे आहे व जे सत्वादिगुणरहित असून गुण भोगणारे आहे॥ १४॥

तरी तें गा किरीटी ऐसें। अवकाशीं आकाश जैसें। पटीं पट होऊनि असे। तंतु जेवीं॥ ८९२॥
उदक होऊनि उदकीं। रसु जैसा अवलोकीं। दीपपणें दीपकीं। तेज जैसें॥ ८९३॥
कर्पूरत्वें कापुरीं। सौरभ्य असे जयापरी। शरीर होऊनि शरीरीं। कर्म जेवीं॥ ८९४॥
किंबहुना जैसें पांडवा। सोनेंचि सोनयाचा रवा। तैसें जें या सर्वां। सर्वांगीं असे॥ ८९५॥

अर्थ—अर्जुना! ज्याप्रमाणे अवकाश किंवा पोकळी या गुणाचे ठिकाणी आकाश आहे किंवा वस्त्राचे ठिकाणी सूतच वस्त्ररूप होऊन राहिले आहे; त्याप्रमाणे ते ज्ञेय सर्वरूपाने आहे॥ ८९२॥ किंवा ज्याप्रमाणे रस हा गुण पाण्याचे ठिकाणी पाणी होऊनच राहतो, पाहा. तेज, दिव्याचे ठिकाणी दिव्याच्या रूपाने राहते॥ ८९३॥ अथवा कापराच्या ठिकाणी सुगंध हा कापराचे रूपानेच असतो, शरीराचे व्यापाररूप कर्म शरीराचे ठिकाणी शरीररूप होऊन राहते॥ ८९४॥ अर्जुना! फार काय सांगावे! ज्याप्रमाणे सोनेच सोन्याचा रवा होऊन राहते, त्याप्रमाणे जे ज्ञेय संपूर्ण पदार्थमात्राचे ठिकाणी पदार्थमात्र होऊन राहते॥ ८९५॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे दोरीवर भीतीने भासलेल्या कल्पित सर्पाचे ठिकाणी, दोरीच सर्परूपाने भासते, त्याप्रमाणे आत्मस्वरूपाहून भिन्नत्वाने कल्पिलेल्या सर्व कार्यरूप पदार्थरूपाने एक अद्वैत आत्माच भासत असतो, असे या ८९२ ते ८९५ ओव्यातून माउलींनी सांगितले आहे.

परी असे रवेपणामाजिवडे। तंव रवा ऐसे आवडे। वांचूनि सोनें सांगडें। सोनया जेवीं॥ ८९६॥
पैं गा वोघचि वांकुडा। परि पाणी उजू सुहाडा। वन्हि आला लोखंडा। लोह नव्हे कीं॥ ८९७॥
घटाकारें वेंटाळें। तेथ नभ गमे वाटोळें। मठीं तरी चौफळें। आये दिसे॥ ८९८॥
परि ते अवकाश जैसे। नोहेजतीचि आकाशें। जें विकार होऊनि तैसें। विकारी नोहे॥ ८९९॥

अर्थ—पण जोपर्यंत सोने रवेपणात असते तोपर्यंत रवा असे म्हटले जाते. रवेपणावाचून नुसत्या सोन्याला सोनेच म्हणतात॥ ८९६॥ हे सुहृदा अर्जुना! तसेच पाण्याचा प्रवाह वाकडा असतो, पण पाणी सरळच असते. अग्नि लोखंडात आला, तरी तो लोखंड होत नाही॥ ८९७॥ आकाश, घटाच्या आकाराने वेटाळले गेले असता ते वाटोळे दिसते, तेच मठामध्ये सापडले असता चौकोनी आकाराचे दिसते॥ ८९८॥ पण ते आकाश अवकाशरूपानेच असते, घटाकार किंवा मठाकार होत नाही. त्याप्रमाणेच जे ज्ञेयविकार रूप झाले असले तरी विकाररूपाने परिणाम पावत नाही॥ ८९९॥

गूढार्थदीपिका—सच्चिदानंद परब्रह्माहून जड-विनाशी इत्यादि भिन्न धर्माने व भिन्न वस्तुत्वाने भासणारे सर्व पदार्थ परब्रह्माचे ठिकाणी भ्रमाने भासत असल्यामुळे त्याचे निराकरण करून ज्ञेय परब्रह्म घेतले पाहिजे, असे येथे सांगितले आहे. यालाच व्यतिरेक म्हणतात हे मागे सांगितलेच आहे.

मन मुख्य इंद्रियां। सत्त्वादि गुणां ययां-। सारिखें ऐसे धनंजया। आवडे कीर॥ ९००॥
पैं गुळाची गोडी। नोहे बांधेया सांगडी। तैसीं गुण इंद्रियें फुडीं। नाहीं तेथ॥ ९०१॥
अगा क्षीराचिये दशे। घृत क्षीराकारें असे। परि क्षीरचि नोहे जैसें। कपिध्वजा॥ ९०२॥
तैसें जें इये विकारी। विकार नोहे अवधारीं। पैं आकारा नाम भोंवरी। येर सोनें तें सोनें॥ ९०३॥
इया उघड म्हाटिया। तें वेगळेपण धनंजया। जाण गुणइंद्रियां-। पासोनियां॥ ९०४॥
नामरूपसंबंधु। जातिक्रियाभेदु। हा आकारासीच प्रवादु। वस्तूसि नाहीं॥ ९०५॥

अर्थ—अर्जुना! इंद्रिये, सत्वादिगुण ज्यात मन मुख्य आहे, त्यांच्या रूपाने ते ज्ञेय भ्रमाने वाटू लागते॥ ९००॥ ज्याप्रमाणे गुळाची गोडी ढेपेच्या बांध्यासारखी होत नाही, त्याप्रमाणे ज्या ज्ञेयाचे ठिकाणी गुण, इंद्रियें ही वास्तविक नाहीत॥ ९०१॥ हे अर्जुना ज्याप्रमाणे दुधाच्या अवस्थेत तूप हे दुधाकार असते, पण ते दुधच नव्हे॥ ९०२॥ त्याप्रमाणे जे ज्ञेय, या सर्व कार्यरूप पदार्थाचे ठिकाणी असून कार्यरूप होत नाही, हे लक्षात ठेव. बुगडी हे नाव आकारालाच आहे. बाकी सोने ते सोनेच असते॥ ९०३॥ अर्जुना! स्पष्ट मराठी भाषेत बोलायचे तर सत्वादि गुण व इंद्रिये यांच्यापासून ते ज्ञेय वेगळेपणानेच असते, असे जाण॥ ९०४॥ नाम, रूप, संबंध, जाति, क्रिया हे सर्व आकाराविषयी बोलले जाते, ज्ञेयवस्तुविषयी नाही॥ ९०५॥

तें गुण नव्हे कहीं। गुणा तया संबंध नाहीं। परि तयाचांचि ठायीं। आभासती॥ ९०६॥
येतुलेयासाठीं। संभ्रांताच्या पोटीं। ऐसें जाय किरीटी। जे हेंचि धरीं॥ ९०७॥
तरि तें गां धरणें ऐसें। अभ्रातें जेवीं आकाशें। कां प्रतिवदन जैसें। आरसेनि॥ ९०८॥
नातरी सूर्य प्रतिमंडळ। जैसेनि धरी सलिल। कां रश्मिकरीं मृगजळ। धरिजे जेवीं॥ ९०९॥
तैसें गा संबंधेंवीण। यया सर्वांतें धरी निर्गुण। परी तें वाया जाण। मिथ्यादृष्टी॥ ९१०॥

अर्थ—ज्ञेयपरब्रह्माचा व सत्वादिगुणाचा मुळी संबंधच होत नसल्यामुळे ते गुणरूप कधी होत नाही, पण गुण हे त्याच्याच ठिकाणी भ्रांतीने भासतात॥ ९०६॥ म्हणूनच अज्ञानाने भ्रांत झालेल्या जीवांना, ज्ञेय परब्रह्मवस्तुच या सर्वांना धारण करते, असे वाटते॥ ९०७॥ ते त्याचे धारण करणे असे आहे, ज्याप्रमाणे आकाश अभ्रांना किंवा आरसा, मुखाच्या प्रतिबिंबाला किंवा पाणी; सूर्याचे प्रतिबिंबाला किंवा सूर्य, किरणरूप हाताचे ठिकाणी मृगजळाला धारण करतो, त्याप्रमाणे, अर्जुना! ज्ञेय जे निर्गुण परब्रह्म, ते सर्व कार्यरूप प्रपंचाला, त्यांचा यत्किंचितही संबंध न होऊं देता, धारण करते; पण ते धारण करणे खोटे असल्यामुळे व्यर्थ आहे॥ ९०८-०९-१०॥

गूढार्थदीपिका—ज्ञेय परब्रह्माचे ठिकाणी जीवाने जड-विनाशी अशा स्थूल जगताची भ्रांतीने कल्पना केली असल्यामुळे व ते जगत् खरोखरच अस्तित्वात नसल्यामुळे त्याचा ज्ञेय परब्रह्माशी काही एक संबंध नसतो; असे येथे वरील ९०६ ते ९१० ओव्यांतून माउलीनी सांगितले आहे.

आचार्यांचेही असेच मत आहे, त्यांची ''तत्रैवं सति यदध्यासस्तत्कृतेन दोषेण गुणेन वाणुमात्रेणापि स न संबध्यते'' ही ब्रह्मसूत्रावरील पंक्ति उदाहृत करून आम्ही मागे सांगितलेच आहे.

आणि यापरी निर्गुणें। गुणातें भोगणें। रंका राज्य करणें। स्वप्नीं जैसें॥ ९११॥
म्हणोनि गुणाचा संगु। अथवा गुणभोगु। हा निर्गुणीं लागु। बोलों नये॥ ९१२॥

अर्थ—आणि ज्याप्रमाणे जागृतीत भिकारी असून स्वप्नात राज्य भोगावे त्याप्रमाणे ज्ञेय असे निर्गुण परब्रह्म सत्वादि गुणाचा भोग घेत असते॥ ९११॥ म्हणून निर्गुणस्वरूपाचे ठिकाणी गुणाचा संग किंवा गुणाचा भोग होतो, असा संबंध लावून निर्गुणस्वरूपाविषयी बोलता येत नाही॥ ९१२॥

गूढार्थदीपिका—निर्गुण-म्हणजे सत्व, रज, तम या तीन गुणाविरहित असलेला, असा आचार्यांनी गीताभाष्यात 'निर्गुण' या शब्दाचा अर्थ केला आहे.

जीव हा खरोखर त्रिगुणरहितच आहे; पण तो व्यर्थच मी त्रिगुणाने बद्ध आहे, अशी खोटीच कल्पना करतो व त्या गुणाचा भोग घेतो, असा भाव.

बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च। सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत्॥ १५॥

अर्थ—जे ज्ञेय, प्राणिमात्रांच्या आत-बाहेर व्यापलेले असून जे चराचररूपहि झाले आहे. जे दूर असून जवळहि आहे, पण अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे ते अज्ञान्याला कळत नाही॥ १५॥

जें चराचर भूतां-। माजीं असे पांडुसुता। नाना वन्हीं उष्णता। अभेंदें जैसी॥ ९१३॥
तैसेनि अविनाश भावें। जें सूक्ष्मदशे आघवें। व्यापूनि असे तें जाणावें। ज्ञेय एथ॥ ९१४॥

अर्थ—हे अर्जुना! ज्याप्रमाणे अनेक प्रकारच्या अग्नीची उष्णता, त्या अग्नीशी एकरूप होऊन राहते, त्याप्रमाणे सर्व सजीव-निर्जीव प्राण्यांमध्ये जे अविनाशभावाने-म्हणजे कधीहि नाश पावत नाही अशा भावाने स्थित आहे. जे सूक्ष्मरूपाने सर्व पदार्थांना व्यापून आहे, ते येथे सांगितलेले ज्ञेय होय, असे जाण॥ ९१३-९१४॥

गूढार्थदीपिका—पूर्वसिद्ध अविनाशी भावाचा आश्रय करूनच विनाशी भावाची कल्पना होत असते. येथे माउलीनी विनाशी प्रपंचाला जो अविनाशभाव आधार आहे, ते ज्ञेय होय, अशी ज्ञेयरूप आत्म्याची अविनाशभावाने ओळख करून दिली आहे.

जें एक आंतु बाहेरी। जें एक जवळ दुरी। जें एकवांचूनि परी। दुजी नाहीं॥ ९१५॥

अर्थ—जे एक सर्वांच्या आंत-बाहेर असून आत्मविचार करणाऱ्यांना जवळ व आत्मविचार न करणाऱ्यांना दूर आहे. ज्या एकावाचून दुसरी वस्तुच नाही किंवा जे केव्हाहि काही एक बदल न होता अखंड एकसारखेच राहणारे आहे॥ ९१५॥

गूढार्थदीपिका—या ओवीत ज्ञेय आत्म्याची सर्वत्र व्याप्ति दाखवून व ते अद्वैत आहे असे सुचवून अद्वैतलक्षणाने त्याची ओळख करून दिली आहे.

क्षीरसागरींची गोडी। माजी बहु थडिये थोडी। हें नाहीं तया परवडी। पूर्ण जें गा॥ ९१६॥

अर्थ—ज्याप्रमाणे दुग्धसमुद्राच्या दुधाची गोडी काठाशी थोडी व मध्ये फार अशी नसते, त्याप्रमाणे जे अखंड सर्वत्र परिपूर्ण आहे॥ ९१६॥

गूढार्थदीपिका—ज्ञेय परब्रह्म अपूर्ण कधी होतच नाही. ते कोणत्याहि दशेत अखंड पूर्णच राहते. अशा लक्षणाने त्याची या ओवीत ओळख करून दिली आहे.

''पूर्णमदः पूर्णमिदम्'' या बृहदारण्यक श्रुतीवर भाष्य करतांना भगवान श्रीशंकराचार्यांनीहि हेच सांगितले आहे.

स्वेदजप्रभृती। वेगळाल्या भूतीं। जयाचिये अनुस्यूती। खोमणें नाहीं॥ ९१७॥

अर्थ—स्वेदज इत्यादि चारी वेगवेगळ्या प्राण्यांच्या ठिकाणी ज्याची व्याप्ति कमी जास्त नाही॥ ९१७॥

गूढार्थदीपिका—या ओवीतून ज्ञेय परब्रह्म अस्फुट आहे असे सांगून ते अवयवरहित असल्यामुळे कमी जास्त होऊ शकत नाही, असे दाखविले आहे व त्या लक्षणाने त्याची ओळख करून दिली आहे.

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम्। भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च॥ १६॥

अर्थ—जे ज्ञेय अस्फुट एकरूप आहे, तेच शरीराच्या भिन्नत्वामुळे सर्व भूताचे ठिकाणी विभागल्या गेल्यासारखे असून उत्पत्तिकाली सर्व सृष्टि निर्माण करणारे, स्थितिकाळी सृष्टीचे पोषण करणारे व प्रलयकाली सर्व सृष्टीला ग्रासणारे आहे॥ १६॥

पैं श्रोते मुख्यटिळका। घटसहस्त्रां अनेका-। मार्जी बिंबोनि चंद्रिका। न भेदे जेवीं॥ ९१८॥

अर्थ—हे थोर थोर श्रोत्यामध्ये श्रेष्ठ असलेल्या अर्जुना! ज्याप्रमाणे हजारो घटातील पाण्यात चद्रबिंब पडले तरी तो चंद्र निरनिराळा होत नाही॥ ९१८॥

गूढार्थदीपिका—या ओवीत ज्ञेय परब्रह्माचे एकवस्तुत्व दाखविले आहे. त्याचे एकवस्तुत्व कधीहि भंग पावत नाही असा भाव.

नाना लवणकणाचिये राशी। क्षारता एकचि जैसी। कां कोडी एकीं उसीं। एकचि गोडी॥ ९१९॥
तैसें अनेकीं भूतजातीं। जें आहे एकी व्याप्ती। विश्वकार्या सुमती। कारण जें गा॥ ९२०॥
म्हणोनि हा भूताकारु। जेथौनि तेंचि तया आधारु। कल्लोळा सागरु। जियापरी॥ ९२१॥

अर्थ—किंवा मिठाच्या खड्यांचा ढीग केला तरी सर्व खड्यात ज्याप्रमाणे खारटपणा सारखाच असतो किंवा उसाची एक मोळी केली तरी सर्व उसात गोडी एकसारखीच असते॥ ९१९॥ हे शुद्धबुद्धि अर्जुना! त्याप्रमाणे जे अनेक भूतमात्राचे ठिकाणी एक अद्वैतरूपानेच व्यापून असून तेच जगद्रूप कार्याचे कारणहि आहे॥ ९२०॥ म्हणून ज्याप्रमाणे समुद्रापासून उत्पन्न झालेल्या तरंगाला समुद्र आधार असतो, त्याप्रमाणे ज्या ज्ञेयापासून हा भूताकार उत्पन्न झाला, ते ज्ञेयच त्याला आधार आहे॥ ९२१॥

गूढार्थदीपिका—ज्ञेय परमात्मा जगताचे कारण आहे, असे जे म्हटले आहे, त्याचे येथे स्पष्टीकरण केले आहे. परमात्मा जगताचे परिणामी कारण नाही-म्हणजे तो जगद्रूपाने परिणाम पावला नाही. तो जगत्कार्याला आधार आहे-म्हणजे जगत् हे परमात्म्यावर पाण्यावरील तरंगाप्रमाणे विवर्तकार्यरूपाने भासते. वेदान्तातहि परब्रह्माला जगाचे विवर्तोपादान कारणच ठरविले आहे.

बाल्यादि तिन्ही वयसी। काया एकचि जैसी। तैसें आदिस्थितिग्रासीं। अखंड जें॥ ९२२॥
सायंप्रातर्मध्यान्ह। होतां जातां दिनमान। जैसें कां गगन। पालटेना॥ ९२३॥

अर्थ—बाल्य, तारुण्य, वृद्धाप्य ह्या वयाच्या अशा बदलत्या तीन अवस्था असल्या, तरी त्या तीन्ही अवस्थेत, ज्याप्रमाणे शरीर एकच असते, त्याप्रमाणे उत्पत्ति, स्थिति, लय या तिन्ही काळी जे ज्ञेय अखंड अविकारी एकरूप असते॥ ९२२॥ दिनमान होत जात असताना प्रात:, माध्यान्ह व सायं असे तीन काळ होतात तरी ज्याप्रमाणे या तिन्ही काळी आकाश न पालटता ते तसेच राहते॥ ९२३॥

गूढार्थदीपिका—या ओव्यांनी ज्ञेय परब्रह्माचे अविकारित्व व अपरिणामित्व दाखविले आहे.

अगा सृष्टीवेळे प्रियोत्तमा। जया नांव म्हणती ब्रह्मा। स्थितीं जें विष्णुनामा। पात्र जाहलें॥ ९२४॥
मग आकारु हा हारपे। तेव्हां रुद्र जें म्हणिपे। तेंहीं गुणत्रय जेव्हां लोपे। तैं जें शून्य॥ ९२५॥
नभाचें शून्यत्व गिळून। गुणत्रयातें नुरऊन। तें शून्य तें महाशून्य। श्रुतिवचनसंमत॥ ९२६॥

अर्थ—हे प्रियोत्तमा अर्जुना! सृष्टि उत्पत्तिकाळी ज्याला ब्रह्मा व स्थितिकाळी ज्याला विष्णु म्हणतात, तसेच प्रलय होऊन जेव्हा सर्व आकार मायेत नाहीसा होतो, तेव्हा ज्याला रुद्र म्हणतात आणि नंतर त्रिगुणहि नाहीसे

झाल्यावर जे शून्यरूप आकाश म्हटले जाते ॥ ९२४-९२५ ॥ अशा रीतीने आकाशाचे शून्यत्व नाहीसे करून व तिन्ही गुणाला नाहीसे करून उरलेल्या शून्याला म्हणजे सत्तेला श्रुतीने महाशून्य म्हणजे महासत्ता म्हटले आहे ॥ ९२६ ॥

गूढार्थदीपिका—ते शून्य ते महाशून्य। श्रुतिवचन संमत-

ब्रह्मांडात जेवढे स्थूलसूक्ष्म पदार्थ आहेत, त्यांचे अस्तित्व ज्ञेय परब्रह्माच्या अमर्याद अखंड सत्तेवरच जीवाने कल्पिले असल्यामुळे ज्ञेय परब्रह्माच्या सत्तेला महाशून्य-म्हणजे महासत्ता-असे ''स भूमा'' या श्रुतीत म्हटले आहे.

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते। ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम्॥ १७॥

अर्थ—ते ज्ञेय सर्व सूर्यादि प्रकाश देणाऱ्या पदार्थांनाही प्रकाश देणारे आहे. ते अविद्या अंध:काराच्या पलीकडे म्हणजे अंध:काररहित म्हटले जाते. तेच ज्ञान असून ज्ञेय तेच आहे. ज्ञानाने प्राप्त होणारे, असेहि त्याला म्हणतात आणि ते सर्वांच्या हृदयात वसत असते ॥ १७ ॥

जें अग्नीचें दीपन। जें चंद्राचें जीवन। सूर्याचे नयन। देखती जेणें॥ ९२७॥
जयाचेनि उजियेडें। तारागण उघडें। महातेज सुरवाडे। राहाटे जेणें॥ ९२८॥
जें आदीची आदी। वृद्धीची जे वृद्धी। बुद्धीची जें बुद्धी। जीवाचा जीव॥ ९२९॥
जें मनाचें मन। जें नेत्राचे नयन। कानाचे कान। वाचेची वाचा॥ ९३०॥
जें प्राणाचा प्राण। जें गतीचे चरण। क्रियेचें कर्तेपण। जयाचेनि॥ ९३१॥
आकारु जेणें आकारे। विस्तारू जेणें विस्तारे। संहारू जेणें संहारे। पांडुकुमरा॥ ९३२॥
जें मेदिनीची मेदिनी। जें पाणी पिऊनि असे पाणी। तेजा दिवेलावणी। जेणें तेजें॥ ९३३॥
जें वायूचा श्वासोच्छ्वासु। जें गगनाचा अवकाशु। हें असो आघवाचि आभासु। आभासे जेणें॥ ९३४॥

अर्थ—जे ज्ञेय अग्नीला प्रकाशमान करणारे आहे, जे चंद्राचा प्राण आहे, सूर्याचे डोळे देखील ज्याच्या योगाने पाहू शकतात ॥ ९२७ ॥ ज्याच्या प्रकाशाने संपूर्ण नक्षत्र समुदाय प्रकाशित झाला आहे, ज्याच्या तेजाने प्रलयातील महातेज देखील सुखाने वावरते ॥ ९२८ ॥ जे सर्व कारणाचे कारण, जे वाढीची वाढी व बुद्धीतील ज्ञानप्रकाशाचाहि प्रकाश असून जे सर्वस्वी जीवाचा आधार आहे ॥ ९२९ ॥ जे मनाचे मन, नेत्राचे नेत्र, कानाचे कान व वाचेची वाचा आहे ॥ ९३० ॥ जे प्राणाचाहि प्राण आहे व जे गतीचे पाय असून क्रियेचे कर्तेपण ज्याच्या योगाने आहे ॥ ९३१ ॥ हे अर्जुना! ज्या योगाने आकार आकाराला येतो, विस्तार विस्ताराला जातो, ज्याच्या योगाने संहार देखील संहार करतो ॥ ९३२ ॥ जी ज्ञेयवस्तु सर्व पदार्थमात्राला आधार देणाऱ्या पृथ्वीचीहि पृथ्वी आहे-म्हणजे पृथ्वीलाहि आधार आहे. जे पाणी पिऊन-म्हणजे पाण्याचे स्थूल भौतिक रूप नाहीसे करून-पाण्याच्या शक्तिरूपाने आहे आणि ज्याच्या तेजाने सर्व तेजरूप दिव्यांची लावणी होते ॥ ९३३ ॥ जे वायूचा श्वासोच्छ्वास असून आकाशाचे अवकाश आहे. अर्जुना! हा विस्तार असो. ज्याच्या योगानेच संपूर्ण आभास भासतो ॥ ९३४ ॥

गूढार्थदीपिका—वर ज्ञेय परब्रह्म सत्तास्वरूप आहे, असे सांगून तेच आता चैतन्यरूप आहे असे सांगतात.

श्रीमद्भगवतांतील दशमस्कंधातर्गत वेदस्तुतीतील ''अगजगदौकसामखिलशक्त्यवबोधक ते'' (भाग. स्कं. १०-८७). या श्लोकात वेदांनी भगवंताची स्तुति करतांना चराचर भूतांचे ठिकाणी असलेल्या नाना प्रकारच्या दिसून येणाऱ्या सर्व शक्तीचा उद्‌बोधक तूच आहेस असे. जे म्हटले आहे, तेच येथे भगवंतांनी वरील श्लोकातून व माउलीनी त्यावरील ओव्यातून सांगितले आहे.

गिरणीतील सर्व चाकांना काम करण्याची शक्ति आणणारे एक तेथे मुख्य चाक असते. त्या मुख्य चाकाची शक्तिच ज्याप्रमाणे गिरणीतील इतर सर्व चाकांना अंशाने प्राप्त होत असते; त्याप्रमाणे सर्व चराचराचे ठिकाणी जो चैतन्यशक्तीचा आविर्भाव दिसून येतो, त्यांना प्रगट करणारा, अनंत ब्रह्मांडाला आधार असणाऱ्या एका परमात्म्यावाचून दुसरा कोण असणार?

किंबहुना पांडवा। जें आघवेंचि असे आघवा। जेथ नाहीं रिगावा। द्वैतभावासी॥ ९३५॥

जें देखिलियाचिसवें। दृश्य द्रष्टा हें आघवें। एकवाट कालवे। सामरस्यें॥ ९३६ ॥
मग तेंचि होय ज्ञान। ज्ञाता ज्ञेय हन। ज्ञानें गमिजे स्थान। तेंहि तेंचि॥ ९३७॥
जैसें सरलियां लेख। आंख होती एक। तैसें साध्यसाधनादिक। ऐक्यासि ये॥ ९३८ ॥
अर्जुना जिये ठायीं। न सरे द्वैताची वही। हें असो जें हृदयीं। सर्वांचां असे॥ ९३९ ॥

अर्थ—अर्जुना! फार काय सांगू! संपूर्ण पदार्थामध्ये जे एकच संपूर्णपणे आहे. जेथे त्यावाचून दुसऱ्या भावाचा प्रवेशच नाही॥ ९३५ ॥ ज्याचे दर्शन झाल्याबरोबर पाहणारा व पाहिले जाणारे संपूर्ण द्वैत एकवस्तूरूप अस्फुट अद्वैतांत समरस मिळून जाते॥ ९३६ ॥ मग ज्ञान, ज्ञाता, ज्ञेय व ज्ञानाने प्राप्त होणारे स्थान इत्यादि सर्वरूपाने तेच एक आहे, असा अनुभव येतो॥ ९३७ ॥ ज्याप्रमाणे लिहिलेले भिन्न आकडे पुसून टाकले असता, त्यांचा भिन्नपणा नाहीसा होऊन त्या सर्वांचे ऐक्य होते, त्याप्रमाणे ज्याच्या दर्शनाने साध्य-साधनादिकांचे ऐक्य अनुभवाला येते॥ ९३८ ॥ अर्जुना! ज्या ज्ञेयस्वरूपाचे ठिकाणी द्वैतभाव वाहणे मुळीच खपत नाही. हे असो, जे सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात आहे॥ ९३९ ॥

गूढार्थदीपिका—ही अखंड अविकारी परब्रह्मअवस्था जीवाचे मूळस्वरूप असल्यामुळे देहादिकांचा अहंभाव सोडून तिचा हृदयाचे ठिकाणी अनुभव घेता येतो.

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः। मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते॥ १८ ॥

अर्थ—याप्रमाणे क्षेत्र, ज्ञान व ज्ञेय यांचे संक्षेपतः वर्णन केले. माझा भक्त हे सर्व जाणून माझ्याशी ऐक्य पावतो॥ १८ ॥

एवं हे तुजपुढां। आदी क्षेत्र सुहाडा। दाविलें फाडोवाडां। विवंचुनी॥ ९४० ॥
तैसेंचि क्षेत्रापाठीं। जैसेनि देखसी दिठी। तैसें ज्ञानही किरीटी। सांगितलें॥ ९४१ ॥
अज्ञानाही कौतुकें। रूप केलें निकें। जंव आयणी तुझी टेंके। पुरें म्हणे॥ ९४२ ॥
आणि आतां हें रोकडें। उपपत्तीचेनि पवाडें। निरूपिलें उघडें। ज्ञेय पैं गा॥ ९४३ ॥
हे आघवीचि विवंचना। बुद्धी भरोनि अर्जुना। मत्सिद्धिभावना। माझिया येती॥ ९४४ ॥
देहादि परिग्रहीं। संन्यासु करूनियां जिहीं। जीवु माझ्या ठाईं। वृत्तिकु केला॥ ९४५ ॥

अर्थ—याप्रमाणे, सुहृदा अर्जुना! तुझ्यासमोर प्रथम आम्ही विचाराने फोड करून क्षेत्राचे स्वरूप दाखविले॥ ९४० ॥ त्याचप्रमाणे क्षेत्रानंतर तू ज्या दृष्टीने ते ज्ञेयस्वरूप पाहू शकशील ती ज्ञानदृष्टि प्राप्त होण्याकरिता आवश्यक असलेले ज्ञानहि, अर्जुना! तुला सांगितले॥ ९४१ ॥ त्याचप्रमाणे तृप्ति होऊन तू पुरे म्हणशील, इतके अज्ञानदृष्टिचेहि रूप, चांगल्या रीतीने कौतुक म्हणून, स्पष्ट केले॥ ९४२ ॥ आता विस्तृत उपपत्तीच्या द्वारा केवळ ज्ञेयाच्या स्वरूपाचेहि स्पष्टपणे निरूपण केले आहे॥ ९४३ ॥ हे संपूर्ण विचार बुद्धिमध्ये दृढ ठसवून व माझ्या प्राप्तीचा ध्यास ठेवून अर्जुना! माझे भक्त माझ्या स्वरूपाला प्राप्त होतात॥ ९४४ ॥ ज्यांनी आपल्याशी संबंध जोडलेल्या देहादिक सर्व पदार्थ मात्र परिवारांचा मनातून संबंध सोडून (आपला) जीव माझ्या ठिकाणीच स्थिर केला॥ ९४५ ॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञानाच्या पूर्वी केलेल्या भक्तीने आत्मज्ञान किंवा क्षेत्रक्षेत्रज्ञ विचार दृढ झाल्यावरहि परमानंद प्राप्तिकरिता सगुणस्वरूपाचे प्रेम तसेच चालू ठेवणे, हा उपाय येथे सांगितला आहे.

ते मातें किरीटी। हेंचि जाणोनियां शेवटीं। आपणपयां साटोवाटीं। मीचि होती॥ ९४६ ॥
मीचि होती परी। हे मुख्य गा अवधारीं। सोहोपी सर्वांपरी। रचिली आम्हीं॥ ९४७ ॥
कडां पायरी कीजे। निराळीं माच बांधिजे। अथावीं सुइजे। तरी जैसी॥ ९४८ ॥
एऱ्हवीं अवघेंचि आत्मा। हें सांगों जरी वीरोत्तमा। तरी तुझिया मनोधर्मा। गिळेल ना॥ ९४९ ॥
म्हणोनि एकचि संचलें। चतुर्धा आम्हीं केलें। जें अदळपण देखिलें। तुझिये प्रज्ञे॥ ९५० ॥
पैं बाळ जैं जेवविजे। तैं घांस विसा ठायीं कीजे। तैसें एकचि चतुर्व्याजें। कथिलें आम्हीं॥ ९५१ ॥
एक क्षेत्र एक ज्ञान। एक ज्ञेय एक अज्ञान। हे भाग केले अवधान। जाणोनि तुझें॥ ९५२ ॥

अर्थ—हे अर्जुना! ते मला अशाप्रमाणे जाणून शेवटी आपल्याला मला समर्पण करून त्या मोबदल्यात मीच होऊन राहतात॥ ९४६ ॥ मद्रूप होण्याचा हाच प्रकार मुख्य आहे, असे जाण. अड्यावर चढण्याकरिता जशा पायऱ्या कराव्या, आकाशात वर जाण्याकरिता जसा माच बांधावा, अथांग पाण्यामध्ये जशी नाव सोडवी, त्याप्रमाणे आम्ही तो मद्रूप होण्याचा प्रकार सर्व रीतीने सोपा करून तुजपुढे मांडला आहे॥ ९४७-९४८ ॥ नाहीतर सर्व आत्माच आहे असे जर सांगितले असते तर, हे सर्वश्रेष्ठा अशा अर्जुना! ते तुझ्या मनाला पटले नसते॥ ९४९ ॥ तुझी बुद्धि ते ग्रहण करण्यास असमर्थ आहे, हे मी पाहिले, म्हणूनच जे एक अद्वैतस्वरूपाने भरले आहे तेच आम्ही तुला चार प्रकारचे करून सांगितले॥ ९५० ॥ ज्याप्रमाणे लहान मुलाला जेवू घालायचे असते तेव्हा पुरुषाच्या एका मोठ्या घासाचेच वीस घास करावे लागतात, त्याप्रमाणे एकच अद्वैत असलेले परब्रह्म चार प्रकारचे करून तुला सांगितले॥ ९५१ ॥ तुझी ग्रहणशक्ति पाहून एक क्षेत्र, एक ज्ञान, एक ज्ञेय, एक अज्ञान असे भाग केलेत॥ ९५२ ॥

गूढार्थदीपिका—दर्शनकारांनी अधिकारानुसार कोणी एक तत्त्व, कोणी दोन, कोणी तीन, कोणी पांच अशी तत्त्वांची निरनिराळी संख्या मानली असली तरी सर्व दर्शनकारानी मोक्ष नित्य मानला असल्यामुळे व नित्य मोक्षाचे स्वरूप अद्वैत परब्रह्मस्थिति हेच होऊ शकत असल्यामुळे त्याच्या दर्शनाच्या प्रतिपादनाचे तात्पर्य अद्वैत परब्रह्माचे ठिकाणी आहे हे जे आम्ही मागे सांगितले तोच, ९४७ ते ९५२ पर्यंतच्या ओव्यांचा भावार्थ आहे.

आणि ऐसेनही पार्था। जरी हा अभिप्रावो तुज हाता। न ये तरी हे व्यवस्था। एक वेळ सांगों॥ ९५३ ॥
आतां चौठायीं न करूं। एकही म्हणोनि न सरूं। आत्मानात्मया धरूं। सरिसा पाडु॥ ९५४॥
परि तुवां येतुलें करावें। मागो तें आम्हां देआवें। जे कानाचि नांव ठेवावें। आपण पयातें॥ ९५५ ॥

अर्थ—आणि इतके करूनहि, अर्जुना! आम्ही सांगितल्याचा अभिप्राय तुला कळला नसेल, तर पुनः एकवेळ माझ्या निरूपणाची संगति सांगतो, ऐक॥ ९५३ ॥ आता ज्ञेयतत्त्वाचे चार भाग न करता किंवा एकच म्हणून न स्वीकारता आत्मा, अनात्मा असे सारखे दोन भाग करून दोघांचाहि बरोबरीने विचार करू॥ ९५४॥ पण तू एवढे करावे की आम्ही मागतो, ते द्यावे. तू आपल्याला कानाचे नाव ठेऊन घे-म्हणजे तू सर्वस्वी एक श्रवणेंद्रियच होऊन राहा॥ ९५५ ॥

या श्रीकृष्णाचिया बोला। पार्थु रोमांचितु जाहला। तेथ देवो म्हणती भला। उचंबळेना॥ ९५६ ॥
ऐसेनि तो येतां वेगु। धरूनि म्हणे श्रीरंगु। प्रकृतिपुरुषविभाग। परिसें सांगों॥ ९५७॥
जया मार्गातें जगीं। सांख्य म्हणती योगी। जयाचिये भाटिवेलागीं। मी कपिल जाहलों॥ ९५८ ॥
तो आईक निर्दोखु। प्रकृतिपुरुषविवेकु। म्हणे आदिपुरुखु। अर्जुनातें॥ ९५९ ॥

अर्थ—असे श्रीकृष्णाचे बोल ऐकून अर्जुनाचे शरीरावर आनंदाने रोमांच उभे राहिले. ते पाहून भगवान म्हणतात अर्जुना! असा अत्यंत हर्षाने उचंबळून येऊ नकोस॥ ९५६ ॥ अर्जुनाला आलेला हर्षवेग अशा बोलण्याने आवरून धरून देव म्हणाले, आता प्रकृति व पुरुष असा विभाग करून सांगतो, ऐक॥ ९५७॥ ज्या मार्गाला योगीलोक सांख्य म्हणतात व ज्या मार्गाची भाटाप्रमाणे स्तुति करण्याकरिता मी कपिल रूपाने अवतीर्ण झालो॥ ९५८ ॥ ज्यात कोणतेहि दोष नाहीत असा तो प्रकृति व पुरुष यांचा विवेक ऐक, असे अर्जुनाला आदिपुरुष भगवान श्रीकृष्ण म्हणू लागले॥ ९५९ ॥

गूढार्थदीपिका—प्रकृतिपुरुषविवेक-म्हणजे प्रकृति व प्रकृतीचे संपूर्ण कार्य, यापासून पुरुषाला निराळे करणे यालाच व्यतिरेकहि म्हणतात.

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि। विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसम्भवान्॥ १९ ॥

अर्थ—प्रकृति व पुरुष असे दोन पदार्थ असून दोन्ही अनादि आहेत, सर्व कार्यरूप पदार्थ व गुण प्रकृतिपासून झाले आहेत, असे जाण॥ १९ ॥

तरी पुरुष अनादि आथी। आणि तैंचिलागोनि प्रकृती। संवसरिसी दिवोराती। दोनी जैसी॥ ९६० ॥

कां रूप नोहे वायां। परी रूपा लागली छाया। निकणु वाढे धनंजया। कणेंसी कोंडा॥ ९६१॥
तैसीं जाण जवटें। दोन्ही इये एकवाटें। प्रकृतिपुरुष प्रकटें। अनादिसिद्धें॥ ९६२॥

अर्थ—ज्याप्रमाणे दिवस व रात्र हे दोन्ही बरोबर असतात, त्याप्रमाणे पुरुष हा अनादि असून प्रकृति त्याच्या बरोबरच असते॥ ९६०॥ किंवा रूप खोटे नसते तरी रूपाबरोबरच खोटी छाया असते अथवा धान्याच्या कणाबरोबरच धान्याचा कण नसलेला कोंडा वाढत असतो॥ ९६१॥ त्याप्रमाणे जुळ्यासारखे हे दोन्ही एकवटून असलेले व अनादिसिद्ध प्रकृति-पुरुष विभक्तरूपाने प्रगट होतात॥ ९६२॥

गूढार्थदीपिका—जीव व त्याची कल्पनारूप प्रकृति हे दोन्ही अनादि आहेत. जीव पूर्वी शुद्ध परब्रह्म होता व नंतर कल्पनाबद्ध किंवा प्रकृतिबद्ध झाला असे मानता येत नाही; कारण तसे मानले, तर मोक्ष नित्य ठरत नाही.

नित्यज्ञानी परमात्मा व अविद्येची निवृत्ति होऊन ज्ञानी झालेला पुरुष, या दोघांनाहि बद्धतेचा प्रत्यय राहत नाही. म्हणून जीव केव्हापासून बद्ध झाला हे तो (परमात्मा) सांगू शकत नाही व बद्ध असलेला जीवहि मी केव्हापासून बद्ध झालो हे सांगू शकत नाही, म्हणून जीव व त्याचा कल्पनेशी असलेला संबंध हे दोन्ही अनादिच मानावे लागतात.

पैं क्षेत्र येणें नांवें। जें सांगितलें आघवें। तेंचि एथ जाणावें। प्रकृति हे गा॥ ९६३॥
आणि क्षेत्रज्ञु ऐसें। जयातें म्हणितलें असे। तो पुरुष हें अनारिसें। न बोलों घेईं॥ ९६४॥
इयें आनानें नांवें। परि निरूप्य आन नोहे। हें लक्षण न चुकावें। पुढतपुढती॥ ९६५॥
तरी केवळ जे सत्ता। ते पुरुष गा पांडुसुता। प्रकृति तें समस्ता। क्रिया नाव॥ ९६६॥

अर्थ—आतापर्यंत क्षेत्र म्हणून जेवढे काही सांगितले, अर्जुना! त्यालाच प्रकृति म्हटले आहे असे जाण॥ ९६३॥ आणि ज्याला मागे क्षेत्रज्ञ म्हटले आहे. तोच पुरुष होय, हे मी अन्यथा सांगत नाही, असे समज॥ ९६४॥ क्षेत्र-क्षेत्रज्ञ, प्रकृति-पुरुष ही निराळी नावे असली, तरी त्या नावांनी सांगितले जाणारे अर्थ मात्र निराळे नाहीत; ही खूण तू विसरू नये, हे माझे वारंवार सांगणे आहे॥ ९६५॥ हे अर्जुना! नुसती जी सत्ता तो पुरुष होय. प्रकृति हे नाव संपूर्ण क्रियेला आहे॥ ९६६॥

गूढार्थदीपिका—प्रकृति ते समस्तां। क्रियां नाव-

क्रिया म्हणजे उत्पत्त्यादि क्रिया.

पुरुष हा केवळ सत्तास्वरूप असल्यामुळे त्याच्या ठिकाणी उत्पत्त्यादि क्रिया नाहीत; म्हणून तो प्रकृतीत मोडला जात नाही आणि उत्पत्त्यादि क्रिया ज्या बुद्धींद्रियादि कार्याचे ठिकाणी भासतात, तो सर्व प्रकृतिविभाग होय.

"असंगोह्ययं पुरुषः" या श्रुतीच्या आधारे सांख्यशास्त्रात 'पुरुष असंग आहे' असे मानले आहे. त्याचे असंगत्व दाखविण्याकरिता पुरुष हा संपूर्ण बुद्ध्यादि प्रकृतिकार्याहून वेगळा, केवळ सत्तास्वरूप आहे, असे त्या पुरुषाचे वर्णन केले आहे.

वेदान्तशास्त्रातहि "सत्पद ते ब्रह्म" "सत्पदनिर्गुण" या नाथवचनानुसार निर्गुण परब्रह्म केवळ सत्तास्वरूप मानले जाते; म्हणून प्रकृतिपुरुषाचा विवेक सांगणारे सांख्यशास्त्र म्हणजे वेदान्तातील आत्मानात्मविवेकरूप पहिली पायरीच होय, असे समजले जाते.

बुद्धि इंद्रियें अंतःकरण। इत्यादि विकारभरण। आणि ते तीन्ही गुण। सत्त्वादिक॥ ९६७॥
हा आघवाचि मेळावा। प्रकृती जाहला जाणावा। हेचि हेतु संभवा। कर्माचिया॥ ९६८॥

अर्थ—बुद्धि, दहा इंद्रिये, अंतःकरण, इत्यादि सर्व कार्याचा समुदाय आणि सत्व, रज, तम हे तीन गुण हा संपूर्ण मेळावा प्रकृतिच झाली आहे, असे समज आणि हेच कर्माच्या उत्पत्तीला कारण आहे.॥ ९६७-९६८॥

कार्यकरणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते। पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते॥ २०॥

अर्थ—कार्य, कारण व कर्तृत्व या सर्वाचे कारण प्रकृति आहे, असे म्हटले जाते आणि पुरुष हा सर्व सुखदुःखाच्या भोगाला कारण आहे, असे म्हटले जाते॥ २०॥

तेथ इच्छा आणि बुद्धी। घडवी अहंकारेंसीं आधीं। मग तिया लाविती वेधीं। कारणाच्या॥ ९६९ ॥

अर्थ—तेथे प्रथम प्रकृति ही इच्छा व बुद्धि यांना अहंकारासहित उत्पन्न करते. मग त्यांना कारणाच्या वेधांत पाडते॥ ९६९ ॥

गूढार्थदीपिका—तेथ इच्छा आणि बुद्धि। घडवी अहंकारेसी आधी—

''प्रकृतेः महत् महतोऽहंकारः'' प्रथम प्रकृतिपांसून बुद्धि व बुद्धिपासून अहंकार उत्पन्न होतो, असे सांख्यशास्त्रात सांगितले आहे.

बुद्धि इच्छेसहितच असल्यामुळे ''बुद्धि'' शब्दाने इच्छा घेतली जाते. जीवाची बुद्धि प्रथम सांख्यशास्त्रोक्त प्रकृतिपुरुषाचा विवेक उत्पन्न होईपर्यंत विषयवासनासहितच राहत असल्यामुळे ''बुद्धि'' शब्दात इच्छेचाहि अंतर्भाव होतो; म्हणूनच सांख्यशास्त्रात जो नुसत्या बुद्धीचा उल्लेख आहे, त्याचेच स्पष्टीकरण, माउलींनी ''इच्छा'' आणि ''बुद्धि'' यांना अलग दाखवून, केले आहे.

मग तिया लाविती वेधी। कारणाच्या-

बुद्धि व अहंकार यांच्यापासून पुढे कार्य उत्पन्न होते; म्हणून प्रकृति यांना कारणपणाचा ध्यास लावते-म्हणजे पुढील कार्याचे कारण करते, असे म्हटले आहे.

तेंचि कारण ठाकावया। जें सूत्र धरणें उपाया। तया नांव धनंजया। कार्य पैं गा॥ ९७० ॥

अर्थ—त्या कारणाला प्राप्त होण्याकरिता ज्या उपायरूप सूत्राला धरावे लागते, त्यालाच अर्जुना! कार्य म्हणतात॥ ९७० ॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे तारेच्या किंवा दोराच्या साहाय्याने मनुष्य प्राप्तव्य ठिकाणी जातो, त्याप्रमाणे कार्याच्या द्वाराच त्याचे कारण ठरविता येते किंवा कार्यावरूनच त्याचे कारण ठरविता येते; म्हणून येथे ज्याच्यावरून कारण ठरविता येते त्याला कार्य म्हटले आहे.

आणि इच्छा मदाचां थावीं। लागली मनातें उठवी। तें इंद्रियें राहाटवी। हें कर्तृत्व पैंगा॥ ९७१ ॥
म्हणोनि तीन्ही या जाणा। कार्यकर्तृत्वकारणा। प्रकृति मूळ हे राणा। सिद्धांचा म्हणे॥ ९७२ ॥
एवं तिहींचेनि समवायें। प्रकृति कर्मरूप होये। परि जया गुणा वाढे त्राये। त्याचिसारिखे॥ ९७३ ॥
जें सत्त्वगुणें अधिष्ठिजे। तें सत्कर्म म्हणिजे। रजोगुणें निपजे। मध्यम तें॥ ९७४ ॥
जें कां केवळें तमें। होती जिये कर्मैं। निषिद्धें अधमें। जाण तियें॥ ९७५ ॥
ऐसेनि संतासंतें। कर्मे प्रकृतीस्तव होतें। तयापासोनि निर्वाळेते। सुखदुःख गा॥ ९७६ ॥
असंतीं दुःख उपजे। सत्कर्मीं सुख निपजे। तया दोहींचा बोलिजे। भोगु पुरुषा॥ ९७७ ॥

अर्थ—आणि ती इच्छा प्रबळ होऊ लागली की मनाला चेतविते आणि ते चेतविलेले मन इंद्रियांकडून व्यापार करविते. मनाच्या त्या इंद्रियाकडून व्यापार करविण्याला कर्तृत्व म्हणतात॥ ९७१ ॥ म्हणून कार्य-म्हणजे जे उत्पन्न होते, पण ज्याच्यापासून पुढे काही उत्पन्न होत नाही, असे शरीरादि पदार्थ; कर्तृत्व म्हणजे व्यापार करविणे आणि कारण-म्हणजे कार्यरूप शरीरादिकांना निर्माण करणारे, बुद्धि अहंकारादि या सर्वांना प्रकृति मूळ-म्हणजे उपादानकारण-आहे असे सर्व सिद्धींचे राजे भगवान श्रीकृष्ण म्हणाले॥ ९७२ ॥ याप्रमाणे कार्य, कर्तृत्व, कारण या तिघांच्या मेळाव्याने प्रकृति कर्मरूप होते, पण ज्या गुणाची प्रतिष्ठा वाढेल-म्हणजे उत्कर्ष होईल-त्या गुणासारखेच कर्म होणार!॥ ९७३ ॥ सत्वगुणाच्या आधिक्याने केलेल्या कर्माला सत्कर्म म्हणतात. रजोगुणाने होणारे कर्म पुण्यरूप नाही तर पापरूपहि नाही, असे मध्यम म्हटले जाते॥ ९७४॥ जी कर्मे केवळ तमोगुणाने होतात, ती निषिद्ध व अधर्मरूप कर्मे म्हटली जातात॥ ९७५ ॥ याप्रमाणे प्रकृतिपासून पुण्यरूप व पापरूप कर्मे निर्माण होतात व त्या पुण्यरूप व पापरूप कर्मापासून अनुक्रमे सुखदुःखरूप फळ प्राप्त होते॥ ९७६ ॥ पापकर्मापासून दुःख प्राप्त होते. व पुण्यकर्माने सुख प्राप्त होते. या दोन्ही सुखदुःखाचा भोग पुरुषाला होतो॥ ९७७ ॥

गूढार्थदीपिका—सुख व दुःख असून ते मला झाले असे ज्ञान होणे, याला भोग म्हणतात.

पुरुष चेतन असल्यामुळे त्याच्या ठिकाणी जाणीव आहे; म्हणून सांख्ययोगी प्रकृतीच्या संगामुळे त्याला भोक्ता म्हणतात; पण प्रकृतीचा संग असला तरी कार्य, कर्तृत्व, कारण हे सर्व प्रकृतीचे कार्य आहे असे ठरत असल्यामुळे सांख्ययोगी, पुरुषाला कर्ता मानीत नाहीत.

सुखदुःखें जंववरी। निफजती साचोकारीं। तंव प्रकृति उद्यम करी। पुरुष भोगी॥ ९७८॥
प्रकृति पुरुषांची कुळवाडी। सांगतां असंगडी। जे आंबुली जोडी। आंबुला खाय॥ ९७९॥

अर्थ—जोपर्यंत सुखदुःखे खरोखर उत्पन्न होतात-म्हणजे खरी वाटतात, तोपर्यंत प्रकृति कर्म करते व पुरुष सुखदुःखाचा भोग घेतो. स्त्री श्रम करून मिळविते व पति बसल्याठिकाणी खातो, असा हा प्रकृतिपुरुषाच्या शेतीचा धंदा सांगतांना व्यवहारविरुद्ध आहे॥ ९७८-९७९॥

गूढार्थदीपिका—जो कर्ता असतो तोच त्याच्या कर्तृत्वाने मिळणाऱ्या फळाचा भोक्ता होतो असा सामान्य नियम आहे; पण सांख्यशास्त्रात कार्य-कारण-कर्तृत्वाला हेतु प्रकृति मानली आहे, भोक्तृत्वाला हेतु मात्र पुरुष मानिला आहे. येथे 'पुरुष भोक्तृत्वाचा हेतु आहे' या मताचा माउलींनी ''सांगता असंगडी'' असे म्हणून उपहास केला असून जसा पुरुष कार्य-कारण-कर्तृत्वाला हेतु नाही, तसाच तो भोक्तृत्वाला हेतु नाही, तो सर्वांचा केवळ साक्षी आहे, असे जे वेदान्ताचे मत, तेच योग्य आहे, असे ध्वनित केले आहे.

आंबुलिया आंबुलिये। संगती ना सोये। कीं आंबुली जग विये। चोज ऐकें॥ ९८०॥

अर्थ—या पुरुषप्रकृतिरूप पतिपत्नीची संगति नाही व संगति होण्याची सोय नाही; परंतु प्रकृतिरूप पत्नी जग प्रसवते हे आश्चर्य ऐक॥ ९८०॥

गूढार्थदीपिका—स्त्री पुरुषाची संगति झाली असता स्त्री मुलांना जन्म देऊ शकते; पण सांख्यशास्त्राच्या मते पुरुष असंग असल्यामुळे पुरुषप्रकृतीचा संबंध होण्याची सोय नसूनहि प्रकृति जगद्रूप कार्य प्रसवते. या सांख्यशास्त्राचा माऊलींनी ''चोज ऐका'', या पदाने उपहास करून पुरुषाचा कधीहि संबंध होत नसलेल्या व स्वतः जड असलेल्या प्रकृतिपासून जगद्रूप कार्य उत्पन्न होणे शक्य नाही; म्हणून ते जगत् खरोखर उत्पन्न झाले नसून अज्ञान भ्रमजन्य आहे, हे वेदान्तमतच ध्वनित केले आहे.

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान्। कारणं गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु॥ २१॥

अर्थ—कार्यकारणादिरूपाने परिणाम पावलेल्या प्रकृतिचे ठिकाणी राहून-म्हणजे, हे सर्व मी आहे, असे अविवेकाने त्याच्याशी ऐक्य करून-पुरुष प्रकृतिपासून उत्पन्न झालेल्या गुणाचा भोग घेतो. याच्या बऱ्यावाईट योनीमध्ये जन्म होण्याला हा गुणांचा संगच कारण आहे॥ २१॥

जे अनंगु तो पेंधा। निकवडा नुसधा। जीर्णु अतिवृद्धा-। पासोनि वृद्धु॥ ९८१॥
तया आडनांव पुरुषु। एऱ्हवीं स्त्री ना नपुंसकु। किंबहुना एकु। निश्चयो नाहीं॥ ९८२॥

अर्थ—तो अंगरहित असा निराकार असून पांगळा-म्हणजे क्रियारहित आहे. तो ऐश्वर्यहीन, नुसधा-म्हणजे एकटा व असंग आहे. तो संपूर्ण वृद्धाहून अतिवृद्ध म्हणजे अनादि आहे॥ ९८१॥ त्या तत्त्वाला पुरुष हे आडनांव आहे. पुरुष नाही, तर तो स्त्री आहे किंवा नपुंसक आहे, असेहि त्याला म्हणता येत नाही; एवढेच नाही तर त्याच्या विषयी कोणताच निश्चय करता येत नाही॥ ९८२॥

गूढार्थदीपिका—तया आडनांव पुरुषु-

प्रकृतिरूप स्त्रियेचे ठिकाणी तो संगत होत नाही व सृष्टिरूप अपत्य उत्पन्न करीत नाही; म्हणून त्यांचे (पुरुषाचे) ''पुरुष'' हे आडनांव आहे, असे म्हटले आहे.

अचक्षु अश्रवणु। अहस्तु अचरणु। रूप ना वर्णु। नाम आथी॥ ९८३॥
अर्जुना कांहींचि जेथ नाहीं। तो प्रकृतीचा भर्ता पाहीं। कीं भोगणें ऐसयाही। सुखदुःखाचें॥ ९८४॥

अर्थ—त्याचे ठिकाणी चक्षु, श्रवण इत्यादि ज्ञानेंद्रिये नाहीत, तसेच हात पाय इत्यादि कर्मेंद्रिये नाहीत. त्याचे ठिकाणी रूप, वर्ण, नाम हेही नाहीत॥ ९८३ ॥ अर्जुना! ज्या पुरुषाचे ठिकाणी काहीच नाही, असा हा पुरुष, प्रकृतीचा भर्तार होय, पाहा आणि अशा पुरुषाला सुखदु:खाचा भोग होतो॥ ९८४ ॥

गूढार्थदीपिका—''काहींचि जेथे नाही''-म्हणजे जो केवळ सत्तास्वरूप आहे. ''प्रकृतीचा भर्तार''-म्हणजे तो केवळ आपल्या सत्तेनेच प्रकृतीला सत्तावान करून कार्यप्रवण होतो.

तो तरी अकर्ता। उदास अभोक्ता। परि इया पतिव्रता। भोगविजे॥ ९८५ ॥

अर्थ—वास्तविक तो कर्ता नाही, भोक्ता नाही, उदास आहे; पण अशा या पुरुषाला त्याची पतिव्रता स्त्री-प्रकृति-भोग भोगायला लावते॥ ९८५ ॥

गूढार्थदीपिका—पुरुषाच्या ठिकाणी भोक्तृत्व हे प्रकृतिपुरुषाच्या अविवेकरूप अज्ञानामुळेच आहे, असा अर्थ.

जियतें अळुमाळु। रूपा- गुणाचा चाळढाळु। ते भलतैसाही खेळु। लेखा आणी॥ ९८६ ॥
मा इये प्रकृती तंव। गुणमयी हेंचि नांव। किंबहुना सावेव। गुण तेचि हे॥ ९८७॥
हे प्रतिक्षणीं नित्य नवी। रूपागुणांचीच आघवी। जडातेंही माजवी। इयेचा माज॥ ९८८ ॥
नामें इयें प्रसिद्धें। स्नेहो इया स्निग्धें। इंद्रियें प्रबुद्धें। इयेचेनि॥ ९८९ ॥
कायि मन हें नपुंसक। कीं तें भोगवी तिन्ही लोक। ऐसें ऐसें अलौकिक। करणें इयेचें॥ ९९० ॥
हे भ्रमाचें महाद्वीप। हे व्याप्तीचेंचि रूप। विकार उमप। इया केले॥ ९९१ ॥

अर्थ—या प्रकृतीचे ठिकाणी आकार व गुण यांची थोडीशी हालचाल सुरू झाली की ती वाटेल तसा खेळ पुरुषापुढे मांडते॥ ९८६ ॥ त्या प्रकृतीचे गुणमयी हेच नांव आहे. एवढेच नाही, तर खरोखर गुण हीच प्रकृति होय॥ ९८७ ॥ ही क्षणोक्षणी बदलणारी आहे. ही संपूर्ण आकार व गुण यांचीच बनलेली आहे. रजोगुणाच्या उत्कर्षाने माजली असता ती जडालाहि माजविते॥ ९८८ ॥ हिच्या योगानेच नांवे प्रगट होतात. हिच्या स्निग्धपणानेच जगात प्रेम व्यक्त झाले आहे आणि हिच्या योगानेच इंद्रिये जाणती झाली आहेत॥ ९८९ ॥ हिच्यापासून झालेले मन हे नपुंसक आहे; पण तीच मनाकडून तिन्ही लोकांचा भोग घेवविते, असे हिचे करणे अलौकिक आहे॥ ९९० ॥ ही प्रकृतिच जगद्रूप अनादिभ्रमाचे फार विस्तीर्ण बेट आहे. व्याप्तीचे रूप हीच होय. हिनेच असंख्य विकार केले आहेत॥ ९९१ ॥

गूढार्थदीपिका—पुरुषाच्या ठिकाणी व्यापकत्व इत्यादि धर्म हिच्या अपेक्षेनेच आले आहेत. प्रकृति असंख्य विकाररूपाने परिणाम पावली नसती, तर पुरुषाला व्यापक म्हणण्याचे कारणच नव्हते, असा अर्थ.

हे कामाची मांडवी। हे मोहवनींची माधवी। इये प्रसिद्धचि दैवी। माया हें नाव॥ ९९२ ॥

अर्थ—ही कामाची मंडपी आहे. ही प्रकृति म्हणजे अविवेकरूपी वनाला टवटवीत ठेवणारा वसंत ऋतु आहे. हीचे ''दैवी माया'' हे नांव वेदान्तात प्रसिद्ध आहे॥ ९९२ ॥

गूढार्थदीपिका—कामाची मांडवी-

ज्याप्रमाणे मांडवाखाली वेल वाढतो, त्याप्रमाणे अविवेकरूपी प्रकृतिमुळेच विषयसुखाची वासना वाढते, असा अर्थ.

हे वाङ्मयाची वाढी। हे साकारपणाची जोडी। प्रपंचाची धाडी। अभंग हे॥ ९९३ ॥
कळा एथूनि जालिया। विद्या इयेच्या केलिया। इच्छा ज्ञान क्रिया। वियाली हे॥ ९९४॥
हे नादाची टांकसाळ। हे चमत्काराचें वेळाउळ। किंबहुना सकळ। खेळु इयेचा॥ ९९५ ॥
जे उत्पत्ति प्रलयो होत। ते इयेचे सायंप्रात। हें असो अद्भुत। मोहन हे॥ ९९६ ॥
हे अद्वयाचें दुसरें। हे नि:संगाचें सोयरें। हे निराळेंसि घरें। नांदत असे॥ ९९७॥
इयेतें येतुलावरी। सौभाग्यव्याप्तीची थोरी। म्हणोनि तया आवरी। अनावरातें॥ ९९८ ॥
तयाचां तंव ठायीं। निपटूनि कांहींचि नाहीं। कीं तया आघवेंही। आपणचि होय॥ ९९९ ॥

अर्थ—सम्पूर्ण लौकिक व अलौकिक वाङ्मयाचा विस्तार हिच्यापासूनच आहे. हीच केवळ सत्तारूप निर्गुण परब्रह्माला झालेली साकारपणाची जोड आहे, आणि पुरुषावर पडलेला प्रपंचाचा अखंड घाला घालणारी हीच आहे. ॥ ९९३ ॥ चौसष्ट कळा येथूनच निर्माण झाल्या, चौदा विद्याहि हिनेच निर्माण केल्या. इच्छा, ज्ञानरूप जाणीव व क्रिया ह्यांना हिनेच जन्म दिला ॥ ९९४ ॥ योगातील दशनादाची टाकसाळ हीच आहे आणि सर्व चमत्काराचे घरहि हीच आहे, फार काय सांगू, अर्जुना! एका सत्तामात्र पुरुषावाचून जेवढे काही विशेषरूप द्वैत दिसते. तो सर्व हिचा खेळ आहे ॥ ९९५ ॥ जगदुत्पत्ति आणि जगत्प्रलय हे जे आदी अंती होतात, ते हिचेच प्रात:काळ व सायंकाळ आहेत. हे असो, ही प्रकृति म्हणजे पुरुषावर घातलेली फार मोठी भुरळ होय ॥ ९९६ ॥ ही प्रकृतिच, अद्वैत परब्रह्माचे ठिकाणी द्वैतरूपाने, नि:संगाचे ठिकाणी संबंधीपणाने व निराकार परब्रह्माचे ठिकाणी संसाररूपाने नांदत आहे ॥ ९९७ ॥ या प्रकृतीचे ठिकाणी येथपर्यंत थोर सौभाग्यव्याप्ति असल्यामुळे ती अनावर पुरुषालाहि आटोक्यात आणते ॥ ९९८ ॥ खरोखर त्या पुरुषाच्या ठिकाणी सर्वस्वी काही नाही, असे असतांना ही प्रकृति त्याचे ठिकाणी आपणच सर्व रूपाने नटते ॥ ९९९ ॥

तया स्वयंभाची संभूती। तया अमूर्ताची मूर्ती। आपण होय स्थिति। ठावो तया ॥ १००० ॥
तया अनार्ताची आर्ती। तया पूर्णाची तृप्ती। तया अकुळाची जाती। गोत होय ॥ १००१ ॥
निराकाराचा आकारु। तया निर्व्यापाराचा व्यापारु। निरहंकाराचा अहंकारु। होऊनि ठाके ॥ १००२ ॥
तया अचर्चाचें चिन्ह। तया अपाराचें मान। तया अमनस्काचें मन। बुद्धी ही होय ॥ १००३ ॥
तया अनामाचें नाम। तया अजाचें जन्म। आपण होय कर्म। क्रिया तया ॥ १००४ ॥
तया निर्गुणाचे गुण। तया अचरणाचे चरण। तया अश्रवणाचे श्रवण। अचक्षूचे चक्षु ॥ १००५ ॥
तया भावातीताचे भाव। तया निरवयवाचे अवयव। किंबहुना होय सर्व। पुरुषाचें हे ॥ १००६ ॥

अर्थ—त्या स्वत:सिद्ध पुरुषाची आपण उत्पत्ति होते. त्या निराकाराची मूर्ति होते. ही प्रकृति आपण स्थिति होऊन त्याला राहण्याचे ठिकाणी करते ॥ १००० ॥ त्या निरिच्छाची इच्छा, त्या पूर्णाची तृप्ति, त्या कुलरहिताची जाति व गोत्र आपणच होते ॥ १००१ ॥ त्या अवर्णनीय पुरुषाचे लक्षण, अमर्यादाची मर्यादा, मनबुद्धि नसलेल्याची मनबुद्धि आपणच होते ॥ १००२ ॥ त्या निराकाराचा आकार, व्यापाररहिताचा व्यापार व अहंकाररहिताचा अहंकार आपणच होऊन राहते ॥ १००३ ॥ त्या नामरहिताचे नांव, त्या जन्मरहिताचा जन्म व कर्मरहिताचे कर्म आपणच होते ॥ १००४ ॥ त्या निर्गुणाचे गुण, अचरणाचे चरण, ज्याला कान नाहीत अशाचे कान व चक्षुरहिताचे चक्षु ती आपणच होते ॥ १००५ ॥ त्या भावरहिताचे भाव. निरवयाचे अवयव, फार काय सांगावे, सत्तामात्र पुरुषाची सत्ता सोडून बाकी सर्व तीच होते ॥ १००६ ॥

ऐसेनि इया प्रकृती। आपुलिया सर्व व्याप्ती। तया अविकारातें विकृती-। माजीं कीजे ॥ १००७ ॥
तेथ पुरुषत्व जें असे। तें ये इये प्रकृतिदशे। चंद्रमा अंवसे। पडिला जैसा ॥ १००८ ॥
विदळ बहु चोखा। मीनलिया वाला एका। कसु होय पांचिका। जयापरी ॥ १००९ ॥
कां साधूतें गोंदळी। संचरोनि सुये मैळीं। ना ना सुदिनाच्या आभाळीं। दुर्दिन कीजे ॥ १०१० ॥
जेवी पय पशूच्या पोटीं। कां वन्हि जैसा काष्ठीं। गुंडूनि घेतला पटीं। रत्नदीपु ॥ १०११ ॥
राजा पराधीन जाहला। कीं सिंहु रोगें रुंधला। तैसा पुरुष प्रकृती आला। स्वतेजा मुके ॥ १०१२ ॥
जागता नरु सहसा। निद्रा पाडूनि जैसा। स्वप्नींचिया सोसा। वश्य कीजे ॥ १०१३ ॥
तैसें प्रकृति जालेपणें। पुरुषा गुण भोगणें। उदास अंतुरीगुणें। आतुडे जेवीं ॥ १०१४ ॥
तैसें अजा नित्या होये। आंगीं जन्ममृत्यूचे घाये। वाजती जैं लाहे। गुणसंगातें ॥ १०१५ ॥
परि तें ऐसें पांडुसुता। तातलें लोह पिटितां। जेवीं वन्हीसीचि घाता। बोलती तया ॥ १०१६ ॥
कां आंदोळलिया उदक। प्रतिमा होये अनेक। तें नानात्व म्हणती लोक। चंद्रीं जेवीं ॥ १०१७ ॥

दर्पणाचिया जवळिका। दुजेपण जैसें ये मुखा। कां कुंकुमें स्फटिका। लोहितत्व ये॥ १०१८॥
तैसा गुणसंगमें। अजन्मा हा जन्मे। पावत ऐसा गमे। एऱ्हवीं नाहीं॥ १०१९॥
अधमोत्तमा योनी। यासि ऐसिया मानीं। जैसा संन्यासी होय स्वप्नीं। अंत्यजादि जाती॥ १०२०॥
म्हणोनि केवळा पुरुषा। नाहीं होणें भोगणें देखा। येथ गुणसंगचि अशेखा-। लागी मूळ॥ १०२१॥

अर्थ—याप्रमाणे ही प्रकृति आपल्या सर्व रूपाने व्यापून त्या कार्यरहित पुरुषाला कार्यामध्ये घालते॥ १००७॥ ज्याप्रमाणे प्रकाशरूप चंद्र अमावस्येला आला असता प्रकाशरूप न दिसता अमावस्येसारखा दिसतो, त्याप्रमाणे पुरुषाचे असंगत्वादि पुरुषत्वहि प्रकृतिदशेत प्रकृतिदशेसारखे दिसते॥ १००८॥ वालभर शुद्ध सोन्यात हीणकस मिळविले असता त्याचा कस पांच रुपये किंमतीचा होतो॥ १००९॥ किंवा ज्याप्रमाणे पिशाच्च, चांगल्या माणसाच्याहि अंगात शिरून त्याला कुकर्मात प्रवृत्त करते किंवा अभ्रे सुदिनाला दुर्दिन करतात॥ १०१०॥ तसेच, ज्याप्रमाणे दूध पशूच्या पोटात असावे किंवा अग्नि लाकडात असावा, रत्नदीप वस्त्रात गुंडाळून घ्यावा॥ १०११॥ राजा पराधीन व्हावा, किंवा सिंह रोगाने व्यापावा, त्याप्रमाणे असंग पुरुषहि प्रकृतिदशेत आला असता (प्रकृतीच्या आधीन झाला असता) आपल्या असंगत्वादि स्वरूपधर्माला मुकतो॥ १०१२॥ ज्याप्रमाणे जागत असलेला पुरुष अकस्मात् त्याला झोप येऊन स्वप्नांतील सुखदुःखभोगाच्या तो स्वाधीन होतो॥ १०१३॥ त्याप्रमाणे अविवेकाने प्रकृतीशी ऐक्य पावल्यामुळे पुरुषाला गुणाचा भोग होतो. ज्याप्रमाणे स्त्री सद्गुणाने उदास पतीलाहि स्वाधीन करून घेते॥ १०१४॥ त्याप्रमाणे जन्मरहित व नित्य अशा पुरुषाच्या अंगी गुणाचा संबंध झाला असता जन्ममृत्युरूपी दुःखाचे घाव पडू लागतात॥ १०१५॥ पण ज्याप्रमाणे, अर्जुना! तापलेले लोखंड पिटले असता लोखंडावर होणारे घाव वन्हीचे ठिकाणीच होतात, असे लोक बोलतात॥ १०१६॥ किंवा पाण्याला हेलकावे दिले असता त्यात पडलेले चंद्राचे प्रतिबिंब अनेकरूप होते. अज्ञानी लोक ते प्रतिबिंबाचे नानात्व चंद्राचेच समजतात॥ १०१७॥ आरशाजवळ असण्याने त्यात मुखाचे प्रतिबिंब पडून जसा मुखाला दोनपणा येतो किंवा केशरामुळे स्फटिकाला लालपणा येतो॥ १०१८॥ त्याप्रमाणे गुणाचा संबंध होऊन जन्मरहित पुरुष जन्मला, असे वाटते. येऱ्हवीं तो जन्मत नाही॥ १०१९॥ स्वप्नांत संन्यासी जसा आपल्याला अंत्यजादि जातीत जन्मलेला पाहतो, त्याप्रमाणे पुरुषाला बऱ्या-वाईट योनी प्राप्त होतात, असे जाण॥ १०२०॥ केवळ सत्तामात्रपुरुषाला जन्म नाही व भोगणेहि नाही. या सर्वांना गुणाचा संबंधच कारण आहे, हे लक्षात घे॥ १०२१॥

गूढार्थदीपिका—मूळात पूर्ण अद्वैत सच्चिदानंद परब्रह्मस्वरूप असलेल्या जीवाला प्राप्त झालेली जीवदशा व येत असलेला सर्व पांचभौतिक अनुभव, त्याने अविवेकाने प्रकृतीशी केलेल्या केवळ ऐक्यामुळे आहे, वास्तविक नाही. हेच या वरील संपूर्ण ओव्यातून सांगितले आहे.

त्वं सर्वभूतहृदयेषु कृतालयोऽपि त्वं मंत्रजाप्यविमुखेषु तनोपि मायाम्।
त्वन्मंत्रसाधनपरेष्वपयाति माया सेवानुरूप फलदोऽसि यथा महीपः॥

(अध्यात्मरामायण)

सच्चिदानंद परमात्मा सर्वांच्या हृदयात घर करून बसला असला व त्याची शक्ति सच्चिदानंदस्वरूप म्हणून त्याच्याशी अभिन्न असली तरी भगवन्विमुख झालेल्यांना ही त्याची शक्ति भ्रमरूप त्रिगुणात्मक मायारूपाने प्रत्ययाला येऊन त्याला सर्व पांचभौतिक आहे, असे भासविते व भगवद्भक्तीने भगवंताशी सन्मुख होणाऱ्यांना ती स्वतः एक सच्चिदानंदस्वरूपाने प्रत्ययाला येऊन सर्व सच्चिदानंदरूप आहे असा प्रत्यय आणून देते. असे अहिल्येने भगवान रामचंद्राची स्तुति करतांना म्हटले आहे.

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः। परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः॥ २२॥

अर्थ—वास्तविक पाहता हा प्रकृतीच्या कार्यात न गुंतता प्रकृतीच्या जवळ राहून केवळ साक्षी होऊन राहणारा, प्रकृतीच्या कार्याला अनुमोदन देणारा, सर्वांचे पोषण करणारा, सर्वांचा भोग घेणारा व सर्वांचे नियंत्रण करणारा सर्वेश्वर आहे. असा हा देहामध्ये परम प्रकृतीच्या पलीकडे असून त्याला परमात्माहि म्हणतात॥ २२॥

हा प्रकृतिमाजीं उभा। परि जुई जैसा वोथंबा। यया प्रकृति पृथ्वीनभा। तेतुला पाडु॥ १०२२॥

अर्थ—हा प्रकृतीच्या कार्यात उभा असला तरी जुईच्या झाडाला टेका दिलेल्या खांबाप्रमाणे केवळ आधाररूप असून पृथ्वी व आकाश यांच्यात जेवढे अंतर आहे, तेवढेच याच्यात (पुरुषात) व प्रकृतीत आहे॥ १०२२॥

गूढार्थदीपिका—प्रकृतिमाजी उभा। परि जुई जैसा वोथंबा—

केवल अद्वैतसत्तारूप पुरुषाहून भिन्न भासणारे, प्रकृति व प्रकृतीचे कार्यपदार्थ त्याच्या (पुरुषाच्या) सत्तेवरच कल्पिले असल्यामुळे त्याचीच एक सत्ता त्यांच्यात अनुगत झालेली आहे. हेच त्याचे प्रकृतिमध्ये उभे राहणे होय.

इया प्रकृति पृथ्वीनभा। तेतुला पाड—

अद्वैत, अविनाशी, सत्तास्वरूप पुरुषाचे ठिकाणी कल्पिलेले प्रकृत्यादि पदार्थ सत्यस्वरूप नसल्यामुळे त्यांचा पुरूषाशी मुळीच संबंध होत नाही; म्हणून त्याचे असंगत्व सदासर्वदा अखंड कायमच राहते आणि प्रकृतीच्या गुणादिकांचा संबंध भ्रांतिजन्यच असतो, हेच या दोन चरणांनी सांगितले आहे.

प्रकृतिसरितेचां तटीं। मेरु होय हा किरीटी। माजीं बिंबे परी लोटीं। लोटों नेणें॥ १०२३॥

अर्थ—अर्जुना! ज्याप्रमाणे नदीच्या काठांवर असलेला पर्वत नदीत प्रतिबिंबित झाला तरी नदीच्या प्रवाहाने तो लोटला जात नाही, त्याप्रमाणे हा पुरुषहि प्रकृतिरूप नदीच्या काठी असलेला अढळ असा मेरु पर्वत होय॥ १०२३॥

गूढार्थदीपिका—माजी बिंबे परि लोटी। लोटो नेणे—

पाण्यातील प्रतिबिंब व त्यावर होणाऱ्या पाण्याच्या हालचालीचा परिणाम हे जसे खोटे असते. त्याप्रमाणे पुरुषाचे प्रकृतीत असणे त्याच्यावर प्रकृतीच्या गुणाचा परिणाम होणे, हे सर्वच खोटे असते-म्हणजे जीवदशा प्राप्त झाली तरी ती खोटी असल्यामुळे जीवाची मूळची शुद्ध ब्रह्मदशा यत्किंचितहि न्यून किंवा मलीन होत नाही.

प्रकृति होय जाये। हा तो असतुचि आहे। म्हणोनि आब्रह्माचें होये। शासन हा॥ १०२४॥

अर्थ—प्रकृतीचा 'आहे-नाही', असा अनुभव येतो, याचा मात्र 'आहे' असाच अनुभव येतो, 'नाही' असा अनुभव येत नाही, म्हणूनच पुरुष हा आपल्या शुद्धस्वरूपाने ब्रह्मदेवापर्यंत सर्व जीवांचे शासन करणारा आहे॥ १०२४॥

गूढार्थदीपिका—आब्रह्माचे होये। शासन हा—

एका व्यापक वस्तूच्या आधारावरच भिन्न भिन्न वस्तु राहू शकतात. त्या स्वतंत्र राहू शकत नाहीत; म्हणून ती व्यापक वस्तु त्या भिन्न वस्तूचे नियमन-म्हणजे उत्पत्ति, स्थिति, लय-करणारी होते.

पुरुष तसाच मुळात व्यापक सत्तारूप असल्यामुळे त्या रूपाने तो सर्व प्रकृति व प्रकृतीच्या कार्याला नियामक आहे, असे येथे दाखविले आहे.

आणि प्रकृति येणें जिये। याचिया सत्ता जग विये। इयालागीं इये। वरयितु हा॥ १०२५॥
अनंते काळें किरीटी। जिया मिळती इया सृष्टी। तिया रिगती ययाच्या पोटीं। कल्पांतसमयीं॥ १०२६॥

अर्थ—पुरुषाच्या योगानेच प्रकृतीला अस्तित्व प्राप्त होते. त्याच्या सत्तेमुळेच तिच्यापासून जगद्रूप कार्य उत्पन्न होते; म्हणून हा प्रकृतीचा भर्तार झाला आहे॥ १०२५॥ प्रलयापर्यंत जो असंख्य काळ असतो, त्या काळात ज्या ह्या सृष्टीमागून सृष्टी उत्पन्न होतात, त्या सर्व प्रलयाचे वेळी पुरुषाच्या ठिकाणी लीन होतात-म्हणजे अव्यक्त होऊन राहतात॥ १०२६॥

गूढार्थदीपिका—सृष्टीच्या व्यक्तदशा व अव्यक्तदशा या दोन्ही सत्तारूप पुरुषाच्या ठिकाणी कल्पितच आहेत, असा अर्थ.

हा महद्ब्रह्मगोसावी। ब्रह्मगोलकलाघवी। अपारपणें मवी। प्रपंचातें॥ १०२७॥

अर्थ—हा पुरुष प्रकृतीचे शासन करणारा असून ब्रह्मांडाचा पसारा दाखविणारा जादुगार आहे. आपल्या अमर्यादपणाने तो प्रपंचालाहि मर्यादा घालणारा आहे॥ १०२७॥

गूढार्थदीपिका-अपारपणे मवी। प्रपंचाते—

ज्याप्रमाणे दोरीच्या पृष्ठभागावरच सर्पाचा भास होतो, तरी भ्रमाने सर्व दोरीच सर्परूपाने प्रत्ययाला येते, त्याप्रमाणे अमर्याद परब्रह्मसत्तेवर भासणारा प्रपंचही परब्रह्मासारखा अमर्यादच वाटतो; पण वेदादिकातून प्रपंचाचे उत्पत्ति, नाश सांगितले असल्यामुळे व ते परब्रह्मसत्तेवरच होत असल्यामुळे सत्तारूप परब्रह्म, प्रपंचापेक्षाहि अमर्याद असून त्याच्या मानाने प्रपंच मर्यादितच आहे, असे जे ''अत्यतिष्ठत दशांगुलम्'' या श्रुतीने सिद्ध केले आहे, तेच माउलीनी येथे सांगितले आहे.

पैं या देहामाझारीं। परमात्मा ऐसी जे परी। बोलिजे ते अवधारीं। ययातेंचि॥ १०२८॥
अगा प्रकृतिपरौता। एकु आथी पांडुसुता। ऐसा प्रवादु तो तत्त्वता। पुरुषु हा पैं॥ १०२९॥

अर्थ—या देहामध्ये परमात्मा आहे, असे जे म्हटले जाते, ते यालाच म्हटले जाते, हे लक्षात घे॥ १०२८॥ अर्जुना! प्रकृति पलिकडेहि एक पुरुष आहे, असा ज्यांचा शास्त्रातून उल्लेख आहे. तो पुरुष हाच होय॥ १०२९॥

गूढार्थदीपिका—कधी न बदलणारे व अखंड अविनाशी सच्चिदानंदस्वरूप राहणारे असे जे जीवाचे मूळचे शुद्ध स्वरूप आहे त्याला धरून जीवालाच परमात्मा म्हटले जाते व ते विसरल्यामुळे ब्रह्मस्वरूपाविषयी होणारी जी विपरीत कल्पना तिला धरून ब्रह्मालाच जीव म्हटले जाते.

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह। सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते॥ २३॥

अर्थ—वर सांगितल्या प्रमाणे जो, पुरुष व गुणासह प्रकृति यांचे स्वरूप जाणतो, तो प्रारब्धानुसार वर्तन करीत असला, तरी पुनः जन्माला येत नाही—म्हणजे त्याला भौतिक शरीराची प्राप्ति होत नाही॥ २३॥

जो निखळपणें येणें। पुरुषाते यया जाणें। आणि गुणाचें करणें। प्रकृतीचें तें॥ १०३०॥
हें रूप हे छाया। पैल जळ हे माया। ऐसा निवाडु धनंजया। जेवीं कीजे॥ १०३१॥
तेणें पाडें अर्जुना। प्रकृतिपुरुषविवंचना। जयाचिया मना। गोचर जाहली॥ १०३२॥
तो शरीराचेनि मेळें। करू कां कर्में सकळें। परि आकाश धुई न मैळे। तैसा असे॥ १०३३॥
आथिलेनि देहें। जो न घेपे देहमोहें। देह गेलिया नोहे। पुनरपि तो॥ १०३४॥
ऐसा तया एकु। प्रकृतिपुरुषविवेकु। उपकारु अलौकिकु। करी पैं गा॥ १०३५॥
परि हाचि अंतरीं। विवेक भानूचिया परी। उदैजे ते अवधारीं। उपाय बहुत॥ १०३६॥

अर्थ—जो या पुरुषाला अशा शुद्धपणाने जाणतो व गुणाचे सर्व कर्म ते प्रकृतिचेच आहे. असे समजतो॥ १०३०॥ हे रूप आहे, ही छाया आहे, पलीकडे पाणी आहे, दिसते ती भ्रांति होय, असा ज्याप्रमाणे धनंजया! विवेक करावा त्याप्रमाणेच हा प्रकृतिपुरुषाचा विवेक अर्जुना! ज्याच्या चित्ताला दिसू लागला॥ १०३१-१०३२॥ तो शरीराचा संबंध असतांना विहित-निषिद्ध सर्व अशी कर्मे करो; पण ज्याप्रमाणे आकाश धुळीने मळत नाही, त्याप्रमाणे तोहि त्या कर्माने लिंपित होत नाही॥ १०३३॥ देह असूनहि ज्याला देहाची आसक्ति नाही, तो देहपात झाल्यावर पुनः जन्माला येत नाही॥ १०३४॥ याप्रमाणे हा एक प्रकृति-पुरुषविवेकच त्याच्यावर अलौकिक उपकार करणारा आहे॥ १०३५॥ पण हा प्रकृति-पुरुष विवेक अंतःकरणांत सूर्याप्रमाणे अखंड प्रकाशरूप राहील असा उत्पन्न झाला पाहिजे. तो ज्या उपायाने उत्पन्न होतो ते उपाय पुष्कळ आहेत, सांगतो ऐक॥ १०३६॥

ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना। अन्ये साङ्ख्येन योगेन कर्मयोगेन चाऽपरे॥ २४॥
अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वान्येभ्य उपासते। तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः॥ २५॥

अर्थ—कोणी ध्यानाच्या योगाने अंतःकरणवृत्तिद्वारा बुद्धीचे ठिकाणी बुद्धिगत आत्मस्वरूपाला पाहतात. इतर कोणी सांख्ययोगाचे द्वारा व कोणी कर्मयोगाचे द्वारा आत्मस्वरूपाला पाहतात॥ २४॥ हे तिन्ही प्रकार न जाणणारे दुसरे कित्येक केवळ दुसऱ्यापासून श्रवण करण्याचीच उपासना करतात. ते श्रवणपरायण झालेलेहि मृत्यु तरून जातात॥ २५॥

कोणी एक सुभटा। विचाराचां आगिटां। आत्मानात्मकिटा। पुटें देउनी॥ १०३७॥
छत्तीसही वानीभेद। तोडोनियां निर्विवाद। निवडिती शुद्ध। आपणपें॥ १०३८॥
तया आपणपयाचां पोटीं। आत्मध्यानाचिया दिठी। देखती गा किरीटी। आपणपेंचि॥ १०३९॥

अर्थ—हे थोर योद्ध्या अर्जुना! कोणी आपल्या शुद्धचेतन आत्मस्वरूपाचे व देहादिक दृश्य जड पदार्थाचे ऐक्य करून, झालेल्या हीणकस जीवस्वरूपाला विचाररूप अग्नीत पुटे देऊन व छत्तीस प्रकारच्या पदार्थांचा कार्यभेद नि:शेष नाहीसा करून बुद्धीने आपल्याला शुद्ध करून घेतात॥ १०३७-१०३८॥ आणि नंतर, अर्जुना! शुद्ध झालेल्या आपल्या ठिकाणी आत्मध्यानरूपदृष्टीने केवळ आपल्या शुद्ध स्वरूपाला पाहतात॥ १०३९॥

गूढार्थदीपिका—तया आपणपयाचां पोटी-

मी वृत्तिपुरता मर्यादित आहे, अशा भ्रांतिसहित बुद्धिवृत्तिगत चैतन्याला जीव म्हणतात. तो "आपणपयाच्या पोटी"-म्हणजे वृत्तिरूप आपल्याला केवळ सत्तारूपाने आधार असलेल्या आत्मस्वरूपाचे ठिकाणी.

आत्मध्यानाचिया दिठी—

देह, इंद्रिये मन यांच्या द्वारा शब्दादि विषयाकडे धावणारी अंत:करणवृत्ति विचाराने दृढ आवरून ती अंतर्यामि असणाऱ्या प्रत्यक्स्वरूपाकडे सारखी लावित जाऊन तेथे स्थिर करणे, याला आत्मध्यानदृष्टि म्हणतात.

देखती गा किरीटी। आपणपेची—

त्या दृष्टीच्या योगाने प्रत्यक् आत्मस्वरूपाशी ऐक्य करून "अहंब्रह्मास्मि" म्हणजे "मीच ब्रह्म आहे" असे जाणतो.

मी आत्मस्वरूप आहे अशा ध्यानाने आत्मस्वरूप होणाऱ्याचे हे वर्णन आहे.

कोणाची पूर्वजन्मातील साधनाने परमार्थाची काही तयारी झाली असल्यामुळे वर्तमान जन्मात आत्मानात्मविवेकपूर्वक आत्मध्यानापासून सुरुवात झालेली दिसून येते.

आणिक पै दैवबगें। चित्त देती सांख्ययोगें। एक ते अंगलगें। कर्माचेनि॥ १०४०॥

अर्थ—आणि दुसरे कित्येक दैववशात् सांख्ययोगाच्या द्वारा, तर कित्येक कर्मयोगरूप भक्तीच्या आश्रयाने आत्मस्वरूपाचे ठिकाणी चित्तवृत्ति लावतात॥ १०४०॥

गूढार्थदीपिका—दैवबगे-म्हणजे दैववशात.

पूर्व अनेक जन्मांतील निष्काम विहितकर्मानुष्ठानाने चित्त शुद्ध झाल्यामुळे जन्मत:च वैराग्यसंपन्न होऊन कोणी पुरुष दैवयोगाने सांख्यशास्त्राकडे वळतात, हे "दैवबगे" या शब्दाने सूचित केले आहे.

सांख्ययोग—म्हणजे प्रकृतिपुरुषाचा विवेक करून मी असंग साक्षिभूत आहे अशी बुद्धिवृत्ति दृढ करणे.

एक ते अंगलगे। कर्माचेनि—

कोणाला पूर्व जन्मातील पुण्यसंचयाने वर्तमान जन्मात परमेश्वर प्राप्तिकरिता निष्कामकर्माचरणाची इच्छा होते.

आणिक एक ते करिती ऐसे। अभिमान दवडूनि देशे। एकाचिया विश्वासे। टेकती बोला॥ १०४१॥
जे हिताहित देखती। हानि कणवा घेपती। पुसोनि शीण हरिती। देती सुख॥ १०४२॥
तयांचेनि मुखें जे निघे। तेतुलें आदरें चांगें। ऐकोनियां आंगें। मनें होती॥ १०४३॥
तया ऐकणेयाचि नांवें। ठेविती गा आघवें। तया अक्षरांसी जीवें। लोण करिती॥ १०४४॥
तेही अंतीं कपिध्वजा। इया मरणार्णवसमाजा-। पासूनि निघती वोजा। गोमटिया॥ १०४५॥

अर्थ—कित्येक दुसरे असे करतात की आपण अत्यंत मूढ आहो, हे जाणून व शहाणपणाचा अभिमान सोडून देऊन जीवाचे हित कोणते, अहित कोणते हे जे योग्य रीतीने जाणतात, जीवांच्या झालेल्या हानीची ज्यांना करुणा येते व त्यांची विचारपूस करून व समाधान करून जे त्यांचे दु:ख नाहीसे करतात व सुख देतात, अशा एखाद्या आत्मप्राप्ति करून घेतलेल्या ज्ञान्याच्या शब्दांवर पूर्ण विश्वास ठेवतात॥ १०४१-१०४२॥ अशा साधुपुरुषांच्या मुखातून

जे जे निघेल ते ते आदराने श्रवण करून शरीराने व मनाने त्यांच्यासारखेच जे आचरण करणारे होतात॥ १०४३॥ अशा सत्पुरुषाच्या मुखाने श्रवण होणार आहे, हे कानावर आल्याबरोबर बाकीची सर्व कामे बाजूला सारून जे ऐकतात व त्यांच्या मुखातून निघणाऱ्या अक्षरावर आपला जीवभाव ओवाळून टाकतात॥ १०४४॥ तेहि, अर्जुना! शेवटी याप्रमाणे मरणरूपी समुद्रात बुडालेल्या समाजापासून-म्हणजे या संसारापासून-उत्तम रीतीने बाहेर पडतात॥ १०४५॥

गूढार्थदीपिका—मरणार्णवसमाज-म्हणजे मृत्यूने किंवा नाशाने ग्रासिलेला यच्चयावत् पदार्थसमुदाय.

अविनाशी परब्रह्माव्यतिरिक्त जेवढे काही नाशिवंत पदार्थ आहेत, त्या सर्वांना उद्देशून येथे ''समाज'' शब्द वापरला आहे. मरण किंवा नाश याला समुद्राची उपमा देऊन तो संपूर्ण ब्रह्मांडात पसरला आहे, हे सूचित केले आहे.

''श्रद्धा सत्सु विधीयताम्'' या वचनाप्रमाणे ज्यांनी पूर्णपणे परमार्थ स्वाधीन करून घेतला आहे व संसारसुखरूप स्वार्थ ज्यांचा निःशेष नाहीसा झाला असून दुसऱ्याच्या परमार्थसुखाविषयी ज्यांच्या पोटात अत्यंत कळवळा असतो, अशा सत्पुरुषांच्या वचनावर दृढ विश्वास ठेऊन चालणारे देखील कृतार्थ होतात, असा भाव.

यया चतुर्विधप्रकारे। जे मज मीनले पुरे। तयासी कांही नुरे। भोक्तव्य गा॥ १०४६॥
येणें येणें प्रकारें। निस्तरती साचोकारें। हें भवकाउरें। आघवेंचि॥ १०४७॥
ऐसे हे उपाये। बहुवस एथें पाहे। जाणावया होये। एकी वस्तु॥ १०४८॥
आतां पुरे हें बहुत। पैं सर्वार्थाचें मथित। सिद्धांतनवनीत। देऊं तुज॥ १०४९॥
येतुलेनि पांडुसुता। अनुभव लाहाणा आयिता। येर तंव तुज होतां। सायास नाहीं॥ १०५०॥
म्हणोनि ते बुद्धि रचूं। मतवाद हे खांचूं। सोलींव निर्वचूं। फलितार्थचि॥ १०५१॥

अर्थ—याप्रमाणे चार प्रकारांनी जे माझ्या ठिकाणी पूर्णपणे ऐक्य पावले त्यांच्या ठिकाणी भोगण्याकरिता प्रारब्धच उरत नाही॥ १०४६॥ या निरनिराळ्या प्रकारांनी हे संपूर्ण संसाररूप दुःखापत्तीतून निःसंशय पार पडतात॥ १०४७॥ याप्रमाणे अद्वैतब्रह्मवस्तु जाणण्याकरिता असे हे पुष्कळ उपाय येथे आहेत॥ १०४८॥ आता हे बहु बोलणे पुरे करू व सांगितलेल्या सर्व उपायरूप अर्थाचे मंथन करून काढलेले सिद्धान्तभूत नवनीत तुला देतो॥ १०४९॥ (अन्वयः-पंडुसुता येतुलेनि तुज आयिता अनुभव लाहाणा होतां तव येर सायास नाही) अर्जुना! येवढ्यानेच तुला अनुभवाचा सहज लाभ झाला असता मग इतर श्रम करावे लागणार नाहीत॥ १०५०॥ म्हणून या सिद्धान्तभूत नवनीताची बुद्धीने मांडणी करून व विरोधीमताचे खंडन करून निर्भेळ व सर्व निरूपणाचा निष्कर्षभूत अर्थच तुला सांगतो॥ १०५१॥

यावत्सञ्जायते किञ्चित्सत्त्वं स्थावरजङ्गमम्। क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ॥ २६॥

अर्थ—भरतश्रेष्ठा अर्जुना! जेवढी काही सजीव निर्जीव जीवसृष्टि उत्पन्न होते, ती सर्व, क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगानेच होते, असे जाण॥ २६॥

तरी क्षेत्रज्ञ येणें बोलें। तुज आपणपें जें दाविलें। आणि क्षेत्रही सांगितलें। आघवें चि॥ १०५२॥
तया येरयेरांच्या मेळीं। होइजे भूतीं सकळीं। अनिलसंगें जळी। कल्लोळ जैसें॥ १०५३॥
कां तेजा आणि उखरा। भेटी जालिया वीरा। मृगजळाचिया पूरा। रूप होय॥ १०५४॥
नाना धाराधरधारीं। झळंबलिया वसुंधरी। उठिजे जेवीं अंकुरीं। नानाविधीं॥ १०५५॥
तैसें चराचर आघवें। जें कांहीं जीवु येणें नांवें। तें तों उभययोगें संभवे। ऐसें जाण॥ १०५६॥
इयालागीं अर्जुना। क्षेत्रज्ञा प्रधाना-। पासूनि न होती भिन्ना। भूतव्यक्ति॥ १०५७॥

अर्थ—क्षेत्रज्ञ या शब्दाने स्वतः तूच आहे, असे जे दाखवून दिले आणि जे संपूर्ण क्षेत्र तेहि तुला सांगितले॥ १०५२॥ ज्याप्रमाणे पाण्याशी वायूचा संबंध झाला असता पाण्यावर लाटा उत्पन्न होतात, त्याप्रमाणेच क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचा परस्पर संबंध झाला असताच सर्व प्राणिसृष्टि उत्पन्न होऊ शकते॥ १०५३॥ किंवा वीरा! सूर्य व

बरड जमीन यांचा संबंध झाला असता मृगजळाचा पूर व्यक्त होतो॥ १०५४॥ किंवा ज्याप्रमाणे पावसाच्या धारांनी पृथ्वी भिजली असताच नाना प्रकारचे अंकुर उत्पन्न होतात॥ १०५५॥ त्याप्रमाणे जीव या नावाने जेवढे काही सजीव-निर्जीव आहेत, ते क्षेत्र व क्षेत्रज्ञ या दोघांच्या संगाने उत्पन्न होतात, असे जाण॥ १०५६॥ म्हणून अर्जुना! क्षेत्रज्ञ व प्रधान यापासून सर्व भूते भिन्न मानता येत नाहीत॥ १०५७॥

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् । विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति॥ २७॥

अर्थ—सर्व नाशिवंत भूताचे ठिकाणी परमेश्वर हा नाश न पावणारा असा एक समस्वरूप आहे, असे जो पाहतो, तोच खरोखर पाहतो॥ २७॥

पैं पटत्व तंतु नव्हे। तरि तंतूचि तें आहे। ऐसां खोलीं डोळां पाहें। ऐक्य हें गा॥ १०५८॥
भूतें आघवींचि होती। एकाचीं एक आहाती। परी पैं भूतप्रतीतीं। वेगळीक असे॥ १०५९॥
यांचीं नामेंही आनानें। अनारिसी वर्तनें। वेषही सिनाने। आघवे यांचे॥ १०६०॥
ऐसें देखोनि किरीटी। भेद सूसी हन पोटीं। तरि जन्माचिया कोटी। न लाहसी निघों॥ १०६१॥
पैं नाना प्रयोजनशीळें। दीर्घे वक्रें वर्तुळें। होती एकीचींच फळें। तुंबिणीयेचीं॥ १०६२॥
होतु कां उजू वांकुडें। परि बोरींचे हें न मोडे। तैसी भूतें अवघडें। परि वस्तु उजू॥ १०६३॥
अंगारकणीं बहुवसीं। उष्णता समान जैशी। तैसा नाना जीवराशीं। परेशु असे॥ १०६४॥
गगनभरी धारा। परी पाणी एकचि वीरा। तैसा या भूताकारा। सर्वांगीं तो॥ १०६५॥
हे भूतग्राम विषम। परी वस्तु ते एथ सम। घटमठीं व्योम। जियापरी॥ १०६६॥
हा नाशतां भूताभासु। एथ आत्मा तो अविनाशु। जैसा केयूरादिकीं कसु। सुवर्णाचा॥ १०६७॥
एवं जीवधर्महीनु। जो जीवेसीं अभिन्नु। देखे तो सुनयनु। ज्ञानियांमाजीं॥ १०६८॥
ज्ञानाचा डोळा डोळसां-। माजीं डोळस तो वीरेशा। हे स्तुति नोहे बहुवसा। भाग्याचा तो॥ १०६९॥

अर्थ—ज्याप्रमाणे पटत्व तंतूहून निराळे दिसत असले, तरी सूत काढून टाकले असता पटत्व नि:शेष नाहीसे होते. म्हणून पटत्व तंतूच आहे, त्याप्रमाणे क्षेत्र-क्षेत्रज्ञाचे ऐक्य आहे असा खोल विचार करून पाहा॥ १०५८॥ सर्व सृष्टि जीवमात्रच आहे व एकापासून झाली आहे; पण ती भूते अलग अलग आहेत अशी प्रतीति येते॥ १०५९॥ या सर्वांची नावें निराळी, वागणूक निराळी व वेषहि निराळे॥ १०६०॥ असे पाहून, अर्जुना! हे सर्व भिन्न आहेत, असा जर भेद मनात वागविशील, तर अनंत जन्माच्या फेऱ्यातून तू बाहेर निघू शकणार नाहीस॥ १०६१॥ निरनिराळ्या उपयोगाला पडणारी व लांब, वाकडी, तिकडी, गोल अशी फळे असली तरी ज्याप्रमाणे ती एका दुध्या भोपळ्याचीच असतात॥ १०६२॥ किंवा बोरीचे लाकूड सरळ असो की वाकडे असो ते बोरीचे नव्हे, असे होत नाही, त्याप्रमाणे भूते नाना प्रकारची घडली असली तरी त्यातील वस्तु मात्र सरळ समस्वरूपच आहे॥ १०६३॥ पुष्कळशा अग्नीच्या ठिणग्यात उष्णता एकसारखीच असते, त्याप्रमाणे नाना प्रकारच्या जीवसमुदायात परमात्मा एकसारखा समच आहे॥ १०६४॥ सर्वत्र आकाशातून पावसाच्या धारा सुरु झाल्या तरी, हे वीरा! पाणी एकच असते, त्याप्रमाणे या भूताकारात एक परमात्माच वस्तुरूपाने त्यांच्या सर्वांगी वसत आहे॥ १०६५॥ ज्याप्रमाणे विषम आकार हे घटामठाचे असले तरी त्यातील आकाश सम असते, विषम होत नाही, त्याप्रमाणे जीवसृष्टि विषम असली तरी, त्यातील परब्रह्मवस्तु समच असते, विषम नसते॥ १०६६॥ ज्याप्रमाणे सोन्याचे बाहुली वगैरे अलंकार निराळ्या आकाराचे असले तरी, त्यांच्या सोन्याचा कस एकच असतो, त्याप्रमाणे जीवरूपी भूतांचा भास नाश पावत असला तरी सत्तारूप आत्मा तो अविनाशीच असतो॥ १०६७॥ याप्रमाणे सर्वाच्या अंतर्यामि राहणारा परमात्मा कोण्या ठिकाणी जीवाहून भिन्न नाही; पण त्या जीवाचे गुणधर्म नाहीत, असे जो पाहतो, तोच "ज्ञानियामाजी" म्हणजे चर्मचक्षूने जाणणाऱ्या मनुष्यामध्ये 'सुनयन' म्हणजे खरा डोळस होय॥ १०६८॥ हे वीरश्रेष्ठा! हा ज्ञानाचा डोळा ज्याला प्राप्त झाला तो पुरुष सर्व डोळस पुरुषांमध्ये डोळस होय. ही त्याची स्तुति नसून खरोखर तो थोर भाग्याचा होय॥ १०६९॥

समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम्। न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम्॥ २८॥

अर्थ—सर्वत्र समस्वरूपाने स्थित असलेल्या परमेश्वराला समस्वरूपाने जाणले असतां तोच आपण आपला घात करून घेत नाही; म्हणून तो परागतीला प्राप्त होतो॥ २८॥

जे गुणेंद्रिय धोकटी। देह धातूंची त्रिकुटी। पांचमेळावा वोखटी। दारुण हे॥ १०७०॥

हे उघड पांचवेउली। हे पंचधा आगीं लागली। जीवपंचानना सांपडली। हरिणकुटी हे॥ १०७१॥

अर्थ—हा देह म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पांच भूताच्या मेळाव्याने व कफ, वात, पित्त या धातूच्या त्रिकूटाने बनलेले व ज्यांत गुण, इंद्रिये ठेवली आहेत अशी फार वाईट खोळ होय॥ १०७०॥ हिला पाच इंद्रियांच्या द्वारा पंचविषयरूप पाच प्रकारच्या आगी लागून अति तप्त होत असते; म्हणून ही पांच नांगी असलेली उघड इंगळीच आहे. देह हा जीवरूप सिंहाला सांपडलेली हरिणकुटीच होय॥ १०७१॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे सिंहाला हरिणकुटी सापडून तिचा नाश होतो, पण सिंहाचा नाश होत नाही, त्याप्रमाणे ज्यांत गुण, इंद्रिये, धातु व पंचमहाभूते आहेत असा प्राप्त झालेला देह नाश पावत असला तरी तो जीव नाश पावत नाही.

ऐसा असोनि इये शरीरीं। कोण नित्यबुद्धीची सुरी। अनित्यभावाचां उदरीं। दाटीचिना॥ १०७२॥

अर्थ—जीव या शरीरात अशा प्रकारचा असल्यामुळे अनित्यभावाच्या उरात नित्यबुद्धीची सुरी कोण खुपसु शकत नाही हे समजत नाही॥ १०७२॥

गूढार्थदीपिका—जीव हा आपल्या अविनाशी स्वरूपांचा विचार करीत नाही व देहाशी ऐक्य पावून जन्ममरणाचा अनुभव घेतो.

परी इये देहीं असतां। जो न येचि आपणया घाता। आणि शेखीं पंडुसुता। तेथेंचि मिळे॥ १०७३॥

अर्थ—पण या देहात असतानाच जो आपल्या अविनाशित्वाचा अनुभव घेतो तो आपला (जन्ममरणरूप) घात करून घेत नाही आणि शेवटी, अर्जुना! तेथेच (आपल्या) मूळस्वरूपांत मिळतो॥ १०७३॥

गूढार्थदीपिका—जीव हा अविनाशीच असल्यामुळे विचाराने हे जाणून ''मी सम आहे'' अशी बुद्धी धारण केली व देहबुद्धी सोडली की तो आपल्या मूळच्या स्वरूपाला प्राप्त होतो.

जेथ योगज्ञानाचिया प्रौढी। वोलांडूनियां जन्मकोडी। न निगों इया भाषा बुडी। देती योगी॥ १०७४॥

जें आकाराचें पैल तीर। जें नादाची पैल मेर। तुर्येचें माजघर। परब्रह्म जें॥ १०७५॥

अर्थ—योगी योगज्ञानाच्या संपत्तीने थोर होऊन, हजारो जन्म ओलांडून व त्यातून आता निघायचे नाही असे म्हणून ज्या आत्मस्वरूपाचे ठिकाणी बुडी मारतात॥ १०७४॥ जे आकाराचे पलीकडील तीर होय-म्हणजे जेथे आकारच नाही. जे नादाची पलीकडील मर्यादा आहे. जे तूर्या अवस्थेचे माजघर असून ज्याला परब्रह्म म्हणतात॥ १०७५॥

गूढार्थदीपिका—तूर्यावस्था ही जीवब्रह्मैक्याची जाणीवरूप अवस्था असल्यामुळे व परब्रह्म जाणीवरहित असल्यामुळे किंवा तुर्यावस्था परब्रह्मस्वरूपावरच भासत असल्यामुळे येथे परब्रह्माला तुर्येचे माजघर म्हटले आहे.

मोक्षासकट गती। जेथें येती विश्रांती। गंगादि अपांपती। सरिता जेवीं॥ १०७६॥

अर्थ—ज्याप्रमाणे समुद्राचे ठिकाणी गंगादि सर्व नद्यांची गति थांबते, त्याप्रमाणे ज्याच्या ठिकाणी मोक्षासकट संपूर्ण गती थांबतात॥ १०७६॥

गूढार्थदीपिका—परब्रह्मात मिळाल्यानंतर 'मी कधी बद्ध नव्हतो' असा अनुभव येत असल्यामुळे मोक्षगतीही खोटीच ठरते, असा अर्थ.

तें सुख येणेंचि देहें। पाय पाखाळणिया लाहे। जो भूतवैषम्यें नोहे। विषमबुद्धी॥ १०७७॥

दीपांचां कोडीं जैसें। एकचि तेज सरिसें। तैसा जो असे। सर्वत्र ईशु॥ १०७८॥

ऐसेनि समत्वें पंडुसुता। जिये जो देखतसांता। तो मरण आणि जीविता। नागवे फुडा॥ १०७९॥
म्हणोनि तो दैवागळा। वानीत असो वेळोवेळां। जे साम्यसेजे डोळा। लागला तया॥ १०८०॥

अर्थ—भूतांची विषमता दिसत असली तरी ज्याची बुद्धि विषम होत नाही, त्या पुरुषाला ते परब्रह्मसुख याच देहांत पादप्रक्षालनाकरिता प्राप्त होते-म्हणजे अत्यंत सुलभ होते॥ १०७७॥ ज्या प्रमाणे हजारो दिव्यांचे तेज एकसारखेच असते, त्याप्रमाणे जो सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी मूळचा सत्तारूपाने असलेला ईश्वर होऊन असतो॥ १०७८॥ अर्जुना! अशा साक्षित्वाने आपल्याला पाहत जो जगतो, तो कधीच जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडत नाही॥ १०७९॥ म्हणून साम्यरूपी शय्येवर त्याला झोप लागलेली असते. या कारणानेच आम्ही त्याची विशेष भाग्यवान म्हणून वारंवार स्तुति करीत असतो॥ १०८०॥

गूढार्थदीपिका—ज्याला संसारात सर्व सुखाची प्राप्ति झालेली असते, त्याला भाग्यवान म्हणतात. पण त्यालाहि सुखाच्या प्राप्तीचा प्रयत्न करीतच राहावे लागते आणि त्याच्या ठिकाणी कमतरताच दिसून येते. पण ब्रह्मसुखाची प्राप्ति झाली असता सुखप्राप्तीची इच्छाच राहत नाही व प्रयत्नहि खुंटतो. म्हणून या ब्रह्मसुखाची ज्याला प्राप्ति झाली तो खरा आगळा भाग्यवान होय.

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः। यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति॥ २९॥

अर्थ—संपूर्ण कर्मे प्रकृतिकडून केली जाणारी आहेत हे जाणून आपल्याला "मी अकर्ता आहे" असे जो जाणतो, तोच खरोखर पाहतो॥ २९॥

आणि मनोबुद्धिप्रमुखें। कर्मेंद्रियें अशेखें। करी प्रकृतीचि हें देखे। साचें जो गा॥ १०८१॥
घरींचीं राहटतीं घरीं। घर कांही न करी। अभ्र धांवें अंबरी। अंबर तें उगें॥ १०८२॥
तैसी प्रकृति आत्मप्रभा। खेळे गुणीं विविधारंभा। येथ आत्मा तो वोथंबा। नेणे कोण॥ १०८३॥
ऐसेनि येणें निवाडें। जयाचां जीवीं उजिवडें। अकर्तयातें फुडें। देखिलें तेणें॥ १०८४॥

अर्थ—मन आणि बुद्धि ज्या कर्मेंद्रियात मुख्य आहेत त्या संपूर्ण कर्मेंद्रियांकडून प्रकृतिच कर्म करविते, हे ज्याला खरोखर कळले आहे॥ १०८१॥ घरात राहणारी माणसेच घरात वावरतात. घर काही करत नाही. आकाशात आलेले मेघच इकडे तिकडे धावतात; पण आकाश स्थिर असते॥ १०८२॥ त्याप्रमाणे आत्मचैतन्याच्या प्रकाशाने त्रिगुणात्मक प्रकृति नाना कर्मप्रवृत्तिरूप खेळ करते. तेथे त्या कर्माचे ठिकाणी आत्मा खांबासारखा अचल असतो. तो कोणते कर्म झाले, हे काही जाणत नाही॥ १०८३॥ अशा या आत्मानात्मविवेकाने ज्याच्या अंतःकरणात ज्ञानप्रकाश झाला, त्यानेच 'मी अकर्ता आहे' असे आपल्याला स्पष्ट जाणले॥ १०८४॥

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति। तत एव च विस्तारं ब्रह्म सम्पद्यते तदा॥ ३०॥

अर्थ—जेव्हा निरनिराळी दिसणारी भूते एका ब्रह्मवस्तूचे ठिकाणी आहेत व त्यापासूनच संपूर्ण भूतविस्तार झाला आहे असे कळते, तेव्हाच तो (जीव) ब्रह्मस्वरूप होतो॥ ३०॥

एऱ्हवीं तैंचि अर्जुना। होईजे ब्रह्मसंपन्ना। जैं या भूताकृती भिन्ना। दिसती एकी॥ १०८५॥
लहरी जैसिया जळीं। परमाणुकणिका स्थळीं। रश्मीकर मंडळीं। सूर्याच्या जेवीं॥ १०८६॥
नातरी देहीं अवेव। मनीं आघवेचि भाव। विस्फुलिंग सावेव। वन्हीं एकीं॥ १०८७॥
तैसे भूताकार एकाचे। हें दिठी रिगे जैं साचें। तैंचि ब्रह्मसंपत्तीचें। तारूं लागे॥ १०८८॥

अर्थ—नाहीतरी, अर्जुना! या जीवाला जेव्हा भिन्न भिन्न भूते एका अद्वैतपरब्रह्माचे ठिकाणी दिसू लागतात तेव्हाच हा जीव ब्रह्मस्वरूप होऊ शकतो॥ १०८५॥ ज्याप्रमाणे पाण्यावर त्याच्याच लहरी, पृथ्वीवर तिचेच परमाणुरूप कण, सूर्यमंडळाचे ठिकाणी किरणे॥ १०८६॥ किंवा देहाच्या ठिकाणी अवयव, मनाच्या ठिकाणी सर्व विकारभाव, अग्नीच्या ठिणग्या असतात॥ १०८७॥ त्याप्रमाणे संपूर्ण भूतांचे आकार एका अद्वैत परब्रह्माचेच होत, हे खरे तत्त्व जेव्हा बुद्धीत ठसते, तेव्हाच संसारसमुद्रावर असलेले ब्रह्मस्वरूपतेचे जहाज हाती लागते॥ १०८८॥

गूढार्थदीपिका—परब्रह्माहून दुसरे जेवढे काही सत्य वाटते, ते बाजूला सारल्यावर परब्रह्म हे त्या सर्वांविरहित केवळ सत्तास्वरूप, अद्वैत, निर्गुण आहे, असे ज्ञान होते; पण या ज्ञानाची येथेच समाप्ति नाही. परब्रह्म अद्वैत असल्यामुळे त्याहून दुसरी वस्तूच राहू शकत नाही; म्हणून परब्रह्माहून जेवढे काही निराळे केले होते त्यातहि परब्रह्मच भरून राहत असल्यामुळे ते सर्व परब्रह्मरूपच आहे, असा व्यापक अनुभव आला असता सगुण निर्गुण एकरूप होऊन जातात, असेच श्रीएकनाथ महाराजांनी "सगुण निर्गुण हरिपायी" या अभंगात सांगितले असून आचार्यांनीहि असाच आपला अनुभव "तरंगफेनभ्रमबुद्बुदादि सर्व स्वरूपेण जलं यथातथा। तथैव देहाद्यहमंतमेतत् सर्व चिदेवैकरसं विशुद्धम्॥" या श्लोकाने सांगितला आहे. अशा या प्रत्ययालाच अन्वयाचा प्रत्यय म्हणतात. येथे ज्ञानाची पूर्णता होते.

मग जयातयाकडे। ब्रह्मचि दिठी उघडे। किंबहुना जोडे। अपार सुख॥ १०८९॥

अर्थ—मग दृष्टीने जिकडे पाहावे तिकडे स्पष्ट ब्रह्मच दिसू लागते. एवढेच नाही तर अमर्याद सुख प्राप्त होते॥ १०८९॥

गूढार्थदीपिका—हा परब्रह्माचा व्यापक अनुभव आला असता या अनुभवात मिथ्या म्हणून उपेक्षणीय काहीच उरत नसल्यामुळे सर्वत्र ब्रह्मविषयक प्रेमदृष्टिच होऊ लागते. या प्रेमदृष्टिलाच व्यापकभक्ति म्हणतात व तिच्या योगाने अपार सुखाचा लाभहि होतो, असे येथे सुचविले आहे.

येतुलेनि तुज पार्था। प्रकृतिपुरुषव्यवस्था। ठायेंठावो प्रतीतिपथा-। माजीं जाहली॥ १०९०॥
अमृत जैसें ये चुळा। कां निधान देखिजे डोळां। तेतुला जिव्हाळा। मानावा हा॥ १०९१॥
हा जी जाहलिये प्रतीती। घर बांधणें जें चित्तीं। तें आतां ना सुभद्रापती। इयावरी॥ १०९२॥
तरी एकदोन्ही ते बोल। बोलिजती सखोल। देंई मनातें वोल। मग ते घेंई॥ १०९३॥
ऐसें देवें म्हणितलें। मग बोलों आदरिलें। तेथें अवधानाचेंचि केलें। सर्वांग येरें॥ १०९४॥

अर्थ—अर्जुना! इतक्या निरूपणाने प्रकृति-पुरुष निवाडा यथास्थितपणे तुझ्या अनुभवाला आला॥ १०९०॥ गुळणा करण्याकरिता अमृत मिळाले असता अत्यानंद होऊन ते थुंकून देऊन त्याची उपेक्षा करवत नाही किंवा द्रव्याचा मोठा ठेवा डोळ्याला दिसला असता त्याची उपेक्षा करवत नाही, त्याप्रमाणे या अन्वयरूप व्यापक प्रत्ययाचे ठिकाणी तसाच प्रेम जिव्हाळा असू दे॥ १०९१॥ प्रकृतिपुरुषाच्या आलेल्या प्रत्ययाला जे चित्तांत घर बांधायचे असते-(म्हणजे जो अनुभव चित्तात दृढ करावयाचा असतो) तो, हे अर्जुना! आता यानंतरच नाही का?॥ १०९२॥ त्याविषयी गूढ अर्थाने भरलेले आहे, असे एक-दोन शब्द सांगतो. तू आपल्या मनाला माझ्याकडे गहाण ठेऊन मग ते बोल ग्रहण कर॥ १०९३॥ असे देवाने म्हणून बोलायला सुरुवात केली. तेथे अर्जुनाने आपले सर्वांगच केवळ अवधानरूप केले॥ १०९४॥

अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः। शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते॥ ३१॥

अर्थ—हा परमात्मा अनादि व निर्गुण असल्यामुळे अविनाशी आहे. म्हणून, हे अर्जुना! तो शरीरात आहे, तरी काही कर्म करीत नाही व कर्मात लिप्त होत नाही॥ ३१॥

तरि परमात्मा म्हणिपे। तो ऐसा जाण स्वरूपें। जळीं जळें न लिंपे। सूर्यु जैसा॥ १०९५॥
कां जे जळा आदीं पाठीं। सूर्य असतुचि असे किरीटी। माजीं बिंबे तें दृष्टी। आणिकांचिये॥ १०९६॥
तैसा आत्मा देहीं। आथि म्हणिपे हें कांहीं। साचें तरी नाहीं। तो जेथिंचा तेथें॥ १०९७॥
आरिसां मुख जैसें। बिंबलिया नाम असे। देहीं वसणें तैसें। आत्मतत्त्वा॥ १०९८॥
तया देहा म्हणती भेटी। हे सपायी निर्जीव गोठी। वारिया वाळुवे गांठी। केंही आहे॥ १०९९॥

अर्थ—ज्याला परमात्मा म्हणतात, तो स्वरूपाने, ज्याप्रमाणे जलातील सुर्य जलाने लिंपित होत नाही, त्याप्रमाणे आहे, असे जाण॥ १०९५॥ कारण, अर्जुना! तो सूर्य पाण्याच्या पूर्वी व नंतरहि असलेलाच असतो; पण त्याचे

पाण्यात प्रतिबिंबित होणे, हे इतरांच्या दृष्टीने असते॥ १०९६ ॥ त्याप्रमाणे आत्मा देहाच्या ठिकाणी आहे, हे जे काही म्हटले जाते, ते खरे नाही. तो जेथल्या तेथेच असतो॥ १०९७ ॥ ज्याप्रमाणे आरशाच्या बाहेर असलेले मुख आरशात दिसले असता आपण त्याला आरशातील मुख म्हणतो, त्याप्रमाणे आत्मतत्त्वाचे, देहाच्या ठिकाणी असणे आहे॥ १०९८ ॥ या आत्मतत्त्वाचा व देहाचा संबंध आहे, या म्हणण्यात काहीच अर्थ नाही. वारा आणि वाळू यांची गाठ कोणी बांधली आहे काय?॥ १०९९ ॥

गूढार्थदीपिका—दोन सत्य पदार्थाचा संबंध होतो. पण क्षेत्रज्ञ व क्षेत्र या दोन पदार्थाचा संबंध आहे असे जे साधकाला वाटते त्याचा आत्मानात्मविवेकाने विचार केला असता क्षेत्रज्ञ आत्मा खरोखर अमर्याद, नित्य व अविनाशीस्वरूप असून क्षेत्र हे अज्ञानभ्रांतिकल्पनाजन्य आहे-म्हणजे त्याचे खरोखर अस्तित्वच नाही-असे सिद्ध होत असल्यामुळे या दोन सत्यमिथ्या अशा पदार्थाचा संबंध होणेच शक्य नाही, असे माउलीचे येथे वेदान्तानुसार म्हणणे आहे.

आगी आणि कापुसा। दोरा सुवावा कैसा। केउता सांदा आकाशा। पृथ्वीयेसी॥ ११००॥
एक निघे पूर्वेकडे। एक तें पश्चिमेकडे। तिये भेटीचेनि पाडें। संबंधु हा॥ ११०१॥
उजियेडा आणि अंधारेया। जो पाडु मृता उभया। तोचि गा आत्मया। देहा जाण॥ ११०२॥
रात्री आणि दिवसा। कनका आणि कापुसा। अपाडु कां जैसा। तैसाचि यासी॥ ११०३॥
देह तंव पांचांचें जालें। हें कर्माचे गुणीं गुंथलें। भंवतसे चाकी सूदलें। जन्ममृत्यूच्या॥ ११०४॥
हें काळानळाचां कुंडीं। घातली लोणियाची उंडी। माशी पांख पाखडी। तंव हें सरे॥ ११०५॥
हें विपायें आगी पडे। तरी भस्म होऊनि उडे। जाहलें श्वाना वरपडें। तरी ते विष्ठा॥ ११०६॥
या चुके दोन्ही काजा। तरी होय कृमींचा पुंजा। हा परिणामु कपिध्वजा। कश्मल गा॥ ११०७॥
या देहाची हे दशा। आणि आत्मा तो एथ ऐसा। पैं शुद्ध नित्य आपैसा। अनादिपणें॥ ११०८॥
सकळु ना निष्कळु। अक्रियु ना क्रियाशीळु। कृश ना स्थूळु। निर्गुणपणें॥ ११०९॥

अर्थ—अग्नि आणि कापूस यात दोरा कसा ओवता येईल? आकाश व पृथ्वी यांचा सांधा कसा जोडला जाणार?॥ ११०० ॥ एक पूर्वेकडे व एक पश्चिमेकडे जाण्याला निघाले असता त्यांची भेट होण्यासारखाच देह व आत्मा यांचा संबंध आहे॥ ११०१ ॥ उजेड व आंधार किंवा मेलेला व जिवंत यांची ज्या मानाने बरोबरी आहे, तशीच बरोबरी देह व आत्मा यांची आहे, असे जाण॥ ११०२ ॥ रात्र आणि दिवस, सोने आणि कापूस हे जितके अजोड आहेत तितकीच देह आणि आत्मा यांची बरोबरी आहे॥ ११०३ ॥ देह हा पंचभूताचा बनला असून कर्माच्या गुणांनी बांधला जाऊन जन्ममृत्यूच्या चाकावर घातल्यामुळे फिरत आहे॥ ११०४॥ हे शरीर काळरूपी अग्नीच्या तोंडात घातलेला लोण्याचा गोळा होय. माशीला फडफडण्याला जितका वेळ लागतो तितक्या वेळात ते नाहीसे होते॥ ११०५ ॥ जर हे शरीर अग्नीत पडले तर त्याचे भस्म होऊन ते नाहीसे होते. कुत्र्याच्या हातीं लागून ते त्याने खाल्ले तर त्याची विष्ठा होते॥ ११०६ ॥ या दोन्ही प्रकारातून वाचले तर ते कृमीचा ढीग होते. हे अर्जुना! याप्रमाणे या देहाचा परिणाम वाईट होतो॥ ११०७ ॥ या देहाची अशी दशा होते आणि आत्मा याच्या उलट असा आहे. तो अनादि असल्यामुळे सहज नित्य शुद्ध आहे॥ ११०८ ॥ निर्गुण असल्यामुळे तो कळासहित नाही व कळारहित नाही. तो क्रियारहित नाही व सक्रिय नाही. तो कृश नाही व स्थूळ नाही॥ ११०९ ॥

गूढार्थदीपिका—परमात्मा निर्गुण आहे—म्हणजे त्याचे ठिकाणी त्रिगुणात्मक मायेपासून झालेल्या जगताचे ठिकाणी दिसून येणारे कोणतेहि पांचभौतिक धर्म व गुण नाहीत असे जे आम्ही विधान केले आहे ते माउलीच्या या व पुढील ओव्याच्या आधारेच होय.

आभासु ना निराभासु। प्रकाशु ना अप्रकाशु। अल्प ना बहुवसु। अरूपपणें॥ १११०॥
रिता ना भरितु। रहितु ना सहितु। मूर्तु ना अमूर्तु। शून्यपणें॥ ११११॥

आनंदु ना निरानंदु। एकु ना विविधु। मुक्त ना बद्धु। आत्मपणें॥ ११११२॥
येतुला ना तेतुला। आइता ना रचिला। बोलता ना उगला। अलक्षपणें॥ १११३॥
सृष्टीचां होणां न रचे। सर्वसंहारें न वेंचे। आथी नाथी या दोहींचें। पंचत्व हा॥ १११४॥
मवे ना चर्चे। वाढे ना खांचे। विटे ना वेंचे। अव्ययपणें॥ १११५॥
एवंरूप पैं आत्मा। देहीं जें म्हणती प्रियोत्तमा। तें मठाकारें व्योमा। नाम जैसें॥ १११६॥
तैसें तयाचिये अनुस्यूती। होती जाती देहाकृती। तो घे ना सांडी सुमती। जैसा तैसा॥ १११७॥
अहोरात्रें जैशीं। येती जाती आकाशीं। आत्मसत्ते तैसीं। देहें जाण॥ १११८॥
म्हणोनि इये शरीरीं। कांहीं करवी ना करी। आयताही व्यापारीं। सज्जु न होय॥ १११९॥
यालागीं स्वरूपें। उणा पुरा न घेपे। हें असो तो न लिंपे। देहीं देहा॥ ११२०॥

अर्थ—भौतिक रूप नसल्यामुळे तो दिसणारा नाही किंवा न दिसणारा नाही, तो प्रकाशरूप नाही, तो अंधाररूप नाही, तो थोडा नाही किंवा बहु नाही॥ १११०॥ केवळ सत्तारूप असल्यामुळे तो कोठे रिकामा आहे किंवा कोठे भरला आहे असे नाही. तो कशा वांचून आहे असे नाही किंवा कशासहित आहे असे नाही. तो मूर्त नाही किंवा अमूर्त नाही॥ ११११॥ प्रत्यक् आत्मस्वरूप असल्यामुळे तो आनंदसहित नाही व आनंदरहित नाही. तो एक नाही किंवा अनेक नाही. तो मुक्त नाही किंवा बद्ध नाही॥ १११२॥ ज्ञानाचा विषय होत नसल्यामुळे तो एवढा नाही किंवा तेवढा नाही. तो आयता नाही किंवा निर्माण केलेला नाही. तो बोलणारा नाही किंवा उगा राहणारा नाही॥ १११३॥ सृष्टीच्या उत्पत्तीने तो उत्पन्न होत नाही किंवा तिचा संहार झाला असता तो नाहीसा होत नाही. ''आहे-नाही'' या दोहोलाहि तो नाहीसा करणारा आहे.॥ १११४॥ अविनाशी असल्यामुळे तो मोजला जात नाही किंवा बोलला जात नाही. तो वाढत नाही व कमी होत नाही. तो विटला जात नाही किंवा खर्च होत नाही॥ १११५॥ हे प्रियोत्तमा अर्जुना! अशा प्रकारचा आत्मा देहाच्या ठिकाणी आहे, असे जे लोक म्हणतात ते आकाशाला मठाकार झाले असता मठाकाश म्हणण्यासारखे आहे॥ १११६॥ हे शुद्धबुद्धि अर्जुना! त्याप्रमाणे त्याच्या सर्वत्र व्यापक सत्तेवरच सर्व देहाकार उत्पन्न होतात व नाश पावतात. तो देहाकार घेत नाही व सोडतहि नाही. तो जशाचा तसाच असतो॥ १११७॥ ज्याप्रमाणे दिवस-रात्र आकाशात येतात व जातात, त्याप्रमाणे आत्मसत्तेवर देह होतात व जातात हे जाण॥ १११८॥ म्हणून या शरीराचे ठिकाणी तो काही करवित नाही व करत नाही. आयत्या प्रकृतिकडून होत असलेल्या व्यापारांतहि तो भाग घेण्यास तयार होत नाही॥ १११९॥ म्हणूनच पूर्ण स्वरूप असल्यामुळे तो उणेपणा-पूरेपणा घेत नाही. हे असो तो देहांत असून देहाशी लिप्त होत नाही॥ ११२०॥

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते। सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते॥ ३२॥

अर्थ—ज्याप्रमाणे आकाश सूक्ष्म असल्यामुळे सर्व वस्तूंचे ठिकाणी व्यापून असूनहि कशाने लिप्त होत नाही, त्याप्रमाणे आत्मा आकाशाहूनहि सूक्ष्म असल्यामुळे सर्वत्र देहात राहूनहि देहाने लिप्त होत नाही॥ ३२॥

अगा आकाश कें नाहीं। हें न रिघेचि कवणें ठायीं। परि कायिसेनि कहीं। गादिजेना जैसें॥ ११२१॥
तैसा सर्वत्र सर्व देहीं। आत्मा असतचि असे पाहीं। परि संगदोषें एकेंही। लिप्तु नोहे॥ ११२२॥
पुढतपुढती एथें। हेंचि लक्षण निरुतें। जे जाणावें क्षेत्रज्ञातें। क्षेत्रविहिना॥ ११२३॥

अर्थ—अर्जुना! आकाश कोठे नाही व कोण्याठिकाणी शिरले नाही? पण ते कशाने कधीहि ज्याप्रमाणे मळत नाही॥ ११२१॥ त्याप्रमाणे सर्वत्र देहात आत्मा मूळचाच आहे, पाहा! पण एकाहि देहाच्या संगतिदोषाने तो लिप्त होत नाही॥ ११२२॥ वारंवार जेथे हेच एक क्षेत्रज्ञाचे शुद्ध लक्षण सांगायचे की क्षेत्रज्ञाला क्षेत्रावाचून जाणावे॥ ११२३॥

गूढार्थदीपिका—क्षेत्र तेवढे जड-विनाशी असून क्षेत्रज्ञ जीव चेतन व अविनाशी आहे; म्हणून तो संपूर्ण क्षेत्राहून निराळा, असंग आहे, असे दृढ जाणल्यानेच ''मी ब्रह्म आहे'' हा प्रथम अनुभव येतो.

संसर्गें चेष्टिजे लोहें। परि लोह भ्रामक नोहे। क्षेत्रक्षेत्रज्ञां आहे। तेतुला पाडु॥ ११२४॥
दीपकाची अर्ची। राहाटी वाहे घरींची। परी वेगळीक कोडीची। दीपा आणि घरा॥ ११२५॥
पैंकाष्ठांच्या पोटीं। वन्हि असे किरीटी। परी काष्ठ नोहे या दृष्टी। पाहिजे गा॥ ११२६॥
अपाड नभा आभाळा। रवि आणि मृगजळा। तैसाचि हाही डोळां। देखावा पै॥ ११२७॥

अर्थ—लोहचुंबकाच्या संसर्गाने लोखंड चळते, पण लोखंड लोहचुंबक होत नाही. क्षेत्र व क्षेत्रज्ञ या दोहोंतहि तितकेच अंतर आहे॥ ११२४॥ दिव्याची ज्योत घरातील माणसाचा व्यवहार चालविते, पण दिवा व घर यांच्यात कितीतरी वेगळेपणा आहे॥ ११२५॥ अर्जुना! लाकडाच्या पोटात अग्नि असला, तरी लाकूड अग्नि नव्हे अशी जशी आपली दृष्टि असते, तशा दृष्टिनेच देहामध्ये आत्म्याला पाहिले पाहिजे॥ ११२६॥ आकाश व अभ्र, सूर्य व मृगजळ यांच्यात जितकी भिन्नता असते तितकीच देह व आत्मा यांच्यात भिन्नता आहे, हे जाणले पाहिजे॥ ११२७॥

गूढार्थदीपिका—भ्रांतीने भासलेला पदार्थ खरोखर अस्तित्वातच नसतो; म्हणून ज्या सत्य वस्तूवर तो भ्रांतीने भासतो, त्या सत्य वस्तूशी त्याचा यत्किंचितहि संबंध राहू शकत नाही. सत्य, अविनाशी, निर्गुण अशा परब्रह्मावर भासणारे जगतहि भ्रांतिजन्य आहे; म्हणूनच सत्य परब्रह्माशी जगताचा यत्किंचितहि संबंध नाही; हाच सिद्धांत माउलींनी मागे पुष्कळदा सांगून पुन: येथेही श्रोत्यांच्या मनांत तो दृढ ठसावा म्हणून वरील ओव्यांतून मांडला आहे.

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः। क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत॥ ३३॥

अर्थ—ज्याप्रमाणे एकच सूर्य संपूर्ण जगताला प्रकाशित करतो, त्याप्रमाणे अर्जुना! क्षेत्रज्ञ हा संपूर्ण क्षेत्राला प्रकाशित करतो॥ ३३॥

हें आघवेंचि असो एकु। गगनौनि जैसा अर्कु। प्रगटवी लोकु। नांवें नांवें॥ ११२८॥
एथ क्षेत्रज्ञु तो ऐसा। प्रकाशकु क्षेत्राभासा। यावरुतें हें न पुसा। शंका नेघा॥ ११२९॥

अर्थ—हे सर्व असू दे. ज्याप्रमाणे एकच सूर्य आकाशांत राहून दररोज लोकसृष्टि प्रकट करतो॥ ११२८॥ या देहांतहि तो क्षेत्रज्ञ असाच सर्व भासरूप क्षेत्राला प्रकाशित करणारा आहे. यापुढे याविषयी पुन: शंका घेऊ नकोस व विचारू नकोस॥ ११२९॥

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा। भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम्॥ ३४॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगो नाम त्रयोदशोऽध्यायः॥ १३॥

अर्थ—क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचे परस्पर अत्यंत वैलक्षण्य आहे व भूतसृष्टीचे कारण जी प्रकृति तिचे खरोखर अस्तित्वच नाही असे ज्ञानदृष्टीने ज्यांनी जाणले, ते परमपदाला जातात॥ ३४॥

शब्दतत्त्वसारज्ञा। पैं देखणी तेचि प्रज्ञा। जे क्षेत्रा क्षेत्रज्ञा अपाडु देखे॥ ११३०॥
इया दोहींचें अंतर। देखावया चतुर। ज्ञानियांचें द्वार। आराधिती॥ ११३१॥

अर्थ—हे शब्दतत्त्वाचे सार जाणणाऱ्या अर्जुना! जी क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचे वैलक्षण्य पाहते तीच बुद्धि होय व तेच पाहणे होय॥ ११३०॥ क्षेत्र व क्षेत्रज्ञ या दोघांचे अंतर जाणून घेण्याकरिता शहाणे पुरुष, ज्ञानीपुरुषाच्या घराच्या द्वाराची आराधना करतात-म्हणजे ज्ञानीपुरुषाच्या दारात नम्र सेवक होऊन राहतात॥ ११३१॥

गूढार्थदीपिका—क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचा योग्य विवेक अनुभवी ज्ञानी पुरुषांच्या साहाय्याशिवाय मनुष्याला केवळ आपल्या बुद्धीने करता येत नाही, असा भाव.

याचिलागीं सुमती। जोडिती शांतिसंपत्ती। शास्त्रांचीं दुभतीं। पोसिती घरीं॥ ११३२॥

अर्थ—हे शुद्धबुद्धि अर्जुना! याच्याचकरिता (मुमुक्षु लोक) शमादमादि साधनसंपत्ति प्राप्त करून घेतात व अनेक शास्त्ररूपी दुभत्या गायी घरी पोसतात॥ ११३२॥

गूढार्थदीपिका—शमदमादि साधनसंपत्तीने क्षेत्रापासून नि:शेष अलग झालेले मनच, शास्त्रानुसार व गुरुपदेशानुसार क्षेत्रविरहित परब्रह्माचे आकलन करू शकते.

योगाचिया आकाशा। वळघिजे येवढाचि धिंवसा। याचियाचि आशा। पुरुषासि गा॥ ११३३॥
शरीरादि समस्त। मानिताति तृणवत। जीवें संतांचें होत। वाहणधरु॥ ११३४॥
ऐसैसियापरी। ज्ञानाचिया भरोवरी। करूनियां अंतरीं। निरुते होती॥ ११३५॥
मग क्षेत्र क्षेत्रज्ञाचे। जे अंतर देखती साचें। ज्ञानें उन्मेख तयांचें। वोवाळूं आम्ही॥ ११३६॥
आणि महाभूतादिकीं। प्रभेदलीं अनेकीं। पसरलीसे लटिकी। प्रकृति जे हे॥ ११३७॥
जे शुकनळिकान्यायें। न लगती लागली आहे। हें जैसें तैसें होये। ठाउवें जयां॥ ११३८॥

अर्थ—हे अर्जुना! योगरूपी आकाशाला मिठी मारावी असे धाडस, पुरुषाला याच्याच प्राप्तीच्या आशेने येते॥ ११३३॥ शरीरादि सर्व पदार्थ तुच्छ मानून जीवभावाने संतांच्या वाहणा डोक्यावर धारण करतात॥ ११३४॥ अशा प्रकारे अंत:करणात ज्ञानाची भर करीत जाऊन ते शुद्ध विवेकसंपन्न होतात॥ ११३५॥ मग जे क्षेत्रक्षेत्रज्ञाचे वैलक्षण्य बरोबर जाणतात, त्यांच्या त्या ज्ञानाला आम्ही आपल्या ज्ञानाने ओवाळू॥ ११३६॥ आणि जी ही खोटी प्रकृति महाभूतादि कार्यपदार्थाने विभक्त होऊन पसरली आहे॥ ११३७॥ जी शुकनळिकान्यायाने पुरुषाला न लागताच लागली आहे. हे जसे आहे, तसेच ज्याला कळून आले॥ ११३८॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे राघूला पकडण्याकरिता केलेली नळी व राघू हे दोन अत्यंत निराळे असतात. राघू नळीवर बसतो व नळी फिरली असता, 'मी पडेन' या भीतीने राघूच नळी पायाने पक्की धरून ठेवतो आणि 'मी नळीहून निराळा आहे', हे विसरतो. त्याचप्रमाणे क्षेत्रज्ञ जीव क्षेत्राहून अत्यंत निराळा आहे, पण हे विसरून तो भ्रांतीने क्षेत्रच ''मी आहे'' असे म्हणतो.

जैसी माळा ते माळा। ऐसीचि देखिजे डोळां। सर्पबुद्धि टवाळा। उखी होउनी॥ ११३९॥
कां शुक्ति ते शुक्ति। हे साच होय प्रतीती। रुपेयाची भ्रांती। जाऊनियां॥ ११४०॥
तैसी वेगळी वेगळेपणें। प्रकृति जे अंत:करणें। देखती ते मी म्हणें। ब्रह्म होती॥ ११४१॥

अर्थ—ज्याप्रमाणे सर्परूपाने दिसलेली माळा, खोटी सर्पबुद्धि नाहीशी होऊन माळारूपानेच डोळ्यांनी पहावी॥ ११३९॥ किंवा ज्याप्रमाणे शिंपेवर झालेली चांदीची भ्रांति नाहीशी होऊन मूळच्या शिंपेची, शिंपरूपाने खरी प्रतीति येते॥ ११४०॥ त्याप्रमाणे पुरुषाहून वेगळी असलेली जी प्रकृति, तिला जे वेगळेपणानेच अंत:करणाने पाहतात, ते पुरुष, मी म्हणतो, ब्रह्म होतात॥ ११४१॥

गूढार्थदीपिका—अखंड, असंगच राहत असलेल्या क्षेत्रज्ञ जीवाने आपले हे स्वरूप जाणले की प्रकृति व प्रकृतीचे संपूर्ण जगत्कार्य यांना स्वतंत्र अस्तित्वच उरत नाही व तो सर्व अज्ञानभ्रांतीचा पसारा होता, असा अनुभव येऊन व प्रकृत्यादिकांचा अत्यंत निरास होऊन तो ठायींच ब्रह्मरूप होऊन राहतो.

जें आकाशाहूनि वाड। जें अव्यक्ताची पैल कड। जें भेटलिया अपाडा पाड। पडों नेदी॥ ११४२॥
आकारु जेथ सरे। जीवत्व जेथें विरे। द्वैत जेथ नुरे। अद्वय जें॥ ११४३॥
तें परमतत्त्व पार्था। होती ते सर्वथा। जे आत्मानात्मव्यवस्था। राजहंसु॥ ११४४॥

अर्थ—जे आकाशाहून मोठे व जे अव्यक्तप्रकृतीचे पलीकडील तीर आहे. जे प्राप्त झाले असता ब्रह्माहून विलक्षण असलेल्या पदार्थाला ब्रह्माच्या बरोबरीचे होऊ देत नाही॥ ११४२॥ आकार जेथे संपतो, जीवत्व जेथे विरून जाते द्वैत जेथे उरत नाही, असे जे अद्वय आहे॥ ११४३॥ अर्जुना! दूध पाणी निवडण्यात प्रवीण असलेल्या राजहंसाप्रमाणे जे आत्मा व अनात्मा यांचा विवेक करण्यात प्रवीण आहेत. तेच परमतत्त्वरूप होऊन राहतात॥ ११४४॥

ऐसा हा जी आघवा। श्रीकृष्णें तया पांडवा। उगाणा दिधला जीवा। जीवाचिया॥ ११४५॥

येर कलशींचें येरीं। रिचविजे जयापरी। आपणपें तया श्रीहरी। दिधलें तैसें॥ ११४६॥
आणि कोणा देता कोण। तो नर तैसा नारायण। वरी अर्जुनातें श्रीकृष्ण। हा मी म्हणे॥ ११४७॥
परि असो तें नाथिलें। ना पुसतां कां मी बोलें। किंबहुना दिधलें। सर्वस्व देवें॥ ११४८॥
कीं तो पार्थु जी मनीं। अझुनी तृप्ती न मनी। अधिकाधिक उतान्ही। वाढवीतु असे॥ ११४९॥
स्नेहाचिया भरोवरी। आंबुथिला दीपु घे थोरी। चाड अर्जुना अंतरीं। परिसतां तैसी॥ ११५०॥

अर्थ—याप्रमाणे श्रीज्ञानेश्वरमाऊली श्रोत्यांना म्हणते, महाराज! असा हा संपूर्ण क्षेत्रक्षेत्रज्ञाचा उलगडा श्रीकृष्णाने आपल्या जीवनापेक्षाहि प्रिय असलेल्या अर्जुनाला करून दिला॥ ११४५॥ ज्याप्रमाणे एका कलशातील पाणी दुसऱ्या कलशात ओतावे, त्याप्रमाणे श्रीहरीने अर्जुनाला आपण आपल्याला दिले—म्हणजे भगवंतांनी आपली शुद्ध स्वरूपस्थिति अर्जुनाचे अंत:करणात प्रगट केली॥ ११४६॥ आणि अर्जुन तो नर होय तसेच श्रीकृष्ण नारायण होत. यावरहि अर्जुनाला श्रीकृष्ण म्हणतात 'हा मीच होय'. याप्रमाणे ते दोघे एकच असल्यामुळे तेथे देणारा कोण असणार व दुसऱ्या कोणाला दिले जाणार!॥ ११४७॥ पण ते असो. न विचारता मी व्यर्थ का बोलावे? फार काय सांगायचे! भगवंतांनी अर्जुनाला आपले सर्वस्व दिले॥ ११४८॥ पण महाराज! तो अर्जुन मनामध्ये अजूनहि ऐकण्याचि तृप्ती मानित नव्हता. उलट त्याची अधिक अधिक ऐकण्याची उत्कंठा वाढतच होती॥ ११४९॥ उजळलेला दिवा जसजशी तेलाची भर घालावी तसतसा तो मोठा होत जातो, त्याचप्रमाणे भगवंताच्या मुखाने श्रवण करीत असता अर्जुनाचे अंत:करणातहि ऐकण्याची इच्छा वाढत होती॥ ११५०॥

गूढार्थदीपिका—भगवंताच्या मुखातून निघणाऱ्या शब्दांचे अर्जुनाला जे इतके प्रेम वाटत होते, ते त्याचे भगवंतावरील प्रेमच त्याद्वारा व्यक्त होत होते.

तेथ सुगरणी आणि उदारे। रसज्ञ आणि जेवणारे। मिळती मग अवतरे। हातु जैसा॥ ११५१॥
तैसें जी होतसे देवा। तया अवधानाचिया लवलवा। पाहातां व्याख्यान चढलें थांवा। चौगुणें वरी॥ ११५२॥
सुवायें मेघु सांवरे। जैसा चंद्रें सिंधु भरे। तैसा मातला रसु आदरें। श्रोतयाचेनि॥ ११५३॥
आतां आनंदमय आघवें। विश्व कीजेल देवें। तें रायें परिसावें। संजयो म्हणे॥ ११५४॥

अर्थ—ज्याप्रमाणे उत्तम स्वयंपाक करणारी असून तसेच सढळ हाताने वाढणारी आहे आणि उत्तम स्वयंपाकाची चंव जाणणारे असून तेच जेवणारे आहेत, अशी जोड मिळाली असता ज्याप्रमाणे वाढणाऱ्या स्त्रियेला वाढण्याची हौस वाटते॥ ११५१॥ त्याप्रमाणेच, महाराज! देवालाहि होत होते. अर्जुनाच्या अवधानाची नित्यनूतनता पाहून श्रीकृष्णाला व्याख्यान करण्यास चौपटीपेक्षा अधिक बळ चढले॥ ११५२॥ ज्याप्रमाणे अनुकूल वाऱ्याने, वर्षाव होण्यासारखे मेघ सांवरले जातात किंवा चंद्राच्या योगाने समुद्राला भरती येते, त्याप्रमाणे श्रोत्यांच्या आदरपूर्वक ऐकण्याने वक्त्याच्या बोलण्यांत रसाची पुष्टि झाली॥ ११५३॥ संजय राजा धृतराष्ट्राला म्हणतो, आता पुढे भगवान श्रीकृष्ण जे आपल्या बोलण्याने सर्व जगत आनंदमय करतील, ते बोलणे महाराजांनी ऐकावे॥ ११५४॥

एवं जे महाभारतीं। श्रीव्यासें अप्रांतमती। भीष्मपर्वी संगती। म्हणितली कथा॥ ११५५॥
तो श्रीकृष्णार्जुनसंवादु। नागरीं बोलीं विशदु। सांगोनि दाऊं प्रबंधु। वोवियेचा॥ ११५६॥
नुसधीचि शांतिकथा। आणिजेल कीर वाक्पथा। जे शृंगाराचां माथां। पाय ठेवी॥ ११५७॥
दाऊं वेल्हाळें देशी नवी। जे साहित्यातें वोजावी। अमृतातें चुकी ठेवी। गोडसेपणें॥ ११५८॥
बोल वोल्हावितेनि गुणें। चंद्रासि घे उमाणे। रसरंगी भुलवणें। नाद लोपी॥ ११५९॥
खेचराचियाही मना। आणी सात्त्विकाचा पान्हा। श्रवणासवें सुमना। समाधि जोडे॥ ११६०॥
तैसा वाग्विलास विस्तारूं। गीतार्थे विश्व भरूं। आनंदाचें आवारूं। मांडूं जगा॥ ११६१॥
फिटो विवेकाची वाणी। हो कानामनाची जिणी। देखो आवडे तो खाणी। ब्रह्मविद्येची॥ ११६२॥
दिसो परतत्त्व डोळां। पाहो सुखाचा सोहळा। रिघो महाबोधसुकाळा-। माजीं विश्व॥ ११६३॥
हें निफजेल आतां आघवें। ऐसें बोलिजेल बरवें। जे अधिष्ठिला असे परमदेवें। श्रीनिवृत्ती मी॥ ११६४॥

म्हणोनि अक्षरीं सुभेदीं। उपमा श्लोक कोंदाकोंदी। झाडा देईन प्रतिपदीं। ग्रंथार्थासी॥ ११६५॥
हा ठावोवरी मातें। पुरतया सारस्वतें। केलें असें श्रीमंते। श्रीगुरुरायें॥ ११६६॥
तेणें जी कृपासावायें। मी बोलें तेतुले सामाये। आणि तुमचिये सभे लाहें। गीता म्हणे॥ ११६७॥
वरि तुम्हां संतांचे पाये। आणि मी लाधलों आहे। म्हणोनि जी नोहे। अटक कांहीं॥ ११६८॥
प्रभु काश्मिरीं मुकें। नुपजे ही कौतुकें। नाहीं उणी सामुद्रिकें। लक्ष्मीयेसी॥ ११६९॥
तैसी तुम्हां संतांपासीं। अज्ञानाची गोठी कायसी। यालागीं नवरसीं। वरुषेन मी॥ ११७०॥

अर्थ—याप्रमाणे अमर्याद अशा बुद्धिमान व्यासमुनींनी भीष्मपर्वाच्या संगतीने महाभारतामध्ये जी कथा सांगितली आहे॥ ११५५॥ तो श्रीकृष्ण व अर्जुन यांचा संवाद ओवीप्रबंधात ग्रथित करून सुंदर मराठी भाषेतून स्पष्ट करून दाखविणार आहे॥ ११५६॥ ही कथा शांतरसाला धरून असली तरी, ती शृंगाररसाच्याहि डोक्यावर पाय ठेविल-म्हणजे शृंगाररसापेक्षाहि चित्ताकर्षक होईल-अशा रीतीने मी आपल्या मराठी वाणीने ती सांगेन॥ ११५७॥ साहित्याला शोभा आणील व गोडपणाने अमृतालाहि नावे ठेवील अशी सुंदर नवी मराठी भाषा निरूपणातून दाखविन॥ ११५८॥ चित्त प्रसन्न करण्याच्या गुणामुळे माझे शब्द चंद्रप्रकाशाचे माप घेतील-म्हणजे चंद्रप्रकाशहि माझ्या शब्दापेक्षा मर्यादित चित्त प्रसन्न करणारा ठरेल-आणि शब्दाने व्यक्त केलेल्या रसात रंगून मोहित झालेल्या मनाला दशनादहि ऐकू येणार नाहीत॥ ११५९॥ माझे बोल ऐकल्याबरोबर अत्यंत रजोगुणी-तमोगुणी व आकाशात भटकणाऱ्या अशा पिशाच्चादि प्राण्यांच्या मनाला देखील सत्वगुणाचा पाझर फुटेल व शुद्ध मनाच्या पुरुषांना समाधि प्राप्त होईल॥ ११६०॥ अशा प्रकारच्या शब्दविलासाचा विस्तार करून संपूर्ण विश्वात भगवद्गीतेचा अर्थ प्रकट करू आणि संपूर्ण जगाभोवती ब्रह्मानंदाचा कोट उभारू॥ ११६१॥ लोकात दिसून येणारी आत्मानात्मविवेकाची उणीव नाहीशी होवो. कान व मन असण्याचे सार्थक होवो व वाटेल त्याच्या दृष्टीला ब्रह्मज्ञानाची खाणी दिसो॥ ११६२॥ सर्वांच्या डोळ्याला एक सर्वत्र परब्रह्मच दिसो. सर्वजण ब्रह्मसुखाचा सोहळाच पाहोत आणि संपूर्ण विश्वाला ब्रह्मबोधाचा सुकाळ होवो॥ ११६३॥ सर्व देवांचा देव व श्रीसद्गुरु निवृत्तिनाथ यांचेच माझ्या चित्तात अधिष्ठान असल्यामुळे इच्छिल्याप्रमाणे सर्व घडून येईल असेच मी आता सुंदर निरूपण करणार आहे॥ ११६४॥ म्हणून ग्रंथाचा अर्थ सांगतांना उपमा व श्लोक यांच्या झालेल्या दाटीत शब्द स्पष्ट निराळे करून प्रत्येक शब्दाचे अर्थ व त्यातील भाव सांगेन॥ ११६५॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न श्रीमंत श्रीगुरु निवृत्तिनाथांनी इतके करता येण्यापुरते मला साहित्यसंपन्न केले आहे॥ ११६६॥ महाराज! श्रीगुरुकृपेच्या साहाय्यामुळेच मी बोलतो तितके माझ्याठिकाणी साठविले आहे आणि तुम्हा श्रोत्यांच्या सभेत गीतार्थ सांगण्यास मी समर्थ झालो आहे॥ ११६७॥ आणखी शिवाय तुम्हा संतांचे चरण आज मला प्राप्त झाले असल्यामुळे मला काही एक अवघड वाटत नाही॥ ११६८॥ हे प्रभो! सरस्वतीच्या पोटी मुके मूल कौतुक म्हणूनहि जन्मू शकत नाही. लक्ष्मीच्या हातावर सामुद्रिक लक्षणे कधी कमी नसतात॥ ११६९॥ त्याप्रमाणे तुम्हां संतांजवळ अज्ञानाची गोष्ट कोठून राहणार! म्हणून तुमच्या कृपेने मी नवरसाने परिप्लुत असे निरूपण करणार आहे॥ ११७०॥

गूढार्थदीपिका—माउलीचे सर्व उद्गार स्वाहंकाराचे नसून ज्ञानभक्तीने पूर्णब्रह्म झालेल्या श्रीसद्गुरुच्या व संताच्या अगाध कृपासामर्थ्यावर विकल्परहित दृढ विश्वास ठेवणाऱ्या शिष्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतात हे व्यक्त करणारे व त्यांचा गौरव करणारे आहेत.

किंबहुना आतां देवा। अवसरु मज देयावा। ज्ञानदेव म्हणे बरवा। सांगेन ग्रंथु॥ ११७१॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां त्रयोदशोऽध्यायः॥ १३॥

अर्थ—श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, हे प्रभो! फार काय सांगावे! आता मी सुंदर ग्रंथ सांगणार आहे, मला अवकाश द्या॥ ११७१॥

श्रीसद्गुरुमाउलीच्या कृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायाचा अनुवाद गूढार्थदीपिकेसह पूर्ण झाला तो श्रीसद्गुरुचरणी समर्पण असो.

समारोप

मागील बाराव्या अध्यायात माउलींनी ब्रह्मज्ञानानंतरहि सगुण साकार भगवंताच्या भक्तीची आवश्यकता व थोरवी गायिली.

भगवंताची सगुण व निर्गुण अशी दोन रूपे आहेत. निर्गुणस्वरूप अपरिणामी, अस्फुट, अद्वैत सच्चिदानंदस्वरूप आहे, तसेच सगुणस्वरूपहि शुद्ध परब्रह्मस्वरूपच आहे. ज्याप्रमाणे सोन्याची पारख झाल्यावाचून हा अलंकार सोन्याचा आहे. अशी खात्री होत नाही व त्याचे प्रेम वाटत नाही त्याप्रमाणे भगवंताच्या निर्गुणस्वरूपाचेहि नि:संदिग्ध ज्ञान झाल्याखेरीज भगवंताच्या सगुणस्वरूपाचेहि पूर्णब्रह्मत्व कळून येत नाही; म्हणून या तेराव्या अध्यायात निर्गुण म्हणजे गुणरहित अशा शुद्ध स्वरूपाचे पुन: विवेचन केले आहे.

भगवान म्हणतात, अर्जुना! या शरीराला क्षेत्र असे म्हणतात व या क्षेत्राला जो जाणतो त्याला क्षेत्रज्ञ म्हणतात. सर्व क्षेत्राचे ठिकाणी मीच एक क्षेत्रज्ञ आहे, असे जाण. तेथे क्षेत्र कोणते, कोणत्या प्रकारचे आहे, व कोणकोणत्या विकारांनी युक्त आहे, हे मजपासून संक्षेपत: ऐक.

वेदान्तदर्शन सोडून इतर दर्शनकारांनी क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचा विचार केला असला तरी त्यांना त्यांचा योग्य निवाडा करता आला नाही, कारण वेदान्तदर्शनात क्षेत्रज्ञ हा अविनाशी मानला असून तद् व्यतिरिक्त सर्व भ्रांतिजन्य नाशिवंत मानले आहे. पण इतर दर्शनकारानी क्षेत्रज्ञासह सर्वच सत्य मानले असल्यामुळे क्षेत्रज्ञासह ते सर्व मर्यादित व नाशिवंत होतात व शून्यवाद गळी येतो.

पंचमहाभूते, अहंकार बुद्धि, अव्यक्त, दहा इंद्रिये, त्यांचे विषय मन, इच्छा, द्वेष, सुख, दु:ख, या सर्वाचा संघात चेतना व धृति या छत्तीस तत्वांचा क्षेत्रात समावेश होतो. तसेच अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षांति, आर्जव, श्रीगुरुसेवा, शौच, स्थैर्य, आत्मविनिग्रह, विषयांचे ठिकाणी वैराग्य, गर्वरहितता, जन्म-मृत्यू-जरा-व्याधि इत्यादि दु:खांचे ठिकाणी दोष पाहणे, देह-स्त्री-गृह-पुत्र इत्यादिकांविषयी यत्किंचित् आसक्ति नसणे, इष्ट व अनिष्ट यांचे ठिकाणी समता, परमेश्वराचे ठिकाणी अनन्यपूर्वक अव्यभिचारी भक्ति, एकान्तसेवन, आत्मस्वरूपाच्या ज्ञानाचे नित्यत्व जाणणे व झालेल्या ज्ञानाने परमात्मसाक्षत्कार होणे अशी, ज्ञान प्राप्त झाले असता, लक्षणे होतात. या लक्षणाच्या उलट लक्षणाचे अज्ञान असते.

जे ज्ञान जाणले असता मनुष्य अविनाशी होतो, ते परब्रह्म होय. त्याला सत् व असत् या शब्दानी संबोधिता येत नाही. त्या ज्ञेयाला विश्वबाहु, विश्वांघ्रि, विश्वतश्चक्षु, विश्वमूर्धा अशीहि नावें आहेत तेच ज्ञेय, मनबुद्धिसह संपूर्ण इंद्रिये व सत्वादिगुण या रूपाने प्रत्ययाला येते. पण ते सर्वापासून निराळे आहे. तसेच ते सत्वादिगुणांचा संबंध नसतांहि गुण भोगणारे आहे. ते ज्ञेय प्राणिमात्रांच्या आतबाहेर व्यापून असून चराचररूपहि झाले आहे. ते एक अस्फुट असून सर्व सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व संहार करणारे आहे. व ते सर्व भूतामात्रांच्या हृदयामध्ये स्थित आहे.

अशा प्रकारे क्षेत्र, ज्ञान, अज्ञान व ज्ञेय जे परब्रह्म यांचे संक्षेपत: वर्णन करून अर्जुनाला भगवंतानी सांगितले; पण अर्जुन ते ग्रहण करू शकला नाही अशी शंका येऊन भगवंतांनी त्या चार तत्त्वांची सांख्यमतानुसार पुरुष व प्रकृति अशा दोनच तत्त्वात विभागणी करून अर्जुनाला समजावून दिले.

भगवान म्हणतात, अर्जुना! प्रकृति व पुरुष हे दोन्ही पदार्थ अनादि असून गुण व सर्व कार्यरूप पदार्थ प्रकृतिपासून झाले आहेत, असे जाण. पुरुष कार्यकारणादिरूपाने परिणाम पावलेल्या प्रकृतीचे ठिकाणी राहून प्रकृतिपासून उत्पन्न झालेल्या गुणांचा भोग घेतो व बऱ्या-वाईट योनींमध्ये जन्म होण्याला हा गुणांचा संगच कारण

आहे. वास्तविक पाहता हा प्रकृतीच्या कार्यात न गुंतता प्रकृतीच्या जवळ राहून या देहातच केवळ साक्षी होऊन राहणारा असून तो सर्वांचा पोषण करणारा व सर्वांचे नियमन करणारा सर्वेश्वर आहे. यालाच परमात्माहि म्हणतात. अशा प्रकारे जो त्याला जाणतो तो जन्ममरणापासून मुक्त होतो.


याला जाणण्याचे पुष्कळ प्रकार आहेत. कोणी ध्यानाच्या योगाने अंत:करणवृत्तिद्वारा त्याला आपल्याच ठिकाणी पाहतात, कोणी सांख्ययोगाचे द्वारा व कोणी कर्मयोगाचे द्वारा त्याला पाहतात.

कोणी परमेश्वराशी ऐक्य पावलेले जे सत्पुरुष आहेत त्यांच्या ठिकाणी अचल श्रद्धा ठेवून त्यांच्याकडून एकचित्ताने परमात्म्याच्या स्वरूपाचे श्रवण करतात व तेहि जन्ममृत्यूपासून मुक्त होतात.

सारांश, क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगामुळे सर्व जडचैतन्यरूप अशा जगाची उत्पत्ति झाली आहे; पण क्षेत्राहून क्षेत्रज्ञ निराळा असून तो सर्व भूतांचे ठिकाणी समस्थितीने वास करतो असे जो पाहतो तोच परमगतीला प्राप्त होतो. अर्जुना! हा क्षेत्रज्ञ परमात्मा अनादि असल्यामुळे अविनाशी आहे, म्हणून या शरीरांत तो आहे तरी तो कर्म करीत नाही व कर्माने लिप्त होत नाही. अशा प्रकारे क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचे अत्यंत वैलक्षण्य आहे.

शेवटी भगवान म्हणतात, अर्जुना! भूतसृष्टि व सृष्टीचे कारण जी प्रकृति हे काही एक अस्तित्वात नसून एक आत्माच आहे, असे ज्ञानदृष्टीने ज्यांनी दृढ जाणले तो माझ्या परमपदाला प्राप्त होतो.

॥ श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥



॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥ 784

श्रीज्ञानेश्वरी-गूढार्थदीपिका



गीताप्रेस, गोरखपुर

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय चौदावा

जयजय आचार्या। समस्तसुरवर्या। प्रज्ञाप्रभातसूर्या। सुखोदया॥ १॥

अर्थ—परब्रह्माचा उपदेश करणाऱ्या हे सद्‌गुरो! जे आपण ब्रह्मदेवादि सर्व देवांना पूज्य, प्रज्ञारूप प्रभात करणारे सूर्य व चित्तांत ब्रह्मसुखाचा उदय करणारे आहात, त्या तुमचा जयजयकार असो॥ १॥

गूढार्थदीपिका—आचार्या—''आचार्यवान् पुरुषो वेद'' इत्यादि श्रुतीतून 'आचार्य' हा शब्द ब्रह्मोपदेशक गुरुलाच लावला आहे.

प्रज्ञाप्रभातसूर्या—ज्याप्रमाणे रात्रीचा अंध:कार संपल्यानंतर पहाट करणारा सूर्य असतो; त्याप्रमाणे श्रीगुरु हे जीवाचे ठिकाणी असलेला अनादि अविद्या अंध:कार नाहीसा करून ब्रह्मोपदेशाने परब्रह्माला व्यापणाऱ्या विद्यावृत्ति अशा शुद्धबुद्धिरूप प्रज्ञेची पाहाट करणारे सूर्य आहेत.

सुखोदया—श्रीगुरुच्या कृपेनेच ब्रह्मसुखाचा उदय होतो.

जयजय सर्व विसांवया। सोहंभावसुहावया। नाना लोक हेलावया। समुद्रा तूं॥ २॥

अर्थ—हे श्रीगुरो! आपण संसारात शीणलेल्या सर्वाचे विश्रांतिस्थान, सोहंभावाने शोभणारे अनेक लोकरूप लाटांना आधारभूत समुद्र आहात. त्या तुमचा जयजयकार असो॥ २॥

गूढार्थदीपिका—सर्व विसांवया। सोहंभावसुहावया—

श्रीगुरुच्या सहवासात सर्व संसारदु:खाचा विसर पडतो-म्हणजे सर्व दु:खे नाहीशी होतात व सोहंभावाची प्रतीति येते.

नानालोक हेलावया। समुद्रा तू—

सर्व ब्रह्मांड श्रीगुरुच्या सत्तेवरच भासते. येथे परमेश्वराच्या ऐक्याने श्रीगुरुचे स्तवन केले आहे श्रीगुरु म्हणजे परमेश्वराचेच स्वरूप होय, हे दाखविले आहे.

आइकें गा आर्तबंधू। निरंतरकारुण्यसिंधू। विशदविद्यावधू—। वल्लभा जी॥ ३॥

अर्थ—हे श्रीगुरो! माझी विनंति ऐका. आपण दीनदु:खितांचे बंधु (कैवारी), अखंड करुणेचे समुद्र व स्पष्ट प्रगट झालेली जी ब्रम्हविद्या, हीच कोणी वधु, तिचे पति आहात॥ ३॥

गूढार्थदीपिका—निरंतरकारुण्यसिंधू—श्रीगुरु केवळ करुणेचीच मूर्ती असते.

आर्तबंधू—पण ते दीनदु:खितांशी मात्र बंधुप्रमाणे वागतात.

विशदविद्यावधू—। वल्लभा—

पत्नी जशी पतीचे स्वाधीन होऊन राहते त्याप्रमाणे ब्रह्मविद्या ही श्रीगुरुचे सर्वस्वी स्वाधीन होऊन राहते, असा अर्थ.

माउलीने ''मोक्षाची सोडी बांधी करी'' (ज्ञा. अ. १२-२२०) ''तेथ जाये पाईक जैसा'' (ज्ञा. अ. ११-९९) इत्यादि ओव्यांनी हेच सांगितले आहे.

तूं जयांप्रति लपसी। तयां विश्व हें दाविसी। प्रकटु तैं करिसी। आघवेंचि तूं॥ ४॥

अर्थ—तू ज्यांना आपल्याला दाखवित नाहीस किंवा तू ज्याच्यापासून लपून राहतोस, त्यांना हे विश्व दाखवितोस व ज्यांना प्रगट होतोस त्यांना, हे संपूर्ण तूच आहेस, असा प्रत्यय आणून देतोस॥ ४॥

गूढार्थदीपिका—प्रकटु तै करिसी। आघवेचि तू—

त्रिगुणात्मक प्रतीति अज्ञानजन्य असून आत्मज्ञानाने अज्ञान नष्ट झाले की जीवाने कल्पिलेले जगद्वस्तुत्व नष्ट

होऊन नामरूपे परब्रह्माशी ऐक्य पावतात व नामरूपासह एक सगुण सच्चिदानंद परब्रह्मच अनुभवाला येते, हेच माउलींनी येथे दाखविले आहे.

कीं पुढिलाची दृष्टि चोरिजे। हा दृष्टिबंध निफजे। परी नवल लाघव तुझें। जें आपणपें चोरे॥ ५॥

अर्थ—पाहाणाऱ्यांची दृष्टि चोरणे-म्हणजे त्या दृष्टीला भ्रम उत्पन्न करणे-असा हा दृष्टिबंदीचा किंवा नजरबंदीचा प्रकार गारुडी दाखवित असतो; पण हे श्रीगुरो भगवंता! तुमचे नाटक असे आश्चर्यकारक आहे, की तुम्ही आपल्यालाहि चोरून ठेवता॥ ५॥

गूढार्थदीपिका—गारुडी पाहाणाऱ्यांची नजरबंदी करून आपल्याहून भिन्न अशा वस्तूचे ठिकाणी लोकांना भ्रम उत्पन्न करतो व आपण सर्वांना दिसतो; पण भगवान अद्वैतस्वरूप असल्यामुळे त्याच्या ठिकाणी अज्ञानी जनांना जे भ्रमाने जगत् भासते, त्याच्या योगाने तो (परमात्मा) दिसेनासा होतो.

नामरूपे ही परमेश्वराची शक्ति आहे, म्हणूनच त्या नामरूपामुळे होणाऱ्या जगताला विद्यारण्यांनी सोपाधिकभ्रम म्हटले आहे.

मागे तेराव्या अध्यायात अध्यात्मरामायणातील अहिल्येने केलेल्या स्तुतीतील वचन उदाहृत करून भगवन्वि-मुखाला भगवंताची माया भगवंताला लोपून ठेवून भ्रम उत्पन्न करते व भगवत्संमुख असलेल्यांना ती सर्व भगवत्स्वरूप आहे, असे दाखविते, असे सांगितले आहे.

मूळात भगवंताची मायाशक्ति व भगवान दोघेहि सच्चिदानंदस्वरूप म्हणून अभिन्न असल्यामुळे येथे माउलीने ही सर्व भगवंताची लीला होय, असे जे म्हटले आहे, ते योग्यच होय.

जे तूंचि तूं सर्वा यया। मा कोणा बोध कोणा माया। ऐसिया आपेंआप लाघविया। नमो तुज॥ ६॥

अर्थ—पण हे श्रीगुरो! हे सर्व तूच असल्यामुळे कोणाचे ठिकाणी ज्ञान, व कोणाचे ठिकाणी अज्ञान, अशी तू आपणच आपली लीला करून दाखवितोस, त्या तुला नमस्कार असो॥ ६॥

गूढार्थदीपिका—न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः। न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता॥ ३२॥

(मांडुक्यकारिका २-३२)

या मांडुक्यकारिकेत सांगितल्याप्रमाणे जग नाही, जगाची उत्पत्ति नाही, प्रलय नाही, कोणी बद्ध नाही कोणी साधक नाही, कोणी मुमुक्षु नाही, कोणी मुक्त नाही एक अविच्छिन्न आत्मस्वरूपच आहे.

जाणों जगीं आप वोलें। तें तुझिया वोला सुरस जालें। तुझेनि क्षमत्व आलें। पृथ्वीयेसी॥ ७॥

अर्थ—जगात पाणी जे ओलेपणाने दिसते, ते तुझ्याच आर्द्रतेमुळे गोड झाले आहे. तुझ्या क्षमागुणामुळेच पृथ्वीचे ठिकाणी क्षमागुण आला आहे.॥ ७॥

रविचंद्रादि शुक्ति। उदय करिती त्रिजगतीं। तें तुझिया दीप्ती। तेज तेजां॥ ८॥

अर्थ—(तुझ्याशी तुलना केली असता) शिंपेसारखे दिसणारे सूर्यचंद्र हे जे सर्व त्रैलोक्याला प्रकाशित करतात, ते त्यांना तुझे देदीप्यमान तेज मिळाले, म्हणूनच होय॥ ८॥

गूढार्थदीपिका—सृष्टितील सर्व चराचर पदार्थाचे ठिकाणी दिसून येणाऱ्या सर्वशक्तीचा उद्बोधक एक परमेश्वरच आहे, हे मागे सांगितलेच आहे. (ज्ञा. गू. दी. अ. ११)

जें चळवळिजे अनिळें। तें दैविकेनि जी निजबळें। नभ तुजमाजीं खेळें। लपीथपी॥ ९॥

अर्थ—वायु इकडे तिकडे वाहतो, ते देवा! तुझेच बळ होय. आकाशहि तुझ्यामध्येच लपाछपीचा खेळ खेळते॥ ९॥

गूढार्थदीपिका-नभ तुजमाजी खेळे। लपीथपी—

आधारभूत भगवंताची सत्ताच, अज्ञानी जीवाने कल्पिलेल्या सृष्टीला अवकाश देणारी अशी, आकाशरूपाने अज्ञानी लोकांच्या प्रत्ययाला येते व आत्मज्ञानानंतर ते आकाशच केवळ सत्तारूपाने ज्ञानी लोकांच्या प्रत्ययाला येते, हेच आकाशाचे परब्रह्माच्या ठिकाणी लपीछपीचा खेळ खेळणे होय.

किंबहुना माया असोस। ज्ञान जी तुझेनि डोळस। असो वानणें सायास। श्रुतीसि हें॥ १०॥

अर्थ—फार काय सांगावे! तुझी मायाशक्ति तुझ्यामुळेच अगाध झाली आहे व ज्ञानहि तुझ्या कृपेनेच डोळस होत असते. असो, तुझे गुणवर्णन करणे वेदालाहि कठीण आहे॥ १०॥

गूढार्थदीपिका—**डोळस**-म्हणजे ब्रह्मसाक्षात्कार करण्याजोगे किंवा परब्रह्माला जाणण्याजोगे.

वेद वानूनि तंवचि चांग। जंव न दिसे तुझें आंग। मग आम्हां तया मूग। एके पांती॥ ११॥
जी एकार्णवाचे ठाईं। पाहतां प्रलयमेघाचा पाड नाहीं। मा महानदी काई। निवडू येती॥ १२॥
कां उदयलिया भास्वतु। चंद्र जैसा खद्योतु। आम्हां श्रुती तुजआंतु। तो पाडु असे॥१३॥
आणि दुजया थांव मोडे। जेथ परेसी वैखरी बुडे। तो तूं मा कोणें तोंडें। वानावासी॥ १४॥

अर्थ—तुझ्या स्वरूपाचा प्रत्यय येत नाही तोपर्यंत वेद, तुझी उत्तम स्तुति करणारा म्हणून गौरवास पात्र होतो आणि तुझा प्रत्यय आला की वेद व आम्ही दोघेहि एका मौनाच्या पंक्तीतच बसतो॥ ११॥ प्रलयकाली सातहि समुद्र एकत्र मिळून एकच समुद्र झाला असता जेथे त्याच्याशी प्रलयकाळच्या मेघाला देखील बरोबरी करता येत नाही, तेथे त्याच्याशी तुलना करण्यास महानदी निवडता येईल काय?॥ १२॥ किंवा सूर्य उगवल्याबरोबर चंद्र जसा त्यापुढे काजव्यासारखा होतो, तशीच आमची व वेदाची तुझ्याशी तुलना होऊ शकते॥ १३॥ तुझ्या स्वरूपाचे ठिकाणी दुसऱ्या वस्तुला अवकाशच राहत नाही व परा, पश्यंति, मध्यमा आणि वैखरी या चारहि वाणी लय पावतात; म्हणून वर्णन करण्यास वाचाच शिल्लक राहत नाही. त्या तुझ्या स्वरूपाचे कोण्या मुखाने वर्णन करता येणार?॥ १४॥

गूढार्थदीपिका—परब्रह्माच्या स्वरूपाचा साक्षात्कार परब्रह्माहून अलग राहून होत नसून त्याच्याशी ऐक्य पावून होत असतो; म्हणूनच वाणीला मौन पडते.

यालागीं आतां। स्तुती सांडूनि निवांता। चरणीं ठेविजे माथा। हेंचि भलें॥ १५॥
तरी तु जैसा आहासि तैसिया। नमो जी श्रीगुरुराया। मज ग्रंथोद्यम फळावया। वेव्हारा होईं॥ १६॥
आतां कृपाभांडवल सोडीं। भरीं मति माझी पोतडी। करीं ज्ञानपद्यजोडी। थोरा मातें॥ १७॥
मग मी संसरेन तेणें। करीन संतांसी कर्णभूषणें। लेववीन सुलक्षणें। विवेकाचीं॥ १८॥
जी गीतार्थानिधान। काढू माझें मन। सुयीं स्नेहांजन। आपुलें तूं॥ १९॥

अर्थ—याकरिता स्तुति करणे सोडून देऊन निवांतपणे तुझ्या चरणांवर मस्तक ठेवावे, हेच मला उत्तम वाटते॥ १५॥ हे सद्गुरुराया! तरी जसा तू असशील तशाच तुला माझा नमस्कार असो आणि माझा ग्रंथ करण्याचा उद्योग सफल होण्याकरिता तू भांडवल पुरविणारा सावकार हो॥ १६॥ आता माझ्याकरिता आपले कृपारूप भांडवल मोकळे कर. माझी बुद्धिरूप पिशवी त्याने भरून दे व ज्ञान प्रगट करणाऱ्या अशा पदांची मला थोर (पूर्ण) जोड प्राप्त करून दे॥ १७॥ मग त्या भांडवलाने उद्युक्त होऊन मी संतांना उत्तम लक्षणे असलेली विवेकांची कर्णभूषणे करीन व ती संतांच्या कानात घालीन-म्हणजे ज्यात विवेक स्पष्ट दिसेल, अशी विवेकांची उत्तम लक्षणे ऐकवीन॥ १८॥ हे श्रीगुरुराया! गीतापद्यात भगवंतांनी ठेवलेला अर्थरूपी ठेवा, माझे मन काढू शकेल, असे आपले प्रेमरूपी अंजन तू माझ्या मन:चक्षूंना लाव॥ १९॥

गूढार्थदीपिका—"यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ। तस्यैते कथिताह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः॥ (श्वे. उ.)"

सगुण भगवान व श्रीगुरु यांचे ठिकाणी नि:सीम प्रेमरूप पराभक्ति करणाऱ्यांनाच भगवंताच्या वचनांचा खरा अर्थ समजू शकतो, अशी श्वेताश्वतर उपनिषदात श्रुती आहे.

या श्रुतीतील तत्त्वाला धरूनच माउलींनी श्रीगुरुची याचना केली आहे.

ज्ञानेश्वर महाराज गीतेचा अर्थ सांगण्यास पात्र अधिकारी कां? याचा उहापोह आम्ही मागे गीतेच्या दहाव्या अध्यायातील ओवी ४७ वरील गूढार्थदीपिकेत केलेलाच आहे.

हे वाक्सृष्टि एके वेळे। देखतु माझे बुद्धीचे डोळे। तैसा उदैजो जी निर्मळें। कारुण्यबिंबें॥ २०॥

माझी प्रज्ञावेली वेल्हाळ। काव्यें होय सुफळ। तो वसंत होयी स्नेहाळ। शिरोमणी॥ २१ ॥
प्रमेयमहापुरें। हे मतिगंगा ये थोरे। तैसा वर्ष उदारे। दिठीवेनी॥ २२ ॥
अगा विश्वैकधामा। तुझा प्रसादचंद्रमा। करू मज पूर्णिमा। स्फुर्तीची जी॥ २३ ॥
जी अवलोकिलिया मातें। उन्मेषसागरीं भरितें। वोसंडेल स्फूर्तीतें। रसवृत्तीचे॥ २४ ॥
तंव संतोषोनि श्रीगुरुराजें। म्हणितलें विनतिव्याजें। मांडिलें देखोनि दुजें। स्तवनमिषें॥ २५ ॥

अर्थ—माझ्या बुद्धीचे डोळे एकाच वेळेला संपूर्ण वाङ्मयसृष्टि पाहू शकतील अशा रीतीने शुद्ध केवळ करुणेची मूर्ति होऊन तू माझ्या ठिकाणी प्रगट व्हावे॥ २० ॥ प्रेम करणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ अशा श्रीगुरो! माझी बुद्धिरूपी विस्तारलेली वेली ज्या वसंतऋतुमुळे काव्यरूपाने फलद्रूप होईल तो वसंतऋतु तू हो॥ २१ ॥ माझी बुद्धिरूपी गंगा सिद्धान्तरूपी थोर महापुराने भरून येईल असा तू अत्यंत उदार होऊन आपल्या कृपादृष्टीचा वर्षाव कर॥ २२ ॥ विश्वाला एकमेव आधार असलेल्या श्रीगुरो! तुझा कृपाप्रसादरूपी चंद्र मला स्फूर्तीची पौर्णिमा करो-म्हणजे पूर्ण स्फूर्ति देवो॥ २३ ॥ त्वां मजकडे कृपादृष्टीने पाहिल्यास ज्ञानसमुद्रावर उठणाऱ्या स्फूर्तीला रसवृत्तीचे-म्हणजे साहित्य अलंकाराचे-भरते ओसंडू लागले॥ २४ ॥ स्तुति करण्याच्या निमित्ताने अत्यंत नम्रतेने नाममात्र द्वैत स्वीकारलेले पाहून श्रीगुरु निवृत्तिनाथ महाराज संतुष्ट होऊन म्हणाले॥ २५ ॥

हें असो आतां वांजटा। तो ज्ञापनार्थ करूनि गोमटा। ग्रंथा दावीं उत्कंठा। भंगों नेदीं॥ २६ ॥
हो कां जी स्वामी। हेंचि पाहात होतों मी। जे श्रीमुखें म्हणा तुम्हीं। ग्रंथ सांग॥ २७ ॥
सहजें दुर्वेचा डिरु। आंगेंचि तंव अमरु। वरी आला पूरु। पीयूषाचा॥ २८ ॥
तरी आता येणें प्रसादें। विन्यासें विदग्धें। मूळशास्त्रपदें। वाखाणीन॥ २९ ॥
परी जीवा आंतुलीकडे। जैसी संदेहाची डोणी बुडे। ना श्रवणीं तरी चाडे। वाढी दिसे॥ ३० ॥
तैसी बोली साचारी। अवतरो माझी माधुरी। माले मागूनि घरी। गुरुकृपेच्या॥ ३१ ॥
तरी मागां त्रयोदशीं। अध्यायीं गोष्ठि ऐसी। श्रीकृष्ण अर्जुनेसी। चावळले॥ ३२ ॥
जे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगें। होइजे येणें जगें। आत्मा गुणसंगें। संसारिया॥ ३३ ॥
आणि हाचि प्रकृतिगतु। सुखदु:खभोगीं हेतु। अथवा गुणातीतू। केवळु हा॥ ३४ ॥

अर्थ—हे व्यर्थ बोलणे आता पुरे. भगवंतांनी अर्जुनाला सांगितलेला अर्थ आम्हाला सुंदर ग्रंथरूपाने विदित करून दाखव आमच्या ऐकण्याच्या इच्छेचा भंग होऊ देऊ नको॥ २६ ॥ श्रीगुरुच्या मुखातून अशी अक्षरे निघाल्याबरोबर श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, "हो जी महाराज!" "ग्रंथ सांगा" असे आपण आपल्या मुखाने मला म्हणावे, याचीच मी वाट पाहत होतो॥ २७ ॥ हरळी आधीच अमर, त्यातहि अमृताचा पूर आला, तसे झाले आहे॥ २८ ॥ आता आपण केलेल्या आज्ञारूप प्रसादाने गीतेतील मूळ पदांचे साहित्यअलंकारांनी युक्त असे मी प्रतिपादन करीन॥ २९ ॥ ज्या रीतीने जीवाच्या अंत:करणातील संशयाची नौका बुडून जाईल, आणखी श्रवणेंद्रियाच्या ठिकाणी ऐकण्याची अत्यंत इच्छा वाढेल॥ ३० ॥ तसे खरोखर मधुर झालेले बोलच माझ्या मुखातून निघावे, अशी गुरुकृपेच्या घरी माले-म्हणजे खंडोबाचा नागर गळ्यात घालून मागितलेली भिक्षा-मी मागतो॥ ३१ ॥ तरी मागील तेराव्या अध्यायात भगवान श्रीकृष्णाचे अर्जुनाशी असे बोलणे झाले की॥ ३२ ॥ क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगाने हे सर्व जगत् उत्पन्न होते आणि गुणाच्या संगामुळेच आत्मा संसारी किंवा जीवरूप भासतो॥ ३३ ॥ आणि अशा रीतीने प्रकृतीत सापडणे हेच त्याच्या सुखदु:खाचे कारणहि आहे. अथवा गुणाचा संबंध सोडून पाहता आत्मा हा मूळचा गुणातीतच आहे व राहतो॥ ३४ ॥

गूढार्थदीपिका-अथवा गुणातीतू। केवळु हा—

जीवाने गुण व गुणाच्या संगाची कल्पना केली असल्यामुळे तो मुळात गुणरहित शुद्धच आहे, असे अर्थातच सिद्ध होते.

तरी कैसा पां असंगा संगु। कोण तो क्षेत्रक्षेत्रज्ञयोगु। सुखदुःखादि भोगु। केवीं तया॥ ३५॥
गुण ते कैसे किती। बांधती कवणे रीती। ना तरी गुणातीतीं। चिन्हें काई॥ ३६॥
एवं इया आघवेया। अर्था रूप करावया। विषो एथ चौदाविया। अध्यायासी॥ ३७॥
तरि तो आतां ऐसा। प्रस्तुत परियेसा। अभिप्रावो विश्वेशा। वैकुंठाचा॥ ३८॥

अर्थ—तरी असंग अशा आत्मस्वरूपाला त्रिगुणाचा संग कसा झाला. क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचा संबंध तो कोणता आणि त्याला सुखदुःखाचे भोग कसे होतात?॥ ३५॥ गुण कोणते आहेत व ते किती आहेत? ते जीवाला कोणत्या रीतीने बांधतात? किंवा आत्म्याला गुणातीत केव्हा म्हटले जाते?॥ ३६॥ याप्रमाणे या सर्व संशयाचा उलगडा करणे हाच या चवदाव्या अध्यायाचा विषय आहे॥ ३७॥ तरी सर्व ब्रह्मांडाचा ईश्वर जो वैकुंठ (परमात्मा) त्याचा या प्रश्नांविषयी अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे. तो आता सांगतो, श्रवण करा॥ ३८॥

श्रीभगवानुवाच

परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम्। यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः॥ १॥

अर्थ—श्रीभगवान म्हणतात—जे ज्ञान सर्व ज्ञानात उत्तम आहे व जे प्राप्त करून घेऊन सर्व मुनी या देहापासून सुटून परमसिद्धीला प्राप्त झाले, असे प्रकृतीच्या पलीकडे असलेल्या पुरुषाचे परमज्ञान आता पुनः तुला सांगतो॥ १॥

तो म्हणे गा अर्जुना। अवधानाची सर्व सेना। मेळऊनि इया ज्ञाना। झोंबावें हो॥ ३९॥
आम्हीं मागां तुज बहुतीं। दाविलें हे उपपत्तीं। तरी आझुनी प्रतीती-। कुशी न रिघे॥ ४०॥
म्हणौनि गा पुढती। सांगिजेल तुजप्रती। पर म्हणोनि श्रुतीं। डाहारिलें जें॥ ४१॥
एऱ्हवीं ज्ञान हें आपुलें। परि पर ऐसेंनि जालें। जे आवडोनि घेतलें। भवस्वर्गादिक॥ ४२॥
अगा याचि कारणें। हें उत्तम सर्वांपरी मी म्हणें। जे वन्हि हें तृणें। येरें ज्ञानें॥ ४३॥

अर्थ—भगवान श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना! एकाग्रतेची सर्व सेना एकत्र करून म्हणजे इंद्रिये, मन वगैरे एकत्र करून-या ज्ञानाला ग्रहण केले पाहिजे॥ ३९॥ मागे आम्ही तुला नाना उपपत्तीने जे ज्ञान सांगितले आहे; पण अजुनहि तुझ्या अंतःकरणात त्याचा अनुभव आलेला दिसत नाही॥ ४०॥ म्हणून अर्जुना! ज्या ज्ञानाला श्रुतीने पर-म्हणजे श्रेष्ठ-असे वारंवार म्हटले आहे, ते ज्ञान तुला पुनः सांगतो॥ ४१॥ खरोखर ज्ञान हे आपले आत्मस्वरूप होय. ते विसरून जीवाने आपल्या अंतःकरणात संसारस्वर्गादिकांचे ज्ञानच आवडीने धरून ठेवल्यामुळे आपल्या आत्मस्वरूपाच्या ज्ञानाला "पर" असे म्हणण्यात आले आहे॥ ४२॥ अर्जुना! या कारणामुळे आत्मस्वरूपाचे ज्ञान सर्वांपेक्षा उत्तम आहे, असे मी म्हणतो; कारण आत्म्याचे ज्ञान हे अग्निरूप असून तद्व्यतिरिक्त स्वर्ग-संसार याची ज्ञाने वाळलेल्या गवताप्रमाणे आहेत॥ ४३॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे वाळलेले सर्व गवत अग्नीने भस्म होते व मग ते गवत दिसत नाही, त्याप्रमाणे अज्ञानकाळी भवस्वर्गादिक वस्तुरूप आहेत असे वाटत असल्यामुळे त्याचे ज्ञान होत असते; पण आत्मज्ञान झाल्यावर ते अज्ञान भ्रमजन्य आहे. वस्तुतः त्यांचे अस्तित्वच नाही, असे समजून येत असल्यामुळे ज्ञानानंतर पूर्वीप्रमाणे त्यांचे वस्तुरूपाने ज्ञानच होत नाही. असे माऊलींनी "जे वन्हि हे तृणे। येरे ज्ञाने" या चरणांनी सुचविले आहे.

जियें भवस्वर्गातें जाणती। यागचि चांग म्हणती। पारखी फुडी आथी। भेदीं जेयां॥ ४४॥
तियें आघवींचि ज्ञानें। केलीं येणें स्वप्नें। जैशा वातोर्मी गगनें। गिळिजती अंतीं॥ ४५॥
कां उदितें रश्मिराजें। लोपिलीं चंद्रादि तेजें। नाना प्रळयांबुमाजें। नदी नद॥ ४६॥
तैसें हे येणें पाहलेया। ज्ञानजात जाय लया। म्हणोनियां धनंजया। उत्तम हें॥ ४७॥
अनादि जे मुक्तता। आपुली असे पांडुसुता। तो मोक्षु हाता येता। होय जेणें॥ ४८॥

अर्थ—ज्या ज्ञानाच्या योगाने संसार-स्वर्ग हेच जाणले जातात व त्यांच्या प्राप्तीचे साधन म्हणून यज्ञयागादि-कर्माची चांगली म्हणून प्रशंसा केली जाते. ज्या ज्ञानाच्या योगाने भेद किंवा द्वैतच सत्य म्हणून स्पष्ट ओळखले

जाते॥ ४४॥ ज्याप्रमाणे कल्पांतसमयी आकाश संपूर्ण वायूच्या लाटांना गिळून टाकते, त्याप्रमाणे या आत्मविषयक ज्ञानाने संपूर्ण इतर ज्ञाने स्वप्नवत् मिथ्या ठरतात॥ ४५॥ किंवा हजारो किरणांनी युक्त अशा सूर्याचा उदय झाल्याबरोबर चंद्रादिकांचे तेज लोपले जाते. किंवा प्रलयात एकार्णवाची स्थिती झालीं असता सर्व नदीनदांचा अलगपणा नाहीसा होतो॥ ४६॥ त्याप्रमाणे ही आत्मज्ञानदृष्टि प्रगट झाली असता संपूर्ण ज्ञाने लयाला जातात; म्हणून आम्ही, अर्जुना! आत्मज्ञानाला उत्तम म्हणतो॥ ४७॥ अर्जुना! जीवाची जी अनादिमुक्तस्थिति आहे ती ज्या आत्मज्ञानाच्या योगाने प्राप्त होते॥ ४८॥

गूढार्थदीपिका—अनादि जे मुक्तता-

अविद्याभ्रम काल्पनिकच असल्यामुळे तो होता तेव्हाहि खरोखर नव्हता; म्हणून मी केव्हाच अविद्येने बद्ध झालो नाही, सदासर्वदा मुक्त म्हणजे अविद्यारहितच आहे. असा जो आत्मज्ञानाने अनुभव येतो, त्याला अनादिमुक्ततेचा अनुभव म्हणतात. असा अनुभव असलेल्या ज्ञान्यालाच खरा ज्ञानीपुरुष म्हटले जाते. 'मी पूर्वी बद्ध होतो, आता मुक्त झालो' असे ज्या ज्ञान्याला वाटते तो ज्ञानी अजून भ्रांतीतच आहे, असे म्हणावे लागते. ''म्हणोनि बंधचि तंव वावो। मा मोक्षा के प्रस्तावो'' (अमृ० प्र० ३-१५) 'मी बद्ध आहे' असे म्हणणे जेथे भ्रांतिजन्य म्हणून व्यर्थ आहे, येथे ''मी मुक्त झालो'' हे म्हणणेहि भ्रांतिजन्यच होते. नित्यमुक्त आत्म्याचे ठिकाणी बंधमोक्षाला वाव नसल्यामुळे बंध व मोक्ष मानणे हे दोन्ही प्रकार भ्रांतिजन्य ठरतात, असे माऊलींनी अमृतानुभवांतहि म्हटले आहे.

जयाचिया प्रतीती। विचारवीरीं समस्तीं। नेदिजेचि संसृती। माथां उधऊं॥ ४९॥
मनें मन घालूंनि मागें। विश्रांति जालिया आंगें। ते देहीं देहाजोगे। होतीचि ना॥ ५०॥

अर्थ—ज्या ज्ञानाचा अनुभव आला असता विचारशक्ति प्राप्त होऊन विचारवंत झालेले सर्व वीर संसाराला डोके वर काढू देत नाहीत. म्हणजे ज्या ज्ञानविचाराने संसाराचे अस्तित्व आहे, असे कधीच वाटत नाही॥ ४९॥ मनानेच मन मागे सारून व शरीराने विश्रांतिस्वरूप झाल्यावर ते देहात असूनही देहाजोगे होत नाहीत. म्हणजे देहाशी ऐक्य पावत नाहीत॥ ५०॥

गूढार्थदीपिका—मने मन लूनिया भागे। विश्रांति जालिया आंगे

मनोहि व्दिविधं प्रोक्तं शुद्धं चाशुध्दमेवच। अशुद्धं काम संकल्पं शुद्धं कामविवर्जितम्॥

अशुद्ध किंवा विकारी व शुद्ध किंवा विचारी असे दोन प्रकारचे मन आहे. हे मागे सांगितलेच आहे. (ज्ञा. गु. दी. अ. ९-१७७) अशुद्ध मनाची धांव विषयाकडे असते व ती झाली असता शरीर, इंद्रिये ही सारखी विषय प्राप्तीच्या उद्योगात लागतात.

शुद्ध मनाची धाव अंतर्मुख होऊन आत्म्याकडे वळलेली असते. या विवेकयुक्त शुद्ध मनाला मागे सारले असता विषयसुख प्रवृत्ति क्षीण होत असल्यामुळे शरीर व इंद्रिये यांचा उद्योगहि शांत होतो.

ते देही देहाजोगे। होतीचि ना—

विषय सुखापासून, निवृत्त झालेले मन स्थिर होत असल्यामुळे त्याच्या ठिकाणी विवेकज्ञान अखंड जागृत असते; म्हणून ज्ञानी पुरुष देहात असूनही देहाशी ऐक्य पावत नाहीत. ते आत्मस्वरूप होऊनच राहतात.

मग तें देहाचें बेळें। वोलांडूनि एकेचि वेळे। संवतुकी कांटाळें। माझें जाले॥ ५१॥

अर्थ—मग ते स्थूळ, सूक्ष्म, कारण, महाकारण या चार देहरूप अडवणुकीला एकदमच ओलांडून तुलनेत माझ्या बरोबरीचे होतात॥ ५१॥

गूढार्थदीपिका—ज्ञानाने, मी सर्व देहाहून निराळा असा ब्रह्मस्वरूप आहे असे एकदम कळून येते, असा अर्थ.

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः। सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च॥ २॥

अर्थ—या ज्ञानाचा आश्रय करून जे माझ्या स्वरूपभूत धर्माला प्राप्त झाले, ते सृष्टिकाली उत्पन्न होत नाहीत व प्रलयकाली प्रलयातील दु:खाने व्यथित होत नाहीत॥ २॥

जे माझिया नित्यता। तेणें नित्य तें पांडुसुता। परिपूर्ण पूर्णता। माझियाचि॥ ५२॥
मी जैसा अनंतानंद। जैसाचि सत्यसंध। तैसेचि ते भेद। उरेचि ना॥ ५३॥
जें मी जेवढें जैसें। ते तेंचि जाले तैसें। घटभंगीं घटाकाशें। आकाश जेवीं॥ ५४॥

अर्थ—हे अर्जुना! जे माझ्या नित्यपणामुळे नित्य झाले व माझ्या अखंड पूर्णतेमुळे परिपूर्ण झाले॥ ५२॥ ज्याप्रमाणे मी अमर्याद ब्रह्मानंदस्वरूप व सत्यप्रतिज्ञ आहे, तसेच तेहि असतात. माझ्यात व त्यांच्यात यत्किंचितहि भेद नसतो॥ ५३॥ ज्याप्रमाणे घट फुटला असता त्यातील आकाश महदाकाश होऊन जाते, त्याप्रमाणे मी जसा जेवढा आहे तेहि तसे तेवढे होतात॥ ५४॥

गूढार्थदीपिका—जीव हा मूळांत परब्रह्मस्वरूपच असल्यामुळे परब्रह्माचे नित्य, शुद्ध, सच्चिदानंदादि धर्म त्याचे ठिकाणी कायमच असतात; पण ते धर्म विसरून जीवाने त्याहून विपरित धर्म आपल्या ठिकाणी घेतले आहेत; म्हणून जीवाला आत्मज्ञान-म्हणजे माझ्या ठिकाणी आत्मधर्मच आहेत, हीच फक्त जाणीव करून घ्यावी लागते.

ज्याप्रमाणे गोडी व साखर यांचे अत्यंत तादात्म्य असते, त्याप्रमाणे सच्चिदानंदधर्म व परब्रह्म यांचे अत्यंत तादात्म्य आहे; म्हणून परब्रह्माच्या सच्चिदानंदादि धर्मांची प्राप्ति म्हणजे परब्रह्माचीच प्राप्ति व सच्चिदानंदधर्मांची विस्मृति म्हणजे परब्रह्माची विस्मृति होय, असे सहजच सिद्ध होते.

नातरी दीप मूळकीं। दीपशिखा अनेकी। मीनलिया अवलोकीं। होय जैसें॥ ५५॥
अर्जुना तयापरी। सरली द्वैताची वारी। नांदे नामार्थ एकाहारीं। मीतूंविणे॥ ५६॥

अर्थ—किंवा एका मूळ दिव्यापासून लावलेल्या अनेक दीपज्योती ज्या मूळ दिव्याशी एकत्र केल्या असता ज्याप्रमाणे त्या सर्वांची एकच ज्योत होते॥ ५५॥ अर्जुना! त्याप्रमाणे ज्ञानाने जे माझ्या स्वरूपाला प्राप्त झाले त्यांची द्वैताची पाळी संपते-म्हणजे ते माझ्याहून कधीहि निराळे होत नाहीत. 'मी-तू'-पणावाचून त्यांचे नाम व अर्थ माझ्याशी ऐक्यानेच राहतात॥ ५६॥

गूढार्थदीपिका—नांदे नामार्थ एकाहारी। मीतूंविण—

'मी' हा शब्द बोलणारा आपल्याला व 'तू' हा शब्द तो आपल्याहून निराळा असलेल्या पुरुषाला लावतो. याप्रमाणे 'मी' व 'तू' हे दोन शब्द परस्पराहून भिन्नार्थाला दाखविणारे आहेत, असे अज्ञानी समजतो. पण विचार केला असता असे दिसून येते की ज्या पुरुषाला बोलणारा ''तू'' म्हणून संबोधतो तो पुरुष आपल्या ठिकाणी ''तू'' या शब्दाचा ''मी'' असाच अर्थ घेतो-म्हणजे ''मी'' व ''तू'' हे शब्द भिन्न दिसत असले तरी विचारांती त्या दोघांचाहि, ''मी'' हाच एक अर्थ असतो व म्हणून शेवटी ''मी'' हाच एक शब्द उरतो.

तसेच भगवंताशी ज्ञानाने ऐक्य पावल्यानंतर ज्ञानीपुरुष 'मी'-'तू' हे शब्द वापरत असला तरी 'मी-तू'-पणावाचून म्हणजे भिन्न अर्थावाचून वापरत असतो. त्याचे परमेश्वराशी झालेले ऐक्य, मुखातून निघणाऱ्या 'मी-तू' शब्दाने बिघडत नाही. त्याच्या अंत:करणात सर्व शब्दाचा अर्थ एक परमात्माच होऊन राहतो व सर्व शब्दहि एका परमेश्वर शब्दात मिळून जातात—म्हणजे त्याच्या अंत:करणात शब्दाचे भिन्नत्वहि राहत नाही, असा भाव.

येणेंचि पैं कारणे। जैं पहिलें सृष्टीचें जुंपणें। तैं ही तया होणें। पडेचिना॥ ५७॥
सृष्टीचिये सर्वादी। जयां देहाची नाहीं बांधी। तें कैचें प्रळयावधि। निमतील पां॥ ५८॥
म्हणौनि जन्मक्षयां। अतीत ते धनंजया। मी जाले ज्ञाना इया। अनुसरोनी॥ ५९॥
ऐसी ज्ञानाची वाढी। वानिली देवें आवडी। तेवींचि पार्थाही गोडी। लावावया॥ ६०॥
तंव तया जालें आन। सर्वांगी निघाले कान। सपाई अवधान। आतला पां॥ ६१॥
आतां देवाचिया ऐसें। जाकळीजत असे वोरसें। म्हणौनि निरूपण आकाशें। वेंटाळेना॥ ६२॥
मग म्हणे गा प्रज्ञाकांता। उजवली आजि वक्तृत्वता। जे बोला येवढा श्रोता। जोडलासि॥ ६३॥
तरि एकु मी अनेकीं। गोंविजे देहपाशकीं। त्रिगुणीं लुब्धकीं। कवणे परी॥ ६४॥

कैसा क्षेत्रयोगें। वियें इयें जगें। तें परिस सांगें। कवणे परी॥ ६५॥
पैं क्षेत्र येणें व्याजें। यालागीं हें बोलिजे। जे मत्संगबीजें। भूतीं पिके॥ ६६॥

अर्थ—या कारणामुळेच जेव्हा पुनः कल्पारंभी सृष्टि उत्पन्न होते त्या सृष्टीत देखील त्याला उत्पन्न व्हावे लागत नाही॥ ५७॥ कल्पाच्या आरंभी उत्पन्न होणाऱ्या सृष्टीत शरीर धारण करून ज्यांना उत्पन्न व्हावे लागत नाही, ते शेवटी प्रलयात कसे मरणार?॥ ५८॥ म्हणून, अर्जुना! या ज्ञानाचा आश्रय करून जे मद्रूप झाले ते जन्ममरणरहित होतात॥ ५९॥ याप्रमाणे भगवंतांनी आवडीने व तशीच अर्जुनाला गोडी लागावी म्हणून, आत्मज्ञानाच्या थोरवीचे वर्णन केले॥ ६०॥ तेव्हा भगवंताचे बोलणे ऐकल्यावर अर्जुनाची निराळी स्थिती झाली. त्याच्या सर्वांगाचे ठिकाणी कान निघून तो नखशिखान्त अवधानाने व्यापिला गेला॥ ६१॥ फुटणाऱ्या प्रेमपान्ह्याप्रमाणे असलेले ते भगवंताचे निरूपण, भगवंताप्रमाणे अमर्याद असल्यामुळे जे आकाशाने वेटाळीता येऊ शकत नाही ते तो अर्जुन ग्रहण करू लागला॥ ६२॥ मग भगवान म्हणाले, हे बुद्धीच्या स्वामी अर्जुना! मी जेवढे बोलतो तेवढे संपूर्ण ग्रहण करण्याजोगा तू श्रोता मिळाल्यामुळे आज माझे वक्तृत्व विवाहित झाले-म्हणजे सार्थक झाले॥ ६३॥ तर मग आता मी एकच अद्वैतरूप असताना त्रिगुणरूपी व्याधाने मला अनेक देहरूपी पाशांत कसे गोविले?॥ ६४॥ तसेच माझा क्षेत्राशी कसा संबंध होतो? हे जग कशा रीतीने उत्पन्न होते? ते सर्व सांगतो, ऐक॥ ६५॥ माझ्या संगरूपी बीजाची पेरणी झाली असता भूतरूपाने पीक येते-म्हणजे अनेक प्राणी उत्पन्न होतात. एवढ्या कारणानेच त्याला क्षेत्र म्हटले जाते॥ ६६॥

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम्। सम्भवः सर्वभूतानां ततो भवति भारत॥ ३॥

अर्थ—माझी महद्ब्रह्मरूप प्रकृति सर्व जगताचे जननस्थान होय. तिचे ठिकाणी मी सृष्टीचा जेव्हा गर्भ ठेवतो तेव्हा तिच्यापासून, अर्जुना! सर्व भूतांची उत्पत्ति होते॥ ३॥

गूढार्थदीपिका—महद्ब्रह्म-कारणाचा मोठेपणा त्याच्या होणाऱ्या कार्यविस्तारावरून कळून येतो प्रकृतिरूप कारणापासून एवढ्या मोठ्या संपूर्ण ब्रह्मांडरूप कार्याचा विस्तार झाला असल्यामुळे व तिच्यांतच तो पुन्हा लय पावत असल्यामुळे त्या ब्रह्मांडाच्या अपेक्षेने प्रकृति ही त्यापेक्षा मोठी आहे. हे 'महत्' या शब्दाने दाखविले आहे. आणि संपूर्ण कार्याचा विस्तार करणारी व त्या कार्यविस्ताराचे पोषण करणारी तीच आहे, 'हे ब्रह्म' या शब्दाने दाखविले आहे.

मम—जगताचे कारण जी जड प्रकृति ती परब्रह्मसत्तेवरच अभिन्न भासते, हे श्लोकांतील 'मम' या शब्दाने सूचित केले आहे.

एऱ्हवी अखंड सच्चिदानंद परमेश्वराची शक्ती त्रिगुणात्मक जड, विनाशी अशी राहणे शक्य नाही. ती सच्चिदानंदस्वरूपच आहे पण परब्रह्माची ही सच्चिदानंदशक्ति जीवाला, अज्ञान आहे तोपर्यंत केवळ त्रिगुणात्मक मायाशक्तिरूप भासते हे मागे सांगितलेच आहे. (ज्ञा० गू० दी० खंड-२ अ० ९-१०६)

गर्भ—जीवाच्या कल्पनारूप. प्रकृतीला परमेश्वराच्या सत्तेचा आधार प्राप्त होणे, हीच जगाची गर्भधारणा होय.

एऱ्हवीं तरी महद्ब्रह्म। यालागीं हें ऐसें नाम। जे महदादिविश्राम-। शाळिका हें॥ ६७॥

अर्थ—या प्रकृतीतून ब्रह्मांडांतील सर्व स्थूल-सूक्ष्म तत्त्वे उत्पन्न होतात व तेथेच लय पावतात. अर्थात् ती ब्रह्मांडापेक्षा मोठी आहे; म्हणून तिला महद्ब्रह्म असे साधारणता नांव दिले गेले आहे॥ ६७॥

गूढार्थदीपिका—महदादि विश्राम। शाळिका हे-

जगदुत्पत्ति, स्थिति, लय हे सर्व प्रकृतीच्या भूमीतच होतात-म्हणजे प्रकृति त्या त्या कार्यरूपाने परिणाम पावते व त्या सर्वांना परमेश्वरसत्तेचा आधार आहे; म्हणून परब्रह्म त्यांना विवर्त-उपादान कारण आहे.

सारांश जडविनाशी जगत्पसारा प्रकृतीचा परिणाम असून परब्रह्माचा अध्यस्त किंवा भ्रमजन्य विवर्त होय. असे वेदान्तशास्त्र म्हणते.

विकारां बहुवस थोरी। अर्जुना हेंचि करी। म्हणोनि अवधारीं। महद्ब्रह्म॥ ६८॥

अर्थ—अर्जुना! सर्व कार्यरूप पदार्थाचा विस्तार हीच (प्रकृतिच) करीत असल्यामुळे हिला महद्‌ब्रह्म म्हणतात॥ ६८॥

गूढार्थदीपिका—विकारां बहुवस थोरी-या मायेमुळेच संपूर्ण भेद उत्पन्न झाला आहे, असा अर्थ.

अव्यक्तवादमतीं। अव्यक्त ऐसी वदंती। सांख्याचिया प्रतीती। प्रकृति हेचि॥ ६९॥
वेदांतीं इये ते माया। ऐसें म्हणिजे प्राज्ञराया। असो किती बोलों वायां। अज्ञान हें॥ ७०॥
आपला आपणपेयां। विसरु जो धनंजया। तेंचि रूप यया। अज्ञानासी॥ ७१॥

अर्थ—सृष्टीचे कारण अव्यक्त असा वाद मानणाऱ्यांच्या मतांत या महद्‌ब्रह्मालाच अव्यक्त म्हटले जाते. सांख्यशास्त्राचे अनुसरणारे या महद्‌ब्रह्मालाच प्रकृति म्हणतात॥ ६९॥ हे सर्व बुद्धिमानांमध्ये श्रेष्ठ असलेल्या अर्जुना! वेदांतशास्त्रात हिलाच माया म्हटले आहे. असो व्यर्थच किती सांगायचे! हेच अज्ञान होय॥ ७०॥ अर्जुना! आपण आपले जे स्वरूप विसरलो आहो तेच अज्ञानाचे स्वरूप होय॥ ७१॥

गूढार्थदीपिका—प्रत्येक जीव, जड-विनाशी देह म्हणजे 'मी' असे समजतो. या विपरीत ज्ञानावरून जीवाला आपल्या मूळ सच्चिदानंद आत्मस्वरूपाची विस्मृति किंवा अज्ञान आहे, हे समजून येते.

आणिकही एक असे। जें विचारावेळे न दिसे। वातीं पाहतां जैसें। अंधारें कां॥ ७२॥
हालविलिया जाय। निश्चळीं तरी होय। दुधीं जैसी साय। दुधाची ते॥ ७३॥
पैं जागारु ना स्वप्न। ना स्वरूप अवस्थान। ते सुषुप्ति कां घन। जैसी होय॥ ७४॥
कां न वियतां वायूतें। वांझें आकाश रितें। तया ऐसें निरुतें। अज्ञान गा॥ ७५॥
पैल खांब कां पुरुखु। ऐसा निश्चयो नाहीं एकु। परी काय नेणो आलोकु। दिसत असे॥ ७६॥
तेवीं वस्तु जैसी असे। तैसी कीर न दिसे। परी कांही अनारिसें। देखिजेना॥ ७७॥
ना राती ना तेज। ते संधि जेवीं सांज। तेवीं विरुद्ध ना निज। ज्ञान आथी॥ ७८॥
ऐसी कोण्ही एकी दशा। तिये वाद अज्ञान ऐसा। तया गुंडलिया प्रकाशा। क्षेत्रज्ञ नांव॥ ७९॥

अर्थ—ज्याप्रमाणे वात उजळून त्याच्या प्रकाशाने अंधार पाहू गेल्यास तो दिसत नाही, त्याप्रमाणे विचाराने पाहू गेल्यास जे दिसत नाही ते अज्ञान होय, असेहि अज्ञानाचे स्वरूप सांगता येईल॥ ७२॥ (अमृ. प्र. ७-ओवी २७३-७७) ज्याप्रमाणे दुधाची साय, दूध तापवून निश्चिळ राहू दिले असता त्यावर जमते; पण दूध हालविल्याबरोबर ती दुधात मिळून जाते॥ ७३॥ जागृत अवस्था नाही, स्वप्नावस्था नाही किंवा समाधि नव्हे. या तिन्ही अवस्थेवेगळी जी घनदाट सुषुप्ति असते, त्याप्रमाणे जे आहे॥ ७४॥ किंवा वायुला उत्पन्न न करता जसे आकाश रिकामे एकटे असते व काहीच ज्ञान होत नाही, त्याच्यासारखे खरोखर हे अज्ञान आहे॥ ७५॥ पलीकडे खांब आहे की पुरुष आहे, असा काही एक निश्चय होत नाही, समोर काय आहे हे समजत नाही, पण नुसता भास दिसतो॥ ७६॥ त्याप्रमाणे आत्मवस्तु जशी आहे तशी दिसत नाही, पण भलतेहि काही दिसत नाही॥ ७७॥ रात्र नाही, उजेड नाही, त्या संधीला जसे सांजवेळ म्हणतात, त्याप्रमाणे आपले ज्ञान नसते व विरुद्धहि ज्ञान नसते॥ ७८॥ अशी जी कोणी एक दशा, तिला अज्ञान असे म्हणतात आणि त्या अज्ञानाने गुंडाळलेल्या चेतन प्रकाशाला क्षेत्रज्ञ (जीव) हे नाव आहे॥ ७९॥

गूढार्थदीपिका—येथे माऊलींनी अज्ञानाचे भावरूपत्व सिद्ध केले असून अज्ञान अनिर्वाच्य भावरूप म्हणजे जीवाने कल्पिले आहे, असे सांगितले आहे.

मी ब्रह्म जाणत नाही, अशी जी जीवाचे ठिकाणी वृत्ति स्फुरते ते अज्ञानाचेच कार्य असून तिच्यावरून जीव अज्ञानाने गुंडाळला आहे, हे प्रत्यक्ष दिसून येते.

"तेविं अविद्याकाळी सतुके। अविद्या नाही" "अविद्या येणे नांवे। मी विद्यमानचि नव्हे। हे अविद्याची

स्वभावे। सांगतसे'' (अमृ० प्र० ६-३१ व ३८) इत्यादि ओव्यातून अज्ञान वस्तुत: नाही असे जे माऊलींनी अमृतानुभवात सांगितले आहे, त्याचेच येथेहि प्रतिपादन केले आहे.

अज्ञान थोरिये आणिजे। आपणपें तरी नेणिजे। तें रूप जाणिजे। क्षेत्रज्ञाचें॥ ८०॥

हाचि उभय योगु। बुझें बापा चांगु। सत्तेचा नैसर्गु। स्वभावो हा॥ ८१॥

अर्थ—अज्ञान व अज्ञानाचे कार्य यांना महत्व देणारा—म्हणजे सत्य समजणारा व आपल्या स्वरूपाला न जाणणारा हाच क्षेत्रज्ञ म्हणजे जीव होय असे, जाण॥ ८०॥ अर्जुना हाच क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचा संबंध होय, हे चांगले लक्षात ठेव. सत्तेचा असा हा निसर्गत: स्वभाव आहे॥ ८१॥

गूढार्थदीपिका—सत्तेचा नैसर्गु। स्वभाव हा-

दोरीवर भ्रांतीने जेव्हा सर्प भासतो व तो खरा वाटतो, तेव्हा तो कार्यकारी होतो-म्हणजे भीति उत्पन्न करतो. या नेहमीच्या अनुभवावरून, खरोखर अस्तित्वात नसलेली वस्तु ही भ्रांतीने, आहे असे वाटून, तिला सत्ता मिळाली असता ती कार्यकारी होते, असा सत्तेचा नैसर्गिक स्वभाव दिसून येतो.

अज्ञान हे वस्तुत: अस्तित्वात नाही, पण जीवाने अमर्याद व अद्वैत अशा आपल्या सत्तेवरच ते मानले असल्यामुळे आत्मसत्तेने ते सत्तावान होऊन कार्यकारी झाले आहे-म्हणजे जीवाला सृष्टि, सृष्टीतील सुखदु:खे इत्यादि भासविण्याला समर्थ झाले आहे.

किंवा

जेव्हा एखाद्या वस्तूचे, ही अमुकवस्तु आहे असे निश्चित् ज्ञान होत नाही, कांही आहे, असे सामान्यपणे नुसते सत्तामात्र ज्ञान होते, तेव्हा त्या ज्ञानाबरोबरच त्या वस्तूच्या विशेषधर्माचे अज्ञान असते. असा हा सत्तामात्र ज्ञानाचा स्वभाव आहे.

हाचि उभय योग-

जीवात्म्याचे परब्रह्मत्व ज्या चिदानंदादि विशेषधर्माने जाणले जाते, ते धर्म जीवात्मा विसरून केवळ सामान्यपणे सत्तामात्र होऊन राहिला असल्यामुळे त्या जीवक्षेत्राचे ठिकाणी अनायासेच त्याच्या एका परब्रह्मस्वरूपाच्या चिदानंदादि विशेषधर्माचे अज्ञान सिद्ध होते. हाच क्षेत्रज्ञ व अज्ञान यांचा संबंध होय.

किंवा

क्षेत्रज्ञ जीवाने आपले सच्चिदानंदादि स्वरूप न जाणणे व अज्ञानाचे किंवा प्रकृतीचे अस्तित्व मानणे हाच क्षेत्राचा क्षेत्रज्ञाशी संबंध होय.

जीवाला सच्चिदानंदरूप विशेषधर्माचे अज्ञान आहे; म्हणूनच तो सत्तामात्र सामान्यज्ञानरूप झाला आहे. आणि त्याची ती सत्ता अज्ञानाला मिळून त्या अज्ञानाने जीवाला सृष्टिरूप भासविला आहे.

मूळांत एक अद्वैत परब्रह्मच असल्यामुळे अज्ञान किंवा प्रकृति हिचे मुळीच अस्तित्व नाही-म्हणजे मी ब्रह्म जाणत नाही अशी जीवच कल्पना करतो-म्हणून क्षेत्राचा क्षेत्रज्ञाशी संबंध काल्पनिक आहे, असा भाव.

आतां अज्ञानासारिखें। वस्तु आपणपांचि देखे। परी रूपें अनेकें। नेणों कोणें॥ ८२॥

अर्थ—आतां आत्मवस्तुच आपल्याला अज्ञानरूपाने पाहते-म्हणजे मी ब्रह्म जाणत नाही, असे म्हणते-पण कोण-कोणत्या अनेक रूपाने पाहते, हे सांगता येत नाही॥ ८२॥

गूढार्थदीपिका—परी रूपे अनेके। नेणो कोणे-

परब्रह्माप्रमाणेच परब्रह्मावर भासणारे अज्ञानकार्यहि अपरिमित असल्यामुळे त्याची संख्या करवत नाही. अज्ञान अज्ञानकार्य व ते पाहणारा ही सर्व त्रिपुटी अज्ञानातीलच असून परब्रह्म नित्य, असंग व प्रकाशरूप असल्यामुळे ते त्या त्रिपुटीला नुसते प्रकाशक होते, असा भाव.

जैसा रंकु भ्रमला। म्हणे जारे मी रावो आला। कां मूर्छित गेला। स्वर्गलोका॥ ८३॥

तेवीं लचकलिया दिठी। मग देखणें जें जें उठी। तया नांव सृष्टी। मीचि वियें पैं गा॥ ८४॥

अर्थ—ज्याप्रमाणे दरिद्रियाने भ्रमिष्ट होऊन "येथून चालते व्हा, मी राजा आलो आहे" किंवा मूर्च्छित झालेल्याने "स्वर्गलोकात गेलो" असे म्हणावे॥ ८३॥ त्याप्रमाणे आत्मस्वरूपापासून दृष्टि चळली असता जे जे दृष्टिसमोर आले त्याला सृष्टि हे नांव प्राप्त झाले असून ती सर्व सृष्टि माझ्यापासूनच होते-म्हणजे माझ्या सत्तेवर ती भासत असल्यामुळे मीच त्या रूपाने दिसतो॥ ८४॥

गूढार्थदीपिका—सर्व सृष्टि आत्मविस्मृतिरूप अज्ञानाजन्य भ्रांतीचे कार्य आहे, असा भाव.

जैंसे कां स्वप्नमोहा। तो एकाकी देखे बहुवा। तोचि पाडु आत्मया। स्मरणेंवीण असे॥ ८५॥
हेंचि आन भ्रांती। प्रमेय उपलवूं पुढती। परी तूं प्रतीती। याचि घे पां॥ ८६॥
तरी माझी हे गृहिणी। अनादि तरुणी। अनिर्वाच्यगुणी। अविद्या हे॥ ८७॥

अर्थ—ज्याप्रमाणेच स्वप्नभ्रम झाला असता एकच पुरुष अनेक वस्तुरूप होतो, त्याप्रमाणेच आत्मविस्मृति झाल्यामुळे जीवात्मा आपल्यालाच बहुरूप पाहतो.॥ ८५॥ हाच सिद्धान्त, अर्जुना! पुन: तुला निराळ्या रीतीने सांगतो, पण याचा तू अनुभव घे॥ ८६॥ तरी अविद्या ही माझी पत्नी होय. ती अनिर्वाच्य म्हणजे कल्पनामात्र व गुणी म्हणजे त्रिगुणात्मक आहे व ती अनादि असून अखंड तरुणच राहते॥ ८७॥

गूढार्थदीपिका—गृहिणी-"गृहिणी गृहमुच्यते" पत्नीमुळेच सर्व संसार थाटत असल्यामुळे ज्याप्रमाणे पत्नीलाच घर म्हणतात व पत्नीच संतति प्रसवते, त्याप्रमाणे अविद्याच सृष्टीला प्रसवणारी अशी सर्व सृष्टि झाली आहे, हे 'गृहिणी' या शब्दाने सुचविले आहे.

गृहिणी जशी पतीच्या स्वाधीन असते, त्याप्रमाणे परमात्मा त्रिगुणात्मक मायेला आपल्या स्वाधीन ठेवतो, तो तिच्या कधी स्वाधीन होत नाही. जीवात्मा मात्र प्रकृतीच्या स्वाधीन झाल्यासारखा असतो.

अनादि-जीवाच्या ठिकाणी असलेल्या अविद्याभ्रमाचा कोणाच्याहि बुद्धीला निश्चय करता येत नाही; म्हणून ती प्रारंभरहित मानावी लागते, असे 'अनादि' या शब्दाने सांगितले आहे.

तरुणी—अविद्या ही कल्पनामात्र आहे व कल्पनेला कधी म्हातारपण म्हणजे क्षीणता येत नाही, हे 'तरुणी' या शब्दाने सांगितले आहे.

अनिर्वाच्य—अविद्येला सत् म्हणता येत नाही किंवा असत् म्हणता येत नाही. किंवा तिला अत्यंत खरी किंवा अत्यंत खोटी असे म्हणता येत नाही, अशी ही दोहोहून विलक्षण आहे. असे "अनिर्वाच्य" या शब्दाने दाखविले आहे.

अविद्या—ती मुळी वस्तुरूपाने अस्तित्वांतच नाही, हे 'अविद्या' शब्दाने सांगितले आहे.

"माया अविद्यमानस्य आख्या" माया हे अस्तित्वात नसलेल्याचे नांव आहे, असे आचार्यांनीहि म्हटले आहे, पुढील ओवीतील "इये नाही हेचि रूप" या चरणाने हाच अर्थ माऊलीनी स्पष्ट केला आहे.

इये नाहीं हेंचि रूप। ठाणें हें अति उमप। हें निद्रितां समीप। चेतां दुरी॥ ८८॥

अर्थ—नसणे हेच तिचे स्वरूप आहे. तिचे राहण्याचे ठिकाण जे ब्रह्म अति विस्तीर्ण आहे. आत्मस्वरूपाचा विचार न करणाऱ्याचे जवळ ती असते आत्मस्वरूपाचा विचार करणाऱ्यांच्या ती दूर असते॥ ८८॥

गूढार्थदीपिका—इये नाही हेंचि रूप-अविद्या वस्तुत: नसून ती जीवकल्पित आहे, असा अर्थ.

निद्रितां समीप-आत्मस्वरूपाचा विचार होत नाही तोपर्यंत ती असते.

चेतां दुरी—आत्मस्वरूपाचा विचार केला असता अविद्या किंवा अज्ञान अथवा त्रिगुणात्मक माया हिचे वर्तमान, भूत, भविष्य अशा तिन्ही काळी भावरूप वस्तुत्वच सिद्ध होत नाही असा जो सर्व ज्ञान्यांचा अनुभव आहे, तोच येथे माउलींनी सांगितला आहे.

अमृतानुभवातील 'अज्ञानखंडन या सातव्या प्रकरणात त्याचेच प्रतिपादन केले आहे; म्हणून अमृतानुभव व

ज्ञानेश्वरी या दोन ग्रंथातील वेदान्तप्रतिपादनात काहीहि फरक नाही.

ज्ञानेश्वरीत कोठे कोठे माउलीनी मायेचा किंवा अविद्येचा जो उल्लेख केला आहे तो अविद्या किंवा माया अथवा अज्ञान ही भावरूप वस्तु आहे असे सांगण्याकरिता केला नसून जीवाने मानलेल्या अविद्येचा किंवा अज्ञानाचा अथवा मायेचा तो नुसता अनुवाद केला आहे.

सारांश, विचाराने अविद्येचे अस्तित्व सिद्ध होत नाही व अविचारानेच ती मानली जाते, असा भाव.

पैं माझेनिचि आंगें। पहुडल्या हे जागे। आणि सत्तासंभोगें। गुर्विणी होय॥ ८९॥

अर्थ—माझ्या अंगाशी निजली असता ती जागी होते व माझ्या सत्तेचा भोग घेऊन ती गरोदर होते॥ ८९॥

गूढार्थदीपिका—माझेनिचि आंगे। पहुडल्या हे जागे—

"चित्पद ते माया" असे श्रीएकनाथ महाराजांनी म्हटले असल्यामुळे चैतन्यरूप प्रकाशाच्या संगतीने ती व्यक्त व जागी म्हणजे कल्पनारूप होते, असा "माझेनिचि आंगे। पहुडल्या हे जागे" या चरणांचा अर्थ आहे.

सत्तासंभोगे। गुर्विणी होय

चैतन्याचे ठिकाणी सत्ता अनुगत असल्यामुळे चैतन्यप्रकाशाने मुक्त झालेल्या वृत्तीच्या ठिकाणी तीच सत्ता अनुगत होते; म्हणून त्या सत्तेच्या बळावर वृत्तिरूपाने व्यक्त झालेली अविद्या कार्य प्रसवण्यास समर्थ होते, असे "सत्तासंभोगे। गुर्विणी होय" या चरणांनी माऊलींनी सुचविले आहे.

महद्ब्रह्माउदरीं। प्रकृतिं आठै विकारीं। गर्भाची करी। पेलोवेली॥ ९० ॥
उभयसंगु पहिलें। बुद्धितत्त्व प्रसवलें। बुद्धितत्त्वें भारैलें। होय मन॥ ९१ ॥
तरुणी ममता मनाची। अहंकार तत्त्व रची। तेणें महाभूतांची। अभिव्यक्ति होय॥ ९२ ॥
आणि विषयेंद्रियां गौसी। स्वभावें तंव भूतांसी। म्हणोनि येती सरिसीं। तियेंही रूपा॥ ९३ ॥
जालेनि विकारक्षोभें। पाठीं त्रिगुणाचें उभें। तेव्हां ये वासना गर्भें। ठायेंठावो॥ ९४ ॥
रुखाचा आवांका। जैसी बीजकणिका। जीवीं बांधे उदका। भेटतखेंवो॥ ९५ ॥
तैसी माझेनि संगें। अविद्या नाना जगें। आर घेवों लागे। अणियाची॥ ९६ ॥
मग गर्भगोळा तया। कैसें रूप तैं ये आया। तें परियेसें राया। सुजनांचिया॥ ९७ ॥
पैं मणिज स्वेदज। उद्भिज जारज। उमटती सहज। अवयव हे॥ ९८ ॥
व्योमवायुवशें। वाढलेनि गर्भरसें। मणिजु उससे। अवयव तो॥ ९९ ॥
पोटीं सूनि तमरजें। आगळिकां तोय तेजें। उठितां निफजे। स्वेदजु गा॥ १०० ॥
आपपृथ्वीउत्कटें। आणि तमोमात्रें निकृष्टें। स्थावरु उमटे। उद्भिजु गा॥ १०१ ॥
पांचां पांचंही विरजीं। होती मनबुद्ध्यादि साजीं। हीं हेतु जारजीं। ऐसें जाण॥ १०२ ॥
ऐसे चारी हे सरळ। करचरणतळ। महाप्रकृति स्थूळ। तेंचि शिर॥ १०३ ॥
प्रवृत्ति पेललें पोट। निवृत्ति ते पाठी नीट। सुरयोनी आंगें आठ। ऊर्ध्वाचीं॥ १०४ ॥

अर्थ—अविद्येच्या पोटात असलेल्या गर्भाची, प्रकृति आठ विकारांची वृद्धि करते॥ ९०॥ क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचा संबंध झाला (कल्पिला) असता प्रथम बुद्धि हे तत्त्व उत्पन्न होते, नंतर बुद्धितत्त्वापासून मन निर्माण होते॥ ९१॥ ममता ही मनाची तरुण स्त्री होय, ती अहंकार तत्त्व उत्पन्न करते आणि अहंकारतत्त्वापासून पुढे भूतांची अभिव्यक्ति होते॥ ९२॥ आणि तो अहंकार स्वभावत:च महाभूतांना कवटाळतो व त्यामुळे विषय बरोबरच व्यक्त होतात॥ ९३॥ चित्तांत विकाराचा क्षोभ झाला असता त्यांच्या पाठीशी सत्व, रज, तम हे तीन गुण उभे असतात व तेथे लगेच वासना उत्पन्न होते॥ ९४॥ ज्याप्रमाणे बी छोटेसे असले तरी पाण्याचा संबंध झाल्याने ते वृक्षाच्या आकाराला येते॥ ९५॥ त्याप्रमाणे माझ्या संगाने अविद्या ही नाना जगाच्या रूपाच्या अंकुराचे कोंब घेऊ लागते॥ ९६॥ मग त्या गर्भगोळ्याला कोणत्या रूपाचा आकार येतो हे, सज्जनामध्ये श्रेष्ठ असलेल्या अर्जुना! सांगतो, ऐक॥ ९७॥ तेव्हा

अंडज, स्वेदज, उद्भिज व जारज असे हे चार प्रकारचे अवयव सहजच उत्पन्न होतात॥ ९८॥ आकाश व वायु यांच्या योगांने गर्भगोळ वोतला असता अंडज अवयव उत्पन्न होतो॥ ९९॥ आणि तमोगुण व रजोगुण पोटांत (अंतरात) ठेवून पाणी आणि तेज यांच्या विशेषाने वाढलेला स्वेदज अवयव उत्पन्न होतो॥ १००॥ पाणी आणि पृथ्वी ही दोन भूते उत्कट होऊन आणि निकृष्ट अशा तमोगुणाची वृद्धि झाली असता उद्भिज असा स्थावर अवयव उत्पन्न होतो॥ १०१॥ पंचमहाभूते ही परस्परांच्या साहाय्याने मन, बुद्धि, अहंकार इत्यादिकांचे पोषण करून वृद्धि करतात आणि हेच जारज अवयव उत्पन्न होण्याचे निमित्त आहे, असे जाण॥ १०२॥ याप्रमाणे चार योनी ह्या सरळ करचरणादिक असून मूळ प्रकृतीचे स्थूळ रूपाला येणे, हा मस्तकाचा भाग होय॥ १०३॥ प्रवृत्ति हे सुटलेले पोट असून निवृत्ति ही सुंदर पाठ आहे आणि आठ सुरयोनी ही वरची अवयवे आहेत॥ १०४॥

गूढार्थदीपिका—प्रवृत्ति पेलले पोट-

नाना प्रकारच्या काम्य कर्माकडे प्रवृत्त करणारा हा प्रवृत्तिमार्ग आहे, ह्याच्या योगाने वासना वाढत जाते; म्हणून या प्रवृत्तीला ''पेलले पोट'' म्हटले आहे.

निवृत्ति ते पाठी नीट—

निवृत्ति मार्ग हा प्रवृत्ति मार्गाकडे पाठ करणारा आहे—म्हणजे सर्व कामनिक कर्मे सोडून देऊन निष्काम चित्ताने परमेश्वराकडे लागणारा आहे.

कंठु उल्हासता स्वर्गु। मृत्युलोकु मध्यअर्धभागु। अधोदेशु चांगु। नितंबु तो॥ १०५॥
ऐसें लेंकरु एक। प्रसवली हे देख। जयाचें तिन्ही लोक। बाळसें गा॥ १०६॥
चौऱ्यांयशी लक्ष योनी। तिये कांडा पेरां सांदणी। वाढे प्रतिदिनीं। बाळक हें॥ १०७॥
नाना देहअवयवीं। नामाचीं लेणीं लेववी। मोहस्तन्यें वाढवी। नित्य नवे॥ १०८॥
सृष्टी वेगवेगळीया। तिया करांघ्रीं आंगोळियां। भिन्नाभिमान सूदलिया। मूदिया तेथें॥ १०९॥
हें एकलौतें चराचर। अविचारित सुंदर। प्रसवोनि थोर। थोरावली॥ ११०॥

अर्थ—आनंददायक स्वर्ग हा कंठप्रदेश असून मृत्युलोक हा मध्यभाग आहे आणि पाताळलोक हा सुंदर कटीचा भाग आहे॥ १०५॥ अशा एका लेकराला प्रकृतीने जन्म दिला असून स्वर्ग, मृत्यु, पाताळ हे तिन्ही लोक ज्या प्रकृतीचे बाळसलेले आंग आहे॥ १०६॥ चौऱ्यांशी लक्ष योनी ह्या त्या बाळसलेल्या लेकराची कांडे, पेरे व सांधे आहेत. अशा प्रकारे ते बालक प्रत्येक दिवशी वाढत जाते॥ १०७॥ नाना देह हेच कोणी अवयव असून त्याच्या ठिकाणी नाना नामांचे अलंकार घातलेले आहेत आणि प्रकृति ही, नित्य नवे आसक्तिरूप दूध पाजून ते बालक वाढवित असते॥ १०८॥ निरनिराळी सृष्टि ही हातापायांची बोटे असून त्यांचा भिन्न भिन्न अभिमान हातापायाच्या बोटात घातलेल्या आंगठ्या होत॥ १०९॥ ह्या प्रकृतीने, विचार करीत नाही तोपर्यंत सुंदर वाटणाऱ्या अशा एकुलत्या एक बालकाला जन्म देऊन ती थोर झाली आहे॥ ११०॥

गूढार्थदीपिका—अविचारित सुंदर—

जीव आत्मज्ञानाचा विचार करीत नाही तोपर्यंतच त्याला जगत् सुंदर वाटते, असा भाव.

पैं ब्रह्मा प्रातःकाळु। विष्णु तो माध्यान्ह वेळु। सदाशिव सायंकाळु। बाळा यया॥ १११॥

अर्थ—या बालकाला ब्रह्मदेव हा प्रातःकाळ विष्णु हा माध्यान्हकाळ व सदाशिव हा सायंकाळ होय॥ १११॥

गूढार्थदीपिका—येथे विष्णुच्या, सृष्टीची स्थिति करण्याच्या व शिवाचा, सृष्टीचा संहार करण्याच्या नुसत्या मर्यादित अधिकाराला धरुनच त्याना ''विष्णू तो मध्यान्ह वेळु। सदाशिव सायंकाळु'' असे म्हटले आहे. त्यांच्या पूर्णब्रह्मत्वाला धरून म्हटले नाही.

महाप्रळयसेजे। खेळौनि निवांत निजे। विषमज्ञानें उमजे। कल्पोदयीं॥ ११२॥

अर्थ—हे बालक सृष्टीचा खेळ खेळून महाप्रलयरूपी आंथरूणावर स्वस्थ निजते व कल्पारंभी पुनः विषमज्ञानाने जागे होते॥ ११२॥

गूढार्थदीपिका—विषमज्ञानें उमजे। कल्पोदयी-
अनादि संस्कारामुळे कल्पारंभी पुन: अशीच सृष्टि निर्माण होते, असा भाव.

अर्जुना इयापरी। मिथ्यादृष्टीच्या घरीं। युगानुवृत्तीचीं करी। चोज पाउलें॥ ११३॥

अर्थ—अर्जुना! याप्रमाणे मिथ्या दृष्टीच्या घरात युगांपाठी युगे करीत हे बालक कौतुकाने पाय टाकते॥ ११३॥

गूढार्थदीपिका—मिथ्यादृष्टीच्या घरी। युगानुवृत्तीचीं करी-
जगताची उत्पत्ति, स्थिति, लय मिथ्यादृष्टीने म्हणजे भ्रांतीनेच आहेत, असा भाव.

संकल्पु ययाचा इष्टु। अहंकारु विनटु। ऐसिया होय तै शेवटु। ज्ञानें यया॥ ११४॥

अर्थ—या बालकाला संकल्प करणे हीच एक गोष्ट आवडत असते. अहंकार त्याचा खेळगडी होय. अशा या जगत्‌बालकाचा शेवट एका आत्मज्ञानानेच होतो॥ ११४॥

गूढार्थदीपिका—संकल्प ययाचा इष्टु—केवल संकल्पानेच सृष्टि उत्पन्न होते, असा अर्थ.

अहंकारू विनटु—अहंकार हा सृष्टीला धरून ठेवणारा आहे, म्हणून तो संकल्पाचा मित्र आहे.

ऐसिया होय शेवटु। ज्ञाने यया-एक ब्रह्मज्ञानच या जगाची नि:शेष निवृत्ति करणारे आहे.

आतां असो हे बहु बोली। ऐसें विश्व माया व्याली। तेथ साह्य जाली। माझी सत्ता॥ ११५॥

अर्थ—अर्जुना! आता हे बहु बोलणे असो. अशा प्रकारे हे संपूर्ण विश्व मायेपासून—म्हणजे भ्रांतिपासून-निर्माण झाले आहे व त्या मायाभ्रांतीला माझ्या सत्तेचा आधार असल्यामुळे माझी सत्ता तिला साहाय्यभूत झाली आहे॥ ११५॥

सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तय: सम्भवन्ति या:। तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रद: पिता॥ ४॥

अर्थ—हे अर्जुना! सर्व योनीमध्ये जेवढे देहाकार आहेत त्यांचे परिणामी-उपादान-कारण प्रकृति असून तिचे ठिकाणी बीज स्थापन करणारा पिता मी आहे॥ ४॥

याकारणें मी पिता। महद्‌ब्रह्म माता। अपत्य पांडुसुता। जगडंबर॥ ११६॥
आतां शरीरें बहुतें। देखौनि न भेद हो चित्तें। जें मनबुद्ध्यादि भूतें। एकेंचि येथें॥ ११७॥

अर्थ—म्हणूनच मी पिता असून महद्‌ब्रह्म म्हणजे प्रकृति ही माता आहे व अर्जुना! ब्रह्मांड हे दोघांपासून झालेले अपत्य आहे॥ ११६॥ आता निरनिराळी पुष्कळशी शरीरे पाहून तू चित्तात त्यांचा भेद मानू नकोस; कारण खऱ्या अन्वयदृष्टीने पाहता मन, बुद्धि, महाभूते इत्यादि सर्व एक परब्रह्मवस्तूच झाली आहे॥ ११७॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे दोरीच भ्रांतीने सर्परूप भासते, त्याप्रमाणे परब्रह्मच अज्ञानभ्रांतीने मनबुद्ध्यादि सर्व कारणकार्यप्रपंचरूप भासते.

हां गा एकचि देहीं। काय अनारिसे अवयव नाहीं। तेवीं विचित्र विश्व पाहीं। एकचि हें॥ ११८॥
पैं उंचा नीचा डाहाळिया। विषमा वेगळालिया। येकाचि जेवीं जालिया। बीजाचिया॥ ११९॥
आणि संबंधु तोही ऐसा। मृत्तिके घटु लेंक जैसा। कां पटत्व कापुसा। नातू होय॥ १२०॥

अर्थ—अर्जुना! एकाच देहाचे ठिकाणी निरनिराळी अवयवे नसतात काय? त्याप्रमाणे विश्व जरी विचित्र दिसत असले तरी त्या सर्वरूपाने एक परब्रह्मवस्तुच प्रगट झाली आहे, असे समज॥ ११८॥ ज्याप्रमाणे एकाच बीजाच्या वर खाली व भिन्न भिन्न आकाराच्या निरनिराळ्या डाहाळ्या वाढतात॥ ११९॥ आणि ज्याप्रमाणे घट हा मातीचा लेक समजला जातो किंवा वस्त्र कापसाचे नातवंड समजले जाते, तसाच हा संबंध आहे॥ १२०॥

गूढार्थदीपिका—संबंधु तोही ऐसा—
परब्रह्मच नामरूपात्मक भासत असल्यामुळे त्याच्या ठिकाणी कल्पिलेल्या चराचर जगाचा संबंध काल्पनिक आहे. वस्तुत: भासत असलेले चराचर पूर्ण परब्रह्मच असल्यामुळे एका वस्तूत संबंध मानणे व्यर्थ आहे असा अर्थ.

नाना कल्लोळपरंपरा। संतती जैसी सागरा। आम्हां आणि चराचरा। संबंधु तैसा॥ १२१॥

अर्थ—किंवा ज्याप्रमाणे एका मागून एक उठणारे तरंग समुद्राचीच संतति समजली जाते, तसा आमचा आणि चराचराचा संबंध आहे॥ १२१॥

गूढार्थदीपिका—आम्हा आणि चराचर। संबंधु तैसा-

खऱ्या दृष्टीने पाहता परब्रह्मच अनध्यस्त विवर्तत्वाने-म्हणजे त्रिगुणात्मक मायेवाचून-नामरूपात्मक झाले आहे; पण अज्ञानी जीवाला हे ज्ञान नसल्यामुळे तो भ्रमाने त्याला (नामरूपात्मक परब्रह्माला) जगत् म्हणतो.

म्हणोनि वन्हि आणि ज्वाळ। दोन्ही वन्हीचि केवळ। तेवीं मी गा सकळ। संबंध वावो॥ १२२॥
जालेनि जगें मी झांकें। तरी जगत्वें कोण फांके। किळेवरी माणिकें। लोपिजे काई॥ १२३॥
अळंकारातें आलें। तरी सोनेंपण काइ गेलें। कीं कमळ फांकलें। कमळत्वा मुके॥ १२४॥
सांग पां धनंजया। अवयवीं अवयविया। आच्छादिजे की तया। तेंचि रूप॥ १२५॥
कीं विरूढलिया जोंधळा। कणिसाचा निर्वाळा। वेंचला कीं आगळा। दिसतसे॥ १२६॥
म्हणोनि जग परौतें। सारूनि पाहिजे मातें। तैसा नोहे उखितें। आघवें मीचि॥ १२७॥

अर्थ—म्हणून ज्याप्रमाणे विस्तव आणि ज्वाला दोन्ही विस्तवच होत, त्याप्रमाणे मीच सर्व चराचर असल्यामुळे माझा व चराचराचा संबंध लावणे खोटे आहे॥ १२२॥ झालेल्या जगाने मी झाकला जातो असे म्हणावे तर जगरूपाने कोण फांकतो? माणिक आपल्या तेजाने झाकले जाते काय?॥ १२३॥ किंवा सोने अलंकारदशेला आले तरी सोनेपण नाहीसे झाले काय? किंवा कमळ फाकलेले असते तेव्हा ते कमळत्वाला मुकते काय?॥ १२४॥ अर्जुना! सांग बरे! देह हा आपल्या अवयवाने झाकला जातो की ते त्याचे रूपच आहे?॥ १२५॥ किंवा जोंधळा विशेष वाढला असता त्याचे कणसात दिसणे नाहीसे होते किंवा विशेष स्पष्ट होते?॥ १२६॥ म्हणून जग बाजूला सारून मला पाहण्याची आवश्यकता नाही. संपूर्ण विश्व निपटून मीच आहे॥ १२७॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञान झाले असता नामरूपाचे ठिकाणी परब्रह्माहून भिन्नत्वाची व जड-विनाशी जगद्वस्तुत्वाची जीवाने अज्ञानभ्रांतीने केलेली फक्त कल्पनाच नाहीशी करायची असते. नामरूपे नाहीशी करायची नसतात. ज्याप्रमाणे घट संबंध मातीचाच दिसतो, त्याप्रमाणे नामरूपासह सच्चिदानंद परब्रह्मच अनुभवाला येते, असे माऊलीचे म्हणणे आहे, हाच अन्यरूप अनुभव होय.

हा तूं साचोकारा। निश्चयाचा खरा। गांठी बांध वीरा। जीवाचिये॥ १२८।
आतां मियां मज दाविला। शरीरीं वेगळाला। गुणीं मीचि बांधला। ऐसा आवडें॥ १२९॥
जैसें स्वप्नीं आपण। उठवूनियां आत्ममरण। भोगिजे गा जाण। कपिध्वजा॥ १३०॥
कां कावळातें डोळे। प्रकाशूनि पिंवळें। देखती तेंही कळे। तयांसीचि॥ १३१॥
नाना सूर्य प्रकाशें। प्रकटी तैं अभ्र भासे। तो लोपला हेंही दिसे। सूर्येचि कीं॥ १३२॥
पैं आपणपेनि जालिया। छाया गा आपुलिया। बिहोनि बिहालिया। आन आहे॥ १३३॥
तैसी इयें नाना देहें। दाऊनि मी नाना होयें। तेथ ऐसा जो बंध आहे। तेंही देखें॥ १३४॥
बंधचि कां न बंधिजे। हें जाणणें मज माझें। नेणणेनि उपजे। आपलेनि॥ १३५॥
तरी कोणें गुणें कैसा। मजचि मी बंध ऐसा। आवडे तें परियेसा। अर्जुनदेवा॥ १३६॥
गुण ते किती किंधर्म। कायि ययां रूपनाम। कें जालें हें वर्म। अवधारिजे॥ १३७॥

अर्थ—हे वीरा अर्जुना! असा हाच खरोखर तत्त्वविचार आहे; म्हणून या खऱ्या निश्चयाची चित्तांत गाठ बांध॥ १२८॥ निरनिराळ्या शरीरात एक मीच वेगवेगळा झालो आहे, हे मी आतापर्यंत दाखविले; परंतु तोच मी गुणांनी बांधल्यासारखा अज्ञानी जीवांना वाटतो॥ १२९॥ ज्याच्या ध्वजाचे ठिकाणी वानर आहे अशा अर्जुना! स्वप्नात उठून जसे आपणच आपल्या मरणाचे दुःख भोगावे॥ १३०॥ किंवा कावीळाने पिवळे झालेल्या डोळ्यांनाच कावीळ दिसते व कावीळ झाली हेहि ते डोळेच जाणतात॥ १३१॥ किंवा सूर्यप्रकाशानेच अभ्र दिसू लागते व सूर्य लोपला

हेहि त्याच्या प्रकाशानेच दिसते॥ १३२॥ आपल्यामुळेच पडलेल्या आपल्या छायेला जर आपण पाहून भ्यालो तर तेथे दुसरा कोणी भिवविणारा आहे काय?॥ १३३॥ त्याप्रमाणे मी नाना प्रकारची शरीरें भासवून मीच नाना प्रकारचा होतो. त्या ठिकाणी गुणाचा जो बंध होतो, तोहि मीच जाणतो॥ १३४॥ बंध भासतो, पण त्या बंधाने मी बांधला गेलो नाही, असे माझ्या स्वरूपाचे ज्ञान मला आहे; पण असे आपल्या स्वरूपाला न जाणल्याने जीव बद्ध होतो॥ १३५॥ तरी अर्जुना! कोणत्या गुणाने बांधला जातो व मला मीच कसा बंधनकारक वाटतो, ते सांगतो ऐक॥ १३६॥ गुण किती आहेत? त्यांचे धर्म काय? त्यांचे रूप काय? त्यांची नावे काय? व ते कोठे उत्पन्न झालेत? हे रहस्य सांगतो, ऐक॥ १३७॥

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः। निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम्॥ ५॥

अर्थ—हे अर्जुना! सत्व, रज, तम हे तीन गुण असून ते प्रकृतीपासून निर्माण झाले आहेत. ते अविनाशी अशा देहाभिमानी जीवाला या देहाचे ठिकाणी बांधतात॥ ५॥

तरी सत्त्व रज तम। तिघासि हें नाम। आणि प्रकृति जन्म-। भूमिका ययां॥ १३८॥
येथ सत्त्व तें उत्तम। रज तें मध्यम। तिहींमाजीं तम। सावियाधारें॥ १३९॥
हें एकेचि वृत्तीच्या ठायीं। त्रिगुणत्व आवडे पाहीं। वयसात्रय देहीं। येकीं जेवीं॥ १४०॥
कां मीनलेनि कीडें। जंवजंव तूक वाढे। तंवतंव सोनें हीन पडे। पांचिकां कसीं॥ १४१॥
पैं सावधपण जैसें। वाहविलें आळसें। सुषुप्ति बैसे। घणावोनी॥ १४२॥
तैसी अज्ञानांगीकारें। निगाली वृत्ति विखुरे। ते सत्त्वरजद्वारें। तमही होय॥ १४३॥

अर्थ—तरी सत्त्व, रज, तम अशी त्यांची नावे असून प्रकृति ही त्यांची जन्मभूमि आहे॥ १३८॥ त्या तिघांमध्ये सत्त्वगुण उत्तम असून रजोगुण मध्यम आहे व तमोगुणसहजच त्यांच्यापेक्षा खालचा म्हणजे कनिष्ट आहे॥ १३९॥ ज्याप्रमाणे एका देहाचे ठिकाणी बाल्य, तारुण्य व म्हातारपण ह्या तिन्ही अवस्था असतात, त्याप्रमाणे हे तिन्ही गुण एकाच अंत:करणवृत्तीच्या ठिकाणी असतात॥ १४०॥ किंवा हीणकसाच्या मिश्रणाने जसजसे सोन्याचे वजन वाढते तसतसे ते (सोने) कसात कमी होऊन पांच रुपये किंमतीचे होते॥ १४१॥ ज्याप्रमाणे आळसाने सावधपणा नाहीसा होऊन गाढ सुषुप्ति येते॥ १४२॥ त्याप्रमाणे, मी अज्ञानी आहे, असा अज्ञानाचा अंगीकार केल्याने उठलेली वृत्ति भेद पावते व ती सत्त्वरजतमात्मक होते॥ १४३॥

गूढार्थदीपिका—ही अहंवृत्ति आपल्या मूळ ब्रह्मस्थितीला विसरल्यामुळे ती सात्विक-राजस-तामस होते. सत्त्वगुणाने ती जाणते, रजोगुणाने कर्माचे कर्तृत्व घेते व तमोगुणाने आळस, निद्रा वगैरे घेते. हेच तिचे अनुक्रमे सत्व-रज-तमात्मक होणे होय.

अर्जुना गा जाण। ययां नाम गुण। आतां दाखऊं खुण। बांधिती ते॥ १४४॥
तरी क्षेत्रज्ञदशे। आत्मा मोटका पैसे। हें देह मी ऐसें। मुहूर्त करी॥ १४५॥

अर्थ—अर्जुना! याला गुण म्हणतात, असे जाण. आता त्यांनी बांधले असे केव्हा समजले जाते, ते सांगतो, ऐक॥ १४४॥ क्षेत्रज्ञदशेत शिरल्यासारखा भासलेला आत्मा, मी देह आहे, असे समजायला लागतो॥ १४५॥

गूढार्थदीपिका—वेदान्तात जीवदशेचा प्रारंभ मानता येत नसल्यामुळे माउलींनी येथे जीवदशेचा प्रारंभ दाखविला नाही. आत्म्याचे ठिकाणी जीव अवस्था मी देह आहे, या कल्पनेमुळे भासते, एवढेच सांगितले आहे.

आजन्ममरणांतीं। देहधर्मीं समस्तीं। ममत्वाची सूती। घे ना जंव॥ १४६॥
जैसी मीनाच्या तोंडीं। पडेना जंव उंडी। तंव गळ आसुडी। जळपारधी॥ १४७॥

अर्थ—ज्याप्रमाणे गळाला लावलेला मासांचा तुकडा मासोळीच्या तोंडात जातो तोच धीवर गळाला हिसडा मारतो, त्याप्रमाणे जीव जन्मापासून मरेपर्यंत देहाच्या संपूर्ण धर्माची ममता धरतो किंवा हे माझे धर्म आहेत असे म्हणतो, तोच मी देह आहे अशी आपल्या ठिकाणी कल्पना करून घेतो व त्रिगुणांनी बांधला जातो॥ १४६-१४७॥

गूढार्थदीपिका—गुण व गुणाची देहादि कार्ये यांचा जाणता 'मी', त्यांच्याहून निराळा आहे, हे विसरून ते सर्व सत्य असून माझ्या ठिकाणी आहेत किंवा माझे आहेत, असे मानणे, हेच गुणांनी बांधले जाणे आहे. जीव असेच मानतो; म्हणून तो गुणबद्ध होतो.

तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम्। सुखसङ्गेन बध्नाति ज्ञानसङ्गेन चानघ॥ ६॥

अर्थ—त्यात सत्त्वगुण हा निर्मल असल्यामुळे प्रकाशक व निरुपद्रवी आहे. हे निष्पाप अर्जुना! तो, सुखाच्या संगाने व ज्ञानाच्या संगाने-म्हणजे मी सुखी आहे, मी जाणता आहे अशा अभिमानाने-बंधन करतो॥ ६॥

तेवीं सत्त्वें लुब्धकें। सुखज्ञानाचीं पासिकें। वोढिजती मग खुडके। मृगु जैसा॥ १४८॥
मग ज्ञानें चडफडी। जाणिवेचे खुरखोडी। स्वयंसुख हें धाडी। हातींचें गा॥ १४९॥
तेव्हां विद्यामानें तोखे। लाभमात्रें हरिखे। मी संतुष्ट हेंही देखे। श्लाघों लागे॥ १५०॥
म्हणे भाग्य ना माझें। आजि सुखियें नाहीं दुजें। विकाराष्टकें फुंजे। सात्त्विकाचेनि॥ १५१॥
आणि येणेंही न सरे। लांकण लागे दुसरें। जें विद्वत्तेचें भरे। भूत आंगीं॥ १५२॥
आपणचि ज्ञानस्वरूप आहे। तें गेलें हें दुःख न वाहे। कीं विषयज्ञानें होये। गगनायेवढा॥ १५३॥
रावो जैसा स्वप्नीं। रंकपणें रिघे धानीं। तो दों दाणां मानी। इंद्रु ना मी॥ १५४॥
तैसें गा देहातीता। जालेया देहवंता। हों लागे पांडुसुता। बाह्यज्ञानें॥ १५५॥
प्रवृत्तिशास्त्र बुझे। यज्ञविद्या उमजे। किंबहुना सुझे। स्वर्गवरी॥ १५६॥
आणि म्हणे आजि आन। मी वांचूनि नाहीं सज्ञान। चातुर्यचंद्रा गगन। चित्त माझें॥ १५७॥
ऐसें सत्त्व सुखज्ञानीं। जीवासि लावूनि कानी। बैलाची करी वानी। पांगुळाचिया॥ १५८॥
आतां हाचि शरीरीं। रजें जियापरी। बांधिजे तें अवधारीं। सांगिजेल॥ १५९॥

अर्थ—पारध्याने पाशात मृग धरला असता जसा तो तडफडतो त्याप्रमाणे सुख व ज्ञान यांच्या संगाने सत्त्वगुणरूपी पारधी जीवाला बांधतो॥ १४८॥ मग आपली स्वयंसुखरूप व ज्ञानरूप स्थिति विसरून, प्राप्त केलेल्या विषयसुखाच्या व विषयज्ञानाच्या अभिमानाने तो तळमळतो॥ १४९॥ तेव्हा त्याच्या विद्वत्तेचा कोणी मान केल्यास त्याला आनंद वाटतो, काही त्याला लाभ झाल्यास तो संतोष मानतो, मी सुखात राहावे, हेहि तो पाहत राहतो व आपल्या सुखस्थितीची प्रशंसा करीत जातो॥ १५०॥ आणि म्हणतो की, माझे हे महद्भाग्यच ना! आज माझ्यासारखा दुसरा कोणी सुखी नाही, असे म्हणता म्हणता तो सत्त्वगुणामुळे आठ प्रकारच्या विकाराने फुगू लागतो॥ १५१॥ आणि एवढ्यानेच संपत नाही, तर दुसरे एक बंधन त्याच्या पाठीमागे लागते. त्याच्या आंगात विद्वत्तेच्या अभिमानाचा भूतसंचार होतो॥ १५२॥ आपण केवळ ज्ञानस्वरूप असतांना आपल्याला त्याचा विसर पडला, याचे त्याला दुःख वाटत नाही; उलट विषयाचे ज्ञान प्राप्त करून घेऊन अभिमानाने आकाशांएवढा फुगतो॥ १५३॥ ज्याप्रमाणे राजा स्वप्नामध्ये दरिद्री होऊन नगरात शिरतो व दोन दाणे मिळाल्याने आपल्याला इंद्र मानू लागतो॥ १५४॥ हे पांडुसुता अर्जुना! देहाहून अलग असलेल्या या क्षेत्रज्ञ जीवाला ''मी देह आहे'' असा देहाचा अभिमान धरून देहवान झाल्याबरोबर बाह्य विषयाच्या ज्ञानाने असे होऊ लागते॥ १५५॥ संसारदायक कर्मकांड तो जाणतो, संपूर्ण यज्ञक्रिया जाणतो, एवढेच नाही, तर स्वर्गप्राप्तिपर्यंत सर्व जाणतो॥ १५६॥ आणि म्हणतो की, आज माझ्या बरोबरीचा विद्वान दुसरा कोणी नाही. माझे चित्त चातुर्यरूपी चंद्राला राहण्याचे आकाश आहे-म्हणजे मीच एक चतुर आहे॥ १५७॥ याप्रमाणे सत्वगुण हा जीवाला सुख व ज्ञान यांच्या अभिमानाच्या दोरीने बांधून नंदीबैलाप्रमाणे करून ठेवतो॥ १५८॥ आता हा जीव रजोगुणाने ज्या प्रकाराने बांधला जातो तो प्रकार सांगतो, ऐक॥ १५९॥

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासङ्गसमुद्भवम्। तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसङ्गेन देहिनम्॥ ७॥

अर्थ—रजोगुण हा मनाचे रंजन करणारा असून तो वासना व आसक्ति यांना उत्पन्न करणारा आहे. तो जीवाला फलाच्या इच्छेने कर्मात आसक्त करून बंधन करतो, असे जाण॥ ७॥

हें रज याचि कारणें। जीवातें रंजऊं जाणे। हें अभिलाखाचें तरुणें। सदाचि गा॥ १६०॥
हें जीवीं मोटकें रिगे। आणि कामाच्या मदीं लागे। मग वारया वळघे। तृष्णेचिया॥ १६१॥
घृतें आंबुखूनि आगियाळें। वज्राग्नीचें सादुकलें। आतां बहु थेंकुलें। आहे तेथ॥ १६२॥
तैसी खवळे चाड। होय दुःखासकट गोड। इंद्रश्रीहि सांकड। गमों लागे॥ १६३॥
तैसी तृष्णा वाढिनलिया। मेरुही हाता आलिया। तऱ्ही म्हणे एखादिया। दारुणा वळघो॥ १६४॥
जीविताची कुरोंडी। वोंवाळूं लागे कवडी। मानी तृणाचिये जोडी। कृतकृत्यता॥ १६५॥
आजि असतें वेंचिजेल। परी पाहे पां काय कीजेल। ऐसा पांगीं वडील। व्यवसाय मांडी॥ १६६॥
म्हणे स्वर्गा हन जावें। तरी काय तेथें खावें। इयालागीं धांवे। याग करूं॥ १६७॥
व्रतापाठीं व्रतें। आचरे इष्टापूर्तें। काम्यावांचूनि हातें। शिवणें नाहीं॥ १६८॥
पैं ग्रीष्मांतींचां वारा। विसावों नेणें वीरा। तैसा न म्हणे व्यापारा। रात्र दिवस॥ १६९॥
काय चंचळ मासा। कामिनीकटाक्ष कायसा। लवलाहो तैसा। विजूही नाहीं॥ १७०॥
तेतुलेनि गा वेगें। स्वर्गसंसारपांगें। आगीमाजीं रिगे। क्रियांचिये॥ १७१॥
ऐसी देहीं देहावेगळा। ले तृष्णेचिया सांखळा। खटाटोपु वाहे गळां। व्यापाराचा॥ १७२॥
हें रजोगुणाचें दारुण। देहीं देहियासि बंधन। परिस आतां विंदाण। तमाचें तें॥ १७३॥

अर्थ—जीवाच्या चित्ताला रंजविणारा असल्यामुळे याला रजोगुण म्हणतात. हा रजोगुण वासनेला अखंड तरुण ठेवतो-म्हणजे तिला क्षीण होऊ देत नाही॥ १६०॥ हा थोडाहि अंत:करणात शिरला की काम-मद उत्पन्न करतो व मग जीव, वासनारूपी वाऱ्याला मिठी मारतो॥ १६१॥ अग्निकुंडाल तूप टाकून पेटलेल्या अग्नीला विद्युत अग्नीने साहाय्य मिळून तो भडकला असता त्याला थोडे-बहुत म्हणता येईल काय?॥ १६२॥ त्याप्रमाणे विषयवासना अशी खवळते की तिला दु:खासह सर्व गोड वाटू लागते व इंद्राच्या संपत्तीनेहि त्याला पुरेशी तृप्ति वाटत नाही॥ १६३॥ तशीच वासना वाढत जाऊन मेरुसारखा सुवर्णाचा पर्वत हाती आला तरी याहिपेक्षा अधिक संपत्ति प्राप्त होईल, असा दुसरा एखादा साहसी प्रयत्न करून पाहावा, असे त्याला वाटते॥ १६४॥ एक कवडी प्राप्त झाली तर तिच्यावरून आपला जीव ओवाळून टाकतो व एक गवताची काडी प्राप्त झाली तर आपल्याला धन्य समजतो॥ १६५॥ आज माझ्यापाशी असलेली संपत्ति संपल्यावर उद्या आपले कसे चालणार? असे मनात येऊन वासनेच्या स्वाधीन असलेला तो मोठ्या प्रयत्नाला लागतो॥ १६६॥ तो म्हणतो, स्वर्गात गेलो तर तेथे खायला काय मिळणार? याकरिता यज्ञ करण्याला प्रवृत्त होतो॥ १६७॥ शरीराचे शोषण करणारी अशी एकामागून एक व्रते करतो. इष्ट-म्हणजे यज्ञयागादि कर्मे व पूर्त-म्हणजे कूप तडागादि बांधणे, अशी कर्मे करतो. याप्रमाणे काम्यकर्मावाचून दुसऱ्या कर्मांना शिवत नाही॥ १६८॥ ज्याप्रमाणे ग्रीष्मऋतूचे शेवटी सुटणारा वारा सारखा वाहत असतो-क्षणभर थांबत नाही-त्याप्रमाणे जो रात्रंदिवस व्यापार करीत राहतो॥ १६९॥ रजोगुणी पुरुषाच्या चांचल्यापुढे माशाचे चंचलपण काहीच नाही अथवा स्त्रियेच्या कटाक्षाची काय मातब्बरी आहे? तसा वेग विद्युल्लतेचाहि नाही॥ १७०॥ तेवढ्या त्या वेगाने स्वर्ग व संसार याचा आश्रय करून तो कर्मरूपी अग्नीत शिरतो॥ १७१॥ अशा प्रकारे देहावेगळा असलेला जीव वासनेच्या बेडया स्वत:च घालून घेतो व नाना प्रकारच्या कर्मांचा व्याप आपल्या गळ्यात लावून घेतो॥ १७२॥ असे हे रजोगुणाचे दुर्धर बंधन देहधारी जीवाला देहाच्या ठिकाणी लागलेले आहे. आता तमोगुणाचा खेळ ऐक॥ १७३॥

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम्। प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत॥ ८॥

अर्थ—अज्ञानापासून झालेला तमोगुण सर्व जीवाच्या बुद्धीला मोह पाडणारा-म्हणजे अविवेकी करणारा आहे. तो प्रमाद-म्हणजे विचार न करता कशाचेहि धाडस करणे, आलस्य व झोप इत्यादि कर्मांनी हे अर्जुना! जीवाला बद्ध करतो॥ ८॥

व्यवहाराचेहि डोळे। मंद जेणे पडळें। मोहरात्रीचें काळें। मेहुडें जें॥ १७४॥
अज्ञानाचें जियालें। तया एका लागलें। जेणें विश्व भुललें। नाचत असे॥ १७५॥
अविवेकमहामंत्र। जें मौढ्यमद्याचें पात्र। हें असो मोहनास्त्र। जीवांसि जें॥ १७६॥
पार्था तें गा तम। रचूनि ऐसें वर्म। चौखुरी देहात्म-। मानियातें॥ १७७॥
हें एकचि कीर शरीरीं। माजों लागे चराचरीं। आणि तेथ दुसरी। गोठी नाहीं॥ १७८॥
सर्वेंद्रिया जाड्य। मनामाजीं मौढ्य। माल्हाती दार्ढ्य। आलस्याचें॥ १७९॥
आंगें आंग मोडामोडी। कार्य जातीं अनावडी। नुसती परवडी। जांभयांची॥ १८०॥
उघडियाचि दिठी। देखणें नाहीं किरीटी। नाळवितांचि उठी। वो म्हणौनि॥ १८१॥
पडलिये धोंडी। नेणे कानी मुरडी। तयाचि परी मुरकुंडी। उकलूं नेणे॥ १८२॥
पृथ्वी पाताळीं जावो। कां आकाशही वरी येवो। परी उठणें हा भावो। उपजों नेणे॥ १८३॥
उचितानुचित आघवें। झांसुरतां नाठवे जीवें। जेथींचा तेथ लोळावें। ऐसी मेधा॥ १८४॥
उभऊनि करतळें। पडिघाये कपोळें। पायाचें शिरियाळें। मांडूं लागे॥ १८५॥
आणि निद्रेविषयीं चांगु। जीवीं आथि लागु। झोंपीं जातां स्वर्गु। वावो म्हणे॥ १८६॥
ब्रह्मायु होइजे। मा निजेलियाचि असिजे। हें वांचूनि दुजें। व्यसन नाहीं॥ १८७॥
कां वाटा जातां वोघें। कल्हातांही डोळा लागे। अमृतही परी नेघे। जरी नीद आली॥ १८८॥
तेवींचि आक्रोशबळें। व्यापारे कोणे एके वेळे। निगालें तरी आंधळें। रोषें जैसें॥ १८९॥
केधवां कैसें राहाटावें। कोणेसीं काय बोलावें। हें ठाकतें कीं नागवे। हेंही नेणे॥ १९०॥
वणवा मियां आघवा। पांखेंचि पुसोनि घेयावा। पतंगु या हांवा। घाली जेवीं॥ १९१॥
तैसा वळघे साहसा। अकरणींचि धिंवसा। किंबहुना ऐसा। प्रमाद रचे॥ १९२॥
एवं निद्रालस्यप्रमादीं। तम इया त्रिविधीं। बांधे निरुपाधी। चोखटातें॥ १९३॥
जैसा वन्ही काष्ठीं भरे। तैं दिसे काष्ठाकारें। व्योम घटें आवरे। तें घटाकाश॥ १९४॥
नाना सरोवर भरलें। तैं चंद्रत्व तेथें बिंबलें। तैसें गुणाभासीं बांधलें। आत्मत्व गमे॥ १९५॥

अर्थ—तमोगुण हा व्यवहाराच्या ज्ञानालाहि पडळरोगाप्रमाणे झाकणारा आहे व जो मोहरूपी (अविवेकरूपी) अंधाऱ्या रात्रीचे काळे ढग आहे॥ १७४॥ अज्ञानापासून झालेला हा तमोगुण ज्या एका जीवाला लागला आहे, त्याच्या योगाने जीव आपल्या स्वरूपाला विसरून विषयाला मोहित झाला आहे॥ १७५॥ अविवेक हा त्याचा मुख्य मंत्र असून तमोगुण हे मूर्खपणारूपी सुरापानाचे भांडेच होय. हे असो हा तमोगुण म्हणजे जीवाला पूर्णपणे मोहून टाकणारे अस्त्रच आहे॥ १७६॥ अर्जुना! असा हा तमोगुण, या लक्षणाने प्रगट होऊन देह म्हणजेच आत्मा असे मानणाऱ्याला चहूबाजूंनी आवळतो॥ १७७॥ हा एकच तमोगुण सर्व स्थावर-जंगम शरीरामध्ये वाढला असता मग तेथे त्याच्या लक्षणाशिवाय दुसरी गोष्टच राहत नाही॥ १७८॥ सर्व इंद्रिये जड होतात, मन अत्यंत अविवेकी होते व तो सर्वस्वी आळसाच्या स्वाधीन होतो॥ १७९॥ अंगाला आळेपिळे देतो, काहीच करावेसे वाटत नाही. नुसत्या जांभया देत राहतो॥ १८०॥ अर्जुना! डोळे उघडेच असून पाहात नाही, हाक न मारताही होकार देऊन उठतो॥ १८१॥ पडलेला दगड जसा कानवडा होत नाही, त्याप्रमाणे घातलेली मुरकुंडी तो मोडत नाही॥ १८२॥ जमीन पाताळात जावो किंवा वरील आकाश तुटून पडतो तरी झोपेतून उठावे असे त्याच्या मनातच येत नाही॥ १८३॥ आळसाने स्वस्थ पडला असता योग्यायोग्य काही पाहात नाही. जेथे असतो तेथेच त्याला पडावेसे वाटते॥ १८४॥ दोन्ही हाताचे तळवे वर करून गालाला धरतो व डोक्याला पायाचे आळे करतो-म्हणजे डोके दोन्ही गुडघ्यात घालतो॥ १८५॥ आणि झोपेच्या ठिकाणी अत्यंत आसक्ति असते झोपेपुढे त्याला स्वर्गहि तुच्छ वाटतो॥ १८६॥ ब्रह्मदेवाचे आयुष्य मिळावे व निजूनच राहावे याशिवाय दुसरा नादच नाही॥ १८७॥ रस्त्याने जात असता तमोगुणाच्या ओघात आंग कलंडून

पडले तरी डोळा लागलाच राहतो निद्रा आली असता अमृत प्राप्त आले तरी ते घ्यावेसे वाटत नाही॥ १८८॥ आंधळा मनुष्य रागाच्या त्वेषात जायला निघाला असता ज्याप्रमाणे तो कोठेहि जातो, नियम नाही; त्याप्रमाणे दुसऱ्याच्या आरडाओरडीने झोपेतून उठविलेला तमोगुणी पुरुषहि एखादे वेळी कामाला प्रवृत्त झाला तरी तो काय करील याचा नियमच नसतो॥ १८९॥ केव्हा कसे वागावे, कोणाशी कसे बोलावे, तसेच हे प्राप्त होणार आहे किंवा नागविणार आहे, हे त्याला कळेनासे होते॥ १९०॥ संपूर्ण वणवा पंखाने पुसून घ्यावा ह्या अविचाराने जसा पतंग त्यात शिरतो व प्राणाला मुकतो॥ १९१॥ त्याप्रमाणे साहसी कर्मांचे तो धाडस करतो, करू नये असे कर्म करण्यातच धैर्य दाखवितो. फार काय सांगावे! असे तो प्रमादच करीत असतो॥ १९२॥ याप्रमाणे निद्रा, आळस, प्रमाद या तीन प्रकारांनी मुळात निरुपाधिक असलेल्या जीवात्म्याला तमोगुण बांधत असतो॥ १९३॥ ज्याप्रमाणे लाकडात अग्नि प्रगट झाला असता तो लाकडाएवढा दिसतो, घटात भरलेले आकाश घटाएवढे दिसते॥ १९४॥ किंवा भरलेल्या सरोवरात चंद्र प्रतिबिंबित होतो, त्याप्रमाणे आत्मा गुणांनी बांधल्यासारखा दिसतो॥ १९५॥

सत्त्वं सुखे सञ्जयति रजः कर्मणि भारत। ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे सञ्जयत्युत॥ ९ ॥
रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत। रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा॥ १०॥

अर्थ—सत्त्वगुण सुखात आसक्त करतो, रजोगुण कर्मात आसक्त करतो व तमोगुण ज्ञानाला झाकून प्रमादात आसक्त करतो॥ ९॥ केव्हा रजोगुण व तमोगुण यांना दाबून सत्त्वगुण असतो तर केव्हा सत्त्वगुण व तमोगुण यांना दाबून रजोगुण असतो. आणि केव्हा सत्त्वगुण व रजोगुण यांना दाबून तमोगुण असतो॥ १०॥

पै परिहरूनि कफवात। जैं देहीं आटोपे पित्त। तैं करी संतप्त। देह जेवीं॥ १९६॥
कां वर्ष आतप जैसें। जिणोनि शीतचि दिसे। तेव्हां होय हिंव ऐसें। आकाश हें॥ १९७॥
नाना स्वप्न जागृती। लोपूनि ये सुषुप्ति। तैं क्षणु एक चित्तवृत्ती। तेचि होय॥ १९८॥
तैसीं रजतमें हारवी। जैं सत्त्व माजु मिरवी। तैं जीवाकरवीं म्हणवी। सुखिया ना मी॥ १९९॥
तैसेंचि सत्त्व रज। लोपूनि तमाचें भोज। वळघे तैं सहज। प्रमादी होय॥ २००॥
तयाचि गा परिपाठीं। सत्त्व तमातें पोटीं। घालूनि जेव्हां उठी। रजोगुण॥ २०१॥
तेव्हा कर्मावांचूनि कांहीं। आन गोमटे नाहीं। ऐसें मानी देहीं। देहराज॥ २०२॥
त्रिगुण निरूपण। तीं श्लोकीं सांगितलें जाण। आतां सत्त्वादिवृद्धीलक्षण। सादर परिसा॥ २०३॥

अर्थ—कफवाताला दाबून पित्त वाढले असता ज्याप्रमाणे ते सर्वांगाचा दाह करते॥ १९६॥ किंवा जेव्हा ग्रीष्मकाळ व वर्षाकाळ यांना जिंकून शीतकाळ येतो, तेव्हा सर्व आकाश शीतमयच होते॥ १९७॥ किंवा जागृति, स्वप्न जाऊन सुषुप्ति अवस्था आली असता चित्त जसे तितका वेळ त्याच अवस्थेच्या रूपाचे होते॥ १९८॥ त्याप्रमाणे रजतमगुण क्षीण होऊन जेव्हा सत्त्वगुण वाढतो, तेव्हा तो जीवाकडून ''मी एक सुखी'' असा अभिमान घेववितो॥ १९९॥ त्याचप्रमाणे सत्व व रज हे दोन गुण क्षीण होऊन तमोगुण फोफावला असता सहजच मनुष्यप्राणी प्रमाद करू लागतो॥ २००॥ या रीतीने सत्व, तम हे दोन गुण पोटात घालून जेव्हा रजोगुण वाढतो॥ २०१॥ तेव्हा या देहामध्ये असलेल्या जीवाला कर्म करण्यावाचून दूसरे काही बरे वाटत नाही॥ २०२॥ याप्रमाणे मागे तीन श्लोकांनी सत्व, रज, तम या तीन गुणांची लक्षणे सांगितली. आता सत्त्वादि गुण वृद्धि पावले असता कोणती लक्षणे होतात, ते सांगतो, लक्ष देऊन ऐका॥ २०३॥

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते। ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत॥ ११॥
लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा। रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ॥ १२॥
अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च। तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन॥ १३॥
यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत्। तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते॥ १४॥
रजसि प्रलयं गत्वा कर्मसङ्गिषु जायते। तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते॥ १५॥

अर्थ—या देहामध्ये असलेल्या सर्व इंद्रियाच्या द्वारातून विवेकज्ञान प्रगट होऊ लागले असता-म्हणजे सर्व इंद्रिये विवेकज्ञानपूर्वक व्यापार करू लागली असता सत्त्वगुणाची वृद्धि झाली, असे जाणावे ॥ ११ ॥ रजोगुण वाढला असता परद्रव्याचा अभिलाष, शरीर व इंद्रिये यांची कर्म करण्याकडे प्रवृत्ति, कर्माची सुरुवात, चित्तांत अशांति असणे (म्हणजे राग, द्वेष इत्यादि विकारापैकी काहीतरी विकार चित्तात राहणे) व वस्तूच्या प्राप्तीची प्रबल इच्छा ही लक्षणे होतात ॥ १२ ॥ तमोगुण वाढला असता अविचार, कर्म करण्यास आळस, प्रमाद, अविवेक अशी लक्षणे होतात ॥ १३ ॥ सत्वगुण वाढला असतांना जेव्हा जीव मरतो तेव्हा तो स्वर्गादि पुण्यलोकात जातो ॥ १४ ॥ तसेच रजोगुण वाढला असतांना जीव मरण पावला तर तो कर्मासक्त अशा मनुष्यलोकात जन्म घेतो. त्याचप्रमाणे तमोगुण वाढला असता असता मरणाऱ्यास पशु, पक्षी, कृमी इत्यादि मूढयोनीत जन्म येतो. ॥ १५ ॥

पैं रजतमविजयें। सत्त्व गा देहीं इये। वाढतां चिन्हें तियें। ऐसीं होती ॥ २०४ ॥
जे प्रज्ञा आंतुलीकडे। न समाती बाहेरी वोसंडे। वसंतीं पद्मखंडें। दूती जैसी ॥ २०५ ॥
सर्वेंद्रियांचां आंगणीं। विवेक करी राबणी। साचचि करचरणीं। होती डोळे ॥ २०६ ॥
राजहंसापुढें। चांचूचें आगरडें। तोडी जेवीं झगडे। क्षीरनीराचे ॥ २०७ ॥
तेवीं दोषादोषविवेकीं। इंद्रियेंचि होती पारखीं। नियम बारे पायिकी। वोळगे तैं ॥ २०८ ॥
नाइकणें तें कानचि वाळी। न पाहाणें तें दिठीचि गाळी। अवाच्य तें टाळी। जीभचि गा ॥ २०९ ॥
वातीपुढे जैसें। पळों लागे काळवसें। निषिद्ध इंद्रियां तैसें। समोर नोहे ॥ २१० ॥
धाराधरकाळे। महानदी उचंबळें। तैसी बुद्धि पघळे। शास्त्रजातीं ॥ २११ ॥
अगा पुनवेचां दिवशीं। चंद्रप्रभा धांवे आकाशीं। ज्ञानीं वृत्ति तैसी। फांके सैंघ ॥ २१२ ॥
वासना एकवटे। प्रवृत्ति वोहटे। मानस विटे। विषयांवरी ॥ २१३ ॥

अर्थ—अर्जुना! रज, तम या गुणांना जिंकून सत्त्वगुण वाढला असता देहाच्या ठिकाणी अशी चिन्हे दिसतात ॥ २०४ ॥ ज्याप्रमाणे वसंत ऋतुत कमलफुलातील सुगंध आत न सामावल्यामुळे बाहेर फाकतो, त्याप्रमाणे जीवाच्या बुद्धीतील सात्त्विकज्ञान आत न सामावल्यामुळे इंद्रियांचे द्वारा बाहेरहि फाकते ॥ २०५ ॥ सर्व ज्ञानेंद्रियांच्या ठिकाणी विवेक राहाटी करतो-म्हणजे सर्व ज्ञानेद्रियांचे व्यापार विवेकपूर्वक होतात. खरोखर हात-पाय यांच्या ठिकाणी देखील डोळे येतात-म्हणजे कर्मेद्रियाचे व्यापारही विवेकाने होतात ॥ २०६ ॥ ज्याप्रमाणे राजहंसापुढे दूध व पाणी यांचे मिश्रण आले असता जसे त्याच्या चोचीच्या योगाने दूध व पाणी अलग होते ॥ २०७ ॥ त्याप्रमाणे हे दोषावह की निर्दोष हे इंद्रियांना आपोआप कळू लागते. यम-नियम हे सात्त्विक पुरुषाची सेवकाप्रमाणे सेवा करू लागतात ॥ २०८ ॥ जे ऐकू नये ते कानच आपण ऐकायचे टाळतात. पाहू नये ते दृष्टिच आपण पाहत नाही. जे बोलू नये ते जीभच बोलण्याचे टाकून देते ॥ २०९ ॥ उजळलेल्या दिव्यापुढे ज्याप्रमाणे आंधार राहात नाही, त्याप्रमाणे इंद्रियाकडून निषिद्धाचरण होतच नाही ॥ २१० ॥ ज्याप्रमाणे पावसाळ्यात महानदी पुरामुळे उचंबळून येते. त्याप्रमाणे सत्त्वगुण वाढला असता बुद्धीला सर्व शास्त्राचे ज्ञान होते ॥ २११ ॥ अर्जुना! पौर्णिमेच्या दिवशी पूर्ण चंद्र झाला असता त्याचा प्रकाश सर्व आकाशभर पसरतो त्याप्रमाणे सत्त्वगुण वाढला असता बुद्धीचे ज्ञान सर्वत्र पसरते ॥ २१२ ॥ नाना विषयाच्या ठिकाणी फाकलेली वासना एका परब्रह्मप्राप्तीचे ठिकाणी एकवटते-म्हणजे विषयप्राप्तीची वासना नाहीशी होऊन एक परमेश्वरप्राप्तीचीच वासना राहते-विषयसुख प्राप्तीचा प्रयत्न क्षीण होतो व मनालाच विषयभोगाचा कंटाळा वाटतो ॥ २१३ ॥

गूढार्थदीपिका—ज्या पुरुषाच्या ठिकाणी सत्त्वगुणाची वृद्धि झाली आहे, त्या पुरुषाला ''ऊहः शब्दोऽध्ययनं दुःखविघातास्त्रयः सुहृत्प्राप्तिः'' (सां० का० श्लो० ५१) ऊह म्हणजे विशेष अशी सूक्ष्म विचारशक्ति, शब्द म्हणजे शब्दव्युत्पत्ति, अध्ययन म्हणजे शास्त्रप्रवेश, आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा तिन्ही दुःखाचा नाश व आत्मकल्याण साधून देणाऱ्या सत्पुरुषाची प्राप्ति, अशा सिद्धी प्राप्त होतात असे सांख्यकारिकेतील ५१ व्या श्लोकात

म्हटले असून ''अध्यवसायो बुद्धिर्धर्मो ज्ञान विराग ऐश्वर्यम्। सात्विकमेतद्रूपम्'' यथार्थ निश्चय होणे, धर्म समजणे, आत्मज्ञान होणे, वैराग्य होणे, ऐश्वर्य प्राप्त होणे इत्यादि अशी सात्त्विकबुद्धीची रूपे आहेत असेहि तेथेच २३ व्या श्लोकाने सांगितले आहे.

एवं सत्त्व वाढे। तैं हें चिन्ह फुडें। आणि निधनही घडे। तेव्हांचि जरी॥ २१४॥
कां पाहालेनि सुयाणें। जालिया परगुणें। पढियंतें ये पाहुणें। स्वर्गोनि ये॥ २१५॥
तरी जैसीच घरींची संपत्ती। आणि तैंसीच औदार्यधैर्यवृत्ती। मा परत्रा आणि कीर्ती। कां नोहावें॥ २१६॥
मग गोमटेया तया। जावळी असे धनंजया। तेवीं सत्त्वीं जाणे देहा। कें आथि गा॥ २१७॥
जे स्वगुणीं उद्धट। घेऊनि सत्त्व चोखट। निगे सांडूनि कोपट। भोगक्षम हें॥ २१८॥
अवचटें ऐसा जो जाये। तो सत्त्वाचाचि नवा होये। किंबहुना जन्म लाहे। ज्ञानियांमाजीं॥ २१९॥
सांग पां धनुर्धरा। रावो रायपणें डोंगरा। गेलिया अपुरा। होय काई॥ २२०॥
नातरी येथिंचा दिवा। नेलिया सेजिया गांवा। तो तेथें तरी पांडवा। दीपचि कीं॥ २२१॥
तैसी ते सत्त्वशुद्धी। आगळी ज्ञानेंसी वृद्धी। तरंगावों लागे बुद्धी। विवेकावरी॥ २२२॥
पैं महदादि परिपाटी। विचारूनि शेवटीं। विचारासकट पोटीं। जिरोनि जाय॥ २२३॥
छत्तिसां सदतिसावें। चोविसां पंचविसावें। तिन्ही नुरोनि स्वभावें। चतुर्थ जें॥ २२४॥
ऐसें सर्व जें सर्वोत्तम। जालें असे जया सुगम। तयासवें निरुपम। लाहे देह॥ २२५॥

अर्थ—याप्रमाणे सत्त्वगुणाची वृद्धि झाली असता ही लक्षणे होतात. अशा सत्त्वगुणाच्या वृद्धीतच जर मरण आले॥ २१४॥ तर ज्याप्रमाणे सर्व धान्यादिकांची विपुल समृद्धि असून मेजवानीचा प्रसंग असावा व तेव्हाच स्वर्गातून प्रिय पाहुणा यावा॥ २१५॥ किंवा आपल्या घरी विपुल संपत्ति असून त्याबरोबर सढळ हाताने दान देण्याची प्रवृत्ति व धैर्य असावे, तर इहलोकात त्याची कीर्ति व परलोकात त्याला सुख का प्राप्त होणार नाही?॥ २१६॥ अर्जुना! मग त्याच्या त्या उत्तम गतीला उपमा देण्याला दुसरे काही आहे काय? त्याप्रमाणे सत्त्वगुणाची वृद्धि होऊन मरण आले असता सत्त्वाला सोडून त्याचा देह कोठे जाणार?॥ २१७॥ आपल्या स्वभावगुणकर्मानुसार विहित केलेल्या धर्माचे अत्यंत एकनिष्ठपणे आचरण करून संपादन केलेला सत्त्वगुणाचा उत्कर्ष घेऊन जो विषयाचा भोग घेण्यास समर्थ असलेल्या या देहरूपी खोपडीतून बाहेर पडतो.॥ २१८॥ अशा रीतीने जो अकस्मात देह सोडून जातो तो सत्त्वगुणी राहून नवा देह प्राप्त करून घेतो. फार काय सांगावे! तो ज्ञानी पुरुषाच्या कुळातच जन्म घेतो॥ २१९॥ हे अर्जुना! राजा, राजाप्रमाणे डोंगरावर गेला म्हणून त्याला कमीपणा येतो काय? सांग बरे!॥ २२०॥ किंवा अर्जुना! येथील दिवा जवळच्या गावात नेला असता तेथेहि तो दिवाच असतो की नाही?॥ २२१॥ त्याप्रमाणे सत्त्वगुणाच्या वृद्धीने ज्ञानाची विशेषच वृद्धि होत असते व बुद्धि आत्मानात्मविवेकावर तरंगू लागते-म्हणजे आत्मानात्मविवेकच करीत राहते॥ २२२॥ ही बुद्धि महदादि तत्त्वाचा क्रमाने विचार करून शेवटी विचारासकट तेथल्या तेथे नाहीशी होते॥ २२३॥ छत्तीस किंवा सदतीस अथवा चोवीस किंवा पंचवीस अशी निरनिराळ्या शास्त्रकारांनी मानलेली तत्त्वे व तीन देह हे सर्व नाहीसे होऊन चवथा जो महाकारण देह किंवा तुर्यावस्था तीच एक उरते॥ २२४॥ महाकारणरूप किंवा तुर्यावस्थारूप असे जे सर्वोत्तम ब्रह्म ते त्याला सुलभ प्राप्त होऊन त्याबरोबरच अनुपम अशा देहाचीहि प्राप्ति होते॥ २२५॥

गूढार्थदीपिका—''**सत्त्वयुक्तं यथा चित्तं शब्दब्रह्मार्थ दर्शनम्**'' (भाग १०-२०-४३) सत्त्वगुण हा परब्रह्माचे दर्शन करून देणारा आहे, असे भागवतातहि म्हटले आहे.

इयाचि परी देख। तमसत्त्व अधोमुख। बैसोनि जैं आगळीक। धरी रज॥ २२६॥
आपलिया कार्याचा। धुमाड गांवीं देहाचा। माजवी तैं चिन्हांचा। उदयो ऐसा॥ २२७॥
पांजरली वाहटुळी। करी वेगळ वेंटाळी। तैसी विषयीं सरळी। इंद्रियां होय॥ २२८॥

परदारादि पडे। परी विरुद्ध ऐसें नावडे। मग शेळियेचेनि तोंडें। सैंघ चारी॥ २२९॥
हा ठायवरी लोभु। करी स्वैरत्वाचा राबु। वेंटाळितां अलाभु। तें तें उरे॥ २३०॥
आणि आड पडलिया। उद्यमजातां भलतेया। प्रवृत्ति धनंजया। हातु न काढी॥ २३१॥
तेवींचि एकादा प्रासादु। कां करावा अश्वमेधु। ऐसा अचाट छंदु। घेऊनि उठी॥ २३२॥
नगरेंचि रचावीं। जळाशयें निर्मावीं। महावनें लावावीं। नानाविधें॥ २३३॥
ऐसैसां अफाटीं कर्मी। समारंभु उपक्रमी। आणि दृष्टादृष्ट कामीं। पुरे न म्हणे॥ २३४॥
सागरही सांडीं पडे। आगी न लाहे तीन कवडे। ऐसें अभिलाषीं जोडे। दुर्भरत्व॥ २३५॥
स्पृहा मना पुढां पुढां। आशेचा घे दवडा। विश्व घापे चाडा। पायांतळीं॥ २३६॥
इत्यादि वाढतां रजीं। इयें चिन्हें होती साजीं। आणि ऐशा समाजीं। वेंचे जरी देह॥ २३७॥
तरी आघवाचि इहीं। परिवारला आनीं देहीं। रिगे परि योनीही। मानुषीचि॥ २३८॥
सुरवाडेंसिं भिकारी। वसो पां राजमंदिरीं। तरी काय अवधारीं। रावो होईल॥ २३९॥
बैल तेथें करबाडें। हें न चुके गा फुडें। नेइजो कां व्हाडें। समर्थाचेनी॥ २४०॥
म्हणौनि व्यापाराच्याहातीं। उसंतु देहा ना राती। तैसयांचिये पांती। जुंपिजे तो॥ २४१॥
कर्मजडाचां ठायीं। किंबहुना होय देहीं। जो रजोवृद्धीच्या डोहीं। बुडोनि निमे॥ २४२॥

अर्थ—त्याचप्रमाणे जेव्हा सत्त्वगुण व तमोगुण हे क्षीण होऊन रजोगुण विशेष वाढतो आणि देहरूपी गावात आपल्या कर्माचा धुमाकूळ माजवितो, तेव्हा ही पुढील चिन्हे प्रगट होतात॥ २२६-२२७॥ ज्याप्रमाणे सुटलेली वाहटूळ पसरली असता ती वेगवेगळ्या पदार्थाना वेटाळून एकत्र करते, त्याप्रमाणे रजोगुणाची वृद्धि झाली असता इंद्रिये विषयांच्या ठिकाणी स्वैर वागतात॥ २२८॥ परस्त्री दृष्टीस पडली असता तिच्याकडे पाहणे किंवा तिचा भोग घेणे हे पाप आहे असे वाटत नाही व मग शेळीच्या तोंडाप्रमाणे इंद्रियांना स्वैर चरू देतो॥ २२९॥ त्या रजोगुणी पुरुषाचा लोभ एथपर्यंत वाढतो की तो स्वैरपणे वागत असताना जो पदार्थ त्याला लाभणार नाही, तेवढाच त्याच्या हातून सुटतो॥ २३०॥ अर्जुना! कोणताहि बरा-वाईट उद्योग करण्याचा प्रसंग समोर आला असता तो प्रवृत्तिपासून माघार घेत नाही-म्हणजे कर्म केल्यावाचून राहत नाही॥ २३१॥ त्याचप्रमाणे एखाद्या मोठा राजवाडा बांधावा किंवा अश्वमेघ यज्ञ करावा अशा अवाढव्य उद्योगाच्या पाठीमागे लागतो॥ २३२॥ शहरे वसवावी, विहिरी-तळी बांधावी व नाना प्रकारच्या अरण्याची लावणी करावी॥ २३३॥ अशा अशा अचाट कामाला तो प्रारंभ करतो व दृष्ट-म्हणजे इहलोकात कीर्ति वगैरे मिळणारी व अदृष्ट-म्हणजे मेल्यावर स्वर्गादिकांची प्राप्ति करून देणारी-कर्मे करतांना त्याला पुरेसे वाटत नाही॥ २३४॥ समुद्रात कितीहि पाण्याची भर होत राहीली तरी तो पूर्ण भरला जात नाही असा दुर्भर आहे, तोहि एकदाचा पूर्ण भरून वाहू लागेल, अग्नीत कितीहि इंधन टाकले तरी तो तृप्त होत नाही, तो अधिकच पेट घेतो असा तो दुर्धर आहे. तोहि एकदाचा तृप्त होईल, पण रजोगुणी पुरुषाचा अभिलाष कधी शांत होत नाही॥ २३५॥ त्या रजोगुणी पुरुषाची इच्छा मनाच्या पुढेच आशेची धाव घेते व त्या आशेने तो संपूर्ण जगत् पालथे घालतो॥ २३६॥ याप्रमाणे रजोगुणाची वृद्धि झाली असता ही लक्षणे व्यक्त होतात आणि अशा रजोगुणाच्या वृद्धीतच तो जर मरण पावला॥ २३७॥ तर या रजोगुण व रजोगुणाच्या लक्षणासह मनुष्ययोनीतच त्याला दुसरा देह प्राप्त होतो॥ २३८॥ पहा! भिकारीमनुष्य राजवाड्यात चांगले भोग भोगीत सुखाने राहिला तरी तो राजा होईल काय?॥ २३९॥ बैल, श्रीमंताच्या लग्नास व्हाडाबरोबर गेले तरी त्यांच्या कपाळाचा कडबा चुकत नाही॥ २४०॥ ज्या रजोगुणी पुरुषाच्या देहाच्या व्यापाररूप हाताला दिवस-रात्र विश्रांति नसते अशांच्या पंक्तीत ते जाऊन बसतात॥ २४१॥ रजोगुणाच्या, वाढलेल्या स्थितीत ज्यांना मृत्यु येतो ते जड अशा कर्ममार्गाच्या ठिकाणी विश्वास ठेवणाऱ्या मूढबुद्धि लोकांच्या कुळात देह धारण करतात॥ २४२॥

मग तैसाचि पुढती। रजसत्त्ववृत्ती। गिळूनि ये उन्नती। तमोगुण॥ २४३॥

तैंचि जियें लिंगें। देहींचीं सबाह्य सांगें। तियें परिस चांगे। श्रोत्रबळें॥ २४४॥
तरी होय ऐसें मन। जैसें रविचंद्रहीन। रात्रींचें का गगन। अंवसेचिये॥ २४५॥
तैसें अंतर असोस। होय स्फूर्तिहीन उद्वस। विचाराची भाष। हारपे तैं॥ २४६॥
बुद्धि मेचवेना धोंडी। हा ठायवरी मवाळें सांडी। आठवो देशधडी। जाला दिसे॥ २४७॥
अविवेकाचेनि माजें। सबाह्य शरीर गाजे। एकलेनि घेपे दीजे। मौढ्यें तेथ॥ २४८॥
आचारभंगाची हाडें। रूपती इंद्रियापुढें। मरे जरी तेणेंकडे। क्रिया जाय॥ २४९॥
पाहीं आणिकही एक दिसे। जे दुष्कृतीं चित्त उल्हासे। आंधारी देखणें जैसें। डुडुळाचें॥ २५०॥
तैसें निषिद्धाचेनि नांवें। भलतेही भरे हांवे। तियेविषयीं धांवें। घेती करणें॥ २५१॥
मदिरा न घेतां डुले। सन्निपातेंवीण बरळे। निष्प्रेमेंचि भुले। पिसें जैसें॥ २५२॥
चित्त तरी गेलें आहे। परी उन्मनी ते नोहे। ऐसें माल्हातिजे मोहें। माजिरेनि॥ २५३॥
किंबहुना ऐसैसीं। इयें चिन्हें तम पोषी। जैं वाढे आयितीसी। आपुलिया॥ २५४॥

अर्थ—मग पुढे त्याचप्रमाणे रजोगुण व सत्त्वगुण क्षीण करून जेव्हा तमोगुणाचा उत्कर्ष होतो॥ २४३॥ तेव्हा देहाच्या ठिकाणी आत व बाहेर जी चिन्हे उमटतात, ती सांगतो, लक्ष देऊन ऐक॥ २४४॥ ज्याप्रमाणे अमावस्येच्या रात्री आकाश सूर्यचंद्रावाचून गडद अंध:कारमय असते असे हे मन ज्ञानहीन होते॥ २४५॥ त्याप्रमाणे अंत:करण अत्यंत जाणीवरहित शून्यमय होते व तेथे विचाराची भाषाच राहत नाही॥ २४६॥ दगड पासंगासहि पुरणार नाही इतका त्या बुद्धीचा कोमलपणा नाहीसा झालेला असतो-म्हणजे बुद्धि अत्यंत कठोर होते. स्मृति नि:शेष नाहीशी होते॥ २४७॥ संपूर्ण शरीराच्या आत-बाहेर अविवेकच माजला असतो आणि तेथे नुसत्या केवळ मूर्खपणानेच देण्याघेण्याचा व्यवहार होतो॥ २४८॥ शास्त्रविहित आचारांचा भंग, हीच कोणी हाडे, कर्मेंद्रियापुढे रोविली असतात-म्हणजे कर्मेंद्रियाकडून निषिद्धाचरणच होते आणि तो मेला तरी त्याची क्रिया तमोगुणाकडेच जाते-म्हणजे निषिद्धच होते॥ २४९॥ ज्याप्रमाणे घुबडाला अंधारातच दिसते, त्याप्रमाणे तमोगुणी पुरुषाची आणखी एक गोष्ट अशी असते की, त्याला वाईट किंवा निषिद्ध कर्म करण्यातच उल्हास वाटतो॥ २५०॥ निषिद्धाचरणाच्या नावाने व काहीहि करण्याच्या इच्छेने तो भारून जातो व त्याची इंद्रिये तसेच करण्याला धावतात॥ २५१॥ ज्याप्रमाणे वेडा झालेला मनुष्य मद्य न पिता देखील झिंगतो, सन्निपात न होतांनाहि बरळतो व भगवत्प्रेमावाचून देहाला विसरतो॥ २५२॥ त्याप्रमाणे तमोगुणी पुरुषाचे चित्त अज्ञानांत लीन झाले असते; पण ती उन्मनी अवस्था नव्हे. असा माजलेल्या मोहाने तो ग्रासला जातो॥ २५३॥ फार काय सांगावे! याप्रमाणे जेव्हा तमोगुण आपल्या सर्व सामुग्रीसह वाढतो, तेव्हा ही लक्षणे होतात॥ २५४॥

आणि हेंचि होय प्रसंगें। मरणाचें जरी पडे खागें। तरी तेतुलेनि रिगे। तमेंसीं तो॥ २५५॥
राई राईपण बीजीं। सांठवूनियां अंग त्यजी। मग विरूढे तैं दुजी। गोठी आहे गा॥ २५६॥
पैं होऊनि दीपकलिका। येरु आगी विझो कां। जेथ लागे तेथ असका। तोचि आहे॥ २५७॥
म्हणोनि तमाचिये लोथे। बांधोनियां संकल्पातें। देह जाय तैं मागुतें। तमाचेंचि होय॥ २५८॥
आतां काय येणें बव्हें। जो तमोवृद्धि मृत्यु लाहे। तो पशु कां पक्षी होये। झाड कां कृमी॥ २५९॥

अर्थ—आणि वाढलेल्या तमोगुणाच्या प्रसंगानेच मरण प्राप्त झाले तर तो मनुष्य त्या वाढलेल्या तमोगुणासह देह सोडून जातो॥ २५५॥ मोहरी मोहरीपणानेच बीजरूपात साठविली जाते व ती पेरली असता पुन: बीजरूपात साठविलेल्या मोहरीहून निराळ्या रीतीने उगवते काय?॥ २५६॥ दिव्याच्या रूपाने प्रगट झाल्यावर अग्नि विझला तरी जेथे जेथे ती दिव्याची ज्योति लागेल तेथे तेथे अग्निच असतो॥ २५७॥ त्याचप्रमाणे सर्व सामग्रीसह वाढलेल्या तमोगुणाच्या गाठोडीत संकल्पाला बांधून जो देह सोडून जातो, तो पुन: पुढे तमोगुणी योनीतच जन्म घेतो॥ २५८॥ आता बहु बोलून काय करायचे! ज्याला वाढलेल्या तमोगुणाच्या स्थितीतच मृत्यु येतो, त्याला पशु, पक्षी, झाड किंवा कृमि अशा योनीतच जन्म येतो.॥ २५९॥

गूढार्थदीपिका—"य इह कपूयचरणा अभ्याशो ह यत्ते कपूयां योनिमापद्येरञ्श्वयोनि वा सूकरयोनि वा चण्डालयोनि वा" (छां० उ०-५-१०-७) जो पाप कर्म करतो त्याला कुत्रा, डुक्कर किंवा चांडाल अशा योनि प्राप्त होतात असे श्रुतीनेहि सांगितले आहे.

जीव हा उत्क्रांतच आहे; म्हणून मनुष्य खालच्या योनीत जातच नाही असा हा पाश्चात्यांचा उत्क्रांतिवाद, पापाचरणाने प्राप्त होणाऱ्या दु:खाची भीति नाहीशी करून स्वैर वर्तनाला पोषक असल्यामुळे बुद्धीला न पटणारा असा वेडगळपणाचा आहे. मनुष्य सदाचरणादिकांनी आपल्या परम अशा अनादि व पूर्ण परब्रह्मस्थितिला प्राप्त होतो व अधर्माचरणाने खालच्या पशुपक्ष्यादि योनीत जातो, हा श्री ज्ञानेश्वर माउलीनी सांगितलेला वैदिक सिद्धान्तच बौद्धिक असून समाजकल्याणकारक आहे.

कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम्। रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम्॥ १६॥

अर्थ—शास्त्रविहित सात्विक अशा पुण्यकर्माचरणाचे निर्मल सात्विक फल मिळते. दु:खप्राप्ति हे राजकर्माचे फल आहे. तमोगुणी कर्माचे अज्ञान किंवा अविवेक हे फळ होय॥ १६॥

येणेंचि पैं कारणें। जें निपजे सत्त्वगुणें। तें सुकृत ऐसें म्हणे। श्रौतसमो॥ २६०॥
म्हणौनि तया निर्मळा। सुखज्ञानी सरळा। अपूर्व ये फळा। सात्त्विक तें॥ २६१॥
मग राजसा जिया क्रिया। तया इंद्रावणी पिकलिया। जे सुखें चितारूनियां। फळतीं दुःखें॥ २६२॥
कां निंबोळियेचें पिक। वरि गोड आंत विख। तैसें तें राजस देख। क्रियाफळ॥ २६३॥
तामस कर्म जितुकें। अज्ञान फळेंचि पिके। विषांकुर विखें। जियापरी॥ २६४॥

अर्थ—या कारणास्तवच जे सत्वगुणाने कर्म केले जाते, ते पुण्यकर्म होय, असे वेदांनी सांगितले आहे॥ २६०॥ म्हणूनच अशा त्या सात्विक कर्म करणाऱ्या निर्मळ चित्ताच्या पुरुषाला ते सात्त्विक कर्म श्रेष्ठ दर्जाचे सुख व ज्ञान असे फळ देते॥ २६१॥ ज्याप्रमाणे इंद्रावणीची फळे वरून दिसायला अति सुंदर असतात, पण आत कडु असतात, त्याप्रमाणे मग ज्या रजोगुणी क्रिया आहेत त्या बाहेरून सुखाने रंगविलेल्या असून त्याचे दु:खरूपच फळ मिळते-प्राप्त होते॥ २६२॥ किंवा ज्याप्रमाणे कडूनिंबाच्या निंबोळ्या दिसायला सुंदर असल्या तरी आंत विषाप्रमाणे कडु असतात, त्याप्रमाणेच रजोगुणी कर्माचे दु:खरूपच फळ मिळते॥ २६३॥ ज्याप्रमाणे विष पेरले असता त्याला विषाचाच अंकुर येतो, त्याप्रमाणे सर्व तमोगुणी कर्माचे अज्ञान हेच फळ मिळते॥ २६४॥

सत्त्वात्सञ्जायते ज्ञानं रजसो लोभ एव च। प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च॥ १७॥

अर्थ—सत्त्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होते, रजोगुणापासून लोभ उत्पन्न होतो व तमोगुणापासून प्रमाद, मोह-म्हणजे अविवेक, उत्पन्न होतात व अज्ञानही उत्पन्न होते.॥ १७॥

म्हणौनि बा रे अर्जुना। येथ सत्त्वचि हेतु ज्ञाना। जैसा कां दिनमाना। सूर्य हा पैं॥ २६५॥
आणि तैसेंचि हें जाण। लोभासि रज कारण। आपलें विस्मरण। द्वैता जेवीं॥ २६६॥
मोह अज्ञान प्रमादा। ययां मैळेंया दोषवृंदा। पुढती पुढती प्रबुद्धा। तमचि मूळ॥ २६७॥
ऐसें विचाराच्या डोळां। तिन्ही गुण हे वेगवेगळां। दाविले जैसा आंवळा। तळहातींचा॥ २६८॥
तंव रजतमें दोन्हीं। देखिलीं प्रौढ पतनीं। सत्त्वावांचूनि नाणी। ज्ञानाकडे॥ २६९॥
म्हणौनि सात्त्विका वृत्ती। एक जाले गा जन्मव्रती। सर्वत्यागें चतुर्थी। भक्ति जैसी॥ २७०॥

अर्थ—म्हणून बाबा अर्जुना! ज्याप्रमाणे दिवसाला सूर्य हा कारण आहे, त्याप्रमाणे ज्ञान उत्पन्न होण्याला सत्वगुणच कारण आहे॥ २६५॥ ज्याप्रमाणे आपल्या अद्वैतस्वरूपाची विस्मृति ही द्वैतभाव उत्पन्न होण्याला कारण आहे, त्याप्रमाणे लोभ उत्पन्न होण्याला रजोगुण कारण आहे॥ २६६॥ मोह, अज्ञान, प्रमाद या काळ्याकुट्ट दोष समुदायाला, अर्जुना! तमोगुण हाच वारंवार कारण होतो॥ २६७॥ तळहातावर ठेवलेला आवळा जसा स्पष्ट दिसतो, त्याप्रमाणे सत्त्व, रज, तम हे तिन्ही गुण विचारदृष्टीने स्पष्ट वेगवेगळे करून तुला सांगितले आहेत.॥ २६८॥ त्यात

रज व तम हे दोन गुण मनुष्याच्या पतनाला मुख्यत: कारण असून सत्वगुणावाचून आत्मज्ञानाकडे प्रवृत्ति होत नाही॥ २६९ ॥ म्हणून ज्याप्रमाणे सर्व मार्ग सोडून देऊन एका चौथ्या भक्तीचाच आश्रय करावा, त्याप्रमाणे ज्यांनी जन्मभर सत्त्वगुणी राहण्याचेच व्रत स्वीकारले॥ २७० ॥

ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः। जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः॥ १८॥

अर्थ—सत्वगुणी पुरुष वर स्वर्गलोकात जातात, रजोगुणी पुरुष मृत्युलोकात वारंवार जन्म घेतात व निषिद्ध आचरण करणारे तमोगुणी पुरुष खालच्या पश्वादि अधम योनीत जातात॥ १८ ॥

तैसें सत्त्वाचेनि नटनाचें। असणें जाणें जयांचें। ते तनुत्यागीं स्वर्गींचे। राय होती॥ २७१॥
इयाचि परी रजें। जिहीं कां जीजे मरिजे। तिहीं मनुष्य होइजे। मृत्युलोकीं॥ २७२॥
तेथ सुखदुःखाचें खिचटें। जेविजे एकेचि ताटें। जेथ इये मरणवाटे। पडिलें नुठी॥ २७३॥
आणि तयाचि स्थिति तमीं। जे वाढोनि निमती भोगक्षमीं। ते घेती नरकभूमी। मूळपत्र॥ २७४॥
एवं वस्तूचिया सत्ता। त्रिगुणासी पांडुसुता। दाविली सकारणता। आघवीचि॥ २७५॥
पैं वस्तु वस्तुत्वें असिकें। तें आपणपें गुणासारिखें। देखोनि कार्यविशेखें। अनुकरे गा॥ २७६॥
जैसें कां स्वप्नींचेनि राजें। जै परचक्र देखिजे। तैं हारी जैत होइजे। आपणचि॥ २७७॥
तैसे मध्योर्ध्वअध। हे जे गुणवृत्तिभेद। ते दृष्टीवांचूनि शुद्ध। वस्तुचि असे॥ २७८॥

अर्थ—त्याचप्रमाणे शास्त्रविहित सात्त्विककर्माचे आचरण जन्मभर करीत राहून शेवटी त्यातच ज्याचा मृत्यु झाला ते सद्‌गुणी पुरुष देह सोडल्यावर स्वर्गाच्या राज्यपदी बसतात॥ २७१ ॥ याचप्रमाणे जे रजोगुणी कर्माचे जन्मभर आचरण करतात व त्यातच मरतात, ते मृत्युलोकात मनुष्य जन्माला येतात॥ २७२ ॥ जेथे मरणाचीच वाट आहे, अशा मनुष्यलोकात ते एकदा पडले की तेथून ते उठत नाहीत-म्हणजे रजोगुणी मनुष्य वारंवार जन्म घेतो व मरतो-तेथे मग एकाच ताटात सुखदु:खाची खिचडी खातात-म्हणजे एकाच देहाने सुख व दु:खहि भोगीत असतात॥ २७३ ॥ या स्थितिप्रमाणे जे तमोगुण वाढवून तमोगुणी भोग भोगतात व त्याचेच संरक्षण करतात, ते नरकभूमि असा जो यम लोक तेथे जाण्याची सनद मिळवितात. ॥ २७४॥ याप्रमाणे परब्रह्माच्या सत्तेमुळे सत्त्व, रज, तम या तिन्ही गुणांनाच सर्व सृष्टीचे कारणत्व आहे, हे तुला दाखविले. ॥ २७५ ॥ परंतु परब्रह्मवस्तु आपल्या मूळस्वरूपाने अखंड जशीच्या तशीच आहे; पण ती आपल्याला गुणासारखी झालेली पाहून कार्यविशेषानुसार होते. ॥ २७६ ॥ ज्याप्रमाणे स्वप्नामध्ये झालेला राजा परचक्र आलेले पाहतो व आपणच हारतो किंवा जिंकतो॥ २७७ ॥ त्याप्रमाणे मनुष्ययोनि, देवयोनि व अधमयोनि इत्यादि सर्व गुणाचेच प्रकार आहेत, वास्तविक पाहता भ्रांत अशा भेददृष्टिवाचून एक सर्व परब्रह्मच आहे॥ २७८ ॥

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति । गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति॥ १९॥

अर्थ—जेव्हा गुणावाचून सृष्टीचा उत्पन्नकर्ता दुसरा कोणी नाही असे जीव पाहतो व गुणाच्या पलीकडे असलेल्या आपल्या स्वरूपाला जाणतो तेव्हा तो ज्ञानी माझ्याशी ऐक्यस्वरूप पावतो॥ १९ ॥

परी हे वाहणी असो। तरी तुज आन न दिसो। परिसें तें सांगतसों। मागील गोष्टी॥ २७९॥
तरी ऐंसें निजनिजे। सामर्थ्यें तिन्ही सहजें। होती देहव्याजें। गुणचि हे॥ २८०॥
इंधनाचेनि आकारें। अग्नि जैसा अवतरे। कां आघवेनि तरुवरें। भूमिरस॥ २८१॥
नाना दहियाचेनि मिसें। परिणमे दूधचि जैसें। कां मूर्त होय ऊंसें। गोडी जेवीं॥ २८२॥
तैसें हें सांतःकरण। देहचि होती त्रिगुण। म्हणोनि बंधासि कारण। घडे कीर॥ २८३॥
परी चोज हें धनुर्धरा। जे एवढा हा गुंफिरा। मोक्षाचा संसारा। उणा नोहे॥ २८४॥

अर्थ—परंतु आता अशा निरूपणाचा प्रवाह पुरे. तुला परब्रह्मवस्तूहून दुसरे काही दिसू नये; म्हणून मागे सांगितलेले निरूपणच सांगत आहे, असे समज॥ २७९ ॥ हे तीन गुणच आपआपल्या साहजिक सामर्थ्याने देहरूप

झाले आहेत॥ २८०॥ ज्याप्रमाणे लाकूड ज्या आकाराचे असेल, त्याच आकाराचा अग्नि होतो किंवा सर्व प्रकारच्या वृक्षात भूमीचा एकच रस त्या त्या प्रमाणे होतो॥ २८१॥ अथवा जसे दूधच दह्याच्या रूपाने परिणाम पावते किंवा गोड़ीच उसाच्या रूपाने साकार स्वरूपात येते॥ २८२॥ त्याप्रमाणे हे तीन गुणच अंत:करणासह देहरूप होतात; म्हणून ते बंधन करण्याला कारणीभूतहि होतात॥ २८३॥ तरीपण, अर्जुना! हे आश्चर्य आहे की जीव इतका गुणबद्ध होऊनहि त्याच्या मोक्षस्थितीत यत्किंचित् कमीपणा येत नाही॥ २८४॥

गूढार्थदीपिका—गुण व गुणाची बद्धता हे सर्व भ्रमजन्य असल्यामुळेच जीवाची मूळची शुद्ध ब्रह्मस्थिति सहजच अखंड कायम राहते, असा अर्थ.

त्रिगुण आपुलालेनि धर्में। देहींचे मागुते साउमें। चाळितांही न खोमे। गुणातीतता॥ २८५॥
ऐसी मुक्ति असे सहज। ते आतां परिसऊं तुज। जे तूं ज्ञानांबुज-। द्विरेफु कीं॥ २८६॥
आणि गुणीं गुणाजोगें। चैतन्य नोहे मागें। बोलिलों तें खागें। तेवींचि हें॥ २८७॥
तरी पार्था जैं ऐसे। बोधलेनि जीवें दिसे। स्वप्न कां जैसें। चेइलेनी॥ २८८॥
नातरी आपण जळीं। बिंबलों तीरोनी न्याहाळी। चळण होतां कल्लोळीं। अनेकधा॥ २८९॥
कां नटलेनि लाघवें। नटु जैसा न झकवे। तैसें गुणजात देखावें। न होनियां॥ २९०॥
पैं ऋतुत्रय आकाशें। धरूनियांही जैसें। नेदिजेचि येवों वोसें। वेगळेपणा॥ २९१॥
तैसें गुणीं गुणापरौतें। जें आपणपें असे आयितें। तिये अहं बैसे अहंते। मूळकेचिये॥ २९२॥
तै तेथूनि मग पाहातां। म्हणे साक्षी मी अकर्ता। हे गुणचि क्रियाजातां। नियोजित॥ २९३॥

अर्थ—तीन गुण हे आपआपल्या स्वभावधर्माप्रमाणे देहाचे ठिकाणी मागे झालेल्या व पुढे होणाऱ्या कर्मरूपाने राहाटत असता जीवाची मूळची गुणातीत स्थिति यत्किंचितहि उणी होत नाही॥ २८५॥ अशी जीवाची गुणातीत मुक्तावस्था जी स्वाभाविकच आहे ती, तूं आत्मज्ञानरूपी कमळावरील भ्रमर असल्यामुळे तुला सांगतो, ऐक॥ २८६॥ आणि चैतन्य हे गुणांमध्ये असले तरी गुणाजोगे होत नाही व तसेच ती अंतिम स्वरूपस्थिति आहे, हे मागे सांगितलेच आहे॥ २८७॥ तरी अर्जुना! ज्याप्रमाणे जागा झालेला मनुष्य स्वप्नाला भास असे समजतो, त्याप्रमाणे जीव जगाला सत्य न समजता मिथ्याभासरूप समजेल.॥ २८८॥ किंवा आपण पाण्यात बिंबलो आहो व पाण्यातील लाटांच्या अनेक प्रकारच्या चळणवळणाने अनेक प्रकारचे होत आहो; पण माझा त्याच्याशी काही एक संबंध नाही, असे जसे तीरावर उभे राहून मनुष्य पाहतो.॥ २८९॥ ज्याप्रमाणे नट, घेतलेल्या नानाप्रकारच्या सोंगाने मी खरोखर तसा झालो, असे समजत नाही; त्याप्रमाणे मी संपूर्ण सत्त्वादिगुणाचा साक्षी, त्याच्याहून निराळा आहे, असे पाहावे.॥ २९०॥ आकाश हे तिन्ही ऋतूंना आपल्या ठिकाणी धारण करते; पण त्यांच्याहून आपला असलेला वेगळेपणा नाहीसा होऊ देत नाही.॥ २९१॥ जी आत्मवस्तु गुणांमध्ये असूनहि आपल्या मूळ स्वरूपानेच आहे-म्हणजे गुणातीत आहे. त्या गुणातीत मूळ स्थितीची अहंता धरून अहंवृत्ति स्थिर होऊन राहते.॥ २९२॥ गुणातीत अशा आत्मस्थितीचे ठिकाणी अहंवृत्ति स्थिर होवून सर्व कर्माचे ठिकाणी सत्त्वादि गुणच कारण आहे, मी त्या सर्वाचा साक्षी असून अकर्ता आहे असे ही चैतन्ययुक्त अहंवृत्ति पाहते.॥ २९३॥

गूढार्थदीपिका—अंत:करणावच्छिन्न-म्हणजे अंत:करणाने मर्यादित केलेल्या चैतन्याला, अंत:करणाच्या ऐक्याच्या भ्रांतिसहित जीव म्हटले जाते व तेच जेव्हा वृत्तीच्या साहाय्याने आपल्याला अंत:करणाहून निराळे ओळखते व अंत:करणाला उपहित म्हणजे आधार होते तेव्हा ते साक्षी म्हटले जाते, असा माउलींच्या ओव्यांतील व ''अहंरूपाने स्फुरणारे वृत्यवच्छिन्न चैतन्यच साक्षी होते'' या आमच्या मागील म्हणण्याचाहि आशय आहे.

सत्त्वरजतमांच्या। भेदीं प्रसर कर्माचां। होत असे तो गुणांचा। विकारु हा॥ २९४॥
ययामाजीं मी ऐसा। वनीं कां वसंतु जैसा। वनलक्ष्मीविलासा। हेतुभूत॥ २९५॥
कां तारागणीं लोपावें। सूर्यकांतीं उद्दीपावें। कमळीं विकासावें। जावें तमें॥ २९६॥

यया कोणाचे काजीं काहीं। सविता जैसा देखत नाहीं। तैसा अकर्ता मी देहीं। सत्तारूप॥ २९७॥
मी दाऊनि गुण देखे। गुणता हे मियां पोखे। ययाचोनि नि:शेषे। उरे तें मी॥ २९८॥
ऐसेनि विवेकें जया। उदो होय धनंजया। ये गुणातीतत्व तया। अर्धपंथें॥ २९९॥

अर्थ—हे सत्त्व, रज, तम गुण परस्पराहून भिन्न असल्यामुळे कर्मेहि वेगवेगळी पसरली आहेत व संपूर्ण कर्माचा विस्तार ही गुणांचीच कार्ये आहेत॥ २९४॥ या सर्व गुण व त्यांच्या कार्यामध्ये मी वनांत वनशोभेला कारणीभूत असणाऱ्या वसंतऋतूप्रमाणे कल्पित असून निमित्तमात्र आहे.॥ २९५॥ किंवा नक्षत्रे नाहीशी व्हावी, सूर्यकान्त मण्याने प्रकाशित व्हावे, कमळाच्या फुलाने प्रफुल्लित व्हावे व अंध:कार नाहीसा व्हावा (ही कार्ये सूर्यामुळे होत असली तरी)॥ २९६॥ यापैकी कोणाचीही कार्ये ज्याप्रमाणे सूर्याला दिसत नाहीत, त्याप्रमाणे या सर्व देहांमध्ये मी अकर्ता असा केवळ सत्तारूप आहे॥ २९७॥ माझ्या सत्तेने गुण प्रगट होऊन मी त्यांचा साक्षी होतो. गुणांची गुणस्थिति माझ्या सत्तेनेच पुष्ट होते. (विस्तार पावते) हे गुण व गुणाचे कार्य नाहीसे होऊन जे उरते, ते सत्तामात्र स्वरूप मी आहे.॥ २९८॥ हे अर्जुना! असा हा आत्मानात्मविवेक ज्यांच्या ठिकाणी प्रगट होतो, त्याला सहजच त्याची मूळची गुणातीत ब्रह्मस्थिति प्राप्त होते॥ २९९॥

गूढार्थदीपिका—ऊर्ध्वपंथे-म्हणजे आकाशातून हातात फळ पडावे, त्याप्रमाणे सहज-आपोआप.

"आत्मा सुटावया मायेपासून। केवळ विषयनिवृत्तिचि नाही साधन। सर्व जगाचे जे प्रवृत्ति कारण। तिचेही गुण निवर्तावे॥ ५२०॥" (श्रीगुलाबराव महाराजाकृत-प्रियलीलामहोत्सव-आगमनविलास पदन्यास-१) जीवात्मा मायाबंधनापासून नुसत्या विषयवैराग्याने-म्हणजे अपरवैराग्याने मुक्त होत नसून सर्व जगाला कारण जे सत्वादि तीन गुण त्यापासून मुक्त झाला पाहिजे तो परवैराग्यसंपन्न झाला पाहिजे किंवा योगशास्त्रात सांगितल्याप्रमाणे त्याला गुणवैतृष्ण्य प्राप्त झाले पाहिजे, हे मत येथे श्री ज्ञानेश्वर माउलींनी प्रगट केले आहे.

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् । जन्ममृत्युजरादु:खैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥ २०॥

अर्थ—हा देहाभिमानी जीव देहाच्या उत्पत्तीला कारणभूत असणाऱ्या या तीन गुणाहून निराळा झाला असता जन्म-मरण-म्हातारपण व सर्व दु:खे यांपासून मुक्त होऊन माझ्या अविनाशी स्वरूपाला प्राप्त होतो॥ २०॥

आतां निर्गुण असे आणिक। तें तो जाणे अचुक। जे ज्ञानें केलें टीक। तयाचिवरी॥ ३००॥
किंबहुना पांडुसुता। ऐसा तो माझी सत्ता। पावे जैसी सरिता। सिंधुत्व गा॥ ३०१॥
नळिकेवरूनि उठिला। जैसा शुक शाखे बैसला। तैसा मूळअहंता ठाकिलां। तो मी म्हणौनि॥ ३०२॥

अर्थ—या त्रिगुणाविरहित म्हणून निर्गुण अशी जी आत्मवस्तु आणखी आहे ती, तो, ज्ञानाने त्याच्याच ठिकाणी वस्ती केली असल्यामुळे अचुक जाणतो॥ ३००॥ एवढेच नाही तर, अर्जुना! ज्याप्रमाणे नदी समुद्राला मिळून समुद्रच होऊन जाते, त्याप्रमाणे तो माझ्या अविनाशी सत्तेशी ऐक्य पावतो॥ ३०१॥ ज्याप्रमाणे पिंजऱ्यातील नळीवरून उडलेला पोपट झाडाच्या फांदीवर जाऊन बसतो, त्याप्रमाणे तो गुणातीत झालेला ज्ञानी मी ब्रह्मस्वरूप आहे, अशी आपल्या मूळच्या ब्रह्मस्वरूपतेची अहंता घेऊन राहतो.॥ ३०२॥

गूढार्थदीपिका—ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणी ब्रह्मस्वरूपाशी केलेल्या ऐक्याचा सात्त्विक अहंकार असतो हे येथे माउलींनी स्पष्ट केले आहे.

अगा अज्ञानाचिया निदा। जो घोरत होता बदबदा। तो स्वस्वरूपीं प्रबुद्धा। चेइला कीं॥ ३०३॥
पैं बुद्धिभेदाचा आरिसा। तया हातोनि पडिला वीरेशा। म्हणौनि प्रतिमुखाभासा। मुकला तो॥ ३०४॥
देहाभिमानाचा वारा। आतां वाजों ठेला वीरा। तैं ऐक्य वीचिसागरां। जीवेशां हें॥ ३०५॥
म्हणौनि मद्भावेंसी। प्राप्ति पाविजे तेणेंसरिसी। वर्षांतीं आकाशीं। घनजात जेवीं॥ ३०६॥
तेवी मी होऊनि निरुता। मग देहींचि ये असतां। नागवे देहसंभूतां। गुणांसि तो॥ ३०७॥

जैसा भिंगाचेनि घरें। दीपप्रकाश नावरे। कां न विझेचि सागरें। वडवानळ॥ ३०८॥
तैसा आला गेला गुणांचा। बोधु न मैळे तयाचा। तो देहीं जैसा व्योमींचा। चंद्र जळीं॥ ३०९॥

अर्थ—असे झाले असता जो जीव अज्ञानाच्या झोपेत सारखा घोरत पडला होता तो, अर्जुना! ती निद्रा टाकून देऊन आपल्या ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणी जागा होतो॥ ३०३॥ हे अर्जुना! रजोगुणी, तमोगुणी अशी अविवेकी भ्रांत बुद्धि हाच भेद दाखविणारा आरसा होय. तो हातातून पडून फुटल्यामुळे मुखाभास नाहीसा झाला-म्हणजे द्वैत नि:शेष नाहीसे झाले॥ ३०४॥ हे वीरा अर्जुना! ज्याप्रमाणे वारा बंद झाला असता सागर व तरंग यांचे ऐक्य होते, त्याप्रमाणे देहाभिमानाचा वारा बंद झाल्यामुळे जीवशिवाचे ऐक्य आहे-म्हणजे देहाभिमानामुळे परमात्म्याहून भिन्न झालेला जीव, देहाभिमान नि:शेष सुटल्यामुळे परमेश्वराशी ऐक्य पावला॥ ३०५॥ ज्याप्रमाणे वर्षाऋतूचे शेवटी मेघ आकाशरूप होऊन जातात, त्याप्रमाणेच अज्ञानभ्रांति पूर्ण नाहीशी झाल्याबरोबर देहाभिमान नाहीसा होऊन जीव माझ्याशी ऐक्य पावतो॥ ३०६॥ तसा तो माझ्यासारखा शुद्ध निरूपाधिक स्वरूप होऊन या देहातच राहत असला तरी देहापासून उत्पन्न होणाऱ्या गुणाच्या स्वाधीन होत नाही॥ ३०७॥ ज्याप्रमाणे अभ्रकाच्या घराने दिव्याचा प्रकाश कोंडला जात नाही अथवा समुद्राच्या पाण्याने वडवानळरूपी अग्नि विझविला जात नाही॥ ३०८॥ जसा आकाशातील चंद्र, पाण्यात प्रतिबिंबित झाला तरी पाण्याच्या हेलकाव्यापासून निर्दोष असतो, त्याप्रमाणे देहाच्या ठिकाणी असतांना देखील उठणाऱ्या गुणामुळे त्याचा (ज्ञान्याचा) आत्मबोध मलीन होत नाही॥ ३०९॥

गूढार्थदीपिका—ज्ञानीपुरुष अखंड साक्षीस्वरूप होऊन राहतात. ते आपले साक्षीत्व कधी विसरत नाहीत, असा अर्थ.

तिन्ही गुण आपुलालिये प्रौढी। देहीं नाचविती बागडीं। तो पाहोंही न धाडी। अहंतेतें॥ ३१०॥
हा ठायवरी। नेहटोनि ठेला अंतरीं। आतां काय वर्ते शरीरीं। काही नेणे॥ ३११॥
सांडूनि आंगींची खोळी। सर्प रिगालिया पाताळीं। ते त्वचा कोण सांभाळी। तैसें जालें॥ ३१२॥
कां सौरभ्यजीर्ण जैसा। आमोदु मिळोनि जाय आकाशा। माघारा कमळकोशा। न येचि तो॥ ३१३॥
पैं स्वरूपसमरसें। तयाही गा जालें तैसें। तेथ किंधर्म हें कैसें। नेणे देह॥ ३१४॥
म्हणौनि जन्मजरामरण। इत्यादि जे साही गुण। ते देहींचि ठेले कारण। नाहीं तया॥ ३१५॥
घटाचिया खापरिया। घटभंगीं फेडिलिया। महदाकाशा आपैसया। जालेंचि असे॥ ३१६॥
तैसी देहबुद्धि जाये। जैं आपणपां आठौ होये। तैं आन कांहीं आहे। तेंवांचुनी॥ ३१७॥
येणें थोर बोधलेपणें। तयासि गा देहीं असणें। म्हणूनि तो मी म्हणें। गुणातीत॥ ३१८॥
यया देवाचिया बोला। पार्थु अति सुखावला। मेघें संबोखिला। मोरु जैसा॥ ३१९॥

अर्थ—सत्त्व, रज, तम या तीन गुणापैकी प्रत्येक गुण वृद्धि पावून आपआपल्या लक्षणरूपी चेष्टा करतात; पण परमात्म्याशी ऐक्य पावलेला ज्ञानीपुरुष त्यांची यत्किंचितहि अहंता धरत नाही॥ ३१०॥ एथपर्यंत ज्ञानीपुरुष अंतर्मुखवृत्ति करून राहतो, म्हणून देहाच्या ठिकाणी काय चालले आहे, हे तो जाणत नाही॥ ३११॥ ज्याप्रमाणे सर्प, माझी ही कात कोण सांभाळील याची काळजी न करता ती टाकून देऊन बिळात शिरतो, त्याप्रमाणे ज्ञानीपुरुषहि, देह आता कोण सांभाळील याची चिंता न करता देहाचा अभिमान नि:शेष सोडून देऊन आपल्या आत्मस्वरूपाशी अहंवृत्तीचे ऐक्य करून साक्षी होऊन राहतो॥ ३१२॥ किंवा जीर्ण झालेल्या कमळाच्या फुलाचा सुवास ज्याप्रमाणे आकाशाशी एकरूप होऊन राहतो व पुन: कमळाचे ठिकाणी येत नाही॥ ३१३॥ त्याप्रमाणे जीव हा शिवाशी समरसतेने ऐक्य पावला असता देहाचे काय धर्म आहेत व त्याचे ठिकाणी काय चालले आहे, हे तो काही जाणत नाही.॥ ३१४॥ म्हणून जन्म, जरा, मृत्यु इत्यादि जे षड्विकार आहेत ते देहाचे ठिकाणीच राहतात. ज्ञानीपुरुषाचा त्यांच्याशी काही एक संबंध नसतो.॥ ३१५॥ घट फुटून घटाची दोन खापरे अलग झाली असता घटाकाश आपोआपच महदाकाश होते, त्याला महदाकाशात मिळावे लागत नाही॥ ३१६॥ याप्रमाणे, जेव्हा आपल्या मूळच्या

शुद्ध स्वरूपाचे जीवाला ज्ञान होते, तेव्हा देहबुद्धि आपोआप नाहीशी होते. मग आत्मस्वरूपाव्यतिरिक्त दुसऱ्याचे अस्तित्व भासेनासे होत असल्यामुळे एका आत्मस्वरूपावाचून दुसरे काहीच अनुभवाला येत नाही. ॥ ३१७ ॥ असा दृढ आत्मबोध ठेवून तो ज्ञानीपुरुष प्रारब्ध संपेपर्यंत देहाचे ठिकाणी राहतो, म्हणून मी त्याला गुणातीत म्हणतो. ॥ ३१८ ॥ मेघाने जसे मोराला आनंदित करावे, त्याप्रमाणे भगवंताचे बोलणे ऐकून अर्जुन अत्यंत आनंदित झाला ॥ ३१९ ॥

अर्जुन उवाच

कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो। किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते॥ २१॥

अर्थ—अर्जुन म्हणाला, हे प्रभो! कोणत्या गुणावरून पुरुष या तीन गुणाच्या पलीकडे गेला हे ओळखता येते? त्याचा आकार कसा असतो? कशा प्रकारे तो तीन गुणाच्या पलीकडे जातो?॥ २१॥

तेणें तोषें वीर पुसे। जी कोण्हीं चिन्हीं तो दिसे। जयामाजीं वसे। ऐसा बोधु॥ ३२०॥
तो निर्गुण काय आचरे। कैसेनि गुण निस्तरे। हें सांगिजो माहेरें। कृपेचेनि॥ ३२१॥
यया अर्जुनाचिया प्रश्ना। तो षड्गुणांचा राणा। परिहार आकर्णा। बोलतु असे॥ ३२२॥
म्हणे पार्था तुझी नवाई। हें येतुलेंचि पुससी काई। तें नामचि तया पाहीं। साच लटिकें॥ ३२३॥

अर्थ—असे भगवंताचे बोलणे ऐकून संतुष्ट झालेला तो वीर अर्जुन विचारू लागला की ज्याच्या ठिकाणी आपण सांगितल्याप्रमाणे दृढ आत्मबोध झाला आहे, असा पुरुष कशा लक्षणाचा असतो?॥ ३२०॥ हे कृपाळु मायबापा श्रीकृष्णा! गुणरहित कोणते आचरण करतो? व कोणत्या साधनाने तो गुणरहित होतो? हे मला सांगा॥ ३२१॥ या अर्जुनाच्या प्रश्नावर उत्तर देऊन त्याच्या शंकेचा परिहार करण्याकरिता तो षड्गुणादि अपरिमित ऐश्वर्यवान श्रीकृष्ण सांगतो, ऐका॥ ३२२॥ अर्जुना! तुझे आश्चर्य वाटते. एवढेच काय विचारतोस? त्याला गुणातीत हे जे नाव दिले गेले, तेच खरे आहे व खोटेहि आहे॥ ३२३॥

गूढार्थदीपिका—ते नामचि तया पाही। साच लटिके—

ज्ञान्याच्या ठिकाणी प्रारब्धामुळे गुणाची लक्षणे दिसून येतात; म्हणून त्याला गुणातीत म्हणणे खोटे ठरते व गुणानुसार वर्तन करीत असतानाहि तो गुणाचा साक्षी होऊनच राहतो, गुणाशी ऐक्य करीत नाही म्हणून गुणातीत हे नांव त्याचे ठिकाणी खरेहि आहे.

गुणातीत जया नांवें। तो गुणाधीन तरी नव्हे। ना होय तरी नागवे। गुणां यया॥ ३२४॥
परी अधीन कां नागवें। हेंचि कैसेनि जाणावें। गुणांचिये उखरवे-। माजीं असतां॥ ३२५॥
हा संदेह जरी वाहसी। तरी सुखें पुसों लाहसी। परिस आतां तयासी। रूप करूं॥ ३२६॥

अर्थ—गुणातीत या नावाने जो संबोधला जातो तो गुणाच्या स्वाधीन होत नाही व गुणानुसार वागत आहे असे दिसला, तरी तो गुणांनी नागवला जात नाही-म्हणजे तो आपल्या स्वरूपाला विसरत नाही. ॥ ३२४॥ गुणाच्या गलबल्यात वावरत दिसतानाहि तो त्यांच्या स्वाधीन झाला किंवा झाला नाही, हे कसे जाणता येते?॥ ३२५॥ असा संशय तुझ्या मनात असल्यास मात्र तू खुशाल विचार. गुणातीततेचे आता स्वरूप सांगतो, ऐक॥ ३२६॥

श्रीभगवानुवाच—

प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पाण्डव। न द्वेष्टि सम्प्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति॥ २२॥

अर्थ—भगवान म्हणाले, प्रकाश म्हणजे सत्त्वगुणाचे कार्य सुख व जाणीव, प्रवृत्ति-म्हणजे रजोगुणाचे कार्य कर्म करण्याची प्रवृत्ति व मोह—म्हणजे तमोगुणाचे कार्य अविवेक, ही उत्पन्न झाली असता (गुणातीत झालेला पुरुष) त्यांचा द्वेष करीत नाही व नाहीशी झाली असतां त्याची इच्छा करीत नाही॥ २२॥

तरी रजाचेनि माजें। देहीं कर्माचें आणोजें। प्रवृत्ति जैं घेइजे। वेंटाळूनि॥ ३२७॥
तैं मीचि कां कर्मठ। ऐसा न ये श्रीमाठ। कां दरिद्रलिये बुद्धी वीट। तोही नाही॥ ३२८॥

अथवा सत्त्वेंचि अधिकें। जैं सर्वेंद्रियीं ज्ञान फांके। तैं सुविद्यता तोखे। उभजेही ना॥ ३२९॥
कां वाढिनलेनि तमें। गिळेजेचि मोहभ्रमें। तैं अज्ञानत्वें न श्रमे। घेणेंही नाहीं॥ ३३०॥
पैं मोहाच्या अवसरीं। ज्ञानाची चाड न धरी। ज्ञानें कर्में नादरी। होतां न दुःखी॥ ३३१॥
सायंप्रातर्मध्यान्हा। या तिही काळांची गणना। नाहीं जेवीं तपना। तैसा असे॥ ३३२॥
तया वेगळाचि काय प्रकाशें। ज्ञानित्व यावें असे। कायि जळार्णव पाउसें। साजा होय॥ ३३३॥
ना प्रवर्तलेनि कर्में। कर्मठत्व तया कां गमे। सांगें हिमवंत हिमें। कांपे कायि॥ ३३४॥
नातरी मोह आलिया। काइ पां ज्ञाना मुकिजेल तया। महा आगीतें उन्हाळेया। जाळवत असे॥ ३३५॥

अर्थ—रजोगुणाच्या वृद्धीने चित्तांत कर्माचा अंकुर उत्पन्न होऊन कर्म करण्याची प्रवृत्ति झाली असतांहि ॥ ३२७॥ मी कर्म करणारा असा त्याला अहंकार उत्पन्न होत नाही किंवा कर्म न करण्याची बुद्धि झाली असता तिचा तो द्वेष करीत नाही-म्हणजे कर्म करण्याची इच्छा करीत नाही॥ ३२८॥ किंवा सत्त्वगुणाच्या वृद्धीने सर्व इंद्रियाच्या ठिकाणी ज्ञानाचा विकास झाला असता मी सुविद्य आहे, असा त्याला संतोष वाटत नाही किंवा खेदहि होत नाही॥ ३२९॥ किंवा तमोगुण वाढला असता तो अविवेकभ्रमाने ग्रासला जात नाही म्हणूनच तो अज्ञान घेत नाही व त्यामुळे तो कष्टी होत नाही.॥ ३३०॥ चित्तात अविवेक वृत्ति उठली असता तो ज्ञानाची इच्छा करीत नाही. ज्ञानामुळे कर्माचा आदर करून कर्म करण्याची इच्छा करीत नाही व कर्म घडले असता दुःखी होत नाही.॥ ३३१॥ ज्याप्रमाणे सूर्याचा प्रकाश सायंकाळ, प्रातःकाळ, माध्यान्हकाळ अशी कालगणना करीत नाही. तो सूर्याच्या ठिकाणी सदा सारखा असतो, त्याप्रमाणे गुणातीत पुरुष निर्विकार असतो॥ ३३२॥ स्वप्रकाश सोडून दुसऱ्या प्रकाशाने त्याला ज्ञानीपणा येतो काय? समुद्र क्षीण होऊन तो पावसाने भरला असे होते काय?॥ ३३३॥ किंवा कर्मप्रवृत्तीच्या योगाने त्याला कर्मठत्व येते काय? अत्यंत थंडीने हिमालय पर्वत थरथर कापतो काय?॥ ३३४॥ किंवा प्रारब्धानुसार मोह किंवा अविवेक उत्पन्न झाला असता आत्मज्ञान त्याला सोडील काय? होमाग्नीला उन्हाळा जाळता येईल काय? किंवा उन्हाळ्याला अग्नी जाळता येईल काय?॥ ३३५॥

गूढार्थदीपिका—विरोधी वस्तुच परस्परांचा नाश करतात; पण ज्याप्रमाणे अग्नि व उन्हाळा याचा विरोध नसल्यामुळे ते परस्परांना जाळीत नाहीत, त्याप्रमाणे ज्ञान सर्वांना जाणणारे व सर्व त्याच्याच सत्तेवर भासत असल्यामुळे त्याचा कशाशी विरोध नसतो; म्हणून मोहादिकांनी आत्मज्ञान नाहीसे होऊ शकत नाही. ज्ञान्याचे ठिकाणी प्रारब्धामुळे सत्व, रज, तम या गुणांची लक्षणे दिसत असली, तरी तो त्याची प्रवृत्ति किंवा निवृत्ति करीत नाही. तो साक्षी होऊन त्याची प्रवृत्ति-निवृत्ति नुसता पाहत राहतो.

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते। गुणा वर्तन्त इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते॥ २३॥

अर्थ—ज्ञानीपुरुष साक्षी होऊन उदासीनासारखा स्वस्थ राहतो, तो गुणाच्या योगाने चलित होत नाही. गुणच परस्परांशी वागत आहे, असे जाणून तो स्वरूपाचे ठिकाणी स्थिर राहतो. तो तेथून कधी ढळत नाही॥ २३॥

तैसें गुणागुणकार्य हें। आघवेंचि आपण आहें। म्हणौनि एकेका नोहे। तडातोडी॥ ३३६॥

अर्थ—त्याप्रमाणे गुण व गुणांची मोहादि लक्षणकार्ये सर्व मीच आहे, अशा ज्ञानाने एक एकाला-म्हणजे ज्ञान व मोहादि कार्ये यांना-दूर करण्याचा प्रयत्न तो करीत नाही॥ ३३६॥

गूढार्थदीपिका—मनुष्याला जेथे मृगजल भासते तेथे ज्याप्रमाणे सूर्यप्रकाशच कंपनामुळे जळाप्रमाणे भासत आहे, असे तो जाणतो, त्याप्रमाणे ज्ञानानंतरहि उरलेल्या प्रारब्धभासामुळे पूर्व अज्ञानजन्य संस्कारानुसार मोहादि रूपाने मीच भासत आहे असे ज्ञानीपुरुष ज्ञानाने समजत असतो; म्हणून तो रजोगुणी तमोगुणी वृत्ती उठल्या तरी त्यांचा द्वेष करीत नाही.

येवढेया गा प्रतीती। तो देहा आलासे वस्ती। वाटे जातां गुंती-। माजीं जैसा॥ ३३७॥
तो जिणता ना हारवी। तैसा गुण नव्हे ना करवी। जैसी कां श्रोणवी। संग्रामींची॥ ३३८॥

कां शरीरातील प्राणू। घरीं आतिथ्याचा ब्राह्मणू। नाना चोहटाचा स्थाणू। उदासु जैसा॥ ३३९॥
आणि गुणांचा यावाजावां। ढळें चळे ना पांडवा। मृगजळाचा हेलावा। मेरु जैसा॥ ३४०॥
हें बहुत कायि बोलिजे। व्योम वारेनि न वचिजे। कां सूर्य ना गिळिजे। अंधकारें॥ ३४१॥
स्वप्न कां गा जियापरी। जागतयातें न सिंतरी। गुणीं तैसा अवधारीं। न बंधिजे तो॥ ३४२॥
गुणांसि कीर नातुडे। परी दुरूनि जैं पाहे कोडें। तैं गुणदोष सायिखडें। सभ्य जैसा॥ ३४३॥

अर्थ—ज्याप्रमाणे वाटेने जाणारा वाटसरू रात्रीपुरता एखाद्या गावाचा आश्रय करतो, त्याप्रमाणे एवढ्या अशा अनुभवासहित तो ज्ञानीपुरुष प्रारब्धापुरता देहरूपी गावात केवळ वस्तीला राहतो. ॥ ३३७॥ ज्याप्रमाणे लढाईच्या भूमीला जय पराजय प्राप्त होत नाहीत, त्याप्रमाणे गुण जिंकले किंवा गुणाला हारविले असा काहीं तो अभिमान बाळगत नाही॥ ३३८॥ किंवा ज्याप्रमाणे शरीरातील प्राण, घरी आलेला अतिथी ब्राह्मण, किंवा चौरस्त्यावरील खांब हे जसे काही न करणारे व काही न करविणारे असे उदास असतात॥ ३३९॥ आणि अर्जुना! मृगजळाच्या हेलकाव्याने जसा मेरु पर्वत ढळत नाही तसा ज्ञानीपुरुषहि आल्या गेल्या ऊर्मीने ढळत नाही किंवा चळत नाही. ॥ ३४०॥ अर्जुना! फार काय सांगू! ज्याप्रमाणे आकाश वाऱ्याने हालविले जात नाही किंवा आंधाराने सूर्य गिळिला जात नाही॥ ३४१॥ अथवा जागे असलेल्या पुरुषाला स्वप्नभ्रम होत नाही, त्याप्रमाणे ज्ञानीपुरुष आपल्याला गुणांनी बद्ध समजत नाही असे समज. ॥ ३४२॥ गुणांना तो सापडत नाही आणि गुणांचा साक्षी राहून त्यांच्याकडे कौतुकाने पाहू लागला तर, नाचणाऱ्या बाहुल्याकडे पाहणाऱ्या सभ्य गृहस्थाप्रमाणे तो गुणदोषाकडे मिथ्यात्वाने पाहतो॥ ३४३॥

गूढार्थदीपिका—एका भासक परब्रह्मवस्तुशिवाय दुसऱ्या कोणत्याहि भासमान दृश्याला तो ज्ञानीपुरुष सत्य वस्तु समजत नाही, असा अर्थ.

सत्कर्में सात्त्विकीं। रज तें रजोविषयकीं। तम मोहादिकीं। वर्तत असे॥ ३४४॥
परिस तयाचिया गा सत्ता। होती गुणक्रिया समस्ता। हें फुडें जाणे सविता। लौकिका जेवीं॥ ३४५॥
समुद्रचि भरती। सोमकांतचि द्रवति। कुमुदें विकासती। चंद्रु तो उगा॥ ३४६॥
कां वाराचि वाजे विझे। गगनें निश्चळ असिजे। तैसा गुणाचिये गजबजे। डोलेना जो॥ ३४७॥
अर्जुना येणें लक्षणें। तो गुणातीत जाणणें। परिस आतां आचरणें। तयाचींये॥ ३४८॥

अर्थ—शास्त्रीय सदाचरणाने सत्त्वगुणात्मक, राजसकर्माने रजोगुणात्मक व मोहादि लक्षणाने तमोगुणात्मक असा तो वागत असतो. ॥ ३४४॥ पण ज्याप्रमाणे सूर्यप्रकाशामुळे लोकांचे व्यवहार चालतात, त्याप्रमाणे "माझ्या सत्तेवरच गुणाच्या क्रिया होत आहेत", हे तो ज्ञानीपुरुष स्पष्ट जाणत असतो. ॥ ३४५॥ ज्याप्रमाणे चंद्रामुळेच, समुद्राला भरती येते, सोमकांत मणी पाझरतो व कमले विकसित होतात, तरीपण चंद्र उगाच असतो, तो काही करीत नाही व करवित नाही॥ ३४६॥ किंवा वाराच वाहतो व बंद पडतो, पण आकाश निश्चल असते, त्याप्रमाणे गुणांच्या गलबल्याने जो यत्किंचितहि हालत नाही॥ ३४७॥ हे अर्जुना! तुला सांगितलेल्या या सर्व लक्षणावरून ज्ञानीपुरुषाचे गुणातीतत्व ओळखता येते. आता त्याचे आचरण सांगतो, ऐक॥ ३४८॥

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः। तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिन्दात्मसंस्तुतिः॥ २४॥

अर्थ—सुखदुःख सम लेखून स्वस्थ राहणारा, सोने व मातीचे ढेकुळ समान लेखणारा, प्रिय वस्तूचा वियोग व अप्रिय वस्तूचा संयोग हे दोन्ही समान पाहणारा व निंदा व स्तुति या दोघांची तुलना सारखीच करणारा, असा तो बुद्धिमान ज्ञानीपुरुष सर्वत्र सम म्हणजे ब्रह्मदृष्टीने पाहत असतो॥ २४॥

तरी वस्त्रासि पाठीं पोटीं। नाहीं सुतावांचूनि किरीटी। ऐसें सुये दिठी। चराचर मद्रूपें॥ ३४९॥
म्हणोनि सुखदुःखासरिसें। कांटाळें आचरे ऐसें। रिपुभक्तां जैसें। हरीचें देणें॥ ३५०॥
येऱ्हवीं तरी सहजें। सुखदुःख तैंचि सेविजे। देहजळीं होइजे। मासोळीं जै॥ ३५१॥

आतां ते तंव तेणें सांडिलें। आहे स्वस्वरूपेंसीचि मांडिलें। सस्यांतीं निवडिलें। बीज जैसें॥ ३५२॥
कां वोघ सांडूनि गंगा। रिघोनि समुद्राचें आंगा। निस्तरली लगबगा। खळाळाची॥ ३५३॥
तेवीं आपणपांचि जया। वस्ती जाली गा धनंजया। तया देहीं आपैसया। सुख तैसें दुःख॥ ३५४॥
रात्रि तैसें पाहलें। हें धारणा जेवीं एक जालें। आत्मारामा देहीआतलें। द्वंद्व तैसें॥ ३५५॥
पैं निद्रिताचेनि आंगेंसीं। साप तैशी उर्वशी। तेवीं स्वरूपस्था सरिसीं। देहीं द्वंद्वे॥ ३५६॥
म्हणौनि तयाच्या ठायीं। शेणा सोनेया विशेष नाहीं। रत्ना गुंडेया कांहीं। नेणिजे भेद॥ ३५७॥
घरा येवो पां स्वर्ग। कां वरिपडो वाघ। परी आत्मबुद्धीसि भंग। कदा नोहे॥ ३५८॥
निवटलें ना उपवढे। जळीनलें न विरूढे। साम्यबुद्धी न मोडे। तयापरी॥ ३५९॥
हा ब्रह्मा ऐसेनि स्तविजो। कां नीच म्हणोनि निंदिजो। परी नेणें जळों विझों। राखोंडी जैसी॥ ३६०॥
तैसी निंदा आणि स्तुती। नये कोण्हेचि व्यक्ती। नाहीं अंधारें कां वाती। सूर्या घरीं॥ ३६१॥

अर्थ—ज्याप्रमाणे अर्जुना! वस्त्रामध्ये आतबाहेर सुतावाचून दुसरे काही नसते, त्याप्रमाणे चराचर विश्वांत आतबाहेर माझ्यावाचून काही नाही; असा तो ज्ञानीपुरुष ज्ञानदृष्टीने पाहत असतो. ॥ ३४९ ॥ म्हणून ज्याप्रमाणे परमात्मा आपल्या विरोधी असलेल्या शत्रूला व भक्ताला सारखेच फळ देतो, त्याप्रमाणे सुख व दुःख यांना तो सारखेच मानित असतो॥ ३५० ॥ जेव्हा जीव देहरूपी जलामध्ये मासोळी होऊन राहतो—म्हणजे देहाचा अभिमान धरतो–तेव्हाच तो अनायासे सुखदुःखे भोगतो. ॥ ३५१ ॥ परंतु ज्याप्रमाणे कोंडा टाकून धान्य घेतले जाते, त्याप्रमाणे त्याने आता देहाभिमान टाकून देऊन आपल्या स्वरूपभूत परब्रह्माशी ऐक्य केले आहे॥ ३५२ ॥ किंवा गंगा प्रवाहरूपाने वाहणे सोडून देऊन समुद्राशी ऐक्य पावली, आता मिळण्यास जाण्याच्या त्वरेमुळे होणारी खळबळ राहिली नाही॥ ३५३ ॥ त्याप्रमाणे ज्याने आपल्या आत्मस्वरूपाचे ठिकाणी वस्ती केली–म्हणजे चित्त स्थिर केले–तो देहाचे ठिकाणी येणारी सुखदुःखे सारखीच लेखतो. ॥ ३५४ ॥ रात्र किंवा सकाळ हे जसे खांबाला सारखेच असतात, त्याप्रमाणे आत्मरूप झालेल्या ज्ञानीपुरुषालाहि देहाचे ठिकाणी येणारी सुखदुःखादि द्वंद्वे सारखीच भासतात. ॥ ३५५ ॥ ज्याप्रमाणे गाढ निजलेल्या पुरुषाच्या आंगाशेजारी सर्प राहिला किंवा उर्वशी अप्सरा राहिली तरी दोन्ही त्याला सारखीच असतात, त्याप्रमाणे आत्मस्वरूपाचे ठिकाणी चित्त स्थिर झालेल्या पुरुषालाहि सुखदुःखादि द्वंद्वे सारखीच वाटतात. ॥ ३५६ ॥ म्हणून अशा ज्ञानीपुरुषाला शेण किंवा सोने किंवा रत्न व गार या दोहोत भेद वाटत नाही॥ ३५७ ॥ अनायासे स्वर्ग प्राप्त झाला असून त्या आनंदाने किंवा वाघ येवून पडला हे पाहून भयाने आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर झालेली त्याची बुद्धि ढळत नाही॥ ३५८ ॥ ज्याप्रमाणे प्राणास मुकले ते पुनः जिवंत होत नाही, जळलेले उगवत नाही, त्याप्रमाणे ज्ञान्याची ब्रह्मरूप झालेली समबुद्धि कधी विषम होत नाही. ॥ ३५९ ॥ ज्याप्रमाणे राखोंडी जळत नाही किंवा विझत नाही, त्याप्रमाणे हा केवळ ब्रह्मदेव आहे, अशी कोणी स्तुति केली किंवा हा केवळ नीच आहे, अशी निंदा केली तरी, ज्ञानीपुरुषाच्या चित्ताला त्याची जाणीवच होत नाही॥ ३६० ॥ तसेच ज्याप्रमाणे सूर्याच्या घरी अंधार नसतो व वातीहि लावल्या जात नाहीत, त्याप्रमाणे केलेली निंदा किंवा स्तुति ज्ञानीपुरुषाचे ठिकाणी कोणत्याहि परिणामरूप व्यक्तित्वाने दिसत नाही॥ ३६१ ॥

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः। सर्वारम्भपरित्यागी गुणातीतः स उच्यते॥ २५॥

अर्थ—मान, अपमान, शत्रु, मित्र यांना जो समान पाहतो, इहपरलोकातील विषयसुखाच्या इच्छेने होणाऱ्या सर्व कर्मप्रवृत्तीचा जो त्याग करतो, त्याला गुणातीत म्हणतात. ॥ २५ ॥

ईश्वर म्हणोनि पूजिला। कां चोर म्हणोनि गांजिला। वृषगजीं वेढिला। केला रावो॥ ३६२॥
कां सुहृद पासीं आलें। अथवा वैरी वरपडे जाले। परी नेणे राती पाहालें। तेज जेवीं॥ ३६३॥
साही ऋतु येतां आकाशें। लिंपिजेचि ना जैसें। तेवीं वैषम्य मानसें। जाणिजेना॥ ३६४॥
आणीकही एक पाहीं। आचार तयाच्या ठायीं। तरी व्यापारासि नाहीं। जालें दिसे॥ ३६५॥

सर्वारंभा उटकलें। प्रवृत्तीचें तेथ मावळले। जळती गा कर्मफळें। ते तो आगी॥ ३६६॥
दृष्टादृष्टाचेनि नांवें। भावचि जीवीं नुगवे। सेवी जें कां स्वभावे। पैठें होय॥ ३६७॥
सुखे ना शिणे। पाषाण कां जेणें मानें। तैसी सांडीमांडी मनें। वर्जिली असे॥ ३६८॥
आतां किती हा विस्तारु। जाणें ऐसा आचारु। जया तोचि साचारु। गुणातीत॥ ३६९॥

अर्थ—ज्याप्रमाणे सूर्य रात्र किंवा पहाट जाणत नाही किंवा साही ऋतु आले तरी आकाश त्याहून अलिप्त राहते त्याप्रमाणे कोणी ईश्वर म्हणून पूजन केले किंवा चोर समजून छळ केला किंवा बैल, हत्ती इत्यादि समुदायाने वेढलेला राजा बनविले किंवा आपले हितकर्ते मित्र जवळ आले अथवा आपल्या शत्रुंनी हल्ला केला तरी त्याच्या चित्तात विषमता उत्पन्न होत नाही. ॥ ३६२-३६३-३६४ ॥ ज्ञानीपुरुषाच्या ठिकाणी आणखी एक आचरण असते की, त्याच्या ठिकाणी व्यापार झालाच नाही असे दिसते. ॥ ३६५ ॥ संपूर्ण विषयसुखाच्या कर्माचा आरंभ नाहीसा झालेला असतो. तशीच ती विषयसुखाची प्रवृत्तिहि त्याची नाहीशी होते आणि ज्या ज्ञानाग्नीमध्ये संपूर्ण कर्मफळे जळतात, तो ज्ञानाग्नीच तो होय. ॥ ३६६ ॥ इहलोकातील दृष्ट विषयसुख व परलोकातील अदृष्ट-म्हणजे मेल्यानंतर मिळणारे विषयसुख-अशा नावांची जेवढी विषयसुखे आहेत, त्यापैकी एकाहि विषयसुखाची ज्ञानीपुरुषाचे अंत:करणात इच्छा उत्पन्न होत नाही. त्याचे केवळ प्रारब्धानुसार सेवन केले जाते. ॥ ३६७ ॥ ज्याप्रमाणे दगड सुखी होत नाही किंवा दु:खी होत नाही, त्याप्रमाणे ज्ञानीपुरुषाच्या मनाने करणे किंवा न करणे या दोहोंचा त्याग केलेला असतो. ॥ ३६८ ॥ अर्जुना! आता फार काय सांगायचे! अशा प्रकारचा ज्याचा आचार असतो, तोच पुरुष खरोखर गुणातीत आहे, असे समजावे ॥ ३६९ ॥

गूढार्थदीपिका—या सर्व ओव्यांवरून ज्ञानीपुरुष व्यवहार करीत नाही किंवा सर्वांशी व सर्व वस्तूशी एकसारखाच वागतो, असे माउलीचे म्हणणे आहे, असे कोणी समजू नये. ज्ञानाच्या सातव्या तुर्यगा भूमीवर असलेला ज्ञानीपुरुषही व्यवहार करतो, असे योगवसिष्ठांत भगवान वसिष्ठानी सांगितले आहे. म्हणून या सर्व ओव्यांचा अर्थ एवढाच आहे की ज्ञानीपुरुषहि अज्ञानीपुरुषाप्रमाणेच, पूर्वी साधकादशेत बाणलेल्या शास्त्रीय आचरणानुसार विषमतेने व्यवहार करीत असतांना दिसत असला तरी, त्याची अंत:करणवृत्ति सम अशा परब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर झाली असल्यामुळे त्याच्या अंत:करणात विषमता उत्पन्न होत नाही. त्याच्या शरीर व इंद्रियांचा आचार केवळ प्रारब्धानुसार असतो व तो सदासर्वदा साक्षी होऊन राहतो.

गुणांतें अतिक्रमणें। घडे उपायें जेणें। तो आतां आईक म्हणे। श्रीकृष्णनाथु॥ ३७०॥

अर्थ—पुरुष ज्या योगाने सत्त्व, रज, तम या तिन्ही गुणांचे अतिक्रमण करतो, तो उपाय आता सांगतो, ऐक, असे भगवान श्रीकृष्ण म्हणाले. ॥ ३७० ॥

गूढार्थदीपिका—आतापर्यंत गुणातीततेची लक्षणे सांगितली असूनहि आता पुढे ज्या भक्तिउपायाने तीन गुणांचे अतिक्रमण करून पुरुष गुणातीत होतो, तो भक्ति उपाय सांगतो असे माउली म्हणत आहे व पुढे भक्तीचा उपाय सांगितलाहि आहे.

अहंवृत्त्यंतर्गत चैतन्याला चिदाभास म्हटले असले व बुद्धिपलीकडील चैतन्याला परब्रह्म म्हटले असले तरी, त्यांचा संबंध सुटत नाही, हा चिदाभास किंवा ही अहंवृत्ति बुद्धिपलीकडील परब्रह्माशी ज्ञानाने ऐक्य पावते. ही अहंवृत्ति बुद्धीची असली तरी या अहंवृत्तिमुळे वृत्तिगत चैतन्य साक्षी होऊन साक्षीरूपाने मी बुद्ध्यादि कार्याहून निराळा आहे असे ते जाणत असते. ही अहंवृत्ति प्रत्येक पुरुषाचे ठिकाणी स्फुरत असून तिचे आत्मस्वरूपाशी ऐक्य झाले की पुरुष ज्ञानी होतो व तो साक्षी राहून मी सत्वादि गुणाच्या अतीत आहे, असे जाणतो.

अशाप्रमाणे ज्ञानीपुरुष गुणातीत होतो असे माउलीनी आतापर्यंत सांगितले; पण साक्षित्व म्हणजे मी असंग आहे, मी गुणांच्या अतीत आहे, असे जाणणेहि सात्त्विक वृत्तिमुळे होत असते; म्हणून केवळ साक्षी होऊन राहिल्याने

ज्ञानीपुरुष अत्यंत गुणातीत होतो असा अर्थ नाही. त्याची गुणातीतता अपुरीच असते. ती ज्या उपायाने नाहीशी होईल तो उपचारच खरोखर गुणातीत करणारा होतो.

अर्थात् गुणातीत होण्याकरिता सात्त्विकवृत्तीच्या उपाधीने उत्पन्न होणारी जाणीवहि नाहीशी व्हायला पाहिजे. सगुण भगवंताच्या प्रेमभक्तीने जाणीवेचा विसर पडतो, सत्त्वगुणाची उपाधि नि:शेष नाहीशी होते व मनुष्य खरा गुणातीत म्हणजे निर्विकल्प होतो; म्हणूनच खरोखर माउलीनी गुणातीत होण्याचा उपाय म्हणजे भक्ति होय, असे पुढे प्रतिपादन केले आहे.

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते। स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते॥ २६॥

अर्थ—जो माझ्या सगुणस्वरूपाची अनन्यभावाने भक्ति करतो, तो या गुणांचे उल्लंघन करून गुणातीत व निर्विकल्प ब्रह्मस्वरूप होण्यास पात्र होतो.॥ २६॥

तरी व्यभिचाररहित चित्तें। भक्तियोगें मातें। सेवी तो गुणातें। जाकळूं शके॥ ३७१॥
तरी कोण मी कैसी भक्ती। अव्यभिचारा काय व्यक्ती। हे आघवीचि निरुती। होआवी लागे॥ ३७२॥
तरी पार्था परियेसा। मी तंव येथ ऐसा। रत्नीं किळावो जैसा। रत्नचि तो॥ ३७३॥

अर्थ—माझ्याहून भिन्न न राहता माझ्याशी ऐक्याने जो माझ्या सगुणस्वरूपाचे ठिकाणी प्रेम करतो, तो तिन्ही गुणांना ताब्यात ठेऊ शकतो.॥ ३७१॥ म्हणून मी कोण आहे. माझी भक्ति कशी आहे-म्हणजे भक्तीचे स्वरूप कसे आहे, तिच्या अव्यभिचारीपणाचे लक्षण कोणते, या सर्वाचा स्पष्टार्थ होणे आवश्यक आहे.॥ ३७२॥ तरी अर्जुना! ऐक, रत्नावरील तेज जसे रत्नच होय, त्याप्रमाणे माझे हे सगुणस्वरूप म्हणजे पूर्णब्रह्मच होय॥ ३७३॥

गूढार्थदीपिका—श्रीसद्‌गुरु गुलाबराव महाराज यांनी आपल्या ग्रंथातून सगुण साकार रामकृष्णादि स्वरूपाचे जे अनध्यस्तविवर्तत्व प्रतिपादिले आहे, त्या अनध्यस्तविवर्ताची कल्पना माऊलींनी ''रत्नी किळावो जैसा। रत्नचि तो'' या चरणानी व तसेच पुढील ओव्यातून दिली आहे.

या सर्वाचे तात्पर्य असे आहे की सगुण व निर्गुणस्वरूप यात जो निराळेपणा आहे तो नामरूपासह षड्‌गुणैश्वर्याचा आहे (निर्गुणस्वरूपाचे ठिकाणी त्याची प्रतीति येत नाही व सगुणस्वरूपाचे ठिकाणी ती येते). हे षड्‌गुणैश्वर्य अमर्याद असल्यामुळे मायिक नसून स्वरूपभूत आहे; म्हणून त्यांच्या ठिकाणी कोणत्याही रीतीने भेद नाही. दोन्ही रूपे अभिन्न आहेत. त्यातहि रत्नाच्या तेजावरूनच, असे रत्नाचे मोल ठरते, त्याप्रमाणे सगुणाच्या ठिकाणी प्रगट असणाऱ्या षड्‌गुणैश्वर्यावरूनच परब्रह्माचे निरुपमत्व अनुभवाला येते व तेजा व्यतिरिक्त जसे रत्न राहत नाही, त्याप्रमाणे ज्ञानाने परब्रह्माचा नामरूपरहित असा निर्गुण अनुभव झाला, तरी भक्तीने त्याच परब्रह्माचा सगुणसाकारस्वरूपाने अनुभव येत असल्यामुळे निर्गुणस्वरूपाला सोडून राहत नाही, असे येथे माऊलीनी सुचविले आहे.

कां द्रवपणचि नीर। अवकाशचि अंबर। गोडी तेचि साखर। आन नाहीं॥ ३७४॥
वन्हि तेचि ज्वाळ। दळाचि नांव कमळ। रूख तेंचि डाळ। फळादिक॥ ३७५॥
अगा हिम जें आकर्षलें। तेंचि हिमवंत जेवीं जालें। नाना दूध मुरालें। तेंचि दहीं॥ ३७६॥
तैसें विश्व येणें नांवें। हें मीचि पै आघवें। घेईं चंद्रबिंब सोलावें। न लगे जेवीं॥ ३७७॥

अर्थ—किंवा पाण्याहून पातळपणा निराळा नाही, पातळपण तेच पाणी, अवकाशाहून आकाश निराळे नाही, अवकाश म्हणजे आकाश होय आणि गोडीहून साखर निराळी नसते, गोडी हीच साखर होय.॥ ३७४॥ ज्वाला अग्निच होय, पाकळ्यालाच कमल हे नाव आहे. वृक्ष म्हणजेच त्याच्या डाहाळ्या-फळे हे होत.॥ ३७५॥ थंडी जी गोठली तिचाच हिमालय होतो किंवा दूध विरजले तेच दही होय॥ ३७६॥ ज्याप्रमाणे चंद्र-बिंबावर साल नसल्यामुळे ते सोलावे लागत नाही, त्याप्रमाणे संपूर्ण विश्व मीच परमात्मा नटलो आहे, असे ग्रहण कर.॥ ३७७॥

गूढार्थदीपिका—परमेश्वराहून जगताच्या भिन्न वस्तुत्त्वाची उत्पत्ति व जड विनाशित्त्वादिकांची अज्ञानजन्य भ्रांत कल्पना सोडून देऊन जगत् सच्चिदानंदस्वरूपच आहे, असे ग्रहण करावे, असा अर्थ.

घृताचें थिजलेंपण। न मोडितां घृतचि जाण। कां नाटितां कांकण। सोनेचि तें॥ ३७८॥
नुकलितां पटु। तंतुचि असे स्पष्टु। न विरवितां घटु। मृत्तिका जेवीं॥ ३७९॥
म्हणोनि विश्वपण जावें। मग तै मातें घेयावें। तैसा नव्हे आघवें। सकटचि मी॥ ३८०॥
ऐसेनि मातें जाणिजे। ते अव्यभिचार भक्ति म्हणिजे। येथ भेदु कांहीं देखिजे। तरी व्यभिचार तो॥ ३८१॥

अर्थ—तूप थिजले तरी ते तूपच राहते. बांगडीचे सोने न आटता देखील सोनेच असते. ॥ ३७८॥ वस्त्राचे दोरे अलग करून पाहिले नाही तरी ते सर्व सूतच असते. मातीचा घट पाण्यात बुडवून विरघळू दिला नाही तरी ती सर्व मातीच असते॥ ३७९॥ त्याप्रमाणे सर्व विश्वाचा लय करून माझे स्वरूप ग्रहण करावे अशी आवश्यकता नसून विश्व असतानाच (वर सांगितल्याप्रमाणे विश्वाच्या वस्तुत्वाची कल्पना सोडून देऊन) नामरूपासह संपूर्ण विश्वच मी आहे॥ ३८०॥ अशा प्रकारे अभेदाने मला जाणणे याला अव्यभिचारी भक्ति म्हणतात (यालाच अन्वयहि म्हणतात). माझ्याहून दुसऱ्या पदार्थाचे अस्तित्व मानून भेद मानणे हाच व्यभिचार होय॥ ३८१॥

याकारणें भेदातें। सांडूनि अभेदें चित्तें। आपणयासकट मातें। जाणावें गा॥ ३८२॥
पार्था सोनयाची टिक। सोनयासी लागली देख। तैसें आपणपें आणिक। मानावें ना॥ ३८३॥
तेजाचा तेजौनि निघाला। परी तेजींचि असे लागला। तया रश्मी ऐसा भला। बोधु होआवा॥ ३८४॥
पैं परमाणु भूतळीं। हिमकणु हिमाचळीं। मजमाजीं न्याहाळीं। अहं तैसें॥ ३८५॥
हो कां तरंगु लहानु। परी सिंधूसी नाहीं भिन्नु। तैसा ईश्वरीं मी आनु। नोहेचि मा॥ ३८६॥
ऐसेनि बा समरसें। दृष्टि जैं उल्हासे। ते भक्ति पैं ऐसें। आम्ही म्हणों॥ ३८७॥

अर्थ—म्हणूनच आपल्याहून मला भिन्न न पाहता, माझ्यासह सर्व एक परमात्माच आहे, अशा अभिन्नत्वाने मला जाणावे. ॥ ३८२॥ हे अर्जुना! सोन्याला लावलेली सोन्याची टिकली सोन्याहून भिन्न नसते, त्याप्रमाणे आपल्याला माझ्याहून भिन्न समजू नये. ॥ ३८३॥ तेजापासून निघालेले तेजाचे किरण ज्याप्रमाणे तेजाचे ठिकाणीच असतात, त्याप्रमाणे मी परमेश्वराचे ठिकाणीच आहे, त्याहून भिन्न नाही, असे ज्ञान असायला पाहिजे. ॥ ३८४॥ जसे परमाणु पृथ्वीवरच असतात, बर्फाचे कण हिमालय पर्वतावर असतात, त्याप्रमाणे 'अहं' हा, मज परमात्मस्वरूपाचे ठिकाणीच आहे, असे अखंड पाहात जा. ॥ ३८५॥ समुद्रावर उठलेला तरंग लहान असला तरी तो समुद्राहून निराळा होत नाही त्याप्रमाणे मी परमेश्वराहून निराळा नाही, असे पाहा॥ ३८६॥ अशा प्रकारची अभेद प्रेमदृष्टि झाली असता आम्ही त्या अभेद प्रेमदृष्टीला भक्ति म्हणतो. ॥ ३८७॥

गूढार्थदीपिका—येथे नुसत्या ऐक्याच्या जाणीवेला भक्ति म्हटले नसून परमेश्वर मी एक आहे अशी अभेदबुद्धि झाल्यावर सहजच जे सगुण परमेश्वराचे ठिकाणी आत्मप्रेम होते ते प्रेमच भक्ति होय; असे या ओवीने सुचविले आहे.

आणि ज्ञानाचें चांगावें। इयेचि दृष्टि नांवें। योगाचेंही आघवें। सर्वस्व हें ॥ ३८८॥
सिंधू आणि जळधरा-। माजीं लागली अखंड धारा। तैसी वृत्ति वीरा। प्रवर्ते ते॥ ३८९॥

अर्थ—आणि या दृष्टीने ज्ञानमार्गाचे उत्तमत्व मानले जाते. योगाचेहि सारसर्वस्व हेच आहे॥ ३८८॥ ज्याप्रमाणे समुद्रावर पाऊस पडत असता समुद्र व मेघ यांच्या मध्ये अखंड पाण्याची धार लागलेली असते, त्याप्रमाणे अर्जुना! मज परमात्म्याच्या ठिकाणी अखंड प्रेमवृत्ति लागणे ही भक्ति होय. ॥ ३८९॥

गूढार्थदीपिका—नुसत्या ज्ञानदशेतून प्रारब्धाने जसे व्युत्थान होते, तसे प्रेमातून होत नाही. परमेश्वराचे ठिकाणी अखंड वृत्ति प्रेमानेच लागू शकते म्हणून "अखंड धारा" या शब्दांनी आत्मप्रेमच सुचविले आहे.

कां कुहेसीं आकाशा। तोडीं सांदा नाहीं जैसा। तो परमपुरुषीं तैसा। एकवटे गा॥ ३९०॥

अर्थ—किंवा ज्याप्रमाणे विहिरीच्या तोंडाशी बाहेरील आकाशाचा सांधा जोडला जात नाही, त्याप्रमाणे जेव्हा जीव हा मज परमपुरुषाचे ठिकाणी समरस एकवटून जातो, तेव्हा ती भक्ति होय.॥ ३९०॥

गूढार्थदीपिका—तो परमपुरुषी तैसा। एकवटे—

''एकवटे'' या शब्दाने येथे ऐक्याच्या जाणीवेवाचून जे ऐक्य होते ते सांगितले आहे.

केवळ ज्ञानाने ऐक्य झाले असता सांधा जोडल्याच्या जाणिवेप्रमाणे ऐक्याची जाणीव राहते, पण प्रेमाने ऐक्य झाले असता ऐक्य होऊनहि ऐक्याची जाणीव राहत नाही; म्हणून येथे परमप्रेमाने होणाऱ्या ऐक्याचाच माउलीने ''एकवटे'' या शब्दाने उल्लेख केला आहे, हे उघड आहे.

प्रतिबिंबौनि बिंबवरी। प्रभेची जैसी उजरी। ते सोहंवृत्ती अवधारीं। तैसी होय॥ ३९१॥
ऐसेनि मग परस्परें। ते सोहंवृत्ति जैं अवतरे। तैं तियेंही सकट सरे। आपैसया॥ ३९२॥
जैसा सैंधवाचा रवा। सिंधूमाजीं पांडवा। विरालेया विरवावा। हेंही ठाके॥ ३९३॥
नातरी जाळूनि तृण। वन्हिही विझे आपण। तैसें भेदु नाशूनि जाण। ज्ञानही नुरे॥ ३९४॥

अर्थ—प्रतिबिंबापासून बिंबापर्यंत ज्याप्रमाणे एक प्रकाशच प्रगट असतो, त्याप्रमाणे सोहंवृत्तिपासून परमेश्वरापर्यंत एक चैतन्यप्रकाशच प्रगट असतो॥ ३९१॥ अशा परस्पर ऐक्याने जी सोहंवृत्ति प्रगट होते, तीहि या प्रेमरूप भक्तिमुळे पुढे आपोआप नाहीशी होते.॥ ३९२॥ अर्जुना! ज्याप्रमाणे समुद्रात मिठाचा खडा टाकल्याने तो आपोआप विरतो, त्याला विरवावे लागत नाही॥ ३९३॥ किंवा ज्याप्रमाणे गवत संपूर्ण जळून गेले असता गवताला जाळणारा अग्नीही विझतो, त्याप्रमाणे ज्ञान हे संपूर्ण भेदाचा नाश करून शेवटी आपणहि नाहीसे होते॥ ३९४॥

गूढार्थदीपिका—ज्ञान हे जसे आपले स्वरूप आहे, तसेच प्रेम हेहि आपले स्वरूप असल्यामुळे ज्ञानाने, परमेश्वराशी आपला अभेद आहे, असे कळून आल्यावर भेद नाहीसा होऊन सहजच परमेश्वरावर प्रेम बसते व ते वाढत जाऊन आत्मवत् होते; म्हणूनच त्या प्रेमाधिक्याने ऐक्याची जाणीवरून सोहंवृत्ति नाहीशी होते.

सारांश, आत्मज्ञान झाल्यावर त्या ज्ञानाने भेद नाहीसा होऊन पुढे प्रेमाने जाणीवहि मुरते व शेवटी एक प्रेमच उरते.

माझें पैलपण जाये। भक्त हें ऐलपण ठाये। अनादि ऐक्य जें आहे। तेंचि निवडे॥ ३९५॥
आतां गुणातें तो किरीटी। जिणे या नव्हती गोष्टी। जे एकपणाही मिठी। पडों सरली॥ ३९६॥
किंबहुना ऐसी दशा। तें ब्रह्मत्व गा सुदंशा। हें तो पावे जो ऐसा। मातें भजे॥ ३९७॥
पुढती इहीं लिंगीं। भक्तु जो माझा जगीं। हे ब्रह्मता तयालागीं। पतिव्रता॥ ३९८॥

अर्थ—मी जो संसाराच्या पलीकडे म्हटला जातो, ते माझे पैलपण नाहीसे होते. संसारनदी तरून जाण्याकरिता संसाराच्या ऐलतीरावरून भक्त जी माझी भक्ती करतो, ते त्याचे ऐलपणहि नाहीसे होऊन मूळचे जाणीवरहित जे ऐक्य आहे तेच तो होऊन राहतो॥ ३९५॥ अर्जुना! अशा स्थितीत जेथे ऐक्यही जाणविले जात नाही येथे गुणाला जिंकण्याची गोष्ट उरत नाही॥ ३९६॥ अर्जुना! फार काय सांगू! अशा दशेलाच ब्रह्म हे नाव आहे आणि ही दशा माझ्या भक्तीनेच प्राप्त होते॥ ३९७॥ आणखी अशा लक्षणाने जो माझा भक्त झाला आहे, त्याची ब्रह्मता ही पतिव्रता स्त्री होऊन राहते॥ ३९८॥

गूढार्थदीपिका—पतिव्रता स्त्री जशी सर्वस्वी पतीच्या स्वाधीन असते त्याप्रमाणे ब्रह्मस्थिति भक्ताच्या सहजच स्वाधीन होऊन राहते.

जैसें गंगेचेनि वोघें। डळमळीत जळ जें निघे। सिंधुपद तयाजोगें। आन नाहीं॥ ३९९॥
तैसा ज्ञानाचिया दिठी। जो मातें सेवी किरीटी। तो होय ब्रह्मतेचां मुकुटीं। चूडारत्न॥ ४००॥
यया ब्रह्मत्वासीचि पार्था। सायुज्य ऐसी व्यवस्था। याचि नांवें चौथा। पुरुषार्थ गा॥ ४०१॥
परी माझें आराधन। ब्रह्मत्वीं होय सोपान। येथ मी हन साधन। गमेन हो॥ ४०२॥

तरी झणी ऐसें। तुझां चित्तीं पैसें। पैं ब्रह्म आन नसे। मीवांचूनि॥ ४०३॥

अर्थ—जे पाणी खळखळ करीत गंगेच्या प्रवाहाच्या रूपाने वाहते, त्याची खळवळ बंद होण्यास जशी समुद्रावाचून दुसरी गति नाही॥ ३९९॥ त्याप्रमाणे ज्ञानाच्या अभेददृष्टीने जो माझ्या सगुणस्वरूपाचे प्रेमाने भजन करतो, तो ब्रह्मतारूप मुकुटावरील मुख्य मणि होय॥ ४००॥ अर्जुना! या ब्रह्मत्वाला सायुज्यता म्हणतात व हिलाच चौथा पुरुषार्थ असेहि नांव आहे॥ ४०१॥ एवढ्यावरून माझी भक्तीही ब्रह्मत्व प्राप्तीचे साधन आहे किंवा ब्रह्मप्राप्तीची पहिली पायरी आहे, म्हणून माझे सगुणस्वरूप साधनरूप आहे, असे तुला वाटेल, पण तसे वाटू देऊ नकोस; कारण माझ्याहून ब्रह्म दुसरे नाही॥ ४०२-४०३॥

गूढार्थदीपिका—पुष्कळ वेदान्ती रामकृष्णादि सगुणसाकार स्वरूपाची भक्ती ही निर्गुण परब्रह्माच्या प्राप्तीला साधनभूत आहे, असे जे समजतात, त्या मताचे माउलींनी येथे स्पष्टच खंडन केले आहे भगवंताच्या निर्गुण व रामकृष्णादि सगुणस्वरूपात श्रेष्ठ कनिष्ठ भाव मुळींच नाहीत व नाथांनीहि "माझे स्वरूप निज निर्गुण। अथवा वैकुंठीचे सगुण। दोन्ही एकचि निश्चये जाण। सगुण निर्गुण समसाम्य॥ ३०६॥" (ए० भा० अ० २५) इत्यादि ओव्यातून असेच सांगितले आहे. पण रामकृष्णादि स्वरूपाची (ज्ञानापूर्वी केलेली) कर्ममिश्रित अपरा किंवा गौणी भक्ती ही "गौण्या तु समाधिसिद्धि:" या शांडिल्यसूत्राप्रमाणे निर्गुण ब्रह्मप्राप्तीला साधनभूत असून ज्ञानोत्तर पराभक्ती ही ज्ञानाने उत्पन्न होणाऱ्या अहंब्रह्मपणाला व सोहंपणाला जिरविणारी होते. ब्रह्मता हीच सायुज्यता आहे व ब्रह्म माझ्याहून निराळे नाही असे सांगून सगुण श्रीकृष्णस्वरूप पूर्णब्रह्मच म्हणजे कारणब्रह्मच आहे, हे तत्त्व माउलींनी येथे प्रतिपादिले आहे.

शांकर ब्रह्मसूत्रात सगुण ब्रह्माला जे कार्य ब्रह्मत्व सांगितले आहे, ते अक्षिपुरुष आदित्यपुरुष इत्यादि सगुण ब्रह्माविषयी सांगितले आहे. रामकृष्णादि सगुणस्वरूपाविषयी नाही, हे आम्ही मागे सांगितलेच आहे.

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च । शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च॥ २७॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोऽध्याय:॥ १४॥

अर्थ—अविनाशी, अविकारी, नित्य अशा ज्ञानयोगरूप निवृत्तिधर्माने प्राप्त होणाऱ्या अखंड आनंदरूप परब्रह्माची प्रतिष्ठा-म्हणजे शेवटचे निर्विकल्प स्वरूप मीच आहे॥ २७॥

अगा ब्रह्म या नांवा। अभिप्रावो मी पांडवां। मीचि बोलिजे आघवां। शब्दीं इहीं॥ ४०४॥
पैं मंडळ आणि चंद्रमा। दोनी नव्हती सुवर्मा। तैसा मज आणि ब्रह्मा। भेदु नाहीं॥ ४०५॥
अगा नित्य जें निष्कंप। अनावृत धर्मरूप। सुख जें उमप। अद्वितीय॥ ४०६॥
विवेकु आपलें काम। सारूनि ठाकी जें धाम। निष्कर्षाचें नि:सीम। किंबहुना मी॥ ४०७॥
ऐसेसें हो अवधारा। तो अनन्याचा सोयरा। सांगतसे वीरा। पार्थासी॥ ४०८॥

अर्थ—अर्जुना! ब्रह्म या नावाचा तात्पर्यार्थ मीच आहे. या सर्व शब्दांनी मीच संबोधिला जातो॥ ४०४॥ ज्याप्रमाणे चंद्रमंडळ आणि चंद्र हे दोन नव्हेत, त्याप्रमाणे मजहून ब्रह्म किंवा ब्रह्माहून मी यत्किंचितहि अलग नाही॥ ४०५॥ जे परब्रह्म नित्य आहे, अविकारी आहे, कशानेहि झाकले गेले नाही असे धर्मरूप जे झाले आहे, जे अमर्याद सुखरूप असून जे अद्वितीय म्हणजे दुसऱ्यावाचून केवळ एकटे आहे॥ ४०६॥ विवेकवृत्ति आपले (जडचैतन्याच्या निवाड्याचे) काम करून शेवटी जेथे स्थिर होते. फार काय सांगायचे! जे सर्व साराचे असीम सारभूत आहे, ते परब्रह्म मी आहे॥ ४०७॥ हे लक्षात घे, असे अनन्याचा आप्त भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगू लागला॥ ४०८॥

गूढार्थदीपिका—या श्लोकावर भाष्य करतांना भगवान श्रीशंकराचार्य म्हणतात. "ब्रह्मण: परमात्मनो हि यस्मात्प्रतिष्ठाऽहं प्रतिष्ठित्यस्मिन्निति प्रतिष्ठाऽहं प्रत्यगात्मा।.........यया चेश्वरशक्त्या भक्तानुग्रहादि प्रयोजनाय ब्रह्म

प्रतिष्ठिते प्रवर्तते सा शक्तिर्ब्रह्मैवाहं शक्तिशक्तिमतोरनन्यत्वादित्यभिप्राय:। अथवा ब्रह्मशब्दवाच्यत्वात् सविकल्पकं ब्रह्म तस्य ब्रह्मणो निर्विकल्पकोऽहमेव नान्य: प्रतिष्ठा आश्रय:'' ज्या अर्थी ब्रह्माचा म्हणजे परमात्म्याचा मी आधार किंवा प्रत्यगात्मा आहे..........ज्या ईश्वरशक्तीने भक्तावर अनुग्रह करणे इत्यादि कार्यासाठी ब्रह्म प्रवृत्त होते ती शक्ति म्हणजे ब्रह्मच, ते मी आहे. शक्ति व शक्तिमान यांचे अभिन्नत्व असते अथवा ब्रह्म या शब्दाने उल्लेख केला असल्यामुळे येथील ब्रह्म सविकल्प आहे, त्या सविकल्प ब्रह्माची निर्विकल्प अशी मीच प्रतिष्ठा म्हणजे आधार आहे.

भाष्यात ''अहं प्रत्यगात्मा'', ''अहं निर्विकल्पक:'' असे शब्दप्रयोग आहेत. या ठिकाणी ''अहं'' म्हणजे 'मी हा शब्द भगवंताच्या सगुण साकार स्वरूपाला उद्देशूनच असल्यामुळे आचार्यांच्या भाष्याचाहि, (आम्ही मागे दाखविल्याप्रमाणेच) असा निष्कर्ष आहे की भगवंताची रामकृष्णादि सगुण साकारस्वरूपे कार्यब्रह्मरूप व क्रमाने मुक्ती देणारी नसून परब्रह्माप्रमाणेच शुद्ध व निरुपाधिक असे कारणब्रह्मरूप व साक्षात् मुक्ति देणारी आहेत.

येथ धृतराष्ट्र म्हणे। संजया हें तूतें कोणें। पुसलेनिविण वायाणें। कां बोलसी॥ ४०९॥
माझी अवसरी ते फेडीं। विजयाची सांगें गुढी। येरु जीवी म्हणे सांडीं। गोठी इया॥ ४१०॥
संजयो विस्मयें मानसीं। आहा करूनी रसरसीं। म्हणे कैसें पां देवेंसीं। द्वंद्व यया॥ ४११॥
तरी कृपाळु तो तुष्टो। यया विवेकु हा घोंटो। मोहाचा फिटो। महारोगु॥ ४१२॥
संजयो ऐसें चिंतितां। संवादु तो सांभाळितां। हरिखाचा येतु चित्ता। महापूर॥ ४१३॥
म्हणोनि आतां येणें। उत्साहाचेनि अवतरणें। श्रीकृष्णाचें बोलणें। सांगिजेल॥ ४१४॥
तया अक्षराआंतील भावो। पाववीन मी तुमचा ठावो। आइका म्हणे ज्ञानदेवो। निवृत्तीचा॥ ४१५॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां चतुर्दशोऽध्याय:॥१४॥

अर्थ—तेव्हा धृतराष्ट्र म्हणाला, संजया! हे तुला कोणी विचारले? जे विचारले नाही ते का व्यर्थ सांगतोस॥ ४०९॥ या क्षणी माझ्या अंत:करणात जो प्रश्न आहे तो सोडव. विजयाची गुढी कोणाकडे उभारली जाईल ते सांग बाकीच्या ह्या सर्व गोष्टी अंत:करणातून सोडून दे॥ ४१०॥ हे ऐकून संजयाला मनात आश्चर्य वाटले आणि म्हणाला, अरे! अरे! भगवंतांनी रसभरित निरूपण केले व ते याला सुदैवाने प्राप्त झाले (पण याला ते आवडत नाही). याचे सुदैवाशी कसे वैर आहे, पाहा॥ ४११॥ तरी कृपाळु भगवान श्रीकृष्ण त्याला प्रसन्न होऊन कृपा करो, त्याला विवेक उत्पन्न होवो व त्याचा अविवेकरूपी महारोग नाहीसा होवो॥ ४१२॥ संजय असे मनात आणून श्रीकृष्णार्जुनाच्या संवादाचा मनात विचार करीत आहे, तोच त्याच्या चित्तात महा आनंदाचा पूर लोटला॥ ४१३॥ म्हणून प्राप्त झालेल्या उत्साहाने पुढे भगवान श्रीकृष्ण काय बोलले ते सांगणार आहे॥ ४१४॥ श्रीनिवृत्तिनाथाचे श्रीज्ञानेश्वर महाराज श्रोत्यांना म्हणतात, भगवंताच्या बोलण्यातील अक्षरांचा भावार्थ मी तुमच्या अंत:करणात उतरवीन, अवधान द्या॥ ४१५॥

श्रीसद्गुरुकृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या चौदाव्या अध्यायाचा अनुवाद गूढार्थदीपिकेसह संपूर्ण झाला तो सद्गुरुंच्या चरणी समर्पण असो.

॥ श्रीज्ञानेश्वर महाराजकी जय॥

समारोप

मागे तेराव्या अध्यायात क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगाने या जगाची उत्पत्ति होते व आत्मा गुणाच्या संगाने संसारी झाल्यासारखा भासतो, पुरुषाला सुखदु:खादि भोग होण्याला गुणसंगच कारण आहे; वास्तविक आत्मा केवळ असंग असून गुणातीत आहे. असे सांगितले.

या चौदाव्या अध्यायात आत्मा असंग असताना त्याला संग कसा होतो? क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचा संयोग म्हणजे काय? गुण म्हणजे काय व ते किती आहेत? ते कसे बंधन करतात? गुणातीत पुरुषाची लक्षणे कोणती? याचे प्रसंगाने वर्णन आले आहे.

भगवान म्हणतात, अर्जुना! ज्या ज्ञानाचा आश्रय करून या देहबंधापासून सुटून मुनी परम सिद्धीला प्राप्त झाले, ते ज्ञान तुला सांगतो, ऐक.

जीव मुळात परब्रह्मस्वरूप असून परब्रह्माचे सच्चिदानंदादि धर्म त्याचे ठिकाणी कायमच असतात; पण तो ते आपले धर्म विसरून त्याहून विपरीत धर्म त्याने आपले ठिकाणी मानून घेतले आहेत. म्हणून जीवाला आत्मज्ञान-म्हणजे माझ्या ठिकाणी आत्मधर्मच आहेत याची जाणीव-करून घ्यावी लागते.

परब्रह्माच्या धर्माची विस्मृति-म्हणजे परब्रह्माची विस्मृति होय. या विस्मृतीलाच अज्ञान किंवा अविद्या असेहि म्हणतात. "ब्रह्मसत्तयैव अज्ञानस्य सत्ता" अविद्या, ब्रह्मसत्तेवरच भासत असते. हिला स्वतंत्र अस्तित्व नाही. माझी विस्मृति झाली असता ही जागी होते व माझ्या सत्तेच्या आश्रयाने ती गरोदर होते व सर्व जग प्रसवते. परब्रह्माच्या सत्तेवर अविद्या भासते, म्हणून परब्रह्म हा जगताचा पिता असून अविद्येपासून सर्व ब्रह्मांड उत्पन्न झाले असल्यामुळे ती ब्रह्मांडाची माता होय. प्रकृतिपासूनच सत्व, रज, तम या तीन गुणांची उत्पत्ति झाली असून तेच जीवाला बंधन करीत असतात. त्यात सत्व हा निर्मळ, प्रकाशरूप व निरुपद्रवी असून सुख व ज्ञान यांच्या योगाने जीवाला बंधन करतो.

रजोगुण हा मनाचे रंजन करणारा असून तो वासना व आसक्ति यांना उत्पन्न करणारा आहे. तो जीवाला फळाच्या इच्छेने फलात आसक्त करून बंधन करतो.

तमोगुण हा सर्व जीवांना मोह पाडणारा असून मोह, आलस्य इत्यादि कर्मांनी बद्ध करतो.

जीवाने गुण व गुणांची कार्ये माझी आहेत, असे समजणे, हाच गुणाचा बंध होय. एऱ्हवी जड असे गुण चेतन-जीवाला कसे बांधणार?

रज व तम या गुणांचा अविर्भाव होऊन सत्वगुण उदय पावला असता ज्ञानाचा प्रकाश पडतो. सत्व व तम यांचा अविर्भाव होऊन रजोगुणाची वृद्धि झाली असता लोभ व कर्माची प्रवृत्ति वाढते व सत्त्व व रज यांचा अविर्भाव होऊन तमोगुण वाढला असता अविवेक, प्रमाद, मोह ही लक्षणे वाढतात. सत्त्वगुणाच्या प्रधान अवस्थेत मनुष्य मरण पावला तर तो स्वर्गादि उत्तम लोकांप्रत जातो. रजोगुणाच्या प्रधान अवस्थेत मरण पावला तर मनुष्यलोकांत जन्म घेतो व तमोगुणाच्या वाढलेल्या अवस्थेत मरण पावला असता तो कीटकादि पश्वादि योनीत जातो.

सात्विककर्माचे निर्मळ असे सात्त्विक फळ मिळते, रजोगुणी कर्माचे दु:ख हे फळ मिळते, व तामस कर्माचे अज्ञान हे फळ मिळते. यावरून पाश्चात्त्यांचा उत्क्रांतिवाद गीतेला मान्य नाही, हे उघड आहे.

जेव्हा जीव गुणावांचून दुसरा कर्ता नाही, असे पाहतो व गुणांच्या पलीकडे असलेल्या अपल्या स्वरूपाला

जाणतो, तेव्हा तो जन्म, जरा, दु:ख यांपासून मुक्त होऊन माझ्या अविनाशी स्वरूपाला प्राप्त होतो.

यावर अर्जुन म्हणतो, हे श्रीकृष्णा! कोणत्या लक्षणांहून हा पुरुष तीन गुणांच्या पलीकडे गेला, असे समजावे? त्याचा आचार कसा असतो? व कशा प्रकारे तो तीन गुणांच्या पलीकडे जातो?

भगवान श्रीकृष्ण म्हणतात, सांगतो, ऐक. गुणातीत झालेला पुरुष प्रारब्धानुसार गुणांनी प्रवृत्त झाला असता त्या गुणांचा तो द्वेष करीत नाही अथवा ते (गुण) निवृत्त झाले असतां त्यांची इच्छा करीत नाही, उदासीना-सारखा राहतो.

सुख-दु:ख, प्रिय-अप्रिय, मान-अपमान, शत्रु-मित्र हे सर्व तो सारखेच मानतो, त्यांनी अंत:करणातून सर्व कर्माचा त्याग केलेला असतो.

सारांश गुणातीत पुरुष गुणाला प्रवृत्त करीत नाही किंवा निवृत्त करीत नाही, अखंड साक्षी होऊन राहतो.

जो मला अनन्यभावाने शरण जाऊन माझ्या सगुण स्वरूपाची भक्ति करतो, तोच या तिन्ही गुणांचे उल्लंघन करून गुणातीत व निर्विकल्प ब्रह्मस्वरूप होतो.

भगवान म्हणतात, अर्जुना! ज्याप्रमाणे समुद्र व लाट हे सर्वतोपरि पाणीच असते, त्याप्रमाणे माझ्या सगुण-स्वरूपांत व निर्गुण परब्रह्मस्वरूपांत यत्किंचितहि भेद नाही. निर्गुण परब्रह्मस्वरूपा प्रमाणेच माझे सगुण श्रीकृष्णस्वरूपहि पूर्णब्रह्मच आहे.

॥ श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥



॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय-पंधरावा

अवतरणिका—येथे श्री ज्ञानेश्वर महाराज मानसपूजेपासून अध्यायाच्या निरूपणास सुरुवात करतात.

आतां हृदय हें आपुलें। चौफळूनियां भलें। वरी बैसऊं पाउलें। श्रीगुरूचीं॥ १॥

अर्थ—आता आपल्या हृदयाचा उत्तम चौरंग करून त्यावर श्रीगुरुचे चरण स्थापन करु—म्हणजे हृदयकमळाचे ठिकाणी श्रीगुरुचे चरण दृढ धारण करु॥ १॥

गूढार्थदीपिका—चौफाळूनिया-आत्मानात्मविवेक, वैराग्य, शमादि षट्क व तीव्र मुमुक्षा हे या हृदयचौरंगाचे चार पाय आहेत. या चार पायांच्या अभावी विषयाच्या ध्यानामुळे श्रीगुरुचे चरण हृदयात दृढ धरले जात नाहीत, असा अर्थ.

ऐक्यभावाची अंजुळी। सर्वेद्रियकुड्मळीं। भरूनियां पुष्पांजुळी। अर्घ्यु देवों॥ २॥

अर्थ—भेद नाहीसा करून ऐक्यभावाच्या अंजुळीत सर्व इंद्रियांच्या फुललेल्या कळ्या भरून त्या चरणावर अर्घ्य देऊ—म्हणजे सर्व इंद्रियांना एकवटून त्यांचे व्यापार त्या चरणाचे ठिकाणीच अनन्यभावाने समर्पण करू॥ २॥

अनन्योदकें धुवट। वासना जे तन्निष्ठ। तें लागलेसे अबोट। चंदनाचें॥ ३॥

अर्थ—अनन्यतारूपी उदकाने धुवून शुद्ध झालेली एक गुरुचरणनिष्ठ वासना, हेच सुवासिक चंदनाचे बोट, मी त्या चरणाचे ठिकाणी लाविले आहे॥ ३॥

गूढार्थदीपिका—वासना शुद्ध व अशुद्ध अशी दोन प्रकारची आहे, हे मागे सांगितलेच आहे. (गू० दी० अ० ९ ओ० १८८)

विषयरहित अशा निष्काम भगवतप्राप्तीच्या इच्छेला प्रेम किंवा शुद्ध वासना म्हणतात. विषयकामनेचा नि:शेष त्याग केला असता ती स्वच्छ, शुद्ध, सात्त्विक व भगवन्निष्ठ होते, या एकनिष्ठ वासनेलाच येथे 'चंदनाचे बोट' असे म्हटले आहे. विषयवासना नाहीशी झाली तरच श्रीगुरुचे ठिकाणी खरे प्रेम जडते, असा अर्थ.

प्रेमाचेनि भांगारें। निर्वाळूनि नूपुरें। लेवऊं सुकुमारें। पदें तियें॥ ४॥

अर्थ—प्रेमरूपी सोन्याचे पैंजण घडवून ते श्रीगुरुच्या सुकुमार चरणांचे ठिकाणी लेववू॥ ४॥

गूढार्थदीपिका—श्रीगुरुच्या चरणाचे प्रेम करण्याला येथे सोन्याने अलंकृत करण्याची उपमा दिलेली आहे-म्हणजे अलंकाराने जशी शोभा येते तशी प्रेमाने केलेल्या सेवेला शोभा येते. प्रेम नसले तर कितीहि पूजा केली तरी ती व्यर्थ आहे, असा अर्थ.

घणावली आवडी। अव्यभिचारें चोखडी। तिये घालूं जोडी। आंगोळिया॥ ५॥

अर्थ—प्रबळ झालेल्या एकनिष्ठ प्रेमाच्या उत्तम आंगठ्या दोन चरणांच्या बोटात घालू॥ ५॥

गूढार्थदीपिका—एकनिष्ठतेने प्रेम वाढते व तेच चरणाच्या आंगठ्याप्रमाणे शोभू लागते किंवा चरणाच्या प्रबल अशा एकनिष्ठ प्रेमाने चरणाचा एक अंश देखील अत्यंत प्रिय वाटू लागतो, असा अर्थ.

आनंदामोदबहळ। सात्त्विकाचें मुकुळ। तें उमललें अष्टदळ। ठेऊं वरी॥ ६॥

अर्थ—आनंदरूप सुगंधाने पूर्ण भरलेली जी अष्टसात्त्विक भावांची कळी उमलली तेच अष्टदळात्मक कमळ वर वाहू॥ ६॥

गूढार्थदीपिका—श्रीगुरुच्या चरणाच्या प्रेमपूर्वक ध्यानाने उत्पन्न होणाऱ्या अष्टसात्त्विक भावाचे भोक्तृत्वहि, सुखाचा भोक्ता न होता, श्रीगुरुला समर्पण करून ज्ञानीभक्त केवळ आनंदरूप किंवा सुखरूप होऊन राहतात, असा भाव.

अवतरणिका—**अष्टसात्त्विक भावाच्या सुखाचा भोक्ता न होता, केवळ सुखरूप कसे व्हायचे, ते आता श्रीज्ञानेश्वर महाराज सांगतात.**

तेथें अहं हा धूप जाळूं। नाहं तेजें वोवाळूं। सामरस्यें पोटाळूं। निरंतर॥ ७॥

अर्थ—त्या ठिकाणी अहंतारूप धूप जाळू, 'मी नाही', 'सर्व एक श्रीगुरुच आहेत', या अद्वैतबुद्धि दीपाने चरणाची आरती करू व शेवटी श्रीगुरुच्या प्रेमाने साक्षित्वहि सोडून देऊन श्रीगुरुशी समरस होऊन श्रीगुरुचे चरण पोटाशी कवटाळून धरू॥ ७॥

गूढार्थदीपिका—**अहं का धूप जाळू**—

जीव मूळात पूर्ण परब्रह्मस्वरूप असून तो अहंतेमुळे निराळा झाला आहे, म्हणून अहं हे धूपाचे द्रव्य होय. तो अहंतारूप धूप जाळला पाहिजे.

''अहंभावोदयाभावः बोधस्य परमावधिः''

'मी ब्रह्म आहे' या निदिध्यासनाने ऐक्य करीत श्रीगुरुहून जीवाला अलग करणाऱ्या अहंभावाचा उदयच होऊ न देणे, याला 'अहं' धूप जाळणे म्हणतात.

माझी तनु आणि प्राण। इया दोनी पाउवा लेऊं श्रीचरण। करु भोग-मोक्ष-निंबलोण। पायां तयां॥ ८॥

अर्थ—माझे शरीर व प्राण यांच्या पादुका करून श्रीगुरुचरणी घालीन व त्या चरणावरून भोग व मोक्ष दोन्ही ओवाळून टाकीन॥ ८॥

गूढार्थदीपिका—**भोग-मोक्ष**-म्हणजे अन्वयावांचून नुसत्या व्यतिरेक ज्ञानाने प्राप्त होणारी जीवन्मुक्ति व विदेहमुक्ति.

एकरस परब्रह्माचे ठिकाणी ह्या अवस्था वस्तुतः नसून अज्ञानी जीवाच्या अपेक्षेने त्या कल्पिलेल्या आहेत.

येथे श्रीगुरुच्या ठिकाणी शिष्याचे जे आत्मवत् अमर्याद प्रेम वाढते त्याचे वर्णन केले आहे.

निर्गुण स्वरूपाच्या अनुभवाने सर्व प्राप्तीपेक्षा सगुणाचे प्रेम अधिक गोड वाटते, असा अर्थ.

इया श्रीगुरुचरणसेवा। हों पात्र तया दैवा। जें सकळार्थमेळावा। पाटू बांधे॥ ९॥

अर्थ—ज्या सुदैवाने संपूर्ण पुरुषार्थाच्या मेळाव्याच्या राज्यावर राज्याभिषेक होतो, त्या सुदैवाला या श्रीगुरुचरणसेवेने मी पात्र होवो॥ ९॥

गूढार्थदीपिका—एका श्रीगुरुच्या चरणसेवेने सर्व पुरुषार्थ साधतात, असा भाव.

ब्रह्मीचें विसवणेंवरी। उन्मेख लाहे उजरी। जें वाचेतें इये करी। सुधासिंधु॥ १०॥

अर्थ—सद्गुरुच्या चरणसेवेने प्राप्त होणाऱ्या ज्या सद्भाग्याने वाणी अमृताच्या सागरासारखी मधुर व परब्रह्माच्या निर्विकल्प स्थितीपर्यंत प्रकाश पाडणारी होते॥ १०॥

गूढार्थदीपिका—ज्ञानभक्तीने निःशेष अहंकाररहित झालेल्या व ब्रह्मानंदात डुल्लत असलेल्या भगवद्भक्ताच्या मुखातून निघणारे शब्द, अधिकारी शिष्याला परब्रह्माच्या स्वरूपाचा साक्षात् व पूर्ण अनुभव प्राप्त करून देणारे, असे प्रभावी असतात, असा अर्थ.

पूर्णचंद्राचिया कोडी। वक्तृत्वा घापे कुरोंडी। तैसी आणि गोडी। अक्षरांतें॥ ११॥
सूर्यें अधिष्ठिली प्राची। जगा राणीव दे प्रकाशाची। तैशी वाचा श्रोतयां ज्ञानाची। दिवाळी करी॥ १२॥
नादब्रह्म खुजें। कैवल्यही तैसें न सजे। ऐसा बोलु देखिजे। जेणें दैवें॥ १३॥
श्रवणसुखाच्या मांडवीं। विश्व भोगी माधवी। तैसी सासिने बरवी। वाचावल्ली॥ १४॥

ठाव न पवतां जयाचा। मनेंसी मुरडली वाचा। तो देवो होय शब्दाचा। चमत्कारु॥ १५॥
जें ज्ञानासि न चोजवे। ध्यानासिही जें नागवें। तें अगोचर फावे। गोठीमाजीं॥ १६॥
येवढें एक सौभग। वळघे वाचेचें आंग। श्रीगुरुपदपद्मपराग। लाहे जैं कां॥ १७॥

अर्थ—श्रीगुरुच्या कृपेने मुखातून निघणारे शब्द इतके आल्हादकारक व रसाळ असतात की त्याच्यावरून पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राच्या चळथी ओवाळून टाकाव्या॥ ११॥ ज्याप्रमाणे पूर्व दिशेला सूर्य उगवून जगाला प्रकाशाचे साम्राज्य देतो, त्याप्रमाणे त्याची वाणी श्रोत्यांना ब्रह्मज्ञानाची दिवाळी (रेलचेल) करते॥ १२॥ श्रीगुरुच्या सेवेने प्राप्त होणाऱ्या शब्दाच्या सद्भाग्याची अनाहत दशनाद बरोबरी करू शकत नाहीत व मोक्षस्थितिहि तशी शोभत नाही॥ १३॥ श्रवणसुखाच्या मांडवात सर्व जग वसंत ऋतूची शोभा भोगील अशी त्याची वाणीरूप वेली उत्तम रीतीने बहरते॥ १४॥ ज्याच्या स्वरूपाला प्राप्त न होताच मनासह वाणी परत फिरते, असा तो परमात्मा त्याच्या शब्दाचा चमत्कार होतो-म्हणजे तो त्याच्या शब्दानेच अपरोक्ष होतो॥ १५॥ जे ज्ञानालाहि कळत नाही व ध्यानानेहि आकलन होत नाही असे ते इंद्रियातीत परब्रह्म त्याच्या नुसत्या बोलण्यात प्राप्त होते॥ १६॥ श्रीगुरुचरणकमलाचे ठिकाणी जेव्हा एकनिष्ठ प्रेम जडते तेव्हाच वाणीच्या ठिकाणी एवढे एक सौभाग्य प्राप्त होते॥ १७॥

तरी बहु बोलूं काई। आजि तें आन ठायीं। मातेवाचूनि नाहीं। ज्ञानदेवो म्हणे॥ १८॥
जे तान्हेनि मियां अपत्यें। आणि माझे गुरु एकलौते। म्हणोनि कृपेसि एकहातें। जालें तिये॥ १९॥
पाहा पां भरोवरी आघवी। मेघ चातकांसी रिचवी। मजलागीं गोसावीं। तैसें केलें॥ २०॥
म्हणोनि रिकामें तोंड। करूं गेलें बडबड। कीं गीता ऐसें गोड। आतुडलें॥ २१॥
होय अदृष्ट आपैतें। तैं वाळूचि रत्नें परते। उजू आयुष्य तैं मारिते। लोभु करी॥ २२॥
आधणीं घातलिया हरळ। होती अमृताचे तांदुळ। जरी भुकेची राखे वेळ। श्रीजगन्नाथु॥ २३॥
तयापरी श्रीगुरु। करिती जैं अंगीकारु। तैं होऊनि ठाके संसारु। मोक्षमय आघवा॥ २४॥

अर्थ—श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, आता फार काय बोलू! हे आतापर्यंत वर्णन केलेले वाणीचे सद्भाग्य प्रस्तुत माझ्यावांचून दुसऱ्याला प्राप्त झाले नाही॥ १८॥ कारण मी श्रीगुरुचे एकुलते एक तान्हे लेकरू असल्यामुळे त्यांच्या कृपेला एकतंत्री (सर्वस्वी) मीच (पात्र) झालो आहे॥ १९॥ हे पाहा! ज्याप्रमाणे मेघ आपला संपूर्ण पाण्याचा साठा केवळ चातक पक्ष्याकरिता रिचवितात त्याप्रमाणे श्रीगुरुनी माझ्यावरच आपल्या पूर्ण कृपेचा वर्षाव केला आहे.॥ २०॥ म्हणूनच माझे रिकामे-म्हणजे शास्त्राध्ययनरहित-तोंड बडबड करीत असता त्यातून गीतेचा गोड मथितार्थ व्यक्त झाला॥ २१॥ जर दैव अनुकूल असेल तर वाळूच रत्नरूप होते किंवा आयुष्य असले तर प्राण घेऊ पाहणाऱ्यालाहि दया उत्पन्न होते॥ २२॥ जर भगवान मनुष्याच्या भुकेच्या वेळेची काळजी वाहील तर, आधणाच्या पाण्यांत खडे टाकले असता देखील त्याचा अमृतासारखा स्वादिष्ट व मधुर भात होतो॥ २३॥ त्याप्रमाणे श्रीगुरुंनी आपला म्हणून मनुष्याचा अंगीकार केला असता त्याचा संपूर्ण संसारच मोक्षस्वरूप होऊन जातो॥ २४॥

गूढार्थदीपिका—श्रीगुरुनी अंगीकार करून ब्रह्मबोध केला असता नामरूपाचे ठिकाणची जगत्स्वरूप अविद्याभ्रांति नाहीशी होऊन एका शुद्ध परब्रह्माचाच हा सर्व नामरूपात्मक विलास होय, असे कळून येते व संपूर्ण दु:खाची निवृत्ति होऊन परमानंद प्राप्ति होते. संपूर्ण दु:खनिवृत्ति व परमानंद प्राप्ति यालाच वेदान्तात मोक्ष म्हणतात, अशा रीतीने सर्व नामरूपात्मक संसार मोक्षमय होतो.

पहा पां काई श्रीनारायणें। तया पांडवांचें उणें। कीजेचि ना पुराणें। विश्ववंद्यें॥ २५॥
तैसें श्रीनिवृत्तिराजें। अज्ञानपण हें माझें। आणिलें वोजे। ज्ञानाचिया॥ २६॥
परि हें असो आतां। प्रेम रुळतसे बोलतां। कें गुरुगौरव वर्णितां। उन्मेष असे॥ २७॥
आतां तेणेंचि पसायें। तुम्हां संताचें मी पाये। वोळगेन अभिप्रायें। श्रीगीतेचेनि॥ २८॥

अर्थ—हे पाहा! विश्वाला वंद्य व पुराणपुरुष अशा भगवान श्रीकृष्णाने त्या पांडवांचे उणे पडले असता धावून

येऊन पूर्ण केले नाही काय?॥ २५॥ त्याप्रमाणे श्रीगुरु निवृत्तिनाथ महाराजांनी माझे अज्ञानपण सहज ज्ञानपणाला आणले॥ २६॥ हे आता असो! बोलता बोलता प्रेम क्षीण होते; पण श्रीगुरुचे यथार्थ माहात्म्य वर्णन केले जाईल असे ज्ञान कोठे आहे?॥ २७॥ आता श्रीगुरुच्या त्याच कृपाप्रसादाने गीतेतील अभिप्राय सांगून तुम्हा संतांच्या चरणाची सेवा करीन॥ २८॥

तरी तोचि प्रस्तुतीं। चौदाविया अध्यायाच्या अंतीं। निर्णयो कैवल्यपती। ऐसा केला॥ २९॥
जें ज्ञान जयाच्या हातीं। तोचि समर्थु मुक्ती। जैसा शतमख संपत्ती। स्वर्गींचिये॥ ३०॥
कां शत एक जन्मां। जो जन्मोनि ब्रह्मकर्मा। करी तोचि ब्रह्मा। आनु नोहे॥ ३१॥
ना तरी सूर्याचा प्रकाशु। लाहे जेवीं डोळसु। तेवीं ज्ञानेंचि सौरसु। मोक्षाचा तो॥ ३२॥
तरी तया ज्ञानालागीं। कवणा पा योग्यता आंगीं। हें पहातां जगीं। देखिला एकु॥ ३३॥
जें पाताळींचेंही निधान। दावील कीर अंजन। परी होआवे लोचन। पायाळाचे॥ ३४॥
तैसें मोक्ष देईल ज्ञान। येथ कीर नाहीं आन। परी तेंचि थारे ऐसें मन। शुद्ध होआवें॥ ३५॥
तरी विरक्तीवांचूनि काहीं। ज्ञानासि तगणें नाहीं। हें विचारूनि ठाईं। ठेविलें देवें॥ ३६॥

अर्थ—कैवल्याचा स्वामी भगवान श्रीकृष्णाने मागील चौदाव्या अध्यायाचे शेवटी असा निर्णय केला की॥ २९॥ ज्याप्रमाणे शंभर यज्ञ करणाराच स्वर्गाधिपति इंद्र होतो, त्याप्रमाणे ज्याला आत्मज्ञान प्राप्त झाले तोच मुक्त होऊ शकतो॥ ३०॥ किंवा ज्याप्रमाणे एकशेएक जन्मपर्यंत सारखा ब्राह्मणकुळात जन्म होऊन जो ब्रह्मकर्म करीत राहतो तोच ब्रह्मदेव होतो. दुसरा कोणी होत नाही॥ ३१॥ किंवा ज्याप्रमाणे डोळस माणसालाच सूर्याचा प्रकाश उपयोगी पडतो, त्याप्रमाणे ज्ञानानेच मोक्षाची योग्यता प्राप्त होते॥ ३२॥ तरी ते ज्ञान प्राप्त करून घेण्याची किंवा बाणविण्याची योग्यता कोणाच्या ठिकाणी आहे याचा विचार करता एक आढळला॥ ३३॥ डोळ्यांना मांत्रिकाचे अंजन लाविले असता खोल भूमीत गुप्त असलेले धनहि निश्चित दिसू शकते; पण ते पायाळू पुरुषाच्या डोळ्याला लावायला पाहिजे॥ ३४॥ त्याप्रमाणे ज्ञान खरोखर मोक्ष देईल हे अन्यथा नाही, पण ते ज्ञान चित्तात दृढ ठसेल असे मन प्रथम शुद्ध व्हायला पाहिजे॥ ३५॥ म्हणून वैराग्यावांचून ज्ञान-म्हणजे ब्रह्मज्ञान-चित्तात दृढ ठसू शकत नाही, असे भगवंताने तेथेच सांगून ठेवले आहे.॥ ३६॥

गूढार्थदीपिका—वैराग्य-म्हणजे विषयांचा तिटकारा-जोपर्यंत उत्पन्न होत नाही तोपर्यंत चित्तात अखंड विषयाचेच प्रेम व ध्यान राहत असल्यामुळे कितीहि ब्रह्मविचार केला तरी तो चित्तात ठसत नाही; म्हणून ब्रह्मज्ञान दृढ होत नाही.

आतां विरक्तीची कवण परी। जे येऊनि मनातें वरी। हेंही सर्वज्ञें श्रीहरी। देखिलें असे॥ ३७॥
जे विषें रांधिली रससोये। जैं जेवणारा ठाउवी होये। तैं तो ताटचि सांडूनि जाये। जयापरी॥ ३८॥
तैसी संसारा या समस्ता। जाणिजे जैं अनित्यता। तैं वैराग्य दवडितां। पाठीं लागे॥ ३९॥
आतां अनित्यत्व या कैसें। तेंचि वृक्षाकारमिषें। सांगिजत असे विश्वेशें। पंचदशीं॥ ४०॥
उपडिलें कवतिकें। झाड येरी मोहरा ठाके। तें वेगें जैसें सुके। तैसें हें नोहे॥ ४१॥
याचि एकेपरी। रूपकाचिया कुसरी। सारीतसे वारी। संसाराची॥ ४२॥
करूनि संसार वावो। स्वरूपीं अहंतेचा ठावो। होआवया अध्यावो। पंधरावा हा॥ ४३॥

अर्थ—आता हे वैराग्य अंत:करणात कोणत्या रीतीने ठसेल हेहि सर्वज्ञ अशा भगवंतांनी विचाराने ठरविले आहे॥ ३७॥ ज्याप्रमाणे स्वयंपाक विषाने तयार झाला असे जर जेवणाऱ्याला कळले तर, तो जसा ताट सोडून जातो॥ ३८॥ त्याप्रमाणे या सर्व संसाराची अनित्यता किंवा क्षणभंगुरता मनांत पक्की ठसली असता वैराग्य हाकलून लाविले तरी मागे लागते॥ ३९॥ आता हा संसार कसा क्षणभंगूर आहे हेच वृक्षाच्या रूपकाने पंधराव्या अध्यायात भगवान सांगतात॥ ४०॥ एऱ्हवी जसे कोणतेहि झाड सहज उपटले असता त्याची मुळे वर येऊन आपल्या समोर

होतात व तो तात्काळ सुकू लागतो; पण हा संसारवृक्ष तसा नाही॥ ४१ ॥ याच एका प्रकाराने व रूपकाच्या चातुर्याने संसाराची वारी संपते, असे प्रतिपादन करतात॥ ४२ ॥ संसार मिथ्या ठरवून आत्मस्वरूपाचे ठिकाणी अहं स्थिर करण्याकरीता हा पंधरावा अध्याय सांगितला गेला आहे. ॥ ४३ ॥

गूढार्थदीपिका—'अहं' म्हणजे 'मी', हे स्फुरण आत्मस्वरूपाचे ठिकाणीच होत असते, पण जीव अज्ञानभ्रांतीने आत्मस्वरूप विसरून 'अहं' म्हणजे 'मी असे आपल्याला आत्मस्वरूपाहून निराळे समजतो व त्याला देहादि सर्व सत्य वाटत असल्यामुळे तो अहंभाव देहाचे ठिकाणी धारण करतो, आत्मविचाराने देहादि सर्व संसार मिथ्या ठरल्यावर अहंभाव सहजच आपल्या आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर होतो व जीवब्रह्माचे ऐक्य होऊन जीवाला 'मी ब्रह्म आहे' असा अनुभव येतो.

आतां हेंचि आघवें। ग्रंथगर्भीचें चांगावें। उपलविजेल जीवें। आकर्णिजो॥ ४४॥

अर्थ—आतां हाच सर्व गीताग्रंथात साठविला असलेला उत्तम अभिप्राय व्यक्त करतो, तो लक्ष देवून ऐका॥ ४४ ॥

श्रीभगवानुवाच

ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम्। छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित्॥ १॥

अर्थ—श्रीभगवान म्हणतात, अर्जुना! वर मुळे व खाली शाखा असलेल्या संसारवृक्षाला अविनाशी अश्वत्थवृक्ष म्हणतात. ऋग्वेदादि वेद हे त्याची पाने असून जो त्या अश्वत्थवृक्षाला जाणतो तोच वेद जाणणारा होय॥ १ ॥

तरी महानंदसमुद्र। जो पूर्णपूर्णिमाचंद्र। तो द्वारकेचा नरेंद्र। ऐसें म्हणे॥ ४५॥

अर्थ—जो परमानंदाचा सागर व पौर्णिमेचा पूर्ण चंद्र आहे तो द्वारकेचा राजा भगवान श्रीकृष्ण असे म्हणाला॥ ४५ ॥

गूढार्थदीपिका—येथे श्रीज्ञानेश्वर माऊलींनी भगवंताला महानंद समुद्राची उपमा देऊन भगवान श्रीकृष्णाचे सगुणसाकारस्वरूप भक्ताच्या निरुपम प्रेमवृत्तीमुळे अमर्याद ब्रह्मानंदाचा होणारा विवर्त आहे व ब्रह्म अफुट असल्यामुळे ब्रह्माची पूर्णता, अमर्यादता हे गुण विवर्तातहि कायम राहिली आहेत, असे सुचविले आहे. किंवा भगवान श्रीकृष्णसगुणस्वरुपाची प्रेमभक्ति करणाऱ्यांना अखंड अमर्याद ब्रह्मानंद प्राप्त होतो असे सुचविले आहे.

अगा पैं पांडुकुमरा। येतां स्वरूपाचिया घरा। करीतसे आडवारा। विश्वाभासु जो॥ ४६॥

अर्थ—अरे बाबा पांडुच्या मुला अर्जुना! आपण आपल्या आत्मस्वरूपाकडे यावयाला लागलो असता जो हा जगताचा भास प्रतिबंध करीत असतो. ॥ ४६ ॥

गूढार्थदीपिका—नामरूपात्मक जगताविषयी अनंत जन्मापासून दृढ झालेली सत्यबुद्धि मधून मधून स्फुरत राहून ती ब्रह्म विचाराने उत्पन्न होणाऱ्या "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या" या बुद्धीला स्थिर होऊं देत नाही.

तो हा जगडंबरु। नोहे येथ संसारु। हा जाणें महातरु। थांवला असे॥ ४७॥
परी येरां रुखांसारिखा। तळीं मूळें वरी शाखा। तैसा नोहे म्हणोनि लेखा। न ये कवणा॥ ४८॥

अर्थ—हे अफाट जग, संसार नसून, बळावलेला एक महान् वृक्ष आहे असे जाण॥ ४७॥ परंतु हा इतर वृक्षासारखा खाली मुळे व वर डाहाळ्या अशा प्रकारचा नसल्यामुळे कोणालाहि त्याचे मोजमाप करता येत नाही॥ ४८ ॥

गूढार्थदीपिका—येथे माउलीने, या संसारवृक्षाला खाली मुळे व वर शाखा नाहीत म्हणजे तो केवळ काल्पनिक किंवा भ्रांतिजन्य आहे असेच सुचविले आहे.

आगी कां कुऱ्हाडी। होय रिगावा जरी बुडीं। तरी हो कां भलतेवढी। वरिचील वाढी॥ ४९॥
जे तुटलिया मूळापाशीं। उलंडेल कां शाखांसी। परी तैशी गोठी कायशी। हा सोपा नव्हे॥ ५०॥

अर्थ—वर कितीहि वाढ झाली असली तरी वृक्षाच्या मुळाशी अग्नि लावला किंवा कुऱ्हाडीचा घाव घातला

असता त्याची मुळे तुटून तो शाखांसहित उन्मळून पडतो; पण हा जगत्वृक्ष उन्मळून पडण्याजोगा तसा सोपा नाही. ॥ ४९-५० ॥

गूढार्थदीपिका—अनेक जन्मात भववृक्षाविषयी झालेल्या सत्यबुद्धीच्या अभ्यासजन्य संस्कारामुळे हा भववृक्ष काल्पनिक किंवा भ्रांतिजन्य आहे, हे बुद्धीत लवकर ठसत नाही, हेच ''उलंडेल कां शाखांसी। परि तैसी गोठी कायसी'' या चरणांनी सांगितले आहे.

अर्जुना हें कवतिक। सांगतां असे अलौकिक। जे वाढी अधोमुख। रुखा यया॥ ५१ ॥
जैसा भानु उंची नेणो कें। रश्मिजाळ तळीं फांके। संसार हें कावरुखें। झाड तैसें॥ ५२ ॥
आणि आथी नाथी तितुकें। रुंधलें असें येणेंचि एकें। कल्पांतींचेनि उदकें। व्योम जैसें॥ ५३ ॥
कां रवीच्या अस्तमानीं। आंधारेनि कोंदे रजनी। तैसा हाचि गगनीं। मांडला असे॥ ५४ ॥
यया फळ ना चुंबितां। फूल ना तुरंबितां। जें कांहीं पांडुसुता। तें रुखुचि हा॥ ५५ ॥

अर्थ—अर्जुना! या संसारवृक्षाचे असे अलौकिक आश्चर्य आहे की त्याची वाढ खाली आहे ॥ ५१ ॥ ज्याप्रमाणे सूर्य किती उंच आहे हे जाणता येत नाही, तरीपण त्याची किरणे पृथ्वीपर्यंत येतात, त्याप्रमाणे हा संसारवृक्ष किती उंच आहे हे समजत नाही, पण खाली वाढलेला दिसतो, असा चमत्कारिक आहे ॥ ५२ ॥ ज्याप्रमाणे कल्पाचे शेवटी सर्व आकाश पाण्याने भरून जावे, त्याप्रमाणे जेवढे काही ''आहे-नाही'' असे म्हणतो तेवढे सर्व या एकानेच व्यापिले आहे ॥ ५३ ॥ किंवा ज्याप्रमाणे सूर्य अस्तास गेला म्हणजे सर्वत्र अंधारमय रात्र होते, त्याप्रमाणे हा आकाशाच्या पोकळीत पसरला आहे ॥ ५४ ॥ या संसारवृक्षाचे फळ खावे तर याला फळच येत नाही. त्याच्या फुलाचा वास घ्यावा तर याला फूलच लागत नाही. जे काही आहे अर्जुना! सर्व तो वृक्षच आहे ॥ ५५ ॥

हा उर्ध्वमूळ आहे। परी उन्मूळिला नोहे। येणेंचि हा होये । शाड्वळू गा॥ ५६ ॥
आणि उर्ध्वमूळ ऐसें। निगदिलें कीर असे। परी अधींही असोसें। मूळें यया॥ ५७ ॥
प्रबळला चौमेरीं। पिंपळा कां वडाचिया परी। जे पारंबियांमाझारीं। डाहाळिया असती॥ ५८ ॥
तेवींचि गा धनंजया। संसारतरु यया। अधींचि आथी खांदिया। हेंही नाहीं॥ ५९ ॥
तरी उर्ध्वाहीकडे। शाखांचे मांदोडे। दिसताति अपाडें। सासिन्नले॥ ६० ॥
जालें गगनचि पालवीये। कां वारा मांडला रुखाचेनि आयें। नाना अवस्थात्रयें। उदय केला असे॥ ६१ ॥
ऐसा हा एकु। विश्वाकार विटंकु। उदयला जाण रुखु। ऊर्ध्वमूळु॥ ६२ ॥

अर्थ—याची मुळे वर आहेत खरी, पण तो उपटून पडलेला नव्हे. म्हणूनच अर्जुना! हा सदा हिरवागार असतो॥ ५६॥ याला वर मुळे आहेत असे जरी खरोखर सांगितले आहे, तरी खालीहि याला असंख्य मुळे आहेत॥ ५७॥ पिंपळ किंवा वडाच्या वृक्षाप्रमाणे हा चहूकडे पसरला असून त्याच्या पारंब्यामध्येहि डाहाळ्या आहेत॥ ५८॥ अर्जुना! त्याचप्रमाणे या संसार वृक्षाला केवळ खालीच खांद्या आहेत, असेहि नाही॥ ५९॥ तर वरहि शाखांचे अपार समुदाय पसरलेले दिसतात॥ ६०॥ हा संसारवृक्ष म्हणजे जणुकाय आकाशालाच पाने फुटली किंवा वाराच संसारवृक्षाच्या आकाराने पसरला किंवा जागृति, स्वप्न, सुषुप्ति ह्या शब्दरूपाने असलेल्या तिन्ही अवस्था प्रत्यक्ष व्यक्त झाल्या॥ ६१॥ याप्रमाणे वर मुळे असलेला एक विश्वाकार उंच व धनदाट वृक्ष उदयास आला आहे, असे समज. ॥ ६२ ॥

आतां ऊर्ध्व या कवण। येथें मूळ तें किं लक्षण। कां अधोमुखपण। शाखा कैसिया॥ ६३ ॥
अथवा द्रुमा यया। अधीं जिया मुळिया। तिया कोण कैसिया। ऊर्ध्व शाखा॥ ६४ ॥
आणि अश्वत्थु हा ऐसी। प्रसिद्धि कायसी। आत्मविदविलासीं। निर्णय केला॥ ६५ ॥
हें आघवेंचि बरवें। तुझिये प्रतीतीसि फावे। तैसेनि सांगों सोलिवें। विन्यासें गा॥ ६६ ॥
परी ऐकें गा सुभगा। हा प्रसंगु असे तुजचि- जोगा। कानचि करीं हो सर्वांगा। हियें आथिलिया॥ ६७ ॥

ऐसें प्रेमरसें सुरफुरें। बोलिलें जंव यादववीरें। तंव अवधान अर्जुनाकारें। मूर्त जालें॥ ६८॥
देव निरूपिती तें थेंकुलें। येवढें श्रोतेपण फांकलें। जैसें आकाशा खेंव पसरिलें। दाहीं दिशीं॥ ६९॥
श्रीकृष्णोक्तिसागरा। हा अगस्तीचि दुसरा। म्हणौनि घोंटु भरों पाहे एकसरा। अवधेयाचा॥ ७०॥
ऐसी सोय सांडूनि खवळिली। आवडी अर्जुनीं देवें देखिली। तेथ जालेनि सुखें केली। कुरवंडी तया॥ ७१॥
मग म्हणे धनंजया। तें ऊर्ध्व गा तरू यया। येणें रुखेंचि कां जया। ऊर्ध्वता गमे॥ ७२॥

अर्थ—आता या संसारवृक्षाचे ऊर्ध्व काय? त्याच्या मूळाचे लक्षण काय? किंवा यांच्या शाखा खाली कशा गेल्या आहेत॥ ६३॥ अथवा या संसारवृक्षाच्या खाली गेलेली जी मुळे आहेत ती कोणती व कशी? व वर गेलेल्या शाखा कोणत्या आणि कशा आहेत॥ ६४॥ आणि या संसारवृक्षाला जे अश्वत्थ म्हणण्यात येते तो निर्णय ज्ञानी पुरुषांनी कशासाठी केला!॥ ६५॥ हे सर्व तुझ्या बुद्धीला उत्तम आकलन होईल अशा स्पष्ट रीतीने, अर्जुना! तुला सांगतो॥ ६६॥ हे भाग्यवान अर्जुना! या विषयीचे निरूपण तुलाच सांगण्याजोगे आहे; म्हणून सर्वांगाचे ठिकाणी कान करून पूर्ण एकाग्र अंत:करणाने ऐक॥ ६७॥ याप्रमाणे यादवांमध्ये पराक्रमी अशा भगवान श्रीकृष्णाने अत्यंत प्रेमाने म्हटले असता अवधानच अर्जुनाचे रूपाने मूर्तिमंत प्रगट झाले॥ ६८॥ ज्याप्रमाणे दहाहि दिशांनी आकाशाला कवटाळिले आहे, त्याप्रमाणे देवाचे संपूर्ण निरूपण हृदयाच्या मानाने छोटे होऊन हृदयात सामाविले जाईल एवढे अर्जुनाचे श्रोतेपण विस्तृत झाले॥ ६९॥ भगवान श्रीकृष्णाच्या निरूपणरूपी सागरास अर्जुन हा दुसरा अगस्तिच प्राप्त झाला; म्हणूनच तो भगवंताच्या संपूर्ण निरूपणाचा एकच घोट करू पाहत होता॥ ७०॥ याप्रमाणे अर्जुनाच्या अंत:करणात निरूपण ऐकण्याची आवड अमर्याद वाढली आहे, हे पाहून भगवान श्रीकृष्णाला जो आनंद झाला, तो अर्जुनावरून ओवाळून टाकला॥ ७१॥ मग भगवान म्हणाले, अर्जुना! ते (ब्रह्म) या वृक्षाचे वर आहे. या वृक्षामुळेच त्याला ऊर्ध्वपणा येतो॥ ७२॥

गूढार्थदीपिका—परब्रह्म हे संपूर्ण आकाशासह असलेल्या असार संसारवृक्षाच्या पलीकडे असल्यामुळे संसारवृक्षाच्या अपेक्षेनेच त्याला ऊर्ध्व असे म्हटले आहे, कठोपनिषद् वल्ली ६ श्रुति १-यातहि या संसारवृक्षाचे असेच वर्णन आले आहे.

एऱ्हवीं मध्य ऊर्ध्व अध। हे नाहीं जेथ भेद। अद्वयासीं एकवद। जया ठायीं॥ ७३॥
जो नाइकिजतां नादु। जो असौरभ्य मकरंदु। जो आंगाथिला आनंदु। सुरतेंविण॥ ७४॥
जया जें आऱ्हां परौतें। जया जें पुढें माघौतें। दृष्येविण देखते। अदृश्य जें॥ ७५॥
उपाधीचा दुसरा। घालितां वोपसरा। नामरूपाचा संसारा। होय जयातें॥ ७६॥

अर्थ—एऱ्हवी ते परब्रह्म अद्वैतरूपाने व्यापक असल्यामुळे त्याचे ठिकाणी मध्ये, वर, खाली असा मुळी भेदच नाही॥ ७३॥ जो न ऐकता येणारा अव्यक्त नाद होय, वास न घेता येणारा अव्यक्त सुवास होय व रतिक्रीडेवाचून पुष्ट असलेला आनंद होय॥ ७४॥ ती ब्रह्मवस्तु ज्या या संसारवृक्षाच्या अलीकडे, पलीकडे, मागे असून जी दृश्यरहित अशी केवळ प्रकाशरूप व अद्वितीय आहे॥ ७५॥ परब्रह्माचे ठिकाणी नामरूपाच्या भिन्न वस्तुत्वाचा मुलामा दिला असता ती नामरूपे उपाधि होऊन संसाररूप भासतात॥ ७६॥

गूढार्थदीपिका—आपला धर्म दुसऱ्या वस्तूचे ठिकाणी भासविण्याला किंवा वस्तूचे ठिकाणी मूळात नसलेला धर्म भासविण्याला कारण होणाऱ्या पदार्थाला उपाधि म्हणतात.

अफुट, अद्वैत, परब्रह्माचे ठिकाणी अनेक नामरूपामुळे अनेक प्रकारच्या संसाराचा केवळ भास होतो, संसाराचे खरोखर अस्तित्व नाही.

ज्ञातृज्ञेयाविहीन। नुसधेंचि जें ज्ञान। सुखा भरलें गगन। गाळींव जें॥ ७७॥
जें कार्य ना कारण। जया दुजें ना एकपण। आपणयां जें जाण। आपणचि॥ ७८॥
ऐसें वस्तु जें साचें। तें ऊर्ध्व गा यया तरूचें। तेथ आर घेणें मूळाचें। तें ऐसें असे॥ ७९॥

तरी माया ऐसी ख्याती। नसतीच यया आथी। कां वांझेची संतती। वानणें जैसे॥ ८०॥
तैंसी सत् ना असत् होये। जे विचाराचें नाम न साहे। ऐसे यापरीची आहे। अनादि म्हणती॥ ८१॥
जे नाना तत्वांची मांदुस। जे जगदभ्राचें आकाश। जे आकारजाताचें दुस। घडी केलें॥ ८२॥
जे भवद्रुमबीजिका। जे प्रपंचचित्रभूमिका। विपरीतज्ञानदीपिका। सांचली जे॥ ८३॥
ते माया वस्तूचां ठायीं। असे जैसेनि नाहीं। मग वस्तुप्रभावचि पाही। प्रगट होय॥ ८४॥

अर्थ—जी परब्रह्मवस्तु ज्ञातृज्ञेयविरहित केवळ ज्ञानरूप असून जे सुखाने भरलेले गाळीव आकाशच होय॥ ७७॥ जी कशापासून उत्पन्न होत नसून कशालाही उत्पन्न करीत नाही. जिच्या बरोबरीची दुसरी वस्तु नाही व दुसऱ्या वस्तूच्या अपेक्षेने जिला एकपणहि नाही. जी (ब्रह्मवस्तु) आपल्या ठिकाणी आपणच अशी द्वैताद्वैतरहित आहे, असे जाण॥ ७८॥ अशी जी खरी (ब्रह्म) वस्तु ती या वृक्षाचे ऊर्ध्व होय. या वस्तुच्या ठिकाणी संसारवृक्षाच्या मुळाचे अंकुर घेणे अशा प्रकारचे आहे॥ ७९॥ ज्याप्रमाणे वंध्येच्या नसलेल्या संततीचे वर्णन करावे त्याप्रमाणे व्यर्थच जिचे 'माया' असे नसतेच नांव प्रसिद्ध आहे॥ ८०॥ जी खरी किंवा खोटी म्हणता येत नाही, जी विचाराचे नाव सहन करीत नाही-म्हणजे जी विचाराने सिद्ध होत नाही. अशा प्रकारची ती आहे व ती अनादि आहे असेहि म्हणतात॥ ८१॥ जी अनेक पदार्थांनी भरलेली पेटीच होय. जी जगद्रूप अभ्र येण्याचे आकाश होय. जी अनेक प्रकारच्या आकाराच्या वस्त्राची केलेली घडी होय॥ ८२॥ अशी जी संसाररूपी वृक्षाचे बीज असून प्रपंचरूप नाना चित्रे काढण्याची भूमि होय. किंवा खरोखर जी विपरित ज्ञानाची अथवा भलतेच दाखविणारी प्रज्वलीत दिवटी आहे॥ ८३॥ ती माया, परब्रह्मवस्तूचे ठिकाणी 'नाही' सारखीच आहे. वास्तविक हे सर्व परब्रह्मवस्तूचेच सामर्थ्य प्रगट झाले आहे, असे समज॥ ८४॥

गूढार्थदीपिका—श्रीज्ञानेश्वर महाराजांनी अमृतानुभव प्रकरण सात-ओव्या ६४-७७ पर्यंत अज्ञानाचे अथवा मायेचे जे स्वरूप वर्णन केले आहे तसेच मायेचे स्वरूप येथेहि त्यानी सांगितले आहे.

या ओव्यांचा आशय असा की माया किंवा अज्ञान वस्तुत: नसून ती जीवाची नुसती कल्पना आहे; म्हणून जे काही नामरूपात्मक भासते ते सच्चिदानंद परब्रह्माहून भिन्न-जड-विनाशी जगत् नसून सच्चिदानंद परब्रह्मच आपल्या ऐश्वर्यशक्तीने प्रगट झाले आहे.

दिसणारे दृश्य दृष्ट्याहून निराळे नसून तो द्रष्टाच आहे असे माउलीने "जे दृश्य द्रष्टाचि आहे" (अमृ० प्र० ७-२१३) इत्यादि ओव्यांनी अमृतानुभवातहि सांगितले आहे.

जेव्हां आपणया आली नीद। करी आपणपें जेवीं मुग्ध। कां काजळी आणि मंद। प्रभा दीपीं॥ ८५॥
स्वप्नीं प्रियापुढें तरुणांगी। निदेली चेवऊनि वेगीं। आलिंगिलेनिवीण आलिंगी। सकाम करी॥ ८६॥
तैसी स्वरूपीं जाली माया। आणि स्वरूप नेणणें जे धनंजया। तेंचि तरु यया। मूळ पहिलें॥ ८७॥

अर्थ—जेव्हा आपल्याला झोप येते तेव्हा ती आपल्याला जशी विचारहीन करते किंवा दिव्यापासून झालेल्या काजळाने दिव्यांचा प्रकाश मंद होतो॥ ८५॥ किंवा ज्याप्रमाणे मनुष्य आपली तरुण स्त्री आपल्याजवळ निजली आहे असे स्वप्नात दिसताच ती जशी आलिंगन न देताच आलिंगन देत आहे असे भासविते व त्याला तात्काळ सकाम करून जागे करते॥ ८६॥ त्याप्रमाणे, अर्जुना! परब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी माया आहे आणि जीवाने मी आपले आत्मस्वरूप न जाणणे हेच संसाररूपी अश्वत्थवृक्षाचे मूळ धरणे होय॥ ८७॥

गूढार्थदीपिका—स्वरूप नेणणे-म्हणजे 'मी ब्रह्म आहे' असे आपले स्वरूप न जाणणे किंवा 'सच्चिदानंद ब्रह्म मीच आहे' असे न जाणणे.

जीव स्वत:मूळचा ब्रह्मस्वरूप असताना तो मी ब्रह्म जाणत नाही म्हणतो या त्याच्या भ्रांतीला माया किंवा अज्ञान म्हणतात. या मायेचा किंवा भ्रांतीचा जीव अभिमान धरतो, पण ती परमेश्वराच्या सत्तेवर भासते.

वस्तूसी आपुला जो अबोधु। तो ऊर्ध्वीं आठुळैजे कंदु। वेदांतींही हाचि प्रसिद्धु। बीजभावो॥ ८८॥

घनअज्ञानसुषुप्ती। तो बीजांकुरभावो म्हणती। येर स्वप्न हन जागृती। हा फळभावो तियेचा॥ ८९ ॥

अर्थ—आपल्याला आत्मवस्तूचा बोध (ज्ञान) नाही असे जे जीवाला वाटते तोच संसारवृक्षाचा वर बांधला गेलेला कंद होय, असे वेदान्तात प्रसिद्ध आहे. त्याला संसारवृक्षाचा बीजभावहि म्हणतात॥ ८८ ॥ असे गाढ अज्ञान ज्या सुषुप्ति अवस्थेत असते त्या अवस्थेला बीजभाव किंवा अंकुरभाव म्हणतात. जागृति व स्वप्न हा तिचा फलरूप भाव होय॥ ८९ ॥

गूढार्थदीपिका—बीजभाव-म्हणजे संसारवृक्षाची अव्यक्त दशा.

फलभाव—म्हणजे संसारवृक्षाची नामरूपात्मक व्यक्त दशा.

ऐसी यया वेदांतीं। निरूपण भाषा प्रतीती। परी तें असो प्रस्तुतीं। अज्ञान मूळ॥ ९० ॥
तें ऊर्ध्व आत्मा निर्मळें। अधोर्ध्व सूचिती मूळें। बळिया बांधोनि आळें। मायायोगाचें॥ ९१ ॥
मग आधिलीं देहांतरें। उठती जियें अपारें। तें चौपासि घेऊनि आगारें। खोलावती॥ ९२ ॥
ऐसें भवद्रुमाचें मूळ। हें ऊर्ध्वी करी बळ। मग आग्रियांचें बेंबळ। अधीं दावी॥ ९३ ॥
तेथ चिद्वृत्ति पहिलें। महत्तत्त्व उमललें। तें पान वाल्हेंदुल्हें। एक निघे॥ ९४ ॥
मग सत्त्वरजतमात्मक। त्रिविध अहंकार जो एक। तो तिवणा अधोमुख। डिरू फुटे॥ ९५ ॥
तो बुध्दीची घेऊनि आगारी। भेदाची वृद्धि करी। तेथें मनाचें डाळ धरी। साजेपणें॥ ९६ ॥

अर्थ—अशा प्रकाराने वेदान्तात भाषा वापरलेली दिसते असो. तूर्त एवढेच सांगावयचे की या संसारवृक्षाचे मूळ अज्ञान आहे॥ ९० ॥ शुद्ध आत्मस्वरूप हे संसारवृक्षाचे ऊर्ध्व असून तेथे मायेचा संबंध हे बळकट आळे बांधले जाते असे सांगून संसारवृक्षाची मूळे खाली वर आहेत असे सूचविले आहे॥ ९१ ॥ मग खालचे जे नाना प्रकारचे असंख्य देह उत्पन्न होतात, ते चार प्रकारचे अंकुर घेऊन आणखी खोल जातात॥ ९२ ॥ असे हे संसारवृक्षाचे मूळ वर बलवान होऊन त्याला खाली अंकुराचे झुपकेच्या झुपके येतात॥ ९३ ॥ तेथे चैतन्यवृत्तिरूप बुद्धि हे जे पहिले तत्त्व प्रगट झाले ते या संसारवृक्षाला अत्यंत कोवळे पान फुटते॥ ९४ ॥ त्यानंतर त्याला सात्विक, राजस, तामस अशा तीन प्रकारच्या अहंकाराचा खाली वाढणारा तीन पानी कोंभ येतो॥ ९५ ॥ तो (अहंकार) बुद्धिरूपी शाखेचा आश्रय करून भेदाची वाढ करतो व तेथे मनाची डाहाळी ताजेपण धारण करते॥ ९६ ॥

गूढार्थदीपिका—मन नवी नवी कल्पना करीत असल्यामुळे मनाच्या डाहाळीच्या साजेपणाची उपमा दिली आहे.

ऐसा मूळाचिया गाढिका। विकल्परस कोंवळिका। चित्तचतुष्टय डाहाळिका। कोंभैजे तो॥ ९७॥

अर्थ—अशा प्रकारे मूळाच्या सुदृढतेमुळे व विकल्परूपी कोवळ्या रसाच्या पुष्टीमुळे त्याला चित्तचतुष्टयरूपी डाहाळीचा कोंभ निघतो॥ ९७॥

गूढार्थदीपिका—चित्तचतुष्टय-मन, बुद्धि, चित्त व अहंकार याला चित्तचतुष्टय म्हणतात.

मग आकाश वायु द्योतक। आप पृथ्वी हे पांच फोंक। महाभूतांचे सारोक। सरळे होती॥ ९८ ॥
तैसीं श्रोत्रादि तन्मात्रें। तियें अंगवसां गर्भपत्रें। लुळलुळितें विचित्रें। उमळती गा॥ ९९ ॥
तेथ शब्दांकुर वरिपडी। श्रोत्रा वाढी देवढी। होता करित कांडीं। आकांक्षेचीं॥ १०० ॥

अर्थ—मग आकाश, वायु, अग्नि, आप व पृथ्वी असे पंचमहाभूतांचे चांगले सरळ फाटे फुटतात॥ ९८ ॥ तसेच श्रोत्रादि तन्मात्रा (शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध) ही शेंड्यावरील न उमललेली कोवळी विचित्र पाने निघतात॥ ९९ ॥ तेथे शब्दरूपी अंकुराशी मिठी पडली असता श्रोत्रेंद्रियांची अधिक वाढ होऊन तिला आकांक्षेची कोंभे फुटतात॥ १०० ॥

गूढार्थदीपिका—कानाने वस्तूचे वर्णन ऐकून ती वस्तु प्राप्त व्हावी ही इच्छा बळावते असा अर्थ.

अंगत्वचेचे वेलपल्लव। स्पर्शांकुरीं घेती धांव। तेथ बांबळ पडे अभिनव। विकारांचें॥ १०१ ॥

अर्थ—जेव्हा अंगावरील त्वचेची वेलपालवी स्पर्शरूपी अंकूराकडे धाव घेते तेव्हा विकाराची विलक्षण वाढ होते ॥ १०१ ॥

गूढार्थदीपिका—त्वचेशी स्पर्शविषयाचा संबंध झाला असता नाना प्रकारचे विकार वाढतात, असा अर्थ.

पाठीं रूपपत्र पालोवेलीं। चक्षु लांब तें कांडें घाली। ते वेळीं व्यामोहता भली। पान्हेली जाय ॥ १०२ ॥

अर्थ—मग रूपपत्राची वाढ झाली असता चक्ष्वेंद्रियाला लांब पेरे निघतात तेव्हा बुद्धीत बरीच आसक्ति वाढते ॥ १०२ ॥

गूढार्थदीपिका—चक्षु लांब ते कांडे घाली-म्हणजे दूर स्वर्गात असलेल्या व मरणानंतर प्राप्त होणाऱ्या अप्सरादिकांच्या रूपावर ते चक्ष्वेंद्रिय आसक्त होऊन धाव घेते.

आणि रसाचे आंगवसे। वाढतां वेगें बहुवसें। जिव्हे आर्तीचीं असोसें। निघती बेंचें ॥ १०३ ॥
तैसेंचि कोंभैलेनि गंधे। घ्राणाची डिरी थाव बांधे। तेथ तळु घे स्वानंदें। प्रलोभाचा ॥ १०४ ॥
एवं महदहंबुद्धी। मनें महाभूतसमृध्दी। इये संसाराचिया अवधी। सासनिजे ॥ १०५ ॥
किंबहुना इहीं आठें। आंगीं हा अधिक फांटे। परी शिंपीचि येवढें उमटे। रुपें जेवीं ॥ १०६ ॥
कां समुद्राचेनि पैसारें। वरी तरंगता असारे। तैसें ब्रह्मचि होय वृक्षाकारें। अज्ञान मूळ ॥ १०७ ॥

अर्थ—रसविषयाची पाने वेगाने फार वाढली असता जिभेला नाना प्रकारचे रस चाखण्याच्या इच्छेची पुष्कळ पानात पाने फुटतात ॥ १०३ ॥ तसेच कोंभरूप असलेल्या गंधविषयाने जेव्हा घ्राणेंद्रियरूप अंकुर बळावतो, तेव्हा घ्राणेंद्रिय आनंदाने लोभाच्या तळापर्यंत जाते-म्हणजे घ्राणेंद्रियाला सुगंधाची आसक्ति जडते ॥ १०४ ॥ याप्रमाणे महत् म्हणजे अहंकार, बुद्धि, मन, पंचमहाभूते या आठ पदार्थांचा समुदाय संसाराच्या मर्यादेतच विस्तारला आहे ॥ १०५ ॥ फार काय सांगावे! ज्याप्रमाणे जेवढी शिंप असते तेवढेच तिच्यावर रुपेहि भासते, त्याप्रमाणे परब्रह्मावर भासणारा हा संसारवृक्ष या आठ तत्त्वांच्या योगाने परब्रह्मासारखाच अमर्याद भासतो ॥ १०६ ॥ किंवा जितका समुद्र पसरलेला असतो तितकेच तरंग पसरलेले दिसतात, त्याप्रमाणे अमर्याद परब्रह्मच अज्ञान मूळ घेऊन संसारवृक्षाकार भासते ॥ १०७ ॥

आतां याचाचि हा विस्तारु। हाचि यया पैसारु। जैसा आपणपें स्वप्नीं परिवारु। येकाकिया ॥ १०८ ॥
परीं तें असो हें ऐसें। कावरें झाड उससे। यया महदादि आरवसें। अधोशाखा ॥ १०९ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे एकच पुरुष स्वप्नात आपणच अनेक परिवाररूप होतो, त्याप्रमाणे परब्रह्माचाच हा विस्तार असून तेच आपण आपल्या ठिकाणी विस्तार पावले आहे ॥ १०८ ॥ पण ते असो. अशा प्रकारचे हे भ्रांतिजन्य झाड वाढीस लागते. महादादि अंकुर ह्या याच्या खालच्या खांद्या होत ॥ १०९ ॥

आणि अश्वत्थु ऐसें ययातें। म्हणती ते जाणते। तेंही परिस हो येथें। सांगिजेल ॥ ११० ॥
तरी अश्वत्थ म्हणिजे उखा। तोंवरि एकसारिखा। नाहीं निर्वाहो यया रुखा। प्रपंचरूपा ॥ १११ ॥
जैसा न लोटतां क्षणु। मेघु होय नानावर्णु। कां विजु नसे संपूर्णु। निमेषभरी ॥ ११२ ॥
कांपतया पद्मदळा। वरीलिया बैसका नाहीं जळा। कां चित्त जैसें व्याकुळा। माणुसांचे ॥ ११३ ॥
तैसीचि ययाची स्थिती। नासत जाय क्षणक्षणाप्रती। म्हणौनि ययातें म्हणती। अश्वत्थ हा ॥ ११४ ॥

अर्थ—आणि या संसाराला अश्वत्थ असे जे जाणते पुरुष म्हणतात, त्याचेहि कारण सांगतो, ऐक ॥ ११० ॥ तरी अश्वत्थ म्हणजे ज्या प्रपंचरूपवृक्षाची उद्यापर्यंत देखील एकसारखी स्थिति राहू शकत नाही असा ॥ १११ ॥ ज्याप्रमाणे एक क्षण लोटत नाही तोच मेघाचे नाना रंग होतात किंवा बीज क्षणभरहि स्थिर राहत नाही ॥ ११२ ॥ किंवा सारखे हालत असलेल्या कमळाच्या पाकळीवरील पाणी एका ठिकाणी स्थिर राहात नाही अथवा व्याकुळ माणसाचे चित्त क्षणभरहि स्थिर राहत नाही ॥ ११३ ॥ त्याप्रमाणेच या प्रपंचवृक्षाची स्थिति आहे. तो क्षणोक्षणी नाश पावत जातो, म्हणून त्याला अश्वत्थ म्हणतात. ॥ ११४ ॥

आणि अश्वत्थ येणें नांवें। पिंपळ म्हणती स्वभावें। परी तो अभिप्रावो नव्हे। श्रीहरीचा॥ ११५॥
एऱ्हवीं पिंपळ घडतां विखीं। मियां गति देखिली असे निकी। परी तें असो काय लौकिकीं। तुम्हां काज॥ ११६॥
म्हणौनि हा प्रस्तुतु। अलौकिक परिसा ग्रंथु। तरी क्षणिकत्वेंचि अश्वत्थु। बोलिजे हा॥ ११७॥

अर्थ—आणि अश्वत्थ या नावाने पिपळाचा वृक्ष असा सहजच अर्थ घेतात; पण येथे भगवंताच्या म्हणण्याचा तसा अर्थ नाही॥ ११५॥ वास्तविक पाहता भगवंतानी संसारवृक्षाला हे जे नाव दिले आहे त्याच्या अर्थाची गति मी उत्तम रीतीने जाणली आहे. पण ते असो! तुम्हाला या लौकिक अर्थाचे काय करायचे आहे॥ ११६॥ म्हणून प्रस्तुतचा हा अलौकिक (आध्यात्मिक) गीता ग्रंथ ऐका आणि हा संसारवृक्ष क्षणिक असल्यामुळेच याला जाणते लोक अश्वत्थ म्हणतात॥ ११७॥

आणिकही येक थोरु। यया अव्ययत्वाचा डगरु। आथी परी तो भीतरु। ऐसा आहे॥ ११८॥
जैसा मेघांचेनि तोंडें। सिंधु एके आंगें काढे। आणि नदी येरीकडे। भरितीचि असती॥ ११९॥
तेथ वोहटे ना चढे। ऐसा परिपूर्णुचि आवडे। परी ते फुली जंव नुघडे। मेघानदींची॥ १२०॥
ऐसें या रुखाचें होणेंजाणें। न तर्के होतेनि वहिलेपणें। म्हणौनि ययातें लोक म्हणे। अव्यय हा॥ १२१॥
एऱ्हवीं दानशीळ पुरुषु। वेंचकपणेंचि संचकु। तैसा व्ययेंही हा रुखु। अव्ययो गमे॥ १२२॥
जातां वेगें बहूवसें। न वचे कां भूमी रुतलें असे। रथाचें चक्र दिसे। जिया परी॥ १२३॥
तैसें काळातिक्रमें जे वाळे। ते भूतशाखा जेथ गळे। तेथ कोडीवरी उमाळे। उठती आणिक॥ १२४॥
परी येकी केधवां गेली। शाखा कोडी केधवां जाली। हें नेणवे जेवीं उमललीं। आषाढअभ्रें॥ १२५॥

अर्थ—आणखी याच्यावर अविनाशी असा एक थोर आरोप आहे खरा; पण आंत तो हा असा आहे॥ ११८॥ ज्याप्रमाणे समुद्र एकीकडे मेघाच्या रूपाने आपल्यातून पाणी काढून घेतो तर दुसरीकडे नद्या भर घालीत असतात॥ ११९॥ म्हणून समुद्र कमी होत नाही किंवा भरला जात नाही. सदासर्वदा पूर्ण आहे, असा वाटतो. परंतु हे सर्व मेघ व नदी याचा संबंध बंद पडत नाही तोपर्यंतच असे वाटते॥ १२०॥ याप्रमाणे या संसारवृक्षाचे होणे-जाणे प्रवाहाप्रमाणे अगदी लागोपाठ होत असल्यामुळे लक्षात येत नाही; म्हणूनच लोक याला अव्यय म्हणतात॥ १२१॥ एऱ्हवी ज्याप्रमाणे दानशूर पुरुष दानाच्या द्वारा खर्च करण्याने संग्रहच करीत असतो त्याप्रमाणे लागोपाठ होणाऱ्या नाशामुळे हा संसारवृक्ष अविनाशी असा वाटतो॥ १२२॥ ज्याप्रमाणे फार वेगाने चालत असलेले रथाचे चक्र जात आहे असे वाटते॥ १२३॥ त्याप्रमाणे काळ लोटल्याबरोबर जो संसारवृक्षाच्या जीवशाखेची फांदी वाळून, गळून पडते तेथेच आणखी दुसऱ्या कोट्यावधी प्राणिरूप शाखांची उत्पत्ति होते॥ १२४॥ ज्याप्रमाणे वरचेवर अभ्रे येणाऱ्या आषाढ महिन्यात एक अभ्र केव्हा गेले व दुसरे केव्हा आले हे कळत नाही, त्याप्रमाणे एक फांदी केव्हा पडली व तेथेच असंख्य शाखा केव्हा उत्पन्न झाल्या हे लक्षात येत नाही॥ १२५॥

महाकल्पाच्या शेवटीं। उदेलिया उन्मूळती सृष्टी। तैसेंचि आणिखीचें दांग उठी। सासिन्नलें॥ १२६॥
संहारवातें प्रचंडें। पडती प्रळयांतींचीं सालडें। तंव कल्पादीचीं जुंबाडें। पाल्हेजती॥ १२७॥
रिगे मन्वंतर मनुपुढें। वंशावरी वंशांचें मांडे। जैसी इक्षुवृद्धी कांडेंनकांडें। जिंके जेवीं॥ १२८॥
कलियुगांतीं कोरडी। चहूं युगांचीं सालें सांडी। तंव कृतयुगाची पेली देव्हडी। पडे पुढती॥ १२९॥
वर्ततें वर्ष जाये। तें पुढिला मूळहारी होये। जैसा दिवसु जात कीं येत आहे। हें चोजवेना॥ १३०॥
जैशा वारियाचां झुळकां। सांदा ठाउवा नव्हे देखा। तैसिया उठती पडती शाखा। नेणों किती॥ १३१॥
एकी देहाची डिरी तुटे। तंव देहांकुरीं बहुवी फुटे। ऐसेनि भवतरु हा वाटे। अव्ययो ऐसा॥ १३२॥

अर्थ—महाकल्पाच्या शेवटी प्रगट असलेल्या सृष्टी उन्मळून पडतात, त्याबरोबरच आणखी दुसऱ्या सृष्टीची पसरलेली अरण्ये उदयास येतात॥ १२६॥ प्रलयकालच्या संहारक वायुने महाप्रलयाच्या अंती संसारवृक्षाच्या साली पडतात तोच कल्पाच्या प्रारंभाची (नवीन सालीचे) झुपकेच्या झुपके उत्पन्न होतात॥ १२७॥ ज्याप्रमाणे उसाची वृद्धि

कांडाकांडांनी अधिक होत जाते, त्याप्रमाणे एका मन्वंतरानंतर दुसरा मनु व एका वंशानंतर दुसरी वंशावळी सुरू होते॥ १२८॥ कलियुग संपल्याबरोबर संसारवृक्ष चारी युगांची कवचे टाकून देतो व लगेच त्याला कृतयुगाची ओली साल दीडपट वाढीने प्राप्त होते॥ १२९॥ वर्तमान वर्षाचे संपणे हेच पुढील वर्षाचे मूळ होते, ज्याप्रमाणे दिवस संपला की नवीन आला हे कळत नाही॥ १३०॥ ज्याप्रमाणे वाऱ्याच्या झुळुका सारख्या वाहत असल्यामुळे त्यांचा सांधा समजत नाही, त्याप्रमाणे या संसारवृक्षाच्या शाखा किती पडतात व किती उत्पन्न होतात हे सांगता येत नाही॥ १३१॥ या संसारवृक्षाची एक देहरूपी डाहाळी तुटते तोच त्या ठिकाणी दुसरे पुष्कळ देहरूपी अंकुर उत्पन्न होतात. ह्यामुळे हा संसारवृक्ष अव्यय आहे, असा वाटतो॥ १३२॥

जैसें वाहतें पाणी जाय वेगें। तैसेंचि आणिक मिळे मागें। तेवीं असतचि असिजे जगें। मानिजे संत॥ १३३॥
कां लागोनि डोळा उघडे। तंव कोडीवरी घडे मोडे। तें नेणतया तरंग आवडे। नित्य ऐसा॥ १३४॥
वायसा एकें बुबुळें दोहीकडे। डोळा चाळितां अपाडें। दोन्हीं आथी ऐसा पडे। भ्रम जेवीं जगा॥ १३५॥
पैं भिंगोरी निधिये पडली। ते गमे भूमीसी जैसी जडली। ऐसा वेगातिशय भुली। हेतु होय॥ १३६॥
हें बहु असो झडिती। आंधारे भोवंडितां कोलती। ते दिसे जैसी आयती। चक्राकार॥ १३७॥
हा संसारवृक्ष तैसा। मोडत मांडत सहसा। न देखोनि लोक पिसा। अव्ययो मानी॥ १३८॥
परि ययाचा वेग देखे। जो हा क्षणिक ऐसा वोळखे। जाणे कोडिवेळां निमिखें। होत जात॥ १३९॥
नाहीं अज्ञानावांचूनि मूळ। ययाचें असिलेपण टवाळ। ऐसें झाड सिनसाळ। देखिलें जेणें॥ १४०॥
तयातें गा पांडुसुता। मी सर्वज्ञही म्हणें जाणता। पैं वाग्ब्रह्मसिद्धांता। वंद्य तोचि॥ १४१॥
योगजाताचें जोडलें। तया एकासीचि उपयोगा गेलें। किंबहुना जियालें। ज्ञानही तेणें॥ १४२॥
हे असो बहु हे बोलणें। वानिजेल तो कवणें। जो भवरुख जाणे। उखि ऐसा॥ १४३॥

अर्थ—ज्याप्रमाणे प्रवाहाचा एक लोट पुढे जातो तोच मागून दुसरा लोट येतो. ते एकामागून एक येणारे लोट निरनिराळे असले तरी पाण्याचा अखंड एक प्रवाह दिसतो, त्याप्रमाणे हा संसारवृक्ष क्षणोक्षणी नाश पावतो व उत्पन्न होतो तरी उत्पत्तिनाशाच्या वेगामुळे तो अखंड एकरूप आहे, असा वाटतो॥ १३३॥ डोळा लागून उघडतो तितक्या अवकाशात तरंगाच्या कोट्यावधी घडामोडी होतात; पण अज्ञानी पुरुषाला ती एकच लहरी आहे, असे वाटते॥ १३४॥ कावळ्याला एक बुबुळ असते व तेच बुबुळ तो दोन्ही डोळ्यात वेगाने फिरवितो; पण त्याला दोन डोळे आहेत असा भ्रम पाहणाऱ्यांना होतो॥ १३५॥ जमिनीवर वेगाने भोवरा फिरविला असता जसा तो जमिनीत स्थिर आहे असा वाटतो, त्याप्रमाणे अतिशय वेगच भ्रमाला कारण होतो॥ १३६॥ हा विषयविस्तार पुरे. पेटलेला टेंभा आंधारात अतिशय वेगाने फिरविला असता तो जसा सहजच चक्राकार दिसतो॥ १३७॥ त्याप्रमाणे हा संसारवृक्षहि वेगातिशयाने नाश पावत व उत्पन्न होत असल्यामुळे, ते न जाणणारे अज्ञानी लोक त्याला अव्यय मानतात॥ १३८॥ या वेगाकडे जो लक्ष देतो तो, हा संसारवृक्ष एका निमेषांत कोटीवेळा उत्पन्न होतो व नाश पावतो म्हणून क्षणिक आहे, असे जाणतो॥ १३९॥ या संसारवृक्षाचे अज्ञानावाचून दूसरे मूळ नाही, ज्याचे अस्तित्व खोटे आहे, असे झाड क्षणिक आहे, हे ज्यानी जाणले॥ १४०॥ हे अर्जुना! तोच वेदान्तसिद्धान्ताला खरोखर जाणणारा व तोच पूज्य आहे, असे सर्वज्ञ असा मी म्हणतो॥ १४१॥ सर्व प्रकारच्या योगप्रक्रियेने प्राप्त होणारे फळ त्यालाच प्राप्त झाले. एवढेच नाही, तर त्याच्याच योगाने ज्ञान जिवंत राहते॥ १४२॥ हा पाल्हाळ पुरे. जो हा संसारवृक्ष खोटा आहे असे जाणतो त्याचे माहात्म्य कोण वर्णन करू शकेल?॥ १४३॥

गूढार्थदीपिका—या सर्व ओव्यातून श्रीज्ञानेश्वर माउलीनी जगताविषयी दृष्टिसृष्टिवाद मानला आहे. "यावत् दृष्टि तावत् सृष्टि:" जोपर्यंत पदार्थाची कल्पना आहे तोपर्यंत पदार्थ असतो व पदार्थ विसरला गेला की तो नाश पावतो, असा दृष्टिसृष्टिवादाचा सिद्धान्त आहे. पदार्थाच्या कल्पना क्षणोक्षणी बदलतात व पूर्वकल्पना विसरल्या जातात; म्हणूनच पदार्थ क्षणभंगुर मानले जातात. अर्थात् सर्व सृष्टि जीवाच्या कल्पनेने एकदम स्वप्नाप्रमाणे निर्माण

झाली असून ती कल्पनेच्या लयाबरोबर लय पावते असे येथे सांगितले आहे.

सृष्टीच्या उत्पत्तीचा व लयाचा क्रम हा मध्यम अधिकाऱ्यासाठी सांगितला असून सृष्टीची उत्पत्ति व लय स्वप्नाप्रमाणे युगपत् होतात हे श्रेष्ठ अधिकाऱ्याकरिता सांगितला आहे, असे वेदान्तशास्त्र म्हणते.

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः।
अधश्च मूलान्यनुसन्ततानि कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके॥ २॥

अर्थ—या संसारवृक्षाच्या फांद्या खाली वर पसरल्या आहेत व त्या सत्व, रज, तम या तीन गुणांनी वाढल्या आहेत. विषय हे त्याची पानरूपी अंकुरे होत. मनुष्यलोकात कर्मांना कारण होणारी (वासनारूपी) मुळे खाली पसरली आहेत॥ २॥

मग ययाचि प्रपंचरूपा। अधोशाखिया पादपा। डाहाळिया जाती उमपा। ऊर्ध्वांही उजू॥ १४४॥
आणि अधीं फांकलीं डाळें। तियें होती मूळें। तयांही तळीं पघळे। वेल पालव॥ १४५॥
ऐसें जें आम्हीं। म्हणितलें उपक्रमीं। तेंही परिसें सुगमीं। बोलीं सांगों॥ १४६॥
तरी बद्धमूळ अज्ञानें। महदादिकीं सासनें। वेदांचीं थोर वनें। घेऊनियां॥ १४७॥
परि आधीं तंव स्वेदज। जरायुज उद्भिज अंडज। बुडौनि महाभुज। उठती चारी॥ १४८॥
यया एकैकाचेनि अणगटें। चौऱ्यांशीं लक्षधा फुटे। ते वेळीं जीवशाखीं फाटें। सैंघ चि होती॥ १४९॥
प्रसवत शाखा सरळिया। नाना सृष्टि डाहाळिया। आड फुटती माळिया। जातिचिया॥ १५०॥
स्त्री पुरुष नपुंसकें। हे व्यक्तिभेदांचे टके। आंदोळती आंगिकें। विकारभारें॥ १५१॥
जैसा वर्षाकाळ गगनीं। पाल्हेजे नवघनीं। तैसें आकारजात अज्ञानीं। वेलीं जाय॥ १५२॥

अर्थ—खाली डाहाळ्या गेलेल्या या प्रपंचवृक्षाच्या असंख्य डाहाळ्या सरळ वरहि गेल्या आहेत॥ १४४॥ आणि खाली आलेल्या फांद्या मूळे होतात व त्यांना वेल, पाने फुटून त्या आणखी खाली जातात॥ १४५॥ असे जे आम्ही प्रारंभी म्हटले, ते का म्हटले, हे आता सोप्या भाषेत सांगतो. ते एक॥ १४६॥ दृढ झालेले अज्ञान व अहंकार, बुद्धि, मन, पंचमहाभूते ही उपकरणे यांच्या योगाने वेदांची थोर अरण्ये घेऊन स्वेदज, जारज, अंडज, उद्भिज असे हे चार फोक आधी बुडापासून उत्पन्न होतात॥ १४७-१४८॥ या एका फांदीच्या अंगावर चौऱ्यांशी लक्ष फांद्या फुटतात तेव्हा जीवशाखा असंख्य स्वरूपाची होते॥ १४९॥ अशा रीतीने सृष्टिरूप नाना डाहाळ्या सरळ वाढत असता त्या शाखेला मध्ये आडजातीच्या आडव्या फांद्या फुटतात॥ १५०॥ त्यातहि पुनः स्त्री, पुरुष, नपुंसक हे व्यक्तिभेदाचे प्रकार आंगच्या विकारभाराने एकमेकांवर आदळतात॥ १५१॥ ज्याप्रमाणे वर्षाकाळी आकाश नव्या नव्या मेघांनी व्यापिले जाते, त्याप्रमाणे असंख्य प्रकारचे आकार अज्ञानाने वाढू लागतात॥ १५२॥

मग शाखांचेनि आंगभारें। लवोनि गुंफती परस्परें। गुणक्षोभाचे वारे। उदयजती॥ १५३॥
तेथ तेणें अचाटें। गुणांचेनि झडझडाटें। तिहीं ठायीं हा फांटे। ऊर्ध्वमूळ॥ १५४॥

अर्थ—मग डाहाळ्या आंगच्या वजनाने वाकल्यामुळे परस्परात गुंततात व गुणक्षोभांचे वारे उत्पन्न होतात॥ १५३॥ तेव्हा गुणांच्या प्रबल क्षोभाने ज्याचे वर मूळ आहे असा हा संसारवृक्ष तीन ठिकाणी फाटतो॥ १५४॥

ऐसा रजाचिया झुळुका। झडाडितां आगळिका। मनुष्यजाती शाखा। थोरावती॥ १५५॥
तिया ऊर्ध्वीं ना अधीं। माझारींचि कोंदाकोंदी। आड फुटती खांदी। चतुर्वर्णांच्या॥ १५६॥
तेथ विधिनिषेधीं सपल्लव। वेदवाक्यांचे अभिनव। पालव डोलती बरव। आपुलालियापरी॥ १५७॥
अर्थ काम पसरे। अग्रवनें घेती थारे। तेथ क्षणिकें पदांतरें। इहभोगांचीं॥ १५८॥
तेथ प्रवृत्तीचेनि वृद्धिलोभें। खांकरेजती शुभाशुभें। नानाकर्मांचे खांबे। नेणों किती॥ १५९॥
तेवींचि भोगक्षयें मागिलें। पडती देहांचीं बुडसळें। तंव पुढां वाढी पेले। नवेया देहांची॥ १६०॥
आणि शब्दादिक सुहावे। सहज रंगें हवावे। विषयपल्लव नवे। नित्य होती॥ १६१॥

ऐसे रजोवातें प्रचंडें। मनुष्यशाखांचे मांदोडे। वाढती तो एथ रूढे। मनुष्यलोक॥ १६२॥

अर्थ—याप्रमाणे रजोगुणाच्या झुळुकामुळे तो अत्यंत वाढला असता मनुष्यजातिरूप डाहाळ्या बळावतात॥ १५५॥ त्या मनुष्यरूपी खांद्या वर किंवा खाली जात नसून तेथल्या तेथे मध्ये दाटू लागतात व त्यांना मध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार वर्णाच्या खांद्या फुटतात॥ १५६॥ आपआपल्या वर्णानुसार वेदवचनाने लावून दिलेले विधिनिषेधरूप विचित्र पाने मनुष्यशाखेच्या ठिकाणी चांगल्या रीतीने शोभूत दिसतात॥ १५७॥ अर्थ (संपत्ति) व काम (विषयवासना) हे दोन पुरुषार्थ वाढले असता इहलोकातील क्षणिक विषयांच्या भोगाची निरनिराळी स्थानरूप पुढची पाने अंकुरित होतात॥ १५८॥ तेथे कर्म करण्याच्या प्रवृत्तीने वाढलेल्या लोभामुळे पुण्य-पाप उत्पन्न होऊन इष्ट, अनिष्ट, मिश्र अशा प्रकारच्या कर्माचे फाटे किती फुटतात हे समजत नाही॥ १५९॥ त्याचप्रमाणे प्रारब्ध भोगकर्म फळ देऊन संपले असता मागील देहाची खोडे पडतात तोच नवीन देह उत्पन्न होतात॥ १६०॥ आणि शोभिवंत अशा आपल्या रंगाने स्वभावत: चित्ताकर्षक असलेली शब्दादिक विषयरूपी नवी नवी पाने नित्य उत्पन्न होत जातात॥ १६१॥ याप्रमाणे रजोगुणी प्रचंड वायूने मनुष्यरूपी खांद्यांचे समुदाय जेथे वाढतात तो मनुष्यलोक होय॥ १६२॥

गूढार्थदीपिका—रजोगुण वाढला असता ज्यात कर्मप्रवृत्ति जास्त आहे, अशा मनुष्यलोकाची प्राप्ति होते.

तैसाचि तो रजाचा वारा। नावेक धरी वोसरा। मग वाजों लागे घोरा। तमाचा तो॥ १६३॥
तेधवां याचि मनुष्यशाखा। नीच वासना अधीं देखा। पाल्हेजती डाहाळिका। कुकर्मीचिया॥ १६४॥
अप्रवृत्तींचे खणुवाळे। फोक निघती सरळे। घेत पान पालव डाळें। प्रमादाचीं॥ १६५॥
बोलती निषेधनियमें। जिया ऋचा यजु:सामें। तो पाला तया घुमे। टकेयावरी॥ १६६॥
प्रतिपादिती अभिचार। आगम जे परमार। तेही पानीं घेती प्रसर। वासना वेली॥ १६७॥
तंव तंव होती थोराडें। अकर्माचीं तळबुडें। आणि जन्मशाखा पुढें पुढें। घेती धांव॥ १६८॥
तेथ चांडाळादि निकृष्टा। दोषजातीचा थोर फांटा। जाळ पडे कर्मभ्रष्टां। भुलोनियां॥ १६९॥
पशु पक्षी सूकर। व्याघ्र वृश्चिक विखार। हे आडशाखानिकर। थोरावती॥ १७०॥
परी ऐशा शाखा पांडवा। सर्वांगींही नित्य नवा। नरकभोग यावा। फळाचा तो॥ १७१॥
आणि हिंसा विषय पुढारी। कुकर्मसंगें धुरी धरी। जन्मवरी आगारी। वाढतीचि असे॥ १७२॥
ऐसे होती तरु तृण। लोह लोष्ट पाषाण। इया खांदिया तेवींचि जाण। फळेंही हेंचि॥ १७३॥

अर्थ—त्याचप्रमाणे रजोगुणरूपी वारा क्षणभर ओसरला असता तमोगुणरूपी भयंकर वारा वाहू लागतो॥ १६३॥ तेव्हा याच मनुष्यशाखेला नीच कुकर्मे करण्याच्या वासनारूपी खाली जाणाऱ्या डाहाळ्या फुटतात, पाहा॥ १६४॥ निषिद्ध प्रवृत्तीचे कठीण सरळ कोंभ निघून त्यांना प्रमाद-म्हणजे बुद्धिपुर:सर शास्त्रविरुद्ध वागणे-ही पाने, अंकुर व फोक फुटतात॥ १६५॥ यजुर्वेद व सामवेद यांच्या ऋचांनी जे निषेध नियम सांगितले आहेत तोच खांद्यांच्या अग्रभागी वाऱ्याने वाहणारा पाला होय॥ १६६॥ दुसऱ्यांना मारक अशा जारण, मारण उच्चाटनादि अभिचार कर्माचे प्रतिपादन करणारे आगम ही पाने जसजशी वासनावेलीला फुटतात॥ १६७॥ तसतशी पापकर्माची खालची बुडे थोर होत जातात आणि जन्मरूपी शाखा पुढे पुढे धाव घेत जातात॥ १६८॥ तेथे दोषावह जातिरूप शाखेला मोठा फाटा फुटतो. तो फाटाच जाळे होतो व अविवेकाने कर्मभ्रष्ट झालेल्यांना भुलवून ते जाळे त्यांच्यावर पडते॥ १६९॥ तसेच पशु, पक्षी, डुक्कर, व्याघ्र, विंचू, सर्प अशा अवांतर जातीच्या शाखांचाहि समुदाय वाढतो॥ १७०॥ अर्जुना! परंतु अशा शाखांना सर्वांगाचे ठिकाणी येणारा तो पापकर्माचा नित्य नवा असा नरकरूप फळभोगच होय॥ १७१॥ आणि ज्यात हिंसा-विषय मुख्य आहे, अशा कुकर्माचे संगाने अग्रगण्य होऊन जन्मभर ह्या कुकर्माचे अंकुर वाढतच जातात॥ १७२॥ असे झाले असता वृक्ष, गवत, लोखंड, माती, दगड ह्या फांद्या होऊन तीच फळेहि होतात, असे जाण॥ १७३॥

गूढार्थदीपिका—तमोगुण अत्यंत वाढला असता मनुष्याचे ठिकाणी निषिद्धकर्माची प्रवृत्ति वाढून शेवटी तो व्याघ्रसर्पादि दुःखयोनीत जातो. पुढे ह्या अत्यंत पापाने प्राप्त होणाऱ्या व अत्यंत दुःखाने जीवाला मूर्च्छित करणाऱ्या वृक्ष, गवत, लोखंड, माती, दगड इत्यादि योनी त्याला प्राप्त होतात व तेथल्या तेथेच त्या पापांचे अत्यंत दुःखरूप फळहि मिळत असल्यामुळे ह्या योनी फळरूपहि आहेत, असा अर्थ.

अर्जुना गा अवधारीं। मनुष्यालागोनि इया परी। वृद्धि स्थावरांतवरी। अधोशाखांची॥ १७४॥

अर्थ—अर्जुना! ऐक. मनुष्यापासून स्थावरापर्यंत अशी खाली जाणाऱ्या फांद्यांची वाढ होते॥ १७४॥

म्हणोनि जे मनुष्यडाळें। तिये जाणवीं अधींचि मूळें। जे एथूनि मग पघळे। संसारतरु॥ १७५॥
एऱ्हवीं ऊर्ध्वीचें पार्था। मुद्दल मूळ पाहतां। अधींचिया मध्यस्था। शाखा इया॥ १७६॥
परी तामसीं सात्त्विकीं। सुकृत दुष्कृतात्मकीं। विरूढती या शाखीं। अधोर्ध्वीचिया॥ १७७॥

अर्थ—असा हा संसारवृक्ष खाली मनुष्यापासून वाढतो; म्हणून मनुष्यरूप डाहाळ्या ह्याच खालच्या खांद्याची मुळे आहेत॥ १७५॥ अर्जुना! साधारणतः वरचे मुख्य अज्ञानमूळ लक्षात घेता मनुष्यशाखा ह्या खाली गेलेल्या मध्यस्थ शाखा आहेत॥ १७६॥ ह्या मनुष्यशाखेच्या ठिकाणीच तमोगुणी म्हणून पापरूप व सत्वगुणी पुण्यरूप अशा खालच्या वरच्या शाखा वाढतात॥ १७७॥

गूढार्थदीपिका—मनुष्यच पुण्यकर्माने सद्गतीला जातो व पापकर्माने अधोगतीस जातो, असा भाव.

मनुष्य जन्माला आल्यानंतर उत्क्रांतिच होत जाते, या पाश्चात्य मताला आमच्या ज्ञानेश्वरादि सर्व संतांचा व शास्त्रांचा विरोध आहे, असे समजावे.

आणि वेदत्रयीचिया पाना। नये अन्यत्र लागों अर्जुना। जे मनुष्यावांचूनि विधाना। विषय नाहीं॥ १७८॥
म्हणोनि तनु मानुषा। इया ऊर्ध्वमूळौनि जरी शाखा। तरी कर्मवृद्धीसि देखा। इयाचि मूळें॥ १७९॥
आणि आनीं तरी झाडीं। शाखा वाढतां मूळें गाढीं। मूळ गाढें तंव वाढी। पैस आथी॥ १८०॥
तैसेंचि इया शरीरा। कर्मे तंव देहा संसारा। आणि देह तंव व्यापारा। ना म्हणोचि नये॥ १८१॥
म्हणोनि देहें मानुषें। इयें मूळें होती न चुके। ऐसें जगज्जनकें। बोलिलें तेणें॥ १८२॥

अर्थ—अर्जुना! ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद ही तीन पाने मनुष्यशाखेशिवाय दुसऱ्या शाखेला लागत नाहीत; कारण त्याचे विधान मनुष्याशिवाय दुसऱ्याकरिता केलेले नाही॥ १७८॥ म्हणून मनुष्याची शरीरे वरच्या मूळाच्या शाखा असल्या तरी कर्माच्या वाढीला हीच मुळे आहेत, असे समज॥ १७९॥ आणि इतर लौकिक झाडांच्या ठिकाणी असे दिसते की जसजशा त्यांच्या फांद्या मोठ्या होतात तसतशी त्याची मुळेहि जमिनीत दृढबद्ध होतात आणि मूळे जमिनीत जसजशी बळकट होतात तसतसा झाडांचा विस्तार वाढत जातो॥ १८०॥ तसेच या शरीराचे आहे. कर्म आहे तोपर्यंत देहाला व संसाराला येणे आहे व देह आहे तोपर्यंत कर्म नाही असे म्हणता येत नाही॥ १८१॥ म्हणून मनुष्यदेह हा मूळे झाल्यावाचून राहत नाही, असे जगांचा पिता भगवान श्रीकृष्ण यांनी सांगितले॥ १८२॥

मग तमाचें तें दारुण। स्थिरावलेया वाउधाण। सत्त्वाची सुटे सत्राण। वाहुटळी॥ १८३॥
तैं याचि मनुष्याकारा। मूळीं सुवासना निघती आरा। घेऊनी फुटती कोंबारा। सुकृतांकुरीं॥ १८४॥
उकलतेनि उन्मेखें। प्रज्ञाकुशलतेंचि तिखें। डिरिया निघती निमिखें। बाबळैजुनी॥ १८५॥
मतीचे सोट वावे। घालिती स्फूर्तीचेनि थांवें। बुद्धि प्रकाश घे धांवें। विवेकाचेनि॥ १८६॥
तेथ मेधारसें सगर्भ। आस्थापत्रीं सबोंब। सरळ निघती कोंभ। सद्वृत्तीचे॥ १८७॥
सदाचाराचिया सहसा। टका उठती बहुवसा। घुमघुमिती घोषा। वेदपद्यांच्या॥ १८८॥
शिष्टागमविधानें। विविधयागवितानें। इयें पानावरी पानें। पालेजती॥ १८९॥

अर्थ—मग तमोगुण भयंकर वाहटूळ थांबली की सत्वगुणाची मोठी वाहटूळ वाहू लागते॥ १८३॥ तेव्हा याच मनुष्यकाराच्या मूळाच्या ठिकाणी सद्वासनेचे कोंभ निघून त्याला पुण्याचे अंकुर येतात॥ १८४॥ ज्ञानाची वृद्धि होऊन

बुद्धीच्या चातुर्याच्या तीक्ष्ण डिरिया एका क्षणात पुष्कळ उत्पन्न होतात॥ १८५॥ ज्ञानशक्तीचे लांब सोट स्फूर्तीचे बळ देतात व बुद्धीचा प्रकाश विवेकापर्यंत (विवेक म्हणजे कल्याणाचे काय व अकल्याणाचे काय हे समजणे) धाव घेतो॥ १८६॥ तेथे स्मरणशक्तिरसाने गर्भयुक्त होऊन श्रद्धारूप पानाच्या ठिकाणी सद्‌वृत्तीचे (शास्त्रानुसार वर्तमानाचे) सुशोभित असे सरळ कोंभ निघतात॥ १८७॥ मग सहजगत्या सदाचरणाचे पुष्कळ अग्रभाग पुढे येतात व वेदशब्दाचा घोष करू लागतात॥ १८८॥ (''वेदप्रामाण्याभ्युपगन्तृत्वं शिष्टलक्षणम्'' वेदाचे प्रामाण्य मान्य करणे हे शिष्टाचे लक्षण होय) अशा शिष्टांनी केलेल्या आगमांतील विधाने-म्हणजे स्मृतिग्रंथातील आचाररूप विधाने-व नाना प्रकारच्या यागाचा विस्तार ही पानावर पाने फुटू लागतात॥१ ८९॥

ऐसा यमदमीं घोंसाळिया। उठती तपाचिया डाहाळिया। देती वैराग्यशाखा कवळिया। वेल्हाळपणें॥ १९०॥
विशिष्टां व्रतांचे फोक। धीराच्या अणगटीं तिख। जन्मवेगें ऊर्ध्वमुख। उंचावती॥ १९१॥
माजीं वेदांचा पाला दाट। तो करी सुविद्येचा झडझडाट। जंव वाजे अचाट। सत्त्वानिळु तो॥ १९२॥
तेथ धर्मडाळ बाहाळी। दिसती जन्मशाखा सरळी। तिया आड फुटती फळीं। स्वार्गादिकीं॥ १९३॥
पुढां उपरति रागें लोहिवी। धर्ममोक्षाची शाखा पालवी। पाल्हाजत नित्य नवी। वाढतीचि असे॥ १९४॥

अर्थ—अशा यमदमाचे घोस लागलेल्या तपाच्या डहाळ्या उठतात व त्याला वैराग्याच्या शाखा फोफावून आलिंगन देतात॥ १९०॥ धैर्यरूपी अग्राने तीक्ष्ण असलेले विशिष्ट व्रतांचे फोक उत्पन्न होण्याच्या वेगाने वर मुख करून उंच जातात॥ १९१॥ जोपर्यंत सत्त्ववृद्धिरूप वायु सपाट्याने वाहतो तोपर्यंत वेदरूपी दाट पाला त्यात सुविद्येचा झणझणाट करीत राहतो॥ १९२॥ तेथे विस्तारलेल्या धर्मरूपी डाहाळीत ज्या जन्मरूपी सरळ शाखा दिसतात त्या स्वर्गादि फलरूपाने आडव्या फुटलेल्या असतात॥ १९३॥ (रागे-म्हणजे) विषयभोगाच्या आसक्तीमुळे (लोहिवी-म्हणजे) लाल झालेली धर्मशाखा फुटते व वैराग्याने मोक्षशाखा फुटते. त्या विस्तार पावून नित्य नवीन वाढतच असतात॥ १९४॥

गूढार्थदीपिका—प्रवृत्तिधर्म फळाशायुक्त, फळाशा रजोगुणी आणि ''रजोरागात्मकं विद्धि'' या भगवद्वचनानुसार लाल रंगयुक्त असल्यामुळे माउलीनेहि त्याचा येथे ''लोहिवी'' या शब्दाने उल्लेख केला आहे.

महाभारतातहि सत्वगुणाचा रंग पांढरा, रजोगुणाचा लाल व तमोगुणाचा काळा असे सत्वादि गुणप्रधान अशा लिंगदेहाचे रंग सांगितले आहेत. (शां० प० अ० २८०)

रजोगुण वाढला असता पुरुष स्वर्गादि प्राप्तीकरिता धर्माचरण करतो.

सात्विक पुरुष धर्मपरायण असतो. त्याच्या बुद्धीत सत्वगुण वाढला असता विषय अनित्य आहेत, त्यात सुख नाही, असे वैराग्य बुद्धीला होऊन ती निष्काम सदाचारी होते व मोक्षमार्गाला लागते, असा अर्थ.

पैं रविचंद्रादि ग्रहवर। पितृ ऋषी विद्याधर। हे आडशाखा प्रकार। पैस घेती॥ १९५॥
याहीपासून उंचवडे। गुढले फळाचेनि बुडें। इंद्रादिक ते मांदोडे। थोर शाखांचे॥ १९६॥
मग तयांही उपरी डाहाळिया। तपोज्ञानीं उंचावलिया। मरीचि कश्यपादि इया। उपरी शाखा॥ १९७॥
एवं माळोवाळी उत्तरोत्तरु। ऊर्ध्वशाखांचा पैसारु। बुडीं साना अग्री थोरु। फलाढ्य हा॥ १९८॥
वरी उपरिशाखाही पाठीं। येती फळभार जे किरीटी। ते ब्रह्मेशान्त अणगटीं। कोंभ निघती॥ १९९॥

अर्थ—मग रविचंद्रादि श्रेष्ठ ग्रह, पितर, ऋषि, विद्याधर ह्या आडशाला विस्तार पावतात॥ १९५॥ याच्याहिपेक्षा उंच गेलेल्या इंद्रादिक मोठ्या शाखांचे जुंबाडे आहेत व त्यांची बुडे फळांनी झाकली आहेत॥ १९६॥ त्यांच्याहि वर तपोधनाने उंच गेलेल्या मरीचिकश्यपादी वरच्या शाखा आहेत॥ १९७॥ अशाप्रमाणे पुढे पुढे वरच्या शाखेचा चहूकडे विस्तार झाला असून तो बुडाच्या ठिकाणी लहान व शेंड्याकडे फळांनी संपन्न होऊन थोर झाला आहे॥ १९८॥ या वरच्या शाखांच्या नंतरहि ज्या शाखा फळांनी भरून येतात, अर्जुना! त्या ब्रह्मलोक व शिवलोकरूप अणकुचीदार कोंभ होत॥ १९९॥

फळाचेनि वोझेपणें। ऊर्ध्वीं वोवांडें दुणें। जंव माघौतें बैसणें। मूळींचि होय॥ २००॥
प्राकृताही तरी रुखा। जे फळें दाटली होय शाखा। ते वोवांडिली देखा। बुडासि ये॥ २०१॥
तैसें जेथूनि हा आघवा। संसारतरूचा उठावा। तियें मूळीं टेंकटी पांडवा। वाढतेनि ज्ञानें॥ २०२॥

अर्थ—फळांच्या ओझ्याने झाडाच्या वरच्या खांद्या खाली दुप्पट वाकून पुन: मूळापर्यंत येतात॥ २००॥ लौकिक झाडाची शाखा देखील फळांनी दाटली की ती फळाच्या भाराने खाली वाकून बुडाकडे येते॥ २०१॥ त्याचप्रमाणे मग अर्जुना! येथे वाढत्या ज्ञानाने-म्हणजे ब्रह्मज्ञानाने-ज्या परब्रह्मरूप मुळापासून या संसारवृक्षाचा उठाव झाला आहे, त्या परब्रह्मरूप मूळालाच येऊन मिळतात॥ २०२॥

गूढार्थदीपिका—ब्रह्मादिलोकशाखांची मनुष्यलोक हीच मुळे असल्यामुळे सकाम तपादिकांनी ब्रह्मादि लोकास गेलेले पुरुष तेथे दिव्यलोक भोगून पुन: मनुष्यलोकांत परत येतात व निष्कामपुरुष, छांदोग्योपनिषदांत सांगितलेल्या सगुण उपासना करून देवयान मार्गाने ब्रह्मलोकात जातात व तेथे ब्रह्मज्ञान संपादन होऊन मुक्त होतात ''अनावृत्ति शब्दादनावृत्तिः........'' हे सूत्र देवयान मार्गाने जाणाऱ्या निष्काम उपासकांविषयीच आहे.

ब्रह्मज्ञान प्राप्त झाले असताच या ब्रह्मरूप मूळापाशी येता येते, येऱ्हवी नाही.

म्हणौनि ब्रह्मेशानापरौतें। वाढणें नाहीं जीवातें। तेथूनि मग वरौते। ब्रह्मचि कीं॥ २०३॥

अर्थ—म्हणून ब्रह्मलोक व शिवलोक यांच्या पलीकडे जीवाचे गमनागमन होत नाही; कारण त्या पलीकडे गमना-गमनरहित परब्रह्मच आहे॥ २०३॥

गूढार्थदीपिका—ब्रह्मलोक व शिवलोक येथपर्यंत जीवाची गति आहे.

परी हें असो ऐसे। ब्रह्मादिक ते आंगवसे। ऊर्ध्वमूळासरिसे। न तुकती गा॥ २०४॥
आणीकही शाखा उपरता। जिया सनकादिकनामें विख्याता। तिया फळीं मूळीं नाडळतां। भरलिया ब्रह्मीं॥ २०५॥

अर्थ—सांगायचे तात्पर्य हे की संसारवृक्षाचे शेंडे जे ब्रह्मलोक व शिवलोक ते ऊर्ध्वमूळ जे ब्रह्म त्याच्या बरोबरीचे नाहीत॥ २०४॥ आणखीहि त्यांच्यावर ज्या सनकादिक नावांच्या प्रसिद्ध शाखा आहेत त्यांना फळे मुळे काही एक नसून त्या नुसत्या परब्रह्मातच भरल्या आहेत॥ २०५॥

गूढार्थदीपिका—सनकादिक हे परब्रह्माचे ज्ञानशक्त्यवतार असल्यामुळे ते जन्ममृत्युरहित असे सदेह पूर्ण परब्रह्मस्वरूपच आहेत, असा अर्थ.

ऐसी मनुष्यापासूनि जाणावी। ऊर्ध्वी ब्रह्मादिशेष पालवी। शाखांची वाढी बरवी। उंचावे पैं॥ २०६॥
पार्था ऊर्ध्वीचिया ब्रह्मादि। मनुष्यत्वचि होय आदि। म्हणौनि इयें अधीं। म्हणितली मूळें॥ २०७॥
एवं तुज अलौकिकु। हा अधोर्ध्वशाखु। सांगितला भवरुखु। ऊर्ध्वमूळु॥ २०८॥
आणि अधींची हीं मूळें। उपपत्तीं परिसविलीं सविवळें। आतां परिस उन्मूळे। कैसेनि हा॥ २०९॥

अर्थ—याप्रमाणे मनुष्यापासून शेवटी ब्रह्मशिवादि लोकांपर्यंत अशी ही वर शाखांची चांगली सविस्तर वाढ झाली आहे, असे समजावे॥ २०६॥ अर्जुना! वरील ब्रह्मादिलोकरूप शाखांना मनुष्यत्वच कारण असल्यामुळे मनुष्यलोकाला त्यांची खालची मूळे आम्ही म्हटले आहे॥ २०७॥ याप्रमाणे अर्जुना! ज्याच्या खांद्या खाली-वर गेल्या आहेत व मूळ वर आहे अशा या अलौकिक संसारवृक्षाचे वर्णन तुला सांगितले॥ २०८॥ आणि हा संसारवृक्षाच्या खालच्या मूळाविषयीहि खुलासेवार उपपत्ति तुला ऐकविली, आता हा वृक्ष कशाने उपडला जातो, हे सांगतो, ऐक॥ २०९॥

न रूपमस्येह तथोपलभ्यते नान्तो न चादिर्न च सम्प्रतिष्ठा।
अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा॥ ३॥

अर्थ—ज्ञानविचार केला असता या संसारवृक्षाचे स्वरूप वर्णन केल्याप्रमाणे दिसून येत नाही. याला आदिअंत नसून याचे अस्तित्वहि नाही. दृढ बद्धमूल झालेला हा अश्वत्थवृक्ष, मी असंग आहे, अशा बळकट ज्ञानविचाररूप शस्त्राने तोडून टाकावा॥ ३॥

परी तुझ्या हन पोटीं। ऐसें गमेल किरीटी। जे एवढें झाड उत्पाटी। ऐसें कायि असे॥ २१०॥
कें ब्रह्मयाच्या शेवटवरी। ऊर्ध्व शाखांची थोरी। आणि मूळ तंव निराकारीं। ऊर्ध्वी असे॥ २११॥
हा स्थावराही तळीं। फांकत असे अधींच्या डाळीं। माजीं धांवतसे दुजां मूळीं। मनुष्यरूपीं॥ २१२॥
ऐसा गाढा आणि अफाटु। आतां कोण करी यया शेवटु। तरी झणी हा हळुवटु। धरिसी भावो॥ २१३॥

अर्थ—अर्जुना! तुझ्या मनात असे येईल की एवढे मोठे झाड उपटून टाकता येईल असे काय आहे?॥ २१०॥ कारण की ह्या संसारवृक्षाच्या शाखा वर ब्रह्मलोकापर्यंत विस्तारल्या असून त्याची मुळे वर निराकार परब्रह्माचे ठिकाणी आहेत॥ २११॥ हा संसारवृक्ष मधल्या दुसऱ्या मनुष्यरूप मूळापासून वृक्षादि स्थावराच्याहि खाली लोष्टपाषाणादि ह्या खालच्या डाहाळ्यांनी पसरलेला आहे॥ २१२॥ अशा दृढमूळ व अफाट पसरलेल्या या संसारवृक्षाचा नाश कोणाच्याने होईल अशी कदाचित् थोडीशी तुझ्या मनात शंका येईल॥ २१३॥

परी हा उन्मूळावया दोषें। येथ सायासचि कायिसे। काय बाळा बागुल देशें। दवडावा आहे॥ २१४॥
गंधर्वदुर्ग कायी पाडावे। काय शशविषाण मोडावें। होआवें मग तोडावें। खपुष्प कीं॥ २१५॥
तैसा संसारु हा वीरा। रूख नाहीं साचोकारा। मा उन्मूळणीं दरारा। कायिसा तरी॥ २१६॥
आम्हीं सांगितली जे परी। मूळडाळांची उजरी। ते वांझेचीं घरभरीं। लेंकुरें जैशीं॥ २१७॥
काय कीजती चेइलेपणीं। स्वप्नींचीं तियें बोलणीं। तैशी जाण ते कहाणी। दुगळीचि ते॥ २१८॥
वांचूनि आम्हीं निरूपिलें जैसें। ययाचें अचळ मूळ असे तैसें। आणि तैसाचि जरी हा असे। साचोकारा॥ २१९॥
तरी कोणाचेनि संतानें। निपजती या उन्मूळणें। काय फुंकिलिया गगनें। जाइजेल गा॥ २२०॥
म्हणौनि पैं धनंजया। आम्हीं वानिलें रूप तें माया। कासवीचेनि तुपें राया। वोगरिलें जैसें॥ २२१॥

अर्थ—परन्तु या संसारवृक्षाला उपटून टाकण्याच्या उद्देशाने काय श्रम करावे लागतील? काय लहान मुलाला बागुल देशांतरात हाकून द्यावयाचा असतो?॥ २१४॥ गंधर्वनगराचा कोट पाडावा लागतो काय? आकाशाला पुष्प असले तरच तोडणार ना!॥ २१५॥ त्याप्रमाणे, हे योद्ध्या अर्जुना! हा संसारवृक्ष खरोखर नाहीच; मग तो तोडून टाकण्यात काय धाक वाटणार?॥ २१६॥ आम्ही प्रपंचवृक्षाची जी वाढ सांगितली ती घरभर असलेल्या वांझेच्या मुलांप्रमाणे होय॥ २१७॥ जाण आल्यानंतर स्वप्नातील बडबड काय कामाची? त्याप्रमाणे संसारवृक्षाची संपूर्ण कहाणी अर्थहीन आहे, असे जाण॥ २१८॥ यावाचून आम्ही निरूपण केल्याप्रमाणे जर हा संसारवृक्ष खरोखरच दृढबद्धमूळ व सत्य असता तर कोणाच्या संततीला तो उपटून टाकता आला असता? नुसत्या फुंकण्याने अभ्र नाहीसे होत असते काय?॥ २१९-२२०॥ म्हणून ज्याप्रमाणे कासवीच्या तुपाने केलेल्या पदार्थाचे पात्र वाढून राजापुढे मांडावे, त्याप्रमाणे तुला संसारवृक्षाचे जे वर्णन करून सांगितले ते जीवाला झालेल्या अज्ञानभ्रांतीचे वर्णन होय, असे जाण॥ २२१॥

गूढार्थदीपिका—कासवीला दूध नसते. ती आपल्या पिलांचे पोषण दृष्टीने करते; म्हणून तिच्या दुधापासून तूप होणे शक्य नाही. अर्थात कासवीच्या तुपाने पक्वान्न तयार करून राजापुढे मांडणे हे केवळ अर्थहीन शब्दमात्र होत. त्याप्रमाणेच ज्ञानदृष्टीने पाहता संसारसृष्टीचे वर्णन केवळ शब्दमात्र आहे, वस्तुनिष्ठ नाही, असा अर्थ.

मृगजळाचीं गा तळीं। तियें दिठी दुरूनिचि न्याहाळीं। वांचूनि तेणें पाणियें साळी केळी। लाविसी काई॥ २२२॥
मूळ अज्ञानचि तंव लटिकें। मा तयाचें कार्य हें केतुकें। म्हणोनि संसाररुख सत्य कें। वावोचि गा॥ २२३॥

अर्थ—अर्जुना! मृगजळाची भरलेली तळी दुरून दृष्टीने पाहावी, त्यापासून त्या पाण्याच्या योगाने धान्य व केळी पिकविता येईल काय?॥ २२२॥ या संसारवृक्षाचे मूळ जे अज्ञान तेच खोटे म्हणजे भ्रांतिरूप आहे. मग त्यापासून उत्पन्न झालेले संसाररूप कार्य कोठून खरे होणार; म्हणून संसारवृक्ष सत्य कोठला? तो खोटाच आहे॥ २२३॥

गूढार्थदीपिका—अमृतानुभवातहि पुनः माउलीने ''म्हणौनि दृश्य ते वावो। देखिले जरी'' या चरणाने असेच सांगितले आहे.

आणि अंत यया नाहीं। ऐसें बोलिजे जें कांहीं। तेंही साचचि पाहीं। येके परी॥ २२४॥
तरी प्रबोध जंव नोहे। तंव निद्रे काय अंत आहे। कीं रात्री न सरे तंव न पाहे। तया आरौतें॥ २२५॥
तैसा जंव पार्था। विवेकु नुधवी माथा। तंव अंतु नाहीं अश्वत्था। भवरूखा यया॥ २२६॥
वाजतें वारें निवांत। जंव न राहे जेथिंचें तेथ। तंव तरंगता अनंत। म्हणावीचि कीं॥ २२७॥
म्हणौनि सूर्य जैं हारपे। तैं मृगजळाभास लोपे। कां प्रभा जाय दीपें। मालवलेनि॥ २२८॥
तैसें मूळ बीज अविद्या खाये। तें ज्ञान जैं उभें होये। तैचि यया अंत आहे। एऱ्हवीं नाहीं॥ २२९॥

अर्थ—आणि या संसारवृक्षाला अंत नाही-म्हणजे त्याचा नाश होत नाही-असे जे म्हटले जाते, तेहि एका दृष्टीने खरे आहे पाहा!॥ २२४॥ जाग येत नाही तोपर्यंत झोपेचा नाश होतो काय? (पाहे तंव रात्र सरे की तया आरौते) पहाट झाल्याबरोबर रात्र संपते की त्यापूर्वी?॥ २२५॥ त्याप्रमाणेच अर्जुना! आत्मानात्मविवेक जोपर्यंत चित्तांत उत्पन्न होत नाही तोपर्यंत या संसारवृक्षाचा अंत होत नाही॥ २२६॥ जोपर्यंत वाहणारा वारा शांत होऊन जेथल्या तेथे स्थिर होत नाही तोपर्यंत समुद्राचे पाणी असंख्य तरंगरूप होत राहणारच॥ २२७॥ म्हणून सूर्य अस्तास गेला असताच मृगजळाचा भास नाहीसा होतो किंवा दिवा विझविला असता प्रकाश नाहीसा होतो॥ २२८॥ त्याप्रमाणे संसारवृक्षाचे मूळबीज जी अविद्या ती ज्या ज्ञानाने नाहीशी होते ते ब्रह्मज्ञान प्रगट झाले तरच या संसाररूप वृक्षाचा नाश होतो, एऱ्हवी नाही॥ २२९॥

तेवींचि हा अनादी। ऐसी आथी शाब्दी। तो आळु नोहे अनुरोधी। बोल यया॥ २३०॥
जे संसारवृक्षाच्या ठायीं। साचोकार तंव नाहीं। मा नाहीं तया आदि काई। कोण होईल॥ २३१॥
जो साच जेथूनि उपजे। तयातें आदि हें साजे। आतां नाहींचि तो म्हणिजे। कोठूनियां॥ २३२॥
म्हणौनि जन्मे ना आहे। तैसिया सांगों कवण माये। यालागीं नाहींपणेंचि होये। अनादि हा॥ २३३॥
वांझेचिया लेंका। कैंची जन्मपत्रिका। नभीं निळी भूमिका। कें कल्पूं पां॥ २३४॥
व्योमकुसुमाचा पांडवा। कवणें देंठ तोडावा। म्हणौनि नाहीं ऐसिया भवा। आदि कैंची॥ २३५॥
जैसें घटाचें नाहींपण। असतचि असे केलेनिवीण। तैसा समूळ वृक्षु जाण। अनादि हा॥ २३६॥
अर्जुना ऐसेनि पाहीं। आद्यंतु ययासि नाहीं। माजीं स्थिती आभासे कांही। परी टवाळ ते गा॥ २३७॥

अर्थ—त्याप्रमाणे या संसारवृक्षाला जो अनादि शब्द लावला जातो तो आरोपमात्र नसून या आमच्या केलेल्या निरूपणाला अनुसरूनच आहे॥ २३०॥ कारण या संसारवृक्षाचे ठिकाणी यत्किंचितहि सत्यता नाही. म्हणजे तो जर अस्तित्वातच नाही तर त्याची उत्पत्ति कशी असणार व कोण करणार?॥ २३१॥ ज्या वस्तूपासून एखादी वस्तु उत्पन्न होते ती वस्तु त्या वस्तूचे कारण आहे व ती उत्पन्न झाली हे म्हणणे खरोखर योग्य होते. आता संसारवृक्षाचे अस्तित्व सिद्ध होत नाही तर तो कोणापासून उत्पन्न झाला असे म्हणायचे!॥ २३२॥ म्हणून अर्जुना! जे उत्पन्न होत नाही व अस्तित्वातहि नाही अशाची माय कोण म्हणून सांगता येईल बरे. अर्थात अस्तित्वात नसल्यामुळे हा (संसारवृक्ष) अनादि म्हटला जातो॥ २३३॥ वंध्येच्या मुलाची पत्रिका कोठून असणार? आकाशात नीळी भूमि असते अशी कल्पना कशी करता येईल?॥ २३४॥ अर्जुना! आकाशपुष्पाचे देठ कोणी तोडावे? म्हणून नसलेल्या संसाराला कारण व उत्पत्ति कोठून असणार?॥ २३५॥ ज्याप्रमाणे घटांचे नसणे उत्पन्न केल्यावाचून असते त्याप्रमाणे संसारवृक्ष खरोखरच नाही, म्हणून अनादि आहे, असे जाण॥ २३६॥ अर्जुना! या दृष्टीनेच या संसारवृक्षाला आदिअंत नसून मध्ये जी काही त्याची स्थिति भासते ती भ्रांतिजन्य म्हणून खोटी आहे॥ २३७॥

ब्रह्मगिरीहूनि न निगे। आणि समुद्रींहीं कीर न रिगे। तरी माजीं दिसे वाउगें। मृगांबु जैसें॥ २३८॥
तैसा आद्यंतीं कीर नाहीं। आणि साचही नोहे कहीं। परि लटिकेपणाची नवाई। पडिभासे गा॥ २३९॥
नाना रंगीं गजबजे। जैसें इंद्रधनुष्य देखिजे। तैसा नेणतया आपजे। आहे ऐसा॥ २४०॥
ऐसेनि स्थितीचिये वेळे। भुलवी अज्ञानाचे डोळे। लाघवी हरी मेखळे। लोकु जैसा॥ २४१॥

आणि नसतीचि श्यामिका। व्योमीं दिसे तैसी दिसो कां। तरी दिसणेंही क्षणा एका। होय जाय॥ २४२॥
स्वप्नींही मानिलें लटिकें। तरी निर्वाहो कां एकसारिखें। तेवीं आभासु हा क्षणिके। रिताचि गा॥ २४३॥
देखतां आहे आवडे। घेऊं जाइजे तरी नातुडे। जैसा टिकु कीजे माकडे। जळामाजीं॥ २४४॥
तरंगभंगु सांडीं पडे। विजूही न पुरे होडे। आभाससि तेणें पाडें। होणें जाणें गा॥ २४५॥
जैसा ग्रीष्मशेषींचा वारा। नेणिजे समोर कीं पाठीमोरा। तैसी स्थिती नाहीं तरुवरा। भवरूपा यया॥ २४६॥
एवं आदि ना अंत स्थिती। ना रूप ययासि आथी। आतां कायसी कुंथाकुंथी। उन्मूळणीं गा॥ २४७॥
आपुलिया अज्ञानासाठीं। नव्हता थांवला किरीटी। तरि आतां आत्मज्ञानाच्या लोटीं। खांडेनि गा॥ २४८॥

अर्थ—ज्याप्रमाणे मृगजळाचा प्रवाह ब्रह्मगिरीहून निघत नसतो व समुद्रासहि मिळत नाही, परंतु मध्येच व्यर्थ भासतो॥ २३८॥ त्याप्रमाणे ज्याला उत्पत्ति-नाश मुळीच नाही व कधी खराहि नाही, परंतु खोटेपणाचे कौतुक असे आहे की वस्तु नसून भासते॥ २३९॥ ज्याप्रमाणे आकाशात नाना रंगांनी भरलेले इंद्रधनुष्य दिसते, त्याप्रमाणे अज्ञानी लोकांना संसारवृक्ष असल्यासारखा प्राप्त होतो॥ २४०॥ ज्याप्रमाणे गारुडी दोरीचा साप दाखवून लोकांना भूलवितो तसेच स्थितिकाळी अज्ञानी पुरुषाला, संसार खरा आहे, असा भ्रम होतो॥ २४१॥ ज्याप्रमाणे आकाशात नसलेला काळसरपणा दिसतो, तसा दिसेना कां! पण ते दिसणेहि एक क्षणात होते व जाते॥ २४२॥ स्वप्नामध्ये आपण पदार्थ खोटे मानले तरी तेथे ते पदार्थ एकसारखे टिकून राहतात काय? ज्याप्रमाणे हा प्रपंचाचा भास क्षणिक असल्यामुळे वस्तुहीन असा व्यर्थ आहे॥ २४३॥ ज्याप्रमाणे माकडाने पाण्यात आपली स्थिति करावी (माकड पाण्यात क्षणभरहि स्थिर राहत नाही) त्याप्रमाणे हा संसारवृक्ष 'आहे' असा वाटतो. धरु जाता हा सापडत नाही॥ २४४॥ तरंगाचे उठणे-मावळणे किंवा विजेचे चमकणे लोपणे यांची देखील संसारवृक्षाच्या भासाशी तुलना करता येत नाही इतका तो त्यांच्यापेक्षाहि क्षणिक आहे॥ २४५॥ ज्याप्रमाणे ग्रीष्मऋतूच्या अंती सुटणारा वारा समोरून येतो की पाठीमागून येतो हे समजत नाही, तशी या संसारवृक्षाची स्थिति लक्षात येत नाही॥ २४६॥ याप्रमाणे ज्या संसारवृक्षाला उत्पत्ति व नाश नाही किंवा रूपहि नाही त्याला उपटून टाकण्याची काय खटपट करावी लागणार!॥ २४७॥ अर्जुना! मुळीच अस्तित्वात नसलेला हा संसारवृक्ष अज्ञानभ्रमाने बलवान झाला आहे; म्हणून तो आत्मज्ञानरूपी खड्गाने कापून काढ॥ २४८॥

वांचूनि ज्ञानेंवीण एकें। उपाय करिसी जितुके। तिहीं गुंफसि अधिकें। रुखीं इये॥ २४९॥

अर्थ—नाही तर, संसारवृक्ष तोडण्याकरिता एका आत्मज्ञानावाचून जितके उपाय करशील तितका तू अधिक त्या वृक्षात गुरफटशील॥ २४९॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञानावाचून अज्ञानाने संसाराला सत्य समजून व आत्मस्वरूपाला विसरून जे काही उपाय होतील ते सर्व अहंकारपूर्वक होत असल्यामुळे संसार कायमच राहतो, असा भाव.

मग किती खांदोखांदी। यया हिंडावें ऊर्ध्वीं अधीं। म्हणौनि मूळचि अज्ञान छेदीं। सम्यक्ज्ञानें॥ २५०॥
एऱ्हवीं दोरीचिया उरगा। डांगा मेळवितां पैं गा। तो वावोचि भारु गा। केला होय॥ २५१॥
तरावया मृगजळाची गंगा। डोणीलागीं धांवतां दांगा-। माजीं वोहळें बुडिजे पैं गा। साच जेवीं॥ २५२॥
तेवीं नाथिलिया संसारा। उपायीं जाचतया वीरा। आपणपें लोपे वारा। विकोपीं जाय॥ २५३॥
म्हणोनि स्वप्नींचेया भया। ओखद चेवोचि धनंजया। तेवीं अज्ञानमूळा यया। ज्ञानचि खड्ग॥ २५४॥

अर्थ—मग किती तरी वेळ त्याच्या वर-खाली पसरलेल्या खांद्यावर फिरत राहावे लागणार. म्हणून यथार्थज्ञानाने या संसारवृक्षाचे मूळ जे अज्ञान ते तोडून टाक॥ २५०॥ नाही तर ज्याप्रमाणे दोरीवर भासलेल्या सर्पाला मारण्याकरिता काठ्या मिळविण्याचा केलेला प्रयत्न व्यर्थ शीणच ठरतो॥ २५१॥ किंवा भासलेल्या मृगजळाच्या गंगेतून पार होण्याकरिता होडी करावी म्हणून लाकडे आणण्या करिता जंगलात गेले असता एखाद्या ओढ्यात जसे खरेच बुडावे॥ २५२॥ त्याप्रमाणे अस्तित्वात नसलेल्या या संसारवृक्षाचा नाश करण्याच्या उपायाचे श्रम करणारा

आत्मस्वरूप विसरतो व त्याच्या अंगात शिरलेला प्रयत्नाचा वारा शेवटी विकोपात परिणाम पावतो ॥ २५३ ॥ म्हणून स्वप्नात लागलेल्या शस्त्राच्या घावाला जसे जागे होणे हेच औषध आहे, त्याप्रमाणे अज्ञानमूळ असलेल्या संसारवृक्षाला कापून काढण्याकरिता आत्मज्ञान हेच उत्तम शस्त्र होय ॥ २५४ ॥

परि तेचि लीला परजवे। तैसें वैराग्याचे नीच नवें। अभंगबळ होआवें। बुद्धीसी गा ॥ २५५ ॥
उठिलेनि वैराग्यें जेणें। हा त्रिवर्गु ऐसा सांडणें। जैसें वमुनियां सुणें। आतांचि गेलें ॥ २५६ ॥
हा ठायवरी पांडवा। पदार्थजातीं आघवा। विटवी तो होआवा। वैराग्यलाठु ॥ २५७ ॥

अर्थ—पण ते ज्ञानखड्ग हाती सहज पेलता येईल असे बुद्धीला वैराग्याचे क्षीण न होणारे व अखंड बळ असायला पाहिजे ॥ २५५ ॥ प्राप्त झालेले वैराग्य असे असावे की ज्यायोगे चित्ताला धर्म, अर्थ व काम हे तिन्ही पुरुषार्थ आताच ओकून गेलेल्या कुत्र्याच्या ओकारीप्रमाणे किळसवाणे वाटून चित्त नि:शेष त्याचा त्याग करील ॥ २५६ ॥ अर्जुना! येथपर्यंत इहपरलोकातील सर्व पदार्थांचा वीट येईल अशा प्रकारच्या वैराग्याचे उत्तम बळ पाहिजे ॥ २५७ ॥

मग देहाहंतेचें दळें। सांडूनि एकेचि वेळे। प्रत्यक्‌बुद्धी करतळें। हातवसावें ॥ २५८ ॥
निसळें विवेकसाहणे। जे ब्रह्माहमस्मिबोधें सणाणें। मग पुरतेनि बोधें उटणें। एकलेंचि ॥ २५९ ॥

अर्थ—मग स्थूळ-सूक्ष्म-कारण या तिन्ही देहांचे कवच एकदम टाकून देऊन मी प्रत्यक् आत्मस्वरूप आहे, अशी बुद्धि धारण करावी ॥ २५८ ॥ "मी ब्रह्म आहे" ह्या एका तीक्ष्णबोधाचा पूर्ण निश्चय होईपर्यंत निर्दोष आत्मानात्मविवेकरूपी साहाणेवर ते ज्ञानखड्ग घासत राहावे ॥ २५९ ॥

गूढार्थदीपिका—या ओवीत "अहं ब्रह्मास्मि" बोध पूर्ण होईपर्यंत प्रथम आत्मानात्मविवेकाचे श्रवण करण्यास सांगितले आहे.

परि निश्चयाचें मुष्टिबळ। पाहावें एकदोन वेळ। मग तुळावें अति चोखाळ। मननवरी ॥ २६० ॥

अर्थ—पण बोधाचा केलेला निश्चय किती दृढ झाला आहे याची एक-दोनदा परीक्षा पाहावी व मग त्या बोधाला साधक अशा उपपत्तीने त्याचे मनन करावे ॥ २६० ॥

गूढार्थदीपिका—बाधकशंकांनी बोध डळमळित होऊ नये म्हणून साधकाला येथे मनन करण्यास सांगितले आहे.

पाठीं हतियेरां आपणयां। निदिध्यासें एक जालिया। पुढे दुजें नुरेल घाया-। पुरतें गा ॥ २६१ ॥

अर्थ—नंतर निदिध्यासनाने ज्ञानखड्ग व आपण एक झाल्यावर त्या ज्ञानखड्गाचा घाव घालण्याकरिता आपल्याहून निराळे काही एक शिल्लक राहणार नाही ॥ २६१ ॥

गूढार्थदीपिका—येथे निदिध्यासनाने "अहं ब्रह्मास्मि" या बोधाचा प्रवाह कधीहि खंडित न होता अखंड राहतो व प्रपंचवृक्षाचा अत्यंत अभाव होतो-म्हणजे प्रपंच मुळी भासतच नाही असे सांगितले आहे.

तें आत्मज्ञानाचें खांडें। अद्वैतप्रभेचेनि वाढें। नेदील उरों कवणेकडे। भववृक्षासि ॥ २६२ ॥

अर्थ—अद्वैतबुद्धीने तीक्ष्ण झालेले ते आत्मज्ञानाचे शस्त्र संसारवृक्षाला कोठेच उरू देणार नाही ॥ २६२ ॥

गूढार्थदीपिका—प्राप्त झालेल्या ज्ञानाने ब्रह्म अफुट, अद्वैत, अविक्रिय आहे, म्हणून प्रपंचवृक्षाला अस्तित्वच नाही, असे कळून येते, असा भाव.

शरदागमींचा वारा। जैसा केरु फेडी अंबरा। कां उदयला रवी आंधारा। घोंटु भरी ॥ २६३ ॥
नाना उपवढ होतां खेंवो। नुरे स्वप्नसंभ्रमाचा ठावो। स्वप्रतीतिधारेचा वाहो। करील तैसें ॥ २६४ ॥
तेव्हां ऊर्ध्व कां अधोमूळ। कां अर्धींचें हन शाखाडाळ। तें कांहींचि न दिसे मृगजळ। चांदिणां जेवीं ॥ २६५ ॥
ऐसेनि गा वीरनाथा। आत्मज्ञानाचिया खड्गलता। छेदूनियां भवाश्वत्था। ऊर्ध्वमूळातें ॥ २६६ ॥

अर्थ—ज्या शरदऋतूच्या आगमनाबरोबर वाहणारा वारा आकाशातील अभ्रांचा केर नाहीसा करतो किंवा सूर्य

उगवला असता तो आंधार गिळून टाकतो॥ २६३ ॥ अथवा जाग येताक्षणीच स्वप्न निःशेष नाहीसे होते, त्याप्रमाणे त्या स्वरूपाच्या स्वानुभवाचा अखंड प्रवाह तसेच करील-म्हणजे संसारवृक्ष मुळीच भासू देणार नाही॥ २६४॥ ज्याप्रमाणे चांदण्यात मृगजळ दिसत नाही, त्याप्रमाणे आत्मानुभवाच्या अखंड वृत्ति प्रवाहात संसारवृक्षाची वरची मुळे की खालची मुळे किंवा खालच्या शाखा-डाहाळ्या हे काही एक दिसणार नाही॥ २६५॥ हे योद्ध्यामध्ये श्रेष्ठ अर्जुना! अशा रीतीने आत्मज्ञानरूपी तरवारीने संसाररूपी वर मुळे असलेल्या संसारवृक्षाला तोडून टाक॥ २६६॥

ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी॥ ४॥

अर्थ—ज्या पदाचे ठिकाणी प्राप्त झालेले पुरुष पुनः संसारात परत येत नाहीत व ज्यापासून अनादि संसारचक्राची प्रवृत्ति झाली आहे त्या आद्य पुरुषाला मी शरण आहे, अशा भावनेने त्या पदाचा शोध करावा॥ ४॥

मग इदंतेसि वाळलें। जें मीपणेंवीण डाहारलें। तें रूप पाहिजे आपलें। आपणचि॥ २६७॥

अर्थ—मग 'हे असे' म्हणून दाखविले जाईल, अशा दृश्यकोटीत जे येत नाही, तसेच जे मीपणा वाचून प्रसिद्धीस आले आहे-म्हणजे मीपणाहि जेथे सहन होत नाही-ते आपले स्वरूप आपणच पाहावे॥ २६७॥

गूढार्थदीपिका—आत्मस्वरूप, अहंता किंवा द्रष्ट्रत्व व इदंता किंवा दृश्यत्व या दोघांनाहि प्रकाशित करणारे असे केवळ ज्ञानरूप आहे, असे आपण ओळखले पाहिजे.

परि दर्पणाचेंनि आधारें। एकचि करून दुसरें। मुख पाहाती गव्हारें। तैसें नको हो॥ २६८॥
हें पाहाणें ऐसें असे वीरा। जैसा न मोडलिया विहिरा। मग आपलिया उगमीं झरा। भरोनि ठाके॥ २६९॥
नातरी आटलिया अंभ। निजबिंबी प्रतिबिंब। नेहटे कां नभीं नभ। घटाभावीं॥ २७०॥
ना ना इंधनांशु सरलेया। वन्हि परते जेवीं आपणपयां। तैसे आपेंआप धनंजया। न्याहाळणें जें॥ २७१॥
जिव्हें आपली चवी चाखणें। चक्षु निज बुबुळ देखणें। आहे तया ऐसें निरीक्षणें। आपुलें पैं॥ २७२॥
कां प्रभेसि प्रभा मिळे। गगन गगनावरी लोळे। नाना पाणी भरलें खोळे। पाणियाचिये॥ २७३॥
आपणचि आपणयातें। पाहिजे जें अद्वैतें। तें ऐसें होय निरुतें। बोलिजतु असे॥ २७४॥
जें पाहिजतेनवीण पाहिजे। कांही नेणणाचि जाणिजे। आद्यपुरुष कां म्हणिजे। जया ठायातें॥ २७५॥

अर्थ—पण आरशाचे साह्याने एकच मुख दोन मुखे करून जसे मूर्ख लोक आपल्या मुखाला पाहतात तसे मात्र आत्मस्वरूपाला पाहता कामा नये॥ २६८॥ हे वीरा अर्जुना! विहिरीत येणारे पाणी ज्याप्रमाणे विहिर उकरण्यापूर्वी उगमात साठविलेले असते, हे आपण जाणतो त्याप्रमाणे आपण आपल्या आत्मस्वरूपाला पाहणे आहे॥ २६९॥ किंवा ज्याप्रमाणे पाणी आटले असता त्यात पडलेले प्रतिबिंब बिंबाशी किंवा घट नाहीसा झाला की घटाकाश महाकाशाशी एकरूप होऊन राहते॥ २७०॥ किंवा अर्जुना! लाकडाचे जळणे संपले असता अग्नि आपल्या स्वरूपात मिळतो, त्याप्रमाणे आपणच आपल्याला जे पाहणे, तेच आपले स्वरूप पाहणे होय (आपण आपल्यासच ब्रह्मस्वरूप समजावे, असा अर्थ)॥ २७१॥ जिव्हेने आपली चव चाखण्यासारखे किंवा डोळ्याने आपले बुबुळ पाहण्यासारखे आपण आपल्याला पाहणे आहे॥ २७२॥ किंवा प्रकाशाने प्रकाशास मिळावे, आकाशाने आकाशावर लोळावे किंवा पाण्याच्या पिशवीत पाणी भरावे॥ २७३॥ अद्वैतदृष्टीने आपण आपल्याला जे पाहणे आहे ते खरोखर अशा प्रकारचे आहे, सांगतो, ऐक॥ २७४॥ जे आत्मस्वरूप पाहिल्यावाचून पाहायचे असते, काही न जाणता जाणायचे असते ज्या आत्मस्वरूपाला आद्यपुरुष म्हणतात॥ २७५॥

गूढार्थदीपिका—अहंता, इदंता इत्यादि सर्व दृश्य नामरूपाहून आपल्याला निराळे करीत शेवटी उरलेल्या केवळ सत्तेशी एकरूप होऊन राहणे याला आत्मस्वरूप पाहणे म्हणतात व हाच निर्गुण आत्मस्वरूपाचा प्रत्यय होय.

तेथही उपाधीचा वोथंबा। घेऊनि श्रुति उभविती जिभा। मग नामरूपाचा बडंबा। करिती वायां॥ २७६॥
पैं भवस्वर्गा उबगले। मुमुक्षु योगज्ञाना वळघले। पुढती न यों इया निगाले। पैजा जेथ॥ २७७॥

संसाराचिया पायां पुढां। पळती वीतराग होडा। ओलांडोनि ब्रह्मपदाचा कर्मकडा। घालिती मागां॥ २७८॥
अहंतादिभावां आपुलियां। झाडा देऊनि आघवेयां। पत्र घेती ज्ञानिये जया। मूळघरासी॥ २७९॥
पैं जेथुनी हे एवढी। विश्वपरंपरेची वेलांडी। वाढती आशा जैसी कोरडी। निदैवाची॥ २८०॥
जिये कां वस्तूचें नेणणें। आणिले थोर जगा जाणणें। नाहीं तें नांदविलें जेणें। मीं तूं जगीं॥ २८१॥
पार्था तें वस्तु पहिलें। आपणपें पैं आपुलें। पाहिजे जैसें हिंवलें। हिंव हिंवे॥ २८२॥
आणीकही एक तया। वोळखण असे धनंजया। तरी जया कां भेटलिया। येणेंचि नाहीं॥ २८३॥
परी तया भेटती ऐसे। जे ज्ञाने सर्वत्र सरिसे। महाप्रळयांबूचें जैसें। भरलेपण॥ २८४॥

अर्थ—अशाहि आत्मस्वरूपाच्या ठिकाणी उपाधि कल्पून मग त्याच्या आश्रयाने श्रुती नामरूपाचा वाचेने व्यर्थ गलबला करतात॥ २७६॥ संसारसुख व स्वर्गसुख या दोहोंनाहि तुच्छ मानून यात पुन: पडायचे नाही या प्रतिज्ञेने योग व ज्ञान या मार्गाला लागलेले मुमुक्षु॥ २७७॥ वैराग्यसंपन्न होऊन पैजेने जेथे संसाराची मांडणी आहे त्याच्या पलीकडे धावतात व ब्रह्मलोकरूपी कर्मकड्याला ओलांडून तोहि मागे टाकतात॥ २७८॥ जे ज्ञानी आपल्या अहंतादि सर्व भावांना नि:शेष सोडून देऊन आपल्या मूळ ब्रह्मपदाची सनद घेतात॥ २७९॥ दुर्दैवी पुरुषाची आशा जशी निष्फळ वाढते त्याप्रमाणे जेथून ह्या विश्वपरंपरेची वाढ व्यर्थ होत असते॥ २८०॥ ज्या वस्तूच्या अज्ञानामुळे एवढ्या मोठ्या जगाचे जाणणे अस्तित्वात आले व नसतेच मी-तूं पण रूढविले गेले॥ २८१॥ अर्जुना! ज्याप्रमाणे हिवाने हिवच कुडकुडूं लागावे, त्याप्रमाणे ती वस्तुच आपले पहिले-म्हणजे मूळ स्वरूप होय, असे जाणावे॥ २८२॥ अर्जुना! आणखी एक त्या वस्तूची ओळख आहे की जिला प्राप्त झाले असता पुन: संसारात परत यावे लागत नाही॥ २८३॥ महाप्रलयातील पाणी जसे सर्वत्र भरलेले असते, त्याप्रमाणे ज्ञानी पुरुष त्या स्वरूपाला असे भेटतात की ते ज्ञानाने सर्वत्र सारखे आपणच होऊन जातात॥ २८४॥

निर्मानमोहा जितसङ्गदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः।
द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसञ्ज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत्॥ ५॥

अर्थ—मान म्हणजे सत्कार, मोह म्हणजे अविवेक यांचा ज्यांनी त्याग केला आहे, आसक्ति व आसक्तीचे दोष ज्यांनी जिंकले आहेत, आत्मस्वरूपाचे ठिकाणी रममाण होणारे, निष्काम झालेले, सुखदु:खादि द्वंद्वापासून मुक्त झालेले, असे ते ज्ञानी पुरुष त्या अविनाशी पदाला प्राप्त होतात॥ ५॥

जया पुरुषांचें कां मन। सांडोनि गेले मोहमान। वर्षांतीं जैसें घन। आकाशातें॥ २८५॥
निकवड्या निष्ठुरा। उबगिजे जेवीं सोयरा। तैसे नागवती विकारां। वेटाळूं जे॥ २८६॥
फळली केळी उन्मळे। तैसी आत्मलाभें प्रबळें। जयांची क्रिया ढाळेंढाळें। गळती आहे॥ २८७॥
आगी लागलिया रुखीं। देखोनि सैरा पळती पक्षी। तैसें सांडिले अशेखीं। विकल्पीं जे॥ २८८॥
आइकें सकळ दोषतृणीं। अंकुरिजती जिये मेदिनी। तिये भेदबुद्धीची काहाणी। नाहीं जयातें॥ २८९॥

अर्थ—ज्याप्रमाणे वर्षाऋतूचे शेवटी आकाशातील अभ्रे निघून जातात, त्याप्रमाणे ज्याच्या मनातून मान व मोह हे नि:शेष नाहीसे झाले॥ २८५॥ ज्याप्रमाणे दरिद्री व निष्ठुर अशा पुरुषाची त्याचे आप्त उपेक्षा करतात, त्याप्रमाणे ज्याचे मन विकाराच्या स्वाधीन होत नाही॥ २८६॥ ज्याप्रमाणे फळलेले केळीचे झाड उन्मुळून पडते, त्याप्रमाणे प्रबळ आत्मप्राप्तीमुळे ज्याची कर्मप्रवृत्ति क्रमाक्रमाने क्षीण होत जाते॥ २८७॥ ज्याप्रमाणे वृक्षाला आग लागलेली पाहून त्यावरील पक्षी सैरावैरा पळतात त्याप्रमाणे संपूर्ण विकल्पांनी ज्याला सोडले आहे॥ २८८॥ अर्जुना! ऐक. संपूर्ण दोषरूपी गवताचे अंकुर ज्या द्वैतबुद्धिरूप भूमीत उगवतात त्या द्वैतबुद्धीची वार्ताहि ज्यांना नसते॥ २८९॥

गूढार्थदीपिका—ज्ञान्याची बुद्धि अखंड अद्वैत परब्रह्मरूप होऊन राहते. तिचा भंग न होता त्याची इंद्रिये मात्र पूर्वीच्या अभ्यासामुळे झालेल्या संस्काराप्रमाणे वागतात. ते शेण व अन्न एकरूप समजत नाहीत, हे लक्षात ठेवावे. नाहीतर कुत्र्यात व त्यांच्यात काहीहि फरक राहणार नाही. सर्व खरे भूतपूर्व व वर्तमान ज्ञानी ''भावाद्वैतं सदा कुर्यात्

क्रियाद्वैतं न कर्हिचित्'' या आचार्यवचनाप्रमाणे सर्व वस्तूंचे भावरूप अस्तित्व एक अद्वैतरूप आहे भिन्न भिन्न नाही अशी अद्वैतदृष्टि करीत आले व करीत असतात. व क्रियांचे अद्वैत कोणी समजत नसत व समजत नाहीत.

सूर्योदयासरिसी। रात्री पळोनि जाय आपैसी। गेली देहअहंता तैसी। अविद्येसवें॥ २९०॥

अर्थ—ज्याप्रमाणे सूर्योदय झाल्याबरोबर रात्र आपोआप जाते, त्याप्रमाणे आत्मज्ञानाने अविद्येचा नाश झाला की त्याबरोबरच ज्याची देहअहंताहि नाश पावते॥ २९०॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञान झाल्यावर ज्ञान्याचा अहं ''मी ब्रह्म'' म्हणून आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर होत असल्यामुळे व त्याचे तो अखंड चिंतन करीत असल्यामुळे त्याचा 'अहं' पुन: देहावर कधी येत नाही, असा अर्थ.

पैं आयुष्यहीना जीवातें। शरीर सांडी जेवीं अवचितें। तेवीं निदसुरें द्वैतें। सांडिले जे॥ २९१॥
लोहाचें सांकडें परिसा। न जोडे अंधारू रवि जैसा। द्वैतबुद्धीचा तैसा। सदा दुकाळ जया॥ २९२॥
अगा सुखदु:खाकारें। द्वंद्वें देहीं जियें गोचरें। तियें जयां कां समोरें। होतीचिना॥ २९३॥
स्वप्नींचें राज्य कां मरण। नोहे हर्षशोकासि कारण। उपवढलिया जाण। जियापरी॥ २९४॥
तैसें सुखदु:खरूपीं। द्वंद्वीं जे पुण्यपापीं। न घेपिजतीं सर्पीं। गरुड जैसे॥ २९५॥

अर्थ—ज्याप्रमाणे आयुष्य सरलेल्या जीवास शरीर एकदम सोडते, त्याप्रमाणे अज्ञानजन्य द्वैताने ज्यांना सोडले॥ २९१॥ ज्याप्रमाणे परिसाला लोखंडाचे संकट पडत नाही किंवा सूर्याला आंधार दिसत नाही, त्याप्रमाणे ज्यांचेजवळ द्वैतबुद्धीचा सदा दुष्काळ असतो॥ २९२॥ अर्जुना! अज्ञानी लोकांच्या देहाच्या ठिकाणी सुखदु:खाच्या रूपाने जे परस्परविरुद्ध भाव दिसून पडतात ते त्याला कधी भासतच नाहीत॥ २९३॥ ज्याप्रमाणे स्वप्नातील राज्यप्राप्ति किंवा मरण, जागे झाल्यावर हर्षाला किंवा शोकाला कारण होत नाही किंवा गरुड सर्पाकडून धरला जात नाही, त्याप्रमाणे पुण्य-पापरूप कर्मांनी उत्पन्न होणारी सुखदु:खरूप द्वंद्वे ज्याला होत नाहीत॥ २९४-२९५॥

आणि अनात्मवर्गनीर। सांडूनि आत्मरसाचें क्षीर। चरताति जे सविचार। राजहंस॥ २९६॥
जैसा वर्षोनि भूतळीं। आपला रस अंशुमाळी। मागौता आणि रश्मिजाळीं। बिंबासीचि॥ २९७॥
तैसें आत्मभ्रांतीसाठीं। वस्तु विखुरली बारावाटीं। ते एकवटिती ज्ञानदृष्टी। अखंड जे॥ २९८॥
किंबहुना आत्मयाचा। निर्धारीं विवेक जयांचा। बुडाला वोघ गंगेचा। सिंधूमांजी जैसा॥ २९९॥
पैं आधवेंचि आपुलेपणें। नुरेचि जयां अभिलषणें। जैसें येथूनि पऱ्हां जाणें। आकाशा नाहीं॥ ३००॥
जैसा अग्नीचा डोंगरु। नेघे कोणी बीजअंकुरु। तैसा मनीं जयांच्या विकारु। उदयजेना॥ ३०१॥
जैसा काढिलिया मंदराचळु। राहे क्षीराब्धि निश्चळु। तैसा नुठी जयां सळू। कामोर्मींचा॥ ३०२॥
चंद्रमा कळीं धाला। न दिसे कोणें आंगीं वोसावला। तेवीं अपेक्षेचा अवखळा। न पडे जयां॥ ३०३॥
हें किती बोलूं असांगडें। जेवीं परमाणु नुरे वायूपुढें। तैसें विषयांचें नावडे। नांवचि जयां॥ ३०४॥
एवं जे जे कोणी ऐसे। केले ज्ञानाख्यहुताशें। ते तेथ मिळती जैसें। हेमीं हेम॥ ३०५॥
तेथ म्हणिजे कवणें ठाईं। ऐसेंही पुससी कांहीं। तरी तें पद गा नाहीं। वेंचु जया॥ ३०६॥
दृश्यपणें देखिजे। कां ज्ञेयत्वें जाणिजे। अमुकें ऐसें म्हणिजे। तें जें नव्हे॥ ३०७॥

अर्थ—जे ज्ञानीपुरुष, आत्म्याहून निराळे असणारे संपूर्ण जडवर्गरूपी पाणी टाकून देऊन आत्मरूपी दुग्धाचे प्राशन करणारे विचारवंत राजहंस होत॥ २९६॥ ज्याप्रमाणे सूर्य आपण शोषलेल्या पाण्याचा वर्षाव करून पुन: आपल्या किरणांनी तो बिंबाच्या ठिकाणी आणतो॥ २९७॥ त्याप्रमाणे अज्ञानभ्रांतिमुळे अनंत प्रकारांनी विखुरलेली आत्मवस्तु जे ज्ञानीपुरुष ज्ञानदृष्टीने अखंड एकरूप पाहतात॥ २९८॥ फार काय सांगावे! ज्याप्रमाणे गंगेचा ओघ समुद्रास मिळून समुद्ररूप होऊन जातो, त्याप्रमाणे ज्यांचा विवेक एका आत्म्याचाच निर्धार करणारा होतो॥ २९९॥ ज्याप्रमाणे सर्वत्र पसरले असल्यामुळे आकाशाला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जावे लागत नाही, त्याप्रमाणे मीच सर्व झालो आहे, ह्या ज्ञानबुद्धीमुळे ज्या ज्ञान्याला दुसऱ्या कशाची इच्छाच राहत नाही॥ ३००॥ ज्याप्रमाणे

अग्नीच्या डोंगरावर कोणताहि अंकुर उत्पन्न होत नाही, त्याप्रमाणे ज्यांच्या अंत:करणात कोणत्याहि विकाराचा अंकुरच उत्पन्न होत नाही॥ ३०१॥ ज्याप्रमाणे क्षीरसमुद्रातून मंदार पर्वत काढून घेतल्यावर तो जसा शांत झाला, त्याप्रमाणे ज्याच्या अंत:करणात कामाची ऊर्मीदेखील उठतच नाही॥ ३०२॥ सोळा कळ्यांनी पूर्ण झालेला पौर्णिमेचा चंद्र कोठेहि अपूर्ण दिसत नाही, त्याप्रमाणे ज्याच्या अंगी पूर्णता बाणल्यामुळे अपेक्षा करण्याकरिता न्यूनताच भासत नाही॥ ३०३॥ किती बोलायचे! तो अवर्णनीय आहे. ज्याप्रमाणे सुटलेल्या वायुपुढे धुळीचा कण टिकत नाही, त्याप्रमाणे ज्यांना विषयाचे नावहि आवडत नाही॥ ३०४॥ ज्ञानाग्नीने जे जे कोणी असे केले गेले ते, सोन्यात सोने मिळवावे, त्याप्रमाणे तेथे (अव्यय परब्रह्माशी) मिळतात॥ ३०५॥ तेथे म्हणजे कोठे? असेहि कदाचित् विचारशील तर जे कधी नाशच पावत नाही, असे ते पद होय॥ ३०६॥ जे दृश्य म्हणजे डोळ्यांनी पाहण्याचा विषय किंवा ज्ञेय म्हणजे जाणण्याचा विषय व अमुक म्हणून जे बोटाने दाखविता येत नाही॥ ३०७॥

गूढार्थदीपिका—मर्यादित वस्तुच प्रत्यक्षादि प्रमाणाने जाणली जाते व बोटाने दाखविता येते. ब्रह्म अमर्याद असल्यामुळे व प्रमाणाच्याहि आधी स्वयंसिद्ध व सूक्ष्म असल्यामुळे ते प्रमाणाने जाणले जाऊ शकत नाही व बोटाने दाखविता येत नाही.

न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः। यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम॥ ६॥

अर्थ—सूर्य, चंद्र किंवा अग्नि देखील त्या पदाला प्रकाशित करू शकत नाहीत. जेथे गेले असता पुरुष पुन: परत येत नाहीत, ते माझे परम स्थान होय॥ ६॥

पैं दीपाचिया बंबाळीं। कां चंद्र हन जें उजळी। हें काय बोलों अंशुमाळी। प्रकाशी जें॥ ३०८॥
तें आघवेंचि दिसणें। जयातें कां न देखणें। विश्व भासतसे जेणें। लपालेनी॥ ३०९॥

अर्थ—अनेक टेंभ्याच्या उजेडाने किंवा चंद्राच्या उजेडाने, एवढेच नाही तर सूर्याच्या प्रकाशाने जेवढे काही दिसते त्या सर्वाचे दिसणे म्हणजे त्याचे न दिसणे होय. जे स्वरूप लोपले असताच विश्व दिसू लागते॥ ३०८-३०९॥

गूढार्थदीपिका—परमात्मप्रकाश लोपला असल्यामुळे म्हणजे परमात्मप्रकाशाच्या अज्ञानामुळे परमात्मप्रकाशाहून निराळे चंद्र, सूर्य, अग्नि इत्यादि भौतिक प्रकाश दिसत आहेत; म्हणून असे हे प्रकाश दिसतात तोपर्यंत परमात्मप्रकाश दिसणे शक्य नाही, असा अर्थ.

जैसें शिंपीपण हारपे। तंव तंव खरें होय रुपें। कां दोरी लपतां सापें। फार होइजे॥ ३१०॥
तैसीं चंद्रसूर्यादि थोरें। इयें तेजें जियें फारें। तियें जयाचेनि आंधारें। प्रकाशती॥ ३११॥

अर्थ—ज्याप्रमाणे जशी जशी शिंप दिसेनाशी होते तसे तसे त्यावर रुपे खरे वाटू लागते किंवा जशी जशी दोरी दिसत नाही तसा तसा सर्पाचा भास दृढ होतो॥ ३१०॥ त्याप्रमाणे जे चंद्रसूर्यादि थोर प्रकाशमान पदार्थ ज्याच्या योगाने थोर प्रकाशमान झाले आहेत॥ ३११॥

गूढार्थदीपिका—सृष्टीतील स्थावर जंगम पदार्थांचे ठिकाणी असणारी कार्यकारी शक्ति ही परमात्म्याचीच आहे, असा भाव.

ते वस्तु कीं तेजोराशी। सर्वभूतात्मक सरिसी। चंद्रसूर्याच्या मानसीं। प्रकाशे जे॥ ३१२॥
म्हणौनि चंद्रसूर्य कडवसां। पडती वस्तूच्या प्रकाशा। यालागीं तेज जें तेजसा। तें वस्तूचें आंग॥ ३१३॥
आणि जयाच्या प्रकाशीं। जग हारपे चंद्रार्केसीं। सचंद्र नक्षत्रें जैसीं। दिनोदयीं॥ ३१४॥
नातरी प्रबोधलिये वेळे। ते स्वप्नींची दिंडी मावळे। कां नुरेचि सांजवेळे। मृगतृष्णिका॥ ३१५॥
तैसा जिये वस्तूच्या ठायीं। कोण्हीच कां आभासु नाहीं। तें माझें निजधाम पाहीं। पाटाचें गा॥ ३१६॥

अर्थ—ती वस्तु म्हणजे तेजाची राशीच होय. ती पदार्थमात्राचे ठिकाणी सारखी असून चंद्रसूर्याचे अंतर्यामीहि तीच प्रकाशते॥ ३१२॥ त्या ब्रह्मस्वरूपाच्या प्रकाशापुढे चंद्रसूर्य हे तेजोहीन पदार्थ आहेत, म्हणून तेजस्वी वस्तुमध्ये जे तेज दिसते ते ज्या ब्रह्मवस्तूचेच परिवर्तित अंगतेज होय॥ ३१३॥ आणि ज्याप्रमाणे सूर्योदय झाला असता नक्षत्रासहित

चंद्र लोपला जातो त्याप्रमाणे ज्याच्या प्रकाशात चंद्रसूर्यासहित विश्व लोपले जाते॥ ३१४॥ किंवा ज्याप्रमाणे जाग आल्याबरोबर स्वप्नातील देखावा मावळतो किंवा संध्याकाळी मृगजळाचा भास उरत नाही॥ ३१५॥ त्याप्रमाणे ज्या स्वरूपाचे ठिकाणी त्याच्याहून अन्य कोणताच दृश्यभास भासत नाही, ते माझे सर्वोच्च धाम होय॥ ३१६॥

गूढार्थदीपिका—निर्गुण निराकार ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी त्यावाचून दुसरा कोणताच आभास राहत नाही, असे येथे जसे सांगितले आहे, तसाच "कंसमर्दने मुरलीवादने अघटित केले असे। की आभास काहीच उरला नसे" या पदाने एकनाथादि संतांनीहि आपल्या सगुणभक्तीचा अनुभव सांगितला आहे.

किंवा जे परब्रह्म अद्वैत भासरहित आहे, असे श्रुति म्हणते त्याचा अनुभव निर्गुणज्ञान्यांना व्यवहारकाली येत नसून समाधिकालीच येऊ शकतो. पण ज्ञानानंतरहि सगुणभक्ति करणाऱ्या भक्तांना मात्र हा अनुभव "समाधिव्युत्थानी हरि विलसे। याविण काही अन्य न भासे" सदासर्वदा असतो असे एकनाथ म्हणतात.

पुढती जे तेथ गेले। ते न घेती माघौतीं पाउलें। महोदधीं कां मिनले। स्त्रोत जैसे॥ ३१७॥
कां लवणाची कुंजरी। सूदलिया लवणसागरीं। होयचि ना माघारी। परती जैसी॥ ३१८॥
नाना गेलिया अंतराळा। न येतीचि वन्हिज्वाळा। नाहीं तप्तलोहौनि जळा। निघणें जेवीं॥ ३१९॥
तेवीं मजसीं एकवाट। जे जाले ज्ञानें चोखट। तयां पुनरावृत्तीची वाट। मोडली गा॥ ३२०॥

अर्थ—जसे नदीचे प्रवाह समुद्रात मिळाले असता पुन: परत फिरत नाहीत, त्याप्रमाणे जे माझ्या या परमपदाला प्राप्त झाले ते पुनः माघारा फिरत नाहीत॥ ३१७॥ किंवा मिठाची केलेली हत्तीण क्षार समुद्रात बुडविली असता ज्याप्रमाणे ती माघारी परत फिरत नाही॥ ३१८॥ किंवा आकाशात गेलेल्या अग्नीच्या ज्वाळा परत येत नाहीत अथवा तापलेल्या लोखंडावर टाकलेल्या पाण्याला पुन: परत येणे नाही॥ ३१९॥ त्याप्रमाणे शुद्धज्ञानाने सकार्य अविद्या नष्ट होऊन जे माझ्याशी ऐक्य पावले त्यांची संसारात परत येण्याची वाटच मोडली जाते॥ ३२०॥

तेथ प्रज्ञापृथ्वीचा रावो। पार्थु म्हणे जी जी पसावो। परी विनंती एकी देवो। चित्त देतु॥ ३२१॥
तरी देवेंसि स्वयें एक होती। मग माघौते जे न येती। ते देवेंसि भिन्न आथी। कीं अभिन्न जी॥ ३२२॥
जरी भिन्नचि अनादिसिद्ध। तरी न येती हें असंबद्ध। जे फुलां गेलें षट्पद। ते फुलेंचि होती कां॥ ३२३॥
पैं लक्ष्याहुनि अनारिसें। बाण लक्ष्यीं शिवोनि जैसे। मागुते पडती तैसे। येतीचि ते॥ ३२४॥
नातरी तूंचि ते स्वभावें। तरी कोणें कोणेसि मिळावें। आपणयासी आपण रुपावें। शस्त्रें केवीं॥ ३२५॥
म्हणोनि तुजसी अभिन्ना जीवां। तुझा संयोगवियोगु देवा। न ये बोलो अवयवां। शरीरेसीं॥ ३२६॥
आणि जे सदां वेगळे तुजसीं। तया मिळणी नाहीं कोणे दिवसीं। मा येती न येती हे कायसी। वायबुद्धि॥ ३२७॥
तरी कोण गा तूतें। पावोनि न येती माघौते। हें विश्वतोमुखा मातें। बुझावीं जी॥ ३२८॥

अर्थ—हे ऐकून प्रज्ञारूप पृथ्वीचा राजा अर्जुन म्हणाला, अहो जी भगवंता! हा तुमचा प्रसाद आहे, पण माझी एक प्रार्थना आहे, देवांनी चित्त द्यावे॥ ३२१॥ देवा! जे तुमच्याशी एकरूप होऊन परत येत नाहीत ते तुमच्याहून भिन्न आहेत की अभिन्न आहेत॥ ३२२॥ जर मूळचे ते तुमच्याहून स्वत:सिद्ध भिन्नच असतील तर पुन: परत येत नाहीत हे बोलणे असंबद्ध आहे. झाडांच्या फुलांवर गेलेले भ्रमर फुलेच होऊन जातात काय?॥ ३२३॥ ज्याप्रमाणे बाण जेथे मारावयाचा, त्या लक्ष्याहून निराळा असलेला, तो लक्ष्याला स्पर्श करून जसा अलग पडतो, त्याप्रमाणे तुम्हाला प्राप्त झालेले परत येतीलच॥ ३२४॥ किंवा तेहि स्वभावत: तूच असशील तर कोणी कोणात मिळायचे? एकच शस्त्र आपणातच आपण कसे खुपसले जाईल?॥ ३२५॥ म्हणून ज्याप्रमाणे शरीराशी अवयवांचा संयोग-वियोग कल्पिता येत नाही त्याप्रमाणे तुझ्याशी अभिन्न असलेल्या जीवाचाही तुझ्याशीच संयोगवियोग कल्पिता येणार नाही॥ ३२६॥ आणि जे सदासर्वदा तुझ्याहून भिन्न आहेत ते केव्हाहि तुझ्याशी मिळू शकत नाहीत; मग ते तुम्हाला प्राप्त होतात, परत येत नाहीत, हे बोलणे व्यर्थ आहे॥ ३२७॥ तरी तुम्हाला प्राप्त होऊन परत येत नाहीत ते कोण, हे सर्वत्र मुखे असलेल्या भगवंता! मला समजावून सांगा॥ ३२८॥

इये आक्षेपीं अर्जुनाच्या। तो शिरोमणि सर्वज्ञांचा। तोषला बोध शिष्याचा। देखोनियां॥ ३२९॥
मग म्हणे गा महामती। मातें पावोनि न येती पुढती। ते भिन्नाभिन्न रिती। आहाती दोनी॥ ३३०॥
जैं विवेकें खोलें पाहिजे। तरी मी तेचि ते सहजें। ना आहाचवाहाच तरी दुजे। ऐसेही गमती॥ ३३१॥
जैसें पाणियांहि वेगळ। तळपतां दिसती कल्लोळ। एऱ्हवीं तरी निखिळ। पाणीचि तें॥ ३३२॥
कां सुवर्णाहूनि आनें। लेणीं गमती भिन्नें। मग पाहिजे तंव सोनें। आघवेंचि तें॥ ३३३॥
तैसें ज्ञानाचिये दिठी। मजसीं अभिन्नचि ते किरीटी। येर भिन्नपण तें उठी। अज्ञानास्तव॥ ३३४॥
आणि साचोकारेनि वस्तुविचारें। कैंचे मज एकासि दुसरें। जें भिन्नाभिन्नव्यवहारें। उमसिजेल॥ ३३५॥
आघवेंचि आकाश सूनि पोटीं। बिंबचि जैं आते खोटी। तैं प्रतिबिंब कें उठी। कें रश्मि शिरे॥ ३३६॥
कां कल्पांतींचिया पाणिया। काय वोत भरताती धनंजया। म्हणोनि कैंचे अंश अविक्रिया। एका मज॥ ३३७॥
परी ओघाचेनि मेळें। पाणी उजू परी वांकुडें जालें। रवी दुजेपण आलें। तोयबगें॥ ३३८॥
व्योम चौफळें कीं वाटोळें। हें ऐसें कायसयाही मिळे। परी घटमठीं वेंटाळे। तैसेंही आथी॥ ३३९॥
हां गा निद्रेचेनि आधारें। काय एकलेनि जग न भरे। स्वप्नीचेनि जैं अवतरे। रायपणें॥ ३४०॥
कां मिनलेनि किडाळें। वानिभेदासि ये सोळें। तैसा स्वमाये वेंटाळें। शुद्ध जैं मी॥ ३४१॥

अर्थ—अर्जुनाने असा आक्षेप घेतला असता सर्वज्ञांचा शिरोमणि श्रीकृष्ण आपल्या प्रिय शिष्याचा बोध पाहून प्रसन्न झाले॥ ३२९॥ मग भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे बुद्धिमान अर्जुना! जो मला प्राप्त होऊन परत येत नाही, त्याचे माझ्याहून भिन्न व माझ्याशी अभिन्न असे दोन ही प्रकार आहेत॥ ३३०॥ खोल अशा विवेकदृष्टीने पाहता मी व ते स्वभावत: एक आहोत व नुसते वरवर दृष्टीने पाहता ते माझ्याहून भिन्नहि दिसतात॥ ३३१॥ ज्याप्रमाणे पाण्यावर उठलेले कल्लोळ वेगळे असे दिसतात, पण ते खरोखर पाणीरूपच असतात॥ ३३२॥ किंवा सोन्याहून अलंकार निराळे वाटतात, पण विचार करून पाहू गेल्यास ते संपूर्ण सोनेच असते॥ ३३३॥ त्याप्रमाणे अर्जुना! ज्ञानदृष्टीने पाहता ते माझ्याशी अभिन्नच आहेत. बाकी अज्ञानामुळे ते माझ्याहून भिन्न वाटतात॥ ३३४॥ खरोखर ब्रह्मवस्तूचा विचार केला असता माझ्या (अफुट, अद्वैतरूप, अमर्याद, अविक्रिय अशा) स्वरूपाचे ठिकाणी भिन्नाभिन्न शब्दाचा व्यवहार लागू पडेल अशी दुसरी वस्तु कोठून असणार?॥ ३३५॥ सर्व आकाश पोटात घालून सर्व एक बिंबच झाले तर त्याचे प्रतिबिंब कोठे पडेल किंवा त्याची किरणे कोठे शिरतील?॥ ३३६॥ किंवा अर्जुना! कल्पाच्या शेवटी सर्व ब्रह्मांड बुडून जलमय करणाऱ्या पाण्याला, नद्यांना पूर येऊन फुटलेले त्याचे प्रवाह भरतात काय? म्हणून अपरिणामी, अफुट, अवयव नसणाऱ्या अशाला माझे अंश कोठून असणार?॥ ३३७॥ पाणी सरळच असते, पण प्रवाहामुळे ते वाकडे होते. सूर्य एकच पण पाण्याच्या संबंधामुळे त्याला दोनपणा येतो॥ ३३८॥ वाटोळे किंवा चौकोनी या आकाराला आकाश कसे प्राप्त होईल? पण ते घटात किंवा मठात सापडले असता तसेहि होते॥ ३३९॥ झोपेमध्ये जेव्हा मी सार्वभौम राजा झालो असे स्वप्न पडते तेव्हा एकच पुरुष जगभर होत नाही काय?॥ ३४०॥ किंवा हीणकटाने मिसळलेले शुद्ध सोने नाना प्रकारच्या कसोटीचे होते, त्याप्रमाणे शुद्ध अद्वैतस्वरूप जो मी, जेव्हा आपल्या मायेने वेटाळला जातो॥ ३४१॥

गूढार्थदीपिका—तैसा स्वमाये वेटाळे

''तैसा स्वमाये वेटाळे'' या पदावरून माया एक पदार्थ आहे व तिचा व ब्रह्माचा केव्हा तरी संबंध होऊन जीव उत्पन्न झाला असे माउलीचे म्हणणे आहे, असे कोणी समजू नये. कारण तसे सिद्धच होत नाही. जीवाने कल्पिलेल्या 'मी ब्रह्म जाणत नाही' इत्यादि भ्रांतिरूप मायेचा व जीवाचा जो अनादि संबंध आहे त्याचे जीवाचे ठिकाणी कसे व कोणते परिणाम होतात एवढेच माउलीने येथे दाखविले आहे.

तैं अज्ञान एक रूढे। तेणें कोहं विकल्पाचें मांडे। मग विवरूनि कीजे फुडें। देहोऽहं ऐसें॥ ३४२॥

अर्थ—तेव्हा मी ब्रह्म जाणत नाही असे एक अज्ञान रूढ होते व त्याच्या योगाने 'कोहं' मी कोण असा

विकल्प उठतो व पुढे विचार करून तो 'देहोहं', मी देह आहे, असे म्हणतो॥ ३४२॥

गूढार्थदीपिका-अज्ञान एक रूढे—आत्मविस्मृतिरूप मायाभ्रांतीलाच अज्ञान असे नाव रूढ होते किंवा भ्रांत झालेला जीव मी ब्रह्म जाणत नाही असे आत्मस्वरूपाविषयीचे अज्ञान बोलत असतो.

कोहंविकल्पाचे मांडे-मग जीवाच्या ठिकाणी असलेल्या त्या आत्मविस्मृतिरूप अज्ञानाचा भ्रांतीने "कोऽहं" म्हणजे 'मी कोण' असा विकल्प उठतो व जीव अज्ञानाने विचार करूनच मी म्हणजे देह असा निश्चय करतो, असा अर्थ.

ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन:। मन: षष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति॥ ७॥

अर्थ—ह्या संसारात जो जीव म्हणून प्रसिद्ध आहे तो माझाच अनादि अंश आहे-म्हणजे अंशासारखा आहे. तो आपआपल्या गोलकाच्या ठिकाणी असलेल्या व मन ज्यांच्यात सहावे आहे अशा इंद्रियांना आकर्षण करतो-म्हणजे ताब्यांत ठेवतो॥ ७॥

ऐसें शरीराचि येवढें। जैं आत्मज्ञान वेगळें पडे। तैं माझा अंशु ऐसें आवडे। थोडेपणें॥ ३४३॥

अर्थ—ज्ञानरूप आत्मा जेव्हा देहाहंतेमुळे देहापुरता व वेगळा वाटतो तेव्हा (तो सर्वव्यापक असूनहि) माझ्या अंशासारखा मर्यादित भासतो॥ ३४३॥

गूढार्थदीपिका—दृष्टिसृष्टिवादाच्या दृष्टीने जीव एकच आहे व तोच एकजीववाद "ममैवांशो जीवलोके" या श्लोकात घेतला आहे. आणि "अंशो नानाव्यपदेशात्" (ब्र० सू० २-३-४३) या सूत्रात सत्तात्रयवादानुसार जीवाचे नानात्व मानून भाष्यकाराने भाष्य केले आहे किंवा दृष्टिसृष्टिवादातील नाना अंत:करणप्रतिबिंबित नाना जीवाभासाला धरून भाष्य केले आहे, असे समजावे.

परब्रह्म निरवयव असल्यामुळे ते विभागले जाऊ शकत नाही. ते अखंड अफुटच राहते; म्हणून जीव खरो-खरच परमेश्वराचा अंश आहे, असे मानता येत नाही, असे भगवान आचार्यांनी वरील सूत्रावर भाष्य करतांना स्पष्ट केले आहे.

जीव पूर्ण परब्रह्मस्वरूपच असून मायाभ्रांतीने तो आपल्याला जे शरीरापुरते मर्यादित मानतो, त्या त्याच्या भ्रांत मर्यादित समजुतीला धरून येथे 'अंश' शब्द वापरला आहे.

समुद्र कां वायुवशें। तरंगाकार उल्लसे। तो समुद्रांशु ऐसा दिसे। सानिवा जेवीं॥ ३४४॥
तेवीं जडातें जीवविता। देहअहंता उपजविता। मी जीव गमें पांडुसुता। जीवलोकीं॥ ३४५॥

अर्थ—वाऱ्यामुळे समुद्रावर तरंग उसळला की तो जसा समुद्राच्या एका छोट्याशा अंशासारखा भासतो॥ ३४४॥ त्याप्रमाणे अर्जुना! जडाला सचेतन करणारा व देहाची अहंता उत्पन्न करणारा मीच जीवलोकांत 'जीव' असा वाटतो॥ ३४५॥

गूढार्थदीपिका—मी जीव गमे-सच्चिदानंद परब्रह्म अखंड मायारहित शुद्धच असते. जीवाच्या ठिकाणी असलेल्या माया भ्रांतीला तेज आधार आहे. दृष्टिसृष्टिवादात मायोपहित ब्रह्मालाच जीव म्हणतात व त्या वादाच्या दृष्टीने मी शुद्धब्रह्मच मायेला आधार असल्यामुळे जीवरूप भासतो, असे "मी जीव गमे" या पदाने सुचविले आहे.

पैं जीवाचिया बोधा। गोचरु जो हा धांदा। तो जीवलोक शब्दा। अभिप्रावो॥ ३४६॥
अगा उपजणें निमणें। हें साचचि जें कां मानणें। तो जीवलोकु मी म्हणें। संसारु हन॥ ३४७॥

अर्थ—जीवाच्या ज्ञानाला विषय होणारा जेवढा सर्व व्यवहार आहे, तोच सर्व 'जीवलोके' या शब्दाचा अभिप्रेत अर्थ आहे॥ ३४६॥ उत्पत्ति व नाश हे जेथे खरे मानले जातात, त्यालाच जीवलोके किंवा संसार असे मी म्हणतो॥ ३४७॥

गूढार्थदीपिका—अविनाशी परब्रह्माचे उत्पत्ति-नाशच राहू शकत नाहीत व अद्वितीय परब्रह्माशिवाय दुसरी वस्तुच नसल्यामुळे दुसऱ्या कोणाचे उत्पत्ति-नाश असू शकत नाहीत. असे असताना उत्पत्ति-नाश खरे आहेत अशी जेथे भ्रांति आहे, तो 'जीवलोक' होय.

एवंविध जीवलोकीं। तूं मातें ऐसा अवलोकीं। जैसा चंद्रु कां उदकीं। उदकातीत॥ ३४८॥

अर्थ—ज्याप्रमाणे पाण्यात चंद्राचे बिंब पडले तरी चंद्र हा पाण्याहून निराळा असतो, त्याप्रमाणे जीवलोकातहि मला जीवलोकाहून निराळे पाहा॥ ३४८॥

गूढार्थदीपिका—दृष्टिसृष्टिवादानुसार अंत:करणस्थ जीवाभास किंवा सृष्टिदृष्टिवादानुसार अविद्यायुक्त जीवच बद्धयुक्त मानला जातो; पण परमेश्वराला कोणी निरुपाधिक, कोणी मायोपाधिक, कोणी मायाधार असे अनेक प्रकारे मानले असले तरी कोणी त्याला बद्ध मानले नाही. सर्वांनी त्याला नित्य मुक्तच मानले आहे. म्हणून परमेश्वराचे अवतारहि कोण्याहि प्रकारे परमेश्वरापेक्षा न्यून किंवा अपूर्ण असू शकत नाहीत.

पैं काश्मीराचा रवा। कुंकुमावरी पांडवा। आणिका गमे लोहिवा। तो तरी नव्हे॥ ३४९॥
तैसें अनादिपण न मोडे। माझें अक्रियत्व न खंडे। परी कर्ता भोक्ता ऐसें आवडे। ते जाण गा भ्रांती॥ ३५०॥
किंबहुना आत्मा चोखटु। होऊनि प्रकृतीसी एकवटु। बांधे प्रकृतिधर्माचा पाटु। आपणपयां॥ ३५१॥
पैं मनादि साही इंद्रियें। श्रोत्रादि प्रकृतिकार्यें। तिये माझीं म्हणौनि होये। व्यापारारूढ॥ ३५२॥

अर्थ—अर्जुना! स्फटिकाचा तुकडा कुंकुमावर पडला तर इतरांना तो लाल दिसतो, पण तो लाल होत नाही॥ ३४९॥ त्याप्रमाणे माझे अनादिपण नाहीसे होत नाही व अक्रियत्व कधीहि भंग पावत नाही, तरी मला जे कर्ता भोक्ता समजतात ती केवळ भ्रांति आहे, असे जाण॥ ३५०॥ फार काय सांगायचे! आत्मा (जीवात्मा) अत्यंत शुद्ध, निर्मळ आहे; पण तो प्रकृतीशी ऐक्य पावल्याप्रमाणे होऊन आपले ठिकाणी प्रकृतीच्या धर्माचा प्रवाह लावून घेतो॥ ३५१॥ मनासह सहा श्रोत्रादि इंद्रिये जी प्रकृतीचे कार्य होत, ती माझी आहेत, असे समजून जीवात्मा त्यांच्या व्यापारावर आरूढ होतो-म्हणजे ते व्यापार मी केले असा अहंकार धारण करतो॥ ३५२॥

जैसें स्वप्नीं परिव्राजें। आपणपयां आपण कुटुंब होईजे। मग तयाचेनि धांविजे। मोहें सैरा॥ ३५३॥
तैसा आपलिया विस्मृती। आत्मा आपणचि प्रकृती-। सारिखा गमोनि पुढती। तियेसीचि भजे॥ ३५४॥

अर्थ—ज्याप्रमाणे कुटुंबाची आसक्ति राहिलेला संन्यासी स्वप्नामध्ये आपणच आपले कुटुंब होऊन त्यांच्या मोहाने सैरावैरा धावतो॥ ३५३॥ त्याप्रमाणेच जीवात्मा आपला मूळ ब्रह्मपणा विसरून आपणच प्रकृतिसारखा भासतो व पुढे तिच्याच ठिकाणी आसक्त होतो॥ ३५४॥

गूढार्थदीपिका—येथे "आत्मा" याचा शुद्ध आत्मा असा अर्थ नसून "जीवात्मा" असा अर्थ आहे.

मनाच्या रथीं वळघे। श्रवणाच्या द्वारें निघे। मग शब्दाचिया रिघे। रानामाजीं॥ ३५५॥
तोचि प्रकृतीचा वागोरा। करी त्वचेचिया मोहरा। आणि स्पर्शाचिया घोरा। वना जाय॥ ३५६॥
कोणे एके अवसरीं। रिघोनि नेत्राच्या द्वारीं। मग रूपाच्या डोंगरीं। सैरा हिंडे॥ ३५७॥
कां रसनेचिया वाटा। निघोनि गा सुभटा। रसाचा दरकुटा। भरोंचि लागे॥ ३५८॥
नातरी येणेंचि घ्राणें। मदंश करी निघणें। मग गंधाचीं दारुणें। आडवें लंघी॥ ३५९॥
ऐसेनि देहेंद्रियनायकें। धरूनि मन जवळिकें। भोगिजती शब्दादिकें। विषयभरणें॥ ३६०॥

अर्थ—मनाच्या रथावर बसून श्रवणेंद्रियद्वारा बाहेर पडतो व मग शब्दाच्या अरण्यांत शिरतो-म्हणजे नाना प्रकारचे शब्द ऐकतो॥ ३५५॥ तोच प्रकृतीचा लगाम करून त्वचेंद्रिय मार्गाने स्पर्शरूपी घोर वनांत शिरतो॥ ३५६॥ केव्हा नेत्रेंद्रियाच्या द्वारे बाहेर निघून रूपविषयाच्या डोंगरावर सैरावैरा भटकतो॥ ३५७॥ किंवा, हे थोर योद्धया अर्जुना! रसनेंद्रियाच्या वाटेने जाण्याला निघून रसाची दरी भरू लागतो॥ ३५८॥ किंवा माझा अंशरूप जीवात्मा घ्राणेंद्रियाच्या द्वाराने बाहेर निघण्याची तयारी करून गंधरूपी दाट अरण्ये ओलांडतो॥ ३५९॥ याप्रमाणे दहा इंद्रियांचा स्वामी जो जीवात्मा तो मनाला जवळ करून शरीराचे पोषण करणारे शब्दादि विषय भोगतो॥ ३६०॥

शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः। गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात्॥ ८॥

अर्थ—ज्याप्रमाणे वायु पुष्पांचा सुगंध घेऊन जातो, त्याप्रमाणे संघातरूप शरीराचा स्वामी जीव जेव्हा देह सोडून दुसरा देह घेतो तेव्हा तो मनासह सर्व इंद्रियांना घेऊनच जातो॥ ८॥

गूढार्थदीपिका—मरतेवेळी जीव हा स्थूलदेह येथेच सोडून दहा इंद्रिये, पंचप्राण, मन व बुद्धि ही सतरा तत्वे मिळून झालेल्या लिंगदेहास मात्र घेऊन जातो, असा भाव.

वेदान्तसूत्र ३-१-१ मध्ये भाष्यकारांनी याचा विचार केला आहे.

परी कर्ता भोक्ता ऐसें। हें जीवाचें तैंचि दिसे। जैं शरीरीं कां पैसे। येकाधिये॥ ३६१॥

अर्थ—जेव्हा जीव एखादे शरीरात प्रवेश करतो तेव्हाच त्याचे कर्तृत्व भोक्तृत्व दिसते॥ ३६१॥

गूढार्थदीपिका—कर्तृत्व भोक्तृत्व हे दोन्ही लिंगशरीरान्तर्गत मनाचे धर्म असले तरी लिंग शरीर हे स्थूल शरीरावाचून नुसते एकटे राहू शकत नाही व स्थूल शरीर घेतल्याशिवाय कर्तृत्व भोक्तृत्व हे प्रगटहि होत नाहीत.

जैसा आथिला आणि विलासिया। तैंचि वोळखों ये धनंजया। जैं राजसेव्या ठाया। वस्तीसि ये॥ ३६२॥
तैसा अहंकर्तृत्वाचा वाढ। कां विषयेंद्रियांचा धुमाड। हा जाणिजे तैं निवाड। जैं देह पावे॥ ३६३॥
अथवा शरीरातें सांडी। तऱ्ही इंद्रियांची तांडी। हे आपणपयांसवें काढी। घेऊनि जाय॥ ३६४॥
जैसा अपमानिला अतिथि। ने सुकृताची संपत्ति। कां साइखडेयाची गति। सूत्रतंतू॥ ३६५॥
नाना मावळतेनि तपनें। नेइजती लोकांचीं दर्शनें। हें असो द्रुती पवनें। नेइजे जैसी॥ ३६६॥
तेवीं मनषष्ठां ययां। इंद्रियांतें धनंजया। देहराजु ने देहा-। पासूनि गेला॥ ३६७॥

अर्थ—अर्जुना! ज्याप्रमाणे राजाने ज्या नगरात वस्ति केली आहे तेथेच जेव्हा मनुष्य येऊन राहतो तेव्हाच तो श्रीमंत व विलासी भोग करणारा आहे, असे कळून यते॥ ३६२॥ त्याप्रमाणेच जेव्हा स्थूल देह प्राप्त होतो तेव्हाच कर्तृत्वाहंकाराची वाढ व विषय इंद्रिये यांचा जोराचा उठाव असतो. असाच निर्णय जाण॥ ३६३॥ तसेच देह सोडतेवेळी हा जीवात्मा मन व इंद्रिये यांचा समुदाय आपल्याबरोबर घेऊन जातो॥ ३६४॥ ज्याप्रमाणे आलेल्या अतिथीचा अपमान झाला असता तो यजमानाची पुण्यसंपत्ति घेऊन जातो किंवा बाहुल्याचे चळणवळण सूत्र हालविणाऱ्याचे स्वाधीन असते॥ ३६५॥ किंवा मावळता सूर्य लोकांची दृष्टि घेऊन जातो अथवा वायु जसा सुगंध घेऊन जातो॥ ३६६॥ त्याप्रमाणे अर्जुना! देहाचा राजा जीवात्मा देह सोडून जाताना मन व इंद्रिये यांना घेऊन जातो॥ ३६७॥

श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च। अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते॥ ९॥

अर्थ—श्रवणेंद्रिय, चक्षुरिंद्रिय, स्पर्शेंद्रिय, वागिंद्रिय, घ्राणेंद्रिय व मन यांच्यावर आरूढ होऊन म्हणजे यांचा अभिमान धरून जीवात्मा विषय भोगतो॥ ९॥

मग येथ अथवा स्वर्गीं। जेथ जें देह आपंगी। तेथ तैसेंचि पुढती पांगी। मनादिक॥ ३६८॥
जैसा मालवलिया दिवा। प्रभेसीं जाय पांडवा। मग उजळिजे तेथ तेधवां। तैसाचि फांके॥ ३६९॥
परी ऐसैसिया राहाटी। अविवेकियांचि दिठी। येतुलें हें किरीटी। गमेचि गा॥ ३७०॥
जे आत्मा देहासी आला। आणि विषयो येणेंचि भोगिला। अथवा देहोनि गेला। हें साचचि मानी॥ ३७१॥
एऱ्हवीं येणें आणि जाणें। कां करणें आणि भोगणें। हें प्रकृतीचें तेणें। मानियेलें॥ ३७२॥

अर्थ—मग इहलोकात असो किंवा स्वर्गलोकात असो जेथे जेथे जसा देह प्राप्त होतो तेथे तेथे तो मनासह इंद्रियांचा आश्रय करतो॥ ३६८॥ अर्जुना! ज्याप्रमाणे दिवा विझविला असता तो प्रकाश घेऊन जातो व पुनः उजळला की सहजच प्रकाशासहच उजळला जातो॥ ३६९॥ अर्जुना! अशा राहाटीमुळे अज्ञानी लोकांच्या दृष्टीला याप्रमाणे वाटत असते की॥ ३७०॥ आत्मा देहात आला म्हणजे जन्मला, विषय यानेच भोगला किंवा हाच देहातून गेला, हे सर्व ते खरे मानतात॥ ३७१॥ वास्तविक पाहता येणे-जाणे (जन्म-मृत्यु) किंवा करणे-भोगणे हे सर्व प्रकृतीचे धर्म आहेत, पण जीवाने ते धर्म आपल्या ठिकाणी मानून घेतले आहेत॥ ३७२॥

उत्क्रामन्तं स्थितं वापि भुञ्जानं वा गुणान्वितम् । विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः॥ १०॥
यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम् । यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः॥ ११॥

अर्थ—देह सोडून जाताना, देहात असताना, विषयादि भोग भोगताना अथवा गुणयुक्त असताना अज्ञानी लोक आपल्या स्वरूपास पाहत नाहीत. ज्यांना ज्ञानदृष्टि प्राप्त झाली ते मात्र पाहतात॥ १० ॥ शमदमादिद्वारा परमेश्वरप्राप्तीचा अभ्यास करणारे योगी आपल्या बुद्धीचे ठिकाणी परमेश्वरास पाहतात व परमेश्वराच्या प्राप्तीची इच्छा करणारे पण शमदमादिद्वारा चित्त शुद्ध न केल्यामुळे ज्यांचे चित्त स्वाधीन झाले नाही, असे पुरुष परमेश्वरास पाहू शकत नाहीत॥ ११ ॥

परी देहाचें मोटकें उभें। आणि चेतना तेथ उपलभे। तिये चळवळेचेनि लोभें। आला म्हणती॥ ३७३ ॥
तैसेंचि तयां संगतीं। इंद्रियें आपलालां अर्थीं वर्तती। तया नांव सुभद्रापती। भोगणें जया॥ ३७४॥
पाठीं भोगक्षीण आपैसें। देह गेलिया तें न दिसे। तेथें गेला गेला ऐसें। बोभाती गा॥ ३७५॥
पैं रुख डोलत देखावा। तरी वारा वाजत मानावा। रुख नसे तेथें पांडवा। नाही तो गा॥ ३७६ ॥
कां आरसा समोर ठेविजे। आणि आपणपें तेथ देखिजे। तरी तेधवांचि जालें मानिजे। काय आधीं नाहीं॥ ३७७॥
कां परता केलिया आरिसा। लोपु जाला तया आभासा। तरी आपणपें नाहीं ऐसा। निश्चयो करावा॥ ३७८॥
शब्द तरी आकाशाचा। परी कपाळीं पिटे मेघांचा। कां चंद्रीं वेग अभ्राचा। आरोपिजे॥ ३७९॥
तैसे होइजे जाइजे देहें। तें आत्मसत्ते अविक्रिये। निष्टंकिती गा मोहें। आंधळे ते॥ ३८०॥

अर्थ—देह थोडा तयार होऊन चेतनाची चळवळ दिसू लागली की चळवळीमुळे लोभ उत्पन्न होऊन जीव जन्माला आला असे मनुष्य म्हणू लागतो॥ ३७३ ॥ त्याप्रमाणेच त्या चेतनाचे संगतीने इंद्रिये जी आपआपल्या विषयाचे ठिकाणी प्रवृत्त होतात, हे अर्जुना! त्याला त्या चेतनाचे भोगणे म्हणतात॥ ३७४ ॥ नंतर आपोआपच भोग क्षीण होऊन देह पडला की चेतना दिसत नाही तेव्हा तो गेला गेला म्हणून रडतात॥ ३७५ ॥ वृक्ष हालत असला तर वारा वाहत आहे असे म्हणावे आणि अर्जुना! त्याचे हालणे बंद झाले म्हणजे वारा नाही, असे म्हणावे काय?॥ ३७६ ॥ किंवा आरसा समोर ठेवला असता त्यात आपले मुख आपण प्रतिबिंबित झालेले पाहतो; म्हणून आपण तेव्हाच उत्पन्न झालो, आधी नव्हतो, असे मानायचे काय?॥ ३७७॥ किंवा आरसा बाजूला नेला असता त्यात पडलेले प्रतिबिंब दिसेनासे होते, तेव्हा आपण नाही असा निश्चय करावा काय?॥ ३७८॥ ध्वनि आकाशाचा गुण होय, पण तो अभ्राच्या कपाळी लावला जातो किंवा अभ्रांचा वेग चंद्रावर आरोपित केला जातो॥ ३७९ ॥ त्याप्रमाणे येणे जाणे देहासच लागू आहे. असे असताना अविक्रिय अशा आत्मसत्तेच्या ठिकाणी जे त्याचा आरोप करतात ते अविचाराने आंधळे झाले आहेत, असे समजावे॥ ३८० ॥

येथ आत्मा आत्मयाच्या ठायीं। देखिजे देहींचा धर्मु देहीं। ऐसे देखणें ते पाहीं। आन आहाती॥ ३८१ ॥

अर्थ—येथे आत्मा आपल्या ठिकाणीच आहे व देहाचे धर्म देहाच्या ठिकाणीच आहेत, असे जे पाहणे ते काही वेगळेच आहे, पाहा!॥ ३८१ ॥

गूढार्थदीपिका—देहधर्माचा आत्म्याचे ठिकाणी व चैतन्य धर्माचा देहाच्या ठिकाणी मिथ्या आरोप करून जीव संसाराचा मिथ्याच अनुभव घेतात.

ज्ञानें कां जयांचे डोळे। देखोनि न राहाती देहींचे खोळे। सूर्यरश्मी आणियाळे। ग्रीष्मीं जैसें॥ ३८२॥
तैसी विवेकाचेनि पैसें। जयांची स्फूर्ती स्वरूपीं बैसे। ते ज्ञानिये देखती ऐसें। आत्मयातें॥ ३८३॥
जैसें तारांगणीं भरलें। गगन समुद्रीं बिंबलें। परी तें तुटोनि नाहीं पडिलें। ऐसें निवडे॥ ३८४॥
गगन गगनींचि आहे। हें आभासे तें वाये। तैसा आत्मा देखती देहें। गंवसिलाही॥ ३८५॥
खळाळाच्या लगबगीं। फेडूनि खळाळाच्या भागीं। देखिजे चंद्रिका कां उगी। चंद्रीं जेवीं॥ ३८६॥
कां नाडरचि भरे शोषे। सूर्य तो जैसा तैसाचि असे। देह होतां जातां तैसें। देखती मातें॥ ३८७॥

घट मठ घडले। तेचि पाठीं मोडले। परि आकाश तें संचलें। असतचि असे॥ ३८८॥
तैसें अखंडे आत्मसत्ते। अज्ञानदृष्टिकल्पितें। हें देहचि होतें जातें। जाणती फुडें॥ ३८९॥
चैतन्य चढे ना वोहटे। चेष्टवी ना चेष्टे। ऐसें आत्मज्ञानें चोखटें। जाणती ते॥ ३९०॥

अर्थ—ज्याप्रमाणे ग्रीष्मऋतूत सूर्याची प्रखर किरणे ढगात अडकून पडत नाहीत, त्याप्रमाणे आत्मस्वरूपाला पाहून ज्याचे डोळे किंवा ज्याची दृष्टि देहरूपी खोळीतच पडत नाही॥ ३८२॥ तसेच आत्मानात्मविचाराने ज्यांची अहंवृत्ति देहाला सोडून आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर झाली असे ज्ञानी पुरुष अशा प्रकारे आत्मस्वरूपाला पाहतात॥ ३८३॥ ज्याप्रमाणे नक्षत्रांनी भरलेले आकाश समुद्रात प्रतिबिंबित होते परंतु ते तुटून पडले नाही असाच निश्चय राहतो॥ ३८४॥ आकाश आकाशाचे ठिकाणीच असून समुद्रात जे आकाश भासत आहे ते खोटे आहे (असे मनुष्य जाणतो). त्याप्रमाणे देहाचे ठिकाणी चैतन्याची सत्ता दिसत असली तरी आत्मा देहाहून निराळा आपल्याच ठिकाणी आहे, असे ते ज्ञानी पुरुष जाणतात॥ ३८५॥ नदीच्या प्रवाहाच्या वेगामुळे होणाऱ्या पाण्याच्या खळखळीत चंद्राचा प्रकाश खळखळत दिसत असला तरी तो प्रकाश चंद्राच्या ठिकाणी व स्थिर आहे, असे आपण जाणत असतो॥ ३८६॥ किंवा पाण्याचे डबके पाण्याने भरते व सुकते (त्यामुळे त्यात पडलेले प्रतिबिंब दिसते व नाहीसे होते); पण सूर्य जशाच्या तसाच राहतो, त्याप्रमाणे देह होत जात असताना मी अखंड निर्विकार राहतो, असे ज्ञानी पुरुष मला जाणतात॥ ३८७॥ ज्याप्रमाणे घट, मठ तयार केले व नंतर ते मोडले, पण आकाश जसेच्या तसेच (उत्पत्ति-नाश रहित राहते)॥ ३८८॥ त्याप्रमाणे अखंड अशा आत्मसत्तेवरच अज्ञानदृष्टीने कल्पिलेले देह होतात-जातात, असे ते ज्ञानी पुरुष स्पष्ट जाणतात॥ ३८९॥ चैतन्य अधिक होत नाही किंवा कमीहि होत नाही. ते काही करवतहि नाही व करीत नाही, असे ज्ञानी पुरुष शुद्ध आत्मज्ञानाने जाणत असतात॥ ३९०॥

आणि ज्ञानही आपैतें होईल। प्रज्ञा परमाणुही उगाणा देईल। सकळ शास्त्रांचें येईल। सर्वस्व हातां॥ ३९१॥
परी ते व्युत्पत्ती ऐसी। जरी विरक्ती न रिगे मानसीं। तरी सर्वात्मका मजसीं। नव्हेचि भेटी॥ ३९२॥
पैं तोंड भरो कां विचारा। आणि अंतःकरणीं विषयांसी थारा। तरी नातुडें धनुर्धरा। त्रिशुद्धी मी॥ ३९३॥

अर्थ—आणि ज्ञान प्राप्त होईल, बुद्धि परमाणूचीहि गणती सांगेल, सर्व शास्त्रांचे सिद्धान्त हाती येतील॥ ३९१॥ पण उपपत्तीने असे शब्दज्ञान होऊनहि चित्तात दृढ वैराग्य बाणले नाही तर, सर्वान्तर्यामि राहणारा जो मी, त्या माझ्याशी ऐक्य होऊ शकत नाही॥ ३९२॥ तोंडभर ब्रह्मविचार बोलता येऊनहि जर अंतःकरणात विषयाचे चिंतन राहील तर, हे अर्जुना! माझी प्राप्ति होणार नाही, हे त्रिवार सत्य आहे॥ ३९३॥

गूढार्थदीपिका—"विवेकाविण वैराग्य आंधळे। वैराग्यविण विवेक पांगळे। हे एकएका अवेगळे। झाल्याविण न कळे परमार्थ॥ ७४॥" (चतुःश्लोकी भाग०) वैराग्यावाचून ज्ञान शब्दमात्रच राहते व ते मनुष्याला कृतार्थ करू शकत नाही असे नाथांनीहि चतुःश्लोकी भागवतात म्हटले आहे.

हां गा वोसणतयाच्या ग्रंथीं। काइ तुटती संसारगुंती। कीं परिवसिलिया पोथी। वाचिली होय॥ ३९४॥
नाना बांधोनियां डोळे। घ्राणीं लाविजती मुक्ताफळें। तरी तयांचें काय कळे। मोल मान॥ ३९५॥
तैसा चित्तीं अहंते ठावो। आणि जिभे सकळशास्त्रांचा सरावो। ऐसेनि कोडी एक जन्म जावो। परी न पविजे मातें॥ ३९६॥
जो एक मी कां समस्तीं। व्यापकु असें भूतजातीं। ऐक तिये व्याप्ती। रूप करूं॥ ३९७॥

अर्थ—स्वप्नात ब्रह्मविचाराचे ग्रंथ बरळण्याने संसाराचे बंधन तुटेल काय? किंवा पोथीवरून हात फिरविला असता पोथी वाचली असे होते काय?॥ ३९४॥ किंवा डोळे बांधून मोत्ये नाकास लाविली असता त्याची किंमत व वजन कळेल काय?॥ ३९५॥ त्याप्रमाणे चित्तात देहाहंकार कायम राहून वाचेला सर्व शास्त्रे मुखपाठ झाली तरी कोट्यावधी जन्म घेऊनहि माझी प्राप्ति होणार नाही॥ ३९६॥ जो मी एक अद्वैतस्वरूप सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणी व्यापून आहे, त्या माझ्या व्याप्तीचे स्वरूप सांगतो, ऐक॥ ३९७॥

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम्। यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम्॥ १२॥

अर्थ—सर्व जगाला भासविणारे सूर्याचे जे तेज आहे, तसेच चंद्राचे आणि अग्नीचे ठिकाणी जे तेज आहे, ते माझेच आहे, असे जाण॥ १२॥

तरी सूर्यासकट आघवी। हे विश्वरचना जे दावी। ते दीप्ति माझी जाणावी। आद्यंतीं आहे॥ ३९८॥
जळ शोषूनि गेलिया सविता। ओलांश पुरवीतसे जे माधौता। ते चंद्रीं पांडुसुता। ज्योत्स्ना माझी॥ ३९९॥
आणि दहन पाचन सिद्धी। करीतसे जे निरवधी। ते हुताशीं तेजोवृद्धी। माझीचि गा॥ ४००॥

अर्थ—सूर्यासह सर्व प्रपंचरचना दाखविणारे जे तेज (ज्ञानप्रकाश) आहे ते माझेच असून जे जगाच्या पूर्वी व जगाच्या नंतरहि राहते॥ ३९८॥ अर्जुना! सूर्याने जल शोषून घेतल्यानंतर वनस्पतींना ओलावा पुरविणारा चंद्राचे ठिकाणचा (शांत) प्रकाश माझाच होय॥ ३९९॥ आणि अमर्याद जाळणारी व खाल्लेले पचविणारी जी अग्नीचे ठिकाणी तेजाची वाढ दिसून येते ती माझीच आहे॥ ४००॥

गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा। पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः॥ १३॥

अर्थ—पृथ्वीत राहून मीच आपल्या सामर्थ्याने सर्व भूतांचे धारण करतो व रसात्मक असा चंद्र होऊन सर्व वनस्पतीचे पोषण करतो॥ १३॥

मी रिगालों असें भूतळीं। म्हणौनि समुद्रमहाजळीं। हे पांसूचि ढेंपुळी। विरेचिना॥ ४०१॥
आणि भूतेंही चराचरें। हे धरितसे जियें अपारें। तियें मीचि धरीं धरे। रिगोनियां॥ ४०२॥
गगनीं मीं पांडुसुता। चंद्राचेनि मिसें अमृता। भरला जालों चालता। सरोवरु॥ ४०३॥
तेथूनि फांकती रश्मिकर। ते पाट पेलूनि अपार। सर्वौषधींचे आगर। भरित असें मी॥ ४०४॥
ऐसेनि सस्यादिकां सकळां। करीं धान्यजाती सुकाळा। दें अन्नद्वारा जिव्हाळा। भूतजातां॥ ४०५॥
आणि निपजविलें अन्न। तरी तैसें कैचें दीपन। जेणें जिरूनि समाधान। भोगिती जीव॥ ४०६॥

अर्थ—मी पृथ्वीच्या पोटात शिरलो असल्यामुळेच समुद्रासारखे अफाट जळ देखील पृथ्वीसारख्या मातीच्या ढेकळाला विरघळू शकत नाही॥ ४०१॥ आणि भूमी जी चराचर अमर्याद भूतसृष्टीला धारण करते ते मीच तिच्यात शिरून धारण करतो॥ ४०२॥ हे अर्जुना! मीच आकाशात चंद्राचे रूपाने अमृताचे चालते सरोवर झालो आहे॥ ४०३॥ तेथून अलग अलग निघालेले असंख्य किरणरूपी ओघ धारण करून सर्व औषधींच्या मळ्याचे मीच पोषण करीत असतो॥ ४०४॥ अशा रीतीने सर्व तृणधान्य इत्यादिकांची समृद्धि करतो व त्या अन्नाचे द्वारा भूतमात्रांना जगवितो॥ ४०५॥ अशा रीतीने प्राणीमात्रांचे तयार झालेले अन्न, खाल्ले जाऊन, ज्या तेजाने ते पचले जाते व प्राणीमात्र समाधान पावतात ते तेज कसे आहे, पाहा॥ ४०६॥

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः। प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्॥ १४॥

अर्थ—मीच जठराग्नि होऊन प्राणिमात्रांच्या देहाचा आश्रय केला आहे व प्राण व अपान यांच्या साहाय्याने चारहि प्रकारचे खाल्लेले अन्न पचवितो॥ १४॥

म्हणौनि प्राणिजांताच्या घटीं। करूनि कंदावरी आगिठी। दीप्ति जठरीं किरीटी। मीचि जालों॥ ४०७॥
प्राणापानाच्या जोडभातीं। फुंकफुंकोनियां अहोराती। आटीतसें नेणों किती। उदरामाजीं॥ ४०८॥
शुष्कें अथवा स्निग्धें। सुपक्वें कां विदग्धें। परी मीचि गा चतुर्विधें। अन्नें पचीं॥ ४०९॥
एवं मीचि आघवें जन। जना जीववितें मीचि जीवन। जीवनीं मुख्य साधन। वन्हिही मीचि॥ ४१०॥

अर्थ—म्हणून सर्व प्राणिमात्रांच्या पोटात नाभिस्थानी शेगडी तयार करून त्यातील जठराग्नि मीच झालो आहे॥ ४०७॥ अहोरात्र प्राणापानाचा जोडभाता फुंकून मी पोटामध्ये किती अन्न पचवितो त्याची गणतीच नाही॥ ४०८॥ शुष्क अथवा स्नेहयुक्त, चांगले शिजलेले अथवा अर्धकच्चे असे चारहि प्रकारचे खाल्लेले अन्न मीच पचवितो॥ ४०९॥ अशा रीतीने मीच सर्व लोक झालो आहे, सर्वांना जगविणारे अन्न मीच आहे. जिवंत राहण्याला मुख्य साधन जो अग्नि तो मीच आहे॥ ४१०॥

आतां ऐसियाहीवरी काई। सांगों व्याप्ती नवाई। येथ दुजें नाहींची घेईं। सर्वत्र मी गा॥ ४११ ॥

अर्थ—अर्जुना! आता इतके सांगितल्यावर आणखी माझ्या व्याप्तीचे विशेष स्वरूप काय सांगायचे राहिले? येथे दुसरे काहीच नाही. मीच सर्वत्र आहे, असे समज॥ ४११ ॥

गूढार्थदीपिका—सूर्य, चंद्र, अग्नि, पृथ्वी इत्यादि सर्व भौतिक पदार्थ जड व काल्पनिक असल्यामुळे त्यांच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या धारण, प्रकाशन, प्रीणन, पाचन, पोषण इत्यादि शक्ति त्यांच्या नाहीत. त्या सर्व ब्रह्मांडाला अधिष्ठित असलेल्या परमात्म्याच्या आहेत. असे येथील वरील १२ ते १४ श्लोकातून सुचविले आहे. त्या शक्तीचे दर्शन झाले असता तेथे परमात्म्याची भावना केली पाहिजे.

तरी कैसेनि पां वेखें। सदा सुखियें एकें। एकें तियें दुःखें। क्रांत भूतें॥ ४१२ ॥
जैसी सगळिये पाटणीं। एकेंचि दीपें दिवे लावणी। जालिया कां न देखणीं। उरलीं एकें॥ ४१३ ॥
ऐसी हन उखिविखी। करित आहासी मानसीं कीं। तरी परिस तेही निकी। शंका फेडीं॥ ४१४ ॥
पैं आघवा मीचि असें। येथ नाहीं कीर अनारिसें। परी प्राणियांचिया उल्लासें। बुद्धी ऐसा॥ ४१५ ॥

अर्थ—अशी एक अद्वैत ब्रह्मवस्तुच असताना तेथे कित्येक जीव सदा सुखी व कित्येक दुःखाने व्याप्त असे दिसतात ते कोणत्या दृष्टीने?॥ ४१२ ॥ संपूर्ण शहरात एका दिव्याने सर्व दिवे लावले असता काही दिवे लागले नाहीत असे राहील काय?॥ ४१३ ॥ तुझ्या मनात त्या मिथ्या भासाविषयी अशी शंका असेल तर त्या शंकेचे निरसन करू, नीट ऐक॥ ४१४ ॥ सर्व काही मीच आहे, यात काही अन्यथा नाही; पण प्राण्याच्या बुद्ध्यनुसार मी भासतो॥ ४१५ ॥

गूढार्थदीपिका—सर्वच परमात्मा असला तरी तो प्राण्यांच्या बुद्धीला त्यांच्या पुण्य-पापरूप कर्मानुसार अनुकूल किंवा प्रतिकूल भासतो व त्यामुळे प्राणी सुखदुःख भोगतात, असा अर्थ.

जैसें एकचि आकाशध्वनी। वाद्यविशेषीं आनानीं। वाजावें पडे भिन्नीं। नादांतरीं॥ ४१६ ॥
कां लोकचेष्टीं वेगळाला। जो हा एकचि भानु उगवला। तो आनानी परी गेला। उपयोगासी॥ ४१७ ॥
नाना बीजधर्मानुरूप। झाडीं उपजवी आप। तैसें परिणमलें स्वरूप। माझें जीवां॥ ४१८ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे आकाशाचा ध्वनि एकच असला तरी तो निरनिराळ्या वाद्यात निरनिराळ्या नादांचा होतो॥ ४१६ ॥ किंवा आकाशात उगवणारा सूर्य एकच असला तरी जसा तो लोकांचे निरनिराळे व्यापार करण्यास उपयोगाचा होतो॥ ४१७ ॥ जसे पाणी बीजाच्या धर्माप्रमाणे झाडांना उत्पन्न करते, त्याप्रमाणे माझे स्वरूपहि जीवांना त्यांच्या कर्मानुसार निरनिराळ्या रीतीने अनुभवास येते॥ ४१८ ॥

गूढार्थदीपिका—आकाश, पाणी यांच्याप्रमाणे परमात्मा सर्वत्र सम आहे; पण निरनिराळ्या बीजाप्रमाणे निरनिराळ्या कर्मानुसार ते परमेश्वराला विषम पाहतात.

अगा नेणा आणि चतुरा। पुढां नीळयांचा दुसरा। नेणा सर्प जाला येरा। सुखालागीं॥ ४१९ ॥
हें असो स्वातीचें उदक। शुक्तीं मोतीं व्याळीं विख। तैसा सज्ञानांसी मी सुख। दुःख तों अज्ञानांसी॥ ४२० ॥

अर्थ—नीलमण्याचा दोनसरी हार, न जाणणाऱ्यापुढे, सर्परूप भासून दुःख देतो व जाणणाऱ्यांना सुख देतो॥ ४१९ ॥ हे असो स्वातीचे पाणी शिंपेत पडून मोतीरूप होते व तेच सर्पाचे तोंडात पडून विष रूप होते, त्याप्रमाणे मी ज्ञानीपुरुषाला सर्वत्र सुखरूप भासत असून अज्ञान्याला दुःखरूप भासतो॥ ४२० ॥

गूढार्थदीपिका—सर्वत्र एक सुखरूप परमात्माच भरला असल्यामुळे त्याला जाणले असता सर्व संसारच सुखाचा होतो व त्याला विसरले असता संसार दुःखाचा होतो. दुःख हे केवळ अज्ञानजन्य आहे. असा अर्थ.

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च । वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम्॥ १५॥

अर्थ—मी सर्वांच्या हृदयात वसत असून माझ्यामुळे स्मृति म्हणजे आठवण, ज्ञान आणि विस्मरण होत असते. सर्व वेदांनी मीच एक जाणला जातो, मीच वेदान्त संप्रदाय उत्पन्न करणारा असून वेद जाणणाराहि मीच आहे॥ १५ ॥

एऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं। मी अमुका आहें ऐसी। जे बुद्धि स्फुरे अहर्निशीं। ते वस्तु गा मी॥ ४२१॥

अर्थ—साधारणत: सर्वांच्या हृदयामध्ये, मी अमुक आहे, अशी जी बुद्धि सदासर्वदा स्फुरते ती वस्तु मी आहे॥ ४२१॥

गूढार्थदीपिका—"मी अमुक आहे" असे जे बुद्धीचे स्फुरण तेच माझे स्वरूप होय असे जे येथे भगवंतांने म्हटले आहे, ते स्थूल दृष्टीने म्हटले आहे. वास्तविक परमात्मा त्या स्फुरणालाहि आधार आहे; पण त्या स्फुरणाच्या द्वारा आधाररूप परमात्म्याचे ग्रहण होते; म्हणून 'मी' रूपाने होणारे स्फुरण माझेच स्वरूप होय. असे भगवंताने म्हटले आहे.

परी संतासवें वसतां। योगज्ञानीं पैसतां। गुरुचरण उपासितां। वैराग्येंसी॥ ४२२॥
येणेंचि सत्कर्मे। अशेषही अज्ञान विरमे। जयांचें अहं विश्रामे। आत्मरूपीं॥ ४२३॥
ते आपेआप देखोनि देखीं। मियां आत्मेनि सदा सुखी। येथें मीवांचून अवलोकीं। आन हेतु असे॥ ४२४॥

अर्थ—परंतु संताच्या संगतीत राहून दृढ वैराग्यपूर्वक योग व ज्ञानाचा अभ्यास केला असता व श्रीगुरुची उपासना केली असता॥ ४२२॥ याच पुण्य कर्माच्या योगाने अज्ञान नि:शेष नाहीसे होऊन आत्मस्वरूपाचे ठिकाणी ज्यांचा अहं विश्राम पावतो॥ ४२३॥ ते आपणच आत्मदृष्टीने आपल्याला पाहतात व त्यांचा आत्मा मीच असल्यामुळे ते सदा सुखी असतात. येथे मला जाणण्याकरिता माझ्याहून दुसरे निमित्त आहे काय?॥ ४२४॥

गूढार्थदीपिका—परमात्मा व बुद्धीचे अहंस्फुरण यांचा विवेक इतका सूक्ष्म आहे की तो संतसमागम व संतांची सेवा यावाचून अनुभविला जाऊ शकत नाही.

अगा सूर्योदयो जालिया। सूर्ये सूर्यचि पहावा धनंजया। तेवीं मातें मियां जाणावया। मीचि हेतु॥ ४२५॥
ना शरीरपरातें सेवितां। संसारगौरवचि ऐकतां। देहीं जयांची अहंता। बुडोनि ठेली॥ ४२६॥
ते स्वर्गसंसारालागीं। धांवतां कर्ममार्गीं। दु:खाच्या सेलभागीं। विभागी होती॥ ४२७॥
परी हेंही होणें अर्जुना। मजचिस्तव तया अज्ञाना। जैसा जागताचि हेतु स्वप्ना। निद्रेतें होय॥ ४२८॥

अर्थ—अर्जुना! ज्याप्रमाणे सूर्योदय झाला असता सूर्यानेच सूर्य पाहिला जातो त्याप्रमाणे मला जाणण्याकरिता मीच निमित्त आहे॥ ४२५॥ देहासक्त अशा अज्ञानी पुरुषांची सेवा करून व संसारसुखाचा बडेजाव ऐकून ज्यांचा अहंभाव देहाचे ठिकाणी दृढ झाला-म्हणजे देहबुद्धि दृढ झाली॥ ४२६॥ ते संसार व स्वर्ग यांच्या प्राप्तीकरिताच सारखी कर्मे करतात व पराकाष्ठेचे दु:ख भोगतात॥ ४२७॥ अर्जुना! पण ज्याप्रमाणे जागणाराच स्वप्नाला व निद्रेला कारण होतो, त्याप्रमाणे हेहि (दु:खहि) या अज्ञानी पुरुषांना माझ्यामुळेच प्राप्त होते॥ ४२८॥

गूढार्थदीपिका—'अहं ब्रह्मास्मि' ही ज्ञानवृत्ति व 'मी अज्ञानी आहे' ही अज्ञानवृत्ति या दोघांनाही भगवंतच आधार असल्यामुळे भगवंतापासूनच ज्ञान्याला ज्ञानाने सुखफल व अज्ञान्याला अज्ञानाचे दु:खफल मिळत असते, असा अर्थ.

पैं अभ्रें दिवस हरपला। तोही दिवसेंचि जाणों आला। तेवीं मी नेणोनि विषयो देखिला। मजचिस्तव भूतीं॥ ४२९॥

अर्थ—ज्याप्रमाणे अभ्रे आल्याने दिवस बुडतो, हेहि दिवसामुळेच कळते, त्याप्रमाणे मला विसरले तरी माझ्यामुळेच प्राणी विषय जाणतात॥ ४२९॥

गूढार्थदीपिका—भगवंताच्या सच्चिदानंद स्वरूपाचे वृत्तिरूपी विशेष ज्ञान जीव विसरला आहे, म्हणून त्याला भगवंताचा साक्षात्कार होत नाही. पण जीवाचे ठिकाणी भगवंताच्या सच्चिदानंदाचा सत्तारूप सामान्य प्रकाश असल्यामुळे तो त्या प्रकाशाच्या योगानेच सर्व विषयरूप जग जाणतो.

भगवंताच्या सामान्य स्वरूपावर जग भासते व त्याच्या विशेषरूपाने जगताची निवृत्ति होते असे वेदान्तात मानले आहे.

एवं निद्रा कां जागणिया। प्रबोधुचि हेतु धनंजया। तेवीं ज्ञाना अज्ञाना जीवांचिया। मीचि मूळ॥ ४३०॥

अर्थ—याप्रमाणे निद्रा व जागे होणे या दोहोलाहि जागृतिच, ज्याप्रमाणे मूळ कारण असते, त्याप्रमाणे जीवाच्या ज्ञानाला व अज्ञानाला मीच कारण आहे॥ ४३०॥

गूढार्थदीपिका—ज्ञान व अज्ञान ह्या दोन्ही वृत्ती पूर्व अनादिसिद्ध भगवत्सत्तेनेच सत्तावान होऊन जीवाला मुक्त किंवा बंधन करण्यास समर्थ होतात, असा अर्थ.

जैसें सर्पत्वा कां दोरा। दोरुचि मूळ धनुर्धरा। तैसा ज्ञाना अज्ञानाचिया संसारा। मियांचि सिध्दी॥ ४३१॥
म्हणौनि जैसा असें तैसया। मातें नेणोनि धनंजया। वेदु जाणों गेला तंव तया। जालिया शाखा॥ ४३२॥
तरी तिहीं शाखाभेदीं। मीचि जाणिजे त्रिशुद्धी। जैसा पूर्वापरा नदी। समुद्रचि ठी॥ ४३३॥

अर्थ—सर्प किंवा दोर दिसण्याला जसा दोरच कारण आहे, त्याप्रमाणे ज्ञान व अज्ञानाच्या देखाव्याला मीच निमित्त असतो॥ ४३१॥ म्हणून अर्जुना! वेद मला जाणायला गेला, पण मी जसा आहे तसा मला न जाणल्यामुळे त्याच्या शाखा झाल्या॥ ४३२॥ ज्याप्रमाणे पूर्वेकडे वाहणाऱ्या व पश्चिमेकडे वाहणाऱ्या सर्व नद्यांना समुद्र हाच शेवट होतो, त्याप्रमाणे वेदाच्या सर्व शाखांनी मीच जाणला जातो, हे त्रिवार सत्य आहे॥ ४३३॥

गूढार्थदीपिका—अज्ञानाच्या दृष्टीनेच वेदाच्या भिन्न शाखा व भिन्न प्रतिपाद्य विषय दिसतात. ज्ञानदृष्टीने पाहता एक अद्वैतब्रह्मच वेदाचा प्रतिपाद्य विषय आहे.

आणि महासिद्धांतापासीं। श्रुति हारपती शब्देसीं। जैसिया सगंधा आकाशीं। वातलहरी॥ ४३४॥
तैसें समस्तही श्रुतिजात। ठाके लाजिलें ऐसें निवांत। तें मीचि करीं यथावत। प्रकटोनियां॥ ४३५॥

अर्थ—ज्याप्रमाणे वासाला वाहून नेणाऱ्या वाऱ्याच्या झुळुका आकाशात लोप पावतात, त्याप्रमाणे शब्दासह सर्व वेदच महासिद्धान्तात म्हणजे "एकमेवाद्वितीयम्" या सिद्धान्तात लुप्त होतात॥ ४३४॥ तसेच सर्व श्रुती लाजून निवांत झाल्या म्हणजे लीन होऊन अव्यक्त झाल्या असता त्या पुन: पूर्ववत् मीच प्रगट करतो॥ ४३५॥

पाठीं श्रुतीसहित अशेष। जग हारपे जेथ नि:शेष। तें निजज्ञानही चोख। जाणता मीचि॥ ४३६॥
जैसें निदेलिया जागिजे। तेव्हां स्वप्नीचे कीर नाहीं दुजें। परि एकत्वही देखों पाविजे। आपलेंचि॥ ४३७॥
तैंसें आपलें अद्वयपण। मी जाणतसें दुजेनवीण। तयाही बोधाकारण। जाणता मीचि॥ ४३८॥
मग आगी लागलिया कापुरा। ना काजळी ना वैश्वानरा। उरणें नाही वीरा। जयापरी॥ ४३९॥
तेवीं समूळ अविद्या खाये। तें ज्ञानही जैं बुडोनि जाये। तऱ्ही जें नाहीं कीर नोहे। आणि न साहे असणेंही॥ ४४०॥
पैं विश्व घेऊनि गेला मागेंसीं। तया चोरातें कवण कें गिवसी। जे कोणी एकी दशा ऐसी। शुद्ध ते मी॥ ४४१॥
ऐसें जडाजड व्याप्ती। रूप करितां कैवल्यपती। ठी केली निरूपहितीं। आपुल्या रूपीं॥ ४४२॥
तो आघवाचि बोधु सहसा। अर्जुनीं उमटला कैसा। व्योमींचा चंद्रोदयो जैसा। क्षीरार्णवीं॥ ४४३॥

अर्थ—नंतर वेदासह संपूर्ण जगत् ज्या ठिकाणी नि:शेष नाहीसे होते, ते आपले शुद्ध अद्वैतज्ञानहि मीच जाणत असतो॥ ४३६॥ ज्याप्रमाणे निजलेला मनुष्य जागा झाला असता स्वप्नातील पदार्थ खरोखर दुसरे नाहीत असे पाहतो व जागेपणाचे एकटेपण हि आपणच पाहतो॥ ४३७॥ त्याप्रमाणे मी आपले अद्वैतस्वरूप, त्याहून भिन्न न होता, जाणत असतो आणि त्या अद्वैतस्थितीला जाणणाऱ्या ज्ञानालाहि मीच जाणत असतो॥ ४३८॥ मग ज्याप्रमाणे, अर्जुना! कापुराला अग्नि लागला असता शेवटी काजळ किंवा अग्नि काही एक उरत नाही॥ ४३९॥ त्याप्रमाणे जेव्हा ज्ञानाने समूळ अविद्येचा नाश होऊन अविद्येचा नाश करणारे ज्ञानहि नाहीसे होते, तेव्हा 'नाही' हे खरोखर नसते व "आहे" म्हणणेहि तेथे सहन होत नाही॥ ४४०॥ जो चोर, होते-नव्हते संपूर्ण घेऊन जाऊन ज्याने मार्गाचा मागमूसहि ठेवला नाही त्या चोराला कोण व कोठे पकडणार? (अशा चोरासारखी) जी कोणी एक शुद्ध दशा आहे ते माझे स्वरूप होय॥ ४४१॥ अशी संपूर्ण चराचराचे ठिकाणी व्याप्ति सांगत असताना भगवान श्रीकृष्णांनी त्याचा शेवट आपल्या निरुपाधिक स्वरूपाचे ठिकाणी केला॥ ४४२॥ भगवान श्रीकृष्णांनी केलेला संपूर्ण बोध अर्जुनाचे ठिकाणी कसा प्रगट झाला म्हणाल तर ज्याप्रमाणे आकाशातील चंद्रोदय क्षीरसमुद्रात (मूळचाच) होता त्याप्रमाणे॥ ४४३॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे क्षीरसमुद्राचे मंथन करून काढलेला चंद्रच भगवंताने आकाशात स्थापन केला, त्याप्रमाणे भगवंतांनी केलेला उपदेश अर्जुनाचे ठिकाणीच मूळचाच लीन असलेला उद्बुद्ध झाला, असा अर्थ.

कां प्रतिभिंती चोखटे। समोरील चित्र उमटे। तैसा अर्जुनें आणि वैकुंठें। नांदतसे बोधु॥ ४४४॥

अर्थ—किंवा ज्याप्रमाणे चकचकित केलेल्या भिंतीमध्ये तिच्या समोर असलेले भिंतीवरील चित्र प्रतिबिंबित होते त्याप्रमाणे अर्जुन व श्रीकृष्ण यांचे ठिकाणी एकच ब्रह्मज्ञान नांदत होते॥ ४४४॥

गूढार्थदीपिका—गुरुपरंपरेने गुरुशिष्यात असा एकच बोध नांदत असतो, म्हणून गुरुपरंपरेचे शास्त्रात महत्व वर्णन केले आहे. ब्रह्म अफुट सर्वत्र एक अद्वितीयच असल्यामुळे त्याचा बोधहि सर्व गुरुशिष्याचे ठिकाणी एकरूपच असणार, भिन्न राहू शकत नाही व तसा कृतयुगापासून आतापर्यंत झालेल्या ज्ञानीपुरुषांचा एकरूप अनुभव दिसतोहि.

"कोणाचे काही न घेसी। आपुलेही तैसेचि न देसी। नेणो जाणो भोगिसी। गौरव कैसे" (अमृ० प्र० ९-६६)

गुरुने मला काही नविन प्राप्त करून दिले असे शिष्याला काही वाटत नाही व गुरुलाहि मी शिष्याला अधिक काही दिले असे वाटत नसते. असे असूनहि 'अहं ब्रह्म' हे वागृऋण फेडण्याकरिता गुरुचे सेव्यत्व कायमच राहते असे माउलींनी अमृतानुभवात सांगितलेहि आहे.

तरी बाप वस्तुस्वभावो। फावे तंव तंव गोडिये थांवो। म्हणौनि अनुभवियांचा रावो। अर्जुन म्हणे॥ ४४५॥
जी व्यापकपण बोलतां। निरुपाधिक जें आतां। स्वरूप प्रसंगता। बोलिलें देवो॥ ४४६॥
तें एक वेळ अव्यंगवाणें। कीजो कां मज सांगणें। तेथ द्वारकेचा नाथु म्हणे। भलें केलें॥ ४४७॥

अर्थ—परब्रह्म वस्तु परम प्रेमरूप आहे व परम प्रेमरूप वस्तूचा असा स्वभाव असतो की जसजशी तिची गोडी अनुभवाची तसतसे चित्त तेथे अधिक स्थिर होत जाते. म्हणून ब्रह्मवस्तूचा अनुभव येणाऱ्यामध्ये श्रेष्ठ असा अर्जुन म्हणतो॥ ४४५॥ भगवंता! आपले व्यापकपण सांगत असताना प्रसंगाने आपण आपल्या निरुपाधिक स्वरूपाचा उल्लेख केला॥ ४४६॥ ते आपले निर्दोष असे निरुपाधिक स्वरूप एकदा मला सांगा! तेव्हा अर्जुनाचे भाषण ऐकून द्वारकेचे राजे भगवान श्रीकृष्ण म्हणाले 'अर्जुना! फार चांगले विचारलेस'॥ ४४७॥

गूढार्थदीपिका—निर्गुणस्वरूप निरुपाधिक आहे, हे अर्जुनाला माहित होतेच; पण भगवंताच्या सगुणसाकार-स्वरूपाचाहि निरुपाधिक उत्तम पुरुषात अंतर्भाव होतो की नाही हे जाणून घेण्याकरिताच 'आपले निरुपाधिक स्वरूप सांगा' अशी अर्जुनाने भगवंताला विनंति केली.

पैं अर्जुना आम्हांहि वाडेंकोडें। अखंड बोलों आवडे। परी काय कीजे न जोडे। पुसतें ऐसें॥ ४४८॥
आजि मनोरथांसि फळ। जोडलासि तूं केवळ। जे तोंड भरूनि निखळ। आलासि पुसों॥ ४४९॥
जें अद्वैतावरीही भोगिजे। तें अनुभवींचें तूं विरजें। पुसोनि मज माझें। देतोसि सुख॥ ४५०॥
जैसा आरिसा आलिया जवळा। दिसे आपणपें आपलां डोळां। तैसा संवादिया तूं निर्मळा। शिरोमणी॥ ४५१॥
तुवां नेणोनि पुसावें। मग आम्ही परिसऊं बैसावें। तो गा हा पाड नव्हे। सोयरेया॥ ४५२॥
ऐसें म्हणौनि आलिंगिलें। कृपादृष्टी अवलोकिलें। मग देवो काय बोलिले। अर्जुनेंसीं॥ ४५३॥

अर्थ—अर्जुना! आम्हालाहि मोठ्या आवडीने या आत्मस्वरूपाविषयी सदासर्वदा चर्चा करावीशी वाटते, पण काय करावे! तसा विचारणाराच कोणी भेटत नाही॥ ४४८॥ तू तोंड भरून विचारण्याला आलास, म्हणून आज तुझ्या योगानेच माझे मनोरथ सफल झाले॥ ४४९॥ अद्वैतप्राप्तीनंतरहि अनुभवसुख भोगायला जे साह्यभूत होते, तेच तू विचारून मला माझे सुख देत आहेस॥ ४५०॥ ज्याप्रमाणे आरसा समोर आला असता आपल्याला आपला डोळा दिसतो, त्याप्रमाणे निर्मळ संवाद करणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ असा तू मला मिळाला आहेस॥ ४५१॥ हे माझ्या सोयऱ्या अर्जुना! समजत नाही, म्हणून तू विचारावे व मग मी उत्तर द्यावे, तसे हे नाही॥ ४५२॥ इतके बोलल्यावर देवांनी अर्जुनाला आलिंगन दिले व त्याच्याकडे कृपादृष्टीने पाहिल्यावर, काय म्हणाले (ते ऐका)॥ ४५३॥

पैं दोही वोठीं एक बोलणें। दोहीं चरणीं एक चालणें। तैसें पुसणें सांगणें। तुझें माझें॥ ४५४॥

एवं आम्हीं तुम्हीं येथें। देखावें एका अर्थातें। सांगतें पुसतें येथें। दोन्हीं एक॥ ४५५॥
ऐसा बोलत देवो भुलला मोहें। अर्जुनातें आलिंगूनि ठाये। मग बिहाला म्हणे नोहे। आवडी हे॥ ४५६॥
जाले इक्षुरसाचे ढाळ। तरी लवण देणें किडाळ। जे संवादसुखाचें रसाळ। नासेल थितें॥ ४५७॥
आधींच आम्हां यया कांहीं। नरनारायणासी भिन्न नाहीं। परी आतां जिरो माझ्या ठाईं। वेगु हा माझा॥ ४५८॥
इया बुद्धी सहसा। श्रीकृष्ण म्हणे वीरेशा। पै गा तो तुवां कैसा। प्रश्नु केला॥ ४५९॥
जो अर्जुन कृष्णीं विरत होता। तो परतोनिया मागुता। प्रश्नावळीची कथा। ऐकों आला॥ ४६०॥

अर्थ—जसा दोन ओठांनी एक शब्द निघतो, दोन पायांनी एकच चालणे होते, त्याप्रमाणे तुझे विचारणे व माझे सांगणे एका निरुपाधिक स्वरूपाविषयीच आहे॥ ४५४॥ याप्रमाणे तुम्ही व आम्ही एकाच अर्थाला घेतले पाहिजे; कारण विचारणारा व सांगणारा दोन्ही एकच आहेत॥ ४५५॥ असे बोलत असता देव अर्जुनाच्या प्रेमाने भुलले व ठिकाणीच (मनाने) त्याला आलिंगन देऊन मग चित्तात भिऊन म्हणाले यावेळी हे प्रेम बरे नव्हे॥ ४५६॥ जसे उसाच्या रसाची ढेप करावयाची असली तर मीठ देणे वाईट, तसे असलेल्या संवादसुखाचे रसाळपणात (त्या प्रेमाने) बिघाड होईल॥ ४५७॥ हा नर व मी नारायण या नरनारायणांमध्ये आधीच भेद नाही; पण हा माझ्या आलेल्या प्रेमाचा वेग माझ्यामध्ये जिरो!॥ ४५८॥ अशी बुद्धि धारण करून श्रीकृष्ण म्हणाले, अर्जुना! तू कोणता प्रश्न विचारीत होतास बरे!॥ ४५९॥ जो अर्जुन श्रीकृष्णाशी ऐक्य पावत होता, तो देवाचे बोलणे ऐकल्याबरोबर प्रश्नाची उत्तरे ऐकण्याकरिता पुन: देहावर आला॥ ४६०॥

येथ सद्गदें बोलें। अर्जुनें जी जी म्हणितलें। निरुपाधिक आपुलें। रूप सांगा॥ ४६१॥
यया बोला तो शार्ङ्गी। तेंचि सांगावयालागीं। उपाधी दोहीं भागीं। निरूपीत असे॥ ४६२॥
पुसिलिया निरुपहित। उपाधि कां सांगे येथ। हें कोण्हाही प्रस्तुत। गमे जरी॥ ४६३॥
तरी ताकाचे अंश फेडणें। याचि नांव लोणी काढणें। चोखाचिये शुद्धी तोडणें। कीडचि जेवीं॥ ४६४॥
बाबुळीचि सारावी हातें। परी पाणी तंव असे आइतें। अभ्रचि जावें गगन तें। सिद्धचि कीं॥ ४६५॥
वरील कोंड्याचा गुंडाळा। झाडूनि केलिया वेगळा। कणु घेतां विरंगोळा। असे काई॥ ४६६॥
तैसा उपाधि उपाहितां। शेवट जेथ विचारितां। तें कोणातेंही न पुसतां। निरुपाधिक॥ ४६७॥
जैसें न सांगणेवरी। बाळा पतीसी रूप करी। बोल निमालेपणें विवरी। अचर्चातें॥ ४६८॥
पैं सांगणेयाजोगें नव्हे। तेथिचें सांगणें ऐसें आहे। म्हणौनि उपाधि लक्षण हे। बोलिजे आदि॥ ४६९॥
पाडिव्याची चंद्ररेखा। निरुती दावावया शाखा। दाविजे तेवीं औपाधिका। बोली इया॥ ४७०॥

अर्थ—तेथे सद्गद वाणीने अर्जुन म्हणू लागला, अहो जी भगवंता! तुम्ही आपल्या निरुपाधिक स्वरूपाचे वर्णन करा॥ ४६१॥ हे बोलणे ऐकून भगवान श्रीकृष्ण तेच सांगण्याकरिता उपाधीचा दोघाशी संबंध आहे, असे सांगू लागले॥ ४६२॥ अर्जुनाने आपले निरुपाधिक स्वरूप सांगा, असे म्हटले असता, उपाधीचा संबंध देव कां सांगतात अशी कोणाला शंका येईल॥ ४६३॥ पण ज्याप्रमाणे ताकाचा अंश निराळा करणे म्हणजेच लोणी काढणे होय किंवा सोने शुद्ध करणे म्हणजेच हीणकट भाग अलग करणे होय॥ ४६४॥ किंवा शेवाळ हाताने दूर केले की पाणी शुद्धच असते. अभ्र गेले की आकाश निर्मळच असते॥ ४६५॥ धान्याच्या वर असलेल्या कोंड्याचा गुंडाळा झाडून दूर केल्यावर धान्याचा कण घेण्यास काही प्रतिबंध होतो काय?॥ ४६६॥ त्याप्रमाणे ज्या वस्तूचे ठिकाणी उपाधि व उपाधीचा आधार होणे विचाराने सिद्ध होत नाही ती आपोआपच निरुपाधिक आहे, असे कळून येते॥ ४६७॥ ज्याप्रमाणे नववधु न बोलण्यानेच आपल्या पतीच्या स्वरूपाची ओळख करून देते किंवा जी वस्तु शब्दाचे पलीकडे आहे, अशा शब्दाचे पलीकडे असलेल्या वस्तूचे विवरण मौन करते॥ ४६८॥ जी वस्तु सांगण्याजोगी नाही त्या वस्तूचे सांगणे असेच आहे; म्हणून प्रथम उपाधीचे लक्षण (कोणाचे ठिकाणी आहे, ते) सांगतो॥ ४६९॥ शुक्लपक्षाच्या प्रतिपदेच्या दिवशी चंद्राची कोर दाखविण्याकरिता ज्याप्रमाणे झाडाच्या फांदीचा संबंध घ्यावा लागतो, त्याप्रमाणे निरुपाधिक स्वरूप दाखविण्याकरिता उपाधीचा संबंध असलेल्या विषयीचे हे बोलणे आहे॥ ४७०॥

गूढार्थदीपिका—निरुपाधिक परब्रह्म उपाधीने झाकले गेले आहे. उपाधि व औपाधिक यांचा व्यतिरेक केला असता उरलेले परब्रह्म साहजिकच निरुपाधिक असते व केवळ बुद्धिवृत्तीने अनुभविण्याजोगे आहे. शब्दाने सांगता येण्याजोगे नाही, असा अर्थ.

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च। क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते॥ १६॥

अर्थ—या लोकात क्षर व अक्षर असे दोन पुरुष आहेत. सर्व भूते क्षरपुरुष असून कूटस्थाला अक्षरपुरुष म्हणतात॥ १६॥

मग तो म्हणे गा सव्यसाची। पैं इये संसारपाटणींची। वस्ती साविया टांची। दुपुरुषीं॥ ४७१॥

अर्थ—मग भगवान म्हणतात, अर्जुना! संसारनगरात खरोखर पाहता जी वस्ति आहे ती दोन मर्यादित पुरुषांनीच केलेली आहे॥ ४७१॥

गूढार्थदीपिका—क्षरपुरुष उपाधिगत असून अक्षरपुरुष उपाधीला आधार असल्यामुळे या दोघांशीच उपाधीचा संबंध आहे व उपाधीमुळे हे दोन मर्यादित झाले आहेत.

जैसी आघवांचि गगनीं। नांदतें दिवोरात्री दोन्ही। तैसे संसारराजधानीं। दोन्हीचि हे॥ ४७२॥
आणिकही तिजा पुरुषु आहे। परी तो या दोहींचें नांव न साहे। जो उदेला गावेंसीं खाये। दोहींतें ययां॥ ४७३॥

अर्थ—ज्याप्रमाणे संपूर्ण आकाशात दिवस—रात्र हे दोघेच नांदतात त्याप्रमाणे संसाररूपी राजधानीत हे दोघेच आहेत॥ ४७२॥ आणखी एक तिसरा पुरुष आहे; पण तो या दोघांचे नावहि सहन करित नाही; कारण तो प्रगट झाला की या संसारनगरासह तो या दोघांनाहि गिळून टाकतो॥ ४७३॥

गूढार्थदीपिका—हा तिसरा पुरुष सच्चिदानंदघन, अद्वैतस्वरूप व व्यापक असल्यामुळे याचा अनुभव आला असता त्याच्याहून निराळ्या अशा उपाधि व उपाधिगताचे नावच राहत नाही, असा अर्थ.

परी ते तंव गोठी असो। आधीं दोहींची हे परियेसो। संसारग्रामा वसों। आलें असती॥ ४७४॥
एक आंधळा वेडा पंगु। येर सर्वांगें पुरता चांगु। परी ग्रामगुणें संगु। घडला दोघां॥ ४७५॥
तया एका नाम क्षरु। येरातें म्हणती अक्षरु। इहीं दोहींचि परी संसारु। कोंदला असे॥ ४७६॥
आतां क्षरु तो कवणु। अक्षरु तो किंलक्षण। हा अभिप्रावो संपूर्णु। विवंचूं गा॥ ४७७॥

अर्थ—पण त्याची गोष्ट तूर्त बाजूला असू दे. अगोदर संसारग्रामात वस्ति करण्याकरिता आलेल्या क्षर व अक्षर या दोघांविषयीच ऐकवितो॥ ४७४॥ या दोघांपैकी एक आंधळा, वेडा, पांगळा असून दुसरा सर्वांगाने चांगला पूर्ण आहे, परंतु एकाच गावात असल्यामुळे त्या दोघांचा संबंध घडला॥ ४७५॥ एकाला क्षर म्हणतात व दुसऱ्याचे नाव अक्षर आहे; पण सर्व संसार या दोघांनीच भरला आहे॥ ४७६॥ आता क्षरपुरुष कोण व अक्षरपुरुषाचे लक्षण काय? या संपूर्ण अभिप्रायाचे आम्ही स्पष्टीकरण करू॥ ४७७॥

तरी महदहंकारा। लागुनियां धनुर्धरा। तृणांतींचा पांगोरा-। वरी पैं गा॥ ४७८॥
जें कांहीं सानें थोर। चालतें अथवा स्थिर। किंबहुना गोचर। मनबुद्धींसि जें॥ ४७९॥
जेतुलें पांचभौतिक घडतें। जें नामरूपा सांपडतें। गुणत्रयाच्या पडतें। कामठां जें॥ ४८०॥
भूताकृतीचें नाणें। घडत भांगारें जेणें। काळासिं जूं खेळणें। जिहीं कवडां॥ ४८१॥
जाणणेंचि विपरीतें। जें जें कांही जाणिजतें। जें प्रतिक्षणीं निमतें। होऊनियां॥ ४८२॥
अगा काढूनि भ्रांतीचें दांग। उभवी सृष्टीचें आंग। हें असो बहु जग। जया नाम॥ ४८३॥

अर्थ—अर्जुना! महत्-अहंतेपासून तृणाच्या शेवटील अग्रापर्यंत॥ ४७८॥ जेवढे काही लहान-मोठे, स्थावर-जंगम आहे; किंबहुना जेवढे मनबुद्धीला गोचर होणारे आहे॥ ४७९॥ जेवढे काही पंचभूतांपासून उत्पन्न झाले आहे, जे नामरूपात सापडले आहे व जे त्रिगुणाच्या टांकसाळेत उत्पन्न होते॥ ४८०॥ ज्या सोन्याचे भूतांची आकृति हे नाणे बनते. ज्या कवड्यांनी काळाशी द्यूत खेळले जाते॥ ४८१॥ जे काही विपरीत ज्ञानानेच जाणले जाते व जे

प्रतिक्षणी उत्पन्न होऊन नाश पावते ॥ ४८२ ॥ ज्या सृष्टीचे स्वरूप भ्रांतिरूप दाट जंगल काढून तयार केले जाते. हे असो बहु काय सांगायचे! ज्याला जग म्हणतात ॥ ४८३ ॥

पैं अष्टधा भिन्न ऐसें। जे दाविलें प्रकृतिमिसें। जे क्षेत्रद्वारा छत्तिसें। भागीं केलें ॥ ४८४ ॥
हें मागील सांगो किती। अगा आतांचि जें प्रस्तुती। वृक्षाकार रूपक रीती। निरूपिलें ॥ ४८५ ॥
तें आघवेंचि साकार। कल्पूनी आपणपयां पुर। जालें असे तदनुसार। चैतन्यचि ॥ ४८६ ॥
जैसा कुहां आपणचि बिंबे। सिंह प्रतिबिंब पाहतां क्षोभे। मग क्षोभला समारंभें। घाली तेथ ॥ ४८७ ॥
कां सलिलीं असतचि असे। व्योमावरी व्योम बिंबे जैसें। अद्वैत होऊनि तैसें। द्वैत घेपे ॥ ४८८ ॥
अर्जुना गा यापरी। साकार कल्पूनि पुरी। आत्मा विस्मृतीची करी। निद्रा तेथ ॥ ४८९ ॥
पैं स्वप्नीं सेजार देखिजे। मग पहुडणें जैसें तेथ कीजे। तैसें पुरीं शयन जाणिजे। आत्मयासी ॥ ४९० ॥
पाठीं तिये निद्रेचेनि भरें। मी सुखी दुःखी म्हणत घोरें। अहंममतेचेनि थोरें। वोसणाये सादें ॥ ४९१ ॥
हा जनकु हे माता। हा मी गौर हीन पुरता। पुत्र वित्त कांता। माझें हें ना ॥ ४९२ ॥

अर्थ—जे आठ प्रकारच्या प्रकृतिरूपाने मागे सांगितले गेले किंवा जे छत्तीस विभागाने क्षेत्र म्हणून सांगितले गेले ॥ ४८४ ॥ अर्जुना! मागील किती सांगू! याच अध्यायात प्रथमारंभी वृक्षाचे रूपक करून जे सांगितले गेले ॥ ४८५ ॥ त्या सर्व साकाराला आपल्या राहावयाच्या नगराची कल्पना करून एक चैतन्यच त्याप्रमाणे झाले आहे ॥ ४८६ ॥ ज्याप्रमाणे सिंह विहिरीत आपले प्रतिबिंब पाहून क्षुब्ध होतो व दुसरा सिंह आहे, असे समजून आवेशाने त्यात उडी घालतो ॥ ४८७ ॥ किंवा ज्याप्रमाणे पाण्यामध्ये आकाश असतेच, त्यावरच आकाशाचे प्रतिबिंब पडते, त्याप्रमाणे अद्वैत आत्माच आपले अद्वैतस्वरूप विसरून द्वैत घेतो ॥ ४८८ ॥ अर्जुना! याप्रमाणे जो सर्व साकाररूप नगरीची कल्पना करून आपल्या स्वरूपाच्या विस्मृतीची तेथे निद्रा करतो-(म्हणजे जीवचैतन्यच आपल्या ठिकाणी साकार देहाची कल्पना करून व हे माझे स्वरूप आहे, असे समजून त्याचा अभिमान धरतो व आपले अद्वैत स्वरूप विसरतो) ॥ ४८९ ॥ ज्याप्रमाणे निद्रिस्थ पुरुष स्वप्नात आंथरुण घातलेले पाहतो व त्यावर जाऊन मी निजलो असे पाहतो तशी या संसारनगरात आत्म्याने निद्रा केली आहे, असे समजावे ॥ ४९० ॥ नंतर त्या निद्रेच्या भरात 'मी सुखी', 'मी दुःखी' असे घोरतो व अहंता-ममता यांच्या योगाने 'मी' व 'माझे' असे मोठ्याने बरळतो ॥ ४९१ ॥ हे माझे वडील, ही माझी आई, मी गोरा, मी अभागी, मी अव्यंग, पुत्र-वित्त-कांता हे माझे आहेत ना! ॥ ४९२ ॥

ऐसिया वळघोनि स्वप्ना। धांवत भवस्वर्गाचिया राना। तया चैतन्या नाम अर्जुना। क्षर पुरुष गा ॥ ४९३ ॥
आतां ऐक क्षेत्रज्ञु येणें। नामें जयातें बोलणें। जग जीवु कां म्हणे। जिये दशेतें ॥ ४९४ ॥

अर्थ—अशा रीतीने स्वप्नभूत जगताला कवटाळून संसार व स्वर्गादि अरण्यात फिरणाऱ्या चैतन्याला, अर्जुना! क्षरपुरुष म्हणतात ॥ ४९३ ॥ आता क्षेत्रज्ञ या नावाने ज्याला ओळखले जाते व ज्या दशेला सर्व लोक जीव म्हणतात ॥ ४९४ ॥

गूढार्थदीपिका—येथे 'जीव', 'जगत्' या शब्दांनी दृष्टिसृष्टिवाद्यांप्रमाणे सर्व जगताचा जीव एकच आहे, असा एकजीववाद स्वीकारला आहे.

जो आपुलेनि विसरें। सर्वभूतत्वें अनुकरे। तो आत्मा बोलिजे क्षरें। पुरुषनामें ॥ ४९५ ॥
जे तो वस्तुस्थिती पुरता। म्हणौनि आली पुरुषता। वरी देहपुरीं निदैजतां। पुरुषनामे ॥ ४९६ ॥
आणि क्षरपणाचा नाथिला। आळु यया ऐसेनि आला। जे उपाधीचि आतला। म्हणोनियां ॥ ४९७ ॥

अर्थ—जो आपल्या स्वरूपाला विसरून सर्व भूतस्वरूप होतो, त्या आत्म्याला क्षरपुरुष समजावे ॥ ४९४ ॥ त्याची मूळची स्थिति तशीच पूर्ण आहे, म्हणून त्याला पुरुष म्हणतात. वर आणखी तो देहरूपी नगरामध्ये निजला आहे, म्हणून त्याला पुरुष म्हणतात ॥ ४९६ ॥ हा उपाधीत सापडला आहे; म्हणून त्याच्यावर क्षर म्हणजे नाशिवंत असा खोटाच आरोप आला आहे ॥ ४९७ ॥

गूढार्थदीपिका—जेव्हा चैतन्य उपाधीच्या स्वाधीन झाल्यासारखे व जागृति आणि स्वप्न या दोन अवस्थेत सुखदु:खादि भोग भोगत आहे, अशा सारखे भासते, तेव्हा त्या चैतन्याला, 'क्षर' संज्ञा दिली जाते.

जैसी खळाळीचिया उदका-। सरसीं उदाळे चंद्रिका। तैसा विकारां औपाधिकां। ऐसाचि गमे॥ ४९८॥
कां खळाळु मोटका शोषे। आणि चंद्रिका तैं सरिसींच भ्रंशे। तैसा उपाधिनाशीं न दिसे। उपाधिकु॥ ४९९॥
ऐसें उपाधीचेनि पाडें। क्षणिकत्व यातें जोडे। तेणें खोंकरपणें घडे। क्षर हें नाम॥ ५००॥
एवं जीवचैतन्य आघवें। हें क्षर पुरुष जाणावें। आतां रूप करूं बरवें। अक्षरासी॥ ५०१॥

अर्थ—ज्याप्रमाणे वाहणाऱ्या पाण्याच्या खळाळीबरोबर चंद्राच्या प्रकाश उसळल्यासारखा दिसतो, त्याप्रमाणे आत्माहि विकारांच्या उपाधिमुळे तसा झालेला दिसतो॥ ४९८॥ खळाळ नाहीसा झाला असता त्याबरोबर चंद्राच्या प्रकाशाचे उसळणेहि नाहीसे होते, त्याप्रमाणे उपाधि नाश पावल्याबरोबर त्याचे उपाधिजन्य धर्महि नाहीसे होतात॥ ४९९॥ याप्रमाणे उपाधीच्या योगाने आत्म्याचे ठिकाणी क्षणिकत्व भासते व त्या क्षणिकतेमुळे 'क्षर' हे नाव आले आहे॥ ५००॥ याप्रमाणे संपूर्ण जीवचेतन हे आहे, याला 'क्षरपुरुष' म्हणतात असे जाण. आता अक्षरपुरुषाचे स्पष्ट लक्षण सांगतो, ऐक॥ ५०१॥

गूढार्थदीपिका—मी अज्ञानी आहे, मी जन्मतो, मी मरतो, मी सुखी, मी दु:खी, इत्यादि सत्व-रज-तम या त्रिगुणांचे, देहाचे, इंद्रियांचे, मनाचे जे शास्त्रातून धर्म सांगितले आहेत, हे आपल्या ठिकाणी मानून घेणाऱ्या चेतनाला क्षरपुरुष म्हणतात.

तरी अक्षर जो दुसरा। पुरुष पैं धनुर्धरा। तो मध्यस्थ गा गिरिवरां। मेरु जैसा॥ ५०२॥
जे तो पृथ्वी पाताळ स्वर्गीं। इहीं न भेदे तिहीं भागीं। तैसा दोहीं ज्ञानाज्ञानांगीं। पडेना जो॥ ५०३॥

अर्थ—अर्जुना! ज्याप्रमाणे सर्व पर्वताच्या मध्ये मेरुपर्वत जसा मध्यस्थ आहे, त्याप्रमाणे अक्षरपुरुष हा उत्तमपुरुष व क्षरपुरुष यांच्यामध्ये आहे॥ ५०२॥ कारण जो पृथ्वी-पाताळ-स्वर्ग या तीन विभागात पडत नाही. तसेच जो ज्ञान व अज्ञान या दोन भागातहि सापडत नाही॥ ५०३॥

गूढार्थदीपिका—जीव आपले ठिकाणी सर्व क्रियांचा, गुणागुणांचा, धर्माचा, गुणांचा वगैरेचा आपल्याशी अहंकारद्वारा संबंध लावून घेतो; पण फक्त अज्ञानाला आधार असणाऱ्या अक्षरपुरुषाचे ठिकाणी अहंकारादि कोणत्याहि वृत्ती नसतात; म्हणून त्याच्याच-म्हणजे अक्षरपुरुषात-भेद उत्पन्न होत नाही.

ना यथार्थज्ञानें एक होणें। ना अन्यथात्वें दुजें घेणें। ऐसें निखळ जें नेणणें। तेंचि तें रूप॥ ५०४॥
पांसुता नि:शेष जाये। ना घटभांडादिकें होये। तया मृत्पिंडा ऐसें आहे। मध्यस्थ जें॥ ५०५॥
पैं आटोनि गेलिया सागरु। मग तरंगु ना नीरु। तया ऐशी अनाकारु। जे दशा गा॥ ५०६॥
पार्था जागणें तरी बुडे। परी स्वप्नाचें कांही न मांडे। तैसिये निद्रे सांगडें। न्याहाळणे जे॥ ५०७॥
विश्व आघवेंचि मावळे। आणि आत्मबोधु तरी नुजळे। तिये अज्ञानदशे केवळे। अक्षरु नाम॥ ५०८॥

अर्थ—यथार्थज्ञानानेहि तो एकरूप होत नाही किंवा अनेक होऊन भेदहि पावत नाही असे जे निव्वळ नेणतेपण ते त्या अक्षरपुरुषाचे रूप होय॥ ५०४॥ कणरूपी धुळीची अवस्था नि:शेष नाहीशी होऊन घटभांडादि होण्यापूर्वी मध्ये जी ओली पिंडरूप मातीची अवस्था असते, त्याप्रमाणे या अक्षरपुरुषाची स्थिति आहे॥ ५०५॥ ज्याप्रमाणे समुद्र आटला असता पाणी राहत नाही व तरंगहि उठत नाही, त्याप्रमाणे आकाराला येण्यापूर्वीची आकाररहित जी दशा असते॥ ५०६॥ अर्जुना! जागणे नाहीसे होऊन स्वप्न पडण्यापूर्वी जसे निद्रेचे स्वरूप असते, तशी अक्षरपुरुषाची स्थिति समजावी॥ ५०७॥ विश्व संपूर्ण नाहीसे होऊन आत्मबोधहि प्रगट झाला नाही, अशा त्या केवळ अज्ञानदशेला अक्षर हे नाव आहे॥ ५०८॥

सर्वां कळीं सांडिलें जैसें। चंद्रपण उरे अंवसे। रूप जाणावें तैसें। अक्षराचें॥ ५०९॥
पैं सर्वोपाधिविनाशें। हे जीवदशा जेथ पैसे। फळपाकांत जैसें। झाड बीजीं॥ ५१०॥

तैसें उपाधी उपहित। थोकोनि ठाके जेथ। तयातें अव्यक्त। बोलती गा॥ ५११॥
घनअज्ञान सुषुप्ती। तो बीजभाव म्हणती। येर स्वप्न हन जागृती। फळभाव तो॥ ५१२॥
जयासी कां बीजभावो। वेदांतीं केला ऐसा आवो। तो तया पुरुषा ठावो। अक्षराचा॥ ५१३॥
जेथुनि अन्यथाज्ञान। फांकोनि जागृति स्वप्न। नानाबुद्धीचें रान। रिगालें असे॥ ५१४॥
जीवत्व जेथुनी किरीटी। विश्व उठवितचि उठी। ते उभय भेदांची मिठी। अक्षरु पुरुषु॥ ५१५॥

अर्थ—सर्व कळा नाहीशा होऊन ज्याप्रमाणे अमावस्येला कळाहीन चंद्र राहतो, त्याप्रमाणे अक्षर पुरुषाचे स्वरूप जाणावे॥ ५०९॥ ज्याप्रमाणे फळाचा परिपाक होई पर्यंत वाढणारे झाड प्रथम बीजात असते, त्याप्रमाणे सर्व उपाधीचा नाश होऊन जीवदशा नाहीशी होऊन जेथे राहते॥ ५१०॥ तसेच उपाधि व उपहितपणा हे दोन्ही जेथे बंद राहतात (लीन होऊन असतात) त्या दशेला अव्यक्तदशा म्हणतात॥ ५११॥ या अव्यक्तदशेलाच घन अज्ञान, सुषुप्ति किंवा बीज भाव म्हणतात व स्वप्न, जागृति यांना व्यक्त वा फलभाव म्हणतात॥ ५१२॥ वेदान्तशास्त्रात ज्या दशेला सर्व जगताचा अव्यक्तभाव किंवा बीजभाव म्हटले आहे तेच अक्षरपुरुषाचे ठिकाण होय॥ ५१३॥ जेथून विपरीत ज्ञान विस्तार पावून बुद्धीचे जागृत-स्वप्नरूप नाना प्रकारचे अरण्य तयार झाले॥ ५१४॥ अर्जुना! जेथून विश्वाची उत्पत्ति घेऊनच विश्वाच्या पसाऱ्यासह जीवदशा व्यक्त होते व जेथे जीवत्व व विश्व या उभयतांचा भेद नाहीसा होतो, ती अज्ञानदशा अक्षरपुरुष होय॥ ५१५॥

येरु क्षरु पुरुष कां जनीं। जिहीं खेळें जागृतीं स्वप्नीं। तिया अवस्था जो दोन्ही। वियाला गा॥ ५१६॥
पैं अज्ञानघनसुषुप्ती। ऐसैसी जे कां ख्याती। या उणी येकी प्राप्ती। ब्रह्माची जे॥ ५१७॥
साचचि पुढती वीरा। जरी न येतां स्वप्न जागरा। तरी ब्रह्मभावो साचोकारा। म्हणों येतां॥ ५१८॥
परी प्रकृतिपुरुष दोनी। अभ्रें जालीं जिये गगनीं। क्षेत्रक्षेत्रज्ञ स्वप्नीं। देखिला जियें॥ ५१९॥
हें असो अधोशाखा। या संसाररूपा रुखा। मूळ तें पुरुषा। अक्षराचें॥ ५२०॥
हा पुरुष कां म्हणिजे। जे पूर्णपणेंचि निजें। पैं मायापुरीं पहुडिजे। तेणेंही बोलें॥ ५२१॥

अर्थ—दुसरा जो क्षरपुरुष आहे, तो ज्या जागृति-स्वप्न या दोन अवस्थेत खेळ खेळतो त्या दोन्ही अवस्थेला ज्यांनी जन्म दिला, (त्याला अक्षरपुरुष म्हणतात)॥ ५१६॥ अज्ञान किंवा गाढ निद्रा म्हणून जी अवस्था प्रसिद्ध आहे त्या अवस्थेला अक्षरपुरुष म्हणतात. या अव्यक्तदशेत एक ब्रह्मप्राप्तिच कमी आहे किंवा ''या उणी'' म्हणजे ही अव्यक्तदशा नाहीशी झाली की ब्रह्माचीच प्राप्ति होते॥ ५१७॥ हे वीरा अर्जुना! या अवस्थेत गेल्यानंतर मागाहून जीव जर जागृति व स्वप्न या अवस्थेत आला नसता तर खरोखर त्या अवस्थेला ब्रह्मस्थितिच म्हणता आली असती॥ ५१८॥ ज्या आकाशात प्रकृति व पुरुष ही दोन अभ्रे आली व ज्या स्वप्नात क्षेत्रक्षेत्रज्ञ यांना पाहिले॥ ५१९॥ हे असो संसारवृक्षाच्या ज्या खालच्या शाखा आहेत त्यांचे अक्षरपुरुष हे मूळ आहे॥ ५२०॥ याला पुरुष का म्हणतात याचे कारण असे आहे की तो पूर्ण राहूनच निजतो व तो मायापुरीत निजतो, म्हणूनहि त्याला पुरुष म्हणतात॥ ५२१॥

आणि विकारांचि जे वारी। ते विपरीत ज्ञानाची परी। नेणिजे जिये माझारीं। ते सुषुप्ती गा हा॥ ५२२॥
म्हणौनि यया आपैसें। क्षरणें पां नसे। आणिकेंही हा न नाशे। ज्ञाना उणें॥ ५२३॥
यालागीं हा अक्षरु। ऐसा वेदांतीं डगरु। केला देखसी थोरु। सिद्धांताचा॥ ५२४॥
ऐसें जीवकार्यकारण। जया मायासंगचि लक्षण। अक्षर पुरुष जाण। चैतन्य तें॥ ५२५॥

अर्थ—आणि कार्यरूपाने पुन: विकारदशेस प्राप्त होणे हा विपरीत ज्ञानाचाच प्रकार होय आणि याचे ज्ञान ज्या अवस्थेत नाही त्याला सुषुप्ति म्हणतात॥ ५२२॥ म्हणूनच हा आपोआप झिजत नाही व ज्ञानाशिवाय दुसऱ्या कशाने नाश पावत नाही॥ ५२३॥ म्हणून हा अक्षर आहे असा वेदान्तशास्त्रात डंका वाजला असून देशी भाषेतहि असा थोर सिद्धान्त केला आहे॥ ५२४॥ ते चैतन्यच अक्षरपुरुष होय व तेच मायासंगतीने कार्यरूप जीव किंवा

कारणरूप जीव होते किंवा याप्रमाणे जीव, कार्य, कारण याचे, मायेचा संग, हेच लक्षण असून अक्षरपुरुष हा चैतन्यस्वरूपच आहे, असे जाण॥ ५२५॥

गूढार्थदीपिका—मायेचे कार्य जे अंत:करण त्याच्या संगतीने ज्याला क्षरपुरुष म्हटले आहे तो कार्यरूप जीव होय व ज्याला येथे अक्षरपुरुष म्हटले आहे तो कारणरूप जीव होय. किंवा जीव, कार्य, कारण या तिघांचेहि ठिकाणी मायेचा संग आहे. अक्षरपुरुष मात्र नुसता मायेला आधार असल्यामुळे चैतन्यस्वरूपच आहे.

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः। यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः॥ १७॥

अर्थ—आता परमात्मा म्हणून जो उत्तम पुरुष सांगितला आहे तो यांच्याहून निराळा असून तो अविनाशी व तिन्ही लोकांना व्यापून त्यांचे धारण व नियंत्रण करणारा आहे॥ १७॥

आतां अन्यथाज्ञानीं। या दोनी अवस्था जया जनीं। तया हरपती घनीं। अज्ञानतत्त्वीं॥ ५२६॥
तें अज्ञान ज्ञानीं बुडालिया। ज्ञानें कीर्तिमुखत्व केलिया। जैसा वन्हि काष्ठ जाळूनियां। स्वयें जळे॥ ५२७॥
तैसें अज्ञान ज्ञानें नेलें। आपण वस्तु देऊनि गेलें। ऐसें जाणणेनिवीण उरलें। जाणतें जे॥ ५२८॥

अर्थ—आता विपरीत ज्ञानरूप स्वप्न व जागृति अशा त्या दोन अवस्था ज्या गाढ निद्रारूप अज्ञानावस्थेत लीन होतात॥ ५२६॥ ज्ञानाने ते अज्ञान खाऊन टाकून ज्ञानाने शंकराच्या कीर्तीमुखगणाप्रमाणे होऊन राहिले असता ज्याप्रमाणे काष्ठ जाळून अग्नि स्वत:, विराम पावतो॥ ५२७॥ त्याप्रमाणे ज्ञानाने अज्ञान नाहीसे होऊन ज्ञानहि नाहीसे झाले असता 'जाणले या भावावाचून' जे नुसते जाणीवरूप राहते॥ ५२८॥

गूढार्थदीपिका—"तैसे आपणया आपण। जाणते नव्हे जाण। म्हणोनि ज्ञानपणेविण। ज्ञानमात्र जे"

(अमृ० प्र० ४-२२)

या ओवीत जसे परब्रह्म जाणतेपणावाचून केवळ ज्ञानस्वरूप आहे असे माउलीने अमृतानुभवात सांगितले आहे तेच, या ओवीत सांगितले आहे-म्हणजे शुद्ध परब्रह्म प्रकाशक आहे, जाणणारे नाही किंवा त्याच्या ठिकाणी जाणण्याची जाणीव उत्पन्न होत नाही असे ते निर्विकल्प आहे.

तें तो गा उत्तम पुरुषु। जो तृतीय कां निष्कर्षु। दोहींहून आणिकु। मागिला जो॥ ५२९॥

अर्थ—मागे जे दोन पुरुष सांगितले त्याच्याहून (मागला) जो निराळा असा तिसरा पुरुष मायासंपर्करहित असून त्याला उत्तम पुरुष म्हणतात॥ ५२९॥

गूढार्थदीपिका—या निरुपाधिक उत्तम पुरुषाला माउलीने ईश्वर, परमात्मा इत्यादि शब्द लावून सगुण-साकार भगवंताचाहि या निरुपाधिक उत्तम पुरुषातच अंतर्भाव केला आहे. निर्गुणपरब्रह्म अधिष्ठानरूप असून अवतार त्याचे विवर्त आहेत. परब्रह्माचे निरवयव, अफुट, निर्गुण, निराकार, मायारहित, अविनाशी, सर्वव्यापी, अविकारी, पूर्ण व सच्चिदानंद इत्यादि धर्म नित्य असल्यामुळे त्याचे अंश पडून अवतार हे अधिष्ठानाहून निराळे व अपूर्ण होत नाहीत. अर्थात् अवतार देखील निरुपाधिक मायारहित अनध्यस्तविवर्त ठरतात, असा अर्जुनाचा विचाराने निश्चय झाला.

"निर्गुणाहूनि सगुण न्यून। म्हणे तो केवळ मूर्ख जाण। सगुण-निर्गुण दोन्ही समान। न्यून पूर्ण असेना॥" (ए० भा० अ० ११-१४५८) या ओवीत नाथांनीहि असेच सांगितले असून "तुज सगुण म्हणो की निर्गुण रे। सगुण निर्गुण एक गोविंद रे" या अभंगात माउलीने असेच म्हटले आहे.

सुषुप्ती आणि स्वप्ना-। पासूनि बहुवें अर्जुना। जागणें जैसें आना। बोधाचेंचि॥ ५३०॥
कां रश्मी हन मृगजळा-। पासूनि अर्कमंडळा। अफाटु तेवीं वेगळा। उत्तम गा॥ ५३१॥
हें ना काष्ठींच्या काष्ठाहुनी। अनारिसा जैसा वन्ही। तैसा क्षराक्षरापासुनी। आनचि तो॥ ५३२॥
पैं ग्रासूनि आपली मर्यादा। एक करीत नदीनदां। उठी कल्पांतीं उदावादा। एकार्णवाचा॥ ५३३॥
तैसें स्वप्न ना सुषुप्ती। ना जागराची गोठी आथी। जैसी गिळिली दिवोराती। प्रळयतेजें॥ ५३४॥
मग एकपण ना दुजें। असें नाहीं हें नेणिजे। अनुभव निर्बुजे। बुडाला जेथें॥ ५३५॥

ऐसें आथि जें कांहीं। तें तो उत्तमपुरुष पाहीं। जें परमात्मा इहीं। बोलिजे नामीं॥५३६॥
तेंही एथ न मिसळतां। बोलणें जीवत्वें पांडुसुता। जैसी बुडणेयाची वार्ता। थडियेचा कीजे॥५३७॥

अर्थ—अर्जुना! ज्याप्रमाणे स्वप्न व निद्रा याहून जागृति ही पुष्कळ प्रकारांनी निराळी अशी यथार्थबोधाची असते॥५३०॥ किंवा सूर्य किरणे व मृगजळ यांच्यापासून सूर्यमंडळ विस्तीर्ण आहे, त्याप्रमाणे हा उत्तमपुरुष या दोन्ही पुरुषाहून अमर्याद आहे॥५३१॥ एवढेच नाही तर, नाना प्रकारच्या लाकडात असलेला अग्नि जसा त्या त्या काष्ठाहून निराळा असतो, त्याप्रमाणे हा उत्तमपुरुष क्षराक्षराहून वेगळा आहे॥५३२॥ ज्याप्रमाणे प्रलयामध्ये समुद्र आपली मर्यादा नाहीशी करून व सर्व नदनद्यांना एकत्र करून एकार्णवाचे पूर्णत्व प्रगट करतो॥५३३॥ ज्याप्रमाणे प्रलयाच्या तेजात दिवस-रात्र नाहीसे होतात, त्याप्रमाणे ज्याचे ठिकाणी स्वप्न-सुषुप्ति नसून जागृतीचीहि गोष्ट नाही॥५३४॥ मग जेथे अद्वैताची जाणीव नाही व द्वैताचीहि जाणीव नाही, 'आहे', 'नाही' असे ज्याच्याविषयी बोलता येत नाही, ज्याच्या योगाने अनुभवहि कासावीस होऊन नाहीसा होतो-म्हणजे जाणतेपणहि जेथे उरत नाही॥५३५॥ अशी जी काही वस्तु आहे ती तो उत्तमपुरुष होय, असे जाण. व तीच वस्तु 'परमात्मा' या शब्दाने बोलिली जाते॥५३६॥ अर्जुना! ज्याप्रमाणे नदीच्या काठावर असलेला व 'मी बुडालो नाही' असे न जाणणारा मनुष्य भ्रमाने जसा आपल्या बुडण्याची गोष्ट करतो॥५३७॥

गूढार्थदीपिका—निरुपाधिक आत्मस्वरूप किंवा भगवत्स्वरूप जाणले जात नाही किंवा त्याच्याशी ऐक्य होत नाही, तोपर्यंतच जीवत्व आहे. परमात्म्याशी एकदा ऐक्य झाले की सर्व तोच भासतो. मग जीवत्व वगैरे काही एक उरत नाही.

तैसें विवेकाचिये कांठीं। उभें ठाकलेया किरीटी। पारावाराचिया गोठी। करणें वेदां॥५३८॥
म्हणौनि पुरुष क्षराक्षर। दोन्हीं देखोनि अवर। यातें म्हणती पर। आत्मरूप॥५३९॥
अर्जुना ऐसिया परी। परमात्मा शब्दवरी। सूचिजे गा अवधारीं। पुरुषोत्तम॥५४०॥
एऱ्हवीं न बोलणेंनि बोलणें। जेथिंचें सर्व नेणिवा जाणणें। कांहींच न होनि होणें। जे वस्तु गा॥५४१॥
सोहं तेंही अस्तवलें। जेथ सांगतेंचि सांगणें जालें। द्रष्टृत्वेंसी गेलें। दृश्य जेथ॥५४२॥
आतां बिंबा आणि प्रतिबिंबा-। माजीं कैंची हें म्हणों नये प्रभा। जऱ्ही कैसेनि हे लाभा। जायेचि ना॥५४३॥
कां घ्राणा फुला दोहीं। द्रुती असे जे माझारिलां ठायीं। ते न दिसे तरी नाहीं। ऐसें बोलों नये॥५४४॥
तैसें द्रष्टा दृश्य हें जाये। मग कोण म्हणे काय आहे। हेंचि अनुभवें तेंचि पाहे। रूप तया॥५४५॥

अर्थ—अर्जुना! विवेकाच्या काठी उभे राहूनच, पलीकडे काय आहे व अलीकडे काय आहे, याविषयी वेदाला गोष्टी करायच्या असतात॥५३८॥ म्हणून क्षर व अक्षर या दोन्ही औपाधिक पुरुषांना खालचे व परमात्म्याला पलीकडचा आत्मरूप म्हणतात॥५३९॥ अर्जुना! याप्रमाणे उत्तमपुरुषच परमात्मा या नावाने सुचविला जातो, हे ध्यानात घे॥५४०॥ वास्तविक पाहता काही न बोलणे हेच ज्या वस्तुविषयी बोलणे आहे, काही न जाणणे हे ज्या वस्तूचे जाणणे होय व काहीच न होऊन राहणे हे ज्या वस्तुचे होणे होय॥५४१॥ जेथे 'सोऽहं' ही जाणीव नाहीशी होते, जेथे सांगणाराच सांगणे होऊन जातो व ब्रह्मासह दृश्य जेथे नाहीसे होते॥५४२॥ आता बिंब व प्रतिबिंब यांच्यामधील प्रभेचा कोणत्याहि रीतीने जरी लाभ होत नाही, तरी ती आली कोठून असे म्हणू नये॥५४३॥ किंवा घ्राणेंद्रिय व फूल या दोघांमध्ये असलेला सुवास दिसत नाही, म्हणून तो नाही, असे म्हणता येत नाही॥५४४॥ त्याप्रमाणे द्रष्टा व दृश्य हे नाहीसे झाल्यावर काही आहे, असे कोण म्हणणार? असा जो अनुभव हेच ज्याचे स्वरूप आहे॥५४५॥

जो प्रकाश्येंवीण प्रकाशु। ईशितव्येंवीण ईशु। आपणेनीचि अवकाशु। वसवीत असे जो॥५४६॥
जो नादें ऐकिजता नादु। स्वादें चाखिजता स्वादु। जो भोगिजतसे आनंदु। आनंदेंचि॥५४७॥
जो पूर्णतेचा परिणाम। पुरुष गा सर्वोत्तम। विश्रांतीचाही विश्राम। विराला जेथें॥५४८॥

सुखासि सुख जोडिलें। जें तेज तेजासि सांपडलें। शून्यही बुडालें। महाशून्यीं जिये॥ ५४९॥

अर्थ—प्रकाशल्या जाणाऱ्या वस्तुवाचून जो प्रकाशरूप आहे, जो नियम्य वस्तुवाचून नियमन करणारा आहे व जो आपणच सर्व आकाशात भरून आहे॥ ५४६॥ जो नादालाच ऐकू येणारा नाद होय. स्वादालाच चाखता येणारा स्वाद असून आनंदालाच भोगता येणारा आनंद होय॥ ५४७॥ जो पुरुषोत्तम पूर्णतेचा परिणाम (म्हणजे पूर्णता पूर्णरूपाने परिणाम पावते) होय; म्हणून तो सर्वापेक्षा उत्तम आहे व विश्रांतीने होणारा विश्रामहि जेथे नाहीसा झाला॥ ५४८॥ जे सुखाला मिळालेले सुख होय, जे तेजास प्राप्त झालेले तेज होय. ज्या महाशून्यात शून्यहि नाहीसे होते॥ ५४९॥

गूढार्थदीपिका-महाशून्य-म्हणजे अमर्याद सत्ता. **शून्य**—म्हणजे मर्यादित सत्ता.

जो विकासाहीवरी उरता। ग्रासातेंही ग्रासूनि पुरता। जो बहुतें पाडें बहुतां-। पासूनि बहु॥ ५५०॥
पैं नेणतयाप्रती। रुपेपणाची प्रतीती। रूपें न होऊनि शुक्ती। दावीं जेवीं॥ ५५१॥
कां नाना अलंकारदशे। सोनें न लपत लपालें असे। विश्व न होनियां तैसें। विश्व जो धरी॥ ५५२॥

अर्थ—जगत्‌रूपकार्याचेहि पलीकडे कार्यरहित असा उरणारा आहे, जो संहाराला नाहीसा करून पूर्ण आहे. थोर थोर पदार्थांच्या तुलनेत पाहता जो त्या सर्वापेक्षा अपरिमित श्रेष्ठ आहे॥ ५५०॥ ज्याप्रमाणे शिंप न जाणणाऱ्याला ती चांदी न होताच आपल्याला चांदीरूप भासविते॥ ५५१॥ किंवा ज्याप्रमाणे सोने अलंकार दशेतहि न लोपले जाता लोपले जाते, त्याप्रमाणे जो विश्व न होताच विश्वाला धारण करतो॥ ५५२॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे अलंकाराकडेच लक्ष देणाऱ्याला सोने दिसत नाही, त्याप्रमाणे जड-विनाशी जगताकडेच लक्ष देणाऱ्याला परमात्मा दिसत नाही. वास्तविक अलंकार जसे सोनेच असते तसे जगत् सच्चिदानंदब्रह्मच आहे.

हें असो जलतरंगा। नाहीं सिनानपण जेवीं गा। तेवीं सत्ता प्रकाश जगा। आपणचि जो॥ ५५३॥
आपलिया संकोच विकाशा। आपणचि रूप वीरेशा। हा जळीं चंद्र हन जैसा। समग्र गा॥ ५५४॥
तैसा विश्वपणें कांहीं होये। विश्वलोपीं केहीं न जाये। जैसा रात्री दिवसें नोहे। द्विधा रवि॥ ५५५॥
तैसा कहींचि कोणीकडे। कायिसेनिहि वेंचीं न पडे। जयाचें सांगडें। जयासीचि॥ ५५६॥

अर्थ—हे, असो. ज्याप्रमाणे पाणी व तरंग हे परस्पर यत्किंचितहि निराळे नसतात, त्याप्रमाणे जो जगाची सत्ता व चैतन्य आपणच झाला आहे॥ ५५३॥ हे वीरामध्ये श्रेष्ठ असलेल्या अर्जुना! ज्याप्रमाणे चंद्र पाण्यातील आपल्या संकोच विकासाला (प्रतिबिंबित होण्याला व प्रतिबिंबित न होण्याला) आपणच कारण होतो॥ ५५४॥ त्याप्रमाणे परमात्माहि विश्वरूपाने रूपांतराला येतो अथवा विश्व लोपले असता तो कोठे तरी जातो, असे मुळीच नाही. ज्याप्रमाणे सूर्याला रात्र व दिवस यांचे योगाने दोनपणा येत नाही॥ ५५५॥ त्याप्रमाणे जो कोणीकडे कशानीहि यत्किंचितहि न्यून होत नाही. ज्याची तुलना ज्याच्याशीच करता येते॥ ५५६॥

गूढार्थदीपिका—या सर्व ओव्यातून माउलीने परमात्मा ज्ञातृत्वभोक्तृत्वरहित केवल निर्विकल्प सच्चिदानंदस्वरूप आहे, हे दाखविले आहे.

"**ऐसिया निरुपमावरी। आपुलिये विलासवरी। आत्मा राणीव करी। आपुल्या ठायी**" (अमृ० प्र० ७-२६८) या अमृतानुभवातील ओवीत माउलीने असेच सांगितले आहे.

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः। अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः॥ १८॥

अर्थ—मी क्षरपुरुषाच्या पलीकडे असून अक्षरपुरुषापेक्षाहि उत्तम आहे, म्हणूनच मी वेद, शास्त्रे व लोक यांच्यात पुरुषोत्तम या नावाने प्रसिद्ध आहे॥ १८॥

जो आपणपेंचि आपणया। प्रकाशीतसे धनंजया। काय बहु बोलों जया। नाहीं दुजे॥ ५५७॥
तो गा मी निरुपाधिकु। क्षराक्षरोत्तमु एकु। म्हणोनि म्हणे वेद लोकु। पुरुषोत्तमु॥ ५५८॥

अर्थ—अर्जुना! जो आपणच आपल्याला प्रकाशित करतो. फार काय सांगू! ज्याचे ठिकाणी दुसरे काहीच नाही॥ ५५७॥ तो मी अत्यंत उपाधिरहित व क्षर व अक्षर या दोन्ही पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहे, म्हणूनच मला वेद व लोक पुरुषोत्तम म्हणतात॥ ५५८॥

यो मामेवमसम्मूढो जानाति पुरुषोत्तमम्। स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत॥ १९॥

अर्थ—जो पुरुष ज्ञानसंपन्न होऊन याप्रमाणे मला (उत्तमपुरुषाला) जाणतो तो सर्व जाणणारा होऊन सर्व भावाने माझेच भजन करतो॥ १९॥

परी हें असो ऐसिया। मज पुरुषोत्तमातें धनंजया। जाणे जो पाहलेया। ज्ञानमित्रें॥ ५५९॥
चेइलिया आपुलें ज्ञान। जैसें नाहींचि होय स्वप्न। तैसें स्फुरतें जया त्रिभुवन। वावो जालें॥ ५६०॥
कां हातीं घेतलिया माळा। फिटे सर्पाभासाचा कंटाळा। तैसा माझेनि बोधे टवाळा। नागवे तो॥ ५६१॥
लेणें सोनेंचि जो जाणे। तो लेणेपण तें वावो म्हणे। तेवीं मी जाणोनि जेणें। वाळिला भेद॥ ५६२॥

अर्थ—हे आता असो! पण अर्जुना! ज्ञानरूपी सूर्याने म्हणजे ज्ञानदृष्टीने माझ्या या पुरुषोत्तम स्वरूपाला ओळखले असता, ज्याप्रमाणे जाग आली असता संपूर्ण स्वप्नातील देखावा मावळतो, त्याप्रमाणे ज्याला भासत असलेले त्रिभुवन मुळीच अस्तित्वात नाही असा प्रत्यय येतो॥ ५५९-५६०॥ किंवा ज्याप्रमाणे हा सर्प नव्हे, माळ आहे, असे जाणून माळ हाती घेतल्याबरोबर सर्पाच्या भासाने वाटलेली भीति नि:शेष नाहीशी होते, त्याप्रमाणे ज्याला माझ्या पुरुषोत्तम स्वरूपाचे ज्ञान झाले, तो ह्या खोट्या जगद्रूप भासाने फसला जात नाही॥ ५६१॥ ज्याप्रमाणे अलंकार सोनेच आहे, असे जो जाणतो, तो सोन्याहून अलंकाराचा भिन्नपणा खोटा (व्यर्थ) समजतो, त्याप्रमाणे माझ्या पुरुषोत्तम स्वरूपाला जाणून ज्याने (नामरूपाचाहि) सर्व भिन्नपणा नाहीसा केला॥ ५६२॥

मग म्हणे सर्वत्र सच्चिदानंदु। मीचि एकु स्वत:सिद्धु। जो आपणेनसीं भेदु। नेणोनि जाणे॥ ५६३॥
तेणेंचि सर्व जाणितलें। हेंही म्हणणें थेंकुलें। जे तया सर्व उरलें। द्वैत नाहीं॥ ५६४॥

अर्थ—मग आपल्यालाहि माझ्याहून भिन्न न पाहता मीच एक सर्वत्र सच्चिदानंदस्वरूपाने भरलो आहे, असे जो जाणतो॥ ५६३॥ त्यानीच सर्व जाणले, हेहि म्हणणे जेथे कमी पडते; कारण सर्वत्र म्हणण्यापुरते त्याला आपल्याहून भिन्न असे काही उरतच नाही॥ ५६४॥

गूढार्थदीपिका—येथे माउलीने हा अन्वय सांगितला आहे.

म्हणोनि माझिया भजना। उचितु तोचि अर्जुना। गगन जैसें आलिंगना। गगनाचिया॥ ५६५॥

अर्थ—म्हणून आकाशाला आलिंगन देण्यास ज्याप्रमाणे आकाशच योग्य असते, त्याप्रमाणे, हे अर्जुना! माझे भजनास तोच योग्य आहे॥ ५६५॥

गूढार्थदीपिका—खरी भक्ति ज्ञानानंतरच होते, हे माउलीनी येथे स्पष्ट केले आहे.

क्षीरसागरा परगुणें। कीजे क्षीरसागरचिपणें। अमृतचि होऊनि मिळणें। अमृतीं जेवीं॥ ५६६॥
साडेपंधरा मिसळावें। तैं साडेपंधरेंचि होआवें। तेवीं मी जालिया संभवे। भक्ति माझी॥ ५६७॥
हां गा सिंधुसि आनी होती। तरी गंगा कैसेनि मिळती। म्हणौनि मी न होतां भक्ती। अन्वयो आहे॥ ५६८॥

अर्थ—ज्याप्रमाणे क्षीरसागराला क्षीरसागराचाच पाहुणचार योग्य होतो किंवा अमृत होऊनच अमृतात मिळता येते॥ ५६६॥ सोन्यात मिसळायचे असल्यास सोनेच झाले पाहिजे, त्याप्रमाणे मी झालो-म्हणजे माझ्याशी ज्ञानाने ऐक्य झाले-असताच माझी भक्ति संभवते॥ ५६७॥ गंगा समुद्राहून भिन्न असती तर ती समुद्रास कशी मिळाली असती, त्याप्रमाणे जीव माझ्याशी ऐक्य न पावता अन्वय भक्ति होईल काय?॥ ५६८॥

गूढार्थदीपिका—येथे श्रीज्ञानेश्वर माउलींनी अन्वयाला भक्ति म्हटले आहे. नाथांनीहि चतु:श्लोकी भागवतात "अन्वय माझी पूर्णभक्ति। व्यतिरेक शुद्ध ब्रह्मस्थिति" (ओ०६१९) या ओवीने असेच सांगितले आहे.

"सात्वस्मिन् परमप्रेमरूपा" डोळ्यांनी दिसणाऱ्या अशा सगुण परमेश्वराचे ठिकाणी परम प्रेम असणे ही भक्ति

होय, असे भगवान नारदांनी आपल्या भक्ति सूत्रात म्हटले असून परमेश्वराचे ठिकाणी परम प्रेम याला भक्ति म्हणतात असे शांडिल्यानी ''परानुरक्तिरीश्वरे'' या सूत्रात भक्तीचे स्वरूप वर्णिले आहे.

नाथांनी नाथभागवतादिकांतून व श्रीज्ञानेश्वर माउलींनी श्रीज्ञानेश्वर्यादिकांतून असेच भक्तिचे स्वरूप वर्णिले आहे.

अन्वय म्हणजे भक्ति व सगुण परमेश्वराचे ठिकाणी प्रेम असणे म्हणजे भक्ति अशा या भक्तिच्या दोन लक्षणात बाह्यत: भिन्नता दिसत असली तरी अन्वयाने नामरूपे ही पूर्ण ब्रह्मस्वरूप आहेत, असा प्रत्यय येऊन भगवंताच्या नामरूपाचे ठिकाणीहि परम प्रेम अनायासेच जडते-म्हणजेच नामरूपात्मक सगुणसाकार परमेश्वराचे ठिकाणी प्रेम जडते. म्हणूनच नाथांनी व माउलींनी अन्वयालाच भक्ति म्हणून भक्तीच्या दोन्ही लक्षणातील विरोध नाहीसा केला आहे.

अर्थातच ''सर्वं खल्विदं ब्रह्म'' या अन्वयाने होत असलेल्या परमप्रेमरूप भक्तीत अहंभाव शिल्लक राहत नाही तसेच एका परब्रह्माशिवाय सर्व विवर्तच असल्यामुळे जगत् व सगुण श्रीहरि दोघेच विवर्त असणार यात शंका नाही; पण अध्यस्त अशा जगताच्या नामरूपाचा जड-विनाशी वस्तुभावात्मक प्रत्ययामुळे जसा त्याच्या, त्याला आधारभूत असणाऱ्या सच्चिदानंद परब्रह्माच्या प्रत्ययाला पूर्वसंस्कारामुळे विकल्प उठून प्रतिबंध होतो, तसा नामरूपासह सच्चिदानंद परब्रह्मस्वरूप भासणाऱ्या अनध्यस्तविवर्त अशा सगुण श्रीहरीच्या नामरूपांचा प्रतिबंध होत नाही.

अर्थातच ''सर्वं खल्विदं ब्रह्म'' या अन्वयात म्हणा किंवा भक्तीत म्हणा अहंभाव शिल्लक राहत नाही, हे उघड आहे.

ऐसियालागीं सर्व प्रकारीं। जैसा कल्लोळ अनन्य सागरीं। तैसा मातें अवधारीं। भजिन्नला जो॥ ५६९॥
सूर्या आणि प्रभे। एकवंकी जेणें लोभें। तो पाड मानूं लाभे। भजना तया॥ ५७०॥

अर्थ—याकरिता ज्याप्रमाणे तरंग सागराहून निराळा न होता सर्व प्रकारांनी समुद्रावर खेळतो, त्याप्रमाणे माझेच जो सर्व भावांनी भजन करतो॥ ५६९॥ सूर्य व त्याची प्रभा यांचे जे स्वाभाविक प्रेमैक्य आहे त्याचीच उपमा त्याच्या भजनाला देता येईल॥ ५७०॥

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ। एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत॥ २०॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
पुरुषोत्तमयोगो नाम पञ्चदशोऽध्याय:॥ १५॥

अर्थ—हे निष्पाप अर्जुना! अत्यंत गुप्त असलेले असे हे शास्त्र मी तुला सांगितले आहे. हे जाणणारा पुरुषच खरा बुद्धिमान होय व तोच कृतकृत्य होतो॥ २०॥

एवं कथिलयादारभ्य। जें हें सर्व शास्त्रैकलभ्य। उपनिषदां सौरभ्य। कमळदळां जेवीं॥ ५७१॥

अर्थ—ज्याप्रमाणे कमलदलात सुगंध असतो, त्याप्रमाणे हा अध्याय म्हणजे सांगण्याला आरंभ केल्यापासून सर्व शास्त्रांच्या एकवाक्यतेने लाभणारा उपनिषदातील सुगंध आहे, असे जाण॥ ५७१॥

गूढार्थदीपिका—या पंधराव्या अध्यायात जे सांगितले आहे, तेच सर्व शास्त्राचे व उपनिषदांचे सारभूत सिद्धान्त होत, असा अर्थ.

हें शब्दब्रह्माचें मथितें। व्यासप्रज्ञेचेनि हातें। मथूनि काढिलें आयितें। सार आम्हीं॥ ५७२॥
जे ज्ञानामृताची जान्हवी। जे आनंदचंद्रींची सतरावी। विचारक्षीरार्णवींची नवी। लक्ष्मी जे हे॥ ५७३॥
म्हणोनि आपुलेनि पदें वर्णें। अर्थाचेनि जीवेंप्राणें। मी वांचोनि हों नेणें। आन कांहीं॥ ५७४॥

अर्थ—भगवान व्यासाच्या बुद्धिरूप हाताने शब्दब्रह्मरूपी वेदांचे मंथन करून हे आयते सार आम्ही काढून ठेवले आहे॥ ५७२॥ ही ज्ञानरूपी अमृताची गंगाच आहे किंवा ही आनंदरूपी चंद्राची सतरावी कळा आहे अथवा ही विचाररूपी क्षीरसागरातून निघालेली नवी लक्ष्मी आहे॥ ५७३॥ म्हणून ही गीता आपल्या अक्षर-वर्ण-पदाने व

अर्थरूप जीवाप्रमाणे मज भगवंतावाचून दुसरे काही होणे जाणत नाही॥ ५७४॥

गूढार्थदीपिका—गीतेची अक्षरे-पदे-वर्ण हे सर्व भगवद्रूपच आहेत, असा भाव.

क्षराक्षरत्वें समोर जालें। तयांचें पुरुषत्व वाळिलें। मग सर्वस्व मज दिधलें। पुरुषोत्तमीं॥ ५७५॥

म्हणौनि जगीं गीता। मियां आत्मेनि पतिव्रता। जे हे प्रस्तुत तुवां आतां। आकर्णिली॥ ५७६॥

अर्थ—क्षर व अक्षर हे दोन्ही ज्ञेयकोटीत किंवा दृश्यकोटीत असल्यामुळे त्याठिकाणी पुरुषत्व नाही असे सांगून शेवटी माझ्या पुरुषोत्तम स्वरूपाचे ठिकाणी सर्वस्व अर्पण केले॥ ५७५॥ म्हणून सध्या तू जी गीता ऐकलीस ती या जगात मज आत्मस्वरूपाचे योगानेच पतिव्रता झाली आहे॥ ५७६॥

गूढार्थदीपिका—गीता सर्वतोपरि परमेश्वराचेच प्रतिपादन करते, असा अर्थ.

साचचि बोलाचें नव्हे हें शास्त्र। पैं संसार जिणतें हे शस्त्र। आत्मा अवतरविते मंत्र। अक्षरें इयें॥ ५७७॥

परी तुज पुढां सांगितलें। तें अर्जुना ऐंसें जालें। जें गौप्यधन काढिलें। माझें आजि तुवां॥ ५७८॥

मज चैतन्यशंभूचा माथां। जो निक्षेपु होता पार्था। तया गौतम जालासि आस्था। निधी तूं गा॥ ५७९॥

चोखटिवा आपुलिया। पुढिला उगाणा घेयावया। तया दर्पणाचीचि परी धनंजया। केली आम्हां॥ ५८०॥

कां भरलें चंद्रतारांगणीं। नभ सिंधू आपणयामाजीं आणी। तैसा गीतेसीं मी अंतःकरणीं। सूदला तुवां॥ ५८१॥

अर्थ—खरोखर हे नुसते बोलण्याजोगे शास्त्र नव्हे ते संसार जिंकणारे शस्त्र आहे व आत्म्याला प्रगट करणारी-म्हणजे सर्व सगुणसाकार ब्रह्मस्वरूपच आहे, असा प्रत्यय आणून देणारी-ही मंत्राक्षरे होत॥ ५७७॥ अर्जुना! तुझ्यासमोर जे निरूपण केले ते त्वां आज माझे गुप्तधनच काढले असे समज॥ ५७८॥ हे अर्जुना! मज चैतन्यरूपी शंकराचे मस्तकावर जो ज्ञानगंगेचा साठा होता तो तू आज श्रद्धेचे कोठार असा गौतम होऊन बाहेर काढलास॥ ५७९॥ हे अर्जुना! आपल्या शुद्ध निरुपाधिक स्वरूपाचा अनुभव घेण्याकरिता तू आम्हाला, स्वरूपाला समोर करून दाखविणारा, आरसा झाला आहेस॥ ५८०॥ किंवा ज्या प्रमाणे चंद्रनक्षत्रांनी भरलेले आकाश, समुद्र आपल्यामध्ये दाखवितो, त्याप्रमाणे गीतेसह मला त्वां आपल्या अंतःकरणात साठविलेस॥ ५८१॥

जे त्रिविध मळकटा। तूं सांडिलासी सुभटा। म्हणौनि गीतेसीं मज वसौटा। जालासि गा॥ ५८२॥

परी हें बोलों काय गीता। जे हे माझी उन्मेषलता। जाणे तो समस्ता। मोहा मुके॥ ५८३॥

सेविली अमृतसरिता। रोग दवडूनि पंडुसुता। अमरपण उचिता। देऊनि घाली॥ ५८४॥

तैसी गीता हे जाणितलिया। काय विस्मयो मोह जावया। परी आत्मज्ञानें आपणपयां। मिळिजे येथ॥ ५८५॥

जया आत्मज्ञानाच्या ठायीं। कर्म आपुलेया जीविता पाहीं। होऊनियां उतराई। लया जाय॥ ५८६॥

हारपलें दावूनि जैसा। मागु सरे वीरविलासा। ज्ञानचि कळस वळघे तैसा। कर्मप्रासादा॥ ५८७॥

अर्थ—हे उत्तम योद्धया अर्जुना! तिन्ही प्रकारच्या दोषांपासून तू मुक्त झालास, म्हणून गीतेसह माझे राहण्याचे स्थान झाला आहेस॥ ५८२॥ फार काय सांगावे! माझी ज्ञानवल्ली जी गीता ती जो जाणतो तो सर्व मोहापासून मुक्त होतो॥ ५८३॥ ज्याप्रमाणे अर्जुना! अमृताच्या नदीचे सेवन केले असता ती संपूर्ण रोगाला नाहीसे करून योग्य अमरपण देते॥ ५८४॥ त्याप्रमाणे ही गीता जाणली असता मोह जाईल यात आश्चर्य नाही; पण गीतेने आत्मस्वरूपाचे ज्ञान होऊन आपण आपल्याशी ऐक्य पावतो॥ ५८५॥ पाहा! ज्या आत्मज्ञानाचे ठिकाणी कर्म आपल्या जीविताचे निंबलोण करून लय पावते॥ ५८६॥ हे वीरश्रेष्ठा अर्जुना! ज्याप्रमाणे हरविलेली वस्तु सापडवून देऊन शोधणे बंद पडते, त्याप्रमाणे निष्कामकर्मरूपी मंदिरावरच ज्ञानाचा कळस चढतो॥ ५८७॥

म्हणौनि ज्ञानिया पुरुषा। कृत्य करू सरलें देखा। ऐसा अनाथांचा सखा। बोलिला तो॥ ५८८॥

तें श्रीकृष्णवचनामृत। पार्थी भरोनि असे वोसंडत। मग व्यासकृपा प्राप्त। संजयासी॥ ५८९॥

तो धृतराष्ट्रराया। सूतसे पान करावया। म्हणौनि जीवितान्त तया। नोहेचि भारी॥ ५९०॥

एऱ्हवी गीताश्रवणअवसरीं। आवडों लागतां अनधिकारी। परी सेखीं तेचि उजरी। पातला भली॥ ५९१॥

जेव्हां द्राक्षीं दूध घातलें। तेव्हां वायां गेलें गमलें। परी फळपाकीं दुणावलें। देखिजे जेवीं॥ ५९२॥
तैसीं श्रीहरीवक्त्रींचीं अक्षरें। संजयें सांगितलीं आदरें। तिहीं अंधु तोही अवसरें। सुखिया जाला॥ ५९३॥

अर्थ—म्हणून ज्ञानी पुरुषाला कर्म करण्याचे बंधन राहत नाही, पाहा! असे अनाथांचे बंधु भगवान श्रीकृष्ण म्हणाले॥ ५८८॥ भगवान श्रीकृष्णाच्या मुखातून निघालेले हे ज्ञानामृत. अर्जुनाचे अंत:करणात पूर्ण भरून वाहू लागले व भगवान व्यासांच्या कृपेने ते संजयालाहि प्राप्त झाले॥ ५८९॥ तो संजय धृतराष्ट्र राजाला ते ज्ञानामृत प्राशन करावयाला देत होता, म्हणूनच त्याला मरणसमयी दु:ख झाले नाही॥ ५९०॥ राजा धृतराष्ट्र, गीता श्रवण करीत असताना जरी अनधिकारी वाटत होता, तरी शेवटी गीताश्रवणाने त्याला सद्गतिच प्राप्त झाली॥ ५९१॥ ज्याप्रमाणे द्राक्षाच्या झाडांना दूध घालतांना ते व्यर्थ गेले असे प्रथम वाटते; पण त्याने फळाची गोडी दुप्पट वाढली असे मागाहून जसे दिसून येते॥ ५९२॥ त्याप्रमाणे भगवंताच्या मुखातून निघालेली अक्षरे संजयाने श्रद्धेने सांगितली, पण ती ऐकून शेवटी धृतराष्ट्रहि त्या बोधामृताने सुखी झाला॥ ५९३॥

तेंचि म्हाटेनि विन्यासें। मियां उन्मेषें ठसें ठोंबसें। जाणें नेणें तैसें। निरोपिलें॥ ५९४॥
सेवंतीये अरसिकांही। आंग पाहतां विशेष तरी नाहीं। परी सौरभ्य नेलें तिहीं। भ्रमरीं जाणिजे॥ ५९५॥
तैसें घडतें प्रमेय घेइजे। उणें तें मज देइजे। जें नेणणें हेंचि सहजें। रूप कीं बाळा॥ ५९६॥
परी नेणतें जऱ्ही होये। तऱ्ही देखोनि बाप कीं माये। हर्ष केंही न समाये। चोज करिती॥ ५९७॥
तैसें संत माहेर माझें। तुम्ही मिनलिया मी लाडैजे। तेंचि ग्रंथाचेनि व्याजें। जाणिजो जी॥ ५९८॥
आतां विश्वात्मकु हा माझा। स्वामी श्रीनिवृत्तिराजा। तो अवधारू वाक्यपूजा। ज्ञानदेवो म्हणे॥ ५९९॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां पञ्चदशोऽध्याय:॥ १५॥

अर्थ—त्याचे मी अजाणत्याने ओबडधोबड मराठी भाषेत रचना करून कळले, न कळले अशा ज्ञानाने निरूपण केले॥ ५९४॥ अरसिक पुरुष शेवंतीचे फूल पाहील तर त्याला विशेष काही दिसून येणार नाही; पण त्यातील विशेष जो सुगंध तो मात्र भ्रमरच लुटतो, हे लक्षात ठेवा॥ ५९५॥ त्याप्रमाणे या ग्रंथात जे सिद्धान्त मान्य असतील ते स्वीकारावे व न्यून (चूक) वाटतील ते परत द्यावे; कारण सर्व न समजणे हेच लहान मुलाचे स्वाभाविक स्वरूप असते॥ ५९६॥ तरी ज्याप्रमाणे लहान मूल अज्ञानी असले तरी आईबाप त्याला पाहून हर्षभरित होतात व त्याचे कोडकौतुकच करतात॥ ५९७॥ त्याप्रमाणे तुम्ही संतश्रोते माझे माहेर आहात. तुम्ही भेटलात म्हणून मी तुमच्याशी जे लडिवाळपणाने वागावे ते या ग्रंथाच्या मिषानेच होय, असे जाणा॥ ५९८॥ श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, माझे विश्वस्वरूपी श्रीगुरु निवृत्तिनाथ महाराज ही वचनरूपी पूजा श्रवण करोत॥ ५९९॥

श्रीसद्गुरुकृपेने ह्या पंधराव्या अध्यायाचा अनुवाद गूढार्थदीपिकेसह पूर्ण झाला तो त्यांचे चरणी समर्पण असो.

समारोप

मागील चौदाव्या अध्यायाच्या शेवटी भगवंतांनी सांगितले की ज्याला आत्मज्ञान झाले तोच मुक्त होऊ शकतो. पण ते ज्ञान, वैराग्यावाचून चित्तात दृढ ठसू शकत नाही. संसाराची अनित्यता मनात पक्की ठसली असताच वैराग्य प्राप्त होते; म्हणून वैराग्य उत्पन्न होण्याकरिता या पंधराव्या अध्यायात भगवंतांनी वृक्षाच्या रूपकाने या संसाराची अनित्यता दाखविली आहे.

भगवान म्हणतात, अर्जुना! वर मुळे व खाली शाखा असलेल्या संसारवृक्षाला अश्वत्थ म्हणतात. ऋग्वेदादि वेद त्याची पाने असून जो त्या अश्वत्थवृक्षाला जाणतो, तोच वेद जाणणारा होय. या संसारवृक्षाच्या फांद्या खाली, वर पसरल्या असून सत्व, रज, तम या तीन गुणांनी वाढल्या आहेत. विषय त्यांची पाने, अंकुरे होत. मनुष्यलोकात कर्मांना कारण होणारी वासनारूपी मूळे खाली पसरली आहेत.

ज्ञानविचार केला असता या संसारवृक्षाचे स्वरूप वर्णन केल्याप्रमाणे दिसत नाही. त्याला आदि-अंत नसून त्याचे अस्तित्वहि सिद्ध होत नाही. हा संसारवृक्ष अज्ञानभ्रमाने बलवान झाला आहे. ही अज्ञानमूळे असलेल्या संसारवृक्षाला कापून काढण्याकरिता आत्मज्ञान हेच उत्तम खड्ग होय. तेव्हा आत्मज्ञानरूपी तरवारीने हा संसारवृक्ष समूळ तोडून ज्या पदाचे ठिकाणी प्राप्त झालेले पुरुष पुनः संसारात परत येत नाहीत व ज्यापासून अनादि संसारचक्राची प्रवृत्ति झाली आहे, त्या पदाला शरण जाऊन त्याचा शोध करावा.

सत्कार, अविवेक यांचा त्याग करणारे, आसक्ति व आसक्तीचे दोष जिंकणारे, आत्मस्वरूपाचे ठिकाणी रममाण होणारे, निष्काम झालेले व सुखदु:खापासून मुक्त झालेले ज्ञानी पुरुष त्या अविनाशी पदाला प्राप्त होतात.

सूर्य, चंद्र किंवा अग्नि हे देखील त्या पदाला प्रकाशित करू शकत नाहीत. ते माझे परमस्थान होय.

या संसारात जो जीव म्हणून प्रसिद्ध आहे तो माझाच अंश आहे. जीव हा पूर्ण परब्रह्मस्वरूपच असून मायाभ्रांतीने तो आपल्याला शरीरापुरते मर्यादित मानतो, जीव हा, मरतेवेळी स्थूलदेह येथेच सोडून दहा इंद्रिये, पंचप्राण, मन व बुद्धि या सतरा तत्वे मिळून झालेल्या लिंगदेहास मात्र घेऊन जातो. पंचज्ञानेंद्रियांचा अभिमान धरून जीवात्मा विषय भोगतो. देह सोडून जाताना, देहात असताना, विषयादि भोग भोगताना अथवा गुणयुक्त असताना अज्ञानी लोक आपल्या स्वरूपास पाहत नाहीत. शमदमादि द्वारा परमेश्वरप्राप्तीचा अभ्यास करणारे योगी मात्र आपल्या सूक्ष्म झालेल्या बुद्धीने परमेश्वरास पाहतात. ज्यांनी आपले चित्त शुद्ध केले नाही ते परमेश्वरास पाहू शकत नाहीत. सूर्य, चंद्र, अग्नि इत्यादि सर्व भौतिक पदार्थ जड व काल्पनिक असल्यामुळे त्यांच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या शक्ति त्यांच्या नसून सर्व ब्रह्मांडाला अधिष्ठित असलेल्या परमात्म्याच्या आहेत.

भगवान म्हणतात, मीच सर्वांच्या हृदयात वसत असून माझ्यामुळे आठवण, ज्ञान व विस्मरण होत असते. सर्व वेदांनी मीच जाणला जातो मीच वेदान्तसंप्रदाय उत्पन्न करणारा असून वेद जाणणाराहि मीच आहे.

या शरीरात परमात्मा व जीव हे दोघेहि एकाच ठिकाणी आहेत. पण जीव हा उपाधिगत असून परमात्मा उपाधिरहित आहे. या परमात्म्याला उत्तम पुरुषहि म्हणतात. उपाधिगत जीवाची मर्यादा समजली असता उपाधिरहित जो परमात्मा तोहि अनायासे गोचर होतो, म्हणून भगवान म्हणतात, अर्जुना! तुला मी आधी उपाधिगत जीवाची मर्यादा सांगतो, ऐक.

हा जीव, मुख्य जीव किंवा एकजीव अथवा अक्षरपुरुष व जीवाभास किंवा क्षरपुरुष असा दोन प्रकारचा आहे. अंत:करणप्रतिबिंबित जीवाभासाला क्षरपुरुष म्हणतात. ज्याप्रमाणे पाण्याचे चांचल्यादि धर्म पाण्यातील प्रतिबिंबाचे ठिकाणी दिसून पडतात, त्याप्रमाणे मनाचे सुखदु:खादि, प्राणाचे क्षुधा-तृषादि, इंद्रियांचे, अंधत्व,


मूकत्व, पटुत्वादि, देहाचे गौरकृष्णादि धर्म उपाधिगत क्षरपुरुष आपले ठिकाणी भ्रांतीने मानून घेतो. या प्रतिबिंबरूप जीवाभावाला जो बिंबरूप अक्षरपुरुष आहे, तो कार्यरूप अंत:करणउपाधीचे कारण जी माया किंवा अज्ञान याला नुसता आधार आहे. अक्षरपुरुषाचे ठिकाणी मी जाणतो किंवा जाणत नाही या दोन्ही वृत्ती नसतात. आकाराला येण्यापूर्वी जशी मातीची दशा आकाररहित असते, तशी या अक्षरपुरुषाची अव्यक्त दशा असते. यथार्थज्ञानाने एकरूप न होता किंवा अनेकरूप होऊन भेद न पावता जे निव्वळ नेणतेपण ते या अक्षरपुरुषाचे स्वरूप होय. येथपर्यंत जीवदशा आहे.

यापलीकडे उत्तम पुरुष किंवा परमात्माच आहे व अर्थातच तो निरुपाधिक आहे. हा निरुपाधिक परमात्मा सगुण व निर्गुण असा दोन प्रकारचा आहे.

सगुण परमात्मा विवर्तरूप असून निर्गुण परमात्मा अधिष्ठानरूप आहे. या सगुणसाकार परमात्मरूप विवर्तात अधिष्ठानरूप परमात्मा लोपला जात नाही. उलट स्पष्ट अनुभवाला येतो.

अधिष्ठान ज्ञानाने विवर्तरूप सगुण परमात्म्याची निवृत्ति होत नाही व अधिष्ठानरूप निर्गुण परमात्मस्वरूपाशी तो अभिन्नच राहतो; म्हणून त्या सगुणसाकार परमात्म्याला निरुपाधिक अथवा अनध्यस्तविवर्त म्हणतात. जो अविनाशी आहे व तिन्ही लोकांना व्यापून त्यांचे धारण व नियंत्रण करणारा आहे तो मीच आहे. अर्जुना! वेदशास्त्रे व लोक यांच्यात पुरुषोत्तम या नावाने मीच प्रसिद्ध आहे. जो पुरुष ज्ञानसंपन्न होऊन याप्रमाणे मला जाणतो, तो सर्व जाणणारा होऊन सर्व भावाने माझेच भजन करतो. तोच खरा बुद्धिमान होय व तोच कृतकृत्य होय.

॥ श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥



॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय सोळावा

मावळवीत विश्वाभासु। नवल उदयला चंडांशु। अद्वयाब्जिनीविकाशु। वंदूं आतां॥ १॥

अर्थ—अद्वैतसत्तारूप कमलाला विकसित करून संपूर्ण विश्वाचा भास नाहीसा करणारा असा हा आश्चर्यकारक प्रखर किरणरूपी ज्ञानसूर्य उगवला आहे. त्यालाच आता वंदन करू॥ १॥

गूढार्थदीपिका—प्राकृत सूर्याच्या प्रकाशाने विश्व दिसते, पण ब्रह्मज्ञानरूपी सूर्याचा उदय झाला असता विश्व मावळते व त्याचाच एक प्रकाश दिसतो, असा श्रीज्ञानेश्वर महाराज आपला अनुभव सांगतात.

जो अविद्याराती रुसोनियां। गिळी ज्ञानाज्ञानचांदणियां। जो सुदिनु करी ज्ञानियां। स्वबोधाचा॥ २॥

अर्थ—हा ज्ञानसूर्य अविद्यारूप रात्र नाहीशी करून व त्यात चमकणाऱ्या ज्ञान व अज्ञानवृत्तिरूप चांदण्या गिळून ज्ञानी पुरुषाला आत्मबोधाचा अखंड दिवसच उजाडवितो॥ २॥

गूढार्थदीपिका—ज्ञानाज्ञान चांदणियां-अविद्या त्रिगुणात्मक असून ज्ञान म्हणजे जाणणे, हे सत्वगुणाचे कार्य असल्यामुळे व अज्ञान म्हणजे न जाणणे, हें तमोगुणाचे कार्य असल्यामुळे ज्ञानाज्ञानाला माउलीने अविद्यारात्रीतील चांदण्याची उपमा दिली आहे.

जेणें विवळतिये सवळें। लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे। सांडिती देहाहंतेचीं अविसाळें। जीवपक्षी॥ ३॥

अर्थ—ज्या आत्मज्ञानाच्या उदयाबरोबर प्राप्त झालेल्या ज्ञानप्रकाश दृष्टीमुळे जीवपक्षी देहअहंतारूपी घरटे सोडून जातो॥ ३॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञान झाले असता मी देह आहे, अशी मर्यादित बुद्धि न राहता, सर्वत्र मीच आहे, अशी व्यापक बुद्धि होते.

लिंगदेहकमळाचा। पोटीं वेंचयता चिद्भ्रमराचा। बंदिमोक्षु जयाचा। उदैला होय॥ ४॥

अर्थ—ज्या आत्मज्ञानरूपी सूर्याच्या उदयाबरोबर लिंगदेहरूपी कमळात अडकून पडून मरणपरंपरा भोगणाऱ्या जीवचैतन्यरूपी भ्रमराच्या बंदिवासाचा मोक्ष होतो॥ ४॥

शब्दाचिया आसकडीं। भेदनदीच्या दोहीं थडीं। आरडत विरहवेडीं। बुद्धिबोधु॥ ५॥

अर्थ—बुद्धि व यथार्थबोध हे दोन चक्रवाक पक्षी शब्दाच्या भिन्नार्थरूपी अडचणीत सापडल्यामुळे परस्परांचा वियोग होऊन ते दोघे भेदनदीच्या दोन काठावर विरहाने वेडे होऊन अनादि कालापासून ओरडत बसले आहेत॥ ५॥

गूढार्थदीपिका—चक्रवाक पक्षी पाण्याचे ठिकाणी राहतात व ते अत्यंत कामासक्त असून परस्परांपासून किंचित् दूर झाले तर परस्परांच्या विरहाने ओरडतात असा पुराणातून उल्लेख आहे.

आत्मज्ञान होण्यापूर्वी शब्दाचा विश्वरूप अर्थ करून केवळ जाणीवरूप ज्ञानापासून ज्ञातृपणाने भिन्न पडणारी बुद्धि भोक्तृपणाने अनादिकालापासून दु:ख भोगते.

तया चक्रवाकांचें मिथुन। सामरस्याचें समाधान। भोगवी जो चिद्गगन-। भुवनदिवा॥ ६॥

अर्थ—जो चिदाकाशातील अखंड प्रकाशरूप गुरुरूप सूर्य या बोधबुद्धिरूप चक्रवाकपक्षांच्या जोडप्याकडून समरस ऐक्यतेच्या भेटीचे सुख भोगवितो॥ ६॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञान झाले असता सर्व शब्द साक्षात् किंवा परंपरेने एका समरस अद्वैत परब्रह्माचेच प्रतिपादन करतात, असे जाणून बुद्धि ज्ञानाशी एकरूप होते व दुःखातून मुक्त होते.

जेणें पाहालिये पाहांटे। भेदाची चोरळी फिटे। रिघती आत्मानुभववाटे। पांथिक योगी॥ ७॥

अर्थ—ज्याच्या ज्ञानप्रकाशाच्या पाहाटेमुळे भेदाची चोरवेळच नाहीशी होते व परमार्थमार्गाने जाऊ पाहणारे वाटसरू जे योगी ते आत्मानुभवाच्या वाटेने जाऊ लागतात॥ ७॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञानाने परब्रह्माची एक अफुट, अद्वैतसत्ताच अनुभवाला येते, असा अर्थ.

जयाचेनि विवेककिरणसंगें। उन्मेखसूर्यकांत फुणगें। दीपले जाळिती दांगें। संसाराचीं॥ ८॥

जयाचा रश्मिपुंजु निबरु। होतां स्वरूप उखरीं स्थिरु। ये महासिद्धीचा पूरु। मृगजळ तें॥ ९॥

अर्थ—ज्याच्या विवेकरूपी किरणाने ज्ञानरूपी सूर्यकान्त मण्यातून निघणाऱ्या ठिणग्याचा प्रकाश संसाररूप अरण्ये जाळतो॥ ८॥ ज्याचा तीव्र किरणरूपी समुदाय आत्मस्वरूपी माळजमिनीवर स्थिर झाला असता महासिद्धीचा जो जगद्रूप पूर येतो ते मृगजळ होय॥ ९॥

गूढार्थदीपिका—आत्मस्वरूपाला 'उखर' म्हणजे माळ जमिनीची उपमा देऊन परब्रह्मापासून जगत् उत्पन्न होणे शक्य नाही. हेच येथे सुचविले आहे.

जो प्रत्यग्बोधाचिया माथया। सोहंतेचां माध्यान्हीं आलिया। लपे आत्मभ्रांतिछाया। आपणपां तळीं॥ १०॥

अर्थ—जो सर्वान्तिर्यामी प्रत्यक्स्वरूप आत्मज्ञानरूप सूर्य माथ्यावर येऊन सोहंरूप माध्यान्हवेळ झाली असता-म्हणजे अहं ब्रह्मास्मि हा बोध दृढ झाला असता-आत्मविस्मृतिरूप भ्रांति आपल्या खालीच लोपली जाते.॥ १०॥

गूढार्थदीपिका—अमृतानुभव प्रकरण तीन, ओवी तीसमध्येहि माउलीने असेच म्हटले आहे (ना तरी माध्यान्ह काळी। छाया न दिसे वेगळी। असे पायातळी। रिगोनिया)

ते वेळी विश्वस्वप्नासहितें। कोण अन्यथामतिनिद्रेतें। सांभाळी नुरेचि जेथें। मायाराती॥ ११॥

अर्थ—तेव्हा मायाभ्रांतिरूप रात्र मुळीच उरत नाही. मग विश्वरूप स्वप्नासहित असलेल्या विपरीत ज्ञानरूप निद्रेला कोण सांभाळणार?॥ ११॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञानाने मायारूप भ्रांति नाहीशी झाली की विपरीत बुद्धि व प्रपंचभास हेहि नाहीसे होतात, असा अर्थ.

म्हणौनि अद्वयबोधपाटणीं। तेथ महानंदाची दाटणी। मग सुखानुभूतीचीं घेणीं देणीं। मंदावों लागती॥ १२॥

अर्थ—अशा त्या अद्वैतज्ञानरूप शहरात एक ब्रह्मानंदाची दाटी असते; म्हणून सुखानुभवाच्या देण्याघेण्याचा व्यवहार क्षीण होऊ लागतो॥ १२॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञानाचा अद्वैतबोध दृढ झाला असता सुखाचे भोक्तृत्व देखील स्फुरत नाही व जीव सुखाचा भोक्ता होण्यापुरता देखील निराळा राहत नाही. केवळ सुखस्वरूप होऊन जातो.

किंबहुना ऐसैसें। मुक्तकैवल्य सुदिवसें। सदा लाहिजे कां प्रकाशें। जयाचेनि॥ १३॥

अर्थ—फार काय सांगावे! ज्याच्या ज्ञानप्रकाशाने वर सांगितल्याप्रमाणे सदासर्वदा उपाधीपासून मुक्त झालेला असा केवळ एक आत्मस्वरूपच होऊन राहतो॥ १३॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञानाने उपाधिपासून खरोखर मुक्त होऊन आत्मस्वरूप झालेला ज्ञानीपुरुष पुनः कधीहि, कोणत्याहि व कशाहि प्रसंगी उपाधीशी ऐक्य पावू शकत नाही, असा अर्थ.

अपरोक्षानुभूति—

तत्त्वज्ञानोदयादूर्ध्वं प्रारब्धं नैव विद्यते। देहादीनामसत्यत्वाद्यथा स्वप्नो विबोधतः॥ ९१॥

कर्मजन्मान्तरकृतं प्रारब्धमिति कीर्तितम्। तत्तु जन्मान्तराभावात्पुंसो नैवास्ति कर्हिचित्॥ ९२॥

स्वप्नदेहो यथाऽध्यस्तस्तथैवायं हि देहकः। अध्यस्तस्य कुतो जन्म जन्माभावे हि तत्कुतः॥ ९३॥

उपादानं प्रपंचस्य मृद्भांडस्येव कथ्यते । अज्ञानं चैव वेदान्तैस्तस्मिन्नष्टे क्व विश्वता ॥ ९४ ॥
यथा रज्जुं परित्यज्य सर्पं गृण्हाति वै भ्रमात् । तद्वत्सत्यमविज्ञाय जगत्पश्यति मूढधीः ॥ ९५ ॥
रज्जुरूपे परिज्ञाते सर्पभ्रांतिर्न तिष्ठति । अधिष्ठाने तथा इति प्रपंचः शून्यतां व्रजेत् ॥ ९६ ॥
देहस्यापि प्रपंचत्वात्प्रारब्धावस्थितिः कुतः । अज्ञानिजनबोधार्थं प्रारब्धं वक्ति वैं श्रुतिः ॥ ९७ ॥

भावार्थ—ज्याप्रमाणे जाग आलेल्या माणसाचे स्वप्न शिल्लक राहत नाही, त्याप्रमाणे देहादिक सर्व केवळ भासमात्र आहेत, म्हणून खोटे असल्यामुळे आत्मज्ञान प्राप्त झाल्यानंतर प्रारब्ध शेष राहत नाही ॥ ९१ ॥ मागील जन्मात केलेले कर्म या जन्मात प्रारब्धरूप होते, असे म्हटले आहे; परंतु आत्मज्ञानविचाराने मागील जन्म, कर्म इत्यादिकांचे देखील अस्तित्वच सिद्ध होत नसल्यामुळे जीवाला खरोखर मागील जन्महि नव्हते ॥ ९२ ॥ स्वप्नातील देह जसा काल्पनिक असतो, तसाच हा देहादि काल्पनिकच आहे. अशा काल्पनिक देहाचा जन्म कसा होणार ? व जन्मच नाही तर प्रारब्ध कोठे राहणार ? ॥ ९३ ॥ म्हणूनच माती जशी मडक्याचे उपादानकारण होय, असे म्हटले जाते, त्याप्रमाणे या सर्व प्रपंचाचे अज्ञान हे उपादानकारण होय असे वेदान्तशास्त्रात सांगितले आहे. ते अज्ञान नाहीसे झाल्यावर तो प्रपंच कोठे भासणार ? ॥ ९४ ॥ ज्याप्रमाणे दोरी टाकून देऊन भ्रमाने सर्प घेतला जातो, त्याप्रमाणे अज्ञानी लोक परब्रह्म जाणत नसल्यामुळे परब्रह्माला जगद्रूपाने पाहतात ॥ ९५ ॥ ज्याप्रमाणे दोरी जाणल्यावर सर्पाभास उरत नाही, त्याप्रमाणे जगताच्या अधिष्ठानभूत परब्रह्माला जाणल्यावर जगत् शून्यस्वरूप होते ॥ ९६ ॥ देहहि प्रपंचातीलच असल्यामुळे देहच शून्यस्वरूप आहे, तर प्रारब्धाची स्थिति कोठून असणार? अज्ञान्याच्या शंकांचे निरसन करण्याकरिता श्रुतींनी ज्ञान्याच्या ठिकाणी प्रारब्ध राहते, असे सांगितले आहे; वस्तुतः नाही ॥ ९७ ॥

असे आचार्यांनीहि अपरोक्षानुभूतीत म्हटले आहे. श्रीतुकाराम महाराजहि ''संचित क्रियमाण। भक्तां प्रारब्ध नाही जाण'' या अभंगात असेच म्हणतात.

जो निजधामव्योमींचा रावो। उदैलाचि उदैजतखेंवो। फेडी पूर्वादि दिशांसि ठावो। उदयास्ताचा ॥ १४ ॥
न दिसणें दिसणेंनसीं मावळवी। दोहीं झांकिलें तें सैंघ पालवी। काय बहु बोलों ते आघवी। उखाचि आनी ॥ १५ ॥
तो अहोरात्रांचा पैलकडु। कोणें देखावा ज्ञानमार्तंडु। जो प्रकाश्येंवीण सुरवाडु। प्रकाशाचा ॥ १६ ॥
तया चित्सूर्या श्रीनिवृत्ती। आतां नमो म्हणों पुढतपुढती। जे बाधका येइजतसे स्तुती। बोलाचिया ॥ १७ ॥
देवाचें महिमान पाहोनियां। स्तुति तरी येइजे चांगावया। जरी स्तव्यबुद्धीसीं लया। जाइजे कां ॥ १८ ॥

अर्थ—जो चित्सूर्य आपणच आपल्या चिदाकाशाचा स्वामी असून ज्ञानरूपाने उदय पावताक्षणीच पूर्वादि दिशांच्या उदय-अस्तांचा ठावठिकाणहि उरू देत नाही ॥ १४ ॥ पदार्थाचे दिसणे न दिसणे हे दोन्ही नाहीसे करून पदार्थांनी झाकले गेलेले परब्रह्म सर्वत्र प्रत्ययाला आणून देतो. फार काय सांगू! ही चित्सूर्याचे होणारी पाहाट काही वेगळीच आहे ॥ १५ ॥ जो दिवस-रात्र यांचे पलीकडील तीर असून अन्य प्रकाशांनी प्रकाशला न जाता केवळ प्रकाशाचाच सुकाळ आहे, तो ज्ञानसूर्य कोणी पाहावा! ॥ १६ ॥ शब्दांनी केली जाणारी स्तुति त्याच्या स्वरूपाला बाधकच होत असल्यामुळे त्या चित्स्वरूपी श्रीनिवृत्तिनाथांना आता वारंवार नमस्कार असो, असेच मी म्हणतो ॥ १७ ॥ श्रीगुरुचा महिमा पाहून त्याची चांगली योग्य स्तुति होण्याकरिता श्रीगुरुस्तवनास योग्य व मी स्तवनकर्ता या दोन बुद्धी लयाला गेल्या पाहिजेत ॥ १८ ॥

गूढार्थदीपिका—अद्वैतस्वरूपाची, त्याहून भिन्न राहून केलेली स्तुति लटकीच होय, असा अर्थ.

जो सर्व नेणिवां जाणिजे। मौनाचिया मिठीया वानिजे। कांहींच न होनि आणिजे। आपणपयां जो ॥ १९ ॥

अर्थ—काही न जाणता ज्याला जाणावे, मौनाला मिठी मारून त्याची स्तुति करावी व जो काही एक न होऊ देता (आपण) आपल्याशी ऐक्य करतो ॥ १९ ॥

गूढार्थदीपिका—सच्चिदानंद आत्मस्वरूप सर्व विशेषणरहित असे निर्विशेष आहे, असा अर्थ.

जया तुझिया उद्देशासाठीं। पश्यंती मध्यमा पोटीं। सूनि परेसींही पाठीं। वैखरी विरे ॥ २० ॥

तया तूतें मी सेवकपणें। लेववीं बोलकेया स्तोत्राचें लेणें। हें उपसाहावेंही म्हणतां उणें। अद्वयानंदा॥ २१॥

अर्थ—ज्या तुझ्या प्राप्तीकरिता परावाणीसह पश्यंति, मध्यमा वाणीला पोटात घालून वैखरी वाणी लय पावते॥ २०॥ आपले ठिकाणी सेवकपणा घेऊन शब्दरूप स्तोत्रांचे अलंकार तुम्हाला लेववित आहे, ह्याची क्षमा करा. हे अद्वयानंद श्रीगुरुनाथा! हे म्हणणेहि आयोग्यच होणार आहे॥ २१॥

गूढार्थदीपिका—निर्विशेष आत्मस्वरूप श्रीगुरुचे ठिकाणी केलेली स्तुति अयोग्य होत असली तरी सेवकभावाने केलेल्या स्तुतीच्या योगाने ग्रंथकर्तृत्वादिकांचा अहंकार उठत नाही व क्षमायाचनेने अयोग्यता या दोषांचाहि परिहार होऊन सेवक गुरुकृपापात्र होतो.

परी रंकें अमृताचा सागरु। देखिलिया पडे उचिताचा विसरु। मग करूं धांवे पाहुणेरु। शाकांचा तया॥ २२॥
तेथ शाकुही कीर बहुत म्हणावा। तयाचा हर्षवेगुचि तो घ्यावा। उजळोनि दिव्यतेजा हातिवा। ते भक्तीचि पाहावी॥ २३॥
बाळा उचित जाणणें होये। तरी बाळपणचि कें आहे। परी साचचि येरी माये। म्हणोनि तोषे॥ २४॥
हां गा गांवरसें भरलें। पाणी पाठीं पाय देत आलें। तें गंगा काय म्हणितलें। परतें सर॥ २५॥
जी भृगूचा कैसा अपकारु। कीं तो मानूनि प्रियोपचारु। काय तोषेचिना शार्ङ्गधरु। गुरुत्वासीं॥ २६॥
की आंधारें खतेलें अंबर। जाले दिवसनाथा समोर। तेणें तयातें पऱ्हा सर। म्हणितलें काई॥ २७॥
तेवीं भेदबुद्धीचिये तुळे। घालूनि सूर्यश्लेषाचें कांटाळें। तुकलासी ते येकी वेळे। उपसाहिजो जी॥ २८॥

अर्थ—पण दरिद्री पुरुषाने अमृताचा समुद्र पाहिला असता आनंदाचे भरात त्याला योग्य सत्कार करण्याचे विसरतो मग तो त्याला शाकभाज्यांचा पाहूणचार करण्याला धावतो॥ २२॥ तेथे शाकभाज्यांचा तरी पाहुणचार पुष्कळच झाला. खरोखर ज्या आनंदाने तो पाहुणचार करतो त्या आनंदाकडेच लक्ष दिले पाहिजे. तेज:पुंज सूर्याला काडवातीने ज्या भक्तीने ओवाळले जाते त्या भक्तीकडेच पाहावे लागते॥ २३॥ योग्य काय ते लेकराला समजले असते तर त्याला लेकरू कसे म्हणता आले असते; पण त्याची आई खरोखरच जन्मदात्री असते म्हणूनच ती त्याच्या कोणत्याहि चेष्टेचा आनंदच मानते॥ २४॥ गावातील सर्व पाणी वेऊन झालेला ओघ गंगेत मिळू लागला तर, गंगा त्याला 'बाजूला हो' म्हणते काय?॥ २५॥ भृगुऋषीचा केवढा अपराध होता, पण ब्राह्मण म्हणून गुरु मानल्यामुळे त्या अपराधास प्रिय भक्ताने अर्पिलेल्या उपचारासारखे मानून भगवान संतुष्ट झाले नाहीत काय?॥ २६॥ किंवा आंधाराने व्यापलेले आकाश सूर्यासमोर झाले असता त्याने त्याला "दूर हो" असे म्हटले काय?॥ २७॥ त्याप्रमाणे भेदबुद्धीच्या तराजूने सूर्यादिकांची उपमारूप वजने टाकून तुझी तुलना केली त्या अपराधाची क्षमा करावी॥ २८॥

गूढार्थदीपिका—अभेद अशा श्रीगुरुचे ठिकाणी भेद कल्पून तुलना केली, अनुपमाला उपमा दिली, हा अपराध झाला असे माउली म्हणते.

जिहीं ध्यानाचां डोळां पाहिलासी। वेदादि वाचां वानिलासी। जें उपसाहिलें तयांसी। ते आम्हांही करीं॥ २९॥
परी मी आजि तुझ्या गुणीं। लांचावलों अपराधु न गणीं। भलतें करीं परी अर्धधणीं। नुठी कदा॥ ३०॥

अर्थ—ज्यांनी तुम्हाला ध्यानरूप डोळ्यांनी पाहिले, वेदादि शब्दांनी तुमचे वर्णन केले त्यांचे अपराध आपण जसे पोटात घातले तसे माझेहि अपराध आपण पोटात घालावे॥ २९॥ पण मी आज तुमचे गुणवर्णन करण्यात लुब्ध झालो असल्यामुळे तुम्ही तो अपराध मानू नये. आपण काही करा, पण मी अर्धपोटी उठणार नाही॥ ३०॥

मियां गीता येणें नांवें। तुझें पसायामृत सुहावें। वानूं लाधलों तें दुणेन थावें। दैवलें दैवे॥ ३१॥
माझिया सत्यवादाचें तप। वाचा केलें बहुत कल्प। तया फळांचें हें महाद्वीप। पातली प्रभु॥ ३२॥

अर्थ—गीता या नावाने असलेले जे तुझे आवडते प्रसादामृत त्याचे जे मी वर्णन करू लागलो त्या सद्भाग्याने मी दुप्पट जोराने भाग्यवान झालो॥ ३१॥ हे प्रभो! असे वाटते की माझ्या वाणीने कल्पानुकल्प सत्य बोलण्याचे जे तप केले त्याचे तिला गीतारूप अफाट बेट हे फळ प्राप्त झाले॥ ३२॥

गूढार्थदीपिका—गीतेची एवढी थोरवी आहे की कोणत्याहि रीतीने तिचा आश्रय करण्याची बुद्धि होणे हे

कल्पानुकल्प केलेल्या सत्यवादासारख्या महातपाचे फळ होय, असा माउलीच्या म्हणण्याचा भाव.

पुण्यें पोशिलीं असाधारणें। तियें तुझे गुण वानणें। देऊनि मज उत्तीर्णें। जालीं आजी॥ ३३॥

अर्थ—मी थोर थोर पुण्यकर्मे जी संपादन केली तीच आज मला तुझे गुणवर्णन करण्याचे ठिकाणी गोडी लावून देऊन माझ्या ऋणातून मुक्त झाली॥ ३३॥

गूढार्थदीपिका—निष्काम कर्माचरणाने भगवत्कृपा होऊन भगवंताच्या गुणांचे वर्णन करण्याची गोडी लागते, असा भाव.

जी जीवित्वाच्या आडवीं। आतुडलों होतों मरणगांवीं। ते अवदसाचि आघवी। फेडिली आजी॥ ३४॥
जे गीता येणें नांवें नावाणिगी। जे अविद्या जिणोनि दाटुगी। ते कीर्ती तुझी आम्हांजोगी। वानावया जाली॥ ३५॥
पैं निर्धना घरीं वानिवसे। महालक्ष्मीचि येऊनि बैसे। तयातें निर्धन ऐसें। म्हणों ये काई॥ ३६॥
कां अंधकाराचिया ठाया। दैवें सूर्यु आलिया। तो अंधारुचि जगा यया। प्रकाशु नोहे॥ ३७॥
जया देवाची पाहतां थोरी। विश्व परमाणुही दशा न धरी। तो भावाचिये सरोभरी। नव्हेचि काई॥ ३८॥
तैसा मी गीता वाखाणीं। हे खपुष्पाची तुरंबणी। परी समर्थे तुवां शिरयाणी। फेडिली ते॥ ३९॥
म्हणौनि तुझेनि प्रसादें। मी गीतापद्यें अगाधें। निरूपीन जी विशदें। ज्ञानदेवो म्हणे॥ ४०॥

अर्थ—अहो जी सद्गुरुनाथा! जीवपणाच्या अरण्यातील मरणगावात जो मी सापडलो होती ती माझी दुर्दशा आज तुम्ही नि:शेष नाहीशी केली॥ ३४॥ कारण अविद्येचा फडशा पाडून बलवान झालेली व गीता या नावाने प्रसिद्धीस आलेली तुझी अगाध कीर्ति आम्हाला वर्णन करण्याजोगी झाली आहे॥ ३५॥ दरिद्री पुरुषाचे घरी अकस्मात् महालक्ष्मी येऊन बसली तर त्याला दरिद्री म्हणता येईल काय?॥ ३६॥ अंध:काराचे ठिकाणी दैवाने सूर्य प्राप्त झाला तर आंधारच जगाला प्रकाश होणार नाही काय?॥ ३७॥ ज्या भगवंताचा महिमा लक्षात घेता हे संपूर्ण ब्रह्मांड देखील त्याच्यापुढे परमाणुएवढेहि म्हणता येणार नाही, तो परमात्मा प्रेमाधीन होऊन भक्ताचा भाव असेल तसा होत नाही काय?॥ ३८॥ त्याप्रमाणे मी गीतेचे व्याख्यान करणे म्हणजे आकाशपुष्पाचा वास घेण्यासारखे आहे. पण त्वां माझी ती हौस पुरविलीस॥ ३९॥ म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, हे सद्गुरुनाथा! गीतेची पदे अशा गंभीर अर्थाने भरलेली असली तरी मी तुमच्या कृपाप्रसादाने त्यांच्या अर्थाचे स्पष्ट निरूपण करीन॥ ४०॥

तरी अध्यायीं पंधरावां। श्रीकृष्णें तया पांडवा। शास्त्रसिद्धांतु आघवा। उगाणिला॥ ४१॥
जे वृक्षरूपक परिभाषा। केलें उपाधि रूप अशेषा। सद्वैद्यें जैसें दोषा। अंगलीना॥ ४२॥
आणि कूटस्थु जो अक्षरु। दाविला पुरुषप्रकारु। तेणें उपहिताही आकारु। चैतन्या केला॥ ४३॥
पाठीं उत्तमपुरुष। शब्दाचें करूनि मिष। दाविलें चोख। आत्मतत्त्व॥ ४४॥
आत्मविषयीं आंतुवट। साधन जें आंगदट। ज्ञान हेंही स्पष्ट। चावळला॥ ४५॥
म्हणौनि इये अध्यायीं। निरूप्य नुरेचि कांहीं। आतां गुरुशिष्यां दोहीं। स्नेहो लाहणा॥ ४६॥

अर्थ—तरी मागील पंधराव्या अध्यायात भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला वेदान्तशास्त्रातील संपूर्ण सारभूत सिद्धान्त स्पष्ट करून सांगितला॥ ४१॥ ज्याप्रमाणे चांगल्या वैद्याने शरीरात भिनलेल्या दोषांचे निदान करावे, त्याप्रमाणे भगवंताने वृक्षाच्या रूपकपरिभाषेने संपूर्ण उपाधीचे वर्णन केले॥ ४२॥ आणि पुरुषाचा प्रकार जो कूटस्थ अक्षरपुरुष त्याचे वर्णन करून मायेला आधार होणाऱ्या चैतन्यालाहि मर्यादा आहे, असे दाखविले॥ ४३॥ नंतर शब्दाच्या निमित्ताने उत्तमपुरुष हे नाव देऊन शुद्ध आत्मस्वरूप दाखविले॥ ४४॥ आणि आत्मप्राप्तीला अत्यंत जवळ असे अंतरंग साधन ज्ञान आहे हेहि भगवंताने सांगितले॥ ४५॥ म्हणून या सोळाव्या अध्यायात काही सांगावयाचे राहिले नाही, आता गुरुशिष्य या दोघांमध्ये एक प्रेम मात्र प्राप्त झाले॥ ४६॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञान झाल्यावर शिष्याचे गुरुच्या ठिकाणी कृतज्ञताबुद्धीमुळे प्रेम असते व शिष्य कृतकृत्य झाला हे पाहून गुरुचे त्याच्यावर पुत्रवत् वात्सल्यप्रेम असते.

एवं इयेविषयीं कीर। जाणते बुझावले अपार। परी मुमुक्षु इतर। साकांक्ष जाले॥ ४७॥
त्या मज पुरुषोत्तमा। ज्ञानें भेटे जो सुवर्मा। तो सर्वज्ञु तोचि सीमा। भक्तीचीही॥ ४८॥

अर्थ—याप्रमाणे या सिद्धान्ताविषयी जाणत्यांचे खरोखर पूर्ण समाधान झाले, पण इतर मुमुक्षु जे होते त्यांना मात्र आणखी ऐकण्याची इच्छा उत्पन्न झाली॥ ४७॥ जो ज्ञानाने मज पुरुषोत्तमाला प्राप्त होतो तोच, हे उत्तम क्षत्रिया अर्जुना! सर्वज्ञ-म्हणजे ज्यांनी सर्व जाणले, आता काही जाणावयाचे राहिले नाही असा-होय व तोच भक्तीची पराकाष्ठा होय॥ ४८॥

गूढार्थदीपिका—अन्वयपूर्ण ज्ञान्याचे सगुण श्रीहरीवर आत्मवत् प्रेम जडते, म्हणून येथे त्या ज्ञान्याला भक्तीची सीमा म्हटले आहे. याचे विवरण आम्ही मागे पंधराव्या अध्यायाच्या शेवटी ओवी ५६८ वरील गूढार्थदीपिकेत केले आहे.

ऐसें हें त्रैलोक्यनायकें। बोलिलें अध्यायान्त श्लोकें। तेथें ज्ञानचि बहुतेकें। वानिलें तोषें॥ ४९॥
भरूनि प्रपंचाचा घोंटु। कीजे देखताचि देखतयां दृष्टु। आनंदसाम्राज्यीं पाट। बांधिजे जीवा॥ ५०॥
येवढेया लाठेपणाचा उपावो। आनु नाहींचि म्हणे देवो। हा सम्यग्ज्ञानाचा रावो। उपायांमाजीं॥ ५१॥
ऐसे आत्मजिज्ञासु जे होते। तिहीं तोषलेनि चित्तें। आदरें तया ज्ञानातें। वोवाळिलें जीवें॥ ५२॥
आतां आवडी जेथ पडे। तयाचि अवसरीं पुढें पुढें। रिगों लागे हें घडे। प्रेम ऐसें॥ ५३॥
म्हणौनि जिज्ञासूंच्या पैकीं। ज्ञानीं प्रतीती होय ना जंव निकी। तंव योगक्षेमु ज्ञानविखीं। स्फुरेलचि कीं॥ ५४॥
म्हणोनि तेंचि सम्यग्ज्ञान। कैसेनि होय स्वाधीन। जालिया वृद्धियत्न। घडेल केवीं॥ ५५॥

अर्थ—असे जे त्रैलोक्याचे स्वामी भगवान श्रीकृष्ण यांनी मागील अध्यायाच्या शेवटील श्लोकाने विशेषत: ज्ञानाचे महत्व संतोषाने वर्णन केले॥ ४९॥ प्रपंचाचे मूळ अस्तित्व नाहीसे करून, पाहणाराच आपल्याला पाहतो आणि जीवाला आनंदसाम्राज्यावर पट्टाभिषेक होतो॥ ५०॥ श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना! एवढा सामर्थ्यवान उपाय ज्ञानावाचून दुसरा नाही; म्हणून ह्या यथार्थ ज्ञानोपायाला सर्व उपायांचा राजा म्हणतात॥ ५१॥ असे जे आत्मजिज्ञासू होते त्यांनी हे उत्तर ऐकून संतुष्ट चित्ताने त्या ज्ञानाविषयी अत्यंत आदर दाखविण्याकरिता त्यावरून आपला जीवभाव ओवाळून टाकला॥ ५२॥ ज्या पदार्थाची आवडी मनात उत्पन्न होते त्या पदार्थाविषयी शंका मनाच्या पुढे पुढे येत असतात. प्रेमामुळेच असे घडत असते॥ ५३॥ म्हणून मुमुक्षुपैकी काहींच्या ठिकाणी जोपर्यंत ज्ञानाचा दृढ अनुभव येत नाही तोपर्यंत ज्ञानाची प्राप्ति कशी करून घ्यावयाची व प्राप्त झाल्यावर त्याचे संरक्षण कसे करावे, ही शंका उत्पन्न होणार!॥ ५४॥ म्हणून ते यथार्थज्ञान कोणत्या उपायाने प्राप्त होईल व प्राप्त झाल्यावर ते वृद्धिंगत म्हणजे व्यापक होऊन दृढ कसे होईल॥ ५५॥

कां उपजोंचि जें न लाहे। जें उपजलेंही अव्हांटा सूये। तें ज्ञानीं विरुद्ध काय आहे। हें जाणावें कीं॥ ५६॥
मग जाणतया जें विरू। तयाची वाट वाहती करूं। ज्ञाना हित तेंचि विचारूं। सर्वभावें॥ ५७॥
ऐसा जिज्ञासु तुम्हीं समस्तीं। भावो जो धरिला असे चित्तीं। तो पुरवावया लक्ष्मीपती। बोलिजेल॥ ५८॥

अर्थ—किंवा ज्या (प्रतिबंधामुळे) आत्मज्ञान होऊ शकत नाही व उत्पन्न झाले तर भलत्या वाटेने निघून जाते, असे ज्ञानाच्या विरुद्ध काय आहे, हे जाणले पाहिजे ना!॥ ५६॥ मग ज्ञान्याच्या विरुद्ध जे प्रतिबंध असतील ते दूर करून ज्ञानाची वाट वाहती (सर्वांना जाता येण्याजोगी मोकळी) करू व ज्ञानाला हितकर काय जे असेल त्याचाच सर्व भावाने विचार करू॥ ५७॥ तुम्ही ज्ञानजिज्ञासूंनी असा जो भाव अंत:करणात धरून ठेवला तो तुमचा मनोरथ जेणे करून पूर्ण होईल असे भगवान लक्ष्मीपति (या अध्यायात) बोलतील॥ ५८॥

ज्ञानांसि सुजन्म जोडे। आपली विश्रांतिही वरी वाढे। ते संपत्तीचे पवाडे। सांगिजेल दैवी॥ ५९॥
आणि ज्ञानाचेनि कामाकारें। जे रागद्वेषांसि दे थारे। तिये आसुरियेहि घोरे। करील रूप॥ ६०॥
सहज इष्टानिष्टकरणी। दोघीचि इया कवतुकिणी। हे नवमाध्यायीं उभारणी। केली होती॥ ६१॥

तेथ साउमा घेयावा उवावो। तंव वोडवला आन प्रस्तावो। तरी तयां प्रसंगें आतां देवो। निरूपीत असे॥ ६२॥
या निरूपणाचेनि नांवें। अध्याय पद सोळावें। लावणी पाहतां जाणावें। मागिलावरी॥ ६३॥
परी हें असो आतां प्रस्तुतीं। ज्ञानाच्या हिताहितीं। समर्था संपत्ती। इयाचि दोन्ही॥ ६४॥
जे मुमुक्षुमार्गींची बोळावी। जे मोहरात्रीची धर्मदिवी। ते आधी तंव दैवी। संपत्ती ऐका॥ ६५॥
जेथ एक एकातें पोखी। ऐसे बहुत पदार्थ येकीं। संपादिजती ते लोकीं। संपत्ति म्हणिजे॥ ६६॥
ते दैवी सुख संभवी। तेथ दैवगुणे येकोपजीवी। जाली म्हणौनि दैवी। संपत्ति हे॥ ६७॥

अर्थ—ज्याच्या योगाने आत्मज्ञान सुलभ व उत्तम रीतीने अंत:करणात प्रगट होईल व आणखी चित्ताची पूर्ण शांती होईल त्या दैवी संपत्तीची महति भगवान सांगतील॥ ५९॥ तसेच जी संपत्ति अज्ञानामुळे उत्पन्न होणाऱ्या विषयवासनेच्या रूपाने रागद्वेषाला आश्रय देते, त्या अत्यंत घोर आसुरी संपत्तीचे स्वरूप वर्णन करतील॥ ६०॥ ह्या दोन संपत्तीच इष्ट म्हणजे कल्याण व अनिष्ट म्हणजे अकल्याण करण्याचे कौतुक करून दाखविणाऱ्या आहेत, असा मागे नवव्या अध्यायात उपक्रम करण्यात आला होता॥ ६१॥ (त्यांचा) साक्षात् तेथेच सविस्तर विचार करायचा; पण मध्ये निराळा प्रसंग उद्भवल्यामुळे तो तेथे करता आला नाही. आता भगवान येथे प्रसंगाने त्याचा उलगडा करतात॥ ६२॥ त्या दोन संपत्तीच्या निरूपणाचे नाव म्हणजे सोळावा अध्याय होय. या अध्यायाची मांडणी पाहता मागील पंधराव्या अध्यायावरच ती झाली आहे, असे जाणावे॥ ६३॥ आता हे पुरे. प्रस्तुत सांगण्याचे तात्पर्य इतकेच की ज्ञानाचे हित व अहित करण्यास अनुक्रमे ह्या दोन संपत्तिच समर्थ आहेत॥ ६४॥ जी संपत्ति संसारातून मुक्त होऊ इच्छिणाऱ्यांना परमार्थ मार्गाने शेवटपर्यंत पोहोचविते व जी अज्ञानअंधकारात मार्ग दाखविणारी धर्मरूप दिवटी आहे, अशा त्या दैवी संपत्तीचे अगोदर वर्णन ऐका॥ ६५॥ जेथे जेव्हा एक दुसऱ्याला पोषण करणारे असे अनेक पदार्थ ज्या एका वस्तूने संपादन केले जातात, तेव्हा त्या एका वस्तुला जगात संपत्ति म्हणतात॥ ६६॥ ती देवाच्या ठिकाणी असणारी म्हणून सुख देणारी व देवाच्या ठिकाणी असणाऱ्या एका सत्वगुणाचाच आश्रय धरून राहणारी म्हणून तिला दैवी संपत्ति म्हणतात॥ ६७॥

श्रीभगवानुवाच

अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः। दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम्॥ १॥

अर्थ—श्रीभगवान म्हणतात, अभय (भीति सोडणे), चित्तशुद्धि, ज्ञान व योगाचे ठिकाणी तत्परता, दान, दम (इंद्रियनिग्रह), यज्ञ (यागादि), स्वाध्याय (वेदशास्त्रादि अध्ययन), तप, आर्जव (मनाचा सरळपणा)॥ १॥

आतां तयाचि दैवगुणां-। माजीं धुरेचा बैसणा। बैसे तया आकर्णा। अभय ऐसें॥ ६८॥
तरी न घालूनि महापुरीं। न घेपे बुडणयाची शियारी। कां रोगु न गणिजे घरीं। पथ्याचिया॥ ६९॥
तैसा कर्माकर्माचिया मोहरा। उठूं नेदूनि अहंकारा। संसाराचा दरारा। सांडणें येणें॥ ७०॥
अथवा ऐक्यभावाचेनि पैसें। दुजे मानूनि आत्मा ऐसें। भयवार्ता देशें। दवडणें जे॥ ७१॥
पाणी बुडवूं ये मिठातें। तंव मीठचि पाणी आतें। तेवीं आपण जालेनि अद्वैतें। नाशे भय॥ ७२॥
अगा अभय येणें नांवें। बोलिजे तें हें जाणावें। सम्यग्ज्ञानाचें आघवें। धांवणें हें॥ ७३॥

अर्थ—आता या दैवी सात्विक गुणांमध्ये ज्याला अग्रसरत्वाचा मान दिला आहे व ज्याला अभय म्हणतात, त्याचे लक्षण ऐका॥ ६८॥ जसे पुरांत उडी घेतली नाही तर, बुडण्याची भीति राहत नाही किंवा पथ्याने वागणाऱ्याला रोगाची भीति नसते॥ ६९॥ त्याप्रमाणे पापपुण्यकर्म करण्याकरिता अहंकार उठू न देऊन त्यामुळे कर्माकर्माने प्राप्त होणाऱ्या संसाराचे भय सोडून देणे॥ ७०॥ अथवा सर्वत्र आपला एकात्मभाव जाणून आत्म्याला भिन्न मानल्याने उत्पन्न होणारे भय नाहीसे करणे॥ ७१॥ जेव्हा पाणी मिठाला बुडवू पाहते तेव्हा मीठच पाणी होऊन जाते, त्याप्रमाणे आपणच अद्वैतरूप झाले असता भयच नाहीसे होते॥ ७२॥ अर्जुना! अभय या नावाने जे बोलले जाते ते हे होय असे जाण. हा संपूर्ण यथार्थज्ञानाचा रक्षकच होय॥ ७३॥

गूढार्थदीपिका—अभय ज्याला प्राप्त झाले त्याला यथार्थज्ञान प्राप्त होतेच असे समजावे.

आतां सत्त्वशुद्धी जे म्हणिजे। ते ऐशा चिन्हीं जाणिजे। तरी जळे ना विझे। राखोंडीं जैसी॥ ७४॥
कां पाडिवा वाढी न मगे। अंवसे तुटी सांडूनि मागें। माजीं अतिसूक्ष्म अंगें। चंद्र जैसा राहे॥ ७५॥
नातरी वार्षिया सांडिली। ग्रीष्में नाहीं मांडिली। माजीं निजरूपें निवडली। गंगा जैसी॥ ७६॥
तैसी संकल्पविकल्पाची वोढी। सांडूनि रजतमाची कावडी। भोगितां निजधर्माची आवडी। बुद्धी उरे॥ ७७॥
इंद्रियवर्गें दाखविलिया। विरुद्धा अथवा भलीया। विस्मयो कांहीं केलिया। नुठी चित्तीं॥ ७८॥
गांवा गेलिया वल्लभु। पतिव्रतेचा विरहक्षोभु। भलतेसणी हानिलाभु। न मनी जेवीं॥ ७९॥
तेवीं सत्स्वरूप रुचलेपणें। बुद्धी जें ऐसें अनन्य होणें। ते सत्त्वशुद्धी म्हणे। केशिहंता॥ ८०॥

अर्थ—आता जिला सत्वशुद्धि म्हणजे अंत:करणशुद्धि म्हणतात ती या लक्षणाने जाण. ज्याप्रमाणे राख जळत नाही व विझत नाही किंवा ज्याप्रमाणे अमावस्येला झालेला कलेचा क्षय मागे टाकून देऊन प्रतिपदेला होणारी कलेची वाढ दिसत नाही तरी मध्ये चंद्र जसा अत्यंत सूक्ष्म असतो॥ ७४-७५॥ किंवा वर्षाऋतूने सोडली असता (वर्षाऋतु संपल्यानंतर) व ग्रीष्मऋतूने बर्फ वितळून गंगेच्या प्रवाहाला पुरवठा केला नसता मध्ये (शरद, हेमंत इत्यादि चार ऋतुमध्ये) ती जशी निव्वळ आपल्या स्वरूपाने राहते॥ ७६॥ त्याप्रमाणे संकल्पविकल्पाची ओढ व रजतमगुणाचे ओझे टाकून बुद्धि केवळ आपल्या सत्पक्षपाती धर्माची आवड धरून राहते॥ ७७॥ इंद्रियाच्या समुदायाने चित्ताला अपायकारक किंवा हितकर असे काहीहि दाखविले तरी नवल असे कधी वाटत नाही॥ ७८॥ प्रिय पति गावास गेल्यामुळे त्याच्या विरहाने व्याकुल झालेली पतिव्रता स्त्री ज्याप्रमाणे वाटेल तसे नुकसान किंवा लाभ झाला तरी त्याला ती जुमानित नाही॥ ७९॥ त्याप्रमाणे सद्ब्रह्मस्वरूपाची आवड उत्पन्न होऊन चित्ताचे एक त्याचेच ठिकाणी पतिव्रतेसारखे अनन्य होणे, ही चित्तशुद्धि होय, असे केशिदैत्याला मारणारे श्रीकृष्ण म्हणतात॥ ८०॥

आतां आत्मलाभाविखीं। ज्ञानयोगामाजीं एकीं। जे आपुलिया ठाकीं। हांवे भरे॥ ८१॥
तेथ सगळिये चित्तवृत्ती। त्याग करणें ऐशा रीती। निष्कामें पूर्णाहुती। हुताशीं जैसी॥ ८२॥
कां सुकुळीनें आपुली। आत्मजा सत्कुळींचि दिधली। हें असो लक्ष्मी स्थिरावली। मुकुंदीं जैसी॥ ८३॥
तैसेनि निर्विकल्पपणें। जें योगज्ञानींच या वृत्तिक होणें। तो तिजा गुण म्हणे। श्रीकृष्णनाथ॥ ८४॥
आतां देहवाचाचित्तें। यथासंपन्नें वित्तें। वैरी जालियाही आर्तातें। न वंचणें जें कां॥ ८५॥
फुली फळी छाया। मूळीं पत्री ही धनंजया। वाटेचा न चुके आलिया। वृक्ष जैसा॥ ८६॥
तैसें मनौनि धनवरी। विद्यमानें आल्या अवसरीं। श्रांतांचिये मनोहारीं। उपयोगा जाणें॥ ८७॥
तया नांव जाण दान। जें मोक्षनिधानाचें अंजन। हें असो ऐक चिन्ह। दमाचें तें॥ ८८॥

अर्थ—आत्मलाभ करून घेण्याकरिता ज्ञान व योग या दोहो मार्गापैकी जो मार्ग आपल्या अधिकारानुसार असेल व करण्याची इच्छा असेल त्या मार्गाकरिता जशी अग्निमध्ये पूर्णाहूति टाकावी त्याप्रमाणे निष्काम चित्ताने सर्व वृत्तींचा त्याग करणे॥ ८१-८२॥ किंवा ज्याप्रमाणे उत्तम कुलवंताने आपली कन्या कुलीन घराण्यातच दिली किंवा लक्ष्मी भगवंताचे ठिकाणी स्थिर झाली॥ ८३॥ त्याप्रमाणे विकल्परहित चित्ताने योग अथवा ज्ञान या मार्गाच्या ठिकाणी अंत:करण लावणे, हा दैवी संपत्तीतील तिसरा गुण होय, असे भगवान म्हणतात॥ ८४॥ आपला शत्रु असला तरी संकटात सापडला असता कायावाचामनाने व यथाप्राप्त संपत्तीने त्याच्याशी प्रतारणा न करणे॥ ८५॥ ज्याप्रमाणे मार्गावर असलेला वृक्ष फूल, फळ, छाया, मूळ, पान यापैकी अर्जुना! जे लागेल ते आलेल्या वाटसरूला देण्याला चुकत नाही॥ ८६॥ त्याप्रमाणे, आलेल्या दु:खितांच्या मनाचे समाधान होईल, अशा रीतीने प्राप्त असलेल्या तन-मन-धनाने त्याच्या उपयोगी पडणे॥ ८७॥ त्याला दान म्हणतात, असे जाण. जे मोक्षरूप संपत्ति दाखविणारे अंजनच होय. हे असो आता दमाचे चिन्ह ऐक॥ ८८॥

तरी विषयेंद्रिय मिळणी। करूनि घापे वितुटणी। जैसें तोडिजे गढूळ पाणी। पारकेया॥ ८९॥

तैसा विषयजातांचा वारा। वाजों नेदिजे इंद्रियद्वारां। इयें बांधोनि प्रत्याहारा। हातीं वोपी॥ ९०॥
आंतुला चित्ताचे अंगवरीं। प्रवृत्ति पेलोनि माघारी। आगी सुयिजे दाहींही द्वारीं। वैराग्याची॥ ९१॥
श्वासोच्छ्वासाहुनी बहुवसें। व्रतें आचरें खरपुसें। वोसंतितां रात्रिदिवसें। नाराणुक जया॥ ९२॥
पैं दमु ऐसें म्हणिपे। तो हा जाण स्वरूपें। यज्ञार्थहि संक्षेपें। सांगो ऐक॥ ९३॥

अर्थ—ज्याप्रमाणे शुद्ध करणारे निवळीचे बी वगैरे पदार्थ गढूळपणा व पाणी यांचा संबंध तोडतात, त्याप्रमाणे विषय व इंद्रिये यांचा जो संबंधच होऊ देत नाही॥ ८९॥ याप्रमाणे विषयाचा वारा इंद्रियांच्या द्वारांना लागू न देता त्याना एकत्र बांधून जो प्रत्याहाराच्या हाती देतो॥ ९०॥ शरीरापर्यंत असलेल्या कर्माच्या प्रवृत्तीला आत चित्तापर्यंत माघार घ्यायला लावून दाहाहि इंद्रियांच्या द्वारात वैराग्याचा अग्नि पेटवावा॥ ९१॥ श्वासोच्छ्वासाहून पुष्कळ व कडक अशा व्रतांचे रात्रंदिवस आचरण करण्याने ज्याला क्षणभर देखील उसंत मिळत नाही॥ ९२॥ ज्याला दम म्हणतात, तो अशा स्वरूपाचा आहे, असे जाण. आता यज्ञाचा योग्य अर्थ संक्षेपाने सांगतो, तोहि ऐक॥ ९३॥

तरी ब्राह्मण करूनि धुरे। स्त्रियादिक पैल मेरे। माझारीं अधिकारें। आपुलालेनि॥ ९४॥
जया जे सर्वोत्तम। भजनीय देवताधर्म। तें तेणें यथागम-। विधी यजिजे॥ ९५॥
जैसा द्विज षट्कर्मे करी। शूद्र तयातें नमस्कारी। कीं दोहींसिही सरोभरी। निपजे यागु॥ ९६॥
तैसें अधिकारपर्यालोचें। हें यज्ञ करणें सर्वांचें। परी विष फळाशेचें। न घापे माजीं॥ ९७॥
आणि मी कर्ता ऐसा भावो। नेदिजे देहाचेनि द्वारें जावों। ना वेदाज्ञेसि तरी ठावो। होइजे स्वयें॥ ९८॥
अर्जुना एवं यज्ञ। सर्वत्र जाण साज्ञ। कैवल्यमार्गींचा अभिज्ञ। सांगाती हा॥ ९९॥

अर्थ—प्रथम ब्राह्मणापासून सुरू करून स्त्री शूद्रापर्यंत मध्ये त्यांच्या त्यांच्या अधिकारानुसार देवतेला उद्देशून ज्याला जे आचारधर्म उत्तम म्हणून सांगितले असतील त्याचे त्यांनी शास्त्रानुसार आचरण करावे॥ ९४-९५॥ उदाहरणार्थ ज्याप्रमाणे ब्राह्मण, शास्त्रानुसार अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान व प्रतिग्रह ही सहा कर्मे करतो व शूद्र ब्राह्मणाला नुसता नमस्कार करतो. पण दोघांनाहि सारखाच यज्ञ घडतो॥ ९६॥ कोणाचा कसा अधिकार आहे, हे पाहून शास्त्राने सर्वांना यज्ञ करायला सांगितले आहे, पण ते यज्ञकर्म करताना कोणत्याहि प्रकारच्या फलाची इच्छा असता कामा नये॥ ९७॥ आणि तसेच देहाला धरून, मी कर्ता आहे, असा कर्तृत्वाहंकार उत्पन्न होऊ देऊ नये. सारांश आपण वेदाज्ञेला केवळ आश्रय होऊन राहावे॥ ९८॥ अर्जुना! याप्रमाणे यज्ञ हा अज्ञानापासून जाणत्यापर्यंत सर्वांना विहित असून तो मोक्षमार्गाचा जाणता सोबती आहे॥ ९९॥

गूढार्थदीपिका—अशा रीतीने होणारे यज्ञकर्म रागद्वेषरहित शुद्ध चित्ताने व निष्काम होत असल्यामुळे परमेश्वरप्राप्तीला अचूक साधक होते, असा अर्थ.

आतां चेंडुवें भूमी हाणिजे। हें नव्हे तो हाता आणिजे। कीं शेतीं बीं विखुरिजे। परी पिकीं लक्ष॥ १००॥
ना तरी ठेविलें देखावया। आदर कीजे दिविया। कां शाखा फळें यावया। सिंपिजे मूळ॥ १०१॥
हें बहु असो आरिसा। आपणपें देखावया जैसा। पुढतपुढती बहुवसा। उटिजे प्रीती॥ १०२॥
तैसा प्रतिपाद्य जो ईश्वरु। तो होआवयालागीं गोचरु। श्रुतीचा निरंतरु। अभ्यासु करणें॥ १०३॥
तें द्विजांसीच ब्रह्मसूत्र। येरां स्तोत्र कां नाममंत्र। आवर्तणें पवित्र। पावावया तत्त्व॥ १०४॥

अर्थ—जसे भूमीवर चेंडूचे आपटणे तो हातात घेण्याकरिता असते किंवा पिकाकडे लक्ष देऊन शेतीत धान्य पेरले जाते॥ १००॥ किंवा आंधारात ठेवेलेले पाहण्याकरिताच आपण दिवा हाती घेतो अथवा झाडाच्या फांद्याना फळे यावी या आशेने मूळाला पाणी देतो॥ १०१॥ हा विस्तार असो. आपण आपल्याला पाहण्याकरिताच, ज्याप्रमाणे वारंवार आरसा प्रेमाने स्वच्छ उटतो॥ १०२॥ त्याप्रमाणे वेदांनी प्रतिपादिलेल्या ईश्वराचा साक्षात्कार होण्याकरिता श्रुतीचा नेहमी जो अभ्यास करावा लागतो, तो उपनिषदाचा व ब्रह्मसूत्राचा अभ्यास ब्राह्मणासच करण्याचा अधिकार

सांगितला आहे व इतर शूद्रादिकांना परतत्त्व प्राप्त होण्याकरिता भगवंताचे स्तोत्र किंवा नाममंत्र यांची आवर्तणे करणे हे विहित केले आहे॥१०३-१०४॥

गूढार्थदीपिका—द्विजांसीच ब्रह्मसूत्र। येथे ''द्विजांसीच ब्रह्मसूत्र'' या पदाने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांनाच केवळ वैदिक ब्रह्मसूत्राचा विचार करण्याचा अधिकार आहे, एवढेच सांगितले आहे, स्तोत्रनाममंत्राचा अधिकार नाही, असे सांगितले नाही उलट.

ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः स्त्रियश्शूद्रांत्यजादयः। यत्रतत्रानुकुर्वन्ति विष्णोर्नामानुकीर्तनम्॥ (भविष्य पुराण)

''ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, स्त्रिया, शूद्र, अंत्यज हे सर्व जेथे कोठे भगवंताचे नामसंकीर्तन करतील'', असे भविष्यादि पुराणातून सांगितले असल्यामुळे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन वर्णानाहि भगवंताचे स्तोत्र, नामसंकीर्तन इत्यादिकांचे ठिकाणी अधिकार आहे, हे उघड आहे.

येरां स्तोत्र कां नाममंत्र—या पदाने शूद्रांना केवळ स्तोत्र व नाममंत्राचाच अधिकार आहे, असे जाणावे.

पार्था गा स्वाध्यावो। बोलिजे तो हा म्हणे देवो। आतां तप शब्दाभिप्रावो। आईक सांगों॥ १०५॥

अर्थ—अर्जुना! ज्याला स्वाध्याय म्हणतात, तो हा होय, असे देव म्हणतात. आता 'तप' शब्दाचा अभिप्राय सांगतो, ऐक॥ १०५॥

तरी दानें सर्वस्व देणें। वेंचणें तें व्यर्थ करणें। जैसे फळोनि स्वयें सुकणें। औषधीचें जेवीं॥ १०६॥
नाना धूपाचा अग्निप्रवेशु। कनकीं तुकाचा नाशु। कां पितृपक्षु पोषितां ऱ्हासु। चंद्राचा जैसा॥ १०७॥
तैसा स्वरूपाचिया प्रसरा-। लागीं प्राणेंद्रियशरीरां। आटणी करणें जें वीरा। तेंचि तप॥ १०८॥
अथवा अनारिसें। तपाचें रूप जरी असे। तरी जाण जेवीं दुधीं हंसें। सूदली चांचू॥ १०९॥
तैसें देहजीवाचिये मिळणी। जो उदयजत सूये पाणी। तो विवेक अंतःकरणीं। जागवी जो॥ ११०॥
पाहतां आत्मयाकडे। परी बुद्धीचा पैस सांकडे। सनिद्र स्वप्न बुडे। जागणीं जैसें॥ १११॥
तैसा आत्मपर्यालोचु। प्रवर्ते जो साचु। तपाचा हा निर्वेचु। धनुर्धरा॥ ११२॥

अर्थ—ज्याप्रमाणे औषधि मूळ, त्वचा, पाने, फूल इत्यादिकांनी समृद्ध होऊन परार्थच जगतात व शेवटी सुकतात, त्याप्रमाणे दानाने सर्वस्व देऊन टाकून स्वशरीर सुखार्थ खर्च करण्याकरिता काही शिल्लक न ठेवणे॥ १०६॥ किंवा ज्याप्रमाणे अग्नीत टाकलेला धूप नाश पावतो, सोने शुद्ध करण्यात त्याचे वजन कमी होते, कृष्णपक्ष वाढण्यात चंद्र कले-कलेने कमी होत जातो॥ १०७॥ त्याप्रमाणे अद्वैत परब्रह्माची प्राप्ती होण्याकरिता शरीर, इंद्रिये, प्राण यांचे शोषण करणे, याला, अर्जुन! तप म्हणतात॥ १०८॥ अथवा तपाचे निराळे लक्षण केले तरी ते हंसाने पाणीमिश्रित दुधात आपली चोच घालावी (तसे आहे)॥ १०९॥ त्याप्रमाणे देहजीवाचे ऐक्यात जो उत्पन्न होताच हात घालतो (वेगळे करतो) तो विवेक अंतःकरणात अखंड जागा ठेवतो॥ ११०॥ ज्याप्रमाणे जाग आल्याबरोबर झोपेसहित स्वप्न नाहीसे होते, त्याप्रमाणे आत्मसाक्षात्कार झाला की बुद्धीचा पसारा आटला जातो॥ १११॥ अर्जुना! असा जो खरा आत्मविचार प्रवृत्त होतो हाच 'तप' शब्दाच्या अर्थाचा निर्णय आहे॥ ११२॥

आतां बाळाच्या हितीं स्तन्य। जैसें नानाभूतीं चैतन्य। तैसें प्राणिमात्रीं सौजन्य। आर्जव तें॥ ११३॥

अर्थ—ज्याप्रमाणे आईच्या स्तनातील दूध बाळाच्या पोषणकरिताच असते किंवा भूतमात्रांच्या ठिकाणी चैतन्य असते, त्याप्रमाणे प्राणिमात्रांशी सरळ निष्कपट वागणे याला आर्जव म्हणतात॥ ११३॥

अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम्। दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम्॥ २॥

अर्थ—कोणालाहि काया-वाचा-मनाने दुःख न देणे, प्रिय व जसे पाहिले किंवा ऐकले असेल तसेच बोलणे, क्रोध न करणे, त्याग (वस्तुवरील ममता सोडणे), अंतःकरणात विकार न उठणे, कोणाचा द्रोह न करणे प्राणिमात्रांवर दया करणे, विषय सन्निध असता चित्त विकारी न होणे, अंतःकरणाचा कोमलपणा, निंद्यकर्माची लाज वाटणे व चित्ताची स्थिरता॥ २॥

आणि जगाचिया सुखोद्देशें। शरीरें वाचा मानसें। राहाटणें तें अहिंसें। रूप जाण॥ ११४॥

अर्थ—काया-वाचा-मनाने प्राणिमात्रांच्या सुखाकरिता व्यापार करणे ते अहिंसेचे स्वरूप होय, असे जाण॥ ११४॥

आतां तीख होऊनि मवाळ। जैसें जातीचें मुकुळ। कां तेज परी शीतळ। शशांकाचें॥ ११५॥
शके दावितांचि रोगु फेडूं। आणि जिभे तरी नव्हे कडु। तें वोखदु नाहीं मा घडु। उपमा कैंची॥ ११६॥
तरी मऊपणें बुबुळें। झगडतांही परी नाडळे। एऱ्हवीं फोडी कोराळें। पाणी जैसें॥ ११७॥
तैसें तोडावया संदेह। तीख जैसें कां लोह। श्राव्यत्वें तरी माधुर्य। पायीं घाली॥ ११८॥
एकों ठाता कौतुकें। कानातेंचि निघती मुखें। जें साचारिवेचेनि बिकें। ब्रह्महीं भेदी॥ ११९॥
किंबहुना प्रियपणें। कोणातेंही झकवूं नेणें। यथार्थ तरी खुपणें। नाहीं कवणा॥ १२०॥
एऱ्हवीं गोरी कीर काना गोड। परी साचाचा पाखाळीं कीड। आगीचें करणें उघड। परी जळों तें साच॥ १२१॥
कानीं लागतां महुर। अर्थे विभांडी जिव्हार। तें वाचा नव्हे सुंदर। लांवचि पां॥ १२२॥
परी अहितीं कोपोनि सोप। लालनीं मऊ जैसें पुष्प। तिये मातेचें स्वरूप। जैसें कां होय॥ १२३॥
तैसें श्रवणसुख चतुर। परीणमोनि साचार। बोलणें जें अविकार। तें सत्य येथें॥ १२४॥

अर्थ—ज्याप्रमाणे जाईच्या फुलाची कळी अणीदार असूनहि कोमल असते किंवा चंद्राचा प्रकाश तेजस्वी असूनहि थंड असतो॥ ११५॥ दाखविताक्षणीच रोग नाहीसा करू शकेल व तोंडाला कडू लागणार नाही असे औषधच नाही, तेव्हा त्याची उपमा कशी देता येईल?॥ ११६॥ तरी पाणी मऊपणामुळे डोळ्याच्या बुबुळास लागले तरी व्यथा करीत नाही. एऱ्हवी तेच पर्वताचे कडे फोडित असते॥ ११७॥ त्याप्रमाणे पाजविलेल्या तीक्ष्ण लोखंडाच्या शस्त्राप्रमाणे जे बोलणे संशयनिवृत्ति करते, पण ऐकण्यास अत्यंत गोड वाटते॥ ११८॥ जे बोलणे सहजासहजी ऐकण्यास मिळाले असता कानाला मुखे निघतात म्हणजे ऐकावेसे वाटते आणि परब्रह्माचा भेद करील इतके ते सत्याला धरून असते॥ ११९॥ फार काय सांगावे! ते बोलणे मधुरपणामुळे कोणालाहि फसवू जाणत नाही व सत्यत्वपणामुळे कोणाच्याहि वर्मी लागत नाही॥ १२०॥ एऱ्हवी व्याधाचे गाणे कानाला गोड लागते, पण त्या सत्याच्या शुद्धतेत हीणकटपणा असतो. नाश करणे हे अग्नीचे कार्य उघडच आहे, पण आग लागो अशा सत्याला॥ १२१॥ जे बोलणे कानाला गोड लागते, पण त्याचा अर्थ काळजाला छिद्र पाडते, हे बोलणे नव्हे. ती सुंदर दिसणारी जखीणच होय॥ १२२॥ अहित होऊ नये म्हणून लटकीच रागावते व लाड करण्यात जी फुलासारखी मऊ असते, असे मातेच्या स्वरूपाप्रमाणे ऐकताना सुख देण्यात चतुर, परिणामी सत्य होणारे व निर्विकार असे जे बोलणे त्याला सत्य म्हणावे॥ १२३-१२४॥

आतां घालितांही पाणी। पाषाणी न निघे आणी। कां मथिलिया लोणी। कांजी नेदी॥ १२५॥
त्वचा पायें शिरीं। हालेयाही फडे न करी। वसंतींहीं अंबरीं। न होती फुले॥ १२६॥
नाना रंभेचेनिही रूपें। शुकीं नुठिजेचि कंदर्पे। कां भस्मीं वन्हि न उद्दीपे। घृतेंही जेवीं॥ १२७॥
तेवींचि कुमारु क्रोधें भरे। तैसिया मंत्राचीं बीजाक्षरें। तियें निमित्त तेही अपारें। मीनलिया॥ १२८॥
पैं धातयाही पायां पडतां। नुठी गतायु पांडुसुता। तैसी नुपजे उपजवितां। क्रोधोर्मी गा॥ १२९॥
अक्रोधत्व ऐसें। नांव तें ये दशे। जाण ऐसें श्रीनिवासें। म्हणितलें तया॥ १३०॥

अर्थ—आता दगडावर कितीहि पाणी घातले तरी त्याला अंकुर फुटणार नाही किंवा कितीहि मंथन केले तरी कांजीतून लोणी निघत नाही॥ १२५॥ सर्पाने टाकलेल्या कातेवर पाय दिला तरी ती फणा उभारत नाही. वसंत-ऋतूतहि आकाशाला फुले येत नाहीत॥ १२६॥ किंवा रंभेसारखे सुंदर रूप पुढे आले तरी श्रीशुकाचार्यांच्या ठिकाणी काम उत्पन्न होत नाही किंवा राखेत तूप टाकूनहि अग्नि पेटायचा नाही॥ १२७॥ अर्जुना! ज्याप्रमणे आयुष्य सरले असता ब्रह्मदेवाच्या पाया पडूनहि मेलेला मनुष्य जिवंत होऊ शकत नाही, त्याप्रमाणे ज्या मंत्रबीजाक्षराच्या जपाने

लहान मुलाला देखील क्रोध उत्पन्न होईल अशी अनेक निमित्ते प्राप्त झाली तरी ज्याच्या अंत:करणात क्रोधाची उर्मी उठविली असताहि उठत नाही॥ १२८-१२९ ॥ या दशेला अक्रोधत्व असे नांव आहे, हे जाण, असे भगवान श्रीकृष्ण त्या अर्जुनाला म्हणाले॥ १३० ॥

आतां मृत्तिकात्यागें घटु। तंतुत्यागें पटु। त्यजिजे जेवी वटु। बीजत्यागें॥ १३१ ॥
कां त्यजूनि भिंतिमात्र। त्यजिजे आघवेंचि चित्र। कां निद्रात्यागें विचित्र। स्वप्नजाळ॥ १३२ ॥
ना ना जळत्यागें तरंग। वर्षा त्यागें मेघ। त्यजिजती जैसे भोग। धनत्यागें॥ १३३ ॥
तेवीं बुद्धिमंतीं देहीं। अहंता सांडूनि पाहीं। सांडिजे अशेषही। संसारजात॥ १३४ ॥
तया नांव त्यागु। म्हणे तो यज्ञांगु। हें मानूनि सुभगु। पार्थु पुसे॥ १३५ ॥

अर्थ—आता ज्याप्रमाणे मातीचा त्याग केल्याने घटाचा त्याग करावा किंवा कापसाच्या सुताचा त्याग केल्याने वस्त्राचा त्याग करावा किंवा बीजाचा त्याग केल्याने वटवृक्षाचा त्याग करावा॥ १३१ ॥ किंवा भिंतीचा त्याग केल्याने संपूर्ण चित्रलेखनाचा त्याग व्हावा. निद्रेचा त्याग केल्याने विचित्र अशा स्वप्नजालाचा त्याग व्हावा॥ १३२ ॥ किंवा पाण्याचा त्याग केल्याने तरंगाचा त्याग व्हावा. वर्षाऋतुच्या त्यागाने मेघांचा अनायासे त्याग व्हावा. संपत्तीचा त्याग केल्याने जसा भोग अनायासे सुटावा॥ १३३ ॥ त्याप्रमाणे बुद्धिमान मनुष्याने आपल्या देहाची अहंता सर्वस्वी सोडून देऊन नि:शेष संसाराचा त्याग करावा, असे जाण॥ १३४ ॥ यालाच त्याग म्हणतात, असे यज्ञात ज्याचे यजन केले जाते असे भगवान श्रीकृष्ण म्हणाले. हे मान्य करून दैववान अर्जुन विचारू लागला॥ १३५ ॥

आतां शांतीचें जी लिंग। तें व्यक्त मज सांग। देवो म्हणती चांग। अवधान देईं॥ १३६ ॥
तरी गिळोनि ज्ञेयातें। ज्ञाता ज्ञानही माघौतें। हारपे निरुतें। ते शांति पैं गा॥ १३७ ॥
जैसा प्रळयांबूचा उभडु। बुडवुनि विश्वाचा पवाडु। होय आपणपें निबिडु। आपणचि॥ १३८ ॥
मग उमग ओघ सिंधु। हा नुरेचि व्यवहारभेदु। परी जलैक्याचा बोधु। तोही कवणा॥ १३९ ॥
तैसी ज्ञेया देतां मिठी। ज्ञातृत्वही पडे पोटीं। मग उरे तेंचि किरीटी। शांतीचें रूप॥ १४० ॥

अर्थ—आता भगवंता! शांतीचे काय स्वरूप आहे, हे मला स्पष्ट करून सांगा. देव म्हणाले, सांगतो, नीट ऐक॥ १३६ ॥ ज्ञेयाला गिळून नंतर ज्ञाता-म्हणजे ज्ञातृत्वाचा अभिमान-व ज्ञान-म्हणजे ज्ञातृत्वरूप जाणीव-हे नाहीसे झाल्यावर जी चित्ताची स्थिति ती खरी शांती होय॥ १३७ ॥ ज्याप्रमाणे प्रलयकाळच्या पाण्याचा लोंढा ब्रह्मांडरूप विश्वाचा संपूर्ण विस्तार बुडवून घनदाट एक आपणच राहतो॥ १३८ ॥ मग उगम, प्रवाह, समुद्र हा व्यावहारिक भेद काहीच राहत नाही आणि (सर्व एक पाणी झाले असता) जलैक्याची जाणीव तरी कोणाला राहणार?॥ १३९ ॥ त्याप्रमाणे ज्ञेयाशी ऐक्य झाले असता ज्ञातृत्वहि लय पावते, तेव्हा जे उरते, अर्जुना! ते शांतीचे रूप होय॥ १४० ॥

आतां कदर्थवित व्याधी। बळीकरणाचिया आधीं। आप पर न शोधी। सद्वैद्य जैसा॥ १४१ ॥
कां चिखलीं रुतली गाये। धड भाकड न पाहे। जो तियेचिया ग्लानी होये। कालाभुला॥ १४२ ॥
नाना बुडतयातें सकरुणु। न पुसे अंत्यजु कीं ब्राह्मणु। काढूनि राखे प्राणु। हेंचि जाणे॥ १४३ ॥
कीं महावनीं पापियें। उघडी केली विपायें। ते नेसविल्यावीण न पाहे। शिष्ट जैसा॥ १४४ ॥
तैसें अज्ञानप्रमादादिकीं। कां प्राक्तनींही सदोखीं। निंद्यत्वाच्या सर्वविखीं। खिळिले जे॥ १४५ ॥
तयां आंगीक आपुलें। देऊनियां भलें। विसरविजती सलें। सलतीं तियें॥ १४६ ॥
अगा पुढिलाचे दोषु। करूनि आपुलिये दिठी चोखु। मग घापे अवलोकु। तयावरी॥ १४७ ॥
जैसा पुजूनि देवो पाहिजे। पेरूनि शेता जाइजे। तोषौनि प्रसादु घेइजे। अतिथीचा॥ १४८ ॥
तैसें आपुलेनि गुणें। पुढीलाचें उणें। फेडूनियां पाहणें। तयाकडे॥ १४९ ॥
वांचूनि न विंधिजे वर्मीं। नातुडविजे अकर्मीं। न बोलविजे नामीं। सदोषीं तिहीं॥ १५० ॥
वरी कोणे एकें उपायें। पडिलें तें उभें होये। तेंचि कीजे परी घाये। नेदावे वर्मीं॥ १५१ ॥

पैं उत्तमाचियासाठीं। नीच मानिजे किरीटी। हे वांचोनि दिठी। दोषु न घेपे॥ १५२॥
अगा अपैशून्याचें लक्षण। अर्जुना हें फुडें जाण। मोक्षमार्गीचें सुखासन। मुख्य हे गा॥ १५३॥

अर्थ—ज्याप्रमाणे रोग पीडा देत आहे असे पाहून रोग्याला धट्टाकट्टा करण्याच्या चिंतेत लागलेला वैद्य, रोगी आपला की परका, असा विचार करीत नाही॥ १४१॥ किंवा चिखलात फसलेल्या दु:खींत गाईला पाहून व्याकुळ होणारा मनुष्य जसा ती दूध देणारी आहे की म्हातारी आहे याचा विचार करीत नाही॥ १४२॥ किंवा मनुष्याला बुडतांना पाहून कनवाळु मनुष्य तो महार आहे की ब्राह्मण आहे, याचा विचार करीत नाही. त्याला बाहेर काढून त्याच्या प्राणाचे रक्षण करावे, हेच तो जाणतो॥ १४३॥ किंवा एखाद्या दुष्टाने कुलस्त्रियेला नग्न केले असता जसा सज्जन पुरुष (लुगडे) नेसविल्याशिवाय तिला पाहत नाही॥ १४४॥ त्याप्रमाणे अज्ञान प्रमादादि किंवा प्रारब्धजन्य निंद्य अशा सर्व दोषांनी पछाडलेले जे॥ १४५॥ त्यांना आपल्या आंगचे उत्तम गुण देऊन त्यांच्या सलणाऱ्या दोषांचा विसर पाडतात॥ १४६॥ आपल्यासमोर असलेल्यांचे दोष आपल्या दृष्टीने दोषरहित करून मग त्याचेकडे पाहतात॥ १४७॥ ज्याप्रमाणे देवाची पूजा करूनच त्याला पाहावे. पेरल्यावर शेताकडे जावे. अतिथीला संतुष्ट करूनच त्यांचा आशीर्वाद घ्यावा॥ १४८॥ त्याप्रमाणे आपल्या गुणांनी दुसऱ्याचा उणेपणा नाहीसा करून त्यांचेकडे पाहावे॥ १४९॥ यावाचून, वर्मी लागेल असे बोलू नये, त्याला निंद्य कर्मात गुरफटू नये. दोषाला धरून नाव ठेवून बोलू नये॥ १५०॥ आणखी ज्या उपायाने, पडलेला मनुष्य उभा होईल तोच उपाय करावा, पण वर्मावर घाव घालू नये॥ १५१॥ सज्जनाच्या संगतीत असलेल्या नीचालाहि सज्जनासाठीं मान द्यावा. यावाचून, दृष्टीने दोष पाहू नये॥ १५२॥ अर्जुना! असे अपैशुन्याचे स्पष्ट लक्षण आहे, ही मोक्षमार्गाने जाण्याकरिता मुख्य अशी पालखीच आहे॥ १५३॥

गूढार्थदीपिका—या अपैशुन्याने गुणदोष पाहण्याची दृष्टी नाहीशी होऊन समब्रह्मभाव बुद्धीत सहज ठसतो, म्हणून या अपैशुन्याला मोक्षमार्गाचे सुखासन म्हटले आहे.

आतां दया ते ऐसी। पूर्णचंद्रिका जैसी। निववितां न कडसी। सानें थोर॥ १५४॥
तैसें दु:खिताचें शिणणें। हिरतां सकणवपणें। उत्तमाधम नेणे। विवंचूं गा॥ १५५॥
पैं जगीं जीवनासारिखें। वस्तु अंगवरी उपखे। परी जातें जीवित राखे। तृणाचेंही॥ १५६॥
तैसें पुढिलाचेनि तापें। कळवळलिये कृपे। सर्वस्वेंसीं दिधलेंही आपणपें। थोडेंचि गमे॥ १५७॥
निम्न भरलियाविणे। पाणी ढळोंचि नेणें। तेवीं श्रांता तोषौनि जाणें। सामोरे या॥ १५८॥
पैं पायीं कांटा नेहटे। तंव व्यथा जीवीं उमटे। तैसा पोळे संकटें। पुढिलांचेनि॥ १५९॥
कां पावो शीतळता लाहे। कीं ते डोळ्यांचिलागीं होये। तैसें परसुखें जाये। सुखावतुजो॥ १६०॥
किंबहुना तृषितालागीं। पाणी आरायिलें असे जगीं। तैसें दु:खितांचे सेलभागीं। जिणें जयाचें॥ १६१॥
तो पुरुष वीरराया। मूर्तिमंत जाण दया। मी उदयजतांचि तया। ऋणिया लाभें॥ १६२॥

अर्थ—आता दया ती अशी आहे—ज्याप्रमाणे पूर्ण चंद्राचा प्रकाश शीतळता देताना लहान, थोर असा भेद करीत नाही॥ १५४॥ त्याप्रमाणे दु:खितांचे दु:ख कळवळ्याने नाहीसे करताना उत्तम, अधम असा भेद जो करीत नाही॥ १५५॥ जगामध्ये सर्वांचे जीवन असलेली पाण्यासारखी वस्तु आपला नाश करून घेऊन गवताच्या देखील नाहीसे होत असलेल्या जीवनाचे रक्षण करते॥ १५६॥ त्याप्रमाणे समोर असलेल्या माणसांचे दु:ख पाहून जो दयेने कळवळतो व त्याचे दु:ख निवारणार्थ त्याला आपले सर्वस्व देऊनहि ते थोडेच मानतो॥ १५७॥ समोर आलेली सखोल जागा भरल्यावाचून जसे पाणी तेथून पुढे हालत नाही त्याप्रमाणे दु:खिताला संतोष दिल्यानंतरच जो पुढे जातो॥ १५८॥ ज्याप्रमाणे काटा पायात बोचतो, पण त्याची व्यथा अंत:करणात होते, त्याप्रमाणे दुसऱ्याचे संकट पाहून जो दु:खी होतो॥ १५९॥ किंवा ज्याप्रमाणे थंड स्पर्श पायाला होतो, पण तो थंडावा डोळ्याला मिळतो त्याप्रमाणे दुसऱ्याच्या सुखाने जो सुखी होतो॥ १६०॥ फार काय सांगावे! ज्याप्रमाणे तान्हेल्याकरिता जगात पाणी निर्माण झाले

त्याप्रमाणे केवळ दुःखितांच्या दुःखाचे निवारण करण्याकरिताच जो जीवंत राहतो ॥ १६१ ॥ हे वीरश्रेष्ठा अर्जुना! असा जो पुरुष, तो म्हणजे दयेची मूर्तिच होय. अशी दया उत्पन्न झाल्याबरोबरच मी त्याचा ऋणी होतो ॥ १६२ ॥

आतां सूर्यासि जीवें। अनुसरलिया राजीवें। परी तें तो न शिवे। सौरभ्य जैसें॥ १६३ ॥
कां वसंताचिया वाहाणी। आलिया वनश्रीच्या अक्षौहिणी। ते न करीतचि घेणी। निगाला तो॥ १६४ ॥
हें असो महासिद्धीसी। लक्ष्मीही आलिया पाशीं। परी महाविष्णु जैसी। न गणीच ते॥ १६५ ॥
तैसे ऐहिकींचे कां स्वर्गींचे। भोग पाइक जालिया इच्छेचे। परी भोगावे हें न रुचे। मनामाजीं॥ १६६ ॥
बहुवें काय कौतुकीं। जीव नोहे विषयाभिलाखी। अलोलुप्त्वदशा ठाउकी। जाण ते हे॥ १६७ ॥

अर्थ—कमळाचे फूल सूर्याला जीवभावाने अनुसरले तरी सूर्य मात्र कमळाच्या सुगंधाला स्पर्श करीत नाही ॥ १६३ ॥ वसंत ऋतु सुरू झाला असता हजारो वनशोभा प्रगट झाल्या तरी तो वसंतऋतु त्या वन शोभेच्या सौंदर्याचा अनुभव न घेता निघून जातो ॥ १६४ ॥ हे असो. सर्व सिद्धीसह लक्ष्मी जवळ आली तरी महाविष्णु जसे तिच्या ठिकाणी आसक्त होत नाहीत, त्याप्रमाणे इहलोकातील व परलोकातील विषयभोग इच्छेच्या सर्वस्वी स्वाधीन झाले तरी ज्याला मनातून ते भोग भोगण्याची इच्छाच होत नाही ॥ १६५-१६६ ॥ फार काय कौतुक सांगावे! ज्याचे मन विषय भोगण्याची इच्छाच करीत नाही, ती त्या मनाची प्रसिद्ध अलोलुप्त्व दशा होय, असे जाण ॥ १६७ ॥

आतां माशियां जैसें मोहळ। जळचरां जेवीं जळ। कां पक्षियां अंतराळ। मोकळें हें॥ १६८ ॥
नातरी बाळकोद्देशें। मातेचें स्नेह जैसें। कां वसंतींच्या स्पर्शें। मऊ मलयानिळ॥ १६९ ॥
डोळ्या प्रियाची भेटी। कां पिलियां कूर्मीची दिठी। तैसी भूतमात्रीं राहटी। मवाळ ते॥ १७० ॥
स्पर्शे अतिमृदु। मुखीं घेतां सुस्वादु। घ्राणासि सुगंधु। उजाळु आंगें॥ १७१ ॥
तो आवडे तेवढा घेतां। विरुद्ध जरी न होता। तरी उपमे येता। कापुर कीं॥ १७२ ॥
परी महाभूतें पोटीं वाहे। तेवींचि परमाणूमाजीं सामाये। या विश्वानुसार होये। गगन जैसें॥ १७३ ॥
काय सांगों ऐसें जिणें। जें जगाचेनि जीवें प्राणें। तयां नांव म्हणें। मार्दव मी॥ १७४ ॥

अर्थ—आता माशांना जैसे मोहोळ, जलचराना जसे पाणी किंवा पक्ष्यांना जसे आकाश केव्हाहि मोकळे असते ॥ १६८ ॥ किंवा मुलाविषयी आईचे जसे प्रेम असते किंवा वसंतऋतूच्या स्पर्शाने मलयपर्वतावरील वाहणारा वायु जसा मृदु होतो ॥ १६९ ॥ किंवा प्रिय पुरुषाच्या दर्शनाने डोळ्याला जसा आनंद होतो, कासवीची आपल्या पिल्यावर जशी दृष्टी असते, त्याप्रमाणे ज्याचे भूतमात्रांशी प्रेमळ वागणे असते ॥ १७० ॥ स्पर्श केला असता अत्यंत मऊ, मुखात घातला असता उत्तम स्वादिष्ट, वास घेतला असता सुगंधी, शरीराने निर्मळ, असा कापूर, विरुद्ध न होता म्हणजे अपाय न होता वाटेल तेवढा खाता आला असता तर त्या कापराची उपमा देता आली असती ॥ १७१-१७२ ॥ जसे आकाश, महाभूते पोटात साठवून परमाणु-परमाणुमध्येहि राहून विश्वाकार होते ॥ १७३ ॥ फार काय सांगू! याप्रमाणे जगाचा जीव-प्राण होऊन जे जीवन कंठणे, त्याला मी मार्दव म्हणतो ॥ १७४ ॥

आतां पराजयें राजा। जैसा कदर्थिजे लाजा। कां मानिया निस्तेजा। निकृष्टास्तव॥ १७५ ॥
नाना चांडाळमंदिराशीं। अवचटें आलियां संन्यासी। मग लाज होय जैसी। उत्तमा तया॥ १७६ ॥
क्षत्रिया रणीं पळोनि जाणें। तें कोण साहे लाजिरवाणें। कां वैधव्यें पाचारणें। महासतियेतें॥ १७७ ॥
रूपसा उदयलें कुष्ट। संभाविता कुटीचें बोट। तया लाजा प्राणसंकट। होय जैसें॥ १७८ ॥
तैसें औटहातपणें। जें शव होऊनि जिणें। उपजों उपजों मरणें। नावांनावां॥ १७९ ॥
तियें गर्भमेदमुसें। रक्तमूत्ररसें। वोंतीव होऊनि असे। तें लाजिरवाणें॥ १८० ॥
हें बहु असो देहपणें। नामरूपासि येणें। नाहीं गा लाजिरवाणें। तयाहूनि॥ १८१ ॥
ऐसैसिया अवकळा। घेपे शरीराचा कंटाळा। ते लाज पैं निर्मळा। निसुगा गोड॥ १८२ ॥

अर्थ—आता ज्याप्रमाणे पराजय झाला असता राजा लाजेने दुःखी होतो किंवा मानी पुरुष निकृष्ट दशेत आला

असता निस्तेज होतो॥ १७५॥ किंवा संन्यासी न कळता चांडाळाच्या घरी आला व चांडाळाचे घर आहे असे कळल्याबरोबर त्याला पराकाष्ठेची लाज वाटते॥ १७६॥ क्षत्रियाला संग्रामातून पळून जाणे जसे अत्यंत लाजिरवाणे असल्यामुळे कोण क्षत्रिय ते सहन करतो? किंवा कोणती महापतिव्रता स्त्री 'गंगाभागिरथी' म्हणून हाक मारली असता ते सहन करील॥ १७७॥ रूपवानाला कोड फुटले किंवा संभाविताला निंदेचे लांछन लागले तर ज्याप्रमाणे त्याला मरणप्राय लाज उत्पन्न होते॥ १७८॥ त्याप्रमाणे साडेतीन हात प्रेतरूपी देह होऊन जगणे, वारंवार जन्ममरणपरंपरा भोगणे॥ १७९॥ तेथे गर्भरूपी मुशीत मेद, रक्त, मूत्र यांचे योगाने ओतले जाणे, याची ज्याला अत्यंत लाज वाटते॥ १८०॥ हा पाल्हाळ पुरे. मूळात सच्चिदानंदस्वरूप असताना जड-विनाशी देहाशी ऐक्य करून नामरूपास येणे याच्यापेक्षा लाजिरवाणे दुसरे नाही॥ १८१॥ निर्लज्ज पुरुषाला हे शरीर गोड वाटते; पण निर्मळ अंत:करणाच्या पुरुषाला, ही दुर्दशा आहे, असे जाणून शरीरादिकांचा कंटाळा येतो॥ १८२॥

आतां सूत्रतंतु तुटलिया। चेष्टाचि ठाके सायखडिया। तैसी प्राणजयें कर्मेंद्रियां। खुंटे गती॥ १८३॥
कीं मावळलिया दिनकरु। सरे किरणांचा पसरु। तैसा मनोजयें प्रचारु। बुद्धींद्रियांचा॥ १८४॥
एवं मनपवननियमें। होती दाही इंद्रियें अक्षमें। तें अचापल्य वर्मे। येणें होय॥ १८५॥

अर्थ—ज्या दोऱ्यांनी बाहुल्या नाचविल्या जातात ती दोरी तुटली की जसे बाहुल्याचे नाचणे बंद पडते त्याप्रमाणे प्राणायामाने प्राण स्वाधीन करून घेतला की कर्मेंद्रियांचे व्यापार बंद पडतात॥ १८३॥ किंवा सूर्य अस्तास गेला म्हणजे सूर्यकिरणांचा प्रसार नाहीसा होतो, त्याप्रमाणे मन जिंकले म्हणजे बुद्धि व इंद्रिये जिंकली जातात॥ १८४॥ सारांश मन व प्राण यांचे नियमन झाल्याने दहाहि इंद्रिये आपआपले कार्य करण्यास असमर्थ होतात, 'अचापल्य' म्हणतात ते अशा रीतीने सिद्ध होते॥ १८५॥

तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता। भवन्ति सम्पदं दैवीमभिजातस्य भारत॥ ३॥

अर्थ—हे अर्जुना! तेजस्वीपणा, अपराधाची क्षमा करणे, धैर्य, अंतर्बाह्य शुद्धि, द्वेष न करणे, अतिमानिता नसणे, असे हे गुण दैवीसंपत्तीला अनुलक्षून उत्पन्न झालेल्या पुरुषाचे असतात॥ ३॥

आतां ईश्वरप्राप्तीलागीं। प्रवर्ततां ज्ञानयोगी। धिंवसेयाची आंगीं। उणीव नोहे॥ १८६॥
वोखटे मरणा ऐसें। तेंही आलें अग्निप्रवेशें। परी प्राणेश्वरोद्देशें। न गणीची सती॥ १८७॥
तैसें आत्मनाथाचिया आधी। लाऊनि विषयविषाची बाधी। धांवों आवडे पाणधी। शून्याचिये॥ १८८॥
न ठाके निषेध आड। न पडे विधीची भीड। नुपजेचि जीवीं कोड। महासिद्धीचें॥ १८९॥
ऐसें ईश्वराकडे निज। धांवे आपसया सहज। तया नांव तेज। आध्यात्मिक तें॥ १९०॥

अर्थ—ईश्वराची प्राप्ति व्हावी म्हणून ज्ञान व योग यांच्या मार्गाने जात असताना धैर्याचे आंग कमी पडू देत नाही॥ १८६॥ अग्नीत प्रवेश करून मरणासारखा अत्यंत दुर्धर प्रसंग स्वत:वर ओढवला जात असताहि प्रिय पतीच्या प्रेमामुळे पतिव्रता स्त्रियेला त्याचे काहीच वाटत नाही॥ १८७॥ त्याप्रमाणे आत्मप्राप्तीच्या तळमळीने विषयरूपी विषाला बांध घालून नामरूपरहित शून्यमय अशा निर्गुण मार्गाने धावणे आवडते॥ १८८॥ ज्याच्या आड निषेध येत नाही किंवा विधिवचनाची भीडहि त्याला पडत नाही. वाटेत सिद्धी प्राप्त झाल्या तरी त्याचे त्याला कौतुक वाटत नाही॥ १८९॥ याप्रमाणे ईश्वराकडे मनाची आपोआप धाव असणे त्याला आध्यात्मिक तेज म्हणतात॥ १९०॥

आतां सर्वही साहातिया गरिमा। गर्वा न ये तेचि क्षमा। जैसें देह वाहोनि रोमा। वाहणें नेणें॥ १९१॥

अर्थ—ज्याप्रमाणे रोमांना शरीर धारण करते, पण त्यांची त्याला जाणीवहि नसते, त्याप्रमाणे सर्व सहन करीत असतांना देखील मोठेपणाचा गर्व उठत नाही. याला क्षमा म्हणतात॥ १९१॥

आणि मातलिया इंद्रियांचे वेग। कां प्राचीनें खवळले रोग। अथवा योगवियोग। प्रियाप्रियांचे॥ १९२॥
यया आघवियांचाचि थोरु। एके वेळे आलिया पुरु। तरी अगस्त्य कां होऊनि धीरु। उभा ठाके॥ १९३॥
आकाशीं धूमाची रेखा। उठिली बहुवा आगळिका। ते गिळी येकी झुळुका। वारा जेवीं॥ १९४॥

तैसें अधिभूताधिदैवां। अध्यात्मादि उपद्रवां। पातलेया पांडवा। गिळूनि घाली॥ १९५॥
ऐसें चित्तक्षोभाच्या अवसरीं। उचलूनि धैर्या जें चांगावें करी। धृती म्हणिपे अवधारीं। तियेतें गा॥ १९६॥

अर्थ—उन्मत्त झालेल्या इंद्रियांचे वेग किंवा प्रारब्धाने प्रगट झालेले दुर्धर रोग किंवा प्रिय-अप्रिय यांचे योग वियोग॥ १९२॥ या सर्वाचा समुदाय एकदमच प्राप्त झाला तरी अगस्ति ऋषिप्रमाणे धैर्यवान होऊन त्यांना तोंड देण्यास सज्ज होतो॥ १९३॥ आकाशामध्ये धुराची प्रचंड रांग उठली तरी वारा एका झुळकीने ती नाहीशी करतो॥ १९४॥ त्याप्रमाणे अर्जुना! आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक असे तिन्ही प्रकारचे उपद्रव प्राप्त झाले तरी ते सर्व निमूटपणे सहन करतो॥ १९५॥ याप्रमाणे चित्त क्षुब्ध झाले असता जे धैर्याला उचलून धरून अढळ करते; त्याला धृति म्हणतात॥ १९६॥

आतां निर्वाळूनि कनकें। भरिला गांगें पीयूखें। तया कलशाचिया सारिखें। शौच असे॥ १९७॥
जे आंगीं निष्काम आचारु। जीवीं विवेकु साचारु। तो सबाह्य घडला आकारु। शुचित्वाचाचि॥ १९८॥

अर्थ—शुद्ध सोन्याचा कलश अमृतरूपी गंगोदकाने भरावा त्याप्रमाणे शुद्धि आहे॥ १९७॥ अंत:करणात विवेक असून बाहेर शरीराकडून ज्याची सर्व कर्मे निष्काम होतात, तो म्हणजे संपूर्ण शुचित्वाची साकार मूर्तिच होय॥ १९८॥

कां फेडित पाप ताप। पोखीत तीरींची पादप। समुद्रा जाय आप। गंगेचें जैसें॥ १९९॥
कां जगाचें आंध्य फेडितु। श्रियेची राउळें उघडितु। निघे जैसा भास्वतु। प्रदक्षिणे॥ २००॥
तैसीं बांधलीं सोडित। बुडालीं काढित। सांकडी फेडित। आर्तांचिया॥ २०१॥
किंबहुना दिवसराती। पुढिलांचें सुख उन्नति। आणित आणित स्वार्थी। प्रवेशिजे॥ २०२॥

अर्थ—ज्याप्रमाणे जगाचे पाप व ताप नाहीसे करीत व काठावरील झाडे वाढवित गंगेचे पाणी समुद्रास जाऊन मिळते॥ १९९॥ किंवा ज्याप्रमाणे जगातील अंध:कार नाहीसा करीत व शोभेची मंदिरे जी कमले ती प्रफुल्लित करीत सूर्य पृथ्वीच्या प्रदक्षिणेला निघतो॥ २००॥ त्याप्रमाणे उपाधीने बांधलेल्यांना मुक्त करीत, संसारात बुडलेल्यांचा उद्धार करीत व दु:खितांचे संकट नाहीसे करीत॥ २०१॥ फार काय सांगावे! समोर दिसेल त्याला रात्रंदिवस सुख देत व त्याचा उत्कर्ष करीत जे स्वार्थ साधतात (म्हणजे जे आपल्या स्वार्थाबरोबर दुसऱ्याचाहि स्वार्थ साधतात किंवा आपल्या आत्महिताबरोबर दुसऱ्याचेहि आत्महित साधण्याचा प्रयत्न करतात)॥ २०२॥

वांचूनि आपुलिया काजालागीं। प्राणिजातांच्या अहितभागीं। संकल्पाचीही आडवंगी। न करणें जें॥ २०३॥
पैं अद्रोहत्व ऐशिया गोष्टी। ऐकसी जिया किरीटी। तें सांगितलें हें दिठी। पाहों ये तैसें॥ २०४॥

अर्थ—यावाचून आपल्या स्वार्थाकरीता इतर, प्राण्यांचे अहित होईल अशा संकल्पाचा देखील, अडथळा न करणे॥ २०३॥ हे अर्जुना! 'अद्रोह' या शब्दाने जे तू ऐकतोस, ते दृष्टीने प्रत्यक्ष पाहता येईल, असे तुला सांगितले॥ २०४॥

आणि गंगा शंभूच्या माथां। पावोनि संकोचे जेवीं पार्था। तेवीं मान्यपणें सर्वथा। लाजणें जें॥ २०५॥
तें हें पुढत पुढती। अमानित्व जाण सुमती। मागां सांगितलेंसे किती। तेंचि तें बोलों॥ २०६॥

अर्थ—ज्याप्रमाणे गंगा शंकराच्या माथ्याचा आश्रय करून तेथे संकोच पावली, त्याप्रमाणे योग्य मानसन्मानाची देखील ज्याला लाज वाटते॥ २०५॥ हे शुद्धबुद्धि अर्जुना! ते हे अमानित्व होय, हे वारंवार लक्षात घे. या अमानित्वाचे लक्षण मागे सांगितलेच आहे तेच ते किती सांगायचे!॥ २०६॥

एवं इहीं सव्विसें। ब्रह्मसंपदा हे वसत असे। मोक्षचक्रवर्तीचें जैसें। अग्रहार होय॥ २०७॥
नाना हें संपत्ति दैवी। या गुणतीर्थांची नीच नवी। निर्विण्णसगरांच्या दैवी। गंगाचि आली॥ २०८॥
कीं गुणकुसुमांची माळा। हे घेऊनि मुक्तिबाळा। वैराग्यनिरपेक्षाचा गळा। गिंवसीत असे॥ २०९॥
कीं सव्विसगुणज्योती। इहीं उजळूनि आरती। गीता आत्मया निजपती। नीरांजना आली॥ २१०॥
उगळितीं निर्मळें। गुण इयेंचि मुक्ताफळें। दैवीशुक्तिकळें। गीतार्णवींची॥ २११॥

काय बहु वानूं ऐसी। अभिव्यक्ती ये अपैसी। केलें दैवी गुणराशी। संपत्ति रूप॥ २१२॥

अर्थ—याप्रमाणे हे सव्विस गुणांच्या रूपाने दैवी संपत्ति वसत असते. ही संपत्ति म्हणजे मोक्षरूपी राज्याच्या सार्वभौमराजाचे जसे इनामच होय॥ २०७॥ किंवा या सव्वीस गुणरूपी तीर्थाची नित्य नवी अशी दैवी संपत्तिच विरक्तिरूप सगरपुत्राच्या दैवाने गंगारूपाने प्राप्त झाली॥ २०८॥ किंवा मुक्तिरूपबाला या गुणांची माळ हाती घेऊन, वैराग्याने निरपेक्ष झालेल्या पुरुषांच्या गळ्यांचा शोध करीत आहे॥ २०९॥ किंवा या सव्विस गुणांची आरती उजळून ही गीता आपल्या आत्मस्वरूप पतीला ओवाळण्याकरीता आली॥ २१०॥ हे सव्वीस गुण म्हणजे गीतारूपी समुद्रातील शिंपेतून बाहेर पडलेले पाणिदार व तेजस्वी मोतीच होत॥ २११॥ फार काय वर्णन करू! या सव्वीस गुणराशीच्या द्वारा दैवी संपत्तीचे स्वरूप आपोआप अभिव्यक्त होईल असे वर्णन केले आहे॥ २१२॥

आतां दु:खाची आंतुवट वेली। दोषकाट्यांची जरी भरली। तरी निजाभिधानीं घालीं। आसुरी ते॥ २१३॥
पैं त्याज्य त्यजावयालागीं। जाणावी जरी अनुपयोगी। तरी ऐका ते चांगी। श्रोत्रशक्ती॥ २१४॥
तरी नरकव्यथा थोरी। आणावया दोषीं अघोरीं। मेळु केला ते आसुरी। संपत्ति हे॥ २१५॥
नाना विषवर्गु एकवटु। तया नांव जैसा बासटु। आसुरी संपत्ति हा खोटु। दोषांचा तैसा॥ २१६॥

अर्थ—आता जी आत दु:खाने भरलेली वेलीच आहे, ती दोषकाट्यांनी जरी भरली असली तरी त्या आसुरी संपत्तीच्या निरूपणाकडे आपले लक्ष दे॥ २१३॥ ज्याप्रमाणे त्याज्य वस्तु जरी अनुपयोगी असली तरी तिचा त्याग करण्याकरिता ती समजून घ्यावी लागते, त्याप्रमाणे, आसुरी संपत्तीचा त्याग करण्याकरिता चांगल्या श्रवणशक्तीने ती ऐक॥ २१४॥ भयंकर अशा नरकदु:खात आणण्याकरीता जो घोर दोषांचा मेळावा, ती आसुरी संपत्ति होय॥ २१५॥ किंवा सर्व विषे एकत्र झाली असता त्याला जसे काळकूट नांव प्राप्त होते, त्याप्रमाणे आसुरी संपत्ति सर्व दोषांची लगडीच होय॥ २१६॥

दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोध: पारुष्यमेव च। अज्ञानं चाभिजातस्य पार्थ सम्पदमासुरीम्॥ ४॥

अर्थ—अर्जुना! आसुरी संपत्तीला अनुलक्षून झालेल्या पुरुषाचे ठिकाणी दंभ (धार्मिकतेचा देखावा), दर्प (गर्व), अभिमान (अहंकार), क्रोध, पारुष्य (कठोरभाषण), अज्ञान ही आसुरी संपत्ति असते॥ ४॥

तरी तयाचि आसुरां। दोषांमाजीं जया वीरा। वाडपणाचा डांगोरा। तो दंभ ऐसा॥ २१७॥
जैसी आपुली जननी। नग्न दाविलिया जनीं। ते तीर्थचि परी पतनीं। कारण होय॥ २१८॥
कां विद्या गुरूपदिष्टा। बोभाइलिया चोहटां। तरि इष्टदा परी अनिष्टा। हेतु होती॥ २१९॥
पैं आंगें बुडतां महापूरीं। जे वेगे काढी पैलतीरीं। ते नावचि बांधिलिया शिरीं। बुडवी जैसी॥ २२०॥
कारण जें जीविता। तें वानिलें जरी सेवितां। तरी अन्नचि पांडुसुता। होय विष॥ २२१॥
तैसा दृष्टादृष्टाचा सखा। धर्मु जाला तो फोकारिजे देखा। तरी तारिता तोचि दोखा-। लागीं होय॥ २२२॥
म्हणौनि वाचेचा चौबारा। घातलिया धर्माचा पसारा। धर्मुचि तो अधर्मु होय वीरा। तो दंभु जाणे॥ २२३॥

अर्थ—हे वीर अर्जुना! त्या आसुरी संपत्तीतील दोषामध्ये ज्याच्याविषयी वडीलपणाचा डांगोरा आहे तो दंभ असा आहे॥ २१७॥ ज्याप्रमाणे आपले जन्मस्थान म्हणून तीर्थस्थान असले तरी आपल्या आईला लोकांना नग्न करून दाखविले असता ते आपल्या अधोगतीला कारण होते॥ २१८॥ किंवा गुरुने सांगितलेला मंत्र चौरस्त्यावर मोठ्याने ओरडून प्रगट केला असता तो कल्याणकारक असला तरी अकल्याणकारक होतो॥ २१९॥ किंवा महापुरात शरीरासह बुडत असताना जी नांव पाण्यातून आपल्याला बाहेर काढून वाचविते, तीच जर डोक्यावर घेतली तर ती जशी बुडविते॥ २२०॥ अर्जुना! जे अन्न जिवंत राहण्याला कारणीभूत होते तेच सेवन करीत असताना वाढणाऱ्याने त्याची प्रशंसा करून वाढले असता दृष्टिदोष होऊन विषरूप होते॥ २२१॥ त्याप्रमाणे इहलोकातील व परलोकातील मित्र असा जो धर्म तो जेवढा काही आपल्याकडून घडला त्याचा डांगोरा पिटला असता तोच तारण्याऐवजी दोषावह

होतो॥ २२२॥ म्हणून धर्माचा पसारा वाचेच्या चव्हाट्यावर मांडला असता जो धर्मच अधर्म होतो, हे अर्जुना! तो दंभ होय, असे जाण॥ २२३॥

आतां मूर्खाचिये जिभे। अक्षराचा आंबुखा सुभे। आणि तो ब्रह्मसभे। न रिझे जैसा॥ २२४॥
कां मांदुरी लोकांचा घोडा। गजपतिही मानी थोडा। कां कांटियेवरिल्या सरडा। स्वर्गुही नीच॥ २२५॥
तृणाचेनि इंधनें। आगी धांवे गगनें। थिल्लरबळें मीनें। न गणिजे सिंधु॥ २२६॥
तैसा माजे स्त्रिया धनें। विद्या स्तुती बहुतें मानें। एके दिवसींचेनि परान्नें। अल्पकु जैसा॥ २२७॥
अभ्रछायेचिया जोडी। निदैवु घर मोडी। मृगांबु देखोनि फोडी। पाणियाडें मूर्ख॥ २२८॥
किंबहुना ऐसैंसें। उतणें जें संपत्तिमिसें। तो दर्पु गा अनारिसें। न बोलें घेईं॥ २२९॥

अर्थ—मुर्खाच्या जिभेवर अक्षराचा शिंतोडा पडला असता मग तो गर्वाने इतका फुगून जातो व ब्रह्मदेवाच्या सभेतहि त्याचे समाधान होत नाही॥ २२४॥ किंवा चाबुकस्वाराचा घोडा इंद्राच्या ऐरावतालाहि तुच्छ मानतो अथवा कुंपणावरील सरडा स्वर्गालाहि नीच समजतो॥ २२५॥ गवतास लागलेला अग्नि आकाशाला टेकतो किंवा डबक्यांतील मासा समुद्रासहि जुमानित नाही॥ २२६॥ जसा दरिद्रि मनुष्य एक दिवस परान्न पोटभर मिळाले म्हणजे माजून जातो, त्याप्रमाणे स्त्री, धन, विद्या, स्तुति, मानमान्यता इत्यादि प्राप्त झालेले पाहून जो उन्मत्त होतो॥ २२७॥ अभ्राची छाया प्राप्त झालेली पाहून दुर्दैवी मनुष्य, असलेले घर मोडून टाकतो किंवा मृगजळ पाहून मूर्ख मनुष्य साठविलेल्या पाण्याचा बांध फोडून टाकतो॥ २२८॥ फार काय सांगावे! अशा अशा रीतीने संपत्तीच्या निमित्ताने उन्मत्त होणे, त्याला दर्प म्हणतात, हे न बोलता जाण॥ २२९॥

आणि जगा वेदीं विश्वासु। आणि विश्वासीं पूज्य ईशु। जगीं एक तेजसु। सूर्येचि हा॥ २३०॥
जगस्पृहे आस्पद। एक सार्वभौम पद। न मरणें निर्विवाद। जगा पढियें॥ २३१॥
म्हणौनि जरी उत्साहें। यातें वानूं जाये। कीं तें आइकोनि मत्सरु वाहे। फुगों लागे॥ २३२॥
म्हणे ईश्वरातें खायें। तया वेदा विष सूयें। गौरवामाजीं त्राये। भंगीत असे॥ २३३॥
पतंगा नावडे ज्योती। खद्योता भानूची खंती। कां टिटिभेनें अपांपती। वैरी केला॥ २३४॥
तैसा अभिमानाचेनि मोहें। ईश्वराचें नामही न साहे। बापाते म्हणे मज हे। सवती जाली॥ २३५॥
ऐसा मान्यतेचा पुष्टगंडु। तो अभिमानी परमलंडु। रौरवाचा रूढु। मार्गचि तो हा॥ २३६॥

अर्थ—जगाला वेदांच्या ठिकाणीच विश्वास वाटतो व त्या विश्वासामुळे वेदांनी प्रतिपादिलेल्या ईश्वराला जग पूज्य मानते. या जगात तेजस्वी एक सूर्यच आहे॥ २३०॥ जगाला एक पद प्राप्त व्हावे अशी महत्वाकांक्षा आहे व ते म्हणजे सार्वभौमपद होय. जगात कोणालाहि, मरू नये, हेच आवडते॥ २३१॥ म्हणून आनंदाने कोणी त्याची प्रशंसा केली तर ती ऐकून त्याच्याविषयी मत्सर दाखवून स्वत: अभिमानाने फुगू लागतो॥ २३२॥ आणि म्हणतो की मी ईश्वरास खाऊन टाकीन, त्या वेदाला विष देईन व मोठेपणाच्या अभिमानाने व्यवहाराला पायाखाली तुडवितो॥ २३३॥ पतंगाला दिवा आवडत नाही, काजव्याला सूर्याचे वाईट वाटते व टिटवी पक्ष्याने समुद्राशी वैर मानले॥ २३४॥ त्याप्रमाणे अभिमानाच्या मोहाने ईश्वराचे नावहि सहन होत नाही व आपल्या प्रत्यक्ष बापालाच मोठेपणाच्या आड येणारी सवत समजतो॥ २३५॥ मानमान्यतेने उन्मत्त झालेला व अभिमानाने कोणालाहि न जुमानणारा असा पुरुष म्हणजे रौरव नरकाला जाणारा रुळलेला मार्गच होय॥ २३६॥

आणि पुढिलांचे सुख। देखणियाचें होय मिख। चढे क्रोधाग्निचे विख। मनोवृत्ती॥ २३७॥
शीतळाचिये भेटी। तातला तेलीं आगी उठी। चंद्रु देखोनि जळे पोटीं। कोल्हा जैसा॥ २३८॥
विश्वाचें आयुष्य जेणें उजळे। तो सूर्य उदैला देखोनि सवळे। पापिया फुटती डोळे। डुडुळाचे॥ २३९॥
जगाची सुखपहांट। चोरां मरणाहूनि निकृष्ट। दुधाचें काळकूट। होय व्याळीं॥ २४०॥
अगाधें समुद्रजळें। प्राशितां अधिकें जळे। वडवाग्नि न मिळे। शांति कहीं॥ २४१॥

तैसा विद्याविनोदविभवें। देखे पुढिलांचीं दैवें। तंव तंव रोषु दुणावे। क्रोधु तो जाण॥ २४२॥

अर्थ—समोर आलेल्या पुरुषाचे सुख पाहण्याचे निमित्त होताच मनोवृत्तीत क्रोधाग्नीचे विष चढते॥ २३७॥ तापलेल्या तेलात थंड पाणी पडताच भडका उठतो किंवा चंद्र उगवला म्हणजे कोल्हा जसा मनात जळतो॥ २३८॥ ज्याच्या योगाने विश्वाचे व्यापार चालू होतात तो सूर्य सकाळी उगवलेला पाहून पापी घुबडाचे डोळे फुटतात॥ २३९॥ सर्व जगाला सुखरूप वाटणारी पाहाट चोराला मरणाहून दुःखद होते. सर्पाचे ठिकाणी दूधच विषरूपाने परिणाम पावते॥ २४०॥ वडवाग्नि समुद्राचे अगाध जळ पीत राहूनहि अधिकच पेटत राहतो व त्याला कधी शांति मिळत नाही॥ २४१॥ त्याप्रमाणे विद्या, विलास, ऐश्वर्य यांनी युक्त अशी इतरांची भाग्ये जसजशी पाहतो, तसतसा जो रोष वाढत जातो, त्याला क्रोध म्हणतात, असे जाण॥ २४२॥

आणि मन सर्पाची कुटी। डोळे नाराचांची सुटी। बोलणें ते वृष्टी। इंगळांची॥ २४३॥
येर जें क्रियाजात। तें तिखयाचें कर्वत। ऐसें सबाह्य खसखसित। जयाचें गा॥ २४४॥
तो मनुष्यांत अधम जाण। पारुष्याचें अवतरण। आतां आइक खण। अज्ञानाची॥ २४५॥

अर्थ—ज्याचे मन जणु काय सर्पाचे बीळच होय. ज्याचे डोळ्याने पाहणे म्हणजे जणु काय सोडलेले तीक्ष्ण बाण होत, ज्याचे बोलणे म्हणजे जळजळित निखाऱ्याचा वर्षावच होय॥ २४३॥ ज्याच्या बाकीच्या क्रिया पोलादी कर्वताप्रमाणे कापणाऱ्या असून ज्याचे अंतर्बाह्य वागणे सर्वथा खरपूसच असते॥ २४४॥ तो मनुष्यांमध्ये अत्यंत नीच व कठोरपणाची मूर्तिच समजावी. आता अज्ञानाचे लक्षण ऐक॥ २४५॥

तरी शीतोष्णस्पर्शा। निवाडु नेणे पाषाणु जैसा। कां रात्रीं आणि दिवसा। जात्यंधु तो॥ २४६॥
आगी उठिला आरोगणें। जैसा खाद्याखाद्य न म्हणे। कां परिस पाडु नेणे। सोनया लोहा॥ २४७॥
नातरी ते नानारसीं। रिघोनि दर्वी जैसी। परी रसस्वादासी। चाखो नेणें॥ २४८॥
कां वारा जैसा पारखी। नव्हेचि गा मार्गामार्गाविखीं। तैसें कृत्याकृत्यविवेकीं। अंधपण जें॥ २४९॥
हें चोख हें मैळ। ऐसें नेणोनियां बाळ। देखे तें केवळ। मुखींचि घाली॥ २५०॥
तैसें पापपुण्याचें खिचटें। करोनि खातां बुद्धि चेष्टे। कडु मधुर न वाटे। ऐसी जे दशा॥ २५१॥
तिये नाम अज्ञान। या बोला नाहीं आन। एवं साही दोषांचें चिन्ह। सांगितलें॥ २५२॥

अर्थ—जसे दगडाला हा शीत स्पर्श, हा उष्ण स्पर्श, असा किंवा जन्मांधाला ही रात्र, हा दिवस, असा निवाडा कळत नाही॥ २४६॥ ज्याप्रमाणे पेटलेला अग्नि खाण्याकरिता उठला असता खाण्याजोगे काय व न खाण्याजोगे काय हा विचार करीत नाही किंवा परिस हे सोने, हे लोखंड असा भेद करू जाणत नाही॥ २४७॥ किंवा ज्याप्रमाणे पळीला खारट, आंबट, तिखट इत्यादि सर्व रसांमध्ये फिरत असताहि त्या रसांचा स्वाद कळत नाही॥ २४८॥ किंवा ज्याप्रमाणे वाऱ्याला मार्ग, अमार्ग याची परीक्षा नसते, त्याप्रमाणे काय करावे, काय करू नये, हे ज्याला समजत नाहीत॥ २४९॥ लहान मूल हे घाणेरडे, की हे स्वच्छ हे न जाणता दिसेल ते केवळ तोंडातच घालते॥ २५०॥ त्याप्रमाणे पाप-पुण्यकर्माची खिचडी करून खाण्याचा व्यापार करीत असता तिला कडू-गोड, बरे-वाईट, असे काही वाटत नाही, अशी जी बुद्धीची दशा॥ २५१॥ त्या दशेला अज्ञान म्हणतात. हे बोलणे अन्यथा नाही. याप्रमाणे आसुरी संपत्तीच्या सहाहि दोषांची लक्षणे सांगितली॥ २५२॥

इहींच साही दोषांगीं। हे आसुरी संपत्ति दाटुगी। जैसें थोर विषय सुभगे अंगी। अंग सानें॥ २५३॥
कां तिघां वन्हींच्या पांती। पाहतां थोडे ठाय गमती। परी विश्वही प्राणाहुती। करूं न पुरे॥ २५४॥
धातयाही गेलिया शरण। त्रिदोषीं न चुके मरण। तया तिहींची दुणी जाण। साही दोष हे॥ २५५॥
इहीं साही दोषीं संपूर्णी। जाली इयेचि उभारणी। म्हणौनि आसुरी उणी। संपदा नव्हे॥ २५६॥
परी क्रूरग्रहांची जैसी। मांदी मिळे एकेचि राशी। कां येती निंदकापासीं। अशेष पापें॥ २५७॥
मरणाराचें आंग। पडिघाती अघवेचि रोग। कां कुमुहूर्तीं दुर्योग। एकवटती॥ २५८॥

विश्वासला आतुडवीजे चोरा। शिणला सुइजे महापुरा। तैसें दोषी इहीं नरा। अनिष्ट कीजे॥ २५९॥
कां आयुष्य जातिये वेळे। शेळिये सात वेउळि मिळे। तैंसे साही दोष सगळे। जोडती तया॥ २६०॥
मोक्षमार्ग्याकडे। जैं जयांचा आंबुखा पडे। तैं न निघे म्हणौनि बुडे। संसारीं तो॥ २६१॥
अधमां योनींच्या पाउटीं। उतरत जो किरीटी। स्थावरांही तळवटीं। बैसणें घे॥ २६२॥
हें असो तयाच्या ठायीं। मिळोनि साही दोषीं इहीं। आसुरी संपत्ति पाहीं। वाढविजे॥ २६३॥
ऐसिया या दोनी। संपदा प्रसिद्धा जनीं। सांगितलिया चिन्हीं। वेगळाल्या॥ २६४॥

अर्थ—ज्याप्रमाणे भुजंगाचे शरीर लहान असते. पण त्याचे विष भयंकर असते, त्याप्रमाणे आसुरी संपत्ति सहा दोषांनी युक्त असली तरी ती तेवढ्यानीच बलवान झाली आहे॥ २५३॥ ज्याप्रमाणे तिन्ही अग्नीच्या (आहवनीय, दक्षिण, गार्हपत्य) पंक्तीला पाहता जागा थोडी लागते, पण विश्वहि त्यांच्या घासाला पुरत नाही॥ २५४॥ त्रिदोष कुपित झाले असता ब्रह्मदेवाला शरण जाऊनहि मरण चुकविता येत नाही. मग हे तर तीन दोषांच्या दुप्पट सहा दोष आहेत॥ २५५॥ या संपूर्ण सहा दोषांनी आसुरी संपत्तीची घडण झाली असल्यामुळे ती कमी सामर्थ्यवान नाही॥ २५६॥ सर्व क्रूर ग्रह मिळून एकाच राशीला यावे किंवा निंदकाला सर्वच पापे घडतात॥ २५७॥ मरणाऱ्याच्या शरीराचे ठिकाणी सर्वच रोग येऊन राहतात किंवा कुमुहूर्तावर सर्व वाईट योग जमतात॥ २५८॥ विश्वास टेवणारा मनुष्य जसा चोराचे हाती लागावा, थकलेला मनुष्य महापुरात सापडावा, त्याप्रमाणे या सहाहि दोषांनी मनुष्याचे अकल्याणच होते॥ २५९॥ आयुष्य सरले असताच ज्याप्रमाणे शेळीशी हिंस्र पशूची गांठ पडते त्याप्रमाणे हे सर्व सहाहि दोष त्या आसुरी संपत्तीच्या पुरुषाला प्राप्त होतात॥ २६०॥ जेव्हा या सहा दोषांचा शिंतोडा पडतो तेव्हा मोक्षमार्गाने जाण्याकरिता निघणार नाही, असे म्हणून तो संसारातच बुडून राहतो॥ २६१॥ निकृष्ट योनीच्या पायऱ्यांनी खाली जात असता, अर्जुना! जो शेवटी वृक्षादि स्थावर योनीच्या तळी जातो॥ २६२॥ हे असो! या सहा दोषांनी त्याचे ठिकाणी एक आसुरी संपत्तिच वाढविली जाते, पाहा!॥ २६३॥ अशा रीतीने जगात प्रसिद्ध असलेल्या या दोन्ही संपत्ती वेगळाल्या चिन्हांनी सांगितल्या॥ २६४॥

दैवी सम्पद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता। मा शुचः सम्पदं दैवीमभिजातोऽसि पाण्डव॥ ५॥

अर्थ—दैवी संपत्ति मुक्त करणारी असून आसुरी संपत्ति बंधन करणारी आहे, असे मानले जाते. हे अर्जुना! तू दैवी संपत्ति घेऊन जन्मास आला असल्यामुळे आसुरी संपत्तीची तू भीति बाळगू नकोस॥ ५॥

इया दोन्हींमाजी पहिली। दैवी जे म्हणितली। ते मोक्षसूर्यें पाहली। उखाचि जाण॥ २६५॥
येरी जे दुसरी। संपत्ति कां आसुरी। ते मोहलोहाची खरी। सांखळी जीवां॥ २६६॥

अर्थ—ह्या दोनपैकी पहिली जी दैवी संपत्ति म्हणून म्हटली जाते ती मोक्षसूर्याने उजाडलेली पाहाटच होय॥ २६५॥ बाकीची राहिलेली दुसरी जी आसुरी संपत्ति ती जीवाच्या पायात असलेली अविवेकपूर्वक आसक्तीची लोखंडी बेडीच होय॥ २६६॥

गूढार्थदीपिका—शास्त्रीय गुणाचे आचरण करणारे लोकच आजपर्यंत संसार तरून गेले व पुढेहि तरतील, पण अशास्त्रीय स्वैर वर्तन करणारे लोक मागे कोणी संसार तरून गेले नाहीत व पुढेहि तरून जाणार नाहीत, असे येथे गीता निश्चयाने सांगते.

परि हे आइकोनि झणें। भय घेसी हो मनें। काय रात्रीचा दिनें। धाक धरिजे॥ २६७॥
हे आसुरी संपत्ति तया। बंधालागीं धनंजया। जो साही दोषां ययां। आश्रयो होये॥ २६८॥
तूं तंव पांडवा। सांगितलेया दैवा। गुणनिधी बरवा। जन्मलासी॥ २६९॥
म्हणौनि पार्था तूं या। दैवी संपत्ती स्वामिया। होऊनि यावें उवाया। कैवल्याचिया॥ २७०॥

अर्थ—हे ऐकून, अर्जुना! तू कदाचित् मनात भय धरशील, पण दिवसाने रात्रीचा धाक धरावा काय?॥ २६७॥ हे अर्जुना! जो या सहाहि दोषांना आश्रय होतो त्यालाच ही आसुरी संपत्ति बंधनकारक म्हणून संसारात

पाडणारी होते॥ २६८॥ पण, अर्जुना! तू तर दैवी संपत्तीत सांगितलेल्या सद्‌गुणांचा समुद्र असा उत्तम जन्माला आला आहेस॥ २६९॥ म्हणून, हे पार्था! तू दैवी संपत्तीचा स्वामी होऊन कैवल्यासारख्या सर्वोत्कृष्ट उत्कर्षास प्राप्त हो॥ २७०॥

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च। दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु॥ ६॥

अर्थ—अर्जुना! ह्या लोकात दैव व असुर अशी दोन प्रकारची भूतसृष्टी आहे. दैवसृष्टि आतापर्यंत विस्तारपूर्वक सांगितली. आता पुढे आसुरी भूतसृष्टि सांगतो, ऐक॥ ६॥

आणि दैवां आसुरां। संपत्तिवंतां नरां। अनादिसिद्ध उजरा। राहाटीचा आहे॥ २७१॥
जैसें रात्रीच्या अवसरीं। व्यापारिजे निशाचरीं। दिवसा सुव्यवहारीं। मनुष्यादिकीं॥ २७२॥
तैसिया आपुलालिया रहाटीं। वर्तती दोनी सृष्टी। दैवी आणि किरीटी। आसुरी येथ॥ २७३॥
तेवींचि विस्तारूनि दैवी। ज्ञानकथनादि प्रस्तावीं। मागील ग्रंथीं बरवी। सांगितली॥ २७४॥

अर्थ—दैवी संपत्ति व आसुरी संपत्ति घेऊन जन्मलेल्या पुरुषाची अशी दोन प्रकारची प्रसिद्ध अशी राहाटी अनादिसिद्धच आहे॥ २७१॥ ज्याप्रमाणे रात्रीच्या वेळी पिशाच्चांचा व्यवहार असतो व दिवसा मनुष्यादि सर्व नीट व्यवहार करतात॥ २७२॥ त्याप्रमाणे दैवी आणि आसुरी ह्या दोन्ही भूतसृष्टी, हे अर्जुना! येथे आपआपल्या राहटीप्रमाणे वागत असतात॥ २७३॥ तसेच मागे ज्ञानलक्षणाचे निरूपण करताना दैवी सृष्टीचे उत्तम रीतीने विस्तारपूर्वक वर्णन केले॥ २७४॥

आतां आसुरी जे सृष्टि। तेथिंची उपलऊं गोठी। अवधानाची दिठी। दे पां निकी॥ २७५॥
तरी वाद्येंवीण नादु। नेदी कवणाही सादु। कां अपुष्पीं मकरंदु। न लभे जैसा॥ २७६॥
तैसी प्रकृति हे आसुर। एकली नोहे गोचर। जंव एकाधें शरीर। माल्हाती ना॥ २७७॥
मग आविष्करला लांकुडें। पावकु जैसा जोडे। तैसी प्राणिदेहीं सांपडे। आटोपली हे॥ २७८॥
ते वेळीं जे वाढी ऊंसा। तेचि आंतुला रसा। देहाकारु होय तैसा। प्राणियांचा॥ २७९॥
आतां तयांचि प्राणियां। रूप करूं धनंजया। घडले जे आसुरीया। दोषवृद्धी॥ २८०॥

अर्थ—आता ज्याला आसुरी सृष्टि म्हणतात, तेथील आचरण कसे असते, विस्ताराने सांगतो. चांगले लक्ष देऊन ऐक॥ २७५॥ ज्याप्रमाणे वाद्यावाचून ध्वनि नाही व ध्वनीशिवाय प्रतिध्वनि उमटत नाही किंवा फुलावाचून मधु प्राप्त होत नाही॥ २७६॥ त्याप्रमाणे ही आसुरी प्रकृति जोपर्यंत एखाद्या शरीरात प्रगट होत नाही, तोपर्यंत ती केवळ एकटी दिसू शकत नाही॥ २७७॥ ज्याप्रमाणे अग्नि लाकडात प्रगट होतो, तेव्हाच तो दिसतो, त्याप्रमाणे ही प्राण्याच्या शरीरात प्रगट झाली असता स्पष्ट दिसते॥ २७८॥ उसाची जी वाढ होते ती त्याच्या आतील रसाचीच वाढ होय. त्याप्रमाणे आसुरी संपत्ति देहात प्रगट होते तेव्हा प्राण्यांचे देह तदाकार होतात॥ २७९॥ म्हणून अर्जुना! आता आसुरी संपत्तीच्या दोषांनी भरलेल्या पुरुषांच्या आचरणांचे स्वरूप सांगतो॥ २८०॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः। न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते॥ ७॥

अर्थ—आसुरी संपत्तीचे लोक प्रवृत्ति-म्हणजे शास्त्रांनी 'करावा' म्हणून सांगितलेला विधिआचार--व-निवृत्ति-म्हणजे करू नये म्हणून सांगितलेले असते ते-काहीच जाणत नाहीत. त्यांच्या आचरणात शुद्धि, विहित आचार व सत्य नसते॥ ७॥

तरि पुण्यालागी प्रवृत्ती। कां पापविषयीं निवृत्ती। या जाणणेयाची राती। तयांचें मन॥ २८१॥
निगणेया आणि प्रवेशा। चित्त नेदीत आवेशा। कोशकिट जैसा। जाचिन्नला पैं॥ २८२॥
कां दिधलें मागुती येईल। कीं न ये हें पुढील। न पाहातां दे भांडवल। मूर्ख चोरां॥ २८३॥
तैसिया प्रवृत्ति निवृत्ति दोनी। नेणिजती आसुरीं जनीं। आणि शुचित्व स्वप्नीं। देखती ना ते॥ २८४॥
काळिमा सांडील कोळसा। वरी चोखी होईल वायसा। राक्षसही मांसा। विटों शके॥ २८५॥

परी आसुरां प्राणियां। शौच नाहीं धनंजया। पवित्रत्व जेवीं भांडिया। मद्याचिया॥ २८६॥

अर्थ—पुण्यकर्माविषयी प्रवृत्ति असली पाहिजे किंवा पापकर्माविषयी निवृत्ति असली पाहिजे हे जाणण्याविषयी त्याच्या मनात आंधार असतो॥ २८१॥ ज्याप्रमाणे कोशातील कीडा कोश बांधण्याच्या आवेशात बाहेर निघण्यास किंवा प्रवेश करण्याकडे लक्ष न दिल्यामुळे जाचातच सापडतो॥ २८२॥ किंवा ज्याप्रमाणे दिलेला पैसा परत येईल किंवा नाही याचा विचार न करतां मूर्ख मनुष्य चोराला पैसे देतो॥ २८३॥ त्याप्रमाणे पुण्यकर्म करण्याकडे प्रवृत्ति किंवा पापकर्मापासून निवृत्ति हे दोन्ही आसुरी लोक जाणत नाहीत. शुद्धि तर त्यांना स्वप्नातहि दिसत नाही॥ २८४॥ कोळसा कदाचित् आपला काळेपणा टाकून देईल, कावळा पांढरा होईल, राक्षसालाहि एकदा मांसाचा कंटाळा येईल॥ २८५॥ पण मद्याच्यां भांड्याला ज्याप्रमाणे पावित्र्य नसते, त्याप्रमाणे आसुरी संपत्तीचा पुरुष शुद्धि जाणत नाही॥ २८६॥

वाढविती विधीची आस। कां पाहाती वडिलांची वास। कर्मे आचारती हे भाष। नेणतीचि ते॥ २८७॥
जैसें चरणें शेळियेचें। कां धांवणें वारियाचें। जाळणें आगीचें। भलतेउतें॥ २८८॥
तैसें पुढां सूनि स्वैर। आचरती तेगा आसुर। सत्येंसि वैर। सदाचि तयां॥ २८९॥
जरी नांगिया आपुलिया। विंचू करी गुदगुलिया। तरी साचा बोलिया। बोलती ते॥ २९०॥
अपानाचेनि तोंडें। जरी सुगंधा येणें घडे। तरी सत्य तयां जोडे। आसुरांतें॥ २९१॥
ऐसें तें न करितां कांहीं। आंगेंचि वोखटें पाहीं। आतां बोलती ते नवाई। सांगिजेल॥ २९२॥
एऱ्हवीं करेयाच्या ठायीं चांग। तें तयासि कैंचें नीट आंग। तैसा असुरांचा प्रसंग। प्रसंगें परिस॥ २९३॥
उधवणीचें जेवीं तोंड। उगळी धुंवाचे उभड। हें जाणिजे तेवीं उघड। सांगों ते बोल॥ २९४॥

अर्थ—शास्त्रानुसार वागण्याची इच्छा वाढवावी किंवा वाडवडिलांच्या आचारविचाराकडे पाहावे किंवा कर्माचे आचरण करावे ही गोष्ट त्यांना माहितच नसते॥ २८७॥ ज्याप्रमाणे शेळीचे चरणे किंवा वाऱ्याचे धावणे किंवा अग्नीचे जाळणे भरमसाट असते॥ २८८॥ त्याप्रमाणे आसुरी लोक दृष्टीसमोर स्वैरपणा ठेऊन आचरण करतात. खरेपणाशी त्यांचे नेहमीच वैर असते॥ २८९॥ जर विंचू आपल्या नांगीने गुदगुल्या करील तरच हे असुर खरे बोलतील॥ २९०॥ अधोद्वाराने सुगंध येईल तरच त्यांचा सत्य बोलण्याशी संबंध होईल॥ २९१॥ अशा रीतीने ते काही न करता सर्वांगाने वाईट असतात, पाहा. आता त्यांचे आश्चर्यकारक बोलणे सांगतो, पाहा॥ २९२॥ एऱ्हवी उंटाचे कोणते आंग, नीटनेटके चांगले असते? त्याप्रमाणे आसुरी लोकांच्या गोष्टी प्रसंगाने ऐक॥ २९३॥ ज्याप्रमाणे धुराळ्याचे तोंड धुरांचे लोटच सोडत असते, त्याप्रमाणे आसुरी लोकांचे बोलणे असते, असे जाण. तेच बोलणे उघड सांगतो, ऐक॥ २९४॥

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम्। अपरस्परसम्भूतं किमन्यत्कामहैतुकम्॥ ८॥

अर्थ—'हे जगत् अनादि आहे' इत्यादि जगताविषयीचे शास्त्राचे म्हणणे खोटे आहे. त्याची व्यवस्था पापपुण्यावर आधारलेली नाही. ईश्वर म्हणून कोणी त्याचा शास्ता नाही ते कामी स्त्रीपुरुषापासून झाले आहे. कामावाचून त्याच्या उत्पत्तीचा दुसरा हेतु काय? असे ते आसुरी लोक बोलतात॥ ८॥

तरी विश्व हा अनादि ठावो। येथ नियंता ईश्वररावो। चावडिये न्यावो अन्यावो। निवडी वेदु॥ २९५॥
वेदीं अन्यायीं पडे। तो निरयभोगें दंडे। सन्यायी तो सुरवाडें। स्वर्गीं जिये॥ २९६॥
ऐसी हे विश्वव्यवस्था। अनादि जे पार्था। इयेतें म्हणती ते वृथा। अवघेंचि हें॥ २९७॥
यज्ञमूढ ठकिले यागीं। देवपिसे प्रतिमालिंगीं। नागविले भगवे योगी। समाधिभ्रमें॥ २९८॥
तेथ आपलेनि बळें। भोगिजे जें जें वेंटाळें। हें वांचोनि कें वेगळें। पुण्य आहे॥ २९९॥
ना अशक्तपणें आंगिकें। वेंगळ वेंटाळीं न टके। ऐसा गादिजे वीण विषयसुखें। तेंचि पाप॥ ३००॥
प्राण घेपती संपन्नांचे। तें पाप जरी साचें। तरी सर्वस्व हाता ये तयांचें। हे पुण्यफळ कीं॥ ३०१॥
बळी अबळातें खाय। हेंचि बाधित जरी होय। तरी मासयां कां न होय। निसंतान॥ ३०२॥

अर्थ—तरी जगत् अनादि आहे, त्याचा शास्ता परमात्मा आहे. वेद हा आपल्या चावडीवर न्याय अन्यायांचा (पुण्यपापांचा) निवाडा करतो॥ २९५ ॥ वेदांनी ज्याला अन्यायी (पापी) ठरविले, त्याला नरकरूपी दुःखाचा दंड मिळतो आणि पुण्यकर्म करणारा स्वर्गात सुख भोगतो॥ २९६ ॥ अर्जुना! अशा प्रकारे जगाची जी अनादि व्यवस्था आहे ती सर्व खोटी आहे, असे ते (असुर लोक) म्हणतात॥ २९७ ॥ आणखी ते म्हणतात, यज्ञाच्या पाठीपागे लागणाऱ्या मूर्खांना यागानी ठकविले. देवाच्या मागे लागून वेडे झालेल्यांना देवाच्या प्रतिमा व लिंग यांनी नागविले. भगवे वस्त्र परिधान करणारे योगी समाधीच्या भ्रमात सापडले॥ २९८ ॥ या मनुष्यलोकात आपण आपल्या मनगटाच्या बळावर जे जे प्राप्त करून घेता येईल ते ते प्राप्त करून घेऊन भोगावे, हेच पुण्य होय. याच्या शिवाय दुसरे पुण्य कोणते?॥ २९९ ॥ तसेच आंगात बळ नसल्यामुळे निरनिराळे भोग प्राप्त करून घेता येत नाहीत; म्हणून जे दुःख भोगणे, तेच पाप होय॥ ३०० ॥ श्रीमंत लोकांचे प्राण घेणे, हे जर पाप असेल तर त्यांची सर्व संपत्ति हाती येते हे पुण्याचेच फळ होय ना!॥ ३०१ ॥ बलवंताने दुर्बलाला खाल्ले असता बाधक होते, असे असेल तर माशांचे निसंतान कां होत नाही॥ ३०२ ॥

आणि कुळें शोधूनि दोन्ही। कुमारेंचि शुभलग्नीं। मेळविजती प्रजासाधनीं। हेतु जरी॥ ३०३ ॥
तरी पशुपक्ष्यादि जाती। जया मिती नाहीं संतती। तयां कोणें प्रतिपत्ती। विवाह केले॥ ३०४ ॥
चोरियेचे धन आलें। तरी तें कोणासि विष जालें। वालभें परद्वार केलें। कोढी कोणी होय॥ ३०५ ॥
म्हणोनि देव गोसावी। तो धर्माधर्मु भोगवी। आणि परत्राच्या गांवीं। करी तो भोगी॥ ३०६ ॥
परी परत्र ना देवो। न दिसे म्हणोनि तें वावो। आणि कर्ता निमे मा ठावो। भोग्यासि कवण॥ ३०७ ॥

अर्थ—आणि दोन्ही कुळांचा विचार करून मुलामुलींचे सुमुहूर्तावर लग्न करणे हे जर संतति उत्पत्तीला कारण होते, असे म्हणावे॥ ३०३ ॥ तर ज्याच्या संततीला मर्यादा नाही अशा पशुपक्ष्यादि जातींचे लग्न कोणत्या शास्त्रीय विधीने होतात॥ ३०४ ॥ चोरीने आलेले धन कोणाला विषाप्रमाणे प्राणघातक होते? आणि आवडीने परद्वार करणारा कोण अचूक कुष्टी होतो?॥ ३०५ ॥ म्हणून परमेश्वर जगाचा स्वामी आहे, तो पुण्य-पापकर्माप्रमाणे भोग देतो आणि जीव मेल्यानंतर परलोकात फळ भोगतो. पण परलोक व देव दिसत नाहीत म्हणून ते नाहीत व कर्ता मेल्यानंतर भोग्य पदार्थाचे ठिकाण कोठे असणार?॥ ३०६-३०७ ॥

येथ उर्वशिया इंद्र सुखी। जैसा कां स्वर्गलोकीं। तैसाचि कृमिही नरकीं। लोळत श्लाघे॥ ३०८ ॥
म्हणौनि नरक स्वर्गु। नव्हे पापपुण्यभागु। जे दोहीं ठायीं सुखभोगु। कामाचाचि तो॥ ३०९ ॥
याकारणें कामें। स्त्रीपुरुषयुग्में। मिळती तेथ जन्मे। आघवें जग॥ ३१० ॥
आणि जें जें अभिलाषें। स्वार्थालागीं पोषे। पाठीं परस्परें द्वेषें। कामचि नाशी॥ ३११ ॥
एवं कामावांचूनि कांहीं। जगा मूळचि आन नाहीं। ऐसें बोलती पाहीं। आसुर गा ते॥ ३१२ ॥
आतां असो हें किडाळ। बोली न करूं पघळ। सांगतांचि सफोल। होतसे वाचा॥ ३१३ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे स्वर्गात उर्वशीच्या समागमाने इंद्र सुखी होतो. तसेच नरकातील किडेहि नरकात सुख मानतात॥ ३०८ ॥ म्हणून नरक, स्वर्ग पापपुण्याचे फळ नव्हे. कारण दोन्ही ठिकाणी विषयाचाच सुखभोग आहे॥ ३०९ ॥ म्हणूनच कामवासनेने स्त्रीपुरुष एके ठिकाणी मिळाले असता हे सर्व जगत् उत्पन्न होते॥ ३१० ॥ आणि ज्याची ज्याची इच्छा करतो ते ते स्वार्थाकरिता जतन करतो व नंतर परस्पराच्या द्वेषाने कामच त्यांचा नाश करतो॥ ३११ ॥ अशा रीतीने कामवासनेवाचून जगाचे दुसरे कारण नाही, असे असुर लोक मानीत असतात॥ ३१२ ॥ आता हे निंद्य वर्णन फार करीत बसत नाही, हे वर्णन करण्यात वाचेला व्यर्थ शीणच होतो॥ ३१३ ॥

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः। प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः॥ ९ ॥

अर्थ—या दृष्टीचा आश्रय करून आत्मस्वरूपाला सर्वस्वी विसरलेले मंदबुद्धीचे असुर लोक, जगाचे शत्रु, जगाचा सर्वस्वी नाश करण्याकरिता घोर कर्म करणारे असे उत्पन्न होतात॥ ९ ॥

आणि ईश्वराचिया खंती। नुसधियाचि करिती चांथी। हेंही नाहीं चित्तीं। निश्चयो एकु॥ ३१४॥
किंबहुना उघड। आंगीं लाऊनियां पाखांड। नास्तिकपणाचें हाड। रोंविलें जीवीं॥ ३१५॥
ते वेळीं स्वर्गालागीं आदरु। कां नरकाचा अडदरु। या वासनांचा अंकुरु। जळोनि गेला॥ ३१६॥
मग केवळ ये देहखोडां। अमेध्योदकाचा बुडबुडा। विषयपंकीं सुहाडा। बुडाले गा॥ ३१७॥
जैं आटावें होती जळचर। तैं डोहीं मिळती ढीवर। कां पडावें होय शरीर। तैं रोगा उदयो॥ ३१८॥
उदैजणें केतूचें जैसे। विश्वा अनिष्टोद्देशें। जन्मती ते तैंसे। लोकां आटूं॥ ३१९॥
विरूढलिया अशुभ। फुटती तैं ते कोंभ। पापाचे कीर्तिस्तंभ। चालते ते॥ ३२०॥
आणि मागांपुढां जाळणें। वांचूनि आगी कांहीं नेणे। तैसें विरुद्धचि एक करणें। भलतेयां॥ ३२१॥
परी तेंचि गा करणें। आदरिती संभ्रमें जेणें। तो आइक पार्था म्हणे। श्रीनिवासु॥ ३२२॥

अर्थ—आणि अंत:करणात ईश्वराविषयी तिरस्कार असल्यामुळे व्यर्थ बडबड करतात. वास्तविक त्यांच्या चित्तात कोणताहि एक निश्चय नसतो॥ ३१४॥ किंबहुना उघड पाखंडमत स्वीकारून अंत:करणात नास्तिकपणाचे हाड रोवून घेतात॥ ३१५॥ तेव्हा पुण्यकर्माने स्वर्ग मिळवावा या आदररूप किंवा पापकर्माने नरक प्राप्त होईल या भीतीरूप वासनाचा अंकुर त्याच्या मनातून जळून गेलेला असतो॥ ३१६॥ मग रसरक्ताच्या अपवित्र अशा पाण्याचा जणु काय बुडबुडा, अशा देहरूपी खोड्यात पडून, हे अर्जुना! ते विषयरूपी चिखलात बुडाले॥ ३१७॥ डोहातील जलचराचा निसंतान होण्याचा काल आला असता ढीवर डोहात शिरतात किंवा शरीर पडते वेळी सर्व रोग उद्भवतात॥ ३१८॥ ज्याप्रमाणे केतूचा उदय जगाचे अनिष्ट होण्याकरिता होत असतो, त्याप्रमाणे ते असुर लोक लोकांचा नाश करण्याकरिताच जन्माला येतात॥ ३१९॥ ते असुर लोक म्हणजे वाढलेल्या पापकर्माचे कोंब आहेत व पापकर्माच्या कीर्तीला आधार देणारे चालते-बोलते स्तंभ आहेत॥ ३२०॥ जसा अग्नि मागील-पुढील जाळण्यावाचून काही जाणत नाही, त्याप्रमाणे असुर लोक वाटेल त्याचे वाईट करणे हेच एक जाणतात॥ ३२१॥ भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे अर्जुना! ते वाईट करणेहि ज्या उत्साहाने ते करतात तो (उत्साह) सांगतो, ऐक॥ ३२२॥

काममाश्रित्य दुष्पूरं दम्भमानमदान्विता:। मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान्प्रवर्तन्तेऽशुचिव्रता:॥ १०॥

अर्थ—कधी तृप्त होणार नाही असा काम वाढवून, दंभ, मान, मद यांनी युक्त होऊन व अविवेकामुळे अशुभ निश्चय करून अमंगल व्रते करण्यास ते प्रवृत्त होतात॥ १०॥

तरी जाळ पाणियें न भरे। आगी इंधन न पुरे। तयां दुर्भरांचिये धुरे। भुकाळु जो॥ ३२३॥
तया कामाचा वोलावा। जीवीं धरूनि पांडवा। दंभमानाचा मेळावा। मेळविती॥ ३२४॥
मातलिया कुंजरा। आगळी जाली मदिरा। तैसा मदाचा ताठा तंव जरा। चढतां आंगीं॥ ३२५॥
आणि आग्रहा तोचि ठावो। वरि मौढ्याऐसा सावावो। मग काय वानूं निर्वाहो। निश्चयाचा॥ ३२६॥
जिहीं परोपतापु घडे। परावा जीवु रगडे। तिहीं कर्मीं होऊनि गाढे। जन्मवृत्ती॥ ३२७॥
मग आपुलें केलें फोकारिती। आणि जगातें धिक्कारिती। दाहीं दिशीं पसरिती। स्पृहाजाळ॥ ३२८॥
ऐसेनि गा आटोपें। थोरिये आणती पापें। धर्मधेनू खुरपें। सुटलें जैसें॥ ३२९॥

अर्थ—जाळे पाण्याने भरले राहू शकत नाही; विस्तवात कितीहि लाकडे टाकली तरी पुरेशी होत नाहीत, अशा कधीहि तृप्त न होणाऱ्या पदार्थांमध्ये जो अग्रसर आहे॥ ३२३॥ अंत:करणात त्या कामाचे मूळ धरून, अर्जुना! दंभमानादि विकारांचा समुदाय गोळा करतात॥ ३२४॥ ज्याप्रमाणे मदोन्मत्त हत्तीला दारू विशेषच मदोन्तमत्त करते, त्याप्रमाणे आसुरी पुरुष वयोवृद्ध होऊ लागला की अधिकच उन्मत्त होतो॥ ३२५॥ दुराग्रहाचे तोच ठिकाण होतो. आणखी वर त्याच्या जोडीला मूर्खपणा असतो. मग अशा स्थितीत निश्चय टिकण्याचे काय वर्णन करावे?॥ ३२६॥ ज्याच्या योगाने दुसऱ्याला दु:ख होईल, दुसऱ्याचा नाश होईल, असेच जन्मभर करण्याचा ते दृढ निश्चय करतात॥ ३२७॥ मग आपण केलेल्या कर्माची बढाई मारतात व दुसऱ्याचा धिक्कार करतात. अशा रीतीने आपल्या

वासनेचे जाळे जिकडे तिकडे पसरवितात॥ ३२८॥ ज्याप्रमाणे देवाला सोडलेली गाय, हेच कोणी खुरपे, ती सुटली असता सर्व शेताचा फडशा पाडते, त्याप्रमाणे अशा प्रकारच्या आवेशाने ते आसुरी लोक पापांना थोर करून सोडतात॥ ३२९॥

चिन्तामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिताः। कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः॥ ११॥

अर्थ—प्रलयापर्यंतच्या काळाची अमर्याद चिंता वागवून व विषयभोगच सर्वस्व आहे, असा निश्चय करून ते (आसुरी लोक) केवळ विषयपरायणच होतात॥ ११॥

याचि येका आयती। तयाचिया कर्मप्रवृत्ती। आणि जिणियाही परौती। वाहती चिंता॥ ३३०॥
पाताळाहूनि निम्न। जियेचिये उंचिये सानें गगन। जें पाहतां त्रिभुवन। अणुही नोहे॥ ३३१॥
ते योगपटाची मवणी। जीवीं अनियम चिंतवणी। जे सांडूं नेणे मरणीं। वल्लभा जैसी॥ ३३२॥
तैसी चिंता अपार। वाढविती निरंतर। जीवीं सूनि असार। विषयादिक॥ ३३३॥
स्त्रिया गाइलें आइकावें। स्त्रीरूप डोळां देखावें। सर्वेंद्रियीं आलिंगावें। स्त्रियेतेंचि॥ ३३४॥
कुरवंडी कीजे अमृतें। ऐसें सुख स्त्रियेपरौतें। नाहींचि म्हणौनि चित्तें। निश्चयो केला॥ ३३५॥
मग तयाचि स्त्रीभोगा-। लागीं पाताळ स्वर्गा। धांवती दिग्विभागा-। परौतेही॥ ३३६॥

अर्थ—याच एका सिद्धीसाठी ते सर्व कर्म करण्याला प्रवृत्त होतात व जिवंत राहण्यापलीकडची चिंता वाहतात॥ ३३०॥ जी पाताळापेक्षाहि खोल, आकाशाहूनहि उंच आहे व पाहू गेले असता जिच्यापुढे त्रिभुवन अणुहि ठरत नाही॥ ३३१॥ ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री आपल्या पतीला मरण आले तरी त्याला सोडून राहू इच्छित नाही किंवा संन्याशाला नवीन संन्यास घेतल्यावर अंत:करणात पाळावयाच्या नियमांची जशी सारखी घोकणी लागते॥ ३३२॥ अशी अमर्याद चिंता नाशिवंत विषयांविषयी रात्रंदिवस ते वाढवित असतात॥ ३३३॥ स्त्रियांचे गायन ऐकावे, स्त्रियांचे रूप डोळ्यांनी पाहावे व सर्वेद्रियांनी स्त्रियांनाच आलिंगन द्यावे॥ ३३४॥ ज्या सुखावरून अमृतहि ओवाळून टाकावे असे सुख स्त्रीवाचून दुसरे ठिकाणी नाही, असाच ज्यांच्या चित्ताने निश्चय केला॥ ३३५॥ मग ते स्त्रीसुख भोगण्याकरिता दिशांच्या पलीकडे असणाऱ्या पाताळ-स्वर्गलोकांकडे धाव घेतात॥ ३३६॥

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः। ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसञ्चयान्॥ १२॥

अर्थ—शेकडो आशांपाशांनी बद्ध होऊन व कामक्रोधयुक्त होत्साते विषयवासना भोगण्यास अन्यायाने विपुल संपत्तीचा साठा मिळविण्याची इच्छा करतात॥ १२॥

आमिषकवळु थोरी आशा। न विचारितां गिळी मासा। तैसें कीजे विषयाशा। तयांसि गा॥ ३३७॥
वांछित तंव न पवती। मग कोरडियेचि आशेची संतती। वाढऊं वाढऊं होती। कोशकिडे॥ ३३८॥
आणि पसरिला अभिलाषु। अपूर्णु होय तोचि द्वेषु। एवं कामक्रोधांहूनि अधिकु। पुरुषार्थु नाहीं॥ ३३९॥
दिहा खोलणें रात्रीं जागोवा। ठाणांतरियां जैसा पांडवा। अहोरात्रींही विसांवा। भेटेचिना॥ ३४०॥
तैसें उंचौनि लोटिलें कामें। नेहटती क्रोधाचिये ढिमे। तरी रागद्वेषें प्रेमें। न माती केंही॥ ३४१॥

अर्थ—ज्याप्रमाणे मासा, परिणामाचा विचार न करता, गळाला लावलेल्या मासाचा तुकडा गिळतो व त्यात अडकला जातो, त्याप्रमाणे त्याची विषयाची आशा, त्यानाहि तसेच करते॥ ३३७॥ इच्छिलेला विषय प्राप्त न होता कोरडी आशा सारखी वाढवित वाढवित कोशकीड्याप्रमाणे ते आशेतच गुरफटून राहतात॥ ३३८॥ वाढविलेला मनोरथ अपूर्ण राहिल्यास तोच द्वेषात परिणाम पावतो. याप्रमाणे कामक्रोधाहून दुसरा पुरुषार्थच त्यांना वाटत नाही॥ ३३९॥ ज्याप्रमाणे, अर्जुना! देवडीवाल्याला दिवसा मालकाची स्वारी निघाली असता समोर धावावे लागते व रात्री गस्त द्यावी लागते, म्हणून अहोरात्र त्याला विश्रांति मिळत नाही॥ ३४०॥ किंवा कामाने उंचावरून लोटले गेलेले क्रोधाच्या खडकावर आदळतात, तरी विषयांवरील प्रेमामुळे त्यांचा रागद्वेष इतका वाढला असतो की तो कोठे मावत नाही॥ ३४१॥

तेविंचि जीवींचिया हांवा। विषयवासनांचा मेळावा। केला परी तो भोगावा। अर्थें कीं ना॥ ३४२॥
म्हणोनि भोगावयाजोगा। पुरता अर्थु पैं गा। आणावया जगा। झोंबती सैरा॥ ३४३॥
एकातें साधूनि मारिती। एकाचि सर्वस्वें हरिती। एकालागीं उभारिती। अपाययंत्रें॥ ३४४॥
पाशिकें पोतीं वागुरा। सुणीं ससाणे चिकाटी खोंचरा। घेऊनि निघती डोंगरा। पारधी जैसे॥ ३४५॥
ते पोसावया पोट। मारूनि प्राणियांचे संघाट। आणिती ऐसें निकृष्ट। तेंही करिती॥ ३४६॥
परप्राणघातें। मेळविती वित्तें। मिळाल्या चित्तें। तोषणें कैसें॥ ३४७॥

अर्थ—तसेच अंत:करणातील हावेप्रमाणे नाना प्रकारच्या विषयवासना वाढविल्या तरी जवळ धन असेल तरच वासनेप्रमाणे भोग भोगता येतील ना!॥ ३४२॥ म्हणून भोग भोगण्यास लागणारे धन आणण्याकरिता वाटेल तसे जगाला पकडतात॥ ३४३॥ कोणाला फसवून ठार मारतात तर कोणाचे सर्वस्व लुटतात व कोणावर जारण-मारणाचे प्रयोग करतात॥ ३४४॥ ज्याप्रमाणे पारधी, पाश, पोती, जाळे, शिकारी कुत्रे, ससाणा पक्षी, चिकटण्या, भाले घेऊन डोंगरावर जातात व आपले पोट भरण्यासाठी प्राण्यांचे समूह मारून आणतात, त्याप्रमाणे आसुरी लोकहि असे कृष्णकर्म करतात॥ ३४५-३४६॥ दुसऱ्याचे प्राण घेऊन संपत्ति मिळवितात व मिळालेली संपत्ति पाहून कसे संतुष्ट होतात (तेहि ऐक)॥ ३४७॥

इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम्। इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम्॥ १३॥

अर्थ—आज हे धन मी मिळविले आहे. ते अगदी मनाजोगे झाले. हे मी उद्या मिळवीन, पुन: तेहि माझे होणार आहे॥ १३॥

म्हणे आजि मियां। संपत्ति बहुतेकांचिया। आपुल्या हातीं केलिया। धन्यु ना मी॥ ३४८॥
ऐसा श्लाघों जंव जाये। तंव मन आणीकही वाहे। सवेंचि म्हणे पाहे। आणिकांचेंही आणूं॥ ३४९॥
हें जेतुलें असे जोडिलें। तयाचेनि भांडवलें। लाभा घेईन उरलें। चराचर हें॥ ३५०॥
ऐसेनि धना विश्वाचिया। मीचि होईन स्वामिया। मग दिठी पडे तया। उरों नेदी॥ ३५१॥

अर्थ—आणि म्हणतो की मी आज पुष्कळांच्या संपत्ती हस्तगत केल्या, तेव्हा मी धन्य आहे की नाही?॥ ३४८॥ अशी आपली स्तुति करून घेतो, तोच मनात आणखी मिळावे अशी इच्छा उत्पन्न होते व लगेच म्हणतो पाहा! दुसऱ्याचेहि धन आणू॥ ३४९॥ हे जितके काही मिळविले त्या मुद्दलावर उरलेल्या चराचरांतील धनाचा लाभ प्राप्त करून घेईन॥ ३५०॥ अशा रीतीने संपूर्ण जगातील संपत्तीचा मालक होईन व मग दृष्टीस पडेल त्याला जिवंत राहू देणार नाही॥ ३५१॥

असौ मया हत: शत्रुर्हनिष्ये चापरानपि। ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी॥ १४॥

अर्थ—या शत्रूला मी मारले, दुसऱ्यांनाहि पुढे मारीन, मीच ईश्वर आहे, मी भोक्ता आहे, मीच सिद्ध, मीच समर्थ, मीच सुखी आहे॥ १४॥

हे मारिले ते वैरी थोडे। आणीकही साधीन गाढे। मग नांदेन पवाडें। येकलाचि मी॥ ३५२॥
मग माझीं होतील कामारीं। तियेंवांचूनि येरें मारीं। किंबहुना चराचरीं। ईश्वरु तो मी॥ ३५३॥
मी भोगभूमिचा रावो। आजि सर्वसुखासी ठावो। म्हणोनि इंद्रुही वावो। मातें पाहूनि॥ ३५४॥
मी मनें वाचा देहें। करीं तें कैसें नोहे। कें मजवांचूनि आहे। आज्ञासिद्ध आन॥ ३५५॥
तंवचि बळिया काळु। जंव न दिसें मी अतुर्बळु। सुखाचा कीर निखळु। रासिवा मीचि॥ ३५६॥

अर्थ—हे थोडे शत्रु मारले आणखी आपल्यापेक्षा बलवान असतील अशा दुसऱ्या शत्रूंनाहि मारीन. मग सर्वत्र कीर्ति पावलेला असा मीच एकटा नांदेन॥ ३५२॥ मग सर्व माझे सेवक होतील. त्यांच्यावाचून जे कोणी राहतील त्यांचा संहार करीन फार काय सांगावे! चराचराचा ईश्वर काय तो एक मीच होईन॥ ३५३॥ भोगभूमि अशा पृथ्वीचा मी राजा होईन. सर्व सुखाला आश्रय स्थान आज मीच होईन. म्हणून मला पाहून इंद्रहि व्यर्थ ठरेल॥ ३५४॥ मी

काया-वाचा-मनाने करतो असे म्हटल्यानंतर ते कसे होणार नाहीं? ज्याची आज्ञा पाळलीच पाहिजे, असा समर्थ माझ्यावाचून दुसरा कोण आहे॥ ३५५॥ जोपर्यंत महाबलवान मी दृष्टीस पडत नाही, तोपर्यंतच काल बलवान म्हटला जातो मी निश्चयाने केवळ सुखाची राशी आहे॥ ३५६॥

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया। यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः॥ १५॥

अर्थ—मी धनसंपन्न आहे, मी कुलवान आहे, माझ्यासारखा दुसरा कोण आहे? मी यज्ञ करीन, दान देईन आनंदित होईन, असे अज्ञानाने मोहित होऊन बरळतात॥ १५॥

कुबेरु आथिला होये। परी तो नेणे माझी सोये। संपत्ती मजसम नव्हे। श्रीनाथांही॥ ३५७॥
माझिया कुळाचा उजाळू। कां जातिगोतांचा मेळू। पाहतां ब्रह्माही हळू। उणाचि दिसे॥ ३५८॥
म्हणोनि मिरविती नांवें। वायां ईश्वरादि आघवे। नाहीं मजसीं सरी पावे। ऐसे कोण्ही॥ ३५९॥
आतां लोपला अभिचारु। त्याचा करीन मी जीर्णोद्धारु। प्रतिष्ठीन परमारु। यागवरी॥ ३६०॥
मातें गाती वानिती। नटनाचें रिझविती। तयां देईन मागती। ते ते वस्तु॥ ३६१॥
माजिरा अन्नपानीं। प्रमदांच्या आलिंगनीं। मी होईन त्रिभुवनीं। आनंदाकारु॥ ३६२॥
काय बहु सांगों ऐसे। ते आसुरीप्रकृतीपिसें। तुरंबिती असोसें। गगनौळें तियें॥ ३६३॥

अर्थ—कुबेर संपन्न खरा, पण मला झालेला धनलाभ त्याला माहित नाही. माझ्यासारखी संपत्ति लक्ष्मीपति विष्णूचीहि नाही॥ ३५७॥ माझ्या कुळाचा नावलौकिक किंवा माझ्या जातीच्या व गोताचा समुदाय पाहता ब्रह्मदेवहि थोडा कमीच वाटतो॥ ३५८॥ म्हणून ईश्वरादि सर्व व्यर्थच नावे धारण करतात, पण माझी बरोबरी करू शकेल असा कोणी नाही॥ ३५९॥ लोपलेल्या जारणमारण प्रकारचा मी जीर्णोद्धार करीन व लोकांना मारक असे याग सुरू करीन॥ ३६०॥ जे कोणी माझे गायन करतील, स्तुति करतील, नाचतमाशाने माझे मनोरंजन करतील त्यांना, ते जे जे मागतील ते ते देईन॥ ३६१॥ मादक अन्न व पेय सेवन करून व स्त्रियांना आलिंगन देऊन या त्रिभुवनात मीच एक सुखाचा पुतळा होईन॥ ३६२॥ फार काय सांगावे! असे आसुरी प्रकृतीने पिसे झालेले लोक अतिशय महत्वाकांक्षेने आकाशपुष्पाचा सुगंध घेऊ पाहतात॥ ३६३॥

अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः। प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ॥ १६॥

अर्थ—अनेक प्रकारच्या चित्तभ्रांतीने युक्त होऊन, जाळ्यात सापडले जाऊन व अनेक विषयभोगांचे ठिकाणी आसक्त होऊन मरणानंतर ते अपवित्र अशा नरकात पडतात॥ १६॥

ज्वराचेनि आटोपें। रोगी भलतैसें जल्पे। चावळती संकल्पें। जाण ते तैसे॥ ३६४॥
अज्ञान आतले धुळी। म्हणौनि आशा वाहटुळी। भोवंडीजती अंतराळीं। मनोरथांच्या॥ ३६५॥
अनियम आषाढ मेघ। कां समुद्रोर्मी अभंग। तैसे कामिती अनेग। अखंड काम॥ ३६६॥
मग पैं कामनाचि तया। जिवीं जाल्या वेलरिया। वोरपिलीं कांटिया। कमळें जैसीं॥ ३६७॥
कां पाषाणाचिया माथां। हांडी फुटली पार्था। जीवीं तैसे सर्वथा। कुटके जाले॥ ३६८॥
तेव्हां चढतिये रजनी। तमाची होय पुरवणी। तैसा मोहो अंतःकरणीं। वाढोंचि लागे॥ ३६९॥
आणि वाढे जंव जंव मोहो। तंव तंव विषयीं रोहो। विषय तेथ ठावो। पातकांसी॥ ३७०॥
पापें आपलेनि थांवें। जंव करिती मेळावे। तंव जितांचि आघवे। येती नरका॥ ३७१॥

अर्थ—ज्वराचा वेग वाढला म्हणजे रोगी जसा वाटेल तसे बडबडतो, त्याप्रमाणे हे लोक नाना प्रकारचे संकल्प बडबडतात, असे समज॥ ३६४॥ अज्ञानरूपी धुळीत सापडल्यामुळे आशारूपी वाहटुळीने मनोरथरूपी आकाशात ते गिरक्या घालतात॥ ३६५॥ आषाढातील मेघ अनियमित असतात किंवा समुद्रावर तरंग सारखे उठत असतात त्याप्रमाणे त्यांचे ठिकाणी कामवासना सदासर्वदा उठत असतात॥ ३६६॥ ज्याप्रमाणे काट्यांनी कमळाची दळे चिरली जातात, त्याप्रमाणे मग त्या कामनाच त्यांच्या अंतःकरणात वेलींच्या जाळ्या होतात॥ ३६७॥ किंवा दगडावर मातीचे

भांडे पडले असता त्याचे तुकडे तुकडे होतात, तसे त्यांच्या जीवाचे कामनेमुळे तुकडे तुकडे होतात॥ ३६८॥ ज्याप्रमाणे जसजशी रात्र होते, तसतसा अंध:काराचाच पुरवठा होत जातो, त्याप्रमाणे अंत:करणात अविवेक उत्तरोत्तर वाढत जातो॥ ३६९॥ आणि जसजसा अविवेक वाढतो तसतशी विषयासक्ति वाढते व जेथे विषय आलेत तेथेच पातकेहि आलीच॥ ३७०॥ पातकाचे बळ वाढून जेव्हा ती एकत्र होतात, तेव्हा जीवंतपणीच सर्व नरकांची प्राप्ति होते॥ ३७१॥

म्हणौनि गा सुमती। जे कुमनोरथां पाळिती। ते असुर येती वस्ती। तया ठाया॥ ३७२॥
जेथ असिपत्र तरुवर। खदिरांगाराचे डोंगर। तातलां तेलीं सागर। उतताती॥ ३७३॥
जेथ यातनांची श्रेणी। हे नित्य नवी यमजाचणी। पडती तिये दारुणीं। नरकलोकीं॥ ३७४॥

अर्थ—म्हणून, हे शुद्धमति अर्जुना! जे दुष्ट मनोरथ अंत:करणात बाळगतात, ते असुर लोक या नरकलोकात वस्ति करण्याकरिता येतात॥ ३७२॥ जेथे तलवारीच्या धारेसारखी तीक्ष्ण पाते असलेले वृक्ष आहेत, खैराच्या निखाऱ्यांचे डोंगर आहेत व तापलेल्या उकळत असलेल्या तेलाचे समुद्र आहेत॥ ३७३॥ जेथे यातनांच्या वाढत्या रांगाच आहेत अशी जी नित्य नवी यमजाचणी होय, त्या घोर नरकात ते आसुरी लोक जाऊन पडतात॥ ३७४॥

आत्मसम्भाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः। यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम्॥ १७॥

अर्थ—आपण आपली संभावना करून घेणारे, ताठर वृत्तीचे व धन व मान यांनी उन्मत्त झालेले ते असुर लोक दंभपूर्वक शास्त्रविधि सोडून नाममात्र यज्ञ करतात॥ १७॥

ऐसे नरकाचिये सेले। भागीन जे जे जन्मले। तेही देखों भुलले। यजिती यागीं॥ ३७५॥
एऱ्हवीं यागादिक क्रिया। लाहणें तेंचि धनंजया। परी विफळती आचरोनियां। नाटकी जैसे॥ ३७६॥
वल्लभाचिया उजरिया। आपणया पति कुस्त्रिया। जोडोनि तोषिया जैसिया। अहेवपणें॥ ३७७॥
तैसें आपणयां आपण। मानिता महंतपण। फुगती असाधारण। गर्वें तेणें॥ ३७८॥
मग लवों नेणती कैसे। आटिवा लोहाचे खांब जैसे। कां उधवले आकाशे। शिळाराशी॥ ३७९॥
तैसे आपुलिये बरवे। आपणचि रिझतां जीवें। तृणाहीहूनि आघवें। मानिती नीच॥ ३८०॥
वरी धनाचिया मदिरा। माजूनि धनुर्धरा। कृत्याकृत्यविचारा। सवतें केलें॥ ३८१॥
जया आंगीं आयती ऐसी। तेथ यज्ञाची गोठी कायसी। तरी काय काय पिसीं। न करिती गा॥ ३८२॥

अर्थ—अशा घोर नरकाच्या यातना भोगण्यास योग्य असलेले लोकहि मोहाने भुलून जाऊन यज्ञयागाच्या नादी लागलेले दिसतात॥ ३७५॥ हे अर्जुना! खरे पाहिले असता, यज्ञायागादि क्रिया आचारणयोग्यच आहेत, पण आसुरी लोक नाटक्याप्रमाणे त्याचे आचरण करून या निष्फळ करतात॥ ३७६॥ ज्याप्रमाणे वाईट चालीच्या स्त्रिया आपल्याला दुसरे पति जोडून घेतात व पतीच्या आश्रयाने सौभाग्यपण मिरविण्यात संतोष मानतात॥ ३७७॥ तसेच आपणच आपल्याला महंत म्हणवून घेऊन ते असुर लोक अतिशय गर्वाने फुगतात॥ ३७८॥ मग ओतीव लोखंडाच्या खांबाप्रमाणे किंवा आकाशात उंच वाढलेल्या दगडाच्या राशीप्रमाणे कसे म्हणून वाकणे-म्हणजे नम्र होणे-ते जाणत नाहीत॥ ३७९॥ त्याप्रमाणे आपणच आपली स्तुति करून समाधान मानतात व दुसऱ्या सर्वांना गवताहून तुच्छ समजतात॥ ३८०॥ अर्जुना! वर आणखी संपत्तीरूप दारूने मत्त होतात व काय करावे, काय करू नये ह्या सांगितलेल्या विधिनिषेधरूप विचाराचा मत्सर करतात॥ ३८१॥ ज्याचे ठिकाणी अशी स्थिति आहे, तेथे विधिपूर्वक यज्ञानुष्ठानाची गोष्ट कशी निघणार? पण भ्रमिष्ट माणसे काय काय करणार नाहीत॥ ३८२॥

म्हणौनि कोणे एके वेळे। मौढ्यमद्याचेनि बळें। यागाचींही टवाळें। आदरिती॥ ३८३॥
ना कुंड मंडप वेदी। ना उचित साधनसमृद्धी। आणि तयांसी तंव विधी। द्वंद्वचि सदा॥ ३८४॥
देवां ब्राह्मणांचेनि नांवें। आड वारेनहि नोहावें। ऐसें आथी तेथ यावें। लागे कवणा॥ ३८५॥
पैं वासरुवाचा भोकसा। गाईपुढें ठेवूनि जैसा। उगाणा घेती क्षीररसा। बुद्धिवंत॥ ३८६॥

तैसें यागाचेनि नांवें। जग वाऊनि हांवे। नागविती आघवें। अहेरावरीं॥ ३८७॥
ऐशा कांहीं आपुलिया। होमिती जे उजरिया। तेणें कामिती प्राणियां। सर्वनाशु॥ ३८८॥

अर्थ—म्हणून मूर्खपणा व मद्य यांच्या प्रभावामुळे एखादे वेळी यज्ञयागाची नक्कल करतात॥ ३८३॥ त्यांना यज्ञाकरिता कुंड, मंडप, वेदी नको; योग्य साधनसमृद्धि नको; शास्त्रात सांगितलेल्या विधीशी त्यांचा सर्वदा विरोधच असतो॥ ३८४॥ देव, ब्राह्मण यांच्या नावाचा वाराहि त्यांना सहन होत नाही. असे जेथे आहे, तेथे कोणाला यावे लागणार?॥ ३८५॥ ज्याप्रमाणे बुद्धिमान लोक गायीपुढे कृत्रिम वासरू ठेऊन तिला पान्हावून दूध घेतात॥ ३८६॥ त्याप्रमाणे यज्ञयागाच्या निमित्ताने लोकांना लोभाने पाचारण करून अहेराच्या द्वारा त्या सर्वांना नागवितात॥ ३८७॥ आपल्या उत्कर्षासाठी असे जे काही उघडपणे होमहवन करतात, ते लोकांच्या सर्वनाशाची इच्छा धरूनच करतात॥ ३८८॥

अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः। मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः॥ १८॥

अर्थ—अहंकार, बल, दर्प, काम व क्रोध इत्यादि विकारांचा आश्रय करून आपल्या देहाचे ठिकाणी व परदेहाचे ठिकाणी असलेल्या माझा द्वेष करणारे व मत्सर करणारेच होत॥ १८॥

मग पुढां भेरी निशाण। लाउनी ते दीक्षितपण। जगीं फोकारिती आपण। वावो वावो॥ ३८९॥
तेव्हां महत्त्वें तेणें अधमां। गर्वा चढे महिमा। जैसे लेवे दिधले तमा। काजळाचे॥ ३९०॥
तैसें मौढ्य घणावे। औद्धत्य उंचावे। अहंकारु दुणावे। अविवेकुही॥ ३९१॥
मग दुजयाची भाष। नुरवावया निःशेष। बळीयेपणा अधिक। होय बळ॥ ३९२॥
ऐसा अहंकार बळा। जालिया एकवळा। दर्पसागरु मर्याद वेळा। सांडूनि उते॥ ३९३॥
मग वोसंडिलेनि दर्पें। कामाही पित्त कुरुपे। तया धर्गीं सैंघ पळिपे। क्रोधाग्नि तो॥ ३९४॥
तेथ उन्हाळा आगी खरमरा। तेलातुपाचिया कोठारा। लागला आणि वारा। सुटला जैसा॥ ३९५॥
तैसा अहंकारु बळा आला। दर्पु कामक्रोधीं गूढला। या दोहींचा मेळु जाला। जयांच्या ठायीं॥ ३९६॥
ते आपुलिया सवेशा। मग कोणी कोणी हिंसा। या प्राणियांतें वीरेशा। न साधिती गा॥ ३९७॥

अर्थ—मग भेरी, निशाण लावून आपल्या दीक्षितपणाचा जगात उगीच व्यर्थ बडेजाव माजवितात॥ ३८९॥ ज्याप्रमाणे अंधःकाराला काजळाचा लेप द्यावा, त्याप्रमाणे अधम पुरुषाचे ठिकाणी तो बडेजाव आणखी गर्व वाढविण्यास कारण होतो॥ ३९०॥ तसेच त्यांचा मूर्खपणा अधिकच वाढतो, उद्धटपणा बळावतो, अहंकार व अविवेकहि दुप्पट वाढतात॥ ३९१॥ मग दुसऱ्याचे नावहि उरू द्यावयाचे नाही, असा प्रयत्न करण्याकरिता त्यांचे बळहि अधिक बळावते॥ ३९२॥ अशा रीतीने अहंकार एकदा बलवान झाला म्हणजे गर्वसमुद्र मर्यादा सोडून उतू येतो॥ ३९३॥ मग त्या मर्यादा सोडून वाहू लागलेल्या गर्वाने कामाचा प्रकोप होतो व त्याच्या उष्णतेने क्रोधाग्नि एकदम भडकतो॥ ३९४॥ तेव्हा, ज्याप्रमाणे खरखरित उन्हाळ्यात तेलातूपाच्या कोठाराला आग लागून त्याला वाऱ्याचे साहाय्य व्हावे॥ ३९५॥ त्याप्रमाणे बळावलेल्या अहंकाराचा व कामक्रोध यांनी व्यापिलेल्या गर्वाचा ज्यांचे ठिकाणी मेळ झाला॥ ३९६॥ वीर अर्जुना! ते लोक आपल्या इच्छेप्रमाणे कोणकोणत्या प्रकारच्या हिंसेने प्राण्यांना मारणार नाहीत!॥ ३९७॥

पहिलें तंव धनुर्धरा। आपुलिया मांसरुधिरा। वेंचु करिती अभिचारा-। लागोनियां॥ ३९८॥
तेथ जाळिती जियें देहें। यामाजीं जो मी आहे। तया आत्मया मज घाये। वाजती ते॥ ३९९॥
आणि अभिचारकीं तिहीं। उपद्रविजे जेतुलें कांहीं। तेथ चैतन्य मी पाहीं। शीण पावे॥ ४००॥

अर्थ—अर्जुना! हे लोक प्रथम जारणमारणादि अभिचारकर्माकरिता आपल्याच रक्तमांसाचा उपयोग करतात॥ ३९८॥ असे करताना ज्या देहाला ते जाळतात त्या देहात असलेल्या मलाच घाव घालतात॥ ३९९॥ आणि त्या अभिचारकर्माने ज्यांना उपद्रव होतो तेथे चैतन्यरूपाने असलेल्या मलाच दुःख होते॥ ४००॥

गूढार्थदीपिका—जीव जरी आपल्याहून परमात्म्याला निराळा मानित असला तरी परमेश्वर, जीवाला आपल्याहून निराळा समजत नाही व जीव चैतन्य आणि ईश्वरचैतन्य एकच असल्यामुळे जीवाला होणारे दु:ख मलाच होते, असे येथे औपचारिकरीत्या भगवंतांनी म्हटले आहे.

आणि अभिचारावेगळें। विपायें जें अवगळे। तया टाकिती इटाळें। पैशुन्याचीं॥ ४०१॥
सती आणि सत्पुरुख। दानशीळ याज्ञिक। तपस्वी अलौकिक। संन्यासी जे॥ ४०२॥
कां भक्त हन महात्मे। इयें माझीं निजाचीं धामें। निर्वाळलीं होमधर्में। श्रौतादिकीं॥ ४०३॥
तया द्वेषाचेनि काळकूटें। बासटोनि तिखटें। कुबोलांची सदटें। सूति कांडें॥ ४०४॥

अर्थ—आणि अभिचारकर्मापासून चुकून जे गळले गेले त्यांना निंद्यकर्माचा दोष लावतात॥ ४०१॥ पतिव्रता, सत्पुरुष, दानशूर, निष्काम यज्ञादिकर्म करणारे तपस्वी, अलौकिक पुरुष, संन्यासी किंवा भक्त माहात्मे, जी, श्रौतादि होमधर्माने शुद्ध सात्विक झालेली ही माझी राहण्याची ठिकाणे आहेत, त्यांना द्वेषरूपी काळकूटविषाने माखलेले अत्यंत मर्मभेदी, तिखट व जोरदार वाग्बाण ते मारतात॥ ४०२-४०४॥

तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान्। क्षिपाम्यजस्त्रमशुभानासुरीष्वेव योनिषु॥ १९॥

अर्थ—अशा त्या द्वेष करणाऱ्या क्रूर नराधमांना मी संसारातील सतत पापरूप आसुरी योनीतच जन्माला घालतो॥ १९॥

ऐसे आघवांची परी। प्रवर्तले माझ्या वैरीं। तरी तयां पापियां जें मी करीं। ते आइक पां॥ ४०५॥
तरी मनुष्यदेहाचा तागा। घेऊनि रुसती जे जगा। ते पदवी हिरोनि पैं गा। ऐसें ठेवीं॥ ४०६॥
जे क्लेशगांवींचा उकरडा। भवपुरींचा पानवडा। ते तमोयोनि तयां मूढां। वृत्तीचि दें॥ ४०७॥
मग आहाराचेनि नांवें। तृणही जेथ नुगवे। ते व्याघ्र वृश्चिक आडवे। तैसिये करीं॥ ४०८॥
तेथ क्षुधा-दुःखें बहुतें। तोडूनि खाती आपणयातें। मरमरों मागुतें। होतचि असती॥ ४०९॥
कां आपला गरळजाळीं। जळतया आंगाची पेंदळी। ते सर्पचि करीं बिळीं। निरुंधला॥ ४१०॥
परी घेतला श्वासु घापे। येतुलेनही मापें। विसांवा तयां नाटोपे। दुर्जनांसी॥ ४११॥
ऐसेनि कल्पांचिया कोडी। गणितांही संख्या थोडी। तेतुला वेळु न काढीं। क्लेशौनि तयां॥ ४१२॥
तरी तयांसी जेथ जाणें। तेथिंचें हें पहिलें पेणें। तें पावोनि येरें दारुणें। न होती दुःखें॥ ४१३॥

अर्थ—अशा रीतीने सर्वच प्रकारे माझे वैर करण्यास जे प्रवृत्त होतात, त्या पापी लोकांना जे मी फळ देतो ते सांगतो, ऐक॥ ४०५॥ मनुष्यदेहाचा संबंध प्राप्त असताहि जे जगाचा नाश करण्यास प्रवृत्त होतात ती त्यांची मनुष्यपणांची पदवी हिसकावून घेऊन त्यांना मी कसे करून ठेवतो॥ ४०६॥ अशा त्या मूढ लोकांना मी जो संपूर्ण दु:खरूपी गावाचा उकरडा होय, जो संसार नरकाचा पाणवठाच होय, अशा त्या तमोगुणी योनीचा वतनदार करून ठेवतो-म्हणजे सतत अशा तमोगुणी योनीतच त्यांना जन्माला घालतो॥ ४०७॥ मग आहाराकरिता गवतहि जेथे मिळणार नाही, अशा जंगलात वाघ, विंचू इत्यादि जन्मात घालतो॥ ४०८॥ मग तेथे भुकेच्या अत्यंत दु:खाने आपणालाच तोडून खाऊन मरत जातात व जन्माला येत जातात॥ ४०९॥ किंवा आपल्या विषाच्या अग्नीने आपल्या आंगाची त्वचा जाळून कात टाकणारा सर्प करून त्यांना बिळात कोंडून ठेवतो॥ ४१०॥ घेतलेला श्वास टाकण्यास जितका वेळ लागतो तितका वेळ देखील विश्रांति त्या दुर्जनांना मिळू देत नाही॥ ४११॥ कल्पांच्या अनेक चळथी लोटण्याचा काळ ज्याच्या गणतीच्या दृष्टीने कमी भरेल इतका काळ लोटला तरी त्या दुर्जनांना मी त्या दु:खातून बाहेर काढत नाही॥ ४१२॥ तरी त्यांना पुढे जेथे जावयाचे त्याचा हा पहिला मुक्कामच होय. ती प्राप्ति झाली असता इतर दु:खे त्याच्यापुढे कांहीच भयंकर वाटणार नाहीत॥ ४१३॥

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि। मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम्॥ २०॥

अर्थ—हे अर्जुना! मग ते तमोगुणी मूर्ख लोक जन्मोजन्मी आसुरीयोनीतच जन्म पावून मला प्राप्त न होता त्यापेक्षाहि नीच गतीला प्राप्त होतात॥ २०॥

हा ठायवरी घोरी। संपत्ति ते आसुरी। अधोगती अवधारीं। जोडिली तिहीं॥ ४१४॥
पाठीं व्याघ्रादि तामसा। योनी तो अळुमाळु ऐसा। देहाधाराचा उसासा। आथी जोही॥ ४१५॥
तोही मी वोल्हावा हिरें। मग तमचि होती एकसरें। जेथ गेलें आंधारें। काळवंडैजे॥ ४१६॥
जयाची पापा चिळसी। नरक घेती विवसी। शीण जाय मूर्च्छी। शिणें जेणें॥ ४१७॥
मळ जेणें मैळे। ताप जेणें पोळे। जयाचेनि नांवें सळे। महाभय॥ ४१८॥
पापा जयाचा कंटाळा। उपजे अमंगळ अमंगळा। विटाळुही विटाळा। बिहे जया॥ ४१९॥
ऐसें विश्वाचेया वोखटेया। अधम जे धनंजया। तें ते होती भोगूनियां। तामसा योनि॥ ४२०॥

अर्थ—ते मूढ लोक येथपर्यंत आसुरी संपत्तीच्या योगाने घोर अधोगति प्राप्त करून घेतात, पाहा!॥ ४१४॥ नंतर व्याघ्रादि तामसीयोनीतील देहाच्या आधाराचा जो थोडासा विसावा घेतला जातो॥ ४१५॥ तोहि ओलावा मी हिरावून घेऊन जेथे प्राप्त झाले असता आंधारालाहि काळेपणाची पुटे चढतील असे ते केवळ एक तमरूपच होऊन राहतात॥ ४१६॥ पापांनाहि ज्यांची किळस येईल, नरकालाहि भीती वाटेल व ज्यांचे दुःखभोग पाहून दुखालाहि मूर्च्छा येईल॥ ४१७॥ ज्याच्या योगाने मळालाहि मळ लागेल, ताप होरपळेल, महाभयालाहि ज्याचे नांव ऐकताच थरकांप सुटेल॥ ४१८॥ पापालाहि ज्याचा कंटाळा येईल व अमंगळालाहि ज्याला पाहता अमंगळ वाटेल, विटाळालाहि ज्याचा विटाळ होईल म्हणून भीती वाटते॥ ४१९॥ अर्जुना! व्याघ्रादि तमोयोनी भोगून जगामध्ये जे अधमातीलहि अधम असेल ते ते होऊन राहतात॥ ४२०॥

अहा सांगतां वाचा रडे। आठवितां मन खिरडे। कटारें मूर्खीं केवढे। जोडिले निरय॥ ४२१॥
कायिसया ते असुर। संपत्ति पोषिती वाउर। जिया दिधलें घोर। पतन ऐसें॥ ४२२॥
म्हणौनि तुवां धनुर्धरा। नोहावें गा तिया मोहरा। जेउता वासु आसुरा। संपत्तिवंता॥ ४२३॥
आणि दंभादि दोष साही। हे संपूर्ण जयांच्या ठायीं। ते त्यजावे हें काई। म्हणों कीर॥ ४२४॥

अर्थ—अरेरे! हे सांगताच आमच्या वाणीला रडूं येते. त्यांच्या नुसत्या आठवणीने आमचे मन मागे फिरते. हाय हाय! या मूर्खांनी केवढे घोरतम नरक प्राप्त करून घेतले॥ ४२१॥ जिच्या योगाने असे हे भयंकर अधःपतन होते, त्या आसुरी संपत्तीचे, ते मूढ लोक, व्यर्थ पोषण कशाला करतात बरे!॥ ४२२॥ म्हणून हे अर्जुना! आसुरी संपत्तीच्या लोकांचा जेथे जेथे रहिवास आहे तेथे तेथे तू जाऊ नकोस॥ ४२३॥ आणि वर सांगितलेले आसुरी संपत्तीतील दंभादि सहाहि दोष ज्यांच्या ठिकाणी असतील त्यांचा संग सर्वदा वर्ज्य करावा, हे खरोखर काय सांगायला पाहिजे॥ ४२४॥

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः। कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत्॥ २१॥

अर्थ—काम, क्रोध, लोभ, असे ते तीन आपला नाश करणारे—म्हणजे सर्व पुरुषार्थाचा नाश करणारे-असून नरकाची द्वारे आहेत, म्हणून या तिघांचा सर्वथा त्याग करावा॥ २१॥

परी काम क्रोध लोभ। या तिहींचेचि थोंब। थांवे तेथें अशुभ। पिकलें जाण॥ ४२५॥
सर्व दुःखीं आपुलिया। दर्शना धनंजया। पाढाऊ हे भलतया। दिधले आहाती॥ ४२६॥
कां पापियां नरकभोगीं। सुवावयालागीं जगीं। पातकांची दाटुगी। सभाचि हे॥ ४२७॥
ते रौरव गा तंवचिवरी। आइकिजती पटांतरीं। जंव हे तिन्ही अंतरीं। उठती ना॥ ४२८॥
अपाय इहीं असलग। यातना इहीं सवंग। हाणी हाणी नोहे हे तिघ। हेचि हाणी॥ ४२९॥
काय बहु बोलो सुभटा। सांगितलिया निकृष्टा। नरकाचा दारवंटा। त्रिशंकु हा॥ ४३०॥
या कामक्रोधलोभां-। माजीं जीवें जो होय उभा। तो निरयपुरीची सभा। येथ पावे॥ ४३१॥
म्हणौनि पुढतपुढतीं किरीटी। हे कामादिदोषत्रिपुटी। त्यजावीचि गा वोखटी। आघवां विषयीं॥ ४३२॥

अर्थ—काम, क्रोध, लोभ या तिघांचा समुदाय जेथे होतो, तेथेच पापकर्म पिकते, असे जाण॥ ४२५॥ अर्जुना!

कोणालाहि आपल्या संपूर्ण दु:खस्वरूपाचे दर्शन करून देण्याकरिता यांना वाटाडे नेमले आहे ॥ ४२६ ॥ काम, क्रोध, लोभ हे तिघे म्हणजे जगामध्ये पापी लोकांना त्यांच्या पापकर्मांचा भोग म्हणून नरकात घालणारी पातकांची एक समर्थ सभाच होय ॥ ४२७ ॥ काम, क्रोध, लोभ हे जोपर्यंत अंत:करणात उत्पन्न होत नाहीत तोपर्यंत रौरवादि नरक हे शाब्दिक असे परोक्षच राहतात ॥ ४२८ ॥ या तिघांच्या योगाने अपाय सोपे झाले आहेत व दु:ख स्वस्त झाले आहे, म्हणून मार! मार! नाही! ह्या तिघांनाच मार ॥ ४२९ ॥ हे उत्तम योद्ध्या अर्जुना! काय सांगू! वर सांगितलेल्या निकृष्ट नरकांचा, हा त्रिशंकू, दारवठाच आहे ॥ ४३० ॥ जो कोणी काम, क्रोध, या तिघांमध्ये जीवभावाने उभा राहतो-म्हणजे जो सर्वस्वी त्यांच्या स्वाधीन होऊन राहतो-तो यमपुरीची सभा येथे जिवंतपणीच पाहतो ॥ ४३१ ॥ म्हणून, हे अर्जुना! काम, क्रोध, लोभ ही दोषरूपी त्रिपुटी अत्यंत अपायकारकच असल्यामुळे सर्व बाबतीत तिचा त्याग करावा, हेच वारंवार सांगणे आहे ॥ ४३२ ॥

एतैर्विमुक्तः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः । आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥ २२ ॥

अर्थ—अर्जुना! जो पुरुष तमोरूपी अधोगतीचे द्वार असलेल्या या तिघांपासून मुक्त होतो, तो आपणच आपले कल्याण करून घेतो, व मग परमगतीला प्राप्त होतो ॥ २२ ॥

धर्मादिकां चौंही आंतु। पुरुषार्थाची तैंचि मातु। करावी जैं संघातु। सांडील हा ॥ ४३३ ॥
हे तिन्ही जीवीं जंव जागती। तंववरी निकियाची प्राप्ती। हे माझे कान नाइकती। देवोही म्हणे ॥ ४३४ ॥
जया आपणपें पढिये। आत्मनाशा जो बिहे। तेणें न धरावी हे सोये। सावधा होइजे ॥ ४३५ ॥
पोटीं बांधोनि पाषाण। समुद्रीं बाहीं आंगवण। कां जियावया जेवण। काळकूटाचें ॥ ४३६ ॥
इहीं कामक्रोधलोभेंसीं। कार्यसिद्धि जाण तैसी। म्हणौनि ठावोचि पुसीं। ययांचा गा ॥ ४३७ ॥

अर्थ—जेव्हा मनुष्य काम, क्रोध, लोभ या तिघांचा समुदाय नि:शेष सोडील तेव्हाच धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी कोणत्याहि पुरुषार्थाच्या प्राप्तीची गोष्ट त्याला करता येईल ॥ ४३३ ॥ हे तिन्ही दोष जोपर्यंत अंत:करणात जागृत असतात तोपर्यंत कल्याण झाल्याची वार्ता माझे कान ऐकत नाहीत, असे देवहि म्हणतात ॥ ४३४ ॥ ज्याला आत्मस्वरूपाचे प्रेम आहे व आत्मविस्मृति होऊ नये म्हणून जो भितो, त्याने यांचा आश्रय करू नये. यांच्यापासून नेहमी सावध राहावे ॥ ४३५ ॥ ज्याप्रमाणे पोटाला दगड बांधून हाताच्या सामर्थ्यावर समुद्रात पोहावे किंवा जिवंत राहण्याकरिता काळकूट विष सेवन करावे ॥ ४३६ ॥ त्याप्रमाणे काम, क्रोध, लोभ यांच्या संगतीने पुरुषार्थसिद्धीचा प्रयास करणे होय, असे जाण म्हणून यांचा ठावठिकाण देखील राहू देऊ नकोस ॥ ४३७ ॥

जैं कहीं अवचटें। हे तिकडी सांखळ तुटे। तैं सुखें आपुलिये वाटे। चालों लाभे ॥ ४३८ ॥
त्रिदोषीं सांडिलें शरीर। त्रिकुटीं फिटलिया नगर। त्रिदाह निमालिया अंतर। जैसें होय ॥ ४३९ ॥
तैसा कामादिकीं तिघीं। सांडिला सुख पावोनि जगीं। संगु लाहे मोक्षमार्गीं। सज्जनांचा ॥ ४४० ॥
मग सत्संगें प्रबळें। सच्छास्त्राचेनि बळें। जन्ममृत्यूचीं निमाळें। निस्तरें रानें ॥ ४४१ ॥
ते वेळीं आत्मानंदे आघवें। जें सदा वसतें बरवें। ते तैसेंचि पाटण पावे। गुरुकृपेचें ॥ ४४२ ॥
तेथ प्रियाची परमसीमा। तो भेटे माउली आत्मा। तये खेंवीं आटे डिंडिमा। सांसारिक हे ॥ ४४३ ॥
ऐसा जो कामक्रोधलोभां। झाडी करूनि ठाके उभा। तो येवढिया लाभा। गोसावी होय ॥ ४४४ ॥

अर्थ—यदाकदाचित् ही तीन कड्यांची साखळी तुटली तरच आपल्याला आपल्या इष्ट मार्गाने चालू लागता येईल ॥ ४३८ ॥ त्रिदोषांचा प्रकोप शांत झाला असता जसे शरीर, चोरी, चाहाडी, शिंदळकी हे तीन नाहीसे झाले असता जसे नगर व आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक हे तिन्ही ताप नाहीसे झाले असता जसे अंत:करण शांत होते ॥ ४३९ ॥ त्याप्रमाणे काम, क्रोध, लोभ या तिघांपासून मुक्त झालेला पुरुष जगात परम समाधान पावून मोक्षमार्गात जात असताना त्याला सज्जनांचा संग लाभतो ॥ ४४० ॥

(टीप-मोक्षमार्गाची पहिली पायरी म्हणजे संतसंगाचा लाभ होय.)

मग प्रबळ संतसंग व सच्छास्त्राचे बळ यांच्या योगाने तो जन्ममृत्युरूपी बरड अरण्यातून पार पडतो॥ ४४१ ॥ तेव्हा त्याला सदा संपूर्ण आत्मानंदाने भरले असलेले गुरुकृपारूपी शहर प्राप्त होते॥ ४४२ ॥

(टीप-गुरुकृपा फलद्रूप होण्याकरिता शिष्यहि अधिकारीच पाहिजे.)

जेथे, जो प्रेमाची परमसीमा होय त्या मायबाप आत्म्याची भेट होते व त्या आत्मस्वरूपाला आलिंगन दिले असता संसाराचा नगारा बंद पडतो॥ ४४३ ॥ अशा या काम-क्रोध-लोभांना जो नि:शेष झाडून टाकून एकटा राहील तोच या परम लाभाचा स्वामी होतो॥ ४४४ ॥

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः। न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम्॥ २३ ॥

अर्थ—जो शास्त्रविधीचे उल्लंघन करून कामवासनेप्रमाणे स्वैर वर्तन करतो तो शुद्धचित्त होऊन परमार्थाचा योग्य अधिकारी होत नाही. त्याला सुखहि प्राप्त होत नाही, मग परमेश्वरप्राप्तिरूप परम गति प्राप्त होत नाही, हे काय सांगायचे ?॥ २३ ॥

ना हें नावडोनि कांहीं। कामादिकांच्याचि ठायीं। दाटिली जेणें डोई। आत्मचोरें॥ ४४५ ॥
जो जगीं समान सकृपु। हिताहित दाविता दीपु। तो अमान्य केला बापु। वेद जेणें॥ ४४६ ॥
न धरीचि विधीची भीड। न करीचि आपली चाड। वाढवीत गेला कोड। इंद्रियांचें॥ ४४७ ॥
कामक्रोधलोभांची कास। न सोडीच पाळिली भाष। स्वैराचाराचें असोस। वळघला रान॥ ४४८ ॥
तो सुटकेचिया वाहणीं। मग पिवों न लाहे पाणी। स्वप्नींही ते सुख काहाणी। दुरीचि तया॥ ४४९ ॥
आणि परत्र तंव जाये। हें कीर तया आहे। परी ऐहिकही न लाहे। भोग भोगूं॥ ४५० ॥
तरी माशालागीं भुलला। ब्राह्मण पाणबुडां रिघाला। कीं तेथही पावला। नास्तिकवादु॥ ४५१ ॥

अर्थ—किंवा हे शास्त्रांनी सांगितलेले काही न आवडून जो आत्मघातकी आपले डोके कामादिकांच्या ठिकाणीच खुपसून राहतो॥ ४४५ ॥ जो जगामध्ये सर्वांवर सारखीच कृपा करणारा आहे, हित कोणते, अहित कोणते, हे दाखविणारा जो दीप होय, तो मायबाप वेद ज्याने झुगारून दिला॥ ४४६ ॥ जो वेदाने सांगितलेल्या विधीची पर्वा करीत नाही, जो आपल्या कल्याणाचीहि चिंता करीत नाही, केवळ इंद्रियाचेच लाड पुरवित जातो॥ ४४७ ॥ जो काम-क्रोध-लोभांची कास सोडत नाही व त्यांचा शब्द मोडत नाही व स्वैराचाररूपी अफाट रानात भटकतो॥ ४४८ ॥ तो जन्ममरणातून होणाऱ्या सुटकारूपी प्रवाहातील पाणी पिऊ शकत नाही. एवढेच नाही तर स्वप्नात देखील सुखाची कहाणी त्याला दूरच राहते॥ ४४९ ॥ आणि त्याचा परलोक अंतरतो हे निश्चित आहे, पण ऐहिक भोगहि तो सुखाने भोगू शकत नाही॥ ४५० ॥ ज्याप्रमाणे ब्राह्मण कुसंगतीने मत्स्याहाराच्या मोहात पडून कोळ्याच्या धंद्यात शिरला व शेवटी नास्तिक झाला॥ ४५१ ॥

तैसें विषयांचेनि कोडें। जेणें परत्रा केलें उबडें। तंव तोचि आणिकीकडे। मरणें नेला॥ ४५२ ॥
एवं परत्र ना स्वर्गु। ना ऐहिकही विषयभोगु। तेथ केउता प्रसंगु। मोक्षाचा तो॥ ४५३ ॥
म्हणौनि कामाचेनि बळें। जो विषय सेऊं पाहे सळें। तया विषयो ना स्वर्गु मिळे। ना उद्धरे तो॥ ४५४ ॥

अर्थ—त्याप्रमाणे ज्याने विषयाच्या प्रेमाने परलोक घालविला व पुढे मरणानंतर भलतीचकडे गेला॥ ४५२ ॥ अशा रीतीने संसाराच्या पैलतीरास पोहोचला नाही, स्वर्ग मिळवला नाही व ऐहिक विषयभोगहि भोगले नाहीत, तेव्हा मग मोक्षप्राप्ति कोठून आली ?॥ ४५३ ॥ म्हणून कामवासनेला बळी पडून हट्टाने विषयसेवनच जो करू लागतो, त्याला इच्छेप्रमाणे विषयसुख मिळत नाही, स्वर्गसुख मिळत नाही किंवा त्याला मोक्षप्राप्ति होत नाही॥ ४५४ ॥

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ। ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि॥ २४॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरसम्पद्विभागयोगो नाम षोडशोऽध्यायः॥ १६ ॥

अर्थ—काय केले पाहिजे व काय करता कामा नये यांचा निश्चय करण्याकरिता तुला शास्त्रच प्रमाण मानले पाहिजे; म्हणून शास्त्रांनी सांगितलेले विधान जाणून घेऊन तसे कर्म करण्यास तू योग्य आहेस॥ २४॥

गूढार्थदीपिका—येथे कर्तव्य कोणते व अकर्तव्य कोणते हे शास्त्रांना प्रमाण मानूनच जाणता येते, असे भगवंतांनी अर्जुनाला सांगितले असल्यामुळे व गीतेत या कर्तव्याकर्तव्याचा उलगडा केला नसून निष्कामचित्ताने कर्मानुष्ठान केले असता तेच चित्तशुद्धीद्वारा भगवंताला प्राप्त करून देणारे कसे होते, एवढेच सांगितले असल्यामुळे 'शास्त्र' हा शब्द गीतेला उद्देशून ग्रंथकाराने योजिला नसून ज्या वेदभागात श्रुति-पुराण इत्यादि ग्रंथातून कर्तव्याकर्तव्याचा ऊहापोह केलेला आहे, त्या ग्रंथांना उद्देशूनच योजिला गेला आहे, हे स्पष्ट होते.

याकारणें पैं बापा। जया आथी आपली कृपा। तेणें वेदांचिया निरोपा। आन न कीजे॥ ४५५॥

अर्थ—म्हणून हे बापा अर्जुना! ज्याला स्वत:ची दया येते त्याने वेदाची आज्ञा कधी मोडू नये॥ ४५५॥

गूढार्थदीपिका—वेद-शास्त्रे ही ईश्वरप्रणीत आहेत. त्यांनी सर्व आपल्या हिताचेच सांगितले आहे, असे ती अपेक्षारहित हित करणारी असल्यामुळे त्यांच्याविषयी शंका घेण्याला जागा नाही, असा भाव.

पतीचिया मता। अनुसरोनि पतिव्रता। अनायासें आत्महिता। भेटेचि ते॥ ४५६॥
नातरी श्रीगुरुवचना। दिठी देतु जतना। शिष्य आत्मभुवना-। माजीं पैसे॥ ४५७॥
हें असो आपुला ठेवा। हाता आथी जरी यावा। तरी आदरें जेवीं दिवा। पुढां कीजे॥ ४५८॥
तैसा अशेषांही पुरुषार्थां। जो गोसावी हो म्हणे पार्था। तेणें श्रुतिस्मृति माथां। बैसणें घापे॥ ४५९॥
शास्त्र म्हणेल जें सांडावें। तें राज्यही तृण मानावें। जें घेववी तें न म्हणावें। विषही विरू॥ ४६०॥
ऐसिया वेदैकनिष्ठा। जालिया जरी सुभटा। तरी कें आहे अनिष्टा। भेटणें गा॥ ४६१॥
पैं अहितापासूनि काढिती। हित देउनी वाढविती। नाहीं श्रुतीपरौती। माउली जगा॥ ४६२॥

अर्थ—पतिव्रता स्त्री आपल्या पतीच्या मनोगताप्रमाणे वागून अनायासे ज्याप्रमाणे आपले आत्महित साधून घेते॥ ४५६॥ किंवा शिष्य आपला गुरूची आज्ञा पाळण्याकडे दृष्टि देईल तर तो जसा आत्मरूपी मंदिरात प्रवेश करतो॥ ४५७॥ हे असो. आपण ठेवलेले धन सापडावे अशी इच्छा असल्यास ज्याप्रमाणे अगत्याने दिवा पुढे केला पाहिजे॥ ४५८॥ त्याप्रमाणे अर्जुना! संपूर्ण पुरुषार्थ प्राप्त व्हावे अशी इच्छा करणाऱ्याने श्रुतिस्मृति ह्या शिरसावंद्य मानल्या पाहिजेत॥ ४५९॥ शास्त्रांनी जे टाकावे म्हणून म्हटले असेल ते आवडते राज्य असले तरी तृणाप्रमाणे तुच्छ समजून त्याचा त्याग करावा आणि ज्याचा स्वीकार करावा असे म्हटले असेल ते विष असले तरी, ते अहितकारक होईल, असे मनातहि आणू नये॥ ४६०॥ अशा रीतीने वेद-शास्त्रे यांना जो एकनिष्ठ होतो, अर्जुना! त्याचे अकल्याण कधीच होत नाही॥ ४६१॥ अकल्याणापासून मागे वळविणारी, कल्याण करून पोषण करणारी, अशी श्रुतीशिवाय जगाला दुसरी माता नाही॥ ४६२॥

म्हणौनि ब्रह्मेंसीं मेळवी। तंव हे कोणें न संडावी। अगा तुवांही ऐसीचि भजावी। विशेषेंसी॥ ४६३॥

अर्थ—आपले परब्रह्माशी ऐक्य होईपर्यंत तिचा कोणी त्याग करू नये आणि अर्जुना! तुवाहि विशेषेकरून तिचा असा आदर केला पाहिजे॥ ४६३॥

गूढार्थदीपिका—परब्रह्माशी ऐक्य होईपर्यंत श्रुतिस्मृतीचा त्याग केल्यास मनुष्य सर्वस्वी स्वैरवर्ती होऊन त्याचे ठिकाणी रजतम वाढतात आणि परब्रह्माशी ऐक्य झाल्यावर बळेच श्रुतिस्मृतीचा त्याग करील तर, ज्ञानाहंकार वाढून तो देहाहंकारापर्यंत येतो. म्हणून ब्रह्मैक्यापूर्वी श्रुतिस्मृतींची आज्ञा पाळावी व ब्रह्मैक्यानंतर पूर्व अभ्यासानुसार इंद्रियांना शास्त्रानुरूप वागू द्यावे. असे केले असताच जीवन्मुक्त स्थिति आंगी वागते.

जे आजि अर्जुना तूं येथें। करावया सत्य शास्त्रें सार्थें। जन्मलासि बळार्थें। धर्माचेनि॥ ४६४॥
आणि धर्मानुज हें ऐसें। ओघेंचि आलें आपैसें। म्हणौनि अनारिसे। करूं नये॥ ४६५॥

कार्याकार्यविवेकीं। शास्त्रेंचि करावीं पारखीं। अकृत्य कुडें तें लोकीं। वाळावें गा॥ ४६६॥
मग कृत्यपणें खरें निगे। तें तुवां आपलेनि आंगें। आचरौनि आदरें चांगें। सारावें गा॥ ४६७॥
जे विश्वप्रामाण्याची मुदी। आजि तुझ्या हातीं असे सुबुद्धी। लोकसंग्रहासी त्रिशुद्धी। योग्य होसी॥ ४६८॥

अर्थ—कारण अर्जुना! तू या लोकात धर्माचरणाच्या बळावर शास्त्रे सार्थ व सत्य करून दाखविण्याकरिता जन्मला आहेस॥ ४६४॥ आणि ओघानेच तुला धर्माचा धाकटा भाऊ आहे असे नाव प्राप्त झाले आहे; म्हणून तू धर्मशास्त्र सोडून वागणे योग्य नव्हे॥ ४६५॥ काय करावे, काय करू नये यांचा निवाडा शास्त्रावरूनच करावा आणि जगात, करू नये म्हणून सांगितले असेल, अशा निंद्य कर्माचा त्याग करावा॥ ४६६॥ मग करावे म्हणून जे यथार्थ ठरेल त्याचे तू स्वत: श्रद्धायुक्त अंत:करणाने आचरण करून ते पुरे करावे॥ ४६७॥ कारण, हे शुद्धबुद्धि अर्जुना! लोकसंग्रह करण्यास-म्हणजे लोकांना धर्मशास्त्रानुसार लावण्यास-तू योग्य असल्यामुळे आज सर्व जगाला शास्त्राचे प्रामाण्य पटवून देण्याचा अधिकार तुझ्या हाती आहे॥ ४६८॥

गूढार्थदीपिका—शास्त्रैकनिष्ठ वर्तनाने चित्तात रागद्वेषादिक विकारांना उत्पन्न होण्यास अवसर राहत नाही व हे उत्पन्न झाले नाहीत म्हणजे चित्ताची शुद्धि झाली असे म्हटले जाते. याप्रमाणे आपले चित्त शुद्ध झाले असता कर्माने चित्तशुद्धि कशी होते व शास्त्रे प्रमाण कशी आहेत हे लोकांना पटवून देता येते.

एवं आसुरवर्गु आघवा। सांगोनि तेथिंचा निगावा। तोही देवें पांडवा। निरूपिला॥ ४६९॥
इयावरी तो पांडूचा। कुमरु सद्भावो जीवीचा। पुसेल तो चैतन्याचां। कानीं ऐका॥ ४७०॥
संजयें व्यासाचिया निरोपा। तो वेळु फेडिला तया नृपा। तैसा मीही निवृत्तिकृपा। सांगेन तुम्हां॥ ४७१॥
तुम्ही संत माझिया कडा। दिठीचा कराल बहुडा। तरी तुम्हां माने येवढा। होईन मी॥ ४७२॥
म्हणोनि निज अवधान। मज वोळगे पसायदान। दीजो जी सनाथ होईन। ज्ञानदेवो म्हणे॥ ४७३॥

इति श्रीज्ञानदेवविरचिता भावार्थदीपिकायां षोडशोऽध्याय:॥ १६॥

अर्थ—याप्रमाणे संपूर्ण आसुरी संपत्तीच्या लोकांचे वर्णन केले गेले व त्यातून निघण्याचा मार्गहि देवांनी पांडवाला सांगितला॥ ४६९॥ असे भगवंतांनी निरूपण केले असता पांडूचा कुमार जो अर्जुन तो, आपल्या अंत:करणातील सद्भाव भगवंताला विचारील. तो संवाद पुढे पूर्ण जागृत राहून ऐका॥ ४७०॥ जसा व्यासांच्या आज्ञेप्रमाणे संजयांनी राजा धृतराष्ट्राला प्रसंग निरूपण करण्यात वेळ घालविला त्याप्रमाणे श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपेने मीहि तुम्हाला सांगेन॥ ४७१॥ तुम्ही संतजन माझ्याकडे आपली पूर्ण कृपादृष्टि कराल तर, मीहि तुमच्या सारखा थोर होईन॥ ४७२॥ म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, की तुमचे सर्व लक्ष एका माझ्या निरूपणाकडेच राहील असा कृपाप्रसाद करा, म्हणजे मी धन्य होईन॥ ४७३॥

श्रीसद्गुरुकृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायाचा मराठी अनुवाद गूढार्थदीपिकेसह पूर्ण झाला, तो त्यांचे चरणी समर्पण असो.

समारोप

मागील पंधराव्या अध्यायात भगवंतांनी वृक्षाच्या रूपक परिभाषेने संपूर्ण उपाधीचे वर्णन करून मायेला आधार होणाऱ्या चैतन्यालाहि मर्यादा आहे, असे दाखविले नंतर उत्तमपुरुष हे नाव देऊन निरुपाधिक आत्मस्वरूपाचे वर्णन केले व आत्मप्राप्तीला अंतरंग साधन ज्ञान आहे, हेहि सांगितले.

आता त्या ज्ञानाला पोषक अशी दैवी संपत्ति व त्याच्या विरुद्ध जी आसुरी संपत्ति त्यांचे भगवान, या सोळाव्या आध्यायात निरूपण करतात.

भगवान म्हणतात, अर्जुना! देवाच्या ठिकाणी असणाऱ्या एका सत्वगुणाचाच आश्रय धरून राहणारी म्हणून जिला दैवी संपत्ति म्हणतात, ती सांगतो, ऐक.

भीती सोडणे, चित्तशुद्धि, ज्ञान व योग यांचे ठिकाणी तत्परता, दान, इंद्रियनिग्रह, यज्ञयागादि, वेद-शास्त्रादिकांचे अध्ययन, तप, मनाचा सरळपणा, कोणालाहि काया-वाचा-मनाने दुःख न देणे, क्रोध न करणे, वस्तुवरील ममता सोडणे, प्राणिमात्रांवर दया करणे, विषय सन्निध असता चित्त विकारी न होणे, अंत:करणाचा कोमलपणा, निंद्यकर्माची लाज वाटणे, चित्ताची स्थिरता, तेजस्वीपणा, अपराधाची क्षमा करणे, व अतिमानिता नसणे, इत्यादि असे हे सव्विस गुण दैवी संपत्तीच्या पुरुषाचे ठिकाणी असतात. आता आसुरी संपत्तीच्या पुरुषाची लक्षणे सांगतो ऐक.

धार्मिकतेची दिखाई, गर्व, अहंकार, क्रोध, कठोर भाषण आणि अज्ञान अशी ही सहा लक्षणे आसुरी संपत्तीच्या पुरुषाचे ठिकाणी असतात.

दैवी संपत्ति मुक्त करणारी असून आसुरी संपत्ति बंधन करणारी आहे. या लोकात दैवी संपत्ति व आसुरी संपत्ति घेऊन जन्मलेल्या पुरुषांची राहाटी अनादिसिद्धच आहे. दैवी संपत्ति असलेल्या पुरुषाची राहाटी मागे तेराव्या अध्यायात अमानित्वादि लक्षणाने सविस्तर वर्णन केली. आता आसुरी संपत्ति असणाऱ्या पुरुषाची राहाटी भगवान सविस्तर सांगतात.

अर्जुना! हे आसुरी लोक शास्त्रात सांगितलेला विधि-आचार काहीच जाणत नाहीत. शुद्धि, सत्यता हे त्यांना माहित नसते. पाप-पुण्य-ईश्वर हे ते काही मानीत नाहीत. जगाच्या उत्पत्तीला स्त्री-पुरुष कामवासनेवाचून दुसरा हेतु नाही, असे ते म्हणतात. कधी तृप्त होणार नाही, असा काम वाढवून, दंभ, मान व मद यांनी युक्त होऊन व अशुभ निश्चय करून अमंगल व्रते करण्यास ते प्रवृत्त होतात. अपार चिंता वाढवून ते विषयभोगच सर्वस्व मानतात. शेकडो आशापाशांनी ते बद्ध असतात. अन्यायाने विपुल संपत्तीचा साठा मिळविण्याचा ते प्रयत्न करतात. आज हे धन मिळाले, उद्या आणखी मिळवावे अशा प्रयत्नात ते असतात. अनेक विषयभोगाचे ठिकाणी ते आसक्त होतात. शास्त्रविधि सोडून नाममात्र ते यज्ञ करतात. पतिव्रता, सत्पुरुष, दानशूर, निष्काम यज्ञयागादि कर्म करणारे तपस्वी वगैरे लोकांचा ते द्वेष करतात. अशा त्या द्वेष करणाऱ्यांना, भगवान म्हणतात, मी आसुरी योनीतच जन्माला घालतो.

या सर्व आसुरी संपत्तीत काम, क्रोध व लोभ हे तीन मुख्य असून हीच नरकाची द्वारे होत. म्हणून या तिघांचा अर्जुना! तू नाश कर. जो या तिघांपासून मुक्त होतो, तोच आपले कल्याण करून घेतो.

शास्त्रविधीला सोडून विषयसुखाच्या वासनेप्रमाणे जे स्वैर वर्तन करतात, त्यांना इह-परसुख तर मिळत नाहीच मग परमेश्वरप्राप्ति कोठून होणार! म्हणून भगवान म्हणतात, अर्जुना! कर्तव्य कोणते व अकर्तव्य कोणते हे श्रुति-स्मृति-पुराणादि शास्त्रांवरून जाणून घेऊन तसे तू वर्तन कर. स्वैर वर्तन करू नकोस.

॥ श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय-सतरावा

विश्वविकासित मुद्रा। जया सोडवी तुझी योगनिद्रा। तया नमो जी गणेंद्रा। श्रीगुरुराया॥ १॥

अर्थ—हे श्रीगुरु गणराया! ज्या तुझ्या नामरूपात्मक विश्वास विकास करणाऱ्या मुद्रेच्या योगाने तुझी योगनिद्रा सोडविली जाते त्या तुला नमस्कार असो॥ १॥

गूढार्थदीपिका—येथे परब्रह्माशी पूर्ण ऐक्य ठेऊन श्रीगुरुचे स्तवन केले आहे.

"विश्वविकासितमुद्रा" या चरणाने श्रीगुरुपरब्रह्माच्या साकार विद्याप्रपंचरूप लीलेचा उल्लेख केला असून "योगनिद्रा" या शब्दाने श्रीगुरुच्या ज्ञान-अज्ञानरहित निराकार अशा निर्विकल्प समाधिस्थितीचा उल्लेख केला आहे.

(**टीप-विद्याप्रपंच**-म्हणजे नामरूपात्मक प्रपंचाचा सच्चिदानंदरूपाने प्रत्यय येणे.)

"तस्मात् परब्रह्मण: परमार्थत: साकारनिराकारौ स्वभावसिद्धौ" परब्रह्म श्रीगुरुच्या साकार, निराकार अशा दोन्ही प्रकारच्या लीला स्वयंसिद्ध आहेत व त्या डोळ्याच्या उघड-झापीप्रमाणे पाठोपाठ होत असतात, असे त्रिपादमहानारायणोपनिषदात सांगितले आहे व तेच येथे माउलींनी सूचित केले आहे.

गणेंद्रा-सर्व विघ्नांच्या समुदायाचा स्वामी किंवा प्रकृति एक, महत्-अहंकार व पंचतन्मात्रा हे सात आणि सोळा कार्यरूपतत्वे या गणांचा नियंता-स्वामी.

त्रिगुणत्रिपुरीं वेढिला। जीवत्वदुर्गीं आडिला। तो आत्मशंभूने सोडविला। तुझिया स्मृती॥ २॥

अर्थ—जो आत्मशंभू त्रिगुणरूप त्रिपुरासुराने वेढला गेल्यामुळे जीवत्वरूपी किल्ल्यात अडकला गेला, त्याला तू त्याच्या मूळच्या स्वरूपाची स्मृति करून देऊन मुक्त केलेस॥ २॥

म्हणौनि शिवेंसीं कांटाळा। गुरुत्वें तूंचि आगळा। तऱ्ही हळु मायाजळा-। माजीं तारूनि॥ ३॥

अर्थ—म्हणून शिवाशी तुझी तुलना करून पाहिली असता गुरुरूपाने तूच विशेष ठरतोस, तरीपण मायाजळातून तारत असल्यामुळे तू हलकाच आहेस॥ ३॥

जे तुझ्याविखीं मूढ। तयांलागीं तूं वक्रतुंड। ज्ञानियांसि तरी अखंड। उजूचि आहासि॥ ४॥

अर्थ—जे तुला जाणत नाहीत व तुझे भजन करीत नाहीत अशा अज्ञान्यांना तू तोंड वाकडे केलेला म्हणजे आपल्याकडे पाहत नाही, असा वाटतोस व तुझ्या स्वरूपाला जाणणाऱ्या ज्ञान्याला तू सरळ आहेस-म्हणजे तूच सर्वतोपरि सांभाळ करणारा आहेस, असा वाटतोस॥ ४॥

गूढार्थदीपिका—अज्ञान्याला परमात्मा दु:खदाता वाटतो तर सज्ञान्याला सुखदाता वाटतो असा अर्थ, "प्रपंचोऽपि द्विविध:। विद्याप्रपंचश्चाविद्याप्रपंचश्चेति। विद्याप्रपंचस्य नित्यत्वं सिद्धमेव नित्यानंदचिद्विलासात्मकत्वात्"

विद्याप्रपंच व अविद्याप्रपंच असा दोन प्रकारचा प्रपंच आहे. विद्याप्रपंच हा अखंड आनंदरूप व चिद्‌विलासरूप असल्यामुळे नित्य आहे. या प्रपंचाचा अनुभव ज्ञानीभक्ताला येतो. भगवान याच प्रपंचरूपाने नटतात. अज्ञानी पुरुषांना हाच प्रपंच त्यांच्या अज्ञानामुळे जड विनाशी-दु:खदायक म्हणून अविद्यात्मक असा विपरीत अनुभवाला येतो.

दैविकी दिठी पाहतां सानी। तऱ्ही मीलनोन्मीलनीं। उत्पत्ति प्रळयो दोन्ही। लीलाचि करिसी॥ ५॥

अर्थ—हे श्रीगुरो गणराया! तुज देवाची दृष्टि दिसायला लहान दिसते, तरीपण तिच्या उघडझापीमध्ये जगाची उत्पत्ति व लय लीलेनेच होतात॥ ५॥

गूढार्थदीपिका—मीलनोन्मीलन-"प्रत्यग्दृष्ट्या स्वस्वरूपचिंतनमेव निमेषः। परागदृष्ट्या स्वस्वरूपचिंतनमेवोन्मेषः" अंतर्मुख दृष्टीने केवळ आत्मचिंतन करणे याला निमेष म्हणतात व बहिर्भूत दृष्टीने स्वस्वरूप चिंतन करणे याला उन्मेष म्हणतात.

निमेष व उन्मेष या दोन्ही वेळी भगवंताचे स्वात्मचिंतनच असते.

"कदाचिदात्मारामस्याखिलपरिपूर्णस्यादिनारायणस्य स्वेच्छानुसारेणोन्मेषो जायते तथाविधस्याद्वैतपरमानंद-लक्षणस्यादिनारायणस्योन्मेषनिमेषाभ्यां मूलाविद्योदयस्थितिलया जायन्ते"

परिपूर्ण अद्वैतानंदरूप आदिनारायणाचा उन्मेष झाला असता त्याच्या ठिकाणी लीन असलेले अनादिमायामोहित जीव, माया व सर्व प्रपंच यांच्या, उदयस्थितीचा व कल्पाचा, माया भ्रांतीमुळे अनुभव घेतात व निमेष झाला असता जीवाला प्रलयाचा अनुभव येतो.

प्रवृत्तिकर्णाच्या चाळीं। उठिला मदगंधानिळीं। पूजीजसी नीलोत्पळीं। जीवभृंगाच्या॥ ६॥

अर्थ—तुम्ही आपला प्रवृत्तिरूपी कान चाळविला असता त्याच्या योगाने गंडस्थळातून वाहणाऱ्या मदाच्या सुगंधाने युक्त असा जो वारा सुटतो त्याने आकृष्ट होऊन तुझ्या गंडस्थलावर जमलेल्या जीवभृंगाने वाहिलेल्या नीलकमलांनी तू पूजिला जातोस॥ ६॥

गूढार्थदीपिका—भगवंतांनी प्रगट केलेल्या प्रवृत्तिमार्गातील विषयसुखाला भुलून जीव भगवंताचे कामनिक पूजन करतात.

पाठीं निवृत्तिकर्णताळें। आहाळी ते पूजा विघुळे। तेव्हां मिरविसी मोकळें। आंगाचें लेणें॥ ७॥

अर्थ—नंतर दुसऱ्या निवृत्तिरूप कर्णाच्या हालचालीने, बांधलेली पूजा विसकटली जाऊन तू आपले शुद्ध स्वरूप प्रकट करतोस॥ ७॥

गूढार्थदीपिका—निवृत्तिरूप निष्कामकर्माने शुद्ध परमेश्वराचा साक्षात्कार होतो, असा अर्थ.

वामांगीचा लास्यविलासु। जो हा जगद्रूप आभासु। तो तांडवमिसें कळासु। दाविसी तूं॥ ८॥

अर्थ—जो हा जगद्रूप आभास चैतन्यशक्तिरूप भार्येचे नृत्यच होय, तो तू तांडवनृत्याच्या मिषाने नाना प्रकारच्या नृत्यांच्या कला दाखवितोस॥ ८॥

गूढार्थदीपिका—"**स्त्रीनृत्यं लास्यमुच्यते**" स्त्रियांच्या नृत्याला लास्य म्हणतात.

हें असो विस्मय दातारा। तूं होसी जयाचा सोयरा। सोइरिकेचिया व्यवहारा। मुकेचि तो॥ ९॥

अर्थ—हे असो. हे मायबापा श्रीगुरो! हे आश्चर्य आहे की तू ज्याचा सोयरा होतोस तो सर्व सोयरिकेच्या संबंधाला मुकतो॥ ९॥

गूढार्थदीपिका—अद्वैतप्रत्ययामुळे व्यावहारिक सोयरिक संबंधच राहत नाहीत नाही, असा अर्थ.

फेडितां बंधनाचा ठावो। तूं जगद्बंधु ऐसा भावो। धरूं वोळगे उवावो। तुझाचि आंगीं॥ १०॥

अर्थ—तू भवबंधनाचे नावहि नाहीसे केले असता "तू जगद्बंधू आहेस" असा भाव तुझ्याच ठिकाणी खरा उत्कर्षाला पावतो॥ १०॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञान झाल्यावर, सर्व दुःखाचे स्थान, अशा जगताचा नाश करणारे श्रीगुरुच खरे जगद्बंधु-म्हणजे जीवाचे खरे हितकर्ते-होत, असा जीवाला अनुभव येतो.

दुजयाचेनि नांवें तया। देहही नुरेचि पैं देवराया। जेणें तूं आपणपयां। केलासी दुजा॥ ११॥

अर्थ—हे देवराया श्रीगुरो! ज्या देहाचे ठिकाणी मी पणा स्थापन करून तुला आपल्याहून निराळे मानले गेले त्या द्वैताचे नाव घेता येईल इतक्यापुरताहि देह उरत नाही॥ ११॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे आत्मज्ञानाने देहादि द्वैतपदार्थाचा निरास होऊन ज्ञानवृत्तीने अद्वैत साधले जाते त्याप्रमाणे अद्वैतानंतरहि जी आत्मप्रेमवृत्ति राहते, त्यावृत्तीने आत्मा तोच परमात्मा असे समजून प्रेमरूप भक्ति होऊ शकते.

तूंतें करूनि पुढें। जे उपायें घेती दवडे। तयां ठासी बहुवें पाडें। मागांचि तूं॥ १२॥

अर्थ—तुला समोर करून तुझ्या प्राप्तीकरिता जो नाना प्रकारचे उपाय करतो, त्याच्या तू फार मागे राहतोस॥ १२॥

गूढार्थदीपिका—परमेश्वराला समोर करून परमेश्वरप्राप्तीचे उपाय केले तरी सर्व उपाय अहंकारानेच होत असल्यामुळे व परमात्मा अहंकाराचा साक्षी असल्यामुळे, तो उपायाने सापडेल, असा कधीच समोर होऊ शकत नाही. तो सदासर्वदा साक्षी राहून मागेच राहतो, असा भाव.

जो ध्यानें सूये मानसीं। तयालागीं नाहीं तूं त्याचें देशीं। ध्यानही विसरे तेणेंसीं। वालभ तुज॥ १३॥

अर्थ—जो तुझे जाणिवेसहित ध्यान करून तुला अंत:करणात साठवू पाहतो, त्याला तू प्राप्त होत नाहीस; पण जो प्रेमाने ध्यानाची जाणीवहि विसरतो तो तुला आवडतो॥ १३॥

गूढार्थदीपिका—जाणिवेचा अहंकार देखील सगुणाच्या प्राप्तीला प्रतिबंध करतो, असा अर्थ.

तूंतें सिद्धचि जो नेणे। तो नांदे सर्वज्ञपणें। वेदांही येवढें बोलणें। नेघसी कानीं॥ १४॥

अर्थ—तू अखंड मायारहित शुद्धच आहेस, असे जो वेद जाणत नाही, तो सर्वज्ञ आहे, असे मानले जाते. पण त्या सर्वज्ञ वेदाचेहि एवढे मोठे बोलणे तू कानावर घेत नाहीस॥ १४॥

गूढार्थदीपिका—अधिष्ठानभूत परमशेवराचे वेदाने वर्णन केले आहे; पण त्याच्या मायारहित व आनंदविवर्त अशा सगुणस्वरूपाचे तो वर्णन करू शकला नाही, असा अर्थ.

मौन गा तुझें राशिनांव। आतां स्तोत्रीं कें बांधों हाव। दिससी तेतुली माव। भजों कांई॥ १५॥

अर्थ—तुझे राशीनाव मौन आहे-म्हणजे बोलताच येत नाही. तेव्हा तुझी स्तुति करण्याची हाव मी कशी धरू आणि जेवढे दिसते तेवढा सर्व खोटा मायिक पसारा असल्यामुळे मी भजन तरी काय करू॥ १५॥

गूढार्थदीपिका—मौन गा तुझे राशीनांव—नक्षत्रावर जन्मणाऱ्याचे राशीनाव निघत असते; पण परमात्मा जन्म नाशरहित व शब्दाच्या पलीकडे असल्यामुळे त्याला राशी नाही व राशीनावहि नाही, हेच माउलीने ''मौन गा तुझे राशीनांव'' या पदाने सुचविले आहे.

दैविकें सेवकु हों पाहों। तरी भेदितां द्रोहचि लाहों। म्हणोनि आतां कांहीं नोहों। तुजलागीं जी॥ १६॥
जैं सर्वथा सर्वही नोहिजे। तैं अद्वया तूतें लाहिजे। हें जाणें मी वर्म तुझें। आराध्यलिंगा॥ १७॥
तरी नुरोनि वेगळेंपण। रसी भजिन्नलें लवण। तैसें नमन माझें जाण। बहु काय बोलों॥ १८॥

अर्थ—तुज देवाचा सेवक म्हणून राहावे, असे म्हटले तर तुला आपल्याहून भिन्न समजून राहावे लागत असल्यामुळे तो तुझा द्रोहच होईल; म्हणून महाराज! तुमच्याशी कोणताहि संबंध न मानणेच उत्तम॥ १६॥ आराधना करण्यास योग्य हेच ज्याचे चिन्ह आहे, अशा श्रीगुरो! सर्वथा कोणत्याहि प्रकारे तुझ्याशी संबंध जोडला गेला नाही, तरच तुज अफुट अद्वैतस्वरूपाची प्राप्ति होऊ शकते. ही तुझ्या प्राप्तीची खूण मी पूर्णपणे जाणत आहे॥ १७॥ फार काय बोलू! ज्याप्रमाणे मीठ यत्किंचितहि वेगळेपणाने न राहता पाण्याशी ऐक्याच्या जाणिवेवाचून एकरूप होऊन राहते, त्याप्रमाणे माझे हे नमन आहे, असे जाण॥ १८॥

गूढार्थदीपिका—तैसे नमन माझे जाण-येथे माऊलीने ''नमन'' या शब्दाने नुसत्या क्रियेमुळे उत्पन्न होणारे द्वैत किंवा ज्ञानाने उत्पन्न होणारी ऐक्याची जाणीव याचाच निषेध केला आहे. नि:सीम गुरुप्रेमाने होणारी स्वाभाविक गुरुचरणनिष्ठ अखंड नम्रवृत्ति या भक्तीचा निषेध केला नाही.

आतां रिता कुंभ समुद्रीं रिगे। तो उचंबळत भरोनि निगे। कां दशी दीपसंगें। दीपुचि होय॥ १९॥
तैसा तुझिया प्रणती। मी पूर्णु जाहलों श्रीनिवृत्ति। आतां आणीन व्यक्ती। गीतार्थु तो॥ २०॥

अर्थ—ज्याप्रमाणे रिकामा मातीचा घडा समुद्रात टाकून उचलला असता तो जळाने तुडुंब भरूनच निघतो किंवा दिव्याचा संबंध होताच वातहि दिवा होऊन जाते॥ १९॥ त्याप्रमाणे, हे श्रीगुरो श्रीनिवृत्तिनाथ! तुम्हाला प्रेमपूर्वक स्वाभाविक नमन केल्याने मीहि पूर्ण झालो. आता गीतेचा अर्थ प्रगट करीन॥ २०॥

तरी षोडशाध्यायशेखीं। तिये समाप्तीच्या श्लोकीं। जो ऐसा निर्णयो निष्टंकीं। ठेविला देवें॥ २१॥
जे कृत्याकृत्यव्यस्था। अनुष्ठावया पार्था। शास्त्रचि एक सर्वथा। प्रमाण तुज॥ २२॥
तेथ अर्जुन मानसें। म्हणे हें ऐसे कैसें। जे शास्त्रेंवीण नसे। सुटिका कर्मा॥ २३॥

अर्थ—तरी सोळाव्या अध्यायाच्या अखेरीस त्या शेवटच्या श्लोकात भगवंताने असा निर्णय केला की॥ २१॥ हे अर्जुना! काय करावे, काय करू नये हे जाणून घेऊन त्याचे अनुष्ठान करण्याकरिता एक शास्त्रच तुला प्रमाण मानिले पाहिजे-म्हणजे शास्त्रावरूनच ते जाणून घेतले पाहिजे॥ २२॥ तेव्हा अर्जुन मनात म्हणतो की कार्याकार्य समजून घेण्याकरिता शास्त्रावाचून दुसरा मार्गच नाही, हे असे कसे?॥ २३॥

गूढार्थदीपिका—हे कर्म करणीय आहे, अशी ज्याची श्रद्धा, ते त्याचे कार्य व हे करणीय नाही अशी ज्याची श्रद्धा ते त्याचे अकार्य अशी कार्याकार्याची व्यवस्था नुसत्या श्रद्धेने ठरविता येणार नाही काय, असा अर्जुनाच्या प्रश्नाचा अभिप्राय.

तरी तक्षकाची फडे। ठाकोनि कैं तो मणि काढे। कैं नाकींचा केशु जोडे। सिंहाचिये॥ २४॥
मग तेणें तो वोंविजे। तरीच लेणें पाविजे। एऱ्हवीं काय असिजे। रिक्तकंठीं॥ २५॥
तैसी शास्त्रांची मोकळी। यां कैं कोण वेंटाळीं। एकवाक्यतेच्या फळीं। पैसिजे कैं॥ २६॥
जालयाही एकवाक्यता। कां लाभे वेळ अनुष्ठितां। कैंचा पैसारु जीविता। येतुलालिया॥ २७॥
आणि शास्त्रें अर्थें देशें काळें। या चहूंही जें एक फळें। तो उपावे के मिळे। आघवयांसी॥ २८॥
म्हणौनि शास्त्राचें घडतें। नोहे प्रकारें बहुतें। तरी मूर्खां मुमुक्षां येथें। काय गति पां॥ २९॥
हा पुसावया अभिप्रावो। जो अर्जुन करी प्रस्तावो। तो सतराविया ठावो। अध्याया येथ॥ ३०॥

अर्थ—तक्षकाच्या फणीपाशी येऊन त्यातील मणी केव्हा काढणार? सिंहाच्या नाकातील केस केव्हा प्राप्त होणार?॥ २४॥ मग त्या केसात तो मणी ओवून तो दागिना प्राप्त व्हावा व कंठात बांधावा, नाही तर भोंड्या गळ्यानेच असायचे काय?॥ २५॥ तसेच शास्त्रांची निरनिराळी मते कोण, केव्हा एकत्र करील व त्यांच्या एका वाक्यतेची प्राप्ति केव्हा होणार?॥ २६॥ आणि काही काळाने एकवाक्यता झाली तरी पुढे आचरण करण्याकरिता वेळ कसा सापडणार? व तसे दीर्घ आयुष्य कोठून लाभणार?॥ २७॥ आणि शास्त्र, अर्थ, देश, काल या चौघांनी फलद्रूप होणारा उपाय सर्वांसच कसा मिळणार?॥ २८॥ म्हणून बहुत करून शास्त्राप्रमाणे तंतोतंत घडून येणे शक्य दिसत नाही. अशा स्थितीत अज्ञानी मूर्ख मुमुक्षूची काय गति होणार?॥ २९॥ ही शंका भगवंताला विचारण्याचा प्रस्ताव अर्जुनाने केला, तोच हा सतरावा अध्याय होय॥ ३०॥

तरी सर्वविषयीं वितृष्णु। जो सकळकळीं प्रवीणु। कृष्णाही नवल कृष्णु। अर्जुनत्वें जो॥ ३१॥
शौर्या जोडला आधारु। जो सोमवंशाचा शृंगारु। सुखादि उपकारु। जयाची लीला॥ ३२॥
जो प्रज्ञेचा प्रियोत्तमु। ब्रह्मविद्येचा विश्रामु। सहचरु मनोधर्मु। देवाचा जो॥ ३३॥

अर्थ—तरी जो संपूर्ण विषयवासनारहित आहे, जो संपूर्ण कलेत निपुण आहे व जो अर्जुनरूपाने श्रीकृष्णाच्या मनाला वेध लावणारा कृष्णच होय॥ ३१॥ जो शौर्यगुणाला मिळालेला आधारच होय, जो सोमवंशाचे भूषण आहे व सुखादि देऊन उपकार करणे हीच ज्याची लीला आहे॥ ३२॥ जो जाणणाऱ्या बुद्धीचा प्रिय पति आहे, ब्रह्मविद्या ज्याचे ठिकाणी विश्रांति घेते व जो नेहमी देवाबरोबर राहणारा देवाचा मनोधर्मच होय॥ ३३॥

अर्जुन उवाच

ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः। तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः॥ १॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, शास्त्रविधीला सोडून जे केवळ श्रद्धेने यजन करतात, भगवंता! त्यांची निष्ठा काय सात्विक राजस की तामस असते, हे सांग॥ १॥

तो अर्जुन म्हणे गा तमालश्यामा। इंद्रियां फावलिया ब्रह्मा। तुझा बोलु आम्हां। साकांक्ष पैं जी॥ ३४॥

जें शास्त्रेंवांचूनि आणिकें। प्राणिया स्वमोक्षु न देखे। ऐसें कां कैं पखें। बोलिलासी॥ ३५॥
तरी न मिळेचि तो देशु। नव्हेचि काळा अवकाशु। जो करवी शास्त्राभ्यासु। तोही दुरी॥ ३६॥
आणि अभ्यासीं विरजिया। होती जिया सामग्रिया। त्याही नाहीं आपैतिया। तिये वेळीं॥ ३७॥
उजू नोहेचि प्राचीन। नेदिचि प्रज्ञा संवाहन। ऐसें ठेलें आपादन। शास्त्रांचें जयां॥ ३८॥
किंबहुना शास्त्रविखीं। एकही न लाहातीचि नखी। म्हणूनि उखिविखी। सांडिली जिहीं॥ ३९॥

अर्थ—तो अर्जुन म्हणाला, हे इंद्रियगोचर झालेल्या परब्रह्मा, तमालश्यामा श्रीकृष्णा! तुझे बोलणे आम्हाला संशयित वाटते॥ ३४॥ शास्त्रावाचून दुसऱ्या कोणत्याहि रीतीने जीवाला आपल्या मोक्षाचा मार्ग स्वतंत्रपणे शोधून काढता येत नाही, असा पक्ष घेऊन काहीं तू बोललास॥ ३५॥ शास्त्राने कर्मानुष्ठानाकरिता सांगितलेला शुद्ध देश मिळाला नाही, तसेच शास्त्रांनी सांगितलेला काळाचा अवकाश प्राप्त झाला नाही, शास्त्रांचा अभ्यास करविणारा गुरु, हा तर, दूरच राहिला॥ ३६॥ आणि शास्त्राभ्यासाला साह्यभूत होणारी सामुग्रीहि त्यावेळी प्राप्त झाली नाही॥ ३७॥ प्राक्तन कर्म अनुकूल नसल्यामुळे त्या कर्मानुसार उत्पन्न झालेली बुद्धि शास्त्रार्थ ग्रहण करण्यास समर्थ नाही, म्हणून शास्त्राचे अध्ययन होऊ शकले नाही॥ ३८॥ फार काय सांगावे! शास्त्राविषयीचा एकहि निश्चय अवगत होत नाही, असे पाहून ज्याने शास्त्राध्ययनाचा विचार सोडून दिला॥ ३९॥

परी निर्धारूनि शास्त्रें। अर्थानुष्ठानें पवित्रें। नांदताती परत्रें। साचारें जे॥ ४०॥
तयांऐसें आम्हीं होआवें। ऐसी चाड बांधोनि जीवें। घेती तयांचे मागावे। आचरावया॥ ४१॥
घड्याचियां आखरां। तळीं बाळ लिहे दातारा। कां पुढांसूनि पडिकरा। अक्षमु चाले॥ ४२॥
तैसें सर्वशास्त्रनिपुण। तयांचें जें आचरण। तेंचि करिती प्रमाण। आपलिये श्रद्धे॥ ४३॥
मग शिवादिकें पूजनें। भूम्यादिकें महादानें। अग्निहोत्रादि यजनें। करिती जे श्रद्धा॥ ४४॥
तयां सत्त्वरजतमां-। माजीं कोण पुरुषोत्तमा। गति होय ते आम्हां। सांगिजो जी॥ ४५॥

अर्थ—पण शास्त्राच्या अर्थाचा निश्चय करून त्याप्रमाणे शुद्ध अनुष्ठान करून जे परलोकात सुखाने नांदत आहेत॥ ४०॥ त्यांच्या सारखेच आपण व्हावे, अशी अंत:करणात इच्छा धरून आचरणाकरिता त्यांच्या पावलावर पाऊल ठऊन जे चालतात॥ ४१॥ महाराज! जसे मूल पुस्तकाच्या धड्यातील अक्षराखाली अक्षराप्रमाणे अक्षर काढते किंवा आंधळा जसा डोळसाला पुढे करूनच चालतो॥ ४२॥ त्याप्रमाणे सर्व शास्त्रात निपुण असणाऱ्याचे जे आचरण असते, तेच श्रद्धेने प्रमाण मानून जे तसेच आचरण करतात॥ ४३॥ मग त्या श्रद्धेने शिवविष्ण्वादिकांचे पूजन, भूमिदानासारखे महादान, अग्निहोत्रासारखे यज्ञादि कर्मे जे करतात॥ ४४॥ हे पुरुषोत्तमा! अशा लोकांना सात्विक, राजस, तामस यांपैकी कोणती गति प्राप्त होते ते आम्हाला सांगा॥ ४५॥

गूढार्थदीपिका—अर्जुन हा वैदिक धर्माभिमानी असल्यामुळे शास्त्र न पाहता, शास्त्रानुसार वागणाऱ्यांच्या पावलावर पाऊल ठेवून वागणाऱ्यांची श्रद्धा सात्विक, राजस की तामस, असा त्याने प्रश्न केला.

श्रीभगवानुवाच

त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा। सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु॥२॥

अर्थ—भगवान म्हणतात, अर्जुना! शास्त्रविहीन लोकांची स्वाभाविक श्रद्धा सात्विक, राजस, तामस अशी तीन प्रकारची असते, सांगतो, ऐक॥ २॥

गूढार्थदीपिका—स्वाभाविक श्रद्धा सात्विक, राजस, तामस अशी तीन प्रकारची आहे. जरी बुद्धि ही, सत्वगुणाचे कार्य असल्यामुळे कर्माचे परिणामजन्य कार्य नव्हे, तरी ज्याप्रमाणे व्यसनी माणसाची बुद्धि व्यसनानुसारच वागते, त्याप्रमाणे वेद, श्रुति, पुराण इत्यादि शास्त्रानुसार ज्याच्या बुद्धीचा विवेक झाला नाही, त्याची बुद्धि कर्माने मिळणाऱ्या फलानुसार होत असते; म्हणूनच अशा शास्त्रविवेकहीन मनुष्याची स्वाभाविक बुद्धि तीन प्रकारची असते, असे येथे सांगितले आहे.

प्रथम मदिरा ठेवलेल्या भांड्यात मदिरा ओतून घेतल्यावर गंगाजळ घातले तरी त्या गंगाजळाला मद्याचा दुर्गंध सहजच लागतो, त्याप्रमाणे बुद्धी ही मूळात सात्विक असली तरी तिला शास्त्रीय विवेक झाला नसला तर तिच्यात पूर्वकर्मानुसार सात्विक, राजस, तामस गुणांचा उत्कर्ष दिसू लागतो व ती सत्वगुणाच्या आधिक्याने स्वाभाविक सात्विक, रजोगुणाच्या आधिक्याने स्वाभाविक राजस व तमोगुणाच्या आधिक्याने स्वाभाविक तामस म्हटली जाते, म्हणून शास्त्रविवेकहीन पुरुषांच्या बुद्धीला यथार्थ ज्ञान होणे दुरापास्त असल्यामुळे तशा पुरुषांच्या बुद्धिवादाचा अभिमान व्यर्थ दुराग्रहच ठरतो.

तंव वैकुंठपिठींचें लिंग। जो निगमपद्माचा पराग। जिये जयाचेनि हें जग। अंगच्छाया॥ ४६ ॥
काळ सावियाचि वाडु। लोकोत्तर प्रौढु। अद्वितीय गूढु। आनंदघन॥ ४७ ॥
इयें श्लाघिजती जेणें बिकें। तें जयाचें आंगीं असिकें। तो श्रीकृष्ण स्वमुखें। बोलत असे॥ ४८ ॥

अर्थ—तेव्हा वैकुंठाचे जे आराध्य दैवत आहे, वेदरूपी कमलातील जो पराग होय, ज्याच्या सत्तेवर कल्पनेने आंगच्या छायेप्रमाणे भासमात्र जग भासते॥ ४६ ॥ काल स्वभावत:च अमर्याद, विस्तीर्ण आहे, अलौकिक वयाचा आहे. तो अद्वैतस्वरूप असून गूढ व आनंदघन आहे॥ ४७ ॥ ज्याच्या आंगी हे सर्व गुण असल्यामुळे अशी ज्यांची वाखाणणी ज्याच्या आंगभूत सामर्थ्याला धरूनच केली जाते, तो भगवान श्रीकृष्ण स्वमुखाने म्हणतो॥ ४८ ॥

म्हणे पार्था तुझा अतिसो। घेईं गा आम्ही जाणतसों। शास्त्राभ्यासाचा आडसो। मानितोसि कीं॥ ४९ ॥
नुसधियाची श्रद्धा। झोंबों पाहसी परमपदा। तरी तैसें हें प्रबुद्धा। सोहोपें नोहे॥ ५० ॥

अर्थ—अर्जुना! तुझ्या बोलण्याचा भर कशावर आहे, हे आम्ही पूर्ण जाणतो. तुला शास्त्राच्या अभ्यासाचा अडथळा वाटतो ना!॥ ४९ ॥ शास्त्रशुद्ध विवेकावाचून केवळ श्रद्धेने परम पदाची प्राप्ति तू करून घेऊ पाहतोस, पण हे ज्ञात्या अर्जुना! परम पदाची प्राप्ति तशी सोपी नाही॥ ५० ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्म प्राप्ती करिता श्रुति-शास्त्र-पुराण यांनी सांगितलेल्या विचारावरच श्रद्धा ठेवली पाहिजे, असा अर्थ.

श्रद्धा म्हणितलियासाठीं। पातेजों नये किरीटी। काय द्विजु अंत्यजघृष्टीं। अंत्यजु नोहे॥ ५१ ॥
गंगोदक जरी जालें। तरी मद्यभांडां आलें। तें घेवों नये कांहीं केलें। विचारीं पां॥ ५२ ॥
चंदनु होय शीतळू। परी अग्नीसी पावे मेळू। तैं हातीं धरितां जाळूं। न शके काई॥ ५३ ॥
कां किडाचिये आटतिये पुटीं। पडिलें सोळें किरीटी। घेतलें चोखटासाठीं। नागवीना॥ ५४ ॥
तैसें श्रद्धेचें दळवाडें। आंगें कीर चोखडें। परी प्राणियांच्या पडे। विभागीं जैं॥ ५५ ॥
तैं प्राणिये तंव स्वभावें। अनादिमाया प्रभावें। त्रिगुणाचेचि आघवे। वळिले आहाती॥ ५६ ॥
तेथही दोन गुण खांचती। मग एक धरी उन्नती। तैं तैसियाचि होती वृत्ती। जीवांचिया॥ ५७ ॥

अर्थ—अर्जुना आमची श्रद्धा आहे, असे म्हणून शास्त्राचा त्याग करू नये. हे अंत्यजाशी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य जर सदासर्वदा सहवास करतील तर तेहि अंत्यज होणार नाहीत काय?॥ ५१ ॥ अर्जुना! गंगोदक झाले तरी, प्रथम मदिरा ज्या भांड्यात होती, त्या भांड्यात ओतले असता, ते काही केले तरी सेवनीय होत नाही, याचा विचार कर॥ ५२ ॥ चंदनाचे लाकूड थंड खरे, पण त्याचा अग्नीशी संबंध झाल्यावर ते हातात धरले असता जाळणार नाही काय?॥ ५३ ॥ अर्जुना! हीणकट सोने आटवित असता त्या मुशीत शुद्ध सोने पडले व ते सर्व सोने शुद्ध आहे, असे समजून विकत घेतले तर ते आपल्याला नागवित नाही काय?॥ ५४ ॥ त्याप्रमाणे श्रद्धा मूळात संपूर्ण चांगली असली तरी जेव्हा ती निरनिराळ्या प्राण्यांच्या ठिकाणी विभागली जाते॥ ५५ ॥ तेव्हा प्राणी हे अनादि मायेच्या प्रभावाने त्रिगुणात्मक झाले असल्यामुळे दोन गुण कमी होऊन, मग एक गुण वाढतो व त्या वाढलेल्या गुणाप्रमाणेच जीवांच्या मनाच्या श्रद्धावृत्ती प्रगट होतात॥ ५६-५७ ॥

वृत्तीऐसें मन धरिती। मना ऐसी क्रिया करिती। केलिया ऐसी वरिती। मरोनि देहें॥ ५८ ॥

बीज मोडे झाड होये। झाड मोडे बीजीं सामाये। ऐसेनि कल्पकोडी जाये। परी जाति न नशे॥ ५९॥
तियापरी यियें अपारें। होतां जातां जन्मांतरें। परी त्रिगुणत्व न व्यभिचरे। प्राणियांचें॥ ६०॥
म्हणूनि प्राणियांच्या पैकीं। पडिली श्रद्धा अवलोकीं। ते होय गुणांसारिखी। तिहीं ययां॥ ६१॥
विपायें वाढे सत्त्व शुद्ध। तेव्हां ज्ञानासी करी साध्य। परी एका दोघे वोखद। येर आहाती॥ ६२॥

अर्थ—वृत्ति स्फुरते तेव्हा ते प्राण्याचे मनच वृत्तिरूप होते. मन ज्या प्रकारचे वृत्तिरूप होते त्याप्रमाणे प्राण्याकडून क्रिया घडते आणि मेल्यानंतर त्या कर्माप्रमाणे त्याला देह प्राप्त होतो॥ ५८॥ बीज नाहीसे होऊन झाड उत्पन्न होते व झाड नाहीसे होऊन ते बीजदशेत येते. अशा रीतीने कोटीकल्प होत राहिले तरी जाति नाहीशी होत नाही॥ ५९॥ त्याप्रमाणे प्राण्यांची अनंत जन्मांतरे होत गेली तरी त्याचे त्रिगुणात्मकत्व नाहीसे होत नाही॥ ६०॥ म्हणून प्राण्यांच्या वाटेला आलेली श्रद्धा या तीन गुणांसारखी होते, पाहा!॥ ६१॥ कदाचित् शुद्ध सत्व वाढले तर ते ज्ञानाला साध्य करून देते; पण बाकीचे दोघे रज, तम हे गुण या एकालाच औषध आहे-म्हणजे ते वाढू देत नाहीत॥ ६२॥

गूढार्थदीपिका—**"अन्योन्याभिभवाश्रयजननमिथुनवृत्तयश्चगुणाः"** (सां० का० १२) सत्व, रज, तम हे तीन गुण परस्परांना दाबणारे व परस्परातून उत्पन्न होणारे आहेत, असे सांख्यकारिकेत सांगितले आहे.

सत्त्वाचेनि आंगलगें। ते श्रद्धा मोक्षफळा रिगे। तंव रज तम उगे। कां पां राहाती॥ ६३॥
मोडोनि सत्त्वाची त्राये। रजोगुण आकाशें जाये। तेव्हां तेचि श्रद्धा होये। कर्मकेरसुणी॥ ६४॥
मग तमाची उठी आगी। तेव्हां तेचि श्रद्धा भंगी। हों लागे भोगालागीं। भलतेया॥ ६५॥

अर्थ—सत्वाच्या आश्रयाने उत्पन्न झालेली श्रद्धा जर आत्मज्ञानद्वारा मोक्षफळाला झोंबते-म्हणजे मोक्ष प्राप्त करून देते-तर रज, तम गुण हे का स्वस्थ बसतील॥ ६३॥ सत्वाच्या वाढीचे सामर्थ्य नाहीसे करून जेव्हा रजोगुण आकाशात जातो-म्हणजे अति वाढतो-तेव्हा अखंड कर्म करण्याविषयीच श्रद्धा जोरावते॥ ६४॥ तसेच जेव्हा तमोगुणाच्या आगीचा उबाळा उठतो तेव्हा वाटेल त्या रीतीने भोग भोगावा, अशा प्रकारची श्रद्धा होते॥ ६५॥

सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत। श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः॥ ३॥

अर्थ—हे अर्जुना! सर्व मनुष्यांच्या ठिकाणी पूर्वकर्माप्रमाणे त्याच्या विशिष्ट संस्कारयुक्त अंत:करणानुसार श्रद्धा असते. हा पुरुष श्रद्धामयच आहे. जो पुरुष ज्या श्रद्धेने युक्त असतो तो तशा श्रद्धेचाच समजला जातो॥ ३॥

एवं सत्त्वरजतमा-। वेगळी श्रद्धा सुवर्मा। नाहीं गा जीवग्रामा-। माजीं यया॥ ६६॥
म्हणोनि श्रद्धा स्वाभाविक। असे पैं त्रिगुणात्मक। रजतमसात्त्विक। भेदीं इहीं॥ ६७॥
जैसें जीवनचि उदक। परी विषीं होय मारक। कां मिरयामाजीं तीख। ऊंसीं गोड॥ ६८॥
तैसा बहुवसें तमें। जो सदाचि होय निमे। तेथ श्रद्धा परिणमे। तेंचि होऊनि॥ ६९॥
मग काजळा आणि मसी। न दिसे विवंचना जैसी। तेवीं श्रद्धा तामसी। सिनी नाहीं॥ ७०॥
तैसीच राजसीं जीवीं। रजोमय जाणावी। सात्त्विकीं आघवी। सत्त्वाचीच॥ ७१॥
ऐसेनि हा सकळु। जगडंबरु निखिळु। श्रद्धेचाचि केवळु। वोतला असे॥ ७२॥

अर्थ—हे अर्जुना! या जीवलोकामध्ये सात्विक, राजस, तामस या त्रिगुणात्मक श्रद्धेवेगळी श्रद्धा नाही॥ ६६॥ म्हणून सर्व पुरुषांचे ठिकाणी जी स्वाभाविक श्रद्धा असते ती सात्विक, राजस, तामस अशा भेदाने त्रिगुणात्मकच असते॥ ६७॥ ज्याप्रमाणे पाणी हे प्राणिमात्राला जगविणारे आहे, हे खरे; पण ते विषामध्ये त्याच्या मारकपणाला, मिऱ्यामध्ये त्याच्या तिखटपणाला व उसामध्ये त्याच्या गोडपणाला पोषक होते॥ ६८॥ त्याप्रमाणे तमोगुणाच्या वृद्धीत जो सदासर्वदा "जायस्व म्रियस्व" या श्रुतीत सांगितल्याप्रमाणे जन्मतो व मरतो त्याची श्रद्धा तमोरूपानेच परिणाम पावते॥ ६९॥ मग ज्याप्रमाणे काजळ व काजळाची शाई यांच्या काळेपणात भेद नसतो, त्याप्रमाणे तामसी श्रद्धा व तमोगुण हे निराळे नसतात॥ ७०॥ त्याप्रमाणेच राजस श्रद्धा रजोगुणरूपच असून सात्विक श्रद्धा संपूर्ण सत्वगुणरूपच

असते॥ ७१ ॥ याप्रमाणे हा संपूर्ण ब्रह्मांडगोल केवळ श्रद्धेचाच बनला आहे॥ ७२ ॥

गूढार्थदीपिका—"**कामः, संकल्पः, विचिकित्सा, श्रद्धा, अश्रद्धा, धृतिः, अधृतिः,ऱ्हीः, धीः, भीरित्येत् सर्व मन एव**" (बृ० उ० १-५-३) काम म्हणजे स्त्रीसंबंधीची अभिलाषादि, संकल्प-म्हणजे प्राप्त झालेल्या विषयाची शुक्लनीलादि भेदाने विशेष कल्पना, विचिकित्सा-म्हणजे संशयज्ञान, श्रद्धा-म्हणजे ज्याचे फल अदृष्ट आहे त्या कर्म व देवता यांच्या ठिकाणी आस्तिकतेचा भाव ठेवणे; अश्रद्धा म्हणजे कर्म व देवतादिकांचे ठिकाणी आस्तिकतेचा भाव नसणे, धृति म्हणजे धारण; अर्थात् देहादिक शिथिल झाले असता त्यांना सांभाळून ठेवणे, अधृति-म्हणजे धृतीच्या विपरीत होणे, ऱ्ही म्हणजे लज्जा, धी-म्हणजे बुद्धि, व भी-म्हणजे भय, हे सर्व मनच आहे-म्हणजे हे सर्व मनाच्याच वृत्ती किंवा व्यापार आहेत. असे हे स्वाभाविक अनेक व्यापारयुक्त मन, लिंगशरीर अंतर्भूत असल्यामुळे, प्रत्येक प्राण्याच्या ठिकाणी असतेच; मग तो सज्ञानी वा अज्ञानी कोणीहि असो; म्हणून मनुष्याचा कोणताहि व्यापार, कर्म, ज्ञान इत्यादि स्वतंत्रपणे बुद्धिमूलकच असण्यापेक्षा स्वाभाविक श्रद्धामूलकच असणे साहजिकच आहे; पण बुद्धिवादाचा पुरस्कार करणाऱ्यांना हे कळत नाही व व्यर्थच ते श्रद्धेची निंदा करतात.

येथे रजोगुणी, तमोगुणी शास्त्रविवेकहीन श्रद्धेची निंदा केली असली तरी स्वाभाविक सात्विक श्रद्धा, आचरणानुसार अचूक ध्येयप्राप्ति करून देणारी असल्यामुळे तिची निंदा केली नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे.

परी गुणत्रयवशें। त्रिविधपणाचें लासें। श्रद्धे जें उठिलें असे। तें वोळख तूं॥ ७३ ॥
तरी जाणिजे झाड फुलें। कां मानस जाणिजे बोलें। भोगें जाणिजे केलें। पूर्वजन्मींचें॥ ७४ ॥
तैसीं जिहीं जिहीं चिन्हीं। श्रद्धेचीं रूपें तीन्ही। देखिजती ते वानी। अवधारीं पां॥ ७५ ॥

अर्थ—पण सत्व, रज, तम या तीन गुणांच्या योगाने श्रद्धेच्या ठिकाणी जे त्रिविधपणाचे डाग उठले आहेत, त्यांची आता ओळख करून घे॥ ७३ ॥ ज्याप्रमाणे फुलावरून झाड ओळखावे किंवा बोलण्यावरून मन ओळखावे सुखदुःखभोगांवरून पूर्वजन्मींचे पुण्य-पाप ओळखावे॥ ७४॥ त्याप्रमाणे ज्या ज्या लक्षणांवरून श्रद्धेची तीन रूपे ओळखता येतील, ते प्रकार सांगतो, ऐक॥ ७५ ॥

यजन्ते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः। प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः॥ ४॥

अर्थ—सात्विक श्रद्धेचे पुरुष श्रुति-स्मृति-पुराण यात सांगितलेल्या वैदिक देवतांचे पूजन करतात. राजस श्रद्धेचे पुरुष यक्ष व राक्षस यांचे पूजन करतात व दुसरे तामस श्रद्धेचे पुरुष भूतप्रेतादिकांचे पूजन करतात॥ ४॥

तरी सात्त्विक श्रद्धा। जयांचा होय बांधा। तयां बहुतकरूनि मेधा। स्वर्गीं आथी॥ ७६ ॥
ते विद्याजात पढती। यज्ञक्रिये निवडती। किंबहुना पडती। देवलोकीं॥ ७७ ॥
आणि श्रद्धा राजसा। घडले जे वीरेशा। ते भजती राक्षसां। खेचरां हन॥ ७८ ॥
श्रद्धा जे कां तामसी। ते मी सांगेन तुजपाशीं। जे कां केवळ पापराशी। अतिकर्कशी निर्दयत्वें॥ ७९ ॥
जीववधें साधूनि बळी। भूतप्रेतकुळें मैळीं। स्मशानीं संध्याकाळीं। पूजिती ते॥ ८० ॥
ते तमोगुणाचें सार। काढूनि निर्मिले नर। जाण तामसियेचें घर। श्रद्धेचें तें॥ ८१ ॥

अर्थ—ज्यांचा पिंड स्वाभाविक सात्विक श्रद्धेचा बनला आहे, त्या लोकांना बहुतेक स्वर्गप्राप्तीची आवड असते॥ ७६ ॥ चौदा विद्यांचे अध्ययन व यज्ञादि कर्मे करण्याचे ठिकाणी त्यांची श्रद्धा असते. फार काय सांगावे! ते देवलोकात जातात॥ ७७ ॥ आणि ज्याचे अंतःकरणात स्वाभाविक राजस श्रद्धा आहे, ते, अर्जुना! यक्षराक्षसादिकांचेच पूजन करतात॥ ७८ ॥ आणि स्वाभाविक तामसी श्रद्धा, जी निर्दयपणामुळे अति कठोर म्हणून केवळ पापराशीच होय, ती आता सांगतो, ऐक॥ ७९ ॥ जीवांच्या वधाने बळी सिद्ध करून त्याच्या योगाने संध्यासमयी अमंगल अशा स्मशानामध्ये भूतप्रेतादि कुळांचे ते पूजन करतात॥ ८० ॥ असे स्वाभाविक तामस श्रद्धेचे पुरुष म्हणजे तमोगुणाचा सार काढून त्याचा केलेला पिंड होय. असे पुरुष तामस श्रद्धेचे घरच होय, असे जाण॥ ८१ ॥

ऐसी इहीं तिहीं लिंगीं। त्रिविध श्रद्धा जगीं। पैं हें ययालागीं। सांगत असें॥ ८२ ॥

जे हे सात्त्विक श्रद्धा। जतन करावी प्रबुद्धा। येरी दोनी विरुद्धा। सांडाविया॥ ८३॥
हे सात्त्विक मति जया। निर्वाहती होय धनंजया। बागुल नोहे तया। कैवल्य तें॥ ८४॥
तो न पढो कां ब्रह्मसूत्र। न लोढो सर्व शास्त्र। सिद्धांत न होत स्वतंत्र। तयाच्या हातीं॥ ८५॥
परी श्रुतिस्मृतींचे अर्थ। जे आपण होऊनि मूर्त। अनुष्ठानें जगा देत। वडील जे हे॥ ८६॥
तयांचीं आचरतीं पाउलें। पाऊनि सात्त्विकी श्रद्धा चाले। तो तेंचि फळ ठेविलें। ऐसें लाहे॥ ८७॥

अर्थ—याप्रमाणे तीन लक्षणांनी त्रिगुणात्मक श्रद्धेचे स्वरूप येवढ्याकरिताच सांगितले आहे की॥ ८२॥ अर्जुना! या तीन श्रद्धेपैकी रजोगुणी व तमोगुणी या दोन श्रद्धा विरुद्ध असल्यामुळे (अध:पतनाला कारणीभूत असल्यामुळे) नि:शेष टाकून देऊन सात्विक श्रद्धा मात्र जतन करावी॥ ८३॥ अर्जुना! ही सात्विक बुद्धि ज्याचे ठिकाणी टिकते त्याला मोक्षाची भीति वाटत नाही॥ ८४॥ स्वाभाविक सात्विक पुरुष ब्रह्मसूत्राचे किंवा कोण्याहि शास्त्राचे अध्ययन न करो अथवा त्याला शास्त्रातील सिद्धान्त अवगत न होवोत॥ ८५॥ पण जे हे आपले वाडवडिल श्रुतिस्मृतीत सांगितल्याप्रमाणे तंतोतंत आचरण करून श्रुतिस्मृतीतील प्रत्यक्ष अर्थच होऊन बसले॥ ८६॥ त्यांच्या आचाररूप पावलावर पाऊल ठेवूनच स्वाभाविक सात्विक श्रद्धेचा पुरुष चालत असतो; म्हणून त्यालाहि त्यांच्याचप्रमाणे फळ प्राप्त होते॥ ८७॥

पैं एक दीप लावी सायासें। आणिक एक तेथें उगला बैसे। तरी तो काय प्रकाशें। वंचिजे गा॥ ८८॥
कां येकें मोल अपार। वेंचोनि केलें धवळार। तो सुरवाड वस्तीकर। न भोगी काई॥ ८९॥
हें असो जो तळें करी। ते तयाचीच तृषा हरी। कीं सुआरासीचि अन्न घरीं। येरां नोहे॥ ९०॥
बहुत काय बोलों पैं गा। येका गौतमासीचि गंगा। येरां समस्तां काय जगा। वोहोळ जाली॥ ९१॥
म्हणोनि आपुलियापरी। शास्त्र अनुष्ठिती कुसरी। जाणे तयातें श्रद्धाळु जो वरी। तो मूर्खुही तरे॥ ९२॥

अर्थ—एक मनुष्य प्रयत्नाने दिवा लावित आहे म्हणून त्याला प्रकाश मिळाला आणि दुसरा मनुष्य तेथे उगाच बसला आहे म्हणून त्याला प्रकाश मिळत नाही काय?॥ ८८॥ किंवा एखाद्या श्रीमंत पुरुषाने पुष्कळ पैसे खर्च करून जर मोठा वाडा बांधला आणि एखादा प्रवासी येऊन तेथे उतरला तर तो वाड्यातील सुखसोयी भोगित नाही काय?॥ ८९॥ हे असो जो तळे करतो (खणतो) त्याचीच ते तळे तहान भागविते काय? किंवा घरी शिजविलेले अन्न आचाऱ्याचीच भूक शमविते, दुसऱ्याची शमवित नाही काय?॥ ९०॥ अर्जुना! फार काय सांगावे! एका गौतमाला गंगा झाली आणि बाकीच्या इतर जगाला ती ओढा झाली काय?॥ ९१॥ म्हणून आपल्या सामर्थ्यानुसार जो शास्त्राप्रमाणे आचरण करण्याचे शाहाणपण बाळगतो, त्याच्या आचरणानुसार शास्त्र न पाहता केवळ श्रद्धेने आचरण करू पाहणारा मूर्खहि तरतो.॥ ९२॥

गूढार्थदीपिका—सात्विक अंधश्रद्धाळू व डोळस श्रद्धाळु या दोघांचेहि एक वैदिकच आचरण असल्यामुळे दोघेहि सारखेच तरतात.

अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः। दम्भाहङ्कारसंयुक्ताः कामरागबलान्विताः॥ ५॥
कर्षयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः। मां चैवान्तःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान्॥ ६॥

अर्थ—जे मूढ लोक विषयाभिलाष व विषयासक्ति या विकाराच्या बळाला बळी पडल्यामुळे दंभ व अहंकार यांनी युक्त होऊन श्रुति, स्मृति, पुराण यातून न सांगितलेली व शरीरातील इंद्रियसमुदायांचे व त्यांच्या साक्षिभूत अशा माझे कर्षण करणारी व दुसऱ्याला पीडा देणारी घोर तपे करतात, अर्जुना! ते लोक आसुर होत, असे जाण॥ ५-६॥

ना शास्त्राचेनि कीर नांवें। खाकरोंही नेणती जीवें। परी शास्त्रज्ञांही शिवे। टेंकों नेदिती॥ ९३॥
वडिलांचिया क्रिया। देखोनि वाती वांकुलिया। पंडितां डाकुलिया। वाजविती॥ ९४॥

अर्थ—जे खरोखर शास्त्राचे नावाने खाकरू इच्छित नाहीत-म्हणजे त्यांना शास्त्रे अगदी तुच्छ वाटतात. शास्त्र

जाणणाऱ्याला तर आपल्या घराच्या सीमेलाहि शिवू देत नाहीत॥ ९३॥ वाडवडिलांच्या शास्त्रानुसार होणाऱ्या क्रिया पाहून त्यांना वाकुल्या दाखवितात व पंडित लोक पाहून त्यांच्यापुढे चुटक्या वाजवून त्यांचा उपहास करतात॥ ९४॥

आपुलेनीचि आटोपें। धनित्वाचेनि दर्पें। साचचि पाखंडाचीं तपें। आदरिती॥ ९५॥
आपुलिया पुढिलांचिया। आंगीं घालूनि कातिया। रक्तमांसा प्रणीतया। भरभरों॥ ९६॥
रिचविती जळतकुंडीं। लाविती चेड्याच्या तोंडीं। नवसियां देती उंडी। बाळकांची॥ ९७॥
आग्रहाचिया उजरिया। क्षुद्र देवतां वरिया। अन्नत्यागें सातरिया। ठाकती एक॥ ९८॥

अर्थ—आपल्या शहाणपणाच्या अभिमानाने व श्रीमंतीच्या गर्वाने खरोखर अवैदिक रुद्रयामलादि तंत्राच्या योग व मोक्षवर्जित भागात सांगितलेल्या तपांचे आचरण करतात. आपल्या व दुसऱ्याच्या आंगात कोयतारूपी शस्त्रे खुपसून व रक्तमासांनी यज्ञपात्रे भरून पेटलेल्या कुंडात आहुत्या देतात व चेटुकाच्या तोंडी लावतात व नवस करून बालकांचे बळी देतात॥ ९५-९७॥ कोणी सात सात दिवस अन्नाचा त्याग करून (कुबेर-यक्षादि) क्षुद्रदेवतांच्या श्रेष्ठत्वाचा उघड आग्रह धरतात व त्यांची उपासना करतात॥ ९८॥

अगा आत्मपरपीडा। बीज तमक्षेत्रीं सुहाडा। पेरिती मग पुढां। तेंचि पिके॥ ९९॥
बाहू नाहीं आपलिया। आणि नावेतेंहि धनंजया। न धरी होय तया। समुद्रीं जैसें॥ १००॥
कां वैद्यातें करी सळा। रसु सांडी पायखोळां। तो रोगिया जेवीं विव्हळा-। सवता होय॥ १०१॥
नाना पडिकराचेनि सळें। काढी आपलेचि डोळे। तें वानवसां आंधळें। जैसें ठाके॥ १०२॥
तैसें तया असुरां होये। जे निंदूनि शास्त्रांची सोये। सैंघ धांवताती मोहें। आडवीं जे कां॥ १०३॥
काम करवी तें करिती। क्रोध मारवी तें मारिती। किंबहुना मातें पुरिती। दुःखाचा गुंडां॥ १०४॥
आपुलां परावां देहीं। दुःख देती जें जें कांहीं। मज आत्मया तेतुलाही। होय सीण॥ १०५॥

अर्थ—हे सूज्ञ अर्जुना! जे कोणी तामस श्रद्धारूपी अंतःकरणक्षेत्रात केवळ आपल्याला व परक्याला पीडा देण्याचेच बीज पेरतात, तेथे तेच पीक येते॥ ९९॥ अर्जुना! बाहू नाही व नावेचाहि आश्रय घेत नाही, अशा पुरुषाची समुद्रामध्ये जशी स्थिति होते॥ १००॥ किंवा ज्याप्रमाणे सवत आपल्या दुःखात भर टाकणारी होते. त्याप्रमाणे, जो पुरुष वैद्याचा द्वेष करतो व औषध पायदळी फेकून देतो तो आपणच आपल्या दुःखात भर टाकणारा होतो॥ १०१॥ किंवा सुंदर डोळस माणसाच्या द्वेषाने त्याला पाहू नये म्हणून जो आपले डोळे फोडून घेतो, तो आंधळा होऊन जसा माजघरात पडून राहतो॥ १०२॥ त्याप्रमाणे, श्रुति, स्मृति, पुराणे इत्यादि शास्त्रांनी सांगितलेल्या मार्गांची निंदा करून अविवेकाने वाटेल तशा स्वैर वर्तनाच्या अरण्यात जे धावतात, त्या आसुरी लोकांची अशी स्थिति होते॥ १०३॥ कामवासना जे करवील ते करतात, क्रोध मारवील त्याला मारतात. फार काय सांगावे! मलाहि दुःखाच्या दगडाखाली पुरतात॥ १०४॥ आपल्या अथवा दुसऱ्याच्या देहाच्या ठिकाणी जे जे ते दुःख देतात, तो तो सर्व दुःखरूप शीण मज आत्मस्वरूपालाच होतो॥ १०५॥

गूढार्थदीपिका—मज आत्मया तेतुलाही। होय सीण-

(अध्याय सोळावा ओवी ४०० वरील गूढार्थदीपिका पाहा.)

पैं वाचेनिही पालवें। पापियां तया नातळावें। परी पडिलें सांगावें। त्यजावया॥ १०६॥
प्रेत बाहिरें घालिजे। कां अंत्यज संभाषणीं त्यजिजे। हें असो हातें क्षाळिजे। कश्मलातें॥ १०७॥
तेथ शुद्धीचिया आशा। तो लेप न मनवे जैसा। तयांतें सांडावया तैसा। अनुवादु हा॥ १०८॥
तरी अर्जुना तूं तयांतें। देखसी तैं स्मर हो मातें। जे आन प्रायश्चित्त येथें। मानेल ना॥ १०९॥
म्हणौनि श्रद्धा जे सात्त्विकी। पुढती तेचि पैं येकी। जतन करावी निकी। सर्वांपरी॥ ११०॥

अर्थ—वाचेच्या पदराने त्या पाप्यांना स्पर्श देखील करू नये म्हणजे त्यांचे नाव देखील उच्चारू नये, पण रजोगुणी-तमोगुणी श्रद्धेचा त्याग करावा, हे सांगण्याकरीता त्याचे वर्णन करणे भाग पडले॥ १०६॥ ज्याप्रमाणे प्रेत

बाहेर काढण्याकरीताच त्याला स्पर्श करावा लागतो किंवा अंत्यजाशी न बोलण्याकरिताच त्याला ''चालता हो'' असे बोलावे लागते. हे असो मल नाहीसा करण्याकरिताच तो हातांनी धुवून काढावा लागतो॥ १०७॥ या सर्व ठिकाणी शुद्धि करताच जसे स्पर्श करणे वाईट मानले जात नाही, त्याप्रमाणेच रजोगुणी-तमोगुणी श्रद्धेचा त्याग करावा, हे सांगण्याकरिताच त्याचा अनुवाद केला आहे॥ १०८॥ तरी अर्जुना! रजोगुणी-तमोगुणी श्रद्धेचा पुरुष दृष्टीस पडताच माझे स्मरण कर. कारण त्यांच्या दर्शनाने होणाऱ्या पापाच्या निवृत्तिकरिता या वाचून दुसरे प्रायश्चित्त उपयोगी पडणार नाही॥ १०९॥ म्हणून पुन: सांगणे इतकेच की सर्व रीतीने एक सात्विक श्रद्धाच जतन करावी॥ ११०॥

तरी धरावा तैसा संगु। जेणें पोखे सात्त्विक लागु। सत्त्ववृद्धीचा भागु। आहारु घेपे॥ १११॥
एऱ्हवीं तरी पाहीं। स्वभाववृद्धीच्या ठाईं। आहारावांचूनि नाहीं। बळी हेतु॥ ११२॥
प्रत्यक्ष पाहें पां वीरा। जो सावध घे मदिरा। तो होऊनि ठाके माजिरा। तियेचि क्षणीं॥ ११३॥
कां जो साविया अन्नरसु सेवी। तो व्यापिजे वातश्लेष्मस्वभावीं। काय ज्वरु जालिया निववी। पयादिक॥ ११४॥
नातरी अमृत जयापरी। घेतलिया मरण वारी। कां आपुलियांऐसें करी। जैसें विष॥ ११५॥
तेवीं जैसा घेपे आहारु। धातु तैसाचि होय आकारु। आणि धातु ऐसा अंतरु। भावो पोखे॥ ११६॥

अर्थ—ज्याच्या योगाने चित्तावर सत्वगुणाची पकड दृढ होईल, अशी संगति धरावी व ज्यात सत्वगुण अधिक आहे, असा आहार घ्यावा॥ १११॥ अर्जुना! साधारणत: पाहता स्वाभाविक गुणांच्या वृद्धीला आहारावाचून दुसरे बलवान कारण नाही॥ ११२॥ अर्जुना! प्रत्यक्षच पाहा बरे! सावध असलेला मनुष्य मद्य प्याल्याबरोबर त्याच क्षणी उन्मत्त होऊन जातो॥ ११३॥ किंवा मनुष्य जो अन्नरस सेवन करतो तो वात व कफ यांच्या स्वभावाने व्यापिला जातो. ज्वर प्राप्त झाला असता दुग्धादि पदार्थ त्याला शांत करतात काय?॥ ११४॥ किंवा अमृत प्राशन केले असता ते मृत्यु निवारण करते अथवा विष ज्या पदार्थात मिसळावे त्या पदार्थाला आपल्यासारखे विषारी, ज्याप्रमाणे करते॥ ११५॥ त्याप्रमाणे जसा आहार घ्यावा तसे रसरक्तादि धातु व शरीर बनते आणि धातुप्रमाणे अंत:करणातील भाव उत्पन्न होतात॥ ११६॥

गूढार्थदीपिका—**''अन्नं पुंसाशितं त्रेधा जायते जठराग्निना। मल: स्थविष्ठो भाग: स्यान्मध्यमो मांसतां व्रजेत्'॥ मन: कनिष्ठो भाग: स्यात् तस्मादन्नमयं मन:॥' (शिवगीता अ० ९)**

मनुष्य जे अन्न खातो त्याचे जठराग्नीच्या योगाने स्थूल, मध्यम व सूक्ष्म असे तीन भाग होतात. स्थूल भाग मळरूप होतो. मध्यम भाग रसरक्तादि धातुरूप होतो व सूक्ष्मभाग मनरूप होतो; म्हणून खाल्लेल्या सात्त्विक, राजस, तामस अन्नाप्रमाणे मन सात्विक, राजस, तामस होते, हे सिद्ध आहे. वैद्यशास्त्राचे असेच म्हणणे आहे आणि येथे माउलीने वैद्यशास्त्राला अनुसरूनच ही ओवी दिली आहे.

जैसें भांडियाचेनि तापें। आंतुलें उदकही तापे। तैसी धातुवशें आटोपे। चित्तवृत्ती॥ ११७॥
म्हणोनि सात्त्विकु रसु सेविजे। तैं सत्त्वाची वाढी पाविजे। राजसा तामसा होइजे। येरीं रसीं॥ ११८॥
तरी सात्त्विक कोण आहारु। राजसा तामसा कायी आकारु। हें सांगों करीं आदरु। आकर्णनीं॥ ११९॥

अर्थ—ज्याप्रमाणे भांडे तापले असता त्या भांड्यातील पाणीहि ऊन होते, त्याप्रमाणे शरीरातील धातू जसे सात्विक, राजस, तामस, असतील, त्याप्रमाणे चित्ताच्या वृत्तीहि बनतात॥ ११७॥ म्हणूनच सात्विक रसाचे सेवन केले असता सत्त्वाची वृद्धि होते आणि दुसरे राजस-तामस रस सेवन केले असता राजस-तामस गुणांचीच वृद्धि होते॥ ११८॥ याकरिताच सात्विक आहार कोणता व राजस-तामस आहाराचे स्वरूप काय, हे आता सांगतो, लक्षपूर्वक ऐक॥ ११९॥

आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रिय:। यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु॥ ७॥

अर्थ—सर्व मनुष्यांना प्रिय असलेला आहार तीन प्रकाराचा आहे. त्याचप्रमाणे यज्ञ, तप, दान हेहि त्रिविध आहेत. त्यांचे भेद सांगतो, ऐक॥ ७॥

आणि एकसरें आहारा। कैसेनि तिनी मोहरा। जालिया तेही वीरा। रोकडें दाऊं॥ १२०॥
तरी जेवणाराचिया रुची। निष्पत्ति कीं बोनियाची। आणि जेविता तंव गुणांची। दासी येथ॥ १२१॥
जे जीव कर्ता भोक्ता। तो गुणास्तव स्वभावता। पावोनियां त्रिविधता। चेष्टे त्रिधा॥ १२२॥
म्हणौनि त्रिविधु आहारु। यज्ञुही त्रिप्रकारु। तप दान हन व्यापारु। त्रिविधचि ते॥ १२३॥
पैं आहारलक्षण पहिलें। सांगों जें म्हणितलें। तें आईक गा भलें। रूप करूं॥ १२४॥

अर्थ—आणि सामान्यपणे एकच आहार असताना त्याचे तीन भेद कसे झाले, हे आता अर्जुना! स्पष्ट सांगतो॥ १२०॥ तरी ज्याप्रमाणे जेवणाऱ्याच्या रुचीप्रमाणे अन्न तयार केले जाते आणि जेवणारा हा गुणाच्या स्वाधीन असतो॥ १२१॥ जो जीव कर्ता भोक्ता आहे, तो सत्वादि गुणांच्या स्वाधीन झाल्यामुळे तीन प्रकारचा होऊन गुणानुसार तीन प्रकारचे व्यापार करतो॥ १२२॥ म्हणून त्याच्याकडून गुणानुसार घेतला जाणारा आहार व केले जाणारे यज्ञ, तप, दान हे सर्व तीन प्रकारचे होतात॥ १२३॥ प्रथम आहाराचे लक्षण सांगतो, असे जे म्हटले ते सांगतो नीट लक्ष देऊन ऐक॥ १२४॥

आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः । रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥ ८ ॥

अर्थ—आयुष्य, चित्तातील स्थैर्यादि सात्विक गुण, शक्ति, आरोग्य, सुख व अभिरुचि वाढविणारे, स्वतः रसभरित, सुरस, स्निग्ध, शरीरात बराच वेळ टिकणारे व इंद्रियांना समाधान देणारे, असे सात्विक पुरुषांना प्रिय असणारे सात्विक आहार असतात॥ ८॥

तरी सत्त्वगुणाकडे। जैं दैवें भोक्ता पडे। तैं मधुरीं रसीं वाढे। मेचु तया॥ १२५॥
आंगेंचि द्रव्यें सुरसें। जे आंगेंचि पदार्थ गोडसे। आंगेंचि स्नेहें बहुवसें। सुपक्कें जियें॥ १२६॥
आकारें नव्हती डगळें। स्पर्शें अति मवाळें। जिभेलागीं स्नेहाळें। स्वादें जियें॥ १२७॥
रसें गाढीं वरी ढिलीं। द्रवभावें आथिलीं। ठायेंठावो सांडिलीं। अग्नितापें॥ १२८॥
आंगें सानें परिणामें थोरु। जैसें गुरुमुखींचें अक्षरु। तैशी अल्पीं जिहीं अपारु। तृप्ति राहे॥ १२९॥
आणि मुखीं जैसीं गोडें। तैसीचि हितें आंतुलेहीकडे। तिये अन्नीं प्रीति वाढे। सात्त्विकांसी॥ १३०॥

अर्थ—जेव्हा भोक्त्या मनुष्याची प्रारब्धानुसार सत्वगुणाकडे प्रवृत्ति होते, तेव्हा त्याला मधुर रसच आवडतो॥ १२५॥ जे पदार्थ स्वतः मूळातच सुरस, स्वभावतः गोड, आंगचेच चांगले पक्व व स्नेहयुक्त झालेले आहेत॥ १२६॥ आकाराने अति मोठे नाहीत, स्पर्शाने अति मऊ, स्वादाने जिभेला स्नेहयुक्त लागतील॥ १२७॥ जे पदार्थ रसाने परिपूर्ण भरलेले असूनहि वरून मऊ आहेत, जे ओलेपणाने संपन्न असून ठिकाणच्या ठिकाणी अग्नीची उष्णता न लागता परिपक्व होतात॥ १२८॥ ज्याप्रमाणे गुरुमुखातून निघणारे अक्षर स्वरूपतः थोडे असले तरी त्याचा परिणाम फार मोठा होतो, त्याप्रमाणे जे पदार्थ थोडे भक्षिले तरी तृप्ति मात्र फार वेळ राहते॥ १२९॥ त्याचप्रमाणे जे तोंडात घातले असताच गोड लागतात, जे पोटात गेल्यावरही सुखकारकच होतात, असेच अन्न सात्विक पुरुषाला अधिक आवडते॥ १३०॥

एवं गुणलक्षण। सात्त्विक भोज्य जाण। आयुष्याचें त्राण। नीच नवें हें॥ १३१॥
येणें सात्त्विक रसें। जंव देहीं मेहो वरिषे। तंव आयुष्यनदी उससे। दिहाचि दिहा॥ १३२॥
सत्त्वाचिये कीर पाळती। कारण हाचि सुमती। दिवसाचिये उन्नती। भानु जैसा॥ १३३॥
आणि शरीरा हन मानसा। बळाचा पैं कुवासा। हा आहारु तरी दशा। कैंची रोगां॥ १३४॥
हा सात्त्विकु होय भोग्यु। तैंचि भोगावया आरोग्यु। शरीरासी भाग्यु। उदयलें जाणों॥ १३५॥
आणि सुखाचें घेणे देणें। निकें उवाया ये येणें। हें असो वाढे साजणें। आनंदेसीं॥ १३६॥
ऐसा सात्त्विक आहारु। परिणमला थोरु। करी हा उपकारु। सबाह्यासी॥ १३७॥
आतां राजसासि प्रीती। जिहीं रसीं आथी। करूं तयाही व्यक्ती। प्रसंगें गा॥ १३८॥

अर्थ--अशा गुणलक्षणाचे अन्नाला सात्विक आहार म्हणतात, असे जाण आणि हे अन्न म्हणजे आयुष्याचे नित्यनवे रक्षणच होय, असे समज ॥ १३१ ॥ जेव्हा अशा या सात्विक आहाराचा रसरूपी मेघ शरीरावर वर्षाव करू लागतो, तेव्हा आयुष्यनदी दिवसेंदिवस वाढू लागते ॥ १३२ ॥ ज्याप्रमाणे दिवसाची वाढ होण्याला सूर्य कारण आहे, त्याप्रमाणे, हे शुद्धबुद्धि अर्जुना! हा सात्विक आहार खरोखर सत्वगुणाचे रक्षण करण्याला कारणीभूत आहे ॥ १३३ ॥ आणि हा सात्विक आहार म्हणजे शरीर, मन यांच्या बळाला आश्रय असणारा आहे. हा असल्यावर रोगाला ठावठिकाण कोठून असणार? ॥ १३४ ॥ हा सात्विक आहार भोग्य झाला असता आरोग्य भोगण्यास शरीराचे भाग्यच उदयास आले, असे समजावे ॥ १३५ ॥ या आहारामुळे देण्याघेण्याचा व्यवहार चांगला सुखाने होतो, असे स्पष्ट दिसून येईल. एवढेच नाही, तर त्यांचे आनंदाशीहि सख्य वाढते ॥ १३६ ॥ असा हा सात्विक आहार अंतर्बाह्य थोर उपकार करणारा असा परिणाम पावतो ॥ १३७ ॥ आता राजस पुरुषाला ज्या आहाराचे ठिकाणी गोडी वाटते, प्रसंगाने तोहि स्पष्ट करून सांगतो ॥ १३८ ॥

कट्वम्ललवणात्युष्ण तीक्ष्णरूक्षविदाहिनः। आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥ ९ ॥

अर्थ—जो आहार अति कडू, अति आंबट, अति खारट, अति उष्ण, अति तीक्ष्ण, अति रुक्ष व शरीराचा अति दाह करणारा आहे व म्हणून जो दुःख, शोक व रोग यांना उत्पन्न करणारा होतो, तो आहार रजोगुणी पुरुषांना प्रिय वाटतो ॥ ९ ॥

तरी मारें उणें काळकूट। तेणें मानें जें कडुवट। कां चुनियाहूनि दासट। आम्लीं हन ॥ १३९ ॥
कणिकीतें जैसें पाणी। तैसेंचि मीठ बांधया आणी। तेतुलीच मेळवणी। रसांतरांची ॥ १४० ॥
ऐसें खारट अपाडें। राजसा तया आवडे। उन्हाचेनि मिषें तोंडें। आगीचि गिळी ॥ १४१ ॥
वाफेचिया सिगे। वातीही लाविल्या लागे। तैसें उन्ह मागे। राजसु तो ॥ १४२ ॥
वावदळ पाडुनि ठाये। साबळु डाहारला आहे। तैसें तीख तो खाये। जें घायेंवीण रूपे ॥ १४३ ॥
आणि राखेहुनि कोरडें। आंत बाहेरी येकें पाडें। तो जिव्हादंशु आवडे। बहु तया ॥ १४४ ॥
परस्परें दांतां। आदळु होय खातां। तो गा तोंडीं घेतां। तोषों लागे ॥ १४५ ॥
आधींच द्रव्यें चुरमुरीं। वरि परवडजती मोहरी। जियें घेतां होती धुवारी। नाकतोंडा ॥ १४६ ॥
हें असो उगें आगीतें। म्हणे तैसें राइतें। पढियें प्राणापरतें। राजसासि गा ॥ १४७ ॥
ऐसा न पुरोनि तोंडा। जिभा केला वेडा। अन्नमिषें अग्नि भडभडा। पोटीं भरी ॥ १४८ ॥

अर्थ—जो आहार, प्राण हरण करण्याचा गुण नसलेल्या काळकूट विषाप्रमाणे अति कडू असतो किंवा चुन्याहून दाहक असा अति आंबट असतो ॥ १३९ ॥ कणकीचा गोळा करण्याकरिता जितके पाणी तितके या आहारात मीठ घातले जाते व तितकेच इतर रसहि घातले जातात ॥ १४० ॥ असा अत्यंत खारट आहार त्या राजस पुरुषाला आवडतो. तो ऊन ऊन खाण्याच्या मिषाने अग्निच गिळतो ॥ १४१ ॥ तो रजोगुणी पुरुष इतके ऊन पदार्थ खायला लागतो की त्या खाण्याच्या पदार्थाच्या शिगेवरील वाफेने दिव्याची ज्योत देखील लावता येईल ॥ १४२ ॥ वाहटुळीने एका ठिकाणी पाडले व तेथे पडली असलेली सब्बल आंगाला लागली तर जसा घाव न पडता तीक्ष्ण दुःख होते तसे तो राजस पुरुष तीक्ष्ण तिखट खातो ॥ १४३ ॥ आतून व बाहेरून एकसारखे राखेपेक्षाहि कोरडे, स्नेहहीन व जिभेला बोचणारे पदार्थ त्याला फार आवडतात ॥ १४४ ॥ ज्या पदार्थाच्या रुक्षपणामुळे खाताना परस्पर दातावर दात आदळतील असे पदार्थ खायला मिळाले असता त्याला आनंद होतो ॥ १४५ ॥ पदार्थ आधीच चुरचुरीत असले तरी जेणेकरून नाकातोंडात आगीचा फणका एकदम उठेल अशी आणखी वाटलेली मोहरी त्याला लावतो ॥ १४६ ॥ हे असो. अग्नीलाहि क्षणभर थांब म्हणेल, असे तिखट रायते त्या राजस पुरुषाला प्राणाहून प्रिय वाटते ॥ १४७ ॥ अशा प्रकारे ज्याच्या तोंडाला कधी पुरेसे वाटत नाही व जो सर्वस्वी जिव्हालोलुप झाला आहे, तो पुरुष अन्नाच्या निमित्ताने पोटात पेटलेला अग्निच भरतो ॥ १४८ ॥

तैसाचि लवंघा सुटे। मग भुई ना सेजे सांटे। पाणियाचें न सुटे। तोंडोनि पात्र॥ १४९॥
ते आहार नव्हती घेतले। व्याधिव्याळ जे सुतले। ते चेववावया घातलें। माजवण पोटीं॥ १५०॥
तैसें एकमेकां सळें। रोग उठती एके वेळे। ऐसा राजसु आहारु फळे। केवळ दुःखें॥ १५१॥
एवं राजसा आहारा। रूप केलें धनुर्धरा। परिणामाचाही विसुरा। सांगितला॥ १५२॥
आतां तया तामसा। आवडे आहारु जैसा। तेंही सांगों चिळसा। झणें तुम्ही॥ १५३॥

अर्थ—त्याबरोबर अंगाचा दाह सुरू होतो. मग तो जमिनीवर किंवा आंथरुणावर स्वस्थ पडून राहू शकत नाही व तोंडचे पाण्याचे भांडे सुटत नाही॥ १४९॥ असा घेतलेला आहार नव्हे, तर सुप्त असलेल्या व्याधिरूप सर्पांना जागे करण्याकरिता पोटात घातलेले मादक पदार्थ होत॥ १५०॥ मग एकमेकांशी स्पर्धा करीत एकाच काळी सर्व रोग उत्पन्न होतात. याप्रमाणे राजस आहार केवळ दुःखाच्या रूपानेच फलद्रूप होतो॥ १५१॥ याप्रमाणे अर्जुना! राजस आहाराचे स्वरूप सांगून त्याच्या परिणामाचाहि विस्तार सांगितला॥ १५२॥ आता तामसी पुरुषांना जो आहार आवडतो तो सांगतो, ऐक. तो ऐकताना तुम्हाला कदाचित् किळस येईल॥ १५३॥

यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत्। उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम्॥ १०॥

अर्थ—शिजल्यावर एक प्रहर लोटल्यामुळे थंड झालेले, नीरस, दुर्गंधयुक्त, शिळे, उष्टे व अपवित्र असे भोजन तामसी पुरुषांना आवडते॥ १०॥

तरी कुहिलें उष्टें खातां। न मनिजे तेणें अनहिता। जैसें कां उपहिता। म्हैसी खाय॥ १५४॥
निपजलें अन्न तैसें। दुपाहरीं कां येरें दिवसें। अतिकरें तैं तामसें। घेईजे तें॥ १५५॥
नातरी अर्ध उकडिलें। का निपट करपोनि गेलें। तैसेंही खाय चुकलें। रसा जें येवों॥ १५६॥
जया का आथि पूर्ण निष्पत्ती। जेथ रसु धरी व्यक्ती। तें अन्न ऐसी प्रतीती। तामसा नाहीं॥ १५७॥
ऐसेनि कहीं विपायें। सदन्ना वरपडा होये। तरी घाणी सुटे तंव राहे। व्याघ्रु जैसा॥ १५८॥
का बहुवे दिवशीं वोलांडिलें। स्वादपणें सांडिलें। शुष्क अथवा सडलें। गाभिणेंही हो॥ १५९॥
तेंही बाळाचे हातवरी। चिवडलें जैसी राडी करी। कां सवें बैसोनि नारी। गोतांबील करी॥ १६०॥
ऐसेनि कश्मळें जैं खाय। तैं तया सुखभोजन ऐसें होय। परी येणेंही न धाय। पापिया तो॥ १६१॥

अर्थ—ज्याप्रमाणे म्हैस जवळ ठेवलेले कोणतेहि अन्न खाते, त्याप्रमाणे तामसी लोक नासके, उष्टे, हे माझ्या हिताचे नाही, असा काहीच विचार करीत नाहीत॥ १५४॥ त्याप्रमाणेच तमोगुणी पुरुष सकाळी शिजविलेले अन्न त्यावरून बराच काळ लोटून गेल्यावर दुपारी किंवा दुसऱ्या दिवशी खातो॥ १५५॥ किंवा अर्धकच्चे शिजविलेले अथवा निःशेष करपलेले व रसहीन बनलेले असेहि अन्न तामसी पुरुष खात असतो॥ १५६॥ पूर्ण शिजलेले रुचीस आलेले, अशा अन्नाला तो तामसी पुरुष अन्न म्हणत नाही॥ १५७॥ इतकेहि करून जर यदाकदाचित् तमोगुणी पुरुषापुढे पूर्ण शिजविलेले व स्वादिष्ट अन्न आलेच तर तो ते न खाता व्याघ्राप्रमाणे ते अन्न नासून त्याची घाण सुटेपर्यंत वाट पाहतो॥ १५८॥ किंवा ज्याच्यावरून पुष्कळ दिवस लोटले गेले, स्वादरहित, सुकलेले किंवा सडून, गाभीण अशा किड्यांनी भरलेले आणि तेहि ज्याप्रमाणे चिखल करावा किंवा परिवारासह बसून गीतांबील करावी, त्याप्रमाणे मुलांच्या हातांनी चिवडले गेलेले, असे घाणेरडे अन्न जेव्हा तो तमोगुणी पुरुष खातो, तेव्हा त्याला भोजन केल्याचे समाधान वाटते, इतक्यानेहि तो पापी तृप्ति मानित नाही॥ १५९-१६१॥

मग चमत्कारु देखा। निषेधाचा आंबुखा। जया का सदोखा। कुद्रव्यासी॥ १६२॥
तया अपेयांच्या पानीं। अखाद्यांच्या भोजनीं। वाढविजे उतान्ही। तामसें तेणें॥ १६३॥
एवं तामस जेवणारा। ऐसैसी मेचु हे वीरा। तयाचें फल दुसरां। क्षणीं नाहीं॥ १६४॥
जे जेव्हांचि हें अपवित्र। शिवे तयाचें वक्त्र। तेव्हांचि पापा पात्र। जाला तो कीं॥ १६५॥
यावरतें जें जेवीं। ते जेविति वोज न म्हणावी। पोटभरती जाणावी। यातना ते॥ १६६॥

शिरच्छेदें काय होये। का आगीं रिघतां कैसें आहे। हें जाणावें काई पाहें। परी साहातचि असे॥ १६७॥
म्हणोनि तामसा अन्ना। परिणाम गा सिनाना। न सांगोंचि गा अर्जुना। देवो म्हणे॥ १६८॥
आतां ययावरी। आहाराचिया परी। यज्ञुही अवधारीं। त्रिधा असे॥ १६९॥
परी तिहींमाजीं प्रथम। सात्त्विक यज्ञाचें वर्म। आईक पां सुमहिम। शिरोमणी॥ १७०॥

अर्थ—मग आश्चर्य असे पाहा की ते तामसी पुरुष, शास्त्रांनी निषिद्धपणाचा शिंतोडा टाकलेले सदोष व वाईट असे अपेय-मदिरादि पिण्याची व अभक्ष्य-मांसादि पदार्थ भक्षण करण्याची इच्छा वाढवितात॥ १६२-१६३॥ हे अर्जुना! याप्रमाणे तामस आहार करणाऱ्याला अशी अशी आवड होत असते तशा आहाराचे फळ त्या क्षणीच मिळते, दुसरा क्षण लागत नाही॥ १६४॥ कारण, ज्या क्षणी हे अपवित्र पदार्थ त्याच्या तोंडाला लागतात, त्या क्षणीच तो पापाला पात्र झाला॥ १६५॥ यानंतर, त्याच्या पदार्थसेवनाला जेवणाची तऱ्हा म्हणू नये तर ती पोट भरणारी यातनाच समजावी॥ १६६॥ शिरच्छेद केला असता काय होते? अग्नीत शिरले असता कसे वाटते, हे तसे करून पाहून जाणायचे असते काय? पण पाहा! तमोगुणी पुरुष हे सर्व सहन करीत असतात॥ १६७॥ म्हणून हे अर्जुना! तामस आहाराचा वेगळा परिणाम सांगत नाही, असे देव म्हणतात॥ १६८॥ आता यानंतर आहाराप्रमाणे यज्ञहि तीन प्रकारचा आहे, ऐक॥ १६९॥ उत्तम कीर्ति असलेल्यामध्ये श्रेष्ठ अशा अर्जुना! तरी तिन्ही प्रकारांमध्ये प्रथम सात्त्विक यज्ञाचे लक्षण (सांगतो) ऐक॥ १७०॥

अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते। यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विकः॥ ११॥

अर्थ—यज्ञाच्या फलाची यत्किंचित् इच्छा न करणाऱ्याकडून शास्त्रविधीला धरून व यज्ञ करणे हे माझे कर्तव्य आहे, असे समजून मनाच्या समाधानाने जो यज्ञ केला जातो, त्याला सात्त्विक यज्ञ म्हणतात॥ ११॥

तरी एकु प्रियोत्तमु-। वांचोनि वाढों नेदी कामु। जैसा का मनोधर्मु। पतिव्रतेचा॥ १७१॥
नाना सिंधूतें ठाकोनि गंगा। पुढारां न करीचि रिगा। कां आत्मा देखोनि उगा। वेदु ठेला॥ १७२॥
तैसे जे आपुल्या स्वहितीं। वेंचूनियां चित्तवृत्ती। नुरवितीची अहंकृती। फळालागीं॥ १७३॥
पातलेया झाडाचें मूळ। मागुतें सरों नेणेचि जळ। जिरालें कां केवळ। तयाच्याचि आंगीं॥ १७४॥
तैसें मनें देहें दोहीं। यजननिश्चयाच्या ठाईं। हारपोनि जे कांहीं। वांछिती ना॥ १७५॥

अर्थ—ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री एका आपल्या प्रियोत्तम पतीच्या प्रेमावाचून दुसरी कोणतीहि कामना मनात उत्पन्न होऊ देत नाही॥ १७१॥ किंवा ज्याप्रमाणे गंगा समुद्रास मिळाल्यानंतर पुढे जातच नाही किंवा आत्म्याचे स्वरूप पाहिल्याबरोबर वेद मौन धारण करतो॥ १७२॥ त्याप्रमाणे जे कोणी आत्मप्राप्तिरूप स्वहित साधण्याकडेच संपूर्ण चित्तवृत्ति लावून विषयसुखाच्या प्राप्तीची इच्छा करण्याकरिता अहंकार उरू देत नाहीत॥ १७३॥ अथवा झाडाच्या मूळाशी प्राप्त झालेले पाणी तेथल्या तेथेच झाडाच्या आंगात जिरून जाते, मागे परत येत नाही॥ १७४॥ त्याप्रमाणे जे कोणी मनाने व देहाने यजन करायचे या निश्चयाचे ठिकाणी तल्लीन होऊन गेल्यामुळे दुसऱ्या कशाचीच इच्छा करीत नाहीत॥ १७५॥

तिहीं फळवांछात्यागीं। स्वधर्मावांचूनि विरागीं। कीजे जो यज्ञु सर्वांगीं। अळंकृतु॥ १७६॥
परी आरिसां आपणपें। डोळां जैसें घेपें। कां तळहातींचें दीपें। रत्न पाहिजे॥ १७७॥
नाना उदिते दिवाकरें। गमावा मार्गु दिठी भरे। तैसा वेद निर्धारें। देखोनियां॥ १७८॥
तियें कुंडें मंडप वेदी। आणीकही संभारसमृद्धीं। ते मेळवणी जैसी विधी। आपण पां केली॥ १७९॥
सकळावयव उचितें। लेणीं पातलीं जैसी आंगातें। तैसे पदार्थ जेथिंचें तेथें। विनियोगुनी॥ १८०॥
काय वानूं बहुती बोली। जैसी सर्वाभरणीं भरलीं। ते यज्ञविद्याचि रूपा आली। यजनमिषें॥ १८१॥
तैसा सांगोपांगु। निपजे जो यागु। नुठऊनियां लागु। महत्त्वाचा॥ १८२॥
प्रतिपाळु तरी पाटाचा। झाडीं कीजे तुळसीचा। परि फळा फुला छायेचा। आश्रयो नाहीं॥ १८३॥

किंबहुना फळाशेवीण। ऐसेया निगुती यज्ञ निर्माण। होय तो यागु जाण। सात्त्विकु गा॥ १८४॥

अर्थ—स्वधर्माव्यतिरिक्त सर्वांविषयी वैराग्य धारण करून व विषयसुखाच्या फळाची इच्छा सोडून तंतोतंत विधीने सांगितल्याप्रमाणे जो यज्ञ करावा॥ १७६॥ ज्याप्रमाणे आरशाच्या योगाने आपण आपल्याला डोळ्यांनी पाहावे किंवा तळहातावरील रत्न दिव्याने पाहावे॥ १७७॥ किंवा सूर्योदय झाल्यावर प्रवासाला जाण्याचा मार्ग दृष्टीस पडावा, त्याप्रमाणे, जणु काय शास्त्रात सांगितलेल्या प्रत्यक्ष विधीनेच जमवाजमव केली, अशा प्रकारे वेदविधि पाहून कुंडे, मंडप, वेदी आणखी इतर यज्ञसमृद्धि मिळवून व ज्याप्रमाणे आंगावरील अवयवांवर त्या त्या अवयवांना योग्य असे अलंकार घालावेत, त्याप्रमाणे शास्त्रांनी सांगितल्याप्रमाणे यज्ञीय पदार्थांचा जेथल्या तेथे विनियोग करून॥ १७८-१८०॥ शब्दाने फार काय प्रशंसा करावी! यजनक्रियेच्या मिषाने साक्षात् यज्ञविद्याच सर्व अलंकाराने अलंकृत होऊन जणु, प्रगट झाली॥ १८१॥ त्याप्रमाणे प्रतिष्ठा वाढविण्याच्या निमित्ताचा स्पर्श न होऊ देता अंगउपांगासहित जो यज्ञ निष्पन्न होतो॥ १८२॥ तुळशीचे झाड फळ, फूल, छाया याला आश्रय होत नसेल तरी त्याचा जसा उत्तम प्रतिपाळ केला जातो॥ १८३॥ तसा, फार काय बोलावे! मनात यत्किंचितहि फळाची इच्छा नसून जो यथार्थ यज्ञ केला जातो तो सात्विक यज्ञ होय, असे जाण॥ १८४॥

अभिसन्धाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत्। इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम्॥ १२॥

अर्थ—हे भरतश्रेष्ठ अर्जुना! फळाकडे लक्ष ठेऊन व लोकात प्रतिष्ठा मिरविण्याकरिता जो यज्ञ केला जातो तो राजसयज्ञ होय, असे जाण॥ १२॥

आतां यज्ञु कीर वीरेशा। करी पैं याचि ऐसा। परी श्राद्धालागीं जैसा। अवंतिला रावो॥ १८५॥
जरी राजा घरासि ये। तरी बहुत उपेगा जाये। आणि कीर्तीही होये। जगामाजी॥ १८६॥
तैसा धरूनि आवांका। म्हणे स्वर्गु जोडेल असिका। दीक्षितु होईन मान्यु लोकां। घडेल यागु॥ १८७॥
ऐसी केवळ फळालागीं। महत्त्व फोकारावया जगीं। पार्था निष्पत्ति जे यागीं। राजस पैं ते॥ १८८॥

अर्थ—सर्व वीर पुरुषात श्रेष्ठ अशा अर्जुना! ज्याप्रमाणे राजाला श्राद्धाकरिता जेवावयास बोलवावे, त्याप्रमाणेच खरोखर राजस यज्ञ केला जात असतो॥ १८५॥ कारण राजा जर घरी आला तर त्याच्या येण्याचा पुष्कळ उपयोग होतो आणि जगात कीर्तिहि होते॥ १८६॥ त्याप्रमाणे तो मनात अशी कल्पना करतो की आपण यज्ञ केला असता सर्व स्वर्गाचे राज्य हाती येईल, लोक मला दीक्षित म्हणून मान देतील व अनायासे यागहि घडेल॥ १८७॥ अर्जुना! अशा रीतीने फळाची आशा धरून व आपली प्रतिष्ठा मिरविण्याकरिता जी यज्ञक्रिया केली जाते ती राजस होय॥ १८८॥

विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम्। श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते॥ १३॥

अर्थ—शास्त्रविधि, यथोक्त अनन्दान, वैदिक मंत्र, शास्त्रोक्त दक्षिणा व श्रद्धा यांवाचून जो यज्ञ केला जातो, त्याला तामस यज्ञ म्हणतात॥ १३॥

आणि पशुपक्षिविवाहीं। जोशी कामापरौता नाहीं। तैसा तामसा यज्ञा पाहीं। आग्रहचि मूळ॥ १८९॥
वारया वाट न वाहे। कीं मरण मुहूर्त पाहे। निषिद्धांसी बिहे। आगी जरी॥ १९०॥
तरी तामसाचिया आचारा। विधीचा आथी वोढावारा। म्हणूनि तो धनुर्धरा। उत्सृंखळु॥ १९१॥
नाहीं विधीची तेथ चाड। नये मंत्रादिक तयाकड। अन्नजाता न सुये तोंड। मासिये जेवीं॥ १९२॥
वैराचा बोधु ब्राह्मणा। तेथ कें रिगेल दक्षिणा। अग्नि जाला वाउधाणा। वरपडा जैसा॥ १९३॥
तैसें वायांचि सर्वही वेंचे। मुख न देखतां श्रद्धेचें। नागविलें निपुत्रिकाचें। जैसें घर॥ १९४॥
ऐसा जो यज्ञाभासु। तया नाम यागु तामसु। आइकें म्हणे निवासु। श्रियेचा तो॥ १९५॥

अर्थ—ज्याप्रमाणे पशुपक्ष्यांच्या विवाहात कामवासनेवाचून दुसरा जोशी नसतो, त्याप्रमाणे तामसयज्ञाचे मूळ कारण आग्रह असतो॥ १८९॥ वाऱ्याकडून एखादी वाट वाहविली जाणार नाही किंवा मरण मुहूर्ताची वाट पाहील

अथवा अग्नि निषिद्ध पदार्थांना जाळण्याला कदाचित भिईल; पण तमोगुणी पुरुषाच्या आचाराला शास्त्रीय विधीचा धरबंधच नसतो; म्हणून हे अर्जुना! त्याचा आचार उच्छृंखल म्हटला जातो॥ १९०-१९१॥ ज्याप्रमाणे अमुक प्राण्यांच्या अन्नाला तोंड लावावे असा माशांना निर्बंध नसतो म्हणून त्या कोणत्याहि प्राण्यांच्या अन्नाना तोंड लावल्यावांचून राहत नाहीत. त्याप्रमाणे तामसयज्ञात वैदिकविधीचा निर्बंध नसतो. वैदिक मंत्रादिक त्यांच्याकडे येत नाहीत॥ १९२॥ जेथे ब्राह्मणाविषयी शत्रुत्वाची भावना आहे, तेथे दक्षिणेचा विचार काय होणार? किंवा ज्याप्रमाणे वाहटुळीला अग्नीची जोड मिळावी किंवा ज्याला संतान नाही त्याचे घर (घराची संपत्ति) व्यर्थच वाटेल त्याच्याकडून लुटली जावी, त्याप्रमाणे श्रद्धेचे तोंडहि न पाहता केल्या जाणाऱ्या तामसयज्ञात व्यर्थच संपूर्ण संपत्ति खर्ची पडते॥ १९३-१९४॥ अशा केवळ आभासरूप यज्ञास तामसयज्ञ म्हणतात, ऐक, असे लक्ष्मीचे राहण्याचे स्थान भगवान श्रीकृष्ण म्हणाले॥ १९५॥

आतां गंगेचें एक पाणी। परी नेलें आनानीं वाहणीं। एक मळी एक आणी। शुद्धत्व जैसें॥ १९६॥
तैसें तिहीं गुणीं तप। येथ जाहालें आहे त्रिरूप। तें एक केलें दे पाप। उद्धरी एक॥ १९७॥
तरी तेंचि तिहीं भेदीं। कैसेनि पां म्हणौनि सुबुद्धी। जाणों पाहासी तरी आधीं। तपचि जाण॥ १९८॥
येथ तप म्हणिजे काई। तें स्वरूप दाऊं पाहीं। मग भेदिलें गुणीं तिहीं। तें पाठीं बोलों॥ १९९॥
तरी तप जें कां सम्यक्। तेंही त्रिविध आइक। शारीर मानसिक। शाब्द गा॥ २००॥

अर्थ—आता गंगेचे पाणी एकच पण निरनिराळ्या वाहीतून नेले असता ते शुद्ध वाहीतून शुद्ध करणारे व अशुद्ध वाहीतून अशुद्ध करणारे होते॥ १९६॥ त्याप्रमाणे तपहि सत्वादि तीन गुणांमुळे सात्विक, राजस, तामस असे तीन प्रकारचे झाले आहे. त्यात राजस-तामस तप केले असता पापरूप होते व सात्विक तप केले असता ते शुद्ध करणारे होते॥ १९७॥ हे सुबुद्धि अर्जुना! ते तप तीन प्रकारचे कशाने झाले हे जाणण्याची इच्छा असेल तर तेच आधी ऐकून घे॥ १९८॥ तेथे तप म्हणजे काय ते कळण्याकरिता प्रथम त्याचे स्वरूप सांगतो, पाहा! मग तीन गुणांमुळे ते तीन प्रकारचे कसे होते, हे नंतर सांगतो॥ १९९॥ तरी यथार्थ जे तप ते शारीरिक, मानसिक आणि शाब्द किंवा वाचिक असे तीन प्रकारचे आहे, ऐक॥ २००॥

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम्। ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते॥ १४॥

अर्थ—देव, ब्राह्मण, गुरु व ज्ञानी यांचे पूजन, शरीरशुद्धि, सरळपणा, ब्रह्मचर्य व प्राण्यांची हिंसा न करणे या आचाराला शरीराने होणारे तप म्हणतात॥ १४॥

आतां या तिहिं माझारीं। शारीर तंव अवधारीं। तरी शंभू कां श्रीहरी। पढियंता होय॥ २०१॥
तया प्रिया देवतालया। यात्रादिकें करावया। आठही पाहार जैसें पायां। उळिग घापे॥ २०२॥
देवांगण मिरवणियां। आंगोपचार पुरवणियां। करावया म्हणियां। शोभती हात॥ २०३॥
लिंग का प्रतिमा दिठीं। देखतखेंवों अंगेष्टी। लोटिजे कां काठी। पडली जैसी॥ २०४॥
आणि विधिविनयादिकीं। गुणीं वडील जे लोकीं। तया ब्राह्मणांची निकी। पाइकी कीजे॥ २०५॥
अथवा प्रवासें का पीडा। का शिणले जे सांकडां। ते जीव सुरवाडा। आणिजती॥ २०६॥
सकल तीर्थांचिये धुरे। जियें कां मातापितरें। तयां सेवेसि कीर शरीरें। लोण कीजे॥ २०७॥
आणि संसारा ऐसा दारुणु। जो भेटलाचि हरी शीणु। तो ज्ञानदानीं सकरुणु। भजिजे गुरु॥ २०८॥

अर्थ—आता तिघांमधील शारीरिक तप ऐक. तरी शिव किंवा श्रीहरी यांपैकी ज्याचे प्रेम असेल त्या प्रिय देवतेच्या मंदिराला यात्रा करण्यासाठी पायाला जणु काय आठहि प्रहर सारखा भोवरा लावावा॥ २०१-२०२॥ देवाचे आंगण सडासंमार्जनाने व रंगमाळादिकांनी सुशोभित करण्याकरिता व त्याच्या मूर्तीच्या आंगाला षोडश उपचार पुरवून पूजनादि करण्याकरिताच हात शोभत आहेत, (असे समजावे)॥ २०३॥ शिवाचे लिंग किंवा विष्णुमूर्ति दृष्टीस पडताच, हातातील काठी पडावी, त्याप्रमाणे नमस्काराकरिता एकदम शरीरकाठी लोटली जावी॥ २०४॥ लोकात जे

कोणी गुणवान व वडील असे ब्राह्मण असतील त्यांची शास्त्रात सांगितलेल्या सत्कार विधीने व विनयादिकाने सेवा करावी ॥ २०५ ॥ किंवा प्रवासाने, रोगादि पीडेने अथवा संकटात सापडल्याने जे कष्टी झाले असतील त्या जीवांना सुखी करून सोडावे ॥ २०६ ॥ संपूर्ण तीर्थापेक्षा श्रेष्ठ असे जे मातापिता त्यांच्या सेवेवरून शरीर ओवाळून टाकावे- म्हणजे त्यांच्या सेवेपुढे ते तुच्छ मानावे ॥ २०७ ॥ आणि ज्याची भेट झाली असता आत्मज्ञान प्राप्त होऊन संसारासारखे अत्यंत दारुण दु:खहि नाहिसे होते त्या करुणासंपन्न अशा श्रीगुरुची सर्वेतोपरि सेवा करावी ॥ २०८ ॥

आणि स्वधर्माचा आगिठां। देह जाड्याचिया किटा। आवृत्तिपुटीं सुभटा। झाडीं कीजे ॥ २०९ ॥

अर्थ—हे उत्तम योद्ध्या अर्जुना! स्वधर्मरूपी अग्नीत शास्त्रोक्त दैनंदिन आचरणाच्या आवृत्तीची पुटे देऊन देहाचे ठिकाणी असलेला जाड्यरूपी मळ जाळून टाकावा ॥ २०९ ॥

गूढार्थदीपिका—'**मृद्रूपो हि यथा कुंभो तद्वद्देहोऽपि चिन्मय:**' मातीपासून झालेला घट जसा मातीरूपच असतो, तसा चिन्मयस्वरूपाचे ठिकाणी भासलेला विवर्तरूप देहहि चिन्मयच आहे, असे आचार्य म्हणतात.

अर्थ—पण अनादि अज्ञानामुळे व दुर्धर पापाचरणजन्य तमोगुणामुळे जीवाला हा चिन्मय देहच जड दिसतो. यथोक्त धर्माचरणाच्या दैनंदिन आवृत्तिमुळे तमोगुणाला कारण होणारे मागील पाप जसे जसे क्षीण होत जाते तसा तसा तमोगुण क्षीण होत जाऊन सत्वगुण वाढत जातो. व शेवटी रजस्तमोगुण अत्यंत क्षीण झाले असता वाढलेल्या सत्वगुणाने श्रीगुरुकृपा होऊन अधिष्ठानरूप सच्चिदानंद परब्रह्माचा साक्षात्कार होतो व त्याचा विवर्तरूप असा देहहि चिन्मयच आहे, असा अनुभव येतो. असा या ओवीतील भाव आहे.

वस्तु भूतमात्रीं नमिजे। परोपकारीं भजिजे। स्त्रीविषयीं नियमिजे। नांवेंनांवें ॥ २१० ॥
जन्मतेंनि प्रसंगें। स्त्रीदेह शिवणें आंगें। तेथूनि जन्म आघवें। सोंवळें कीजे ॥ २११ ॥
भूतमात्राचेनि नांवें। तृणही नासुडावें। किंबहुना सांडावें। छेद भेद ॥ २१२ ॥
ऐसैसी जैं शरीरीं। रहाटीची पडे उजरी। तै शारीर तप घुमरी। आलें जाण ॥ २१३ ॥
पार्था समस्तही हें करणें। देहाचेनि प्रधानपणें। म्हणौनि ययातें मी म्हणें। शारीर तप ॥ २१४ ॥
एवं शारीर जें तप। तयाचें दाविलें रूप। आतां आईक निष्पाप। वाङ्मय तें ॥ २१५ ॥

अर्थ—परब्रह्म परमात्मा अणुरेणूत व्यापक आहे, असे समजून जीव दृष्टीस पडताच परमात्म्याकडे लक्ष देऊन नमस्कार करावा, परोपकाराने परमेश्वराचे सेवन करीत असावे आणि स्त्रीसंभोगाची इच्छा समूळ नाहीशी होईल, अशा रीतीने स्त्रीसंभोगाचे नियमन करावे-म्हणजे स्त्रीसंभोगाचा कालावधी वाढवित जावा ॥ २१० ॥ जन्म झाला तेव्हाच स्त्रीदेहाचा स्पर्श झाला असेल तो झाला, त्यानंतर संपूर्ण जन्म स्त्रीदेहस्पर्शावाचून ठेवावा ॥ २११ ॥ पदार्थमात्र जीव आहे असे समजून गवतालाहि हिसका लागू देऊ नये. एवढेच नाही तर, त्याला तोडणे, कापणे हे देखील करू नये ॥ २१२ ॥ अशा अशा प्रकारे जेव्हा शरीराची राहाटी उत्कर्षास पोहोचते तेव्हा शारीरिक तप पूर्ण झाले, असे जाण ॥ २१३ ॥ अर्जुना! हे सर्व शरीराच्याच आश्रयाने होत असल्यामुळे याला मी शारीर तप म्हणतो ॥ २१४ ॥ याप्रमाणे शारीरिक जे तप त्याचे स्वरूप सांगितले. आता पापरहित असे वाचिक तप सांगतो, ऐक ॥ २१५ ॥

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत्। स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १५ ॥

अर्थ—ऐकल्याबरोबर खिन्नता उत्पन्न न करणारे, सत्य, प्रिय व हितकारक असे बोलणे, आपल्याला दररोज पठण करण्यास योग्य म्हणून स्वीकारलेली स्तोत्रे व ग्रंथ यांचा अभ्यास करणे, याला वाचिक तप म्हणतात ॥ १५ ॥

तरी लोहाचें आंग तुक। न तोडितांचि कनक। केलें जैसें देख। परिसें तेणें ॥ २१६ ॥
तैसें न दुखवितां सेजे। जावळिया सुख निपजे। ऐसें साधुत्व का देखिजे। बोलणां जिये ॥ २१७ ॥
पाणी मुदल झाडा जाये। तृण तें प्रसंगेंचि जिये। तैसें एका बोलिलें होये। सर्वांहि हित ॥ २१८ ॥
जोडे अमृताची सुरसरी। तैं प्राणांतें अमर करी। स्नानें पाप ताप वारी। गोडीही दे ॥ २१९ ॥
तैसा अविवेकुही फिटे। आपुलें अनादित्व भेटे। आइकतां रुचि न विटे। पीयूषीं जैसी ॥ २२० ॥

जरी कोणी करी पुसणें। तरी होआवें ऐसें बोलणें। नातरी आवर्तणें। निगमु का नाम॥ २२१॥
ऋग्वेदादि तिन्ही। प्रतिष्ठिजती वाग्भुवनीं। केली जैसी वदनीं। ब्रह्मशाळा॥ २२२॥
नातरी एकादें नांव। तेंचि शैव कां वैष्णव। वाचे वसे तें वाग्भव। तप जाणावें॥ २२३॥
आतां तप जे मानसिक। तेंहीं सांगों आइक। म्हणे लोकनाथनायक-। नायकचि तो॥ २२४॥

अर्थ—ज्याप्रमाणे लोखंडाचा तुकडा न तोडता किंवा वजन कमी न करता परिस लोखंडाचे सोने करतो॥ २१६॥ त्याप्रमाणे कोणाचेहि चित्त न दुखविता सहजच जवळच्या माणसाला सुख समाधान वाटेल असा ज्या बोलण्यात सज्जनपणा असतो॥ २१७॥ ज्याप्रमाणे पाणी मुख्यत: झाडाला दिले जाते, पण हाच प्रसंग गवताला वाढण्यास कारणीभूत होतो; त्याप्रमाणे ज्या एकाला बोलण्याने सर्वानाच सुख समाधान वाटते॥ २१८॥ अमृताची गंगा प्राप्त झाली तर ती प्राशन केली असता प्राणाला अमर करते, गोडीहि देते व तिच्यात स्नान केले असता ती पाप-ताप नाहीसे करते॥ २१९॥ त्याप्रमाणे, जे बोलणे ऐकले असता अविवेक नाहीसा होऊन आपल्या अनादि स्वरूपस्थितीचे ज्ञान होते व अमृताचा जसा वीट येत नाही, तसे ऐकताना त्याचा वीटहि येत नाही॥ २२०॥ कोणी विचारल्यास असे बोलणे असावे, नाही तर वेदाची किंवा हरिनामाची आवर्तने करीत बसावे॥ २२१॥ मुखाला जणु काय वेदशाळाच बनविली अशा रीतीने ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद या तिन्ही वेदांची मुखमंदिरात स्थापना करावी-म्हणजे तिन्ही वेद मुखोद्‌गत करावे॥ २२२॥ किंवा शिव, विष्णु यांच्यापैकी कोणाचेहि नाव वाणीवर राहावे, याला वाणीचे तप म्हणतात॥ २२३॥ आता ज्याला मानसिक तप म्हणतात. तेहि सांगतो, ऐक, असे लोकनाथ-म्हणजे लोकपाल त्यांचा नायक म्हणजे ब्रह्मदेव व त्यांचा नायक म्हणजे भगवान श्रीकृष्ण म्हणाले॥ २२४॥

मन: प्रसाद: सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रह:। भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते॥ १६॥

अर्थ—रागद्वेषरहित मन होणे, मनात सर्व लोकांच्या हिताची इच्छा असणे, न बोलणे, इंद्रिये व त्याचे विषय यांकडे मनाने न जाणे व निष्कपट बुद्धि याला मानसिक तप म्हणतात॥ १६॥

तरी सरोवर तरंगीं। सांडिलें आकाश मेघीं। कां चंदनाचें उरगीं। उद्यान जैसें॥ २२५॥
नाना कळावैषम्यें चंद्रु। कां सांडिला आधीं नरेंद्रु। नातरी क्षीरसमुद्रु। मंदराचळें॥ २२६॥
तैंसीं नाना विकल्पजाळें। सांडूनि गेलिया सकळें। मन राहे कां केवळें। स्वरूपें जें॥ २२७॥
तपनेंवीण प्रकाशु। जाड्येंवीण रस। पोकळीवीण अवकाशु। होय जैसा॥ २२८॥
तैसी आपली सोय देखे। आणि आपलिया स्वभावा मुके। हिंवलीं जैसी आंगिकें। हिवों नेदी॥ २२९॥
मग न चलतें कळंकेवीण। शशिबिंब जैसें परिपूर्ण। तैसें चोखी शृंगारपण। मनाचें जें॥ २३०॥

अर्थ—ज्याप्रमाणे तरंगानी सरोवराला किंवा मेघानी आकाशाला अथवा सर्पांनी चंदनाचे उद्यानाला सोडले॥ २२५॥ किंवा कळावैषम्याने चंद्राला किंवा चिंतेनी राजाला किंवा क्षीर समुद्राला मंदार पर्वताने सोडले॥ २२६॥ त्याप्रमाणे संपूर्ण विकल्पजाळ मनाला सोडून गेले असता मन जे केवळ स्वरूपभूत होऊन राहते॥ २२७॥ ज्याप्रमाणे उष्णतेवाचून प्रकाश असावा किंवा जडपणावाचून रस असावा किंवा पोकळीवाचून अवकाश असावा॥ २२८॥ जशी थंडी आपल्या आंगच्या थंडीने थरथर कापत नाही, त्याप्रमाणे मन आपल्याच खऱ्या ब्रह्मरूप आश्रयाला जाणून जेव्हा आपला संकल्पविकल्परूप स्वभावाचा त्याग करते॥ २२९॥ तेव्हा कलंकापासून मुक्त होऊन न चालणारे चंद्रबिंब जसे नित्य व परिपूर्ण होते, तसे मन शुद्ध ब्रह्मभावामुळे जे शृंगारित होते॥ २३०॥

बुजाली वैराग्याची वोरप। जिराली मनाची धांप कांप। तेथ केवळ जाली वाफ। निजबोधाची॥ २३१॥
म्हणौनि विचारावया शास्त्र। राहाटवावें जें वक्त्र। तें वाचेचेंही सूत्र। हातीं न धरीं॥ २३२॥
तें स्वलाभ लाभलेपणें। मन मनपणाही धरूं नेणे। शिवतलें जैसें लवणें। आपुलें निज॥ २३३॥
तेथ कें उठिती ते भाव। जिहीं इंद्रियमार्गीं धांव। घेऊनि ठाकावे गांव। विषयांचे ते॥ २३४॥
म्हणौनि तियें मानसीं। भावशुद्धीचि असे आपैसी। रोमशुचि जैसी। तळहाताची॥ २३५॥

काय बहु बोलों अर्जुना। जैं हे दशा ये मना। तै मनस्तपोभिधाना। पात्र होय ती॥ २३६॥
परी तें असो हें जाण। मानस तपाचें लक्षण। देवो म्हणे संपूर्ण। सांगितलें॥ २३७॥
एवं देहवाचाचित्तें। जें पातलें त्रिविधत्वातें। तें सामान्य तप तूतें। परिसविलें गा॥ २३८॥
आतां गुणत्रयसंगें। हेंचि विशेषीं त्रिविधीं रिगें। तेंही आइक चांगें। प्रज्ञाबळें॥ २३९॥

अर्थ—वैराग्याचा वोरखाडा बुजून जातो, मनाची धाव व अस्वस्थता नाहीशी होते व मन केवळ एक ब्रह्मबोधाची भूमिकाच होऊन राहते॥ २३१॥ म्हणून शास्त्राचा विचार करण्याकरिता ज्या वाणीचा व्यापार करावा लागतो, त्या वाणीरूप सूत्राला तो हाती धरत नाही (म्हणजे मौन धरून राहतो)॥ २३२॥ मिठाने आपल्या मूळ पाणीरूप स्वरूपास स्पर्श केला असता, जसे ते पाणीरूप होऊन जाते, त्याप्रमाणे आपल्या अधिष्ठानभूत मूळ स्वरूपाचा लाभ झाला असता ते मन पूर्वीप्रमाणे आपले संकल्प-विकल्प धरणे विसरून जाते॥ २३३॥ अशा स्थितीत ज्या भावामुळे इंद्रियमार्गाने धावत जाऊन विषयाचे गावाला मन जाते ते भाव उठण्याला अवसर कोठून असणार?॥ २३४॥ म्हणून ज्याप्रमाणे तळहाताचे ठिकाणी केस स्वभावत:च नसतात, त्याप्रमाणे अशा मनाचे ठिकाणी साहजिकच भावशुद्धि म्हणजे विकल्परहित स्थिति असते॥ २३५॥ अर्जुना! फार काय सांगू! जेव्हा मनाला अशी दशा प्राप्त होते तेव्हा ते मनच मानसिक तप या नावाला पात्र होते॥ २३६॥ पण ते असो. मानसतपाचे संपूर्ण लक्षण तुला सांगितले, हे लक्षात ठेव, असे देव म्हणाले॥ २३७॥ याप्रमाणे जे एक सामान्य तप काया-वाचा-मनामुळे या तीन प्रकाराला प्राप्त झाले, ते तुला ऐकविले॥ २३८॥ आता सत्वादि तीन गुणांमुळे ते विशेष तीन प्रकारचे कसे होते तेहि सांगतो. चांगले लक्ष देऊन ऐक॥ २३९॥

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः। अफलाकाङ्क्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते॥ १७॥

अर्थ—कायिक, वाचिक, मानसिक हे तीन प्रकारचे तप अत्यंत श्रद्धेने व फळाची-म्हणजे विषयसुखाची-यत्किंचितहि इच्छा न करणाऱ्या व निश्चल चित्त झालेल्या पुरुषाने केले असता सात्विक म्हटले जाते॥ १७॥

तरी हेंचि तप त्रिविधा। जें दाविलें तुज प्रबुद्धा। तेंचि करीं पूर्णश्रद्धा। सांडूनि फळ॥ २४०॥
जैं पुरतिया सत्त्वशुद्धी। आचरिजे आस्तिक्यबुद्धी। तैं तयातेंचि गा प्रबुद्धीं। सात्त्विक म्हणिपे॥ २४१॥

अर्थ—हे शाहाण्या अर्जुना! तुला कायिक, वाचिक, मानसिक असे जे तीन प्रकारचे तप सांगितले ते फलाशा सोडून अत्यंत श्रद्धेने कर॥ २४०॥ जेव्हा नि:शेष विकल्परहित पूर्ण आस्तिक्यबुद्धीने हे तप करावे, तेव्हा सूज्ञ लोक त्याला सात्विक तप म्हणतात॥ २४१॥

सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत्। क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम्॥ १८॥

अर्थ—आपला सत्कार-मान-पूजा करून घेण्याकरिता म्हणून जे तप दंभाने केले जाते त्याचे फळ अनियमित व अस्थिर असल्यामुळे त्याला राजस तप म्हटले आहे॥ १८॥

नातरी तपस्थापनेलागीं। दुजेपण मांडूनि जगीं। महत्त्वाद्रीच्या शृंगीं। बैसावया॥ २४२॥
त्रिभुवनींचिया सन्माना। न वचावें ठाया आना। धुरेचिया आसना। भोजनालागीं॥ २४३॥
विश्वाचिया स्तोत्रा। आपण होआवया पात्रा। विश्वें आपलिया यात्रा। कराविया यावें॥ २४४॥
लोकांचिया विविधा पूजा। आश्रयो न धरावया दुजा। भोग भोगावें वोजां। महत्त्वाचिये॥ २४५॥
आंगा बोल माखूनि तपें। विकावया आपणपें। अंगहीन पडपे। जियापरी॥ २४६॥
हें असो धनमानीं आस। वाढउनी तप कीजे सायास। तैं तेंचि तप राजस। बोलिजे गा॥ २४७॥

अर्थ—किंवा तपाची प्रतिष्ठा करण्याकरिता जगात द्वैत भावाचे प्रतिपादन करून श्रेष्ठपणाच्या पर्वतशिखरावर बसण्याकरिता, त्रिभुवनात असलेल्या श्रेष्ठत्वाच्या मानाने माझ्यावाचून दुसरीकडे जाऊ नये व आसन भोजन इत्यादि वेळेचा पहिला मान मिळावा म्हणून, सर्व जगात आपलीच स्तुति गायिली जावी व आपल्या दर्शनाकरिता लोकांनी यात्रा कराव्या म्हणून, लोकांच्या नाना प्रकारच्या पूजेने माझ्यावाचून दुसरा आश्रय धरू नये व मोठेपणाच्या रीतीने-

म्हणजे महंत होऊन-भोग भोगावे म्हणून, ज्याप्रमाणे एखादे आंग नसलेला पुरुष आपल्याला भूषविणाऱ्या अशा वस्त्रादिकांनी सन्मान मिळवितो, त्याप्रमाणे स्तुतिस्तोत्रादिकांनी व मानसन्मानद्वारा आपल्याला विकण्याकरिता आपले मोठेपण दिसेल असे शब्द तपाचे द्वारा लोकांकडून माखून घेतो-म्हणजे लावून घेतो॥ २४२-२४६ ॥ हे असो. धन-मान मिळविण्याची आशा वाढवून ते मिळविण्याकरिता जे कष्टप्रद तपकरावे, त्या तपाला राजस-तप म्हणतात. ॥ २४७ ॥

परी पहुरणीं जें दुहिलें। तैं तें गुरूं न दुभेचि व्यालें। का उभें शेत चारिलें। पिकावया नुरे॥ २४८॥
तैसें फोकारितां तप। कीजे जें साक्षेप। तें फळीं तंव सोप। नि:शेष जाय॥ २४९॥
ऐसें निर्फळ देखोनि करितां। माझारीं सांडी पांडुसुता। म्हणौनि नाहीं स्थिरता। तपा तया॥ २५०॥
एऱ्हवीं तरी आकाश मांडी। जो गर्जोनि ब्रह्मांड फोडी। तो अवकाळु मेघ काय घडी। राहात आहे॥ २५१॥
तैसें राजस तप जें होये। तें फळीं कीर वांझ जाये। परी आचरणींही नोहे। निर्वाहतें गा॥ २५२॥
आतां तेंचि तप पुढती। तामसाचिये रीती। पैं परत्रा आणि कीर्ती। मुकोनि कीजे॥ २५३॥

अर्थ—ज्याप्रमाणे पहुरणी नावाच्या कीड्याने झालेल्या ओटीच्या रोगात दूध काढून घेतले असता गाय किंवा म्हैस व्याली तरी दूध देत नाही किंवा चांगले उगवलेले शेत चारले गेले असता हाती पीक येण्यास काही उरत नाही॥ २४८॥ त्याप्रमाणे हट्टाने केले जाते व ज्याचा लोकात बडेजाव माजविला जातो ते तप अगदी निष्फळ होते॥ २४९ ॥ असे हे तप निष्फळ होते हे जाणून मध्येच ते टाकून दिले जाते, म्हणून या तपाला, अर्जुना! स्थिरता नसते॥ २५० ॥ नाही तरी, जो अकाळ मेघ आकाशात भरून गर्जनेने ब्रह्मांड भेदरून सोडतो तो घटकाभर तरी राहतो काय?॥ २५१ ॥ त्याप्रमाणे राजस तप जे आहे, ते फळाच्या दृष्टीने खरोखर वांझ होते व त्याचे आचरणहि टिकणारे नसते॥ २५२ ॥ आता तेच तप तमोगुणी पुरुषाकडून परलोकप्राप्तीची व कीर्तीची पर्वा न करता या प्रकारे केले जाते॥ २५३ ॥

मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः। परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम्॥ १९॥

अर्थ—देह म्हणजेच आत्मा अशा दृढ अविवेकी अंत:करणाने आपल्या देहाला अत्यंत पीडा देऊन किंवा दुसऱ्याचा नाश करण्याकरिता जे तप केले जाते, त्याला तामस तप म्हटले आहे॥ १९॥

केवळ मूर्खपणाचा वारा। जीवीं घेऊनि धनुर्धरा। नाम ठेविजे शरीरा। वैरियाचें॥ २५४॥
पंचाग्नीची दडगी। खोलवीजती शरीरालागीं। कां इंधन कीजे हें आगी-। आंतु लावी॥ २५५॥
माथां जाळिजती गुगुळु। पाठीं घालिजती गळु। आंग जाळिती इंगळु। जळतभीतां॥ २५६॥
दवडोनि श्वासोश्वास। कीजती वायांचि उपवास। कां घेपती धूमाचे घांस। अधोमुखें॥ २५७॥
हिमोदकें आकंठें। खडकें सेविजती तटें। जितया मांसाचे चिमुटे। तोडती जेथ॥ २५८॥
ऐसी नानापरी हे काया। घाय सूतां पैं धनंजया। तप कीजे नाशावया। पुढिलातें॥ २५९॥

अर्थ—अर्जुना! केवळ अविचारी अंत:करणाने देहाला शत्रु समजून त्याला अत्यंत पीडा देत, देह तापविण्याकरिता पंचाग्नीची ज्वाळा लावतात किंवा शरीराला अग्नीत लावण्याचे इंधनच समजतात॥ २५४-२५५॥ माथ्यावर गुग्गुल जाळतात, पाठीला गळ घालतात, जळत असता ज्याला लोक भितात, अशा प्रखर निखाऱ्याने आंग जाळतात॥ २५६ ॥ श्वासोच्छ्वास घालवून व्यर्थ उपवास करतात किंवा खाली डोके वर पाय असे अधोमुख होऊन पंचाग्नि साधन करीत धूमाचे घास घेतात॥ २५७॥ ज्या तपात अत्यंत थंडीच्या दिवसात आकंठ पाण्यात बुडून किंवा नदीचे तीरावर किंवा खडकावर राहतात. जिवंतपणी आपल्या आंगच्या मांसाचे लचके तोडतात॥ २५८ ॥ अर्जुना! याप्रमाणे नाना प्रकारे या शरीरावर घाव घालून किंवा दुसऱ्याचा नाश करण्याकरिता जे तप केले जाते॥ २५९॥

आंगभारें सुटला धोंडा। आपण फुटोनि होय खंडखंडा। कां आड जालियातें रगडा। करी जैसा॥ २६०॥
तेवीं आपलिया आटणिया। सुखें असतया प्राणिया। जियावया शिराणिया। कीजती गा॥ २६१॥
किंबहुना हे वोखटी। घेऊनि क्लेशाची हातवटी। तप निफजे तें किरीटी। तामस होय॥ २६२॥

एवं सत्त्वादिकांच्या आंगीं। पडिलें तप तिही भागीं। जालें तेंही तुज चांगी। दाविलें व्यक्ती॥ २६३॥
आतां बोलतां प्रसंगा। आलें म्हणोनि पैं गा। करूं रूप दानलिंगा। त्रिविधा तया॥ २६४॥
येथ गुणाचेनि बोलें। दानही त्रिविध असे जालें। तेंचि आइक पहिलें। सात्त्विक ऐसें॥ २६५॥

अर्थ—उंचावरून आंगभाराने घसरलेल्या दगडाचे ज्याप्रमाणे तुकडे तुकडे होतात व त्याच्या आड येणाऱ्या वस्तूंचाहि तो चुराडा करतो॥ २६०॥ त्याप्रमाणे शरीराला अत्यंत दुःख देऊन सुखी असलेल्या प्राण्यांचा नाश करण्याची आपली इच्छा पुरी करून घेतात॥ २६१॥ फार काय सांगावे! अर्जुना! अशी ही आपल्याला दुःख देण्याची दुष्ट पद्धत स्वीकारून जे तप निष्पन्न होते, त्याला तामस तप म्हणतात॥ २६२॥ याप्रमाणे सत्व, रज, तम या तीन गुणांमुळे त्रिविध झालेल्या तपाचे उत्तम रीतीने वर्णन करून सांगितले॥ २६३॥ आता बोलताना प्रसंगाने आले म्हणून दान जे तीन प्रकारचे आहे, त्यांच्या चिन्हाचे स्वरूप वर्णन करतो॥ २६४॥ येथे गुणांच्या योगाने दानहि तीन प्रकारचे झाले आहे. प्रथम जे सात्विक दान, ते सांगतो, ऐक॥ २६५॥

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे। देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम्॥ २०॥

अर्थ—कुरुक्षेत्रादि पुण्यक्षेत्रात, संक्रात्यादि पुण्यकाली व उपकार फेडण्यास असमर्थ अशा वेदपारंगत ब्राह्मणास केवळ द्यायचे म्हणून जे दान दिले जाते ते सात्विक दान होय॥ २०॥

तरी स्वधर्माआंतौतें। जें जें मिळे आपणयातें। तें तें दीजे बहुतें। सन्मानयोगें॥ २६६॥
जालया सुबीजप्रसंगु। पडे क्षेत्रवाफेचा पांगु। तैसाचि दानाचा हा लागु। देखतसें॥ २६७॥
अनर्घ्य रत्न हाता चढे। तैं भांगाराची वोढी पडे। दोनीं जालीं तरी न जोडे। लेतें आंग॥ २६८॥
परी सण सुहृद संपत्ती। हे तिन्ही येकीं मिळती। जैं भाग्य धरी उन्नती। आपुल्याविषीं॥ २६९॥
तैसें निफजवावया दान। जैं सत्त्वासि ये संवाहन। तैं देश काळ भाजन। द्रव्यही मिळे॥ २७०॥
तरी आधीं तंव प्रयत्नेंसीं। होआवें कुरुक्षेत्र कां काशी। नातरी तुके जो इहींसीं। तो देशही हो॥ २७१॥
तेथ रविचंद्रराहुमेळु। होतां पाहे पुण्यकाळु। कां तयासारिखा निर्मळु। आनुही जाला॥ २७२॥
तैशा काळीं तिये देशीं। होआवी पात्रसंपत्ती ऐसी। मूर्ति आहे धरीली जैसी। शुचित्वेंचि कां॥ २७३॥
आचाराचें मूळपीठ। वेदांची उतारपेठ। तैसें द्विजरत्न चोखट। पावोनियां॥ २७४॥
मग तयाचे ठाईं वित्ता। निवर्तवावी स्वसत्ता। परी प्रियापुढें कांता। रिगे जैसेनि॥ २७५॥

अर्थ—स्वधर्माने वागत असताना जे जे आपल्याला मिळेल ते ते अत्यंत सन्मान करून द्यावे॥ २६६॥ ज्याप्रमाणे प्रसंगाने उत्तम बीज सापडले तरी उत्तम वाही केलेल्या जमिनीच्या वाफ्याची उणीव असते, तशीच या सात्विक दानाची स्थिति दिसून येते॥ २६७॥ एखादे वेळी बहूमोल रत्न हाती आले तरी त्याला कोंदण करण्याकरिता सोन्याची टंचाई भासते व रत्न आणि सोने दोन्ही प्राप्त झाली तरी ज्या शरीरावर ते लेणे शोभून दिसेल असे सुंदर शरीर सापडत नाही॥ २६८॥ आपल्या भाग्याचा उत्कर्ष झाला असताच दीपावळीसारखे सण, इष्टमित्र व द्रव्यसंपत्ति या तिहींचा एके ठिकाणी मेळ होतो॥ २६९॥ त्याप्रमाणे उत्कृष्ट प्रकारचे दान घडवून आणण्याकरिता जेव्हा सत्वगुण साह्यभूत होतो, तेव्हा योग्य देश, काळ, पात्र-ब्राह्मण व द्रव्य या सर्वांचा मेळ घडून येतो॥ २७०॥ म्हणून प्रथम कुरुक्षेत्र किंवा काशी त्याच्या बरोबरीचा दुसरा असा देश प्रयत्नाने मिळवावा॥ २७१॥ मग तेथे राहूचा चंद्रसूर्याशी मेळ म्हणजे सूर्यचंद्रादि ग्रहणासारखा किंवा त्याच्या बरोबरीचा दुसरा शुद्ध पुण्यकाल प्राप्त व्हावा॥ २७२॥ तसेच त्या पुण्य देशात त्या पुण्यकाळी दानाला सत्पात्र जणु काय शुचित्वाची मूर्तिच घडविली, असा ब्राह्मण असावा॥ २७३॥ जो धर्माचरणाचे मुख्य पीठ व सर्व वेदांची उतरण्याची जागा आहे असे म्हणता येईल, असा रत्नभूत ब्राह्मण प्राप्त करून घेऊन॥ २७४॥ मग ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री आपली यत्किंचितहि स्वतंत्र सत्ता न वागविता दासी समजून आपल्या प्रिय पतिपुढे जाते, त्याप्रमाणे आपली काही एक सत्ता न ठेवता त्या ब्राह्मणाला दान द्यावे॥ २७५॥

कां जयाचें ठेविलें तया। देऊनि होइजे उतराइया। नाना हडपें विडा राया। दिधला जैसा॥ २७६॥

तैसेनि निष्कामें जीवें। भूम्यादिक अर्पावे। किंबहुना हांवे। नेदावें उठों॥ २७७॥
आणि दान जया द्यावें। तयातें ऐसेया पाहावें। जया घेतलें नुमचवे। कायसेंनही॥ २७८॥
साद घातलिया आकाशा। नेदी प्रतिशब्दु जैसा। कां पाहिला आरसा। येरीकडे॥ २७९॥
नातरी उदकाचिये भूमिके। आफळिलेनि कंदुकें। उधळौनि कवतिकें। न येइजे हाता॥ २८०॥
नाना वसो घातला चारू। माथां तुरंबिला बुरू। न करी प्रत्युपकारू। जियापरी॥ २८१॥
तैसें दिधलें दातयाचें। जो कोणेही आंगें नुमचे। अर्पिलया साम्य तयाचें। कीजे पैं गा॥ २८२॥
ऐसिया जें सामग्रिया। दान निफजे वीरराया। तें सात्त्विक दान वरिया। सर्वांही जाण॥ २८३॥

अर्थ—किंवा जसे ज्याचे ठेवलेले धन त्याला परत देऊन उतराई व्हावे किंवा ज्याप्रमाणे विडा देणारा राजाचा सेवक राजाचाच विडा राजाला देतो॥ २७६॥ त्याप्रमाणे कशाचीहि यत्किंचित हाव न धरता निष्काम चित्ताने भूम्यादिक पदार्थाचे दान करावे॥ २७७॥ आणि ज्याला दान द्यावयाचे तो असा पाहावा की ज्याच्याने कोणत्याहि रीतीने दानाची फेड करवणार नाही॥ २७८॥ ज्याप्रमाणे आकाशाला हाक मारली असता ते प्रत्युत्तर देत नाही किंवा आरसा पाठीमागून पाहिला असता त्यात प्रतिबिंब पडत नाही॥ २७९॥ अथवा पाण्याच्या पृष्ठभागावर चेंडू आपटला असता तो उसळत नाही म्हणून हाती घेता येत नाही॥ २८०॥ किंवा ज्याप्रमाणे पोळाला चारा घातला असता अथवा कृतघ्नाला डोक्यावर घेतले तरी तो प्रत्युपकार करीत नाही॥ २८१॥ त्याप्रमाणे जो पुरुष दात्याने दिलेल्या दानाची कोणत्याहि आंगाने परतफेड करू शकणार नाही, अशा पुरुषाला दान दिल्यानंतर त्या दानाचे त्याच्याशी साम्य करावे– म्हणजे मी काही दान केले अशी जाणीव उरू न देता त्याचेच त्याला दिले असा भाव धरावा॥ २८२॥ असा सामग्रीने जे दान केले जाते, हे वीरामध्ये श्रेष्ठ असलेल्या अर्जुना! ते सर्व दानापेक्षा श्रेष्ठ असे सात्विक दान होय, असे जाण॥ २८३॥

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः। दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्॥ २१॥

अर्थ—जे दान आपल्यावर परत उपकार व्हावा या इच्छेने अथवा फळाच्या इच्छेने व कष्टी अंत:करणाने दिले जाते ते राजस दान होय, असे सांगितले आहे॥ २१॥

आणि तोचि देशु काळु। घडे तैसाचि पात्रमेळु। दानभागुही निर्मळु। न्यायगतु॥ २८४॥
परी मनीं धरूनि दुभतें। चारिजे जेवीं गाईतें। का पेंव करूनि आइतें। पेरूं जाइजे॥ २८५॥
नाना दिठी घालूनि आहेरा। अवंतु जाइजे सोयिरा। का वाण धाडिजे घरा। वोवसीयाचे॥ २८६॥
पैं कळांतर गांठीं बांधिजे। मग पुढिलांचें काज कीजें। पूजा घेऊनि रसु दीजे। पीडितांसी॥ २८७॥
ऐसें जया जें दान देणें। तो तेणेंचि गा जीवनें। पुढती भुंजावा भावे येणें। दीजे जें का॥ २८८॥
अथवा कोणी वाटे जातां। घेतलें उमचों न शकता। मिळे जैं पांडुसुता। द्विजोत्तम॥ २८९॥
तरी कवड्या एकासाठीं। अशेषां गोत्रांचींच किरीटी। सर्व प्रायश्चित्तें सुये मुठी। तयाचिये॥ २९०॥
तेवींचि पारलौकिकें। फळें वांछिजती अनेकें। आणि दीजे तरी भुके। येकाही नोहे॥ २९१॥
तेंही ब्राह्मण नेवों सरे। कीं हाणिचेनि शिणें झांसुरे। सर्वस्व जैसें चोरें। नागऊनि नेलें॥ २९२॥
काय बहु सांगों सुमती। जें दीजे या मनोवृत्ती। तें दान गा त्रिजगतीं। राजस पैं॥ २९३॥

अर्थ—आणि सात्विक दानाप्रमाणे, देश, काल, पात्र यांचा मेळ मिळून दानाचे द्रव्यहि स्वधर्मानेच मिळविलेले शुद्ध असले॥ २८४॥ तरी ज्याप्रमाणे दुधाची आशा करून गायीला चारा घालावा किंवा पेवात धान्य साठविले गेले पाहिजे या इच्छेने पेव खोदून तयार करून मग शेतात धान्य पेरायला जावे॥ २८५॥ किंवा अहेराकडे दृष्टि ठेवून सोयऱ्यांना आमंत्रण द्यावे किंवा वायन परत यावे या इच्छेने व्रतस्थ असलेल्या स्त्रियेच्या घरीच वायन पाठवावे॥ २८६॥ आधी व्याज कनवटीस लावून, मग पैसा मागायला आलेल्या पुरुषाचे काम भागवावयाचे, दु:खी रोगी असला तरी आधी आपला सन्मान करून घेऊन–म्हणजे पैसे घेऊन मग त्याला औषधि द्यावयाची॥ २८७॥

त्याप्रमाणे ज्याचे दान देणे त्याच्या जीवनाचे एक साधनच असते. आपण दान दिल्यानंतर दान घेणाऱ्यांनी आपल्यावर पुन: उपकार केला पाहिजे, अशी इच्छा ठेऊनच जे दान दिले जाते ॥ २८८ ॥ अथवा, अर्जुना! जो घेतलेल्या दानाची परतफेड करण्यास असमर्थ आहे, असा ब्राह्मण वाटेने जाताना आढळल्यास ॥ २८९ ॥ अर्जुना! एक कवडी दान देऊन आपल्या व आपल्या संपूर्ण गोत्रजांच्या पापांच्या प्रायश्चित्ताचे पाणी त्याच्या हातावर सोडतो ॥ २९० ॥ त्याप्रमाणेच जे थोडकेसे दान देतो तेवढ्यानेच मेल्यानंतर अनेक प्रकारची फळे प्राप्त व्हावी, अशी आशा करतो आणि दिलेले दान, एकदा तरी भूक शमेल, इतक्यापुरतेहि नसते ॥ २९१ ॥ ते अल्पसे दान ब्राह्मण घेऊन जाऊ लागला असता जणु काय चोरांनी घर लुटून नागविले असा कष्टी होऊन तो झुरतो ॥ २९२ ॥ हे शुद्धबुद्धि अर्जुना! फार काय सांगू! अशा मनोवृत्तीने जे दान दिले जाते ते दान त्रैलोक्यात राजस म्हटले जाते ॥ २९३ ॥

अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते। असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥

अर्थ—अपवित्र देशकालाचे ठिकाणी, अपवित्र पात्राला, काही पूजादि सत्कार न करता उलट त्याची अवहेलना करून जे दान दिले जाते ते दान तामस म्हटले आहे ॥ २२ ॥

मग म्लेंच्छांचे वसौटे। दांगाणें हन कैकटे। कां शिबिरें चोहटे। नगरींचे ते ॥ २९४ ॥
तेही तेंही ठाईं मिळणी। समयो सांजवेळ कां रजनी। तेव्हां उदार होणें धनीं। चोरियेच्या ॥ २९५ ॥
पात्रें भाट नागारी। सामान्य स्त्रिया का जुवारी। जियें मूर्तिमंतें भुररीं। भुले तयां ॥ २९६ ॥
रूपानृत्याची पुरवणी। ते पुढां डोळेभारणी। गीत भाटींव तो श्रवणीं। कर्णजप ॥ २९७ ॥
तयाहीवरी आळुमाळु। जैं घे फुलागंधाचा गुगुळु। तंव भ्रमाचा तो वेताळु। अवतरे तैसा ॥ २९८ ॥
तेथ विभांडुनियां जग। आणिले पदार्थ अनेग। तेणे घालूं लागे मातंग-। गवादीसी ॥ २९९ ॥
एवं ऐसेनि जें जे देणें। तें तामसदान मी म्हणें। आणि घडे दैवगुणें। आणिकही एक ॥ ३०० ॥

अर्थ—मग अपवित्र अशा म्लेछांनी वसविलेली स्थाने, अरण्ये, धर्मकृत्यास अयोग्य ठरलेले देश किंवा शहरातील छावण्या व चौरस्ते ॥ २९४ ॥ अशा ठिकाणी, संध्यासमयी किंवा रात्री, चोरी अपकार इत्यादि द्वारा मिळविलेल्या धनाचे, भाट, गारुडी, वेश्या, जुगारी अशा भ्रमात पाडणाऱ्या मूर्तिमंत भुलीचे ठिकाणी भुलून जाऊन, दान देण्यास उदार होणे. त्यातहि त्यांच्या रूपाची व नाचण्याची भर म्हणजे डोळ्याला पाडणारी भुरळ असून त्यांचे गायन व स्तुति हे तर कानात गुणगुणणारे जपच होत ॥ २९५-२९७ ॥ त्यातहि फुल, गंध, गुग्गुळाचा धूप यांचा संयोग झाला असता भ्रमाचा तो वेताळ जसा प्रगट होतो ॥ २९८ ॥ मग जगाला नागवून आणलेले जे अनेक पदार्थ त्यांच्या योगाने माहार, मांग यांच्याकरिता अन्नछत्र घालतो ॥ २९९ ॥ अशा रीतीने द्रव्याचा विनियोग करणे, याला मी तामस दान म्हणतो. किंवा दैवयोगाने असेहि घडून येते, ते सांगतो, ऐक ॥ ३०० ॥

विपायें घुणाक्षर पडे। टाळिये काउळा सांपडे। तैसें तापसां पर्व जोडे। पुण्यदेशीं ॥ ३०१ ॥
तेथ देखोनि तो आथिला। योग्यु मागोंही आला। तोही दर्पा चढला। भांबावे जरी ॥ ३०२ ॥
तरी श्रद्धा न धरी जीवीं। तया माथाही न खालवी। स्वयें न करी ना करवी। अर्घ्यादिक ॥ ३०३ ॥
आलिया न घाली बैसों। तेथ गंधाक्षतांचा काय अतिसो। हा अप्रसंग कीर असो। तामसीं नरीं ॥ ३०४ ॥
पैं बोळविजे रिणाइतु। तैसा झकवी तयाचा हातु। तूं करणें याचा बहुतु। प्रयोगु तेथ ॥ ३०५ ॥
आणि जया जें दे किरीटी। तयातें उमाणी तयासाठीं। मग कुबोलें कां लोटी। अवज्ञाचि ॥ ३०६ ॥
हें बहु असो यापरी। मोल वेंचणें जें अवधारीं। तया नांव चराचरीं। तामस दान ॥ ३०७ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे किड्याचे लाकडात कोरणे अकस्मात अक्षरासारखे होते किंवा दोन हातांनी टाळी वाजविली असता अकस्मात त्यात कावळा सापडतो, त्याप्रमाणे तामस दान करणाऱ्यांना दानप्रसंगी अकस्मात पुण्यदेशकालाचाहि सुयोग घडून येतो ॥ ३०१ ॥ तेव्हा दानदाता संपन्न आहे, असे पाहून धर्माचरणसंपन्न व दानाची फेड करण्यास असमर्थ असा योग्य दानपात्र ब्राह्मण दान मागण्यास आला असता तो तामसदानकर्ता गर्वाने फुगून जाऊन जरी गडबडून

जातो ॥ ३०२ ॥ तरी अंत:करणात श्रद्धा धरीत नाही; त्याला नमस्कार करीत नाही व स्वत: किंवा दुसऱ्या कोणाकडून तरी अर्घ्यदानादिकांनी त्याची पूजा करित नाही ॥ ३०३ ॥ असा ब्राह्मण आलेला पाहून जेथे त्याला बसायला आसन घातले जात नाही तेथे गंधाक्षतेचा विशेष सत्कार कोठून असणार ? खरोखर तमोगुणी पुरुषाची अशी अयोग्य वागणूक असते ॥ ३०४ ॥ ज्याप्रमाणे कर्जदार असलेला मनुष्य कर्ज मागायला आला असता जसे त्याला झिटकारावे, त्याप्रमाणे तमोगुणी पुरुषहि दान घेणाऱ्याला झिटकारतो. त्याच्याशी बोलण्यात एकवचनी अपमानकारक 'तू' या शब्दाचा फार प्रयोग करतो ॥ ३०५ ॥ आणि अर्जुना ! तो ज्याला जे देतो तीच त्याची किंमत आहे असे म्हणतो व नंतर अपमानकारक असे वाईट शब्द बोलून त्याला घराबाहेर घालवितो ॥ ३०६ ॥ हे पुष्कळ बोलणे आता असो. याप्रमाणे जे द्रव्य खर्च केले जाते त्याला जगतात तामस दान म्हणतात, हे लक्षात ठेव ॥ ३०७ ॥

ऐसे आपुलाल्या चिन्हीं। अळंकृतें तिन्हीं। दानें दाविलीं अवधानीं। राजतनया ॥ ३०८ ॥
तेथ मी जाणत असें। विपायें तूं गा ऐसें। कल्पिसील मानसें। विचक्षणा ॥ ३०९ ॥
जे भवबंधमोचक। येकलें कर्म सात्त्विक। तरी कां वेखासी सदोख। येर बोलावीं ॥ ३१० ॥
परी नोसंतितां विवसी। भेटी नाहीं निधीसी। कां धूं न साहतां जैसी। वाती न लगे ॥ ३११ ॥
तैसें शुद्धसत्त्वाआड। आहे रजतमाचें कवाड। तें भेदणेंयातें कीड। म्हणावें का ॥ ३१२ ॥
आम्हीं श्रद्धादि दानांत। जें समस्तही क्रियाजात। सांगितलें का व्याप्त। तिहीं गुणीं ॥ ३१३ ॥
तेथ भरंवसेनि तिन्ही। न सांगोंचि ऐसें मानीं। परी सत्त्व दावावया दोन्ही। बोलिलों येरें ॥ ३१४ ॥
जें दोहींमाजीं तिजें असे। तें दोन्हीं सांडितांचि दिसे। अहोरात्रत्यागें जैसें। संध्यारूप ॥ ३१५ ॥
तैसें रजतमविनाशें। तिजें जें उत्तम दिसे। तें सत्त्व हें आपैसें। फावासि ये ॥ ३१६ ॥
एवं दावावया सत्त्व तुज। निरूपिलें तम रज। तें सांडूनि सत्त्वें काज। साधीं आपलें ॥ ३१७ ॥

अर्थ—याप्रमाणे, हे राजपुत्रा अर्जुना ! त्यांच्या त्यांच्या अलंकृत असलेल्या लक्षणांनी युक्त अशी तीन प्रकारची दाने त्यांच्या निरनिराळ्या नावासह तुला सांगितली ॥ ३०८ ॥ हे शाहाण्या अर्जुना ! येथे मी असे जाणतो की कदाचित तू आपल्या मनात अशी कल्पना करशील ॥ ३०९ ॥ की जर एकटे सात्विक कर्म संसारबंधनाचा नाश करणारे आहे तर, मग त्या व्यतिरिक्त दोषयुक्त म्हणून वाईट अशी इतर कर्मे कां सांगितली जावी ॥ ३१० ॥ ज्याप्रमाणे पुरुन ठेवलेल्या द्रव्यावर बसविलेले पिशाच्च दूर केल्यावाचून त्या द्रव्याला हात लावता येत नाही. किंवा धूर सहन केल्यावाचून वात उजळली जाऊ शकत नाही ॥ ३११ ॥ त्याप्रमाणे शुद्ध सत्वाच्या आड त्याला प्रतिबंधक होणारे जे रजोतमोगुणाचे कवाड आहे, त्याची मोडतोड करण्याला वाईट कां म्हणावे ? ॥ ३१२ ॥ आम्ही ज्या ज्या सत्व-रज-तम या गुणांनी व्यापून असलेल्या श्रद्धेपासून दानापर्यंतच्या सर्व क्रिया सांगितल्या ॥ ३१३ ॥ त्या सर्व क्रिया, खरोखर करण्याकरिता म्हणून सांगितल्या नाहीत, हे पक्के समज. पण त्यात सात्विक क्रियांचे स्वरूप स्पष्ट करण्याकरिताच बाकीच्या दोन राजस, तामस क्रियाहि सांगितल्या आहेत ॥ ३१४ ॥ ज्याप्रमाणे दिवस व रात्र यांचा त्याग केला असता संध्याकाळ सापडते, त्याप्रमाणे रजोगुण-तमोगुण यांच्यामध्ये असलेला सत्वगुण, त्या दोघांचा त्याग केल्याबरोबर, अनायासे स्पष्ट होतो ॥ ३१५ ॥ तसेच रज-तमाचा नाश झाला असता उरलेला जो तिसरा गुण चांगला आहे, असे दिसते. तो सत्वगुण होय हे स्पष्ट कळून येते ॥ ३१६ ॥ याप्रमाणे सत्वगुण स्पष्ट करून दाखविण्याकरिताच रज-तमोगुणांचे निरूपण केले आहे; म्हणून, अर्जुना ! रज-तमगुण नाहीसे करून सत्वगुणाच्या योगाने आपले मोक्षरूपी कार्य साधून घे ॥ ३१७ ॥

सत्त्वेंचि येणें चोखाळें। करीं यज्ञादिकें सकळे। पावसी तैं करतळें। आपलें निज ॥ ३१८ ॥
सूर्यें दाविले सांतें। काय एक न दिसे तेथें। तेवीं सत्त्वें केलें फळातें। काय नेदी ॥ ३१९ ॥
हे कीर आवडतांविखीं। शक्ति सत्त्वीं आथी निकी। परी मोक्षेंसी एकी। मिसळणें जें ॥ ३२० ॥
तें एक आनचि आहे। तयाचा मोक्ष सावावो जैं लाहे। तैं मोक्षाचाही होये। गांवीं सरतें ॥ ३२१ ॥

पैं भांगार जऱ्ही पंधरें। तऱ्ही राजावळीचीं अक्षरें। लाहे तैंचि सरे। जियापरी॥ ३२२॥
स्वच्छें शीतळें सुगंधें। जळें होतीं सुखप्रदें। परी पवित्रत्व संबंधें। तीर्थाचेनि॥ ३२३॥
नदी हो कां भलतैसी थोरी। परी गंगा जैं अंगीकारी। तैंचि तिये सागरीं। प्रवेशु गा॥ ३२४॥

अर्थ—या शुद्धसत्वाच्या योगाने तू आपली संपूर्ण यज्ञादिक कर्मे कर म्हणजे तुझे मूळचे स्वरूप तुझ्या तळहातावर प्राप्त होईल॥ ३१८॥ सूर्याने आपल्या प्रकाशाने दाखविले असता कोणती एक वस्तु दिसणार नाही? त्याप्रमाणे सत्वगुणयुक्त होऊन कर्म केले असता ते काय फळ देणार नाही॥ ३१९॥ इच्छित प्राप्त करून घेण्याकरिता सात्विक कर्माचे ठिकाणी निश्चित शक्ति आहे; पण ज्या एका मोक्षामध्ये परमात्म्याशीं ऐक्य पावणे जे आहे॥ ३२०॥ तो प्रकार एक निराळाच आहे. त्याचे जेव्हा साह्य मिळते, तेव्हा जीव मोक्षाच्या गावीहि प्राप्त होतो॥ ३२१॥ ज्याप्रमाणे पंधरा रुपये किंमतीच्या सोन्याचे ठिकाणी राजाच्या नावाचा शिक्का बसतो तेव्हाच त्याला किंमत येते॥ ३२२॥ किंवा स्वच्छ, शीतळ व सुगंध असे पाणी सुखप्रद होते, परंतु त्याच्या ठिकाणी पवित्रत्व मात्र तीर्थाचा संबंध आला असताच येत असते॥ ३२३॥ नदी कितीहि मोठी असली तरी गंगेने तिचा अंगीकार केला असताच तिचा समुद्रात प्रवेश होईल॥ ३२४॥

गूढार्थदीपिका—माउलीच्या या म्हणण्याचे स्पष्टीकरण ज्ञानेश्वरी गूढार्थदीपिका खंड ४-अध्याय १३-ओवी ३७२ मध्ये केले आहे.

तैसें सात्त्विका कर्मा किरीटी। येतां मोक्षाचिये भेटी। न पडे आडकाठी। तें वेगळें आहे॥ ३२५॥
हा बोलु आइकतखेवीं। अर्जुना आधि न माये जीवीं। म्हणे देवें कृपा करावी। सांगावें तें॥ ३२६॥
तेथ कृपाळु चक्रवर्ती। म्हणे आईक तयाची व्यक्ती। जेणें सात्त्विक तें मुक्ती-। रत्न देखें॥ ३२७॥

अर्थ—त्याप्रमाणे, अर्जुना! सात्विक कर्माच्यायोगाने प्रतिबंध न होता मोक्षप्राप्ति होईल तो प्रकार वेगळा आहे॥ ३२५॥ असे देवाचे बोलणे ऐकताच अर्जुनाच्या अंत:करणात आतुरता मावेनाशी झाली व देवाने कृपा करून मला तो प्रकार सांगावा, असे तो म्हणू लागला॥ ३२६॥ तेव्हा कृपाळु सर्व ब्रह्मांडाचा राजा भगवान् श्रीकृष्ण म्हणाले, अर्जुना! ज्याच्या योगाने सात्विक कर्म मुक्तिरूप रत्न पाहू शकेल तो प्रकार सांगतो, ऐक॥ ३२७॥

ॐतत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः। ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा॥ २३॥

अर्थ—परब्रह्माचा ॐ, तत, सत् असा तीन प्रकारचा नामनिर्देश केला आहे. या त्रिविध नामनिर्देशद्वाराच ब्राह्मण, वेद व यज्ञ हे तिघे पूर्वी निर्माण केले गेले॥ २३॥

तरी अनादि परब्रह्म। जें जगदादिविश्रामधाम। तयाचें एक नाम। त्रिधा पैं असे॥ ३२८॥

अर्थ—जगताच्या उत्पत्तीचे व विश्रांतीचे स्थान असे जे अनादि परब्रह्म, त्याचे एकच नाव तीन प्रकारचे आहे॥ ३२८॥

गूढार्थदीपिका—"अनादि" या शब्दाने परब्रह्म उत्पत्तिरहित स्वत:सिद्ध आहे, हे दाखविले आहे.

जगदादिविश्रामधाम—सच्चिदानंद, निरवयव, अविकारी अशा परब्रह्माचा भिन्न वस्तुत्वाने व जड-विनाशी अशा भिन्न धर्माने भासणाऱ्या जगताशी जो कारणत्वाने वेदान्तात भ्रान्त संबंध मानला गेला आहे, तो अज्ञानी जीवाच्या भ्रमाला धरूनच मानला गेला आहे व त्याच दृष्टीने परब्रह्माला येथे "जगदादिविश्रामधाम" हे विशेषण लावले आहे. वस्तुत: परब्रह्मापासून त्याहून विरूद्ध धर्माचे कार्यच उत्पन्न होणे शक्य नाही.

तें कीर अनाम अजाती। परी अविद्यावर्गाचिये राती-। माजीं वोळखावया श्रुती। खूण केली ते॥ ३२९॥

अर्थ—ते परब्रह्म खरोखरच शब्दाच्या पलीकडे असल्यामुळे नामावाचून व त्याच्यासारखी दुसरी वस्तु नसल्यामुळे जातिवाचून आहे. परंतु त्या परब्रह्माच्या आधाराने जीवाला भासत असलेल्या अविद्या, अस्मिता, राग, द्वेष अभिनिवेश या ब्रह्मपदाचा विसर पाडणाऱ्या गाढ अंध:कारात न दिसणारे परब्रह्म जीवाला ओळखता यावे म्हणून श्रुतीने परब्रह्माच्या ठिकाणी ही खूण केली आहे॥ ३२९॥

गूढार्थदीपिका—वेदान्तात कोठेहि कशाचाहि प्रथम आरंभ मानला नाही. सर्वत्र पूर्व पूर्व संस्कारानुसार उत्तरोत्तर कार्याभिव्यक्ति मानली आहे. येथे नामरूपरहित परमेश्वराला प्रथम केव्हा तरी नाम ठेवले गेले असे समजायचे नसून परमेश्वराचा व नामरूपाचा संबंध अनादि आहे, असेच समजले पाहिजे. फरक एवढाच की अज्ञानी जीवाला जेवढे काही त्याच्या भ्रांतीमुळे नामरूपात्मक जगत् दिसते ते सर्व अनादि, पण आत्मज्ञानाने नाश पावणारे आहे आणि ज्ञानी भक्तांच्या अनुभवास येणारा परमेश्वर, त्याचे नामरूप व त्याची प्रेमवर्धक लीला, यांचा संबंध अनादि व अविनाशी आहे.

उपजलिया बाळकासी। नांव नाहीं तयापासीं। ठेविलेनि नांवेंसीं। ओ देत उठी॥ ३३० ॥
कष्टले संसारशिणें। जे देवों येती गाऱ्हाणें। तयां ओ दे नांवे जेणें। तो संकेतु हा॥ ३३१ ॥
ब्रह्माचा अबोला फिटावा। अद्वैतत्त्वें तो भेटावा। ऐसा मंत्रु देखिला कणवा। वेदें बापें॥ ३३२ ॥
मग दाविलेनि जेणें एकें। ब्रह्म आळविलें कवतिकें। मागां असत ठाके। पुढां उभें॥ ३३३ ॥
परी निगमाचळशिखरीं। उपनिषदार्थनगरी। आहाति जे ब्रह्माच्या येकाहारीं। तयांसीच कळे॥ ३३४ ॥
हेंही असो प्रजापती। शक्ति जे सृष्टि करिती। ते जया एका आवृत्ती। नामाचिये॥ ३३५ ॥
पैं सृष्टीचिया उपक्रमा-। पूर्वीं गा वीरोत्तमा। वेडा ऐसा ब्रह्मा। एकला होता॥ ३३६ ॥
मज ईश्वरातें नोळखें। ना सृष्टिही करूं न शके। तो थोरु केला एकें। नामें जेणें॥ ३३७ ॥

अर्थ—जन्मास आलेल्या बालकास प्रथम नाम नसते, पण ते, ठेवलेल्या नामाने हाक मारली असता, हे आपले नाव आहे, असे समजून ते ''ओ'' देत असते॥ ३३० ॥ संसारात अहोरात्र शीण करता करता श्रमलेले जीव जेव्हा आपल्या दु:खाचे निवारण करण्याकरिता परमेश्वराचा धावा करतात, तेव्हा ज्या नावाने मला हाक मारली असता मी धावून येतो, असे भगवंताने आपल्या वेदवाणीने ठरविले किंवा संकेत केला, ते संकेतरूप नाव हेच होय॥ ३३१ ॥ परब्रह्म अखंड, अफुट, अविकारी असे एकमेव सद्रूप आहे, त्यात यत्किंचितहि बिघाड न होता, त्याची अबोल स्थिति बोलकी होईल व तेच परब्रह्म जीवाशी अद्वैत एकरूप राहून सद्रूपाने जीवाला गोचर होईल असा हा मंत्र कृपाळु बाप वेदाने शोधून काढला आहे॥ ३३२ ॥ मग वेदाने दाखविलेल्या ज्या एका नाममंत्राने परब्रह्माला आळविले असता दृष्टिआड असलेले परब्रह्मच दृष्टिगोचर होते॥ ३३३ ॥ परंतु निगमरूपी पर्वताच्या शिखरावरील उपनिषदार्थरूप नगरात राहणाऱ्या परब्रह्माच्या पंक्तीला जे बसले-म्हणजे परब्रह्मस्वरूप झाले. त्यांनाच ते कळून येते॥ ३३४॥ हे असो. प्रजापतीच्या ठिकाणी सृष्टि निर्माण करण्याची जी शक्ति आहे ती त्या एका नामाच्या आवर्तनामुळेच आली आहे॥ ३३५ ॥ हे वीरश्रेष्ठा अर्जुना! सृष्टि उत्पत्तिपूर्वी सृष्टिउत्पत्तीचे काही एक ज्ञान नसलेला असा ब्रह्मदेव एकटाच होता॥ ३३६ ॥ तो मज ईश्वराला जाणत नव्हता व सृष्टिहि करू शकत नव्हता, पण या एका नामाने त्याला (मला जाणणारा व सृष्टि निर्माण करणारा असा) थोर केले॥ ३३७ ॥

गूढार्थदीपिका—सूक्ष्म समष्टि लिंगशरीराची अभिमानी देवता जो हिरण्यगर्भ तोच समष्टि स्थूल ब्रह्मांडाची अभिमानी देवता होऊन स्थूल ब्रह्मांड निर्माण करतो अशी पौराणिक सृष्टिउत्पत्तीची प्रक्रिया माउलीला मान्य आहे. प्रलय झाला असता प्रकृतीत लीन झालेल्या ह्या देवता आधिकारिक असल्यामुळे उत्तर सृष्टीत पुन: उत्पन्न होऊन परमेश्वरकृपेने त्यांना पूर्वीच्या कल्पातील सृष्टिसर्जनसामर्थ्य प्राप्त होते, असे आचार्यांनी ब्रह्मसूत्र १-३-३० वरील भाष्यात म्हटले आहे. त्याच सिद्धान्ताचा माउलीने येथे उल्लेख केला आहे.

जयाचा अर्थु जीवीं ध्यातां। जें वर्णत्रयचि जपतां। विश्वसृजनयोग्यता। आली तया॥ ३३८ ॥
तेधवां रचिले ब्रह्मजन। तयां वेद दिधले शासन। यज्ञाऐसें वर्तन। जीविकें केलें॥ ३३९ ॥
पाठीं नेणों किती येर। स्त्रजिले लोक अपार। जाले ब्रह्मदत्त अग्रहार। तिन्हीं भुवनें॥ ३४० ॥

अर्थ—ॐ, तत्, सत् ज्या तीन वर्णांच्या जपाने व ज्याच्या अर्थरूप परब्रह्माच्या ध्यानाने त्याच्या आंगी सृष्टि उत्पन्न करण्याची योग्यता आली॥ ३३८ ॥ तेव्हा ब्राह्मणप्रजा निर्माण केली व त्यांना वेदात सांगितल्याप्रमाणे

वागण्याकरिता वेद दिले आणि यज्ञासारखे कर्म त्यांच्या उपजीविकेचे साधन म्हणून नेमून दिले॥ ३३९ ॥ मागाहून किती लोक निर्माण झाले याची गणतीच नाही व तीन लोक ब्रह्मदेवाने त्यांना इनाम करून दिले॥ ३४० ॥

गूढार्थदीपिका—"जाले ब्रह्मदत्त अग्रहार। तिन्ही भुवने" तिन्ही भुवनात यज्ञयागादि द्वारा उपजीविका करण्याचा अधिकार दिला.

ऐसें नाममंत्रें जेणें। धातया अढळचि करणें। तयाचें स्वरूप आइक म्हणे। श्रीकांतु तो॥ ३४१ ॥

अर्थ—ज्या या मंत्राच्या योगाने ब्रह्मदेवाचे स्थान सर्वापेक्षा अढळ केले, त्या मंत्राचे स्वरूप सांगतो, ऐक, असे लक्ष्मीचा पति भगवान श्रीकृष्ण म्हणाला॥ ३४१ ॥

तरी सर्व मंत्रांचा राजा। तो प्रणवो आदिवर्णु बुझा। आणि तत्कारु जो दुजा। तिजा सत्कार ॥ ३४२ ॥
एवं ॐतत्सदाकारु। ब्रह्मनाम हें त्रिप्रकारु। हे फूल तुरंबी सुंदरु। उपनिषदाचे॥ ३४३ ॥

अर्थ—सर्व मंत्रात श्रेष्ठ असा जो प्रणव तो त्या मंत्राचा प्रथम वर्ण असून तत्कार हा दुसरा वर्ण आहे आणि तिसरा वर्ण सत्कार आहे, असे जाण॥ ३४२ ॥ अर्जुना! याप्रमाणे ॐ, तत्, सत् असे परब्रह्माचे तीन प्रकारचे नाम आहे या उपनिषदरूप सुंदर फुलाचा तू वास घे॥ ३४३ ॥

गूढार्थदीपिका—उपनिषद ते-उपनिषदात ब्रह्मप्राप्ति करून देणारी ब्रह्मविद्या सांगितली आहे या ब्रह्मनामानेहि ब्रह्मप्राप्तिच होत असल्यामुळे या ब्रह्मनामाला माउलीने येथे "उपनिषद" म्हटले आहे.

येणेंसीं गा होऊनि एक। जैं चाले कर्म सात्त्विक। तैं कैवल्यातें पाइक। घरींचें करी॥ ३४४॥

अर्थ—या तीन वर्णात्मक मंत्राशी एकरूप होऊन सात्विक कर्म होऊ लागले असता ते मोक्षाला घरचा चाकर करते-म्हणजे मोक्ष चाकराप्रमाणे घरी राबतो॥ ३४४॥

परी कापुराचें थळींव। आणूनि देईल दैव। लेवों जाणणेंचि आडव। तेथ असे बापा॥ ३४५ ॥
तैसें आदरिजेल सत्कर्म। उच्चारिजेल ब्रह्मनाम। परी नेणिजेल जरी वर्म। विनियोगाचें॥ ३४६ ॥
तरी महंताचिया कोडी। घरा आलिया वोढी। मानूं नेणतां परवडी। मुदल तुटे॥ ३४७॥
कां ल्यावया चोखट। टीक भांगार एकवट। घालूनि बांधली मोट। गळा जेवीं॥ ३४८ ॥
तैसें तोंडीं ब्रह्मनाम। हातीं तें सात्त्विक कर्म। विनियोगेंवीण काम। विफळ होय॥ ३४९ ॥
अगा अन्न आणि भूक। पासीं असे परी देख। जेऊं नेणतां बाळक। लंघनचि कीं॥ ३५० ॥
कां स्नेहासूत्र वैश्वानरा। जालियाही संसारा। हातवटी नेणतां वीरा। प्रकाश नोहे॥ ३५१ ॥
तैसें वेळे कृत्य पावे। तेथिंचा मंत्रही आठवे। परी व्यर्थ तें आघवें। विनियोगेंवीण॥ ३५२ ॥
म्हणोनि वर्णत्रयात्मक। जें हें परब्रह्मनाम एक। विनियोग तूं आइक। याचा आतां॥ ३५३ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे दैव, कापराचे अलंकार प्राप्त करून देईल, पण, बा अर्जुना! ते कसे घालावे, हे ठाऊक असण्याचीच तेथे अडचण असते॥ ३४५ ॥ त्याप्रमाणे सात्त्विक कर्माचे आचरण होईल व या ब्रह्मनामाचाहि उच्चार होईल, पण विनियोगाचे वर्म जर माहीत नसेल॥ ३४६ ॥ तर ज्याप्रमाणे साधुसंतांच्या पंक्ती (समुदाय) आपला लळा वागवून घरी आल्या असता त्यांचा सत्कार करण्याची रीत माहित नसली तर आपल्या साठविलेल्या पुण्याचा क्षय होतो॥ ३४७॥ किंवा कोणता अलंकार कोठे घालावा हे माहीत नसताना आंगावर संपूर्ण अलंकार चांगले घालावे म्हणून जडावाचे व सोन्याचे अलंकार गाठोडीत एकत्र करून ती गाठोडी गळ्यात बांधली॥ ३४८ ॥ त्याप्रमाणे तोंडामध्ये परब्रह्माचे नाम आहे आणि हाताने सात्विक कर्म करीत आहे, पण त्या मंत्रांचा विनियोग कसा करायचा, हे माहित नसेल तर ते सर्व निष्फळ होते॥ ३४९ ॥ अर्जुना पोटात भूक लागली आहे व अन्नहि जवळच आहे, पण मुलाला कसे जेवावे हे माहित नसेल तर ते उपाशीच राहील ना!॥ ३५० ॥ किंवा तेल, वात व अग्नि या तिहींचा एकत्र मेळ झाला तरी दिवा उजाळण्याची युक्ति माहित नसली तर, अर्जुना! प्रकाश मिळत नाही॥ ३५१ ॥ त्याप्रमाणे योग्य वेळी कर्म घडत आहे व त्याचा मंत्रहि आठवत आहे, पण ते विनियोगावाचून केले गेले तर सर्व व्यर्थ होते॥ ३५२ ॥ म्हणून ॐ, तत्, सत् हे जे तीन वर्णात्मक परब्रह्माचे नाम आहे त्याचा, आता विनियोग ऐक॥ ३५३ ॥

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपः क्रियाः। प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम्॥ २४॥

अर्थ—म्हणून वेदवादी ब्राह्मणांच्या यज्ञ, दान, तप इत्यादि शास्त्रात सांगितलेल्या सर्व क्रिया प्रथम ॐकाराचा उच्चार करून नेहमी होत असतात॥ २४॥

तरी या नामींचीं अक्षरें तिन्हीं। कर्मा आदिमध्यनिदानीं। प्रयोजावीं पैं स्थानीं। इहीं तिन्हीं॥ ३५४॥

अर्थ—तरी परब्रह्माच्या ॐ, तत्, सत् या मंत्राच्या तीन अक्षरांची अनुक्रमे कर्माच्या प्रारंभी, मध्ये व शेवटी अशा तीन स्थानी निश्चित योजना करावी॥ ३५४॥

गूढार्थदीपिका—विनियोग-म्हणजे कर्म करताना त्या कर्मात मंत्राचा उपयोग करणे.

हेचि एकी हातवटी। घेउनी हन किरीटी। आले ब्रह्मविद भेटी। ब्रह्माचिये॥ ३५५॥
ब्रह्मेंसीं होआवया एकी। ते न वंचती यज्ञादिकीं। जें चावळलें वोळखी। शास्त्रांचिया॥ ३५६॥
तो आदि तंव ओंकारु। ध्यानें करिती गोचरु। पाठीं आणिती उच्चारु। वाचेही तो॥ ३५७॥
तेणें ध्यानें प्रकटें। प्रणवोच्चारें स्पष्टें। लागती मग वाटे। क्रियांचिये॥ ३५८॥
आंधारीं अभंगु दिवा। आडवीं समर्थु बोळावा। तैसा प्रणवो जाणावा। कर्मारंभी॥ ३५९॥
उचितदेवोद्देशें। द्रव्यें धर्म्यें आणि बहुवसें। द्विजद्वारा हन हुताशें। यजिती पैं ते॥ ३६०॥
आहवनीयादि वन्ही। निक्षेपरूपीं हवनीं। यजिती पैं विधानीं। फुडे होउनि॥ ३६१॥
किंबहुना नाना याग। निष्पत्तीचें घेउनी अंग। करिती नावडतेया त्याग। उपाधींचे॥ ३६२॥

अर्थ—हीच विनियोगाची रीती जाणून घेऊन, अर्जुना! वेदवेत्ते ऋषी कर्मे करीतच परब्रह्माचे भेटीस आले॥ ३५५॥ ज्यांनी निरनिराळ्या शास्त्रांच्या सिद्धांताची ओळख करून घेतली ते परब्रह्माशी ऐक्य होण्यापासून यज्ञादिक कर्मानी आचवले जात नाहीत॥ ३५६॥ प्रथम ध्यानाने ॐकार या अक्षराला प्रत्यक्ष पाहतात व मागाहून वाणीनेहि त्याचा उच्चार करतात॥ ३५७॥ याप्रमाणे ॐकाराचे ध्यान व त्याचा वाणीने स्पष्ट उच्चार झाल्यावर मग क्रिया करायला सांगतात॥ ३५८॥ त्याप्रमाणे आंधारामध्ये केव्हाहि न विझणारा दिवा असावा किंवा आडमार्गाने जाताना जाणता सोबती असावा, त्याप्रमाणे कर्माची प्रारंभी प्रणव आहे असे, समजावे॥ ३५९॥ धर्मानुसार मिळविलेल्या पुष्कळशा द्रव्यांनी, यजनाला योग्य अशा परमात्म्याचे, ब्राह्मण व अग्नि यांचे द्वारा ते यजन करतात॥ ३६०॥ शास्त्रीय विधानात निष्णात होऊन आहवनीयादि अग्नीत टाकल्या जाणाऱ्या आहुतीच्या योगाने ते यजन करतात॥ ३६१॥ फार काय सांगावे! नाना प्रकारचे यज्ञ निष्पन्न करून आत्मप्राप्तीला प्रतिबंधक म्हणून न आवडणाऱ्या उपाधीचा ते त्याग करतात॥ ३६२॥

का न्याये जोडला पवित्रीं। भूम्यादिकीं स्वतंत्रीं। देशकाळ शुद्धपात्रीं। देती दानें॥ ३६३॥
अथवा एकांतरा कृच्छ्रीं। चांद्रायणें मासोपवासीं। शोषोनि गा धातुराशी। करिती तपें॥ ३६४॥

अर्थ—किंवा धर्मानुसार मिळविलेल्या पवित्र अशा स्वतंत्र भूम्यादिकांचे पवित्र अशा काशी इत्यादि क्षेत्रात, संक्रांति इत्यादि पवित्र काली व वेदमूर्ति अशा पवित्र ब्राह्मणाला दान देतात॥ ३६३॥ अथवा एकांतर, कृच्छ्र, चांद्रायण एक महिना उपवास अशी व्रतरूप तपे करतात व शरीरातील धातूचे शोषण करतात॥ ३६४॥

गूढार्थदीपिका—एकान्तर-म्हणजे एकदिवसाआड भोजन करणे.

कृच्छ्र—पहिले दिवशी दूध, दुसरे दिवशी तूप, तिसरे दिवशी तापलेले, पाणी व चवथे दिवशी उपवास करणे याला कृच्छ्र म्हणतात.

चांद्रायण—जसजशी तिथी वाढत जाईल तसतसे मोराच्या अंड्याएवढा ग्रास वाढवित खाणे, असे प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत करावयाचे व पुन: अमावस्येपर्यंत एक एक ग्रास कमी कमी करीत खाणे, याला चांद्रायण व्रत म्हणतात.

एवं यज्ञदानतपें। जियें गाजती बंधरूपें। तिहींच होय सोपें। मोक्षाचें तयां॥ ३६५॥
स्थळीं नावा जिया दाटिजे। जळीं तियाचि जेवीं तरिजे। तेवीं बंधकीं कर्मीं सुटिजे। नामें येणें॥ ३६६॥

परी हें असो ऐसिया। या यज्ञदानादि क्रिया। ओंकारें सावायिलिया। प्रवर्तती॥ ३६७॥

अर्थ—याप्रमाणे जी यज्ञ, दान, तपे बंधनकारक म्हणून प्रसिद्ध झाली आहेत त्यांच्याच योगाने मोक्षप्राप्ति सोपी होते॥ ३६५॥ ज्याप्रमाणे जमिनीवर ज्या नावा अडखळतात त्यांच्याच योगाने जलाशय तरून जाता येतो, त्याप्रमाणे कर्मे बंधनकारक असली तरी या नामाच्या योगाने ती बंधनापासून सुटका करणारी होतात॥ ३६६॥ पण हे असो. अशा या यज्ञदानादि क्रिया ॐकाराचे साह्य घेऊन केल्या जातात॥ ३६७॥

गूढार्थदीपिका—प्रथम ॐकारापासूनच उत्पन्न झालेल्या वैदिक क्रिया ॐकाराच्या ध्यानपूर्वक उच्चाराने केल्या असता त्या ॐकारमय होऊन जातात.

तिया मोटकिया जेथ फळीं। रिगो पाहाती निहाळीं। प्रयोजिती तिये काळीं। तच्छब्दु तो॥ ३६८॥

अर्थ—त्या अल्प अशा यज्ञ-दान-तपादि क्रिया ज्या फळाचे रूपाने फलद्रूप व्हावयाच्या त्या ठिकाणी वेदवेत्ते ब्राह्मण त्या 'तत्' शब्दाचा विनियोग करतात किंवा 'तत्' शब्द लावतात, पाहा!॥ ३६८॥

तदित्यनभिसन्धाय फलं यज्ञतपः क्रियाः । दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः ॥ २५ ॥

अर्थ—परमेश्वरप्राप्तिरूप मोक्षाची इच्छा करणारे त्या कर्मांने प्राप्त होणाऱ्या स्वर्गसुखादि कर्मफळाची इच्छा न करता 'तत्' या ब्रह्मवाचक पदाकडे-ईश्वराकडे लक्ष्य देऊन नाना प्रकारची यज्ञतपदानादि क्रिया करतात॥ २५॥

जे सर्वांही जगापरौतें। जें एक सर्वही देखतें। जें तच्छब्दें बोलिजेतें। पैल वस्तु॥ ३६९॥
तें सर्वादिकत्वें चित्तीं। तद्रूप ध्यावूनियां सुमती। उच्चारेंही व्यक्ती। आणिती पुढती॥ ३७०॥
म्हणती तद्रूपा ब्रह्मा तया। फळेंसीं क्रिया इयां। तेचि होतु आम्हां भोगावया। कांहींचि नुरो॥ ३७१॥
ऐसेनि तदात्मकें ब्रह्में। तेथ उगाणूनि कर्में। आंग झाडिती न ममें। येणें बोलें॥ ३७२॥
आतां ओंकारें आदरिलें। तत्कारें समर्पिलें। इया रिती जया आलें। ब्रह्मत्व कर्मा॥ ३७३॥
तें कर्म कीर ब्रह्माकारें। जालें तेणेंही न सरे। जे करी तेणेंसी दुसरें। आहे म्हणौनि॥ ३७४॥
मीठ आंगें जळीं विरे। परी क्षारता वेगळी उरे। तैसें कर्म ब्रह्माकारें। गमे तें द्वैत॥ ३७५॥
आणि दुजें जंव जंव घडे। तंव तंव संसारभय जोडे। हे देवो आपुलेनि तोंडें। बोलती वेदें॥ ३७६॥
म्हणोनि परत्वें ब्रह्म असे। तें आत्मत्वें परियवसे। सच्छब्द या रिणादोषें। ठेविला देवें॥ ३७७॥

अर्थ—जी संपूर्ण कार्यकारणरूप जगाच्या पलीकडे आहे, जी सर्वांना जाणते, जी एक अद्वैतस्वरूप असून 'तत्' शब्दाने बोलली जाते, जिला सर्वांच्या पलीकडील वस्तु म्हणतात—म्हणजे जिच्या पलीकडे काही नाही॥ ३६९॥ हे शुद्धबुद्धि अर्जुना! जी सर्वांचे मूळ कारण असल्यामुळे चित्तात 'तत्' रूपाचे ध्यान करून तोंडानेहि त्याचा व्यक्त उच्चार करतात॥ ३७०॥ आणि म्हणतात की फळासह त्या संपूर्ण क्रिया तद्रूप ब्रह्मासच प्राप्त होवोत! आम्हाला भोग भोगण्याकरिता काहीच शिल्लक न राहो!॥ ३७१॥ अशा प्रकारे 'तत्' स्वरूप परब्रह्माचे ठिकाणी सर्व कर्मे समर्पण करून आपण "न मम" असे म्हणून आपले आंग झाडून टाकतात-म्हणजे कर्मावेगळे होतात॥ ३७२॥ ॐकाराने कर्माचा आरंभ करून ते 'तत्' पदाच्या उच्चाराने परब्रह्माचे ठिकाणी समर्पण केले व अशा रीतीने ज्या कर्माला परब्रह्मस्वरूप प्राप्त झाले॥ ३७३॥ ते कर्म निश्चित ब्रह्माकार झाले खरे! पण एवढ्यानेच होत नाही. कारण (कर्म ब्रह्माकार झाले असे म्हणण्याचा, कर्म असून ते ब्रह्माकार झाले, असा अर्थ होत असल्यामुळे) ते कर्म ब्रह्माहून भिन्न राहून द्वैत कायम राहते॥ ३७४॥ मिठाचा खडा अंगाने पाण्यात विरला तरी ज्याप्रमाणे त्याचा खारटपणा निराळा भासतो, त्याप्रमाणे कर्माचे ब्रह्माकार भासणे, हे द्वैतच होय॥ ३७५॥ आणि जोपर्यंत द्वैत भासते तोपर्यंत संसाराचे भय आहे, हे भगवंतांनीच आपल्या वेदरूपीमुखाने सांगून ठेविले आहे॥ ३७६॥ सर्वांच्या पलीकडे जे ब्रह्म आहे, ते आत्मस्वरूपातच पर्यवसान पावते-म्हणजे आत्मस्वरूपाने अनुभवाला येते; म्हणून निराळेपणाची किंवा द्वैतरूपाची उणीव नाहीशी करण्याच्या उद्देशाने भगवंताने 'सत्' शब्द ठेविला आहे॥ ३७७॥

गूढार्थदीपिका—परब्रह्म सच्चिदानंदस्वरूप आहे, असे सांगितले असले तरी परब्रह्माच्या सत्, चित्, आनंद

या तिन्ही धर्मांचा आपल्या आत्मस्वरूपाचे ठिकाणीच अनुभव घ्यावा लागतो व म्हणूनच परब्रह्माचे व आत्मस्वरूपाचे ऐक्य किंवा आत्मा परब्रह्मस्वरूप आहे, असे श्रुतीत सांगितले आहे. आपल्या सदात्मस्वरूपाशी ऐक्य झाले असताच द्वैत नाहीसे होते; म्हणूनच येथे ब्रह्माकार झालेल्या कर्मामुळे भासणारे द्वैत नाहीसे करण्याकरिता त्याचे आत्मस्वरूपाशी 'सत्' शब्दाने ऐक्य सांगितले आहे.

नाम-रूप-कर्मे ही आत्मस्वरूपाहून भिन्न मानली असता मिथ्या ठरतात व त्यांचे सदात्मस्वरूपाशी ऐक्य केले तर ती सर्व सत्य होतात, असे आचार्यांनीहि छांदोग्योपनिषदात म्हटले आहे (छां० उ० भा० ६-३-२).

सारांश या 'सत्' शब्दाच्या विनियोगाने कर्म पूर्ण ब्रह्मस्वरूपच होऊन जाते, असा अर्थ.

तरी ॐकार तत् कारीं। कर्म केलें जें ब्रह्म शरीरीं। जें प्रशस्तादि बोलवरी। वाखाणिलें॥ ३७८ ॥
प्रशस्तकर्मी तिये। सच्छब्दा विनियोगु आहे। तोचि आइका होये। तैसा सांगों॥ ३७९ ॥

अर्थ—ब्राह्मणशरीराचे ठिकाणी ओंकारतत्कारपूर्वक जे कर्म ब्रह्मरूप केले गेले ते 'प्रशस्त' या शब्दाने वाखाणिले जाते॥ ३७८ ॥ त्या प्रशस्त कर्माचे ठिकाणी 'सत्' शब्द जो लावला जातो, तोच कसा लावला जातो, हे सांगतो ऐका॥ ३७९ ॥

सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते। प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते॥ २६ ॥

अर्थ—अर्जुना! अविनाशी भावाचे ठिकाणी, सद्वर्तनाचे ठिकाणी व तसेच चांगल्या मंगल कार्याचे ठिकाणी हा 'सत्' शब्द लावला जातो॥ २६ ॥

तरी सच्छब्दें येणें। आटूनि असताचें नाणें। दाविजे अव्यंगवाणें। सत्तेचें रूप॥ ३८० ॥
जें सतचि काळेंदेशें। होऊं नेणेचि अनारिसें। आपणपां आपण असे। अखंडित॥ ३८१ ॥

अर्थ—या 'सत्' शब्दाच्या योगाने विनाशीपणाचे नाणे आटले जाऊन (नाहीसे होऊन) अविनाशी भावरूप सत्तेचे निर्दोषस्वरूप दाखविले जाते॥ ३८० ॥ ते 'सत्' स्वरूप कोणत्याहि काळात व कोणत्याहि देशात 'असत्' होऊ शकत नाही. ते आपण आपल्या ठिकाणी अखंड, अविनाशी, अविकारी आहे॥ ३८१ ॥

गूढार्थदीपिका—माउलीने या ओवीत सत्स्वरूपाची व्याख्याच दिली आहे.

हें दिसतें जेतुलें आहे। तें असत्पणें जें नोहे। देखतां रूपीं सोये। लाभे जयाची॥ ३८२ ॥

अर्थ—असतपणाने जेवढे काही दिसते तेवढे ते नव्हे, असा विचार करून पाहिले असता ज्याचा आश्रय रूपाचे ठिकाणीहि लाभलेला दिसतो॥ ३८२ ॥

गूढार्थदीपिका—याचा अर्थ असा की रूपालाहि सत्स्वरूपाचाच आधार आहे. सत्स्वरूपाला सोडून रूपाला स्वतंत्र अस्तित्व नाही, म्हणून ते 'असत्' नाही.

"**दृश्य कीर दृष्टि असे। परि साच की दृष्टा असे**" (अमृ० प्र० ७-२०४) दृश्य, जड, असत् जगद्रूप नसून तेहि अविनाशी सद्रूप ब्रह्मच आहे असे माउलींनी अमृतानुभवातहि सांगितले आहे. अर्थात् सत्स्वरूपाचा विचार केला असता रूपहि सत्स्वरूपच ठरते.

तेणेंसीं प्रशस्त तें कर्म। जें जालें सर्वात्मक ब्रह्म। देखिजे करूनि सम। ऐक्यबोधें॥ ३८३ ॥
तरी ॐकार तत्कारे। जें कर्म दाविलें ब्रह्माकारें। तें गिळुनि होइजे एकसरें। सन्मात्रचि॥ ३८४ ॥
ऐसा हा अंतरंगु। सच्छब्दाचा विनियोगु। जाण म्हणे श्रीरंगु। मी ना म्हणें हो॥ ३८५ ॥
ना मीचि जरी हो म्हणें। तरी श्रीरंगीं दुजें हेंचि उणें। म्हणौनि हें बोलणें। देवाचेंचि॥ ३८६ ॥

अर्थ—जे प्रशस्त कर्म सत्स्वरूपासह सर्वात्मक ब्रह्मस्वरूप झाले त्याचे आपल्याशी ऐक्य आहे या ज्ञानबोधाने ते समस्वरूप पाहावे॥ ३८३ ॥ जे ओंकार-तत्कारपूर्वक केलेले कर्म ब्रह्माकार होते, असे जे मागे सांगितले ते सर्व द्वैत मनातून काढून टाकून केवळ सन्मात्रस्वरूप होऊन राहावे॥ ३८४ ॥ असा हा 'सत्' शब्दाचा अंतरंगविनियोग आहे, असे जाण, असे भगवान श्रीकृष्ण म्हणतात; मी म्हणत नाही, हो!॥ ३८५ ॥ आणि, मी म्हणतो,

असे जरी म्हटले तरी भगवंताहून मी अलग राहणे हे सर्वव्यापक भगवंताचे ठिकाणी उणेपण आहे. याहि दृष्टीने पाहता, हे म्हणणे भगवंताचेच आहे ॥ ३८६ ॥

आतां आणिकीही परी। सच्छब्द हा अवधारीं। सात्त्विका कर्मा करी। उपकार जो॥ ३८७॥
तरी सत्कर्मे चांगें। चालिलीं अधिकारबगें। परी एकाधें का आंगें। हिणावती जैं॥ ३८८॥
तैं उणें एकें अवयवें। शरीर ठाके आघवें। का अंगहीन भांडावे। रथाची गती॥ ३८९॥
तैसें एकेंचि गुणेंवीण। सतचि परी असतपण। कर्म धरी गा जाण। जिये वेळे॥ ३९०॥
तेव्हां ओंकार तत्कारीं। सावायिला हा चांगी परी। सच्छब्दु कर्मा करी। जीर्णोद्धार॥ ३९१॥
तें असतपण फेडी। आणी सद्भावाचिये रूढी। निजसत्त्वाचिये प्रौढी। सच्छब्द हा॥ ३९२॥

अर्थ—आणखी दुसरे असे की या 'सत्' शब्दाने सात्विक कर्मावर जो उपकार केला जातो, तो सांगतो, ऐक॥ ३८७॥ सात्विक कर्म अधिकारानुसार चांगले अनुष्ठिले जात असताना जर त्यात एखाद्या अंगाने वैगुण्य प्राप्त झाले तर॥ ३८८॥ ज्याप्रमाणे एखादे अंग किंवा अवयव नसले म्हणजे संपूर्ण शरीर त्या अवयवाचून राहते किंवा चाक वगैरे एखाद्या अंगाने हीन असलेल्या रथाची गति बंद पडते॥ ३८९॥ त्याप्रमाणे जेव्हा एका गुणाच्या उणेपणामुळे सत्कर्माला 'असत्' पण येते॥ ३९०॥ तेव्हा ओंकार-सत्कार यांचे साह्य असलेला हा 'सत्' शब्द त्या कर्माचा चांगला जीर्णोद्धार करतो-म्हणजे उणीव भरून काढतो व कर्म पूर्ण करतो॥ ३९१॥ हा 'सत्' शब्द आपल्या सद्भावाच्या भारदस्तपणामुळे कर्माचे 'असत्' पण नाहीसे करून त्याचे ठिकाणी 'सत्' पणा रूढ करतो॥ ३९२॥

दिव्यौषध जैसें रोगिया। कां सावावो ये भंगलिया। सच्छब्द कर्मा व्यंगलिया। तैसा जाण॥ ३९३॥
अथवा कांहीं प्रमादें। कर्म आपुलिये मर्यादे। चुकोनि पडे निषिद्धे। वाटे हन॥ ३९४॥
चालतयाही मार्गु सांडे। पारखिया अखरें पडे। राहाटीमाजीं न घडे। काई काई॥ ३९५॥
म्हणौनि तैसी कर्मा। राभस्यें सांडे सीमा। असाधुत्वाचिया दुर्नामा। येवों पाहे जै॥ ३९६॥
तेथ गा हा सच्छब्दु। येरां दोहींपरीस प्रबुद्धु। प्रयोजिला करी साधु। कर्मातें यया॥ ३९७॥
लोहा परिसाची घृष्टी। वोहळा गंगेची भेटी। कां मृता जैसी वृष्टी। पीयूषाची॥ ३९८॥
पैं असाधु कर्मा तैसा। सच्छब्दप्रयोग वीरेशा। हें असो गौरवचि ऐसा। नामाचा यया॥ ३९९॥

अर्थ—जसे दिव्य औषध रोग्याला किंवा साहाय्य मिळणे आशाभंग झालेल्यास, उत्साहजनक होते, त्याप्रमाणे कोण्याहि रीतीने व्यंग झालेल्या कर्माला 'सत्' शब्द हा पूर्ण करतो, असे जाण॥ ३९३॥ अथवा कोणत्या एखाद्या चुकीमुळे कर्म आपली विहित मर्यादा सोडून निषिद्ध कोटीत गेले तर॥ ३९४॥ चालणाऱ्याचीच वाट चुकते, परीक्षकच एखादे वेळी फसतो, व्यवहारामध्ये काय काय घडत नाही॥ ३९५॥ त्याप्रमाणे अविवेकाने एखादे वेळी कर्माची विहित मर्यादा ओलांडली जाऊन त्या कर्माला असाधु असे जे वाईट नाव प्राप्त होते॥ ३९६॥ असे झाले असता 'सत्' शब्द हा ॐकार व तत्कार या दोघांपेक्षा इतक्या पूर्ण अवस्थेला पोहोचला आहे की तो लावला असता कर्माला आपल्यासारखेच चांगले व पूर्ण करतो॥ ३९७॥ ज्याप्रमाणे लोखंडाला परिसाचा संसर्ग व्हावा, गंगेला ओढा मिळावा किंवा मेलेल्या माणसावर अमृताची वृष्टि व्हावी॥ ३९८॥ त्याप्रमाणेच, वीरश्रेष्ठा अर्जुना! अपूर्ण व निषिद्ध अशा कर्माला 'सत्' शब्द लावण्याचा उपयोग आहे. हे असो 'सत्' या नामाची अशी महतिच आहे॥ ३९९॥

घेऊनि येथिंचे वर्म। जैं विचारिसी हें नाम्। तैं केवळ हेंचि ब्रह्म। जाणसी तूं॥ ४००॥
पाहें पां ॐ तत् सत् ऐसें। हें बोलणें तेथ नेतसे। जेथूनि का हें प्रकाशे। दृश्यजात॥ ४०१॥
तें तंव निर्विशिष्ट। परब्रह्म चोखट। तयाचें हें आंतुवट। व्यंजक नाम॥ ४०२॥
परी आश्रयो आकाशा। आकाशचि का जैसा। या नामा नामी आश्रयो तैसा। अभेदु असे॥ ४०३॥

अर्थ—या नामाचे हे रहस्य जाणून तू नामाचा विचार करशील तेव्हा तुला असे दिसून येईल की ॐतत्-सत् हेच ब्रह्म आहे॥ ४००॥ हे पाहा अर्जुना! जेथून हे दृश्यजगत् प्रगट होते तेथेच ॐ-तत्-सत् हे नाम जीवाला

पोहचविते ॥ ४०१ ॥ ती वस्तु म्हणजे सर्व विशेषरहित असे शुद्ध परब्रह्म होय. त्याचा प्रत्यय आणून देणारे असे हे नाम अंतरंगभूत साधन आहे ॥ ४०२ ॥ ज्याप्रमाणे आकाशाला आकाशच आश्रय आहे, त्याप्रमाणे भगवंताच्या नामाला भगवंताचाच आश्रय असल्यामुळे भगवान व भगवंताचे नाव यांचा अभेदच आहे ॥ ४०३ ॥

गूढार्थदीपिका—म्हणूनच भगवान जसा अनध्यस्तविवर्तरूप आहे तसे त्याचे नावहि अनध्यस्तविवर्तरूप आहे, असेच सर्व संत मानतात.

उदयिला आकाशीं। रवीचि रवीतें प्रकाशी। नामव्यक्ती तैसी। ब्रह्मा करी ॥ ४०४ ॥

अर्थ—आकाशात सूर्य उगवला असता तो आपल्यालाच प्रकाशरूप करतो, त्याप्रमाणे ॐ-तत्-सत् हे व्यक्तनाम ब्रह्माला प्रकाशित करते ॥ ४०४ ॥

यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते। कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥ २७ ॥

अर्थ—यज्ञ, दान व तप यांच्या अनुष्ठानात राहण्याच्या स्थितीला 'सत्' असे म्हणतात व त्यांच्याकरिता होणाऱ्या कर्मालाहि 'सत्' असे म्हणतात ॥ २७ ॥

म्हणौनि त्र्यक्षर हें नाम। नव्हे जाण केवळ ब्रह्म। ययालागीं कर्म। जें जें कीजे ॥ ४०५ ॥
तें याग अथवा दानें। तपादिकें गहनें। तियें निफजतु कां न्यूनें। होऊनि ठातु ॥ ४०६ ॥
परी परिसाचां वरकलीं। नाहीं चोखाकिडाची बोली। तैसीं ब्रह्मीं अर्पितां केलीं। ब्रह्मचि होती ॥ ४०७ ॥
उणिया पुरियाची परी। नुरेचि तेथ अवधारीं। निवडूं न येती सागरीं। जैसिया नदी ॥ ४०८ ॥
एवं पार्था तुजप्रती। ब्रह्मनामाची हे शक्ती। सांगितली उपपत्ती। डोळसा गा ॥ ४०९ ॥
आणि येकेकाही अक्षरा। वेगळवेगळा वीरा। विनियोगु नागरा। बोलिलों रीती ॥ ४१० ॥
आतां एवं ऐसें सुमहिम। म्हणौनि हें ब्रह्मनाम। जाणितलें कीं सुवर्म। राया तुवां ॥ ४११ ॥
तरी येथूनि याचि श्रद्धा। उपलविली हो सर्वदा। जयाचें जालें बंधा। उरों नेदी ॥ ४१२ ॥
जिये कर्मीं हा प्रयोगु। अनुष्ठिजे सद्विनियोगु। तेथ अनुष्ठिला सांगु। वेदुचि तो ॥ ४१३ ॥

अर्थ—म्हणून ॐ-तत्-सत् हे नुसते तीन अक्षरी नाम नसून ते केवळ परब्रह्मच होय, असे समज. याच्या निष्पत्तिकरिता जी जी थोर यज्ञ-याग, तप दाने इत्यादि कर्मे केली जातात ती सांग होवोत किंवा व्यंग होवोत ॥ ४०५-४०६ ॥ तरी ज्याप्रमाणे परिसाच्या कसोटीच्या स्पर्शाने झालेल्या सोन्यात, हे हीणकट आहे, हे चांगले आहे, अशी भाषा राहत नाही, त्याप्रमाणे परब्रह्माचे ठिकाणी अर्पण केलेली कर्मे सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपच होतात ॥ ४०७ ॥ ज्याप्रमाणे समुद्रास मिळालेल्या नद्या पुनः ओळखता येत नाहीत, त्याप्रमाणे परब्रह्माला कर्मे अर्पण केली असता ती उणीपुरी राहत नाहीत, हे पक्के समज ॥ ४०८ ॥ याप्रमाणे, ज्ञानवान अर्जुना! तुला या ब्रह्मनामाच्या शक्तीची ही उपपत्ति सांगितली ॥ ४०९ ॥ आणि, हे वीरा अर्जुना! या ब्रह्मनामातील एक एक अक्षराचा वेगवेगळा विनियोगहि सुंदर रीतीने सांगितला ॥ ४१० ॥ अशा प्रकारे, वर सांगितल्याप्रमाणे त्याची उत्तम कीर्ति आहे, म्हणून ते परब्रह्माचे नाम झाले आहे, त्याचे हे नीट वर्म, हे राजा, जाणलेस ना! ॥ ४११ ॥ आजपासून ही नामाची श्रद्धा सदासर्वदा अशीच वाढलेली राहिली तर ती प्राप्त झालेल्या कर्मबंधनाला उरू देणार नाही ॥ ४१२ ॥ ज्या कर्मामध्ये 'ॐ-तत्-सत्' या ब्रह्मनामाचा उच्चार होऊन त्याचा योग्य विनियोग केला जाईल तेथे संपूर्ण वेदाचेच अनुष्ठान झाले ॥ ४१३ ॥

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत्। असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥ २८ ॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
श्रद्धात्रयविभागयोगो नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

अर्थ—हे अर्जुना! अश्रद्धेने केलेल्या हवनाला, दिलेल्या दानाला, केलेल्या तपाला व केलेल्या स्तुति-नमस्कारादि कर्माला असत् म्हणतात. (हे सर्व करण्यात अत्यंत कष्ट होत असले) तरी त्याचे इहलोकी किंवा परलोकीहि फळ मिळत नाही॥ २८॥

ना सांडूनि हे सोये। मोडूनि श्रद्धेची बाहे। दुराग्रहाची त्राये। वाढऊनियां॥ ४१४॥
मग अश्वमेध कोडी कीजे। रत्नें भरोनि पृथ्वी दीजे। एकांगुष्ठींही तपिजे। तपसाहस्त्रीं॥ ४१५॥
जळाशयाचेनि नांवें। समुद्र कीजती नवे। परी किंबहुना आघवें। वृथाचि तें॥ ४१६॥
खडकावरी वर्षलें। जैसें भस्मीं हवन केलें। कां खेंव दिधलें। साउलिये॥ ४१७॥
नातरी जैसें चडकणां। गगन हाणितलें अर्जुना। तैसा समारंभु सुणा। गेलाचि तो॥ ४१८॥
घाणा गाळिले गुंडे। तेथ तेल ना पेंडी जोडे। तैसें दरिद्र तेवढें। ठेलेंचि आंगीं॥ ४१९॥
गांठीं बांधली खापरी। येथें अथवा पैल्तीरीं। न सरोनि जैसी मारी। उपवासीं गा॥ ४२०॥

अर्थ—कर्म करण्याची ही हातोटी सोडून देऊन व कर्माला लागणारा श्रद्धेचा हात मोडून टाकून अश्रद्धेने नुसत्या दुराग्रहाच्या बळावर कोट्यावधि अश्वमेध यज्ञ केले, रत्नांनी भरलेल्या पृथ्वीचे दान केले किंवा एका अंगुष्ठावर उभे राहण्यासारखी हजारो तपे केली अथवा फार काय सांगायचे! जलाशय निर्माण करण्याच्या नावाखाली समुद्रासारखे नवे समुद्र निर्माण केले तरी ते सर्व व्यर्थच होय॥ ४१४-४१६॥ ज्याप्रमाणे पाषाणावर झालेला पाण्याचा वर्षाव किंवा राखेत केलेले हवन, अथवा सावलीला दिलेले आलिंगन किंवा अर्जुना! आकाशाला मारलेली थापड व्यर्थ होय, त्याप्रमाणे अश्रद्धेने केलेले सर्व कार्यारंभ व्यर्थ होत॥ ४१७-४१८॥ ज्याप्रमाणे घाण्यात घालण्याकरिता टाकलेल्या दगडापासून तेल किंवा पेंड काहीच प्राप्त होत नाही, परंतु स्वत:चे दारिद्र्य तेवढे कायमच राहते॥ ४१९॥ कनवटीस खोचलेली खापरखुटी अलीकडील किंवा पलीकडील तीरावरील गावात कोठेहि चालत नसल्यामुळे जशी उपाशी मारते॥ ४२०॥

तैसें कर्मजातें तेणें। नाहीं ऐहिकीचें भोगणें। तेथ परत्र ते कवणें। अपेक्षावे॥ ४२१॥
म्हणौनि ब्रह्मनामश्रद्धा। सांडूनि कीजे जो धांदा। हें असो सिणू नुसधा। दृष्टादृष्टीं तो॥ ४२२॥
ऐसें कलुषकरिकेसरी। त्रितापतिमिरतमारी। श्रीवीरवरनरहरी। बोलिले तेणें॥ ४२३॥

अर्थ—त्याप्रमाणे अश्रद्धेने केलेल्या कर्मजाताने जेथे ऐहिक भोगच मिळत नाही, तेथे त्यांच्या योगाने परलोकातील भोग मिळतील, अशी आशा कशी करावी?॥ ४२१॥ म्हणून ॐ-तत्-सत् या ब्रह्मनामाचा प्रयोग व श्रद्धा यांना सोडून केलेले कोणतेहि कर्म, इहपरलोकी नुसता शीणच होय॥ ४२२॥ पापरूपी हत्तीला मारणारा सिंह, त्रिविध दु:खरूप अंधाराचा नाश करणारा सूर्य, लक्ष्मीचा पति, पराक्रमी, नरहरी असा हा भगवान श्रीहरी असे बोलता झाला॥ ४२३॥

तेथ निजानंदा बहुवसा-। माजीं अर्जुन तो सहसा। हरपला चंद्रु जैसा। चांदिणेनि॥ ४२४॥
अहो संग्रामु हा वाणिया। मापें नाराचांचिया आणिया। सूनि मांस घे मवणिया। जीवितेंसी॥ ४२५॥
ऐसिया समयीं कर्कशें। भोगीजत स्वानंदराज्य कैसें। आजि भाग्योदयो हा नसे। आणिके ठायीं॥ ४२६॥
संजयो म्हणे कौरवराया। गुणा रिझों ये रिपूचिया। आणि गुरुही हा आमुचिया। सुखाचा येथ॥ ४२७॥
हा न पुसता हे गोठी। तरी देवो कां सोडिते गांठी। तरी कैसेनि आम्हां भेटी। परमार्थेंसी॥ ४२८॥
होतों अज्ञानाच्या आंधारां। वोसंतीत जन्मवाहरा। तें आत्मप्रकाशमंदिरा-। आंत आणिलें॥ ४२९॥
एवढा आम्हां तुम्हां थोरु। केला येणें हा उपकारु। म्हणोनि हा व्याससहोदरु। गुरुत्वें होय॥ ४३०॥
तेवींचि संजयो म्हणे चित्तीं। अतिशयो या नृपती। खुपेल म्हणौनि किती। बोलत असों॥ ४३१॥

ऐसी हे बोली सांडिली। मग येरीचि गोठी आदरिली। जे पार्थे कां पुसिली। श्रीकृष्णातें॥ ४३२॥
याचें जैसें कां करणें। तैसें मीही करीन बोलणें। ऐकिजो ज्ञानदेवो म्हणे। निवृत्तीचा॥ ४३३॥

इति श्रीज्ञानदेवविरचिता भावार्थदीपिकायां सप्तदशोऽध्यायः॥ १७॥

अर्थ—ज्याप्रमाणे चंद्रापेक्षा पुष्कळपटीने असलेल्या (सूर्याच्या) प्रकाशात चंद्र हारपला जातो, त्याप्रमाणे अपार अशा आत्मानंदात अर्जुन तात्काळ निमग्न झाला॥ ४२४॥ अहो! कौरवपांडवाचा युद्धप्रसंग म्हणजे एक वाणीच होय. बाणांची अग्ररूपे मागे घालून तो प्राणासह मांसाचे माप घेत आहे॥ ४२५॥ अशा कठोर प्रसंगी तो अर्जुन स्वानंदाचे साम्राज्य कसे भोगित आहे, पाहा! अर्जुनावाचून दुसऱ्याचे ठिकाणी असा भाग्योदय झालेला दिसणार नाही॥ ४२६॥ संजय म्हणतो, हे कौरवांच्या राजा धृतराष्ट्रा! शत्रूच्या गुणाने आनंद होतो व तो आमच्या सुखप्राप्तीला कारण असल्यामुळे गुरुस्थानीहि आहे॥ ४२७॥ अर्जुनाने ही गोष्ट विचारलीच नसती तर देवांनी तरी प्रक्रियारूप गाठोडीची गाठ कशाला सोडली असती व मग आमच्यासारख्याला परमार्थाचा लाभ कसा झाला असता?॥ ४२८॥ जो मी आता विस्मृतिरूप आंधारात जन्मदुःख भोगित होतो, त्या मला आत्मस्मृति करून देऊन आत्मप्रकाशरूप मंदिरात आणले॥ ४२९॥ एवढा मोठा उपकार या अर्जुनाने आपल्यावर केला असल्यामुळे तो भगवान व्यासांचा बंधु व आपला गुरु झाला आहे॥ ४३०॥ तसेच संजय आपल्या चित्तात म्हणतो, अर्जुनाची केलेली स्तुति राजाच्या मनाला झोंबेल, म्हणून आता किती बोलायचे!॥ ४३१॥ असा विचार करून त्याने बोलणे आटोपते घेतले व मग अर्जुनाने भगवान श्रीकृष्णाला जी गोष्ट विचारली, हो त्या दुसऱ्याच गोष्टीविषयी बोलणे सुरू केले॥ ४३२॥ श्रीनिवृत्तिनाथ महाराजांचे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ऐका! त्यांचे जसे करणे झाले आहे, तदनुरूपच मीहि निरूपणाचे बोलणे करीन॥ ४३३॥

श्रीसद्गुरुमाऊलीच्या कृपाप्रसादाने श्रीज्ञानेश्वरीच्या सतराव्या अध्यायाचा अनुवाद गूढार्थदीपिकेसह समाप्त झाला, तो श्रीगुरुमाउलीच्या चरणी समर्पण असो.



समारोप

मागे सोळाव्या अध्यायाच्या शेवटी भगवंतांनी असा निर्णय केला की कर्तव्याकर्तव्याच्या निश्चितीकरिता एक शास्त्रच प्रमाण मानले पाहिजे. तेव्हा अर्जुनाला अशी शंका आली की, हे कर्म कर्तव्य होय किंवा कर्तव्य नव्हे, असे नुसत्या श्रद्धेने ठरविता येणार नाही काय? म्हणून अर्जुनाने प्रश्न केला की, हे भगवंता! शास्त्र न पाहता जे केवळ श्रद्धेने यजन करतात त्यांची ती निष्ठा सात्विक, राजस की तामस?

भगवान म्हणतात, अर्जुना! शास्त्राभ्यास किंवा शास्त्रावलोकन न करणाऱ्या लोकांची पूर्वकर्मानुसार प्राप्त होणारी स्वाभाविक श्रद्धाहि सात्विक, राजस, तामस अशी तीन प्रकारची असते. हा पुरुष श्रद्धामयच आहे. सात्विक पुरुषाची श्रुतिस्मृतिपुराणात सांगितलेल्या शिव व विष्णु यांच्या पूजनाचे ठिकाणी श्रद्धा असते. राजस श्रद्धेचे पुरुष यक्ष व राक्षस यांचे पूजन करतात व तामस श्रद्धेचे पुरुष भूतप्रेतादिकांचे पूजन करतात.

या तीन श्रद्धेपैकी रजोगुणी, तमोगुणी या दोन श्रद्धा अध:पतनाला कारणीभूत असल्यामुळे नि:शेष टाकून देऊन सात्विक श्रद्धाच जतन करावी. तसेच ज्यायोगे चित्तात सत्वगुण दृढ ठसेल, अशी संगति धरावी व सत्वगुण ज्यात अधिक आहे, असा आहार घ्यावा. खाल्लेल्या अन्नाप्रमाणेच मनुष्याचे मन बनते. सर्व मनुष्यांना प्रिय असलेला आहार सात्विक, राजस, तामस असा तीन प्रकारचा आहे. त्याचप्रमाणे यज्ञ, तप व दान हेहि तीन प्रकारचे आहेत.

भगवान म्हणतात, अर्जुना! प्रथम आहाराचे भेद सांगतो, ऐक.

आहार—सात्विक पुरुषाला प्रिय असलेला आहार, आयुष्य, चित्तातील स्थैर्य, शक्ति, आरोग्य, सुख व अभिरुचि इत्यादि सात्विक गुण वाढविणारा, स्वभावत:च रसभरित, आंगचाच स्निग्ध, शरीरात बराच वेळ टिकणारा व इंद्रियांना समाधान देणारा, असा असतो. राजस पुरुषाला प्रिय असलेला आहार, अति कडू, अति आंबट, अति तिखट, अति खारट, अति उष्ण, अति रुक्ष व शरीराचा दाह करणारा म्हणून दु:ख, शोक व रोग यांना उत्पन्न करणारा असतो. तामस पुरुषाला प्रिय असलेला आहार, निरस, दुर्गंधीयुक्त, शिळा, उष्टा व अपवित्र असा असतो.

यज्ञ—फळाची यत्किंचितहि इच्छा न करता शास्त्रविधीला धरून केला जाणारा सात्विक यज्ञ होय. फळाची इच्छा धरून लोकात प्रतिष्ठा मिरविण्याकरिता केला जाणारा यज्ञ राजस यज्ञ होय. शास्त्रविधि, यथोक्त अन्नदान, वैदिक मंत्र, शास्त्रोक्त दक्षिणा व श्रद्धा याविरहित केल्या जाणाऱ्या यज्ञाला तामस यज्ञ म्हणतात.

तप—अर्जुना! आता तपाचे स्वरूप ऐक.

तप हे शारीरिक, वाचिक व मानसिक असे तीन प्रकारचे आहे. देव, ब्राह्मण, गुरु व ज्ञानी यांचे पूजन करणे, शरीरशुद्धि, सरळपणाने वागणे, ब्रह्मचर्य व कोण्याहि प्राण्याची हिंसा न करणे ही कर्मे शरीराने होत असल्यामुळे याला शारीरिक तप म्हणतात.

खिन्नता उत्पन्न न करणारे, सत्य प्रिय व हितकारक असे बोलणे व आपल्याला पठण करण्यास योग्य म्हणून स्वीकारलेली स्तोत्रे व ग्रंथ यांचा अभ्यास करणे, याला वाचिक तप म्हणतात.

रागद्वेषरहित मन होणे, मनात सर्व लोकांच्या हिताची इच्छा व निष्कपट बुद्धि असणे याला मानसिक तप म्हणतात. हेच तप अत्यंत श्रद्धेने व फळाची इच्छा न धरता केले असता, ते सात्विक तप होते व फळाची इच्छा धरून प्रतिष्ठा मिरविण्याकरिता केले असता राजस तप होते; तसेच अविकारी अंत:करणाने आपल्या देहाला अत्यंत पीडा देऊन दुसऱ्याचा नाश करण्याकरिता केलेले तप तामस म्हटले जाते.

दान—पुण्यक्षेत्रात, पुण्यकाली, उपकार फेडण्यास असमर्थ व वेदपारंगत अशा ब्राह्मणाला दिले जाणारे दान सात्विक दान होय.

प्रत्युपकाराच्या आणि फळ मिळण्याच्या बुद्धीने व कष्टी अंत:करणाने केलेले दान राजस दान होय.

संध्यासमयी किंवा रात्री, अधर्माने मिळविलेल्या धनाचे, पापी लोकांना दान करणे याला तामस दान म्हणतात.

भगवान म्हणतात अर्जुना! आम्ही श्रद्धेपासून दानापर्यंत सत्व, रज, तम या तीन गुणांनी व्याप्त ह्या ज्या क्रिया सांगितल्या त्या, सात्विक कर्माचे स्वरूप स्पष्ट करण्याकरिता सांगितल्या. तू सत्वगुणाचा आश्रय करून सात्विक कर्मेच कर व राजस-तामस कर्माचा त्याग कर.

केलेल्या सात्विक कर्माने मोक्षसिद्धि कशी होते याचे वर्म मी तुला आता सांगतो, ऐक.

परब्रह्माचा ॐ, तत्, सत् असा तीन प्रकाराने नामनिर्देश केला आहे. या त्रिविध नामनिर्देशद्वाराच ब्राह्मण, वेद व यज्ञ निर्माण केले गेले, म्हणून मोक्षाची इच्छा करणाऱ्या वेदवादी ब्राह्मणांच्या यज्ञ, दान, तप इत्यादि सर्व क्रिया प्रथम ॐकाराचा उच्चार करून नेहमी होत असतात. केवळ तत्वाच्य ब्रह्माकडे लक्ष देऊन ते नाना प्रकारचे यज्ञ-दान-तपादि कर्मे करतात व तसेच अस्तित्व सद्वृत्तत्व या अर्थी प्रशस्त कर्मांचे ठिकाणी सत् शब्द लावला जातो. अशा प्रकारे ॐ, तत्, सत् या तीन नामांचा विनियोग करून यज्ञ, दान, तप यांचा अनुष्ठानात राहणाऱ्या स्थितीला सत् असे म्हणतात. जे अश्रद्धेने हवन केले जाते, दान दिले जाते ते असत् कर्म होय. इहलोकी किंवा मरणानंतर त्याचे काही फळ होत नाही.

॥ श्रीमद्सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥



॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥ 784

श्रीज्ञानेश्वरी-गूढार्थदीपिका



गीताप्रेस, गोरखपुर

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय अठरावा

अवतरणिका—भगवंतांनी सतराव्या अध्यायापर्यंत अर्जुनाला समोर करून सर्व जगताला जे तत्त्वज्ञान सांगितले त्याची उजळणी करून थोडक्यात पुनः सारांश सांगण्याकरिता अठराव्या अध्यायाची निर्मिती झाली आहे. या अध्यायाला श्रीज्ञानेश्वर माउलींनी ''हा अठरावा अध्याय नोहे। हे एकाध्यायी गीताची आहे'' (ज्ञाने० अ० १८-८४) असे म्हटले आहे. आचार्यहि ''सर्वस्यैव गीताशास्त्रस्यार्थोऽस्मिन्नध्याय उपसंहृत्य.............सर्वेषु ह्यतीतेष्वध्यायेषूक्तोऽर्थोऽस्मिन्नध्यायेऽवगम्यते'' (अवतरणिका गीताभाष्य) ''सर्वच गीताशास्त्राचा अर्थ या अध्यायात संक्षेपतः संग्रहीत करून पूर्वी होऊन गेलेल्या सर्व अध्यायामध्ये सांगितलेला शास्त्रार्थ या अध्यायांत ज्ञात होतो.'' असेच म्हणतात एवं दोघांच्याहि मताने गीतेतील तत्त्वज्ञान संक्षेपरूपाने पहावयाचे असल्यास ते अठराव्या अध्यायात दिसून येईल.

जयजय देव निर्मळ। निजजनाखिलमंगळ। जन्मजराजलदजाळ। प्रभंजन॥ १ ॥
जयजय देव प्रबळ। विदळितामंगळकुळ। निगमागमद्रुमफळ। फलप्रद॥ २ ॥

अर्थ—हे सद्‌गुरुदेवा! तू त्रिगुणात्मक उपाधिरहित असा निर्मळ आहेस. तू आपल्या भक्तांचे संपूर्ण कल्याण करतोस. तू जन्मजरारूपी मेघांच्या समूहांचा नाश करणारा वायुच आहेस, तुझा जयजयकार असो॥ १ ॥ हे सद्‌गुरु देवा! तू सर्व समर्थ असून दुःखरूपाने फलद्रूप होणाऱ्या सर्व अशुभांचा निःशेष नाश करणारा आहेस. वेदशास्त्ररूपी वृक्षाचे मोक्षरूपी फळ तूच असून ते प्राप्त करून देणारा तूच आहेस. तुझा जयजयकार असो॥ २ ॥

गूढार्थदीपिका—योगप्राप्ति किंवा परमेश्वर प्राप्ति हीच मोक्षप्राप्ति होय. ती भगवंताच्या किंवा श्रीगुरुच्या कृपेनेच होते. म्हणजे चित्ताची शुद्धि व इतर साधनभूत प्रयत्न हे त्याची कृपा संपादन करून केली असताच फलद्रूप होतात असा भाव.

जयजय देव सकळ। विगतविषयवत्सल। कलितकाळकौतूहल। कलातीत॥ ३ ॥
जयजय देव निश्चळ। चलितचित्तपानतुंदिल। जगदुन्मीलनाविरळ-। केलिप्रिय॥ ४ ॥

अर्थ—हे श्रीगुरुदेवा! संपूर्ण तूच एक आहेस. निःशेष विषयवासनारहित झालेल्यांना, आपल्या लहान मुलावर प्रेम करणाऱ्या आईप्रमाणे तू ममताळु आहेस. काळाच्या क्षणोक्षणी होणाऱ्या जन्ममृत्युरूपी क्रीडेला तू नाहीसा करणारा आहेस. तू अंशरहित असा अफूट, पूर्ण आहेस. तुझा जयजयकार असो॥ ३ ॥ हे श्रीगुरुदेवा! तू अवयवरहित असल्यामुळे गतिरहित अखंड अढळ आहेस. चंचल चित्ताचे प्राशन करून तू दोंदिल झाला आहेस–म्हणजे चित्ताच्या चंचलपणाचा नाश करून तू निःशेष वासनारहित नित्यतृप्त आहेस. नामरूपात्मक जगताच्या रूपाने निरंतर प्रगट होण्याची क्रीडा तुला फार प्रिय आहे. तुझा जयजयकार असो॥ ४ ॥

गूढार्थदीपिका—मायाभ्रांतिमुळे जीवाला परमेश्वराच्या नामरूपात्मक सगुणरूपाने प्रगट होण्याचा व अंतर्धान पावण्याचा प्रत्यय येत असला तरी परमेश्वराचे नामरूपात्मक सगुणस्वरूप निरंतरच असते. म्हणजे ते सत्, चित् व आनंदमय पूर्ण परब्रह्मच आहे, असे माउलींनी दाखविले आहे.

जयजय देव निष्कळ। स्फुरदमंदानंदबहळ। नित्यनिरस्ताखिलमळ। मूळभूत॥ ५ ॥
जयजय देव स्वप्रभ। जगदंबुदगर्भनभ। भुवनोद्भवारंभस्तंभ। भवध्वंस॥ ६ ॥
जयजय देव विशुद्ध। अविद्योद्यानद्विरद। शमदममदनमदभेद। दयार्णव॥ ७ ॥

जयजय देवैकरूप। अतिकृतकंदर्पसर्पदर्प। भक्तभावभुवनदीप। तापापह॥ ८॥
जयजय देव अद्वितीय। परिणतोपरमैकप्रिय। निजजनजित भजनीय। मायागम्य॥ ९॥
जयजय देव श्रीगुरो। अकल्पनाख्यकल्पतरो। स्वसंविद्द्रुमबीजप्ररो-। हणावनी॥ १०॥

अर्थ—अखंडपूर्ण असलेल्या श्रीगुरुदेवा! तू स्फुरत असलेला आनंदच होय. अविद्यादि कोणतेहि दोष तुझ्या ठिकाणी कधीच नाहीत. असा तू सदा सर्वदा मूळचा दोषरहित केवळ आनंदरूप आहेस. तुझा जय जयकार असो॥ ५॥ हे श्रीगुरुदेवा! तू स्वयंप्रकाश म्हणजे तूच तुला प्रकाशित करणारा, जगद्रूपी मेघाच्या गर्भाला धारण करणारे आकाश, त्रिभुवनाच्या उत्पत्तीच्या आरंभाचा आधारभूत स्तंभ व संसाराच्या प्रत्ययाचा नाश करणारा तू आहेस. तुझा जयजयकार असो॥ ६॥ हे श्रीगुरुदेवा! तू सदासर्वदा अविद्यादि दोषरहित शुद्ध असल्यामुळे अविद्यारूपी उपवनाचा नाश करणारा हत्ती व शमदमाच्या योगाने कामवासनेमुळे उत्पन्न होणाऱ्या मदाचा नाश करणारा असा तू दयेचा सागर आहेस. तुझा जयजयकार असो॥ ७॥ अखंड एकरूप अशा श्रीगुरुदेवा! तू कामरूपी सर्पाच्या गर्वाचे उल्लंघन म्हणजे त्याचा नाश करणारा आहेस. तू भक्ताच्या प्रेमळ अंत:करणरूपी मंदिरातील दिवा आहेस व तू सर्व ताप नाहीसे करणारा आहेस. तुझा जयजयकार असो॥ ८॥ हे श्रीगुरुदेवा! तुझ्या सारखा दुसरा कोणी नाही. चित्ताची परम शांती हीच एक तुला प्रिय आहे. तू आपल्या भक्ताच्या स्वाधीन होतोस. तू भजनास योग्य आहेस. मायाभ्रांति आहे तोपर्यंत तू प्राप्त होत नाहीस. तुझा जयजयकार असो॥ ९॥ हे श्रीगुरुदेवा! कल्पनारहिततारूप .किंवा निर्विकल्पतारूप इच्छित फल देणारा तू कल्पतरू आहेस. आत्मचैतन्यरूप वृक्षाचे ब्रह्मज्ञानरूपी बीज अंकुरित करून वाढीला लावणारी जमीन तूच आहेस. तुझा जयजयकार असो॥ १०॥

हें काय एकैक ऐसें। नानापरिभाषावशें। स्तोत्र करूं तुजोद्देशें। निर्विशेषा॥ ११॥

अर्थ—याप्रमाणे अनेक परिभाषेच्या अनुरोधाने एक एक विशेषण घेऊन तुझ्या निर्विशेष स्वरूपाची कशी स्तुति करू शकणार॥ ११॥

गूढार्थदीपिका—निर्विशेषा-सर्व व एकमेव सच्चिदानंद असलेल्या व त्याहून दुसरे काही नसलेल्या परमेश्वराचे ठिकाणी विशेष भाव व तो दाखविण्याकरितां विशेष लक्षणें राहू शकत नाहीत; म्हणून परमेश्वराला ''निर्विशेष'' म्हणतात.

जिहीं विशेषणीं विशेषिजे। तें दृश्य नव्हे रूप तुझें। हें जाणें मी म्हणोनि लाजें। वानणां इहीं॥ १२॥

अर्थ—जी जी विशेषणे लावून तुझी स्तुती करावी त्या त्या विशेषणाच्या योगाने तुझे रूप दृश्यकोटीत येत असल्यामुळे तू त्या रूपाहून साक्षित्वाने निराळाच राहतोस, हे मी जाणतो. म्हणून कोणतीही विशेषणे लावून तुझी स्तुती करण्याची माझ्या मनाला लाजच वाटते॥ १२॥

गूढार्थदीपिका—जी जी विशेषणे लावून तुझी स्तुति करावी ती ती विशेषणे तुझ्या निर्विशेष स्वरूपाहून भिन्न असल्यामुळे त्यांच्या योगाने विशिष्ट झालेले तुझे द्रष्टृस्वरूपही साक्षी स्वरूपाहून निराळे पडून भिन्न अशा दृश्यकोटीत येते, असा अर्थ.

परी मर्यादेचा सागरु। हा तंवचि तया डगरु। जंव न देखे सुधाकरु। उदया आला॥ १३॥
सोमकांतु निजनिर्झरीं। चंद्रा अर्घ्यादिक न करी। तें तोचि अवधारीं। करवी कीं जी॥ १४॥
नेणों कैसी वसंतसंगें। अवचितिया वृक्षाचीं अंगें। फुटती तैं तयांही जोगें। धरणे नोहे॥ १५॥
पद्मिनी रविकिरण। लाहे मग लाजे कवण। कां जळें शिवतलें लवण। आंग भुले॥ १६॥
तैसा तूंतें जेथ मी स्मरें। तेथ मीपण मी विसरें। मग जाकळिला ढेंकरें। तृप्त जैसा॥ १७॥
मज तुवां जी केलें तैसें। माझें मीपण दवडूनि देशें। स्तुतिमिषेंच पां पिसें। बांधलें वाचे॥ १८॥

अर्थ—असे असले तरी ज्या प्रमाणे, समुद्र आपली मर्यादा सोडत नाही, अशी जी समुद्राची ख्याती तो चंद्रउदयाला येत नाही तोपर्यंतच खरी असते॥ १३॥ किंवा चंद्रकांतमणी आपण होऊन आपल्या पाझराने चंद्राला

अर्घ्यादिक अर्पण करीत नाही; पण चंद्रोदय झाल्याबरोबर तो चंद्रच सोमकान्त मण्याकडून त्याला पाझर फोडून अर्घ्यादिक करवून घेतो॥ १४॥ अथवा वसंतऋतूच्या आगमनाबरोबर झाडांना कसे अकस्मात् अंकुर फुटतात, हे सांगता येत नाही; पण झाडांच्यानी ते थांबवून धरवत नाही॥ १५॥ सूर्यविकासिनी कमळावर सूर्याचे किरण पडल्याबरोबर त्याचा सर्व संकोच सुटून ते टवटवीत व प्रफुल्ल होते. किंवा मिठाच्या खड्याला पाणी लागल्या बरोबर तो आपला आकाररूप देहच विसरतो॥ १६ ॥ ज्याप्रमाणे तृप्त झालेला पुरुष ढेंकराने व्यापून जातो, त्या प्रमाणें जेथे मला तुझे स्मरण होते तेथे माझे मीपणच भासत नाही (एक तूच राहतोस)॥ १७॥ त्याप्रमाणे मलाही तू केले आहेस. माझ्या मीपणाला देशोधडीला लावून तुझ्या स्तुतीच्या निमित्ताने माझ्या वाणीला वेडच लावून दिले आहेस॥ १८॥

गूढार्थदीपिका—ज्ञानी भक्तांना मीपणा व देहादिक या सर्वांचा विसरच पडत असल्यामुळे त्यांच्याकडून कर्तृत्वस्फुरणपूर्वक स्तुत्यादिक होत नसतात. ते सर्व सहजसहजी प्रेमानेच होत असते. म्हणजे त्यांचा तो स्वभावच होऊन जातो. ''स्वभावो भजनं हरेः'' किंवा परमेश्वरच प्रेमातिरेकामुळे आपली स्तुत्यादिक भक्ति करीत असतो, असा भाव.

ना एऱ्हवीं तरी आठवीं। राहोनि स्तुति जैं करावी। तैं गुणागुणीया धरावी। सरोभरी कीं॥ १९॥
तरी तूं जी एकरसाचें लिंग। केवीं करूं गुणागुणी विभाग। मोतीं फोडोनि सांधितां चांग। कीं तैसेंचि भलें॥ २०॥
आणि बाप तूं माय। इहीं बोलीं ना स्तुति होय। डिंभोपाधिक आहे। विटाळु तेथें॥ २१॥
जी जालेनि पाइकें आलें। तें गोसावीपण केवीं बोलें। ऐसें उपाधी उशिटलें। काय वर्णूं॥ २२॥
तरी आत्मा तूं एकसरा। हें ही म्हणतां दातारा। तरी आंतुल तूं बाहेरा। घापतासी॥ २३॥
म्हणूनि सत्यचि तुजलागीं। स्तुती न देखों जी जगीं। मौनावांचूनि लेणें आंगीं। सुसीना मा॥ २४॥
स्तुती कांहीं न बोलणें। पूजा कांहीं न करणे। सन्निधीं कांहीं न होणें। तुझ्या ठायीं॥ २५॥
तरी जिंतलें जैसें भुली। पिसें आलापु घाली। तैसें वानूं तें माउली। उपसाहावें तूं॥ २६॥

अर्थ—नाही तर सर्वांची आठवण राहून तुमची स्तुती करू गेली तर गुणी व अगुणी किंवा विशेष व निर्विशेष असा द्वैतभाव धरून ठेवावा लागतो॥ १९॥ महाराज! आपण एकरस एक जिनसी अफुट लिंग आहा. तेथे गुणी अगुणी असा भेद कसा करू? मोती फोडून त्याला जोडणें हे बरे की तो न फोडता तसाच ठेवणे बरे!॥ २०॥ आणि तुम्हाला माय किंवा बाप म्हणून आळवले, तरी या शब्दांनी ती स्तुती होत नाही; कारण त्याठिकाणी अज्ञानी बाळपणाची उपाधि घ्यावी लागते॥ २१॥ मी सेवक झालो असता तुमच्याकडे स्वामीपणा येतो. तो स्वामीपणा मी कसा सांगू? या प्रमाणे उपाधीच्या योगाने उष्टे झालेल्या स्वरूपाचे काय वर्णन करू?॥ २२॥ तू सर्वत्र आत बाहेर एक सारखा आत्मस्वरूपच आहेस, असे म्हटले तरी, हे प्रभो! तू आत असलेला बाहेर घातला जातोस॥ २३॥ म्हणून तुझ्या स्वरूपाची योग्य स्तुतीच जगात होऊ शकत नाही. मौनावाचून दुसऱ्या कोणत्याही शब्दालंकाराने तू आपल्याला सुशोभित होऊ देत नाहीस ना?॥ २४॥ कांही न बोलणेच ही तुझी स्तुती होय. काही न करणेच ही तुझी पूजा होय आणि काही न होणे हेच तुझ्या सन्निध असणे होय॥ २५॥ तरी ज्याप्रमाणे भ्रमाने भुललेला वेडा नाना प्रकारचे आलाप करतो त्याप्रमाणे वेडा होऊन जे मी तुझे वर्णन करतो त्याबद्दल त्या मला माउलीने क्षमा करावी॥ २६॥

गूढार्थदीपिका—परब्रह्माच्या निर्गुण स्थितीचे वर्णन करण्याकरितां वापरण्यात येणाऱ्या भाषेचा वापर करून सगुण स्वरूप असलेल्या सद्गुरुंच्या स्थितीचे वर्णन, श्रीज्ञानेश्वर महाराज या सर्व ओव्यातून करीत आहेत. यात काही विद्वान समजतात तसा अर्थवाद नाही. ज्ञानानंतर निर्गुण तेच सगुण व सगुण तेच निर्गुण असते. निर्गुण व सगुणात अज्ञानकाळी भासणारा भेद राहत नाही, हे माउलीला या ठिकाणी सांगावयाचे आहे. ज्ञानदृष्टीने पाहता सर्व विशेषणे सापेक्षतेची बोधक आहेत. ती निर्गुण ब्रह्माच्या ठिकाणी ज्याप्रमाणे लागू शकत नाहीत, त्याचप्रमाणे प्रीतिवृत्तीचे आलंबन झालेल्या सच्चिदानंदस्वरूप अशा सगुण सद्गुरुलाही लागू शकत नाहीत. म्हणूनच माउलीने सद्गुरुचे वर्णन करताना सद्गुरुला एका मौनावाचून दुसरा कोणताही अलंकार शोभू शकत नाही, असे म्हटले आहे. एकरस

अशा परब्रह्मस्वरूप सद्‌गुरुचे ठिकाणी कोणत्याच गुणाचा प्रवेश संभवत नसल्याकारणाने कोणतेही विशेषण वापरून केलेली स्तुती ही भेदालाच धरून होईल.

पण असे असले तरी सद्‌गुरुच्या कृपेने प्राप्त झालेल्या आत्मानंदामुळे प्रीतिवृत्तीचे कल्लोळ शिष्याच्या अंत:करणात सारखे उठत असतात व ते सद्‌गुरुची स्तुती करण्याला अभावितपणे त्याच्या वाणीला प्रेरित करतात.

प्रीतिवृत्तीच्या या वर्तनात माउली म्हणते की मला कशाचेच भान राहत नाही. कार्यकारणात्मक असलेल्या व्यावहारिक दृष्टिकोनातून सुसंगत वाटत नसलेली ही स्थिती प्रीतीच्या दृष्टीने मात्र सुसंगतच म्हणावी लागते, कारण प्रीति ही अद्वैतज्ञानावर अधिष्ठित व एकरसात्मक असल्याकारणाने द्वैतमूलक व्यावहारिक ज्ञानातील कार्यकारणात्मक सुसंगततेला प्रीतिकल्लोळात स्थान राहत नाही.

आतां गीतार्थाची मुक्तमुदी। ल्रवीं माझिये वाग्वृद्धी। जें माने हे सभासदीं। सज्जनांच्या॥ २७॥

अर्थ—आता मी केलेल्या गीतार्थाच्या शब्दविस्तारास, सज्जन समुदायात जेणे करून ते मान्य होईल अशी मोत्याची अंगठी घाला॥ २७॥

गूढार्थदीपिका—या अठराव्या अध्यायाचे विवेचन संपूर्ण गीतार्थाचे सार असल्यामुळे मोत्याच्या मुदीप्रमाणे सुंदर भाषेत थोडक्यांत व्यक्त होईल असे करा, असा भाव. (मोती अलक्ष्मीचा नाश करणारे व यश प्राप्त करून देणारे आहे असे त्याचे फल वराहपुराणांत सांगितले आहे.)

तेथ म्हणितलें श्रीनिवृत्ती। नको हें पुढतपुढती। परिसीं ल्रोहा घृष्टी किती। वेळवेळां कीजे गा॥ २८॥
तंव विनवी ज्ञानदेवो। म्हणे हो कां जी पसावो। तरी अवधान देतु देवो। ग्रंथा आतां॥ २९॥

अर्थ—तेव्हा श्रीनिवृत्तिनाथ महाराज म्हणाले, अशी वारंवार विनंती करण्याचे कारण नाही. परिसाने लोखंडाला किती वेळा घासावे लागते?॥ २८॥ तेव्हा श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणाले, जी महाराज! हे बोलणे तुमचा प्रसादच होय. आता, महाराज ग्रंथनिरूपणाकडे लक्ष देतील॥ २९॥

जी गीतारत्नप्रासादाचा। कळसु अर्थ चिंतामणीचा। सर्व गीतादर्शनाचा। पाढाऊ जो॥ ३०॥
ल्रोकीं तरी आथी ऐसें। जे दुरूनि कळसु दिसे। आणि भेटीचि हातवसे। देवतेची तिये॥ ३१॥
तैसेंचि एथही आहे। जे एकेंचि येणें अध्यायें। आघवाचि दृष्ट होये। गीतागमु हा॥ ३२॥
मी कळसु याचि कारणें। अठरावा अध्यायो म्हणें। उवाइल्रा बादरायणें। गीताप्रासादा॥ ३३॥
नोहे कळसापरतें कांहीं। प्रासादीं काम नाहीं। तें सांगतसे गीताही। संपलेपणें॥ ३४॥

अर्थ—या गीतारूपी रत्नाच्या राजवाड्याच्या मंदिरावरील कळसाप्रमाणे दुरून दिसणारा चिंतामणीसारखा हा जो सारभूत अर्थ आहे, तो सर्व गीतादर्शनाचा बोध करून देणारा वाटाड्याच होय॥ ३०॥ आणि लोकांमध्ये असा समजही रूढ आहे की देवाच्या मंदिराचा कळस दुरून दिसला असता देवालयातील देवतेची भेटच झाली असे होते॥ ३१॥ तसेच येथेही आहे, कारण ह्या एकाच अध्यायानें संपूर्ण गीताशास्त्र अवगत होते॥ ३२॥ म्हणूनच गीतामंदिराला या अठराव्या अध्यायाचा भगवान व्यासांनी कळस चढविला असे जे मी म्हणतो ते याच कारणाने की मंदिरावर एकदा कळस चढला म्हणजे मंदिराचे काम आता काही शिल्लक राहिलेले नाही असे जसे कळते, त्याचप्रमाणे या अठराव्या अध्यायाच्या रूपाने गीतारूपी मंदिराचे काम पूर्ण झाले असे कळते॥ ३३-३४॥

गूढार्थदीपिका—गीतेवर माउलींनी देवळाचे रूपक करून या अठराव्या अध्यायावर देवळाच्या कळसाचे रूपक केले आहे. कळसाचे दुरून दर्शन होताच भक्ताला देवळातील मूर्तीचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याचा जसा आनंद होतो, त्याचप्रमाणे या अठराव्या अध्यायाच्या अध्ययनाने संपूर्ण गीतेचे सार कळल्याचे सुख मिळते.

देवळावर कळस चढविल्यानंतर देवळाचे काम पूर्ण झाले, असे लोक समजतात, त्याचप्रमाणे गीतारूप मंदिराचा कळस असलेल्या या अठराव्या अध्यायामुळे गीतेत भगवंतांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाची परिसमाप्ति झाली आहे हे देवळाच्या रूपकाद्वारे श्रीमाउलींनी सूचित केले आहे.

सतराव्या अध्यायापर्यन्त सांगितलेल्या तत्त्वज्ञानात्त काही प्रश्नांच्या बाबतीत संदिग्धता किंवा अस्पष्टार्थता राहिली असेल तीही या अठराव्या अध्यायाच्या रूपाने भगवंतांनी काढून टाकून एकजिनसी तत्त्वज्ञान सांगितले हेही यातून ध्वनित केले आहे.

गीतेचे तत्त्वज्ञान एकरूप असून त्याचा विचार करताना तात्पर्यवृत्तीने गीतेचे तत्त्वज्ञान ग्रहण करायला पाहिजे, हे या ठिकाणी देवळाच्या रूपकाने दाखविले आहे.

कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग या त्रयींवर गीतेच्या तत्त्वज्ञानाची उभारणी करण्यात आली आहे व त्याचे विस्तृत वर्णन यथास्थान निरनिराळ्या अध्यायातून माउलींनी केलेही आहे. मात्र या तिघांच्याही मर्यादा कोठे सुरू होतात व कोठे संपतात हे सांगता येत नाही. हे तिन्हीही योग स्वतंत्र नसून ते एकमेकांना पूरक आहेत व शेवटी ते तिन्हीही प्रलयार्णवाप्रमाणे एकरूप होतात. त्यांच्यात भेद राहत नाही. या तीन स्वतंत्र विचारसरणी नसल्यामुळे एकाच वस्तूच्या तीन अंगाप्रमाणे या तिघांची स्थिती आहे. म्हणूनच एकजिनसी अशा तत्त्वज्ञानाचे देऊळ भगवंतांनी गीतेत अठराव्या अध्यायाच्या रूपाने उभारले आहे असे माउली म्हणते.

व्यासु सहजें सूत्री बळी। तेणें निगमरत्नाचळीं। उपनिषदर्थांची माळी। माजीं खांडिली॥ ३५ ॥
तेथ त्रिवर्गाचा अणुआरु। आडऊ निघाला जो अपारु। तो महाभारतप्राकारु। भोंवता केला॥ ३६ ॥
माजीं आत्मज्ञानाचें एकवट। दळवाडें झाडूनि चोखट। घडिलें पार्थवैकुंठ-। संवाद कुसरी॥ ३७ ॥
निवृत्तिसूत्र सोडवणिया। सर्व शास्त्रार्थ पुरवणिया। आवो साधिला मांडणिया। मोक्षरेखेचा॥ ३८ ॥
ऐसेनि करितां उभारा। पंधरा अध्यायांत पंधरा। भूमी निर्वाळलिया पुरा। प्रासादु जाहला॥ ३९ ॥
उपरि सोळावा अध्यावो। तो ग्रीवेघंटेचा आवो। सप्तदशु तोचि ठावो। पडघाणिये॥ ४० ॥
तयाहीवरी अष्टादशु। तो अपैसा मांडला कळसु। उपरि गीतादिकीं व्यासु। ध्वज लागला॥ ४१ ॥
म्हणोनि मागील जे अध्याय। ते चढते भूमीचे आय। तयांचे पुरें दाविताहे। आपुल्या आंगीं॥ ४२ ॥
जाल्या कामा नाहीं चोरी। ते कळसें होय उजरी। तेवीं अष्टादशु विवरी। साद्यंत गीता॥ ४३ ॥
ऐसा व्यासें विंदाणिये। गीताप्रासादु जोडणिये। आणूनि राखिले प्राणिये। नानापरी॥ ४४ ॥

अर्थ—व्यास हे मुळातच मोठे कारागीर होते. त्यांनी वेदरूप रत्नांच्या पर्वतावर उपनिषदरूपी माळजमिनीमध्ये खणती लावली॥ ३५ ॥ त्या खणण्यात धर्म, अर्थ व काम हा त्रिविध पुरुषार्थरूपी जो पुष्कळसा चाराचुरा व दगडधोंडा निघाला त्याचा त्या भोंवती त्यांनी महाभारतरूपी मोठा परकोट बांधला॥ ३६ ॥ खणतीत निघालेल्या आत्मज्ञानरूपी अखंड दगडाला साफसूफ करून त्याचा श्रीकृष्ण व अर्जुन यांचा संवादरूपी चांगला चिरा तयार केला॥ ३७ ॥ वैराग्यरूपी दोरी लावून आणि सर्व शास्त्रांच्या अर्थाची भर घालून त्या चिराच्या मांडणीने मोक्षाच्या स्वरूपाचा आकार साधला॥ ३८ ॥ अशा रीतीने बांधकाम चढता चढता पंधरा अध्यायापर्यन्त पंधरा थर पुरे होऊन (पंधरा अध्याय पूर्ण होऊन) गीतारूपी मंदीर पूर्ण झाले॥ ३९ ॥ वरती सोळावा अध्याय हा मंदिराच्या गळमण्याचा घाट असून सतरावा अध्याय जो आहे तोच कळसाची बैठक होय॥ ४० ॥ त्यावरही अठरावा अध्याय सहजच कळस मांडला असून वर गीतादी शास्त्रामुळे भगवान् व्यास ध्वज झालेत॥ ४१ ॥ म्हणून मागील अध्याय चढत्या कामाच्या स्वरूप-भूमिका दाखविणारे आहेत व हा अठरावा अध्याय त्या सर्वांची पूर्ती झाली हे दाखवित आहे॥ ४२ ॥ झालेल्या मंदिराच्या कामात काहीही त्रुटी राहिली नाही, हेच हा कळस बसविल्याने स्पष्ट होते. याप्रमाणे अठराव्या अध्यायाच्या विवरणाने गीता संपूर्ण झाली आहे॥ ४३ ॥ याप्रमाणे (महाज्ञानी) व्यासांनी मोठ्या कौशल्याने गीतारूपी मंदिराची जोडणी करून नाना प्रकारांनी प्राण्यांना संसारदु:खातून रक्षिले आहे॥ ४४ ॥

एक प्रदक्षिणा जपाचिया। बाहेरोनि करिती यया। एक ते श्रवणमिषें छाया। सेवितीययाची॥ ४५ ॥
एक ते अवधानाचा पुरा। विडापाऊड भीतरां। होऊनि रिघती गाभारां। अर्थज्ञानाच्या॥ ४६ ॥
ते निजबोधें उराउरी। भेटती आत्मया श्रीहरी। परी मोक्षप्रासादीं सरी। सर्वांही आथी॥ ४७ ॥

समर्थाचिये पंक्तिभोजनें। तळिल्या वरिल्या एक पक्वान्नें। तेवीं श्रवणें अर्थे पठणें। मोक्षुचि लाभे॥ ४८॥
ऐसा गीता वैष्णवप्रासादु। अठरावा अध्याय कळसु विशदु। म्यां म्हणितला हा भेदु। जाणोनियां॥ ४९॥

अर्थ—कोणी या गीतामंदिराला बाहेरूनच जपाच्या प्रदक्षिणा घालतात. कोणी गीतेचे श्रवण करण्याच्या निमित्ताने याच्या छायेखाली बसतात॥ ४५॥ कोणी एकाग्रतेचा विडा पैसा घेऊन अर्थज्ञानाच्या गाभाऱ्यात शिरतात व ते आत्मबोधाने आत्मरूपी श्रीहरीला तात्काळ भेटतात. परंतु मोक्षरूपी मंदिरात सर्वांची योग्यता सारखीच आहे॥ ४६-४७॥ श्रीमंताच्या पंक्तीस भोजनास बसले असता ब्राह्मणांना व शूद्रांना जसे एकच पक्वान्न वाढले जाते त्याप्रमाणे या गीतेच्या श्रवणाने, अर्थज्ञानाने व पठनाने एक मोक्षच प्राप्त होतो॥ ४८॥ याप्रमाणे गीता हे वैष्णवमंदिर व त्याचा अठरावा अध्याय हा स्पष्ट कळस आहे, असे जे मी म्हटले ते हा भेद जाणूनच म्हटले॥ ४९॥

गूढार्थदीपिका—गीतेच्या वाचकांचे निरनिराळे वर्ग पडतात. कोणी अर्थ न जाणता पठनच करतात, तर कोणी श्रवणच करतात. कोणी गीतेचा अर्थ समजून घेतात. माउलींनी या तिन्ही प्रकारच्या लोकांना मोक्षाचा लाभ होतो, असे म्हटले आहे.

अर्थ समजून घेऊन गीतेचे पठन करणाऱ्यांची वृत्ती अर्थानुरूप होत असल्याकारणाने गीतेच्या तत्वज्ञानानुसार त्यांना अनुभव किंवा साक्षात्कार होणें साहजिकच आहे. पण अर्थानुसंधान न ठेवता केवल श्रवण किंवा पठन करणाऱ्यांना मोक्षाचा लाभ कसा होतो, हा प्रश्न निर्माण होणे साहजिक आहे.

गीतेचे पठन करणारे असोत. श्रवण करणारे असोत किंवा अर्थानुसंधान ठेऊन पठन करणारे असोत, हे तिन्ही प्रकारचे लोक भगवद्गीतेचे श्रद्धाळु अंत:करणाने पठन, श्रवण किंवा अर्थानुरूप वाचन करणारे आहेत ही गोष्ट प्रथम आपल्याला लक्षात ठेवावी लागेल. मुळीच श्रद्धा नसताना यांपैकी काहीही करणाऱ्यांना मोक्षाचा लाभ होतो असे माउली म्हणत नाही. श्रद्धेने भगवद्गीतेचे पठन, श्रवण किंवा अर्थानुसंधान ठेऊन पठन करणाऱ्यांच्या ठिकाणी गीतेचा प्रत्येक शब्द हा साक्षात् भगवंताच्या मुखातून आलेला आहे ही अंत:करणात सारखी जाणीव राहत असल्यामुळे गीतेच्या प्रत्येक शब्दागणिक भगवंताविषयीचे प्रेम त्यांच्या ठिकाणी वाढत जाते. त्या वाढत्या प्रेमामुळेच भगवंताची सगुण मूर्ति त्यांच्या अंत:करणात स्थिरावत जाते. अर्थानुसंधान ठेऊन पठन करण्यामुळे जी ज्ञानाची प्राप्ती झाली असती, तीच प्राप्ती भगवंताविषयीच्या वाढत्या प्रेमामुळे होणार असल्यामुळे सश्रद्धा अंत:करणाने केवळ पठन किंवा श्रवण करणाऱ्यांनाही मोक्षाचा लाभ होतो हे माउलीचे म्हणणे यथार्थच म्हणावे लागेल. "श्रद्धावान् लभते ज्ञान" (गी० अ०४-३८) यातही भगवंतांनी श्रद्धेने ज्ञानाची प्राप्ती होते हे स्पष्टपणे सांगितलेच आहे.

वेद हे ज्याप्रमाणे भगवंतापासून निर्माण झालेत त्याप्रमाणे भगवद्गीता ही परब्रह्मस्वरूप असलेल्या सगुण साकार भगवंताच्या मुखातून निघाली असल्यामुळे जसे वेद अपौरुषेय आहेत तशीच गीताही अपौरुषेयच आहे. श्री गुलाबराव महाराजांनी गीतेला जागृत्श्रुति म्हटले आहे. वेदांतील प्रत्येक शब्दाला जसे मंत्रत्व आहे त्याचप्रमाणे गीताही मंत्ररूपच आहे. "आत्मा अवतरिते मंत्र" असे माउलींनीही गीतेविषयी पंधराव्या अध्यायांत म्हटले आहे. मंत्राचा अर्थ कळला न कळला तरी त्यांच्या उच्चाराने देखील ज्याप्रमाणे चित्तशुद्धी होते त्याप्रमाणेच भगवद्गीतेच्या पाठाने अर्थ न कळताही चित्त शुद्ध होऊन अंत:करण भगवदनुग्रहाला पात्र होते. त्यातून ज्ञानाचा उदय होऊन साधकाला मोक्षाचा लाभ होतो; असा भाव.

आतां सप्तदशापाठीं। अध्याय कैसेनि उठी। तो संबंधु सांगों दिठी। दिसे तैसा॥ ५०॥
कां गंगायमुनाउदक। वोघबगें वेगळिक। दावी होऊनि एक। पाणीपणें॥ ५१॥
न मोडतां दोन्ही आकार। घडिलें एक शरीर। हें अर्धनारीनटेश्वर। रूपीं दिसे॥ ५२॥
ना ना वाढिली दिवसें। कळा बिंबीं पैसे। परी सिनानें लेवे जैसें। चंद्रीं नाहीं॥ ५३॥
तैसीं सिनानीं चारीं पदें। श्लोक श्लोकावच्छेदें। अध्यावो अध्यायभेदें। गमे कीर॥ ५४॥
परी प्रमेयाची उजरी। आनान रूप न धरी। नाना रत्नमणीं दोरी। एकचि जैसी॥ ५५॥

मोतियें मिळोनि बहुवें। एकावळीचा पाडु आहे। परी शोभे रूप होये। एकचि तेथ॥ ५६॥
फुलां फुलसरां लेख चढे। द्रुतीं दुजी अंगुळी न पडे। श्लोक अध्याय तेणें पाडें। जाणावे हे॥ ५७॥
सात शतें श्लोक। अध्यायां अठरांचे लेख। परी देवो बोलिले एक। जें दुजें नाहीं॥ ५८॥
आणि म्यांही न सांडूनि ते सोये। ग्रंथ व्यक्ती केली आहे। प्रस्तुत तेणें निर्वाहें। निरूपण आइका॥ ५९॥

अर्थ—आता सतराव्या अध्यायानंतर या अध्यायाचा कसा प्रारंभ होतो तो मला कळला तसा सांगतो॥ ५०॥ ज्याप्रमाणे गंगेयमुनेचे पाणी ओघाचा संबंध लक्षात घेता भिन्न दिसते, पण पाणीपणाने ते एकच आहे॥ ५१॥ स्त्री पुरुषाचे दोन भिन्न आकार नाहीसे न होता ज्याप्रमाणे अर्धनारी नटेश्वराच्या ठिकाणी शरीर एक झाले॥ ५२॥ किंवा चंद्रबिंबाचे ठिकाणी दिवसेंदिवस कळा वाढली असे दिसते पण चंद्राचे ठिकाणी कळेची निराळी पुटे दिली जात नाहीत॥ ५३॥ त्याप्रमाणे प्रत्येक श्लोकाची चार निराळी पदे पडल्यामुळे श्लोकांना मर्यादा आली व श्लोकांच्या मर्यादेमुळे अध्याय वेगळे पडले, असा खरोखर भेद वाटतो॥ ५४॥ तरीपण ज्याप्रमाणे नाना रत्नात ओवलेला दोरा एकच असतो, त्याप्रमाणे (गीतेतही) सिद्धान्ताची स्पष्टता निरनिराळी नाही॥ ५५॥ पुष्कळशी मोत्ये (सुतात एके ठिकाणीं) मिळाली असता त्यांना एकसरी हार असा मान मिळतो, परंतु त्यांच्या योगाने शोभणारे रूप एकच असते॥ ५६॥ फुलावर फूल चढले असता फुलांची मंख्या वाढते, परंतु त्यांचा सुवास एकच असतो. सुवासाला एकापेक्षा जसे दुसरे बोट मोजावे लागत नाही, त्याप्रमाणे श्लोक व अध्याय यांची गणती जाणावी॥ ५७॥ श्लोकांची संख्या सातशे आहे व अध्याय अठरा आहेत; पण देवांनी मात्र एकच (तत्त्वज्ञान) सांगितले त्याहून दुसरे सांगितले नाही॥ ५८॥ आणि मीहि ती व्यवस्था न सोडता ग्रंथाचे निरूपण केले आहे. आता त्या घोरणानेच केलेले निरूपण ऐका॥ ५९॥

गूढार्थदीपिका—परी देव बोलिले एक। जें दुजें नाहीं

सर्व भगवद्गीतेतून भगवंताला एकच अर्थ सांगावयाचा आहे असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात. संपूर्ण गीता ही मोत्यांच्या सराप्रमाणे आहे. मोती निरनिराळे दिसत असले तरी संपूर्ण सर जसा एकच त्याप्रमाणे प्रश्नांचे पैलू अनेक दिसत असले तरी त्यांच्या उत्तरांचे तात्पर्य एकच आहे.

भारतीय तत्त्वज्ञानांत मोक्षप्राप्तीचा विचार करणाऱ्या निरनिराळ्या विचारसरणी आहेत, ज्यांना दर्शनशास्त्रे म्हणतात. त्या दर्शनग्रंथात वरवर मतभिन्नता किंवा विरोध दिसत असला तरी त्यांनी अधिकाऱ्यानुसार आपआपल्या दर्शनाची रचना केली असून शेवटीं त्यांच्या प्रतिपादनांचे पर्यवसान साक्षात् किंवा परंपरेने अद्वैत परब्रह्माचे प्रतिपादन करण्यांत आहे. ''सर्वेषां प्रस्थानकर्तृणां मुनीनां विवर्तवादपर्यवसानेनाद्वितीये परमेश्वरे एव प्रतिपाद्ये तात्पर्यम्'' असेच मधुसूदन सरस्वतींनी शिवमहिम्नस्तोत्रांवरील टीकेत सांगितले आहे. अठरावा अध्याय हा एकाध्यायी गीताच असल्यामुळे भगवंताच्या मुखांतून निघालेले एकरूप तत्त्वज्ञान (म्हणजे सर्व दुःख निवृत्ति व परमानंद प्राप्तिरूप उपाय) या अध्यायांत सांगितले आहे, असा अर्थ.

तरी सतरावा अध्यावो। पावतां पुरता ठावो। जें संपतां श्लोकीं देवो। बोलिले ऐसें॥ ६०॥
अर्जुना ब्रह्मनामाच्या विखीं। बुद्धि सांडूनि आस्तिकीं। कर्मे कीजती तितुकीं। असंतें होतीं॥ ६१॥
हा ऐकोनि देवाचा बोलु। अर्जुना आला डोलु। म्हणे कर्मनिष्ठां मळु। ठेविला देखों॥ ६२॥
तो अज्ञानांधु तंव बापुडा। ईश्वरुचि न देखे एवढा। तेथ नाम एक पुढां। कां सुझे तया॥ ६३॥
आणि रजतमें दोन्ही। गेलियावीण श्रद्धा सानी। ते कां लागे अभिधानीं। ब्रह्माचिये॥ ६४॥
मग कोता खेंव देणें। वार्तेवरील धांवणें। सांडीं पडे खेळवणें। नागिणीचें तें॥ ६५॥
तैसी कर्मे दुवाडें। तयां जन्मांतराची कडे। दुर्मेळावे येवढे। कर्मामाजीं॥ ६६॥
ना विपायें हें उजू होये। तरी ज्ञानाची योग्यता लाहे। एऱ्हवीं येणेंचि जाये। निरयालया॥ ६७॥

अर्थ—सतरावा अध्याय संपत असता शेवटच्या श्लोकात भगवान् असे म्हणाले॥ ६०॥ हे अर्जुना! परब्रह्माच्या

ॐ तत् सत् या नामाच्या ठिकाणी श्रद्धा न ठेवतां जी कर्मे केली जातात ती व्यर्थ होतात॥ ६१ ॥ हे भगवंताचे बोलणे ऐकून अर्जुन डोलू लागला आणि म्हणाला की शेवटी भगवंताने कर्मनिष्ठेच्या ठिकाणी दोष ठेवलाच, हे दिसून आले॥ ६२ ॥ जेथें अज्ञानाने अंध झालेल्या बापड्या मनुष्याला सर्व व्यापक असलेला एवढा मोठा भगवानच कळत नाही, तेथे त्याला त्याच्यापुढे असलेले एक नाम कसे कळणार॥ ६३ ॥ रजोगुण तमोगुण नाहीसे झाल्यावाचून असलेली अल्पशी श्रद्धा परब्रह्माच्या ॐ, तत्, सत् या नामाच्या ठिकाणी काय टिकून राहणार आहे?॥ ६४ ॥ मग शस्त्राला आलिंगन देणे, दोरीवर धावणे किंवा नागिणीला खेळवणे ह्या गोष्टी जशा घातक आहेत त्याप्रमाणे ब्रह्मनामाशिवाय केलेली कर्मे सदोष आहेत. कारण ती नाना जन्म प्राप्त करून देणारी असतात. असे या कर्मामध्ये वाईट गोष्टी प्राप्ति करून देण्याचे सामर्थ्य असते॥ ६५-६६ ॥ किंवा जर कदाचित् हीच कर्मे शास्त्रानुसार झाली तर त्यांच्या योगाने अंत:करणशुद्धिद्वारा ज्ञानाची योग्यता प्राप्त होते. नाहीतर याच कर्मांनी नरक प्राप्ति होते॥ ६७ ॥

कर्मीं हा ठायवरी। आहाती बहुवा अवसरी। आतां कर्मठां कैं ये वारी। मोक्षाची हे॥ ६८ ॥
तरी फिटो कर्माचा पांगु। कीजो अवघाचि त्यागु। आदरिजो अव्यंगु। संन्यासु तो॥ ६९ ॥
कर्मबाधेची कहीं। जेथ भयाची गोठी नाहीं। तें आत्मज्ञान जिहीं। स्वाधीन होय॥ ७० ॥
ज्ञानाचे आवाहनमंत्र। जें ज्ञानपिकतें सुक्षेत्र। ज्ञानआकर्षितें सूत्र-। तंतु जे का॥ ७१ ॥
ते दोनी संन्यास त्याग। अनुष्ठूनि सुटे जग। तरी हेंचि आतां चांग। व्यक्त पुसों॥ ७२ ॥
ऐसें म्हणोनि पार्थें। त्यागसंन्यास व्यवस्थे। रूप होआवया जेथें। प्रश्नु केला॥ ७३ ॥
तेथ प्रत्युत्तरें बोली। श्रीकृष्णें जे चावळिली। तया व्यक्ती जाली अष्टादशा॥ ७४ ॥

अर्थ—कर्मांमध्ये अशा प्रकारच्या पुष्कळ अडचणी आहेत, तेव्हा कर्मठाला मोक्षाची वारी केव्हा करता येणार?॥ ६८ ॥ कर्माची ताबेदारी नाहीशी व्हावी, संपूर्ण त्याग घडावा व व्यंगरहित संन्यासाचा आदर करावा॥ ६९ ॥ कधीही कर्माची बाधा होईल, अशी भयाची गोष्ट राहणार नाही, ते आत्मज्ञान ज्याच्या योगाने प्राप्त होते॥ ७० ॥ जे ज्ञानप्राप्तीचा मंत्रच होय. जे ज्ञानरूपी पीक देणारे उत्तम शेतच होय. किंवा ज्ञानाला आकर्षण करणारी दोरीच होय॥ ७१ ॥ ज्याचे आचरण केले असता जग मुक्त होते असे जे त्याग व संन्यास, त्यांचेच आता स्पष्ट स्वरूप चांगल्या रीतीने विचारू॥ ७२ ॥ असे अर्जुनाने मनात म्हणून त्याग व संन्यास या दोन्ही शब्दाची व्यवस्था समजून घेण्याकरितां येथे प्रश्न केला॥ ७३ ॥ तेव्हा त्याला उत्तर म्हणून श्रीकृष्णांनी जे बोलणे केले तोच अठरावा अध्याय झाला॥ ७४ ॥

एवं जन्यजनकभावें। अध्यावो अध्यायातें प्रसवे। आतां ऐका बरवें। पुसिलें जें॥ ७५ ॥
तरी पांडुकुमरें तेणें। देवाचें सरतें बोलणें। जाणोनि अंत:करणें। काणी घेतली॥ ७६ ॥
एऱ्हवीं तत्त्वविषयीं भला। तो निश्चितु असे कीर जाहला। परी देवो राहे उगला। तें साहावेना॥ ७७ ॥
वत्स धालयाही वरी। धेनु न वचावी दुरी। अनन्य प्रीतीची परी। ऐसीच आहे॥ ७८ ॥
तेणें काजेंवीणही बोलावें। तें देखिलें तरी पाहावें। भोगितां चाड दुणावे। पढियंतयाठायीं॥ ७९ ॥
ऐसी प्रेमाची हे जाती। आणि पार्थ तंव तेचि मूर्ती। म्हणूनि करूं लाहे खंती। उगेपणाची॥ ८० ॥

अर्थ—याप्रमाणे उत्पन्न होणारा व उत्पन्न करणारा या नात्याने मागच्या अध्यायाचे सूत्र पुढील अध्याय उत्पन्न करतो. आतां अर्जुनाने जे विचारले ते चांगले ऐका॥ ७५ ॥ तेव्हा पांडूचा मुलगा अर्जुन देवाचे बोलणे संपत आलेले पाहून मनात खिन्न झाला॥ ७६ ॥ येऱ्हवी पाहता, अद्वैतब्रह्म तत्त्वाविषयी तो पूर्ण नि:संशय झाला होता. परंतु आता देव पुढे बोलणार नाहीत, उगे राहतील, हे त्याला सहन होत नव्हते॥ ७७ ॥ दूध पिऊन वासरू पूर्ण तृप्त झाले तरी आपली माय आपल्यापासून दूर होऊ नये. असे त्याला वाटत असते. अनन्य प्रेमाचे लक्षण हेच आहे॥ ७८ ॥ प्रेमाच्या माणसाने काही कारण नसताही बोलावे, त्याला पाहिले तरी पुन: पुन: पाहावे. ज्याप्रमाणे प्रेमवस्तूचा भोग घेउनही तिचा पुन: पुन: भोग घ्यावा अशीच इच्छा त्या वस्तूचे प्रेम असणाऱ्या माणसाचे ठिकाणी वाटत असते॥ ७९ ॥ असा

प्रेमाचा स्वभावच आहे. आणि अर्जुन तर प्रेमाची मूर्तिच होता. म्हणूनच भगवंत उगे राहतील या भगवंताच्या उगेपणाची त्याला खंती वाटत होती॥ ८०॥

आणि संवादाचेनि मिषें। जें अव्यवहारी वस्तु असे। तेचि भोगिजे कीं जैसें। आरिसां रूप॥ ८१॥
मग संवादु तोही पारुखे। तरी भोगितां भोगणें थोके। हें कां साहावेल सुखें। लांचावलेया॥ ८२॥
यालागीं त्याग संन्यास। पुसावयाचें घेऊनि मिस। मग उपलविले दुस। गीतेचें तें॥ ८३॥
अठरावा अध्याय नोहे। हे एकाध्यायी गीताचि आहे। जैं वत्सचि धेनू दुहे। तैं वेळु कायसा॥ ८४॥
तैसी संपतां अवसरीं। गीता आदरविली माघारीं। स्वामी भृत्याचा न करी। संवादु काई॥ ८५॥
परी हें असो ऐसें। अर्जुनें पुसिजत असे। म्हणे विनंती विश्वेशें। अवधारिजो॥ ८६॥

अर्थ—येऱ्हवी न पाहता येण्याजोगे आपले मुख जसे आरशाच्या साहाय्याने पाहता येते, त्याप्रमाणे कोणत्याही व्यवहाराचा विषय न होणारे आपले परब्रह्मस्वरूप संवादांच्या मिषाने अनुभविता येते॥ ८१॥ मग संवादही, बंद पडून वस्तूचे स्वरूप भोगत असता भोगणेही थांबेल, अशी स्थिती केवळ सुखरूप होऊन राहण्याला जो लांचावला त्याला संवाद सोडून भगवंताचे उगे राहणे कसे सहन होईल॥ ८२॥ म्हणूनच त्याग व संन्यास यांची लक्षणे काय हे विचारण्याचे निमित्त करून गीतेचे वस्त्र उकलविले॥ ८३॥ हा गीतेचा अठरावा अध्याय नसून एकाध्यायी गीताच आहे. जर गायीचे वासरू गायीचे दोहन करू लागले तर गायीला पान्हा सुटायला काय वेळ लागणार?॥ ८४॥ त्याप्रमाणे संवादरूप गीता संपत आली असली तरी तिचा पुन: सेवकाने मोठ्या आदराने संवाद सुरू केला असता स्वामी आपल्या सेवकाशी संवाद करणार नाही काय?॥ ८५॥ पण हे असो. अर्जुन असा विचार करीत, म्हणाला की हे भगवंता! विश्वेशा, माझी विनंती आहे. इकडे लक्ष द्या॥ ८६॥

अर्जुन उवाच

सन्न्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम्। त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन॥ १॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, हे पराक्रमी कृष्णा! हे हृषीकेशा! हे केशिराक्षसाचा वध करणाऱ्या भगवंता! संन्यासाचे तत्त्व काय व त्यागाचे तत्त्व काय अलग अलग मी जाणू इच्छितो॥ १॥

हां जी संन्यासु आणि त्यागु। इयां दोहीं एक अर्थीं लागु। जैसा संघातु आणि संघु। संघातेंचि बोलिजे॥ ८७॥
तैसेचि त्यागें आणि संन्यासें। त्यागुचि बोलिजत असे। आमचेनि तंव मानसें। जाणिजे हेंचि॥ ८८॥
ना कांही आथी अर्थभेदु। तो देव करोतु विशदु। तेथ म्हणती श्रीमुकुंदु। भिन्नचि पै॥ ८९॥
तरी अर्जुना तुझ्या मनीं। त्याग संन्यास दोनी। एकार्थ गमले हें मानीं। मी ही साच॥ ९०॥
इहीं दोहीं कीर शब्दी। त्यागुचि बोलिजे त्रिशुद्धी। परी कारण एथ भेदीं। येतुलेंचि॥ ९१॥

अर्थ—हे भगवंता! संन्यास आणि त्याग हे दोन्ही शब्द एकाच अर्थी वाटतात. ज्याप्रमाणे संघात आणि संघ या दोन्ही शब्दांचा 'संघात' असा एकच अर्थ होतो, त्याप्रमाणे त्याग आणि संन्यास यांचाही त्याग हाच अर्थ आहे. असेच आमच्या मनाला वाटते॥ ८७-८८॥ किंवा दोन्ही शब्दांच्या अर्थात काही फरक असल्यास तो देवच स्पष्ट करतील. तेव्हा, भगवान श्रीकृष्ण म्हणाले, अर्जुना! या दोन्ही शब्दांचा अर्थ भिन्नच आहे॥ ८९॥ तरी अर्जुना! त्याग आणि संन्यास हे दोन्ही शब्द एकार्थीच तूं समजलास हे तुझे म्हणणे खरे आहे, असे मीही मानतो॥ ९०॥ या दोन्ही शब्दांनी निश्चयाने खरोखर त्यागच बोलला जातो, हे त्रिवार सत्य आहे. पण दोघांच्या अर्थात भेद आहे, त्याचे एवढेच कारण आहे॥ ९१॥

जें निपटूनि कर्म सांडिजे। तें सांडणें संन्यासु म्हणिजे। आणि फलमात्र कां त्यजिजे। तो त्यागु गा॥ ९२॥
तरी कोणा कर्माचें फळ। सांडिजे कोण कर्म केवळ। हेंही सांगों विवळ। चित्त दे॥ ९३॥
तरी आपैसीं दांगीं डोंगर। झाडें लागती अपार। तैसें लांबे राजागर। नुठिती ते॥ ९४॥
न पेरितां सैंघ तृणें। उठती तैसें साळीचें होणें। नाहीं गा राबाउणें। जियापरी॥ ९५॥

कां अंग जाहलें सहजें। परी लेणें उद्यमें कीजे। नदी आपैसी आपादिजे। विहिरी जेवीं॥ ९६ ॥
तैसें नित्य नैमित्तिक। कर्म होय स्वाभाविक। परी न कामितां कामिक। न निफजे॥ ९७॥

अर्थ—कर्माचा विधिपूर्वक त्याग करून पुन: ते कधीच न करणे या कर्मत्यागाला संन्यास म्हणतात. कर्माने प्राप्त होणाऱ्या फळाची मुळीच इच्छा न करता केवळ कर्म करणे याला त्याग म्हणतात॥ ९२ ॥ अर्जुना! तरी कोणत्या कर्माच्या फळाचा त्याग करावयाचा व कोणते कर्म सोडून द्यावयाचे हे स्पष्ट करून सांगतो, ऐक॥ ९३ ॥ ज्याप्रमाणे डोंगरावर व अरण्यात आपोआप पुष्कळशी झाडे झुडपे उत्पन्न होतात; पण बागा व भाताची शेते तशी आपोआप उगवत नाहीत॥ ९४॥ पेरल्यावाचून गवत जसे सर्वत्र उगवते तशी भाताची शेते, मेहनत केल्याशिवाय उगवत नाहीत॥ ९५ ॥ किंवा शरीर सहज प्राप्त होते, पण अलंकार प्रयत्नाने घडवावे लागतात. नदी आपोआप अस्तित्वात येते पण विहीर प्रयत्न केल्यावांचून तयार होत नाही॥ ९६ ॥ त्याप्रमाणें विहित अशी नित्यनैमित्तिक कर्मे प्रकृति स्वभावानुसार प्राप्त आहेत. पण काम्यकर्मे, त्यांच्यापासून प्राप्त होणाऱ्या फळाची इच्छा केल्याशिवाय, घडून येत नाहीत॥ ९७ ॥

श्रीभगवानुवाच

काम्यानां कर्मणां न्यासं सन्न्यासं कवयो विदु:। सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणा:॥ २॥

अर्थ—शाहाणे लोक काम्य कर्माचा त्याग करणे याला संन्यास म्हणतात व सर्व कर्मांच्या फळांचा त्याग करणे याला त्याग म्हणतात॥ २॥

का कामनेचेनि दळवाडें। जें उभरावया घडे। अश्वमेधादिक फुडे। याग जेथ॥ ९८॥
वापी कूप आराम। अग्रहारें हन महाग्राम। आणीकही नानासंभ्रम। व्रतांचे ते॥ ९९॥
ऐसें इष्टापूर्त सकळ। जया कामना एक मूळ। जें केलें भोगवी फळ। बांधोनियां॥ १००॥
देहाचिया गांवा आलिया। जन्ममृत्यूचिया सोहळया। ना म्हणों नये धनंजया। जियापरी॥ १०१॥
का ललाटींचें लिहिलें। न मोडे गा कांही केलें। काळेगोरेपण धुतलें। फिटों नेणे॥ १०२॥
केलें काम्य कर्म तैसें। फळ भोगावया धरणें बैसे। न फेडितां ऋण जैसें। वोसंडीना॥ १०३॥
का कामनाही न करितां। अवसांत घडे पांडुसुता। तरी वायकांडें न झुंझतां। लागे जैसें॥ १०४॥
गूळ नेणतां तोंडीं। घातला देचि गोडी। आगी मानूनि राखोंडी। चेपिला पोळी॥ १०५॥
कामकर्मीं हें एक। सामर्थ्य आथी स्वाभाविक। म्हणोनि नको कौतुक। मुमुक्षू एथ॥ १०६॥

अर्थ—जे अश्वमेधादिक यागासारखे कर्म केवळ कामाचा विस्तार करण्याकरितांच केले जाते॥ ९८॥ लोकाकरिता रस्त्यावर पायऱ्याची विहीर करणे, विहीर खोदणे, बगीचा लावणे, मोठमोठी गावे इनाम देणे, आणखी नाना प्रकारच्या व्रतांची खटपट करणे॥ ९९ ॥ सर्व कामनेला जी मूळ आहेत अशी केवळ इष्ट व पूर्त कर्मे केली असता कर्ता फळाने बांधला जाऊन ते फळ त्याला भोगावे लागते॥ १०० ॥ अर्जुना! ज्याप्रमाणे देह प्राप्त झाला असता, मी जन्ममृत्यूचा अंगीकार करीत नाही, असे म्हणता येत नाही॥ १०१ ॥ किंवा कपाळाची अक्षरे काही केले तरी पुसली जात नाहीत. अथवा शरीराचे काळेगोरेपण धुतल्यानेही बदलत नाही॥ १०२॥ कर्जाऊ आणलेले पैसे परत दिल्याशिवाय जसा पाठी लागलेला तगादा सुटत नाही, त्याप्रमाणे केलेले काम्यकर्म कर्त्याला कर्माचे फळ भोगविण्याकरिता त्याचे ठिकाणी धरणे धरून बसते॥ १०३ ॥ युद्धाला सज्ज न होता (लटुपटूचे) युद्ध करणाऱ्याला जसे बोथट तरी बाण सहन करावे लागतात, त्याप्रमाणें कामना न करता अकस्मात् कामनिक कर्म घडले तरी त्या कर्माचे फल भोगावे लागते॥ १०४॥ हा गूळ आहे, हे न जाणता तोंडात घातला तरी तो आपली गोडी देतोच. आगीच्या निखाऱ्यावर राखोंडी समजून, पाय दिला तर पाय पोळतोच॥ १०५ ॥ काम्य कर्माचे ठिकाणी असे हे एक स्वाभाविक सामर्थ्य आहे, म्हणून मुमुक्षूने कौतुकाने उगेच देखील काम्यकर्म करू नये॥ १०६ ॥

किंबहुना पार्था ऐसें। जें काम्यकर्म गा असे। तें त्यजिजे विष जैसें। वोकूनियां॥ १०७॥

मग तया त्यागातें जगीं। संन्यासु ऐसिया भंगीं। बोलिजे अंतरंगीं। सर्वद्रष्टा॥ १०८॥
हें काम्यकर्म सांडणें। तें कामनेतेंचि उपडणें। द्रव्यत्यागें दवडणें। भय जैसें॥ १०९॥

अर्थ—फार काय सांगू अर्जुना! असे जे हे काम्यकर्म आहे, ते विषाप्रमाणे ओकून टाकून द्यावे॥ १०७॥ मग अशा काम्यकर्माच्या त्यागाला लोकांमध्ये संन्यास हे नाव देतात असे सर्वदृष्टे भगवान म्हणतात.॥ १०८॥ द्रव्याचा त्याग केला की त्याचे भय नाहीसे होते, त्याप्रमाणे काम्यकर्माचा त्याग करणे म्हणजे अंत:करणातून कामनाच नाहीशी करणे होय.॥ १०९॥

आणि सोमसूर्यग्रहणें। येऊनि करविती पार्वणें। कां मातापितरमरणें। अंकित जे दिवस॥ ११०॥
अथवा अतिथी हन पावे। हे ऐसैसें पडे जें करावें। तें तें कर्म जाणावें। नैमित्तिक गा॥ १११॥
वार्षिया क्षोभे गगन। वसंतें दुणावे वन। देहा शृंगारी यौवन-। दशा जैसी॥ ११२॥
का सोमकांतु सोमें पघळे। सूर्ये फांकती कमळें। एथ असे तेंचि पाल्हाळे। आन नये॥ ११३॥
तैसें नित्य जें का कर्म। तेंचि निमित्ताचे लाहे नियम। एथ उंचावे तेणें नाम। नैमित्तिक होय॥ ११४॥

अर्थ—आणि मातापितरांच्या उद्देशाने पार्वणे करावयास लावणारी जी चंद्रसूर्यादि ग्रहणे किंवा माता पिता मरण पावले असता त्या दिवशी किंवा प्रत्येक वर्ष, मास, तिथि या दिवशी जे श्राद्ध करावयाचे असते अथवा अनायासे अतिथि आला असता त्याचा सत्कार करावयाचा असतो इत्यादि जी कर्मे ती नैमित्तिक कर्मे होत, असे समज॥ ११०-१११॥ ज्याप्रमाणे वर्षाऋतूत ढगांच्या येण्याजाण्याने व त्यांच्या आवाजाने आकाश क्षुब्ध होते. वसंतऋतूत झाडांना नवी कोवळी पाने फुटून अरण्याची शोभा अधिक वाढते. यौवनदशा देहाला शोभा आणते॥ ११२॥ किंवा चंद्राच्या योगाने सोमकांतमणी पाझरतो अथवा सूर्य प्रकाशाने सूर्यकमले विकसित होतात. या सर्व ठिकाणी असलेले गुणच प्रगट होतात. दुसरे बाहेरून काही येत नाही॥ ११३॥ त्याप्रमाणे जे कर्म नित्य करायचे असते, तेच पण निमित्ताने केले जाते. त्यायोगाने त्याला नैमीत्तिक असे मोठे नाव प्राप्त होते॥ ११४॥

आणि सायंप्रातर्मध्यान्हीं। जें कां करणीय प्रतिदिनीं। परी दृष्टि जैसी लोचनीं। अधिक नोहे॥ ११५॥
कां नापादितां गती। चरणीं जैसी आथी। नातरी ते दीप्ती। दीपबिंबीं॥ ११६॥
वास नेदितां जैसें। चंदनीं सौरभ्य असे। अधिकाराचें तैसें। रूपचि जें॥ ११७॥
नित्य कर्म ऐसें जनीं। पार्था बोलिजे तें मानीं। एवं नित्य नैमित्तिक दोन्हीं। दाविलीं तुज॥ ११८॥

अर्थ—आणि जे कर्म दररोज सकाळ-दुपार-संध्याकाळ करायचे असते, परंतु ज्याप्रमाणे डोळ्याचे ठिकाणी दृष्टि कमी अधिक होत नाही. सारखीच राहते॥ ११५॥ किंवा पायात असलेली गति जशी संपादन केलेली नसून ती मूळचीच त्याचे ठिकाणी असते. किंवा बिंबरूप दीपाचे ठिकाणी जसे तेज स्वाभाविक असते॥ ११६॥ सुवास, न लावता तो चंदनाचे ठिकाणी मूळचाच असतो, त्याप्रमाणे जे कर्म ब्राह्मणादिकांच्या अधिकाराचे स्वरूपच होय॥ ११७॥ अर्जुना त्या कर्माला लोकात नित्यकर्म म्हणतात, असे जाण. याप्रमाणे नित्यनैमित्तक अशा दोन्ही कर्मांची तुला ओळख करून दिली॥ ११८॥

हेंचि नित्यनैमित्तिक। अनुष्ठेय आवश्यक। म्हणोनि म्हणों पाहती एक। वांझययातें॥ ११९॥
परी भोजनीं जैसें होये। तृप्ति लाभे भूक जाये। तैसें नित्य नैमित्तिकीं आहे। सर्वांगीं फळ॥ १२०॥
कीड आगिठां पडे। तरी मळु तुटे वानी चढे। यया कर्मा तया सांगडें। फळ जाणावें॥ १२१॥
जे प्रत्यवाय तंव गळे। स्वाधिकार बहुवें उजळे। तेथ हातोफळिया मिळे। सद्गतीसी॥ १२२॥
येवढेवरी ढिसाळ। नित्यनैमित्तिकीं आहे फळ। परी तें त्यजिजे मूळ। नक्षत्रीं जैसें॥ १२३॥
लता पिके आघवी। तंव च्यूत बांधे पालवी। मग हात न लावित माधवीं। सोडूनि घाली॥ १२४॥
तैसी नोलांडितां कर्म रेखा। चित्त दीजे नित्यनैमित्तिका। पाठीं फळा कीजे अशेखा। वांतिचिये वानी॥ १२५॥
यया कर्मफळत्यागातें। त्यागु म्हणती पैं जाणते। एवं त्याग संन्यास तूतें। परिसविले॥ १२६॥

अर्थ—या नित्यनैमित्तिक कर्माचे अवश्य अनुष्ठान केले पाहिजे असे शास्त्र म्हणते; म्हणून कित्येक लोक नित्य-नैमित्तिक कर्मांना वांझ म्हणजे त्याचे काही फळच होत नाही असे समजतात॥ ११९ ॥ पण भोजन करणे या कर्माचे ठिकाणी भूक नाहीशी करून सुख देण्याचे जसे सामर्थ्य आहे, असेच नित्यनैमित्तिक कर्माचे ठिकाणीं सर्वांगाने फळ देण्याचे सामर्थ्य आहे॥ १२० ॥ हीणकट सोने अग्नीमध्ये पडले असता त्यात मिश्रित असलेला इतर धातूचा मळ निघून जातो व सोन्याचा शुद्ध कस वाढतो. त्या प्रमाणे नित्यनैमित्तिक कर्माचे फळ आहे, असे जाणावे॥ १२१ ॥ कारण नित्य-नैमित्तिक कर्म केल्याने जो प्रत्यवाय (म्हणजे निषिद्ध कर्म घडून होणारे पाप) होतो ते पाप नित्यनैमित्तिक कर्म केल्याने नाहीसे होते आणि ब्राह्मणादि अधिकार वाढत जातो. असे झाले असता मृत्युनंतर तात्काळ सद्‌गति प्राप्त होते॥ १२२ ॥ एवढे या नित्यनैमित्तिक कर्माचे ढोबळ फळ आहे. परंतु ज्याप्रमाणे नक्षत्रात मूळ नक्षत्राचा सर्वथा त्याग करतात त्याप्रमाणे नित्यनैमित्मिक कर्माच्या फळाचा त्याग करून ते कर्म केले पाहिजे॥ १२३ ॥ वसंतऋतु आला असता सर्व बेली पानांनी भरून जातात. त्यावेळी आंब्याच्या झाडाला नवी कोवळी पाने व फळे येतात. इतके होऊनही मग वनश्री त्या पानांचा व फळांचा भोग न घेता त्यांना सोडून जाते॥ १२४॥ कर्माची मर्यादा यत्किंचितही उल्लंघिली जाणार नाही असे सावध असून नित्यनैमित्तिक कर्माकडे चित्त द्यावे व त्या कर्माच्या फळाविषयीं मात्र ओकारीप्रमाणे किळसवाणे मन असावे॥ १२५ ॥ अशा या कर्मफळाच्या त्यागाला, जाणते लोक त्याग म्हणतात. याप्रमाणे त्याग व संन्यास यांची लक्षणे तुला ऐकविली॥ १२६ ॥

हा संन्यासु जैं संभवे। तैं काम्य बाधूं न पावे। निषिद्ध तंव स्वभावें। निषेधें गेलें॥ १२७ ॥
आणि नित्यादिक जें असे। तें येणें फळत्यागें नासे। शिर लोटलिया जैसें। येर आंग॥ १२८ ॥
मग सस्य फळपाकांत। तैसें निमालिया कर्मजात। आत्मज्ञान गिंवसित। आपैसें ये॥ १२९ ॥
ऐसिया निगुती दोनी। त्याग संन्यास अनुष्ठानीं। पडले गा आत्मज्ञानीं। बांधती पाट॥ १३० ॥
नातरी हे निगुती चुके। मग त्यागु कीजे हाततुकें। तैं कांहीं न त्यजे अधिकें। गोवींचि पडे॥ १३१ ॥
जें औषध व्याधी अनोळख। तें घेतलिया परतें विख। का अन्न न मानितां भूक। न मारी काय॥ १३२ ॥
म्हणोनि त्याज्य जें नोहे। तेथ त्यागातें न सुवावें। त्याज्यालागीं नोहावें। लोभपर॥ १३३ ॥
चुकलिया त्यागाचें वोझें। केला सर्वत्यागही होय वोझें। निषिद्धें त्या सर्वत्र जुंझे। वीतराग ते॥ १३४ ॥

अर्थ—असा हा संन्यास साधला असता (म्हणजे संन्यासाचे आचरण केले असता काम्यकर्म बाधक होत नाही व शास्त्राने करू नये म्हणून सांगितलेल्या निषिद्ध कर्माचा तर निषिद्ध म्हणून त्यागच केला जातो॥ १२७॥ आणि ज्याप्रमाणे शीर कापून पडल्याबरोबर सर्व शरीरच लोटले जाते त्याप्रमाणे नित्यादिक कर्मे, त्यांच्या फळांचा त्याग केला असता आपोआप निरर्थक होतात॥ १२८ ॥ ज्याप्रमाणे धान्याला बीजरूप फळ प्राप्त झाल्यानंतर ते (गवत) नाश पावते त्याप्रमाणे सर्व कर्मे नाहीशी झाल्यानंतर (म्हणजे काम्यकर्म सोडून देऊन नित्यनैमित्तिक कर्माच्या फळांचा त्याग केल्यानंतर) आत्मज्ञान आपोआप त्या पुरुषाचा शोध करीत येते॥ १२९ ॥ या रीतीने त्याग व संन्यास या दोघांचे व्यवस्थित अनुष्ठान केले असता ते आत्मज्ञानापर्यंत चित्ताच्या प्रवाहाचा पाट बांधतात॥ १३० ॥ किंवा असे या त्याग व संन्यास यांचे अनुष्ठान सावधान चित्ताने लक्षपूर्वक न घडल्यास मग जो अंदाजाने त्याग केला जातो तसे करण्यात कशाचाच त्याग होत नाहीं, उलट मनुष्य त्यात अधिक गोवला जातो॥ १३१ ॥ घेतले जाणारे औषध, त्या रोगावर उपयुक्त आहे किंवा नाही हे माहित नसता, घेतले तर जसे ते विषच होते किंवा भूक आहे किंवा नाही याचा विचार न करता अन्न सेवन केले असता ते मारणार नाही काय?॥ १३२ ॥ म्हणून ज्याचा त्याग करण्याची आवश्यकता नाही त्याचा त्याग करू नये आणि ज्याचा त्याग करायला पाहिजे त्याच्या अनुष्ठानाचा लोभ धरू नये॥ १३३ ॥ कर्माचे अनुष्ठान करताना त्यागाचे वर्म चुकले असता सर्व अनुष्ठित त्यागच ओझ्यासारखा व्यर्थ दु:खदायक होतो. तशा निषिद्ध कर्माशी विरक्त पुरुष सर्वत्र झुंज देतात म्हणजे विरक्त पुरुष तसे आचरण कधीच करीत नाहीत॥ १३४॥

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः। यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे॥ ३॥

अर्थ—काही विचारी लोक कर्म दोषयुक्त असल्यामुळे त्याच्या त्याग करावा असे म्हणतात, तर काही विचारी लोक यज्ञ, दान, तप या कर्मांचा त्याग करू नये असे म्हणतात. ॥ ३ ॥

एकां फलत्याग न ठाके। ते कर्मातें म्हणती बंधकें। जैसें आपण नग्न भांडकें। जगातें म्हणे॥ १३५॥
का जिव्हालंपट रोगिया। अन्नें दूषी धनंजया। आगां न रुसे कोढिया। मासियां कोपे॥ १३६॥
तैसें फळकाम दुर्बळ। म्हणती कर्मचि किडाळ। मग निर्णयो देती केवळ। त्यजावें ऐसा॥ १३७॥

अर्थ—ज्या प्रमाणे आपणच नंगे भांडखोर असताना दुसऱ्यास भांडखोर म्हणतात त्या प्रमाणे कित्येकांना कर्माच्या फलाचा त्याग करणे साधत नाहीं म्हणून ते, कर्मच करू नये, त्याचा त्यागच करावा असे प्रतिपादन करतात॥ १३५ ॥ किंवा अर्जुना! वाटेल ते खावेसे वाटणारा रोगी जसे ते खाता येत नाही म्हणून अन्नाची निंदा करतो किंवा ज्याप्रमाणे कुष्ठरोगी कुष्ठ झालेल्या शरीरावर न रागावता तेथे बसणाऱ्या माश्यांवर रागावतो॥ १३६ ॥ त्याप्रमाणे कर्माच्या फलाची इच्छा ज्याच्यांने सोडवत नाही ते कर्मच वाईट आहे असे म्हणतात व मग कर्माचा त्यागच करावा असा निर्णय देतात॥ १३७ ॥

एक म्हणती यागादिक। करावेचि आवश्यक। जे यावांचूनि शोधक। आन नसे॥ १३८॥
मनशुद्धीच्या मार्गीं। जैं विजयी व्हावें वेगीं। तैं कर्म सबळालागीं। आळसु न कीजे॥ १३९॥
भांगार आथी शोधावें। तरी आगी जेवीं नुबगावें। कां आरिसयालागीं सांचावें। अधिक रज॥ १४०॥
ना ना वस्त्रैं चोखें होआवीं। ऐसें आथी जरी जीवीं। तरी संवदणी न मानावी। मलिन जैसी॥ १४१॥
तैसीं कर्मे क्लेशकारें। म्हणोनि न न्यावीं अव्हेरें। कां अन्न लाभे अरुवारें। रांधितिये उणें॥ १४२॥
इहीं इहीं गा शब्दीं। एक कर्मी बांधती बुद्धी। ऐसा त्यागु विसंवादीं। पडोनि ठेला॥ १४३॥
तरी विसंवादु तो फिटे। त्यागाचा निश्चयो भेटे। तैसें बोलों गोमटें। अवधान देईं॥ १४४॥

अर्थ—कोणी म्हणतात, यागादिकांवाचून अंत:करणाची शुद्धि करणारे दुसरे काहीच नाही, म्हणून ते अवश्य केलेच पाहिजेत॥ १३८ ॥ जर लवकर चित्ताची पूर्ण शुद्धि करून विजयी व्हावयाचे असेल तर चित्तशुद्धि करण्याच्या कामी समर्थ असलेली यागादिक कर्मे करण्यास आळस करू नये॥ १३९ ॥ सोने शुद्ध करावयाचे असेल तर त्याला अग्नीत घालण्याची उपेक्षा करता कामा नये किंवा आरसा स्वच्छ करावयाचा असल्यास त्याकरिता स्वच्छ करणाऱ्या पदार्थाचे पुष्कळसे रजोकण संग्रही ठेवावयास पाहिजे॥ १४० ॥ किंवा वापरण्याची वस्त्रे स्वच्छ असावी असे मनात वाटत असेल तर परीटाच्या कपडे धुण्याच्या भांड्यास घाणेरडे म्हणण्यात हाशील नाही॥ १४१ ॥ त्याप्रमाणे कर्माचे अनुष्ठान क्लेशदायक असते म्हणून त्यांचा अव्हेर करू नये. अन्न जर चांगले शिजविले गेले नाही तर नरम, मृदू अशा अन्नाचा लाभ कसा होणार ?॥ १४२ ॥ अशा अशा शब्दांनी कोणी कर्माचे ठिकाणी बुद्धीला बांधून ठेवतात म्हणजे कर्म केले पाहिजे असा निश्चय बुद्धीत धरून ठेवतात. अशा रीतीने त्यागाविषयी विवाद उत्पन्न झाला आहे॥ १४३ ॥ म्हणून, अर्जुना! त्यागाविषयी विवाद राहणार नाही व त्यागाचे निश्चित स्वरूप हाती लागेल असे सुंदर निरूपण करतो. लक्ष दे॥ १४४॥

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम। त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः सम्प्रकीर्तितः॥ ४॥

अर्थ—हे भरत कुलातील श्रेष्ठ पुरुषा अर्जुना! त्या त्यागाविषयी मी आपला निश्चय सांगतो, ऐक. हे शूर पुरुषा! त्यागही तीन प्रकारचा सांगितला आहे॥ ४॥

तरी त्याग एथें पांडवा। त्रिविध पैं जाणावा। तया त्रिविधाही बरवा। विभाग सांगों॥ १४५॥
त्यागाचे तिन्हीं प्रकार। कीजती जरी गोचर। तरी तूं इत्यर्थाचें सार। इतुलें जाण॥ १४६॥
मज सर्वज्ञाचिये बुद्धी। जें आलोट माने त्रिशुद्धी। निश्चयतत्त्व तें आधीं। अवधारीं पां॥ १४७॥
तरी आपुलीये सोडवणे। जो मुमुक्षु जागों म्हणे। तया सर्वस्वें करणें। हेंचि एक॥ १४८॥

अर्थ—तरी अर्जुना! येथे त्यागही तीन प्रकारचा सांगितला आहे, असे जाण. त्या तिन्हीही प्रकारच्या त्यागाचा

चांगला विभाग करून सांगतो॥ १४५॥ त्यागांचे तीनही प्रकार जरी समजले तरी त्या विवरणाचा सारभूत अर्थ इतकाच आहे की॥ १४६॥ माझ्या सारख्या सर्वज्ञाच्या बुद्धीस जे केलेच पाहिजे-म्हणजे जे सोडता येत नाही-असे जे वाटते ते अगोदर ऐक॥ १४७॥ ज्या मुमुक्षुला आपण या संसारबंधनापासून सोडवून घेण्यास नेहमी जागरूक व्हावे असे वाटत असेल त्याने सर्वतोपरी हीच एक गोष्ट केली पाहिजे॥ १४८॥

यज्ञदानतपः कर्म न त्याज्यं कार्यमेव तत्। यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्॥ ५॥

अर्थ—यज्ञ, दान, तप ही कर्मे टाकून देऊ नयेत. ती केलीच पाहिजेत. कारण यज्ञदानतपादि कर्मे करीत असताना कर्मांनी प्राप्त होणाऱ्या फलांची यत्किंचितही इच्छा न करणाऱ्या विचारी माणसांच्या चित्ताची, ती कर्मे, शुद्धि करतात॥ ५॥

जियें यज्ञदानतपादिकें। इयें कर्में आवश्यकें। तियें न सांडावीं पांथिकें। पाउलें जैसीं॥ १४९॥
हरपले न देखिजे। तंव तयाचा मागु न सांडिजे। कां तृप्त न होता न लोटिजे। भाणें जेवीं॥ १५०॥
नाव थडी न पवतां। न सांडिजे केळी न फळतां। कां ठेविलें न दिसतां। दीप जैसा॥ १५१॥
तैसी आत्मज्ञानविखीं। जंव निश्चिती नाहीं निकी। तंव नोहावें यागादिकीं। उदासीन॥ १५२॥

अर्थ—प्रवाशाला मुक्काम गाठेपर्यंत जसे चालणें सोडतां येत नाही, त्याप्रमाणे मुमुक्षुनेही यज्ञदानतपादि कर्मे सोडू नयेत. ती कर्मे करणे आवश्यक आहे॥ १४९॥ ज्याप्रमाणे हारवलेली वस्तू, सांपडत नाही, तोपर्यंत तिचा शोध करणे सोडता येत नाही. किंवा तृप्ती होत नाही तोपर्यंत समोरील अन्नाचे ताट दूर करता येत नाही॥ १५०॥ नदीच्या तीराला नाव लागत नाही तोपर्यंत तिचा आश्रय सोडता येत नाही. किंवा केळीच्या झाडाला फळाचा घड येत नाही तोपर्यंत त्याला काढून टाकता येत नाही. किंवा ठेवलेली वस्तू दिसत नाही तोपर्यंत दिवा सोडता येत नाही॥ १५१॥ त्याप्रमाणे आत्मज्ञानाविषयी जोपर्यंत दृढ निश्चय झाला नाही तोपर्यंत यागादिक कर्मे करण्याविषयी उदासीन राहू नये॥ १५२॥

तरी स्वाधिकारानुरूपें। तियें यज्ञदानें तपें। अनुष्ठावींचि साक्षेपें। अधिकेंवर॥ १५३॥
जें चालणें वेगावत जाये। तो वेगु बैसावयाचि होये। तैसा कर्मातिशयो आहे। नैष्कर्म्यालागीं॥ १५४॥
अधिकें जंव जंव औषधी। सेवायाचि मांडी बांधी। तंव तंव मुकिजे व्याधी। तयाचिये॥ १५५॥
तैसीं कर्में हातोपातीं। जैं कीजती यथानिगुती। तैं रजतमें झडती। झाडा देऊनी॥ १५६॥
का पाठोवाटीं पुटें। भांगारा खार देणें घटे। तैं कीड झडकरी तुटे। निर्व्याज होय॥ १५७॥
तैसें निष्ठा केलें कर्म। तें झाडी करूनि रजतम। सत्त्वशुद्धीचें धाम। डोळां दावी॥ १५८॥
म्हणोनियां धनंजया। सत्त्वशुद्धी गिंवसि तया। तीर्थांचिया सावाया। आलीं कर्में॥ १५९॥
तीर्थें बाह्यमळ क्षाळे। कर्में अभ्यंतर उजळे। एवं तीर्थें जाण निर्मळें। सत्कर्मेंचि॥ १६०॥

अर्थ—म्हणून आपल्या अधिकारानुसार जी यज्ञदानतपादिक कर्मे आपल्याला करण्यास योग्य असतील ती अधिक अगत्येने करावी॥ १५३॥ चालण्याचा वेग वाढविला असता जसा तो वेग ठिकाणाला प्राप्त करून देऊन (बसण्याकरितां म्हणजे) विश्रांती घेण्याकरिताच असतो, त्याप्रमाणे यज्ञदानतपे ही कर्मे करण्याची निकड वाढविणे, हे कर्मरहित (नैष्कर्म्य) होण्याकरिताच उपयोगी पडते॥ १५४॥ औषधि घेण्याचा निश्चय जितका दृढ होतो तितका तो व्याधीपासून मुक्त करतो॥ १५५॥ त्याप्रमाणे ही यज्ञदानतपादि कर्मे जेव्हा यथायोग्य वारंवार केली जातात तेव्हा रज तम हे दोन गुण झाडून नाहीसे होतात॥ १५६॥ किंवा सोन्याला एकामागून एक अशी पुटे दिली असता त्याचा हीणकटपणा नाहीसा होऊन ते सोने अत्यंत शुद्ध होते॥ १५७॥ त्याप्रमाणे निष्ठेने झालेले कर्म अंतःकरणातून रजोगुण तमोगुण नाहीसे करून अंतःकरणाला शुद्ध सात्विकगुणाचे घर स्पष्ट दाखविते॥ १५८॥ म्हणून, अर्जुना! अंतःकरणाची शुद्धी त्याचा शोध करीत येते. अशा रीतीने यज्ञ-दान-तप ही कर्मे तीर्थक्षेत्राप्रमाणे चित्तशुद्धीला साह्यभूत आहेत॥ १५९॥ तीर्थे शरीराचे ठिकाणी असलेले बाह्य पापरूप मल नाहीसे करतात; पण कर्मे अंतःकरणातील मल नाहीसे करून चित्त शुद्ध करतात. या प्रमाणे कर्मे हीच शुद्ध तीर्थे आहेत॥ १६०॥

तृषार्ता मरुदेशीं। झळे अमृतें वोळली जैसी। कीं अंधालागीं डोळ्यांसीं। सूर्य आला॥ १६१॥
बुडतया नदीच धाविन्निली। पडतया पृथ्वीच कळवळिली। निमतया मृत्यूनें दिधली। आयुष्यवृद्धी॥ १६२॥
तैसें कर्मे कर्मबद्धता। मुमुक्षु सोडविले पांडुसुता। जैसा रसरीती मरतां। राखिला विषें॥ १६३॥
तैसीं एके हातवटिया। कर्मे कीजती धनंजया। बंधकेंचि सोडवावया। मुख्यें होती॥ १६४॥
आतां हेचि हातवटी। तुज सांगों गोमटी। जया कर्माते किरीटी। कर्मचि रुसे॥ १६५॥

अर्थ—ज्याप्रमाणे, पाणी मिळणे दुर्मिळ अशा मारवाड देशात तृषेने पीडित झालेल्याला उन्हाचे चटके लागत असता, अमृताने येऊन वर्षाव केला किंवा आंधळ्या डोळयाचे ठिकाणी प्रकाशरूप सूर्य आला॥ १६१॥ नदीत बुडणाऱ्या मनुष्याला वाचविण्याकरिता नदीच साहाय्य करण्याकरिता धावून आली. पडणाऱ्याचा पृथ्वीलाच कळवळा आला. मृत्यूनेच मरणाऱ्याचे आयुष्य वाढविले॥ १६२॥ त्याप्रमाणे अर्जुना! कर्मानेच मुमुक्षू कर्मबंधनापासून सोडविले जातात. ज्याप्रमाणे विषाला रसरूप करण्याच्या पद्धतीने बनविले तर ते मरणाऱ्यालाही वाचविते॥ १६३॥ त्याप्रमाणे धनंजया! एका विवक्षित रीतीने कर्म केले असता ते कर्म बंधन करणारे असले तरी बंधनापासून सोडविण्यास मुख्य साधन होते॥ १६४॥ आता ज्या हातवटीने कर्म केले असता कर्मच कर्मबंधापासून सोडविते ती उत्तम हातवटी, अर्जुना! तुला सांगतो॥ १६५॥

एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च। कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम्॥ ६॥

अर्थ—अर्जुना! ही कर्मे सुद्धा कर्तृत्वाभिमान व फळाची आशा सोडून देऊनच केली पाहिजेत असे माझे निश्चित उत्तम मत होय॥ ६॥

तरी महायाग प्रमुखें। कर्मे निफजतांही अचुकें। कर्तेपणाचें न ठाके। फुंजणें आंगीं॥ १६६॥
जो मोलें तीर्था जाये। तया मी यात्रा करित आहें। ऐसीये श्लाघ्यतेचा नोहे। तोष जीवीं॥ १६७॥
का मुद्रा समर्थाचिया। जो एकवटु झोंबे राया। तो मी जिणता ऐसिया। नयेची गर्वा॥ १६८॥
जो कांसे लागोनि तरे। तया पोहती उर्मी नुरे। पुरोहितु नाविष्करे। दातेपणें॥ १६९॥
तैसें कर्तृत्व अहंकारें। नेघोनि यथा अवसरें। कृत्यजातांचे मोहरे। सारीजती॥ १७०॥

अर्थ—ज्यात महायागादिक प्रमुख आहेत अशी यज्ञादी कर्मे यथासांग उपजवीत असताना यत्किंचित् देखील कर्तृत्वाभिमान जो मनात स्फुरू देत नाही॥ १६६॥ जो दुसऱ्याच्या पैशाने यात्रा करतो तो, मी यात्रा करीत आहे अशी बढाई मिरवित नाही व त्याचा त्याला मोठेपणा वाटत नाही, म्हणून त्याला आनंदही होत नाही॥ १६७॥ किंवा अर्जुना! समर्थ पुरुषाने आपल्या सहीशिक्यानिशी दिलेल्या पदाच्या मोठेपणाच्या भरवश्यावर जो सर्व सैन्य एकत्रित करून राजाशी झुंज देतो. पण तो जिंकला तरी, मी जिंकलो, असा जसा जिंकण्याचा अभिमान तो वागवित नाही॥ १६८॥ जो दुसऱ्याच्या आधाराने नदी तरून जातो त्याच्या अंत:करणात मी नदी तरून आलो. अशी कधी उर्मी राहत नाही. किंवा पुरोहित यजमानाला दानाचा मंत्र सांगतो म्हणून मी दान करणारा असा अभिमान धरीत नाहीं॥ १६९॥ त्याप्रमाणे कर्तृत्वाचा यत्किंचित्ही अभिमान न वागविता ज्यावेळी जे जे कर्म करायचे म्हणून समोर येईल ते ते कर्म करतो॥ १७०॥

आणि केल्या कर्मी पांडवा। जो आथी फळाचा यावा। तया मोहरा हों नेदावा। मनोरथ॥ १७१॥
आधींचि फळीं आस तुटिया। कर्में आरंभावीं धनंजया। परावें बाळ धाया। पाहिजे जैसें॥ १७२॥
पिंपरुवांचिया आशा। न शिंपिजे पिंपळ जैसा। तैसिया फळनिराशा। कीजती कर्मे॥ १७३॥
सांडूनि दुधाची टकळी। गोंवारी गांवधेनु वेंटाळी। किंबहुना कर्मफळीं। तैसें कीजे॥ १७४॥
ऐसी हे हातवटी। घेऊनि जे क्रिया उठी। आपुलिया आपण गांठी। लाहेचि तो॥ १७५॥
म्हणोनि फळीं लागु। सांडोनी देहसंगु। कर्मे करावीं हा चांगु। निरोपु माझा॥ १७६॥
जो जीव बंधें शिणला। सुटके जाचे आपला। तेणें पुढतपुढतीं या बोला। आन न कीजे॥ १७७॥

अर्थ—पण अर्जुना! या केलेल्या कर्माने जे फळ प्राप्त होते म्हणून शास्त्रांनी सांगितले असेल ते प्राप्त व्हावे अशी मनांत यत्किंचितही इच्छा असू नये॥ १७१॥ ज्या प्रमाणे दाई प्रेमभावाने परक्याच्या मुलाचा सांभाळ करते, त्याप्रमाणे अर्जुना! कर्म करण्यापूर्वीच त्या कर्मापासून प्राप्त होणाऱ्या फळाची आशा नि:शेष सोडून कर्माला आरंभ करावा॥ १७२॥ ज्याप्रमाणे पिंपळाच्या फळाच्या आशेने पिंपळाला कोणी पाणी घालून वाढवित नाही, त्याप्रमाणे कर्मांच्या फलाची इच्छा सोडून देऊन कर्मे करावी॥ १७३॥ फार काय सांगावे! ज्याप्रमाणे दुधाच्या प्राप्तीचा यत्किंचितही ध्यास मनात न ठेविता गायी राखणारा गावांतील गायी गोळा करतो, त्याप्रमाणे कर्म करतेवेळी, कर्मफळाच्या ठिकाणी "मला या कर्माचे फळ प्राप्त व्हावे" अशी यत्किंचितही आशा नसावी॥ १७४॥ अशा प्रकारची कर्म करण्याची हातोटी साधून जे कर्म केले जाते त्या कर्माची त्या कर्माशीच गांठ बांधली जाते म्हणजे ते कर्म बंधनकारक होत नाही, असा अर्थ॥ १७५॥ म्हणून कर्मफळाच्या ठिकाणी यत्किंचितही आसक्ती न धरता व कर्तृत्वाभिमान सोडून देऊन कर्म करावे हे माझे निश्चित सांगणे आहे॥ १७६॥ जो जीवरूपी बंधनाने त्रस्त झाला असेल व ज्याला त्यातून मुक्त होण्याची सारखी रुखरुख लागली असेल, त्याने या मझ्या म्हणण्याहून दुसरे निराळे काही करू नये, असे माझे वारंवार सांगणे आहे॥ १७७॥

नियतस्य तु सन्न्यासः कर्मणो नोपपद्यते। मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः॥ ७॥

अर्थ—या शास्त्रविहित नित्यनैमित्तिक कर्मांचा संन्यास (म्हणजे त्याग) सर्वस्वी करता येत नाही (सांगितलेल्या मार्गाने) विचार न करता केला जाणारा कर्माचा त्याग अविचारपूर्वक होत असल्यामुळे तो तामस त्याग म्हटला जातो॥ ७॥

नातरी आंधाराचेनि रोखें। जैसीं डोळां रोंविजती नखें। तैसा कर्मद्वेषें अशेखें। कर्मेंचि सांडी॥ १७८॥
तयाचें जे कर्म सांडणें। तें तामस पैं मी म्हणें। शिसाराचें रागें लावणें। शिसचि जैसें॥ १७९॥
हां गा मार्ग दुवाड होये। तरी निस्तरितील पाये। कीं तेचि खांडणें आहे। मार्गापराधें॥ १८०॥
भुकेलियापुढें अन्न। हो का भलतैसें उन्ह। तरी बुद्धी न घेतां लंघन। भाणें पापरां हाल्या॥ १८१॥
तैसा कर्माचा बाध कर्में। निस्तरिजे करितेनि वर्में। हें तामस नेणे भ्रमें। माजविला॥ १८२॥
कीं स्वभावें आलें विभागा। तें कर्मेंचि वोसंडी पैं गा। परी झणें आतला त्यागा। तामसा तया॥ १८३॥

अर्थ—ज्या प्रमाणे काळ्याकुट्ट आंधारावर सूड उगविण्याकरिता डोळ्यात बोट घालून डोळे फोडून घेऊन अंध व्हावे त्याप्रमाणे कर्माच्या द्वेषामुळे जो नि:शेष कर्माचा त्याग करतो॥ १७८॥ ज्याप्रमाणे अर्धशीशीच्या दु:खाच्या रागाने कपाळच कापावे, त्याप्रमाणे त्याचा संपूर्ण कर्मांचा त्याग तामस असतो, असे मी म्हणतो॥ १७९॥ हे अर्जुना! मार्ग वाईट असला तरी, पायच तो कसा तरी चालून जातील. मार्गाच्या दोषामुळे पायच तोडायचे असतात काय?॥ १८०॥ अत्यंत भुकेल्यापुढे ठेवलेले ताटभर अन्न अत्यंत उन्ह असले तरी थोडा बुद्धीने विचार करून ते घेतले नाही व रागाने लाथाडले तर तो (भुकेला) उपाशीच राहील॥ १८१॥ याप्रमाणे कर्म करूनही कर्म बंधनकारक होणार नाही अशी जी कर्म करण्याची मार्मिक हातोटी ती अज्ञानभ्रमाने माजलेला तामसपुरुष जाणत नसतो॥ १८२॥ जे कर्म प्रकृति-स्वभावानुसार आपल्या वाटेला आले त्या कर्माचा जो त्याग करतो त्याचा तो त्याग तामसत्यागात पडतो. अर्जुना! अशा तामसत्यागाचा तू स्पर्श होऊ देऊ नकोस॥ १८३॥

दु:खमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत्। स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत्॥ ८॥

अर्थ—शरीराच्या दु:खाच्या भयाने कर्म हे दु:खदायक आहे, असे वाटून कर्माचा त्याग करणे, याला राजस त्याग म्हणतात. या राजसत्यागाने खऱ्या सात्विकत्यागाचे फल मिळत नाही॥ ८॥

अथवा स्वाधिकार बुझे। आपलें विहितही सुझे। परी करितया उभजे। निबरपणा॥ १८४॥
जे कर्माची ऐली कड। नावेक होय दुवाड। जे वाहतिये वेळे जड। शिदोरी जैसी॥ १८५॥
जैसा निंब जिभे कडवटु। हिरडा पहिलें तुरटु। तैसा कर्मा ऐल शेवटु। खणुवाळा होय॥ १८६॥

कां गाई दुवाड शिंग। शेंवतीये अडव आंग। भोजनसुख महाग। पाक करितां॥ १८७॥
तैसें पुढतपुढती कर्म। आरंभींच अति विषम। म्हणोनि तो तें श्रम। करितां मानी॥ १८८॥
एऱ्हवीं विहितत्त्वें मांडी। परी घालितां असुरवाडीं। तेथ पोळला ऐसा सांडीं। आदरिलेंही॥ १८९॥
म्हणे वस्तु देहासारिखी। आली बहुती भाग्यविशेखीं। मा जाचूं कां कर्मादिकीं। पापिया जैसा॥ १९०॥
केले कर्मी जें द्यावें। तें झणें मज होआवें। आजि भोगूं ना कां बरवे। हातींचे भोग॥ १९१।

अर्थ—अथवा नित्य विहित कर्म हे आपला ब्राह्मण्यादि अधिकार कायम ठेवणारे आहे, हे तो जाणतो. आणि ते आपणाला विहितच आहे असेही जाणतो. परंतु कर्म करण्याकडे मन वळतच नाहीं किंवा ते कर्म करावेसे वाटतच नाही॥ १८४॥ ज्याप्रमाणे शिदोरी वाटेने घेऊन जाताना जड वाटते, त्याप्रमाणे कर्म, करते वेळी शरीराला (प्रारंभी) क्षणभर दुःखदायक वाटते॥ १८५॥ ज्याप्रमाणे रोग निवारण करण्याकरिता घेतलेला निंब प्रथम कडू वाटतो. तसेच हिरडा प्रथम तुरट वाटतो, त्याप्रमाणे कर्माची सुरुवातच फक्त प्रथम कठीण वाटते॥ १८६॥ गायीचे शिंगच भीतिदायक असते. कांटेरी शेवंतीचा आडवा भाग काट्यामुळे प्रथमतः तापदायक होतो. भोजनाने सुख होते, पण त्याकरिता कराव्या लागणाऱ्या स्वयंपाकाचा त्रास सहन करावा लागतो॥ १८७॥ त्याप्रमाणे नित्यनैमित्तिक कर्मे वारंवार करताना आरंभीच त्रासदायक वाटतात; म्हणून मनुष्याला ती कर्मे करण्याचे श्रम वाटतात॥ १८८॥ नाही तरी हा राजस त्यागकर्ता नित्यनैमित्तिक कर्मे शास्त्रांनी सांगितली आहेत असे प्रतिपादन करतोच; पण ते कर्म करीत असता क्लेश झाले की मध्येच अग्नीने पोळल्याप्रमाणे सोडून देतो॥ १८९॥ राजसत्यागकर्ता मनात म्हणतो मोठ्या भाग्याने हा मनुष्य देह प्राप्त झाला असताना पापभोग भोगणाऱ्या दुर्दैवी मनुष्याप्रमाणे कर्मादिक करण्याचे कष्ट या देहाला देऊन त्या देहाचा छळ कां करू?॥ १९०॥ केलेल्या कर्माचे फळ पुढे ते कदाचित् मला मिळणारही नाही, मग आजच जे भोग प्राप्त झाले आहेत ते भोगून घेणे बरे नाही काय?॥ १९१॥

ऐसा शरीराचिया क्लेशा-। भेणें कर्मे वीरेशा। सांडी तो परियेसा। राजसु त्यागु॥ १९२॥
एऱ्हवीं तेथही कर्म सांडे। परी त्यागफळ न जोडे। जैसें उतलें आगीं पडे। तें नलगेचि होमा॥ १९३॥
का बुडोनि प्राण गेले। ते अर्धोदकीं निमाले। हें म्हणों नये जाहलें। दुर्मरणचि॥ १९४॥

अर्थ—याप्रमाणे कर्म करताना शरीराला होणाऱ्या क्लेशाच्या भीतीने कर्म सोडून देणे याला, वीरश्रेष्ठा अर्जुना! राजसत्याग म्हणतात.॥ १९२॥ तापावयास मांडलेल्या, पण उतू गेलेल्या दुधाचा होम झाला असे ज्याप्रमाणे समजले जात नाही, त्याप्रमाणे तेथेही वास्तविक पाहतां (कर्माच्या राजस त्यागात) कर्म सुटले जाते. पण त्याला सात्विक त्यागाचे फळ मिळत नाही॥ १९३॥ किंवा देहाच्या अर्ध्या इतक्या गंगेच्या पाण्यात अकस्मात् बुडणाऱ्यांना अर्धोदकी मेले असे म्हणता येत नाही. त्याचे ते दुर्मरणच होय॥ १९४॥

गूढार्थदीपिका—अर्धोदके तु जान्हव्यां म्रियतेऽनशनेन यः। स याति न पुनर्जन्म ब्रह्मसायुज्यमेति च॥

(अग्निपुराण)

आधले दिवशी उपोषण करून दुसरे दिवशी देहाच्या अर्ध्याभागापर्यंत खोल असलेल्या गंगेच्या पाण्यात, ब्रह्मपद प्राप्त व्हावे या भावनेने, जो प्राणोत्क्रमण करतो, त्याला पुनर्जन्म प्राप्त होत नाही व सायुज्यतामुक्ति मिळते, असे अग्निपुराणात वचन आहे. अर्थात् अर्धोदकात मरणारे, समाधानाने, ब्रह्मप्राप्तीच्या भावनेने मेले पाहिजेत असे वरील वचनात सांगितले असल्यामुळे व बुडून मरणाऱ्याच्या ठिकाणी त्या भावना राहत नसल्यामुळे त्यांचे ते मरण माउलींनी दुर्मरणच ठरविले आहे.

तैसें देहाचेनि लोभें। जेणें कर्मा पाणी सुभे। तेणें साच न लभे। त्यागाचें फळ॥ १९५॥
किंबहुना आपुलें। जैं ज्ञान होय उदया आलें। तैं नक्षत्रातें पाहलें। गिळीं जैसें॥ १९६॥
तैशा सकारण क्रिया। हारपती धनंजया। तो कर्मत्यागु ये जया। मोक्षफळासी॥ १९७॥
तें मोक्षफळ अज्ञाना। त्यागिया नाहीं अर्जुना। म्हणोनि तो त्यागु न माना। राजसु तो॥ १९८॥

श्रीमाउलींनी दोघांना पक्षी व नर अशा दोन उपमा देऊन नर ज्याप्रमाणे 'हळु हळु ढाळे ढाळे। केउतेनि एके वेळे। तया मार्गाचेनि बळें। निश्चित ठाके "(ज्ञा ३-४२) एका खांदीवरून दुसऱ्या खांदीवर जात जातच निश्चित फळाला प्राप्त होतो, त्याप्रमाणे कर्मयोग निष्ठा आचरणारा पुरुष" विहितेचि निजाचारे। पूर्णता अवसरे। पावते होती" काही काळाने पूर्णावस्थेला पोहोचतो असे सांगितले.

जोपर्यंत आपल्या ठिकाणी असलेली विषयसुखाची वासना नाहीशी होत नाही तोपर्यंत आपणाला प्रयत्न हा करावा लागणारच. विषयावाचून मन सदा संतुष्ट राहू लागले की प्रयत्न करण्याचे आपोआप थांबते.

नित्यनैमित्तिक कर्मे केवळ कर्तव्य म्हणून व भगवंतांची आज्ञापालन म्हणून केली असता कर्तृत्वाभिमान व फळाकांक्षा राहण्यास जागा राहत नाही. अशा रीतीने कर्म करूनही कर्माचा त्याग अनायासेच घडतो. यालाच "सात्विक त्याग" असे म्हणतात हा सात्विक त्यागच नैष्कर्म्य स्थिति प्राप्त करून देण्याला कारणीभूत आहे.

नैष्कर्म्य म्हणजे आपण मूळचे कर्मरहित केवळ सच्चिदानंद स्वरूप आहोत असे जाणणे होय. कर्माच्या सात्विक त्यागाच्या अनुष्ठानाने भगवंतांनी निर्माण केलेल्या धर्मानुसार वागण्याचा इंद्रियांना अभ्यास लागून चित्त परमेश्वराचे ठिकाणी स्थिर होत जाते. व परमेश्वराच्या कृपेने तो कर्मयोगी आत्मज्ञान प्राप्त होऊन कर्म व कर्तृत्व याहून आपल्याला पूर्णत: अलग समजतो. त्यामुळे त्याच्या ठिकाणी खरी प्रवृत्तिनिवृत्तिरहित साक्षीदशा किंवा समता बाणली जाते. म्हणूनच माउली अशा या सात्विकत्यागाला मोक्षरूपी मोठे फळ येते असे म्हणते.

आतां जाळुनि बीज जैसें। झाडा कीजे निर्वंशें। फळ त्यागूनि कर्म तैसें। त्यजिलें जेणें॥ २०८॥
तया लागतखेंवो परिसीं। धातूची गंधिकाळिक जैसी। जाती रजतमें तैसीं। तुटलीं दोन्ही॥ २०९॥
मग सत्त्वें चोखाळे। उघडती आत्मबोधाचे डोळे। तेथ मृगांबु सांजवेळे। होय जैसें॥ २१०॥
तैसा बुद्ध्यादिकांपुढां। असतु विश्वाभास हा येवढा। तो न देखे कवणीकडां। आकाश जैसें॥ २११॥

अर्थ—आता ज्याप्रमाणे बीजच जाळले तर झाडाचा निर्वंश होतो त्याप्रमाणे ज्याने कर्माच्या फळाचा त्याग करून कर्माचा त्याग केला॥ २०८॥ ज्याप्रमाणे परिसाचा लोखंडाला स्पर्श झाल्याबरोबर लोखंडाचा जंग व काळेपणा नाहीसा होतो त्याप्रमाणे सात्विकत्याग साधला तर रज तम हे दोन्ही गुण नाहीसे होतात॥ २०९॥ ज्याप्रमाणे सायंकाळी मृगजळ निरास पावते त्याप्रमाणे मग शुद्ध अशा सात्विकत्यागाने आत्मबोधाचे डोळे उघडतात (म्हणजे आत्मबोध अंत:करणात रुजेल अशी भूमिका प्राप्त होते). व आकाशाला मेघ केव्हा आले व केव्हा नाहीसे झाले याची वार्ताही नसते त्याप्रमाणे तो सात्विकत्यागी बुद्धी, मन, प्राण इत्यादिकांपुढे भासणारा एवढा मोठा जगताचा भास कोठेही पाहत नाही. (याप्रमाणे आत्मबोधामुळे अनात्मपदार्थाचा निरास होतो)॥ २१०-२११॥

न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते। त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशय:॥ १०॥

अर्थ—जो अशुभ कर्माचा द्वेष करीत नाही व शुभकर्मात आसक्त होऊन राहत नाही तोच त्यागशील, सत्त्वगुण युक्त, बुद्धिमान् व नि:शंक (पुरुष) होय॥ १०॥

म्हणोनि प्राचीनाचेनि बळें। आलीं कृत्ये कुशलाकुशलें। तियें व्योमाआंगी आभाळें। जिरालीं जैसीं॥ २१२॥
तैसीं तयाचिये दिठी। कर्मे चोखाळलीं किरीटी। म्हणोनि सुखदु:खीं उठी। पडे ना तो॥ २१३॥
तेणें शुभकर्म जाणावें। मग तें हर्षें करावें। का अशुभालागीं होआवें। द्वेषिया ना॥ २१४॥
तरी इया विषयींचा कांहीं। तया एकुही संदेहो नाहीं। जैसा स्वप्नाच्या ठायीं। जागिन्नलिया॥ २१५॥
म्हणऊनि कर्म आणि कर्ता। या द्वैतभावाची वार्ता। नेणे तो पांडुसुता। सात्त्विक त्यागु॥ २१६॥
ऐसेनि कर्मे पार्था। त्यजिलीं त्यजिती सर्वथा। अधिकें बांधती अन्यथा। सांडिलीं तरी॥ २१७॥

अर्थ—आणि प्रारब्धाच्या योगाने जी शुभ किंवा अशुभ कर्मे प्राप्त झाली ती त्याच्या दृष्टीने सात्विकत्यागामुळे शुद्ध झाली असल्याकारणाने ज्याप्रमाणे आकाशात अभ्रे नाहीशी व्हावी त्याप्रमाणे शुभकर्माने मिळालेल्या सुखाने तो उल्हास पावत नाही किंवा अशुभ कर्माने मिळालेल्या दु:खाने गलित होत नाही॥ २१२-२१३॥ त्याने शुभ कर्माची

ओळख करून घेऊन ते आनंदाने करावे किंवा अशुभ कर्माचा द्वेष करावा असे त्याच्याकडून घडत नाही॥ २१४॥ ज्याप्रमाणे स्वप्नातील घडलेला दृश्य पसारा जाग आल्यावर मिथ्या वाटतो त्याप्रमाणे शुभाशुभ कर्मापासून प्राप्त होणारे सुखदु:ख मिथ्या आहेत, याबद्दल त्याला काहीच संशय नसतो.॥ २१५॥ म्हणून अर्जुना! हे कर्म व मी करणारा कर्ता या द्वैतभावाची गोष्टही तो जाणत नाही. हा सात्विक त्याग होय॥ २१६॥ अर्जुना! अशा प्रकारे (द्वैतरहित होऊन) कर्मे केली गेली असता ती खरोखर सोडली जातात. त्या व्यतिरिक्त अन्य प्रकाराने सोडलेली कर्मे अधिकच बंधनात पाडतात॥ २१७॥

न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः। यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते॥ ११॥

अर्थ—शरीरधारी जीवाला सर्व कर्मे संपूर्णत: टाकून देणे शक्य नाही; परंतु जो कर्माच्या फलाचा त्याग करतो, तो खरा त्यागी होय॥ ११॥

आणि हां गा सव्यसाची। मूर्ति लाहोनि देहाची। खंती करिती कर्माची। ते गांवढे गा॥ २१८॥
मृत्तिकेचा वीटु। घेऊनि काय करील घटु। केउता तंतू पटु। सांडील तो॥ २१९॥
तेवींचि वन्हित्व आंगी। आणि उबे उबगणें आगी। कीं तो दीपु प्रभेलागीं। द्वेष करील काई॥ २२०॥
हिंगु त्रासिला घाणी। तरी कैचें सुगंधत्व आणी। द्रवपण सांडूनि पाणी। कें राहे तें॥ २२१॥
तैसा शरीराचेनि आभासें। नांदतु जंव असे। तंव कर्मत्यागाचें पिसे। काइसें तरी॥ २२२॥
आपण लाविजे टिळा। म्हणोनि पुसों ये वेळोवेळा। मा घाली फेडी निडळा। कां करूं ये गा॥ २२३॥
तैसें विहित स्वयें आदरिलें। म्हणोनि त्यजूं ये त्यजिलें। परी कर्मचि देह आतलें। तें कां सांडील गा॥ २२४॥
जें श्वासोच्छ्वासवरी। होत निजेलियाही वरी। कांही न करणेंचि परी। होती जयाची॥ २२५॥
या शरीराचेनि मिसकें। कर्मचि लागलें असिकें। जिता मेलया न ठाके। इया रीती॥ २२६॥
यया कर्मातें सांडिती परी। एकीचि ते अवधारीं। जे करितां न जाइजे हारी। फळाशेचिये॥ २२७॥

अर्थ—आणि हे पाहा, अर्जुना! देह धारण करून जे कर्माचा तिटकारा करतात ते गांवढळ होत॥ २१८॥ मातीचा तिटकारा करून घट काय करील? वस्त्राला तंतूचा कसा त्याग करता येईल?॥ २१९॥ त्याचप्रमाणे उष्णता हेच ज्याचे स्वरूप आहे असा अग्नि आपल्या उष्णतेला त्रासेल काय? किंवा दिवा आपल्या प्रकाशाचा द्वेष करील काय?॥ २२०॥ हिंग आपल्या वासाला कंटाळला तरी तो आपले ठिकाणी सुगंधत्व कोठून आणील? पाणी आपला पातळपणा टाकून कोठे राहील?॥ २२१॥ त्याप्रमाणे शरीराच्यारूपाने जोपर्यंत (जीवंत) आहे तोपर्यंत कर्मत्यागाचा वेडेपणा तरी कसा करता येईल?॥ २२२॥ अर्जुना! कपाळाला आपणच गंध लावतो म्हणून ते सहज पुसताही येते. परंतु कपाळालाच लावणे व काढणे करता येईल काय?॥ २२३॥ त्याप्रमाणे विहित (म्हणजे आपल्या अधिकारानुसार प्राप्त झालेले कर्म) कर्माचा आपणच आदर केला असल्यामुळे त्या कर्माचा त्याग केला तर तो त्याग करता येतो. पण कर्मानेच देहाला व्यापिले असल्यामुळे ते देहाला कसे सोडता येईल?॥ २२४॥ निजले असता काहीही कर्म घडले नसले तरी श्वास घेणे व सोडणे हे कर्म ज्याचे होत राहते॥ २२५॥ या शरीराचे निमित्ताने कर्म हे पाठीला लागले आहे. जीवंत असताना वा मेल्यावरही या प्रकारे ते थांबत नाही॥ २२६॥ कर्माचा त्याग करण्याचा एकच उत्तम मार्ग आहे. तो असा ऐक, कर्म करीत असताही त्याच्यापासून प्राप्त होणाऱ्या फलाच्या इच्छेच्या स्वाधीन होऊ नये॥ २२७॥

कर्मफळ ईश्वरीं अर्पे। तत्प्रसादें बोधु उद्दीपे। तेथ रज्जुज्ञानें लोपे। व्याळशंका॥ २२८॥
तेणें आत्मबोधें तैसें। अविद्येसीं कर्म नाशे। पार्था त्यजिजे जैं ऐसें। तैं त्यजिलें होय॥ २२९॥
म्हणोनि इयापरी जगीं। कर्में करितां मानूं त्यागी। येर मूर्च्छने नांव रोगीं। विश्रांति जैसी॥ २३०॥
तैसा कर्मी शिणे एकीं। तो विसांवों पाहे आणिकीं। दांडेयाचे घाय बुकी। धाडणें जैसें॥ २३१॥
परी हें असो पुढती। तोचि त्यागी त्रिजगतीं। जेणें फळत्यागें निष्कृती। नेलें कर्म॥ २३२॥

अर्थ—कर्मापासून प्राप्त होणारे फल ईश्वराच्या ठिकाणी समर्पण करावे. ईश्वराच्या प्रसादाने आत्मज्ञान प्रगट होते तेव्हा दोराच्या ज्ञानाने ज्याप्रमाणे सर्पाची शंका दूर होते, त्याप्रमाणे त्या आत्मबोधाने अविद्येसहित कर्माचा बंध तुटतो. अर्जुना! अशा प्रकारचा त्याग जेव्हा घडतो तेव्हाच तो खरा त्याग होतो. ॥ २२८-२२९ ॥ म्हणून या प्रकाराने जगात जो कर्माचा त्याग करतो तो (खरा) महात्यागी होय. त्यावाचून दुसरा त्याग म्हणजे जसे रोग्याला मूर्छा आली असता तो विश्रांति घेतो असे समजण्यासारखे आहे ॥ २३० ॥ तसे तो एका कर्माने शिणला म्हणून दुसऱ्या कर्माचा आश्रय घेऊन विसावा घेउ पाहतो. असे करणे म्हणजे दंडुक्याचे घाव चुकविण्याकरितां बुक्क्यांचा मार सहन करण्यासारखे आहे ॥ २३१ ॥ परंतु याचा आता पुढील विस्तार पुरे. कर्माच्या फळाचा त्याग करून कर्माला ज्याने कर्मरहित स्थितीस पोहोचविले तोच त्रैलोक्यात खरा त्यागी होय. ॥ २३२ ॥

अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम् । भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु सन्न्यासिनां क्वचित् ॥ १२ ॥

अर्थ—जो कर्माचा वर सांगितल्याप्रमाणे खरा त्याग करीत नाही त्याला मेल्यानंतर अनिष्ट, इष्ट व मिश्र अशी तीन प्रकारची कर्माची फळे मिळतात. ज्ञानप्रधान संन्यास करणाऱ्याला ही फळे मिळत नाहीत ॥ १२ ॥

एऱ्हवीं तरी धनंजया। त्रिविधा कर्मफळा गा यया। समर्थ ते कीं भोगावया। जे न सांडितीचि आशा ॥ २३३ ॥
आपणचि विऊनि दुहिता। कीं न मम म्हणे पिता। तो सुटे कीं प्रतिग्रहिता। जांवाई शिरके ॥ २३४ ॥
विषाचे आगरही वाहती। ते विकितां सुखें लाभें जिती। येर निमाले जे घेती। वेंचोनि मोलें ॥ २३५ ॥
तैसें कर्ता कर्म करूं। अकर्ता फळाशा न धरूं। एथ न शके आवरूं। दोहीते कर्म ॥ २३६ ॥
वाटे पिकलिया रुखाचें। फळ अपेक्षी तयाचें। तेवीं साधारण कर्माचें। फळ घे तया ॥ २३७ ॥
परी करूनि फळ नेघे। तो जगाच्या कामीं न रिघे। जे त्रिविध जग अवघें। कर्मफळ हें ॥ २३८ ॥
देव मनुष्य स्थावर। यया नांव जगडंबर। आणि हे तंव तिन्हीप्रकार। कर्मफळाचे ॥ २३९ ॥
तेंचि एक गा अनिष्ट। एक तें केवळ इष्ट। आणि एक इष्टानिष्ट। त्रिविध ऐसें ॥ २४० ॥

अर्थ—वास्तविक पाहता अर्जुना! जे कर्माच्या फलाची आशा सोडून देत नाहीत, तेच या तीन प्रकारच्या कर्माचा भोग भोगण्यास योग्य आहेत ॥ २३३ ॥ बाप आपणच मुलीच्या जन्माला कारणभूत होऊन कन्यादान करतो त्यावेळी, ती माझी नाही, असे म्हणतो व तो सुटतो, पण दान घेणारा जांवाई मात्र त्यात गुंततो ॥ २३४ ॥ विषाच्या बागाची लागवड करणारे किंवा विषाचा सांठा डोक्यावर वाहणारे विषाच्या बागा किंवा गठ्ठे विकून विषबाधेपासून सुटतात व जीवंत राहतात, पण जे दुसरे पैसे देऊन ते विकत घेतात (व सेवन करतात) ते मात्र प्राणास मुकतात ॥ २३५ ॥ त्याप्रमाणे अहंकार धारण करणारा कर्माचा कर्ता कर्म करो किंवा अहंकाररहित झालेला अकर्ता कर्माच्या फलाची आशा (इच्छा) न करो येथे कर्म दोघांनाही सोडू शकत नाही ॥ २३६ ॥ ज्याप्रमाणे वाटेवर असणाऱ्या झाडाचे पिकले फळ जो त्याची इच्छा करील त्याला ते प्राप्त होते, त्याप्रमाणे कर्माचा अहंकार धारण करणाऱ्या प्राकृत पुरुषाला कर्माच्या फळाची अपेक्षा असल्यामुळे यच्चयावत् कर्माचे फल त्याला मिळते ॥ २३७ ॥ हे सर्व तीन प्रकारचे जग कर्माचे फल आहे. जो कर्म करून कर्माच्या फलाची इच्छा करीत नाही, तो जगातील सुख-दुःखात्मक भोगापासून अलिप्त असतो ॥ २३८ ॥ देव, मनुष्य, स्थावर यालाच जगडंबर (जगत) असे म्हणतात आणि हे तीनही प्रकार कर्माच्या फलापासून प्राप्त होतात ॥ २३९ ॥ ते कर्मफल एक अनिष्ट, एक केवल इष्ट आणि एक इष्ट व अनिष्ट मिश्र तीन प्रकारचे आहे ॥ २४० ॥

परी विषयमंती बुद्धी। आंगीं सूनि अविधी। प्रवर्तती जे निषिद्धीं। कुव्यापारीं ॥ २४१ ॥
तेथ कृमि कीट लोष्ट। हे देह लाहती निकृष्ट। तया नाम तें अनिष्ट। कर्मफळ ॥ २४२ ॥

अर्थ—परंतु विषयाधीन झालेली बुद्धि शास्त्रबाह्य कर्माच्या ठिकाणी उपयुक्त होऊन धर्माने निषिद्ध ठरविलेली वाईट अविधियुक्त कर्मे जेव्हा करू लागते ॥ २४१ ॥ तेव्हा त्यांना कृमी, कीटक, पाषाण हे नीच देह प्राप्त होतात. त्याला अनिष्ट कर्मफल म्हणतात ॥ २४२ ॥

का स्वधर्मा मान देतां। स्वाधिकार पुढां सूतां। सुकृत कीजे पुसतां। आम्नायातें॥ २४३॥
तैं इंद्रादिक देवांचीं। देहें लाहिजती सव्यसाची। तया कर्मफळा इष्टाची। प्रसिद्धि गा॥ २४४॥

अर्थ—किंवा स्वत:च्या धर्माचा आदर करून व स्वत:चा अधिकार (पात्रता) पुढे ठेवून वेदाज्ञेच्या अनुरोधाने पुण्यकर्म केले जाते, तेव्हा अर्जुना! इंद्रादिक देवांचे देह प्राप्त होतात. त्याला इष्टकर्माचे फल असे म्हणतात॥ २४३-२४४॥

आणि गोड आंबट मिळे। तेथ रसांतर फरसाळें। उठी दोहीं वेगळें। दोहीं जिणतें॥ २४५॥
रेचकचि योगवशें। होय स्तंभावयादोषें। तेवीं सत्यासत्य समरसें। सत्यासत्यचि जिणिजे॥ २४६॥

अर्थ—गोड व आंबट रस एके ठिकाणी मिळाले असता दोहोंहून वरचढ असा भिन्न रुचीचा तिसराच रस तयार होतो॥ २४५॥ योगप्रक्रियेने रेचकच कुंभक साधणारा होतो किंवा आयुर्वेद शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे रेचन करणारे औषधच मिश्र द्रव्याच्या योगाने स्तंभन करण्यास कारणीभूत होते, त्याप्रमाणे सत्य व असत्य यांच्या सामरस्याने सत्य असत्याहून निराळेच असे कर्मफल निर्माण होते.

गूढार्थदीपिका—सत्व, रज व तम या तीन गुणांच्या कमी जास्त प्रमाणामुळे चांगली अथवा वाईट कर्मे आपल्याकडून घडतात. चांगल्या कर्माचे फळ पुण्यरूप व वाईट कर्माचे फळ पापरूप असते. यानांच दुसरी इष्ट व अनिष्ट ही नांवे दिली गेली आहेत.

सत्त्वगुणाच्या प्राधान्याने पुण्यरूप कर्मे होत असल्याकारणाने त्याचे फळ इष्ट मिळते व इंद्रादि देवतांच्या योनीत जन्म मिळतो. तमोगुणाच्या प्राधान्याने अत्यंत पापरूप कर्म होत असल्यामुळे त्याचे फळ अनिष्ट मिळते व कृमी, कीटक व दगडादि योनीत जन्म मिळतो. सत्व व तमाच्या सामरस्याने काही पुण्यरूप व काही पापरूप कर्मे होत असल्यामुळे त्याचे फळ इष्टानिष्ट किंवा मिश्र असे मिळते व मनुष्य योनीत जन्म मिळतो. मिश्रफळरूप असलेली ही मनुष्ययोनी सत्त्वप्रधानरूप इंद्रादि देवादिकांच्या योनीहून व तमप्रधानरूप कृमीकीटकपाषाणादि योनीहून कशी अलग आहे व तिचे स्वरूप दोघांपेक्षा तृतीय असे निराळेच कसे आहे हे ''रेचकचि योगवशे'' या पदाने माउली सांगत आहे.

योगवशें—हा शब्द आयुर्वेद व योगशास्त्र या दोन्ही शास्त्रांच्या दृष्टीने वापरण्यात आल्याचे दिसते. आयुर्वेदात औषध योगाने म्हणजे मिश्रण करून घटक द्रव्यांच्या कार्याहून अगदी निराळे कार्य देखील होऊ शकते. रेचक म्हणजे सारक औषध मिश्रद्रव्य युक्त झाले तर त्याचीच परिणती रेचक कार्य थांबविण्यात होऊन त्याच्याहून निराळी अशी स्तंभन क्रिया करण्यातही होऊ शकते. योगाशास्त्रात रेचक करीत असता वायू स्तब्ध होतो व तो रेचक व पूरक याहून निराळ्या अशा कुंभकास कारणीभूत होतो, असे सांगितले आहे. तेव्हा योग अथवा आयुर्वेद या दोघीं पैकी कोणतीही उपमा घेतली तरी ती लागू होते.

सत्यासत्यसमरसे। सत्यासत्यचि जिणिजे

श्रीज्ञानेश्वर माउलींनी मनुष्ययोनीचे वैशिष्ट्य या पंक्तींने ध्वनित केले आहे.

सत्वाचा गुण प्रकाशरूप किंवा ज्ञानरूप असून तमाचा गुण असत्य म्हणजे जाड्यरूप आहे. मनुष्ययोनी ही दोहींचेही मिश्रण असल्यामुळे प्रकृतीने किंवा स्वभावाने सत्य व असत्य यांचा विलक्षण मिलाफ त्याच्या ठिकाणी झालेला आहे. पश्वादी योनी काय किंवा देवादी योनी काय त्या दोन्हीही केवळ भोगयोनी आहेत. पहिल्यात केवळ दु:खाचा भोग तर दुसऱ्यात केवळ सुखाचा भोग. या दोन्ही योनीत मनुष्ययोनी प्रमाणे आत्मानात्मविवेकाची संधी प्राप्त होत नाही. मनुष्ययोनी मात्र सुखदु:खात्मक भोगरूप असूनही आत्मज्ञान प्राप्त करून देणारी आहे. अध्यात्मशास्त्राच्या अध्ययनाने व श्रीगुरुच्या उपदेशामृताने मनुष्य कृतार्थ होऊन भोगप्रवृत्तीच्या विरुद्ध अशी निर्वृत्तिक स्थिति या मनुष्ययोनीत प्राप्त करून घेऊ शकतो.

सत्य व असत्य अथवा पुण्य व पाप हे सम झाले असताच मनुष्य जन्म येतो व याच जन्मात मनुष्यजन्माचे

सार्थक होउ शकते असे ''सत्यासत्य समरसें। सत्यासत्यचि जिणिजे'' या पंक्तीने सुचविले आहे.

म्हणौनि समभागें शुभाशुभें। मिळोनि अनुष्ठानाचें उभें। तेणें मनुष्यत्व लाभे। तें मिश्र फळ॥ २४७॥

अर्थ—म्हणून पुण्यरूप व पापरूप अशा समभाग कर्माचे आचरण घडले असता जे फळ प्राप्त होते त्यायोगे मनुष्ययोनीत जन्म येतो. ते (कर्माचे) मिश्रफळ होय.॥ २४७॥

ऐसें त्रिविध यया भागीं। कर्मफळ मांडलेंसे जगीं। हें न संडी तयांसी भोगीं। जें सूदले आशा॥ २४८॥
जेथें जिव्हेचा हातु फांटे। तंव जेवितां वाटे गोमटें। परि परिणामीं शेवटें। अवश्य मरण॥ २४९॥
संवचोरमैत्री चांग। जंव न पविजे तें दांग। सामान्या भली आंग। न शिवे तंव॥ २५०॥
तैसीं कर्मे करितां शरीरीं। लाहती महत्त्वाची फरारी। पाठीं निधनीं एकसरी। पावती फळें॥ २५१॥
जैसा समर्थु आणि ऋणिया। मार्गो आला बाइणिया। न ल्रोटे तैसा प्राणिया। पडे तो भोगु॥ २५२॥
मग कणिसौनि कणु झडे। तो विरूढला कणिसा चढे। पुढती भूमी पडे। पुढती उठी॥ २५३॥
तैसें भोगीं जें फळ होय। तें फळांतरें वीत जाय। चालतां पावो पाय। जिणिजे जैसा॥ २५४॥
उताराचिये सांगडी। ठाके ते ऐलीच थडी। तेवीं न मुकिजती वोढी। भोग्याचिये॥ २५५॥
पैं साध्यसाधनप्रकारें। फळभोगु तो पसरे। एवं गोंविले संसारें। अत्यागी ते॥ २५६॥

अर्थ—याप्रमाणे कर्माचे फळ या जगात तीन प्रकारच्या विभागात पडले. जे कर्मफळाच्या आशेत सांपडले त्यांना कर्मफल भोगावेच लागते. ते त्यांना सोडत नाही॥ २४८॥ खाण्याची वासना अनिवार वाढते तेव्हा खाण्याचे वेळी बरे वाटते, पण त्याचा परिणाम शेवटी अवश्य मरणात होतो॥ २४९॥ जोपर्यंत जंगलात प्रवेश होत नाही तो पर्यंतच सोबतच्या चोराची मैत्री चांगली, वेश्या तो पर्यंतच चांगली जोपर्यंत तिच्या अंगाचा स्पर्श होत नाही॥ २५०॥ त्याप्रमाणे शरीराने कर्म करीत असताच, त्या कर्माचा मोठेपणा असतो. शरीर पडल्यावर (मेल्यानंतर) एकदम त्या कर्माची फले प्राप्त होतात॥ २५१॥ सावकार ऋणकोला कर्जाची मुदत संपताच वायदा मागण्यास आला असता ते देणे चुकविता येत नाही. त्याप्रमाणे जीवाला कर्माचा भोग चुकविता येत नाही. तो भोगायला लागतो (अशी परंपरा चालू असते)॥ २५३॥ (एक पाय पुढे व एक पाय मागे नंतर पुढील पाय मागे व मागील पाय समोर असे) पायाने चालले असता जसे वाटचाल केली जाते त्याप्रमाणे शरीराकडून घडलेल्या कर्माचे फळ भोगीत असता आणखी कर्मे घडून ती नानाप्रकारची दुसरी फळें प्रसवतात॥ २५४॥ ज्याप्रमाणे ने आण करणाऱ्या नावेला ती ज्या तीरावर थांबेल ते तीर (पुनः परतीरावर जायचे असल्याने) तिला अलिकडीलच तीर असते. पलीकडचे तीर नसते म्हणून दोन्ही तीरे समानच त्याप्रमाणे भोग्य पदार्थाच्या ओढी थांबत नाहीत॥ २५५॥ साध्य-साधन प्रकाराने फलांचा भोग विस्तार पावत असतो. याप्रमाणे ज्यांना खरा त्याग साधला नाही ते संसाराच्या पाशात गुंतले जातात॥ २५६॥

एऱ्हवी जांईचियां फुलां विकसणें। त्याचि नाम जैसें सुकणें। तैसें कर्ममिषें न करणें। केलें जिहीं॥ २५७॥
बीजचि वरोसि वेंचे। तेथ वाढती कुळवाडी खांचे। तेवीं फळत्यागें कर्माचें। सारिलें काम॥ २५८॥
ते सत्त्वशुद्धी साहाकारें। गुरुकृपामृततुषारें। सासिन्नलेनि बोधें वोसरे। द्वैतदैन्य॥ २५९॥
तेव्हां जगदाभासमिषें। स्फुरे तें त्रिविध फळ नाशे। येथ भोक्ता भोग्य आपैसें। निमालें हें॥ २६०॥
घडे ज्ञानप्रधानु हा ऐसा। संन्यासु जयां वीरेशा। तेचि फळभोग सोसा। मुकले गा॥ २६१॥

अर्थ—वास्तविक पाहता जाईच्याफुलाचे उमलणे म्हणजेच जसे त्या फुलाचे सुकणे होय (जाईचे फूल फार वेळ प्रफुल्लित राहत नाही. ते लवकर सुकते) त्याप्रमाणे ज्याने कर्माच्या निमित्ताने कर्म निष्कृत केले म्हणजे कर्माला निमित्त झाला तरी कर्तृत्व जो आंगी लावून घेत नाही॥ २५७॥ बीजच जर पोटगी करता संपवले तर भरभराटीस येणारा शेतकीचा व्यवहार जसा नाश पावतो त्याप्रमाणे कर्माच्या फलाच्या त्यागाने कर्माचे मूळ नाहीसे होते॥ २५८॥ असे निष्कृत (म्हणजे फळाचा संबंध सुटलेले) कर्म सत्वशुद्धीच्या साहाय्याने (अंत:करण शुद्ध झाल्यामुळे) व गुरुकृपारूपी अमृताच्या ओलाव्याने तरतरीत झाले असतां द्वैतरूपी दैन्य नाहीसे होते॥ २५९॥ जगताच्या भासामुळे

स्फुरणारे इष्ट, अनिष्ट व मिश्रित असे जे तीन प्रकारचे कर्माचे फळ प्रतीतीस येते, तेच (सात्विक त्यागाने) नाहीसे झाले असता भोक्ता व भोग्य हे आपोआपच नाहीसे होतात. ॥ २६० ॥ वीरश्रेष्ठा अर्जुना! अशा प्रकाराचा ज्ञानप्रधान संन्यास ज्यांना साधला ते फलभोगाच्या हव्यासापासून मुक्त झाले॥ २६१ ॥

आणि येणें कीर संन्यासें। जैं आत्मरूपीं दिठी पैसे। तैं कर्म एक ऐसें। देखणें आहे॥ २६२॥
पडोनि गेलिया भिंती। चित्रांची केवळ होय माती। कां पाहालेया राती। आंधारें उरे॥ २६३॥
जैं रूपचि नाहीं उभें। तैं साउली काह्याची शोभे। दर्पणेवीण बिंबे। वदन कें पां॥ २६४॥
फिटलिया निद्रेचा ठावो। कैंचा स्वप्नासि प्रस्तावो। मग साच का वावो। कोण म्हणे॥ २६५॥
तैसें गा संन्यासें येणें। मूळ अविद्येसीचि नाहीं जिणें। मा तियेचें कार्य कोणें। घेपे दीजे॥ २६६॥

अर्थ—आणि खरोखर असा संन्यास साधून आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं दृष्टी स्थिरावली असता कर्म एक अशी वस्तु आहे, असे भासेल तरी काय?॥ २६२ ॥ भिंत पडली तर भिंतीवर काढलेल्या चित्रांची केवल मातीच होते किंवा रात्र संपून उजाडल्यावर आंधार राहतो काय?॥ २६३ ॥ जेथे मूळात वस्तुच नाही तेथे छाया कशी शोभा देणार (म्हणजे सावली कोठून पडणार) आरशाशिवाय मुखाचे प्रतिबिंब कसे पडेल?॥ २६४॥ झोप नाहीशी झाली तर स्वप्नाचा प्रसंग कोठून येणार? मग स्वप्न खरे की खाटे हे तरी कोण म्हणणार?॥ २६५ ॥ त्याप्रमाणे या ज्ञानप्रधान संन्यासाने अविद्याच जीवंत राहत नाही; तर मग त्या अविद्येच्या कार्याशी (कर्मफलाशी) घेण्यादेण्याचा व्यवहार कोणी करावा?॥ २६६ ॥

म्हणोनि संन्यासिये पाहीं। कर्माची गोठी कीजेल काई। परी अविद्या आपुला देहीं। आहे जैं कां॥ २६७॥
जैं कर्तेपणाचेनि थांवें। आत्मा शुभाशुभीं धांवे। दृष्टि भेदाचिये राणिवे। रचलीसे जैं॥ २६८॥
तैं तरी गा सुवर्मा। बिजावळी आत्मया कर्मा। अपाडें जैसी पश्चिमा। पूर्वेसि कां॥ २६९॥
नातरी आकाशा का आभाळा। सूर्या आणि मृगजळा। बिजावळी भूतळा। वायूसि जैसी॥ २७०॥
पांघरोनि नईचें उदक। असे नईचिमाजीं खडक। परी जाणिजे का वेगळिक। कोडीचि ते॥ २७१॥
हो कां उदकाजवळी। परी सीनानीचि ते बाबुळी। काय संगास्तव काजळी। दीपु म्हणों ये॥ २७२॥
जरी चंद्रीं जाला कलंकु। तरी चंद्रेंसीं नव्हे एकु। आहे दिठी डोळ्यां विवेक। अपाड जैसा॥ २७३॥
नाना वाटा वाटे जातया। वोघा वोघीं वाहतया। आरसा आरसां पाहतया। अपाडु जेतुला॥ २७४॥
पार्था गा तेतुलेनि मानें। आत्मेनिसीं कर्म सिनें। परी घेववीजे अज्ञानें। तें कीर ऐसें॥ २७५॥
विकासें रवीतें उपजवी। द्रुती अलीकरवीं भोगवी। ते सरोवरीं कां बरवी। अब्जिनी जैसी॥ २७६॥
पुढतपुढती आत्मक्रिया। अन्यकारणकाचि तैशिया। करूं पांचांही तयां। कारणां रूप॥ २७७॥

अर्थ—म्हणून, पाहा! संन्यासियाच्या ठिकाणी कर्माचा परिणाम काय होणार? परंतु आपल्या देहाच्या ठिकाणी जोपर्यंत अविद्या लागली आहे (म्हणजे देह म्हणजेच आत्मा अशी बुद्धि जोपर्यंत आहे) व जेव्हा दृष्टि भेदाच्या राज्यावर आरूढ होते, तेव्हा जीव, मी कर्माचा कर्ता आहे, या अहंकाराने पुण्यरूप किंवा पापरूप कर्म करण्याकडे धांव घेतो. तेव्हा तरी, चांगले वर्म जाणणाऱ्या अर्जुना! ज्याप्रमाणे पूर्व व पश्चिम यात महदंतर असते त्याप्रमाणे आत्मा व कर्म यांचा भिन्नपणा असतो॥ २६७-२६९ ॥ किंवा आकाश व मेघ, सूर्य व मृगजल, भूमि व वायू यांचा जसा भेद असतो॥ २७० ॥ नदीचे पाणी वेष्टून नदीमध्ये खडक राहतात, परंतु खडक व पाणी यांत अनंतपटीने वेगळेपणा असतो, असे समज॥ २७१ ॥ किंवा पाण्याच्याच जवळ शेवाळ असते, पण शेवाळ व पाणी निराळे असतात. दीपाच्या संगतीने काजळ राहते म्हणून काय काजळाला दीप म्हणता येईल?॥ २७२ ॥ जरी चंद्राच्या ठिकाणी डाग आहे तरी तो (डाग) चंद्राशी एकरूप नाही. डोळा व दृष्टि यांच्यात जितका भेद आहे॥ २७३ ॥ किंवा वाट व वाटेने जाणारा, ओघ व ओघात वाहणारा, आरसा व आरशात पाहणारा यांच्यात जितका भिन्नभाव आहे॥ २७४॥ हे अर्जुना! याप्रमाणे तितक्या प्रमाणात आत्म्याहून कर्म निराळे आहे परंतु खरोखर त्यांचे (आत्मा

व कर्म यांचे) ऐक्य अशा प्रकारे अज्ञानाने ग्रहण केले जाते॥ २७५॥ ज्याप्रमाणे सुंदर कमलिनी सरोवरात असते. आपल्या विकासाने सूर्योदय घडवून आणणारी व आपल्या सुवासाने भ्रमराला भोग घडविणारी होते. त्याप्रमाणे आत्म्याच्या ठिकाणी जे कर्म भासते ते दुसऱ्या कारणामुळेच भासते. ती कारणे पांच आहेत. त्या कारणांचे स्वरूप वर्णन करू॥ २७६-२७७॥

पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे। साङ्ख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम्॥ १३॥

अर्थ—सर्व कर्मांच्या सिद्धिकरिता वेदान्तात पांच कारणे सांगितली आहेत. ती अर्जुना! माझेकडून जाणून घे॥ १३॥

आणि पांचही कारणें तियें। तूंही जाणसील विपायें। जे शास्त्रें उभऊनी बाहे। बोल्ती जयांतें॥ २७८॥
वेदरायाचिया राजधानीं। सांख्यवेदांताच्या भुवनीं। निरूपणाच्या निशाणध्वनीं। गर्जती जियें॥ २७९॥
जे सर्वकर्मसिद्धीलागीं। इयेंचि मुद्दलें हो जगीं। येथ न सुवावा अभंगीं। आत्मराज॥ २८०॥
या बोलाची डांगुरटी। तियें प्रसिद्धी आलीं किरीटी। म्हणोनि तुझ्या हन कर्णपुटीं। वसोंत कां जें॥ २८१॥
आणि मुखांतरीं आइकिजे। तैसें कायसें हें ओझें। मी चिद्रत्न तुझें। असतां हातीं॥ २८२॥
दर्पण पुढां मांडलेया। या लोकांचियां डोळियां। मान द्यावा पाहावया। आपुलें निकें॥ २८३॥
भक्त जैसेनि जेथ पाहे। तें तेथ तेंचि होत जाये। तो मी तुझें जाहलों आहें। खेळणें आजि॥ २८४॥

अर्थ—आणि अर्जुना! जी पाच कारणे शास्त्रें हातवर करून सांगतात ती कदाचित् तूही जाणत असशील॥ २७८॥ वेदरूपी राजाच्या राजधानीत सांख्य-वेदान्ताच्या मंदिरामध्ये तत्वनिरूपणरूप पताका व घोष यांच्या समवेत जी पाच कारणे गर्जना करतात॥ २७९॥ जगामध्ये सर्व कर्माच्या सिद्धीकरिता हीच मूळ कारण आहेत. त्याठिकाणी अविनाशी आत्मरूपी राजाला मध्ये घालू नये॥ २८०॥ अर्जुना! असा सांख्य-वेदान्तशास्त्रात डंका वाजल्यामुळे ती प्रसिद्धीस आली. तेव्हा त्या डंकेची गर्जना तुझ्याही कानी आलेली बरी, असे मला वाटते॥ २८१॥ आणि मी चिद्रूपी रत्न तुझ्या स्वाधीन असता दुसऱ्याच्या मुखाने तू ऐकावे असे ओझे तरी घालण्यात काय अर्थ आहे?॥ २८२॥ आपले मुख पाहण्याकरिता आरसा समोरे ठेवला असता व आपली दृष्टी स्वच्छ असता लोकांची दृष्टि कां प्रमाण मानावी॥ २८३॥ भक्त भगवंताला जेथे जेथे ज्या ज्या भावनेने पाहील तेथे तेथे व तसा तसा भगवान होत जातो, तो भगवान मी आज तुझ्या हातचे बाहुले झालो आहे॥ २८४॥

ऐसें हे प्रीतीचेनि वेगें। देवो बोल्तां से नेघे। तंव आनंदामाजीं आंगें। विरतसे पार्थ॥ २८५॥
चांदिणियाचा पडिभरु। होता सोमकांताचा डोंगरु। विघरोनि सरोवरु। हों पाहे जैसा॥ २८६॥
तैसें सुख आणि अनुभूती। या भावांची मोडूनि भिंती। आतलें अर्जुनाकृती। सुखचि जेथ॥ २८७॥
तेथ समर्थु म्हणोनि देवा। अवकाशु जाहला आठवा। मग बुडतयाचा धांवा। जीवें केला॥ २८८॥

अर्थ—याप्रमाणे प्रेमाच्या भरात बोलत असता देव स्वत:ला विसरले आणि इकडे आनंदामध्ये मग्न झालेला अर्जुन देहभाव विसरला व पूर्णत: निर्व्यापार झाला॥ २८५॥ चांदण्याचा वर्षाव झाला असता सोमकान्ताचा डोंगर विरघळून ज्याप्रमाणे त्याचे सरोवर होऊ पाहतो त्याप्रमाणे सुख व सुखप्रत्यय या दोहोंमधील असणारी भिंत मोडून अर्जुनाच्या रूपाने जेव्हा सुखच भरून राहिले (अर्जुन केवल सुखाची मूर्ति झाला)॥ २८६-२८७॥ तेथे भगवान् श्रीकृष्ण समर्थ होते म्हणून त्यांना आठवणीला सवड झाली. मग सुखात निमग्न होऊन देहाभिमान विसरलेल्या अर्जुनाला सांभाळण्यासाठी श्रीकृष्ण कळकळीने धावले॥ २८८॥

अर्जुना येसणें धेंडें। प्रज्ञापसरेंसीं बुडे। आलें भरतें एवढें। तें सांवरूनि॥ २८९॥
देवो म्हणे हां गा पार्था। तूं आपणपें देख सर्वथा। तंव सांवरूनि येरें माथा। तुकियेला॥ २९०॥
म्हणे जाणसी दातारा। मी तुजसी व्यक्तिशेजारा। उबगला आदीं एकाहारा। येवों पाहें॥ २९१॥
तयाही हा ऐसा। लोभें देतसा जरी लालसा। तरी कां जी घालीतसां। आड आड जीवा॥ २९२॥

तेथ श्रीकृष्ण म्हणती निकें। अद्यापि नाहीं मा ठाऊकें। वेड्या चंद्रा आणि चंद्रिकें। न मिळणें आहे॥ २९३॥
आणि हाही बोलोनि भावो। तुज दाऊं आम्ही भिवों। जे रुसतां बांधे थांवो। तें प्रेम गा हें॥ २९४॥
एथ एकमेकांचिये खुणे। विसंवादु तंवचि जिणें। म्हणोनि असो हें बोलणें। इये विषयींचें॥ २९५॥

अर्थ—अर्जुन येवढा थोर भक्त. त्याला आत्मस्वरूपाच्या आनंदाचे इतके भरते आले होते की, तो ज्ञानबोधासहित आनंदात विरून गेला; पण समर्थ परमेश्वरांनी त्याला सावरले॥ २८९॥ देव म्हणाले, अरे अर्जुना! तू सर्वस्वी आपल्याकडे पाहा. तेव्हा आपल्याला सावरून अर्जुनाने मान डोलावली॥ २९०॥ अर्जुन म्हणाला; हे उदारा श्रीकृष्णा! तू जाणतोस की मी तुझ्या सान्निध्यात असलो तरी, या द्वैतभावाला कंटाळून मी मूळच्या ऐक्य स्वरूपात येऊ पाहत होतो॥ २९१॥ माझ्या प्रेमाने जर तुम्ही माझी ऐक्याची ही उत्कट इच्छा पूर्ण करीत आहात तर जीवदशेस आणून पुन: आडकाठी कां करीत आहात?॥ २९२॥ तेव्हा श्रीकृष्ण म्हणतात, खरे आहे. पण वेड्या, चंद्र व चंद्राचा प्रकाश यांचा वियोग वेगळेपणा) नाही, हे तुला अझून कसे कळत नाही॥ २९३॥ आणि असे बोलून तुला जी जी आम्ही भिती दाखवितो त्यामुळे तू रुसलास तरी आपले प्रेम आणखीच दृढ होते. असेच हे प्रेम आहे॥ ५९४॥ येथे जोपर्यंत आपण एकमेकांच्या रूपाने निराळे आहोत, तोपर्यंत आपले गुरुशिष्यरूपाने जगणे शक्य आहे. म्हणून या विषयावरील आता बोलणे पुरे॥ २९५॥

मग कसकसें ते आतां। बोलत होतों पांडुसुता। सर्व कर्मा भिन्नता। आत्मेनिसीं॥ २९६॥
तंव अर्जुन म्हणे देवें। माझिये मनींचेंचि स्वभावें। प्रस्ताविलें बरवें। प्रमेय तें जी॥ २९७॥
जें सकळ कर्मांचें बीज। कारणपंचक तुज। सांगेन ऐसी पैज। घेतली कां॥ २९८॥
आत्मया एथ कांहीं। सर्वथा लागु नाहीं। हें पुढारलासि तें देंई। लाहाणें माझें॥ २९९॥
यया बोला विश्वेशें। म्हणितलें तोषें बहुवसे। इयेविषयीं धरणें बैसे। ऐसें कें जोडे॥ ३००॥

अर्थ—मग अर्जुना! मी आता आत्म्याशी सर्व कर्मांची भिन्नता कसकशी आहे म्हणजे आत्म्याहून सर्व कर्मे कसकशी निराळी आहेत, हे सांगत होतो॥ २९६॥ तेव्हा अर्जुन म्हणतो, माझ्या अंत:करणात असलेल्या सिद्धान्ताचीच सहजच देवाने प्रस्तावना केली हे चांगले झाले॥ २९७॥ ही पाच कारणे सर्व कर्मांचे मूळ आहे, हे सांगू अशी शपथ घेतली होती की॥ २९८॥ आत्म्याचा येथे मुळीच संबंध नाही हेही जे तू पुढे मांडलेस ते माझे देणे दे. म्हणजे ते मला समजावून सांग॥ २९९॥ या अर्जुनाच्या म्हणण्यावर सर्व जगाचा शासन करणारा श्रीकृष्ण अत्यंत आनंदित होत्साता म्हणाता, या पारमार्थिक विषयात धरणे धरून बसेल असा श्रोता मिळतो आहे कोठे!॥ ३००॥

तरी अर्जुना निरूपिजेल। तें कीर भाषेआंतुल। परी मेचु ये होइजेल। ॠणिया तुज॥ ३०१॥
तंव अर्जुन म्हणे देवो। काई विसरले मागील भावो। इये गोठीं कीं राखत आहों। मीतूंपण जी॥ ३०२॥
एथ श्रीकृष्ण म्हणती हो का। आतां अवधानाचा पसरु निका। करूनियां आइका। पुढारलों तें॥ ३०३॥
तरी साचचि गा धनुर्धरा। सर्व कर्मांचा उभारा। होतसे बाहिरबाहिरा। करणीं पांचें॥ ३०४॥
आणि पंचकारण दळवाडें। जिहीं कर्माकारु मांडे। ते हेतु तंव उघडे। पांच आथी॥ ३०५॥
येर आत्मतत्त्व उदासीन। तें ना हेतु ना उपादान। ना तें अंगें करी संवाहन। कर्मसिद्धीचें॥ ३०६॥
तेथ शुभाशुभीं अंशीं। निफजती कर्में ऐसीं। राती दिवो आकाशीं। जियापरी॥ ३०७॥

अर्थ—तरी अर्जुना! खरोखर जेवढे सांगता येईल तेवढे सांगू. पण प्रीति तुला गहाण ठेवावी लागेल॥ ३०१॥ तेव्हा अर्जुन म्हणाला, देवा! मागील अभिप्राय विसरले की काय? कारण आपण या गोष्टीने मीतूपण जोपासत आहोत॥ ३०२॥ येथे श्रीकृष्ण म्हणतात, होय की, आता चांगले पुरेपूर लक्ष देऊन काय सांगतो ते ऐक॥ ३०३॥ तरी अर्जुना! सर्व कर्मांची उभारणी खरोखर पांच कारणांनी बाहेरच्याबाहेरच होत असते. (आत्म्याला त्याचा स्पर्शही नाही)॥ ३०४॥ आणि ज्या पांच कारणांच्या समुदायाने कर्मांची मांडणी होते त्याचे हेतुही स्पष्ट पांच आहेत॥ ३०५॥ येथे आत्मतत्त्व उदासीन आहे. ते कर्माचे ना निमित्त कारण आहे ना उपादान कारण आहे. किंवा कर्माच्या

सिद्धीकरिता ते अंगानेही झटत नाही॥ ३०६ ॥ ज्याप्रमाणे आकाशात रात्र व दिवस होत असतात त्याप्रमाणे तेथे पुण्यरूप व पापरूप अंशाने कर्मे आत्म्याचे ठिकाणी होतात (भासत असतात)॥ ३०७॥

तोय तेज धूमु। ययां वायूसीं संगमु। जालिया होय अभ्रागमु। व्योम तें नेणे॥ ३०८॥
नाना काष्ठीं नाव मिळे। ते नावाडेनि चळे। चालविजे अनिळें। उदक तें साक्षी॥ ३०९॥
का कवणें एकें पिंडें। वेंचितां अवतरे भांडें। मग भवंडीजे दंडें। भ्रमें चक्र॥ ३१०॥
आणि कर्तृत्व कुलालाचें। तेथ काय तें पृथ्वीयेचें। आधारावांचूनि वेंचे। विचारीं पां॥ ३११॥
हेंही असो लोकांचिया। राहाटी होतां आघविया। कोण काम सवितया। आंगा आलें॥ ३१२॥
तैसें पांचहेतुमिळणीं। पांचेंचि इहीं कारणीं। कीजे कर्मलतांचि लावणी। आत्मा सिना॥ ३१३॥
आतां येंचि वेगळालीं। पांचही विवंचूं गा भलीं। तुकोनि घेतलीं। मोतियें जैसीं॥ ३१४॥

अर्थ—पाणी उष्णता व धूर यांची वायूशी मिळणी झाली असता मेघ येतात, पण आकाशाला त्याची वार्ताही नसते॥ ३०८॥ किंवा लाकडापासून नाव तयार होते, नावाड्यामुळे ती सरकते, वायूचे साहाय्याने ती गति घेते. पाणी तेथे साक्षी (तटस्थ) असते॥ ३०९॥ किंवा कोणता एक मातीचा गोळा चाकावर ठेवून दंडाने चाक फिरवून भांडे तयार होते. येथे कुंभाराचे कर्तृत्व आहे. पृथ्वीला येथे आधारावाचून काय श्रम पडले याचा विचार कर बरे॥ ३१०-३११॥ हेही असो. लोकांचे सर्व व्यवहार होत असता सूर्याला कोणते काम अंगाने करावे लागले॥ ३१२॥ त्याप्रमाणे पांच हेतूंची मिळणी झाली असता या पांच कारणांनी कर्मरूपी वेलीची लावणी होते. आत्मा निराळाच असतो॥ ३१३॥ या कारण व हेतु यांच्या अनुक्रमें वेगळ्या वेगळ्या स्वरूपांचे आतां उत्तमप्रकारे विवरण करू. ज्याप्रमाणे मोत्यें वजन करून घेतली जातात॥ ३१४॥

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम्। विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम्॥ १४॥

अर्थ—अधिष्ठान (इच्छा, द्वेष, सुख, दुःख ज्ञान इत्यादिकांच्या अभिव्यक्तीचा आश्रय तेच शरीर), कर्ता, निरनिराळी इंद्रिये, प्राणादि वायूंचे व्यापार व इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवता, ही कर्माची पांच कारणे आहेत॥ १४॥

तैसीं यथालक्षणें। आइकें पांच कारणें। तरी देह हें मी म्हणें। पहिलें एथ॥ ३१५॥
ययातें अधिष्ठान ऐसें। म्हणिजे तें याचि उद्देशें। जे स्वभोग्येंसी वसे। भोक्ता येथ॥ ३१६॥
इंद्रियांच्या दाहें हातीं। जाचोनियां दिवोराती। सुखदुःखें प्रकृती। जोडीजती जियें॥ ३१७॥
तियें भोगावया पुरुखा। आन ठावोचि नाहीं देखा। म्हणोनि अधिष्ठानभाखा। बोलिजे देह॥ ३१८॥
हें चोविसांही तत्त्वांचें। कुटुंब घर वस्तीचें। तुटे बंधमोक्षाचें। गुंथाडें एथ॥ ३१९॥
किंबहुना अवस्थात्रया। हे अधिष्ठान धनंजया। म्हणोनि देहा यया। हेंचि नाम॥ ३२०॥

अर्थ—त्याप्रमाणे पांच कारणे यथार्थ लक्षणासह ऐक. तरी देह हे पहिले कारण होय, असे मी म्हणतो॥ ३१५॥ भोक्ता आपल्या भोग्यासहित येथे असतो, याच उद्देशाने याला अधिष्ठान असे म्हणतात॥ ३१६॥ दहाही इंद्रियांना रात्रं दिवस राबवून जी सुखदुःखे प्रकृतीच्या बलाने प्राप्त होतात॥ ३१७॥ ती सुखदुःखे भोगावयाला दुसरे स्थानच नसल्यामुळे या देहाला अधिष्ठान असे म्हणतात॥ ३१८॥ या चोवीसही तत्त्वांच्या कुटुंबाचे राहण्याचे हे घर असून येथेच बंध व मोक्ष यांचा गुंता सुटला जातो॥ ३१९॥ फार काय सांगावे अर्जुना! जागृति, स्वप्न सुषुप्ति या तीन अवस्थांचे हे ठिकाण आहे, म्हणून या देहाला अधिष्ठान हेच नाव साजेसे आहे॥ ३२०॥

आणि कर्ता हे दुजें। कर्माचें कारण जाणिजे। प्रतिबिंब म्हणिजे। चैतन्याचें जें॥ ३२१॥
आकाशचि वर्षे नीर। तें तळवटीं बांधे नाडर। मग बिंबोनि तदाकार। होय जेवीं॥ ३२२॥
कां निद्राभरें बहुवें। राया आपणपें ठाउवें नव्हे। मग स्वप्नींचिये सामावे। रंकपणीं॥ ३२३॥
तैसें आपुलेंनि विसरें। चैतन्यचि देहाकारें। आभासोनि आविष्करे। देहपणें जें॥ ३२४॥
जया विचाराच्या देशीं। प्रसिद्धि गा जीव ऐसी। जेणें भाष केली देहेंसी। आघवाविषयीं॥ ३२५॥

प्रकृति करी कर्मे। तीं म्यां केलीं म्हणे भ्रमें। येथ कर्ता येणें नामें। बोलिजे जीव॥ ३२६॥

अर्थ—आणि ज्याला चैतन्याचे प्रतिबिंब म्हणजे जीव असे म्हणतात, तो कर्ता हे कर्माचे दुसरे कारण आहे. हे लक्षात घे॥ ३२१॥ आकाशातूनच पाऊस पडून सखोल जागेत डबके साचते. मग त्यात पडलेले त्याच आकाशाचे प्रतिबिंब तेवढ्याच (उबक्याच्याच) आकाराचे जसे होते॥ ३२२॥ किंवा निद्रेच्या ऐन भरात राजाला मी राजा आहे हे ठाऊक नसते (आपले राजेपण तो विसरतो). मग स्वप्नात तो मी दरिद्री झालो असा अनुभव घेतो॥ ३२३॥ त्याप्रमाणे आपल्या मूळ चैतन्यस्वरूपाचा विसर पडून देहाच्या आकाराने चैतन्यच भासते व तेच मी देह आहे या रूपाने प्रगट होते॥ ३२४॥ ज्याला विचाराच्या प्रान्तात म्हणजे वेदान्तशास्त्रात जीव अशी प्रसिद्धी असून सर्व विषयांच्या बाबतीत ज्याने देहाबरोबरच राहण्याचे वचन दिले आहे॥ ३२५॥ प्रकृती कर्मे करते. (पण) तो विपरीत समजुतीने, मी ती केली, असे म्हणतो. येथे कर्ता या नावाने जीवाला संबोधिले जाते॥ ३२६॥

मग पातेयांच्या केशीं। एकीच उठी दिठी जैसी। मोकळी चवरी ऐसी। चिरीव गमे॥ ३२७॥
कां घरा आंतुल एकु। दीपाचा तो अवलोकु। गवाक्षभेदें अनेकु। आवडे जेवीं॥ ३२८॥
कां एकचि पुरुष जैसा। अनुसरत नवां रसां। नवविधु ऐसा। आवडों लागे॥ ३२९॥
तेवीं बुद्धीचें एक जाणणें। श्रोत्रादिभेदें येणें। बाहेरी इंद्रियपणें। फांके जें कां॥ ३३०॥
तें पृथक्विध करण। कर्माचें इया कारण। तिसरें गा जाण। नृपनंदना॥ ३३१॥

अर्थ—पापण्यांच्या केसातून एकच दृष्टि निघते. ती मोकळीच स्वच्छ अशी दृष्टि समोरून पाहणाऱ्याला केसामुळे जशी चिरल्या सारखी (विभक्त झाल्यासारखी) वाटते॥ ३२७॥ किंवा घरातील एका दिव्याचा प्रकाश अनेक खिडक्यामुळे अनेकसा वाटतो॥ ३२८॥ किंवा एकच पुरुष नव रसांच्या आविष्काराने नऊ प्रकारचा जसा वाटू लागतो॥ ३२९॥ त्याप्रमाणे बुद्धीची जाणण्याची शक्ति एकरूप असली तरी या श्रोत्रादिज्ञानेंद्रियरूपाने विभक्त होऊन बाहेर निरनिराळ्या इंद्रियरूपाने ती प्रगट होते॥ ३३०॥ ती निरनिराळी इंद्रिये अर्जुना! हे कर्माचे तिसरे कारण होय, असे समज॥ ३३१॥

आणि पूर्वपश्चिमवाहणीं। निघालिया वोघाचिया मिळणी। होय नदी नद पाणी। एकचि जेवीं॥ ३३२॥
तैसी क्रियाशक्ति पवनीं। असे जे अनपायिनी। ते पडिली नानास्थानीं। नाना होय॥ ३३३॥
जैं वाचे करी येणें। तैं तेंचि होय बोलणें। हाता आली तरी घेणें। देणें होय॥ ३३४॥
अगा चरणाच्या ठायीं। तरी गति तेचि पाहीं। अधोद्वारीं दोहीं। क्षरणें तेचि॥ ३३५॥
कंदौनि हृदयवरी। प्रणवाची उजरी। करितां तेचि शरीरीं। प्राणु म्हणिजे॥ ३३६॥
मग उर्ध्वीचिया रिगानिगा। पुढती तेचि शक्ति पैं गा। उदानु ऐसिया लिंगा। पात्र जाहली॥ ३३७॥
अधोरंध्राचेनि वाहें। अपानु हें नाम लाहे। व्यापकपणें होये। व्यानु तेचि॥ ३३८॥
आरोगिलेनि रसें। शरीर भरी सरिसें। आणि न सांडितां असे। सर्वसंधीं॥ ३३९॥
ऐसिया इया राहटीं। मग तेचि क्रिया पाठीं। समान ऐसी किरीटी। बोलिजे गा॥ ३४०॥
आणि जांभई शिंक ढेंकर। ऐसैसा होतसे व्यापार। नाग कुर्म कृकर। इत्यादि होय॥ ३४१॥
एवं वायूची हे चेष्टा। एकीचि परी सुभटा। वर्तनास्तव पालटा। येतसे जे॥ ३४२॥
ते भेदली वृत्तिपंथें। वायुशक्ति गा एथें। कर्मकारण चौथें। ऐसें जाण॥ ३४३॥

अर्थ—पूर्वे कडून किंवा पश्चिमेकडून निघालेले पाण्याचे ओघ नदी असो की नद असो एके ठिकाणी मिळाले असता एक पाणीच होऊन जाते॥ ३३२॥ त्याप्रमाणे वायुमध्ये जी अखंड क्रियाशक्ति आहे ती निरनिराळ्या स्थानी पडल्यामुळे निरनिराळ्या प्रकारची होते॥ ३३३॥ जेव्हा ती क्रियाशक्ति वाचेच्या ठिकाणी येते तेव्हा तेथे बोलणे होते. हाताचे ठिकाणी येते तेव्हा घेण्यादेण्याचा व्यवहार होतो॥ ३३४॥ अर्जुना! ती पायाच्या ठिकाणी येते, पाहा, तेव्हा पायाला गती येते. खालच्या दोन द्वारात येते तेव्हा मल मूत्र विसर्जन होते॥ ३३५॥ नाभी पासून हृदयापर्यंत ॐकार

प्रगट करते. म्हणून शरीरामध्ये असणाऱ्या त्याच क्रियाशक्तीला प्राण म्हणतात॥ ३३६॥ पुढे तीच शक्ति वर जाते येते म्हणून उदान अशा संज्ञेस पात्र झाली॥ ३३७॥ खालच्या रंध्रातून वाहते तेव्हा अपान हे नाव प्राप्त होते. सर्व शरीरात व्यापून राहते तीच व्यान होय॥ ३३८॥ सेवन केलेल्या सर्व रसाने ती शक्ति शरीराचा कोणताही कानाकोपरा न सोडता सर्व शरीरभर पसरते व जी सर्व सांध्यांच्या ठिकाणी असते॥ ३३९॥ अर्जुना! अशा या व्यापारामुळे मग त्याच क्रियाशक्तीला समान असे म्हणतात. ॥ ३४०॥ जांभई, शिंक, ढेंकर अशा तऱ्हेचे जे व्यापार होतात त्यांना नाग, कूर्म, कूकर इत्यादि संज्ञा अनुक्रमे प्राप्त होतात॥ ३४१॥ याप्रमाणे एकाच वायूचे हे व्यापार होत, पण अर्जुना! तिच्या निरनिराळ्या कार्यामुळे तिला निरनिराळेपण येतो॥ ३४२॥ येथे वायुशक्ति निरनिराळ्या कार्यामुळे भेदाला पावली. ते कर्माचे चौथे कारण होय, असे जाण॥ ३४३॥

आणि ऋतु बरवा शारदु। शारदीं पुढती चांदु। चंद्रीं जैसा संबंधु। पूर्णिमेचा॥ ३४४॥
कां वसंतीं बरवा आरामु। आरामींही प्रियसंगमु। संगमीं आगमु। उपचारांचा॥ ३४५॥
नाना कमळीं पांडवा। विकासु जैसा बरवा। विकासींही यावा। परागाचा तो॥ ३४६॥
वाचे बरवें कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व। रसिकत्वीं परतत्त्व। स्पर्शु जैसा॥ ३४७॥
तैसी सर्ववृत्तिवैभवीं। बुद्धिचि एकली बरवी। बुद्धीही बरव नवी। इंद्रियप्रौढी॥ ३४८॥

अर्थ—सर्व ऋतूंमध्ये शरदऋतु, त्यात चंद्रप्रकाश व त्याला जशी पौर्णिमेची जोड असावी किंवा वसंतऋतूत उद्यान ह्यातही प्रेयसीचा सहवास व तेथे पुन: प्रणयाराधानाची जोड असावी किंवा अर्जुना! कमल असून ते उमलावे व त्यांतही मकरंदाचा बहर असावा. वाङ्मयात साहित्य, त्यात रसाळपणा व त्यातही आत्मानुभूतीची जोड असावी. त्याप्रमाणे अंत:करणात उठणाऱ्या सर्व वृत्तीत एकटी बुद्धिवृत्तिच चांगली व बुद्धीचाही सतेजपणा इंद्रियांच्या सामर्थ्यामुळे आहे॥ ३४४-३४८॥

गूढार्थदीपिका—श्रुतीने "यो बुद्धे: परतस्तु स:" व "दृश्यते त्वग्रया बुद्ध्या" असे सांगून बुद्धीचा अशुद्ध व शुद्ध स्वरूपाचे वर्णन केले आहे. आत्मस्वरूपाहुन भिन्न अशा निरनिराळ्या पदार्थांचा निश्चय करणारे चैतन्य म्हणजेच "अशुद्ध बुद्धि" होय. हिलाच "अव्यवसायात्मिका बुद्धि" ही म्हणतात, हिच्या पलीकडे आत्मस्वरूप आहे, हीच बुद्धि एका परमेश्वराशिवाय दुसरी वस्तु नाही असा निश्चय करते तेव्हा तिलाच "शुद्ध बुद्धि" किंवा "व्यवसायात्मिका बुद्धि" म्हणतात.

सर्व विपरीत समजुतीला किंवा भ्रमाला कारण ही अशुद्ध बुद्धिच आहे. तीच आत्मस्वरूपाचा विसर पाडून भिन्न-भिन्न पदार्थाचा निश्चय करणारी आहे. हीच शास्त्राच्या अध्ययनाने व श्रीगुरुच्या कृपाप्रसादाने भिन्न-भिन्न पदार्थाचा निश्चय सोडून देऊन जेव्हा एका परब्रह्माचाच निश्चय करते तेव्हा तीच परब्रह्मस्वरूप होते.

संसाराच्या खोड्यात अडकविणारी व त्यांतून मुक्त करणारी ही बुद्धिच असल्याकारणाने सर्व कारण पंचकात हिचे स्थान अनन्यसाधारण आहे, हे उघड आहे. व म्हणूनच माउली "तैसी सर्व वृत्तिवैभवी। बुद्धीची एकली बरवी" अशी तिची कीर्त्ती गात आहे.

इंद्रियप्रौढीमंडळा। शृंगारु एकचि निर्मळा। जैं अधिष्ठात्रियां कां मेळा। देवतांचा जो॥ ३४९॥
म्हणूनि चक्षुरादिकीं दाहें। इंद्रियां पाठीं स्वानुग्रहें। सूर्यादिकां कां आहे। सुरांचें वृंद॥ ३५०॥
तें देववृंद बरवें। कर्मकारण पांचवें। अर्जुना एथ जाणावें। देवो म्हणे॥ ३५१॥
एवं माने तुझिये आयणी। तैसी कर्मजातांचि हे खाणी। पंचविध आकर्णीं। निरूपिली॥ ३५२॥
आतां हेचि खाणी वाढे। मग कर्माची सृष्टि घडे। जिहीं ते हेतुही उघडे। दाऊं पांचै॥ ३५३॥

अर्थ—जेव्हा इंद्रियांना अधिष्ठान असणाऱ्या देवतांचा समूह अनुकूल असतो तेव्हाच इंद्रियसामर्थ्याला उत्तम शोभा येते॥ ३४९॥ म्हणून चक्षुरादि दहा इन्द्रिये आहेत व त्यांच्यावर अनुग्रह करणारे सूर्यादिक देवतांचे समुदाय आहेत॥ ३५०॥ देव म्हणतात, अर्जुना! उत्तम अनुग्रह करणारे देवतांचे समुदाय ते येथे कर्माचे पांचवे कारण होय

असे जाण॥ ३५१ ॥ याप्रमाणे तुझ्या समजुतीला पटेल अशा रीतीने आम्ही सर्व कर्मे ज्यापासून उत्पन्न होतात अशी पांच प्रकारची कारणे सांगितली ती तू ऐकलीस॥ ३५२ ॥ ज्या हेतूने ही पांच कारणे वाढीला लागून मग कर्माची सृष्टी उत्पन्न होते ते पांच हेतुही स्पष्ट सांगू॥ ३५३ ॥

शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः। न्याय्यं वा विपरीतं वा पञ्चैते तस्य हेतवः॥ १५॥

अर्थ—शरीराने, वाचेने, मनाने, शास्त्राला अनुसरून वा शास्त्रविरुद्ध जे कर्म मनुष्य करतो त्या कर्माचीही (ही वरील) पांच कारणे आहेत॥ १५ ॥

तरी अवसांत आली माधवी। ते हेतु होय नवपल्लवीं। पल्लव पुष्पपुंज दावी। पुष्प फळातें॥ ३५४॥
कां वार्षिये आणिजे मेघु। मेघें वृष्टिप्रसंगु। वृष्टीस्तव भोगु। सस्यसुखाचा॥ ३५५॥
नातरी प्राची अरुणातें विये। अरुणें सूर्योदयो होये। सूर्यें सगळा पाहे। दिवो जैसा॥ ३५६॥
तैसें मन हेतु पांडवा। होय कर्मसंकल्पभावा। तो संकल्पु लावी दिवा। वाचेचा गा॥ ३५७॥

अर्थ—अकस्मात् वसंतऋतु आला तर तो वृक्षवेलींना नवी पालवी फुटण्यास कारण होतो. पालवीपासून फुलांचे घोस व फुले फळांना प्रगट करतात॥ ३५४॥ किंवा वर्षाऋतु मेघांना घेऊन येतो मेघामुळे पाऊस पडतो व पावसापासून धान्यसुखाचा लाभ होतो॥ ३५५ ॥ किंवा पूर्व दिशेला अरुणोदय होतो. अरुणोदयाने सूर्यादय होतो. सूर्य उगवला की पूर्ण दिवस ज्याप्रमाणे प्रगट होतो॥ ३५६ ॥ त्याप्रमाणे कर्माचा संकल्प होण्यास मन हे कारण आहे. तो संकल्प (वाणीचा) वाचेचा दिवा लावतो-म्हणजे वाणीने शब्द प्रगट करण्यास कारणीभूत होतो॥ ३५७॥

मग वाचेचा तो दिवटा। दावी कृत्यजातांचिया वाटा। तेव्हां कर्ता रिगे कामठां। कर्तृत्वाच्या॥ ३५८॥
तेथ शरीरादिक दळवाडें। शरीरादिकां हेतूचि घडे। लोहकाम लोखंडें। निर्वाळीजे जैसें॥ ३५९॥
कां तांथुवाचा ताणा। ताथु घालितां वैरणा। तो तंतूचि विचक्षणा। होय पट॥ ३६०॥
तैसें मनवाचादेहांचें। कर्म मनादि हेतुचि रचे। रत्नीं घडे रत्नाचें। दळवाडें जेवीं॥ ३६१॥

अर्थ—मग वाणीचा तो दिवा आपल्याला जे कर्म करावयाचे त्या सर्वाचा मार्ग दाखवितो. तेव्हा कर्म करणारा कर्ता (हे मला कर्म करावयाचे आहे) या कर्तव्याच्या व्यापारात सापडतो॥ ३५८॥ त्याप्रमाणे शरीरादिक समूह शरीरादिकांना कारण होते. ज्याप्रमाणे लोखंडी घडकाम लोखंडाच्या घडणाने घडले जाते॥ ३५९ ॥ हे विचारशील अर्जुना! किंवा ताणलेल्या तंतूत तंतू आडवा घातला असता वस्त्र तयार होते॥ ३६० ॥ जसे रत्नाचे पैलू रत्नानेच होतात, त्याप्रमाणे मन, वाणी, देह यांच्याकडून होणाऱ्या कर्माचे कारण मनादीकच आहेत॥ ३६१ ॥

एथ शरीरादिकें कारणें। तेचि हेतु केवीं हें कोणें। अपेक्षिजे तरी तेणें। अवधारिजो॥ ३६२॥
आइका सूर्याचिया प्रकाशा। हेतु कारण सूर्युचि जैसा। कां ऊंसाचें कांडें ऊंसा। वाढी हेतु॥ ३६३॥
नाना वाग्देवता वानावी। तैं वाचाचि लागे कामवावी। कां वेदां वेदेंचि बोलावी। प्रतिष्ठा जेवीं॥ ३६४॥
तैसें कर्मा शरीरादिकें। कारण हें कीर ठाउकें। परी हेंचि हेतु न चुके। हेंही एथ॥ ३६५॥

अर्थ—येथे कारण जे शरीरादिक तेच हेतु कसे, अशी शंका कोणी करील तर त्यांनी लक्ष देऊन ऐकावे॥ ३६२ ॥ ऐका सूर्याच्या प्रकाशाला जसा सूर्यच कारण आहे किंवा उसाच्या वाढीला उसाचे पेरे कारण आहेत॥ ३६३ ॥ किंवा वाग्देवतेची (सरस्वतीची) स्तुती करण्याकरिता वाणीलाच राबवावे लागते. किंवा ज्या प्रमाणे वेदाचे महत्त्व वेदानेच सांगावे लागते॥ ३६४॥ त्याप्रमाणे कर्माला शरीरादिक साधनभूत आहेत हे खरोखर माहित असले तरीपण हेच पाच त्याचे कारणही आहे हेही विसरू नकोस॥ ३६५ ॥

आणि देहादिकीं कारणीं। देहादी हेतुमिळणीं। होय जया उभारणी। कर्मजातां॥ ३६६॥
तें शास्त्रार्थें मानिलेया। मार्गा अनुसरे धनंजया। तरी न्याय तो न्याया। हेतु होय॥ ३६७॥
जैसा पर्जन्योदकाचा लोटु। विपायें धरी साळीचा पाटु। तो जिरे परी अचाटु। उपयोगु आथी॥ ३६८॥
कां रोषें निघालें अवचटें। पडिलें द्वारकेचिया वाटे। तें शिणे परी सुनाटें। न वचती पदें॥ ३६९॥

तैसें हेतुकारणमेळें। उठी कर्म जें आंधळें। तें शास्त्राचे लाहे डोळे। तैं न्याय्य म्हणिपे॥ ३७०॥

अर्थ—आणि देहादिक साधनभूत व देहादिक कारणे यांच्या संयोगाने ज्या सर्व कर्मांची मांडणी होते॥ ३६६॥ शास्त्रांत सांगितलेल्या मार्गाला अनुसरून जर ते कर्म, अर्जुना! घडले असेल तर ते पुण्य कर्म होय. तो पुण्यमार्गच पुण्यकर्माला कारण होतो॥ ३६७॥ ज्याप्रमाणे पावसाच्या पाण्याचा लोट धानाच्या शेतात जर का बांधाच्या रूपाने ते पाणी स्थिर होईल व ते पाणी तेथे जिरेल तर त्या पाण्याचा मोठाच उपयोग होईल (पाणी जिरल्यामुळे पीक भरारून येईल)॥ ३६८॥ किंवा रागाने घराबाहेर पडला व अकस्मात् द्वारकेच्या मार्गाला लागला तर शीण होईल, पण मार्ग चालणारी पाऊले वाया जाणार नाहीत (सार्थकी लागतील)॥ ३६९॥ त्याप्रमाणे साधन व कारण यांच्या संयोगाने जे कर्म घडेल त्याचे फळ जरी माहित नसले तरी शास्त्रवचनानुकूल ते घडले असल्यामुळे त्याला पुण्यकर्म म्हणावे॥ ३७०॥

ना दूध वाढितां ठावो पावे। तंव उतोनि जाय स्वभावें। तोही वेंचु परी नव्हे। वेंचिलें तें॥३७१॥
तैसें शास्त्र साह्येंवीण। केलें नोहे जरी अकारण। तरी लागो कां नागवण। दानलेखीं॥ ३७२॥
अगा बावन्ना वर्णापरता। कोण मंत्रु आहे पांडुसुता। कां बावन्नही नुच्चारितां। जीवु आथी॥ ३७३॥
परी मंत्राची कडसणी। जंव नेणिजे कोदंडपाणी। तंव उच्चारफळ वाणी। न पवे जेवीं॥ ३७४॥
तेवीं कारणहेतुयोगें। जें बिसाट कर्म निगे। तें शास्त्राचिये न लगे। कांसे जंव॥ ३७५॥
कर्म होतचि असे तेव्हाही। परी तें होणे नव्हे पाहीं। तो अन्यायो गा अन्यायीं। हेतु होय॥ ३७६॥

अर्थ—(अग्नीवर ठेवलेले दूध) दूध वाढता वाढता काठापर्यंत येऊन स्वाभाविकपणे ते उतू जाते. ते दूध खर्च झाले, पण ते योग्यपणे कारणी लागले असे म्हणता येणार नाही॥ ३७१॥ त्याप्रमाणे शास्त्रवचनाच्या साहाय्याशिवाय केलेले कर्म जर व्यर्थ म्हणू नये तर लुबाडल्या गेलेल्या धनाची दानात गणना करावी काय?॥ ३७२॥ अगा अर्जुना! बावन वर्णाच्या पलीकडे कोणता मंत्र आहे? व या बावनही वर्णांचा उच्चार करीत नाही असा कोण मनुष्य आहे॥ ३७३॥ पण हे अर्जुना! मंत्राचे रहस्य जोपर्यंत कळत नाही, तोपर्यंत वाणी मंत्रोच्चाराच्या फळाला जशी प्राप्त होत नाही॥ ३७४॥ त्याप्रमाणे साधन व कारण यांच्या मेळाव्याने जे अनियमित कर्म घडते ते जेव्हा शास्त्राच्या कसोटीला लागत नाही॥ ३७५॥ तेव्हाही ते कर्मच असले तरी ते न होण्यासारखेच आहे. ते पापकर्मच त्या पापकर्मरूपफळाला कारण आहे, पाहा!॥ ३७६॥

तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः। पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः॥ १६॥

अर्थ—असे जरी आहे, तरी, जो (देह म्हणजे आत्मा असे समजून) आत्म्याला कर्माचा कर्ता मानतो त्याची बुद्धि शुद्ध नसल्यामुळे त्या मूर्खाला आत्म्याचे खरे स्वरूप कळत नाही॥ १६॥

एवं पंचकारणां कर्मा। पांचही हेतु हे सुमहिमा। आतां एथें पाहें पां आत्मा। सांपडला असे॥ ३७७॥
भानु न होनि रूपें जैसीं। चक्षुरूपातें प्रकाशी। आत्मा न होनि कर्मे तैसीं। प्रकटित असे गा॥ ३७८॥
पाहीं प्रतिबिंब आरिसा। दोन्ही न होनि वीरेशा। दोहींतें प्रकाशी जैसा। न्याहाळिता तो॥ ३७९॥
कां अहोरात्र सविता। न होनि करी पांडुसुता। तैसा आत्मा कर्मकर्ता। न होनी दावी॥ ३८०॥

अर्थ—याप्रमाणे श्रेष्ठ महिमा असलेल्या अर्जुना! कर्माची पाच साधने व पाच कारणे आहेत. आता याठिकाणी कर्माच्या साधनात व कारणात आत्मा गोवला गेला आहे काय?॥ ३७७॥ सूर्य वस्तु न होता चक्षुरिंद्रियाला गोचर असणाऱ्या रूपाला जसा प्रकाशित करतो, त्याप्रमाणे आत्मा कर्मरूप न होता कर्माला प्रगट करतो॥ ३७८॥ हे वीर श्रेष्ठा अर्जुना! प्रतिबिंब व आरसा हे दोन्ही न होता पाहणारा ज्या दोघांनाही पाहतो॥ ३७९॥ किंवा अर्जुना! ज्याप्रमाणे सूर्य दिवस रात्र न होता त्याना उत्पन्न करतो त्याप्रमाणे आत्मा कर्म व कर्ता न होताच कर्मरूप भासतो॥ ३८०॥

परी देहाहंमानभुली। जयाची बुद्धि देहींच आतली। जया आत्मविषयीं जाली। मध्यरात्री गा॥ ३८१॥
जेणें चैतन्या ईश्वरा ब्रह्मा। देहचि केलें परमसीमा। तया आत्मा कर्ता हे प्रमा। अलोट उपजे॥ ३८२॥

आत्माचि कर्मकर्ता। हाही निश्चयो नाहीं तत्त्वतां। देहोचि मी कर्मकर्ता। मानी तो साच॥ ३८३॥
जे आत्मा मी कर्मातीतु। सर्वकर्मसाक्षिभूतु। हे आपली कहीं मातु। नायकेचि कानीं॥ ३८४॥

अर्थ—पण ज्याची बुद्धि मीच देहरूप आहे या अभिमानाने (आत्मस्वरूपाला) भुलून देहातच गुरफटली त्याला आत्मतत्त्वाविषयीं मध्यरात्री झाली म्हणजे मध्यरात्रीं जसा अंधार काळोख असतो तसे आत्मतत्त्वाविषयीं अंध:कार झाला॥ ३८१ ॥ ज्याने चैतन्य, ईश्वर, ब्रह्म यांना सरतेशेवटी देहाच्याच मर्यादेत आणून ठेवले त्याला आत्मा कर्ता आहे असेच अबाधित ज्ञान होते॥ ३८२ ॥ आत्माच कर्मकर्ता आहे हाही त्याचा खरा निश्चय नसतो. मी देहच वस्तुत: कर्माचा कर्ता आहे, असे तो मानतो॥ ३८३ ॥ मी आत्मस्वरूप आहे, कर्मातीत आहे, सर्वकर्माचा साक्षी आहे ही जी आपली स्वरूपस्थिति आहे, ती गोष्ट कधीही कानी येऊ देत नाही॥ ३८४॥

म्हणोनि उमपा आत्मयातें। देहचिवरी मविजे एथें। विचित्र काई रात्रि दिवसातें। डुडुळ न करी॥ ३८५॥
पैं जेणें आकाशींचा कहीं। साचु सूर्य देखिला नाहीं। तो थिल्लरींचें बिंब काई। मानूं न लाहे॥ ३८६॥
थिल्लराचेनि जालेपणें। सूर्यासि आणि होणें। त्याच्या नाशीं नाशणें। कंपें कंपु॥ ३८७॥
अगा निद्रिता चेवो नये। तंव स्वप्न साच हों लाहे। रज्जु नेणतां सापा बिहे। विस्मो कवण॥ ३८८॥
जंव कवळ आथि डोळां। तंव चंद्रु देखावा कीं पिंवळा। काय मृगींही मृगजळा। भाळावें नाहीं॥ ३८९॥
तैसा शास्त्रगुरुचेनि नांवें। जो वाराही टेंकों नेदी सिंवे। केवळ मौढ्याचेनिचि जीवें। जियाला जो॥ ३९०॥
तेणें देहात्मदृष्टीमुळें। आत्मया घापे देहाचें जाळें। जैसा अभ्राचा वेगु कोल्हें। चंद्रीं मानी॥ ३९१॥

अर्थ—म्हणून (अमर्याद) अशा आत्म्याला मर्यादित देहाच्या मापाने मोजतो (देहा पुरताच समजतो) यात आश्चर्य काय. घुबड दिवसाला रात्र करीत नाही काय? (घुबडाला दिवसा दिसत नाही)॥ ३८५ ॥ ज्याने आकाशात असलेला खरा सूर्य कधीच पाहिला नाही तो डबक्यात पडलेल्या सूर्याच्या प्रतिबिंबाला सूर्य मानीत नाही काय?॥ ३८६ ॥ डबक्यांत सूर्य दिसला तर सूर्य प्रगट झाला, डबक्यातील पाणी नाहीसे झाले तर सूर्य नाश पावला व पाण्याच्या कंपनाने सूर्य कंपन पावला असे तो समजतो॥ ३८७॥ निजलेल्याला जोपर्यंत जाग येत नाही तोपर्यंत त्याला स्वप्न खरे वाटते. दोरी न जाणता दोरीवर भासणाऱ्या सर्पाला भ्यावे यात आश्चर्य ते काय?॥ ३८८ ॥ किंवा जोपर्यंत कावीळ रोग आहे तोपर्यंत, चंद्र पिवळाच दिसावा. किंवा मृगांनी मृगजळाला (पाणीसमजून) फसू नये काय?॥ ३८९ ॥ त्याप्रमाणे जो शास्त्र व गुरु यांच्या नांवाचा वारा देखील गावाच्या शिवेवर टिकू देत नाही व जो मूर्खपणाच्या जिवानेच जगत असतो॥ ३९० ॥ ज्याप्रमाणे कोल्ह्याने अभ्राचा वेग चंद्राचे ठिकाणी मानावा, त्याप्रमाणे मोहामुळे देह हाच आत्मा आहे अशी दृष्टि ठेवून तो आत्म्याला देहाच्या जाळ्यात घालतो म्हणजे आत्म्यावर देहाचा आरोप करतो॥ ३९१ ॥

मग तया मानणयासाठी। देहबंदिशाळे किरीटी। कर्माच्या वज्रगांठी। कळासे तो॥ ३९२॥
पाहें पां बंधभावना दृढा। नळियेवरी तो बापुडा। काय मोकळेयाही चवडा। न ठकेचि पुंसा॥ ३९३॥
म्हणोनि निर्मळे आत्मस्वरूपीं। जो प्रकृतीचें केलें आरोपी। तो कल्पकोडीच्या मापीं। मवीचि कर्में॥ ३९४॥

अर्थ—मग अर्जुना! त्या देहाला आत्मा मानल्यामुळे देहरूपीबंदीशाळेत कर्माच्या पक्क्या गांठीने तो कडसला जातो॥ ३९२ ॥ पाहा! नळीवर बसलेला पोपट पायाचा चवडा मोकळा असूनही बांधला गेलो आहे या दृढ भावनेने तो बिचारा फसत नाही काय?॥ ३९३ ॥ म्हणून जो प्रकृतीचे कर्म शुद्ध आत्मस्वरूपाच्या ठिकाणी आरोपीत करतो तो कल्पाच्या अनंत कालाच्या मापने कर्मे मोजतच बसतो॥ ३९४॥

गूढार्थदीपिका—आधार किंवा अधिष्ठानरूप असलेल्या सच्चिदानंदरूप परब्रह्माच्या स्वरूपाचा विसर पडल्यामुळे जीव मर्यादित अशा देहाशी तादात्म्य करतो व देहाकडून होणाऱ्या सर्व क्रियांचे कर्तृत्व चुकीने आपल्या ठिकाणी कसे ओढून घेतो याचे माउलींनी वरील ओव्यात सुंदर वर्णन केले आहे.

नित्य प्रकाशरूप असलेल्या सूर्याच्या प्रकाशाच्या ठिकाणी दिवस व रात्र या रूपांनी भावाभाव पाहणारा सूर्याहून

भिन्न असलेला माणूसच दिवस व रात्र या विषयी बोलू शकतो. सूर्याला मात्र दिवस रात्र यांच्या संबंधीची कसलीही कल्पना राहत नाही. दिवस व रात्र यांचे कर्तृत्व चुकीने सूर्यावर मनुष्य लादतो व सूर्य हा दिवस व रात्र या कल्पनांना केवळ आधार होतो. त्याला त्या दोन्ही गोष्टींचा गंधही राहत नाहीं.

आत्मस्वरूप देखील सूर्याप्रमाणे नित्य ज्ञानस्वरूप आहे. म्हणजेच त्याला आपल्या सच्चिदानंद स्वरूपाची कधीही विस्मृति होत नाही. पण त्याचेच स्फुरण असलेला जीव मात्र ही गोष्ट विसरला जाऊन चुकीने मर्यादित अशा देहाशी तादात्म्य करून आपल्या अमर्यादित अशा स्वरूपाला मर्यादित समजूं लागतो. व देहाचे अर्थातच सर्व धर्म आपल्यावर ओढून घेतो. या मर्यादित त्याच्या जाणीवेमुळेच देश, काल, वस्तुत्व यांचा त्रिविध परिच्छेद त्याला भासू लागतो. कर्म, कर्ता, क्रिया हे भाव त्यातूनच उत्पन्न होतात. हेच चुकीचे किंवा विपरीत ज्ञान होय. शास्त्र व गुरु यांचा संबंध झाला असता हे विपरीत ज्ञान नाहीसे होऊन तो आपल्या मूळ स्वरूपाला प्राप्त होऊ शकतो असे माउलींनी येथे सुचविले आहे.

आतां कर्मामाजीं असे। परी तयातें कर्म न स्पर्शे। वडवानळातें जैसें। समुद्रोदक॥ ३९५॥
तैसेनि वेगळेपणें। जयाचें कर्मीं असणें। तो कीर ओळखावा कवणें। तरी सांगों॥ ३९६॥
जे मुक्तातें निर्धारितां। लाभे आपलीच मुक्तता। जैसी दीपें दिसे पाहतां। आपली वस्तु॥ ३९७॥
ना तरी आरिसा जंव उटिजे। तंव आपणपयां आपण भेटिजे। कां पाणी पावतां पाणी होइजे। लवणें जेवीं॥ ३९८॥
हें असो परतोनि मागुतें। प्रतिबिंब पाहे बिंबातें। तंव पाहणें जाउनी आयितें। बिंबचि होय॥ ३९९॥
तैसें हारपलें आपणपें पावे। तैं संतांतें पाहातां गिंवसावें। म्हणोनि वानावे ऐकावे। तेचि सदा॥ ४००॥

अर्थ—आता समुद्राचे पाणी जसे वडवाग्नीला स्पर्श करीत नाही, त्याप्रमाणे तो (आत्मा) कर्मामध्ये असतो परंतु त्याला कर्म स्पर्श करीत नाही. तसे वेगळेपणाने ज्याचे कर्मामध्ये असणे असते तो खरोखर कसा ओळखावा ते सांगतो॥ ३९५-३९६॥ ज्याप्रमाणे दिव्याने पाहिले असता अंधारात ठेविली असलेली आपली वस्तु सापडते त्याप्रमाणे ज्ञान्यांच्या लक्षणांचा किंवा त्यांच्या स्वरूपाचा निर्धार केला असता आपलीच मुक्तता प्राप्त होते॥ ३९७॥ किंवा जितका जितका आरसा स्वच्छ करावा तितके तितके आपले स्वच्छ स्वरूप त्यात दिसते. किंवा मीठ पाण्याला मिळाले असता मीठ पाणीरूप होऊन जाते॥ ३९८॥ हे असो. प्रतिबिंब मागे फिरून बिंबाला पाहील तर पाहणेपणा नाहीसा होऊन आयता ते बिंबच होईल॥ ३९९॥ त्याप्रमाणे आपली विसरलेली मूळ स्वरूपस्थिति आपल्याला प्राप्त व्हावी अशी जर इच्छा असेल तर संतांचा कित्ता पुढे ठेवून त्यांचीच कीर्ति नेहमी वर्णन करावी व श्रवण करावी॥ ४००॥

गूढार्थदीपिका—म्हणोनि वानावे ऐकावे। तेचि सदा॥

''आम्ही संत म्हणूं तया अवघी देवावरी माया'' (तु० गा०) ''माझ्या स्वरूपींच ज्याचे चित्त। अखंड जडलें भजनयुक्त। त्यासीच बोलिजे मद्भक्त। तेचि संतसज्जन'' (ए० भा०) अद्वैतज्ञान प्राप्त होऊन सगुण भगवंताच्या ठिकाणी अखंड प्रेम ठेवणाऱ्याला संत म्हणतात अशी संताची व्याख्या श्रीं तुकाराम महाराज व नाथादि संतांनी केली आहे. ज्याच्या अहंतेचा व ममतेचा विषय एक सगुण भगवानच झाला आहे. त्यांना सर्व कर्मे करताना एका भगवंताशिवाय दुसरे काहीही अनुभवास येत नाही. त्यांच्या ठिकाणी ब्रह्मभाव पूर्णपणे बाणलेला असतो. एका ब्रह्मरूपभगवंताशिवाय दुसरा कोणताहीं संकल्प त्यांच्या मनात उठत नाही. त्यांच्याकडून होणारी सर्व कर्मे ब्रह्मरूपच होतात ''ब्रह्मरूपाची ती कर्मे ब्रह्मरूप। अविकल संकल्प होती जाती'' (तु० गा०)

अंधारात मार्गदर्शन करणारा जसा दिवा असावा त्याप्रमाणे आत्मस्वरूपाची ओळख करून देणारे ज्ञानीभक्त दीपस्तंभाप्रमाणेच आहेत. त्यामुळे त्या मुक्त पुरुषांचा विचार करणे म्हणजेच आपण आपल्या मुक्त स्वरूपाचा विचार करणे होय; हे वरील ओवी ३९७ मध्ये माउलींनी म्हटलेच आहे.

''ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति'' या श्रुतीत सांगितल्या प्रमाणे ब्रह्मनिष्ठ भगवद्भक्त म्हणजे साकार परब्रह्मच होय.

या ब्रह्मनिष्ठ संतांच्या ठिकाणी अवतारा प्रमाणेच देहदेही भाव राहत नाही. ते देहासह सच्चिदानंदरूप असतात, त्यांचा प्रत्येक शब्द वेदवाणीच असतो "तयाचे बिसाट शब्द। का न सुखे म्हणों येती वेद। सदेह सच्चिदानंद। कां न होवावे ते" असे पुढे याच अध्यायात श्री माउलींनी म्हटले आहे.

अशा या सगुण साकार परब्रह्मरूप असलेल्या संताच्या ठिकाणी आपली प्रीति जडल्यास तीच आत्मस्थिति आपल्याही ठिकाणी कां बाणली जाणार नाही!

संताच्या चरित्राचे वर्णन केल्याने किंवा त्याचे श्रवण केल्याने त्यांच्या विषयी आपल्या अंत:करणात प्रीतीचा उमाळा निर्माण होतो व मनात त्यांची मूर्ति हळू हळू स्थिरावू लागते. मनात त्यांचे ध्यान वाणीने त्यांचे नामस्मरण होत राहते. अंत:करणाला अशा रीतीने त्यांचाच सारखा ध्यास लागतो. संतही प्रेमाचे सागर असल्यामुळे तेही आपल्या प्रेमाचा प्रवाह आपल्याकडे वळवितात. व आपल्याविषयी उत्पन्न झालेल्या कळवळयाने ते जेव्हा उपदेश करतात. तेव्हा त्या उपदेशात त्यांच्या शक्तीचा पात होत असल्याकारणाने आपल्या अंत:करणात दृढ ब्रह्मबोध ठसतो. मन निर्विकल्प होत जाते व विषयांचा विचारही मनाला शिवत नाही. अशारीतीने आपणही त्यांच्या प्रेमात वाहून जाऊ लागतो. प्रेमाच्या चढत्या श्रेणीत प्रेमाची जेव्हा अत्यंत तीव्र अशी अवस्था निर्माण होते, तेव्हा सर्व जगच संतमय वाटू लागते. संताचे व्यापक स्वरूप अशा रीतीने ध्यानात येताच तेच ज्ञान निर्विकल्प ज्ञानात परिणत होते व त्यांच्या विषयींचे असीम प्रेम पराप्रीतीत परिणत होते, माउलीविषयी नामदेव तुकारामादि संतांनी काढलेले उद्धार यादृष्टीने पाहण्यासारखे आहे.

"तिन्ही देव जैसे परब्रह्मीचे ठसे" (नाम० गा०) ज्ञानियाचा गुरु स्वामी महाराज। म्हणतो ज्ञानराज तुम्हा ऐसे "ब्रह्मादिकां जेथे तुम्हा ओळगण। इतका तुळण काय तेथे" (तु० गा०)

परी कर्मी असोनि कर्मे। जो नावरे समें विषमें। चर्मचक्षूंचेनि चामें। दृष्टि जैसी॥ ४०१॥
तैसा सोडवला जो आहे। तयाचें रूप आतां पाहें। उपपत्तीची बाहे। उभऊनि सांगो॥ ४०२॥

अर्थ—ज्याप्रमाणे चर्मचक्षूच्या कातड्यामुळे दृष्टि लिप्त होत नाही (अडसर निर्माण न होता ती मोकळीच राहते) त्याप्रमाणे कर्म करून देखील बऱ्यावाईट कर्माने तो गुरफटला जात नाही॥ ४०१ ॥ अशा रीतीने जो कर्मापासून सुटला आहे त्याचे स्वरूप उपपत्तीची भुजा उभारून (कार्यकारण संबंध दाखवून) सांगतो ते पाहा॥ ४०२॥

यस्य नाहङ्कृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते। हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते॥ १७॥

अर्थ—ज्याच्याठिकाणी अहंभाव नाही व ज्याची बुद्धी महणजे अन्त:करण लिप्त होत नाही त्याने लोकांचा वध करूनही तो (वस्तुत:) वध (म्हणून) करीत नाहीं व त्या कर्माने तो बद्ध होत नाही॥ १७॥

तरी अविद्येचिया निदा। विश्वस्वप्नाचा हा धांदा। भोगीत होता प्रबुद्धा। अनादि जो॥ ४०३॥
तो महावाक्याचेनि नांवें। गुरुकृपेचेनि थांवें। माथां हातु ठेविला नव्हे। थापटिला जैसा॥ ४०४॥
तैसा विश्वस्वप्नेंसी माया। नीद सांडूनि धनंजया। सहसा चेइला अद्वया-। नंदपणें जो॥ ४०५॥

अर्थ—हे सूज्ञ अर्जुना! जो अज्ञानाच्या झोपेत विश्वाच्या घडमोडीचे स्वप्न अनादिकालापासून अनुभवित होता॥ ४०३॥ तो (तत्त्वमस्यादि) महावाक्याच्या बोधाने व श्री गुरुच्या कृपेच्या बलाने, मस्तकावर हात ठेऊन थापटल्यामुळे नव्हे, अर्जुना! बिना सायास विश्वाच्या स्वप्नासह अज्ञानाची झोप टाकून देऊन अद्वैतभावाच्या आनंदाने जागा झाला॥ ४०४-४०५॥

तेव्हां मृगजळाचे पूर। दिसते एक निरंतर। हारपती कां चंद्रकर। फांकता जैसें॥ ४०६॥
कां बाळत्व निघोनि जाय। तैं बागुला नाहीं त्राय। पैं जळालिया इंधन न होय। रंधन जेवीं॥ ४०७॥
नाना चेवो आलिया पाठीं। तैं स्वप्न न दिसे दिठी। तैसी अहंममता किरीटी। नुरेचि तया॥ ४०८॥

अर्थ—त्यावेळी ज्याप्रमाणे चंद्राची किरणे फाकताक्षणीच एकसारखे दिसणारे मृगजळाचे पूर नाहीसे होतात॥ ४०६॥ किंवा बालपण निघून गेल्यावर ज्याप्रमाणे बागुलबोवाचे (भीतीचे) सामर्थ्य राहत नाही किंवा

लाकूड जळून गेल्यावर ज्याप्रमाणे स्वयंपाक होऊ शकत नाही॥ ४०७॥ किंवा जागृतीत आल्यानंतर ज्याप्रमाणे दृष्टीला स्वप्न पडत नाही त्याच प्रमाणे, अर्जुना! अहंता व ममता त्याचे ठिकाणी राहत नाही॥ ४०८॥

मग सूर्य आंधारालागी। रिघो का भलते सुरंगी। परी तो तयाच्या भागीं। नाहींचि जैसा॥ ४०९॥
तैसा आत्मत्वें वेष्टिला होये। तो जया तया दृश्यातें पाहे। ते दृश्य द्रष्टेपणेंसीं होत जाये। तयाचेचि रूप॥ ४१०॥

अर्थ—मग सूर्य अंधार पाहण्यासाठी कोणत्याही भुयारात प्रवेश करनो का? तो अंधार कधी त्याच्या वाट्याला येतच नाही॥ ४०९॥ त्याप्रमाणे आत्मभावाने व्यापलेला ज्ञानी असलेले जे जे दृश्य पाहील ते ते सर्व दृश्य त्याला। त्याचे स्वत:चे द्रष्टृस्वरूप भासत जाईल किंवा तो पाहील॥ ४१०॥

गूढार्थदीपिका—तैसा आत्मत्वें वेष्टिला होये।

भोक्ता-भोग्य व द्रष्टा-दृश्य यांचे ज्ञानाच्या भूमिकेवरून विचार करता द्वैत राहत नाही. म्हणजे भोक्ता व भोग्य किंवा द्रष्टा व दृश्य यांच्या भिन्न सत्ता किंवा यांचे भिन्न वस्तुत्व भासत नाही. हे दोन्ही ही एका वस्तूचे तुकडे किंवा भाग नसून एक अफूट वस्तुच आपल्या प्रेमाकरिता एकाच सत्तेवर स्फुरण पावत असल्यामुळे दोन रूपाने भासते एवढेच. प्रेमामुळेच त्यांच्या दोनपणाचे ज्ञानही होत नाही. व दोनपणाचे ज्ञान होत नाही म्हणूनच त्यांच्यातील दोनपणातही एकच वस्तु (सच्चिदानंद ब्रह्म) आपले एकपण कायम ठेऊन दृष्टा-दृश्य किंवा भोक्ता भोग्य भावाने क्रीडा करते.

अज्ञानदशेत दृश्याला आपल्याहून भिन्नपणाने पाहत असता जी दृश्याची जाणीव होत होती ती ज्ञानानंतर उत्पन्नच होत नाही. अज्ञानदशेत द्रष्टा चेतन, दृश्य जड असा भेद असतो. म्हणूनच मी दृश्य पाहिले अशी जाणीव उत्पन्न होऊ शकते. पण ज्ञानदृष्टीने जेव्हा द्रष्टा-दृश्यही आत्मस्वरूपाने म्हणजे आपल्याच स्वरूपाचे पाहतो, तेव्हा तो जाणीवस्वरूप द्रष्टा आत्म्याच्या नित्यज्ञानदृष्टीशी ऐक्य पावून तोही नित्यज्ञान दृष्टिस्वरूपच होऊन जातो. जडरूप दृश्याचा भास संपूर्णपणे मावळून जातो.

आता आत्मा स्वसंवेद्य आहे तर मग आपली जाणीव उत्पन्न होणार नाही काय? हा प्रश्न उत्पन्न होतो. तर त्याचे उत्तर असे आहे की नित्यज्ञानस्वरूप असलेल्या आत्म्याला त्याची जाणीव उत्पन्न होण्याचे कारणच नाही. जाणीव ही द्वैतातच उत्पन्न होते. जीवब्रह्मैक्याची जाणीव देखील द्वैताचा भास राहतो म्हणूनच होते. द्वैताचा भास निवृत्त होऊन स्वाभाविक मूळची ऐक्य स्थिति प्राप्त झाली म्हणजे जीव ब्रह्मैक्याची जाणीव स्फुरणेही बंद पडते.

द्रष्टा दृश्यरूपाने स्फुरणे हा आत्म्याच्या स्वभावच असल्यामुळे स्वभावाची जाणीव वस्तूला कधी होत नाही, हा भाव.

माउलींनी अमृतानुभवाच्या सातव्या प्रकरणात हाच अर्थ स्पष्ट केला आहे. माउली म्हणते.

कल्लोळ जळीं धातलें। सोनेनि सोनें पांघरलें। दिठीचे पाय गुंतले। दिठीसीचि॥ २४७॥ श्रुतीसी मेळविली श्रुती। दृतीसी मेळविली दृती। कां जे तृप्तीसी तृप्ती। वोगरली॥ २४८॥ हा येणें पाहिला ऐसा। कांहीं न पाहिला जैसा। आणि न पाहताही आपैसा। पाहणेंचि हा॥ २५१॥

जैसा वन्हि जया लागे। तें वन्हिचि जालिया आंगें। दाह्यदाहकविभागें। सांडिजे तें॥ ४११॥
तैसा कर्माकारा दुजेया। तो कर्तेपणाचा आत्मया। आळु आला तो गेलिया। कांहीं बाहीं जें उरे॥ ४१२॥
तिये आत्मस्थितीचा जो रावो। मग तो देहीं इये जाणेल ठावो। काय प्रल्यांबूचा उन्नाहो। वोघु मानी॥ ४१३॥
तैसी ते पूर्ण अहंता। काई देहपणें पांडुसुता। आवरे काई सविता। बिंबें धरिला॥ ४१४॥
पै मथूनि लोणी घेपे। तें मागुती ताकीं घापे। तरी तें अलिप्तपणें सिंपे। तेणेंसीं काई॥ ४१५॥
नाना काष्ठौनी वीरेशा। वेगळाविलियां हुताशा। राहे काष्ठाचिया मांदुसा। कोंडलेपणें॥ ४१६॥
कां रात्रीचिया पोटाआंतु। निगाला जो हा भास्वतु। तो रात्री ऐसी मातु। ऐके कायी॥ ४१७॥
तैसें वेद्य वेदकपणेंसी। पडिलें कां जयाचे ग्रासीं। तया देह मी ऐसी। अहंता कैंची॥ ४१८॥

आणि आकाशें जेथें जेथुनी। जाइजे तेथ असे भरोनि। म्हणोनि ठेलें कोंदोनि। आपेंआप॥ ४१९॥
तैसें जें तेणें करावें। तो तेंचि आहे स्वभावें। मा कोणें कर्मीं वेष्टावें। कर्तेपणें॥ ४२०॥
नुरेचि गगनावीण ठावो। नोहेचि समुद्रा प्रवाहो। नुठीचि ध्रुवा जावों। तैसें जाहालें॥ ४२१॥
ऐसेनि अहंकृतिभावो। जयाचां बोधीं जाहाला वावो। तऱ्ही देहा जंव निर्वाहो। तंव आथी कर्मे॥ ४२२॥

अर्थ—ज्याप्रमाणे अग्नि ज्याला ग्रासतो तो पदार्थ सर्वांगाने अग्निरूपच झाल्यामुळे दाह्य व दाहक (जाळणारा अग्नि व जळली जाणारी वस्तु) हा विभाग उरू देत नाही॥ ४११॥ त्याप्रमाणे आत्म्याहून भिन्न असलेल्या कर्मामुळे आत्म्याच्या ठिकाणी जो कर्तेपणाचा आरोप आला होता तो नाहिसा झाल्यावर जे काही अवशिष्ट राहते॥ ४१२॥ अशा आत्मस्थितीवर जो आरूढ झाला तो या देहापुरतेच आपल्याला समजेल काय? प्रलयसागराची भरती (प्रलयजलाचा तांडव करणाऱ्या ऊर्मी) स्वत:ला ओहोळ समजतील काय?॥ ४१३॥ त्याप्रमाणे मीच सर्व ब्रह्मरूप आहे ही व्यापक ज्ञानाहंता देहभावाने सिमित होईल काय? सूर्य काय आपल्या बिंबापुरताच मर्यादित होईल?॥ ४१४॥ ताक घुसळल्यावर लोणी काढून घेऊन ते पुन: ताकात घातले तरी ते ताकात एकरूप होऊन मिसळेल काय?॥ ४१५॥ हे वीरश्रेष्ठा! अथवा लाकडातून अग्नि मंथन करून वेगळा केलां असता तो काय लाकडाच्या पेटीत कोंडून राहतो.॥ ४१६॥ किंवा रात्रीच्या पोटात शिरलेला सूर्य रात्री नावाची गोष्ट आहे असे ऐकेल काय?॥ ४१७॥ त्याप्रमाणे जाणली जाणारी वस्तु व जाणणारा (ज्ञेय व ज्ञाता) यांचा ज्याठिकाणी एकच घास झाला (ऐक्य झाले) त्याच्या ठिकाणी 'मी देह' ही अहंता कोठून असणार!॥ ४१८॥ आणि आकाशाने जेथून जेथे जावे तेथे ते सारखे भरलेलेच असते. कारण ते स्वभावत:च सर्वत्र गच्च भरून असते.॥ ४१९॥ त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाने जे जे करावे ते ते स्वभावत: त्याचेच रूप आहे. मग कोणत्या कर्माने कर्तेपणाच्या अभिमानाने त्याने गुंतावे (कोणत्या कर्माचा त्याने कर्तेपणा घ्यावा)॥ ४२०॥ अवकाशाला ज्याप्रमाणे दुसरे वसतिस्थान नसते, किंवा समुद्राला ज्याप्रमाणे प्रवाह नसतो किंवा ध्रुवाला ज्याप्रमाणे गती नसते त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाची स्थिति असते (ज्ञानीपुरुष आत्मनिष्ठ असतो)॥ ४२१॥ अशा रीतीने आत्मबोधामुळे ज्याचा अहंकार व्यर्थ झाला (संपूर्ण नाहिसा झाला) तरी त्याचा देह आहे तोपर्यंत त्याच्याकडून कर्मे होतच असतात॥ ४२२॥

गूढार्थदीपिका—क्रिया किंवा गती दोन वस्तूंची कल्पना केल्याशिवाय संभवत नाही. अत्यंत व्यापक असलेल्या आकाशाला राहण्याचे ठिकाण आकाशाशिवाय दुसरे नसते. सर्व प्रवाह ज्याठिकाणी मिळतात त्या समुद्राचा प्रवाह, कसा निर्माण होणार? ध्रुव म्हणजेच निश्चळ. त्याला गती कशी येणार? त्याचप्रमाणे ज्ञानीपुरुष आकाशापेक्षाही व्यापक असलेल्या ब्रह्माशी एकरूप होत असल्यामुळे त्याच्याठिकाणी इतरांना भासणारे कर्मादी भाव त्याच्या ज्ञानात केवळ ब्रह्मरूप असतात. त्याच्या ठिकाणी अज्ञानाच्या ठिकाणी उठणारा त्रिपुटीचा भाव केव्हाही उमटत नाही. प्रारब्धाने त्याच्याकडून सर्व कर्मे होत असली तरी कर्मादी सर्व त्याला आपला स्वभावच म्हणजे चिन्मात्रस्वरूपच आहे असे वाटते, हा भाव.

अगा वारा जरी वाजोनि वोसरे। तरी तो डोल रुखीं उरे। कां सेंदें द्रुति राहे कापुरें। वेंचलेनी॥ ४२३॥
कां सरलेया गीताचा समारंभु। न वचे राहवलेपणाचा क्षोभु। भूमी ल्वेळोनी गेलिया अंबु। वोल थारे॥ ४२४॥
अगा मावळलेनि अर्कें। संध्येचिये भूमिके। ज्योतिदीप्ती कौतुकें। दिसे जैसी॥ ४२५॥
पैं लक्ष भेदिलियाहीवरी। बाण धांवेचि तंववरी। जंव भरली आथी उरी। बळाची तया॥ ४२६॥
नाना चक्रीं भांडें जालें। तें कुंलालें परतें नेलें। परी भ्रमेचि तें मागिले। भोवंडिलेपणें॥ ४२७॥
तैसा देहाभिमान गेलिया। देह जेणें स्वभावें धनंजया। जालें तें आपैसया। चेष्टवीच तें॥ ४२८॥
संकल्पेंवीण स्वप्न। न लावितां दांगीचें बन। न रचितां गंधर्वभुवन। उठी जैसें॥ ४२९॥
आत्मयाचेनि उद्यमेंवीण। तैसें देहादि पंचकारण। होय आपणयां आपण। क्रियाजात॥ ४३०॥
पैं प्राचीनसंस्कारशेषें। पांचही कारणें सहेतुकें। कामवीजती गा अनेकें। कर्माकारें॥ ४३१॥

अर्थ—सोसाट्याने वाहणारा वारा जरी थांबला तरी झाडांच्या ठिकाणी हालचाल चालूच राहते. किंवा कापूर संपून गेला तरी करंड्याला सुगंध येतच असतो॥ ४२३॥ किंवा गाण्याची मैफल संपल्यानंतर गाण्याच्या तंद्रीचा भर संपत नाही. किंवा जमिनीवर सांडलेले पाणी निघून गेले तरी ओलेपणा कायम असतो॥ ४२४॥ सूर्य मावळल्यावर संध्याकाळी जशी सूर्याची प्रभा कौतुकवश दिसतच राहते॥ ४२५॥ जोपर्यंत बाणामध्ये वेगसामर्थ्य उरले असते तोपर्यंत तो बाण लक्ष्याचा वेध केल्यानंतरही ज्याप्रमाणे पुढे जातच असतो॥ ४२६॥ किंवा चाकावरील भांडे तयार झाल्यावर कुंभाराने ते काढून घेतले तरी चाकाचे गरगर फिरणे ज्याप्रमाणे पूर्वीच्या गतीमुळे चालूच राहते॥ ४२७॥ त्याप्रमाणे देहाचा अभिमान नाहीसा झाल्यावरही, अर्जुना! ज्या प्रकृतिगुणाने देह निर्माण झाला ते देहाकडून कर्मे घडवीत असतात॥ ४२८॥ कोणत्याही प्रकारे मनात इच्छा नसता जसे स्वप्न पडते किंवा रोपणी शिवाय झाडे लागतात किंवा आकाशात गंधर्वनगराची रचना न करताच ते निर्माण होतात॥ ४२९॥ त्याप्रमाणे आत्म्याकडून कोणताही उद्योग न होता देहादी पांच कारणामुळे ʼआपोआप सर्व कर्मे घडतात॥ ४३०॥ शिल्लक राहिलेल्या पूर्व जन्मीच्या संस्कारामुळे पांचही कारण व साधने अनेक प्रकारची कर्मे करवितात॥ ४३१॥

तया कर्मामाजीं मग। संहरो आघवें जग। अथवा नवें चांग। अनुकरो॥ ४३२॥
परी कुमुद कैसेनि सुके। तें कमळ कैसें फाकें। हीं दोन्हीं रवी न देखे। जयापरी॥ ४३३॥
का वीजु वर्षोनि आभाळ। ठिकरिया आतो भूतळ। अथवा करू शाड्वळ। पर्जन्यवृष्टी॥ ४३४॥
परी तया दोहींतें जैसें। नेणिजेचि कां आकाशें। तैसा देहींच जो असे। विदेहदृष्टी॥ ४३५॥
तो देहादिकी चेष्टीं। घडतां मोडतां हे सृष्टी। न देखे स्वप्न किरीटी। चेइला जैसा॥ ४३६॥
एऱ्हवीं चामाचे डोळेवरी। जे देखती देहचिवरी। ते कीर तो व्यापारी। ऐसेंचि मानिती॥ ४३७॥

अर्थ—त्या कर्मामध्ये सर्व जगाचा नाश होवो अथवा नवीन चांगले जग उत्पन्न होवो॥ ४३२॥ कमल कसे सुकते किंवा ते कसे उमलते ह्या दोन्हीही गोष्टी ज्याप्रमाणे सूर्य जाणत नाही॥ ४३३॥ वीज पडून जमिनीचे तुकडे होवोत अथवा पाऊस पडून हिरवळ निर्माण होवो ह्या दोन्ही गोष्टी आकाश ज्याप्रमाणे जाणत नाही, त्याच प्रमाणे देहात असूनच जो देहाभिमानरहित असतो॥ ४३४-४३५॥ ज्याप्रमाणे स्वप्नातून जागा झालेला स्वप्नातील जगत पाहत नाही त्याप्रमाणे देहादिकांकडून घडलेल्या क्रियांनी सृष्टी निर्माण झाली किंवा नाश पावली हे तो जाणत नाही॥ ४३६॥ एऱ्हवी जे देहपणाने मर्यादित अशा स्थूल दृष्टीने त्याला पाहतात तेच तो कर्म करणारा कर्ता आहे असे समजतात॥ ४३७॥

कां तृणाचा बाहुला। जो आगरामेरे ठेविला। तो साचचि राखता कोल्हा। मानिजे ना॥ ४३८॥
पिसें नेसलें कां नागवें। हें लोकीं येऊनि जाणावें। ठाणोरियाचे मवावे। आणिकीं घाय॥ ४३९॥
का महासतीचे भोग। देखे कीर सकळ जग। परी ते आगी ना आंग। ना लोकु देखे॥ ४४०॥
तैसा स्वस्वरूपें उठिला। जो दृश्येंसी द्रष्टा आटला। तो नेणे काय राहटला। इंद्रियग्रामु॥ ४४१॥
अगा थोरी कल्लोळीं कल्लोळ साने। ल्रेपतां तिरींचेनि जनें। एकीं एक गिळिलें हें मनें। मानिजे जऱ्हीं॥ ४४२॥
तऱ्ही उदकाप्रति पाहीं। कोण ग्रसितसे काई। तैसें पूर्णा दुजें नाहीं। जें तो मारी॥ ४४३॥

अर्थ—शेताच्या कडेला ठेवलेले गवताचे बाहुल्याला हा खराच शेताचा रक्षणकर्ता आहे असे कोल्हा समजत नाही काय!॥ ४३८॥ पागल माणूस वस्त्र नेसला आहे की नागवा आहे हे लोकांनी पाहूनच ठरवावे (त्याला स्वत:चे भानच नसते) किंवा युद्धात ठार झाले त्यांच्या जखमा इतरांनी मोजाव्या॥ ४३९॥ सती जाणाऱ्या पतिव्रतेचे भोग (मळवट शृंगारादी) सर्व जग खरे समजतात, पण तिला मात्र ना आग, ना शरीर ना लोक यांचे भान असते, त्याप्रमाणे जो स्वस्वरूप झाला अर्थात ज्याचे द्रष्ट्रत्व दृश्यासह मावळले त्याला, इंद्रियांच्या समुदायाकडून काय व्यापार होतात हे कळत नाही॥ ४४०-४४१॥ अर्जुना! मोठ्या लाटेमुळे लहान लाट नाहीशी झाल्याचे पाहून तीरावरील लोकांना मोठ्या लाटेने लहान लाटेला गिळिले असे जरी वाटत असले, तरी पाण्याच्या दृष्टीने पाहता कोणी कोणाला गिळिले!

त्या प्रमाणे पूर्णस्वरूप झालेल्या ज्ञान्याला ज्याला तो मारील असे दुसरे काही नाहीच॥ ४४२-४४३॥

गूढार्थदीपिका—मुक्त पुरुषांचा व्यवहार कसा होतो याचे वर्णन या सर्व ओव्यांतून माउली करीत आहे.

अज्ञानी लोकांना ज्ञानी कर्म करताना दिसत असले तरी ज्ञानी पुरुषांना त्याचे ज्ञान नसल्यामुळे त्यांच्या दृष्टीने खरोखर कर्म किंवा व्यापार अशी वस्तुच अस्तित्वात नसते. अज्ञानी पुरुष ज्याला कर्म म्हणतो ते वस्तुत: चैतन्यच असते. म्हणून ज्ञान्याला सर्व कर्म आत्मस्वरूप वाटते. जड, विनाशी, दु:खरूप जगत् अज्ञान्याला भासते. कारण तशा तऱ्हेचेच ज्ञान त्याला होत असते व तसाच त्याला अनुभव असतो. कर्माचे ठिकाणी ज्ञान्याला सत्, चित् आनंदरूप ब्रह्माचेच दर्शन घडत असते.

जग म्हणजे एक नाना प्रकारच्या वस्तूंचा समुदाय आहे व त्या नाना प्रकारच्या वस्तूंची ती नामरूपे आहेत असे अज्ञानी समजतो तर चैतन्य ही एकच वस्तु आहे व तिचीच सर्व नामरूपे आहेत असे ज्ञानी समजतो. म्हणून त्यांच्याकडून काहीही व कितीही व्यापार झालेला दिसला तरी त्यांची अक्रियस्थिति कधीही भंगत नाही. माउलींनी हीच गोष्ट.

"व्यापाराचे गाडे। मोडताही अपाडे। अक्रियेचे न मोडे। पाउल केही॥" (अमृ० ९-२०)

या ओवीत सांगितले आहे. माउली म्हणते ज्ञानी पुरूषांचे विषयसेवन म्हणजे चंद्रावर चंद्रप्रकाशाचे जसे पडणे किंवा समुद्रावर पाण्याचा वर्षाव होणे असे आहे (अमृ० ९-१८)

अग्नीला अग्नीचा संयोग झाला असता तो काय पोळणार? त्याचप्रमाणे जो ज्ञानी आत्मस्वरूपाशिवाय कर्माचा कोणताही पसारा जाणतच नाही त्याच्या बुद्धीला कोणते कर्म लिप्त करील? एवढे मात्र खरे की मुक्त पुरूषांचे देह प्राक्तनाने केवल व्यवहार करीत असतानाही मूर्ख अज्ञानी लोक मात्र त्यांना भ्रमाने कर्ता समजतात.

सुवर्णाचिया चंडिका। सुवर्णशूळेंचि देखा। सुवर्णाचिया महिखा। नाशु केला॥ ४४४॥
तो देवलवसिया कडा। व्यवहारु गमला फुडा। वांचूनि शूळ महिष चामुंडा। सुवर्णचि तें॥ ४४५॥
पैं चित्रींचे पाणी हुताशु। तो दृष्टीचाचि आभासु। पटीं आगीवोलांशु। दोन्ही नाहीं॥ ४४६॥
मुक्ताचें देह तैसें। हालत संस्कारवशें। तें देखोनि लोक पिसे। कर्ता म्हणती॥ ४४७॥

अर्थ—सोन्याच्या केलेल्या देवीने सोन्याच्याच शूलाने सोन्याच्याच महिषासुराचा केलेला वध, जवळच असलेल्या देवळातील पुजाऱ्याच्या दृष्टीने खराच वाटला तरी, महिषासुर, शूळ व देवी एका सोन्याशिवाय काहीच नाही. ते सर्व सोनेच आहे॥ ४४४-४४५॥ चित्रात दिसणारे पाणी व अग्नि केवळ पाहाणाऱ्याच्या दृष्टीला येणारा आभासरूप प्रत्यय आहे. (चित्राचा आधार असणाऱ्या) वस्त्राच्या ठिकाणी मात्र अग्नी किंवा पाण्याचा ओलावा दोन्हीही नाहीत॥ ४४६॥ त्याप्रमाणे मुक्त पुरुषाचे देह प्राक्तनाने (पूर्वीच्या कर्माने) केवळ व्यवहार करतात. पण ते पाहून मूर्ख (अज्ञानी) लोक त्यांना कर्ता समजतात.॥ ४४७॥

आणि तयां करणेयाआंतु। घडो तिहीं लोकां घातु। परी तेणें केला हे मातु। बोलोंचि नये॥ ४४८॥
तंव अंध:कार देखावा तेजें। मा तो फेडी जे हें कें बोलिजे। तैसें ज्ञानिया नाहीं दुजें। मारील कायी॥ ४४९॥

अर्थ—आणि त्या मुक्त पुरुषाच्या कर्म करण्यात त्रैलोक्य पूर्णपणे नष्ट झाले तरी त्यांनी ते केले ही गोष्ट म्हणता येत नाही॥ ४४८॥ सूर्याने अंध:कार पाहिला व त्या अंध:काराचा त्याने नाश केला हे जसे म्हणणे त्याच प्रमाणे (ज्ञान्याला जग सत्य वाटले व त्याचा नाश करून त्या कर्माचा तो कर्ता झाला असे म्हणणें होय.) पण ज्ञान्याला दुसरा पदार्थच नाही की ज्याला तो मारील॥ ४४९॥

म्हणोनि तयाची बुद्धी। नेणे पापपुण्याची गंधी। गंगा मीनलिया नदी। विटाळ जैसा॥ ४५०॥
अग्नीसी अग्नी झगटलिया। काय पोळे तो धनंजया। कीं शस्त्र रुपे आपणया। आपणचि॥ ४५१॥
तैसें आपणपयापरतें। जो नेणे क्रियाजातातें। तेथ काय लिंपवी बुद्धीतें। तयाचिये॥ ४५२॥

अर्थ—ज्या प्रमाणे नदी गंगेला मिळाल्यावर नदीचा अमंगलपणा राहत नाही, म्हणून ज्ञानी पुरुषाच्या बुद्धीला

पापपुण्याचा स्पर्श नसतो॥ ४५०॥ अग्नीला अग्नीचा संयोग झाला असता तो पोळेल काय? किंवा शस्त्र आपणच आपल्याला कधी रुतेल काय?॥ ४५१॥ त्याप्रमाणे जो ज्ञानी आत्मस्वरूपाशिवाय दुसरी कर्म नावाची वस्तु जाणतच नाही त्याच्या बुद्धीला कोणते कर्म लिप्त करील?॥ ४५२॥

म्हणोनि कार्य कर्ता क्रिया। हें स्वरूपचि जाहालें जया। नाहीं शरीरादिकीं तया। कर्मबंध॥ ४५३॥
जे कर्ता जीव विंदाणी। काढूनि पांचही खाणी। घडित आहे करणीं। आउतीं दाहे॥ ४५४॥
तेथ न्यावो आणि अन्यावो। हा द्विविधु साधूनि आवो। उभवितां न लवी खेंवो। कर्मभुवनें॥ ४५५॥
या थोराडा कीर कामा। विरजा नोहे आत्मा। परी म्हणसी हन उपक्रमा। हात लावी॥ ४५६॥
तो साक्षी चिद्रूपु। कर्मप्रवृत्तीचा संकल्पु। उठी तो कां निरोपु। आपणचि दे॥ ४५७॥
तरी कर्मप्रवृत्तीहीलागीं। तया आयासु नाहीं आंगीं। जे प्रवृत्तीचेही उळिगीं। लोकुचि आथी॥ ४५८॥
म्हणोनि आत्मयाचें केवळ। जो रूपचि जाहला निखिळ। तया नाहीं बंदिशाळ। कर्माची हे॥ ४५९॥

अर्थ—म्हणून कार्य, कर्ता व क्रिया हे सर्व ज्याचे आत्मस्वरूपच झाले त्याला शरीरादिकांनी केलेल्या कर्माचा बंध लागत नाही॥ ४५३॥ स्वत:ला कर्ता मानणारा जो जीव तो आपल्या बुद्धीच्या कौशल्याने दहा इंद्रियांच्या अवजारांचे साहाय्य घेऊन कर्माची कारणे असलेले अधिष्ठानादी पाच खाणी बाहेर काढून कर्ममात्र तयार करीत असतो॥ ४५४॥ तेथे (विधि) धर्म व (निषेध) अधर्म असे दोन प्रकारचे आकार साधून (कर्मे करून) कर्माचे विश्व उभारण्याला क्षणाचाही वेळ लागत नाही॥ ४५५॥ या प्रचंड कामाला खरोखरच आत्म्याचे साहाय्य होत नाही. तरी तू म्हणशील या कामाच्या आरंभाला आत्मा हातभार लावतो की॥ ४५६॥ तो आत्मा चिद्रूप असून साक्षीरूप असल्याकारणाने कर्म करण्याची वृत्ती त्याच्या ठिकाणी उठली तरी आपणच तो आज्ञा देईल काय?॥ ४५७॥ ज्या कर्म प्रवृत्तीच्या बिगारीला सर्व लोकच कारणीभूत आहेत. आत्म्याला अंगाने प्रवृत्ति करताना काही श्रम करावे लागत नाही॥ ४५८॥ म्हणून जो केवळ पूर्ण आत्मस्वरूपच झाला त्याला कर्माचा हा बंदिवास नाही॥ ४५९॥

गूढार्थदीपिका—वेदान्तात विचार हा नेहमी दोन भूमिकेवरून कसा होत जातो याचे हे एक उदाहरण आहे. माउलींनी ओवी ४४७ ते ४५३ पर्यंत ज्ञान्याच्या भूमिकेचे वर्णन केले व आत्मस्वरूपाची ओळख झालेल्या पुरुषाला एका परब्रह्माशिवाय दुसरी वस्तूच भासत नसल्यामुळे त्याचा सर्वव्यवहार ज्ञाता ज्ञान, ज्ञेय या त्रिपुटीविरहित असा होतो; हे सांगितले. त्याच्या सर्व व्यवहारात सच्चिदानंदाचे अखंड अनुसंधान कायम राहते. त्याच्याठिकाणी उठणारी कर्ता, कर्म, क्रियारूप त्रिपुटी केव्हाही उठत नाही. म्हणूनच तो परब्रह्माप्रमाणे अकर्तृस्वरूप साक्षी होतो हे सांगितले. ही ज्ञान्याची भूमिका. पुढे ओवी ४५४ व ४५५ यात अज्ञान्याच्या भूमिकेचे वर्णन करतात.

वस्तुत: मी रूपाने आपल्या ठिकाणी होणारे स्फुरण हे परब्रह्माचे निरुपाधिक स्फुरण असते. स्फुरणाला आधार असणाऱ्या परब्रह्मरूप अधिष्ठानाकडे आपण लक्ष देत नाही. अधिष्ठानाकडे दुर्लक्ष झाल्याबरोबर अधिष्ठानाची विस्मृति होऊन अधिष्ठान व स्फुरण यांची फारकत होते. व वस्तुत: एकरूपच असलेला दोनपणा भिन्नसत्तेमुळे द्वैतात परिणत होतो. 'मी' म्हणताच अर्थातच अमर्यादित्वाची जाणीव आपण न बाळगता मर्यादितपणाची जाणीव बाळगून त्याचे देहाशी तादात्म्य करतो व देहाला दिलेल्या नावाने आपल्या 'मी' ची ओळख व्हावयाला सुरुवात होते.

द्वैताला सुरुवात झाल्याबरोबर देश, काल, वस्तु यांच्या मर्यादांच्या कल्पनांना अशा रीतीने सुरुवात होऊन त्रिविध परिच्छेदाची निर्मिती होते. अधिष्ठानरूप परब्रह्माच्या सच्चिदानंद धर्माच्या ठिकाणी आवरण पडत असल्यामुळे अर्थातच त्याच्या विपरीत धर्मांची प्रतीति मग आपल्याला येऊ लागते. आवरणाची परिणती अशा रीतीने विक्षेपात होते. हा सर्व प्रकार अधिष्ठानाच्या विस्मृतिरूप अज्ञानातून उद्भवतो.

आत्मस्वरूपाची विस्मृति अशा रीतीने विपरीत धर्माच्या दृश्याचा पसारा निर्माण करते. व सच्चिदानंदरूप द्रष्ट्याचा नामरूपांनी नटलेला हा सच्चिदानंदरूप विलास असत्-जडरूपादि जगत्प्रपंचरूपाने भासायला लागतो. अशा रीतीने द्रष्ट्याहून पूर्णपणे अलग व त्याच्या स्वरूपाहून ही पूर्णपणे विपरीत धर्माचे दृश्य द्रष्ट्याला भासते. त्रिविध

परिच्छेद म्हणून ज्याचा पूर्वी उल्लेख केला त्या त्रिविध परिच्छेदांनी युक्त असा विषयांचा पसारा निर्माण होतो.

द्रष्टा मर्यादित झाल्यामुळे व विषयही मर्यादित स्वरूपाचे भासत असल्यामुळे त्याला आवडणाऱ्या निरनिराळ्या विषयांच्या प्राप्तीत आनंद व न आवडणाऱ्या विषयांच्या संपर्कात दु:ख होऊ लागते. आवडणाऱ्या विषयांची प्राप्ती व न आवडणाऱ्या विषयांचा संपर्क टाळण्याचा त्याचा मग सारखा प्रयत्न दहा इंद्रियादिकांच्या द्वारा सुरू होतो.

या दोन्ही प्रकारच्या प्रयत्नामुळे निरुपाधिक 'मी' च्या स्फुरणाला देहतादात्म्यामुळे अहंकाराचे स्वरूप प्राप्त होते. कर्तृत्वादिकांची जाणीव तो आपल्याठिकाणी ओढून घेतो. अशा प्रकारे कर्माच्या जाळ्यात सापडून कर्माने पूर्णपणे जखडला जातो. अज्ञानाला कर्मांचा बंध कसा होतो याची ही अशी कहाणी आहे. अज्ञानाची दशा यालाच म्हणतात.

परी अज्ञानाच्या पटीं। अन्यथा ज्ञानाचें चित्र उठी। तेथ चितारणी हे त्रिपुटी। प्रसिद्ध जे कां॥ ४६०॥

अर्थ—परंतु अज्ञानाच्या पटावर विपरीत ज्ञानाचे चित्र उठते व प्रसिद्ध असलेली त्रिपुटीच चित्र काढणारी आहे॥ ४६०॥

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना। करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसङ्ग्रहः॥ १८॥

अर्थ—ज्ञान, ज्ञेय व ज्ञाता हे त्रिकुट कर्माचे प्रेरक आहेत व कारण, कर्म व कर्ता असे कर्माचे त्रिविध साहित्य आहे॥ १८॥

जें ज्ञान ज्ञाता ज्ञेय। हें जगाचें बीजत्रय। तें कर्माची नि:संदेह। प्रवृत्ति जाण॥ ४६१॥
आतां ययाचि गा त्रया। व्यक्ती वेगळालिया। आइकें धनंजया। करूं रूप॥ ४६२॥

अर्थ—ज्ञान, ज्ञाता, ज्ञेय ही त्रिपुटी जगाला कारणीभूत आहे. त्यामुळे हिच्यापासून कर्माची नि:संशय प्रवृत्ती होते॥ ४६१॥ आता या तिघांचे वेगवेगळे स्पष्ट स्वरूप सांगतो. अर्जुना ऐक॥ ४६२॥

तरी जीवसूर्यबिंबाचे। रश्मी श्रोत्रादिकें पांचें। धांवोनि विषयपद्माचे। फोडिती मढ॥ ४६३॥
कीं जीवनृपाचे वारु उपलाणें। घेऊनि इंद्रियांचीं केंकाणें। विषयदेशींचें नागवणें। आणीत जे॥ ४६४॥
हें असो इहीं इंद्रियीं राहटे। जें सुखदु:खेंसीं जीवा भेटे। तें सुषुप्तिकाळीं वोहटे। जेथ ज्ञान॥ ४६५॥
तया जीवा नांव ज्ञाता। आणि जें हें सांगितलें आतां। तेंचि एथ पांडुसुता। ज्ञान जाण॥ ४६६॥
जें अविद्येचिये पोटीं। उपजतखेवों किरीटी। आपणयातें वांटी। तिहीं ठायीं॥ ४६७॥
आपुलिये धांवे पुढां। घालूनि ज्ञेयाचा गुंडा। उभारी मागिलीकडां। ज्ञातृत्वातें॥ ४६८॥

अर्थ—श्रोत्रादि पांच इंद्रिये ही जीवरूपी सूर्याच्या बिंबाची किरणे असून ती विषयरूपी कमलाकडे धाव घेतात व त्यांच्या कळ्या उमलवितात॥ ४६३॥ किंवा जीवरूपी राजा शरीररूपी खोगीर असलेल्या घोड्यावर बसून व इंद्रियरूपी (युद्ध सामग्री) घेऊन व विषयरूपी देशावर आक्रमण करून सुखदु:खरूपी लूट आणतो॥ ४६४॥ हे असो. या इंद्रियांच्या होणाऱ्या व्यापारामुळे जे ज्ञान सुखदु:खासह जीवाला भेटते ते सुषुप्तीमध्ये जेथे लीन असते॥ ४६५॥ त्या अशा जीवाला ज्ञाता हे नाव आहे आणि ज्याविषयी आतापर्यंत मागील ओवीत सांगितले तेच या ठिकाणी अर्जुना! ज्ञान हे समज॥ ४६६॥ जे ज्ञान अविद्येचे पोटी जन्म घेताक्षणीच आपली, अर्जुना! तीन ठिकाणी वाटणी करते॥ ४६७॥ जे ज्ञान आपल्या धावेपुढे ज्ञेयाचा दगड टाकून आपल्या मागील बाजूला ज्ञातेपणाला (ज्ञात्याला) उभारते॥ ४६८॥

मग ज्ञातया ज्ञेया दोघां। तो नांदणुकेचा बगा। माजीं जालेनि पैंगा। वाहे जेणें॥ ४६९॥
टाकूनि ज्ञेयाची शीव। पुरे जयाची धांव। सकळ पदार्थां नांव। सूतसे जें॥ ४७०॥
तें गा सामान्यज्ञान। या बोला नाहीं आन। ज्ञेयाचेंही चिन्ह। आइक आतां॥ ४७१॥

अर्थ—अशा रीतीने ज्ञाता व ज्ञेय यांच्या परस्पर व्यवहाराचा मार्ग तयार झाल्यावर त्या ज्ञानाच्या मार्गाने राहाटी सतत चालू राहते॥ ४६९॥ ज्ञेयाची हद्द येताच ज्या ज्या ज्ञानाची धाव खूंटते आणि मग जे ज्ञान सर्व पदार्थनामांना जन्म देते॥ ४७०॥ याला सामान्य ज्ञान म्हणतात, हे म्हणणे अन्यथा नाही. आतां ज्ञेयाचें स्वरूपही ऐक॥ ४७१॥

तरी शब्द स्पर्शु। रूप गंध रसु। हा पंचविध आभासु। ज्ञेयाचा जो॥ ४७२॥
जैसें एकेंचि चूतफळें। इंद्रियां वेगळवेगळें। रसें वर्णें परिमळें। भेटिजे स्पर्शें॥ ४७३॥
तैसें ज्ञेय तरी एकसरें। परी ज्ञान इंद्रियद्वारें। घे म्हणोनि प्रकारें। पांचें जालें॥ ४७४॥
आणि समुद्रीं वोघाचें जाणें। सरे लाणीपासीं धांवणें। कां फळीं सरे वाढणें। सस्याचें जेवीं॥ ४७५॥
तैसें इंद्रियांच्या वाहवटीं। धांवतया ज्ञाना जेथ ठी। होय तें गा किरीटी। विषय ज्ञेय॥ ४७६॥
एवं ज्ञातया ज्ञाना ज्ञेया। तिहीं रूप केलें धनंजया। हे त्रिविध सर्व क्रिया-। प्रवृत्ति जाण॥ ४७७॥

अर्थ—शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध असे पांच प्रकारचे ज्ञेयाचे प्रत्यय आहेत॥ ४७२॥ जसा एकच आंबा गोडी, रंग व सुवास इत्यादि व स्पर्श प्रकारांनी भिन्न भिन्न इंद्रियांना भिन्न रीतीने जाणवतो॥ ४७३॥ त्याप्रमाणे ज्ञेय जरी एकच असले तरीपण त्याचे ज्ञान, निरनिराळ्या इंद्रियांच्या द्वारे घेतल्यामुळे पांच प्रकाराने झाले॥ ४७४॥ ज्याप्रमाणे समुद्राकडे जाणारा पाण्याचा प्रवाह समुद्राला मिळताच संपतो किंवा मुक्काम येताच धावणे संपते किंवा फळ येताच धान्याच्या रोपट्याची वाढ खुंटते॥ ४७५॥ त्याप्रमाणे इंद्रियांच्या व्यापारात वृत्तीचे बहिर्गमन होऊन ज्ञानाला जेथे मर्यादा पडते त्या स्थानाला अर्जुना! ज्ञेय म्हणजे ज्ञानाचा विषय म्हणतात॥ ४७६॥ याप्रमाणे ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय या तिघांचेही स्वरूप अर्जुना! स्पष्ट केले, हे तीनही सर्व क्रियांना प्रवृत्त करणारे आहेत, असे समज॥ ४७७॥

गूढार्थदीपिका—कर्माची प्रवृत्ती निर्माण करण्यास कारणभूत असलेली ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय ही त्रिपुटी आत्मविस्मृतिरूप अविद्येमुळे जीवाच्या ठिकाणी कशी निर्माण होते व त्रिपुटीतील प्रत्येकाचे स्वरूप काय आहे हे माउली वरील ओव्यांतून सांगत आहे.

श्रोत्रादी पांच इंद्रिये विषयाकडे कशी धाव घेतात याचे वर्णन रूपकाद्वारे प्रथम करून कर्मेंद्रियांची धडपड मग त्या विषय प्राप्तीकरता कशी होते याचे वर्णन दुसऱ्या रूपकाद्वारे करतात.

सूर्य विकासिनी कमळे ज्याप्रमाणे सूर्याच्या किरणांनी उमलतात त्याप्रमाणे श्रोत्रादी पांच ज्ञानेंद्रिये जीवरूपी सूर्यबिंबाची जणुकाय किरणे असून ती विषयरूपी कमळाकडे धाव घेतात व त्यांना उमलवितात.

कर्मेंद्रिये ही जीवरूपी राजाची जणुकाय सामग्री म्हणजे शस्त्रास्त्रेच आहेत. हा जीवरूपी राजा विषयरूपी देशावर स्वारी करून कर्मेंद्रियांच्या साहाय्याने लुटालूट करून आणतो (सुखदु:खांची)

अमर्याद सुखांचा साठा असलेल्या अधिष्ठानरूप ब्रह्माचा विसर पडल्यामुळे अधिष्ठानाकडे दुर्लक्ष झालेली ज्ञानवृत्ती, सुखाचा साठा बाहेर आहे, असे समजते. सुखाच्या तळमळीने तिची धाव मग बाह्य विषयाकडे वळते. ज्ञानेंद्रिये विषयांचे ज्ञान करून घेतात व कर्मेंद्रिये विषयांची प्राप्ती करून घेतात. आत्मविस्मृतिरूप अज्ञानातून निर्माण झालेले हे विपरीत ज्ञान म्हणजेच अज्ञान किंवा भ्रम होय. देश, काल व वस्तुत्व या त्रिविध परिच्छेदांनी विषय मर्यादित असल्याकारणाने विषयाकडे धावणारे ज्ञान विषयापर्यन्त पोहोचताच तेथे थांबते. ते ज्ञान विषयाला व्याप्त करून विषयाचा आकार धारण करते. विषय हा पूर्वी ज्ञात नसतो, तो नंतर ज्ञात होतो. म्हणून पदार्थाचे म्हणजेच विषयाचे ज्ञान झाले म्हणजे पूर्वी तो मला कळला नव्हता, आता तो मला कळला किंवा ज्ञात झाला, अशी जाणीव पदार्थाचे किंवा विषयाचे ज्ञान झाल्यावर आपल्या ठिकाणी उत्पन्न होते. अशा रीतीने विषयाचे ज्ञान करून घेणाऱ्या जीवाच्या ठिकाणी ज्ञातृत्वाची उभारणी होऊन तो ज्ञाता होतो व त्याला कळलेला विषय ज्ञेय होते.

याप्रमाणे ज्ञाता व ज्ञेय यांचा परस्पर ज्ञानव्यवहाराचा मार्ग तयार होतो.

ज्ञेयाच्या सरहद्दीवर येताच थांबणारे ज्ञान अशा रीतीने सर्व पदार्थाच्या नावांना जन्म देते. यालाच सामान्य ज्ञान म्हणतात. ज्ञाता, व ज्ञेय यांचे स्वरूप हे असे आहे. आत्मविस्मृतिरूप अज्ञानातूनच या त्रिपुटीची निर्मिती होत असल्याकारणाने आत्मज्ञान होताच या त्रिपुटीचा डोल्लारा कोलमडून पडतो व त्रिपुटीरहित चिन्मात्र अवस्थेचा अनुभव ज्ञान्याला येतो.

जे शब्दादि विषय। हें पंचविध जें ज्ञेय। तेंचि प्रिय कां अप्रिय। एके परीचें॥ ४७८॥

ज्ञान मोटकें ज्ञातया। दावी ना जंव धनंजया। तंव स्वीकारा की त्यजावया। प्रवर्तेचि तो॥ ४७९॥
परी मीनातें देखोनि बकु। जैसा निधानातें रंकु। कां स्त्री देखोनि कामुकु। प्रवृत्ति धरी॥ ४८०॥
जैसें खालारा धांवे पाणी। भ्रमर पुष्पाचिये घाणीं। नाना सुटला सांजवणीं। वत्सचि पां॥ ४८१॥
अगा स्वर्गींची उर्वशी। ऐकोनि जेवीं माणुसीं। वारत्या लावीजती आकाशीं। यागांचिया॥ ४८२॥
पैं पारिवा जैसा किरीटी। चढला नभाचिये पोटीं। पारवी देखोनि लोटी। आंगचि सगळें॥ ४८३॥
हें ना घनगर्जनासरिसा। मयूर वोवांडे आकाशा। ज्ञाता ज्ञेया देखोनि तैसा। धांवचि घे॥ ४८४॥
म्हणोनि ज्ञान ज्ञेय ज्ञाता। हे त्रिविध गा पांडुसुता। होयचि कर्मा समस्तां। प्रवृत्ति येथ॥ ४८५॥

अर्थ—ज्ञेय असणारे जे शब्द स्पर्शरसादि पांच विषय आहेत, ते एक तर प्रिय अप्रिय असतात॥ ४७८॥ हे अर्जुना हे अल्पसे ज्ञान ज्ञात्याला होत नाही तोच त्याचा स्वीकार करण्यास किंवा टाकून देण्यास तो प्रवृत्त होतो॥ ४७९॥ ज्याप्रमाणे बगळा माश्याला पाहून किंवा दरिद्री धनाला पाहून किंवा कामी पुरुष स्त्रीला पाहून त्यांना प्राप्त करून घेण्याची इच्छा करतो॥ ४८०॥ ज्याप्रमाणे पाणी उताराकडे वाहते, किंवा भ्रमर पुष्पाच्या वासाने आकृष्ट होतो किंवा संध्याकाळी धार काढण्याचे वेळी वासरू गायीकडे धाव घेते॥ ४८१॥ किंवा हे अर्जुना! ज्याप्रमाणे स्वर्गातील उर्वशीचे वर्णन ऐकून मनुष्य तिच्या प्राप्तीकरिता यज्ञयागांच्या शिड्या आकाशात लावतो॥ ४८२॥ किंवा अर्जुना! ज्याप्रमाणे कबूतर उंच आकाशात उडाला तरी खाली मादीला पाहताक्षणी तिच्याकडे सर्वस्वानी झेप घेतो॥ ४८३॥ घनगर्जना ऐकताच मोर (आनंदाच्या भरात नाचू लागतो जणू तो) आकाशाला आपला जीवच ओवाळून टाकतो, त्याप्रमाणे ज्ञाता ज्ञेयाला पाहताच तिकडे धांव घेतो॥ ४८४॥ म्हणून ज्ञान, ज्ञेय, ज्ञाता अर्जुना! ही त्रिपुटी सर्व कर्मांना येथे प्रवृत्त करणारी आहे॥ ४८५॥

परी तेंचि ज्ञेय विपायें। जरी ज्ञातयातें प्रिय होये। तरी भोगावया न साहे। क्षणही विलंबु॥ ४८६॥
नातरी अवचटें। तेंचि विरुद्ध होऊनि भेटे। तरी युगांत वाटे। सांडावया॥ ४८७॥
व्याळा कां हारा। वरपडा जालेया नरा। हरिखु आणि दरारा। सरिसाचि उठी॥ ४८८॥
तैसें ज्ञेय प्रियाप्रियें। देखिलेनि ज्ञातया होये। मग त्यागस्वीकारीं वाहे। व्यापारातें॥ ४८९॥

अर्थ—परंतु तेच ज्ञेय ज्ञात्याला यदाकदाचित् प्रिय वाटले तर तो ज्ञाता विषय भोगण्याकरिता क्षणाचाही विलंब सहन करीत नाही॥ ४८६॥ तेच ज्ञेय एखादेवेळी अप्रिय म्हणजे दु:खरूप वाटले तर ते टाकण्याकरिता लागणारा क्षण प्रलयासारखा वाटतो॥ ४८७॥ सर्प किंवा हार मनुष्याला जर प्राप्त झाला तर भीति किंवा आनंद हे एकदमच त्याच्या ठिकाणी उत्पन्न होतात॥ ४८८॥ त्याप्रमाणे ज्ञेयाला पाहून ज्ञात्याच्या ठिकाणी विषयाविषयीची आवड किंवा नावड निर्माण होते व मग त्या विषयाचा स्वीकार किंवा त्याग करण्याची क्रिया त्याच्याकडून घडते॥ ४८९॥

गूढार्थदीपिका—बाह्य विषयात सुख आहे असे अज्ञानाने समजूत करून घेऊन त्यांची प्राप्ती करून घेण्याकरिता तळमळणाऱ्या ज्ञात्याच्या ठिकाणी काही विषयांविषयी आवडी व काही विषयांविषयी नावडी असते. आवडीचा विषय प्राप्त करून घेण्याकरिता वाटेल तो प्रयत्न करणारा ज्ञाता, न आवडणाऱ्या पदार्थांचा आपल्याला स्पर्श देखील होऊ नये म्हणून तितकाच प्रयत्न करतो. ही आवडी नावडी त्या वस्तुंच्या गुणावर किंवा दोषांवर अवलंबून नाही. तसे असते तर नेहमीच त्यांच्या सहवासामुळे आनंद किंवा दु:ख झाले असते. पण तसे होत नाही. ज्ञाताच त्या विषयाविषयी आपली अनुकूल किंवा प्रतिकूल वृत्ति बनवून घेतो. व त्यांच्या प्राप्तीत सुखाची व वियोगात दु:खाची कल्पना करतो.

तेथ रागी प्रतिमल्लाचा। गोसांवी सर्व दळाचा। रथु सांडूनि पायांचा। होय जैसा॥ ४९०॥
तैसें ज्ञातेपणें जे असे। तें ये कर्ता ऐसिये दशे। जेवितें बैसलें जैसें। रंधन करूं॥ ४९१॥
कां भंवरेंचि केला मळा। वरकलुचि जाला अंकसळा। नाना देवो रिगाला देउळा-। चिया कामा॥ ४९२॥

अर्थ—ज्याप्रमाणे कुस्तीशौकीन आपल्या तोलाचा पहेलवान पाहिल्या नंतर सर्व सैन्याचा सेनापति असला तरी

रथ सोडून देऊन पायीच (त्याच्याशी भिडणकरितां) चालू लागतो॥ ४९०॥ त्याप्रमाणे ज्ञातेपणाची जाणीव बाळगणारा कर्ता या दशेला येतो. ज्याप्रमाणे जेवणाऱ्याने स्वयंपाक करण्यास बसावे किंवा ज्याप्रमाणे भ्रमराने स्वत:चा बगीचा तयार करावा किंवा कसोटीच्या दगडाने स्वत: परीक्षक व्हावे किंवा देवच स्वत: देऊळ बांधण्याच्या कामाला लागावा॥ ४९१-४९२॥

तैसा ज्ञेयाचिया हांवा। ज्ञाता इंद्रियांचा मेळावा। राहाटवी तेथ पांडवा। कर्ता होय॥ ४९३॥
आणि आपण होउनी कर्ता। ज्ञाना आणी करणता। तेथें ज्ञेयचि स्वभावतां। कार्य होय॥ ४९४॥
ऐसा ज्ञानाचिये निजगती। पालटु पडे गा सुमती। डोळ्यांची शोभा रातीं। पालटे जैसी॥ ४९५॥
कां अदृष्ट जालिया उदासू। पालटे श्रीमंताचा विलासू। पुनिवेपाठीं शीतांशु। पालटे जैसा॥ ४९६॥
तैसा चाळितां करणें। ज्ञाता वेष्टिजे कर्तेपणें। तेथिंचीं तियें लक्षणें। ऐक आतां॥ ४९७॥

अर्थ—त्याप्रमाणे ज्ञेय जे विषय त्यांच्या आसक्तीमुळे अर्जुना! ज्ञाता इंद्रियांचा समुदाय राबवितो व तेथे तो कर्ता होतो॥ ४९३॥ आणि ज्ञाता आपण कर्ता होऊन ज्ञानाला साधन बनवितो व तेथे ज्ञेय आपोआपच कार्य होते॥ ४९४॥ या प्रमाणे ज्ञानाचा जो यथार्थ स्वभाव आहे त्यांत, अर्जुना! बदल होतो. ज्याप्रमाणे रात्रीच्या वेळी डोळ्याची शोभा म्हणजे डोळ्यांची वस्तु स्पष्ट दिसणे यात बदल होतो म्हणजे वस्तु स्पष्ट दिसत नाही॥ ४९५॥ किंवा दैव फिरले म्हणजे श्रीमंत मनुष्याचे ऐश्वर्य नाहीसे होते. किंवा पौर्णिमा संपल्यावर ज्याप्रमाणे चंद्राचे पूर्ण बिंबाचा पालट होऊन ते क्षीण होत जाते॥ ४९६॥ त्याप्रमाणे ज्ञाताच इंद्रियांना राबवीत असल्यामुळे तो कर्तेपणाने व्यापिला जातो. अशा स्थितीत त्याचे स्वरूप काय असते ते आता ऐक॥ ४९७॥

तरी बुद्धि आणि मन। चित्त अहंकार हन। हें चतुर्विध चिन्ह। अंत:करणाचें॥ ४९८॥
बाह्य त्वचा श्रवण। चक्षु रसना घ्राण। हें पंचविध जाण। इंद्रियें गा॥ ४९९॥
तेथ आंतुलें तंव करणें। कर्ता कर्तव्या घे उमाणें। मग तैं जरी जाणें। सुखा येतें॥ ५००॥
तरी बाहेरिलें तियेंही। चक्षुरादिकें दाहाही। उठौनि लवलाहीं। व्यापारा सूये॥ ५०१॥
मग तो इंद्रियकदंबु। करविजे तंव राबु। जंव कर्तव्याचा लाभु। हातासि ये॥ ५०२॥
ना तें कर्तव्य जरी दु:खें। फळेल ऐसें देखे। तो लावी त्यागमुखें। तियें दाहाही॥ ५०३॥
मग फिटे दु:खाचा ठावो। तंव राहटवी रात्रिदिवो। विकणवातें कां रावो। जयापरी॥ ५०४॥
तैसेनि त्यागस्वीकारीं। वाहातां इंद्रियांची धुरी। ज्ञातयातें अवधारीं। कर्ता म्हणिपे॥ ५०५॥

अर्थ—अंत:करणाची बुद्धि, मन, चित्त व अहंकार अर्जुना! अशी चार प्रकारची लक्षणे आहेत॥ ४९८॥ त्वचा, कान, डोळे, जीभ व नाक ही पांच प्रकारची बाह्य ज्ञानरूप इंद्रिये होत॥ ४९९॥ तेथे अंतररूपी इंद्रियांच्या योगाने मला हे करावयाचे आहे असे (कर्ता) समजतो व मग त्यापासून सुखप्राप्ति होईल असे जर वाटले तर चक्षुरादी बाहेरील दहाही इंद्रिये तात्काळ उठून कर्माला लावतात॥ ५००-५०१॥ मग करावयाच्या कर्माचा लाभ मिळेपर्यंत तो इंद्रियांच्या समुदायाला राबवितो॥ ५०२॥ किंवा करावयाच्या कर्मापासून दु:खाची प्राप्ति होईल असे त्याला वाटले, तर दहाही इंद्रियांना त्यापासून परावृत्त करतो॥ ५०३॥ ज्याप्रमाणे वाहणारा वारा कोंड्याला दूर सारतो त्याप्रमाणे दु:ख नाहीसे होईपर्यंत इंद्रियांना रात्रंदिवस राबवितो॥ ५०४॥ अशा प्रकारे विषयांचा त्याग अथवा स्वीकार करण्यासाठी इंद्रियांचे नेतृत्व करणाऱ्या ज्ञात्याला कर्ता म्हणतात, असे समज॥ ५०५॥

आणि कर्तयाच्या सर्व कर्मीं। आउतांचिया परी क्षमी। म्हणोनि इंद्रियांतें आम्ही। करणें म्हणों॥ ५०६॥

अर्थ—आणि कर्त्याच्या सर्व कर्मात आउतासारखी सर्व इंद्रिये सक्षम होतात म्हणून आम्ही इंद्रियांना कर्माचे साधन म्हणतो॥ ५०६॥

आणि हेचि करणेंवरी। कर्ता क्रिया ज्या उभारी। तिया व्यापे तें अवधारीं। कर्म एथ॥ ५०७॥
सोनाराचिया बुद्धी लेणें। व्यापे चंद्रकरीं चांदिणें। कां व्यापे वेल्हाळपणें। वेली जैसी॥ ५०८॥

नाना प्रभा व्यापे प्रकाशु। गोडिया इक्षुरसु। हें असो अवकाशु। आकाशीं जैसा॥५०९॥
तैसें कर्तयाचिया क्रिया। व्यापलें जें धनंजया। तें कर्म गा बोलावया। आन नाहीं॥५१०॥

अर्थ—आणि ह्याच इंद्रियांकडून कर्ता ज्या ज्या क्रिया करतो त्या क्रियांनी व्याप्त झालेले जे असते ते या ठिकाणी कर्म होय, असे समज॥५०७॥ ज्याप्रमाणे सोनाराच्या बुद्धीने अलंकार व्यापिला जातो (घडविले जाते) किंवा चंद्रकिरणांनी चंद्राचा प्रकाश व्यापिला असतो किंवा भरघोसपणे वेली पसरली असते॥५०८॥ किंवा ज्योत प्रकाशरूप असते किंवा उसाचा रस गोडीने युक्त असतो. किंवा फार काय सांगावे! जशी आकाशांत पोकळी असते, त्याप्रमाणे कर्त्याच्या क्रियांनी जे व्यापिले जाते. अर्जुना! ते कर्म होय. हे बोलणें अन्यथा नाही॥५०९-५१०॥

एवं कर्ता कर्म करण। या तिहींचेंही लक्षण। सांगितलें तुज विचक्षण। शिरोमणी॥५११॥

अर्थ—या प्रमाणे हे सूज्ञश्रेष्ठा अर्जुना! कर्म, कर्ता व करण या तिघांचेही स्वरूप तुला सांगितले॥५११॥

एथ ज्ञाता ज्ञान ज्ञेय। हें कर्माचें प्रवृत्तित्रय। तैसेंचि कर्ता करण कार्य। हा कर्मसंचयो॥५१२॥
वन्हीं ठेविला असे धूमु। आथी बीजीं जेवीं द्रुमु। कां मनीं जोडे कामु। सदा जैसा॥५१३॥
तैसा कर्ता क्रिया करणीं। कर्माचें आहे जिंतवणीं। सोनें जैसें खाणी। सुवर्णाचिये॥५१४॥
म्हणोनि हें कार्य मी कर्ता। ऐसें आथि जेथ पांडुसुता। तेथ आत्मा दूरी समस्तां। क्रियांपासीं॥५१५॥
यालागीं पुढत पुढती। आत्मा वेगळाचि सुमती। आतां असो हे किती। जाणतासि तूं॥५१६॥

अर्थ—या ठिकाणी ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय ही त्रिपुटी कर्मप्रवृत्तिकारक आहे. त्याचप्रमाणे कर्ता, करण व कार्य हा कर्माचा संचय (कर्माचे साहित्य) आहे॥५१२॥ ज्याप्रमाणे अग्नीच्या ठिकाणी धूम असावा किंवा बीजाच्या ठिकाणी वृक्ष असावा किंवा अंत:करणात सदा वासना असावी॥५१३॥ सोन्याचे खाणीत ज्याप्रमाणे सोने असावे त्याप्रमाणे कर्ता, कर्म आणि करण (साधन) या तिघात कर्माचा जिव्हाळा आहे॥५१४॥ म्हणून हे कार्य व मी त्या कार्याचा कर्ता ही स्थिती, अर्जुना! जेथे असते तेथे सर्व क्रियांपासून आत्मा अलिप्त राहतो॥५१५॥ या करिता, हे सूज्ञ अर्जुना! आत्मा हा वेगळाच आहे, हे वारंवार सांगितले. हे असो, हे किती सांगावे, तूं (सर्व) हे जाणतोसच॥५१६॥

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदत:। प्रोच्यते गुणसङ्ख्याने यथावच्छृणु तान्यपि॥१९॥

अर्थ—ज्ञान, कर्म व कर्ता हे त्रिगुणाच्या भेदामुळे तीन प्रकारचे आहेत. त्यांचे वर्णन सांख्यशास्त्रात केल्याप्रमाणे मी सांगतो. ते ही तू ऐक॥१९॥

परी सांगितलें जें ज्ञान। कर्म कर्ता हन। तिन्ही तिहीं ठायीं भिन्न। गुणीं आहाती॥५१७॥
म्हणोनि ज्ञाना कर्मा कर्तया। पतिजों नये धनंजया। जे दोनी बांधती सोडावया। एकचि प्रौढ॥५१८॥
तें सात्त्विक ठाउवें होये। तो गुणभेदु सांगो पाहें। जो सांख्यशास्त्रीं आहे। उवाइला॥५१९॥

अर्थ—पण आता ज्ञान, कर्म व कर्ता ही जी सांगितली ती तीन गुणामुळे तीन प्रकारची होतात॥५१७॥ या तीन गुणांपैकी दोन गुण बंधनकारक असून एकच (सत्व) मोक्ष देण्याला समर्थ आहे म्हणून ज्ञान, कर्म व कर्ता या तिघांवरही विश्वास ठेवू नये॥५१८॥ ज्या सात्विक गुणाचे वर्णन सांख्यशास्त्रात विस्ताराने केले आहे त्या सात्विक गुणाची ओळख होण्याकरिता त्या गुणांचे प्रकार सांगतो, पाहा॥५१९॥

जें विचारक्षीरसमुद्र। स्वबोधकुमुदिनीचंद्र। ज्ञानडोळसां नरेंद्र। शास्त्रांचा जें॥५२०॥
कीं प्रकृतिपुरुष दोनीं। मिसळलीं दिवोरजनीं। तियें निवडितां त्रिभुवनीं। मार्तंडु जें॥५२१॥
जेथ अपारा मोहराशी। तत्त्वांच्या मापीं चोविसीं। उमाणा घेऊनि परेशीं। सुरवाडिजे॥५२२॥
अर्जुना तें सांख्यशास्त्र। पढे जयाचें स्तोत्र। तें गुणभेदचरित्र। ऐसें आहे॥५२३॥

अर्थ—जे सांख्यशास्त्र, विचारांचा क्षीरसमुद्र आहे, आत्मस्वरूपी कमलाला विकसित करणारा चंद्र आहे व यथार्थ ज्ञान दृष्टि देणाऱ्या शास्त्रांचा सम्राट राजा आहे॥५२०॥ किंवा (जे सांख्यशास्त्र) ज्या प्रमाणे दिवस व रात्र एकत्र मिसळावेत त्याप्रमाणे मिसळलेल्या प्रकृति व पुरुष यांचा विवेक करणारा तिन्ही जगतातील अखंड ज्ञानसूर्यच

आहे ॥ ५२१ ॥ ज्या शास्त्रामध्ये अमर्याद अज्ञानराशीची चोवीस तत्त्वांच्या मापाने मोजणी करून परब्रह्माच्या ठिकाणचा आनंद प्राप्त करता येतो ॥ ५२२ ॥ अर्जुना! त्या सांख्यशास्त्रामध्ये ज्या तीन गुणांच्या भेदांची (सत्व, तम, रज या तीन गुणांची) कीर्ति गायिली आहे, त्या गुणभेदाचे वर्णन असे आहे ॥ ५२३ ॥

जे आपुलेनि आंगिकें। त्रिविधपणाचेनि अंकें। दृश्यजात तितुकें। अंकित केलें॥ ५२४॥
एवं सत्त्वरजतमा। तिहींची एवढी असे महिमा। जे त्रैविध्य आदी ब्रह्मा। अंतीं कृमी॥ ५२५॥
परी विश्वींची आघवी मांदी। जेणें भेदलेनि गुणभेदीं। पडिली ते तंव आदी। ज्ञान सांगों॥ ५२६॥
जे दिठी जरी चोख कीजे। तरी भलतेंही चोख सुजे। तैसें ज्ञानें शुद्धें लाहिजे। सर्वही शुद्ध॥ ५२७॥
म्हणोनि तें सात्त्विक ज्ञान। आतां सांगों दे अवधान। कैवल्यगुणनिधान। श्रीकृष्ण म्हणे॥ ५२८॥

अर्थ—आपल्या स्वत:च्या अंगी असलेल्या सामर्थ्याने त्रिविधपणाच्या ठशाने, दृश्य म्हणून जेवढे असेल, तेवढे सर्व तो चिन्हित करतो ॥ ५२४ ॥ अशा रीतीने सत्व रज तम या तिघांचा महिमा एवढा मोठा आहे की ब्रह्मदेवापासून तो लहानशा कृमीपर्यंत जो तीनपणा अतिक्रमण करतो ॥ ५२५ ॥ पण हा सर्व विश्वसमुदाय ज्याच्या भेदामुळे तीनपणाच्या भेदात गोवला गेला आहे ते ज्ञान आम्ही आधी सांगतो ॥ ५२६ ॥ ज्याप्रमाणे दृष्टि जर निर्मळ असली तर कोणताही पदार्थ निर्मळच वाटतो. त्याप्रमाणे यथार्थ ज्ञानाने सर्व ठिकाणी व्याप्त असलेले शुद्ध स्वरूप कळते ॥ ५२७ ॥ म्हणून त्या सात्विक ज्ञानाचे आम्ही आता वर्णन करतो. ते लक्ष देऊन ऐक, असे मोक्षाचा साठा असलेले भगवान श्रीकृष्ण म्हणाले ॥ ५२८ ॥

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते । अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम्॥ २० ॥

अर्थ—सर्व निरनिराळ्या भूतांच्या ठिकाणी अखंड अविनाशी एकरूप असा भाव ज्या ज्ञानाने पाहतो, त्या ज्ञानाला सात्विकज्ञान म्हणतात ॥ २० ॥

तरी अर्जुना गा तें फुडें। सात्त्विक ज्ञान चोखडें। जयाच्या उदयीं ज्ञेय बुडे। ज्ञातेनिसीं॥ ५२९॥
जैसा सूर्य न देखे आंधारें। सरिता नेणिजती सागरें। कां कवळिलिया न धरे। आत्मच्छाया॥ ५३०॥
तयापरी जया ज्ञाना। शिवादि तृणावसाना। इया भूतव्यक्ति भिन्ना। नाडळती॥ ५३१॥
जैसें हातें चित्र पाहातां। होय पाणियें मीठ धुतां। कां चेवोनि स्वप्ना येतां। जैसें होय॥ ५३२॥
तैसें ज्ञानें जेणें। करितां ज्ञातव्यातें पाहाणें। जाणता ना जाणणें। जाणावें उरे॥ ५३३॥
पैं सोनें आटूनि लेणीं। न काढिती आपुलिया आयणी। कां तरंग न घेपती पाणी। गाळूनि जैसें॥ ५३४॥
तैसी जया ज्ञानाचिया हाता। न लगेचि दृश्यकथा। तें ज्ञान जाण सर्वथा। सात्त्विक गा॥ ५३५॥

अर्थ—ज्या ज्ञानाचा आविर्भाव होताच ज्ञात्यासह ज्ञेय (परब्रह्मात) विलीन होते, हे अर्जुना! ते खरोखर यथार्थ ज्ञान होय ॥ ५२९ ॥ ज्या प्रमाणे सूर्याला आंधार दिसत नाही किंवा समुद्राला नद्यांची जाणीव नसते किंवा धरू म्हटले तरी आपली सावली हातात येत नाही ॥ ५३० ॥ त्याप्रमाणे ज्या ज्ञानाला महेश्वरापासून तो गवतापर्यंत असलेल्या भौतिक पदार्थातील भिन्नता आढळत नाही ॥ ५३१ ॥ ज्याप्रमाणे भिंती वरील चित्रें हातानें भिंत सारवून पाहिली असतां किंवा पाण्याने मीठ धुतले असतां किंवा जागृतीत स्वप्नाचा अनुभव घेता काहीच हाती लागत नाही ॥ ५३२ ॥ त्याप्रमाणे जाणावयाच्या वस्तूचे ज्ञान करू जाता जाणणारा (ज्ञाता) जाणली जाणारी वस्तु (ज्ञेय) व जाणीव (ज्ञान) ही त्रिपुटी ज्या ज्ञानाने शिल्लक राहत नाही ॥ ५३३ ॥ ज्याप्रमाणे सोन्याचा नाश करून आपल्याला इच्छित असलेला अलंकार घडविता येत नाही किंवा पाणी सोडून तरंग घेता येत नाही ॥ ५३४ ॥ त्या प्रमाणे ज्या ज्ञानाच्या हातात दृश्य कधी सापडतच नाही. तेच ज्ञान पूर्णपणे सात्विक आहे, असे समज ॥ ५३५ ॥

आरिसा पाहों जातां कोडें। जैसें पाहातेंचि कां रिगे पुढें। तैसें ज्ञेय लोटोनि पडे। ज्ञाताचि जें॥ ५३६॥
पुढतीं तेंचि सात्त्विक ज्ञान। जें मोक्षलक्ष्मीचें भुवन। हें असो ऐक चिन्ह। राजसाचें॥ ५३७॥

अर्थ—कौतुकाने आरसा पाहण्याला गेले असता ज्याप्रमाणे पाहणाराच आरशासमोर होतो, त्याप्रमाणे जे ज्ञान,

ज्ञेय नाहीसे करून ज्ञाताच होते॥ ५३६॥ जे मोक्षलक्ष्मीचे मंदीर आहे, तेच सात्विक ज्ञान आहे. हे असो, आता या पुढे राजसाचे (राजसज्ञानाचे) लक्षण ऐक॥ ५३७॥

गूढार्थदीपिका—श्रीमाउलींनी ५२९-५३६ या ओव्यातून सात्विक ज्ञान कशाला म्हणतात व त्याचे स्वरूप काय हे सांगितले आहे.

ज्ञानरूप द्रष्टा चिद्रूप व आनंदरूप असल्या कारणाने ज्ञानरूपाने व आनंदरूपाने त्याचे स्फुरण होणारच. मधुसूदन सरस्वतींनीही "चैतन्ये हि स्फुरणं स्वाभाविकम्" या पंक्तीने चैतन्याचा स्फुरण पावणे हा स्वभावच आहे, असे सांगितले आहे. स्फुरणामुळे अधिष्ठान व स्फुरण असा दोनपणा त्याठिकाणी उमटणारच. दृश्य म्हणजे द्रष्ट्याचेच ज्ञानरूपाने होणारे स्फुरण होय. हा दृश्यद्रष्टारूप दोनपणा एकाच सत्तेवर भासत असल्यामुळे ते द्वैत नव्हे, तर अद्वैत आहे. पृथकसत्तेशिवाय द्वैताची कल्पना अद्वैतवेदान्तात नाही.

या द्रष्टा व दृश्याची स्थिति सोने व त्यावरील अलंकार किंवा पाणी व त्यावर उठणारा तरंग याप्रमाणे भिन्न इव पण पृथक सत्ता नसल्यामुळे भिन्न नाही, नव्हे. एकरूपच अशी आहे. अलंकाराला सोन्याशिवाय किंवा तरंगाला पाण्याशिवाय काहीच अस्तित्व नाही. त्याप्रमाणे दृश्याचे अस्तित्व द्रष्ट्याच्या आधारावर अवलंबून आहे. जसे सोने सोडून अलंकार राहू शकत नाही किंवा पाणी सोडून तरंग राहू शकत नाही त्याप्रमाणे द्रष्ट्याला सोडून दृश्य राहू शकत नाही. द्रष्टा निघून जाताच दृश्य नाहीसे होते.

या दोन्ही दृष्टान्तात अधिष्ठान व त्याचा भास दोनपणा असला तरी रज्जुसर्पातील दृष्टान्तांप्रमाणे अधिष्ठानाचे ज्ञान लोपवून हा भास आपल्याला भासत नाही. त्यामुळे अधिष्ठान व भास यांचा संबंध विवर्ताचा असला तरी रज्जुसर्पातील विवर्ताप्रमाणे हा अज्ञानरूप विवर्त नाही. तर तो ज्ञानरूप विवर्त आहे. यात उलट अधिष्ठानाची आवडी वाढविणारा हा भास आहे. याठिकाणी भास, अधिष्ठानाच्या ज्ञानाच्या विरोधी नाही उलट त्याच्या यथार्थ ज्ञानाला साधक आहे.

म्हणून ज्या ज्ञानात द्रष्ट्याच्या स्वरूपज्ञानाहून दृश्य म्हणून स्वतंत्र असे ज्ञान काही होत नाही त्याला सात्विक ज्ञान म्हटले आहे. या ज्ञानात द्रष्ट्याच्या स्वरूपाहून भिन्न व विपरीत असे दृश्य राहत नाही. तसेच द्रष्टा, दृश्य व दर्शन अशी त्रिपुटीही या ज्ञानात राहत नाही. दृश्य, द्रष्टा व दर्शन त्यांचे स्वरूप एकमेव ज्ञानच असल्याकारणाने त्रिपुटी इव भास त्यात होत असला तरी भिन्नसत्तेच्या अभावामुळे ते ज्ञान निखिल ज्ञानमात्रच म्हटले जाते. दृश्य व द्रष्टा यांचे ज्ञानोत्तर स्वरूप अशा रीतीने अज्ञान दशेप्रमाणे विरोधी राहत नाही. तर द्रष्ट्याच्याच स्वरूपाचे दृश्य ज्ञान्याला भासत राहते. नव्हे तो ज्ञानी दृश्य म्हणजे आपल्या ज्ञानाचाच स्फुरणरूप विलास होय असे समजतो. हेच खरे सात्विक ज्ञान होय. यालाच विद्यावृत्ति, यथार्थ ज्ञान, मोक्ष असे म्हणतात.

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान्। वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम्॥ २१॥

अर्थ—जे ज्ञान सर्व भूतांच्या ठिकाणी भिन्न भिन्न रूपाने भिन्न भिन्न लक्षणाचे निरनिराळे पदार्थ जाणते ते ज्ञान राजस होय, असे जाण॥ २१॥

तरी पार्था परियेस। तें ज्ञान गा राजस। जे भेदाची कांस। धरूनि चालें॥ ५३८॥
विचित्रता भूतांचिया। आपण आंतोनि ठिकरिया। बहु चकें ज्ञातया। आणिली जेणें॥ ५३९॥
जैसें साचा रूपाआड। घालूनि विसराचें कवाड। मग स्वप्नाचें काबाड। ओपी निद्रा॥ ५४०॥
तैसें स्वज्ञानाचिये पौळी-। बाहेरि मिथ्या मोहाचे खळी। तिही अवस्थाचिया वाह्याळी। दावी जें जीवा॥ ५४१॥
अलंकारपणे झांकलें। बाळा सोनें कां वायां गेलें। तैसें नामीं रूपीं दुरावलें। अद्वैत जया॥ ५४२॥
अवतरली गाडग्या घडां। पृथ्वी अनोळख जाली मूढां। वन्हि जाला कानडा। दीपत्वासाठी॥ ५४३॥
कां वस्त्रपणाचेनि आरोपें। मूर्खाप्रति तंतु हारपे। नाना मुग्धा पटु लोपे। दाऊनि चित्र॥ ५४४॥

अर्थ—तरी अर्जुना! ऐक, भेदाचा आश्रय करून जे ज्ञान व्यवहार करते ते ज्ञान राजस होय॥ ५३८॥ आपण स्वत: भेदभावाने युक्त होऊन भूतांचा वेगळेपणा मानला (म्हणजे प्रत्येक भूताचे स्वतंत्र अस्तित्व व वस्तुत्व मानले)

व ज्ञात्याला भ्रमात पाडून विचित्रता निर्माण केली॥ ५३९॥ ज्याप्रमाणे प्रत्यक्ष दिसणाऱ्या वस्तूला लोपवून व विस्मरणाचा दरवाजा बंद करून निद्रा, स्वप्नाची नसती दग दग आपल्या अनुभवाला आणते॥ ५४०॥ त्याप्रमाणे आत्मज्ञानाच्या आवाराच्या बाहेर खोट्या मोहाच्या गर्तेत (जागृति, स्वप्न, सुषुप्ति) या तिन्ही अवस्थांचा खेळ ते ज्ञान जीवाला दाखविते॥ ५४१॥ अलंकाराआड दडलेले सोने लहान मुलाला कळत नाही. सोन्याचे महत्व माहीत नसल्यामुळे त्याच्या दृष्टीने ते व्यर्थच झाले की! त्याप्रमाणे नामरूपामुळे अद्वैताचे ज्ञान ज्या ज्ञानाला दुरावले आहे॥ ५४२॥ गाडगे व मडके यांच्या रूपाने असलेली माती, अज्ञान्याला ज्याप्रमाणे ओळखूं येत नाही किंवा दिव्यामुळे अग्नी अपरिचित व्हावा॥ ५४३॥ किंवा वस्त्र हे नांव प्राप्त होताच अज्ञानी तंतूचे ज्ञान विसरतो. (म्हणजे वस्त्र जरी तंतूचेच बनले आहे तरी वस्त्र हे नांव प्राप्त होताच ते तंतूहून निराळाच पदार्थ आहे असे अज्ञानी समजतो.) किंवा मूढाला चित्राचे ज्ञान होताना कापडाचे ज्ञान राहत नाही॥ ५४४॥

तैशी जया ज्ञाना। जाणोनि भूतव्यक्ती भिन्ना। ऐक्यबोधाची भावना। निमोनि गेली॥ ५४५॥
मग इंधनीं भेदला अनळु। फुलावरी परिमळु। कां जळभेदें सकळु। चंद्रु जैसा॥ ५४६॥
तैसे पदार्थभेद बहुवस। जाणोनि ल्हान थोर वेष। आंतलें तें राजस। ज्ञान येथ॥ ५४७॥
आतां तामसाचेंही लिंग। सांगेन तें वोळख चांग। डावलावया मातंग-। सदन जैसें॥ ५४८॥

अर्थ—ज्याप्रमाणे भिन्न भिन्न भूतव्यक्ति पाहून ज्या ज्ञानाची ऐक्याची भावना नाहीशी होते॥ ५४५॥ मग निरनिराळ्या इंधनामुळे अग्नीत किंवा निरनिराळ्या फुलामुळे सुगंधात किंवा निरनिराळ्या पाण्यात पडलेल्या प्रतिबिंबामुळे चंद्रबिंबात भेद पाहावा॥ ५४६॥ ज्याप्रमाणे पदार्थाचे नाना प्रकारचे भेद करून त्याच्या रूपानुसार लहान मोठे असे वर्गीकरण करून त्यांना व्यापणारे ज्ञान, राजस ज्ञान होय॥ ५४७॥ ज्याप्रमाणे मातंगाचे घर टाकण्याकरिता त्याची ओळख असावी लागते त्याप्रमाणे आता तामसज्ञानाचेही स्वरूप मी सांगेन, ते तू चांगल्या रीतीने समजून घे॥ ४५८॥

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम्। अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम्॥ २२॥

अर्थ—जे ज्ञान एक शरीर अथवा उपास्य देवेतेची मूर्ति या पलीकडे काही नाही असे पहाते व तेथे आसक्त असते आणि जे असयुक्तिक तात्पर्यहीन व थोडे असते, त्याला तामस ज्ञान म्हणतात॥ २२॥

तरी किरीटी जें ज्ञान। हिंडे विधीचेनि वस्त्रेंहीन। श्रुति पाठमोरी नग्न। म्हणौनि तया॥ ५४९॥
येरीही शास्त्र बाह्यकारी। जें निंदेचे विटाळवरी। बोळविलेंसे डोंगरीं। म्लेंच्छधर्माच्या॥ ५५०॥
जें गा ज्ञान ऐसें। गुणग्रहें तामसें। घेतलें भोवे पिसें। होऊनियां॥ ५५१॥

अर्थ—अर्जूना! जे ज्ञान शास्त्रविधीचे वस्त्र न नेसता हिंडते. जे नग्न म्हणून श्रुति मातेने पाठ फिरविली आहे॥ ५४९॥ इतरांनीही म्हणजे (स्मृत्यादिक शास्त्रकारांनी) शास्त्राच्या बहिष्कारामुळेच त्या ज्ञानाच्या निंदेचा विटाळ आपल्याला होऊ नये म्हणून म्लेंच्छधर्माच्या डोंगरात त्याला हाकलून दिले॥ ५५०॥ अर्जुना! तमोगुणरूप नक्राने पछाडलेले अशा तऱ्हेचे ते ज्ञान वेडे पिसे होऊन भटकत राहते॥ ५५१॥

जें सोयरिके बाधु नेणे। पदार्थी निषेधु न म्हणे। निरोपिलें जैसें सुणें। शून्यग्रामीं॥ ५५२॥
तया तोंडीं जें नाडळे। कां खातां जेणें पोळे। तेंचि एक वाळे। येर घेणेचिते॥ ५५३॥
पाहीं सोनें चोरितां उंदीरु। न म्हणे थरुविथरु। नेणे मांसखाइरु। काळें गोरें॥ ५५४॥
नाना वनामाजीं बोहरी। कडसणी जेवीं न करी। कां जीत मेलें न विचारी। बैसतां माशी॥ ५५५॥
अगा वांता कां वाढिलेया। साजुक कां सडलिया। विवेकु कावळिया। नाहीं जैसा॥ ५५६॥
तैसें निषिद्ध सांडूनि द्यावें। कां विहित आदरें घ्यावें। हें विषयांचेनि नांवें। नेणेचि जें॥ ५५७॥

अर्थ—जे ज्ञान शरीरसंबंधाला कोणत्याही तऱ्हेची आडकाठी मानीत नाही. किंवा कोणताही पदार्थ निषिद्ध समजत नाही. ज्याप्रमाणे ओसाड गावात सोडलेले कुत्रे, त्याच्या तोंडात जे सापडत नाही किंवा खाताना तोंड भाजेल

तेच पदार्थ तो सोडून देतो, बाकी तो खातोच खातो॥ ५५२-५५३॥ सोने चोरणारा उंदीर सोने चोख आहे की हीणकस आहे हे पाहत नाही किंवा मांस खाणारा काळ्यागोऱ्याचा विचार करीत नाही.॥ ५५४॥ किंवा रानातील वणवा, हे कोण, ते कोण, याचा विचार करीत नाही. किंवा माशी बसताना हा मेलेला की जीवंत याचा विचार करीत नाही॥ ५५५॥ अथवा ओकलेले की वाढलेले, ताजे की सडलेले. हा विवेक कावळ्याला जसा राहत नाही॥ ५५६॥ त्याप्रमाणे शास्त्रांनी निषिद्ध ठरविलेले टाकून द्यावे किंवा विहित केलेले आदराने घ्यावे असे जे ज्ञान विषयाच्या संबंधात जाणत नाही॥ ५५७॥

जेतुलें आड पडे दिठी। तेतुलें घेचि विषयासाठीं। मग तें स्त्री द्रव्य वाटी। शिश्नोदरां॥ ५५८॥
तीर्थातीर्थ हे भाष। उदकीं नाहीं सनोळख। तहान वोळे तेंचि सुख। वांचुनियां॥ ५५९॥
तयाचिपरी खाद्याखाद्य। न म्हणे निंद्यानिंद्य। तोंडा आवडे तें मेध्य। ऐसाचि बोधु॥ ५६०॥
आणि स्त्रीजात तितुकें। त्वचेंद्रियेंचि वोळखे। तियेविषयीं सोयरिके। सादरचि बहु॥ ५६१॥
पैं स्वार्थी जे उपकरे। तयाचि नाम सोयिरें। देहसंबंधु न सरे। जिये ज्ञानी॥ ५६२॥
मृत्यूचें आघवेंचि अन्न। आगी आघवेंचि इंधन। तैसें जगचि आपलें धन। तामसज्ञाना॥ ५६३॥

अर्थ—जे जे विषय डोळ्यापुढे येतील ते ते विषय भोगासाठी ते ज्ञान घेते. व मग स्त्री व द्रव्य ह्यांची अनुक्रमे शिश्न व उदर याकरिता वाटणी करते॥ ५५८॥ तहान भागविण्याव्यतिरिक्त ज्या ज्ञानाला हे पवित्र, हे अपवित्र ही भाषा पाण्याच्या ठिकाणी ओळखीची नाही॥ ५५९॥ त्याचप्रमाणे हे खाण्याला योग्य की अयोग्य किंवा हे निंद्य की अनिंद्य याचा विचार न करता तोंडाला आवडेल ते ते पवित्र अशीच ज्या ज्ञानाची धारणा आहे॥ ५६०॥ आणि स्त्रीजात म्हणून जितकी असेल तिची स्पर्शेंद्रियानेच ज्याला ओळख आहे आणि तिच्याशी शारीरिक संबंध करण्यास जे ज्ञान अत्यंत उत्सुक असते॥ ५६१॥ स्वार्थ साधण्यास जो कामी येतो तोच आपला सोयरा ही धारणा व शरीराच्या विषयीच एक मात्र विचार ज्या ज्ञानात असतो॥ ५६२॥ मृत्युला सारेच भक्ष्य असते, अग्नीला सर्वच जळण असते, त्याप्रमाणे तामसज्ञानाला सर्व जग आपलीच मालमत्ता आहे असे वाटते॥ ५६३॥

ऐसेनि विश्व सकळ। जेणें विषयोचि मानिलें केवळ। तया एक जाणें फळ। देहभरण॥ ५६४॥
आकाशपतिता नीरा। जैसा सिंधूचि येक थारा। तैसें कृत्यजात उदरा-। लागींचि बुझे॥ ५६५॥

अर्थ—अशा रीतीने ज्या तामसज्ञानाने संपूर्ण जगत् केवळ आपले भोग्य विषय मानले, त्याला देहाचे पोषण करणे एवढेच एक फळ मिळते, असे समज॥ ५६४॥ आकाशातून पडलेल्या पाण्याला ज्याप्रमाणे समुद्रच एक काय तो आश्रय असतो, त्याप्रमाणे जे जे कृत्य करावयाचे ते ते केवळ पोट भरण्याकरिताच करावयाचे असे ते ज्ञान समजते॥ ५६५॥

वांचूनि स्वर्ग नरक आथी। तया हेतु प्रवृत्ति निवृत्ती। इये आघवियेचि राती। जाणिवेची जें॥ ५६६॥
जें देहखंडा नाम आत्मा। ईश्वर पाषाणप्रतिमा। ययापरौती प्रमा। ढळों नेणे॥ ५६७॥
म्हणे पडिलेनि शरीरें। केलेंनिसीं आत्मा सरे। मा भोगावया उरे। कोण वेषें॥ ५६८॥
ना ईश्वरु पाहतां आहे। तो भोगवी हें जरी होये। तरी देवचि खाये। विकूनियां॥ ५६९॥
गांवींचें देवळेश्वर। नियामकचि होती साचार। तरी देशींचे डोंगर। उगे कां असती॥ ५७०॥

अर्थ—शिवाय स्वर्ग किंवा नरक यांच्या प्राप्तीकरिता यथार्थशास्त्र किंवा निषिद्ध आचरण हेच कारण होय, याविषयी ज्या ज्ञानाच्या ठिकाणी अंधार (अज्ञान) असते॥ ५६६॥ देहाच्या तुकड्याला आत्मा हे नाव, दगडाची मूर्ति हाच ईश्वर, ह्याच्या पलीकडे ज्या तामसज्ञानाची धाव नाही॥ ५६७॥ शरीर पडल्यानंतर कर्माबरोबरच आत्माही नाश पावतो. कर्माचा भोग घेण्याला तो कोणत्या स्वरूपात राहतो॥ ५६८॥ किंवा पाहणारा ईश्वर जर असेल व तोच जर हे होणारे भोग भोगवित असेल तर देवच विकून खावा म्हणजे झाले॥ ५६९॥ गावातील देवळात असणारे दगडाचे देव जर खरोखर जगाचे शासनकर्ते असतील तर देशातील डोंगर तरी स्वस्थ कां बसतील (तेही नियामक कां होऊ नयेत, असा अर्थ)॥ ५७०॥

ऐसा विपायें देवो मानिजे। तरी पाषाणमात्रचि जाणिजे। आणि आत्मा तंव म्हणिजे। देहातेंचि॥ ५७१ ॥
येरें पापपुण्यादिकें। तें आघवेंचि करोनि लटिकें। हित मानी अग्निमुखें। चरणें जें कां॥ ५७२ ॥
जे चामाचे डोळे दाविती। जें इंद्रियें गोडी लाविती। तेंचि साच हे प्रतीती। फुडी जया॥ ५७३ ॥
किंबहुना ऐसी प्रथा। वाढती देखसी पार्था। धूमाचि वेली वृथा। आकाशीं जैसी॥ ५७४ ॥
कोरडा ना वोला। उपेगा आथी गेला। तो वाढोनि मोडला। भेंडु जैसा॥ ५७५ ॥
नाना उंसांची कणसें। कां नपुंसकें माणुसें। वन लागलें जैसें। साबरीचें॥ ५७६ ॥
नातरी बाळकाचें मन। कां चोराघरींचें धन। अथवा गळास्तन। शेळियेचे॥ ५७७ ॥
तैसें जें वायाणें। वोसाळ दिसे जाणणें। तयातें मी म्हणें। तामसज्ञान॥ ५७८ ॥

अर्थ—अशा रीतीने चुकून देव मानलाच तर दगडाचा मात्र मानायचा आणि देहालाच आत्मा मानायचा असे जे ज्ञान॥ ५७१ ॥ या शिवाय पापपुण्यादिकांची तमा न बाळगता ती सर्व खोटी आहेत असे समजून अग्नीप्रमाणे जो सर्व विषय सेवन करीत असतो व त्यांतच आपले कल्याण आहे असे जे ज्ञान समजते॥ ५७२ ॥ चर्मचक्षूंनी जे दिसेल व ज्याची इंद्रिये गोडी लावून देतील ते खरे असा ज्यांचा (तामसज्ञान्यांचा) पक्का अनुभव आहे॥ ५७३ ॥ फार काय सांगावे, आकाशात धुराची वेली व्यर्थच वाढत जाते, त्याप्रमाणे अर्जुना! अशी स्थिती, त्याचा ठिकाणी वाढतीच पाहशील॥ ५७४ ॥ भेंडाचे झाड ओले असो वा वाळले असो ते वाढल्यावर कोणत्याही प्रकारे उपयोगी न होताच मोडून जाते॥ ५७५ ॥ किंवा उसाच्या झाडाला येणारे तुरे, किंवा षंढ माणसे किंवा निवडुंगाच्या झाडांनी भरलेले जंगल, किंवा लहान मुलांचे मन, किंवा चोराघरचे धन किंवा शेळीच्या गळ्यातील स्तन जसे निरुपयोगी, त्याप्रमाणे जे ज्ञान निरर्थक व शून्य असते त्याला मी तामसज्ञान म्हणतो॥ ५७६-५७८ ॥

तेंही ज्ञान इया भाषा। बोलिजे तो भावो ऐसा। जात्यंधाचा कां जैसा। डोळा वाडु॥ ५७९ ॥
का बधिराचे नीट कान। अपेया नाम पान। तैसें आडनांव ज्ञान। तामसा तया॥ ५८० ॥
हें असो किती बोलावें। तरी ऐसें जें देखावें। तें ज्ञान नोहे जाणावें। डोळस तम॥ ५८१ ॥

अर्थ—त्याला, ज्ञान ही भाषा वापरण्याचा भाव असा की जन्मजात आंधळ्याचे डोळे मोठे आहेत किंवा बहिऱ्याचे कान सुंदर आहेत, किंवा पिण्याला अयोग्य असलेल्या पेयाला पान हे म्हणणे जसे नाममात्र आहे, तसेच तामसज्ञानाला ज्ञान म्हणणे टोपण नावासारखे आहे॥ ५७९-५८० ॥ हे आता राहू दे. याविषयी किती बोलायचे! असे जे ज्ञान दृष्टीस पडते ते ज्ञान नव्हेच. तो प्रत्यक्ष अंधारच आहे॥ ५८१ ॥

एवं तिहीं गुणीं। भेदलें यथालक्षणीं। ज्ञान श्रोतेशिरोमणी। दाविलें तुज॥ ५८२ ॥
आतां याचि त्रिप्रकारा। ज्ञानाचेनि धनुर्धरा। प्रकाशें होती गोचरा। कर्तयाच्या क्रिया॥ ५८३ ॥
म्हणौनि कर्म पैं गा। अनुसरे तिहीं भागां। मोहरें जालिया वोघा। पाणी जैसें॥ ५८४ ॥
तेंचि ज्ञानत्रयवशें। त्रिविध कर्म जें असे। तेथ सात्त्विक तंव ऐसें। परिस आधीं॥ ५८५ ॥

अर्थ—अशा रीतीने, हे सर्वश्रेष्ठ श्रोत्या अर्जुना! याच गुणांनी झालेले ज्ञानाचे तीन प्रकार त्यांच्या यथार्थ स्वरूपासह तुला सांगितले॥ ५८२ ॥ हे अर्जुना! याच तीन प्रकारच्या ज्ञानाच्या प्रकाशाने कर्त्याच्या क्रिया झालेल्या दिसतात॥ ५८३ ॥ ज्याप्रमाणे ओघाला अनुसरून पाणी जाते, त्याप्रमाणे कोणतेही कर्म या तीन ज्ञानाच्या तीन वाटांना धरून घडत तसते॥ ५८४ ॥ हेच तीन प्रकारच्या ज्ञानाने होणारे तीन प्रकारचे जे कर्म आहे, त्यातील सात्विक कर्माचे लक्षण, प्रथम ऐक॥ ५८५ ॥

नियतं सङ्गरहितमरागद्वेषतः कृतम्। अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते॥ २३ ॥

अर्थ—जे फलाच्या प्राप्तीची इच्छा न करणाऱ्या कर्त्याकडून, रागद्वेषावांचून केलेले आसक्तिरहित नित्यकर्म, त्याला सात्त्विक कर्म म्हटले जाते॥ २३ ॥

तरी स्वाधिकाराचेनि मार्गें। आलें जें मानिलें आंगें। पतिव्रतेचेनि परिष्वंगें। प्रियातें जैसें॥ ५८६ ॥

सांवळ्या आंगा चंदन। प्रमदालोचनीं अंजन। तैसें अधिकारासी मंडण। नित्यपणें जें॥ ५८७॥
तें नित्य कर्म भलें। होय नैमित्तिकीं सावाइलें। सोनयासि जोडलें। सौरभ्य जैसें॥ ५८८॥

अर्थ—पतिव्रता स्त्री जशी आपल्या पतीला स्वाभाविकपणे आलिंगन देते, त्याप्रमाणे आपल्या अधिकारानुसार प्राप्त झालेले कर्म जो स्वाभाविकपणे आचरतो॥ ५८६ ॥ काळ्या शरीराला चंदनाची उटी किंवा तरुणीच्या डोळ्यात काजळ, त्याप्रमाणे अधिकारानुरूप प्राप्त झालेल्या नित्य कर्माचे आचरण भूषणावह असते॥ ५८७॥ ते नित्यकर्म चांगलेच असते व त्याला नैमित्तिक कर्माची जोड मिळाली तर सोन्याला सुगंधाचा लाभ होण्यासारखे आहे॥ ५८८॥

आणि आंगा जीवाची संपत्ती। वेंचुनि बाळाची करी पाळती। परी जीवें उबगणें हे स्थिती। न पाहे माय॥ ५८९॥
तैसें सर्वस्वें कर्म अनुष्ठी। परी फळ न सूये दिठी। उखिती क्रिया पैठी। ब्रह्मींचि करी॥ ५९०॥
आणि प्रिय आलिया स्वभावें। सबल उरे वेचें ठाउवें नव्हे। तैलें सत्प्रसंगें करावें। पारुषे जरी॥ ५९१॥
तरी अकरणाचेनि खेदें। द्वेषातें जिवीं न बांधे। जालियाचेनि आनंदें। फुंजो नेणे॥ ५९२॥
ऐसेऐसिया हातवटिया। कर्म निफजे जें धनंजया। जाण सात्त्विक हें तया। गुणनाम गा॥ ५९३॥
ययावरी राजसाचें। लक्षण सांगिजेल साचें। न करी अवधानाचें। वाणेपण॥ ५९४॥

अर्थ—मनाला शीणवून व देहाला शिजवून आई आपल्या मुलाचे संगोपन करते, पण मनाला कंटाळा, म्हणून असा तिला कधी वाटतच नाही॥ ५८९ ॥ त्याप्रमाणे सर्वस्वपणे कर्म करूनही फलाकडे दृष्टि ठेवत नाही. संपूर्ण कर्म ब्रह्माच्याच ठिकाणी अर्पण करतो॥ ५९० ॥ आपला आवडता माणूस घरी आला असता, त्याकरिता आपल्या जवळील अन्नसामुग्री खर्च झाली तरी आपल्या करिता ती उरेल किंवा संपेल याची जशी चिंता नसते, त्याप्रमाणे सत्प्रसंगी कर्म करावे, पण जर ते राहिले तरी न करण्यामुळे खेद किंवा द्वेष मानीत नाही. किंवा कर्म पूर्ण झाले तर आनंदाने फुगून जात नाही॥ ५९१-५९२ ॥ अशा युक्तीने, अर्जुना! जे कर्म घडते त्याला त्याच्या गुणावरून सात्विक असे नाव द्यावे॥ ५९३ ॥ यानंतर राजस कर्माचे यथार्थस्वरूप सांगणार आहे. लक्ष देण्यात उणेपणा येऊ देऊ नकोस॥ ५९४॥

यत्तु कामेप्सुना कर्म साहङ्कारेण वा पुनः। क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम्॥ २४॥

अर्थ—पण जे कर्म फल प्राप्तीची इच्छा करणाऱ्याकडून किंवा अहंकाराने युक्त असलेल्या पुरुषाकडून आटापिटा करून केले जाते ते राजसकर्म म्हटले जाते॥ २४॥

तरी घरीं मातापितरां। धड बोली नाहीं संसारां। येर विश्व भरी आदरा। मूर्खु जैसा॥ ५९५॥
कां तुळशीचिया झाडा। दुरूनि न घापे सिंतोडा। द्राक्षीचिया तरी बुडा। दूधचि लाविजे॥ ५९६॥
तैसी नित्यनैमित्तिकें। कर्मे जियें आवश्यकें। तयांचेविषीं न शके। बैसला उठूं॥ ५९७॥
येरां काम्याचेनि तरी नांवें। देह सर्वस्व आघवें। वेंचितांही न मनवे। बहु ऐसें॥ ५९८॥
अगा देवढी वाढी लाहिजे। तेथ मोल देतां न धाइजे। पेरितां पुरे न म्हणिजे। बीज जेवीं॥ ५९९॥
कां परिसु जालिया हातीं। लोहालागीं सर्वसंपत्ती। वेंचितां ये उन्नती। साधक जैसा॥ ६००॥
तैसीं फळें देखोनि पुढें। काम्यकर्मे दुवाडें। करी परी तें थोडें। केलेंही मानी॥ ६०१॥

अर्थ—संसारात आई-वडिलाशी चांगले न बोलणारा मूर्ख सर्व जगाशी मात्र आदराचा व्यवहार करतो॥ ५९५ ॥ किंवा तुळशीच्या झाडाला दुरूनही पाण्याचा शिंतोडा न घालणारा द्राक्षाच्या बुडाला मात्र दूध देतो॥ ५९६ ॥ त्याप्रमाणे नित्यनैमित्तिक जी आवश्यक कर्मे त्याच्याविषयी मात्र बसल्या जागेवरून उठत सुद्धा नाही॥ ५९७॥ एऱ्हवी काम्य कर्माचे नाव येताच ते करण्याकरिता आपले सर्व शरीर जरी खर्ची घालावे लागले, तरी फार काही कष्ट झाले, असे वाटत नाही॥ ५९८॥ अर्जुना! दिडी दुपटीने जर आपल्याला लाभ होत असेल तर पैसा गुंतविणारा आता पुरे असे म्हणत नाही. किंवा बी पेरीत असताना आता पुरे असे ज्याप्रमाणे म्हणत नाही॥ ५९९ ॥ किंवा परीस ज्याच्या हाती आला त्या साधकाने लोखंडाकरिता सर्व संपत्ति जरी खर्च केली तरी त्याची भरभराटच होणार॥ ६०० ॥ त्याप्रमाणे पुढील फळाच्या आशेने दुःखदायक अशी काम्यकर्मे कितीही केली तरी ती थोडीच केली असे मानतो॥ ६०१ ॥

तेणें फळकामुकें। यथाविधि नेटकें। काम्य कीजे तितुकें। क्रियाजात॥ ६०२॥
आणि तयाही केलियाचे। तोंडीं लावी दौंडीचें। कर्मी या नामपाठाचे। वाणें सारी॥ ६०३॥
तैसा भरे कर्माहंकारु। मग पिता अथवा गुरु। ते न मनी काळज्वरु। औषध जैसें॥ ६०४॥
तैसेनि साहंकारें। फळाभिलाषियें नरें। कीजे गा आदरें। जें जें कांहीं॥ ६०५॥
परी तेंहि करणें बहुवसा। वळघोनि करी सायासा। जीवनोपावो कां जैसा। कोल्हाटियांचा॥ ६०६॥
एका कणालागीं उंदीरु। आसका उपसे डोंगरु। कां शेवाळोद्देशें दर्दुरु। समुद्रु डहुळी॥ ६०७॥
पाहीं भिकेपरतें न लाहे। तऱ्ही गारुडी सापु वाहे। काय कीजे शीणुचि होये। गोडु येका॥ ६०८॥
हें असो परमाणूचेनि लाभें। पाताळ लंघिती वोळंबे। तैसें स्वर्गसुखलोभें। विचंबणें जें॥ ६०९॥
तें काम्य कर्म सक्लेश। जाणावें येथ राजस। आतां चिन्ह परिस। तामसाचें॥ ६१०॥

अर्थ—फळाच्या ठिकाणी आसक्त होऊन जेवढी म्हणून काम्य कर्मे आहेत ती सर्व शास्त्राने जसे सांगितले असेल त्याप्रमाणे रीतसर टापटीपीने तो करतो॥ ६०२॥ आणि तो जे जे करतो त्याची आपल्याच तोंडाने दवंडी पिटतो. आणि या सर्वांचा कर्ता मी आहे, अशी आपल्या नावाच्या थोरवीची वाणे वाटतो॥ ६०३॥ ज्याप्रमाणे मृत्युपर्यवसायी काळज्वर कोणत्याही औषधाला जुमानीत नाही, त्याप्रमाणे कर्माच्या कर्तृत्वाच्या अहंकाराने भारलेला पुरुष आपले वडील किंवा गुरु यांना जुमानीत नाही॥ ६०४॥ तसेच फळाच्या अभिलाषेने अहंकारयुक्त होऊन मनुष्याकडून जे जे काही आदराने केले जाते. पण तेही करणे, डोंबारी लोकांच्या जीवनाचे साधन जसे कष्टमय, तसे कष्टमय असते॥ ६०५-६०६॥ धान्याच्या एका दाण्याकरिता उंदीर संपूर्ण डोंगर उपसतो. किंवा शेवाळाच्या आशेने बेडूक समुद्र ढवळतो॥ ६०७॥ भिके परता जास्त काहीही पदरात पडत नसताना सुद्धा गारुडी सापाचे ओझे वाहतो. पण काय सांगावे! काहीना कष्टच गोड वाटतात॥ ६०८॥ हे असो! एका कणाच्या लाभासाठी वाळवी संपूर्ण पाताळ जसे पालथे घालते त्याप्रमाणे स्वर्गाच्या सुखाच्या लोभाने केवळ जे श्रम पावणे आहे ते कष्टयुक्त काम्यकर्म राजस आहे असे समज. आता तामस कर्माचे स्वरूप ऐक॥ ६१०॥

अनुबन्धं क्षयं हिंसामनवेक्ष्य च पौरुषम्। मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते॥ २५॥

अर्थ—जे कर्म, मागून होणारा परिणाम, शक्तीचा व धनाचा क्षय, प्राण्याची पीडा आणि आपले सामर्थ्य याचा विचार न करिता मोहाने आरंभिले जाते त्याला तामसकर्म म्हटले जाते॥ २५॥

तरी तें गा तामस कर्म। जें निंदेचें काळें धाम। निषेधाचें जन्म। साच जेणें॥ ६११॥
जें निपजविल्यापाठीं। कांहींच न दिसे दिठी। रेघ काढिलिया पोटीं। तोयाचे जेवीं॥ ६१२॥
कां कांजी घुसळलिया। कां राखोंडी फुंकलिया। कांहीं न दिसे गाळिलिया। वाळु घाणां॥ ६१३॥
नाना उपणिलिया भूंस। कां विंधिलिया आकाश। नाना मांडिलिया पाश। वारयासी॥ ६१४॥
हें अवघेंचि जैसें। वांझें होऊनि नासे। जें केलिया पाठीं तैसें। वायांचि जाय॥ ६१५॥

अर्थ—जे कर्म निंदेचे पापघर आहे व ज्याच्या योगाने खरीच निषिद्धता जन्मास येते, त्याला तामस कर्म म्हणतात॥ ६११॥ ज्याप्रमाणे पाण्यावर काढलेली रेघ निष्फळ त्याप्रमाणे जे कर्म घडल्यानंतर दृष्टीला काहीच (अपेक्षित) दिसत नाही॥ ६१२॥ किंवा पेज घुसळली असता किंवा राख फुंकली असता किंवा वाळू घाण्यात गाळली असता कांहीच (फलांच्या दृष्टीने) मिळत नाही॥ ६१३॥ किंवा भुसा पाखडला असता किंवा आकाशाला छिद्र पाडले असता किंवा वाऱ्याला पकडण्या करिता पाश टाकला असता॥ ६१४॥ हे सर्व ज्याप्रमाणे निष्फळ होऊन नाश पावते त्याप्रमाणे जे कर्म केल्यानंतर व्यर्थ होते॥ ६१५॥

एऱ्हवीं नरदेहाही येवढें। धन आटणीये पडे। जें कर्म निफजवितां मोडे। जगाचें सुख॥ ६१६॥
जैसा कमळवनीं फांसु। काढिलिया कांटसु। आपण झिजे नाशु। कमळां करी॥ ६१७॥

अर्थ—वास्तविक पाहता मनुष्य जन्मासारखे अमूल्य धन खर्ची पडूनही जे कर्म घडते त्याने जगतातील

सुख नाहीसे होते॥ ६१६॥ ज्याप्रमाणे कमळाच्या वनामध्ये काटेरी फास ओढला असता काटे झिजतात व कमळाचा नाश होतो॥ ६१७॥

कां आपण आंगें जळे। आणि नागवी जगाचे डोळे। पतंगु जैसा सळें। दीपाचेनि॥ ६१८॥
तैसें सर्वस्व वायां जावो। वरी स्वदेहाही होय घावो। परी पुढीलां अपावो। निफजविजे जेणें॥ ६१९॥
मासी आपणयातें गिळवी। परी पुढीला वांती शिणवी। तें कश्मळ आठवी। आचरण जें॥ ६२०॥

अर्थ—किंवा दिव्याचा प्रकाश दिसताच पतंग दिव्याच्या द्वेषाने ज्याप्रमाणे दिव्यावर उडी घेतो आणि स्वत: जळून जगाला अंधार करतो॥ ६१८॥ त्याप्रमाणे आपले सर्वस्व व्यर्थ गेले व आपल्या देहालाही दु:ख झाले तरी चालेल, पण ज्या कर्माने दुसऱ्यांना अपाय केला जातो॥ ६१९॥ माशी आपल्याला गिळून घेते पण दुसऱ्याला वांतीचे कष्ट घडविते, असे हे तामस कर्माच्या किळसवाण्या आचरणाची आठवण करून देते॥ ३२०॥

तेंही करावया दोषें। मज सामर्थ्य असे कीं नसे। हेंही पुढील तैसें। न पाहतां करी॥ ६२१॥
केवढा माझा उवावो। करितां कोण प्रस्तावो। केलियाही आवो। काय येथ॥ ६२२॥

अर्थ—ते दोषयुक्त कर्म करण्यास आपल्यात सामर्थ्य आहे की नाही याचाही पुढचा विचार न करतातच. तो ते करतो॥ ३२१॥ आपला प्रयत्न केवढा, प्रसंग कोणता आणि आपले सामर्थ्य ते येथे काय?॥ ६२२॥

इये जाणिवेची सोये। अविवेकाचेनि पायें। पुसोनियां होये। साटोप कर्मी॥ ६२३॥
आपुला वसौटा जाळुनी। बिसाटे जैसा वन्ही। कां स्वमर्यादा गिळोनि। सिंधु उठी॥ ६२४॥
मग नेणे बहु थोडें। न पाहे मागें पुढें। मार्गामार्ग येकवढे। करीत चाले॥ ६२५॥

अर्थ—अशा प्रकारच्या ज्ञानाचा मार्ग अविवेकाच्या पायाने लाथाडतो आणि कर्माचा खटाटोप करतो॥ ६२३॥ आपले वसतिस्थान जाळून टाकून अग्नि ज्याप्रमाणे भडकतो किंवा समुद्र आपली मर्यादा सोडून देऊन (चंद्राचे दर्शन झाले असतां) उसळतो॥ ६२४॥ मग कमी किंवा जास्त लक्षात न घेता, मागे पुढे न पाहता, वाट व अव्हाट यांचा एककार करून (त्यांचा विवेक न करता) आपली वाटचाल करीत असतो॥ ६२५॥

तैसें कृत्याकृत्य सरकटित। आपपर नुरवित। कर्म होय तें निश्चित। तामस जाण॥ ६२६॥

अर्थ—याप्रमाणे करण्यासारखे (उचित) व न करण्यासारखे (अनुचित) यांना सरसकट मिसळून (म्हणजे यांचा विचार न करता) आपले किंवा दुसऱ्याचे हा भेद शिल्लक न ठेवता जे कर्म होते ते निश्चयेकरून तामस कर्म समज॥ ६२६॥

ऐसी गुणत्रयभिन्ना। कर्माची गा अर्जुना। हे केली विवंचना। उपपत्तींसीं॥ ६२७॥
आतां ययाचि कर्मा भजतां। कर्माभिमानिया कर्ता। तो जीवुही त्रिविधता। पातला असे॥ ६२८॥
चतुराश्रमवशें। एकु पुरुषु चतुर्धा दिसे। कर्तया त्रैविध्य तैसें। कर्मभेदें॥ ६२९॥
परी तयां तिहींआंतु। सात्त्विक तंव प्रस्तुतु। सांगेन दत्तचित्तु। आकर्णी तूं॥ ६३०॥

अर्थ—याप्रमाणे अर्जुना! सत्व, रज, तम या तीन गुणांच्यामुळे भिन्न भिन्न झालेल्या कर्माचे सोपपत्तिक विवरण केले॥ ९२७॥ आता हे कर्म करणारा व त्या कर्माच्या कर्तेपणाचा अहंकार धारण करणारा जीवही तीन प्रकारचा होतो॥ ६२८॥ ज्याप्रमाणे एकच पुरुष चार आश्रमांच्या योगाने चार प्रकारचा दिसतो, त्याप्रमाणे कर्माच्या भिन्नत्वानुसार (सत्व, रज, तम) कर्त्याच्या आंगीही त्रिविधता येते॥ ६२९॥ परंतु तिन्हींमध्ये पहिला जो सात्विककर्ता, त्याचें विवेचन करतो, ते तू नीट लक्ष देऊन ऐक॥ ६३०॥

मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वित:। सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकार: कर्ता सात्त्विक उच्यते॥ २६॥

अर्थ—हिम्मतीने व उत्साहाने, फळाची आशा न धरता, निरहंकारवृत्तीने कर्म करीत असताना कर्माचे फळ मिळाले किंवा न मिळाले तरी ज्याचे मन निर्विकार असते त्याला सात्त्विक कर्ता म्हणतात॥ २६॥

तरी फळोद्देशें सांडिलिया। वाढिती जेवीं सरळिया। शाखा कां चंदनाचिया। बावन्नया॥ ६३१॥

कां न फळतांही सार्थका। जैसिया नागलतिका। तैसिया करी नित्यादिकां। क्रिया जो कां॥ ६३२॥
परी फलशून्यता। नाहीं तया विफळता। पैं फळासीचि पांडुसुता। फळें कायिसी॥ ६३३॥

अर्थ—मलयागिरीवरील उत्तम प्रकारच्या चंदनाच्या झाडांना फळे येत नसली तरी त्या झाडांच्या फाद्या सरळच वाढत जातात॥ ६३१ ॥ किंवा फळ न येताही ज्याप्रमाणे नागवेलीची झाडे उपयोगाची असतात. (कारण त्यांची पाने उपयोगी पडतात) त्याप्रमाणे जो नित्यनैमित्तिक कर्मे करतो॥ ६३२॥ परंतु या फळशून्यतेमुळे त्याला फोलपण येत नाही. कारण अर्जुना! फळालाच फळे कधी येतात काय? (निष्फलता हेच त्या सात्विक कर्त्याच्या कर्माचे फळ आहे. त्याला आता आणखी फळ कसे लागणार? हा भाव)

गूढार्थदीपिका—नित्य कर्मे भगवंतानी मला करायला सांगितली आहेत व भगवंताची आज्ञा पालन करणे हे आपले कर्तव्य आहे, असे समजून भगवंताच्या प्रेमामुळे तो ती नित्यकर्मे आचरीत असतो. त्यामुळे त्या कर्मा विषयीची आसक्ती किंवा त्यापासून होणारा लाभ याविषयी त्याच्या मनात कोणताही भाव राहत नाही. भगवंताचे प्रेमच फक्त त्याच्या अंत:करणात असते.

कर्माविषयी व त्यापासून होणाऱ्या फळाविषयी अशा रीतीने अनासक्ति त्याच्या मनात असल्या कारणाने त्याची ती कर्मे निरहंकार पूर्वक व फलाशारहित होत असतात. कर्माचे आचरण करतांना त्याचे ध्येयच निष्फळता असल्यामुळे त्याच निष्फळतेची प्राप्ती त्यामुळे कर्मानंतर होणार, आतां या निष्फळतेला आणखी फळ ते काय लागणार! झाडाच्या जीवनाची सार्थकता फळातच असते.

आणि आदरें करी बहुवसें। परी कर्ता मी हें नुमसे। वर्षाकाळींचे जैसें। मेघवृंद॥ ६३४॥
तेवींचि परमात्मलिंगा। समर्पावयाजोगा। कर्मकलापु पैं गा। निपजावया॥ ६३५॥
तया काळातें नुलंघणें। देशशुद्धिही साधणें। कां शास्त्रांच्या वातीं पाहणें। क्रियानिर्णयो॥ ६३६॥

अर्थ—वर्षाकाळी मेघाचे समूह एकत्र येऊन पृथ्वीवर पावसाचा वर्षाव करतात, पण आपण वर्षाव केला हे ते जाणत नाहीत. त्याप्रमाणे अत्यंत आदराने कर्मे करूनही ज्याच्या ठिकाणी मी कर्माचा कर्ता आहे ही अहंकाराची वृत्ति उठत नाही॥ ६३४-६३५॥ त्याप्रमाणे परमेश्वराला समर्पण करण्यायोग्य अशी कर्मे करण्याकरिता कालाची मर्यादा न सोडता देशाची शुद्धी साधून कर्माच्या योग्यायोग्यतेचा निर्णय शास्त्राच्या दिव्याने करतो॥ ६३६॥

वृत्ती करणें येकवळा। चित्त जावों न देणें फळा। नियमांचिया सांखळा। वाहणें सदा॥ ६३७॥
हा निरोधु साहावयालगीं। धैर्याचिया चांगचांगी। जिंतवणी जिती आंगीं। वाहे जो कां॥ ६३८॥
आणि आत्मयाचिये आवडी। कर्मे करितां वरपडीं। देहसुखाचिये परवडी। येवों न लाहे॥ ६३९॥
ऐसा निद्रा दुऱ्हावे। क्षुधा न बाणवे। सुरवाडु न पावे। आंगाचा ठावो॥ ६४०॥
तंव अधिकाधिक। उत्साहो धरी आगळीक। सोनें जैसें तुक। तुटलिया कसीं॥ ६४१॥
जरी आवडी आथी साच। तरी जीवितही सलंच। आगीं घालितां रोमांच। देखिजती सतिये॥ ६४२॥
मा आत्मयायेवढीया प्रिया। वालभेला जो धनंजया। देहही सिदतां तया। काय खेदु होईल॥ ६४३॥
म्हणौनि विषयसुरवाडु तुटे। जंव जंव देहबुद्धि आटे। तंव तंव आनंदु दुणवटे। कर्मीं जया॥ ६४४॥

अर्थ—इंद्रियें व अंत:करणवृत्ति यांना बांधून चित्ताला फलाकडे जाऊ न देता जो शास्त्रांच्या नियमांची बेडी नित्य पायात बाळगतो (शास्त्राचे बंधन पाळतो)॥ ६३७॥ हे निर्बंध सहन करण्याकरिता उत्कृष्ट धैर्य आपले ठिकाणीं असावे म्हणून जो जागती चिंता वाहत राहतो॥ ६३८॥ आणि आत्मप्राप्तीच्या तळमळीमुळे (अधिकारानुसार प्राप्त झालेली) कर्मे करीत असता देहाच्या सुखाची पर्वा करीत नाही॥ ६३९॥ तो (आळस) व झोप टाकून देतो. त्याला भुकेचीही आठवण होत नाही आणि शरीराची सुखावस्था त्याला रुचत नाही॥ ६४०॥ सोनें ज्याप्रमाणे मुशीत टाकले असता (हीणकस भाग जळल्यामुळे) वजनात कमी भरले तरी कसाला जास्त उतरते त्याप्रमाणे कर्म करण्याविषयी त्याचा उत्साह अधिकाधिक वाढतच जातो॥ ६४१॥ खरोखर जर प्रेम असेल तर त्याच्यापुढे जीवंत राहणेही सहन

होत नाही. पतिव्रता स्त्रियेच्या ठिकाणी (सती जाताना) अग्नीत उडी टाकते वेळी आनंदाचे आंगावर शाहारे उमटलेले दिसतात॥ ६४२ ॥ मग अर्जुना! आत्मस्वरूपा सारख्या प्रियकरावर ज्याचे प्रेम बसेल त्याच्या देहाला कष्ट झाले तरी दु:ख होईल काय?॥ ६४३ ॥ म्हणून विषयांच्या सुखाची इच्छा नाहीशी होऊन जशी जशी देहाविषयीची आसक्ति कमी कमी होत जाते तसतसा (शास्त्रोक्त) कर्म करण्याविषयीचा त्याचा आनंद दुणावत जातो॥ ६४४ ॥

ऐसेनि जो कर्म करी। आणि कोणे एके अवसरीं। तें ठाके ऐसी परी। वाहे जरी॥ ६४५ ॥
तरी कडाडीं लोटला गाडा। तो आपणपें न मनी अवघडा। तैसा ठाकलेनिही थोडा। नोहे जो कां॥ ६४६ ॥
नातरी आदरिलें। अव्यंग सिद्धी गेले। तरी तेंही जिंतिलें। मिरवूं नेणे॥ ६४७ ॥
इया खुणा कर्म करितां। देखिजे जो पांडुसुता। तयातें म्हणिपे तत्त्वता। सात्त्विकु कर्ता॥ ६४८ ॥
आतां राजसा कर्तेया। वोळखणें हें धनंजया। जे अभिलाषा जगाचिया। वसौटा तो॥ ६४९ ॥

अर्थ—याप्रमाणे जो कर्म करतो व एखादेवेळी ते कर्म बंद पडले असा प्रसंग आला॥ ६४५ ॥ तरी जसे कड्यावरून गाडा पडून मोडला तरी त्याचे त्याला दु:ख होत नाही त्याप्रमाणे कर्म बंद पडले तरी तो (सात्विक कर्ता) यत्किंचितही दु:खी होत नाही॥ ६४६ ॥ किंवा आरंभिलेले कर्म कोणताही व्यत्यय न येता पूर्णपणे सिद्धीला गेले तरी आपण ते पार पाडले याबद्दल तो अभिमानही मिरवीत नाही॥ ६४७ ॥ अर्जुना! अशा लक्षणांनी कर्म करणारा जो पाहशील त्यालाच खरोखर सात्विक कर्ता म्हणावे॥ ६४८ ॥ आता, धनंजया! लौकिक बाबतीचे वसतिस्थान असलेला असा जो राजसकर्ता त्याला ओळखण्याचे लक्षण असे॥ ६४९ ॥

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचि:। हर्षशोकान्वित: कर्ता राजस: परिकीर्तित:॥ २७ ॥

अर्थ—विषयाचे ठिकाणी आसक्त, कर्माच्या फळाची इच्छा करणारा, लोभी, हिंसा करणारा, अपवित्र, सुखदु:खानी युक्त असलेला असा जो त्याला राजसकर्ता म्हणतात॥ २७ ॥

जैसा गांवींचिया कश्मळा। उकरडा होय येकवळा। कां स्मशानीं अमंगळा। आघवयांचि॥ ६५० ॥
तयापरी जो अशेषा। विश्वाचिया अभिलाषा। पायपाखाळणिया देखा। घरटा जाला॥ ६५१ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे गावातील घाणेरडे पदार्थ टाकण्याचे एकमेव ठिकाण उकरडा असतो किंवा श्मशानात सर्वत्र अमंगळच असते. त्याप्रमाणे जो विश्वातील यच्चयावत् वासनांच्या दोषांचा पाय धुण्याचे आश्रयस्थान होतो॥ ६५०-६५१ ॥

म्हणोनि फळाचा लागु। देखे जिये असलगु। तिये कर्मीं चांगु। रोहो मांडी॥ ६५२ ॥
आणि आपण जालिये जोडी। उपखों नेदी कवडी। क्षणक्षणा कुरोंडी। जीवाची करी॥ ६५३ ॥

अर्थ—म्हणून सुलभतेने ज्या फळाचा लाभ साधण्यासारखा त्याला दिसत असेल त्या कर्माची आदराने सुरुवात करतो॥ ६५२ ॥ आणि कर्मापासून झालेल्या लाभाचा फायदा आपणच घ्यावयाचा, त्यातील एक कवडी देखील खर्च न करता क्षणोक्षणी आपले प्राण देखील ओवाळून टाकण्यास तो सिद्ध होतो॥ ६५३ ॥

कृपणु चित्तीं ठेवा आपुला। तैसा दक्षु पराविया माला। बकु जैसा खुतला। मासेयासी॥ ६५४ ॥

अर्थ—कद्रू माणूस अंत:करणात सदा सर्वकाळ आपल्या ठेवीविषयी जसा सावध असतो किंवा मासा हाती गवसावा, म्हणून बगळा जसा तटस्थ बसतो त्याप्रमाणे तो (राजसकर्ता) दुसऱ्याच्या मालाविषयी दुसऱ्याचा माल कसा हडपता येईल याविषयी दक्ष असतो॥ ६५४ ॥

आणि गोंवी गेलिया जवळी। झगटलिया अंग फाळी। फळे तरी आंतु पोळी। बोरांटी जैसी॥ ६५५ ॥
तैसें मने वाचा कायें। भलतया दु:ख देतु जाये। स्वार्थु साधितां न पाहे। पराचें हित॥ ६५६ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे बोरीचे झाड, जवळ गेले तर अडकविते (कपडे वगैरे काट्यात अडकतात). हिसकाहिसकी केली तर आंगाची कातडी काढते व फळायला लागली तर आत मात्र पोकळ असते. त्याप्रमाणे शरीराने, मनाने व बोलून, कोणीही दुसरा असला तर त्याला दु:खच देत जायचे. आपला स्वार्थ साधताना दुसऱ्याचे हित पहावयाचे नाही॥ ६५५-६५६ ॥

तेवींच आंगें कर्मीं। आचरणें नोहे क्षमी। न निघे मनोधर्मीं। अरोचकु॥ ६५७॥
कनकाचिया फळा। आंतु माज बाहेरी मौळा। तैसा सबाह्य दुबळा। शुचित्वें जो॥ ६५८॥

अर्थ—त्याचप्रमाणे आरंभलेले कर्म (काम्य) शारीरिक सामर्थ्य नसतानाही त्याच्या ठिकाणी त्या कर्माविषयी मनात अरुचि निर्माण होत नाही॥ ६५७॥ ज्याप्रमाणे धोतऱ्याच्या फळाला आतून कैफ आणणारा गर व बाहेरून काटेरी कवच असते त्याप्रमाणे शुचित्वाच्या दृष्टीने तो आतून व बाहेरून करंटा असतो॥ ६५८॥

आणि कर्मजात केलिया। फळ लाहे जरी धनंजया। तरी हरिखें जगा यया। वांकुलिया वाये॥ ६५९॥

अर्थ—आणि अर्जुना! केलेल्या कर्माचे फळ जर त्याला प्राप्त झाले तर हर्षातिरेकाने तो जगाला वाकुल्या दाखवितो॥ ६५९॥

अथवा जें आदरिलें। हीनफळ होय केलें। तरी शोकें तेणें जिंतिलें। धिक्कारों लागे॥ ६६०॥
कर्मीं राहाटी ऐसी। जयातें होती देखसी। तोचि जाण त्रिशुद्धीसी। राजस कर्ता॥ ६६१॥
आतां यया पाठी येरु। जो कुकर्माचा आगरु। तोही करूं गोचरु। तामस कर्ता॥ ६६२॥

अर्थ—किंवा एखादे कर्म करून फलप्राप्ती झाली नाही तर शोकापन्न होऊन कर्माचा धिक्कार करू लागतो॥ ६६०॥ कर्म करण्याच्या बाबतीत अशा तऱ्हेची वागणूक ज्याची दिसून येईल तो निश्चित राजस कर्ता होय असे जाण॥ ६६१॥ आता यापुढे वाईट कृत्यांचे आगरच असलेला जो तामस कर्ता त्याचेही विवरण करू॥ ६६२॥

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः। विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते॥ २८॥

अर्थ—अजितेंद्रिय, मूर्ख, ताठर, कपटी, परोत्कर्ष सहन न करणारा, आळशी, दुर्मुख व चेंगट असा जो कर्ता त्याला तामसकर्ता म्हणतात॥ २८॥

तरी मीयां लागलिया कैसें। पुढील जळत असे। हें नेणिजे हुताशें। जियापरी॥ ६६३॥
पैं शस्त्रें मियां तिखटें। नेणिजे कैसेनि निवटे। कां नेणिजे काळकूटें। आपलें केलें॥ ६६४॥
तैसा पुढीलया आपुलया। घातु करीत धनंजया। आदरी वोखटिया। क्रिया जो कां॥ ६६५॥
तिया करितांही वेळीं। काय जालें हें न सांभाळी। चळला वायू वाहटुळी। चेष्टे तैसा॥ ६६६॥
पैं करणिया आणि जया। मेळु नाहीं धनंजया। तो पाहुनी पिसेया। कैंची त्राय॥ ६६७॥

अर्थ—तरी माझ्या स्पर्शाने समोर येणाऱ्या वस्तू कशा जळतात हे जसे अग्नीला समजत नाही॥ ६६३॥ किंवा आपल्या तीक्ष्ण धारेने लोक कसे मरतात हे जसे शस्त्रांना समजत नाही किंवा आपली करणी (जीव घेण्याची) जशी काळकूटाला कळत नाही॥ ६६४॥ त्याप्रमाणे, अर्जुना! आपल्यापुढे येणाऱ्यांचा घात करण्यासाठी वाईट कर्म करण्यास जो प्रवृत्त होतो॥ ६६५॥ ती कर्मे करीत असताना वावटळीचा वारा जसा सैरावैरा वाहतो त्याप्रमाणे जो परिणामाकडे लक्ष न देता कर्म करीतच राहतो॥ ६६६॥ आणि अर्जुना! तो व त्याची कृती यांच्यात कसलाच मेळ नसतो. याच्या पुढे वेड्याची किंमत ती काय॥ ६६७॥

आणि इंद्रियांचें वैरिलें। चरोनि राखें जो जियालें। बैलातळीं लागले। गोचिड जैसें॥ ६६८॥
हांसया रुदना वेळु। नेणतां आदरी बाळु। राहाटे उच्छृंखळु। तयापरी॥ ६६९॥
जो प्रकृती आंतलेपणें। कृत्याकृत्यस्वादु नेणे। फुगे केरें धालेपणें। उकरडा जैसा॥ ६७०॥

अर्थ—आणि बैलाच्या पोटाला लागलेल्या गोचिडाप्रमाणे इंद्रियांनी वाढलेल्या विषयांवर चरून जो आपला जीवननिर्वाह करतो॥ ६६८॥ ज्याप्रमाणे तान्ह्या मुलाला हासण्याला व रडण्याला काळवेळ राहत नाही त्याप्रमाणे ज्याच्या वागण्यात ताळतंत्र राहत नाही॥ ६६९॥ प्रकृतीच्या स्वाधीन झाल्यामुळे ज्याला योग्य काय, अयोग्य काय याचा सारासार विचार राहत नाही. व केरकचरा सांचल्यामुळे ज्याप्रमाणे उकिरडा फुगावा त्याप्रमाणे जो खोट्या समाधानाने फुगतो॥ ६७०॥

म्हणोनि मान्याचेनि नांवें। ईश्वराही परी न खालवे। स्तब्धपणें न मनवे। डोंगरासी॥ ६७१॥

अर्थ—म्हणून मोठेपणाच्या जाणीवेने जो ईश्वरापुढेही वाकत नाही व अहंकाराच्या ताठ्यामुळे डोंगरालाही देखील कस्पटाप्रमाणे समजतो ॥ ६७१ ॥

आणि मन जयाचें कलाली। राहटी फुडी चोरिली। दिठी कीर ते वोली। पण्यांगनेची॥ ६७२ ॥
किंबहुना कपटाचें। देहचि वळिलें तयाचें। तें जिणें कीं जुवाराचें। टिटेघर॥ ६७३ ॥
नोहे तयाचा प्रादुर्भावो। तो साभिलाष भिल्लांचा गांवो। म्हणोनि नये येवों जावों। तया वाटा॥ ६७४ ॥

अर्थ—आणि ज्याचे मन कपटी व वागणूक पक्की चोरासारखी, दृष्टि तर खरोखर वेश्येसारखीच कपटी प्रेमाने युक्त असते॥ ६७२ ॥ फार काय सांगावे! त्याचा सारा देह कपटाचाच बनलेला असतो. त्याचे आयुष्य म्हणजे रिठ्या वरच्या (वाईट कृत्याच्या) जुगाराचा अड्डाच होय॥ ६७३ ॥ त्याचा मूर्तिमंत अवतार म्हणजे स्वार्थाने भरलेल्या वाटमारी करणाऱ्या भिल्लांचा गावच नव्हे काय? (होय) म्हणून त्या गावाकडे येऊ व जाऊ नये॥ ६७४ ॥

आणि आणिकांचें निकें केलें। विरु होय जया आलें। जैसें अपेय पया मिनलें। लवण करी॥ ६७५ ॥
कां हींव ऐसा पदार्थु। घातला आगीआंतु। तेचि क्षणीं धडाडितु। अग्नि होय॥ ६७६ ॥
नाना सुद्रव्यें गोमटीं। जालिया शरीरीं पैठीं। होऊनि ठाती किरीटी। मळुचि जेवीं॥ ६७७ ॥
जैसें पुढिलाचें बरवें। जयाच्या भीतरीं पावे। आणि विरुद्धचि आघवें। होऊनि निगे॥ ६७८ ॥
जो गुण घे दे दोष। अमृताचें करी विष। दूध पाजिलिया देख। व्यालु जैसा॥ ६७९ ॥

अर्थ—आणि ज्याप्रमाणे दुधात मीठ टाकले असता ते पिण्याला अयोग्य होते त्याप्रमाणे दुसऱ्याचे चांगले झालेले पाहून ज्याला (आपल्या) विरुद्ध (काही) झाले असे वाटते॥ ६७५ ॥ किंवा थंड असा पदार्थ अग्नीत टाकला तर तो त्याचक्षणी धडधडित पेटून अग्नीच होतो॥ ६७६ ॥ किंवा अर्जुना! ज्याप्रमाणे कितीही उत्तम उत्तम पदार्थ पोटात गेले असता शेवटी त्यांचा मळच होतो॥ ६७७ ॥ त्याप्रमाणे दुसऱ्याचे चांगले झालेल्याची बातमी त्याला कळली रे कळली की, त्याला ती सहन न होऊन पूर्णपणें ती वाईटरूपाने बाहेर पडलीच म्हणून समजावी॥ ६७८ ॥ सापाला दूध पाजले असता तो जसे दुधाचे विष करतो त्याप्रमाणे दुसऱ्याचे गुण ऐकल्या बरोबर तो त्यांना दोषदृष्टीने पाहून त्याची निंदा करू लागतो॥ ६७९ ॥

आणि ऐहिकीं जियावें। जेणें परत्रा साच यावें। तें उचित कृत्य पावे। अवसरीं जिये॥ ६८० ॥
तेव्हां जया आपैसी। निद्रा ये ठेविली ऐसी। दुर्व्यवहारीं जैसी। विटाळें लोटे॥ ६८१ ॥
पैं द्राक्षरसा आम्ररसा। वेळे तोंड सडे वायसा। कां डोळे फुटती दिवसा। डुडुळाचे॥ ६८२ ॥
तैसा कल्याणकाळु पाहे। तैं तयातें आळसु खाये। ना प्रमादीं तरी होये। तो म्हणे तैसें॥ ६८३ ॥

अर्थ—आणि ज्यायोगाने इहलोकीं कीर्ति होईल व परलोकीही सद्‌गती मिळेल असे सत्कर्म करण्याचा जेव्हा प्रसंग येतो॥ ६८० ॥ तेव्हा त्याला आपोआप झोप ठेवल्यासारखी येते. आणि वाईट कर्म करतेवेळी मात्र ती (झोप) जणुकाय विटाळ होईल म्हणूनच दूर पळते॥ ६८१ ॥ द्राक्षाच्या किंवा आंब्याच्या मोसमात कावळ्याला मुखरोग होतो किंवा घुबडाचे डोळे दिवसाचे वेळी जसे आंधळे होतात॥ ६८२ ॥ त्याप्रमाणे कल्याण साधण्याची वेळ आली असता त्याला आळस खातो आणि चूक होण्याच्या वेळी मात्र तो म्हणेल त्याप्रमाणे होते. (म्हणजे आळस झटकून तो उत्साहाने कर्माला प्रवृत्त होतो) ॥ ६८३ ॥

जेवींचि सागराच्या पोटीं। जळे अखंड आगिठी। तैसा विषादु वाहे गांठीं। जिवाचिये जो॥ ६८४ ॥
लेंडोराआगीं धूमावधि। कां अपाना आंगीं दुर्गंधि। तैसा जो जीवितावधि। विषादें केला॥ ६८५ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे समुद्राच्या पोटातील वडवाग्नी सतत जळत असतो त्याप्रमाणे अंत:करणात जो (दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळे) सतत (मत्सराचे) दु:ख बाळगत असतो॥ ६८४ ॥ ज्याप्रमाणे लेंड्यांच्या विस्तवात शेवटपर्यंत धूरच धूर असतो किंवा अपानद्वाराने निघणारा वायू जसा दुर्गंधयुक्तच असतो, त्याप्रमाणे जो जन्मभर विषादाने ग्रासलेला असतो॥ ६८५ ॥

आणि कल्पांताचिया पारा। वेगळेंही जो वीरा। सूत्र धरी व्यापारा। साभिलाषा॥ ६८६॥
अगा जगाही परौती। शुचा वाहे पैं चित्तीं। करितां विषीं हातीं। तृणही न लगे॥ ६८७॥
ऐसा जो लोकाआंतु। पापपुंजु मूर्तु। देखसी तो अव्याहतु। तामसु कर्ता॥ ६८८॥
एवं कर्म कर्ता ज्ञान। या तिहींचे त्रिधा चिन्ह। दाविलें तुज सुजन-। चक्रवर्ती॥ ६८९॥

अर्थ—हे वीरा अर्जुन! आणि जो कल्पांताच्याही पलीकडील फलप्राप्तीच्या अभिलाषेने काम्य कर्मे करण्याचे सूत्र धरतो॥ ६८६॥ अरे! जो जगाच्या पलीकडील गोष्टीविषयी अंत:करणात चिंता वाहतो. पण ज्याविषयी चिंता वाहतो त्यापैकी एका गवताच्या काडी इतकाही लाभ त्याला होत नाही॥ ६८७॥ अशाप्रमाणे लोकामध्ये मूर्तिमंत पापांची राशी असा जो पाहशील तो निर्विवाद तामसकर्ता होय॥ ६८८॥ अशा प्रकारे कर्म, कर्ता व ज्ञान या तिघांचीही तीन लक्षणें, हे सज्जन शिरोमणी अर्जुना! तुला दाखवून दिली॥ ६८९॥

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु। प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनञ्जय॥ २९॥

अर्थ—अर्जुना, गुणांच्या योगाने झालेले बुद्धीचे व धैर्याचे तीन प्रकारचे भेद पूर्णपणे वेगवेगळे तुला सांगतो, ते तू ऐक॥ २९॥

आतां अविद्येच्या गांवीं। मोहाची वेढूनि मदवी। संदेहाचीं आघवीं। लेऊनि लेणीं॥ ६९०॥
आत्मनिश्चयाची बरव। जया आरिसां पाहे सावयव। तिये बुद्धीचीही धांव। त्रिधा असे॥ ६९१॥

अर्थ—आतां अज्ञानरूपी गावात मोहाचे वस्त्र नेसून व संशयरूपी सर्व अलंकार घालून जीवाच्या यथार्थ स्वरूपाच्या निश्चयाची शोभा ज्या आरशात स्पष्ट दिसते त्या बुद्धीची धावही तीन प्रकारची आहे॥ ६९०-६९१॥

अगा सत्त्वादि गुणीं इहीं। काइ एक तिहीं ठायीं। न कीजेचि येथ पाहीं। जगामाजीं॥ ६९२॥
आगी न वसतां पोटीं। कवण काष्ठ असे सृष्टी। तैसें तें कैचें दृश्यकोटीं। त्रिविधा जें नोहे॥ ६९३॥
म्हणौनि तिहीं गुणीं। बुद्धी केली त्रिगुणीं। धृतीसिही वांटणी। तैसीचि असे॥ ६९४॥
तेंचि येक वेगळालें। येथ चिन्हीं अळंकारलें। सांगिजेल उपाइलें। भेदलेपणें॥ ६९५॥
परी बुद्धि धृति इयां। दोहीं भागांमाजीं धनंजया। आधीं रूप बुद्धीचिया। भेदासि करूं॥ ६९६॥
तरी उत्तमा मध्यमा निकृष्टा। संसारासि गा सुभटा। प्राणियां येतियां वाटा। तिनी आथी॥ ६९७॥
जे करणीय काम्य निषिद्ध। ते हे मार्ग तिन्ही प्रसिद्ध। संसारभय संबंध। जीवा ययां॥ ६९८॥

अर्थ—अरे अर्जुना! या जगामध्ये कोणती एक वस्तु आहे की सत्वरजतम या तीन प्रकारची केली नाही॥ ६९२॥ जगात कोणते असे लाकूड आहे की जिच्या पोटात विस्तव राहत नाही? त्याप्रमाणे दृश्याच्या वर्गात मोडणारे असे काय आहे जे सत्वरजतमात्मक तीन प्रकारचे नसते॥ ६९३॥ म्हणून या तीन गुणांमुळे बुद्धि त्रिगुणात्मक झाली आहे, त्याचप्रमाणे धैर्याचीही वाटणी तशीच तीन गुणांची झाली आहे॥ ६९४॥ बुद्धीचा व धृतीचा हाच एक त्रिविधपणा त्यांच्या भिन्न भिन्न यथायोग्य लक्षणासह विस्ताराने सांगण्यात येईल॥ ६९५॥ परंतु, हे धनंजया! बुद्धी आणि धृती या दोन भागांपैकी प्रथम बुद्धीच्या भेदाचे निरूपण करू॥ ६९६॥ हे उत्कृष्ट योद्ध्या अर्जुना! संसारात येणाऱ्या प्राण्यांना उत्तम, मध्यम व निकृष्ट अशा तीन वाटा आहेत॥ ६९७॥ विहित कर्म, काम्यकर्म व निषिद्ध कर्म हे तीन मार्ग प्रसिद्ध आहेत. यांपासूनच जीवांना संसाराचे भय निर्माण होते॥ ६९८॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये। बन्धं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी॥ ३०॥

अर्थ—अर्जुना! जी बुद्धी कर्ममार्ग व संन्यास मार्ग, कर्तव्य कोणते व निषिद्ध कोणते, भय कशापासून व अभय कशापासून, बंध कोणत्या मार्गाने होतो व मोक्ष कशामुळे होतो हे जाणते तिला सात्विक बुद्धि म्हणतात॥ ३०॥

म्हणौनि अधिकारें मानिलें। जें विधीचेनि वोघें आलें। तें येकचि येथ भलें। नित्य कर्म॥ ६९९॥
तेंचि आत्मप्राप्तिफळ। दिठी सूनि केवळ। कीजे जैसें कां जळ। सेविजे ताहने॥ ७००॥
येतुलेनि ते कर्म। सांडी जन्मभय विषम। करूनि दे सुगम। मोक्षसिद्धि॥ ७०१॥

ऐसें कर्म करी तो भला। संसारभयें सांडिला। करणीयत्वें आला। मुमुक्षुभागा॥ ७०२॥
तेथ जे बुद्धि ऐसा। बळीया बांधे भरंवसा। मोक्षु ठेविला ऐसा। जोडेल येथ॥ ७०३॥

अर्थ—म्हणून आपल्या अधिकारानुसार व शास्त्राच्या मार्गाने आपल्या वाट्याला आलेले जे नित्य (विहित) कर्म, तेच एक काय ते या जगात आचरण करण्यास चांगले आहे॥ ३९९॥ तेच नित्य कर्म, केवळ आत्मप्राप्तीच्या ध्येयावर दृष्टि ठेवून, तहान लागलेला माणूस जसा जळाचे सेवन करतो त्याप्रमाणे आचरीत जावे॥ ७००॥ एवढ्यानेच ते कर्म अनिष्ट अशा जन्माच्या भयाला घालविते व मुक्तीचा लाभ सुलभ करून देते॥ ७०१॥ अशा रीतीने जो सूज्ञ माणूस कर्म करतो तो संसाराच्या भीतीपासून मुक्त होतो व विहित कर्माच्या अनुष्ठानाने तो मुमुक्षूच्या योग्यतेला चढतो॥ ७०२॥ तेव्हा येथे जी बुद्धि अशा प्रकारचा (विहित कर्मानुष्ठानातच मोक्ष आहे असा) दृढ निश्चय करून ठेवते तिला मोक्ष राखून ठेवल्या सारखा प्राप्त होतो॥ ७०३॥

म्हणौनि निवृत्तीचि मांडिली। सूनि प्रवृत्तितळीं। इये कर्मी बुडकुळी। द्यावी कीं ना॥ ७०४॥
तृषार्ता उदकें जिणें। कां पुरीं पडलिया पोहणे। अंधकूपीगती किरणें। सूर्याचेनि॥ ७०५॥
ना ना पथ्येंसीं औषध लाहे। तरी रोगें दाटलाही जिये। कां मीना जिव्हाळा होये। जळाचा जरी॥ ७०६॥
तरी तयाच्या जीविता। नाहीं जेवीं अन्यथा। तैसें कर्मी इये वर्ततां। जोडेचि मोक्षु॥ ७०७॥
हें करणीयाचिया कडे। जें ज्ञान आथी चोखडें। आणि अकरणीय हें फुडें। ऐसें जाण॥ ७०८॥

अर्थ—म्हणून निष्काम कर्माच्या प्रवृत्तीला तळाला घालून (मोक्षाकडे दृष्टि ठेवून) निवृत्तीची उभारणी करण्यात आली आहे. अशा कर्माच्या ठिकाणी बुडी मारू नये काय? (म्हणजे असे कर्माचे आचरण करू नये काय?)॥ ७०४॥ तहानेने व्याकुळ झालेल्याला जसे पाण्याने शांती मिळते, पुरात पडलेल्याला जसे पोहण्याने तरून जाता येते. अंधारमय विहीरीमध्ये पडलेल्याला ज्याप्रमाणे सूर्याच्या किरणामुळे वर येण्याला मार्ग दिसतो॥ ७०५॥ किंवा पथ्यपाण्यासह औषध मिळाले तर रोगाने पूर्णपणे पछाडलेलाही वाचतो किंवा माशाला जर पाण्याचा आश्रय मिळाला॥ ७०६॥ तर त्याच्या जीवाला मग भीती उरत नाही त्याप्रमाणे विहित कर्माच्या आचरणाने मोक्ष हा मिळतोच मिळतो॥ ७०७॥ ही करणीय कर्मे आहेत असे ज्याला उत्तम ज्ञान आहे आणि करण्याला अयोग्य असणारी कर्मे कशी आहेत ती तूं स्पष्ट जाण॥ ७०८॥

जीं तियें काम्यादिकें। संसारभयदायकें। अकृत्यपणाचें आंबुखें। पडिलें जयां॥ ७०९॥
तिये कर्मी अकार्यी। जन्ममरणसमयीं। प्रवृत्ति पळवी पायीं। मागिलीचि॥ ७१०॥
पैं आगीमाजीं न रिघवे। अथावीं न घालवे। धगधगीत नागवे। शूळ जेवीं॥ ७११॥
कां काळियानाग धुंधुवातु। देखोनि न घालवे हातु। न वचवे खोपेआंतु। वाघाचिये॥ ७१२॥
तैसें कर्म अकरणीय। देखोनि महाभय। उपजे निःसंदेह। बुद्धी जिये॥ ७१३॥

अर्थ—जी संसाराचे भय निर्माण करणारी काम्यादी कर्मे आहेत आणि निषिद्धपणाचे शिंतोडे ज्यावर पडले आहेत॥ ७०९॥ त्या निषिद्ध व जन्ममरणाच्या भीतीने युक्त असलेल्या कर्मांच्या बाबतीत जी बुद्धी प्रवृत्तीला मागल्या पायीच पळविते॥ ७१०॥ आगीमध्ये शिरवत नाही, खोल पाण्यात उडी घालवत नाही, तीक्ष्ण धार असलेल्या शूळाला हातात धरवत नाही॥ ७११॥ किंवा फुत्कार करणाऱ्या काळ सर्पाला पाहून त्याच्या बिळात हात घालवत नाही. किंवा वाघाच्या गुहेत ज्याप्रमाणे जाववत नाही॥ ७१२॥ त्याप्रमाणे निषिद्ध कर्म पाहूनच ज्या बुद्धीत निःसंशय महाभय उत्पन्न होते॥ ७१३॥

वाढिलें रांधूनि विखें। तेथें जाणिजे मृत्यु न चुके। तेवीं निषेधीं कां देखे। बंधातें जो॥ ७१४॥
मग बंधभयभरितीं। तियें निषिद्धी प्राप्तीं। विनियोग जाणे निवृत्ती। कर्माचिये॥ ७१५॥
ऐसेनि कार्याकार्यविवेकी। जे प्रवृत्तिनिवृत्तिमापकीं। खरा कुडा पारखीं। जिया परी॥ ७१६॥
तैसी कृत्याकृत्यशुद्धी। बुझे जे निरवधी। सात्त्विक म्हणिपे बुद्धी। तेंचि तूं जाण॥ ७१७॥

अर्थ—विष घालून शिजविलेले अन्न खाल्ले असता मरण चुकत नाही त्याप्रमाणे निषिद्ध कर्माच्या ठिकाणी जिला (ज्या बुद्धीला) जन्म मरणाचे बंधन दिसते॥ ७१४॥ मग जन्ममरणाच्या बंधाच्या भीतीने युक्त असलेले असे निषिद्ध कर्मे प्राप्त झाली असता ज्या बुद्धीला त्या कर्माची व्यवस्था म्हणजे त्यापासून परावृत्त होणे हेच जी बुद्धी जाणते॥ ७१५॥ रत्नपारखी जसा खऱ्या खोट्याची परीक्षा करतो तसे प्रवृत्ति व निवृत्ति यांच्या मापाने योग्य काय अयोग्य काय याचा जी बुद्धी निर्णय करते॥ ७१६॥ त्याप्रमाणे ज्या बुद्धीला चांगले व वाईट कृत्य कोणते हे उत्तम रीतीने कळते. तिलाच सात्त्विक बुद्धी म्हणतात, हे तू जाण॥ ७१७॥

यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च । अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी॥ ३१॥

अर्थ—ज्या बुद्धीने धर्म, अधर्म व कार्य, अकार्य यांचा यथार्थ निर्णय होत नाही ती बुद्धी, हे पार्था! राजस होय॥ ३१॥

आणि बकांच्या गांवीं। घेपे क्षीरनीर सकल्वी। कां अहोरात्रींची गोंवी। आंधळें नेणे॥ ७१८॥
जया फुलांचा मकरंद फावे। तो काष्ठें कोरूं धांवे। परी भ्रमरपणा नव्हे। अव्हांटा जेवीं॥ ७१९॥
तैसीं इयें कार्याकार्यें। धर्माधर्मरूपें जियें। तियें न चोजवितां जाये। जाणती जे कां॥ ७२०॥
अगा डोळांवीण मोतियें। घेतां पाड मिळे विपायें। न मिळणें तें आहे। ठेविलें तेथें॥ ७२१॥
तैसें अकरणीय अवचटें। नोडवे तरीच लोटे। एऱ्हवीं जाणे एकवटें। दोन्ही जे कां॥ ७२२॥
ते गा बुद्धि चोखविखी। जाण येथ राजसी। अक्षत टाकिली जैसी। मांदियेवरी॥ ७२३॥

अर्थ—आणखी बगळ्याच्या गावात दूध व पाणी मिसळलेले सरसकट प्याले जाते किंवा आंधळ्याला दिवस व रात्र यांतील भेद कळत नाही॥ ७१८॥ ज्या भ्रमराला फुलातील मध मिळतो तो लाकडे कोरण्याकरताही धावतो, असे असले, तरी ते भ्रमरपणाला अनुचित नाही॥ ७१९॥ त्याप्रमाणे धर्म व अधर्म यांच्या रूपांनी असणारी कार्ये व अकार्ये यांची निवड न करता जी बुद्धी सरसकट आचरण करीत जाते॥ ७२०॥ बाबा रे! मोत्यांच्या परीक्षेची दृष्टी नसता जर मोती घेतले तर ती एखादे वेळी चांगली मिळतील ही, परंतु चांगली न मिळणे हेच अगदी ठरल्यासारखे असायचे॥ ७२१॥ त्याप्रमाणे निषिद्ध कर्म अकस्मात् प्राप्त न झाले तरच घडावयाचे नाही. एऱ्हवी जी बुद्धी कार्याकार्याची एकत्र सरभेसळ करते॥ ७२२॥ योग्यायोग्यतेचा विचार न करता ज्याप्रमाणे सर्व गावाला आमंत्रण द्यावे त्याप्रमाणे चांगल्या वाईट कर्माविषयीं जिला निवड करता येत नाही ती राजस बुद्धी होय असे समज॥ ७२३॥

अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता । सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी॥ ३२॥

अर्थ—हे पार्था! अधर्मालाही धर्म समजणारी व सर्व अर्थाचा विपरीत अर्थ करणारी व तमोगुणाने आच्छादिलेली जी बुद्धी ती तामसी बुद्धी.॥ ३२॥

आणि राजा जिया वाटा जाये। ते चोरांसि आडव होये। कां राक्षसां दिवो पाहे। राति होऊनि॥ ७२४॥
नाना निधानचि निदैवा। होये कोळसयाचा उडवा। पैं असतें आपणपें जीवा। नाहीं जालें॥ ७२५॥
तैसें धर्मजात तितुकें। जिये बुद्धीसी पातकें। साच तें लटिकें। ऐसेंचि बुझे॥ ७२६॥

अर्थ—राजा ज्या मार्गाने जातो तो मार्ग चोरांना आडमार्ग होतो किंवा रात्र ही राक्षसांचा दिवस होऊन उजाडते॥ ७२४॥ किंवा भाग्यहीनाला ज्या द्रव्याचा ठेवा कोळशाचा ढीग होतो. म्हणून धन जवळ असूनही त्याला नाही सारखेच असते॥ ७२५॥ त्याप्रमाणे धर्म म्हणून जितके काही शास्त्रांनी सांगितले असेल तितके त्या पापरूप बुद्धीला पापरूपच वाटते. व खरे म्हणून जे असेल ते सर्व खोटे अशीच त्याची समजून असते॥ ७२६॥

ते आघवेचि अर्थ। करूनि घाली अनर्थ। गुण ते ते व्यवस्थित। दोषचि मानी॥ ७२७॥
किंबहुना श्रुतिजातें। अधिष्ठूनि केलें सरतें। तेतुलेंही उपरतें। जाणे जे बुद्धि॥ ७२८॥
ते कोणातेंही न पुसतां। तामसी जाणावी पांडुसुता। रात्री काय धर्मार्था। साच करावी॥ ७२९॥
एवं बुद्धीचे भेद। तिन्ही तुज विशद। सांगितले स्वबोध-। कुमुदचंद्रा॥ ७३०॥

आतां ययाची बुद्धिवृत्ती। निष्टंकिला कर्मजातीं। खांद मांडिजे धृती। त्रिविधा जया॥ ७३१॥
तिये धृतीचेही विभाग। तिन्ही यथालिंग। सांगिजती चांग। अवधान देईं॥ ७३२॥

अर्थ—शास्त्रांनी सांगितलेला खरा अर्थ टाकून देऊन जी त्याच्या उलट अर्थ करते व ज्यांना गुण म्हणून सांगितले असेल त्याला दोषच समजते॥ ७२७॥ फार काय सांगावे! यच्चयावत् श्रुतींनी जे जे म्हणून योग्य ठरविले आहे त्या सर्वांना जी बुद्धी अयोग्य समजते॥ ७२८॥ अशी बुद्धी, अर्जुना! कोणालाही न विचारता नि:शंकपणे तामसी समजावी. ही रात्रीसारखी अंधकारमय असलेली बुद्धी धर्मकार्याला काय उपयोगाची?॥ ७२९॥ अशा रीतीने आत्म-बोधरूपी कमलाला विकास करणाऱ्या चंद्ररूपी अर्जुना! बुद्धीचे तिन्ही भेद तुला स्पष्ट करून सांगितले॥ ७३०॥ आता त्याच बुद्धिवृत्तीने कर्मामध्ये प्रवृत्त झाले असता ज्या धैर्याने ती केली जातात त्याचेही तीन प्रकार आहेत॥ ७३१॥ त्या धैर्याचे तीन भाग त्यांच्या लक्षणांसह मी सांगणार आहे. चांगले लक्ष देऊन ऐक॥ ७३२॥

धृत्या यया धारयते मन:प्राणेन्द्रियक्रिया:। योगेनाव्यभिचारिण्या धृति: सा पार्थ सात्त्विकी॥ ३३॥

अर्थ—अर्जुना! ज्या एकनिष्ठ धैर्याने मन, प्राण, इंद्रिये यांच्या क्रिया, योगामुळे, शास्त्रप्रवृत्तिपासून रोखून विरुद्ध धारण केल्या जातात ते सात्विक धैर्य होय॥ ३३॥

तरी उदेलिया दिनकरु। चोरीसि थोके अंधारु। कां राजाज्ञा अव्यवहारु। कुंठवी जेवीं॥ ७३३॥
नाना पवनाचा साटु। वाजीनलिया नीटु। आंगेंसीं बोभाटु। सांडिती मेघ॥ ७३४॥
कां अगस्तीचेनि दर्शनें। सिंधु घेऊनी ठाती मौनें। चंद्रोदयीं कमळवनें। मिठी देती॥ ७३५॥
हें असो पावो उचलिला। मदमुख न ठेविती खालां। गर्जोनि पुढां जाला। सिंहु जरी॥ ७३६॥
तैसा जो धीरु। उठलिया अंतरु। मनादिकें व्यापारु। सांडिती उभीं॥ ७३७॥

अर्थ—सूर्य उगवला असता चोरी बरोबर अंधकारही थांबतो. किंवा राजाच्या हुकुमाने निंद्य व्यवहार थांबतात॥ ७३३॥ वारा सपाट्याने वाहू लागला म्हणजे मेघ आपल्या गडगडाटासह नाहीसे होतात॥ ७३४॥ किंवा अगस्ती दृष्टीस पडताच समुद्र मौन धारण करतो किंवा चंद्राचा उदय होताच सूर्यविकासिनी वने कोमेजून जातात॥ ७३५॥ हे असो. गर्जना करीत सिंह जरी पुढे आला तरी मदोन्मत्त हत्ती उचललेला पाय खाली ठेवीत नाही॥ ७३६॥ त्याप्रमाणे अंत:करणात धैर्य उठले तर मन, प्राण, इंद्रिये यांचे व्यापार जागच्या जागीच बंद पडतात॥ ७३७॥

इद्रियांविषयांचिया गांठी। अपैसया सुटती किरीटी। मना मायेच्या पोटीं। रिगती दाहीं॥ ७३८॥
अधोर्ध्व गुढें काढी। प्राण नवांची पेंडी। बांधोनि घाली उडी। मध्यमेमाजीं॥ ७३९॥
संकल्पविकल्पांचें लुगडें। सांडूनि मन उघडें। बुद्धिही मागिलेकडे। उगीचि बैसे॥ ७४०॥

अर्थ—अर्जुना! इंद्रियें व विषय यांची गांठ आपोआप तुटते. दहाही इंद्रिये मनरूपी आईच्या पोटात शिरतात (इंद्रिये अंतर्मुख होतात असा भाव)॥ ७३८॥ प्राणायाम साधून, खालचा अपानमार्ग व वरचा उर्ध्व मार्ग बंद करून देहाची नवही छिद्रांची गाठोडी बांधून प्राण हा सुषुम्ना नाडीत शिरतो॥ ७३९॥ संकल्प व विकल्प यांची वस्त्रे टाकून देऊन मन उघडे पडते व बुद्धी मागच्या बाजूला गुपचूप बसते॥ ७४०॥

ऐसी धैर्यराजें जेणें। मन प्राण करणें। स्वचेष्टांची संभाषणें। सांडविजती॥ ७४१॥
मग आघवींचि सडीं। ध्यानाच्या आंतुल्या मढीं। कोंडिजती निरवडी। योगाचिये॥ ७४२॥
परी परमात्मया चक्रवर्ती। उगाणिती जंव हातीं। तंव लांच न घेतां धृती। धरिजती जिया॥ ७४३॥
ते गा धृती येथें। सात्त्विक हें निरुतें। आईक अर्जुनातें। श्रीकांत म्हणे॥ ७४४॥

अर्थ—जो धैर्यरूपी राजा याप्रमाणे मनाला, प्राणाला व इंद्रियांना आपआपल्या व्यापारांची बोलणी टाकावयास लावतो॥ ७४१॥ मग ती एकटी मनादी सारी इंद्रिये योगाच्या कौशल्याने ध्यानरूपी आंतील कोठडीत, जे धैर्य, कोंडून ठेवते॥ ७४२॥ परंतु सार्वभौम राजा जो परमात्मा त्याच्या ताब्यात ह्या इंद्रियादिकांना देईपर्यंत कोणतीही लाच न घेता

जे धैर्य त्यांना धरून ठेवते. ॥ ७४३ ॥ अर्जुना! ते धैर्य सात्विक होय, असे समज. असे लक्ष्मीपति श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले ॥ ७४४ ॥

यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन । प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥ ३४ ॥

अर्थ—हे अर्जुना! ज्या धैर्यामुळे धर्म, काम, अर्थ हे तीनच पुरुषार्थ साधले जातात व त्याच्या आचरणसमयी फलांची इच्छा केली जाते. ते राजस धैर्य होय ॥ ३४ ॥

आणि होऊनियां शरीरी। स्वर्गसंसाराच्या दोहीं घरीं। नांदे जो पोटभरी। त्रिवर्गोपायें ॥ ७४५ ॥
तो मनोरथांच्या सागरीं। धर्मार्थकामांच्या तारुवावरी। जेणें धैर्यबळें करी। क्रियावाणिज्य ॥ ७४६ ॥
जें कर्म भांडवला सूये। तयाची चौगुणी येती पाहे। येवढें सायास साहे। जया धृती ॥ ७४७ ॥
ते गा धृती राजस। पार्था येथ परियेस। आतां आइक तामस। तिसरी जे कां ॥ ७४८ ॥

अर्थ—आणि जो देह धारण करून धर्म, अर्थ व काम तीन पुरुषार्थांच्या उपायांनी परलोकी स्वर्गरूपी व इहलोकी संसाररूपी या दोन्ही घरात अत्यंत आनंदाने राहतो ॥ ७४५ ॥ मनोरथरूपी समुद्रामध्ये धर्म, अर्थ व काम यांच्या गलबतावर बसून तो क्रियारूपी व्यापार ज्या धैर्याच्या बळावर करतो ॥ ७४६ ॥ त्या व्यापारात जे कर्मरूपी भांडवल घालतो त्याची चौपट प्राप्ती होईल एवढे धोरण बांधून ज्या धैर्याने तो कष्ट सहन करतो ॥ ७४७ ॥ हे पार्था! ऐक त्या धृतीला (धैर्याला) राजस धृति म्हणतात. आता तिसरी जी तामस धृती ती ऐक. ॥ ७४८ ॥

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च । न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ॥ ३५ ॥

अर्थ—अर्जुना! जिच्यामुळे दुष्टबुद्धीचा मनुष्य झोप, भीती, दुःख, खेद व मद ही सोडत नाही तिला तामस धृती (धैर्य) असे म्हणतात ॥ ३५ ॥

तरी सर्वाधमें गुणें। जयाचें कां रूपा येणें। कोळसा काळेपणें। घडला जैसा ॥ ७४९ ॥
अहो प्राकृत आणि हीनु। तयाही कीं गुणत्वाचा मानु। परी न म्हणिजे पुण्यजनु। राक्षसु काई ॥ ७५० ॥
पैं ग्रहांमाजीं इंगुळु। तयातें म्हणिजे मंगळु। तैसा तमीं धसाळु। गुणशब्दु हा ॥ ७५१ ॥
जे सर्वदोषांचा वसौटा। तमचि कामऊनि सुभटा। उभारिला आंगवठा। जया नराचा ॥ ७५२ ॥

अर्थ—काळे कुट्टपणाने जसा कोळसा घडलेला असतो त्याप्रमाणे सर्व अधमगुणांनी ज्याचे स्वरूप बनलेले आहे ॥ ७४९ ॥ अहो जो तमोगुण निकृष्ट व हीन आहे त्यालाही गुणत्वाचा मान कसा? राक्षस हे दुष्ट व पापी असूनही त्यांना 'पुण्यजन' असे म्हणत नाहीत काय? ॥ ७५० ॥ सर्व ग्रहांमध्ये धगधगित विस्तवाप्रमाणे ताप देणारा असा जो ग्रह त्याला मंगळ (कल्याणकारक) म्हणतात, त्याप्रमाणे तमाला 'गुण' शब्द अविचाराने लावण्यात येतो ॥ ७५१ ॥ हे उत्तम योद्धया अर्जुना! सर्व दोषांचे वसतिस्थान असलेल्या तमोगुणाला राबवूनच ज्यापुरुषाचा पिंड बनलेला आहे ॥ ७५२ ॥

तो आळसु सुनि असे कांखे। म्हणौनि निद्रे कहीं न मुके। पापें पोषितां दुःखें। न सांडिजे जेवीं ॥ ७५३ ॥
आणि देहधनाचिया आवडी। सदा भय तयातें न सांडी। विसंबूं न सके धोंडीं। काठिण्य जैसें ॥ ७५४ ॥
आणि पदार्थजातीं स्नेहो। बांधे म्हणोनि तो शोकें ठावो। केला न शके पाप जावों। कृतघ्नौनि जैसें ॥ ७५५ ॥
आणि असंतोष जीवेंसीं। धरूनि ठेला अहर्निशीं। म्हणौनि मैत्री तेणेंसीं। विषादें केली ॥ ७५६ ॥
लसणातें न सांडी गंधी। कां अपथ्यशीळातें व्याधी। तैसी केली मरणावधी। विषादें तया ॥ ७५७ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे पापांना पोसिले असता दुःख कधीच नाहीसे होत नाही, त्याप्रमाणे आळसाला तो काखेत बाळगून असल्यामुळे झोप त्याला (तमोगुणी पुरुषाला) कधीच सोडत नाही ॥ ७५३ ॥ कणखरपणा ज्याप्रमाणे दगडाला सोडीत नाही, त्यप्रमाणे त्याला धनाच्या व शरीराच्या आवडीमुळे भय सदा सर्वकाळ सोडीत नाही ॥ ७५४ ॥ आणि पाप जाण्याकरिता कृतघ्न माणसाने कितीही खटपट केली तरी ते जसे जात नाही त्याप्रमाणे पदार्थ मात्राच्या ठिकाणी तो आसक्तीने जखडलेला असल्याकारणाने तो दुःखाचे निवासस्थान बनतो ॥ ७५५ ॥ आणि तो रात्रंदिवस

असंतोषाला आपल्या अंत:करणात धरून ठेवीत असल्यामुळे खेदाने त्याच्याशी मैत्री केलेली असते॥ ७५६॥ लसणाला ज्याप्रमाणे दुर्गंध सोडीत नाही किंवा अपथ्य करणाऱ्याला रोग सोडत नाही त्याप्रमाणे विषाद (खेद) मरणाच्या क्षणापर्यंत त्याला सोडीत नाही. ॥ ७५७॥

आणि वयसा वित्तकामु। ययांचा वाढवी संभ्रमु। म्हणौनि मदें आश्रमु। तोचि केला॥ ७५८॥

अर्थ—आणि तारुण्य, द्रव्य व विषयेच्छा यांचे तो (तामसी पुरुष) महत्त्व वाढवितो म्हणून मद देखील त्यालाच आश्रय स्थान करतो॥ ७५८॥

आगीतें न सांडी तापु। सळातें जातीचा सापु। कां जगाचा वैरी वासिपु। अखंडु जैसा॥ ७५९॥
नातरी शरीरातें काळु। न विसंबे कवणे वेळु। तैसा आथी अढळु। तामसीं मदु॥ ७६०॥

अर्थ—ज्याप्रमाणे अग्निला उष्णता सोडत नाही किंवा जातिवंत सर्प जसा वैर सोडत नाही, भीती जशी नेहमी जगाची शत्रू आहे॥ ७५९॥ किंवा काळ जसा शरीराला केव्हाही सोडत नाही त्या प्रमाणे मद (माजोरीपणा) तामस पुरुषामध्ये नित्य राहतो॥ ७६०॥

एवं पांचही हे निद्रादिक। तामसाच्या ठायीं दोख। जिया धृती देख। धरिलें आहाती॥ ७६१॥
तिये गा धृती नांवें। तामसी येथ हें जाणावें। म्हणितलें तेणें देवें। जगाचेनि॥ ७६२॥

अर्थ—अशा रीतीने निद्रादिक पांचही दोष ज्या धृतीने (धैर्याने) धरून ठेवले जातात॥ ७६१॥ अर्जुना! त्या धैर्याला तामसी धृती हे नाव आहे, असे समज, असे जगाच्या ईश्वराने (श्रीकृष्णाने) म्हटले॥ ७६२॥

एवं त्रिविध जे बुद्धि। कीजे कर्मनिश्चयो आधि। तो धृती या सिद्धि। नेइजो येथ॥ ७६३॥
सूर्यें मार्ग गोचरु होये। आणि तो चालती कीर पाये। परी चालणें तें आहे। धैर्यें जेवीं॥ ७६४॥
तैसी बुद्धि कर्मातें दावी। तें करणसामग्री निफजवी। परी निफजावया होआवी। धीरता जे॥ ७६५॥
ते हे गा तुजप्रति। सांगितली त्रिविध धृति। यया कर्मत्रया निष्पत्ति। जालिया मग॥ ७६६॥

अर्थ—याप्रमाणे तीन प्रकारच्या बुद्धीने जो प्रथम कर्माचा निश्चय केला जातो तो (पुढे) या जगात (तीन प्रकारच्या) धैर्याने सिद्धीस नेला जातो॥ ७६३॥ सूर्याच्या योगाने मार्ग दिसतो अणि पायाने तो मार्ग चालला जातो. पण चालणें हे जसे धैर्याच्या योगाने होते॥ ७६४॥ त्याप्रमाणे बुद्धी कर्म दाखविते इंद्रिय ही साधने ते कर्म करतात. परंतु ते कर्म करण्याला ज्या धैर्याची आवश्यकता असते॥ ७६५॥ त्या धैर्याचे हे तीन प्रकार तुला सांगितले. असे हे तीन प्रकारचे कर्म निष्पन्न झाले म्हणजे मग॥ ७६६॥

येथ फळ जें एक निफजे। सुख जयातें म्हणिजे। तेंही त्रिविध जाणिजे। कर्मवशें॥ ७६७॥

अर्थ—या तीन प्रकारच्या कर्मापासून जे एक फळ उत्पन्न होते, ज्याला सुख असे म्हणतात. तेही सुख कर्माच्या स्वाधीन असल्यामुळे तीन प्रकारचे असते. हे लक्षांत घे॥ ७६७॥

तरी फळरूप तें सुख। त्रिगुणीं भेदलें देख। विवंचूं आतां चोख। चोखीं बोलीं॥ ७६८॥
परी चोखी ते कैसी सांगें। पैं घेवों जातां बोलबगें। कानींचियेही लागे। हातींचा मळ॥ ७६९॥
म्हणौनि जयाचेनि अव्हेरें। अवधानही होय बाहिरें। तेणें आइक हो आंतरें। जिवाचेनि जीवें॥ ७७०॥
ऐसें म्हणौनि देवो। त्रिविधा सुखाचा प्रस्तावो। मांडला तो निर्वाहो। निरूपित असे॥ ७७१॥

अर्थ—तर ते फळाच्यारूपाने प्राप्त होणारे सुखही तीन गुणांनी तीन प्रकारचे झालेले असते, हे लक्षात घे. त्याचे आता चांगल्या शब्दात स्पष्ट विवेचन करू॥ ७६८॥ परंतु शब्दाचा चांगलेपणा तरी कसा वर्णन करावा! शब्दांच्या मार्गाने ग्रहण कर म्हणावे तर श्रवणेंद्रियाच्या माध्यमाचे दोष (मर्यादा) त्याला लागतात॥ ७६९॥ म्हणून ज्यांना (शब्दांना) झिटकारिले असता बाह्य अवधान देखील नष्ट होते त्याचे केवळ अंत:करणाच्या उत्कट आदराने श्रवण कर॥ ७७०॥ असे म्हणून देवाने तीन प्रकारच्या सुखाचे निरूपण करण्यास प्रारंभ केला तो प्रकार आता सांगतो॥ ७७१॥

सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ। अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति॥ ३६॥

अर्थ—ज्या सुखाच्या ठिकाणी अभ्यासाने जीव रममाण होतो व ज्यायोगाने दुःखाचा खात्रीने नाश होतो ते तीन प्रकारचे सुख, हे भरतश्रेष्ठा अर्जुना! माझ्यापासून ऐक॥ ३६॥

म्हणे सुखत्रयसंज्ञा। सांगों म्हणौनि प्रतिज्ञा। बोलिलों तें प्राज्ञा। ऐक आतां॥ ७७२॥
तरी सुख तें गा किरीटी। दाविजेल तुज दिठी। जें आत्मयाचिये भेटी। जीवासि होय॥ ७७३॥
परी मात्रेचेनि मापें। दिव्यौषध जैसें घेपे। कां कथिलाचें कीजे रूपें। रसभावनीं॥ ७७४॥
नाना लवणाचें जळु। होआवया दोनि चार वेळु। देऊनि सांडिजती ढाळु। तोयाचे जेवीं॥ ७७५॥
तेवीं जालेनि सुखलेशें। जीव भाविलिया अभ्यासें। जीवपणाचें नासे। दुःख जेथें॥ ७७६॥

अर्थ—हे सुज्ञा अर्जुना! तीन प्रकरच्या सुखाची लक्षणे सांगीन म्हणून मी जे तुला वचन दिले होते ती आता ऐक.॥ ७७२॥ अर्जुना! जीवाला आत्मज्ञान झाले असता जो आनन्द होतो तो तुझ्या दृष्टीला दाखवून देतो॥ ७७३॥ ज्याप्रमाणे उत्कृष्ट औषध मात्रेच्या प्रमाणात घ्यावे किंवा रसाच्या भावना देऊन कथिलाची चांदी करावी॥ ७७४॥ किंवा मिठाच्या ख़ड्याचे पाणी करावयाचे असल्यास ज्याप्रमाणे त्यावर दोन चार वेळ पाणी टाकावे॥ ७७५॥ त्याप्रमाणे मिळालेल्या आनंदाचा अभ्यास जीवाला झाला असता जीवपणाचे म्हणून जे दुःख आहे ते जेथे नाश पावते॥ ७७६॥

गूढार्थदीपिका—जीवपणाचे नासे। दुःख जेथे॥

अविद्या निःशेष नाहीशी होऊन पूर्ण ब्रह्मरूपता आंगी बाणेपर्यंत गुणातीत अवस्था प्राप्त होऊ शकत नाही. अर्थातच ब्रह्मरूपता बाणून गुणातीत जोपर्यंत होता येत नाही तोपर्यंत प्राप्त होणाऱ्या सुखाचेही सत्त्व, रज व तम या गुणांमुळे साहजिकच तीन भेद होतात. या ओव्यांतून माउली सांगत आहे.

'मी ब्रह्मस्वरूप आहे' अशा तऱ्हेचे आत्मज्ञान झाल्यानंतर जीव व शिव यांचे ऐक्य झाले असता जीवाच्या ठिकाणची मर्यादित्वाची जाणीव नाहीशी होते. या मर्यादित्वाच्या जाणीवेमुळेच शिवापासून तो आपल्याला अलग समजत होता. व या नामरूपांच्या भेदामुळेच शिवाच्या स्वरूपधर्माहून (सच्चिदानंद धर्माहून) अत्यंत विपरीत अशा (असत्, जड, दुखरूप) या अनेक वस्तूची कल्पना तो करीत होता. हा भेदच त्याच्या दुःखाला कारण झाला होता, पण आत्मज्ञानाने आता जीव व शिव यांचे ऐक्यरूप ज्ञान त्याला झाल्यामुळे त्याची भेदाची चुकीची किंवा अज्ञानाची कल्पना नाहिशी होते व यथार्थज्ञानाने आपल्याला तो व्यापक समजू लागतो. ह्या व्यापकत्वाच्या जाणीवेच्या सुखामुळे भेदाने झालेला जीवपणा व त्यामुळे होणारे दुःख हे दोन्हीही नाहीसे होतात.

मिठाचे पाणी करण्याकरिता मिठावर दोन चारदा जसे पाणी शिपडावे लागते, त्याप्रमाणे भेदरूपी जीवत्वाची जाणीव नाहीशी करण्याकरिता "मी ब्रह्म आहे" ही जाणीव बाळगावी लागते. व ती कायम ठेवण्याकरिता सारखा अभ्यास करावा लागतो.

'मी ब्रह्मस्वरूप आहे' या ऐक्याच्या ज्ञानाचा, ज्ञात्याला येणारा अनुभव किंवा प्रत्यय व्यतिरेक ज्ञानाने येणारा आहे. हे व्यक्तिरेक ज्ञान मोक्ष्याचा दुःखनिवृत्तिरूप पहिल्या अंगाची प्राप्ती करून देते. हा दुःखनिवृत्तिरूप आनंद किंवा सुख सत्वगुणात्मक आहे व म्हणूनच याला सात्विक सुख किंवा सात्विक आनंद म्हणतात. पण मोक्षाचे दुसरे व प्रमुख अंग परमानंदरूपता हे आहे. हे अंग अर्थातच कोणतीही जाणीव-यथार्थज्ञानाची असली तरी-कायम असताना प्राप्त होत नाही. अहंब्रह्मास्मिरूप व्यतिरेकज्ञान यथार्थज्ञान असले तरी ते सापेक्षज्ञान आहे. व ज्ञान हे जाणीवरूप असल्यामुळे तेही वृत्तिरूप आहे, हे वृत्तिरूप ज्ञान नाहीसे झाल्याशिवाय परमानंदता बाणू शकत नाही. वेदान्तात म्हणूनच या ज्ञानाला 'लेशाविद्या' असे म्हणतात. ही ऐक्याची जाणीव नाहीशी करणे म्हणजेच ब्रह्मानंदता बाणणे होय, असे आचार्य "अहं भावोदयाभावः बोधस्य परमावधि" या पंक्तीत सांगतात. गुणातीत, त्रिपुटीरहित, निर्वृत्तिक व रसरूप म्हणून जिचे वर्णन करण्यात येते ती स्थिती लेशाविद्या नाहीशी झाल्यावरच प्राप्त होते. अर्थातच

ही स्थिति जाणीवप्रधान ज्ञानवृत्तीने प्राप्त होणे शक्य नाही. तर ही जाणीव नि:शेष विसरायला लावणाऱ्या सगुण भगवंताच्या ठिकाणी केलेल्या परमप्रीतीने प्राप्त होते. ही गुणातीत अवस्था असल्यामुळे ह्या सुखाचे किंवा आनंदाचे वर्णन शब्दांच्या पलीकडचे आहे. तिचे स्वरूप 'मूकास्वादनवत्' आहे.

तें येथ आत्मसुख। जालें असे त्रिगुणात्मक। तेंही सांगों एकैक। रूप आतां॥ ७७७॥

अर्थ—या जगात ते आत्मसुखही तीन प्रकारचे झाले आहे. त्याचेही एक एक स्वरूप आता सांगू॥ ७७७॥

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्। तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम्॥ ३७॥

अर्थ—जे आरंभी विषासारखे कडू पण परिणामी अमृतासारखे (गोड) आणि आत्मविषयक बुद्धीपासून उत्पन्न झालेले असते, ते सात्त्विक सुख होय॥ ३७॥

आतां चंदनाचें बुड। सर्पीं जैसें दुवाड। कां निधानाचें तोंड। विवसिया जेवीं॥ ७७८॥
अगा स्वर्गींचें गोमटें। आडव यागसंकटें। कां बाळपण दासटें। त्रासकाळें॥ ७७९॥
हें असो दीपाचिये सिद्धी। अवघड धूम आधीं। नातरी तो औषधीं। जिभेचा ठावो॥ ७८०॥
तयापरी पांडवा। जया सुखाचा रिगावा। विषम तेथ मेळावा। यमदमांचा॥ ७८१॥
देत सर्वस्नेहा मिठी। आंगीं ऐसें वैराग्य उठी। स्वर्गसंसारा कांटी। काढितची॥ ७८२॥
विवेकश्रवणें खरपुसें। जेथ व्रताचरणें कर्कशें। करितां जाती भोकसे। बुद्ध्यादिकांचे॥ ७८३॥
सुषुम्नेचेनि तोंडें। गिळिजे प्राणापानाचे लोंढे। बोहणियेसीचि येवढें। भारी जेथ॥ ७८४॥

अर्थ—चंदनाच्या झाडाचा बुंधा सर्पामुळे जसा बिकट किंवा ठेव्याचे तोंड भूत पिशाच्चामुळे जसे अप्राप्त असते॥ ७७८॥ अरे अर्जुना! स्वर्गीचे सुख चांगले, पण यज्ञयागादिकांच्या अडथळ्यामुळे ते जसे त्रासदायक किंवा बाळपण बोलता येत नाही चालता येत नाही, कांही समजत नाही इत्यादि त्रासामुळे पीडादायक असते॥ ७७९॥ हे असो. दिवा लावण्याकरिता ज्याप्रमाणे धुव्याचा त्रास आधी सहन करावा लागतो किंवा औषधी सेवन जिभेला त्रासदायक असते॥ ७८०॥ त्याप्रमाणे, अर्जुना! ज्यांना या (सात्त्विक) सुखात प्रवेश करावयाचा असेल त्यांना प्रथम यमदमादि साधन संपत्ती प्राप्त करण्याचे संकट सोसावे लागते॥ ७८१॥ (तसेच) यच्चयावत् वैषयिक वस्तू विषयींचे प्रेम पूर्णपणे नाहीसे करीत अंगात असे वैराग्य उत्पन्न होते की स्वर्ग व संसार या दोहों विषयीचे आसक्तीचे कुंपण ते (वैराग्य) उपटून टाकते॥ ७८२॥ ज्या ठिकाणी खरखरीत अशा नित्यानित्य विवेकाचे श्रवण करावे लागते व कठोर व्रतांचे आचरण घडावे लागते. अशा आचरणानी बुद्ध्यादिकांच्या चिरफाळ्या होतात॥ ७८३॥ सुषुम्नेच्या तोंडाने प्राण व अपान वायूंचे लोंढे गिळावे लागतात. सुरुवातीलाच जेथे ह्या सर्व अडचणी सहन कराव्या लागतात॥ ७८४॥

जें सारसांही विघडतां। होय वोहाहूनि वत्स काढितां। नव्हे भणंग दवडितां। भाणयावरुनी॥ ७८५॥
पैं मायेपुढौनि बाळक। काळें नेता एकुलतें एक। होय का उदक। तुटता मीना॥ ७८६॥
तैसें विषयांचें घर। इंद्रियां सांडितां थोर। युगांत होय तें वीर। विराग साहाती॥ ७८७॥

अर्थ—चक्रवाक जोडप्याचा एकमेकापासून वियोग झाला असता किंवा गाईचे वासरू तिच्या कासेखालून ओढले असता किंवा भिकाऱ्याला भरल्या ताटावरून हाकलून दिले असता॥ ७८५॥ किंवा आईचे एकुलते एक मूल काळाने हिराबून नेले असता किंवा माशाला पाण्यातून बाहेर काढले असता जसे (अत्यंत दु:ख) होते॥ ७८६॥ अर्जुना, त्याचप्रमाणे इंद्रियांना विषयांचे घर सोडतांना महाप्रलयाचे दु:ख होते. परंतु ते वीर पुरुष (हे) विषयवैराग्य सहन करतात॥ ७८७॥

ऐसा जया सुखाचा आरंभु। दावी काठिण्याचा क्षोभु। मग क्षीराब्धीं लाभु। अमृताचा जैसा॥ ७८८॥

अर्थ—ज्या सुखाचा आरंभ अशा महान् संकटांचा अनुभव देतो परंतु मग ज्या प्रमाणे क्षीराब्धीचे मंथन केल्यावर अमृताचा लाभ (देवादिकांना) झाला (त्याप्रमाणे शेवटी मोक्षामृताचा लाभ त्यांना होतो)॥ ७८८॥

पहिल्या वैराग्यगरळा। धैर्यशंभू वोडवी गळा। तरी ज्ञानामृतें सोहळा। पाहे जेथें॥ ७८९ ॥

अर्थ—पहिल्याने वैराग्यरूपी गरळ (ज्यांत निघेल ते) प्राशन करण्याकरता सात्त्विक धैर्यरूपी शंकर जेव्हा आ करील, तेव्हाच ज्ञानरूप अमृताचा सोहळा भोगायला मिळतो॥ ७८९ ॥

पैं कवलिताही कोपे ऐसें। द्राक्षांचें हिरवेपण असे। तें परिपाकीं कां जैसें। माधुर्य आते॥ ७९० ॥
तें वैराग्यादिक तैसें। पिकलिया आत्मप्रकाशें। मग वैराग्येंसींही नाशे। अविद्याजात॥ ७९१ ॥

अर्थ—हिरवी द्राक्षे इतकी आंबट असतात की तोंडांत टाकल्या बरोबर जिभेला त्याच्या आंबटपणाने मनाचा क्षोभ होतो पण तीच पिकली म्हणजे तेंच हिरवेपण (आबंटपण) सुरस गोडपणात परिणत होते॥ ७९० ॥ त्याचप्रमाणे आत्मज्ञानाने वैराग्यादिक परिपक्व (पूर्णतेला आले) झाले म्हणजे वैराग्यासह सर्व अज्ञानाचा पसारा नाहीसा होतो॥ ७९१ ॥

तेव्हां सागरीं गंगा जैसी। आत्मी मीनल्या बुद्धि तैसी। अद्वयानंदाची आपैसी। खाणी उघडे॥ ७९२ ॥

अर्थ—त्यावेळी समुद्राला जशी गंगा मिळते, त्याप्रमाणे आत्मस्वरूपाशी बुद्धीचे ऐक्य झाले म्हणजे अद्वैतानंदाची खाण आपोआपच उघडते॥ ७९२ ॥

ऐसें स्वानुभवविश्रामें। वैराग्यमूळ जें परिणमे। तें सात्त्विक येणें नामें। बोलिजे सुख॥ ७९३ ॥

अर्थ—वैराग्य ज्याचे मूळ आहे असे जे सुख याप्रमाणे आपल्या अद्वैतानंदाच्या अनुभवाने विश्रांतिरूपाने परिणाम पावते त्याला सात्विक सुख असे म्हणतात॥ ७९३ ॥

विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् । परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम्॥ ३८ ॥

अर्थ—जे सुख विषय आणि इंद्रिये यांच्या संयोगाने आरंभी अमृतासारखे (गोड) आणि परिणामी विषा सारखे (कडू) असते तें राजस सुख होय. ॥ ३८ ॥

आणि विषयेंद्रियां। मेळु होतां धनंजया। जें सुख जाय थडिया। सांडूनि दोन्ही॥ ७९४॥

अर्थ—हे धनंजया! विषयांचा आणि इंद्रियांचा संगम झाला म्हणजे दोन्ही थडी भरून जो सुखाचा पूर येतो॥ ७९४॥

अधिकारिया रिगतां गांवो। होय जैसा उत्साहो। कां रिणावरी विवाहो। विस्तारिला॥ ७९५ ॥
नाना रोगिया जिभेपासीं। केळें गोड साखरेसीं। कां बचनागाची जैसी। मधुरता पहिली॥ ७९६ ॥
पहिलें संवचोराचें मैत्र। हाटभेटीचें कलत्र। कां लाघवियाचे विचित्र। विनोद ते॥ ७९७॥
तैसें विषयेंद्रियदोखीं। जें सुख जिवातें पोखी। मग उपडिला खडकीं। हंस जैसा॥ ७९८॥
तैसी जोडी आघवी आटे। जीविताचा ठाय फिटे। सुकृताचियाही सुटे। धनाची गांठी॥ ७९९॥
आणिक भोगिलें जें कांहीं। तें स्वप्न तैसें होय नाहीं। मग हानिच्याचि घाई। लोळावें उरे॥ ८००॥

अर्थ—अधिकारी गावात आला म्हणजे (लोकांना) जसा उत्साह येतो, किंवा कर्ज काढून लग्न समारंभ होतात॥ ७९५ ॥ किंवा रोग्याच्या जिभेला साखरे प्रमाणे केळें गोड लागतात किंवा बचनाग (विष) खाताना जसा पहिल्याने गोड लागतो॥ ७९६ ॥ आपल्या बरोबर येणाऱ्या (चोराची) जशी पहिलीच मैत्री, किंवा बाजारात भेटलेल्या वेश्येचे आरंभीचे जसे आचरण (सुखकर) किंवा बहुरुप्याचे विचित्र विनोद जसे (मोह उत्पन्न करणारे)॥ ७९७॥ हंस ज्याप्रमाणे खडकावर आपटून (पाण्यांतून प्रतिबिंबित चांदण्यांना भ्रमाने रत्ने समजून त्यावर झेप घेताना) मग मरतो त्याप्रमाणे विषय व इंद्रिये यांच्या संयोगरूप दोषामुळें जे सुख जीवाला मिळते;॥ ७९८ ॥ त्याप्रमाणे संपादिलेली सर्व कमाई संपते, जीविताचाही नाश होतो व पुण्यरूपी धनाचा साठाही रिकामा होतो॥ ७९९ ॥ मग पूर्वी जे जे काही भोगले असेल ते स्वप्नाप्रमाणे नाहीसे होते व सर्वस्व हानीच्या आघाताने (गडबडा) लोळत राहणे एवढेच काय ते उरते॥ ८०० ॥

ऐशा आपत्ती जें सुख। ऐहिकीं परिणमें देख। परत्रीं कीर विख। होऊनि परते॥ ८०१ ॥

अर्थ—जे इहलोकातील सुख अशा प्रकारे आपत्तीच्या रूपात परिणाम पावते पहा व परलोकात तर खरोखर ते विष होऊनच उलटते॥ ८०१ ॥

जे इंद्रियजाता ळ्ळा। दिधलिया धर्माचा मळा। जाळूनि भोगिजे सोहळा। विषयांचा जेथ॥ ८०२॥

तेथ पातकें बांधिती थावो। तियें नरकीं देती ठावो। जेणें सुखें हा अपावो। परत्री ऐसा॥ ८०३॥

अर्थ—कारण सर्व इंद्रियांना विषयांचा लळा लावून व धर्माच्या शेताला जाळून जेथे विषयांचे सुख भोगले जाते॥ ८०२ ॥ त्याठिकाणी पातकांना थारा मिळून त्यांना बळ चढते व ती पातके विषयरूपसुख भोगणाऱ्याला नरकात जागा देतात. एवंच या (इहलोकीच्या) सुखाने परलोकी असा घात होतो॥ ८०३ ॥

पैं नामें विष मधुरें। परी मारूनि अंतीं खरें। तैसें आदि जें गोडिरें। अंतीं कडू॥ ८०४॥

अर्थ—विषाला मधुर हे नाव असले तरी ते जसे प्राणघात करून अखेर विष ठरते, जसे जे सुख (राजस) आरंभी गोड वाटते पण अंती (परिणामी) कडूच (दु:खदायक) ठरते॥ ८०४॥

पार्था तें सुख साचें। वळिलें आहे रजाचें। म्हणौनि न शिवें तयाचें। आंग कहीं॥ ८०५॥

अर्थ—अर्जुना, हे सुख केवळ रजोगुणाचेच बनलेले आहे म्हणून त्याला तूं कधीही स्पर्श देखील करूं नकोस॥ ८०५ ॥

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः। निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम्॥ ३९ ॥

अर्थ—जे आरंभी व उपभोगानंतर शेवटी चित्ताला मोह उत्पन्न करते आणि निद्रा, आळस व प्रमाद यापासून जे उत्पन्न होते ते तामस सुख होय॥ ३९ ॥

आणि अपेयाचेनि पानें। अखाद्याचेनि भोजनें। स्वैरस्त्रीसंनिधानें। होय जें सुख॥ ८०६॥

अर्थ—आणि अपेय पानाने (मदिरादि) अभक्ष्य भक्षणाने (मांसादी) **व स्वैरिणी** स्त्रीच्या समागमाने होणारे जे सुख॥ ८०६ ॥

कां पुढीलांचेनि मारें। नातरी परस्वापहारें। जें सुख अवतरे। भाटांच्या बोलीं॥ ८०७॥

अर्थ—किंवा दुसऱ्यांचा घात करून, किंवा परधनाचा अपहार करून किंवा तोंडपुजे लोकांनी केलेली स्तुती ऐकून जे सुख होते॥ ८०७॥

जें आलस्यावरी पोखिजे। निद्रेमाजीं जें देखिजे। जयाच्या आद्यंतीं भुलिजे। आपुली वाट॥ ८०८॥

अर्थ—जे सुख आळसाने पोसले जाते, जे झोपेत अनुभवाला येते व ज्या सुखाच्या आरंभी व शेवटी भ्रमामुळे आपली आत्मस्वरूपप्राप्तीची वाट विसरली जाते॥ ८०८ ॥

तें गा सुख पार्था। तामस जाण सर्वथा। हें बहु न सांगोचि जे कथा। असंभाव्य हे॥ ८०९॥

ऐसें कर्मभेदें मुदलें। फळसुखही त्रिधा जालें। तें हें यथागमें केलें। गोचर तुज॥ ८१०॥

अर्थ—अर्जुना, ते सुख सर्वस्वी तामस होय. त्याची कहाणी सांगणे संभवनीय नाही इतके ते निंद्य आहे; म्हणून तिचा विस्तार मी करीत नाही॥ ८०९ ॥ अशा रीतीने मूळचे एकाच प्रकारचे कर्मफळ म्हणजे सुख कर्माच्या भेदामुळे तीन प्रकारचे झाले. ते हे मी शास्त्रानुसार तुला फोड करून सांगितले॥ ८१० ॥

तें कर्ता कर्म कर्मफळ। ये त्रिपुटी येकी केवळ। वांचूनि कांहींचि नसे स्थूळ-। सूक्ष्मीं इये॥ ८११॥

आणि हे तंव त्रिपुटी। तिहीं गुणीं इहीं किरीटी। गुंफिली असे पटीं। तांतुवीं जैसी॥ ८१२॥

अर्थ—कर्ता, कर्म व फळ या एका त्रिपुटी वांचून या स्थूल व सूक्ष्म सृष्टींत दुसरे काहीच नाही॥ ८११॥ आणि हे अर्जुना, वस्त्र जसे तंतूनी तयार केलेले असते त्याप्रमाणे ही त्रिपुटी (कर्ता, कर्म व फळ) ह्या तीन गुणांनी (सत्व, रज व तम) भरलेली आहे॥ ८१२॥

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः। सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः॥ ४०॥

अर्थ—प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या या तीन गुणांपासून अलिप्त अशी स्थावर व जंगम वस्तु पृथ्वीवर, स्वर्गात व देवतादिकातही दिसणार नाही॥ ४० ॥

म्हणौनि प्रकृतीच्या आलोकीं। न बंधिजे इहीं सत्त्वादिकीं। तैसी स्वर्गी ना मृत्युलोकीं। आथी वस्तु॥ ८१३॥

अर्थ—म्हणून प्रकृतीच्या कक्षेत असूनही सत्वादी गुणांनी बांधली जाणार नाही अशी एकादी वस्तु मृत्युलोकांत किंवा स्वर्गात नाही. ॥ ८१३ ॥

कैंचा लोंवेवीण कांबळा। मातियेवीण मोदळा। कां जळेंवीण कल्लोळा। होणें आहे॥ ८१४॥

अर्थ—लोकरीशिवाय कांबळें, मातीवाचून ढेकूळ किंवा पाण्यावाचून लाटा उत्पन्न होतील काय?॥ ८१४॥

तैसें न होनि गुणाचें। सृष्टीच्या रचना रचे। ऐसें नाहींच गा साचें। प्राणिजात॥ ८१५॥

अर्थ—त्याप्रमाणे गुणांना घेतल्याशिवाय सृष्टीच्या रचनेत उत्पन्न होईल असा कोणताच प्राणिमात्र नाही॥ ८१५॥

यालागीं हें सकळ। तिहीं गुणांचेंचि केवळ। घडलें आहे निखिळ। ऐसें जाण॥ ८१६॥

अर्थ—या करता हे सर्व (जग) तीन गुणांचेच केवळ बनलेले आहे असे पक्के समज॥ ८१६॥

गुणीं देवां त्रयी लाविली। गुणीं लोकीं त्रिपुटी पाडिली। चतुर्वर्णा घातलीं। सिनानीं उळिगें॥ ८१७॥

अर्थ—गुणांमुळेच देवातही तीन भेद झालेत. गुणांनीच जगात कर्ता, कर्म व फळ असे तीन भेद केलेत. आणि चारी वर्णाना भिन्न भिन्न कर्मे लावून दिलीं॥ ८१७॥

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परन्तप। कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः॥ ४१॥

अर्थ—हे शत्रूंना ताप देणाऱ्या अर्जुना! ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांची कर्मे प्रकृतिजन्य गुणांनी निरनिराळी झाली आहेत॥ ४१॥

तेचि चारी वर्ण। पुससी जरी कोण कोण। तरी जयां मुख्य ब्राह्मण। धुरेचे कां॥ ८१८॥

अर्थ—ते चार वर्ण कोण कोणते असे जर विचारशील तर त्यामध्ये ब्राह्मण हे मुख्य अग्रणी आहेत॥ ८१८॥

येर क्षत्रिय वैश्य दोन्ही। तेही ब्राह्मणाच्याचि मानिजे मानीं। जे ते वैदिकविधानीं। योग्य म्हणौनि॥ ८१९॥

अर्थ—दुसरे क्षत्रिय आणि वैश्य या दोघांचा मानही ब्राह्मणा—सारखाच समजावा. कारण ते वेदोक्त कर्म करण्यास योग्य आहेत म्हणून॥ ८१९॥

चौथा शूद्र जो धनंजया। वेदीं लाग कीर नाहीं तया। तऱ्ही वृत्ति वर्णत्रया-। अधीन तयाची॥ ८२०॥

अर्थ—अर्जुना! चवथा जो शूद्र त्याचा मात्र वेदांशी कांही संबंध नाही. असे असले तरी. त्याच्या चरितार्थाचे साधन मात्र तीन वर्णाच्या अधीन आहे॥ ८२०॥

तिये वृत्तीचिया जवळिका। वर्णत्रया ब्राह्मणादिकां। अहो शूद्रही कीं देखा। चौथा जाला॥ ८२१॥

अर्थ—त्या वृत्तीच्या निकट संबंधामुळे ब्राह्मणादी तीन वर्णाबरोबर शूद्रही चौथा वर्ण होऊन बसला॥ ८२१॥

जैसा फुलाचेनि सांगातें। तांतु तुरंबिजे श्रीमंतें। तैसें द्विजसंगें शूद्रातें। स्वीकारी श्रुती॥ ८२२॥

अर्थ—ज्याप्रमाणे फुलांच्या बरोबर (मालेबरोबर) श्रीमंतांकडून ओवलेल्या दोऱ्याचाही सुवास घेण्यात येतो त्याप्रमाणे ब्राह्मणांच्या बरोबर शूद्राचाही श्रुतींनी (वेदाने) स्वीकार (चार वर्णात) केला॥ ८२२॥

ऐसेसी गा पार्था। हे चतुर्वर्णव्यवस्था। करूं आतां कर्मपथा। यांचिया रूप॥ ८२३॥

अर्थ—अर्जुना, अशी ही चार वर्णांची व्यवस्था आहे. आता या चारी वर्णांच्या कर्ममार्गाचे वर्णन करू॥ ८२३॥

जिहीं गुणीं ते वर्ण चारी। जन्ममृत्यूचिये कातरी। चुकोनियां ईश्वरीं। पैठे होती॥ ८२४॥

अर्थ—ज्या कर्ममार्गाने त्रिगुणांत पडलेले चारी वर्ण, जन्म व मृत्यु यांच्या कातरीतून सुटून ते ईश्वराच्या ठिकाणी पोहोचतात. ॥ ८२४॥

जियें आत्मप्रकृतीचे इहीं। गुणीं सत्त्वादिकीं तिहीं। कर्मैं चौघां चहूं ठांई। वांटिली वर्णा॥ ८२५॥

अर्थ—आत्म्याची त्रिगुणात्मक प्रकृती तिच्या सत्वादी तीन गुणांच्या चारही वर्णांना चार ठिकाणी जीं कर्मे वाटून दिलीत॥ ८२५॥

जैसें बापें जोडिलें लेंका। वांटिलें सूर्ये मार्ग पांथिकां। नाना व्यापार सेवकां। स्वामी जैसे॥ ८२६॥

अर्थ—ज्याप्रमाणे बापाने संपादन केलेली संपत्ती मुलांनां वाटून द्यावी, किंवा ज्याप्रमाणे वाटसरूना त्यांचे मार्ग सूर्य दाखवून देतो किंवा मालक आपल्या नोकरांना कामे वाटून देतो॥ ८२६ ॥

तैसी प्रकृतीच्या गुणीं। जया कर्माची वेल्हावणी। केली आहे वर्णीं। चहूं इहीं॥ ८२७॥

अर्थ—त्याप्रमाणे प्रकृतीच्या गुणांनी (सत्व, रज व तम) कर्माचा विस्तार करून त्यांची चार वर्णाचे ठिकाणी वाटणी केली॥ ८२७ ॥

तेथ सत्त्वें आपल्या आंगीं। समीननिमीन भागीं। दोघे केले नियोगी। ब्राह्मण क्षत्रिय॥ ८२८॥

अर्थ—त्या ठिकाणी सत्वगुणाने आपल्या आंगच्या सम व विषमभागाने ब्राह्मण व क्षत्रिय या दोघांना युक्त केले॥ ८२८ ॥

आणि रज परी सात्त्विक। तेथ ठेविले वैश्य लोक। रजचि तमभेसक। तेथ शूद्र ते गा॥ ८२९॥

अर्थ—आणि रज परंतु सात्विक (रज मिश्र सत्व) यांत वैश्य लोकांना ठेवले व रजच पण तममिश्रित तेथे शूद्राना ठेवले. ॥ ८२९ ॥

ऐसा येकाचि प्राणिवृंदा। भेदु चतुर्वर्णधा। गुणींचि प्रबुद्धा। केला जाण॥ ८३०॥

अर्थ—हे बुद्धिमंता अर्जुना, अशा प्रकारे एकाच प्राणिसमुदायाचा चार प्रकारचा भेद ह्या गुणांनीच केला आहे हे लक्षांत ठेव॥ ८३० ॥

मग आपलें ठेविलें जैसें। आइतेंचि दीपें दिसे। गुणभिन्न कर्म तैसें। शास्त्र दावी॥ ८३१॥

अर्थ—मग आपले ठेवलेले-दिव्याने जसे सहज दिसते त्याप्रमाणे गुणांच्यामुळे निरनिराळे झालेले कर्म शास्त्र दाखवून देते॥ ८३१ ॥

गूढार्थदीपिका—अज्ञान आहे तो पर्यन्त मनुष्य हा सत्व, रज व तम तीन गुणांनी बांधला गेलेला आहे. हे तीन गुण प्रकृतीचा स्वभाव असल्यामुळे ब्रह्मज्ञान होईपर्यन्त या तीनगुणांच्या प्रभावापासून मनुष्याची सुटका नाही. अर्थातच या तीन गुणांच्या कमी जास्त प्रमाणांतील मिश्रणाने ब्राह्मण क्षत्रियादी चार वर्णांची निर्मिती झाली. त्यामुळे प्रत्येकाचा स्वभाव किंवा प्रकृती या गुणांच्या मिश्रणानुसारच असते. व विचार आणि विकार यांचे प्राबल्यही त्या गुणांच्या प्रमाणातच माणसात राहते.

सत्वाचा गुण ज्ञान असल्याकारणाने अज्ञान निवृत्तीकरता या गुणाचा उत्कर्ष होणे आवश्यक आहे. जितक्या जितक्या प्रमाणांत माणसात हा गुण वाढत जाईल तितक्या तितक्या प्रमाणांत मोक्षाचा पल्ला तो गाठत जाईल. मनुष्याच्या स्वभावाची ही गुणानुसार झालेली घडण लक्षांत घेऊनच ब्राह्मण क्षत्रियादी चारी वर्णांना गुणानुसार निरनिराळी कर्मे शास्त्रांनी लावून दिलीत. उद्देश हा की ही कर्मे भगवदाज्ञा म्हणून त्यांनी आचरली असता अनायासेच त्यांचे अंत:करण शुद्ध म्हणजे सत्त्वप्रधान व्हावे व ज्ञानाच्या उदयाचा मार्ग निष्कंटक व्हावा. ह्यालाच अंत:करणाची शुद्धी म्हणतात व ती केवळ शास्त्रोक्त कर्मांच्या फलासक्तिरहित आचरणाने प्राप्त होते. शास्त्रोक्त कर्मांची विभागणी अशारीतीने या चार वर्णांच्या गुणांनुसार असल्यामुळे तीही स्वाभाविकच म्हणावी लागते. घरात अंधारात ठेवलेली एखादी वस्तु फक्त दाखवून देण्याचे कार्य दिवा ज्याप्रमाणे करतो त्याच प्रमाणे चार वर्णांच्या प्रकृतीनुसार अंत:करणशुद्धी द्वारा मोक्षाला उपयोगी पडणारी ही कर्मे फक्त दाखवून देण्याचे कार्य शास्त्रें करीत असतात.

तेंचि आतां कोण कोण। वर्णविहिताचें लक्षण। हें सांगों ऐक श्रवण-। सौभाग्यनिधी॥ ८३२॥

अर्थ—श्रवणरूपी सौभाग्याचा निधी असलेल्या अर्जुना, तुला आता निरनिराळ्या वर्णांची शास्त्रांनी विहित केलेली कर्मे कोणती ती सांगतो, ऐक॥ ८३२ ॥

शमो दमस्तप: शौचं क्षान्तिरार्जवमेव च । ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम्॥ ४२॥

अर्थ—चित्ताचे नियमन, बाह्येंद्रियांचे नियमन, कायिक, वाचिक व मानसिक तप, शुचिर्भूतपणा, क्षमा, सरळपणा, शास्त्रांचे ज्ञान, अनुभूति आणि श्रुतिस्मृति विषयीं श्रद्धा हे ब्राह्मणांचे स्वभावसिद्ध कर्म होय॥ ४२॥

तरी सर्वेंद्रियांचिया वृत्ती। घेऊनि आपल्या हाती। बुद्धि आत्मया मिळे कांतीं। प्रिया जैसी॥ ८३३॥

अर्थ—तर प्रिया ज्याप्रमाणे आपल्या पतीशी एकान्तात एकरूप होते त्याप्रमाणे सर्व इंद्रियांच्या वृत्तींना आपल्या हातांत घेऊन (निग्रह करून) बुद्धि आत्मस्वरूपीं मिळते॥ ८३३॥

ऐसा बुद्धीचा उपरमु। तया नाम म्हणिपे शमु। तो गुण गा उपक्रमु। जया कर्माचा॥ ८३४॥

अर्थ—अशी जी बुद्धिची शांत स्थिती तिला शम म्हणतात. आणि या गुणाने (शमाने) ज्या कर्माचा आरंभ होतो॥ ८३४॥

आणि बाह्येंद्रियांचें धेंडें। पिटूनि विधीचेनि दंडें। नेदिजे अधर्माकडे। कहींचि जावों॥ ८३५॥

अर्थ—आणि बाह्य इंद्रियांच्या धेंडांना शास्त्रांच्या नियमांनी शासन करून पिटाळून लावतो व अधर्माकडे त्यांना (इंद्रियांना) कधी जाऊंच देत नाही॥ ८३५॥

तो पैं गा शमा विरजा। दम गुण जेथ दुजा। आणि स्वधर्माचिया वोजा। जिणें जें कां॥ ८३६॥

अर्थ—जो दम नावाचा दुसरा गुण शमाला सहाय्य करणारा असतो. शिवाय, त्याच्यामुळे स्वधर्मानुसार जीवन व्यतीत करता येते.॥ ८३६॥

तेवींचि सटवीचिये राती। न विसंबिजे जेवीं वाती। तैसा ईश्वरनिर्णयो चित्तीं। वाहणें सदा॥ ८३७॥

अर्थ—त्याच प्रमाणे सटवाईच्या रात्री (पाचवीला) दिव्याला जसे क्षणभरही विसरले जात नाही; त्याप्रमाणे अहर्निश ईश्वरा विषयीचा विचार अंत:करणांत बाळगला जातो॥ ८३७॥

तया नाम तप। तें तिजया गुणाचें रूप। आणि शौचही निष्पाप। द्विविध जेथ॥ ८३८॥

अर्थ—त्याचे नाव तप. तें तिसऱ्या गुणाचे लक्षण होय आणि निष्पाप (शुद्ध) असा शुचिर्भूतपणाही जेथे दोन प्रकारचा आहे॥ ८३८॥

मन भावशुद्धी भरलें। आंग क्रिया अळंकारिलें। ऐसें सबाह्य जियालें। साजिरें जें कां॥ ८३९॥
तया नाम शौच पार्था। तो कर्मी गुण जये चौथा। आणि पृथ्वीचिया परी सर्वथा। सर्व जें साहाणें॥ ८४०॥

अर्थ—मन शुद्ध भावनेने भरलेले आणि शरीर विहित कर्मांनी अलंकृत झालेले, असे अंतर्बाह्य सुंदर झालेले जे जीवन॥ ८३९॥ अर्जुना, त्याचे नाव "शौच" हा कर्मातला चवथा गुण होय. आणि पृथ्वीप्रमाणे जे सर्व (बरे वाईट) सहन करणे॥ ८४०॥

ते गा क्षमा पांडवा। गुण जेथ पांचवा। स्वरांमाजीं सुहावा। पंचमु जैसा॥ ८४१॥

अर्थ—(सप्त) स्वरांमध्ये ज्या प्रमाणे पंचम (पांचवा स्वर) शोभिवंत त्याप्रमाणे, अर्जुना 'क्षमा' (ब्राह्मण कर्मात) पाचवा गुण होय.॥ ८४१॥

आणि वांकडेनि वोघेंसीं। गंगा वाहे उजूचि जैसी। कां पुठीं वळला ऊंसीं। गोडी जैसी॥ ८४२॥
तैसा विषमांहि जीवां-। लागीं उजुकारु बरवा। तें आर्जव गा सहावा। जेथींचा गुण॥ ८४३॥

अर्थ—आणि वाकड्या प्रवाहाने गंगा वहात असली तरी ती ज्या प्रमाणे सरळ (समुद्राकडे) वाहते किंवा ऊस (पाठीमागे) वाकडा वळला असला तरी त्याची गोडी एक सारखीच असते॥ ८४२॥ त्याप्रमाणे आपल्याला त्रास देणाऱ्या प्राणिमात्राविषयी देखील सरळपणाचा व्यवहार करणे तो आर्जव (ज्या ब्राह्मण कर्मात) सहावा गुण होय.॥ ८४३॥

आणि पाणियें प्रयत्नें माळी। अखंड जचे झाडामुळीं। परी तें आघवेंचि फळीं। जाणे जेवीं॥ ८४४॥
तैसें शास्त्राचारें तेणें। ईश्वरुचि येक पावणें। हें फुडें जें कां जाणणें। तें येथ ज्ञान॥ ८४५॥

अर्थ—आणि माळी हा प्रयत्नाने सतत खपून झाडाच्या मुळाला पाणी घालतो. परंतु तो आपले परिश्रम जसे फळाच्याठिकाणी पहातो॥ ८४४॥ त्याप्रमाणे शास्त्रानुसार आचरण करून त्याच्या योगाने ईश्वराची प्राप्ती हे जे पक्के जाणणे ते येथे (ब्राह्मण कर्मात) ज्ञान आहे॥ ८४५॥

तें गा कर्मी जिये। सातवा गुण होये। आणि विज्ञान हें पाहें। एवंरूप॥ ८४६॥

अर्थ—हे ज्ञान ज्या कर्माचा (ब्राह्मण कर्माचा) सातवा गुण आहे आणि विज्ञान (पुढे सांगितल्याप्रमाणे) हे अशा स्वरूपाचे आहे ते लक्षात घे॥ ८४६॥

तरी सत्त्वशुद्धीचिये वेळे। शास्त्रें कां ध्यानबळें। ईश्वरतत्त्वींचि मिळे। निष्टंकबुद्धी॥ ८४७॥

अर्थ—तर शास्त्र विचाराने किंवा ध्यानाच्या अभ्यास सामर्थ्याने जी निश्चयात्मिका बुद्धि सत्वशुद्धीच्यावेळी (सत्त्व शुद्धि साधल्यानंतर) ईश्वररूपी मिळते॥ ८४७॥

हें विज्ञान बरवें। गुणरत्न जेथ आठवें। आणि आस्तिक्य जाणावें। नववा गुण॥ ८४८॥

अर्थ—अर्जुना, हे चांगले विज्ञान आहे, तें या ब्राह्मण कर्मांत आठवे गुणरत्न आहे आणि आस्तिक्य हा नववा गुण समज.॥ ८४८॥

पैं राजमुद्रा आथिलीया। प्रजा भजे भलतया। तेवीं शास्त्रें स्वीकारिलिया। मार्गमात्रातें॥ ८४९॥

अर्थ—राजाचा शिक्का असलेल्या कोणत्याही हुकुमाचा प्रजा जशी स्वीकार करते त्याप्रमाणे शास्त्राने स्वीकारलेल्या सर्व मार्गांना॥ ८४९॥

आदरें जें कां मानणें। तें आस्तिक्य मी म्हणें। तो नववा गुण जेणें। कर्म तें साच॥ ८५०॥

अर्थ—जे आदराने मानणे त्याला मी आस्तिक्य म्हणतो. तो नववा गुण आहे आणि त्याच्या योगाने (आस्तिक्यामुळे) ते ब्राह्मण कर्म खरे खरे होते.॥ ८५०॥

एवं नवही शमादिक। गुण जेथ निर्दोष। तें कर्म जाण स्वाभाविक। ब्राह्मणाचें॥ ८५१॥

अर्थ—अशा रीतीने शमादिक नवही गुण जेथे (ज्या कर्मात) निर्दोष रीतीने असतील ते ब्राह्मणाचे स्वाभाविक कर्म हे लक्षांत ठेव.॥ ८५१॥

तो नवगुणरत्नाकरु। या नवरत्नांचा हारु। न फेडित ले दिनकरु। प्रकाशु जैसा॥ ८५२॥
नाना चांपा चांपौळी पूजिला। चंद्रु चंद्रिका धवळला। कां चंदनु निजें चर्चिला। सौरभ्यें जेवीं॥ ८५३॥
तेवीं नवगुणटिकला। लेणे ब्राह्मणाचें अव्यंग। कहींचि न संडी आंग। ब्राह्मणाचें॥ ८५४॥

अर्थ—प्रकाशरूप सूर्याने जसा प्रकाश धारण करावा त्याप्रमाणे या नवरत्नहाराला तो नवगुणांचा समुद्र असणारा (ब्राह्मण) सदैव धारण करतो.॥ ८५२॥ किंवा चांपा जसा आपल्या चांपेकळ्यांनी सुशोभित होतो किंवा चंद्र जसा आपल्याच चंद्रप्रकाशाने उजळतो किंवा चंदन जसे आपल्याच सुवासाने भरलेलेच असते॥ ८५३॥ त्याप्रमाणे नऊ गुणांच्या रत्नांनी जडलेला हा अलंकार ब्राह्मणाचे निर्मळ भूषण आहे, तो ब्राह्मणाच्या आंगापासून कधीही दूर होत नाही.॥ ८५४॥

आतां उचित तें क्षत्रिया। तेंही कर्म धनंजया। सांगों ऐक प्रज्ञेचिया। भरोवरी॥ ८५५॥

अर्थ—अर्जुना आता क्षत्रियांना उचित जे कर्म तेही सांगतो. तें तूं बुद्धीच्या सामग्रीने ऐक॥ ८५५॥

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम्। दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम्॥ ४३॥

अर्थ—पराक्रम, तेज, धैर्य, दक्षता, युद्धांतून पळून न जाणे, दातृत्व आणि लोकांवर सत्ता चालवणे हे क्षत्रियांचे स्वभावसिद्ध कर्म होय.॥ ४३॥

तरी भानु हा तेजें। नापेक्षी जेवी विरजें। कां सिंहें न पाहिजे। जावळिया॥ ८५६॥

अर्थ—सूर्य हा प्रकाशाच्या बाबतीत ज्याप्रमाणे कोणाच्या मदतीची अपेक्षा करीत नाही किंवा सिंहाला (पराक्रमाकरता) दुसऱ्याची सोबत लागत नाही॥ ८५६॥

ऐसा स्वयंभ जो जीवें लाठु। सावायेंवीण उद्भटु। तें शौर्य गा जेथ श्रेष्ठु। पहिला गुण॥ ८५७॥

अर्थ—असा स्वत:च जो बलाढ्य व कोणाच्या सहाय्यावाचून शूर, तो अर्जुना! (क्षात्रप्रकृतीचा) शौर्य हा पहिला गुण होय.॥ ८५७॥

आणि सूर्याचेनि प्रतापें। कोडिही नक्षत्र हारपे। ना तो तरी न लोपे। सचंद्रीं तिहीं॥ ८५८॥

अर्थ—आणि सूर्याच्या प्रकाशाच्या प्रभावाने कोट्यावधी नक्षत्रे असली तरी ती लोप पावतात (निस्तेज होतात) पण ती (नक्षत्रे) चंद्रासह असली तरी त्याला (सूर्याला) मात्र लोपवू (निस्तेज करू) शकत नाहीत॥ ८५८॥

तैसेनि आपुले प्रौढिगुणें। जगा या विस्मयो देणें। आपण तरी न क्षोभणें। कायसेनही॥ ८५९॥

अर्थ—त्याप्रमाणे आपल्या सामर्थ्याने व गुणाने जगाला चकित करून टाकणे व आपण मात्र कोणत्याही गोष्टीमुळे विचलित न होणे॥ ८५९॥

तें प्रागल्भ्यरूप तेजा। जिये कर्मीं गुण दुजा। आणि धीरु तो तिजा। जेथींचा गुण॥ ८६०॥

अर्थ—पाणीदारपणा असलेले तेज ज्या क्षात्रकर्मात दुसरा गुण आहे व धैर्य हा तिसरा गुण आहे॥ ८६०॥

वरि पडलिया आकाश। बुद्धीचे डोळे मानस। झांकी ना तें परियेस। धैर्य जेथें॥ ८६१॥

अर्थ—वरून आकाश जरी कोसळले तरी ज्याच्या बुद्धीचे डोळे व मन झाकले जात नाही त्याचे नाव धैर्य होय.॥ ८६१॥

आणि पाणी हो भलतेतुकें। परी तें जिणौनि पद्म फांके। कां आकाश उंचिया जिंके। आवडे तयातें॥ ८६२॥

तेवीं विविधा अवस्था। पातलिया जिणौनि पार्था। प्रज्ञा फळतया अर्था। वेझ देणें जें॥ ८६३॥

तें दक्षत्व गा चोख। जेथ चौथा गुण देख। आणि जुंझ अलौकिक। तो पांचवा गुण॥ ८६४॥

अर्थ—आणि पाणी वाटेल तितके असले तरी त्याला जिंकून कमल पाण्यावर उमलते किंवा आकाश उंचीच्या बाबतीत वाटेल त्याला जिंकते॥ ८६२॥ त्याप्रमाणे अर्जुना कितीही प्रसंग आले तरी त्यावर मात करून इष्ट फळ देणाऱ्या कार्यात चाणाक्षपणाने प्रवेश करणे.॥ ८६३॥ याला दक्षता असे म्हणतात व तो (क्षात्रप्रकृतीचा) चवथा गुण होय व अलौकिक झुंज देणे हा पांचवा गुण होय.॥ ८६४॥

आदित्याचीं झाडें। सदा सन्मुख सूर्याकडे। तेवीं समोर शत्रूपुढें। होणें सदा॥ ८६५॥

अर्थ—सूर्यफुलाची झाडें ज्याप्रमाणे नेहमी सूर्याकडे सन्मुख असतात, त्याप्रमाणे शत्रूंच्या समोर नेहमी असणे (शत्रूला पाठ न दाखवणे)॥ ८६५॥

माहेवणी प्रयत्नेंसी। चुकविजे सेजे जैसी। रिपू पाठी नेदिजे तैसी। समरांगणीं॥ ८६६॥

अर्थ—गरोदर स्त्री ज्या प्रमाणे हरप्रयत्नाने नवऱ्याची शय्यासोबत टाळते, त्याप्रमाणे युद्ध भूमीवर शत्रूला पाठ न दाखवणे॥ ८६६॥

हा क्षत्रियांचेया आचारीं। पांचवा गुणेंद्र अवधारीं। चहूं पुरुषार्थां शिरीं। भक्ति जैसी॥ ८६७॥

अर्थ—चारही पुरुषार्थात (धर्म, अर्थ, काम व मोक्ष) भक्ति हा पुरुषार्थ जसा श्रेष्ठ त्याप्रमाणे क्षत्रियांच्या आचारात हा पाचवा गुण सर्वोत्कृष्ट आहे हे ध्यानात ठेव॥ ८६७॥

आणि जालेनि फुलें फळें। शाखिया जैसी मोकळे। का उदार परिमळें। पद्माकरु॥ ८६८॥

नाना आवडीचेनि मापें। चांदिणें भलतेणें घेपे। पुढिलांचेनि संकल्पें। तैसें जें देणे॥ ८६९॥

तें उमप गा दान। जेथ सहावें गुणरत्न। आणि आज्ञे एकायतन। होणें जें कां॥ ८७०॥

अर्थ—आणि झाडाला फुले आणि फळे आली म्हणजे डाहाळ्या (ती देऊन टाकून) मोकळ्या होतात किंवा सुगंध देण्यात कमळे जशी उदार असतात॥ ८६८॥ किंवा चादणे हे आवडेल त्याने आवडेल त्या मापांने घ्यावे त्याप्रमाणे दुसऱ्यांच्या (याचकांच्या) इच्छे प्रमाणे त्याला धन देणे॥ ८६९॥ ते अपरिमित दान जेथे क्षात्रकर्मात सहावे गुणरत्न आहे आणि आज्ञेचे रहाण्याचे एकच स्थान होणे (म्हणजे ज्याची आज्ञा सर्वांनी ऐकणे)॥ ८७०॥

पोषूनि अवयव आपुले। करविजती मातविले। तेवीं पालणें लोभविलें। जग जें भोगणें॥ ८७१॥

तया नाम ईश्वरभावो। जो सर्वसामर्थ्याचा ठावो। तो गुणांमाजीं रावो। सातवा जेथ॥ ८७२॥

अर्थ—आपल्या अवयवांना धडधाकट करून त्यांच्याकडून कोणतेही काम करवून घेता येते. त्याप्रमाणे प्रजेचे

पालन करून त्यांच्या प्रेमामुळे जगाचा (प्रजेचा) उपभोग घेणे॥ ८७१ ॥ यालाच 'ईश्वरभाव' असे म्हणतात व जो सर्व सामर्थ्याचे स्थल (ठिकाण) आहे. तो हा गुणांमध्ये सर्वश्रेष्ठ ज्या क्षात्र कर्मात सातवा गुण आहे.॥ ८७२ ॥

गूढार्थदीपिका—तया नाम ईश्वरभावो। जो सर्व सामर्थ्याचा ठावो। चातुवर्ण प्रधान समाज पद्धतीत क्षत्रियाची भूमिका समाज रक्षणाची व राज्य करून प्रजापालनाची आहे. क्षत्रियांच्या सातही गुणांत हा सर्वांत श्रेष्ठ व म्हणून महत्वाचा गुण आहे असे माउली या ठिकाणी सांगत आहे.

राजाने प्रजेने पालन स्वत:ला पिता व प्रजेला पुत्र समजून करावे अशी धर्मशास्त्रांत राजाची कर्तव्ये सांगत असतांना म्हटले आहे. ही वात्सल्याची भावना प्रजेविषयी असल्यास प्रजेची पिळवणूक वगैरे करण्याचा प्रश्न निर्माणच होऊ शकत नाही. पित्याचे मुलांवर नियंत्रण असते. पण ते कल्याणाच्या पोटी. त्याचप्रमाणे क्षत्रियाने समाजाचे किंवा प्रजेचे जे नियंत्रण करावयाचे ते त्यांच्या कल्याणाच्या पोटी. हा नियंत्रणाचा किंवा शासनाचा जो भाग आहे त्यालाच 'ईश्वरभाव' असे म्हणतात. प्रजेचे प्रेम संपादन करून नंतर उपभोग घेणे हे क्षत्रियाचे 'शासन' कल्पनेत अंतर्भूत असल्यामुळे राज्याच्या उपभोगाला अर्थातच गौण स्थान प्राप्त होते. क्षत्रियाचा हा खरा व श्रेष्ठ गुण आहे.

ऐसें जें शौर्यादिकीं। इहीं सात गुणविशेखीं। अळंकृत सप्तऋखीं। आकाश जैसें॥ ८७३ ॥
तैसें सप्तगुणीं विचित्र। कर्म जें जगीं पवित्र। तें सहज जाण क्षात्र। क्षत्रियाचें॥ ८७४ ॥

अर्थ—सप्तर्षीनी सुशोभित केलेल्या आकाशाप्रमाणे अशा या शौर्यादी सात गुणांनी अलंकृत असलेला पुरुष शोभतो.॥ ८७३ ॥ त्याप्रमाणे या सात अलौकिक गुणांनी अलंकृत झालेले या जगात जे पवित्र कर्म असते. ते क्षत्रियांचे स्वाभाविक क्षात्रकर्म आहे असे समज॥ ८७४ ॥

नाना क्षत्रिय नव्हे नरु। तो सत्त्वसोनयाचा मेरु। म्हणौनि गुणस्वर्गा आधारु। सातां इयां॥ ८७५ ॥

अर्थ—किंवा हा क्षत्रिय म्हणजे मनुष्य नव्हे तर तो सत्वरूप सोन्याचा मेरु पर्वतच आहे. म्हणून तर तो या सात गुणरूपी स्वर्गाला आधार होतो. (धरून ठेवतो)॥ ८७५ ॥

नातरी सप्तगुणार्णवीं। परिवारली बरवी। हे क्रिया नव्हे पृथ्वी। भोगीतसे तो॥ ८७६ ॥

अर्थ—किंवा हे (क्षात्र) कर्म नव्हेत तर सात गुणरूपी समुद्रांनी वेढलेली पृथ्वीच असून तिचा तो उपभोग घेत असतो॥ ८७६ ॥

कां गुणांचे सातांही ओघीं। हे क्रिया ते गंगा जगीं। तया महोदधीचिया आंगीं। विलसे जैसी॥ ८७७ ॥

अर्थ—किंवा या सात गुणांच्या ओघांनी ही क्रियारूपी (क्षात्रक्रियारूपी) गंगा या (क्षत्रियरूपी) महासागराच्या अंगावर जणुं काय विलास करीत आहे.॥ ८७७ ॥

परी हें बहु असो देख। शौर्यादि गुणात्मक। कर्म गा नैसर्गिक। क्षत्रजातीसी॥ ८७८ ॥

अर्थ—परंतु हा विस्तार पुरे. शौर्यादिगुणात्मक कर्मे ही क्षत्रिय जातीची स्वाभाविक कर्मे आहेत॥ ८७८ ॥

आतां वैश्याचिये जाती। उचित जे महामती। तें ऐकें गा निरुती। क्रिया सांगों॥ ८७९ ॥

अर्थ—हे बुद्धिमान् अर्जुना, वैश्य जातीचे जे उचित कर्म तेही स्पष्ट करून सांगतो ऐक॥ ८७९ ॥

कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम्। परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम्॥ ४४॥

अर्थ—शेती करणे, गुरे बाळगणे, क्रयविक्रय करणे हे वैश्यांचे स्वाभाविक कर्म होय. आणि सेवा करणे हे शूद्राचेही स्वाभाविक कर्म होय॥ ४४ ॥

तरी भूमि बीज नांगरु। यया भांडवलाचा आधारु। घेऊनि लाभु अपारु। मेळवणें जें॥ ८८० ॥
किंबहुना कृषी जिणें। गोधनें राखोनि वर्तणें। कां समर्घीची विकणें। महर्घी वस्तु॥ ८८१ ॥
येतुलाचि पांडवा। वैश्यातें कर्माचा मेळावा। हा वैश्यजातिस्वभावा-। आंतुला जाण॥ ८८२ ॥

अर्थ—जमीन, बियाणे व नांगर या भांडवलाच्या आधारावर खूप फायदा मिळवणे॥ ८८० ॥ किंबहुना

शेती करून निर्वाह करणे, गाई म्हशींना पाळून चरितार्थ, चालविणे किंवा स्वस्तात घेतलेली वस्तू महाग विकणे॥ ८८१ ॥ अर्जुना, एवढ्याच गोष्टी वैश्याच्या वृत्तीच्या आहेत. त्याच वैश्य जातीच्या स्वाभाविक कर्माच्या कक्षेत येतात असे समज॥ ८८२ ॥

आणि वैश्य क्षत्रिय ब्राह्मण। हे द्विजन्मे तिन्हीं वर्ण। ययांचें जें शुश्रूषण। तें शूद्रकर्म॥ ८८३ ॥

अर्थ—आणखी वैश्य, क्षत्रिय व ब्राह्मण हे दोनदा जन्मलेले (पहिला सर्व सामान्य शौक्ल नांवाचा जन्म व उपनयनादी संस्कारामुळे दुसरा जन्म) असे तिन्ही वर्ण, त्यांची सेवा करणे हे शूद्राचे कर्म (स्वाभावकि) होय॥ ८८३ ॥

पैं द्विजसेवेपरौतें धांवणें नाहीं शूद्रातें। एवं चतुर्वर्णोचितें। दाविलीं कर्में॥ ८८४॥

अर्थ—ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या द्विजांच्या सेवे व्यतिरिक्त शूद्रांना अन्यत्र कर्मे नाहीत याप्रमाणे चारही वर्णांना उचित अशी जी कर्मे ती तुला दाखवून दिली॥ ८८४॥

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः। स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु॥ ४५॥

अर्थ—आपापल्या कर्माच्या ठिकाणी जो रत असतो त्याला ज्ञान निष्ठेला पात्र होण्याची योग्यात येते. आपल्या कर्माच्या ठिकाणी तत्पर असणाऱ्याला ती कशी येते ते ऐक॥ ४५ ॥

आतां इयेचि विचक्षणा। वेगळालिया वर्णा। उचित जैसें करणां। शब्दादिक॥ ८८५॥

अर्थ—आता, हे शाहाण्या अर्जुना, ज्याप्रमाणे शब्दादी विषय श्रोत्रादि इंद्रियांना योग्य आहेत, त्याप्रमाणे हीच कर्मे (आतापर्यंत सांगितलेली कर्मे) वेगवेगळ्या वर्णांना योग्य आहेत॥ ८८५ ॥

नातरी जळदच्युता। पाणिया उचित सरिता। सरितेंसीं पांडुसुता। सिंधु उचितु॥ ८८६॥
तैसें वर्णाश्रमवशें। जें करणीय आलें असे। गोरेया आंगा जैसें। गोरेपण॥ ८८७॥

अर्थ—किंवा मेघापासून पडलेल्या पाण्याला ज्याप्रमाणे नदी योग्य आणि नदीला अर्जुना ज्याप्रमाणे समुद्र योग्य आहे॥ ८८६ ॥ गोऱ्या अंगाला ज्याप्रमाणे गोरेपणा शोभतो त्याप्रमाणे वर्णाश्रमानुसार आपल्या वाट्याला कर्तव्य म्हणून आलेले कर्म असेल ते त्याला शोभतें॥ ८८७ ॥

तया स्वभावविहिता कर्मा। शास्त्राचेनि मुखें वीरोत्तमा। प्रवर्तावयालागीं प्रमा। अढळ कीजे॥ ८८८॥

अर्थ—हे वीरश्रेष्ठा अर्जुना, (वर्णाच्या) स्वभावानुसार विहित केलेल्या कर्माचे शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे आचरण करण्याविषयी आपली बुद्धी निश्चित करावी॥ ८८८ ॥

पैं आपुलेंचि रत्न थितें। घेपे पारखियाचेनि हातें। तैसें स्वकर्म आपैतें। शास्त्रें करावें॥ ८८९॥

अर्थ—आपल्याच जवळ असलेले रत्न, रत्नपारख्याकडून परीक्षा करून ज्याप्रमाणे घ्यावे त्याप्रमाणे वर्णानुसार प्राप्त झालेले आपले स्वाभाविक कर्म शास्त्रानुसार (शास्त्रातून समजून घेऊन) करावे॥ ८८९ ॥

जैसी दिठी असे आपुलिया ठायीं। परी दीपेंवीण भोग नाहीं। मार्गु न लहतां काई। पाय असतां होय॥ ८९०॥

अर्थ—ज्याप्रमाणे आपल्याजवळ दृष्टी असूनही (आंधारात) दिव्याशिवाय तिचा उपयोग होत नाही. मार्गच जर सांपडला नाही तर पाय असून काय उपयोग?॥ ८९० ॥

म्हणौनि ज्ञातिवशें साचारु। सहज असे जो अधिकारु। तो आपुलालिया शास्त्रें गोचरु। आपण कीजे॥ ८९१॥

अर्थ—म्हणून जातिधर्मानुसार स्वाभाविक आपल्याला जो अधिकार (कर्माचा) प्राप्त झालेला असतो, तो आपापल्या शास्त्रानुसार आपणच समजून घ्यावा॥ ८९१ ॥

मग घरींचाचि ठेवा। जेवीं डोळ्या दावी दिवा। तरी घेतां काय पांडवा। आडळु असे॥ ८९२॥
तैसें स्वभावें भागा आलें। वरी शास्त्रें खरें केलें। तें विहित जो आपुलें। आचरे गा॥ ८९३॥

अर्थ—मग अर्जुना, घरचाच द्रव्याचा ठेवा जर दिव्याने. डोळ्यांना दाखवून दिला तर तो घेण्याला काय आडकाठी आहे?॥ ८९२॥ त्याप्रमाणे वर्णाच्या स्वाभाविक धर्माप्रमाणे आपल्या वाट्याला आलेले त्याशिवाय

(भरीला भर म्हणून) शास्त्राने ज्याला पुष्टी दिली (खरे ठरविले) ते आपले विहित कर्म जो आचरण करतो ॥ ८९३ ॥

परी आळसु सांडुनी। फळकाम दवडुनी। आंगें जीवें मांडुनी। तेथेंचि भरु ॥ ८९४ ॥

वोघीं पडिलें पाणी। नेणे आनानी वाहणी। तैसा जाय आचरणी। व्यवस्थोनी ॥ ८९५ ॥

अर्जुना जो यापरी। तें विहित कर्म स्वयें करी। तो मोक्षाच्या ऐल्द्वारीं। पैठा होय ॥ ८९६ ॥

अर्थ—परंतु आळस टाकून देऊन व फळाची इच्छा सोडून देऊन शरीर व मन (अर्पण करून) ओतून त्याठिकाणी भर देतो ॥ ८९४ ॥ वोघांत पडलेल्या पाण्याला निराळ्या मार्गाने वाहणे माहीत नसते त्याप्रमाणे ज्याचे आचरण व्यवस्थित (शास्त्रानुसार) असते ॥ ८९५ ॥ अर्जुना, जो या प्रमाणे ते विहित कर्म स्वत: करतो तो मोक्षाच्या अलीकडील तीराला प्राप्त होतो ॥ ८९६ ॥

जे अकरणा आणि निषिद्धा। न वचेचि कांहीं संबंधा। म्हणौनि भवा विरुद्धा। मुकला तो ॥ ८९७ ॥

अर्थ—जो विहित कर्म न करणे व निषिद्ध कर्म करणे या दोहोंचाही संबंध स्वत:ला लागू देत नाही असा म्हणूनच (आत्मस्वरूपाला) विरुद्ध असा जो संसार त्यातून तो मुक्त होतो ॥ ८९७ ॥

आणि काम्यकर्मांकडे। न परतेचि जेथ कोडें। तेथ चंदनाचेही खोडे। न लेचि तो ॥ ८९८ ॥

अर्थ—आणि काम्यकर्माकडे तो कोडकौतुकाने म्हणून कधी वळतच नसल्यामुळे चंदनाचा खोडाही पायात अडकवण्यास दिला तरी तो अडकवून घेत नाही ॥ ८९८ ॥

येर नित्य कर्म तंव। फलत्यागें वेंचिलें सर्व। म्हणौनि मोक्षाची शीव। ठाकूं लाहे ॥ ८९९ ॥

अर्थ—बाकीचे नित्य कर्म तर फळत्याग केल्यामुळे पूर्णपणे नाहीसे होते म्हणून तो मोक्षाची सीमा गाठूं लागतो ॥ ८९९ ॥

गूढार्थदीपिका—कर्म हा शब्द या ठिकाणी आपल्याकडून होणाऱ्या कोणत्याही क्रियेला धरून वापरण्यांत आलेला नाही. वर्णानुसार शास्त्राने विहित केलेले कर्म या अर्थाने हा शब्द वापरण्यांत आलेला आहे. वर्णानुसार शास्त्राने कांही नित्य कर्मे लावून दिलेली आहेत. या कर्म लावून देण्यामागे शास्त्राचा उद्देश्य असा आहे की जीवाची विषयांकडे जाण्याची जी धाव आहे तिला नियंत्रित करावे. कोणतेही कर्म अहंकाराशिवाय होऊ शकत नाही व अहंकारच जीवाला बंधनात पाडणारा आहे. अहंकारपूर्वक कर्म होताच कर्ता, करण व कर्म ही कर्मत्रयी त्याच्या मानगुटी बसल्याशिवाय राहत नाही. शास्त्रोक्त नित्य कर्मे भगवदाज्ञा म्हणून, भगवंताच्या प्रेमाकरता व भगवंताला समर्पण करून आचरल्यास अर्थातच त्या कर्माचे कर्तृत्व आपल्याकडे ओढून घेण्याचा प्रश्न उत्पन्न होत नाही. ते कर्म त्यामुळे अहंकारपूर्वक होत नाही व परिणामत: कर्ता करण व कर्म ह्या त्रयी पासून तो मुक्त राहतो. स्वामीची आज्ञा पालन केल्यामुळे स्वामीला जसा आनंद व्हावा व नोकराचा त्या कर्माशी जसा संबंध नसावा तशी स्थिती या ठिकाणी रहाते. ह्या नित्य कर्माच्या आचरणाने भगवान् संतुष्ट होतो व कर्मकर्ता हळुहळु भगवदाज्ञा परतंत्र होत असल्यामुळे अहंकारापासून मुक्त होत जातो. शरीर, मन व इंद्रिये यांच्या प्रवृत्तीना या नित्य कर्माच्या आचरणामुळे अनायासेच आळा बसत जातो व अंत:करणाची वृत्ति अंतर्मुख होण्याला मदत होते.

सर्व शास्त्रोक्त कर्माची उभारणी सत्वाचा उत्कर्ष करण्या करताच असल्यामुळे अंत:करणांत या निष्काम कर्माच्या आचरणाने चित्ताची शुद्धी होण्याला मदत होते व यथार्थ ज्ञानाचे बीज रुजण्याकरता लागणारी शुद्ध भूमी अनायासेच तयार होते. ही नित्यकर्मे अशा रीतीने निष्काम होत असल्याकारणाने कर्माचे बंधन निर्माण होत नाही. म्हणूनच ते कर्म नाहीसे होते म्हणजे नैष्कर्म्यात परिणत पावते व अशारीतीने मोक्षाची शीव जी अंत:करण शुद्धी तो तो कर्म करणारा अनायासेच गाठतो.

ऐसेनि शुभाशुभीं संसारीं। सांडिला तो अवधारी। वैराग्यमोक्षद्वारीं। उभा ठाके ॥ ९०० ॥

अर्थ—अशा प्रकारे पापपुण्यात्मक संसारातून तो सुटला जातो व वैराग्यरूपी मोक्ष द्वारांत उभा राहतो ॥ ९०० ॥

जें सकळ भाग्याची सीमा। मोक्षलाभाची जें प्रमा। नाना कर्ममार्गश्रमा। शेवटु जेथ ॥ ९०१ ॥

अर्थ—जे (वैराग्य) सर्व भाग्याची सीमा आहे व जे मोक्ष प्राप्तीचे ज्ञान करून देणारे आहे व नाना प्रकारच्या कर्म मार्गाच्या परिश्रमांचा जेथे शेवट होतो॥ ९०१ ॥

मोक्षफळें दिधली वोल। जें सुकृततरुचें फूल। तये वैराग्यीं ठेवी पाऊल। भंवरु जैसा॥ ९०२॥

अर्थ—जे वैराग्य म्हणजे मोक्षफळाने दिलेले तारण होय किंवा जे सत्कर्मरूप वृक्षाचे फूलच होय. त्या वैराग्याच्या ठिकाणी (वैराग्य पुष्पाच्या ठिकाणी) साधक पुरुष भ्रमरा प्रमाणे (अलगद) पाऊल ठेवतो॥ ९०२॥

पाहीं आत्मज्ञानसुदिनाचा। वाधावा सांगतयां अरुणाचा। उदयो त्या वैराग्याचा। ठावो पावे॥ ९०३॥

अर्थ—अर्जुना, वैराग्य हे दिवस उजाडण्याची-आत्मज्ञानाची-वार्ता सांगणाऱ्या वाधाव्याप्रमाणे अरुणोदयाच्या स्थानी आहे हे लक्षात ठेव. त्या वैराग्याचा साधकाला लाभ होतो. ॥ ९०३ ॥

किंबहुना आत्मज्ञान। जेणें हाता ये निधान। तें वैराग्य दिव्यांजन। जीवें ले तो॥ ९०४॥

अर्थ—किंबहुना, आत्मज्ञानरूप संपत्तीचा ठेवा, ज्याच्या योगाने आपल्या हातात येतो, ते वैराग्यरूपी दिव्यांजन तो आपल्या डोळ्यांत मनापासून घालतो॥ ९०४॥

ऐसी मोक्षाची योग्यता। सिद्धी जाय तया पांडुसुता। अनुसरोनि विहिता। कर्मा यया॥ ९०५॥

अर्थ—अर्जुना, शास्त्राने सांगितलेल्या (विहित) कर्माचे पालन केल्यामुळे त्याला अशारीतीने मोक्षाची योग्यता प्राप्त होणारी सिद्धी प्राप्त होते॥ ९०५॥

हें विहित कर्म पांडवा। आपुला अनन्य वोलावा। आणि हेचि परम सेवा। मज सर्वात्मकाची॥ ९०६॥

अर्थ—अर्जुना, हे विहित कर्मच जीवाला अत्यंत जिव्हाळ्याचे ठिकाण आहे आणि याचेच आचरण माझ्या सर्वस्वरूप परमात्म्याची खरी खरी सेवा आहे॥ ९०६॥

पैं आघवाचि भोगेंसी। पतिव्रता क्रीडे प्रियेंसीं। कीं तयाची नामें जैसीं। तपें तिया केलीं॥ ९०७॥
कां बाळका एकी माये-। वांचोनि जिणें काय आहे। म्हणौनि सेविजे कीं तो होये। पाटाचा धर्म॥ ९०८॥
नाना पाणी म्हणौनि मासा। गंगा न सांडितां जैसा। सर्वतीर्थ सहवासा। वरपडा जाला॥ ९०९॥
तैसें आपलिया विहिता। उपायो असे न विसंबितां। ऐसा कीजे कीं जगन्नाथा। आभारु पडे॥ ९१०॥

अर्थ—पतिव्रता स्त्री सर्व भोगांसह आपल्या पतीबरोबरच क्रीडा करते किंवा त्याच्या साठीच ती त्याच्या नामाचे तपच करीत असते॥ ९०७॥ किंवा एका आईशिवाय बाळाला दुसरे काय असते? म्हणून त्याने तिची सेवा करणेच योग्य होय कारण तोच त्याचा श्रेष्ठ धर्म आहे. ॥ ९०८॥ किंवा पाणी समजून जरी माशाने गंगा सोडली नाही तरी त्याला सर्वतीर्थांचा सहवास सहजच घडतो॥ ९०९॥ त्याप्रमाणे आपल्या हिताचा (आपल्याला विहित असलेल्या कर्माच्या आचरणाचा) उपाय जो असेल तो क्षणमात्र न विसंबता अशा रीतीने करावा की त्या भगवंतालाही भार व्हावा॥ ९१०॥

अगा जया जें विहित। तें ईश्वराचें मनोगत। म्हणौनि केलिया निभ्रांत। सांपडेचि तो॥ ९११॥

अर्थ—अर्जुना, ज्याला जे विहित कर्म सांगितले आहे तेच ईश्वराचे मनोगत (भगवंताच्या मनातील इच्छा) आहे. म्हणूनच त्याचे आचरण कोणताही मनांत संशय न ठेवता केले असता. भगवत्प्राप्ती ही होतेच॥ ९११॥

पैं जीवाचे कसीं उतरली। ते दासी कीं गोसांवीण जाली। तैसी सेवेची तया मविली। वही जेवीं॥ ९१२॥

अर्थ—अरे, जी आपल्या अंत:करणाच्या कसोटीला उतरली ती मूळची दासी असली तरी जशी स्वामिनी होते. त्याच प्रमाणे सेवकाने केलेल्या सेवेचे मूल्यमापन स्वामीकडून दप्तरी जसे नोंद केले जाते॥ ९१२॥

तैसें स्वामीचिया मनोभावा। न चुकिजे हेचि परमसेवा। येर तें गा पांडवा। वाणिज्य करणें॥ ९१३॥

अर्थ—अर्जुना, अशा रीतीने, धन्याचे मनोगत न चुकता जी सेवा केली जाते तीच परमसेवा होय. इतर जी सेवा तो केवळ व्यापार उदीम समजावा॥ ९१३॥

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्। स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः॥ ४६॥

अर्थ—ज्याच्या सत्तेने सर्व भूतांची उत्पत्ति होते, आणि ज्याने हे सर्व विश्व व्यापले आहे त्या ईश्वराला विहित कर्माने भजणाऱ्या मनुष्याला ज्ञाननिष्ठा योग्यता लक्षणा सिद्धी प्राप्त होते॥ ४६॥

म्हणोनि विहित क्रिया केली। नव्हे तयाची खूण पाळिली। जयापासूनि कां आलीं। आकारा भूतें॥ ९१४॥

अर्थ—म्हणून विहित कर्म केले म्हणजे केवळ आपले कर्म केले असे नव्हे तर ज्याच्या पासून प्राणिमात्र उत्पन्न झाले आहेत त्याची आज्ञा पाळली असे होते.॥ ९१४॥

जो अविद्येचिया चिंधिया। गुंडूनि जीव बाहुलिया। खेळवीतसे तिगुणिया। अहंकाररज्जू॥ ९१५॥

अर्थ—जो अविद्येच्या (अज्ञानाच्या) चिंध्या गुंडाळून त्रिगुणात्मक अहंकाररूप दोरीने जीवरूप बाहुल्यांना खेळवतो.॥ ९१५॥

जेणें जग हें समस्त। आंत बाहेरी पूर्ण भरित। जालें आहे दीपजात। तेजें जैसें॥ ९१६॥

तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा। पूजा केली होय अपारा। तोषालागीं॥ ९१७॥

अर्थ—प्रकाशाने सर्व दिवे जसे प्राप्त असावेत त्याप्रमाणे ज्याने हे सर्व जग आंतून व बाहेरून पूर्ण भरून गेले आहे॥ ९१६॥ त्या सर्वात्मक ईश्वराला (हे वीरा अर्जुना) अत्यंत संतोष होण्यासाठी विहित कर्मरूप पुष्पांनी पूजा केली.॥ ९१७॥

म्हणौनि तिये पूजे। रिझलेनि आत्मराजे। वैराग्यसिद्धि देईजे। पसाय तया॥ ९१८॥

अर्थ—म्हणून त्या पूजेच्या योगाने संतुष्ट झालेला आत्मराज (परमात्मा) त्याला (तो) वैराग्य सिद्धिरूप प्रसाद देतो॥ ९१८॥

जिये वैराग्यदशे। ईश्वराचेनि वेधवशें। हें सर्वही नावडे जैसें। वांत होय॥ ९१९॥

अर्थ—ज्या वैराग्यदशेला ईश्वराचा छंद लागला असल्यामुळे वांतीप्रमाणे हे सर्व विषयसुख आवडेनासे होते॥ ९१९॥

प्राणनाथाचिया आधी। विरहणीतें जिणेंही बाधी। तैसें सुखजात त्रिशुद्धी। दुःखचि लागे॥ ९२०॥

अर्थ—प्राणप्रिय असलेल्या पतीच्या ध्यासाने, विरहिणीला आपले जीवंत रहाणेही दुःखद वाटते त्याप्रमाणे यच्चयावत् सुख म्हणून जे जे आहे ते ते त्याला निश्चयेकरून दुःखरूपच वाटते॥ ९२०॥

सम्यक्ज्ञान नुदैजतां। वेधेंचि तन्मयता। उपजे ऐसी योग्यता। बोधाचि लाहे॥ ९२१॥

अर्थ—यथार्थ ज्ञान उत्पन्न झाले नाही तरी त्याच्या ध्यासाने त्याला तन्मयता उत्पन्न होते व अशी अपरोक्ष ज्ञानाची योग्यता त्याला प्राप्त होते.॥ ९२१॥

म्हणौनि मोक्षलाभालागीं। जो व्रतें वाहतसे आंगीं। तेणें स्वधर्मु आस्था चांगी। अनुष्ठावा॥ ९२२॥

अर्थ—म्हणून मोक्षाच्या लाभाकरता जो स्वतः नाना व्रतांचे आचरण करतो त्याने मोठ्या आस्थेने स्वधर्माचे उत्तम अनुष्ठान करावे॥ ९२२॥

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्। स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्॥ ४७॥

अर्थ—आचरण्यास सुलभ अशा परधर्मापेक्षा आचरण्यास कठीण असला तरी; स्वधर्म हा श्रेष्ठ आहे. जे आपले स्वाभाविक नियत कर्म आहे. ते केल्याने मनुष्य पापाने लिप्त होत नाही॥ ४७॥

अगा आपुला हा स्वधर्मु। आचरणीं जरी विषमु। तरी पाहावा तो परिणामु। फळेल जेणें॥ ९२३॥

अर्थ—बाबारे, आचरण्यात आपला हा स्वधर्म कठीण असला तरी ज्याच्यायोगाने इष्ट फळप्राप्ती होईल तिकडे दृष्टी द्यावी (घडणारा परिणाम बघावा)॥ ९२३॥

जैं सुखालागीं आपणपयां। निंबचि आथी धनंजया। तैं कडुवटपणा तयाचिया। उबगिजेना॥ ९२४॥

अर्थ—अर्जुना, कटुलिंबानेच आपल्याला जर आराम पडणार असेल तर त्याच्या कडवटपणाला कंटाळू नये॥ ९२४॥

फळणया ऐलीकडे। केळीतें पाहतां आस मोडे। ऐसी त्यजिली तरी जोडे। तैसें कें गोमटें॥ ९२५॥

अर्थ—फळे येण्याच्या आधीच केळीकडे पाहिले तर (फळ मिळण्याची) आशाच खुंटते. (केवळ पानेच पाने दिसतात म्हणून) पण म्हणून तिला जर टाकून दिले (तिच्याकडे दुर्लक्ष्य केले) तर तशी सुंदर फळे कशी मिळतील॥ ९२५॥

तेवीं स्वधर्मु सांकडु। देखोनि केला जरी कडु। तरी मोक्षसुरवाडु। अंतरला कीं॥ ९२६॥

अर्थ—त्याप्रमाणे आपल्याला विहित केलेला धर्म आचरण्यास कठीण आहे असे वाटून जर त्याला आपण कडू मानले (त्याचा त्याग केला) तर मग मोक्षाचे सुख अंतरलेच!॥ ९२६॥

आणि आपुली माये। कुब्ज जरी आहे। तरी जीये तें नोहे। स्नेह कुन्हें कीं॥ ९२७॥

अर्थ—आणि आपली आई जरी कुबडी (कुरूप) असली तरी ज्या तिच्या प्रेमाने आपण जगतो ते प्रेम काही वाकडे रहात नाही॥ ९२७॥

येरी जिया पराविया। रंभेहूनि बरविया। तिया काय कराविया। बाळकें तेणें॥ ९२८॥

अर्थ—इतर दुसऱ्या स्त्रिया रंभेहूनही सुंदर असल्या तरी त्या मुलाला त्यांचे काय?॥ ९२८॥

अगा पाणियाहूनि बहुवें। तुपीं गुण कीर आहे। परी मीना काय होये। असणें तेथें॥ ९२९॥

अर्थ—अरे पाण्यापेक्षा तुपात जास्त गुण आहेत हे खरे; पण माशांना त्यांत (तुपात) असणे काय कामाचे? (मासा पाण्यांत जगेल, तुपात नाही)॥ ९२९॥

पैं आघविया जगा जें विख। तें विख कीडिया पीयूख। आणि जगा गुळ तें देख। मरण तया॥ ९३०॥

अर्थ—तसेच सर्व जगाला जे विष, ते विषात राहणाऱ्या किड्यांना मात्र अमृत आहे. आणि सर्व जगाला गोड वाटणारा गूळ तो त्या किड्यांना मात्र मृत्यु आहे॥ ९३०॥

म्हणौनि जे विहित जया जेणें। फिटे संसाराचें धरणें। क्रिया कठोर तऱ्ही तेणें। तेचि करावी॥ ९३१॥

अर्थ—म्हणून ज्याला जे विहित केले आहे व ज्याच्यामुळे संसार बंधन नाहीसे होते, ते कर्म कितीही कष्टदायक असले तरी त्याने त्याचे आचरण केलेच पाहिजे॥ ९३१॥

येरा पराचारा बरविया। ऐसें होईल टेंकलेया। पायांचें चालणें डोइया। केलें जैसें॥ ९३२॥

अर्थ—इतर दुसऱ्याचा आचार चांगला आहे म्हणून जर आपण त्याचा आश्रय केला तर पायांनी चालावयाचे काम डोक्याने केल्यासारखे होईल॥ ९३२॥

यालागीं कर्म आपुलें। जें जातिस्वभावें असे आलें। ते करी तेणें जिंतिलें। कर्मबंधातें॥ ९३३॥

अर्थ—या करता आपल्या जातिस्वभावानुसार जे कर्म आपल्या वाट्याला आले असेल त्याचे आचरण जो करील त्याने कर्म बंधाला जिंकले म्हणून समजावे॥ ९३३॥

आणि स्वधर्मुचि पाळावा। परधर्मु तो गाळावा। हा नेमुही पांडवा। न कीजेचि मा॥ ९३४॥

अर्थ—आणि अर्जुना! स्वधर्माचेच पालन करावे, परधर्माचा त्याग करावा हा नेमही जर केला नाही॥ ९३४॥

तरी आत्मा दृष्ट नोहे। तंव कर्म करणें कां ठाये। आणि करणें तेथ आहे। आयास आधीं॥ ९३५॥

अर्थ—तर आत्मज्ञान प्राप्त होणार नाही आणि ते आत्मज्ञान जोपर्यंत होत नाही तो पर्यन्त कर्म करणे थांबते काय? आणि कर्म करावयाचे म्हटले म्हणजे प्रथम कष्ट हे आलेच॥ ९३५॥

सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत्। सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः॥ ४८॥

अर्थ—अर्जुना, जातिस्वभावानुसार प्राप्त झालेले जे कर्म त्यांत दोष असला तरी ते सोडू नये कारण धुराने जसा अग्नी व्यापलेला असतो त्याप्रमाणे सर्व कर्माचे आरंभ दोषाने व्यापलेले असतात.॥ ४८॥

म्हणौनि भलतिये कर्मीं। आयासु जऱ्ही उपक्रमीं। तरी काय स्वधर्मीं। दोष सांगें॥ ९३६॥

अर्थ—ह्याच करता कोणत्याही कर्माच्या आरंभाला जर कष्ट हे पडतातच, तर मग स्वधर्म आचरण्यात दोष तो कोणता? सांग॥ ९३६॥

अगा उजू वाटा चालावें। तऱ्ही पायचि शिणवावे। आडरानें धांवावें। तऱ्ही तेंचि॥ ९३७॥

अर्थ—अरे, सरळ मार्गाने चालले तरी पाय हे दमणारच किंवा आडमार्गाने धावले तरी तेच (पाय दमणारच)॥ ९३७॥

पैं शिळा कां सिदोरिया। दाटणें एक धनंजया। परी जें वाहतां विसांवया। मिळिजे तें घेपे॥ ९३८॥

अर्थ—तसेच अर्जुना, धोंडा आणि शिदोरी दोहोंचे वोझे सारखेच! परंतु जे नेताना विसाव्याच्या ठिकाणी उपयोगी पडेल ते घ्यावे॥ ९३८॥

एऱ्हवीं कणा आणि भूसा। कांडितांही सोसु सरिसा। जेंचि रंधन श्वानमांसा। तेंचि हवी॥ ९३९॥

अर्थ—बाकी धान्याचे कण व भूसा (अलग करण्या करता) कांडताना श्रम सारखेच पडतात. कुत्र्याचे मांस शिजवायला जितकी खटपट तितकीच खटपट होमद्रव्य शिजविण्यालाही करावी लागतेच॥ ९३९॥

दधी जळाचिया घुसळणा। व्यापार सारिखेचि विचक्षणा। वाळुवे तिळा घाणा। गाळणें एक॥ ९४०॥

अर्थ—हे बुद्धिमंता अर्जुना, दही किंवा पाणी यांच्या घुसळण्याचे श्रम सारखेच. किंवा वाळू व तीळ घाण्यांत गाळण्याचे श्रम सारखेच॥ ९४०॥

पैं नित्य होम देयावया। कां सैरा आगी सुवावया। फुंकितां धूम धनंजया। साहणें तेंचि॥ ९४१॥

अर्थ—तसेच अर्जुना, नित्यकर्म म्हणून होमाला आहुति देण्याकरितां किंवा एरव्ही इतर कामाकरता म्हणून अग्नी पेटवण्याकरता फुंकतेवेळी धुराचा त्रास हा सहन करावाच लागतो॥ ९४१॥

परी धर्मपत्नी धांगडी। पोसितां जरी एकी वोढी। तरी कां अपरवडी। आणावी आंगा॥ ९४२॥

अर्थ—त्याचप्रमाणे धर्मपत्नीला व वेश्येला पोसतांना जर सारखीच ओढाताण हीत असेल तर मग (वेश्येला पोसून) अपकीर्तीचा कलंक तरी आपल्या आंगास कां लावून घ्यावा॥ ९४२॥

हां गा पाठीं लागला घायीं। मरण न चुकेचि पाहीं। तरी समोरला काई। आगळें न कीजे॥ ९४३॥

अर्थ—अर्जुना असे पहा की, शत्रूच्या हातून पाठीला घाव लागल्यामुळे मरण जर चुकत नाही तर मग शत्रूला समोर जाऊन तेथे पराक्रम का गाजवू नये?॥ ९४३॥

अकुळस्त्री दांड्याचे घाये। परघर रिगालीहि जरी साहे। तरी स्वपतीतें वायें। सांडिलें कीं॥ ९४४॥

अर्थ—कुलस्त्रीला दुसऱ्याचे घर रिघूनही जर दांडक्याचा मार सहन करावाच लागतो तर मग आपल्या नवऱ्याला तिने व्यर्थच नाही कां टाकून दिले?॥ ९४४॥

तैसें आवडतेंही करणें। न निपजे शिणल्याविणें। तरी विहित बा रे कोणें। बोलें भारी॥ ९४५॥

अर्थ—त्याप्रमाणे आपल्याला आवडते ते कर्म देखील शिणल्या शिवाय होऊ शकत नाही तर मग, बाबारे विहित कर्म कोणत्या तोंडाने कठीण आहे असे म्हणायचे॥ ९४५॥

वरी थोडेंचि अमृत घेतां। सर्वस्व वेंचो कां पांडुसुता। जेणें जोडे जीविता। अक्षय्यत्व॥ ९४६॥

अर्थ—आणखी अर्जुना, ज्याच्या योगाने जीवन अमर होणार त्या अमृताच्या अल्पप्राप्तीकरता देखील आपले सर्वस्व वेचावे लागले तरी हरकत नाहीं॥ ९४६॥

येर काह्यां मोलें वेंचूनि। विष पियावें घेउनि। आत्महत्येसि निमोनि। जायिजे जेणें॥ ९४७॥

अर्थ—ज्याच्या योगाने आत्महत्या (पातक) घडून मरण ओढवते असे विष मुद्दाम मोल देऊन कशाकरता प्यावयाचे?॥ ९४७॥

तैसें जाचूनियां इंद्रियें। वेचूनि आयुष्याचेनि दियें। सांचले पापीं आन आहे। दुःखावांचूनि॥ ९४८॥

अर्थ—त्याप्रमाणे इंद्रियांना कष्ट देऊन व आयुष्याचे दिवस खर्च करून साठवलेल्या पापामुळे दुःखावाचून आणखी काय मिळणार?॥ ९४८॥

म्हणोनि करावा स्वधर्मु। जो करितां हिरोनि घे श्रमु। उचित देईल परमु। पुरुषार्थराजु॥ ९४९॥

अर्थ—म्हणून ज्याचे आचरण करताच श्रमाचा परिहार होतो, तो स्वधर्मच आचरावा. उचित अशा सर्वश्रेष्ठ मोक्षाची प्राप्ती तोच करून देईल॥ ९४९॥

याकारणें किरीटी। स्वधर्मांचिये रहाटी। न विसंबिजे संकटीं। सिद्धमंत्र जैसा॥ ९५०॥

अर्थ—ज्याप्रमाणे संकटाचे वेळी सिद्धमंत्र सोडू नये त्याप्रमाणे या करताच अर्जुना, स्वधर्माचे आचरण सोडू नये॥ ९५०॥

कां नाव जैसी उदधीं। महारोगीं दिव्यौषधी। न विसंबिजे तया बुद्धी। स्वकर्म येथ॥ ९५१॥

अर्थ—किंवा समुद्रांत जशी नाव सोडूं नये किंवा महारोग्याने जसा दिव्यौषधीचा त्याग करूं नये त्याप्रमाणे स्वकर्माचे आचरण करण्याचा निश्चय सोडू नये.॥ ९५१॥

मग ययाचि गा कपिध्वजा। स्वकर्मांचिया महापूजा। तोषला ईश तमरजा। झाडा करूनि॥ ९५२॥
शुद्धसत्त्वाचिया वाटा। आणी आपुली उत्कंठा। भव स्वर्ग काळकूटा। ऐसें दावी॥ ९५३॥

अर्थ—मग अर्जुना, या स्वकर्माचरणरूप महापूजेने संतुष्ट झालेला भगवान् तमोगुण व रजोगुण यांचा नाश करून॥ ९५२॥ आपल्या उत्कंठेला शुद्ध सत्वगुणाच्या वाटेला आणतो आणि ऐहिक व पारलौकिक भोग काळकूट विषाप्रमाणे (त्याज्य) आहेत हे दाखवतो॥ ९५३॥

जिये वैराग्य येणें बोलें। मागां संसिद्धी रूप केलें। किंबहुना तें आपुलें। मेळवी खागें॥ ९५४॥

अर्थ—वैराग्य या शब्दाने मागे संसिद्धीचे निरूपण केले किंबहुना तेच आपले अंतिम स्थान तो मिळवतो॥ ९५४॥

मग जिंतिलिया हे भोये। पुरुष सर्वत्र जैसा होये। कां जालाही जें लाहे। तें आतां सांगों॥ ९५५॥

अर्थ—ही वैराग्याची भूमी प्राप्त झाली म्हणजे तो पुरुषच जसा सर्वत्र असतो व त्या स्थितीत त्याला काय लाभ होतो हे आता सांगतो॥ ९५५॥

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः। नैष्कर्म्यसिद्धिं परमां सन्न्यासेनाधिगच्छति॥ ४९॥

अर्थ—ज्याची बुद्धी कोठेही आसक्त होत नाही ज्याने आपले अंत:करण आपल्या स्वाधीन ठेवले आहे व जो देह भोगादिकांचे ठिकाणी तृष्णारहित आहे असा मनुष्य संन्यासाच्या योगाने श्रेष्ठ अशा निष्कर्मतारूप सिद्धीला प्राप्त होतो॥ ४९॥

तरी देहादिक हें संसारें। सर्वही मांडलेंसे जें गुंफिरें। तेथ नातुडे तो वागुरे। वारा जैसा॥ ९५६॥

अर्थ—ज्या प्रमाणे जाळ्यामध्ये वारा सापडत नाही, त्याप्रमाणे देहादिक संसाररूपी हा सर्व जो गुंताडा मांडला गेला त्यात तो सांपडत नाही॥ ९५६॥

पैं परिपाकाचिये वेळे। फळ देठें ना देठू फळें। न धरें तैसें स्नेह खुळें। सर्वत्र होय॥ ९५७॥

अर्थ—फळ पिकायला आले म्हणजे फळाला जसे देठ धरत नाहीं किंवा देठाला फळ धरत नाही त्याप्रमाणे ज्याचे सर्व ठिकाणचे प्रेम (संसारावरील) क्षीण होते.॥ ९५७॥

पुत्र वित्त कलत्र। हे जालियाही स्वतंत्र। माझें न म्हणे पात्र। विषाचें जैसें॥ ९५८॥

अर्थ—विषयुक्त अन्नाने भरलेले ताट ज्याप्रमाणे कोणींही माझे असे म्हणत नाही, त्याप्रमाणे मुल, पैसा व बायको ही आपल्या स्वाधीन असूनही तो त्यांना माझें म्हणत नाही॥ ९५८॥

हें असो विषयजातीं। बुद्धी पोळली ऐसी माघौती। पाउलें घेऊनि एकांतीं। हृदयाच्या रिगे॥ ९५९॥

अर्थ—फार काय सांगावे बुद्धी संपूर्ण विषयापासून (पोळल्याप्रमाणे) मागल्या पावलीच परत फिरते व हृदयाच्या एकांतात शिरते. (आत्मस्वरूपाकडे लागते).॥ ९५९॥

ऐसया अंत:करण। बाह्य येतां तयाची आण। न मोडी समर्था भेण। दासी जैसी॥ ९६०॥

अर्थ—स्वामीच्या भीतीने दासी ज्याप्रमाणे बाहेर न येण्याची शपथ मोडीत नाही, त्याप्रमाणे असे आत्मस्वरूपाकडे लागलेले अंत:करण बाहेर विषयाकडे धांव घेत नाही॥ ९६०॥

तैसें ऐक्याचिये मुठी-। माजिवडें चित्त किरीटी। करूनि वेधीं नेहटी। आत्मयाच्या॥ ९६१॥

अर्थ—अशा प्रकारे अर्जुना साधक अंत:करणाला आत्मैक्याच्या मुठीमध्ये ठेवून व त्या अंत:करणाला आत्म्याचा ध्यास लावतो॥ ९६१॥

तेव्हा दृष्टादृष्ट स्पृहे। निमणें जालेंचि आहे। आगी दडपलिया धुयें। राहिजे जैसें॥ ९६२॥

अर्थ—त्यावेळी अग्नी धुळेने दडपला म्हणजे जसा आपोआप नाहीसा होतो त्याप्रमाणे इहलोकाची व परलोकाची भोगेच्छा सहजच नष्ट होते॥ ९६२॥

म्हणौनि नियमिलिया मानसीं। स्पृहा नासोनि जाय आपैसी। किंबहुना तो ऐसी। भूमिका पावे॥ ९६३॥

अर्थ—म्हणून मनाचे नियंत्रण (निग्रह) केले की इच्छा आपोआपच नाहीशी होऊन जाते. किंबहुना त्याला (साधकाला) अशी (निष्काम) अवस्था प्राप्त होते॥ ९६३॥

पैं अन्यथा बोधु आघवा। मावळोनि तया पांडवा। बोधमात्रींचि जीवा। ठावो होय॥ ९६४॥

अर्थ—अर्जुना, संपूर्ण विपरीत ज्ञान (अज्ञान) त्याचे नाहीसे होऊन केवळ ज्ञानाच्या ठिकाणी त्याच्या अंत:करणाचा निश्चय स्थिर होतो. ॥ ९६४॥

धरवणी वेंचें सरे। तैसें भोगें प्राचीन पुरे। नवें तंव नुपकरे। कांहींचि करूं॥ ९६५॥

अर्थ—जसे धरून ठेवलेले (साठवलेले) पाणी खर्च केले म्हणजे संपते, तसे प्रारब्धकर्म हे भोगल्याने नाहीसे होते. आणि नवीन कर्म (क्रियमाण) तर पापपुण्य निर्माण करण्यास (अहंकार नसल्यामुळे) कामी येत नाही॥ ९६५॥

ऐशी कर्में साम्यदशा। होय तेथ वीरेशा। मग श्रीगुरु आपैसा। भेटेचि गा॥ ९६६॥

अर्थ—अशा कर्मांच्या योगाने हे वीर श्रेष्ठा अर्जुना! जेव्हा साम्यावस्था प्राप्त होते, तेव्हा आपोआपच श्रीगुरुची भेट होते॥ ९६६॥

रात्रीची चौपाहरी। वेंचलिया अवधारीं। डोळ्या तमारी। मिळे जैसा॥ ९६७॥

अर्थ—हे पहा रात्रीचे चार प्रहर संपले म्हणजे ज्याप्रमाणे डोळ्याला अंधकाराचा नाश करणाऱ्या सूर्याचे दर्शन होते॥ ९६७॥

का येऊनि फळाचा घडु। पारुषवी केळीची वाढु। गुरु भेटोनि करी पाडु। मुमुक्षू तैसा॥ ९६८॥

अर्थ—किंवा फळांचा घड आला म्हणजे तो केळीची वाढ जशी खुंटवितो त्याप्रमाणे श्रीगुरुची भेट होताच तसा प्रकार मुमुक्षूचा होतो (त्याचे कर्मकर्तृत्व सर्व बंद पडते)॥ ९६८॥

मग आलिंगिला पूर्णिमा। जैसा उणीव सांडी चंद्रमा। तैसें होय वीरोत्तमा। गुरुकृपा तया॥ ९६९॥

अर्थ—पौर्णिमेने आलिंगन दिलेला चंद्रमा ज्याप्रमाणे आपला सर्व कमीपणा टाकून देतो (आपल्या संपूर्ण प्रकाशाने प्रकाशतो) त्याप्रमाणे हे शूरश्रेष्ठा अर्जुना, गुरुकृपेने साधकाची तशी स्थिती होते (परिपूर्णदशा बाणते)॥ ९६९॥

तेव्हां अबोधुमात्र असे। तो तंव तया कृपा नासे। तेथ निशीसवें जैसें। आंधारें जाय॥ ९७०॥

अर्थ—रात्री बरोबर ज्याप्रमाणे अंधार नाहीसा होतो, त्याप्रमाणे अज्ञान म्हणून जेवढे असते तेवढे सारे त्यांच्या (श्रीगुरुंच्या) कृपेने नाहीसे होते॥ ९७०॥

तैसी अबोधाचिये कुशी। कर्म कर्ता कार्य ऐशी। त्रिपुटी असे ते जैसी। गाभिणी मारिली॥ ९७१॥

अर्थ—त्याचप्रमाणे अज्ञानाच्या पोटात कर्म, कर्ता व कार्य ही जी त्रिपुटी असते; ती, गर्भिणीला मारल्याप्रमाणे समूळ नष्ट होते. (गर्भिणीला मारल्यानंतर जसा तिच्या पोटांतील गर्भ नाहीसा व्हावा त्याप्रमाणे)॥ ९७१॥

तैसेंचि अबोधनाशासवें। नाशे क्रियाजात आघवें। ऐसा समूळ संभवे। संन्यासु हा॥ ९७२॥

अर्थ—त्याचप्रमाणे अज्ञानाच्या नाशाबरोबरच संपूर्ण कर्म म्हणून जितके आहे तितके सर्व नाश पावते. अशा प्रकारे हा समूळ संन्यास घडतो. (खराखुरा किंवा संपूर्ण कर्म त्याग)॥ ९७२॥

येणें मूळज्ञान संन्यासें। दृश्याचा जेथ ठावो पुसे। तेथ बुझावें तें आपैसें। तोचि आहे॥ ९७३॥

अर्थ—त्यामुळे मूळ अज्ञानाच्या नाहीसे होण्याने सर्व दृश्य पसारा नष्ट झाला मग जाणावयाचे जे ते, तो आपण स्वत: होतो॥ ९७३॥

चेइलियावरी पाहीं। स्वप्नींचिया तिये डोहीं। आपणयातें काई। काढूं जाइजे॥ ९७४॥

अर्थ—(अर्जुना) असे पाहा की, स्वप्नातून जागे झाल्यानंतर स्वप्नांतील डोहातून आपल्याला काय काढावे लागते ?॥ ९७४॥

तैं मी नेणें आतां जाणेन। हें सरलें तया दु:स्वप्न। जाला ज्ञातृज्ञेयाविहीन। चिदाकाश॥ ९७५॥

अर्थ—तेव्हा पूर्वी मला कळत नव्हते आता मी जाणतो हे त्याचे दु:स्वप्न नष्ट होते व ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय यांच्या (त्रिपुटी) कल्पनेविरहित तो केवळ चैतन्यस्वरूप होतो॥ ९७५॥

मुखाभासेंसीं आरिसा। परौता नेलिया वीरेशा। पाहातेपणेंवीण जैसा। पाहाता ठाके॥ ९७६॥

अर्थ—हे वीरश्रेष्ठा अर्जुना मुखाच्या प्रतिबिंबासहित आरसा दूर नेल्यावर ज्याप्रमाणे पहाणारा हा पहातेपणाशिवाय राहतो॥ ९७६॥

तैसें नेणणें जें गेलें। तेणें जाणणेंही नेलें। मग निष्क्रिय उरलें। चिन्मात्रचि॥ ९७७॥

अर्थ—त्याप्रमाणे अज्ञान जेव्हा नाहीसे होते, तेव्हां ते ज्ञानासही (सापेक्षज्ञान) घेऊन जाते. मग केवळ निष्क्रिय ज्ञान मात्र शिल्लक राहते॥ ९७७॥

तेथ स्वभावें धनंजया। नाहीं कोणीचि क्रिया। म्हणौनि प्रवादु तया। नैष्कर्म्य ऐसा॥ ९७८॥

अर्थ—अर्जुना, या चैतन्याच्या ठिकाणी स्वभावत:च कोणतीही क्रिया राहत नसल्यामुळे त्याला नैष्कर्म्य असे म्हणतात॥ ९७८॥

तें आपुलें आपणपें। असतचि होऊनि हारपे। तरंगु कां वायुलोपें। समुद्रु जैसा॥ ९७९॥

अर्थ—ज्याप्रमाणे वाऱ्यामुळे उत्पन्न होणाऱ्या लाटा वारा बंद झाला म्हणजे जशा समुद्ररूप होऊन जातात त्याप्रमाणे आपल्याला आपले जे यथार्थज्ञान होते (ते वृत्तिरूप व सापेक्ष असल्यामुळे) (अहंब्रह्मास्मिरूप ज्ञान) तेही खोटे ठरून आपल्या आत्मस्वरूपाच्या ठिकाणी ते विलीन होते. (एकरूप होते)॥ ९७९॥

तैसें न होणें निपजे। ते नैष्कर्म्यसिद्धि जाणिजे। सर्वसिद्धींत सहजें। परम हेचि॥ ९८०॥

अर्थ—त्याचप्रमाणे मी ब्रह्मस्वरूप आहे हीही वृत्ति न उठणे ही जी स्थिती प्राप्त होते तीच 'नैष्कर्म्य सिद्धी' आहे हे समज. साहजिकच सर्व सिद्धीमध्ये ही सर्वश्रेष्ठ आहे॥ ९८०॥

देउळाचिया कामा कळसु। परम गंगेसी सिंधुप्रवेशु। कां सुवर्णशुद्धी कसु। सोळावा जैसा॥ ९८१॥
तैसें आपुलें नेणणें। फेडीजे का जाणणें। तेंही गिळूनि असणें। ऐसी जे दशा॥ ९८२॥
तियेपरतें कांहीं। निपजणें येथ नाहीं। म्हणौनि म्हणिपे पाहीं। परमसिद्धि ते॥ ९८३॥

अर्थ—कळस बसल्यावर ज्याप्रमाणे देवळाच्या कामाची समाप्ती होते, किंवा गंगेने समुद्रात प्रवेश केला म्हणजे पुढे तिचा प्रवाह बंद होतो, किंवा सोळा आणे कस लागला म्हणजे सोन्याच्या शुद्धीची क्रिया थांबते॥ ९८१॥ त्याप्रमाणे आपले अज्ञान ज्या ज्ञानाने (अहंब्रह्मास्मिरूप वृत्तिज्ञानाने) नाहीसे केले तेही ज्ञान (वृत्तिरूप व सापेक्ष असल्यामुळे) नाहीसे होऊन जी स्थिती येते॥ ९८२॥ त्या स्थितीपेक्षा किंवा दशेपेक्षा आता पलीकडे काहीही प्राप्त व्हावयाचे रहात नाही. म्हणूनच तिला 'परमसिद्धी' असे म्हणतात॥ ९८३॥

गूढार्थदीपिका—ओवी क्रमांक ९८२.

अज्ञान नाहीसे झाल्यावर तत्सापेक्ष ज्ञानही नाहीसे व्हावयाला पाहिजे. अज्ञानाबरोबरच तत्सापेक्ष ज्ञान नाहीसे झाले म्हणजे मग क्रियारहित असे केवळ ज्ञानमात्रच राहते.

झोपेतील 'मी निजलो' याचे विस्मरण व 'मी आता जागा झालो' याचे स्मरण हे दोन्हीही नाहीसे झाल्यावर जसे आपण राहतो तशी आत्मवस्तु आहे. जमीनीवर मडके ठेवले असता ती जमीन मडक्यासह आहे असे आपण

म्हणतो, मडके जमीनीवरून काढून घेतले असता जमीन आता मडक्या विरहित झाली असे आपण म्हणतो. पण वस्तुत: मडक्याच्या असण्या व नसण्याचा जमीनीशी कांही संबंध नसतो, त्याप्रमाणे आपण अत्यंत शुद्ध म्हणजे 'आहे-नाही' या भाव विरहित असायला पाहिजे. "निदेचे नाहींपण। निमालियाहि जागेपण। असिजे कां तेण। कोण होऊनि जैसे॥ ४१ ॥ कां भूमि कुंभ ठेविजे। तै सकुंभता आपजे। तो नेलिया म्हणीजे। तेणेविण॥ ४२ ॥ तरी दोन्ही हे भाव। न शिवती भूमीचे अंग। तेवेळी भूमि तैसे चांग। चोख जे असणे॥ ४३ ॥ अमृतानुभव प्रक० ४

ज्ञानमात्र स्वरूपाच्या ठिकाणी जाणीव देखील उठणे योग्य नाही. कारण ज्ञानमात्र स्वरूप म्हणजेच आपल्या किंवा दुसऱ्या कोणाच्या ज्ञानाचा विषय न होणारे स्वरूप होय. तेव्हा स्वाभाविक शुद्ध आत्मस्वरूपस्थिती म्हणजे आपल्या किंवा दुसऱ्या कशाच्याही अस्तित्वाची किंवा नाहीपणाची, दोहोचीही जाणीव न होणे होय. आत्मस्वरूप केवळ ज्ञानस्वरूप मात्र आहे म्हणून आत्मस्वरूप होण्या करता जीवाला जाणीव नेणीव विरहित जाणीवस्वरूप होऊन राहिले पाहिजे. आचार्यांनीही हेच सांगितले आहे. "अस्तीति प्रत्ययोयश्च यश्च नास्तीति वस्तुनि। बुद्धेरेव गुणावेतौ नतु नित्यस्य वस्तुन:" विवेक चूडामणि श्लोक ५७३

परी हेंचि आत्मसिद्धि। जो कोणी भाग्यनिधि। श्रीगुरुकृपालब्धि-। काळीं पावे॥ ९८४॥

अर्थ—परंतु हीच आत्मप्राप्ती श्रीगुरुकृपा प्राप्त होण्याची वेळ आली म्हणजे, जो कोणी भाग्यशाली पुरुष असेल, त्यालाच प्राप्त होते. ॥ ९८४ ॥

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे। समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा॥ ५०॥

अर्थ—अर्जुना, ही ज्ञाननिष्ठायोग्यतारूप सिद्धी ज्याला प्राप्त झाली आहे, त्याला ब्रह्माची प्राप्ती कशी होते ते मी थोडक्यात सांगतो, समजून घे. ही जी ब्रह्मप्राप्ती तोच ज्ञानाची परमसीमा होय॥ ५० ॥

उदयजतांचि दिनकरु। प्रकाशुचि आते आंधारु। कां दीपसंगें कापुरु। दीपुचि होय॥ ९८५॥
तया लवणाची कणिका। मिळतखेंवो उदका। उदकचि होऊनि देखा। ठाके जेवीं॥ ९८६॥
कां निद्रित चेवविलिया। स्वप्नेंसि निद वायां। जाऊनि आपणपया। मिळे जैसा॥ ९८७॥
तैसें जया कोण्हासि दैवें। गुरुवाक्य श्रवणाचिसवें। द्वैत गिळोनि विसंवे। आपणया वृत्ती॥ ९८८॥

अर्थ—सूर्य उगवताच जसा अंधारच प्रकाश होऊन जातो किंवा कापराला दिव्याचा स्पर्श होताच तो दिवाच होऊन जातो॥ ९८५ ॥ किंवा मिठाचा एक कण पाण्यांत मिसळताच तो ज्याप्रमाणे पाणीच होऊन जातो॥ ९८६ ॥ किंवा झोपलेल्याला जागे केल्यावर स्वप्नासह त्याची झोप नाहीशी होऊन तो पुन्हा आपल्या मूळ स्वरूपात येतो॥ ९८७॥ तशी दैवयोगाने सद्‌गुरुचा उपदेश ऐकल्याबरोबर ज्या कोणीचा वृत्ती भेदाचा नाश करून आत्मस्वरूपाच्या ठिकाणी स्थिरावते॥ ९८८ ॥

तयासी मग करणें। हें बोलिजैलचि कवणें। आकाशा येणें जाणें। आहे काई॥ ९८९॥

अर्थ—त्या ज्ञान्याला मग कर्म करण्याचे उरते असे कोण म्हणेल? आकाशाला येणे जाणे आहे काय? ॥ ९८९ ॥

म्हणौनि तयासि कांहीं। त्रिशुद्धि करणें नाहीं। परी ऐसें जरी हें कांहीं। नव्हे जया॥ ९९०॥

अर्थ—म्हणून त्याला निश्चये करून काहीही करावयाचे रहात नाही. पण असेही काही ज्याला घडणार नाही॥ ९९० ॥

कानावचनाचिये भेटी-। सरिसाचि पैं किरीटी। वस्तु होऊनि उठी। कवणि एक जो॥ ९९१॥

अर्थ—अर्जुना आपल्या कानाची व श्रीगुरुच्या वचनाची गाठ पडताक्षणीच जो कोणी एखादाच ब्रह्मस्वरूप होतो॥ ९९१ ॥

गूढार्थदीपिका—ओवी क्रमांक ९९१. कानावचनाचिये भेटी—

सद्‌गुरुच्या उपदेशाशिवाय ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होते ही गोष्ट अद्वैत वेदान्ताला मान्य नाही. त्यामुळेच भारतात

असलेल्या बहुतेक सर्व संप्रदायात गुरूपदेशाचे महत्व मान्य करण्यात आले आहे. काही संप्रदायात तर दीक्षाविधी व शक्तिपात याचेही महत्व वर्णन करण्यात आले आहे. विचारांनी जसा मनाचा पालट होतो तसाच सद्‌गुरुंच्या वाणीच्या सामर्थ्याने मनाचा पालट होतो. अधिकारी असलेल्या शिष्याच्या ठिकाणी आपल्या शक्तीचा पात करून समाधि सुखाची थोडीशी चुणूकही अधिकारी सद्‌गुरु क्वचित दाखवून देतात. मुकुंदराजांच्या चरित्रात अशा तऱ्हेचा उल्लेख आलेला आहे.

शास्त्रांनी सांगितलेला मोक्षाचा मार्ग सर्वांना अध्ययनाने माहीत झाला तरी त्याचे आचरण करणे सुलभ नाही. प्रत्येकाच्या मनाची ठेवण निरनिराळी असते व विचार आणि विकार यांची गुन्तागुन्त प्रत्येकाच्या मनाची अलग अलग असते. ही गुन्तागुन्त सोडवण्यास श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरुशिवाय दुसऱ्या कोणाचीही मदत होऊं शकत नाही. साधन चतुष्टय संपन्न असलेला शिष्यदेखील या मनाच्या गुन्तागुन्तीत सांपडलेला असतो व केवळ आपल्या स्वत:च्या विचारांच्या सामर्थ्यावर तो मोक्षाचा मार्ग निष्कंटक आक्रमू शकत नाही. त्याच्या मनाची घडण लक्षात घेऊन सद्‌गुरु निरनिराळ्या प्रकृत्या ह्याच्या प्रेमाकरता रचून व त्याच्या संशयाची निवृत्तीकरून त्याला आत्मबोध करतात. अर्थातच मनाच्या या विविध घडणीमुळे सत्‌शिष्यांचेही अनेक भेद होत असतात. मात्र या सर्व सत्‌शिष्यांना अपवादभूत व म्हणूनच ललामभूत असलेला असा एखादाच शिष्य निघतो की जो सद्‌गुरुंचा बोध कानी पडताच एकदम आत्मस्वरूप होतो. अशा शिष्याची मनोभूमी वैराग्यादी साधन चतुष्टयामुळे इतकी परिपक्व झालेली असते की सद्‌गुरूंनी आत्मबोधाचे बीज त्यात टाकून आपल्या अमृतवाणीचा वर्षाव करताच तो अर्थानुरूप होतो व त्याला आत्मस्वरूपाचे कोंभ फुटतात, अर्थातच ही अलौकिक शिष्याची स्थिती आहे यात काही संशय नाही.

ए्हवीं स्वकर्मांचेनि वन्ही। काम्यनिषिद्धाचिया इंधनीं। रजतमें कीर दोन्ही। जाळिलीं आधीं॥ ९९२॥

अर्थ—सामान्यत: त्याने स्वविहित कर्माच्या अग्नीमध्ये काम्य व निषिद्धाच्या इंधनाने रज आणि तम ही दोन्हीही आधीच जाळून टाकलेली असतात॥ ९९२॥

पुत्र वित्त परलोक। यया तिहींचा अभिलाख। घरीं होय पाइक। हेंही जालें॥ ९९३॥

अर्थ—मुलगा, द्रव्य व परलोक या तिन्ही विषयींची अभिलाषा ज्याच्या घरी दासी होऊन राहिली हीहि गोष्ट घडून आली॥ ९९३॥

इंद्रियें सैरा पदार्थीं। रिगतां विटाळलीं होतीं। तियें प्रत्याहार तीर्थीं। न्हाणिलीं कीर॥ ९९४॥

अर्थ—इंद्रियांनी स्वैरपणे (धर्म्याधर्म्यांचा विचार न करता) विषयांच्या ठिकाणी प्रवेश केल्यामुळे ती इंद्रिये विटाळली होती त्यांना (शुद्ध करण्याकरिता) प्रत्याहाररूपी तीर्थात स्नान घातले॥ ९९४॥

आणि स्वधर्माचें फळ। ईश्वरीं अर्पूनि सकळ। घेऊनि केलें अढळ। वैराग्यपद॥ ९९५॥

अर्थ—आणि स्वधर्म आचरण्याचे संपूर्ण फळ ईश्वराच्या ठिकाणी समर्पण करून त्याच्यायोगाने वैराग्याचे पद अढळ करून टाकले॥ ९९५॥

ऐसी आत्मसाक्षात्कारीं। लाभे ज्ञानाची उजरी। ते सामुग्री कीर पुरी। मेळविली॥ ९९६॥

अर्थ—आत्मसाक्षात्कारामध्ये ज्ञानाचा उत्कर्ष साधण्याकरता अशी जितकी म्हणून सामग्री असेल तितकी त्याने जुळविली॥ ९९६॥

आणि तेचि समयीं। सद्‌गुरु भेटले पाहीं। तेवींचि तिहीं कांहीं। वंचिजेना॥ ९९७॥
परी वोखद घेतखेंवो। काय लाभे आपुला ठावो। का उदयजतांचि दिवो। मध्यान्ह होय॥ ९९८॥
सुक्षेत्रीं आणि वोल्टे। बीजही पेरिलें गोमटें। तरी आलोट फळ भेटे। परी वेळे कीं गा॥ ९९९॥
जोडला मार्ग प्रांजळ। मिनला सुसंगाचाही मेळ। तरी पाविजे वांचूनि वेळ। लागेचि कीं॥ १०००॥

अर्थ—आणि त्याचवेळीं सद्‌गुरुंची भेटही झाली, आणि त्यांनी उपेक्षांही केली नाही (यथार्थ ज्ञानाचा बोध केला). ॥ ९९७॥ परंतु औषध घेताक्षणीच (रोगमुक्त होऊन) आपले मूळ स्वास्थ्य प्राप्त होते काय? किंवा सूर्य

उगवताच दुपार होते काय?॥ ९९८ ॥ चांगल्या आणि ओलावा असलेल्या शेतात उत्तम बी पेरले तर अमाप पीक देईल हे निश्चित. पण बाबारे थोडा वेळ लागेलच!॥ ९९९ ॥ सरळ रस्ता सांपडला चांगल्या लोकांची सोबतही मिळाली तर मुक्कामी पोहोचणारच. शिवाय थोडावेळ लागायचा तो लागणारच॥ १००० ॥

तैसा वैराग्यलाभ जाला। वरी सद्गुरुही भेटला। जीवीं अंकुरु फुटला। विवेकाचा॥ १००१ ॥
तेणें ब्रह्म एक आथी। येर आघवीचि भ्रांती। हेंही कीर प्रतीती। गाढी केली॥ १००२ ॥
परी तेंचि जें परब्रह्म। सर्वात्मक सर्वोत्तम। मोक्षाचेंही काम। सरे जेथ॥ १००३ ॥
यया तिन्ही अवस्था पोटीं। जिरवी जें गा किरीटी। तया ज्ञानासिही मिठी। दे जे वस्तु॥ १००४ ॥
ऐक्याचें एकपण सरे। जेथ आनंदकणुही विरे। कांहीचि नुरोनि उरे। जें कांहीं गा॥ १००५ ॥
तिये ब्रह्मीं ऐक्यपणें। ब्रह्मचि होऊनि असणें। तें क्रमेंचि करूनि तेणें। पाविजे पैं॥ १००६ ॥

अर्थ—याप्रमाणे वैराग्याची प्राप्ती झाली त्यात सद्गुरुही भेटलेत व आत्मानात्म विवेकाचा अंत:करणात अंकुरही फुटला॥ १००१ ॥ त्यामुळे (आत्मानात्म विवेकामुळे) ब्रह्मच एक काय ते सत्य आहे बाकीचे सर्व भ्रांतिरूप आहे हाही दृढ़ अनुभव येऊन चुकला॥ १००२ ॥ परंतु तेच परब्रह्म जे सर्व व्यापक व सर्वोत्तम आहे; मोक्षाचेही प्रयोजन ज्या ठिकाणी (ब्रह्मानुभवात) समाप्त होते॥ १००३ ॥ जे ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान या त्रिपुटीला किंवा जागृति, स्वप्न व सुषुप्ती या अवस्थांना गिळून टाकते इतकेच नाही तर अर्जुना जी ब्रह्मवस्तु ज्ञानाचीही (ऐक्यरूप) जाणीव नाहीशी करते॥ १००४ ॥ ज्या ठिकाणी ब्रह्माच्या ऐक्याची जाणीवही नाहीशी होते, व आनंदाच्या जाणीवेचाही कण विरून जातो व काहीही शिल्लक न राहता (जाणीव नेणीव दोन्हीही) जे अवशिष्ट राहते (चिन्मात्र स्वरूप)॥ १००५ ॥ त्या ब्रह्माच्या ठिकाणी एकरूपतेने ब्रह्मच होऊन राहणे ही स्थिती त्याला (साधकाला) क्रमाक्रमानेच प्राप्त होते॥ १००६ ॥

भुकेलियापासीं। वोगरिलें षड्रसीं। तो तृप्ति प्रतिग्रासीं। लाहे जेवीं॥ १००७ ॥
तैसा वैराग्याचा वोलावा। विचाराचा तो दिवा। आंबुथितां आत्मठेवा। काढीची तो॥ १००८ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे भुकेल्याला षड्रस अन्नाचे भोजन वाढले असता त्याला जशी प्रत्येक घासाबरोबर तृप्ती होत जाते॥ १००७ ॥ त्याप्रमाणे वैराग्याचे तेल मिळून विवेकाचा दिवा प्रज्वलित झाला असता तो आत्मज्ञानाचा ठेवा काढतोच. (आत्मप्राप्ती त्याला होते)॥ १००८ ॥

तरी भोगिजे आत्मऋद्धी। येवढी योग्यतेची सिद्धी। जयाच्या आंगीं निरवधी। लेणें जाली॥ १००९ ॥
तो जेणें क्रमें ब्रह्म। होणें करी गा सुगम। तया क्रमाचें आतां वर्म। आईक सांगों॥ १०१० ॥

अर्थ—तर आत्मस्वरूपाचे ऐश्वर्य भोगावे एवढ्या योग्यतेची सिद्धी ज्याच्या (साधकाच्या) अंगावर कायमचा अलंकार होऊन राहिली आहे॥ १००९ ॥ तो (साधक) ज्या क्रमाक्रमाने ब्रह्मप्राप्ती सुलभ करून घेतो त्या क्रमाचे वर्म आता सांगतो ते ऐक॥ १०१० ॥

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च। शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च॥ ५१ ॥

अर्थ—अत्यंत शुद्ध बुद्धीने युक्त होऊन धैर्याने आपल्या मनाचा निग्रह करून व शब्दादी विषयांचा त्याग करून प्रीति व द्वेष नाहीसे करून टाकतो॥ ५१ ॥

तरी गुरु दाविलिया वाटा। येऊनि विवेकतीर्थतटा। धुऊनियां मळकटा। बुद्धीचा तेणें॥ १०११ ॥
मग राहूनें उगळिली। प्रभा चंद्रें आलिंगिली। तैसी शुद्धते जडली। आपणयां बुद्धि॥ १०१२ ॥

अर्थ—सद्गुरुंनी दाखविलेल्या मार्गाने जाऊन विवेकरूपी तीर्थाच्या काठी बुद्धीचा मळ धुवून टाकतो॥ १०११ ॥ मग ज्याप्रमाणे राहूच्या ग्रासातून मुक्त झालेली चंद्राची प्रभा चंद्राकडून आलिंगिली जाते, त्याप्रमाणे बुद्धी शुद्ध होऊन (मूळच्या) आत्मस्वरूपाशी एकरूप होते॥ १०१२ ॥

सांडूनि कुळें दोन्ही। प्रियासी अनुसरे कामिनी। द्वंद्वत्यागें स्वचिंतनीं। पडली तैसी॥ १०१३ ॥

अर्थ—सासर व माहेर ही दोन्ही कुळे टाकून देऊन (त्यांचा अभिमान व स्नेह) पतिव्रता स्त्री जशी आपल्या पतीलाच अनुसरते, त्याप्रमाणे द्वंद्वाचा (सुखदुःखादींचा) त्याग करून बुद्धी केवळ आत्मचिंतनातच मग्न होऊन राहते॥ १०१३॥

आणि ज्ञाना ऐसें जिव्हार। नेवों नेवों निरंतर। इंद्रियीं केले थोर। शब्दादिक जे॥ १०१४॥
ते रश्मिजाळ काढलेया। मृगजळ जाय लया। तैसें धृतिरोधें तयां। पांचांही केलें॥ १०१५॥

अर्थ—आणि आत्मज्ञानासारख्या जिव्हाळ्याच्या वस्तूला दूरदूर ठेऊन इंद्रियांनी ज्या शब्दादिक विषयांचे स्तोम माजविले॥ १०१४॥ ते (इंद्रियांचे) पाच विषय, सूर्याच्या किरणांचा समुदाय (काढून घेतल्यावर) निघून गेल्याबरोबर ज्याप्रमाणे मृगजळ नाहीसे होते, त्याप्रमाणे इंद्रियाद्वारे धावणाऱ्या वृत्तींचा रोध करताच त्या नाहीशा होतात॥ १०१५॥

नेणतां अधमाचिया अन्ना। खादलिया कीजे वमना। तैसीं वोकविलीं सवासना। इंद्रियें विषयीं॥ १०१६॥

अर्थ—अजाणता नीचाचे अन्न खाल्ले असता ते ओकून टाकावे लागते, त्याप्रमाणे इंद्रियांकडून वासनेसह त्याने विषय ओकविले (त्याग केला)॥ १०१६॥

मग प्रत्यगावृत्ती चोखटें। लाविलीं गंगेचेनि तटें। ऐसीं प्रायश्चित्तें धुवटें। केली येणें॥ १०१७॥

अर्थ—मग ही इंद्रियें अंतर्मुखवृत्तीरूपी पवित्र गंगेच्या तीरावर आणून व प्रायश्चित्त देऊन त्याना शुद्ध केले॥ १०१७॥

पाठीं सात्त्विकें धीरें तेणें। शोधारलीं तियें करणें। मग मनेंसीं योगधारणें। मेळविलीं॥ १०१८॥

अर्थ—नंतर ती शुद्ध केलेली इंद्रिये सात्विक धैर्याच्या बळावर मनासह योग धारणेला लावली॥ १०१८॥

तेवींचि प्राचीनें इष्टानिष्टें। भोगेंसीं येउनी भेटे। तेथ देखिलियाही वोखटें। द्वेषु न करी॥ १०१९॥

अर्थ—तसेच प्रारब्धानुसार इष्टानिष्ट भोग त्याला प्राप्त होतात. त्यात अनिष्ट भोग वोढवला तरी तो त्याद्दल राग मानीत नाही॥ १०१९॥

ना गोमटेंचि विपायें। तें आणूनि पुढां सूये। तयालागीं न होये। साभिलाषु॥ १०२०॥

अर्थ—किंवा अकस्मात् चांगला भोग पुढे येऊन उभा राहिला तर त्याच्याबद्दल अभिलाषाही धरीत नाही॥ १०२०॥

यापरी इष्टानिष्टीं। रागद्वेष किरीटी। त्यजूनि गिरिकपाटीं। निकुंजीं वसे॥ १०२१॥

अर्थ—याप्रमाणे अर्जुना इष्ट येवो किंवा अनिष्ट येवो, त्याच्याविषयी (कोणत्याही प्रकारचा) रागद्वेष न बाळगतां तो पर्वताच्या गुहेत किंवा गुंफेत वास्तव्य करतो॥ १०२१॥

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः। ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः॥ ५२॥

अर्थ—तो एकांतवास करणारा, मिताहारी, वाणी शरीर व मन यांना स्वाधीन ठेवणारा, निरंतर ध्यान योगात रहाणारा आणि वैराग्याचा आश्रय करणारा असा असतो॥ ५२॥

गजबजा सांडिलिया। वसवी वनस्थळिया। अंगाचिया मांदिया। एकलेया॥ १०२२॥

अर्थ—लोकांनी गजबजलेले ठिकाण सोडून एकट्या शरीराच्या अवयवांच्या समुदायासह तो वनात वस्ती करतो॥ १०२२॥

शमदमादिकीं खेळे। न बोलणेंचि चावळे। गुरुवाक्याचेनि मेळें। नेणे वेळु॥ १०२३॥

अर्थ—तो शमदमादिकांमध्ये खेळतो, न बोलणेच बोलतो, व श्रीगुरुंनी केलेल्या उपदेश वाक्याच्या मननात सारखा तल्लीन असल्यामुळे वेळेचे देखील त्याला भान रहात नाही॥ १०२३॥

आणि आंगा बळ यावें। नातरी क्षुधा जावें। कां जीभेचे पुरावे। मनोरथ॥ १०२४॥

अर्थ—आणि आपल्या आंगात शक्ती यावी अथवा भूक निवावी किंवा जिभेचे चोचले पुरवावेत॥ १०२४॥

भोजन करितांविखीं। यया तिहींतें न लेखी। आहारीं मिती संतोषीं। माप न सूये॥ १०२५॥

अर्थ—या तिन्ही गोष्टी भोजन करताना त्याच्या मनात येत नाहीत. मोजक्या आहाराने त्याला होणाऱ्या संतोषाचे मोजमाप करिताच येत नाही॥ १०२५॥

अनशनाचेनि पावकें। हारपति प्राणु पोखे। इतुकि याचि भागु मोटकें। अशन करी॥ १०२६॥

अर्थ—उपवासाने जठराग्नी प्रक्षुब्ध होऊन प्राण नाश होईल म्हणून प्राणरक्षणा पुरतेच बेताचे अन्न सेवन करतो॥ १०२६॥

आणि परपुरुषें कामिली। कुळवधू आंग न घाली। निद्रालस्या न मोकली। अशन तैसें॥ १०२७॥

अर्थ—आणि परपुरुषाने इच्छा केली असता कुलीन स्त्री जशी त्याला थारा देत नाही, त्याप्रमाणे साधक निद्रा व आळस यांना वाव देत नाही. तसे त्याचे भोजन असते॥ १०२७॥

दंडवताचेनि प्रसंगें। भुयीं हन अंग लागे। वांचूनि येर नेघे। राभस्य तेथ॥ १०२८॥

अर्थ—(भगवंताला) साष्टांग नमस्कार घालतांना जे काय जमीनीला आंग लागेल ते लागेल त्या व्यतिरिक्त अविचाराने जमीनीवर लोळणे नाही॥ १०२८॥

देहनिर्वाहापुरतें। राहावटी हातांपायांतें। किंबहुना आपैतें। सबाह्य केलें॥ १०२९॥

अर्थ—देह चालण्यापुरताच हातापायांना राबवतो. फार काय सांगावे! त्याने अंतर्बाह्य (मन, शरीर व इंद्रियें) सर्व आपल्या स्वाधीन केलें॥ १०२९॥

आणि मनाचा उंबरा। वृत्तीसी देखों नेदी वीरा। तेथ कें वाग्व्यापारा। अवकाशु असे॥ १०३०॥

अर्थ—आणि अर्जुना, जो आपल्या वृत्तीला मनाचा उंबरठाही पाहू देत नाही (संकल्पविकल्पापर्यंत येऊ देत नाही) तेथे शब्दादिकांच्या व्यापाराला अवसर कोठे?॥ १०३०॥

ऐसेनि देह वाचा मानस। हे जिणौनि बाह्यप्रदेश। आकळिलें आकाश। ध्यानाचें तेणें॥ १०३१॥

अर्थ—अशा प्रकारें शरीर, वाणी व मन ही बाहेरची ठिकाणे जिंकून त्याने ध्यानाचे आकाश आपल्या स्वाधीन केले॥ १०३१॥

गुरुवाक्यें उठविला। बोधीं निश्चयो आपुला। न्याहाळी हातीं घेंतला। आरिसा जैसा॥ १०३२॥

अर्थ—श्री गुरुच्या उपदेशाने तो जागा झाला (अज्ञान नाहीसे होते) व आरसा हातात घेऊन आपले रूप स्पष्टपणे पहावे त्याप्रमाणे तो श्रीगुरुच्या बोधाच्या ठिकाणी आत्मस्वरूपाचा निश्चय पाहतो. (मी ब्रह्मस्वरूप आहे हा निश्चय तो करतो).॥ १०३२॥

पैं ध्याता आपणचि परी। ध्यानरूप वृत्तिमाझारीं। ध्येयत्वें घे हे अवधारीं। ध्यानरूढी गा॥ १०३३॥

अर्थ—तेव्हा अर्जुना, ऐक ध्यान करणारा (ध्याता) आपल्यालाच, ध्यानरूप झालेल्या वृत्तीमध्ये, ध्येयपणाने घेतो. हीं ध्यान करण्याची प्रसिद्ध रीत आहे॥ १०३३॥

तेथ ध्येय ध्यान ध्याता। ययां तिहीं एकरूपता। होय तंव पांडुसुता। कीजे तें गा॥ १०३४॥

अर्थ—तेव्हा अर्जुना, ध्येय, ध्यान आणि ध्याता (ही त्रिपुटी विसरून) या तिघांचीही एकरूपता होईपर्यंत हे ध्यान करावे लागते॥ १०३४॥

म्हणौनि तो मुमुक्षु। आत्मज्ञानीं जाला दक्षु। परी पुढांसूनि पक्षु। योगाभ्यासाचा॥ १०३५॥

अर्थ—म्हणून तो मुमुक्षू आत्मज्ञानामध्ये प्रवीण होतो. पण हे सर्व योगाभ्यासाचा पक्ष (मार्ग) पुढे करून (योगाभ्यासाचा आश्रय करून)॥ १०३५॥

अपानरंध्रद्वया-। माझारीं धनंजया। पार्ष्णी पिडूनियां। कांवरुमूळ॥ १०३६॥
आकुंचूनि अध। देऊनि तिन्हीं बंध। करूनि एकवद। वायुभेदा॥ १०३७॥
कुंडलिनी जागवूनि। मध्यमा विकाशूनि। आधारादि भेदूनि। अग्नीवरी॥ १०३८॥
सहस्त्रदळाचा मेघु। पीयूषें वर्षोनि चांगु। तो मूळवरी वोघु। आणूनियां॥ १०३९॥

नाचतया पुण्यगिरी। चिद्भैरवाच्या खापरीं। मनपवनाची खीचपुरी। वाढूनियां॥ १०४०॥

अर्थ—अर्जुना गुद व उपस्थ या दोन द्वारामधील जी शिवण आहे तिचा मध्य टाचेने दाबून॥ १०३६॥ अधोभाग (गुदस्थान) आकुंचन करून व मूळबंधादी तिन्ही बंध साधून आणि प्राणापानादी वायुभेदांची एकवाक्यता करून॥ १०३७॥ कुंडलिनी जागी करून, सुषुम्ना नाडीचा विकास करून व आधार चक्रापासून तो अग्निचक्रापर्यंत चक्रांचे भेदन करून॥ १०३८॥ सहस्रदळरूपी मेघांच्या अमृताचा चांगला वर्षाव करून तो (वर्षाव) मूलाधार चक्रापर्यंत आणून॥ १०३९॥ (आज्ञाचक्ररूपी) पुण्य पर्वतावर नाचत असलेल्या चैतन्यरूपी भैरवाच्या भिन्न पात्रात मन व प्राण यांची ऐक्यरूपी खिचडी वाढून॥ १०४०॥

जालिया योगाचा गाढा। मेळावा सूनि हा पुढां। ध्यान मागिलीकडां। स्वयंभ केलें॥ १०४१॥

अर्थ—योगाभ्यास चांगला दृढ झाल्यावर हा समुदाय (तीन बंधाचा) पुढे करून त्याच्या पाठीमागे ध्यानाला (ब्रह्मस्वरूपाच्या) स्वयंभू करून सोडतो॥ १०४१॥

आणि ध्यान योग दोन्ही। इये आत्मतत्त्वज्ञानीं। पैठी होआवया निर्विघ्नीं। आधींचि तेणें॥ १०४२॥
वीतरागतेसारिखा। जोडूनि ठेविला सखा। तो आघवियाचि भूमिका-। सवें चाले॥ १०४३॥

अर्थ—आणखी हे ध्यान व योग दोन्हीही ह्या आत्मतत्त्वज्ञानामध्यें निर्विघ्नपणे स्थिर होण्याकरता त्याने आधीच॥ १०४२॥ वैराग्यासारखा मित्र जोडून ठेवलेला असतो. तो (आरंभापासून तो ब्रह्मप्राप्तीपर्यंतच्या) सर्वभूमिकेवर त्याच्या बरोबर चालत असतो॥ १०४३॥

पाहावें ते दिसें तंववरी। दिठीतें न संडी दीप जरी। तरी कें आहे अवसरी। देखावया॥ १०४४॥

अर्थ—पहावयाची वस्तू दिसेपर्यंत दिव्याने डोळ्यांना जर सोडले नाही तर ती वस्तू दिसायला वेळ कोठे लागेल॥ १०४४॥

तैसें मोक्षीं प्रवर्तल्या। वृत्ती ब्रह्मीं जाय लया। तंव वैराग्य आथी तया। भंगु कैचा॥ १०४५॥

अर्थ—त्याप्रमाणे मोक्षाच्या ठिकाणी प्रवृत्त झालेल्या पुरुषाची (अहंब्रह्मास्मि) वृत्ती ब्रह्माच्या ठिकाणी लय पावेपर्यन्त त्याच्या बरोबर वैराग्य असते. मग त्याचा (वैराग्याचा) नाश कसला॥ १०४५॥

म्हणौनि सवैराग्यु। ज्ञानाभ्यासु तो सभाग्यु। करूनि जाला योग्यु। आत्मलाभा॥ १०४६॥

अर्थ—म्हणून वैराग्यासह जो ज्ञानाचा अभ्यास करतो तोच आत्मप्राप्तीला योग्य होतो तोच भाग्यवान होय॥ १०४६॥

ऐसी वैराग्याची अंगीं। बाणूनियां वज्रांगी। राजयोगतुरंगीं। आरूढला॥ १०४७॥

अर्थ—अशाप्रकारे वैराग्याचे चिलखत अंगावर चढवून राजयोगरूपी (अद्वैतस्वरूप निर्विकल्प समाधि) घोड्यावर तो साधक बसतो॥ १०४७॥

गूढार्थदीपिका—ओवी क्रमांक १०४७ राजयोग तुरंगी। आरूढला

आत्मज्ञान झाल्यावरही वैराग्यरूपी मित्र हा ज्ञान्याबरोबर शेवट पर्यंत रहात असतो. वैराग्यावाचून ज्ञान टिकणे शक्य रहात नाही म्हणून वैराग्यावाचून ज्ञानाची कल्पना करता येत नाही. म्हणूनच वैराग्यासह ज्ञानाचा अभ्यास करणारा ज्ञानीच आत्मप्राप्तीचा लाभ करूं शकतो असे माउली म्हणते.

(म्हणौनि सवैराग्यु। ज्ञानाभ्यासु तो सभाग्य)

असा वैराग्यशील आत्मज्ञानी ध्यान व अष्टांगयोग यांचा अभ्यास करून राजयोगरूपी घोड्यावर आरूढ होतो. राजयोग म्हणजे निर्विकल्प समाधि अवस्था. निर्विकल्प समाधी ही सर्व योगांमध्ये श्रेष्ठ योग असल्यामुळे त्याला ''राजयोग'' असे म्हणतात. ''योगानां राजा राजयोग:'' अशी राजयोगाची व्युत्पत्ती आहे. जीव व शिव यांच्या ऐक्याला 'योग' असे म्हणतात.

भगवान् शंकराचार्यांनी हा राजयोग प्राप्त झाला असता ज्ञान्याची कशी स्थिती होते ह्याचे वर्णन 'योगतारावलि'

या आपल्या प्रकरण ग्रंथात केले आहे. ते म्हणतात राजयोगात साधक ब्रह्मस्वरूप होतो, त्याच्या दृष्टीला लक्ष्याची गरज रहात नाही. चित्ताला ध्येयवस्तूच्या ठिकाणी लावावे लागत नाही. त्याला देशाचे वा काळाचे भान रहात नाही. त्याला प्राणायामाची गरज उरत नाही. धारणा व ध्यान यांचेही कष्ट करावे लागत नाही. [न दृष्ट लक्ष्याणि न चित्तबन्धो न देशकालौ न च वायुरोध:। न धारणा-ध्यान-परिश्रमो वा समेधमाने सति राजयोगे॥ योगतारावलि—श्लोक १४]

वरी आड पडिलें दिठी। सानें थोर निवटी। तें बळी विवेकमुष्टीं। ध्यानाचें खांडें॥ १०४८॥

अर्थ—(साधक) विवेकाच्या बळकट मुठीत ध्यानरूप तलवार धरून जे कांही लहान मोठे दृष्टीच्या आड आलेले असेल त्याचा तो संहार करीत सुटतो॥ १०४८॥

ऐसेनि संसाररणाआंतु। आंधारीं सूर्यु तैसा असे जातु। मोक्षविजयश्रीये वरैतु। होआवयालागीं॥ १०४९॥

अर्थ—अशा रीतीने अंधारात सूर्य जातो तसा संसाररूपी रणांगणांत मोक्षरूपी विजयश्री वरण्याकरता तो (साधक) चाल करून जातो॥ १०४९॥

अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम्। विमुच्य निर्मम: शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते॥ ५३॥

अर्थ—जो मनुष्य अहंकार, सामर्थ्य उन्मत्तपणा, काम, क्रोध व संग्रह करणे या प्रवृत्तींना टाकून देऊन व ममतारहित होउन शांत असतो तो ब्रह्मरूप होण्यास योग्य असतो. ॥ ५३॥

तेथ आडवावया आले। दोषवैरी जे धोपटिले। तयांमाजीं पहिले। देहाहंकारु॥ १०५०॥

अर्थ—या ठिकाणी दुष्ट शत्रू जे जे आडवे येतात व ज्यांना धोपटून काढावे लागते त्यातला म्होरक्या देहाहंकार हा आहे. ॥ १०५०॥

जो न मोकली मारुनी। जीवों नेदी उपजवोनी। विचंबवी खोडां घालुनी। हाडांचिया॥ १०५१॥
तयाचा देहदुर्ग हा थारा। मोडूनि घेतला तो वीरा। आणि बळ हा दुसरा। मारिला वैरी॥ १०५२॥

अर्थ—जो (अहंकार) मेल्यानंतरही (मनुष्याला) सोडत नाही व जन्मल्यावरही सुखाने जगू देत नाही तर हाडांच्या खोडात अडकवून जीवाला तो कुचंबत ठेवतो॥ १०५१॥ हे वीरा अर्जुना! त्या त्या अहंकाराचा देहरूपी किल्ला हा मुख्य आधार आहे. त्याचा पाडाव करून त्याने तो कार्बीज केला आणि बळ हा दुसरा शत्रू मारला॥ १०५२॥

जो विषयाचेनि नांवें। चौगुणेंही वरी थांवे। जेणें मृतावस्था धांवे। सर्वत्र जगा॥ १०५३॥

अर्थ—विषयांचे नाव घेताच जो चौपटीहूनही अधिक वाढतो आणि ज्याच्या योगाने सर्व जगाला मृतावस्था प्राप्त होतो॥ १०५३॥

तो विषयविषाचा अथावो। आघविया दोषांचा रावो। परी ध्यानखड्गांचा घावो। साहेल कैंचा॥ १०५४॥

अर्थ—तो (बलरूपी शत्रू) विषयरूपी विषाचे ठिकाण असून सर्व दोषांचा राजा आहे. परंतु तो ध्यानरूपी तलवारीचा घाव कसा सहन करूं शकेल?॥ १०५४॥

आणि प्रियविषयप्राप्ती। करी जया सुखाची व्यक्ति। तेचि घालूनि बुंथी। आंगीं जो वाजे॥ १०५५॥

अर्थ—आणि आवडणाऱ्या विषयाची प्राप्ती ज्या सुखाची अभिव्यक्ती करते (सुखाला दाखविते), त्या सुखाचा अंगात बुरखा घालून जो गरजू लागतो॥ १०५५॥

जो सन्मार्ग भुलवी। मग अधर्माच्या आडवीं-। सूनि वाघां सांपडवी। नरकादिकां॥ १०५६॥

अर्थ—जो (दर्पशत्रू) सन्मार्गाला भुरळ पाडतो आणि अधर्माच्या अरण्यात घालवून नरकादिक वाघांच्या तावडीत देतो॥ १०५६॥

तो विश्वासें मारितां रिपु। निवटूनि घातला दर्पु। आणि जयाचा अहा कंप। तापसांसी॥ १०५७॥

अर्थ—विश्वास देऊन घात करणारा शत्रू जो दर्प तो मारून टाकला आणि अरेरे, ज्या क्रोधाचे नाव ऐकताच तपस्व्यांना थरकाप होतो. ॥ १०५७॥

क्रोधा ऐसा महादोखु। जयाचा देखा परिपाकु। भरिजे तंव अधिकु। रिता होय जो॥ १०५८॥

अर्थ—क्रोधासारखा भयंकर दोष ही ज्याची परिपक्व अवस्था आहे व जो भरला असता आणखी आणखी रिकामा होतो. (जसे जसे विषय द्यावेत तसतसा तो आणखी वाढतो)॥ १०५८॥

तो कामु कोणेच ठायीं। नसे ऐसें केले पाहीं। कीं तेंचि क्रोधाही। सहजें आलें॥ १०५९॥

अर्थ—(असा जो काम) तो कोणत्याही ठिकाणी नाही असे केले. (म्हणजे तो नि:शेष नाहीसा केला) मग क्रोधाची देखील तीच स्थिती झाली॥ १०५९॥

मुळाचें तोडणें जैसें। होय कां शाखोद्देशें। कामु नाशलेनि नाशे। तैसा क्रोधु॥ १०६०॥

अर्थ—जसे मूळ तोडण्याने शाखा तोडण्याचा उद्देश सफळ होतो त्याप्रमाणे कामाच्या नाशाने क्रोधाचाही नाश (आपोआपच) होतो.॥ १०६०॥

म्हणौनि काम वैरी। जाला जेथ ठाणोरी। तेथ सरली वारी। क्रोधाचीही॥ १०६१॥

अर्थ—म्हणून कामरूपी शत्रू जेथे युद्धात मेला तेव्हा क्रोधाचीही येण्याजाण्याची वारी संपली. (तोही त्या वेळेस नष्ट झाला)॥ १०६१॥

आणि समर्थु आपुला खोडा। शिसें वाहवी जैसा होडा। तैसा भुंजौनि जो गाढा। परिग्रहो॥ १०६२॥

जो माथांचि पालाणवी। अंगा अवगुणा घाल्वी। जीवें दांडी घेववी। ममत्वाची॥ १०६३॥

अर्थ—ज्याप्रमाणे सत्ताधीश आपले ओझे पैजेने दुसऱ्याच्या शिरावर टाकून त्याला ते वहावयास लावतो, त्याप्रमाणे भोग भोगून प्रबळ झालेला जो परिग्रह तो आपले खोगीर जीवाच्या मस्तकावर ठेऊन आपल्या आंगचे अवगुण त्याच्याठिकाणी जडवतो व त्याला ममत्वाची काठी धरावयाला लावतो॥ १०६२-१०६३॥

शिष्य-शास्त्रादिविलासें। मठादिमुद्रेचेनि मिसें। घातले आहाती फांसे। निसंगा जेणें॥ १०६४॥

अर्थ—ज्या परिग्रहाने शिष्य व शाखादिकांचा बडिवार वाढवून मठादी स्थापन करणे व खेचरी वगैर मुद्रेचे प्रदर्शन करणे इत्यादि लक्षणांच्या मिषाने नि:संग पुरुषाला (संगाच्या) पाशात अडकवले॥ १०६४॥

घरीं कुटुंबपणें सरे। तरी वनीं वन्य होऊनि अवतरे। नागवीयाही शरीरें। लागला आहे॥ १०६५॥

अर्थ—घरी कुटुंबाच्या रूपाने असलेला परिग्रह संपला तरी तो (परिग्रह) जंगलामध्ये रहाणारा या रूपाने पुन्हा प्रगट होतो व अगदी उघडा असला तरी तो शरीररूपाने त्याला लागलेला असतो॥ १०६५॥

ऐसा दुर्जयो जो परिग्रहो। तयाचा फेडूनि ठावो। भवविजयाचा उत्साहो। भोगीतसे जो॥ १०६६॥

अर्थ—जिंकण्याला कठीण असलेला असा जो परिग्रह त्याचे ठावठिकाण नष्ट करून संसारातून सुटण्याच्या विजयाचा आनंद जो भोगतो॥ १०६६॥

तेथ अमानित्वादि आघवे। ज्ञानगुणाचे जे मेळावे। ते कैवल्यदेशींचे आघवे। रावो जैसे आले॥ १०६७॥

अर्थ—त्यावेळी अमानित्वादी सर्व ज्ञानगुणांचे समुदाय ते जणुंकाय मोक्षदेशाचे राजेच असावेत त्याप्रमाणे येतात॥ १०६७॥

तेव्हां सम्यक्ज्ञानाचिया। राणिवा उगाणूनि तया। परिवारु होऊनियां। राहत अंगें॥ १०६८॥

अर्थ—तेव्हा यथार्थ ज्ञानाचे राजपद त्याला देऊन ते (गुण) आपण स्वत: त्याचे परिवार होऊन राहिलेत॥ १०६८॥

प्रवृत्तीचिये राजबिदीं। अवस्थाभेदप्रमदीं। कीजत आहे प्रतिपदीं। सुखाचें लोण॥ १०६९॥

अर्थ—प्रवृत्तिरूपी राजमार्गांत असलेल्या निरनिराळ्या अवस्थारूपी (जागृति, स्वप्न व सुषुप्ति) स्त्रिया पावलोपावली त्याच्यावरून सुखाचे निंबलोण उतरवीत असतात॥ १०६९॥

पुढां बोधाचिये कांबीवरी। विवेकु दृश्याची मांदी सारी। योगभूमिका आरती करी। येती जैसिया॥ १०७०॥

अर्थ—(त्या साधकाच्या) पुढें विवेक हा बोधरूपी काठीने दृश्यांची गर्दी दूर करतो व योगभूमिका जणुं काय (त्याला ओवाळायला) आरत्या घेऊन येतात.॥ १०७०॥

तेथ ऋद्धिसिद्धींची अनेगें। वृंदें मिळती प्रसंगें। तये पुष्पवर्षीं आंगें। नाहातसे तो॥ १०७१॥

अर्थ—तेव्हां त्याप्रसंगी ऋद्धिसिद्धींचे अनेक समुदाय येतात. आणि त्यांच्या पुष्पवृष्टीने त्याचे आंग अगदी न्हाऊन निघते॥ १०७१॥

ऐसेनि ब्रह्मैक्यासारिखें। स्वराज्य येतां जवळिकें। झळंबित आहे हरिखें। तिन्ही लोक॥ १०७२॥

अर्थ—अशा प्रकारे ब्राह्मैक्यासारख्या स्वराज्याची प्राप्ती जवळ आली असता त्याला तिन्ही लोक आनंदाने उचंबळलेले दिसतात॥ १०७२॥

तेव्हां वैरिया कां मैत्रिया। तयासि माझें म्हणावया। समानता धनंजया। उरेचिही ना॥ १०७३॥

अर्थ—त्यावेळी अर्जुना, समभावामुळे त्याला हा माझा वैरी आहे अथवा हा माझा मित्र आहे असे म्हणण्याला काही उरतच नाही॥ १०७३॥

हें ना भल्तेणें व्याजें। तो जयातें म्हणे माझें। तें नोडवेचि कां दुजें। अद्वितीय जाला॥ १०७४॥

अर्थ—इतकेच नाही, कोणत्याही निमित्ताने ज्याला त्याने माझे असे म्हटले ते सर्व त्याच्यापुढे दुजेपणाने ठरत नाही. कारण तो स्वत:च अद्वैतस्वरूप झालेला असतो॥ १०७४॥

पैं आपुलिया एकी सत्ता। सर्वही कवळूनिया पांडुसुता। कही न लगती ममता। धाडिली तेणें॥ १०७५॥

अर्थ—अर्जुना, याप्रमाणे तो केवळ आपल्या एकत्वाच्या भावाने सर्व विश्वाला कवटाळतो (पाहतो) आणि म्हणून त्याला ममता कधीच जडत नाही, तो तिचा सर्वस्वी त्याग करतो॥ १०७५॥

ऐसा जिंतिलिया रिपुवर्ग। आपु मानलयां हें जग। अपैसा योगतुरंग। स्थिर जाला॥ १०७६॥

अर्थ—याप्रमाणे शत्रुसमुदाय जिंकल्यानंतर आणि (मायिक) अशा या जगाचा निरास केल्यानंतर त्याचा योगरूपी घोडा आपोआपच स्थिर होतो॥ १०७६॥

वैराग्याचें गाढलें। अंगीं त्राण होतें भलें। तेंही नावेक ढिलें। तेव्हां करी॥ १०७७॥

अर्थ—त्यावेळी वैराग्याचे, अंगात बळकट घातलेले चिलखत सुद्धा, घटकाभर तो ढिले करतो॥ १०७७॥

आणि निवटी ध्यानाचें खांडें। तें दुजें नाहींचि पुढें। म्हणूनि हातु आसुडे। वृत्तीचाही॥ १०७८॥

अर्थ—आणि ध्यानरूपी तलवारीच्या योगाने ज्याचा नाश होतो असे दुसरे समोर काहीच नसल्यामुळे तो वृत्तीचाही हात झिटकारून देतो॥ १०७८॥

जैसें रसौषध खरें। आपुलें काज करूनि पुरें। आपणही नुरे। तैसें होतसे॥ १०७९॥

अर्थ—ज्याप्रमाणे खरे रसायन आपले कार्य पूर्ण करून आपणही शिल्लक उरत नाही, त्याप्रमाणे हे होते॥ १०७९॥

देखोनि ठाकिता ठावो। धांवता थिरावे पावो। तैसा ब्रह्मसामीप्यें थांवो। अभ्यासु सांडी॥ १०८०॥

अर्थ—थांबण्याचे ठिकाण दिसले म्हणजे धावणारे पाय जसे थांबू लागतात त्याप्रमाणे ब्रह्मप्राप्ती झाली म्हणजे अभ्यास आपोआप रहातो॥ १०८०॥

घडतां महोदधीसी। गंगा वेगें सांडिजे जैसी। कां कामिनी कांतापासीं। स्थिर होय॥ १०८१॥

अर्थ—समुद्राला मिळताच नदीचा वेग जसा बंद पडतो किंवा पतीची गांठ पडताच कामिनी (पत्नी) जशी शांत होते.॥ १०८१॥

नाना फळतिये वेळे। केळीची वाढी मांटुळें। कां गांवापुढें वळे। मार्गु जैसा॥ १०८२॥

अर्थ—अथवा केळीचे झाड फळल्यावर ज्याप्रमाणे त्याची वाढ खुंटते किंवा गाव येताच ज्याप्रमाणे वाट संपते॥ १०८२॥

तैसा आत्मसाक्षात्कारु। होईल देखोनि गोचरु। ऐसा साधनहतियेरु। हळूचि ठेवी॥ १०८३॥

अर्थ—त्याप्रमाणे आत्मसाक्षात्कार प्राप्त होईल असे समजताच तो (साधक) साधनरूपी हत्यारे हळूच ठेऊन देतो॥ १०८३॥

म्हणौनि ब्रह्मेंसीं तया। ऐक्याचा समो धनंजया। होतसें तैं उपाया। वोहटु पडे॥ १०८४॥

अर्थ—म्हणून अर्जुना, ब्रह्माशी ऐक्य होण्याच्यावेळी त्याच्या सर्व साधनमार्गांना वोहोटी लागते॥ १०८४॥

मग वैराग्याची गोंधळुक। जे ज्ञानाभ्यासाचें वार्धक्य। योगफळाचाही परिपाक। दशा जें कां॥ १०८५॥

ते शांति पैं गा सुभगा। संपूर्ण ये तयाचिया आंगा। तैं ब्रह्म होआवयाजोगा। होय तो पुरुषु॥ १०८६॥

अर्थ—मग वैराग्याची जी सांजवेळ, जी ज्ञानाच्या अभ्यासाचे वार्धक्य, योगाच्या फळाची जी परिपक्व दशा अशी ती संपूर्ण शान्ती, हे भाग्यवान् अर्जुना, त्याच्या आंगी खेळू लागते, तेव्हा तो पुरुष ब्रह्म होण्यास पात्र होतो॥ १०८५-१०८६॥

पुनवेहूनी चतुर्दशी। जेतुलें उणेपण शशी। कां सोळेयाऊनि जैसी। पंधरावी वानी॥ १०८७॥

सागरींही पाणी वेगें। संचरे तें रूप गंगे। येर निश्चळ जें उगें। तें समुद्र जैसा॥ १०८८॥

ब्रह्म आणि ब्रह्महोतिये। योग्यतें तैसा पाडु आहे। तेचि शांतीचेनि ल्वलाहें। होय तो गा॥ १०८९॥

अर्थ—पौर्णिमेपेक्षा चतुर्दशीचे दिवशी जितका चंद्राच्या कलेत कमीपणा असतो किंवा सोळा आणे कसापेक्षा (सोन्यात) पंधरा आणे कसात जितकी कमतरता असते. किंवा॥ १०८७॥ समुद्रांत नदीने प्रवेश केल्यानंतर पाण्याचा वेग जेथपर्यंत दिसतो तोपर्यंत ती नदी व जेथे तो वेग थांबतो तो समुद्र॥ १०८८॥ त्याप्रमाणे ब्रह्म व ब्रह्म होणारा यांचा संबंध असतो आणि या शांतीमुळे तो लागलाच ब्रह्मरूप होतो॥ १०८९॥

पैं तेंचि होणेनवीण। प्रतीती आलें जें ब्रह्मपण। ते ब्रह्म होती जाण। योग्यता येथ॥ १०९०॥

अर्थ—परंतु तशी पूर्ण ब्रह्मरूपता येण्यापूर्वी जो ब्रह्माचा अनुभव आलेला असतो; तो ब्रह्म होण्याची योग्यता आहे असे समज॥ १०९०॥

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति। समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्॥ ५४॥

अर्थ—ब्रह्मरूप झालेला पुरुष अंत:करणांत आनंदी होऊन कशाचे दु:ख करीत नाही व कशाची इच्छा करीत नाही. तो सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी समबुद्धी ठेऊन माझी परमभक्ती प्राप्त करून घेतो॥ ५४॥

ते ब्रह्मभावयोग्यता। पुरुषु तो मग पांडुसुता। आत्मबोध-प्रसन्नता-। पदीं बैसे॥ १०९१॥

अर्थ—मग, अर्जुना, ब्रह्मरूप होण्याची योग्यता असलेला तो पुरुष आत्मज्ञानाने प्राप्त होणाऱ्या आनंदाच्या पदावर बसतो॥ १०९१॥

जेणें निपजे रससोय। तो तापुही जैं जाय। तैं ते कां होय। प्रसन्न जैसी॥ १०९२॥

अर्थ—ज्याने स्वयंपाक तयार होतो, तो अग्नी जेव्हा विझेल तेव्हाच तो स्वयंपाक मनाला आनंद देतो॥ १०९२॥

नाना भरतिया ल्गबगा। शरत्काळीं सांडिजे गंगा। कां गीत राहतां उपांगा। वोहटु पडे॥ १०९३॥

तैसा आत्मबोधीं उद्यमु। करितां होय जो श्रमु। तोही जेथें समु। होऊनि जाय॥ १०९४॥

अर्थ—अथवा शरद् ऋतूमध्ये गंगा ज्याप्रमाणे पुराचा वेग सोडून देते किंवा गाणे बंद होताच साथीची वाद्य साधने बंद पडतात॥ १०९३॥ त्याप्रमाणे आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी केलेले श्रम तेही जेथे शांत (बंद) होऊन जातात॥ १०९४॥

आत्मबोधप्रशस्ती। हे तिये दशेची ख्याती। ते भोगीतसे महामती। योग्यु तो गा॥ १०९५॥

अर्थ—'आत्मबोधानंद' या नावाने त्या अवस्थेची प्रसिद्धी आहे. हे अत्यंत बुद्धिमान् अर्जुना, तो योग्य पुरुष तिचा आनंद लुटतो॥ १०९५॥

तेव्हां आत्मत्वें शोचावें। कांहीं पावावया कामावें। हें सरलें समभावें। भरितें तया॥ १०९६॥

अर्थ—त्यावेळी सर्वत्र आत्मबुद्धी झाल्यामुळे एखाद्या विषयी दु:ख करावे किंवा कशाची तरी प्राप्ती व्हावी म्हणून इच्छा करावी या दोन्ही गोष्टी ब्रह्मसाम्य भावाच्या भरतीमुळे नाहीशा होतात॥ १०९६॥

उदया येतां गभस्ती। नाना नक्षत्रव्यक्ती। हारविजती दीप्ती। आंगिका जेवीं॥ १०९७॥

अर्थ—सूर्य उदयाला आला म्हणजे सर्व नक्षत्रे जशी आपल्या अंगची प्रभा हरवून बसतात॥ १०९७॥

तेवीं उठतिया आत्मप्रथा। हे भूतभेदव्यवस्था। मोडीत मोडीत पार्था। वास पाहे तो॥ १०९८॥

अर्थ—त्याप्रमाणे हे अर्जुना, आत्मानुभव प्राप्त झाला म्हणजे तो पुरुष प्राणिमात्रातील भेदात्मक व्यवस्था मोडीत (अद्वैताची) वाटचाल करीत असतो (तो जिकडे तिकडे अद्वैतभाव बघत असतो)॥ १०९८॥

पाटियेवरील अक्षरें। जैसीं पुसतां येती करें। तैसीं हारपती भेदांतरें। तयाचिये दृष्टी॥ १०९९॥

अर्थ—पाटीवर काढलेली अक्षरे जशी हाताने पुसून काढता येतात, त्याप्रमाणे त्याच्या दृष्टीत भेदाभेद नाहीसे होतात॥ १०९९॥

तैसेनि अन्यथाज्ञानें। जियें घेपती जागरस्वप्नें। तियें दोन्ही केली लीनें। अव्यक्तामाजीं॥ ११००॥

अर्थ—त्याप्रमाणे अन्यथा (चुकीच्या) ज्ञानामुळे ज्या जागृती व स्वप्न अवस्था निर्माण होतात त्या दोन्ही अवस्था अव्यक्तामध्ये (अज्ञानामध्ये) लीन होतात॥ ११००॥

मग तेंही अव्यक्त। बोध वाढता झिजत। पुरलां बोधीं समस्त। बुडोनि जाय॥ ११०१॥

अर्थ—मग तेही (मूळ अज्ञान) जसा जसा बोध वाढत जाईल तसे तसे नाहीसे होत होत पूर्ण बोधात पूर्णपणे गडप होते॥ ११०१॥

जैसी भोजनाच्या व्यापारीं। क्षुधा जिरत जाय अवधारीं। मग तृप्तीच्या अवसरीं। नाहींच होय॥ ११०२॥
नाना चालीचिया वाढी। वाट होत जाय थोडी। मग पातला ठायीं बुडी। देऊनि निमे॥ ११०३॥
कां जागृती जंव जंव उद्दीपे। तंव तंव निद्रा हारपे। मग जागीनलिया स्वरूपें। नाहींच होय॥ ११०४॥
हें ना आपुलें पूर्णत्व भेटे। जेथ चंद्रासीं वाढी खुंटे। तेथ शुक्लपक्षु आटे। निःशेषु जैसा॥ ११०५॥
तैसा बोध्यजात गिळितु। बोधु बोधें ये मज आंतु। मिसळला तेथ साद्यंतु। अबोधु गेला॥ ११०६॥

अर्थ—ऐक, जेवण चालले असता जशी (प्रत्येक घासाबरोबर) भूक कमी कमी होत जाते व पूर्ण तृप्ती झाली असता ती अजिबात नाहीशी होते॥ ११०२॥ किंवा चालणे जसजसे वाढत जाते तसतसा पल्ला कमी कमी होत जातो आणि ठरवलेल्या ठिकाणी पोहोचल्यावर वाट चालण्याचे सरते॥ ११०३॥ किंवा जो जो जागेपणा येत जातो तो तो झोप नाहीशी होत जाते आणि अखेर पूर्णपणे जागे झाल्यावर ती पूर्णपणे नाहीशी होते.॥ ११०४॥ हे राहू दे पौर्णिमेच्या दिवशी चंद्राला आपले पूर्णत्व प्राप्त होते व जेव्हा चंद्राचे वाढणे थांबते तेव्हा ज्याप्रमाणे शुक्लपक्ष निःशेष नाहीसा होतो॥ ११०५॥ त्याप्रमाणे ज्ञेय म्हणून जितके काही असेल ते सर्व अद्वैतज्ञानाने नाहीसे होऊन तो माझ्याशी एकरूप होतो तेव्हा अज्ञान समूळ नाहीसे होते॥ ११०६॥

तेव्हां कल्पांताचिये वेळे। नदी सिंधूचें पेंडवळें। मोडूनि भरलें जळें। आब्रह्म जैसें॥ ११०७॥
नाना गेलिया घट मठ। आकाश ठाके एकवट। कां जळोनि काष्ठें काष्ठ। वन्हीचि होय॥ ११०८॥
नातरी लेणियांचे ठसे। आटोनि गेलिया मुसे। नामरूपभेदें जैसें। सांडिजे सोनें॥ ११०९॥
हेंही असो चेइलया। तें स्वप्न नाहीं जालिया। मग आपणचि आपणयां। उरिजे जैसें॥ १११०॥
तैंसा मी एकवांचूनि कांहीं। तया तयाहीसकट नाहीं। हे चौथी भक्ति पाहीं। माझी तो लाहे॥ ११११॥

अर्थ—तेव्हा प्रलयकाली नदी व समुद्र यांच्या सीमा नाहीशा होऊन ब्रह्मांडात ज्याप्रमाणे सर्व पाणीच पाणी होऊन जाते॥ ११०७॥ किंवा घडा, मठ नाहीसे झाल्यानंतर आकाश (त्यांच्यातील) जसे एक होऊन जाते किंवा लाकडे जळल्यानंतर लाकूड जसे विस्तवच होऊन जाते॥ ११०८॥ किंवा मुशीमध्ये अलंकार टाकले असता ते आटून त्यांचा साज नाहीसा होतो व सोने जसे नामरूपाला (साजाच्या) सोडून देते॥ ११०९॥ हेही राहू द्या. पूर्णपणे जागे होऊन स्वप्न नाहीसे झाल्यानंतर मग आपणच आपल्या ठिकाणी एकटे जसे उरतो॥ १११०॥ त्याप्रमाणे (ज्ञानी पुरुषाला) माझ्याशिवाय त्याच्या सहवर्तमान त्याला दुसरे काहीही उरत नाही. पहा ही अशी माझी चौथी भक्ती त्याला

प्राप्त होते. (स्वत:च्या अस्तित्वाचेही भान न उरता त्याला मज परमात्म्याव्यतिरिक्त अन्य काहीच प्रतीत होत नाही. अशी ही माझी चौथी भक्ति त्याला लाभते, पाहा) ॥ ११११ ॥

येर आर्तु जिज्ञासु अर्थार्थी। हे भजती जिये पंथीं। ते तिन्ही पावोनि चौथी। म्हणिपत आहे॥ १११२ ॥

अर्थ—इतर जे आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी भक्त हे ज्या मार्गांनी माझें भजन करतांत, त्या तिन्ही मार्गांच्या अपेक्षेने या भक्तीला मी चवथी भक्ती म्हणत आहे. ॥ १११२ ॥

एऱ्हवीं तिजी ना चौथी। हे पहिली ना सरती। पैं माझिये सहजस्थिति। भक्ति नाम॥ १११३ ॥

अर्थ—तसे जर पाहिले तर, भक्ती ही तिसरी नाही व चौथीही नाही, पहिलीही नव्हे आणि दुसरी नव्हे. माझ्या ब्रह्मरूप सहजावस्थेलाच भक्ती हे नाव आहे. ॥ १११३ ॥

जें नेणणें माझें प्रकाशूनि। अन्यथात्वें मातें दाऊनि। सर्वही सर्वीं भजौनि। बुझावीतसे जें॥ १११४ ॥

अर्थ—जी माझी सहजस्थिती अज्ञानाला प्रकाशित करून मला विपरीत धर्मांनी (जगद्रूपाने) दाखवून सर्वांना सर्व ठिकाणी भक्ती (प्रेम) करायला लावून सर्वांना समजावीत असते. ॥ १११४ ॥

जो जेथ जैसें पाहों बैसे। तया तेथ तैसेंचि असे। हें उजियेडें कां दिसे। अखंडें जेणें॥ १११५ ॥

अर्थ—जो जेथे जसे पाहू लागतो, त्याला तेथे तसेच आहे असे वाटू लागते व हे त्याला ज्या अखंड (चित्) प्रकाशामुळे दिसते ॥ १११५ ॥

स्वप्नाचें दिसणें न दिसणें। जैसें आपलेनि असलेपणें। विश्वाचें आहे नाहीं जेणें। प्रकाशे तैसें॥ १११६ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे स्वप्नाचे दिसणे किंवा न दिसणे आपल्या अस्तित्वावर अवलंबून आहे, त्याप्रमाणे विश्वाचे असणे नसणे ज्या प्रकाशावर (चित्) अवलंबून आहे. ॥ १११६ ॥

ऐसा हा सहज माझा। प्रकाशु जो कपिध्वजा। तो भक्ति या वोजा। बोलिजे गा॥ १११७ ॥

अर्थ—अर्जुना, असा जो माझा सहज प्रकाश (चिद्रूपता) तो भक्ती या नावाने बोलला जातो ॥ १११७ ॥

म्हणोनि आर्ताच्या ठायीं। हे आर्ति होऊनि पाहीं। अपेक्षणीय जें कांहीं। तें मीचि केला॥ १११८ ॥

अर्थ—म्हणून आर्ताच्या ठिकाणी ही भक्ती उत्कट इच्छेच्या रूपाने बनून त्यापासून जी काही अपेक्षा आहे (इच्छेचा विषय) तीत आलंबन म्हणून मीच रहात असतो ॥ १११८ ॥

जिज्ञासुपुढां वीरेशा। हेचि होऊनि जिज्ञासा। मी कां जिज्ञासु ऐसा। दाखविला॥ १११९ ॥

अर्थ—हे वीरश्रेष्ठा, हीच (भक्ती) जाणण्याची इच्छा करणाऱ्यापुढे जिज्ञासा होऊन मीच जिज्ञासेचा विषय (जिज्ञासा) दाखविला जातो ॥ १११९ ॥

हेचि होऊनि अर्थना। मीचि माझ्या अर्थीं अर्जुना। करूनि अर्थाभिधाना। आणी मातें॥ ११२० ॥

अर्थ—हीच भक्ती, अर्जुना, अर्थाच्या प्राप्तीची इच्छा होऊन मला अर्थरूप करून तीच मला अर्थ हे नाव देते ॥ ११२० ॥

एवं घेऊनि अज्ञानातें। माझी भक्ति जे हे वर्ते। ते दावी मज द्रष्टयाते। दृश्य करूनि॥ ११२१ ॥

अर्थ—याप्रमाणे अज्ञानाला घेऊन माझी जी ही भक्ती व्यवहार करूं लागते, ती द्रष्टृस्वरूप असलेल्या मला दृश्य करून दाखवते ॥ ११२१ ॥

येथें मुखचि दिसे मुखें। या बोला कांहीं न चुके। परी दुजेपण हें लटिकें। आरिसा करी॥ ११२२ ॥

अर्थ—आरशात पाहिले असता तोंडामुळेच तोंड दिसते. या म्हणण्यात काही चूकही नाही. पण आरसा मात्र खोटाच दोनपणा निर्माण करतो ॥ ११२२ ॥

दिठी चंद्रचि घे साचें। परी येतुलें हें तिमिराचें। जे एकचि असे तयाचे। दोनी दावी॥ ११२३ ॥

अर्थ—दृष्टी खरोखर चंद्रालाच पहाते परंतु नेत्ररोग (तिमिर नावाचा) एवढे काम करतो की एकच चंद्राला दोन करून दाखवतो ॥ ११२३ ॥

तैसा सर्वत्र मीचि मियां। घेपतसें धनंजया। परी दृश्यत्व हें वायां। अज्ञानवशें॥ ११२४॥

अर्थ—त्याप्रमाणे अर्जुना सर्वत्र मीच माझ्याकडून आकलन केला जातो. परंतु दृश्यत्व हे खोटे असून ते अज्ञानवशतेमुळे आहे॥ ११२४॥

तें अज्ञान आतां फिटलें। माझें द्रष्टृत्व मज भेटलें। निजबिंबीं एकवटलें। प्रतिबिंब जैसें॥ ११२५॥

अर्थ—ते अज्ञान आता नाहीसे झाले व प्रतिबिंब ज्याप्रमाणे आपल्या बिंबात एकरूप व्हावे त्याप्रमाणे माझे दष्टृत्व मला भेटले. (द्रष्टा व दृश्य एकरूप झाले)॥ ११२५॥

गूढार्थदीपिका—माझे द्रष्टृत्व मज भेटले।

एका आत्मवस्तूशिवाय दुसरी वस्तूच नसल्याकारणाने दृश्याच्या अपेक्षेने वापरण्यात येणारा 'द्रष्टा' शब्दाचा प्रयोग खरोखर विचार करता चूकच म्हणावा लागेल. परंतु असे असले तरी आत्मवस्तूचे वर्णन शब्दाने करत असतांना त्या शब्दाशिवाय दुसऱ्या कोणत्याही शब्दाचा वापरही करता येत नाही. अंधाराची कधीच कल्पना नसलेल्या प्रकाशरूप अशा सूर्याचा उल्लेख अंधाराच्या अपेक्षेने वापरण्यात येणाऱ्या प्रकाश शब्दाव्यतिरिक्त आणखी कोणत्या शब्दाने करता येणार?

आत्मस्वरूपाच्या सच्चिदानंदरूप धर्माहून विलक्षण अशा अचित् जड व दुःखरूप दृश्याचा अज्ञाननिवृत्तिनंतर निरास होतो. म्हणजेच दृश्याचे स्वरूपही द्रष्टृस्वरूप आत्मस्वरूपाच्या लक्षणाचेच भासू लागते. बिंब व प्रतिबिंबात प्रतिबिंबाला बिंबाहून अलग अशी सत्ता रहात नाही. त्यामुळे प्रतिबिंब नाहीसे होताच ते मूळच्या बिंबातच विलीन होते. त्याचप्रमाणे ज्ञानरूप व आनंदरूप असलेल्या द्रष्टृस्वरूप अशा आत्मस्वरूपाच्या ठिकाणी ज्ञान व आनंद यांचे स्वाभाविक स्फुरण होऊन जो दोनपणाचा भास पाण्यावरील तरंगाप्रमाणे निर्माण होतो त्यामुळे द्रष्टा-दृश्य असा भास निर्माण होतो. वस्तुतः द्रष्टृस्वरूप अशा आत्मशक्तीचाच तो विलास असतो. मात्र अज्ञानामुळे हा दोनपणाचा विलास विभिन्नसत्ताक भासून द्वैतात परिणत होतो व अधिष्ठानरूप आत्मस्वरूपाचा विसर पडून सच्चिदानंदाच्या विरोधी धर्माचे दृश्य भासायला लागते. यालाच जगत् असे दुसरे नांव आपण देतो. ज्ञानाने ह्या अज्ञानाचा पूर्ण निरास झाला म्हणजे हेच दृश्य मूळच्या द्रष्टृस्वरूप आत्मस्वरूपाचा स्फुरणरूप विलास वाटतो व अशा रीतीने दृश्य म्हणून दुसरे काही नसून ते द्रष्टृस्वरूपच आहे असे यथार्थज्ञान होते व अज्ञानातील भिन्नसत्ताक व भिन्न धर्मांचा द्रष्टा-दृश्य भाव पूर्णपणे नाहीसा होतो. त्यांचा दोनपणा एकस्वरूपच म्हणजे सच्चिदानंदस्वरूप भासतो. यालाच अद्वैत म्हणतात.

पैं जेव्हांही असे किडाळ। तेव्हांही सोनेंचि अढळ। परी तें कीड गेलिया केवळ। उरे जैसें॥ ११२६॥

अर्थ—हीनकस धातु ज्यावेळी मिसळलेली असते त्यावेळी ही सोन्याचे सोनेपण अढळच असते, पण हीनकस ज्यावेळी जळून जाते त्यावेळी केवळ जसे खरे सोने उरते॥ ११२६॥

हां गा पूर्णिमेआधीं कायी। चंद्रु सावयवुचि नाहीं। परी तिये दिवशीं भेटे पाहीं। पूर्णता तया॥ ११२७॥

अर्थ—किंवा पौर्णिमेच्या आधी चंद्र काय सर्वांगांनी पूर्ण नसतो? परंतु ज्या दिवशी (पौर्णिमेच्या) मात्र त्याला पूर्णता प्राप्त होते असे वाटते॥ ११२७॥

तैसा मीचि अज्ञानद्वारें। दिसें परी हस्तांतरें। मग द्रष्टृत्वीं तें सरे। मियांचि मी लाभें॥ ११२८॥

अर्थ—याचप्रमाणे मीच अन्यथा ज्ञानाने दिसतो, पण (दृश्य रूपाने) भिन्नपणाने दिसतो. मग (ज्ञानाने) दृश्याचा निरास होऊन ते द्रष्टृत्वात मावळते व मलाच मी लाभतो॥ ११२८॥

म्हणौनि दृश्यपथा-। अतीतु माझा पार्था। भक्तियोगु चवथा। म्हणितला गा॥ ११२९॥

अर्थ—म्हणूनच, अर्जुना, दृश्यरूप मार्गाच्या पलीकडला माझा (चौथा) भक्तियोग आहे असे मी म्हटले॥ ११२९॥

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः। ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम्॥ ५५॥

अर्थ—मी जेवढां आणि जसा आहे तसा मला तो भक्तिच्यायोगाने यथार्थ जाणतो व मला यथार्थ रूपात जाणल्यानंतर तो मद्रूप होतो.॥ ५५॥

इया ज्ञानभक्ति सहज। भक्तु एकवटला मज। तो मीचि केवळ हें तुज। श्रुतही आहे॥ ११३०॥

अर्थ—या ज्ञान भक्तीने जो भक्त माझ्याशी एकरूप झाला आहे तो भक्त केवळ मीच आहे हे तू ऐकलेच आहेस॥ ११३०॥

जे उभऊनियां भुजा। ज्ञानिया तो आत्मा माझा। हें बोलिलों कपिध्वजा। सप्तमाध्यायीं॥ ११३१॥

अर्थ—कारण की अर्जुना, सातव्या अध्यायामध्ये ज्ञानी (पुरुष हा) माझा आत्मा आहे असे हात वर करून मी सांगितलेच आहे॥ ११३१॥

ते हे कल्पादीं भक्ति मियां। भागवतमिषें ब्रह्मया। उत्तम म्हणोनि धनंजया। उपदेशिली॥ ११३२॥

अर्थ—अर्जुना ती ही भक्ती उत्तम आहे म्हणूनच मी ती कल्पाच्या आरंभी भागवताच्या निमित्ताने ब्रह्मदेवाला उपदेशिली॥ ११३२॥

ज्ञानी इयेतें स्वसंविति। शैव म्हणती शक्ति। आम्ही परमभक्ति। आपुली म्हणों॥ ११३३॥

अर्थ—ज्ञानी हिला स्वसंविती (आत्मज्ञान) म्हणतात. शैव हिला शक्ती म्हणतात आणि आम्ही हिला आपली श्रेष्ठ भक्ती म्हणतो॥ ११३३॥

हे मज मिळतिये वेळे। तयां कर्मयोगियां फळे। मग समस्तही निखिळें। मियांचि भरे॥ ११३४॥

अर्थ—कर्मयोगी मला मिळतात तेव्हाच त्यास ही भक्ती प्राप्त होते व मग (त्याच्या दृष्टिने) जिकडे तिकडे मीच भरून राहतो॥ ११३४॥

तेथ वैराग्यविवेकेंसीं। आटे बंध मोक्षेंसीं। वृत्ती तये आवृत्तीसीं। बुडोनि जाय॥ ११३५॥

अर्थ—त्यावेळी विवेकासह वैराग्य व मोक्षासह बंधही आटून जातात आणि मिथ्यावृत्तीबरोबरच ब्रह्माकारवृत्तीही नाहीशी होते॥ ११३५॥

गूढार्थदीपिका—ओवी क्रमांक ११३५ वृत्ती तये अवृत्तीसीं। बुडोनि जाय।

एका सगुण भगवंताशिवाय दुसरी वस्तु नाही असे सगुण भगवंताचे व्यापक ज्ञान झाल्यामुळे ज्यांच्या प्रेमाचा विषय एक सगुण भगवानच होतो व अशा त्या ज्ञानी भक्तांकडून होणारा सर्व व्यवहार त्यांच्या प्रेमाचा विषय असलेल्या एका भगवंता करताच होत असतो. अशा भगवद्भक्ताला म्हणजे कर्मयोग्याला भगवंताची प्राप्ती होऊन त्याला जिकडे तिकडे भगवानच नामरूपाने नटला असा प्रत्यय येतो. ह्या ज्ञानीभक्ताला येणाऱ्या अनुभवाचे वर्णन याठिकाणी माउली करत आहे.

ह्या ज्ञानीभक्ताच्या ठिकाणी 'अहंब्रह्मास्मिरूप' व 'सर्वं खल्विदं ब्रह्मरूप' या दोन्ही प्रकारचे ज्ञान (व्यतिरेक व अन्वयांतील) बाणलेले असते. पण हे दोन्ही प्रकारचे ज्ञान वृत्तिरूपच असल्यामुळे हे सापेक्षच ज्ञान म्हणावे लागते. वृत्ती जोपर्यंत कायम राहते तो पर्यंत परमानंदतेचा अनुभव येऊ शकत नाही. समाधीमध्ये अर्थातच वृत्ती लीन होत असल्या कारणामुळे समाधीत परमानंदतेचा अनुभव येतो. समाधीतून व्यवहारात आल्यावर म्हणजे व्युत्थान दशेत प्रारब्धाने वृत्तींचे स्फुरण होत असते. अशावेळी भक्तिरहित ज्ञानी अज्ञान दशेप्रमाणे वृत्तीवर आरूढ होत नाही. तो वृत्तींना मिथ्या समजून आपल्या ठिकाणी साक्षित्व ठेवण्याचा अभ्यास करतो. पण हे सर्व तो करीत असतांना समाधी-सारखी अखंड परमानंदता त्याच्या ठिकाणी मात्र राहू शकत नाही. जाणीवेचा विसर पडल्याशिवाय परमानंदता बाणू शकत नाही हा वेदान्ताचा सिद्धान्त आहे व सर्वांचा तसा अनुभवही आहे.

ज्ञानीभक्त किंवा कर्मयोगी ह्याला व्युत्थानात देखील नामरूपांनी त्याच्या प्रेमाचे आलंबन असलेला सगुण भगवानच नटलेला आहे असा अनुभव येत असल्यामुळे त्याच्या सर्व वृत्तींना आलंबन सगुण भगवान राहते. त्याच्या सर्व उठणाऱ्या वृत्ती समाधीप्रमाणेच सगुण भगवंताकार होतात. त्यामुळे समाधीवत् व्युत्थानातही त्याचा ब्रह्मानंद कायम रहातो. देवएकनाथांनी वर्णन करतांना म्हटले आहे की "समाधि व्युत्थानी हरि विलसे, त्याविण अन्य न काही भासे। मौनही वाचे पडे कि हरिरूप अखंड नयनापुढे।"

या सगुण भगवंताच्या परमप्रेमात निमग्न झालेल्या ज्ञानीभक्ताला अर्थातच आत्मानात्म विवेक किंवा विषयां विषयीचे वैराग्य, बंधाची कल्पना किंवा त्यातून मुक्त झाल्याची कल्पना, जगता विषयीचा मिथ्याभाव किंवा त्या जगताच्या अपेक्षेने असलेली ब्रह्मरूपतेची जाणीव या कशाचेच भान रहात नाही. त्याच्या दृष्टीने या सर्व गोष्टी पूर्णपणे नाहीशा झालेल्या असतात. प्रेमात कोणतीच जाणीव शिल्लक रहात नसल्या कारणाने प्रेमस्वरूप झालेल्या ज्ञानी भगवद्भक्तांना या सर्व गोष्टींचा पूर्ण विसर पडतो व त्यांची निर्विकल्प दशा अखंड कायम राहते हा भाव.

घेऊनि ऐलपणातें। परत्व हारपे जेथें। गिळूनि चाऱ्ही भूतें। आकाश जैसें॥ ११३६ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे चारही भूतांना (पृथ्वी, आप, तेज व वायु) पचवून एकटे आकाशच मागे उरते त्याप्रमाणे जीवपणाला घेऊन ईश्वरपणाही जेथे नाहीसा होतो॥ ११३६॥

तया परी थडथांद। साध्यसाधनातीत शुद्ध। तें मी होऊनि एकवद। भोगी तो मातें॥ ११३७॥

अर्थ—त्याप्रमाणे अलिप्तत्व, साध्य व साधन यांच्या पलीकडे असलेले असे शुद्ध स्वरूप ते मी, तो होऊन, ऐक्यरूपाने आत्मानंदाला (माते) अनुभवतो॥ ११३७॥

घडोनि सिंधूचिया आंगा। सिंधूवरी तळपे गंगा। तैसा पाडु तया भोगा। अवधारीजो॥ ११३८॥

अर्थ—समुद्राच्या आत घुसूनही गंगा जशी समुद्रावर शोभते. त्याचप्रमाणे या आत्मानंदाच्या अनुभवाचा प्रकार आहे हे लक्षात घे.॥ ११३८॥

का आरिसयासि आरिसा। उटूनि दाविलिया जैसा। देखणा अतिशयो तैसा। भोगणां तिये॥ ११३९॥

अर्थ—आरसा स्वच्छ करून दुसऱ्या आरशासमोर ठेवला असता पाहणारा व भोगणारा यांचे जसे एकमेकात सुरेख ऐक्य होते व एकमेकांचा आनंद घेतात त्याचप्रमाणे समरस होऊन आत्मानंदाचा अनुभव घेता येतो॥ ११३९॥

हें असो दर्पणु नेलिया। तो मुखबोधुही गेलिया। देखलेपण एकलेया। आस्वादिजे जेवीं॥ ११४०॥

अर्थ—हे असो, आरसा दूर केल्यावर व मुखाचा आभासही नाहीसा झाल्यावर, जसा पहाणारा एकटाच पाहिलेल्या मुखाच्या अनुभवाचा आस्वाद घेतो॥ ११४०॥

चेइलिया स्वप्न नाशे। आपलें ऐक्यचि दिसे। तें दुजेनवीण जैसें। भोगिजे कां॥ ११४१॥

अर्थ—किंवा जागे झाल्यावर स्वप्न नाहीसे होते आणि मग आपले ऐक्यच दिसू लागते. ते एकटेपण ज्याप्रमाणे दुसऱ्या शिवाय तो आपणच आपले भोगतो॥ ११४१॥

तोचि जालिया भोग तयाचा। न घडे हा भावो जयांचा। तिहीं बोलें केवीं बोलाचा। उच्चारु कीजे॥ ११४२॥

अर्थ—वस्तूशी एकरूप झाल्यावर वस्तूचा भोग घडत नाही असे जे म्हणतात ते, शब्दाने शब्दाचाच उच्चार कसे करतात?॥ ११४२॥

गूढार्थदीपिका—ओवी क्रमांक ११४२

अद्वैत ज्ञानस्वरूप झाल्यावरही ज्ञानीभक्त अशा अद्वैत अवस्थेत भक्ती म्हणजे परमप्रेम कसे करूं शकतो याचे सोपपत्तिक विवेचन ११३७ ते ११५१ या ओव्यातून माउलीने केले आहे.

ज्ञानी भक्ताच्या ठिकाणी वृत्ति स्फुरण होतच राहते. स्फुरणरूप ज्ञानी व त्याला आधाररूप ब्रह्म अशा तऱ्हेचा पाणी व तरंगाप्रमाणे दोनपणाचा भास राहतो. ज्ञानाने त्याच्या अहंतेचा विषय त्याला आधाररूप ब्रह्म ज्याप्रमाणे असते त्याचप्रमाणे त्याच्या ममतेचा विषयही तेच आधाररूप ब्रह्म होत असते. आपल्या ममतेचा म्हणजेच प्रीतीचा विषय तो जेव्हा आपल्या आधाररूप परब्रह्माला करतो तेव्हा तेच परब्रह्म-तेही परमप्रेमास्पद असल्याकारणाने-ह्या ज्ञानी भक्ताच्या प्रेमाने उचंबळून येते आणि सगुण व साकार होते. अशा सगुण साकार स्वरूपाच्या ठिकाणी अंत:करणात तो ज्याप्रमाणे सर्वस्वाने प्रेम करतो. त्याचप्रमाणे हेच सगुणब्रह्म बाहेरही नामरूपाने नटलेले आहे असे समजून तिकडेही तो आपल्या प्रीतीचा प्रवाह वळवतो. त्याच्यादृष्टीने आत बाहेर एका सगुण भगवंताशिवाय दुसरी वस्तूच रहात नाही. त्यामुळे भक्तिरहित ज्ञान्याला बाहेर नामरूपांनी भासणाऱ्या दृश्याच्या ठिकाणी जसा मिथ्यात्वाचा प्रत्यय

येतो तसा या ज्ञानीभक्ताला येत नाही. त्याला आत बाहेर एकरसात्मक ब्रह्माचाच प्रत्यय येतो.

सामान्य माणसाला या अद्वैत दशेतील प्रेमाची कल्पना येण्याकरता माउलीने या ओव्यातून अनेक दृष्टान्त दिलेले आहेत. शब्दानेच 'शब्दा'चा उच्चार जसा केला जातो तसाच हा प्रकार आहे. पण शेवटी मात्र हे केवळ अनुभवानेच कळण्यासारखे आहे, बोलण्यासारखे नाही असे म्हणून ही स्थिती वाचेच्या पलीकडील आहे असे माउलीने पुढे 'हे अनुभवाचिजोगें नव्हे। बोला ऐसे' (ओ० ११५१) या ओवीने दाखविले आहे.

तयांच्या नेणों गांवीं। रवी प्रकाशी हन दिवी। कीं व्योमालागीं मांडवी। उभिली तिहीं॥ ११४३॥

अर्थ—आणि त्यांच्या गावात दिव्याकडून सूर्य प्रकाशला जात असेल तर नकळे! अथवा त्यांनी आकाशाला (आत) घेण्याकरता मांडव उभारला आहे की काय कळत नाही॥ ११४३॥

हां गा राजन्यत्व नव्हतां आंगीं। रावो रायपण काय भोगी। कां आंधारु हन आलिंगी। दिनकरातें॥ ११४४॥

अर्थ—आंगी क्षत्रियत्व नसता राजा राजेपण काय भोगणार! किंवा अंध:कार (अंधकाररूप राहून) सूर्याला कधी मिठी मारील काय?॥ ११४४॥

आणि आकाश जें नव्हें। तया आकाश काय जाणवे। रत्नाच्या रूपीं मिरवे। गुंजांचें लेणें॥ ११४५॥

अर्थ—आणि जे आकाशच नाही, त्याला आकाश कसे कळणार! गुंजाचा दागिना रत्नांचा दागिना म्हणून मिरवण्यासारखेच आहे॥ ११४५॥

म्हणौनि मी होणें नाहीं। तया मीचि आहें केहीं। मग भजेल हें कायी। बोलों कीर॥ ११४६॥

अर्थ—म्हणून जो मत्स्वरूप झाला नाही, त्याला मीच कोठे आहे? तो माझी मग भक्ती ती काय करील! हे बोलायलाच नको!॥ ११४६॥

गूढार्थदीपिका—ओवी ११४६

आत्मस्वरूपाची प्राप्ती करून घेतल्याशिवाय अखंड आत्मसुखाची आपली तळमळ शांत होणे शक्य नाही. ही जाणीव ज्याच्या ठिकाणी आत्मानात्म विवेक व मुमुक्षुत्व आहे अशाच्याच ठिकाणी होणार. इतरांच्या ठिकाणी विवेकालाच स्थान नसल्याकारणाने आत्मस्वरूपाचा विचारच तो करूं शकत नाही. त्याच्या विचारप्रणालीत परमेश्वर व त्याची प्राप्ती या दोघांनाही स्थान नाही. त्यामुळे परमेश्वरस्वरूप होऊन त्याची भक्ती करण्याचा प्रश्नच त्यांच्या मनात उत्पन्न होणे शक्य नाही.

जे लोक परमेश्वर व जीव यांचा भेद नित्य आहे असे मानतात त्यांच्या दृष्टीने परमेश्वर व जीव यांचे बिंब व प्रतिबिंब यांच्याप्रमाणे स्वरूप नसल्यामुळे प्रतिबिंब नाहीसे झाल्यावर बिंबात विलीन झाल्यावर जशी ऐक्याची स्थिती होते तशी ऐक्याची स्थिती त्यांच्या मनात संभवत नाही. त्यामुळे या अद्वैत दशेत येणाऱ्या आत्मानंदाच्या अनुभूतीची कल्पनाही ते करूं शकत नाहीत.

परमेश्वर व जीव यांच्यात द्वैत आहे व तेही नित्य आहे असे मानल्यास त्यांच्या सत्ता पृथक किंवा विभिन्न मानाव्या लागतात. विभिन्न सत्ता मानल्याबरोबर मर्यादितपणा परमेश्वरावरही येऊं पहातो. व मर्यादितपणामुळे इतर वैषयिक पदार्थांप्रमाणे तोही नाशिवंत ठरू पहातो. त्याचे अस्तित्वच अशा रीतीने नाशिवंत ठरल्यास त्याची प्राप्ती व तत्स्वरूप होणे ह्या दोन्ही गोष्टी द्वैतमतात संभवत नाही. द्वैताशिवाय प्रेमाची कल्पना त्यांच्या मतात संभवत नसल्यामुळे अद्वैत अवस्थेत भक्ती करण्याची कल्पनाच त्यांना करता येऊ शकत नाही.

माउलीच्या मताने अद्वैतज्ञानाशिवाय परमेश्वराची प्राप्ती नाही व परमप्रेम किंवा पराभक्तीही संभवतच नाही.

यालागीं तो कर्मयोगी। मी जालाचि मातें भोगी। तारुण्य कां तरुणांगीं। जियापरी॥ ११४७॥

अर्थ—ज्याप्रमाणे तरुण स्त्रीच्या ठिकाणी तारुण्य असते (ती त्याचा भोग घेते) त्याप्रमाणे कर्मयोगी मत्स्वरूप होऊन मला भोगतो॥ ११४७॥

तरंग सर्वांगीं तोय चुंबी। प्रभा सर्वत्र विलसे बिंबीं। नाना अवकाश नभीं। लुंठतु जैसा॥ ११४८॥

अर्थ—जसा तरंग सर्वांगाने पाण्याचे चुंबन घेतो किंवा प्रकाश बिंबाच्या ठिकाणी सर्वत्र व्यापून राहतो किंवा पोकळी आकाशात सर्वत्र भरून राहते॥ ११४८॥

तैसा रूप होऊनि माझें। मातें क्रियावीण तो भजे। अलंकारु का सहजें। सोनयातें जेवीं॥ ११४९॥

अर्थ—ज्याप्रमाणे सोने स्वाभाविकपणे लगडपणाने असते. त्याप्रमाणे तो कर्मयोगी मत्स्वरूप होऊन कोणतीही क्रिया न घडता मला भजत असतो॥ ११४९॥

गूढार्थदीपिका—ओवी ११४९

११३८ ते ११४९ पर्यंतच्या ओव्यातून माउलीने ज्ञानोत्तर भक्तीचे स्वरूप वर्णन केले आहे.

वेदान्तात व भक्तिशास्त्रांत श्रद्धा आणि प्रेम हे पर्यायवाची शब्द आहेत. "श्रद्धया परयोपेत:" या गीतेच्या १२व्या अध्यायातील श्लोकावर टीका करताना "तैसी नित नवी भजता। श्रद्धा दिसे" "परी ठाकिलिया सागर। जैसा मागिलहि यावा अनिवार। तिये गंगेचिया ऐसा पडिभर। प्रेमभावा॥" या ओव्यातून श्रद्धा शब्दाचा अर्थ प्रेम माउलीने केला आहे. जे प्रेम नित्य नवेच राहते, शिळे कधी होतच नाही—म्हणजे भगवंताच्या सेवेत, नामस्मरणांत किंवा कोणत्याही कामात कधीही कंटाळा किंवा आता पुरे झाले असे वाटत नाही, त्याला श्रद्धा, परमप्रेम किंवा नित्य नवी श्रद्धा म्हणतात. या प्रेमात मनाला एक सारखा अखंड उल्हास असतो. हीच पराभक्ती होय.

माउली या ओव्यातून ज्ञानोत्तर अशा ऐक्य स्थितींतही सगुणसाकार भगवंताचे प्रेम कसे रहाते हे सांगत आहे.

व्यक्तिरेक ज्ञानाने नामरूपा विषयी जी उदासीन बुद्धी उत्पन्न होते ती, अन्वय ज्ञानाने नामरूपेहीं पूर्णब्रह्म आहेत असा अनुभव येऊन नि:शेष नाहीशी झाली की नामरूपासह असलेला परमात्माही निरुपाधिकच ठरतो. म्हणून त्याच्या नामरूपासह त्याच्यावर आत्मप्रेम जडते व त्या परमात्म्याच्या ठिकाणी **स्वामी सेवक** भावाने प्रेम करावेसे वाटते. हीच गोष्ट माउलीनी "ही ज्ञान निष्ठा जेथ हात वसे। तेथ भक्ती माझी उल्हसे" या ओवीतही पुढे सांगितली आहे. ज्ञाननिष्ठा म्हणजे बुद्धीची चिन्मात्र स्थिती झाली असताच ही पराभक्ती होते असे माउली म्हणते ही पराभक्ती ज्यांनी ज्ञाननिष्ठा संपादन केली आहे अशा पुरुषाच्या ठिकाणी अनुभवाने सिद्ध होत असल्यामुळे ती नुसत्या बोलण्याचा विषय नाही.

का चंदनाची द्रुती जैसी। चंदनीं भजे अपैसी। का अकृत्रिम शशीं। चंद्रिका ते॥ ११५०॥

अर्थ—अथवा चंदनाचा सुवास जसा चंदनाला आपोआप भजतो किंवा चांदणे जसे निसर्गत: चंद्राला भजते॥ ११५०॥

तैसी क्रिया कीर न साहे। परी अद्वैतीं भक्ति आहे। हें अनुभवाचिजोगें नव्हे। बोलाऐसें॥ ११५१॥

अर्थ—ज्याप्रमाणे (अद्वैतात) क्रिया करणे खरोखर जरी संभवत नाही, तर देखील अद्वैतात भक्ती राहत असते. हे अनुभवानेच कळण्यासारखे आहे, बोलण्या सारखे नाही॥ ११५१॥

गूढार्थदीपिका—तैसी क्रिया कीर न साहे। परी अद्वैंती भक्ती आहे।

अद्वैत ज्ञानाने ज्ञांता, ज्ञान व ज्ञेय ही त्रिपुटी नाहीशी होत असल्याकारणाने ज्या अद्वैतज्ञान दशेत कोणत्याही प्रकारची क्रिया होणे संभवत नाही. पण त्याही दशेत परमप्रेमरूपा भक्ती मात्र रहाते हे खरे आहे. ही अद्वैतदशेत होणारी भक्ती अनुभव घेण्याची गोष्ट आहे, ती शब्दाने व्यक्त करण्या जोगी नाही.

अद्वैतज्ञान झालेल्या ज्ञान्याच्या ठिकाणी मिथ्या देहाभास व जगदाभास प्रारब्धामुळे रहात असतात; म्हणून ज्ञानाने मनोनाश व वासनाक्षय यांचा सतत अभ्यास चालू ठेवावा, असे वेदान्त म्हणतो. याच दशेला 'जीवन्मुक्त दशा' असे म्हणतात. प्रारब्ध संपून देहपात झाल्यावर अर्थातच देहाभास किंवा जगदाभास यांचा प्रश्न उपस्थित होत नाही व म्हणून तो ज्ञानी पूर्णमुक्त होतो. ह्याच दशेला विदेहमुक्ती असे वेदान्त म्हणतो. जीवन्मुक्ती व विदेहमुक्तीतील हा फरक केवळ देहाचा व जगताचा मिथ्याभास यावर अवलंबून आहे.

ज्ञानोत्तर सगुण भगवंताच्या ठिकाणी होणाऱ्या पराभक्तीमुळे ज्ञानी भक्तांच्या ठिकाणी कोणत्याच प्रकारची जाणीव शिल्लक रहात नसल्यामुळे देहाचा व जगताचा मिथ्याभासही त्यांचा पूर्णपणे निवृत झालेला असतो. हीच स्थिती त्यामुळेच विदेहमुक्तितुल्य रहात असल्यामुळे ज्ञानीभक्तांना जीवन्मुक्तीतच विदेहमुक्तीचा अनुभव येतो. त्यांच्या दृष्टीने जीवन्मुक्ती व विदेहमुक्ती हा फरकच रहात नाही. सगुण भगवंताच्या परमप्रेमांत तल्लीन झालेल्या या ज्ञानी भक्तांना सर्वनामरूपासह एक भगवान्च अनुभवाला येतो व हीच एक रसात्मक ब्रह्मस्थिती आहे. अद्वैत ज्ञानानंतर पराभक्तीने येणारा आपला अनुभव सांगतांना श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात की आम्हां भक्तांना भोग म्हणजे इष्ट परमानंद व मोक्ष म्हणजे विदेहमुक्ती या दोहों करता तुझ्या सगुण साकार मूर्तीवाचून दुसरे काहीही लागत नाही. म्हणूनच आता तुझ्या विश्वरूपाचा उपसंहार कर व सगुण श्रीकृष्णरूपाने प्रगट हो.

आम्हां भोगमोक्षांचिया ठायीं। श्रीमूर्तीवांचूनि नाहीं।
म्हणौनी तैसाचि साकार होई। हे उपसंहारी आता॥

(ज्ञानेश्वरी अ० ११-१६०८)

श्रीगुलाबराव महाराजांनी ज्ञानोत्तर भगवद्भक्तीने येणाऱ्या या अनुभवाचे वर्णन करताना म्हटले आहे की एकदा खाल्लेले अन्न वारंवार सेवन केले तरच त्या पदार्थांचे प्रेम अवीट होते. ब्रह्मानंद अवीट आहे असे सांगितले आहे. पण भक्तीवाचून दुसऱ्या मार्गाने त्या ब्रह्मानंदाचे सेवन होत नसल्यामुळे भक्तीवाचून, केवळ ज्ञानाने, ब्रह्मानंदाचा अवीटपणा अनुभवाला येत नाही.

अहो जेवलेचि जेवावे। तैसे सेविलेंचि सेवावे।
तरीच ते स्वभावे। अविट होईल॥
ब्रह्मानंद अविट पूर्ण। त्याची कैसी काय खूण।
तें न कळेचि भक्तिवीण। न घडे सेवन पुनः पुनः॥

[श्री गुलाबराव महाराजकृत भगवद्भक्ति सौरभ, पराग ८ श्लोक २९-३० व बाबाजी पंडीतांची त्यावरील भावार्थ प्रकाशिका]

तेव्हां पूर्वसंस्कारछंदें। जें कांहीं तो अनुवादे। तेणें आळविलेनि वो दें। बोलतां मीचि॥ ११५२॥

तेव्हां पूर्वीच्या संस्कारांमुळे तो जे काही बोलतो, ते बोलणेच माझी भक्ती होते व त्या आळवणीला साद देऊन मी वो देतो आणि बोलणारा मीच असतो॥ ११५२॥

बोलतया बोलताचि भेटे। तेथें बोलिलें हें न घटे। तें मौन तंव गोमटें। स्तवन माझें॥ ११५३॥

अर्थ—बोलणाऱ्याला बोलणाराच स्वतः भेटला, तर बोलणे होण्याचाच संभव नाही. तेव्हा मौन हेच उत्तम स्तवन होय.॥ ११५३॥

म्हणौनि तया बोलतां। बोली बोलतां मी भेटतां। मौन होय तेणें तत्त्वतां। स्तवी तो मातें॥ ११५४॥

अर्थ—म्हणून तो बोलत असताना त्याच्या बोलण्यात बोलणारा जो मी तो भेटत असल्या कारणाने ते त्याचे बोलणे मौनच होय. त्या मौनाने तत्त्वतः तो माझे स्तवन करतो.॥ ११५४॥

तैसेंचि बुद्धी का दिठी। जें तो देखों जाय किरीटी। तें देखणें दृश्य लोटी। देखतेंचि दावी॥ ११५५॥

अर्थ—त्याचप्रमाणे अर्जुना, बुद्धीने अथवा डोळ्याने तो जे पहावयास जातो, त्याचे ते पाहणे, दृश्याला नाहीसे करून द्रष्ट्यालाच दाखविते॥ ११५५॥

आरिसया आधीं जैसें। देखतेंचि मुख दिसे। तयाचें देखणें तैसें। मेळवी द्रष्टें॥ ११५६॥

अर्थ—आरशात पहाण्यापूर्वी जसे मुख होते तसेच ते आरशात पहातानाच दिसते, त्याप्रमाणे त्याच्या पहाण्यात द्रष्ट्याचेच दर्शन होते॥ ११५६॥

दृश्य जाउनियां द्रष्टें। द्रष्ट्यासीचि जैं भेटे। तैं एकलेपणें न घटे। द्रष्टेपणही॥ ११५७॥

अर्थ—जेव्हा दृश्याच्या कल्पनेचा निरास होऊन द्रष्टा द्रष्ट्यालाच भेटतो, तेव्हां द्रष्टाच एकमेव रहात असल्याकारणाने द्रष्टेपणही नाहीसे होते॥ ११५७॥

तेथ स्वप्नींचिया प्रिया। चेवोनि झोंबों गेलिया। ठायिजे दोन्ही न होनियां। आपणचि जैसें॥ ११५८॥

अर्थ—जाग आल्यावर स्वप्नातील प्रियेला आलिंगन देण्याला गेलेला पुरुष ज्याप्रमाणे स्त्री व पुरुष दोन्हीही (स्वप्नातील) नाहीसे झाल्यामुळे तो एकटाच केवळ राहतो॥ ११५८॥

का दोहीं काष्टांचिये घृष्टी-। माजीं वन्हि एक उठी। तो दोन्हीं हे भाष आटी। आपणचि होय॥ ११५९॥

अर्थ—किंवा दोन लाकडांच्या घर्षणातून एकच अग्नी निर्माण होतो व 'दोन लाकडे' ही भाषा संपून तोच केवळ एक राहतो. ॥ ११५९॥

नाना प्रतिबिंब हातीं। घेऊं गेलिया गभस्ती। बिंबताही असती। जाय जैसी॥ ११६०॥

अर्थ—किंवा सूर्य आपले प्रतिबिंब हातात धरायला गेला असता (प्रतिबिंबा बरोबरच तत्सापेक्ष) बिंबताही ज्याप्रमाणे नाहीशी होते॥ ११६०॥

तैसा मी होऊनि देखतें। तो घेऊ जाय दृश्यातें। तेथ दृश्य ने तिथें। द्रष्टृत्वेंसीं॥ ११६१॥

अर्थ—त्याप्रमाणे तो मत्स्वरूप द्रष्टा होऊन जेव्हा दृश्याला घेऊं पहातो, तेव्हा द्रष्टेपणाही दृश्यासह नाहीसा होतो॥ ११६१॥

रवि आंधारु प्रकाशिता। नुरेचि जेवीं प्रकाश्यता। तेवीं दृश्यीं नाहीं द्रष्टृता। मी जालिया॥ ११६२॥

अर्थ—सूर्य काळोखाला प्रकाशित करू लागला म्हणजे ज्याप्रमाणे प्रकाश्य जो आंधार तो उरत नाही (केवळ प्रकाशच राहतो) त्याप्रमाणे मत्स्वरूप झाले म्हणजे दृश्याच्या ठिकाणी (तोच असल्यामुळे तत्सापेक्ष) द्रष्टुपणही रहात नाही॥ ११६२॥

मग देखिजे ना न देखिजे। ऐसी जे दशा निपजे। ते तें दर्शन माझें। साचोकारें॥ ११६३॥

अर्थ—मग पाहणेही नाही किंवा न पाहणेही नाही अशी जी दशा उत्पन्न होते तेच माझे यथार्थ दर्शन होय॥ ११६३॥

तें भलतयाही किरीटी। पदार्थाचिया भेटी। दृष्टृदृश्यातीता दृष्टी। भोगी तो सदा॥ ११६४॥

अर्थ—अर्जुना, कोणताही पदार्थ पहात असता तो द्रष्टा व दृश्य या भावरहित दृष्टीने त्यांचा अनुभव घेत असतो॥ ११६४॥

आणि आकाश हें आकाशें। दाटलें न ढळें जैसें। मिया आत्मेन आपणपें तैसें। जालें तया॥ ११६५॥

अर्थ—आणि आकाशानेच संपूर्ण आकाश घनदाट भरून गेले असल्यामुळे ते किंचित् देखील ज्याप्रमाणे हालत नाही, त्याप्रमाणे माझ्या आत्मस्वरूपाशी तो एकरूप झाला असल्यामुळे त्याला आपल्या ठिकाणी तसाच घनदाट आत्मस्वरूपाचा प्रत्यय येतो॥ ११६५॥

कल्पांतीं उदक उदकें। रुंधिलिया वाहों ठाके। तैसा आत्मेनि मियां येकें। कोंदला तो॥ ११६६॥

अर्थ—कल्पाच्या शेवटी (प्रलयाच्यावेळी) पाण्यानेच पाणी रोखले गेल्यामुळे पाण्याचे वाहणे बंद होते, त्याप्रमाणे माझ्या एका आत्मस्वरूपानेच तो संपूर्णपणे भरून जातो॥ ११६६॥

पावो आपणपयां वळघे। केवीं वन्हि आपणपयां लागे। आपणपां पाणी रिघे। स्नाना कैसें॥ ११६७॥

अर्थ—पाय आपल्यावरच कसा चढेल? विस्तव स्वत:लाच कसा जाळील? पाणी स्वत:च्याच स्नानाला कसे उपयोगी येईल?॥ ११६७॥

म्हणोनि सर्व मी जालेपणें। ठेलें तया येणेंजाणें। तेचि गा यात्रा करणें। अद्वया मज॥ ११६८॥

अर्थ—म्हणून अर्जुना, तोच सर्वत्र मीच झाल्याकारणाने त्याचे येणे जाणे थांबते. मी जो अद्वयस्वरूप त्या माझी हीच यात्रा आहे॥ ११६८॥

पैं जळावरील तरंगु। जरी धांविन्नला सवेगु। तरी नाहीं भूमिभागु। क्रमिला तेणें॥ ११६९॥

अर्थ—पाण्यावरील लाट जरी वेगाने उसळून धावली तरी तिच्याकडून जमीनीचा भाग आक्रमिला जात नाही.॥ ११६९॥

जें सांडावें कां मांडावें। जें चालणें जेणें चालावें। तें तोयचि एक आघवें। म्हणोनियां॥ ११७०॥

अर्थ—त्या लाटेला जे ठिकाण टाकून द्यावयाचे किंवा ज्या ठिकाणी तिला जावयाचे, तिचे जे चालणे किंवा ज्याने चालावयाचे ते संपूर्ण एक पाणीच असते म्हणून॥ ११७०॥

गेलियाही भलतेउता। उदकपणें पांडुसुता। तरंगाची एकात्मता। न मोडेचि जेवीं॥ ११७१॥

अर्थ—अर्जुना, ती लाट वाटेल तिकडे गेली तरी पाणीपणामुळे लाटेची पाण्याशी जी एकरूपता आहे ती ज्याप्रमाणे अजिबात ढळत नाही॥ ११७१॥

तैसा मीपणें हा लोटला। तो आघवेंयाचि मज आतुं आला। या यात्रा होय भला। कापडी माझा॥ ११७२॥

अर्थ—त्याप्रमाणे मीपणाने (अहंब्रह्मास्मिरूपाने) हा पूर्णपणे भरलेला असता (हा मीपणाने 'अहंब्रह्मास्मि वृत्तीने उचंबळत असला तरी) तो सर्वस्वाने मत्स्वरूप झालेला असतो. या यात्रेमुळे तो चांगल्या प्रकारे माझा यात्रेकरू होतो॥ ११७२॥

आणि शरीरस्वभाववशें। कांहीं येक करूं जरी बैसे। तरी मीचि तो तेणें मिषें। भेटें तया॥ ११७३॥

अर्थ—आणि शरीराच्या स्वभावधर्मानुसार तो जे जे काही करू लागतो, (त्या सर्व व्यवहारात) ते ते सर्व मीच असल्यामुळे त्या त्या रूपाने मीच त्याला भेटत असतो॥ ११७३॥

गूढार्थदीपिका—तरी मीचि तो तेणें मिषें। भेटे तया।

ज्ञानी भक्ताचे प्रारब्धानुसार जे विषयांचे सेवन होते व जी इंद्रियांची प्रवृत्ती होते त्याचा उलगडा या ओवीत ज्ञानेश्वर महाराजांनी केला आहे.

अज्ञानी लोकांना ज्ञानीपुरुष विषय सेवन करतो असे दिसत असले तरी त्या ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणी त्याचे काहीच ज्ञान नसते. कारण भोक्ता भोग्य किंवा द्रष्टा दृश्य असे तो दोघांचे दोन पण पहात नसून भोग्याच्याठिकाणी व दृश्याच्या ठिकाणी तो आपल्या स्वत:लाच पहात असतो. त्यामुळे त्याच्या वृत्तीत आपण काही भोगले किंवा आपण काही पाहिले अशी जाणीवच उत्पन्न होत नाही. म्हणून ज्ञान्याची सर्व इंद्रियप्रवृत्ती विषय रहित असते.

'उत्तम भक्त विषय सेविती। हा बोल वाढला प्राकृताप्रति। त्यासी विषयी नाही विषयस्फूर्ति। त्यागिति भोगिती दोन्ही मिथ्या॥' (एक० भाग० अ० २) ''मुक्तिमाजी विशेषु कायी। वृत्ति निर्विकल्प असे पाही। भक्तांच्या सर्व कर्मांचे ठायीं। स्फुरण नाही विषयांचे'' (ए० भा० अ० ११) असे नाथांनी ज्ञान्यांच्या व्यवहाराविषयी म्हटले आहे.

अमृतानुभवाच्या नवव्या प्रकरणात माउली म्हणते. ''विषयाचे नाव समजल्याबरोबर इंद्रिय-समुदाय आपापल्या विषयाकडे समोर धाव घेत असला तरी ज्याप्रमाणे दृष्टिसमोर आरसा आल्याबरोबर दृष्टि दृष्टीलाच पहाते किंवा एका दृष्टीलाच बोध होतो त्याप्रमाणे ज्ञानी भक्त पुरुषाच्या वृत्तीच्या स्फुरणाची स्थिती होते.''

म्हणोनि विषयांचेनि नावे। सुनीं इंद्रियाचे थवे। सैंघ घेती धावे। समोरही॥ ९॥
परी आरसा शिवे शिवे। तव दिठीसी दिठी फावे। तैसे झाले धावे। वृत्तीचिया॥ १०॥

अज्ञान्याला त्याच्या अज्ञानामुळे ज्ञान्याच्या ठिकाणी व्यापार होत असताना दिसतो, ज्ञान्याला मात्र त्याचे अजिबात ज्ञान नसते हा भाव. लहरीचे व पाण्याचे जसे ऐक्य असते तसेच परमात्म्याचे व मी या वृत्तीचे ऐक्य आहे. हे ऐक्यज्ञान आपण विसरल्यामुळे मी म्हणजे आपण कोणी आहोत असे आपल्याला वाटते व आपण आपल्याला परमेश्वराहून निराळे समजू लागतो. ह्या विस्मृतिमुळेच सर्व नामरूपात स्फुरणारे मीपण आपण निरनिराळे समजून त्यांना निरनिराळे स्वतंत्र पदार्थ समजू लागलो अशा रीतीने भेदभावना आपल्याठिकाणी निर्माण झाली. या भेदभावनेला किंवा भेदज्ञानालाच जगत् हे नाव आहे, विसरणाऱ्या मीपणाला जीव ही संज्ञा आहे.

ज्ञानीभक्ताच्या दृष्टिकोनातून विचार करता ज्याप्रमाणे लहरी पाण्याला सोडून देऊन उठूं शकत नाही ती पाणी घेऊनच उठते, त्याप्रमाणे 'मी' वृत्ती देखील ज्ञानरूप शिवाला किंवा परमात्म्याला सोडून उठू शकत नाही. ती ज्ञानरूप शिवासहच स्फुरते म्हणून 'मी' वृत्तिरूप शक्तीचे व ज्ञानरूप शिवाचे स्वाभाविकच ऐक्य आहे या स्वाभाविक ऐक्यामुळेच 'मी' वृत्तीत ज्ञानरूप परमात्माच भरलेला आहे.

तेथ कर्म आणि कर्ता। हें जाऊनि पांडुसुता। मीयां आत्मेनि मज पाहतां। मीचि होय॥ ११७४॥

अर्थ—तेव्हा अर्जुना! कर्म आणि कर्ता हे दोन्ही भाव जाऊन तो मला आत्मत्वाने पाहात असल्यामुळे मत्स्वरूपच होतो.॥ ११७४॥

पैं दर्पणातें दर्पणें। पाहिलिया होय न पाहणें। सोनें झांकिलिया सुवर्णें। न झांके जेवीं॥ ११७५॥

अर्थ—आरशाने आरशालाच पाहिले तर न पाहिल्यासारखेच होते. सोन्याने सोने झांकले तर ते जसे झाकले जात नाही॥ ११७५॥

दीपातें दीपें प्रकाशिजे। तें न प्रकाशणेंचि निपजे। तैसें कर्म मियां कीजे। तें करणें कैंचें॥ ११७६॥

अर्थ—दिव्याने दिव्यालाच प्रकाशित केले तर ते न प्रकाशणेच होते. त्याप्रमाणे मद्रूप होऊन केलेले कर्म ते कर्म कसले?॥ ११७६॥

कर्महीं करितचि आहे। जैं करावें हें भाषचि जाये। तैं न करणेंचि होये। तयाचें केलें॥ ११७७॥

अर्थ—कर्म तर करीतच असतो, पण ते केले पाहिजे ही भाषा जेव्हा नाहीशी होते, तेव्हा त्याने केलेले कर्मच हे कर्म न केल्यासारखे होते॥ ११७७॥

क्रियाजात मी जालेपणें। घडे कांहींचि न करणें। तयाचि नांव पूजणें। खुणेचें माझें॥ ११७८॥

अर्थ—यच्चयावत् कर्म मद्रूपच होत असल्याकारणाने काही एक न घडल्याप्रमाणे होते. तेच माझे खरोखर पूजन होय॥ ११७८॥

म्हणौनि करीतयाही वोजा। तें न करणें हेंचि कपिध्वजा। निफजे तिया महापूजा। पूजी तो मातें॥ ११७९॥

अर्थ—म्हणून हे अर्जुना, तो करतो त्या पद्धतीने ते त्याचे करणेच न करणे होते व त्याच महापूजेने तो माझी पूजा बांधतो॥ ११७९॥

एवं तो बोले तें स्तवन। तो देखे तें दर्शन। अद्वया मज गमन। तो चाले तेंचि॥ ११८०॥

अर्थ—अशा रितीने तो जे बोलेल ते माझे स्तवनच होते. तो जे पाहिल ते माझे दर्शन होते. तो चालेल तेच अद्वयस्वरूप अशा माझ्याकडे त्याचे येणे होते॥ ११८०॥

तो करी तेतुली पूजा। तो कल्पी तो जपु माझा। तो असे तेंचि कपिध्वजा। समाधी माझी॥ ११८१॥

अर्थ—अर्जुना, तो जे जे करतो, ती तो सारी माझी पूजा, तो जी जी कल्पना करील तो तो माझा जप आणि तो निजतो तीच माझी समाधी॥ ११८१॥

जैसें कनकेंसीं कांकणें। असिजे अनन्यपणें। तो भक्तियोगें येणें। मजसीं तैसा॥ ११८२॥

अर्थ—अलंकाराची सोन्याची ज्याप्रमाणे एकरूपता असते त्याप्रमाणे भक्तीच्या योगाने तो माझ्याशी एकरूप झालेला असतो॥ ११८२॥

उदकीं कल्लोळु। कापुरीं परिमळु। रत्नीं उजाळु। अनन्यु जैसा॥ ११८३॥
किंबहुना तंतूसी पटु। कां मृत्तिकेसीं घटु। तैसा तो एकवटु। मजसीं माझा॥ ११८४॥

अर्थ—पाण्याशी लाटेची, कापराशी सुवासाची किंवा रत्नाशी तेजाची अभिन्नता असते॥ ११८३॥ किंबहुना सूताशी वस्त्राचे किंवा मातीशी घड्याचे जसे तादात्म्य असते, त्याप्रमाणे तो (माझा भक्त) माझ्याशी एकरूप असतो॥ ११८४॥

इया अनन्यसिद्धा भक्ती। या आघवाचि दृश्यजातीं। मज आपणपेंया सुमती। द्रष्ट्याते जाणें॥ ११८५॥

अर्थ—हे सुमते, या स्वयंसिद्ध अनन्यरूप भक्तीच्या योगाने हे सर्व जे जे दिसणारे आहे ते ते सर्व तो मला द्रष्ट्याला आत्मत्वाने पहातो॥ ११८५॥

तिन्ही अवस्थांचेनि द्वारें। उपाध्युपहिताकारें। भावाभावरूप स्फुरे। दृश्य जें हें॥ ११८६॥

अर्थ—जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती या तीन अवस्थांच्या द्वाराने, स्थूल, सूक्ष्म व कारण या तीन देहरूप उपाधींच्या रूपाने व विश्व, तैजस आणि प्राज्ञ या उपहिताच्या आकाराने जे भाव व अभावरूप दृश्य स्फुरण पावते॥ ११८६॥

तें हें आघवेंचि मी द्रष्टा। ऐसिया बोधाचा माजिवटा। अनुभवाचा सुभटा। धेंडा तो नाचे॥ ११८७॥

अर्थ—हे शूरश्रेष्ठा, हे जे सर्व दृश्य आहे ते द्रष्टृस्वरूप असलेल्या माझेच स्वरूप आहे अशा ज्ञानाच्या धुंदीत तो ऐक्यानुभावाचा झेंडा नाचवीत असतो.॥ ११८७॥

गूढार्थदीपिका—ओवी ११८६-८७

या पूर्वीच्या व या नंतरच्या ओव्यांतून माउलीनी अज्ञानाचा नाश होऊन ज्ञानाने ऐक्याची जी जाणीव निर्माण होते ती कशी होते हे समजवून सांगत असतांना सुवर्ण व अलंकार, पाणी व त्यावरील लाटा, कापूर आणि सुगंध, रत्न व त्याची कांती, तंतु व पट, माती व घट इत्यादी तादात्म्य संबंध दर्शविणारे दृष्टान्त दिले आहेत. त्याचप्रमाणे दोरी व साप किंवा स्वप्न व जागृती यांचेही दृष्टान्त दिले आहेत. (ओ०, ८२ ते ८५ व ओ० ८८ ते ९१)

शांकर वेदान्तात हे सर्व दृष्टान्त विवर्तवादाचे आहेत. विवर्ताची व्याख्या ''अतत्त्वोऽन्यथाप्रथा विवर्त इत्युदीरीत:'' ''पूर्वायस्थामपरित्यज्यैवावस्थान्तरभानं विवर्त:'' अशा तऱ्हेने केलेली आहे. कारणावस्था नाहिशी न होता मूळ वस्तू थोड्या निराळ्या फरकाने भासणे असा त्याचा अर्थ आहे, यात निराळ्या तऱ्हेने भासणाऱ्या म्हणून विवर्त असलेल्याची सत्ता मूळ वस्तूचीच सत्ता असते. ज्याला वेदान्तात 'अधिष्ठान' असा पारिभाषिक शब्द वापरतात. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी या विवर्तालाच अनेक ठिकाणी स्फुरण किंवा स्फुर्ती हा शब्द वापरला आहे.

स्फुरण व आधार म्हणजे ज्यावर ते स्फुरते ते अधिष्ठान यांचाही संबंध विवर्त व अधिष्ठानाप्रमाणेच आहे. कारण स्फुरणाचीही सत्ता आधाराचीच किंवा अधिष्ठानाचीच असते. पाणी व तरंग आणि दोरी व साप हे दोन्ही दृष्टान्त विवर्ताचेच असले तरी त्यात थोडा फरक आहे तो आपण या ठिकाणी लक्षात ठेवायला पाहिजे. पाणी व तरंग किंवा तंतु व पट किंवा माती व घडा यात मूळ कारणरूप अधिष्ठानाचे ज्ञान लोपवून तरंग, पट किंवा घडा यांचे ज्ञान आपणाला होत नाही नव्हे, मूळ कारणाचे ज्ञान कायम राहून या भासांचे आपणाला ज्ञान होते. म्हणून हा विवर्त असला तरी ज्ञानपूर्वक विवर्त आहे.

यालाच मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबराव महाराजांनी अनध्यस्त म्हणजे ज्यात अध्यास किंवा अज्ञान नाही असा विवर्त असे नाव दिले आहे. याच्या उलट रज्जुसर्प किंवा स्वप्न जागृती या उदाहरणांत अधिष्ठानाचे ज्ञान लोपवून भास किंवा विवर्ताचे ज्ञान होते. त्यामुळे हा अज्ञानयुक्त किंवा अध्यस्त विवर्त आहे.

जागृति, स्वप्न व सुषुप्ती या तीन अवस्थांच्या द्वारा उपाधी व उपहित यांच्या रूपाने जेवढे काही भावाभाव स्फुरतात ते सर्व दृश्यभावाभाव म्हणजे (नाशिवंत, जड व दु:ख रूपाने भासणारे) जग होय, असा अज्ञानयुक्त किंवा अध्यस्त स्फुरणाचा उल्लेख करून ज्ञानदृष्टी प्राप्त झाली असता हाच सर्व अज्ञान दृष्टीचा देखावा चैतन्यरूप ब्रह्माच्या विलासाचा (सत्, चिद् व आनंद धर्मांच्या) म्हणजेच चिद्विलासाचा देखावा होतो असे माउली या ठिकाणी म्हणते. आचार्यांच्या विवर्तवादात व माउलीच्या स्फुरणवादात वेदान्ताचे यथार्थज्ञान असल्यास फरक वाटण्याचे कारण नाही.

रज्जु जालिया गोचरु। आभासतां तो व्याळाकारु। रज्जुच ऐसा निर्धारु। होय जेवीं॥ ११८८॥

अर्थ—ही दोरी आहे असे दिसू लागले म्हणजे सर्पाच्या आकाराचा होणारा भास जाउन ती दोरीच आहे असा ज्याप्रमाणे आपला निश्चय होतो.॥ ११८८॥

भांगारापरतें कांहीं। लेणें गुंजहीभरी नाहीं। हें आटुनियां ठायीं। कीजे जैसें॥ ११८९॥

अर्थ—सोन्या व्यतिरिक्त अलंकार म्हणून गुंजभर देखील कांही नाही हे अलंकार आटवून ज्याप्रमाणे निश्चित करावे॥ ११८९॥

उदका येकापरतें। तरंग नाहींचि हें निरुतें। जाणोनि तया आकारातें। न घेपे जेवीं॥ ११९०॥

अर्थ—एका पाण्याव्यतिरिक्त तरंग म्हणून काहीच नाही हे समजल्यावर ज्याप्रमाणे तरंगाच्या आकाराची स्वतंत्र वस्तू घेतली जात नाही॥ ११९०॥

नातरी स्वप्नविकारां समस्तां। चेऊनियां उमाणें घेतां। तो आपणयापरौता। न दिसे जैसा॥ ११९१॥

अर्थ—किंवा स्वप्नातील यच्चयावत् दिसणाऱ्या गोष्टींचा जागे झाल्यावर हिशोब करायला लागलो असता ज्या प्रमाणे आपल्या व्यतिरिक्त दुसरे काहीही दिसत नाही॥ ११९१॥

तैसें जें कांहीं आथी नाथी। येणें होय ज्ञेयस्फूर्ती। तें ज्ञाताचि मी हे प्रतीती। होऊनि भोगी॥ ११९२॥

अर्थ—त्याप्रमाणे जे काही 'आहे-नाही' या भावाने ज्ञेयाचे स्फुरण होते ते सर्व मी ज्ञाताच आहे. हा त्याला अनुभव येऊन तो तसा अनुभव भोगतो॥ ११९२॥

जाणे अजु मी अजरु। अक्षयो मी अक्षरु। अपूर्व मी अपारु। आनंदु मी॥ ११९३॥

अर्थ—मी जन्मरहित आहे, मी वार्धक्यरहित आहे, मी नाशरहित आहे, मी अविनाशी आहे, मी अनादी आहे, मी अमर्यादित आहे व आनंदही मीच आहे असे तो जाणतो.॥ ११९३॥

अचळु मी अच्युतु। अनंतु मी अद्वैतु। आद्यु मी अव्यक्तु। व्यक्तुही मी॥ ११९४॥

अर्थ—मी स्थिर आहे. मी न ढळणारा आहे, मी नित्य आहे, मी अद्वैत आहे, मी सर्वांच्या आधीचा आहे, मी निराकार आहे व साकारही मीच आहे.॥ ११९४॥

ईश्य मी ईश्वरु। अनादि मी अमरु। अभय मी आधारु। आधेय मी॥ ११९५॥

अर्थ—नियम्य व नियात्मक मीच, अनादी व अमर मीच अभय मीच व आधार मीच आणि आधारभूतही मीच आहे.॥ ११९५॥

स्वामी मी सदोदितु। सहजु मी सततु। सर्व मी सर्वगतु। सर्वातीतु मी॥ ११९६॥

अर्थ—मी मालक असून नित्य आहे, मी स्वत:सिद्ध व अखंड आहे, सर्व मीच असून मीच सर्वत्र आहे व सर्वांच्या पलीकडचाही मीच आहे.॥ ११९६॥

नवा मी पुराणु। शून्यु मी संपूर्णु। अस्थूलु मी अनणू। जें कांहीं तें मी॥ ११९७॥

अर्थ—मी नवा व जुना आहे, मी शून्य व संपूर्ण आहे, जे काही स्थूळ नाही व जे अणु नाही तेही मीच आहे.॥ ११९७॥

अक्रियु मी येकु। असंगु मी अशोकु। व्याप्यु मी व्यापकु। पुरुषोत्तमु मी॥ ११९८॥

अर्थ—मी क्रियारहित आहे, मी एकटाच आहे, मी संगरहित व शोकरहित आहे, व्याप्य व व्यापक मीच व उत्तम पुरुषही मीच आहे.॥ ११९८॥

अशब्दु मी अश्रोत्रु। अरूपु मी अगोत्रु। समु मी स्वतंत्रु। ब्रह्म मी परु॥ ११९९॥

अर्थ—मी शब्दरहित व कानरहित आहे, मी रूपरहित व गोत्ररहित आहे, मी समस्वरूप व स्वतंत्र आहे, मी परब्रह्म आहे॥ ११९९॥

ऐसें आत्मत्वें मज एकातें। इया अद्वयभक्ती जाणोनि निरुतें। आणि याही बोधा जाणतें। तेंही मीचि जाणें॥ १२००॥

अर्थ—अशा प्रकारे मला एकाला अद्वैतभक्तीद्वारे आत्मस्वरूपाने खरोखर जाणतो आणि याही ज्ञानाला जाणणारा तोही मीच आहे हे तो जाणतो॥ १२००॥

पैं चेइलेयानंतरें। आपुलें एकपण उरे। तेंही तोंवरी स्फुरे। तयाशींचि जैसें॥ १२०१॥

कां प्रकाशतां अर्कु। तोचि होय प्रकाशकु। तयाही अभेदा द्योतकु। तोचि जैसा॥ १२०२॥

तैसा वेद्याच्या विलयीं। केवळ वेदकु उरे पाहीं। तेणें जाणवे तयातेंही। हेंही जो जाणे॥ १२०३॥

अर्थ—स्वप्नातून जागे झाल्यानंतर आपले एकपणच शिल्लक रहाते व तेही आपल्याला आपल्याच ठिकाणी स्फुरते॥ १२०१॥ किंवा सूर्य प्रकाशत असताना तोच प्रकाशक होतो व त्या अभेदाचा (प्रकाश्य व प्रकाशक यांच्या) जसा तोच दाखवणारा (द्योतक) असतो.॥ १२०२॥ त्याचप्रमाणे जाणल्या जाणाऱ्या वस्तूंचा नाश झाल्यानंतर केवळ ज्ञाताच शिल्लक राहतो. त्या ज्ञात्याकडूनच तोही स्वत: जाणला जातो हेही जो जाणतो.॥ १२०३॥

गूढार्थदीपिका—ओवी १२०३ तेणें जाणवे तयातेंही। हेंही जो जाणे।

स्वप्न पहात असणारा माणूस स्वप्नात देखील वस्तुत: एकटाच असतो. पण आपल्याच कल्पनेने तो अनेक दृश्ये स्वप्नात निर्माण करतो व अनेक गोष्टीचा तेथे अनुभव घेतो. स्वप्नातून जागे झाल्यानंतर स्वप्नातील अनेक वस्तू पूर्णपणे नाहीशा होतात व त्याचे एकटेपण केवळ शिल्लक राहते व ते एकटेपणही तो जाणत राहतो.

सूर्य प्रकाशत असतांना तो आपलाच प्रकाशक होतो कारण सूर्याच्या अस्तित्वाचे ज्ञान त्याच्याच प्रकाशामुळे आपल्याला कळते. प्रकाश व प्रकाशक असा जो सूर्य ह्यांचा अभेदही जसा त्याच्यामुळे कळतो म्हणून त्या अभेदाला दाखवणाराही तोच असतो. प्रकाशक, प्रकाश्य व प्रकाश ते तिन्हीही एक सूर्यच असतो. त्याचप्रमाणे अद्वैत ज्ञानानंतर विपरीत धर्मांनी भासणारे ज्ञेय पूर्णपणे नाहीसे झाल्यावर केवळ ज्ञाताच शिल्लक राहतो. ज्ञात्याच्या ठिकाणचे हे ज्ञातृत्व ज्ञेयाच्या अपेक्षेने आलेले असते. पण ही ज्ञातृत्वाची वृत्तीच असल्यामुळे ती त्या वृत्तीला आधार असलेल्या अशा ब्रह्मावरच स्फुरणार व हे आधाररूप ब्रह्म ज्ञानस्वरूप असते. आता तो आपण आपल्याच व्यापक स्वरूपाला जाणतो व 'मी ब्रह्मस्वरूप' आहे असे म्हणतो. हे त्याचे ज्ञान स्फुरणरूप किंवा वृत्तिरूप असल्यामुळे त्या ज्ञानाला जाणणारेही ज्ञान अधिष्ठानरूप परब्रह्माला होत असते. त्यालाच ईश्वर म्हणतात. अधिष्ठानरूप ईश्वराची ही निरपेक्ष ज्ञातृरूपता नित्य असते म्हणून तिला वेदान्तात नित्यदृष्टी असे म्हणतात.

तया अद्वयपणा आपुलिया। जाणती ज्ञप्ती जे धनंजया। ते ईश्वरचि मी हे तया। बोधासि ये॥ १२०४॥

अर्थ—अर्जुना, त्या आपल्या अद्वयपणाला जाणणारी जी ज्ञातृरूपता (ज्ञानवृत्ती) ती ईश्वरच आहे व तो ईश्वरच मी आहे असे त्यास ज्ञात झालेले असते.॥ १२०४॥

मग द्वैताद्वैतातीत। मीचि आत्मा एकु निभ्रांत। हें जाणोनि जाणणें जेथ। अनुभवीं रिघे॥ १२०५॥
तेथ चेइलयां येकपण। दिसे जें आपुलयां आपण। तेंही जाता नेणों कोण। होईजे जेवीं॥ १२०६॥
कां डोळां देखतिये क्षणीं। सुवर्णपण सुवर्णीं। नाटितां होय आटणी। अळंकाराचीही॥ १२०७॥
नाना लवण तोय होये। मग क्षारता तोयत्वें राहे। तेही जिरतां जेवीं जाये। जालेपण तें॥ १२०८॥
तैसा मी तो हें जें असे। ते स्वानंदानुभवसमरसें। काल्वूनियां प्रवेशे। मजचिमाजीं॥ १२०९॥

अर्थ—मग द्वैत व अद्वैत यांच्या पलीकडे असणारा जो आत्मा तो नि:संशय मीच आहे हे समजून हे (वृत्तिरूप) ज्ञान जेथे अनुभवात प्रवेश करते. (अनुभवरूप होऊन जाते)॥ १२०५॥ स्वप्नातून जागे झाल्यानंतर आपल्याला आपला जो एकपणा दिसू लागतो तोही नाहीसा झाला असता काय होऊन राहते हे जसे कळत नाही. (त्या अनुभवाचे काय स्वरूप असते हे जसे कळत नाही.)॥ १२०६॥ किंवा सोन्याकडे त्याच्या मूळ स्वरूपाच्या (अधिष्ठानरूपाने) दृष्टीने पहाताक्षणीच आटणी (खरोखर) न करताच अलंकाराची आटणी होते.॥ १२०७॥ किंवा पाण्यांत मीठ टाकल्यानंतर मीठ पाणीरूप होऊन जाते व त्याचा खारटपणा पाण्याच्यारूपाने राहतो व तो खारेपणाही जिरून गेल्यानंतर ज्याप्रमाणे मीठाचे पाणी झाल्याचा भावही नाहीसा होतो॥ १२०८॥ त्याप्रमाणे मी (देव) व तो (भक्त) हा जो दोनपणा असतो, तो आत्मानंदाच्या अनुभवात समरसपणाने मिसळून तो माझ्याच ठिकाणी प्रवेश करतो॥ १२०९॥

आणि तो हे भाष जेथ जाये। तेथें मी हें कोण्हासी आहे। ऐसा मी ना तो तिये सामाये। माझ्याचि रूपीं॥ १२१०॥

अर्थ—आणि 'तो' ही भाषा जेथे नाहीशी होते तेथें 'मी' पणा कोणी धारण करायचा? अशा रीतीने 'मी' ही नाही व 'तो' ही नाही अशा माझ्याच स्वरूपामध्ये तो मिळतो॥ १२१०॥

जेव्हां कापुर जळों सरे। तयाचि नाम अग्नि पुरे। मग उभयातीत उरे। आकाश जेवीं॥ १२११॥

कां धाडलिया एका एकु। वाढे तो शून्य विशेखु। तैसा आहे नाहींचा शेखु। मीचि मग आथी॥ १२१२॥

अर्थ—जेव्हा कापूर जळून संपतो, त्याचवेळेला अग्नीही त्याच्याच नावाबरोबर नाहीसा होतो. मग त्यांच्याहून वेगळे असलेले केवळ आकाशच एक ज्याप्रमाणे शेष राहते॥ १२११॥ किंवा एकातून एक वजा केला असता जसे शून्य शेष राहते, त्याप्रमाणे आहे नाहीचा शेष मग मीच राहतो॥ १२१२॥

तेथ ब्रह्म आत्मा ईशु। यया बोला मोडे सौरसु। न बोलणेयाही पैसु। नाहीं तेथ॥ १२१३॥

अर्थ—तेव्हा ब्रह्म, आत्मा ईश्वर या शब्दांच्या बोलण्याचे स्वारस्यच नाहीसे होते व न बोलण्यालाही (त्यांच्या सापेक्ष) तेथे जागा राहत नाही॥ १२१३॥

न बोलणेंही न बोलोनी। तें बोलिजे तोंड भरुनी। जाणिव नेणिव नेणोनी। जाणिजे तें॥ १२१४॥

अर्थ—न बोलणेही न बोलता ते तोंड भरून बोलावे व जाणीव नेणीव रहित होऊन ते जाणावे॥ १२१४॥

तेथ बुझिजे बोधु बोधें। आनंदु घेपे आनंदें। सुखवरी नुसधे। सुखचि भोगिजे॥ १२१५॥

अर्थ—त्या ठिकाणी बोधानेच बोध जाणायचा; आनंदानेच आनंद घ्यावयाचा व सुखानेच केवळ सुख भोगावयाचे॥ १२१५॥

गूढार्थदीपिका—ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय किंवा भोक्ता, भोग्य व भोग या त्रिपुटिरहित व त्यामुळेच ज्ञातृत्व व भोक्तृत्व ह्यांच्या पलीकडे असलेल्या निर्विकल्प दशेचे वर्णन माउली या ठिकाणी करत आहे. सामान्य माणसाला त्रिपुटीशिवाय ज्ञानाची व आनंदाची कल्पना करता येत नाही. निर्विकल्प दशा वाचेच्या पलीकडची असल्यामुळे शब्दांनी तिचे वर्णन करून सांगत असताना शब्दांची द्विरुक्ती करावी लागते.

ज्ञानीभक्त हा पाण्यावरील तरंगाप्रमाणे स्फुरणरूप असतो त्यामुळे परब्रह्म व त्याचा आधार आधेयरूप भास नाहीसा होत नाही. हा भास विषमसत्ताक असल्यामुळे पाणी व तरंगाप्रमाणे तो भास पूर्णपणे अद्वैतरूप आहे. परब्रह्माप्रमाणेच हा ज्ञानीभक्त चित्‌रूप व आनंदरूप आहे. त्यामुळे या अद्वैत दशेत पाणीरूप असलेल्या लहरीने तिला आधाररूप पाण्याचे ज्ञान करावे किंवा आनंद घ्यावा तशाच प्रकारे हा सच्चिदानंदरूप ज्ञानीभक्त आपल्या आधाररूप सच्चिदानंदरूप परब्रह्माचेच ज्ञान व आनंद अद्वैतरूपाने अनुभवतो. ही अवस्था त्यामुळेच बोधानेच बोध घ्यावा किंवा आनंदानेच आनंद भोगावा या स्वरूपाची आहे.

तेथ लाभु जोडला लाभा। प्रभा आलिंगिली प्रभा। विस्मयो बुडाला उभा। विस्मयामाजीं॥ १२१६॥

अर्थ—त्या अवस्थेत लाभालाच लाभ होतो. प्रभाच प्रभेला आलिंगन देते व आश्चर्यच आश्चर्यात पूर्णपणे बुडते॥ १२१६॥

समु तेथ सामवला। विश्रामु विश्रांति आला। अनुभव वेडावला। अनुभूतिपणें॥ १२१७॥

अर्थ—तेथे शमाला शांती मिळते, विश्रामाला विश्रान्ती मिळते व अनुभव अनुभूतिनेच वेडावून जातो॥ १२१७॥

किंबहुना ऐसें निखळ। मीपणा जोडे तया फळ। सेवूनि वेली वेल्हाळ। कर्मयोगाची ते॥ १२१८॥

अर्थ—फार काय सांगावे! असे शुद्ध मी पणाचे फळ त्या कर्मयोग्याला, कर्मयोगाची सुंदर वेळ सेवन करून (आश्रय करून) प्राप्त होते॥ १२१८॥

पैं कर्मयोगिया किरीटी। चक्रवर्तीच्या मुकुटीं। मी चिद्रत्न ते साटोवाटीं। होय तो माझा॥ १२१९॥

अर्थ—आणि अर्जुना, त्या कर्मयोगरूप सार्वभौम राजाच्या मुकुटात चैतन्यरूप रत्न मी होतो व त्याच्या मोबदल्यात तो मद्रूप होऊन राहतो. (आपली जीवदशा सोडून देऊन)॥ १२१९॥

कीं कर्मयोगप्रासादाचा। कळसु जो हा मोक्षाचा। तयावरील अवकाशाचा। उवावो जाला तो॥ १२२०॥

अर्थ—किंवा कर्मयोगरूपी मंदिराचा जो हा मोक्षरूपी कळस त्यावरील आकाशाचा तो कर्मयोगी विस्तार होतो.॥ १२२०॥

गूढार्थदीपिका—ओवी १२२० तयावरील अवकाशाचा। ऊवावो जाला तो।

आत्यंतिक दु:ख निवृत्ती व परमानंदप्राप्ती ही जी मोक्षाची दोन अंगे आहेत त्यापैकी अद्वैतज्ञानाने पहिले अंग प्राप्त होते व अद्वैत ज्ञानोत्तर सगुण भगवंताच्या भक्तीने दुसरे अंग प्राप्त होते.

जीवाची आत्यंतिक तळमळ अखंड तळमळ अखंड परमानंद प्राप्ती करताच आहे. मात्र ती प्राप्ती आत्यंतिक दु:ख निवृत्ति शिवाय प्राप्त होऊ शकत नाही त्यामुळे अद्वैत ज्ञानाची प्राप्ती ही मोक्षाच्या दुसऱ्या म्हणजे परमानंदरूप अंगाच्या प्राप्तीचे साधन ठरते.

सर्व व्यवहार भगवंता प्रीत्यर्थ होणाऱ्या कर्मयोगात मोक्षाची दोन्ही अंगे समाविष्ट झालेली आहेत, कर्मयोगाच्या पहिल्या अवस्थेत प्रेमाची उत्कटता राहत नसल्यामुळे तीत ज्ञानाचे अंग प्रधान राहत असते व प्रेमाचे अंग अर्थातच गौण. ह्या अवस्थेत 'अहंब्रह्मास्मि' व 'सर्वं खाल्विदं ब्रह्म' ह्या दोन्ही प्रकारच्या अद्वैतज्ञानाचा अनुभव त्या कर्मयोग्याला येत असतो.

हे दोन्ही प्रकारचे ज्ञानवृत्तिरूप असल्यामुळे जाणीव कायम ठेवणारे आहे. जोपर्यन्त जाणीव कायम आहे तो पर्यन्त निर्विकल्प दशेचा अनुभव येऊं शकत नाही हे आतापर्यन्तच्या विवेचनांवरून आपण पाहिलेच आहे.

कर्मयोगाच्या दुसऱ्या अवस्थेत सगुण भगवंताविषयीच्या वाढत्या प्रेमाने प्रेमाचे अंग प्रधान होते व ज्ञानाचे गौण. त्यामुळे ह्या ज्ञानीभक्त असलेल्या कर्मयोग्याला आंत व बाहेर एक सगुण भगवंताशिवाय दुसऱ्या कशाचेच भान राहत नाही ह्या प्रेमाच्या अवस्थेत कोणत्याही प्रकारची जाणीवच शिल्लक राहत नसल्यामुळे परब्रह्माच्या अत्यंत व्यापकतेचा अनुभव ह्या प्रेमाच्या समरस अवस्थेत त्या ज्ञानीभक्ताला येतो. अशा रीतीनें हा ज्ञानी भक्त कर्मयोगरूपी मंदिराचा मोक्षरूपी कळस होतो. आकाश व्यापकतेचे निर्विकल्पकतेचे प्रतीक आहे. म्हणूनच आकाशासारख्या व्यापक व निर्विकल्प अवस्थेचा अनुभव ह्या अवस्थेत त्याला येत असल्यामुळे कळसावरील आकाशावरील आकाशाचा विस्तार तो कर्मयोगी होतो असे माउलीने म्हटले आहे.

नाना संसार आडवीं। कर्मयोग वाट बरवी। जोडिली ते मदैक्यगांवीं। पैठी जालीसे॥ १२२१॥

अर्थ—अथवा संसाररूपी अरण्यात कर्मयोगाची उत्तम वाट असून ती मत्स्वरूपरूपी गावात येऊन ठेपली आहे.॥ १२२१॥

हें असो कर्मयोगवोघे। तेणें भक्तचिद् गंगे। मी स्वानंदोदधी वेगें। ठाकिला कीं गा॥ १२२२॥

अर्थ—हे असो. कर्मयोगाच्या ओघाने ज्ञान व भक्तीच्या नदीबरोबर 'मी' या आत्मानंदरूपी सागराला तो मोठ्या वेगाने येऊन मिळालेला असतो॥ १२२२॥

हा ठायवरी सुवर्मा। कर्मयोगीं आहे महिमा। म्हणौनि वेळोवेळां तुम्हां। सांगतों आम्ही॥ १२२३॥

अर्थ—हे मर्मज्ञ अर्जुना, येथपर्यंत कर्मयोगाची एवढी मोठी थोरवी आहे. म्हणूनच मी तुला पुन: पुन: सांगत आहे॥ १२२३॥

पैं देशें काळें पदार्थें। साधूनि घेईजे मातें। तैसा नव्हे मी आयतें। सर्वांचे सर्वही॥ १२२४॥

अर्थ—देश, काळ, पदार्थ इत्यादिकांच्या साधनाने (त्रिविध परिच्छेदासह) माझी प्राप्ती होईल अशातला मी नाही. तर मी स्वत:सिद्ध असून सर्व ठिकाणी आहे. (देशकालादीसुद्धा मद्व्यतिरिक्त नाहीत हा भाव.)॥ १२२४॥

म्हणौनि माझ्या ठायीं। जाचावें न लगे कांहीं। मी लाभें इयें उपायीं। साचचि गा॥ १२२५॥

अर्थ—म्हणून (मला वेगळे समजून) माझ्या प्राप्तीकरता काहीही कष्ट करण्याची आवश्यकता नाही. अरे, या पूर्वोक्त उपायांनी खरोखरच माझी प्राप्ती होते॥ १२२५॥

गूढार्थदीपिका—म्हणौनि माझ्या ठायीं। जाचावें न लगें कांहीं।

एखादी वस्तू आपल्याहून भिन्न असते तेव्हाच आपण कष्ट करून तिला प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करतो. आपण आपल्यालाच प्राप्त करून घेण्याचे कष्ट करीत नाही. आत्मवस्तू आपण स्वत:च असल्याकारणाने तिच्या

प्राप्तीकरता कष्ट करण्याची आवश्यकता नाही. पुन्हा ती वस्तू नित्य असल्याकारणाने ती कोणत्याही ज्ञानाने किंवा कर्माने निर्माण करता येत नाही. (न हि नित्यं वस्तु कर्मणा ज्ञानेन वा क्रियते। गीताभाष्य अ० ८ श्लोक ६७)

'ज्ञानादेव तु कैवल्यम्' असे जे म्हणण्यात येते त्याचा मग अर्थ काय? या म्हणण्याचा अर्थ ज्ञानाने अज्ञानाचा म्हणजेच द्वैताच्या अनुभवाचा नाश होतो व स्वत:सिद्ध असलेले आत्मज्ञान प्रगट होते असा आहे. मी अकर्ता, अक्रिय व फलरहित आहे व माझ्याशिवाय दुसरी वस्तूच नाही, अशा तऱ्हेचे ज्ञान ज्ञान्याला होऊन कर्माला कारण होणाऱ्या भेदबुद्धीचा नाश होतो. ज्ञानाचा अज्ञानाशी विरोध आहे. त्यामुळे रज्जुसर्पाच्या उदाहरणात दिव्याच्या प्रकाशाने अधिष्ठानरूप दोरीचे ज्ञान होताच सर्पाची ज्याप्रमाणे त्रैकालिक निवृत्ती होते त्याचप्रमाणे अधिष्ठानरूप ब्रह्माचे ज्ञान होताच अज्ञानजन्य सर्व विपरीत धर्माच्या दृश्याची त्रैकालिक निवृत्ती होते. (आत्मज्ञानस्य तु केवलस्य नि:श्रेयस हेतुत्वं, भेदप्रत्यय निवर्तकत्वेन कैवल्यफलावसायित्वात्.........न मत्त: अन्य: अस्ति कश्चित् इत्येवं रूपं आत्मविषयकं ज्ञानं उत्पद्यमानं कर्मप्रवृत्तिहेतुभूताया: भेद बुद्धे: निवर्तकत्वात्।.......अविद्या निवर्तकत्वे सति दृष्टकैवल्यफलावसानत्वात्..........गीता शांकरभाष्य अ० १८ श्लोक ६७)

कर्मयोगात ज्ञान व भक्तीचा संगम असल्याकारणाने त्या कर्मयोगाच्या साधनाने उभयविध पुरुषार्थरूप मोक्षाची प्राप्ती नि:संदेह व निश्चित होते असा भाव.

एक शिष्य एक गुरु। हा रूढला साच व्यवहारु। तो मत्प्राप्तिप्रकारु। जाणावया॥ १२२६॥

अर्थ—एक शिष्य व एक गुरु हा जो (परमार्थात) रूढ व्यवहार जगात चालू आहे तो माझ्या प्राप्तीचा मार्ग (स्वरूप, साधन व फळ) जाणून घेण्याकरताच आहे.॥ १२२६॥

अगा वसुधेच्या पोटीं। निधान सिद्ध किरीटी। वन्हि सिद्ध काष्ठीं। दोहां दूध॥ १२२७॥

अर्थ—अर्जुना, पृथ्वीच्या पोटात धनाचा ठेवा आयताच आहे, लाकडात अग्नी आयताच आहे व कासेत दूध आयतेच असते॥ १२२७॥

परी लाभें तें असतें। तया कीजे उपायातें। येर सिद्धचि तैसा येथें। उपायीं मी॥ १२२८॥

अर्थ—तसे पाहिले तर, असते त्याचीच प्राप्ती होऊ शकते. परंतु त्या करता उपायमात्र करावे लागतात. त्याचप्रमाणे मूळचा मी सिद्धच असलो तरी साधनमार्गानेच माझी प्राप्ती करून घ्यावी लागते॥ १२२८॥

हा फळहीवरी उपावो। कां पां प्रस्तावीतसे देवो। हें पुसतां तरी अभिप्रावो। येथिंचा ऐसा॥ १२२९॥

अर्थ—फळ सांगितल्यानंतर देखील साधन मार्ग पुन्हा सांगण्याचा भगवान् उपक्रम का करीत आहे अशी जर विचारणा करशील तर या सांगण्याचा हेतु हा आहे.॥ १२२९॥

जे गीतार्थाचें चांगावें। मोक्षोपायपर आघवें। आन शास्त्रोपाय कीं नव्हे। प्रमाणसिद्ध॥ १२३०॥

अर्थ—गीतेतील बोधाचा चांगुलपणा यात आहे की संपूर्ण गीताशास्त्र मोक्षाच्या प्राप्तीचे साधनमार्ग सांगणारे आहे इतर शास्त्रांनी सांगितलेले उपाय प्रमाणाने (अनुभूती) सिद्ध होणारे नाहीत.॥ १२३०॥

वारा आभाळचि फेडी। वांचूनि सूर्यातें न घडी। कां हातु बाबुळी धाडी। तोय न करी॥ १२३१॥

तैसा आत्मदर्शनीं आडळु। असे अविद्येचा जो मळु। तो शास्त्र नाशी येरु निर्मळु। मी प्रकाशें स्वयें॥ १२३२॥

अर्थ—वारा (सूर्या आड येणाऱ्या) अभ्रांना दूर सारतो त्या व्यतिरिक्त तो काही सूर्याला नवीन तयार करीत नाही किंवा हात पाण्यावरील शेवाळाला दूर सारतो, पाणी नवीन तयार करीत नाही॥ १२३१॥ त्याचप्रमाणे आत्मदर्शनाला प्रतिबंध करणारा जो अज्ञानाचा मळ असतो तो शास्त्राच्यामुळे नाहीसा होतो, एरव्ही मी निर्मळ आणि स्वयंप्रकाशच आहे.॥ १२३२॥

गूढार्थदीपिका—येर निर्मळ। मी प्रकाशे स्वये।

आत्मा शब्दाने म्हणजे शास्त्राने प्रकाशित होत नाही. शास्त्राने अविद्यादिक अडथळे किंवा प्रतिबंध दूर होतात व मग आत्मा स्वयं प्रकाशतो. कारण तो चैतन्यस्वरूप म्हणजे प्रकाश स्वरूपच आहे. स्वयंप्रकाशरूप असलेल्या

सूर्याला दाखवण्याकरता ज्याप्रमाणे दुसऱ्या तेजाची आवश्यकता नाही, त्याप्रमाणे स्वयं प्रकाशरूप चैतन्यात्म्याला प्रकाशित करण्याकरता शब्दादिकांची आवश्यकता नाही.

जेवढ्या काही विपरीत म्हणजे स्वरूप विसरून कल्पना केल्या असतील त्याच नाहीशा करावयाच्या असतात. ब्रह्मज्ञानाकरता स्वतंत्र आणखी प्रयत्न करण्याची आवश्यकता नाही. कारण ब्रह्म आपले स्वरूपच असल्यामुळे ते अत्यंत प्रसिद्धच आहे, असे आचार्य म्हणतात.

''अविद्याद्यारोपित निराकरणमात्रं ब्रह्मणि कर्तव्यम्, न तु ब्रह्मविज्ञाने यत·। अत्यंत प्रसिद्धत्वात्।''

गीताशांकरभाष्य अध्याय १८

म्हणोनि आघवींचि शास्त्रें। अविद्याविनाशाचीं पात्रें। वांचोनि न होती स्वतंत्रें। आत्मबोधीं॥ १२३३॥

अर्थ—म्हणून संपूर्ण शास्त्रे अविद्येचा नाश करण्याची साधने आहेत. त्या व्यतिरिक्त, स्वतंत्रपणे आत्मबोध करण्यास ती समर्थ नाहीत (आत्मबोध करणे त्यांच्या आधीन नाही.)॥ १२३३॥

तया अध्यात्मशास्त्रांसीं। जैं साचपणाची ये पुसी। तैं येइजे जया ठायासी। ते हे गीता॥ १२३४॥

अर्थ—त्या आत्मज्ञान प्रतिपादक शास्त्रांना जेव्हा आपला खरेपणा सिद्ध करण्याचा प्रश्न येतो तेव्हा त्यांना ज्या ठिकाणी जावे लागते ते हे गीताशास्त्र होय॥ १२३४॥

भानुभूषिता प्राचिया। सतेजा दिशा आघविया। तैसी शास्त्रेश्वरा गीता या। सनाथें शास्त्रें॥ १२३५॥

अर्थ—सूर्योदयाने पूर्व दिशेला शोभा आणली असता ज्याप्रमाणे सर्व दिशा प्रकाशमान होतात त्याप्रमाणे या एका श्रेष्ठ गीताशास्त्राने सर्व शास्त्रे सनाथ होतात. (सर्वशास्त्रांना छत्र लाभते अथवा सर्व शास्त्रांना आधार गवसतो)॥ १२३५॥

हें असो येणें शास्त्रेश्वरें। मागां उपाय बहुवे विस्तारें। सांगितला जैसा करें। घेवों ये आत्मा॥ १२३६॥

अर्थ—हे असो. या शास्त्रात श्रेष्ठ अशा या गीतेने ज्यारीतीने आत्मा हाताने घेता येईल (करतलामलकवत् स्पष्ट आकलन होईल) असा साधनमार्ग मागे पुष्कळ विस्ताराने सांगितला॥ १२३६॥

परी प्रथमश्रवणासवें। अर्जुना विपायें हें फावे। हा भावो सकणवे। धरूनि श्रीहरी॥ १२३७॥
तेंचि प्रमेय एक वेळ। शिष्यीं होआवया अढळ। सांगतसे मुकुळ-। मुद्रा आतां॥ १२३८॥

अर्थ—परंतु पहिल्यानेच ऐकल्या बरोबर हे अर्जुनास क्वचितच् समजले असेल अशी कल्पना कृपाळू अशा भगवंताच्या मनात येऊन॥ १२३७॥ एकवेळ सांगितलेला सिद्धान्तच शिष्याच्या ठिकाणी चांगला बिंबावा म्हणून श्रीकृष्ण आता पुन: संक्षेपाने सांगत आहेत.॥ १२३८॥

आणि प्रसंगें गीता। ठावोही हा संपता। म्हणौनि दावी आद्यंता। एकार्थत्व॥ १२३९॥

अर्थ—आणि सहजासहजी गीता देखिल समाप्त होत असल्यामुळे तिच्या आरंभापासून तो शेवटापर्यंत एकाच अर्थाचे प्रतिपादन आहे हे भगवान् दाखवीत आहेत.॥ १२३९॥

जे ग्रंथाच्या मध्यभागीं। नाना अधिकारप्रसंगीं। निरूपण अनेगीं। सिद्धांतीं केलें॥ १२४०॥
तरी तेतुलेही सिद्धांत। इये शास्त्रीं प्रस्तुत। हें पूर्वापर नेणत। कोण्ही जैं मानी॥ १२४१॥
तैं महासिद्धांताचा आवांका। सिद्धांतकक्षा अनेका। भिडऊनि आरंभु देखा। संपवितु असे॥ १२४२॥

अर्थ—या गीता-ग्रंथाच्या मध्यभागात निरनिराळ्या अधिकार प्रसंगी अनेक सिद्धान्त मांडून जे प्रतिपादन केले॥ १२४०॥ ते तितकेही सिद्धान्त या गीता शास्त्रांत आहेत असे पूर्वापार संबंध न समजता कोणी मानील॥ १२४१॥ म्हणून अनेक सिद्धान्ताची एक वाक्यता करूनच महासिद्धान्ताचे तात्पर्य सांगितले असल्यामुळे आरंभी प्रतिपादन केलेल्या सिद्धान्तानेच समाप्तीही केली आहे.॥ १२४२॥

एथ अविद्यानाशु हें स्थळ। तेणें मोक्षोपादान फळ। या दोहीं केवळ। साधन ज्ञान॥ १२४३॥

अर्थ—या गीताशास्त्रात अविद्येची निवृत्ती हा प्रतिपाद्य विषय आहे. त्याच्या योगाने मोक्षाची प्राप्ती करून घेणे हे प्रयोजन आहे. व दोन्ही गोष्टी साध्य करून घेण्याचे साधन केवळ ज्ञान आहे.॥ १२४३॥

हें इतुलेंचि नानापरी। निरूपिलें ग्रंथविस्तारीं। तें आतां दोहीं अक्षरीं। अनुवादावें॥ १२४४॥

अर्थ—हे इतकेच नाना प्रकारांनी या ग्रंथात विस्ताराने सांगितले. तेच आता दोन शब्दात पुन्हा सांगावयाचे आहे. ॥ १२४४ ॥

म्हणौनि उपेयही हातीं। जालया उपायस्थिती। देव प्रवर्तलें तें पुढती। येणेंचि भावें॥ १२४५॥

अर्थ—म्हणून साध्यही प्राप्त झाल्यावर पुन्हा उपाय सांगण्यास देव प्रवृत्त झाले ते याच उद्देशाने॥ १२४५॥

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः। मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम्॥ ५६॥

अर्थ—(कायावाचामनाने) मला शरण आलेला पुरुष सर्वकाळ सर्वकर्मे करीत असला तरी माझ्या कृपेमुळे शाश्वत व अविनाशी असे पद प्राप्त करतो. ॥ ५६ ॥

मग म्हणे गा सुभटा। तो कर्मयोगी या निष्ठा। मी होऊनी होय पैठा। माझ्या रूपीं॥ १२४६॥

अर्थ—मग भगवान् म्हणतात योद्ध्या अर्जुना, अशा निष्ठेने (स्थिर भक्तीने) तो कर्मयोगी, मत्स्वरूप होऊन माझ्याच ठिकाणी अढळपणे राहतो. ॥ १२४६ ॥

स्वकर्मांच्या चोखौळीं। मज पूजा करूनि भली। तेणें प्रसादें आकळी। ज्ञाननिष्ठेतें॥ १२४७॥

अर्थ—स्वकर्मरूप चांगल्या पुष्पांनी माझी सुंदरपूजा करून माझ्या प्रेमरूप कृपाप्रसादाने, ज्ञाननिष्ठा, तो प्राप्त करून घेतो. ॥ १२४७ ॥

ते ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे। तेथ भक्ति माझी उल्लासे। तिया मजसी समरसें। सुखिया होय॥ १२४८॥

अर्थ—तो ज्ञानमार्ग जेव्हा हस्तगत होतो, तेव्हा माझ्या भक्तीचा आविर्भाव होतो व तिच्या योगाने माझ्याशी समरस होऊन तो सुखी होतो. ॥ १२४८ ॥

गूढार्थदीपिका—ते ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे। तेथ भक्ती माझी उल्लासे।

श्रीज्ञानेश्वर महाराजांनी या ओवीत ज्ञान व भक्ती यांचा जनक व जन्य हा संबंध दाखविला आहे. ज्ञानप्राप्तीनंतरच परमप्रेम होऊ शकते. म्हणून ज्ञानसाधन व भक्तीसाध्य हे ओघानेच सिद्ध होते. ज्ञान हे जाणीवरूप असल्या कारणाने ती जाणीव जोपर्यन्त नाहीशी होत नाही तोपर्यन्त परमानंद प्रगट होऊ शकत नाही. प्रीतीचाच स्वभाव असा आहे की ती जाणिवेची जाणीव होऊ देत नाही. म्हणूनच प्रीती किंवा प्रेमवृत्ती जोपर्यन्त प्रधान होत नाही तो पर्यंत समरसतेचा म्हणजेच परमानंदाचा अनुभव येऊ शकत नाही. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी या ओवीत अद्वैत ज्ञाननिष्ठा ही पहिली पायरी, त्यानंतर परमप्रेमाचा सगुण भगवंताच्या ठिकाणी आविष्कार ही दुसरी पायरी, त्यामुळे समरसतेचा अनुभव ही तिसरी पायरी व त्यामुळे परमानंदता ही शेवटची अवस्था असा थोडक्यांत क्रम दर्शविला आहे. ऐक्याची जाणीव नाहीशी होऊन ऐक्य किंवा समरसता बाणण्याचे सामर्थ्य ज्ञानरूप चिद्वृत्तीत नसून आनंदरूप प्रीति किंवा पराभक्तीत आहे हा भाव. अद्वैत वेदान्तात देखील ज्ञानवृत्तीची जाणीव निःशेष नाहीशी होणे यालाच ज्ञानाची पराकाष्ठा म्हटले आहे. ''अहं भवोदयाभावः बोधस्य परमावधिः'' ज्ञान लीन झाले असताच खरा मोक्ष होतो असे श्रीज्ञानेश्वर महाराजही अमृतानुभवात म्हणतात. ''ज्ञानें मोक्षु घडे। ते निमालेनि।'' अमृता प्र० ३ ओवी २४.

आणि विश्वप्रकाशितया। आत्मया मज आपुलिया। अनुसरे जो करूनियां। सर्वत्रता हे॥ १२४९॥

अर्थ—आणि विश्वाला प्रकाशित करणारा जो मी आत्मा. त्या मला, माझे सर्वत्र व्यापकत्व जाणून जो मला अनुसरतो॥ १२४९ ॥

सांडूनि आपला आडळ। लवण आश्रयी जळ। का हिंडोनि राहे निश्चळ। वायु व्योमीं॥ १२५०॥

अर्थ—आपला प्रतिबंध (कठीणपणा) टाकून देऊन मीठ ज्याप्रमाणे पाण्यात विरघळून जाते किंवा इकडे तिकडे हिंडून वायू जसा आकाशात शांत राहतो॥ १२५० ॥

तैसा बुद्धी वाचा कायें। जो मातें आश्रऊनि ठाये। तो निषिद्धेंही विपायें। कर्मे करूं॥ १२५१॥

परी गंगेच्या संबंधीं। बिदी आणि महानदी। ऐक्य तेवीं माझ्या बोधीं। शुभाशुभांसी॥ १२५२॥

अर्थ—त्याचप्रमाणे बुद्धी, वाणी व देहाने ज्याने केवळ माझाच आश्रय केला आहे त्याच्याकडून चुकून एखादे वेळी निषिद्ध कर्मे केली गेली॥ १२५१ ॥ तरी गंगेला मिळणारा ओहोळ व मोठी नदी ज्याप्रमाणे गंगारूप होऊन जातात त्याप्रमाणे माझ्या ज्ञानामध्ये नंतर शुभ व अशुभ हे (दोन्हीही) एकरूपच होतात॥ १२५२ ॥

का बावनें आणि धुरें। हा निवाडु तंवचि सरे। जंव न घेपती वैश्वानरें। कवळूनि दोन्ही॥ १२५३ ॥

अर्थ—चंदन आणि साधे लाकूड हा भेद अग्नी जो पर्यन्त त्या दोघांनाही कवटाळीत नाही, तो पर्यन्तच असतो॥ १२५३ ॥

नाना पांचिकें आणि सोळें। हें सोनया तंवचि आलें। जंव परिसु आंगमेळें। एकवटीना॥ १२५४ ॥

अर्थ—हिणकस व शुद्ध सोने हा फरक परिसाचा त्यांना अंगस्पर्श होत नाही तो पर्यन्तच॥ १२५४ ॥

तैसें शुभाशुभ ऐसें। हें तंवचिवरी आभासे। जंव येकु न प्रकाशें। सर्वत्र मी॥ १२५५ ॥

अर्थ—त्याप्रमाणे शुभ व अशुभ हे तो पर्यन्तच भासतात जो पर्यन्त माझा सर्वत्र व्यापकत्वाने अनुभव येत नाही. ॥ १२५५ ॥

अगा रात्री आणि दिवो। हा तंवचि द्वैतभावो। जंव न रिगिजे गांवो। गभस्तीचा॥ १२५६ ॥

अर्थ—अरे, जो पर्यन्त सूर्याच्या कक्षेत प्रवेश केला नाही तो पर्यन्तच रात्र आणि दिवस हा भेद असतो॥ १२५६ ॥

म्हणौनि माझिया भेटी। तयाचीं सर्व कर्मे किरीटी। जाऊनि बैसे तो पाटीं। सायुज्याच्या॥ १२५७ ॥

अर्थ—अर्जुन, म्हणूनच माझी भेट होताक्षणीच त्याची सर्व कर्मे (शुभ व अशुभ) नाहीशी होऊन तो मुक्तीच्या पदावर जाऊन बसतो॥ १२५७ ॥

देशें काळें स्वभावें। वेंचु जया न संभवे। तें पद माझें पावे। अविनाश तो॥ १२५८ ॥

अर्थ—देशामुळें, काळामुळे किंवा नैसर्गिक धर्मामुळे ज्याच्यात कोणत्याही तऱ्हेचा ऱ्हास संभवत नाही अशा त्या माझ्या अविनाशी पदाला तो प्राप्त होतो. ॥ १२५८ ॥

किंबहुना पांडुसुता। मज आत्मयाची प्रसन्नता। लाहे तेणें न पविजतां। लाभु कवणु असे॥ १२५९ ॥

अर्थ—किंबहुना अर्जुना, माझ्या आत्मस्वरूपाचा प्रसाद प्राप्त झाल्यावर त्याला अप्राप्य असा कोणता लाभ आहे ?॥ १२५९ ॥

चेतसा सर्वकर्माणि मयि सन्न्यस्य मत्परः। बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव॥ ५७ ॥

अर्थ—अंतःकरणपूर्वक सर्व कर्मे माझ्या ठिकाणी समर्पण करून व मत्पर होत बुद्धियोगाच्या आश्रयाने आपले चित्त माझ्या ठिकाणी सतत ठेव॥ ५७ ॥

याकारणें गा तुवां इया। सर्व कर्मा आपुलिया। माझ्या स्वरूपीं धनंजया। संन्यासु कीजे॥ १२६० ॥

अर्थ—या करता, अर्जुना, तू आपल्या सर्व कर्मांचा माझ्या सगुण स्वरूपाचे ठिकाणी संन्यास कर. (सर्व कर्मे मला समर्पण कर)॥ १२६० ॥

परी तोचि संन्यासु वीरा। करणीयेचा झणें करा। आत्मविवेकीं धरा। चित्तवृत्ति हे॥ १२६१ ॥

अर्थ—परंतु अर्जुना, हा नित्य कर्माचा संन्यास नव्हे! आपली चित्तवृत्ती तू आत्मविचाराकडे लाव॥ १२६१ ॥

मग तेणें विवेकबळें। आपणपें कर्मावेगळें। माझ्या स्वरूपीं निर्मळे। देखिजेल सर्व॥ १२६२ ॥

अर्थ—मग त्या आत्मविचाराच्या सामर्थ्याने तुला आपल्याला कर्माहून वेगळे करता येऊन माझ्या निर्मळ स्वरूपाच्या ठिकाणी सर्व असल्याचे तुला दिसून येईल. ॥ १२६२ ॥

आणि कर्माची जन्मभोये। प्रकृति जे का आहे। ते आपणयाहूनि बहुवे। देखसी दूरीं॥ १२६३ ॥

अर्थ—आणि कर्माची जन्मभूमी जी प्रकृती आहे ती (आपल्याहून) आत्मस्वरूपापासून खूपच दूर आहे असे तूं पाहशील॥ १२६३ ॥

तेथ प्रकृति आपणयां-। वेगळी नुरे धनंजया। रूपेंवीण का छाया। जयापरी॥ १२६४॥

अर्थ—मग अर्जुना, पदार्थाहून छाया जशी अलग राहू शकत नाही तशी ती प्रकृतीही आत्मस्वरूपाहून वेगळी उरणार नाही. ॥ १२६४॥

ऐसेनि प्रकृतिनाशु। जालया कर्मसंन्यासु। निफजेल अनायासु। सकारणु॥ १२६५॥

अर्थ—अशा प्रकारे प्रकृतीचा नाश झाल्यावर कारणासहित कर्मसंन्यास आपोआपच घडून येईल॥ १२६५॥

मग कर्मजात गेलिया। मी आत्मा उरें आपणयां। तेथ बुद्धि घापे करूनियां। पतिव्रता॥ १२६६॥

अर्थ—अशा प्रकारे सर्व कर्मे नाहीशी झाल्यावर मग केवळ मी आत्मा आपल्या ठिकाणी उरतो. त्याठिकाणी तूं आपली बुद्धी पतिव्रतेसारखी एकनिष्ठ करून ठेवावी॥ १२६६॥

बुद्धि अनन्यें येणें योगें। मजमाजीं जैं रिगे। तैं चित्त चैत्यत्यागें। मातेंचि भजे॥ १२६७॥

अर्थ—या रीतीने अनन्य असणाऱ्या भक्तीने बुद्धी माझ्या ठिकाणी रममाण झाली म्हणजे चित्तही आपले विषय-चिंतन टाकून देऊन केवळ माझ्याच ठिकाणी रंगते. ॥ १२६७॥

ऐसें चैत्यजातें सांडिलें। चित्त माझ्या ठायीं जडलें। ठाके तैसें वहिलें। सर्वदा करी॥ १२६८॥

अर्थ—अशाप्रकारे सर्व विषयचिंतन सोडून देऊन चित्त माझ्याच ठिकाणी सर्वदा जडून राहील असाच साधनमार्ग तूं लवकर कर. ॥ १२६८॥

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि। अथ चेत्त्वमहङ्कारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि॥ ५८॥

अर्थ—मत्स्वरूप झालेला तूं माझ्या कृपेने सर्व जन्ममरणरूप संकट परंपरा तरून जाशील. पण अहंकाराने जर तूं मी सांगतो ते ऐकणार नाहीस तर मात्र नाश पावशील. ॥ ५८॥

मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियांचि भरेल जेव्हां। माझा प्रसादु जाण तेव्हां। संपूर्ण जाहला॥ १२६९॥

अर्थ—मग या अभिन्न सेवेने (अभेद भक्तीने) चित्तात मी भरून जाईन तेव्हा माझी कृपा पूर्ण झाली असे समज॥ १२६९॥

तेथ सकळदुःखधामें। भुंजीजती जियें मृत्युजन्में। तियें दुर्गमेंचि सुगमें। होती तुज॥ १२७०॥

अर्थ—ज्या जन्ममृत्युमुळे सर्व दुःखे भोगली जातात ती अटळ असल्यामुळे त्यातून पार पडणे दुस्तर असले तरी तुला मात्र त्यातून सहज पार पडता येईल॥ १२७०॥

सूर्याचेनि सावायें। डोळा सावाइला होये। तैं आंधाराचा आहे। पाडु तया॥ १२७१॥

अर्थ—सूर्याच्या मदतीचा हात डोळ्याला मिळाल्यावर त्या डोळ्यांना आंधाराची काय किंमत?॥ १२७१॥

तैसा माझेनि प्रसादें। जीवकणु जयाचा उपमर्दे। तो संसाराचेनि बाधे। बागुलें केवीं॥ १२७२॥

अर्थ—त्याप्रमाणे माझ्या कृपाप्रसादाने ज्याच्या जीवभावाचा कण पूर्णपणे नाहीसा झालेला आहे त्याला संसाराचा वागुलबोवा काय त्रास देणार?॥ १२७२॥

म्हणौनि धनंजया। तूं संसारदुर्गती यया। तरसील माझिया। प्रसादास्तव॥ १२७३॥

अर्थ—म्हणून अर्जुना, माझ्या कृपाप्रसादाने या संसाररूपी वाईट गतीतून तू पार पडशील॥ १२७३॥

अथवा हन अहंभावें। माझें बोलणें हें आघवें। कानामनाचिये शिंवे। नेदिसी टेंकों॥ १२७४॥

अर्थ—पण जर अहंकारामुळे माझे हे सर्व बोलणे आपल्या कानाच्या व मनाच्या हद्दीलाही शिवू देणार नाहीस. ॥ १२७४॥

तरी नित्य मुक्त अव्ययो। तूं आहासि तें होऊनि वावो। देहसंबंधाचा घावो। वाजेल आंगीं॥ १२७५॥

अर्थ—तर मग तू नित्यमुक्त व अव्यक्त असूनही ते सारे व्यर्थ होऊन देहाभिनाचा घाव तुला लागल्याशिवाय रहाणार नाही. ॥ १२७५॥

जया देहसंबंधाआंतु। प्रतिपदीं आत्मघातु। भुंजतां उसंतु। कहींच नाहीं॥ १२७६॥

अर्थ—ज्या देहतादात्म्यात पावलोपावली आत्मघात आहे व त्याचे फळ भोगत असता उसंत कधीच मिळत नाही॥ १२७६ ॥

येवढेनि दारुणें। निमणेनवीण निमणें। पडेल जरी बोलणें। नेघसी माझें॥ १२७७॥

अर्थ—माझे हे बोलणे जर मनावर घेणार नाहीस तर मरण नसतानाही (आत्मदृष्टीने) येवढे भयंकर मरण तुला भोगावे लागेल॥ १२७७॥

यदहङ्कारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे। मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति॥ ५९॥

अर्थ—अहंकाराच्या बळावर 'मी युद्ध करणार नाही' असा जो तू विचार करीत आहेस तो तुझा निश्चय व्यर्थ आहे. प्रकृतीच तुला युद्ध करण्याला प्रवृत्त करील.॥ ५९॥

पथ्यद्वेषिया पोषी ज्वरु। कां दीपद्वेषिया अंधकारु। विवेकद्वेषें अहंकारु। पोषूनि तैसा॥ १२७८॥

अर्थ—पथ्याचा द्वेष करणारा जसा ज्वराला पोसतो किंवा दिव्याचा द्वेष करणारा जसा अंधाराला बाळगतो त्याप्रमाणे विवेकाच्या द्वेषाने अहंकार बळावून॥ १२७८॥

स्वदेहा नाम अर्जुनु। परदेहा नाम स्वजनु। संग्रामा नाम मलिनु। पापाचारु॥ १२७९॥
इया मती आपुलिया। तिघां तीन नामें ययां। ठेऊनियां धनंजया। न जुंझें ऐसा॥ १२८०॥
जीवामाजीं निष्टंकु। करिसी जो आत्यंतिकु। तो वायां धाडील नैसर्गिकु। स्वभावोचि तुझा॥ १२८१॥

अर्थ—आपल्या देहाला अर्जुन व दुसऱ्यांच्या देहांना सगेसोयरे असे नाव देऊन व युद्धाला वाईट व पापकारक कृत्य असे म्हणून॥ १२७९॥ अर्जुना, अशा आपल्या या विचारसरणीने तिघांना तीन नावे देऊन मी लढणार नाही असा॥ १२८०॥ जो तू आपल्या मनात ठाम निश्चय केला आहेस त्या निश्चयाला तुझा जन्मजात क्षात्रस्वभावच व्यर्थ करून टाकील.॥ १२८१॥

आणि मी अर्जुनु हे आत्मिक। ययां वधु करणें हें पातक। हें माया वांचूनि तात्त्विक। कांहीं आहे॥ १२८२॥

अर्थ—आणि मी अर्जुन व हे माझे आप्तेष्ट, यांचा वध करणे हे पाप आहे या म्हणण्यात भ्रमावाचून दुसरा काही तात्विक भाग आहे?॥ १२८२॥

आधीं जुंझार तुवां होआवें। मग जुंझावया शस्त्र घेयावें। कां न जुंझावया करावें। देवांगण॥ १२८३॥

अर्थ—आधी तूं लढण्यास हो, मग लढण्याकरता शस्त्रें ग्रहण कर किंवा न लढण्याची शपथ तरी घे॥ १२८३॥

म्हणौनि न जुंझणें। म्हणसी तें वायाणें। ना मानूं लोकपणें। लोकदृष्टीही॥ १२८४॥

अर्थ—म्हणून मी लढत नाही ही भाषा व्यर्थच आहे. हे तिऱ्हाइतपणे व लोकदृष्टीनेही बरोबर नाही॥ १२८४॥

तऱ्ही न जुंझें ऐसें। निष्टंकिसी जें मानसें। तें प्रकृति अनारिसें। करवीलचि॥ १२८५॥

अर्थ—तरी मी लढणार नाही असा जो तूं मनाने निर्धार करीत आहेस, तो तुझा निर्धार तुझी क्षात्र प्रकृती निष्फळ करीलच॥ १२८५॥

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा। कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत्॥ ६०॥

अर्थ—अर्जुना, प्रकृतिसिद्ध असलेल्या स्वत:च्या कर्मामुळे बद्ध झालेला तू, मोहामुळे जे कर्म करूं इच्छित नाहीस, ते कर्म तूं (अगतिक होऊनच करशील) केल्याशिवाय रहाणार नाहीस॥ ६०॥

पैं पूर्वे वाहतां पाणी। पव्हिजे पश्चिमेचे वाहणीं। तरी आग्रहो उरे तें आणी। आपुलिया लेखा॥ १२८६॥

अर्थ—पाणी पूर्वेकडे वहात असता आपण पश्चिमेकडे पोहूं लागलो तर, आपला हट्ट तेवढा दिसणार. बाकी ते (पाणी) त्याला आपल्याच वळणाला आणणार!॥ १२८६॥

का साळीचा कणु म्हणे। मी नुगवें साळीपणें। तरी आहे आन करणें। स्वभावासी॥ १२८७॥

अर्थ—किंवा साळीचा दाणा 'मी साळीपणाने उगवणार नाही' म्हणू लागला तर स्वभावाच्या विरूद्ध करणे त्याला शक्य आहे?॥ १२८७॥

तैसा क्षात्रसंस्कारसिद्धा। प्रकृती घडिलासी प्रबुद्धा। आतां नुठी म्हणसी हा धांदा। परी उठविजसीचि तूं॥ १२८८॥

अर्थ—त्याप्रमाणे हे बुद्धिमंता, क्षात्र संस्काराने तुझी प्रकृती बनलेली आहे. आता तूं (युद्धकरण्यास) उठत नाही म्हणतोस, पण युद्धधर्माचा हा व्यवहार तुला उठवल्याशिवाय राहणार नाही॥ १२८८॥

पैं शौर्य तेज दक्षता। एवमादिक पांडुसुता। गुण दिधले जन्मतां। प्रकृती तुज॥ १२८९॥

अर्थ—अर्जुना, शौर्य, तेज, दक्षता इत्यादि गुण प्रकृतिने तूला जन्मताच दिलेले आहेत.॥ १२८९॥

तरी तयांचिया समवाया-। अनुरूप धनंजया। न करितां उगलिया। नयेल असों॥ १२९०॥

अर्थ—तर अर्जुना, त्या गुणांच्या समुच्चयानुरूप (त्यांच्या स्वभावानुरूप) तूं जर करणार नाहीस तर ते गुण तुला स्वस्थ बसवणार नाहीत॥ १२९०॥

म्हणौनियां तिहीं गुणीं। बांधलासि तूं कोदंडपाणी। त्रिशुद्धी निघसी वाहणीं। क्षात्राचिया॥ १२९१॥

अर्थ—म्हणून अर्जुना, तूं त्या (शौर्यादि) गुणांनी बांधला गेला आहेस. म्हणूंनच तू क्षात्रधर्माच्या प्रवाहाने जाशील हे निश्चित आहे.॥ १२९१॥

ना हें आपुलें जन्ममूळ। न विचारीतचि केवळ। न जुंझें ऐसें अढळ। व्रत जरी घेसी॥ १२९२॥
तरी बांधोनि हात पाये। जो रथीं घातला होये। तो न चले तरी जाये। दिगंता जेवीं॥ १२९३॥
तैसा तूं आपुलियाकडुनी। मी कांहींच न करीं म्हणौनी। ठासी परी भरंवसेनि। तूंचि करिसी॥ १२९४॥

अर्थ—अथवा आपल्या जन्मजात मूळ प्रकृतिचा विचार न करताच केवळ मी लढणार नाही असे जर अढळ व्रत घेशील॥ १२९२॥ तर हातपाय बांधून, रथात टाकलेला जरी पायाने चालत नसला तरी दूर देशाला ज्याप्रमाणे जातोच.॥ १२९३॥ त्या प्रमाणे तूं आपण स्वत: काहीच करणार नाही असे म्हणून स्वस्थ बसलास तरी खात्रीने तूंच (युद्ध) करशील॥ १२९४॥

उत्तरु वैराटींचा राजा। पळतां तूं कां निघालासि जुंझा। हा क्षात्रस्वभावो तुझा। जुंझवील तुज॥ १२९५॥

अर्थ—विराट देशाचा राजा उत्तर तो युद्धात पळत असता तू त्यावेळी लढाईस कां निघालास? तुझा हा क्षात्र स्वभावच तुला लढायला लावील.॥ १२९५॥

महावीर अकरा अक्षौहिणी। तुवां येकें नागविले रणांगणीं। तो स्वभावो कोदंडपाणी। जुंझवील तूतें॥ १२९६॥

अर्थ—हे अर्जुना, अकरा अक्षौहिणी असलेले मोठे बलाढ्य वीर युद्धांत तूं एकट्याने मोहनास्त्राचा प्रयोग करून नागविलेस (पराजित केलेस) तो तुझा स्वभावच (क्षात्रवृत्ती) तुला युद्ध करावयाला लावील.॥ १२९६॥

हां गा रोगु कायी रोगिया। आवडे दरिद्र दरिद्रिया। परी भोगविजे बळिया। अदृष्टें जेणें॥ १२९७॥

अर्थ—अरे रोग्याला रोग आणि गरीबाला गरिबी काय आवडत असते! परंतु ज्या बलवान् प्रारब्धाने या वाईट गोष्टी भोगविल्या जातात.॥ १२९७॥

तें अदृष्ट अनारिसें। न करील ईश्वरवशें। तो ईश्वरुही असे। हृदयीं तुझ्या॥ १२९८॥

अर्थ—तें प्रारब्ध ईश्वराधीन असल्यामुळे वेगळे काही करणार नाही व तो ईश्वरही तुझ्याच हृदयात वास करीत आहे.॥ १२९८॥

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति। भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया॥ ६१॥

अर्थ—अर्जुना यंत्रावर जणूं काय चढवलेल्या सर्व प्राणिमात्रांना (आपल्या) मायेच्या योगाने फिरवणारा ईश्वर सर्व प्राणीमात्रांच्या हृदयाच्या ठिकाणी स्थित आहे.॥ ६१॥

सर्व भूतांच्या अंतरीं। हृदयमहाअंबरीं। चिद्वृत्तीच्या सहस्त्रकरीं। उदयला असे जो॥ १२९९॥

अर्थ—सर्व प्राणीमात्रांच्या आत हृदयरूपी महा आकाशात चैतन्य वृत्तींच्या सहस्त्रकिरणांनी युक्त असलेला ईश्वररूपी असा जो उदयाला आला आहे.॥ १२९९॥

गूढार्थदीपिका—चित्वृत्तीचिया सहस्त्रकरी। उदयला असे जो।

आत्मा हा चैतन्याचा सागर आहे. चैतन्याचा स्वभाव स्फुरणरूप असल्याकारणाने त्या चैतन्याच्या सागरावर शुद्ध चैतन्यमय लहरी उठतात. ज्याप्रमाणे आकाशाच्या ठिकाणी वायु स्वभावत:च स्फुरतो त्याप्रमाणे चैतन्याच्या समुद्रावर आत्मस्वरूपाची चैतन्यशक्ती लहरीच्या रूपांनी स्फुरण पावते. हे स्फुरण अर्थातच निरुपाधिकच असते अज्ञानी जीव मात्र याच सच्चिदानंद स्फूर्तीवर आपल्या अज्ञानामुळे सृष्टीचा आरोप करतो.

सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी **'अहं बहुस्याम् प्रजायेय'** मी पुष्कळ स्वरूपाचे व्हावे अशी परब्रह्माच्या ठिकाणी संकल्प स्फूर्ती होते असे तैत्तिरीय उपनिषदात सांगितले आहे. त्यावर भाष्य करतांना श्रीशंकराचार्य म्हणतात **''सत्यज्ञानलक्षणाः स्वात्मभूतत्वाद्विशुद्धाः''** परब्रह्माची मी बहुस्वरूप व्हावे ही संकल्पस्फूर्ती आत्मस्वरूपाशी एकरूप व सच्चिदानंदस्वरूपच असते. हे शक्तिरूपाने परब्रह्माचे होणारे स्फुरण सर्वांच्याच हृदयात असते व म्हणूनच सर्व सृष्टीचे कारण जो ईश्वर किंवा शिव, तो सर्व जीवांच्या हृदयामध्ये अनंत चैतन्य वृत्तींसह प्रगट झाला आहे असे श्रीज्ञानेश्वर महाराज या ओवीत सांगतात.

त्याची ओळख आपल्याला आपल्या ठिकाणी उठणाऱ्या 'मी' या वृत्तीने होते. आचार्य म्हणतात **''तस्मात्सर्व शरीरेष्वमहमित्येव भासते स्पष्टः। यः प्रत्ययोऽपि शुद्धस्तस्य ब्रह्मैव भवति मुख्योऽर्थः''** सर्वांच्या शरीरात 'मी' मी म्हणून जे स्फुरण होते त्याचा मुख्य अर्थ परब्रह्मच आहे. आचार्यांनी हीच गोष्ट **'अहं शब्देन विख्यातः एक एव स्थितः परः'** यातही सांगितली आहे. देहाचा अहंकार सोडून देऊन आपल्याठिकाणी केवळ 'मी' 'मी' म्हणून स्फूरण होते तेच परब्रह्म होय. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीही ज्ञाने० अ० १८ ओवी १३१५ मध्ये हेच सांगितले आहे.

अवस्थात्रय तिन्ही लोक। प्रकाशूनि अशेख। अन्यथादृष्टि पांथिक। चेवविले॥ १३००॥

अर्थ—जागृति, स्वप्न व सुषुप्ती या तिन्हीही अवस्था व स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तिन्ही लोक यांना पूर्णत: प्रकाशित करून विपरीत ज्ञानाने भुललेले जीव ज्याने जागे केले आहेत. ॥ १३०० ॥

वेद्योदकाच्या सरोवरीं। फांकतां विषयकल्हारीं। इंद्रियषट्पदाचारी। जीवभ्रंमरातें॥ १३०१॥

अर्थ—दृश्य जगद्रूपी पाण्याच्या सरोवरात विषयरूपी कमळांना (शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध) उमलवून इंद्रियरूपी सहा पाय (श्रोत्र, त्वक्, चक्षु, जिव्हा, घ्राण व मन) असलेल्या जीवरूप भ्रमराकडून त्या कमळांचे सेवन करवतो॥ १३०१ ॥

असो रूपक हें तो ईश्वरु। सकल भूतांचा अहंकारु। पांघरोनि निरंतरु। उल्हासत असे॥ १३०२॥

अर्थ—हे रूपक राहू दे. सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी, मीपणाने स्फुरणारा जो अहंकार, (समष्टिरूप) तो पांघरून, तो ईश्वर निरंतर विलसत असतो. ॥ १३०२ ॥

स्वमायेचें आडवस्त्र। लावूनि एकला खेळवी सूत्र। बाहेरी नटी छायाचित्र। चौऱ्याशीं लक्ष॥ १३०३॥

अर्थ—आपल्या मायेचा पडदा लावून आतून एकटाच दोरी हालवितो व पडद्याच्या बाहेरच्या बाजूला चौऱ्यासी लक्ष योनीरूपी चित्रे नाचवितो. ॥ १३०३ ॥

तया ब्रह्मादिकीटांता। अशेषाही भूतजातां। देहाकार योग्यता। पावोनि दावी॥ १३०४॥

अर्थ—ब्रह्मदेवापासून तो कीटकापर्यंत संपूर्ण प्राणिमात्रांना ज्यांची योग्यता (पापपुण्यरूप) पाहून त्यांना तो देहाकार देतो. ॥ १३०४॥

तेथ जें देह जयापुढें। अनुरूपपणें मांडे। तें भूत तया आरूढे। हें मी म्हणौनि॥ १३०५॥

अर्थ—तेव्हा जो देहाचा आकार ज्या प्राण्याच्या कर्मानुसार त्याच्यापुढे मांडला जातो त्या देहाच्या आकारावर तो प्राणी ''मीच तो देह आहे'' असे म्हणून त्यावर आरूढ होतो. ॥ १३०५ ॥

सूत सूतें गुंतलें। तृण तृणेंचि बांधलें। का आत्मबिंबा घेतलें। बाळकें जळीं॥ १३०६॥
तयापरी देहाकारें। आपणपेंचि दुसरें। देखोनि जीव आविष्करे। आत्मबुद्धी॥ १३०७॥

अर्थ—सुताचा गुंडाळा जसा सुतानेच बांधला असतो, किंवा गवताची पेंडी जशी गवतानेच बांधलेली असते

किंवा पाण्यात पडलेल्या आपल्या प्रतिबिंबाला लहान मूळ जसे आपणच आहो असे समजते॥ १३०६ ॥ त्याचप्रमाणे देहाच्या आकाराच्या रूपाने आपलेच दुसरे रूप समजून जीव त्या देहाच्या ठिकाणी तादात्म्यबुद्धीने प्रगटतो म्हणजे देहरूप आकाराने जो दुसरा तो मीच आहे म्हणून तिथे (भ्रमाने) मीपणा धारण करतो. ॥ १३०७ ॥

ऐसेनि शरीराकारीं। यंत्रीं भूतें अवधारीं। वाहूनि हालवी दोरी। प्राचीनाची॥ १३०८ ॥

अर्थ—याप्रमाणे शरीराच्या आकाररूपी यंत्रावर यच्चयावत् प्राणीमात्र बसवून ईश्वर प्रारब्ध कर्माची दोरी हालवितो. ॥ १३०८ ॥

तेथ जया जें कर्मसूत्र। मांडूनि ठेविलें स्वतंत्र। तें तिये गती पात्र। होंचि लागे॥ १३०९ ॥

अर्थ—तेव्हा ज्या प्राण्याचे जे स्वतंत्र प्रारब्धकर्मरूपी सूत्र ठरवून ठेवलेले असते त्यानुसार तो प्राणी त्या गतीला पात्र होतोच. ॥ १३०९ ॥

किंबहुना धनुर्धरा। भूतांतें स्वर्गसंसारा-। माजी भोवंडी तृणें वारा। आकाशीं जैसी॥ १३१० ॥

अर्थ—फार काय सांगायचे! अर्जुना, वारा जसा पाला पाचोळा आकाशांत ज्याप्रमाणे गरगर फिरवतो, त्याप्रमाणे हा ईश्वर प्राण्यांना स्वर्गादिसंसारामध्ये फिरवीत असतो. ॥ १३१० ॥

भ्रामकाचेनि संगें। जैसे लोहो वेढा रिगे। तैसीं ईश्वरसत्तायोगें। चेष्टती भूतें॥ १३११ ॥

अर्थ—लोहचुंबकाच्या सान्निध्याने लोखंड ज्याप्रमाणे गोल गोल फिरते त्याप्रमाणे ईश्वराच्या सत्तेच्या योगाने (सामर्थ्याने) सर्व प्राणीमात्र आपापला व्यवहार करतात. ॥ १३११ ॥

जैसे चेष्टा आपुलिया। समुद्रादिक धनंजया। चेष्टती चंद्राचिया। सन्निधी येकी॥ १३१२ ॥
तया सिंधू भरितें दाटे। सोमकांत पाझरु फुटे। कुमुदांचकोरांचा फिटे। संकोचु तो॥ १३१३ ॥
तैसीं बीजप्रकृतिवशें। अनेकें भूतें येकें ईशें। चेष्टविजती तो असे। तुझ्या हृदयीं॥ १३१४ ॥

अर्थ—अर्जुना चंद्राच्या एका सान्निध्याने समुद्रादिक आपापली हालचाल करतात॥ १३१२ ॥ समुद्राला भरती येते चंद्रकांत मण्याला पाझर फुटतो, चंद्रविकासी कमळांचा व चकोर पक्षांचा संकोच नाहीसा होतो. ॥ १३१३ ॥ त्याप्रमाणे कारणरूप प्रकृती (अज्ञान) च्या स्वाधीन झालेले प्राणिमात्र ज्या एका ईश्वराकडून चेष्टविले जातात व तो ईश्वर तुझ्या हृदयात आहे. ॥ १३१४ ॥

अर्जुनपण न घेतां। मी ऐसें जें पांडुसुता। उठतसे तें तत्त्वता। तयाचें रूप॥ १३१५ ॥

अर्थ—अर्जुना, अर्जुनपणाची जाणीव सोडून देऊन तुझ्या ठिकाणी 'मी' असे जे स्फुरते, तेच खरोखर ईश्वराचे स्वरूप आहे. ॥ १३१५ ॥

गूढार्थदीपिका—अर्जुनपण न घेतां। मी ऐसे जे पांडुसुता।

अर्जुनपणा म्हणजे देहाचा अहंकार सोडून आपल्याठिकाणी 'मी' पणा जो स्फुरतो तोच ईश्वर होय, हे ईश्वराचे स्फुरण असले तरी स्फुरणामुळेच ते मर्यादित आहे. या स्फुरणात ज्ञान व आनंद किंवा प्रेम आहे. हे वस्तूत: निरुपाधिक स्फुरण असताना, आपण हे 'मी' पण देहाला धरून बाळगतो त्यामुळे अमर्याद व निरुपाधिक असलेलेच स्फुरण सोपाधिक व मर्यादित होते. 'तत्वमसि' या महावाक्याच्या उपदेशाने जेव्हा देहावरील 'मी' पणा आपण सोडून देऊन तो आत्म्याच्या ठिकाणी स्थापन करतो, तेव्हा तेच शुद्ध किंवा विद्यावृत्तीचे स्फुरण होते. व तेच 'मी' स्फुरण परमात्मा होते, 'अहं ब्रह्मास्मि' ज्ञानातील हा शुद्ध 'अहं' अर्जुनपणा म्हणजे देहाचा अहंकार सोडून रहात असतो. याच शुद्ध 'अहं' विद्यावृत्तीने त्या शुद्ध अहंला आधारभूत असलेल्या व्यापक ब्रह्माला व्याप्त केले जात असल्यामुळे ब्रह्मज्ञानात ''वृत्तीव्याप्ती'' राहते 'फलव्याप्ती' राहत नाही असे वेदान्ती म्हणतात.

यालागीं तो प्रकृतीतें। प्रवर्तवील हें निरुतें। आणि जुंझवील तूतें। न जुंझसी जरी॥ १३१६ ॥

अर्थ—ह्या करिताच तो ईश्वर प्रकृतीला प्रवृत्त करील हे निश्चित आहे. आणि तू जरी युद्ध करणार नसलास तरी तीं प्रकृती तुला युद्ध करायला लावील. ॥ १३१६ ॥

म्हणोनि ईश्वरु तो गोसावी। तेणें प्रकृती हे नेमावी। तिया सुखें राबवावीं। इंद्रिये आपुलीं॥ १३१७॥

अर्थ—म्हणून ईश्वर हा स्वामी असून तो प्रकृतीचे नियमन करतो व इंद्रियांकडून त्यांची कामे तो बिना आयास करून घेते. ॥ १३१७ ॥

तूं करणें न करणें दोन्ही। लाऊनि प्रकृतीच्या मानीं। प्रकृतीही का अधीनी। हृदयस्था जया॥ १३१८॥

अर्थ—प्रकृति ही हृदयांत रहाणाऱ्या ज्या ईश्वराच्या स्वाधीन आहे त्या प्रकृतीकडे करणे न करणे या दोन्ही गोष्टी तूं सोपवून दे. ॥ १३१८ ॥

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत। तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्॥ ६२॥

अर्थ—हे भरतकुलोत्पन्ना! मन वाणी आणि शरीर या सर्वभावाने तू त्यालाच शरण जा. त्याच्या कृपेने तुला अत्यंत श्रेष्ठ शान्ती व शाश्वत स्थान प्राप्त होईल. ॥ ६२ ॥

तया अहं वाचा चित्त आंग। देऊनियां शरण रिग। महोदधी का गांग। रिगालें जैसें॥ १३१९॥

अर्थ—गंगेचे पाणी जसे महासागराला मिळते त्याप्रमाणे त्याला अहं, वाचा, मन व काया अर्पण करून शरण जा. ॥ १३१९ ॥

मग तयाचेनि प्रसादें। सर्वोपशांतिप्रमदे। कांतु होऊनियां स्वानंदें। स्वरूपींच रमसी॥ १३२०॥

अर्थ—मग त्या ईश्वराच्या कृपाप्रसादाने शांतिरूपी प्रमदेचा (स्त्री) पती होउन तूं आत्मानंदाने स्वस्वरूपातच रममाण होशील॥ १३२० ॥

संभूति जेणें संभवे। विश्रांति जेथें विसंवे। अनुभूतिही अनुभवे। अनुभवा जया॥ १३२१॥

अर्थ—उत्पत्ती ज्याच्यामुळे संभवते, विश्रांतीलाही जेथे विसावा मिळतो व अनुभवालाही अनुभव घडतो॥ १३२१ ॥

तिये निजात्मपदींचा रावो। होऊनि ठाकसी अव्ययो। म्हणे लक्ष्मीनाहो। पार्था तूं गा॥ १३२२॥

अर्थ—लक्ष्मीचा पती म्हणाला, अर्जुना, तू त्या अशा स्वत:च्या आत्मस्वरूपाचा नित्य राजा होऊन राहशील॥ १३२२ ॥

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया। विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु॥ ६३॥

अर्थ—गूढाहून अत्यंत गूढ असे ज्ञान तुला मी सांगितले याचा विचार करून तुझी जशी इच्छा असेल, त्याप्रमाणे कर. ॥ ६३ ॥

हें गीतानाम विख्यात। सर्ववाङ्मयाचें मथित। आत्मा जेणें हस्तगत। रत्न होय॥ १३२३॥

अर्थ—ज्याच्या योगाने आत्मज्ञानासारखे रत्न प्राप्त होते, असे हे गीता नावाचे प्रसिद्ध असलेले सर्व वाङ्मयाचे मंथन करून काढलेले सार आहे॥ १३२३ ॥

ज्ञान ऐसिया रूढी। वेदांतें जयाची प्रौढी। वानितां कीर्ति चोखडी। पातली जगीं॥ १३२४॥

अर्थ—वेदान्ताने 'ज्ञान' या नावाने ज्या गीताशास्त्राचा मोठेपणा वर्णन केल्यामुळे जगात ज्याला खूप ख्याती प्राप्त झाली. ॥ १३२४ ॥

बुद्ध्यादिकें डोळसें। हें जयाचें का कडवसें। मी सर्वद्रष्टाही दिसें। पाहला जया॥ १३२५॥

अर्थ—बुद्ध्यादिक डोळस पदार्थ हे ज्या गीताशास्त्राच्या ज्ञानाचे कडवसे आहेत व मी जो द्रष्टृस्वरूप त्याचे ज्ञानही ज्या गीता शास्त्रामुळे अनुभवाला येते. ॥ १३२५ ॥

तें हें गा आत्मज्ञान। मज गोप्याचेंही गुप्त धन। परी तूं म्हणूनि आन। केवीं करूं॥ १३२६॥

अर्थ—अशा तऱ्हेचे हे आत्मज्ञान (गीतारूपी) माझ्या सारख्याला अत्यंत गोपनीय आहे. परंतु तू असल्यामुळे तुझ्यापासून कसे लपवून ठेवू?॥ १३२६ ॥

याकारणें गा पांडवा। आम्हीं आपला हा गुप्त ठेवा। तुज दिधला कणवा। जाकळिलेपणें॥ १३२७॥

अर्थ—अर्जुना, म्हणूनच आम्ही आपला हा गुप्त ठेवा करुणेने ओथंबल्यामुळे तुला दिला आहे. ॥ १३२७॥

जैसी भुल्ली वोरसें। माय बोले बाळादोषें। प्रीति ही परी तैसें। न करूंचि हो॥ १३२८॥

अर्थ—प्रेम पान्हयाने भुललेली आई जशी आपल्या बाळाला खोटे खोटेच (त्याचे दोष दाखवूनच) बोलत असते व तो प्रेमाचाच व्यवहार असतो परंतु आम्ही तसे करणार नाही॥ १३२८॥

येथ आकाश आणि गाळिजे। अमृताही सालि फेडिजे। का दिव्याकरवीं करविजे। दिव्य जैसें॥ १३२९॥

जयाचेनि अंगप्रकाशें। पाताळींचा परमाणु दिसे। तया सूर्याहि का जैसें। अंजन सूदलें॥ १३३०॥

तैसें सर्वज्ञेंही मियां। सर्वही निर्धारूनियां। निकें होय तें धनंजया। सांगितलें तुज॥ १३३१॥

अर्थ—आकाशही जसे गाळून घ्यावे, अमृताचीही जशी साल काढावी, किंवा दिव्याकडून जसे दिव्य करण्यास लावावे.॥ १३२९॥ ज्याच्या आंगच्या प्रकाशाने पाताळात असलेलाही परमाणु देखील दिसतो त्या सूर्याच्याही डोळ्यात जसे अंजन घालावे.॥ १३३०॥ त्याप्रमाणे अर्जुना, सर्वज्ञ अशा मी तुला सर्व बाजूंनी विचार करून खरे काय तेच सांगितले॥ १३३१॥

आतां तूं ययावरी। निकें हें निर्धारीं। निर्धारूनि करीं। आवडे तैसें॥ १३३२॥

अर्थ—आता यावर तू विचार करून खरे तत्त्व कोणते ते निश्चित कर व तुला जे आवडेल ते कर.॥ १३३२॥

यया देवाचिया बोला। अर्जुनु उगाचि ठेला। तेथ देवो म्हणती भला। अवंचकु होसी॥ १३३३॥

अर्थ—या देवाच्या बोलण्यावर अर्जुन उगाच राहिला. देव अर्जुनाला म्हणतात. तू बराच भिडस्त आहेस.॥ १३३३॥

वाढितया पुढें भुकेला। उपरोधें म्हणे मी धाला। तैं तोचि पीडे आपुला। आणि दोषुही तया॥ १३३४॥

तैसा सर्वज्ञु श्रीगुरु। भेटलिया आत्मनिर्धारु। न पुसिजे जैं आभारु। धरूनियां॥ १३३५॥

अर्थ—वाढणाऱ्यापुढे भुकेला मनुष्य भूक असून भिडेने "मी तृप्त झालो" म्हणाला तर त्या भुकेमुळे त्रासही होतो आणि खोटे बोलल्याचा दोषही लागतो.॥ १३३४॥ त्याप्रमाणे सर्वज्ञ श्रीगुरू भेटले असता भीड धरून जर आत्मज्ञान विचारून घेतले नाही॥ १३३५॥

तैं आपणपेंचि वंचे। आणि पापही वंचनाचें। आपणयाचि साचे। चुकविलें तेणें॥ १३३६॥

अर्थ—तेव्हा आपणच आपल्याला फसविल्यासारखे होते व फसवल्याचे पापही लागते. खरे तर ज्याने आपल्यालाच आपल्या सत्यस्वरूपाला मुकवलेले असते.॥ १३३६॥

पैं उगेपणा तुझिया। हा अभिप्रावो कीं धनंजया। जें एकवेळ आवांकुनियां। सांगावें ज्ञान॥ १३३७॥

अर्थ—परंतु अर्जुना, तुझ्या उगेपणामुळे मला असे वाटते की पुन्हा एकवेळ मी ते सर्व ज्ञान साररूपाने सांगावे.॥ १३३७॥

तेथ पार्थु म्हणे दातारा। भलें जाणसी माझिया अंतरा। हें म्हणों तरी दुसरा। जाणता असे काई॥ १३३८॥

अर्थ—तेव्हा अर्जुन म्हणाला! हे उदार भगवंता, आपण माझे अंत:करण बरोबर जाणता. पण असे म्हणणेही व्यर्थच आहे. तुमच्या शिवाय दुसरा कोणी जाणता आहे काय?॥ १३३८॥

येर ज्ञेय हें जी आघवें। तूं ज्ञाता एकचि स्वभावें। मा सूर्यु म्हणौनि वानावें। सूर्यातें काई॥ १३३९॥

अर्थ—स्वाभाविकपणे तुम्हीच एक ज्ञाता आहात, बाकी सर्व यच्चयावत् ज्ञेय आहे. तेव्हा सूर्य म्हणून सूर्याला काय ते वाखाणायचे?॥ १३३९॥

या बोला श्रीकृष्णें। म्हणितलें काय येणें। हेंचि थोडें गा वानणें। जे बुझतासि तूं॥ १३४०॥

अर्थ—या बोलण्यावर श्रीकृष्ण म्हणाले "हे जे स्तुतिपर वर्णन कशाला? सांगितलेले समजतोस हेच काय थोडे वर्णन झाले?"॥ १३४०॥

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः। इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम्॥ ६४॥

अर्थ—सर्वात अत्यंत गुह्य असे माझे उत्कृष्ट बोलणे तू पुन्हा ऐक. तू मला अत्यंत आवडता आहेस म्हणूनच मी तुला हे हिताचे सांगतो.॥ ६४॥

तरी अवधान पघळ। करूनियां आणिक एक वेळ। वाक्य माझें निर्मळ। अवधारीं पां॥ १३४१॥

अर्थ—तर आता आपले लक्ष चांगले विस्तृत करून आणखी एकवेळ माझा नि:संदिग्ध असा उपदेश ऐक.॥ १३४१॥

हें वाच्य म्हणौनि बोलिजे। का श्राव्य मग आयिकिजे। तैसें नव्हे परी तुझें। भाग्य बरवें॥ १३४२॥

अर्थ—हे बोलण्यासारखे आहे म्हणून बोलायचे किंवा ऐकण्यासारखे आहे म्हणून ऐकायचे असे नाही परंतु तुझे भाग्यच चांगले आहे.॥ १३४२॥

कूर्मीचिया पिलियां। दिठी पान्हा ये धनंजया। का आकाश वाहे बापिया। घरींचें पाणी॥ १३४३॥

अर्थ—अर्जुना, कासवीला पिलांना पाहता क्षणीच पान्हा फुटतो; चातकाकरितां घरचे पाणी आकाश धरून ठेवते.॥ १३४३॥

जो व्यवहारु जेथ न घडे। तयाचें फळचि तेथ जोडे। काय दैवें न सांपडे। सानुकूळें॥ १३४४॥

अर्थ—जो व्यवहार जेथे घडत नाही, त्याचे फळ तेथेच प्राप्त होते. दैव जर अनुकूल असेल तर काय मिळणार नाही.॥ १३४४॥

एऱ्हवीं द्वैताची वारी। सारूनि ऐक्याच्या परिवरीं। भोगिजे तें अवधारीं। रहस्य हें॥ १३४५॥

अर्थ—तसे पाहिले तर द्वैताची येरझार बाजूला सारून ऐक्याच्या घरात जी गोष्ट भोगावयाची; ती, ही आहे हे लक्षात ठेव॥ १३४५॥

आणि निरुपचारा प्रेमा। विषय होय जें प्रियोत्तमा। तें दुजें नव्हे कीं आत्मा। ऐसेंचि जाणावें॥ १३४६॥

अर्थ—सर्वात प्रिय अर्जुना जे निर्हेतुक प्रेमाचा विषय असते ते दुसरे कोणी नाही तर आत्माच आहे असे समजावे.॥ १३४६॥

आरिसाचिया देखिलया। गोमटें कीजे धनंजया। तें तया नोहे आपणयां-। लागीं जैसें॥ १३४७॥

तैसें पार्था तुझेनि मिषें। मी बोलें आपणयाचि उद्देशे। माझ्या तुझ्या ठाईं असे। मीतूंपण गा॥ १३४८॥

अर्थ—आरशात पहाण्याकरता आरशाला अर्जुना, स्वच्छ जे आपण करतो ते त्याच्या करता नसते तर आपल्या करता जसे असते.॥ १३४७॥ त्याप्रमाणे अर्जुना तुला निमित्त करून मी जो बोलतो ते मलाच उद्देशून आहे. माझ्या व तुझ्या ठिकाणी मीतूपणा आहे काय?॥ १३४८॥

म्हणौनि जिव्हारींचें गुज। सांगतसें जीवासि तुज। हें अनन्यगतीचें मज। आथी व्यसन॥ १३४९॥

अर्थ—म्हणून; तू आमचा जीवलग असल्याकारणाने जिव्हाळ्याची गुप्त गोष्ट तुला आम्ही सांगत आहोत. अनन्यगतीच्या भक्ताचे मला हे मोठे वेडच आहे.॥ १३४९॥

पैं जळा आपणपें देतां। ल्वण भुललें पंडुसुता। कीं आघवें तयाचें होतां। न लजेचि तें॥ १३५०॥

अर्थ—अर्जुना, आपल्या स्वत:ला पाण्यात झोकून देताना मीठ जसे आपल्याला (खडेपणाला) विसरते व आपण सर्वस्वी त्याचे (पाण्याचे) होताना ते लाजत नाही.॥ १३५०॥

तैसा तूं माझ्या ठाईं। राखों नेणसीचि कांहीं। तरी आतां तुज काई। गोप्य मी करू॥ १३५१॥

अर्थ—त्याप्रमाणे तूं माझ्या पासून काहीही लपवून ठेवणे जाणत नाहीस तर मी तरी आता तुझ्यापासून काही गुप्त ठेवीन काय?॥ १३५१॥

म्हणौनि आघवींचि गूढें। जें पाऊनि अति उघडें। तें गोप्य माझें चोखडें। वाक्य आईक॥ १३५२॥

अर्थ—म्हणून जे गुह्य पाहिले असता यच्चयावत् बाकीची गुह्ये उघडी वाटतात असे माझे गूढ व यथार्थ बोलणे ऐक.॥ १३५२॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे॥ ६५॥

अर्थ—माझ्या ठिकाणी मन ठेव. माझा भक्त हो. माझे यजन करणारा हो. मला नमस्कार कर. माझ्याचकडे तूं येशील. तूं मला प्रिय असल्यामुळे हे मी सत्य शपथेवर सांगत आहे.॥ ६५॥

तरी बाह्य आणि अंतरा। आपुलिया सर्व व्यापारा। मज व्यापकातें वीरा। विषयो करी॥ १३५३॥

अर्थ—हे वीर अर्जुना, तूं आपल्या बाह्य इंद्रिय व्यापारांचा व मनादी आंतर व्यापारांचा, व्यापक अशा मला विषय कर.॥ १३५३॥

आघवां आंगीं जैसा। वायु मिळोनि आहे आकाशा। तूं सर्व कर्मी तैसा। मजसीचि अस॥ १३५४॥

अर्थ—सर्वांगाने आकाशाला वायू जसा व्यापून राहतो त्याप्रमाणे तूं सर्वकर्मामध्ये माझ्याशीच मिसळून रहा॥ १३५४॥

किंबहुना आपुलें मन। करीं माझें एकायतन। माझेनि श्रवणें कान। भरूनि घालीं॥ १३५५॥

अर्थ—फार काय सांगायचे! तू आपले मन माझ्याच राहण्याचे एकमेव ठिकाण कर व आपले कान माझ्या विषयीच्या गोष्टींच्या श्रवणने भरून टाक.॥ १३५५॥

आत्मज्ञानें चोखडीं। संत जे माझीं रूपडीं। तेथ दृष्टि पडो आवडी। कामिनी जैसी॥ १३५६॥

अर्थ—ज्याप्रमाणे प्रेमाने स्त्रीची दृष्टी आपल्या पतीवर खिळून राहते, त्याप्रमाणे आत्मज्ञानाने पवित्र झालेले व माझेच दुसरे स्वरूप असलेले जे संतलोक, त्यांच्या ठिकाणी तुझी दृष्टी प्रेमाने सारखी वेधून राहो.॥ १३५६॥

मी सर्व वस्तीचें वसौटें। माझीं नामें जियें चोखटें। तियें जीवा यावया वाटे। वाचेचिये लावीं॥ १३५७॥

अर्थ—मी यच्चयावत् वस्तुमात्राचे वसतीस्थान आहे. त्या माझी जी गोड नावे आहेत ती अंत:करणात ठसण्यास वाणीच्या मार्गाला लाव.॥ १३५७॥

हाताचें करणें। का पायांचें चालणें। तें होय मजकारणें। तैसें करीं॥ १३५८॥

अर्थ—हातांनी जे काही करावयाचे किंवा पायांनी जे काही चालायचे ते केवळ माझ्याच करता होईल असे कर॥ १३५८॥

आपुला अथवा परावा। ठायीं उपकरसी पांडवा। तेणें यज्ञें होईं बरवा। याज्ञिकु माझा॥ १३५९॥

अर्थ—अर्जुना, आपला असो अथवा परका असो, त्याच्या उपयोगी पडून त्या उपकाराच्या यज्ञाने तू माझा उत्तम यज्ञ करणारा हो.॥ १३५९॥

हें एकैक शिकऊं काई। पैं सेवकै आपुल्या ठाईं। उरौनि येर सर्वही। मी सेव्यचि करीं॥ १३६०॥

अर्थ—हे एक एक काय काय म्हणून शिकवावे! तूं आपल्या ठिकाणी सेवकपणा बाणवून घेऊन व इतर यच्चयावत् जगत् मद्रूप समजून त्याची सेवा करीत जा.॥ १३६०॥

तेथ जाऊनिया भूतद्वेषु। सर्वत्र नमवैन मीचि एकु। ऐसेनि आश्रयो आत्यंतिकु। लाहसी तूं माझा॥ १३६१॥

अर्थ—तेव्हां, प्राणिमात्रांचा द्वेष नाहीसा होऊन सर्वत्र मीच काय तो एकटा पुन: पुन: नमस्कार करण्यास अवशिष्ट राहील. असे केले म्हणजेच माझे दृढ सान्निध्य तुला प्राप्त होईल.॥ १३६१॥

मग भरलेया जगाआंतु। जाऊनि तिजयाची मातु। होऊनि ठायील एकांतु। आम्हां तुम्हां॥ १३६२॥

अर्थ—मग अत्यंत गजबजलेल्या या जगामध्ये तिसऱ्याची गोष्टच न राहल्यामुळे तुझा व माझा खराखुरा एकांत घडून येईल.॥ १३६२॥

तेव्हां भलतिये अवस्थे। मी तूंतें तूं मातें। भोगिसीं ऐसें आइतें। वाढेल सुख॥ १३६३॥

अर्थ—त्यावेळी कोणत्याही अवस्थेत, तुला माझा व मला तुझा प्रेमानंद लुटता येईल व अशारीतीने आयतेच सुख वाढेल.॥ १३६३॥

आणि तिजें आडळ करितें। निमालें अर्जुना जेथें। तैं मीचि म्हणौनि तूं मातें। पावसी शेखीं॥ १३६४॥

अर्थ—आणि अर्जुना मध्ये प्रतिबंध करणारे तिसरे नाहीसे झाले म्हणजे त्या स्थितीत तूं मद्‌रूप असल्यामुळे मलाच शेवटी प्राप्त होशील.॥ १३६४॥

जैसी जळींची प्रतिभा। जळनाशीं बिंबा। येतां गाभागोभा। कांहीं आहे॥ १३६५॥

अर्थ—ज्याप्रमाणे पाण्यांत पडलेले प्रतिबिंब, पाणी नाहीसे होताच, बिंबात समाविष्ट होते, त्यांत काही अडथळा असतो काय?॥ १३६५॥

पैं पवनु अंबरा। कां कल्लोळु सागरा। मिळतां आडवारा। कोणाचा गा॥ १३६६॥

अर्थ—अरे, वारा आकाशाला मिळताना किंवा तरंग समुद्राला मिळताना कोणाची आडकाठी असणार!॥ १३६६॥

म्हणौनि तूं आम्हीं। हें दिसताहे देहधर्मीं। मग ययाच्या विरामीं। मीचि होसी॥ १३६७॥

अर्थ—म्हणून तू आणि आम्ही वेगळे दिसतो ते केवळ देहाच्या उपाधीमुळे. मग देहांचा निरास झाल्यावर तूं मद्रूपच होशील.॥ १३६७॥

यया बोलामाझारीं। होय नव्हे झणें करीं। येथ आन आथी तरी। तुझीच जाण॥ १३६८॥

अर्थ—ह्या माझ्या बोलण्यामध्ये होईल न होईल अशी शंका घेऊ नकोस. ह्यात कांही अन्यथा असेल तर तुझी शपथ आहे.॥ १३६८॥

पैं तुझी आण वाहणें। हें आत्मलिंगातें शिवणें। प्रीतीची जाति लाजणें। आठवों नेदी॥ १३६९॥

अर्थ—तुझी शपथ घालणे म्हणजे, आत्मस्वरूपाचीच शपथ घालणे होय. परंतु प्रीतीचे लक्षण असे आहे की ती लाजेची आठवणच होऊ देत नाही.॥ १३६९॥

एऱ्हवीं वेदु निष्प्रपंचु। जेणें विश्वाभासु हा साचु। आज्ञेचा नटनाचु। काळातें जिणें॥ १३७०॥

तो देवो मी सत्यसंकल्पु। आणि जगाच्या हितीं बापु। मा आणेचा आक्षेपु। कां करावा॥ १३७१॥

अर्थ—वास्तविकपणें पाहतां जगताला आधारभूत असलेला व ज्याच्यामुळे हा विश्वाचा भासणारा पसारा सत्य वाटतो व ज्याच्या सत्तेच्या सामर्थ्यामुळे काळालाही जिंकले जाते॥ १३७०॥ तो असा मी देव जर सत्य संकल्प आहे व जगताच्या कल्याणाकरता निरंतर जागरूक आहे तर त्याने शपथ घालण्याचा भलताच प्रयत्न कां करावा?॥ १३७१॥

परी अर्जुना तुझेनि वेधें। मियां देवपणाचीं बिरुदें। सांडिलीं गा मी हें आर्धे। सगळेनि तुवां॥ १३७२॥

अर्थ—परंतु अर्जुना, तुझ्या विषयीच्या प्रेमाच्या ध्यासाने मी देवपणाची चिन्हे टाकून दिली आहेत. त्यामुळे मी अर्धा झालो आहे. पण तू मात्र (मद्रूप झाल्यामुळे) पूर्ण झाला आहेस.॥ १३७२॥

पैं काजा आपुलिया। रावो आपुली आपणया। आण वाहे धनंजया। तैसें हें कीं॥ १३७३॥

अर्थ—अर्जुना, आपले कार्य साधण्यांकरता राजा आपलीच आपण शपथ वाहतो, तशातलाच हा प्रकार आहे.॥ १३७३॥

तेथ अर्जुनु म्हणे देवें। अचाट हें न बोलावें। जे आमचें काज नांवें। तुझेनि एकें॥ १३७४॥

अर्थ—तेव्हा अर्जुन म्हणाला, भगवंता! आपण हे भलतेच बोलूं नये. तुमच्या एका नावानेच (नामस्मरणाने) आमचे कार्य होते.॥ १३७४॥

यावरी सांगों बैससी। कां सांगतां भाषही देसी। या तुझिया विनोदासी। पारु आहे जी॥ १३७५॥

अर्थ—असे असूनही, तूं सांगायला लागतोस आणि वर शपथही घेतोस, तुझ्या या विनोदाला काही पार आहे काय?॥ १३७५॥

कमळवना विकाशु। करी रवीचा एक अंशु। तेथ आघवाचि प्रकाशु। नित्य देतो॥ १३७६॥

अर्थ—सूर्याचा एकच किरण संपूर्ण कमलवनाला विकसित करतो. तरी देखील सूर्य आपला संपूर्ण प्रकाश (जगाला) नित्य देतच असतो.॥ १३७६॥

पृथ्वी निवऊनि सागर। भरीजती येवढें थोर। वर्षे तेथ मिषांतर। चातकु कीं॥ १३७७॥

अर्थ—पृथ्वीला शांत करून सर्व समुद्र भरून जातील एवढी प्रचंड वृष्टी मेघ करतो. पण असे करण्यात चातक मात्र निमित्तमात्र असतो.॥ १३७७॥

म्हणौनि औदार्या तुझेया। मज निमित्त ना म्हणावया। प्राप्ति असे दानीं राया। कृपानिधी॥ १३७८॥

अर्थ—म्हणून तुझ्या या औदार्याला मी एक केवळ निमित्तमात्रच झालो नाही काय? हे श्रेष्ठा कृपानिधे, तुझ्या या ज्ञानदानात जगाला प्राप्ती होणारी आहे. ॥ १३७८ ॥

तंव देवो म्हणती राहें। या बोलाचा प्रस्तावो नोहे। पैं मातें पावसी उपायें। साचचि येणें॥ १३७९॥

अर्थ—तेव्हा देव म्हणाले, थांब. आमची स्तुती करण्याचा हा प्रसंग नाही. पण या उपायाने तू मात्र निश्चितपणे माझ्या स्वरूपाला प्राप्त होशील. ॥ १३७९ ॥

सैंधव सिंधू पडलिया। जो क्षणु धनंजया। तेणें विरेचि कीं उरावया। कारण कायी॥ १३८०॥

अर्थ—अर्जुना, मीठाचा खडा ज्या क्षणी समुद्रात पडतो त्याचक्षणी तो विरून जातो. त्याला (खडेपणाने) न विरता उरण्याचे कारण काय?॥ १३८० ॥

तैसें सर्वत्र मातें भजतां। सर्व मी होतां अहंता। निःशेष जाऊनि तत्त्वता। मीचि होसी॥ १३८१॥

अर्थ—त्याप्रमाणे सर्वत्र मीच भरलेला असे जाणून परम प्रेमाने मला भजले असता व सर्व मद्रूपच भासत असता अहंकार संपूर्ण नाहीसा होऊन तू मत्स्वरूपच होशील. ॥ १३८१ ॥

एवं माझिये प्राप्तीवरी। कर्मालागोनि अवधारीं। दाविली तुज उजरी। उपायांची॥ १३८२॥

अर्थ—अशाप्रकारे कर्मापासून माझ्या प्राप्तीपर्यंतचे सर्व उपाय तुला विशद करून सांगितले आहेत. ते तूं ध्यानात घे. ॥ १३८२ ॥

जे आधीं तंव पांडुसुता। सर्व कर्में मज अर्पितां। सर्वत्र प्रसन्नता। लाहिजे माझी॥ १३८३॥

अर्थ—कारण कीं अर्जुना, आधी सांगितल्याप्रमाणे सर्व कर्मे मला अर्पण केली की सर्व ठिकाणी माझी प्रसन्नता (कृपा) तुला प्राप्त होईल. ॥ १३८३ ॥

पाठीं माझ्या इये प्रसादीं। माझें ज्ञान जाय सिद्धी। तेणें मिसळिजे त्रिशुद्धी। स्वरूपीं माझ्या॥ १३८४॥

अर्थ—नंतर माझ्या या प्रसादामुळे माझ्या विषयीचे ज्ञान परिपूर्ण होते आणि त्याच्या योगाने निश्चये करून माझ्या स्वरूपांत मिळतो॥ १३८४॥

मग पार्था तिये ठायीं। साध्य साधन होये नाहीं। किंबहुना तुज कांहीं। उरेचि ना॥ १३८५॥

अर्थ—मग अर्जुना! त्याठिकाणी साध्य आणि साधन (हा भेद) ही दोन्हीही नाहीशी होतात. किंबहुना तुला काही कर्तव्य उरणारच नाही. ॥ १३८५ ॥

तरी सर्व कर्में आपुलीं। तुवां सर्वदा मज अर्पिलीं। तेणें प्रसन्नता लाधली। आजि हे माझी॥ १३८६॥

अर्थ—तर तू आपली सर्व कर्मे मला सर्वदा अर्पण केल्या कारणाने आज माझी ही कृपा तुला प्राप्त झाली आहे ॥ १३८६ ॥

म्हणौनि येणें प्रसादबळें। नव्हे झुंजाचेनि आडळे। न ठकेचि येकेवेळे। भाळलों तुज॥ १३८७॥

अर्थ—म्हणून या कृपेच्या बळामुळे युद्धाची आडकाठी मानली नाही (उपदेश करीत राहिलो) कारण मी एकदम तुझ्यावर भाळलो होतो॥ १३८७॥

जेणें सप्रपंच अज्ञान जाये। जेणें एक मी गोचरु होये। तें उपपत्तीचेनि उपायें। गीतारूप हें॥ १३८८॥

अर्थ—कारण प्रपंचासह अज्ञानाचा नाश होतो व जिच्यामुळे मीच एक फक्त सर्वत्र गोचर होतो त्या तर्कसिद्ध उपायांचे ज्ञान हेच गीतेचे स्वरूप आहे. ॥ १३८८ ॥

मियां ज्ञान तुज आपुलें। नानापरी उपदेशिलें। येणें अज्ञानजात सांडीं वियालें। धर्माधर्म जें॥ १३८९॥

अर्थ—मी तुला नानापरींनी आत्मज्ञानाचा उपदेश केला आहे. याच्या योगाने तूं धर्म व अधर्मरूप म्हणून जेवढे काही अज्ञान आहे ते सर्व टाकून दे. ॥ १३८९ ॥

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥ ६६॥

अर्थ—सर्व धर्माधर्माचा त्याग करून मला एकट्यालाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन तूं शोक करूं नकोस. ॥ ६६ ॥

आशा जैसी दुःखातें। व्याली निंदा दुरितें। हें असो जैसें दैन्यातें। दुर्भगत्व ॥ १३९० ॥

अर्थ—आशा ज्याप्रमाणे दुःखाला जन्म देते किंवा निंदा पातकांना उत्पन्न करते किंवा दुर्दैव जसे दीनपणाला कारण होते. ॥ १३९० ॥

तैसें स्वर्गनरकसूचक। अज्ञान व्यालें धर्मादिक। तें सांडूनि घाली अशेख। ज्ञानें येणें ॥ १३९१ ॥

अर्थ—त्याप्रमाणे स्वर्ग आणि नरकाची प्राप्ती करून देणारे धर्मादिक अज्ञानापासून उत्पन्न होतात. ती सारी या ज्ञानाच्या योगाने नाहीशीं करून टाक. ॥ १३९१ ॥

हातीं घेऊनि तो दोरु। सांडिजे जैसा सर्पाकारु। कां निद्रात्यागें घराचारु। स्वप्नींचा जैसा ॥ १३९२ ॥

अर्थ—दोरी हातात धरून सर्पाचा आकार (भ्रमाने भासलेला) जसा सोडून द्यावा किंवा झोपेतून जागे झाल्यावर स्वप्नातले व्यवहार ज्याप्रमाणे आपण (खोटेपणामुळे) सोडून द्यावे. ॥ १३९२ ॥

नाना सांडिलेनि कवळें। चंद्रींचें धुपे पिंवळें। व्याधित्यागें कडुवाळें-। पण मुखाचें ॥ १३९३ ॥

अर्थ—किंवा कावीळ नाहीशी झाली म्हणजे ज्याप्रमाणे चंद्राच्या ठिकाणी भासणारा पिवळेपणा नाहीसा होतो किंवा रोग गेला म्हणजे ज्याप्रमाणे तोंडाचा कडवटवणा नाहीसा होतो ॥ १३९३ ॥

अगा दिवसा पाठीं देऊनी। मृगजळ घापे त्यजुनी। कां काष्ठत्यागें वन्ही। त्यजिजे जैसा ॥ १३९४ ॥

अर्थ—किंवा दिवस गेला म्हणजे मृगजळही जसे नाहीसे होते किंवा लाकूड टाकून दिले म्हणजे अग्नीचाही जसा त्याग होतो ॥ १३९४ ॥

तैसें धर्माधर्माचें टवाळ। दावी अज्ञान जें कां मूळ। तें त्यजूनि त्यजीं सकळ। धर्मजात ॥ १३९५ ॥

अर्थ—त्या प्रमाणे धर्माधर्माला कारण असणारे जे (खोटे) अज्ञान त्या अज्ञानाचा त्याग करून यच्चयावत् धर्मांधर्म सोडून दे. ॥ १३९५ ॥

मग अज्ञान निमालिया। मीचि येकु असें अपैसया। सनिद्र स्वप्न गेलिया। आपणपें जैसें ॥ १३९६ ॥

अर्थ—मग अज्ञान नाहीसे झाले म्हणजे मी एकटा आपोआप उरतो. जसे निद्रेसह वर्तमान स्वप्न गेले म्हणजे आपले आपणच राहतो. ॥ १३९६ ॥

तैसा मी एकवांचूनि कांहीं। मग भिन्नाभिन्न आन नाहीं। सोहंबोधें तयाच्या ठायीं। अनन्यु होय ॥ १३९७ ॥

अर्थ—त्याप्रमाणे माझ्या एकट्यावाचून दुसरे भिन्न अभिन्न काहीच नाही. त्या अशा माझ्या स्वरूपाच्या ठिकाणी 'तोच मी आहे' या ज्ञानाने एकरूप हो. ॥ १३९७ ॥

पैं आपलेनि भेदेंविण। माझें जाणिजें जें एकपण। तयाचि नांव शरण। मज येणें गा ॥ १३९८ ॥

अर्थ—अरे अर्जुना, आपल्याला माझ्याहून अलग न समजता माझे जे एकत्व जाणणे याचेच नाव मला शरण येणे होय ॥ १३९८ ॥

जैसे घटाचेनि नाशें। गगनीं गगन प्रवेशे। मज शरण येणें तैसें। ऐक्य करी ॥ १३९९ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे घट फुटला असता घटातील आकाश महाआकाशात मिळून जाते त्याप्रमाणे या शरण येण्याने माझ्याशी ऐक्य होते. ॥ १३९९ ॥

सुवर्णमणि सोनया। ये कल्लोळु जैसा पाणिया। तैसा मज धनंजया। शरण ये तूं ॥ १४०० ॥

अर्थ—अर्जुना, सोन्याचा मणी जसा सोन्याशी किंवा लाटा ज्याप्रमाणे पाण्याशी ऐक्य पावतात त्याप्रमाणे तू मला शरण ये. ॥ १४०० ॥

गूढार्थदीपिका—ओवी १३९८ ने १४००

या सर्व ओव्यातून भगवंताला शरण जाणे म्हणजे काय हे श्रीज्ञानेश्वर महाराज सांगत आहेत. मीपणाची

जाणीव किंवा आपलेपणा नि:शेष विसरून जाणे म्हणजे भगवंताला शरण जाणे होय. घडा नाहीसा झाला की घडयातील आकाश सहजच बाहेरच्या आकाशात मिसळून जाते, त्याप्रमाणे जीव भगवंताला शरण गेला की दोघांचेही ऐक्य होते. शरणागतीत प्रीतिवृत्तीचे प्राधान्य राहत असल्यामुळे दोघांचेही ऐक्य होऊनही ऐक्याची जाणीव त्या दशेत राहत नाही व हेच जीवाशिवाचे स्वाभाविक ऐक्य होय. भगवंताला शरण जाऊन जर त्याच्या ठिकाणीही आपलेपणाची जाणीव शिल्लक राहत असेल तर भगवंताला शरण असे म्हणण्याची त्याला लाजच वाटायला पाहिजे ह्याच शरणागतीला खरे वंदन म्हणतात व याच वंदनाला तुकाराम महाराज 'नमन ते भक्ति' म्हणतात.

वांचूनि सागराच्या पोटीं। वडवानळु शरण आला किरीटी। जाळूं न ठाके तया गोठी। वाळूनि दे पां॥ १४०१ ॥

अर्थ—याशिवाय अर्जुना, समुद्राच्या पोटात वडवानळ शरण आला खरा. पण तो त्याला जाळणार नाही ही गोष्ट सोडून दे. ॥ १४०१ ॥

मजही शरण रिघिजे। आणि जीवत्वेंचि असिजे। धिग् बोली ईया न लजे। प्रज्ञा केवीं॥ १४०२ ॥

अर्थ—मला शरण येऊनही जीवपणा कायम राहिला. धिक्कार असो अशा बोलण्याला! असे बोलण्याची बुद्धीला लाज कशी वाटत नाही? ॥ १४०२ ॥

अगा प्राकृताही राया। आंगीं पडे जें धनंजया। तें दासिरूंही कीं तया। समान होय॥ १४०३ ॥

अर्थ—अर्जुना य:कश्चित् राजानेही जिचा स्वीकार केला असतो अशी दासी देखील त्याच्या बरोबरीची (होते) ॥ १४०३ ॥

मा मी विश्वेश्वरु भेटे। आणि जीवग्रंथी न सुटे। हे बोल नको वोखटे। कानीं लाऊं॥ १४०४ ॥

अर्थ—मग मी विश्वाचा स्वामी आहे तो मी भेटलो आणि जीवदशा नाहीशी झाली नाही ही ओंगळ गोष्ट कानावर देखील येऊ देऊ नकोस ॥ १४०४ ॥

म्हणौनि मी होऊनि मातें। सेवणें आहे आयितें। तें करीं हातां येतें। ज्ञानें येणें॥ १४०५ ॥

अर्थ—म्हणून मत्स्वरूप होऊन माझी भक्ती करणे अनायासेच होणार आहे. ही (भक्ती) या ज्ञानाने प्राप्त होईल. असे कर. ॥ १४०५ ॥

मग ताकौनिया काढिलें। लोणी मागौतें ताकीं घातलें। परी न घेपेचि कांहीं केलें। तेणें जेवीं॥ १४०६ ॥

अर्थ—मग ताकापासून काढलेले लोणी पुन्हा ताकात टाकले तर ते काही केले तरी ज्याप्रमाणे ताकात मिसळत नाही. ॥ १४०६ ॥

तैसें अद्वयत्वें मज। शरण रिघालिया तुज। धर्माधर्म हे सहज। लागतील ना॥ १४०७॥

अर्थ—त्याप्रमाणे अद्वयपणाने मला शरण आल्यावर तुला धर्माधर्म सहजच लागणार नाहीत. ॥ १४०७ ॥

लोह उभे खाय माती। तें परिसाचिये संगती। सोनें जालया पुढती। न शिविजे मळें॥ १४०८ ॥

अर्थ—लोखंड जरी तसेच राहिले तर ते माती खाते (गंजून जाते) पण तेच परिसाच्या स्पर्शाने सोने झाल्यावर त्याला मळ (गंज) शिवत देखील नाही. ॥ १४०८ ॥

हें असो काष्ठापासोनी। मंथूनि घेतलया वन्ही। मग काष्ठेंही कोंडोनि। न ठके जैसा॥ १४०९ ॥

अर्थ—ते राहू दे. लाकडापासून घासून अग्नी काढला. असता तो जसा काष्ठानी कोंडून रहात नाही. ॥ १४०९ ॥

अर्जुना काय दिनकरु। देखत आहे अंधारु। कीं प्रबोधीं होय गोचरु। स्वप्नभ्रमु॥ १४१० ॥

अर्थ—अर्जुना, सूर्य आंधार पहातो काय? किंवा जागे झाल्यावर स्वप्नभ्रम दिसेल काय? ॥ १४१० ॥

तैसें मजसीं येकवटलेया। मी सर्वरूप वांचूनियां। आन कांहीं उरावया। कारण असे॥ १४११ ॥

अर्थ—त्याप्रमाणे माझ्याशी एकरूप झाल्यावर मी जो सर्वरूप, त्या वांचून दुसरे काही उरण्याला कारण आहे काय? ॥ १४११ ॥

म्हणौनि तयाचें कांहीं। चिंतींना आपुल्या ठाईं। तुझें पापपुण्य पाहीं। मीचि होईन॥ १४१२ ॥

अर्थ—म्हणून त्याचा काही एक (पाप पुण्यांचा) आपल्या मनात विचार करू नको. तुझे पापपुण्य सर्व मीच होइन॥ १२१२॥

तेथ सर्वबंधलक्षणें। पापें उरावें दुजेपणें। तें माझ्या बोधीं वायाणें। होऊनि जाईल॥ १४१३॥

अर्थ—आता सर्व बंधाचे लक्षण, म्हणजे माझ्याहून स्वत:ला भिन्न पहाण्याचे जे पाप, ते देखील माझे ज्ञान (अद्वैतरूपाने) झाल्यानंतर नाहीसे होईल.॥ १२१३॥

जळीं पडिलिया लवणा। सर्वही जळ होय विचक्षणा। तुज मी अनन्यशरणा। होईन तैसा॥ १४१४॥

अर्थ—हे सुज्ञा, पाण्यात मीठ पडले म्हणजे ते जसे जलरूप होऊन जाते, त्याप्रमाणे तूं मला अनन्यभावाने शरण आलां असता मत्स्वरूपच होऊन जाशील.॥ १४१४॥

येतुलेनि आपैसया। सुटलाचि आहासी धनंजया। घेईं मज प्रकाशोनियां। सोडवीन तूतें॥ १४१५॥

अर्थ—अर्जुना, येवढ्याने आपोआपच तूं सुटशील, मला तू ज्ञानपूर्वक जाणून घे म्हणजे तुला मी (धर्माधर्मापासून) सोडवीन.॥ १४१५॥

याकारणें पुढती। हें आधी न वाहें चित्तीं। मज एकासि ये सुमती। जाणोनि शरण॥ १४१६॥

अर्थ—हे बुद्धिमंता, म्हणून ह्यानंतर आपल्या मनात काहीही चिंता करूं नकोस. तू मला एकट्यालाच जाणून शरण ये.॥ १४१६॥

ऐसें सर्वरूप रूपसें। सर्वदृष्टिडोळसें। सर्वदेशनिवासें। बोलिलें श्रीकृष्णें॥ १४१७॥

अर्थ—सर्वरूपे ज्याच्यायोगाने रूपवान् होतात, सर्वदृष्टी ज्याच्या योगाने डोळस होते व जे सर्वत्र व्यापलेले आहेत असे भगवान् श्रीकृष्ण याप्रमाणे म्हणाले.॥ १४१७॥

मग सांवळा सकंकणु। बाहु पसरोनि दक्षिणु। आलिंगिला स्वशरणु। भक्तराजु तो॥ १४१८॥

अर्थ—मग कंकणयुक्त श्यामल वर्णाचा उजवा बाहू पसरून आपणाला शरण आलेल्या भक्तराजाला त्याने आलिंगन दिले.॥ १४१८॥

न पवतां जयातें। काखे सूनि बुद्धीतें। बोलणें मागौतें। वोसरलें॥ १४१९॥

अर्थ—वस्तूची प्राप्ती न होता बुद्धीला काखेत मारून बोलणें माघारी फिरले॥ १४१९॥

ऐसें जें कांहीं एक। बोला बुद्धीसीही अटक। तें द्यावया मिख। खेवाचें केलें॥ १४२०॥

अर्थ—अशी जी काही वस्तू जिच्यामध्ये वाणी व बुद्धी यांचा शिरकाव होत नाही ती देण्याकरता (भगवंतानी) आलिंगनाचे निमित्त केले.॥ १४२०॥

हृदया हृदय येक जालें। ये हृदयींचें ते हृदयीं घातलें। द्वैत न मोडितां केलें। आपणाऐसें अर्जुना॥ १४२१॥

अर्थ—हृदयाशी हृदय भिडले. आपल्या हृदयातील अद्वैतबोध अर्जुनाच्या हृदयात घातला. व देव व भक्त यांचा दोनपणा ठेऊन अर्जुनाला आपल्यासारखे केले॥ १४२१॥

दीपें दीपु लाविला। तैसा परिष्वंगु तो जाला। द्वैत न मोडितां केला। आपणपें पार्थु॥ १४२२॥

अर्थ—दिव्याने दिवा लावावा त्याप्रमाणे ते आलिंगन झाले. दोनपणा न मोडता अर्जुनाला स्वस्वरूप केले॥ १४२२॥

तेव्हां सुखाचा मग तया। पूरु आला जो धनंजया। तेथ वाडु तऱ्हीं बुडोनियां। ठेला देवो॥ १४२३॥

अर्थ—तेव्हां अर्जुनाला जो सुखाचा पूर आला तो इतका मोठा होता की त्यात देव जरी सामर्थ्यवान होते तरी ते बुडून गेलेत.॥ १४२३॥

सिंधु सिंधूतें पावों जाये। तें पावणें ठाके दुणा होये। वरी रिगे पुरवणिये। आकाशही॥ १४२४॥

अर्थ—समुद्राला समुद्र जेव्हा मिळायला जातो तेव्हा ते मिळणे एकीकडेच राहते व तो मात्र दुप्पट होतो व भरीला तो आकाशापर्यंत उसळतो.॥ १४२४॥

तैसें तया दोघांचें मिळणें। दोघां नावरे जाणावें कवणें। किंबहुना श्रीनारायणें। विश्व कोंदलें॥ १४२५॥

अर्थ—त्याप्रमाणेच त्या दोघांची भेट दोघांनाही आवरेना त्याचे मर्म कोणाला कळणार? फार काय सांगावे. भगवंतानी सर्व विश्वच कोंदून टाकले म्हटले तरी चालेल.॥ १४२५॥

एवं वेदाचें मूळसूत्र। सर्वाधिकारैकपवित्र। श्रीकृष्णें गीताशास्त्र। प्रकट केलें॥ १४२६॥

अर्थ—अशाप्रकारे वेदाचे मूळसूत्र व सर्व अधिकारांचे एकमेव पवित्र ठिकाण असे जे गीतारूपी शास्त्र ते श्रीकृष्णाने प्रगट केले.॥ १४२६॥

येथ गीता मूळ वेदां। ऐसें केवीं पां आलें बोधा। हें म्हणाल तरी प्रसिद्धा। उपपत्ति सांगों॥ १४२७॥

अर्थ—येथे 'गीता ही वेदाचे मूळ' हे कसे काय समजले असे म्हणाल तर त्या संबंधीची सयुक्तिक कारण मीमांसा सांगतो॥ १४२७॥

तरी जयाच्या निश्वासीं। जन्म झालें वेदराशी। तो सत्यप्रतिज्ञ पैजेसीं। बोलिला स्वमुखें॥ १४२८॥

अर्थ—ज्याच्या निश्वासापासून वेदांचा समुदाय जन्माला आला त्याच सत्य प्रतिज्ञा असलेल्या भगवंताने प्रतिज्ञेवर आपल्या मुखाने गीता सांगितली॥ १४२८॥

गूढार्थदीपिका—बोलिला स्वमुखे। ओवी १४२८

आपण श्वासोश्वास करतो त्याकरता आपल्याला प्रयत्न करावा लागत नाही. तो अयत्नपूर्वकच होतो. त्याप्रमाणे नित्ययोगी असेल्या परमेश्वराकडून कोणताही यत्न न करता निश्वासाप्रमाणे वेद निर्माण केले जातात.

भगवान् श्रीकृष्ण परब्रह्माचेच अवतार असल्याकारणाने त्यांच्या ठिकाणी अवतारकाळीही योगस्थिती भंगत नाही. अयत्नपूर्वक वेद निर्माण करतेवेळी जर सत्याचा आविष्कार करताना भगवान् चुकले नाहीत तर यत्नपूर्वक भगवद्गीता सांगताना सत्याचे प्रतिपादन करण्यात त्यांची कशी चूक होऊं शकेल?

वेदांतील अनेक गोष्टीं अव्यक्तार्थबोधक आहेत. पण भगवद्गीता साक्षात् भगवंतानी आपल्या मुखाने सांगितली असल्याकारणाने ती स्पष्टार्थबोधक आहे.

श्रीगुलाबराव महाराजांनी म्हणून गीतेला जाग्रत् श्रुती म्हटले आहे ते किती समर्पक आहे हे यावरून कळून येईल. (श्रीगुलाबराव महाराज कृत प्रियलीला महोत्सव सखीप्रेषण ३).

म्हणौनि वेदां मूळभूत। गीता म्हणों हें होय उचित। आणिकही येकी येथ। उपपत्ति असे॥ १४२९॥

अर्थ—म्हणून वेदांचे मूळसूत्र गीता आहे हे म्हणणे योग्यच आहे. आणखीही याठिकाणी एक युक्तिसंगत तर्क आहे.॥ १४२९॥

जें न नशतु स्वरूपें। जयाचा विस्तारु जेथ लपे। तें तयाचें म्हणिपे। बीज जगीं॥ १४३०॥

अर्थ—ज्याचा स्वरूपत: नाश होत नाही व ज्याचा विस्तार ज्यात लुप्त होऊन राहतो त्याला जगात त्याचे बीज असे म्हणतात.॥ १४३०॥

तरी कांडत्रयात्मकु। शब्दराशी अशेखु। गीतेमाजीं असे रुखु। बीजीं जैसा॥ १४३१॥

अर्थ—तर बीजामध्ये ज्याप्रमाणे वृक्ष (अव्यक्त) असतो त्याप्रमाणे तीन कांडात्मक संपूर्ण वेदराशी गीतेमध्ये (अव्यक्तरूपाने) आहे.॥ १४३१॥

म्हणौनि वेदाचें बीज। श्रीगीता होये हें मज। गमे आणि सहज। दिसतही आहे॥ १४३२॥

अर्थ—म्हणून वेदांचे बीज श्रीगीता आहे असे मला वाटते आणि ते सहज देखील दिसून येते.॥ १४३२॥

जे वेदाचे तिन्ही भाग। गीते उमटले असती चांग। भूषणरत्नीं सर्वांग। शोभलें जैसें॥ १४३३॥

अर्थ—सुवर्णालंकार व रत्न यांनी ज्याप्रमाणे सर्व शरीराला शोभा येते, त्याप्रमाणे वेदांचे (कर्मादी) तिन्ही भाग गीतेमध्यें सुंदररीतीने उमटले आहेत.॥ १४३३॥

तियेंचि कर्मादिकें तिन्हीं। कांडें कोणकोणे स्थानीं। गीते आहाति तें नयनीं। दाखऊं आईक॥ १४३४॥

अर्थ—तीच कर्मादिक (कर्म, ज्ञान व भक्ती) तिन्ही कांडे गीतेमध्ये कोण कोणत्या ठिकाणी आहेत ती डोळ्यांना दाखऊ ऐका. ॥ १४३४ ॥

तरी पहिला जो अध्यावो। तो शास्त्रप्रवृत्तिप्रस्तावो। द्वितीयीं सांख्यसद्भावो। प्रकाशिला ॥ १४३५ ॥

अर्थ—तर पहिला जो अध्याय आहे तो शास्त्राच्या प्रवृत्तीची प्रस्तावना आहे. दुसऱ्यात सांख्यशास्त्राची भूमिका स्पष्ट केली आहे. ॥ १४३५ ॥

मोक्षदानीं स्वतंत्र। ज्ञानप्रधान हें शास्त्र। येतुलालें दुजीं सूत्र। उभारिलें ॥ १४३६ ॥

अर्थ—ह्या शास्त्रात ज्ञानाचे प्राधान्य असून ते मोक्षप्राप्ती करून देण्यास स्वतंत्र आहे इतकेच दुसऱ्या अध्यायात सूत्ररूपाने सांगितले आहे. ॥ १४३६ ॥

मग अज्ञानें बांधलेयां। मोक्षपदीं बैसावया। साधनारंभु तो तृतीया-। ध्यायीं बोलिला ॥ १४३७ ॥

अर्थ—अज्ञानाने बद्ध असलेल्या जीवाला मोक्षाची प्राप्ती करून देण्याकरता ज्या साधनमार्गाचा आरंभ करावयाचा त्यांची माहिती तिसऱ्या अध्यायांत दिली आहे. ॥ १४३७ ॥

जे देहाभिमानबंधें। सांडूनि काम्यनिषिद्धें। विहित परी अप्रमादें। अनुष्ठावें ॥ १४३८ ॥

अर्थ—कारण की देहाभिमानामुळे बंधनकारक असलेली काम्य व निषिद्ध कर्मे सोडून देऊन विहित असणारी कर्मे दोषरहित अशी आचरावी. ॥ १४३८ ॥

ऐसेनि सद्भावें कर्म करावें। हा तिजा अध्यावो जो देवें। निर्णय केला ते जाणावें। कर्मकांड येथ ॥ १४३९ ॥

अर्थ—अशा सद्भावाने कर्म करावे हा भगवंतानी तिसऱ्या अध्यायात निर्णय सांगितला. ते येथे कर्मकांड आहे हे लक्षात ठेवावे. ॥ १४३९ ॥

आणि तेंचि नित्यादिक। अज्ञानाचें आवश्यक। आचरतां मोचक। केवीं होय पां ॥ १४४० ॥

अर्थ—आणखी तसेंच नित्यनैमित्तिक कर्मे आचरण करताना अज्ञानापासून सोडवणारे ते कसे होतील. ॥ १४४० ॥

ऐसी अपेक्षा जालिया। बद्ध मुमुक्षुते आलिया। देवें ब्रह्मार्पणत्वें क्रिया। सांगितली ॥ १४४१ ॥

अर्थ—अशी इच्छा झाली असता व शुद्ध पुरुषाला मोक्षाची तळमळ लागली असता देवाने त्याला ब्रह्मार्पण बुद्धीने कर्म करण्याला सांगितले. ॥ १४४१ ॥

जे देहवाचामानसें। विहित निपजे जें जैसें। तें एक ईश्वरोद्देशें। कीजे म्हणितलें ॥ १४४२ ॥

अर्थ—ते असे की कायावाचामनेकरून जे जे विहित कर्म जसे जसे उत्पन्न होईल ते ते एका ईश्वराच्या उद्देशाने करावे असे देवाने सांगितले. ॥ १४४२ ॥

हेंचि ईश्वरीं कर्मयोगें। भजनकथनाचें खागें। आदरिलें शेषभागें। चतुर्थाचेनी ॥ १४४३ ॥

अर्थ—कर्मयोगाने ईश्वराच्या ठिकाणी भजनादी भक्ती करण्याचे हेच शेवटचे ठिकाण होय असे हे चवथ्या अध्यायाच्या राहिलेल्या भागांत सांगितले. ॥ १४४३ ॥

तें विश्वरूप अकरावा। अध्यावो संपे जंव आघवा। तंव कर्में ईशु भजावा। हें जें बोलिलें ॥ १४४४ ॥

अर्थ—ते (चवथ्या अध्यायपासून) विश्वरूपाचा अकरावा अध्याय संपेपर्यंत कर्माच्या योगाने ईश्वराची भक्ती करावी हे जे सांगितले ॥ १४४४ ॥

तें अष्टाध्यायीं उघड। जाण येथें देवताकांड। शास्त्र सांगतसे आड। मोडूनि बोलें ॥ १४४५ ॥

अर्थ—त्या आठ अध्यायात (चार ते अकरा अध्यायात) स्पष्टपणे देवताकांड आहे असे गीताशास्त्र सांगत आहे, हे आडपडदा न ठेवता सांगतो. ॥ १४४५ ॥

आणि तेणेंचि ईशप्रसादें। श्रीगुरुसंप्रदायलब्धें। साच ज्ञान उद्बोधे। कोंवळें जें ॥ १४४६ ॥

अर्थ—आणि ईश्वराच्या त्या कृपाप्रसादाने व श्रीगुरुच्या संप्रदायातून प्राप्त झालेले कोवळे असे यथार्थज्ञान जे अनुभवले जाते. ॥ १४४६ ॥

तें अद्वेष्टादि प्रभृतिकीं। अथवा अमानित्वादिकीं। वाढविजे म्हणोनि लेखीं। बारावा गणूं॥ १४४७॥

अर्थ—ते, अद्वेष्टा इत्यादी किंवा अमानित्वादी गुण आंगी बाणण्याच्या मार्गांनी वाढवून दृढ करावे. ह्या हिशेबात बाराव्या अध्यायाची आम्ही गणना करतो. ॥ १४४७ ॥

तो बारावा अध्याय आदी। आणि पंधरावा अवधी। ज्ञानफळपाकसिद्धि। निरूपणासी॥ १४४८॥

अर्थ—त्या बाराव्या अध्यायापासून व पंधराव्याला शेवट धरून त्या अध्यायापर्यंत जे अध्याय आहेत त्यांत ज्ञानाचे परिपक्व फळ हाच निरूपणाचा विषय आहे. ॥ १४४८ ॥

म्हणौनि चहूंही इहीं। ऊर्ध्वमूळांतीं अध्यायीं। ज्ञानकांड ये ठायीं। निरूपिजे॥ १४४९॥

अर्थ—म्हणून या 'ऊर्ध्वमूळ' पर्यंतच्या या चारही अध्यायात ज्ञानकांडाचेच निरूपण आले आहे. ॥ १४४९ ॥

एवं कांडत्रयनिरूपणी। श्रुतीचि हे कोडिसवाणी। गीतापद्यरत्नांचीं लेणीं। लेयिली आहे॥ १४५०॥

अर्थ—या प्रमाणे कांडत्रयाचे रूप धारण केलेली (कर्म, उपासना व ज्ञान) ही (गीता) गोजिरवाणी श्रुतीच आहे व तिने (गीतेतील) श्लोकरूपी रत्नालंकार धारण केलेले आहेत. ॥ १४५० ॥

हें असो कांडत्रयात्मक। श्रुति मोक्षरूप फळ येक। बोभावे जें आवश्यक। ठाकावें म्हणौनि॥ १४५१॥

अर्थ—हे राहू दे. हे तीन भाग असलेली (गीतारूपी) श्रुती ज्या एका मोक्षफळाची गर्जना करते व जे अवश्यमेव प्राप्त करावे म्हणून सांगते. ॥ १४५१ ॥

तयाचेनि साधनज्ञानेंसीं। वैर करी जो प्रतिदिवशीं। तो अज्ञानवर्ग षोडशीं। प्रतिपादिजे॥ १४५२॥

अर्थ—त्याचे (मोक्षाचे) साधन जे ज्ञान त्याच्याशी रात्रंदिवस वैर करणारा जो अज्ञानवर्ग तो सोळाव्या अध्यायात वर्णन केला आहे. ॥ १४५२ ॥

तोचि शास्त्राचा बोळावा। घेवोनि वैरी जिणावा। हा निरोपु तो सतरावा। अध्याय येथ॥ १४५३॥

अर्थ—शास्त्राचे साह्य घेऊन हा वैरी (शत्रुवर्ग) जिंकावा अशा तऱ्हेचा संदेश सतराव्या अध्यायात आहे. ॥ १४५३ ॥

ऐसा प्रथमालागोनी। सतरावा लाणीं करूनी। आत्मनिश्वास विवरूनि। दाविला देवें॥ १४५४॥

अर्थ—ह्याप्रमाणे पहिल्यापासून सतराव्यापर्यंत देवांनी आपलेच श्वासोश्वास असलेले असे जे वेद त्याचे विवरण केले आहे. ॥ १४५४ ॥

तया अर्थजाता अशेषा। केला तात्पर्याचा आवांका। तो हा अठरावा देखा। कलशाध्यायो॥ १४५५॥

अर्थ—या सर्व अध्यायांतील सर्व अर्थाचा ज्यात थोडक्यात आढावा घेतला आहे तो हा अठरावा कलशाध्याय होय. ॥ १४५५ ॥

एवं सकळसांख्यसिंधु। श्रीभगवद्गीताप्रबंधु। हा औदार्यें आगळा वेदु। मूर्तु जाण॥ १४५६॥

अर्थ—अशा प्रकारे तत्त्वज्ञानाचा समुद्र असा हा श्रीमद्भगवद्गीता ग्रंथ आपल्या ज्ञानदानाच्या औदार्यामुळे संपन्न झालेला आगळाच मूर्तिमंत वेद आहे. ॥ १४५६ ॥

वेदु संपन्नु होय ठाईं। परी कृपणु ऐसा आनु नाहीं। जे कानीं लागला तिहीं। वर्णांच्याचि॥ १४५७॥

अर्थ—वेद आपल्या ठिकाणी ज्ञानसंपत्तीने परिपूर्ण आहे खरा. पण त्याच्या सारखा दुसरा कंजूस कोठेच नाही. कारण तो फक्त तीनच वर्णांच्या लोकांच्या कानांशी लागतो. ॥ १४५७ ॥

येरां भवव्यथा ठेलियां। स्त्रीशूद्रादिकां प्राणियां। अनवसरू मांडूनियां। राहिला आहे॥ १४५८॥

अर्थ—इतर स्त्रीशूद्रादिक जे जीव आहेत व जे संसारयातनेत पिचत पडले आहेत त्यांना अनधिकारी ठरवून तो स्वस्थ राहिला आहे. ॥ १४५८ ॥

तरी मज पाहतां तें मागील उणें। फेडावया गीतापणें। वेदु वेठला भलतेणें। सेव्य होआवया॥ १४५९॥

अर्थ—मला तर असे वाटते की मागचा कमीपणा घालवण्याकरताच व कोणालाही त्याचे सेवन करता यावे म्हणून गीतेच्या रूपाने वेद प्रगट झाला आहे. ॥ १४५९ ॥

गूढार्थदीपिका—वेद वेठला भलतेणें। सेव्य होआवया।

भगवंताचेच नि:श्वासरूप वेद असल्याकारणाने वेदाला कमीपणा आणण्याचा याठिकाणी माउलीचा हेतु नाही. कारण माउलींनीच 'तरी जयाच्या निश्वासी। जन्म झाले वेदराशी। तो सत्यप्रतिज्ञ पैजेसी। बोलिला स्वमुखें' यात वेद व भगवद्गीता या दोहोंचेही कर्तृत्व भगवंताकडेच दिलेले आहे. त्यामुळे त्यांच्यात तरतमभाव तसा नाही, अस्पष्टार्थबोधक व स्पष्ट अर्थबोधक एवढा मात्र फरक या दोहोत आहे. वेदासमान गीतेचेही प्रामाण्य आहे, हे माउलीला येथे सूचित करावयाचे आहे.

वेदात बीजरूपाने असलेली अध्यात्मविद्या स्पष्टपणे गीतेत समाविष्ट केलेली आहे. म्हणूनच माउलीने गीतेला वेदांचे मूळ म्हटले आहे. ''म्हणौनि वेदाचें बीज। श्रीगीता होये हें मज'' अ० १८ ओ० १४३२. ''वेदांचा प्रतिपाद्य विषय जो भगवान् परमात्मा तोच या गीता ग्रंथाचा वक्ता असल्यामुळे गीतेची थोरवी काय वर्णावी!'' याही माउलीच्या उद्गारांवरून वेदतुल्य प्रामाण्य व आदर श्रीगीतेविषयी माउलीला वाटत असल्याचे दिसून येते. ''बाप बाप ग्रंथ गीता। जो वेदीं प्रतिपाद्य देवता। तो श्रीकृष्ण वक्ता। जिये ग्रंथी॥ अ० ११ ओ० २४ वेदांनीच उदार होऊन गीतेचे रूप धारण केले व आपल्या ठिकाणचा कृपणपणा नाहीसा केला याही म्हणण्यात गीता ही वेदांचेच दुसरे रूप ठरते व गीतेचे प्रामाण्य वेदाहून किंचितही कमी नाही हे निश्चित होते.

नाहे हे अर्थु रिगोनि मनीं। श्रवणें लागोनि कानीं। जपमिषें वदनीं। वसोनियां॥ १४६०॥

अर्थ—किंवा हें (गीताशास्त्र) अर्थाने मनात शिरून, श्रवणाने कानास लागून व जपाच्या निमित्ताने मुखात राहून॥ १४६०॥

ये गीतेचा पाठु जो जाणे। तयाचेनि सांगातीपणें। गीता लिहोनि वाहाणें। पुस्तकमिषें॥ १४६१॥

अर्थ—या गीतेचा पाठ जो जाणणार आहे त्याच्या संगतीत राहून व गीता लिहून ती पुस्तकरूपाने जो जवळ बाळगतो॥ १४६१॥

ऐसैसा मी सकटा। संसाराचां चोहटां। गवादी घालीत चोखटा। मोक्षसुखाची॥ १४६२॥

अर्थ—त्याला अशा अशा निमित्ताने संसाराच्या चव्हाट्यावर मोक्षसुखाचे अन्नछत्रच घालून ठेवले आहे.॥ १४६२॥

परी आकाशीं वसावया। पृथ्वीवरी बैसावया। रविदीप्ती राहाटावया। आवारु नभ॥ १४६३॥

अर्थ—परंतु अंतरिक्षात संचार करण्याला, पृथ्वीवर बसण्याला किंवा सूर्यप्रकाश पसरण्याला ज्याप्रमाणे आकाशच आवार असते.॥ १४६३॥

तेवीं उत्तम अधम ऐसें। सेवितां कवणातेंही न पुसे। कैवल्यदानें सरिसें। निववीत जगा॥ १४६४॥

अर्थ—त्याप्रमाणे सेवन करताना तू उत्तम आहेस की अधम आहेस असे कोणालाही गीता विचारीत नाही. मोक्षाचे सारखेच दान करून सर्वजगाला ती तृप्त करते.॥ १४६४॥

यालागीं मागिली कुटी। भ्याला वेदु गीतेच्या पोटीं। रिगाला आतां गोमटी। कीर्ति पातला॥ १४६५॥

अर्थ—या करता मागच्या निंदेला भिऊन वेद गीतेच्या पोटात शिरला. आता त्याने चांगली कीर्ती मिळवली आहे॥ १४६५॥

म्हणौनि वेदाची सुसेव्यता। ते हे मूर्त जाण श्रीगीता। श्रीकृष्णें पांडुसुता। उपदेशिली॥ १४६६॥

अर्थ—म्हणून वेदाचे सुलभ सेवन करण्यासारखे जे मूर्तिमंत रूप ती ही श्रीकृष्णाने अर्जुनाला उपदेशिलेली गीता आहे हे तूं जाण.॥ १४६६॥

परी वत्साचेनि वोरसें। दुभतें होय घरोद्देशें। जालें पांडवाचेनि मिषें। जगदुद्धरण॥ १४६७॥

अर्थ—पण वासराच्यामुळे पान्हा फूटून गाईचे दुभते जसे सर्व घराला उपयोगी पडते, त्याप्रमाणे अर्जुनाच्या निमित्ताने सर्व जगताचा उद्धार झाला॥ १४६७॥

चातकाचिये कणवे। मेघु पाणियेसिं धांवे। तेथ चराचर आघवें। निवालें जेवीं॥ १४६८॥

अर्थ—चातकाची करूणा येऊन मेघ जसा पाणी घेऊन धावून येतो व त्यावेळी संपूर्ण चराचर सृष्टी जशी गारीगार (शांत) होते. ॥ १४६८ ॥

कां अनन्यगतीकमळा-। लागीं सूर्य ये वेळोवेळां। कीं सुखिया होइजे डोळां। त्रिभुवनींचां ॥ १४६९ ॥

अर्थ—किंवा कमळाच्या एकनिष्ठते करता सूर्य वारंवार येतो पण त्यामुळे त्रिभुवनातील लोकांच्या डोळ्यांना जसे सुख मिळते. ॥ १४६९ ॥

तैसें अर्जुनाचेनि व्याजें। गीता प्रकाशूनि श्रीराजें। संसाराएवढें थोर ओझें। फेडिलें जगाचें ॥ १४७० ॥

अर्थ—त्याप्रमाणे अर्जुनाला निमित्त करून भगवंतानी गीता प्रगट केली व जगाचे संसारासारखे प्रचंड ओझे नाहीसे केले. ॥ १४७० ॥

सर्वशास्त्ररत्नदीप्ती। उजळिता हा त्रिजगती। सूर्यु नव्हे लक्ष्मीपती-। वक्त्राकाशींचा ॥ १४७१ ॥

अर्थ—सर्वशास्त्ररूपी रत्नांच्या तेजाला त्रैलोक्यात देदीप्यमान करणारा हा (गीता ग्रंथ) लक्ष्मीपतीच्या मुखरूपी आकाशातील हा सूर्यच नव्हे काय? ॥ १४७१ ॥

बाप कुळ तें पवित्र। जेथिंचा पार्थु या ज्ञाना पात्र। जेणें गीता केलें स्वतंत्र। आवारु जगा ॥ १४७२ ॥

अर्थ—ज्यातील अर्जुन या आत्मज्ञानास पात्र होऊन त्याने सर्व जगाला गीतारूपी स्वतंत्र आवार मोकळे करून दिले ते कुळही पवित्र व धन्य होय. ॥ १४७२ ॥

हें असो मग तेणें। सद्गुरुश्रीकृष्णें। पार्थाचें मिसळणें। आणिलें द्वैता ॥ १४७३ ॥

अर्थ—हे राहू द्या. मग त्या सद्गुरु श्रीकृष्णाने अर्जुनाच्या आपल्याशी झालेल्या प्रेमाद्वैतातून त्याला द्वैतावर आणले. ॥ १४७३ ॥

पाठीं म्हणतसें पांडवा। शास्त्र हें मानलें कीं जीवा। तेथ येरु म्हणे देवा। आपुलिया कृपा ॥ १४७४ ॥

अर्थ—मग अर्जुनाला (भगवान्) म्हणाले. हे शास्त्र तुझ्या अंत:करणाला पटले की नाही? तेव्हा तो म्हणाला, भगवंता आपल्या कृपेने पटले. ॥ १४७४ ॥

तरी निधान जोडावया। भाग्य घडे गा धनंजया। परि जोडिलें भोगावया। विपायें होय ॥ १४७५ ॥

अर्थ—तर अर्जुना, ठेवा प्राप्त होण्यास भाग्य पाहिजे पण मिळालेला ठेवा भोगण्याचे भाग्य मात्र क्वचितच लाभते. ॥ १४७५ ॥

पैं क्षीरसागरायेवढें। अविरजी दुधाचें भांडें। सुरां असुरां केवढें। मथितां जालें ॥ १४७६ ॥

अर्थ—क्षीरसागराएवढें न विरजलेल्या दुधाचे भांडे घुसळताना देवांना व राक्षसांना किती तरी कष्ट पडले. ॥ १४७६ ॥

ते सायासही फळा आले। जें अमृतही डोळां देखिलें। परी वरिली चुकले। जतने ते ॥ १४७७ ॥

अर्थ—ते सर्व श्रम शेवटी फळाला आले. कारण कीं त्यांनी (त्यातून निघालेले) अमृत डोळ्यांनी पाहिले. परंतु नंतर त्याचे रक्षण करण्यास ते चुकले. ॥ १४७७ ॥

तेथ अमरत्वा वोगारिलें। तें मरणाचिलागीं जालें। भोगों नेणतां जोडले। ऐसें आहे ॥ १४७८ ॥

अर्थ—तेव्हा अमरत्व प्राप्त होण्याकरता जे वाटले ते (अमृत) ते मरणाला (दैत्यांच्या) कारण झाले. मिळालेले कसे भोगावे हे माहीत नसले म्हणजे असे होते. ॥ १४७८ ॥

नहुषु स्वर्गाधिपति जाहला। परी राहाटीं भांबावला। तो भुजंगत्व पावला। नेणसी कायी ॥ १४७९ ॥

अर्थ—नहुष राजा स्वर्गाचा स्वामी झाला. पण स्वर्गाच्या वर्तणुकीच्या पद्धतीत चुकला. त्यामुळे त्याला सर्पयोनी प्राप्त झाली हे तुला माहीत नाही काय? ॥ १४७९ ॥

म्हणौनि बहुत पुण्य तुवां। केलें तेणें धनंजया। आजि शास्त्रराजा इया। जालासि विषयो ॥ १४८० ॥

अर्थ—तेव्हा अर्जुना, तूं खूप पुण्यसंचय केला त्यामुळे आज तूं हे सर्वश्रेष्ठ शास्त्र (गीतारूप) प्राप्त होण्यास पात्र झाला आहेस. ॥ १४८० ॥

तरी ययाचि शास्त्राचेनी। संप्रदायें पांघुरौनी। शास्त्रार्थु हा निकेनी। अनुष्ठीं हो॥ १४८१॥

अर्थ—तर याच शास्त्राचा संप्रदाय अंगीकार करून या शास्त्राच्या शिकवणुकी चांगल्या रीतीने आचरणांत आण. ॥ १४८१ ॥

एऱ्हवीं अमृतमंथना-। सारिखें होईल अर्जुना। जरी रिघसी अनुष्ठाना। संप्रदायेंवीण॥ १४८२॥

अर्थ—नाही तर, अर्जुना, संप्रदायाशिवाय जर तूं आचरण करूं पाहशील तर अमृतमंथना सारखी स्थिती होईल. ॥ १४८२ ॥

गाय धड जोडे गोमटी। ते तैंचि पय दे किरीटी। जैं जाणिजे हातवटी। सांजवणीची॥ १४८३॥

अर्थ—गाय चांगली सुंदर धडधाकट मिळाली पण अर्जुना, धार काढण्याची कला अवगत असली तरच तिचे दूध मिळणार. ॥ १४८३ ॥

तैसा श्रीगुरु प्रसन्नु होये। शिष्य विद्याही कीर लाहे। परी ते फळे संप्रदायें। उपासिलिया॥ १४८४॥

अर्थ—त्याचप्रमाणे श्रीगुरु प्रसन्न होतील व शिष्याला खरोखर विद्याही प्राप्त होईल. पण ती (विद्या) फलद्रूप होईल संप्रदायानुसार अनुष्ठान केल्यासच॥ १४८४॥

म्हणौनि शास्त्रीं जो इये। उचितु संप्रदायो आहे। तो ऐक आतां बहुवें। आदरेंसी॥ १४८५.॥

अर्थ—तेव्हा या (गीता) शास्त्रात जो योग्य संप्रदाय आहे त्या विषयी अत्यंत आदरपूर्वक आता श्रवण कर. ॥ १४८५ ॥

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन। न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति॥ ६७॥

अर्थ—तपरहित, गुरु व ईश्वराविषयी भक्ती नसलेला, जो हे ज्ञान ऐकण्याची इच्छा करीत नाही व जो माझी निंदा करतो, त्याला हे ज्ञान कधीही सांगू नये. ॥ ६७॥

तरी तुवां हें जें पार्था। गीताशास्त्र लाधलें आस्था। तें तपोहीना सर्वथा। सांगावें ना हो॥ १४८६॥

अर्थ—तरी अर्जुना, तुला हे गीताशास्त्र श्रद्धेने प्राप्त झाले आहे ते तपोहीन मनुष्याला मुळीच सांगू नको. ॥ १४८६ ॥

अथवा तापसुही जाला। परी गुरुभक्ती जो ढिला। तो वेदीं अंत्यजु वाळिला। तैसा वाळी॥ १४८७॥

अर्थ—किंवा तापस असूनही ज्याची गुरुविषयी भक्ती अढळ नाही त्याला, वेदाध्ययनाच्या बाबतीत ज्याप्रमाणे अंत्यजाला वाळीत टाकण्यात आले आहे त्याप्रमाणे वाळीत टाकावे. ॥ १४८७॥

नातरी पुरोडाशु जैसा। न घापे वृद्ध तरी वायसा। गीता नेदी तैसी तापसा। गुरुभक्तिहीना॥ १४८८॥

अर्थ—किंवा यज्ञातील अवशेष प्रसाद कावळा जरी वृद्ध असला तरी त्याला ज्याप्रमाणे घालीत नाही, त्याप्रमाणे तापस असला तरी गुरुभक्तीचा लवलेश नसेल तर त्याला गीताशास्त्र सांगू नये. ॥ १४८८॥

का तपही जोडे देहीं। भजे गुरुदेवांच्या ठायीं। परी आकर्णनीं नाहीं। चाड जरी॥ १४८९॥

अर्थ—अथवा एखाद्याने शारीरिक तप केले व तो श्रीगुरुंच्या व ईश्वराच्या ठिकाणी भक्तिनिष्ठही आहे पण त्याला (हे ज्ञान) ऐकण्याची इच्छा नसेल. ॥ १४८९ ॥

तरी तो मागील दोहीं आंगीं। उत्तम होय कीर जगीं। परी या श्रवणालागीं। योग्यु नोहे॥ १४९०॥

अर्थ—तर तो मागील (वर्णन केलेल्या) दोन्ही गुणांनी जगात खरोखर उत्तम असेल पण हे (गीताशास्त्र) श्रवण करण्याला मात्र योग्य नव्हे. ॥ १४९० ॥

मुक्ताफळ भलतैसें। हो परी मुख नसे। तंव गुण प्रवेशे। तेथ कायी॥ १४९१॥

अर्थ—मोती कितीही सुंदर असले पण त्यांना जर (छिद्र) नसेल तर त्यात दोरा जाईल काय?॥ १४९१॥

सागरु गंभीरु होये। हें कोण ना म्हणत आहे। परी वृष्टि वायां जाये। जाली तेथ॥ १४९२॥

अर्थ—समुद्र गंभीर आहे हे कोण नाही म्हणतो? पण त्यावर झालेली वृष्टी वाया जातेच॥ १४९२॥

धालिया दिव्यान्न सुवावें। मग जें वायां धाडावें। तें आर्तीं कां न करावें। उदारपण॥ १४९३॥

अर्थ—तृप्त झालेल्यांना सुग्राम अन्न वाढून ते वाया घालवण्यापेक्षा उदारपणाने ते भुकेल्यालाच का वाढू नये?॥ १४९३॥

म्हणौनि योग्य भलतैसें। होतु परी चाड नसे। तरी झणें वानिवसें। देसी हें तयां॥ १४९४॥

अर्थ—म्हणून (इतर बाबतीत) वाटेल तितका योग्य असला तरी गीता श्रवणाची जर त्याला इच्छा नसली तर कौतुकाने देखील हे गीताशास्त्र त्याला देऊं नको बर का!॥ १४९४॥

रूपाचा सुजाणु डोळा। वोडवूं ये कायि परिमळा। जेथ जें माने तें फळा। तेथचि ये गा॥ १४९५॥

अर्थ—रूपाचे ग्रहण करण्याला सुयोग्य असलेला डोळा सुवास घेण्याच्या कामी उपयोगी होईल काय? म्हणून जेथे जे योग्य असेल तेथेच ते फळद्रूप होते.॥ १४९५॥

म्हणौनि तपी भक्ति। पाहावे ते सुभद्रापति। परी शास्त्रश्रवणीं अनासक्ति। वाळावेचि ते॥ १४९६॥

अर्थ—म्हणून अर्जुना, (ज्यांना गीता सांगावयाची आहे) ते तपस्वी व भक्तिमान् आहेत किंवा नाही हे तर पहावेच पण (त्याबरोबरच) त्यांची जर गीता श्रवणाच्या ठिकाणी आवडी नसेल तर मात्र त्यांचा त्यागच करावा.॥ १४९६॥

नातरी तपभक्ति। होऊनि श्रवणीं आर्ति। आथी ऐसीही आयती। देखसी जरी॥ १४९७॥

अर्थ—अथवा तप, भक्ती व (गीताशास्त्र) श्रवण करण्याची इच्छा ही इतकी सामग्री असलेली जरी पाहशील॥ १४९७॥

तरी गीताशास्त्रनिर्मिता। जो मी सकळलोकशास्ता। तया मातें सामान्यता। बोलेल जो॥ १४९८॥

अर्थ—तरी त्या गीताशास्त्राला निर्माण करणारा व सर्व भूतमात्रांचे नियमन करणारा जो मी त्या माझ्याविषयी जो तुच्छतेने बोलेल.॥ १४९८॥

माझ्या सज्जनेंसिं मातें। पैशून्याचेनि हातें। येक आहाती तयांतें। योग्य न म्हण॥ १४९९॥

अर्थ—माझ्या भक्तांची व माझी निंदा करणारे जे कोणी असतील अशा त्यांना हे गीताशास्त्र देण्यास योग्य समजू नकोस.॥ १४९९॥

तयांची येर आघवी। सामग्री ऐसी जाणावी। दीपेंवीण ठाणदिवी। रात्रीची जैसी॥ १५००॥

अर्थ—त्या अशा लोकांची असलेली इतर सर्व सामग्री म्हणजे रात्रीच्यावेळी दिवा न लावलेला स्थान दिवाच समजावा.॥ १५००॥

अंग गोरें आणि तरुणें। वरि लेइलें आहे लेणें। परी येकलेनि प्राणें। सांडिलें जेवीं॥ १५०१॥

अर्थ—शरीर गोरे व तरणे बांड आहे. शिवाय त्यावर अलंकारही घातलेले आहेत; परंतु ते एका प्राणाशिवाय जसे टाकावे लागते.॥ १५०१॥

सोनयाचें सुंदर। निर्वाळिलें होय घर। परी सर्पांगना द्वार। रुंधलें आहे॥ १५०२॥

अर्थ—सोन्याचे सुन्दर घर बांधले आहे, पण आत जाण्याचे द्वार मात्र जसे नागिणीने अडवून ठेवले असावे.॥ १५०२॥

निपजे दिव्यान्न चोखट। परी माजीं असे काळकूट। असो मैत्री कपट-। गर्भिणी जैसी॥ १५०३॥

अर्थ—सुग्रास अन्न तयार झालेले आहे पण त्यांत विष मिसळलेले असावे किंवा मैत्री असावी पण पोटात कपट असावे.॥ १५०३॥

तैसी तपभक्तिमेधा। तयाची जाण प्रबुद्धा। जो माझयांची कां निंदा। माझीचि करी॥ १५०४॥

अर्थ—हे बुद्धिमंता, जो माझ्या भक्तांची किंवा माझी निंदा करतो त्याचे तप, त्याची भक्ती व बुद्धी त्याप्रमाणे आहे असे समज.॥ १५०४॥

याकारणें धनंजया। तो भक्तु मेधावी तपिया। तरी नको बापा इया। शास्त्रा आतळों देवों॥ १५०५॥

अर्थ—अर्जुना, या कारणास्तव तो भक्त, बुद्धिवान् व तपस्वी असला तरी बाबा, ह्या शास्त्राला त्याला शिवू देऊ नकोस. ॥ १५०५ ॥

काय बहु बोलों निंदका। योग्य स्त्रष्ट्याहीसारिखा। गीता हे कवतिका। लागींही नेदी॥ १५०६॥

अर्थ—फार काय सांगायचे! तो निंदक ब्रह्मदेवाच्या योग्यतेचा असला तरी कौतुकाकरताही हे गीताशास्त्र त्याला देऊ नकोस. ॥ १५०६ ॥

म्हणौनि तपाचा धनुर्धरा। तळीं दाटोनि गाडोरा। वरी गुरुभक्तीचा पुरा। प्रासादु जो जाला॥ १५०७॥

अर्थ—म्हणून अर्जुना, खाली तपाचा पाया भरून त्यावर गुरुभक्तीचा जो मंदिर झाला आहे. ॥ १५०७ ॥

आणि श्रवणेच्छेचा पुढां। दारवंटा सदा उघडा। वरी कलशु चोखडा। अनिंदारत्नांचा॥ १५०८॥

अर्थ—आणि (गीताशास्त्र) श्रवण करण्याच्या इच्छेचा दरवाजा निरंतर पुढे उघडा ठेऊन ज्या मंदिरावर निंदेच्या अभावरूपी रत्नांचा कळस ठेवला गेला आहे. ॥ १५०८ ॥

य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति । भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः॥ ६८॥

अर्थ—हे अत्यंत गुप्त असलेले ज्ञान माझ्या ठिकाणी पराभक्ती करून जो माझ्या भक्तांना सांगेल तो निःसंशय माझ्या स्वरूपाला प्राप्त होईल. ॥ ६८ ॥

ऐशा भक्तालयीं चोखटीं। गीतारत्नेश्वरु हा प्रतिष्ठीं। मग माझिया संवसाटी। तुकसी जगीं॥ १५०९॥

अर्थ—अशा भक्तरूपी पवित्र मंदिरात गीतारत्नरूपी ईश्वराची प्राणप्रतिष्ठा कर म्हणजे जगामध्ये माझ्याच योग्यतेस तू चढशील॥ १५०९ ॥

का जे एकाक्षरपणेंसीं। त्रिमात्रकेचिये कुशीं। प्रणवु होतां गर्भवासीं। सांकडला॥ १५१०॥

अर्थ—(ॐ या) एकाक्षराच्यारूपाने अ० उ० म० या त्रिमात्रकेच्या पोटात ओंकार हा गर्भवासामध्ये अडकला होता. ॥ १५१० ॥

तो गीतेचिया बाहळीं। वेदबीज गेलें पाल्हाळीं। कीं गायत्री फुलीं फळीं। श्लोकांच्या आली॥ १५११॥

अर्थ—वेदाचे बीज असलेला तो ॐकार गीतेच्या शाखांनी विस्तारला गेला किंवा (गीता म्हणजे जणुं काय) गायत्रीच श्लोकांच्या फुलांनी व फळांनी बहरली॥ १५११ ॥

ते हे मंत्ररहस्य गीता। मेळवी जो माझिया भक्तां। अनन्यजीवना माता। बाळका जैसी॥ १५१२॥

अर्थ—आई व्यतिरिक्त दुसरे जीवनच माहीत नसलेल्या बालकाची जशी आईशी गाठ घालून द्यावी त्याप्रमाणे (गायत्री) मंत्राचे रहस्य असलेल्या ह्या गीतेची जो माझ्या भक्ताशी गाठ घालून देईल. ॥ १५१२ ॥

तैसी भक्तां गीतेसीं। भेटी करी आदरेंसीं। तो देहापाठीं मजसीं। येकचि होय॥ १५१३॥

अर्थ—व अशाप्रमाणे जो गीतेशी भक्तांची आदराने भेट करील तो देहपात झाल्यानंतर मत्स्वरूपच होईल. ॥ १५१३ ॥

न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः। भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि॥ ६९॥

अर्थ—गीता शास्त्र संप्रदाय चालविणाऱ्या मनुष्यामध्ये त्याच्यापेक्षा मला कोणीही अतिशय प्रिय नाही व पुढेही जगतात त्यापेक्षा मला कोणीही अधिक प्रिय होणार नाही. ॥ ६९ ॥

आणि देहाचेंही लेणें। लेऊनि वेगळेपणें। असे तंव जीवेप्राणें। तोचि पढिये॥ १५१४॥

अर्थ—आणि शरीररूपी अलंकार घालून तो (गीता सांगणारा) माझ्याहून वेगळा असतो तेव्हाही तो मला जीवाभावाने आवडतो. ॥ १५१४ ॥

ज्ञानियां कर्मठां तापसां। यया खुणेचिया माणुसां-। माजीं तो एकु गा जैसा। पढिये मज॥ १५१५॥

तैसा भूतळीं आघवा। आन न देखें पांडवा। जो गीता सांगे मेळावा। भक्तजनांचा॥ १५१६॥

अर्थ—ज्ञानी, कर्मठ व तपस्वी या लक्षणांच्या मनुष्यामध्ये भक्तांच्या समुदायात गीता सांगणारा तो जसा मला आवडता होतो. ॥ १५१५ ॥ जो भक्तजनांच्या मेळाव्यांत गीता सांगतो तो मला जसा आवडतो तसा अर्जुना, दुसरा मला आवडता; या अखिल भूतळावर दिसत नाही. ॥ १५१६ ॥

मज ईश्वराचेनि लोभें। हे गीता पढतां अक्षोभें। जो मंडन होय सभे। संतांचिये॥ १५१७॥

अर्थ—मी जो ईश्वर त्या माझ्या केवळ प्रेमामुळे स्वस्थ चित्ताने जो गीता सांगत असतो तो संताच्या सभेचे भूषणच होय. ॥ १५१७ ॥

नवपल्लवीं रोमांचितु। मंदानिळें कांपवितु। आमोदजळें वोल्रवितु। फुलांचे डोळे॥ १५१८॥
कोकिळाकलरवाचेनि मिषें। सद्गद बोल्वीत जैसें। वसंत का प्रवेशे। मद्भक्तआरामीं॥ १५१९॥
का जन्माचें फळ चकोरां। होतु चंद्र ये अंबरा। नाना नवघन मयूरां। वो देत पावे॥ १५२०॥
तैसा सज्जनांच्या मेळावीं। गीतापद्यरत्नीं उमपीं। वर्षे जो माझ्या रूपीं। हेतु ठेऊनि॥ १५२१॥

अर्थ—नवीन पालवींनी रोमांचित होऊन, मंदमंद वाऱ्याच्या झुळकीने त्यांना डोलवीत, सुवासिक जलाने फुलांचे डोळे ओले करीत॥ १५१८॥ कोकिळेच्या मधुर आवाजाच्या मिषाने गद्गद् होऊन हाका मारणाऱ्या वसंत ऋतुप्रमाणे जो माझ्या भक्तमंडळीरूपी बगीच्यात प्रवेश करतो॥ १५१९ ॥ किंवा चंद्र आकाशात उगवला म्हणजे चकोर पक्षाच्या जन्माचे सार्थक होते किंवा मोराच्या टाहोला ओ देत नूतन मेघ जसा येऊन ठाकतो. ॥ १५२० ॥ त्याप्रमाणे केवळ माझ्या स्वरूपाच्या प्राप्तीचे लक्ष्य ठेऊन जो सत्पुरुषांच्या मेळाव्यात गीतापद्यरूपी रत्नांचा अमाप वर्षाव करतो. ॥ १५२१ ॥

मग तयाचेनि पाडें। पढियंतें मज फुडें। नाहींचि गा मागेंपुढें। न्याहाळितां॥ १५२२॥

अर्थ—अर्जुना, मागे होऊन गेलेल्या व पुढे होणाऱ्या भक्तांचा विचार करता, अशा या पुरुषा इतका मला आवडता असा खरोखरच दुसरा कोणी नाही॥ १५२२॥

अर्जुना हा ठायवरी। मी तयातें सूयें जिव्हारीं। जो गीतार्थाचें करी। परगुणें संतां॥ १५२३॥

अर्थ—अर्जुना, गीतेच्या अर्थांची जो संताना मेजवानी देतो त्याला अद्यापपर्यंत मी आपला जीवीचा जिवलग करून ठेवत आलो आहे. ॥ १५२३ ॥

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः। ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः॥ ७०॥

अर्थ—या आपल्या (मोक्ष) धर्मरूप संवादाचे जो अध्ययन करील त्याने ज्ञानरूपी यज्ञाने माझे यजन केले असे मी उमजतो. ॥ ७० ॥

पैं माझिया तुझिया मिळणीं। वाढीनली जे हे कहाणी। मोक्षधर्म का जिणीं। आलासे जेथें॥ १५२४॥

अर्थ—माझ्या व तुझ्या या भेटीत जी ही गीतारूपी कथा वाढली व ज्यात मोक्षधर्म जन्माला आला॥ १५२४॥

तो हा सकळार्थप्रबोधु। आम्हां दोघांचा संवादु। न करितां पदभेदु। पाठेंचि जो पढे॥ १५२५॥

अर्थ—तो हा सकल अर्थ देणारा आपणा उभयतांचा संवाद शब्दात काहीही बदल न करता. जो केवळ पठन करतो. ॥ १५२५ ॥

तेणें ज्ञानानळीं प्रदीप्तीं। मूळ अविद्येचिया आहुती। तोषविला होय सुमती। परमात्मा मी॥ १५२६॥

अर्थ—हे सुबुद्धी अर्जुना! त्याने धगधगीत झालेल्या ज्ञानरूपी अग्नीमध्ये मूळ अविद्येची आहुती देऊन मी जो परमात्मा त्या मला संतुष्ट केले आहे. ॥ १५२६ ॥

घेऊनि गीतार्थ उगाणा। ज्ञानिये जें विचक्षणा। ठाकिती तें गाणावाणा। गीतेचा तो लाहे॥ १५२७॥

अर्थ—हे ज्ञानी अर्जुना, गीतेच्या अर्थाचा झाडा (विस्तृत ज्ञान) घेऊन ज्ञानी पुरुष ज्या पदास पोहोचतात तेच पद गीतेचे गायन करणाऱ्यास व वर्णन करणाऱ्यास प्राप्त होते. ॥ १५२७ ॥

गीतापाठकासि असे। फळ अर्थज्ञाचि सरिसें। गीतामाउलियेसि कीं नसे। जाणें तान्हें॥ १५२८॥

अर्थ—गीतेचा पाठ (अर्थरहित) करणाऱ्यास गीतेचा अर्थ जाणणाऱ्या इतकेच फळ प्राप्त होते. गीतारूपी मातेला जाणते (ज्ञानी) मूल व नेणते (अज्ञानी) मूल हा भेद नाही. ॥ १५२८ ॥

श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः। सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम्॥ ७१ ॥

अर्थ—श्रद्धायुक्त व मत्सररहित असा मनुष्य हे श्रवण करील तर तो देखील पापापासून मुक्त होईल व पुण्यकर्म करण्याने मिळणाऱ्या शुभ लोकांना प्राप्त होईल. ॥ ७१ ॥

आणि सर्वमार्गीं निंदा। सांडूनि आस्था पैं शुद्धा। गीताश्रवणीं श्रद्धा। उभारी जो॥ १५२९ ॥

अर्थ—आणि सर्वतोपरी निंदा टाकून देऊन श्रवणाच्या (गीता श्रवणाच्या) ठिकाणी आस्थेने शुद्ध श्रद्धा जो ठेवील॥ १५२९ ॥

तयाच्या श्रवणपुटीं। गीतेचीं अक्षरें जंव पैठीं। होतीना तंव उठाउठीं। पळेचि पाप॥ १५३० ॥

अर्थ—त्याच्या कानामध्ये गीतेची अक्षरे शिरतात न शिरतात तोच पाप तत्काळ पळून जाते. ॥ १५३० ॥

अटवियेमाजीं जैसा। वन्हि रिघतां सहसा। लंघिती का दिशा। वनौकें तियें॥ १५३१ ॥

का उदयाचळकुळीं। झळकतां अंशुमाळी। तिमिरें अंतराळीं। हारपती॥ १५३२ ॥

तैसा कानाच्या महाद्वारीं। गीता गजर जेथ करी। तेथ सृष्टीचिये आदीवरी। जायचि पाप॥ १५३३ ॥

अर्थ—अरण्यात अकस्मात् वणवा पेटला असता वनातील पशुपक्षी जसे सैरावैरा पळत सुटतात॥ १५३१ ॥ किंवा उदय गिरीवर सूर्य झळकू लागला म्हणजे आकाशातील अंधःकार जसा नाहीसा होतो. ॥ १५३२ ॥ त्याप्रमाणे जेथे कानाच्या महाद्वारात गीतेचा गजर होतो तेथे सृष्टीच्या आरंभा पासून झालेले पाप (ऐकणाऱ्याचे) नष्ट होते. ॥ १५३३ ॥

ऐसी जन्मवेली धुवट। होय पुण्यरूप चोखट। याहीवरी अचाट। लाहे फळ॥ १५३४ ॥

अर्थ—ह्या प्रमाणे जन्माची परंपरारूप वेल निर्मल होऊन शुद्ध व पुण्यरूप होते व मग तिला अद्भुत (मोठे) फळयेते. ॥ १५३४ ॥

जे इये गीतेचीं अक्षरें। जेतुलीं का कर्णद्वारें। रिघती तेतुले होती पुरे। अश्वमेध कीं॥ १५३५ ॥

अर्थ—कारण की या गीतेची अक्षरे जितकी जितकी कर्णद्वारात शिरतील तितके तितके पूर्ण अश्वमेध यज्ञ घडल्याप्रमाणे होते. (अश्वमेधाचे पुण्य प्राप्त होते) ॥ १५३५ ॥

म्हणौनि श्रवणें पापें जाती। आणि धर्म धरी उन्नती। तेणें स्वर्गराज्यसंपत्ति। लाहेचि शेखीं॥ १५३६ ॥

अर्थ—म्हणून (गीतेच्या) श्रवणाने पापे जातात आणि धर्माचा उत्कर्ष होतो आणि त्यामुळे शेवटी स्वर्गाच्या राज्याची संपत्ती मिळते. ॥ १५३६ ॥

तो पैं मज यावयालागीं। पहिलें पेणें करी स्वर्गीं। मग आवडे तंव भोगी। पाठीं मजचि मिळे॥ १५३७ ॥

अर्थ—माझ्याकडे येण्याकरता तो पहिला मुक्काम स्वर्गाचा करतो. आणि आवडेल तो पर्यंत स्वर्गसुखाचा भोग उपभोगून मागाहून मलाच येऊन मिळतो. ॥ १५३७ ॥

ऐसी गीता धनंजया। ऐकतया आणि पढतया। फळे महानंदें मियां। बहु काय बोलों॥ १५३८ ॥

अर्थ—अर्जुना, अशी ही गीता ऐकणाऱ्याला व पठन करणाऱ्याला महान आनंदाने फळ देते (परमानंद स्वरूप माझी प्राप्ति करून देते) यापेक्षा जास्त काय सांगायचे!॥ १५३८ ॥

याकारणें हें असो। परी जयालागीं शास्त्रातिसो। केला तें तंव तुज पुसों। काज तुझें॥ १५३९ ॥

अर्थ—एवढ्या करता हे राहू दे. पण ज्या करता एवढा हा शास्त्राचा विस्तार केला ते तुझे काम तुला आता विचारतो (त्या तुझ्या कामाविषयी आता विचारले पाहिजे.) ॥ १५३९ ॥

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा। कच्चिदज्ञानसम्मोहः प्रनष्टस्ते धनञ्जय॥ ७२ ॥

अर्थ—अर्जुना, तू एकाग्र चित्ताने हे श्रवण केलेस ना? धनंजया, तुझ्या अज्ञानापासून उत्पन्न झालेला मोह नष्ट झाला ना?॥ ७२ ॥

तरी सांग पां पांडवा। हा शास्त्रसिद्धांतु आघवा। तुज एकचित्तें फावा। गेला आहे॥ १५४०॥

अर्थ—तर अर्जुना, हा सर्व शास्त्रसिद्धान्त एकाग्र चित्ताने नीट समजून घेतलास की नाही; सांग पाहू?॥ १५४०॥

आम्हीं जैसें जया रीती। उगाणिलें कानांच्या हातीं। येरीं तैसेंचि तुझ्या चित्तीं। पैठें केलें कीं॥ १५४१॥

अर्थ—आम्ही जसे व ज्यारीतीने हे ज्ञान तुझ्या कानांच्या पदरात टाकले. पण बघ, तसेच व त्यारीतीने ते तुझ्या चित्तात स्थिरावले की नाही?॥ १५४१॥

अथवा माझारीं। गेलें सांडिविखुरी। किंवा उपेक्षेवरी। वाळूनि सांडिलें॥ १५४२॥

अर्थ—अथवा मध्येच ते सांडण्यालोटण्यावारी गेले आहे किंवा त्याची उपेक्षा होऊन ते टाकून दिले गेले आहे?॥ १५४२॥

जैसें आम्हीं सांगितलें। तैसेंचि हृदयीं पावलें। तरी सांग पां वहिलें। पुसेन तें मी॥ १५४३॥

अर्थ—जसे आम्ही तुला सांगितले तसेच जर तुझ्या अंत:करणात सांठवले असेल तर मी आता जे विचारीन ते लवकर सांग पाहू॥ १५४३॥

तरी स्वाज्ञानजनितें। मागिलें मोहें तूतें। भुलविलें तो येथें। असे कीं नाहीं॥ १५४४॥

अर्थ—आपल्या स्वरूपाच्या अज्ञानामुळे उत्पन्न झालेल्या ज्या मोहाने तुला भ्रमात पाडले होते तो मोह अजून आहे की नाही!॥ १५४४॥

हें बहु पुसो काई। सांगें तूं आपल्या ठाईं। कर्माकर्म कांहीं। देखतासीं॥ १५४५॥

अर्थ—हे फार काय विचारायचे? तूं हे सांग की, तूं स्वत:च्या ठिकाणी (अद्यापि) कर्माकर्म बघतोस काय?॥ १५४५॥

पार्थु स्वानंदैकरसें। विरेल ऐसा भेददशे। आणिला येणें मिषें। प्रश्नाचेनि॥ १५४६॥

अर्थ—अर्जुन हा आत्मानंदाच्या रसात विरून जाईल म्हणून या प्रश्नाच्या निमित्ताने त्याला द्वैत दशेत आणले॥ १५४६॥

पूर्णब्रह्म जाला पार्थु। तरी पुढील साधावया कार्यार्थु। मर्यादा श्रीकृष्णनाथु। उल्लंघों नेदी॥ १५४७॥

अर्थ—अर्जुन पूर्णब्रह्मस्वरूप झाला तरी पुढील कार्य साधण्याकरता भगवान् श्रीकृष्ण त्याला कर्मयोगाची मर्यादा ओलांडू देईनात.॥ १५४७॥

एऱ्हवीं आपुलें करणें। सर्वज्ञ काय तो नेणे। परी केलें पुसणें। याचिलागीं॥ १५४८॥

अर्थ—न होतर, आपल्या उपदेश कृतीचा परिणाम सर्वज्ञ असलेला भगवान् काय जाणत नव्हता! परंतु अर्जुन देहभानावर यावा म्हणूनच देवांनी प्रश्न विचारला.॥ १५४८॥

एवं करोनियां प्रश्न। नसतेंचि अर्जुनपण। आणूनियां जालें पूर्णपण। तें बोलवी स्वयें॥ १५४९॥

अर्थ—याप्रमाणे प्रश्न करून नसताच अर्जुनपणा नाहीसे झालेले अर्जुनाचे देहभान आणून ब्रह्मप्राप्तीचा जो अनुभव अर्जुनाला आला होता तोच त्याला बोलायला लावला.॥ १५४९॥

मग क्षीराब्धीतें सांडितु। गगनीं पुंजुमंडितु। निवडे जैसा न निवडितु। पूर्णचंद्र॥ १५५०॥
तैसा ब्रह्म मी हें विसरे। तेथ जगचि ब्रह्मत्वें भरे। हेंही सांडी तरी विरे। ब्रह्मपणही॥ १५५१॥

अर्थ—क्षीरसमुद्रातून निघणारा व आपल्या किरणांच्या पुंजाने सुशोभित दिसणारा आकाशातील पौणिमेचा चंद्र जसा पांढरा तसाच क्षीरसमुद्रही पांढरा. ते आपले पांढरेपण निळे न करताच निराळा दिसावा.॥ १५५०॥ त्याप्रमाणे 'मी ब्रह्म आहे' ही जाणीव विसरतो तेव्हा सर्वजगच ब्रह्मरूप असल्याची (अमर्यादित्वाची) जाणीव निर्माण होते व तीही नाहीशी होताच ब्रह्मपणाच्या व्यापकत्वाची जाणीवही पूर्णपणे विरून जाते.॥ १५५१॥

गूढार्थदीपिका—**हेंही सांडी तरी विरे। ब्रह्मपणही।**

जोपर्यंत जाणीव कायम राहते तोपर्यंत ब्रह्मरूपता आंगी बाणली असे म्हणता येत नाही. 'मी ब्रह्मस्वरूप आहे' ही जाणीव अब्रह्मरूप जो पूर्वी प्रत्यय येत होता त्याच्या अपेक्षेने असल्यामुळे ही विद्यावृत्ती असली तरी लेखाविद्याच आहे हे ज्ञान व्यतिरेक ज्ञान आहे. ''नामरूपांनी भासणारे सर्व दृश्य जगत् हे ब्रह्मच आहे'' हा अन्वयाचा प्रत्यय व्यतिरेक ज्ञानानंतर येतो. हे अन्वयाचे व्यापक ज्ञान असले तरी हीही वृत्तीच आहे. ज्ञानांश जोपर्यंत प्रधान आहे तोपर्यंत जाणीव ही कायम राहणारच. व जाणीव आहे तोपर्यंत वृत्तिरूपता नाहीशी होऊ शकत नाही. तेव्हा ही वृत्तीही नाहीशी झाल्याशिवाय ब्रह्मरूपतेचा जाणीवरहित अनुभव येऊं शकत नाही. ही ज्ञानाची वृत्ती अर्थातच दुसऱ्या कोणत्याही ज्ञानाने नाहीशी होऊ शकत नाही. तिला नाहीशी करावयाचे असल्यास प्रेमवृत्तीला प्रधान करणे हाच त्यावर उपाय आहे. प्रेम हे सगुण साकार भगवंताविषयी होत असल्यामुळे अशा ज्ञानीभक्तांचा सर्व व्यवहारच भगवद्रूप होतो व जीवन्मुक्तीतच त्यांना विदेहमुक्तीचाही लाभ होतो. ज्ञान्याच्या ठिकाणी असणारा समाधि व व्युत्थान हाही भेद त्यांना भासत नाही व त्यांना नित्य समाधीसुख लाभते. ''यत्र यत्र मनो याति तत्र तत्र समाधय:'' ही उक्ती ज्ञानोत्तर भक्तांच्याच ठिकाणी सार्थ होते, केवळ ज्ञान्याच्या ठिकाणी नाही.

ऐसा मोडतु मांडतु ब्रह्में। तो दु:खें देहाचिये सीमे। मी अर्जुन येणें नामें। उभा ठेला॥ १५५२॥

अर्थ—याप्रमाणे एक (अव्यापक) जाणीव सोडत व दुसरी (व्यापक) जाणीव धरीत तो देहाच्या सीमेवर 'मी अर्जुन' या नावाने मोठ्या दु:खाने उभा राहिला.॥ १५५२॥

मग कापतां करतळीं। दडपूनि रोमावळी। पुल्कू स्वेदजळीं। जिरऊनियां॥ १५५३॥
प्राणक्षोभें डोल्तया। आंगा आंगचि टेंकया। सूनि स्तंभु चाळया। भुलौनियां॥ १५५४॥
नेत्रयुगुळाचेनि वोतें। आनंदामृताचें भरितें। वोसंडत तें मागुतें। काढूनियां॥ १५५५॥
विविधा औत्सुक्यांची दाटी। चीप दाटत होती कंठीं। ते करूनियां पैठी। हृदयामाजीं॥ १५५६॥
वाचेचें वितुळणें। सांवरूनि प्राणें। अक्रमाचें श्वसणें। ठेऊनि ठायीं॥ १५५७॥

अर्थ—मग कापऱ्या तळहातांनी उभे राहिलेले रोमांच दाबून व पुलकित झाल्यामुळे आलेल्या स्वेदबिंदूना जिरवून॥ १५५३॥ श्वास लागल्यामुळे हालणाऱ्या अंगाला अंगाचाच टेका देऊन व हालचालीला विसरून स्तब्ध राहून.॥ १५५४॥ दोन्ही डोळ्यांतील अश्रूंच्या रूपाने आनंदामृताच्या पुराचा जो लोट वहात होता त्याला मागच्यामागे थोपवून॥ १५५५॥ नाना प्रकारच्या उत्कंठेच्या गर्दीमुळे कंठात जो गहिवर दाटत होता त्याला हृदयात दाबून टाकून॥ १५५६॥ (बोबडी वळल्यामुळे) विस्कळीत झालेल्या वाणीला प्राणाने सावरून व अनियमित झालेल्या श्वासाला पूर्ववत करून (नियमित करून)॥ १५५७॥

अर्जुन उवाच

नष्टो मोह: स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत। स्थितोऽस्मि गतसन्देह: करिष्ये वचनं तव॥ ७३॥

अर्थ—अर्जुन म्हणाला—माझा मोह नाहीसा झाला, भगवंता, तुझ्याकृपेने माझ्या खऱ्या स्वरूपाचे मला ज्ञान झाले. आता मी नि:संदेह झालो आहे. आता तुझी आज्ञा पालन करीन.॥ ७३॥

मग अर्जुन म्हणे काय देवो। पुसताति आवडे मोहो। तरी तो सकुटुंब गेला जी ठावो। घेऊनि आपला॥ १५५८॥

अर्थ—मग अर्जुन म्हणाला, देवा, मोह आवडतो की काय म्हणून आपण विचारता; तर, तो महाराज आपले ठिकाण घेऊन परिवारासह गेला॥ १५५८॥

पासीं येऊनि दिनकरें। डोळ्यातें आंधारें। पुसिजे हें कायि सरे। कोणे गांवीं॥ १५५९॥
तैसा तूं श्रीकृष्णराया। आमुचिया डोळ्यां। गोचर हेंचि कायिसया। न पुरे तंव॥ १५६०॥

अर्थ—सूर्याने जवळ येऊन डोळ्यांनाच विचारायचे की आता आंधार आहे काय? असे कोणत्या गावी घडले आहे?॥ १५५९॥ त्याप्रमाणे श्रीकृष्णराया, तूं आमच्या डोळ्यासमोर उभा आहेस येवढेच त्याला (मोह विनाशाला) पुरे नाही काय?॥ १५६०॥

वरी लोभें मायेपासूनी। तें सांगसी तोंड भरूनी। जें कायिसेनिही करूनी। जाणूं नये॥ १५६१॥

अर्थ—शिवाय, जे कशानेही (कोणत्याही साधनमार्गांनी) जाणता येणार नाही ते आईपेक्षाही अधिक प्रेमाने तू तोंड भरून सांगतोस.॥ १५६१॥

आतां मोह असे कीं नाहीं। हें ऐसें जी पुससी काई। कृतकृत्य जाहलों पाहीं। तुझेपणें॥ १५६२॥

अर्थ—तेव्हा आता मोह (मला) आहे की नाही हे आपण काय विचारता? मी तुझ्या स्वरूपाशी ऐक्य पावल्याने कृतकृत्य झालो पहा!॥ १५६२॥

गुंतलों होतों अर्जुनगुणें। तो मुक्त जालों तुझेपणें। आतां पुसणें सांगणें। दोन्ही नाहीं॥ १५६३॥

अर्थ—अर्जुनपणामुळे मी जो अडकलो होतो तो तुझ्यास्वरूपाशी ऐक्य पावल्यामुळे मुक्त झालो. आता तू विचारणे व मी सांगणे या दोन्ही गोष्टी उरल्या नाहीत.॥ १५६३॥

मी तुझेनि प्रसादें। लाधलेनि आत्मबोधें। मोहाचे तया कांदे। नेदीच उरों॥ १५६४॥

अर्थ—तुमच्या कृपेमुळे प्राप्त झालेल्या आत्मबोधाने मोहाचे मूळ (मी आपल्या ठिकाणी) मुळीच शिल्लक राहू देणार नाही.॥ १५६४॥

आतां करणें का न करणें। हें जेणें उठी दुजेपणें। तें तूं वांचूनि नेणें। सर्वत्र गा॥ १५६५॥

अर्थ—आता, भगवंता, करणे किंवा न करणे हे ज्या दुजेपणामुळे (द्वैतामुळे) निर्माण होते ते, आता तुझ्या एका शिवाय सर्व ठिकाणी मला काहीही नसल्यामुळे, उरले नाही.॥ १५६५॥

येविषयीं माझ्या ठायीं। संदेहाचें नुरेचि कांहीं। त्रिशुद्धी कर्म जेथ नाहीं। तें मी जालों॥ १५६६॥

अर्थ—याविषयीं माझ्या ठिकाणीं कोणताही संदेह मुळीच उरला नाही. तर निश्चयेकरून जेथे कर्माचा संबंधच नाही ते (ब्रह्मस्वरूपच) मी झालो आहे.॥ १५६६॥

तुझेनि मज मी पावोनी। कर्तव्य गेलें निपटूनी। परी आज्ञा तुझी वांचोनी। आन नाहीं प्रभो॥ १५६७॥

अर्थ—तुझ्या कृपेने माझे आत्मस्वरूप मला प्राप्त होऊन 'अमके करायचे' अशा तऱ्हेचे कर्तव्य सपशेल नाहीसे झाले. परंतु तुमच्या आज्ञेवाचून, भगवंता, आता मला दुसरे कर्तव्य काही नाही.॥ १५६७॥

कां जें दृश्य दृश्यातें नाशी। जें दुजें द्वैतातें ग्रासी। जें एक परी सर्वदेशीं। वसवी सदा॥ १५६८॥

अर्थ—कारण की गुरुरूप जे दृश्य श्रीगुरुमूर्ती म्हणजे श्रीकृष्ण स्वरूप (पंचभूतात्मक) दृश्याचा नाश करते व जे दुसरे दिसतात पण द्वैताचा पूर्ण निरास करतात व जे एकच असले तरी सर्व देशात वास करतात॥ १५६८॥

जयाचेनि संबंधें बंधु फिटे। जयाचिया आशा आस तुटे। जें भेटलया सर्व भेटे। आपणपांचि॥ १५६९॥

अर्थ—ज्याच्या संबंधाने संसाराचे बंधन तुटून पडते, ज्याची आशा केली असता इतर सर्व आशा नष्ट होतात, व जे भेटले असता आपल्याच ठिकाणी सर्व भेटते.॥ १५६९॥

तें तूं गुरुलिंग जी माझें। जें येकलेपणींचें विरजें। जयालागीं वोलांडिजे। अद्वैतबोधु॥ १५७०॥

अर्थ—ज्याच्या प्रीतीकरता अद्वैतबोधही उल्लंघावा लागतो व जी एकाकीपणालाच (अद्वैतभावाला) साह्य करते अशी माझी श्रीगुरुमूर्ती तू आहेस.॥ १५७०॥

आपणचि होऊनि ब्रह्म। सारिजे कृत्याकृत्यांचे काम। मग कीजे का निःसीम। सेवा जयाची॥ १५७१॥

अर्थ—आपणच ब्रह्मरूप होऊन कार्य व अकार्य यांचा झगडा मिटवून मग ज्याची निःसीम सेवा करावी.॥ १५७१॥

गंगा सिंधु सेवूं गेली। पावतांचि समुद्र जाली। तेवीं भक्तां सेल दिधली। निजपदाची॥ १५७२॥

अर्थ—गंगा समुद्राची सेवा करायला गेली व तेथे पोहचताच समुद्ररूप झाली त्याप्रमाणे आपणही भक्ताला आपल्या ब्रह्मपदाचा शेवटचा वाटा दिलात.॥ १५७२॥

तो तूं माझा जी निरुपचारु। श्रीकृष्णा सेव्य सद्‌गुरु। मा ब्रह्मतेचा उपकारु। हाचि मानी॥ १५७३॥

अर्थ—श्रीकृष्णा, तो तू माझा निरुपाधिक सेवा करण्यास योग्य असा सद्‌गुरु आहेस. आपण मला ब्रह्मरुपता प्राप्त करून दिली हा माझ्यावर उपकार झाला. पण त्याची फेड म्हणजे सद्‌गुरुचरणसेवा घडावी हे मी समजतो ॥ १५७३ ॥

गूढार्थदीपिका—या ब्रह्मतेचा उपकारु। हाचि मानी।

'देखे आपुलिया प्रतीति। जगचि मुक्त।' अशी ज्यांची ज्ञानदृष्टी परिपक्व झाली आहे अशा तऱ्हेचे सद्‌गुरु कोणाला शिष्य मानू शकतील? त्याना जर शिष्यच भासत नसेल तर ते आपल्याठिकाणी गुरुत्व तरी कसे वागवतील? तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे शिष्याची ते सेवा घेऊ शकत नाहीत कारण शिष्यालाही ते देवच मानतात 'शिष्याची जो नेघे सेवा। मानी देवा समान' आत्मस्वरूप अफूट असल्याकारणाने गुरुशिष्यादी कोणताही संबंध त्या ठिकाणी राहू शकत नाही.

पण असे असले तरी दिव्याने दिवा लावला असता पहिल्या दिव्याचे मोठेपण जसे नाहीसे होत नाही, त्याप्रमाणे शिष्याच्या बुद्धीतून श्रीगुरुविषयीची कृतज्ञाता बुद्धी नाहीशी होऊ शकत नाही. श्रीगुरुनी मला ब्रह्मस्थितीच्या अंतिम टोकावर बसविल्यामुळे मी पूर्ण ब्रह्मस्वरूप झालो; आता मला कृत्याकृत्य काहीही राहिले नाहीत. पण श्रीगुरुची निःसीम सेवा करणे एवढेच आता एक शिल्लक राहिले.

अज्ञान दशेत भेदाचे कवाड आड येत असल्यामुळे अहंता व ममता या दोन्ही अंशांनी श्रीगुरुची सेवा करता येऊ शकली नाही. ज्ञानाने तो अडसर दूर होऊन गेल्यामुळे श्रीगुरुच्या ऋणातून मुक्त होण्याचा एकच मार्ग आता उरला व तो म्हणजे त्यांची निःसीम सेवा करणे. माउलीनी याठिकाणी एकप्रकारे सच्छिष्य कसा असतो किंवा असावा याचा आदर्शच येथे सांगितला आहे.

शिष्याच्या अंतःकरणातून गुरुत्वभावना ज्ञानानंतर नाहीशी झाल्यास शिष्याचा ज्ञानाहंकार बळावण्याचा संभव असतो व म्हणूनच वेदान्तात **'नाद्वैतन् गुरुणासह'** अशी ज्ञानी शिष्याला शिकवण दिली आहे. (तत्वोपदेश० श्लो० ८७)

जें मज तुम्हां आड। होतें भेदाचें कवाड। तें फेडोनि केलें गोड। सेवासुख॥ १५७४॥

अर्थ—तुमच्या आणि माझ्याकडे जे भेदाचे दार आडवे होते ते काढून टाकून तुम्ही सेवेचे गोड सुख प्राप्त करून दिले. ॥ १५७४ ॥

तरी आतां तुझी आज्ञा। सकळदेवाधिदेवराज्ञा। करीन देईं अनुज्ञा। भलतियेविषयी॥ १५७५॥

अर्थ—तर आता, हे सकळ देवाधिदेवा! तुमची आज्ञा मला शिरसावंद्य आहे. आपण मला कोणतीहि आज्ञा द्या. ॥ १५७५ ॥

यया अर्जुनाचिया बोला। देवो नाचे सुखें भुल्ला। म्हणे विश्वफळा जाला। फळ हा मज॥ १५७६॥

अर्थ—या अर्जुनाच्या बोलण्याने भगवान् सुखाने भांबावून जाऊन आनंदाने नाचू लागले आणि म्हणाले विश्वाचे साध्य जो मी त्या मला हा फळ (आनंद) देणारा झाला. ॥ १५७६ ॥

उणेनि उमचला सुधाकरु। देखुनी आपला कुमरु। मर्यादा क्षीरसागरु। विसरेचिना॥ १५७७॥

अर्थ—आपला मुलगा जो चंद्र त्याचा उणेपणा (कलारहित) नाहीसा होऊन तो पूर्णत्वाने प्रकाशू लागल्यावर समुद्र आपली मर्यादा सांडतोच ना!॥ १५७७ ॥

ऐसें संवादाचां बहुलां। लग्न दोघांचिया आंतुला। लागलें देखोनि जाला। निर्भरु संजयो॥ १५७८॥

अर्थ—याप्रमाणे संवादाच्या बोहल्यावर दोघांचे (श्रीकृष्ण व अर्जुन) यांचे अंतर्भावाचे मीलन झालेले पाहून संजय हर्षभरित झाला॥ १५७८ ॥

तेणें म्हणतसे संजयो। बाप कृपानिधी रावो। तो आपुला मनोभावो। अर्जुनेंसी केला॥ १५७९॥

अर्थ—त्या भरात संजय म्हणाला, "प्रभु कृपानिधी फार थोर! त्याने अर्जुनाला आपला मनोभावच करून सोडला" म्हणजे अर्जुनाप्रमाणे तोही संवादरूपी सुखांने उचंबळून आला॥ १५७९ ॥

तेणें उचंबळलेपणें। संजय धृतराष्ट्रातें म्हणें। जी कैसें बादरायणें। रक्षिलों दोघे॥ १५८०॥

अर्थ—तसाच सद्‌गदित अंत:करणाने संजय धृतराष्ट्राला म्हणाला "महाराज! आपण दोघे व्यासाकडून कसे रक्षिलो गेलो." (कृपेला पात्र झालो.)॥ १५८०॥

आजि तुमतें अवधारा। नाहीं चर्मचक्षूही संसारा। कीं ज्ञानदृष्टिव्यवहारा। आणिलेती॥ १५८१॥

अर्थ—अहो ऐका, तुम्हाला तर संसार करण्यास लागणारे डोळेही नाहीत म्हणूनच ज्ञानदृष्टीच्या व्यवहाराला आपणाला आणले॥ १५८१॥

आणि रथींचिये राहाटी। घेईजो घोडेयासाठीं। तया आम्हां या गोष्टी। गोचरा होती॥ १५८२॥

अर्थ—आणि रथांचे घोडे (परीक्षा करून) घेण्यासाठी ज्या आम्हाला ठेवले त्या आम्हाला (कृष्णार्जुन संवादाच्या) ह्या गोष्टी प्रत्यक्ष ऐकण्याचा योग आला!॥ १५८२॥

वरी जुंझाचें निर्वाण। मांडलें असे दारुण। दोहीं हारीं आपण। हारपिजे जैसें॥ १५८३॥

अर्थ—शिवाय युद्ध तर असे प्रचंड घनघोर चालू आहे की दोहोपैकी कोणाचाही पराभव झाला तरी आपलीच हार आहे असे प्रत्येकाला वाटते.॥ १५८३॥

येवढा जिये सांकडां। कैसा अनुग्रहो पैं गाढा। जे ब्रह्मानंदु उघडा। भोगवीतसे॥ १५८४॥

अर्थ—एवढे जेथे भयानक संकट उभे राहिले आहे, तेथे आम्हाला प्रत्यक्ष ब्रह्मानंद भोगावयास मिळत आहे.॥ १५८४॥

ऐसें संजय बोलिला। परी न द्रवे येरु उगला। चंद्रकिरणीं शिवतला। पाषाणु जैसा॥ १५८५॥

अर्थ—चंद्र किरणांचा स्पर्श होऊनही दगडाला जसा पाझर फुटत नाही त्याप्रमाणे संजय अशाप्रकारे बोलला तरी धृतराष्ट्राच्या मनाला किंचितही द्रव आला नाही.॥ १५८५॥

हे देखोनि तयाची दशा। मग करीचि ना सरिसा। परी सुखें जाला पीसा। बोलतसे॥ १५८६॥

अर्थ—ही त्याची अवस्था पाहून त्याने बोलण्याचे सोडून दिले होते तरीपण हर्षातिशयाने बेहोष झाल्यामुळे तो बोलतच राहिला॥ १५८६॥

भुलविला हर्षवेगें॥ म्हणौनि धृतराष्ट्रा सांगें। एऱ्हवीं नव्हे तयाजोगें। हें कीर जाणे॥ १५८७॥

अर्थ—हर्षातिशयाने वाहवला गेल्यामुळे तो धृतराष्ट्राला सांगू लागला. एऱ्हवी तो ऐकण्याच्या योग्यतेचा नाही हे तो निश्चितपणे जाणत होता.॥ १५८७॥

सञ्जय उवाच

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः। संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम्॥ ७४॥

अर्थ—संजय म्हणाला—महात्मा अर्जुन व श्रीकृष्ण यांचा अत्यंत विस्मयकारक व अंगावर रोमांच उभे राहतील इतका आनंददायक असलेला संवाद मी ऐकला.॥ ७४॥

मग म्हणे पैं कुरुराजा। ऐसा भ्रातृपुत्र तो तुझा। बोलिला तें अधोक्षजा। गोड जालें॥ १५८८॥

अर्थ—मग संजय म्हणाला, "हे कौरवाधिपते, असे तुझा पुतण्या जो अर्जुन जे काही बोलला, ते बोलणे श्रीकृष्णाला फार गोड वाटले."॥ १५८८॥

अगा पूर्वापर सागर। हा नामासीचि सिनार। येर आघवें तें नीर। एक जैसें॥ १५८९॥
तैसा श्रीकृष्ण पार्थ ऐसें। हें आंगाचिपासीं दिसे। मग संवादीं जी नसे। कांहींचि भेदु॥ १५९०॥

अर्थ—अहो, पूर्वेचा समुद्र, पश्चिमेचा समुद्र ही नावेच काय ती वेगवेगळी, एरव्ही पाणी येथून तेथून सारे जसे एकच.॥ १५८९॥ त्याप्रमाणे श्रीकृष्ण व अर्जुन हे शरीरामुळेच काय ते वेगवेगळे भासत परंतु संवादामध्ये मात्र भेद म्हणून काहीच नव्हता.॥ १५९०॥

पैं दर्पणाहूनि चोखें। दोन्ही होती सन्मुखें। तेथ येरीं येर देखे। आपणपें जैसें॥ १५९१॥

तैसा देवेंसीं पांडुसुतु। आपणपें देवीं देखतु। पांडवेंसीं देखे अनंतु। आपणपें पार्थीं॥ १५९२॥

अर्थ—आरशापेक्षाही स्वच्छ अशा दोन वस्तू जर समोरासमोर आल्या तर त्या जशा एकमेकात आपल्याला पहातात. ॥ १५९१ ॥ त्याप्रमाणे अर्जुन देवासह देवामध्ये आपणाला पहात होता व भगवान् अर्जुनासह अर्जुनामध्ये आपणाला पहात होते. ॥ १५९२ ॥

देवो देवभक्तालागीं। जिये विवरूनि देखे आंगीं। येरुही तियेची भागीं। दोन्ही देखे॥ १५९३॥

अर्थ—देव ज्या आंगाच्या ठिकाणी स्वत:ला व भक्ताला अवकाश पहात होते, त्याचठिकाणी तोही (भक्तही) दोघांना अवकाश पहात होता. ॥ १५९३ ॥

आणिक कांहींच नाहीं। म्हणौनि करिती काई। दोघे एकपणें पाहीं। नांदताती॥ १५९४॥

अर्थ—आणखी (दोघाशिवाय) दुसरे काहीच नाही, तेव्हा करणार काय? म्हणून दोघेही एकरूप होऊन राहूं लागले पहा. ॥ १५९४ ॥

आतां भेदु जरी मोडे। तरी प्रश्नोत्तर का घडे। ना भेदुचि तरी जोडे। संवादसुख कां॥ १५९५॥

अर्थ—आता द्वैतभावच जर नाहीसा झाला तर प्रश्नोत्तरे तरी कशी होणार? भेदच जर, नाही तर संवादाचे सुख तरी कसे लाभणार!॥ १५९५ ॥

ऐसें बोलतां दुजेपणें। संवादीं द्वैत गिळणें। तें ऐकिलें बोलणें। दोघांचें मियां॥ १५९६॥

अर्थ—असे दोनपणा ठेऊन बोलता बोलताच संवादामध्ये द्वैत पूर्णपणे नाहीसे होऊन गेले व ते बोलणे मी ऐकले (असे संजय म्हणतात) ॥ १५९६ ॥

उटूनि दोन्ही आरसे। वोडविलीया सरिसे। कोण कोणा पाहातसे। कल्पावें पां॥ १५९७॥

अर्थ—दोन आरसे स्वच्छ करून एकमेकासमोर ठेवले असता कोणकोणाकडे पहातो म्हणून कल्पना करावी?॥ १५९७ ॥

का दीपासन्मुखु। ठेविलया दीपकु। कोण कोणा अर्थिकु। कोण जाणे॥ १५९८॥

अर्थ—किंवा एका दिव्यासमोर दुसरा दिवा ठेवला तर कोण कोणाला प्रकाशाची याचना करतो (प्रकाश देतो) म्हणून समजावे. ॥ १५९८ ॥

नाना अर्कापुढें अर्कु। उदयलिया आणिकु। कोण म्हणे प्रकाशकु। प्रकाश्य कवण॥ १५९९॥

अर्थ—किंवा सूर्यासमोर आणखी एक सूर्य उगवला तर प्रकाश करणारा कोण व प्रकाशित होणारा कोण म्हणायचा!॥ १५९९ ॥

हें निर्धारूं जातां फुडें। निर्धारासि ठक पडे। ते दोघे जाले येवढे। संवादें सरिसे॥ १६००॥

अर्थ—ह्याचा खरा निर्णय करायला गेलो म्हणजे निर्णयच कुंठित होतो. इतके ते दोघे संवादाने एकरूप होऊन गेलेत. ॥ १६०० ॥

जी मिळतां दोन्ही उदकें। माजीं ल्वण वारूं ठाके। कीं तयासींही निमिखें। तेंचि होय॥ १६०१॥

अर्थ—महाराज, दोन प्रवाहाचे पाणी एकमेकात मिसळून जाईल म्हणून त्यांना अलग ठेवण्याकरिता मध्ये जर मीठ ठेवले, तर क्षणातच तेही तद्रूप होऊन जाते. ॥ १६०१ ॥

तैसे श्रीकृष्ण अर्जुन दोन्ही। संवादलें तें मनीं। धरितां मजही वानी। तेचि होतसे॥ १६०२॥

अर्थ—त्याप्रमाणे श्रीकृष्ण व अर्जुन या दोघांचे झालेले संभाषण मनात आणताच माझीही तशीच तऱ्हा झाली. ॥ १६०२ ॥

ऐसें म्हणे ना मोटकें। तंव हिरोनि सात्त्विकें। आठव नेला नेणों कें। संजयपणाचा॥ १६०३॥

अर्थ—असे बोलतो न बोलतो तोच सात्त्विक भाव दाटून येऊन त्याने संजयपणाची जाणीव कोठे नेली कोण जाणे?॥ १६०३ ॥

रोमांच जंव फरके। तंव तंव आंग सुरके। स्तंभ स्वेदांतें जिंके। एकला कंपु॥ १६०४॥

अर्थ—जो जो अंगावर रोमांच उभे राहू लागले तो तो शरीराचा संकोच होऊ लागला व एकटा कंप गहिवरामुळे आलेली स्तब्धता व घाम या दोन सात्त्विक भावापेक्षा उठून दिसत होता॥ १६०४॥

अद्वयानंदस्पर्शे। दिठी रसमय जाली असे। ते अश्रु नव्हती जैसें। द्रवत्वचि॥ १६०५॥

अर्थ—अद्वयानंदाचा अनुभव आल्यामुळे डोळे डबडबून भरून आलेत, ते प्रेमाश्रु नव्हते तर जणु काय डोळ्यांना प्रेम पाझरच फुटला म्हणायचे!॥ १६०५॥

नेणों काय न माय पोटीं। काय नेणों गुंफे कंठीं। वागर्था पडत मिठी। उससांचिया॥ १६०६॥

अर्थ—पोटात काय मावत नव्हते कोणास माहीत? गळ्यात काय अडकत होते माहीत नाही. पण हुंदक्यामुळे मात्र वाणीला आडकाठी झाली होती.॥ १६०६॥

किंबहुना सात्त्विकां आठां। चाचरु मांडतां उमेठा। संजयो जाहलासे चोहटा। संवादसुखाचा॥ १६०७॥

अर्थ—किंबहुना अशा अष्टसात्त्विक भावांनी त्याची अतिशय बोबडी वळवून टाकल्यामुळे संजय, त्या संवादसुखाचा चव्हाटाच (साक्षिभूत) होऊन बसला.॥ १६०७॥

तया सुखाची ऐसी जाती। जे आपणचि धरी शांती। मग पुढती देहस्मृती। लाधली तेणें॥ १६०८॥

अर्थ—त्या आनंदाची जातच अशी आहे की ते आपोआपच शांती धारण करते (वेग कमी होतो) मग पुन्हा त्यामुळे तो देह भानावर आला.॥ १६०८॥

व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम्। योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम्॥ ७५॥

अर्थ—साक्षात् योगेश्वर श्रीकृष्ण स्वतः सांगत असताना व्यासांच्या कृपेने दिव्यचक्षु लाभ प्राप्त होऊन योगरूप परमगुह्य ऐकले.॥ ७५॥

तेव्हां बैसतेनि आनंदें। म्हणें जी जें उपनिषदें। नेणती तें व्यासप्रसादें। ऐकिलें मियां॥ १६०९॥

अर्थ—तेव्हा आनंद थोडा ओसरल्यावर तो म्हणाला महाराज! जे ज्ञान उपनिषदांनाही ठाऊक नाही ते व्यासांच्या कृपेने मी ऐकले.॥ १६०९॥

ऐकतांचि ते गोठी। ब्रह्मत्वाची पडिली मिठी। मीतूंपणेंसीं दिठी। विरोनि गेली॥ १६१०॥

अर्थ—ते संभाषण ऐकता क्षणीच मी ब्रह्मस्वरूप झालो व मी तूपणाची दृष्टी होती ती पूर्णपणे नाहीशी झाली.॥ १६१०॥

हे आवघेचि का योग। जया ठाया येती मार्ग। तयाचें वाक्य सवंग। केलें मज व्यासें॥ १६११॥

अर्थ—हे सर्वच योग ज्या ठिकाणाला नेणारे मार्ग आहेत त्या भगवंताचे बोलणे व्यासांच्या कृपेमुळे मला सहजासहजी ऐकायला मिळाले.॥ १६११॥

अहो अर्जुनाचेनि मिषें। आपणपेंचि दुजें ऐसें। नटोनि आपणया उद्देशें। बोलिले जें देव॥ १६१२॥

अर्थ—महाराज, अर्जुनाच्या निमित्ताने आपणच दुसरे बनून आपल्यालाच उद्देशून देव जे बोललेत॥ १६१२॥

तेथ कीं माझे श्रोत्र। पाटाचे जाले जी पात्र। काय वानूं स्वतंत्र। सामर्थ्य श्रीगुरूचें॥ १६१३॥

अर्थ—तेथे माझे कान श्रवण करण्याच्या अधिकाराला पात्र की हो झालेत! श्री गुरुंच्या (व्यासांच्या) स्वतंत्र (त्यांचे ठिकाणी असलेल्या) सामर्थ्याचे मी काय वर्णन करूं!॥ १६१३॥

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम्। केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः॥ ७६॥

अर्थ—राजा, या श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या अद्भुत व पुण्यकारक संवादाचे वारंवार स्मरण होऊन मला पुनःपुनः आनंद होत आहे.॥ ७६॥

राया हें बोलतां विस्मित होये। तेणेंचि मोडावला ठाये। रत्नीं कीं रत्नकिळा ये। झांकोळित जैसी॥ १६१४॥

अर्थ—ज्याप्रमाणे रत्नाची कांती रत्नाला झाकून टाकते, त्याप्रमाणे 'राया' हे म्हणताच संजय विस्मित झाला व त्या विस्मयानेच तो देहभान विसरून गेला.॥ १६१४॥

हिमवंतींचीं सरोवरें। चंद्रोदयीं होती काश्मीरें। मग सूर्यागमीं माघारें। द्रवत्व ये॥ १६१५॥

अर्थ—चंद्र उगवला म्हणजे जशी हिमालयावरील सरोवरे स्फटिकशिला सारखी धनरूप होतात पण सूर्य उगवताच पुन्हा त्यांना पाझर फुटतो.॥ १६१५॥

तैसा शरीराचिया स्मृती। तो संवादु संजय चित्तीं। धरी आणि पुढती। तेंचि होय॥ १६१६॥

अर्थ—त्याप्रमाणे देहभानावर येताच तो संवाद पुन्हा तो मनात आणी आणि पुन्हा त्याची तीच अवस्था देहभान हारपण्याची होई॥ १६१६॥

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः। विस्मयो मे महानाराजन्हृष्यामि च पुनः पुनः॥ ७७॥

अर्थ—भगवान् श्रीकृष्णाच्या अत्यंत अद्भुत रूपाची पुनः पुनः आठवण होऊन हे राजा, मला अत्यंत आश्चर्य वाटत आहे व पुनः पुनः मला आनंद होत आहे.॥ ७७॥

मग उठोनी म्हणे नृपा। श्रीहरीचिया विश्वरूपा। देखिलया उगा कां पां। असों लाहासी॥ १६१७॥

अर्थ—मग उठून म्हणाला, राजा, भगवंताचे विश्वरूप पाहूनही आपण स्तब्ध कसे काय राहू शकलात?॥ १६१७॥

न देखणेनि जें दिसे। नाहींपणेंचि जें असे। विसरें आठवे तें कैसें। चुकवूं आतां॥ १६१८॥

अर्थ—न पाहताही जे दिसते, नाहीपणानेच जे आहे, विसरू म्हटले तरी जे आठवते, ते आता कसे चुकवूं?॥ १६१८॥

देखोनि चमत्कारु। कीजे तो नाहीं पैसारु। मजहीसकट महापुरु। नेत आहे॥ १६१९॥

अर्थ—ते (विश्वरूप) पाहून भगवंताचा तो चमत्कार आहे असेही म्हणण्यास अवकाश रहात नाही. विश्वरूपाचा तो महापूर माझ्यासकट वाहून नेत आहे.॥ १६१९॥

ऐसा श्रीकृष्णार्जुन-। संवादसंगमीं स्नान। करूनि देतसे तिळदान। अहंतेचें॥ १६२०॥

अर्थ—याप्रमाणे श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या संवादरूपी संगमात स्नान करून संजय अहंतेला तिलांजली देत होता॥ १६२०॥

तेथ असंवरें आनंदें। अलौकिकही कांहीं स्फुंदे। श्रीकृष्ण म्हणे सद्गदें। वेळोवेळां॥ १६२१॥

अर्थ—तेव्हा अनावर झालेल्या आनंदाने त्याला विलक्षण गहिवरामुळे हुंदके येऊन सद्गदित अंतःकरणाने 'श्रीकृष्ण श्रीकृष्ण' असे तो वारंवार म्हणू लागला.॥ १६२१॥

या अवस्थांची कांहीं। कौरवातें परी नाहीं। म्हणौनि रायें तें कांहीं। कल्पावें जंव॥ १६२२॥

तंव जाला सुखलाभु। आपणपां करूनि स्वयंभु। बुझाविला अवष्टंभु। संजयें तेणें॥ १६२३॥

अर्थ—(संजयाच्या) या अवस्थांची धृतराष्ट्राला कल्पनाही नव्हती. म्हणून तो असे का करतो याविषयी धृतराष्ट्राने जेव्हां कल्पना करावी॥ १६२२॥ तेव्हा संजयाने यथेच्छ सुखाचा लाभ घेतला आणि मग निग्रहाने आपला गहिवर सावरून घेतला.॥ १६२३॥

तेथ कोणी एकी अवसरी। होआवी ते करूनि दुरी। रावो म्हणे संजया परी। कैशी तुझी गा॥ १६२४॥

अर्थ—तेव्हा धृतराष्ट्र म्हणाला, संजया, कोणत्या वेळेला काय काय घडते हे सांगावयाचे सोडून तू हे काय चालवले आहेस?॥ १६२४॥

तेणें तूंतें येथें व्यासें। बैसविलें कासया उद्देशें। अप्रसंगामाजीं ऐसें। बोलसी काई॥ १६२५॥

अर्थ—तुला येथे व्यासांनी कोणत्या कामा करता, बसवले आहे? प्रसंग नसता मध्ये दुसरेच काय बोलतोस?॥ १६२५॥

रानींचें राऊळा नेलिया। दाही दिशा मानी सुनिया। कां रात्री होय पाहलया। निशाचरां॥ १६२६॥

अर्थ—जंगलात राहाणाराला जर राजवाड्यात नेले तर त्याला दाही दिशा शून्य वाटतात किंवा दिवस उजाडला की निशाचरांना रात्रच होते.॥ १६२६॥

जो जेथिंचें गौरव नेणे। तयासि तें भिंगुळवाणें। म्हणौनि अप्रसंगु तेणें। म्हणावा कीं तो॥ १६२७॥

अर्थ—ज्याला जेथचे महत्त्व माहीत नसते त्याला ते भयंकरच वाटते. तेव्हा त्याने त्याला अप्रसंग म्हणणे योग्यच आहे. ॥ १६२७ ॥

मग म्हणे सांगें प्रस्तुत। उदयलेंसे जें उत्कळित। तें कोणासि बा रे जैत। देईल शेखीं॥ १६२८॥

अर्थ—मग (धृतराष्ट्र) म्हणाला. बाबारे, आता असे सांग की हे जे युद्ध उपस्थित झाले आहे त्यात शेवटी कोणाचा विजय होणार?॥ १६२८॥

एऱ्हवीं विशेषें बहुतेक। आमुचें ऐसें मानसिक। जे दुर्योधनाचे अधिक। प्रताप सदा॥ १६२९॥

अर्थ—वास्तविक पाहतां आमचा असा तर्क आहे की केव्हाही दुर्योधनाचा पराक्रम हा नेहमी जास्तच असणार. ॥ १६२९ ॥

आणि येरांचेनि पाडें। दळही यांचें देव्हडें। म्हणौनि जैत फुडें। आणील ना तें॥ १६३०॥

अर्थ—आणि प्रतिपक्षाच्या मानाने तर यांचे सैन्यही दीडपट आहे. म्हणून ते सैन्य जयश्री ओढून आणील ना?॥ १६३० ॥

आम्हां तंव गमे ऐसें। मा तुझें जोतीष कैसें। तें नेणों संजया असे। तैसें सांग पां॥ १६३१॥

अर्थ—आम्हाला तर असे वाटते. मग तुझे ज्योतिष्य कसें काय आहे, ते कळत नाही. तेव्हा, संजया! ते सांग पाहू. ॥ १६३१ ॥

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम॥ ७८॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
मोक्षसन्न्यासयोगो नामाष्टादशोऽध्यायः॥ १८॥

अर्थ—जिकडे योगेश्वर कृष्ण व धनुर्धारी अर्जुन असतील तेथे श्रीविजय, ऐश्वर्य आणि नीति ही निश्चितच आहेत असा माझा निश्चय आहे. ॥ ७८ ॥

यया बोला संजयो म्हणे। जी येरयेरांचें मी नेणें। परी आयुष्य तेथें जिणें। हें फुडें कीं गा॥ १६३२॥

अर्थ—या भाषणावर संजय म्हणाला, राजा, त्यांच्या एकमेकांचे काय होईल हे मला माहीत नाही पण जेथे आयुष्य आहे तेथे जगणे निश्चितच आहे. ॥ १६३२ ॥

चंद्र तेथें चंद्रिका। शंभु तेथें अंबिका। संत तेथें विवेका। असणें कीं जी॥ १६३३॥
रावो तेथें कटक। सौजन्य तेथें सोइरीक। वन्हि तेथें दाहक। सामर्थ्य कीं॥ १६३४॥
दया तेथें धर्मु। धर्मु तेथें सुखागमु। सुखीं पुरुषोत्तमु। असे जैसा॥ १६३५॥
वसंत तेथें वनें। वन तेथ सुमनें। सुमनीं पालिंगनें। सारंगांचीं॥ १६३६॥
गुरु तेथ ज्ञान। ज्ञानीं आत्मदर्शन। दर्शनीं समाधान। आथी जैसें॥ १६३७॥
भाग्य तेथ विलासु। सुख तेथें उल्लासु। हें असो तेथ प्रकाशु। सूर्य जेथें॥ १६३८॥
तैसें सकळ पुरुषार्थ। जेणें स्वामी का सनाथ। तो श्रीकृष्ण रावो जेथ। तेथ लक्ष्मी॥ १६३९॥

अर्थ—राजा, चंद्र तेथे चांदणे, शिव तेथे पार्वती, संत तेथे आत्मानात्मविचार असायचाच॥ १६३३ ॥ राजा तेथे सैन्य, सौजन्य तेथे सोयरीक, आणि विस्तव तेथे दाहकशक्तीही राहणारच. ॥ १६३४॥ दया तेथे धर्म व धर्म तेथे सुखाचा लाभ व सुख तेथे ईश्वर जसा असतोच॥ १६३५ ॥ वसंत तेथे वन आणि वन तेथे फुले ही असणारच. आणि फुले म्हटली की तेथे भुंग्यांचा समुदाय ठरलेलाच॥ १६३६ ॥ सद्गुरु तेथे ज्ञान, ज्ञान तेथे आत्मदर्शन आणि आत्मदर्शनात जसे समाधान असते. ॥ १६३७॥ भाग्य तेथे सुखविलास सुख तेथे उल्हास, हे असो. जेथे सूर्य तेथे प्रकाश. ॥ १६३८ ॥ त्याप्रमाणे ज्या स्वामीमुळे सर्व पुरुषार्थ सनाथ झाले आहेत, तो श्रीकृष्ण जेथे आहे तेथे लक्ष्मी ही असायचीच. ॥ १६३९ ॥

आणि आपलेनि कांतेंसीं। ते जगदंबा जयापासीं। अणिमादिकी काय दासी। नव्हती तयातें॥ १६४०॥

अर्थ—आणि पतीसह जगन्माता ज्याच्याजवळ आहे त्याच्या अणिमादिक सिद्धी दासी होणार नाहीत काय ? ॥ १६४० ॥

कृष्ण विजयस्वरूप निजांगें। तो राहिला असे जेणें भागें। तैं जयो लागेंवेगें। तेथेंचि आहे॥ १६४१॥

अर्थ—कृष्ण स्वत:च विजय स्वरूप आहे. ते ज्या पक्षाकडे असतील त्या पक्षाला विजय हा तातडीने मिळायचाच. ॥ १६४१ ॥

विजयी नामें अर्जुन विख्यातु। विजयस्वरूप श्रीकृष्णनाथु। श्रियेसीं विजय निश्चितु। तेथेंचि असे॥ १६४२॥

अर्थ—विजय नावाने अर्जुन तर प्रसिद्धच आहे. आणि भगवान् श्रीकृष्ण स्वत:च विजयस्वरूप आहेत. तेव्हा लक्ष्मीसह विजय तेथेच आहे हे निश्चित समज. ॥ १६४२ ॥

तयाचिये देशींच्या झाडीं। कल्पतरूतें होडी। न जिणावें कां येवढी। मायबापे असतां॥ १६४३॥

अर्थ—ज्यांना एवढ्या मोठ्या आईबापांचे पाठबळ आहे त्यांच्या देशांतील साध्या झाडांनी कल्पतरूंना पैजेने कां जिंकू नये. ॥ १६४३ ॥

ते पाषाणही आघवे। चिंतारत्नें कां नोहावे। तिये भूमिके कां न यावें। सुवर्णत्व॥ १६४४॥

अर्थ—त्या देशातील सर्व दगड चिंतामणी कां होऊ नयेत ? आणि तेथील मातीला सुवर्णत्व (सोनेपण) कां येऊ नये ? ॥ १६४४ ॥

तयाचिया गांवींचिया। नदी अमृतें वाहाविया। नवल काये राया। विचारीं पां॥ १६४५॥

अर्थ—त्यांच्या गावातील नद्या अमृताने भरून वाहू लागल्या तर नवल काय ? राजा, विचार कर. ॥ १६४५ ॥

तयाचे बिसाट शब्द। सुखें म्हणों येती वेद। सदेह सच्चिदानंद। कां नोहावा तो॥ १६४६॥

अर्थ—त्यांचे वेडे विद्रे शब्दही खुशाल वेद म्हणावे. आणि ते स्वत:च देहासकट सच्चिदानंदस्वरूप का होणार नाहीत ? ॥ १६४६ ॥

पैं स्वर्गापवर्ग दोन्ही। इयें पदें तया अधीनीं। श्रीकृष्ण बाप जननी। कमळा जया॥ १६४७॥

अर्थ—श्रीकृष्ण ज्यांचे बाप व लक्ष्मी ज्यांची आई आहे त्यांच्या स्वाधीन स्वर्ग व मोक्ष दोन्ही पदे असतात ॥ १६४७ ॥

म्हणौनि जिया बाहीं उभा। तो लक्ष्मियेचा वल्लभा। तेथ सर्वसिद्धी स्वयंभा। येर मी नेणें॥ १६४८॥

अर्थ—म्हणून ज्या पक्षाच्या बाजूने लक्ष्मीपति उभा आहे त्याठिकाणी सर्वसिद्धी आपोआपच ठेवल्या आहेत. (येवढेच मी जाणतो) बाकी मला काही समजत नाही. ॥ १६४८ ॥

आणि समुद्राचा मेघु। उपयोगें तयाहूनि चांगु। तैसा पार्थी आजि लागु। आहे तये॥ १६४९॥

अर्थ—आणि मेघ हा समुद्रापासूनच झालेला असला तरी उपयोगाच्या दृष्टीने तो त्याहून चांगला आहे. तीच गोष्ट अर्जुनाच्या बाबतीत इथे लागू आहे. ॥ १६४९ ॥

कनकत्वदीक्षागुरू। लोहा परिसु होय किरू। परी जगा पोसिता व्यवहारू । तेंचि जाणें॥ १६५०॥

अर्थ—सुवर्णपणा येण्याची दीक्षा लोखंडाला देणारा परीस हा लोखंडाचा गुरू खरा, पण जगाचे पोषण करणारा व्यवहार करणे सोन्यालाच कळते. ॥ १६५० ॥

येथ गुरुत्वा येतसे उणें। ऐसें झणें कोण्ही म्हणे। वन्हि प्रकाश दीपपणें। प्रकाशी आपला॥ १६५१॥

अर्थ—याठिकाणी गुरुत्वाला कमीपणा येतो असे कदाचित् कोणी म्हणेल, पण तसे नाही. दिव्याच्यारूपाने अग्नी आपलाच प्रकाश जसा प्रकाशित करतो. ॥ १६५१ ॥

तैसा देवाचिया शक्ती। पार्थु देवासीचि बहुती। परी माने इये स्तुती। गौरव असे॥ १६५२॥

अर्थ—त्याप्रमाणे भगवंताच्याच सामर्थ्याने अर्जुन भगवंताहूनही अधिक सामर्थ्यसंपन्न दिसू लागला ही अर्जुनाची स्तुति भगवंताला गौरवकारक वाटते. ॥ १६५२ ॥

आणि पुत्रें मी सर्व गुणीं। जिणावा हे बापा शिराणी। तरी ते शार्ङ्गपाणी। फळा आली॥ १६५३॥

अर्थ—आणि मुलाने आपल्या सर्व गुणांनी जिंकावे हीच बापाची इच्छा असते. ती भगवंताची इच्छा फलद्रूप झाली. ॥ १६५३ ॥

किंबहुना ऐसा नृपा। पार्थु जालासे कृष्णकृपा। तो जयाकडे साक्षेपा। रीति आहे॥ १६५४॥
तोचि गा विजयासि ठावो। येथ तुज कोण संदेहो। तेथ न ये तरी वावो। विजयोचि होय॥ १६५५॥

अर्थ—किंबहुना, राजा, अर्जुन कृष्णकृपेस पात्र झाला आहे व तो ज्या पक्षाकडे जाणून सवरून राहिला आहे. ॥ १६५४॥ त्याला विजयश्री माळ घालील यात तुला संदेह का वाटावा? त्या पक्षाला जर विजय मिळणार नसेल तर विजयच अर्थहीन ठरेल!॥ १६५५॥

म्हणौनि जेथ श्री तेथे श्रीमंतु। जेथ तो पांडूचा सुतु। तेथ विजय समस्तु। अभ्युदयो तेथ॥ १६५६॥

अर्थ—म्हणून जेथे लक्ष्मी तेथे लक्ष्मीपती, आणि जेथे तो पांडूचा मुलगा अर्जुन तेथेच संपूर्ण विजय व सर्व गोष्टींची भरभराट असणार. ॥ १६५६ ॥

जरी व्यासाचेनि साचें। धिरे मन तुमचें। तरी या बोलाचें। ध्रुवचि माना॥ १६५७॥

अर्थ—व्यासांच्या खरेपणावर जर तुमचा विश्वास असेल तर माझे हे बोलणे अढळ आहे असे समजा. ॥ १६५७॥

जेथ तो श्रीवल्लभु। जेथ भक्तकदंबु। तेथ सुख आणि लाभु। मंगळाचा॥ १६५८॥

अर्थ—ज्याठिकाणी लक्ष्मीपती त्याठिकाणीच भक्तांचे समुदाय तेथे सुखाची आणि कल्याणाची प्राप्ती ठरलेलीच. ॥ १६५८॥

या बोला आन होये। तरी व्यासाचा अंकु न वाहें। ऐसें गाजोनि बाहे। उभिली तेणें॥ १६५९॥

अर्थ—माझे हे बोलणे जर अन्यथा ठरले तर व्यासाचा शिष्य मी म्हणवणार नाही. असे मोठ्याने बोलून त्याने हात वर केला. ॥ १६५९॥

तो भारताचा आवांका। आणूनि श्लोका येका। संजयें कुरुनायका। दिधला हातीं॥ १६६०॥

अर्थ—संपूर्ण महाभारताचे सार अशारीतीने एका श्लोकात आणून संजयाने ते धृतराष्ट्राच्या हातात दिले॥ १६६०॥

जैसा नेणों केवढा वन्ही। परी गुणाग्रीं ठेऊनी। आणिजे सूर्याची हानी। निस्तरावया॥ १६६१॥

अर्थ—अग्नी हा केवढा मोठा (व्यापक) आहे हे काही आपल्याला कळत नाही. पण तो वातीच्या टोकावर ठेऊन (दिव्याच्या रूपाने) सूर्यप्रकाशाची उणीव भरून काढण्याकरता ज्याप्रमाणे त्याला (अग्नीला) आणावा॥ १६६१॥

तैसें शब्दब्रह्म अनंत। जाले सवालक्ष भारत। भारताचें शतें सात। सर्वस्व गीता॥ १६६२॥

अर्थ—त्याप्रमाणे वेद हे अनंत व त्यापासून सवा लक्ष भारत झाले व भारताचे सार असलेली गीता सातशे श्लोकात झाली. ॥ १६६२॥

तयाही सातां शतांचा। इत्यर्थु हा श्लोक शेषींचा। व्यासशिष्य संजयाचा। पूर्णोद्गारु जो॥ १६६३॥

अर्थ—व्यासांचा शिष्य जो संजय त्याचा पूर्णोद्गार असलेला हा गीतेचा शेवटला जो श्लोक तो या सातशेही श्लोकांचे तात्पर्य आहे. ॥ १६६३॥

येणें येकेंचि श्लोकें। राहे तेणें असकें। विद्याजाताचें निकें। जिंतिलें होय॥ १६६४॥

अर्थ—या एकाच श्लोकावर जो पूर्णपणे विसंबून राहील त्याने संपूर्ण अविद्या प्रपंच जिंकलाच म्हणून समजावे. ॥ १६६४॥

ऐसे श्लोक शतें सात। गीतेचीं पदें आंगें वाहत। पद्यें म्हणो कीं परमामृत। गीताकाशींचें॥ १६६५॥

अर्थ—असे हे सातशे श्लोक म्हणजे गीतामूर्तीची चालती पावलेच म्हणावी. अथवा ही पावले म्हणावी की गीतारूपी आकाशातील परम अमृतच समजावे. ॥ १६६५॥

कीं आत्मराजाचिये सभे। गीते वोडवले हे खांबे। मज श्लोक प्रतिभे। ऐसे येत॥ १६६६॥
कीं गीता हे सप्तशती। मंत्रप्रतिपाद्य भगवती। मोहमहिषा मुक्ती। आनंदली असे॥ १६६७॥
म्हणौनि मनें कायें वाचा। जो सेवक होईल इयेचा। तो स्वानंदसाम्राज्याचा। चक्रवर्ती करी॥ १६६८॥

अर्थ—किंवा आत्मराजाच्या गीतारूप सभेला (सभामंडपाला) हे श्लोकरूपी खांबच लावले आहेत असे मला वाटते॥ १६६६॥ किंवा गीता ही सप्तशतीच्या मंत्रांनी (सातशे श्लोकरूपी) प्रतिपादन केलेली भगवतीच असून मोहरूपी महिषाला मुक्ती देऊन ती आनंदली आहे.॥ १६६७॥ म्हणून मनाने, देहाने व वाणीने जो हिचा (गीतादेवीचा) सेवक होईल त्याला ती आत्मानंदरूपी साम्राज्याचा सार्वभौम राजाच करील.॥ १६६८॥

कीं अविद्यातिमिररोखें। श्लोक सूर्यातें पैजा जिंके। ऐसे प्रकाशिले गीतामिखें। रायें श्रीकृष्णें॥ १६६९॥

अर्थ—किंवा अविद्यारूपी अंधःकारावर चाल करून जे सूर्यालाही प्रतिज्ञेवर जिंकतात असे हे श्लोक गीतेच्या रूपाने भगवान् श्रीकृष्णाने प्रगट केले आहेत.॥ १६६९॥

कीं श्लोकाक्षरद्राक्षलता। मांडव जाली आहे गीता। संसारपथश्रांता। विसंवावया॥ १६७०॥

अर्थ—किंवा संसाराचा मार्ग चालून चालून थकलेल्यांना विसावा घेण्यासाठी श्लोकांच्या अक्षररूपी द्राक्षांच्या वेलीचा गीता ही मांडवच झाली आहे.॥ १६७०॥

कीं सभाग्यसंतीं भ्रमरीं। सेविली ते श्लोक कल्हारीं। श्रीकृष्णाख्यसरोवरीं। सासन्नली हे॥ १६७१॥

अर्थ—किंवा भाग्यवान् संतरूपी भ्रमरांनी सेवन केली अशा ह्या श्लोकरूपी कमळांनी श्रीकृष्ण नावाचे हे गीतारूपी सरोवर गजबजून गेले आहे.॥ १६७१॥

कीं श्लोक नव्हती आन। गमे गीतेचें महिमान। वाखाणिते बंदिजन। उदंड जैसे॥ १६७२॥

अर्थ—किंवा हे श्लोक दुसरे कोणी नसून गीतेचा महिमा वर्णन करणारे जणु काय पुष्कळसे हे भाटच वाटतात.॥ १६७२॥

कीं श्लोकाचिया आवारा। सात शतें करूनि सुंदरा। सर्वागम गीतापुरा। वसों आले॥ १६७३॥

अर्थ—किंवा सातशे श्लोकांचा सुंदर तट घालून सर्वशास्त्रे या गीतारूपी नगरीत रहावयास आली आहेत.॥ १६७३॥

कीं निजकांता आत्मया। आवडी गीता मिळावया। श्लोक नव्हती बाह्या-। पसरु का जो॥ १६७४॥

अर्थ—किंवा आपला पती जो आत्मा त्याला प्रीतीने आलिंगन देण्या करता गीतेने पसरलेले हे श्लोक म्हणजे बाहूच नव्हेत काय!॥ १६७४॥

कीं गीताकमळींचे भृंग। कीं हे गीतासागरतरंग। कीं हरीचे तुरंग। गीतारथींचे॥ १६७५॥

अर्थ—किंवा हे (श्लोक) गीतारूप कमळातील भृंगच म्हणाना! किंवा गीतारूप समुद्रावर उठलेले हे तरंगच म्हणता येतील किंवा श्रीहरीच्या गीतारूप रथाचे हे घोडेच म्हणावेत!॥ १६७५॥

कीं श्लोक सर्वतीर्थसंघातु। आला श्रीगीतेगंगेआंतु। जे अर्जुन सिंहस्थु। जाला म्हणौनि॥ १६७६॥

अर्थ—किंवा अर्जुन हा सिंहस्थ पर्वणी झाला म्हणून हा श्लोकरूपी सर्व तीर्थांचा समुदाय श्रीगीतारूपी गंगेत येऊन मिळाला.॥ १६७६॥

कीं नोहे हे श्लोकश्रेणी। अचिंत्यचित्तचिंतामणी। कीं निर्विकल्पां लावणी। कल्पतरूंची॥ १६७७॥

अर्थ—किंवा ही श्लोकांची पंक्ती नसून निर्वासन चित्त झालेल्यांना चिंतामणीच आहेत किंवा निर्विकल्प ब्रह्माचे फळ देणाऱ्या कल्पवृक्षांची ही रांगच लावली आहे.॥ १६७७॥

ऐसिया शतें सात श्लोकां। परि आगळा येकयेका। आतां कोण वेगळिका। वानावा पां॥ १६७८॥

अर्थ—अशा प्रकारे हे सातशे श्लोक आहेत. पण एकापेक्षा एक वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आता कोण कोणाची वेगळी निवड करून वाखाणणी करावी?॥ १६७८॥

तान्ही आणि पारठी। इया कामधेनूतें दिठी। सूनि जैसिया गोठी। कीजतीना॥ १६७९॥

अर्थ—कामधेनूच्या बाबतीत बोलताना ती तान्ही (नुकतीच व्यालेली) की पारठी आहे अशा तऱ्हेच्या गोष्टी ज्याप्रमाणे करता येत नाही.॥ १६७९॥

दीपा आगिलु मागिलु। सूर्यु धाकुटा वडीलु। अमृतसिंधु खोलु। उथळु कायसा॥ १६८०॥
तैसे पहिले सरते। श्लोक न म्हणावे गीते। जुनीं नवीं पारिजातें। आहाती काई॥ १६८१॥

अर्थ—दिवा हा मागचा कसला आणि पुढचा कसला? सूर्य हा लहान कसला आणि मोठा कसला? अमृताचा सागर खोल कसला आणि उथळ कसला?॥ १६८०॥ त्याप्रमाणे गीतेच्या श्लोकात हे पहिले (उत्तम) व हे शेवटचे (निकृष्ट) असे प्रकार आहेत असे म्हणू नये. (स्वर्गातील) पारिजातकांच्या फुलात ताजी व शिळी असा भेद आहे काय?॥ १६८१॥

आणि श्लोका पाडु नाहीं। हें कीर समर्थु काई। येथ वाच्य वाचकही। भागु न धरी॥ १६८२॥

अर्थ—आणि श्लोकाश्लोकांत तरतमभाव नाही ह्याचे आणखी काय समर्थन करावयाचे? या गीतेत वाच्य व वाचक असाही भेद नाही.॥ १६८२॥

जे इये शास्त्रीं येकु। श्रीकृष्णचि वाच्य वाचकु। हें प्रसिद्ध जाणे लोकु। भलताही॥ १६८३॥

अर्थ—कारण की या गीताशास्त्रात श्रीकृष्णच हेच एक काय ते वाच्य व वाचक आहेत ही गोष्ट प्रसिद्ध असून कोणालाही माहीत आहे.॥ १६८३॥

येथें अर्थे तेंचि पाठें। जोडे येवढेनि धटें। वाच्यवाचक येकवटें। साधितें शास्त्र॥ १६८४॥

अर्थ—मोठ्या कष्टाने प्राप्त होणारे जे साध्य ते येथे अर्थाने जसे प्राप्त होणार तसेच ते पाठाने निश्चये करून प्राप्त होणार. वाच्य व वाचक यांचे ऐक्य हे गीताशास्त्र साधते.॥ १६८४॥

गूढार्थदीपिका—श्रीकृष्णचि वाच्य वाचकु। वाच्यवाचक येकवटे। साधितें शास्त्र।

सच्चिदानंदरूप निर्गुण परब्रह्म अवतारकालीही आपल्या स्वरूप स्थितीत यत्किंचितही न्यूनता न आणता सगुण साकार होते. भगवान् श्रीकृष्ण सगुण साकार दिसत असले तरी त्यांची अखंड निर्गुण निराकारता अवतारकालीही कायम असते. 'यस्य निःश्वसिता वेदाः' म्हणून ज्या परब्रह्माचा उल्लेख करण्यात येतो तेच परब्रह्म सगुण साकार श्रीकृष्ण होऊन अवतरले व त्याने आपल्या मुखाने अर्जुनाला वेदातील आत्मरहस्य सांगितले. सच्चिदानंद ब्रह्माचा गीतेच्यारूपाने अशा रीतीने आविष्कार झाला असल्यामुळे भगवान श्रीकृष्ण ज्याप्रमाणे सच्चिदानंदस्वरूप त्याचप्रमाणे त्यानी सांगितलेली गीताही सच्चिदानंदस्वरूप. माउलीने ज्ञानीभक्तांचे वर्णन करतांना अशा ज्ञानी भक्तांच्या तोंडून जे जे शब्द बाहेर पडतील ते ते सर्व वेदवाणीच राहील (तयांचे ते बिसाट शब्द। सुखे म्हणो येती वेद। अ० १८ ओ० १६४६) असे म्हटले आहे. भगवान् श्रीकृष्ण तर प्रत्यक्ष परब्रह्माचेच अवतार. मग त्यांच्या तोंडातून येणारे शब्द परब्रह्मस्वरूप का होणार नाहीत?

याठिकाणी भगवान् श्रीकृष्ण वाचक म्हणजे सांगणारे व भगवद्गीता ही वाच्य म्हणजे सांगितली जाणारी आहे. भगवंताचा सर्व व्यवहारच जसा सच्चिदानंदरूप तशाच प्रमाणे त्यांच्या मुखातून निघालेली गीताही सच्चिदानंदस्वरूप.

गीतेत जीव व शिवाचे ऐक्य प्रतिपादन करणारे जे आत्मज्ञान भगवंतानी सांगितले आहे ते गीतेचा अर्थ समजून घेणाऱ्याला जसे प्राप्त होते तसेच गीतेचा अर्थ न समजता केवळ पठन करणाऱ्या श्रद्धाळु भक्तालाही प्राप्त होते. भगवान् श्रीकृष्णाच्या मुखातून निघालेल्या गीतेकडे या श्रद्धाळु पठन करणाऱ्या भक्तांचा दृष्टिकोन भगवंताच्या प्रेमाचा राहत असतो व गीतेचे पठन करीत असताना भगवान् श्रीकृष्ण त्यांच्या प्रेमाचे आलंबन राहत असल्यामुळे भगवंताविषयी प्रेम उत्तरोत्तर वाढण्यात त्याची परिणती होते. साहजिकच कायावाचामनाने एक भगवानच त्यांचा विषय होत असल्यामुळे श्रद्धाळु वाचक भक्त व गीतेतील प्रतिपाद्य (वाच्य) भगवान् यांचे ऐक्य अनायासेच गीतेच्या पठनाने साधते.

म्हणौनि मज कांहीं। समर्थनीं आतां विषय नाहीं। गीता जाणा हे वाङ्मयी। श्रीमूर्ति प्रभूची॥ १६८५॥

अर्थ—म्हणून मला आता प्रतिपादन करण्यासारखा विषय राहिला नाही. गीता ही भगवंताची वाङ्मयीन मूर्तीच आहे, असे समजा.॥ १६८५॥

शास्त्र वाच्यें अर्थे फळे। मग आपण मावळे। तैसें नव्हे हें सगळें। परब्रह्मचि॥ १६८६॥

अर्थ—इतर शास्त्र अर्थाचे ज्ञान करून देऊन (प्रयोजन संपल्यामुळे) स्वत: नाहीसे होते. पण गीताशास्त्र हे तसे नाही. हे सगळे परब्रह्मस्वरूपच आहे.॥ १६८६॥

कैसा विश्वाचिया कृपा। करूनि महानंद सोपा। अर्जुनव्याजें रूपा। आणिला देवें॥ १६८७॥

अर्थ—सर्व जगावर कृपा करून अर्जुनाच्यारूपाने भगवंतानी (दुर्लभ असा) ब्रह्मानंद सोपा करून कसा प्रगट केला आहे पहा!॥ १६८७॥

चकोराचेनि निमित्तें। तिन्ही भुवनें संतप्तें। निवविलीं कळावंतें। चंद्रें जेवीं॥ १६८८॥
कां गौतमाचेनि मिषें। कळिकाळज्वरितोद्देशें। पाणिढाळु गिरीशें। गंगेचा केला॥ १६८९॥
तैसें गीतेचें हें दुभतें। वत्स करूनि पार्थातें। दुभीनली जगापुरतें। श्रीकृष्णगाय॥ १६९०॥

अर्थ—चकोर पक्षाच्या निमित्ताने ज्याप्रमाणे पूर्णकलायुक्त चंद्र आपल्या शीतल प्रकाशाने तापलेल्या तिन्ही लोकांना शांत करतो.॥ १६८८॥ किंवा गौतमऋषीच्या निमित्ताने कळिकाळरूपी ज्वराने पछाडलेल्या जीवांची व्याधी नाहीशी करण्याकरता भगवान् शंकरानी गंगेला (गोदावरीला) या मृत्युलोकांत पाठवून दिले.॥ १६८९॥ त्याप्रमाणे पार्थरूपी वासराचे निमित्त करून श्रीकृष्णरूप गायीने हे गीतारूप दूध जगाला पुरेल एवढे दिले.॥ १६९०॥

येथें जीवें जरी नाहाल। तरी हेंचि कीर होआल। नातरी पाठमिषें तिंबाल। जीभचि जरी॥ १६९१॥
तरी लोह एके अंशें। झगटलिया परिसें। येरीकडे आपैसें। सुवर्ण होय॥ १६९२॥
तैसी पाठाची ते वाटी। श्लोकपाद लावा ना जंव वोठीं। तंव ब्रह्मतेची पुष्टी। येईल आंगा॥ १६९३॥

अर्थ—या गीतेच्या अर्थाला अंत:करणापर्यंत पोहोचवाल (अर्थ विचाराने ग्रहण करून) किंवा पठनाच्यारूपाने जरी आपली जीभ ओली कराल तर ते स्वरूपच व्हाल॥ १६९१॥ तरी, लोखंडाचा एक भाग जरी परिसाला लागला तरी इतर भागाचे जसे आपोआप सोने होते.॥ १६९२॥ त्याप्रमाणे श्लोक, पद इत्यादिकांच्या पाठाची वाटी तोंडाला लावताच सर्व अंगाला ब्रह्मस्वरूपाची पुष्टी येईल.॥ १६९३॥

ना येणेंसीं मुख वांकडें। करूनि ठाकाल कानवडें। तरी कानींही घेतां पडे। तेचि लेख॥ १६९४॥

अर्थ—अथवा गीतेकडे तोंड वाकडे करून एका कुशीवर पडाल तरी कानाने गीता ऐकली असता तोच हिशेब होईल. (तेच फळ मिळेल.)॥ ९४॥

जे हे श्रवणें पाठें अर्थे। गीता नेदी मोक्षाआरौतें। जैसा समर्थ दाता कोणातें। नास्ति न म्हणे॥ १६९५॥

अर्थ—कारण, संपत्तीचे सामर्थ्य असलेला दाता जसा कोणालाही 'नाही' असे म्हणत नाही त्याप्रमाणे ही गीता, केवळ श्रवण करा, की नुसता पाठ करा की अर्थासह वाचा; एका मोक्षाशिवाय दुसरे काहीही द्यावयाची नाही.॥ १६९५॥

म्हणौनि जाणतया सवा। गीताचि येकी सेवा। काय कराल आघवां। शास्त्रीं येरीं॥ १६९६॥

अर्थ—म्हणून ज्ञानी पुरुषांच्या संगतीने एका गीतेचीच सेवा करावी. इतर शास्त्रांना घेऊन (मोक्षाच्या दृष्टीने) काय करणार?॥ १६९६॥

आणि कृष्णार्जुनीं मोकळी। गोठी चावळिली जे निराळीं। ते श्रीव्यासें केली करतळीं। घेवों ये ऐसी॥ १६९७॥

अर्थ—आणि श्रीकृष्ण व अर्जुन यांनी मोकळेपणाने अनाकलनीय ज्या गोष्टी केल्यात त्यांना तळहातावर घेता येईल असे श्रीव्यासांनी करून ठेवले.॥ १६९७॥

बाळकातें वोरसें। माय जैं जेवऊं बैसे। तैं तया ठाकती तैसे। घांस करी॥ १६९८॥

अर्थ—आई ममतेने जेव्हा मुलाला जेऊं घालायला बसते तेव्हा त्याला सहज गिळतां येईल असे घास करून देते. ॥ १६९८ ॥

कां अफाटा समीरणा। आपैतेपण शाहाणा। केलें जैसें विंजणा। निर्मूनियां॥ १६९९ ॥

अर्थ—किंवा जिकडे तिकडे पसरला असलेल्या वाऱ्याला बेतापुरताच घेण्यासाठी सूज्ञ लोकांनी जसा पंखा तयार केला. ॥ १६९९ ॥

तैसें शब्दे जें न लभे। तें घडूनियां अनुष्टुभें। स्त्रीशूद्रादि प्रतिभे। सामाविलें॥ १७०० ॥

अर्थ—त्याप्रमाणे शब्दांनीही जे साध्य होणार नाही ते अनुष्टुप छंदात गुंफून स्त्री शूद्रादिकांच्या बुद्धीलाही ग्रहण करता येईल असे केले. ॥ १७०० ॥

स्वातीचेनि पाणियें। न होती जरी मोतियें। तरी अंगीं सुंदराचिये। का शोभतीं तियें॥ १७०१ ॥

अर्थ—स्वाती नक्षत्राच्या पाण्याचे (थेंब) जर मोती झाले नसते तर सुंदर स्त्रियांच्या आंगावर कोठून शोभा आली असती. ॥ १७०१ ॥

नादु वाद्या न येतां। तरी कां गोचरु होता। फुलें न होतां घेपता। आमोदु केवीं॥ १७०२ ॥

अर्थ—नाद जर वाद्याच्या रूपाला आला नसता तर तो कानाला कसा ऐकू आला असता? सुगंधाने पुष्परूप घेतले नसते तर त्याचे (सुगंधाचे) ग्रहण कसे झाले असते?॥ १७०२ ॥

गोडी न होतीं पक्वान्नें। तरी कां फावती रसने। दर्पणावीण नयनें। नयनु का दिसे॥ १७०३ ॥

अर्थ—गोडी जर पक्वान्ने झाली नसती तर ती जिभेला कशी घेता आली असती? आरशाशिवाय डोळ्यामुळे डोळा दिसेल काय?॥ १७०३ ॥

द्रष्टा श्रीगुरुमूर्ती। न रिगता दृश्यपंथीं। तरी काह्या उपास्ती। आकळता तो॥ १७०४॥

अर्थ—दृष्टुस्वरूप असलेले श्रीगुरु या दृश्याच्या मार्गात पडले नसते (निर्गुणस्वरूप सगुण झाले नसते) तर ते भक्तीने कसे वश झाले असते?॥ १७०४ ॥

तैसें वस्तु जें असंख्यात। तया संख्या शतें सात। न होती तरी कोणा येथ। फावों शकतें॥ १७०५ ॥

अर्थ—त्याप्रमाणे अमर्याद असलेली अशी परब्रह्म वस्तू जर सातशे श्लोकांच्या मर्यादेत आली नसती तर या जगात ती कोणाला प्राप्त होऊ शकली असती?॥ १७०५ ॥

गूढार्थदीपिका—द्रष्टा श्रीगुरुमूर्ति। न दिसता दृश्यपथीं। तरीं का ह्या उपास्ती। आकळता तो॥

परमानंदरूप असलेली ब्रह्मवस्तूच आपले परमसुख भोगण्याकरता कसे उपाधिरहित सगुण साकाररूप धारण करते हे या ओवीत माउली सांगत आहे.

आपला सुवास घेण्याकरता फूलच ज्याप्रमाणे नासिकेंद्रिय व्हावे, त्याप्रमाणे आपले सुख भोगण्याकरता सच्चिदानंद ब्रह्मच निवृत्तिनाथ झालेत असे माउलीने अमृतानुभवात म्हटले आहे. ''तैसे निवृत्तिपणासी कारण। हाचि आपणतया आपण। घेयावया फूलचि झाले घ्राण। दृति'' (अमृ० प्र० २०७५) आपले निरपेक्ष अद्वैतत्व कायम ठेऊनच निवृत्तिनाथ दोनपणाला अर्थातच दृश्यपणाला (नामरूपात्मक सगुणपणाला) आलेत. चेतनरूप ब्रह्मच श्रीगुरुच्या रूपाने दृश्यरूप होते हा भाव.

मेघ सिंधूचें पाणी वाहे। तरी जग तयातेंचि पाहे। कां उमप तें नोहे। ठाकतें कोण्हा॥ १७०६ ॥

अर्थ—मेघ हा जरी समुद्राचे पाणी वाहतो तरी जग मात्र (समुद्राकडे न पाहता) त्याच्याकडेच पाहते. कारण ते अमर्याद असल्यामुळे कोणाला प्राप्त करून घेता येत नाही. ॥ १७०६ ॥

आणि वाचा जें न पवे। तें हे श्लोक न होते बरवे। तरी कानें मुखें फावे। ऐसें कां होतें॥ १७०७॥

अर्थ—आणि वाणीला जे प्राप्त होत नाही (परब्रह्म) ते (परब्रह्म) हे जर सातशे सुंदर श्लोक झाले नसते तर कानाने व तोंडाने उपभोगता येईल असे झाले असते काय?॥ १७०७ ॥

म्हणौनि श्रीव्यासाचा हा थोरु। विश्वासि जाला उपकारु। जे श्रीकृष्णउक्ती आकारु। ग्रंथाचा केला॥ १७०८॥

अर्थ—म्हणून श्रीव्यासांचा जगावर मोठा उपकार झाला की त्यांनी भगवंताच्या बोलण्याला ग्रंथाचे रूप दिले. ॥ १७०८ ॥

आणि तोचि हा मी आतां। श्रीव्यासाचीं पदें पाहतां पाहतां। आणिला श्रवणपथा। मऱ्हाठिया॥ १७०९॥

अर्थ—श्रीव्यासांच्या पदांचा अर्थ पहात पहात मी आता तोच ग्रंथ मराठीतून ऐकण्याच्या रूपाला आणला. ॥ १७०९ ॥

व्यासादिकांचे उन्मेख। राहाटती जेथ साशंक। तेथ मीही रंक येक। वाचाळी करीं॥ १७१०॥

अर्थ—व्यासादिकांच्या ज्ञानाला, वावरताना जेथे शंका राहतात, त्या गीतेच्या बाबतीत मी एक गरीब (दरिद्री) बडबड करीत आहे!॥ १७१० ॥

परी गीता ईश्वरु भोळा। ले व्यासोक्तिकुसुममाळा। तरी माझिया दुर्वादळा। ना न म्हणे कीं॥ १७११॥

अर्थ—परंतु गीता हा भोळा देव आहे. व्यासांच्या उक्तिरूपी फुलांच्या माळा त्याने धारण केल्या तरी माझ्या (ओवीरूपी) दुर्वादळांना निश्चितच तो 'ना' म्हणार नाही. ॥ १७११ ॥

आणि क्षीरसिंधूचिया तटा। पाणिया येती गजघटा। तेथ काय मुरकुटा। वारिजत तसे॥ १७१२॥

अर्थ—आणि क्षीरसमुद्राच्या किनाऱ्यावर पाणी पिण्यास हत्तींचे कळप येतात, तेथे डासांना क्षीरसमुद्र येऊं नका म्हणेल काय?॥ १७१२ ॥

पांख फुटे पाखिरूं। नुडे तरी नभींच थिरू। गगन आक्रमी सत्वरू। तो गरुडही तेथ॥ १७१३॥

अर्थ—पंख फुटलेले पाखरू फार उंच उडू शकत नसले तरी आकाशातच स्थिर राहते (उडते) आणि वेगाने आकाशाचे आक्रमण करणारा गरूडही तेथेच उडत असतो. ॥ १७१३ ॥

राजहंसाचें चालणें। भूतळीं जालिया शाहाणें। आणिकें काय कोणें। चालावेंचि ना॥ १७१४॥

अर्थ—राजहंसाचे चालणे जगात उत्तम गणले गेले म्हणून काय पृथ्वीवर इतर कोणी चालूच नये॥ १७१४॥

जी आपुलेनि अवकाशें। अगाध जळ घेपे कलशें। चुळीं चूळपणा ऐसें। भरूनि न निघे॥ १७१५॥

अर्थ—अहो! आपल्या (आकारमान) पोकळीप्रमाणे घागरीला पुष्कळ पाणी घेता येते तसेच चुळीत चुळभर पाणी येत नाही काय?॥ १७१५ ॥

दिवटीच्या आंगीं थोरी। तरी ते बहु तेज धरी। वाती आपुलिया परी। आणीच कीं ना॥ १७१६॥

अर्थ—दिवटीचा आकार मोठा असतो म्हणून तिचा उजेड मोठा पडतो पण वात आपल्या परीने उजेड देतेच की नाही!॥ १७१६ ॥

जी समुद्राचेनि पैसें। समुद्रीं आकाश आभासे। थिलुरीं थिल्लराऐसें। बिंबेचि पैं॥ १७१७॥

अर्थ—अहो, समुद्रात समुद्राच्या विस्ताराच्या मानाने आकाशाचे प्रतिबिंब पडते तर डबक्यात डबक्याएवढे प्रतिबिंब पडतेच की॥ १७१७॥

तेवीं व्यासादिक महामती। वावरों येती इये ग्रंथीं। मा आम्ही ठाकों हे युक्ती। न मिळे कीर॥ १७१८॥

अर्थ—त्याप्रमाणे व्यासादिकांसारखे अलौकिक प्रतिभासंपन्न लोक या ग्रंथाचे विवरण करतात. मग आम्ही आपल्या अल्पबुद्धिप्रमाणे या ग्रंथाचे विवरण करावे! हे युक्ति संगत होणार नाही काय?॥ १७१८॥

जिये सागरीं जळचरें। संचरती मंदराकारें। तेथ देखों शफरें येरें। पोहों लाहती॥ १७१९॥

अर्थ—ज्या समुद्रामध्ये मंदार पर्वता येवढे मोठमोठे जलप्राणी संचार करतात ते पाहून देखील त्याच समुद्रात लहान लहान मासे पोहत नाहीत काय?॥ १७१९ ॥

अरुण आंगाजवळिके। म्हणोनि सूर्यातें देखे। मा भूतळींची न देखे। मुंगी काई॥ १७२०॥

अर्थ—अरुण हा सूर्याच्या जवळ असतो म्हणून सूर्याला पाहतो, पण मग त्या सूर्याला पृथ्वीवरची मुंगी पहात नाही काय?॥ १७२० ॥

यालागीं आम्हां प्राकृतां। देशिकारें बंधें गीता। म्हणणें हें अनुचिता। कारण नोहे॥ १७२१॥

अर्थ—म्हणून आमच्या सारख्या सामान्य लोकांना देशी भाषेत (मराठीत) गीता आणता येते या म्हणण्यात अनौचित्याला जागा नाही. ॥ १७२१ ॥

आणि बापु पुढां जाये। ते घेत पाउलाची सोये। बाळ ये तरी न लाहे। पावों कायी॥ १७२२॥

अर्थ—आणि बाप पुढे गेलेला असला आणि त्याच्याच पाउलाच्या वाटेने मूल आले तर ते त्याच ठिकाणावर पोहाचणार नाही काय? ॥ १७२२ ॥

तैसा व्यासांचा मागोवा घेतु। भाष्यकारांतें वाट पुसतु। अयोग्यही मी न पवतु। कें जाईन॥ १७२३॥

अर्थ—त्याप्रमाणे व्यासांचा माग काढीत काढीत व भाष्यकारांना वाट पुसत पुसत मी अयोग्य असलो तरी तेथे (गीतार्थाच्या ठिकाणी) न पोहोचता कोठे जाईन? ॥ १७२३ ॥

आणि पृथ्वी जयाचिया क्षमा। नुबगे स्थावरजंगमा। जयाचेनि अमृतें चंद्रमा। निववी जग॥ १७२४॥
जयाचें आंगिक अंशिकें। तेज लाहोनि अर्कें। आंधाराचें सावाइकें। लोटिजत आहे॥ १७२५॥
समुद्रा जयाचें तोय। तोया जयाचें माधुर्य। माधुर्या सौंदर्य। जयाचेनि॥ १७२६॥
पवना जयाचें बळ। आकाश जेणें पघळ। ज्ञान जेणें उज्वळ। चक्रवर्ती॥ १७२७॥
वेद जेणें सुभाष। सुख जेणें सोल्लास। हें असो रूपस। विश्व जेणें॥ १७२८॥
तो सर्वोपकारी समर्थु। सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथु। राहाटत असे मजहीआंतु। रिघोनियां॥ १७२९॥

अर्थ—आणि त्याच्या (श्रीगुरुच्या) क्षमेच्या वृत्तीमुळे पृथ्वी स्थावर व जंगमाच्या (विश्वातील घडामोडींचा त्रास) त्रासाला कंटाळत नाही व ज्याच्या पासून प्राप्त होणाऱ्या अमृतामुळे चंद्र जगाला शांत करतो॥ १७२४॥ ज्याच्या (श्रीगुरुच्या) अंगाच्या तेजामुळे सूर्याला तेज प्राप्त होऊन तो अंधाराचे संकट दूर सारतो. ॥ १७२५॥ ज्याच्यामुळे (श्रीगुरुच्या सत्तेमुळे) समुद्राला पाणी आहे, पाण्याला ज्याच्यामुळे माधुर्य आहे, व माधुर्याला सौंदर्य ज्याच्यामुळे आहे. ॥ १७२६ ॥ वाऱ्यातील सामर्थ्य ज्याचे आहे, आकाशाला ज्यामुळे पैस आला आहे आणि ज्याच्यामुळे ज्ञान हे प्रकाशमान व सार्वभौम झाले आहे ॥ १७२७ ॥ वेद ज्याच्या योगाने बोलका झाला, सुख ज्याच्यामुळे उल्हासयुक्त आहे. हे असो, सारे विश्व ज्याच्या योगाने रूपवान् झाले आहे. ॥ १७२८ ॥ असा तो सर्वांवर उपकार करणारा समर्थ सद्‌गुरु श्रीनिवृत्तिनाथ माझ्यांत प्रवेश करून सर्व व्यवहार करीत आहे. ॥ १७२९ ॥

आतां आयती गीता जगीं। मी सांगें मऱ्हाठिया भंगीं। येथ कें विस्मयालागीं। ठावो आहे॥ १७३०॥

अर्थ—ज्या गीतेचे ज्ञान मला आयते मिळाले ती गीता मी आता मराठी भाषेतून सांगत आहे. तेव्हा येथे आश्चर्याला जागा कोठे आहे? ॥ १७३० ॥

श्रीगुरुचेनि नांवें माती। डोंगरीं जयापासीं होती। तेणें कोळियें त्रिजगतीं। येकवद केली॥ १७३१॥

अर्थ—डोंगरामध्ये श्रीगुरुचे (द्रोणाचार्य) नाव देऊन (त्यांची मूर्ति) ज्या कोळ्याने (एकलव्याने) मांडली त्याने सुद्धा त्रिभुवन हालवून सोडले. ॥ १७३१ ॥

चंदनें वेधलीं झाडें। जालीं चंदनाचेनि पाडें। वसिष्ठें मांडली कीं भांडे। भानूसीं शाटी॥ १७३२॥

अर्थ—चंदन वृक्षाचा गराडा पडलेली झाडे चंदनाच्याच सारखी (सुवासित) झाली. वसिष्ठानी (भांडणाच्या) निवाड्यासाठी (सूर्याच्या जागी) ठेवलेली छाटी, सूर्यासारखीच देदीप्यमान झाली. ॥ १७३२ ॥

मा मी तव चित्ताथिला। आणि श्रीगुरु ऐसा दादुला। जो दिठीवेनि आपुला। बैसवी पदीं॥ १७३३॥

अर्थ—मग मी तर सचेतन आहे आणि जो केवळ आपल्या कृपादृष्टीने आपल्या पदावर बसवतो अशा तऱ्हेचा श्रीगुरु सारखा माझा धनी आहे. ॥ १७३३ ॥

आधींचि देखणी दिठी। वरी सूर्य पुरवी पाठी। तैं न दिसे ऐसी गोठी। केंही आहे॥ १७३४॥

अर्थ—मूळची दृष्टी निर्मल असून तिला जर सूर्याचे साहाय्य मिळाले तर तिला (दृष्टीला) दिसणार नाही अशी कोणती गोष्ट आहे? ॥ १७३४ ॥

म्हणोनि माझे नित्य नवे। श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे। श्रीगुरुकृपा काय नोहे। ज्ञानदेवो म्हणे॥ १७३५॥

अर्थ—म्हणून माझे नित्य नवे श्वासोश्वास सुद्धा काव्यप्रबंध होऊ लागले आहेत. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात की श्रीगुरुची कृपा काय करू शकणार नाही!॥ १७३५॥

याकारणें मियां। श्रीगीतार्थ मऱ्हाठिया। केला लोकां यया। दिठीचा विषो॥ १७३६॥

अर्थ—याच कारणामुळे श्री गीतेचा अर्थ मराठीमध्यें लोकांना आकलन होईल असा मी केला.॥ १७३६॥

परी मऱ्हाठे बोल रंगें। कवळितां पैं गीतांगें। तैं गातयाचेनि पांगें। एकाढ्यता नोहे॥ १७३७॥

अर्थ—परंतु माझ्या मराठी शब्दमाधुर्याच्या रंगाने जेव्हा कोणी गीतेतील शब्दादीक समजून घेईल तर सांगणाऱ्याच्या (संस्कृतमधून) उणीवेमुळे मराठी शब्दांच्या अर्थाला मर्यादितपणा येणार नाही.॥ १७३७॥

म्हणौनि गीता गावों म्हणे। तैं गाणिवें होती लेणें। ना मोकळे तरी उणें। गीताही आणित॥ १७३८॥

अर्थ—म्हणून माझ्या सार्थ मराठी गीतेचे जर कोणी पठन करील तर माझी मराठी टीकाही गीतेचा अलंकार होईल. पण जर केवळ मराठी टीकाच पठन करील तर ही गीता (मराठी टीका) संस्कृतमधून सांगितलेल्या अर्थालाही मागे सारील.॥ १४३८॥

सुंदर आंगीं लेणें न सूये। तैं तो मोकळा शृंगारु होये। ना लेइलें तरी आहे। तैसें कें उचित॥ १७३९॥
कां मोतियांची जैसी जाती। सोनयाही मान देती। नातरी मानवती। अंगेंचि सडीं॥ १७४०॥
नाना गुंफिलीं कां मोकळीं। उणीं न होती परिमळीं। वसंतागमींचीं वाटोळीं। मोगरीं जैसीं॥ १७४१॥
तैसा गाणिवेनें मिरवी। गीतेवीणही रंगु दावी। तो लाभाचा प्रबंधु ओंवीं। केला मियां॥ १७४२॥

अर्थ—सुंदर दागिना आंगावर घातला नाही तरी तो नुसताही शोभतोच. मग ज्या प्रमाणे आंगावर घातल्यावर आणखी चांगली गोष्ट ती कोणती?॥ १४३९॥ अथवा मोत्यांचा स्वाभाविक गुण असा की सोन्यालाही ती शोभा आणतात ती मोकळी असली तरी आपल्या अंगच्याच गुणांनी ज्याप्रमाणे शोभिवंत असतात.॥ १७४०॥ अथवा वसंत ऋतुच्या सुरवातीची मोगऱ्याची वाटोळी फुले मोकळी असोत किंवा गुंफली असोत सुगंधाच्या दृष्टीने त्यात ज्याप्रमाणे कोणताही कमीपणा रहात नाही.॥ १७४१॥ त्याप्रमाणे संस्कृत गीतेसह ही मराठी टीका सांगण्यात आली तर ती शोभा आणील पण गीते शिवाय ही नुसती माझी मराठी टीका सांगण्यात आली तरी ती शोभा देईल. अशा तऱ्हेचा (उभयप्रद) लाभ देणारा ओवीबद्ध काव्यग्रंथ मी केला आहे.॥ १७४२॥

तेणें आबालसुबोधें। वोवीयेचेनि प्रबंधें। ब्रह्मरससुस्वादें। अक्षरें गुंथिलीं॥ १७४३॥

अर्थ—लहान मुलापासून तो मोठ्या समजदार माणसापर्यंत सर्वांना सहज कळणारी ओवीच्या छंदात (वृत्तात) ब्रह्मरसाच्या गोडीने ओथंबलेली अक्षरे मी गुंफिली आहेत.॥ १७४३॥

आतां चंदनाच्या तरुवरीं। परिमळालागीं फूलवरी। पारुखणें जियापरी। लागेना कीं॥ १७४४॥
तैसा प्रबंधु हा श्रवणीं। लगतखेंवो समाधि आणी। ऐकिलियाही वाखाणी। काय व्यसन न लवी॥ १७४५॥

अर्थ—आता चंदनाच्या झाडांना सुवासाकरता फुले येईपर्यंत ज्याप्रमाणे वाट पहावी लागत नाही॥ १७४४॥ त्याप्रमाणे ही माझी ओवीबद्ध टीका श्रवण करताक्षणीच श्रोत्यांना समाधि लावते मग ती व्याख्यानरूपाने ऐकल्यानंतर ती ऐकण्याचा नाद लागणार नाही काय?॥ १७४५॥

पाठ करितां व्याजें। पांडित्यें येती वेषजे। तैं अमृतातें नेणिजे। फावलिया॥ १७४६॥

अर्थ—माझी टीका पठन (वाचीत असताना) करायला लागले की त्यानिमित्ताने मूर्तिमंत पांडित्य येऊन उभे राहते आणि त्यावेळी त्यातील गोडीचा अनुभव आला की अमृताचीही आठवण होत नाही.॥ १७४६॥

तैसेनि आइतेपणें। कवित्व जालें हें उपेणें। मनन निदिध्यास श्रवणें। जिंतिलें आतां॥ १७४७॥

अर्थ—त्याप्रमाणे हे कवित्व अनायासेच (सर्वांना) विश्रांतिस्थान झाले आहे. आता मनन आणि निदिध्यासन हे एका श्रवणानेच साध्य झाले आहे.॥ १७४७॥

हे स्वानंदभोगाची सेल। भलतयासीचि देईल। सर्वेंद्रियां पोषवील। श्रवणाकरवीं॥ १७४८॥
चंद्रातें आंगवणें। भोगूनि चकोर शहाणे। परी फावे जैसें चांदिणें। भलतया- ही॥ १७४९॥
तैसें अध्यात्मशास्त्रीं इये। अंतरंगचि अधिकारिये। परी लोकु वाक्‌चातुर्यें। होईल सुखिया॥ १७५०॥

अर्थ—ही माझी टीका पाहिजे त्याला आत्मानंद भोगाचा शेवटचा वाटा देईल. आणि श्रवणेंद्रियाकडून सर्व इंद्रियांचे पोषण करील.॥ १७४८॥ आपल्या आंगच्या गुणामुळे चंद्राचा उपभोग घेऊन (चंद्राचे अमृतकण सेवून) चकोर पक्षी चतुर ठरला आहे पण चंद्राच्या प्रकाशाचा आस्वाद मात्र सर्वांनाच ज्याप्रमाणे घेता येतो.॥ १७४९॥ त्याप्रमाणे या अध्यात्मशास्त्राचे अंतर्मुख ज्ञानीच अधिकारी आहेत. पण यातील वाक् विलासाने मात्र सर्वांनाच आनंद मिळू शकेल.॥ १७५०॥

गूढार्थदीपिका—तैसे अध्यात्मशास्त्रीं यिये। अंतरंगचि अधिकारियें।

भगवदगीतेवर मराठीतून ओवीबद्ध केलेल्या आपल्या टीकेचे प्रयोजन याठिकाणी माउली सांगत आहे.

अर्जुनाला निमित्त करून अखंडपरमानंदरूपी मोक्षाचा ठेवा सर्व जगताला भगवंतानी उपलब्ध करून दिला. माउलीने मराठीतून आपली लालित्यपूर्ण व रसाळ त्यावर सविस्तर टीका लिहून आबाल वृद्धापर्यंत भगवंताच्या उपदेशाचे रहस्य पोहोचविण्याचे कार्य केले. माउलीचा वाक्‌विलास पाहिल्यानंतर सर्वसामान्य वाचकांना असे वाटते की गीतेवरील त्यांची ही टीका काव्याचे प्रयोजन मनात ठेऊन त्यांनी लिहिली. माउलीने या टीकेचा अधिकारी अध्यात्मशास्त्राची तळमळ असलेला व अंतर्मुख वृत्ती झालेला ज्ञानी आहे असे स्पष्ट सांगून, काव्य हे केवळ साधन आहे हे दर्शविले आहे. संपूर्ण भगवद्गीता व त्यावरील माउलीचे भाष्यरूप असलेली टीका यांचे प्रयोजन जीवाला त्याच्या मूळ आत्मस्वरूपाची ओळख करून देणे हे आहे. लोकांची बहिर्मुख वृत्ती व शब्दमाधुर्याची त्यांची ओढ लक्षात घेऊन माउलीने आपल्या काव्यमय भाषेचा साज त्या अध्यात्मावर चढविला एवढेच. पण साध्यसाधनाच्या भाषेत बोलायचे म्हणजे अद्वैतज्ञानपूर्वक पराभक्तीने अखंड परमानंदतेची याच देहाने प्राप्ती करून घेणे हे ध्येय व त्या प्राप्तीचे माध्यम म्हणजे विविध दृष्टान्त व साहित्यातील अलंकाराने नटलेले त्यांचे काव्यात्मक विवरण हे होय.

बाह्य विषयापासून इंद्रियांना परावृत्त करून अंत:करणातील अधिष्ठानरूप ब्रह्माकडे त्यांचा ओढा वळवणे हे साधन चतुष्टय संपन्न अधिकाऱ्यालाच शक्य आहे. अशा तऱ्हेचा अधिकारी पुरुषच माउलीच्या या टीकारूप वाङ्मयाचा खरा आस्वादक आहे. इतरांना शब्दांच्या लालित्यामुळे आनंद होत असला तरी ते अर्थाला झोंबू शकत नसल्यामुळे माउलीच्या वाङ्मयाचा खरोखर आस्वाद ते घेऊ शकत नाहीत.

ऐसें श्रीनिवृत्तिनाथाचें। गौरव आहे जी साचें। ग्रंथु नोहे हें कृपेचें। वैभव तये॥ १७५१॥

अर्थ—महाराज, खरोखर असा हा श्रीनिवृत्तिनाथ महाराजांचा महिमा आहे. हा ग्रंथ नसून खरोखर हे त्यांच्या कृपेचे ऐश्वर्य आहे.॥ १७५१॥

क्षीरसिंधुपरिसरीं। शक्तीच्या कर्णकुहरीं। नेणों कैं श्रीत्रिपुरारीं। सांगितलें जें॥ १७५२॥
तें क्षीरकल्लोळाआंतु। मकरोदरीं गुप्तु। होता तयाचा हातु। पैंठें जालें॥ १७५३॥

अर्थ—क्षीरसमुद्राच्या परिसरामध्ये पार्वतीच्या कानात श्रीशंकरांनी जे सांगितले ते माहीत नाही॥ १७५२॥ पण त्यावेळी क्षीरसागराच्या लाटांमध्ये माशाच्या पोटामध्ये गुप्त असलेल्याला मत्स्येंद्रनाथांना ते ज्ञान हस्तगत झाले.॥ १७५३॥

तो मत्स्येंद्र सप्तशृंगीं। भग्नावयवा चौरंगीं। भेटला कीं तो सर्वांगीं। संपूर्ण जाला॥ १७५४॥

अर्थ—तो मत्स्येंद्र सप्तशृंग पर्वतावर हातपाय तुटलेल्या चौरंगीला भेटतांच तो (चौरंगी) संपूर्ण अवयवयुक्त झाला.॥ १७५४॥

मग समाधि अव्यत्यया। भोगावी वासना यया। ते मुद्रा श्रीगोरक्षराया। दिधली मीनीं॥ १७५५॥

अर्थ—मग निर्विघ्नपणे समाधीचे सुख भोगावे अशा इच्छेने ते गुह्य मच्छेंद्रनाथांनी श्रीगोरक्षरायाला दिले.॥ १७५५॥

तेणें योगाब्जिनीसरोवरु। विषयविध्वंसैकवीरु। तिये पदीं का सर्वेश्वरु। अभिषेकिले॥ १७५६ ॥

अर्थ—योगरूपी कमळांचे सरोवर व विषयांचा नाश करण्यांत शूर असलेल्या अशा श्रीगोरक्षनाथास व मत्स्येंद्रनाथांनी सर्वेश्वर-अष्टांगयोगाधिकारी म्हणून (समाधि पदाच्या ठिकाणी) अभिषेक केला. ॥ १७५६ ॥

मग तिहीं तें शांभव। अद्वयानंदवैभव। संपादिलें सप्रभव। श्रीगहिनीनाथा॥ १७५७ ॥

अर्थ—मग त्या गोरक्षनाथांनी शंकरापासून प्राप्त झालेले अद्वैत आनंदाचे ऐश्वर्य मूळासकट श्रीगहिनीनाथाला दिले. ॥ १७५७ ॥

तेणें कळि कळितु भूतां। आला देखोनि निरुता। ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा। दिधली ऐसी॥ १७५८ ॥

अर्थ—कलिकाळ प्राण्यांना खरोखर ग्रास करण्यास आला आहे असे पाहून गहिनीनाथांनी श्रीनिवृत्तिनाथांना आज्ञा केली ती अशी॥ १७५८ ॥

ना आदिगुरु शंकरा-। लागोनि शिष्यपरंपरा। बोधाचा हा संसारा। जाला जो आमुतें॥ १७५९ ॥

तो हा तूं घेऊनि आघवा। कळीं गिळितयां जीवां। सर्व प्रकारीं धांवा। करीं पां वेगीं॥ १७६० ॥

अर्थ—की आद्यगुरु जो शंकर त्यापासून शिष्य परंपरेने हा जो बोधाचा विस्तार आमच्या पर्यन्त आला॥ १७५९ ॥ तो हा सर्व घेऊन कलीकडून गिळल्या जाणाऱ्या जीवांना संकटाच्यावेळी सर्वप्रकारे धावून सत्वर मदत कर॥ १७६० ॥

आधींच तंव तो कृपाळु। वरी गुरुआज्ञेचा बोलु। जाला जैसा वर्षाकाळु। खवळणें मेघां॥ १७६१ ॥

मग आर्ताचेनि वोरसे। गीतार्थग्रंथनमिसें। वर्षला शांतरसें। तो हा ग्रंथु॥ १७६२ ॥

अर्थ—पावसाळा येताच मेघ ज्याप्रमाणे जोराची वृष्टि करूं लागतात, त्याप्रमाणे आधीच कृपाळू असलेल्या निवृत्तिनाथांना गुरूची आज्ञा मिळताच॥ १७६१ ॥ मग पीडित जीवांवर करुणा करण्यासाठी गीतेचा अर्थ सांगण्याच्या निमित्ताने (निवृत्तिनाथाकडून) जी शांतरसाची वृष्टि झाली तो हा ग्रंथ होय॥ १७६२ ॥

तेथ पुढा मी बापिया। मांडला आर्ती आपुलिया। कीं यासाठीं येवढिया। आणिलों यशा॥ १७६३ ॥

अर्थ—तेव्हा मी चातकपक्षी आपल्या तीव्र इच्छेने समोर उभा होतो आणि त्यामुळेच मी एवढ्या यशाला पात्र झालो. ॥ १७६३ ॥

एवं गुरुक्रमें लाधलें। समाधिधन जें आपुलें। तें ग्रंथें बांधौनि दिधलें। गोसावी मज॥ १७६४ ॥

अर्थ—अशा रीतीने गुरुपरंपरेने प्राप्त झालेले जे समाधिरूप धन ते ग्रंथाच्या रूपाने बोध करून स्वामींनी (निवृत्तिनाथांनी) मला दिले. ॥ १७६४ ॥

गूढार्थदीपिका—बोधाचा हा संसरा। जाला जो आमुते। (ओ० १७५९)

एवं गुरुक्रमें लाधले। समाधिधन जें आपुलें। (ओ० १७६४)

ज्ञानदृष्टी प्राप्त होण्यापूर्वी सर्वांचीच जीवदशा असते. सद्गुरुंच्या बोधामृताने ज्ञानदृष्टीचा उदय होतो. या ठिकाणी श्रीज्ञानेश्वर महाराज ही ज्ञानदृष्टी आम्हाला श्रीगुरुपासून प्राप्त झाली असे स्वत:च सांगतात व गुरुपरंपरेने प्राप्त झालेले आपले समाधिरूपी धन स्वामींनी (श्रीनिवृत्तिनाथ महाराजांनी) मला दिले असे म्हणतात.

वांचूनि पढे ना वाची। ना सेवाही जाणे स्वामीची। ऐसिया मज ग्रंथाची। योग्यता कें असे॥ १७६५ ॥

अर्थ—ना मी काही शिकलो, ना मी काही वाचले, ना मला सद्गुरुची सेवा कशी करावी हे माहीत आहे अशा मला ग्रंथ करण्याची योग्यता कोठून येणार ?॥ १७६५ ॥

परी साचचि गुरुनाथें। निमित्त करूनि मातें। प्रबंधव्याजें जगातें। रक्षिलें जाणा॥ १७६६ ॥

अर्थ—परंतु खरोखर सद्गुरुनाथांनी मला निमित्त करून या ग्रंथरचनेच्या मिषाने सर्व जगाचे रक्षण केले असे समजा. ॥ १७६६ ॥

तऱ्ही पुरोहितगुणें। मी बोलिलों पुरें उणें। तें तुम्हीं माउलीपणें। उपसाहिजो जी॥ १७६७॥

अर्थ—तरी सद्‌गुरुंचा एक पुरोहित म्हणून मी जे काही कमी जास्त बोललो असेल ते आपण (श्रोत्यांनी) आईच्या वात्सल्याने सहन करावे. ॥ १७६७ ॥

शब्द कैसा घडिजे। प्रमेयीं कैसें पां चढिजे। अळंकारु म्हणिजे। काय तें नेणें॥ १७६८ ॥

अर्थ—शब्द कसा योजावा, सिद्धांताची मांडणी कशी करावी, साहित्यशास्त्रांतील अलंकार कशाला म्हणतात यापैकी काहीही मला माहीत नाही. ॥ १७६८ ॥

सायिखडेयाचें बाहुलें। चालवित्या सूत्राचेनि चाले। तैसा मातें दावीत बोले। स्वामी तो माझा॥ १७६९ ॥

अर्थ—कळसूत्री बाहुले, चालविणाऱ्याच्या दोऱ्याने चालत असते. त्याप्रमाणे मला पुढे करून माझे सद्‌गुरु बोलत आहेत. ॥ १७६९ ॥

यालागीं मी गुणदोष-। विषीं क्षमाविना विशेष। जे मी संजात ग्रंथलों देख। आचार्यें कीं॥ १७७० ॥

अर्थ—ह्या करता मी गुणदोषाबद्दल विशेष क्षमा मागत नाही कारण सद्‌गुरुच्या प्रेरणेतून निर्माण झालेला ग्रंथच मी केला आहे. ॥ १७७० ॥

आणि तुम्हां संतांचिये सभे। जें उणिवेंसी ठाके उभें। तें पूर्ण नोहे तैं लोभें। तुम्हांसीचि कोपें॥ १७७१ ॥

अर्थ—आणि तुम्हा संतांच्या सभेमध्ये जर उणिव कायमच राहील आणि ती पूर्ण होणार नाही तर मग लडिवाळपणाने मी तुमच्यावरच रागावीन॥ १७७१ ॥

सिवतलियाही परिसें। लोहत्वाचिये अवदसे। न मूकिजे आयसें। तैं कोणा बोलु॥ १७७२ ॥

अर्थ—परिसाचा स्पर्श होऊनही लोखंडाच्या निकृष्ट दशेला जर लोखंड मुकले नाही तर तो दोष कोणाचा? ॥ १७७२ ॥

वोहळें हेंचि करावें। जे गंगेचें आंग ठाकावें। मगही गंगा जरी नोहावे। तैं तो काय करी॥ १७७३ ॥

अर्थ—लहानशा ओढ्याने एकच करायचे कीं गंगेच्या प्रवाहाला जाऊन मिळायचे. मग देखील तो गंगा झाला नाही तर त्याने काय करावे?॥ १७७३ ॥

म्हणौनि भाग्ययोगें बहुवें। तुम्हां संतांचे मी पाये। पातलों आतां कें लाहे। उणें जगीं॥ १७७४ ॥

अर्थ—म्हणून मोठ्या भाग्य योगाने मी तुम्हा संतांच्या पायाजवळ येऊन पोहोचलो तेव्हा आता जगात उणे असे काय रहाणार आहे?॥ १७७४ ॥

अहो जी माझेनि स्वामी। मज संत जोडुनि तुम्हीं। दिधलेति ते सर्वकामीं। परिपूर्ण जालों॥ १७७५ ॥

अर्थ—अहो महाराज, माझ्या सद्‌गुरुस्वामींनी मला आपल्या सारख्या संतांची जोड मिळवून दिली त्यामुळे मी आता सर्वबाबतीत परिपूर्ण झालो॥ १७७५ ॥

पाहा पां मातें तुम्हां सांगडें। माहेर तेणें सुरवाडें। ग्रंथाचें आळियाडें। सिद्धी गेलें॥ १७७६ ॥

अर्थ—पहा की तुम्हा संतांसारखे माहेर मला लाभले. त्यामुळे हा माझा ग्रंथाचा हट्ट सुखाने फलद्रूप झाला॥ १७७६ ॥

जी कनकाचें निखळ। वोतूं येईल भूमंडळ। चिंतारत्नीं कुळाचळ। निर्मूं येती॥ १७७७ ॥

अर्थ—महाराज! सर्व पृथ्वी सोन्याने मढविता येईल, सर्व पर्वत चिंतामणीरत्नांचेच करता येतील॥ १७७७ ॥

सातांही हो सागरातें। सोपें भरितां अमृतें। दुवाड नोहे तारांतें। चंद्र करितां॥ १७७८ ॥

कल्पतरूचे आराम। लावितां नाहीं विषम। परी गीतार्थाचें वर्म। निवडूं न ये॥ १७७९ ॥

अर्थ—सात समुद्रही अमृताने सहज भरता येतील ताऱ्यांचे चंद्र करणे कठीण नाही॥ १७७८ ॥ कल्पतरूंचे बगीचे लावणे कठीण नाही. पण गीतेच्या अर्थाचे मर्म मात्र काढून दाखवता येणार नाही. ॥ १७७९ ॥

तो मी येकु सर्वमुका। बोलोनि मऱ्हाठिया भाखा। करीं डोळेवरी लोकां। घेवों ये ऐसें जें॥ १७८० ॥

अर्थ—मी एक केवळ मुका असलेला, तो गीतेचा अर्थ मराठीत सांगून सर्वसाधारण लोकांच्या दृष्टीला सहज आकलन होईल असा केला॥ १७८०॥

हा ग्रंथसागरु येव्हढा। उतरोनि पैलीकडा। कीर्तिविजयाचा धेंडा। नाचे जो का॥ १७८१॥

अर्थ—हा एवढा ग्रंथ समुद्र पार करून पलीकडे गेल्याचा कीर्तिरूप विजयाचा झेंडा जो फडकतो॥ १७८१॥

गीतार्थाचा आवारु। कळशेंसीं महामेरु। रचूनि माजीं श्रीगुरु-। लिंग जें पूजी॥ १७८२॥

अर्थ—तो मी गीतेच्या अर्थाच्या आवारात अठरावा अध्यायरूपी कळसासह महामेरुपर्वत तयार करून त्याठिकाणी श्रीगुरुमूर्तीची (शिवलिंगाची) पूजा करीत आहे.॥ १७८२॥

गीता निष्कपट माय। चुकोनि तान्हें हिंडे जें वाय। ते मायपूता भेटी होय। हा धर्म तुमचा॥ १७८३॥

अर्थ—गीतारूप निष्कपट आईला चुकवून हे मूल व्यर्थ भटकत होते. त्या मायलेकराची भेट करून दिली, हा तुमचा स्वभावच आहे॥ १७८३॥

तुम्हां सज्जनांचें केलें। आकळुनी जी मी बोलें। ज्ञानदेव म्हणे थेंकुलें। तैसें नोहे॥ १७८४॥

अर्थ—ज्ञानदेव म्हणतात—महाराज तुम्ही सज्जनांनी केलेल्याचा विचार करून मी बोलत आहे. हे उगाच काहीतरी बोलणे नव्हे.॥ १७८४॥

काय बहु बोलों सकळां। मेळविलों जन्मफळा। ग्रंथसिद्धीचा सोहळा। दाविला जो हा॥ १७८५॥

अर्थ—फार काय बोलावे! तुम्ही हा जो ग्रंथ समाप्तीचा आनंदाचा सोहळा दाखवला त्यामुळे माझ्या सर्व जन्माचे सार्थक झाले.॥ १७८५॥

मियां जैसजैसिया आशा। केला तुमचा भरंवसा। ते पुरवूनि जी बहुवसा। आणिलों सुखा॥ १७८६॥

अर्थ—महाराज, मी आपल्या भरवशावर जितक्या जितक्या आशा धरल्यात त्या सर्व तुम्ही पूर्ण करून मला परमसुखाला पोहोचविले.॥ १७८६॥

मजलागीं ग्रंथाची स्वामी। दुजी सृष्टी जे हे केली तुम्हीं। तें पाहोनि हांसों आम्ही। विश्वामित्रातेंही॥ १७८७॥

अर्थ—महाराज, माझ्या करता तुम्ही जी ग्रंथाची दुसरी सृष्टी निर्माण केलीत ती पाहून आम्ही विश्वामित्राला देखील हसूं!॥ १७८७॥

जे असोनि त्रिशंकुदोषें। धातयाही आणावें वोसें। तें नासतें कीजे कीं ऐसें। निर्मावें नाहीं॥ १७८८॥

अर्थ—कारण, त्रिशंकूकरता ब्रह्मदेवालाही उणेपणा आणण्यासाठी दुसरी सृष्टी निर्माण केली पण ती नाशिवंत होती. ही (ग्रंथरूप सृष्टी) मात्र तशी नाही. (अविनाशी आहे)॥ १७८८॥

शंभू उपमन्यूचेनि मोहे। क्षीरसागरूही केला आहे। येथ तोही उपमे नोहे। जे विषगर्भ कीं॥ १७८९॥

अर्थ—शंकराने उपमन्यूच्या प्रेमाने क्षीरसमुद्रही निर्माण केला. पण तोही येथे उपमा देण्यास योग्य होत नाही कारण त्याच्या (क्षीरसागराच्या) पोटात विष आहे.॥ १७८९॥

अंधकारु निशाचरां। गिळितां सूर्ये चराचरां। धांवा केला तरी खरा। ताउनी कीं तो॥ १७९०॥

अर्थ—अंधकाररूपी राक्षस सर्व सृष्टीला गिळीत असता सूर्याने धावत येऊन त्या संकटातून सर्व सृष्टीला वाचवले खरे, पण ते ताप देऊन (ऊष्णतेने)॥ १७९०॥

ताતलियाही जगाकारणें। चंद्रें वेंचिलें चांदणें। तया सदोखा केवीं म्हणे। सारखें हें॥ १७९१॥

अर्थ—होरपळलेल्या जगासाठी चंद्राने शीतल चांदणे पाडले पण कलंक असलेल्या त्या चंद्रासारखे हे आहे असे कसे म्हणता येईल?॥ १७९१॥

म्हणौनि तुम्हीं मज संतीं। ग्रंथरूप जो हा त्रिजगतीं। उपयोग केला तो पुढती। निरुपम जी॥ १७९२॥

अर्थ—म्हणून महाराज, तुम्ही संतांनी ग्रंथाच्या रूपाने मला निमित्त करून माझ्यावर जो उपकार केला पुन: पुन: विचार केला असता त्रिभुवनात अनुपम आहे असे म्हणावे लागते.॥ १७९२॥

किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्तन हें सिद्धी गेलें। येथ माझें जी उरलें। पाईकपण॥ १७९३॥

अर्थ—महाराज, फार काय बोलावे! तुम्ही केलेले हे धर्मासंबंधीचे व्याख्यान तुमच्याच कडून शेवटास गेले. आणि यात माझा सेवकपणाच काय तो उरला.॥ १७९३॥

आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें। तोषोनि मज द्यावें। पसायदान हें॥ १७९४॥

अर्थ—आता विश्वरूप झालेल्या भगवंताने या वाणीरूपी यज्ञाने संतुष्ट व्हावे व संतुष्ट होऊन मला हे प्रसादरूपी दान द्यावे.॥ १७९४॥

जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मीं रती वाढो। भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें॥ १७९५॥

अर्थ—की दुष्टांचा वाकडेपणा (दुष्टपणा) नाहीसा व्हावा आणि त्यांची सत्कर्माच्या ठिकाणी आवडी वाढावी व प्राण्यांचे एकमेकाशी जीवाभावाच्या मित्रत्वाचे संबंध जडावेत.॥ १७९५॥

दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो। जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात॥ १७९६॥

अर्थ—पापरूपी अंधकार नाहीसा व्हावा व जगात स्वधर्मरूप सूर्याचा उदय व्हावा. आणि जो जो प्राणी जी जी इच्छा करील ती ती त्याची परिपूर्ण व्हावी.॥ १७९६॥

वर्षत सकळमंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी। अनवरत भूमंडळी। भेटो तयां भूतां॥ १७९७॥

अर्थ—ईश्वरनिष्ठ लोकांचा समुदाय संपूर्ण कल्याणाचा वर्षाव करीत या भूतलावर सदोदित सर्व प्राण्यांना भेटावा.॥ १७९७॥

चलां कल्पतरूंचे आरव। चेतनाचिंतामणीचे गांव। बोलते जे अर्णव। पीयूषाचे॥ १७९८॥

चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु॥ १७९९॥

अर्थ—चालते बोलते कोटयावधि कल्पतरूंचे वृक्षच, सजीव चिंतामणीचे गांवच, अमृताचे बोलणारे समुद्रच॥ १७९८॥ जे कलंकरहित चंद्र, जे तापरहित सूर्य, असे जे संतसज्जन ते सर्वांचे सदासर्वकाळ आप्त होवोत.॥ १७९९॥

किंबहुना सर्वसुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं। भजिजो आदिपुरुखीं। अखंडित॥ १८००॥

अर्थ—फार काय सांगायचे! स्वर्ग, मृत्यु व पाताळ या तिन्ही लोकात रहाणारे सर्व प्राणिमात्र सर्वसुखाने परिपूर्ण होऊन आदिपुरुषाच्या भजनी निरंतर राहावेत.॥ १८००॥

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं इयें। दृष्टादृष्टविजयें। होआवें जी॥ १८०१॥

अर्थ—आणि महाराज! या श्लोकात विशेषकरून हा ग्रंथ ज्यांचा जीवनसर्वस्व होऊन राहिला असेल त्यांना या लोकांतील व परलोकातील भोगावर विजय प्राप्त होवो.॥ १८०१॥

येथ म्हणे श्रीविश्वेशरावो। हा होईल दानपसावो। येणें वरें ज्ञानदेवो। सुखिया झाला॥ १८०२॥

अर्थ—तेव्हा विश्वाचे प्रभुराव श्री निवृत्तिनाथ महाराज म्हणाले "हा दानप्रसाद मिळेल" या वराने ज्ञानदेव आनंदित झालेत.॥ १८०२॥

ऐसें युगीं परी कळीं। आणि महाराष्ट्रमंडळीं। श्रीगोदावरीचां कूलीं। दक्षिणलिंगी॥ १८०३॥

त्रिभुवनैकपवित्र। अनादि पंचक्रोशक्षेत्र। जेथ जगाचें जीवसूत्र। श्रीमहालया असे॥ १८०४॥

तेथ यदुवंशविलासु। जो सकळकळानिवासु। न्यायातें पोषी क्षितीशु। श्रीरामचंद्र॥ १८०५॥

अर्थ—अशाप्रकारे कलियुगात आणि महाराष्ट्रदेशामध्ये, गोदावरीच्या दक्षिण तीरावर॥ १८०३॥ तिन्ही लोकांमध्ये अत्यंत पवित्र असे जे अनादि पाच कोसाचे क्षेत्र आहे व जेथे जगातील सर्व घडामोडींचे नियंत्रण करणारी अशी श्रीमहालया वास्तव्य करते॥ १८०४॥ तेथे यदुवंशाला ललामभूत असलेला व सर्व कलांमध्ये प्रवीण असलेला श्रीरामचंद्र राजा न्यायाने राज्य करीत होता॥ १८०५॥

तेथ महेशान्वयसंभूतें। श्रीनिवृत्तिनाथसुतें। केलें ज्ञानदेवें गीते। देशीकार लेणें॥ १८०६॥

अर्थ—तेथे (त्या नेवाशामध्ये) आदिनाथ शंकर यांच्या परंपरेत जन्मलेला श्रीनिवृत्तिनाथांचा शिष्य जो ज्ञानदेव त्याने गीतेवर देशीभाषेचा (मराठी भाषेचा) अलंकार चढवला॥ १८०६॥

एवं भारताच्या गांवीं। भीष्मनाम प्रसिद्ध पर्वीं। श्रीकृष्णार्जुनीं बरवी। गोठी जे केली॥ १८०७॥
जें उपनिषदांचें सार। सर्व शास्त्रांचें माहेर। परमहंसीं सरोवर। सेविजे जें॥ १८०८॥
तिये गीतेचा कळसु। संपूर्ण हा अष्टादशु। म्हणे निवृत्तिदासु। ज्ञानदेवो॥ १८०९॥

अर्थ—अशाप्रकारे भारताच्या गावात भीष्मनावाने प्रसिद्ध असलेल्या पर्वात श्रीकृष्ण व अर्जुन यांचा जो सुंदर संवाद झाला॥ १८०७॥ उपनिषदांचे जे सार आहे, सर्व शास्त्रांचे जे माहेर आहे व परमहंसरूपी राजहंसानी सेवन करण्याचे जें मानस सरोवर आहे॥ १८०८॥ निवृत्तिनाथांचे दास श्रीज्ञानदेव म्हणतात, अशा त्या गीतेचा हा अठरावा अध्याय कळस असून तो येथे संपूर्ण झाला आहे.॥ १८०९॥

पुढती पुढती पुढती। इया ग्रंथपुण्यसंपत्ती। सर्वसुखीं सर्वभूतीं। संपूर्ण होईजे॥ १८१०॥

अर्थ—या ग्रंथाच्या पुण्यरूप संपत्तीने सर्व प्राणिमात्रांनी सर्व प्रकारच्या सुखांनी उत्तरोत्तर परिपूर्ण व्हावे.॥ १८१०॥

शके बाराशतें बारोत्तरें। तैं टीका केली ज्ञानेश्वरें। सच्चिदानंदबाबा आदरें। लेखकु जाहला॥ १८११॥

अर्थ—शके बाराशे बारामध्ये श्रीज्ञानेश्वरांनी ही टीका केली आणि सच्चिदानंदबाबा यांनी ती लिहिण्याचे काम मोठ्या आदराने केले.॥ १८११॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां अष्टादशोऽध्यायः॥ १८॥

श्रीसद्गुरुमाऊलीच्या कृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायाचा अनुवाद गूढार्थ दीपिकेसह पूर्ण झाला तो श्रीसद्गुरु चरणी समर्पण असो.



॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

समारोप

मागील सतराव्या अध्यायातील शेवटच्या श्लोकात भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले की अश्रद्धेने यज्ञ, तप, दानादिक केली असता त्यांची इहलोकी काहीच फळे मिळत नाहीत. अशी कर्मे करणे नुसता शीणच होय. परमात्मा श्रीकृष्णाचे हे बोलणे ऐकून अर्जुनाला वाटले की कर्मे ही द्वाडच आहेत. कर्मामुळेच नाना प्रकारच्या योनीत जन्म घ्यावा लागतो कर्मांचा त्यागच करावा हे उत्तम. ही शंका दूर करण्याकरिता अर्जुनाने कर्माचा संन्यास व त्याग याविषयी श्रीकृष्णाला प्रश्न केला. त्याचे विवरण म्हणजे हा अठरावा अध्याय होय. यात गीतेचे सार श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले म्हणून याला एकाध्यायी गीताही म्हणतात.

अर्जुन म्हणतो, परमेश्वरा श्रीकृष्णा! मी संन्यास व त्याग यांचे तत्त्व जाणूं इच्छितो. तरी आपण त्यांचे स्पष्ट निरूपण करावे.

भगवान म्हणतात, अर्जुना! काम्य कर्माचा त्याग याला संन्यास म्हणतात व सर्व कर्मांच्या फळांचा त्याग, याला त्याग म्हणतात.

कांही विद्वान कर्म बंधनकारक आहेत म्हणून त्यांचा त्याग करावा, असे म्हणतात तर काही म्हणतात की यज्ञ, दान, तप इत्यादिक कर्मांचा त्याग करू नये, माझे निश्चित मत मात्र असे आहे—

त्याग हा सात्त्विक, राजस, तामस असा तीन प्रकारचा आहे. जोपर्यंत आत्मज्ञानाचा पूर्ण निश्चय होत नाही तोपर्यंत यज्ञ, दान, तप ही कर्मे अवश्य करावीच. ती अंत:करण शुद्धीला परंपरेने कारणीभूत आहेत. आपल्याला जे कर्म विहित आहे, त्याचा त्याग, हा तामस त्याग होय. कर्म करण्याने शरीराला कष्ट पडतात. म्हणून शारीरिक कष्टाला भिऊन जो कर्माचा त्याग तो राजस त्याग होय. मी कर्माचा कर्ता आहे हा अहंकार टाकून व कर्माच्या फळाची इच्छा न धरता जे विहित कर्म केले जाते तो सात्विक त्याग होय. सात्विक कर्म करणारा पुरुषच पुढे ज्ञानाचा अधिकारी होतो. देह धारण करणाऱ्या पुरुषाला सर्व कर्माचा त्याग करणे अशक्य आहे कर्माची, अनिष्ट, इष्ट व मिश्र अशी तीन प्रकारची फळे सांगितली आहेत अज्ञानी लोकांना देहत्याग केल्यानंतर ती भोगावीच लागतात. ज्ञानी लोकांचा कर्माचा संबंध सुटला असल्यामुळे ती भोगावी लागत नाहीत.

सर्व कर्मांच्या सिद्धीला वेदान्तात पांच कारणे सांगितली आहेत.

(१) **अधिष्ठान**—म्हणजे इच्छा, द्वेष, सुख दु:ख, ज्ञान इत्यादिकांच्या अभिव्यक्तीचा आश्रय जो देह. (२) **कर्ता**—म्हणजे जीव, ज्याने सर्वस्वी देहाशीच संबंध जोडला आहे. (३) **करण**—म्हणजे दहा इंद्रिये, मन व बुद्धि. (४) **चेष्टा**—म्हणजे प्राणापानादिक वायूंच्या नानाप्रकारच्या क्रिया. (५) व (६) **दैवम्**—म्हणजे इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवता.

जितकी काही बरी वाईट कर्मे आहेत त्यांना ही पांच कारणेच कारणीभूत आहेत. आत्मा, मात्र या सर्व कर्मांहून निराळा आहे. अज्ञानी पुरुष हे जाणत नाही, कारण त्याच्या बुद्धीला गुरु, शास्त्र न्याय यांचा संस्कार झालेला नसतो. ज्ञानी लोक मी या सर्व कर्माहून निराळा आहे असे पाहतात. ज्याच्या ठिकाणी मी कर्म करतो हा अहंकार उठत नाही तो कोणत्याही कर्माने बांधला जात नाही. ज्ञाता, ज्ञान ज्ञेय ही त्रिपुटी कर्माला प्रवृत्त करणारी आहे. कर्म कर्ता, करण ही त्रिपुटी कर्म घडवून आणते.

ज्ञान, कर्म, कर्ता हे सत्त्व, रज, तम या तीन गुणांनी तीन प्रकारच्या विभागात पडते असे सांख्यदर्शनशास्त्रांत सांगितले आहे.

सर्व भूतांमध्ये ज्या ज्ञानाने एक आत्मवस्तु ग्रहण केली जाते ते सात्विक ज्ञान होय. सर्वप्राण्यांमध्ये असलेला आत्मा ज्या ज्ञानाने भिन्न भिन्न स्वरूपाने ग्रहण केला जातो ते राजस ज्ञान होय. जड देह म्हणजेच आत्मा व पाषाणाचा

देव म्हणजेच ईश्वर अशा मर्यादित स्वरूपाने जे ज्ञान आत्मस्वरूपाला पाहते ते तामसज्ञान होय. जे विहित कर्म आसक्तिरहित व रागद्वेषावाचून फलाची इच्छा न धरता केले जाते, ते सात्त्विक कर्म होय. फलाची इच्छा धरून अहंकाराने व पुष्कळकष्ट करून जे कर्म केले जाते ते राजसकर्म होय, जे कर्म पुढे काय परिणाम होईल याचा विचार न करता प्राण्यांना पीडा देऊन व आपले बल व धन यांचा व्यर्थ क्षय करून, मोहाने केले जाते ते तामस कर्म होय. 'मी' 'मी' म्हणणे ज्याचे शील नाही, धैर्य धरून जो उत्साहाने आपले विहित कर्म करतो, कर्म पूर्णपणे पार पडले तर आनंद मानित नाही व मध्येच खंड पडला तर दु:ख करीत नाही. तो सात्त्विक कर्ता होय, कर्माच्या ठिकाणी आसक्ति ठेवणारा, कर्मफलाची इच्छा करणारा, लोकांना दु:ख होईल असे कर्म करणारा, बाह्य व आंतरशुद्धि न ठेवणारा, कर्म सिद्धीस गेले तर आनंद मानणारा व कर्मसिद्धि झाली नाही तर दु:ख करणारा राजसकर्ता होय. जो चित्ताला कधीही आवरत नाही, जो शास्त्र संस्काररहित व अविनीत आहे, जो दुसऱ्याच्या वृत्तीचा छेद करतो, जो आळशी असून नेहमी दु:खीच असतो, जो आजचे काम उद्यावर ढकलतो, तो तामस कर्ता होय.

बुद्धि, धैर्य व सुख यांचेही तीन गुणामुळे तीन भेद झाले आहेत. इहलोकांत व परलोकांत असा प्राणी नाही की जो या तीन गुणांत सांपडला नाही. देवांना सुद्धा या तीन गुणांनी व्याप्त केले आहे व या तीन गुणामुळेच मनुष्य चातुवर्णांत पडला आहे. म्हणून वेदांनी व शास्त्रांनी त्यांच्या कल्याणाकरितां त्यांना अनुष्टेय अशी निरनिराळी कर्मे वाटून दिली आहेत.

मन इंद्रियांपासून आवरणे इंद्रियांना विषयाकडे जाऊ न देणे, तप, शांति, सरळपणा, ज्ञान, विज्ञान, ईश्वराचे अस्तित्व मानणे ही ब्राह्मणाची कर्मे होत. शौर्य, दुसऱ्याकडून पराभूत न होणे, धैर्य, दक्षता व प्रजेवर प्रेम करणे ही क्षत्रियाची कर्मे होत. शेत नांगरणे, पशूचे पालन करणे. देवधेवीचा व्यापार करणे ही वैश्याची कर्मे होत व या तिन्ही वर्णाची सेवा करणे हे शूद्राचे कर्म होय.

आपल्या वर्णाप्रमाणे प्राप्त झालेल्या कर्मात नेहमी तत्पर असावे. या योगानेच अंत:करणशुद्धि होते. ज्ञान प्राप्त होण्यास ही अंत:करणशुद्धि आवश्यक आहे. ती नुसत्या कर्म केल्याने होत नाही तर जो सर्व जगाची उत्पत्ति, स्थिति लय करणारा असून सर्व प्राणिमात्रात भरलेला आहे त्या ईश्वराला ते सर्व कर्मे समर्पण करावे. आपला विहित धर्म आचरण्यास कठीण असला व परधर्माचे आचरण सुलभ असले तरी आपला धर्म सोडून दुसऱ्याच्या धर्माचे आचरण करू नये. आपलाच विहित धर्म आपल्याला कल्याणकारक आहे. सर्व कर्म परमेश्वराला समर्पण केले असता परमेश्वराचा अनुग्रह प्राप्त होऊन त्याचे ठिकाणी वैराग्य प्राप्त होते. विषयात त्याला गोडी वाटत नाही. तो एकान्त सेवन करतो, शरीर व्यवहार चालतील एवढाच आहार घेतो. सतत परमेश्वराचे ध्यान व योग यात तो तत्पर असतो. अहंता, ममता, काम, क्रोध, लोभ, परिग्रह यांचा तो त्याग करतो व त्याचे ठिकाणी शांति बाणते. हे सात्त्विक गुण, पुरुषाचे ठिकाणी प्राप्त झाले असता तो ज्ञानप्राप्ति करून घेण्यास योग्य होतो. अशा पुरुषाला मग श्रीगुरुची भेट होऊन श्रीगुरु त्याला ज्ञानाचा उपदेश करतात. ब्रह्मज्ञान झाल्यानंतर पराभक्ति त्याला प्राप्त होते. भक्तीनेच अर्जुना! माझे खरे स्वरूप तत्त्वत: कळते. म्हणून वारंवार सांगतो की सर्व कर्मे मला समर्पण कर, माझाच आश्रय कर. मी प्रसन्न झालो असता माझे शाश्वत, अविनाशी असे पद तुला प्राप्त होईल. अंत:करणात माझे सतत ध्यान राहिल्यास तुझी सर्व विघ्ने नाहिशी होतील. व तूं हा संसारसागर सहज तरून जाशील. पण जर का अहंकार वागवून माझे ऐकणार नसशील तर तुझा सर्वस्वी घात होईल. अर्जुना! मी लढाई करीत नाही, हा जो तुझा निश्चय आहे तो व्यर्थ आहे. तुझ्या पूर्वकर्माने हा क्षत्रिय देह तुला प्राप्त झाला आहे. या क्षत्रिय स्वभावा विरुद्ध मोहाने मी लढाई करीत नाही असे म्हणत असलास तरी तुझा क्षत्रिय स्वभावच तुला लढाई करण्यास प्रवृत्त करील.

ईश्वर सर्व प्राणिमात्रांच्या हृदयांत वास करतो व तोच त्यांच्या स्वभावानुसार सर्व कर्म घडवून आणीत असतो. त्या ईश्वराला शरण जा. तो प्रसन्न झाला असता तुला शांति मिळून अविनाशी असे स्थान प्राप्त होईल.

अर्जुना! गुह्यांत अत्यंत गुह्य असे हे ज्ञान तुला सांगितले. याचा विचार कर. मग तुझी इच्छा असेल तसे कर

तूं मला अत्यंत प्रिय असल्यामुळे तुझ्या हिताचीच गोष्ट सांगतो की, तूं आपले मन माझें कडे सतत लावून ठेव माझेच पूजन करणारा हो. मलाच नमस्कार कर म्हणजे तूं माझ्याशी ऐक्य पावशील. हे मी सत्य प्रतिज्ञेने सांगतो. भगवद्भक्तालाच अखंड परमानंद प्रातिरूप मोक्ष होतो. म्हणून पुनः सांगतो की अर्जुना! भगवत्परायण हो, धर्माधर्माचा त्याग कर व मलाच शरण ये. दु:ख करू नकोस.

अर्जुना! तपश्चर्या न करणारा, अभक्त, गुरु व ईश्वर यांची सेवा न करणारा, माझे ईश्वरत्व न जाणणारा, त्यांना हे मी उपदेशिलेले ज्ञान सांगू नकोस. हे परमगुह्य ज्ञान जो माझ्या भक्तांना श्रवण करवील तो मत्स्वरूप होईल. मनुष्यांमध्ये ज्ञानोत्तर भक्ति संप्रदाय चालविंणारा पुरुष श्रेष्ठ होय. तो मला अत्यंत प्रिय असतो. अर्जुना! आपला हा गीता शास्त्ररूपी संवाद जो पठन करील तो मला अत्यंत प्रिय होईल. ज्ञानयज्ञ केल्याचे फळ त्याला प्राप्त होईल. तसेच श्रद्धा ठेवून एकाग्र चित्ताने श्रवण करणाराही अत्यंत प्रशंसनीय पुरूष समज. भगवान श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना! हे गीताशास्त्र तूं एकाग्र चित्ताने ऐकलेस ना! मग तो तुझा अज्ञानामुळे प्राप्त झालेला मोह नाहीसा झाला ना! अर्जुन म्हणतो भगवंता! आपल्या कृपेने माझा सर्व मोह नाहीसा होऊन मी आपल्या मूळच्या सच्चिदानंद स्थितीला प्राप्त झालो आहे. माझे सर्व संशय नाहीसे झाले आहेत. आतां तूं सांगशील तसे करीन.

संजय म्हणतो, हे धृतराष्ट्रा! माहात्म्या श्रीकृष्णाचा व अर्जुनाचा हा आश्चर्यकारक संवाद मी ऐकला. आनंद-सागरात बुडून गेलो. माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले व्यासांच्या कृपेनेच अत्यंत गुह्य हा उपदेश मला ऐकण्याचा योग आला. हा पुण्यरूप संवाद माझ्या अंत:करणात इतका ठसला आहे की पुनः पुनः त्याचे स्मरण होऊन मी आनंदित होत आहे. श्रीकृष्णाच्या अत्यद्भुत विश्वरूपाची आठवण झाली म्हणजे अंत:करणात आनंदाच्या लाटा उसळतात. धृतराष्ट्रा! या लढाईत कोणाला जय मिळेल याचे भविष्य मी सांगतो ऐक. ज्या बाजूला श्रीकृष्ण परमात्मा साह्यकारी आहे ज्या पक्षामध्ये अर्जुनासारखा गांडीव धनुष्य धारण करणारा अर्जुन आहे त्या बाजूला लक्ष्मी, विजय, ऐश्वर्य आणि नीति यांचा वास राहणार हे प्रतिज्ञेने सांगतो.

॥ श्रीमद् सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

